REGISTERED No. B 3434

१६ पानांचा अंक.

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गानिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २    पुणें, बुधवार, तारीख १ जानेवारी, १९३६.    अंक १


# विम्याच्या क्षेत्रांतील नवोदित
व
# धडाडीची विमा कंपनी.

एकाच चाकोरींतून त्याच त्या रुळलेल्या मार्गावरून कारभार हांकणाऱ्या गतानुगतिक—जरी जनतेच्या गरजा प्रत्यही बदलत चालल्या; विम्याचें संरक्षण मिळविण्याच्या बाबींत, राहणीच्या व परिस्थितीच्या विविधतेमुळें बदल करणें अत्यावश्यक भासूं लागलें तरीहि आपले जुने मार्ग व विम्याच्या जुन्या पद्धति न बदलणाऱ्या विमा कंपन्यांच्या पावलावर पाऊल टाकीत जाण्याकरितां नवभारत विमा कंपनीची स्थापना झाली नसून, विमा कंपनी आपल्या विमेदारांचें व राष्ट्राचें जास्तींत जास्त हित कशा तऱ्हेनें साधूं शकते हें स्वतःच्या उदाहरणानें हिंदी जनतेस दाखविण्यासाठींच तिनें विम्याच्या क्षेत्रांत पदार्पण केलें आहे.

हिंदी जनतेकडून देशी विमा कंपन्यांस जो आश्रय मिळतो तो तिच्यांत जागृत झालेल्या राष्ट्रीय वृत्तीमुळेंच असल्यानें त्या वृत्तीला साजेसा मोबदला त्या कंपन्यांकडून जनतेच्या पदरांत पडला पाहिजे हें नवभारतचें म्हणणें आहे.

फायद्याचा ठराविक हिस्सा राष्ट्रीय दृष्ट्या विधायक कार्याकरितां खर्च करण्याच्या योजनेचें बंधन स्वतःच्या घटनेंतच आपणांवर लादून घेतलें आहे; आणि इतकें असूनहि नवभारतनें विमेदारांच्या हिताकडे मुळींच दुर्लक्ष केलेलें नाहीं.

**निव्वळ नफ्याचा शेकडा ९५ इतका भाग विमेदारांच्या पदरांत पाडण्याचें ठरविणें ही गोष्ट हिंदी विमा कंपन्यांच्या इतिहासांत क्वचितच आढळेल.**

नवभारतचें विम्याच्या पॉलिसीचें प्रत्येक कोष्टक हिंदुस्थानच्या परिस्थितीचा सूक्ष्म विचार करून हिंदी जनतेच्या वास्तविक गरजांस मानवेल असेंच तयार केलें आहे. प्रत्येक विमेच्छूनें आपला विमा उतरविण्यापूर्वी आमच्या विमापत्रकांची व कंपनीची सविस्तर माहिती आमच्याकडून किंवा आमच्या एखाद्या स्थानिक एजंटाकडून मिळविण्यास चुकूं नये.

## नवभारतएवढ्या सवलती जेथें मिळतात व नवभारतएवढी जी राष्ट्रीय आहे, अशा विमा कंपनींतच आपण आपला विमा उतरा.

कामाची हमी देऊं शकतील अशा गृहस्थांना महाराष्ट्र, वऱ्हाड, मध्यप्रांत व कर्नाटक भागांतील कांहीं जिल्हे, संस्थानें व संस्थानचे ग्रुप्ससाठीं भरपूर मोबदल्याच्या शर्तीवर चीफ एजन्सीज देणें आहेत.

# नवभारत इन्शुरन्स कंपनी, लि.

मेन्कवा बिल्डिंग, आउट्राम रोड, कोट, मुंबई.

## वर्गणीदारांस सूचना

१ जानेवारी, १९३६ रोजीं ‘अर्था’चें दु[illegible] सुरू झालें. गेल्या वर्षाची ज्यांची वर्ग[illegible] यावयाची असेल, त्यांनीं ती नव्या वर्गणीबरोबर सत्वर पाठवावी. ज्यांची मुदत संपली असेल, त्यांनीं अंक नको असल्यास तसें कळवावें.

व्यवस्थापक, ‘अर्थ’

# विविध माहिती

### रोखे बाजारास सुट्टी

नाताळच्या सुट्टीनंतर २ तारखेस हा बाजार उघडेल.

### अमेरिकेचें राष्ट्रीय कर्ज

अमेरिकेची संपत्ति मुबलक, वैभव मोठें, त्याप्रमाणें कर्जहि अफाट आहे. त्या सरकारला एकूण ८५ अब्ज रुपये देणें आहे.

### रेडिओवर युरोपियन कार्यक्रम ज्यास्त वेळ होणार

हिंदुस्थानांत रेडिओची लोकप्रियता दिवसानुदिवस वाढत आहे. दोन वर्षांत रेडिओचा लायसेन्स असणारांची संख्या दुप्पट झाली. सध्या रेडिओवर हिंदी कार्यक्रमाच्या वांटणीस येणारा वेळ थोडा कमी करून, हिंदी व युरोपियन कार्यक्रमास ३५:६५ ह्या प्रमाणांत वेळ यापुढें मिळणार आहे.

### अमेरिका नाताळच्या सणांत २५० कोटि रुपये खर्च करणार

अमेरिकेंतली आर्थिक मंदी दूर झाली आहे असें दिसतें. कारण, कित्येक वर्षांत केला नव्हता एवढा खर्च चालू नाताळाच्या सणांत तेथील लोक चैनींत करणार आहेत असें म्हणतात. ह्या खर्चाचा अंदाज सुमारें २५० कोटि रुपयांचा आहे.

### टाइपरायटर्सचा उपयोग: एक आण्यास दहा मिनिटें

जर्मनीमधील पोस्ट ऑफिसांत टाइपरायटर्स ठेवण्यांत आले असून गिऱ्हाइकांस, त्यांचा उपयोग करण्यासाठी दर १० मिनिटांगणिक एक आणा द्यावा लागतो, दुसरा एक आणा खर्च केला कीं कागद, कार्बन पेपर, पाकिट व दोन पत्रें मिळतात. यंत्रांतील खाचांतून नाणीं टाकलीं, म्हणजे वरील कामें आपोआप होतात.

### कोळशापासून पेट्रोल

दगडी कोळशापासून तयार केलेल्या पेट्रोलचा इंग्लंडमधील पहिला पंप लंडनमध्यें गेल्या महिन्यांत सुरू झाला. तेलाच्या विहिरींतून काढण्यांत येणाऱ्या नेहमींच्या पेट्रोलपेक्षां हें पेट्रोल महाग दरानें विकण्यांत येणार नाहीं.

### अमेरिकेंत जुलमी सावकार

गरजू मजुरांना व कामगारांना भारी दरानें पैसे उसने देऊन त्यांची वसुली धाकदपटशानें करणारे सावकार अमेरिकेंतहि आहेत. पांच डॉलर कर्जाऊ घेतले, तर सात दिवसांनीं सहा डॉलर परत द्यावयाचे, ह्या हिशेबानें त्यांच्या व्याजाचा दर द. सा. द. शे. १,०४० पडतो. कित्येक बडे पैसेवाले ह्या जबरदस्तांस आंतून पैसे पुरवतात, कारण भारी व्याजाच्या मानानें त्यांच्या भांडवलास धोका फारच अल्प असतो.

### नव्या दिल्लींत एक नवीन सरकारी इमारत

आगामी राज्यघटनेंतील सरकारी कचेऱ्यांसाठी १८ लाखांची एक नवी इमारत नव्या दिल्लींत बांधण्याचें घाटत आहे.

### मुंबईचें नवें म्युनिसिपल लोन

१९६६ सालीं परत फेडावयाचें, ३½ टक्के दराचें आणि १९ लक्ष रुपयांचे कर्जाबाबत मुंबई कॉर्पोरेशननें ६ जानेवारी पासून टेंडरें मागविलीं आहेत, तीं १८ तारखेचे आंत पोंचलीं पाहिजेत. दर १०० रुपयांच्या रोख्यास १०० चे खालील टेंडर स्वीकारण्यांत येणार नाहीं.

### रिझर्व्ह बँकेच्या भागांवर डिव्हिडंड

वरील बँकेच्या ९ महिन्यांच्या कामावर ३½ टक्के दरानें डिव्हिडंड मिळेल, अशी अपेक्षा आहे. बँकेचें वर्ष डिसेंबर अखेर संपतें व २ ते १६ जानेवारी ह्या मुदतींत तिचीं ट्रॅन्स्फर बुकें बंद रहातील. ३ तारखेस बँकेची वार्षिक सभा भरेल.

### वेस्टर्न इंडिया ला. इं. कंपनी लि०, सातारा

वरील कंपनीचें नव्या वर्षाचें मोठें कॅलेंडर मुद्दाम स्वतंत्र चित्र तयार करवून केलेलें आहे व चित्र विम्याचे धंद्यास पोषक असेंच आहे.

### चांदीची निर्गत

२८ डिसेंबर रोजीं संपलेल्या आठवड्यांत ८४ लक्ष रुपये किंमतीची चांदी मुंबई बंदरांतून बाहेर परदेशीं गेली.

### बॉम्बे टॉकीज, लि०

सिनेमा बोलपट तयार करणाऱ्या ह्या कंपनीस ‘जवानीकी हवा’ ह्या बोलपटापासून ३१ ऑक्टोबर अखेर ८६ हजार रु. मिळाले. तो बोलपट एकूण २ लक्ष रु. मिळवून देईल अशी मॅनेजिंग एजंटसची अपेक्षा आहे.

### हिंदुस्थानांतील बँका

इंपीरियल बँक, एक्सचेंज बँका व हिंदी संयुक्त भांडवलाच्या बँका ह्या सर्वांकडे मिळून ठेवींची रक्कम १९३३ सालीं २ अब्ज २८ कोटि रुपये, इतकी होती. ह्यांपैकीं १८ एक्सचेंज बँकांच्या वांट्यास ७० कोटि रुपये आले, इंपीरियल बँकेच्या खात्यांवर ८० लक्ष रुपये होते व उरलेली रक्कम इतर बँकांत विभागलेली होती. अहवालाचे मुदतींत २६ बँका बुडाल्या; ह्या बाबतींत बंगाल व मद्रासचा नंबर वर लागतो.

### लँकेशायरचे प्रतिनिधी परत गेले

कपास-कापडाच्या गिरण्यांस संरक्षण किती व कसें द्यावें, ह्याचा विचार करण्यासाठी टारिफ बोर्ड नेमलेलें आहे. त्यापुढें आपलें म्हणणें मांडण्यासाठी लँकेशायरचे प्रतिनिधी आले होते, ते गेल्या आठवड्यांत परत गेले. मंडळाचे पुढारी मि. कँबेल, हे अजून येथेंच आहेत.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २१ डिसेंबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ७४,३०,४८९ |
| ता. २८ डिसेंबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ५६,९३,४०६ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते २८ डिसेंबर १९३५ अखेर | २,५६,७६,३९,९५२ |

## अनुक्रमणिका.

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २ | ५ सहकारी चळवळीची प्रगति | ७ |
| २ 'अर्था'स दुसरें वर्ष लागलें | ३ | ६ म्युनिसिपालट्या व त्यांची करपद्धति ... | ८ |
| ३ कपाशीच्या भावांतला तुलनात्मक मेळ | ४ | ७ मुंबईतले हॉटेल कामगार | ८ |
| ४ स्फुट विचार ... श्रीमंत पंतप्रतिनिधींचें भाषण—मध्यवर्ती शिक्षण मंडळ—म्युनिसिपालिट्या व त्यांची कर पद्धति—नाताळ संपला पण हबसाणांतलें युद्ध संपलें नाहीं—अमेरिकन सर्वसत्ताधारी खात्याची इतिश्री—अमेरिकेचें सर्वच कांहीं न्यारें आहे ! | ५ | ८ आर्थिक परिस्थितीसंबंधानें विचार ... | ९ |
| | | ९ लिंबू-रस टिकविण्याची कृति ... | ११ |
| | | १० जमिनीचा कस वाढविण्यासाठीं प्रयोग ... | ११ |
| | | ११ बेकारीच्या प्रश्नावर पुनः चर्चा ... | १२ |
| | | १२ शिक्षण सुधारणेस आर्थिक प्रगतीची जोड पाहिजे | १३ |

अर्थ

बुधवार, ता. १ जानेवारी १९३६

## " अर्था "स दुसरें वर्ष लागलें

ह्या अंकापासून " अर्था "चें दुसरें वर्ष चालू झालें. उद्योगधंदे, व्यापार, शेती, सहकार, चलन, विमा, बँकिंग, सरकारी उत्पन्न-खर्च, असल्या सामान्य महाराष्ट्रीय जनतेच्या दृष्टीनें रुक्ष दिसणाऱ्या विषयांच्या चर्चेस सर्वस्वी वाहिलेलें साप्ताहिक मराठीमध्यें चालवण्यांत एक प्रकारचें साहस आम्ही करीत आहों, असें पहिल्या अंकांतील अग्रलेखांत विधान केलेलें होतें. नवीन तऱ्हेच्या मालाचा लोकांस पुरवठा करून त्यास अनुकूल अशी जनाभिरुचि आणि मागणी निर्माण करतां येते, ह्या अल्पपरिचित आर्थिक तत्त्वाची त्याबरोबरच आम्हीं वाचकांस माहिती दिली होती आणि प्रयत्नांतीं व कालांतरानें " अर्था "चा प्रसार महाराष्ट्रीय समाजांत समाधानकारक रीतीनें होईल अशी अपेक्षाहि व्यक्त केली होती. महाराष्ट्रांतील सुशिक्षित पांढरपेशा वर्गाची उपजीविका सरकारी नोकरी आणि वकीली व वैद्यकी असल्या व्यवसायांवर चालत असल्यानें आणि व्यापार व उद्योगधंदे ह्यांकडे त्यांचें लक्ष्य नसल्यामुळें " अर्था "तील प्रतिपाद्य विषयांचें महत्त्व त्यांस वाटणें शक्य नव्हतें. महाराष्ट्रीय व्यापारी मंडळीच्या क्षेत्रांतहि आधुनिक पद्धतीचे धंदे, उद्योग आणि बँकिंगचे व्यवहार विशेष येत नाहींत, म्हणून त्यांचीहि चलन, हुंडणावळ, रोखेबाजार, विमा इत्यादि प्रश्नांशीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं अशी कल्पना होणें स्वाभाविक होतें. आमचा शेतकरी वर्ग तर बोलून चालून मागसलेला व अडाणी. त्याकडून कसली अपेक्षा करावी ? अशा स्थितींत " अर्था "चें पांडित्य कोणापुढें करावयाचें हा विचार उद्भवला असतां, ह्या साप्ताहिकाचें कार्य मार्गदर्शकाचें व शैक्षणिक आहे, तें यशस्वी होण्यास कांहीं कालावधि लागणारच, आणि तें कोणी तरी स्वार्थत्यागपूर्वक स्वतःच्या शिरावर घेतलें मात्र पाहिजे, ह्या भावनेनें गेल्या वर्षीं आम्हीं प्रस्तुत उपक्रमास हात घातला. परिस्थिति एकंदरीनें अत्यंत प्रतिकूल असतांहि " अर्था "चा प्रसार आणि त्याविषयींची वाढती अभिरुचि ह्यांचे बाबतींत अपेक्षेच्या मानानें बरेंच यश आलें आहे हें नमूद करण्यास आम्हांस आनंद वाटतो. महाराष्ट्रीय वृत्तपत्रीय वाङ्मयांत " अर्था "स योग्य आणि दृढ स्थान लवकरच प्राप्त होईल, अशी आशा आतां उत्पन्न झाली आहे.

आमच्या विशिष्ट उपक्रमाचें महत्त्व जाणून कित्येकांनीं त्यास प्रथमपासूनच उदारपणानें आश्रय दिला आहे, ह्या गोष्टीचा साभार उल्लेख करणें हें आमचें कर्तव्य आहे, असें आम्ही समजतों. समाजाच्या विचारांस व्यावहारिक वळण लागावें आणि आर्थिक विषयांचें ज्ञान विद्यार्थ्यांस व तरुण पिढीस व्हावें ह्या केवळ लोकोपकारी बुद्धीनें त्यांनीं आम्हांस सहाय केलें आहे. पैसा, भांडवल, व्यापार, कारखाने, औद्योगिक संस्था व व्यवहार ह्यांची माहिती जनतेमध्यें ज्या मानानें पसरेल त्या मानानें नवीन उद्योगधंदे निघणें व जुन्यांचा उत्कर्ष होणें ह्या गोष्टी अवलंबून असल्याकारणानें व्यापक दृष्टि ठेवून ज्या सद्गृहस्थांनीं व संस्थांनीं "अर्था"स आश्रय दिला आहे, त्यांची मदत आम्हांस विशेषच उपकारक झाली आहे. सहकारी संस्था, बँका, व्यापारी आणि औद्योगिक व विमा मंडळ्या " अर्था " ची सेवा स्वीकारीत आहेत व आम्हांस त्यांच्या अनेकविध सहायाचा चांगला उपयोग होत आहे, ही गोष्ट उत्तेजनदायक आहे. कांहीं वृत्तपत्रीय व्यवसायबंधूंचीहि आमच्या प्रयत्नाविषयीं सहानुभूतीची वृत्ति आहे आणि ती वाढत जावी अशी आमची इच्छा आहे. त्यांच्या क्षेत्रांतल्या एका मर्यादित प्रदेशांत आम्हीं वावरत असल्यानें परस्परांस सहाय करण्यास येथें विपुल वाव आहे असें आम्हांस वाटतें. महाराष्ट्रांत नवीन आर्थिक मनूस प्रारंभ झाला आहे. नवीन उद्योग व धंदे काढण्याकडे लोकांची प्रवृत्ति निश्चित होत आहे. आमच्या शिक्षणपद्धतीस खास व्यावहारिक वळण लागावें अशी इच्छा चोहोंकडे व्यक्त केली जात आहे. शेतकरी वर्गासहि आपली आजची स्थिति कां प्राप्त झाली व ती कशी सुधारतां येईल ह्या विषयीं जिज्ञासा उत्पन्न झाली आहे. पांढरपेशा व सुशिक्षित वर्गास धंदे व्यापाराची कास धरल्यावांचून आपणांस तरणोपाय राहिला नाहीं, अशी जाणीव होत आहे. तथापि, अनेक पिढ्या अंगीं खिळलेली आर्थिक प्रश्नांविषयींची उदासीनता एकदम नष्ट होत नाहीं. तरी, महाराष्ट्रीय समाजांतले निरनिराळे वर्ग हेतुपूर्वक "अर्था"स आपापल्या परीनें मदत करून आपणांमध्यें अर्थाची वृद्धि करण्यास अधिकाधिक सहाय करीत जातील अशी आम्हांस उमेद आहे. पांढरपेशा वर्गांतली समंजस मंडळी, कारखानदार, दुकानदार, इतर धंदेवाले, शिक्षक, पालक, वाचनालयाचे व सहकारी संस्थांचे चालक ह्या सर्वांकडून आम्ही मदतीची अपेक्षा करतों.

"अर्था"च्या अनुषंगानें आम्हीं " अर्थ ग्रंथमाला " चालू केली असून तीमधलीं, " बँका आणि त्यांचे व्यवहार, " " हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक " व " व्यापारी उलाढाली " हीं तीन पुस्तकें आतांपर्यंत प्रसिद्ध झालीं आहेत. हिंदुस्थानच्या आर्थिक स्थितीसंबंधाच्या ठळक प्रश्नांचें सोप्या भाषेंत सांगोपांग विवेचन करणारीं आणखी पुस्तकें लिहून प्रसिद्ध करण्याचा आमचा मानस आहे. ह्या मालेसहि लोकाश्रय मिळत आहे, तो उत्तेजनकारक आहे. शिक्षक आणि शाळांचे चालक ह्यांनीं ह्या ग्रंथमालेंतील पुस्तकांचा उपयोग करावा आणि त्यांनीं व पालकांनीं मुला-मुलींच्या वाचनांत तीं येतील अशी व्यवस्था करावी अशी आमची सूचना आहे. इंदूर येथें गेल्या आठवड्यांत भर-

लेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि, ह्यांच्या भाषणांत वरील पुस्तकांचा नाहीं तरी "अर्था" चा उल्लेख आला असून व्यापार, धंदे, शेती इत्यादि धनोत्पादक व्यवसायांसंबंधाचें वाङ्मय मराठी भाषेंत वाढावें अशा विषयीं त्यांनीं प्रोत्साहनपर उद्गार काढले आहेत, हे महाराष्ट्राच्या भावी आर्थिक प्रगतीचें आशाजनक सुचिन्ह आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मराठी समाजाच्या पोषणास आर्थिक वाङ्मयाची आवश्यकता आहे, हा सिद्धांत त्यांच्यासारख्या अधिकारी पुरुषानें साहित्यसंमेळनापुढें ठासून मांडला ही एक लक्षांत राहण्यासारखी गोष्ट घडलेली आहे आणि त्यांच्या घोषणेचा परिणाम महाराष्ट्रीय समाजाच्या अभिरुचीस व्यावहारिक स्वरूपाचें वळण लागण्यांत झाल्यास तें अत्यंत इष्टच होईल.

महाराष्ट्रांतील भिन्न-भिन्न वर्गांच्या व स्थितींतल्या वाचकांस ज्ञानदायक व सहायकारक होईल अशीच माहिती देण्याचें आणि अशीच आर्थिक विषयांची चर्चा करण्याचें धोरण आम्हीं अंगीकारलें आहे. "अर्था" मध्यें सुधारणा व विस्तार करण्यास पुष्कळ जागा आहे. तथापि, हें केवळ वाढत्या लोकाश्रयावर अवलंबून असल्याकारणानें सुधारणा क्रमाक्रमानें होणार हें अपरिहार्य आहे. "अर्था"च्या संपादकाच्या परिश्रमास, द्रव्यबलास व त्यागास मर्यादा आहेत. ही गोष्ट जाणून महाराष्ट्रीय जनतेनें आपल्या व लोकांच्या हितासाठीं स्वतः व हस्तेंपरहस्तें त्यास सहाय केल्यास त्याचें योग्य चीज झाल्यावांचून रहाणार नाहीं, असें आश्वासन देण्यास आम्हांस मुळीच हरकत वाटत नाहीं. 'मला ह्या विषयाशीं काय करावयाचें आहे?' किंवा 'आमच्या येथें हें पत्र कोण वाचणार?' असले विचार पांढरपेशा व सुशिक्षित महाराष्ट्रीयांनीं तरी सोडून देण्याचा काळ खास आलेला आहे. आर्थिक प्रश्नांबाबतचें अज्ञान किंवा उदासीनता हा घातुक दुर्गुण ठरणार आहे, नव्हे ठरला आहे, हें त्यांनीं आतां पक्कें समजावें. ह्या विषयाचा येथें अधिक विस्तार करण्याचें प्रयोजन नाहीं.

## कपाशीच्या भावांतला तुलनात्मक मेळ (पॅरिटी)

(१)

कपाशीच्या जगांतील अत्यंत महत्त्वाच्या व प्रसिद्ध अशा बाजार पेठा न्यूयॉर्क, लिव्हरपूल आणि मुंबई ह्या होत. ह्या तीन पेठांमध्यें वेळोवेळ जे कपाशीचे भाव प्रचलित असतात, त्यांचा परस्पर संबंध एक प्रकारच्या कोष्टकाच्या स्वरूपांत निश्चित करतां येतो, त्यास 'पॅरिटी' असें म्हणतात. अमेरिकन, ब्रिटिश आणि हिंदी बाजार एकमेकांपासून हजारो मैलांच्या अंतरावर आहेत, त्यांत हाताळली जाणारी कपास भिन्न-भिन्न जातींची व प्रकारांची असते आणि त्यांच्या किंमती तीन निरनिराळ्या चलनांत व्यक्त केल्या जातात. तथापि कपास ही अशी एक वस्तु आहे कीं तिला जगभर मागणी असून तिचा बाजार जागतिक आहे; आणि ह्यामुळें न्यूयॉर्कमध्यें एक विशिष्ट भाव केव्हाहि वेळीं प्रचलित असेल त्यावेळीं मुंबईंत त्यास अनुसरून ठराविक किंमत असावयास पाहिजे असा ठोकताळा येत असतो. किंमतींतल्या ह्या परस्पर संबंधांत चलबिचल झाल्यास 'पॅरिटी' बिघडली असें म्हणतात; आणि असा बिघाड होण्याचीं अनेक कारणें असतात. तीं नीट न समजल्यामुळें पॅरिटींत होणाऱ्या फेरबदलाचा फायदा करून घेण्याच्या हेतूनें कित्येक धंदेवाले खरेदी-विक्रीच्या व्यवहारांत पडून स्वतःचें नुकसान करून घेतात. ही जर धंदेवाल्यांची स्थिति तर अनभ्यस्त लोकांची गोष्ट कशाला विचारावयास पाहिजे? तेव्हां, असल्या अवघड विषयाची एखाद्या व्यवहारतज्ज्ञानेंच फोड करून सांगितली असतां ती उपकारक होण्यासारखी असणार. मुंबईच्या नारायणदास राजाराम अँड कंपनीच्या चालकांपैकीं श्री. आर जी. सरय्या ह्यांनीं सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्समध्यें गेल्या फेब्रुवारींत एक व्याख्यान दिलें होतें, त्यांत प्रस्तुत विषयाचें विवेचन केलें होतें. तें विस्तृत करून मुंबई विश्वविद्यालयाच्या नियतकालिकांत त्यांनीं प्रसिद्धीसाठीं दिलें आणि तो लेख आतां स्वतंत्र रीतीनें छापण्यांत आला आहे. (द्दि पॅरिटी ऑफ इंडिअन कॉटन : ले. आर. जी. सरय्या.) हिंदी कपाशीची पॅरिटी कशी निश्चित होते, ह्यासंबंधानें त्यांनीं सुंदर माहिती त्यांत दिली आहे.

हिंदी कपाशीची पॅरिटी म्हणजे न्यूयॉर्क (अमेरिकन कपाशीचें उत्पादन जगामध्यें सर्वांत मोठें असल्यानें) च्या बाजारांतील वायद्याचा भाव आणि भडोच कपाशीचा ह्याच प्रकारचा भाव, ह्या दोहोंची तुलना होय. 'भडोच एप्रिल–मे' चा अर्थ, चांगल्या दर्जाच्या (फुलीगुड) मामुली धाग्याच्या (अॅव्हरेज स्टेपल) भडोच जातीच्या शुद्ध कापसाच्या एका खंडीचा (७८४ पौंड) रुपयांत व्यक्त केलेला दर असा असून, विक्रेत्याच्या इच्छेप्रमाणें एप्रिल किंवा मे महिन्यांत माल द्यावयाचा असतो, आणि शिवाय त्याच्या बद्दला, किंमतीच्या फरकानें, धोलेरा किंवा सुरत जातीचा मालहि देण्याचा हक्क त्यास असतो. त्याच चालीवर, 'न्यूयॉर्क मे' चा वायद्याचा भाव असतो. त्यांत अमेरिकन कापसाच्या दर पौंड वजनास किती डॉलर–सेंट हें व्यक्त केलेलें असतें आणि धाग्याची लांबी वगैरे गुणहि निश्चित असून विक्री करणारास दुसऱ्या जातीचा कापूस पुरवण्याची मुभा असते. लिव्हरपूलचा दर पेन्सांत व्यक्त केलेला असतो. हुंडणावळीचा दर हिशेबांत घेऊन अमेरिकन व इंग्लिश भावांचें रूपांतर रुपयांच्या व खंडीच्या भावांत करतां येतें. अमेरिकन वजन कपाशीच्या वेष्टणासह असतें, लिव्हरपूलचें निवळ कपाशीचें असतें. न्यूयॉर्कचा भाव १२·८० सेंट्स व डॉलर–रुपया हुंडणावळ २·७० रु. =१ डॉलर असेल तर न्यूयॉर्कची रुपयांतली किंमत दर खंडीस २७१ रुपये, व निवळ वजनाचा हिशेब केल्यास, २८७ रुपये होईल. मुंबईतला भाव खंडीस २३६ रुपये आहे असें समजल्यास तो न्यूयॉर्कच्या मानानें ५१ रुपयांनीं कमी भरेल. लिव्हरपूलचा भाव दर पौंडास ६·८० पेन्स व हुंडणावळ १८ पेन्स असली, तर रुपयांतली खंडीची किंमत २९६ रुपये होऊन मुंबईतला भाव ६० रुपयांनीं कमी ठरेल. दोन दरांतल्या फरकांतली ९ रुपयांची तफावत (६०५–१ रु.) अमेरिकेंतून लिव्हरपूलला कापूस नेण्यास लागणाऱ्या खर्चामुळें पडत आहे, असें मानतां येईल.

खंडी व रुपये ह्यांचे ऐवजीं पौंड व पेन्स ह्यांमध्येंहि वरील फरक व्यक्त करतां येईल. वरील उदाहरणांत भडोचची किंमत २३६ रुपये व लिव्हरपूलची ६·८० धरली आहे. भडोचचा भाव २३६ रुपये असला म्हणजे वास्तविक दर पौंडास ५·४२ पेन्स इतका होतो आणि ह्या रीतीनें स्वाभाविक मेळाचा भाव व प्रत्यक्ष भाव ह्यांमध्यें १·३८ पेन्सांचा फरक येतो. दहा-पंधरा वर्षांचे पॅरिटीचे आंकडे पाहिले तर असें दिसून येतें कीं, मार्च, १९३२ मध्यें लिव्हरपूलपेक्षां भडोचचा भाव फक्त ०·१७ पेन्सांनीं म्हणजे ३ टक्क्यांनीं कमी होता. १९३१–३२ मधलें हिंदी कपाशीचें पीक

कमी होतें, हें त्याचें कारण दाखवतां येईल. येथील कपाशीचा पुरवठा मर्यादित असल्यानें भाव वाढला आणि त्या मानानें लिव्हरपूलच्या पॅरिटींतली तफावत कमी झाली. ह्याच्या उलट, १९२३ च्या अखेर लिव्हरपूलचा भाव २० पेन्स होता तेव्हां फार मोठा फरक पॅरिटींत दिसून आला व तो ५·९९ पेन्स म्हणजे ३४·९५ टक्के इतका होता. लिव्हरपूल आणि मुंबई ह्यांमधील फरकाचें एक महत्त्वाचें कारण लक्षांत ठेवलें पाहिजे आणि तें पॅरिटी ठरवतांना हिशेबांतहि धरणें आवश्यक आहे. लिव्हरपूलमध्यें विकला जाणारा कापूस व भडोच ह्यांमध्यें गुणांत फरक आहे. भडोच कापूस धाग्यांत व मजबुतींत कमी प्रतीचा आहे, ह्यामुळें त्याची किंमत स्वाभाविकपणेंच कमी असली पाहिजे. हा जात्याच उद्भवलेला कमीपणा किती आकारावयाचा हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. तो १० टक्के हलका आहे असें समजलें आणि त्याच्या व लिव्हरपूलच्या भावांत १५ टक्के फरक असला तर भडोच पॅरिटीच्या मानानें ५ टक्के कमी आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कपाशीच्या बाजारभावांचा परस्पर-संबंध (पॅरिटी) अढळ नसून अनेक कारणांनीं तो कमी-ज्यास्त होत असतो हें येथें स्पष्टपणें नमूद केलें पाहिजे. असें कां होतें ह्याचें विवेचन दुसऱ्या लेखांत करूं.

## स्फुट विचार

### श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधींचें भाषण

इंदूरच्या साहित्य संमेलनांत श्रीमंत पंतप्रतिनिधींनीं केलेल्या अध्यक्षीय भाषणांतील कांहीं मननीय उद्गारांचा ओझरता उल्लेख आजच्या अग्रलेखांत आम्हीं केला आहे. शेतकरी व पांढरपेशे वर्ग ह्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटण्यास सहायक होईल अशा रीतीचें मराठी वाङ्मय तयार होणें अगत्याचें असल्याबद्दल त्यांनीं आपलें मत स्पष्टपणें साहित्यिकांच्यापुढें मांडलें आहे. साहित्य परिषदेंत अध्यक्षपदावरून अशाप्रकारचे उद्गार निघणें हें कित्येक सरस्वतीभक्तांस अपरिचित असणार. तथापि, तें अनुचित होतें असें तरी त्यांस वाटणार नाहीं अशी आम्हांस आशा आहे. कोणत्याहि काळाच्या वाङ्मयांत समाजाच्या आकांक्षा, अडचणी व विचार ह्यांची प्रतीति होते किंवा झाली पाहिजे, हें जर खरें असेल तर महाराष्ट्राच्या सद्यःकालीन वाङ्मयांत तसें न झाल्यास त्यांत जिवंतपणा नाहीं, असेंच म्हणावें लागेल. साहित्याच्या क्षेत्रांत भावना, कल्पनातरंग, अधिकार, व्याकरण व छंद ह्यांचेंच साम्राज्य पाहिजे आणि रुपये, आणे, पैच्या विचाराचा प्रवेश त्यांत होऊं देणें म्हणजे सरस्वती देवीचें पवित्र मंदिर भ्रष्ट करणें होय असें श्रीमंत बाळासाहेबांचें भाषण ऐकून अथवा वाचून कोणी विचारवान साहित्यिक म्हणेल असें वाटत नाहीं. "पोटापाण्याची योजना सर्व तऱ्हेनें अर्थशास्त्राला धरून सामाजिक घटना झाली म्हणजे ललित वाङ्मयाला योग्य भूमिका व काल निर्माण होईल, असें आम्हांला वाटतें," ह्या त्यांच्या वाक्यांतल्या कल्पना विचारप्रवर्तक नाहींत असें कोण म्हणेल? त्यांच्या भाषणांत एककल्लीपणा आहे असाहि आक्षेप टीकाकारांस घेतां येणार नाहीं. कारण, महाराष्ट्रीय वाङ्मयाच्या अनेक शाखांचा त्यांनीं योग्य समाचार घेतला असून ललित वाङ्मयासहि उचित असें महत्त्व त्यांनीं दिलें आहे. स्वतःचा अनुभव व ध्येय ह्यांस अनुलक्षून प्रत्येक विचारी वक्ता वाङ्मयाच्या विशिष्ट अंगासंबंधानें उत्साहानें बोलणारच. असें झालें नाहीं तरच त्यांत आश्चर्य.

### मध्यवर्ती शिक्षण मंडळ--खाणें थोडें, मचमच फार

हिंदुस्थान सरकारच्या विद्यमानें अखिल भारतीय मध्यवर्ती शिक्षणमंडळ स्थापन झालें असून प्रांतिक विद्याधिकारी, शिक्षणमंत्री व विश्वविद्यालयांचे चालक ह्यांच्या नेमणुका त्यावर केलेल्या आहेत, ह्याची माहिती "अर्था"मध्यें मागेंच आली आहे. मंडळाची पहिली सभा दिल्ली येथें नुकतीच भरली होती, त्याप्रसंगीं हिंदी सरकारचे तात्पुरते शिक्षणमंत्री, सर गिरिजाशंकर बाजपेय ह्यांनीं ह्या नवीन संस्थेचा उद्देश व कार्याची दिशा ह्यांसंबंधानें माहिती देऊन तिच्यावर घेण्यांत येणाऱ्या आक्षेपांस उत्तर देण्याचा प्रयत्न केला. शिक्षणासंबंधाचे अनुभव, नवीन विचार आणि विधायक सूचना ह्यांचा विचार करून सुधारणा व प्रगति ह्यांच्या दृष्टीनें सल्ला देण्याची मंडळाची कामगिरी महत्वाची होईल ह्यांत शंका नाहीं; आणि संकुचित वृत्तीनें त्या संस्थेच्या स्थापनेस किंवा कार्यास हरकत घेणें चुकीचें होईल. ह्या संबंधांत खरी तक्रार आहे, ती असल्या संस्थांच्या बाबतींत "खाणें थोडें आणि मचमच फार" असा वारंवार अनुभव येतो, त्यास अनुलक्षून आहे. बदलणाऱ्या आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थितींत हिंदी शिक्षण-पद्धतींत फेरफार व्हावयास पाहिजेत ह्यांत वाद नाहीं. पण ह्या सुधारणेस उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या प्रगतीची व उत्कर्षाची जोड दिली नाहीं तर शिकलेल्या लोकांची बेकारी दूर कशी होणार आणि शिक्षण पद्धतींत करावयाच्या फेरबदलाचा उपयोग काय होणार? हिंदी तरुणांस अंगमेहनत करावयास नको, त्यांच्यांत धडाडी नाहीं वगैरे दोष आहेत असें मानलें तरी त्यांस उत्साह दाखवावयास व काम करण्यास संधी आणि वाव आहे काय? ह्या संबंधांत हिंदुस्थान सरकार काय करीत आहे? त्यांस सल्ला देण्यासाठी आर्थिक मंडळ स्थापावें अशी सूचना करण्यांत आली होती, ती कोठें अमलांत आली आहे? सर गिरिजाशंकर ह्यांनीं हिंदी सुशिक्षितांच्या बेकारीस त्यांचे वर निर्दिष्ट केलेले दोष जबाबदार आहेत, असें सांगून त्यांच्या विचार परिवर्तनाचें काम समाज सुधारकांनीं व लोकमतास वळण लागणारांनीं करावें अशी त्यांनीं सूचना केली व ते मोकळे झाले. जणूं काय हा जिव्हाळ्याचा प्रश्न सोडवण्यांत हिंदुस्थान सरकारचा कांहीं संबंध नाहीं व त्यांस कांहीं कर्तव्य नाहीं. हा विषय त्यांच्या अधिकाराच्या क्षेत्रांत येत नसेल, परंतु बेकारीसारख्या प्रश्नाची वासलात असल्या एकांगी पद्धतीचा अवलंब करून लावण्यानें कोणता कार्यभाग होणार? प्रो. काळे ह्यांनीं गेल्या आठवड्यांत वांई येथें केलेल्या भाषणांत ह्या मुद्द्याचें विस्तृत विवेचन आलें असून त्याचा सारांश आजच्या अंकांत दुसरीकडे दिला आहे. तिकडे आम्हीं वाचकांचें लक्ष वेधतों.

### म्युनिसिपालिट्या व त्यांची करपद्धति

लॉर्ड ब्रेबर्न ह्यांच्या गेल्या महिन्यांतल्या गुजराथेंतील दौऱ्यांत त्यांस अनेक म्युनिसिपालिट्यांनीं मानपत्रें दिलीं व त्यांत आपलीं गाऱ्हाणीं आणि मागण्या त्यांनीं इलाख्याच्या मुख्याधिकाऱ्यांच्या पुढें शिरस्त्याप्रमाणें मांडल्या. गव्हर्नरसाहेबांनीं मानपत्रांस दिलेल्या उत्तरांत व्यक्त करण्यांत आलेले कित्येक विचार आणि केलेल्या सूचना सामान्यतः सर्वच स्थानिक संस्थांस मननीय वाटण्यासारख्या आहेत. म्युनिसिपालिट्या आणि लोकलबोर्डस ह्यांच्या उत्पन्नाच्या बाबी अगोदरच मर्यादित असल्याची ओरड कित्येक वर्षांची जुनी आहे आणि प्रचलित मंदीमुळें ती ज्यास्तच तीव्र झाली आहे. ह्या स्थितींत कार्यविस्ताराची

किंवा सुधारणेचीं कामें हातीं घेणें त्यांस अशक्य झालें आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांस पाणीपुरवठ्यासारख्या कामासाठी ग्रँट्स देण्याची पद्धति ग्रेटब्रिटनमध्येंहि चालू आहे, परंतु आमच्या प्रांतिक सरकारास स्वतःसच पैशाची तंगी भासत असल्याकारणानें त्यांनीं ग्रँट्सना काट मारला आहे. तथापि, हा ग्रँट्सच्या पद्धतीचा तत्त्वाचा प्रश्न असल्यानें सरकार व स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांनीं तो तडजोडीनें व सहकार्यानें सोडवला पाहिजे. लॉर्ड ब्रेबर्न ह्यांच्या म्युनिसिपालिट्यांच्या मानपत्रांस दिलेल्या उत्तरांचे दोन तीन उतारे आजच्या अंकांत दुसरीकडे दिले आहेत. त्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांनीं करांसंबंधानें कोणतीं तत्त्वें अमलांत आणावीं ह्याचें त्रोटक परंतु मार्मिक विवेचन केलेलें आढळून येईल. वाढत्या सुखसोयी हव्या, पण त्या कामीं लागणारा खर्च भागवण्याकरितां करांच्या साधनानें जादा उत्पन्न उभें करणें नागरिकांस व स्थानिक संस्थांच्या सभासदांस नको असतें. नगररचनेसारख्या सुधारणेच्या योजना स्वयंपोषक करतां येतात हा अनुभव आहे; आणि करांच्या मोबदलाच जादा सुखसोयी मिळवतां येतात, हें विसरून चालावयाचें नाहीं. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांची विभागणी, टर्मिनल टॅक्सची अंमलबजावणी वगैरे बाबींचा निर्णय हिशेबी पद्धतीनेंच केला पाहिजे. जनतेच्या खर्चानें नगरविस्तार ज्या म्युनिसिपल हद्दींत होत असेल, तेथें मात्र बिगर शेतीचा कर माफक ठेवण्यास सरकारची खरोखर हरकत नसावी. 'जी संस्था स्वतःस सहाय करण्यास झीज सोसते, तिस सरकारचें सहाय्य द्यावें' हें तत्त्व येथें अंमलांत येणें अगत्याचें आहे. गर्दीची वस्ती मोडून शहरांचें आरोग्य सुधारण्याच्या कामीं ग्रेटब्रिटनमध्यें अशी मदत देण्यांत येते. मध्यवर्ती म्हणजे प्रांतिक सरकारनें सांपत्तिक उत्तेजन देऊन लोकहिताचीं कामें स्थानिक संस्थांकडून करून घेतलीं पाहिजेत. स्थानिक नागरिकांनीं आपली जबाबदारी ओळखून स्वतः झीज सोसण्याची तयारी दाखवल्यास त्यांस सरकारनें सवलती व सहाय देणें योग्यच होईल.

---

### नाताळ संपला पण हबसाणांतलें युद्ध संपलें नाहीं

इटलीचें हबसाणांतील युद्ध नाताळाचे सुमारास बंद होऊन शांतता व बंधुप्रेम पुन्हां प्रस्थापित होतील, असें भाकित कांहीं लोकांनीं केलें होतें, तें खोटें ठरलें आहे. खिस्ती राष्ट्रांत नाताळाचा सण शांतता व प्रेम ह्यांचा द्योतक मानला जातो, परंतु त्यांच्या व सर्व जगाच्या दुर्दैवानें त्याचा कांहींच परिणाम इटलीवर झालेला नाहीं. धर्मगुरु पोप ह्यांनीं युद्धबंदीच्या बाबतींत हात टेकले असून त्यांनीं केवळ आशेवर आतां भिस्त ठेवली आहे. नाताळाचे सुमारास युद्ध थांबेल हें भविष्य वस्तुतः खिस्ताच्या शिकवणीचा परिणाम होण्यावर आधारलेलें नव्हतें. फ्रान्स व ग्रेटब्रिटन ह्यांनीं तहाच्या अटींची एक योजना आंखली होती आणि ती इटली व राष्ट्रसंघ ह्यांस मान्य होईल असें ती तयार करणाऱ्या मुत्सद्यांस वाटत होतें. ह्या योजनेंत हबसाणाची फाळणी होऊन त्या देशाचा मोठा भाग इटलीच्या ताब्यांत व वर्चस्वाखाली जाण्याची तरतूद होती. पूर्वी ठरल्याप्रमाणें इटलीची नाकेबंदी करावयाची म्हणजे त्या राष्ट्राचा पेट्रोलचा पुरवठा बंद पाडणें आवश्यक होतें. पण त्या दिशेनें यत्न झाल्यास हबसाणांतल्या युद्धाचा वणवा पसरून युरोपांतहि तो जाऊन भिडेल अशी धमकी इटलीनें दिली आणि तिची फ्रान्सला भीतीहि वाटली. ह्यास्तव इटलीस विशेष अनुकूल अशा तहाच्या अटी सुचवून त्या राष्ट्राचें समाधान झालें तर पहावें असें फ्रान्सचे मुख्य प्रधान व सर सॅम्युअल होअर ह्यांच्या मनानें घेतलें. परंतु त्या योजनेची बातमी बाहेर फुटतांच तिच्या विरुद्ध चोहोंकडे इतका गिल्ला झाला कीं होअर साहेबांस मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागून ग्रेटब्रिटनच्या मुख्य प्रधानांसहि लोकमतापुढें नमतें घ्यावें लागलें. दरम्यान इटलीचा शिरजोरपणा चालू असून हबसाणास चीत करण्याचा मुसोलिनीनें चंग बांधला आहे. अशा परिस्थितींत तडजोडीचा विचार तूर्त सोडून देऊन इटलीची नाकेबंदी आणि राष्ट्रसंघाच्या ठरावाप्रमाणें इतर उपाय योजणें फ्रान्स व इंग्लंड ह्यांस प्राप्त झालें आहे. युद्धाच्या मर्यादा ह्यापुढें वाढल्यास त्याचा परिणाम जगाच्या व्यापारावर झाल्यावांचून रहावयाचा नाहीं. इटलीची मुजोरी कोठवर चालते ह्यावर भावी घडामोडी अवलंबून आहेत.

---

### अमेरिकन सर्वसत्ताधारी खात्याची इतिश्री

जर्मनींत नाझी व इटलींत फॅसिस्ट ह्या पक्षांनीं आपल्या हातांत सर्व सत्ता एकवटून राज्यकारभार चालविला आहे. अमेरिकेंत प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं याच पद्धतीची एक आवृत्ति काढून राष्ट्राचें आर्थिक पुनरुज्जीवन करण्यासाठी स्वतंत्र कारभाराचें खातें दीड वर्षांपूर्वी निर्माण केलें आणि त्याच्या मार्फत अनेक नियंत्रक कानूंची अंमलबजावणी चालविली. प्रचलित आर्थिक मंदी दूर होण्यास बाजारभाव, मजुरीचे दर इत्यादींचें नियमन करणें जरूर होतें आणि तें कार्य सरकारनें व्यक्तिस्वातंत्र्य मर्यादित करून स्वतःच हातीं घेतल्यावांचून यशस्वी होणें शक्य नाहीं ह्या समजुतीनें त्यांनीं हा तोडगा काढला. हा एकमुखी आणि एकहाती कारभार जनतेस जाचक वाटला, तरी राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें लोकांनीं तो चालू दिला. तथापि, नानाप्रकारचे नियम करून कायदेमंडळास न विचारतां त्यांची अंमलबजावणी कार्यकारी अधिकाऱ्यांस स्वेच्छेनें कायदेशीर रीतीनें करतां येते काय? हा प्रश्न उपस्थित करण्यांत आला असतां त्यास मुख्य न्यायाधीशांनीं 'नाहीं' असें उत्तर दिलें. ह्या निर्णयानें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांच्या योजनेचा पायाच खचला आणि त्यांनीं उभारलेल्या एन. आर. ए. ची (नॅशनल रिकव्हरी ॲडमिनिस्ट्रेशन: राष्ट्राचें आर्थिक पुनरुज्जीवन घडवून आणणारें खातें) इमारत डळमळूं लागली. तेव्हां त्यांनीं आतां नवीन हुकूम काढून हा कारभार संपला, असें जाहीर केलें आहे. अमेरिकेचा व्यापार व उद्योगधंदे ह्यांचें नियंत्रण करण्यासाठी ५५७ निरनिराळ्या नियमावल्या प्रसिद्ध करून त्यांप्रमाणें कारभार हांकण्याचें काम करण्यास जें खातें स्थापिलें होतें, त्याच्या पायीं आजपावेतों सुमारें ५२ कोटि रुपये खर्च झाले आहेत. 'खटाटोपो भयंकरः' असाच हा सर्व प्रकार झाला असें म्हणावयाचें कीं काय?

---

### अमेरिकेचें सर्वच कांहीं न्यारें आहे!

व्यापार व उद्योगधंदे ह्यांची घडी नीट बसवण्यासाठी प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं केलेला खटाटोप व्यर्थ गेला असें अनुमान त्यांच्या नियंत्रणखात्याची इतिश्री झाली आहे ह्यावरून काढावें तर अमेरिकेच्या व्यापाराची १९३५ मध्यें चांगलीच चलती होती असें तेथील व्यापारी खात्याच्या चिटणीसांनीं प्रसिद्ध केलें आहे, त्यावरून ह्या दोहोंचा कांहीं संबंध नाहीं असें म्हणावें लागतें. एकंदरीनें पहातां धंदेव्यापाराचें अमेरिकेंत बस्तान बरें बसलें आहे

असें त्यांच्या म्हणण्याचें सार आहे. अमेरिकन राष्ट्राची संपत्ति व उत्पादनशक्ति एवढी प्रचंड आहे कीं, शेकडों कोटि इकडे किंवा शेकडों कोटि तिकडे ह्याची त्यास क्षितीच नाहींसें दिसतें. युरोपांतून सोन्याचा ओघ सारखा तिकडे चाललाच आहे आणि चांदीखरेदीचें अमेरिकन सरकारचें धोरण तूर्त अनिश्चित दिसलें तरी तें अजून सुटलें नाहीं. अमेरिकेंत लुटारू, चोर व इतर गुन्हेगार ह्यांचा जुलूम इतका चालला आहे कीं, तो त्या राष्ट्राच्या इभ्रतीला कालिमा लावीत आहे. ह्याचा बंदोबस्त करण्याचीहि प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांच्या अमदानींत शिकस्त चालली आहे, तरी असल्या राक्षसी कृत्यांस अजून आळा बसलेला नाहीं. ह्याचें द्योतक म्हणजे कर्नल लिंडबर्ग ह्यांस आपल्या मुलांच्या सुरक्षिततेची खात्री न वाटून सहकुटुंब मुकाट्यानें अमेरिकेस रामराम ठोकावा लागला असल्याची बातमी, हें आहे. त्या धाडसी व लोकप्रिय वैमानिकाच्या मुलास अमानुष रीतीनें पळवून नेण्यांत आलें व त्यांत त्याचा अंत झाला, ह्या गोष्टीस साडेतीन वर्षें झालीं. तसल्या गुन्ह्याची पुनरावृत्ति होईल अशी भीति कर्नल लिंडबर्ग ह्यांस वाटून देशत्याग करण्याचा प्रसंग यावा, हें अमेरिकेस लांछनास्पद आहे, असें तेथील वर्तमानपत्रें स्पष्ट म्हणत आहेत. आधुनिक सुधारणेच्या शिखरावर पोहोंचलेल्या राष्ट्रांत अशी स्थिति असावी, ह्यास काय म्हणावें हेंच समजत नाहीं.

## सहकारी चळवळीची प्रगति व तिच्या मार्गांतील अडचणी

(२)

शहरांतील सहकारी संस्थांपैकीं बहुतेक सर्व बँकिंगचा धंदा करतात. त्यांचे सभासद् कित्येक ठिकाणीं हजारांवर असतात व त्यांचे लाखो रुपयांचें खेळतें भांडवल असतें. खेडेगांवांतील सहकारी पतपेढ्यांचें काम नीट चालावयाचें असेल, तर सभासदांची संख्या मर्यादित असणें व त्यांस परस्परांची माहिती असणें हीं आवश्यक आहेत. अशा तऱ्हेच्या संस्थांस योग्य असणारी घटना शहरी संस्थांचे कार्यास जुळेलच, असें नाहीं. बँकेच्या व्यवस्थापक मंडळावर लोकांचा विश्वास असल्याखेरीज लोक तेथें आपल्या ठेवी ठेवणार नाहींत, हें उघड आहे. बँकांच्या निवडणुकींत अनुभवी व तज्ज्ञ लोक भाग घेत नाहींत, कारण ह्या निवडणुकींचे वेळीं कित्येक प्रसंगीं अनिष्ट स्वरूपाची चढाओढ लागून निवडणुकींस उभें राहण्यास चांगल्या माणसाचें मनच घेत नाहीं. ह्या कारणानें संस्थापकांनीं आंखलेलें ध्येयाधिष्ठित धोरण कायम राखणें कठीण झालें आहे. बँकांच्या यशस्वितेवर ज्यांचें हित अवलंबून आहे, अशा लोकांसच वास्तविक व्यवस्थापकांची जागा मिळावी व त्यांनीं सर्व व्यवहार तज्ज्ञांचे सल्ल्यानें चालवावा आणि अंतर्गत व्यवस्थेसंबंधीं त्यांस स्वतंत्र अधिकार देण्यांत यावे. म्हणजे, वार्षिक सभेंत गैरमाहितगार सभासद वाटेल ते ठराव पास करून व्यवस्थापकांस अडचणींत आणतात, त्यास आळा बसेल व पैसे गुंतविणारांचाहि संस्थेवरील विश्वास वाढेल.

कित्येक लोक एकापेक्षां अधिक सहकारी संस्थांचे सभासद असतात व त्या सर्वांकडून कर्जें उचलतात. ही पद्धत तावडतोब बंद करण्यांत आली पाहिजे. एकाच केंद्रांत, विशिष्ट प्रकारचें काम करणाऱ्या अनेक संस्था असाव्यात किंवा नाहीं हाहि विचार करण्याजोगा प्रश्न आहे. लहान लहान संस्थांनीं स्वतंत्रपणें व्यवहार करण्यापेक्षां एकाच मध्यवर्ती संस्थेनें शाखांच्या द्वारां तें काम केल्यास पैशाची व मनुष्यबळाची बचत होईल.

सहकारी चळवळीचें, काटकसरीची संवय उत्पन्न करणें, हें एक प्रमुख ध्येय आहे. तथापि, शहरी बँका त्याकडे दुर्लक्ष्य करून फक्त सावकारीचा धंदा करणाऱ्या संस्था बनल्या आहेत. प्रॉव्हिडंड फंडाची पद्धत सुरू करून, प्रत्येक सभासदानें कांहीं रकम त्यांत टाकलीच पाहिजे, असा नियम ह्या संस्थांनीं अवश्य करावयास पाहिजे.

बिगरशेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांची प्रगति आपल्या देशांत फारच अल्प झालेली आहे, फक्त दक्षिण हिंदुस्थान ह्यास अपवाद आहे. मद्रासचे खालोखाल म्हैसूरचा नंबर लागतो. पतपेढ्या चालविण्यापेक्षां ह्या संस्थांचा कारभार पहाणें ज्यास्त कठीण असतें, ही गोष्ट खरी आहे. चोख व्यवस्था व सभासदांची निष्ठा ह्यांखेरीज त्यांमध्यें भागत नाहीं. लहान गांवांत व खेड्यांत खप कमी असल्यामुळें तेथें अशा संस्थांस फारसा वाव नाहीं. मोठ्या शहरांतील सहकारी स्टोअर्समध्यें कित्येक वस्तूंच्या किंमती बाजार भावापेक्षां अधिक असतात, अशी तक्रार आहे. सर्व संस्था एका संयुक्त घटनेंत सामील झाल्या, तर त्यापासून फार फायदा होईल. निदान त्यांनीं खरेदीच्या वेळीं तरी सहकार्य करावें, म्हणजे स्वस्त दरानें त्यांस माल मिळूं शकेल. घरें बांधण्यास मदत करणाऱ्या सोसायट्यांनींहि आपलें कार्यक्षेत्र वाढविण्यास पुष्कळ वाव आहे.

संस्था व्यावहारिक कुशलतेनें चालविण्यास लागणाऱ्या शिक्षित व लायक लोकांचा अभाव व सहकाराचें ध्येय व कार्याचें स्वरूप ह्यांबद्दल जनतेमधील अज्ञान, ही सहकारी चळवळीच्या प्रगतीचे मार्गांतील मुख्य अडचण होय. संस्था स्थापन होते, परंतु ती चालविण्यास योग्य असलेलीं माणसें मिळत नाहींत. ह्यासाठी एक स्वतंत्र इन्स्टिटयूट स्थापून तिच्याकडे हें शिक्षणाचें काम सोंपवावें व त्याबरोबरच सामान्य लोकांना सहकाराबद्दल माहिती पुरवावी. मासिकें व परिषदा ह्यांचे द्वारां थोडेंफार काम होतें; परंतु जनतेस त्यांपासून म्हणण्यासारखा फायदा होत नाहीं. हल्लींच्या बेकारीच्या दिवसांत, सार्वजनिक कार्याची हौस असलेले तरुण पुढें येऊन हें कार्य हातीं घेऊं शकतील, परंतु त्यांस योग्य शिक्षण व प्रोत्साहन मिळालें पाहिजे.

सोसायट्यांमध्यें काम करणारांचेकडून नियम व कानू नीट पाळले न जाण्याचीं उदाहरणें वरचेवर आढळून येऊं लागल्या कारणानें सरकारास आपली देखरेख ज्यास्त कडक ठेवणें प्राप्त झालें आहे. अर्थातच, त्यामुळें चळवळीचा स्वावलंबनाचा मूळ पायाच खचल्यासारखें होत आहे. सरकारच्या सहकारी खात्यानें फक्त देखरेखीचें व मार्गदर्शकत्वाचें काम करावें व सहकारी संस्थांनीं आपला अंतर्गत व्यवहार स्वतंत्रतेनें चालवावा, अशी पहिली योजना होती. आज मात्र सहकारी खात्याची चळवळीवरील पकड दृढतर होऊं लागली आहे. अर्थात् ह्याची जबाबदारी सहकारी संस्थांवरच प्रामुख्यानें येते. ज्या अर्थीं सरकारनेंच सोसायट्यांच्या स्थापनेस उत्तेजन दिलेलें आहे त्या अर्थीं नीट न चाललेल्या सोसायट्या केवळ गुंडाळावयास लावून सरकारचें कर्तव्य संपणार नाहीं. त्याचा परिणाम चळवळीवर एकंदरीनें इष्ट असा होणार नाहीं. ह्या प्रसंगांतून सरकारनें व सहकार प्रेमी लोकांनीं परस्पर सहकार्य करून चळवळीला वर ओढलें पाहिजे. (समाप्त)

## म्युनिसिपालिट्या आणि त्यांची करपद्धति

### नडियाद म्युनिसिपालिटी व पाणीपुरवठा

लॉर्ड ब्रेबर्न ह्यांचें नडियाद म्युनिसिपालिटीस उत्तरः—

"तुमची दुसरी विनंति पाणीपुरवठ्याबाबतची आहे ... कुंडतलाव तुमच्या ताब्यांत दिला आहे, त्याच्या शेजारी खणून पाणी काढण्याच्या प्रश्नाचा उल्लेख तुम्हीं केला आहे.

ह्या संबंधांतली सबंध योजना सरकारनें स्वतःच्या खर्चानें करावी आणि शिवाय ती अमलांत आणण्याकरितां ग्रँट द्यावी ही गोष्ट अशक्य कोटींतील आहे. म्युनिसिपालिट्यांच्या पाणीपुरवठ्याच्या योजना स्वयंसिद्ध असल्या पाहिजेत व त्यांचा सर्व खर्च त्यांच्या अंमलबजावणींतूनच भागला पाहिजे. आपल्या हद्दींतल्या लोकांच्या उपयोगाकरितां म्युनिसिपालिट्या पैसा खर्चून पाण्याचा पुरवठा करतात आणि त्याचा सर्व खर्च भागेल अशा बेतानें त्यांनीं नागरिकांवर कर बसवला पाहिजे. प्राथमिक खर्चासाठी बाजारांत कर्ज उभारण्यांत यावें. तुमची इच्छा असेल तर योग्य खर्चाचे पैसे घेऊन तुम्हांस पाण्याची व पैशाच्या अंदाजाची योजना सरकार तयार करून देईल."

### नडियाद आणि नगररचना

ह्या विषयासंबंधानें लॉर्ड ब्रेबर्न ह्यांनीं नडियाद म्युनिसिपालिटीस सल्ला दिला तो येणेंप्रमाणें होताः—

"तुमच्या हद्दींतल्या लोकसंख्येची वाढ लक्षांत घेतां ( वीस वर्षांत ती वाढ २७ टक्के इतकी झाली आहे ). नगररचना व गर्दीची वस्ती पातळ करणें ह्या दोन्ही गोष्टी जरूरीच्या आहेत. मोकळ्या जागेंत घरें बांधणें व तेथें जाऊन रहाणें ह्या संबंधांत तुम्हीं लोकांचीं मनें मात्र वळवलीं पाहिजेत. ह्या सुधारणा म्युनिसिपालिटीस सहज करतां येण्यासारख्या असतां सरकारनें सहकारी संस्था काढून घरांच्या पुरवठ्याच्या कार्यास मदत करावी, असल्या अटी तुम्हीं कां घालतां हें समजत नाहीं. म्युनिसिपालिटीनें सोइस्कर जागा घेऊन तिच्यांत रस्ते वगैरे आखावे व नंतर ती लोकांस विकावी हा उत्तम मार्ग आहे. अशा प्रकारची व्यवस्था अन्य म्युनिसिपालिट्यांच्या क्षेत्रांत करण्यांत आली असून तिचें अनुकरण येथें होण्यास अडचण नसावी. एकदम मोठ्या योजनांस हात घालण्याचें प्रयोजन नाहीं. मर्यादित योजना प्रथम हातीं घेऊन अनुभव येईल त्याप्रमाणें प्रगति करतां येईल.

"बिगर शेतकी कर ( नॉन ॲग्रिकल्चरल असेसमेंट ) माफ करण्याचेंहि कारण नाहीं. दुसऱ्या कोणत्याहि मोठ्या गांवीं माफी दिलेली नाहीं आणि ती देणें म्हणजे इलाख्यांतील सर्वसामान्य कर देणारांकडून पैसे घेऊन ते एका विशिष्ट शहराच्या हवाली करण्यासारखें आहे. केरा-नडियाद रस्त्यावर मिशन वसाहत, माफीसारख्या सवलती वाचून भरभराटीस आली आहे असें समजतें. मग म्युनिसिपालिटीची योजना यशस्वी कां होऊं नये ?"

### म्युनिसिपालिट्या आणि कर बसवण्याचें तत्त्व

मेहमदाबाद ( गुजराथ ) म्युनिसिपालिटीच्या मानपत्रास उत्तर देतांना मुंबई इलाख्याचे गव्हर्नर, लॉर्ड ब्रेबर्न, ह्यांनीं म्युनिसिपल करांचे संबंधानें काढलेले उद्गारः—

"तुपाच्या निर्गतीवर 'टर्मिनल टॅक्स' बसवण्याची परवानगी पाहिजे, ही तुमची शेवटची विनंति आहे. मे. कमिशनर ह्यांनीं ह्या प्रश्नाचा निकाल केला असल्याचें मला समजतें. कोणत्याहि कराच्या उत्पन्नाचा फायदा ज्या लोकांस मिळावयाचा त्यांच्यावरच मुख्यत्वेंकरून त्या कराचा बोजा पडावा, हें तत्त्व योग्य होय. म्हणून, म्युनिसिपालिट्यांनीं बसवलेले कर त्यांच्या हद्दींतल्या लोकांवरच बसले पाहिजेत. तुपावर 'टर्मिनल टॅक्स' बसवला गेला तर वरील तत्त्वाच्याविरुद्ध, मेहमदाबादमध्यें न रहाणाऱ्या अनेक लोकांवर तो पडेल. तुमच्या म्युनिसिपालिटीच्यां एकूण उत्पन्नापैकीं निम्में उत्पन्न अगोदरच ऑक्ट्रॉयसारख्या अप्रत्यक्ष करांपासून उभें करण्यांत येत आहे. ह्याकरितां घरांवर कर बसवून किंवा सॅनिटरी सेस बसवून तुम्हीं आपलें उत्पन्न वाढवावें हें उचित आहे. हा सेस बसवण्याचा तुमचा विचार चालला आहे, हें ऐकून मला आनंद होतो."

## मुंबईंतील हॉटेल कामगार व श्री. बखले ह्यांचें बिल

श्री. बखले ह्यांनीं दुकानांतील कामगारांच्या कामाचे तास नियंत्रित करणारें एक बिल मुंबई कायदेमंडळांत आणलें आहे. त्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां मुंबई हॉटेलकीपर्स असोसिएशनची सभा नुकतीच भरली होती; तीमध्यें सरकारकडे पाठविण्याचा खालील प्रमाणें मसुदा मंजूर करण्यांत आलाः—

( १ ) मुंबई शहरांत ३,१९० हॉटेल्स आहेत व त्यांत सुमारें ४० ते ४५ हजार नोकर आहेत. म्हणजे, बिलामुळें, सर्वांत ज्यास्त नुकसान आमच्या धंद्याचें होणार आहे.

( २ ) रात्रंदिवस आमचीं गिऱ्हाइकें येत असतात. नोकरांचा व त्यांचा प्रत्यक्ष संबंध येतो व हे नोकर खुषीनें काम करीत असल्याखेरीज, गिऱ्हाइक टिकणें शक्य नाहीं. ह्यावरून नोकरवर्ग संतुष्ट आहे, हें सिद्ध होतें. बिलामुळें तेढ मात्र वाढेल.

( ३ ) ज्यांना खाण्यापिण्याची व शिकण्याची ऐपत नाहीं, अशींच मुलें नोकरीस रहातात. त्यांची दुसरीकडे नीट सोय झाल्याखेरीज त्यांच्या नोकरीवर गदा आणण्यांत त्यांचें नुकसानच आहे.

( ४ ) बिलाची अंमलबजावणी होण्याचे मार्गांत कित्येक अडचणी उपस्थित होतील.


दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें नं २.

१९३५-३६ च्या उंसाची लागवड सुरू झाली.

अंदाजी नफा शेंकडा ७ ते १० टक्के.

प्रॉस्पेक्टस व शेअर फॉर्म, कंपनीचे ब्यांकर्स व मुख्य कचेरी २५७, बुधवार पेठ, पुणें नं. २ यांजकडे मिळतील.

डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें

मध्यम वर्गांतील गृहेच्छु लोकांस | अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य

भाडेकरी-घरमालक-गृहयोजना

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.

जनरल मॅनेजर

महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचा मजबूत पाया

# अर्थ

**मध्यप्रांत व वऱ्हाड**

हायस्कूल, मिडल स्कूल व नॉर्मल स्कूल ह्यांतील शिक्षकांच्या ग्रंथालयासाठीं मंजूर

[ व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि आर्थिक विषयांस वाहिलेलें साप्ताहिक ]

संपादक : प्रो. वा. गो. काळे

सहायक : श्री. श्री. वा. काळे

**मुंबई इलाखा**

सरकारी व सरकार-मान्य शाळांत व ट्रेनिंग कॉलेजांत घेण्यासाठीं मंजूर

महाराष्ट्रीयांचीं मनें उद्योगधंदे, व्यापार, इत्यादि धनोत्पादक व्यवहारांकडे वळून त्यांस ह्या विषयांची गोडी लागावी, या दृष्टीनें 'अर्था'ची मांडणी केलेली असते. व्यापारी, शिक्षक, विद्यार्थी, सार्वजनिक कार्यकर्ते व सर्वसाधारण नागरिक ह्या सर्वांनीं 'अर्था'चें वाचन केलें असतां महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीचा मजबूत पाया तयार झाल्याखेरीज रहाणार नाहीं. उद्योगधंद्यांत असणाऱ्या, त्याचप्रमाणें त्यांत नव्यानें पडणाऱ्या सर्वांस हें पत्र मार्गदर्शक होईल.

प्रत्येक महाराष्ट्रीय कुटुंबांत व शाळेंत अर्थ वाचला जाणें आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी **फक्त चार रुपये** असून टपालखर्च वेगळा नाहीं. मनिऑर्डर पाठवून वर्गणीदार व्हा.

व्यवस्थापक, **अर्थ**, अर्थ ऑफिस, पुणें ४

**'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थ मूलौ धर्मकामाविति ।**

## आर्थिक परिस्थितीसंबंधानें विचार.

(२)

### शिरपूर

शिरपूर येथील म्युनिसिपल हॉलमध्यें प्रो. काळे ह्यांचें जाहीर व्याख्यान झालें, त्यास गांवांतील प्रमुख व्यापारी, अधिकारी, वकील इत्यादि मंडळी हजर होती. जागतिक आर्थिक मंदीचें स्वरूप अत्यंत सोप्या भाषेंत समजावून सांगून हिंदी कपास वगैरे शेतीचा माल ह्यांचे बाजारभाव पडण्याचीं कारणें त्यांनीं स्पष्ट केलीं. आर्थिक क्षेत्रांत शक्य तितकें स्वावलंबी बनण्याचा प्रत्येक राष्ट्राचा प्रयत्न, देशांचा परस्परांविषयीं अविश्वास, अमेरिकेसारख्या एकाच देशांत होऊन गेलेला सोन्याचा अपूर्व संचय, फौजा व आरमारें ह्यांच्यावर चाललेला प्रचंड खर्च ह्या कारणांमुळें जगाचा व्यापार घटला आहे. हिंदुस्थानच्या कपास, भुइमूग इत्यादिसारख्या शेतीच्या मालास मागणी पूर्वीप्रमाणें येत नाहीं ह्याचें कारण दुसऱ्या देशांतले कारखानदार इतर ठिकाणांहून कच्चा माल घेतात किंवा मंदीमुळें त्यांचे धंदे नीट चालत नाहींत. महायुद्धापूर्वी सुमारें ३०० कोटि वार लांबीचें कापड दरवर्षी हिंदुस्थानांत येत होतें आणि देशी गिरण्या व हातमाग ह्या दोहोंची मिळून पैदास २५० कोटि वार होती. आतां आमच्या देशी गिरण्यांमध्यें ३२० कोटि वार लांबीचें कापड निघत असून लँकेशायरच्या कापडाची आयात पूर्वीच्या मानानें तिसऱ्या हिश्शावर आली आहे. आमच्या कापडावरची जकात कमी करा, आम्हीं तुमचा कापूस वाढत्या प्रमाणांत घेऊन आमच्या गिरण्यांत तो वापरूं, असें मँचेस्टरच्या गिरणीवाल्यांचे प्रातिनिधि हिंदुस्थानांत येऊन सांगत आहेत, ह्याचें रहस्य जगाच्या व्यापाराची घडी कशी बिघडली आहे, हें स्पष्टपणानें दर्शवीत आहे. हिंदुस्थान व जपान ह्या राष्ट्रांचे दरम्यान ह्या प्रकारचा करार झाला असून त्याची मुदत संपतांच तो पुन्हां चालू ठेवण्याचें महत्त्व आम्हांस वाटत आहे. ह्या गोष्टीचा अर्थहि ध्यानांत येणें जरूर आहे. जगाच्या व्यापाराची घडी ह्या रीतीनें बिघडली असतां प्रत्येक राष्ट्रांतलें सरकार आणि जनता आपल्यापुरती ती बसवण्याची खटपट करीत आहे. आमच्या देशांत आम्हीं ह्याच मार्गाचा अवलंब करण्यावांचून गत्यंतर राहिलेलें नाहीं.

### धुळें

प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बँकेच्या धुळें येथील शाखेच्या वार्षिक सभेच्या प्रसंगीं प्रो. काळे ह्यांनीं सभेमध्यें व्यक्त करण्यांत आलेल्या कित्येक ठळक विचारांस दुजोरा देऊन त्यांचे स्पष्ट विवरण केलें. सहकारी संस्थांनीं, रजिस्ट्रार साहेबांनीं सुचवलेल्या कर्जफेडीच्या व व्याजाच्या सवलतीच्या योजनेचा पूर्ण फायदा करून घ्यावा; सध्याच्या मंदीच्या काळांत सरकारनें पुढें येऊन अधिक मदत द्यावी म्हणून आपण मागणी करावी पण स्वावलंबन आणि परस्पर-सहाय ह्यांवरच शेवटीं आपण भिस्त ठेवली पाहिजे. शेतकऱ्यांनीं आपली कपास सहकारी विक्री संघामार्फतच विकण्याचें महत्त्व काय आहे ह्याचेंहि विवेचन अध्यक्षांनीं केलें आणि सहकारी चळवळींत निरपेक्ष बुद्धीनें काम करणारीं माणसें अधिकाधिक येण्याची जरूरी किती आहे हें समजावून सांगितलें.

प्रो. काळे ह्यांचें सर्वांस उपयुक्त पुस्तक

# बँका आणि त्यांचे व्यवहार

ह्या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति ह्यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून, बँकांनीं आपला कारभार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा ह्या बाबतींत उपयुक्त सूचना केल्या आहेत. त्यांत चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँक, सावकारी धंदा, आर्थिक मंदी, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक प्रश्नांची सांगोपांग चर्चा आली आहे. सध्यांच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास तें बोधप्रद होईल अशा रीतीची पुस्तकाची मांडणी व विवेचनपद्धति आहे. बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाईक, व्यवस्थापक आणि नोकर ह्यांनीं तें अवश्य वाचून त्याचें मनन केलें पाहिजे.

कापडी बांधणी किंमत १ रु.

प्रती, आर्यभूषण प्रेस, पुणें, यांचेकडे मिळतील.

प्रो. काळे ह्यांचें नवीन पुस्तक

# रिझर्व्ह बँक

हिंदुस्थानांत राष्ट्रीय मध्यवर्ती बँक ह्या नात्यानें रिझर्व्ह बँकेची स्थापना होऊन त्या संस्थेचें काम चालू झालें आहे. रिझर्व्ह बँकेची घटना, तिच्या कार्याचा व्याप, तिचा इतर बँकांशीं संबंध इत्यादि विषयांची सांगोपांग माहिती ह्या पुस्तकांत दिली असून रिझर्व्ह बँकेच्या कायद्याच्या निरनिराळ्या कलमांची छाननी केलेली आहे. अवघड विषयाचा सुलभ बोध व्हावा म्हणून पुस्तक-कर्त्यानें बँकगच्या धंद्यांतले आधुनिक प्रकारचे व्यवहार, त्यांची उपपत्ति व त्यांचें कार्य ह्यांचो अत्यंत सोप्या मराठी भाषेंत चर्चा केली आहे आणि देशी व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें कोणत्या योजना अमलांत आणल्या पाहिजेत ह्या संबंधानें व्यावहारिक सूचना केल्या आहेत. रिझर्व्ह बँक ही, राष्ट्रीय आर्थिक प्रगतीस परिपोषक होईल काय? ह्या प्रश्नास प्रस्तुत पुस्तकांत उत्तर मिळण्यासारखें आहे.

पृष्ठें १३०-किंमत १ रुपया ( ट. ह्ं. वेगळें )

पुस्तक मिळण्याचीं ठिकाणें:—

( १ ) व्यवस्थापक, "अर्थ" ग्रन्थमाला, पुणें ४.

( २ ) आर्यभूषण प्रेस, पुणें २.

( ३ ) दि को-ऑपरेटर्स बुकडेपो, ९, बेकहौस लेन, फोर्ट, मुंबई.

# वेस्टर्न इंडिया

## लाइफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड.

स्थापना स. १९१३ मुख्य कचेरी-सातारा

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची, पहिली आणि पहिल्या प्रतीची विमा कंपनी.

**बोनस** त्रैवार्षिक दर हजारीं

हयातींतील रु. ६०
हयातीनंतरचें रु. ७५

| | | |
|---|---|---|
| एकूण चालू काम | .... ... | २,५०,१५,०८२ रुपये |
| एकूण जिंदगी | .... .... | ६१,६९,१६९ ,, |
| लाइफ फंड | ... ... | ५०,९९,४३९ ,, |

एजन्सी आणि इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

मॅनेजर.

# शुद्ध दुग्धालय

३१६, नारायण, पुणें.

येथून गेलीं सात वर्षें सीलबंद बरण्यांतून गिऱ्हाइकांना दूध वक्तशीर घरपोंच मिळत आहे. नवीन गिऱ्हाइकांनीं याचा फायदा घ्यावा.

ह. स. पटवर्धन

# बंगाल कोल सप्लाइंग फर्म

उत्तम दगडी कोळसा (बंगाल, सी. पी.) आणि कोक ह्यांचे व्यापारी

व

म्युनिसिपल, लोकलबोर्ड, पी. डब्ल्यु. डी. (सरकारी) कॉन्ट्रॅक्टर्स

५११ बुधवार पेठ, पुणें शहर २.

तारेचा पत्ताः-व्यंकटेश. फोन नं. ४७१

"अर्थ" ग्रंथमाला

( पुस्तक ३ रें )

# व्यापारी उलाढाली

( लेखक-प्रो. वा. गो. काळे )

व्यापार व उद्योगधंदे ह्यासंबंधीचे व्यवहार, औद्योगिक व व्यापारी मंडळ्यांचें कामकाज, इत्यादि विषयांचें रहस्य समजावून सांगणारें पुस्तक.

पृष्ठें १४३. किंमत १ रु.
[ ट. ह्ं. वेगळें. ]

## अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ

### लिंब–रस टिकविण्याची अथवा 'लाइमज्यूस' तयार करण्याची कृति

( एका तज्ज्ञाकडून )

कागदी लिंबांना पावसाळ्यांत बहार येतो पण त्यावेळीं त्यांस फारशी मागणी नसल्यामुळें तीं फारच स्वस्त विकावीं लागतात. उलट उन्हाळ्यांत लिंबांना मागणी असते तर लिंबेंच कमी असतात व म्हणून तीं महाग विकतात. बागवानांना पावसाळी पिकाचा फायदा न मिळाल्यामुळें वर्षअखेर एकंदरींत तोटाच येतो. म्हणून पावसाळ्यांतील लिंबांचा रस काढून तो उन्हाळ्यांत मागणी असतांना विकल्यास चांगला फायदा होईल.

लिंबरस टिकविणें फारसें अवघड नाहीं. उत्तम व सरस लिंबें निवडून घेऊन तीं पाण्यानें स्वच्छ धुवावीं. नंतर तीं एका लाकडी फळीवर सालींतील कडवट तेल निघून जाईपर्यंत चोळावीं व नरम करावीं. नंतर लिंबांचा रस काढण्याच्या यंत्रानें (कॉंबिनेशन ज्यूस प्रेस) अगर सोयीप्रमाणें इतर प्रकारानें लिंबांचा रस काढावा. यांत्रिक प्रेसमध्यें लिंबें कापणें, पिळणें वगैरे सर्व एकाच वेळेस होतें व त्यामुळें पुष्कळ वेळ व श्रम वांचून लिंबांच्या बियाहि शाबूत निघतात. या प्रेसची किंमत १५० रु. आहे व तो दररोज आठ तास चालविल्यास १२,००० लिंबांचा रस काढतो. या प्रेसनें रसाचें प्रमाण शेकडा ४८ पडतें.

अशा प्रकारें काढलेला रस निवळण्यासाठी कांचेच्या मोठ्या बरण्यांतून काठोकाठ भरून ठेवावा. हा रस पावसाळ्यांत १५ दिवस व उन्हाळ्यांत ८ ते १० दिवसपर्यंत निवळूं द्यावा. नंतर त्यांतील जडांश (साखा) हलके हलके बुडाशी बसतो व वर अतिशय हलका भाग तरंगतो. मध्यभागीं मात्र स्वच्छ व सुंदर रस असतो. हा रस हलकेच काढून दुसऱ्या बरणींत पुन्हां निवळण्यासाठी ४।५ दिवस ठेवावा. अशा प्रकारें रस पुरता निवळल्यावर सायफननें (वक्रनलिकेनें) मधील स्वच्छ व निवळ रस हलकेंच काढून बाटल्या भरून ठेवाव्या. बाटल्या भरतांना त्या काठोकाठ न भरतां तोंडाशी निदान इंचभर जागा रिकामी ठेवावी. रस तापविल्यावर त्याचा आकार वाढतो म्हणून ही तरतूद करणें जरूर आहे. रस भरण्यापूर्वी बाटल्या स्वच्छ धुवून थंड पाण्यांत ठेवून उकळून जंतुरहित कराव्या. नंतर एक रुंद तोंडाचें व सपाट बुडाचें पातेलें किंवा हौद (वाटरबाथ) थंड पाण्यानें अर्धा भरून ठेवावा. यास मोदकपात्राप्रमाणें काढतां घालतां येणारें असें दुसरें एक बूड पाहिजे. त्यापैकीं वरच्या बुडावर लिंबरसानें भरलेल्या बाटल्या गळ्यापावेतों पाण्यांत बुडवून ठेवाव्या आणि खालच्या बुडाखालीं आंच लावून तें पाणी ७० अंशांपर्यंत (७० डिग्री सेंटिग्रेड) तापवावें व त्याच उष्णतेच्या गरम पाण्यांत अर्धातासपर्यंत बाटल्या राहूं द्याव्या. बाटल्या गरम असतानांच बंद कराव्या व त्यांत पाण्याचा एक थेंबहि जाणार नाहीं अशी खबरदारी घ्यावी. ह्या बंद केलेल्या बाटल्या आतां विक्रीस तयार झाल्या. अशा प्रकारें भरलेला रस पुष्कळ दिवस टिकतो.

रस भरण्याच्या बाटल्या १० ते १२ औंसांच्या असाव्या. २४ औंसांच्याहि बाटल्या चालतील. या बाटल्यांच्या तोंडावर झांकणाची टोपी अगदीं घट्ट बसेल अशी योजना केलेली असते. अशा विशिष्ट प्रकारच्या बाटल्यांना 'क्राऊन बॉटल्स' म्हणतात. ह्या बाटल्या व त्यांचीं बुचें खालील ठिकाणीं मिळतात. १०-१२ औंसांच्या कोऱ्या बाटल्या दर ग्रोसास १८-२० रु. ह्या दरानें मिळतात. २४ औंसांच्या वापरलेल्या बाटल्यांस दर ग्रोसास ४-६ रु. पडतात. दोन्ही प्रकारच्या बाटल्यांचीं टोपीवजा झांकणें ग्रोसास १० आणे प्रमाणें मिळतात. झांकणें बसविण्याच्या यंत्राला ३० रु. किंमत पडते. हें सर्व सामान (१) मेसर्स टी अल्ली महंमद आणि कंपनी, भुसारी मोहल्ला, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई अगर (२) मेसर्स डेक्कन एंजिनिअरिंग स्टोअर्स, सदाशिव पेठ, पुणें शहर, यांचेकडे मिळतें.

ह्या बाटल्यांना सुंदरशीं लेबलें लावून पुण्या-मुंबईचे बाजारांत विकणें शक्य आहे. खानदेश भागांत उन्हाळ्यांत सरबताकरितां लिंबरसास चांगली मागणी असते. जाहिरातद्वारें लिंबरसाच्या शुद्धपणाची व उपयुक्ततेची जनतेस खात्री पटविल्यास गिऱ्हाइक मिळण्यास पंचाईत पडणार नाहीं.

या बाबतींत अधिक माहिती हवी असल्यास मे. हॉर्टिकल्चरिस्ट टु गव्हर्नमेंट, शेतकी कॉलेज, पुणें, यांचेकडे ती मिळेल.

## जमिनीचा कस वाढवण्यासाठीं प्रयोग

### साखरेच्या उत्पादनांत वाढ कशी होईल ?

हिंदुस्थानांतील जमिनींत होणारी पैदास इतर कित्येक देशांतील पैदासीच्या मानानें फार कमी पडते, ह्यासंबंधीं प्रो. धार, नॅशनल अॅकेडमी ऑफ सायन्सेसच्या अलाहाबाद येथील अधिवेशनाचे अध्यक्ष, ह्यांनीं आपल्या भाषणांत उल्लेख केला. हिंदुस्थानांत दर एकरी तांदूळ १,२९५ पौंड पिकतो, इजिप्तमधील तेवढीच जमीन २,७८३ पौंड तांदूळ देते तर जपानमध्यें दर एकरी उत्पन्न ३,०४० पौंड होतें. साखरेचे बाबतींत हाच अनुभव येतो. हिंदुस्थानांत दर एकरी उत्पन्न २,४०० पौंड होतें, जपानमध्यें ३,३४० पौंड, इजिप्तमध्यें ३,३७८ पौंड व जाव्हांत ११,९८८ पौंड आणि हवाई बेटांत १८,६९९ पौंड उत्पन्न मिळतें! हिंदी जमिनींतील नैट्रोजनचें अल्प प्रमाण हें ह्या कमी उत्पादनशक्तीचें कारण आहे. परदेशांतून आयात होणाऱ्या नैट्रोजनयुक्त खतांचा उपयोग करणें आपल्या शेतकऱ्यांस परवडत नाहीं. साखर तयार करतांना निघणाऱ्या 'मोलॅसेस'चें (काकवी) मातींत मिश्रण केलें, म्हणजे मोलॅसेसमधील साखरेशी हवेंतील ऑक्सिजनचा संयोग होतो व त्यावेळीं निर्माण होणाऱ्या शक्तीमुळें नैट्रेट व अमोनिया तयार होण्यास सहाय होतें. मोलॅसेसमुळें अशा रीतीनें जमिनीस नैट्रोजन मिळतो. पेरणीचे आधीं दोन तीन महिने शेतांत मोलॅसेस घालून तीन चार वेळां नांगरणी करावी व जमिनीस पाणी द्यावें. अॅकेडमीच्या बैठकीचे अध्यक्ष, संयुक्त प्रांताचे गव्हर्नर सर हॅरी हेग, ह्यांनीं डॉ० धार ह्यांच्या संशोधनाच्या व्यावहारिक उपयुक्ततेचें महत्त्व सांगून उंसाच्या लागवडीस मोलॅसेसच्या खतामुळें मदत होऊन मोलॅसेसचा उठावहि होईल व अशा रीतीनें जमिनींतून उंसांत, उंसांतून मोलॅसेसमध्यें व त्यांतून पुनः जमिनींत, असें उपयुक्त वर्तुळ तयार होईल, असें सांगितलें.

## बेकारीच्या प्रश्नावर पुनः चर्चा

### मध्यवर्ती मंडळाची योजना

सुशिक्षितांमधील बेकारीची तीव्रता दिवसानुदिवस वाढत चालली आहे, ह्या गोष्टीची जाणीव लोकांप्रमाणें सरकारासहि असली तरी तिच्यावर उपाययोजना मात्र होत नाहीं. शिक्षणाचें ध्येय काय असावें, हा प्रश्न त्यासंबंधांतल्या चर्चेमध्यें नेहेमी उत्पन्न होतो, आणि तिच्या ओघांत संस्कृतीच्या विशिष्ट महत्त्वावर कित्येक वेळां भर देण्यांत येतो. बेकारीवरील खरा उपाय बेकारांस काम मिळेल अशी व्यवस्था करणें, म्हणजे उद्योगधंद्यांची स्थापना व वाढ करणें, हाच होय, ही गोष्ट कित्येक प्रसंगीं दृष्टीआड होते. एका विशिष्ट विषयांत पारंगत असलेल्यांची संख्या जरूरीपेक्षां ज्यास्त आहे, परंतु दुसऱ्या विषयाचें ज्ञान व कौशल्य असणारांची उणीव भासत आहे, अशा परिस्थितींत शिक्षणक्रमांत फेरबदल घडवून आणणें, हा उपाय सयुक्तिक ठरेल. परंतु, आज जेथें कोणत्याच तऱ्हेच्या शिक्षणास बाजारी किंमत राहिलेली नाहीं, तेथें शिक्षितांसाठी काम निर्माण करणें हाच एक उपाय प्रभावी होऊं शकणार, हें उघड आहे. मध्यवर्ती शैक्षणिक सल्लागार मंडळानें दिल्ली येथें भरलेल्या आपल्या सभेंत बेकारीसंबंधीं आंखलेल्या धोरणाकडे ह्याच दृष्टीनें पहाणें जरूर आहे.

विवक्षित तऱ्हेच्या नोकरीपुरतें सामान्य विद्यार्थ्यांस शिक्षण मिळालें, म्हणज त्यानें पुढें शिक्षण घेऊं नये, हें सदरहु मंडळाच्या सूचनांचें सार आहे. ( १ ) साक्षर करणारें प्राथमिक शिक्षण, ( २ ) व्यावसायिक शिक्षणाचा व उच्च शिक्षणाचा पाया तयार करणारें शिक्षण व ( ३ ) विश्वविद्यालयांत प्रवेश देणारें व वरच्या दर्जाचें इतर शिक्षण असे शिक्षणाचे तीन टप्पे मंडळानें कल्पिले आहेत. सरकारी नोकरी करणारांसाठी स्वतंत्र परीक्षा ठेवावी व १९ वर्षांवरील उमेदवारांस तिला बसतां येऊं नये, ह्या मंडळाच्या सूचनेचे मुळाशीं बी. ए. किंवा एम. ए. झालेल्यांची स्पर्धा खालच्या दर्जाच्या नोकऱ्यांतून होऊं नये, ही मंडळाची इच्छा असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. मंडळानें इतर मामुली ठराव पास करून कांहीं कमिट्याहि नेमल्या आहेत. बेकारीचा प्रश्न केवळ शैक्षणिक नसून तो आर्थिक व सामाजिकहि आहे व त्या दृष्टीनींच तो सोडविण्याची खटपट झाली पाहिजे, हें जरी खरें असलें, तरी कमिटीच्या शिफारसींची अंमलबजावणी झाल्यास विद्यार्थ्यांच्या पैशाचा, श्रमाचा व कालाचा अपव्यय थांबण्यास सहाय होईल, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्या कामास ज्यास्त लायकीच्या मनुष्याचा उपयोग होत नाहीं, त्या कामीं विनाकारण स्पर्धेस वाव कां मिळावा व ह्या स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी खटपट करण्यांत विद्यार्थ्यांचें आयुष्य वांया कां जावें ? ह्या दृष्टीनें पहातां कमिटीच्या सूचना योग्य वाटतील. शिक्षणाची शाखा किंवा टप्पा कोणताहि असो; त्यांत विद्यार्थ्यांच्या कार्यक्षमतेकडे योग्य लक्ष पुरवलें जाणें अर्थातच आवश्यक आहे. मध्यवर्ती सल्लागार मंडळाच्या शिफारसींची अंमलबजावणी करण्याचें काम प्रांतिक सरकारांवर पडणार हें ओघानेंच प्राप्त होतें. तें कसें वठणार हाच अवघड प्रश्न आहे.


काटकसर आणि चढाओढ

सध्यांचे आर्थिक मंदीचे दिवसांत अधिक काटकसर कशी करितां येईल हा विचार प्रत्येकापुढें आहेच. संस्था, ऑफिस, कारखाना, घर इ० सर्व ठिकाणीं काटकसरीचा प्रयत्न सुरू आहे.

परंतु

वेळेची काटकसर करणें आरोग्याशिवाय कसें शक्य होईल, आणि आरोग्य मिळण्यास व टिकविण्यास उपाय काय ?

याचें उत्तर

आरोग्यमिश्रण

याचे सेवनानें

शौचास साफ होऊं लागून भूक वाढते, व तरतरी आणि उत्साह हीं वाढतात.



बोधचिन्ह

सर्व एजंटांकडे मिळतें.

श्रीधूतपापेश्वर आर्यौषधि कारखाना,

पनवेल—कुलाबा.

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street Bombay | 716, Sadashiv Peth Poona City

धी पूना कँटोनमेंट को. क्रे. बँ. सो. लि. पुणें

ऑफिसः—९५, लक्ष्मीरोड, गणेश चौक.

कायम ठेवीः—द. सा. द. शे. ४॥ ते ६ टक्के.

सेव्हिंग्ज ठेवीः—द. सा. द. शे. रोज शिलकेवर ३ टक्के.

अल्पसंग्रह ठेवीः—आज किंमत रु. ८, चार वर्षांनीं रु. १०.

मेंबर्सकरितां बँकिंगचे इतर व्यवहार केले जातात.

विशेष माहिती समक्ष.

सेक्रेटरी.

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली

## शिक्षण सुधारणेस आर्थिक प्रगतीची जोड पाहिजे

### प्रो. काळे ह्यांचें वांई येथील व्याख्यान

वांई येथील द्रवीड हायस्कूलच्या बक्षिस समारंभाचे प्रसंगीं प्रो. काळे ह्यांनीं अध्यक्ष ह्या नात्यानें केलेल्या भाषणाचा सारांश खालीं दिला आहे:—

गेल्या दोनतीन आठवड्यांत विश्वविद्यालयीन पदवीदान समारंभाचे वेळीं शिक्षणतज्ज्ञ, विद्वान् व समाजधुरीण ह्यांचीं अनेक ठिकाणीं भाषणें झालीं असून सध्याच्या अभ्यासक्रमांत सुधारणा व त्यांचा प्रचलित बेकारीशीं निकट संबंध ह्या विषयांवर विविध मतें प्रदर्शित करण्यांत आलीं आहेत. हिंदुस्थान सरकारचेंहि सद्‌रहू प्रश्नाकडे लक्ष गेलें आहे आणि त्यांनीं एक मध्यवर्ती शिक्षण सल्लागार मंडळ स्थापन केलें आहे. ह्या मंडळाची दिल्लीस पहिली सभा नुकतीच झाली. तीमध्यें हिंदुस्थान सरकारचे मंत्री, सर गिरिजाशंकर वाजपेय, ह्यांनीं बेकारीसंबंधानें काढलेल्या उद्गारांविषयीं दोन शब्द बोलणें आवश्यक आहे. सुशिक्षितांस अंगमेहनतीचीं कामें करण्याचा तिटकारा आहे आणि समाजामध्यें विश्वविद्यालयाच्या पदव्यांस विलक्षण मान आहे. ह्यामुळें शिकलेल्या लोकांत बेकारी पसरली आहे आणि हा प्रश्न सोडवण्याचें काम मुख्यत्वेंकरून समाजसुधारकांचें व लोकमतास योग्य वळण लावणारांचें आहे. अनेक वर्षांच्या संवयीमुळें पांढरपेशा लोकांत श्रमाचा कंटाळा व उत्साहाचा अभाव हे दोष दृढमूल झाले आहेत ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं व हें वैगुण्य दूर करणें हें शिक्षकांचें, पालकांचें व विद्यार्थ्यांचें कर्तव्य आहे.

तथापि, ह्या प्रश्नाच्या दुसऱ्या बाजूचा सर गिरिजाशंकर ह्यांनीं निर्देश करणें आवश्यक होतें. सरकारनें शिक्षण सल्लागार मंडळ नेमलें तसें उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या बाबतींतहि एक मंडळ कां स्थापन केलें नाहीं हा प्रश्न त्यास विचारण्यासारखा आहे. तरुण पिढीनें उद्योग, व्यापार, यांत्रिककला ह्यांचें शिक्षण घेतलें तरी त्यांतील तज्ज्ञांस काम मिळेल अशी सोय करण्याची जबाबदारी सरकारावर कांहींच पडत नाहीं काय ? कांहीं वर्षांमागें, वाङ्मयात्मक शिक्षण फार झालें, भौतिक शास्त्रांच्या शिक्षणाकडे विद्यार्थी वळवले पाहिजेत, अशी ओरड होऊन बी. एस्‌सी. चा अभ्यासक्रम चालू करण्यांत आला. पण आज परिस्थिति अशी आहे कीं, बी. ए. बरोबरच बी. एससी. बेकार बनले आहेत, आणि भौतिक शास्त्रांतली पदवी मिळवणारांची अवस्था बी. ए. पेक्षांहि अधिक कठिण झाली आहे. उद्योगधंदे व व्यापार ह्यांस उत्तेजन देण्याचें ज्यांच्या हातांत आहे, त्या हिंदुस्थान सरकारनें शिक्षणसुधारणेची जबाबदारी जनतेच्या पुढाऱ्यांवर टाकून स्वतः मोकळें होऊन चालावयाचें नाहीं. इतर देशांत बेकारीच्या निवारणासाठीं तेथील सरकारें सढळ हातानें खर्च करून ह्या विषयांत मन घालतात, उद्योगधंद्यांस द्रव्यसहाय देतात व लोकांस काम मिळेल अशी व्यवस्था करतात. हिंदुस्थानांत मध्यवर्ती सरकार ह्या बाबतींत उदासीन असल्यानें लोकांनींच संघशक्तीनें तो प्रश्न सोडवला पाहिजे.

गल्या पांच-पंचवीस वर्षांत आमच्या शिक्षणक्रमांत फेरबदल झाले आहेत. परंतु आर्थिक व सामाजिक स्थित्यंतरें होत आहेत, त्यांच्याशीं जुळतील अशा सुधारणा आमच्या हातून घडून आलेल्या नाहींत. ह्यामुळें शिक्षणपद्धति व सामाजिक जीवन ह्यांच्यामध्यें मेळ बसलेला नाहीं. सर्वच विद्यार्थी पंडित बनत नाहींत, बनू शकत नाहींत व बनणें इष्ट नाहीं. शिक्षण, नित्य व्यवहारांत तरुण पिढीस कार्यक्षम बनवण्यास असमर्थ असेल तर तें कुचकामाचें आहे असें समजलें पाहिजे. ह्यासंबंधांतली जबाबदारी विद्यार्थी, शिक्षक व पालक ह्या सर्वांनींच उचलली पाहिजे आणि शिक्षणाचा व सामाजिक जीवनाचा गाडा स्वावलंबनाच्या तत्त्वावर हांकला पाहिजे. मातृभाषेस उच्च शिक्षणक्रमांत स्थान देण्यास आमच्या विश्वविद्यालयास चाळीस वर्षें लागलीं ह्यावरून शिक्षण पद्धतीची सुधारणा किती मंद गतीनें होत असते, याची कल्पना येईल. तेव्हां महाराष्ट्राचा आर्थिक प्रश्न सुटावयाचा असेल तर तो उद्योगधंदे व व्यापार ह्यांची संघटनात्मक प्रगति आणि तिला जुळेल अशा प्रकारचें शिक्षण ह्यांची जोडगोळी आपणांस योजावी लागेल. मुलांचे खेळ, अभ्यास व व्यवसाय असे असले, पाहिजेत कीं, जीवनार्थ चाललेल्या कलहांत त्यांचा निभाव लागेल, ह्या प्रकारची त्यांची शाळांत व कॉलेजांत तयारी होईल. सध्याची तरुण-पिढी बिघडली आहे अशीं नांवें ठेवण्यांत कांहीं हंशील नाहीं. त्यांच्या परिस्थितीची जबाबदारी सर्वस्वी समाजावर आहे. ती ओळखून प्रत्येकानें वागणें आवश्यक आहे. तरुण पिढीला कामाचे योग्य मार्ग खुले केले पाहिजेत, ह्याचा अर्थ, त्यांनीं ऐदी बनावें असा नसून तरुणांच्या उत्साहास व कर्तबगारीस अनुकूल अशी परिस्थिति चोंहोबाजूंनीं निर्माण होणें जरूर आहे आणि त्यांनीं धडाडीनें व उमेदीनें स्वतःच्या उन्नतीसाठीं झटावें, असा येथें सांगण्याचा मुख्य उद्देश आहे. शिक्षणक्रम हें साधन आहे, साध्य नाहीं; आणि उन्नति मेहनतीवांचून होत नसते, हें सर्वांनीं ध्यानांत बाळगावें.

---

### भाषणें आवरतीं घ्या !

ब्रिटिश हाउस ऑफ कॉमन्सची निवडणूक नुकतीच झाली. नव्या पार्लमेंटाचे अध्यक्ष म्हणून कॅप्टन फिट्झरॉय ह्यांची पुनः नेमणूक झाल्यावर त्यांनीं आपलें स्थान स्वीकारण्यापूर्वी सभासदांना जो थोडासा उपदेश केला, त्याचें मनन इकडील सार्वजानिक कार्यकर्त्यांनीं करण्यासारखें आहे. वादविवाद आणि वक्तृत्व ह्यांतील फरक समजावून सांगून ते म्हणाले, कीं वादविवादांत एकानें दुसऱ्याच्या मुद्यांचा थोडक्यांत परामर्ष घ्यावा. तयार केलेलीं भाषणें बोलून दाखवण्याची प्रवृत्ति वादविवादास मारक होते व सभागृहांतील वातावरणांत ताजेपणा रहात नाहीं. लांब लांब भाषणें करून सभागृहाचा वेळ निष्कारण वांया घालविण्याची ही संवय सर्वत्र आढळते. कित्येकांस तर प्रत्येक विषयावर आपलें म्हणणें विस्तारानें सांगितल्याशिवाय चैनच पडत नाहीं, मग त्या विषयाची स्वतःस माहिती असो अगर नसो ! कॅप्टन फिट्झरॉय ह्यांनीं दिलेला इषारा योग्य असून त्याकडे लक्ष वेधलें जाणें अगत्याचें आहे.

---

### निवडक बाजारभाव

#### सोनें–चांदी

| | | |
|---|---|---|
| चार्टर्ड बँकेचें सोनें | तोळयास | ३४—१५ |
| मिंट ,, | तोळयास | ३४-१३½ |
| हिंदी मिंट चांदी | १०० तोळयांस | ५१—१ |
| हिंदी मिंट चांदी ( वायदा ) | १०० तोळयांस | ५८—१४ |

#### हुंडणावळ

| | |
|---|---|
| मुंबई–लंडन | १ रुपयास १ शि. ६३/१६ पेन्स. |
| मुंबई–न्यूयॉर्क | १०० रुपयांस २७·१ डॉलर |
| मुंबई–बर्लिन | १०० रुपयांस ९० मार्क |

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानी असलेली

# शेतकऱ्यांची रिझर्व बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १५ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १६ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १७ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १८ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | १९ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २० शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २१ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २२ साक्री ( „ „ ) |
| ९ अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २३ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० शेवगांव ( „ „ ) | २४ मालेगांव ( „ नाशिक ) |
| ११ कोपरगांव ( „ „ ) | २५ सटाणा ( „ „ ) |
| १२ भिवंडी ( „ ठाणें ) | २६ कळवण ( „ „ ) |
| १३ पालघर ( „ „ ) | २७ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १४ कल्याण ( „ „ ) | २८ कालोल ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २००००००० चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**

**This year 1934-35**

**Exceeds**

**2 CRORES & 50 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca,

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## पहिल्यानें सुरक्षितता

रस्त्यावरून जातांना तुम्हीं सुरक्षिततेचा मार्ग पहिल्यानें पहातां. हीच गोष्ट पैसे बँकेंत किंवा विम्यांत गुंतविण्यासंबंधीं आहे. पहिल्यानें तुम्ही पैशाची सुरक्षितता पहातां; नंतर व्याज किंवा बोनस.

हिशेब तपासणी आणि प्रतिनिधित्व सरकारी खात्याकडे असल्यानें

## दि बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लि.

मध्यें आपले पैसे गुंतविल्यास कसलाच धोका नाहीं.

सविस्तर माहितीकरितां लिहा—

कळकर्णी आणि कंपनी, चीफ ऑर्गनायझर्स | चुनीलाल डी. बरफीवाला, मॅनेजिंग डायरेक्टर.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

## रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पद्मजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

---

“ दुसरें मूल्यमापन जाहीर झालें ”

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:-

## कॉमनवेल्थ विमा कंपनी, लि. पुणें.

अध्यक्ष-श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां भेटा अगर समक्ष लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

---

## बॅडमिंटन शटल्स

| | डझन | रु. |
|---|---|---|
| फ्रेंच शटल्स | ,, | ६ ते ८ |
| इंग्लिश शटल्स | ,, | ६ ते १२ |
| देशी शटल्स | ,, | १ ते ५ |

साठे स्पोर्ट्स,

डेक्कन जिमखाना, पुणें.

---

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंड विमा कं.

## दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठी लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

---

## श्री माणकेश एजन्सी

शहापूर लुगडीं, जरीचीं व टोपपदरी, अंगास रंग न लागणारीं मिळतात.

तसेंच, इरकल, खंबायत वगैरे पेठेचा गॅरंटीड माल मिळतो.

मंडई रस्ता, शनीचा पार, पुणें.

---

## क. ब. साठे.

## लोहभांडार.

इमारतीस लागणाऱ्या सर्व तऱ्हेच्या मालाचे व्यापारी. स्वदेशी मालास प्राधान्य. वजन माप बरोबर म्हणून माल स्वस्त.

३६५, रविवार, पुणें.

---

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult

## V. G. & Sons

ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

# दि बॉंबे लाइफ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड.

(स्थापना १९०८)

## विश्वासार्ह व मजबूत विमा-कंपनी.

| | | |
|---|---|---|
| मालमत्ता .... .... | ७०,००,००० रु. चे वर | |
| विमाखातीं शिल्लक ( लाइफ फंड ) | ५८,००,००० | ,, |
| हप्त्यांचें उत्पन्न ... .... | १८,८५,००० | ,, |
| एकूण चालू काम .... .... | ३,७१,००,००० | ,, |
| आजपर्यंत क्लेम्सचे पैसे दिले ... | ३२,००,००० | ,, |

माफक हप्ते, भरपूर बोनस, क्लेम्सची तात्काळ भरपाई, व पॉलिसींतील सवलतीच्या अटी हें "बॉंबे लाइफ पॉलिसीं" चें वैशिष्ट्य आहे.

एजन्सी व पॉलिसी ह्यासंबंधींच्या तपशिलासाठीं लिहा:—
मॅनेजर,
बॉंबे लाइफ बिल्डिंग, ४५।४७, चर्चगेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

शेअर विक्री सुरू आहे

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. १० लक्ष |
| तूर्त विक्रीकरितां काढलेलें भांडवल ... | रु. ५ लक्ष |

प्रत्येक शेअरची किंमत रु. ५०

१ अर्जासोबत प्रत्येक शेअरला रु. १५/- }
२ अर्जमंजुरीनंतर रु. १०/- } प्रमाणें.

बाकी रक्कम "अनकॉल्ड रिझर्व्ह" म्हणून राहील.

संचालक मंडळाचे अध्यक्षः—प्रो० वा. गो. काळे, एम्. ए., एक्स् मेम्बर, इंडियन टॅरिफ बोर्ड.
" उपाध्यक्षः—श्री. घोंडो कृष्ण साठे, बी.ए., बी. एससी., व्यापारी व कॉन्ट्रॅक्टर, पुणें.

प्रॉस्पेक्टस व शेअर अर्जाच्या नमुन्याकरितां लिहा:—

पुणें:—मॅनेजर, दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
मुंबई:—आर. आर. नाबर आणि कं., शेअर व स्टॉक ब्रोकर, एक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, कोट.
नागपूर:—एस. एन. आगाशे आणि कं., चीफ एजन्टस, कॉमनवेल्थ इन्शु. कं. लि., महाल.

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

**एन. ए. ॲन्ड फ्रेन्ड्स**
स्टेशनर्स, जनरल मर्चन्टस, ॲन्ड कमिशन एजन्टस.
आप्पा बळवंत चौक, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 343 4

**जाहिरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख ८ जानेवारी, १९३६. अंक २

**एजन्टस पाहिजेत.**


( १ ) अत्यल्प हप्त्यांचे दरांत मोबदला.
( २ ) एजंटांस अमर्याद वाव.
( ३ ) वंशपरंपरेनें रिन्यूअल कमिशन मिळविण्याची सोय.

चेअरमन :
रा. ब. हणमंतराम रामनाथ

**दि इंडियन प्रोग्रेसिव्ह इन्शु. कं. लि., पुणें शहर**

व्हाइस चेअरमन :
श्री. एच. जी. वारपुरे, L.S.C.

माहितीपत्रक मागवा.
सेक्रेटरी.



**किर्लोस्कर**
**लोखंडी नांगर**

आज ३,००,००० वर शेतकरी पूर्ण संतोषानें वापरीत आहेत.

किर्लोस्कर नांगरांच्या निरनिराळ्या २६ नमुन्यांची सविस्तर माहिती असलेला कॅटलॉग तावडतोब मागवा.

**किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी** ( सं. औंध )
एजंट:—केळकर बंधु, पुणें–नाशिक

**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें नं २.**

१९३५–३६ च्या उंसाची लागवड सुरू झाली.

अंदाजी नफा शेंकडा ७ ते १० टक्के.

प्रॉस्पेक्टस व शेअर फॉर्म, कंपनीचे ब्यांकर्स व मुख्य कचेरी २५७, बुधवार पेठ, पुणें नं. २ यांजकडे मिळतील.

**'अर्थ' ग्रन्थमाला**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
**Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.**

# विविध माहिती

### हिंदी कपाशीचा लँकेशायरमध्यें उठाव

लँकेशायर इंडियन कॉटन कमिटीचे अध्यक्ष, सर रिचर्ड जॅकसन, हे हिंदुस्थानांत येण्यासाठीं निघाले असून, हिंदी कपाशीचा लँकेशायरमध्यें खप वाढावा ह्या दृष्टीनें ते प्रयत्न करणार आहेत. लँकेशायरमधील गिरण्यांस कोणत्या तऱ्हेची कपास लागते हे सर रिचर्ड समजावून देणार आहेत.

### मोटारगाड्यांची वाढती लोकप्रियता

ग्रेटब्रिटनमध्यें सुमारें १० लक्ष कुटुंबांजवळ खाजगी मोटरगाडी आहे, म्हणजे दर ८ कुटुंबांमागिक एक गाडी, असें प्रमाण पडतें. फटफटी वापरण्याची प्रवृत्ति कमी होऊं लागली आहे. आज सुमारें १५ लक्ष गाड्या ब्रिटनमध्यें वापरांत आहेत, त्यांपैकीं ३½ लक्ष गाड्या व्यापारी व धंदेवाईक लोक आपल्या कामासाठीं वापरतात व दोन दोन गाड्या असणारीं १ लक्ष कुटुंबें आहेत.

### कलकत्त्याजवळ टायर्सचा कारखाना

शहागंज ( हुवळी जिल्हा, बंगाल ) येथील २७८ बिघे जमीन डनलॉप रबर कंपनीनें मिळविली असून तेथें सर्व तऱ्हेच्या मोटर टायर्स तयार करणारा कारखाना ती कंपनी चालू करणार आहे. यंत्रांची जुळवाजुळव सुरू आहे.

### सिनेमाची लोकप्रियता

ग्रेट ब्रिटनमध्यें सिनेमा किती लोकप्रिय आहे, हे दर्शविणारे १९३४ सालासंबंधाचे आंकडे खालीं दिले आहेत:—

| | |
|---|---|
| सिनेमाचीं खपलेलीं तिकिटें | ९५ कोटि ७० लक्ष |
| प्रत्येक मनुष्य ( पुरुष, स्त्रिया व मुलें सर्व धरून ) सरासरीनें वर्षातून किती वेळां सिनेमास गेला ? | २२ वेळां |

### कॅनडा देशांत बेकारांस सरकारी मदत

बेकारांस मदत म्हणून खर्चण्यासाठीं कॅनडामधील मध्यवर्ती सरकार प्रांतिक सरकारास दर महिना सुमारें साडेचार लक्ष रुपयांची ग्रँट देतें. हिवाळ्यामध्यें ही ग्रँट मुद्दाम वाढवण्यांत आली आहे.

### श्रीमंतांच्या मुलांची ब्रिटिश शाळा

इंग्लंडमध्यें घरंदाज व श्रीमंत मुलांकरितां जीं विद्यालयें आहेत, त्यांमध्यें ईटन येथील शाळा प्रसिद्ध आहे. तेथील वर्षाची फी ३,००० रुपये आहे ती ३,२२५ रुपये करण्यांत येणार आहे.

### पाटणा येथील औद्योगिक प्रदर्शन

ता. १० ते २४ फेब्रुवारी अखेर पाटणा येथें अखिल भारतीय स्वरूपाचें एक औद्योगिक प्रदर्शन प्रांतिक सरकारच्या पुरस्कारानें भरणार आहे. त्याप्रीत्यर्थ हिंदुस्थान सरकारनें व बिहार व ओरिसा प्रांतानें प्रत्येकीं १० व १२ हजार रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत.

### मुंबई इलाख्यांतील तांदुळाचें पीक

मुंबई इलाख्यांत ( सिंध वगळून ) एकूण २२ लक्ष ५७ हजार एकर जमिनींत तांदूळ लावलेला आहे. हिंदुस्थानांतील एकूण पिकाच्या मानानें ही लागवड फक्त ४·२ टक्के भरते. त्यांतून एकूण ९ लक्ष २४ हजार टन तांदूळ निघेल, असा अंदाज आहे.

### जपानी युद्धसामुग्रीचा परदेशांमध्यें खप

स्वतःचें वाढतें सैन्य व आरमार ह्यांस जपानी कारखाने युद्धसामुग्रीचा पुरवठा करीत आहेत, इतकेंच नाहीं तर आतां दुसऱ्या देशांसहि शस्त्रास्त्रें विकण्याचा जपानचा धंदा वाढत आहे. तुर्कस्थान व ग्रीस हीं जपानचीं गिऱ्हाइकें बनलीं आहेत. रुमानियांत ह्याशिवाय शस्त्रास्त्रांचे कारखाने काढण्यासहि जपान मदत करीत आहे. ब्राझिल देशानें कित्येक लढाऊ जहाजें जपानकडून खरेदी करण्याचें ठरविलें आहे. एशिया खंडांत जपानचें प्रस्थ कसें वाढत आहे ह्याचें वरील धंदा हें उत्कृष्ट उदाहरण आहे.

### पूर्व खानदेश सहकारी इन्स्टिट्यूट, जळगांव

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या पूर्व खानदेश जिल्ह्याच्या शाखेस ता. ३१ डिसेंबर १९३५ रोजीं सहकारी खात्याचे दिवाण, दिवाण बहादुर कंबळी, ह्यांनीं भेट दिली व कामकाज पाहून समाधान व्यक्त केलें.

### कॉमनवेल्थ विमा कंपनीची मुंबई शाखा

कॉमनवेल्थ विमा कंपनीच्या मुंबई येथील शाखेचें उद्घाटन रविवार, ता. ५ जानेवारी रोजीं, मुंबईचे मेयर मि. नरिमन ह्यांच्या हस्तें झालें.

### रशियांत कपाशीची पैदास

गेल्या हंगामांत रशियामध्यें १५ लक्ष टन कपास पिकली. पूर्वीच्या वर्षाच्या मानानें गेल्या सालीं सुमारें ३½ लक्ष टनांनीं हें पीक जास्त आहे.

### प्रकाशकाचे धंद्यास तेजी

१९३५ सालीं ग्रेटब्रिटनमध्यें जितकीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं, तितकीं आतांपर्यंत कोणत्याच वर्षी त्या देशांत झालीं नव्हतीं. ह्या वर्षांत एकूण १६,६७८ पुस्तकें प्रसिद्ध झालीं.

### इंडियन बँक लि०

वरील बँकेस वर्षअखेर २,५८,५७६ रु. नफा झाला आहे.

### चांदीची निर्गत

गेल्या आठवड्यांत ८७½ लक्ष रुपये किंमतीची चांदी परदेशांत गेली.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २८ डिसेंबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ५६, ९३, ४०६ |
| ता. ४ जानेवारी रोजीं पुरा झालेला आठवडा | ७४, २४, ९०९ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते ४ जानेवारी १९३६ अखेर | २, ५७, ५०, ६४, ८९१ |

अनुक्रमणिका.


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | १८ | स्वीकारा—सिलोनमध्यें आर्थिक जागृति—कॉमनवेल्थ कंपनीची मुंबई येथील शाखा—हिंदुस्थानांतले कारखाने | |
| २ रिझर्व्ह बँक शेतीला मदत कशी करणार? | १९ | ६ तेलाच्या घाण्या | २३ |
| ३ आर्थिक परिस्थिती-संबंधानें विचार | २० | ७ रानटी लोक व आधुनिक शिक्षण | २३ |
| ४ सरस्वती मठ संस्था | २० | ८ ब्रिटिश सिनेमाचा धंदा | २४ |
| ५ स्फुट विचार | २१ | ९ मननीय उद्गार | २४ |
| तेलाच्या घाण्यांचा धंदा—घाण्यांच्या धंद्यांत आवश्यक सुधारणा—बडोद्याच्या महाराजांची एक कोटि रुपयांची देणगी—व्यापाराची नवीन पद्धति | | १० कपाशीच्या भावांतला तुलनात्मक मेळ | २५ |
| | | ११ निवडक बाजारभाव | २६ |



# अर्थ

बुधवार, ता. ८ जानेवारी १९३६


## रिझर्व्ह बँक शेतीला मदत कशी करणार?

### शेतीसाठीं स्वतंत्र बँकिंग संस्था?

[ १ ]

देशांतील व्यापार आणि उद्योगधंदे सुरळीत रीतीनें चालावे ह्यासाठी जरूर असलेलें चलन आणि इतर विनिमय साधनें ह्यांचा योग्य पुरवठा होईल अशी व्यवस्था करणें हा हिंदुस्थानांत रिझर्व्ह बँक स्थापण्याचा एक प्रमुख उद्देश आहे. मध्यवर्ती बँकेस ज्या व्यापारी बँका जोडण्यांत आलेल्या आहेत, त्यांच्या व प्रांतिक सहकारी बँकांच्या मार्फत पैसा खेळवण्याचें हें रिझर्व्ह बँकेचें कार्य व्हावयाचें आहे. शेतीच्या धंद्याच्या गरजा व अडचणी विशिष्ट प्रकारच्या असल्यामुळें त्यास रिझर्व्ह बँकेच्या कक्षेंत कसें आणतां येईल, हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न होता. परंतु कांहीं थोड्या सवलतींची तरतूद करण्यापलीकडे शेतीच्या धंद्याबाबत स्वतंत्र आणि भरपूर व्यवस्था रिझर्व्ह बँकेच्या व्यवहारांत कायद्यानें करतां आलेली नाहीं. कायद्याच्या १७ व्या कलमान्वयें शेतीच्या व्यवहारांस नऊ महिन्यांच्या मुदतीपर्यंत, त्यांमध्यें उद्भवणाऱ्या हुंड्या किंवा वचनचिठ्या ह्यांच्या खरेदीनें किंवा डिस्कौंटनें बँकांच्या मार्फत रिझर्व्ह बँकेस पैसा पुरवतां येईल. शेतीच्या मालाच्या तारणावर, तीन महिन्यांच्या मुदतीनें ह्याचप्रमाणें तिला पैशाची व्यवस्था करतां येईल. जमिनीच्या तारणावर किंवा व्यक्तींशीं कर्जाचे व्यवहार करण्याची रिझर्व्ह बँकेस सक्त मनाई आहे. शेतीच्या गरजा भागवण्याची व्यवस्था नवीन मध्यवर्ती बँकेच्या हातून म्हणण्यासारखी कांहींच होऊं शकणार नाहीं, हें लक्ष्यांत येऊन रिझर्व्ह बँकेच्या कायद्याची चर्चा चालू असतांना सदरहू बाबतींत कांहीं तरी तजवीज झालीच पाहिजे असा जनतेच्या प्रतिनिधींनीं आग्रह धरल्यावरून कायद्यामध्यें दोन जादा कलमांचा समावेश करण्यांत आला. खेडेगांवांतील धंदे, विशेषतः शेती, ह्यासंबंधांतील प्रश्नांचा विचार करून सरकारास सल्ला देण्यासाठीं रिझर्व्ह बँकेंत एक स्वतंत्र खातें उघडण्यांत यावें व त्या खात्यानें शेतीस होणाऱ्या पैशाच्या पुरवठ्याबाबत निरीक्षण करावें अशी एका कलमांत योजना आहे. जोडलेल्या बँकांव्यतिरिक्त इतर संस्था व व्यक्ती ह्यांस रिझर्व्ह बँकेच्या कक्षेंत कसें आणत येईल आणि शेतीस भांडवल पुरवण्याचे कामीं काय विशेष योजना करतां येईल ह्याविषयीं विचार करून बँकेनें सरकारकडे रिपोर्ट करावा असें वर निर्दिष्ट केलेल्या दुसऱ्या कलमांत सांगितलें आहे.

शहरें सोडून दिलीं तर देशांतील इतर ठिकाणीं म्हणजे खेडेगांवांच्या सर्व विभागांमध्यें व्यापार व उद्योगधंदे ह्यांस सावकार आणि सराफ पैसा पुरवतात; आणि रिझर्व्ह बँकेचे सर्व व्यवहार मात्र मोठ्या बँकांच्या मार्फत चालणार. अशा स्थितींत मध्यवर्ती बँकेचा फायदा बहुसंख्याक शेतकरी वर्गास कसा मिळणार? हा प्रश्न उपस्थित होतो व त्याबाबत कांहींतरी योजना व्हावी या हेतूनें वरील दुसरें कलम रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत दाखल करण्यांत आलें आहे. परंतु रिझर्व्ह बँकेसारख्या संस्थेस मूलतः आणि तत्त्वतः खेडेगांवें, शेती व सावकार ह्यांच्याशीं आपल्या व्यवहारांचा संबंध जोडतां येणेंच शक्य नाहीं असा कित्येकांचा आक्षेप असून, त्यांच्या मतें ह्या बाबतींत दुसरी स्वतंत्र व भरभक्कम अशी व्यवस्था होणें अगत्याचें आहे. "रिझर्व्ह बँक अँड ॲग्रिकल्चरल क्रेडिट्स" ह्या नांवाच्या* सुमारें पन्नास पानांच्या चोपड्यांत मद्रास इलाख्यांतील मदुरा येथील ॲडव्होकेट, श्री. ए. रामय्या ह्यांनीं ह्या प्रकारची विचारसरणी पुढें मांडून एक विधायक योजनाहि सुचविली आहे. तिची माहिती देण्यापूर्वी मध्यवर्ती बँकांस शेतीस भांडवल पुरवण्याचा प्रश्न सोडवणें शक्य आहे काय आणि हिंदी रिझर्व्ह बँकेच्या हातून ह्या प्रकारची कामगिरी होण्याजोगी आहे काय? ह्या प्रश्नांचा विचार झाला पाहिजे. रिझर्व्ह बँकेचा व्यवहार प्रमुख बँकांशींच येणार आणि त्या संस्थेचा पैसा अल्प काळाच्या अवधीं पुरतांच गुंतून राहिला पाहिजे; तरच चलनव्यवस्थेचें स्थैर्य टिकवण्याचें आपलें मुख्य कार्य तिला करतां येईल. स्थावर जिंदगींत किंवा लांब मुदतीच्या कर्जांत आपला पैसा तिला मुळींच अडकवतां येत नाहीं. हुंड्या डिस्कौंट करून किंवा दोन तीन महिन्यांच्या मुदतीपर्यंत इतर बँकांच्या मध्यस्थीनें मध्यवर्ती बँकेस पैसा पुरवतां येईल. ह्याच्या पलीकडे जाणें तिला अशक्य आहे. मग हिंदी शेतकऱ्यांच्या दोन तीन वर्षांच्या आणि लांब मुदतीच्या कर्जाविषयींच्या गरजा रिझर्व्ह बँक कशा भागवणार? इतर देशांचीं उदाहरणें पाहिलीं तरी हा व्यवहार तेथील मध्यवर्ती बँका करीत नाहींत. ह्या परिस्थितींत हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांच्या कर्जाचा प्रश्न अन्य मार्गांनीं सोडवला पाहिजे असें श्री. रामय्या ह्यांचें म्हणणें आहे. त्यांच्या विचाराची मांडणी कशी आहे व त्यांनीं स्वतः सुचवलेल्या योजनेचें स्वरूप कोणत्या प्रकारचें आहे, याचें विवेचन प्रस्तुत विषयावरील पुढच्या लेखांत करूं.

---

*" The Reserve Bank and Agricultural Credits"—A. Ramaiya, M.A., Madura.

## आर्थिक परिस्थितीसंबंधानें विचार

( ३ )

धुळें

### इंस्टिट्यूटच्या विद्यमानें व्याख्यान

पश्चिम खानदेशच्या सहकारी इंस्टिट्यूटचे अध्यक्ष श्री. उत्तमराव देशमुख ह्यांनीं धुळें येथील सभेचे ठिकाणींच आपल्या संस्थेच्या विद्यमानें प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान निश्चित केलें होतें. त्यावेळीं श्री. काकासाहेब गरूड ह्यांनीं अध्यक्षस्थान मंडित केलें होतें. महाराष्ट्रांत कपाशीचें उत्पादन व व्यापार ह्यांचे बाबतींत मोठा लौकिक असल्यानें त्यांच्या अनुरोधानें प्रो. काळे ह्यांनीं आपल्या विषयाची मांडणी केली.

प्रचालित मंदीचे पूर्वी हिंदुस्थानांत दरवर्षी सुमारें २५ कोटि रुपयांचें सोनें बाहेरून येत होतें. त्याचा योग्य हिस्सा खानदेशाच्या वांट्यास येत असे, ह्याचा दाखला सरकारी अहवालांमध्यें पहावयास मिळत असे. अलीकडच्या मंदीच्या काळांत हा ओघ उलटला असून सोनें खानदेशांतून मुंबईकडे व मुंबईतून परदेशांमध्यें चाललें आहे. गेल्या पांच-चार वर्षांमध्यें ह्या देशांत सोनें आयात होण्याच्या ऐवजीं त्याची २५० कोटींच्यावर निर्गतच झाली आहे. ज्यांनीं हें सोनें व्यापाऱ्यांस विकलें त्यांस खरेदीच्या मानानें पूर्वीपेक्षां अधिक किंमत मिळाली, हें खरें असलें तरी लोकांच्या बचतींतला इतका पैसा कमी झाला व आपल्या कमाईतून गुजारा करतां न आल्यानें त्यांस शिलकी भांडवल बाहेर काढून खर्चावें लागलें, ही गोष्ट स्पष्ट होत आहे. आमच्या शेतीच्या मालास परदेशांत मागणी हवी तशी नाहीं आणि त्याचे बाजारभाव उतरले आहेत, ह्या कारणानें परदेशांत गांठचें सोनें पाठवून व्यापाराच्या ताळेबंदाची तोंड मिळवणी करावी लागत आहे. ह्या तऱ्हेची आपत्ति सर्व जगास भोगणें प्राप्त झालें असलें तरी प्रत्येक देशांतलें सरकार तिला तोंड देण्याचा प्रयत्न करून करीत आहे. इंग्लंडसारख्या मोठ्या कारखान्यांविषयीं प्रसिद्धी पावलेल्या देशांमध्येंहि शेतीचें संरक्षण करण्याचे उपाय तेथील सरकार योजीत आहे. अमेरिकेंत सरकारनें कपाशीची लागवड मर्यादित करण्याचा सल्ला शेतकऱ्यांस देऊन कपाशीचे भाव पडणार नाहींत अशा विषयीं प्रयत्न चालवला आहे आणि शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नुकसानीची भरपाई करून देण्याचें धोरण आंखलें आहे. व्यापार, धंदे व शेती ह्यांचे बाबतींत जगांतील राष्ट्रांचें परस्परांवरील अवलंबन आधुनिक काळांत वाढलें असलें तरी आर्थिक मंदीचें निवारण करण्यासाठी प्रत्येक राष्ट्र आपल्या पुरते सोयीचे उपाय योजीत आहे. आपणांस फायदेशीर दिसेल तो धंदा व व्यापार प्रत्येकानें करावा असें म्हणून स्वस्थ बसण्याचे दिवस आतां राहिले नसून तुम्ही आमचा विशिष्ट माल घ्या, त्याच्या मोबदला आम्हीं तुमचा विशिष्ट माल घेऊं, असे करार राष्ट्रांस एकमेकांशीं करावे लागत आहेत. कपास व कापड ह्यांची देवघेव परस्परांत व्हावी म्हणून जपान आणि हिंदुस्थान ह्यांस करार करणें भाग पडलें आहे. मँचेस्टरच्या गिरणीवाल्यांचा ह्याच प्रकारची मागणी आहे.

खानदेशांतल्या किंवा हिंदुस्थानांतल्या शेतकऱ्यांनीं व व्यापाऱ्यांनीं कपाशीचे भाव चढवण्याचे प्रयत्न केले तरी ते निष्फळ ठरतील. हें काम देशाच्या सरकाराचें आहे. अमेरिका, इंग्लंड, जपान वगैरे राष्ट्रांनीं आपल्या चलनाच्या व्यवस्थेंत तात्पुरता फेरफार करून व्यवहारांत मुबलक नाणें खेळावें आणि स्वतःच्या व्यापारावर त्याचा अनुकूल परिणाम व्हावा अशी तरतूद केली आहे. इंग्लंडमध्यें बिटाची साखर करण्याच्या धंद्यास सहाय म्हणून गेल्या दहा वर्षांत ५० कोटि रुपये खर्च केले गेले असून शेतकऱ्याच्या मालास चांगली किंमत मिळावी म्हणून संरक्षक विक्रीच्या योजना अंमलांत आणल्या आहेत.रंगाच्या धंद्यास अशीच मदत करून जर्मन रंगांवरचें इंग्लंडचें अवलंबन सरकारनें दूर केलें आहे. ह्याप्रमाणें, प्रचलित आर्थिक मंदीस आळा घालून राष्ट्रीय उद्योगधंदे, शेती व व्यापार सुरक्षित पायावर उभा करण्याच्या योजना प्रत्येक देशांतील सरकार अमलांत आणीत आहे. ह्याच धोरणाचें अनुकरण हिंदुस्थानांत होणें अगत्याचें आहे, परंतु त्यासंबंधांतल्या जागृतीचीं लक्षणें दुर्दैवानें अजून दिसत नाहींत. हिंदी रिझर्व्ह बँकेनें शेतीच्या धंद्यास द्यावयाच्या सहायाचा प्रश्न उदाहरण म्हणून घेतलें तर असें दिसून येतें कीं, त्याबाबत काय तरतूद करावयाची हें अजून निश्चित झालेलें नाहीं. मध्यवर्ती बँकेकडून शेतकरी वर्गास हलक्या व्याजाच्या दरानें पैसा मिळण्याची सोय करण्यांत येईल अशी लोकांची अपेक्षा आहे आणि रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत ह्याकरितां दोन कलमें मुद्दाम दाखल करून घेण्यांत आलीं आहेत. त्यासंबंधांत काय करतां येईल ह्याची चौकशी व्हावयाची होती, तिचा निकाल कसा झाला ह्याची माहिती प्रसिद्ध झालेली नाहीं. जनतेनें ह्यासंबंधांतले प्रश्न समजावून घेऊन सरकारकडून त्याबाबत दाद लावून घेतली पाहिजे. मंदीचें निराकरण आणि आर्थिक पुनर्घटना ह्यांचा विचार आणि त्यांच्याविषयीं योग्य उपायांची अंमलबजावणी प्रत्येक राष्ट्रांत चालू आहे. हिंदुस्थानांतहि आम्हीं त्यांचा कित्ता गिरवल्यावांचून आमच्या देशास तरणोपाय नाहीं. ( समाप्त )

## सरस्वती मठसंस्था

### ग्रामोद्धार शिक्षणछावणीचा नूतन उपक्रम

सतत आठ वर्षें मावळ तालुक्यांतील लोहगड किल्ल्याखालच्या पठारांतील २० चौरस मैल क्षेत्रफळांत सरस्वती मठ काढून खेडेगांवीं शिक्षणाचें काम करणाऱ्या मुंबई येथील 'राष्ट्रधर्मा' च्या सरस्वतीमठ ग्रामोद्धार शिक्षणछावणीचा नवीन उपक्रम गेल्या नाताळांत करण्यांत आला. खेडेगांवांची सुधारणा करूं इच्छिणाऱ्या सुशिक्षितांस भरीव कार्य करण्यास अवसर मिळावा म्हणून सुट्टीच्या फावल्या वेळांत त्यांस एकत्र आणणें, हा ह्या छावणीचा उद्देश होय.

छावणीचा उद्घाटन समारंभ नवभारत विमा कंपनीच्या कचेरींत मुंबई येथें ता. २४ डिसेंबर रोजीं रात्रीं झाल्यावर मंडळी दुसरे दिवशीं सकाळीं मळवलीस आली. लोहगड, महागांव, सावंताची वाडी, इत्यादि ठिकाणीं गांवकऱ्यांच्या सभा भरवून सामुदायिक कार्याबद्दल जागृति निर्माण करण्यांत आली. शिवली येथें शेतीसुधारणेसंबंधीं प्रदर्शन, आम्रवृक्षारोपण, आरोग्य पहाणी, इत्यादि कार्यक्रम झाले. ता. २७ रोजीं मुंबई कॉर्पोरेशनमधील इंजिनियर श्री. पाटकर ह्यांचे हस्तें संस्थेचा बक्षिससमारंभ झाला. त्यानंतर प्रो. भागवत ह्यांच्या ग्रामसंघटनामंडळातर्फे त्रैमासिक संमेलन, कार्यकर्त्यांच्या कामाचा अहवाल, चर्चा, इत्यादि मार्गांनीं ग्रामसुधारणेचें पाऊल पुढ टाकण्यासंबंधीं विचार-विनिमय झाला. अशाच तऱ्हेच्या छावण्या मे महिन्यांत भरविण्यांत येणार आहेत.

# स्फुट विचार

### तेलाच्या घाण्यांचा धंदा

आजच्या अंकांत दुसरीकडे देशी तेलाच्या घाण्यांसंबंधाचा एका तज्ज्ञ मित्राचा लेख प्रसिद्ध केला आहे, त्याकडे वाचकांचें विशेष लक्ष वेधणें आवश्यक आहे. तीळ, करडी, भुइमूग इत्यादि गळिताच्या धान्यांचें, बैलाच्या सहायानें चालणाऱ्या घाणीमध्यें तेल काढणें हा हिंदुस्थानांतील प्राचीन, घरगुती व खेडेगांवी धंदा आहे. अलीकडे यांत्रिक शक्तीनें मोठ्या प्रमाणावर तेल गाळण्याच्या गिरण्या निघाल्या असून घाण्यांस त्यांच्यांशीं किंमतीच्या बाबतींत टक्कर देणें कठीण झालें आहे. तरी देखील मुंबई इलाख्यांत चाळीस-पंचेचाळीस तेलाच्या गिरण्या तर चवदा पंधरा हजार तेलाच्या घाण्या चालू आहेत, यावरून सदरहू धंद्याचा चिवटपणा किती आहे, ह्याची कल्पना येईल. ह्या जुन्या पद्धतीच्या देशी घाण्यांत गेल्या शेकडों वर्षांत, उत्पादनाच्या पद्धतीच्या दृष्टीनें कांहींच फेरफार किंवा सुधारणा झालेली नाहीं. तरीहि कांहीं विशिष्ट कारणांमुळें सध्याच्या यांत्रिक युगांत तो धंदा तग धरून राहिला आहे. आमच्या देशाच्या सध्याच्या परिस्थितींत सर्वच उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर काढून चालवणें शक्य व इष्ट नाहीं. त्याचप्रमाणें, यांत्रिक सहायानें आधुनिक पद्धतीचे कारखाने मुळींच स्थापन करावयाचे नाहींत, असेंहि म्हणून चालावयाचें नाहीं. खेडेगांवांतील लोकांच्या हितासाठी व सोयीसाठी जे त्यांच्या परिस्थितीशी मिळतील असे लहान-मोठे उद्योगधंदे काढणें किंवा अशा प्रकारच्या जुन्या व्यवसायांचें पुनरुज्जीवन व संरक्षण करणें हें शहाणपणाचें होईल. ह्या दृष्टीनें पहातां, तेलाच्या घाण्यांचा धंदा हातीं घेऊन तो सुधारणें व किफायतशीर करणें हा ग्रामसुधारणेच्या कार्यक्रमांतला एक भाग होणें आवश्यक दिसतें.

---

### घाण्यांच्या धंद्यांत आवश्यक सुधारणा

जुन्या पद्धतीची तेलाची घाणी प्राचीन पद्धतीनें परंतु अत्यंत काटकसरीनें चालविली जाते, हें ती आधुनिक यंत्रांच्या स्पर्धेत टिकून रहण्याचें एक कारण आहे. हिंदुस्थानांत गळितांचीं धान्यें विपुल आहेत व त्यांपासून निघणाऱ्या तेलास आणि पेंडीस भरपूर मागणी आहे. घाण्यांच्या चालू उत्पादन-पद्धतींत आधुनिक शास्त्रांच्या सहायानें कित्येक सुधारणा केल्या तर तेल्यांच्या पूर्वापार चालत आलेल्या धंद्यास ऊर्जितावस्था प्राप्त होईल. खेडेगांवांतील लोकांच्या उपजीविकेचीं जोड-साधनें एकामागून एक नाहींशीं होत चालल्या कारणानें त्यांची आर्थिक स्थिति खालावत असलेली स्पष्ट दिसत आहे. अशा परिस्थितींत जगवण्यालायक असलेल्या धंद्यांपैकीं तेलाच्या घाण्यांचा उद्योग हा एक महत्त्वाचा आहे, ह्यांत शंका नाहीं. खेडेगांवांची सुधारणा, ग्रामोद्योग-पुरस्कार, ग्रामोद्धार, इत्यादि अनेक नांवांखालीं, खेड्यांची उन्नति घडवून आणण्याच्या उद्देशानें बहुविध चळवळ देशांत चाललेली आहे. दुसरीकडे प्रसिद्ध केलेल्या ह्या विषयावरील लेखांत सुचविलेल्या सुधारणा तेलाच्या घाण्यांच्या उत्पादन पद्धतींत होतील तर त्या कार्यांतल्या एका महत्त्वाच्या विभागांत चांगली प्रगति घडून येईल. एकट्या मुंबई इलाख्यांत चवदा–पंधरा हजार घाण्या आहेत, ह्यावरून किती ग्रामस्थ कुटुंबांची उपजीविका ह्या धंद्यावर चालली आहे, हें तेव्हांच समजेल. अखिल भारतीय ग्रामोद्योगसंघ आणि खेडेगांवांची सुधारणा करूं इच्छिणाऱ्या इतर संस्था आणि व्यक्ती, यांनीं प्रस्तुत विषयाकडे लक्ष्य पुरवणें जरूर आहे, असें आम्हांस वाटतें.

---

### बडोद्याच्या महाराजांची एक कोटि रुपयांची देणगी

खेडेगांवांच्या आणि शेतकऱ्यांच्या स्थितीची सुधारणा व्हावी, ह्या प्रीत्यर्थ हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारांत एक कोटि रुपये वांटले असून मुंबई इलाख्याच्या वांटणीस त्यांतले सात लक्ष रुपये आले आहेत, ही गोष्ट आतां सुप्रसिद्ध आहे. हिंदुस्थानांत चोहोंकडे ग्रामसुधारणा, पुनर्घटना, ग्रामोद्योगाच्या योजना, ह्यांसंबंधीं चर्चा व प्रयत्न चालू आहेत व एकूण जरूरीच्या मानानें हिंदुस्थान सरकारची देणगी पुरी पडणें शक्य नाहीं. तथापि, ग्रामसुधारणेच्या प्रश्नास त्यामुळें विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे, ह्यांत संशय नाहीं. बडोद्याच्या महाराजांना, त्यांच्या ज्युबिलीचे प्रसंगीं, त्यांच्या प्रजेनें गेल्या आठवड्यांत मानपत्र अर्पण केलें, त्यास उत्तर देतांना महाराजांनीं आपल्या 'डायमंड ज्युबिली ट्रस्ट'ची योजना जाहीर केली. ह्या एक कोटि रुपयांच्या ट्रस्टचा विनियोग खेडेगांवांतील रहाणी व हरिजनांची परिस्थिति सुधारण्याकडे करण्यांत यावयाचा आहे.ट्रस्टची मूळ रकम कायम रहावयाची असून, त्याच्या उत्पन्नांतूनच खर्च व्हावयाचा असल्यामुळें ह्या कार्यास कायम मदत मिळणार आहे,हा ह्या देणगीचा विशेष होय. सध्यां ह्याप्रीत्यर्थ चालू असलेल्या बडोदें सरकारच्या खर्चांत ह्या देणगीमुळें कोणत्याहि तऱ्हेनें बचत करण्यांत येणार नाहीं. खेडेगांवांतील लोकांचें आयुष्य ज्यास्त सुखकर व्हावें व त्यांची रहाणी सुधारावी, ह्या तीव्र इच्छेनें प्रेरित होऊन महाराजांनीं ही योजना केलेली आहे. इतर कित्येक बाबतींत बडोद्यानें आपलें पुढारीपण कायम राखलें आहे व महाराजांनीं ज्युबिलीच्या निमित्तानें आपल्या प्रजेस दिलेलें हें बक्षीस बडोद्याचे कीर्तींत भर घालील, ह्यांत संशय नाहीं. ग्रामसुधारणेच्या प्रयत्नांस कायम स्वरूप प्राप्त व्हावें, ह्यासाठी हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकारें ह्यांनीं कांहीं तरी निश्चित योजना करणें जरूर आहे. बडोद्याच्या महाराजांचें उदाहरण त्यांस मार्गदर्शक होण्याजोगें आहे.

---

### व्यापाराची नवी पद्धति स्वीकारा

सध्याच्या तीव्र जीवनकलहाच्या काळांत आर्थिक बाबतींत मागसलेल्या महाराष्ट्रीयासारख्या समाजास नवीन धर्तीवर चालणाऱ्या उद्योगधंद्यांची कास धरणें अगत्याचें आहे, इतकेंच नव्हे तर पूर्वापार चालत आलेल्या पद्धतीनें व्यवहार करणें हा ज्यांचा पिढीजात धंदा आहे आणि एकमेव व्यवसाय शेकडों वर्षें चालत आला आहे, अशा मारवाडी समाजासहि आधुनिक वळणाचा अंगीकार करण्याची आवश्यकता भासूं लागली आहे, हें लक्ष्यांत ठेवण्याजोगें आहे. अखिल मारवाडी परिषद् नुकतीच कलकत्त्यास भरली होती. तिचे अध्यक्ष, रायबहादुर रामदेव चोखानी, ह्यांनीं आपल्या भाषणांत, सदरहु विषयाची प्रामुख्यानें चर्चा केली. "दुकानदारी, सावकारी व युरोपिअन व्यापाऱ्यांशीं दलाली हे जुने व्यवसाय आतां कुचकामाचे बनले असून आधुनिक आर्थिक मार्ग चोखाळले पाहिजेत" असा सल्ला त्यांनीं आपल्या समाजबांधवांस दिला. आयात–निर्गत व्यापारांत नुसती बनियेगिरी करून यापुढें आपल्या लोकांचें भागावयानें नाहीं आणि त्यांनीं, बँकिंग, विमा, आगबोटींची वहातुक इत्यादि क्षेत्रांत पाऊल टाकलें पाहिजे असा उपदेश करून, एकमेकांशीं घातुक स्पर्धा करण्यानें

सर्वांचें नुकसान होत असल्याकारणानें संघशक्तीनें युरोपिअन समाजाप्रमाणें वागावें असा इशाराहि त्यांच्या भाषणांत होता. मारवाडी समाजांत जुगारीची प्रवृत्ति वाढत आहे तिचा रायबहादुरांनीं निषेध केला आणि जुटीनें वागण्याचें महत्व परिषदेच्या निदर्शनास आणलें. त्यांनीं प्रदर्शित केलेल्या विचारांपासून महाराष्ट्रीत जनतेनें पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे, हें सांगावयास नको.

## सिलोनमध्यें आर्थिक जागृति

लहान आणि परसत्तेखालीं असलेल्या राष्ट्रांमध्येंहि स्वतःची आर्थिक उन्नति करून घेण्याची इच्छा किती प्राबल्यानें जागृत झाली आहे आणि तिला अनुसरून त्यांचे शिस्तवार प्रयत्न कसे चालू आहेत, ह्याची कल्पना सिलोनच्या उदाहरणावरून येईल. त्या देशाचे व्यापार-धंद्यांचे मंत्री, मि. पेरी सुंदरम्, ह्यांनीं मद्रासला नुकतीच मुलाखत दिली, तीमध्यें आपण स्वदेशाच्या आर्थिक उन्नतीसाठीं कोणत्या योजना आंखल्या आहेत, ह्याचें दिग्दर्शन त्यांनीं केलें. सिलोनमध्यें उद्योगधंदे स्थापन करण्याचें निश्चित झालें असून त्या धोरणाची अंमलबजावणी व्हावी म्हणून एक औद्योगिक सल्लागार नेमण्यांत आलेला आहे. औद्योगिक संशोधन आणि विस्तार ह्यांविषयींचे प्रश्न एका स्वतंत्र कमिटीकडे सोंपवले असून देशांत उपलब्ध असलेल्या कच्च्या मालाची पहाणी व्हावयाची आहे. मोठ्या उद्योगधंद्यांस द्रव्यसहाय देण्याच्या हेतूनें, सर सोराबजी पोचखनवाला ह्यांच्या शिफारशीवरून सरकारी मदतीनें चाललेली औद्योगिक बँक स्थापन व्हावयाची आहे व ह्या संबंधांत एक कायदा करण्याचेंहि घाटत आहे. सरकारी सहायानें थोड्याच वर्षांत सिलोनमध्यें उद्योगधंद्यांचा चांगला विस्तार होईल अशी मि. सुंदरम् ह्यांस उमेद वाटत आहे. देशाची आर्थिक दृष्टीनें पहाणी करण्याचेंहि घाटत असल्याचें त्यांनीं आपल्या मुलाखतींत सांगितलें. सरकारनें वरील प्रकारचें आर्थिक धोरण अंगीकारावें, अशी मागणी हिंदुस्थानांत केली जात आहे, त्यांत विपरीत असें कांहींच नसून, उलट, तें राष्ट्रीय सरकारचें कर्तव्य आहे, ह्याविषयीं वास्तविकपणें शंका उद्भवण्याचें आतां कारण उरलेलें नाहीं.

## कॉमनवेल्थ विमा कंपनीच्या मुंबई शाखेची स्थापना

कॉमनवेल्थ विमा कं. लि. च्या मुंबई येथील शाखेचा उद्घाटन समारंभ रविवार ता. ५ रोजीं मुंबईचे मेयर मि. नरिमन ह्यांचे हस्तें मोठ्या थाटानें झाला. कॉमनवेल्थ कंपनीची स्थापना नोव्हेंबर १९२८ मध्यें झाली व तिनें अल्पावधींत लोकप्रियता संपादन केली. कंपनीचें १९३५ अखेर तिसरें मूल्यमापन झालें व विमेदारांस हयातीमधील व हयातीनंतरच्या विम्यांवर अनुक्रमें ३७½ व ४५ रुपये त्रैवार्षिक बोनस मिळालें. मुंबई येथें आपल्या शाखेची स्थापना करून तिनें प्रगतीचें आणखी एक पाऊल टाकलें आहे. गेल्या सहा वर्षांत कॉमनवेल्थ कंपनीनें केलेली प्रगति अत्यंत समाधानकारक असून आपलें कार्यक्षेत्र वाढविण्यास तिनें आतां सुरवात केली आहे. मुंबई येथील शाखेमुळें कंपनीच्या कार्याचा प्रसार होण्यास उत्कृष्ट सहाय मिळेल, अशी आशा आहे.

## हिंदुस्थानांतले कारखाने

कारखान्यांच्या कायद्याखालीं येणारे असे सुमारें ९¾ हजार लहान मोठे कारखाने १९३४ साल अखेर हिंदुस्थानांत होते. त्यांपैकीं ८,६५८ चालू होते, म्हणजे पूर्वीच्या सालापेक्षां हा आंकडा २०६ नें ज्यास्त होता. ह्या कारखान्यांतले निम्याच्यावर वर्षांतून कांहीं काळपर्यंत चालणारे असून बाकीचे सबंध वर्षभर चालत होते. मद्रास, मुंबई व पंजाब ह्या प्रांतांत कपाशीची सरकी काढण्याचे व गठ्ठे बांधण्याचे कारखाने बरेच वाढले. १९३४ मध्यें १४ लक्ष ८७ हजार मजूर कारखान्यांत कामावर होते आणि १९३३ सालाच्या मानानें ह्या संख्येंत सुमारें ८२ हजारांची वाढ झाली. तागाच्या कारखान्यांत अडीच लक्षांवर मजूर काम करीत होते व त्यांच्या संख्येंतहि वाढ झालेली दिसून आली. कपाशीच्या कापडाच्या गिरण्यांत ३ लक्ष ८५ हजार कामकरी होते व पूर्वीच्या सालचा हा आंकडा ३ लक्ष ६४ हजार होता. साखरेच्या कारखान्यांतल्या मजूरांची संख्या एका वर्षांत ४९ हजारांपासून ६५ हजारांवर गेली. मजूरी करणाऱ्या मुलांची संख्या कमी होत चालली असून १९३४ अखेर ती १९ हजार होती. स्त्री मजुरांच्या संख्येंत थोडी वाढ होऊन ती २ लक्ष, २० हजार झाली. कारखान्यांत २० हजार अपघात झाले; १९३३ सालच्या मानानें हा आंकडा २ हजारांनीं अधिक होता. मजुरांसाठीं चाळी बांधण्याच्या कामांत प्रगति दिसून आली. कायद्याचे नियम मोडल्याबद्दल १,४६८ खटल्यांत आरोपाची शाबीती झाली.


"दुसरें मूल्यमापन जाहीर झालें"

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली

पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:–

**कॉमनवेल्थ विमा कंपनी, लि. पुणें.**

अध्यक्ष–श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला | हयातीनंतर विम्यास |
| --- | --- | --- |
| ३७॥ रु. | दर हजारीं त्रैवार्षिक नफा | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां भेटा अगर समक्ष लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.



"अर्थ" ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. (ट. ख. निराळा)

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला
पुणें ४.

## तेलाच्या घाण्या

गळिताच्या बियांचें हिंदुस्थानांत होणारें उत्पन्न सर्व जगांत होणाऱ्या उत्पन्नाच्या एक पंचमांश आहे. एके काळीं या उत्पन्नाचा बराच भाग परदेशीं जात असे. परंतु ही निर्गत अलीकडे बरीच कमी झाली आहे. १९२८–२९ सालीं १३ लक्ष टन माल बाहेर गेला परंतु दर सालीं निर्गत थोडी थोडी कमी होऊन ती १९३२–३३ सालीं ७ लक्ष २६ हजार टनापर्यंत खाली आली. रुपयांत बोलावयाचें झाल्यास १९२८–२९ सालीं २९ कोटी ३७ लक्ष रुपयांची निर्गत, १९३२–३३ सालीं ११ कोटी १६ लक्ष रुपयांवर आली. अशा प्रकारें निर्गत कमी होऊन तेल हिंदुस्थानांतच गाळलें गेलें तर एका धंद्याची वाढ होऊन त्यांत हिंदुस्थानचाच फायदा आहे. तेल गाळण्याच्या धंद्याची वाढ कशा प्रकारें व्हावी याबद्दल मतभेद होण्याचा संभव आहे. कांहींच्या मतें तेल काढण्याच्या मोठाल्या गिरण्यांचा प्रसार होऊन तेल काढण्याचीं सोईचीं केंद्रें निघाल्यास धंदा फायदेशीर होईल. इतर कांहींच्या मतें तेल गाळणें हा शेतीला जोड धंदा किंवा दुय्यम धंदा असावा. त्या योगानें खेडेगांवच्या लोकांच्या मिळकतीची एक बाब खेड्यांत राहील. कांहीं धंदे असे आहेत कीं थोड्या प्रमाणांत मोठ्या यंत्राच्या सहाय्यावांचून चालविल्यास परवडणार नाहींत व त्यांपासून नुकसान येण्याचा संभव आहे. असे धंदे गिरण्या काढूनच चालविले पाहिजेत. परंतु सर्वच धंदे अशा प्रकारचे असतात असें नाहीं. कांहीं धंदे लहान प्रमाणांतहि फायदेशीर होऊं शकतात. तल गाळण्याचा धंदा या दुसऱ्या सदरांत येतो. बैलानें चालणाऱ्या तेल काढण्याच्या घाण्या फायदेशीर आहेत व कांहीं प्रसंगीं अडचणींतून तगून बाहेर पडण्यास गिरण्यांपेक्षां अधिक सोईच्या आहेत असें शोधाअंतीं आढळून आलेलें आहे. मुंबई इलाख्यांत एकंदर चाळीस–पंचेचाळीस तेलाच्या गिरण्या आहेत व सरासरी चवदा–पंधरा हजार तेलाच्या घाण्या आहेत. तेलाच्या गिरण्या जितक्या फायदेशीर करतां येणें शक्य असेल तितक्या त्या फायदेशीर करण्याचा प्रयत्न करणें हें जरूर आहे. त्याचप्रमाणें, आज मुंबई इलाख्यांत असणाऱ्या चवदा-पंधरा हजार घाण्या अधिक कार्यक्षम करणें व त्यांचा फायदा वाढविणें हें अत्यंत जरूर आहे. जो धंदा हल्लींच्या परिस्थितीशीं झगडून टिकणें शक्य नाहीं, अशा धंद्याला मदत करण्यापेक्षां जो धंदा स्वतःच्या पायावर उभा राहणें शक्य आहे त्याचा पाया भक्कम करून त्याला स्थायिक करणें अधिक श्रेयस्कर होय.

तेलाच्या घाण्या हल्लींच्या परिस्थितीला तोंड देऊन जगल्या आहेत; परंतु त्या आहेत यापेक्षां चांगल्या स्थितींत राहून लोकांच्या गरजा अधिक प्रमाणांत भागविण्याची ताकद त्यांच्यांत आली पाहिजे. या दृष्टीनें विचार केल्यास त्यांत सुधारणा होणें जरूर आहे. उदहरणार्थ, हल्लीं घाणींतून एका दिवसांत जितकें तेल निघतें त्यापेक्षां जास्त तेल, घाणावर हल्लीं होणारा खर्च न वाढवितां, काढणें ही सुधारणा घ्या.या बाबतींत आपल्या कडील यंत्रांतील तज्ज्ञ लोक व इंजिनिअर लोक,ह्यांनीं घाणीचा बारकाईनें आभ्यास करून त्यांत कोणत्या प्रकारच्या सुधारणा करतां येणें शक्य आहे हें ठरवून त्या घडवून आणल्या पाहिजेत. सरकारनें सुधारणा घडवून आणणाराला बक्षीस देण्याचें जाहीर केल्यास त्याचा बराच उपयोग होईल. घाणीची थोडी जरी तेल काढण्याची शक्ति वाढली तरी त्यापासून जनतेचें पुष्कळ कल्याण होणार आहे.

तेल घाणींतून निघो किंवा गिरणींतून निघो, त्यांत थोडे आम्ल पदार्थ असतात. त्यांचा घशावर परिणाम होऊन खोकला वगैरेसारखा त्रास होण्याचा संभव असतो. तेव्हां हा दोष नाहींसा करण्याचा तेल्यांना सहजगत्या जमेल असा उपाय सुचविणें, ही दुसरी महत्त्वाची गोष्ट आहे.

तेल किंवा पेंड फार दिवस टिकत नाहीं. विशेषतः भुइमुगाचें तेल व त्याची पेंड लवकर खराब होते. हे पदार्थ जास्त दिवस टिकण्यास काय करावें यासंबंधानें सुद्धां तेल्यांना सूचना देणें किंवा माहिती करून देणें जरूर आहे.

वर सांगितलेल्या गोष्टींकडे सरकारचें व तज्ज्ञांचें लक्ष जाणें आवश्यक आहे. त्या घडवून आणणें हें अशक्य किंवा अवघड कोटींपैकीं नाहीं. त्या दिशेनें प्रयत्न झाल्यास त्या खात्रीनें साध्य होतील व आपल्या एका जुन्या धंद्यास उत्तेजन मिळेल.

द. ल. स.

---

## रानटी लोक व आधुनिक शिक्षण

### शिक्षणाचा प्रतिकूल परिणाम

ब्रिटिश राज्य किंवा सत्ता ह्यांची जाणीवहि नाहीं असे लक्षावधि लोक आज हिंदुस्थानांत जंगलांतून व डोंगराळ मुलुखांतून आपली उपजीविका करीत आहेत. कित्येकांचीं गांवें स्वयंसत्ताक आहेत व बाहेरून एक शब्दहि त्यांचे कानावर पडत नाहीं. मिशनरी लोकांच्या प्रयत्नांमुळें कांहीं रानटी लोक सुधारणेशीं परिचित झाले असले तरी त्यांची संख्या अत्यंत अल्प आहे. धनुष्य–बाणानें शिकार करून किंवा फळें व मुळें ह्यांवर अवलंबून राहून आपलें पोट भरणारे रानटी लोक अद्याप आढळतात.

१९३१ सालीं घेण्यांत आलेल्या खानेसुमारीचें वंशविस्तार-विषयक परिशिष्ट आतां प्रसिद्ध झालें आहे, त्यांत हिंदुस्थानांतील मागसलेल्या व रानटी जातीविषयींचीं निरीक्षणाचीं टिपणें समाविष्ट केलीं आहेत. हिंदी व युरोपियन ह्या दोन्ही निरीक्षकांचें एका बाबतींत ऐकमत्य दिसून येतें, ती बाब म्हणजे रानटी लोकांची होणारी पिछेहाट ही होय. सुधारणेशीं जेव्हां त्यांचा संपर्क सुद्धां झाला नव्हता त्यावेळीं त्यांचें जीवन सुखी व समाधानाचें होतें. त्यांच्या मुलाबाळांस पोट भरण्यास योग्य असें शिक्षण सहज मिळे व कालांतरानें तीं मोठीं झाल्यावर कुटुंबाचा भार सहन करूं शकत. जंगली लोकांचें अन्न साधें असलें तरी त्यांच्या रोजच्या जीवनक्रमास तें साजेसें होतें. परंतु आतां डोंगराळ मुलूख व खालचा प्रदेश ह्यांत दळणवळण सुरू झाल्यामुळें इन्फ्लुएंझा, क्षय, देवी, पटकी, इत्यादि सुधारणेच्या रोगांनीं जंगलांत प्रवश केला आहे. ह्याहूनहि ज्यास्त नुकसान यंत्रांनीं आरंभिलें आहे. आगकाड्यांच्या सहायानें विस्तव करतां येऊं लागला तर तो कोणास नको आहे ? त्यामुळें, मजुरी करून रोजच्या कमाईच्या पैशानें लहान-सहान चैनीच्या वस्तु आयत्या विकत घेण्याची प्रवृत्ति जंगली लोकांत वाढत आहे. साक्षरतेनें व शिक्षणानें त्यांची भूक तर भागत नाहींच, परंतु नव्या नव्या कल्पना त्यांच्या डोक्यांत शिरून पैशाचे अभावीं त्यांचे नाशास मात्र त्या कारणीभूत होतात.

जंगली व रानटी लोकांना नागरिकत्वाचे धडे देऊन त्यांस समाजघटनेंत स्थान प्राप्त करून देणें अत्यंत अवघड व चिकट काम आहे. जोपर्यंत त्यांचेसाठी उपजीविकेचें साधन निर्माण करून देतां येणें कठीण आहे, तोंपर्यंत बसलेली घडी विसकटण्यांत तरी काय फायदा ? त्यापेक्षां ज्यास्त जिव्हाळ्याचे व महत्त्वाचे प्रश्न आज हिंदी कार्यकर्त्यांपुढें उभे आहेत.

## ब्रिटिश सिनेमाचा धंदा

### कांहीं मनोरंजक आंकडे

ह्या धंद्याची प्रगति इंग्लंडमध्यें किती झाली आहे आणि त्याची परिस्थिति काय आहे, ह्याविषयींची चांगली माहिती प्रसिद्ध झालेली आहे. ती लक्षांत घेतां ह्या प्रकारचीच हिंदी सिनेमाच्या धंद्यासंबंधानें माहिती उपलब्ध होईल, तर तें बोधप्रद आणि उत्तेजनकारक होण्यासारखें आहे. चित्रपटांची प्रगति हिंदुस्थानांत झपाट्यानें चालली आहे, नवीन सिनेमागृहें उभारलीं जात आहेत आणि त्यांत प्रेक्षकांची गर्दी वाढत आहे. ब्रिटिश सिनेमोटोग्राफ सोसायटीप्रमाणें येथील चित्रपटांच्या मध्यवर्ती संस्थेनें हें काम हातीं घेतल्यास हिंदुस्थानांतील सध्याच्या परिस्थितींत तें उपकारक होईल.

ग्रेट ब्रिटनमध्यें १९३४ सालीं ४,३०५ सिनेमागृहें होतीं. त्यांपैकीं शेकडा ७० लंडनमधल्या सामान्य गृहांपेक्षां लहान असून त्यांत एक हजार व त्याहून कमी माणसें बसण्याची व्यवस्था होती. ३१ मार्च १९३५ ला पूर्ण झालेल्या वर्षांत मोठ्या चित्रपटांचे ६६७ विषय रजिस्टर्ड झाले होते व पटांची लांबी ४३ लक्ष फूट होती. ह्यापैकीं २९ टक्के ब्रिटिश चित्रपट होते व त्यांची लांबी ११ लक्ष ८६ हजार फूट होती.

प्रत्येक ब्रिटिश चित्रपट सरासरीनें ७,४२० वेळां दाखविण्यांत आला व परदेशी चित्रपटासंबंधाचा तुलनात्मक आंकडा ६,९०० होता.

सिनेमागृहांत लोकांनीं तिकिटांवर ५३ कोटि रुपये खर्च केले, त्यांपैकीं सुमारें ८ कोटि रुपये कराच्या स्वरूपांत सरकारी तिजोरींत गेले. कर वजा जातां बाकीच्या उत्पन्नापैकीं ४२ टक्के रकम हलक्या दराच्या म्हणजे ५ आणेवाल्या तिकिटांच्या विक्रीनें मिळाली व ३६½ टक्के उत्पन्न १० आण्यांपेक्षां अधिक नाहीं अशा किंमतीच्या तिकिटांचें झालें. म्हणजे, पांचांपैकीं चार लोक ९ आणे किंवा त्यापेक्षां कमी किंमतीचें तिकिट विकत घेऊन इंग्लंडमध्यें सिनेमा पहातात असें झालें. त्या देशांतलें उच्च रहाणीचें मान लक्ष्यांत घेतां सिनेमाची करमणूक तेथील जनतेस अतीशय स्वस्त उपभोगावयास मिळते असें म्हणण्यास हरकत नाहीं. दर आठवड्यास सरासरीनें १ कोटि ८५ लक्ष तिकिटें खपतींत. अर्थातच कांहीं महिन्यांत तिकिटांचा खप ज्यास्त असतो, तर कांहींमध्यें कमी असतो.

एका वर्षांत ९५ कोटि तिकिटें विकत घेतलीं जातात, ह्याचा अर्थ, ग्रेटब्रिटनमधील प्रत्येक माणूस, ( बायका, मुलें धरून ) २२ वेळां सिनेमागृहांत जातो, असा आहे.

त्या देशांत १९३४ अखेर प्रत्येक दहा हजार माणसांगणिक एक सिनेमागृह होतें आणि बारा माणसांगणिक त्यांत बसण्याची एक जागा होती. देशाच्या निरनिराळ्या भागांत हे आंकडे भिन्न भिन्न असणें स्वाभाविक आहे.

एक हजारापेक्षां कमी माणसें बसण्याची सोय असलेलीं सिनेमागृहें अनेक आहेत. असल्या गृहांची संख्या ३,०८२ होती म्हणजे एकूण सिनेमागृहांच्या ७१ टक्क्यांइतकीं तीं होतीं. रविवारीं चालू असलेल्या गृहांची संख्या फार थोडी म्हणजे केवळ ८७४ असून त्यांपैकीं ४९० लंडन किंवा त्याच्या आसपासच्या भागांत होतीं. ग्रेटब्रिटनमध्यें तयार झालेल्या चित्रपटांची लोकप्रियता वाढली आहे. हिंदी चित्रपटांसंबंधानेंहि हिंदुस्थानचे बाबतींत हेंच विधान करण्यास हरकत नाहीं.

---

## मननीय उद्गार

### हिंदी कच्च्या मालाचें गिऱ्हाईक गेलें !

हँबूर्ग ( जर्मनी ) येथील हिंदुस्थान सरकारचे व्यापारी प्रतिनिधि, श्री. गुप्त, आय. सी. एस., हे आपल्या १९३४–३५ च्या अहवालांत म्हणतातः—

" जर्मनीनें इतर देशांबरोबर परस्पर-व्यापाराचे करार केले असल्यामुळें कच्चा माल येण्याचीं त्याचीं ठिकाणें बदललीं आहेत; हिंदुस्थानांतून पुरवठा होत असे, तो आतां इतर देशांतून होतो. जर्मनीमधील विशिष्ट अडचणींचें निवारण आणखी दहा वर्षांत तरी होण्याचें चिन्ह नाहीं. तेव्हां, दहा वर्षेपर्यंत जर्मनीनें इतर देशांचा माल घेतला, तर त्यानंतर नव्या परिचयामुळें व संवयीमुळें पुनः हिंदी मालास तेथें मागणी येण्याचा संभव नाहीं."

### इंग्लंडची जपानच्या आकांक्षांकडे पहाण्याची दृष्टि

ग्रेटब्रिटनचे जपानमधील एका काळचे वकील, सर फ्रॅन्सिस लिंडले, हे आपल्या एका भाषणांत म्हणालेः—

" पूर्व आशियांतील सर्वांत बलिष्ठ राष्ट्राचें वैर संपादन करण्यापूर्वीं आपण नीट विचार केला पाहिजे. जपानशीं मैत्री राखणें हें धोरण सर्वश्रेष्ठ होय. जर आपण चीनला खरीखुरी मदत देऊं शकूं व तसें करण्याची आपली इच्छा असेल, तरच त्या देशाविषयीं सहानुभूति दाखवावी. एरव्हीं नुसती अपेक्षा उत्पन्न करण्यांत अर्थ नाहीं. इतर देशांस सहानुभूति दाखवून त्यांस मदत मात्र न केल्यामुळें ह्या राष्ट्राचें किती तरी नुकसान झालें आहे. "

### रेडिओच्या धंद्यास मुबलक वाव

मुंबई येथें भरलेल्या रेडिओ प्रदर्शनाचें उद्घाटन ब्रॉडकास्टिंगचे कंट्रोलर, मि. फील्डेन, ह्यांनीं केलें, त्यावेळीं ते म्हणालेः—

"ह्या प्रदर्शनांत भारी किंमतीचे कित्येक रेडिओ सेट्स आले आहेत, परंतु सामान्य मनुष्याच्या आवाक्यांत त्यांची किंमत येणें जरूर आहे. परदेशी सेटनीं हिंदी बाजारपेठ कां काबीज करावी ? येथें रेडिओ तयार करण्याचा धंदा सुरू कां होऊं नये ? अजून ह्या धंद्यास वाव आहे व सरकार रेडिओचा प्रसार करण्यास आतुर आहे, तेव्हां व्यापाऱ्यांनीं व कारखानदारांनीं वेळींच सावध होणें जरूर आहे. "

### आमच्या मुलांचें शिक्षण ( ? )

सर डग्लस यंग हे हिंदुस्थानासंबंधीं बोलतांना आपल्या एका भाषणांत म्हणालेः—

" हिंदुस्थानांतील बहुसंख्याक मुलें अशा परिस्थितींत वाढविण्यांत येतात, कीं तीं पुढें चांगले नागरिक होण्यास नालायक ठरतात. जातिवैमनस्य व लांचलुचपत ह्यांत गैर कांहींच नाहीं, अशी त्यांची समजूत होते. आपल्या गांवांतील लहानसहान अधिकाऱ्यांची पैसेखाऊ वृत्ति खेडेगांवांतील हुशार मुलांच्या नजरेस सहज येते. ह्या खेरीज भटकणारे भिकारी व सावकार हे सामाजिक उत्पन्नाच्या वांटणींतील आपला हिस्सा घेतातच. स्थानिक नोकरांचे पगार इतके अल्प असतात, कीं जणूं काय अन्य मार्गानें त्यांनीं ज्यास्त पैसे मिळवावे, हें गृहीतच धरलेलें असतें. लांचलुचपतीचे प्रकार आज शेंकडों वर्षें चालत आलेले आहेत. व त्यांतून सुटका होणें शक्य नाहीं, अशा अर्थाचें बाळकडू लहान मुलांस मिळतें. त्यांच्या करमणुकीकडे कोणी पहात नाहीं व दानत निर्माण व्हावी, असा कोणी प्रयत्न करीत नाहीं. "—

## कपाशीच्या भावांतला तुलनात्मक मेळ ( पॅरिटी )

( २ )

न्यूयॉर्क, लिव्हरपूल व मुंबई येथील बाजारांत कापसाच्या भावांचा परस्पर मेळ असतो, तो ठराविक प्रमाणांत सारखा स्थिर मात्र रहात नाहीं. कापसाची प्रत, बाजारांमधलें अंतर, वहातुकीचा खर्च इत्यादि बाबी ह्या मेळाच्या दरांत हिशेबांत धरलेल्या असल्या तरी निरनिराळ्या कारणांमुळें त्यांची ' पॅरिटी ' बदलते. ' पॅरिटी'चे अडाखे कसे बसवतात, हें मागील लेखांत सांगितलेंच आहे. पुन्हां एक उदाहरण घेऊन असें म्हणतां येईल कीं, भडोचचा भाव २३६ रुपये व लिव्हरपूलचा ६·८० पेन्स असला म्हणजे खंडीचें व रुपयांचें रूपांतर पौंड वजनांत व पेन्सांत करून भडोचचा दर ५·४२ पेन्स आहे असें गणित होईल. पण तो प्रत्यक्ष ६·८० पेन्स असल्यानें ' पॅरिटी'चा फरक १·३८ पेन्स होतो. त्याचप्रमाणें भडोच २४२ रुपये व लिव्हरपूल ६·८५ पेन्स असतांना ही तफावत १·३० इतकी येते. बॉंबे कॉटन ॲन्युअल ह्या वार्षिक अहवालांत ह्या प्रकारची आंकडेमोड करून दाखविलेली आहे. तिच्यांतले आंकडे श्री. सरय्या ह्यांनीं उद्धृत केले आहेत. त्यांपैकीं १९३४ सालामधले महिनेवार आंकडे खालीं दिले आहेतः—

१९३४

| माहिना | लिव्हरपूल (दर पौंडास पेन्स ) | भडोच (दर खंडीस रुपये) | दोहोंतली तफावत (दरपौंडास पेन्स ) | पॅरिटी लिव्हरपूरच्या भावाशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| जाने. | ५·६४ | १९७ | १·११ | १९·७ |
| फेब्रु. | ६·२६ | २०९ | १·४६ | २३·३ |
| मार्च | ६·२० | २०५ | १·४८ | २३·९ |
| एप्रिल | ५·९८ | १९८ | १·३८ | २३·३ |
| मे | ५·८८ | १९४ | १·४३ | २४·३ |
| जून | ६·३९ | २०९ | १·६० | २५·० |
| जुलै | ६·६३ | २२२ | १·५२ | २२·९ |
| ऑगस्ट | ६·९१ | २२८ | १·६७ | २५·२ |
| सप्टें. | ६·७५ | २१७ | १·७६ | २६·० |
| ऑक्टो. | ६·५५ | २०९ | १·७५ | २६·७ |
| नोव्हें. | ६·५४ | २१५ | १·६० | २३·६ |
| डिसें. | ६·७४ | २३० | १·४५ | २१·४ |
| जाने. ( १९३५ ) | ६·८२ | २४६ | १·१६ | १७·१ |

भडोच कापूस अमेरिकनपेक्षां १० टक्के हलका आहे असें मानलें आणि दोहोंच्या कोणत्याहि दिवसाच्या प्रत्यक्ष किंमतींच्या तुलनेंत तो १५ टक्के कमी आहे असें आढळलें तर पॅरिटींत भडोच ५ टक्के हलका आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. वरच्या कोष्टकांत भावांचें शतमान प्रमाण शेवटच्या रकान्यांत दिलें आहे, त्यांत निरनिराळ्या महिन्यांत निरनिराळी तफावत दिसून येते ह्यास मि. सरय्या ह्यांनीं सहा कारणें दिलीं आहेत, तीं अशीं:—

( १ ) मागणी–पुरवठ्याचा परस्पर संबंध
( २ ) दर वर्षाच्या पिकाची तुलनात्मक स्थिति
( ३ ) बाजारांत माल नेण्यास लागणारी वहातुक
( ४ ) हुंडणावळ आणि जकाती ह्यांबाबतचे निर्बंध
( ५ ) बाजारभावांचें कृत्रिम नियंत्रण
( ६ ) खरेदी विक्रींत सट्टेबाजी आणि मक्तेदारीचा यत्न

हिंदी कपाशीचें पीक एखाद्या वर्षी कमी झालें व अमेरिकेचें भरपूर झालें तर पॅरिटींत हिंदी कापूस चढेल, व ह्याच्या उलट परिस्थिति असेल तर परिणामहि उलट होईल. पिकें चांगलीं किंवा वाईट येणें ह्याचाहि परिणाम वरील दिशेनेंच होणें अपरिहार्य आहे. वहातुकीची बाब याच प्रकारची आहे. हिंदी कपास जपान सारख्या बाजारांत खपते व तेथें अमेरिकन कपाशीशीं तिची स्पर्धा होते. जो माल कमी खर्चानें ह्या बाजारांत जाऊन पडेल, त्याची किंमत अनुकूल ठरणार, हें; उघड आहे. हिंदुस्थानांत कापसाच्या आयातीवर जकात बसवली तरी हिंदी कापसास त्यापासून फायदा होत नाहीं, ह्याचें कारण तरी हेंच आहे. नवसरी सारख्या विशिष्ट दर्जाच्या कापसाची गोष्ट निराळी आहे. मागणीच्या मानानें त्याचा पुरवठा कमी असतो आणि २४½ रुपये खंडी ह्याप्रमाणें जकात भरून अमेरिकन कापूस ज्या भावास येथें विकेल त्या मर्यादेपर्यंत नवसरीचा भाव चढेल व त्याची पॅरिटी ज्यास्त आहे असें म्हणतां येणार नाहीं. अमेरिकन सरकारनें कपाशीचे भाव कृत्रिम रीतीनें चढवण्याचा केलेला प्रयत्न किंवा मंदीवाल्यांचा बाजारावर केलेला हल्ला इत्यादि गोष्टींचा ' पॅरिटी'वर तात्कालिक परिणाम होतो हें सांगावयास नको. तथापि, हा परिणाम दीर्घकाल टिकणें शक्य नसतें. मागणी-पुरवठा आणि स्पर्धा वगैरे कारणांचा जोर होऊन पॅरिटीचें पारडें फिरून जागेवर आल्याशिवाय रहात नाहीं. न्यूयॉर्क, लिव्हरपूल व मुंबई येथील बाजारांत जाहीर होणाऱ्या रोजच्या कापसाच्या भावांत निश्चित मेळ ( पॅरिटी ) असलाच पाहिजे व तो बिघडतो तेव्हां त्यांत कांहीं तरी गुप्त कारवाई असते अशी जी सामान्य जनतेची समजूत होते, तिला अनुलक्षून श्री. सरय्या ह्यांनीं वस्तुस्थितीचें स्पष्टीकरण केलें आहे तें वरील विवेचनावरून किती उपयुक्त आहे, ह्याची कल्पना वाचकांस आलीच असेल. (समाप्त)

प्रो. काळे ह्यांचें सर्वांस उपयुक्त पुस्तक

### बँका आणि त्यांचे व्यवहार

ह्या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजांची पद्धति ह्यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून, बँकांनीं आपला कारभार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा ह्या बाबतींत उपयुक्त सूचना केल्या आहेत. त्यांत चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँक, सावकारी धंदा, आर्थिक मंदी, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक प्रश्नांची सांगोपांग चर्चा आली आहे. सध्यांच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास तें बोधप्रद होईल अशा रीतीची पुस्तकाची मांडणी व विवेचनपद्धति आहे. बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाईक, व्यवस्थापक आणि नोकर ह्यांनीं तें अवश्य वाचून त्याचें मनन केलें पाहिजे.

कापडी बांधणी किंमत १ रु.

प्रती, आर्यभूषण प्रेस, पुणें, यांचेकडे मिळतील.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | ११०–१५ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९—८ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—८ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११६—८ |
| ४% १९६०–७० ... ... | ११०—६ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९६—६½ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०५–१० |
| ४% १९४३ ... ... ... | १०८–१२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०५—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०५—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०५—४ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | १०५—४ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | १०९—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२१—४ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडियां ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२६ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०५—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३६–१० |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५७६—४ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १२९—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | ९८—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९२—८ |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९०७—८ |


## ' अर्था 'चे किरकोळ अंक

### खालील ठिकाणीं मिळतात.

पुणें १ आर्यभूषण छापखाना कचेरी.
२ एन. ए. अँड फ्रेंडस्, अप्पा बळवंत चौक.
कोल्हापूर रा. शं. गोखले, रामकृष्ण कार्यालय.
सोलापूर व्ही. के. भागवत, हनुमान कार्यालय.


## वर्गणीदारांस सूचना

१ जानेवारी, १९३६ रोजीं 'अर्था' चें दुसरें वर्ष सुरू झालें. गेल्या वर्षाची ज्यांची वर्गणी अजून यावयाची असेल, त्यांनीं ती नव्या वर्गणीबरोबर सत्वर पाठवावी. ज्यांची मुदत संपली असेल, त्यांनीं अंक नको असल्यास तसें कळवावें.

व्यवस्थापक, 'अर्थ'


# MARATHE & Co.

## ENGINEERS & IRON FOUNDERS

| WORKS : | Can undertake to do any sort of casting. | OFFICE : |
|---|---|---|
| Natu Bag, | We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act. | 978-79, |
| Bhikardas Road, | | Sadashiv, Laxmi Rd., |
| POONA 2 | **Our prices are very competitive.** | POONA 2 |

# S. B. JOSHI & Co.

## ENGINEERS & CONTRACTORS

| 41 A, Bruce Street Bombay | 716, Sadashiv Peth Poona City |
|---|---|

प्रो. काळे ह्यांचें

'अर्थ' ग्रन्थ मालेंतील तिसरें पुस्तक

## व्यापारी उलाढाली

महाराष्ट्रांत व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांचा उत्कर्ष व्हावा असें प्रत्येकास वाटतें, परंतु ह्या संबंधांत जे व्यवहार चालतात त्यांची माहिती फार थोड्या लोकांस असते. सामान्य जनतेस कमाईतून बचत करण्याची संवय लागून तीमधून निर्माण होणाऱ्या द्रव्यसंग्रहाचा उपयोग, व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या अभिवृद्धीकडे व्हावा, ह्याकरितां औद्योगिक व व्यापारी मंडळ्या ह्यांचे व्यवहार कसे चालतात, बाजारांत निरनिराळ्या प्रकारांच्या उलाढाली कशा होतात, इत्यादि विषयांचें ज्ञान महाराष्ट्रीय समाजांत पसरणें आवश्यक आहे. वृत्तपत्रांमध्यें व ऐकिवांत ह्या संबंधांत ज्या बातम्या येतात, त्यांचें रहस्य ओळखण्याची पात्रता लोकांमध्यें उत्पन्न झाली पाहिजे. हें ज्ञान महाराष्ट्रीय लोकांस सुगम रीतीनें व्हावें, ह्या उद्देशानें प्रस्तुत पुस्तक मुद्दाम लिहिलें आहे आणि त्याचा योग्य उपयोग जनता करून घेईल असा ग्रंथकर्त्यांस विश्वास वाटत आहे.

पृ० १४३—किंमत १ रुपया. ( ट. ह. वेगळें )

**मिळण्याचीं ठिकाणें:—**

( १ ) व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रंथमाला, पुणें ४.
( २ ) आर्यभूषण प्रेस, पुणें २.
( ३ ) दि को-ऑपरेटर्स बुक-डेपो, ९ बेकहौस लेन, फोर्ट, मुंबई.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

## NEW BUSINESS

**This year 1934-35**
**Exceeds**
**2 CRORES & 50 LAKHS**

## BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment **Rs. 23** On Whole Life **Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches:* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca,

*Offices:* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.



## काटकसर आणि चढाओढ

सध्यांचे आर्थिक मंदीचे दिवसांत अधिक काटकसर कशी करितां येईल हा विचार प्रत्येकापुढें आहेच. संस्था, ऑफिस, कारखाना, घर इ० सर्व ठिकाणीं काटकसरीचा प्रयत्न सुरू आहे.

परंतु

वेळेची काटकसर करणें आरोग्याशिवाय कसें शक्य होईल, आणि आरोग्य मिळण्यास व टिकविण्यास उपाय काय !

याचें उत्तर

## आरोग्यमिश्रण

याचे सेवनानें

शौचास साफ होऊं व तरतरी आणि

लागून भूक वाढते उत्साह हीं वाढतात.



बोधचिन्ह

सर्व एजंटांकडे मिळतें.

श्रीधूतपापेश्वर आर्यौषधि कारखाना,

पनवेल—कुलाबा.



## डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें

मध्यम वर्गांतील गृहेच्छु लोकांस | अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य

## भाडेकरी–घरमालक–गृहयोजना

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.

जनरल मॅनेजर



# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

## रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये !

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

## महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचा मजबूत पाया

**मध्यप्रांत व वऱ्हाड**

हायस्कूल, मिडल स्कूल व नॉर्मल स्कूल ह्यांतील शिक्षकांच्या ग्रंथालयासाठीं मंजूर

# अर्थ

[ व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि आर्थिक विषयांस वाहिलेलें साप्ताहिक ]

संपादक : प्रो. वा. गो. काळे

सहायक : श्री. श्री. वा. काळे

**मुंबई इलाखा**

सरकारी व सरकार-मान्य शाळांत व ट्रेनिंग कॉलेजांत घेण्यासाठीं मंजूर

महाराष्ट्रीयांचीं मनें उद्योगधंदे, व्यापार, इत्यादि धनोत्पादक व्यवहारांकडे वळून त्यांस ह्या विषयांची गोडी लागावी, या दृष्टीनें 'अर्था'ची मांडणी केलेली असते. व्यापारी, शिक्षक, विद्यार्थी, सार्वजनिक कार्यकर्ते व सर्वसाधारण नागरिक ह्या सर्वांनीं 'अर्था'चें वाचन केलें असतां महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीचा मजबूत पाया तयार झाल्याखेरीज रहाणार नाहीं. उद्योगधंद्यांत असणाऱ्या, त्याचप्रमाणें त्यांत नव्यानें पडणाऱ्या सर्वांस हें पत्र मार्गदर्शक होईल.

प्रत्येक महाराष्ट्रीय कुटुंबांत व शाळेंत अर्थ वाचला जाणें आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी फक्त चार रुपये असून टपालखर्च वेगळा नाहीं. मनिऑर्डर पाठवून वर्गणीदार व्हा.

व्यवस्थापक, **अर्थ**, अर्थ ऑफिस, पुणें ४

**'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।**



शेअर विक्री सुरू आहे

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १० लक्ष |
| तूर्त विक्रीकरितां काढलेलें भांडवल | ... | रु. ५ लक्ष |

प्रत्येक शेअरची किंमत रु. ५०

१ अर्जासोबत प्रत्येक शेअरला रु. १५/–
२ अर्जमंजुरीनंतर रु. १०/– } प्रमाणें.

बाकी रक्कम "अनकॉल्ड रिझर्व्ह" म्हणून राहील.

संचालक मंडळाचे अध्यक्षः—प्रो० वा. गो. काळे, एम्. ए., एक्स् मेम्बर, इंडियन टॅरिफ बोर्ड.

" उपाध्यक्षः—श्री. घोंडो कृष्ण साठे, बी.ए., बी. एससी., व्यापारी व कॉन्ट्रॅक्टर, पुणें.

प्रॉस्पेक्टस व शेअर अर्जाच्या नमुन्याकरितां लिहा:—

पुणें:—मॅनेजर, दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

मुंबई:—आर. आर. नावर आणि कं., शेअर व स्टॉक ब्रोकर, एक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, कोट.

नागपूर:—एस. एन. आगाशे आणि कं., चीफ एजन्टस, कॉमनवेल्थ इन्शु. कं. लि., महाल.



**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

**एन. ए. ॲन्ड फ्रेन्ड्स**
स्टेशनर्स, जनरल मर्चन्टस, ॲन्ड कमिशन एजन्टस.
आप्पा बळवंत चौक, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा घ. नं. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख १५ जानेवारी, १९३६. अंक ३

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "
स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली
पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—
कॉमनवेल्थ विमा कंपनी, लि. पुणें.
अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी
हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.
जास्त माहितीकरितां भेटा अगर समक्ष लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

न. वि. वडनेरकर
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.
आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.
शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

पहिल्यानें सुरक्षितता
रस्त्यावरून जातांना तुम्हीं सुरक्षिततेचा मार्ग पहिल्यानें पहातां. हीच गोष्ट पैसे बँकेंत किंवा विम्यांत गुंतविण्यासंबंधीं आहे. पहिल्यानें तुम्ही पैशाची सुरक्षितता पहातां; नंतर व्याज किंवा बोनस.
हिशेब तपासणी आणि प्रतिनिधित्व सरकारी खात्याकडे असल्यानें
दि बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लि.
मध्यें आपले पैसे गुंतविल्यास कसलाच धोका नाहीं.
सविस्तर माहितीकरितां लिहा—
कुळकर्णी आणि कंपनी चीफ ऑर्गनायझर्स } चुनीलाल डी. बरफीवाला मॅनेजिंग डायरक्टर.
९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें नं २.
१९३५-३६ च्या उंसाची लागवड सुरू झाली.
अंदाजी नफा शेंकडा ७ ते १० टक्के.
प्रॉस्पेक्टस व शेअर फॉर्म, कंपनीचे ब्यांकर्स व मुख्य कचेरी २५७, बुधवार पेठ, पुणें नं. २ यांजकडे मिळतील.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

# विविध माहिती

### फुटबॉलचा सामना पहाण्यास लंडनमध्यें दहा हजार जर्मन

इंग्लंड व जर्मनी ह्यांच्या संघांचा फुटबॉलचा सामना गेल्या महिन्यांत झाला, तो पहाण्यासाठी दहा हजार जर्मन नागरिक इंग्लंडला गेले होते. सामन्याच्या आदल्या दिवशीं रात्रीं जर्मनींतून निघून ते लंडनला गेले आणि सामना झाल्यावर त्याच रात्रीं तेथून परतले. परराष्ट्रीय हुंड्यांची जर्मनींत टंचाई असल्यानें प्रत्येकास दहा मार्कांपेक्षां जास्त रकम बरोबर नेण्याची व लंडनमध्यें खर्चण्याची मनाई होती, असें म्हणतात.

### रेल्वेच्या इंजनांत तीस हजार निरनिराळे भाग

रेल्वेच्या इंजनाची रचना अत्यंत गुंतागुंतीची असते व त्यांत ३०,००० निरनिराळे भाग असतात.

### किड्यांना रंग आवडतात व तेच त्यांचा नाश करतात

कित्येक कीटकांस विशिष्ट रंग आवडतात. ते बागांतील झाडांचा व फळांचा नाश करीत असल्यानें त्यांच्या आवडत्या रंगाचे विजेच्या धक्क्यानें मारून टाकतील असे तारेचे पिंजरे ठिकठिकाणीं ठेवतात. रंगावर लुब्ध होऊन किडे विजेच्या तारांवर उड्या घेतात व तेथेंच मरतात.

### कृष्णवर्ण लोकांत जुळ्यांच्या जननाचें प्रमाण जास्त

श्वेतवर्ण लोकांच्या मानानें कृष्णवर्ण लोकांत जुळीं मुलें जन्मण्याचें प्रमाण मोठें असतें असें अनुमान, हॉस्पिटलांत झालेल्या जननाच्या आंकड्यांवरून काढण्यांत आलें आहे. पीतवर्ण लोकांत हें प्रमाण अल्प आहे.

### हिंदुस्थानांत कालव्यांचा विस्तार

कालवे व तलाव ह्यांच्या पाण्यावर हिंदुस्थानांत १८७८ मध्यें १ कोटि एकर जमीन भिजत होती. चालू शतकाच्या प्रारंभास हा आंकडा २ कोटि झाला आणि आतां तो ३ कोटींच्या आसपास आहे. हें क्षेत्र सुमारें ४७,००० चौरस मैल इतकें भरतें आणि तें इंग्लंड देशाच्या एकूण आकारापेक्षां किंचित् लहान आहे. पंजाबमध्यें कालव्यांचें क्षेत्र मोठें (सवा कोटि एकर) असून त्याच्या खालोखाल मद्रास इलाख्यांतलें आहे. संयुक्त प्रांतांत तें ४० लक्ष एकर आहे. हिंदुस्थानांतील एकूण कालव्यांची मिळून दर सेकंदास २५ लक्ष गॅलन पाणी देण्याची शक्ति आहे. कालवे, त्यांच्या शाखा, उपशाखा व पाट ह्या सर्वांची एकूण लांबी ८७,००० मैल भरेल, आणि त्यांवर होणाऱ्या पिकांची किंमत चालू पडलेल्या बाजार भावानें सुमारें १०० कोटि रुपये होईल, असा अजमास करण्यांत आला आहे.

### बँक ऑफ इंडिया लि०

३१ डिसेंबर, १९३५ अखेर वरील बँकेस, मागील वर्षांतून ओढलेले ५ लक्ष रुपये धरून, एकूण २३ लक्ष, ८२ हजार रु. नफा झाला. त्यांतून सबंध वर्षाचें, १० टक्के दरानें प्राप्तीवरील कर भरलेलें डिव्हिडंड द्यावें, अशी डायरेक्टरांची शिफारस आहे. ह्याखेरीज दर भागावर आठ आणे (द. द. १%) बोनस वांटावयाचें आहे.

### कापसाचा रस्ते करण्याकडे उपयोग

खडीचे रस्ते सर्वांच्या परिचयाचे आहेत. आतां डांबरी रस्तेहि कित्येक ठिकाणीं झाले आहेत. कापसाचा उपयोग रस्ते करण्याकडे यशस्वी रीतीनें करतां येईल काय, ह्यासंबंधीं अमेरिकन तज्ज्ञ प्रयोग करीत असून, त्या देशांतील २० लक्ष मैल लांबीचे रस्ते कपाशीमध्यें अस्फाल्टचें मिश्रण करून त्यापासून बनविण्यांत येण्यासंबंधीं खटपट चालू आहे. हे प्रयोग यशस्वी ठरल्यास अमेरिकन कपाशीच्या पिकास भाव येईल व त्याचा परिणाम हिंदी कपाशीवरहि अनुकूल असा होईल.

### इंग्लंडमधील दूध-पुरवठा

इंग्लंडमध्यें दुधाचा पुरवठा मागणीपेक्षां ज्यास्त झाला आहे. ह्याचा अर्थ असा, कीं दुधाचा भाव न परवडल्यामुळें, मालाचा खप न होऊन तें उरतें. अमेरिका, फ्रान्स, जर्मनी इत्यादि देशांत दर माणशीं जेवढें दूध लागतें, तेवढें इंग्लंडांत लागत नाहीं. इंग्लंडमध्यें दूध सध्याइतकें महाग गेल्या २० वर्षांत नव्हतें व जगांतील सर्व देशांत तें आज किती तरी स्वस्त आहे. दुधाचा भाव उतरविल्यास त्यास मागणी किती ज्यास्त येईल व शाळांतून त्याचा खप कसा वाढेल, ह्यासंबंधीं चौकशीची खटपट करून, मिल्क मार्केटिंग बोर्ड, दुधाची गिऱ्हाइकी वाढविण्याचा प्रयत्न करणार आहे.

### अमेरिकन व्यापाऱ्यांची हिंदी बाजारपेठांवर नजर

जपानचा माल हिंदी बाजारांत वाढत्या प्रमाणांत खपत आहे, ह्यावरून येथें अमेरिकेच्या मालास पुष्कळ वाव आहे आणि मध्यस्थांची अडगळ वाटेंत न येऊं देतां अमेरिकन कारखानदारांनीं हिंदुस्थानांतील लोकांस आपला उंची प्रतीचा माल विकण्याचा प्रयत्न केल्यास त्यांत यश आल्यावांचून रहाणार नाहीं, असा अभिप्राय न्यूयॉर्क येथील एका व्यापारी वृत्तपत्रानें प्रसिद्ध केला आहे.

### मुंबई प्रांतिक सहकारी जमीन गहाणाची बँक, लि.

वरील बँकेचा उद्घाटन समारंभ आज, बुधवार, ता. १५ जानेवारी रोजीं मुंबई येथें इलाखाधिपति, लॉर्ड ब्रेबर्न, ह्यांचे हस्तें होणार आहे.

### अमेरिका ही आजची सुवर्ण-भूमि

हिंदुस्थानास सुवर्णभूमि हें नांव एका काळीं देण्यांत येत असे. आज ह्या देशांतून सोनें बाहेर जात आहे, पण अमेरिकेस तें नांव चांगलें शोभूं लागलें आहे. १९३२ सालच्या अखेरीस त्या देशांतल्या चलनाची किंमत सुमारें साडेचार हजार कोटि रुपये होती. ह्यापैकीं सुमारें २,७५० कोटि रुपयांचें सोनें, १५० कोटि रुपयांचीं डॉलरचीं नाणीं व १५० रुपयांची चांदी होती.

### मुंबई बंदरांतून सोन्याची निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. ४ जानेवारी रोजीं पुरा झालेला आठवडा | ७४,२४,९०९ |
| ता. ११जानेवारी रोजीं पुरा झालेला आठवडा | ८९,०९,६०९ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते ११ जानेवारी १९३६ अखेर | २,५८,३९,७४,४७० |

## अनुक्रमणिका.


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ३० |
| २ हिंदी चलन खात्याचा अहवाल | ३१ |
| ३ रिझर्व्ह बँक शेतीस मदत कशी करणार ? | ३२ |
| ४ युरोपांतील शेती | ३२ |
| ५ स्फुट विचार — हिंदी अर्थशास्त्रज्ञांची परिषद—रिझर्व्ह बँक व सराफी धंदा—हिंदी जनतेचें रोजचें अन्न पोषक आहे काय ? —प्रेसिडेंट रूझल्वेट ह्यांच्यावर मात करण्याचा यत्न—मुंबईचे बाजार—उद्योगधंद्यांस सरकारची मदत | ३३ |
| ६ खेडेगांवांची पुनर्घटना | ३५ |
| ७ दोन मृत्यू | ३६ |
| ८ मननीय उद्गार | ३६ |
| ९ आकडेशास्त्राचें वाढतें महत्त्व | ३६ |
| १० जगांतील सिनेमागृहें | ३७ |
| ११ हिंदुस्थानचें आर्थिक भवितव्य | ३८ |
| १२ निवडक बाजारभाव | ३८ |



# अर्थ

बुधवार, ता. १५ जानेवारी १९३६


## हिंदी चलन खात्याचा अहवाल

### १९३४–३५ सालचा आढावा

चलनाची व्यवस्था रिझर्व्ह बँकेकडे सोंपवली जाण्यापूर्वी ती हिंदुस्थान सरकारच्या चलन–खात्याकडे होती आणि त्या खात्याचा १९३४–३५ सालाचा शेवटचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. नोटा काढणें, हुंडणावळीची व्यवस्था पहाणें वगैरे कामें आतां रिझर्व्ह बँकेकडे गेलीं असल्यानें हिंदुस्थान सरकारच्या सदरहु खात्याचा कारभार संपुष्टांत आला आहे. मार्च, १९३५ अखेरच्या प्रसिद्ध झालेल्या अहवालांत नमूद असलेल्या बाबींमध्यें नाविन्य उरलेलें नसून त्यांची माहिती लोकांस ह्या पूर्वींच झाली आहे. तथापि, त्यांतल्या कांहीं ठळक गोष्टींचा उल्लेख येथें करण्यास हरकत नाहीं. विलायती हुंड्या घेऊन त्यांच्या द्वारें सरकारनें लंडनला अहवालाच्या सालीं सुमारें ५० कोटि रुपयांची रकम पाठविली. पूर्वीच्या सालाच्या मानानें हा आंकडा १० कोटि रुपयांनीं कमी होता. सोन्याच्या निर्गतीचा प्रवाह थोडासा रोडावला तरी चार वर्षांमध्यें मिळून हिंदुस्थानांतून २,९२,१०,६२९ औंस वजनाचें सोनें बाहेर गेलें. तोळ्यांच्या हिशेबांत हें वजन सुमारें सात–साडे सात कोटि तोळे भरतें. १९२०–२१ पासून हिंदुस्थानांत बाहेरून जेवढें सोनें आलें त्यापैकीं सुमारें ५८ टक्के ह्या चार वर्षांत येथून पुन्हां बाहेर गेलें. त्या सालापूर्वी ह्या देशांत आलेल्या सोन्याचा विचार करतां वरील निर्गत कांहीं विशेष नाहीं आणि हिंदुस्थानांत अजून कितीतरी सोनें बाहेर पाठवण्यास शिल्लक आहे, असे समाधानाचे उद्गार सरकारी अहवालांत काढले आहेत ! सोन्याची मोठ्या प्रमाणावर निर्गत होत रहाणें म्हणजे हिंदी जनतेची शिल्लकी संपत्ति कमी होणें आणि लोकांस आपल्या भांडवलावर जगावें लागणें होय, ह्या विचाराचें आर्थिक महत्त्व अहवालाच्या लेखकास म्हणजे हिंदुस्थान सरकारास वाटत नाहीं, हें उघड आहे. हुंडणावळीचा १८ पेन्सांचा दर केवळ सोन्याच्या निर्गतीमुळें टिकून राहिला आणि मालाची निर्गत विशेष झाली नाहीं, ह्या गोष्टीचा त्याच्यावर परिणाम मुळींच झाला नाहीं, हें अहवालांत स्पष्टपणें नमूद केलें आहे. चांदीच्या आयात निर्गतींचा हिशेब करतां सुमारें ५½ कोटि रुपये किंमतीची चांदी १९३४–३५ मध्यें देशाच्या बाहेर गेली असें दिसून आलें. मार्च, १९३५ अखेर पुऱ्या झालेल्या सुमारें आठ वर्षांत हिंदुस्थान सरकारनें २२, ८१, ८२, २५५ औंस वजनाची शुद्ध चांदी आपल्या जवळच्या शिलकेमधून विकली. मंदीमुळें रुपयांच्या नाण्यांस व्यापाराच्या देवघेवींत मागणी कमी होऊन सरकार-जवळ त्यांची चांदी पुष्कळ जमली, ती त्यांनीं बेताबेतानें विकून टाकण्याचा क्रम चालू ठेवलेला आहे, त्याचा हा हिशेब आहे.

सरकारनें काढलेल्या व लोकांनीं घेतलेल्या ट्रेझरी बिलांचा आंकडा १९३४–३५ च्या प्रारंभीं ३२ कोटि, ३१ लक्ष इतका होता, तो वर्ष अखेर कमी होऊन १८ कोटि, २७ लक्ष झाला. आपलें अल्प मुदतीचें कर्ज ह्या तऱ्हेनें सरकारनें कमी केलें, असा त्याचा अर्थ आहे. अहवालाच्या वर्षांत देशांत खेळणाऱ्या चलनाचा विस्तार ६ कोटि रुपयांनीं करण्यांत आला. हिंदुस्थान सरकारच्या लंडन येथील तिजोरींतली शिल्लक जरूरीच्या मानानें वाढल्याकारणानें ६ कोटींची रकम त्या तिजोरींतून हिंदुस्थानांतील तिजोरींत वर्ग करण्यांत आली. हिंदी नोटांच्या चलनास आधार म्हणून जी गंगाजळी असते, तिचा कांहीं भाग लंडनमध्यें ठेवलेला असतो. तेथील तिजोरींतल्या शिलकेमधून ६ कोटि रुपये काढून ती रकम ह्या लंडनमधल्याच गंगाजळींत दाखल केली आणि तेवढीच रकम हिंदुस्थानांतल्या गंगाजळींतून घेऊन तिजोरीच्या खात्यांत टाकली कीं हा कागदी व्यवहार पुरा होतो, आणि अशा रीतीनें अप्रत्यक्ष रीतीनें चलनाचा विस्तार होतो. हिंदुस्थानांतल्या तिजोरींत आलेला हा पैसा चलनास उपयोगी पडल्यामुळें त्या मानानें चलन वाढलें, हें उघड आहे. प्रत्यक्ष जरूरीच्या मानानें ज्यास्त पैसा हुंड्यांच्या द्वारें लंडनला पाठवला गेल्यामुळें वर सांगितल्याप्रमाणें ६ कोटि रुपये इकडे वर्ग झाले, तरी चलनाच्या गंगाजळीचा लंडनमधला भाग वर्षअखेर एकूण १० कोटि रुपयांनीं वाढला. चलनाचा कारभार १९३५, एप्रिल मध्यें रिझर्व्ह बँकेच्या स्वाधीन व्हावयाचा, ह्या दृष्टीनें हिंदी चलनाचा आधार लंडनच्या बाजारांत वरील रकमेच्या मानानें दृढ झाला ह्याविषयीं अहवालांत समाधान व्यक्त करण्यांत आलें आहे. हिंदुस्थान सरकारचें एकूण कर्ज अहवालाच्या सालांत १४½ कोटि रुपयांनीं वाढलें. तथापि, ह्यापैकीं बाहेरच्या कर्जांतला वाढावा फक्त १ कोटीचा आहे, व बाकीचें कर्ज हिंदुस्थानांतच वाढलें आहे. हिंदुस्थान सरकारच्या एकूण कर्जापैकीं १६ टक्के म्हणजे सुमारें एक–षष्ठांश अनुत्पादक असून बाकीचें पांच–षष्ठांश रेलवे, पाटबंधारे वगैरेंचा फायदा देणाऱ्या कामांत गुंतलें आहे, ही गोष्ट नमूद करण्यांत आली आहे. १९३४–३५ सालांत खेळत्या पैशाचा पुरवठा बाजारांत विपुल होता आणि व्याजाचे दर हलके होते. लंडनच्या रोखेबाजारांत चलती असण्याचाहि परिणाम हिंदुस्थानावर अनुकूल झाला आणि एकंदरीनें हिंदुस्थानांत रोख्यांचे भाव चढीचे राहिले. हिंदुस्थान सरकारच्या चलनखात्यानें १९३४–३५ सालच्या परिस्थितीचा आपल्या अहवालांत काढलेल्या आढाव्याचा सारांश वर दिला आहे, त्यावरून चालू सालची परिस्थिति त्याहून फारशी भिन्न नाहीं, हें दिसून येईल. व्यापाराची मंदी, पैशाचा विपुल पुरवठा, व्याजाचे हलके दर, रोख्यांचे चढीचे बाजारभाव, सोन्याची

सारखी चाललेली निर्गत, हुंडणावळीच्या दरांत तिच्यामुळें आलेली स्थिरता, ह्या गोष्टी आतां लोकांस जणूं काय नित्यपरिचयाच्या झालेल्या आहेत. त्यांचेंच चित्र चलनखात्याच्या १९३४–३५ सालच्या अहवालांत पहावयास मिळतें.

## रिझर्व बँक शेतीस मदत कशी करणार ?

### शेतीसाठी स्वतंत्र बँकिंग संस्था ?

( २ )

जमिनीच्या तारणावर किंवा कमीअधिक लांब मुदतीचीं कर्जे रिझर्व बँकेस, तिचें उद्दिष्ट आणि व्यवहारपद्धति लक्षांत घेतां, जर देतां यावयाचीं नाहींत, तर हें कार्य एक स्वतंत्र संस्था उभारून तिच्या मार्फत केलें पाहिजे, हें ओघानेंच प्राप्त होतें. श्री. रामय्या यांनीं आपली योजना त्याच भूमिकेवर उभारली असून अमेरिका व इंग्लंड ह्या देशांत शेतकऱ्यांस कर्जे देण्यासाठी स्थापन झालेल्या संस्थांचीं उदाहरणें त्यांनीं आधारादाखल घेतलीं आहेत.त्यांची योजना थोडक्यांत अशी आहे.शेतीच्या धंद्यास पैसा पुरविण्यासाठीं रिझर्व्ह बँकेच्या धर्तीवर एक स्वतंत्र संस्था स्थापावी व तिचें मूळ भांडवल सुमारें ५ कोटि रुपये असावें. तिनें जमीन गहाणावर शेतकऱ्यांस कर्जे द्यावीं पण तीं व्यक्ति किंवा संस्था ह्यांच्या हमीवर द्यावीं.ह्यास लागणारें भांडवल संस्थेनें कर्जरोखे विकून उभारावें, आणि त्याबद्दल सरकारनें हमी घ्यावी. त्या रोख्यांचा उपयोग कर्जे देण्यांत व त्यांच्या परतफेडींत होण्यास मुभा असावी. तारण घ्यावयाच्या जमिनीच्या किंमतीचा अंदाज वगैरे गोष्टी जमीन-गहाणाच्या बँकांत असतात, त्याच तऱ्हेच्या असाव्या. इतर सरकारी कर्जरोख्यांप्रमाणेंच नवीन संस्थेचे रोखे आहेत, असें मानून रिझर्व्ह बँकेनें त्यांचे संबंधांत व्यवहार करावे. संस्थेनें रोखे देऊन लोकांकडून पैसे कर्जाऊ घ्यावयाचे, त्यांस तारण शेतकऱ्यांच्या कर्जाबाबत ताब्यांत येणारे गहाणाचे हक्क रहातील. शेतकऱ्यांकडून हप्ते वसूल न झाल्यास हमी घेणारी व्यक्ति किंवा संस्था जबाबदार धरली जाईल.ह्या व्यक्तीचें किंवा संस्थेचें भांडवल निदान एक लक्ष रुपये असलें पाहिजे.

योजनेच्या स्थूल मानाच्या वरील वर्णनावरून ती एक प्रचंड जमीन-गहाणाची बँकच आहे असें दिसून येईल. जमीनगहाणाच्या बँका सामान्यतः लांब मुदतीचींच कर्जे देतात; योजनेंतली संस्था अल्प मुदतीपुरतींहि कर्जे देईल व तीं हुंड्या आणि वचनचिठ्ठ्या ह्यांच्या डिस्कौंटच्या मार्गानें देईल. मोठ्या प्रमाणावर संस्था काढल्यानें व चालवल्यानें, तसेंच, सरकारचा व रिझर्व्ह बँकेचा तिला पाठिंबा असल्यानें कर्जावर हलक्या दरानें व्याज आकारणें तिला परवडेल, हा निःसंशय फायदा आहे. तथापि, अलीकडे निघालेल्या सहकारी जमीन-गहाणाच्या बँकांच्या मानानें लांब मुदतीच्या कर्जाबाबत ह्या योजनेंत कांहीं विशेष आहे असें वाटत नाहीं. हमी घेणाऱ्या संस्था आणि व्यक्ति ह्यांच्या सांपत्तिक परिस्थितीवर नजर राखणें हें अत्यंत अवघड काम आहे व योजनेंतल्या संस्थेस तें कसें व कितीसें करतां येईल,हा प्रश्नच आहे. हमी घेणारास तरी शेतकऱ्यांकडून हप्ते वेळेवर फिटतील अशी खात्री कशी पटणार ? हमीची जोखीम देणारा मनुष्य किंवा पेढी आपल्या जबाबदारीबद्दल मेहनताना मागणारच. म्हणजे ह्या व इतर खर्चांमुळें शेतकऱ्यांवर व्याजाचा बोजा मोठा होण्याची भीति आहे. सहकारी पेढ्यांच्या व्यवस्थेंत श्री. रामय्या यांनीं अनेक दोष आहेत, असें म्हटलें आहे. पण त्यांच्या योजनेंतहि अडचणी कांहीं थोड्या नाहींत. आज सावकारांस व सहकारी पतपेढ्यांस आपले पैसे वसूल करण्याचे कामीं कोण त्रास पडतो, तो नवीन योजनेंतहि पडणार. म्हणजे सहकारी चळवळीचे इतर फायदे न मिळतां तिच्या अडचणी मात्र मार्गांत येणार,असें होणार आहे. सहकारी जमीन-गहाणाच्या बँकांच्या मुद्दलाबद्दल व व्याजाबद्दल आज प्रांतिक सरकारांनीं हमी घेतलेली आहे आणि प्रांतिक मध्यवर्ती बँकेच्या मार्फत रिझर्व्ह बँकेकडून त्यांस सवलती मिळणार आहेत.

श्री. रामय्या ह्यांस, त्यांनीं सुचवलेल्या गहाणाच्या संस्थेचा कारभार वाटतो, तितका सोपा होणार नाहीं. ती संस्था व रिझर्व्ह बँक ह्यांचे परस्पर संबंध कसे रहातील व त्या दोघांचीं कामें सुरळीत कशीं चालतील, हाहि विचार करण्यासारखा प्रश्न आहे. तथापि, शेतीच्या धंद्यास पैशाचा योग्य पुरवठा कसा होईल आणि रिझर्व्ह बँकेस त्या बाबतींत कांहीं कामगिरी करतां येईल किंवा नाहीं, ह्या प्रश्नाकडे लोकांचें लक्ष्य वेधण्याचें महत्त्वाचें कार्य त्यांनीं खचित केलें आहे. सहकारी जमीन गहाणाच्या बँका व सहकारी बँका आणि पेढ्या ह्यांनीं चालविलेलें कार्य श्री. रामय्या ह्यांच्या कल्पनेच्या धर्तीवरच वस्तुतः आहे व त्यांच्या कारभारांतल्या अडचणींची जाणीव त्यांस नाहीं, असें नाहीं. हिंदुस्थानांतील शेतीची स्थिति पाश्चात्य देशांतल्या परिस्थितीहून फार भिन्न आहे, हें त्यांस माहींत आहे. कृतीस चालना देण्याच्या दृष्टीनें त्यांनीं केलेल्या सूचना विचार करण्यास योग्य आहेत, ह्यांत संशय नाहीं.

## युरोपांतील शेती

रावबहादुर प्रो. द. ल. सहस्रबुद्धे ह्यांनीं डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशनतर्फे ' युरोपांतील शेती ' ह्या विषयावर पुणें येथें व्याख्यान देतांना आपल्या युरोपांतील सफरीचा अनुभव निवेदन केला. ते म्हणाले:—

" युरोपांत शेती ही दुय्यम धंदा म्हणून किंवा मुख्य धंदा म्हणून केली जाते, आणि जर जिच्यापासून फायदा होत नसेल तर ती सोडून देऊन लोक दुसरा धंदा स्वीकारतात. आपल्या इकडल्याप्रमाणें शेतींत फायदा होवो वा न होवो तरी ती करीत रहावयाची अशी त्यांची वृत्ति नाहीं. तिकडील शेतकरी नुसतें धान्य पिकवूनच राहाणार नाहींत तर गुरांसाठीं गवत करतील, रॉसबेरीचा जॅम करतील, दुधापासून चीज करतील व जनावरांपासून व कोंबड्यांपासून कोंबडीं व अंडीं करतील. सहकारी संस्थांमार्फत माल विकल्यानें, बाजारभावांत उतार झाला तरी, संरक्षण मिळतें. उन्हाळ्यासारखे विनपावसाचे आणि पाण्याच्या तुटवड्याचे दिवस कधींच येत नाहींत. चारपांच इंचांखालीं पाणी व वर सेंद्रिय पदार्थांचे थर असल्यामुळें फक्त खतें घातलीं कीं पीक चांगलें येतें. युरोपांतील व हिंदुस्थानांतील शेतींत महदंतर नैसर्गिक परिस्थितीमुळें पडत आहे हें उघड आहे. तेथील एकंदर राहणी उच्च दर्जाची आहे ही गोष्ट नाकारतां येत नाहीं, तरी एकंदरींत आपल्या येथील परिस्थिति निराशाजनक आहे असें म्हणण्याचें कारण नाहीं. पिकांत सुधारणा व एकंदर धंदेवाईक धोरण ठेवल्यास आपणांसही आपली स्थिति सुधारतां येईल. "

# स्फुट विचार

### हिंदी अर्थशास्त्रज्ञांची परिषद्-अध्यक्षाचें भाषण

ढाका येथें भरलेल्या अर्थशास्त्रज्ञांच्या परिषदेचे अध्यक्ष, डॉ. मनोहरलाल, ह्यांनीं केलेलें भाषण मननीय आणि विचारप्रवर्तक होतें. त्याचा मथितार्थ असा होता कीं प्रचलित आर्थिक मंदीचा उगम, महायुद्धांत झालेल्या संपत्तीच्या नाशांत आणि त्याच्या अखेरीस झालेल्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेंत सांपडतो, आणि ह्या नवीन परिस्थितींत निरनिराळ्या राष्ट्रांनीं स्वयंपूर्णतेचें जें धोरण अंगीकारलें आहे त्याचेंच अनुकरण हिंदुस्थानांत होऊन येथील सरकारनें तें निश्चयानें अमलांत आणल्यावांचून ह्या देशांतली दुःस्थिति दूर होण्याचा संभव नाहीं. शेतीच्या मालाचे भाव इतर पदार्थांच्या मानानें ज्यास्तच उतरले असल्याकारणानें शेतीच्या धंद्यावर सर्वस्वी अवलंबून असलेल्या हिंदुस्थान देशाची स्थिति विशेषच दुःखद झाली आहे. असें असूनहि आमच्या सरकारानें ती सुधारण्यासाठीं म्हणण्यासारखे कांहींच प्रयत्न केले नाहींत असें डॉ. मनोहरलाल ह्यांचें म्हणणें आहे. हिंदुस्थानची लोकसंख्या झपाट्यानें वाढत आहे आणि परदेशांत शेतीच्या उत्पादनपद्धतींत सुधारणा होत असून त्यांचा धान्य व इतर माल ह्यांचा पुरवठा विस्तृत होत चालला आहे. अशा परिस्थितींत संततिनियमनाचा अवलंब करण्यावांचून दुसरा तरणोपाय नाहीं, असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण निरक्षर व अडाणी हिंदी लोकांत हा उपाय यशस्वी होणें अशक्य आहे. मध्यम स्थितींतल्या कांहीं मंडळीस फार तर त्याचा थोडासा उपयोग होईल, पण हिंदी आर्थिक प्रगतीचा प्रश्न सोडवण्यास संततिनियमनाच्या चळवळीची मदत होईल असें समजणें चुकीचें आहे, हें डॉ. मनोहरलाल ह्यांचें मत मननीय आहे. उद्योगधंद्यांची स्थापना आणि विस्तार ह्यांच्या योगानें जपाननें आपली उन्नति करून घेतली, त्यापासून आम्हीं हिंदुस्थानांत बोध घेतला पाहिजे. डॉ. मनोहरलाल हे इंग्लिश अर्थशास्त्रज्ञांच्या संप्रदायाचे अनुयायी आहेत आणि व्यक्तिस्वातंत्र्य व स्पर्धा ह्यांच्या साम्राज्याचे अर्थातच ते भोक्ते आहेत. तथापि, पंजाब कायदे कौंसिलांतील कामाचा अलीकडला अनुभव आणि ग्रेटब्रिटन सारख्या राष्ट्रांत आर्थिक विचार व धोरण ह्यांचे बाबतींत झालेली क्रांति ह्यांचा परिणाम त्यांच्या मनावर झालेला स्पष्ट दिसून येतो, ही गोष्ट सुद्धा आनंदाची आहे, असें समजलें पाहिजे. असल्या प्रवृत्तीचा इष्ट परिणाम हिंदुस्थान सरकाराच्या धोरणावर आतां तरी होईल काय?

---

### रिझर्व्ह बँक व सराफी धंदा

शेती, व्यापार व उद्योगधंदे ह्यांस भांडवल पुरविण्याचें हल्ली बँका करीत असलेलें काम आज कित्येक शतकें सराफ किंवा श्रॉफ हे पार पाडीत आलेले आहेत. अजूनहि मोठमोठीं शहरें व महत्त्वाचीं गांवें येथेंच फक्त नवीन पद्धतीचे बँकिंगचे व्यवहार आढळून येतात; श्रॉफ व सावकार ह्यांचा धंदा खेडोपाडीं देशभर चालतो. तथापि, बँकांच्या स्थापनेपासून श्रॉफ लोकांचें महत्त्व कमी होऊं लागलें. मुंबईमधील श्रॉफ लोकांनीं आपले व्यवहार सुसंगत रीतीनें व सहकारानें व्हावे ह्या उद्देशानें एक असोसिएशन स्थापन केली, तिची रौप्य ज्युबिली नुकतीच साजरी झाली. त्याप्रसंगीं भाषण करतांना असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. चुनीलाल बी. मेहता, ह्यांनीं, सराफांचा व रिझर्व्ह बँकेचा परस्पर संबंध न जोडला गेल्यामुळें, शेतकऱ्यांस व व्यापाऱ्यांस स्वस्त व मुबलक भांडवलाचा पुरवठा करणें, हा बँकेच्या स्थापनेचा मुख्य हेतु सफल होणार नाहीं, असें सांगितलें. देशांतील पैशाचा बाजार व सराफ ह्यांचा अत्यंत निकट संबंध असल्यानें रिझर्व्ह बँकेच्या व्यवहारक्षेत्रांत सराफांस योग्य स्थान मिळणें जरूर आहे, असें आपलें मत त्यांनीं स्पष्टपणें जाहीर केलें. शेतकऱ्यांच्या डोईजड कर्जबाजारीपणाची जबाबदारी सर्व देशभर पसरलेल्या असंघटित सावकारांवर लादून त्यांचे हितसंबंधांस बाध आणणारे ऋणविमोचनाचे कायदे पास करणें खुद्द शेतकऱ्यांच्या हिताचेंहि होणार नाहीं, असा त्यांनीं इषारा दिला. सराफांच्या धंद्यास हिंदी राष्ट्रीय बँकिंगच्या साखळींत महत्त्वाचें स्थान आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. तथापि, हिशेबाची व व्यवहाराची नवी पद्धत स्वीकारून सराफांनीं घटनात्मक फेरफार करणें अगत्याचें आहे, ह्याची त्या वर्गांतहि जाणीव उत्पन्न होत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. शेतीच्या धंद्याच्या गरजा भागवून त्याच्या अडचणी दूर करण्यासाठी रिझर्व्ह बँकेंत एक स्वतंत्र खातें निर्माण करण्यांत यावें, अशी कायद्यांत तरतूद करण्यांत आलेली आहे. ह्या खात्याकडून प्रत्यक्ष कामगिरी काय होते, ह्याकडे सर्वांचें लक्ष्य लागून रहाणें स्वाभाविक आहे. ह्या प्रकारचें कार्य मध्यवर्ती बँकेच्या व्यवहारक्षेत्रांत येत नाहीं असें कित्येक तज्ञांचें मत असल्यानें सदरहु बाबतींत प्रत्यक्ष कृति कितीशी घडते ह्याविषयीं शंका उत्पन्न झाली आहे.

---

### हिंदी जनतेचें रोजचें अन्न पोषक आहे काय?

आरोग्य व आपले नित्याचे व्यवसाय करण्यास लागणारी शक्ति इतर राष्ट्रांतील लोकांचे मानानें हिंदी जनतेंत कमी आहे आणि त्यामुळें रोगांचा फैलाव, अकालीं मृत्यु आणि हलक्या प्रतीची कार्यक्षमता इत्यादि अनिष्ट गोष्टी ह्या देशांत आढळून येतात, ह्या सामान्य समजुतीस शास्त्रज्ञांच्या मताचा आधार आहे, असें भौतिक शास्त्रज्ञांची इंदूर येथें नुकतीच परिषद् भरली होती, तिच्या अधिवेशनांत झालेल्या चर्चेवरून दिसून येतें. पाश्चात्य लोकांस हवापाण्याच्या भिन्नतेमुळें जितकें व ज्या प्रकारचें अन्न आवश्यक असतें, तितकें व त्या प्रकारचें अन्न हिंदुस्थानांत जरूर नसलें, तरी आतांपर्यंत केलेल्या शास्त्रीय चौकशीवरून आजचें हिंदी जनतेचें अन्न असावें तितकें पोषक नाहीं, ही गोष्ट सिद्ध झाली आहे. हिंदी अन्नांतल्या पदार्थांचा पोषकपणा आणि त्यांतलें वैगुण्य ह्यांची पहाणी होऊन जनतेस आवश्यक असें कोणतें व किती अन्न मिळालें पाहिजे, ह्याविषयीं अधिकारयुक्त निर्णय तज्ज्ञांनीं प्रसिद्ध करणें अगत्याचें आहे. इंदूरच्या परिषदेंत शास्त्रज्ञांचें ह्यासंबंधांत ऐकमत्य होतें, ही समाधानाची गोष्ट आहे. हिंदी अन्नांत दुधाचा भाग वाढत्या प्रमाणांत आला पाहिजे, हें त्यांच्यापैकीं एकानें व्यक्त केलेलें मत ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. शुद्ध दुधाचा पुरवठा आणि त्याचें नित्याचें सेवन ह्यांचे बाबतींत सुधारणेस हिंदुस्थानांत अमर्याद वाव आहे. गोरक्षणाच्या चळवळीचा उपयोग ह्या कामीं अधिक होईल तर कितीतरी महत्त्वाचें कार्य घडून येईल. शास्त्रज्ञांच्या शोधाचा व चौकशीचा पाठिंबा त्यास मिळाल्यास ह्या प्रश्नाचें महत्त्व लोकांच्या मनावर अधिकच ठसेल.

---

### प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांच्यावर मात करण्याचा यत्न

अमेरिकेंतील प्रातिनिधिक सभांनीं केलेले कायदे आणि तेथील सरकारनें अंमलांत आणलेलें आर्थिक व राजकीय धोरण हीं

राष्ट्रीय राज्यघटनेस धरून आहेत कीं नाहीं ह्या संबंधानें निर्णयात्मक अभिप्राय देण्याची सत्ता मुख्य न्यायाधिशांच्या हातांत आहे. हिंदुस्थानांत जसें एक सुप्रीम कोर्ट कायद्यानें स्थापन व्हावयाचें आहे, त्याच प्रकारचें मुख्य राष्ट्रीय न्यायमंदिर अमेरिकेंत आहे आणि प्रधानमंडळाचा कारभार कायदेशीर आहे का बेकायदेशीर आहे ह्या विषयींचा अखेरचा निकाल त्यास देतां येतो. अलीकडच्या मंदीच्या काळांत विस्कटलेली आर्थिक व्यवहारांची घडी नीट बसवण्याच्या उद्देशानें अमेरिकन कायदेमंडळ व प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं अनेक योजना तयार करून त्या अमलांत आणल्या. त्यांच्या अंमलबजाणींत अर्थातच कित्येक व्यक्ती, वर्ग व संस्था ह्यांच्या हितसंबंधांवर घाला येऊन कार्यकारी सरकारास खाजगी स्वरूपाच्या व्यवहारांत ढवळाढवळ करावी लागली. प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांच्या योजनांच्या योगानें ज्यांच्या स्वार्थास बाध आला, असे व्यापारी, कारखानदार व बँकर आणि त्यांच्याविरुद्ध असलेले राजकीय पक्षाचे पुढारी ह्यांनीं प्रधानमंडळाचें धोरण, मुख्य न्यायमंदिरांत तक्रार करून, बेकायदेशीर आहे, असें न्यायाधिशांकडून ठरवून घ्यावें आणि अशा रीतीनें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांचा पाडाव करावा, असा डाव टाकला. त्यांत त्यांस एका महत्वाचें बाबींत यश आलें असून कपाशीचे बाजारभाव उचलून धरण्यासाठी जमींनदारांस दिल्या जाणाऱ्या पैशाच्या मदतीविषयींचा कायदा अमेरिकन राज्यघटनेस सोडून आहे असा निर्णय न्यायाधिशांनीं नुकताच दिला आहे. ह्याचा परिणाम कपाशीचे बाजारभाव खाली जाण्यांत झाला असून मुंबईच्या कपास-बाजारांतहि किंमतीमध्यें घट झाली आहे. प्रेसिडेंट रूझव्हेल्ट हे कांहीं लेचेपेचे मुत्सद्दी नाहींत. त्यांनीं प्रतिपक्ष्यांचा आणि स्वार्थी वर्गाचा डाव चांगला ओळखला असून ते स्वतःवर त्यांची मात होऊं देणार नाहींत. शेतकरी वर्गाचा त्यांस ह्या कामीं अर्थातच पाठिंबा मिळणार आहे, एवढेंच नव्हे, तर न्यायाधिशांच्या निकालामुळें कपाशीचे भाव गडगडल्यास अमेरिकन राष्ट्रावर भयंकर आपत्ति ओढवेल ह्याची जाणीव जनतेस आहे. आलेल्या गंडांतरांतून पार पडण्यासाठी प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं एक योजना आंखून ठेविली असून जरूर पडल्यास अमेरिकन राज्यघटनेच्या कायद्यांत हवी असलेली दुरुस्ती घडवून आणण्याचाहि प्रयत्न ते करतील, असें म्हणतात.

---

### मुंबईचे बाजार

अमेरिकेंत उपस्थित झालेल्या अनिश्चितपणाचा परिणाम हिंदी कपास-बाजारावर होणें स्वाभाविक आहे आणि त्याप्रमाणें मुंबईतले भाव उतरले आहेत. विलायतेंतहि साशंकपणाचें वातावरण असल्यानें तिकडून येणाऱ्या बातम्यांची प्रवृत्ति येथील बाजारांत स्थैर्य उत्पन्न करण्यासारखी असणें शक्य नाहीं. ब्रिटिश पौंड व फ्रेंच फ्रँक ह्यांच्या मानानें अमेरिकन डॉलर पडल्याकारणानें मध्यंतरीं अस्वस्थतेंत भरच पडली. असल्या परिस्थितींत अफवांचा नेहमीं सुकाळ असतो आणि त्यांच्या योगानें बाजाराची घडी अधिकच बिघडते. डॉलरची किंमत आणखी उतरवण्याचा अमेरिकन सरकारचा विचार आहे, अशी गप्प बाजारांत पसरण्यांत आली आहे. ह्या बातमीचा अधिकारी रीत्या इन्कार करण्यांत आला आहे, तरी त्या प्रश्नाचे संबंधांतली अनिश्चितता अजून दूर झालेली नाहीं. ती हलुहलुच नाहींशी होणार, हें उघड आहे. दरम्यान, भडोच कपाशीचा भाव पंधरा-वीस रुपयांनीं उतरून पुन्हा चढावयास लागला आहे. चांदीच्या भावास घसरगुंडी लागून तो ५० रुपयांच्या ( १०० तोळ्यांस ) खाली गेला होता, त्यांतहि किंचित् वाढ झालेली दिसत आहे. ह्या प्रकरणांतहि अमेरिकेच्या चांदी-खरेदीच्या धोरणाचा प्रत्यक्ष संबंध आला असून त्याच्याभोंवतीं अनिश्चितपणाचें अवगुंठन आहे. रोखेबाजार स्तब्ध आहे. सरकारी कर्ज रोख्यांचे भाव खाली गेले आहेत, ते अजून वर डोकें काढीत नाहींत. गिरण्या व कंपन्या ह्यांच्या भागांच्या किंमती त्याचप्रमाणें नरमल्या आहेत. एकंदरींनें पहातां बाजारांची परिस्थिति मंदीची आहे. हिंदुस्थान सरकारच्या बजेटांत वाढावा येणार असा रंग दिसत असून कांहीं कर, विशेषतः प्राप्तीवरील कराच्या आकारणीचे दर, कमी होतील अशी कित्येकांस आशा वाटत आहे.

---

### उद्योगधंद्यांस सरकारची मदत

अडचणीचे प्रसंगीं अनेक उद्योगधंद्यांस सरकार सहाय करतें व आर्थिक मदत देऊन राष्ट्रीय जीवनास आवश्यक अशा वस्तूंचें उत्पादन स्वदेशांत व्हावें, ह्या हेतूनें खटपट करतें, असा अनुभव महायुद्धानंतर आतां बहुतेक सर्व राष्ट्रांचे बाबतींत आला आहे. खुल्या व्यापाराचा पुरस्कार करणारें इंग्लंडसुद्धां ह्या धोरणाचा अंगीकार करीत आहे. घरें बांधण्यास मदत, बीट-साखरेच्या धंद्यास सहाय, जहाजांचा धंदा व वहातुक ह्यांचे कंपन्यांस आश्रय, दूध पुरवठ्यासाठी उदार देणग्या, इत्यादि मार्गांनीं ब्रिटिश सरकार आज राष्ट्रीय उद्योगधंद्यांस प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें मदत देत असून दरसाल सुमारें ५० कोटि रुपये त्या कामीं खर्च करीत आहे. सरकारी औद्योगिक संरक्षण एकदां देण्यांत आलें, कीं तें कायम होण्याची प्रवृत्ति सर्वत्र आढळून येते. टारिफ बोर्डाची हिंदी कापडाच्या गिरण्यास द्यावयाच्या संरक्षणासंबंधीं चौकशी सध्या चालू आहे, तीमध्यें उपस्थित केले जाणारे मुद्दे वरील माहितीच्या दृष्टीनें विचारणीय आहेत.


॥ श्री ॥

**अकोला सेंट्रल बँक लिमिटेड**

**अकोला [ वऱ्हाड ]**

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, ता. १ जानेवारी १९३६ पासून पुनः प्रसिद्ध होईपर्यंत ही बँक खालील **कमी केलेल्या दरानें मुदती ठेवी** स्वीकारील. जुन्या ठेवींची मुदत संपल्यावर त्या पुनः चालू करतांना त्यांनाही हे **नवीन दर** लागू होतील.

| | |
|---|---|
| ३ महिने पूर्ण | ३ द. सा. द. शे. |
| ६ महिने पूर्ण | ३। ,, |
| ९ महिने पूर्ण | ३॥ ,, |
| १२ महिने पूर्ण | ४ ,, |
| २ वर्षे पूर्ण | ४॥ ,, |
| ३ वर्षे पूर्ण | ५ ,, |
| ४ वर्षे पूर्ण | ५। ,, |
| ५ वर्षे पूर्ण | ५॥ ,, |

**सेव्हिंग्ज बँक व चालू ठेवी**वरील व्याजाचे दर हल्लींचेच म्हणजे अनुक्रमें द. सा. द. शे. ३ व २ हे अमलांत राहतील.

अकोला [ वऱ्हाड ]
ता. २३-१२-३५

**श्री. अ. भागवत,**
ऑनररी सेक्रेटरी,
**अकोला सेंट्रल बँक लिमिटेड.**

## खेडेगांवांची पुनर्घटना

### प्रो. काळे ह्यांचें भाषण

डाक्का येथें भरलेल्या आर्थिक परिषदेंत खेडेगांवांची पुनर्घटना ह्या विषयाची चर्चा झाली. तिला प्रारंभ करून देतांना प्रो. काळे ह्यांनीं सदरहु प्रश्नाची रूपरेखा परिषदेपुढें मांडली. त्यांचे मुद्दे संक्षेपानें खाली दिले आहेत:—

शेतकरी वर्ग आणि खेडेगांवें ह्यांच्या संबंधानें विचार, सरकार आणि लोक ह्यांचे मार्फत पूर्वी अनेक वेळां झालेला असला तरी त्यांच्या परिस्थितीचें अवलोकन साकल्यानें व सूक्ष्म रीतीनें करण्यांत आलेलें नाहीं. पूर्वीच्या प्रयत्नांचा आढावा घेऊन, खेडेगांवच्या लोकांच्या मनांत आर्थिक सुधारणा व सुस्थिति ह्यांच्या बाबतींत जागृति उत्पन्न करणें व त्यासाठी त्यांची कमाई वाढवणें हीं कामें अगत्याचीं आहेत आणि त्यासंबंधांतली जबाबदारी सरकारची आहे, ही गोष्ट अलीकडल्या शेतकी कमिशननें प्रामुख्यानें निदर्शनास आणली.

राजकीय जागृति व आकांक्षा आणि कायदेमंडळें व इतर संस्थांतील अधिकाऱ्यांच्या निवडणुकी ह्यांच्या योगानें सध्या खेडेगांवांच्या प्रश्नास चालना मिळाली आहे. हिंदुस्थान सरकारनें ह्या कामाकरितां प्रांतिक सरकारांच्या हवाली एक कोटि रुपये केले आहेत हें परिस्थितीचें विशेष सूचक आहे.

'ग्रामसुधारणा', 'ग्रामसंघटन', 'खेडेगांवांची पुनर्घटना' इत्यादि शब्दप्रयोग वापरण्यांत येतात, त्यांचा अर्थ नीट ध्यानांत येणें अगत्याचें आहे. अज्ञान, दारिद्र्य व दुःस्थिति ह्यांच्या चिखलांत रुतलेल्या खेडगांवीं जनतेस हात देऊन वर काढणें हा चालू कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आधुनिक संस्कृतीच्या आघातामुळें खेडेगांवांची आर्थिक घटना विस्कळित झाली असून कित्येक ठिकाणीं ती मोडून गेली आहे. तिची स्थापना पुन्हां करावयाची, का सभोंवार होणाऱ्या फेरफारांशीं मेळ घालण्यासाठी तिची डागडुजी करावयाची, का जुनी व्यवस्था सपशेल मोडून टाकून व नाहींशी करून तिच्या जागीं नवीन एखाद्या प्रकारची व्यवस्था अमलांत आणावयाची हा प्रश्न येथें उपस्थित होतो. एकंदर परिस्थितीचा विचार करतां, हिंदुस्थानांतील खेडेगांवांमध्यें आर्थिक क्रांति घडवून आणणें शक्य आहे असें दिसत नाहीं आणि आधुनिक कल्पनांस अनुसरून त्यांतील लोकांच्या जीवनक्रमांत कित्येक फेरबदल होतील असे यत्न करणें हेंच शक्य कोटींत आहे असें म्हणावें लागतें. कारण, कार्यकर्ते, पैसा व उत्साह ह्यांचा पुरवठा मर्यादित आहे.

ग्रामसुधारणेचे सध्या चालू असलेले प्रयत्न दोन प्रकारचे आहेत: विवक्षित निवडक खेडेगांवांत शिक्षण, आरोग्य, शेतीची व्यवस्था, पाणीपुरवठा इत्यादि बाबतींत सुधारणा एकत्रित प्रकारानें करणें हा पहिला मार्ग होय. सरकारी व बिनसरकारी लोकांकडून ह्या तऱ्हेनें नमुनेदार खेडीं तयार केलीं जात आहेत आणि क्रमाक्रमानें त्यांचा कित्ता दुसऱ्या क्षेत्रांत गिरवला जाईल अशी अपेक्षा आहे. तथापि, असल्या प्रयत्नांनीं खेडेगांवांतील जनतेंत स्वतःच्या उन्नतीविषयीं स्फूर्ति उत्पन्न होऊन त्यांची सुधारणा टिकाऊ बनेल अशी खबरदारी घेणें जरूर आहे. कार्यकर्त्यांची पाठ वळतांच खेडेगांवांत 'येरें माझ्या मागल्या' होऊं नये अशी परिस्थिति निर्माण झाली पाहिजे.

कार्याची दुसरी दिशा म्हटली म्हणजे शेतीची पद्धति, आरोग्य, रस्ते, शिक्षण इत्यादि बाबतींत विस्तृत क्षेत्रांत पसरतील अशा सुधारणा हातीं घेऊन त्यांचा फैलाव करणें ही आहे. सरकारचीं शेती, आरोग्य वगैरे संबंधांतलीं खातीं ह्या मार्गानें यत्न करीत आहेत आणि स्थानिक स्वराज्य संस्थाहि त्यांस हातभार लावीत आहेत.

ग्रामसुधारणेच्या कार्यास मिळालेली चालना आणि प्रचलित आर्थिक मंदी ह्या गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून आल्या कारणानें खेडेगांवांच्या सुधारणेच्या मार्गांत विलक्षण अडचणी उपस्थित झाल्या आहेत, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. शेतीच्या मालाचे बाजारभाव उतरल्यानें शेतकऱ्यांची कमाई घटली आहे, कर्जबाजारीपणा वाढला आहे, शेतीच्या धंद्यास भांडवल मिळण्याची मारामार आहे आणि सहकारी संस्थांचीहि दैना झाली आहे. प्रांतिक सरकाराकडून स्थानिक स्वराज्य संस्थांस मिळावयाच्या ग्रँट्स कमी करण्यांत आल्यानें लोकांच्या उपयोगाचीं कामें हातीं घेतां येत नाहींत. ह्या प्रकारचें सध्याचें वातावरण ग्रामसुधारणेस अनुकूल आहे, असें कसें म्हणतां येईल? पुढें उडी मारण्याऐवजी गेलेला तोल संभाळणें हीच महत्त्वाची गोष्ट आज होऊन बसली आहे.

खेडेगांवांतल्या जुन्या धंद्यांचें शक्यतोंवर संरक्षण करणें, त्यांत शेतीस जोडून नवीन धंदे उत्पन्न करणें, भांडवलाचा पुरवठा व मालाची विक्री इत्यादि बाबतींत सुधारणा करून शहरें व खेडेगांवें ह्यांचा दुवा जोडून देणें वगैरे महत्त्वाचीं कामें आज करावयाचीं आहेत. जकाती, चलन, हुंडणावळ, औद्योगिक संरक्षण इत्यादि बाबींतलें धोरण. आंखणें हिंदुस्थान सरकारच्या हातीं आहे. त्यांनीं ग्रामसुधारणेस सहाय देण्याचें मनावर घेतल्यावांचून प्रांतिक सरकार व स्थानिक संस्था ह्यांच्या हातून विशेष कामगिरी होण्याचा संभव दिसत नाहीं. देशांतील वाढत्या लोकसंख्येस उपजीविकेचीं साधनें उपलब्ध होतील अशी व्यवस्था होईल तरच ग्रामसुधारणेचें पाउल पुढें पडेल. लोकांच्या रहाणीविषयींच्या कल्पना बदलत आहेत, त्यांस अनुसरून प्रगति व्हावयाची म्हणजे त्या मानानें जनतेचें आर्थिक सामर्थ्य वाढलें नाहीं तर खेडेगांवांचा उत्कर्ष कसा होणार?

राष्ट्रोन्नतीच्या ध्येयानें प्रेरित झालेले कार्यकर्ते आणि सरकारी खातीं व अधिकारी ह्यांचें सहकार्य होईल तरच ग्रामोद्धाराच्या कार्यक्रमांत कांहीं म्हणण्यासारखी प्रगति घडवून आणतां येईल. त्याचप्रमाणें, कार्यकर्त्यांस, सुधारणेसाठी लागणारा पैसा पुरवला गेला पाहिजे. खेडेगांवांची पुनर्घटना हें वाटतें तसें सोपें काम नाहीं. त्याच्या मार्गांत विलक्षण अडचणी असलेल्या दिसत आहेत. तथापि, सर्वांनीं निश्चयानें झटण्याचें ठरल्यास 'अकरणात् मंदकरणं श्रेयः' ह्या न्यायानें थोडें बहुत तरी कार्य हातून घडूं शकेल.

दत्तात्रय नारायण हेजीब
किराणा व सुक्या मेव्याचे व्यापारी
आमचेकडे आंबेपोळी, फणसपोळी, खारा पिस्ता वगैरे
सुका मेवा मिळेल.
रे-मार्केटजवळ, २० शुक्रवार पेठ, पुणें २.

## दोन मृत्यू

### मि. एफ्. ई. दिनशा व मि. अर्देसर गोद्रेज

[ मुंबईच्या व्यापारी व औद्योगिक क्षेत्रांतील दोन पुढारी गेल्या पंधरवड्यांत दिवंगत झाले. मि. दिनशा व मि. गोद्रेज ह्या दोघांनींहि आपआपल्या क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी बजावलेली आहे. त्यांच्या कामगिरीचा परिचय थोडक्यांत येथें करून देण्यांत येत आहे. ]

### मि.. एफ. ई. दिनशा

( मृत्यु : ता. ३ जानेवारी, १९३६ )

वडिलांनीं आय. सी. एस. होण्यासाठी विलायतेस पाठविलेले, वकिलीच्या परीक्षेंत पहिले आलेले व सॉलिसिटरच्या धंद्यांत वागबगार असलेले मि. दिनशा हे मुंबईच्या व्यापारी क्षेत्रांत पहिल्या दर्जाचें स्थान मिळवूं शकले ! महायुद्धानंतरच्या तेजीच्या काळांत मि. दिनशा ह्यांनीं व्यापारी क्षेत्रांत प्रवेश केला व त्यांत ते यशस्वी झाले. सुमारें ८० कंपन्यांचे ते डायरेक्टर होते. बँक ऑफ इंडियासाठी त्यांनीं केलेलें कार्य फारच महत्त्वाचें आहे. ग्वाल्हेरच्या माजी महाराजांचे ते मुंबईमधील विश्वासू सल्लागार ह्या नात्यानें, महाराजांच्या सुमारें १०–१५ कोटि रुपयांचा व्यवहार त्यांचेकडे असे. मि. दिनशा ह्यांचें नांव जरी सर्वांच्या नजरेपुढें नसलें, तरी त्यांच्या अनुभविक सल्ल्यानें कित्येक कंपन्यांचें कल्याण झालें आहे. टाटा कंपनीच्या अडचणींचे प्रसंगीं, त्यांनीं ग्वाल्हेरच्या महाराजांकडून कंपनीस एक कोटि रुपये मिळवून दिले. सिमेंटच्या धंद्यास ऊर्जितावस्थेस आणण्यास त्यांचेच परिश्रम कारणीभूत झालेले आहेत. सिमेंट कंपन्यांचें एकत्रीकरण करण्याची त्यांची योजना तयार झाली आहे. रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती बोर्डावर त्यांची नुकतीच नेमणूक झाली होती. मि. दिनशा ह्यांचे मतास विषेश वजन असे व तें इतरांस पटलें नाहीं तरी ते माघार घेत नसत. आर्थिक व व्यापारी क्षेत्रांतील त्यांचें महत्त्व त्यांच्या साध्या स्वभावामुळें सामान्य लोकांस कळणें शक्य नाहीं. रोखे, कपास, चांदी इत्यादि बाजारांत त्यांनीं कधींहि सट्टे केले नाहींत हें लक्ष्यांत ठेवण्याजोगें आहे.

### मि. अर्देसर गोद्रेज

( मृत्यु: ता. ९ जानेवारी, १९३६ ).

चरबीविरहित साबू, पोलादी तिजोऱ्या, कुलपें, इत्यादि स्वदेशी वस्तूमुळें सर्वांस परिचयाचे झालेले मि. अर्देसर गोद्रेज हे गेल्या आठवड्यांत मरण पावले. सुमारें ४० वर्षांपूर्वी शस्त्रक्रियेचीं उपकरणें तयार करण्याचा धंदा त्यांनीं सुरू केला; त्यानंतर कपाटें, तिजोऱ्या व कुलपें ह्यांचा कारखाना त्यांनीं स्थापला. हा कारखाना पांच वर्षांपूर्वी त्यांनीं आपल्या बंधूचे स्वाधीन केला. वनस्पतिजन्य तेलापासून साबण तयार करण्यास त्यांनीं १० वर्षांपूर्वी सुरवात केली. हे साबण आतां हिंदुस्थानांतच नव्हे, तर हिंदुस्थानाबाहेरहि लोकप्रिय झाले आहेत. मि. गोद्रेज हे सुद्धा वकिलीच्या धंद्यांतूनच कारखानदारींत शिरले. छापण्यास लागणारी शाई, बूटपॉलिश इत्यादि जिनसांचे कारखानेहि त्यांनीं उभारले. नाशिकजवळ जमीन घेऊन त्यामध्यें सोया बीन्सची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यास त्यांनीं सुरवात केली होती. तिजोऱ्यांचे कारखान्यांत आज सुमारें १,००० कामगार कामावर आहेत. मि. अर्देसर ह्यांनीं आपले पैसे साबणाचे कारखान्यांत गुंतविले असून जमीनजुमल्याचें धर्मादाय विश्वस्तिपत्र केलें आहे.

---

## मननीय उद्गार

### औद्योगिक राष्ट्रांस साम्राज्याची जरूरी

जर्मनीची साम्राज्यासंबंधीच्या आकांक्षांचें दिग्दर्शन, तिच्या फडनविसांनीं एका भाषणांत केलें. ते म्हणाले:—

"आपण आपली निर्गत वाढविली नाहीं, तर फक्त दोनच मार्ग शिल्लक उरतात. ( १ ) जरूरीचे सर्व जिन्नस जर्मनींतच तयार करणें किंवा ( २ ) कच्चा माल मिळविण्यासाठी जर्मनीबाहेरील प्रदेशांत वांटणी मागणें. ह्या दोहोंपैकीं पहिला मार्ग अव्यवहार्य आहे."

### शास्त्रज्ञांची सामाजिक जबाबदारी

"इंडियन ॲकेडमी ऑफ सायन्सेस" ह्या शास्त्रज्ञांच्या मंडळीच्या वार्षिक बैठकीस सुरवात करून देतांना मुंबईच्या गव्हर्नरांनीं भाषण केलें, त्यांत त्यांनीं खालील उद्गार काढले:—

"शास्त्रज्ञांचें, रोजच्या व्यवहारी जगांत पडावें तितकें वजन पडत नाहीं. शास्त्रीय प्रगतीमुळें मानव जातीचें कल्याण झालें आहे, ही गोष्ट खरी; तथापि त्याबरोबरच कित्येक प्रश्न नव्यानेंच उपस्थित झाले आहेत.उत्पादन इतकें वाढलें तरी त्याची वांटणी करणें कठीण होऊन बसलें आहे. शास्त्रज्ञांनीं ही गोष्ट ध्यानांत बाळगून व राजकीय व सामाजिक प्रश्नांत मन घालून आपलें धोरण सहकार्यानें आंखलें पाहिजे."

### शेतकऱ्यांची स्थिति कशानें सुधारेल ?

श्री.वैकुंठराय मेहता हे सुरत येथील खादी व ग्रामोद्योग प्रदर्शनाचें उद्घाटन करतांना म्हणाले:—

"भांडवलाचा अभाव हें शेतकऱ्यांच्या दुःस्थितीचें खरें कारण नव्हे. भांडवलाचा पुरवठा करणाऱ्या सहकारी संस्था कितीहि कार्यक्षम झाल्या, तरी तेवढ्यानें कर्जबाजारीपणाचा प्रश्न सुटणार नाहीं. जमीनगहाणाच्या बँकांमुळें शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याजाचा दर कमी होईल, हप्त्यांनीं परत फेड करण्याची सवलत मिळेल व एका सावकाराच्या जागीं दुसरा घेणेकरी येईल. पण तेवढ्यानें कार्यभाग होणार नाहीं. खेडुतांची स्थिति सुधारण्याचा खरा मार्ग म्हणजे शेतीवरील लोकांचें अवलंबन कमी करून स्थानिक उद्योगधंद्यांत त्यांस वाव देणें, हा आहे. जमिनीची मशागत कसून करणें, पिकांत बदल व सुधारणा करून उत्पन्न वाढविणें, गुरांपासून ज्यास्तींत जास्त उत्पन्न काढणें, नेहमींच्या उद्योगांबरोबर दुय्यम धंदे करणें, विश्रांतीचा वेळ उपयुक्त कार्यांत खर्च करणें, इत्यादि मार्गांनीं प्रयत्न झाले, तरच तरणोपाय आहे."


**धी पूना कँटोनमेंट को. क्रे. बँ. सो. लि. पुणें**

ऑफिसः—९५, लक्ष्मीरोड, गणेश चौक.

कायम ठेवीः—द. सा. द. शे. ४॥ ते ६ टक्के.

सेव्हिंग्ज ठेवीः—द. सा. द. शे. रोज शिलकेवर ३ टक्के.

अल्पसंग्रह ठेवीः—आज किंमत रु. ८, चार वर्षांनीं रु. १०.

मेंबर्सकरितां बँकिंगचे इतर व्यवहार केले जातात.

विशेष माहिती समक्ष.

सेक्रेटरी.

## आकडेशास्त्राचें वाढतें महत्त्व

कोणत्याहि गोष्टीसंबंधीं निश्चित धोरण आंखण्यापूर्वीं त्यासंबंधीं तपशीलवार माहिती असणें आवश्यक असतें. ही माहिती गोळा करून व तिचें वर्गीकरण करून त्यांतून योग्य तो अर्थबोध काढणें, हें काम सोपें नाहीं. भरमसाट माहिती जमा न करतां, हातांतील विषयास जरूर त्या बाबी निवडून काढणें, जरूर तेथें 'नमुना पद्धती'चा अवलंब करणें, तर्कशास्त्राचे आधारें माहितीपासून सिद्धांत काढणें, इत्यादि गोष्टी करण्यास आकडेशास्त्राचें सहाय होतें. परिस्थितीची कल्पना थोडक्यांत करून देणें व वैयक्तिक उदाहरणांवरून सर्वांस समजेल असा सिद्धांत काढणें, हें आकडेशास्त्राचें कार्य होय, व तें करतांना सरासरी, ग्राफवरील चढउतार, तुलना दर्शविण्यासाठी लहानमोठ्या ठोकळ्यांची योजना, कोष्टकें, इत्यादींचा उपयोग केला जातो.

अलीकडे आकडेशास्त्राचें महत्त्व प्रत्यहि वाढत आहे. प्रत्येक विषयासंबंधीं चर्चा करतांना, त्यासंबंधीं आकडे मिळाल्याखेरीज ती चर्चा पुरी समजली जात नाहीं. आयात-निर्गत, लोकसंख्या, अपघात, जन्म-मृत्यु, बेकारी, उत्पन्न, राहणीचें मान, रोगराई, रेल्वेवरील वहातुक, पिकांचे अंदाज, इत्यादि प्रत्येक बाबतींत तुलनात्मक आकड्यांची जरुरी असते. त्याच आंकड्यांवरून कित्येक प्रसंगीं अगदीं परस्पर-विरुद्ध असे निष्कर्ष निघणें अशक्य नसतें. आकडे जमा करतांना व त्यांची मांडणी करतांना शास्त्रशुद्ध व तर्कशुद्ध रीतीनें वागणें महत्त्वाचें असतें. आकडेशास्त्राचें वाढतें महत्त्व व त्या शास्त्रांत वाकबगार असणारांचें हिंदुस्थानांतील दुर्भिक्ष्य ध्यानांत घेऊन इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटनें एक अभ्यासक्रम योजिला आहे. संशोधक व त्यांचे हाताखालीं काम करणारे सहायक ह्यांच्या कामास जरूर त्या मानानें अभ्यासक्रमाचे दोन भाग केलेले आहेत.

दर दहा वर्षांनीं होणारी खानेसुमारी, सरकारी खात्यांमार्फत जमा केली जाणारी वेगवेगळ्या गोष्टींसंबंधीं माहिती व हिंदुस्थान सरकारच्या 'कमर्शिअल इंटेलिजन्स व स्टॅटिस्टिक्स' खात्याचें व्यापारविषयक प्रश्नांच्या आकड्यांबाबतचें काम, ह्याखेरीज इतर कोणत्याच मार्गानें इतके दिवस आकडेशास्त्राची मदत विशेष घेतली जात नसे. हवा-पाणी खात्याचे कामांत आकडेशास्त्राची मदत अर्थातच लागे. २० वर्षांपूर्वीं, कलकत्ता विश्वविद्यालयाच्या परीक्षांच्या निकालासंबंधीं आकडेवार माहिती जमा करण्याची खटपट करण्यांत आली होती, परंतु तें काम पुरें झालें नाहीं. शेतकी कमिशनच्या अहवालानें आकडेशास्त्राच्या कामास जोराची चालना मिळाली व इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें त्यासाठी स्वतंत्र शाखा निर्माण करून पैशाची मदत देण्यास सुरवात केली. पुसा येथील इन्स्टिट्यूटमध्यें दोन वर्षांपूर्वीं आकडेशास्त्राचें एक खातें सुरू झालें. रासायनिक खतांच्या कंपन्यांनीं स्वतःचे धंद्यासाठी म्हणून कित्येक ठिकाणीं चौकशी चालू ठेवली आहे. हवा-पाण्याचें खातें, जंगल खातें, आरोग्य खातें, कालवे खातें, इत्यादि खात्यांमार्फत सर्व प्रांतांतून आतां संशोधन चालू आहे. त्याचप्रमाणें, कपाशीसंबंधीं, चहासंबंधीं व लोखंड व पोलाद ह्यासंबंधीं संशोधन-कार्य सुरू आहे. मजुरांची राहणी, कामाचे तास, अपघात, कार्यक्षमता, मुलांचें शिक्षण, इत्यादि प्रश्नहि आकडेशास्त्राचे तावडींतून निसटलेले नाहींत. रेल्वेजनीं सुद्धा ह्या बाबतींत प्रगति केली आहे. सध्याच्या हलाखीच्या दिवसांत आर्थिक प्रश्नांकडे लोकांचें लक्ष प्रामुख्यानें वेधलें जाणें अपरिहार्य आहे व त्याचा परिणाम आर्थिक प्रश्नांची सूक्ष्म पहाणी केली जाण्याकडे होत आहे. हिंदुस्थान सरकारच्या आकडेशास्त्रविषयक चौकशांच्या कामाबाबत सल्ला देण्यासाठी प्रो. बौले व मि. रॉबर्टसन ह्या दोन तज्ज्ञांस इंग्लंडांतून येथें १९३३ सालीं बोलावून घेण्यांत आलें होतें. त्यांच्या अहवालांतून काय निष्कर्ष निघतो, हें पहावयाचें आहे.

हिंदी युनिव्हर्सिट्यांतून आकडेशास्त्राचें शिक्षण देण्याची पद्धतशीर व्यवस्था अजून झालेली नाहीं. गणित व आकडेशास्त्र हीं दोन्हीं जवळचीं भावंडें असलीं, तरी चांगला गणिती आकडेशास्त्रांत निपुण असतोच असें नाहीं; तें एक वेगळेंच व स्वतंत्र शास्त्र आहे. त्याचप्रमाणें, अर्थशास्त्रज्ञाचें गणित व आकडेशास्त्र ह्या दोन्ही बाबतींत अज्ञान असणें अशक्य नसतें. तेव्हां, आकडेशास्त्राचा स्वतंत्रपणें अभ्यास करून त्यांत प्रावीण्य संपादन केलेल्या तज्ज्ञांस हिंदुस्थानांत भरपूर काम आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

## जगांतील सिनेमागृहें

इतर देशांचे मानानें हिंदुस्थान हा सिनेमाच्या बाबतींत किती मागें आहे. ह्याची कल्पना खाली दिलेल्या आंकड्यांवरून येईल. ही माहिती 'जर्नल ऑफ दि मोशन पिक्चर सोसायटी ऑफ इंडिया'च्या ताज्या अंकांतून घेतली आहे. आपल्या देशाची लोकसंख्या ३५¼ कोटि आहे व सिनेमा थिएटरांची संख्या ६६० आहे. म्हणजे, दर ५३½ लक्ष लोकांस एक थिएटर, असें प्रमाण पडतें. इतर देशांबरोबर तुलना केली असतां हिंदुस्थानाचें ह्या बाबतीमधील स्थान लक्ष्यांत येईल.

सिनेमागृहांचें लोकसंख्येशीं प्रमाण

| देश | सिनेमा थिएटरें | लोकसंख्या ( कोटि ) | किती लोकांगणिक एक थिएटर ? ( हजार ) |
|---|---|---|---|
| रशिया | ९,९८७ | १६½ | १६½ |
| जर्मनी | ५,१०० | ६½ | १३ |
| ग्रेट ब्रिटन | ४,८९७ | ४½ | ९ |
| फ्रान्स | ४,००० | ४ | १०½ |
| हिंदुस्थान | ६६० | ३५¼ | ५३५ |

सन १९३३ मध्यें हिंदुस्थानांत बोलपट दाखविणारीं २४० सिनेमागृहें होतीं. ही संख्या एका वर्षांत ५०६ वर गेली. जपानमध्येंहि तत्सम संख्येंत दुपटीनें वाढ होऊन १९३४ मध्यें ८७७ थिएटरांतून बोलपट दाखविण्यांत येऊं लागले.

---

## कॉलेजांतील विद्यार्थ्यांची शरीरप्रकृति

मुंबई इलाख्यांतील कॉलेज-विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय तपासणींत असें आढळून आलें कीं, १३,८३४ विद्यार्थ्यांपैकीं ६,५७१, जणांची शारीरिक स्थिति बरी होती व ७,१३६ जणांची प्रकृति सामान्य म्हणजे असमाधानकारक होती. धारवाडच्या कर्नाटक कॉलेजांतील विद्यार्थ्यांचा तपासणींत पहिला नंबर लागला आणि गुजराथेंतील कॉलेजांतील विद्यार्थी सुमार असल्याचें दिसून आलें. शारीरिक खेळांच्या बाबतींत आपली कांहींच सोय नाहीं अशी विद्यार्थिनींची जोराची तक्रार आहे.

## हिंदुस्थानचें आर्थिक भवितव्य

[वरील विषयावरील, ' दि इकनॉमिस्ट ' ह्या सुप्रसिद्ध अर्थशास्त्रविषयक साप्ताहिकांमधील एका लेखांतील महत्त्वाचे मुद्दे खाली दिले आहेत.]

( १ ) हिंदुस्थानाचें परदेशांवर अवलंबन फारच अल्प आहे. तेथील उत्पादनापैकीं ७ ते १० टक्के इतकाच माल निर्गत होतो.

( २ ) हिंदुस्थान देश शेतीप्रधान असून, १९२९ ते १९३३ ह्या मुदतींत शेतीच्या उत्पन्नाची पैशांत व्यक्त होणारी किंमत निम्म्यानें घटली. तथापि, शेतकऱ्यानें सावकारास, जमीनदारास व सरकारास याव्या लागणाऱ्या रकमा कायम राहिल्यामुळें त्याची दुर्दशा उडाली.

( ३ ) परदेशांशीं होणारा व्यापार घटल्यामुळें सरकारचा वसूल कमी झाला. जकातीच्या उत्पन्नांत व प्राप्तीवरील करांत तूट आली व बजेटाची तोंडमिळवणी होईना. ही परिस्थिति सुधारण्यास सोन्याच्या निर्गतीमुळेंच सरकारास पुष्कळ सहाय झालें, ह्यांत संशय नाहीं.

( ४ ) सरकारनें शेतकऱ्यांवरील डोईजड बोजा हलका करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत व औद्योगिक उत्पादनहि वाढत आहे.

( ५ ) शेतकऱ्यांचें उत्पन्न वाढविणें अत्यंत जरूर आहे व त्याकरितां आधुनिक पद्धतीनें उत्पादन होण्याची खटपट केली पाहिजे. ह्यासाठी लागणारें भांडवल केवळ हिंदुस्थानांतच उभारतां येणें अशक्य आहे.

( ६ ) आज सुमारें १,००० कोटि रुपये ब्रिटिश भांडवल ह्या देशांत गुंतलेलें आहे. हिंदी भांडवलाची ( सरकारी व इतर रोखे,संयुक्त भांडवलाच्या मंडळया,इतर उद्योगधंदे हीं सर्व धरून) एकूण बेरीज ७५० कोटींवर जाणार नाहीं.

( ७ ) हिंदुस्थानानें परदेशी भांडवलाचें सहाय घेतल्याखेरीज चालणार नाहीं. ब्रिटिश लोकांस ह्या बाबतींत पुढाकार मिळवावयाचा असेल तर त्यांनीं आपलें व्यापारविषयक धोरण बदललें पाहिजे. ओटावा करारांविरुद्ध हिंदी लोकमत असून हिंदी उद्योगधंद्यांच्या न्याय्य हक्कांचें संरक्षण होईल, अशी गव्हर्नर जनरलांनीं काळजी घेतली पाहिजे.

( ८ ) हिंदुस्थान जसजसा स्वयंसत्ताक होत जाईल त्या मानानें सरकारी नोकऱ्यांतून इंग्रजांचें प्रमाण कमी होईल व त्यांस व्यापारी पेशा पुनः पत्करणें भाग पडेल.

( ९ ) हिंदी प्रगतीस ब्रिटिशांचें सहाय अजून कितीतरी होण्याजोगें आहे. परंतु, जुन्या पद्धतीचें आपलें वागणें सोडून, हिंदी लोकांस समतेनें वागविलें व त्यांच्या लायखीस व हुशारीस वाव दिला, तरच तें शक्य होईल.

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी
टेलरिंग फर्म
मॅनेजर:-व्ही. पी. पाटसकर, D.M.T.C.A. (London.)
पाटसकर आणि कंपनी
शर्ट स्पेशालिस्ट नं. १
४८ निहाल पेठ, पुणें शहर.
सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी
आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—० |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९—९ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—७ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—६ |
| ४% १९६०—७० ... ... | ११०—१० |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९६—६ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०५—१५ |
| ४% १९४३ ... ... ... | १०९—० |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०५—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०४—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०५—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | १०५—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३—६३ ) ... | १०९—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२१—४ |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२७—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०५—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३६—० |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५७५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | ९८—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९२—८ |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९०७—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु., डिव्हि. १३% ) | १४८—२ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २२३-१२ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२१—४ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १५४७—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५२२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९१—९ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६२—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १५१—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५९६—४ |

### सोनें—चांदी

| | | |
|---|---|---|
| चार्टर्ड बँकेचें सोनें | तोळयास | ३४—१३ |
| मिंट " | तोळयास | ३४-११½ |
| हिंदी मिंट चांदी | १०० तोळयांस | ५०—८ |
| हिंदी मिंट चांदी ( वायदा ) | १०० तोळयांस | ५०—८ |

आपणांस विहिर बोअर करावयाची आहे काय ?

# भिडे आणि सन्स्

स्वतः तयार केलेल्या मशीननें बोअर खणून देतात.

चौकशी कराः—

भिडे आणि सन्स

सांगली ( S. M. C. ) शनीचा पार, पुणें. २

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंड विमा कं.

# दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय

प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठी लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

# संजीवन हेअर टॉनिक

दारुणा ( Dandrulf ), केंस गळणें व टक्कल यांवर अनुभविक उपाय. केंसांची वाढ करण्यास उत्कृष्ट साधन. white oil पासून अलिप्त. बाटली किं. १ रु. पो. व पॅ. निराळें. पुण्यांत नू. म. विद्यालय भांडार, येथें मिळेल.

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग. कं. अमदाबाद.

# श्री माणकेश एजन्सी

शहापूर लुगडीं, जरीचीं व टोपपदरी, अंगास रंग न लागणारीं मिळतात.

तसेंच, इरकल, संबायत वगैरे पेठेचा गॅरंटीड माल मिळतो.

मंडई रस्ता, शनीचा पार, पुणें.

# ' अर्था 'चे किरकोळ अंक

खालील ठिकाणीं मिळतात.

पुणें १ आर्यभूषण छापखाना कचेरी.
२ एन. ए. अँड फ्रेंड्स्, अप्पा बळवंत चौक.

कोल्हापूर रा. शं. गोखले, रामकृष्ण कार्यालय.

सोलापूर व्ही. के. भागवत, हनुमान कार्यालय.

# S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street Bombay | 716, Sadashiv Peth Poona City

शेअर विक्री सुरू आहे

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें

अधिकृत भांडवल ... ... रु. १० लक्ष

तूर्त विक्रीकरितां काढलेलें भांडवल ... रु. ५ लक्ष

प्रत्येक शेअरची किंमत रु. ५०

१ अर्जासोबत प्रत्येक शेअरला रु. १५/– } प्रमाणें.
२ अर्जमंजुरीनंतर रु. १०/– }

बाकी रक्कम " अनकॉल्ड रिझर्व्ह " म्हणून राहील.

संचालक मंडळाचे अध्यक्षः—प्रो० वा. गो. काळे, एम्. ए., एक्स् मेम्बर, इंडियन टॅरिफ बोर्ड.

" उपाध्यक्षः—श्री. धोंडो कृष्ण साठे, बी.ए., बी. एससी., व्यापारी व कॉन्ट्रॅक्टर, पुणें.

प्रॉस्पेक्टस व शेअर अर्जाच्या नमुन्याकरितां लिहाः—

पुणें:—मॅनेजर, दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

मुंबई:—आर. आर. नावर आणि कं., शेअर व स्टॉक ब्रोकर, एक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, कोट.

नागपूर:—एस. एन. आगाशे आणि कं., चीफ एजन्टस, कॉमनवेल्थ इन्शु. कं. लि., महाल.

# K. K. & Co.

Photographic Dealers

POONA.

# एन. ए. ॲन्ड फ्रेन्ड्स

स्टेशनर्स, जनरल मर्चन्टस, ॲन्ड कमिशन एजन्टस.

आप्पा बळवंत चौक, पुणें २.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**

**This year 1934-35**
**Exceeds**
**2 CRORES & 50 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca,

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.



# काटकसर आणि चढाओढ

सध्यांचे आर्थिक मंदीचे दिवसांत अधिक काटकसर कशी करितां येईल हा विचार प्रत्येकापुढें आहेच. संस्था, ऑफिस, कारखाना, घर इ० सर्व ठिकाणीं काटकसरीचा प्रयत्न सुरू आहे.

**परंतु**

वेळेची काटकसर करणें आरोग्याशिवाय कसें शक्य होईल, आणि आरोग्य मिळण्यास व टिकविण्यास उपाय काय ?

याचें उत्तर

# आरोग्यमिश्रण

याचे सेवनानें

शौचास साफ होऊं लागून भूक वाढते व तरतरी आणि उत्साह हीं वाढतात.

बोधचिन्ह

सर्व एजंटांकडे मिळतें.

श्रीधूतपापेश्वर आर्यौषधि कारखाना,

पनवेल—कुलाबा.



# डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें

मध्यम वर्गांतील गृहेच्छु लोकांस | अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य

## भाडेकरी–घरमालक–गृहयोजना

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.

जनरल मॅनेजर



# वेस्टर्न इंडिया

## लाइफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड.

स्थापना स. १९१३ मुख्य कचेरी–सातारा

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची, पहिली आणि पहिल्या प्रतीची विमा कंपनी.

**बोनस** त्रैवार्षिक दर हजारीं

हयातींतील रु. ६०
हयातीनंतरचें रु. ७५

| | |
|---|---|
| एकूण चालू काम .... ... | २,५०,१५,०८२ रुपये |
| एकूण जिंदगी .... .... | ६१,६९,१६९ ,, |
| लाइफ फंड ... ... | ५०,९९,४३९ ,, |

एजन्सी आणि इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

मॅनेजर.


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख २२ जानेवारी, १९३६. अंक ४

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—

**कॉमनवेल्थ विमा कंपनी, लि. पुणें.**

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां भेटा अगर समक्ष लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

स्वदेशी

कापड म्हणजे काय!

(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.


या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.

हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणी-पासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.

खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण

**स्वदेशी भांडार**

लक्ष्मीरोड, पुणें २.



किर्लोस्कर

**लोखंडी नांगर**

आज ३,००,००० वर शेतकरी पूर्ण संतोषानें वापरीत आहेत.

किर्लोस्कर नांगरांच्या निरनिराळ्या २६ नमुन्यांची सविस्तर माहिती असलेला कॅटलॉग ताबडतोब मागवा.

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी ( सं. औंध )

एजंटः—केळकर बंधु, पुणें–नाशिक

दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें नं २.

१९३५–३६ च्या उंसाची लागवड सुरू झाली.

अंदाजी नफा शेंकडा ७ ते १० टक्के.

प्रॉस्पेक्टस व शेअर फॉर्म, कंपनीचे ब्यांकर्स व मुख्य कचेरी २५७, बुधवार पेठ, पुणें नं. २ यांजकडे मिळतील.

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

## वर्गणीदारांस सूचना

१ जानेवारी, १९३६ रोजीं 'अर्था' चें दुसरें वर्ष सुरू झालें. गेल्या वर्षाची ज्यांची वर्गणी अजून यावयाची असेल, त्यांनीं ती नव्या वर्गणीबरोबर सत्वर पाठवावी. ज्यांची मुदत संपली असेल, त्यांनीं अंक नको असल्यास तसें कळवावें.

व्यवस्थापक, 'अर्थ'

# विविध माहिती

### " बँक ऑफ महाराष्ट्र "

शनिवार, ता.८ फेब्रुवारी १९३६ रोजीं "बँक ऑफ महाराष्ट्र" चें उद्‌घाटन सर सोराबजी पोचखनवाला ह्यांचे हस्तें होणार आहे.

### रिझर्व्ह बँकेकरितां मुंबईत नवी इमारत

रिझर्व्ह बँकेसाठी मुंबई शहरांत नवी इमारत व्हावयाची आहे, व कोटांत राणीच्या पुतळयाच्या मागें सरकारी टेलिग्राफ ऑफिसची इमारत आहे, तिच्या आवारांतली जागा तिच्याकरितां पसंत करण्यांत आली आहे. जुन्या इमारतीच्या कांहीं भागाचाहि समावेश ह्या जागेंत होणार आहे.

### हिंदी रेल्वेजचें नऊ महिन्यांतलें उत्पन्न

गेल्या एप्रिल ते डिसेंबर अखेरच्या नऊ महिन्यांत हिंदुस्थानांतील सरकारच्या मालकीच्या रेल्वेजचें एकूण उत्पन्न ६४ कोटि, ९० लक्ष रुपये झालें. पूर्व वर्षीतल्या ह्याच मुदतींतल्या उत्पन्नाच्या मानानें हा आंकडा ६८ लक्ष रुपयांनीं कमी आहे. हिंदी रेल्वेजच्या सांपत्तिक स्थितींत सुधारणा अजून सुरू झाली नाहीं, हें उघड आहे.

### तिकिटाशिवाय रेल्वेचा प्रवास

रेल्वेचा प्रवास फुकट करणारांची संख्या एवढी मोठी आहे कीं, त्या योगानें आपलें फार नुकसान होतें, अशी रेल्वेच्या अधिकाऱ्यांची तक्रार आहे. फुकट प्रवास बंद करण्याचे शिकस्तीचे प्रयत्न आपण केले तरी त्यांस यश येत नाहीं असें त्यांचें म्हणणें असून त्याबाबत कायद्याच्या शिक्षेची तजवीज व्हावी, अशी त्यांची सूचना आहे. ह्यासंबंधांत कायदा लवकरच होण्याचा रंग दिसत आहे.

### चष्म्यांचा विमा

ग्रेट ब्रिटनमधील एका विमा कंपनीनें चष्म्यांचे विमे स्वीकारण्यास सुरवात केली आहे. चष्मा हरवला अगर मोडला, तर ही कंपनी ५ पौंडांपर्यंत खर्च करून नवा चष्मा देते अगर जुना दुरुस्त करून देते. वार्षिक हप्ता ५ शिलिंग बसतो.

### मुंबई इलाख्यांतील जंगल खात्याचें उत्पन्न

१९३४–३५ सालीं मुंबई सरकारच्या जंगलखात्यास ५५ लक्ष, ३४ हजार रुपये उत्पन्न मिळालें. त्यांतून खर्च वजा जातां निवळ नफा २४ लक्ष रुपये उरला.

### रौप्य ज्युबिली फंडाचा विनियोग

पंचम जॉर्ज बादशहांचे रौप्यज्युबिलीनिमित्त हिंदुस्थानांत उभारण्यांत आलेल्या फंडाची रकम १ कोटि, ३८ लक्ष रुपये झाली आहे. त्यांपैकीं सुमारें ९७ लक्ष रुपये ( ७०% ) प्रांतांस परत मिळतील. उरलेले ४१ लक्ष रुपये ( ३०% ) इंडियन रेड क्रॉस सोसायटी, सेंट जॉन्स ॲम्ब्युलन्स असोसिएशन, कौंटेस ऑफ डफरिन फंड व इंडियन आर्मी बेनिव्होलंट फंड ह्यांत वांटण्यांत येतील. ही सर्व विभागणी बादशहांच्या अनुमतीनेंच होईल.

### कामाच्या वेळांत विश्रांतीचें महत्त्व

कारखान्यांतील कामगारांना रोजचें काम करतांना साहजिकच कंटाळा व थकवा येतो. त्यांस योग्य वेळीं विसावा दिला, तर कामगारांस तें हवें असतेंच, परंतु त्याबरोबरच त्यांचेमधील आजारीपणाचें व अपघाताचें प्रमाण कमी होतें व त्यांची कार्यक्षमता वाढते, असा अनुभव आहे. इंग्लंडमधील एका कारखान्यानें कामगारांच्या इच्छेविरुद्ध सकाळीं पंधरा मिनिटें व दुपारीं १५ मिनिटें काम बंद ठेवलें. अर्ध्या तासाचें त्यामुळें जरी नुकसान झालें, तरी एकूण कामाचा उठाव त्यामुळें सवापट झाला !

### मुंबई इलाख्यांतील जवसाचें पीक

मुंबई इलाख्यांत ९६ हजार एकर जमिनींत जवस लावलेला आहे. हिंदुस्थानांतील एकूण पिकाच्या मानानें ही लागवड फक्त ४ टक्के भरते. मध्यप्रांत ( २८% ), संयुक्त प्रांत ( २५% ) व बिहार आणि ओरिसा ( १९% ) हे जवसाच्या पिकाचे दृष्टीनें महत्त्वाचे प्रांत आहेत.

### जंगलें आणि त्यांत चरणारीं जनावरें

मुंबई इलाख्यांतील जंगलांत सुमारें २५ लक्ष जनावरें सरकारच्या परवानगीनें चारणीस लावलीं जातात आणि त्यांबद्दल फीचें उत्पन्न सुमारें ५½ लाख रुपये होतें. पांच ते सहा लक्ष जनावरें फुकट चरूं दिलीं जातात.

### ब्रिटिश पौंडाची स्थिरता

गेल्या सालीं ब्रिटिश चलनी नोटांची सोन्यांत व्यक्त होणारी किंमत स्थिर राहिली आणि सोन्याचा आधार असलेल्या प्रमुख परराष्ट्रीय चलनांच्या हुंडणावळीच्या दरांत म्हणण्यासारखी चलबिचल झाली नाहीं. बेल्जम व इटालियन चलन खालावल्याकारणानें त्यांच्या मानानें मात्र अनुक्रमें ३८ व ६·२ टक्के इतकी मजबुती ब्रिटिश नोटांस आली.

### मनुष्यप्राण्याच्या आयुष्यांतील वेळेची विभागणी

मनुष्य ७० वर्षें जगला, असें समजल्यास तो आपल्या आयुष्यांतील १३ वर्षें बोलण्यांत दवडतो, ६ वर्षें जेवत असतो, २३ वर्षें मजा मारतो, १½ वर्षें आंग स्वच्छ करतो व २३ वर्षें झोपतो, असा हिशेब होतो. उरलेला वेळ कामांत खर्च करावयाचा, तर मग तो वांया न घालवणें जरूर नाहीं काय ?

### कॅनडा देशाची संपत्ति

उत्तर अमेरिकेंत कॅनडा हा महत्वाचा ब्रिटिश 'डोमिनिअन' आहे. त्याची लोकसंख्या थोडी ( सुमारें १ कोटि ) पण विस्तार मोठा आणि संपत्तिहि भरपूर आहे. १९३५ सालीं कॅनडांतल्या शेतीच्या पिकाचें उत्पन्न सुमारें १३५ कोटि रुपये झालें आणि त्यांतलें ५० कोटींची किंमत गव्हाच्या उत्पन्नाची होती. त्याच वर्षीं खनिज पदार्थांच्या कॅनडांतल्या उत्पादनाची किंमत सुमारें १०० कोटि रुपये भरली.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. ११ जानेवारी रोजीं पुरा झालेला आठवडा | ८९,०९,६०९ |
| ता. १८ जानेवारी रोजीं पुरा झालेला आठवडा | ७६,८४,०३६ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते १८ जानेवारी १९३६ अखेर | २,५९,१६,५८,५०६ |

## अनुक्रमणिका.


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४२ |
| २ ही स्वस्ताई का महर्घता? | ४३ |
| ३ जपान व लँकेशायर ह्यांची ओढाताण ... | ४४ |
| ४ स्फुट विचार ... | ४५ |
| व्यापारी कॉलेजें आणि मुंबई युनिव्हर्सिटी—प्रि. डावर ह्यांचा कोटिक्रम—मुंबई प्रांतिक जमीन-गहाणाची बँक—ब्रिटिश आगबोटींसाठी सरकारी सहायाची मागणी—सप्रू कमिटीच्या शिफारसी—चांदीच्या बाजारांत पुनः गडबड—कै. वा. रा. ब. काळे—आर्थिक परिस्थिति व बालमृत्यू. | |
| ५ सरकारी उत्पन्नाची वांटणी ... | ४८ |
| ६ 'अर्था' चें अभिनंदन | ४९ |
| ७ आंतरराष्ट्रीय व्यापार ... | ४९ |
| ८ निवडक बाजारभाव ... | ५० |
| ९ हिंदी चलनाबाबत मनोरंजक माहिती ... | ५१ |



# अर्थ

बुधवार, ता. २२ जानेवारी, १९३६


## ही स्वस्ताई का महर्धता ?

### सुबक, स्वस्त पण अनिष्ट !

मनुष्य बाजारांत गेला असतां चार दुकानांत चौकशी करून कमींत कमी किंमतींत जेथें माल मिळेल तेथें तो खरेदी करतो. त्याचप्रमाणें, दिसण्यांत सुबक असलेल्या पदार्थांकडे त्याचा ओढा असतो. हा मानवी मनाचा धर्म आहे असें मानण्यांत येतें. लहान मुलांस बाजारांत पाठवतांना, चार ठिकाणीं किंमतीची चौकशी करून जिन्नस घे, असें वडील माणसें त्यांस मुद्दाम सांगत असतात. ह्यांत व्यावहारिक ज्ञान सांठवलेलें असून तरुण पिढीस अनुभवजन्य माहिती आणि संसारी शिक्षण मिळावें, असा त्यांचा हेतु असतो. चौकस बुद्धि, पदार्थांची पारख आणि स्वस्त मालाच्या खरेदीनें होणारा बचत लक्ष्यांत येण्याची पात्रता हे गुण व्यक्ती आणि समाज ह्यांस हितकर आहेत, ही प्राचीन काळापासून चालत आलेली समजूत आहे आणि ती अनुभवावर आधारलेली आहे. माणसें कोणते व्यवहार करतात, ते कां करतात व कसे करतात हें सूक्ष्म रीतीनें समजून घेऊन त्या संबंधांतले आपले सिद्धांत अर्थशास्त्रज्ञांनीं बनवलेले आहेत आणि त्यासाठीं मानसशास्त्राचेंहि सहाय्य त्यांनीं घेतलें आहे. 'स्वस्त बाजारांत खरेदी करा आणि महाग बाजारांत विक्री करा' हा त्यांच्या सिद्धांतास धरून प्रणीत झालेला दंडक सुप्रसिद्ध आहे. गिऱ्हाइकें बाजारांत किंमतीची चौकशी करूं लागली असतां आपला माल खपावा म्हणून दुकानदारांची एकमेकांशीं चढाओढ चालते आणि तिचा फायदा हलक्या किंमतीच्या स्वरूपांत खरेदीदारांस मिळतो. गिऱ्हाइक स्वतःकडे ओढून घेण्याची व्यापाऱ्यांची प्रवृत्तिहि स्वभावसिद्ध आहे असें म्हणावयास हरकत नाहीं आणि तिला अनुलक्षूनच अर्थशास्त्राचा स्पर्धेसंबंधाचा सिद्धांत बनलेला आहे. त्यांमध्यें कितीहि दोष असले तरी, स्वताई व स्पर्धा इष्ट आहेत, असा उपदेश अर्थशास्त्र करीत असल्याचा आक्षेप त्यावर नेहमी घेण्यांत येतो. तथापि, सूक्ष्म विचाराअंतीं असें दिसून येईल कीं, अर्थशास्त्र स्वताईचें स्तोम माजवीत नाहीं आणि स्पर्धेच्या दुष्परिणामांकडेहि त्याचें दुर्लक्ष झालेलें नाहीं. खरेदी-विक्रीच्या सर्व बाजू हिशेबांत धरूनच स्वताईचा विचार करावयाचा असतो आणि केला जातो, ही महत्त्वाची गोष्ट येथें ह्या संबंधांत अनेक वेळां दृष्टिआड होते आणि गैरसमजास जागा उत्पन्न होते.

### हातसडीचे तांदूळ

ह्या प्रश्नाचें योग्य विवेचन करण्यास हातसडीच्या तांदुळाविषयीं ग्रामोद्योगसंघाचा सध्या प्रचार चालू आहे, त्याचें उदाहरण देणें सोयीचें होईल. गिरणींत चकचकित केलेले तांदूळ आकर्षक असतात आणि घरीं भात सडण्याचा त्रास वांचून ते स्वस्तहि पडतात, ह्या समजुतीनें तेच तांदूळ वापरण्याची संवय हिंदुस्थानांत अलीकडे झपाट्यानें प्रसार पावली आहे. यंत्राच्या सहाय्यानें मनुष्याची शारीरिक दगदग चुकून शुभ्र तांदूळ स्वस्त मिळत असतां हातानें भात सडण्याचा उपद्व्याप करणें व कोंड्याच्या मिश्रणाचा काळसर पदार्थ पोटांत घालणें वेडेपणाचें आहे, अशी लोकांची कल्पना झाली असून अर्थशास्त्राचीहि शिकवण तशीच असली पाहिजे, असें त्यांस वाटतें. परंतु ही विचारसरणी चुकीची आहे. तांदुळाचा चांगुलपणा केवळ त्याच्या रंगामध्यें नसून त्यांत पौष्टिकपणाचा गुण अत्यंत महत्वाचा गणला गेला पाहिजे. तांदूळ बघण्यासाठीं नसून खाण्यासाठीं असतात. त्यांत शुभ्रपणा अधिक असला पण अन्नसत्वाचा गुण त्या मानानें कमी असला तर तकाकीचा तांदूळ, त्याच्या मुख्य उपयोगाच्या दृष्टीनें, हलक्या दर्जाचाच समजला पाहिजे. तांदुळांतला तांदुळपणा नष्ट झाला असतां त्याच्या वाढलेल्या रंगाच्या आकर्षकतेनें त्यास खरी किंमत येणें शक्य नाहीं. ज्या उपयोगाकरितां एखादा जिन्नस विकत घ्यावयाचा तो उपयोग त्यापासून चांगला होत नसेल तर, त्याची स्वताई ही वस्तुतः महर्धताच होय. गिरण्यांत साफ केलेल्या तांदुळांतून कोंडा सर्वथैव निघून गेल्या कारणानें त्यांतला पौष्टिकपणा नाहींसा होतो, एवढेंच नव्हे, तर ते खाल्ल्यानें कित्येक रोगहि मनुष्याच्या शरीरांत उत्पन्न होतात, असें वैद्यकी तज्ञ सांगतात. गिरणींत होणाऱ्या गव्हाच्या पिठाची भाकरी खाल्ल्यानें कॅन्सर सारखे भयंकर रोग होतात असा विलायतेंतला अनुभव आहे, आणि सबंध गव्हाच्या रोट्या लोकांनीं खाव्या असा वैद्यांचा सल्ला आहे.

### रवींद्रनाथ टागोर यांचा लेख

'हरिजना'च्या गेल्या ११ व्या तारखेच्या अंकांत 'स्वतःवर ओढवलेली उपासमार' ह्या शीर्षकाखालीं डॉ. रवींद्रनाथ टागोर ह्यांचा प्रस्तुत विषयावर एक लेख प्रसिद्ध झाला आहे. बंगाली जनतेस उद्देशून त्यांनीं असें म्हटलें आहे कीं हे लोक गिरणींतून निघालेले निःसत्व असे तांदूळ शिजवून खातात आणि त्या मार्गानें बेरीबेरी सारख्या रोगांस आमंत्रण देतात. जणुं काय मलेरियासारख्या आपत्ति बंगालमध्यें पुरेशा नाहींत ! ह्या रीतीनें भात सडण्याच्या गिरण्यांचा प्रसार करून त्यांनीं नवीन रोगांची भर घातली आहे. गिरण्या निघाल्यानें प्रकृति-स्वास्थ्यास आवश्यक असलेली अंगमेहनत तर कमी झालीच, पण त्या बरोबर खेडेगांवांतील एक धंदाहि नाहींसा झाला आहे. ह्यासाठीं शरीराची हानि करणाऱ्या ह्या घातक प्रघातास आळा घालण्याचा लोकांनीं संघटित व निश्चयात्मक प्रयत्न करावा, असें त्यांचें कळकळीचें व आग्रहाचें सांगणें आहे. स्वताई आणि सुबकपणा ह्यांच्या बरोबर पदार्थामध्यें व्यावहारिक उपयुक्ततेसारखे इतर व महत्वाचे गुण असावे लागतात, ही साधी पण महत्वाची गोष्ट अनेकांच्या ध्यानांत येत नाहीं. आज आमच्या बाजारांत बाहेरून येणाऱ्या अत्यंत स्वस्त व सुंदर चाकू-कात्र्या वाटेल तितक्या मिळतात. परंतु त्यांच्यानें कापण्याचें काम कितीसें होऊं शकतें, हें पाहिलें असतां, त्यांची हलकी किंमत खरोखर भारी आहे आणि त्यांचें सौंदर्य केवळ दिखाऊ आहे, ह्याची तेव्हांच खात्री पटते.

## जपान व लँकेशायर ह्यांची हिंदी बाजारांत ओढाताण.

जपानची स्पर्धा ब्रिटिश कारखानदारांस सर्वत्र भोंवूं लागली असून लँकेशायरच्या कापडाच्या गिरण्यांस तर ती विशेष तीव्रतेनें जाचक होत आहे. चीन, सिलोन, हिंदुस्थान इत्यादि पौरस्त्य देशांतील बाजारपेठा हस्तगत करण्याचा सपाटा जपाननें चालवला आहे, आणि ह्या स्पर्धेस तोंड देण्याचे शिकस्तीचे यत्न ब्रिटिश कारखानदार करीत आहेत. ह्या झटापटीशीं हिंदुस्थानचा निकट संबंध आला आहे, म्हणून सदरहु विषय हिंदी जनतेस अत्यंत जिव्हाळ्याचा असा झाला आहे. कपास पिकवणारा हिंदी शेतकरी वर्ग, स्वदेशी गिरण्यांचे चालक आणि कापड वापरणारी व कर देणारी सामान्य हिंदी जनता ह्यांचे हितसंबंध सदरहु प्रश्नाशीं निगडित झाले आहेत. कपाशीस बांहेरच्या देशांत चांगली मागणी येऊन तिचे भाव वाढावे ह्यांत हिंदी शेतकऱ्यांचें हित आहे. स्वदेशी कापडास परदेशी कापडाच्या चढाओढींत मागें पडणें प्राप्त होऊं नये आणि देशी मालास तेजी असावी ही येथील गिरणीवाल्यांची इच्छा असणें स्वाभाविक आहे. स्वदेशीचा पुरस्कार करणारी हिंदी जनता देशांत झालेला माल स्वार्थत्यागपूर्वक घेण्यास तयार आहे, तथापि जकातीचा बोजा शक्य तितका हलका असावा असें बहुजन समाजास वाटणें साहजिक आहे. स्वदेशीच्या पुरस्कारार्थ हिंदुस्थाननें जपानी कापडाच्या आयातीच्या मार्गांत जबर जकातीचे अडथळे उत्पन्न केले असतां आम्हीं तुमची कपास घेऊन तुम्हांस मदत कां करावी ? असें जपानी कारखानदारांनीं म्हटल्यास तें अगदींच वावगें ठरणार नाहीं. इंग्लंड व हिंदुस्थान हे एकाच ब्रिटिश साम्राज्याचे घटक व ब्रिटिश कारखानदारांस हिंदी लोकांच्या राष्ट्रीय आकांक्षांविषयीं सहानुभूति वाटते; म्हणून ह्या देशानें ब्रिटिश कापडाची आयात सवलतीच्या जकाती घेऊन होऊं द्यावी अशी लँकेशायरची मागणी. कापडाच्या आयातीवर सध्या जी जकात आहे, तीमध्यें जपानच्या मानानें लँकेशायरला सवलत मिळालीच आहे. तथापि, तेवढ्यानें ब्रिटिश गिरणीवाल्यांचें समाधान न होतां, हिंदी गिरण्यांच्या संरक्षणासाठी असलेली प्रस्तुत जकात वास्तविक रीतीनें फार मोठी आहे, म्हणून ती आपले बाबतींत कमी करावी, असें त्यांचें म्हणणें आहे, आणि ह्या प्रश्नाचा विचार टारिफ बोर्ड करीत आहे. आपल्या मागणीस देवाण-घेवाणीच्या व्यवहारी तत्त्वाचा आधार आहे हें सिद्ध करण्यासाठी लँकेशायर हिंदी कपाशीची खरेदी वाढत्या प्रमाणांत करीत असल्यासंबंधानें पुराव्याचे आंकडेहि ते पुढें मांडीत आहेत.

हा सर्व प्रकार जपानी कारखानदारांच्या नजरेंतून निसटणें अर्थातच शक्य नाहीं. जपाननें हिंदी कपाशीची आयात विशिष्ट प्रमाणांत केली असतां हिंदुस्थाननें जपानी कापड विशिष्ट जातीचें आणि लांबीचें, जकात घेऊन, आंत येऊं द्यावें अशा प्रकारचा हिंद-जपान करार झालेला आहे, त्याची मुदत लवकरच संपत आहे. ह्या गोष्टीचा फायदा घेऊन आपल्या मागण्यांचें थोडें नवीन व्हावयाच्या कराराचे प्रसंगीं पुढें दामटावें, असें जपाननें ठरविलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. लँकेशायरचे प्रतिनिधी हिंदुस्थानांत आले आहेत, त्यांचें असें सांगणें आहे कीं, ब्रिटिश गिरण्या पूर्वी हिंदी कपास मुळीच वापरित नसत; परंतु अलीकडे मोदी-लीज करार झाल्यापासून हिंदी कपाशीची ग्रेट ब्रिटनमधली आयात सारखी वाढत असून तिचा आकडा आतां ४ लक्ष गासड्यांच्या घरांत आला आहे. सर रिचर्ड जॅक्सन ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, लँकेशायर आणि हिंदुस्थान ह्यांनीं परपस्परांशीं व्यापाराचे बाबतींत सहकार्य करून एकमेकांस सवलतीनें वागवण्यांत दोघांचेंहि हित आहे. इंपीरिअल कौंसिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चचे नवे व्हाइस प्रेसिडेंट आणि मध्यवर्ती हिंदी कॉटन कमिटीचे अध्यक्ष, सर ब्राइस बर्ट, ह्यांनीं सदरहु संस्थेच्या मुंबई येथें भरलेल्या सभेंत ह्याच मताचा अनुवाद केला. इकडे, हिंदुस्थान व ग्रेटब्रिटन ह्यांनीं कपास व कापड ह्यांची सवलतीनें देवघेव करण्याच्या इष्टतेविषयीं चर्चा चालली असतां जपानी व्यापारी स्वस्थ बसलेले नाहींत. येत्या सप्टेंबर महिन्यापूर्वी हिंद-जपान कराराचा फेरविचार करण्याकरितां परिषद् भरेल, तीमध्यें जपानी मालावरची जबर जकात कमी झाली पाहिजे, असा आग्रह धरण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. जपान आणि ग्रेटब्रिटन ह्यांच्या कापडावरील जकातींत जपानला प्रतिकूल असा भेद करण्याचें कारण नाहीं; जपान ग्रेटब्रिटनेपेक्षां किती तरी ज्यास्त हिंदी कापूस घेत असल्यानें ह्या तऱ्हेचा भेदाभेद अन्यायाचा आहे असें त्यांचें म्हणणें आहे. चालू कराराप्रमाणें जपाननें हिंदी कापसाच्या १५ लक्ष गाठी घेतल्या तर हिंदुस्थाननें ४० लक्ष चौरस वार लांबीचें कापड जपानमधून येऊं द्यावें असें ठरलें आहे. हें प्रमाण ३:१ आहे, तें १:१ असें व्हावें अशी मागणी जपानी व्यापारी करणार आहेत. करारांत अशा तऱ्हेच्या इतर दुरुस्त्याहि सुचवण्याचा त्यांचा बेत आहे. ह्याप्रमाणें, हिंदी कपास व कापड ह्यांच्या बाजारांत सध्या तिरंगी किंवा चौरंगी सामना चालू आहे. हिंदी राष्ट्राच्या दृष्टीनें विचार करतां, येथील शेतकरीवर्ग आणि स्वदेशी कारखाने ह्यांच्या हिताचें संवर्धन ज्या मार्गानें होईल तोच लोकांनीं व सरकारनें चोखाळला पाहिजे. हिंदी कापसाच्या चार लाख गाठी घेणाऱ्या लँकेशायरला जकातीच्या विशेष सवलती आणि पंधरा लक्ष गाठी घेणाऱ्या जपानच्या कापडावर जबर जकाती, हा सध्याचा प्रकार सकृद्दर्शनींच विपरीत दिसतो आणि त्या विरुद्ध जपाननें तक्रार केल्यास ती गैरवाजवी आहे, असें म्हणणें कठीण जाईल. टारिफ बोर्डाच्या शिफारशींसंबंधानें निर्णय करतांना ह्या सर्व साधकबाधक गोष्टींचा काळजीपूर्वक विचार व्हावा लागेल आणि एव्हांपासूनच त्यांची चर्चा करणें आवश्यक आहे. जपान व्यापारी करारासंबंधानें काय धोरण आंखणार आहे, ह्याची कल्पना पुढ मांडली गेली असल्यानें लँकेशायरच्या मागण्यांचा निकाल करतांना त्या ध्यानांत बाळगणें जरूरच होईल.

## पंचम जॉर्ज बादशहा ह्यांच्या निधनाची शोककारक वार्ता

आजच्या अंकाचा मजकूर छापून तयार होत असतां पंचम जॉर्ज बादशहा ह्यांच्या निधनाची दुःखदायक वार्ता प्रसिद्ध झाली. प्रजावात्सल्य आणि सौजन्य इत्यादि त्यांच्या सद्गुणांमुळें साम्राज्यांतील जनतेच्या मनांत बादशहांच्या संबंधानें पूज्यबुद्धि आणि प्रेम उत्कटतेनें वसत होतीं. बादशहांच्या शोककारक निधनानें त्यांच्या प्रजेस आणि जगांतील इतर देशांतील लोकांसहि हळहळ वाटेल.

## स्फुट विचार

### व्यापारी कॉलेजें आणि मुंबई युनिव्हर्सिटी

मुंबई इलाख्यांत सिडेनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स हें व्यापारी शिक्षणाचें एकच कॉलेज असल्यामुळें पुणें व अहमदाबाद येथें अशा संस्था काढण्या संबंधाच्या योजना तयार होऊन त्या विश्वविद्यालयाच्या अधिकाऱ्यांकडे पाठविण्यांत आल्या आहेत. कॉलेजांची स्थापना किंवा विस्तार ह्यांचेबाबत परवानगीसाठीं युनिव्हर्सिटीकडे अर्ज गेले असतां त्यांची चौकशी व्हावी ह्या हेतूनें कमिट्या नेमण्यांत येतात. पुणें व अहमदाबाद येथील योजलेल्या व्यापारी कॉलेजांचे बाबत कमिट्यांची चौकशी झाली असून त्यांच्या शिफारसी युनिव्हर्सिटीच्या कार्यकारी मंडळाकडे गेल्या आहेत, असें समजतें. पुढें आलेल्या योजनांमध्यें, इमारती, शिक्षकवर्ग, ग्रंथसंग्रह, उत्पन्न आणि निधि ह्यांचेविषयीं कांहीं वैगुण्यें असल्यास तीं दूर करण्याबद्दल कमिट्या शिफारस करतात आणि ह्या अटींवर युनिव्हर्सिटीचें सिंडिकेट व सेनेट कॉलेजांच्या उत्पादकांस व चालकांस योजना अमलांत आणण्याची परवानगी देतात, असा नेहमींचा रिवाज आहे. अहमदाबाद व पुणें येथें निघावयाच्या व्यापारी कॉलेजांच्या संबंधानें शिफारसी काणत्या झाल्या आहेत आणि अटी कोणत्या घालण्यांत आल्या आहेत, हें अजून जाहीर झालेलें नाहीं. कित्येक ठिकाणीं ज्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत किंवा ऐकिवांत आहेत, त्यांवरून अहमदाबाद येथील कॉलेजाच्या उत्पादकांनीं मोठा फंड गोळा केला पाहिजे अशी शर्त सुचविली गेली आहे आणि पुण्याच्या योजनेंत पैशाच्या संबंधांत मोठें वैगुण्य आहे, त दूर झालें पाहिजे, असा अभिप्राय व्यक्त करण्यांत आला आहे, असें समजतें. अहमदाबादच्या कॉलेजांतील वैगुण्य सहज दूर होण्यासारखें असून, येत्या जूनपासून ती संस्था चालू होण्यास हरकत येणार नाहीं, असें म्हणतात. पुण्याच्या कॉलेजास मात्र अहमदाबादप्रमाणें पैशाचा पुरसा पुरवठा होण्याचा तूर्त तरी संभव नसल्यानें त्या योजनेस मान्यता देण्याचें काम पुढें ढकलण्यांत येईल, अशी बातमी आहे. ह्या बातमींत तथ्य असेल तर पुण्याच्या योजनेंत, जे तिच्या उत्पादकांस सहा महिन्यांत दूर करतां येणें अशक्य आहे, असे कोणत दोष आहेत असें युनिव्हर्सिटीस वाटतें आणि त्यासंबंधांत योजनेच्या पुरस्कर्त्यांचें काय म्हणणें आहे, हें लोकांस समजणें अगत्याचें आहे. अहमदाबादेसारख्या श्रीमान शहरांत व्यापारी कॉलेजाकरितां पैसा जमवणें जसें सोपें आहे, तसें तें पुण्यास शक्य नाहीं, हें उघड आहे. तथापि, एकंदर कार्यक्षमतेच्या बाबतींत महाराष्ट्रीय कॉलेजाची योजना सामान्यतः समाधानकारक असली तर विशिष्ट शर्तींवर तिला मान्यता देण्यास युनिव्हर्सिटीची हरकत असूं नये. अहमदाबादेस परवानगी मिळाली व पुण्याची मान्यता पुढें ढकलली गेली तर तो महाराष्ट्रास अन्याय होणार आहे.

### प्रि. डावर ह्यांचा कोटिक्रम

पुणे आणि अहमदाबाद येथें स्थापन व्हावयाच्या व्यापारी शिक्षणाचे कॉलेजांचे संबंधांत युनिव्हर्सिटी सेनेटमध्यें चर्चा व्हावयाची आहे, तिला अनुलक्षून प्रि. डावर ह्यांनीं बॉम्बे क्रॉनिकल पत्रांत विचार प्रदर्शित केले आहेत, त्यांविषयीं येथें दोन शब्द लिहिणें आवश्यक आहे. युनिव्हर्सिटीची बी. कॉमची पदवी मिळवलेल्या लोकांस त्यांचा त्या विषयांचा अभ्यास झाला असला तरी बँकिंग, हिशेबपद्धति, इत्यादींची निराळी परीक्षा पास झाल्यावांचून नोकरी मिळत नाहीं, अशी त्यांची तक्रार असून, हा दोष दूर झाला पाहिजे असें त्यांचें म्हणणें आहे. ह्यापुढें जाऊन ते असें म्हणतात कीं, व्यापारी पदवी धारण करणारांस आजच काम मिळण्याची मारामार पडत असल्यामुळें नवीन व्यापारी शिक्षणाचीं कॉलेजें स्थापन करण्यांत कांहीं हंशील नाहीं. प्रि. डावर ह्यांचा हा कोटिक्रम सकृद्दर्शनीं योग्य वाटला तरी विचाराअंतीं त्यांत विशेष तथ्य नाहीं, हें लक्ष्यांत येण्यासारखें आहे. आर्थिक मंदीमुळें सर्वत्र बेकारी माजली असून कोणतीहि पदवी धारण करणारास आज बेकारीशी झगडावें लागणारच आहे. तथापि, व्यापारी शिक्षणक्रम निदान व्यावहारिक स्वरूपाचा तरी आहे आणि त्यांतून जाणाऱ्या विद्यार्थ्यांची स्थिति इतर विषय शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानानें अधिक वाईट होणार नाहीं, हें निश्चित आहे. शिवाय, व्यापारी पदवी मिळण्याची सोय फक्त मुंबईसच आहे, त्यामुळें बाहेरच्या होतकरू विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होते, ही गोष्ट मान्य केल्यावांचून गत्यंतर नाहीं. उद्योग व व्यापार ह्यांच्या मार्गांत नव्यानेंच पाऊल टाकणाऱ्या महाराष्ट्रांत व्यापारी कॉलेजाची उणीव आहे, ती भरून निघण्याचा प्रयत्न होत असतां त्यास उत्तेजन देणें हें युनिव्हर्सिटी व सरकार ह्यांचें एक प्रकारचें कर्तव्य आहे. प्रि. डावर ह्यांस हवी असलेली सुधारणा त्यांनीं युनिव्हर्सिटीमार्फत अवश्य घडवून आणावी; परंतु तसें प्रत्यक्ष होईपर्यंत मुंबईच्या बाहेर व्यापारी शिक्षणाची सोय होत असल्यास तिच्या मार्गांत अडथळा उत्पन्न करणें श्रेयस्कर नाहीं. अहमदाबादेंत नवीन व्यापारी कॉलेज निघाल्यास त्यांत मुंबईस किंवा पुण्यास वैषम्य वाटण्याचें कारण नाहीं., परंतु युनिव्हर्सिटीच्या शर्ती पुऱ्या करून अहमदाबादेनें एकदा कॉलेज चालू केलें तर पुण्याच्या कॉलेजास मान्यता मिळणें दुरावेल व पुढें अशक्यहि होईल, अशी भीति वाटण्यास जागा आहे. करितां, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या चालकांनीं युनिव्हर्सिटीच्या अटी समाधानकारक रीतीनें पुऱ्या करून तिची आपल्या कॉलेजास मान्यता मिळवण्याची शिकस्त केली पाहिजे. योजनेचा अपुरेपणा किंवा योग्य तयारीचा अभाव, असल्या कारणांमुळें संधि गमावल्याचा दोष संस्थेच्या चालकांनीं आपणांवर येऊं देतां कामा नये. त्याचप्रमाणें, पुण्याच्या कॉलेजाच्या योजनेंत योग्य अवधींत जरूर ती वाढ होण्याची तरतूद असेल आणि शिक्षण-व्यवस्था कार्यक्षम होण्याची शक्य तितकी तरतूद करण्यांत आली असेल तर युनिव्हर्सिटीनें तीमध्यें सुधारणा सुचवाव्या, परंतु मान्यतेची चाल-ढकल करूं नये, हें उचित आहे.

### मुंबई प्रांतिक जमीन-गहाणाची बँक चालू झाली

आमच्या इलाख्यांत प्रयोगादाखल जमीन-गहाणाच्या तीन बँका कांहीं वर्षांपूर्वीं स्थापन करण्यांत आल्या. त्यानंतर गेल्या पांच वर्षांत ह्या संस्थांचा विस्तार होण्याची आवश्यकता तीव्रतेनें भासूं लागली. बँकिंग कमिटीच्या ह्या बाबतींतल्या शिफारसी, मद्रास इलाख्यांत असलेल्या संस्थांची झालेली प्रगति आणि प्रचलित आर्थिक मंदीच्या परिस्थितींत शेतकरी वर्गाच्या कर्जबाजारीपणाचा बोजा हलका करण्याची निकड इत्यादि कारणांमुळें ही तीव्रता वाढली. खास नेमलेल्या कमिटीच्या शिफारशींस अनुसरून मुंबई सरकारानें दहा नवीन प्राथमिक जमीन-गहाणाच्या बँका स्थापन केल्या असून त्यांस स्वस्त दरानें भांडवल पुरवण्याकरितां एक मध्यवर्ती प्रांतिक बँकेचीहि स्थापना केली आहे. प्रांतिक बँक भांडवल उभारील त्याचें मुद्दल व व्याज ह्यांचे बाबतींत सरकार हमी घेणार असल्यानें त्या संस्थेच्या व्यवहारांस मजबुती येणार

आहे. ह्या बँकेचा आपचारिक उद्‌घाटन समारंभ लॉर्ड ब्रेबर्न ह्यांच्या हस्तें मुंबईस गेल्या बुधवारीं झाला. जिल्हानिहाय स्थापन झालेल्या जमीनगहाणाच्या प्राथमिक बँकांच्या कामास आतां लवकर चालना मिळेल, अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. जमीन-गहाणाच्या तारणावर लांब मुदतीचीं कर्जें देणाऱ्या बँकांची जबाबदारी काय आहे, ह्यासंबंधानें उद्‌घाटन समारंभाचे प्रसंगीं गव्हर्नर साहेबांनीं काढलेले उद्गार सर्वांनीं ध्यानांत बाळगण्यासारखे आहेत. ते म्हणाले:–"प्राथमिक जमीन-गहाणाच्या बँकांचे कामासंबंधीं एक महत्त्वाचा धडा शिकण्यासारखा आहे, आणि तो असा आहे कीं, सदरहू संस्थांमध्यें बुडित कर्जें व थकबाक्या निघतां कामा नयेत आणि ज्या मानानें हें ध्येय साध्य होइल त्याच मानानें त्यांमध्यें यश प्राप्त होईल. प्रांतिक बँकेस ह्याच तत्त्वाप्रमाणें वागावें लागेल, इतकेंच नाहीं तर, तें तत्त्व अधिक कशोशीनें पाळावें लागेल. प्राथमिक बँकांचे व्यवहार सावधगिरीचे असले पाहिजेत; आणि प्रांतिक बँक हा त्यांचा पाया असल्यामुळें तिच्या कारभारांत तर अधिकच सावधगिरी असणें आवश्यक आहे."

---

### ब्रिटिश आगबोटींसाठीं सरकारी सहायाची मागणी

मालाची किरकोळ ने-आण करणाऱ्या जहाजांच्या धंद्याचें परराष्ट्रीय स्पर्धेपासून संरक्षण व्हावें म्हणून ग्रेटब्रिटनमध्यें सरकारनें द्रव्यसहाय देण्याचें धोरण अंमलांत आणलें आहे. स्वदेशीच्या किंवा स्वसाम्राज्यनिष्ठेच्या तत्त्वावर पी. अँड ओ. कंपनी सारख्या बलिष्ठ व प्रख्यात आगबोटींच्या ब्रिटिश मंडळीच्या चालकांस परदेशी स्पर्धेची झळ लागून सरकारी संरक्षण मागण्याची पाळी यावी, हें बदललेल्या जागतिक आर्थिक परिस्थितीचें द्योतक आहे. परदेशी कंपन्यांस सरकारची मदत असल्यानें त्यांच्याशीं आपणांस टक्कर देणें कठीण झालें असून समुद्रांतील कांहीं भागांत वहातुक करणाऱ्या आपल्या आगबोटी, ब्रिटिश साम्राज्यांतर्गत राष्ट्रांच्या सहायाच्या अभावीं,काढून घ्याव्या लागतील असे निर्वाणीचे उद्गार पी. अँड ओ. च्या वार्षिक सभेंत मि. अलेक्झँडर शॉ ह्यांनीं काढले. ऑस्ट्रेलियाच्या बाजूच्या महासागरांत वहातुक करणें आपणांस अशक्य झालें असून तो धंदा परकीयांचे हातीं गेला आहे असें त्यांचें म्हणणें आहे. स्वदेशी व साम्राज्यांतर्गत आगबोटींच्या धंद्यानें ब्रिटिश व्यापार, उद्योगधंदे व मजूरी ह्यांस कसें सहाय होतें हें उदाहरणांनीं दाखवून परदेशी कंपन्यांस त्यांच्या सरकारांकडून मिळणारी मदत बंद झाली पाहिजे किंवा जशास तसें ह्या न्यायानें ब्रिटिश साम्राज्यांतील राष्ट्रांनीं स्वतःच्या कंपन्यांचें त्याच रीतीनें रक्षण केलें पाहिजे, असें त्यांनीं प्रतिपादन केलें. त्यांच्या कंपनीनें स्ट्रॅथमोर ह्या नांवाची मोठी आगबोट बांधवून घेतली, तिची बांधणी चालली असतां कामाचे साडेतेरा लक्ष दिवस झाले आणि चौदा हजार बेकार लोक व त्यांचे आश्रित ह्यांस अठरा महिने काम मिळालें, ही गोष्टहि मि. शॉ ह्यांनीं आपल्या भाषणांत निवेदिली. आज जगांत व्यापारी आगबोटींचा इतका सुळसुळाट झाला आहे कीं, पुढें येणाऱ्या भरभराटीच्या काळांतहि त्यांस पुरेसें काम मिळणें अशक्य आहे आणि परकीय राष्ट्रें आपली महत्त्वाकांक्षेची तृष्णा तृप्त करण्यासाठीच केवळ कर देणारांचा पैसा लढाऊ आरमाराच्या कार्यक्रमाचें एक अंग म्हणून व्यापारी जहाजांस सहाय देण्यांत खर्ची घालीत आहेत, असा त्यांचा आक्षेप आहे. तो घेतांना, ग्रेटब्रिटनचें आरमारविषयक धोरण पिढ्यानुपिढ्या ह्याच प्रकारचें आहे, ही गोष्ट मात्र ते विसरले. स्वतःवर कराचा बोजा लादून घेऊन परकीय राष्ट्रें समुद्रांतली वहातुक आपल्या आगबोटींच्या द्वारें स्वस्त करीत आहेत, तर त्यांत जगाचें हितच नाहीं काय ? आणि खुल्या व्यापाराचा पुरस्कार करणाऱ्या ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं ह्या स्वस्ताईविरुद्ध तक्रार कां करावी ? हे प्रश्न त्यांस विचारण्याजोगे आहेत. परकीय राष्ट्रांशीं ह्या बाबतींत वाटाघाटी करून त्यांचा कांहीं उपयोग होणार नाहीं आणि ब्रिटिश सरकारानें आपल्या आगबोटी कंपन्यांस द्रव्यसहाय देऊन त्यांचें अनुकरण करणें प्राप्त आहे, अशी मि. शॉ ह्यांची शिफारस आहे. हिंदी आगबोटीचा धंदा तर अगदीं बाल्यावस्थेंत आहे, आणि त्यास बाहेरील कंपन्यांची स्पर्धा अत्यंत जाचक होत आहे. त्यास सरकारनें योग्य सवलती द्याव्या अशी देशी कंपन्यांची मागणी आहे. मि. शॉ ह्यांनीं आपल्या सरकारास सुचवलेल्या धोरणास अनुसरून ते आणि त्यांचे व्यापारी बंधु ह्या हिंदी मागणीस जोराचा पाठिंबा देण्यास तयार होतील काय ? का, आपल्या देशांत एक तत्त्व आणि हिंदुस्थानांत दुसरें तत्त्व असा प्रकार ते करणार ? ह्या प्रश्नांचीं उत्तरें देणें फारसें अवघड नाहीं.

---

### चांदीच्या बाजारांत पुन्हां गडबड

चांदीचें नष्टचर्य अजून संपलेलें दिसत नाहीं. लंडन व न्यूयॉर्क येथील बाजारांतले भाव पडल्याबरोबर मुंबईच्या बाजारांत चांदीच्या किंमतीस घसरगुंडी लागली. मागणी अपुरी आहे असें पाहून आणि भाव ज्यास्त खाली जाण्याचा संभव आहे असें वाटून कित्येक धंदेवाल्यांनीं माल विकला. पहिल्या वायद्याचा भाव एका क्षणीं तर ४६ रु. १२ आण्यांपर्यंत खाली गेला व पुढें तो ४८ रु.२ आण्यांवर सावरला.पटावरींत होणाऱ्या घडामोडींमुळें उत्पन्न झालेल्या अनिश्चितपणाची बाजारांच्या गोंधळांत भर पडून चांदीचा भाव कोठें स्थिरावणार, ह्याचा अंदाज लागणें कठिण झालें. चांदीच्या दरांत गेल्या बारा महिन्यांत काय विलक्षण स्थित्यंतरें घडून आलीं आहेत, हें पाहिलें असतां चमत्कार वाटतो. गेल्या सालीं ह्या वेळेचे सुमारास चांदीचा भाव (१०० तोळयांस) ६४-६५ रुपये होता. सहा महिन्यांमागें तो ७१ रुपयांपर्यंत चढत गेला आणि चांदीचें भाग्य उदयास आलें असें वाटूं लागून अमेरिकेचा बाजारभाव उचलून धरण्याच्या धोरणावर लोकांचा विश्वास बसला. परंतु पुढें चीनमध्यें चलनपद्धतींत गोंधळ माजून भाव उतरला व गेल्या महिन्यांत तो ५२ रुपयांवर आला. बाजारभाव ४८ रुपयांच्या पाहिरीवर घसरेल अशी त्यावेळीं थोड्यांचीच कल्पना झाली असेल; पण मागच्या आठवड्यांत तो ४८ रुपये झाला. ही अस्थिरता आतां केव्हां थांबणार ?

---

### कै. वा. रावबहादुर काळे

गोखले स्कूल ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्स ही संस्था सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीस जोडून स्थापन व्हावी, ह्या हेतूनें रावबहादुर काळे ह्यांनीं सव्वा लाख रुपयांची देणगी एका रकमेनें दिली होती, ही एकच गोष्ट त्यांच्या दातृत्वाचीच नव्हे तर राष्ट्राच्या उन्नतीसाठीं आवश्यक असलेल्या तयारीसंबंधाच्या त्यांच्या व्यापक दृष्टीचीहि साक्ष पटवण्यास पुरेशी आहे. हिंदी राष्ट्राच्या प्रगतीस राजकीय व आर्थिक प्रश्नांचा शास्त्रीय पद्धतीनें अभ्यास होण्याची मोठी आवश्यकता असली तरी ह्या प्रकारचा उद्योग द्रव्याच्या अभावीं अशक्य होतो, हें जाणून त्यांनीं वरील संस्थेच्या स्थापनेस उदारपणें मदत केली. राष्ट्राची सर्वांगीण उन्नति हें त्यांच्या जीविताचें ध्येय असून त्या कार्मी

त्यांनीं स्वार्थत्यागपूर्वक अनेक क्षेत्रांत परिश्रम केले. त्यांच्या मृत्यूनें महाराष्ट्राची मोठी हानि झाली आहे, ह्यांत संशय नाहीं.

**आर्थिक परिस्थितीवर बालमृत्यूंचें प्रमाण अवलंबून आहे!**

हिंदुस्थानांतील बालमृत्यूंचें भीषण प्रमाण प्रसिद्ध आहे. बाल-विवाह, अज्ञान, अडाणीपणाच्या चालीरीती इत्यादि सामाजिक वैगुण्यांचा हा अनिष्ट परिणाम आहे, असें नेहमीं सांगण्यांत येतें. त्यांत कितीहि तथ्य असलें तरी ह्यासंबंधांतलें एक महत्त्वाचें कारण लक्ष्यांत ठेवणें आवश्यक आहे. दारिद्र्य व दुःस्थिति ह्यांवर बाल-मृत्यूंचें प्रमाण कसें अवलंबून असतें, हें दर्शविणारे अमेरिकेंतील सात शहरांत गोळा केलेले आंकडे सूचक होतील. जन्मास नुकत्याच आलेल्या मुलांच्या मृत्यूचें प्रमाण श्रीमंत कुटुंबांत कमी आढळतें, हा त्या चौकशी निष्कर्ष आहे.

बापाचें उत्पन्न व अर्भकांचा मृत्यू ह्यांचा परस्पर संबंध

| बापाचें उत्पन्न | एका वर्षाखालील अर्भकांच्या मृत्यूचें दरहजारी प्रमाण |
|---|---|
| उत्पन्न नाहीं | २११ |
| २,००० ते २५,०० रु. | १०७ |
| ४,००० रु. चे वर | ५९ |

वरील आंकड्यांवरून, आर्थिक परिस्थितींत सुधारणा होणें वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक जीवनास किती आवश्यक आहे, हें ध्यानांत येईल.

**" नवा मनु "**

जानेवारी, १९३६ पासून ह्या नव्या साप्ताहिकास सुरवात झाली असून तें दर शनिवारीं प्रसिद्ध होतें. त्याच्या प्रसिद्ध झालेल्या तीन अंकांवरून 'नवा मनु' वाचकांचें मनोरंजन तर करीलच, परंतु त्याबरोबरच हिंदी राष्ट्राची योग्य मार्गांनीं सर्वांगीण सुधारणा होण्यास जरूर असलेलें वळण सामाजिक विचारांस लावण्याचे कामीं हातभार लावील, असा भरवसा वाटतो. श्री. का. म. ताम्हनकर व पु. बा. कुळकर्णी ह्या हे नव्या साप्ताहिकाचे संपादक आहेत. वा. व. आगाऊ मनिऑर्डरीनें ४ रु. आहे.

**हिरड्यांपासून टॅनिक ॲसिड**

कातडीं कमावणें व रंगवणें, औषधें तयार करणें, इत्यादींसाठी टॅनीन व टॅनिक ॲसिड ह्यांचा उपयोग करतात. सध्या हिंदुस्थानांत हीं द्रव्यें तयार करणारा, राणिगंज येथें एकच कारखाना आहे. दक्षिण महाराष्ट्रांत हिरड्यांची कमतरता नाहीं; तेव्हां त्यांपासून हीं द्रव्यें काढण्याची योजना यशस्वी होण्यास अनुकूल परिस्थिति आहे. भोर संस्थानांत असा एक कारखाना स्थापन होणार आहे, असें समजतें. कातडीं कमवतांना टॅनीनचा उपयोग केल्यास पुष्कळ श्रम व वेळ ह्यांची बचत होईल. हिंदुस्थानाबाहेरहि टॅनीन व टॅनिक ॲसिड ह्यांचा खप होईल.

**लंडनमधील हॉस्पिटलांचा खर्च**

लंडन शहरांतील हॉस्पिटलांचा खर्च १९३४ सालीं ५½ कोटि रुपयांच्यावर झाला.त्यांच्या उत्पन्नाची जमा त्याच वर्षी ६½ कोटी रुपये झाली,उत्पन्नापैकीं निम्म्याच्या वर लोकांनीं दिलेल्या देणग्यांपासून मिळाले. लंडनची लोकसंख्या लक्ष्यांत घेतां तेथें दरमाणशीं ७ रुपये हॉस्पिटलवर खर्च होतात असें दिसतें. आजारी माणसांच्या शुश्रूषेवर आपण त्या मानानें किती खर्च करतों ह्या विषयींची तुलना हिंदुस्थानांतील शहरांच्या संबंधांत सहज करतां येईल.


प्रो. काळे ह्यांचें सर्वांस उपयुक्त पुस्तक

# बँका आणि त्यांचे व्यवहार

ह्या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति ह्यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या मार्गानें केलेलें असून, बँकांनीं आपला कारभार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा ह्या बाबतींत उपयुक्त सूचना केल्या आहेत. त्यांत चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँक, सावकारी धंदा, आर्थिक मंदी, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक प्रश्नांची सांगोपांग चर्चा आली आहे. सध्यांच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास तें बोधप्रद होईल अशा रीतीची पुस्तकाची मांडणी व विवेचनपद्धति आहे. बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाईक, व्यवस्थापक आणि नोकर ह्यांनीं तें अवश्य वाचून त्याचें मनन केलें पाहिजे.

कापडी बांधणी किंमत १ रु.

**प्रती, आर्यभूषण प्रेस, पुणें, यांचेकडे मिळतील.**

आपणांस विहिर बोअर करावयाची आहे काय ?

# भिडे आणि सन्स्

स्वतः तयार केलेल्या मशीननें बोअर खणून देतात.

चौकशी कराः—

भिडे आणि सन्स

सांगली ( S. M. C. ) शनीचा पार, पुणें. २

# संजीवन हेअर टॉनिक

दारुणा ( Dandrulf ), केंस गळणें व टक्कल यांवर अनुभविक उपाय. केंसांची वाढ करण्यास उत्कृष्ट साधन. white oil पासून अलिप्त. बाटली किं. १ रु. पो. व पॅ. निराळें. पुण्यांत नू. म. विद्यालय भांडार, येथें मिळेल.

**संजीवन मॅन्युफॅक्चरिंग. कं. अमदाबाद.**

# 'अर्था'चे किरकोळ अंक

**खालील ठिकाणीं मिळतात.**

पुणें १ आर्यभूषण छापखाना कचेरी.
२ एन. ए. अँड फ्रेंडस्, अप्पा बळवंत चौक.
कोल्हापूर रा. शं. गोखले, रामकृष्ण कार्यालय.
सोलापूर श्री. के. भागवत, हनुमान कार्यालय.

## सरकारी उत्पन्नाची वांटणी

### सर ओटो निमायर ह्यांची चौकशी

मॉंटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणा चालू झाल्या तेव्हां मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकार ह्यांचे दरम्यान उत्पन्नाची वांटणी कशी करावी आणि सुधारणांची गाडी सुरळीत चालण्यासाठी पैशाच्या पुरवठ्याची कोणती योजना अमलांत आणावी, हा प्रश्न उपस्थित झाला. सर जेम्स मेस्टन ह्यांवर ह्या बाबतींतली चौकशी करून समाधानकारक वांटणी सुचवण्याची कामगिरी सोंपवण्यांत आली. प्रांतिक सरकारांस तोडून दिलेल्या उत्पन्नाच्या बाबी पूर्वीच्या मानानें ज्यास्त उत्पादक झाल्या कारणानें त्यांनीं आपल्या वाढाव्यांतला हिस्सा विशिष्ट प्रमाणांत हिंदुस्थान सरकारास द्यावा आणि कालांतरानें मध्यवर्ती सरकारानें आपली मिळकत वाढवून पूर्णपणें स्वावलंबी व्हावें अशा प्रकारची व्यवस्था लॉर्ड मेस्टन ह्यांनीं सुचवली. हा मेस्टन-निर्णय मान्य होऊन रीतसर अमलांतहि आला. तथापि, त्याच्या योगानें कित्येक प्रांतांत असमाधान उत्पन्न होऊन आपल्या वांट्यास आलेल्या उत्पन्नाच्या बाबी अपुऱ्या असल्या विषयींची त्यांची तक्रार अखेरपर्यंत कायम राहिली. पंधरा वर्षांपूर्वी सर जेम्स मेस्टन ह्यांच्याकडे जी कामगिरी सोंपवण्यांत आली होती, त्याच तऱ्हेचें काम नवीन राज्यघटनेच्या प्रारंभापूर्वी सर ओटो निमायर ह्यांच्याकडे देण्यांत आलें आहे. सर ओटो गेल्या आठवड्यांत मुंबईस येऊन दाखल झाले आणि लगेच दिल्लीस प्रयाण करून त्यांनीं आपल्या कार्यास सुरवात केली. प्रांतांमध्यें नूतन राज्यपद्धतीचा अम्मल चालू होण्यापूर्वी त्यांतली उत्पन्नाची तरतूद विचारपूर्वक निश्चित होणें अगत्याचें असल्यानें सदरहु बाबतींत स्वतंत्र तज्ज्ञाचा सल्ला मिळवण्याचें पार्लमेंटनें ठरवलें आणि सर ओटो ह्यांस ती कामगिरी सांगितली. त्यांच्या चौकशीसाठी प्रांतिक सरकारांनीं आपल्या मागण्या आणि त्यांच्या आधारार्थ जरूर ती माहिती हिंदुस्थान सरकारामार्फत अगोदरच पुरवली असून मध्यवर्ती सरकाराचेंहि म्हणणें त्यांच्यापुढें मांडण्यांत आलें आहे. सर ओटो ह्यांचें काम अत्यंत गुंतागुंतीचें आणि अवघड आहे. त्यांत पुष्कळसा अनिश्चितपणा आणि पहाण्याच्या दृष्टिकोनांत परस्पर-विरोध आढळून येणार आहे, आणि त्यांच्या निर्णयानें सार्वत्रिक समाधान होण्याचा संभव नाहीं, तें वेगळेंच.

आपलें उत्पन्न वाढवून मिळावें अशी प्रत्येक प्रांताची इच्छा असणें स्वाभाविक आहे व त्याप्रमाणें त्यांची कैफियत मांडली जाणार, हें उघड आहे. मुंबई व बंगाल ह्या प्रांतांचें जमीनमहसुलाचें उत्पन्न मर्यादित असल्यानें, प्राप्तीवरील कराचें उत्पन्न आज सर्वच मध्यवर्ती सरकारच्या तिजोरींत जातें, त्यांतला योग्य हिस्सा आपणांस मिळावा, ही त्यांची मागणी कित्येक वर्षांची जुनी आहे. सुधारणेच्या नव्या अमदानींत प्रांतिक सरकारांस मध्यवर्ती सरकाराकडून प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नाचा वांटा मिळणें आवश्यक आहे. तो न मिळाल्यास मुंबई इलाख्याच्या भावी राज्यकर्त्यांची सांपत्तिक स्थिति निराशाजनक झाल्यावांचून रहावयाची नाहीं. ही वांटणी केव्हां सुरू व्हावी आणि ती कोणत्या तत्त्वावर व्हावी ह्या विषयींचा निर्णय सर ओटो निमायर ह्यांना द्यावा लागेल. हिंदुस्थान सरकारची भिस्त मुख्यत्वें करून जकातींपासून मिळणाऱ्या उत्पन्नावर आहे. औद्योगिक संरक्षणाच्या धोरणांचा त्यांच्यावर परिणाम झाल्यावांचून रहात नाहीं, हें साखरेवरील जकातीच्या अनुभवानें सिद्ध केलें आहे. त्या उत्पन्नाची परिस्थिति आज अनिश्चित प्रकारची आहे आणि जकातीविषयींचें धोरण पुढें काय रहाणार हें सांगणें कठिण आहे. कांहीं गोष्टी गृहीत धरूनच सर ओटो ह्यांस आपला मार्ग काढावा लागेल, हें सांगावयास नको. हिंदुस्थान सरकारचा लष्करी खर्च कमी व्हावा अशी लोकांची जोराची मागणी आहे. परंतु युद्धसामुग्रींत आणि विशेषतः आकाशयानांच्या बाबतींत सुधारणांची व अर्थातच जादा खर्चाची जरूरी आहे अशी लष्करी तज्ज्ञांची मागणी येणार. हिंदी रेल्वेजच्या सांपत्तिक स्थितीची रड तर प्रसिद्धच आहे. त्यासंबंधांत पुढें काय करावयाचें, हें अद्यापि ठरावयाचें आहे, आणि त्या प्रश्नावरहि कांहीं तरी अभिप्राय प्रकट केल्यावांचून सर ओटो ह्यांचें काम पुरें होणें अशक्य आहे. सिंध आणि ओरिसा हे नवे प्रांत निर्माण करण्यांत आलेले आहेत, त्यांच्या उत्पन्न–खर्चाची तोंडमिळवणी होण्यास वार्षिक देणगी देण्याची जबाबदारी मध्यवर्ती सरकारावर पडली आहे. देणगीची रकम व मुदत ह्यांबाबतहि निर्णय आतांच व्हावा लागेल. केटाच्या धरणीकंपामुळें झालेलें नुकसान भरून काढून तेथें पुन्हां स्थिरस्थावर करण्यास सुमारें १० कोटि रुपये खर्च येईल, असा अंदाज आहे आणि त्याचा बोजाहि मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्नावर पडणार आहे.

फेडरेशनची घटना अस्तित्वांत येण्यास अजून कालावधि असला, तरी प्रांतिक स्वायत्ततेची अंमलबजावणी सत्वर होणार असल्यामुळें प्रांतांच्या सरकारांचा योगक्षेम व्यवस्थित चालेल अशी खबरदारी प्रारंभापासून घ्यावी लागेल. स्वतंत्र टाकण्यांत येणाऱ्या जबाबदाऱ्या राष्ट्रीय महत्त्वाच्या आहेत आणि म्हणून त्या कार्यक्षम रीतीनें आपणांस पार पाडतां येतील, ह्या प्रकारची आपली सांपत्तिक स्थिति असणें अगत्याचें आहे, ह्या कोटिक्रमावर हिंदुस्थान सरकार अर्थातच भर देणार, तर प्रांतिक स्वायत्तता खरीखुरी होण्यास आपलें उत्पन्न परिस्थितीस धरून, पुरेसें असणें आवश्यक आहे असा आग्रह प्रांतांतील सरकार धरणार. दोघांसहि कर देणारा नागरिक एकच असणार आणि वरील ओढाताणींत आपल्या हितसंबंधाची काळजी कशी घेतली जाते याकडे त्याचें लक्ष्य रहाणार. सर ओटो निमायर ह्यांचा चौकशी आणि निर्णय ह्यांचें किती जिव्हाळ्याचें महत्त्व आहे याची कल्पना वरील विवेचनावरून सहज येईल. त्यांची कामगिरी त्रयस्थ तज्ज्ञ आणि निःपक्षपाती न्यायाधीश असल्या भूमिकेची आहे. ती कशी काय वठते, हें पुढें दिसेलच.


ह्यूम पाईप वापरा
पूर्ण स्वदेशी व टिकाऊ
३ इंच ते ७२ इंच व्यासाचे पाईप व
अर्धगोल पाईप मिळतात.
टाक्या, खांब, सेप्टीक टाक्या वगैरे
कांक्रीटच्या वस्तु
आम्हीं केलेल्या फारच टिकाऊ असतात.
— सर्व प्रांतांत कारखाने आहेत —
इंडियन ह्यूम पाईप कंपनी, लिमिटेड
बलार्ड इस्टेट, मुंबई.

## "अर्था"चें व्यवसायबंधूंकडून अभिनंदन

('अर्था'स दुसरें वर्ष लागलें, ह्यासंबंधानें कित्येक व्यवसायबंधूंनीं 'अर्था'च्या कामगिरीबाबत प्रशंसोद्गार काढून त्याचें अभिनंदन केलें आहे, याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहों. कांहीं निवडक अभिप्राय खालीं उद्धृत केले आहेत.)

"प्रो. वामन गोविंद काळे यांनीं महाराष्ट्रांत आर्थिक विषयाची गोडी उत्पन्न करून आर्थिक उलाढालींत महाराष्ट्राला योग्य असें स्थान मिळावें म्हणून गेलीं कित्येक वर्षें बरीच खटपट चालविली आहे. त्यांनीं वरील विचारानेंच गेल्या वर्षी 'अर्थ' नांवाचें साप्ताहिक सुरू केलें व महाराष्ट्रानें त्या पत्राचें यथोचित स्वागतहि केलें. या वर्षाच्या प्रारंभीं या पत्राला दुसरें वर्ष लागत असून गेल्या वर्षाप्रमाणेंच किंबहुना अधिकच कामगिरी त्याच्याकडून होईल अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्रांतील मध्यमवर्गातील तरुण लोकांचें लक्ष आर्थिक व्यवहाराकडे लागेल तर त्यांच्यांतील बेकारीला आळा बसेल. हें लक्ष लागावें म्हणून उद्योगधंदा, व्यापार, शेती, सहकारी चळवळ, चलन, विमाव्यवसाय, बँकिंग, सरकारी जमाखर्च वगैरेची सांगोपांग व अधिकारयुक्त माहिती या पत्रांत दिली जाते. रिझर्व्ह बँक ही आतां यापुढें राष्ट्रांतील अर्थव्यवहाराचें केंद्र बनणार. त्या संस्थेची माहिती या पत्रांत मराठींत दिली जात असल्याने महाराष्ट्रांतील व्यापारी वर्गाची मोठीच सोय होत आहे. गेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांतहि 'अर्थ' पत्राचा उल्लेख प्रामुख्याने केला गेला आहे. प्रो. काळे यांची 'अर्थ' ग्रंथमाला हीहि वरील उद्देशानें चालू केली असून तिचेहि तीन ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. अशा या राष्ट्रोपयोगी कार्यास महाराष्ट्रांतील लोक मदत करतील अशी आम्हास उमेद वाटते."

—केसरी (७ जानेवारी, १९३६)

---

"सुशिक्षितांतील बेकारी नष्ट होण्यास महाराष्ट्रीयांनीं व्यापारी वृत्तीचें बनलें पाहिजे असें निश्चितपणें आतां सर्वांना वाटूं लागलें आहे. असें निश्चित मार्गदर्शन करण्याच्या कामीं महाराष्ट्रांत ज्यांनीं पुढाकार घेतला त्यांत प्रो. काळे यांना अग्रस्थान देण्यास हरकत नाहीं. त्यांचा अर्थशास्त्राचा अभ्यास जबर आहे. शिवाय त्यांना टॅरिफ बोर्डावर काम करावयाला मिळाल्यामुळें पुस्तकी व्यासंगाला अनुभवाची जोड मिळाली आहे. त्याचा उपयोग पुण्याची मराठा चेंबर, महाराष्ट्र बँक, को-ऑपरेटिव्ह बँक वगैरे संस्थांना ते देत आहेत. त्या प्रमाणेंच गतवर्षापासून त्यांनीं सुशिक्षितांत हिंदुस्थानच्या आणि महाराष्ट्राच्या आर्थिक उलाढालीकडे चौकसपणें पाहाण्याची दृष्टि उत्पन्न व्हावी या साठीं परिश्रमपूर्वक आणि स्वार्थत्याग करून 'अर्थ' साप्ताहिक चालवलें आहे. या साप्ताहिकाला दुसरें वर्ष लागण्याच्या आंत पुण्यास 'व्यापारी जगत्' नांवाचें व्यापाऱ्यांना उपयुक्त असलेली माहिती देणारें मासिक निघालें यावरून प्रो. काळे यांचे परिश्रम कारणीं लागले असें म्हणावयास हरकत नाहीं. क्लेशः फलेनहि पुनर्नवतां विधत्ते या न्यायानें प्रो. काळे यांनीं अर्थ साप्ताहिकाच्या दुसऱ्या वर्षास सुरवात केली असून त्यांना यंदा अधिक मोठ्या प्रमाणावर लोकाश्रय मिळेल अशी आम्हांस खात्री वाटते."

—प्राविण्य (जानेवारी, १९३६)

---

# आंतरराष्ट्रीय व्यापार

### "लँकेशायरचें कापड जपानी कापडास मागें सारील —मात्र यंत्रें नवीं द्या"

टेक्स्टाइल मशिनरी मेकर्स लि. चे अध्यक्ष, सर वॉल्टर प्रेस्टन, ह्यांनीं मँचेस्टर येथें रोटरी क्लबांत भाषण केलें, त्यांत त्यांनीं जपानी कापडाच्या सरशीचें रहस्य उकलून दाखविलें. जपाननें आपलीं यंत्रें ज्यांचेकडून विकत घेतलीं, त्यांचेकडूनच लँकेशायरचे गिरणीवाले आपलीं यंत्रें घेतात, परंतु जपानची खरेदी ताजी असून तीं यंत्रें ज्यास्त कार्यक्षम आहेत, असें सर वॉल्टर म्हणाले. लँकेशायरच्या गिरण्यांतील यंत्रांचे मानानें तीं यंत्रें ज्यास्त माल स्वस्तांत काढूं शकतात. लँकेशायरच्या गिरण्यांत त्या तऱ्हेचीं यंत्रें वापरण्यांत आलीं, तर ब्रिटिश कापड जपानी कापडास केव्हांच मागें टाकील. प्रात्यक्षिक म्हणून सरकारनें नव्या यंत्रसामुग्रीनें सज्ज अशी गिरणी उभारावी, म्हणजे लँकेशायर जपानच्या स्पर्धेस हार न जातां फायदा मिळवूं शकतें, हें जगास दिसून येईल. ह्या योजनेस जो खर्च येईल, त्याचा कांहीं भाग मी स्वतः देईन, माझी त्यांच्या यशस्वितेसंबंधीं इतकी खात्री आहे, असेंहि सर वॉल्टर प्रेस्टन म्हणाले.

---

### ॲन्टिमनी धातूचा व्यापार आणि युद्ध

बंदुकीच्या गोळ्यांत तीक्ष्णता उत्पन्न करण्याकडे ॲन्टिमनी ह्या धातूचा उपयोग केला जातो व चीन देशांतून त्या धातूची विशेष निर्गत होते. १९३४ सालांतील पहिल्या १० महिन्यांशीं १९३५ मधील पहिल्या १० महिन्यांची तुलना केली, तर असें आढळतें, कीं इंग्लंडकडे होणारी निर्गत २३% वाढली; इटलीनें तर ४६०% ॲन्टिमनी ज्यास्त घेतलें. अमेरिकेकडे होणारी निर्गत मात्र ४४% कमी झाली.

---

### फोर्मोसा

चीन देशाच्या किनाऱ्यापासून फक्त १०० मैलांवर असलेलें हें बेट जपानच्या सत्तेखालीं आहे. त्यांतील लोकसंख्या (सुमारें ५० लक्ष) जरी मूळ चिनी वंशाची असली, तरी फोर्मोसाचे आर्थिक संबंध सर्वस्वी जपानशींच आहेत. ह्या देशांतील कच्च्या मालापासून जपानला ज्यास्तींत ज्यास्त फायदा मिळावा, ह्यासाठी फोर्मोसा बेटासंबंधीं दशवार्षिक आर्थिक योजना तयार झाली असून, ती जपानी कायदेमंडळापुढें लवकरच मांडण्यांत येईल.

---

### जकात चुकविण्याची अजब युक्ति !

हॉलंडमध्यें कोंबड्यांस लागणारा अन्नाचा पुरवठा मुबलक आहे, परंतु तेथून जर्मनीकडे अंडीं पाठविण्याचे मार्गांत एक मोठी अडचण आहे, ती म्हणजे जर्मनीमधील जकात, ही होय. ही जकात चुकविण्यासाठी, सीमेवरील शेतकरी हॉलंडच्या हद्दींत कोंबड्या पाळतात व अंडीं घालण्याचे वेळीं त्यांस जर्मन हद्दींत आणतात. अशा रीतीनें अंड्यांवरील जकात वाचते. दरसाल सुमारें २० लक्ष अंडीं ह्या मार्गानें जकात चुकवून जर्मनींत प्रवेश करतात !

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—२ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९—४ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—७ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—४ |
| ४% १९६०—७० ... ... | ११०-११ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९६—१ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०६—० |
| ४% १९४३ ... ... ... | १०९—४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०६—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०४—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०५—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षें मुदत) | १०५—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | १०९—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५% ) ... ... | १२१—४ |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ). | १२९—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १०५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३६—० |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५४२—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १२८—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | ९८—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९२—८ |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ). | ९०७—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु., डिव्हि. १३% ) | १४८—७ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २२३-१२ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२१—४ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १५१७—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५२२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९०-१० |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६२—४ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १४७—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५६६—४ |

#### सोनें—चांदी

| | | |
|---|---|---|
| चार्टर्ड बँकेचें सोनें | तोळयास | ३४—१२ |
| मिंट " | तोळयास | ३४—११ |
| हिंदी मिंट चांदी | १०० तोळयांस | ४८—१० |
| हिंदी मिंट चांदी ( वायदा ) | १०० तोळयांस | ४८—८ |


# NOTICE TO CONTRACTORS.

Tenders are invited for the work of "Improvements to low-lying portions, miles 75 to 84 of Bombay Poona Road (Providing a surface of premixed asphalt 2½" thick including sealcoat) valued approximately at Rs. 1,86,000/–.

2. Tender forms and other particulars regarding earnest money, deposit, time limit for the execution of the work should be obtained from the office of the undersigned during office hours on payment of Rs. 2/–.

3. Last dates of issuing and receiving tenders together with a solvency certificate and a receipted chalan for Rs. 1860/– as earnest money are 30th and 31st January 1936 respectively.

Executive Engineer's Office, Poona Division.
Central Offices Building.
Poona, 17th January 1936.

G. D. DAFTARY.
Executive Engineer,
Poona Division.

## PUBLIC WORKS DEPARTMENT

# NOTICE.

Sealed tenders will be received by the undersigned in his office at Thana up to 2 P. M. (S. T.) on 27th January 1936 for rebuilding 148 units for Police Constables at Thana estimated to cost Rs. 1,24,200/—

2. Blank forms with specifications can be had on payment of Rs. 5/— on any working day during office hours except the day on which tenders are to be received.

3. Each tender should be accompanied by a chalan of Rs. 2,500/— as earnest money paid into any Government treasury or the Reserve Bank of India without which no tender will be considered.

4. The Superintending Engineer, Northern Circle, Bombay, does not bind himself to accept any or the lowest tender and no reason for the acceptance or rejection of any tender will be given.

B. K. BOSE,
Executive Engineer,
Thana, 15th January 1936. Thana Division.

# S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716, Sadashiv Peth, Poona City

## हिंदी चलनाबाबत मनोरंजक माहिती

(१)

### हिंदुस्थानांतील नाण्यांच्या वजनांत होणारी घट

नाण्यांच्या देवघेवींत तीं झिजत जाऊन त्यांचें वजन हळुहळु कमी होतें. कांहीं विशिष्ट मर्यादेबाहेर वजनांत घट झाली, म्हणजे हलकीं नाणीं जमा करून सरकार तीं टाकसाळीकडे पाठवितें. ह्यासंबंधीं, १९३४-३५ सालाचा चांदीच्या नाण्यांचा तपशील येथें दिला आहे:—

हलकीं झालेलीं चांदीचीं नाणीं.

| नाणीं | रुपये | | लहान नाणीं | | सर्व नाणीं | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | घट २% ते ६¼% | घट ६¼% ते २५% | घट २% ते १२½% | घट १२% ते २५% | घट २५% पेक्षां जास्त | |
| रुपये | ३,५०,२७३ | ७९,७४८ | ... | ... | १,०३,२०५ | ५,३३,२२६ |
| अधेल्या | ... | ... | १६,०७,८६२ | १,२६,५०३ | ४८,७१५ | १७,८३,०८० |
| पावल्या | ... | ... | ... | ३,६४,४५६ | ७,०९५ | ३,७१,५५१ |
| चवल्या | ... | ... | ... | ६४,२७९ | १०,९१३ | ७५,१९२ |
| एकूण | ३,५०,२७३ | ७९,७४८ | १६,०७,८६२ | ५,५५,२३८ | १,६९,९२८ | २७,६३,०४९ |


'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचा मजबूत पाया

मध्यप्रांत व वऱ्हाड

हायस्कूल, मिडल स्कूल व नॉर्मल स्कूल ह्यांतील शिक्षकांच्या ग्रंथालयासाठीं मंजूर

अर्थ

[ व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि आर्थिक विषयांस वाहिलेलें साप्ताहिक ]

संपादक : प्रो. वा. गो. काळे

सहायक : श्री. श्री. वा. काळे

मुंबई इलाखा

सरकारी व सरकार-मान्य शाळांत व ट्रेनिंग कॉलेजांत घेण्यासाठीं मंजूर

महाराष्ट्रीयांचीं मनें उद्योगधंदे, व्यापार, इत्यादि धनोत्पादक व्यवहारांकडे वळून त्यांस ह्या विषयांची गोडी लागावी, या दृष्टीनें 'अर्था'ची मांडणी केलेली असते. व्यापारी, शिक्षक, विद्यार्थी, सार्वजनिक कार्यकर्ते व सर्वसाधारण नागरिक ह्या सर्वांनीं 'अर्था'चें वाचन केलें असतां महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीचा मजबूत पाया तयार झाल्याखेरीज रहाणार नाहीं. उद्योगधंद्यांत असणाऱ्या, त्याचप्रमाणें त्यांत नव्यानें पडणाऱ्या सर्वांस हें पत्र मार्गदर्शक होईल.

प्रत्येक महाराष्ट्रीय कुटुंबांत व शाळेंत अर्थ वाचला जाणें आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी **फक्त चार रुपये** असून टपालखर्च वेगळा नाहीं. मनिऑर्डर पाठवून वर्गणीदार व्हा.

व्यवस्थापक, अर्थ, अर्थ ऑफिस, पुणें ४

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

**एन. ए. ॲन्ड फ्रेन्ड्स**
स्टेशनर्स, जनरल मर्चन्टस, ॲन्ड कमिशन एजन्टस.
आप्पा बळवंत चौक, पुणें २.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

This year 1934-35

Exceeds

2 CRORES & 50 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca,

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.



## काटकसर आणि चढाओढ

सध्यांचे आर्थिक मंदीचे दिवसांत अधिक काटकसर कशी करितां येईल हा विचार प्रत्येकापुढें आहेच. संस्था, ऑफिस, कारखाना, घर इ० सर्व ठिकाणीं काटकसरीचा प्रयत्न सुरू आहे.

परंतु

वेळेची काटकसर करणें आरोग्याशिवाय कसें शक्य होईल, आणि आरोग्य मिळण्यास व टिकविण्यास उपाय काय ?

याचें उत्तर

आरोग्यमिश्रण

याचे सेवनानें

शौचास साफ होऊं व तरतरी आणि

लागून भूक वाढते उत्साह हीं वाढतात.

बोधचिन्ह

सर्व एजंटांकडे मिळतें.

श्रीधूतपापेश्वर आर्यौषधि कारखाना,

पनवेल—कुलाबा.



## डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें

मध्यम वर्गांतील गृहेच्छु लोकांस | अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य

भाडेकरी—घरमालक—गृहयोजना

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.

जनरल मॅनेजर



## शेअर विक्री सुरू आहे

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. १० लक्ष |
| तूर्त विक्रीकरितां काढलेलें भांडवल ... | रु. ५ लक्ष |

प्रत्येक शेअरची किंमत रु. ५०

१ अर्जासोबत प्रत्येक शेअरला रु. १५/- }
२ अर्जमंजुरीनंतर रु. १०/- } प्रमाणें.

बाकी रक्कम " अनकॉल्ड रिझर्व्ह " म्हणून राहील.

संचालक मंडळाचे अध्यक्षः—प्रो० वा. गो. काळे, एम्. ए., एक्स् मेम्बर, इंडियन टॅरिफ बोर्ड.

" उपाध्यक्षः—श्री. धोंडो कृष्ण साठे, बी.ए., बी. एससी., व्यापारी व कॉन्ट्रॅक्टर, पुणें.

प्रॉस्पेक्टस व शेअर अर्जाच्या नमुन्याकरितां लिहा:—

पुणें:—मॅनेजर, दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

मुंबई:—आर. आर. नाबर आणि कं., शेअर व स्टॉक ब्रोकर, एक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, कोट.

नागपूर:—एस. एन. आगाशे आणि कं., चीफ एजन्टस, कॉमनवेल्थ इन्शु. कं. लि., महाल.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा घ. नं. १२७/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

# अर्थ

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख २९ जानेवारी, १९३६. अंक ५

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः–

**कॉमनवेल्थ विमा कंपनी, लि. पुणें.**

अध्यक्ष–श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां भेटा अगर समक्ष लिहा.

मॅनेजिंग एजन्टस.

**न. वि. वडनेरकर**
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

**ह्यूम पाईप वापरा**
पूर्ण स्वदेशी व टिकाऊ
३ इंच त ७२ इंच व्यासाचे पाईप व अर्धगोल पाईप मिळतात.

टाक्या, खांब, सेप्टीक टाक्या वगैरे
**कांक्रीटच्या वस्तु**
आम्हीं केलेल्या फारच टिकाऊ असतात.
— सर्व प्रांतांत कारखाने आहेत —
**इंडियन ह्यूम पाईप कंपनी, लिमिटेड**
बलार्ड इस्टेट, मुंबई.

**दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें नं २.**

१९३५–३६ च्या उंसाची लागवड सुरू झाली.

अंदाजी नफा शेंकडा ७ ते १० टक्के.

प्रॉस्पेक्टस व शेअर फॉर्म, कंपनीचे ब्यांकर्स व मुख्य कचेरी २५७, बुधवार पेठ, पुणें नं. २ यांजकडे मिळतील.

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी
टेलरिंग फर्म
मॅनेजर:-व्ही. पी. पाटसकर, D.M.T.O.A. (London.)
**पाटसकर आणि कंपनी**
४८ निहाल पठ, पुणें शहर.
सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी
आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

## वर्गणीदारांस सूचना

१ जानेवारी, १९३६ रोजीं 'अर्था' चें दुसरें वर्ष सुरू झालें. गेल्या वर्षाची ज्यांची वर्गणी अजून यावयाची असेल, त्यांनीं ती नव्या वर्गणीबरोबर सत्वर पाठवावी. ज्यांची मुदत संपली असेल, त्यांनीं अंक नको असल्यास तसें कळवावे.

व्यवस्थापक, 'अर्थ'

# विविध माहिती

### नव्या हिंदी घटनेच्या अंमलबजावणीस सुरवात

नवी घटना एप्रिल, १९३७ पासून अंमलांत येईल व १९३७-३८ चीं प्रांतिक सरकारांचीं अंदाजपत्रकें नव्या कायदे मंडळांनीं पास करावीं का अधिकारन्यास करणाऱ्या मंडळांनीं तीं पास करून विसर्जन पावावें, ह्या संबंधीं नव्या दिल्लींत खलबतें चालू आहेत.

### हिंदुस्थानांतील रस्ते

हिंदुस्थानांतील ( ब्रह्मदेश सोडून ) एकूण रस्त्यांची लांबी ३ लक्ष मैल आहे. त्यांपैकीं, ७५ हजार मैल लांबीचे रस्ते खडीचे किंवा केवळ मातीखेरीज इतर रीतीनें बनविलेले आहेत. ह्या रस्त्यांत १५० ते २०० कोटि रुपये गुंतलेले आहेत. त्यांची दुरुस्ती करण्यास दरसाल ७½ कोटि रुपये लागतात व प्रतिवर्षी २ कोटि रुपये नवीन रस्ते करण्यासाठी खर्ची पडतात.

### नवीन सब-जज्ज

१९३६-३७ सालीं सब-जज्जांच्या जागीं नेमणुका करण्यासाठीं मुंबई सरकार १५ उमेदवार निवडणार आहे व त्या प्रीत्यर्थ मागवण्यांत आलेले अर्ज १० फेब्रुवारीच्या आंत पोंचले पाहिजेत.

### पी. अँड ओ. च्या वहातुकीची प्रगति

प्रवासी आणि पोस्टाचीं पत्रें व पार्सलें नेण्याच्या आगबोटी मंडळ्यांत पी. अँड ओ. ची जगांत प्रसिद्धि आहे. त्या कंपनीनें आपल्या बोटींतून नेलेल्या पोस्टाच्या थैल्यांची संख्या १९१३ मध्यें ३,३४,६५८ होती. १९३४ मध्यें हा आंकडा ४,८८,५५९ इतका वाढला. गेल्या सालीं ह्या आंकड्यांत आणखी वाढ झाली. असें आहे तरी परराष्ट्रीय कंपन्यांची स्पर्धा व आर्थिक मंदी ह्यांचे योगानें कंपनीची सांपत्तिक स्थिति असमाधानकारक असल्याविषयीं तिच्या चालकांची ओरड आहे.

### शेतीच्या धंद्यांतल्या बेकारीचा विमा

गिरण्या व कारखाने ह्यांमध्यें काम करणाऱ्या मजुरांच्या बेकारीचा विमा उतरण्याची व्यवस्था ग्रेटब्रिटन वगैरे कित्येक पाश्चात्य देशांमध्यें अस्तित्वांत आहे. तथापि अनेक अडचणींच्या कारणामुळें शेतीच्या धंद्यांतल्या मजुरांच्या बाबत अशी विम्याची व्यवस्था झालेली नाहीं. ग्रेटब्रिटनमध्यें आतां ह्या संबंधांत पार्लमेंटला एक बिल सादर करण्यांत येत असून शेतींतल्या मजुरांच्या बेकारीचा विमा उतरण्याची योजना अमलांत आणण्याचा प्रयत्न होत आहे.

### आफ्रिकेंतील निर्जन प्रदेश

युरोपियन राष्ट्रांच्या आफ्रिकेंतील वसाहतींचें क्षेत्रफळ एक कोटि चौरस मैल येईल, परंतु त्यांत वस्ती करणाऱ्या युरोपियनांची संख्या पुरती ३५ लाखहि नाहीं. आज पन्नास वर्षांत ह्या संख्येंत म्हणावी तशी वाढ झालेली नाहीं. ह्या ३५ लाखांपैकीं २० लक्षांची वसति दक्षिण आफ्रिकेंत आहे व १२ लक्ष लोक आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावरील देशांत विभागलेले आहेत. उरलेले ३ लक्ष लोक तुरळकपणें ९० लक्ष चौरस मैलांच्या प्रदेशांत संचार करतात.

### जपानी कापडाची वाढती निर्गत

जपानी कापडाची निर्गत सालोसाल वाढत आहे. १९३५ सालीं ३० नोव्हेंबर अखेरच्या ११ महिन्यांत लँकेशायरच्या निर्गतीपेक्षां जपानची निर्गत सुमारें ७० कोटी वार ज्यास्त झाली. जपानच्या निर्गतीचे खालील आंकडे उद्बोधक होतील:—

| वर्ष | निर्गत ( कोटि चौरस यार्ड ) |
|---|---|
| १९३१ | १४१ |
| १९३२ | २०८ |
| १९३३ | २०९ |
| १९३४ | २५८ |
| १९३५ ( २० डिसेंबरपर्यंत ) | २६२ |

### कोंबड्यांच्या अंड्यांच्या विक्रीची इंग्लंडमध्यें व्यवस्था

शेतीचीं पिकें आणि शेतकऱ्यानें उत्पन्न केलेले पदार्थ ह्यांस चांगल्या किंमती याव्या म्हणून इंग्लंडमध्यें विक्रीची व्यवस्था करण्यासाठीं कमिट्या नेमण्यांत आल्या आहेत. परदेशांतून येणाऱ्या मालावर अल्पशी जकात बसविण्यांत येते आणि तिच्या उत्पन्नांतून विक्रीच्या व्यवस्थेस मदत दिली जाते. ब्रिटिश साम्राज्यांतून येणाऱ्या मालावर सवलतीची जकात असते. कोंबड्यांचीं अंडीं आणि कोंबड्या ह्यांच्या किंमती ठरवणें, त्यांच्या विक्रीचीं ठिकाणें ठरवून देणें इत्यादि विषयींची व्यवस्था काय असावी, ह्या संबंधानें सरकारनें नेमलेल्या एका कमिशननें शिफारसी केल्या आहेत. ह्यांस सरकारी मान्यता लवकरच मिळेल व अंड्यांच्या विक्रीची सुचवलेली योजना अमलांत येईल अशी अपेक्षा आहे.

### मद्रास सेफ डिपॉझिट कं.

दुसऱ्याच्या मौल्यवान जिनसा संभाळण्याचें काम योग्य मोबदल्यावर करणाऱ्या मंडळ्या मोठमोठ्या शहरांतून असतात. कित्येक बँकाहि हा व्यवहार करतात. मद्रास येथें आतां हें काम करणारी एक कंपनी स्थापन झाली असून तिनें सुरवातीस जिन्नस ठेवण्याच्या ३,००० कप्प्यांची सोय केली आहे. मुंबईच्या सेफ डिपॉझिट कंपनीच्या प्रत्येकीं २०० रुपयांच्या भागाची किंमत ९५० रुपये आहे, ह्यावरून हा धंदा कसा फायदेशीर असतो, ह्याची कल्पना येईल.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | |
|---|---|
| ता. १८ जानेवारी रोजीं पुरा झालेला आठवडा | ७६,८४,०३६ |
| ता. २५ जानेवारी रोजीं पुरा झालेला आठवडा | ७६,९३,९६७ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते २५ जानेवारी १९३६ अखेर | २,५९,९३,५२,४७१ |

अनुक्रमणिका.


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ५४ |
| २ पंचम जॉर्ज बादशहांची संस्मरणीय कारकीर्द | ५५ |
| ३ अमेरिकन शेतकरी आणि कारखानदार | ५५ |
| ४ स्फुट विचार ... बादशहा आठवे एडवर्ड ह्यांनीं राज्यसूत्रें हातीं घेतलीं—लोकरीच्या गिरण्या आणि संरक्षण—वैद्यासमोर दुखणें झांकण्यांत हंशील नाहीं—शेतकऱ्यांच्या मदतीचा कायदा—डॉ. ए. आर. ॲक्ट व हायकोर्ट अभिप्राय—बेकारी निवारणाची मोहीम. | ५७ |
| ५ पैशाच्या वर्गावर्गीची सहकारी संस्थांची व्यवस्था | ५९ |
| ६ पॅसिफिक महासागरांतील १,४०० बेटें | ५९ |
| ७ हिंदी चलनाबाबत मनोरंजक माहिती ... | ६० |
| ८ बिहार व ओरिसा प्रांतांतील सहकारी चळवळ | ६१ |
| ९ निवडक बाजारभाव | ६२ |
| १० अर्थाचें व्यवसायबंधूंकडून अभिनंदन | ६३ |



# अर्थ

बुधवार, ता. २९ जानेवारी, १९३६


## पंचमजॉर्ज बादशहांची संस्मरणीय कारकीर्द

बादशहा पंचम जॉर्ज हे सोमवार ता. २० जानेवारी १९३६ रोजीं वयाच्या ७० व्या वर्षी ख्रिस्तवासी झाले, ही दुःखदायक बातमी आम्हीं आमच्या वाचकांस मागील अंकांत निवेदन केलीच आहे. बादशहांच्या निधनवार्तेनें त्यांच्या प्रजाजनांसच नव्हे तर जगांतील सर्व लोकांस, दुःख वाटलें असल्याचें ठिकठिकाणच्या बातम्या आल्या आहेत त्यांवरून स्पष्ट दिसतें. त्यांच्या पंचवीस वर्षांच्या कारकीर्दींत ब्रिटिश राष्ट्रास आणि बादशहांस अनेक कठिण प्रसंगांतून मार्ग काढावा लागला, परंतु प्रत्येक वेळीं त्यांनीं अत्यंत समतोल वृत्तीनें व मुत्सद्देगिरीनें वागून लोकांस धीर व आधार दिला. तेव्हां त्यांचें प्रजावात्सल्य व उदारमनस्कता सर्वांच्या निदर्शनास आली. बादशहांची कारकीर्द कित्येक सामाजिक, आर्थिक व राजकीय गंडांतरांतून यशस्वी रीतीनें पार पडली. महायुद्धाच्या वणव्यांत ब्रिटिश साम्राज्य सांपडलें असतां बादशहांनीं स्वतः पुढें होऊन सैनिकांस धीर दिला व राष्ट्रावर आपत्ति आली असतां राजाहि त्यांत सहभागी आहे, ह्याची सर्वांस प्रचीति आणून दिली. सर्व गोष्टींत आपल्या प्रजेशीं समरस होणें आणि लोकांचें सुखदुःख तें आपलें सुखदुःख अशी दृढभावना असणें, हा त्यांच्या स्वभावाचा विशेष गुण होता आणि ह्या कारणानें राजसत्ता व प्रजेच्या आकांक्षा ह्यांच्यामध्यें जॉर्ज बादशहांच्या कारकीर्दींत कधींच विरोध उत्पन्न झाला नाहीं. पांच वर्षांमागें ग्रेट ब्रिटनवर दुसऱ्या स्वरूपाचें आर्थिक संकट कोसळलें, त्यावेळींहि बादशहांनीं मोठ्या व्यवहार कुशलतेनें राष्ट्रास पाठिंबा दिला. ब्रिटिश पौंड घसरूं लागला व त्याची पत कमी होऊं लागली आणि ब्रिटनचा परराष्ट्रीय व्यापार बसला, ही त्यावेळची परिस्थिति खरोखरच चिंताजनक होती. ब्रिटनचें वैभव संपुष्टांत आलें, अशी घोषणा करण्यासहि कांहीं ठिकाणीं सुरवात झाली होती. ह्या आपत्तींतून ब्रिटन व्यवस्थित रीतीनें बाहेर पडलं व आपलें वर्चस्व त्यानें कायम राखलें. युरोपांतील राजे एकामागाहून एक स्थानभ्रष्ट होत असतां, जॉर्ज बादशहांची लोकप्रियता वाढत होती, ही एकच गोष्ट त्यांच्या सुस्वभावाची व राष्ट्रीय भावनेची साक्ष पटवून देण्यास पुरेशी आहे.

सातव्या एडवर्ड बादशहांच्या मागून पंचम जॉर्ज बादशहा १९११ सालीं इंग्लंडच्या सिंहासनावर आले. त्यापूर्वी १९०५-१९०६ सालीं, प्रिन्स ऑफ वेल्स ह्या नात्यानें आपल्या युवराज्ञी-समवेत हिंदुस्थानास त्यांनीं भेट दिली होती. त्यानंतर ६ वर्षांनीं राज्यारोहणाचे प्रसंगानें त्यांची हिंदी जनतेस पुनर्भेट झाली. १९१२ सालच्या दिल्ली येथील दरबारास हजर असलेले कित्येक लोक त्यावेळच्या वैभवशाली समारंभाची साक्ष देतील. मध्यंतरीच्या काळांत बंगालच्या फाळणीमुळें हिंदी जननेंत असमाधान पसरलें होतें तें, राज्यारोहणाचे प्रसंगानुसार फाळणी रद्द केल्याचें जाहीर झाल्यामुळें पुष्कळ शमलें. ग्रेट ब्रिटनचे मागोमाग हिंदुस्थान देशहि महायुद्धांत पडला व पैसा आणि मनुष्यबळ ह्या दोन्ही मार्गांनीं ह्या देशानें ग्रेट ब्रिटनला मदत केली. इंग्लंडचें युद्ध हें आपलेंच युद्ध आहे, ह्या भावनेनें हिंदी राजेरजवाडे व प्रजा ह्यांनीं स्वार्थत्यागपूर्वक साम्राज्यसेवा केली. १९२१ सालीं हिंदुस्थानास देण्यांत आलेल्या सुधारणा हिंदी प्रजेच्या आकांक्षाच्या मानानें अपुऱ्या पडल्या, हे आतां नव्यानें सांगावयास नको. १९३७ सालीं अंमलांत येणाऱ्या राज्यघटनेंत फेडरेशनच्या तत्त्वाचा अंतर्भाव झाला असला तरी त्यामानानें प्रजेस विशेष हक्कप्राप्ति झालेली नाहीं. गेल्या मे महिन्यांतच बादशहांची ज्युबिली साजरी झाली, त्यावेळीं सर्व हिंदी लोकांनीं बादशहांचें मनःपूर्वक अभिनंदन केलें, ह्यावरून प्रजेच्या राजकीय आकांक्षा अतृप्त राहिल्या, तरी त्यामुळें बादशहांच्या विषयीं वाटणारा आदर व निष्ठा हीं कमी झालीं नाहींत, ही गोष्ट सिद्ध झाली. ब्रिटिश राजा पक्षातीत आहे ह्या तत्त्वास जॉर्ज बादशहांनीं आपल्या समतोलपणाच्या बुद्धीनें दृढता आणली आणि 'अहमेवमतो महीपतेरिति सर्वः प्रकृतिष्व चिंतयत्' ह्या कालिदासानें वर्णिलेल्या परिस्थितीची जाणीव करून दिली. नवीन राज्यघटनेस सुरवात होण्यापूर्वीच जॉर्ज बादशहा दिवंगत झाले असले, तरी हिंद-ब्रिटिश संबंध सलोख्याचे ठेवण्यास त्यांच्या उदार चरिताच्या पुण्य स्मरणाचें आणि हिंदी आकांक्षांचें समाधान होण्यास त्यांच्या पावलांवर पाऊल टाकून चालणाऱ्या आठव्या एडवर्ड बादशहांचें हिंदुस्थानास सहाय प्राप्त होवो, अशी हिंदी जनतेचा प्रस्तुत प्रसंगीं शुभेच्छा आहे.

## अमेरिकन शेतकरी आणि कारखानदार

### प्रेसिडेंट रूझवेल्ट यांचें धोरण

उद्योग धंद्यास एकदा सरकारचा आश्रय मिळून जकातींच्या संरक्षक भिंतीच्या आडोशाची संवय लागली म्हणजे जकातींच्या संरक्षणाचें राष्ट्रीय धोरण नित्याच्या कार्यक्रमांत येऊन बसतें, असा सर्वत्र अनुभव येतो. मर्यादित कालपर्यंतच प्रथम संरक्षक जकात बसवली असली तरी तिची मुदत हळूहळू वाढत जाते. हा अनुभव हिंदुस्थानांतहि नवा नाहीं. अमेरिकेंतील कारखानदारांस एकदा मिळालेलें संरक्षण, ते आतां सोडण्यास तयार नाहींत, ह्यांत आश्चर्य नाहीं. परंतु, बदललेल्या आर्थिक स्थितींत हा त्यांचा आग्रह चालू दिला, तरी अन्य मार्गानें संसारास हातभार लावणें त्यांस जरूर पडतें, आणि एका घेतलेली सरकारी मदत दुसऱ्या हातानें त्यांस सोडून द्या पक्क्या आयात मालावरील जकाती कमी होण्यास म

याची का आपल्या कच्च्या मालाची किंमत कृत्रिम रीतीनें चढवली जात असता ती वाढू द्यावयाची, एवढाच प्रश्न कारखानदारांसमोर शिल्लक रहातो. गेल्या चार-पांच वर्षांतला अमेरिकेंतील आर्थिक घडामोडींचा इतिहास ह्या संबंधांत अत्यंत बोधप्रद आहे.

महायुद्धाचे वेळा अमेरिकन गहूं, कपास, तंबाखू व मांस ह्यांस प्रचंड मागणी उत्पन्न झाली व ह्या संधीचा फायदा घेऊन शेतकऱ्यांनीं भराभर जमिनी गहाण टाकून पैसे उभारले आणि आपलें उत्पादन वाढवलें. ह्या रीतीनें तीन कोटि एकर जमीन नव्यानच लागवडींत आली व अमेरिकेची निर्गत दुप्पट झाली. तथापि, युद्धानंतरच्या मंदीचे काळांत युरोपियन राष्ट्रांची आर्थिक परिस्थिति बिघडली व अमेरिकन मालास असलेली मागणी नाहींशी होऊन शेतकऱ्यांचें दिवाळें वाजलें ! त्याबरोबरच, शतकऱ्यांशीं व्यवहार करणाऱ्या बँकासुद्धां डबघाईस आल्या. अमेरिकन शेतकऱ्यांची परिस्थितिहि दिवसानुदिवस खालावत चालला. १९२२ ते १९३२ ह्या मुदतींत, एक तृतीयांश अमेरिकन बँका बंद पडल्या. चलतीचा काळ संपून मंदीचा अवतार झाला असतां शेतीच्या धंद्याची काय अवस्था होते, ह्याचा अनुभव हिंदुस्थानांत आला आहेच.

शेतकऱ्यांच्या हलाखींत भर घालणारें प्रमुख कारण म्हणजे डोईजड अमेरिकन जकाती होत असें आतां वाटूं लागलें. बाहेरून येणाऱ्या मालावर जबर जकाती बसविलेल्या असल्यामुळें कारखानदारांचें बस्तान बरें होतें व त्यांच्या मालास विशेष असा प्रतिस्पर्धी उरला नाहीं; परंतु शेतकऱ्यांच्या मालाची किंमत मात्र वाढली नाहीं. उलट, त्यांस लागणाऱ्या वस्तू मात्र स्वस्त न होतां महाग राहिल्या. मि. रूझवेल्ट हे अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यावर त्यांनीं शेतकऱ्यांच्या हलाखीचा हा प्रश्न हातीं घेतला. शेतकरी व कारखानदार ह्यांचे हितसंबंध राष्ट्रीय दृष्ट्या सारख्याच दर्जाचे आहेत, असें ठरवून त्याप्रमाणें नव्या अध्यक्षांनीं आपलें धोरण आंखलें. शेतीचा माल व कारखान्यांत तयार होणारा माल ह्यांच्या बाजारभावांत कांहीं तरी मेळ रहावा, असा त्यांचा हेतु होता. (१) जकाती कमी करून, शेतकरी व कारखानदार ह्यांच्या, जरूरीपेक्षां ज्यास्त होत असलेल्या उत्पादनाची देवघेव एकाच पातळीवर आणून ठेवणें व (२) शेतीचें उत्पादन मर्यादित करून कपास, गहूं इत्यादि जिनसांच्या किंमती कृत्रिम रीतीनें वाढवणें, हे दोन मार्ग त्यांस मोकळे होते. १९२९ सालीं निर्माण झालेल्या बिकट आर्थिक परिस्थितींत तेव्हांचे अध्यक्ष, मि. हूवर, ह्यांनीं आलेल्या नवीन आपत्तींतून कारखानदारांस वांचवण्यासाठी केवळ जकातींमध्यें वाढ करणाऱ्या बिलास नाइलाजानें संमति दिली. ह्या जकाती पन्नास टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा अधिकार अध्यक्षांस आहे; परंतु त्या अधिकाराची अंमलबजावणी झाली तरी किंमती बेतावर न आल्यानें आज भागेनासें झालें आहे. शिवाय वेगवेगळ्या दशांशा अमेरिकेनें व्यापारी करार केले आहेत, त्यांचाहि उपयोग फारसा होऊं शकलेला नाहीं.

वर नमूद केलेल्या पहिल्या उपायाची वासलात ह्या रीतीनें लागून शतांचें उत्पादन मर्यादित करणें, हा दुसरा उपाय प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं जारीनें अंमलांत आणला व सुमारें ५ कोटि एकर जमिनीमधील लागवड त्यांनीं बंद पाडली. ह्याबद्दल अर्थातच ...कारास शेतकऱ्यांस नुकसानभरपाई द्यावी लागते व त्याचा ...ा सर्वसाधारण गिऱ्हाइकांवर पडतो. उत्पादन मर्यादित झाल्या... कारखानदारांच्या कच्च्या मालाची किंमत हे वाढते व एका मार्गानें जकातींपासून होणारा नफा महागाइच्या कच्च्या मालाचे स्वरूपांत निघून जातो. कारखानदार व शेतकरी ह्यांच्या हितसंबंधांत अशा रीतीनें विरोध उत्पन्न होतो. कपाशीचे व इतर पिकांचे बाजारभाव उचलून धरण्याच्या धोरणामुळें आज शेतकऱ्यांचा तात्कालिक फायदा होत आहे, ह्यांत संशय नाहीं, परंतु त्या संबंधांतला कायदा अमेरिकन राज्यघटनेस धरून नाहीं; असा अमेरिकन मुख्य न्यायमंदिरानें निर्णय दिला आहे, त्यामुळें अमेरिकेंतील परिस्थितींत आमूलाग्र बदल झाला आहे. तथापि, शेतकऱ्यांस संकटांतून सोडवणारा हा कायदा नाहींसा होणें अमेरिकेच्या हिताचें होणार नाहीं, हें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचे प्रतिस्पर्धीसुद्धां जाणून आहेत. शेतकरी व कारखानदार ह्यांचे हितसंबंधांत परस्पर विरोध उत्पन्न झाला असूनहि ह्या बिकट परिस्थितींतून वर येण्यासाठीं अमेरिकन सरकारनें एवढें धडाडीचें धोरण आंखलें, हें मात्र खरोखर अभिनंदनीय आहे.

सरकारनें आतां अमेरिकन पार्लमेंट (काँग्रेस) मध्यें एक नवीन बिल आणण्याचें ठरविलें आहे. त्या अन्वयें, वर निर्दिष्ट केलेले उपायच वेगळ्या स्वरूपांत अंमलांत यावयाचे असून त्यासाठी १५० कोटि रुपयांची मंजूरी मागण्यांत येईल.

### मध्यप्रांतांतील सहकारी चळवळ

आपल्या प्रांतांतील सहकारी चळवळ सरकारनें थांबवावी व मध्यवर्ती बँका गुंडाळण्यांत याव्या; जरूर तर त्याप्रीत्यर्थ ५० लक्ष रुपयांचें कर्ज देण्यांत यावें, अशा अर्थाचा एक ठराव मध्यप्रांताच्या कायदेमंडळांत येणार आहे. शेतकऱ्यांची परिस्थिति बरीच खालावली आहे, हें जरी खरें असलें, तरी सहकारी चळवळ बंद करण्याइतकी तेथील परिस्थिति वाईट नाहीं. अडचणींचे प्रसंगीं सहकारानें उपयोगी पडण्यापेक्षां पाठीमागें पाय घेणें कितपत रास्त होईल, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. चळवळीचा पाया मजबूत राखणें निराळें व अजिबात ती बंद पाडणें निराळें. वर निर्दिष्ट केलेला ठराव परिस्थितीचें आकलन करण्यास उपयोगी पडेल, तर त्यापासून फायदाच आहे.

### "बॉम्बे को-ऑपरेटिव्ह क्वॉर्टर्ली"

वरील त्रैमासिकाच्या डिसेंबर महिन्याच्या अंकात, श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचा मद्रास इलाख्यांतील चळवळ ह्या विषयावरील व श्री. देसाई ह्यांचा मालाचा उठाव आणि ग्राहकांच्या सोसायट्या ह्यासंबंधीं उत्कृष्ट लेख आले आहेत. कै. श्री. गोपाळ कृष्ण देवधर ह्यांचें सहकारी चळवळींतील स्थान लक्ष्यांत घेतां, त्यांचेसंबंधीं प्रसिद्ध झालेले लेख उचित आहेत, ह्यांत शंका नाहीं. नेहेमींचीं इतर उपयुक्त सदरेंहि अंकांत आहेत.

### पुणें अनाथ विद्यार्थी गृह

वरील संस्थेचा ३० सप्टेंबर १९३५ अखेरचा अहवाल व १९३६सालाचें कॅलेंडर आमचेकडे आलीं आहेत. ही संस्था आज २६ वर्षें, बुद्धिमान व होतकरू परंतु गरीब व निराश्रित अशा हिंदू मुलांच्या पालनपोषणाची व शिक्षणाची सोय करून त्यांस स्वावलंबी नागरिक बनविण्याचें कार्य यशस्वी रीतीनें करीत आहे. नाशिक येथें या संस्थेची एक शाखा १९२६ सालीं स्थापन झाली, तिचीहि प्रगति चांगल्या तऱ्हेनें होत आहे. पंचवटींत संस्थेचे जागीं क्षयरोगचिकित्सालय स्थापन करून अनाथ विद्यार्थी गृहानें समाजसेवा सुरू केली आणि त्याचा क्षयरोगप्रतिबंधक प्रचारहि चालू आहे. केवळ लोकाश्रयावर चाललेल्या ह्या संस्थेची प्रगति समाधानकारक रीतानें होत आहे, ह्याबद्दल चालकांचें अभिनंदन करणें जरूर आहे.

## स्फुट विचार

### बादशहा आठवे एडवर्ड ह्यांनीं राज्यसूत्रें हातीं घेतलीं

ब्रिटिश राज्यघटनेप्रमाणें राजाच्या कारकीर्दीत कधीच खंड पडत नाहीं. 'राजाचें देहावसान झालें, राजा दीर्घायु होवो' अशी हा आशय व्यक्त करणारी ब्रिटिश घोषणा सुप्रसिद्ध आहे. तिला अनुसरून, पंचम जॉर्ज बादशहांचे ज्येष्ठ पुत्र, प्रिन्स ऑफ वेल्स, हे आठवे एडवर्ड ह्या नांवानें बादशहा झाले असल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे. महाराणी व्हिक्टोरिया आणि पंचम जॉर्ज बादशहा ह्यांची कर्तव्यदक्षतेची व लोकसंग्रहाची परंपरा आठवे एडवर्ड बादशहा चालू ठेवतील व राजा आणि प्रजा ह्यांच्या भावनांचें समरसत्व कायम राखून सर्वांच्या परम आदरास पात्र होतील, ह्याविषयीं त्यांच्या प्रजाजनांत पूर्ण विश्वास वसत आहे. जनतेच्या कल्याणाच्या आणि गोरगरीबांच्या हिताच्या गोष्टींत सहाय देण्याचा व त्या कामीं खस्त खाण्याचा क्रम प्रिन्स ऑफ वेल्स असतांना एडवर्ड बादशहांनीं अनेक वर्षे सारखा चालू ठेवला होता. कामकरी, बेकार तरुण, महायुद्धांत जखमी आणि पंगू झालेले शिपाई ह्यांमध्यें अगदीं सामान्य माणसाप्रमाणें मिसळून त्यांनीं लोकांस उत्तेजन आणि सहाय दिलें असल्याचें वेळोवेळीं प्रसिद्ध झालें आहे. त्यांनीं हिंदुस्थानांत व ब्रिटिश साम्राज्याच्या इतर भागांत प्रवास करून तेथील परिस्थिति डोळ्यांनीं पाहिली असून लोकांच्या अडचणी, गरजा आणि आकांक्षा ह्यांची पूर्ण माहिती मिळवली आहे. कांहीं वर्षांमागें त्यांनीं हिंदुस्थानास भेट दिली, त्या प्रसंगीं त्यांची साधी वृत्ति आणि प्रेमळ वागणूक ह्यांची हिंदी जनतेवर उत्तम छाप पडली, ही गोष्ट अनेकांच्या स्मरणांत असेल. सार्वजनिक हितसंबंधांच्या प्रश्नांचें ज्ञान, मनाचा समतोलपणा, सहानुभूतीची भावना इत्यादि गुण आठवे एडवर्ड बादशहा ह्यांचेमध्यें शिक्षण व अनुभव ह्यांचे योगानें बाणले असल्याकारणानें त्यांची कारकीर्द सर्वांस सुखाची होईल, ह्याविषयीं लोकमताचा एक सूर वहात आहे, तो अगदी यथार्थ आहे. नूतन बादशहांस दीर्घायुष्य लाभो आणि त्यांच्या कारकीर्दीत हिंदुस्थानची सर्वांगीण प्रगति त्वरित गतीनें होवो अशी इच्छा ह्या देशांत सर्वत्र प्रकट केली जाईल, हें हिंदी जनतेच्या राजनिष्ठेस अनुरूपच असें होईल.

---

### लोकरीच्या गिरण्या आणि संरक्षण

लोकरीच्या कापडाच्या हिंदी धंद्यास संरक्षण देण्याच्या संबंधांतला टारिफ बोर्डाचा रिपोर्ट व त्यावरील हिंदुस्थान सरकारचा अभिप्राय हे प्रसिद्ध झाले आहेत. त्या बाबतींत एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित झाला आहे, त्याचा उल्लेख येथें करणें आवश्यक आहे. कोणत्याहि धंद्यांतल्या लोकांनीं सरकारकडे संरक्षणाची मागणी केली असतां तिची छाननी करण्याचें काम टारिफ बोर्डाकडे सोंपवण्यांत येतें. संरक्षणाची मागणी सयुक्तिक आहे किंवा नाहीं ह्याचा निर्णय करण्यास हिंदी कारखानदारांस आपला माल तयार करण्यास किती खर्च येतो ह्याचा हिशेब टारिफ बोर्डास प्रथम करावा लागतो. परदेशी माल हिंदुस्थानांत इतक्या स्वस्त किंमतीस विकला जातो कीं त्या किंमतींत त्यांच्याशीं स्पर्धा करणें आपणांस अशक्य होतें, म्हणून त्या मालावर जकाती बसवून तो महाग केला जावा अशी संरक्षण मागणाऱ्या कारखानदारांची सूचना असल्यानें येथील कारखान्यांत उत्पादनाचा किती खर्च येतो ह्याची माहिति काढल्यावांचून टारिफ बोर्डास पुढें पाऊल टाकतां येत नाहीं. देशी मालाच्या उत्पादनाचा किमान खर्च आणि परदेशी मालाची बाजारांतली किंमत ह्यांच्या फरकाइतकें संरक्षण हिंदी कारखानदारांस मिळेल तरच संरक्षक जकातींचा उपयोग होईल, हें उघड आहे. त्याचप्रमाणें, हिंदी उत्पादनखर्चांत कालांतरानें बचत होण्याचा संभव आहे किंवा नाहीं, ह्यावरहि संरक्षणाची शिफारस करणें किंवा न करणें अवलंबून ठेवणें टारिफ बोर्डास आवश्यक असतें. ह्यासाठी संरक्षण मागणाऱ्या कारखानदारांनीं ह्याविषयींची तपशीलवार माहिति बोर्डास पुरवणें अत्यावश्यक आहे हें सांगावयास नको. लोकरीच्या कापडाच्या हिंदी धंद्याची चौकशी चालू असतां कानपूर व न्यू इगर्टन मिल्स ह्यांच्याकडून उत्पादन खर्चाविषयींची माहिती पुरवण्यांत आली नाहीं, अशी तक्रार प्रसिद्ध झाली आहे. ह्या धंद्यांतला निम्मा हिस्सा सदरहु कारखान्यांच्या हुकमतीखाली आहे आणि त्यांचेकडून जरूर ती माहिती टारिफ बोर्डास मिळाली नाहीं, तर त्यानें आपलें मत कोणत्या आधारावर बनवावें? सामान्यतः चांगल्या रीतीनें चालविल्या जाणाऱ्या लोकरीच्या कारखान्यास, किती आयात जकात बसविली असतां परदेशीच्या मालाच्या बरोबरीनें विक्री आणि उत्पादन करणें परवडेल, ह्याचा अंदाज, आवश्यक असलेल्या माहितीच्या अभावीं टारिफ बोर्डास नीट करतां येणें अशक्य असल्यानें त्यानें केलेल्या संरक्षणाबाबतच्या शिफारसी वरील कारण देऊन सरकारनें अमान्य ठरविल्या आहेत.

---

### वैद्यासमोर दुखणें झांकण्यांत हंशील नाहा

ज्यांनीं मागच्या चौकशीचे वेळीं बोर्डापुढें साक्ष दिली नाहीं (आणि त्यामुळें ती चौकशी अपुरी ठरली) त्या कारखानदारांस तसें करण्यास पुन्हां एकवार संधि देण्यासाठी लोकर-गिरण्यांच्या संरक्षणाचा प्रश्न टारिफ बोर्डाकडे दुसऱ्यांदा पाठविण्याचें सरकारनें निश्चित केलें आहे. सदरहु कारखानदारांच्या मतें त्यांच्या धंद्यास संरक्षणाची गरज नसेल तर गोष्ट वेगळी. तसें त्यांनीं स्पष्ट म्हणावें, म्हणजे माहिती न पुरवल्याबद्दल त्यांस दोष देतां येणार नाहीं. परंतु आपल्या गिरण्यांस संरक्षण हवें असें त्यांचें मत असेल तर टारिफ बोर्डास आपल्या चौकशीकरितां जरूर वाटणारी माहिती त्यांनीं देणें सरळ आणि अगत्याचें आहे. खर्चाविषयींचा आंकडे जाहीर झाल्यानें आपल्या कारखान्यांच्या अंतःस्थितीची परिस्फुटता होऊन आपल्या व्यवस्थेचीं गुपितें प्रतिस्पर्ध्यांस समजतात, ही भीति गिरणीवाल्यांस वाटत असते आणि तिला मुळींच आधार नाहीं, असें म्हणतां यावयाचें नाहीं. तथापि, कारखानदारांस कांहीं माहिति खाजगी रीतीनें देतां येते आणि तिचा दुरुपयोग केला जाणार नाहीं अशी खबरदारी टारिफ बोर्ड घेतेंहि. कारखानदारांचें नुकसान होईल अशा रीतीनें त्यांची व्यक्तिगत माहिती जाहीर न होण्याचें महत्त्व आणि जबाबदारी बोर्डास समजत नाहीं, असें नाहीं. सबब, संरक्षणासाठी सरकारकडे धांव घेणाऱ्या कारखानदारांनीं टारिफ बोर्डापुढें आपली सर्व परिस्थिति तपशीलवार मांडून त्यास चौकशीच्या कामीं हरतऱ्हेनें मदत केली पाहिजे. स्वदेशी आणि परदेशी गिरणीवाले ह्यांच्या उत्पादनखर्चाची तपशीलवार छाननी करून त्यांत तफावत कोठें व कशी पडते ह्याचा निर्णय करणें आणि देशी धंद्यांचा खर्च कमी करण्यास वाव आहे किंवा नाहीं हें पाहून ते कांहीं काळानें स्वावलंबी होण्याची शक्यता अजमावणें हें तर टारिफ बोर्डाचें मुख्य कार्य असतें. तें नीट रीतीनें पार पडण्यास लागणारी सामुग्री त्यास उपलब्ध झाली नाहीं तर चौकशीचा खटाटोप व

खर्च फुकट जाणार, हें उघड आहे. ज्या दोन कारखान्यांकडून माहिती मिळाली नाहीं, त्यांचें सरकारनें केलेल्या तक्रारी संबंधानें काय म्हणणें आहे, तें प्रसिद्ध होणें आवश्यक आहे. तसें झाल्यास त्यांची बाजू सबळ आहे का दुर्बळ आहे आणि त्यांनीं साक्ष देण्याचें नाकारलें यांत सयुक्तिकतेचा भाग कितीसा आहे, ह्याची लोकांस कल्पना येऊन कारखानदारांविरुद्ध एकतर्फी मत प्रदर्शित झालें असा संशय येण्यास कारण उरणार नाहीं. वैद्यासमोर दुखणें झाकण्यांत कांहीं हंशील नाहीं, एवढी साधी गोष्ट त्यांस कळत नसेल असें कसें म्हणावें ? संरक्षणाच्या मागणीचा अखेरचा निकाल लागण्यांत तूर्त दिरंगाई झाली आहे. तथापि, टारिफ बोर्डाकडून पुन्हां चौकशी करवून घेण्याचें सरकारनें ठरवलें आहे, हें प्रस्तुत प्रकरणीं भाग्यच आहे, असें समजलें पाहिजे.

---

### शेतकऱ्यांच्या मदतीचा कायदा ( डी. ए. आर. ॲक्ट )

सावकार लोक कर्जदार शेतकऱ्यांवर व्याज-मुद्दलाचा अवास्तव बोजा लादून त्यांस जेरीस आणतात, असें आढळून आल्यावरून असल्या अडाणी व गरीब लोकांच्या सहायाकरितां डी. ए. आर. ॲक्ट ह्या नांवानें प्रसिद्ध असलेला कायदा करण्यांत आला. ह्या कायद्यानें शेतकऱ्यांच्या कर्जाची तपशीलवार छाननी करून सरळ व योग्य वाटेल तेवढीच रकम आणि व्याज हप्ते बंदीनें सावकारास देववण्याचा विशेष अधिकार दिवाणी कोर्टास दिला आहे. ह्या मार्गानें शेतकऱ्यांस सहाय मिळण्याची सोय झाली तरी सदरहु कायद्याची योजना व भाषा अत्यंत सदोष असून त्या योगानें अनंत घोटाळे माजतात आणि त्याचा मुख्य हेतु साध्य न होतां प्रत्यक्ष अंमलबजावणींत विपरीत परिणाम घडून आल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें, अशी तक्रार आज अनेक वर्षें चालली आहे. डी. ए. आर. ॲक्टाची योग्य दुरुस्ती व्हावी अशा सूचना अनेक वेळां होऊन मुंबई सरकारनें त्याबाबत चौकशी करून तिच्या संबंधांत रिपोर्टहि प्रसिद्ध झाले आहेत. बॉंबे बँकिंग इनक्वायरी कमिटीनेंहि सदरहु कायद्याबद्दलचीं मतें मागावून त्याची चर्चा केली आहे. सारांश, कायदा असमाधानकारक आहे आणि त्यांत फेरबदल होणें अत्यंत अगत्याचें आहे, ह्याची वाच्यता आणि उहापोह इतक्या वेळां आणि इतक्या प्रकारांनीं झाला आहे कीं, त्या विषयाबाबत आतां कांहीं नवीन सांगावयाचें उरलेलें नाहीं. परंतु कायद्यांत दुरुस्ती कशी व कोठें करावी म्हणजे त्याचा हेतु साध्य होऊन प्रत्यक्ष-अंमलबजावणींत भानगडी उत्पन्न होणार नाहींत, हें ठरवणें सरकारास कठिण गेलें आहे, आणि त्याबद्दल कायदे पंडितांमध्यें एकवाक्यता होणें अवघड झालें असावें असें दिसतें. कायद्यांत नमूद असलेला 'शेतकरी' कोणास म्हणावें येथूनच अडचणींस प्रारंभ झालेला आढळतो, ह्यावरून ह्या प्रश्नांतल्या भानगडींची कल्पना येईल.

---

### डी. ए. आर. ॲक्ट व हायकोर्टाचा अभिप्राय

शेतकऱ्यांच्या मदतीच्या कायद्यांतले घोटाळे दूर होण्यासाठी कायदेमंडळानें त्यांत दुरुस्त्या केल्या पाहिजेत, असा स्पष्ट अभिप्राय मुंबई हायकोर्टानें नुकताच व्यक्त केला आहे. जमीनींच्या विक्रीबाबत आणि तिच्यामधून वादीनें आपल्या कर्जाचा पैसा वसूल करून घेण्याबाबत खालच्या कोर्टानें हुकूमनामा केला असतां आपण शेतकरी असल्यानें ह्यासंबंधांत आपणांस कायद्यानें दिलेल्या सवलती मिळाव्या, असा मुद्दा प्रतिवादीनें उपस्थित केला. त्यासंबंधानें झालेल्या अपीलाचा निकाल करतांना हायकोर्टांतील न्यायाधीशांनीं वर उल्लेखिलेलें मत प्रदर्शित केलें आहे. डी. ए. आर. ॲक्टाची शब्दरचना सदोष असल्यानें कसे घोटाळे माजतात ह्याचें प्रस्तुत अपिलांत उपस्थित झालेला प्रश्न हें एक ताजें उदाहरण आहे, असें न्यायमूर्ति वाडिया ह्यांनीं आपल्या निकालांत म्हटलें आहे. न्यायमूर्ति दिवाटिया ह्यांनींहि ह्याच आशयाचें मत व्यक्त केलें आहे. प्रस्तुत खटल्यांत उद्भवलेल्या मुद्यासंबंधानेंच नव्हे, तर कोर्टापुढें वारंवार जे घोटाळ्याचे व भानगडीचे प्रश्न येतात, त्यांसहि अनुलक्षून कायद्यांत दुरुस्त्या करण्याचें कायदेमंडळानें मनावर घेणें इष्ट आहे असें न्यायमूर्तींचें म्हणणें आहे. डी. ए. आर. ॲक्टांत आमूलाग्र सुधारणा होणें जरूर आहे, असेंहि त्यांनीं सांगितलें आहे, ह्यावरून, मुंबई सरकारनें ह्या प्रश्नाकडे विलंब न करतां, लक्ष्य पुरवणें हें किती तातडीचें काम आहे ह्याविषयीं कायदे मंडळाची व जनतेची खात्री पटेल. दुरुस्तीचें काम सोपें नाहीं, हें खरें असलें तरी तें केव्हां तरी हातीं घेतलेंच पाहिजे. तेव्हां ही गोष्ट जितकी लवकर घडेल, तितकें चांगलेंच होईल.

---

### बेकारी-निवारणाची मोहीम—सप्रू कमिटीच्या शिफारसी

संयुक्त प्रांत सरकारनें १९३४ सालीं, बेकारीच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी सर तेज बहादुर सप्रू ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नेमलेल्या कमिटीचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. बेकारीचें निवारण करणारा रामबाण उपाय सांपडणें शक्य नाहीं; त्याचप्रमाणें हा प्रश्न तात्काल सुटण्याजोगाहि नाहीं, असें आपलें स्पष्ट मत कमिटीनें नमूद केलें आहे. शिक्षणक्रमांत करतां येण्याजोग्या कित्येक सुधारणा कमिटीनें सुचविल्या आहेत व त्याबरोबरच, सुशिक्षित तरुणांस काम मिळेल, अशा प्रकारची शेती व उद्योगधंदे ह्यांत सुधारणा झाली पाहिजे, असा आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. औद्योगिक युगाची सुरवात होण्यास सरकारनें चालना द्यावी, कमी केलेल्या जागा पुनः भरण्यांत याव्या, ठराविक वयानंतर सरकारी नोकरांना सक्तीनें सेवानिवृत्त करण्यांत यावें, वकिलांचे दोन वर्ग करून दस्तऐवज तयार करण्याचें काम एकासाठी राखून ठेवावें, वृत्तपत्र व्यवसायाचें व ग्रन्थाध्यक्षाचें काम शिकविणारे वर्ग स्थापण्यांत यावेत, शिकलेल्या लोकांस नवीन धंदे स्थापन करण्यासाठी मदत देण्यांत यावी, इत्यादि अनेक सूचना कमिटीनें केल्या आहेत. सरकारनें ह्या विषयांत लक्ष्य घालून त्यासाठी ज्यास्त पैसे खर्च केले, तर बेकारीच्या प्रश्नाची तीव्रता कमी होण्यास पुष्कळ सहाय होईल, हें कमिटीचें मत सरकारनें विचारांत घेणें अवश्य आहे. मध्यवर्ती शिक्षण सल्लागार मंडळाची स्थापना करून हिंदुस्थान सरकारनें त्या संबंधांतल्या आपल्या जबाबदारीची एक प्रकारें कबुली दिलेली आहे. बेकारीचा प्रश्न एकट्या दुकट्याच्या हातून सुटण्याजोगा नाहीं; सरकारनें आपलें सामर्थ्य व वजन खर्चून तो सोडवला पाहिजे. सप्रू कमिटीच्या शिफारसींचा सर्व प्रांतिक सरकारांनीं अवश्य विचार करून बेकारी निवारणाच्या मोहिमेस लागणें अगत्याचें आहे.

---

## पैशाच्या वर्गावर्गीची सहकारी संस्थांची व्यवस्था

(१)

( लेखकः–श्री. ल. म. जोशी, बी. कॉम्., सर्टि. ए. आय. आय. बी., मुंबई. )

केवळ मुंबई इलाख्यापुरतेंच बोलावयाचें झाल्यास सहकारी तत्त्वावर चालविलेल्या बहुतेक सर्व बँकांचे व्यवहार आज १०–१२ वर्षांपासून बरेच सुरळीत चालले असून त्यांनीं ( समायिक भांडवलाच्या बँकांप्रमाणेंच ) खेडेगांवांतील व शहरांतील लोकांचा बराच विश्वास संपादन केला आहे. लोकांच्या आदरास व विश्वासास पात्र होणें हा बँकेंतील व्यवहारांच्या यशस्वितेचा पाया असल्यामुळें सहकारी बँकांची प्रगति उत्तरोत्तर झपाट्यानें होऊन ती अशीच समाधानकारक राहील असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. ह्या प्रगतीस, थोड्या खर्चात पैशांचे देवघेवीचे अंतर्गत व्यवहार करण्याच्या सोयींच्या योगानें बरीच चालना मिळाली असून त्या बाबतींतल्या परस्पर सहायकरी अशा कांहीं व्यवहारोपयोगी योजनाहि उपयुक्त झाल्या आहेत. यांचेंच थोडक्यांत दिग्दर्शन करून त्या संबंधांतल्या एका महत्त्वाच्या प्रश्नाचा ऊहापोह करण्याचें या लेखांत योजिलें आहे.

सुमारें १५–२० वर्षांपूर्वी येथील सर्व साधारण बँकांचे व्यवहार बाल्यावस्थेंतच होतें. सहकारी बँकांचा तर त्यावेळीं नुकताच कोठें उदय होत होता. समायिक भांडवलाच्या बँकांनीं व्यापारी दृष्टि ठेऊन आपलें ठाणें प्रथम मोठमोठ्या शहरीं दिलेलें, तर सहकारी बँकांचा मूळ उद्देश शेतकरी वर्गाची उन्नति करण्याचा असल्यामुळें त्यांनीं आपला तळ तालुक्याचें शहरीं अगर व्यापारी दृष्टीनें महत्त्वाच्या अशा एखाद्या खेडेगांवांत दिलेला होता. अर्थात्‌च, भर हंगामाचे दिवासांत मालाचे उठावास लागणाऱ्या पैशांचे अंतर्गत देवघेवीचे व्यवहारांस शहरांत जरी विशेष अडचण भासत नसली तरी ती खेडेगांवांत फारच भासत असे. एखाद्या गांवीं विपुल पडलेला निकामीं पैसा त्याची जरूर असलेल्या गांवीं न्यावयाचा म्हटल्यास कोण मारामार पडे! एकतर तो स्वतः बरोबर घेऊन जावें लागत असे; किंवा मनीऑर्डरनें तरी तो पाठवावा लागत असे. हें काम बरेंच त्रासाचें, खर्चाचें व दिरंगाईचें असल्यामुळें व व्यापारांत वेळेचें महत्त्व फार मानलें जात असल्यामुळें लोकांची फार कुचंबणा झाल्यास नवल नाहीं. तेव्हां, यास कांहीं तरी मार्ग काढणें अवश्य होऊन बसलें. यासच १९२६ सालच्या रॉयल कमिशन ऑन इंडियन करन्सीनें, "केव्हांहि बँकिंगच्या व्यवहारांत सुधारणा घडवून आणल्या गेल्यास त्यामध्यें पैसे पाठविण्याच्या अंतर्गत व्यवस्थेसंबंधाची तरतूद होणें व तिचा सर्वत्र प्रसार होणें अत्यंत जरूर आहे," अशा अर्थाची एक शिफारस केली होती. तीस अनुसरून "सप्लाय बिल्स" व आर. टी. आर्स गव्हर्नमेंट खातीं इंपीरिअल बँकेकडून मिळण्याची सोय झाली, व विशेषतः सहकारी बँकांस कांहीं मामुली अटींवर तीं विना कमिशन मिळूं लागल्यामुळें त्यांस निरनिराळ्या ठिकाणची पैशाची देवघेव करणें सुकर होऊं लागलें. याबरोबरच, चेक्स, ड्राफ्टस अगर हुंड्या यांच्या देवघेवीनें व्यापार करण्याची प्रथा लोकांमध्यें जास्त प्रमाणांत पडूं लागली.

यानंतर १९३० मध्यें मुंबई इलाख्याच्या बँकिंग इन्क्वायरी कमिटीनें सहकारी बँकांस ह्या बाबतींत विशेष सवलती मिळण्यासंबंधानें जोराची शिफारस केली. ज्या ठिकाणीं कोणतीहि समायिक भांडवलाची मोठी बँक आपली शाखा अगर पोटशाखा उघडण्याचें स्वप्नांत सुद्धां आणणार नाहीं अशा दूरदूरच्या ठिकाणीं सहकारी बँका आपलें ऑफिस उघडून तेथील सावकारांस अगर व्यापाऱ्यांस अगदीं कमी खर्चात मोठ्या प्रमाणावर पैशाचे देवघेवीचे व्यवहार करण्यास मदत करतात व अशा रीतीनें हंगामाचे दिवसांत मालाचा उठाव करण्यास मदत करून तेथील व्यापाराची वाढ होण्यास उत्तेजन देत असल्यामुळें ह्या बँकांस शक्य तितक्या जास्त सवलती सरकारकडून अगर त्यांचे तर्फे इंपीरिअल बँकेकडून मिळाव्या अशी तिची सूचना होती. तिचा परिणाम असा झाला कीं, वरील प्रकारच्या ठिकाणीं प्रतिदिनीं कांहीं ठराविक रकमेपर्यंत तेथील ट्रेझरीच्या अगर सबट्रेझरीच्या मार्फत पैशाची देवघेव करण्यांस सहकारी बँकांस परवानगी मिळाली व मध्यवर्ती बँकेवर पाठविण्याकरितां इंपीरियल बँकेकडून जिल्ह्याच्या व तालुक्याच्या गांवीं विना कमिशन ड्राफ्ट्स् मिळूं लागले.

ह्या व्यवस्थेचा परिणाम सहकारी बँकांच्या व्यवहारांवर फार चांगला झाला व त्या बँका निरक्षर खेडुतांच्या अगर व्यापाऱ्यांच्या आदरास व विश्वासास पात्र झाल्या. त्यांचे संबंधानें आपुलकीची भावना लोकांमध्यें उत्पन्न झाल्यामुळें सहकारी बँकांची पत वाढूं लागून त्यावेळीं अगोदरच सुस्थितींत असलेल्या समायिक भांडवलावर चालणाऱ्या बँकांशीं यशस्वी तऱ्हेनें टक्कर देण्याचें सामर्थ्य यांच्यांत उत्पन्न झालें. खेडेगांवांतील लोकांत व इतर नागरिकांत त्यांचे चेक्स, अगर हुंड्या ह्यांस प्रसिद्धी मिळून त्यांचे व्यवहार वाढूं लागले, व शेतकरी आणि व्यापारी ह्यांस बँकेच्या कामकाजाच्या पद्धतीची माहिती होऊन त्या त्यांच्या आंगवळणीं पडल्या व त्यांत सर्वांचेंच हित होत गेलें. तसेंच गिऱ्हाइकांस शक्य तितक्या जास्त सवलती दिल्याचें श्रेय एकीकडे बँकांच्या पदरीं पडून दुसरीकडे व्यापारी पतीचें एकीकरण झालें आणि खर्च व वेळ वाचून सार्वत्रिक सोय झाली.

## पॅसिफिक महासागरांतील १,४०० बेटें

महायुद्धांतील पराभूत राष्ट्रांकडून काबीज केलेल्या देशांची व्यवस्था राष्ट्रसंघानें आपल्या २२ व्या कलमान्वयें केलेली आहे. कोणत्याहि एक राष्ट्रानें हे प्रदेश आत्मसात् करूं नयेत, त्यांची व्यवस्था पहाण्याचें काम राष्ट्रसंघानें करावें व कोणत्या तरी एका राष्ट्राकडे त्यांवरील प्रत्यक्ष देखरेख सोंपवावी, अशी ही घटना आहे. अर्मेनिया, सिरिया, मेसापोटेमिया, जर्मन पश्चिम आफ्रिका, पॅसिफिक महासागरांतील जर्मन बेटें, इत्यादि अंकित प्रदेशांची वासलात ह्याच मार्गानें लावण्यांत आलेली आहे व विजयी राष्ट्रांनीं ते प्रदेश देखरेखीसाठीं आपआपसांत वांटून घेतलेले आहेत. ह्या मुलुखांतील लोकांच्या झालेल्या कमी-जास्त सुधारणेनुसार त्यांचे प्रतवार तीन गट केलेले आहेत. क वर्गातील (सर्वांत कनिष्ट) प्रदेशांची व्यवस्था प्रत्यक्ष व्यवहारांत काबीज केलेले देशांप्रमाणेंच करण्यांत येत असते.

विषुववृत्ताच्या उत्तरेकडील जर्मन बेटें क वर्गांत दाखल असून तीं जपानचे देखरेखीखालीं आलेलीं आहेत. ह्या बेटांची संख्या सुमारें १,४०० इतकी असून लोकसंख्या अर्धा लाख व क्षेत्रफळ ८५६ चौरस मैल भरतें. जपाननें राष्ट्रसंघाचें सभासदत्व सोडलेलें असलें तरी ह्या बेटांवर जपानचीच सत्ता चालू आहे.

## हिंदी चलनाबाबत मनोरंजक माहिती

(२)

### चलनी-नोटा

हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या कागदी चलनांत दहा रुपयांच्या नोटा अत्यंत लोकप्रिय असून, एकूण नोटांच्या ३९·५ टक्के किंमतीच्या नोटा दहा रुपयेवाल्या आहेत. त्यांचे खालोखाल (३५·५%) पांच रुपये किंमतीच्या नोटा येतील. १९३४–३५ सालीं एक हजारांच्या नोटांचा प्रसार थोडासा ज्यास्त झाला, परंतु नव्या पन्नास रुपये किंमतीच्या नोटा मागसल्या आहेत. दहा हजार रुपये किंमतीच्या नोटा व्यवहारांत क्वचितच येतात; त्यांचा मुख्य उपयोग म्हणजे इंपीरियल बँक व सरकारी तिजोऱ्या ह्यांमध्यें पैशाची ने–आण सुलभतेनें करणें, हा होय. साधारणपणें, प्रत्येक जातीच्या नोटेचें आयुष्य एका वर्षाहून ज्यास्त नसतें. पांच व दहा रुपयांच्या नोटांस मध्यंतरीं हलक्या दर्जाचा कागद वापरण्यांत आला होता, त्याचा प्रतिकूल परिणाम तात्काल दिसून आला, हें खालील कोष्टकावरून ध्यानांत येईल:—

खराब झालेल्या सर्व तऱ्हेच्या नोटा किती बदलून दिल्या?

(नोटांची संख्या)

| | १९३१-३२ | १९३२-३३ | १९३३-३४ | १९३४-३५ |
|---|---|---|---|---|
| खराब झालेल्या नोटा | २६,३०४ | ३१,७०८ | २७,२०७ | ३६,५६८ |

सरकारी तिजोऱ्या, रेल्वे स्टेशनें व टाकसाळी येथें आढळलेल्या बनावट नाण्यांची संख्या १९३४–३५ सालीं खालीलप्रमाणें आढळली:—

### बनावट नाणीं

| | रुपये | अधेल्या | पावल्या | चवल्या |
|---|---|---|---|---|
| १९३४–३५ | १,६६,५८० | १४,१६३ | १०,२१६ | १,००१ |

लहान सहान नाणीं बनावट करण्यापेक्षां रुपये बनावट करण्यांत नफा ज्यास्त असल्यानें, खोट्या रुपयांचें प्रमाण जबरदस्त आहे. पंजाब, मुंबई, बंगाल व संयुक्तप्रांत येथें सर्वांत ज्यास्त खोटीं नाणीं सांपडलीं.

### टाकसाळी

१९३४–३५ मध्यें फक्त कलकत्ता येथील टाकसाळीमध्यें सरकारी नाणीं पाडण्यांत आलीं. २० लक्ष रुपयांच्या अधेल्या, ७½ लक्ष रुपयांच्या निकेली चवल्या, २१½ लक्ष रुपयांच्या आणेल्या, १३½ लक्ष रुपये किंमतीचे पैसे, ७० हजारांचे अर्धे पैसे व ९० हजारांच्या पया मिळून एकूण १५ कोटि ६२ लक्ष नाणीं त्या टाकसाळींतून बाहेर पडलीं. ह्या सेरीज, कांहीं संस्थानांचें कामहि करण्यांत आलें. मुंबई येथील टाकसाळीनें मुख्यत: सरकारी चांदी शुद्ध करण्याचें काम केलें व २ कोटि ४० लक्ष हाँगकाँग ब्रिटिश डॉलर पाडून दिले. १ कोटि, १० लक्ष तोळे सोनें व १ कोटि, ५७ लक्ष चांदी तेथें वितळविण्यांत आली.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

MARATHE & Co.
ENGINEERS & IRON FOUNDERS
WORKS: Natu Bag, Bhikardas Road, POONA 2
Can undertake to do any sort of casting.
We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act.
Our prices are very competitive.
OFFICE: 978-79, Sadashiv, Laxmi Rd., POONA 2

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street Bombay | 716, Sadashiv Peth Poona City

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा (Dandruff), केंस गळणें व टक्कल यांवर अनुभविक उपाय. केंसांची वाढ करण्यास उत्कृष्ट साधन. white oil पासून अलिप्त. बाटली किं. १ रु. पो. व पॅ. निराळें. पुण्यांत नू. म. विद्यालय भांडार, येथें मिळेल.
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग. कं. अमदाबाद.

प्रो. काळे ह्यांचें नवीन पुस्तक
रिझर्व्ह बँक
हिंदुस्थानांत राष्ट्रीय मध्यवर्ती बँक ह्या नात्यानें रिझर्व्ह बँकेची स्थापना होऊन त्या संस्थेचें काम चालू झालें आहे. रिझर्व्ह बँकेची घटना, तिच्या कार्याचा व्याप, तिचा इतर बँकांशीं संबंध इत्यादि विषयांची सांगोपांग माहिती ह्या पुस्तकांत दिली असून रिझर्व्ह बँकेच्या कायद्याच्या निरनिराळ्या कलमांची छाननी केलेली आहे. अवघड विषयाचा सुलभ बोध व्हावा म्हणून पुस्तक–कर्त्यानें बँकगच्या धंद्यांतले आधुनिक प्रकारचे व्यवहार, त्यांची उपपत्ति व त्यांचें कार्य ह्यांचा अत्यंत सोप्या मराठी भाषेंत चर्चा केली आहे आणि देशी व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें कोणत्या योजना अमलांत आणल्या पाहिजेत ह्या संबंधानें व्यावहारिक सूचना केल्या आहेत. रिझर्व्ह बँक ही, राष्ट्रीय आर्थिक प्रगतीस परिपोषक होईल काय? ह्या प्रश्नास प्रस्तुत पुस्तकांत उत्तर मिळण्यासारखें आहे.
पृष्ठें १२०–किंमत १ रुपया (ट. हं. वेगळें)
पुस्तक मिळण्याचीं ठिकाणें:—
(१) व्यवस्थापक, "अर्थ" ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) आर्यभूषण प्रेस, पुणें २.
(३) दि को-ऑपरेटर्स बुकडेपो, ९, बेकहौस लेन, फोर्ट, मुंबई.

## बिहार व ओरिसा प्रांतांतील सहकारी चळवळ

### विकट परिस्थिति

बिहार आणि ओरिसा प्रांतांतील सहकारी सोसायट्यांचा १९३४ सालचा वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला असून त्याची एक प्रत आमचेकडे आली आहे. श्री. वाय्. ए. गोडबोले, आय. सी. एस., हे सदरहु प्रांताच्या सहकारी खात्याचे रजिस्ट्रार असून त्यांचे नेतृत्वाखाली तेथील सहकारी चळवळीची नाव प्रचलित मंदीच्या हलाखींतून सावधगिरीनें व कुशलतेनें चालवली जात आहे. शेतकऱ्यांच्या खालावलेल्या परिस्थितीमुळे सर्वच प्रांतांतील शेतकी सोसायट्यांवर आज कठिण प्रसंग आलेला आहे. त्यांतच बिहारमधील धरणीकंपाच्या आपत्तीनें तेथील चळवळीवर विलक्षण गंडांतर आणलें. अहवालाचे सालीं ७७ नव्या सोसायट्या बिहार–ओरिसांत नोंदण्यांत आल्या, तथापि बिघडलेल्या सोसायट्यांचे व्यवहार बंद करण्याचें परिणामीं हितकारक धोरण चालू ठेवल्यामुळे सोसायट्यांच्या एकूण संख्येंत घट होऊन ती संख्या ८,८८२ झाली. सोसायट्यांच्या वर्गवारांत चांगल्या सोसायट्यांचें प्रमाण कमी होत असलेलें दिसतें, आणि तें प्रचलित आर्थिक दुःस्थितीचें ठळक लक्षण आहे. सभासदांनीं सोसायट्यांस व सोसायट्यांनीं बँकांस देणें असलेल्या थकबाकींत झालेली वाढ श्रेयस्कर नाहीं, ह्याची जाणीव सहकारी खात्यास आहे. म्हणून, परतफेड करण्याच्या पात्रतेप्रमाणें हप्ते ठरवून दीर्घ मुदतीचीं कर्जे अल्प व्याजाच्या दरानें देण्याची व्यवस्था झाल्याखेरीज कर्जबाजारी शेतकऱ्यांस चांगले दिवस दिसणें शक्य नाहीं, असा अभिप्राय नमूद करण्यांत आला आहे. तसेंच पैशाचा पुरवठा अपुरा झाल्यास सहकारी संस्था थंडावतील अशा भीतिहि प्रकट करण्यांत आली आहे, ती धोरणाच्या दृष्टीनें चिंतनीय आहे.

### प्रांतिक बँक व फेडरेशन

प्रांतिक सहकारी बँकेस आतां २१ वर्षे पुरीं झालीं आहेत; तथापि, तिची परिस्थिति फारशी समाधानकारक नाहीं. अहवालाचे सालीं फक्त ३[१] लक्ष रुपये, म्हणजे त्या पूर्वीच्या सालापेक्षां ९ लक्ष रुपये कमी, बँकांस व सोसायट्यांस कर्जाऊ दिले गेले. सरकारनें, १५ वर्षे मुदतीचें १६ लाखांचें व ४ वर्षे मुदतीचें ४ लाखांचें, अशीं दोन कर्जें बँकेस देऊन तिच्या व्यवहारांस स्थैर्य आणलें. अहवालाचे सालीं बँकेस जरी १ लक्ष रुपये नफा झाला, तरी थकलेलें व्याज ( २ लक्ष ८३ हजार रुपये ) नफा वांटणीच्या हिशेबांत घेतां येत नसल्यानें डिव्हिडंड देण्यांत आलें नाहीं.

प्रांतिक सहकारी फेडरेशनकडे ऑडिटचें काम सोंपविलेलें आहे. त्याबरोबरच, प्रचार, शिक्षण, सोसायट्यांची स्थापना व त्यांवर देखरेख इत्यादि कामें त्यानें करावयाचीं आहेत. त्याबद्दल बँका व सोसायट्या ह्यांचेकडून मिळावयाची रकम हातीं न आल्यामुळें फेडरेशनला सरकारी ग्रँट मिळूनहि ५५ हजारांचें कर्ज काढावें लागलें.

एकंदरीनें पहातां, बिहार व ओरिसा येथील सहकारी चळवळ आर्थिक आपत्तीच्या भोंवऱ्यांत सांपडली आहे, हें स्पष्ट दिसतें. अहवालांत सांगितलेली परिस्थिति चिंताकारक असली, तरी रजिस्ट्रारसाहेबांनीं, एका वर्षापूर्वीच्या मानानें आज आशेस ज्यास्त जागा आहे, असे उद्गार काढले आहेत. सहकारी खात्याच्या रिपोर्टावर अभिप्राय देतांना सरकारनें श्री. गोडबोले ह्यांच्या कामगिरीचा आपल्या ठरावांत गौरवपर उल्लेख केला आहे.

---

## विमा कंपन्यांस एक सूचना

जुन्या कंपन्यांशीं स्पर्धा करणें नव्या कंपन्यांस जड जातें. सर्व कंपन्यांच्या हप्त्यांचे दर साधारणपणें सारखेच असतात, तथापि, नफा–वांटणीच्या बाबतींत मात्र जुन्या कंपन्या अधिक आकर्षक असतात. साहजिकच नव्या कंपन्यांस विमाक्षेत्रांतल्या स्पर्धेत ही अडचण चांगलीच जाणवते. सुरवातीचीं कांहीं वर्षे कंपनीचें व्यवहारक्षेत्र आंखण्यांत जाऊन प्राथमिक स्वरूपाचा खर्च होतो, त्याची भरपाई विमेदारांकडून मिळणाऱ्या पैशांतूनच होणार, हें उघड आहे. त्यामुळें, प्रारंभाच्या विमेदारांस फारसें बोनस मिळत नाहीं. कांहीं वर्षांनीं तें मिळतें खरें, परंतु नव्या कंपनींत विमा उतरवून तिच्या यशस्वितेस हातभार लावल्याबद्दल सुरवातीच्या विमेदारांस मोबदला काय मिळाला? २५ वर्षांनीं कंपनीची अतिशय भरभराट झाली, तर तेव्हांच्या विमेदारांस भरपूर नफा मिळेल, परंतु 'आद्य' विमेदारांच्या हिताची हेळसांड होते, त्याविषयीं कांहीं तजवीज करणें आवश्यक नाहीं काय?

सुरवातीस ज्या विमेदारांनीं विमामंडळीच्या कार्यास चालना दिली, त्यांच्या कार्याचा मोबदला म्हणून आज नाहीं तरी पुढें त्यांस भरपाई होणें इष्ट आहे. पहिल्या पांच वर्षांत विमे उतरविणारांस आपण 'आद्य विमेदार' असें समजूं. पहिल्या पंचवार्षिक मूल्यमापनांत दर हजारीं सालिना १० रु. नफा वांटला व दुसऱ्या पंचवार्षिक मूल्यमापनांत सालिना १५ रु. नफा वांटला, तर आद्य विमेदारांचें, मागाहून विमे उतरणारांच्या मानानें थोडें नुकसान नाहीं कां झालें? नवीन विमेदारांस सुरवातीपासूनच १५ रु. नफा पडला, तसा जुन्यांस मिळाला नाहीं. म्हणून विमामंडळीनें आद्य विमेदारांस १५ रुपये दरानें दुसऱ्या मूल्यमापनाचे वेळीं नफा देऊन नंतर मग सर्वांस एकजात १५ रु. नफा वांटणें ज्यास्त सयुक्तिक होणार नाहीं काय?

वर केलेल्या सूचनेचें स्पष्टीकरण आंकड्यांत खालीलप्रमाणें होईलः—

### विमेदारांस मिळणारें बोनस

( चालू पद्धत )

| | विम्याची रक्कम | पहिला पंचवार्षिक नफा | दुसरा पंचवार्षिक नफा | नफ्यासह एकून रक्कम |
|---|---|---|---|---|
| आद्य विमेदार | १,००० | ५० | ७५ | १,१२५ |
| ५ वर्षांनंतरचा विमेदार | १,००० | — | ७५ | १,०७५ |

### सुचविलेली पद्धत

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आद्य विमेदार | १,००० | ५० | २५+७५ | १,१५० |
| ५ वर्षांनंतरचा विमेदार | १,००० | — | ७५ | १,०७५ |

वर सुचविलेल्या पद्धतींत, आद्यविमेदारास २५ रुपयांची भरपाई मिळते व नव्या कंपनींत विमा उतरण्याचें पुण्य त्यास घडतें.

बोनस वांटण्याच्या वर सुचविलेल्या पद्धतीप्रमाणें इतर मार्गांनींहि उद्दिष्ट साध्य करतां येणें शक्य आहे. विमा मंडळयांनीं ह्या प्रश्नाचा विचार करण्याजोगा आहे.

पु. ग. मराठे

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—२ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११८—१२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—४ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—६ |
| ४% १९६०–७० ... ... | ११०—१४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९६—६ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०६—१ |
| ४% १९४३ ... ... ... | १०९—४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०६—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०४—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०५—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १०५—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | १०९—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५% ) ... ... | १२१—४ |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२७—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०४—१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५—१० |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५१५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १२९—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | ९८—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९३—४ |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९०७—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १४८—१२ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४५—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २१८—१२ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १५३६—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५२२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १८८—१२ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६३—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १४८—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५७६—४ |

#### सोनें–चांदी

| | | |
|---|---|---|
| चार्टर्ड बँकेचें सोनें | तोळयास | ३४—१० |
| मिंट | तोळयास | ३४—११ |
| हिंदी मिंट चांदी | १०० तोळयांस | ४९—१५ |
| हिंदी मिंट चांदी ( वायदा ) | १०० तोळयांस | ४९—११ |

### ज्युबिलीफंडाच्या रकमेचा विनियोग

मरहूम पंचम जॉर्ज बादशहांच्या ज्युबिलीफंडासाठी मुंबई शहरांत ४,७९,४६३ रु. वर्गणी जमा झाली होती. एकूण जमा झालेल्या रकमेच्या ७० टक्के रक्कम प्रत्येक प्रांतास स्वतःच्या इच्छेप्रमाणें विनियोग करण्यासाठी मिळावयाची आहे, ह्या हिशेबानें मुंबई शहराच्या वांट्यास ३,३६,००० रुपये येतात. हा फंड उभारतवेळीं, फंडाच्या रकमेचा प्राऊण हिस्सा रकम मुंबई शहरांतील इस्पितळांस देण्यांत येईल, असें गव्हर्नरसाहेबांनीं जाहीर केलें होतें. म्हणजे, इस्पितळांच्या वांटणीस २,५२,००० रु. येतात. उरलेले ८४,००० रु. इंडियन रेडक्रॉस सोसायटी, सेंट जॉन्स ॲम्ब्युलन्स असोसिएशन व कौंटेस ऑफ डफरिन फंड आणि इंडियन आर्मी बेनिव्होलंट फंड, ह्यांत विभागण्यांत येतील.

मुंबई इलाख्यांतील वेगवेगळ्या जिल्ह्यांतून जमा झालेल्या फंडाचा विनियोग कसा करावयाचा, ह्याबद्दल विचार चालू आहे.

## Notice to Contractors.

Sealed tenders on B 2 form are invited for the works of (i) Special Repairs to Aqueduct No. 3 in mile No. 8 of Godavari Right Bank Canal, Taluka Sinner, District Nasik and (ii) Special Repairs to Culvert No. 16 in mile No. 12 of the Godavari Left Bank Canal, Taluka Niphad, District Nasik. The estimated costs are about Rs. 8,700/- and 7,600/- and earnest money payable is Rs. 261/-and 228/- respectively.

2. Blank Tender forms can be had on payment of Rs 2/- each from the office of the Undersigned at Nasik during office hours on any working day upto 4th February 1936. Tenders will be received up-to 12 A. M. on 5th February 1936 and opened at the same time at the same place. Plans etc. can be seen during all office hours in the office of the Undersigned.

3. Every Tender should be accompanied by a receipted chalan for payment of earnest money as Specified above from any Government Treasury or the Imperial Bank of India without which no tender will be considered. This amount will be refunded to those whose tenders will be rejected and forfeited in the case of those who refuse to complete the contract documents after their acceptance and to commence work. A solvency certificate signed by the Collector of District must accompany each Tender.

4. Undersigned reserves the right to reject any tenders and no reason shall be given for the acceptance or rejection of any of them.

Sd. C. G. Kale,
Executive Engineer,
Nasik Irrigation Division.

Nasik. 22-1-36
Executive Engineer's Office,
N. I. Division.

## "अर्था"चें व्यवसायबंधूंकडून अभिनंदन

('अर्था'स दुसरें वर्ष लागलें, ह्यासंबंधानें कित्येक व्यवसायबंधूंनीं अर्था'च्या कामगिरीबाबत प्रशंसोद्गार काढून त्याचें अभिनंदन केलें आहे, याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहों. कांहीं निवडक अभिप्राय खाली उद्धृत केले आहेत.)

एका विशिष्ट शास्त्रास धरून प्रवीणांनीं चालविलेलीं नियतकालिकें आपल्या महाराष्ट्रांत तरी अगदींच तुरळक आहेत. ही उणीव प्रो. काळे यांनीं चालविलेल्या 'अर्थ' या साप्ताहिकानें चांगलीच भरून काढली आहे. हल्लींचें राजकारण निव्वळ भावनांचें राजकारण राहिलें नसून त्यांत दिवसेंदिवस अर्थशास्त्राचें प्राबल्य वाढत चाललें आहे. हरघडी अर्थशास्त्राशीं निगडित असलेले प्रश्न उत्पन्न होत आहेत. एका राष्ट्रांतील आर्थिक परिस्थितीचा परिणाम आतां सटदिशीं इतरांना भोंवूं लागलेला आहे. जगाचे संबंध अशा रीतीनें आर्थिक बाबींभोंवतीं फिरताहेत. अशा परिस्थितींत हे प्रश्न सुलभ रीतीनें जनतेला कळणें जरूर आहे. तशांत आतां लोकशाही वाढत्या स्वरूपांत आपल्यामध्यें नवीन घटनांनीं येणार असल्यामुळें सर्वसाधारण जनतेला ह्या आर्थिक प्रश्नाची ओळख चांगली होणें जरूर आहे. अर्थानें हें काम चांगलें चालविलेलें आहे. त्यांतील 'विविध माहिती' हें सदर अर्थशास्त्रविषयक मनोरंजक व उद्बोधक माहितीनें भरलेलें असतें व इतरही पुष्कळच आंकडे व माहिती सर्वत्र दिलेली असते. अर्थशास्त्रांतील निरनिराळ्या प्रश्नांबाबत ज्यांना आंकडेवारी माहिती जमा करून अभ्यास करण्याची इच्छा असेल त्यांना तर 'अर्थ' हें साप्ताहिक फारच उपयुक्त आहे. प्रो. वा. गो. काळे यांनीं मराठींतून अर्थशास्त्राचें सुलभ ज्ञान देण्याचें जें ठरविलें आहे तें खरोखरीच अभिनंदनीय आहे.

—प्रभा (२१ जानेवारी १९३६.)

अर्थशास्त्र या विषयासच वाहिलेल्या असलेल्या साप्ताहिकाची उणीव महाराष्ट्रांत फार भासत होती. ती या साप्ताहिकानें दूर केल्याबद्दल महाराष्ट्रीयांनीं प्रो. काळे यांचे खरोखर आभार मानले पाहिजेत. महाराष्ट्राचा औद्योगिक व आर्थिक व्याप कसा वाढत आहे व तो आणखी कसा वाढवितां येईल, हें या साप्ताहिकाच्या परिशीलनानें कोणालाहि समजण्यासारखें आहे.

—कुलाबा समाचार (१८ जानेवारी १९३६.)


'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

**महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचा मजबूत पाया**

**अर्थ**

[व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि आर्थिक विषयांस वाहिलेलें साप्ताहिक]

संपादक : प्रो. वा. गो. काळे

सहायक : श्री. श्री. वा. काळे

**मध्यप्रांत व वऱ्हाड**

हायस्कूल, मिडल स्कूल व नॉर्मल स्कूल ह्यांतील शिक्षकांच्या ग्रंथालयासाठीं मंजूर

**मुंबई इलाखा**

सरकारी व सरकारमान्य शाळांत व ट्रेनिंग कॉलेजांत घेण्यासाठीं मंजूर

महाराष्ट्रीयांचीं मनें उद्योगधंदे, व्यापार, इत्यादि धनोत्पादक व्यवहारांकडे वळून त्यांस ह्या विषयांची गोडी लागावी, या दृष्टीनें 'अर्था'ची मांडणी केलेली असते. व्यापारी, शिक्षक, विद्यार्थी, सार्वजनिक कार्यकर्ते व सर्वसाधारण नागरिक ह्या सर्वांनीं 'अर्था'चें वाचन केलें असतां महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीचा मजबूत पाया तयार झाल्याखेरीज रहाणार नाहीं. उद्योगधंद्यांत असणाऱ्या, त्याचप्रमाणें त्यांत नव्यानें पडणाऱ्या सर्वांस हें पत्र मार्गदर्शक होईल.

प्रत्येक महाराष्ट्रीय कुटुंबांत व शाळेंत अर्थ वाचला जाणें आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी फक्त चार रुपये असून टपालखर्च वेगळा नाहीं. मनिऑर्डर पाठवून वर्गणीदार व्हा.

व्यवस्थापक, **अर्थ**, अर्थ ऑफिस, पुणें ४

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

**एन. ए. ॲन्ड फ्रेन्ड्स**
स्टेशनर्स, जनरल मर्चन्टस, ॲन्ड कमिशन एजन्टस.
आप्पा बळवंत चौक, पुणें २.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**

**This year 1934-35**
**Exceeds**
**2 CRORES & 50 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment **Rs. 23** On Whole Life **Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.



## काटकसर आणि चढाओढ

सध्यांचे आर्थिक मंदीचे दिवसांत अधिक काटकसर कशी करितां येईल हा विचार प्रत्येकापुढें आहेच. संस्था, ऑफिस, कारखाना, घर इ० सर्व ठिकाणीं काटकसरीचा प्रयत्न सुरू आहे.

**परंतु**

वेळेचीं काटकसर करणें आरोग्यःशिवाय कसें शक्य होईल, आणि आरोग्य मिळण्यास व टिकविण्यास उपाय काय ?

याचें उत्तर

## आरोग्यमिश्रण

याचे सेवनानें

शौचास साफ होऊं व तरतरी आणि



लागून भूक वाढते, उत्साह हीं वाढतात.

बोधचिन्ह

सर्व एजंटांकडे मिळतें.

**श्रीधूतपापेश्वर आर्यौषधि कारखाना,**

**पनवेल—कुलाबा.**



## डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें

मध्यम वर्गातील हे च्छु लाकांस | अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य

## भाडेकरी–घरमालक–गृहयोजना

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.

जनरल मॅनेजर



### शेअर विक्री सुरू आहे

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें

अधिकृत भांडवल ... ... रु. १० लक्ष

तूर्त विक्रीकरितां काढलेलें भांडवल ... रु. ५ लक्ष

**प्रत्येक शेअरची किंमत रु. ५०**

१ अर्जासोबत प्रत्येक शेअरला रु. १५/–
२ अर्जमंजुरीनंतर रु. १०/– } प्रमाणें.

बाकी रक्कम "अनकॉल्ड रिझर्व्ह" म्हणून राहील.

संचालक मंडळाचे अध्यक्षः—प्रो० वा. गो. काळे, एम्. ए., एक्स् मेम्बर, इंडियन टॅरिफ बोर्ड.

" उपाध्यक्षः—श्री. धोंडो कृष्ण साठे, बी.ए., बी. एससी., व्यापारी व कॉन्ट्रॅक्टर, पुणें.

प्रास्पेक्टस व शेअर अर्जाच्या नमुन्याकरितां लिहाः—

पुणें:—मॅनेजर, दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

मुंबई:—आर. आर. नाबर आणि कं., शेअर व स्टॉक ब्रोकर, एक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, कोट.

नागपूर:—एस. एन. आगाशे आणि कं., चीफ एजन्टस, कॉमनवेल्थ इन्शु. कं. लि., महाल.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६१३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख ५ फेब्रुवारी, १९३६. अंक ६

## वेस्टर्न इंडिया

### लाइफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड.

स्थापना स. १९१३ मुख्य कचेरी-सातारा

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची,
पहिली आणि पहिल्या प्रतीची विमा कंपनी.

**बोनस**
त्रैवार्षिक
दर हजारीं

हयातींतील रु. ६०
हयातीनंतरचें रु. ७५

| | | |
|---|---|---|
| एकूण चालू काम | .... ... | २,५०,१५,०८२ रुपये |
| एकूण जिंदगी | .... .... | ६१,६९,१६९ ,, |
| लाइफ फंड | ... ... | ५०,९९,४३९ ,, |

एजन्सी आणि इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

मॅनेजर.

## पहिल्यानें सुरक्षितता

रस्त्यावरून जातांना तुम्हीं सुरक्षिततेचा मार्ग पहिल्यानें पहातां. हीच गोष्ट पैसे बँकेंत किंवा विम्यांत गुंतविण्यासंबंधीं आहे. पहिल्यानें तुम्ही पैशाची सुरक्षितता पहातां; नंतर व्याज किंवा बोनस.

हिशेब तपासणी आणि प्रतिनिधित्व सरकारी खात्याकडे असल्यानें

### दि बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लि.

मध्यें आपले पैसे गुंतविल्यास कसलाच धोका नाहीं.

सविस्तर माहितीकरितां लिहा—

कुळकर्णी आणि कंपनी, चीफ ऑर्गनायझर्स
चुनीलाल डी. बरफीवाला, मॅनेजिंग डायरेक्टर.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंड विमा कं.

### दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

## श्री माणकेश एजन्सी

शहापूर लुगडीं, जरीचीं व टोपपदरी, अंगास रंग न लागणारीं मिळतात.

तसेंच, इरकल, संवायत वगैरे पेठेचा गॅरंटीड माल मिळतो.

मंडई रस्ता, शनीचा पार, पुणें.

## वर्गणीदारांस सूचना

१ जानेवारी, १९३६ रोजीं 'अर्था'चें दुसरें वर्ष सुरू झालें. गेल्या वर्षाची ज्यांची वर्गणी अजून यावयाची असेल, त्यांनीं ती नव्या वर्गणीबरोबर सत्वर पाठवावी. ज्यांची मुदत संपली असेल, त्यांनीं अंक नको असल्यास तसें कळवावें.

व्यवस्थापक, 'अर्थ'

# विविध माहिती

### जर्मनीमध्यें पांच लक्ष रेनकोट जपान पुरवणार

येत्या ऑगस्टमध्यें आंतरराष्ट्रीय मर्दुमकीचे सामने जर्मनीची राजधानी बर्लिन येथें होणार आहेत. त्यावेळीं प्रेक्षकांचें पावसापासून संरक्षण व्हावें, ह्यासाठी तेलकट कागदांचे रेनकोट त्यांस स्वस्तांत स्वस्त पुरवण्यांत यावयाचे आहेत. ह्या सुमारें ५ लक्ष रेनकोटांचें कंत्राट एका जपानी कंपनीस द्यावें लागलें; कारण स्वस्तपणांत त्या कंपनीबरोबर कोणाचाच टिकाव लागला नाहीं. प्रत्येक कोटाची किंमत फक्त ५ पैसे ठेवण्यांत येईल.

### विमानमार्गानें बद्रिनाथची यात्रा

बद्रिनाथ आणि केदारनाथ येथें उतारूंची ने-आण करणाऱ्या हिमालय एरवेज लि. ह्या कंपनीस गेल्या वर्षअखेर ६८ हजार रुपये उत्पन्न मिळालें. दिल्ली ते कालका व लाहोर ते श्रीनगर अशी ने-आण करण्यासंबंधानें कंपनीची वाटाघाट चालू आहे.

### अमेरिकेंत चांदीचा संचय

चांदीचा भाव पडूं नये म्हणून सरकारनें तिची खरेदी व संग्रह सारखा चालू ठेवला पाहिजे, ह्या अर्थाचा कायदा अमेरिकेंत झाल्यापासून गेल्या डिसेंबरअखेर त्या सरकारचा चांदीचा संचय ८३½ कोटि औंस इतका झाला आहे. ह्यांपैकीं सुमारें ६६ कोटि औंस वरील कायद्याच्या अन्वयें, सुमारें ६ क्रोटि खाणींतून नवीन निघालेली चांदी आणि बाकीची खासगी संग्रहांतून जमा केलेली, असा हा प्रचंड संचय आहे.

### मिस् इशबेल मॅकडोनॉल्ड ह्यांचा पेशा

माजी ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. रॅम्से मॅकडोनॉल्ड, ह्यांची ज्येष्ठ कन्या, मिस् इशबेल ह्यांनीं दुशारी आणणारीं पेयें विकण्याचा पेशा पत्करून त्या उद्योगास थाटानें प्रारंभ केला आहे. त्या संबंधांतल्या उद्घाटनप्रसंगाच्या उत्साहाचें वर्णन एका इंग्रजी पत्रांतल्या लेखकानें केलें आहे.

### हिंदुस्थान सरकारच्या अंदाजपत्रकाविषयीं अंदाज

मध्यवर्ती कायदे-मंडळाच्या येत्या बैठकींत अंदाजपत्रक सादर केलें जाईल, त्यावेळीं चालू सालीं उत्पन्नांत ३-४ कोटि रुपयांचा वाढावा आलेला दिसून येईल, असें म्हणतात. ह्या रकमेचा विनियोग कसा केला जाईल, ह्याविषयीं अनेक तर्क आहेत.

### इंग्लंडमधील झिंगणारे दारूबाज गुन्हेगार

१९३४ सालीं इंग्लंड आणि वेल्समध्यें दारू पिऊन झिंगल्याचा गुन्हा ३९,७४८ लोकांनीं केला. त्यांमध्यें साडेसहा हजार स्त्रिया होत्या. गेल्या तीन वर्षांत दारूबाजांची संख्या वाढत आली आहे.

### आर्थिक परिस्थितींत सुधारणा होऊं लागली आहे काय ?

वरील प्रश्नाचें अस्तिपक्षी उत्तर देतांना कॅनडामधील एका वर्तमानपत्रानें खालील कारणें सांगितली आहेत:—

१ ओढलेल्या सिगारेट्स रस्त्यांवर टाकण्यांत येतात, त्यांची थोटकें आतां जरा लांब असतात.

२ लोक एकमेकांस जेवण्यास बोलावूं लागले आहेत.

### लोकसंख्येसंबंधीं कांहीं माहिती

इंग्लंडमधील दरमाणशीं सरासरी आयुष्य दिवसानुदिवस वाढत असल्याचें आढळतें. तेथें पुरुष ३२ वर्षें २½ महिने जगतो व स्त्री ३३ वर्षें १० महिने जगते. जननाचें प्रमाण दर हजारीं लोकसंख्येंत १४½ असें पडतें; हिंदुस्थानांत हें प्रमाण ३५½ इतकें आहे ! इंग्लंडमध्यें पुरुषांपेक्षां स्त्रियांची संख्या १५ लाखांनीं ज्यास्त आहे. हिंदुस्थानांत, ह्या उलट, स्त्रियांची संख्या कमी असून, १,००० पुरुष : ९४० स्त्रिया असें येथें प्रमाण पडतें.

### दर माणशी विजेचे दिवे किती लागतात ?

एका काळीं मनुष्यप्राणी सबंद रात्र अंधारांत काढीत असे. आतां, सुधारलेल्या व श्रीमान राष्ट्रांत रात्रीचे दिवस झाले आहेत! दरसाल दरमाणशी विजेचे दिवे—बल्ब्स—किती जळतात, ह्याचा हिशेब काढला, तर अमेरिकेचा नंबर पहिला लागतो. तेथें दर माणसागणिक पांच दिवे लागतात, डेनमार्कमध्यें १¾ दिवे व युरोपांतील इतर देशांत १½ दिवे, असा हिशेब होतो.

### कंपनी-कायद्याची दुरुस्ती

हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या कंपनी-कायद्याच्या दुरुस्तीविषयींची अखेरची चर्चा, मध्यवर्ती सरकारचे कायदे-मंत्री, सर एन्. एन्. सरकार आणि व्यापारी संस्थांचे प्रतिनिधि ह्यांचेमध्यें वाटाघाट होऊन पूर्ण झाली आहे. ह्या चर्चेस अनुलक्षून नवीन कायद्याचा मसुदा तयार करण्याचें काम लवकरच हातीं घेतलें जाईल, असें समजतें.

### गोंडळ संस्थाननें १९ लक्षांचें कर्ज दिलें

मुंबई कॉर्पोरेशननें १९६६ सालीं फेडावयाचें ३½ टक्के दराचें १९ लक्ष रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरवून त्याबाबत टेंडरें मागविलीं होतीं. १०० रुपयांच्या रोख्यास १०० चें खालील टेंडर स्वीकारण्यांत येणार नाहीं, असें जाहीर केलें होतें, तरी एकूण ४१ लक्ष रुपयांचीं टेंडरें लोकांनीं पाठविलीं. गोंडळ संस्थानाचें १०३ रुपये दरानें सबंद कर्जाची रकम देण्याचें टेंडर होतें. ह्यापेक्षां अनुकूल असें दुसरें टेंडर नसल्यानें गोंडळचें टेंडर कॉर्पोरेशननें मान्य केलें आहे. म्हणजे, १९ लक्षांच्या रोख्यांबद्दल कॉर्पोरेशनला १९ लक्ष ५७ हजार रुपये मिळतील. गोंडळ संस्थानाची संपत्ति, सध्यांची पैशाच्या बाजारांतली स्थिति आणि मुंबई कॉर्पोरेशनची बाजारांतली पत ह्या तीन गोष्टी सदरहु व्यवहारावरून स्पष्ट होतात.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २५ जानेवारी रोजीं पुरा झालेला आठवडा | ७६,८४,०३६ |
| ता. १ फेब्रुवारी रोजीं पुरा झालेला आठवडा | ५४,२६,४८६ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते १ फेब्रुवारी १९३६ अखेर | २,६०,४७,७८,९५९ |

अनुक्रमणिका.


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ... ६६ | हलाखी--हिंदी सुशिक्षितां-मधील बेकारीची उपपत्ति--रिझर्व्ह बँकेचें पहिलें वर्ष | |
| २ गत साल बँकांस कसें गेलें? | ६७ | ६ पैशाच्या वर्गावर्गीची व्यवस्था | ... ७१ |
| ३ व्यापारी करार आणि हिंदुस्थान | ... ६८ | ७ नोकराचा हलगर्जीपणा व मालकाची जबाबदारी | ७२ |
| ४ जाहिरात कोठें व कशी द्यावी? | ... ६८ | ८ सहकारी चळवळ | ७३ |
| ५ स्फुट विचार | ... ६९ | ९ तांदळाचें दर एकरी उत्पादन | ... ७३ |
| हेर हिटलर ह्यांचें दंडुक्याचें अर्थशास्त्र—हिंदी सरकारचें आर्थिक धोरण—स्वस्त भांडवलाचा योग्य उपयोग-जर्मन रेल्वेजची सांपत्तिक | | १० दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. पुणें | ... ७४ |
| | | ११ निवडक बाजारभाव | ७५ |


# अर्थ

बुधवार, ता. ५ फेब्रुवारी, १९३६

## गत साल बँकांस कसें गेलें ?

प्रचलित मंदीनें सर्व राष्ट्रांस सारखेंच घेरलें असल्यानें व्यापारी बँकांच्या परिस्थितींत इंग्लंडमध्यें काय किंवा हिंदुस्थानांत काय, एकच तऱ्हा दिसून येते. गेल्या वर्षी इंग्लंडांत व्यापार थोडा बसला ह्यामुळें तेथील बँकांच्या स्थितींत बिघाड झाला नाहीं, हें मात्र विशेष आहे. ब्रिटिश आणि हिंदी व्यापारी बँकांस १९३५ हें साल कसें गेलें ह्या विषयींचा आढावा काढला असतां कांहीं गोष्टींच्या बाबतींत विलक्षण साम्य आढळतें. पहिली नजरेंत भरणारी गोष्ट म्हणजे पैशाच्या बाजारांतले अत्यंत खालावलेले व्याजाचे सररहा दर ही होय. हे दर पूर्वीच्या वर्षापेक्षांहि खाली गेले होते. बँकांचा नफा केवळ मिळणाऱ्या व्याजाच्या दरावर अवलंबून नसतो, हें जरी खरें असलें तरी, पैशाच्या पुरवठ्याचा बाजारांत पूर आला असतां, डिव्हिडंड वांटणीचें प्रमाण कायम राखणें बँकांस कठिण होणें स्वाभाविक आहे. प्रमुख ब्रिटिश बँकांनीं स्वीकारलेल्या ठेवींचा आंकडा बारा महिन्यांत सुमारें १६० कोटि रुपयांनीं वाढला व त्यांच्याशीं रोख शिलकेचें प्रमाण सुमारें ११ टक्के पूर्वी होतें, तें १०½ टक्के झालें. ठेवींच्या रकमा फुगल्यामुळें त्यांचा विनियोग करण्याचे बाबतींत बँकांची एकमेकांशीं चढाओढ लागली आणि व्याजाचा दर उतरण्यास हें एक कारण झालें. कमी दर सुटत असल्यास ट्रेझरी बिलांत पैसा घालावयाचा नाहीं, ह्या त्यांच्या निश्चयानेंहि फायदेशीर व्यवहारास नियंत्रण बसलें. तसेंच, अल्प मुदतीनें दिलेल्या कर्जावरहि व्याज अल्प मिळत होतें. व्यापारांतल्या हुंड्यांत आणि कर्जांवर घातलेल्या बँकांच्या पैशांत थोडीच वाढ झाली, ह्याचें कारण कारखानदारांची स्वतःच्या शिलकांवर अवलंबून रहाण्याची वाढती प्रवृत्ति हें आहे. रोख्यांच्या खरेदीकडे बँकांस अधिक लक्ष्य द्यावें लागलें, हा वरील परिस्थितीचा स्वाभाविक परिणाम होय, असें म्हटलें पाहिजे.

हिंदुस्थानांतल्या प्रमुख व्यापारी बँकांस वरच्या प्रमाणेंच अनुभव आला आहे. येथें चालू खात्यावरील व्याजाचा दर आतां १ टक्का असून ट्रेझरी बिलांवर ह्यापेक्षां अधिक व्याज सुटत नाहीं. अत्यंत अल्पकालिक परत बोलीच्या कर्जावरील व्याजाचा दर (कॉल मनी रेट) ½ टक्का व ¼ टक्काहि झालेला दिसतो. एक वर्ष मुदतीच्या ठेवींवरील व्याजाचा दर २½ टक्के राहिला आहे. बँक रेटहि आतां उतरल्यामुळें बँकांस त्यांच्या कर्जदारांकडून मिळावयाच्या व्याजांतहि घट झाली आहे. गिऱ्हाइकांकडून होणारी फायदेशीर कर्ज मागणी न वाढल्याकारणानें, कमी उत्पन्न देणाऱ्या कर्ज-रोख्यांत रकमा गुंतवणें बँकांस प्राप्त झालें आहे. जोडलेल्या बँकांच्या व्यवहाराचे आंकडे रिझर्व्ह बँकेकडून दर आठवड्यास प्रसिद्ध केले जातात, त्यांकडे पाहिलें असतां बँकिंगच्या धंद्यास आर्थिक मंदीची कशी विलक्षण झळ लागली आहे, हें दिसतें. गेल्या सहा महिन्यांत, प्रमुख हिंदी बँकांनीं आपल्या गिऱ्हाइकांस दिलेल्या कर्जांची एकूण रकम सुमारें वीस कोटि रुपयांनीं कमी होऊन, अलीकडे सुमारें ८५ कोटि रुपयांवर घसरली आहे. व्यापारी हुंड्यांवरील कर्जे ४ कोटि रुपयांच्या आसपास होतीं, तीं सुमारें ३½ कोटींवर आलीं आहेत.

व्यवहारांत विशेष वाढ झाली नाहीं व मिळावयाच्या व्याजाच्या दरांत घट झाली तरी, इंग्लंडमध्यें व हिंदुस्थानांतहि बँकांनीं वांटलेल्या डिव्हिडंडमध्यें म्हणण्यासारखा फरक केला नाहीं. लॉइड्स बँकेचें १२ टक्के, बार्क्लेचें १४ टक्के आणि मार्टिनचेंहि १४ टक्के ह्याप्रमाणें प्रमुख ब्रिटिश बँकांचें डिव्हिडंड पूर्वीचेंच कायम आहे. हिंदुस्थानांत, इंपीरियल बँकेच्या डिव्हिडंडचा दर १२ टक्के कायम राहिला. सेंट्रल बँक ऑफ इंडियानें ६ टक्के व २ टक्के ज्युबिली बोनस दिलें. बँक ऑफ बडोद्याच्या १० टक्क्यांत बदल झाला नाहीं. पंजाब आणि सिंध बँकेनें १५ टक्के डिव्हिडंड मागील सालाप्रमाणेंच दिलें. बँक ऑफ इंडियानें १० टक्के वांटून १ टक्का बोनस दिलें. इंग्लंडमध्यें बँकांच्या व्यवहारांत थोडीशी वाढ झाल्याकारणानें, व्याजाच्या उतरलेल्या दराचा परिणाम त्यांस कमी जाणवला. अलीकडे रोख्यांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारांत वाढत्या प्रमाणांत बँका फायदा मिळवूं लागल्या आहेत. जोंपर्यंत ह्या फायद्यांतला कांहीं भाग रिझर्व्हमध्यें टाकण्यांत येत आहे आणि रोख्यांच्या बाजारभावांचा वाढावा जिंदगी म्हणून हिशेबांत धरला जात नाहीं, तोंपर्यंत वरील फायद्याच्या बाबींचा समावेश नफा-तोटा खात्यांत करण्यास फारसा प्रत्यवाय नाहीं. संशयित व बुडित कर्जांसाठी तरतूद मागें भक्कम केली गेल्यानें आणि असलीं कर्जे आतां फारशीं शिल्लक राहिलीं नसल्यानें त्या बाबतींत बँकांची बचत झाली. ब्रिटिश बँकांस कंपन्यांनीं उभारलेल्या नवीन भांडवलाच्या भागांवर कमिशन मिळालें, त्याचीहि उत्पन्नांत भर पडली. मध्यंतरीं कर्जरोख्यांच्या किंमती एकदम चढल्या तेव्हां त्यांच्या व्यवहारांत बँकांनीं चांगला फायदा मिळवला आणि भक्कम रिझर्व्हचीहि तजवीज त्यांस करतां आली. परंतु अशी संधी आतां पुन्हां येणें शक्य नाहीं. व्याजाचे दर उतरल्यानें येणारी तूट अन्य बाबींतून भरून निघण्याची शक्यता नेहमी मर्यादितच असणार. म्हणून उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांची पुन्हा चलती होण्यावरच बँकांचा नफा आणि डिव्हिडंड हीं वस्तुतः मुख्यत्वेंकरून अवलंबून रहाणार आहेत. जागतिक मंदीच्या परिस्थितींत विशेष सुधारणा झाली नसली तरी, खुद्द ग्रेटब्रिटनमध्यें अंतर्गत व्यापाराच्या चलतीस प्रारंभ झाला आहे. ह्या कारणानें तेथील बँकांस त्यांच्या व्यवहारांत नफा उरत आहे. गेल्या वर्षाच्या दृष्टीनें इंग्लंड व हिंदुस्थान येथील बँकांच्या परिस्थितींतला हा भेद लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे.

## व्यापारी करार आणि हिंदुस्थान

एक काळ असा होता कीं, त्या वेळीं एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राशीं विशिष्ट मालाच्या आयात-निर्गतीबद्दलच्या शर्तीसंबंधानें करार करणें अनावश्यक आणि वेडेपणाचेंहि समजलें जात असे. व्यापार हा अनुकूल-प्रतिकूल परिस्थितीचा व्यवहार असून केवळ खुषीचा सवदा आहे आणि कमी फायद्याच्या क्षेत्रांतून जास्त फायद्याच्या क्षेत्रांत तो धंदेवाल्यांच्या मार्फत जाणार, ह्या प्रचलित कल्पनेनें राष्ट्रीय सरकारें व्यापारी करारांच्या भानगडींत फारशी पडत नसत. आंतरराष्ट्रीय तहांमध्यें खुल्या किंवा सवलतीच्या देवघेवीबाबत कलमें असत, हें खरें आहे, परंतु व्यापारी करारांस आज जें विस्तृत व राष्ट्रीय आवश्यकतेचें महत्त्व प्राप्त झालें आहे, तें महायुद्धाच्या काळापूर्वी अस्तित्वांत नव्हतें. त्या युद्धाच्या समाप्तीनंतर व त्याचा परिणाम म्हणून ज्या राजकीय व आर्थिक घडामोडी झाल्या त्यांमध्यें प्रत्येक राष्ट्राच्या सरकारास आपल्या लोकांच्या उद्योगधंद्यांच्या व व्यापाराच्या वृद्धीसाठीं व संरक्षणासाठीं नवीन धोरण स्वीकारावें लागलें. कित्येक राष्ट्रांच्या हातून त्यांच्या संवयीच्या पूर्वीच्या बाजारपेठा निसटल्या आणि त्यांमध्यें इतरांचें वर्चस्व स्थापन झालें. स्वत:च्या देशांतलें गिऱ्हाईक स्वकीय धंदेवाल्यांसाठीं राखून ठेवणें आणि बाहेरचें गिऱ्हाईक त्यांस उपलब्ध करून देणें ह्या दिशेनें राष्ट्रीय सरकारांचे प्रयत्न चालू झाले. ग्रेटब्रिटन व फ्रान्स आणि कांहीं अंशीं जपान ह्यांनीं आपल्या वर्चस्वाच्या मर्यादेंत असलेल्या देशांच्या परस्पर व्यापाराचें नियंत्रण करून त्यांचे गट बनवले आहेत. जोंपर्यंत इंग्लंडमध्यें खुल्या व्यापाराच्या तत्त्वाचा बोलबाला होता, तोंपर्यंत, सवलती देण्यास संरक्षक जकाती असाव्या लागतात, त्यांच्या अभावामुळें तेथील सरकारास व्यापारी करारांच्या मार्गांत पाऊल टाकणेंच अशक्य होतें. परंतु त्या देशांत ब्रिटिश उद्योगधंद्यांस संरक्षण देण्याचें धोरण उघडपणें स्वीकारलें गेलें तेव्हां तेथील सरकारास सवलतींच्या जकातींचा, व्यापारी गटांचा आणि व्यापारविषयक करारांचा मार्ग मोकळा झाला. प्रत्येक देशाशीं होणाऱ्या आयात-निर्गतीस अनुलक्षून, तुम्हीं आमचा विशिष्ट माल सवलतीनें घ्याल तर आम्हीं तुमचा विशिष्ट माल तसाच सवलतीनें आंत येऊं देऊं अशा तऱ्हेचे करार ब्रिटिश सरकारनें अलीकडे केले आहेत. ब्रिटिश साम्राज्याचा घटक ह्या नात्यानें हिंदुस्थानावरहि ह्या नवीन धोरणाचा परिणाम झाला असून ओटावा करार हें त्याचें प्रसिद्ध उदाहरण आहे.

ओटावा करार हिंदुस्थानावर बंधनकारक झाल्यापासून हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापारांत काय वाढ-घट झाली आहे, आणि तो करार ह्या देशाच्या सरकारानें पुढें चालू ठेवावा किंवा नाहीं हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न सध्या उपस्थित झाला आहे. त्यासंबंधाची आंकडेवार माहिती सरकारनें प्रसिद्ध केली असून त्याची चर्चा मध्यवर्ती कायदेमंडळाच्या चालू अधिवेशनांत व्हावयाची आहे. ओटावा करारामुळें हिंदुस्थानच्या व्यापाराचें किती हितानहित झालें ह्या विषयाचें अनुमान वरील तुलनात्मक माहितीवरूनच काढलें पाहिजे, हें उघड आहे. त्या कामीं लोकांस सहाय व्हावें म्हणून व्यापाराच्या आंकड्यांविषयीं विवेचनात्मक सूचकपत्रकें सरकारमार्फत अलीकडे प्रसिद्ध झालीं आहेत. ओटावा-करार, हिंद-ब्रिटन करार आणि नवीन राज्यघटनेंत दाखल झालेलीं निर्बंधाचीं तत्त्वें हिंदुस्थानच्या जगांतील बाजारपेठांतल्या विशिष्ट परिस्थितीस अनुकूल आहेत किंवा कसें हा येथें विचाराचा महत्त्वाचा विषय आहे. हिंदुस्थानाच्या शेतीच्या व इतर कच्च्या मालास ब्रिटिश साम्राज्यापेक्षां त्याच्या बाहेर ज्यास्त विस्तृत गिऱ्हाईक आहे आणि हिंदुस्थानांत मालाची आयात होते, तींपैकीं मोठा हिस्सा मात्र ग्रेटब्रिटनमधून येतो. ही वस्तुस्थिति येथें लक्ष्यांत ठेवणें जरूर असून साम्राज्यांतर्गत देशांस आम्हीं विशेष सवलती दिल्यास आमच्या व्यापारास बाहेरच्या देशांत मज्जाव होण्याची भीति आहे, ही गोष्टहि विसरून चालावयाचें नाहीं. ओटावा करारासारख्या नियंत्रणानें हिंदी व्यापार बांधला गेला असतां दुसऱ्या देशांशीं अनुकूल असे करार करण्यास येथील सरकारास पुरेसा वाव मिळणार नाहीं, हें उघड आहे. हिंदुस्थानची शेती, उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांचा विस्तार व उत्कर्ष ज्या मार्गांनीं होईल ते चोखाळण्याची आणि त्या रीतीनें परराष्ट्रांशीं परिस्थितीशीं जुळतील असे करार करण्याची हिंदी सरकारास मुभा असावयास पाहिजे. ओटाव्याचा व इतर करार ह्यांच्या इष्टानिष्टतेची छाननी करतांना हें तत्त्व ध्यानांत बाळगलें गेलें पाहिजे आणि त्याप्रमाणें कृति व्हावयास हवी. आर्थिक स्वावलंबनाचा व स्वयंसिद्धतेचा आतां जगभर सर्वत्र पायंडा पडला असल्यानें स्वहितसिद्ध्यर्थ हिंदुस्थानासहि त्याच मार्गानें जाणें प्राप्त आहे.

## जाहिरात कोठें व कशी द्यावी ?

इंग्लंडमधील सेल्स मॅनेजर्स असोसिएशन आपल्या सभासदांकडून, त्यांच्या जाहिरात देण्याच्या पद्धतीसंबंधानें माहिती मागवत आहे. त्यासाठीं काढण्यांत आलेल्या प्रश्नपत्रिकेंतील कांहीं प्रश्न खालीं दिले आहेत. त्यांवरून, जाहिराती देतांना किती सूक्ष्म विचार करावा लागतो व प्रत्येक धंदेवाल्यानें ह्या संबंधांत सर्व तऱ्हेची माहिती जमवून आपल्या जाहिरातींची योजना करणें कसें जरूर असते, ह्याची कल्पना येईल.

**प्रश्नपत्रिकेंतील कांहीं प्रश्न**

१ जाहिरातीप्रीत्यर्थ खर्चण्यांत येणारी रकम आपण दरवर्षी नक्त अशी ठरवतां, का ती आपल्या विक्रीवर अवलंबून असते ? जर विक्रीवर ती अवलंबून असेल, तर आपण आधीं झालेली विक्रीच फक्त विचारांत घेतां, कीं अपेक्षित विक्रीवर जाहिरातींची मांडणी अवलंबून ठेवतां ?

२ विक्रीखात्याचा मॅनेजर व जाहिरात मॅनेजर ह्यांचीं कामें एकमेकांच्या सल्ल्यानें चालतात का ?

३ मोठ्या प्रमाणावर जाहिरातींची मोहीम सुरू करण्यापूर्वीं कांहीं विवक्षित भागांत तत्संबंधीं प्रयोग करून पहातां का ?

४ दुकानाची पुढची बाजू आकर्षक करण्यांत सर्वांत ज्यास्त हुशारी कोण दाखवतो, ह्याविषयीं चढाओढ लावण्यांत येते का ?

५ आपल्या जाहिरातींचे फलक ( पोस्टर्स ) योग्य ठिकाणीं लावण्यांत आले आहेत व ते सुस्थितींत आहेत, ह्याबद्दल आपले विक्रेते वरचेवर आपणांकडे माहिती पुरवतात का ?

६ रेडिओवर वेळ भाड्यानें घेऊन आपली जाहिरात करता का ?

७ वर्तमानपत्रें, फलक, पत्रें, प्रदर्शनें, इत्यादि बाबींत प्रत्येकीं कोणत्या प्रमाणांत खर्च होतो ?

वरील प्रश्नांवरून, जाहिराती देणें हें कसें एक शास्त्र आहे, ह्याची कल्पना येईल. वरील प्रश्न इकडील व्यापाऱ्यांस व कारखानदारांस मार्गदर्शक होण्याजोगे आहेत.

# स्फुट विचार

## हेर हिटलर ह्यांचें दंडुक्याचें अर्थशास्त्र

राष्ट्रसंघास धाब्यावर बसवून इटलीनें ॲबिसीनियावर पाश्चात्य सुधारणा लादण्याच्या निमित्तानें युद्ध सुरू केल्यापासून जर्मनी सारख्या राष्ट्रांच्या तोंडास पाणी सुटलें आहे आणि आपणांसहि युरोपच्या बाहेरील देशांत दंडुक्याच्या जोरावर वसाहती स्थापण्यास हरकत कां व्हावी असें त्यांतले राजकीय नेते उघडपणानें विचारूं लागले आहेत. ॲबिसीनियांत इटलीनें घातलेल्या धुडगुसाचा परिणाम जगांतील शांतता आणि आंतरराष्ट्रीय सलोखा ह्यांवर कसा होत आहे, इकडे लक्ष्य देऊन राष्ट्रसंघांतील पुढारी राष्ट्रांनीं वेळींच सावध होऊन दंडुकेशाहीचा व अन्यायाचा प्रतिकार करण्यास सज्ज झालें पाहिजे. राष्ट्रसंघ हतबल आहे असें दिसतांच जर्मनीसारखीं राष्ट्रें दुर्बल लोकांच्या मुलखावर स्वाऱ्या करून त्यांच्या स्वातंत्र्याचें हरण करण्यास यत्किंचितहि मागेंपुढें पहाणार नाहींत, अशीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. हेर हिट्लरनें तर जाहीर घोषणा करून आपण राष्ट्रसंघ किंवा तहनामे ह्यांची पर्वा करीत नाहीं, असें स्पष्टपणें बोलून दाखविलें आहे. वसाहतींनीं कच्चा माल पुरवावा आणि त्याच्या मोबदला, औद्योगिक उन्नतींत पुढें गेलेल्या देशांनीं पक्का माल द्यावा, अशा रीतीचा विनिमय दोघांच्याहि हिताचा आहे, अशी एका काळीं दृढ समजूत होती. ती चुकलेली असून पौरस्त्य देश व वसाहती ह्यांसहि कारखाने काढून आपली औद्योगिक प्रगति करतां येते आणि ती त्यांनीं घडवून आणणें इष्ट आहे, हा सिद्धांत प्रत्यक्ष कृतीनें व अनुभवानें खरा करून दाखविला आहे. असें नसतें तर आर्थिक उन्नतीच्या शिखरास जाऊन पोहोंचलेलें अमेरिकन राष्ट्र आज इंग्लंडची मागसलेली व परावलंबी 'वसाहत' म्हणून राहिलें असतें. कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, वगैरे ब्रिटिश वसाहतींतहि युरोपिअन राष्ट्रांप्रमाणें उद्योगधंद्यांचा उत्कर्ष झालेला आपण पहातों. हेर हिटलर ह्यांचें राजकारणमिश्रित अर्थशास्त्र ह्याहून निराळें आहे. युरोपिअन राष्ट्रांस कच्चा माल पाहिजे आहे, आणि त्याकरितां दंडुक्याच्या जोरावर पौरस्त्य वसाहती पादाक्रांत करण्याचा त्यांस नैसर्गिक हक्कच आहे, असें नुकतेंच स्वच्छ सांगितलें आहे. जेथें पाश्चात्य राष्ट्रें एकदा का शांततेची भाषा बोलूं लागलीं आणि वसाहतींच्या लोकांस स्वराज्याची गोडी लागू देऊं लागलीं कीं त्या लोकांचें युरोपवरचें अवलंबन नाहींसें होऊन ते युरोपिअन राष्ट्रांची मुर्वत ठेवणार नाहींत हा त्यांचा कोटिक्रम राष्ट्रसंघाच्या मुळावरच घाव घालणारा आहे. पौरस्त्य राष्ट्रांनीं आपली आर्थिक उन्नति कधींच करून घेऊं नये आणि सदा पाश्चात्यांचे अंकित रहावें, ही हेर हिटलरांची विसाव्या शतकांतल्या पाश्चात्य संस्कृतिविषयींची कल्पना अजब आहे, ह्यांत संशय नाहीं. ज्या तत्त्वांवर राष्ट्रसंघाची उभारणी झाली, त्यांचें पालन करण्याचें कर्तव्य त्याच्या पुरस्कर्त्यांनीं इमानानें बजावलें नाहीं, तर सर्व जगावर महायुद्धासारखी आपत्ति पुन्हां कोसळल्यावांचून रहाणार नाहीं, ह्याची त्यांस आठवण करून देण्याची आवश्यकता वास्तविक भासूं नये. मुसोलिनी व हिट्लर ह्यांचे भरमसाटपणाचे उद्गार जगास भयसूचना देण्यास पुरे आहेत.

## हिंदी सरकारचें आर्थिक धोरण

मुंबईच्या इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं झालेल्या भाषणांत हिंदुस्थान सरकारच्या अलीकडील आर्थिक धोरणावर करण्यांत आलेल्या टीकेंतील एक दोन महत्त्वाच्या मुद्यांचा उल्लेख येथें करणें जरूर आहे. गेल्या सालचे चेंबरचे अध्यक्ष, श्री. मनु सुभेदार, यांनीं हिंदी सरकारचे फडनवीस, सर जेम्स ग्रिग, ह्यांच्या अमदानींत स्वदेशी धंद्यांस द्यावयाच्या संरक्षणाबाबत पद्धतशीर पीछेहाट चालली असल्याबद्दल तक्रार केली. ग्रेटब्रिटनमध्येंहि औद्योगिक संरक्षणाचें धोरण अमलांत आलें असतां येथील सरकारनें खुल्या व्यापाराच्या तत्त्वास कवटाळून पहावें हें विपरीत असून लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या लोकपक्षीय सभासदांनीं संरक्षक जकातींचा प्रश्न धसास लावावा, अशी त्यांनीं सूचना केली. टारिफ बोर्डाच्या शिफारसींस फांटे फोडून देशी धंद्यांस संरक्षण नाकारण्याचा सरकारनें पाडलेला प्रघात अनिष्ट असून चवदा वर्षांपूर्वी फिस्कल कमिशननें आणि कायदे मंडळानें मान्य केलेल्या तत्त्वाशीं विसंगत आहे. अलीकडे जगांत चाललेल्या घडामोडी लक्ष्यांत घेतां त्यांच्याशीं मेळ घालण्यासाठीं ह्या सबंद प्रश्नाचा पुन्हां विचार होऊन फिस्कल कमिशनच्या शिफारसींच्या पुढें जाण्याचा काळ आला आहे, हा श्री. सुभेदार यांचा अभिप्राय सर्वस्वी रास्त आहे. सर जेम्स ग्रिग हे अर्थशास्त्राच्या जीर्ण व निरुपयोगी झालेल्या सिद्धांतांचे पुरस्कर्ते आहेत, त्यामुळें हिंदुस्थानची शेती, उद्योगधंदे व व्यापार ह्यांस उत्तेजन देण्याच्या बाबतींत ते उदासीन आहेत. त्याचा परिणाम देशाच्या आर्थिक स्थितीवर प्रतिकूल रीतीनें होत आहे. आयात जकाती कमी झाल्या असतां परदेशांतून येणारा माल स्वस्त होऊन जनतेचा फायदा होईल, ही सरकारची विचारसरणी सकृद्दर्शनीं ग्राह्य वाटते, पण तिचा फोलपणा श्री. सुभेदार ह्यांनीं स्पष्ट करून दाखवला. बाहेरून स्वस्त माल ज्यास्त आला असतां देशी धंद्यांची गैरसोय तर होईलच, परंतु आयात वाढून त्या मानानें निर्गत व्यापार न वाढल्यानें सोनें बाहेर पाठवूनहि परराष्ट्रीय देण्याघेण्याची तोंडमिळवणी करणें आजच कठीण होत आहे, तें ज्यास्त अवघड होईल. सारांश, हिंदी सरकारचें सर्वच आर्थिक धोरण राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीनें योग्य रीतीनें आंखणें अगत्याचें झालें आहे, ह्यांत शंका नाहीं.

## स्वस्त भांडवलाचा योग्य उपयोग होण्याची आवश्यकता

लोकरीच्या स्वदेशी धंद्यास संरक्षण न मिळाल्यानें त्याची झालेली अवस्था आणि कापसाच्या गिरण्यांस आज असलेलें संरक्षण जकात कमी होऊन नाहींसें झालें तर त्या धंद्यावर ओढवणारें संकट, ह्यासंबंधानें चार शब्द बोलून श्री. रहिमतुल्ला चिनॉय, इंडियन चेंबरचे नवीन अध्यक्ष, यांनीं श्री. मनु सुभेदार ह्यांच्या भाषणाचा अनुवाद केला. चालू वर्षाकरतां निवडलेले उपाध्यक्ष, श्री. ए. डी. श्रॉफ, ह्यांनीं सर जेम्स ग्रिग यांच्या चुकीच्या व अनिष्ट धोरणावर कडक टीका केली. त्यांनीं पुढें मांडलेला महत्त्वाचा मुद्दा, सध्या भांडवल विपुल आणि स्वस्त झालेलें आहे, त्याचा योग्य उपयोग औद्योगिक प्रगतीच्या कामीं लोकांनीं करून घेण्याच्या आवश्यकतेसंबंधानें होता. मुंबईच्या कापसाच्या गिरण्या हलाखींत आहेत, त्यांपैकीं ज्यांची कार्यक्षमता कमी दर्जाची आहे, त्या बंद ठेवून बाकीच्यांत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न कारखान्यांच्या मालकांनीं सहकारितेनें केला तर त्यांस यश येईल आणि ह्या योजनेकरितां सध्या भांडवल मुबलक मिळण्यासारखें आहे त्याचा उपयोग करण्यांत आला पाहिजे, अशी विधायक सूचना श्री. श्रॉफ ह्यांनीं केली. गिरण्यांच्या कंपन्यांनीं ठेवींच्या ऐवजीं डिबेंचर्सच्या किंवा प्रेफरन्स भागांच्या मार्गानें भांडवल उभारावें आणि ह्या रीतीनें बाजारांत कर्ज काढल्यानें आपल्या पतीस धक्का

लागेल ही भ्रामक समजूत त्यांनीं टाकून द्यावी असें त्यांचें म्हणणें आहे. सध्याच्या विपुल भांडवलाच्या अनुकूल परिस्थितीचा पूर्ण फायदा गिरणीवाल्यांनीं घेतला पाहिजे असें सांगतांना मुंबईतल्या बँकांनीं आपल्या गिऱ्हाइकांकडून घ्यावयाच्या व्याजाचा किमान दर संगनमत करून निश्चित केला आहे, त्या धोरणाचा श्री. श्रॉफ यांनीं उल्लेख केला आणि ह्या योगानें धंदे व व्यापार ह्यांतली मंदी दूर होण्याची प्रवृत्ति दिसत आहे, तिला अडथळा येईल असें मत प्रदर्शित केलें. व्यापाराच्या चलतीस अनुकूल असें वातावरण निर्माण करण्याची खटपट रिझर्व्ह बँकेनें चालविली आहे, तिलाहि बँकांच्या वरील धोरणाचा व्यत्यय येणार असल्यानें तें टाकून देण्यांत यावें, अशी त्यांनीं सूचना केली. पडून राहिलेल्या पैशाचा आणि उतरलेल्या व्याजाच्या दराचा योग्य उपयोग धंद्यांच्या वाढीस अवश्य करून घेतला गेला पाहिजे, हें श्री. श्रॉफ ह्यांचें म्हणणें विचार करण्यासारखें असून त्याप्रमाणें कृति होणें अगत्याचें आहे.

## जर्मन रेल्वेजची सांपत्तिक हलाखी

हिंदुस्थानांतल्या रेल्वेजचें बजेट थोड्याच दिवसांत लेजिस्लेटिव्ह असेंब्लीपुढें मांडलें जाईल, त्यावेळीं ह्या व्यापारी स्वरूपाच्या सरकारी खात्याची परिस्थिति कमी बिकट झाली आहे कीं काय व तीमध्यें कांहीं सुधारणा होण्याचीं चिन्हें आहेत किंवा कसें, हें दिसून येईल. जर्मनींतल्या रेल्वेज हिंदी रेल्वेज प्रमाणेंच सरकारी म्हणजे राष्ट्रीय मालकीच्या असल्यानें त्यांच्या सांपत्तिक स्थितीचा सरकारच्या बजेटाशीं निकट संबंध येतो; आणि त्याहि प्रचलित आर्थिक मंदीच्या भोंवऱ्यांत सांपडल्या आहेत, असें दृष्टोत्पत्तीस येतें. जर्मन सरकारचें राजकीय व आर्थिक धोरण आणि रेल्वेजचें उत्पन्न ह्यांचा परस्परांवर विलक्षण परिणाम झालेला आहे. त्या सरकारानें देशांतील बेकारीनिवारणार्थ रस्त्यांचीं वगैरे कामें काढलीं असून त्यासाठीं पुष्कळ खर्च होत आहे आणि बाजारभाव चढले आहेत. रेल्वेजचा विस्तार चालला आहे, एवढेंच नव्हे तर जर्मनींत मोठमोठे हमरस्ते तयार करण्याच्या योजनांसहि पैसा पुरवावा लागत आहे. तसेंच, लढाऊ शस्त्रास्त्रें बनवण्याच्या कारखान्यांस भरपूर काम दिलें जात असून त्यांत मोठ्या प्रमाणांत भांडवल गुंतून रहात आहे. हें धोरण चालू ठेवण्याचा जर्मन सरकारचा निश्चय नुकताच जाहीर करण्यांत आला आहे आणि त्या कारणानें रेल्वेजना स्वस्त भांडवल मिळणें दुरापास्त झालें आहे. ह्या सर्व कारणांच्या योगानें जर्मन रेल्वेजच्या चालू सालच्या बजेटांत मोठी तूट येत आहे आणि ती अंशतः भरून काढण्यास वहातुकीचे दर वाढवण्यांत येणार असून शक्य त्या बाबींत बचत करण्याचा विचार चालू आहे. वर निर्दिष्ट केलेला जादा बोजा जर्मन रेल्वेजवर नसल्यास त्यांस आजमितीसहि फायदा होईल हें स्पष्ट दिसतें. तथापि, आपल्या राजकीय धोरणास अनुसरून त्यांतून शक्य तितकें उत्पन्न काढावयाचें असा नात्सी पक्षाचा निश्चय दिसतो.

## हिंदी सुशिक्षितांमधील बेकारीची उपपत्ति

कोणत्याहि धंद्यांत पैसा मिळण्याजोगा असेल, तर सुशिक्षित माणसें त्यांत पडतात, सामाजिक व धार्मिक बंधनांस जुगारून देण्यास ते तयार असतात आणि अशिक्षितांचें काम आपण सहज व चांगलें करूं, अशी त्यांस खात्री वाटते, तर मग शेती, हस्तव्यवसाय, इत्यादि धंद्यांत ते कां पडत नाहींत? ' दि गंगा '. ह्या लाहोरच्या त्रैमासिकांत वरील प्रश्नाचें उत्तर देण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. त्याचा मथितार्थ पुढीलप्रमाणें आहे:—वरील प्रकारच्या धंद्यांत फारशी प्राप्ति होत नाहीं, हें याचें खरें कारण आहे. शेतकरी व किरकोळ उद्योगधंदा करणारे लोक आपला चरितार्थ कसाबसा जेमतेम भागवूं शकतात; सकाळपासून संध्याकाळपर्यंत खपून सुद्धा पोट भरण्याची त्यांस मारामार पडते. अशा स्थितींत आप्तेष्टांवर अवलंबून राहून पोट भरलें व आसरा मिळाला, तर मग काम कोण करतो? ही प्रवृत्ति सुशिक्षितांच्या बेकारीचें मूळ आहे. दक्षिण आफ्रिकेंतील श्वेतवर्णीय कामगारांचा दाखला येथें देतां येईल. श्वेतवर्णीयांची भारी मजूरी देऊन त्यांस कामावर ठेवण्याइतकें धंदेवाल्या मालकांजवळ काम नाहीं व तद्देशीय लोकांचें काम इतकें हलकें व कमी प्राप्ति देणारें असतें कीं, श्वेतवर्णीय कामगारांस तें करण्यापेक्षां आपली गरिबीच बरी वाटते. ह्याच तऱ्हेचें अंतर हिंदुस्थानांत सुशिक्षित व अशिक्षित ह्यांमध्यें आढळतें. शिक्षितांच्या पगाराची रकम ठरविली गेली, तेव्हां इंग्लंडमधील रहाणीचें मान इंग्रज अधिकाऱ्यांचे नजरेसमोर होतें. इकडे बेकारीचें प्रमाण वाढत असतांना नोकरींत असलेले लोक आपल्या भोंवतीं स्वतंत्र वातावरण निर्माण करून युरोपियन अधिकाऱ्यांबरोबर समतेचा दर्जा मिळावा म्हणून खटपट करीत आहेत. बेकारीचा प्रश्न त्यांच्यापुढें उभा रहात नाहीं व त्यांचे हितसंबंधहि बेकारांस अनुकूल असत नाहींत. ही परिस्थिति फार काळ टिकणार नाहीं; जनतेची प्रगति होईल त्या बरोबरच ह्या सुशिक्षितांसहि एक पायरी खालीं यावें लागेल, असा इशारा सदरहु लेखांत दिलेला आहे.

## रिझर्व्ह बँकेचें पहिलें वर्ष

ता. १ एप्रिल, १९३५ रोजीं रिझर्व्ह बँकेच्या कामास सुरवात झाली, तेव्हांपासून ३१ डिसेंबर, १९३५ अखेरचा तिचा प्रथम वार्षिक अहवाल, ३ फेब्रुवारी रोजीं कलकत्ता येथें भरणाऱ्या पहिल्या वार्षिक साधारण सभेपुढें मंजुरीसाठीं मांडण्यांत आला. शेतीच्या धंद्यास लागणारा पैसा पुरवण्याच्या बाबतींत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांचा विचार करून त्यासंबंधांतील व्यवस्था करण्याकरतां रिझर्व्ह बँकेनें एक स्वतंत्र विभाग स्थापन करावा, अशी तरतूद कायद्यामध्यें करण्यांत आलेली आहे. मि. डार्लिंग ह्यांचा तत्संबंधाचा अहवाल सरकारपुढें आहे, पण निश्चित निर्णय अगर योजना अजून झालेली नाहीं. रिझर्व्ह बँकेच्या भागांस किती प्रचंड मागणी आली होती, ह्याची कल्पना भाग विक्रीस निघाले, त्यावेळीं प्रसिद्ध झालेल्या आंकड्यावरून लक्ष्यांत येण्याजोगी आहे. एकूण ५७४ अर्ज स्वीकारण्याच्या कचेऱ्यांत १,३४,५५८ अर्जदारांनीं ९ कोटि रुपयांच्या भागांची मागणी केली! बँकेचें काम सुरळीतपणें चालून वर्षअखेर तिच्या व्यवहारांत ५६ लक्ष रुपये निवळ नफा उरला. त्यांतून भागीदारांस ३½ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यास १२ लक्ष १२ हजार रुपये लागतील.

## जाहीर व्याख्यान

बुधवार ता. ५-२-३६ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां भारत इतिहास संशोधक मंडळ मंदिरांत प्रो. वामन गोविंद काळे एम्. ए. यांचें ' पुण्यांतील एका सराफाच्या शके १६७२ चे वहींतील पानें ' या विषयावर व्याख्यान होईल. जिज्ञासू व अर्थशास्त्राभ्यासू यांनीं अवश्य यावें.

## पैशाच्या वर्गावर्गीची सहकारी संस्थांची व्यवस्था

(२)*

(लेखकः—श्री. ल. म. जोशी, बी. कॉम., सर्टि. ए. आय. आय. बी., मुंबई.)

वर वर्णिलेल्या व्यवस्था चिरस्थायी व प्रगतिपर होण्यास संघटनेची आवश्यकता होती. सुमारें ७–८ वर्षांपूर्वी ह्या इलाख्यांतील कांहीं तज्ज्ञ माणसांनीं सहकारी बँकांची परिषद भरवून, सहकारी चळवळीचा प्रसार आणि तिची सर्वांगीण उन्नति व्हावी या स्तुत्य हेतूनें एक योजना अमलांत आणण्याचें ठरविलें आणि ज्या ज्या सहकारी बँका तीमध्यें सामील होतील त्या सर्वांनीं परस्परांमधील, अगर परस्परांकडे वेळोवेळीं पाठविल्या जाणाऱ्या चेक्सची वसुली विनाकमिशन करावी असें ठरलें. या योजनेमुळें तिहेरी फायदा झाला. एक तर सहकारी बँकांची सुसंघटना व एकीकरण होऊन परस्परांचा व्यापार वाढीस लागला. दुसरें, खातेदारांस अल्प कमिशनवर दूरदूरच्या ठिकाणचे चेक्स वसूल करतां येऊं लागले व तिसरें, पैशाचे अंतर्गत देवघेवींचे व्यवहार सुलभ, स्वस्त व झपाट्यानें होऊं लागले.

या योजनेंतील अगदीं अलीकडील प्रगति म्हणजे कित्येक सहकारी बँका मध्यवर्ती सहकारी बँकेचा इंपीरिअल बँकेसारखाच—किंवा आतां रिझर्व बँकेसारखाच—उपयोग करून घेऊं लागल्या आहेत, ही होय. म्हणजे असें कीं, ट्रेझरी अगर सबट्रेझरी मधून पैसे नेण्याची अगर आणण्याची दगदग करण्यापेक्षां मध्यवर्ती बँकेंत एक खातें उघडून दुसरें, आपल्या नजीकच असलेल्या तिच्या एखाद्या शाखेंत उघडणें, व ज्या ज्या वेळीं आपणांस जरूर भासेल त्या त्या वेळीं आपल्या येथें हुंड्या व चेक्स विकून जमा झालेले पैसे मध्यवर्ती बँकेंत व मध्यवर्ती बँकेकडून आपणांकडे नेण्याआणण्याची व्यवस्था करणें त्यांस फारच सोईस्कर होऊं लागलें आहे. इतकेंच काय, पण आपले चेक्स विनाकमिशन मध्यवर्ती बँकेकडून अगर तिच्या शाखेकडून marked good for payment करवून घेऊन या पैशाची देवघेव ताबडतोब करवून घेणें हें देखील या सहकारी बँकांस अगदीं शक्य झालें आहे.

रिझर्व बँकेसारखी कोणत्याहि तऱ्हेनें स्थिति नसतांना व पैशाचे अंतर्गत देवघेवीचे व्यवहार सुलभ होऊन तदनुषंगिक सर्व फायदे मिळत असतांना, कांहीं सहकारी बँकांनीं मध्यवर्ती बँकेस विनाकमिशन आणि शिवाय पोस्टेज वगैरेसारखा प्रत्यक्ष केलेला खर्चहि न देतां तिचेकडून हें काम करवून घ्यावें किंवा नाहीं; मध्यवर्ती बँकेनें तें तसें करावें किंवा नाहीं; किंवा केल्यास कमिशन घ्यावें कीं प्रत्यक्ष आलेला खर्चच घ्यावा; कीं तो सुद्धां घेऊं नये, हे सर्व मुद्दे वादग्रस्त आहेत. त्यांचा विचार केल्यास मुख्यतः तीन पक्ष संभवतात.

(१) प्रथम पक्षाचे मतें, अर्बन बँकांस सेंट्रल अगर प्रॉव्हिन्शिअल बँकेप्रमाणें ठिकठिकाणीं आपल्या शाखा स्थापन करण्याची मुभा नसल्यामुळें त्यांस आपला अंतर्गत व्यापार वाढविण्यास मध्यवर्ती बँकेचीच मदत घ्यावी लागते. तेव्हां इतर अर्बन बँकांस ज्या सवलती मिळत नाहींत त्या मध्यवर्ती बँकेस मिळत असतांना तिनें अर्बन बँकांकरितां अगर इतर सहकारी बँकांकरितां पैशांचे देवघेवीचे व्यवहार विनाकमिशन करण्याची थोडीशी झीज सोसण्यास कांहींच हरकत नाहीं. यामध्यें मध्यवर्ती बँकेचें विशेषसें नुकसान न होतां लहान लहान सहकारी बँकांचा थोडा फायदा होईल. दुसरें, एकाच गांवीं अर्बन व सेंट्रल अगर प्रॉव्हिन्शिअल सहकारी बँकेची शाखा स्थापन झाली असल्यास प्रत्यक्ष अनुभव असा येतो कीं, प्रॉव्हिन्शिअल अगर सेंट्रल बँकेची पत अर्बन बँकेपेक्षां केव्हांहि जास्त असल्यामुळें चेक्स, ड्राफ्ट्स, रेल्वे रिसीट्स किंवा मुदत व दर्शनी हुंड्या यांचा व्यापार सहाजिकच सेंट्रल अगर प्रॉव्हिन्शिअल बँकेमार्फतच केला जातो. हा एक फारच मोठा फायदा या बँकांस मिळत असल्यामुळें वर दर्शविलेली सवलत लहान लहान सहकारी बँकांस देण्यास त्यांस विशेष अडचण पडण्याचें कांहींच कारण नाहीं. तिसरें असें कीं, सेंट्रल अगर प्रॉव्हिन्शिअलसारख्या मोठ्या बँकेनें इतर लहान लहान सहकारी बँकांस कांहीं सवलती देऊन मदत करणें सहकारी तत्त्वास पोषकच होईल व त्यामुळें पर्यायानें मध्यवर्ती बँकेचा फायदाच होईल. या सर्व कारणांस्तव मध्यवर्ती बँकेनें इतर सहकारी बँकांकरितां पैशाचे अंतर्गत देवघेवीचे व्यवहार कांहीं मोबदला अगर खर्च न घेतां करावे असें प्रथम पक्षाचें मत आहे.

(२) दुसऱ्या पक्षाचें म्हणणें असें कीं, अंतर्गत देवघेवीचे व्यवहार बँकांबँकांमध्यें चोख रीतीनें होत असल्यास त्यांवर मध्यवर्ती बँकेकरितां कमिशन घेण्यांत येऊं नये. म्हणजे असें कीं, एखाद्या खातेदाराच्या अगर व्यापाऱ्याच्या नांवें चेक अगर हुंडी काढली असल्यास त्यावर कमिशन घेऊं नये. पण एकाच गांवांत अर्बन व सेंट्रल सहकारी बँक असतांना हुंडणावळीचे व्यापारांत जमा झालेले, परंतु तेथें असलेल्या दुसऱ्या बँकेंत आपल्या खातीं जमा केलेले पैसे परस्पर त्या बँकेवर चेक काढून एकाद्या बँकेस दुसऱ्या एकाद्या विशिष्ट स्थळीं पाठवावयाचे झाल्यास यांत त्या बँकेचा स्वार्थी हेतु असल्यामुळें त्या व्यवहारावर कमिशन जरूर घेण्यांत यावें. तसेंच, वेळ पडल्यास अगदीं शेवटचा उपाय म्हणून मध्यवर्ती बँकेनें या सवलतीचा गैरवाजवी फायदा घेणाऱ्या सहकारी बँकेचें खातेंच अजीबात बंद करावें. म्हणजे चेक्सचें व हुंड्यांचें दळण-वळण अगर अभिसरण यांत कोणत्याहि तऱ्हेनें आडकाठी न येतां या सवलतीच्या मुळाशीं असलेला विशिष्ट हेतु साध्य होईल

(३) तिसऱ्या पक्षाचे मतें, लहान सहान सहकारी बँकांस अगर इतर सहकारी बँकांस लागणारा पैसा वरचेवर पुरविण्यास मध्यवर्ती बँकेस बराच त्रास, श्रम, वेळ व खर्च सोसावा लागतो. म्हणजे असें कीं, जवळ असलेल्या पैशापैकीं अगदीं कमींतकमी पैसा जवळ ठेवून बाकीचा कोठें तरी गुंतवून ठेवण्याचें बँकांचें सर्वसाधारण धोरण असल्यामुळें अगाऊ कोणत्याहि तऱ्हेची सूचना नसतांना एकदम मागणी आल्यास चटकन् पुरवठा करतां यावा एवढ्याकरितां तिला मुद्दाम तशी व्यवस्था करावी लागते. तसेंच, पत्रव्यवहार वगैरे इतर गोष्टीहि तीसच कराव्या लागत असल्यामुळें या कामीं स्टेशनरी, पोस्टेज व कामदार मंडळींचा खर्चहि बराच वाढतो. तेव्हां, अगोदरच सर्व व्यवहार "कमींत कमी फायदा ठेवून जास्तीत जास्त सवलती" देण्याच्या तत्त्वावर चालू असतांना त्यांतच आणखी, पैशावरील व्याजाची सूट, स्टेशनरी, पोस्टेज व कामदार मंडळींचे पगार वगैरेसारखे येणारे खर्च स्वतःचे शिरावर लादून घेऊन आणखी विनाकमिशन पैशांचे देवघेवीचे व्यवहार करण्याची सवलत द्यावयाची, हें मध्यवर्ती बँकेस जरी अगदीं अशक्य नसलें तरी व्यावहारिक दृष्ट्या तें बरोबर होणार नाहीं. तेव्हां, तीस या कामाबद्दल व त्याकरितां

* पहिला लेखांक ता. २९ जानेवारीचे अंकांत प्रसिद्ध झाला आहे.

सोसाव्या लागणाऱ्या झिजेबद्दल कांहीं तरी मोबदला मिळावा हेंहि अगदी योग्य आहे.

इतके परस्पर विरोधी असे विचारप्रवाह प्रस्तुत विषयाच्या चर्चेंत वहात असलेले आढळतात. तथापि कोणत्याहि एकांतिक कल्पनेचा कोणी आग्रह धरणें सहकारी चळवळीच्या हिताच्या दृष्टीनें इष्ट नाहीं असेंच समजूतदार कार्यकर्त्यास वाटल्यावांचून रहाणार नाहीं. तेव्हां, शक्य तितक्या लवकर ह्या वादांतून कांहीं तरी मार्ग काढून सुवर्ण-मध्य गांठण्याचा सर्व सहकारीबंधूंनीं विचार करावयाचा ठरविल्यास, सर्वसाधारणपणानें मार्गदर्शक व आदर्शभूत म्हणून मानल्या जाणाऱ्या मध्यवर्ती बँकेनें इतर सहकारी बँकांस विशिष्ट सवलती देतांना त्यांचेकडून कमिशन घेणें जरी योग्य नसलें तरी दुसऱ्या सहकारी बँकांनींहि मध्यवर्ती बँकेस खरोखरीच सोसाव्या लागणाऱ्या झिजेबद्दलची भरपाई करण्याचें साफ नाकारणें हें देखील उचित नाहीं असेंच कोणाचेंहि मत पडेल असें वाटतें. ( संपूर्ण )

## नोकराचा हलजर्गीपणा व मालकाची जबाबदारी

( इंग्लंडमधील एक निवाडा )

मिसेस एचिसन नांवाच्या बाईनें आपली मोटारगाडी पेज मोटर्स लि. कडे दुरुस्तीसाठीं दिली. तेथें ती दुरुस्त होणार नाहीं, फुलहॅम येथील वर्कशॉपमध्यें ती धाडली पाहिजे, असा सल्ला तेथें बाईस मिळाला व ती तशी पाठविण्यास बाईनीं अनुमति दिली. त्याप्रमाणें गाडी पाठविण्यांत आली व त्याच दिवशीं संध्याकाळीं दुरुस्ती पूर्ण होऊन पेज मोटर्सच्या सर्व्हिस मॅनेजरनें तिचा ताबा घेतला. गाडी पेज मोटर्सच्या तबेल्यांत सरळ आणण्याऐवजीं सर्व्हिस मॅनेजरनें त्या गाडींत आपल्या एका मित्रास व त्याच्या पत्नीस बसवून आणलें. घरीं जातांना वाटेंत अपघात होऊन तो स्वतः व गाडींतील उतारू हे सर्व मरण पावले आणि गाडीचा चुराडा झाला. गाडी निष्काळजीपणानें हांकण्यांत आली हें सिद्ध झालें.

मिसेस एचिसननें पेज मोटर्सकडे नुकसानभरपाई मागितली, परंतु कंपनीनें बचाव करतांना ( १ ) सर्व्हिस मॅनेजरला फुलहॅम येथून गाडी आणण्याचा अधिकार नव्हता व (२) अपघाताचे वेळीं गाडीचा उपयोग खासगी कामासाठीं करण्यांत आला होता, कंपनीच्या कामासाठीं नव्हे, सबब कंपनी त्याबद्दल जबाबदार नाहीं असें आपलें म्हणणें पुढें मांडलें. सर्व्हिस मॅनेजर फुलहॅमहून नेहेमी मोटारी आणीत असे, ह्यावरून त्यास तसें करण्याचा अधिकार होता, हें सिद्ध झालें. त्याचप्रमाणें, नोकर हा मालकाकरतां काम करीत असतांनाच फक्त त्याच्या निष्काळजीपणाबद्दल मालकावर जबाबदारी येते, हें तत्त्व कोर्टानें मान्य केलें; परंतु एकंदर प्रश्नांचें व्यापक दृष्टीनें निरीक्षण करून, त्यांनीं मोटार-मालकिणीस नुकसानीची भरपाई देवविली.

## हिंदी भांडवलास सिलोनमध्यें वाव

सिलोन देश हा जरी अगदी हिंदुस्थानास लागून असला, तरी राजकीयदृष्ट्या तो विभक्त आहे. त्याच्या आर्थिक प्रगतीसंबंधानें शेठ वालचंद हिराचंद हे कोलंबो येथील एका मुलाखतींत म्हणाले:—

“ किती तरी हिंदी भांडवल आज सहज उपलभ्य आहे. हिंदुस्थान व सिलोन ह्यांमध्यें सहकार्य होईल, तर कित्येक नवे उद्योगधंदे सिलोनमध्यें स्थापन होऊं शकतील. त्यामुळें ह्या बेटाच्या कच्च्या मालास गिऱ्हाइक मिळेल व बेकार कामगारांस काम लागेल. ”


॥ श्री ॥

अकोला सेंट्रल बँक लिमिटेड

अकोला [ वऱ्हाड ]


सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, ता. १ जानेवारी १९३६ पासून पुनः प्रसिद्ध होईपर्यंत ही बँक खालील **कमी केलेल्या दरानें मुदती ठेवी** स्वीकारील. जुन्या ठेवींची मुदत संपल्यावर त्या पुनः चालू करतांना त्यांनाही हे **नवीन दर** लागू होतील.

| | |
|---|---|
| ३ महिने पूर्ण | ३ द. सा. द. शें. |
| ६ महिने पूर्ण | ३। ,, |
| ९ महिने पूर्ण | ३॥ ,, |
| १२ महिने पूर्ण | ४ ,, |
| २ वर्षें पूर्ण | ४॥ ,, |
| ३ वर्षें पूर्ण | ५ ,, |
| ४ वर्षें पूर्ण | ५। ,, |
| ५ वर्षें पूर्ण | ५॥ ,, |

**सेव्हिंग्ज बँक व चालू ठेवी**वरील व्याजाचे दर हल्लीचेच म्हणजे अनुक्रमें द. सा. द. शें ३ व २ हे अमलांत राहतील.

अकोला [ वऱ्हाड ] ता. २३-१२-३५

श्री. अ. भागवत,
ऑनररी सेक्रेटरी,
अकोला सेंट्रल बँक लिमिटेड.



किर्लोस्कर
लोखंडी नांगर

आज ३,००,००० वर शेतकरी पूर्ण संतोषानें वापरीत आहेत.

किर्लोस्कर नांगरांच्या निरनिराळ्या २६ नमुन्यांची सविस्तर माहिती असलेला कॅटलॉग तावडतोब मागवा.

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी ( सं. औंध )

एजंटः—केळकर बंधु, पुणें—नाशिक

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

एन. ए. ॲन्ड फ्रेन्ड्स
स्टेशनर्स, जनरल मर्चन्टस, ॲन्ड कमिशन एजन्टस.
आप्पा बळवंत चौक, पुणें २.

## सहकारी चळवळ

### सिन्नर तालुका ( जि. नाशिक ) सहकारी परिषद

वरील परिषद नाशिक जिल्हा सहकारी इन्स्टिट्यूटचे ऑनररी सेक्रेटरी व सहकारी सोसायट्यांचे ऑनररी ऑर्गनायझर श्री. व्ही. जी. तिडके ह्यांच्या अध्यक्षतेखाली सिन्नर येथें ता. १७ जानेवारी रोजीं भरली होती. त्यावेळीं सुमारें १०० सहकारी बंधू हजर होते. नाशिक जिल्हा सेंट्रल बँकेचे मॅनेजर श्री. कारखानीस ह्यांनीं सविस्तर भाषण करून सध्याच्या बिकट परिस्थितींतून सोसायट्या बाहेर कशा निघूं शकतील, ह्याबद्दल त्यांनीं विवेचन केलें. जिल्हा ऑनररी ऑर्गनायझर श्री. देशमुख ह्यांनीं वक्तशीर परतफेडीचें महत्त्व समजावून सांगितलें. त्यानंतर अध्यक्षांनीं ठराव मांडले, ते सर्व मंजूर करण्यांत आले.

### सामुदायिक विक्रीमुळें सहकारी सोसायट्यांचा होणारा फायदा

पूर्व खानदेशांतील जामनेर तालुक्यामधील कित्येक सहकारी सोसायट्या आपल्या सभासदांचा उत्पन्नाचा माल एके ठिकाणीं आणतात व आसपासच्या बाजारपेठेंतील व्यापारी मंडळी बोलावून त्यांचे समोर लिलाव पुकारतात. ह्यामुळें व्यापाऱ्यांत चढाओढ लागून मालास भाव चांगला मिळतो व मालाचा उठावहि एकदम होतो. व्यापाऱ्यांसहि माल एके ठिकाणीं मिळूं शकतो. सोसायट्यांचा पैसा अनायसें वसूल होतो व सभासदांची पत वाढते. जिल्ह्यांतील इतर सोसायट्यांनीं वरील सोसयट्यांचें अनुकरण करावें, अशी आग्रहाची सूचना पूर्व खानदेश सहकारी इस्टिट्यूटचे चेअरमन, श्री. वामनराव पाटील ह्यांनीं एक पत्रक काढून केली आहे.

---

पुण्याचे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रो. वा. गो. काळे यांच्या संपादकत्वाखाली निघणाऱ्या 'अर्थ' साप्ताहिकास नुकतेंच दुसरें वर्ष लागलें याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करतों. महाराष्ट्रीय वाचकांना जशी ललितवाङ्मयाची आवड आहे तशी शास्त्रीय विषयाची नसल्यामुळें अशा वृत्तपत्रांना वाचकांचा म्हणावा तसा आश्रय मिळत नाहीं. तथापि या बिकट परिस्थितींतहि 'अर्थ' पत्रानें जनतेंत शास्त्रीय विषयाची, विशेषतः अर्थशास्त्राची आवड उत्पन्न करून त्यांना अर्थशास्त्राची सांगोपांग माहिती देण्याचा जो उपक्रम चालविला आहे तो अभिनंदनीय व म्हणूनच उत्तेजनार्ह आहे. मराठी वाचकांनीं या पत्रास उदार आश्रय द्यावा अशी आमची आग्रहाची शिफारस आहे.

—सेवक ( १ फेब्रुवारी १९३६ )

### तांदळाचें दर एकरी उत्पन्न

वेगवेगळ्या देशांत तांदळाचें दर एकरी उत्पन्न किती होतें, ह्याबद्दल तुलनात्मक आंकडे खाली दिले आहेत. हिंदुस्थानांतील उत्पादनाचें दर एकरी प्रमाण अतिशय अल्प असून त्यांत सुधारणा होण्यास किती-तरी जागा आहे, हें त्यांवरून स्पष्ट होईल.

दर एकरी तांदळाचें उत्पादन

| देश | दर एकरी उत्पन्न ( मण ) |
|---|---|
| स्पेन | ६४ |
| जपान | ३६ |
| पोर्तुगाल | ३३ |
| अमेरिका | २१ |
| सयाम | १७ |
| ब्रि. हिंदुस्थान | १६ |
| सिलोन | ८ |

हिंदुस्थानांतील प्रांतांतहि भिन्नभिन्न उत्पादनाचें मान अशाच तऱ्हेचें आहे, हें खाली दिलेले आंकडे दर्शवितील: —

| | |
|---|---|
| कुर्ग | २७ |
| मुंबई | २२ |
| मद्रास | १९ |
| ब्रम्हदेश | १८ |
| बंगाल | १८ |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | १२ |


बंगाल
कोल सप्लाइंग फर्म
उत्तम दगडी कोळसा ( बंगाल, सी. पी. )
आणि
कोक ह्यांचे व्यापारी
व
म्युनिसिपल, लोकलबोर्ड,
पी. डब्ल्यु. डी. ( सरकारी ) कॉन्ट्रॅक्टर्स
५११ बुधवार पेठ, पुणें शहर २.
तारेचा पत्ता:-व्यंकटेश. फोन नं. ४७१

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street Bombay | 716, Sadashiv Peth Poona City

दि मुकुंद इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें शहर.
[ अधिकृत भांडवल १००,००० रुपये ]
प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त
गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत प्रत्येकाची विमा कंपनी !
शेअरविक्री जोरांत सुरू झाली.
शेअर्स खपविणारे एजंटस मर्यादित. त्वरित अर्ज करा.
मॅनेजिंग एजंटस्—विष्णु मुकुंद आणि कं., पो. बॉ. नं. ४३.
२८१ सदाशिव, पेरूगेटाजवळ, पुणें शहर.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. पुणें

## उद्घाटन

वरील बँकेचें उद्घाटन येत्या शनिवारीं सर सोराबजी पोचखनवाला ह्यांच्या हस्तें होणार आहे. सर सोराबजी हे सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे मॅनेजिंग डायरेक्टर असून बँकिंगचे क्षेत्रांतील त्यांची गेल्या पंचवीस वर्षांतील कामगिरी सुप्रसिद्ध आहे. सिलोन-मधील बँकिंग इन्कायरी कमिटीचेहि ते अध्यक्ष होते. अशा अनुभवी व नामांकित बँकरचे हस्तें महाराष्ट्राच्या मध्यवर्ती बँकेचें उद्घाटन होणार, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

### स्थापनेची पूर्वतयारी

व्यापाराकरितां लागणाऱ्या भांडवलाचा पुरवठा करणारी समाईक भांडवलाची मोठी अशी महाराष्ट्रीय व्यापारी बँक एकहि नाहीं. सराफ, सावकार, सहकारी बँका, इत्यादि आपआपल्या परीनें महाराष्ट्रांतील बँकिंगच्या गरजा थोड्याफार अंशीं भागवीत आहेत, परंतु त्यांच्या मर्यादित व्यवहारांच्या बाहेर विस्तृत क्षेत्र मोकळें असून त्यासाठीं अवश्य असणारी समाईक भांडवलाची बँक आज अस्तित्वांत नाहीं. ही गरज दि बँक ऑफ महाराष्ट्र व तिच्या संकल्पित शाखा योग्य तऱ्हेनें भरून काढतील, अशी अपेक्षा आहे.

दि मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज ह्या संस्थेनें आपल्या स्थापनेपासून अत्यंत अल्प कालांतच ह्या प्रश्नासंबंधीं अनुकूल वातावरण उत्पन्न केलें व ही बँक स्थापन होण्यासंबंधीं जरूर ती खटपट केली. जनतेकडून ह्या बँकेचें उत्तम तऱ्हेनें स्वागत केलें जात आहे, ही गोष्ट समाधानकारक व उत्तेजनदायक आहे. बँकेच्या संचालक मंडळानें जबाबदारपणानें व व्यवहारदक्षतेनें कारभार चालविण्याचा निश्चय केला असल्याकारणानें ह्या संस्थेचें कार्य काटकसरीनें व चोख चालेल, असा विश्वास जनतेस वाटत आहे.

### बँकेचें प्रगतिपर धोरण

महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचें पाऊल हळुहळू पुढें पडत आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. 'दि बँक ऑफ महाराष्ट्र'च्या स्थापनेनें ह्या प्रवृत्तीस जोराची चालना मिळेल. सध्याचा काल आधुनिक पद्धतीनें बँकिंगचा व्यवहार करणारी संस्था स्थापन होण्यास अनुकूल असाच आहे. मोठ्या प्रमाणावर नफा मिळविण्याचें संकुचित ध्येय बँकेनें आपल्यापुढें ठेवलेलें नाहीं; योग्य मार्गानें व सुरक्षितपणास बाध येऊं न देतां जनतेस जास्तींत जास्त सोयी मिळाव्या असेंच धोरण बँक आंखील,अशी लोकांची अपेक्षा आहे.

'दि बँक ऑफ महाराष्ट्र'नें महाराष्ट्राच्या आर्थिक घटनेंत एका नव्या अत्यंत उपयुक्त संस्थेची भर घातलेली आहे. बँक चालू करण्यास जरूर तेवढें भांडवल खपलें असून सर सोराबजी पोचखनवाला ह्यांच्या हस्तें तिचें औपचारिक रीत्या उद्घाटन होणार आहे,ही गोष्ट शुभसूचक आहे. बँकेच्या हातून महाराष्ट्राची श्रेष्ठ दर्जाची सेवा घडो, असें आम्ही इच्छितों.


शेअर विक्री सुरू आहे

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें**

अधिकृत भांडवल ... ... रु. १० लक्ष
तूर्त विक्रीकरितां काढलेलें भांडवल ... रु. ५ लक्ष

प्रत्येक शेअरची किंमत रु. ५०

१ अर्जासोबत प्रत्येक शेअरला रु. १५/-
२ अर्जमंजुरीनंतर रु. १०/- } प्रमाणें.

बाकी रक्कम "अनकॉल्ड रिझर्व्ह" म्हणून राहील.

संचालक मंडळाचे अध्यक्षः—प्रो० वा. गो. काळे, एम्. ए., एक्स-मेम्बर, इंडियन टॅरिफ बोर्ड.
" उपाध्यक्षः—श्री. धोंडो कृष्ण साठे, बी.ए., बी. एससी., व्यापारी व कॉन्ट्रॅक्टर, पुणें.

प्रॉस्पेक्टस व शेअर अर्जाच्या नमुन्याकरितां लिहा:—

पुणें:—मॅनेजर, दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
मुंबई:—आर. आर. नाबर आणि कं., शेअर व स्टॉक ब्रोकर, एक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, कोट.
नागपूर:—एस. एन. आगाशे आणि कं., चीफ एजन्टस, कॉमनवेल्थ इन्शु. कं. लि., महाल.



**दत्तात्रय नारायण हेजीब**

किराणा व सुक्या मेव्याचे व्यापारी

आमचेकडे आंबेपोळी, फणसपोळी, खारा पिस्ता वगैरे सुका मेवा मिळेल.

रे-मार्केटजवळ, २० शुक्रवार पेठ, पुणें २.



पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी

टेलरिंग फर्म

मॅनेजर—व्ही. के. पाटसकर, D.M.T.C.A. (London.)

**पाटसकर आणि कंपनी**

४८ निहाल पेठ, पुणें शहर.

सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी

आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—२ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९—२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—६ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७—१० |
| ४% १९६०–७० ... ... | १११—४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९६—७ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०६—४ |
| ४% १९४३ ... ... ... | १०९—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०६—४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०४—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०५—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १०५—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | १०९—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२१—४ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२८—४ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०४—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५—२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५२५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३०—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | ९८—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९३—४ |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९½% ) | ८९०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५०—५ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२१—४ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १५२३–१२ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५०३–१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९०–१० |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६४—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १४४—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५३७—८ |

#### सोनें–चांदी

| | | |
|---|---|---|
| चार्टर्ड बँकेचें सोनें | तोळयास | ३४—१२ |
| मिंट " | तोळयास | ३४—११ |
| हिंदी मिंट चांदी | १०० तोळयांस | ४९—८ |
| हिंदी मिंट चांदी ( वायदा ) | १०० तोळयांस | ४९—६ |


# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

This year 1934-35

Exceeds

2 CRORES & 50 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca,

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.



ह्यूम पाईप वापरा

पूर्ण स्वदेशी व टिकाऊ

३ इंच ते ७२ इंच व्यासाचे पाईप व अर्धगोल पाईप मिळतात.

टाक्या, खांब, सेप्टीक टाक्या वगैरे

कांक्रीटच्या वस्तु

आम्हीं केलेल्या फारच टिकाऊ असतात.

— सर्व प्रांतांत कारखाने आहेत —

इंडियन ह्यूम पाईप कंपनी, लिमिटेड

बलार्ड इस्टेट, मुंबई.



'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली

# दि बॉंबे लाइफ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड.

( स्थापना १९०८ )

विश्वासार्ह व मजबूत विमा-कंपनी.

| | | |
|---|---|---|
| मालमत्ता .... .... | ७०,००,००० रु. चे वर | |
| विमाखातीं शिल्लक ( लाइफ फंड ) | ५८,००,००० | ,, |
| हप्त्यांचें उत्पन्न ... .... | १८,८५,००० | ,, |
| एकूण चालू काम .... .... | ३,७१,००,००० | ,, |
| आजपर्यंत क्लेम्सचे पैसे दिले ... | ३२,००,००० | ,, |

माफक हप्ते, भरपूर बोनस, क्लेम्सची तात्काळ भरपाई, व पॉलिसींतील सवलतीच्या अटी हें "बॉंबे लाइफ पॉलिसीं" चें वैशिष्ट्य आहे.

एजन्सी व पॉलिसी ह्यासंबंधींच्या तपशिलासाठीं लिहाः—
मॅनेजर,
बॉंबे लाइफ बिल्डिंग, ४५।४७, चर्चगेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टके फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—

## कॉमनवेल्थ विमा कंपनी, लि. पुणें.

अध्यक्ष-श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां भेटा अगर समक्ष लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

स्वदेशी

कापड म्हणजे काय ?

(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.

या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.

हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.

खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण

## स्वदेशी भांडार

लक्ष्मीरोड, पुणें २.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult

## V. G. & Sons

ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

## डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें

मध्यम वर्गांतील गृहेच्छू लोकांस — अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य

भाडेकरी-घरमालक-गृहयोजना

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.

जनरल मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख १२ फेब्रुवारी, १९३६. अंक ७

कामकाज चालू झालें

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १० लक्ष |
| तूर्त विक्रीकरितां काढलेलें भांडवल | ... | रु. ५ लक्ष |

प्रत्येक शेअरची किंमत रु. ५०

१ अर्जासोबत प्रत्येक शेअरला रु. १५/- } प्रमाणें.
२ अर्जमंजुरीनंतर रु. १०/- }

बाकी रक्कम "अनकॉल्ड रिझर्व्ह" म्हणून राहील.

संचालक मंडळाचे अध्यक्षः—प्रो० वा. गो. काळे, एम्. ए., एक्स-मेम्बर, इंडियन टॅरिफ बोर्ड.

" उपाध्यक्षः—श्री. धोंडो कृष्ण साठे, बी.ए., बी. एससी., व्यापारी व कॉन्ट्रॅक्टर, पुणें.

प्रॉस्पेक्टस व शेअर अर्जाच्या नमुन्याकरितां लिहा:—

पुणें:—मॅनेजर, दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

मुंबईः—आर. आर. नावर आणि कं., शेअर व स्टॉक ब्रोकर, एक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, कोट.

नागपूरः—एस. एन. आगाशे आणि कं., चीफ एजन्टस्, कॉमनवेल्थ इन्शु. कं. लि., महाल.

## दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

# विविध माहिती

### लंडनचे विसराळू रहिवासी

१९३४ सालाचे मानानें १९३५ सालीं लंडन येथील रहिवाशांनीं विसराळूपणांत प्रगति केली असें दिसतें. तेथील आगगाड्या, ट्रॅमगाड्या व बसेस ह्यांमध्यें विसरलेल्या वस्तूंसंबंधीं तुलनात्मक आंकडे खालीं दिले आहेत:—

| वस्तू | १९३४ | १९३५ | वाढ |
|---|---|---|---|
| छत्र्या | ८७,३५६ | ९८,९६१ | १३ % |
| इतर जिनसा | २,१०,१७२ | २,३२,४१२ | ११ % |
| एकूण | २,९७,५२८ | ३,३१,३७३ | ११ % |

स्त्रियांमध्यें विसराळूपणाचें प्रमाण अधिक आढळलें. विसरून राहिलेल्या वस्तूंमध्यें गेल्या वर्षीं जरी वाढ झाली, तरी त्यांपैकीं मालकांस परत करण्यांत आलेल्या वस्तूंचें प्रमाणहि वाढलें, हें विशेष आहे.

### स्त्रिया व वृत्तपत्रव्यवसाय

स्त्रिया आतां पुरुषांचे बरोबरीनें अनेक प्रकारांचीं कामें करूं लागल्या आहेत, असें आपण पहातों. विशेषतः, पाश्चात्य देशांत स्त्रियांचा ज्यांत शिरकाव झालेला नाहीं, असा उद्योगधंद्यांचा कोणताच प्रांत उरलेला नाहीं. तथापि, वृत्तपत्रव्यवसाय अजून पुरुषांचेच हातांतच बहुंशीं आहे. ह्या व्यवसायांत असलेल्या लंडनमधील ५,५३३ लोकांपैकीं स्त्रियांची संख्या फक्त १६८ भरते.

### ७५० नव्या 'वाघिणी'

१९३६–३७ ह्या वर्षीं हिंदुस्थान सरकारचें रेल्वेखातें ७५० नव्या 'वाघिणी' विकत घेणार आहे. त्या हिंदी बनावटीच्या असाव्यात, अशी लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या स्टँडिंग फिनॅन्स कमिटीची सूचना आहे.

### पोस्ट व तारखात्याचा अहवाल

१९३४-३५ सालीं सरकारी पोस्ट व तारखात्यास ३८ लक्ष रुपये नफा झाला. ह्या पूर्वीच्या वर्षीं ५२ लक्ष रुपये तोटा आला होता. ३१ लक्ष इतक्या पोस्टल सेव्हिंग्ज खात्यांवर ५८ कोटि रुपये होते, म्हणजे प्रत्येक खात्यांत सरासरी १८८ रु. ८ आणे होते असा हिशेब झाला. गेल्या वर्षी कॅश सर्टिफिकिटांत एकूण १० कोटि रुपये गुंतवण्यांत आले. पूर्वीच्या सालापेक्षां हा आंकडा ९½ कोटींनीं कमी आहे. कॅश सर्टिफिकिटांवरील व्याजाचा दर कमी केल्याचा हा परिणाम होय. टेलिफोनच्या खात्यास १९३३-३४ सालीं फक्त २½ लक्ष रुपये नफा झाला होता, त्या मानानें गतसालीं बरीच सुधारणा झाली व २३½ लक्ष रुपये नफा उरला.

### गंज काढण्यासाठीं वाळूचा फवारा

सिंध प्रांतांतील सक्कर जवळील 'लॉइड बराज ' ह्या धरणाचें रचनेंत बराच लोखंडी माल वापरण्यांत आला आहे. त्यांस रंग देण्यापूर्वी त्यावरील गंज काढावा लागतो. हें काम वाळूच्या फवाऱ्यानें करण्यांत येतें. ३० ते ३५ पौंड दाबाच्या हवेच्या सहायानें हा फवारा जोरानें उडविण्यांत येतो.

### म्हैसूर सरकारचें नवें कर्ज

१९६१ सालीं नक्की, परंतु १९५६ नंतर केव्हांहि, परतफेड होणारें ३ टक्के दराचें नवें कर्ज म्हैसूर सरकारनें उभारलें आहे. व्याजावरील प्राप्तीच्या कराची माफी मिळणार आहे.

### कंपनी कायद्यांत सुचविलेल्या दुरुस्त्या

कंपनी कायद्यांत कोणत्या दुरुस्त्या करण्यांत याव्या, ह्यासंबंधीं सल्ला देण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या कमिटीनें आपल्या सूचना सरकारकडे पाठविल्या आहेत, असें समजतें. त्यांतील मुख्य सूचनांचा सारांश येथें दिला आहे.

( १ ) मॅनेजिंग एजन्सीच्या कराराची मुदत वीस वर्षांपेक्षां जास्त असूं नये.

( २ ) व्यापारी व औद्योगिक क्षेत्रांत बँकांचें महत्त्व विशेष आहे, परंतु त्यांच्या मजबुतीबद्दल लोकांचा पूर्ण विश्वास असणें आवश्यक आहे. ह्याकरितां बँकेच्या नफ्यापैकीं कांहीं अंश बाजूस राखून ठेवण्याची सक्ति असावी. हा रिझर्व्ह, भरणा झालेल्या भांडवलाइतका होईपर्यंत दरसाल वाढत जावा.

( ३ ) कांहीं विशिष्ट रकम वेगळी काढून ठेवल्यावर उरलेल्या रकमेंतूनच डिव्हिडंड वाटण्यांत यावें.

### बडोद्यांत सायकलीवर कर

बडोद्याच्या शहर म्युनिसिपालिटीनें आपल्या हद्दींत सायकलींवर १ रुपया कर बसवण्याचें ठरवलें आहे.

### सरकारी प्रसिद्धीखात्याचा विस्तार

हिंदुस्थान सरकारनें आपलें प्रसिद्धी खातें वाढवलें असून ह्या नव्या योजनेस पुढील वर्षी ५७,००० रुपये खर्च येईल. डेप्युटि डायरेक्टरचे जागीं एका युरोपिअनास नेमण्यांत आलें आहे. हिंदी भाषांतून प्रसिद्धी देण्याची व्यवस्था एका हिंदी इसमाकडे सोपविण्यांत येईल.

### हिंदुस्थानाची लोकसंख्या ४० कोटि होणार ?

( १ ) १५ ते ५० वर्षे वयाच्या स्त्रियांच्या संख्येंत वाढ व ( २ ) जननाचें प्रमाण कायम राहून मृत्यूच्या प्रमाणांत झालेली घट, ह्यांमुळें १९४१ सालीं होणाऱ्या खानेसुमारीचे वेळीं हिंदुस्थानाची लोकसंख्या सुमारें ४० कोटि होईल, असा कलकत्ता येथील डॉ. राजा ह्यांचा अंदाज आहे.

### हिंदी गव्हाच्या पिकाचा अंदाज ( १९३५-३६ )

हिंदुस्थानांत सुमारें ३ कोटि २८ लक्ष एकर जमिनींत गहूं लावण्यांत आला आहे, असा सरकारी अंदाज आहे. गव्हाच्या लागवडीच्या दृष्टीनें पंजाब प्रांताचा नंबर पहिला लागतो. तेथें सुमारें १ कोटि एकर जमीन गव्हानें व्यापलेली आहे. मुंबई इलाख्यांत ( सिंध धरून ) ३० लक्ष एकर जमिनींत गहूं लावलेला आहे. अमेरिकेंत ४३ कोटि एकर गव्हाखालीं आहेत.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत.

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. १ फेब्रुवारी रोजीं पुरा झालेला आठवडा | ५४,२६,४८६ |
| ता. ८ फेब्रुवारी रोजीं पुरा झालेला आठवडा | ८८,८३,३६३ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते ८ फेब्रुवारी १९३६ अखेर | २,६१,३६,६२,३२२ |

अनुक्रमणिका.


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ७८ | ५ दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. प्रो. काळे व सर पोचखनवाला ह्यांचीं भाषणें | ८२ |
| २ बँक ऑफ महाराष्ट्र चालू झाली ... ... ... | ७९ | ६ मोटर गाड्यांचे प्रांतवार आकडे ... ... | ८४ |
| ३ स्फुट विचार ... ... एका कारखान्याचा कुढेपणा अनेकांस भोवला—टारिफ बोर्डाची उपेक्षा—आमूलाग्र सुधारणा झाली पाहिजे—एका वर्षानें मुदत वाढली—युरोपिअन राष्ट्रें व मागसलेले देश | ८० | ७ सहकार व ग्रामोद्धार... | ८५ |
| | | ८ मध्यवर्ती कायदेमंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश | ८५ |
| | | ९ मुंबईमध्यें कॅनरी काढण्याची योजना ... | ८६ |
| ४ सर पोचखनवाला ह्यांचा पण्यांतील कार्यक्रम ... | ८१ | १० अर्थाचें अभिनंदन ... | ८६ |
| | | ११ निवडक बाजारभाव ... | ८७ |



# अर्थ

बुधवार, ता. १२ फेब्रुवारी, १९३६


## बँक ऑफ महाराष्ट्र चालू झाली

गेल्या शनिवारीं बँक ऑफ महाराष्ट्र ह्या संस्थेचा, सर सोराबजी पोचखनवाला ह्यांचे हस्तें उद्घाटन समारंभ झाला. त्या प्रसंगीं, देशांत बँकिंगच्या धंद्याचा विस्तार कोणत्या तत्वावर होणें इष्ट आहे, ह्या संबंधानें महत्वाचे विधायक विचार पुढें मांडण्यांत आले, त्यांचें दिग्दर्शन येथें केलें असतां तें उपयुक्त होईल. ह्या मूलभूत धोरणाच्या बाबतींत बँकेचे अध्यक्ष, प्रो. काळे व सर सोराबजी ह्यांच्यामध्यें पूर्ण एकवाक्यता आहे, ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. (१) बँकिंगचा धंदा एका काळीं हिंदुस्थानांत उत्कर्षाच्या शिखरास जाऊन पोहोंचला होता, तो आतां परिस्थितीच्या भोंवऱ्यांत सांपडून खालावलेल्या अवस्थेंत असलेला दिसून येतो. (२) इतर राष्ट्रांच्या मानानें बँकिंगच्या बाबतींत हिंदुस्थान मागसलेला असून त्यांत प्रगति घडवून आणणें अगत्याचें आहे. (३) सहकारी संस्थांच्या मार्फत त्या दिशेनें चांगले प्रयत्न झाले असून त्यांत बरेंच यशहि आलें आहे; तथापि त्यांचें क्षेत्र मर्यादित असल्यानें आधुनिक पद्धतीच्या व्यापारी बँकांचा विस्तार करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे. (४) महाराष्ट्रांत दोनशें वर्षांमागेंहि सराफी धंदा किती विस्तृत प्रमाणावर आणि किफायतशीर तऱ्हेनें चालत असे ह्याची माहिती पुण्यांतल्या एका सराफाच्या १८५ वर्षांपूर्वीच्या वहीवरून प्रो. काळे ह्यांनीं आपल्या भाषणांत दिली आणि ह्या धंद्याचें आधुनिक स्वरूपांत पुनरुज्जीवन होण्याची आवश्यकता प्रतिपादली व (५) नव्या पद्धतीच्या बँकिंगचा सुव्यवस्थित प्रसार झाल्यावांचून हिंदुस्थानांत रिझर्व्ह बँक स्थापन झाली न झाली सारखेंच होणार आहे ही महत्वाची गोष्ट निदर्शनास आणिली. (६) महाराष्ट्राची अशी आजवर एकहि व्यापारी बँक अस्तित्वांत नव्हती आणि मुंबईमधील बँकांच्या शाखांकडून मराठी जिल्ह्यांची बँकिंगची तहान भागणें शक्य नव्हतें. अशा स्थितींत भासणारी उणीव दूर करण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्राच्या उत्पादकांनीं त्या संस्थेची स्थापना केली आणि ह्या रीतीनें हिंदी बँकिंगच्या साखळींत नसलेला दुवा जोडून दिला, ही स्पष्टीकरणात्मक हकीकत प्रो. काळे ह्यांनीं विवेदन केली.

सर सोराबजी व प्रो. काळे ह्यांच्या भाषणांत दोन विशेष महत्त्वाच्या मुद्यांसंबंधानें ऐकमत्य दिसून आलें ते, (७) मुंबईहून शाखांच्या मार्फत, तेथील बँकांनीं अंतर्गत प्रदेशांत व्यवहार करण्याच्या ऐवजी प्रादेशिक बँकिंग संस्थांनीं हा धंदा करण्याची आवश्यकता आणि (८) मागें अनेक बँका बुडाल्या, त्यांच्या हातून झालेल्या चुकांपासून नवीन संस्थांनीं उचित बोध घेण्याचें अगत्य, हे होत. मुंबई शहरांत स्थापन झालेल्या बँकांच्या हातून इतर प्रांतांच्या मानानें खुद्द आमच्याच इलाख्यांत बँकिंगचा प्रसार किती मर्यादित झालेला आहे, हें प्रो. काळे ह्यांनीं आंकडे देऊन सिद्ध केलें. मुंबईसारख्या शहरांत बँका व त्यांच्या शाखा ह्यांचा सुळसुळाट झाला असून प्रादेशिक बँकांनीं तालुक्यांत व खेड्यांत आपल्या कार्याचा फैलाव केला पाहिजे हें आपलें निश्चित मत सर सोराबजी यांनीं ठासून पुढें मांडलें. त्यांच्या सारख्या अनुभवी व नाणावलेल्या मुंबईच्या बँकरचा हा अभिप्राय सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखा आहे आणि तो बँक ऑफ महाराष्ट्राच्या चालकांस उत्तेजनकारक व मार्गदर्शक होण्यासारखा आहे. महाराष्ट्रांत नवीन मोठ्या व्यापारी बँकेची काय जरूर होती अशी शंका घेणारांस त्यांच्या भाषणांत अत्यंत समर्पक असें उत्तर मिळणार आहे. मागें महाराष्ट्रांतहि कित्येक बँका बुडाल्याकारणानें नवीन संस्था स्थापन होण्याबाबत लोकांचीं मनें साशंक असणें अगदीं स्वाभाविक आहे. तथापि, एकदा विस्तवानें हात भाजला म्हणून त्याच्याजवळ कधींहि जावयाचेंच नाहीं हें जसें वेडेपणाचें होईल तशीच, मागें गोंधळ झाले आणि अपयश आलें, एवढ्यासाठी बँकेच्या स्थापनेचा फिरून यत्न करावयाचा नाहीं, ही वृत्ति भेकडपणाची होईल. बँका बुडण्याचीं महत्त्वाचीं कारणें सर सोराबजी त्यांनीं विशद करून सांगितलीं आणि पुढच्यास ठेंच, मागचा शहाणा ह्या न्यायानें नवीन बँका काढणारांनीं कोणती सावधगिरी बाळगली पाहिजे ह्याचीहि स्पष्ट माहिती दिली. (९) महाराष्ट्रांत आधुनिक बँकिंगचा संघटित प्रसार होण्यास किती वाव आहे आणि त्यासंबंधांत आमच्या उणीवा व वैगुण्यें कोणतीं आहेत, ह्याचा निर्देश करून अनुकूल व आशाजनक अशा कोणत्या बाबी ह्या नवीन उपक्रमांत आहेत, ह्याचें विवेचन प्रो. काळे ह्यांनीं आपल्या भाषणांत केलें. बँकिंगच्या बाबतींत जनतेची सर्व प्रकारची सोय करावयाची, परंतु तसें करतांना सुरक्षिततेकडे विशेष लक्ष्य देऊन सावधगिरीनें पुढें पाऊल टाकावयाचें, हें बँक ऑफ महाराष्ट्राच्या चालकांचें ध्येय असल्याचें त्यांनीं जाहीर केलें.

सर सोराबजी पोचखनवाला यांच्यासारख्या कसलेल्या बँकरच्या हातून महाराष्ट्राच्या मध्यवर्ती व्यापारी बँकेचें उद्घाटन होऊन त्या संस्थेस त्यांचा पोक्त सल्ला व आशीर्वाद मिळाला, ही उत्साहवर्धक घटनाच होय. (१०) महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीस सध्या जोराची चालना मिळाली आहे, तिला या नवीन बँकेचें उत्कृष्ट सहाय होईल अशी आम्हांस उमेद आहे. सर सोराबजी ह्यांनीं केलेल्या सूचना ध्यानांत वागवून बँकेची चालकमंडळी आपल्या व्यवहारांचा गाडा हांकतील आणि त्यांस महाराष्ट्रीय जनतेची सहानुभूति आणि आश्रय हीं योग्य रीतीनें मिळतील, तर बँकेपुढें जें लोकसेवेचें उच्च ध्येय ठेवण्यांत आलें आहे, तें पण क्रमाक्रमानें तिच्याकडून गांठतां येईल. बँकिंगचा धंदा

अत्यंत उपयुक्त पण तितकाच नाजूक स्वरूपाचा आहे. त्यांत सावधगिरी, शिस्त व सचोटी ह्या गोष्टी अत्यंत महत्वाच्या असून लोकांची सहानुभूति व आश्रय ह्यांवर, तसेंच बँकेचे चालक आणि जनता ह्यांच्या पूर्ण परस्पर-सहकारितेवर नवीन संस्थेचें यश अवलंबून राहील. उद्घाटनसमारंभाचे प्रसंगीं झालेल्या भाषणांचें मनन होऊन त्यांपासून घेण्यासारखा बोध आहे तो सर्वांच्या मनांवर ठसेल तर बँक ऑफ महाराष्ट्र समाजाची उत्कृष्ट सेवा करूं शकेल आणि जनतेच्या आर्थिक उन्नतीस उत्तम सहाय करील.

# स्फुट विचार

## एका कारखान्याचा कुढेपणा अनेकांस भोंवला

हिंदी लोकरीच्या कापडाच्या धंद्याची चौकशी टारिफ बोर्डापुढें चालू असतांना ब्रिटिश इंडिया कॉर्पोरेशननें आपल्या उत्पादन-खर्चासंबंधीं आंकडे पुरविले नाहींत व त्या कारणानें हिंदी कारखानदारांस कसा अन्याय झाला, ह्याची माहिती 'अर्था'च्या २९ जानेवारीच्या अंकांत आलेली आहे. लोकरीच्या धंद्यांतील निम्मा हिस्सा सदरहु कारखानदारांचे हुकमतीखालीं आहे. त्यांची साक्ष घेऊन जरूर ती माहिती त्यांचेकडून घेणें अशक्य झाल्यामुळें टारिफ बोर्डाची चौकशी यथासांग होऊं शकली नाहीं व त्याच्या शिफारसींस सरकारकडून मान्यता मिळण्यास अडचण पडून त्याबद्दलचें प्रायश्चित्त लोकरीच्या इतर गिरणीवाल्यांस भोगावें लागलें आहे. कानपूर व इगर्टन मिल्स ह्यांच्या कुढेपणाच्या धोरणामुळें टारिफ बोर्डास आपल्या दौऱ्याचा कार्यक्रम बदलावा लागून कानपूरला जाणें रहीत करणें भाग पडलें. औद्योगिक संरक्षणासारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांची चौकशी करण्यासाठी सरकारनें नेमलेल्या तज्ज्ञांच्या कमिटीशीं कारखानदारांचें बेफिकीरीचें वर्तन होऊं लागल्यास हा एक थट्टेचा विषय होऊन बसणार, याचा पद्धतशीर विचार होण्याची खास वेळ आली आहे. इतर देशांतील टारिफ बोर्डाचें कार्यक्षेत्र व्यापक असतें व त्यांचे अधिकार विस्तृत असतात. हिंदी टारिफ बोर्डाच्या कामाचा व्याप अगोदर मर्यादित आणि आतां तो अधिकच संकुचित होऊं लागला असल्यानें त्यांत कांहीं राम उरला नाहीं, असें लोकमत बनणें अगदी स्वाभाविक आहे.

## टारिफ बोर्डाची उपेक्षा

टारिफ बोर्डाची उपेक्षा झाल्याचीं उदाहरणें वरचेवर कानीं येऊं लागलीं असून त्याची प्रतिष्ठा कमी होत आहे ह्यांत शंका नाहीं. इकडे, सरकारनेंहि बोर्डाच्या शिफारसी गुंडाळून ठेवून ह्या तज्ज्ञ कमिटीच्या सभासदांची मेहनत निष्फळ करून टाकल्याचीं उदाहरणेंहि घडलीं आहेत. फिस्कल कमिशनच्या शिफारसींना अनुसरून टारिफ बोर्डाची योजना करण्यांत आली, त्यावेळीं बोर्डाचे सभासद स्वतंत्र विचारानें व तज्ज्ञ या नात्यानें प्रत्येक प्रश्नाचा विचार करतील आणि त्यांची भूमिका न्यायाधिशांची राहील, अशी अपेक्षा होती. त्याप्रमाणें, सुरवातीचीं कांहीं वर्षें बोर्डाचें काम सुरळीत चाललें. तथापि, अलीकडे त्याच्या सभासदांच्या नेमणुकींसंबंधानेंहि वेळोवेळीं टीका ऐकूं येते हें विशेष आहे. कलकत्त्याच्या 'इंडियन फिनॅन्स' ह्या साप्ताहिकानें प्रस्तुत विषयासंबंधानें आपलें मत खालील कडक पण मोजक्या शब्दांत प्रदर्शित केलें आहे:—"टारिफ बोर्डाची पुनर्घटना लवकरच करण्यांत आली नाहीं, तर त्याचा विनाशकाल जवळ येऊन ठेपल्याप्रमाणेंच आहे. स्वतः सभासदांसहि आपलें खरें स्थान समजत नाहीं व किती मुदतीपर्यंत आपलें सभासदत्व टिकेल, ह्याबद्दल त्यांस कांहींच माहिती असत नाहीं. सरकार त्यांस मानीत नाहीं व कारखानदार त्यांस जुमानीत नाहींत. मान्यता व प्रतिष्ठा नांवाचीच, सत्तेचा लेशहि नाहीं, नाममात्र अधिकार, नवीन उपक्रम करण्याबाबत निर्बंध, आपलें सभासदत्व किती काळ टिकेल ह्याची अनिश्चितता व भविष्यकाळाविषयीं साशंकता, इत्यादि कारणांमुळें टारिफ बोर्ड निरर्थक बनून कित्येक वेळीं उपहासास पात्र झालें आहे."

## आमूलाग्र सुधारणा झाली पाहिजे

टारिफ बोर्डाच्या शिफारसी अमलांत आणाव्या कीं नाहीं व त्यांस मूर्त स्वरूप कसें द्यावें हें ठरविण्याचें काम वस्तुतः कायदेमंडळाचें आहे. परंतु आज बोर्डाच्या घटनेपासून तो त्याचा रिपोर्ट प्रसिद्ध करण्यापर्यंत सर्वत्र गोष्टी सरकार आपल्या मर्जीप्रमाणें करीत असल्यानें तज्ज्ञांचा सल्ला व लोकमत ह्यांस मुळींच मान मिळेनासा झाला आहे. टारिफ बोर्डाच्या सभासदांच्या नेमणुका तात्पुरत्या असून त्या सरकारनें आपल्या इच्छेप्रमाणें करावयाच्या, संरक्षण मिळण्याबाबत आलेला कोणत्या धंद्यासंबंधाचा अर्ज बोर्डाकडे पाठवावयाचा हें पूर्वचौकशी करून सरकारनें ठरवावयाचें, बोर्डाचा रिपोर्ट केव्हां प्रसिद्ध करावयाचा इत्यादि निर्णय सरकारचा, त्यांतल्या पूर्ण माहितीवर आधारलेल्या शिफारसींवर त्यांनींच अभिप्राय व्यक्त करावयाचा व त्यांची वासलात लावावयाची, असा प्रकार अलीकडे सररहा चालला आहे. हिंदुस्थान सरकारचे सध्याचे फडनवीस, सर जेम्स ग्रिग, ह्यांस औद्योगिक संरक्षणाचें वावडें असल्यानें त्यांच्या हातून सद्यःस्थितींत सुधारणा होण्याची लोकांस आशा वाटत नाहीं. देशी उद्योगधंद्यांच्या उन्नतीप्रीत्यर्थ गेल्या दहा वर्षांत कांहीं विधायक कामगिरी झाली असेल तर ती टारिफ बोर्डाची स्थापना व त्यानें केलेल्या औद्योगिक संरक्षणासंबंधाच्या शिफारसी ही होय. ह्या कार्याचा विस्तार होण्याऐवजी त्याची पिछेहाट होणें हें देशाचें दुर्दैवच समजलें पाहिजे. 'इंडियन फिनॅन्स'नें सुचविल्याप्रमाणें हा सबंद प्रश्न धसास लावला जाणें अगत्याचें असून, राष्ट्रहिताच्या दृष्टीनें टारिफ बोर्डासंबंधानें आमूलाग्र सुधारणा व्हावयास पाहिजे. औद्योगिक संरक्षणाचें धोरण 'व्यावहारिक राजकारणा'च्या कक्षेंत लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें प्रथम आणलें. त्याच कायदेमंडळावर, ह्या धोरणास उचलून धरून त्याचा विकास करण्याची जबाबदारी आज येऊन पडली आहे.

## एक वर्षानें मुदत वाढली

टारिफ बोर्डाची मुदत येत्या ३१ मार्चपासून एक वर्ष वाढवण्याचें सरकारनें ठरविलें असल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. तिच्यावरून असें दिसून येईल कीं बोर्डाचें आयुष्य बारमासी असून दर वेळेस तितक्याच मुदतीनें तें वाढवलें जातें. बोर्ड ही कांहीं स्थायी संस्था नाहीं. तिचें काम सतत चालेल अशी सरकारची अपेक्षा नाहीं. देशी धंद्यांस सहाय देण्याचें धोरण कायम टिकेल आणि सहायास पात्र असलेल्या धंद्यांचे अर्ज सारखे येत रहातील असें सरकारास वाटत नसावें. बोर्ड अस्तित्वांत राहिलें असतां त्याकडे आपली संरक्षणाबाबतची मागणी, चौकशी व व शिफारसी होण्यासाठी सोंपवावी, अशी सरकारास विनंति करण्याची स्फूर्ति धंदेवाल्यांस साहजिकपणें होणार. औद्योगिक संरक्षणाचें धोरण ज्यांस मान्य नाहीं अशा अधिकाऱ्यांस, ह्या

प्रकारची परिस्थिति अर्थातच पसंत पडत नाहीं. औद्योगिक संरक्षण व संरक्षक जकाती ह्यांचा हिंदुस्थानांत बारा वर्षांपूर्वी पायंडा पडला ही गोष्टच कित्येकांस रुचत नाहीं. वास्तविकरीत्या स्वतंत्र विचाराचे व माहितगार तज्ज्ञ ज्याचे सभासद आहेत, असा टारिफ बोर्ड स्थायी असणें जरूर आहे. आयात-निर्गत जकाती व व्यापाराची घडामोड ह्यांवर सतत नजर ठेवून उद्योगधंद्यांस संरक्षण देण्याचे बाबतींत चौकशी व रिपोर्ट करण्याचें काम त्याकडे सोंपवण्यांत आलें पाहिजे. जकाती कमीज्यास्त करणें अथवा नव्यानेंच बसवणें ह्याविषयींचा अखेरचा निर्णय करण्याची सत्ता व जबाबदारी अर्थातच कायदेमंडळाची आहे. तथापि, व्यापार व उद्योगधंदे ह्यांसंबंधांतली माहिती गोळा करून तद्विषयक सूचना व शिफारशी करण्याचें काम टारिफ बोर्डासारख्या तज्ज्ञमंडळावरच टाकलें पाहिजे. फेडरल राज्यघटना लवकरच अस्तित्वांत येणार असल्या कारणानें तिच्याशीं निकट संबंध असलेल्या ह्या प्रश्नाचा निर्णय आज करणें इष्ट नाहीं, ह्या विचारसरणीचा आश्रय सरकार घेईल आणि म्हणूनच टारिफ बोर्डाची आणखी एकच वर्ष मुदतीपुरती नेमणूक करण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. लोकरीच्या गिरण्यांविषयींची चौकशी पुन्हां व्हावयाची असून इतर धंद्यांचे संरक्षणाबद्दलचे अर्जहि त्याकडे पाठवावे लागतील. कापसाच्या कापडाच्या धंद्याबाबत चौकशी करण्यासाठी एक खास टारिफ बोर्ड नेमलें होतें, त्याचा रिपोर्ट चालू महिना अखेर तयार होईल, असें म्हणतात.

---

### युरोपियन राष्ट्रें व मागसलेले देश

युद्धामध्यें विजयी झालेल्या राष्ट्रांस आपण जेते आहोंत, हें दर्शविणारें विजयचिन्ह धारण करण्याची आकांक्षा असते; त्याखेरीज त्यांचें समाधान होत नाहीं. गेल्या महायुद्धानंतर दोस्त राष्ट्रांची हीच परिस्थिति झाली. ह्या उलट लहानसहान राष्ट्रांसहि आपलें राजकीय स्वातंत्र्य व राज्यशासनपद्धति स्वतःच्या इच्छेप्रमाणें निश्चित करण्याचा अधिकार असला पाहिजे, ह्या तत्वाचा महायुद्धाचे वेळीं पुरस्कार करण्यांत आला होता. अमेरिकेनेंहि ह्याच तत्वास अनुसरून दोस्तराष्ट्रांस सहाय केलें होतें. ह्या कारणानें काबीज केलेले देश स्वतःच्या राज्यांत सामील करून घेणें जेत्या राष्ट्रांस योग्य दिसलें नसतें, हें उघड आहे. युद्धांत पाडाव झालेल्या देशांची व्यवस्था ह्या अडचणीच्या परिस्थितींत कशी करावयाची हा नाजुक प्रश्न उद्भवला असतां, त्याचा निर्णय राष्ट्रसंघानें 'मँडेट'च्या म्हणजे स्वतःच्या देखरेखीखालीं सदरहु प्रदेशांची वांटणी जेत्या राष्ट्रांमध्यें करून लावलेला दिसून येतो. हे प्रदेश वाटून घेतांना, अर्थातच, बलाढ्य राष्ट्रांनीं आपल्या शिरावर जास्त जबाबदारी घेतली. तथापि, पुढें इतर राष्ट्रांच्या डोळ्यांवर ही गोष्ट येऊन हिट्लर आणि मुसोलिनी हे आपल्या सामर्थ्यास अनुरुप असा मागसलेल्या देशांच्या वाटणीचा हिस्सा उघडपणें मागूं लागले आहेत. राष्ट्रसंघानें नेमलेल्या दहा तज्ज्ञांच्या कमिटीपुढें, ह्या मागसलेल्या देशांची आपण व्यवस्था कशी पाहिली, त्यांत सुधारणा कोणत्या केल्या, इत्यादि माहिती ह्या जेत्या राष्ट्रांस सादर करावी लागते. मँडेट्स कमिटीला अहवाल ऐकण्यापलीकडे किंवा राष्ट्रसंघाचे कानावर आपलें म्हणणें घालण्यापलीकडे अधिकार नसल्यानें तिचा वचक ह्या राष्ट्रांवर पडत नाहीं. हिट्लरनें नुकत्याच केलेल्या घोषणेमुळें वसाहती व मँडेटमधले प्रदेश ह्यांचेकडे पुनः सर्वांचें लक्ष वेधलें गेलें आहे. एकोणिसावे शतकाचे उत्तरार्धांत वसाहती मिळविण्यासाठी जशी युरोपियन राष्ट्रांत चढाओढ लागून राहिली होती, त्याच प्रकारची चढाओढ या वसाहती कायम राखणारे व गमावलेल्या पुनः मिळविणारे देश, ह्यांमध्यें पुनरपि लागण्याचा संभव आहे. युरोपियन श्वेतवर्णीयांचे करितांच जगांतील संपत्ति राखून ठेवली पाहिजे, ह्या तत्त्वाचा पुरस्कार जर्मनीसारखीं राष्ट्रें करूं लागलीं आहेत, ही गोष्ट जगांत खळबळ उडवून देणारी आहे, ह्यांत संशय नाहीं.

---

## सर सोराबजी पोचखनवाला ह्यांचा पुण्यांतील कार्यक्रम

### मराठा चेंबरला भेट

गेल्या शनिवारीं दुपारीं सर सोराबजी पोचखनवाला यांचा येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या कार्यकारी मंडळानें कॉमनवेल्थ विमा कंपनीच्या जागेंत सन्मान केला. श्री. कामत ह्यांच्या स्वागतपर भाषणास उत्तर देतांना त्यांनीं अशा चेंबरची महाराष्ट्रास जरूर असून ह्या संस्थेस स्थानिक उपयुक्ततेचे अनेक प्रश्न सोडवतां येतील असें सांगून मुंबईच्या इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सला ती जोडून घ्यावी, ह्या आशयाची सूचना केली. मुंबईच्या इंडिअन चेंबरचा अनुभव व सल्ला ह्यांचा फायदा मराठा चेंबरनें अवश्य घ्यावा आणि महाराष्ट्रीय जनतेच्या व्यापारी आणि औद्योगिक गरजांकडे बारीक लक्ष्य पुरवावें असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला. प्रो. काळे यांनीं सर सोराबजी ह्यांचे आभार मानले व चेंबरच्या सभासदांची त्यांस ओळख करून दिली.

---

### इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या पुण्याच्या शाखेंत भाषण

बँक ऑफ महाराष्ट्राचा उद्घाटनसमारंभ समाप्त झाल्यावर गोखलेहॉलच्या वरच्या दिवाणखान्यांत सर सोराबजी यांचा इंडियन इनस्टिट्यूट ऑफ बँकर्सची पुण्याची शाखा आहे, तिच्या वतीनें सन्मान समारंभ करण्यांत आला. शाखेच्या कमिटीचे अध्यक्ष, प्रो. काळे, ह्यांनीं पाहुण्यांचें स्वागत करून तिचे उद्देश व कार्यक्रम ह्यांसंबंधानें माहिती सांगितली. शाखेचे साठ-सत्तर सभासद हजर होते व त्यांमध्यें स्थानिक बँकांशीं संबंध असलेल्या अधिकाऱ्यांचा व कामगारांचा मोठा भरणा होता. सर सोराबजी ह्यांनीं बँकेंत काम करणाऱ्या नोकरवर्गानें बँकिंगच्या धंद्याचा तात्त्विक दृष्टीनें अभ्यास आणि त्या बाबतचीं नियतकालिकें वाचण्याचा क्रम सतत चालू ठेवावा असा उपदेश केला. आपणास असलेल्या अभ्यासापासून वैयक्तिक काय फायदा आहे अशी साशंक व बेफिकीरपणाची वृत्ति असूं नये आणि माहितगार व शिकाऊ माणसास आपल्या नोकरींत वर चढण्याची संधी आज नाहीं उद्यां मिळण्याची आशा असते; तसेंच, बँकेच्या एका खात्यांतून दुसऱ्या खात्यांत नोकरांस पाठवण्याचा प्रघात अलीकडे पडला आहे व धंद्याचें तात्त्विक ज्ञान मिळण्याच्या चांगल्या सोयी झाल्या आहेत, इत्यादि व्यावहारिक स्वरूपाची व स्वानुभवाची माहिती देऊन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या पुण्याच्या शाखेंत चाललेल्या कामाबद्दल तिचें त्यांनीं अभिनंदन केलें. अध्यक्षांच्या सूचनेवरून, पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. चितळे ह्यांनीं एकदोन मार्मिक प्रश्न विचारले, त्यांस सर साराबजी ह्यांनीं उत्तरें दिल्यावर प्रो. काळे ह्यांनीं समारोपादाखल भाषण केलें व समारंभ समाप्त झाला.

---

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

## बँकेचें उद्घाटन होऊन व्यवहारांस सुरवात झाली

[ शनिवार ता. ८ फेब्रुवारी रोजीं 'दि बँक ऑफ महाराष्ट्र'चा उद्घाटन समारंभ सर सोराबजी पोचखनवाला ह्यांच्या हस्तें गोखले हॉल, पुणें, येथें मोठ्या थाटानें व उत्साहानें पार पडला. त्यावेळीं, बँकेचे चेअरमन प्रोफेसर वा. गो. काळे व सर सोराबजी पोचखनवाला, ह्यांनीं केलेल्या भाषणांतील महत्त्वाचे भाग येथें दिले आहेत. ]

### प्रो. काळे यांचें भाषण

समारंभाचे अध्यक्ष, सर सोराबजी पोचखनवाला, ह्यांनीं बँकेचें उद्घाटन करण्याचें मान्य केल्याबद्दल त्यांचे आभार मानून, प्रो. काळे म्हणाले:—

#### नवीन बँकेचें उद्दिष्ट

"आमच्या देशांतील पतीचे व्यवहार करणाऱ्या संस्थांसंबंधींच्या उणीवा दूर करून बदलत्या आर्थिक परिस्थितीच्या गरजा भागवण्यास पुरी पडेल अशी बँकिंगच्या संस्थांची जोपासना करण्याची आवश्यकता कोठें जर विशेष असेल तर ती महाराष्ट्रांतच आहे. पतीच्या व्यवहारांत एकसूत्रीपणा आणण्याकरतां जें कार्य होणें आवश्यक आहे तें घडवून आणण्यास सहाय करण्याचा बँक ऑफ महाराष्ट्राच्या उत्पादकांचा मनोदय आहे. मराठी प्रदेशांतील लोकांजवळील शिलकी पैशाचा उपयोग याच भागांतील व्यापारउदिमाच्या वाढीकरतां व येथील लोकांची आर्थिक परिस्थिति सुधारण्याकरतां करण्याच्या उद्देशानें या बँकेचें संवर्धन करण्याची त्यांची मनीषा आहे. हें आमचें उद्दिष्ट पार पाडण्याच्या कामीं मुंबईतील पुढारलेल्या बँकांची सहानुभूति व सहाय्य मिळेल अशी आम्हांस आशा आहे.

#### महाराष्ट्रीय सराफांची अमूल्य कामगिरी

हिंदुस्थानांतील इतर प्रांतांप्रमाणेंच महाराष्ट्रांतहि बँकिंगचा व्यवहार शतकानुशतकें विस्तृत प्रमाणावर फायदेशीर रीतीनें चालत आला आहे व आमच्या इकडील सराफ इतर ठिकाणच्या त्यांच्या व्यवसायबंधूंप्रमाणेंच व्यापार-व्यवहाराला लागणारा पैसा पुरविण्याचें कार्य करीत आले आहेत. महाराष्ट्रांतील सराफ-सावकार अनेक जातींचे आहेत व त्यांत, परप्रान्तांतून इकडे येऊन कायम वास्तव्य ज्यांनीं केलें आहे अशा जातींतील लोकांचा भरणा आहे. आमच्याकडील सराफ-सावकारांनीं व्यापार-धंद्याला अमूल्य मदत केलेली आहे. येथील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या परवानगीनें, त्यांच्याकडे दीक्षित पटवर्धन, ह्या मोठ्या प्रमाणावर पैशाअडक्याचा व्यवहार करीत असलेल्या इतिहासकालीन सराफाच्या आजच्या वंशजांनीं दिलेल्या हिशेबाच्या वह्या पाहण्याची मला नुकतीच संधि मिळाली. यांतील जुन्यांत जुनी वही शके १६७२ अगर इ. स. १७५० मधील म्हणजे एकशें पंचायशीं वर्षांपूर्वींची आहे. ही सराफी पेढी हुंड्या कटमितीनें विकत घेणें, देणें व वटवणें, सरकारला व संस्थानिकांना रकमा कर्जाऊ देणें, ठेवी ठेवणें, सोन्या-चांदीचा व्यवहार करणें व नाणीं बदलून देणें वगैरे हरतऱ्हेचे व्यवहार करीत असे. या पेढीच्या हिशेबांवरून असा व्यवसाय करणारे सराफ लोक ह्या भागांत विखुरलेले होते व इतर प्रांतांप्रमाणेंच महाराष्ट्रांतहि ही जुनी सराफी पद्धत मोडकळल्यामुळें जीर्ण स्वरूपांत आजतागायत चालू आहे. परंतु बदलत्या कालौघाबरोबर जुन्या पद्धतीच्या सराफांस आपला पूर्वींचा दर्जा कायम ठेवण्यासाठी व जीवन-कलहांत टिकून राहण्यासाठी नवीन पद्धतीचा अंगिकार करण्याची आतां आवश्यकता वाटूं लागली आहे.

#### सहकारी पेढ्या आणि आधुनिक व्यापारी बँका

खेड्यापाड्यांतूनहि सहकारी पतपेढ्या निघाल्यामुळें सर्व साधारण लोकांना पैशांच्या आधुनिक पद्धतीच्या व्यवहाराची बरीच माहिती झाली आहे. काटकसर, शिलकी ठेवी, भांडवलाची सांठवण, चेक, ताळेबंद, कर्ज-रोख्यांत पैसा गुंतविणें, डिव्हिडंड, मालाच्या तारणावर व वैयक्तिक पतीवर कर्ज देणें-घेणें वगैरे संबंधींची माहिती खेड्यापाड्यांतहि सहकारी पतपेढ्यांमुळें झाली आहे; आणि शहरांतून आधुनिक पद्धतीच्या बँकिंगच्या व्यवहारांस तर विशेष चालना मिळाली आहे. सहकारी पतपेढ्यांचें कार्यक्षेत्र मर्यादित असलें तरी त्यांनीं आपल्या यशस्वी व्यवहारांनीं आधुनिक पद्धतीच्या व्यापारी बँकिंगचा धंदा मोठ्या प्रमाणावर करणाऱ्या संस्थेची उपयुक्तता व इष्टता लोकांस चांगलीच पटवून दिली आहे. देशी सराफ-सावकारांचा लोकांच्या बदलत्या गरजा भागविण्याकडे हळुहळू कां होईना परंतु निश्चित वळलेला कल ही गोष्टहि पतीचे व्यवहार संघटित करण्यास व त्यांत सुधारणा घडवून आणण्यास अनुकूल आहे.

#### मागसलेला मुंबई इलाखा व महाराष्ट्रीय बँकिंगच्या संघटनेची आवश्यकता

पतीचे व्यवहार वाढत्या प्रमाणांत होण्यास महाराष्ट्रांत भरपूर वाव असून त्यासंबंधाची लोकांची निकडीची मागणी आहे व त्याबरोबरच इतस्ततः विखुरलेलें परंतु योग्य कामीं लावण्यासारखें रिकामें पडलेलें भांडवलहि आहे, या गोष्टींबद्दल आतां दुमत राहिलेलें नाहीं. हें रिकामें भांडवल पद्धतशीर रीतीनें गोळा करून एखादी बँक योग्य कामीं लावील तर ती जनतेची मोठीच सेवा करील. सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे श्री. दिवाणजी यांनीं 'बँकांच्या शाखा' या विषयावर एक प्रबंध प्रसिद्ध केला आहे, त्यास मीं प्रस्तावना लिहिली आहे. सदर पुस्तकांत श्री. दिवाणजी यांनीं असें निदर्शनास आणलें आहे कीं, औद्योगिक, व्यापारी व बँकिंगच्या संस्था स्थापन करण्यांत मुंबईनें पुढाकार घेतला आहे व मुंबईतील बँकांनीं परप्रांतांत शाखा उघडल्या आहेत, तरी स्वतःच्या इलाख्यांत शाखा उघडण्याकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें आहे.

#### बँकिंगच्या विस्ताराविषयीं मागणी अपूरित राहिली होती

बँकिंगच्या व्यवसायाचे बाबतींत मागें पडलेल्या महाराष्ट्रांत बँकिंगच्या सोयींची वाढ होण्याची व त्यांतील पडून राहिलेली आर्थिक साधनसंपत्ती नीट उपयोगांत येण्याची तीव्रतर जरूरी भासत आहे. मराठी जिल्ह्यांत महाराष्ट्रीय अशी एकहि मोठी बँक आज अस्तित्वांत नाहीं आणि असल्या संस्थेची जागा मुंबईच्या बँकांच्या शाखांनीं भरून निघणें अशक्य आहे. शेतीच्या उत्पन्नाच्या व्यापारासाठी लागणाऱ्या पैशाकरतां, सहकारी शहरी बँकांकरतां व इकडील संस्थानांतून समाईक भांडवलाच्या बँकांकरतां दिवसेंदिवस वाढत चाललेल्या मागणीवरून ही गोष्ट चांगलीच निदर्शनास आली आहे. शहरें व जानपद प्रदेश ह्यांची व्यापाराची साखळी

जोडण्याचें काम अगत्याचें असून तें हातीं घेण्याचा आमच्या बँकेचा उद्देश आहे.

**पुढच्यास ठेच, मागचा शहाणा**

स्थैर्य व सुरक्षितता यांवर बँकिंग व्यवसायाचें यश अवलंबून असतें. बँका काढण्याच्या बाबतींतील उत्साहातिरेकामुळें या दोन मूलभूत गोष्टींकडे दुर्लक्ष केलें जाण्याचा जसा संभव आहे त्याप्रमाणें पूर्वीं बँकांच्या बाबतींत आलेल्या अपयशाच्या आठवणीमुळें पुन: बँकिंगच्या व्यवसायाकडे फिरकूं नये असा भेकडपणा व बेफिकिरी उत्पन्न होण्यांतहि धोका आहे. वस्तुतः व्यापार-परिस्थितींत सुधारणा होऊं लागतांच त्याचा पुरेपूर फायदा स्वतःच्या पदरांत पाडून घेण्याच्या दृष्टीनें सध्याचा काळ नवीन बँक काढण्याला विशेष अनुकूल आहे. बँक ऑफ महाराष्ट्राच्या संस्थापकांना चालू परिस्थितींतील अनुकूलता व मर्यादा या दोहोंचीहि जाणीव असून त्यांनीं हळूहळू परंतु निश्चितपणें पुढें पाऊल टाकण्याचें ठरविलें आहे. परिस्थितीची शक्यता व लोकांच्या गरजा विचारांत घेऊन आम्ही आमचा व्याप वाढवूं व जरूरीप्रमाणें महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेरहि शाखा उघडून वा अन्य तऱ्हेनें आम्हीं आमचे संबंध जोडूं. व्यापारीवर्गाच्या सहकार्यानें व जनतेच्या सक्रिय सहानुभूतीनें लवकरच इच्छित यश संपादन करण्याची आम्हांस उमेद वाटत आहे.

**आभार प्रदर्शन आणि सहायाची जनतेस विनंति**

महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीला शक्य त्या सर्व विधायक मार्गांनीं सहाय करण्याच्या उद्देशानें स्थापन झालेल्या पुणें येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज या संस्थेनें ह्या बँकेची कल्पना काढली, बँक काढण्याच्या शक्याशक्यतेचा विचार केला, ऋणानुबंधी मंडळींची बँकेच्या योजनेला सहानुभूति मिळविली व बँक-स्थापनेकरतां ज्या ज्या प्रकारची पूर्व तयारी करावी लागते ती ती सर्व केली. चेंबरचे त्यांनीं केलेल्या कार्याबद्दल या प्रसंगानें बँकेच्या संचालकमंडळाच्या वतीनें मी मनःपूर्वक आभार मानतों. आजपर्यंत या बँकेच्या योजनेस जनतेकडून चांगला पाठिंबा मिळाला आहे, तो याहूनहि वाढत्या प्रमाणांत पुढें मिळेल अशी मी आशा करतों.”

---

## सर सोराबजी पोचखनवाला यांचें भाषण

**सराफांचा उज्ज्वल इतिहास व प्रस्तुतची अवनति**

‘दि बँक ऑफ महाराष्ट्र’च्या उद्घाटन समारंभांत भाग घेण्याची संधि मिळाली ह्याबद्दल मला अतिशय आनंद होत आहे. पाश्चिमात्य देशांतील लोकांस बँकिंगचा श्रीगणेशा देखील येत नव्हता, अशा वेळीं हिंदी बँकिंगचा धंदा प्रगतीच्या उच्च स्थानीं विराजमान झाला होता, परंतु आज तो अत्यंत मागसलेला आहे, हा योगायोग विचित्र आहे. श्रॉफ व सावकार ह्यांचे कार्याबद्दल कित्येक वेळां अनुदार शब्द ऐकूं येतात. तथापि प्रो. काळे ह्यांनीं दाखवून दिल्याप्रमाणें त्यांनीं आजवर केलेली व सध्या ते करीत असलेली कामगिरी विसरून चालणार नाहीं. केवळ बँकिंगचा धंदा फायदेशीर न राहिल्यानें ते लोक सराफीबरोबर व्यापारहि करूं लागले. ह्या कारणानें, स्वतःचें भांडवल आणि दुसऱ्यानें ठेव म्हणून ठेवलेला पैसा ह्या दोहोंचा विनियोग व्यापारासाठीं करण्याचा मोह त्यांस आवरणें कठीण झालें.ह्या तऱ्हेच्या व्यवहारांचा परिणाम हळूहळू त्यांच्या सामर्थ्यावर अनिष्ट असाच झाला. सराफांनीं मागें उत्कृष्ट कामगिरी केली असली, तरी सध्याच्या बदललेल्या काळांत शास्त्रशुद्ध व अभिनव पद्धतीच्या बँकिंग सेरीज—जॉइंट स्टॉक व्यापारी बँकांसेरीज—भागणार नाहीं, हें विसरतां कामा नये. ह्या बाबतींत विशेषतः हिंदुस्थान फार मागसलेला आहे. हिंदुस्थानानें बँकिंगच्या क्षेत्रांतील आपलें स्थान पुनः मिळवावें व त्यानें आधुनिक काळांतील बँकिंगच्या प्रगतीच्या मागें राहूं नये, ह्याकरतां सर्वांनीं योग्य मार्ग शोधून काढला पाहिजे.

**दि बँक ऑफ महाराष्ट्राची लोकसेवा व भावी कार्याची दिशा**

ह्या दृष्टीनें पहातां, ‘दि बँक ऑफ महाराष्ट्र’ सारख्या बँकिंग संस्थेची स्थापना, ही राष्ट्रसेवाच—गाजावाजा न करतां केलेली सेवा—समजली पाहिजे.

‘दि बँक ऑफ महाराष्ट्र’ च्या पद्धतीच्या प्रादेशिक बँका, हिंदी बँकिंगच्या प्रगतीस अत्यावश्यक आहेत, असें माझें पहिल्यापासून मत आहे; कारण ह्या तऱ्हेच्या बँकाच बँकिंगची संवय समाजास लावूं शकतील व आपला देश व इतर देश ह्यांमधील ह्या संबंधांतील तफावत त्या दूर करतील, अशी माझी खात्री आहे. कांहीं वर्षांपूर्वीच्या मानानें अलीकडे हिंदी बँकिंगची प्रगति बरीच शीघ्र झाली आहे, परंतु त्यांत योग्य मार्गदर्शकत्वाचा अभाव दिसून येतो, हें दुर्दैव होय. बँकिंगचें क्षेत्र ठराविक चाकोरीच्या बाहेर गेलेलें नाहीं व खेड्यापाड्यांत जेथें त्याची जरूरी ज्यास्त भासते तेथें त्याचा प्रवेश न होतां बँकांनीं-शहराबाहेर आपलें क्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. खेड्यापाड्यांतील लोकांस काटकसर व बचत ह्यांची संवय लावण्याच्या आवश्यकतेकडे आजपर्यंत जरूर तेवढें लक्ष देण्यांत आलेलें नाहीं,ही जशी खेदाची तशीच आश्चर्याची गोष्ट आहे. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कमी करण्याचा व त्यांस बँकिंगची संवय लावण्याचा शिकस्तीचा प्रयत्न आज कित्येक वर्षें सहकारी चळवळ करीत आली आहे, परंतु ह्या चळवळीची प्रगति सर्व प्रांतांत सारखी झालेली नाहीं, व जेथें ती थोडीफार झाली आहे, तेथें सुद्धा जरूरीच्या मानानें तिचा प्रसार अत्यल्प झालेला आहे. प्रो. काळे ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें व्यापारी संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यांस खेड्यांतील लोकांची सेवा करण्यास अमर्याद वाव आहे.

**मुंबई शहरांतल्या बँकांपेक्षां स्थानिक बँका अधिक उपयुक्त**

आपल्या रहिवाशांच्या विशिष्ट गरजा भागवणारी अशी बँक हिंदुस्थानांतील हजारों खेड्यांपैकीं प्रत्येक खेड्याच्या वांट्यास ज्या दिवशीं येईल, तो दिवस मोठा भाग्याचा समजला पाहिजे. निरक्षरता व जुन्यास चिकटून बसण्याची प्रवृत्ति ह्या खेडेगांवांच्या प्रगतीच्या मार्गांतील दोन मोठ्या अडचणी आहेत. प्रत्येक खेडेगांवीं नाहीं, तरी निदान प्रत्येक तालुक्याच्या गांवीं एक बँक असण्यास अडचण येऊं नये. अशा बँकांनीं आजूबाजूच्या प्रदेशांतील लोकांस बँकिंगची संवय लावण्याचा प्रयत्न करणें अगत्याचें आहे. सदरहू बँकांचे चालक त्या विशिष्ट ठिकाणचेच असणें इष्ट आहे. इलाख्याची राजधानी किंवा शेकडों मैलांवरील इतर शहरें येथें मध्यवर्ती कचेरी असलेल्या बँकांच्या हातून हें काम नीट पार पडणार नाहीं, कारण त्यांच्या चालकांस स्थानिक लोकां-इतकें विशिष्ट परिस्थितीचें ज्ञान असणें शक्य नाहीं, व तीबद्दल सहानुभूतिहि कमीच वाटणार, हें उघड आहे.

**खेडेगांवांपर्यंत बँकिंगचे लोण पोंचवा**

बँकिंगच्या कार्याच्या केवळ प्रांतिक मर्यादा वाढण्यापेक्षां, त्याचीं मुळें खोल रुजावींत, असें माझें ठाम मत आहे. मुंबई, कलकत्ता, इत्यादिसारख्या शहरांतून ज्यास्त ‘शहरी’ बँका किंवा

त्यांच्या शाखा काढण्याची आज आवश्यकता नाहीं; शेतकऱ्यांस बचत करण्याची संवय लावण्याचा यत्न करणाऱ्या व घरगुती धंद्यांस उत्तेजन देणाऱ्या 'खेडेगांवीं' बँकाची जरूरी आहे. शहरांतून आतां बँका पुरेशा झाल्या आहेत, इतकेंच नव्हे, तर त्यांची संख्या वाजवीपेक्षां ज्यास्त झाली आहे.

### सावधगिरीची सूचना

खेडेगांवांतील लोकांची गरज अत्यंत निकडीची असूनहि आजपर्यंत तिकडे दुर्लक्ष्य करण्यांत आलें. आतां बँकांनीं अंतर्गत प्रदेशाकडे लक्ष्य पुरवून त्यांत प्रवेश करावा व खेडुतांच्या द्रव्याचा संचय करून त्यांच्या सर्व तऱ्हेच्या आर्थिक गरजा भागवाव्या. तालुकानिहाय बँकांची स्थापना करण्यांत यावी व ह्या बँकांनीं आपल्या भौगोलिक हद्दीमध्यें कार्य करावें; बाहेर शाखा काढण्याच्या उद्योगांत पडूं नये. त्या सर्व एकमेकांपासून स्वतंत्र अशा असाव्यात व त्यांच्या व्यवस्थापक मंडळाचे सभासद सर्व स्थानिक लोकच असावेत. त्यांचा हल्लीं अस्तित्वांत असलेल्या शहरी बँकांशीं शाखा ह्या नात्यानें संबंध नसावा; जरूर त्या बाबतींत मदतीसाठी, सल्ल्यासाठी व मार्गदर्शनासाठी मात्र त्यांचें सहकार्य अवश्य घ्यावें.

'दि बँक ऑफ महाराष्ट्र' आतां आपल्या व्यवहारास जोरानें सुरवात करणार आहे, तेव्हां कोणत्या गोष्टींबद्दल तिनें विशेष काळजी घेतली पाहिजे, ह्याबद्दल दोन शब्द सांगणें जरूर आहे. सध्याच्या व पुढें निघणाऱ्या बँकांनीं (१) अप्रामाणिक मार्गाचें अवलंबन व (२) सट्टेबाजी ह्या दोन धोक्यांच्या मार्गापासून दूर रहाणें जरूर आहे; हींच दोन कारणें बँकांच्या नाशास मार्गे कारणीभूत झालेलीं आहेत. बँकिंग व सामान्य व्यापार ह्या दोघांचें मिश्रण करण्याची प्रवृत्ति, हें १९१३–१४ च्या गडबडीच्या काळांत बँका बुडण्याचें आणखी एक बलवत्तर कारण होतें. बँका म्हणवून घेणाऱ्या कित्येक संस्थांनीं गाड्या तयार करणें व ऋण–शुश्रुषा ह्यांचा अंतर्भाव बँकिंगच्या व्यवहारांतच केला होता! कित्येक हिंदी बँकांचे म्यानेजर व डायरेक्टर्स स्वार्थ बुद्धीनें स्वतःचे खिसे गरम करण्यांतच गर्क असत; आणि ठेवीदार व भागीदार ह्यांच्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष्य होत असे. त्याचप्रमाणें, डायरेक्टरांमध्यें परस्परांत वितुष्ट आणि डायरेक्टर व म्यानेजर ह्यांचेमध्यें होणारी अनिष्ट धुसफुसहि बँकांच्या यशाचे मार्गांत आड आली.

'दि बँक ऑफ महाराष्ट्र' चे अधिकारी आपली समाजहितसंबंधाची जबाबदारी पूर्णपणें ओळखतात, ह्याबद्दल माझी खात्री आहे व आतांच निर्दिष्ट केलेल्या अडचणी ते टाळतील ह्याबद्दल मला शंका नाहीं. धोक्याचीं स्थळें ह्या प्रसंगीं दाखवून देण्यांत माझा उद्देश इतकाच आहे कीं, तीं माहीत असलीं म्हणजे मनुष्य त्यांचा प्रतिकार करण्यास सज्ज रहातो. म्हणून, गतकालच्या बोधप्रद धड्यांचें वाचन मधून मधून करणें आपल्या हिताचें असतें.

### खेडेगांवांत उपशाखा उघडा

महाराष्ट्रांतील सर्व प्रमुख खेडेगांवांतून बँकिंगच्या संवयीचा प्रसार करण्याकडे 'दि बँक ऑफ महाराष्ट्र' चे अधिकारी लक्ष्य वळवतील, असा मला विश्वास आहे. महाराष्ट्राबाहेर शाखा स्थापन करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां महत्त्वाच्या खेड्यांतून उपशाखा त्यांनीं उघडाव्यात, असें मी सुचवितों. त्याचप्रमाणें, इतर ठिकाणीं शाखा असणाऱ्या मोठ्या शहरी बँकांशीं 'एजन्सीज'चे स्वरूपानें सहकार्य करून शहरांतील व खेडेगांवांतील बँकिंगमध्यें एकसूत्रीपणा आणतां येईल. 'दि बँक ऑफ महाराष्ट्र'नें ह्या सूचनांप्रमाणें महाराष्ट्रांतील लोकांच्या उन्नतीस मदत केली, तर ती उच्च दर्जाची देशसेवा होईल, ह्यांत संशय नाहीं.

आजच्या उद्‌घाटन समारंभामध्यें भाग घेण्याची संधि मला दिल्याबद्दल मी डायरेक्टरांचे पुनः आभार मानतों. मी त्यांस मदत करण्यास केव्हांहि तयार आहें व त्यांच्या बँकेस जरूर तें सहाय व सल्ला मी आनंदानें देईन.

बंधुभगिनींनो, 'दि बँक ऑफ महाराष्ट्र' चें आतां उद्‌घाटन झालें, हें जाहीर करण्यास मला अतिशय आनंद होत आहे. ह्या नव्या बँकेस जनतेकडून सहकार्य व पाठिंबा मिळेल, अशी मला खात्री वाटते."

## मोटारगाड्यांचे प्रांतवार आंकडे

हिंदुस्थानांतील वेगवेगळ्या प्रांतांतील व संस्थानांतील मोटारगाड्यांसंबंधीं आंकडे खालीं दिले आहेत, त्यावरून ह्या धंद्याच्या विस्ताराची कल्पना येईल. मुंबई इलाख्यांत खासगी गाड्या किंचित् ज्यास्त असल्या तरी भाड्याच्या टॅक्सी व लाऱ्या ह्यांची संख्या बंगालमध्यें अधिक आहे.

| | खाजगी गाड्या | टॅक्सी | बसेस | लॉऱ्या | मोटार सायकली | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई | १६,८३८ | १,००५ | ६,११३ | ९२८ | १,३७१ | २६,२५५ |
| बंगाल | १६,५११ | ३,६९३ | ३,२७१ | २,७८५ | १,२७२ | २७,५३२ |
| सं. प्रांत | ११,८०६ | ६८९ | ३,८५५ | (बसेसमध्यें मोजल्या) | १,६८७ | १८,०३७ |
| मद्रास | ११,२७१ | ३५३ | ३,३२४ | ७१८ | १,४५२ | १७,११८ |
| पंजाब | ६,०४२ | ५५३ | ४,९२१ | १,२१३ | १,३३७ | १४,०६६ |
| सिंध | २,१९९ | (बसेसमध्यें मोजल्या) | ७०५ | १०४ | ४८९ | ३,४९७ |
| दिल्ली | २,२१३ | १२७ | १५३ | ६०१ | ३७१ | ३,४८५ |
| त्रावणकोर | १,३८३ | १७९ | १,०५१ | ३५४ | ६०३ | ३,५७० |
| म्हैसूर | १,५६० | | ४५० | ५०० | २६८ | २,७७८ |
| बडोदें | ३६३ | ८८ | ४०३ | ११९ | २० | ९९३ |

## सहकार व ग्रामोद्धार

### पश्चिम खानदेश जिल्हा को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट, धुळें

ह्या इन्स्टिटयूटनें तळोदें येथें भिल उमेदवाराकरितां सेक्रेटरींचा शिक्षणवर्ग ता. २१-१-३६ ते ३१-१-३६ पर्यंत भरविला, त्यांत १७ उमेदवार होते. वर्गाचा उद्घाटन समारंभ व समारोप तळोदें येथील मामलेदार ह्यांच्या अध्यक्षतेखाली झाला. वर्गास शिक्षण देण्याचे कामीं सहकारी खात्याचे ऑडिटर, बँकेचे इन्स्पेक्टर, ॲ. ॲग्रि. सबओव्हसियर, सुपरवायझर व तालुका ऑ. ऑर्गनायझर मे. भांगरे ह्यांची व वर्ग भरविण्याचे कामीं श्री. वीरसिंग बापू पाडवी, डि. ऑ. ऑर्गनायझर ह्यांची चांगली मदत झाली. नंदुरबार, तळोदें व नवापूर ह्या भागांत, सहकारिता, सुधारलेलीं शेतीचीं साधनें, ग्रामसुधारणा ह्या विषयांवर अत्यंत परिणामकारक अशीं सदीप व्याख्यानें ॲग्रि. ओव्हरसियर व प्रो. ऑफिसर ह्यांनीं दिलीं व भिल समाजांत बरीच जागृति केली. भिल भागांत सोसायटया स्थापन करण्याचा कार्यकर्त्यांचा प्रयत्न आहे. तसेंच, तळोदें येथें प्रॉ. को. बँकेची शाखा उघडण्याचें घाटत आहे.

### प्रिन्सिपॉल गोखले ह्यांचें सहकारितेवर व्याख्यान

येथील ॲग्रिकल्चरल कॉलेजचे प्रिन्सिपाल, श्री. गोखले, ह्यांनीं जिल्हा को-ऑपरेटिव्ह इंस्टिट्यूटचे विद्यमानें श्री. गुप्ते यांचे अध्यक्षतेखाली युरोपांतील व हिंदुस्थानांतील सहकारी चळवळींचा तुलनात्मक विचार ह्या विषयावर गेल्या रविवारीं विचारप्रवर्तक व्याख्यान दिलें. युरोपांतील देशांतल्या नैसर्गिक व आर्थिक परिस्थितीचें आणि तेथील सहकारी चळवळीचें स्वरूप काय आहे, ह्याची व्याख्यात्यांनीं उद्बोधक माहिती देऊन हिंदुस्थानांतील शेतकरी वर्ग आणि त्यांच्या सहकारी संस्था ह्यांच्या अवस्थेशी त्याची तुलना केली. हिंदी शेतकऱ्यांचें अज्ञान आणि दारिद्य लक्ष्यांत घेतां सहकारी चळवळीच्या मार्गांत कोणत्या अडचणी आहेत, ह्यांचें दिग्दर्शन करून कोणत्या सुधारणांस वाव आहे व प्रगतीच्या मार्गांत कोणते अडथळे आहेत, ह्याचें श्री. गोखले ह्यांनीं मार्मिक विवेचन केलें. उद्योगधंद्यांचा विकास होऊन शेतकऱ्यांची कमाई वाढणें मुख्यतः अगत्याचें आहे; तसें होईल तर शेतीच्या व्यवसायांत प्रगति करतां येईल व तिचा फायदा त्या वर्गास मिळूं शकेल, असें त्यांनीं शेवटीं प्रतिपादन केलें. अध्यक्ष श्री. गुप्ते, ह्यांनीं विचारपरिप्लुत असा समारोप केला.

---

### दि बॉंबे लाइफ ॲशुअरन्स कं. लि., मुंबई.

वरील कंपनीनें १९३५ सालीं १ कोटि २३ लक्ष रुपयांचे विमे पुरे केले.

ह्या कंपनीची स्थापना १९०८ च्या स्वदेशी चळवळीच्या वेळीं झाली. तिचें सुरवातीस स्वदेशी लाइफ ॲशुअरन्स कंपनी, असें नांव होतें. १९३५ सालीं पुऱ्या झालेल्या कामाचा आकडा १९३२ च्या मानानें दुप्पट आहे, ही गोष्ट कंपनीच्या प्रगतीची साक्ष देते. सर लल्लूभाई सामळदास हे कंपनीचे अध्यक्ष असून श्री. ज्योतींद्र मेहता हे मॅनेजर आहेत.

---

## मध्यवर्ती कायदेमंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

कंपनी कायद्यामध्यें दुरुस्ती करणारें एक बिल लवकरच कायदेमंडळांत मांडण्यांत येईल. बिलाचा मसुदा तयार करण्याचें काम चालू आहे.

*
* *

विम्याबाबतच्या कायद्यांतहि लवकर दुरुस्ती होणें जरूर आहे; कंपनी कायद्याची चर्चा संपण्याचे आंत हें दुरुस्ती बिल मांडण्यांत येऊन त्यावर सिलेक्ट कमिटी नेमून घ्यावी असें सर नृपेंद्र सरकार ह्यांनीं सरकारतर्फे सांगितलें.

*
* *

साम्राज्यांतील देशांच्या जहाजांतून मालाची आयात करण्याबद्दल म्युनिसिपालट्या व लोकलबोर्डें ह्यांस सूचना यावी अशा अर्थाचें सर्क्युलर हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारांकडे पाठविलें होतें. ह्याचा अर्थ ब्रिटिश जहाजांतूनच माल मागवा, असा अर्थ होत नाहीं का ? ह्या श्री. सत्यमूर्ति ह्यांच्या प्रश्नास सर महमद झाफरुल्ला ह्यांनीं होकारार्थी उत्तर दिलें व जगांत कोठेंहि वास्तव्य केलेल्या ब्रिटिश प्रजाजनांचा 'ब्रिटिश' ह्या शब्दांत अंतर्भाव होतो, असें सांगितलें.

*
* *

तिकिटाशिवाय रेल्वेनें प्रवास करणारांस आळा बसावा, ह्याकरितां रेल्वेबाबतच्या कायद्यांत दुरुस्ती होणार आहे.

*
* *

पूर्व आफ्रिकेंत आपला व्यापारी प्रतिनिधी नेमण्याचा प्रश्न सरकारपुढें असून त्याबद्दल विचार चालू आहे.

*
* *

हिंदी रेल्वेजच्या प्रसिद्धीकरणास सुमारें ८ लक्ष रुपये दरसाल खर्च येतो.

---

## अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ

### लखनौ येथील ग्रामोद्योग प्रदर्शन

वरील प्रदर्शन ता. १० मार्च १९३६ ला सुरू होईल व ता. २५ मार्च अखेर खुलें राहील. प्रदर्शनास सुरवात होण्यापूर्वी प्रदर्शनासंबंधीं सर्व माहिती देणारें एक पुस्तक (गाईड) तयार करावयाचें आहे. ज्या वस्तु श्रेष्ठ प्रतीच्या ठरतील त्यांस द्यावयाच्या बक्षिसांचा निर्णय प्रदर्शन बंद होण्यापूर्वी एक आठवडा करण्यांत येईल. त्याचा फायदा प्रदर्शन पहाणारांस होईल, कारण ज्या वस्तु श्रेष्ठ ठरल्या जातील त्यांची माहिती त्यांना मिळेल. म्हणून प्रदर्शनचालकांची अशी इच्छा आहे कीं, ज्यांना प्रदर्शनांत वस्तु पाठवावयाच्या असतील त्यांनीं तारीख २१ फेब्रुवारीपर्यंत लखनौस पोंचतील ह्या बेतानें त्या पाठवाव्यात. वस्तु पाठविण्यापूर्वी प्रथम मला कळवावें, असें श्री. वैकुंठ ल. मेहेता, सभासद, व्यवस्थापकमंडळ अ. भा. ग्रामोद्योग संघ हे कळवितात.

## फळें व त्यांचे पदार्थ टिकण्याकरितां मुंबईमध्यें ' कॅनरी '* काढण्याची योजना

लेखकः—एस. एस. भट, एम्. एजी., शेतकी कॉलेज, पुणें.
भाषांतरकारः—के. जी. कोल्हटकर, बी. एजी.

( १ ) कॅनिंग*करण्याचें महत्त्वः—हल्ली कॅनिंग करून फळें व फळांचे रस टिकवण्याकडे पुष्कळ बागवानांचें व धंदेवाल्यांचें लक्ष वेधत चाललें आहे. फळझाडांच्या क्षेत्राचें वाढतें प्रमाण, हंगामी फळांच्या बाजारभावांत नेहमीं असणारी मंदी किंवा बाजारांतील चढ-उतार, परदेशांतून येणारा तयार माल, फळांसारख्या लवकर खराब होणाऱ्या मालाच्या बाजारांत होत असलेली सुधारणा आणि शेतकीखात्याचें फळझाडांच्या लागवडीस प्रोत्साहन वगैरे गोष्टींमुळें वरील विषयाला जास्त महत्त्व येत आहे. मालाला उठाव नसल्यानें पुष्कळ फळवाल्यांचें लक्ष फळें टिकवून तीं किफायतशीर रीतीनें कशीं विकतां येतील याकडे लागलें आहे.

( २ ) या विषयासंबंधीं केलेले प्रयत्नः—

चौकशीअंतीं असें आढळून आलें आहे कीं, असा धंदा करण्याचे प्रयत्न पुष्कळांनीं केले व त्यांत त्यांना यश आलें नाहीं. तरी एक गोष्ट मात्र त्यांना समजून चुकली कीं, हा धंदा योग्य रीतीनें चालविल्यास चांगला फायदा होण्यास या देशांत पुष्कळच वाव आहे. वरीलप्रमाणें अपयशाबद्दल निराश होण्याचें कांहींच कारण नाहीं, कारण एकंदर या अशा प्रयत्नांचा अनुभव मिळून मोठ्या प्रमाणावर व सुधारलेल्या पद्धतीनें धंदा करणारांस तो मार्गदर्शक होईल.

( ३ ) या धंद्याबाबत करण्यांत आलेले पहिले प्रयत्नः—

मुंबई इलाख्यांत होनावर येथील ओरिएंटल कॅनरी कंपनी व मार्मा गोवा येथील डी कॉस्टा यांची फर्म, या दोन कंपन्यांनीं या धंद्यास या शतकाच्या प्रारंभीं सुरवात केली होती. या कारखान्यांत सुरवातीस आंब्याच्या रसाचे डबे बनवीत असत व नंतर आंब्याच्या फोडींचे टिकणारे पदार्थहि तयार करण्यास त्यांनीं सुरवात केली. आंब्याचें पीक या देशांत विपुल होतें, त्यामुळें या धंद्यास अनुकूल अशी परिस्थिति त्यांना मिळाली. यानंतर पुण्याची प्रीमिअर फ्रूट प्रॉडक्ट कंपनी व सेंट्रल कॅनिंग कंपनी, कारवार ( हल्लीची प्रीमिअर फ्रूट प्रॉडक्ट कंपनी लिमिटेड, बेळगांव ) या दोन कंपन्यांनीं या धंद्यांत वरीच प्रगति करून व्यापहि पण मोठा वाढविला आहे. या कारखान्यांतून आंब्याचा रस, अननस, संत्र्याच्या फोडी वगैरे कॅनिंग करण्याजोग्या फळांचे पदार्थ तयार करीत असत. सध्यां पुण्यांत हसन बाग फ्रूट प्रॉडक्ट्स कंपनी, पॉप्युलर फ्रूट प्रॉडक्ट्स कंपनी, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी, ओरिएंटल फ्रूट प्रिझर्व्हेटरी वगैरे आणि खानदेशांतील बाबेल फ्रूट ज्यूस मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, उतराण व जाजू मॅन्युफॅक्चरिंग वर्क्स, एरंडोल, या सर्व कंपन्या नवीनच निघाल्या आहेत. वर सांगितलेल्या कंपन्यांपैकीं " हसन बाग " या कंपनींत जाते, जेली वगैरे फळांचे बऱ्याच प्रकारचे पदार्थ तयार करण्यांत येतात व शेवटीं सांगितलेल्या तीन कंपन्या कागदी लिंबाचा रस टिकविण्याकडे जास्त लक्ष देतात. वर सांगितलेले सर्व कारखाने व्यापारी दृष्ट्या जरी अगदी मामुली व तात्पुरते असले तरी त्यांना जो नफातोटा झाला त्यांत महदंतर आहे. कांहीं कारखाने अजीबात बुडाले तर कांहीं अजून चांगल्या स्थितींत असून यापेक्षांहि चांगली प्रगति करण्याची त्यांची उमेद आहे.

( ४ ) या धंद्याच्या प्रगतीच्या मार्गांत येणाऱ्या अडचणीः—

या धंद्याच्या अभ्युदयाच्या मार्गांत खालील अडचणींचा समावेश होतोः—

( १ ) मोठ्या प्रमाणांत माल काढण्यास व जाहीरातद्वारा मालाचा प्रसार करण्यास लागणाऱ्या भांडवलाचा अभाव.

( २ ) कारखान्याच्या कामांत योग्य व पद्धतशीर रीतीनें काम करण्याचा अभाव असल्यानें गैरमाहितीनें होणाऱ्या ढोबळ चुका.

( ३ ) विलायती कंपन्यांच्या मालाचा बाजारांत भरणा व गिऱ्हाइकामध्यें हिंदी मालाबद्दल असणारा तिटकारा.

( ४ ) डबे, कॅन्स, वगैरे पॅकिंगला लागणाऱ्या वस्तु व इतर उपयुक्त गोष्टी मिळण्यास पडणारी अडचण.

( अपूर्ण )

*कॅनरीः—फळ, भाज्या अगर त्यांचे पदार्थ डब्यांतून अगर बाटल्यांतून टिकवून ठेवण्याचा कारखाना.

* कॅनिंगः—फळें, भाज्या अगर त्यांचे पदार्थ डब्यांतून अगर बाटल्यांतून टिकवून ठेवणें.

## "अर्था"चें व्यवसायबंधूंकडून अभिनंदन

( ' अर्था 'स दुसरें वर्ष लागलें, ह्यासंबंधानें कित्येक व्यवसायबंधूंनीं ' अर्था 'च्या कामगिरीबद्दल प्रसंशोद्गार काढून त्याचें अभिनंदन केलें आहे, याबद्दल आम्हीं त्यांचे अत्यंत आभारी आहों. कांहीं निवडक अभिप्राय खालीं उद्धृत केले आहेत. )

" महाराष्ट्रीय जनतेचें लक्ष आर्थिक उलाढालीकडे लागून त्यासंबंधानें जरूर ती जागृति करण्याच्या उद्देशानें प्रो. वा. गो. काळे यांनीं गेल्या वर्षी सुरू केलेल्या ' अर्थ ' साप्ताहिकास चालू महिन्यापासून दुसरें वर्ष सुरू होत आहे. पत्राची एक वर्षातील कामगिरी अभिनंदनीय असून प्रो. काळे यांनीं आर्थिक झीज सोसून हें कार्य चालविलें आहे. सध्यां देशापुढें असलेल्या असंख्य आर्थिक विषयांची सुलभ रीतीनें ओळख करून देऊन त्यांकडे वेळोवेळीं महाराष्ट्रीय वाचकांचें लक्ष त्यांनीं वेधविलें आहे. त्यांनीं चालविलेल्या या कार्याचें महत्त्व ओळखून ' अर्थ ' साप्ताहिकासारखें पत्र स्वावलंबी होईल, याबद्दल दक्षता बाळगणें, हें प्रत्येक महाराष्ट्रीयाचें कर्तव्य आहे."

—नवा मनु ( जानेवारी, १९३६ )

"पुणें येथें प्रसिद्ध होणाऱ्या अर्थ या साप्ताहिकाचें पहिलें वर्ष पुरें होऊन, त्यानें दुसऱ्या वर्षांत पदार्पण केलें आहे. आर्थिक प्रश्नांच्या विचाराला वाहिलेलें हें मराठींतील एकटेंच साप्ताहिक आहे, असें म्हटलें तरी चालेल आणि म्हणून अशा नियतकालिकाला लोकांनीं जरूर उदार आश्रय द्यावा. गेल्या वर्षांत या साप्ताहिकानें बऱ्याच आर्थिक प्रश्नांची माहिती सोप्या भाषेंत आपल्या वाचकवर्गाला पुरविली आहे. प्रो. वामनराव काळे यांच्यासारखा नामांकित अर्थशास्त्रज्ञ या साप्ताहिकाला संपादक म्हणून लाभला असल्यामुळें, त्यांतील विचारसरणीकडे लोकांचें विशेष लक्ष वेधावें, हें स्वाभाविक आहे. आम्ही अर्थ साप्ताहिकाला भरभराट इच्छितों."

—ज्ञानप्रकाश ( २४ जानेवारी १९३६ )

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—८ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९-१४ |
| ५% ( १९२९-४४ ) लोन ... ... | १०९—६ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११८—८ |
| ४% १९६०-७० ... ... | ११२—४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९७—९ |
| ३½% १९४७-५० ... ... | १०६-१२ |
| ४% १९४३ ... ... ... | १०९-११ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०६—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०६—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १०६—८ |
| ४% म्हैसूर कज ( १९५३-६३ ) ... | १०९-१० |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३०—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०४-१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकी २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५—४ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५५५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३१—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | ९८—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९४—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ८८०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५१—४ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२१—४ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १५४०—० |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि. ७½%) | १५०७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९०-१० |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६५-१२ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १४५—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५४६—४ |


# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**

**This year 1934-35**

**Exceeds**

**2 CRORES & 50 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca,

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.



**ह्यूम पाईप वापरा**

**पूर्ण स्वदेशी व टिकाऊ**

३ इंच ते ७२ इंच व्यासाचे पाईप व अर्धगोल पाईप मिळतात.

टाक्या, खांब, सेप्टिक टाक्या वगैरे

**कॉंक्रीटच्या वस्तु**

आम्हीं केलेल्या फारच टिकाऊ असतात.

— सर्व प्रांतांत कारखाने आहेत —

**इंडियन ह्यूम पाईप कंपनी, लिमिटेड**

बलार्ड इस्टेट, मुंबई.



**'अर्थ' ग्रन्थमाला**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली

# MARATHE & Co.

**ENGINEERS & IRON FOUNDERS**

| WORKS : | Can undertake to do any sort of casting. | OFFICE : |
| --- | --- | --- |
| Natu Bag, Bhikardas Road, POONA 2 | We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act. **Our prices are very competitive.** | 978-79, Sadashiv, Laxmi Rd., POONA 2 |

# S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716, Sadashiv Peth, Poona City

# K. K. & Co.

**Photographic Dealers**

**POONA.**

FOR
**SAFETY, ECONOMY**
AND
**DURABILITY**
Consult

# V. G. & Sons

ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
**Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.**

प्रो. काळे ह्यांचें नवीन पुस्तक

# रिझर्व्ह बँक

हिंदुस्थानांत राष्ट्रीय मध्यवर्ती बँक ह्या नात्यानें रिझर्व्ह बँकेची स्थापना होऊन त्या संस्थेचें काम चालू झालें आहे. रिझर्व्ह बँकेची घटना, तिच्या कार्याचा व्याप, तिचा इतर बँकांशीं संबंध इत्यादि विषयांची सांगोपांग माहिती ह्या पुस्तकांत दिली असून रिझर्व्ह बँकेच्या कायद्याच्या निरनिराळ्या कलमांची छाननी केलेली आहे. अवघड विषयाचा सुलभ बोध व्हावा म्हणून पुस्तक-कर्त्यानें बँकिंगच्या धंद्यांतले आधुनिक प्रकारचे व्यवहार, त्यांची उपपत्ति व त्यांचें कार्य ह्यांचो अत्यंत सोप्या मराठी भाषेंत चर्चा केली आहे आणि देशी व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें कोणत्या योजना अमलांत आणल्या पाहिजेत ह्या संबंधानें व्यावहारिक सूचना केल्या आहेत. रिझर्व्ह बँक ही, राष्ट्रीय आर्थिक प्रगतीस परिपोषक होईल काय ? ह्या प्रश्नास प्रस्तुत पुस्तकांत उत्तर मिळण्यासारखें आहे.

**पृष्ठें १३०-किंमत १ रुपया** ( ट. हं. वेगळें )

पुस्तक मिळण्याचीं ठिकाणें:—

( १ ) व्यवस्थापक, "अर्थ" ग्रन्थमाला, पुणें ४.
( २ ) आर्यभूषण प्रेस, पुणें २.
( ३ ) दि को-ऑपरेटर्स बुकडेपो, ९, बेकहौस लेन, फोर्ट, मुंबई.

# डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें

| | |
| --- | --- |
| मध्यम वर्गातील गृहेच्छू लोकांस | **अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य** |

## भाडेकरी-घरमालक-गृहयोजना

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.

जनरल मॅनेजर

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली

**पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—**

# कॉमनवेल्थ विमा कंपनी, लि. पुणें.

अध्यक्ष-श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
| --- | --- | --- |
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां भेटा अगर समक्ष लिहा.

**मॅनेजिंग एजन्ट्स.**

## न. वि. वडनेरकर

**जव्हेरी आणि सराफ,**
**रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.**

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

**शुभकार्यांत** भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख १९ फेब्रुवारी, १९३६. अंक ८

## वेस्टर्न इंडिया

### लाइफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड.

स्थापना स. १९१३ मुख्य कचेरी—सातारा

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची,
पहिली आणि पहिल्या प्रतीची विमा कंपनी.


**बोनस**
त्रैवार्षिक
दर हजारीं

हयातींतील रु. ६०
हयातीनंतरचें रु. ७५

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण चालू काम | .... | ... | २,५०,१५,०८२ रुपये |
| एकूण जिंदगी | .... | .... | ६१,६९,१६९ ,, |
| लाइफ फंड | ... | ... | ५०,९९,४३९ ,, |

एजन्सी आणि इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

मॅनेजर.



## किर्लोस्कर
## लोखंडी नांगर

आज २,००,००० वर शेतकरी पूर्ण संतोषानें वापरीत आहेत.

किर्लोस्कर नांगरांच्या निरनिराळ्या २६ नमुन्यांची सविस्तर माहिती असलेला कॅटलॉग ताबडतोब मागवा.

**किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी** ( सं. औंध )

एजंटः—केळकर बंधु, पुणें—नाशिक

## दत्तात्रय नारायण हेजीब

किराणा व सुक्या मेव्याचे व्यापारी

आमचेकडे आंबेपोळी, फणसपोळी, खारा पिस्ता वगैरे सुका मेवा मिळेल.

रे-मार्केटजवळ, २० शुक्रवार पेठ, पुणें २.

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी

टेलरिंग फर्म

## पाटसकर आणि कंपनी

मॅनेजरः—हरी.पां. पाटसकर, D.M.T.O.A. (London.)

४८ निहाल पेठ, पुणें शहर.

सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी

आमचेकडें—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

# विविध माहिती

### इंपीरिअल बँक ऑफ इंडिआचा नफा

गेल्या डिसेंबर अखेर पुऱ्या झालेल्या सहामाहींत इंपीरिअल बँक ऑफ इंडिआस सुमारें ३६½ लक्ष रुपये निवळ नफा झाला. पूर्वीच्या व त्याच्या पूर्वीच्या सालांचा त्याच सहामाहींत झालेला नफा अनुक्रमें करून ४४½ लाख आणि ४१½ लाख रुपये इतका होता.

### ट्रेझरी बिलांची विक्री बंद

चालू महिन्याच्या प्रारंभापासून हिंदुस्थानसरकारच्या ट्रेझरी बिलांची जाहीर विक्री तात्पुरती बंद ठेवण्यांत आली आहे. सरकारच्या खर्चास खेळता पैसा लागतो, त्याचा पुरवठा भरपूर असल्यामुळें ह्या मार्गानें लोकांकडून अल्प मुदतीचीं कर्जे काढण्याची आवश्यकता तूर्त वाटत नाहीं, हें सदरहु विक्रीबंदीचें कारण आहे, हें उघड आहे.

### चालू सालच्या बजेटांतील वाढाव्याची वांटणी कशी होणार?

चालू सालच्या हिंदुस्थान सरकारच्या जमाखर्चीत अंदाजाच्या मानानें ३।४ कोटि रुपयांचा वाढावा येईल अशी कल्पना आहे. ह्या पैशाची खैरात कशी होणार ह्या संबंधानें लोकांचे तर्क चालू आहेत.

### हिंदी रेल्वे-बजेटांत तूट

मध्यवर्ती कायदेमंडळास सादर करण्यांत आलेल्या रेल्वे-बजेटांत चालू सालीं २¾ कोटि रुपये व येत्या वर्षी ३½ कोटि रुपये इतकी तूट येईल असा अंदाज जाहीर करण्यांत आला.

### बकांस सुटी

शुक्रवार, ता. २१ फेब्रुवारी रोजीं महाशिवरात्रीनिमित्त बँका बंद रहातील.

### विमा-एजंटाची कारवाई

आगीच्या विम्याचें काम करणाऱ्या एका अमेरिकेंतील विमा एजंटानें काम मिळविण्यासाठीं योजिलेल्या अजब युक्तीची माहिती प्रसिद्ध झाली आहे. आपल्या मोटारीमध्यें तो नेहेमीं जाहिरातीच्या मोठमोठ्या पाट्या बाळगीत असे. शहरांतील आगीच्या बंबावरील अधिकाऱ्यांशीं संगनमत करून आगीची बातमी तो टेलिफोनवरून तात्काळ मिळवी. आग पहावयास येणाऱ्या लोकांत परिणामकारक रीतीनें विमा प्रसार करण्याची हीच वेळ आहे, हें ओळखून, हा एजंट आग लागलेल्या घराजवळ आपल्या पाट्या नेऊन लावीत असे. हजारों लोकांच्या नजरेखालून ह्या पाट्या जात असल्यानें व जाहिरात देण्यास वेळ उत्तम शोधून काढल्यानें हा विमा एजंट चांगलें काम मिळवूं शकला.

### हिंदी रेल्वेजचें उत्पन्न वाढवण्याच्या योजना

अलीकडे हिंदी रेल्वेजचें उत्पन्न घटलें असून त्या तोट्यांत चालल्या आहेत. मध्यवर्ती सरकारच्या तिजोरीस प्रतिवर्षी रेल्वेजच्या उत्पन्नांत सुमारें ५ कोटि रुपये मिळावयाचे ते तर मिळत नाहींतच आणि ह्या रीतीनें कर देणाऱ्या जनतेचें नुकसान होतें आणि त्याशिवाय, खुद्द रेल्वेजच्या जमाखर्चाचाहि मेळ बसत नाहीं. ह्यासाठीं खर्चांत काटकसर करून व अन्य उपायांनीं रेल्वेजचें उत्पन्न वाढवावें ह्या बाबतींत सरकारनें रेल्वे अधिकाऱ्यांशीं चर्चा केली असून, सुमारें एक कोटि रुपयांचा वाढावा उत्पन्नांत होईल, अशी तजवीज होत आहे, असें सर महमद झाफरुल्लाखान यांनीं लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत सांगितलें.

### सरवडे शेतकी प्रदर्शन

कोल्हापूर संस्थानांतील राधानगरी पेट्यांतील सरवडे शेतकी प्रदर्शनाचें उद्‌घाटन रावबहादुर भोसले ह्यांच्या हस्तें झालें. संस्थानाचे सहकारी खात्याचे रजिस्ट्रार, श्री. शिर्के फातरफेकर, हे स्वागताध्यक्ष होते. त्यांनीं आपल्या भाषणांत, शिक्षण, दुय्यम धंदे, फळ-संवर्धन, सहकार, जनावरांचा प्रश्न, इत्यादि विषयांचें थोडक्यांत परंतु मुद्देसूद विवेचन केलें. (१) पैशाच्या, (२) धान्यांच्या, (३) सुखसंपत्ति-संवर्धक व (४) नित्य लागणाऱ्या मालविक्रीच्या अशा चारी प्रकारच्या संस्था प्रत्येक खेडेगांवांत असल्याच पाहिजेत, असें त्यांनीं सांगितलें.

### बँक ऑफ इंग्लंडच्या सुवर्णनिधींत वाढ

गेल्या चार वर्षांच्या अवधींत बँक ऑफ इंग्लंडच्या सोन्याच्या गंगाजळींत सुमारें १७५ कोटि रुपये किंमतीच्या सोन्याची भर पडली आहे अशी माहिती ब्रिटिश फडनविसांनीं कॉमन्स सभेंत दिली.

### मुंबई कॉटन एक्सचेंजची नवी इमारत

मुंबई कॉटन एक्सचेंजची सध्याची इमारत शेवरी येथें आहे. ती शहरापासून फार दूर असल्यानें व्यापाऱ्यांची व सट्टेवाल्यांची फार गैरसोय होते. ह्याकरितां, शहरांतील मध्यवर्ती ठिकाणीं नवी इमारत बांधण्यांत येणार आहे, तिच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ गेल्या आठवड्यांत झाला. ही इमारत पुरी झाली, म्हणजे तिची उंची १०२½ फूट भरेल व जगांतील इतर कॉटन एक्सचेंजच्या उत्कृष्ट इमारतींच्या तोडीची ती होईल.

### हिंदी साखरेचें उत्पादन

हिंदुस्थानांत दरसाल सुमारें ९ लक्ष टन साखर खपते. १९३३–३४ सालीं ८ लक्ष ८५ हजार टन साखर खपली. १९३४–३५ सालीं हिंदुस्थानांत एकूण ६ लक्ष २० हजार टन साखरेचें उत्पादन झालें, त्यांपैकीं ४० हजार टन साखर गुळापासून व बाकीची उरलेली उंसाच्या रसापासून करण्यांत आली होती. परदेशांतून २ लक्ष ३० हजार टन साखरेची आयात झाली.

### ग्रेट ब्रिटनमधील १९३५ सालांतील विमे

१९३५ सालीं ग्रेट ब्रिटनमध्यें एकूण सुमारें ३१० कोटि रुपयांच्या रकमेचे आयुर्विमे उतरविण्यांत आले. १९३३ व १९३४ सालांचे तत्सम आकडे अनुक्रमें २५० व २८० कोटि रुपये असे होते. इतरत्र किफायतशीर दरानें रकमा गुंतविण्यास आज वाव नसल्यानें लोकांच्या बचतीचा प्रवाह विम्याकडे वाहूं लागला आहे व हा कांहीं काल असाच वाहणार, अशीं चिन्हें आहेत. विमा कंपन्या खासगी व्यक्तींपेक्षां ज्यास्त किफायतीनें पैसे व्याजीं लावूं शकतात व त्यांस पैसे वेगवेगळ्या ठिकाणीं पेरतां येऊन सुरक्षितता कायम राखतां येते. तथापि, विमा कंपन्यांसहि पूर्वीप्रमाणें व्याज पडत नाहीं व त्यांस आपल्या हप्त्यांचे दर वाढविणें भाग पडत आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत.

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. ८ फेब्रुवारी रोजीं पुरा झालेला आवडा | ८८,८३,३६३ |
| ता. १५ फेब्रुवारी रोजीं पुरा झालेला आठवडा | ९२,९७,०८२ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते १५ फेब्रुवारी १९३६ अखेर. | २,६२,२९,५९,४०४ |

अनुक्रमणिका.


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ९० | ६ परप्रांतांत वसति करणारांची वाढती संख्या | ९५ |
| २ गोपाळ कृष्ण गोखले यांचें पुण्यस्मरण | ९१ | ७ मुंबईमध्यें कॅनरी काढण्याची योजना | ९६ |
| ३ साखरेचा धंदा व व्यापार | ९२ | ८ ध्येय आणि तयारी ह्यांचा 'अमेळ' | ९७ |
| ४ स्फुट विचार — रेल्वेजचा कारभार कोणीं पहावा ?—बी. एन्. डब्ल्यू. आणि एम.एस.एम.रेल्वेज—असेंब्लींत व्यक्त झालेलें लोकमत—सिनेमा फिल्मवरील जकात कमी करा | ९३ | ९ शिक्षण व धंदे ह्यांचें महत्त्व | ९७ |
| ५ मध्यवर्ती कायदेमंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश | ९४ | १० विजेच्या ग्राहकांवरील जबाबदारी | ९८ |
| | | ११ अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ | ९८ |
| | | १२ निवडक बाजारभाव | ९८ |



# अर्थ

बुधवार, ता. १९ फेब्रुवारी, १९३६


## गोपाळ कृष्ण गोखले यांचें पुण्यस्मरण

### आर्थिक प्रश्नांविषयींचे गोपाळरावजींचे विचार

फेब्रुवारी १९ रोजीं १९१५ मध्यें गोपाळ कृष्ण गोखले दिवंगत झाले, त्यास आज २१ वर्षें झालीं. हिंदुस्थानच्या राष्ट्रीय उन्नतीसंबंधाचें त्यांचें उच्च ध्येय आणि तें गांठण्यासाठी स्वार्थ-त्याग-प्रेरित असे करावे लागणारे सर्वांगीण प्रयत्न ह्यांविषयींची त्यांची कल्पना ह्या आज मितीसहि हिंदी जनतेस स्फूर्तिदायक व कार्यप्रवण करण्याच्या योग्यतेच्या आहेत. एकदा स्वराज्याचें ध्येय निश्चित झालें म्हणजे त्याच्या मार्गांतला एक, एक टप्पा, तात्पुरत्या अपयशानें खचून न जातां, गांठीत पुढें जावयाचें हें त्यांचें धोरण होतें. तात्कालिक अपयशांतून किंवा अल्प यशांतूनच प्रगतीचा पुढचा मार्ग पुढाऱ्यांस काढावा लागतो, हा अनुभव गोपाळरावांच्या कालाच्या मानानें सद्यःस्थिति कितीहि अनुकूल असली तरी, आजच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांसहि आलेला आहे. वीस वर्षांपूर्वी मॉंटग्यू-चेम्सफर्ड सुधारणाहि अस्तित्वांत नव्हत्या आणि कायदेमंडळांत सरकारावर वजन पाडून राष्ट्रीय हिताच्या अशा अगत्याच्या वाटणाऱ्या सुधारणा त्यांच्या करवीं घडवून आणणें अत्यंत कठिण होतें. आर्थिक व सामाजिक प्रगति आणि कायदेमंडळाची सत्ता ह्यांचा अत्यंत निकट संबंध असून, ह्या सत्तेचा अभाव गोपाळरावांस किती अडचणीचा वाटत असला पाहिजे, ह्याची कल्पनाच केली पाहिजे. किंवा कल्पना तरी कशाला ? लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत आज मितीस जें काम चालतें, त्यांतहि लोक-प्रतिनिधींचें प्रत्यक्ष व्यावहारिक कार्यसिद्धीच्या दृष्टीनें किती तेज पडतें, हें सर्वांस दिसतच आहे. आर्थिक व उत्पन्न-खर्चाच्या संबंधांतल्या प्रश्नांची मुद्देसूद चर्चा आणि त्या बाबतींतल्या सरकारी धोरणावर विधायक व सूचनात्मक भरीव टीका करण्यांत गोपाळरावांचा हात धरणारा त्यावेळीं कोणी नव्हता आणि तसा पुरुष आजहि कोणी नाहीं. ध्येयवाद आणि व्यावहारिकत्व ह्यांचा मेळ घालण्याचें कामहि ते अत्यंत चातुर्यानें करीत असत, ह्या कारणानें सरकारी अधिकाऱ्यांस त्यांच्यापुढें हतबुद्ध व्हावें लागे.

चालू पिढीला साध्या, सरळ व नित्य परिचयाच्या वाटणाऱ्या गोष्टी सरकारच्या गळीं उतरवणें वीस पंचवीस वर्षांपूर्वी किती कष्टाचें होतें हें एक उदाहरण येथें दिल्यास स्पष्ट होईल. पंचवीस वर्षांमागें नामदार मि. (आतां सर) माणेकजी दादाभाय यांनीं, वरिष्ठ कायदेमंडळांत, हिंदी कापडाच्या गिरण्यांत तयार होणाऱ्या मालावरील ३½ टक्क्यांची पट्टी दूर केली जाऊन स्वदेशी धंद्यांच्या प्रगतीच्या मार्गांतली ही आडकाठी नाहींशी व्हावी असा ठराव पुढें मांडला. गिरणीवाल्यांच्या फायद्यासाठी नाहीं, तरी गरीब जनतेच्या हिताच्या दृष्टीनें ठरावांत नमूद केलेली सूचना अमलांत येणें जरूर असून त्यामुळें सरकारी उत्पन्नांत येणारी तूट परदेशी कापडावरील आयात जकात ५ टक्क्यांपर्यंत वाढवण्यांत यावी असा अभिप्राय त्याप्रसंगीं गोपाळरावांनीं व्यक्त केला. आपल्या भाषणांत ते म्हणाले:—

"त्याचप्रमाणें, सर्वसाधारण अर्थशास्त्रीय सिद्धांत म्हणून सर्व राष्ट्रांस लागू असें खुल्या व्यापाराचें तत्व असेल; परंतु व्यवहाराच्या दृष्टीनें त्यास सर्वत्र मान्यता मिळण्याचा काळ अजून फार दूर आहे, आणि तो काळ येईपर्यंत प्रत्येक राष्ट्रानें आपल्या आर्थिक हिताची जोपासना आपल्या पुरती स्वतः केली पाहिजे. अध्यक्ष महाराज, बहुतेक सर्व राष्ट्रांनीं औद्योगिक संरक्षणाचें धोरण स्वीकारलें आहे." ज्याच्या योगानें सामान्य जनतेच्या हिताचें संवर्धन होईल असें आणि ज्याचा मूठभर भांडवलवालेच काय तो फायदा घेतील तें, असें दोन प्रकारचें संरक्षणाचें धोरण असून त्यांपैकीं ग्राह्य प्रकार अंमलांत येण्याजोगी अनुकूल परिस्थिति अजून हिंदुस्थानांत निर्माण झाली नाहीं असें ह्यापुढें सांगून गोपाळराव म्हणाले:—"हिंदी लोकांची इच्छा व मत ह्यांस अनुसरून येथें कारभार चालेल आणि लोकमत अजमावण्याची राजकीय घटनेंत योग्य व्यवस्था असेल आणि सरकारच्या मर्जीप्रमाणेंच, त्यांच्या दृष्टीनें ग्राह्य दिसणारेंच तेवढें धोरण अमलांत यावयाचें नसेल तर गोष्ट वेगळी."

गोपाळरावांच्या काळाच्या मानानें हिंदुस्थानच्या आर्थिक आणि राजकीय परिस्थितींत किती तरी अंतर पडलें आहे. तरीहि आमच्या आर्थिक उन्नतीच्या मार्गांतल्या अडचणी अजून दूर झालेल्या नाहींत. औद्योगिक संरक्षणाचें तत्त्व वीस वर्षांपूर्वीपेक्षांहि अधिक तीव्रतेनें जगभर अंमलांत आलें आहे, इतकेंच नव्हे, तर राष्ट्रीय आर्थिक स्वायत्ततेचें ध्येय अनेक राष्ट्रांनीं स्वतःपुढें ठेवून त्याप्रमाणें आचरण चालविलें आहे. तेव्हां आर्थिक संरक्षणाच्या बाबतींत हिंदुस्थानांत सरकारनें व जनतेनें काय केलें पाहिजे ह्याविषयीं शंकाच उरत नाहीं. गेल्या वीस वर्षांत ह्या देशांत अनेक धंदे हिंदी लोकांनीं काढून ते यशस्वी करून दाखविले आहेत; आणि त्यांच्या उत्कर्षास जकातीच्या धोरणाचें उत्कृष्ट साह्य होतें ही गोष्ट आतां सिद्ध झाली आहे. परदेशी साखरेवर जबर जकात बसवून येथील धंद्याच्या संरक्षणाचा यत्न केल्यास जनतेवर महाग साखरेचा बोजा पडून ह्या धोरणाचा फायदा भलत्यांच्याच खिशांत जाईल, ही गोपाळरावांच्या वेळीं वाटत असलेली भीतीहि पुष्कळशी दूर झाली असून हिंदी भांडवलानें व हिंदी व्यवस्थेखाली चालणारे अनेक स्वदेशी धंदे अलीकडे निघाले आहेत. सुमारें तीस वर्षांपूर्वी गोपाळरावांनीं स्वदेशी चळवळीवर एक प्रसिद्ध व्याख्यान देऊन तिच्या मूलभूत तत्त्वाचें सुंदर विवेचन केलें. त्यासंबंधांतहि परिस्थिति आतां पुष्कळच अनुकूल झाली आहे. अनेक जातींच्या मालाचें उत्पादन, विमा-

व्यवसाय, बँकिंग, व्यापार इत्यादि बाबतींत स्वदेशीचें पाऊल झपाट्यानें पुढें पडलें आहे व पडत आहे. तथापि, आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें हिंदी राष्ट्राच्या मार्गांत, बदलत्या परिस्थितीबरोबर, कितीतरी अडचणी उपस्थित होत असून सरकारी उत्पन्न व खर्च, चलन व हुंडणावळ, शेतकरी वर्गाची स्थिति, उद्योगधंद्यांस उत्तेजन, संरक्षक जकाती वगैरे नानाविध प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटण्यास कायदेमंडळांत लोकप्रतिनिधींस खरीखुरी सत्ता प्राप्त होण्याचं महत्त्व पूर्वीप्रमाणेंच कायम आहे. नवीन राज्यघटनेंतले आर्थिक निर्बंध, ओटावा-करार, टारिफ बोर्डासंबंधांतलें धोरण, सोन्याची निर्गत, संरक्षक जकातींची आवश्यकता, रेल्वेजची सांपत्तिक स्थिति, इत्यादि जिव्हाळ्याचे प्रश्न लोकांपुढें आज आहेत, त्यांची मुद्देसूद चर्चा करून जनता व सरकार ह्यांस अधिकारी रीतीनें सरळ मार्ग दाखविण्यास गोपाळराव गोखले हयात असते तर राष्ट्रास केवढें सहाय झालें असतें हा विचार आज त्यांच्या मृत्युतिथीस मनांत आल्यावांचून रहात नाहीं. आर्थिक विषयांवरचीं त्यांचीं कायदेमंडळांतलीं व इतर भाषणें हा ज्ञानाचा व स्फूर्तीचा एक खजीनाच आहेत. त्यांच्या मननानें चालू पिढीस पुष्कळ बोध घेतां येण्याजोगा आहे. त्या भाषणांचा निष्कर्ष काढून प्रस्तुत लेखकानें गोपाळरावजींच्या पहिल्याच मृत्युतिथीस, वीस वर्षांमागें, एक सिंहावलोकनात्मक इंग्रजी ग्रंथ (Gokhale and Economic Reforms) प्रसिद्ध करून त्यांच्या स्मृतीस अर्पण केला. दुर्दैवानें त्या पुस्तकाच्या प्रती आज उपलब्ध नाहींत. त्याचें पुनर्मुद्रण करण्याचा योग केव्हां येईल तेव्हां येवो.

---

## साखरेचा धंदा व व्यापार

### महाराष्ट्राची गरज

साखरेच्या धंद्याशीं ज्यांचा संबंध आहे, अशा सर्व हिंदी कारखानदारांस व शेतकऱ्यांस साखरेच्या व्यापाराविषयींची जागतिक परिस्थिति काय आहे, ह्याची माहिती असणें जरूर आहे. साखर तयार करणारा प्रत्येक देश ह्या प्रश्नाकडे लक्ष्य पुरवीत असून ती विकत घेऊन खाणाऱ्या राष्ट्रांसहि त्या बाबतींत जिज्ञासा असणें स्वाभाविक आहे. मागणीच्या मानानें जगांत साखरेचा पुरवठा अधिक होत आहे असें पाहून साखरेचा धंदा मोठ्या प्रमाणावर करणाऱ्या प्रमुख राष्ट्रांनीं सुमारें पांच वर्षांमागें परस्परांमध्यें एक करार करून प्रत्येकानें परदेशीं पाठवावयाच्या मालाचें प्रमाण निश्चित केलें होतें. क्यूबा, जाव्हा, पेरू, झेकोस्लोव्हेकिया, हंगेरी, युगोस्लाव्हिया व बेलजम हे देश वरील करारांत सामील झाले होते. परंतु त्यांस असें आढळून आलें कीं जागतिक मंदीमुळें, ठरलेल्या मर्यादित प्रमाणांतहि साखरेस पुरेसें गिऱ्हाइक मिळणें अशक्य होतें. कराराच्या कक्षेच्या बाहेर असलेल्या देशांत साखरेचें उत्पादन वाढत चालल्यामुळेंहि वरील करार यशस्वी होण्याच्या मार्गांत अडचण उपस्थित झाली. हिंदुस्थानासारख्या देशांस करारांत सामील करून घेण्याचे यत्न सफळ झाले नाहींत. करारांत भाग घेणाऱ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींची सभा भरून तीमध्यें कराराची मुदत वाढवण्याची आणि साखरेच्या निर्गतीचें प्रमाण पुन्हां निश्चित करण्याची सहा महिन्यांमागें खटपट झाली आणि असें होण्याच्या शर्तीवर आपण ह्या सहविचारांत व सहकार्यांत शिरूं असें ब्रिटिश सरकाराचें म्हणणें जाहीर करण्यांत आलें होतें. सहा महिन्यांमागें भरलेल्या वर निर्दिष्ट केलेल्या प्रातिनिधिक सभेंत कराराची मुदत वाढण्याविषयींचा ठराव झाला नाहीं; म्हणून तो करार गेल्या सप्टेंबरपासून रद्द झाला आहे. परंतु आंतरराष्ट्रीय साखरकमिटी मात्र एक वर्षपर्यंत अस्तित्वांत राहणार आहे.

पुन्हां जागतिक साखर परिषद् बोलावण्यांत आली व तीमध्यें भाग घेण्याचें ग्रेटब्रिटननें ठरवलें तर पूर्वीपेक्षां निराळ्या स्वरूपाचे प्रश्न तिच्यापुढें चर्चेसाठीं यावे लागतील. गेल्या चार वर्षांत जपान व हिंदुस्थान ह्या देशांनीं आपली साखरेची पैदास वाढवली असल्यामुळें सदरहु चर्चेस निराळें वळण लागलें पाहिजे. ह्या देशांचें साखरेच्या पुरवठ्याच्या बाबतींतलें परावलंबन संपलें असून त्या मालाची निर्गत करण्याचेंहि सामर्थ्य त्यांस प्राप्त झालें आहे. प्रस्तुत विषयासंबंधानें लिहितांना वरील हकीकत देऊन एक जर्मन वृत्तपत्र म्हणतें कीं साखरेचे प्रचलित बाजारभाव आणि अनेक देशांमध्यें आयात व्यापाराचें होणारें नियंत्रण लक्ष्यांत घेतां जर्मनीनें साखरेच्या व्यापाराविषयींच्या करारांत भाग घेण्याचा प्रश्न आज उद्भवत नाहीं. खुद्द जर्मनीमध्यें साखरेचा मोठा खप होत असल्यानें अंतर्गत पुरवठ्याकडे आणि उत्पादनाच्या सुधारणेकडेच त्या देशांत विशेष लक्ष्य दिलें पाहिजे आणि आंतरराष्ट्रीय करार झाल्यास त्यास तो इष्टच असला तरी त्यासंबंधानें जर्मनीस उत्सुकता वाटण्याचें कारण नाहीं, असें त्या पत्राचें मत आहे. त्यान अशी सूचना मात्र केली आहे कीं, अंतगत खपास आवश्यक असलेली सर्व साखर स्वतःच्या देशांत तयार होईल अशी शेतकऱ्यांनीं व कारखानदारांनीं खबरदारी घेतली पाहिजे. जमन साखरेचा फाजील पुरवठा झाल्यास तो माल परदेशांत विकावयास सांपडावा इतक्यापुरताच जर्मनीचा आंतरराष्ट्रीय साखर-कराराशीं संबंध पोहोंचतो.

हिंदुस्थानांतले ऊंस पिकवणारे शेतकरी व साखरेचे कारखानदार ह्यांस प्रस्तुत प्रश्न जिव्हाळ्याचा आहे. त्यांनीं व हिंदुस्थान सरकारनें जागरूक राहून स्वसंरक्षणाचे उपाय वेळींच योजले पाहिजेत. महाराष्ट्रांत उंसाची लागवड व साखरेची पैदास सुधारण्याचा प्रयत्न चालला असून कॅनॉलच्या पाण्यावर कारखानेहि निघाले आहेत. ह्या कारणानें प्रत्यक्ष उत्पन्नाच्या व एकंदर आर्थिक उन्नतीच्या दृष्टीनें मुंबई सरकारचे हितसंबंध साखरेच्या धंद्याशीं संलग्न झाले आहेत. साखरेच्या धंद्याच्या मार्गांतल्या अडचणी दूर करून त्यांच्या प्रगतीस सहाय देणें हें सरकारचें कर्तव्य आहे. साखरेची पैदास हा आमच्या प्रांतांत मुख्यत्वेंकरून महाराष्ट्रीय धंदा आहे आणि तसाच तो मुंबई इलाख्याच्या औद्योगिक अभिवृद्धीस परिपोषक असा उपक्रम आहे. असल्या धंद्यांच्या प्रगतीच्या कामीं सरकारनें उदासीन रहाण्याचे दिवस केव्हांच संपले आहेत, हें जगाचा अलीकडचा इतिहास कंठरवानें सांगत आहे. मुंबईसरकारनें सध्याच्या बदलत्या जागतिक परिस्थितीच्या काळांत विधायक धोरण आंखून आपल्या प्रांतांतील होतकरू उद्योगधंद्यांस सहाय करण्यास पुढें यावें, अस आमचें आग्रहाचें सांगणें आह. असल्या धंद्यांमध्यें साखरेचा धंदा आज प्रमुख आहे. हिंदुस्थान सरकारची सहानुभूति व पाठिंबा ह्या धंद्यास मिळवणें हें कामहि प्रांतिक सरकारासच साधेल आणि तें करण्यांत त्याचें व जनतेचें हित आहे.

---

# स्फुट विचार

### रेल्वेजचा कारभार कोणीं पहावा ?

हिंदुस्थानांतील प्रमुख रेल्वेज प्रारंभीं खासगी युरोपिअन कंपन्यांनीं विलायतेंत भांडवल उभारून बांधल्या, तरी त्यांचे सरकारशीं जे करार त्यावेळीं झाले, त्यांस अनुसरून ठराविक मुदतीनंतर मोबदला देऊन त्यांची मालकी व कारभार सरकारास विकत घेतां आला आहे. ईस्ट इंडिअन व जी.आय. पी. ह्या रेल्वेज सरकारच्या मालकीच्या बनून अशाच रीतीनें थोड्या वर्षांपूर्वी त्यांची व्यवस्था सरकारच्या हातीं आली. गिरण्या, कारखाने, कोळशांच्या खाणी ह्यांच्या व्यवस्थेप्रमाणें रेल्वेज चालवणें हा एक धंदा आहे आणि तो कोणत्याहि देशाच्या कार्यकारी सरकारनें चालवणें कितपत श्रेयस्कर आहे, ह्यासंबंधानें तात्त्विक मतभेद सर्वत्र आढळतो. राज्यकारभार पहाणें व एकादा धंदा करणें ह्या गोष्टी अत्यंत भिन्न असून व्यवहार यशस्वी होण्यास जें चातुर्य, दक्षता व काटकसरी वृत्ति लागते ती सरकारी पगारदार अधिकारी व नोकर ह्यांच्यांत असणें शक्य नसल्यामुळें रेल्वेजसारख्या उद्योगांपासून सरकारनें दूर रहावें आणि ते खासगी व्यक्ति व मंडळ्या ह्यांसच चालवूं द्यावे असें कित्येकांचें मत असून त्याप्रमाणें ग्रेट ब्रिटन, अमेरिका इत्यादि देशांत रेल्वेज खासगी कंपन्यांच्या मालकीच्या आहेत व त्यांची व्यवस्थाहि खासगीच आहे. ह्याच्या उलट, राष्ट्राचें संरक्षण, व्यापार व अंतर्गत दळणवळण असल्या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींशीं रेल्वेजचा निकट संबंध येत असल्यानें त्यांची व्यवस्था देशाच्या सरकारच्या हातींच असली पाहिजे असें मत तितक्याच जोरानें व अधिकारीपणानें प्रतिपादलें जात असतें. त्याप्रमाणें जर्मनीसारख्या देशांत रेल्वेजची व्यवस्था सरकारी असून ती राष्ट्रीय उत्पन्नाची मोठी बाबहि आहे. पोस्ट व तारायंत्र ह्यांसारखीं महत्त्वाचीं कामें सरकारी खातीं पहातात व त्यांपासून दशास चांगलें उत्पन्न मिळतें तर रेल्वेज सरकारी मालकीच्या आणि व्यवस्थेखालच्या असावयास कोणती हरकत आहे ? हा प्रश्न येथें सरळ उभा राहातो आणि त्यास अस्ति किंवा नास्ति पक्षी उत्तर एकदम देतां येत नाहीं. सरकारी किंवा बिनसरकारी व्यवस्था निर्भेळ रीतीनें ग्राह्य किंवा अग्राह्य आहे, हें सांगतां येणार नाहीं. त्याचा निर्णय प्रत्येक देशाची परिस्थिति व परंपरा ह्यांवर अवलंबून राहिला पाहिजे व तसा तो राहिला आहे. ब्रिटिश रेल्वेज खासगी मालकीच्या आहेत, म्हणून हिंदुस्थानांतहि तीच पद्धति स्वीकारली गेली पाहिजे असें कांहीं शास्त्र नाहीं.

### बी. एन्. डब्ल्यू. आणि एम्. एस. एम्. रेल्वेज

रेल्वेजच्या कारभाराच्या प्रश्नाचा निकाल हिंदुस्थानांत स्पष्ट रीतीनें मार्गेच लागला आहे. ह्यासंबंधांत येथें दोन प्रकार संभवले. कराराप्रमाणें हिंदुस्थान सरकारनें कंपन्यांच्या रेल्वे, त्यांस पैसे देऊन, आपल्या हातीं घेऊन व्यवस्था त्यांच्याकडेच विशिष्ट शर्तींवर चालू ठेवणें, हा एक प्रकार आणि सरकारनें, पहिला करार संपतांच, मालकी व व्यवस्था दोन्ही आपल्या हातीं घेणें हा दुसरा प्रकार. ह्यांपैकीं पहिल्या प्रकारची योजना हिंदुस्थानांत कित्येक वर्षे चालू होती. परंतु लोकमताचा ओढा दुसऱ्या प्रकाराकडे असल्यानें ह्या सर्वच प्रश्नाचा विचार पंधरा वर्षांमागें एका कमिटीकडे सोंपवण्यांत आला आणि असें ठरलें कीं, खाजगी रेल्वे कंपन्यांचे करार जसजसे संपतील तसतसें सरकारनें रेल्वेज यांच्याकडून काढून आपल्या हातीं घ्याव्या. ह्या निर्णयास अनुसरून, ईस्ट इंडियन व जी. आय. पी. ह्या रेल्वेज कांहीं वर्षांमागें त्यानें आपल्या ताब्यांत घेतल्या व त्या आजमितीस पूर्णपणें सरकारी आहेत. बंगाल नॉर्थ वेस्ट रेल्वे व मद्रास अँड सदर्न मराठा रेल्वे ह्यांबाबतच्या करारांच्या मुदती लवकरच संपत असल्यानें त्यांचा कारभार, वरील धोरणास अनुसरून, सरकारनें आपल्या हातीं घ्यावयास पाहिजे. ह्या व्यवस्थेस हिंदी लोकमत पूर्वीपासूनच अनुकूल आहे, हें वर सांगितलें आहे. त्याचप्रमाणें, रेल्वेजचा कारभार खासगी कंपन्यांच्या हातीं असणें इष्ट आहे, असें प्रतिपादन करणारे कांहीं लोक आहेत, ह्या गोष्टीचाहि निर्देश तेथें केला आहे. ह्या मतभेदास पुन्हां तोंड फुटलें असून लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत बी. एन. डब्ल्यू. व एम्. एस. एम्. ह्या रेल्वेजबद्दलच्या ठरावाची चर्चा झाली तेव्हां तो पुन्हां व्यक्त करण्यांत आला. रेल्वेजचा सरकारी कारभार आणि सध्याची सांपत्तिक दुःस्थिति ह्यांविषयींच्या मताचा परिणाम सदरहु चर्चेत झालेला दिसून आला. तथापि, सरकारी मालकीच्या झालेल्या रेल्वेजची व्यवस्था, संधी येतांच, कंपन्यांच्या हातीं राहूं न देतां, सरकारनें आपणाकडे घेतली पाहिजे, हें लोकमत असेंब्लींत झालेल्या वादविवादांत असंदिग्धपणानें प्रकट झालें.

### असेंब्लींत व्यक्त झालेलें लोकमत

बंगालमधील व दक्षिणेंतील रेल्वेज कंपन्यांच्याकडून काढून घ्यावयाच्या किंवा नाहीं, ह्याचा अखेरचा निर्णय चालू साल संपण्यापूर्वीच करावा लागेल व त्याबाबत सरकारला त्या कंपन्यांस नोटिस द्यावी लागेल. एम. एस. एम. रेल्वे आणखी पांच वर्षांनीं ताब्यांत घेण्याची सवड असतां ही गोष्ट १९३७ मध्येंच अमलांत आणावयाची झाल्यास काय अडचणी येतील, ह्यासंबंधानें सरकारच्या बाजूनें सर महंमद झाफरुल्लाखान ह्यांनीं माहिती सांगितली. "दोन्ही रेल्वेज सरकारनें आपल्या ताब्यांत घ्यावयाच्या म्हणजे सुमारें २३ कोटी रुपये त्यांच्या कंपन्यांस लंडनमध्यें पौंडांच्या स्वरूपांत द्यावे लागतील आणि १९३७ मध्यें, नव्या राजकीय घटनेस अनुसरून सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया ह्यांस सदरहू रकम उभारतां येणार नाहीं व पार्लमेंटची संमति घ्यावी लागेल. एवढी मोठी रकम हिंदुस्थानच्या वतीनें कंपन्यांच्या पदरांत लंडनमध्यें टाकणें हें रिझर्व्ह बँकेस फारच जड जाईल. तसेंच सध्यां भांडवल विपुल असून हलक्या व्याजाच्या दरानें उभारतां येणें शक्य आहे, तीच परिस्थिति पुढें टिकेल किंवा काय, हें सांगतां येत नाहीं. त्याच सुमारास रेल्वेजच्या हिंदी नियंत्रण मंडळाची नवी योजना अमलांत येणार असून त्याकडे हा गुंतागुंतीचा व अवघड प्रश्न सोंपविणें योग्य होईल काय, हेंहि विचार करण्यासारखें आहे. कंपन्यांच्या हातून रेल्वेज काढून घेतल्या असतां त्यांवर अधिक खर्च करावा लागून त्यांपासून मिळणारें उत्पन्न घटेल. साउथ इंडिअन रेल्वेच्या कराराची मुदत १९४५ मध्यें संपते. त्याचवेळीं सदर्न मराठा व ती ह्या दोन्ही हातीं घ्याव्या का १९३७ मध्यें सदर्न मराठा रेल्वेबरोबरच, साउथ इंडिअन रेल्वे, थोडा जास्त खर्च करून, ताब्यांत घ्यावी, हा प्रश्नहि चिंतनीय आहे. सरकारनें कोणत्याच बाजूनें आपलें मत बनवलेलें नाहीं आणि प्रस्तुत चर्चेत कोणत्या महत्त्वाच्या बाबी विचारार्ह आहेत, ह्याचा आपण खुलासा करीत आहों" ह्या आशयाचा सरकारी रेल्वे मंत्र्यांनीं समारोप केला. असेंब्लींतल्या लोकप्रतिनिधींचें बहुमत, निर्दिष्ट झालेल्या अडचणी

दूर करतां येतील आणि वादविवादविषयक रेल्वेज सरकारनें विलंब न करतां आपल्या ताब्यांत घ्याव्या अशा प्रकारचें स्पष्ट असल्याचें त्यांनीं कबूल केलें आणि तें अवश्य विचारांत घेतलें जाईल, असें आश्वासन दिलें. असेंब्लीची कमिटी नेमून तिच्याकडे मात्र हा प्रश्न शिफारशीसाठीं सोंपवण्यांत येणार नाहीं असें त्यांनीं निक्षून सांगितलें. लोकमत व्यक्त करणाऱ्या त्या बाबतींतल्या ठरावावर अध्यक्षांनीं मतें घेतलीं तेव्हां सरकारी सभासद स्तब्ध राहिले आणि तो मंजूर झाला.

---

### सिनेमा फिल्मवरील जकात कमी करा

हिंदी सिनेमाच्या धंद्याच्या अभिवृद्धीसाठीं दि मोशन पिक्चर सोसायटी ऑफ इंडिया ही संस्था करीत असलेले संघटित प्रयत्न सर्वांस माहीत आहेतच. सोसायटीनें हिंदुस्थान सरकारच्या व्यापारी खात्याचे नजरेस आणण्यासाठीं त्या धंद्याच्या संबंधांतल्या कांहीं अडचणी, एका पत्राचे द्वारां त्यापुढें मांडल्या आहेत. कच्च्या फिल्म्सवरील भारी जकातीचा धंद्याचे वाढीवर कसा अनिष्ट परिणाम होतो, हें त्यांत दाखवून देण्यांत आलें आहे. जकातीचा दर कमी केल्यामुळें त्यापासून सरकारचें उत्पन्न बुडालेलें नाहीं, हें सिद्ध करून, येत्या बजेटाचे वेळीं सरकारनें ही जकात ब्रिटिश व ब्रिटिशेतर कच्च्या मालावर अनुक्रमें ५ व ७½ टक्के करण्याचें जाहीर करावें, असें सुचविलें आहे. आज ह्या धंद्यांत प्रत्यक्षपणें सुमारें १५ हजार लोक काम करीत आहेत व अर्ध्या लाखांवर लोकांचा ह्या धंद्याशीं अप्रत्यक्ष रीतीनें प्राप्तीचें साधन ह्या दृष्टीनें संबंध पोहोंचतो. ग्रामोद्धाराचे प्रचार कार्यास सिनेमाचें सहाय घेणें आवश्यक असून, १६ मि. मि.च्या शिक्षणोपयोगी चित्रपट तयार करण्यास उपयुक्त असलेल्या फिल्म्स व त्यांचे कॅमेरे ह्यांवर पुस्तकांप्रमाणेंच जकात माफ असावी, अशा आशयाचें मोशन पिक्चर सोसायटीचें म्हणणें सरकारपुढें मांडण्यांत आलें आहे.

---

### प्रो. काळे ह्यांचा सांगलींतील सार्वजनिक कार्यक्रम

सांगलीच्या दोन दिवसांच्या आपल्या मुक्कामांत प्रो. काळे ह्यांनीं पहिलें व्याख्यान वुइलिंग्डन कॉलेजमध्यें दिलें. त्याच दिवशीं त्यांनीं प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या तासगांवच्या शाखेस भेट देऊन तेथील परिस्थितीसंबंधानें चर्चा केली. सायंकाळीं त्यांचें नगरवाचनमंदिराच्या विद्यमानें 'रिझर्व्ह बँक' ह्या विषयावर व्याख्यान झालें. दुसरे दिवशीं सकाळीं प्रो. काळे ह्यांनीं स्थानिक गर्ल्स हायस्कूल व सिटी हायस्कूल ह्या संस्थांस भेट दिली आणि नवीन स्थापन झालेल्या अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या चालकांशीं विचारविनिमय केला. दुपारीं श्रीमंत सर गंगाधरराव बाळासाहेब ह्यांच्या भेटीस ते मिरजेस गेले आणि थोडा वेळ मिळाला, तेवढ्यांत जुन्या सराफी घराण्यांतील हिशेबाच्या वह्यांचा तलास लावला. नंतर सांगलीस बँक ऑफ सांगलीचे चालक व इतर हितचिंतक ह्यांच्याशीं दीड तास बँकिंग संबंधाच्या कित्येक महत्त्वाच्या प्रश्नांची वाटाघाट केली आणि त्यांनीं सायंकाळीं अंबराईमध्यें जागतिक आर्थिक मंदी व हिंदुस्थान ह्या विषयावर व्याख्यान दिलें. व्याख्यानास हिज हायनेस आप्पासाहेब, रामदुर्ग व कुरुंदवाडचे चीफसाहेब, सर मोरोपंत जोशी, संस्थानचे अधिकारी व गांवांतील अनेक प्रमुख गृहस्थ हजर होते.

---

## मध्यवर्ती कायदेमंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

१९३५ अखेर हिंदुस्थान सरकारजवळ १,६७,९२१, पौंड कोयनेल शिल्लक होतें. ह्यापैकी दीड लक्ष पौंड कोयनेल जरूर उपस्थित झाल्यास शिल्लक असावें, म्हणून बाजूस काढून ठेवण्यांत आलेलें आहे. वास्तविक, आरोग्याची बाब प्रांतिक सरकारांच्या कक्षेंत येते. तथापि, हिंदुस्थान सरकारनें मोफत वाटण्यासाठीं त्यांस वेळोवेळ कोयनेल पुरवलें आहे.

*
* *

१९३४-३५ मध्यें कोयनेलच्या विक्रीपासून हिंदुस्थान सरकारास ६ लक्ष ९ हजार रुपये मिळाले.

*
* *

हिंदी मालास सिलोनमध्यें सवलती मिळाव्यात, ह्यासंबंधीं सिलोन सरकारबरोबर वाटाघाट चालू आहे.

*
* *

नॉर्थ वेस्टर्न रेल्वे व ईस्ट इंडियन रेल्वे ह्यांचेसाठीं २९ इंजनें पुरवण्याचें कंत्राट क्रुप्सच्या जर्मन कारखान्यास देण्यांत आल्याचें सर महमद जाफरुल्लाखान ह्यांनीं जाहीर केलें. ईस्टर्न बेंगाल रेल्वेनें इंजनांचे १५ बॉयलर मागवले.

*
* *

सप्टेंबर, १९३५ अखेर विजगापट्टम् बंदराच्या सुधारणेचे योजनेवर ३२½ कोटि रुपये खर्च झाला. हें बंदर हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर कोकोनाडाचे उत्तरेस १०५ मैलांवर व कलकत्त्याचे दक्षिणेस ५४५ मैलांवर आहे. बंदराचे आवारांत मोठीं जहाजें येण्याजोगें तें खोल व रुंद करण्याच्या योजनेसाठीं हिंदुस्थान सरकार पैसे पुरवीत आहे.

*
* *

इराक हा देश ब्रिटिश नेतृत्वाखालीं असून त्याचें क्षेत्रफळ सुमारें जपानएवढें आहे. तेथें सुमारें ४,५०० हिंदी लोक वास्तव्य करून आहेत. त्यांच्या मालमत्तेची किंमत ७० लक्ष रुपये भरेल.

*
* *

बंगाल नागपूर रेल्वे व सदर्न मराठा रेल्वे ह्या दोन्ही रेल्वेज सध्या खाजगी कंपन्यांच्या मालकींत आहेत त्या सरकारनें विकत घेण्याचें ठरविल्यास कंपन्यांना एका वर्षाची नोटिस द्यावी लागेल, नाहीं तर १९४२ पर्यंत थांबलें पाहिजे. खरेदीची किंमत सुमारें २३½ कोटि रुपये होईल व ही रकम इंग्लंडमध्यें पौंडांत अदा करावी लागेल. १९३७ सालीं स्टेट सेक्रेटरीला एवढें मोठें कर्ज उभारण्यासाठीं नव्या घटनेप्रमाणें पार्लमेंटची अनुमति घ्यावी लागेल.

*
* *

हिंदुस्थानांतील सर्व मुलूख नव्या सुधारणांचे अमलाखालीं येणार नाहीं. 'मागसलेले प्रदेश' गव्हर्नरांचे ताब्यांत रहाणार असून फेडरल किंवा प्रांतिक कायदेमंडळाचे कायदे त्यांस लागणार नाहींत. हे मुलूख हिंदी कायदेमंडळाच्या कक्षेंत आणण्याची सरकारनें व्यवस्था करावी, अशा अर्थाचा ठराव असेंब्लींत चर्चेस निघाला.

*
* *

पेट्रोल, केरोसीन व इतर खनिज तेलांचा व्यापार करणाऱ्या हिंदुस्थानांत ६६ कंपन्या आहेत, त्यांपैकीं २१ कंपन्या परदेशांत स्थापन झालेल्या आहेत.

---

## परप्रांतांत वसति करणारांची वाढती संख्या

लोकांची प्रवृत्ति आपलें गांव सोडून न देण्याची व शक्य तोंवर न हालतां काम मिळेल व पोट भरेल तर पहावें अशी असते. तथापि, परगांवीं किंवा परप्रांतांत जाऊन तेथें स्थायिक होण्याची प्रवृत्ति हिंदुस्थानांत आतां वाढत आहे आणि नोकरीसाठी व उद्योगधंद्यासाठी लोकांची आंतरप्रांतीय ये-जा मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहे. आसपासच्या खेड्यांतून, विवाहकार्यानिमित्त इकडच्या माणसें तिकडे जातात; त्याचप्रमाणें, यात्रेसाठी, उद्योग-धंद्यासाठी, तात्पुरत्या कामासाठी किंवा रोगराईपासून बचाव करण्यासाठी मनुष्य स्थलांतर करतो. शहरांत मजुरीसाठी आलेले 'घाटे' शेतीच्या मोसमाचे वेळीं परत कोंकणांत जातात, ह्याची माहिती सर्वांस आहेच. कामानिमित्त इतरत्र वास्तव्य करून आपल्या गांवीं मधून मधून परतणारे कामगार बरेच आढळतात. स्वतःच्या गांवीं राहून रोजच्या रोज शेजारच्या गांवांत अगर शहरांत कामास जाणारे कित्येक लोक आहेत. कल्याण, ठाणें, इत्यादि ठिकाणीं राहणारे हजारो लोक रोज मुंबईस जातात. त्याचप्रमाणें, पुण्यांतील लोक खडकीच्या कारखान्यांत जात असलेले दिसतात.

एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत जाणारे लोक बरेच दिवस तेथें काढण्याच्या इरादानें जातात, हें उघड आहे. त्या संबंधांतले आंकडे येथें दिले आहेतः—

**एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत जाऊन स्थायिक होण्याची लोकांची प्रवृत्ति दर्शवणारे आकडे**

| | १९३१ ची खानेसुमारी | | १९२१ ची खानेसुमारी | |
|---|---|---|---|---|
| | परप्रांतांतून आलेले लोक | परप्रांतांत गेलेले लोक | परप्रांतांतून आलेले लोक | परप्रांतांत गेलेले लोक |
| आसाम | १३,१४,०४७ | ७३,०३६ | १२,१६,६६१ | ७५,९०९ |
| पंजाब | ६,३५,०२५ | ७,०२,८१७ | ५,९१ ८८५ | ५,३०,९४२ |
| बंगाल | १७,२६,३७० | ९,५४,४३४ | १८,१३,७७५ | ६,८५,५८१ |
| बिहार व ओरिसा | ४,६६,५६३ | १७,५८,१३० | ३,८७,०६८ | १९,५५,०३६ |
| ब्रह्मदेश | ६,१७,५२१ | २४,१९७ | ५,६२,५३० | १९,०५९ |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | ६,४९.:६४ | ४,२२,०६१ | ६,० ,९२४ | ४,०६,६०१ |
| मद्रास | २,४६,८९२ | ११,३५,२३१ | १,९६,६०९ | ९,१४,७९२ |
| मुंबई | ११,८८,९०१ | ५,९२,११४ | १०,३९,६२२ | ५,६७,५९९ |
| संयुक्त प्रांत | ४,९४,३०८ | १५,५७,४५१ | ४,२५,१५२ | १३,९९,७१४ |

मुंबई इलाख्यांत आलेल्या परप्रांतीय लोकसंख्येसंबंधी आंकडे खाली दिले आहेत.

**मुंबई इलाख्यांत आलेले परप्रांतस्थ लोक**

| कोणत्या प्रांतांतून आले ? | १९३१ ची खानेसुमारी | १९२१ ची खानेसुमारी |
|---|---|---|
| मद्रास | ५८,७६२ | ४४,०३९ |
| बंगाल | ४२,४३७ | |
| पंजाब | ८९,४३७ | ३३,८३४ |
| संयुक्तप्रांत | १,३५,२१७ | १,१२,४६६ |
| मध्यप्रांत | ५५४,३७५ | ३०,७५६ |
| हैद्राबाद | १,६१,६६७ | २,०६,८४२ |

म्हणजे, मुंबई इलाख्यांत जन्मलेले परंतु हिंदुस्थानांत इतरत्र आढळलेले असे १९३१ सालीं फक्त ५ लक्ष ९२ हजार लोक होते. ह्या उलट परप्रांतांत जन्मून मुंबई इलाख्यांत आढळल्यांची संख्या ११ लक्ष ९० हजार भरली. प्रत्येक प्रांताचें नैसर्गिक, सामाजिक आणि आर्थिक वैशिष्ट्य आहे आणि त्यावरून तेथें लोकसंख्या गर्दीची किंवा तुरळक असणें अवलंबून रहातें. कांहीं ठिकाणचे लोक स्थानिक उद्योग-धंद्यांबाबत फारसें औत्सुक्य दाखवीत नाहींत आणि त्यासाठी बाहेरचीं माणसें आणावीं लागतात असा, उदाहरणार्थ, आसाम व बंगाल प्रांतांतला अनुभव आहे. पठाण व पुरभय्ये ह्या प्रांतांत आढळतात आणि मारवाडी लोकांचा व्यापारधंदा कलकत्त्यांत मोठ्या प्रमाणावर चालतो ह्या गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत.

(१) बिहार व ओरिसा, (२) संयुक्त प्रांत व (३) मद्रास हे प्रांत सर्वांत ज्यास्त लोकांस परप्रांतांत पाठवितात, ही गोष्ट ह्या तीन प्रांतांतील आर्थिक परिस्थितीची निदर्शक आहे. लोक-संख्येच्या मानानें प्राप्तीचीं साधनें अपुरीं पडून सालोसाल बेकारींत होणारी वाढ ही वरील आंकड्यांत प्रतिबिंबित झाली आहे. आपल्या इकडे घरगुती नोकरींत व गवळ्यांच्या धंद्यांत 'भय्ये' लोकांची गर्दी झाली आहे व मद्रासी लोकांनीं मुंबईसारख्या शहरीं कारकुनी नोकऱ्यांच्या क्षेत्रांत चांगलेंच आक्रमण केलें आहे, ह्याचा अनुभव सर्वांस आहेच. परप्रांतांतून येणाऱ्या लोकांस मुंबईत अजून वाव आहे, असें वरील आंकड्यांवरून सूचित होतें, परंतु हें खरें नाहीं. परप्रांतीय लोक घरेंदारें सोडून आलेले असतात; त्यामुळें स्थानिक लोकांशीं अनिष्ट स्पर्धा करून ते नोकऱ्या पटकवतात अशी तक्रार ऐकूं येत आहे. मद्रासी लोकांनीं परप्रांतांत आपलें बस्तान बसविण्यास सुरवात केली आहे, ही गोष्ट खरी आहे. बृहन्म-हाराष्ट्राच्या परिस्थितीची व भवितव्याची चर्चा होत असतां प्रस्तुत लेखांत दिलेली माहिती उपयुक्त व विचारप्रवर्तक होईल.

---

## डॉन ऑफ इंडिया इन्शुअरन्स कं. लि., पुणें

**३१ डिसेंबर, १९३५ चे कामकाजाची प्रगति दर्शविणारे आंकडे**

| | |
|---|---|
| विमे—वैद्यकीय तपासणीनंतर | २,७८,५०० रु. |
| विमे—वैद्यकीय तपासणीखेरीज | ३,६७,७०० रु. |
| पॉलिसींची संख्या | १,६०० |
| विमा खातीं शिल्लक ( लाइफ ॲशुअरन्स फंड ) | ४७,००० रु. |
| व्याजीं लावून गुंतविलेल्या रकमा | ८०,००० रु. |
| 'कंट्रोल ऑफ करन्सी' जवळ ठेवलेले सरकारी रोखे | २७,००० रु. |

**बोनस**

( ३१ मार्च रोजीं जाहीर केलेलें पहिलें चतुर्वार्षिक बोनस )

| | | |
|---|---|---|
| हयातीनंतरचे विमे | दर हजारीं | ६० रु. |
| हयातीमधील मुदतीचे विमे | „ | ४८ रु. |

**क्लेम्सचे पैसे दिले**

| | |
|---|---|
| वैद्यकीय तपासणी शाखा | ४,००० रु. |
| विना-तपासणी शाखा | १,४०० रु. |

## फळें व त्यांचे पदार्थ टिकविण्याकरितां मुंबईमध्यें 'कॅनरी' काढण्याची योजना

लेखकः—एस. एस. भट, एम्. एजी. शेतकी कॉलेज पुणें.
भाषांतरकारः—के. जी. कोल्हटकर, बी. एजी.

( मागील अंकावरून चालू )

**( ५ ) वरील अडचणींवर जरूर असलेली उपाययोजनाः—**

वर सांगितलेल्या अनेक अडचणी केवळ सरकारच्या मदतीनें व प्रोत्साहनानें दूर होण्यासारख्या असून धंद्याची प्रगतीहि पण त्यावरच अवलंबून आहे. सरकारनें कांहीं अडचणींवर काय योजना करावी हें खाली दिलें आहे.

( १ ) या देशांत होणाऱ्या फळें व भाज्या कॅनिंग करून दीर्घकाल साठवून ठेवण्याच्या पद्धतींचा पूर्व शोध लावण्यासाठीं संशोधन संस्था स्थापन करणें.

( २ ) शुद्ध, स्वच्छ व निर्भेळ माल मिळण्याबाबत कायदे करून त्यांची धंदेवाले व कारखानदार यांवर अंमलबजावणी करणें. अशा कायद्याचा उत्तम तोच परिणाम होऊन कारखानदार उत्तम तऱ्हेचाच माल नेहेमी काढतील.

( ३ ) खाजगी रीतीनें धंदे करणारांना प्रोत्साहन व मदत देऊन त्यांना उर्जितावस्थेस आणणें.

( ४ ) परदेशांतून येणाऱ्या मालावर जबर जकात बसवून स्वदेशी मालाला संरक्षण देणें.

( ५ ) बरण्या, डबे (कॅन्स), उत्तम फळें व भाज्या वगैरे या धंद्यास जरूर असणाऱ्या कच्च्या पदार्थांच्या वाढीस उत्तेजन देणें.

वर सांगितलेल्या गोष्टी जरी अत्यंत महत्वाच्या असल्या तरी हिंदुस्थानांत हल्लींच्या परिस्थितींत त्या अमलांत येणें एकंदरीनें पहातां कठिणच आहे.

( ६ ) **दुसरी एक उपाययोजनाः**—हा धंदा पुढें येण्यास दुसरा एक उपाय म्हणजे गिऱ्हाइकांस स्वदेशी मालाबद्दल गोडी उत्पन्न करून देणें व त्याचबरोबर आपला माल उत्तम प्रकारचा, टिकाऊ, स्वस्त व सर्वबाजूंनीं परदेशी मालाच्या तोडीचा असतो याबद्दल त्यांची खात्री करून देणें, हा होय. जाहिरातद्वारां व अशाच अनेक प्रकारांनीं उत्तम माल केव्हांच लोकप्रिय होतो. आतां ज्या ठिकाणीं फळें व भाज्या यांचा निसर्गात भरपूर पुरवठा आहे व जेथें ज्या ठिकाणीं डब्यांतून सांठविलेला बाजारी माल वापरण्याबद्दल धार्मिक निर्बंध आहेत तेथें हा धंदा एकदम वाढीस लागणार नाहीं; तरी कांहीं कालानंतर एका विवक्षित मर्यादेपर्यंत त्याची वाढ होण्यास कांहींच हरकत नाहीं.

( ७ ) **महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सः**—महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स या भांडवलवाल्या संस्थेनें या धंद्याच्या शक्यतेकडे नुकतेंच लक्ष घालण्यास सुरवात केली आहे. त्यांनीं मनावर घेतल्यास त्यांच्या व्यापारी कौशल्यानें व अनुभवानें हा धंदा उर्जितावस्थेस आल्याविना रहाणार नाहीं; अर्थात् त्यांनीं सुद्धा पूर्ण दक्षता व सावधगिरी बाळगूनच सुरवात केली पाहिजे.

**( ८ ) वरील संस्थेस मार्गदर्शक सूचनाः—**

खाली दिलेले कांहीं मुद्दे वर सांगितलेल्या संस्थेस मार्गदर्शक होतील असा भरंवसा आहे.

( १ ) प्रथम अर्ध-व्यापारी तत्वावर एक 'कॅनरी' उघडावी; शास्त्रीय शोध वगैरे मागाहून करण्यास हरकत नाहीं.

( २ ) चांगलें भरभक्कम भांडवल दूरहंगामी उत्तम प्रकारचीं फळें विकत घेऊन तीं सांठवून ठेवण्यांत गुंतविलें पाहिजे व त्याचबरोबर माल खपविण्यासाठीं जाहिरातद्वारा खूप प्रसिद्धि केली पाहिजे.

( ३ ) ज्यांना या धंद्याची गोडी आहे असे तज्ज्ञ लोक कामावर ठेवले पाहिजेत. मुख्यतः व्यापारी धोरण ठेवून थोडेसें शास्त्रीय संशोधनहि चालू ठेवावें.

( ४ ) प्रथम थोडेसेच पण महत्त्वाचे पदार्थ तयार करण्याकडे लक्ष द्यावें व नंतर सवडीनुसार अनेक तऱ्हेचे पदार्थ करण्यास सुरवात करावी.

( ५ ) सुरवातीस सध्या बाजारांत मिळणारे उत्तम प्रकारचे डबे ( कंटेनर्स ) थोडेसे महाग असले तरी उपयोगांत आणावे व नंतर स्वतःच्याच कारखान्यांत असल्या वस्तू करावयास लागावें.

वर सांगितलेल्या सूचना अमलांत आणल्यास धंदा किफायतशीर होईल हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. या अशा धंद्याला आजपर्यंत भासणारी महत्वाची उणीव म्हणजे पदार्थ सर्वांगसुंदर, आकर्षक व टिकाऊ बनविण्यास लागणाऱ्या सामानाचा अभाव हीं होय. ही उणीव या धंद्याच्या उत्कर्षाच्या मार्गातील मोठीच धोंड आहे. सुधारलेली व योग्य प्रकारची यंत्रसामुग्री मिळाल्यास माल उत्तम निघतो एवढेंच नव्हे तर अशावर काम आपोआपच शतपटीनें चांगलें निघतें. यापुढें तरी या धंद्यांतील संशोधन व माल तयार करणें हीं दोन्हींहि बरोबरच झालीं पाहिजेत. कारखान्यांत काम करणाऱ्या लोकांना त्या कामाबद्दल जर आवड असेल तरच त्यांच्या बुद्धिमत्तेचा व कौशल्याचा उपयोग होईल. पुष्कळ प्रकारचा पण अपूर्ण किंवा भिकार माल तयार करण्यापेक्षां कांहीं थोडक्याच गोष्टींकडे विशेष लक्ष देऊन त्या सर्वांगसुंदर व मनपसंत बनविणें यांतच या धंद्याच्या उत्कर्षाचें सार आहे. असा तयार झालेला माल किफायतशीर रीतीनें विकतां आलाच पाहिजे. आतां स्वानुभवावर पुष्कळ गोष्टींत फेरबदल करणें हें अवलंबून राहील.

**( ९ ) धंद्याच्या वाढीची शक्यताः—**

आतांपर्यंत सांगितलेले मुद्दे लक्षांत घेऊन जर कारखान्याची मांडणी केली तर त्याची वाढ झपाट्यानें होईल व खाली दिलेल्या गोष्टी त्याच्या प्रगतीस सहायकारक होतील.

( १ ) या इलाख्यांत निरनिराळ्या प्रकारच्या उत्तमोत्तम फळांची पैदास.

( २ ) कांहीं विवक्षित फळांचा भरपूर साठा व त्या प्रत्येकास असणारी निरनिराळी चव.

( ३ ) संघटना करून बागांची लागवड झाल्यावर कच्चा माल भरपूर मिळण्याची शक्यता.

( ४ ) स्वस्त व मेहनती मजूर येथें पुष्कळ मिळूं शकतात.

( ५ ) डब्यांतून जतन केलेल्या फळांना या इलाख्यांत असलेली भरपूर मागणी. सुमारें ५½ लक्ष रुपये किंमतीचीं कॅनिंग केलेलीं फळें परदेशांतून येथें येतात. ती आयात बंद केली असतां देशी मालास भाव येऊन त्याच्या धंद्याची चांगलीच वाढ होईल.

---

### दि मुकुंद इन्शुअरन्स कं. लि० पुणें

वरील विमा कंपनीची जाहिरात ह्या अंकांत दुसरीकडे प्रसिद्ध करण्यांत आली आहे, तिच्याकडे आम्ही वाचकांचें लक्ष वेधतों. विमा कंपन्यांच्या कार्यास जरी आतां अमर्याद वाव नसला, तरी काटकसरीनें काम करणाऱ्या व लोकांच्या गरजा ओळखून त्या भागविणाऱ्या कंपन्या यशस्वी होण्यास जागा आहे हें आम्हीं मागेंच सांगितलेलें आहे. तरी मुकुंद इन्शुअरन्स कंपनीचा, व्यापार व उद्योगधंदे ह्यांत पैसे गुंतविणाऱ्यांनीं वरील दृष्टीनें विचार करून ह्या संधीचा फायदा घ्यावा.

## ध्येय आणि तयारी ह्यांचा " अमेळ "

### प्रो. काळे ह्यांचें सांगलीच्या कॉलेजांत व्याख्यान

सांगली येथील वुइलिंग्डन कॉलेजच्या इतिहास-अर्थशास्त्र मंडळाच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं प्रो. काळे ह्यांनीं अध्यक्षीय भाषण केलें, त्यांत देशांतील बदलती परिस्थिति व सामाजिक जीवन ह्यांमध्यें उत्पन्न झालेला " अमेळ " हा सध्याच्या बेकारीसारख्या आर्थिक आपत्तींस कारणीभूत झाला असून, तो दूर करून हिंदी राष्ट्रानें सदरहु बाबतींत योग्य समन्वय केला पाहिजे, ह्या सिद्धांताचें विशेषेंकरून विवेचन केलें. सामान्य माणसांत ऐतिहासिक व मार्मिक बुद्धि जागृत झालेली नसते. ह्या कारणानें भूत, वर्तमान व भविष्य ह्यांच्या परस्परसंबंधाचें त्यास आकलन होत नाहीं आणि तो मनानें भूतकालांत विलीन होऊन रहातो. कित्येक विचारशील लोक नवीन ध्येयाच्या आकाशांत भराऱ्या मारतात आणि त्यांचा भूत व वर्तमान यांचा आधार तुटून ते अशक्यतेच्या क्षेत्रांत तरंगत रहातात. सांगली-मिरजेच्या समाजांत गेल्या पिढींत केवढे महत्त्वाचे सामाजिक व आर्थिक फेरबदल झाले आहेत, ह्याचा विचार करणारांस आपलें जीवन सुखकर होण्यास सद्यःस्थितींत वहावत न जातां त्यास उचित अशी मुरड श्रमपूर्वक घातली पाहिजे ह्याचें महत्त्व पटेल.

आमची शिक्षणपद्धति आणि समाज-जीवन ह्यांमध्यें मेळ नाहीं, अशी टीका वारंवार ऐकूं येते; आणि ह्या पद्धतींत सुधारणा होणें इष्ट असल्याविषयीं सर्वत्र एक मत आहे. आमच्या गरजा वाढल्या व बदलल्या, आमच्या आचार-विचारांत फरक पडला, आमची रहाणी पूर्वीं सारखी राहिली नाहीं. परंतु नवी रहाणी पचवण्यास व टिकवण्यास आवश्यक असलेलीं साधनें तरुण पिढीस हस्तगत करतां येतील अशी तजवीज मात्र आमच्या हातून झालेली नाहीं. केवळ अभ्यासक्रम बदलण्यानें इष्ट फलप्राप्ती व्हावयाची नाहीं.इतर देशांत सध्याच्या मंदीच्या काळांतहि,नुसत्या शिक्षणांतच नव्हे तर उद्योगधंदे, व्यापार, सरकारी धोरण इत्यादि अनेक बाबतींमध्येंहि जरूर ते फेरफार वेळींच घडवून आणून बेकारी, दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, हलाखीची स्थिति, उतरतें रहाणीचें मान इत्यादि अनिष्ट पद्दामोडींवर उपाययोजना केली जाते. आमच्या देशांत ह्या संबंधांत अज्ञान,अनास्था व आळस ह्यांचें पूर्ण साम्राज्य असल्याचें दिसून येतें. ह्या परिस्थितीचा काळजीपूर्वक विचार करून सामाजिक जीवनाची घडी नीट बसवण्यास लागणारीं साधनें हस्तगत करण्याची तयारी तरुण पिढीच्या हातूनच आतां व्हावयास पाहिजे. आपल्या वैयक्तिक, कौटुंबिक व राष्ट्रीय गरजा एका प्रकारच्या आणि आपली शिक्षणपद्धति आणि आपलें बौद्धिक जीवन व व्यावहारिक वर्तन दुसऱ्या प्रकारचें, असा " अमेळ " आज चोहोंकडे आमच्या देशांत आहे. तो नाहींसा करण्याचा यत्न प्रत्येक विद्यार्थ्यानें आपल्या पुरता केला पाहिजे. राज्यकर्ते व युनिव्हर्सिटी ह्या कामीं हालचाल करतील, अशी अपेक्षा करून वाट पहाण्यांत कांहीं हशील नाहीं, आपणांस इष्ट असलेला बनाव आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिति ह्यांच्यामध्यें मोठी खिंड पडली आहे, तिचें कारण अनास्था व बेफिकीरपणा ह्यांनीं आम्ही ग्रासून जाऊन स्वस्थ बसलों, हेंच आहे. तेव्हां, आजपर्यंत आपणांस भोंवलेला आळस झाडून टाकून प्रत्येकानें स्वतःच्या व राष्ट्राच्या प्रगतीस आपापल्या बुद्धिप्रमाणें व सामर्थ्यानुसार हातभार लावण्याचा निश्चय करणें इष्ट असून त्या कामीं स्वतःची कंबर बांधली पाहिजे. तरुण पिढींत अशी तयारी होईल तरच आपल्या समाजाचा उत्कर्ष होण्याची आशा आहे.

---

## शिक्षण व धंदे ह्यांचें महत्त्व

### रावसाहेब गायकवाड ह्यांचें भाषण

कुडाळ ( जि. सातारा ) येथें, सातारा जिल्हा क्षत्रिय माळी समाजाचें तिसरें अधिवेशन ता. २ फेब्रुवारी रोजीं रावसाहेब बळवंतराव रखमाजी गायकवाड ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें. त्यावेळीं रावसाहेबांनीं केलेल्या भाषणांतील महत्त्वाचा भाग येथें दिला आहे:—

**जिल्हा परिषदांचें खेडेगांवांतील लोकांस महत्त्व**

" परिषदेची खरी गरज सुशिक्षितांना अगर शहरवासीयांना नसते. जर खरोखर तिची गरज कोणास भासत असेल तर ती खेडेगांवांत रहाणाऱ्या अज्ञान बांधवांना असते. कारण त्यांना शिक्षणाच्या अभावीं जगांत काय चाललें आहे हें कळत नाहीं. पूर्वापार चालत आलेल्या रूढींमुळें आपण कशा रीतीनें रसतळास चाललों आहोंत याची जाणीव त्यांस नसते.भाऊबंदकीच्या विनाकारण वादामुळें आपण आपलेंच कसें नुकसान करून,लोकांचा फायदा कसा करतो याची समज नसते. दारू आदिकरून व्यसनांना बळी पडून आपले व आपल्या कुटुंबांतील मुलाबाळांचे कसे हाल करतों याची कल्पना नसते. भोळ्या समजुतींनें वहात जाऊन निष्कारण खर्च कित्येक प्रसंगीं करण्यामुळें काय काय तोटे होतात याचा अंदाज त्याला नसतो. आपली ऐपत नसतांना आपल्या लहान-लहान मुलाबाळांचीं लग्नें, आपलीं घरेंदारें, शेतें वगैरे सावकाराच्या पदरीं गहाण टाकून करण्यापासून आपली काय परिस्थिति होते याचें चित्र त्याला रेखाटतां येत नाहीं, वगैरे गोष्टींपासून होणाऱ्या तोट्यांची जाणीव जिल्हा परिषदांकरवीं खेड्यांतील अज्ञजनांना करतां येते व अशा तऱ्हेची कामगिरी करण्यास त्या चांगल्या उपयोगी पडतात. "

नंतर साक्षरतेचें व शिक्षणाचें महत्त्व वर्णन करून ते म्हणाले:-

" आपल्या सामुदायिक शेतीच्या धंद्याचा व त्याला अनुरूप अशा जोडधंद्याचाहि उहापोह करून योग्य तो मार्ग चोखाळला पाहिजे. त्याचप्रमाणें कुटुंबांतील सर्वच माणसांनीं एकाच धंद्यावर अवलंबून न रहातां प्रत्येकानें आपापल्या आवडीनुसार धंद्याची निवड केली पाहिजे व त्यांत पारंगता मिळवली पाहिजे. कोणताहि धंदा करण्यास मनास लाज वाटतां कामा नये."

INSURE WITH—
**The SUN SHINE INSURANCE Ltd.**
LAHORE
BECAUSE OF
Its Most Modern, Unique & Beneficial Schemes
*For Prospectus Please write to:—*
Special Officer,
POONA BRANCH

**S. B. JOSHI & Co.**
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716, Sadashiv Peth, Poona City

## विजेच्या ग्राहकांवरील जबाबदारी

### हायकोर्टातील एक महत्त्वाचा निवाडा

कित्येक शहरांतून आतां विजेचे दिवे झाले आहेत. घरांत वीज घेतल्यामुळें आपणांवर कांहीं विशिष्ट जबाबदारी येते, ह्याची बहुतेक घरमालकांस जाणीवहि नसते. ह्या दृष्टीनें, मुंबई हायकोर्टानें नुकताच दिलेला एक निवाडा अत्यंत महत्त्वाचा असून त्यासंबंधीची हकीकत येथें देत आहों.

मि. नाझरअली ह्यांच्या मुलानें घराचा माळा दुरुस्त करण्यासाठी एका गवंड्यास बोलावून त्याच्या हाताखाली एक बिगारी दिला. काम करतांना, बिगाऱ्याचे हातून चुकून विजेच्या तारेवरील वेष्टन कापलें गेलें व विजेच्या धक्क्यानें तो मरण पावला. पाण्याच्या नळाला जोडून दिलेली तार (अर्थ वायर) तुटल्यामुळें, विजेचा प्रवाह जमिनींत जाण्याऐवजीं बिगाऱ्याचे शरीरांतून तो गेला व त्यामुळें त्यावर मृत्यूचा प्रसंग ओढवला. ही तार गंजून गेलेली होती.

मुंबईच्या मुख्य प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटपुढें हा खटला चालला. इंडियन इलेक्ट्रिसिटी ॲक्टान्वयें केलेल्या नियमाप्रमाणें, विजेच्या तारेवर ज्याची मालकी असेल त्यानें ती दुरुस्त राखली पाहिजे, असें सरकारतर्फे सांगण्यांत आलें. मि. नाझरअली ह्यांचें म्हणणें असें कीं, ते विजेचे केवळ ग्राहक होते; नियमांतील व्याख्येप्रमाणें ते तारेचे मालक होत नव्हते. कोर्टानें प्रतिवादीचें म्हणणें मान्य करून त्यास सोडून दिलें. सरकारनें हायकोर्टाकडे अपील केलें, परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. गंजलेली 'अर्थ वायर' जरी घरमालकाच्या मालकीची होती असें समजलें, तरी ग्राहकांस विजेसंबंधी माहिती असणें कठिण असल्यानें नियमाप्रमाणें विजेच्या तारा त्यांच्या हातून दुरुस्त रहाण्याची अपेक्षा करणें व्यर्थ आहे. नियम मोडल्याबद्दल शिक्षा करणें म्हणजे विजेच्या ग्राहकांवर भलतीच जबाबदारी टाकणें होय. ४१ वा नियम मोडला गेला असला, तरी त्याबद्दल शिक्षा सांगितलेली नाहीं, सबब हायकोर्टानें अपील नामंजूर केलें.

## अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ

वरील प्रदर्शनासंबंधीं माहिती 'अर्था' च्या गेल्या अंकांत दिलेलीच आहे. ह्या प्रदर्शनाचे तीन भाग पाडण्यांत आले आहेतः—(१) प्रदर्शनीय विभाग. ह्या भागांत वेगवेगळया प्रांतांत बनविलेल्या हस्त-वस्तू ठेवण्यांत येतील. (२) आकडेवार माहिती पुरविणारा विभाग. ह्यामध्यें वस्तु तयार करण्याची पद्धत, मजुरी, कच्चा माल, बाजारपेठ, परदेशी मालाची स्पर्धा, उद्योगधंद्यांतील साधनें इत्यादींसंबंधींच्या माहितीचा समावेश होईल. (३) प्रात्यक्षिक विभाग. प्रत्येक प्रांतांतील मुख्य व महत्त्वाच्या हस्तकौशल्याच्या प्रात्यक्षिकांचें प्रदर्शन. वरील तीन विभागांखेरीज, प्रदर्शनांत ग्रामोद्योगाचा बाजार म्हणून निराळें दालन उघडण्यांत येईल. त्यांत फक्त ग्रामोद्योगाचे व्यापाऱ्यांसच भाग घेतां येईल. वरील प्रदर्शनासंबंधांतील पत्रव्यवहार श्री. वैकुंठ ल. मेहेता, सभासद, व्यवस्थापक मंडळ अ. भा. ग्रामोद्योग संघ, मुंबई, ह्यांजबरोबर करावा.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| **सरकारी कर्जरोखे** | |
| बँक रेट (२८ नोव्हेंबर १९३५ पासून) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—१० |
| ५% करमाफ लोन (१९४५-५५) ... | ११९—९ |
| ५% (१९३९-४४) लोन ... ... | १०९—६ |
| ४½% लांब मुदत (१९५५-६०) ... | ११९—० |
| ४% १९६०—७० ... ... | ११२—४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९७—६½ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०७—२ |
| ४% १९४३ ... ... ... | १०९—१२ |
| **निमसरकारी रोखे** | |
| ४% पोर्ट ट्रस्ट (बिगर गॅरंटी व लांब मुदत) | १०७—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड) | १०६—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... | १०७—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | १०७—० |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३—६३) ... | ११०—० |
| ५% म्हैसूर (१९५५) ... ... | १२२—० |
| **मंडळयांचे भाग** | |
| **बँका** | |
| बँक ऑफ इंडिया (भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १३०—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०४—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि.) | ३४-१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि.) | १५५०—० |
| रिझर्व्ह बँक (१०० रु.) | १३०-१२ |
| **रेल्वेज** | |
| दौंड—बारामती (१०० रु. चा भाग, डिव्हि. ५%) | ९८—० |
| पाचोरा—जामनेर (१०० रु. चा भाग, डिव्हि. ६%) | ९४—० |
| अहमदाबाद-प्रांतज (५०० रु. चा भाग, डिव्हि. ९½%) | ८८०—० |
| **वीज** | |
| बाँबे ट्रॅम्वे (ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३%) | १५०-१५ |
| कराची (१०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २४१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक् (१०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२३-१२ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½%) | १५३२—८ |
| टाटा पॉवर (१,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५२०—० |
| **इतर** | |
| टाटा आयर्न (१५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६%) | १९२—८ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६६—८ |
| टाटा आयर्न (७५ रु. ऑर्डि.) | १४३—० |
| टाटा आयर्न (३० रु. डिफर्ड) | ५२७—८ |

बंगाल
कोल सप्लाइंग फर्म
उत्तम दगडी कोळसा ( बंगाल, सी. पी. )
आणि
कोक ह्यांचे व्यापारी
व
म्युनिसिपल, लोकलबोर्ड,
पी. डब्ल्यु. डी. ( सरकारी ) कॉन्ट्रॅक्टर्स
५११ बुधवार पेठ, पुणें शहर २.
तारेचा पत्ताः–व्यंकटेश. फोन नं. ४७१

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

एन. ए. ॲन्ड फ्रेन्ड्स
स्टेशनर्स, जनरल मर्चन्टस, ॲन्ड कमिशन एजन्टस.
आप्पा बळवंत चौक, पुणें २.

दि मुकुंद इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें शहर.
[ अधिकृत भांडवल १००,००० रुपये ]
प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त
गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत प्रत्येकाची विमा कंपनी !
शेअरविक्री जोरांत सुरू झाली.
शेअर्स खपविणारे एजंटस मर्यादित. त्वरित अर्ज करा.
मॅनेजिंग एजंटस्—विष्णु मुकुंद आणि कं., पो. बॉ. नं. ४३.
२५६ सदाशिव, पेरूगेटाजवळ, पुणें शहर.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें
मध्यम वर्गांतील गृहेच्छू लोकांस | अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य
भाडेकरी–घरमालक–गृहयोजना
माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.
जनरल मॅनेजर

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "
स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली
पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः–
कॉमनवेल्थ विमा कंपनी, लि. पुणें.
अध्यक्ष–श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी
हयातींतील विम्यास ३७॥ रु. | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास ४५ रु.
जास्त माहितीकरितां भेटा अगर समक्ष लिहा.
मॅनेजिंग एजन्टस.

स्वदेशी
कापड म्हणजे काय ?
(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.
या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.
हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.
खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण
स्वदेशी भांडार
लक्ष्मीरोड, पुणें २.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची रिझर्व बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १५ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १६ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १७ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १८ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | १९ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २० शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २१ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २२ साक्री ( „ „ ) |
| ९ अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २३ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० शेवगांव ( „ „ ) | २४ मालेगांव ( „ नाशिक ) |
| ११ कोपरगांव ( „ „ ) | २५ सटाणा ( „ „ ) |
| १२ भिवंडी ( „ ठाणें ) | २६ कळवण ( „ „ ) |
| १३ पालघर ( „ „ ) | २७ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १४ कल्याण ( „ „ ) | २८ कालोल ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २००००००० चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल. मेहता.



# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**

**This year 1934-35**

**Exceeds**

**2 CRORES & 50 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches:* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca,

*Offices:* throughcut India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.



## ह्यूम पाईप वापरा

## पूर्ण स्वदेशी व टिकाऊ

३ इंच ते ७२ इंच व्यासाचे पाईप व अर्धगोल पाईप मिळतात.

टाक्या, खांब, सेप्टिक टाक्या वगैरे

## कांक्रीटच्या वस्तु

आम्हीं केलेल्या फारच टिकाऊ असतात.

— सर्व प्रांतांत कारखाने आहेत —

## इंडियन ह्यूम पाईप कंपनी, लिमिटेड

बलार्ड इस्टेट, मुंबई.



## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली


ई पत्र पुणें, पठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं १२४/१? पुणें शहर येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख २६ फेब्रुवारी, १९३६. अंक ९

## दि मुकुंद इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें शहर.

[ अधिकृत भांडवल १००,००० रुपये ]

प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त

**गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत प्रत्येकाची विमा कंपनी !**

शेअरविक्री जोरांत सुरू झाली.

शेअर्स खपविणारे एजंटस मर्यादित. त्वरित अर्ज करा.

मॅनेजिंग एजंटस्—विष्णु मुकुंद आणि कं., पो. बॉ. नं. ४३.
२५६ सदाशिव, पेरूगेटाजवळ, पुणें शहर.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

**डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें**

मध्यम वर्गातील गृहेच्छू लोकांस — अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य

**भाडेकरी—घरमालक—गृहयोजना**

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.
जनरल मॅनेजर

"दुसरें मूल्यमापन जाहीर झालें"

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—

**कॉमनवेल्थ विमा कंपनी, लि. पुणें.**

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां भेटा अगर समक्ष लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

**न. वि. वडनेरकर**
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ
बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यात भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

# विविध माहिती

### प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान

इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या पुणें शाखेच्या विद्यमानें गुरुवार, ता. २७ रोजीं ६॥ वाजतां गोखले हॉलमध्यें प्रो. काळे ह्यांचें "परराष्ट्रीय हुंडणावळ" या विषयावर इंग्रजींत व्याख्यान होणार आहे. जिज्ञासूंस व्याख्यानास येण्याची मोकळीक आहे, असें सेक्रेटरी कळवतात.

### मुंबई इलाख्यांतील फिल्म कंपन्या व स्टूडिओ

मुंबई इलाख्यांत सिनेमा फिल्म तयार करणाऱ्या एकूण ६१ कंपन्या आहेत, त्यांपैकीं ५४ मुंबई शहरांत असून, तीन पुण्यांत, तीन कोल्हापुरांत व एक नाशिक येथें आहे व एकूण फिल्म स्टूडिओ मात्र फक्त १९ आहेत, अशी माहिती प्रांतिक कायदे मंडळांत सांगण्यांत आली.

### कलकत्त्यांतील भिकारी

कलकत्ता शहरांत चार हजार भिक्षेकरी आहेत. त्यांपैकीं निम्मे भिकारी शरीरानें पुष्ट आहेत. उरलेल्यांत सुमारें एक हजार महारोगी व पांचशें आंधळे आहेत.

### मुंबई शहरांतील आत्महत्या

मुंबई शहरांत १९३५ सालीं एकूण १२९ लोकांनीं आत्महत्त्या केली. १९३४ सालीं १२० आत्महत्त्या झाल्या होत्या.

### ठेवी वाढल्या, परंतु रकमा गुंतविण्यास वाव नाहीं

दि बँक ऑफ इंडियाची वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत भरली होती. त्या वेळीं बँकेचे अध्यक्ष, सर चुनीलाल मेहता, हे म्हणाले कीं, अहवालाचे सालीं ठेवींची रकम दीड कोटीनीं वाढली तरी कर्जाऊ दिलेल्या रकमेंत फक्त सदतीस लाखांचीच वाढ झाली. योग्य तारणावर फायदेशीर दरानें रकमा व्याजीं लावणें हल्ली इतकें पूर्वी कधींच कठीण झालें नव्हतें. बाजारांत भरपूर पैसा असल्याचा हा परिणाम होय. सोन्याची निर्गत होत आहे, त्याबद्दल मिळणाऱ्या रकमा ठेवींचे रूपानें जमा होतात. बँक ऑफ इंडियाच्या एक कोटि रुपये अधिकृत भांडवलापैकीं निम्में भांडवल वसूल झालेलें आहे.

### लंडन शहरांत धुकें पडल्यास किती नुकसान होतें ?

गेल्या आठवड्यांत सर्व इंग्लंडभर धुकें पडलें होतें, त्यामुळें विमानें, आगबोटी, आगगाड्या ह्या सर्वांची कशी आडकाठी झाली व अडीच तासपर्यंत लोकांची कशी गैरसोय झाली ह्याची माहिती वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेली आहे. अशा धुक्यामुळें होणाऱ्या नुकसानीची पैशांत किंमत किती होते ह्याचे आंकडे बरेच मनोरंजक आहेतः—लंडन शहराचा त्यामुळें दर दिवशीं सुमारें १½ कोटि रुपयांचा अपहार होतो. वहातुकीची कुचंबणा व भाड्यांची नुकसानीः ४० लक्ष रु., प्रकाश व उष्णता ह्यांसाठी जादा खर्चः ३६ लक्ष रु., मालाच्या ने-आणीस होणारी खोटीः २० लक्ष रु., आरोग्य व चीजवस्तु ह्यांची खराबीः १६ लक्ष रु., मजुरीच्या रकमेंत कपातः २० लक्ष रु. धुक्यांतून दिसूं शकेल, असें एक खिशांत मावणारें पेन्सिली एवढें यंत्र निघाल्यास लोकांची फार सोय होईल. आगबोटींना दहा मैलांपर्यंत दिसेल, अशी व्यवस्था असणारीं यंत्रें आज आहेतच.

### मुंबईचें अबकारी उत्पन्न

१९३४–३५ सालीं मुंबई सरकारच्या अबकारी खात्यास ३ कोटि १५ लक्ष रुपये उत्पन्न झालें.ह्यामध्यें सिंधमधील उत्पन्नाची रकम ( ३० लक्ष रु. ) धरलेली नाहीं. व्यवस्थेचा खर्च अनुक्रमें ४६ व ४ लक्ष रु. आला.

### ब्रिटिश इंडस्ट्रीज फेअर

मालाची प्रसिद्धि व खरेदी–विक्री मोठ्या प्रमाणावर होण्याचें ब्रिटिश इंडस्ट्रीज फेअर हें एक महत्त्वाचें ठिकाण आहे. यंदाच्या प्रदर्शनासाठी साम्राज्यांतील देशांच्या प्रतिनिधींप्रमाणें २८ साम्राज्येतर देशांतून खरेदीदार आले आहेत. प्रदर्शनाच्या पहिल्या दोन दिवसांतच मालाची खरेदी विक्री प्रचंड प्रमाणावर झाली.

### एका वर्षांत २½ लक्ष रेडिओंची वाढ

ग्रेट-ब्रिटनमध्यें रेडिओ सेट्सचे लायसेन्स असलेले ७४ लक्ष लोक आहेत; म्हणजे इतक्यांचे जवळ रेडिओ सेट्स आहेत. एक वर्षापूर्वी हा आकडा २½ लाखांनीं कमी होता. रेडिओचे द्वारा, दर आठवड्यास, चांगल्या कार्याकरितां मदत मागण्यांत येते. गेल्या वर्षी ह्या मार्गानें १४ लाख रुपये जमा झाले.

### आगपेट्यांच्या धंद्यांतील प्रमुख राष्ट्रें

आगपेट्यांच्या व्यापारांत स्वीडन, रशिया व जपान हे देश अग्रेसर आहेत. त्या देशांतून १९३५ सालीं निर्गत झालेल्या आगपेट्यांचे आंकडे येथें दिले आहेत.

| देश | निर्गत |
|---|---|
| स्वीडन | ११,७८९ टन |
| जपान | ९,०१३ टन |
| रशिया | ५,४७३ टन |

### वहातुकीसाठी मालाची कुतरओढ

सिंधमध्यें सक्करचें धरण झाल्यापासून कित्येक लक्ष एकर जमीन नव्यानेंच लागवडीखालीं आली आहे. मुख्यतः कपास व गहू ह्यांची लागवड फारच वाढली आहे. ह्यापासून निघणाऱ्या पिकांच्या वहातुकीस विशेष महत्त्व प्राप्त झालें असून, हा माल कराचीं बंदरामार्फत बाहेर पडत असे, तो रेल्वे मार्गानें मुंबईकडे येईल, असे स्वस्त दर ठेवण्याचें धोरण रेल्वे बोर्ड आखीत असल्याची तक्रार आहे. सिंधमधील गव्हास कलकत्ता येथें चांगली मागणी येते. हा गहू रेल्वेनें आगला जावा, ह्यासाठी रेल्वेकडून विशेष सवलती दिल्या जातात. सरकारी सत्तेचा अशा रीतीनें उपयोग करण्यांत येऊं नये, प्रत्येक बंदरास योग्य तो वाव मिळणें जरूर आहे, अशा तऱ्हेचीं गाऱ्हाणीं पुढें मांडण्यांत आलीं आहेत.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. १२ फेब्रुवारी रोजीं पुरा झालेला आठवडा, | ९२,९७,०८२ |
| ता. २२ फेब्रुवारी रोजीं पुरा झालेला आठवडा, | ३१,१२,२४२ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते २२ फेब्रुवारी १९३६ अखेर | २,३२,६४,७१,६४६ |

अनुक्रमणिका.

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १०२ |
| २ मुंबई इलाख्याचें बजेट | १०३ |
| ३ हिंदी रेल्वे बजेटांत पुनः तूट ... ... ... | १०४ |
| ४ स्फुट विचार... ... | १०५ |
| पैशाची वर्गावर्गी व सहकारी बँका—सहकारी शिक्षणासाठी सरकारची ग्रँट-हिशेच तपासनिसांचा दाखला—कॅलेंडर प्रदर्शन—स्कूल ऑफ कॉमर्सचें वार्षिक—नोकऱ्यांवर विदेशीयांच्या उड्या—हिंदी कोळसा व औद्योगिक प्रगति | |
| ५ सहकारी संस्थांच्या पैशाची वर्गावर्गी ... ... | १०७ |
| ६ इंग्लंडमध्यें आयुष्याच्या विम्याची वाढ ... | १०८ |
| ७ हिंदी चहाचा धंदा ... | १०९ |
| ८ 'अर्था' चें अभिनंदन | १०९ |
| ९ पंजाबमधील जमीन गहाणाच्या बँका ... | ११० |
| १० आंतरराष्ट्रीय कामगार परिषद् ... ... | ११० |
| ११ निवडक बाजारभाव | १११ |
| १२ लखनौ येथील खादी व ग्रामोद्योग प्रदर्शन ... | १११ |

अर्थ

बुधवार, ता. २६ फेब्रुवारी, १९३६

## मुंबई इलाख्याचें बजेट

### सिंध विभक्तीकरणाचा फायदा

सिंध प्रांताचें विभक्तीकरण व स्वतंत्र नोंदणूक ही मुंबई इलाख्याच्या इतिहासांत घडून येणारी एक महत्त्वाची गोष्ट समजली पाहिजे. ह्यासंबंधांत पूर्वी काय चर्चा झाली आहे आणि सिंध प्रांत वेगळा होणें इष्ट आहे किंवा कसें ह्याचा विचार करण्याची वेळ आतां राहिलेली नाहीं. हिंदी राज्यघटनेच्या नव्या कायद्यांत सिंध स्वतंत्र प्रांत बनण्याची तरतूद करण्यांत आली असून त्यासंबंधांत हुकूम सुटला आहे, इतकेंच नाहीं, तर त्याच्या निराळ्या संसारास येत्या एप्रिलपासून, पूर्वतयारी म्हणून प्रारंभ व्हावा असेंहि निश्चित झालें आहे आणि प्रांतिक कायदेमंडळांत गेल्या सोमवारीं केलेल्या आपल्या भाषणांत गव्हर्नरसाहेबांनीं सिंधच्या नूतन राजवटीस यश चिंतलें आहे. 'शुभास्ते पंथानः सन्तु' झाल्यावर त्यांनीं सिंध प्रांत वेगळा झाल्यानें मुंबई इलाख्याच्या सरकारची सांपत्तिक स्थिति कशी सुधारणार आहे, याचें दिग्दर्शन केलें. चालू वर्षाच्या दुरुस्त केलेल्या बजेटांत २७ लक्ष रुपयांची तूट आहे आणि उत्पन्न—खर्चाच्या नैमित्तिक बाबी हिशेबांत धरल्यास ती ५२ लक्ष रुपये भरते. परंतु सिंधचें विभक्तीकरण आणि डेव्हेलपमेंट लोनच्या व्याजांत झालेली बचत ह्यामुळें सदरहु तूट नाहींशी होऊन ४५ लक्ष रुपयांचा वाढावा उरत आहे! येत्या एप्रिलपासून सुरू होणाऱ्या प्रांतिक बजेटांत सिंधच्या उत्पन्न—खर्चाचा अंतर्भाव केलेला नाहीं, ह्याचें कारण उघड आहे. शेजाऱ्याच्या जमाखर्चाची उठाठेव करण्याचा मुंबई इलाख्याच्या सरकारास व कायदेमंडळास आतां अधिकार पोहोचत नाहीं. सिंध विभक्तीकरणाविषयींच्या वर उल्लेखिलेल्या हुकमास राजेसाहेबांची संमति अजून मिळावयाची आहे व ती रीतसर येईलहि. तें वेळेवर न घडल्यास जादा बजेटाची व्यवस्था करावी लागेल, हें उघड आहे. एखाद्या कुटुंबांत वांटणी झाली असतां मालमत्तेची विभागणी ज्याप्रमाणें करतात त्याच पद्धतीचा अंगीकार प्रस्तुत प्रकरणीं केलेला आहे.

चालू सालच्या बजेटांत ४५ लक्ष रुपयांचा वाढावा झाला आहे, त्यांतले ९ लक्ष रुपये, बैलगाड्यांवर घेण्यांत येणाऱ्या जकातीची माफी त्यासंबंधांतल्या नवीन झालेल्या कायद्याप्रमाणें द्यावी लागेल, तिच्या प्रीत्यर्थ खर्च होतील आणि मोटारींवर ह्यापुढें कर घेतला जाईल, त्याच्या उत्पन्नापैकीं येत्या सालापुरते ६½ लक्ष रुपये परत करावे लागतील. प्राथमिक शिक्षणाबद्दल स्थानिक स्वराज्य संस्थांस मिळणाऱ्या ग्रँटमध्यें १९३१ व १९३२ सालीं सरकारनें काट दिला होता. आतां त्यापैकीं ६½ लक्ष रुपये खर्चण्याचें ठरलें असून इंडिअन वुइमेन्स युनिव्हर्सिटीस अर्धा लाख रुपये मिळावयाचे आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. मुंबईंत क्वीन्स रोडवर ह्या संस्थेसाठीं हिंदुस्थान सरकारच्या मालकीची एक जागा खरेदी करण्यास सहाय म्हणून ही ग्रँट दिली जाणार आहे. मध्यम वर्गांत आज बेकारी भीषण स्वरूपांत दिसत आहे, तिला आळा घालण्याचे उपाय योजिले जातील, त्यांस सरकारची मदत व्हावी ह्या हेतूनें, धंदेशिक्षणांप्रीत्यर्थ अर्धा लाख रुपये खर्चले जाणार आहेत. बेकारीच्या प्रश्नाबाबत सरकारचें कांहीं कर्तव्य आहे, ह्या विषयींची जाणीव मूर्त स्वरूपांत मुंबई सरकारनें व्यक्त केली आहे हें सुचिन्हच गणलें पाहिजे. हा प्रश्न सुटणें जवळ जवळ अशक्य असून युनिव्हर्सिटी आणि जनता ह्यांच्या कक्षेंत तो पडतो असें गव्हर्नरसाहेबांनीं आपल्या भाषणांत म्हटलें आहे, ह्यावरून सरकारची आर्थिक सुषुप्ति अजून किती गाढ आहे, याची मात्र कल्पना येते. समाजाच्या चालीरीतींत आणि कल्पनांत फेरबदल झाल्यावांचून बेकारीचा त्याच्या मागचा ससेमिरा दूर व्हावयाचा नाहीं आणि उच्च शिक्षणाच्या पद्धतींतहि सुधारणा झाली पाहिजे असा आपला अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला आहे. त्यांतला तथ्यांश सर्वमान्यच आहे. परंत राष्ट्रीय सरकारचें धोरण आर्थिक प्रगतीस परिपोषक असणें ही गोष्ट बेकारी निवारणाच्या बाबतींत अत्यंत महत्त्वाची आहे, हें येथें विसरून चालावयाचें नाहीं.

उत्पन्नाच्या वाढाव्यांतून ५ लक्ष रुपये प्रांतिक व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रस्ते, इमारती सारख्या कामांवर खर्च होणार आहेत. नव्या कायदे मंडळाच्या निवडणुकीवर ५½ लक्ष रुपये खर्चले जातील. बाकी राहिलेल्या रकमेचा विनियोग पेन्शनींवर व कित्येक किरकोळ बाबींवर होईल. पुढील सालच्या बजेटांत उत्पन्न १२ कोटि, ३ लक्ष रुपये धरलें असून खर्च जवळ जवळ तितकाच होइल असा अंदाज आहे. कायदेमंडळानें मागें मंजूर केलेले नवे कर तसेच चालू राहतील ह्या कल्पनेवर हें बजेट बसवलेलें आहे आणि त्या सर्वांस पुन्हां मंजुरी यंदा मिळाली नाहीं तर त्याची सबंद इमारत ढासळेल आणि सरकारनें योजिलेल्या जादा खर्चास काट मारणें प्राप्त होईल अशी इशारत गव्हर्नरसाहेबांनीं स्पष्ट दिली आहे. हिंदुस्थान सरकार व मुंबई सरकार ह्यांच्यामधल्या उत्पन्नाच्या वांटणीचा फेरविचार चालू असल्यानें पुढील सालच्या बजेटास कायदेमंडळानें पूर्ण पाठिंबा दिला नाहीं तर प्रांतिक सरकारची बाजू प्रचलित वाटाघाटींत लंगडी पडेल असें त्यांचें म्हणणें आहे. गेल्या चार वर्षांत लोकांस न रुचणारे व कायदेमंडळांत विरोधाचा विषय झालेले असे कर बसवण्यांत आले आहेत त्यांस अनुलक्षून वरील इशारत आहे.

### पुढील सालचें प्रांतिक बजेट

| | रुपये |
|---|---|
| उत्पन्न | १२,०३,५८,००० |
| खर्च | १२,०३,१७,००० |
| वाढावा | ४१,००० |

## हिंदी रेल्वे-बजेटांत पुनः तूट

हजारो मैल लांबीच्या रेल्वे रस्त्यांची मालकी सरकारकडे आहे, कित्येक रेल्वे कंपन्यांचे भागीदारींत सरकारचा मोठा हिस्सा आहे व कांहीं लहान कंपन्यांचे भांडवलावरील व्याजाची त्यानें हमी घेतलेली आहे. रेल्वेजकडून सरकारास मिळणारें उत्पन्न व आगगाड्यांवर होणारा खर्च, ह्यांचा इतर सरकारी उत्पन्न-खर्चाशीं अर्थातच निकट संबंध आहे. आगगाड्यांचा कारभार कार्यक्षमतेनें चालावा व त्यांच्या वाढीस लागणारें भांडवल निश्चितपणें मिळावें, अशी व्यवस्था होणें जरूर असून, आगगाड्यांचें अंदाजपत्रक हिंदुस्थान सरकारच्या मुख्य अंदाजपत्रकापासून स्वतंत्र असावें, अशी ॲकवर्थ कमिटीनें १९२१ सालीं सूचना केली. रेल्वे कंपन्या, आगगाड्यांच्या धंद्यावर जर पैसे मिळवतात, तर हिंदुस्थान सरकारला तसा नफा का मिळूं नये ? ह्या विचारसरणीस अनुसरून सदरहु नव्या व्यवस्थेंत एक योजना समाविष्ट करण्यांत आली. ती अशी कीं, विवक्षित वर्षाच्या अगोदरचें एक वर्ष टाकून त्याच्या पूर्वीच्या वर्षांत आगगाड्यांच्या धंद्यांत जेवढें सरकारी भांडवल गुंतलेलें असेल, त्यावर एक टक्का हिंदुस्थान सरकारास मिळावा आणि ह्याखेरीज जो अधिक नफा होईल, त्यापैकीं एक पंचमांश भाग सरकारास मिळावा व उरलेला भाग आगगाड्यांच्या शिलकी निधींत जावा. रेल्वे खात्याकडून सरकारास पैशाची मदत व्हावी, अशी अपेक्षा असतांना, १९३०–३१ सालानंतर मध्यवर्ती सरकारच्या संसारास आगगाड्यांनीं एका पैचाहि हातभार लावलेला नाहीं. त्यापूर्वी मात्र ४२ कोटि रुपये ह्या खात्यानें सरकारास अदा केले परंतु ह्या रकमेनें त्या मागच्या सालांतला तोटाहि पुरा भरून निघाला नव्हता, हें विसरतां कामा नये.

दरसाल, सरकारी मुख्य बजेटाचे आधी कांहीं दिवस रेल्वे-बजेट मध्यवर्ती कायदेमंडळास सादर करण्यांत येतें. त्याप्रमाणें, गेल्या ता. १७ फेब्रुवारी रोजीं गव्हर्नर-जनरलच्या कार्यकारी कौन्सिलांतील व्यापारीखात्याचे सभासद, सर झफरुल्लाखान, ह्यांनीं व चीफ कमिशनर सर गथ्री रसेल ह्यांनीं अनुक्रमें असेंब्ली व कौन्सिल ऑफ स्टेट ह्यांमध्यें येत्या वर्षाचें बजेट मांडलें.

१९३५-३६ सालीं रेल्वे-बजेटांत सुमारे दोन कोटि रुपयांची तूट येईल, असा अंदाज सुरवातीस करण्यांत आला होता. हें वर्ष मार्च अखेर संपतें. आतांपर्यंतच्या उत्पन्न-खर्चाच्या आंकड्यांवरून, ह्या तुटींत सालअखेर २¾ कोटी रुपयांची भर पडेल, अशी अपेक्षा आहे. म्हणजे, एकूण तूट ४½ कोटींवर जाणार, असा रंग दिसतो. हिंदुस्थानांतील कित्येक रेल्वे रस्ते लष्करी संरक्षणाच्या दृष्टीनें विशिष्ट भागांत आंखण्यांत आले, त्यांपासून अर्थातच निवळ उत्पन्न मिळत नाहीं. अशा रस्त्यांवरील आगगाड्यांपासून रेल्वेखात्यास दरसाल दोन कोटि रुपयांची बूड येते. ही तूट वास्तविक लष्करी खात्यानें सोसली पाहिजे, अशी आज कित्येक दिवस लोकांची तक्रार आहे. परंतु ती रेल्वेच्या एकूण हिशेबांत दाखल झाल्यानें लष्करी खर्च कमी दिसतो व रेल्वेखात्यास तोटा येतो.

येत्या, म्हणजे १९३६-३७ सालीं, आगगाड्यांपासून एकूण उत्पन्न ९१½ कोटि रुपये होईल व त्यापेक्षां ३¼ कोटि रुपये ज्यास्त खर्च होऊन बजेटांत तेवढी तूट पडेल, असा अजमास करण्यांत आला आहे. आगगाड्यांच्या शिलकी निधांतून वेळोवेळी कर्जाऊ रकमा घऊन आजवर ह्या खात्यानें वेळ भागवून नेली. येत्या वर्षअखेर ह्या कर्जाची रकम ३५½ कोटि रुपये भरेल व फंडांत फक्त ११½ कोटि रुपये शिलक रहातील. रेल्वेखात्यास चांगले दिवस येऊन बजेटांत वाढावा येऊं लागला, म्हणजे शिलकी निधींतून उचललेल्या रकमांची भरपाई करावी लागेल. ती होते किंवा नाहीं व झाली तर कशी होते ह्याची आज शंकाच आहे...

रेल्वेच्या उत्पन्नांत झालेल्या घटीची चिकित्सा करतांना कायदेमंडळांतील सरकारच्या दोन्ही प्रतिनिधींनीं खालील गोष्टींचा उल्लेख केला. (१) जागतिक आर्थिक मंदी व पडते बाजारभाव. (२) आंतरराष्ट्रीय मोकळ्या व्यापाराऐवजीं आर्थिक स्वावलंबनाकडे राष्ट्रांचा ओढा. (३) मोटार वहातुकीची स्पर्धा. (४) मजूरांबाबतचे कायदे. (५) रेल्वे नोकरांच्या नोकरीसंबंधांतील सढळ योजना. त्याखेरीज, तिकिटांशिवाय प्रवास व मालाचें पुरें भाडें आकारण्यांत ढिलाई, ह्यामुळें रेल्वेजचें अत्यंत नुकसान होत असून, त्या दोन्हींचा बंदोबस्त करण्यांत यावयाचा असल्याचा निश्चय जाहीर करण्यांत आला.

गहू, कपास, ताग, इत्यादि पिकांच्या लागवडीच्या क्षेत्रांत घट झाल्यामुळें व मालाच्या किंमती उतरल्यामुळें हिंदी रेल्वेजचें उत्पन्न कसें कमी झालें, ह्याची माहिती सर रसेल ह्यांनीं विस्तारानें दिली. एखाद्या ठिकाणीं कपाशीची लागवड वाढली, म्हणजे त्या मानानें तेथील धान्याचें पीक कमी होतें. सहाजिकच, धान्याचे प्रदेशांतून तेथें धान्य आणावें लागतें व कपास बाहेर पाठवावी लागते. ही वहातुक आगगाड्यांस अर्थातच फलदायक होते. ह्या उलट, कपाशीच्या जागीं धान्याचें पीक लावलें म्हणजे मालाची ये जा कमी होते. १९२५–२६ सालीं २ कोटि, ८४ लक्ष एकरांत कपास लावण्यांत आली होती. १९३२ सालीं २ कोटि २५ लक्ष एकरच कपाशीखालीं आले व त्याबरोबर ह्या पिकांच्या वहातुकीपासून रेल्वेजना मिळावयाच्या उत्पन्नाचा आंकडा ४½ कोटींवरून ३½ कोटींवर आला. हीच गोष्ट तागाचे पिकांचीहि आहे. पिकांचे भाव पूर्ववत झाल्यावर ही तूट भरून येईल, परंतु मोटारींची स्पर्धा मात्र कमी न होतां ती वाढण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

हिंदुस्थानांतील खासगी रेल्वे कंपन्या आज नफा मिळवीत असतां सरकारी रेल्वे कां बुडींत येतात, हा विचार करण्याजोगा प्रश्न आहे. आज कित्येक वर्षें हिंदुस्थान सरकारनें आगगाड्यांवर जो खर्च केलेला आहे, त्याची भरपाई तर राहोच, परंतु चालू खर्चाची तरी तोंडमिळवणी होणें जरूर आहे. हिंदी रेल्वेजचा कारभार कुशल तज्ज्ञांचे हातीं आहे, असें सरकारचें मत असलेंच पाहिजे. मग रेल्वेजच्या उत्पन्नांत सुधारणा होऊं नये हें आश्चर्यजनक नाहीं काय ? प्रचलित मंदीचें कारण पुढें केल्यानें वरील प्रश्नास समाधानकारक उत्तर मिळण्यासारखें नाहीं.

*For All Medicinal Requisites*

— TRY —

**N. MAHADEV & Co.**

**DISPENSING CHEMISTS**
AND
**DRUGGISTS**

City Post Office Corner, POONA 2.

## स्फुट विचार

### पैशाची वर्गावर्गी व सहकारी बँका

पूना सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. चितळे, ह्यांचे वरील विषयाबाबतचे विचार, आजच्या अंकांत दुसरीकडे प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या लेखांत व्यक्त करण्यांत आले आहेत, त्यांकडे वाचकांनीं अवश्य लक्ष द्यावें. सहकारी बँकांनीं परस्परांवरील व परस्परांकडे वेळोवेळ पाठविलेल्या चेक्सची वसुली विनाकमिशन करावी, अशी जी प्रचलित व्यवस्था आहे, तीमध्यें प्रांतिक सहकारी बँकेच्या विशिष्ट स्थानामुळें व तिच्या शाखांच्या विस्तृत जाळ्यामुळें जिल्हा बँकांची व अर्बन बँकांची चांगली सोय झाली आहे. त्या मानानें मध्यवर्ती बँकेस विशेष फायदा न होतां जादा दगदग आणि खर्च मात्र त्या संस्थेस सोसावा लागत आहे, ह्यांत शंका नाहीं. तेव्हां, मध्यवर्ती बँकेनें पैशाच्या वर्गावर्गीचें काम विनाकमिशन किंवा पोस्टेज सारखा प्रत्यक्ष झालेला खर्चहि न घेतां करणें वाजवी व आवश्यक आहे किंवा काय इत्यादि प्रश्न श्री. ल. म. जोशी ह्यांनीं "अर्था" त मागें प्रसिद्ध झालेल्या आपल्या लेखांत उपस्थित केले होते व त्यासंबंधांत संभवणारी भिन्नभिन्न मतें चर्चेकरितां पुढें मांडली होतीं. प्रांतिक सहकारी बँकेनें थोडीफार झीज सोसून आकुंचित व्यापारी दृष्टि बाजूस ठेवावी; इतकेंच नव्हे, तर वर्गावर्गीची हल्लीची व्यवस्था मुंबई इलाख्यापुरतीच मर्यादित न ठेवतां शक्य तर ती अखिल भारतीय स्वरूपाची करावी, असा श्री. चितळे ह्यांच्या म्हणण्याचा आशय आहे. मध्यवर्ती बँकेची शाखा असलेल्या एखाद्या ठिकाणची अर्बन बँक ह्या व्यवस्थेचा गैरवाजवी फायदा घेऊं लागली, तर त्याबद्दल उपाययोजना केली पाहिजे, हें त्यांस मान्य आहे; योजनेच्या हेतूचा विपर्यास न होण्याबद्दल खबरदारी घेतली जावी, ह्याबद्दलहि त्यांचें मत स्पष्ट आहे. त्यांनीं आपला मार्मिक अभिप्राय प्रांजलपणानें मांडला आहे. तो नीट ध्यानीं येण्यासाठी दुसऱ्या बाजूची मांडणी येणेंप्रमाणें करतां येईल. सहकारी चळवळीच्या आद्य तत्वाच्या दृष्टीनें, सध्या चालू असलेल्या सवलतीच्या योजनेंत फेरबदल होणें आवश्यक वाटत नसलें, तरी अर्बन व इतर बँकांनीं स्वतःस मिळणाऱ्या सवलतींबद्दल कांहींतरी मोबदला द्यावा व प्रांतिक बँकेस विनाकरण विशेष झीज सोसावी लागूं नये हें मतहि त्या तत्त्वाशी विसंगत नाहीं, ही गोष्ट मान्य करावी लागेल. सहकारी चळवळींतल्या आपल्या विशिष्ट स्थानास अनुरूप अशी कामगिरी बजावण्याची जबाबदारी प्रांति बँकेवर येऊन पडते व ती तिनें पार पाडली पाहिजे ह्यांत वाद नाहीं. तथापि, मध्यवर्ती बँकेकडून सयुक्तिक मर्यादेच्या बाहेर स्वार्थत्यागाची अपेक्षा करीत रहाणें इष्ट आणि स्वावलंबनाच्या तत्वास साजेसें होणार नाहीं हेंहि विसरतां कामा नये. श्री. जोशी व श्री. चितळे ह्यांचे, वरील विषयावरील लेख प्रस्तुत प्रश्नाच्या चर्चेस चालना देण्यास अत्यंत उपयुक्त असून त्याबद्दल इतरांसहि आपले विचार मांडावयाचे असल्यास 'अर्था' मध्यें त्यांस स्थळ मिळेल. ह्या प्रश्नाची सर्व दृष्टींनीं छाननी झाली म्हणजे त्याचा निर्णय लागण्यास सहाय होईल, हें उघड आहे.

---

### सहकारी शिक्षणासाठी हिंदुस्थान सरकारची ग्रँट

हिंदुस्थान सरकारनें ग्रामोद्धाराकरितां एक कोटि रुपये चालू सालीं खर्च व्हावे म्हणून बाजूस काढून ठेविले होते, त्याचप्रमाणें, सहकारी चळवळीप्रीत्यर्थ १५ लक्ष रुपयेहि प्रांतिक सरकारांमध्यें वांटण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. पंजाबचे सिव्हिलियन अधिकारी, मि. डार्लिंग, ह्यांनीं गेल्या वर्षी सर्व प्रांतांमध्यें हिंडून रिझर्व्ह बँक व हिंदुस्थान सरकार ह्यांस विशिष्ट बाबतींत सल्ला देण्याच्या हेतूनें सर्वत्र चौकशी केली. सहकारी चळवळीच्या प्रगतीस सहाय म्हणून मिळावयाच्या हिंदुस्थान सरकारच्या ग्रँटचा विनियोग कसा व्हावा, ह्या बाबतींतहि त्यांनीं शिफारसी केल्या असून त्यांस अनुसरून प्रांतिक सरकारांनीं सहकारी चळवळींतल्या अधिकाऱ्यांच्या व सहकारी संस्थांच्या सभासदांच्या शिक्षणासंबंधानें योजना अमलांत आणण्याचें ठरविलें आहे, अशी माहिती लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत एका प्रश्नास उत्तर देतांना सर गिरिजाशंकर बाजपेय ह्यांनीं दिली. प्रत्येक प्रांतांत प्राथमिक सहकारी मंडळ्यांच्या सभासदांची संख्या जेवढी असेल, तिच्या प्रमाणांत त्यांतील सरकारास १५ लक्ष रुपयांचा हिस्सा मिळावयाचा आहे असें त्यांनीं सांगितलें. मुंबई इलाख्याच्या वांट्यास सुमारें १½ लक्ष रुपये येतील आणि सहकारी खात्यांतल्या अधिकाऱ्यांच्या शिक्षणाची योजना प्रांतिक सरकारनें तयार केली असून तिच्या अंमलबजावणीस प्रारंभहि झाला आहे. सुरवातीस सहा-सात निवडक अधिकाऱ्यांचा एक वर्ग बनवून त्यांस सहकारी चळवळीच्या निरनिराळ्या अंगांचें सोपपत्तिक ज्ञान द्यावयाचें आणि त्यांस भावी शिक्षक म्हणून तयार करावयाचें अशी ही योजना असल्याचें समजतें. प्रत्यक्ष कामाचा व्यावहारिक अनुभव असलेले हे अधिकारी असल्यानें त्यांस तात्विक आणि व्यापक दृष्टि देणारें शिक्षण मिळाल्यास त्यांच्या हातून इच्छिलेलें काय पुढें उत्तम रीतीनें पार पडेल, अशी अपेक्षा आहे.

---

### हिशेब तपासनीसांचा दाखला

संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यांचे हिशेब तपासून ते व्यवस्थित असल्या विषयींचा दाखला लायक ऑडिटरांनीं लेखी द्यावा लागतो व मंडळ्यांच्या वह्या, पावत्या इत्यादि कागदपत्र तपासून हिशेब बरोबर ठेवले असल्याबद्दल त्यांनीं स्वतःची खात्री करून घ्यावी लागते. भागीदारांच्या दृष्टीनें ऑडिटरांची तपासणी व त्यांचा दाखला ह्यांस विशेष महत्त्व आहे आणि ह्या संबंधांत हिशेब तपासनीसांवर एक प्रकारची खास जबाबदारी येऊन पडते. बँक ऑफ इंडियाच्या भागीदारांची वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत भरली असतां तीमध्यें, ऑडिटरांच्या दाखल्याबाबत एक उपयुक्त सूचना करण्यांत आली, तिचा उल्लेख येथें करणें आवश्यक आहे. आम्हीं ताळेबंद, हिशेबाच्या वह्या, रोकड शिल्लक व रोखे पाहिले (examined) आहेत अशा अर्थाचा शेरा देण्याची पद्धति कित्येक तपासनीसांनीं अलीकडे चालू केली आहे; परंतु असल्या शेऱ्यावरून, त्यांनीं पावत्या हिशेबाशीं पडताळून पाहिल्या आहेत किंवा नाहीं, हें स्पष्ट होत नाहीं अशी तक्रार उपस्थित करण्यांत येऊन, आम्हीं हिशेब तपासून, पडताळून पाहिले (audited) आहेत, असा शेरा केला जावा ह्या प्रकारची सूचना पुढें मांडण्यांत आली. ऑडिटरांची जबाबदारी स्पष्टपणानें व्यक्त होण्यास त्यांचा दाखला कोणत्या शब्दांत व्यक्त केला जावा, या प्रश्नाचा खल अनेक मंडळ्या करीत आहेत. बँक ऑफ इंडियाच्या चालकांनीं वर निर्दिष्ट केलेली सूचना अमलांत आणली असल्याचें परवांच्या वार्षिक सभेंत जाहीर रीतीनें सांगण्यांत आलें, ही गोष्ट समाधानकारक आहे. ह्यावरून ऑडिटरांच्या दाखल्याच्या नमुन्यांत अधिक

स्पष्टता उत्पन्न होणें अगत्याचें आहे, ही गोष्ट सिद्ध झाली आहे. त्यांच्या खास कामाच्या कक्षेबाहेर ऑडिटरांवर जबाबदारी टाकणें चुकीचें होईल. परंतु विशिष्ट मर्यादेंत त्यांनीं आपली जबाबदारी असंदिग्ध रीतीनें उचलणें अगत्याचें आहे, ह्यांत शंका नाहीं.

## कॅलेंडर-प्रदर्शन

पुणें येथें श्री गणेश मोफत वाचनालयाच्या जागेंत, शेट पोपटलाल शहा ह्यांचे दिवाणखान्यांत, कॅलेंडर-प्रदर्शनाचा उद्घाटन समारंभ गेल्या गुरुवारीं प्रो. काळे ह्यांच्या हस्तें झाला. प्रदर्शनाचे चिटणीस, श्री. हरी भालचंद्र देशपांडे, ह्यांनीं सदरहु उपक्रमाचे कामीं पुष्कळ श्रम केले असून अनेक व्यापाऱ्यांचीं कॅलेंडरें जमवण्यांत आलीं आहेत. कॅलेंडर हा मालाच्या जाहिरातीचा एक प्रकार असल्यानें व्यापारी व कारखानदार यांनीं त्याच्या द्वारें ज्यास्त गिऱ्हाइक कसें आकर्षतां येईल इकडे लक्ष्य पुरवलें पाहिजे असें सांगून प्रो. काळे ह्यांनीं आधुनिक युगांत जाहिरातीचें महत्त्व कां व किती आहे ह्याचें विवेचन युरोपिअन राष्ट्रें आणि जपान इत्यादि राष्ट्रांचीं उदाहरणें देऊन सुगम रीतीनें केलें. जनतेची अभिरुचि बारकाईनें ध्यानांत आणून तिला अनुसरून माल तयार करणें आणि तो परप्रांतांतच काय, पण परदेशांतहि खपवण्याचा यत्न करणें हें हिंदी कारखानदारांचें व व्यापाऱ्यांचें कर्तव्य आह; आणि असें होईल तरच स्वदेशी उद्योगधंद्यांचें पाऊल पुढें पडण्याची महाराष्ट्रास आशा आहे. माझा माल चांगला असेल तर गिऱ्हाइक माझ्या कारखान्यांत किंवा घरीं येऊन तो घेईल असें म्हणून स्वस्थ बसण्याचे धंदेवाल्यांचे दिवस गेले. आपल्या मालाचा प्रकार व त्याचें भावी गिऱ्हाइक ह्यांस साजेल अशा प्रकारचें कॅलेंडर बनवण्यांत आलें पाहिजे आणि जाहिरात म्हणून उपयोगल्या जाणाऱ्या इतर जिनसांसहि हाच नियम लागू आहे. कॅलेंडर ही क्षुल्लक गोष्ट आहे असें सकृद्दर्शनीं वाटेल, पण मालाच्या जाहिरातीचें प्रतीक ह्या दृष्टीनें त्याकडे पहाणें आवश्यक आहे. प्रस्तुत प्रदर्शनानें जनतेंत औद्योगिक व व्यापारविषयक प्रगतीस सहाय होवो अशी इच्छा प्रदर्शित करून प्रदर्शनाच्या उत्पादकांचें, त्यांचा उत्साह व कल्पकता ह्यांबद्दल अभिनंदन करून प्रो. काळे ह्यांनीं आपलें भाषण समाप्त केलें.

## शिक्षण प्रसारक मंडळीच्या स्कूल ऑफ कॉमर्सचें वार्षिक

वरील वार्षिकाचा पहिला अंक आमचेकडे आला आहे. व्यापारी शिक्षणाचें उच्च शिक्षण देणाऱ्या कॉलेजांप्रमाणेंच, मध्यम प्रतीचें शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा व्यापारविषयक ज्ञानाचा पाया तयार करून व्यवहारी शिक्षण देणाऱ्या शाळांचीहि पण महाराष्ट्रास आज जरूर आहे. येथील शिक्षण प्रसारक मंडळीच्या स्कूल ऑफ कॉमर्सचे ह्या संबंधांतील प्रयत्न अभिनंदनीय आहेत. या संस्थेनें आतां आपल्या वार्षिकाच्या रूपानें जनतेस स्वतःच्या कार्याची ओळख करून देण्याचा उपक्रम केला आहे. प्रस्तुत अंकांत बँकिंग, व्यापारी शिक्षण, ताळेबंद, व्यापारी भूगोल, विमा व्यवसाय, उद्योगधंदे, इत्यादि विषयांवर चांगले लेख आले आहेत. वार्षिकास मराठी विभाग जोडला आहे हें ठीक आहे. तथापि, कविता आणि गोष्टी यांचा त्यांत झालेला अंतर्भाव औचित्यास धरून व व्यावहारिक उपयुक्ततेस पोषक आहे असें वाटत नाहीं. ह्याची जाणीव व्यवस्थापकांच्या स्फुट लेखांत व्यक्त झालेली आहे ही समाधानाची गोष्ट आहे. व्यापारी पाठशाळेचें उद्दिष्ट त्याच्या शिक्षणपद्धतींत आणि विद्यार्थ्यांच्या मनोरचनेंत व कृतींत प्रतीत व्हावें आणि ह्यापुढील अंकांत ध्येयास अनुरूप असे लेख प्रसिद्ध करण्याची खबरदारी घेतली जावी अशी सूचना करणें आवश्यक दिसते. वार्षिकाचे सुरवातीस प्रो. काळे ह्यांचा अभीष्टचिंतनपर संदेश देण्यांत आला आहे.

## नोकऱ्यांवर परदेशीयांच्या उड्या

आर्थिक मंदीमुळें सर्व देशांतून बेकारी माजली असल्यानें, नोकऱ्या कमी पण अर्जदार पुष्कळ अशी परिस्थिति सर्वत्र निर्माण झाली आहे. इंग्लंडमधील परिस्थिति इतर देशांचे मानानें किती तरी चांगली आहे. तथापि, तेथेंहि नोकऱ्यांसाठी स्पर्धा व धडपड चालली असल्याचें आढळतें. दरसाल सुमारें पांच हजार मुली इतर देशांतून कामाच्या शोधार्थ इंग्लंडमध्यें येतात व तेथील ऑफिसांतील नोकऱ्या पटकावतात. त्यामुळें कित्येक ब्रिटिश मुलींना नोकऱ्या मिळत नाहींत. पार्लमेंटमध्यें हा प्रश्न उपस्थित केला जाऊन, परदेशांतील मुलींना नोकऱ्या मिळूं नयेत अशी व्यवस्था व्हावी, असे प्रयत्न चालू आहेत. हिंदुस्थानांतील कांहीं प्रांतांतून परप्रांतांत वसति करण्यास जाणारांची संख्या दरसाल वाढत आहे व त्यांच्या अनिष्ट स्पर्धेबद्दल तक्रार ऐकूं येत आहे. ह्या संबंधांतील माहिती 'अर्था'च्या गेल्या अंकांत आलेलीच आहे.

## हिंदुस्थानांतील कोळसा : औद्योगिक प्रगतीच्या मार्गांत अडचण येणार काय ?

येत्या शंभर वर्षांत, हिंदुस्थानांतील खाणींमधून निघणारा कोळसा संपून जाईल व औद्योगिक प्रगतीच्या मार्गांत ती मोठीच अडचण उपस्थित होण्याचा संभव आहे, अशा अर्थाचा अभिप्राय एका सरकारी पत्रकांत ('डायरेक्टर ऑफ दि जिऑलॉजिकल सर्व्हे' नें प्रसिद्ध केलेल्या बुलेटिनमध्यें) आढळतो. ह्या देशाच्या पोटांत सुमारें ४५० कोटि टन चांगल्या दर्जाचा कोळसा आहे, तो फार तर २०० वर्षें पुरेल. हल्लींची कोळसा उकरून काढण्याची पद्धत सुधारण्यांत आली नाहीं, तर तो १०० वर्षें तरी पुरेल किंवा नाहीं, ह्याची शंका आहे. लोखंडाचा पुरवठा मात्र कमी पडण्याचा संभव नाहीं. वरील ४५० कोटि टन कोळशापैकीं फक्त १७० कोटि टनच उत्कृष्ट ह्या सदरांत येईल. कोळशासारखे खनिज पदार्थ संपून जाण्याची भीति ग्रेटब्रिटनमध्येंहि वेळोवेळ व्यक्त करण्यांत येत असते. परंतु असल्या अंदाजांनीं कोणीहि घाबरून जाण्याचें कारण नाहीं.

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

एन. ए. ॲन्ड फ्रेन्ड्स
स्टेशनर्स, जनरल मर्चन्टस, ॲन्ड कमिशन एजन्टस.
आप्पा बळवंत चौक, पुणें २.

## सहकारी संस्थांच्या पैशाची वर्गावर्गी

( लेखकः—श्री. द. दि. चितळे, पुणें. )

मुंबई इलाख्यांतील सहकारी बँकांची सुसंघटना व एकीकरण होऊन परस्परांचा व्यवहार वाढीस लागावा, त्यांचे खातेदारांस अल्प कमिशनवर दूरदूरच्या ठिकाणचे चेक्स वसूल करतां यावेत व त्यायोगें पैशाच्या अंतर्गत देवघेवीचे व्यवहार सुलभ, स्वस्त व झपाट्यानें व्हावेत या सद्हेतूनें सुमारें सातआठ वर्षांपूर्वी या इलाख्यांतील तज्ज्ञ सहकाऱ्यांची व बँकांची एक परिषद भरून सहकारी चळवळीचा प्रसार आणि सर्वांगीण उन्नति होण्याचे दृष्टीनें सहकारी संस्थांच्या पैशांची वर्गावर्गी विनाकमिशन करण्यासंबंधीं एक योजना निश्चित करण्यांत आली होती, हें सहकारी मंडळीस व बँकांस विदित आहेच. सदर योजनेस अनुसरून ज्या संस्था या योजनेंत सामील झाल्या त्या आजपर्यंत अल्प खर्चांत अगर विनाकमिशन आपल्या पैशांची वर्गावर्गी करीत आल्या आहेत; व त्या योगें सहकारी बँकांची बरीच प्रगति झाली असून त्यांच्या सभासदांत व खातेदारांत पैशाची उलाढाल करण्याची दिवसेंदिवस वाढती प्रवृत्ति निर्माण झाली आहे, हें सहकारी चळवळीचे दृष्टीनें भूषणावह आहे.

ही पैशाची वर्गावर्गी मध्यवर्ती बँकेमार्फत आजपर्यंत पोस्टेजसारख्या अल्प खर्चांत केली जात आहे. परंतु यापुढें ती तशीच केली जाणें इष्ट व व्यवहार्य आहे कीं कसें असा प्रश्न श्री. ल. म. जोशी यांनीं " अर्थ " साप्ताहिकांत ता. २९।१।३६ व ता. ५।२।३६ च्या दोन अंकांतील आपल्या लेखांत उपस्थित केला आहे. इलाखा मध्यवर्ती बँक ही सहकारी संस्थांची मेरूमणी ( Apex ) बँक असल्यानें अर्बन बँका व तिचे सभासद यांचे देवघेवीचे व्यवहार दिवसेंदिवस वाढण्याचे दृष्टीनें त्यांस प्रोत्साहन मिळावें म्हणून मध्यवर्ती बँकेनें थोडी फार झीज सोसूनहि पैशाची वर्गावर्गी पूर्वीप्रमाणेंच विनाकमिशन करीत रहावें, असें आमचें मत आहे. मध्यवर्ती बँकांची पत व मोठेपणा हीं तिला जोडलेल्या दुसऱ्या सहकारी संस्थांच्या सामुदायिक पतीवर व मोठेपणावर अवलंबून असल्यानें जोडलेल्या सोसायट्यांच्या व्यवहारांत सारखी वाढ होत रहावी, याकडे तिनें अत्यंत बारकाईनें लक्ष पुरविलें पाहिजे व ती तसें पुरवीत असतां या व्यवहारांतून अर्बन बँकांना मिळणाऱ्या उत्पन्नापैकीं कांहीं कमिशन आपणांसहि मिळावें अशी आकुंचित व्यापारी दृष्टि तिनें न ठेवतां मध्यवर्ती सहकारी संस्थेस शोभणारी सहकार्याची उदार वृत्ति तिनें ठेवावी, असें आम्हांस प्रांजलपणें म्हणावेसें वाटतें. मध्यवर्ती बँकेची शाखा असणाऱ्या एकाद्या ठिकाणची अर्बन बँक मध्यवर्ती बँकेनें विनाकमिशन पैशाची वर्गावर्गी करण्यासंबंधीं दिलेल्या सवलतीचा स्वार्थीपणानें गैरवाजवी फायदा घेऊं लागली तर त्या अर्बन बँकेसंबंधीं कोणती उपाययोजना करावी, या प्रश्नाचा अधिक बारकाईनें विचार करणें जरूर आहे, ही गोष्ट आम्हांसहि मान्य आहे. परंतु अपवादात्मक कांहीं संस्था या सवलतीचा दुरुपयोग करतात अगर त्या तसा करण्याचा संभव आहे, म्हणून पूर्वीची योजना आमूलाग्र दुरुस्त करावी असें मात्र आम्हांस वाटत नाहीं. आमचे दृष्टीनें यांत अशी एक तोड काढतां येणें शक्य आहे, कीं ज्या एखाद्या विशिष्ट ठिकाणीं मध्यवर्ती बँकेची शाखा व अर्बन बँक या दोन्हीहि असतील तेथें त्या अर्बन बँकेला शाखा कचेरींत ठेवलेल्या आपल्या खात्यांतील पैसे मध्यवर्ती बँकेच्या मूळ ठिकाणीं विनाकमिशन वर्ग करून देऊं नयेत. ही वर्गावर्गी करणें झाल्यास त्यासाठी थोडेसें कमिशन आकारलें जावें. मात्र हा कमिशनचा दर इतर खातेदारांपेक्षां जास्त सवलतीचा असला पाहिजे. या दृष्टीनें पूर्वीचे योजनेंत थोडीफार दुरुस्ती केल्यास सदर सवलतीचा गैरफायदा घेणाऱ्या संस्थांवर एक प्रकारचें बंधन राहून ज्या हेतूनें ही मूळ योजना आखली होती त्याचा विपर्यास होणार नाहीं. मात्र येथें हेंहि नमूद करणें जरूर आहे कीं, सदर ठिकाणीं अर्बन बँकांच्या कार्यक्षेत्रांत येणारा हुंडी, चिठ्ठीसारखा व्यवहार मध्यवर्ती बँकेच्या शाखेनें मुळींच करितां कामा नये. म्हणजे मग आम्हीं वर सुचविलेप्रमाणें पैशाच्या वर्गावर्गीसाठीं योग्य तें कमिशन देण्यास अर्बन बँका तक्रार करतील असें आम्हांस वाटत नाहीं.

मध्यवर्ती बँकेस पोस्टेज, स्टेशनरी, कामगार मंडळीचा पगार, व्याजाची सूट, इत्यादि बाबींवर इतर संस्थांप्रमाणें जरूर तो खर्च करावा लागत असेल याबद्दल दुमत नाहीं. परंतु प्रत्येक सहकारी संस्था ही स्वतःस कमींत कमी फायदा ठेवून आपल्या सभासदांस अगर खातेदारांस जास्तींत जास्त सवलती देण्यासाठी स्थापन झालेली असते ही गोष्ट लक्षांत ठेवली तर मध्यवर्ती बँकेनें थोडी झीज सोसून अगर क्वचित्प्रसंगीं थोडा तोटा सोसूनहि आपल्या कार्यक्षेत्रांत येणाऱ्या अर्बन बँकांस अल्प खर्चांत एवढेंच नव्हे तर बिनखर्चांत पैशाची वर्गावर्गी करण्यास मदत करणें हें तिचें कर्तव्य आहे, असें आम्हांस वाटतें. मध्यवर्ती बँकेकडून थोडें डिव्हिडंड कमी मिळालें तरी तिजकडून केल्या जाणाऱ्या योग्य त्या कामगिरीकडे लक्ष देऊन तिच्या भागीदारांनीं ( आपण एका सहकारी संस्थेचे भागीदार आहोंत याची पूर्ण जाणीव ठेवून ) संतुष्ट रहावयास पाहिजे व तसे ते आहेत असें आम्हांस वाटतें. अशा परिस्थितींत अर्बन बँकांना आजवर दिलेल्या सवलती यापुढें कमी करणें अगर त्या काढून घेणें हें मध्यवर्ती बँकेस इष्ट नसून तिनें तें तसें करूं नये असा तिला आमचा मित्रत्वाचा सल्ला आहे.

सहकारी संस्थांच्या पैशाची वर्गावर्गी कमी खर्चांत करण्याची हल्लींची व्यवस्था ही केवळ मुंबई इलाख्यापुरतीच मर्यादित न ठेवतां शक्य तर ती अखिल भारतीय करण्याचे दृष्टीनें वेगवेगळ्या मध्यवर्ती बँकांनीं प्रयत्न केला पाहिजे असें आम्हांस वाटतें, व तशी एखादी सोयीची योजना आखली गेली तर सहकारी संस्थांचे दृष्टीनें तें फार श्रेयस्कर होऊन त्यांना स्वतःचे पायावर हळूहळू उभे रहातां येईल व मग हल्लींप्रमाणें सरकार, रिझर्व बँक, इंपीरिअल बँक वगैरे संस्थांकडे विनाकमिशन पैशाची वर्गावर्गी करण्याबद्दल याचना करण्याची फारशी गरज रहाणार नाहीं.

### फडनविसांच्या भाषणाचें गौप्य

असेंब्लीमध्यें मांडण्यांत यावयाच्या बजेटाच्या प्रती वर्तमानपत्रांना इतके दिवस कांहीं तास अगर दिवस अगाऊ मिळत असत. यंदा ही पद्धत बदलण्यांत आली आहे. बजेटाचा सिंहावलोकनात्मक पूर्वार्ध सालाबादप्रमाणें आधीं उपलब्ध होईल व त्याबरोबर १,४०० शब्दांत त्याचा सारांश मिळेल. बजेटाचा, विधायक सूचना समाविष्ट असलेला, उत्तरार्ध मात्र, फडनविसांनीं आपल्या भाषणांत त्याचा समाचार घेतल्यानंतरच वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधींना मिळूं शकेल. त्याच्या प्रती असेंब्लीच्या प्रेसगॅलरींत वांटण्यांत येतील व तेथून त्याचा २२५ शब्दांचा सारांश व पूर्ण भाषण हीं दोन्हीं विद्युत्संदेशानें वर्तमानपत्रांच्या कचेऱ्यांत सत्वर मिळण्याची व्यवस्था होईल.

## इंग्लंडमध्यें आयुष्याच्या विम्याची वाढ

### हिंदुस्थानांतली परिस्थिति

गेल्या तीन वर्षांचा अनुभव पहातां, ग्रेट ब्रिटनमध्यें दरसाल उतरलेल्या विम्यांच्या रकमेंत सुमारें २७० कोटि रुपयांची वाढ होते, असें दिसून येतें. १९३४ सालीं ब्रिटिश विमा मंडळयांनीं सुमारें २७० कोटि रुपयांचें नव्या आयुर्विम्याचें काम मिळवलें आणि १९३५ मध्यें हा आकडा २९० रुपये झाला. ब्रिटिश विमा व्यवसाय एवढ्या मोठ्या प्रमाणावर चालत असला तरी ह्या बाबतींत ग्रेटब्रिटन अजून अमेरिका व कॅनडा ह्या देशांच्या मागेंच आहे. गेल्या सालच्या कामांतला वाढावा बहुतेक सर्व विमा मंडळयांच्या व्यवहारांत चलती झाल्यामुळें घडून आला असला, तरी कांहीं विशिष्ट मंडळयांचें काम इतरांच्या मानानें ज्यास्त प्रमाणांत वाढलें असल्याचें आढळून येतें. प्रुडेन्शल ह्या एकट्या कंपनीचें गेल्या सालांतलें काम ३६ कोटि रुपयांचें झालें व तें १९३४ सालाच्या मानानें ४ कोटींनीं अधिक होतें. त्याच्या खालोखाल सन लाइफ कंपनीचें काम २४ कोटि रुपयांचें झालें व त्यांत पूर्वीच्या सालांच्या मानानें १½ कोटि रुपयांचा वाढावा झाला.

आयुर्विम्याचा हा जो सर्वसाधारण विस्तार झालेला दिसतो, त्याचें मुख्य कारण ब्रिटिश जनतेस आपला बचत केलेला पैसा सरकारी व इतर कर्जरोखे आणि मंडळयांचे भाग ह्यांमध्यें गुंतवण्याची संधी उपलब्ध झाली नाहीं, हें आहे. व्यक्तीपेक्षां विमा मंडळया व्याजानें रकमा गुंतवण्याचें काम अधिक यशस्वी रीतीनें करूं शकतात, हा जनतेचा विश्वास वरील वस्तुस्थितीच्या मुळाशीं आहे. तथापि, व्याजाचे सुर्वसामान्य दर उतरल्यानें विमा मंडळयांसहि पैसा किफायतशीर रीतीनें गुंतवण्याच्या कामीं अडचण भासूं लागली आहे आणि निदान 'एंडौमेंट' पॉलिसींचे दर चढवणें त्यांस प्राप्त झालें आहे. ह्या धोरणाचा परिणाम मंडळयांच्या कामाच्या आकड्यांवर व सांपत्तिक स्थितीवर झालेला पुढच्या सालीं दिसून येण्याचा पुष्कळ संभव आहे. प्रचलित मंदी हळु हळु दूर होत आहे, आणि रिकाम्या पैशाचा ओघ उद्योगधंदे व व्यापार ह्यांचेकडे वहाण्याचा रंग दिसत आहे. तथापि, विम्याच्या धंद्यांत पैसा येतो त्यास दुसरी मुख्य वाट सरकारी वगैरे रोख्यांकडची असते आणि त्यांचे बाजारभाव उतरल्यास लोकांची प्रवृत्ति त्यांमध्यें पैसे गुंतवण्याकडे होऊन विमा व्यवसायाच्या प्रसारास थोडा आळा बसल्यावांचून रहाणार नाहीं. अशा स्थितींतहि कांहीं बाबी विम्याचा धंदा वाढण्यास अनुकूल आहेत. नियमित मुदतीच्या विम्याच्या पॉलिसींचे दर थोडे चढले असले तरी सबंद आयुष्याच्या प्रकाराच्या पॉलिसींचे दर मृत्यूचें प्रमाण सुधारल्यामुळें उतरले आहेत. शिवाय, विमा-मंडळया नवीन नवीन तऱ्हेच्या पॉलिसी चालू करीत असून ह्यांपैकीं कित्येक योजना लोकप्रिय होत आहेत. घरें बांधण्याच्या मंडळयांस पैसा पुरविण्याचें साधन विमा कंपन्यांस सोइस्कर झालें असल्यानें पैसा गुंतवण्याचा त्यांचा मार्ग ह्या संबंधांत मोकळा आहे. ह्या रीतीनें प्रतिकूल-अनुकूल परिस्थितींचें निरीक्षण केलें असतां आयुर्विम्याच्या क्षेत्रांतला व्यवहार विशेष वाढला नाहीं तरी तो कमी होईल असें म्हणण्यास जागा दिसत नाहीं.

ग्रेटब्रिटनमधल्या विम्याच्या धंद्याच्या सद्यःस्थितीचें केलेलें हें दिग्दर्शन हिंदुस्थानांतल्या विमा मंडळया व जनता ह्यांनीं विचार करण्यासारखें आहे. आमच्या देशांत विमा-व्यवसाय मुळांतच अजून मर्यादित असल्यामुळें त्याच्या विस्तारास बराचसा वाव आहे, ह्यांत संशय नाहीं. ह्या दृष्टीनें पाहिलें असतां येथील परिस्थिती अनुकूल आहे. भोंवतालच्या सर्वसाधारण आर्थिक व विशेषतः खेळत्या भांडवलाच्या बाबतींत ग्रेट ब्रिटनमध्यें असलेल्या वर वर्णिलेल्या वस्तुस्थितीचा प्रकार हिंदुस्थानांतहि अनुभवास येणें साहजिक आहे. रोख्यांच्या व पैशाच्या बाजारांतल्या हालचाली आणि व्याजाचे प्रचलित दर ह्यांचा विमा मंडळयांच्या सांपत्तिक, पैसा गुंतवण्याच्या व पॉलिसीविषयींच्या धोरणाशीं निकट संबंध येथेंहि राहणारच.तेव्हां ब्रिटिश मंडळयांच्या सावधगिरीच्या आणि दूरदर्शित्वाच्या धोरणाचें अनुकरण हिंदी विमा कंपन्यांनीं करणें अगत्याचें आहे. आपणांवर पॉलिसीच्या योगानें येऊन पडणारी सांपत्तिक जबाबदारी आणि गुंतवावयाच्या पैशावर सुटणारें व्याज ह्यांचा योग्य मेळ घालून आपल्या खर्चाचें प्रमाण व पॉलिसींचे दर ह्यांविषयींचें धोरण त्यांनीं काळजीपूर्वक निश्चित केलें पाहिजे. व्याजाचे प्रचलित हलके दर असेच राहतील ह्या अनुमानास भक्कम आधार आहे असें समजण्याचें कारण नाहीं,आणि ह्या संबंधांतली स्थिति अधिक सोयीची होण्याचा चांगला संभव आहे. ज्यांच्या कामाचा पाया विस्तृत व भक्कम आहे अशा मंडळयांचा विस्तार व प्रगति होण्यास इंग्लंडप्रमाणें हिंदुस्थानांतहि वाव आहे. विमा व्यवसायांत पडलेल्या लोकांनीं व जनतेनें परिस्थितीचा शहाणपणानें फायदा करून घेणें इष्ट आहे.

## "थ्रेडनीडल स्ट्रीटची म्हातारी"

### बँक ऑफ इंग्लंडचें टोपणनांव

बँक ऑफ इंग्लंडला "थ्रेड नीडल स्ट्रीटची म्हातारी" असें विनोदात्मक टोपणनांव आहे. ह्या नांवाचा उलगडा अलीकडे झाला आहे तो असा. अनेक वर्षांमागें ह्या बँकेंतील एका कामगारास वेड लागलें आणि त्याच्या बायकोपासून ही गोष्ट लपवून ठेवण्यांत आली. जेव्हां जेव्हां ती आपल्या नवऱ्याबद्दल चौकशी करण्यास बँकेंत जाई तेव्हां तेव्हां त्यास गुप्त कामगिरीवर परदेशीं पाठवण्यांत आलें आहे अशी तिची समजूत काढण्यांत येई. त्या बाईस "थ्रेड नीडल स्ट्रीटची म्हातारी" असें लोक म्हणूं लागले आणि अखेर तेंच नांव बँक ऑफ इंग्लंडला चिकटलें!

## एका फलविद्याविशारदाची शक्कल

### तरु-बालकें बाटल्यांच्या बोथ्यांतून अन्नरस शोषतात

फळझाडांस त्यांच्या मुळांतून पोषक अन्न न मिळाल्यामुळें तीं नीट वाढत नाहींत असें पाहून एका फलविद्याविशारदानें त्यांस तान्ह्या बालकांप्रमाणें बाटलीनें अन्नरस पाजण्याची शक्कल काढली आहे. झाडांमध्यें पेयाच्या बाटल्या ठेवून त्यांस जोडलेल्या रबरी नळयांस लावलेली कांचेचीं बोंडें त्यांच्या खोडांत तो खुपसतो आणि झाडें बाटल्यांतलें पोषक पेय "बोथ्यां"तून शोषून घेतात. ह्या योगानें झाडें सुदृढ होऊन त्यांस चांगलीं व विपुल फळें येतात, असें म्हणतात!

## हिंदी चहाचा धंदा

[ इंग्लंडमधील रॉयल सोसायटी ऑफ आर्ट्सच्या हिंदी विभागापुढें मि. वाट्सन ह्यांनी वरील विषयावर एक व्याख्यान दिलें. त्यांतील कांहीं महत्त्वाची माहिती येथें उद्धृत केली आहे. ]

( १ ) इंग्लंडमध्यें आयात होणाऱ्या चहावर १६८० सालीं दर पौंडास ३३/४ रु. जकात पडत असे. १९०४ सालीं सुद्धा ८ आणे म्हणजे मूळ किंमतीच्या बरोबरीनें जकात पडे.

( २ ) जगांतील चहाचें उत्पादन १४० कोटि पौंड आहे. एकट्या चीन देशांत ५५ कोटि चहा खपतो.

( ३ ) गेल्या वर्षी ग्रेटब्रिटनमध्यें ४४१/२ कोटि पौंड चहा खपला. सत्तर वर्षांपूर्वी चहाचा वार्षिक खप १२-१३ लक्ष पौंड एवढाच असे.

( ४ ) १८५० सालीं हिंदुस्थानांत फक्त १,००० एकरांत चहाची लागवड होती व त्यांतून २१/२ लक्ष पौंड चहाची निपज होई. सध्या ८ लक्ष ३२ हजार एकर चहाखालीं असून त्यांतून ३८ कोटी ३० लक्ष पौंड चहा निघतो. आज ह्या धंद्यांत १०० कोटि रुपये भांडवल गुंतलेलें आहे.

( ५ ) आसाम, दार्जिलिंग व जलपैगुरी येथें हिंदी पिकाच्या ७७ टक्के चहा पिकतो. मलबार किनाऱ्यावरहि मोठ्या प्रमाणावर लागवड होते.

( ६ ) १९३४ सालीं आसाममधील १,०४६ मळ्यांपैकीं ३३६ मळ्यांची मालकी हिंदी लोकांच्या हातांत होती.

( ७ ) १९३४ सालीं एकूण २१ कोटि रुपये किंमतीच्या चहाची निर्गत झाली. त्यापैकीं ग्रेट ब्रिटनमध्यें सुमारें १९ कोटि रुपयांचा चहा उतरला.

( ८ ) १९३१-३२ मध्यें आसामांतील मजुरांस ५१/२ कोटि रुपये वेतन मिळालें व सुमारें ५ कोटि रुपये चहाच्या व इतर मालाच्या वहातुकीवर खर्च झालें.


धूम्रपानापासून होणारे वाईट परिणाम टाळण्यास
शुद्ध व उंची तंबाखूच्या विड्या
ओढणेंच अगत्याचें आहे.
आपली गरज शंभर टक्यांनीं पुरविण्यास
लायक असलेल्या

लंगर छाप विड्याच




आपले दुकानदाराकडे घ्या.
ठाकूर सावदेकर कंपनी,
फुलवाला चौक, ३७७ वेताळ पेठ, पुणें.


## " अर्था " चें व्यवसायबंधूंकडून अभिनंदन

( 'अर्था' स दुसरें वर्ष लागलें, ह्यासंबंधानें कित्येक व्यवसायबंधूंनीं 'अर्था' च्या कामगिरीबाबत प्रशंसोद्गार काढून त्याचें अभिनंदन केलें आहे, याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहों. कांहीं निवडक अभिप्राय खालीं उद्धृत केले आहेत. )

पुण्याचे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रो. वा. गो. काळे यांनीं सुरू केलेल्या 'अर्थ' साप्ताहिकास एक वर्ष पुरें होऊन, त्यानें दुसऱ्या वर्षांत अधिक जोमानें व आत्मविश्वासानें पदार्पण केलें आहे, याबद्दल आम्हांस अंतःकरणपूर्वक आनंद होत आहे. 'अर्थ' हा विषय बहुजनसमाजाच्या अत्यंत जिव्हाळ्याचा असला तरी तो अत्यंत उपेक्षित आहे. याला कारण त्या विषयाची रुक्षता व दुर्बोधता हेंहि असूं शकेल. सामान्य समाजानें ह्या विषयाची अपेक्षा केली, तरी त्याची उपयुक्तता लवमात्र कमी होत नाहीं.

अर्थशास्त्रासारखा दुर्बोध विषय बालबोध भाषेनें सुबोध व सुगम करून त्याबद्दल जनतेच्या अंतःकरणांत जिज्ञासा व आस्था उत्पन्न करणें, हा प्रो. काळ्यांचा हेतु गेल्या वर्षांत बराच सफल झाला आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. लोकांस अर्थ प्रिय असला तरी अर्थशास्त्राबद्दल त्यास औदासिन्य शक्य तेवढें नाहींसें करण्याचा 'अर्था' नें प्रयत्न केला आहे. बुद्धीस फारसा शीण न देतां, जगांतील व विशेषतः हिंदुस्थानांतील अर्थ व्यवहाराचें आवश्यक ज्ञान थोडक्यांत व सोप्या भाषेत 'अर्था' नें करून दिलें आहे. या महत्त्वाच्या कामगिरीचें श्रेय प्रो. काळे यांस आहे. गेल्या वर्षी आम्हीं म्हटल्याप्रमाणें " अर्थशास्त्रांतील अधिक उच्च व गहन प्रश्नांचा अभ्यास करून ग्रंथनिष्पत्ति करण्यास अत्यावश्यक असलेला वेळ, सामान्य जनतेस शिक्षण देण्यांत खर्च करण्याचें प्रो. काळे यांनीं योजावें " हें विशेषच कौतुकास्पद व अभिनंदनीय होय. प्रो. काळे यांच्या लोक-शिक्षणाच्या ह्या प्रयत्नांत यश येत आहे हें पाहून आम्हास आनंद होत आह. गुणज्ञ महाराष्ट्र 'अर्था' स अधिक आश्रय देऊन आपली कृतज्ञता व्यक्त करील अशी आम्हांस उमेद आहे.

—मातृभूमि ( ३० जानेवारी, १९३६ )

---

महाराष्ट्रांतील विख्यात अर्थशास्त्रज्ञ प्रो. वा. गो. काळे यांच्या संपादकत्वाखालीं गेल्या वर्षी हें साप्ताहिक सुरू झालें. राजकारण आणि अर्थशास्त्र यांचा संबंध इतका निकट आहे कीं, सारें राजकारण द्रव्यमूल आहे म्हटलें तरी चालेल. पण, महाराष्ट्रांत राजकारणाला वाहिलेलीं वृत्तपत्रें जरी अनेक निघत असलीं, तरी आर्थिक प्रश्नांची चर्चा करणारें वृत्तपत्र मात्र एकहि नव्हतें. ती उणीव या साप्ताहिकानें उत्तम भरून काढली आहे. त्यांत निरनिराळ्या प्रकारच्या व्यापारी बातम्या, प्रचलित आर्थिक प्रश्नांचा ऊहापोह व औद्योगिक चळवळींचा आढावा येत असतो. त्यांतील विवेचन शास्त्रशुद्ध खरें, पण सुबोध असतें. राजकारणी लोकांप्रमाणेंच व्यापारी व धंदेवाईक लोकांनाहि हें साप्ताहिक उपयुक्त आहे. 'अर्था' ला उत्तरोत्तर वाढता लोकाश्रय मिळो, असें आम्ही इच्छितों. वर्गणी चार रुपये.

--महाराष्ट्र ( २ फेब्रुवारी, १९३६ )

## पंजाबमधील जमीन गहाणाच्या बँका

### लायख व्यवस्थापकांचा अभाव : प्रतिकूल परिस्थिति

[ सहकारी जमीन गहाणाच्या बँकांची स्थापना मुंबई इलाख्यांत आतां जिल्हानिहाय झाली असून, त्यांस पैसे पुरविणाऱ्या प्रांतिक मध्यवर्ती जमीन गहाणाच्या बँकेनेंहि आपलें कामकाज सुरू केलें आहे. पंजाब प्रांत ह्या बाबतींत अग्रेसर असल्यानें, तेथील अनुभव इतर ठिकाणच्या बँकांना व कार्यकर्त्यांना मार्गदर्शक होईल. अलिगडच्या मुस्लिम युनिव्हर्सिटीचे मि. अताउल्ला ह्यांच्या, इंडियन जर्नल ऑफ इकनॉमिक्समध्यें प्रसिद्ध झालेल्या, एका लेखांतील माहितीचा सारांश येथें दिला आहे. ]

कर्जाची किमान मर्यादा गहाण जमिनीवरील सान्याच्या तीसपट अशी ठरली असली, तरी पांच हजारांपेक्षां जास्त रकमेचें कर्ज देऊं नये, असें सहकारी खात्याचें धोरण आहे. १९३३ सालानंतर नवीं कर्जे जवळ जवळ अजिबात देण्यांत आलेलीं नाहींत. परतफेडीची मुदत पांच वर्षें होती, ती आतां दहा वर्षें करण्यांत आली आहे.

#### बँकांच्या व्यवहारांतील अडचणी

जमीन खरेदी करण्यासाठीं कर्ज काढण्याची प्रवृत्ति फारच मोठ्या प्रमाणावर असलेली आढळते. भरमसाट किंमती देऊन विकत घेतलेल्या जमिनीपासून नफा काय मिळणार? आतां, अशीं कर्जें देणें बंद करण्यांत आलें आहे.

पात्रता व उत्साह ह्यांचा व्यवस्थापकमंडळांत पूर्ण अभाव आहे; योग्य व लायक डायरेक्टर मिळणें अत्यंत कठीण जातें. डायरेक्टर लोक आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करतात व मित्रांस व नातेवाइकांस कर्जें मिळवून देतात. बँकेच्या हितापेक्षां अप्रामाणिक नातेवाइकांकडे त्यांचा ओढा ज्यास्त असतो. डायरेक्टरांस स्वतःसाठी कर्ज मिळूं नये, अशी तरतूद कटु अनुभवानंतर आतां करण्यांत आली आहे.

कर्ज मागणाराच्या मालमत्तेचा व पूर्वीच्या कर्जाचा अंदाज डायरेक्टरांचे मार्फत करण्यांत येतो, तो क्वचितच विश्वासार्ह असतो. आपल्या स्नेह्यांस व गोतावळ्यांतील लोकांस कर्ज मिळावें म्हणून त्यांच्या बाबतींत ढिलेपणाचें धोरण स्वीकारण्यांत येतें.

अर्जदारास चेकचे रूपानें कर्ज देण्यांत येतें व हा चेक ज्याचेकडून जमिनीचें गहाण सोडवावयाचें असेल त्या गहाणदाराचे नांवानें लिहिण्यांत येतो, परंतु गहाणदार नेहमींच चेक स्वीकारतो असें नाहीं. अर्जदारानें पैशाचा अपव्यय करूं नये म्हणून केलेल्या व्यवस्थेचा दुरुपयोग करण्यास ह्या योगानें डायरेक्टरांस संधि मिळते.

गहाण सोडवलें गेल्यावर रेव्हेन्यू रेकार्डीतील नोंद बदलण्यांत अत्यंत दिरंगाई होते. अर्जदाराचीं विधानें तपासून पडताळण्यासाठीं खाते उतारा पहावा लागतो, परंतु रेव्हेन्यू खात्यांतील खालचे कामगार सहकारी खात्यास सहाय करीत नाहींत.

व्याजाचा दर आठ ते नऊ टक्के पडतो. मालाच्या किंमती उतरल्या असल्यानें हा दर शेतऱ्यांस परवडत नाहीं. दरसाल ८५० रुपये खंड देणारी जमीन आज १५० रुपयांस खंडानें चावी लागते.

कर्जाची परतफेड वक्तशीर होत नाहीं. डायरेक्टर लोक कर्जदारांवर मेहेरबानी करतात, परंतु बँकेच्या हिताकडे त्यांचें दुर्लक्ष होतें. पुढेंमागें आपल्यावरहि अशीच मेहेरनजर रहावी, हा त्यांचा हेतु असतो.

पंजाबमधील बँकांची स्थापना झाली, तीच मुळी जरा चमत्कारिक काळांत झाली. त्यावेळीं मालाच्या किंमती चढीच्या होत्या व त्यांस अनुसरून कर्जें देण्यांत आलीं. मंदीच्या कठिण प्रसंगीं ह्या कर्जावरील व्याजाचा हप्ता भरणेंहि आतां शेतकऱ्यांस अवघड झालें आहे. कर्जाचें तारण अपुरें पडलें असून गहाण घेतलेल्या जमिनी विकल्या तरी बँकांचें व्याजहि वसूल होण्याची भ्रांत आहे. कर्जें देण्याचें बंद झाल्यावर बँकेच्या कामांत डायरेक्टर लक्ष घालीनासे झाले. "डायरेक्टर हे काम व सेवा करण्याकरतां आलेले नसून शोषण करण्यासाठीं आले आहेत" अशी एका बँकेसंबंधीं केलेली तक्रार खरी दिसते. पंजाबनें या बाबतींत मद्रासचें उदाहरण नजरेपुढें ठेवलें पाहिजे. तेथें जमीन गहाणाच्या बँकांची स्थापना नव्यानें झाली असून प्रचलित हलके व्याजाचे दर व जमिनीच्या उतरलेल्या किंमती ह्यांनीं बँकांचे व्यवहारांस सुरवात तरी चांगली करून दिली आहे, असा अभिप्राय पंजाबच्या सहकारी खात्याच्या १९३३ चे अहवालांत नमूद करण्यांत आलेला आहे.

कर्जदार शेतकरी आपलीं देणीं भागविण्यास खरोखरच असमर्थ आहे, ही गोष्ट रजिस्ट्रारनेंच स्वतः कबूल केली आहे. हप्ते चुकल्यास, बँकेनें जमीन ताब्यांत घेणें अपरिहार्य होईल, परंतु बँकेस ती विकण्याचा अधिकार दिल्यास, शेतकऱ्यानें सावकाराकडून कर्ज काढणें व बँकेकडून काढणें ह्यांत फरक तो काय राहिला?

## आंतरराष्ट्रीय कामगारपरिषद

### १९३५ मधील प्रगति

महायुद्धानंतर जो व्हर्सेलसचा तह झाला, त्या अन्वयें १९१९ मध्यें इंटर नॅशनल लेबर ऑफिसची स्थापना झाली. कामकरी वर्गाच्या बिकट परिस्थितीमुळें असमाधान निर्माण होऊन जागतिक शांतता व एकोपा ह्यांस बाध येतो, म्हणून जगांत कायम शांतता नांदावी ह्या हेतूनें वरील संस्था अस्तित्वांत आणली गेली. राष्ट्रसंघाचे सभासद साहजिकच ह्या संस्थेचे सभासद होतात, तथापि इतर देशांसहि सभासदत्व मिळूं शकतें. सभासद-राष्ट्राच्या दोन प्रतिनिधींबरोबरच प्रत्येकांतील कारखानदार व कामगार ह्यांचा प्रत्येकीं एक प्रतिनिधि परिषदेंत बसतो, हा ह्या संस्थेचा विशेष आहे.

इंटर नॅशनल लेबर कॉन्फरन्सच्या वॉशिंग्टन येथील पहिल्या अधिवेशनांत कामाच्या कमाल तासांची मर्यादा ४८ ही ठरविण्यांत आली, तथापि ह्या निर्णयास कित्येक प्रमुख राष्ट्रांनीं अजून मान्यता दिलेली नाहीं. १९३२ च्या सुमारास जागतिक मंदीमुळें सर्वत्र बेकारी माजली, तेव्हां कामाच्या वांटणींत सर्वांस थोडा फार हिस्सा मिळावा, ह्यासाठीं कामाचे तास चाळीसांवर आणावे, ह्या योजनेस कामगारांचा व सरकारी प्रतिनिधींचा पाठिंबा होता; तथापि कामाचे तास कमी झाले, तरी मजुरी पूर्वीची रहावी, ह्या कामगारांच्या मागणीस पुरेसा दुजोरा मिळाला नाहीं. आतां, १९३५ मध्यें, लेबर ऑफिसनें ४० तासांच्या आठवड्यास तत्त्वतः मान्यता दिलेली असून, त्याच्या अंमलबजावणीसहि हळु हळु सुरवात झाली आहे. हें तत्त्व वाढत्या प्रमाणांत लागूं व्हावें अशी येत्या अधिवेशनांत स्पष्ट करण्यांत येईल. १९३५ च्या परिषदेनें, खाणींमध्यें स्त्रियांस काम करण्याची मनाई, तरुणांच्या बेकारीवर उपाययोजना, कामगारांचें नीट पोषण होत नाहीं त्यावर उपाय, इत्यादि संबंधांत व हंगामी कामगारांचे पेन्शनबद्दलचे हक्क ह्यांविषयीं ठराव केले आहेत.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | ११२—० |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९-१२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९-१० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—५ |
| ४% १९६०-७० ... ... | ११२—४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९७-१०½ |
| ३½% १९४७-५० ... ... | १०७—० |
| ४% १९४३ ... ... ... | ११०—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७-१० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०६—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०७—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | १०७—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | ११०—२ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—८ |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३१—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३४-१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५४८-१२ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३०—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | ९८—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९५—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ८५२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५१—४ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२३-१२ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १५३६—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५२५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९३-१२ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६६—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १४३—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५२८-१२ |

## अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ. वर्धा.

### लखनौ येथील अखिल भारतीय ग्रामोद्योग व खादी प्रदर्शन

सदरहु प्रदर्शन ता. २५ मार्चला सुरू होईल व ता. १४ एप्रिल अखेर खुलें राहील. ह्या प्रदर्शनांत महाराष्ट्रासाठीं एक स्वतंत्र स्टॉल ठेवण्यांत आला आहे. प्रदर्शनाकडे जो माल पाठवावयाचा त्यासाठीं जी. आय. पी., एम. एस. एम व नायझाम स्टेट रेल्वे ह्यांनीं सवलत दिली आहे. प्रदर्शनाबद्दल खाली रूपरेषा देत आहे. जास्त माहिती पाहिजे असेल तर प्रदर्शन-चालकांकडे पत्रद्वारें अगर समक्ष चौकशी करावी.

**१ खादी विभाग**

पोट विभाग ( अ ) कापूस व इतर कच्चा माल ( आ ) यांत्रिक विभाग ( इ ) प्रात्यक्षिक विभाग ( ई ) खास प्रदर्शनीय विभाग ( उ ) वस्त्रस्वावलंबन विभाग ( ऊ ) आकडेशास्त्र विभाग ( ए ) खादी बाजार.

**२ ग्रामोद्योग विभाग**

( अ ) खेड्यांतील उद्योग ( आ ) हस्तकौशल्याचीं कामें. ह्या बाबतीमधील मांडणी ( १ ) प्रदर्शनीय विभाग ( २ ) यंत्रें व प्रात्यक्षिक विभाग ( ३ ) आकडेशास्त्र विभाग व ( ४ ) ग्रामोद्योग वस्तुबाजार ह्या वरील सदराप्रमाणें केली जाईल.

**३ शेतकी विभाग**

( १ ) खतें, त्यांचे प्रकार व बनविण्याची पद्धति ( २ ) बीबिआणे प्रकार व नमुने. ( ३ ) यंत्रें, उपकरणें, ( ४ ) गुरें, रोग, किडे ( ५ ) खेड्यांतील जीवन व परिस्थिति. इ.

**४ खाद्यपदार्थ विभाग**

**५ करमणूक विभाग**

**६ कला विभाग**

**रेल्वेची सवलत**:—प्रदर्शनासाठीं व प्रदर्शनांत विक्रीसाठीं जो माल रवाना होईल तो किंवा ह्यापैकीं उरलेला माल परत आणतांना मोफत पाठविला जाईल. विक्रीसाठीं जे कोणी कांहीं वस्तू पाठवितील त्यांची विक्री प्रदर्शनातर्फे करून देण्यांत येईल व जो माल विक्री होईल त्याचे किंमतीचें शेकडा १० प्रमाणें बटाव ( कमिशन ) घेण्यांत येईल. राहिलेला माल मालकाकडे परत पाठविला जाईल. माल पाठवितांना रेल्वेभाडें व गाडीभाडें वगैरेसाठीं लागणारी रक्कम माल पाठविणारानें अगाऊ भरली पाहिजे. प्रदर्शनाबाबत पत्रव्यवहार व माल रवाना करणें तो, श्री. मंत्री, खादी व ग्रामोद्योग प्रदर्शन, आर्यनगर, लखनौ यांचेशीं करावा.

वैकुंठ एल. मेहता,
सभासद,
व्यवस्थापक मंडळ, अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ.


S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716, Sadashiv Peth, Poona City

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची
प्रमुख प्राव्हिडंड विमा कं.

**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**

च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

आपणांस विहीर बोअर करावयाची आहे काय ?

**भिडे आणि सन्स्**

स्वतः तयार केलेल्या मशीननें बोअर खणून देतात.
चौकशी कराः—
भिडे आणि सन्स

सांगली ( S. M. C. ) शनीचा पार, पुणे २

**MARATHE & Co.**
**ENGINEERS & IRON FOUNDERS**

| WORKS : | | OFFICE : |
|---|---|---|
| Natu Bag, Bhikardas Road, POONA 2 | Can undertake to do any sort of casting. We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act. **Our prices are very competitive.** | 978-79, Sadashiv, Laxmi Rd., POONA 2 |

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**
**This year 1934-35**
**Exceeds**
**2 CRORES & 50 LAKHS**

**BONUS**
PER THOUSAND PER YEAR
On Endowment **Rs. 23** On Whole Life **Rs. 20**

# HINDUSTHAN
**Co-operative Insurance Society, Ltd.**
( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

**दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.**

**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पद्मजी पेपर मिल, मुंबई.**

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये ?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४/१? पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें २.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख ४ मार्च, १९३६. अंक १०

दि मुकुंद इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें शहर.
[ अधिकृत भांडवल १००,००० रुपये ]
प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त
गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत प्रत्येकाची विमा कंपनी !
शेअरविक्री जोरांत सुरू झाली.
शेअर्स खपविणारे एजंटस मर्यादित. त्वरित अर्ज करा.
मॅनेजिंग एजंटस्—विष्णु मुकुंद आणि कं., पो. बॉ. नं. ४३.
२५६ सदाशिव, पेरूगेटाजवळ, पुणें शहर.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें
मध्यम वर्गातील गृहेच्छू लोकांस — अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य
भाडेकरी–घरमालक–गृहयोजना
माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.
जनरल मॅनेजर

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "
स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:–
कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.
अध्यक्ष–श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी
हयातींतील विम्यास ३७॥ रु. | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारी त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास ४५ रु.
जास्त माहितीकरितां भेटा अगर समक्ष लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

स्वदेशी
कापड म्हणजे काय !
(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.
या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.
हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सव प्रकारची स्टेशनरी वगैरे.
खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण
स्वदेशी भांडार
लक्ष्मीरोड, पुणें २.

# विविध माहिती

### बँकांस सुटी

गुरुवार, ता. ५ मार्च रोजीं बकर-ईदनिमित्त बँका बंद राहतील.

### लंडनमधील आगीच्या बंबास बोलावणीं

१९३४ सालीं लंडनमध्यें एकूण ८,८३१ वेळां आगीच्या बंबांस बोलावणीं आलीं. त्यांपैकीं ३,१८७ बोलावणीं निष्कारण होतीं.

### लंडनमधील रहिवाशांचे प्रवास

१९३४ सालीं लंडनमधील प्रत्येक रहिवाशानें सरासरीनें १२९ वेळां आगगाडीनें, २३३ वेळां बसनें व १२३ वेळां ट्रामनें प्रवास केला.

### टेलिफोनचा वाढता उपयोग

दहा वर्षांपूर्वी लंडन येथील रहिवाशांनीं एकूण दोन कोटि तारा केल्या व ४८३ कोटि वेळां टेलिफोनचा उपयोग केला होता. आतां टेलिफोनची सोय सर्वत्र झालेली असल्यामुळें १९३४ सालीं ८५३ कोटींहून ज्यास्त वेळां टेलिफोन केले गेले, परंतु तारांच्या संख्येंत मात्र सत्तर लाखांची घट आढळून आली.

### स्त्रिया ज्यास्त कार्यक्षम ठरतात

ऑफिसांतील कित्येक कामें आतां यंत्रें करूं लागलीं आहेत. ह्या यंत्रांवर काम करण्यास पुरुषांपेक्षां स्त्रिया ज्यास्त लायक ठरतात, असा अनुभव आहे. ब्रिटिश सरकारी नोकऱ्यांतून ह्याचें प्रतिबिंब उमटलेलें आढळतें. इंग्लंडमधील सिव्हिल सर्व्हिस कमिशनर्सनीं १९३४ सालीं ३,७१९ नव्या नेमणुका केल्या, त्यांपैकीं ३,१०८ म्हणजे ८४ टक्के नेमणुका स्त्रियांच्या होत्या.

### इंपीरिअल टोबॅको कंपनीचें अजस्त्र प्रकरण

इंपीरिअल टोबॅको अनेक लहान-मोठ्या मंडळयांची मिळून बनली असून तिचें एकूण भांडवल सुमारें ७२ कोटि रुपये आहे. गेल्या सालीं त्या कंपनीस १४ कोटि रुपये नफा झाला. तिच्यावर आर्थिक मंदीचा प्रतिकूल परिणाम झालेला नाहीं, इतकेंच नाहीं तर १९३५ साला इतका नफा तिला पूर्वी कधीच झाला नव्हता!

### "पदवीधर होऊन उपाशी मरण्यापेक्षां पदवीविहीन जगणें बरें"

बंगालमध्यें 'सुंदरवनां'त सर डॅनिअल हॅमिल्टन ह्यांनीं एक वसाहत स्थापन केली असून तेथें तरुणांस शेती व कापड विणणें वगैरे हस्तव्यवसायाचें शिक्षण देण्यांत येतें. तरुणांस आपलें पोट स्वतंत्रपणानें भरतां यावें अशा प्रकारचें व्यावहारिक शिक्षण देणें हा त्यांच्या संस्थेचा मुख्य हेतु आहे. त्यास उद्देशून सर डॅनिअल एका मुलाखतींत नुकतेच म्हणालेः—"थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आम्हीं तरुणांस कसें उपाशी मरावें हें शिकवीत नसून त्यांनीं कसें जगावें ह्याचें शिक्षण देतों, कारण पदवीधर होऊन उपास काढण्यापेक्षां पदवीशिवाय जगणें बरें."

### दूधवाल्यांचा धंदा संततिनियमनामुळें बसला

न्यूयॉर्कमध्यें संततिनियमनामुळें जननाचें प्रमाण झपाट्यानें उतरलें आहे व तान्ह्या मुलांच्या संख्येंत घट झाल्याकारणानें दुधाचा खप कमी झाला आहे. "दुधाचा खप वाढवावयाचा असेल तर जननाचें प्रमाण वाढवा" असा संदेश तेथील दूधवाल्यांस देण्यांत आला आहे.

### अकरा कोटि रुपयांच्या जिंदगीचा वारस जन्मला

एका डॅनिश उमरावाच्या श्रीमान इंग्लिश पत्नीस लंडनमध्यें पुत्रप्राप्ति नुकतीच झाली आहे. ह्या पुत्ररत्नास अकरा कोटि रुपयांच्या जिंदगीची मालकी मिळावयाची आहे.

### लंडन येथें वेड्यांचीं इस्पितळें

लंडन येथील वेड्यांच्या इस्पितळांत चाळीस हजार वेड्यांची सोय आहे.

### ग्रेटब्रिटनमध्यें आइसक्रीमचा खप

गेल्या वर्षीं ग्रेटब्रिटनमध्यें चार कोटि गॅलन आइसक्रीम खपलें.

### बेलूर येथील लोखंड-पोलादाचा कारखाना

कलकत्त्याजवळ बेलूर येथें स्थापन झालेल्या ह्या कारखान्याच्या भांडवलाचा तिसरा हिस्सा जपाननें पुरवला आहे व इंजिनियर आणि तज्ज्ञ लोक सर्व जपानी आहेत. यंत्रसामुग्रीची खरेदी बहुतेक जपानांतच झाली. ह्या कारखान्याची वार्षिक उत्पादनशक्ति साठ हजार टन होईल.

### रिझर्व्ह बँकेची मुंबईंतली इमारत

राणीच्या पुतळयाच्या मागची जुन्या तार ऑफिसची जागा रिझर्व्ह बँकेच्या नव्या इमारतीसाठीं घेण्याचा बेत बदलला असून आतां टाउन हॉलच्या बाजूस असलेली, मिंट रोड व बझारगेट स्ट्रीटचें टोक ह्यांच्या मधली जागा मुंबई म्युनिसिपालिटीकडून ९ लक्ष रुपयांस खरेदी करण्याचें ठरलें आहे.

### जमिनीखालीं आठ हजार फुटांवर काम करणारे मजूर

दक्षिण आफ्रिकेंतील रॉबिन्सन डीप गोल्ड माइन ही सोन्याची खाण जगांतील सर्व खाणींत ज्यास्तींत ज्यास्त खोल आहे. तिची खोली आठ हजार फूट आहे. अशा खोलीवर काम करणारे मजूर कामावरून परत आल्यावर इतके थकतात, कीं त्यांचें वजन केव्हां केव्हां पांच पांच पौंड कमी होतें. पुनः कामावर जाण्यापूर्वी खाणीचे मालक विशेष तऱ्हेचें अन्न त्यांस देऊन, मजुरांना पुढची पाळी येईपर्यंत पूर्ववत् ताजेतवाने करतात. श्वेतवर्णीयांकडे देखरेखीचेंच काम असल्यामुळें त्यांचेवर अनिष्ट परिणाम होत नाहीं.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २२ फेब्रुवारी रोजीं पुरा झालेला आठवडा | ३५,१२,२४२ |
| ता. २९ फेब्रुवारी रोजीं पुरा झालेला आठवडा | ६६,०६,१७५ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते २९ फेब्रुवारी १९३६ अखेर | २,६३,२०,७७,८२१ |

अनुक्रमणिका.


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ११४ | ६ हौरा पुलाचें कंत्राट ... | ११८ |
| २ मध्यवर्ती बजेटांत वाढाव्याची भरती ... | ११५ | ७ सहकारी संस्था व आर. टी. आर. ... ... | ११९ |
| ३ बँकांचीं गिऱ्हाइकें ... | ११६ | ८ मुंबईमध्यें कॅनरी काढण्याची योजना ... | १२० |
| ४ स्फुट विचार... ... जमशेदपूर येथील टाटांचा कारखाना—हिंदी रेल्वेजच्या व्यवस्थेवर टीकेचा भडिमार—तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे हाल—बजेटाच्या तुटीची सर्वत्र हाकाटी—बंगलोरचें इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स | ११७ | ९ इजिप्तमधलि लोकांचे हितसंबंध ... ... | १२० |
| | | १० बार्कलेज बँकांचीं गिऱ्हाइकें ... ... | १२१ |
| | | ११ बँकांमधील ठेवींचे आंकडे ... ... | १२१ |
| | | १२ पोस्ट व तार खात्याचा अहवाल ... ... | १२२ |
| ५ सहकारी वृत्त ... | ११८ | १३ निवडक बाजारभाव ... | १२३ |



# अर्थ

बुधवार, ता. ४ मार्च १९३६


## मध्यवर्ती बजेटांत वाढाव्याची भरती

### वाढाव्याचीं कारणें आणि विनियोग

एखाद दुसरा अपवाद शिवाय करून प्रांतिक सरकारांस आपल्या खर्चाची तोंडमिळवणी करण्याची मारामार पडत असतां हिंदुस्थान सरकारच्या तिजोरींत मात्र वाढावा दिसून येत आहे. नवे कर बसवून किंवा नडीच्या प्रसंगीं बसवलेले जुने कर चालू ठेवून प्रांतिक सरकारास मोठ्या अडचणींनें आपलीं बजेटें बसवावीं लागत आहेत, पण मध्यवर्ती सरकारास वाढत्या उत्पन्नामुळें कर कमी करतां येण्याचें भाग्य लाभलें आहे. जनतेचें हें सुदैव आहे, कारण प्रचलित मंदीच्या काळांत करभार थोडा जरी हलका झाला तरी तें इष्टच आहे. करांची जमा अंदाजाच्या मानानें वाढून गेल्या व चालू वर्षाच्या हिशेबांत अनपेक्षित वाढावा झाला असून येत्या सालांतहि कर थोडे कमी केले तरी चांगली शिल्लक उरेल असा सर जेम्स ग्रिग ह्यांचा अजमास आहे. वाढाव्याची ही भरती कशी आली आहे, हें खाली दिलेल्या आंकड्यांवरून दिसून येईल:—

| साल | | वाढावा |
|---|---|---|
| १९३४–३५ | : दुरुस्त अंदाज | = ३२७ लक्ष रुपये |
| „ | : पुऱ्या हिशेबांत | = ४९५ „ „ |
| १९३५–३६ | : अंदाजी वाढावा | = ६ „ „ |
| „ | : दुरुस्त अंदाची वाढावा | = २४२ „ „ |
| १९३६–३७ | : अंदाजी वाढावा | = २०५ „ „ |
| १९३७–३८ | : तोंडमिळवणी | = ... „ „ |
| १९३८–३९ | : अंदाजी आढावा | = २०० „ „ |

दोन वर्षांसंबंधाचे अंदाज चुकून, हिशेबांत अदमासाबाहेर वाढावे कसे आले? जमा व खर्च ह्यांचा बरोबर अंदाज करणें ह्यांतच फडनवीसांचें खरें कौशल्य असतें आणि सर जेम्स ग्रिग ह्यांचा अजमास व प्रत्यक्ष राहिलेल्या शिलका ह्यांमध्यें मोठ्या तफावती दिसून आल्या आहेत. तेव्हां ह्याचें कारण स्पष्ट करून सांगणें त्यांस प्राप्तच होतें. १९३४-३५ सालच्या वाढाव्यास अनुलक्षून कोणत्या बाबींची जमा कल्पनेपेक्षां अधिक झाली हें त्यांनीं सांगितलें आणि मंदींतून बाहेर निघण्याचें सामर्थ्य हिंदुस्थानांत आहे असें म्हणणारांवर विश्वास न ठेवतां, ब्रिटिश साम्राज्याशीं ह्या देशाचा निकट संबंध आहे त्यामुळें व सरकारच्या हुंडणावळीच्या बाबतच्या धोरणामुळें येथील आर्थिक स्थिति खालावत आहे अशी ओरड करणारांच्या टीकेस आपण अधिक मान दिला, त्याचा परिणाम उत्पन्नाचा अंदाज कमी धरण्यांत झाला व वाढावा उत्पन्न झाला, असा टोमणा विनोदानें त्यांनीं दिला. केव्हांहि सावधगिरीचा अंदाज इष्ट असतो, तरी हिंदुस्थानच्या आर्थिक हलाखीविषयीं अतिशयोक्तीनें अभिप्राय व्यक्त करणाऱ्या टीकाकारांच्या मतास फाजील महत्त्व देण्याची चूक आपण ह्यापुढें करणार नाहीं, असेहि उद्गार त्यांनीं काढले. ह्या संबंधांत वस्तुस्थिति अशी आहे कीं करांचे दर भारी असले आणि देशांतली आर्थिक परिस्थितीस लागलेली मंदीची झळ थोडी जरी कमी झाली (उदाहरणार्थ, सरकारी कर्जावरचा व्याजाचा दर उतरला) तरी अंदाजाच्या मानानें उत्पन्नांत वाढावा येतो, आणि अशा प्रकारचा अनुभव सर बेसील ब्लॅकेट ह्यांच्या फडनवीशी अमदानींत मागें आलेला आहे. ह्याप्रमाणें उत्पन्नांत वाढावा निर्माण होऊं लागला म्हणजे जनतेवरील करांचा बोजा हलका करणें हाच सरळ मार्ग आक्रमणें उचित असतें.

फडनवीसांच्या हातांत १९३४–३५, १९३५–३६ व १९३६–३७ ह्या तीन सालांच्या जमाखर्चांत निघणारा एकूण सुमारें ६२० लक्ष रुपयांचा वाढावा आला आणि एवढ्या मोठ्या रकमेचा उपयोग कसा करावा, हा प्रश्न अर्थातच उपस्थित झाला. १९३४-३५ मध्यें खेडेगांवांच्या सुधारणेसाठी बाजूस काढून ठेवलेल्या फंडांत १७२½ लाख रुपये शिल्लक आहेत. त्यांतून खाली नमूद केल्याप्रमाणें शेतीच्या व लहान उद्योग धंद्यांच्या उपयोगाकरितां रकमा खर्ची पडावयाच्या आहेत:—

| | |
|---|---|
| शेतीसंबंधीं शास्त्रीय शोध | = ३० लक्ष रु. |
| मलेरिया निवारणार्थ शोध | = १० „ |
| लोकरीच्या हातमागाचा धंदा | = ५ „ |
| रेडिओमार्फत खेडेगांवांत शिक्षणाचा प्रसार | = २० लक्ष रु. |

वरील खर्च होऊन १०८½ लक्ष रुपये बाकी उरतात, त्यांची वांटणी, खेडेगांवांच्या सुधारणेसाठी प्रांतांमध्यें योजावयाच्या सर्वसाधारण उपायांवर खर्चावे म्हणून त्यांच्या सरकारांमध्यें लोकसंख्येच्या प्रमाणांत केली जाईल.

ह्यानंतर १९३५-३६ सालच्या वाढाव्याचे २४२ लक्ष व १९३६-३७ सालचे अपेक्षित २० लक्ष रुपये राहिले. त्यांपैकीं पहिल्या रकमेमधून ४५ लक्ष सिंध व ओरिसा ह्या नव्या प्रांतांत जरूर असलेल्या सरकारी इमारतींकरितां मदत म्हणून देण्यांत येतील. १९३७-३८ मध्यें नवीन राज्यघटनेप्रमाणें प्रांतांमध्यें राज्यकारभार सुरू होईल तेव्हां हिंदुस्थान सरकारचें मामुली उत्पन्न सुमारें २½ कोटि रुपयांनीं वाढलेलें असेल; तरी त्यावर्षी पुनर्घटनेमुळें तितकाच जादा खर्चहि येईल. तेव्हां, त्याची तरतूद करण्यासाठी वरील २४२ लक्षांतले उरलेले १९७ लक्ष रुपये गंगाजळी म्हणून बाजूस काढून ठेवण्यांत यावे, अशी सर जेम्स ग्रिग ह्यांची सूचना आहे. हें मान्य झाल्यास १९३६-३७ मधला २ कोटि रुपयांचा वाढावा कर कमी करण्याकडे योजण्यास हरकत नाहीं, असें त्यांचें म्हणणें आहे. कर कमी करण्याची

संधी येतांच प्रांतीवरील कराचा बोजा हलका करण्याचें वचन सरकारनें मागें दिलें आहे, तें येत्या सालच्या बजेटांत पुरें करण्याचा फडनवीसांचा बेत आहे. प्रांतीवरील करावर जी जादा पट्टी आकारण्यांत येते, ती निम्मी करण्यांत येणार असून ह्या कराच्या माफीची मर्यादा एक हजार रुपये आहे, ती दोन हजार रुपयांपर्यंत चढवण्यांत येणार आहे. सदरहु पट्टी सबंद काढून टाकल्यास २७६ लाखांनीं उत्पन्न कमी होईल. म्हणून ती निम्मी करून त्याबद्दलचें १३८ लक्षांचें व करमाफीची मर्यादा चढवण्यानें होणारें ४७ लक्षांचें मिळून एकूण १८५ लक्षांचें नुकसान सोसण्याची सरकारची तयारी आहे. येत्या वर्षातल्या २०५ लक्षांच्या बचतींतले १८५ लाख ह्याप्रमाणें गेले म्हणजे २० लाख उरतात. त्या रकमेचा विनियोग, १ आण्यांत १ तोळा वजनाचीं पत्रें पोस्टानें नेण्यांत होणारी तूट भरून काढण्यांत करावयाचें योजिलें आहे. पोस्टकार्डाची किंमत कमी न करतां सरकारनें अर्ध्या तोळ्याच्या ऐवजीं एक तोळा वजनाचीं पाकिटें पोस्टांतून नेण्याची सवलत सुचविली आहे, तिनें सामान्य जनतेची विशेष बचत होईल असें म्हणतां येणार नाहीं.

---

## बँकांचीं गिऱ्हाइकें.

### ब्रिटिश बँकांचें उदाहरण व त्यापासून घ्यावयाचा बोध

जनतेचा विश्वास हा बँकांच्या यशाचा पाया आहे. बँकेचा कारभार सचोटीनें व काळजीकाळ्यानें चालविला जात असल्याविषयीं लोकांस नेहमी खात्री वाटत असली पाहिजे आणि त्यासाठीं त्या संस्थेची व्यवस्था जबाबदारीच्या भावनेनें वागणाऱ्या तज्ञ कारभाऱ्यांच्या व नेत्यांच्या हातीं असावी लागते. बँक व तिचीं गिऱ्हाइकें ह्यांचे संबंध वैयक्तिक व खासगी स्वरूपाचे असतात व त्यांचे व्यवहार गुप्त राखणें अगत्याचें असतें. तथापि, देशांत व्यापारी उद्योगाची परिस्थिति कशी आहे आणि तिचा परिणाम बँकांच्या कार्यावर कसा होत आहे, तसेंच, विशिष्ट आर्थिक स्थित्यंतरांत बँकांच्या कारभाराचें धोरण कोणत्या प्रकारचें आहे ह्याची माहिती सदर विषयासंबंधानें आस्था वाटणाऱ्या लोकांस स्थूल मानानें मिळणें आवश्यक आहे. बँकांविषयींची वैयक्तिक व तशाच प्रकारची माहिती व इतर माहिती खासगी व गुप्त समजली जाणें आणि देशांतील बँकांच्या व्यवहारांचें सर्वसाधारण ज्ञान जनतेस वेळोवेळ होणें ह्यांमधलें महत्त्वाचें अंतर नीट लक्ष्यांत वागवलें जाणें आणि त्या दोहोंमधली सीमा स्पष्ट राखणें अगत्याचें आहे. रिझर्व्ह बँक स्थापन झाल्यापासून हिंदुस्थानांतील प्रमुख बँकांच्या मुदतीच्या व एकूण ठेवी किती आहेत, त्यांनीं निरनिराळ्या प्रकारांचीं एकंदर कर्जें आपल्या गिऱ्हाइकांस किती दिलीं आहेत व त्यांच्या जवळ रोकड शिल्लक किती आहे ह्याविषयींच्या दर आठवड्यास प्रसिद्ध होणाऱ्या पत्रकावरून उपयुक्त माहिती मिळण्याची जिज्ञासूं जनतेची सोय झाली आहे. इंपीरिअल बँक ऑफ इंडियासारख्या प्रमुख बँकेचे तपशीलवार माहितीचे आकडे ह्या तऱ्हेनें साप्ताहिक पत्रद्वारें प्रसिद्ध होतात, त्यांचे योगानेंहि पैशाचा बाजार व व्यापार ह्यांच्या वेळोवेळच्या परिस्थितीवर उद्बोधक प्रकाश पडत असतो.

ग्रेट ब्रिटनमधील प्रमुख बँकांच्या व्यवहारांची माहिती तर अधिक विस्तारानें आणि कमी कालावधीनें प्रसिद्ध होण्याचा प्रघात पूर्वापार चालत आला आहे. ह्या कारणानें, पैशाचा बाजार, अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापार, उद्योगधंदे इत्यादि महत्त्वाच्या बाबींच्या सारख्या बदलत्या परिस्थितीवर फिरता प्रकाश सतत पडत रहातो. परंतु ह्याहि पेक्षां महत्त्वाची गोष्ट येथें नमूद करावयाची आहे, ती ही कीं, व्यवहाराचें वर्ष संपतांच शक्य तितक्या लवकर हिशेब पुरे करून नफा व त्याची वांटणी जाहीर करण्याची ब्रिटिश बँकांची वहिवाट आहे; इतकेंच नव्हे तर वार्षिक अहवाल व ताळेबंद प्रसिद्ध करून भागीदारांच्या सभेंत तो मंजूर व्हावयास नव्या वर्षाचा एक महिनाहि लोटावा लागत नाहीं. १९३५ डिसेंबर अखेरचे ब्रिटिश बँकांचे ताळेबंद आणि अहवाल जानेवारी महिन्यांत भागीदारांच्या सभेंत मंजूरहि झाले आहेत. ही कार्यक्षमता आणि तत्परता हिंदुस्थानांत ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. आमच्या देशांत हीं कामें अत्यंत मंदगतीनें चालतात, ह्यास मुख्य कारण समजूतदार जनतेंत ह्यासंबंधांत असलेला जिज्ञासेचा अभाव हें आहे. गेल्या बारा महिन्यांत राष्ट्रीय व्यापार वाढला कीं खालावला आणि बँकिंगच्या धंद्याचा ओघ रोडावला कीं मोठा झाला हें समजण्याची इच्छा आमच्या लोकांस फारशी असत नाहीं आणि ह्यामुळें जनतेस आपल्या व्यवहारांबद्दलची माहिती तातडीनें व उद्बोधक रीतीनें देण्याचें महत्व बँकांच्या चालकांस वाटत नाहीं. वार्षिक सभांमध्यें ब्रिटिश बँकांचे नेते स्वतःच्या संस्थांविषयींची व्यावहारिक दृष्ट्या शक्य होईल इतकी माहिती तर देतातच, पण देशाच्या एकंदर आर्थिक परिस्थितीचें सिंहावलोकन करून तिच्या संबंधानें आपला अभिप्राय व्यक्त करतात. अगदीं अलीकडे प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या भाषणांतील सर्वसामान्यपणें उपयुक्त वाटणाऱ्या मुद्यांचें त्रोटक विवेचन आम्हीं पुढें करणार आहों. प्रस्तुत एकाच मनोरंजक बाबीचा उल्लेख करणें शक्य आहे.

बार्क्लेज ह्या नांवाच्या ब्रिटिश बँकेचें खेळतें भांडवल सुमारें ५८० कोटि रुपये आहे. तिच्या अध्यक्षांनीं अशी माहिती सांगितली कीं त्या संस्थेच्या गिऱ्हाइकांची एकूण संख्या दोन लक्ष आहे. त्यांपैकीं प्रत्येकीं ५ हजार पौंड म्हणजे सुमारें ७० हजार रुपये इतकें कर्ज कोणत्याना कोणत्या स्वरूपांत घेणाराची संख्या १ लक्ष, ९६ हजार असून कर्जाची सरासरी दर गिऱ्हाइकी रकम सुमारें १० हजार रुपये होते. ब्रिटिश राष्ट्राची संपत्ति लक्षांत घेतली असतां ह्या रकमांचें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. ह्या बँकेकडून पैसा घेणाऱ्या गिऱ्हाइकांची वर्गवारी व प्रतवारी केली म्हणजे असें दिसतें कीं, त्यांमध्यें सामान्य धंद्यांतल्या व्यक्तींचा मोठा भरणा असून त्यांनीं उचललेल्या एकूण रकमेचें प्रमाण सर्वांत मोठें आहे. ह्या वर्गातल्या सुमारें सव्वा लक्ष लोकांनीं सुमारें ७५ कोटि रुपये घेतले आहेत. किरकोळ व्यापार करणाऱ्या गिऱ्हाइकांची संख्या २५ हजार असून त्यांच्या नांवें सुमारें १८ कोटि रुपये पडलेले आहेत. जमीनदार गिऱ्हाइकांची संख्या १९ हजारांवर आणि घरें बांधण्याच्या धंद्याशीं संबंध असलेल्यांची संख्या ६ हजार आहे. समाजांतील निरनिराळ्या वर्गांतील लहान-मोठीं माणसें बँकांचा उपयोग कसा करून घेतात आणि बँका जनतेची उपयुक्त सेवा कशी करतात, ह्याची कल्पना वरील आकड्यांवरून येण्यासारखी असल्यानें, आम्हीं ते येथें मुद्दाम दिले आहेत. हिंदुस्थानच्या व विशेषतः महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीच्या मानानें आमच्या इकडील बँकांच्या व्यवहारांचे आकडे लहान असणें स्वाभाविक आहे. परंतु समाजाच्या जीवनांत येथील बँकांस अजून योग्य स्थान प्राप्त व्हावयाचें आहे आणि बँकिंगच्या प्रसारास किती तरी वाव आहे. बँका आणि जनता ह्यांनीं परस्परांस सहाय करून आवश्यक असलेली प्रगति घडवून आणण्यास झटलें पाहिजे, हा बोध ब्रिटिश बँकांच्या उदाहरणावरून घेतां येईल.

---

## स्फुट विचार

### जमशेदपूर येथील टाटांचा कारखाना

ह्या कंपनीचें लोखंडाचे व पोलादाचें उत्पादन सारखें वाढत असून तिच्या भागांचे भाव बाजारांत स्थिर आहेत. तथापि, बंगालमध्यें पोलादाचा एक मोठा कारखाना निघावयाचा आहे, त्याचे व टाटा कंपनीचे संबंध कसे रहातील ह्याविषयीं अनिश्चितता असल्यानें जनतेच्या मनांत कुतूहल तरी खास उत्पन्न झालें आहे. टाटा कंपनी व नवी निघणारी कंपनी एक होणार असें कोणी म्हणतात तर दोहोंमध्यें विशिष्ट तऱ्हेचा करार होऊन परस्परांची स्पर्धा टाळण्याची व्यवस्था केली जाणार असा कित्येकांचा तर्क आहे. बर्न अँड कंपनी, इंडिअन आयर्न अँड स्टील कंपनी व बेंगाल आयर्न कंपनी ह्या तीन मंडळयांचा नवीन कारखान्यांच्या योजनेंत हात आहे आणि स्वतःच्या हिताचें पूर्ण संरक्षण होण्याच्या दृष्टीनें टाटा कंपनीस तिच्यांतील भांडवल बरेंचसें उचलावें लागेल. स्वतःच्या बचतीमधून नवीन कंपनींत भांडवल घालण्यांत टाटा कंपनीचा फायदा आहे, हें उघड आहे. नवीन निघणारा पोलादाचा कारखाना हा प्रतिस्पर्धी उत्पन्न होण्याच्या ऐवजीं तो टाटा कंपनीस सहायक झाला तर तें इष्टच आहे. नवीन कारखाना पुरा होण्यास अजून चार वर्षें लागतील. दरम्यान टाटांची प्रगति व पैशाची बचत होत रहाणार, त्यांचा उपयोग नवीन कारखान्यास स्वतःचें भांडवल पुरवण्याकडे टाटा कंपनी करणार अशी योजना असावी असा तर्क आहे. हा खरा असल्यास सदरहु व्यवस्था समाधानकारकच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. सध्या चालू असलेल्या वाटाघाटी पुऱ्या होईतोंपर्यंत त्यांच्या निष्कर्षासंबंधानें निश्चितपणानें विधान करणें अर्थातच शक्य नाहीं. तथापि एकंदरींत वारा कसा वहात आहे इकडे लक्ष्य दिल्यास भावी परिस्थिति टाटा कंपनीस प्रतिकूल तर होणार नाहींच, पण पुष्कळशी अनुकूलच होईल, असें दिसतें. टाटा कंपनीच्या भागांच्या बाजारभावांत सर्वसाधारण प्रकारची मजबुती दिसून येते, ह्याचें कारण तिच्या चालकांची कार्यक्षमता आणि दूरदर्शीपणाचें धोरण ह्या बाबतींत जनतेस वाटणारा विश्वास हेंच मुख्यत्वेंकरून आहे.

---

### हिंदी रेलवेजच्या व्यवस्थेवर टीकेचा भडिमार

हिंदुस्थान सरकारच्या मालकीच्या व ताब्यांतल्या रेलवेजची सांपत्तिक स्थिति इतकी खालावली आहे कीं ती ताळयावर आणण्याचा मार्ग अधिकारी वर्गासच सुचेनासा झाला आहे. लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें रेल्वे बजेटांतील निरनिराळया बाबींची चर्चा चालू असतांना सभासदांनीं सरकारी रेल्वे व्यवस्थेवर टीकेचा भडिमार केला. असेंब्लींतल्या सभासदांच्या भिन्न भिन्न गटांनीं हल्ला करावयाचे विषय निवडून अगोदर आपसांत वांटून घेतले होते व त्या योगानें त्यांस सरकार पक्षाचा अनेक वेळां पराभव करतां आला. ह्या चर्चेत बजेटाच्या सर्व अंगांवर आणि रेल्वे व्यवस्थेच्या धोरणावर चौफेर मारा झाला. बड्या अधिकाऱ्यांच्या पगारांत बचतीच्या उद्देशानें एका काळीं केलेली कपात दूर करण्यांत निष्कारण घाई झाली, ह्या सभासदांच्या टीकेस सरकारतर्फे समाधानकारक उत्तर आलें नाहीं. सर लेस्ली हड्सन, युरोपिअन गटाचे प्रमुख प्रतिनिधि, ह्यांची तक्रार, हिंदी रेल्वेंत ८०० कोटि रुपये गुंतले असतां त्यांची जिंदगी त्यापेक्षां कमी असल्यासंबंधानें होती. रेल्वेजच्या ताळेबंदांत दाखवलेल्या भांडवलाच्या रकमेपेक्षां आज त्यांच्या जिंदगीची किंमत सुमारें १०० कोटि रुपयांनीं कमी भरेल असें त्यांचें म्हणणें असून इतक्या रकमेनें भांडवल उतरवून दाखवणें जरूर आहे, अशी त्यांची सूचना आहे. ह्या संबंधांत त्यांनीं दिलेल्या उदाहरणांपैकीं एकाचाच उल्लेख केला तरी पुरें होईल. खासगी रेल्वे कंपन्यांस खरेदीची किंमत देतांना सरकारनें ४७ कोटि रुपये गुडविल म्हणून आदा केले होते. ती रकम भांडवल म्हणून हिशेबांत दाखल आहे, पण तिच्या प्रमाणांत जिंदगीच्या बाजूस अर्थातच माल असणें शक्य नसल्यानें भांडवल फाजील फुगलें आहे. निदान ५० कोटि रुपये तरी रेल्वे भांडवलांतून काढून घ्यावे व ते इतर कर्जाच्या रकमेंत सामील करावे म्हणजे त्या रकमेवरच्या व्याजाचा बोजा रेल्वेजच्या डोक्यावरून दूर होईल, असें सर लेस्ली ह्यांचें म्हणणें आहे. जी गोष्ट वार्षिक उत्पन्नामधून पूर्वीच करावयास हवी होती ती आतां त्या युक्तीनें घडवून आणण्यांत कांहीं हंशील नाहीं. कर देणारांच्या दृष्टीनें त्या योजनेपासून कांहींच फायदा नाहीं कारण, वाटींतून ताटांत सांडण्याचाच हा प्रकार होईल आणि रेल्वेजचा खर्च कमी झाल्याचा आभास मात्र होईल.

---

### तिसऱ्या वर्गाच्या रेल्वे उतारूंचे हाल

रेल्वेजच्या कारभारावर होणाऱ्या टीकेंत तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे हाल आणि गैरसोयी ह्यांचा उल्लेख प्रामुख्यानें वर्षानुवर्षे होत असून त्यासंबंधांतल्या तक्रारी अजून जोरानें पुढें येतच आहेत. रेल्वेकारभाराच्या खर्चाबद्दलची बजेटांत दाखल असलेली मागणी सरकारनें केली असतां निषेधात्मक कपात सुचवली गेली व ती मंजूर झाली, त्याचप्रमाणें तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या हालांची कहाणी सांगण्यासाठीं सुचवलेली कपातहि असेंब्लींत बिनविरोध पास झाली. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंविषयींची गाऱ्हाणीं अनेक आहेत आणि त्यांपैकीं बहुतेकांस वस्तुस्थितीचा आधार असल्याची कबूली खुद्द सर महमद झाफरुल्ला ह्यांस द्यावी लागली. ह्या उतारूंच्या अडचणी व गैरसोयी आहेत व त्या दूर झाल्या पाहिजेत ह्याबद्दल सरकार व टीकाकार ह्यांचेमध्यें मुळींच मतभेद नाहीं. रेल्वे अधिकारी उतारूंशीं नीट वागतहि नाहींत ह्या सारखी तक्रार दूर होण्यास पैशाची अडचण मार्गांत येत नाहीं. मग त्या बाबतींत सुधारणा कां झालेली नाहीं? तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत कांहीं रेल्वेजवर मुताऱ्या नाहींत, पंखे विशेष जरूर असतांनाहि कोठेंच नाहींत, ह्या प्रकारच्या अडचणींकडे सरकारचें लक्ष्य अनेक वेळां वेधलें गेलें आहे. त्या दूर न होण्यास सर झाफरुल्लाखान ह्यांच्या मतें पैशाची टंचाई हेंच कारण आहे. रुपयाचें कांहीं केलें तरी सत्रा सोळा आणे होत नाहींत, त्यास नाइलाज आहे, असें त्यांचें टीकाकारांस उत्तर आहे.

---

### बजेटाच्या तुटीची सर्वत्र हाकाटी

सध्या प्रांतिक बजेटांचा हंगाम चालू असून अनेक प्रांतांत बजेटांत तूट येत असल्याची ओरड ऐकूं येत आहे. मुंबई इलाख्याच्या बजेटांत उत्पन्न–खर्चाची तोंडमिळवणी जेमतेम झाली आहे आणि तीहि अलीकडे केलेल्या करांच्या वाढाव्यावर अवलंबून आहे. सिंधच्या विभक्तीकरणानें मुंबई सरकारास थोडासा हात दिला आहे परंतु त्याचा संसार मेटाकुटीनें चालवावा लागत आहे. हातपाय हलवण्यास त्यास मुळींच वाव नाहीं. मध्यप्रांताच्या बजेटाची तोंडमिळवणी होण्यास जादा कर बसवल्या वांचून गत्यंतर नाहीं आणि सध्याच्या हलाखीच्या दिवसांत जादा करास

लोक समात कसे देणार? बंगाल प्रांतास तागाच्या निर्गतीवरील जकातींत हिंदुस्थान सरकाराकडून मोठा हिस्सा मिळूनहि तेथील बजेटांत तूट आहेच. पंजाबमध्येंहि तीच अवस्था आहे. बाजारभाव पडलेले, शेतकऱ्यांची कमाई कमी झालेली, बेकारी वाढलेली, सरकारच्या कारभाराचा खर्च बहुतेक पूर्वीसारखाच राहिलेला आणि ही हलाखी पांच वर्षांवर सारखी चाललेली अशा स्थितींत प्रांतिक बजेटांत उत्पन्न-खर्चाचा मेळ बसावा कसा? इकडे ओटो निमायर ह्यांची मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकार ह्यांच्या दरम्यान उत्पन्नाची वांटणी योग्य व न्याय्य रीतीनें कशी व्हावी ह्याविषयींची चौकशी चालली आहे आणि त्यांच्या शिफारसींचा परिणाम म्हणून आपणांस थोडेंतरी जादा उत्पन्न मिळेल अशी कित्येक प्रांतिक सरकारांस आशा लागून राहिली आहे. परंतु ह्या वांटणीचा फायदा फार तर दोन तीन प्रांतांस मिळण्याचा संभव आहे आणि ह्याहि गोष्टीस बराच कालावधि आहे. नवीन राज्यघटनेचा अंमल प्रांतांत सुरू होण्याच्या सुमारास अशी प्रतिकूल परिस्थिति असावी हें दुर्दैव आहे. हिंदी राष्ट्राची आर्थिक प्रकृति मुळांतच सकस नाहीं आणि त्यामुळें एकदा बिघडल्यानंतर पुन्हां ती ताळ्यावर येण्याची इतकी मुष्कील होतें, हें सध्याच्या स्थितीवरून स्पष्ट होत आहे. आपलीं बजेटें स्थिर पायावर उभीं करण्याची वेळ प्रांतिक सरकारांस केव्हांच येऊन गेली आहे.

---

### बंगलोरचें इंस्टिटयूट ऑफ सायन्स

मरहूम जमशेटजी टाटा ह्यांच्या अपूर्व औदार्यामुळें व म्हैसूर संस्थानाच्या सहायामुळें अस्तित्वांत आलेल्या बंगलोर येथील इंडिअन इंस्टिट्यूट ऑफ सायन्सची सांपत्तिक स्थिति प्रचलित मंदीमुळें खालावली आहे, ह्या बातमीनें हिंदी जनतेस वाईट वाटल्यावांचून रहाणार नाहीं. भौतिक शास्त्रांत शोध करण्याचें शिक्षण मिळण्याची सोय व्हावी आणि त्याच्या योगानें हिंदी उद्योगधंद्यांच्या वाढीस प्रोत्साहन प्राप्त व्हावें, हा बंगलोरच्या संस्थेचा आद्य हेतु आहे. तिचें वार्षिक उत्पन्न प्रारंभीं साडेतीन लक्ष रुपये होतें तें महायुद्धाच्या समाप्तीनंतरच्या चलतीच्या काळांत ५½ लक्ष रुपये झालें व प्रचलित मंदीच्या सुरवातीपूर्वी हा आकडा ६½ लक्ष रुपयांच्या जवळ गेला. उत्पन्न वाढल्या कारणानें इंस्टिट्यूटमध्यें शास्त्रीय शोधाच्या अधिक शाखा काढण्यांत आल्या व नवीन शिक्षकांच्या नेमणुका करण्यांत आल्या. अलीकडे उत्पन्न घटून खर्च मात्र कायम राहिला आहे आणि त्यामुळें दरवर्षी पाउण लाखाची तूट येत आहे. इंस्टिट्यूटची व्यवस्था अधिक कार्यक्षम करणें जरूर झालें असून हिंदुस्थान सरकारनें आपली ग्रँट आज दीड लाख आहे ती दोन लाख रुपये करावी अशी सूचना संस्थेचे डायरेक्टर, सर सी. व्ही. रामन यांनीं केली आहे. इतर संस्थांप्रमाणें प्रचलित आर्थिक मंदीनें इंस्टिट्यूटलाहि घेरलें असून उत्पन्न-खर्चाची तोंडमिळवणी करण्याचे उपाय तातडीनें व निक्षून अमलांत आणल्यावांचून गत्यंतर नाहीं.

---

### प्रो. डी. बी. लिमये ह्यांचें संशोधन कार्य

न्यायमूर्ति रानडे ह्यांचें स्मारक म्हणून, गोपाळराव गोखले ह्यांच्या परिश्रमानें स्थापन झालेल्या इंडस्ट्रिअल अँड एकॉनॉमिक इंस्टिट्यूटमध्यें श्री. डी. बी. लिमये ह्यांनीं पंचवीस वर्षें रसायन शास्त्रांतल्या संशोधनाचें कार्य मोठ्या आस्थेनें चालविलें आहे. त्यांनीं सुरू केलेल्या रसायनशास्त्रासंबंधाच्या नियतकालिकाचा प्रकाशन समारंभ गेल्या रविवारीं प्रि. व्हीलर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला.

---

## सहकारी वृत्त

### पश्चिम खानदेश जिल्हा को-ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूट, धुळें

खानदेश विभागाचे असि. रजिस्ट्रार, श्री. एन. व्ही. नायक, ह्यांची पुणें येथें बदली झाल्यामुळें त्यांचे सन्मानार्थ प. खा. जिल्हा को. इन्स्टिटयूट, प. खा. जिल्हा सहकारी खरेदी-विक्री यूनियन व धुळें तालुका शेतकी सभा ह्या संस्थांच्या विद्यमानें धुळें म्युनिसिपल हॉलमध्यें तारीख ९।२।३६ रोजीं त्यांना पानसुपारी देण्यांत आली. श्री. नायक ह्यांनीं तेथें असतांना प. खानदेश जिल्हा सहकारी लँड् मॉर्गेज बँक स्थापन करण्याचे कामीं बरीच मेहनत घेतली. तसेंच, प्रत्येक सोसायटीस भेट देऊन शेतकऱ्यांच्या तक्रारी व अडचणी ऐकून त्यांकडे लक्ष देण्याबाबत ते झटत होते, अशा अर्थाचीं गुणगौरवपर भाषणें झालीं. श्री. नायक ह्यांनीं योग्य शब्दांत आभार मानले. येथील इतर स्थानिक सहकारी संस्थांनींहि त्यांना पानसुपारी देऊन त्यांचा गौरव केला.

### पंच कमिटी शिक्षण वर्ग

वार्षिक सभेनें मंजूर केलेल्या कार्यक्रमाप्रमाणें धुळें तालुक्यांत कुसुंबे येथें ता. १३।२।३६ रोजीं पंच कमिटी शिक्षण वर्ग ह्या विभागाचे असि. रजिस्ट्रार, श्री. पालेकर, ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आला. सदर वर्गास जवळपासच्या ७ सोसायट्यांचे पंच, सभासद् व सेक्रेटरी मिळून ५० लोक हजर होते. पंच कमिटीचीं कर्तव्यें, वक्तशीर कर्जफेड, सहकारितेचे १० मुद्दे, सहकारी चळवळ व तत्सम विषयांवर भाषणें झालीं.

वरीलप्रमाणेंच आर्वी, ता. धुळें, येथें ता. २४।२।३६ रोजीं पंच कमिटी शिक्षण वर्ग, धुळें तालुका शेतकी सभेचे ऑ. सेक्रेटरी, श्री. माधवराव दिवाण, ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आला, तोहि यशस्वी झाला.

ह्याचप्रमाणें, प्रत्येक तालुक्यांत पंच कमिटीचे शिक्षण वर्ग पुढील महिन्यांत भरविण्याचें ठरविलें आहे.

---

## हौरा पुलाचें कंत्राट कोणास मिळावें?

कलकत्त्याजवळ हुगळी नदीवर बांधण्यांत यावयाच्या लोखंडी पुलाचें कंत्राट कोणास द्यावयाचें तें अजून निश्चित झालेलें नाहीं. विदेशीय कंपनीचें टेंडर मंजूर झाल्यास त्यामुळें हिंदुस्थानाचें कसें नुकसान होईल, ह्यासंबंधाची माहिती खालीं दिली आहे:—

(१) टाटा कंपनीनें काम मिळेल ह्या अपेक्षेनें पूर्व तयारीसाठीं बराच मोठा खर्च केलेला आहे. (२) हिंदुस्थानांतील कंपनीस कंत्राट मिळाल्यास सुमारें एक कोटि रुपये हिंदुस्थानांत खर्ची पडतील, परंतु विदेशीय कंपनीकडे काम गेल्यास तसें होणार नाहीं. (३) हिंदुस्थानांत काम राहिल्यास पांच हजार मजुरांस तीन वर्षेंपर्यंत काम लागेल, मजुरीची रकम वीस लाखांवर जाईल व रेल्वेजना वहातुकीबद्दल पंधरा लक्ष रुपये मिळतील (४) हिंदी पोलादाच्या कारखान्यांस वाव मिळाल्यास युद्धाचे त्याचप्रमाणें शांततेचे काळांतहि ह्या राष्ट्रीय महत्त्वाच्या धंद्याचें पोषण व संरक्षण होईल. हिंदुस्थान सरकारच्या व्यापारी खात्याचे प्रमुख सर महंमद झाफरुल्लाखान, ह्यांचेपुढें वरील मुद्दे असेंब्लीच्या सभासदांच्या डेप्युटेशननें मांडले.

## सहकारी संस्था व रेमिटन्स ट्रॅन्स्फर रिसीट्स

( लेखकः—ल. के. भा. )

सहकारी कायद्याखाली रजिस्टर झालेल्या संस्थांना त्या कायद्यान्वयें प्राप्त झालेल्या विशिष्ट हक्कांबरोबरच सरकारच्या हुकुमानें दिलेल्या इतर हक्कांत, सहकारी संस्थांच्या रकमा सरकारी तिजोऱ्या मार्फत मोफत रवाना करण्याच्या एका महत्त्वाच्या सवलतीचा अंतर्भाव होतो. या रकमा मुख्यतः दोन प्रकारच्या असतातः—( १ ) सहकारी संस्थांच्या खऱ्या व्यवहारास आवश्यक समजल्या जाणाऱ्या अशा त्यांच्या वरील मागण्या पुरविण्याकरितां लागणाऱ्या रकमा, भागांचे हप्ते, ठेवी व त्या संस्थांनीं कर्जाऊ द्यावयाच्या अगर वसूल केलेल्या कर्जफेडीच्या रकमा व ( २ ) वरील कारणाव्यतिरिक्त इतर कामाकरितां लागणाऱ्या रकमा. यांपैकीं पहिल्या प्रकारच्या रकमा रवाना करण्याकरितां सहकारी संस्थांना जिल्हा तिजोऱ्यांवर व पूर्व परवानगीनें कांहीं तालुका तिजोऱ्यांवर मोफत आर. टी. आर. ( रेमिटन्स ट्रॅन्स्फर रिसीट्स ) मिळूं शकतात. अशा आर. टी. आर. मिळण्याबद्दलच्या अर्जासोबत, त्या सहकारी संस्थांच्या खऱ्या व्यवहारास वर नमूद केलेल्या कारणाकरितां पाहिजेत, असा स्पष्ट दाखला द्यावा लागतो. दुसऱ्या प्रकारच्या रकमा जिल्हा तिजोऱ्या मार्फत पाठविण्याकरितां खालील प्रमाणें कमिशन द्यावें लागतें.

१०,००० रु. व त्यावरः १/१६%

१,००० रु. व रु. १०,००० च्या दरम्यानः १/८%

१,००० चे खालीः १/४%

रिझर्व बँकेच्या स्थापनेपूर्वीं तालुका तिजोऱ्यांवर परस्पर मिळावयाच्या आर. टी. आर. च्या मर्यादा मंजूर करण्याचा अधिकार कंट्रोलर ऑफ करन्सीकडे असून त्यांच्याकडून वेळोवेळीं ठरविल्या जाणाऱ्या कमाल मर्यादेपर्यंत तशा आर. टी. आर. देण्याची परवानगी दिली जात असे. हा अधिकार हल्लीं रिझर्व बँकेच्या करन्सी ऑफिसरकडे सोपविण्यांत आला आहे. परंतु त्या वेळेपासून कांहीं नवीन निघालेल्या अर्बन बँकांस तशी सवलत मिळण्याच्या बाबतींत अगर कांहीं बँकांच्या वाढत्या व्यवहाराच्या दृष्टीनें हल्लीं मंजूर असलेल्या मर्यादा वाढवून मिळण्याबद्दल मागण्या केल्या असतां सहकारी सोसायट्यांस द्यावयाच्या आर. टी. आर. च्या सवलती बाबतच्या प्रश्नाचा हल्लीं रिझर्व बँकेकडून विचार होत असल्यामुळें, नवीन अगर जादा सवलती देण्यांत येत नसल्याचें समजतें. रिझर्व बँकेचें खेड्यांपाड्यांतून भांडवल पुरवठ्याचे बाबतींत स्वतंत्र खातें निर्माण करण्याच्या संबंधांत मि. एम. एल. डार्लिंग यांनीं केलेल्या रिपोर्टावर स्थानिक सरकारांचीं मागितलेलीं मतें येईपर्यंत हा प्रश्न कदाचित् बँकेच्या अधिकाऱ्यांनीं लांबणीवर टाकला असल्याचा संभव आहे.

परंतु अशा रितीनें हा प्रश्न अमर्याद कालपर्यंत लांबणीवर पडल्यामुळें नवीन संस्थांची फारच कुचंबणा झाली असून, विशेषतः बाल्यावस्थेंत त्यांस जरूर असलेल्या ह्या सवलतींस या प्रमाणें त्या आंचवल्यामुळें त्यांच्या व्यवहारास बराच अडथळा व गैरसोय होत आहे. तालुका तिजोऱ्यांवर परस्पर आर. टी. आर. मिळण्याच्या सवलतीच्या अभावीं अशा संस्थांस प्रथम ज्या त्या जिल्हा तिजोऱ्यावर आर. टी. आर. घ्यावा लागत असून नंतर तेथून तालुका तिजोऱ्यांवर कॅश आर्डरी ( वराती ) मिळवाव्या लागतात. पैशाची ही ने–आण सहकारी संस्थांच्या खऱ्या व्यवहाराकरितां असतां याप्रमाणें रिझर्व बँकेकडून तालुका तिजोऱ्यांवर आर. टी. आर. मिळत नसल्यामुळें प्रथम जिल्हा व नंतर तालुका तिजोऱ्यांमार्फत वर लिहिल्याप्रमाणें रकमांची नेआण करण्यांत अर्थात् निष्कारण बराच वेळ जाऊन त्या संस्थांच्या तुटपुंज्या भांडवलाच्या व्याजाचें नुकसान होऊन त्यांपासून सहकारी संस्थांच्या सभासदांस लागणारें भांडवल योग्य वेळीं मिळण्यास अडचण पडते व त्यामुळें त्या संस्थांच्या कार्यपद्धतीबद्दल लोकांच्या मनांत कांहींसा अविश्वास उत्पन्न होतो. शिवाय, हा प्रश्न नवीन अगर जादा सवलती देण्याचा नसून, सरकारच्या हुकुमानें दिलेल्या सवलती फक्त पुढें चालू ठेवण्याचा आहे. मि. डार्लिंग यांच्या, वर नमूद केलेल्या स्वतंत्र खातें उघडण्याच्या शिफारशींच्या निकालावर हा प्रश्न अवलंबून ठेविला असल्यास अशा खात्याचा सहकारी संस्थांच्या पैशाची ने आण करण्याच्या प्रश्नाशीं कांहीं संबंध नसल्यामुळें त्यांचेकडून त्या बाबतींत हात घातला जाणें संभवनीय नाहीं व त्याच। रिझर्व बँकेच्या अधिकाऱ्यांनींच स्वतंत्रपणें विचार करणें जरूर आहे. ह्याप्रमाणें सर्व बाजूंनीं विचार करतां हा महत्त्वाचा प्रश्न असा लांबणीवर टाकला जाणें सहकारी संस्थांच्याच काय पण एकंदर सहकारी चळवळीच्या दृष्टीनें अनिष्ट होय ह्यांत शंका नाहीं.

आरंभीं सांगितलेल्या दुसऱ्या तऱ्हेच्या रकमांची ने–आण करण्याच्या बाबतींत सरकारनें नेमलेल्या इंडिअन सेंट्रल बँकिंग इन्क्वायरी कमिटीनें आपल्या रिपोर्टाच्या १८२ व ५६६ पॅरिग्राफ मध्यें केलेल्या शिफारसींत खऱ्या सहकारी कामाव्यतिरिक्त लागणाऱ्या पैशाची ने-आण करण्याबाबत जॉइंट स्टॉक बँकांस मिळणाऱ्या सवलतींस सहकारी बँका पात्र असाव्या असा आपला अभिप्राय व्यक्त केला आहे, परंतु अशा तऱ्हेच्या रकमा पाठविण्याच्या बाबतींत रिझर्व बँकेनें दिलेले दर तीस जोडलेल्या ( शेड्यूल्ड ) बँकांकरितां केलेल्या नियमांतल्या नियम ९ मध्यें नमूद केलेले नसून सर्वसाधारण गिऱ्हाइकांस आकारले जाणारे आहेत. यावरून या बाबतींत बँकिंग इन्क्वायरी कमिटीच्या शिफारसीप्रमाणें सहकारी बँकांस कांहीं विशेष सवलत मिळाली नसल्याचें दिसतें. सहकारी बँका ह्या शेड्यूल्ड बँका नाहींत हें खरें; तथापि त्यांच्याकडून देशाच्या शेतीस लागणाऱ्या भांडवलाचे बाबतींत महत्त्वाची कामगिरी होत असल्यामुळें प्रांतिक सहकारी बँकांस रिझर्व बँकेशीं व्यवहार करण्याची मुभा ठेविली असून बँकेच्या शेतकी भांडवलविषयक खात्यानें बँकेचे व प्रांतिक बँकांचे संबंध ठरवावयाचे आहेत. या दृष्टीनें निदान प्रांतिक बँकांस तरी सर्वसाधारण गिऱ्हाइकांस मिळणाऱ्या सवलतीपेक्षां कांहींतरी जास्त सवलती मिळणें जरूर असून रिझर्व बँकेनें या बाबतींत शेड्यूल्ड बँकांकरितां ठरविलेले सवलतीचे दर तरी प्रांतिक बँकांस मिळण्याची अपेक्षा करणें निराधार होईल असें वाटत नाहीं.

### वजनमापांचा कायदा सर्व इलाख्यास लागू झाला

१९३२ सालीं पास झालेला वजनें व मापें ह्याविषयींचा कायदा मुंबई शहर व कांहीं विशिष्ट जिल्हे ह्यांसच लागू करण्यांत आला होता. तो आतां सिंध धरून सबंध मुंबई इलाख्यास लागू करण्यांत आला असल्यानें नाशिक, खानदेश, सोलापूर, रत्नागिरी वगैरे पूर्वीं वगळलेले जिल्हे आतां त्याच्या क्षेत्रांत आले आहेत.

## फळें व त्यांचे पदार्थ टिकविण्याकरितां मुंबईमध्यें 'कॅनरी' काढण्याची योजना

लेखकः—एस. एस. भट, एम्. एजी., शेतकी कॉलेज, पुणें.
भाषांतरकारः—के. जी. कोल्हटकर, बी. एजी.

( मागील अंकावरून चालू )

### ( १० ) 'कॅनिंग' करण्यास उपयुक्त फळें—

खाली सांगितलेलीं प्रमुख फळें कॅनिंग करण्यासाठीं उपयोगांत आणावीत. याबाबत त्या फळांचे गुणधर्म व उपयुक्तता यांचीहि खाली चर्चा करण्यांत आली आहे.

( १ ) आंबाः—या इलाख्यांत हें फळ अगदी गांवठी जातींपासून ते हापूसपर्यंत सर्व ठिकाणीं व भरपूर प्रमाणांत निपजतें व दर हंगामी माल अगदी भरपूर मिळूं शकतो. याचे रस, फोडी, लोणचीं, साठें, गुळांबे, वड्या, बर्फी वगैरे अनेक प्रकारचे टिकाऊ पदार्थ बनवितां येतात. हापूस आंब्याचे जास्त दिवस टिकणारे व लज्जतदार पदार्थ बनतात व साधारण आंब्यांचीं कमी दर्जाचीं लोणचीं वगैरे पदार्थ बनतात. आंब्याचे सर्व पदार्थ किफायतशीर रीतीनें परदेशीं रवाना होऊं शकतात. टिकाऊ पदार्थ तयार करण्यासाठी आंब्यांचा पुरवठा ज्या ठिकाणांहून होतो अशा ठिकाणांचें त्यांच्या लागवडीचें क्षेत्र देण्यांत आलें आहे.

**आंब्यांच्या लागवडीचें क्षेत्र**

( ५०० एकरांवर क्षेत्र असणाऱ्या जिल्ह्यांचीं नांवें खाली दिलीं आहेत. )

| जिल्ह्याचें नांव | क्षेत्र ( एकर ) |
|---|---|
| रत्नागिरी | ५३९८ |
| सुरत | २०९९ |
| मुंबई ( उपनगर ) | १८५२ |
| कानडा | १३२२ |
| ठाणा | १२६० |
| धारवाड | १२४० |
| नाशिक | ८८४ |
| बेळगांव | ८२४ |
| कुलाबा | ६०२ |

वरील क्षेत्रांवरून आंब्यांचा पुरवठा अगदी भरपूर व खात्रीचा असतो हें दिसून येईल. मुंबईच्या नजीक असणाऱ्या ठाणा, कुलाबा, सुरत वगैरे जिल्ह्यांत आंब्यांखाली एकंदर ५,६०० एकर क्षेत्र असून हापूस, पायरी वगैरे श्रेष्ठ प्रतीच्या फळांचीच येथें लागवड होते व या फळांना मुंबईस तावडतोब भाव येतो. गोवें, रत्नागिरी वगैरे जिल्ह्यांतूनहि याच सुमारास म्हणजे आंब्याच्या मोसमांत लाखों फळें मुंबईस येतात व त्यामुळें भावास मंदी येते. अशा वेळेस मुंबईस एकादी 'कॅनरी' असल्यास फळांच्या भावास तेजी येऊन त्यामुळें एकंदर त्याच्या लागवडीचें क्षेत्र फार व्यापक होईल.

पेरूः—पेरू फळ फार दिवस न टिकणाऱ्यांपैकीं असून या इलाख्यांत त्याची लागवडहि फार होते. त्याच्या लवकर खराब होणाच्या अवगुणामुळें बागवानांना तो फार झटपट विकावा लागतो व त्यामुळें त्यांना फारसा फायदा होत नाहीं. हेंच फळ टिकवून त्याची जेली, मोरांबे वगैरे टिकाऊ पदार्थ तयार केल्यास, ह्याची लागवड किफायतशीर झाल्याशिवाय राहणार नाहीं.

**पेरूची लागवड**

ह्या इलाख्यांत पेरूची लागवड ज्या जिल्ह्यांत आहे, त्यांचीं नांवें खाली दिलीं आहेत. ( २०० एकरांपेक्षां जास्त लागवड असणाऱ्या जिल्ह्यांचीच नांवें खाली दिली आहेत. )

| | | | |
|---|---|---|---|
| पुणें | ८८३ एकर | धारवाड | ४५८ एकर |
| सातारा | ६०३ ,, | अहमदनगर | ४०२ ,, |
| पू. खानदेश | ५८९ ,, | भडोच | ३२२ ,, |
| अमदाबाद | ५५९ ,, | बेळगांव | २४६ ,, |
| नाशिक | ५३४ ,, | सोलापूर | २१२ ,, |

ह्या आंकड्यांवरून आपणांस असें दिसून येईल कीं, पेरूची लागवड दक्षिणेंत फार आहे व विशेषतः पुणें व सातारा या दोन जिल्ह्यांत ती सर्वांत जास्त आहे. या सर्व फळांना मुंबई व पुणें येथें मार्केटबाजार आहे. परंतु पुष्कळशीं फळें ज्या त्या ठिकाणींच विकलीं जातात. मुंबईस निजामचे राज्यांतून औरंगाबाद वगैरे ठिकाणांहून व संयुक्त प्रांतांतून पेरू येतात. लखनौ व अलाहाबाद येथील पेरू फार प्रसिद्ध आहेत. पेरूचा हंगाम नोव्हेंबरपासून तीन महिनेपर्यंत असतो. हें फळ फारच स्वस्त दरानें विकलें जातें. उत्तम व ताजीं फळें मुंबईच्या बाजारांत मिळतात व आधीं व्यवस्था केल्यास तोड झाल्यापासून दोन दिवसांतच ताजे पेरू मिळूं शकतात.

## इजिप्तमधील लोकांचे हितसंबंध व राष्ट्रीय भावना

इजिप्तच्या राज्यकारभारांत परकीयांचा कांहींहि हात असूं नये, ह्याकरितां त्या देशांत जोराची चळवळ चालू आहे. ह्या दृष्टीनें, तेथील परकीयांची संख्या व त्यांचें सामाजिक जीवनांतील स्थान, ह्यासंबंधांतली माहिती उद्बोधक वाटेल.

इजिप्तची खानेसुमारी १९२७ सालीं झाली, त्यावेळीं एकूण १ कोटि ४० लक्ष लोकसंख्येंत सुमारें २५ लक्ष लोक विदेशीय आढळले. ह्यांपैकीं ७६ हजार ग्रीस देशांतून आलेले होते, ५२ हजारांची मातृभूमि इटली होती व ३४ हजार इंग्रज होते. ह्या सर्वांत, इंग्लिशांच्या वांट्यास उत्तम नोकऱ्या व चांगल्या मिळकतीच्या जागा आलेल्या आहेत. दुकानांतील नोकऱ्यांत व कारकुनी पेशांत ग्रीक लोकांचा भरणा आहे, तर मॅनेजर व व्यवस्थापक बहुशः ब्रिटिश आहेत. सर्व युरोपिअनांत, ब्रिटिश लोकांस तेथें मान जास्त आहे. व्यापारीवर्गाचे हितसंबंध ब्रिटिश बँकांशीं संलग्न झालेले आहेत व युद्धाच्या वातावरणांत ब्रिटिश लढाऊ जहाजांचें दृश्य व्यापाऱ्यांच्या राष्ट्रीय भावनांस दुःख देत असलें तरी आर्थिक हितसंबंधांचें त्यामुळें संरक्षण होत असल्यानें व्यापाऱ्यांची त्याबाबत तक्रार होत नाहीं. खालच्या दर्जाचे अरबहि, ब्रिटिश सोजिरांकडून त्यांस पैसे मिळवितां येत असल्यामुळें असंतुष्ट नाहींत. इजिप्तमधील सुशिक्षित वर्गाचें ब्रिटिशांशीं वैयक्तिक दृष्ट्या वैर नाहीं, परंतु स्वराष्ट्राची प्रतिष्ठा कमी होऊं नये, अशी त्यांची स्वाभाविक इच्छा आहे. विद्यार्थी वर्गांत मात्र राष्ट्रीय भावना अत्यंत उत्कट आहे. इजिप्तच्या एकूण लोकसंख्येपैकीं शेकडा फक्त ११ लोक साक्षर आहेत, व त्यांवरच वर्तमानपत्रांतील लिखाणाचा परिणाम होऊं शकतो. ध्येय व हितसंबंध ह्या दोन्हीं दृष्टींनीं इजिप्तमधील जनतेंत कमालीचें मतवैचित्र्य आहे व त्यामुळें स्वातंत्र्याच्या चळवळीस जरूर असलेली एकी होणें तेथें कठीण झालें आहे.

## बार्क्लेज बँकेच्या गिन्हाइकांसंबंधाची माहिती

आजच्या अंकांत पृ. ११६ वर बँकांसंबंधानें लेख प्रसिद्ध केला आहे. त्यांत बार्क्लेज नांवाच्या ब्रिटिश बँकेच्या गिन्हाइकांची वर्गवारी आणि त्यांनीं घेतलेलीं कर्जें ह्यांचा उल्लेख आला आहे. त्याबाबतचा तपशीलवार छाननीचा तक्ता खालीं दिला आहे, तो जिज्ञासू वाचकांस बोधप्रद वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

बार्क्लेज बँक

( ऑक्टोबर, १९३५ अखेरचे आंकडे )

| गिन्हाइकें | रकम | एकूण कर्जाशीं प्रमाण | गिन्हाइकांची संख्या |
|---|---|---|---|
| | पौंड (लक्ष) | | |
| १ शेतकरी ... | १२३ | ७·९ | १९,४२३ |
| २ उत्पादक धंदे ... | | | |
| (अ) कापडाचे कारखाने ... | १८ | १·१ | २८६ |
| (ब) कापड शिवण्याचे धंदे, बूट इ. | ३० | १·९ | २,२८५ |
| (क) लोखंड पोलाद, इ. कारखाने, मोटार, यंत्रें इ. चे उत्पादक. | ७६ | ४·९ | १,६८५ |
| (ड) बांधकाम. ... | ११६ | ७·५ | ६,६६२ |
| (इ) अन्न, पेय, तंबाखू इ. ... | २६ | १·७ | ५८० |
| (उ) कोळशाच्या खाणी ... | ७८ | ५·० | १३१ |
| (ए) इतर. ... | ४२ | २·७ | २,६०५ |
| ३ कच्च्या मालाचे घाऊक व्यापारी. | ४० | २·६ | १,८१४ |
| ४ पक्क्या मालाचे घाऊक व्यापारी. | ४२ | २·७ | २,७३४ |
| ५ किरकोळीनें विक्री करणारे व्यापारी. | १३५ | ८·७ | २५,७५८ |
| ६ हॉटेल्स, परटांचीं दुकानें इ. ... | ३९ | २·५ | ४,६७४ |
| ७ स्थानिक स्वराज्य संस्था, गॅस, वीज, पाणी, ट्राम इ. कंपन्या. ... | ६५ | ४·२ | ९२२ |
| ८ आगबोटींच्या कंपन्या. ... | २१ | १·४ | २२९ |
| ९ विमा कंपन्या, बँका इ. ... | ७६ | ४·९ | ५९८ |
| १० धंदेवाइक लोक व इतर लोक ... | ५५५ | ३५·७ | १२३,७६४ |
| ११ करमणुकीच्या कंपन्या, छापखाने, बुकबाइंडर, इस्पितळें इ. ... | ७२ | ४·६ | ६,५९४ |
| | १५५४ | ... | २,००,७४४ |

## हिंदी व इंग्लिश बँका ह्यांमधील ठेवींचे आंकडे

बँकिंगचे क्षेत्रांत हिंदुस्थान किती मागसलेला आहे, हें खालीं दिलेल्या आंकड्यांवरून लक्ष्यांत येईल. आर्थिक प्रगतीचे निदर्शक ह्या दृष्टीनें ह्या आकड्यांस विशेष महत्त्व आहे. इंग्लंडमधील 'बिग फाइव्ह' ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या पांच सर्वांत महत्त्वाच्या बँकांची, हिंदी पांच प्रमुख बँकांशीं तुलना केलेली आहे.

| इंग्लंडांतील पांच प्रमुख बँका | | हिंदी पांच प्रमुख बँका | |
|---|---|---|---|
| बँकेचें नांव | ठेवींची रकम रु. | बँकेचें नांव | ठेवींची रकम रु. |
| | रु. को. ल. | | रु. को. ल. |
| मिडलंड बँक, लि. | ५३७ १५ | इंपीरियल बँक ऑ. इं. | ७२ ४३ |
| लॉइड्स बँक, लि. | ४६७ ६१ | सेंट्रल बँक ऑ. इं. लि. | २५ ५८ |
| बार्क्लेज बँक, लि. | ४६७ ४९ | बँक ऑ. इंडिया, लि. | १४ २३ |
| वेस्ट मिनिस्टर बँक, लि. | ३९२ ९८ | अलाहाबाद बँक लि. | १० १२ |
| नॅशनल प्रॉव्हिन्शिअल बँक, लि. | २८४ ३२ | बँक ऑफ बरोडा लि. | ६ २९ |

| | |
|---|---|
| इंग्लंडची लोकसंख्या ४को. ४९ल. | हिंदुस्थानची लो. सं. ३५ को. २८ ल. (इंग्लंडच्या आठ पट) |
| पांच प्रमुख बँकांत दर माणशी ठेव ५०० रु. | पांच प्रमुख बँकांत दर माणशी ठेव ३ रु. ८ आ. |

[ दि सेंट्रल बँक मन्थली नोट्सवरून ]


## धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

### नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें. ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—


स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानावाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## हा अभिप्राय सर्वांचा—

# किर्लोस्कर
## पोलादी फर्निचर

या फर्निचरसारखें वापरण्यास सोईचें सुंदर आणि मजबूत असें दुसरें फर्निचर नाहीं.



खुर्च्या, टेबल, बांक, पलंग, कोंच, शेल्फ, स्टुलें, पाळणें इ०

सविस्तर माहितीसाठीं ताबडतोब लिहा.

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड,
किर्लोस्करवाडी.

# MARATHE & Co.
ENGINEERS & IRON FOUNDERS

| WORKS : | | OFFICE : |
|---|---|---|
| Natu Bag, Bhikardas Road, POONA 2 | Can undertake to do any sort of casting. We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act. **Our prices are very competitive.** | 978-79, Sadashiv, Laxmi Rd., POONA 2 |

## पोस्ट व तार खात्याचा अहवाल

[ हिंदुस्थान सरकारच्या पोस्ट व तार खात्याच्या १९३४-३५ च्या अहवालावरून खालील माहिती देण्यांत येत आहे. श्री. जी. व्ही. बेवूर, सी. आय. ई., आय. सी. एस., जे. पी., हे ह्या खात्याचे डायरेक्टर जनरल आहेत. ]

पोस्ट व तार खात्याच्या १९३४-३५ च्या अहवालावरून तें खातें १९३४-३५ सालीं हिंदुस्थान सरकारास फायदेशीर झालें, असें आढळून येतें. या वर्षी ह्या खात्यास ३८ लक्ष रुपये नफा झाला; १९३३-३४ सालीं, ह्या उलट, ५२ लक्ष रुपये तूट आली होती. अहवालाचे सालीं झालेल्या उत्पन्न-खर्चाचे आकडे येथें देत आहों:—

१९३४-३५ मधील पोस्ट खात्याचा उत्पन्न-खर्च

| | उत्पन्न रु. | | खर्च रु. | |
|---|---|---|---|---|
| | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष |
| पोस्ट ऑफिस | ७ | ६० | ७ | ३६ |
| तारा | २ | ७२ | २ | ३६ |
| टेलिफोन | | ८० | | ५६ |
| रेडिओ | | ८ | | १० |

अहवालाचे सालीं पोस्टानें किती व्यवहार केला, हें खालील आकड्यांवरून समजेल.

| | कोटि | लक्ष |
|---|---|---|
| एकूण जिनसांची ने-आण | ११४ | ३८ |
| रजिस्टर्ड पत्रें | ४ | १६ |
| विमा उतरलेल्या वस्तु | | ३४ |
| विमा उतरविलेल्या वस्तूंच्या विम्याची किंमत ( रु. ) | १०० | ६८ |
| पोस्टेजचें उत्पन्न ( रु. ) | ६ | ४८ |
| मनिऑर्डरींची संख्या | ३ | ८९ |
| मनिऑर्डरींची किंमत ( रु. ) | ७७ | ८४ |
| व्ही. पी. च्या रकमांची वसुली ( रु. ) | १८ | ७९ |

मार्च ३१, १९३५ रोजीं पोस्टांतील ३१ लक्ष सेव्हिंग्ज खात्यांवर ५८ कोटि ३० लक्ष रुपये होते, म्हणजे प्रत्येक खात्यावर सरासरीनें १८८ रु. ८ आणे होते. १७ कोटि, १३ लक्ष रुपयांच्या ९० हजार विमा पॉलिसी चालू होत्या.

अहवालाचे सालीं पोस्टामार्फत १४३/४ हजार पौंड वजनाचें कोयनेल विकण्यांत आलें, त्यापासून ३ लक्ष रुपये मिळाले.

## चष्मेवाल्या मुलांच्या संख्येंत वाढ

इंग्लंडमधील मुलांची दृष्टि सदोष असल्याची तक्रार आतां वरचेवर ऐकूं येऊं लागली आहे. मुलींचे डोळे विशेषतः ज्यास्त अधू आहेत. फार तास अभ्यास करण्याचा हा परिणाम असावा. लंडन कौंटी कौन्सिलनें आपल्या अधिकारक्षेत्रांतील कांहीं शाळांची तपासणी केली, तेव्हां असें आढळून आलें कीं १२ वर्षें वयाच्या मुलांत व मुलींत चष्मे वापरण्याचें प्रमाण शेंकडा अनुक्रमें १४३/४ व १६३/४ असें पडलें. पंधरा वर्षें वयाच्या मुलामुलींत हें प्रमाण जास्तच बिघडून तें शेकडा १८३/४ व २१३/४ असें झालें. १९३४ सालीं एकूण एक लक्ष ऐंशी हजार मुलांमुलींना चष्मे देण्यांत आले. चष्मे वापरणारांची संख्या त्या सालीं एकूण पांच लक्ष भरली.


पहिल्यानें सुरक्षितता

रस्त्यावरून जातांना तुम्हीं सुरक्षिततेचा मार्ग पहिल्यानें पहातां. हीच गोष्ट पैसे बँकेंत किंवा विम्यांत गुंतविण्यासंबंधीं आहे. पहिल्यानें तुम्ही पैशाची सुरक्षितता पहातां; नंतर व्याज किंवा बोनस.

हिशेब तपासणी आणि प्रतिनिधित्व सरकारी खात्याकडे असल्यानें

दि बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लि.

मध्यें आपले पैसे गुंतविल्यास कसलाच धोका नाहीं.

सविस्तर माहितीकरितां लिहा—

कुळकर्णी आणि कंपनी, चीफ ऑर्गनायझर्स | चुनीलाल डी. बरफीवाला, मॅनेजिंग डायरेक्टर.

९ बेंक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.



॥ श्री ॥

अकोला सेंट्रल बँक लिमिटेड

अकोला [ वऱ्हाड ]

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, ता. १ जानेवारी १९३६ पासून पुनः प्रसिद्ध होईपर्यंत ही बँक खालील **कमी केलेल्या दरानें मुदती ठेवी** स्वीकारील. जुन्या ठेवींची मुदत संपल्यावर त्या पुनः चालू करतांना त्यांनाही हे **नवीन दर** लागू होतील.

| | |
|---|---|
| ३ महिने पूर्ण | ३ द. सा. द. शे. |
| ६ महिने पूर्ण | ३। ,, |
| ९ महिने पूर्ण | ३॥ ,, |
| १२ महिने पूर्ण | ४ ,, |
| २ वर्षें पूर्ण | ४॥ ,, |
| ३ वर्षें पूर्ण | ५ ,, |
| ४ वर्षें पूर्ण | ५। ,, |
| ५ वर्षें पूर्ण | ५॥ ,, |

सेव्हिंग्ज बँक व चालू ठेवीवरील व्याजाचे दर हल्लीचेच म्हणजे अनुक्रमें द. सा. द. शे. ३ व २ हे अमलांत राहतील.

अकोला [ वऱ्हाड ] ता. २३-१२-३५ — श्री. अ. भागवत, ऑनररी सेक्रेटरी, अकोला सेंट्रल बँक लिमिटेड.



*For All Medicinal Requisites*

— TRY —

N. MAHADEV & Co.

DISPENSING CHEMISTS AND DRUGGISTS

City Post Office Corner, POONA 2.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | ११२—० |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०—० |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९-१० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—५ |
| ४% १९६०-७० ... ... | ११३—४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९८-१३ |
| ३½% १९४७-५० ... ... | १०७—४ |
| ४% १९४३ ... ... ... | ११०-१२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०८—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०७—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०७—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १०७—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | ११०—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—८ |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२९—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०५-१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५-१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५५३-१२ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३१—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | ९८—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ८७२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५१—८ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२३-१२ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १५४२—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५२५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९३-१२ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६६-१२ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १४४—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५२६—४ |


# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**

**This year 1934-35**
**Exceeds**
**2 CRORES & 50 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR
On Endowment **Rs. 23** On Whole Life **Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

# S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street Bombay | 716 Sadashiv Peth Poona City

## बंगाल

## कोल सप्लाइंग फर्म

उत्तम दगडी कोळसा ( बंगाल, सी. पी. )
आणि
कोक ह्यांचे व्यापारी
व
म्युनिसिपल, लोकलबोर्ड,
पी. डब्ल्यु. डी. ( सरकारी ) कॉन्ट्रॅक्टर्स
५११ बुधवार पेठ, पुणें शहर २.
तारेचा पत्ताः-व्यंकटेश. फोन नं. ४७१

# दि बॉंबे लाइफ अ‍ॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड.

( स्थापना १९०८ )

**विश्वासार्ह व मजबूत विमा–कंपनी.**

| | | |
|---|---|---|
| मालमत्ता .... .... | ७०,००,००० रु. चे वर | |
| विमाखातीं शिल्लक ( लाइफ फंड ) | ५८,००,००० | ,, |
| हप्त्यांचें उत्पन्न ... .... | १८,८५,००० | ,, |
| एकूण चालू काम .... .... | ३,७१,००,००० | ,, |
| आजपर्यंत क्लेम्सचे पैसे दिले ... | ३२,००,००० | ,, |

माफक हप्ते, भरपूर बोनस, क्लेम्सची तात्काळ भरपाई, व पॉलिसींतील सवलतीच्या अटी हें " बॉंबे लाइफ पॉलिसीं " चें वैशिष्ट्य आहे.

एजन्सी व पॉलिसी ह्यासंबंधींच्या तपशिलासाठी लिहाः—
मॅनेजर,
बॉंबे लाइफ बिल्डिंग, ४५।४७, चर्चगेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.



# वेस्टर्न इंडिया

## लाइफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड.

स्थापना स. १९१३ मुख्य कचेरी–सातारा

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची, पहिली आणि पहिल्या प्रतीची विमा कंपनी.

**बोनस** त्रैवार्षिक दर हजारी — हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५

| | |
|---|---|
| एकूण चालू काम .... ... | २,५०,१५,०८२ रुपये |
| एकूण जिंदगी .... .... | ६१,६९,१६९ ,, |
| लाइफ फंड ... ... | ५०,९९,४३९ ,, |

एजन्सी आणि इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

मॅनेजर.



**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.



**एन. ए. अ‍ॅन्ड फ्रेन्ड्स**
स्टेशनर्स, जनरल मर्चन्टस, अ‍ॅन्ड कमिशन एजन्टस.
आप्पा बळवंत चौक, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. अनिरुद्ध वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा घ. नं. ९२४/११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख ११ मार्च, १९३६. अंक ११

## दि मुकुंद इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें शहर.

[ अधिकृत भांडवल १००,००० रुपये ]

प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त  प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त

गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत प्रत्येकाची विमा कंपनी !

शेअरविक्री जोरांत सुरू झाली.

शेअर्स खपविणारे एजंटस मर्यादित.  त्वरित अर्ज करा.

मॅनेजिंग एजंटस्—विष्णु मुकुंद आणि कं., पो. बॉ. नं. ४३.
२५६ सदाशिव, पेरूगेटाजवळ, पुणें शहर.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

**डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें**

मध्यम वर्गातील गृहेच्छू लोकांस | अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य

भाडेकरी-घरमालक-गृहयोजना

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.
जनरल मॅनेजर

"दुसरें मूल्यमापन जाहीर झालें"

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली
पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—

**कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.**

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां भेटा अगर समक्ष लिहा.
मॅनेजिंग एजन्टस.

स्वदेशी
कापड म्हणजे काय !
(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.
या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.
हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सव प्रकारची स्टेशनरी वगैरे.
खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण
**स्वदेशी भांडार**
लक्ष्मीरोड, पुणें २.

# विविध माहिती

### ब्रिटिश टाकसाळ

ग्रेट ब्रिटनमधील 'रॉयल मिंट' कित्येक देशांचीं नाणीं पाडून देते. अशीं दरसाल सुमारें ३½ कोटि नाणीं पाडण्यांत येतात, त्यांपैकीं निम्मीं चांदीचीं असतात. ह्या टाकसाळींत एका दिवसांत दहा लाख नाणीं तयार होऊं शकतात, परंतु साधारणपणें दर मिनिटास १२० नाणीं असें प्रमाण पडतें.

### लॉर्ड रीडिंग ह्यांची इस्टेट

हिंदुस्थानचे माजी व्हाइसरॉय, लॉर्ड रीडिंग, हे ३०, डिसेंबर १९३५ रोजीं वारले. त्यांनीं आपल्यामागें सुमारें ४० लक्ष रुपये ठेवले आहेत. ह्यांपैकी वारसावरील कराच्या रूपानें ९½ लक्ष रुपये ब्रिटिश सरकारी तिजोरीस मिळतील.

### जयपूर स्टेट रेल्वे

सध्या बी. बी. ॲन्ड सी. आय. रेल्वे कंपनी वरील रेल्वेची व्यवस्था पहाते ती १ एप्रिल, १९३६ पासून जयपूर संस्थानकडे जाईल.

### पोस्टकार्डांत ज्यास्त मजकूर मावणार

पोस्टकार्डांत ज्यास्त मजकूर लिहिण्यास जागा असावी, ह्यासाठी कार्डांच्या लांबीरुंदींत वाढ झाली तरी ती नियमाविरुद्ध ठरणार नाहीं, अशा अर्थाचा एक सरकारी ठराव जाहीर झाला आहे. सरकारी कार्डांचें आकारमान पूर्वीइतकेंच रहणार, परंतु खासगी बनविलेल्या कार्डांची लांबी-रुंदी खालीलप्रमाणें असली तरी चालेल :—

कार्डाची कमाल लांबी-रुंदी : ५⅞ इंच लांबी, ४⅛ इंच रुंदी

कार्डाची किमान लांबी-रुंदी : ४ इंच लांबी, २⅞ इंच रुंदी

ता.१ मार्चपासून ह्या सवलतीचा फायदा घेतां येईल.

### ॲबिसीनियांतील युद्ध तहकूब

राष्ट्रसंघाची सूचना मान्य करून इटलीनें ॲबिसीनियांतील आपल्या लष्करी हालचाली तात्पुरत्या बंद ठेवल्या आहेत.

### जर्मनीच्या चढाईचा बाजारावर परिणाम

रोखे, चांदी, सोनें आणि कापससारखा माल ह्यांच्या बाजारांची प्रकृति नाजुक असते. जर्मनीच्या चढाईच्या धोरणाचा बाजारभावांवर तात्काल परिणाम ह्यामुळें होणें अपेक्षितच होतें. ३½ टक्क्यांच्या सरकारी प्रॉमिसरी नोटांचा भाव अलीकडे चढत जाऊन ९८ ⅞ रुपयांस भिडला होता, तो एकदम ९६⅞ रुपयांपर्यंत उतरला. चांदी सुधारून ५०¼ पर्यंत चढली, सोन्याचा भाव थोडा घसरला व कापूस, भुइमूग वगैरे मालांस तेजी आली.

### नवीन जहाजांची बांधणी

१९३५ सालीं सर्व जगांतील देशांत मिळून, १३ लक्ष टन वजनाची शक्ति असलेलीं एकूण ६४९८ व्यापारी जहाजें नवीं तयार होऊन ने-आण करण्याच्या धंद्यांत शिरलीं. (१०० टनांखालचीं जहाजें वरील आंकड्यांतून वगळलीं आहेत). ह्या १३ लक्ष टन शक्तीच्या जहाजांपैकीं ८ लक्ष टनांचीं जहाजें ग्रेटब्रिटन व आयर्लंड ह्यांतल्या बांधणीचीं असून बाकीचीं इतर देशांत बनवलीं गेलीं होतीं. ह्यांत जर्मनी = २½ लक्ष, जपान =१½ लक्ष, डेन्मार्क = १½ लक्ष व स्वीडन = १ लक्ष ह्याप्रमाणें वांटणी होती. १९३४ च्या मानानें १९३५ सालांतलें जहाजांचें जागतिक उत्पादन ३½ लक्ष टनांनीं वाढलें.

### बायबल

बायबलच्या (ख्रिस्ती लोकांचा धर्मग्रंथ) एकूण १ कोटि १० लक्ष प्रती गेल्या वर्षीं खपल्या. हिंदुस्थानांतील १५ भाषांमध्यें बायबलाचें भाषांतर झालेलें आहे.

### हिंदी कपाशीचें पीक

(सरकारी अंदाज)

यंदाचे वर्षी एकूण २½ कोटि एकर जमीन कपाशीखालीं आहे, म्हणजे कपाशीच्या क्षेत्रांत गत सालाचे मानानें सात टक्के वाढ झाली आहे ह्यापैकीं मुंबई इलाख्यांतील लागवड सुमारें २८ टक्के म्हणजे ५७ लक्ष एकर आहे. त्याचे खालोखाल मध्यप्रांत व वऱ्हाड (१९%), पंजाब (११%) व मद्रास (९%) हे येतात. हैद्राबाद संस्थानांत ३७ लक्ष एकर कपाशीखाली आहेत.

### हिंदी ग्राम-सुधारणेची चळवळ इंग्लंडला पोहोंचली

हिंदुस्थानांतून सेवा-निवृत्त होऊन स्वदेशीं गेलेल्या कित्येक अधिकाऱ्यांनीं हिंदी ग्रामसुधारणा मंडळ इंग्लंडमध्यें स्थापन केलें असून त्याच्यामार्फत ईस्टरमध्यें व्याख्यानें व्हावयाचें ठरलें आहे. ह्या मंडळींत लॉर्ड मेस्टन, डॉ. मॅन, मि. स्ट्रिकलंड, मि. जे. जी. कॉव्हरन्टन इत्यादि गृहस्थ आहेत.

### कॉफीचा शोध कसा लागला ?

आपल्या बकऱ्या चारीत असतांना एका अरबाच्या नजरेस आलें कीं, कांहीं झाडांच्या फळांवर ताव मारणारे बकरे विशेष उल्हसित व आनंदी आहेत. त्यानेंहि स्वतः कांहीं फळें चाखून पाहिलीं व त्यावरहि तसाच परिणाम झाला. त्यानें इमामला बोलावून, त्यावर प्रयोग केला असतां तसाच सुपरिणाम घडून आलेला दिसला. अशा रीतीनें कॉफीचा 'शोध' लागला व हें पेय लोकप्रिय झाल.

### ट्रेझरीबिलांची विक्री

गेले चार आठवडे सरकारी ट्रेझरीबिलांची विक्री बंद होती. चाल आठवड्यांत १ कोटि रुपये किंमतीच्या बिलांचीं टेंडरें रिझर्व्ह बँकेच्यामार्फत मागविण्यांत आलीं आहेत.

### हिंदी रेल्वेजचें उत्पन्न अजून कमीच आहे

गल्या एप्रिलच्या प्रारंभापासून ते फेब्रुवारी २० पर्यंतच्या काळांत गेल्या वर्षांतल्या ह्याच मुदतीच्या मानानें हिंदी रेल्वेजचें उत्पन्न ८४ लक्ष रुपयांनीं कमी झालें. चालू वर्षाच्या ११ महिन्यांत जी. आय. पी. रेल्वेचें उत्पन्न मात्र थोडेसें म्हणजे सुमारें १६ लक्ष रुपयांनीं वाढून १२ कोटि, ६६ लक्ष रुपये झालें आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किमत |
|---|---|
| ता. २९ फेब्रुवारी रोजीं पुरा झालेला आठवडा | ६६,०६,१७५ |
| ता. ६ मार्च रोजीं पुरा झालेला आठवडा | ३१,४९,५३८ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते ६ मार्च १९३६ अखेर | २,६३,५२,१८,३५९ |

## अनुक्रमणिका.

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १२६ |
| २ मध्यवर्ती बजेटाचे गुणावगुण ... ... | १२७ |
| ३ हिंदुस्थानचा जर्मनीशी होणारा व्यापार घटला | १२८ |
| ४ मागणी पुरवठ्याचा मेळ | १२८ |
| ५ स्फुट विचार... ... | १२९ |
| शिक्षित तरुणांची बेकारी–बेकारी निवारणाचा मार्ग–जादा करांची मंजुरी—हिंदुस्थान व ऑस्ट्रेलिया ह्यांचा परस्परांशीं व्यापार–पुराणांतली वांगीं पुराणांत–कच्च्या मालाचा पुरवठा–जर्मनीची चढाई—सोशल सर्व्हिस लीग, मुंबई | |
| ६ मुंबई इलाख्याचें नवीन कायदेमंडळ... ... | १३२ |
| ७ पोलाद, सिमेंट, का दोहोंचा मिलाफ ? ... ... | १३३ |
| ८ व्यापारी शिक्षण परीक्षा | १३३ |
| ९ मध्यवर्ती कायदेमंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश | १३३ |
| १० सहकारी चळवळ ... | १३४ |
| सुखसंपत्ति संवर्धक मंडळ आसले–नगर जिल्ह्यांतील चुळवळ–हिंदू नागरिक सहकारी संस्था इंदूर | |
| ११ निवडक बाजारभाव ... | १३५ |


# अर्थ

बुधवार, ता. ११ मार्च १९३६


## मध्यवर्ती बजेटाचे गुणावगुण

### केट्टा बाबतच्या खर्चाची तरतूद कशी करावी ?

कोणत्याहि वर्षी फडनवीसांनीं वाढाव्याचें बजेट सादर केलें कीं त्यांच्या कारभाराविषयीं लोकांनीं सामान्यत: समाधान व्यक्त करावें हें साहजिक आहे. सर जेम्स ग्रिग ह्यांनीं तर लागोपाठ तीन वर्षांच्या अंदाजपत्रकांतून सुमारें नऊ कोटि रुपयांची एकूण वाढ काढून दाखविल्यानें आणि तिचा विनियोग, शेतीची सुधारणा व करांचा बोजा हलका करणें ह्या कामीं व्हावा अशी योजना पुढें मांडल्यानें त्यांचें धोरण विशेषच खुलून दिसूं लागलें आहे. फडनवीसांच्या बजेटांत खालील विशेष आढळतात: ( १ ) उत्पन्न–खर्चांमधली तूट नाहींशी होऊन वाढावा उत्पन्न झाला आहे; ( २ ) वाढाव्याचा उपयोग, बऱ्याच प्रमाणांत, शेती व खेडगांवांतल्या जनतेची स्थिति यांत सुधारणा घडवून आणण्याच्या हेतूनें व्हावयाचा आहे; ( ३ ) प्राप्तीवरील कराचा बोजा थोडासा हलका करण्यांत आला आहे; ( ४ ) राज्यघटनेंतल्या सुधारणा अंमलांत येण्यास सहाय होईल अशा बेतानें जमाखर्चाची तरतूद करण्यांत येत आहे; ( ५ ) केट्टाच्या धरणीकंपामुळें झालेल्या नुकसानीची भरपाई व त्या शहराची पुनर्घटना चालू उत्पन्नांतून होणार आहे; ( ६ ) हलक्या व्याजाच्या दरानें सरकारास कर्जें मिळाल्यानें खर्चांत बचत होऊन हिंदुस्थानची पत वाढली आहे; ( ७ ) येत्या वर्षी कर्ज न काढतां सरकारचें काम भागणार आहे, एवढेंच नाहीं, तर इंग्लंडमधल्या एका कर्जाची परतफेडहि केली जावयाची आहे; ( ८ ) पुढच्या सालांच्या बजेटांतहि वाढावा निघेल अशी अपेक्षा आहे.

वरील गोष्टी फडनवीसांस अनुकूल म्हणून जमेच्या बाजूस धरल्या तरी त्यांचें अंदाजपत्रक व देशाची आर्थिक परिस्थिति ह्यांच्या परस्पर संबंधाविषयीं त्यांच्या बजेटाच्या भाषणांत खुलासा आढळत नाहीं हें त्यांत मोठें वैगुण्य आहे असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं. अनपेक्षित रीतीनें हातीं आलेल्या वाढाव्यांतून खेडेगांवांच्या सुधारणेच्या कार्यक्रमास मदत दिली ही गोष्ट स्तुत्य असली, तरी आर्थिक मंदीमुळें सामान्य जनतेची जी दुःखद हलाखी झाली आहे ती दूर करण्याबाबतच्या धोरणाचा फडनवीसांच्या भाषणांत मागमूस नाहीं. जगांत चोहोंकडे व्यापारी स्पर्धा अत्यंत तीव्र स्वरूपांत चाललेली असतांना हिंदी सरकारानें देशी उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळावें म्हणून कांहीं योजना आखली आहे किंवा नाहीं ह्याचा त्यांत उल्लेख नाहीं– "तुका म्हणे उगे रहावें, जें जें होइल, तें तें पहावें" असेंच धोरण ह्या बाबतींत सरकारनें ठेवलें आहे. सर जेम्स ग्रिग ह्यांच्या कारभाराचें वळण ह्या तऱ्हेचें आहे, ही गोष्ट अनेक वेळां दिसून आली आहे. मध्यवर्ती सरकाराच्या उत्पन्न–खर्चाची तोंडमिळवणी करून दाखविली म्हणजे आपलें काम संपलें अशी त्यांची समजूत असल्यास ती योग्य नाहीं. शेतीच्या उत्पन्नांत वाढ होण्याची आवश्यकता, बेकारीनिवारण, स्वदेशी उद्योगधंद्यांचा उत्कर्ष, ह्या बाबी अप्रत्यक्ष रीतीनें परंतु अत्यावश्यक रीतीनें फडनवीसांच्या क्षेत्रांत येतात. त्यांचें बजेट म्हणजे विशिष्ट खात्यास मर्यादित झालेलें कार्य हें सामान्यपणें खरें असलें तरी वास्तविक त्याची व्याप्ती मोठी असते. हिंदुस्थान सरकारच्या आर्थिक व राजकीय धोरणाचा परिपाक व गमक ह्या दृष्टीनें फडनवीसांच्या बजेटाकडे पहावें लागतें; आणि ही कसोटी सर जेम्स ग्रिग ह्यांच्या प्रस्तुत बजेटास लावल्यास निराशा वाटल्याशिवाय रहात नाहीं.

केट्टाच्या पुनर्रचनेचा खर्च मामुली उत्पन्नांतून करावा आणि तो कर्जांत सामील होऊं नये ह्या आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ फडनवीसांनीं ज्या कोटिक्रमाचा आश्रय केला आहे, तो समाधानकारक नाहीं:–"रेलवेसारख्या उत्पादक कामांसाठीच कर्ज काढून खर्च करावा म्हणजे त्यांच्या वार्षिक उत्पन्नांतून व्याजाची व कर्जफेडीची व्यवस्था होऊं शकते, परंतु केट्टावर होणारा खर्च सर्वस्वी वुडित स्वरूपाचा असल्यानें तो नेहमीच्या उत्पन्नांतूनच व्हावा असें त्यांचें म्हणणें आहे. हिंदुस्थान सरकारास अगोदरच १,२०० कोटि रुपयांचें कर्ज आहे व त्याच्या परतफेडीसाठीं योजिलेल्या गंगाजळीची रकम अत्यंत अल्प आहे, अशा स्थितींत अनुत्पादक कर्जांत भर घालणें इष्ट नाहीं. शिवाय, केट्टाकरितां काढलेलें कर्ज केव्हांतरी फेडावेंच लागणार आणि परतफेडीची व नवीन सुधारणा अमलांत येऊन प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नांतला हिस्सा प्रांतिक सरकारांस वांटून देण्याची वेळ एकच होणार. तेव्हां प्रांतिक उत्पन्नाच्या व राजकीय सुधारणांच्या यशस्वितेच्या दृष्टीनें पाहिलें असतां केट्टाच्या पुनर्घटनेकरितां कर्ज काढणें सर्वतोपरी अयोग्य आहे." अनुत्पादक कर्ज कमी करण्याचा हिंदी फडनवीसांचा आग्रह अनेक वर्षांपासूनचा आहे. सरकारच्या तिजोरींत वाढावा आला कीं, जनतेवरील करांचें ओझें हलकें न करतां अनुत्पादक कर्ज कमी करण्याची त्यांची सारखी घाई असे, आणि ह्या संबंधांत गोपाळराव गोखल्यांनीं फडनवीसांवर एके वर्षी कायदेमंडळांत सुंदर टीका करून प्रतिपक्षास निरुत्तर करून टाकलें होतें. इतर देशांच्या मानानें हिंदुस्थानचें अनुत्पादक कर्ज अत्यल्प आहे ही गोष्ट सरकारच्या बाजूनें मोठ्या अभिमानानें सांगितली जाते, मग भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळें होणाऱ्या खर्चाची कर्जांत भर पडली तर त्यांत विशेष न बिघडतां तो बोजा अनेक वर्षांवर वांटला जाऊन सध्याच्या हलाखीच्या काळांत कर देणाऱ्या जनतेची अल्पशी

सोय होईल. कांहीं कोटि रुपये चालू उत्पन्नांतून आणि करांच्या जमेंतून सहज खर्चतां येतील अशी आजची हिंदी लोकांची स्थिति नाहीं, हें सर जेम्स ग्रिग ह्यांसहि कबूल करणें प्राप्त आहे. म्हणून त्यांचा सर्वसाधारण सिद्धांत धरणीकंपामुळें ओढवलेल्या अनर्थापायीं होणाऱ्या खर्चास मुळीच लागू पडत नाहीं. पुस्तकी तत्त्वांस काळाच्या व परिस्थितीच्या मर्यादा असतात, हें त्यांनीं लक्ष्यांत ठेवलें पाहिजे.

## हिंदुस्थानचा जर्मनीशीं होणारा व्यापार घटला

ह्या देशांतली व्यापाराची मंदी व उतरलेले बाजारभाव ह्यांचें मुख्य कारण परदेशांत हिंदी कच्च्या मालास पूर्वींइतकी मागणी राहिलेली नाहीं, हें होय. हिंदुस्थान सरकारच्या प्रसिद्धी खात्यानें ह्या देशाचें परराष्ट्रीय व्यापारी धोरण काय असावें ह्याविषयीं लोकांस आपलें मत बनवण्यास सहाय मिळावें म्हणून तत्संबंधीं उपयुक्त माहिती पुरवण्याचा उपक्रम केला आहे. चर्चेचा प्रश्न आहे तो, कोणत्याहि देशानें दुसऱ्या देशांशीं विशिष्ट मालाच्या देवघेवीबद्दल स्वतंत्र करार करावे आणि त्यांत मालाचा प्रकार व त्याच्या आयात-निर्गतींचें प्रमाण ह्याबद्दल तपशीलवार शर्ती परस्परांवर बंधनकारक कराव्या कीं एकमेकांशीं तह करणाऱ्या राष्ट्रांस कांहीं सवलती सारख्याच मिळाव्या अशी तरतूद त्यांच्या व्यापारी करारांमध्यें असावी ह्या संबंधाचा आहे. अलीकडील प्रवृत्ति स्वतंत्र तपशीलवार बंधनकारक व्यापारी करारांस अनुकूल असून एका राष्ट्रास देण्यांत आलेल्या सवलती सहजगत्या इतरांस मिळूं शकत नाहींत. अशा परिस्थितींत हिंदुस्थाननें ह्या निर्दिष्ट केलेल्या दोन प्रकारांपैकीं कोणता स्वीकारावा हा प्रश्न सध्या उपस्थित झाला आहे. जपानचें धोरण साधारणपणें प्रत्येक राष्ट्राशीं स्वतंत्र करार करण्यास अनुकूल नाहीं व त्या योगानें त्याच्या व्यापाराचा विस्तार झाला आहे. ह्याच्या उलट, हिंदुस्थाननें जर्मनीसारख्या देशांशीं निरनिराळे करार करून आयात व निर्गत व्हावयाच्या मालाचे प्रकार व परिमाण निश्चित करावें असें मत प्रदर्शित करण्यांत येत आहे.

हिंदुस्थानचा जर्मनीशीं होणारा व्यापार घटला आहे, त्या संबंधांत वस्तुस्थिति काय आहे? धान्यधुन्य परदेशांतून न आणतां स्वदेशांतील शेतीच्या धंद्यास उत्तेजन देण्यासाठीं त्या मालाच्या आयातीवर निमंत्रण घालावें अशा धोरणाची जर्मन सरकारनें चार वर्षांपूर्वी अंमलबजावणी सुरू केली. पुढें जर्मनीच्या हुंडणावळीचें संरक्षण करण्याच्या हेतूनें निर्गत व्यापाराच्या प्रमाणांत मालाची आयात होण्यास परवानगी देण्यांत यावी, म्हणजे जर्मन चलनाची परराष्ट्रीय किंमत उतरणार नाहीं असें ठरलें. तथापि, जीवितास व कारखान्यांस अत्यावश्यक अशा मालास खास परवाने मिळण्याची व्यवस्था झाल्यानें हिंदी तांदूळ, ताग, गळिताचीं धान्यें व कातडीं ह्यांस मज्जाव होऊं शकला नाहीं. पण हिंदुस्थानचा किती माल जर्मनींत जातो त्याची नक्की माहिती निर्यात-व्यापाराच्या आकड्यांवरून वस्तुतः मिळत नाहीं. युरोपांतल्या अँटवर्प सारख्या बंदरांत उतरणारा माल अखेर जर्मनींत जातो व त्या बाजूस जाणारा किती माल शेवटीं जर्मनींत शिरतो हें सांगतां येत नाहीं. त्याच्या उलट, खुद्द जर्मन बंदरांत उतरणारा माल अखेर जर्मनींतच जाईल व तेथून त्याची निर्गत दुसराकडे होणारच नाहीं, अशी खात्री नसते. चालू वर्षाच्या पाहिल्या आठ महिन्यांचे आंकडे पाहिले तर हिंदी व्यापार जर्मनींत जीव धरून राहिला आहे, असें दिसतें. परंतु १९३३ सालाच्या मानानें त्यांत २१ टक्के घट झाली आहे. तसेंच, महायुद्धापूर्वी जर्मनींतून ह्या देशांत येणाऱ्या मालापेक्षां येथून जर्मनींत अधिक माल निर्गत होत असे आणि आयात-निर्गतींचें हें परस्पर-प्रमाण १:२ असें सरासरीनें असे. आज हें पारडें पार बदललें आहे. हिंदुस्थानच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाच्या अशा गणलेल्या मालाच्या निर्गतींत घट झाली आहे आणि जर्मनीच्या सध्याच्या व्यापारी धोरणाचा अनिष्ट परिणाम ह्या देशावर झाला आहे, ह्यांत संशय नाहीं. जर्मनीच्या बाबतींत आमच्या आयात-निर्गतींतली तफावत जवळ-जवळ नाहींशी झाली आहे व आमचा माल त्या देशांत कमी प्रमाणांत जात आहे.

## मागणी पुरवठ्याचा मेळ

### जॉर्ज बादशहांचे मृत्यूचा कापडाचे व्यापारावर परिणाम

राष्ट्रीय महत्त्वाच्या सर्वच गोष्टींचा परिणाम लोकांच्या सामाजिक आयुष्यक्रमावर होत असतो. पंचम जॉर्ज बादशहांच्या मृत्यूचा इंग्लंडमधील कापडाचे व्यापारावर विलक्षण परिणाम झाला, तो मागणी-पुरवठ्याविषयींच्या अर्थशास्त्रीय सिद्धांताचें उत्कृष्ट उदाहरण होण्यासारखा होता. मनुष्याच्या मनोवृत्तींचें प्रतिबिंब त्याच्या तात्कालिक रहाणीवर पडत असतें, आणि प्रत्येक समाजाच्या विशिष्ट रिवाजांप्रमाणें आनंदी अथवा दुःखी वृत्तीबरोबर लोकांच्या वस्त्रप्रावरणांतहि बदल होतो. ह्या दृष्टीनें बादशहांच्या मृत्यूची छाया ग्रेटब्रिटनमधील लोकांच्या कपड्यांवर पडणें अपरिहार्य होतें. मँचेस्टरच्या सर्व गिरण्यांकडे काळया रंगाचे कापडास एकदम मागणी आली. लंडन व इतर शहरांतून तारांनीं व टेलिफोननें कापड लवकर मिळण्याबाबत व्यापाऱ्यांनीं निकड लावली. ज्या व्यापाऱ्यांचे जवळ काळया रंगाच्या कापडाचा भरपूर साठा होता, त्यांनीं थोड्या अवधींत चांगलेच पैसे केले. ही मागणी अल्पकालिक ठरते कीं आणखी कांहीं महिने ती चालू रहाते, ह्याचा कारखानदार अंदाज करीत आहेत. रंगित कापड, छत्र्या, बूट, पिशव्या, इत्यादींस कांहीं कालपर्यंत मागणी मर्यादित राहील; काळया रंगाच्या जिनसाच विशेष खपतील, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

आधुनिक कारखान्यांचा धंदा व व्यापार मोठ्या प्रमाणावर चालतो आणि मालाचें उत्पादन वर्ष-सहा महिन्यांच्या अंदाजी मागणीस अनुसरून कमी ज्यास्त करावें लागतें. ह्या कारणानें असल्या व्यवहारांत अनिश्चितपणा व धोका बराच असतो आणि मागणी व बाजारभाव ह्यांविषयींचा अंदाज करण्यांत धंदेवाल्यांचें कौशल्य दिसून येतें. ग्रेटब्रिटनमध्यें जॉर्ज बादशहांच्या सुतकाच्या मुदतींत भिन्न भिन्न वर्गाचे लोक उन्हाळयांत कोणत्या प्रकारचें कापड पसंत करतील ह्या संबंधानें ब्रिटिश व्यापारी व कारखानदार ह्यांचे कयास सध्या चालू आहेत व त्यांची चर्चा वर्तमानपत्रांत होत आहे. विशिष्ट कल्पनेनें कांहीं माल तयार केला किंवा साठवला आणि त्यास अपेक्षेप्रमाणें मागणी आली नाहीं तर आपलें नुकसान होईल, हा विचार धंदेवाल्यांच्या मनांत घोळत आहे.

# स्फुट विचार

## शिक्षित तरुणांची बेकारी

हिंदुस्थानांतील सुशिक्षितांमधील बेकारीकडे देशांतील जबाबदार व विचारी पुढाऱ्यांचें लक्ष्य वेधलें गेलें आहे, ही गोष्ट आशाजनक समजली पाहिजे. सर तेजबहादुर सप्रू ह्यांनीं ह्या प्रश्नाचा पिच्छा पुरविला असून त्यांच्या उद्गारांत तळमळ व परिस्थितीच्या भीषणतेची जाणीव हीं ठळकपणानें आढळून येतात. बेकारीनिवारणासंबंधीं विधायक सूचना करण्यासाठीं संयुक्त प्रांतांच्या सरकारनें एक कमिटी नेमली होती, तिचे सर तेजबहादुर हे अध्यक्ष होते. कमिटीच्या अहवालाचा सारांश अर्थामध्यें मागेंच (ता. २९ च्या अंकांत) प्रसिद्ध झालेला आहे. सर तेजबहादुर यांनीं तीन महिन्यांपूर्वी संयुक्त प्रांतांतील विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिषदेंत केलेलें भाषण मार्मिक आणि मोठ्या कळकळीचें होतें व त्यावरून सुचलेले विचार आम्हीं 'अर्था' च्या २७ नोव्हेंबरच्या अंकांत प्रदर्शित केलेले आहेत. त्यानंतर, मध्यवर्ती शिक्षण सल्लागार मंडळानें दिल्ली येथें भरलेल्या आपल्या सभेंत आंखलेलें धोरण प्रसिद्ध झालें, परंतु त्यापासून विशेष फलनिष्पत्ति होईल अशी आशा उत्पन्न करण्याजोगें वातावरण निर्माण झालें नाहीं. सप्रू रिपोर्टावर संयुक्तप्रांताच्या कायदेमंडळांत चर्चा सुरू झाली, तेव्हां ह्या प्रश्नास पुन: चालना मिळाली. त्यांच्या सल्ल्याचा फायदा मिळावा म्हणून सर तेजबहादुर ह्यांस मंडळाचे सभासद करून घेण्यांत आलें होतें. सरकारनें रिपोर्टांतील सूचनांचा परामर्ष घेण्यासाठीं एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक केली असल्याचें सरकारतर्फे सांगण्यांत आलें व खर्च न करतां करण्याजोग्या गोष्टी तात्काल हातीं घेतल्या जातील, असें जाहीर आश्वासन देण्यांत आलें. सर तेजबहादुर सप्रू ह्यांनीं उत्तर देतांना, सरकार पैशाची सबब पुढें करून बेकारीच्या प्रश्नाची टोलवाटोलवी करील अशी मला कल्पना असती तर बेकारीची चौकशी व तिच्या संबंधाचा रिपोर्ट ह्यांच्या खटाटोपांत मी पडलों नसतों असें निक्षून सांगितलें. भावी पिढीच्या हितसंबंधाकडे दुर्लक्ष करणारांवरच अराजकतेच्या प्रसाराची जबाबदारी येऊन पडते, व सरकाराप्रमाणें जनतेनेंहि ह्या प्रश्नाकडे लक्ष पुरवलें पाहिजे. रिपोर्टामुळें लोकांमध्यें उत्पन्न झालेल्या आकांक्षा पुऱ्या करण्याबद्दल सप्रू साहेबांनीं कायदेमंडळास प्रोत्साहन दिलें व बेकारी निवारणासाठीं जरूर वाटल्यास जादा कराची योजना करावी, असें सुचविलें.

---

## बेकारीनिवारणाचा मार्ग

ज्या दिवशीं सर तेजबहादुरांनीं वरील आशयाचें भाषण लखनौ येथें केलें, त्याच दिवशीं बनारस येथें, पंडित मालवीयांनीं पदवीदान समारंभाचे प्रसंगीं, बेकारी व त्यासंबंधांतील सरकारची जबाबदारी ह्यांचा आपल्या भाषणांत उल्लेख केला आहे. डिसेंबर महिन्यांत, नागपूर येथील विश्वविद्यालयाच्या पदवीदान समारंभाचे वेळीं श्री. जयकर ह्यांनींहि बेकारीच्या प्रश्नावरच भर देऊन शिक्षण सुधारणेच्या मार्गाची चर्चा केली होती. बेकार तरुण पिढीस उद्योगक्षम बनवून तिला कामधंदा मिळेल अशी अनुकूल परिस्थिति निर्माण करण्या बाबतच्या सरकारच्या जबाबदारीवर आमच्या पुढाऱ्यांनीं जोर दिला असून सरकारासहि ती आतां नाकारणें अशक्य झालें असलें पाहिजे. तथापि, जबाबदारीसंबंधाची कबुली व बेकारी निवारणाचें प्रत्यक्ष प्रयत्न ह्यांत बरेंच अंतर रहाणार हें विसरून चालावयाचें नाहीं. सामान्य लोकांच्या मनोभूमिकेंत फरक घडवून आणण्याचा प्रयत्न करणें ही ह्या बाबतींतली पहिली महत्त्वाची गोष्ट आहे. ह्या दृष्टीनें लोकांत आर्थिक प्रश्नांसंबंधीं जागृति निर्माण करून आर्थिक संघटनाच्या कार्यास पुढाऱ्यांनीं व धनिकांनीं पुढें सरसावलें पाहिजे. औद्योगिक व व्यापारविषयक संघटनेचें काम अत्यंत अवघड आहे ह्यांत शंका नाहीं; तथापि सरकारच्या सहायाची वाट पहात न बसतां लोकांनींच तें हातीं घेऊन नेटानें, निश्चयानें आणि स्वार्थत्यागपूर्वक पार पाडल्यावांचून गत्यंतर नाहीं.

---

## बेकारी निवारणासाठीं जादा करांची मंजुरी

बेकारी निवारणाचे कामीं पुढाकार घेऊन व त्याप्रीत्यर्थ जादा कर बसविण्याचें ठरवून संयुक्त प्रांताच्या कायदेमंडळानें इतर प्रांतांच्या पुढें आघाडी मारली असल्याचें, त्या मंडळांत झालेल्या चर्चेवरून व सरकारच्या आश्वासनावरून दिसून येईल. सप्रू कमिटीच्या शिफारशींवर दोन दिवस वादविवाद होऊन कोर्ट फी व स्टँप ड्यूटी वाढविण्यासाठीं त्या संबंधांतलीं बिलें पुन: कायदेमंडळापुढें आणण्यास मंजुरी मिळाली. ता. १३ रोजीं ही करवाढ मामुली स्वरूपांत कायदेमंडळापुढें मांडली जाईल. ह्या वाढलेल्या उत्पन्नापैकीं ४ लक्ष रुपयांचा विनियोग सप्रू कमिटीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याकडेच खास केला जाईल, असें सरकारतर्फे आश्वासन देण्यांत आलें आहे. सर तेजबहादूर सप्रू ह्यांनीं आपल्या भाषणांत हिंदुस्थान सरकारच्या दिरंगाईच्या धोरणावर सडकून टीका केली व बेकारीचा प्रश्न लवकर न सोडविल्यास त्याचा सरकारावर व समाजावर किती अनिष्ट परिणाम होईल, ह्याचें भयानक चित्र सभासदांच्या डोळ्यांसमोर उभे केलें. बेकारीचा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी सरकारच्या माथीं मारण्याचें श्रेय सर तेजबहादुरासच आहे. संयुक्त प्रांताचा कित्ता इतर प्रांतांनीं गिरवण्याजोगा आहे व ह्या दृष्टीनें प्रयत्न होणें आवश्यक आहे. पण हिंदुस्थान सरकारची ह्या संबंधांत कांहींच जबाबदारी नाहीं काय? असल्या अत्यंत महत्वाच्या कार्यांत त्यांच्यापासून मदत मिळण्याऐवजीं दिल्ली, सिमला व व्हाइटहॉल ह्यांचे कडून अडचणी मात्र उपस्थित केल्या जातात अशी सर तेजबहादुरांची तक्रार आहे.

---

## हिंदुस्थान व ऑस्ट्रेलिया ह्यांचा परस्परांशीं व्यापार

ऑस्ट्रेलियाचे व्यापारमंत्री, डॉ. पेज, इंग्लंडच्या वाटेवर असतां त्यांनीं मुंबईंत कांहीं तास घालवले. आपल्या देशाचा निर्गत व्यापार परदेशांशीं वाढावा म्हणून खटपट करण्यासाठीं त्यांचा प्रवास आहे. ह्याच उद्देशानें ऑस्ट्रेलियन प्रतिनिधिमंडळ हिंदुस्थानांत मागेंच येऊन गेलें आहे. ह्या देशांत ऑस्ट्रेलियाचा माल अधिक खपण्यास जागा आहे आणि दोन राष्ट्रांचे संबंध स्नेहाचे रहावे व एवढ्याकरितां हिंदी लोकांनीं आपल्या देशामध्यें अवश्य यावें अशी डॉ. पेज ह्यांनीं मुंबईस दिलेल्या एका मुलाखतींत सूचना केली. गेल्या सालीं ऑस्ट्रेलियानें सुमारें २½ कोटि रुपये किंमतीचा हिंदी माल घेतला पण हिंदुस्थानांत एक कोटि रुपयांपेक्षांहि कमी किंमतीचा ऑस्ट्रेलियन माल आयात झाला. ह्या दोन देशांचें सांनिध्य लक्षांत घेतां त्यांचा परस्परांशीं होणारा व्यापार अतिशय मर्यादित प्रमाणांत होत असून त्याचा विस्तार

होणें जरूर आहे असें डॉ. पेज ह्यांचें म्हणणें आहे. ऑस्ट्रेलियन व्यापारी प्रतिनिधिमंडळास तें हिंदुस्थानांत असतांना फारच प्रेमाचा पाहुणचार मिळाला ह्याबद्दल त्यांनीं कृतज्ञता व्यक्त केली. ऑस्ट्रेलियाचा माल हिंदुस्थानांत ज्यास्त प्रमाणांत खपण्याच्या मार्गांतली मुख्य अडचण येथील लोक दरिद्री व मागसलेले आहेत ही आहे, ह्या गोष्टीची जाणीव त्यांनीं मनांत बागविली पाहिजे. दूध, चीज, क्रीम, सुरवलेलीं फळें ह्या चैनीच्या जिनसांचा खप सामान्य हिंदी जनतेंत वाढण्यास फारसा वाव नाहीं. हिंदुस्थानांत रहाणारे युरोपिअन आणि युरोपिअन पद्धतीची रहाणी असणारे श्रीमान हिंदी लोक ह्यांमध्येंच वर निर्दिष्ट केलेल्या जिनसांची मागणी असणार. त्याचप्रमाणें, लोकरीच्या कापडाचा धंदा येथें मोठ्या प्रमाणावर चालत नसल्यानें कच्च्या ऑस्ट्रेलियन लोकरीचा खप येथें वाढण्यास फारशी जागा नाहीं. हिंदुस्थान व ऑस्ट्रेलिया ह्यांचे दरम्यान खास आगबोटींच्या वहातुकीची व्यवस्था व्हावी अशी डॉ. पेज ह्यांची इच्छा आहे. ह्या देशांतून ऑस्ट्रेलियास चैनीसाठी किंवा विश्रांतीकरतां जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढावी हें दोन्ही देशांच्या हिताचें आहे अशीहि सूचना त्यांनीं केली आहे. आपला परराष्ट्रीय व्यापार वाढवण्याचे जारीचे प्रयत्न जगांतील सर्व देश कसे करीत आहेत ह्याची कल्पना डॉ. पेज ह्यांनीं व्यक्त केलेल्या अभिप्रायावरून सहज येईल.

## पुराणांतलीं वांगीं पुराणांत

जर्मनींत लायपझिग येथील औद्योगिक प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभाचे प्रसंगीं हेर हिटलर ह्यांचा उजवा हात समजण्यांत येणारे, डॉ. गोबेल्स, यांनीं जगांतली सध्याची संपत्तीची वांटणी अत्यंत विषम असल्याची तक्रार केली. कारखान्यांस लागणाग कच्चा माल तयार करणाऱ्या राष्ट्रांचा निर्गत व्यापार बसला आहे आणि त्याची जरूर वाटणाऱ्या राष्ट्रांस तो दुष्प्राप्य झाला आहे. त्या विषमतेच्या वाटणीच्या मुळाशीं भांडवलवाल्यांचा मूर्खपणा, राष्ट्रांचा परस्परांविषयीं द्वेष आणि आंतरराष्ट्रीय हुंडणावळीची अस्थिरता हीं कारणें आहेत अशी डॉ. गोबेल्स ह्यांची तक्रार असून ह्या मूर्खपणास आळा बसल्यावांचून आज जगांत चोहोंकडे आर्थिक गोंधळ माजला आहे, त्यांत सुधारणा होणें शक्य नाहीं, असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला. दुसऱ्या राष्ट्रांतले पुढारी मुत्सद्दी हेंच कंठरवानें सांगत आहेत. परंतु भाषणें व कृति ह्यांमध्यें मेळ कोठेंच आढळत नाहीं. डॉ. गोबेल्स ह्यांच्या जर्मन राष्ट्रानें तरी जगांत शांतता नांदावी व व्यापार सुरळीत चालावा ह्या संबंधानें कोणते प्रयत्न केले आहेत? नात्सी पक्षाचें धोरण जगाच्या आर्थिक सुधारणेस सहायकारक आहे असें जर्मनीबाहेर लोकांनीं समजावें ही अपेक्षा पुरी होण्यास त्यांच्या हातून कोणती अनुकूल कृति घडली आहे? जर्मनीचा डोळा महायुद्धांत गमावलेल्या आपल्या वसाहतींवर असून, जगांत कच्च्या मालाची वांटणी सर्व देशांत जरूरीप्रमाणें अनियंत्रित व्हावी असें सांगण्यांत ते प्रदेश पुन्हां आपल्या ताब्यांत यावे, हें सुचविण्याचा डॉ. गोबेल्सचा हेतु आहे. जर्मनीनें स्वतः पुरतें आर्थिक स्वायत्ततेचें धोरण स्वीकारलें असून लढाऊ खच वाढवला आहे. हिंदुस्थानची जर्मनींत होणारी निर्गत घटली आहे व नात्सी पक्षानें व्यापारावर कडक नियंत्रण घातलें आहे. अशा स्थितींत डॉ. गोबेल्स ह्यांचें भाषण "पुराणांतलीं वांगीं पुराणांत" ह्या सदरांतलें आहे, असें तिऱ्हाइतांस वाटल्यावांचून रहाणार नाहीं. ह्या देशासंबंधानें हेर हिटलर यांनीं नुकतेच काढलेले उद्गार हिंदी लोक अजून विसरले नाहींत. डॉ. गोबेल्स ह्यांनीं वर्तमानपत्रांच्या पंधराशे प्रतिनिधींस उद्देशून भाषण केलें त्यास उत्तर देतांना मि. निक्सन ह्यांनीं जर्मनींत होणारा हिंदी तागाचा व चहाचा खप घटला असून तो वाढल्यावांचून हिंदुस्थानांतल्या विस्तृत बाजारपेठांत जर्मन मालास वाव मिळणार नाहीं, ह्या गोष्टीची आठवण करून देण्यांत स्तुत्य प्रकारचें औचित्य दाखविलें.

## कच्च्या मालाचा पुरवठा वांटून द्या नाहींतर संभाळून रहा

जगांतील कच्च्या मालावर व वसाहतींवर ग्रेट ब्रिटन, फ्रान्स इत्यादि राष्ट्रांचा बहुंशीं ताबा आहे व त्यामुळें इतर राष्ट्रांस जरूर तो माल किफायतशीर रीतीनें मिळत नाहीं व वसाहत करण्यास त्यांस बाहेर वाव नाहीं, ह्या तक्रारीचा विचार करण्यासाठीं एक आंतरराष्ट्रीय परिषद् बोलवावी, अशी सूचना मि. लॅन्सबरी ह्यांनीं ब्रिटिश पार्लमेंटांत केली. मि. लॉइड जॉर्ज ह्यांनीं तीस पाठिंबा दिला व ब्रिटिश राष्ट्राचे देखरेखीखालील 'मँडेट्स' ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या वस्तुतः स्वतंत्र अशा मुलखांच्यासंबंधीं फेरविचार व्हावा, असें सुचविलें. ब्रिटिश परराष्ट्रीय मंत्री, सर सॅम्युअल होअर ह्यांनीं कच्च्या मालाच्या विभागणीचा प्रश्न जिनीव्हा येथें सप्टेंबर महिन्यांत उपस्थित केला होता व खुद्द पार्लमेंटमध्येंहि ह्या बद्दलची इतर राष्ट्रांची तक्रार समजावून सांगितली होती. वसाहतींची विषम वांटणी हें युद्धाचें वातावरण निर्माण करण्यास फार मोठें प्रभावी कारण आहे, ह्याबद्दल कोणासच शंका नव्हती व नाहीं, परंतु स्वतःचे ताब्यांतील प्रदेश सुखासुखी कोण सोडणार? हॉलंड एक वावभर देखील जागा देणार नाहीं असें त्या राष्ट्राच्या परराष्ट्रीय मंत्र्यांनीं डच पार्लमेंटांत हा प्रश्न उपस्थित करण्यांत आला असतांना स्वच्छ सांगितलें. आपल्या वसाहती कायम राखण्यास, त्याचप्रमाणें दुसऱ्याच्या वसाहती घेण्यास, युद्ध हा एकच मार्ग उरला म्हणजे शस्त्रास्त्रांची व सैन्यांची तयारी सुरू होणें ओघानेंच येतें. दुसऱ्यावर आपला वचक रहावा व युद्ध टळावें, म्हणून प्रतिपक्षापेक्षां आपली बाजू मजबूत करण्याचा प्रत्येक राष्ट्र प्रयत्न करतें व अशा रीतीनें युद्धमय वातावरण उत्पन्न होतें. आर्थिक व औद्योगिक प्रगति मग व्हावी कशी?

## जर्मनीची चढाई व शांततेस विघ्न

जगांतील आर्थिक मंदी दूर होऊन जनतेच्या रहाणींत सुधारणा होण्यास एक कोणती गोष्ट अत्यावश्यक असेल तर ती, आंतरराष्ट्रीय शांतता ही होय; परंतु दुर्दैवानें अलीकडे सर्वत्र अविश्वास, भीति आणि अशांतता बोकाळल्यानें निराशेचें वातावरण चोहोंकडे पसरलें असून त्या योगानें शांततामय प्रगतीच्या मार्गांत विघ्नें उपस्थित झालीं आहेत. इकडे अॅबिसीनियांतलें युद्ध बंद व्हावें ह्यासंबंधानें वाटाघाट चालू आहे, तर त्याच वेळेस हर हिटलर ह्यांनीं व्हर्सेईचा तह व लोकार्नोचा करार धाब्यावर बसवून फ्रान्स व राष्ट्रसंघ ह्यांस एकप्रकारचें आव्हानच दिलें आहे. महायुद्धाची व्हर्सेईच्या तहानें समाप्ती होऊन सोळा वर्षें होऊन गेलीं तरी त्याचे परिणाम जगास अजूनहि भोगावे लागत असून तसलें होमकुंड पुन्हां पेटतें कीं काय, अशी भीति उत्पन्न झाली आहे. फ्रान्स व जर्मनी ह्यांचें पिढ्यानपिढ्या चालत असलेलें हाडवैर प्रसिद्ध आहे. जर्मनीनें बेल्जम व फ्रान्स ह्यांच्या मुलखांत शिरून

युद्धाचा वणवा १९१४ सालीं पेटवला, त्याची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून ऱ्हाइन नदीच्या सीमेच्या अलीकडे जर्मन फौजा व शस्त्रास्त्रें येऊं नयेत अशी तजवीज तहांत करण्यांत आली व त्याच्या शर्ती जर्मनीस पाळण्यास लावण्याची जबाबदारी राष्ट्रसंघानें पत्करली. स्वतःच्या मुलखांत ह्या प्रकारचें बाहेरचें नियंत्रण आपणांवर कायमचें रहावें हा गोष्ट जर्मनीस शल्यासारखी बोचत आहे. जर्मनीनें १९१४ सालसारखा रानदांडगेपणा करूं नये ह्या हेतूनें त्याची चोहोंबाजूंनीं नाकेबंदी करणें हा व्हर्सेईच्या तहाचा उद्देश होता ह्यांत शंका नाहीं; परंतु जर्मनीवर लादलेले हे निर्बंध किती दिवस टिकणार ? फ्रान्सनें रशियाशीं नुकताच करार केला आहे, त्याची संधि साधून आणि राष्ट्रसंघाच्या सभासदांमध्यें अॅबिसीनियन युद्धामुळें फाटाफूट झाली आहे, हें पाहून हेर हिट्लर यांनीं जर्मन फौजांस मनाई असलेल्या ऱ्हाइन नदीच्या आसपासच्या प्रदेशांत सैन्य पाठवून पूर्वी झालेले करार धिटाईनें मोडले आहेत. जर्मनीचें हें कृत्य उघड उघड बेकायदेशीर असल्यानें व्हर्सेईचा तह व लोकार्नोचा करार पाळण्याची जबाबदारी खुषीनें स्वतःच्या शिरावर घेणाऱ्या राष्ट्रसंघाच्या सभासदांनीं त्याचा प्रतिकार केला पाहिजे, असें फ्रान्स म्हणणार आणि इटलीनें अॅबिसीनियन युद्ध राष्ट्रसंघाच्या मतास न जुमानतां चालू ठेवलें आहे व फ्रान्सच त्या बाबतींतलें वर्तन गुळमुळीतपणाचें आहे, एवढेंच नव्हे तर सोव्हिअट रशियाशीं करार करून लोकार्नोचा करार फ्रान्सनें तत्त्वतः मोडला आहे, असें जर्मनी रोखठोक उत्तर देणार. पूर्वीच्या तहाच्या व करारांच्या ऐवजीं न्याय्य व सयुक्तिक असे करार करून युरोपच्या शांततेविषयींची निश्चित व टिकाऊ व्यवस्था करण्यास आपण तयार आहों असें हेर हिट्लर यांनीं सुचवलें आहे. सध्याच्या हलाखीच्या परिस्थितींत कोणतेंहि राष्ट्र युद्धास तयार होणार नाहीं व आपल्या मागण्या राष्ट्रसंघास मान्य कराव्या लागतील ह्या खात्रीलायक समजुतीनें जर्मनीनें प्रस्तुतची उडी घेतली आहे. राष्ट्रसंघ हा पेंच कसा सोडवतो, तें पहावें.

---

### दि सोशल सर्व्हिस लीग, मुंबई

मार्च १९, १९११ रोजीं केवळ समाजकार्य करण्याच्या हेतूनें वरील संस्था स्थापन झाली. सर नारायणराव चंदावरकर ह्यांनीं स्थापिलेल्या ह्या संस्थेचा रजतमहोत्सव या महिन्यांत १५ ते २७ तारखेपर्यंत साजरा होणार आहे. गेल्या २५ वर्षांत लीगचें एकूण उत्पन्न १९ लक्ष, ५७ हजार रुपये झालें व खर्च १९ लक्ष, २२ हजार रुपये झाला, ह्यावरून संस्थेच्या कार्याचा विस्तार किती मोठा आहे, ह्याची कल्पना येईल. लोकांची शारीरिक, मानसिक, धार्मिक, सामाजिक व आर्थिक सुधारणा व्हावी, हा वरील संस्थेचा उद्देश असून, १८ वर्षांवरील कोणासहि तिचें सभासद होतां येतें. सध्यां तिच्या पटावर ५२० सभासद आहेत. लीगचें काम पांच आजन्म सेवक, स्वयंसेवक व सबंद किंवा अर्धा वेळ काम करणारे कार्यकर्ते ह्यांचेमार्फत केलें जातें. तिचें वार्षिक उत्पन्न ५५ हजार रुपये असून त्याचा विनियोग वर निर्दिष्ट केलेल्या कार्यासाठी करण्यांत येतो. स्त्रियांची उन्नति, मजुरांची रहाणी आरोग्य इ. सुधारण्याचे प्रयत्न, शिक्षण, आपत्तीचे प्रसंगीं मदत, इत्यादि गोष्टींनीं व्यापलेलें हें कार्यक्षेत्र इतकें व्यापक आहे, कीं त्याच्या तपशिलाचा नामनिर्देशहि येथें करणें अशक्य आहे. मुंबईमधील वजनदार व जबाबदार मंडळींच्या सल्ल्यानेंच संस्थेचें कार्य चालत असल्यानें, तिच्या कार्याबद्दल सर्वांस आदर वाटतो. मुंबईच्या लीगचें इतरत्र अनुकरण होत आहे, ही एकच गोष्ट तिच्या उपयुक्त कामगिरीची साक्ष पटवून देण्यास पुरेशी आहे.

---

### " लीप इयर "

फेब्रुवारी महिन्यास दरवर्षीं २८ दिवस असतात. परंतु चार वर्षांतून एकदां हा महिना २९ दिवसांचा होतो. गेला फेब्रुवारी असाच एक दिवसानें मोठा होता व १९३६ हें वर्ष "लीप इयर" झालें. सूर्याभोंवतीं पृथ्वीची प्रदक्षिणा होण्यास ३६५¼ दिवस लागतात व दरवर्षीं वगळण्यांत येणारे सहा तास चार वर्षांतून एकदां फेब्रुवारी महिन्यास जोडून देण्यांत येतात, म्हणून असा प्रकार घडतो.

सरकारी फडनविसांना लीप इयर फार चांगलें, कारण जकातींपासून व करांपासून एका दिवसाचें उत्पन्न ज्यास्त मिळतें व ही रक्कम कांहीं लहानसहान नसते. त्याचप्रमाणें, ज्यांचा रेल्वेचा सीझन पास असतो, त्यांस एका दिवसाचा प्रवास फुकट करतां येतो. ज्यांचा पगार महिन्याच्या बोलीनें ठरलेला असतो. त्यांना एक दिवस ज्यास्त काम करावें लागून त्याबद्दल मोबदला मिळत नाहीं, परंतु त्या दिवसाचा अन्नखर्च कांहीं वांचत नाहीं. विद्यार्थ्यांना मात्र एक दिवस परीक्षा पुढें गेल्यामुळें अभ्यासास वेळ ज्यास्त मिळतो.

---

### "हिंदुस्थानांतील आमच्या सफरी" *

भोरचे राजेसाहेब श्रीमंत रघुनाथराव पंतसचिव ह्यांनीं युवराजावस्थेंत १९०९ सालीं उत्तर हिंदुस्थानचा प्रवास केला, त्यावेळीं घेतलेल्या त्रोटक टिपणांच्या आधारें लिहिलेलें हें प्रवासवृत्त ग्रंथरूपानें प्रकाशित करण्यांत आलें आहे. प्रवासाच्या शैक्षणिक महत्त्वाच्या दृष्टीनेंच राजेसाहेबांनीं हा प्रवास केला होता व त्याची तपशीलवार नोंद ठेविली होती. पुस्तकांत उत्तर हिंदुस्थानांतील प्रेक्षणीय शहरांची व ठिकाणांची सचित्र माहिती देण्यांत आली असून ती वस्तुस्थितिनिदर्शक आहे व तिचा प्रवाशांस उपयोग व्हावा अशी अपेक्षा आहे. राजेसाहेबांच्या प्रस्तुत पुस्तकांत वर्णिलेल्या प्रवासास पंचवीस वर्षें लोटून गेलीं असल्यानें सद्यःकालीन स्थितीचें प्रतिबिंब त्यांत दिसलें नाहीं तरी त्यांत रेखाटलेलीं शब्दचित्रें एकंदरीनें उठावदार व परिणामकारक आहेत. शिवाय, तरुण युवराजांच्या भूमिकेंत केलेल्या निरीक्षणाच्या नोंदी राजेसाहेबांनीं प्रांजलपणानें पुस्तकांत उतरून घेतल्या असल्यानें त्यास विशिष्ट प्रकारची मनोरंजकता प्राप्त झाली आहे. सामान्य जनतेमध्यें वावरून व सर्व सोयी स्वतः करून घेऊन त्यांत रमण्याचें भाग्य श्रीमंतांना, त्यांची तशी इच्छा असतांहि, स्वतःचा दर्जा कायम राखण्याच्या जबाबदारीमुळें, मिळालें नाहीं, ह्याची जाणीव राजेसाहेबांना असल्याचें पुस्तकांत नमूद आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. प्रवासापासून स्वतःवर झालेल्या सुपरिणामांचें सविस्तर विवेचन प्रवासवृत्त पूर्णपणें लिहून झाल्यावर संकलित स्वरूपांत करण्यांत येणार आहे. श्रीमंत राजेसाहेबांनीं हौसेनें अंगिकारलेल्या ह्या प्रवासवृत्ताचें आम्ही स्वागत करतों.

---

### श्री. ल. ब. भोपटकर ह्यांचें व्याख्यान

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या पुणें शाखेच्या विद्यमानें श्री. ल. ब. भोपटकर ह्यांचें " Law of Partnership in relation to Bankers " ह्या विषयावर गेल्या शनिवारीं व्याख्यान झालें.

*लेखकः—श्रीमंत राजेसाहेब, भोर.

## मुंबई इलाख्याचें नवीन कायदेमंडळ.

मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळांची घटना व त्यांमधील सभासदांची संख्या, जागांची जातवार वाटणी, इत्यादि गोष्टी नव्या राज्यघटनेमध्यें कशा असणार, हें गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टानें निश्चित केलेलें आहे. तथापि, मतदारसंघ व त्यांच्या मर्यादा ठरविण्याचें काम सर लॉरी हॅमंड ह्यांच्या अध्यक्षतेखालील कमिटीकडे सोपविण्यांत आलें होतें. ह्या कमिटीच्या शिफारशी आतां प्रसिद्ध झाल्या आहेत. शहरें व जिल्हे ह्यांमध्यें सभासदांची वांटणी; स्त्रिया, जमीनदार, व्यापारी व विश्वविद्यालयें ह्यांच्या मतदारसंघांचे गट ठरविणें; प्रत्येक मतदारसंघांतून एक कीं अधिक उमेदवार निवडण्यांत यावेत, ह्याचा निर्णय करणें; इत्यादि प्रश्नांचा कमिटीनें निकाल दिला आहे.

मुंबई इलाख्यांत ह्यापुढें दोन कायदेमंडळें असणार. त्यांपैकीं कनिष्ठ मंडळांतील म्हणजे प्रांतिक लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमधील मतदारसंघाची योजना कशी असावी, ह्याचा निर्णय कमिटीनें केला आहे, तो असा:—

मुंबई प्रांतिक असेंब्लीमध्यें एकूण १७५ सभासद असतील. त्यांपैकीं ११४ जागा मुसलमान प्रभृति जाती सोडून इतरांस खुल्या आहेत व १५ जागा 'शेड्यूड कास्ट्स्'साठीं म्हणजे मागसलेल्या जातींसाठी राखून ठेवलेल्या आहेत. ह्या १५ पैकीं २ जागा मुंबई शहराचे वांटणीस आल्या आहेत; बाकीच्या जागा इलाख्यांतील जिल्ह्यांतून वांटून गेल्या आहेत. मुसलमानांसाठी एकूण २९ जागा राखीव आहेत. खुल्या जागांपैकीं १४ व मुसलमानांच्या राखीव जागांपैकीं ६ अशा २० जागा शहरांतील मतदारांचे प्रतिनिधींसाठी योजिल्या असून, मुंबई, अहमदाबाद, सुरत-रांदेर, पुणें व सोलापूर हीं ह्या कारणांसाठी 'शहरें' ह्या संदर्भांत मोडतील. व्यापाऱ्यांचे प्रतिनिधींना सध्याचे कायदेमंडळांत ६ जागा आहेत; नव्या राजवटींत त्यांना ७ जागा मिळतील. ही सातवी जागा ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनच्या वांटणीस येईल. मुंबई कायदेमंडळांत मजूरांच्या वांटणीस येणाऱ्या ७ जागांपैकीं ६ जागा ट्रेड युनियनच्याच प्रतिनिधींना मिळूं शकतील; सातवी जागा इतर मजूरांपैकी कोणासहि निवडणुकींत यशस्वी होऊन मिळवतां येईल. उरलेल्या जागांची भरती येणेंप्रमाणें होईल:— ॲंग्लो-इंडियन: २; विशिष्ट पद्धतीचें प्रतिनिधित्व ज्यांस जरूर आहे असे मागसलेले लोक: १; युरोपियन: ३; हिंदी ख्रिस्ती: ३; जमीनदार: २; युनिव्हर्सिटी: १; स्त्रिया: ६ (पैकीं १ मुसलमान).

## विद्यार्थ्यांच्या संख्येवर निर्बंध ?

१९३४-३५ ह्या सालीं सर्व हिंदी विश्वविद्यालयांत मिळून एकूण १,१३,३२८ विद्यार्थी शिक्षण घेत होते. ग्रेट ब्रिटनमध्यें शिक्षण घेणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांची संख्या १,३९३ होती. युरोपांत व अमेरिकेंत अनुक्रमें १११ व १५२ विद्यार्थी विद्याग्रहण करीत होते. पदवीधर तरुणांमधील बेकारी कमी करण्यासाठी व फक्त कार्यक्षम लोकांसच वाव मिळावा ह्यासाठी कांहीं निर्बंध घालून विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित करण्याची वेळ आली आहे, असा अभिप्राय हिंदुस्थान सरकारच्या शिक्षणविषयक अहवालांत व्यक्त करण्यांत आला आहे.


**धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०**

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा:—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानावाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

This year 1934-35
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca,
*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## पोलाद, सिमेंट का दोहोंचा मिलाफ ?

कोचीनच्या बंदरास धक्का बांधण्याचें मोठें काम व्हावयाचें आहे, त्यांत पोलाद वापरावें का सिमेंट उपयोगांत आणावें, ह्याबाबत तज्ज्ञांमध्यें वाद चालू आहे. बंदरांवरील कामांत युरोप व अमेरिका ह्या खंडांतील देशांत सिमेंट जसें फार मोठ्या प्रमाणावर वापरतात, तसें तें हिंदुस्थानांत वापरण्यांत आलेलें नाहीं आणि आमचेकडे पोलादावरच बहुतेक भिस्त असते. खाऱ्या पाण्याचा पोलादावरच परिणाम होऊन तें बिघडतें आणि त्यास मधून मधून रंग देण्याचा व त्यांत दुरुस्ती करण्याचा खर्च येतो. ह्या पेक्षां, पोलादाचें आंत पुरण असलेल्या सिमेंटचा ( रीइन्फोर्स्डें कॉंक्रीट) उपयोग केल्यास काम मजबूत आणि कमी खर्चाचें होतें असें अलीकडल्या अनुभवी इंजिनिअरांचें म्हणणें आहे. पोलादाप्रमाणें उघडें रीइन्फोर्स्ड कॉंक्रीट खराब होणार नाहीं कशावरून ? अशी शंका पुराणमतवादी इंजिनिअरांस येत आहे. तिचें निरसन प्रत्यक्ष आलेल्या अनुभवानेंच होणार आहे. लोखंड-पोलादाप्रमाणें सिमेंटवर तांबरा चढत नाहीं असा अनेक ठिकाणचा अनुभव आहे आणि कोचीन बंदरांत तें म्हणजे रीइन्फोर्स्ड कॉंक्रीट वापरणें इष्ट आहे, अशी वर निर्दिष्ट केलेल्या वादांत सूचना करण्यांत आली आहे. हें कॉंक्रीट वापरलें असतां कांहीं ठिकाणीं कामांची खराबी झाली असल्याविषयींच्या आक्षेपास, त्या कामांची योजना किंवा कृति अथवा हीं दोन्हीं सदोष असल्याचा तो परिणाम आहे असें असल्याचें अनुभवसिद्ध उत्तर देण्यांत आलें आहे. ह्या चर्चेच्या ओघांत, "अर्थ" च्या तारीख २५, सप्टेंबर १९३५ च्या अंकांत वाळवीनें सिमेंट खाऊन टाकल्याची हकीकत त्या किड्याच्या खादाडपणाचें उदाहरण म्हणून प्रसिद्ध झाली आहे, तिचा उल्लेख करणें जरूर आहे. आमचे मित्र, श्री. गोविंद त्रिंबक गोखले, बी. ई., इंजिनिअर आणि कॉंट्रॅक्टर, ह्यांस वाळवीस सिमेंट खातां येणें शक्य नाहीं, अशी खात्री वाटल्यावरून, त्यांनीं कॉंक्रीट असोसिएशन ऑफ इंडियास पत्र लिहून त्या संस्थेचा अभिप्राय आणवला आहे. वरील उदाहरणांत, सदोष कामामुळेंच वाळवीस आपला नाशकारक उद्योग करण्यास फावलें असलें पाहिजे, एरव्हीं त्या किंवा इतर कोणत्याहि कीटकांस सिमेंट कॉंक्रीटच्या व्यवस्थित रीतीनें केलेल्या कामास इजा करणें अशक्य आहे, असा अभिप्राय त्या संस्थेनें व्यक्त केला आहे. हेंच मत योग्य आणि ग्राह्य आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. श्री. गोखले ह्यांनीं सदरहु कामीं लक्ष्य घातलें ही गोष्ट स्तुत्य आहे.

### वेळेचें भाडें : दर तासास आठ हजार रुपये

आपल्या मालाचा उठाव करण्यासाठीं व्यापारी व कारखानदार जाहिराती देत असतात. वर्तमानपत्रांतील जाहिराती सर्वांच्या परिचयाच्या आहेत. आतां रेडिओचा प्रसार सर्वत्र झाला असल्यानें, रेडिओवरील वेळ भाड्यानें घेऊन त्याचा उपयोग आपल्या मालाची जाहिरात देण्याकडे करण्याची पद्धत पुढारलेल्या राष्ट्रांत प्रचलित झाली आहे. युरोपांतील तीन ठिकाणच्या रेडिओ स्टेशन्सवरून ब्रिटिश जाहिरातदार आपल्या मालाचें वर्णन करीत असतात. ह्या प्रत्येकांतून पाठविलेले संदेश दर रविवारीं सुमारें ८० लक्ष लोक ऐकतात. लक्झेंबर्ग येथील स्टेशन दर रविवारीं रात्रीं सव्वा दोन तासांत वेळेच्या भाड्याचे स्वरूपांत सुमारें १८ हजार रुपये वसूल करतें ! वर्तमानपत्रकारांचें ह्या जाहिरातींकडे लक्ष असून, आपलें नुकसान न होण्याबद्दल ते सावधगिरी बाळगीत आहेत.

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ आणि व्यापारी शिक्षण परीक्षा

हल्ली मराठींतून व्यापारी शिक्षण देण्याची व शिकलेल्या व्यापारी विषयांची परीक्षा घेऊन प्रशस्तिपत्रें देण्याची कांहींच सोय नाहीं. जें शिक्षण थोडेंफार मिळतें तें इंग्रजींतून मिळतें व परीक्षाहि इंग्रजींतूनच घेतल्या जातात. त्यामुळें व्यापारीवर्गापैकीं शेंकडा ९० अशा देशी व्यापाऱ्यांसाठीं पाहिजे असलेला चांगला नोकरवर्ग मिळत नाहीं. यामुळें व्यापारी शिक्षणाची वाढहि व्हावी तशी होत नाहीं. यासाठीं चालू असलेल्या मराठी-इंग्रजी व्यापारी शिक्षणसंस्थांची संघटना करून व्यापारी शिक्षणास व्यवस्थित स्वरूप देण्यासाठीं टिळक महाराष्ट्र विद्यापीठानें प्राथमिक व माध्यमिक व्यापारी परीक्षा मराठींतून घेण्याची योजना निश्चित केली असून त्याकरतां जरूर तो अभ्यासक्रमहि तज्ज्ञांच्या सहाय्यानें निश्चित केला आहे. या परीक्षेचे प्राथमिक व माध्यामिक असे दोन भाग केले असून या प्रत्येक भागांत विषयवार प्रमाणपत्रें आणि गटवार प्रशस्तिपत्रें देण्यांत यावयाचीं आहेत. परीक्षा मराठींतून घेतल्या जावयाच्या असल्यानें शिक्षणहि मराठींतून दिलें जाईल व त्यामुळें मॅट्रिक न होऊं शकणारालाहि शिक्षणाचा फायदा मिळूं शकेल व व्यापारी वर्गाची सोय होईल. तरी, ठिकठिकाणच्या व्यापारी शिक्षणसंस्थांनीं आपली माहिती पाठवून विद्यापीठाच्या या कार्यांत सहभागी होण्याची इच्छा दर्शवावी अशी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कार्यवाहांची विनंति आहे.

### मध्यवर्ती कायदेमंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

हिंदुस्थानांत सरकारी नोकरीवर असलेले लोक जेव्हां रजा घेऊन परदेशांत जातात व आपला पगार तिकडेच घेतात, तेव्हां त्या पगारावरील प्राप्तीच्या कराची त्यांस माफी मिळते. खासगी नोकरींतील लोकांसहि ही सवलत देण्यांत आली आहे, म्हणजे आतां पंक्तिप्रपंचाची तक्रार रहाणार नाहीं.

* * *

यात्रेचे वेळीं आगगाडीचे डबे कमी पडून "वाघिणीं"चा उपयोग उतारूंच्या वहातुकीसाठीं कित्येक वेळां करण्यांत येतो. असे प्रसंग शक्य तोंवर येऊं नयेत, अशी व्यवस्था सरकार करीत आहे. परंतु तसे हुकूम सोडल्यास उतारूंचीच गैरसोय होऊन तक्रारी येण्याचा संभव आहे, असें सर झाफरुल्ला म्हणाले.

* * *

पोस्टाचे बजेटांत केवळ दोन लाख रुपयांचाच वाढावा असल्यानें मध्यवर्ती सरकारास ह्या व्यापारी तत्त्वावर चालविलेल्या खात्यास आपल्या उत्पन्नांतून मदत करतां येत नाहीं, असें सरकारचे फडनवीस, सर जेम्स ग्रिग, म्हणाले.

* * *

हिंदुस्थान सरकारनें गेल्या वर्षी प्रांतिक सरकारांस ग्रामसुधारणेच्या कार्यासाठीं एक कोटि रुपये दिले. ह्या रकमेचा विनियोग कसा करण्यांत आला, ह्यासंबंधाचा अहवाल प्रांतिक सरकारांकडून मागविण्यांत आला आहे. नवीन रकमांची वांटणी करण्यापूर्वी त्यांचा विनियोग कसा व्हावा, ह्याबद्दल हिंदुस्थान सरकार नियंत्रण घालील.

## सहकारी चळवळ

### सुख-संपत्ति संवर्धक सहकारी मंडळ

आसले, ( सातारा )

पहिली साधारण सभा

सुख-संपत्ति संवर्धक सहकारी मंडळ, आसले, ही संस्था नुकतीच रजिस्टर होऊन आलेली होती व या अवधींतच असि० रजिस्ट्रार श्री. एन्. पी. भागवत, एम. ए., एलएल. बी., यांच्या वाई तालुक्यांतील मुक्कामाची संधी साधून आसले येथील ग्रामस्थांनीं पहिली साधारण सभा ता. १७।२।३६ रोजीं त्यांचे अध्यक्षतेखालीं भरविण्याचें योजून त्यांची संमति मिळविली. सदरहु सभेस अर्जावर सह्या करणारे बहुतेक सर्व सभासद व इतर स्थानिक रहिवासी हजर असून शिवाय श्री. आण्णासाहेब डुबे इनामदार, श्री. साळुंखे ॲग्रिकल्चरल ऑर्गनायझर, श्री. एन्. ए. रुकडे, सुपरवायझर व असोसिएशनचे फिल्डमन वगैरे मंडळी हजर होती.

आसले येथील आजपर्यंतच्या ग्रामसुधारणेच्या कामाच्या अहवालाचें वाचन, मे. रजिस्ट्रार यांचेकडून मंजूरी मिळालेल्या नियमांचा स्वीकार, अध्यक्षांनीं सुचविलेल्या कांहीं सोप्या नियमांची अंमलबजावणी करण्याचा निश्चय, इत्यादि कामें पार पडल्यावर अध्यक्षांचें भाषण झालें. त्यांत ते म्हणाले :—

श्री. भागवत ह्यांचें भाषण

"प्रत्येक मनुष्यप्राण्यानें रहाणीमध्यें, शेतकीचे कामांत व नैतिक बाबतींत सुधारणा करणें अत्यंत जरूर आहे. जग झपाट्यानें पुढें जात आहे. अशा स्थितींत पूर्वीचेच आचारविचार कायम ठेवून भागणार नाहीं. त्यांत जरूर तेथें थोडाफार बदल केला पाहिजे. अशी सुधारणा होण्यास संघटनेची अत्यंत जरूरी आहे, आणि संघटणेसाठी व स्वावलंबनाकरितां सहकारी संस्था अवश्य पाहिजेत. व्यक्तीनें स्वतःपुरतें पहाण्यापेक्षां संघटनेनें काम चांगलें व थोडक्या अवधींत होतें. परंतु या सहकार्यांत आत्मीय कळकळ पाहिजे, दुसरा येऊन आमची सुधारणा करील असें विसंबण्याचे दिवस राहिलेले नाहींत व याकरितां स्वावलंबन हें ध्येय निश्चित केलें पाहिजे. वरील तऱ्हेनें काम पार पाडीत असतांना प्रत्येक गोष्ट पटवून घेतली पाहिजे. पैशाशिवाय कांहींच होत नाहीं ही गोष्ट जरी खरी असली तरी त्याकरितां शेतकऱ्यांच्या ज्या मुख्य तीन अडचणी आहेत, त्या दूर केल्या पाहिजेत. ( १ ) कर्जबाजारीपणा, ( २ ) खर्च जास्त, उत्पन्न कमी अशी स्थिति व ( ३ ) धंद्याकडे दुर्लक्ष. कर्जबाजारीपणा दिवसेंदिवस वाढत आहे व उत्पन्न मात्र घटत आहे. त्याकरितां खर्चाचें प्रमाण कमी केलें पाहिजे, अनावश्यक गोष्टींचा त्याग केला पाहिजे, व कोर्टकचेरीच्या कामांत विनाकारण पैशाचा जो अपव्यय होत आहे तो दूर केला पाहिजे. केवळ कोर्टकचेरीच्या कामांत अनावश्यक असा जो पैसा खर्च होतो तोच कमी केला तर सातारा जिल्ह्यांतच २ लाखांची बचत होईल. तसेंच, लग्नकार्यांत परिस्थितीप्रमाणें माफक खर्च केला पाहिजे. वरील सर्व बाबींचा विचार करावयास प्रत्येकाच्या ज्ञानांत थोडीफार भर पडली पाहिजे व या बाबीकडे आतां लक्ष देणें व प्रौढ शिक्षणाचा फायदा घेणें अत्यंत जरूर आहे. सुधारलेले निरनिराळे शेतकीचे प्रयोग करून त्यांचा फायदा घेतला पाहिजे."

अध्यक्षांच्या नंतर मे. आण्णासाहेब डुबे, इनामदार, यांनीं ग्रामस्थांतर्फे त्यांचे आभार मानले व हारतुरे, अत्तर गुलाब होऊन सभेचें काम संपलें.

---

### नगर जिल्ह्यांत सहकारी चळवळीची प्रगति

मुंबई इलाख्याच्या सहकारी खात्याचे रजिस्ट्रार मि. के. एल्. पंजाबी हे ता. २५ ते २९ फेब्रुवारी अखेर नगर जिल्ह्यांत फिरतीवर होते व ह्या मुदतीमध्यें त्यांनीं शेवगांव, कोपरगांव, राहुरी, संगमनेर, इत्यादि सहकारी चळवळीच्या दृष्टीनें महत्वाच्या केंद्रांस भेटी दिल्या. वक्तशीर फेड करणाऱ्या सभासदांना रीबेट देण्याच्या पद्धतीमुळें गेल्या दोन वर्षांत झालेल्या प्रगतीबद्दल रजिस्ट्रार साहेबांनीं समाधान व्यक्त केलें. ह्या योजनेनें डबघाईस आलेल्या कित्येक सोसायट्यांना वांचवलेलें आहे. नगर येथें २८ फेब्रुवारी रोजीं, ह्या योजना यशस्वी करण्यास विशेष मदत करणाऱ्या कार्यकर्त्यांना पदकें वांटण्याचा समारंभ रजिस्ट्रार साहेबांच्या हस्तें झाला, त्यावेळीं असिस्टंट रजिस्ट्रार श्री. भागवत, सरदार थोरात, श्री. भापकर, ऑडिटर श्री. प्रधान, सीनियर बँक इन्स्पेक्टर श्री. देवधर इत्यादि मंडळी व इतर अनेक प्रमुख लोक हजर होते. अध्यक्षांनीं, आपल्या भाषणांत, सोसायट्यांना पुनर्जीवन देणाऱ्या सार्वजनिक कार्यकर्त्यांचे आभार मानले. जिल्ह्यांतील लोकांकडून नव्या सोसायट्यांच्या स्थापनेबद्दल मागणी येत आहे, ह्यावरून सहकारावरील लोकांचा विश्वास व्यक्त होतो. लांब मुदतीचीं कर्जें देणाऱ्या जमीन गहाण बँकेची स्थापना नगर जिल्ह्यांत लौकरच होईल अशी आशा त्यांनीं प्रदर्शित केली. ह्या बाबतींत रजिस्ट्रार साहेबांचा सरकारबरोबर पत्रव्यवहार चालू आहे.

सरदार थोरात ह्यांनीं सहकारी अधिकारी व कार्यकर्ते ह्यांस चहापार्टी दिली.

---

### हिंदु नागरिक सहकारी संस्था मर्यादित, इंदूर

वरील संस्थेस चार वर्षें पूर्ण होऊन तिची वार्षिक सभा नुकतीच भरली होती. संस्थेच्या पटावर १४५६ सभासद असून वसूल झालेलें भांडवल ८६ हजार रुपये आहे. संस्थेजवळील ठेवींची रक्कम सुमारें तीन लाख असून गंगाजळी व इतर निधी साडेपांच हजारांवर आहेत. २ लक्ष ८९ हजार रुपये कर्जाऊ देण्यांत आलेले आहेत. अहवालाचे सालीं संस्थेनें एकूण ८½ लक्ष रुपयांचा व्यवहार केला व १०,१७६ रु. नफा मिळवला. गंगाजळी व इतर निधींत रकमा टाकून, ४६९६ रु. भागीदारांत वांटण्यांत यावे, अशी कार्यकारी मंडळानें शिफारस केली; म्हणजे, डिव्हिडंड ६ टक्के दरानें पडले. कर्जवसुलीसाठी सभासदांवर दावे करावे लागणें हें कांहीं चांगलें नाहीं आणि ह्या बाबतींत कार्यकारी मंडळानें दिलेला इशारा सभासदांनीं ध्यानांत बाळगणें अगत्याचें आहे.

संस्थेची मजबुती वाढवण्याकरितां निरनिराळ्या निधींत नफ्यांतून रकमा घालण्याची चालकांची पद्धति स्तुत्य आहे. थकबाकीच्या प्रमाणाकडे लक्ष्य दिलें असतां असल्या तरतुदीचें महत्व पटण्यासारखें आहे. श्री. प्रो. वामन गोपाळ ऊर्ध्वरेषे व त्यांचे सहकारी ह्यांच्या नेतृत्वाखालीं संस्थेची व्यवस्था आस्थापूर्वक चालली असल्याचें अहवालावरून दिसतें.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | ११०-१० |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११८-१२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—० |
| ४% १९६०–७० .... ... | ११२—४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९६-१४ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०६—४ |
| ४% १९४३ ... ... ... | ११०—४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०६—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०७—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | १०७—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | १०३-१२ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—८ |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२९—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०३—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३३-१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५५८-१२ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३१—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १००—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ८८२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५१-१२ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२३-१२ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १५४१—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५६०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९३-१२ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६६—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १४९—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५५६—४ |

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंड विमा कं.
दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.
च्या लोकप्रिय प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा.
किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

श्री माणकेश एजन्सी
शहापूर लुगडीं, जरीचीं व टोपपदरी, अंगास रंग न लागणारीं मिळतात.
तसेंच, इरकल, संबायत वगैरे पेठेचा गॅरंटीड माल मिळतो.
मंडई रस्ता, शनीचा पार, पुणें.

दत्तात्रेय नारायण हेजीब
किराणा व सुक्या मेव्याचे व्यापारी
आमचेकडे आंबेपोळी, फणसपोळी, सारा पिस्ता वगैरे सुका मेवा मिळेल.
रे–मार्केटजवळ, २० शुक्रवार पेठ, पुणें २.

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी टेलरिंग फर्म
पाटसकर आणि कंपनी
४८ निहाल पेठ, पुणें शहर.
मॅनेजर–ही. म. पाटसकर, D.M.T.C.A. (London)
सर्व प्रकारचे देशीं व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी
आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचा मजबूत पाया

# अर्थ

**मध्यप्रांत व वऱ्हाड**

हायस्कूल, मिडल स्कूल व नॉर्मल स्कूल ह्यांतील शिक्षकांच्या ग्रंथालयासाठी मंजूर

[ व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि आर्थिक विषयांस वाहिलेलें साप्ताहिक ]

संपादक : प्रो. वा. गो. काळे

सहायक : श्री. श्री. वा. काळे

**मुंबई इलाखा**

सरकारी व सरकार-मान्य शाळांत व ट्रेनिंग कॉलेजांत घेण्यासाठी मंजूर

महाराष्ट्रीयांचीं मनें उद्योगधंदे, व्यापार, इत्यादि धनोत्पादक व्यवहारांकडे वळून त्यांस ह्या विषयांची गोडी लागावी, या दृष्टीनें 'अर्था'ची मांडणी केलेली असते. व्यापारी, शिक्षक, विद्यार्थी, सार्वजनिक कार्यकर्ते व सर्वसाधारण नागरिक ह्या सर्वांनीं 'अर्था'चें वाचन केलें असतां महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीचा मजबूत पाया तयार झाल्याखेरीज रहाणार नाहीं. उद्योगधंद्यांत असणाऱ्या, त्याचप्रमाणें त्यांत नव्यानें पडणाऱ्या सर्वांस हें पत्र मार्गदर्शक होईल.

प्रत्येक महाराष्ट्रीय कुटुंबांत व शाळेंत अर्थ वाचला जाणें आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी फक्त चार रुपये असून टपालखर्च वेगळा नाहीं. मनिऑर्डर पाठवून वर्गणीदार व्हा.

व्यवस्थापक, **अर्थ**, अर्थ ऑफिस, पुणें ४

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पद्मजी पेपर मिल, मुंबई.**

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये ?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

**एन. ए. अ‍ॅन्ड फ्रेन्ड्स**
स्टेशनर्स, जनरल मर्चन्टस, अ‍ॅन्ड कमिशन एजन्टस.
आप्पा बळवंत चौक, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१७, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।


—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ | पुणें, बुधवार, तारीख १८ मार्च, १९३६. | अंक १२


## हा अभिप्राय सर्वांचा—

# किर्लोस्कर
## पोलादी फर्निचर



या फर्निचरसारखें वापरण्यास सोईचें सुंदर आणि मजबूत असें दुसरें फर्निचर नाहीं.

खुर्च्या, टेबल, बांक, पलंग, कोंच, शेल्फ, स्टुलें, पाळणें इ०

सविस्तर माहितीसाठीं ताबडतोब लिहा.

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड,
किर्लोस्करवाडी.

## पहिल्यानें सुरक्षितता

रस्त्यावरून जातांना तुम्हीं सुरक्षिततेचा मार्ग पहिल्यानें पहातां. हीच गोष्ट पैसे बँकेंत किंवा विम्यांत गुंतविण्यासंबंधीं आहे. पहिल्यानें तुम्ही पैशाची सुरक्षितता पहातां; नंतर व्याज किंवा बोनस.

हिशेब तपासणी आणि प्रतिनिधित्व सरकारी खात्याकडे असल्यानें

# दि बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लि.

मध्यें आपले पैसे गुंतविल्यास कसलाच धोका नाहीं.

सविस्तर माहितीकरितां लिहा—

कुळकर्णी आणि कंपनी, चीफ ऑर्गनायझर्स
चुनीलाल डी. बरफीवाला, मॅनेजिंग डायरेक्टर.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

# वेस्टर्न इंडिया
## लाइफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड.

स्थापना स. १९१३ — मुख्य कचेरी-सातारा

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची, पहिली आणि पहिल्या प्रतीची विमा कंपनी.

**बोनस**
त्रैवार्षिक
दर हजारीं

हयातींतील रु. ६०
हयातीनंतरचें रु. ७५

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण चालू काम | .... | ... | २,५०,१५,०८२ रुपये. |
| एकूण जिंदगी | .... | .... | ६१,६९,१६९ ,, |
| लाइफ फंड | ... | ... | ५०,९९,४३९ ,, |

एजन्सी आणि इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

मॅनेजर.

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि.

# नोटीस

या बँकेच्या व्यक्तिशः सभासदांना सोनें-चांदीच्या जिनसांचे तारणावर कर्ज देण्याबाबतच्या नियमांस मे. रजिस्ट्रारसाहेब यांची अखेरची मान्यता मिळाली असल्यानें सदर प्रकारचा व्यवहार आतां बँकेनें सुरूं केला आहे. तरी गरजूंनीं त्याचा अवश्य फायदा घ्यावा अशी विनंती आहे.

पुणें, ता. १५-३-३६ } द. दि. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर


# विविध माहिती

### प्रोफेसर काळे ह्यांचें व्याख्यान

इंडियन इंस्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या पुणें शाखेच्या विद्यमानें, इंस्टिट्यूटच्या जागेंत, गोखले हॉलमध्यें, उद्यां म्हणजे गुरुवार, १९ मार्च रोजीं सायंकाळीं ६ वाजतां प्रोफेसर काळे यांचें "परराष्ट्रीय हुंडणावळ" ह्या विषयावरचें दुसरें इंग्रजी व्याख्यान होणार आहे.

### मद्रास इलाख्यांत विजेचा प्रसार

मद्रास सरकार आपल्या इलाख्यांत विजेचें उत्पादन वाढवणार असून येत्या दहा वर्षांत त्या प्रीत्यर्थ दहा कोटि रुपये खर्चण्यांत यावयाचे आहेत.

### श्री अर्थ मोफत वाचनालय, सातारा

वरील वाचनालयाचा उद्घाटन समारंभ ता. १० मार्च रोजीं श्री. यशवंत काशिनाथ दीक्षित ह्यांचे हस्तें पार पडला. हें वाचनालय रोज सकाळीं ७ ते १० व सायंकाळीं ६ ते ७ उघडें असतें.

### मुंबई ते दिल्ली इंटरचें भाडें उतरलें

ता. १ एप्रिल, १९३६ पासून बी. बी. अँड सी. आय. रेल्वेवरील मुंबई ते दिल्ली ह्या प्रवासाच्या इंटर वर्गाचें भाडें २४ रु. ६ आण्यांवरून १६ रु. ८ आण्यांवर उतरविण्यांत आलें आहे. तूर्त सहा महिन्यांपर्यंतच हे उतरलेले दर अमलांत रहातील.

### ऑस्टिन मोटर कंपनी

ऑस्टिन मोटर कंपनी आपल्या इंग्लंडमधील कारखान्यावर येत्या वर्षी ५० लक्ष रुपये जादा भांडवल खर्च करणार आहे.

### केट्टा शहराच्या पुनर्रचनेसाठी स्वस्त सिमेंट

केट्टा शहराच्या पुनर्रचनेसाठी बरेंच सिमेंट लागणार. सिमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडियानें, केट्टा येथें विशेष सवलतीनें सिमेंट पुरविण्याबद्दलची आपली योजना सरकारास कळविली आहे.

### ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन

इंग्लंडमधील रेडिओ संबंधांतील कार्यक्रम इत्यादींची व्यवस्था वरील कंपनीकडे आहे. तिला १९३५ सालीं एकूण ३½ कोटि रुपये उत्पन्न झालें. ही रकम त्या पूर्वीच्या सालांतील उत्पन्नापेक्षां ५० लक्षांनीं ज्यास्त आहे. लायसेन्स फीच्या रूपानें ह्यापैकीं २¾ कोटि रुपये मिळाले व रेडिओवरील कार्यक्रमाप्रीत्यर्थ सुमारें १¾ कोटि रुपये खर्च झाले.

### बँकांस सुटी

शनिवार, ता. २१ मार्च रोजीं जमशेदी नौरोज निमित्त बँका बंद रहातील.

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया

सेंट्रल बँक ऑफ इंडियाची रौप्यज्युबिली लवकरच साजरी करण्यांत येणार आहे. ह्या बँकेचे एकूण १,८०० नोकर आहेत आणि ते सर्व हिंदी आहेत. त्यांतले शेकडा ७० हिंदु असून बाकी पार्शी, मुसलमान व ख्रिस्ती आहेत. पंचवीस वर्षांपूर्वी सेंट्रल बँक स्थापन झाली तेव्हां हिंदुस्थानांतील सर्व जॉइंट स्टॉक बँकांत मिळून २५½ कोटि रुपयांच्या ठेवी होत्या. आज तितक्या रकमेच्या ठेवी एकट्या सेंट्रल बँक ऑफ इंडियामध्यें आहेत.

### लंडनमध्यें पहिली हिंदी 'एक्सचेंज बँक'

सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या विद्यमानें लंडनमध्यें एक हिंदी 'एक्सचेंज बँक' काढण्याची योजना पूर्णतावस्थेस आली आहे. हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापारांतल्या हुंड्यांचा धंदा आज कित्येक वर्षें परकीय बँकांच्या हातीं आहे आणि आतां निघणारी वरील बँक पहिलीच हिंदी 'एक्सचेंज बँक' आहे.

### ब्रिटिश जनता व धूम्रपान

ग्रेटब्रिटनमध्यें पुरुष व स्त्रिया मिळून दरसाल ६५० कोटि सिगारेट्स ओढतात, म्हणजे वयांत आलेल्या माणसांपैकीं चारांतील तिघेजण दररोज सरासरीनें दहा सिगारेटसचा धूर करतात असा हिशेब होतो.

### ब्रिटिश लोकांची परदेशांकडून येणारी वार्षिक कमाई

ब्रिटिश राष्ट्रांतले भांडवलवाले, जहाजांच्या आणि विमामंडळ्या इत्यादि धंदेवाले ह्यांस त्यांच्या कामगिरीबद्दल व्याज, नफा, कमिशन वगैरे स्वरूपांत प्रतिवर्षी जी कमाई होत असते, तिची रकम १९३५ सालीं सुमारें ४०० कोटि रुपये भरली. ह्यांत सुमारें २५० कोटि रुपये, परदेशांत कर्जाऊ दिलेल्या व धंद्यांत घातलेल्या भांडवलावरील व्याजाचे आहेत.

### असाध्य रोगांनीं पीडिलेल्यासाठीं स्वतंत्र इस्पितळ

मरहूम बादशहांच्या रौप्य महोत्सवाप्रीत्यर्थ उभारण्यांत आलेल्या मध्यवर्ती फंडाकडून मुंबई शहराचे वांटणीस जी रकम आली, त्यांतील २¾ लक्ष रुपये उरतात. असाध्य रोगांनीं पछाडलेल्या रोग्यांसाठीं इस्पितळ काढण्याकडे ह्या रकमेचा विनियोग करण्यांत येणार आहे. सध्या ह्या रोग्यांस नेहमींच्याच इस्पितळांत ठेवण्यांत येते व त्यामुळें इतर रोग्यांचीं संख्या त्या मानानें मर्यादित होते.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. ६ मार्च रोजीं पुरा झालेला आठवडा | ३१,४९,५३८ |
| ता. १३ मार्च रोजीं पुरा झालेला आठवडा | ६८,८०,२९४ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते १३ मार्च १९३६ अखेर | २,६४,३०,९८,६५२ |

## अनुक्रमणिका.


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १३८ | ५ मेंढ्यांची निगा आणि घोंगड्यांचा धंदा ... | १४२ |
| २ बँकांची आर्थिक शक्ति आणि कर्तव्यें ... | १३९ | ६ मुंबईमध्यें कॅनरी काढण्याची योजना | १४३ |
| ३ "पेशवे कालीन महाराष्ट्र" | १४० | ७ राष्ट्रसंघाविषयीं मनोरंजक माहिती ... | १४३ |
| ४ स्फुट विचार ... | १४० | ८ बँक ऑफ इंग्लंडचे गुप्त व्यवहार ... | १४४ |
| वजन-मापाच्या कायद्यांत दुरुस्ती !—पगार कपात आणि जादा कर— केंद्राच्या पुनर्रचनेचा खर्च— प्रांतिक कायदेमंडळ आणि सहकारी चळवळ— " मूले कुठारः " | | ९ इंडस्ट्रिअल इनव्हेस्टमेंट ट्रस्ट ... | १४४ |
| | | १० सहकारी चळवळ ... | १४५ |
| | | ११ लोकांनींचा तह ... | १४६ |



# अर्थ

बुधवार, ता. १८ मार्च १९३६


## बँकांची आर्थिक शक्ति आणि कर्तव्यें

### अनुभवी तज्ञांचा अभिप्राय

" बँकर्सचा सत्ता किंवा कर्तव्यें ह्यांचेसंबंधानें ऐकमत्य नाहीं. आपल्या ठेवीदारांचा पैसा सुरक्षित राखणें हें त्यांचें पहिलें कर्तव्य आहे, असें माझें स्वतःचें मत आहे. ह्या कर्तव्याशीं विसंगत नाहीं अशा रीतीनें करावयाचें आमचे जनतेविषयींचें दुसरें कर्तव्य म्हणजे गिऱ्हाइकांस पैशाची मदत व सल्ला देणें आणि एकंदरीनें आपला धंदा चोखपणानें चालवणें हें होय. बँकर्सची सत्ता व कर्तव्यें ह्यांचें क्षेत्र यापेक्षां अधिक व्यापक आहे, असें म्हणणारांचें मत मला मान्य नाहीं. समाजांत सर्वत्र हिंडून आमच्याकडून कर्जें घ्या म्हणून लोकांच्या मागें आम्हांस लागतां येत नाहीं किंवा जनतेवर विशिष्ट धोरण आपल्याच समजुतीप्रमाणें लादणें हेंहि माझ्या कल्पनेप्रमाणें इष्ट नाहीं. "—लॉइड्स बँकेचे अध्यक्ष, मि. बोमंट पीस, ह्यांचें बँकेच्या वार्षिक सभेच्या प्रसंगीं झालेलें भाषण.

आर्थिक मंदी व बेकारी दूर होण्यासाठीं ज्या योजना अमलांत येणें आवश्यक आहे, त्यांत बँकांनीं हलक्या व्याजाच्या दरानें लोकांस विस्तृत प्रमाणांत पैसा पुरवून त्यांची कमाई वाढवण्यास सहाय करण्याच्या जरूरीचा अंतर्भाव कित्येक लेखक अलीकडे करीत असतात. बँकांच्या हातांत इतका सामाजिक मालकीचा पैसा पडून राहिला असतां सामान्य जनतेस खर्चण्यास पैसा मिळत नाहीं, भांडवलाच्या अभावीं लोकांचे उद्योगधंदे नीट चालत नाहींत व बेकारी सारखी वाढत आहे, तेव्हां बँकर्सचें धोरणच चुकलें असून त्यांत फेरबदल झाला पाहिजे असें मत कित्येकांनीं व्यक्त केलें आहे. आपल्या व्यवहारासंबंधानें ह्या प्रकारची टीका चालली असतां त्याबाबत स्वतःचा जबाबदारी व कर्तव्य काय आहे, ह्याचें स्पष्टीकरण करण्याचें अगत्य बँकिंगच्या धंद्यांतल्या पुढाऱ्यांस वाटावें हें साहजिक आहे. लॉइड्स बँकेच्या चालकमंडळाचे अध्यक्ष, मि. बोमंट पीस, ह्यांनीं सदरहू बँकेच्या नकत्याच झालेल्या वार्षिक सभेंत भागीदारांस हा प्रश्न समजाऊन देऊन त्या संबंधांतलें आपलें मत निवेदन केलें, ( त्याचें सार आम्हीं वर उद्धृत केलें आहे ) त्याचा उद्देश उघड असून स्तुत्य आहे.

कित्येकांस असें वाटतें कीं बँकांस कर्जें देण्याचे बाबतींत अमर्याद वाव असून त्यांची वृत्ति गंजीवरील कुत्र्यासारखी असते व त्यामुळें जनतेचें नुकसान होतें. ह्यावर मि. पीस यांचें असें म्हणणें आहे कीं बँकर्सकडे पैशाची जी मागणी येते, त्या प्रत्येकीचा नीट विचार करून सुरक्षिततेच्या अंतिम मर्यादेच्या आंत राहूनच त्यांस निकाल करावा लागतो. बँकांनीं कोणते व्यवहार करावे ह्याविषयीं इतर लोकांनीं त्यांच्या चालकांस उपदेश करणें जसें चुकीचें आहे तसेंच जनतेनें विशिष्ट उद्योग हातीं घेऊन त्यांत पैसा गुंतवावा असें धंदेवाल्यांस बँकर्सनीं सांगणें गैर आहे अशी त्यांची विचारसरणी आहे. बँकांच्या व्यवहारांस कोणत्या मर्यादा आहेत हें त्यांच्या टीकाकारांस समजत नाहीं, असें नाहीं आणि ज्यांत पैशास धोका येण्याचा संभव आहे अशा व्यवहारांत बँकांनीं पडूं नये ही गोष्ट त्यांस कळते. तथापि, बँकिंगचा धंदा सरकारच्या हातांत किंवा नियंत्रणाखालीं गेल्यास लोकांस पैशाचा भरपूर पुरवठा होईल अशी त्यांची कल्पना असते. परंतु सुरक्षितपणाकडे विशेष लक्ष पुरवणाऱ्या बँकांस जे व्यवहार धोक्याचे वाटल्यानें करतां येत नाहींत, त्यांतला धोका बँकिंगची मालकी सरकारी खात्याकडे गेल्यानें कसा नाहींसा होणार ? असा ह्या संबंधांत मि. पीस ह्यांनीं सवाल केला आहे.

विशिष्ट ठिकाणीं किंवा प्रसंगीं असामान्य परिस्थिति निर्माण झाली असतां राष्ट्राच्या सरकारानें पुढें सरसावून जनतेच्या तर्फेनें आर्थिक व्यवहारांस सहाय देणें अगत्याचें होतें. असल्या परिस्थितींत बँकिंगचा धंदा करणाऱ्या संस्थांसहि आपल्या कारभाराच्या पद्धतीस थोडी मुरड घालून ह्या कार्यांतला आपला वांटा उचलावा लागतो. लोकांकडून ठेवींच्या मार्गानें आलेला पैसा कारखान्यांच्या कायम स्वरूपाच्या भांडवलांत अडकून ठेवूं द्यावयाचा नाहीं ह्या निश्चित तत्त्वाप्रमाणें ब्रिटिश बँका आजवर चालत आल्या आहेत. अलीकडे त्यांच्या जवळ पुष्कळ पैसा पडून राहिल्याकारणानें ह्या नियमाची अंमलबजावणी पूर्वी इतक्या कडक रीतीनें होत नाहीं आणि परिस्थितीप्रमाणें बँका आपल्या व्यवहारपद्धतींत योग्य फेरबदल करतात असें मि. पीस ह्यांचें म्हणणें आहे. बँकांची पैसा पुरवण्याची शक्ति आणि त्यांचें मुख्य कार्य ह्यांस, त्यांनीं अंगिकारिलेल्या जबाबदारीच्या स्पष्ट मर्यादा असतात. त्या ओळखल्या जाऊन बँकांच्या व्यावहारिक कर्तव्यक्षेत्रांत समाविष्ट होणाऱ्या अशाच बाबींत त्यांचेकडून सहाय मिळण्याची अपेक्षा असावी, हें त्यांच्या भाषणाचें सार आहे. बँकांजवळ पैसा पडून आहे आणि लोकांस पैसा हवा आहे, एवढ्यावरून वाटेल त्या प्रकारचीं व सर्व तऱ्हांच्या गरजू माणसांस कर्जें मिळावीं हा सिद्धांत निघत नाहीं. बँक ही ठेवीदारांचें हित पहाणारा ट्रस्टींची संस्था आहे आणि ट्रस्टींच्यावर जी जबाबदारी व जोखीम असते त्याच तऱ्हेची, सुरक्षितपणा व सुव्यवस्था ह्यांचे बाबतींत, सदरहू संस्थेवर जबाबदारी असते, हें नेहमी सर्वांनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे.

---

## " पेशवेकालीन महाराष्ट्र " *

आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या महाराष्ट्राविषयींच्या ऐतिहासिक ग्रंथांतून मागील पिढ्यांतील लोकांच्या कामगिरीची माहिती उपलब्ध होते व लढाया, स्वाऱ्या, तह इत्यादि राजकीय घडामोडींचा तपशील वाचावयास मिळतो. वास्तविक पहातां हीं वर्णनें वस्तुस्थितीचें ज्ञान होण्यास आवश्यक असलीं तरी त्यांपासून सामाजिक जीवनाच्या एकाच अंगावर प्रकाश पडतो. राजकीय घडामोडींवरच समाजाचा जिवंतपणा अवलंबून रहाणें अपरिहार्य असलें, तरी आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक इत्यादि अंगोपांगांच्या समुच्चयाचेंच समाज हें दृश्य स्वरूप असतें, हें विसरतां कामा नये. ह्या दृष्टीनें पहातां, महाराष्ट्राचे अंतरंग साकल्यानें दर्शविणारे ग्रंथ विशेष बोधप्रद व वाचनीय झाल्यावांचून रहाणार नाहींत. न्यायमूर्ति रानडे ह्यांनीं पेशव्यांच्या रोजनिशांच्या आधारावर अशा तऱ्हेचा व्यवस्थित उपक्रम प्रथम केला. श्री. वासुदेव कृष्ण भावे ह्यांचा 'पेशवेकालीन महाराष्ट्र' हा ग्रंथ त्याचें विस्तृत स्वरूपांत अनुकरण असून अथपासून इतिपर्यंत त्यांत सामाजिक जीवनावर प्रकाश पाडणारी हरतऱ्हेची माहिती सुव्यवस्थित रीतीनें सजवलेली आहे. अलीकडे ह्या प्रकारची पुष्कळ नवी माहिती उपलब्ध झाली आहे व ग्रंथकर्त्यानें तिचा उपयोग केला आहे. मराठ्यांच्या लढायांचा व राजकर्त्यांच्या कारकीर्दीचा इतिहास इतर अनेक पुस्तकांत आढळत असल्याकारणानें त्याचा पुनरुच्चार वरील ग्रंथांत अर्थातच केलेला नाहीं. शाहू महाराजांपासून पेशवाई अखेरपर्यंतचा कालखंड लेखनासाठीं निवडण्यांत आला असून त्या मुदतींमधील अनेक उपलब्ध कागदपत्रांच्या परिशीलनाच्या आधारावरच ग्रंथाची रचना करण्यांत आली आहे. सुमारें तीस भिन्न भिन्न विषयांसंबंधाची माहिती तितक्या प्रकरणांत स्वतंत्र रीतीनें मांडण्यांत आली असल्यानें 'पेशवेकालीन महाराष्ट्रां'त तत्कालिन परिस्थितीचें वस्तुस्थितिनिदर्शक शब्दचित्र उमटलेलें आढळतें.

लोकांची रहाणी, त्यांच्या चालीरीति, त्यांच्या कल्पना व समजुती ह्यांविषयींच्या बारीक सारीक उल्लेखांचीहि नोंद घेऊन ग्रंथकर्त्यानें योग्य प्रकरणांत त्यांची एकसूत्री जुळणी केली आहे. राज्यव्यवस्थेपासून भोजनसमारंभापर्यंत लहानमोठ्या बाबींचा ह्या रीतीनें पुस्तकांत परामर्श घेण्यांत आला आहे. सध्याच्या बदललेल्या काळांत ग्रेटब्रिटनमध्यें व्हिक्टोरिया राणीच्या गेल्या शतकाच्या पूर्वार्धांतील काळांतल्या सामाजिक रिवाजांचा उल्लेख तुलनात्मक बुद्धीनें कुतूहलपूर्वक व विनोदानें केला जातो, त्याप्रमाणेंच, महाराष्ट्रीयांच्या चालू पिढीस, श्री. भावे ह्यांनीं वर्णिलेला अनेक बाबतींतला 'पेशवाई थाट' मनोरंजक वाटल्याशिवाय राहणार नाहीं. प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक कागदपत्रांची छाननी करून विल्हेवारी लावणें, त्यांतले उल्लेख भिन्नभिन्न विषयांच्या सदरांत टाकून ते संगतवार जुळवणें आणि त्यांची कथानकें चटकदार रीतीनें वाचकांपुढें ठेवणें हें काम ग्रंथकर्त्यानें मोठ्या परिश्रमानें व कौशल्यानें केलें आहे. सर्वच प्रकरणें वाचनीय बनलीं असल्यानें त्यांत निवड करून विशिष्ट विषयांचा उल्लेखहि करणें ह्या परीक्षणांत शक्य नाहीं. श्री. भावे ह्यांनीं प्रस्तुत सुंदर ग्रंथ निर्माण केल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. त्याच्या वाचनानें जनतेस मनोरंजनाबरोबर महाराष्ट्राच्या पेशवेकालीन जीवनाचें यथातथ्य ज्ञान प्राप्त होण्यास सहाय झाल्यावांचून रहाणार नाहीं.

*लेखकः—श्री. वासुदेव कृष्ण भावे, बी. ए. पृ. सं. ५५८ किं. ३ रु.

# स्फुट विचार

### वजन-मापांच्या कायद्यांत दुरुस्ती ?

युरोपिअन चेंबरच्या वार्षिक सभेंत, वजन-मापाचा कायदा चालू आहे, त्याच्या दुरुस्तीसंबंधानें एक सूचना मि. कुक ह्यांनीं आपल्या भाषणांत केली, तिकडे सरकार व व्यापारी मंडळी यांचें लक्ष्य वेधणें आवश्यक आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें प्रचलित असलेल्या कायद्याच्या धर्तीवर मुंबई सरकारनें घाउक खरेदी-विक्रीच्या व्यवहारांबाबत येथील कायद्यांतलीं कलमें बदलावीं असें ह्यांचें म्हणणें आहे. ब्रिटिश कायदा मूळ घाउक खरेदी-विक्रीस लागू नसून किरकोळ व्यवहारांतच त्याची अंमलबजावणी होते. मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री करणाऱ्या धंदेवाल्यांस कायद्याच्या संरक्षणाची आवश्यकता नाहीं. सामान्य जनतेस मात्र बाजारांत योग्य वजन आणि माप मिळालें पाहिजे ह्यासंबंधानें ब्रिटिश कायद्याचा कटाक्ष आहे. तेंच तत्त्व मुंबई इलाख्यांत लावलें जावें आणि सरकारनें त्यास अनुसरून सध्याच्या कायद्यांत दुरुस्ती करावी अशी मि. कुक ह्यांची सूचना आहे. ह्या संबंधांत महाराष्ट्रांतील व्यापारी वर्गाचें काय म्हणणें आहे, ह्याची चौकशी मराठा चेंबर ऑफ कॉमर्सनें करण्याजोगी आहे. वर सुचविलेल्या दुरुस्तीपासून आमच्या व्यापाऱ्यांस कांहीं सवलत मिळण्यासारखी असेल किंवा ती झाल्यानें त्यांच्या व्यवहाराच्या मार्गांतल्या विशिष्ट अडचणी दूर होणें शक्य असेल तर मराठा चेंबरनें सदरहु सूचनेस पाठिंबा देऊन सरकारास व्यापारी वर्गाचें म्हणणें रीतसर कळवावें. चालू कायदा आतां सर्व जिल्ह्यांस लागू करण्यांत आला आहे. त्याच्या अंमलबजावणीचा आलेला अनुभव लक्ष्यांत घेतां खुद्द सरकारासच त्यांत कित्येक दुरुस्त्या करणें जरूर वाटेल. इतर सुधारणाहि कायद्यांत घडवून आणण्यास ह्या प्रसंगीं संधी मिळेल आणि तिचा फायदा आमच्या व्यापाऱ्यांनीं वेळींच घेणें अगत्याचें आहे.

---

### पगार-कपात आणि जादा कर बरोबरच गेले पाहिजेत

मुंबईच्या युरोपिअन व्यापारी मंडळाचा (चेंबर) शतसांवत्सरिक उत्सव चालू सालीं साजरा होणार आहे, यावरून युरोपिअन व्यापाऱ्यांचें आपल्या हितसंबंधांच्या संरक्षणाचें कार्य कसें संघटित रीतीनें, धिमेपणानें व सातत्यानें चालतें ह्याची कल्पना येईल. मंडळाची वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत भरली होती, त्या प्रसंगीं वक्त्यांनीं गेल्या सालीं घडलेल्या महत्त्वाच्या बाबींचा उल्लेख करून आर्थिक घडामोडींचं समालोचन केलें. जगाची बिघडलेली परिस्थिति अजूनहि सुधारली नसून प्रत्यक्ष युद्ध व भावी युद्धाची भीति ह्यांनीं नवीनच काळजी उत्पन्न केली असल्यानें हिंदी फडनवीसांनीं केलेला भरभराटीचा अंदाज खरा ठरो अशी शुभाशा प्रकट करण्यापलीकडे ह्या वक्त्यांस जातां येणें शक्य नव्हतें व सर जॉन अबरक्रॉबी ह्यांनीं विजेवरील कर तात्पुरता म्हणून मुळांत बसवण्यांत आला तरी दरवर्षी कोर्ट फी व स्टँप ड्यूटी ह्यांच्या बरोबर तो चालू ठेवण्यांत येत असल्याविषयीं तक्रार केली. मध्यवर्ती व प्रांतिक बजेटाच्या संबंधांत " विशेष अडचणीचा प्रसंग "हा शब्द-प्रयोग व्यर्थी करण्यांत येत असतो; लोकांवरील करांचा प्रश्न असला कीं, ती अल्पकालिक बाब चिरंजिवी होते आणि सरकारी नोकरांच्या पगारांतली कपात मात्र अल्पायुषी असून जादा कर चालू राहिले तरी

ती दूर करण्यांत येत. कपात व नवे कर हे उपाय बरोबर विशिष्ट सांपत्तिक अडचणीमुळें आले, ते दोन्ही बरोबरच नाहींसे झाले पाहिजेत; तस न होतां नोकरांचे पगार पूर्वीसारखे झाले, पण जादा कर मात्र शिल्लक राहिले असा त्यांच्या म्हणण्याचा आशय होता. युरोपिअन चेंबरच्या सभेस गव्हर्नर-साहेब हजर होते. त्यांस वरील खोचदार विधानास उत्तर देणें प्राप्तच झालें. अखिल भारतीय गटांतील नोकरांचे पगार वाजवीपेक्षां लवकर पूर्वस्थळावर आले, ह्याचा दोष मध्यवर्ती किंवा प्रांतिक सरकाराचा नसून ती सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या अधिकारांतली गोष्ट आहे असें त्यांनीं सांगितलें. पण प्रांतिक गटांतल्या नोकरांवरची सत्ता तरी मुंबई सरकाराच्या हातांत होती, मग त्यांचे पगार पूर्वीसारखे करण्याची जबाबदारी मुंबई सरकारावर पडत नाहीं काय ? हा प्रश्न सहजच उपस्थित होतो. एका गटांतल्या नोकरांस सवलत मिळाली असतां दुसऱ्यांस ती नाकारणें सरळ झालें नसतें व ह्या प्रांतिक दर्जाच्या नोकरांस तक्रार करण्यास योग्य कारण मिळालें असतें हें गव्हर्नरसाहेबांनीं केलेलें स्पष्टीकरण त्यांच्या श्रोत्यांस पटलें असेल असें वाटत नाहीं.

### केंद्राच्या पुनर्रचनेचा खर्च कोठून करावा ?

"अर्था"च्या गेल्या आठवड्याच्या अंकांतील अग्रलेखांत आम्हीं केंद्राच्या पुनर्रचनेसाठी खर्चीं पडावयाच्या रकमा मामुली उत्पन्नांतून घेण्याविषयींची सर जेम्स ग्रिग ह्यांची योजना आहे, तिच्यावर टीका करून त्यांचें धोरण कसें चुकलें आहे, ह्याचें विवेचन केलें होतें. लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत हिंदुस्थानसरकारच्या बजेटांत दाखल असलेल्या मागण्यांचा विचार चालू असतां सर कावसजी जहांगिर ह्यांनीं सदरहु प्रश्न उपस्थित करून बलुचिस्थानच्या खर्चाच्या मागणींत कपात सुचवली. सरकारी कर्जाच्या फेडीसाठी दरवर्षी करावयाची तरतूद अत्यंत अल्प असल्यानें अनुत्पादक कर्जांत भर घालून केंद्रावर खर्च करण्याच्या ऐवजीं तो मामुली उत्पन्नांतून करावा हा फडनवीसांची विचारसरणी असून असेंब्लींत झालेल्या चर्चेंत त्यांनीं तिचा पुनरुच्चार केला. ह्याविरुद्ध मत असलेल्या सभासदांनीं आम्हीं गेल्या अंकांत पुढें मांडलेल्या मुद्यांचा अनुवाद करून ज्या पैशाच्या विनियोगाचा फायदा पुढें येणाऱ्या अनेक पिढ्या घेणार त्याचा बोजा आज कर देणाऱ्या जनतेवर टाकणें युक्त नाहीं असें सांगितलें. फडनवीसांच्या हातांत पैसा उत्पन्नाच्या वाढाव्यामुळें आलेला आहे तो जादा करांच्या जमेंतला आहे, हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे, आणि असा वाढावा त्यांस मिळाला नसता तर त्यांनीं केंद्रासाठी कर्जांतूनच खर्च करावा असें सुचवलें असतें. सर जेम्स ग्रिग ह्यांची योजना मान्य करणं म्हणजे सरकारचें उत्पन्न वाढलें असतांहि जादा कर चालू ठेवण्यास मान्यता देणें होय, हें ओघानेंच प्राप्त होतें. सर कावसजी जहांगीर ह्यांनीं सुचविलेली कपात मोठ्या बहुमतानें मंजूर झाली व सरकारचा पराभव झाला.

### प्रांतिक कायदेमंडळ आणि सहकारी चळवळ

खर्चासाठी सरकारनें केलेल्या मागण्यांची चर्चा मुंबई कायदे कौन्सिलांत चालली असतां सहकारी चळवळीविषयींच्या कित्येक महत्त्वाच्या प्रश्नांवर गेल्या आठवड्यांत मनोरंजक वादविवाद झाला. सरकारी खात्यांच्या कारभारांतील दोषांचें आविष्करण व सुधारणेच्या दृष्टीनें केलेल्या विधायक सूचना ह्यांच्या स्वरूपांत वरील प्रकारच्या चर्चेचा चांगला उपयोग होतो. सभासदांस मन मोकळें करून बोलण्यास आणि सरकारच्या प्रतिनिधींस आपल्या धोरणाचें स्पष्टीकरण करण्यास बजेटाच्या तपशीलवार छाननीनें उत्कृष्ट संधि मिळते. गेल्या आठवड्यांतील वादविवादांत सहकारी पेढ्या व बँका ह्यांचेंकडून ऑडिट फी सरकार वसूल करतें ती जबर असल्याविषयीं तक्रार करण्यांत आली. जमीन गहाणाच्या बँका नुकत्याच स्थापन झाल्या आहेत, त्यांस प्रारंभीं तूट येईल. ती भरून निघण्यासाठीं पहिल्या वर्षीं पंधरा हजार रुपयांपर्यंत सरकारी मदत मिळावयाची आहे ती अपुरी पडणार असून ही मदत अधिक सढळ हातानें सरकारनें दिली नाहीं तर सदरहु बँकांचा उपक्रम अयशस्वी ठरेल, अशी भीतिहि व्यक्त केली गेली. सहकारी चळवळीचे मुख्य उद्देश साध्य झाले नसल्यानें ती सध्याच्या खात्याकडून काढून घेऊन सरकारनें जिल्हा कलेक्टरांच्या हातीं द्यावी अशी सूचना एका बाजूनें पुढें आली असतां ती अग्राह्य असून चळवळींतले दोष नाहींसे करण्याचा प्रयत्न मात्र अवश्य झाला पाहिजे, असा अभिप्राय दुसऱ्या बाजूनें प्रकट करण्यांत आला. शेतकऱ्यांच्या कर्जाचें निवारण आणि तुकडे उडालेल्या शेतांचें एकीकरण ह्यांचे बाबतींत ज्यास्त उपाययोजना व्हावी अशीहि सूचना सरकारपुढें मांडण्यांत आली.

### "मूले कुठारः"च्या स्वरूपाचे दोन प्रश्न

वरील वादविवादाच्या ओघांत तात्त्विक महत्त्वाचे दोन प्रश्न उपस्थित करण्यांत आले आणि त्यांच्या मूलग्राही स्वरूपास अनुलक्षून कायदेमंडळाच्या अध्यक्षांनीं ते विशद करून सांगितले व सरकारनें त्यासंबंधांत स्पष्ट खुलासा करावा असें सुचवलें. त्यांपैकीं पहिला प्रश्न तर "मूले कुठारः" ह्या स्वरूपाचा होता. १९२५ सालअखेर मुंबई सरकारनें एक ठराव प्रसिद्ध केला आणि सहकारी खातें 'सोपीव' खातें म्हणून स्थापन झाल्याचें जाहीर केलें. परंतु ह्या स्थापनेस कायदेमंडळाची मंजुरी घेण्यांत आली होती काय आणि ती घेतली नसल्यास सहकारी खातें विनकायदेशीर ठरत नाहीं काय, ह्या आशयाचा सदरहु प्रश्न आहे. तथापि तो अनपेक्षितपणानें व अचानक रीतीनें उपस्थित केला गेल्यामुळें त्याबाबत चौकशी करून कायदेमंडळाचें समाधान करण्यास सरकारास योग्य वेळ देणें आवश्यक आहे, असें अध्यक्षांनीं सांगितल्यावरून हें प्रकरण तथेंच थांबलें. जमीन गहाणाची प्रांतिक बँक डिबेंचर्सच्या मार्गानें बाजारांत कर्ज उभें करील, त्याच्या ५० लक्ष रुपयांपर्यंत मुद्दल व व्याज ह्यांचेबद्दल सरकारनें हमी घ्यावी असा ठराव कायदेमंडळाच्या मागील बैठकींत मंजूर झाला होता. सरकारनें सुचविलेल्या मूळ ठरावांत १० लक्षांची रकम दाखल होती, ती कायदेमंडळानें ५० लक्ष केली होती. ह्या ठरावाचें सरकारनें काय केलें असा दुसरा महत्त्वाचा प्रश्न पुढें आला व त्याचें सरकारनें उत्तर द्यावें अशी अध्यक्षांनीं इच्छा दर्शविली. कौन्सिलनें ५० लक्षांची रकम हमीदाखल मंजूर केली तरी ती सरकारवर बंधनकारक होऊं शकत नाहीं, असें वरील शंकेस उत्तर देण्यांत आलें. कौन्सिलच्या ठरावाचा एक भाग मान्य व दुसरा अमान्य असें सरकारास कसें म्हणतां येईल ही त्याच्यावर अडचण निघाली. कारण, जमीन गहाणाच्या मध्यवर्ती बँकेस त्याच ठरावांत मान्यता दिलेली आहे आणि सबंद ठराव सरकारनें मान्य न केल्यास त्या बँकेच्या स्थापनेस दिलेली मंजुरीहि रद्द होईल अशी आपत्ति उत्पन्न होते. वरील ठरावास गव्हर्नर-इन्-कौन्सिल ह्यांनीं संमति दिली आहे किंवा नाहीं ह्याचीहि माहिती सरकारतर्फे कायदेमंडळास मिळूं शकली नाहीं. प्रस्तुत दोन्ही बाबींचा सरकारास समाधानकारक खुलासा करावा लागून त्यासंबंधांत योग्य ती तरतूद करावी लागेल.

## मुंबई इलाख्यांतील छापखान्यांत काम करणारे कामगार

मुंबई इलाख्यांतील ( सिंध वगळून ) छापखान्यांत काम करणाऱ्या कामगारांचें वेतन, कामाचे तास, इत्यादि विषयांची, पहाणी मुंबई सरकारच्या लेबर ऑफिसनें केली, त्या संबंधाचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे.

फॅक्टरी ॲक्टाखाली नोंदण्यांत आलेल्या छापखान्यांची एकूण संख्या बरोबर १०० भरते. ह्या खेरीज, लहान सहान छापखाने कित्येक आहेत, ते वेगळेच. अहवालांत वरील फक्त १०० कारखान्यांतील कामगारांसंबधींच माहिती देण्यांत आली आहे. त्या सर्वांत मिळून ८,६६८ लोक कामावर आहेत. एकट्या मुंबई शहरांतच ६२ छापखाने असून त्यांत ६,१०९ कामगार आहेत. सबंद इलाख्यांतील उपरिनिर्दिष्ट सर्व कारखान्यांत मिळून १,७९६ पुरुष, ६ स्त्रिया व १ मुलगा खिळे जुळविण्याचें काम करतात. इतर धंद्यांतील नोकरीपेक्षां छापखान्यांतील नोकरी ज्यास्त टिकाऊ स्वरूपाची असते, असें दिसून येतें. शेंकडा ९३ कामगारांचा पगार दर महिनाअखेर चुकता करण्यांत येतो व उरलेल्या बहुतेकांस प्रत्येक आठवड्यास वेतन मिळतें.

## लक्ष्मी कॉटन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

दि बॉंबे कंपनी लि.कडे ह्या गिरणीची व्यवस्था आहे. ३१ डिसेंबर १९३५ अखेर संपलेल्या वर्षांत सोलापूर येथील ह्या गिरणीस ७८ हजार रुपये नुकसान आलें, परंतु मागील सालांतून ओढलेली बाकी व डिव्हिडंड आणि रिझर्व फंडांतून काढलेल्या रकमा ह्यांतून ९८ हजार रुपये नफा वांटणीसाठी घेऊन दर भागास १२ रु. ८ आ. डिव्हिडंड वांटण्याचें ठरलें. कपाशीच्या किंमतींत वाढ झाली तरी तयार कापडाचे भाव चढले नाहींत, मुंबईच्या गिरण्यांची अत्यंत अनिष्ट स्पर्धा होते, सोलापूर जिल्ह्यांतच नव्या गिरण्या स्थापन झाल्यानें परिस्थिति जास्तच बिकट झाली, चोपन तासांच्या आठवड्यानें मजूरी वाढून कार्यक्षमतेंत मात्र कांहीं फरक पडला नाहीं, इत्यादि गोष्टींचा अहवालांत उल्लेख आहे. बॉंबे कंपनी लि.कडेच व्यवस्था असलेल्या विष्णू कॉटन मिलनें प्रेफरन्स भागास ३५ रु. व ऑर्डिनरी भागास करमाफ ५० रु. अशी वांटणी केली.

## म्हैसूर संस्थानच्या सरकारी नोकरांचा कर्जबाजारीपणा: खातेवार सहकारी सोसायट्यांची स्थापना

म्हैसूरच्या सरकारी नोकरांत, विशेषतः मध्यम व कनिष्ठ वर्गांतील नोकरांत, पसरलेला कर्जबाजारीपणा कसा कमी करावा, ह्यासंबंधीं योजना सुचविण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली होती. हे अंमलदार व नोकर वेगवेगळ्या ठिकाणच्या अनेक सोसायट्यांचे सभासद असल्यानें त्यांस एकाच वेळीं कित्येक सोसायट्यांकडून कर्ज काढतां येतें. ह्यासतोड अशी सुचविण्यांत आली आहे, कीं सरकारी खात्यानिहाय सोसायट्या स्थापन करण्यांत याव्या व नोकरवर्गास इतर सोसायट्यांचे सभासद होण्यास प्रतिबंध करावा. असें झालें म्हणजे हल्लींचीं त्यांचीं कर्जें नव्या सोसायट्यांकडे वर्ग करण्यांत येतील व जरूर त्या रकमा पगारांतून वसूल करण्यांत येतील.

## मेंढ्यांची निगा आणि घोंगड्यांचा धंदा

खेडेगांवाच्या सुधारणेच्या प्रश्नास सध्या चालना मिळाली असून त्याच्या चर्चेंत खेडेगांवीं धंद्यांच्या पुनरुज्जीवनाचा प्रामुख्यानें अंतर्भाव होतो. अशा धंद्यांपैकीं लोकरीच्या घोंगड्या विणण्याचा आणि धनगरांचा मेंढ्या पाळण्याचा उद्योग बराच महत्त्वाचा आहे. इतर स्वदेशी धंदे मागे पडले त्यास जीं कारणें झालीं, तींच ह्या धंद्याच्या ऱ्हासाच्या मुळाशीं आहेत. आधुनिक पद्धतीनें विलायती आणि देशी कारखान्यांत बनविण्यांत येणाऱ्या स्वस्त ब्लॅंकेटांची स्पर्धा, मेंढ्यांची निपज व त्यांची योग्य निगा राखण्याचें काम ह्या बाबतची अनास्था आणि लोकांच्या अभिरुचींत घडून आलेला बदल ह्यांमुळें देशी धनगर व लोकरीचे विणकर ह्यांच्या उद्योगाची पीछेहाट झाली आहे. म्हैसूर संस्थान अनेक बाबतींत पुढें गेलें आहे. तेथें ह्या धंद्यासंबंधानें काय परिस्थिति आहे आणि कोणत्या सुधारणा होणें आवश्यक आहे, ह्याविषयीं जागृति उत्पन्न करण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यासंबंधानें थोडी माहिती खाली दिली आहे:—म्हैसूर संस्थानांत २८ लक्षांवर मेंढ्या असून हवापाण्याच्या अनुकूल परिस्थितीमुळें शेजारच्या मद्रास व मुंबई इलाख्यांतल्या जिल्ह्यांच्या मानानें त्यांची प्रतवारी वरच्या दर्जाची आहे. मेंढ्यांचा उपयोग, त्यांचें मांस व लोकर ह्यांच्या दृष्टीनें दुहजवी होत असल्यानें धनगर लोक त्यांची संख्या वाढवून पैसे करण्याकडे जास्त लक्ष्य देतात आणि लोकरीच्या वाढीकडे दुर्लक्ष्य होतें. मेंढ्यांची लोकर वर्षांतून दोनदा व निष्काळजीपणानें काढल्याकारणानें ती चांगली निघत नाहीं आणि तिचा धागा सकस रहात नाहीं. मेंढ्या चारण्यास पुरेसें क्षेत्र उपलब्ध होत नाहीं, अज्ञानामुळें धनगर लोक आपल्या धंद्यांत प्रगति करण्यास तयार नसतात आणि त्यांत सुधारणा व प्रयोग करण्यास आवश्यक असलेला पैसा मिळत नाहीं, ह्या अडचणी येथें भासतात. ह्या सर्व बाबतींत सद्यःस्थिति सुधारण्यास पुष्कळ वाव आहे. म्हैसूर संस्थानांत लोकरीच्या घोंगड्या विणणारीं ७,५०० कुटुंबें आहेत. इटलीसारख्या बाहेरच्या देशांतून येणाऱ्या मालाची चढाओढ त्यांस व धनगरांस आज जाणवत आहे. विणकर लोक धनगरांपासून अल्प किंमत देऊन लोकर खरेदी करतात आणि तिचा उपयोग बहुंशीं कांबळींच बनवण्याकडे केला जातो. स्वदेशी कारखान्यांत सर्व प्रकारांचें लोकरीचें कापड तयार होऊं शकत नाहीं, कारण ह्यांपैकीं प्रत्येक तऱ्हांस स्वतंत्र रीतीचीं यंत्रें जरूर असतात आणि तीं येथें परवडत नाहींत. स्थानिक कारखान्यांत मुख्यत्वेंकरून ब्लॅंकेटें व रग्ज तयार होतात. स्वस्त विलायती ब्लॅंकेटें बाजारांत आल्यानें देशी कांबळ्या मागें पडत चालल्या आहेत. देशी धंद्यास संरक्षण मिळून धनगर व लोकरीचे विणकर ह्यांच्या उद्योगास उत्तेजन मिळेल, अशी तजवीज होणें अत्यंत आवश्यक आहे. औद्योगिक संरक्षणासाठी बसविलेल्या जकातीच्या उत्पन्नांतून ह्या खेडेगांवी धंद्यास सहाय मिळालें पाहिजे. ह्या प्रकारचा अल्पसा उपक्रम हिंदुस्थान सरकारनें अलीकडे केला आहे.

## बादशहांच्या मृत्युसंस्कारासाठीं ३२ लक्ष रुपये खर्च आला

मरहूम पंचम जॉर्ज ह्यांच्या मृत्युसंस्कारास सुमारें ३२ लक्ष रुपये खर्च आला. इतर देशांतून आलेल्या पाहुण्यांप्रीत्यर्थ झालेल्या खर्चाचाहि ह्यांत समावेश होतो.

## फळें व त्यांचे पदार्थ टिकविण्याकरितां मुंबईमध्यें 'कॅनरी' काढण्याची योजना

लेखक:—एस. एस. भट, एम्. एजी., शेतकी कॉलेज, पुणें.
भाषांतरकार:—के. जी. कोल्हटकर, बी. एजी.

( मागील अंकावरून चालू )

**३ कागदी लिंबें**—टिकण्याचे पदार्थ बनविण्यांत कागदी लिंबाचा तिसरा नंबर लागतो. त्याच्या झाडांना लाग बहुतेक वर्षभर सारखा असतोच परंतु विशेषेंकरून पावसाळयांत व हिंवाळयांत एकंदर लागापैकीं शेंकडा ७० टक्के लाग असतो व ह्या वेळेस त्यास मागणी मात्र फारच कमी असते. उन्हाळयांत या फळांना मागणी फार असते, परंतु माल कमी असल्यानें भाव चांगला मिळतो. पावसाळयांतील मालाचीं सरबतें, लोणचीं वगैरे टिकाऊ पदार्थ बनवून त्यांची उन्हाळयांत विक्री केल्यास बागवानांना फायदा झाल्याशिवाय राहाणार नाहीं.लिंबाच्या पदार्थांस उन्हाळयांत मागणी फार असते हें निराळें सांगावयास नकोच.

कागदी लिंबाच्या लागवडीखालीं असणारें जिल्हेवार क्षेत्र खालीं दिलें आहे, ह्या फळांचें १०० एकरवर क्षेत्र ज्या जिल्ह्यांत आहे असेच जिल्हे खालीं देण्यांत आले आहेत.

| | |
|---|---|
| खेडा | ५९८ एकर |
| पुणें | ४८१ ,, |
| अहमदनगर | ४०४ ,, |
| नाशिक | २०८ ,, |
| अहमदाबाद | १८३ ,, |
| सोलापूर | १७८ ,, |
| धारवाड | १६३ ,, |
| प. खानदेश | १५७ ,, |
| पू. खानदेश | १४१ ,, |
| सातारा | ११९ ,, |

वरील क्षेत्रांवरून आपणांस असें दिसून येईल कीं, खेडा, पुणें व अहमदनगर या तीन जिल्ह्यांत कागदी लिंबाची लागवड फार आहे. सर्व जातींच्या लोकांना कागदी लिंबांची आवड आहे व त्यामुळें जेथें त्यांची लागवड होते त्याच ठिकाणीं त्याचा खपहि पण पुष्कळ होतो. त्याचप्रमाणें पुणें मुंबईसारख्या मोठ्या शहरांतूनहि याला पुष्कळ मागणी असते. उत्तर हिंदुस्थानांत सुद्धां बराचसा माल इकडून रवाना होतो. इतकें असून सुद्धां पावसाळयांत व हिंवाळयांत या फळांचा फार भर असल्यानें मालाला बिलकूल भाव येत नाहीं व हजारों रुपयांचा माल वाया जातो अशा वेळेला याचें टिकाऊ पदार्थ बनवून उन्हाळयांत जेव्हां फार मागणी असते त्या वेळेस विकणें किफायतशीर झाल्याविना रहाणार नाहीं. मुंबईसारख्या शहरांत उन्हाळयांत लिंबाच्या सरबताला बरीच मागणी असते.

### ११ दुसरीं फळें व भाज्या यांचा उपयोग

( १ ) नारिंगें ( संत्रीं व मोसंबी ) या फळांचें सायरप, लोणचीं वगैरे टिकाऊ पदार्थ तयार करतां येतात. या फळझाडांची लागवडहि या भागांत बरीच असून फळें पुष्कळच स्वस्त दरानें मिळूं शकतात; यांच्या रसाला लिंबाच्या रसाइतकी मागणी नसते. या इलाख्यांत संत्रीं-मोसंब्यांच्या लागवडीखालीं एकंदर ८००० एकर जमीन आहे व पुणें व अहमदनगर या जिल्ह्यांतून याची लागवड **सर्वांत जास्त आहे.**

( २ ) अननस—अननस हें फळ 'कॅनिंग' करून ठेवण्याजोगें आहे. परंतु आपल्याकडे होणारे अननस हे फार कमी दर्जाचे असतात. 'क्यू क्वीन' ( सिंगापूर ) या जातीच्या अननसाची लागवड या इलाख्यांत अजून मोठ्या प्रमाणांत झाली नाहीं परंतु त्याची लागवड येथें झाल्यास सुद्धां सिंगापुरहून येणाऱ्या मालाबरोबर आपणांस कितपत टक्कर देतां येईल याची शंकाच आहे.

( ३ ) जांभूळ—हीं फळें 'सायरप' बनविण्यास चांगलीं असतात. या फळांत मधुमेह रोगावर मारक अशीं औषधीद्रव्यें आहेत असें म्हणतात. याच्या पदार्थांना बाजारांत फारशी मागणी नाहीं.

( ४ ) भाज्या:—घेवडे, सेलेरी वगैरे भाज्यांचें 'कॅनिंग' करण्यास हरकत नाहीं. आजपर्यंत हिंदुस्थानांत यावर फारसे प्रयत्न कोणी केले नाहींत परंतु त्याचा पूर्ण अभ्यास करून 'कॅनिंग' करून ते स्वदेशांत व परदेशांत खपविण्यास कांहींच हरकत नाहीं. कॅनिंग करण्यास योग्य असणाऱ्या वस्तूंची यादी आणखीहि पुष्कळ लांबेल, परंतु लांबलचक यादी देण्यांत कांहीं फायदा नसून थोड्याशाच वस्तूंचा प्रयोग करून खरीखुरी सुरवात करून अनुभव मिळविण्यांतच खरा फायदा आहे.

### १२ कॅनरींत काम करण्याचे दिवस

कॅनिंग करण्यास तीनच प्रमुख फळें उपयोगांत आणलीं तर खालीं लिहिल्याप्रमाणें प्रत्येकीं काम करण्याचे दिवस लागतील.

| | |
|---|---|
| आंबा | मे ते जून ( ६० दिवस ) |
| कागदी लिंबू | जुलै ते सप्टेंबर ( ९० दिवस ) |
| पेरू | नोव्हेंबर ते जानेवारी ( ९० दिवस ) |

वरील कार्यक्रमाप्रमाणें कारखाना वर्षांतून २४० दिवस चालू शकेल व उरलेले १२५ दिवसांत कच्च्या आंब्यांचीं लोणचीं वगैरे किरकोळ गोष्टी बनविल्यास थोडेसें जास्त उत्पन्न येईल.

## राष्ट्रसंघाविषयीं मनोरंजक माहिती

राष्ट्रसंघाच्या कार्यकारी खात्यांत १,००० च्या वर नोकर आहेत. त्यांपैकीं सुमारें ६५० स्त्रिस असून ते कारकुनी पेशाचे आहेत. संघाचें मुख्य ठिकाण स्वित्सर्लंड असल्यानें तेथील रहिवाशांस ह्या जागांवर नेमणें खर्चाच्या दृष्टीनें सोयीचें आहे.बाकीचे ३५० अधिकारी राजकीय व तज्ज्ञ खात्यांत काम करतात. राष्ट्रसंघाचे एकूण सभासद ५४ राष्ट्रें आहेत आणि वरील ३५० अधिकारी त्यांपैकीं ४५ राष्ट्रांचे नागरिक आहेत. म्हणजे, कांहीं राष्ट्रांचे प्रतिनिधि संघाच्या नोकरींत मुळींच नाहींत, ह्याचें कारण त्यांमध्यें लायक माणसें मिळण्यास अडचण पडते. ३५० अधिकाऱ्यांच्या जागांपैकीं फक्त ६ हिंदी लोकांच्या वांट्यास आल्या आहेत, व त्या चांगल्या दर्जाच्या आहेत. दोन जागा रिकाम्या झाल्या असून त्यासाठीं हिंदुस्थानांत जाहिरात देऊन अर्ज मागवण्यांत आले आहेत. निरनिराळया पत्रांचे १०० बातमीदार जिनीव्हा येथें कायमचें ठाणें देऊन असतात व विशेषप्रसंगीं त्यांची संख्या ४०० पर्यंत जाते. हिंदुस्थानांतील एकाहि वृत्तपत्राचा कायमचा प्रतिनिधि येथें नाहीं. २५-३० राष्ट्रांच्या सरकारांनीं आपल्या प्रतिनिधींचीं मंडळें जिनीव्हास स्थायी केलीं आहेत. राष्ट्रसंघास हिंदुस्थानकडून वर्गणी म्हणून बरीच मोठी रकम मिळते आणि गेल्या पंधरा वर्षांत दर माणशी एक आणा ह्याप्रमाणें तिची एकूण बेरीज झाली आहे.

## दि बँक ऑफ इंग्लंडचे गुप्त व्यवहार

ग्रेट ब्रिटनमधील सर्वांत प्रमुख आणि मध्यवर्ती बँक म्हणजे दि बँक ऑफ इंग्लंड ही होय. ह्या बँकेच्या धोरणाचा सरकारच्या आर्थिक हालचालींवर परिणाम होत असतो, ही गोष्ट आतां सर्वांच्या परिचयाची आहे. मजूर पक्षाचे पुढारी मि. मॅकडोनल्ड, ह्यांचें प्रधानमंडळ बँकेच्या प्रभावी सत्तेमुळेंच पडलें, अशी ओरड त्यावेळीं ऐकूं येत होती. परराष्ट्रीय राजकारण, चलन व्यवस्था, हुंडणावळ, बाजारभाव इत्यादींवर बँकेच्या धोरणाचा परिणाम होत असतो. इतक्या ह्या प्रभावशाली संस्थेच्या घटनेबद्दल चौकशी केली असतां कित्येक गोष्टी मनोरंजक व विस्मयकारक वाटतील. जगांतील सर्वांत श्रेष्ठ प्रतीच्या ह्या बँकेचीं कांहीं वैशिष्ट्यें येथें दिलीं आहेत.

दि बँक ऑफ इंग्लंडच्या डायरेक्टर बोर्डांत २५ सभासद आहेत. त्यांतील कांहीं जण अत्यंत निष्णात व नांवाजलेले आहेत तर कांहींच्यासंबंधानें कोणासच विशेष माहिती नाहीं. ह्या २५ डायरेक्टरांपैकीं नऊ जणांची गुप्त मतदानपद्धतीनें आपआपसांतच निवड करण्यांत येऊन त्यांची एक कमिटी बनते. बँकेच्या भागीदारांसहि कमिटीमधील नांवें कळविलीं जात नाहींत. कोणत्याहि रीतीनें हीं नांवें समजण्यास मार्ग नसतो, तथापि कमिटीच्या हातांत सत्ता मात्र अमर्याद असते व तिच्या निर्णयावर प्रधानमंडळाचें धोरण अवलंबून रहातें. बँकेचा ताळेबंद कधींच प्रसिद्ध केला जात नाहीं व वार्षिक अहवालहि जाहीर होत नाहीं. भागीदारांना दरसाल १२ टक्के डिव्हिडंड मिळतें, परंतु अंतर्गत व्यवस्थेबद्दल मात्र कोणास मागमूसहि लागत नाहीं. बँकेच्या कार्याचा विस्तार होत आहे, परंतु सामान्य जनतेस बँकिंगच्या संस्था आपल्या विश्वासांत घेत नाहींत अशी तक्रार ऐकूं येत आहे. इंग्लंडसारख्या पुढारलेल्या राष्ट्रांत बँक ऑफ इंग्लंडचें हें गौप्य टिकून आहे, हें जरा विलक्षणच नाहीं काय ? चालकांची जबाबदारीची वागणूक, त्यांवर असलेला जनतेचा विश्वास आणि बँकांचें स्थैर्य ह्या ठळक गोष्टी येथें ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत.

---

### इंडस्ट्रिअल इनव्हेस्टमेंट ट्रस्ट, लि.

एकाच उद्योगधंद्यांत पैसे गुंतवणें थोडेंफार धोक्याचें असतें, परंतु आपले पैसे चार पांच व्यवसायांत गुंतविले तर सरासरीनें व्याज चांगलें पडतें. सरकारी रोख्यांवरील व्याज हमखास मिळत असलें तरी त्याचा दर अल्प असतो. कारखान्यांत रकमा गुंतविणें सामान्य मनुष्यास सोईचें नसतें, कारण वेगवेगळ्या तऱ्हेच्या व्यवसायांत पुरेसें भांडवल अडकविण्यापुरता त्याचेजवळ पैसा नसतो. ही अडचण मुंबईच्या इंडस्ट्रिअल इनव्हेस्टमेंट ट्रस्टनें दूर झाली आहे व भागीदारांचे पैसे एकत्रित करून ते अनेक ठिकाणीं पेरतां येणें ह्या संस्थेस शक्य झालें आहे. इंडस्ट्रिअल इनव्हेस्टमेंट ट्रस्टच्या तिसऱ्या वर्षाचे अहवालावरून त्याचें काम यशस्वी होत असल्याचें दिसतें. वसूल भांडवल ५० लक्ष रुपये असून सालअखेर झालेल्या व मागील वर्षांतून ओढलेल्या नफ्याची रकम सुमारें ४३ लक्ष रु. भरली, त्यांतून करमाफ ४ टक्के डिव्हिडंड द्यावें, अशी डायरेक्टरांची शिफारस आहे. वार्षिक सभा ता. २४ रोजीं भरेल.

---


दी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०
कडून
हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक
नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानावाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS
This year 1934-35
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS

BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

HINDUSTHAN
Co-operative Insurance Society, Ltd.
( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

# सहकारी चळवळ

## सहकारी संस्थांच्या पैशाची वर्गावर्गी

( लेखक:—श्री. व्यं. पां. जोशी, कराड. )

आपले तारीख २९।१।३६ व ५।२।३६ च्या अर्थाचे अंकांत श्री. ल. म. जोशी यांनीं मांडलेले विचार व तारीख २६।२।३६ च्या अंकांत श्री. द. दि. चितळे यांनीं मांडलेले विचार वाचले. त्यांवरून आम्हांस सुचलेले विचार खालीलप्रमाणें आहेत:—

सहकारी बँकांच्या पैशाच्या वर्गावर्गीसंबंधीं सेंट्रल बँक कॉन्फरन्सचे सेक्रेटरी यांनीं तारीख २०।९।३५ रोजीं एक सर्क्युलर काढून सदर विषयास चालना दिलेली आहे व सदर प्रश्नाचा निकाल सेंट्रल बँक कॉन्फरन्समध्यें लागेलच. तथापि कोठल्याहि प्रश्नाची खुल्या अंतःकरणानें चर्चा झाल्यास तो प्रश्न सहज सुटण्यास मदतच होते. कोणतीहि सहकारी संस्था कसलाच फायदा विना-मोबदला मिळावा असें म्हणणार नाहीं या दृष्टीनें श्री. चितळे ह्यांनीं सुचविलेले मतास आमचा पाठिंबा आहे. परंतु ज्या ठिकाणीं प्रॉ. बँकेची शाखा आहे व त्याच क्षेत्रांत अर्बन बँक आहे तेथेंच सदर प्रश्न प्रामुख्यानें उभा राहतो. अर्बन बँकेकडून ज्यावेळीं माफक कमिशन घेण्याचा प्रश्न उभा राहतो. त्या वेळीं इतर गोष्टींचाहि विचार करणें जरूर आहे. प्रॉ. बँकेची शाखा अर्बन बँकेचे क्षेत्रांत हुंडी खरेदी-विक्रीचा व रेल्वे रशिदी वसुलीचा व्यवहार करीत असल्यानें अर्बन बँकेचें साहजिकच नुकसान होतें. तसेंच ठेवींचे बाबतींतहि मध्यवर्ती बँकेस कमी व्याजानें अर्बन बँकेचे क्षेत्रांतुन ठेवी मिळूं शकतात व अर्बन बँकेस ठेवींवर थोडें जास्त व्याज द्यावें लागतें. प्रॉ. बँकेचे शेअर भांडवलापैकीं बराच मोठा भाग अर्बन बँकांनीं घेतलेला आहे. ठेवीचे रकमेपैकीं बऱ्याच मोठ्या रकमा अर्बन बँकांकडून आलेल्या असतात. अशा रितीनें अर्बन बँकांकडून अप्रत्यक्षपणें मध्यवर्ती बँकेस बराच फायदा होतो. तरी पूर्वीप्रमाणेंच, असलेली सवलत मध्यवर्ती बँकेनें चालू ठेवावी असें आमचें मत आहे. हल्लीं मध्यवर्ती बँक प्रत्यक्ष खर्च म्हणून प्रत्येक चेकमागें चार आणे घेतेच. शिवाय पैशाच्या वर्गीकरणाबद्दल रकमेचीहि मर्यादा घातलेली आहेच. अशा परिस्थितींत मध्यवर्ती बँकेनें चळवळींतील आपलें स्थान ओळखून लहान संस्थांस मदत करण्याचें धोरण कायम राखावें.

---

### पूर्व खानदेश जिल्हा को. इन्स्टिट्यूट

ता. १७–४–१९३६ ते ४–५–१९३६ पावेतों या शाखेमार्फत सोसायट्यांचे सेक्रेटरींना शिक्षण देण्यासाठीं एक वर्ग जळगांव येथें भरविण्यांत येणार आहे. सेक्रेटरींशिवाय इतर लोकांसहि सदर वर्गांत शिक्षण देण्याची व्यवस्था केली जाईल. वर्गाची फी फक्त रु. १० आहे. या फीमध्यें सेक्रेटरी-मेंबरांच्या राहण्याची व जेवण्याची व्यवस्था करण्यांत येईल. तरी सेक्रेटरी वा मेंबर यांचें नांव व रु.१० ता. १०-४-३६ चे आंत भरावे लागतील. बाहेरून बसणारांस ५ रु. जादा द्यावे लागतील. जेवणाची सोय नको असल्यास फक्त रु. ५ फी द्यावी लागेल. सहकारी परीक्षांस ३ मे रोजीं सुरवात होईल, त्याबद्दलची माहिती इन्स्टिट्यूटच्या ऑफिसमध्यें मिळेल.

---

### सटाणा तालुका को. सु. युनियन, लि. ( जि. नाशिक ) ( ब वर्ग )

वरील यूनियनचा १९३४–३५ चा अहवाल आमचेकडे आला आहे. सटाणें तालुक्यांतील सर्व म्हणजे ४० को. के. सोसायट्या यूनियनमध्यें सामील आहेत. सुपरवायझर व असि. सुपरवायझर ह्यांनीं अहवालाचे सालीं सोसायट्यांना ३८८ भेटी दिल्या. मागील सालीं ही संख्या १७३ इतकीच होती. मामुली कामाबरोबरच सभासदांत साक्षरतेचा प्रसार व जोडधंदे निर्माण करण्याकडे यूनियननें लक्ष्य पुरवावें, अशी अहवालांत सूचना आहे, ती योग्य अशीच आहे. हल्ली सोसायट्यांकडे ज्या बाक्या आहेत त्या बहुतेक त्यांतील चालक मंडळींनींच थकविल्यामुळें वसुलावर अनिष्ट परिणाम होत आहे, अशी तक्रार अहवालांत करण्यांत आली आहे. तालुक्यांतील सर्व सोसायट्यांत सभासदांकडील कर्जावरील व्याजाचा दर, दरसाल दर शेकडा १० रु. ५ आ. इतका आहे. यूनियनच्या वार्षिक सभेंत, बँकेनें आपल्या व्याजाचा दर ज्यास्तींत ज्यास्त ६ टक्के घ्यावा अशा अर्थाचा विनंतिवजा ठराव मंजूर झाला. यूनियनचा अहवाल वस्तुस्थितिनिदर्शक आहे, असें दिसतें. श्री. धर्माजी तानाजी पाटील हे यूनिअनचे अध्यक्ष आहेत.

---

### फुरसंगी सोसायटीचें सवलतीचें व्याज परत देण्याचा समारंभ

फुरसंगी ता. हवेली येथील को. के. सोसायटीचें सवलतीचें व्याज परत देण्याचा समारंभ सहकारी खात्याचे ऑडिटर श्री. एस. सी. मेथा, बी. कॉम., पुणें भाग, यांचे अध्यक्षतेखालीं रविवार ता. १।३।३६ रोजीं झाला. सदर समारंभास श्री. डी. ए. सावंत सुपरवायझर, श्री. के. डी. कुलकर्णी बँक इन्स्पेक्टर, सोसायटीचे मेंबर व गांवांतील इतर सद्‌गृहस्थ मिळून शंभराचेवर लोक जमले होते. अध्यक्षसाहेब आपल्या भाषणांत म्हणाले:—

"शेतकरी लोकांचे बाबतींत मुख्यतः दोन गोष्टी आहेत. एक, स्वस्त व्याजाचे दरानें पैसा मिळण्याची सोय आणि दुसरी, आपले शेतांतील मालाची योग्य किंमत मिळण्याची सोय. गांवांतील क्रेडिट सोसायटीचा शेतकरी लोकांस फारच उपयोग होतो. वेळेवर स्वस्त व्याजाचे दरानें कर्ज मिळाल्यानें आपल्या शेतीची सुधारणा करतां येते. मे. रजिस्ट्रारसाहेबांची सवलतीची योजना शेतकरी सभासदांना चांगलीच उपयोगी पडली व त्या योजनेप्रमाणें सभासदांनीं वसूल दिल्यानें व्याजाचा फायदा आज रोखीनें वाटला जात आहे याबद्दल आनंद वाटतो. शेतकऱ्यांचा भाजीपाला वगैरे माल सहकारी तत्त्वावर विकला जावा यासाठीं भाजीपाला विक्रीची सोसायटी पुणें व मुंबई या ठिकाणीं काढण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठीं सदरहु सोसायटीस प्रत्येक शेतकरी बंधूनें भांडवलाची मदत करावी."अध्यक्षांचें भाषण झाल्यावर जमलेल्या मंडळींचे व श्री. मेथा साहेबांचे आभार मानून हारतुरे पानसुपारी होऊन हा समारंभ पार पडला, असें सदर सोयायटीचे सेक्रेटरी मि. जाधव हे कळवितात.

---

### हिंदुस्थानांतील सहकारी सोसायट्या

हिंदुस्थानांत एकूण १,०५,००० सहकारी सोसायट्या असून त्यांचें खेळतें भांडवल ९६ कोटि रुपये आहे व प्राथमिक सोसायट्यांचे ४३ लक्ष सभासद आहेत अशी माहिती १९३३–३४ च्या अहवालावरून मिळते.

---

## लोकार्नोचा तह

हेर हिट्लर ह्यांनीं ता. ७ फेब्रुवारी रोजीं ऱ्हाइन नदीकाठच्या प्रदेशांत जर्मन पलटणी सोडल्या आणि अशा रीतीनें व्हर्सेइच्या ४२, ४३ व ४४ व्या कलमांविरुद्ध वर्तन केलें व लोकार्नोचा कराराहि धाब्यावर बसवला. ऱ्हाइन ही नदी जर्मनीच्या प्रदेशांतून वहात जाते व तिच्या डाव्या तिरापासून फ्रेंच हद्द फारशी दूर नाहीं. त्या दोन देशांमधील लष्करी हद्द ह्या दृष्टीनें ऱ्हाइन नदीस विलक्षण राजकीय महत्त्व आज अनेक पिढ्या प्राप्त झालें आहे. ऱ्हाइन नदीच्या पश्चिमेचा जर्मन मुलूख तर फ्रेंच डोळ्यांत एकसारखा सलत आहे. १९१८ सालीं महायुद्ध समाप्तीनंतर ऱ्हाइनच्या आसपासच्या मुलुखाची व्यवस्था लावण्याबद्दल फ्रान्स अत्यंत उतावीळ झाला होता. ऱ्हाइन लँडमध्यें फ्रान्सनें १५ वर्षेपर्यंत आपलें ठाणें घावें व जर्मनीनें ऱ्हाइन नदीच्या पश्चिम तीरावर तर नाहींच, परंतु पूर्व तीरावरील ५० किलोमिटर म्हणजे सुमारें ३१ मैलांच्या पट्टींत सैन्य ठेवतां कामा नये व तटबंदी करतां कामा नये, असें व्हर्सेइच्या तहानें ठरवलें.

जर्मनीस राष्ट्रसंघामध्यें १९२६ सालीं प्रवेश मिळण्यापूर्वी १९२५ सालीं लोकार्नोचा तह झाला होता. ह्या तहाच्या अन्वयें ठरलेल्या पश्चिम युरोपांतील राष्ट्रसीमा बदलूं न देण्याबद्दल ग्रेटब्रिटन, फ्रान्स, बेल्जम, जर्मनी व इटली ह्यांनीं आपणांस बांधून घेतलें व जर्मनी, फ्रान्स व बेल्जम ह्या तीन देशांमध्यें परस्परांत युद्ध होतां कामा नये, आणि तसें झाल्यास ग्रेटब्रिटन व इटली हीं राष्ट्रें पीडित राष्ट्रास मदत करतील असें ठरलें. "लोकार्नोच्या तहानें युद्धकालाची परिसमाप्ति होऊन शांततेच्या काळास सुरवात होत आहे" ही सर ऑस्टिन चेंबरलेन ह्यांची घोषणा दहा वर्षांतच खोटी ठरली आहे! तसेंच लोकार्नोमुळें जर्मनी व फ्रान्स ह्यांमध्यें मित्रत्वाचें नातें जडेल, हा अपेक्षा फोल ठरली आहे. जर्मनीची पश्चिम सीमा 'लोकार्नो'नें निश्चित केली, तरी ती बदलण्याबद्दल जर्मन राष्ट्रांत संघटित प्रचार चालूच होता व फ्रान्सनेंहि लोकार्नोवर विसंबून रहाण्याचा भोळेपणा दाखविला नाहीं.

हेर हिट्लर ह्यांनीं ऱ्हाइनलंड संबंधांतील आपल्या धोरणाची पहिली चुणूक ३१ मे १९३५ रोजीं केलेल्या आपल्या भाषणांत दाखवली. लोकार्नो करारावर सह्या करणारीं इतर राष्ट्रें त्यांतील अटी पाळण्याची जबाबदारी टाळीत आहेत, अशी तक्रार करण्यास त्यांनीं तेव्हांपासूनच सुरवात केली. फ्रान्सनें रशियाशीं अलीकडे केलला करार हा लोकार्नोचे करारांशीं विसंगत आहे, असें हेर हिटलर ह्यांचें आतां म्हणणें आहे. "लोकार्नोवर सह्या करणाऱ्या इतर राष्ट्रांस त्यांतील अटी बंधनकारक होत नाहींत, तर जर्मनीवरच त्यांची अंमलबजावणी कां व्हावी? ही गोष्ट जर्मन राष्ट्राच्या इभ्रतीस कमीपणा आणणारी आहे व लोकार्नोचा तह मोडण्याची जबाबदारी फ्रान्सवरच आहे; तथापि न्याय्य व टिकाऊ असे करार करण्यास जर्मनीची तयारी आहे," असें हे· हिटलर ह्यांनीं जाहीर केलें आहे.


## एक हजार रुपयांचें कर्ज पाहिजे

कर्जाची मुदत, व्याजाचा दर, परत फेडीची व्यवस्था, इत्यादींबद्दलचा खुलासा समक्ष करावा.

क्ष C/o मॅनेजर, 'अर्थ'
पुणें ४.

**S. B. JOSHI & Co.**
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street Bombay | 716 Sadashiv Peth Poona City

*For All Medicinal Requisites*
— TRY —
**N. MAHADEV & Co.**
DISPENSING CHEMISTS AND DRUGGISTS
City Post Office Corner, POONA 2.

INSURE WITH—
**The SUN SHINE INSURANCE Ltd.**
LAHORE
BECAUSE OF
Its Most Modern, Unique & Beneficial Schemes
*For Prospectus Please write to:—*
Special Officer,
POONA BRANCH

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

**एन. ए. ॲन्ड फ्रेन्ड्स**
स्टेशनर्स, जनरल मर्चन्टस, ॲन्ड कमिशन एजन्टस.
आप्पा बळवंत चौक, पुणें २.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंड विमा कं.
**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**
च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा.
किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

**'अर्थ' ग्रन्थमाला**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | ११०-१२ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १०९—१ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८-१० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११८—० |
| ४% १९६०-७० ... ... | १११-१४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९५-१३ |
| ३½% १९४७-५० ... ... | १०५—८ |
| ४% १९४३ ... ... ... | १०९-१२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०६—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०५—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०६—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षे मुदत) | १०६—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | १०३-१२ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२१—० |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२७—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०२—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३१—० |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५३०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १२९—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १००—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ८८७—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५४-११ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२३-१२ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १५३७—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५६०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९२—८ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६५—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १४६—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५३८-१२ |

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं
असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १५ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १६ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १७ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १८ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | १९ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २० शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २१ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २२ साक्री ( „ „ ) |
| ९ अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २३ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० शेवगांव ( „ „ ) | २४ मालेगांव ( „ नाशिक ) |
| ११ कोपरगांव ( „ „ ) | २५ सटाणा ( „ „ ) |
| १२ भिवंडी ( „ ठाणें ) | २६ कळवण ( „ „ ) |
| १३ पालघर ( „ „ ) | २७ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १४ कल्याण ( „ „ ) | २८ कालोल ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल. मेहता.
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि मुकुंद इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें शहर.

[ अधिकृत भांडवल १००,००० रुपये ]

प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त

**गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत प्रत्येकाची विमा कंपनी !**

शेअरविक्री जोरांत सुरू झाली.

शेअर्स खपविणारे एजंटस मर्यादित. त्वरित अर्ज करा.

मॅनेजिंग एजंट्स्—विष्णु मुकुंद आणि कं., पो. बॉ. नं. ४२.

२५६ सदाशिव, पेरूगेटाजवळ, पुणें शहर.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult

## V. G. & Sons

ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

## डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें

मध्यम वर्गातील गृहेच्छू लोकांस | अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य

**भाडेकरी-घरमालक-गृहयोजना**

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.

जनरल मॅनेजर

### " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां भेटा अगर समक्ष लिहा.

मॅनेजिंग एजन्टस.

### न. वि. वडनेरकर

जव्हेरी आणि सराफ, रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

### बंगाल कोल सप्लाइंग फर्म

उत्तम दगडी कोळसा ( बंगाल, सी. पी. )
आणि
कोक ह्यांचे व्यापारी
व
म्युनिसिपल, लोकलबोर्ड,
पी. डब्ल्यु. डी. ( सरकारी ) कॉन्ट्रॅक्टर्स
५११ बुधवार पेठ, पुणें शहर २.
तारेचा पत्ताः—व्यंकटेश. फोन नं. ४७१

## MARATHE & Co.

ENGINEERS & IRON FOUNDERS

| WORKS : | Can undertake to do any sort of casting. | OFFICE : |
|---|---|---|
| Natu Bag, Bhikardas Road, POONA 2 | We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act. **Our prices are very competitive.** | 978-79, Sadashiv, Laxmi Rd., POONA 2 |


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए, यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१२, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ | पुणें, बुधवार, तारीख २५ मार्च, १९३६. | अंक १३

धूम्रपानापासून होणारे वाईट परिणाम टाळण्यास
शुद्ध व उंची तंबाखुच्या विड्या
ओढणेंच अगत्याचें आहे.
आपली गरज शंभर टक्यांनीं पुरविण्यास
लायक असलेल्या

लंगर छाप विड्याच




आमचे दुकानदार कडे घ्या.
ठाकूर सावदेकर कंपनी,
फुलवाला चौक, ३७७ वेताळ पेठ, पुणें.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची
प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.
**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**
च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा.
किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

**श्री माणकेश एजन्सी**

शहापूर लुगडीं, जरीचीं व टोपपदरी, अंगास रंग न लागणारीं मिळतात.

तसेंच, इरकल, संब्रायत वगैरे पेठेचा गॅरंटीड माल मिळतो.

मंडई रस्ता, शनीचा पार, पुणें.

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी
टेलरिंग फर्म
**पाटसकर आणि कंपनी**
४८ निहाल पेठ, पुणें शहर.
मॅनेजर:-व्ही.ग. पाटसकर, D.M.T.O.A. (London.)
सव प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व
तयार कपड्यांचे व्यापारी
आंमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा ( Dandrulf ), केंस गळणें व टकल यांवर अनुभविक उपाय. केंसांची वाढ करण्यास उत्कृष्ट साधन. white oil पासून अलिप्त. बाटली किं. १ रु. पो. व पॅ. निराळें. पुण्यांत नू. म. विद्यालय भांडार, येथें मिळेल.

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग. कं. अमदाबाद.

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

**एक हजार रुपयांचें कर्ज पाहिजे**

कर्जाची मुदत, व्याजाचा दर, परत फेडीची व्यवस्था, इत्यादींबद्दलचा खुलासा समक्ष करावा.

क्ष C/o मॅनेजर, 'अर्थ'
पुणें ४.

# विविध माहिती

## बँकांस सुट्टी

मंगळवार, ता. ३१ रोजीं रामनवमीनिमित्त बँका बंद रहातील.

## सुएझ कालव्यांतून मालाची वहातुक

१९२९ साल सोडलें तर सुएझ कालव्यांतून गेल्या वर्षाइतकी वहातुक कधीच झाली नाहीं. ह्याचें मुख्य कारण म्हणजे इटलीनें ॲबिसिनियाकडे युद्धविषयक मालाची केलेली रवानगी, हें होय. ही वहातुक हिशेबांतून सोडली, तर १९३५ साल हें सुएझ कालव्यास अत्यंत वाईट गेलें असें म्हणावें लागेल. कालव्यांतून मालाची वहातुक करण्याचे बाबतींत इंग्लंडचा पहिला नंबर असला, तरी निम्याहून जास्त वहातुक एकस्याचीच असण्याचा आजतागायतचा मान त्यास गेल्या वर्षी मिळाला नाहीं.

## सिनेमागृहांत हसण्यासाठी फुकट पास

अमेरिकेंतील बॉस्टन ह्या शहरामधील एका सिनेमागृहांत एक हास्यकारक फिल्म दाखविली जात असतांना प्रेक्षकांवर अपेक्षित परिणाम झालेला दिसेना. इतक्यांत एका कोपऱ्यांतून हंसण्याचा आवाज आला व थिएटरभर हंशा पिकला. सिनेमागृहाच्या कल्पक व्यवस्थापकास ह्यावरून एक क्लृप्ति सुचली. हास्याची वावटळ उठविणारा मनुष्य तात्काळ शोधून काढण्यांत आला आणि त्यास सिनेमागृहाचा कायमचा फुकट पास देण्यांत आला. तेव्हांपासून तें गृह लोकप्रिय झालें.

## इंग्लंड आपल्या मालकीचा नवीन सुएज कालवा बांधणार काय ?

सध्याच्या सुएज कालव्यास समांतर आणि त्याच्या पूर्वेस एक नवीन कालवा खोदून इटली व इजिप्त ह्यांचेवरील अवलंबन नाहींसें करण्याचा इंग्लंडचा विचार आहे, अशी गप्प उठली आहे. सध्याचा कालवा एका फ्रेंच कंपनीच्या मालकीचा असून ती पॅरिस येथें रजिस्टर झालेली आहे. इजिप्तमध्यें दिवसेंदिवस राष्ट्रीय भावना तीव्रतर होत आहे, लिबिया ह्या इटालियन प्रदेशांतून कालव्यावर बॉंब फेकतां येतील, कालव्याचें संरक्षण करण्याचे मार्गांत अनेक अडचणी आहेत, इत्यादि कारणें ह्या संबंधांत पुढें करण्यांत येत आहेत.

## जर्मन लोक, धुम्रपान व दारू

जर्मन लोक सिगार ओढण्याचें टाकून चिलीम ओढूं लागले आहेत, हें त्यांच्या आर्थिक परिस्थितीच्या कठिनतेचें निदर्शक आहे. व्यंग चित्रें काढणारे चितारी जर्मन माणसाचे हातांत बीर व इंग्रजाचे तोंडांत चिरूट देतात. वास्तविक, जर्मन लोकांपेक्षां इंग्रज लोकच बीर ज्यास्त पितात व धूम्रपानाचे बाबतींत जर्मन ज्यास्त पुढें गेलेले आहेत.

## खेळाचें मैदान दुरुस्त करण्यासाठी १३ लक्ष रुपये

ऑस्ट्रेलियामधील मेलबर्न येथील क्रिकेटच्या मैदानाची दुरुस्ती करण्यासाठी सुमारें १३ लक्ष रुपये खर्च होतील. ६५ हजार लोकांस बसून सामने पहाण्याची तेथें व्यवस्था होणार आहे.

## ग्रेट ब्रिटनमधील रस्त्यांवर मोटारींचे अपघात

गेल्या २५ वर्षांत ग्रेट ब्रिटनमध्यें अपघातांचें प्रमाण फारच वाढलें आहे. १९१० सालीं ३० हजार अपघात झाले; १९३४ सालीं अपघातांची संख्या २ लक्षांवर गेली ! जॉर्ज बादशहांच्या २५ वर्षांच्या कारकीर्दींत २५ लाखांहून ज्यास्त अपघात झाले ! रस्त्यांवरून फिरणाऱ्या वाहनांत ह्याच मुदतींत मोठी वाढ झाली, त्याचाच हा परिणाम होय. वाहनांमध्यें रोज ४५० गाड्यांची भर पडली ! दर चौरस मैलांत आढळणाऱ्या वाहनांच्या संख्येच्या दृष्टीनें ग्रेट ब्रिटनचा नंबर सर्वांत वर लागतो. तेथें एक चौरस मैल क्षेत्रफळांत २३ मोटारी आहेत, अमेरिकेंत फक्त ७ च आहेत ! रेल्वे व ट्रामगाड्या ह्यांची वहातुक जशी नियंत्रित झाली आहे, तशी मोटारगाड्यांची अजून झालेली नाहीं.

## इंग्लंडमध्यें निर्भेळ दुधाचा खप

ग्रेट ब्रिटनमध्यें निर्भेळ व आरोग्यकारक दुधाचा पुरवठा मुबलक व स्वस्त करण्याबाबत होत असलेल्या प्रयत्नांची माहिती ह्याच अंकांत दुसरीकडे दिली आहे. सिनेमागृहांच्या आवारांतहि दुग्धमंदिरें स्थापन होऊं लागलीं आहेत. उत्कृष्ट दर्जाच्या दुधाबद्दल प्रशस्तिपत्रें असलेल्या दुग्धालयांची संख्या गेल्या दहा महिन्यांत आठशेवरून सतरा हजारांवर गेली !

## गॅससाठी तांब्याच्या नळ्या

शहरांत गॅसचा पुरवठा पोलादी नळ्यांतून करण्यांत येतो. पोलादी नळ्यांऐवजीं तांब्याच्या नळ्या उपयोगांत आणल्यास त्या फायदेशीर पडतात असा अनुभव आला आहे. टिकण्याचे दृष्टीनें त्या उत्कृष्ट असतात व परिणामा त्या स्वस्त ठरतात.

## ग्रेट ब्रिटनमधील मोटारींवर कर व त्याचा विनियोग

गेल्या वर्षी मोटारींवरील करापासून ग्रेट ब्रिटनच्या सरकारास सुमारें ९५ कोटि रुपये उत्पन्न मिळालें. त्यांपैकीं ३५ कोटींचा विनियोग रस्त्यांसाठी करण्यांत आला व उरलेले ६० कोटि सरकारी खजिन्यांत गेले. रस्त्यांप्रीत्यर्थ सरकार दरसाल एकूण सुमारें ७० कोटि रुपये खर्च करतें; म्हणजे गतसालीं ३५ कोटींची तरतूद सर्वसामान्य उत्पन्नांतून करण्यांत आली. जगांतील कोणत्याहि देशापेक्षां ग्रेट ब्रिटनमध्यें मोटारींवर कर अधिक आहे.

## मुंबईमध्यें कंपन्यांवर नवा कर

मुंबई शहरामध्यें काम करणाऱ्या इनकॉर्पोरेटेड कंपन्यांवर कर बसविण्याचें घाटत आहे. कलकत्ता व मद्रास शहरांत अशा तऱ्हेचा कर आहे. कलकत्ता येथील कराची आकारणी भरणा झालेल्या भांडवलावर करण्यांत येते. मुंबई शहरांत हा कर बसविल्यास तेथील कापडाच्या गिरण्यांवर त्याचा अनिष्ट परिणाम होण्याचा संभव आहे अशी तक्रार करण्यांत येऊं लागली आहे.

## कपास-कापडाची ग्रेट-ब्रिटनमधून निर्गत

गेल्या सालीं ग्रेट ब्रिटननें सुमारें ८० कोटि रुपयांचें कपास-कापड व सूत परदेशांत धाडलें. निर्गत केलेल्या मालांत १९५ कोटि चौरस वार कापड व १४ कोटि पौंड सूत होतें. हिंदुस्थानानें गेल्या वर्षी ४ कोटि वार कापड कमी मागवलें, परंतु १३½ लक्ष पौंड सूत ज्यास्त घेतलें.

## अनुक्रमणिका.


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १५० | तिकिटाच्या रेल्वे प्रवासा-वर नियंत्रण—मिठावरील कर | |
| २ लांब मुदतीचे व्याजाचे दर उतरणार काय ? | १५१ | ६ मुंबईमध्ये कॅनरी काढण्याची योजना ... | १५४ |
| ३ शेतीच्या धंद्याचा तुलनात्मक विचार ... | १५२ | ७ मालाचा संघटित उठाव | १५५ |
| ४ बेकारी ... | १५२ | ८ अर्थाचें स्वागत ... | १५५ |
| ५ स्फुट विचार ... | १५३ | ९ टी सेस कमिटी ... | १५६ |
| असेंब्लींत फिनॅन्स बिलाची चर्चा—प्राप्तीवरील कराच्या जादा पट्टया—फिस्कल कमिशन नेमून चौकशी करा—बिन- | | १० हिंदुस्थानांतील शिक्षणाची प्रगति ... | १५८ |
| | | ११ शेती व सहकार ... | १५८ |
| | | १२ निवडक बाजारभाव | १५८ |



# अर्थ

बुधवार, ता. २५ मार्च १९३६


## लांब मुदतीचे व्याजाचे दर उतरणार काय ?

अल्प मुदतीच्या कर्जावरील व्याजाचे दर अलीकडे विलक्षण रीतीनें खाली गेले आहेत, हें सुप्रसिद्ध आहे. खेळत्या पैशाचा पुरवठा इतका विपुल झाला आहे कीं, त्यास कोणी विचारीनासें होऊन गेलें आहे. त्याचेंच लक्षण किंवा परिणाम, इंग्लंड व हिंदुस्थान ह्या देशांतील सरकारांस व स्थानिक संस्थांस अत्यंत अल्प व्याजाच्या दरानें कर्जें मिळत आहेत. ट्रेझरी बिलांवर सरकारकडून तुटपुंजें व्याज मिळाल्याकारणानें योग्य दर दिला गेला नाहीं तर त्या बिलांत आपला पैसा घालावयाचा नाहीं असा निश्चय मध्यंतरीं ब्रिटिश बँकांस करावा लागला होता. सरकारी कर्जरोख्यांचे बाजारभाव चढीचे रहाणें हें व्याजाच्या हलक्या दराचें एक चिन्हच आहे. त्याप्रमाणें हिंदुस्थानांत साडे तीन टक्के व्याजाच्या सरकारी रोख्यांचा भाव ९७ च्या आसपास आज कित्येक महिने टिकलेला आहे. युरोपमधील युद्धाविषयींच्या भीतिकारक बातम्यांनीं त्या भावांत वेळोवेळ चलबिचल झाली तरी एकंदरीनें कर्जरोखे फारसे घसरले नाहींत. अल्प मुदतीचा व्याजाचा दर व लांब मुदतीचा दर ह्यांचे दरम्यान विशिष्ट संबंध असतो, हें खरें असलें तरी ते एकाच प्रमाणांत सारखे चढत किंवा उतरत नाहींत. त्याचप्रमाणें, खेळता पैसा आणि उद्योग धंद्यांतले भांडवल यांच्यावरील व्याजाचे दर एक नसतात, आणि त्यांमध्यें प्रमाणबद्ध असा चढउतार होत नाहीं. बँकांतल्या ठेवींवरील व सरकारी कर्ज रोख्यांवर सुटणारें व्याज कमी झालें तरी मंडळयांच्या भागांच्या किंमती रोख्यांच्या बाजारभावांइतक्या चढतील किंवा उतरतील असें नाहीं. तेव्हां सध्याची स्थिति कांहीं काळ चालू राहिली तरी लांब मुदतीच्या व्याजाचे दर खाली येतील असें म्हणतां यावयाचें नाहीं.

प्रसिद्ध ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ, प्रो. जे. एम. केन्स ह्यांनीं गेलीं तीन वर्षे व्याजाच्या दरांसंबंधानें विचार करून आपलीं अनुमानें व अपेक्षा जनतेपुढें वारंवार मांडल्या आहेत. नॅशनल म्युचुअल लाइफ ॲशुअरन्स सोसायटीचे ते अध्यक्ष असून ह्या मंडळीच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं कर्ज रोख्यांत व मंडळयांच्या भागांत गुंतवल्या जाणाऱ्या भांडवलाचा पुरवठा व त्यांवरील व्याजाचे दर ह्यासंबंधाची चर्चा करण्याचा त्यांचा प्रघात आहे, असें म्हटलें तरी चालेल. त्यांच्या उद्गारांस इंग्लंडमध्यें मानहि मिळतो. पहिल्या प्रतीच्या रोख्यांवरच्या व्याजाचा दर त्यावेळीं वाजवीपेक्षां अधिक उंचीचा आहे, असा अभिप्राय त्यांनीं दोन वर्षांपूर्वी व्यक्त केला होता आणि गेल्या सालीं त्यांनीं प्रकट केलेल्या मताचें विवेचन २० मार्च, १९३५ च्या "अर्था"च्या अंकांत आम्ही केलें होतें. नॅशनल म्यूचुअल विमा मंडळीच्या धंद्याच्या वार्षिक सभेंत, गेल्या महिन्यांत, प्रो. केन्स ह्यांनीं पुन्हां प्रस्तुत विषयाची चर्चा केली. दोन वर्षांमागें लांब मुदतीच्या व्याजाचा दर उतरेल असें भविष्य आपण वर्तवलें होतें, ह्या गोष्टीचा उल्लेख करून चालू सालीं काय व्हावयास पाहिजे याविषयीं आपलें मत त्यांनीं सांगितलें. उद्योग धंद्यांतलें कायमच्या स्वरूपाचें भांडवल लांब मुदतीचें असतें आणि त्याचा पुरवठा जरूरी इतका व हलक्या व्याजाच्या दरानें होणें औद्योगिक चळतीस आवश्यक असतें. तथापि, अल्प मुदतीच्या कर्जावरील व्याजाचे दर बराच काळपर्यंत स्थिर रीतीनें हलके राहिल्यावांचून व त्यांच्या स्थैर्याविषयीं विश्वास दृढ झाल्याशिवाय लांब मुदतीच्या दरांवर त्यांचा परिणाम होऊं शकत नाहीं, हा प्रो. केन्स यांचा मुख्य सिद्धांत असून अशा प्रकारची अनुकूल परिस्थिति ग्रेट ब्रिटनमध्यें आहे, असें त्यांस वाटत नाहीं.

ह्या संबंधांत ब्रिटिश तिजोरीच्या अधिकाऱ्यांचें प्रस्तुतचें धोरण प्रो. केन्स ह्यांस मान्य नसून तें प्रोफेसर मजकुरांच्या प्रतिकूल टीकेचा विषय झालें आहे. अल्प मुदतीचें कर्ज हलक्या दरानें सहज मिळत असतां तें कमी करणें आणि पांच–दहा वर्षांच्या मध्यम मुदतीचें कर्ज न काढणें हें ब्रिटिश फडनवीसांचें धोरण त्यांस पसंत नाहीं. ट्रेझरी बिलांसारखें, आपला पैसा अल्पकालिक गुंतवण्यास बँकांस सोईचें साधन हवें असतें. तें ह्या कारणानें त्यांस मिळत नाहीं व पैशाचा बाजार बिघडतो; आणि ट्रेझरी बिलांचें रूपांतर लांब मुदतीच्या सरकारी रोख्यांत होण्यानें तिजोरीस विनाकारण अधिक व्याज भरावें लागतें. हें दुहेरी नुकसान आहे, असें प्रो. केन्स ह्यांचें म्हणणें आहे. ब्रिटिश सरकारच्या कर्जाबाबतच्या ताज्या व्यवहाराचें उदाहरण देऊन आपल्या विधानाची सत्यता सिद्ध करण्याचा यत्न त्यांनीं केला आहे. ब्रिटिश फडनवीसांनीं पांच वर्षांच्या मुदतीचें १½ टक्का व्याजाचें व त्याबरोबरच पंचवीस वर्षांच्या मुदतीचें २¾ टक्के व्याजाचें कर्ज नुकतेंच उभारलें आहे. एवढ्या लांब मुदतीचें कर्ज सरकारनें काढल्यानें वै त्याचा उपयोग ½ टक्का व्याजानें मिळणारें कर्ज कमी करण्याकडे केला गेल्यामुळें अल्प मुदतीच्या कर्जावरील व्याजाच्या दराच्या स्थैर्याविषयीं फडनवीस साशंक आहेत, असें अनुमान सामान्य जनतेनें काढल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. सध्याचा खेळत्या पैशाचा आणि अल्पकालिक भांडवलाचा पुरवठा विपुल राहून, त्यावरील व्याजाचा हलका दर कांहीं काळपर्यंत टिकेल अशी खात्री सरकारासच वाटत नाहीं तर ती लोकांस कशी वाटणार? आणि त्या संबंधांत जनतेमध्येंहि साशंक वृत्ति निर्माण झाल्यास लांब मुदतीच्या कर्जावरील व्याजाचे दर कसे उतरणार? हा प्रो. केन्स यांचा तत्वमूलक प्रश्न आहे. त्याचें विस्तृत विवेचन पुढील लेखांत करणें सोईचें होईल. प्रोफेसर साहेबांची व्याजाच्या दरांसंबंधाची भूमिका काय आहे, एवढेंच आज स्पष्ट करून सांगितलें आहे.

## शेतीच्या धंद्याचा तुलनात्मक विचार

### डेन्मार्क, ग्रेटब्रिटन व हिंदुस्थान

डेन्मार्क हा युरोप खंडांत एक चिमुकला कृषिप्रधान देश आहे, पण तेथील लोकांनीं सहकारी चळवळीच्या सहायानें आपली उन्नति करून घेतली असल्यामुळें तो जगाला आदर्श होऊन बसला आहे. शेतीच्या सुधारणेची भाषा निघाली कीं, डेन्मार्कचें उदाहरण, अनुकरणास योग्य म्हणून, पुढें ठेवलें जातें आणि हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांनींहि त्या देशापासून पुष्कळ चांगल्या गोष्टी घेण्यासारख्या आहेत, असा उपदेश करण्यांत येतो. डेन्मार्कमधील नमुनेदार शेतीचें कौतुक खुद्द इंग्लंडमध्येंहि लोक करितात ब्रिटिश शेतकऱ्यांच्या दृष्टीनें डेन्मार्कमधील शेतीची चर्चा करून एका ब्रिटिश लेखकानें कांहीं महत्वाचे तुलनात्मक विचार प्रदर्शित केले आहेत, ते हिंदुस्थानांतहि मननीय असल्यानें त्यांचा माथितार्थ आम्ही येथें देत आहों. एका देशाच्या सुधारलेल्या पद्धति व प्रगतिपर धोरण ह्यांपासून पुष्कळ बोध घेण्यासारखा असतो. परंतु दोहोंतली नैसर्गिक, सामाजिक वगैरे परिस्थिति एकाच तऱ्हेची नसल्यानें अनुकरण मर्यादित प्रमाणांतच शक्य व इष्ट असतें, हें ध्यानांत ठेवणें जरूर आहे.

डेन्मार्कमधल्या ३७ लक्ष प्रजेपैकीं १२ लक्ष लोक शेतीच्या जमिनीवर जगतात व इतर हजारो लोक शेतीच्या मालाचा व्यापार करतात. ग्रेट ब्रिटनची लोकसंख्या ४½ कोटि आहे, पण त्यांतलीं फक्त ७ लक्ष, ८४ हजार माणसें शेतीचा धंदा करतात व सुमारें १½ कोटि लक्ष कारखाने व इतर उद्योगधंदे ह्यांत गुंतलेलीं आहेत. एका काळीं इंग्लंड व डेन्मार्क हे दोन्ही देश कृषिप्रधानच होते. पण इंग्लंडमध्यें कोळसा व लोखंड विपुल आहे आणि डेन्मार्कमध्यें त्यांचा अभाव आहे. ह्या कारणानें इंग्लंडमध्यें कारखाने भरभराटले व डेन्मार्कमध्यें तसें झालें नाहीं. दोन्ही देशांनीं आपला परराष्ट्रीय व्यापार मात्र जोरानें वाढवला आहे. तथापि, इंग्लंडमधून कारखान्यांत तयार झालेला व खाणींतून काढलेला माल बाहेर जातो, तर डेन्मार्कची निर्गत बहुतांशीं शेतीच्या मालाची असते. हिंदुस्थानांत शेकडा ७० च्या वर लोकांचें जीवित शेतीवर अवलंबून असून आमच्या देशांतून मालाची निर्गत होते ती बहुतेक सर्व शेतांत तयार झालेल्या कच्च्या मालाची व धान्याची असते.

इंग्लंडच्या शेतीचा पाया मोठमोठ्या जमीनदाऱ्यांचा आहे. जमीन मोठ्या प्रमाणांत मालकांपासून खंडानें घेऊन शेतकरी तिच्यामधून पिकें काढतात व पिकांच्या जोडीनें दुसरे धंदे करतात. जमिनींत घालण्यास जमीनदारापाशीं आज भांडवल नाहीं. करांच्या मार्गानें त्यांचा पैसा सरकारी तिजोरींत गेल्या कारणानें शेतीला भांडवलाचा तुटवडा पडला आहे. खंडकऱ्यांनीं नवीन यंत्रसामुग्री व शेतीचीं साधनें वापरावीं असा उपदेश करणें सोपें आहे, परंतु कारखानदारांप्रमाणें त्यांस बाजारांत भांडवल उभें करतां येत नाहीं. ब्रिटिश सरकारनें शेतकऱ्यांस कर्जाऊ भांडवल देण्याबाबत कांहींच योजना केलेल्या नाहींत. ब्रिटिश जमीनदार व शेतकरी जुन्या पद्धतीस चिकटून रहातात व त्यांची एकंदरीनें पुराणप्रिय प्रवृत्ति असते. सहकारी तत्त्वावर शेती करणें किंवा आपला माल विकणें हें त्यांस आवडत नाहीं. जमीनदारास आपण धंदेवाला आहों असें वाटत नाहीं आणि परराष्ट्रीय व्यापारांत शेतीच्या मालास महत्त्वाचें स्थान कधींहि प्राप्त झालेलें नाहीं. गहूं, मांस, लोणी, अंडीं वगैरे माल ग्रेटब्रिटनमधून बाहेर जात नाहीं; त्याची आयातच होते. शेतीसंबंधाचें ब्रिटिश सरकारचें धोरण निश्चित नाहीं, ह्यामुळें जमीनदारांस त्यासंबंधांत विश्वास व शाश्वति वाटत नाहीं.

---

## बेकारी

मध्यम स्थितींतल्या लोकांची बेकारी इतकी जाचक झाली आहे कीं, ती दूर होण्याची निकड व उपाय ह्यांसंबंधानें आपले विचार प्रकट करण्याचें अगत्य अनेक वक्त्यांस आणि लेखकांस वाटूं लागलें आहे हें सुचिन्हच समजलें पाहिजे. श्री. एस. वाय. जोशी, इंजीनिअर, ह्यांनीं सदरहु विषयावर लिहिलेलें लहानसें पुस्तक अत्यंत स्फूर्तिदायक व बोधप्रद असें झालें आहे.* अनुभवी, माहितगार आणि चर्चेच्या विषयासंबंधानें कळकळ वाटणारा लेखक असला म्हणजे त्याच्या हातून परिणामकारक लिखाण कसें निघतें ह्याचा प्रस्तुत पुस्तक हा एक उत्कृष्ट नमुना आहे. महाराष्ट्रीय समाजांत आढळणाऱ्या दोषांचें आविष्करण करून उद्योगधंद्यांच्या प्रगतीचा मार्ग, अनेक प्रकारची उपयुक्त, व्यावहारिक माहिती देऊन त्यांनीं सुचवला आहे. आजपर्यंत महाराष्ट्रांत कोणते धंदे निघाले व ह्यापुढें कोणते लहानमोठे उद्योग निघणें शक्य आहे, त्यांस भांडवलाचा पुरवठा कसा होईल, त्यांच्या बाबतींत तरुण पिढीनें व एकंदर समाजानें काय केलें पाहिजे, इत्यादि बाबींचें श्री. जोशी यांनीं केलेलें विवेचन मार्मिक असून मार्गदर्शक होण्यासारखें आहे. लिहिण्याच्या ओघांत त्यांनीं अनेक इंग्रजी व मराठी उतारे दिले आहेत, त्यांतले कांहीं चांगले उपयुक्त आहेत, तर कांहीं अडगळवजा आहेत असें वाचकांस वाटेल. लेखकाच्या माहितीचें भांडार ओतूं जाण्याचें व त्यांतून शक्य तितका मोठा पुरवठा जनतेस करून देण्याच्या उत्साहाचें तें लक्षण आहे असें उघड दिसतें. अनवश्यक व चुकीची माहिती आणि ढिलेपणाची विचारसरणी पुस्तकांत कांहीं ठिकाणीं आढळते. हिंदुस्थानांतील दरमाणशी उत्पन्नाचे हिशेब, हिल्टन यंग कमिशनचा रिपोर्ट व सहकारी शेतकी पतपेढ्या यांचा उल्लेख इत्यादि उदाहरणें ह्या बाबतींत देतां येतील. आर्थिक विषयावरील व्यावहारिक महत्त्वाच्या चर्चेंत असले दोष टाळणें आवश्यक आहे. बॅरिस्टर जयकर ह्यांनीं महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीच्या प्रश्नांत अलीकडे विशेष मन घातलें असून त्यांची ह्या संबंधांतली तळमळ आतां सर्वश्रुत आहे. त्यांची उद्बोधक प्रस्तावना प्रस्तुत पुस्तकास जोडली असल्यानें श्री. जोशी ह्यांच्या तडफदार लिखाणास प्रोत्साहनतेची जळजळित जोड मिळाली आहे. ओघवती व चटकदार भाषा, उद्योगधंद्यांविषयीं तपशीलवार व विस्तृत माहिती आणि महाराष्ट्रास जागृत करून अर्थकार्यप्रवण बनविण्यासंबंधाची लेखकाची उत्कट इच्छा ह्या गुणांमुळें पुस्तक वाचनीय व मननीय झालें आहे.

---

*" बेकारी–तिचीं कारणें व उपाय "–लेखकः–श्री. एस. वाय. जोशी, इंजीनियर, यशवंत पंप वर्क्स, मळवली, ( लोणावळा ). किंमत १ रुपया.

# स्फुट विचार

### असेंब्लींत फिनॅन्स बिलाची चर्चा

करांच्या संबंधाच्या योजनांचा एका बिलांत अंतर्भाव करून फडनवीस तें लेजिस्लेटिव्ह असेंब्लीपुढें मांडतात आणि त्यास कायदेमंडळाची मंजुरी मिळाली म्हणजे कर वसूल करण्याचा कायदेशीर अधिकार हिंदुस्थान सरकारास प्राप्त होतो. अंदाजपत्रक कायदेमंडळास प्रथम सादर करण्यांत येतें व त्यावर सर्वसाधारण चर्चा होते. खर्चासाठी रकमा बजेटांत नमूद असतात त्यांस नंतर मंजुरी घेण्यांत येते. त्यावेळीं सभासदांस फेरबदल सुचवण्यास व सरकारच्या धोरणावर टीका करण्यास अवसर मिळतो. वादविवादाची सरकारी धोरणावरच्या टीकेची तिसरी संधी वर निर्दिष्ट केलेल्या फिनॅन्स बिलाच्या चर्चेचे वेळीं प्राप्त होते. असेंब्लीनें सुचवलेले काट आणि करांबाबत केलेल्या सूचना अमान्य करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरल ह्यांस असल्यानें तीन आठवडे चाललेल्या वादविवादांतून लोकप्रतिनिधींच्या दृष्टीनें कांहींच फलप्राप्ति न होण्याचाच संभव फार असतो. तथापि, त्यांची एखाददुसरी सूचना क्वचित् प्रसंगीं मान्य केली जाते. असेंब्लीमधल्या भिन्नभिन्न गटांच्या पुढाऱ्यांचीं भाषणें गेल्या आठवड्यांत फिनॅन्स बिलाच्या चर्चेच्या अनुषंगानें झालीं आणि त्यांमध्यें प्रत्येकानें हिंदुस्थान सरकारच्या धोरणावर सडकून टीका केली. त्या ओघांत फिनॅन्स बिलाशीं प्रत्यक्ष संबंध नाहीं अशाहि अनेक प्रश्नांचा समाचार घेण्यांत आला आणि सभासदांनीं दुसऱ्या पक्षांशीं दोन हात करण्याची ह्या रीतीनें मिळालेली संधी फुकट जाऊं दिली नाहीं. राज्यकारभार, राजकारण आणि सरकारी आर्थिक धोरण ह्यांच्या क्षेत्रांत एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सभासदांनीं आंदोलन केलें म्हणजे सरकारच्या फडनवीसांस आपल्या टीकाकारास उत्तर देणें बरेंच सोपें जातें. कारण, निरनिराळ्या गटांतल्या सभासदांनीं एकमेकांचे मुद्दे खोडून काढून फडनवीसांचें काम सुलभ करून टाकलेलें असतें. एखाद्या सूचनेवर बिनसरकारी पक्षांचें एकमत झालें तर मात्र कांहीं मर्यादेंत तिचा सरकार अंगीकार करतें.

### प्राप्तीवरील करावरच्या जादा पट्ट्या

सर जॉर्ज शूस्टर हिंदुस्थानसरकारचे फडनवीस असतांना बजेटामध्यें तुटीची मोठी खिंड पडल्यामुळें त्यांस कित्येक कर चढवावे लागले. तुटीच्या आपत्तीस तोंड देण्याकरितां ज्या करांत विशेष प्रकारचा वाढावा करावा लागला, त्यांपैकीं प्राप्तीवरील कराची बाब प्रमुख होती. उत्पन्न-खर्चाविषयींच्या नडीचे प्रसंगीं प्राप्तीवरील कराच्या दरांत त्यांवर जादा पट्ट्या बसवून जी वाढ करण्यांत आली, ती बजेटांत मोठमोठ्या शिलका उरूं लागल्या तरी तशीच राहूं देणें न्यायाचें आहे काय? हा प्रश्न, लेजिस्लेटिव्ह असेंब्लींतले युरोपियन सभासदांच्या गटाचे पुढारी, सर लेस्ली हडसन, ह्यांनीं फिनॅन्स बिलाची चर्चा चालू असतां धसास लावला. त्यांनीं जादा पट्ट्यांचा इतिहास सांगितला, तो असा आहे.:—मार्च १९३१ मध्यें प्राप्तीवरील कराचे सर्वसाधारण दर चढवण्यांत आले. पुढें सहा महिन्यांनीं त्यांत २५ टक्के वाढ झाला. मार्च, १९३१ पर्यंत ५,००० ते १०,००० रुपयांच्या प्राप्तीवर रुपयास ६ पै प्रमाणें कर आकारला जात असे तो त्याच सालच्या एप्रिलांत ९ पै करण्यांत आला व ह्या रीतीनें त्या दरांत ५० टक्के वाढ झाली. पुढें ऑक्टोबरमध्यें ९ पैच्या ११¼ पै करण्यांत येऊन पूर्व वर्षाच्या मानानें एकूण वाढावा ८७½ टक्क्यांचा झाला. १९३१ च्या मार्चमध्यें १०,००० ते १५,००० रुपयांच्या प्राप्तीवर रुपयास ९ पै प्रमाणें कराची आकारणी होत होती. तो दर एप्रिलमध्यें १२ पै व ऑक्टोबरांत १५ पै पर्यंत चढला. ही वाढ ६० टक्के झाली. त्याचप्रमाणें, १५,००० ते २०,००० उत्पन्नावर मूळ दर १० पै होता, तो अनुक्रमें १६ पै व २० पै होऊन कराची आकारणी ह्या बाबतींत १०० टक्के वाढली. ह्या रीतीनें प्राप्तीवरील करावर अडचणीच्या प्रसंगीं निर्वाणीचा उपाय म्हणून जादा पट्ट्या लादण्यांत आल्या त्या बजेटांत दोन-दोन, तीन-तीन कोटींची वाढ झाली असतांहि कायम ठेवणें न्यायास धरून नाहीं असें सर लेस्ली हडसन ह्यांचें म्हणणें आहे. सरकारी नोकरांच्या पगारांतील कपात नाहींशी करण्यांत सरकारनें विशेष तत्परता दाखविली, पण निर्वाणीची वेळ निघून गेली तरी प्राप्तीवरील करावरच्या पट्ट्या मात्र दूर केल्या जात नाहींत, हा एक प्रकारचा वचनभंग आहे असाहि स्पष्ट शेरा त्यांनीं मारला. कर वाढवणें किंवा कमी करणें ही गोष्ट कायदेमंडळाच्या अधिकारांतली असून सरकारास त्या बाबतींत अभिवचन देतां येत नाहीं, हा मुद्दा श्री. जोशी ह्यांनीं पुढें मांडला होता तो ह्या बाबतींत लक्षांत ठेवणें जरूर आहे. ज्यांस कराचा बोजा मुळींच सहन होत नाहीं त्या गरीब वर्गाचा परामर्श अगोदर घेतल्याशिवाय श्रीमंतांच्यावरचें कराचें ओझें हलकें करणें उचित नाहीं असेंहि त्यांनीं सांगितलें, तेंहि चिंतनीय होतें.

### फिस्कल कमिशन नेमून चौकशी करा

सर इब्राहिम रहिमतुल्ला ह्यांच्या अध्यक्षतेखालीं फिस्कल कमिशननें हिंदी उद्योगधंद्यांस द्यावयाच्या संरक्षणासंबंधानें चौकशी करून शिफारसी केल्या आणि त्यांस अनुसरून टारिफ बोर्डाची नेमणूक होऊन कित्येक देशी धंद्यांस जकातीचें रक्षण मिळालें व अनेकांस तें नाकारण्यांत आलें. फिस्कल कमिशननें सर्वसाधारणपणें औद्योगिक संरक्षणाचें धोरण आखून दिलें. त्यास आतां पंधरा वर्षें होतील. दरम्यानच्या काळांत अनेक घडामोडी झाल्या आहेत आणि टारिफ बोर्डाची घटना व नेमणूक व संरक्षणाच्या धोरणाबाबतचा सरकारचा दृष्टिकोन ह्यांबाबत लोकांची प्रतिकूल टीका झाली आहे. असेंब्लींत होणाऱ्या चर्चेमध्यें हा प्रश्न मधून मधून सारखा डोकावतो आहे. फिनॅन्स बिलावरील वादाच्या ओघांत सर एच. पी. मोदी ह्यांनीं गेल्या आठवड्यांत त्या विषयास जोराची चालना दिली. देशांतली बेकारी दूर होण्यास देशी धंद्यांचा उत्कर्ष झाला पाहिजे आणि तो होण्यास धंदेरक्षण उत्साहानें करणें अगत्याचें आहे असें सांगून सध्या हिंदी टारिफ बोर्डाचें कार्य, इतर देशांतील तत्सम तज्ज्ञमंडळांच्या मानानें अत्यंत मंदगतीचें व मर्यादित आहे अशी त्यांनीं टीका केली. कांच व सिनेमा ह्यांसारख्या धंद्यांस लागणारा कांहीं किंवा बराच कच्चा माल परदेशांतून आणावा लागला तरीहि त्यांस संरक्षक जकातींचें सहाय राष्ट्रीय आर्थिक उन्नतीच्या दृष्टीनें अत्यावश्यक आहे असें सर होमी मोदी ह्यांनीं प्रतिपादन केलें. आयात जकातींसंबंधानें चौकशी करण्यासाठी नेमण्यांत आलेल्या ग्रेट ब्रिटनमधील मंडळानें तीन वर्षांत ३१० अर्जांचा निकाल केला आहे. त्याच्या उलट, हिंदी टारिफ बोर्डाच्या हातून दहा वर्षांच्या अवधींत अवघ्या ५० अर्जांची चौकशी झाली आहे. ह्यावरून हिंदुस्थानांतली पद्धति अत्यंत सदोष असून तिच्यामध्यें आमूलाग्र

सुधारणा होणें जरूर आहे, असें सर होमी मोदी ह्यांनीं सुचवलें. संरक्षक धोरणामुळें जनतेवर भारी किंमतींचा बोजा पडतो असें कांहीं आंकड्यांवरून सिद्ध करण्याचा सर जेम्स ग्रिग ह्यांचा प्रयत्न चुकीचा आहे असें म्हणून त्यांनीं, ह्या सबंद प्रश्नाचा व्यापक दृष्टीनें विचार करण्यासाठीं पुन्हां एकवार फिस्कल कमिशन नेमण्याची वेळ आली आहे असा अभिप्राय व्यक्त केला.

---

### विन तिकिटाच्या रेल्वेप्रवासावर नियंत्रण

रेल्वेचा प्रवास फुकट करणारांची संख्या एवढी मोठी आहे कीं त्या योगानें आपलें फार नुकसान होतें, अशी रेल्वे अधिकाऱ्यांची बऱ्याच वर्षांची तक्रार आहे. त्या बाबतच्या कायद्यांत कडक शिक्षेची तजवीज असावी, ह्या त्यांच्या मागणीचा विचार लवकरच होणार असल्याचा रंग दिसतो. गेल्या महिन्यांत मध्यवर्ती कायदेमंडळापुढें रेल्वेच्या उत्पन्नांत झालेल्या घटीची चिकित्सा होत असतांना तिकिटांशिवाय प्रवास करणारांचा बंदोबस्त करण्यांत यावयाचा सरकारचा निश्चय जाहीर करण्यांत आला होता. ह्या संबंधांत कायदा करण्याबाबत प्रथम १९२३ मध्यें प्रश्न उपस्थित झाला व तेरा वर्षांनीं त्याचा आतां निकाल लागावयाचा आहे. बिनतिकिटानें होणारे प्रवास जेथें विशेष आढळून आले अशा ठिकाणांवर लक्ष ठेवणें, तपासणी कडक करणें, तिकिटें काढण्याच्या सोई वाढवणें, प्लॅटफॉर्म तिकिट शक्य तितक्या स्टेशनांवर आवश्यक करणें, तिकिटांचे हिशेब कडक रीतीनें तपासणें, प्रवासाच्या लहान टप्प्यांवर विशेष नजर ठेवणें, रेल्वे हद्दींतून भिकारी वगैरेंची हकालपट्टी करणें, बिनतिकिटाचे प्रवासी स्टेशनांतून निसटूं न देण्याची खबरदारी घेणें, स्टेशन हद्दींत कुंपणें वाढवणें, इत्यादि मार्गांचा अवलंब होऊनहि फुकट प्रवास करणारांची संख्या दरसाल फुगत चालली आहे. १९२५ सालीं १७ लक्ष लोक बिगरतिकिट सांपडले. १९३४ सालीं ही संख्या २७ लाखांपर्यंत गेली! नवीन कायद्यांत ह्या गुन्ह्यास कैदेची शिक्षा सांगण्यांत येईल, अशी अपेक्षा आहे. साध्या कैदेचा उपयोग होत नाहीं, असा अभिप्राय पंजाब सरकारनें १९२३ सालींच दिलेला आहे!

---

### मिठावरील कर

असेंब्लींत फिनॅन्स बिलाच्या चर्चेमध्यें, मिठावरील कर अजीबात बंद व्हावा अशा आशयाची दुरुस्ती बहुमतानें मंजूर झाली. सुमारें ८ कोटी रुपयांचें उत्पन्न ह्या योगानें कमी होत असतां सरकार ही दुरुस्ती मान्य करील, हें संभवतच नाहीं. गव्हर्नर जनरल ह्यांस जे विशेष अधिकार आहेत, त्यांच्या जोरावर वरील दुरुस्ती फेटाळून लावून मिठाच्या करावावतचें बिलांतलें मूळ कलम कायम होईल अशी ते व्यवस्था करतील, हें निश्चित आहे. असेंब्लीच्या सभासदांचें मिठावरील कर सबंद काढून टाकण्यासंबंधांत एवढें बहुमत झालें, याचा अर्थ, त्यांस सरकारच्या सांपत्तिक धोरणाचा निषेध करावयाचा होता, असा आहे, हें स्पष्टच आहे. बिनसरकारी पक्षांच्या सभासदांचें ह्या प्रश्नावर बहुमत झालें, ह्याचें रहस्य, गव्हर्नर जनरल ह्यांस आपल्या विशेष अधिकाराचा उपयोग करावयास लावण्याच्या इच्छेमध्यें आहे.

---

## फळें व त्यांचे पदार्थ टिकविण्याकरितां मुंबईमध्यें 'कॅनरी' काढण्याची योजना

लेखक:—एस. एस. भट, एम्. एजी., शेतकी कॉलेज, पुणें.
भाषांतरकार:—कै. जी. कोल्हटकर, बी. एजी.

( मागील अंकावरून चालू )

(१३) 'कॅनरी' काढण्यास योग्य जागेची निवड:— अशा प्रकारची कॅनरी मुंबईस काढल्यास ती यशस्वी होईल, हें आपणांस खालील मुद्यांवरून सहज कळून येईल.

(१) प्रथम जीं फळें 'कॅनिंग' करतां घ्यावयाचीं त्यांत आंबा, पेरू व कागदी लिंबू यांचा समावेश होतो. हीं फळें ज्या प्रदेशांत होतात त्यांतील कोणत्याहि ठिकाणाहून मुंबई शहर सारख्या अंतरावर पडतें व त्यामुळें वाहतुकीचा खर्च दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणापेक्षां येथें कमी पडतो. मुंबई उपनगर जिल्ह्यांतून तसेंच ठाणा, कुलाबा, सुरत व कोंकणपट्टींतून आंबे मुंबईस दर हंगामीं सहज येऊं शकतात. नाशिक, पुणें, अहमदनगर व खानदेश ह्या जिल्ह्यांतून पेरू, व पुणें आनंद, (कैरा) नाशिक वगैरे ठिकाणाहून कागदी लिंबें मुंबईस फार जलद व स्वस्त येऊन पडतात. 'कॅनरी' स्थापन करण्याची ती एकच जातीच्या फळांकरतां नसून वर सांगितलेल्या निदान तीन तरी फळांचा त्यांत समावेश होतो व अशा करतां मुंबई शहराखेरीज कारखाना किंवा कॅनरी काढण्यास दुसरें सोईस्कर ठिकाण ह्या इलाख्यांत सांपडणें फार कठीण पडेल.

(२) 'कॅनरीस' लागणाऱ्या निरनिराळ्या वस्तू, बाटल्या, डबे, पॅकिंग करण्यास लागणारी यंत्रसामुग्री वगैरे सामान मुंबईसच सहज मिळूं शकतें व त्याचप्रमाणें परदेशाशीं व्यवहार करण्यास मुंबई हेंच केंद्र योग्य आहे.

(३) मुंबई शहर हें फार अवाढव्य असल्यानें तेथेंच मालाचा बराचसा उठाव होतो. त्यांतून, या शहरांत सुशिक्षित व सुधारलेल्या जनतेस अशा प्रकारच्या पदार्थांची फार आवड असते व कारखान्यांतून निघालेला अगदी खात्रीचा व ताजा माल खरेदी करणें त्यांना फार पसंत पडतें. या शहरांतील एकंदर अवाढव्य घडामोडीमुळें मालाची आपोआपच ख्याती होते व त्यास निराळ्या जाहिरातीची जरूर लागत नाहीं. मुंबईशिवाय इतर ठिकाणीं जरी कारखाने काढले तरी मुंबईस होणारा मालाचा प्रचंड खप हा प्रामुख्यानें लक्षांत घेतला पाहिजे.

(४) मुंबई शहर हें मोठें व्यापारी बंदर असल्यानें परदेशांत व स्वदेशांत येथूनच मालाची ने आण होत असते व त्यामुळें मुंबईसच कारखाना असल्यास कोणत्याहि ठिकाणीं माल पाठविणें किफायतशीर होईल. मुंबईस मोठमोठे व्यापारी व मोठमोठ्या कंपन्यांचे एजंट लोक असतात. त्यांना तेथें असलेला कारखाना प्रत्यक्ष पाहतां येईल, व नंतर त्यांची मालाच्या शुद्धतेबद्दल व खरेपणाबद्दल आपोआपच खात्री होईल.

(५) मुंबईस कारखाना असल्यास त्यांत काम करणाऱ्या लोकांना तेथील मोठमोठ्या व्यापाऱ्यांशीं व हॉटेलवाल्यांशीं विचारविनिमय करून मालांतील दोष काढून त्यांत सुधारणा घडवून आणणें सुलभ जाईल.

(६) मुंबईस आपल्या मालाचीं प्रदर्शनें व प्रात्यक्षिकें भरवून जनतेपुढें मालाची मांडणी करण्याची सुसंधि अनेकदां येते व तज्ञ लोकांना कोणत्याहि प्रकारचा खर्च अगर त्रास न पडतां अशाप्रसंगीं हजर राहतां येतें व आपल्या मालाबद्दल लोकांस खात्री पटवून देतां येते.

---

## मालाचा संघटित उठाव करण्याबाबतच्या योजना

### ब्रिटिश मिल्क मार्केटिंग बोर्डाचें उदाहरण

योजनात्मक आर्थिक धोरणाची अंमलबजावणी सर्व प्रगतिपर देशांत आतां करण्यांत येऊं लागली आहे. राष्ट्रहिताच्या व्यापक दृष्टीनें जरूर तेथें व्यक्तिस्वातंत्र्यास मर्यादा घालून राष्ट्रीय सरकारानें आर्थिक संघटन केलें पाहिजे, ह्या तत्त्वाचा पुरस्कार इंग्लंड-सारख्या जुन्या परंपरेस चिकटून राहाणाऱ्या देशानेंहि केलेला आहे. हिंदुस्थानांत त्याचें अस्पष्ट प्रतिबिंब पडलें असून शेतकऱ्यांचें ऋणविमोचन, ऊंस, ताग, चहा इत्यादि पिकांसंबंधीं योजना, ग्रामोद्धारासाठी सहाय, वगैरे मार्गांनीं येथील सरकार ह्यासंबंधांतील आपल्या जबाबदारीची जाणीव थोडीबहुत व्यक्त करीत आहे. राष्ट्रीय सरकारनें लोकांच्या हितासाठी आर्थिक योजना आंखाव्या, हें ठीक आहे; परंतु त्यांची अंमलबजावणी करतांना किती बारकाईनें त्यांस देखरेख करावी लागते, ह्याची कल्पना फारच थोड्या लोकांस असेल. जकातीच्या संरक्षक धोरणाचा अवलंब म्हणजे सरकारचा नसता उपद्व्याप होय, अशा आत्यंतिक मताच्या लोकांस इंग्लंडमधील 'खुल्या व्यापारा'ची महती गाणारें सरकार सार्वजनिक जीवनांत किती खोल हात घालतें हें समजणें जरूर आहे. ह्याकरितां प्रस्तुत प्रसंगीं दुधाच्या धंद्याबाबत ब्रिटिश सरकारचें धोरण कोणतें आहे, ह्याची माहिती देण्यांत येत आहे.

इंग्लंडमध्यें 'दि मिल्क मार्केटिंग बोर्डा'कडे दुधाच्या धंद्याचें नियंत्रण सोपविण्यांत आलेलें आहे. ह्या बोर्डानें केलेल्या योजनेनुसार प्रत्येक ठिकाणच्या दुधाचे उत्पादकास दर गॅलनी ठराविक किंमतच फक्त मिळूं शकते. दुधाचा उपयोग कोणत्या स्वरूपांत करण्यांत येणार त्यावर त्याची किंमत अवलंबून असते. त्याचे पदार्थ बनवून ते विकण्यांत येणार असतील, तर दुधाचा अधिकृत भाव नेहेमीच्या भावापेक्षां निम्मा असतो. मोठ्या प्रमाणावर दुधाचा धंदा करणारे उत्पादक व किरकोळीनें दूध खपवणारे विक्रेते ह्या सर्वांवर, त्यांच्या व्यवहारांप्रमाणें पट्टी बसविण्यांत येते. ठराविक भावाखाली दूध विकण्यास बंदी करण्यांत आल्याकारणानें स्पर्धा नाहींशी होते, ह्या सोईची वरील पट्टी ही किंमत आहे. दुधाची एकजात किंमत नक्की केल्याकारणानें व ती भारी नसल्यानें दूधवाल्यांस विशेष फायदा होत नाहीं; तथापि विशिष्ट किंमत मिळण्याची खात्री असल्याकारणानें ही योजना एकंदरीनें फायदेशीरच होते. दूध खपण्याचीं केंद्रें म्हणजे लंडनसारखीं मोठीं शहरें हीं होत. त्यांच्या आसपास तयार होणाऱ्या दुधाच्या व लांबच्या पल्ल्यावरून येणाऱ्या दुधाच्या विक्रीचे किंमतींत फरक पडेल, अशी अपेक्षा होती; तथापि इंग्लंडसारख्या लहान देशांत वहातुकीसाठी येणारा खर्च ह्या बाबतींत विशेष प्रभावी होत नाहीं, असा अनुभव आहे.

मिल्क मार्केटिंग बोर्डानें शाळेंत जाणाऱ्या मुलांसाठी स्वस्त दूध पुरविण्याची आपली योजना प्रथम १९३४ सालीं चालू केली व ती ताबडतोब यशस्वी झाली. त्यानंतरची दुसरी पायरी म्हणजे उत्कृष्ट प्रतीच्या दुधास गॅलनमागें एक आणा असें बक्षिस देण्यास सुरवात ही होय. दुधाच्या सर्व उत्पादकांवर बसवलेल्या पट्टीमधून निर्माण होणाऱ्या मध्यवर्ती फंडांतून हें बोनस वाटण्यांत येतें. ह्या कारणानें दूध स्वच्छ व आरोग्यकारक राखण्याबद्दल उत्पादकांत चढाओढ लागून सार्वजनिक हितांचें संरक्षण होतें. दुधाच्या स्वच्छतेबद्दलची लवकरच परीक्षा ज्यास्त कडक करण्यांत यावयाची आहे. सध्या पुरविलें जाणारें दूध उत्कृष्ट असलें तरी क्षयरोगाचे जंतू त्यांतून नाहींसे झालेले असतीलच, अशी ग्वाही देतां येत नाहीं. दुग्धालयांतून ह्या जंतूंचा नायनाट करण्याबाबत प्रयत्न करण्यांत येणार आहेत.

दूध-पुरवठ्याचा प्रश्न आमच्या देशांत सर्वस्वी उपेक्षित असा आहे. मोठ्या प्रमाणावर धंदा करणारीं दुग्धालयें अजून सर्वत्र निघालीं नाहींत; त्याचप्रमाणें, शुद्ध दुधाचें महत्त्वहि अजून लोकांस पटावें तसें पटलेलें नाहीं. दुधांत पाणी तरी निदान मिसळलेलें नसावें, ह्याबद्दलहि लोकांचा विशेष कटाक्ष नाहीं. तथापि सरकारी किंवा निमसरकारी नियंत्रणामुळें उत्पादक व ग्राहक ह्या दोघांचाहि शेवटीं फायदा होतो, असा अनुभव आलेला आहे. इंग्लंडसारख्या स्वतंत्र वृत्तीच्या राष्ट्रांत सुद्धां दूध पुरवठ्यासारख्या बाबतींत किती लक्ष्य घातलें जात आहे, हें पाहून आश्चर्य वाटतें. मिल्क मार्केटिंग बोर्डाप्रमाणें डुकरें, बटाटे, बीट साखर, फळें, भाज्या, कोंबड्या ह्या सर्वांच्या पुरवठ्याबाबत ब्रिटिश सरकारनें योजनात्मक धोरण आंखलें आहे. हिंदी सरकारनें कांहीं अपवादात्मक संघटन आणि करार करून ह्या तत्त्वास तात्त्विक संमति दर्शविलेली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु व्यापक स्वरूपांत धोरण आखून त्याची तपशीलवार अंमलबजावणी करण्याची विशेष उत्सुकता त्यानें दर्शविलेली नाहीं. ग्रेटब्रिटनच्या उदाहरणावरून हिंदुस्थानांत कांहीं बोध घेण्यासारखा नाहीं काय?

## 'अर्था'चें व्यवसाय बंधूकडून स्वागत

"प्रो. काळे यांनीं कॉलेजांतील प्रोफेसर व अर्थशास्त्रीय ग्रंथाचे लेखक म्हणून बजावलेली कामगिरी सर्व विश्रुतच आहे. अलीकडे ते महाराष्ट्राच्या औद्योगिक जीवनांत प्रत्यक्षपणें भाग घेऊं लागले आहेत; किंबहुना त्यांच्या प्रेरणेनें व सल्लयामुळें महाराष्ट्र व्यापार-उद्योगांत मागसलेला हा आरोप झाडून टाकण्यास उद्युक्त झाला आहे. आमचे अर्थशास्त्राचे प्रोफेसर जीविताच्या उत्तर भागांत तरी केवळ पुस्तकी ज्ञानाच्या टरफलांतून बाहेर पडून देशाच्या आर्थिक व औद्योगिक क्षेत्रांत पुढें येतील तर या देशाचें भवितव्य निःसंशय उज्वल होईल.

प्रो. काळे यांच्या 'अर्थ' साप्ताहिकांत व्यापार, विमा, बँका, कारखाने इत्यादि संबंधीं अत्यंत उपयुक्त व साधार माहिती असते व त्यांतील लेख इतर पत्रांतूनहि मधून मधून उद्धृत करण्यांत येत असतात, त्यामुळें त्यांचें महत्त्व वाचकांना कळून येईल. या स्वरूपाचे पत्र स्वतःचे आर्थिक जबाबदारीवर चालविणें हें कांहींसें आंतबट्ट्याचें असतें पण ती झीज सोसून प्रो. काळे आपलें कर्तव्य करीत आहेत त्याचें चीज महाराष्ट्रीय वाचकवर्ग पत्राचे वर्गणीदार होऊन करील असें आम्हांस वाटतें.

'अर्थ' साप्ताहिकाप्रमाणें अर्थ प्रकाशनमाला प्रो. काळे यांनीं काढली असून बँका व त्यांचे व्यवहार 'रिझर्व्ह बँक' व स्टॉक 'एक्स्चेंज' या विषयावर मालेतर्फे तीन पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. अर्थशास्त्रविषयक मराठी वाङ्मयांत या मालेनें आतांपर्यंत चांगलीच भर टाकली आहे."

—तेज ६।३।३६

### टी सेस कमिटी

दि इंडियन टी असोसिएशन ह्या चहाच्या मळेवाल्यांच्या संस्थेनें विनंति केल्यावरून १९०३ सालीं चहाच्या निर्गतीवर दर पौंडास ¼ पै ह्याप्रमाणें पट्टी बसविण्यांत आली व चहाचा खप वाढविण्यासाठी प्रचारकार्य करण्यासाठी तिच्या उत्पन्नाचा विनियोग करण्यांत आला. ही पट्टी पुढें वाढविण्यांत आली. सरकार पट्टीची वसुली फक्त करून देते; आणि एका कमिटीकडे हे पैसे दाखल होतात. इंडियन सेस ॲक्टांत आतां दुरुस्ती करण्यांत यावयाची आहे. कमिटीचें नांव पूर्वी 'टी सेस कमिटी' असें होतें, तें बदलून 'टी मार्केटिंग एक्सपॅन्शन बोर्ड' असें ठेवण्यांत येईल. दर शंभर पौंड चहावर सध्यां ज्यास्तींत ज्यास्त बारा आणे पट्टी आकारण्यांत येते, ती नवीन विलान्वयें दीड रुपये करण्यांत येईल. कमिटीचा खर्च वर्षभर चालू असतो, परंतु चहाच्या निर्गतीचे मोसमांतच फक्त पट्टी वसूल होते पट्टीच्या वसुलीचे तारणावर ह्या मंदीचे दिवसांत बँकेकडून कर्ज काढण्याची कमिटीस मुभा हवी आहे. कमिटीमध्यें सध्या वीस सभासद असतात. ही संख्या पंचवीस करण्यांत येईल, म्हणजे सहा सभासद तरी हिंदी रहातील अशी अपेक्षा आहे. कमिटीच्या कार्यकारी मंडळावर हल्ली एकहि हिंदी सभासद नाहीं; नव्या योजनेप्रमाणें दोघांस त्यांत जागा मिळेल.

---

### मध्यवर्ती कायदेमंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

हिंदुस्थान सरकारच्या सेक्रेटारिएटमध्यें सेक्रेटरी, जॉइंट सेक्रेटरी व डेप्युटी सेक्रेटरी ह्यांच्या दर्जाच्या, एकूण ४८ जागा आहेत. त्यांपैकीं १३ जागांवर हिंदी लोकांची नेमणूक झालेली आहे.

* * *

हिंदुस्थानांतील सरकारी मालकीच्या रेल्वेवरील कनिष्ट दर्जाच्या नोकरांस प्रॉव्हिडंड फंडाची योजना लागू केली, तर त्यासाठीं सरकारास दरसाल २५ लक्ष रुपये खर्च येईल. आर्थिक अडचणींमुळें ह्या प्रश्नाचा विचार तूर्त पुढें ढकलला आहे.

* * *

इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्यें एकूण ७५६ युरोपियन व ५४४ हिंदी नोकर आहेत; म्हणजे शंभरांत अनुक्रमें ५८ व ४२ असें त्यांचें प्रमाण पडतें. गेल्या पांच वर्षांत वास्तविक १७५ युरोपियन व १७५ हिंदी नोकरांस नव्यानें प्रवेश मिळावयाचा, परंतु ९६ युरोपियन व १६२ हिंदी लोक नोकरींत घेतले गेले आणि ९२ जागा भरल्या गेल्या नाहींत. ह्यांपैकीं ७९ जागा युरोपियनांच्या वांटणीच्या आहेत. ही तूट कशी भरून काढावी, ह्याचा सरकार विचार करीत आहे.

---

### जिलेट् सेफ्टी रेझर कंपनीचा नफा

जिलेट् सेफ्टी रेझरच्या कंपनीस ( ही कंपनी अमेरिकन आहे ) गेल्या सालीं, घसारा वगैरे बाबी वजा जाऊन, एकूण निवळ नफा सुमारें १ कोटि रुपये झाला. पूर्वीच्या वर्षाच्या मानानें हा आंकडा सुमारें ८ लक्ष रुपयांनीं ज्यास्त आहे.

---

### मुंबई इलाख्यांतील प्राथमिक शिक्षण

मुंबई इलाख्यांत जिल्हा लोकल बोर्डांनीं चालविलेल्या १०,८१३ प्राथमिक शाळा आहेत. म्युनिसिपालिट्यांच्या शाळा आहेत, त्या वेगळ्या. जिल्हा लोकलबोर्डें ह्या शाळांवर दरसाल सुमारें १ कोटि ५ लक्ष रुपये खर्च करतात, त्यांपैकीं ७० लक्ष रुपये सरकार देतें.

---


**धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०**

कडून

**हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | |
|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |

| | | |
|---|---|---|
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |

| | |
|---|---|
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानावाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

**CONFIDENCE**

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**

**This year 1934-35**
**Exceeds**
**2 CRORES & 50 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

**HINDUSTHAN**

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD. 1907 )

*Branches:* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca,
*Offices:* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER: Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## हिंदुस्थानांतील शिक्षणाची प्रगति

### विद्यार्थ्यांची वाढती संख्या, वाढता खर्च व वाढती बेकारी

हिंदुस्थान सरकारनें तयार केलेला, १ एप्रिल १९३३ ते ३१ मार्च १९३४ अखेरचा हिंदुस्थानांतील शिक्षणविषयक प्रगतीचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यांतील महत्त्वाचे कांहीं उतारे येथें दिले आहेत:—

( १ ) विश्वविद्यालयांतून गर्दी झाली आहे, दुय्यम शिक्षण एकांगी आहे, सभोंवतालच्या परिस्थितीशीं प्राथमिक शिक्षणाचा फारच थोडा संबंध येतो व बेकारीचा प्रश्न तर अत्यंत कठीण आहे. तथापि, शिक्षणाचा फैलाव मात्र जास्त झाला आहे, ह्यांत संशय नाहीं. अहवालाचे सालीं बंगालमध्यें १,५९९ शिक्षणसंस्थांची भर पडली, परंतु इतर प्रांतांत मात्र बरीच घट होऊन सबंद हिंदुस्थानांत मिळून फक्त १,३७७ संस्थांची वाढ झाली. तथापि, विद्यार्थ्यांच्या संख्येंत त्या मानानें बरीच म्हणजे ३ लक्ष २० हजारांनीं भर पडली. आर्थिक मंदीचा, प्रांतिक सरकारांनीं शिक्षणावर करावयाच्या खर्चावर प्रतिकूल परिणाम झाला नाहीं, हें विशेष होय. खालील कोष्टकांत १९२७ सालीं प्रतिक सरकारांनीं शिक्षणासाठी केलेल्या खर्चाची १९३४ सालांतील खर्चाशीं तुलना केली आहे.

| प्रांत | १९२७ | | १९३४ | |
|---|---|---|---|---|
| | शिक्षणावर सरकारी खर्च | शिक्षणावर केलेल्या खर्चाचें एकूण प्रांतिक खर्चाशीं शतमानानें प्रमाण | शिक्षणावर सरकारी खर्च | शिक्षणावर केलेल्या खर्चाचें एकूण प्रांतिक खर्चाशीं शतमानानें प्रमाण |
| | लक्ष रु. | % | लक्ष रु. | % |
| मद्रास | २०२ | १३·३ | २४६ | १५·०९ |
| मुंबई | १९९ | १३·६ | १७६ | १२·१ |
| बंगाल | १४८ | १४·० | १३५ | १४·९ |
| संयुक्त प्रांत | १९६ | १७·२ | १९८ | १७·६ |
| पंजाब | १५१ | १३·९ | १६० | १४·९ |
| ब्रह्मदेश | ९५ | ९·४ | ५८ | ६·८ |
| बहार व ओरिसा | ७२ | १२·५ | ५५ | ११·१ |
| मध्यप्रांत | २१ | १४·२ | ४४ | १०·२ |
| आसाम | २५ | १०·२ | २८ | १४·० |
| सरहद्द प्रांत | ... | ... | १९ | ११·० |

( २ ) १९३४ सालअखेर सर्व हिंदी विश्वविद्यालयांत मिळून १,१३,३२८ विद्यार्थी शिकत होते. ज्यास्त कार्यक्षम विद्यार्थ्यांस वाव मिळावा व सुशिक्षितांमधील बेकारीस आळा बसावा ह्यासाठी विद्यार्थ्यांची संख्या नियमित करावी लागण्याची पाळी लवकरच येणार आहे.

( ३ ) मॅट्रिकची परीक्षा सोडली, तर विश्वविद्यालयाच्या इतर परीक्षांस बसणाऱ्या पुरूष विद्यार्थ्यांची संख्या कायम आहे. परंतु विद्यार्थिनींची संख्या मात्र वाढत आहे व परीक्षेंत उत्तीर्ण होण्याचे बाबतींतहि त्या अग्रेसर आहेत.

( ४ ) प्रत्येक शाळेंतील विद्यार्थ्यांची संख्या सरासरीनें ५० पडते. जपानमध्यें हें प्रमाण ३०० इतकें आहे. शाळा मोठ्या केल्यास खर्चांत बरीच बचत होईल.

( ५ ) जिल्ह्यांतील शाळांत मुलांमुलींचें प्राथमिक शिक्षण एकत्र होत नाहीं. तथापि प्राथमिक वर्गांत तें एकत्र असल्यास त्याबद्दल तक्रार ऐकूं येत नाहीं. शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या वाढत असून त्याबरोबर त्या प्रीत्यर्थ होणारा खर्चहि ज्यास्त ज्यास्त होऊं लागला आहे.

( ६ ) युरोपियन व अँग्लो-इंडियन शाळांत जाणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांची संख्या एकसारखी वाढत आली आहे. गेल्या आठ वर्षांत ती पांच हजारांनीं वाढली. मुसलमान मुलांपेक्षां मुलींमध्यें शिक्षणाचा फैलाव ज्यास्त जोरानें होत आहे. पंजाबमधील प्रगति विशेष उल्लेखनीय आहे. अहवालाचे सालीं हरिजन विद्यार्थ्यांच्या संख्येंत ६९ हजारांनीं वाढ झाली.

### हौरा पुलाचें टेंडर

कलकत्त्याजवळील हुगळी नदीवर बांधण्यांत यावयाच्या नव्या पुलासाठीं टेंडरें मागविण्यांत आलीं होतीं. टेंडरें पाठविणारांनीं आपले अदमास खालीलप्रमाणें दिले:—

मेसर्स. क्रप्स ( जर्मन )—२ कोटि, ९ लक्ष रु.

मेसर्स. बर्न, ब्रेथवेट अँड जेसप ( हिंदुस्थानांतील)—२ कोटि, ३२ लक्ष रु.

मेसर्स क्लीव्हलंड ब्रिज अँड इंजिनिअरिंग कंपनी (ब्रिटिश)—२ कोटि, १४ लक्ष रु.

कलकत्ता पोर्ट ट्रस्टच्या पोर्ट कमिशनर्सच्या पोट कमिटीनें ब्रिटिश कंपनीचें टेंडर मंजूर करण्यांत यावें असा अभिप्राय दिला आहे. अशी बातमी पसरली होती, परंतु त्यांच्यापैकीं बहुमतवाल्यांनीं हिंदी कंपनीचा पुरस्कार केला आहे असें समजतें.

### फेन्ट्स

कापडाच्या चार वारांपेक्षा लहान आकाराच्या तुकड्यास "फेन्ट" असें म्हणतात. ह्या तुकड्यांच्या आयातीवरील जकातीचा दर इतर कापडावरील दरापेक्षां कमी असल्यानें त्या सवलतीचा गैरवाजवी फायदा जपान घेऊं लागला आहे. वाया गेलेल्या कापडाचे तुकड्यांना पुन्हा लांबीच्या ताग्यांचा भाव येणार नाहीं, ह्या दृष्टीनें त्यांच्यावर जबर जकात बसविण्यांत आली नव्हती, परंतु चांगल्या कापडाचे तुकडे करून ते मोठ्या प्रमाणावर निर्गत करण्याचें धोरण अंगीकारून जपाननें हिंदी बाजारपेठ काबीज केली आहे. 'फेन्ट्स'ला जकातीबाबत मिळालेली सवलत रद्द करण्याच्या हेतूनें एक बिल मध्यवर्ती कायदेमंडळांत सरकार मांडणार आहे. ह्यामुळें खऱ्याखुऱ्या 'फेन्ट्स'च्या व्यापारावर सुद्धां निर्बंध बसेल, हें उघड आहे.

## शेती व सहकार

### ग्रामसुधारणा मंडळ, मिरजोळें ( रत्नागिरी )

वरील संस्थेच्या चतुर्थवार्षिक अहवालावरून तिनें चालविलेल्या कामासंबंधी चांगली माहिती मिळते. संस्थेच्या पटावर आठरा सभासद् असून त्यांत ब्राह्मण, भंडारी, तेली, कुणबी ह्या सर्वांचा समावेश झाला आहे. मंडळाचा मूळ उद्देश, सभासदांचे उन्नतीकरतां प्रयत्न करणें हा असला, तरी गांवांतील सार्वजनिक कामेंहि त्याच्या कक्षेंत येतात व तीं केलीं जातात. हस्तव्यवसायांचीं प्रदर्शनें भरविण्याचे कामीं मेहनत घेऊन तीं यशस्वी करण्यांत आलीं आहेत. विणकरांची सहकारी संस्था, रत्नागिरीस एक मोठें प्रदर्शन, कारागिरांचा माल खपविण्यासाठी स्वतंत्र भंडार, इत्यादि गोष्टींबाबत पूर्वतयारी चालू आहे. संस्थेचें कार्य उत्साहानें व चिकाटीनें करण्यांत येत आहे, ह्याचें प्रतिबिंब अहवालांत दिसतें. मंडळाचे अध्यक्ष श्री. ग. वि. भाटवडेकर हे आहेत.

### सहकारी चळवळ व सरकारी सहाय

मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांतिक सहकारी बँकेच्या नव्या इमारतीचा उद्घाटन समारंभ प्रांताचे गव्हर्नर सर हाइड गोवन ह्यांच्या हस्तें झाला. त्या प्रसंगीं आपल्या भाषणांत ते म्हणाले:—

"वाईटांतून चांगलें निघतें, त्याप्रमाणें सध्याच्या बिकट परिस्थितीमुळें सहकारी चळवळीचा दोन दृष्टींनीं फायदा होईल. चळवळीच्या प्रगतीसंबंधांतील दोषांची चर्चा करण्यास लोकांना संधी मिळाली असून सरकारासहि आपलें धारण निश्चित ठरवावें लागलें आहे व चळवळीवर सर्वसाधारण नजर ठेवून तिचें मार्गदर्शकत्व स्वीकारावें लागलें आहे. एका विशिष्ट कारणासाठी अनेक लोक एकत्र आले म्हणजे त्या सर्वांस मिळून त्यांच्या सामुदायिक पतीवर कर्ज मिळणें सोपें जातें. त्याचप्रमाणें एकट्या दुकट्यास प्राप्त न होणारे कित्येक फायदे मिळूं शकतात. हीं गोष्ट सामान्य जनतेस जोंपर्यंत पटली नाहीं, तोंपर्यंत सरकारनें मार्गदर्शनाचें काम करीत रहाणें अत्यावश्यक आहे."

### मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूट, पू. खानदेश शाखा

वरील शाखेनें पंचकमिटींतील सभासदांसाठी शिक्षणवर्ग भरविले. त्याचा फायदा बऱ्याच सोसायटयांच्या सभासदांनीं व इतर लोकांनीं करून घेतला. भडगांव, पाळधी, कासोदा, केकतनिंभोरे, अमळनेर, बोदवड व म्हसावद येथील वर्गांत मिळून सुमारें ५०० सभासद् हजर होते. प्रत्येक शिक्षणवर्गांत प्रास्ताविक भाषण करण्यांत येऊन इन्स्टिटयूटसंबंधीं माहिती देण्यांत येई व मॅनेजिंग कमिटीचीं कर्तव्यें, वसुलीबाबत धोरण, सुखसंपत्ति संवर्धक सोसायटया व त्यांची आवश्यकता, सोसायटयांची नियामित व अनियामित जबाबदारी, सहकारी तत्त्वावर सभासदांच्या मालाची विक्री, इत्यादि संबंधाची माहिती देण्यांत येई.

### माळशिरस तालुका को-ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनिअन, माळशिरस

माळशिरस येथें ता. २९।३।३६ रोजीं रविवारीं दोन प्रहरीं ३ वाजतां युनिअन बोर्ड मेंबर्स ट्रेनिंग क्लास व ता. ३०।३।३६ रोजीं सोमवारीं दुपारीं १२ वाजतां दुसरी माळशिरस तालुका को-ऑपरेटिव्ह कॉन्फरन्स, श्री. वैकुंठराय एल. मेहता, मॅनेजिंग डायरेक्टर, मुंबई प्रांतिक सहकारी बँक मुंबई, यांचे अध्यक्षतेखालीं भरविणेचें ठरलें आहे.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | ११०—८ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १०९-१० |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८—८ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११८—० |
| ४% १९६०–७० ... ... | ११२—५ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९३-३½ |
| ३½% १९४७-५० ... ... | १०५-१० |
| ४% १९४३ ... ... ... | ११०—० |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०६—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०६—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रुव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | १०६—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | १०३-१२ |
| ४% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२१—८ |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२७—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०१—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३२—८ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५३५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १२९—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १००—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९½% ) | ८७२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५५—० |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२३-१२ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½%) | १५३६—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५६०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९३-१२ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८आ.) | १६५-१२ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १४६-१२ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५४०—० |

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचा मजबूत पाया

मध्यप्रांत व वऱ्हाड

हायस्कूल, मिडल स्कूल व नॉर्मल स्कूल ह्यांतील शिक्षकांच्या ग्रंथालयासाठी मंजूर

# अर्थ

[ व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि आर्थिक विषयांस वाहिलेलें साप्ताहिक ]

संपादक : प्रो. वा. गो. काळे

सहायक : श्री. श्री. वा. काळे

मुंबई इलाखा

सरकारी व सरकार-मान्य शाळांत व ट्रेनिंग कॉलेजांत घेण्यासाठी मंजूर

महाराष्ट्रीयांचीं मनें उद्योगधंदे, व्यापार, इत्यादि धनोत्पादक व्यवहारांकडे वळून त्यांस ह्या विषयांची गोडी लागावी, या दृष्टीनें 'अर्था'ची मांडणी केलेली असते. व्यापारी, शिक्षक, विद्यार्थी, सार्वजनिक कार्यकर्ते व सर्वसाधारण नागरिक ह्या सर्वांनीं 'अर्था'चें वाचन केलें असतां महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीचा मजबूत पाया तयार झाल्याखेरीज रहाणार नाहीं. उद्योगधंद्यांत असणाऱ्या, त्याचप्रमाणें त्यांत नव्यानें पडणाऱ्या सर्वांस हें पत्र मार्गदर्शक होईल.

प्रत्येक महाराष्ट्रीय कुटुंबांत व शाळेंत अर्थ वाचला जाणें आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी फक्त चार रुपये असून टपालखर्च वेगळा नाहीं. मनिऑर्डर पाठवून वर्गणीदार व्हा.

व्यवस्थापक, अर्थ, अर्थ ऑफिस, पुणें ४



# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये ?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.



K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

एन. ए. ॲन्ड फ्रेन्ड्स
स्टेशनर्स, जनरल मर्चन्टस, ॲन्ड कमिशन एजन्टस.
आप्पा बळवंत चौक, पुणें २.

# दि मुकुंद इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें शहर.

[ अधिकृत भांडवल १००,००० रुपये ]

प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त

**गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत प्रत्येकाची विमा कंपनी !**

शेअरविक्री जोरांत सुरू झाली.

शेअर्स खपविणारे एजंटस् मर्यादित. त्वरित अर्ज करा.

मॅनेजिंग एजंटस्—विष्णु मुकुंद आणि कं., पो. बॉ. नं. ४३.

२५६ सदाशिव, पेरूगेटाजवळ, पुणें शहर.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult

**V. G. & Sons**

ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

**डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें**

मध्यम वर्गातील गृहेच्छू लोक — अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य

**भाडेकरी–घरमालक–गृहयोजना**

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.

जनरल मॅनेजर

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टके फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:–

**कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.**

अध्यक्ष–श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. — दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा — हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां भेटा अगर समक्ष लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपी व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला पुणें ४.

**स्वदेशी**

कापड म्हणजे काय !
(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.

या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.

हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.

खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण

**स्वदेशी भांडार**

लक्ष्मीरोड, पुणें २.

**बंगाल**

**कोल सप्लाइंग फर्म**

उत्तम दगडी कोळसा (बंगाल, सी.पी.)
आणि
कोक ह्यांचे व्यापारी
व
म्युनिसिपल, लोकलबोर्ड,
पी. डब्ल्यु. डी. ( सरकारी ) कॉन्ट्रॅक्टर्स
५११ बुधवार पेठ, पुणें शहर २.

तारेचा पत्ताः–व्यंकटेश. फोन नं. ४७१

**न. वि. वडनेरकर**

जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१?, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख १ एप्रिल, १९३६. अंक १४

## पहिल्यानें सुरक्षितता

रस्त्यावरून जातांना तुम्ही सुरक्षिततेचा मार्ग पहिल्यानें पहातां. हीच गोष्ट पैसे बँकेंत किंवा विम्यांत गुंतविण्यासंबंधीं आहे. पहिल्यानें तुम्ही पैशाची सुरक्षितता पहातां; नंतर व्याज किंवा बोनस.

हिशेब तपासणी आणि प्रतिनिधित्व सरकारी खात्याकडे असल्यानें

**दि बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लि.**

मध्यें आपले पैसे गुंतविल्यास कसलाच धोका नाहीं.

सविस्तर माहितीकरितां लिहा—

कुळकर्णी आणि कंपनी, चीफ ऑर्गनायझर्स
चुनीलाल डी. बरफीवाला, मॅनेजिंग डायरेक्टर.
९ बेंक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

---

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**

च्या लोकप्रिय प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

---

*For All Medicinal Requisites*
— TRY —
**N. MAHADEV & Co.**
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner, POONA 2.

---

## MARATHE & Co.
ENGINEERS & IRON FOUNDERS

| WORKS : | | OFFICE : |
|---|---|---|
| Natu Bag, Bhikardas Road, POONA 2 | Can undertake to do any sort of casting. We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act. **Our prices are very competitive.** | 978-79, Sadashiv, Laxmi Rd., POONA 2 |

---

## S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

---

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी
टेलरिंग फर्म
**पाटसकर आणि कंपनी**
४८ निहाल पेठ, पुणें शहर.
मॅनेजर:-व्ही. ग. पाटसकर, D.M.T.C.A. (London.)

सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी

आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

---

INSURE WITH—
**The SUN SHINE INSURANCE Ltd.**
LAHORE
BECAUSE OF
**Its Most Modern, Unique & Beneficial Schemes**
*For Prospectus Please write to:—*
Special Officer,
POONA BRANCH

# विविध माहिती

### ओटावा करार रद्द होणार ?

ओटावा करारांतून हिंदुस्थान अंग काढून घेणार अशी नोटीस तात्काळ द्यावी व हिंदी सरकारानें भिन्न भिन्न राष्ट्रांशीं स्वतंत्र व्यापारी करार करावे ह्या आशयाची मि. जिना ह्यांनीं सरकारी ठरावास सुचवलेली दुरुस्ती ७० विरुद्ध ६५ मतांनीं असेंब्लींत पास झाली.

### बँकांस सुट्टी

शुक्रवार, ता. ३ रोजीं मोहरमनिमित्त बँका बंद रहातील.

### 'रे म्यूझियम रोड,' पुणें

" कोतवाल चावडी ते टिळक पुतळयापर्यंत रस्त्यास 'रे म्यूझियम रोड ' असें नांव द्यावें, " असा ठराव पुणें शहर म्युनिसिपालिटीनें केला आहे.

### मुंबई शहरांतील खिसेकापू

मुंबई शहरामध्यें सुमारें दोन हजार लोक खिसेकापूचा धंदा करून पोट भरतात. सिंधमधून येणारे खिसेकापू ह्या कलेंत अत्यंत वाकबगार असल्याचें आढळतें व त्यांच्या सावजांपैकीं दहांतलीं सात मारवाडी असतात.

### मुंबई म्युनिसिपालिटीचें १९ लाखांचें कर्ज

मुंबई म्युनिसिपालिटीनें काढलेलें १९ लक्ष रुपयांचे कर्जरोखे गोंडळच्या महाराजांनीं घेतल्याची बातमी मागेंच प्रसिद्ध झाली आहे. स्टँपचे १९ हजार रुपये धरून छपाई, जाहिरात, दलाली वैगेर बाबींचा एकूण खर्च म्युनिसिपालिटीस २३,२३२ रुपये आला. तथापि, शंभर रुपये किंमतीच्या प्रत्येक रोख्यास १०३ रुपये मिळाल्याकारणानें ह्या व्यवहारांत त्या संस्थेस ५७,००० रुपयांचा वाढावा आला आणि वरील सर्व खर्च वजा जाऊन सुमारें ३४ हजारांचा निवळ नफा उरला.

### लंडनवरच्या हुंड्या

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें लंडनवरील हुंड्यांच्या मागवलेल्या टेंडर्सची भरती १६१ लक्ष पौंड झाली. जरूरीच्या मानानें ही रकम फार मोठी असल्याकारणानें बँकेनें त्यांपैकीं फक्त १० लक्ष पौंड किंमतीचीं टेंडर्स स्वीकारलीं. हुंडणावळीचा सरासरी दर १ रुपया = १८$\frac{2}{3}$ पेन्स इतका पडला. चालू आठवड्यांत पुन्हां १० लक्ष पौंड किंमतीच्या हुंड्यांचीं टेंडर्स मागविण्यांत आलीं आहेत.

### ट्रेझरी बिलें

तीन महिने मुदतीच्या ट्रेझरी बिलांस गेल्या आठवड्यांत १४२ लक्ष रुपयांची टेंडरमार्फत मागणी आली. प्रत्येकीं १०० रुपये किंमतीच्या ट्रेझरी बिलास ९९ रु. १४ आणे एवढी जी मागणी होती ती सबंध पुरी करण्यांत आली व ९९ रु. १३ आ. ९ पैच्या दरानें आलेल्या मागणीपैकीं ६५ टक्के पुरवली गेली. एकंदर १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें देण्यांत येऊन त्यांचा व्याजाचा सरासरी दर दरसाल दरशेकडा ० रु. ८ आ. ८ पै इतका पडला.

### बाँबे टेलिफोन कं. लि.

ह्या कंपनीची प्रगति समाधानकारक होत असल्याचें चिन्ह म्हणजे १९२५ व १९२६ सालीं मुळींच डिव्हिडंड न देतां येण्यासारखी परिस्थिति असतां तिनें आतां १९३४ व १९३५ सालीं ८ टक्के डिव्हिडंड दिलेलें आहे, हें होय. १९२३ सालीं ८,७५१ खाजगी टेलिफोन होते, ते १९३५ सालीं १४,७८५ झाले.

### वजनमापाच्या कायद्याचीं पुस्तकें

वजनमापाचा कायदा व त्याखालील कानू ह्यांच्या मराठी भाषांतरांचीं पुस्तकें तयार असून तीं मुंबई येथें गव्हर्नमेंट स्टेशनरी ऑफिसमध्यें अनुक्रमें एक व चार आण्यांस मिळतात.

### कॅलेंडर प्रदर्शनाचा बक्षिससमारंभ

पुणें येथें गेल्या महिन्यांत प्रो. वा. गो. काळे यांचे हस्तें उद्घाटन झालेल्या कॅलेंडरप्रदर्शनाचा बक्षिससमारंभ ता. २५ मार्च रोजीं श्री. बा.म.फुलंब्रीकर यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. ज्यास्तींत ज्यास्त कॅलेंडरें जमविणारे श्री. ना.भा.देशपांडे, श्री. चाबूकस्वार, व श्री. लोकगारीवार, यांना अनुक्रमें प्रोप्रा. गजानन पेंटिंग वर्क्स, श्री. बा. गं. घैसास व चित्रकार शं. द. देवधर यांनीं ठेविलेलीं बक्षिसें देण्यांत आलीं. तसेंच व्यापाऱ्यांपैकीं "साठेबंधु" बिस्किटकारखाना व " कांतीलाल आणि कं. " सायकल मर्चंट यांना प्रदर्शनातर्फे बक्षिसें देण्यांत आलीं.

### महाराष्ट्र-परिचय-ग्रंथ

महाराष्ट्रांतील व बृहन्महाराष्ट्रांतील निरनिराळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्या स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांबद्दल एकत्र माहिती देणारा संदर्भ ग्रंथ अद्याप तयार झाला नाहीं. समाजांतील सर्व दर्जाच्या लोकांची एकत्र माहिती करून असा संदर्भ-ग्रंथ तयार करण्याचें ठरलें आहे. या बाबतींत कोणास कांहीं सूचना करावयाच्या असल्यास अगर प्रत्यक्ष सल्लागार-संपादक अथवा अन्य मार्गानें सहाय्य करणें असल्यास त्यांनीं ५०४ सदाशिव पेठ, पुणें शहर येथें चिटणीस, महाराष्ट्र-परिचय ग्रंथ, यांस कळवावें.

### लंडन : ' जगाचा स्विचबोर्ड '

केन्या देशास जोडणाऱ्या लंडन येथील टेलिफोनचा उद्घाटन-समारंभ नुकताच झाला. अल्बानिया, चीन, इराण, अरबस्तान, पश्चिम आफ्रिका व पूर्व आफ्रिकेंतील वसाहती ह्यांखेरीज इतर सर्व देशांशीं लंडनचें टेलिफोनमार्गें दळणवळण चालू आहे. इंग्लंडचे पोस्ट मास्टर जनरल मि. ट्रायन ह्यांनीं भाषण करतांना लंडनचें ' जगाचा स्विचबोर्ड ' असें वर्णन केलें. एका देशाहून दुसऱ्या देशाशीं बोलावयाचें असल्यास लंडनद्वारां तें करावें लागतें. लंडनहून केन्या येथें टेलिफोन करावयाचा असेल तर दर मिनिटास २० रुपये पडतात.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २१ मार्च रोजीं पुरा झालेला आठवडा | ५७,३९,९२३ |
| ता. २८ मार्च रोजीं पुरा झालेला आठवडा | ५०,८०,५५३ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते २८ मार्च १९३६ अखेर | २,६५,३९,१९,१२९ |

## अनुक्रमणिका.


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | १६२ |
| २ ग्रेटब्रिटनचा परराष्ट्रीय व्यापार | १६३ |
| ३ शेतीच्या धंद्याचा तुलनात्मक विचार | १६४ |
| ४ कृत्रिम रेशमाचे धंद्यास वाव | १६४ |
| ५ स्फुट विचार | १६५ |
| फिनॅन्स बिल व लेजिस्लेटिव्ह असेंब्ली—असेंब्लींत ओटावा करार—फळांचा रस टिकविण्याचा धंदा—श्री. आपटे ह्यांचा स्तुत्य उद्योग—साठे बंधूंचा बिस्किटांचा कारखाना—मि.अडवाणी ह्यांचें भाषण | |
| ६ ओटावा कराराची फलश्रुति | १६७ |
| ७-प्राप्तीवरील करासंबंधी... दोन निवाडे | १६८ |
| ८ कंपनी कायद्यांत दुरुस्ती | १६८ |
| ९ "ओटावाचा करार आणि हिंदुस्थान" | १६९ |
| १० सहकारी चळवळ | १७० |
| ११ निवडक बाजारभाव | १७१ |



# अर्थ

बुधवार, ता. १ एप्रिल १९३६


## ग्रेटब्रिटनचा परराष्ट्रीय व्यापार

### त्या संबंधांत हिंदुस्थानची तुलनात्मक परिस्थिति

परदेशांशीं होणारा आपला व्यापार वाढावा ह्या बाबत ग्रेटब्रिटनचे प्रयत्न सारखे चालू आहेत. साम्राज्यांतर्गत देशांशीं केलेला ओटावा करार आणि इतर कित्येक देशांशीं केलेले परस्पर-सवलतीचे स्वतंत्र करार ह्यांच्या मार्गानें सदरहु उद्देश साध्य केला जात आहे. तेव्हां, गेल्या दोन वर्षांत ग्रेटब्रिटनच्या परराष्ट्रीय व्यापारावर ह्या धोरणाचा परिणाम काय झाला आणि इतर देशांच्या मानानें हिंदुस्थानच्या आयात--निर्गतीच्या व्यवहारांत कोणता फरक घडून आला, ह्याची माहिती उपयुक्त झाल्यावांचून रहाणार नाहीं. खालीं आकडे नमूद केले आहेत, ते डिसेंबर अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षाचे दिले आहेत, हें सांगणें जरूर आहे. ओटावा करारानें, ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांतून येणाऱ्या मालास ग्रेटब्रिटनमध्यें जकातीच्या सवलती दिल्या असल्यानें साम्राज्यांतून इंग्लंडमध्यें होणारी आयात वाढण्याची अपेक्षा करणें सरळ आहे; आणि त्याप्रमाणें आयात वाढलीहि आहे. ग्रेटब्रिटनमध्यें आयात होणाऱ्या मालाचे (१) साम्राज्यांतर्गत देशांतला व (२) साम्राज्याच्या बाहेरील देशांतला असे दोन भाग केले तर १९३१ मध्यें पहिल्याच्या किंमतीचें एकंदर आयातीशीं प्रमाण शेकडा २८·७ होतें, तें १९३२ मध्यें ३५·४ झालें, १९३३ मध्यें ३६·९ झालें, १९३४ मध्यें ३७·१ वर गेलें आणि १९३५ मध्यें तें ३७·६ पर्यंत चढलें. साम्राज्येतर देशांतून होणाऱ्या आयातीचें प्रमाण ह्याच मानानें अर्थात् कमी झालें आहे. गेल्या दोन वर्षांतलें हें प्रमाण अनुक्रमेंकरून ६२·९ व ६२·४ टक्के असें होतें. ब्रिटिश मालाची साम्राज्यांतर्गत देशांत झालेली निर्गत एकंदर निर्गतीच्या ४६·९ टक्के १९३४ मध्यें व ४८ टक्के १९३५ मध्यें होती. म्हणजे साम्राज्यांत होणारी ब्रिटिश निर्गत वाढली. पण त्याच्या उलट साम्राज्याच्या बाहेरील देशांत झालेली निर्गत त्याच प्रमाणांत कमी झाली. ह्या निर्गतीचे शतमानाचे आकडे अनुक्रमेंकरून ५३·१ व ५२·० असे होते.

### इंग्लंडचा परराष्ट्रीय व्यापार

( आकडे लक्ष पौंडांचे आहेत: १ पौंड=१३ रु. ५ आं. )

| | १९३४ | | १९३५ | |
|---|---|---|---|---|
| | आयात | निर्गत | आयात | निर्गत |
| ब्रिटिश साम्राज्यांतून आयात व ब्रिटिश देशांत निर्गत | २,७१२ (३७·१%) | १,८५५ (४६·९%) | २,८४८ (३७·६%) | २,०४३ (४८·०%) |
| परराष्ट्रांतून आयात व परराष्ट्रांत निर्गत | ४,६०१ (६२·९%) | २,१०४ (५३·१%) | ४,७२० (६२·४%) | २,२१६ (५२·०%) |
| एकूण | ७,३१४ | ३,९५९ | ७,५६९ | ४,२५९ |

### प्रमुख देशांविषयीं आकडे

( आकडे लक्ष पौंडांचे आहेत )

| | १९३४ | | १९३५ | |
|---|---|---|---|---|
| | ग्रेट ब्रिटनमध्यें आयात | ग्रेट ब्रिटनमधून निर्गत | ग्रेट ब्रिटनमध्यें आयात | ग्रेट ब्रिटनमधून निर्गत |
| ऑस्ट्रेलिया | ४९९ | २६२ | ५४३ | २९३ |
| न्यूझीलंड | ४०४ | ११४ | ३८१ | १३५ |
| कॅनडा | ५०३ | १९७ | ५५९ | २१३ |
| ब्रिटिश हिंदुस्थान | ४२१ | ३६६ | ४११ | ३७८ |
| दक्षिण आफ्रिका | ११८ | ३०२ | १३६ | ३३५ |
| इजिप्त | ११४ | ६५ | १२७ | ७६ |
| अमेरिका | ८१९ | १७५ | ८७५ | २२८ |
| फ्रान्स | १९२ | १६७ | २१६ | १६७ |
| जर्मनी | ३०५ | १४० | ३०० | १८९ |
| डेन्मार्क | ३२८ | १३३ | ३२० | १३७ |
| आर्जेंटिना | ४७० | १४६ | ४३९ | १५२ |
| रशिया | १७३ | ३६ | २१७ | ३५ |

ऑस्ट्रेलिया व कॅनडामधून ग्रेटब्रिटनमध्यें झालेली आयात गेल्या सालीं वाढली, पण न्यूझीलंड व हिंदुस्थानमधली कमी झाली. हिंदुस्थानचा माल ग्रेटब्रिटनमध्यें अधिक खपावा हा जो ओटावा कराराचा हेतु होता, तो ह्या देशाच्या बाबतींत तरी सफल झालेला दिसत नाहीं. कॅनडा व ऑस्ट्रेलिया ह्या ब्रिटिश वसाहतींची ग्रेटब्रिटनमध्यें होणारी निर्गत मात्र चांगली वाढली. अमेरिकेंतली आयात तर पुष्कळच वाढली व त्या प्रकारचीच वाढ रशिया आदिकरून युरोपांतल्या देशांचे बाबतींत झाली आहे. ग्रेटब्रिटनमधून साम्राज्यांतर्गत देशांत होणारी निर्गतहि गेल्या सालीं वाढली. ह्या देशांमध्यें ब्रिटिश माल घेण्याचे बाबतींत हिंदुस्थानचा पहिला, दक्षिण आफ्रिकेचा दुसरा व ऑस्ट्रेलियाचा तिसरा नंबर लागतो. म्हणजे, हिंदुस्थानची ग्रेटब्रिटनमधून होणारी आयात सर्वांत मोठी असून ती वाढली पण ह्या देशाची ग्रेटब्रिटनमध्यें होणारी निर्गत अगोदरच कमी असून ती आणखी कमी झाली. ओटावा कराराचा हिंदी परराष्ट्रीय व्यापारावर काय परिणाम झाला आहे,ह्याचें वरील आकड्यांत एक गमक सपडण्यासारखें आहे. आज ब्रिटिश मालास सर्व जगांत हिंदुस्थानाएवढी मोठी कोणतीच मोठी बाजारपेठ नाहीं. ग्रेट ब्रिटनला माल पुरवण्याच्या संबंधांत मात्र हिंदुस्थानचा नंबर पांचवा लागतो. इतर देश आपला माल ग्रेट ब्रिटनमध्यें मोठ्या प्रमाणांत पाठवून त्या मानानें ब्रिटिश माल कमी घेतात. आम्हीं ब्रिटिश माल अधिक घेऊन त्या मानानें आपला माल ग्रेट ब्रिटनमध्यें पाठवं शकत नाहीं. ही परिस्थिति खरोखर अत्यंत चिंतनीय आहे.

## शेतीच्या धंद्याचा तुलनात्मक विचार

### डेन्मार्क, ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान

(२)

ग्रेट ब्रिटनमध्यें मोठ्या जमीनदाऱ्या असून कुळें शेतें वहातात. ह्या कुळांची शेतीहि, हिंदुस्थानच्या मानानें मोठ्या प्रमाणावर चालते. आमच्या देशांत बंगाल, बहार, संयुक्तप्रांत ह्यांत मोठे जमीनदार असून अनेक लहान-मोठ्या कुळांकरवीं ते जमिनी करतात व त्यांचेकडून खंड घेतात. मुंबई, मद्रास, पंजाब व वऱ्हाड ह्या प्रांतांत जमीनीचे मालकच शेती करतात, असें स्थूल मानानें म्हणण्यास हरकत नाहीं. डेन्मार्कमध्येंहि अशाच प्रकारची परिस्थिति आहे. शेकडा ९३ शेतें तेथें शेतकऱ्यांच्या मालकीचीं आहेत. मोठा शेतकरी कोणास म्हणावें आणि छोटा कोणास म्हणावें हें जमीनीचा मगदूर, त्यांत होणारें पीक वगैरे बाबींवर अवलंबून असल्यानें त्या बाबतींत क्षेत्राची विशिष्ट मर्यादा घालतां येणें शक्य नसतें. तथापि, पाश्चात्य देशांत पांच दहा एकरांचीं शेतें छोटीं समजलीं जातात आणि त्यांचें एकूण संख्येंतलें प्रमाण अल्प असतें. मध्यम दर्जाचीं म्हणजे ज्यांवर शेतकऱ्याच्या कुटुंबाचा निर्वाह सहज होऊं शकेल अशींच शेतें बहुसंख्याक असतात. पाश्चात्य देशांतील शेतकऱ्यांच्या रहाणीचें मान हिंदुस्थानाशीं तुलना करतां उच्च दर्जाचें असतें आणि ह्यामुळें तुकडे उडालेल्या शेतांवर गुजारा करण्याची पाळी थोड्याच लोकांवर तिकडे येते. ज्यांस मध्यम आकाराचीं म्हणतां येतील अशींच शेतें डेन्मार्कमध्यें बहुशः आढळतात. सबंध डेन्मार्कमध्यें सुमारें दोन लक्ष स्वतंत्र शेतें आहेत आणि त्यांपैकीं लहान आकाराच्या व मर्यादित मगदुराच्या शेतांच्या मालकांस सर्व प्रकारचें सहाय देण्याचें धोरण डॅनिश सरकारानें अंगीकारलें आहे. गेल्या पंधरा वर्षांत डेन्मार्कमधल्या सरकारनें शेतकऱ्यांस सुमारें १३ कोटि रुपये कर्जाऊ दिले आहेत आणि त्यांच्या हिताच्या संरक्षणार्थ अनेक कायदे केले आहेत.

डेन्मार्कमधील शेतकरी बडे जमीनदार, भांडवलवाले किंवा सुखवस्तु गृहस्थ नाहींत. सहकारी तत्त्वावर आपलें संघटन करून त्यांनीं आपल्या धंद्याचा उत्कर्ष करून घेतला आहे. बीं-बियाणें, खतें वगैरे जिन्नस विकत घेणें व आपला तयार माल विकणें ह्या गोष्टी सहकारी संस्थांमार्फत ते करतात, ह्यामुळें त्यांचे व्यवहार कमी खर्चांत व फायदेशीर रीतीनें होतात हा डेन्मार्कमधील शेतीच्या धंद्याचा विशेष आहे. डॅनिश शेती सुस्थितींत राहून आंतरराष्ट्रीय चढाओढींत ती टिकून राहिली असेल तर त्याचें मुख्य कारण तिचें सहकारी संघटन हेंच आहे. दूध, दुधाची साय (क्रीम), अंडीं, डुकराचें मांस ह्यासारख्या मालावर डॅनिश शेतकऱ्यांची भिस्त आहे व तो माल परदेशांत मोठ्या प्रमाणावर जातो. शेतीच्या मालाचें उत्पादन व विक्री सहकारी तत्त्वावर इतक्या पद्धतशीर रीतीनें व कार्यक्षमपणानें चालते कीं, ह्या कारणानें डॅनिश शेतकऱ्यास यशस्वितेच्या बाबतींत सर्व जगांत अत्यंत मानाचें स्थान प्राप्त झालें आहे. डेन्मार्कच्या परराष्ट्रीय व्यापाराचा आधार शेतीचा माल हाच आहे. ह्या बाबतींत त्याचें हिंदुस्थानाशीं साम्य असलें तरी निर्गत होणाऱ्या मालाच्या प्रकारांत आणि परराष्ट्रीय व्यापाराच्या व्यवस्थेंत दोहोंमध्यें अंतर आहे हें तेव्हांच ध्यानांत येईल. लोणी, अंडीं वगैरे मालाचे बाबतींत ग्रेट ब्रिटन हें राष्ट्र डेन्मार्कचें मोठें गिऱ्हाइक आहे. आपल्या शेतकऱ्यांचा माल बाजूस सारून डेन्मार्कमधून येणारे नित्याच्या खाण्यांतले पदार्थ आपणांस घ्यावे लागावे हें ब्रिटिश लोकांस खपत नाहीं. पण दोन देशांतली आर्थिक परिस्थिति व शेतीच्या व्यवस्थेचा प्रकार ह्यांमध्यें महदंतर असल्यानें डेन्मार्कमधली यशस्वी पद्धति ग्रेट ब्रिटनमध्यें उचलतां येणें अव्यावहारिक आहे. ब्रिटिश शेतकऱ्यांची प्रवृत्ति सहकारी संघटनेस सामान्यतः अनुकूल नाहीं. तथापि, शेतीच्या मालाची योग्य प्रत लावणें आणि सहकारी पद्धतीनें त्याची विक्री करणें ह्या गोष्टी ग्रेट ब्रिटनमध्यें साध्य होणार नाहींत, असें नाहीं आणि ह्या संबंधांत ब्रिटिश सरकारच्या विद्यमानें संघटित प्रयत्न चालू आहेत.

डेन्मार्कमधील यशस्वी शेतीची पद्धति इंग्लंडमध्यें जशीच्या तशी उचलतां येणें शक्य नाहीं. हिंदुस्थानांतहि तिचें अनुकरण सर्व बाबतींत करतां येणार नाहीं. तथापि, डेन्मार्कपासून दोन्ही देशांस शिकतां येण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. सहकारी संघटनाचा अवलंब हिंदी शेतकऱ्यांनीं करून आपली उन्नति अवश्य करून घेतली पाहिजे. आमची शेती अल्प प्रमाणावरची असून तीमध्यें विशेष भांडवल नाहीं. म्हणून सहकारी पद्धतीनें हिंदी शेतकऱ्यांनीं व्यवहार केले तरच त्यांच्या धंद्याची स्थिति सुधारण्यासारखी आहे. परस्पर सहाय, परस्पर विश्वास, पद्धतशीर व चोख व्यवहार इत्यादि गोष्टींची जोड असल्यावांचून सहकारी संघटनाहि परिणामकारक होत नाहीं, हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. सहकारी शेतीच्या प्रगतीचे बाबतींत डेन्मार्कचें उदाहरण नमुनेदार आहे, ह्यांत शंका नाहीं. सबब त्या देशांतील शेतीचा कित्ता हिंदी शेतकऱ्यांनीं शक्य आहे त्या बाबतींत गिरवला पाहिजे.

### कृत्रिम रेशमाचे धंद्यास वाव

कृत्रिम रेशीम ऊर्फ रेयॉन ह्याच्या धाग्यांचें बनविलेलें कापड आतां जगांतील सर्व पेठांतून खपूं लागलें आहे. कृत्रिम रेशीम कसें तयार करतात, त्याच्या उत्पादनांत कोणतीं कच्चीं द्रव्यें वापरतात, त्याचें देशवार उत्पादन किती आहे, इत्यादि सविस्तर माहिती "अर्थ"च्या २० नोव्हेंबर, १९३५ च्या अंकांत आलेली आहे. १९३४ सालीं सर्व जगांत मिळून ७७ कोटि पौंड वजनाचें रेयॉन तयार झालें. १९३५ मध्यें त्यांत २२ टक्के वाढ होऊन तें ९४ कोटि झालें! रेयॉनचे सुताच्या उत्पादनांत अमेरिकेचा नंबर (२६ कोटि पौंड) पहिला लागला, व जपानचा दुसरा नंबर (२४½ कोटि पौंड) आला. १९३५ सालीं सर्व तऱ्हेच्या धाग्यांचें उत्पादन किती झालें ह्याचे शतमानाचे आकडे खालीं दिले आहेत, त्यांवरून कृत्रिम रेशमास अजून किती वाव आहे, ह्याची कल्पना येईल:—

| | % |
|---|---|
| कपास | ५३·८ |
| लोकर | १५·४ |
| ताग | १०·५ |
| इतर | १६·३ |
| कृत्रिम रेशीम | ४·१ |
| | १०० |

# स्फुट विचार

## फिनॅन्स बिल व लेजिस्लेटिव्ह असेंब्ली

लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें, सरकारनें पुढें मांडलेलें फिनॅन्स बिल फेटाळल्यामुळें गव्हर्नर-जनरल ह्यांस आपल्या खास अधिकाराचा उपयोग करून तें पास झालें असें जाहीर करणें भाग पडलें. मिठावरील कर अजीबात उठवावा व पोस्टकार्डाची किंमत अर्धा आणा व्हावी, ह्या दुरुस्त्या मूळ बिलांत झाल्यामुळें व सरकारास त्या दोन्हीं अमान्य असल्यानें मूळचें बिल जसेंच्यातसें असेंब्लीनें मंजूर करावें अशी शिफारस गव्हर्नर जनरल ह्यांनीं करून तें कायदेमंडळाकडे पाठविलें. मिठावरील आठ कोटि रुपयांच्या कराचें उत्पन्न हातचें घालवून बजेटाची तोंडमिळवणी करणें फडनवीसांस अशक्य होतें आणि असेंब्लींतल्या लोकपक्षीय सभासदांस त्याबद्दलच्या आपल्या दुरुस्तीच्या अव्यवहार्यतेची जाणीव नव्हती असें नाहीं; पण सरकार आपल्या कोणत्याच सूचना मान्य करणार नाहीं तेव्हां दुरुस्त्यांच्या तारतम्याकडे पहाण्याचें आपणांस कारण नाहीं आणि स्वतःस हव्या त्या स्वरूपांत फिनॅन्स बिल पास करण्याचा शेवटचा अधिकार गव्हर्नर-जनरलच्या हातांत आहेच, ह्या भावनेनें त्यांनीं बिलाचा फेरविचार करण्याचें नाकारलें. पोस्टकार्डाची किंमत कमी करण्याची सूचना तरी निदान सरकार मान्य करील आणि केंद्राच्या पुनर्घटनेचा खर्च चालू उत्पन्नांतून करण्याचा आपला आग्रह सर जेम्स ग्रिग सोडून देतील असें वाटत होतें. पण तीहि गोष्ट घडली नाहीं. उत्पन्न-खर्चाची व्यवस्था ठरविण्याचा अधिकार व अंतिम सत्ता कार्यकारी सरकारच्या हातींच असली पाहिजे, हा फडनवीसांचा सिद्धांत ब्रिटिश पार्लमेंटाप्रमाणें हिंदी कायदेमंडळासहि लागू करणें, विषम गोष्टींची तुलना करून मेळ घालण्यासारखें आहे. हिंदी सरकार कायदेमंडळास जबाबदार नसल्यामुळें असे प्रकार ह्या देशांत होतात, हें सुप्रसिद्ध आहे. दोन्ही बाजूंमध्यें बिनजबाबदारीची वृत्ति दिसून येणें हा प्रचलित राज्यघटनेचा ठळक दोष आहे, ह्याची आठवण, असेंब्लीनें फिनॅन्स बिल फेटाळून लावलें या गोष्टीनें पुन्हां करून दिली आहे.

---

## असेंब्लींत ओटावा करार

सुमारें चार वर्षांमागें ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांमध्यें परस्पर सवलतीचा करार झाला, त्याच वेळीं त्यांत हिंदुस्थानचा अंतर्भाव होण्यास हिंदी लोकमत फारसें अनुकूल नव्हतें. त्याचा फेरविचार करण्याचा प्रसंग येतांच त्यांतून हिंदुस्थाननें आपलें अंग काढून घेण्यासंबंधाची नोटीस तात्काळ दिली जावी, अशी सूचना लोकपक्षीय सभासदांकडून लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें येणें अपरिहार्य होतें. ओटावा करारास तीन वर्षें झालीं म्हणजे तो चालू ठेवावा किंवा नाहीं ह्याचा निर्णय करण्यासाठीं तो प्रश्न असेंब्लीपुढें मांडण्यांत यावा, ही सूचना हिंदुस्थानसरकारनें मान्य केली होती आणि तीस अनुसरून गेल्या आठवड्यांत सर महमद झाफरुल्लाखान ह्यांनीं कायदेमंडळांत सदरहू प्रश्न उपस्थित केला. पूर्ण चौकशीअंतीं ओटावा करार हिंदुस्थानच्या हिताचा नाहीं, असें असेंब्लीचें मत बनल्यास तिनें तसें खुशाल म्हणावें. परंतु कराराची फलश्रुति नीट ध्यानांत येण्यास गुंतागुंतीच्या आंकड्यांची तपशीलवार छाननी होणें आणि त्यांचा अर्थ व्यवस्थित लावला जाणें अगत्याचें असल्यानें, तें काम असेंब्लीनें एका कमिटीकडे सोंपवावें, अशी सर महमद ह्यांची सूचना होती. करार आम्हांस नको असें तडकाफडकी न म्हणतां साधकबाधक गोष्टींचा विचार शांतपणानें करण्यास असेंब्लीस अवसर मिळावा, एवढीच सरकारची इच्छा असल्याचें त्यांनीं सांगितलें. साम्राज्यांतर्गत व्यापार सवलतीच्या तत्त्वावर चालण्याची योजना निश्चित झाल्यास तीमध्यें हिंदुस्थानचा अंतर्भाव होण्यास येथील लोकमत आज कित्येक वर्षें प्रतिकूल आहे आणि येथील सरकारनेंहि त्या अर्थाचें मत मागें व्यक्त केलें आहे. हिंदी कच्च्या मालास जगांत अनेक देशांत गिऱ्हाइकें असल्यामुळें सवलतीच्या करारानें हा देश ब्रिटिश साम्राज्याशीं बांधला गेला असतां त्या देशांशीं होणारा हिंदुस्थानचा व्यापार बिघडण्याची भीति असते, हें ह्या प्रतिकूल मताचें मुख्य कारण आहे. हिंदी लोकांस जकातीचें स्वातंत्र्य हवें आहे, त्यासहि साम्राज्यांतर्गत सवलतीच्या व्यापारानें बाध येतो. ह्या कारणास्तव लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत, ओटावा करारांतून हिंदुस्थाननें स्वतःस मोकळें करून घ्यावें, असें लोकमत स्पष्ट व्यक्त झालें, आणि कमिटीविषयींच्या सरकारी सूचनेस विरोध झाला.

---

## फळांचा रस टिकवण्याचा सोपा धंदा

वाया जाणाऱ्या वस्तु उपयोगी करणें आणि अल्पकाल टिकणाऱ्या पदार्थांचें आयुष्य वाढवणें म्हणजे संपत्तीच्या उत्पादनांत व पुरवठ्यांत भर घालण्यासारखेंच आहे. ह्या दृष्टीनें पहातां हंगामांत कवडीमोल होणाऱ्या महाराष्ट्रांतील फळांचा पूर्ण उपयोग करून घेतां येईल किंवा नाहीं आणि त्या मार्गानें खेडेगांवांची कमाई वाढवतां येईल किंवा कसें हा महत्वाचा प्रश्न आहे. मुंबईसरकारनें नेमलेल्या एका कामिटीनें ह्यासंबंधांत चौकशी करून रिपोर्ट सादर केला आहे आणि आंबे विशिष्ट पद्धतीनें टिकवून विलायतेसहि पाठवण्याचा उपक्रम चालू झाला आहे. कागदी लिंबें, डाळिंबें, संत्रीं, मोसंबीं, जांभळें, वगैरे फळांचा त्यांच्या हंगामांत रस काढून तो पुढें उपयोगांत येईल अशी व्यवस्था झाल्यास बागवाल्यांचा फायदा आणि वाटेल तेव्हां फळांचा आस्वाद घेण्याची जनतेची सोय या दोन गोष्टी साधतां येतील. फळें मुबलक असतात तेव्हां त्यांचा रस काढून ठेवून तीं दुर्मिळ होतात तेव्हांहि लोकांस त्यांचा उपयोग करतां येईल अशी व्यवस्था होण्यांत आर्थिक प्रगति आहे आणि त्यांतली कृति खेडेगांवी लोकांस सहज साधल्यास एकंदर समाजाचें त्यांत हित आहे. निरनिराळीं फळें घेऊन त्यांचा अत्यंत कमी खर्चांत अधिकांत अधिक उपयोग कसा करून घेतां येईल, ह्या संबंधांत चौकशी व प्रयोग शास्त्रीय पद्धतीनें आणि हिशेबी वृत्तीनें होणें अगत्याचें आहे, हें उघड आहे. कित्येक फळांचे विलायती रस परदेशांतून इकडे येतात आणि बाजारांत त्यांचा खप होतो. आपण बनवलेल्या रसांत विलायती मालाचे गुण उतरतात किंवा नाहीं आणि ते बाजारांत त्याचे मानानें स्वस्त विकणें परवडेल किंवा कसें, तसेंच, ह्या उद्योगास लागणारी साधनसामुग्री सहज लभ्य आहे किंवा नाहीं, ह्या अनेक बाबींची व्यावहारिक व विश्वसनीय माहिती उपलब्ध झाल्यावांचून फळांचा रस करून विकण्याचा नवा धंदा खेडेगांवांत करतां येण्याजोगा आहे असें निश्चयानें सांगतां येणार नाहीं.

---

### श्री. एन. जी. आपटे ह्यांचा स्तुत्य उद्योग

येथील पाणी शोधण्याच्या कामांतले तज्ज्ञ, श्री. एन. जी. आपटे ह्यांनीं फळांचे रस काढून ते टिकवण्याचा धंदा सुकर व फायदेशीर होईल किंवा नाहीं, ह्याबाबत प्रयोग करून व्यावहारिक अनुभव मिळवला आहे, तो अत्यंत उपयुक्त आहे, असें आम्हांस वाटतें. कागदी लिंबू, जांभूळ, मोसंबें, संत्रें, डाळिंब ह्या फळांचे रस काढून त्यांपैकीं लिंबू व जांभूळ ह्यांचा रस टिकवतां येतो आणि तो चांगल्या स्थितींत राहूं शकतो अशी त्यांनीं खात्री करून घेतली आहे व त्यासंबंधांत तज्ज्ञांचे अनुकूल अभिप्राय मिळवले आहेत. इतर फळांचे बाबतींतहि असे प्रयत्न त्यांचे चालू आहेत. हा एकंदर धंदा यशस्वी होण्यास फळांतल्या सामान्यतः वाया घालवल्या जाणाऱ्या भागांचाहि उपयोग करतां येणें इष्ट असतें. लिंबांतला रस काढून घेतल्यावर राहिलेली साल टाकून न देतां तिच्यांतून तेल काढलें व त्यास मागणी असली तर रस काढण्याच्या धंद्याची उत्पादकता वाढली, असेंच होणार असल्यानें, श्री. आपटे ह्यांनीं त्याहि मार्गानें प्रयोग केले आहेत व त्यांत त्यांस बरेचसें यश आलें आहे. रस काढणें, तो बाटल्यांत भरणें वगैरे कृति सहज साधाव्या म्हणून त्यांनीं आपल्या कल्पनेनें साधीं उपकरणें बनवलीं आहेत. धंदा लहान प्रमाणांतला असला तरी त्यांत किमान भांडवल व किमान मागणी ह्यांची आवश्यकता असतेच. तसेंच, फळांच्या रसांचा पेय म्हणून उपयोग करण्याची प्रथा समाजांत पडली नसेल किंवा पडणार नाहीं, तर असल्या धंद्यास फारसा वाव मिळणार नाहीं. तेव्हां मागणी व पुरवठा ह्यांचा मेळ येथें घालावाच लागेल आणि रसाच्या गुणाबरोबर त्याची किंमतहि बेताची असावी लागेल. श्री. आपटे ह्यांचा उद्योग व्यावहारिक स्वरूपाचा व पद्धतशीर असल्यानें त्यांस जनतेकडून उत्तेजन मिळणें आवश्यक आहे. आजपर्यंत केलेले प्रयत्न व पुढच्या कार्यक्रमाची योजना त्यांनीं जाहीर केली आहे. जिज्ञासू, तज्ज्ञ व भावी गिऱ्हाइकें ह्यांनीं त्याबाबत माहिती व खात्री करून घ्यावी, अशीच त्यांची सरळ इच्छा आहे.

---

### साठे बंधूंचा बिस्किटांचा कारखाना

गेल्या रविवारीं, डायरेक्टर ऑफ् इंडस्ट्रीज, मि. अडवाणी, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं येथील साठे बंधूंच्या कारखान्याच्या नवीन इमारतीचा उद्घाटनसमारंभ साजरा झाला. इमारत खुल्या जागेंत बांधली असून प्रशस्त व सोयीची आहे, आणि साठे बंधूंच्या उद्योगाचा व्याप किती वाढला आहे, याची ती साक्ष देत आहे. उद्घाटनसमारंभाचे प्रसंगीं कारखान्याचे मालक, श्री. साठे, ह्यांनीं त्याविषयीं हकीकत सांगितली, ती विशेष बोधप्रद व उत्तेजनकारक होती. अत्यंत लहान प्रमाणावर प्रारंभ करून व भांडवलासंबंधाच्या वगैरे अनेक अडचणींस तोंड देऊन त्यांनीं मोठ्या नेटानें आपल्या उद्योगाचा विस्तार केला आहे आणि आपला कारखाना नमुनेदार करण्याचा त्यांचा निश्चय आहे. कारखान्यांतील कामगार लोकांकरितां रहातीं घरें बांधण्याची योजना त्यांनीं आखली असून त्यास एक प्रयोगशालाहि जोडण्यांत आली आहे. आपला माल गुणांनीं उत्तम वठावा व त्यांत शक्य तितक्या सुधारणा दिवसानुदिवस करतां याव्या हा प्रयोगशालेचा स्तुत्य हेतु असून साठे बंधूंच्या प्रगमनशीलतेची साक्ष हा उपक्रम पटवीत आहे. काटकसरीनें, सचोटीनें व दृढनिश्चयानें काम केल्यास महाराष्ट्रांत नवीन उद्योगधंदे काढून त्यांचा उत्कर्ष घडवून आणतां येतो, ह्याचें, साठे बंधूंचा बिस्किटांचा कारखाना हें उत्तम उदाहरण आहे. उद्घाटनसमारंभाचे वेळीं जीं भाषणें झालीं, त्यांत वक्त्यांनीं ही गोष्ट स्पष्ट करून सांगितली. कारखान्याचे मालक, श्री. साठे, ह्यांनीं आपल्या निवेदनांत नवीन उद्योगधंद्यांस भांडवल पुरविण्याचे बाबतींत बँकांचे मार्फत तरतूद होण्याची आवश्यकता प्रतिपादिली आणि त्याहि बाबतींत महाराष्ट्रांत काय सोयी आज आहेत व कोणत्या नवीन सोयी करतां येतील, ह्याचा खुलासा करण्यांत आला आणि तो मार्गदर्शक होता असें आम्हांस वाटतें. साठे बंधूंच्या उद्योगास उत्तरोत्तर वाढतें यश प्राप्त व्हावें, असें आम्ही इच्छितों.

---

### मि. अडवाणी ह्यांचें भाषण

समारंभाचे अध्यक्ष, मि. अडवाणी, ह्यांनीं आपल्या भाषणांत माहिती दिली आणि सूचना केल्या, त्यांचा विचार महाराष्ट्रीय जनतेनें अवश्य केला पाहिजे. साऱ्या मुंबई इलाख्यांत, फॅक्टरी ॲक्टाखालीं येणारे असे बिस्किटांचे सातआठच कारखाने असून त्यांत काम करणारांची संख्या पुरती पांचशे इतकीहि नाहीं. सहा लक्ष रुपयांचीं बिस्किटें व केक्स प्रतिवर्षीं बाहेरून येऊन मुंबईच्या बंदरांत उतरतात. ह्या इलाख्यांत सोळाशे कारखाने असून त्यांतले निम्मे हंगामी आहेत. मुंबई इलाख्याची औद्योगिक प्रगतीविषयीं ख्याति असली तरी तो बहुतांशीं कृषिप्रधानच अजून राहिला असून त्यामध्यें उद्योगधंद्यांच्या वाढीस वाटेल तितका वाव आहे, ही गोष्ट मि. अडवाणी ह्यांनीं आपल्या भाषणांत प्रामुख्यानें सांगितली. मुंबई सरकारनें उद्योगधंद्यांस द्रव्यसहाय देण्याची एक योजना निश्चित केली आहे आणि दहा हजार रुपयांपर्यंत कोणत्याहि कारखान्यास भांडवल पुरवण्याची व्यवस्था तिच्यामध्यें आहे. ह्या योजनेचा उपयोग आमच्या होतकरू धंदेवाल्यांनीं अवश्य करून घेतला पाहिजे. देशांत उद्योगधंद्यांची वाढ होण्यास सामान्य जनतेंत औद्योगिक मनःप्रवृत्तीचा उदय झाला पाहिजे आणि त्या बाबतींत एकप्रकारचें प्रौढ शिक्षण देण्याची खटपट करणें आवश्यक आहे असें त्यांनीं सुचवलें. आधुनिक यंत्रसामुग्री व औद्योगिक घटना ह्यांविषयीं लोकांस माहिती नसते व त्यामुळें नवीन उपक्रमास सामान्य माणसें बुजतात. हा बुजरेपणा दूर होण्याकरितां योग्य उपायांची योजना होणें जरूर आहे, असें मि. अडवाणी ह्यांचें मत आहे. जनतेनें स्थानिक कारखान्यांत तयार झालेला मालच वापरावा असें सांगून स्वदेशीस उत्तेजन देण्याची आवश्यकताहि त्यांनीं प्रतिपादली. एकंदरीनें पहातां साठे बंधूंच्या कारखान्याच्या नवीन इमारतीचा उद्घाटन समारंभ,त्या प्रसंगीं प्रदर्शित केलेल्या विचारांचे योगानें, स्फूर्तिदायक व उत्साहवर्धक झाला ह्यांत शंका नाहीं.

---

### सहकारी कायद्यांत दुरुस्ती

रानटी जनावरांपासून पिकांस उपद्रव होतो, अशा ठिकाणीं कुंपणाच्या सहकारी सोसायट्यांची स्थापना करणें सुकर व्हावें, ह्यासाठीं मुंबई सहकारी कायद्यांत दुरुस्ती करणारें बिल मुंबई कायदेमंडळांत पास झालें. रानडुकरांचा उपद्रव शेतीच्या पिकांस फार होत असतो, आणि शेतांस कुंपणें नसल्या कारणानें त्यांचा प्रतिबंध होत नाहीं, असा अनुभव आहे. ह्याकरितां सहकारी पद्धतीनें तजवीज करावयाची म्हटलें तर अडचणी उपस्थित होतात व शेतकऱ्यांस आपल्यापुरती सोय करतां येत नाहीं. या संबंधांतल्या आजपर्यंत भासलेल्या अडचणी दूर करणें हा प्रस्तुत दुरुस्तीचा मुख्य हेतु आहे.

## ओटावा कराराची फलश्रुति

–:——:–

सन १९३२ सालीं ओटावा येथें ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांची आर्थिक परिषद भरली होती. तीमध्यें, परस्परांस वाव-याच्या आर्थिक व व्यापारी सवलतींसंबंधानें चर्चा होऊन शेवटीं तिची ' ओटावा करार ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या योजनेंत परिसमाप्ती झाली. हिंदुस्थान सरकारच्या प्रतिनिधींनीं व्यापार-विषयक कांहीं करार केल्यामुळें जकातींमध्यें बदल करावा लागला, तर त्यास येथील कायदेमंडळाची संमति घेण्यांत येईल, असें सरकारनें आश्वासन दिलें होतें; परंतु सरकारचें धोरण आंखलें जाण्यापूर्वीं हिंदी व्यापारी वर्गाचा सल्ला घेण्यांत आलेला नव्हता. इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांचे दरम्यान जो करार झाला, त्या अन्वयें हिंदी निर्गत वाढून शेतकऱ्यांच्या मालाचा उठाव होईल व तांदूळ, जवस, चहा, कॉफी, कांतडीं, ताग, कपास इत्यादि मालास इंग्लंडमध्यें सवलत मिळाल्यानें त्यांची निर्गत वाढून इतर देशांचा ब्रिटिश बाजारांतील माल मागें पडेल, अशी अपेक्षा होती. ओटाव्याच्या करारापासून हिंदुस्थानाचा फायदा होणार नाहीं, झाला तर तोटाच होईल, असें लोकपक्षाचें मत होतें व त्याच्या उलट, ओटाव्यामुळें हिंदी परराष्ट्रीय व्यापारास सव-लत व उत्तेजन मिळालेलें आहे, असें सरकारचें म्हणणें होतें. ह्या संबंधांतला मतभेद कायम राहिला असून त्याचीच वाच्यता पुन्हां असेंब्लीमध्यें झाली आहे. ह्या प्रश्नाचें आकलन होण्यास खालीं दिलेल्या आकड्यांचा उपयोग होईलः—

१९२९-३० सालाच्या मानानें गेल्या चार वर्षांतील हिंदी आयातीचे आकडे खालीं दिले आहेतः—

**एकूण आयात.**

( कोटि रु. )

| कोठून | १९२९-३० | १९३१-३२ | १९३२-३३ | १९३३-३४ | १९३४-३५ |
|---|---|---|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन | १०३·१ | ४४·८ | ४८·८ | ४७·६ | ५३·७ |
| ब्रि.साम्राज्य (ग्रे. ब्रि. सोडून) | २१·४ | ११·९ | १०·६ | १०·१ | ११·६ |
| ब्रि.साम्राज्य (एकूण) | १२४·५ | ५६·७ | ५९·४ | ५७·७ | ६५·३ |
| इतर देश (एकूण) | ११६·३ | ६९·८ | ७३·२ | ५७·७ | ६६·९ |
| एकूण आयात | २४०·८ | १२६·४ | १३२·६ | ११५·४ | १३२·३ |

वरील कोष्टकावरून असें दिसेल कीं, १९३१-३२ मध्यें म्हणजे ओटावाचा करार होण्यापूर्वीं, हिंदी आयातीपैकीं ३५·५ टक्के माल ग्रेट ब्रिटनमधून आला व ५५·२ टक्के माल साम्राज्याबाहेरील देशां-तून आला. १९३४-३५ मध्यें हें प्रमाण अनुक्रमें ४०·६ व ५०·६ असें झालें, म्हणजे ग्रेट ब्रिटनमधून होणारी आयात वाढून इतर देशांतील माल इकडे कमी आला.

**हिंदुस्थानांत सवलत मिळणाऱ्या मालाची आयात**

| कोठून | १९३१-३२ | १९३२-३३ | १९३३-३४ | १९३४-३५ |
|---|---|---|---|---|
| ग्रेटब्रिटन | १२·६ | १३·३ | १४·९ | १६·९ |
| इतर देश | १८·२ | २०·१ | १७·६ | २१·५ |
| एकूण | ३०·८ | ३३·४ | ३२·५ | ३८·४ |

ग्रेट ब्रिटनच्या मालास सवलत मिळाल्यानें इतर देशांच्या मानानें त्या देशांतील मालाची आयात कशी ज्यास्त होत गेली, हें वरील कोष्टकावरून लक्ष्यांत येईल.

ह्यापुढें एकूण हिंदी निर्गतीचे तुलनात्मक आंकडे दिले आहेतः—

**एकूण निर्गत**

( कोटि रु. )

| कोठें | १९२९-३० | १९३१-३२ | १९३२-३३ | १९३३-३४ | १९३४-३५ |
|---|---|---|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन | ६६·६ | ४२·९ | ३७·० | ४७·२ | ४७·५ |
| ब्रि. साम्राज्य ( ग्रे. ब्रि. सोडून ) | ४३·६ | २५·३ | २२·८ | २०·९ | २०·८ |
| ब्रि.साम्राज्य(एकूण) | ११०·२ | ६८·२ | ५९·८ | ६८·१ | ६८·४ |
| इतर देश ( एकूण ) | २००·६ | ८७·७ | ७२·६ | ७८·२ | ८२·९ |
| एकूण निर्गत | ३१०·८ | १५५·९ | १३२·४ | १४६·३ | १५१·२ |

वरील कोष्टकावरून ध्यानांत येईल, कीं गेल्या दोन वर्षांत एकूण हिंदी निर्गत १९ कोटींनीं वाढली. जपानकडे होणाऱ्या निर्गतीमध्यें ११ कोटींची भर पडली, अमेरिकेनें ३ कोटींचा माल ज्यास्त घेतला व ग्रेट ब्रिटननें सवलती मिळूनहि फक्त ११ कोटींचा माल ज्यास्त उचलला, परंतु इतर देशांकडे होणारी निर्गत ८½ कोटींनीं घटली. ज्याच्या संबंधांत सवलती देण्यांत आल्या आहेत त्या मालाच्या निर्गतीचे आकडे खालच्या कोष्टकांत नमूद केले आहेतः—

**सवलत मिळणाऱ्या मालाची निर्गत**

( कोटि रु. )

| कोठें | १९३१-३२ | १९३२-३३ | १९३३-३४ | १९३४-३५ |
|---|---|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन | ३३·३ | २९·७ | ३६·५ | ३६·७ |
| इतर देश | ७७·६ | ६५·३ | ६२·९ | ५७·७ |
| एकूण | ११०·९ | ९५·५ | ९९·४ | ९४·४ |

ग्रेट ब्रिटनकडे होणाऱ्या निर्गतीमध्यें झालेल्या वाढीइतकीच इतर देशांकडे झालेल्या निर्गतींत घट पडली आहे, हें वरील आंकड्यांवरून लक्ष्यांत येईल.

ओटावा करारामुळें हिंदी निर्गतीची फक्त दिशा बदलली, ग्रेट ब्रिटनकडे होणाऱ्या निर्गतींत विशेष वाढ होऊन एकूण व्यापार भरभराटेल, ही आशा फलद्रूप झाली नाहीं असा निष्कर्ष वरील आकड्यांवरून निघतो. अनेक आगंतुक जागतिक कारणांमुळें अपेक्षित फलनिष्पत्ति झाली नाहीं असें म्हणावें तर ओटावा करा-राचें समर्थन कसें करतां येईल ? हा प्रश्न शिल्लकच रहातो.

**एक हजार रुपयांचें कर्ज पाहिजे**

कर्जाची मुदत, व्याजाचा दर, परत फेडीची व्यवस्था, इत्यादींबद्दलचा खुलासा समक्ष करावा.

क्ष C/o मॅनेजर, ' अर्थ '
पुणें ४.

**एन. ए. ॲन्ड फ्रेन्ड्स**
स्टेशनर्स, जनरल मर्चन्टस, ॲन्ड कमिशन एजन्टस.
आप्पा बळवंत चौक, पुणें २.

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

## प्राप्तीवरील करासंबंधीं दोन निवाडे

### लागू झालेलें पण हातीं न आलेलें कमिशन

मुरारजी गोकुळदास गिरणीच्या कंपनीचे विक्रेते ह्या नात्यानें मेसर्स रामकुमार केदारनाथ हे काम करीत असत व स्वतः विकलेल्या मालावर, त्याचप्रमाणें कंपनीनें विकलेल्या मालावरहि त्यांस कमिशन मिळत असें. प्राप्तीवरील करासाठी डिसेंबर १९३३ अखेरच्या वर्षाचे हिशेब सादर करतांना त्यांनीं आपल्या मिळकतीच्या आंकड्यांत फक्त ३० जून पर्यंतच्या कमिशनचीच रक्कम दाखविली. जुलै ते डिसेंबर १९३३ ह्या मुदतीमधील कमिशनवर स्वतःचा हक्क लागू झाला होता तरी मुरारजी गोकुळदास कंपनीची स्थिति समाधानकारक नसल्यानें तें कमिशन आपणांस न मिळण्याचा संभव होता असें मेसर्स रामकुमार केदारनाथ ह्यांचें म्हणणें होतें. कमिशनर ऑफ इन्कमटॅक्सनें ह्या प्रश्नाचा निर्णय हायकोर्टाकडे सोपविला.

वरील उदाहरणांतील जुलै ते डिसेंबर ह्या मुदतीमध्यें मिळवलेले पैसे जमा न झाल्यास ते कर्ज ह्या सदरांत येतात व कर्जाची रकम लागू होणें म्हणजे मिळकत लागू होणें नव्हें, असा १९३४ मधील प्रिव्ही कौन्सिलचा एक निवाडा मेसर्स राजकुमार ह्या फर्मनें आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ पुढें मांडला. तथापि, हा निवाडा येथें लागू पडत नाहीं, आजपर्यंत फर्मनें प्राप्तीच्या हिशेबांत कमिशन रुजूं झालें कीं त्याचा आकडा धरलेला आहे, ह्या मुद्यांवर हायकोर्टानें कमिशनर ऑफ इन्कम टॅक्सच्या बाजूनें निकाल दिला व खर्चाचा बोजाहि फर्मवर टाकला.

### डिबेंचर्सचे पैसे बुडाले, ते इतर उत्पन्नांतून वजा करतां येतील काय ?

सर चिनुभाई माधवलाल ह्यांनीं आग्रा स्पिनिंग अँड वीव्हिंग कंपनी लि. नें काढलेल्या डिबेंचर्समध्यें कांहीं पैसे गुंतवले. सदरहु कंपनी कांहीं दिवसांनीं गुंडाळण्यांत आली व त्यामुळें सर चिनुभाईचें ८,५८,७१० रुपयांचें नुकसान झालें. हें नुकसान कर देणाऱ्याच्या इतर उत्पन्नांतून वजा टाकतां येतें काय, ह्या मुद्याचा निर्णय व्हावा, असा मुंबईच्या कमिशनर ऑफ इन्कमटॅक्सनें हायकोर्टाकडे अर्ज केला होता.

इन्कमटॅक्स ॲक्टाच्या कोणत्याहि कलमाच्या अन्वयें ह्या नुकसानीचा इतर उत्पन्नाशीं संबंध जोडतां येत नाहीं, असा हायकोर्टानें निकाल दिला. डिबेंचर्सची खरेदी हा सावकारीच्या व्यवहाराचा एक भाग होता व इतर व्यवसायांबरोबर सर चिनुभाई हे सावकारीहि करीत होते, असें सिद्ध झाल्यास मिळकतीमधून हें नुकसान वजा टाकतां येईल. परंतु तशी वस्तुस्थिति नाहीं. सर चिनुभाई हे वयांत येण्यापूर्वींच त्यांच्या मातोश्रीनें हीं डिबेंचर्स १९२२ सालीं घेतलीं होतीं. सावकारीचा धंदा करणारानें केलेल्या कोणत्याहि व्यवहारांत रकम गुंतविणेचा प्रसंग आला, तर तो व्यवहार सावकारीचाच भाग असला पाहिजे, असें म्हणतां येणार नाहीं.

---

बनारस विश्वविद्यालयाच्या १८ व्या पदवीदान प्रसंगीं भाषण करतांना पंडित मदनमोहन मालवीय म्हणाले:—

" बेकारांस काम पुरविणें हें सरकारच्या कर्तव्यक्षेत्रांत आलें पाहिजे. देशांदेशांत व जातींजातींत बंधुत्वाचें नातें निर्माण करून कलह थांबविला पाहिजे. शांतता, समाधान व सुबत्ता नांदण्यास शास्त्रीय प्रगतीचें सहाय्य झालें पाहिजे; शास्त्रीय शोधांनीं विनाशास प्रोत्साहन मिळतां कामा नये."


धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी

चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें

त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,

मॅनेजिंग डायरेक्टर.

CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

This year 1934-35

Exceeds

2 CRORES & 50 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca,

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## कंपनी कायद्यांत दुरुस्ती

हिंदी कंपनी–कायदा जुना पुराणा झाला असून त्यांत दुरुस्ती होणें आवश्यक आहे, अशी तक्रार आज कित्येक दिवस ऐकूं येत आहे. हिंदुस्थानांतील संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यांचा कारभार मॅनेजिंग एजंट्सच्या मार्फत चालण्याचा प्रघात अत्यंत अनिष्ट असल्याची हाकाटी कित्येक वर्षांची जुनी आहे. सध्या अंमलांत असलेला कंपन्यांचा कायदा सदोष असून त्यांत महत्त्वाच्या सुधारणा होणें जरूर आहे, ह्या लोकांच्या निकडीच्या मागणीस मान देऊन हिंदुस्थान सरकारनें ह्या प्रश्नाची चौकशी करून रिपोर्ट करण्यासाठी श्री. सुशील सेन ह्या अधिकाऱ्याची खास नेमणूक केली होती. त्यांच्या रिपोर्टासंबंधाचें व्यापारी वर्गाचें म्हणणें ऐकून घेऊन सरकारनें एक बिल तयार केलें आहे व तें आतां लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत रीतसर मांडण्यांतहि आलें आहे.

सध्याच्या कायद्यांत विशेषेंकरून खालील बाबतींत सुधारणा व्हावी, अशी लोकांची मागणी होती:-भरमसाटपणानें स्थापन केल्या जाणाऱ्या कंपन्यांवर नियंत्रण, प्रॉस्पेक्टसची प्रसिद्धी व त्यांतील मजकूर ह्यांत सुधारणा, भागीदारांस कंपन्यांची आर्थिक परिस्थिति जास्त विस्तारानें समजण्याची तरतूद व व्यवस्थेवर भागीदारांचें प्रभावी नियंत्रण, बँकिंग कंपन्यांसंबंधीं विशेष तरतूद, इ.

सध्याचा कंपन्यांचा कायदा इंग्लंडमधील कायद्यास अनुसरून करण्यांत आलेला होता. नवीन बिलानें ह्या कायद्याचा आराखडा कायम ठेवला असून शक्यतोंवर इंग्लिश कायद्यास धरूनच त्याच्या दुरुस्तीचें बिल बनवण्यांत आलें आहे.

प्रस्तुत बिलांत मॅनेजिंग एजंटांसंबंधीं पुढीलप्रमाणें सुधारणा करण्यांत आली आहे:–मॅनेजिंग एजन्सीच्या करारावर व नेमणुकीच्या मुदतीवर नियंत्रण, एजंटांस काढून टाकण्याबाबतची तरतूद, एजन्सीची वर्गावर्गी करण्याबद्दल नियम, वेतन दुसऱ्यास लावून देण्यास प्रतिबंध, कंपनीस एजंटांवर अधिकार चालविण्यास कांहीं बाबतींत सत्ता, इ.

डायरेक्टरांस कर्ज देण्यावर कांहीं बाबतींत प्रतिबंध असून कांहीं बाबतींत तें देण्यावर नियंत्रण घालण्यांत आलें आहे. डायरेक्टरांस दिलेल्या कर्जाचा तपशील ताळेबंदांत दाखविण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. त्यांचेवर इतरहि कित्येक बंधनें घालण्यांत आलीं आहेत.

बिलानें बँकिंग कंपनीची व्याख्या करून, त्यांच्या व्यवहाराचें क्षेत्र बँकिंगपुरतेंच मर्यादित केलें आहे. कामास सुरवात होण्यापूर्वी पुरेसें भांडवल जमणें आवश्यक होऊन रिझर्व्ह फंड व रोख शिल्लक ह्यांचीहि योग्य तरतूद करणें बँकांस आतां प्राप्त होणार आहे. तात्कालिक कारणांमुळें संकटांत आलेल्या बँका बुडूं नयेत, ह्याचीहि तरतूद बिलानें केली आहे.

---

**श्रीगजानन वीव्हिंग मिलसची दिनदर्शिका ( शके १८५८ )**

ह्या दिनदर्शिकेंत जुन्या पंचांगाप्रमाणें वार, तारीख, मिती व त्यांचा शास्त्रार्थ, टिळक पंचांगाप्रमाणें फरक, रविचंद्राचे उदयास्त, बँकांच्या सुट्ट्या इत्यादि उपयुक्त माहिती देण्यांत आली असून टिपणासाठी जागाहि राखून ठेवलेली आहे. गजानन मिल्समध्यें रेशमी कापड तयार करण्याची आपली योजना प्रास्तविक मजकुरांत चालकांनीं जाहीर केली आहे.

## “ ओटावा करार आणि हिंदुस्थान ”

( प्रि. गाडगीळ यांची लेखमाला )

गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अॅन्ड इकनॉमिक्सचे डायरेक्टर, प्रि. धनंजयराव गाडगीळ, ह्यांनीं वरील विषयावर ‘ सर्व्हंट ऑफ इंडिया ’ ह्या इंग्रजी साप्ताहिकांत एक लेखमाला लिहिली, ती आतां पुस्तक रूपानें प्रसिद्ध करण्यांत येत आहे. मूळ ओटावा कराराची असेंब्लीमध्यें चर्चा होण्याचे सुमारास श्री. गाडगीळ ह्यांनीं ‘ इंपीरियल प्रेफरन्स ’ ह्या नांवाच्या आपल्या चोपड्यांत ओटाव्याची साधकबाधक छाननी केलेली होती व त्याच धर्तीवर ही नवी लेखमाला लिहिण्यांत आलेली आहे. हिंदुस्थानाच्या व्यापारांत झालेली सुधारणा हा एकंदर जागतिक कारणसमुच्चयांचा परिणाम आहे, व्यापारविषयक धोरणाचाच केवळ नव्हे, असें सुरवातीसच सांगून ओटावा करारामुळें विशिष्ट मालाच्या व्यापारांत काय फरक घडून आला, ह्याचें निरीक्षण त्यांनीं प्रस्तुत लेखमालेंत केलें आहे. जवसाचे व्यापारावर ओटावा कराराचा अनुकूल परिणाम झाला, ही निर्गतीच्या आंकड्यांवरून होणारी समजूत कशी भ्रामक आहे, ह्याचेंहि दिग्दर्शन करण्यांत आलें आहे. ज्या हिंदी मालास ग्रेट ब्रिटननें जकातीमध्यें सवलत दिलेली आहे, त्या मालाची ब्रिटिश मालाबरोबर स्पर्धा होत नाहीं, फारच थोड्या जातींच्या मालास ओटावा करारामुळें फायदा होण्याजोगा आहे व हिंदी निर्गतीचा माल हा बव्हंशीं ब्रिटिश कारखान्यांचा कच्चा माल असल्यानें त्यास इंग्लंडमध्यें विना-जकात प्रवेश मिळणें जरूर आहे, हीं अनुमानें लेखमालेंत पुढें मांडण्यांत आलीं आहेत. ओटावा करारामुळें हिंदी तिजोरीस किती नुकसान सोसावें लागलें व ग्राहकांवर बोजा किती बसला, कराराच्या सरकारी समर्थनांत कित्येक प्राथमिक स्वरूपाचे दोष कसे आढळतात, दोन देशांत परस्पर व्यापारी करार ठरण्याची इष्टता व शक्यता किती आहे, इत्यादि प्रश्नांची चर्चा करून ओटावा करारांचें यथार्थ स्वरूप जनतेपुढें मांडण्यांत श्री. गाडगीळ ह्यांनीं औचित्य तर दाखवलें आहेच, परंतु त्याबरोबरच श्रमपूर्वक व अभ्यासू विवेचन करून ह्या प्रश्नावर स्पष्ट प्रकाश पाडला आहे. आर्थिक प्रश्नांबाबत माहिती गोळा करून तिची शास्त्रीय पद्धतीनें छाननी करणें आणि तिच्यावरून निघणारीं अनुमानें जनतेच्या ज्ञानांत भर पडावी म्हणून प्रसिद्ध करणें हें श्री. गाडगीळ व त्यांची इंस्टिट्यूट ह्यांनीं चालविलेलें कार्य किती उपयुक्त आहे ह्याची कल्पना प्रस्तुत लेखमालेवरून येण्यासारखी आहे.

---

**१९३६–३७ सालाचीं प्रांतवार अंदाजपत्रकें**

हिंदुस्थानांतील प्रांतिक अंदाजपत्रकांचे १९३६–३७ सालाचे आकडे खाली दिले आहेत, त्यांवरून तुलनात्मक माहिती मिळूं शकेल.

| प्रांत | उत्पन्न ( रु. ) | खर्च ( रु. ) |
|---|---|---|
| मुंबई ( सिंध वगळून ) | १२,०२,५८,००० | १२,०३,१७,००० |
| बंगाल | ११,४९,४३,००० | ११,९०,७७,००० |
| मद्रास | १६,४०,००,००० | १६,४०,००,००० |
| पंजाब | १०,४४,२०,००० | १०,६०,५८,००० |
| ब्रम्हदेश | ८,९६,९७,००० | ९,११,४०,००० |
| मध्यप्रांत | ४,८१,००,००० | ४,८९,००,००० |
| बिहार ( ओरिसा वगळून ) | ४,७०,२४,००० | ४,८१,७३,००० |
| संयुक्त प्रांत | ११,७०,९६,००० | १२,४४,६६,००० |

सिंध व ओरिसा हे प्रांत विभक्त होणार असल्यानें त्यांच्या बजेटांचे आकडे अनुक्रमें मुंबई व बिहार ह्या प्रांताच्या बजेटांत समाविष्ट नाहींत.

## सहकारी चळवळ

**विमा एजंटाचें समाजोपयोगी कार्य: प्रो. काजी ह्यांचें भाषण**

बॉंबे को-ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटी, मुंबई, ह्या सहकारी विमा संस्थेचे प्रमुख उत्पादक व गेल्या वर्ष अखेर तिचे अध्यक्ष, प्रोफेसर एच. एल. काजी, ह्यांच्या सन्मानार्थ कंपनीच्या कार्यकर्त्यांनीं गेल्या आठवड्यांत पानसुपारीचा समारंभ केला आणि सोसायटीचे प्रमुख ऑर्गेनायझर्स, मेसर्स कुळकर्णी आणि कंपनी, ह्यांनीं त्यांस मेजवानी दिली. रावबहादुर माणेकलाल लल्लुभाई, मेजर हॉस, मि. नील, मि. ईलिअट, रा. ब. तालमाकी, मि. संजाना, रजिस्ट्रार मि. के. एल. पंजाबी, असि. रजिस्ट्रार मि. हुली, दिवाणबहादुर सी. एम. गांधी, इ. गृहस्थ सदर प्रसंगीं हजर होते.

आभार प्रदर्शनाच्या भाषणांत प्रोफेसर काजी ह्यांनीं खालील उद्गार काढले:—" विमा एजंटाचें काम विशेष मानाचें समजलें जात नसलें तरी तो अत्यंत उत्कृष्ट धंदा आहे, ह्यांत शंका नाहीं. एजंटानें विमा उतरविण्याची जरी कोणावर सक्ती केली, तरी त्यामुळें त्याच्या 'सावजा' चें व एकंदर समाजाचें हितच होत असतें. सहकारी संघटनेमुळें विम्याचें तत्त्व सर्व समाजांत खोलवर पसरतें. विमा संस्थेच्या दृष्टीनें विमा एजंट हा सोन्याचीं अंडीं घालणाऱ्या कोंबडीप्रमाणें अत्यंत उपयुक्त कार्यकर्ता असून त्याच्या हित-संबंधास बाध आणणें श्रेयस्कर होणार नाहीं."

---

**शेतकऱ्यांचें कर्ज कोण निवारील ?**

शेतकरी अत्यंत कर्जबाजारी झाला आहे. हल्लीचे मंदाईमुळें आपला प्रपंच भागवून कर्ज फेडणें त्याच्या आटोक्याबाहेर झालें आहे. सावकाराचे कर्जासाठी त्याच्या जमिनींचे लिलांव भराभर होऊन राहिले आहेत. शेतकऱ्यांच्या जमिनी नष्ट झाल्यास त्यास पोटापाण्याचें दुसरें कोणतेंच साधन राहणार नाहीं व बेकारी बोकाळून अनर्थ गुदरेल. असें होऊं नये, म्हणून शेतकऱ्यांनीं प्रथम संघटना करावी व खालील नियम जरूर पाळावेत, अशी नगर इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष, श्री. पी. के. भापकर, ह्यांनीं एक पत्रक काढून विनंति केली आहे.


(१) सावकाराच कर्ज मुळीच काढूं नये. (२) पावतीशिवाय वसूल देऊं नये. (३) सर्वांनीं साक्षर बनावें. (४) लग्नकार्य व इतर विधी यांवर उत्पन्नाचे निम्मे हिश्यापेक्षां जास्त खर्च करूं नये. (५) संघटना करावी. संघटना म्हणजेच सहकार. सहकार म्हणजे सावकार नाहीं अगर सरकार पण नाहीं; सहकार म्हणजेच जीवनाचें सार होय. संघटना, सहकार हींच शेतकऱ्यांचें दुःख निवारण करतील. (६) आपल्या किरकोळ गरजांसाठी आपले गांवीं सोसायटी स्थापन करा. (७) हल्लीचे कर्जाचे फेडीसाठी व शेती सुधारणेसाठीं लँड मार्गेज बँकेची मागणी करा. (८) सुधारलेलीं आयुधें, उत्तम खत व बियांसाठी सोसायट्यांचा आश्रय धरा. (९) आरोग्य, रस्ते व पाणीपुरवठ्यासाठी सुखसंपत्तिसंवर्धक सोसायट्या सुरू करा. (१०) शिक्षणासाठी (प्रौढ) रात्रींच्या शाळा चालवा.

---


तुम्हांस हवें, त्याच धर्तीचें

किर्लोस्कर पोलादी फर्निचर

पलंग, खुर्च्या, टेबल, बांक, काच, शेल्फ, कपाट, स्टुलें, पाळणे इ. इ.



हेंच एक फर्निचर होय.
डौलदार, मजबूत, आटोपशीर.
सविस्तर माहिती मागवा.

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड, किर्लोस्करवाडी.

---

आपले घरीं सालाचे बेगमीचे मीठ घेणेंपूर्वीं आपले वाण्याजवळ

**सॉलर सॉल्ट**

बद्दल चौकशी करणेस विसरूं नका. ह्या मिठाची १ किंवा २ मणाची गोणी घेतल्यास आपला मीठ सुकवण्याचा, दळण्याचा व रांजणांत भरून ठेवण्याचा सर्व त्रास वांचेल. हें मीठ गोणींतच पण निवाऱ्याचे जागीं ठेवल्यास भर पावसाळ्यांत पाझरत नाहीं. आपले वाण्याजवळ नसल्यास आम्हांला लिहा.

रिप्रेझेंटेटिव्ह—
एम्. बी. भिडे,
तुळशीबाग, पुणें २

Uran Salt Works.
583, Chira Bazar,
Bombay 2.

---

**धी बँक ऑफ इंडिया लि.**

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

उभारलेलें भांडवल ... ... ... रु. २००००००० 
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १०००००००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,०४,००,०००

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज (शेख मेमन स्ट्रीट, मुंबई), बांद्रें (मुंबईनजीक), मलबार हिल (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**चालू ठेवीवरील व्याजाचा दर**

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेकडा १ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धा आम्हीं ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धा ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट:— टी. आर. लालवाणी.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | ११०—९ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १०९—४ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८—६ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११७-१२ |
| ४% १९६०-७० ... ... | ११२—४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९६-१५½ |
| ३½% १९४७-५० ... ... | १०५-११ |
| ४% १९४३ ... ... ... | १०९-१२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७—४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०६—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०६-१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षें मुदत) | १०६-१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | ११०—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२६—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०२—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३१—८ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५२५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १२८—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १००—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ८७२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५५—० |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२३-१२ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १४८१—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५२७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९२—८ |
| टाटा आयर्न (१०० रु. इ. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६७—४ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १४६-१२ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५३२—८ |

### मोटार कराच्या अंमलबजावणीस सुरवात

आज, ता. १ एप्रिलपासून, नव्या मोटार कराच्या ( १९३५ चा बॉंबे मोटार व्हेइकल्स टॅक्स ॲक्ट ) अंमलबजावणीस सुरवात झाली. गेल्या ऑगस्टमध्यें मोटारी रजिस्टर करण्यांत आल्या होत्या, त्यांची मुदत ३१ मार्च रोजीं संपली व १ एप्रिलपासून त्यांची नव्यानें नोंद करावी लागेल. नवीन कायद्यान्वयें भराव्या लागणाऱ्या रकमेंतून गेल्या ऑगस्टमध्यें भरलेल्या वार्षिक फीची उरलेली रक्कम ( ७⁄१२ ) वजा करण्यांत येईल. ही सवलत ३० एप्रिल अखेर मिळेल; त्यानंतर गाड्या नोंदविणारांस ती मिळणार नाहीं. ३० एप्रिलचे आंत गाड्या नोंदविल्या नाहींत तर मोटारींचे मालक शिक्षेस पात्र होतील. ( पहिल्या खेपेस १०० रु. दंड, पुढील प्रत्येक खेपेस २०० रु. दंड. )

### फोर्ड गाड्यांचें उत्पादन

सन १९३५ मध्यें आपण दहा लाखांहून ज्यास्त गाड्या तयार करूं, अशी मि. हेन्री फोर्ड ह्यांनीं गेल्या वर्षी घोषणा केली होती, ती खरी ठरली आहे. कारण, १९३५ सालीं फोर्ड कारखान्यांतून एकूण १३,३५,८६५ गाड्या बाहेर पडल्या.

### हिंदी आगगाड्यांच्या रुळाखालील लांकडी स्लीपर

रेल्वेरूळ हे जमिनीमध्यें पुरलेल्या लांकडी अगर लोखंडी 'स्लीपर'वर बसविलेले असतात. लांकडाची जागा लोखंड व पोलाद घेतील, ही अपेक्षा आतां खोटी ठरली आहे, हें खालील आंकड्यांवरून समजेलः—

हिंदी रेल्वेजसाठी लांकडी स्लीपर्सची खरेदी
( आंकडे लक्ष स्लीपर्सचे आहेत )

| | १९३१-३२ | १९३२-३३ | १९३३-३४ |
|---|---|---|---|
| ब्रॉडगेज (५ फूट ६ इंच ) | १२·१५ | १२·३७ | १७·४० |
| मीटरगेज ( ३ फूट ३⅜ इंच ) | ११·०६ | १०·२९ | १३·३० |
| नॅरोगेज ( २ फूट ६ इंच ) | १·१७ | २·२० | १·५१ |

हे सर्व स्लीपर्स हिंदी लांकडापासून बनवलेले होते.


## दि मुकुंद इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें शहर.

[ अधिकृत भांडवल १००,००० रुपये ]

प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त

**गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत प्रत्येकाची विमा कंपनी !**

शेअरविक्री जोरांत सुरू झाली.

शेअर्स खपविणारे एजंटस मर्यादित. त्वरित अर्ज करा.

मॅनेजिंग एजंटस्—विष्णु मुकुंद आणि कं., पो. बॉ. नं. ४३.

२५६ सदाशिव, पेरूगेटाजवळ, पुणें शहर.

# दि बाँबे लाइफ अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड.

( स्थापना १९०८ )

प्रगति

कंपनीची **लोकप्रियता** सिद्ध करते

कमाल प्रगति : पुरें केलेलें नवीन काम मिळविलें तें

| | | |
|---|---|---|
| १९२५ | : | रु. २२,१८,५०० |
| १९२७ | : | रु. ३८,७७,००० |
| १९२९ | : | रु. ५१,२२,५०० |
| १९३१ | : | रु. ५८,६६,५०० |
| १९३३ | : | रु. ९४,१६,५०० |
| **१९३५** | **:** | **रु. १,२३,२८,०००** |

माफक हप्ते, भरपूर बोनस, क्लेम्सची तात्काळ भरपाई, व पॉलिसींतील सवलतींच्या अटी हें " बाँबे लाइफ पॉलिसीं " चें वैशिष्ट्य आहे.

एजन्सी व पॉलिसी ह्यासंबंधींच्या तपशिलासाठीं लिहा:—

मॅनेजर,

बाँबे लाइफ बिल्डिंग, ४५।४७, चर्चगेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

## डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें

मध्यम वर्गांतील गृहेच्छू लोक — अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य

**भाडेकरी–घरमालक–गृहयोजना**

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.

जनरल मॅनेजर

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | दर हजारीं त्रैवार्षिक नफा | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां भेटा अगर समक्ष लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

## " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, ' अर्थ ' ग्रन्थमाला

पुणें ४.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३ पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख ८ एप्रिल, १९३६. अंक १५

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—

कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | दर हजारीं त्रैवार्षिक नफा | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला
पुणें ४.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें

मध्यम वर्गातील गृहेच्छू लोक — अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य

भाडेकरी—घरमालक—गृहयोजना

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.

जनरल मॅनेजर

दि मुकुंद इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें शहर.

[ अधिकृत भांडवल १००,००० रुपये ]

प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त     प्रत्येक शेअर किं. रु. १० फक्त

गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत प्रत्येकाची विमा कंपनी !

शेअरविक्री जोरांत सुरू झाली.

शेअर्स खपविणारे एजंटस मर्यादित.     त्वरित अर्ज करा.

मॅनेजिंग एजंटस्—विष्णु मुकुंद आणि कं., पो. बॉ. नं. ४२.
२५६ सदाशिव, पेरूगेटाजवळ, पुणें शहर.

# विविध माहिती

### बँकांस सुट्टी

ता. १०,११ व १३ रोजीं गुड फ्रायडे व ईस्टर निमित्त बँका बंद रहातील.

### पोस्टाच्या पाकिटांचे नवे दर

ता.१ एप्रिल १९३६ पासून एका तोळ्यापर्यंतच्या पाकिटांस एक आण्याचीं तिकिटें पुरतील. त्यापेक्षां अधिक असलेल्या प्रत्येक तोळा वजनास अर्धा आणा ज्यास्त पडेल.

### लँकेशायरच्य गिरण्यांतील चात्या बंद

लँकेशायरच्या गिरण्यांच्या मालाचा उठाव होत नाहीं आणि त्यांमध्यें मागणीच्या मानानें ज्यास्त सूत तयार होतें असा अनुभव आल्यावरून कांहीं चात्या बंद ठेवण्यांत याव्या आणि त्यामुळें कारखानदारांचें नुकसान होईल त्याची भरपाई बाकीच्या चालू चात्यांचा मालकांवर पट्टी बसवून तिच्या वसूलांत करावी ह्या आशयाचा एक कायद्याचा मसुदा ब्रिटिश कॉमन्स सभेपुढें होता. ह्या योजनेस कित्येक कारखानदारांचा विरोध होता. तथापि सदरहु बिल कॉमन्स सभेंत गेल्या आठवड्यांत तिसरें वाचन होऊन मंजूर झालें.

### बडोदें संस्थानांत रेडिओचा प्रसार

बडोदें संस्थानांत गेल्या वर्षी १६० नवे रेडिओ लायसेन्स देण्यांत आलें. ही संख्या त्यापूर्वीच्या सालाचेपेक्षां ७० नें ज्यास्त आहे. ह्या १६० लायसेन्समध्यें बडोदें शहरांत ८३ व बडोद्याबाहेर ७७ अशी वांटणी आहे.

### हैद्राबादच्या निजामांची अलोट संपत्ति

हिंदी राजेरजवाड्यांची संपत्ति व अवाढव्य खर्च ह्यांविषयींचीं रसभरित वर्णनें ब्रिटिश वृत्तपत्रांत येत असतात. त्यांपैकीं एकानें अलीकडे खालील माहिती आपल्या वाचकांस दिली आहे:—

निजामांची संपत्ति २०० कोटि रुपये आहे, त्यांचें वार्षिक उत्पन्न १४ कोटि रुपये आहे आणि त्यांचेपाशीं ४० कोटि रुपये किंमतीचें जवाहिर आहे. आपल्या प्रजेच्या उपयोगासाठी त्यांनीं अलीकडे २०,००० रेडिओ खरेदी केले. त्यांच्या खाजगी खर्चासाठी रोजींना १३ हजार रुपयांची नेमणूक आहे. त्यांच्या रौप्यज्युबिली निमित्त पांच लक्ष लोकांस जेवण मिळेल आणि एकूण खर्च सव्वा कोटि रुपयांच्या वर होईल.

### विमा व्यवसायांत पन्नास वर्षें

प्रुडेन्शल नांवाच्या प्रसिद्ध ब्रिटिश विमा मंडळीचे मॅनेजर, सर जोसेफ बर्न, ह्यांचीं विमा व्यवसायांतलीं ५० वर्षें पुरीं झालीं आहेत. ते वयाच्या पंधराव्या वर्षी कारकून म्हणून कामावर लागले आणि आज ते ज्या कंपनीचे व्यवस्थापक आहेत, तिनें २ कोटि, ८० लक्ष विमे उतरले असून, त्यांच्या हाताखाली एकंदर १६,००० नोकर आहेत.

### बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर, मि. मॉंटेग्यू नॉर्मन

मि. मॉंटेग्यू नॉर्मन हे बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर म्हणून सोळा वर्षें काम पहात आहेत. त्यांची, त्याच जागेवर पुन्हां निवडणूक झाली आहे.

### मुंबईमधील टॅक्सी

मुंबई शहरामध्यें एकूण ९५९ भाड्याच्या मोटारी (टॅक्सी) आहेत.

### ग्रेट ब्रिटनमध्यें कोंबड्या व अंडीं ह्यांचा खप

गेल्या दहा वर्षांत, ग्रेट ब्रिटनमध्यें कोंबड्या व अंडीं ह्यांस असलेली मागणी पुष्कळच वाढली आहे, ह्या संबंधांतले आंकडे येथें दिले आहेत:—

| | अंडीं | | कोंबड्या | |
|---|---|---|---|---|
| | १९२४ | १९३४ | १९२५ | १९३४ |
| एकूण कोंबड्या व अंडीं | कोटि ५५७ | कोटि ८०१ | लक्ष हं.वेट १३·६३ | लक्ष हं.वेट २०·८५ |
| दर माणशीं संख्या | १२४ | १७२ | — | ५ पौंड |

### दर प्रश्नामागें १५ रुपये खर्च

पार्लमेंटमध्यें सभासदांनीं विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यास सरकारास दर प्रश्नामागें सरासरीनें १५ रुपये खर्च येतो. माहिती गोळा करण्यांत टपाल हंशील, नोकरांच्या वेळाचा व श्रमाचा मोबदला इत्यादि बाबींप्रीत्यर्थ खर्च होतो त्याचा हा हिशेब आहे.

### जर्मनींत फोर्ड कंपनीच्या "स्वदेशी" मोटारी

फोर्ड मोटारगाड्यांच्या कारखान्यांचें जाळें सर्व जगभर पसरलें आहे. जर्मनीमध्यें ह्या गाड्यांचा कारखाना स्थापन झाला असून त्याचा एकूण नफा गेल्या वर्षी १½ कोटि रुपयांच्यावर झाला व एकंदर उलाढाल ४½ कोटींच्यापेक्षां अधिक झाली. ह्या कारखान्यांतला खर्च ९५ टक्के जर्मन मालावर होत असल्यानें त्या फोर्ड मोटारगाड्या जर्मन "स्वदेशी" आहेत असें कंपनीचें म्हणणें आहे.

### ब्रिटिश तिजोरीची परिस्थिति सुधारली

सन १९३५–३६ ह्या वर्षअखेर ग्रेट ब्रिटनच्या जमाखर्चात २९ लक्ष ४१ हजार पौंडांचा वाढावा आला. तरंगत्या कर्जाची रकम सुमारें ५ कोटि पौंडांनीं कमी होऊन ती ८३⅓ कोटि पौंड झाली.

### हुंडी पटविण्याचें टाळतां येत नाहीं

इंग्लंडमधील एका व्यापाऱ्यानें फिनलंड देशांतून कांहीं लांकूड मागविलें. लांकूड निर्गत करणाऱ्या फर्मच्या लंडनमधील प्रतिनिधीनें माल आयात करणारावर दोन हुंड्या काढल्या. तथापि माल मागविणाऱ्या व्यापाऱ्यानें, माल पाठविणाऱ्याचे व स्वतःचे मधील कांहीं वांधे मिटल्याखेरीज रकम देण्याचें नाकारलें. फिनलंडमधील व्यापाऱ्याच्या लंडनमधील ब्रोकरची भूमिका खुद्द बँकेच्या बरोबरीची आहे व रकमेबद्दल तंटा असला तरी ठराविक दिवशीं हुंडी ही पटवलीच पाहिजे असा लंडन येथील कोर्ट ऑफ अपीलनें महत्त्वाचा निर्णय दिला.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २८ मार्च रोजीं पुरा झालेला आठवडा | ५०,८०,५५३ |
| ता. ४ एप्रिल रोजीं पुरा झालेला आठवडा | ५०,६४,७६३ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते ४ एप्रिल १९३६ अखेर | २,६५,८९,८३,८९२ |

अनुक्रमणिका.


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १७४ | ५ माळशिरस येथील सहकारी परिषद् ... | १७८ |
| २ व्याजाचे दर आणि भाग व कर्जरोखे ह्यांचे बाजारभाव ... ... | १७५ | ६ नव्या उमेदवारानें यशस्वी होण्यासाठीं काय करावें ! | १७९ |
| ३ युद्धाचें वातावरण आणि सुवर्णनिधि | १७६ | ७ अहमदाबाद येथील कापडाच्या गिरण्या ... | १७९ |
| ४ स्फुट विचार ... | १७६ | ८ गेलें वर्ष मुंबई येथील गिरण्यांस कसें गेलें.. | १८० |
| रोखे बाजारांतील हालहवाल–ओटावा करागचें पुढें काय !–विभक्त सिंध प्रांत–सिंध प्रांत व मुंबई इलाखा–अकोला सेंट्रल बँक लि० | | ९ अकलेची परीक्षा ... | १८१ |
| | | १० हिंदी बंदरांत एकवटलेला व्यापार ... ... | १८१ |
| | | ११ साम्राज्य बोटींतून प्रवास करा ... ... | १८२ |
| | | १२ निवडक बाजारभाव... | १८२ |



# अर्थ

बुधवार, ता. ८ एप्रिल १९३६


## व्याजाचे दर आणि भाग व कर्जरोखे ह्यांचे बाजारभाव

ब्रिटिश तिजोरीच्या अधिकाऱ्यांनीं लोकांमध्यें हलक्या व्याजाच्या दराबाबत विश्वास उत्पन्न होण्यासाठीं, आपल्या खेळत्या म्हणजे अत्यल्प मुदतीच्या कर्जाचें रूपांतर पांच–दहा वर्षांच्या रोख्यांवर काढलेल्या हलक्या व्याजाच्या रोख्यांत करावें अशी प्रो. केन्स ह्यांनीं केलेल्या सूचनेचा उल्लेख आम्हीं प्रस्तुत विषयावरील लेखांत मागील एका अंकामध्यें केला आहे. युद्धाचे कृष्णवर्ण ढग युरोप खंडाच्या राजकीय आकाशांत भेडसावयास लागले असतां ह्या प्रकारच्या सूचनेचा स्वीकार होणें अव्यवहार्य आहे, ही गोष्ट बाजूस ठेवली तरी ब्रिटिश सरकारनें सुमारें ४०० कोटि रुपयांची लढाऊ सामुग्री खरेदी करण्याची योजना आंखली आहे, तिची अंमलबजावणी व्हावयाची म्हणजे औद्योगिक भांडवलास मागणी उत्पन्न होऊन रोख्यांवरील व्याजाच्या दरांची खालीं जाण्याची गति थांबून कदाचित् ते चढण्याचाहि संभव आहे. ह्या प्रवृत्तीकडे कांहीं तज्ज्ञांनीं लक्ष्य वेधून प्रो. केन्स ह्यांच्या अपेक्षेच्या मार्गांतली अडचण दाखविली आहे. लांब मुदतीच्या व्याजाचे दर, ह्या व असल्या इतर कारणांमुळें कांहीं काळपर्यंत तरी उतरण्याचा रंग दिसत नाहीं असा त्यांचा अंदाज आहे. कारखान्यांत भांडवल अधिक गुंतलें कीं, रोख्यांस मागणी कमी येणार आणि त्यांचे बाजारभाव उतरून त्यांवर सुटणारे व्याजाचे दर चढणार, अशी ह्या बाबतींतील विचारसरणी आहे. लढाऊ सामुग्री प्रीत्यर्थ तीन वर्षांच्या अवधींत खर्च व्हावयाची ४०० कोटि रुपयांची रकम कोणत्या मार्गानें उभी केली जाते, त्यासाठीं अल्प मुदतीचें कर्ज काढलें जाईल कीं लांब मुदतीचे कर्जरोखे सरकार काढील ह्याविषयीं निश्चयात्मक माहिती मिळेपर्यंत सदरहू प्रश्नास ठाम उत्तर देणें कोणासच शक्य नाहीं. पुढें लागणाऱ्या पैशाची तजवीज आजच मोठें कर्ज उभारून सरकारनें केली तर पैशाच्या बाजारांत ट्रेझरी बिलांसारख्या अल्प मुदतीच्या रोख्यांचा पुरवठा मर्यादित होऊन बँकांस आपल्या रिकाम्या रकमा गुंतवण्याची अडचण पडेल. त्या उलट, मोठें व कायमचें कर्ज काढण्याचा विचार पुढें ढकलला गेल्यास सरकारास ट्रेझरी बिलांमार्फत तात्पुरता पैसा उभा करावा लागून बँकांची पैसे गुंतवण्याची सोय होईल. ब्रिटिश फडनवीशी खातें अर्थातच अनेक साधकबाधक गोष्टींचा विचार करून आपल्या दृष्टीनें हिताचा वाटेल असाच निर्णय करील, हें उघड आहे.

लांब मुदतीचे कायम व्याजाचे दर उतरण्यास प्रो. केन्स ह्यांच्या मतें आणखी एक गोष्ट घडणें आवश्यक आहे. जनतेच्या संग्रहांतले कर्जरोखे उघड्या बाजारांत विकत घेऊन त्यांत गुंतलेला पैसा मोकळा होऊन तो ठेवींच्या रूपानें बँकांकडे यावा अशी व्यवस्था बँक ऑफ इंग्लंडनें केली असतां रोख्यांच्या किंमती चढण्यास व व्याजाचे दर उतरण्यास सहाय होईल असें त्यांचें म्हणणें आहे. १९३२ अखेर बँक ऑफ इंग्लंडनें, पूर्वींच्या वर्षाच्या मानानें १२ टक्क्यांनीं बँकांतल्या ठेवी वाढतील अशी तजवीज केली, ती बाजारांत कर्जरोख्यांच्या खरेदीच्या मार्गानेंच केली. त्याचा परिणाम रोख्यांच्या किंमती ३२ टक्क्यांनीं वाढण्यांत झाला. गेल्या सालीं व्यापाराची चलती होती, त्यावेळीं खेळत्या पैशाच्या पुरवठ्याचा विस्तार ६ टक्क्यांनीं केला गेला, पण तो जरूरीच्या मानानें अपुरा होता. तो वाढण्याकडे व त्या उपायानें रोख्यांचे भाव चढीचे रहातील असें धोरण ठेवण्याकडे सरकारी तिजोरीच्या अधिकाऱ्यांचें लक्ष्य असलें पाहिजे असें प्रो. केन्स ह्यांचें सांगणें आहे. ह्या संबंधांत इतर गोष्टी विचारांत घेणें आवश्यक आहे आणि सरकारची सत्ता अमर्यादित व निश्चयानें प्रभावी ठरेल अशी नाहीं, ह्याची त्यांस जाणीव आहे आणि ब्रिटिश भांडवल इंग्लंडच्या बाहेर फारसें गुंतवलें जात नाहीं व देशांत बेकारी आणि मंदी आहे, ह्या कारणानें व्याजाचे दर चढण्यास विशेष अवसर नाहीं, ही गोष्ट त्यांनीं नमूद केली आहे. औद्योगिक व व्यापारी मंडळ्यांच्या भागांच्या किंमती आर्थिक परिस्थितीच्या व प्रगतीविषयींच्या अपेक्षेचे मानानें फाजील चढीच्या आहेत आणि सरकारी कर्जरोख्यांच्या बाजारभावांशीं तुलना करतांहि त्या भारी आहेत असा प्रो. केन्स यांचा अभिप्राय आहे.

रोखे-बाजारांत उलाढाली करणाऱ्या तज्ज्ञांस हें मत मान्य नाहीं. व्याजाचे दर कायमचे उतरलेले रहाणार हा अंदाज पूर्वींच्या अनुभवावरून त्यांस पटत नाहीं. आर्थिक व्यवहारांच्या चक्रनेमिक्रमांतला सध्याचा कालखंड हा एक हालता भाग आहे असें त्यांस वाटत आहे. औद्योगिक मंडळ्यांच्या भागांतलें भांडवल मोकळें करून तें कायम व्याजाच्या रोख्यांत, प्रो. केन्स ह्यांच्या अपेक्षेस किंवा इच्छेस अनुसरून लोक विशेष प्रमाणांत घालण्यास तयार होतील असें त्यांची कल्पना त्यांस सांगत नाहीं. लोकांत जुगारी वृत्ति बोकाळली असून मंडळ्यांचे भाग भलत्या चढीच्या किंमतींस भरमसाटपणानें खरेदी करण्याची अनेकांस लागलेली खोड अनिष्ट आहे आणि ती कित्येकांस खड्ड्यांत घातल्यावांचून रहाणार नाहीं असें कांहीं तज्ज्ञांचें म्हणणें आहे व तें खरेंहि आहे आणि त्यांचें मत प्रो. केन्स ह्यांच्या अभिप्रायाशीं एवढ्यापुरतें जुळतें त्यांत शंका नाहीं. तथापि, लढाऊ सामुग्री तयार करणाऱ्या कारखान्यांस नवीन पुष्कळ काम मिळावयाचें आहे, त्यामुळें मंडळ्यांच्या भागांची उलाढाल करणाऱ्या लोकांस चलतीची नवी आशा उत्पन्न झाली आहे. तरीहि कर्जरोख्यांची बाजारांतली किंमत कमी होऊन त्यांवरील व्याजाचा दर चढणें ह्या गोष्टी शक्य वाटत नाहींत. रोख्यांचे भाव एकंदरीनें चढीचे रहाणार आणि व्याजाचे दरांत उतरती प्रवृत्ति टिकणार असा

रंग तूर्त दिसत आहे. अल्प मुदतीचें आणि बँकांतील ठेवींवरचें व्याज आणखी उतरण्याचा संभव वाटतो. लोक गतानुगतिक असतात आणि ब्रिटिश पैसे-बाजाराचें वळण हिंदुस्थानांतील बाजार गिरवतांना अनेक वेळां दिसतात. प्रो. केन्स ह्यांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नाची इंग्लंडमध्यें होणारी चर्चा ह्या देशांतहि उपयोगी पडण्यासारखी असल्यानें प्रस्तुत विषयाकडे वाचकांचें लक्ष्य वेधण्याचा आम्हीं यत्न केला आहे.

## युद्धाचें वातावरण आणि सुवर्णनिधि

युद्धाच्या प्रत्यक्ष होणाऱ्या हालचाली आणि युद्ध उपस्थित होण्याची नुसती भीति ह्यांचा महत्त्वाचा परिणाम, राष्ट्रांच्या चलनाचा आधार म्हणून जो सुवर्णनिधि असतो, त्यांत घट होण्यांत, सोन्याच्या निर्गतींत आणि प्रचलित व्याजाच्या दराच्या वाढींत घडून आलेला आढळतो. युद्धखर्चासाठीं जादा चलनाचा पुरवठा करावा लागतो आणि त्या मानानें सोन्याचा निधि वाढवणें शक्य नसतें. निर्गत व्यापार कमी होऊन आयात मालाची किंमत हुंड्यांच्या वजावाटीनें करतां येत नाहीं आणि त्या देण्याची फेड सोनें परदेशांत पाठवून करणें भाग पडतें. कागदी चलनाचा व्यवहारांत सुळसुळाट होतो आणि हातचें सोनें जाऊं न देण्याची प्रवृत्ति जनतेमध्यें बळावते. परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर अशा परिस्थितींत सांपडलेल्या देशास प्रतिकूल होतो आणि मध्यवर्ती बँकेस व सरकारास सोन्याच्या निर्गतीवर नियंत्रण घालून व्याजाचा दर चढवावा लागतो. ॲबिसीनियन युद्धांत पडलेल्या इटलीच्या मध्यवर्ती बँकेचा सुवर्णसंचय घटला असल्याविषयींचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांचें रहस्य वरील विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत येईल.

फ्रान्समध्येंहि तेथील मध्यवर्ती बँकेचा सुवर्णनिधि घटला असून डिस्कौंटचे दर चढवावे लागले आहेत. ह्याच्या मुळाशीं, जर्मनीचें चढाईचें धोरण आणि युरोपांत माजलेल्या राजकीय अस्वस्थतेची परिस्थिति हीं आहेत. फ्रेंच सरकारची ओढघस्तपणाची अवस्था, शस्त्रास्त्रांवर करावा लागणारा वाढता खर्च आणि प्रचलित आर्थिक मंदी ह्यांच्या जोडीस आतां राजकीय अनिश्चितता येऊन बसल्याकारणानें साहजिकपणेंच फ्रँक ह्या चलनावरचा लोकांचा विश्वास कमी झाला आहे. उपस्थित झालेल्या अडचणींस तोंड देण्याकरितां फ्रेंच सरकार, ब्रिटिश पौंड व अमेरिकन डॉलर ह्यांच्या मानानें आपलें राष्ट्रीय चलन स्वस्त करणार कीं काय अशी शंका लोकांत उत्पन्न झाली आहे. फ्रँक स्वस्त होणार असेल तर आपला ऐवज आज लंडनला पाठवावा आणि दर बदलल्यावर तो परत आणावा आणि फायदा मिळवावा ह्या उद्देशानेंहि धंदेवाले देशाच्या बाहेर पैसा पाठवितात आणि त्याचा हुंडणावळीवर प्रतिकूल परिणाम होतो. फ्रँकचलन किंमतीनें उतरूं लागलें असतां त्यांस टेकू देण्याकरितां फ्रेंच सरकारनें लंडनमध्यें तात्पुरतें कर्ज उभारलें आहे. मागणी आली असतां सोनें देण्याची जबाबदारी ह्या लंडनमधल्या ऐवजाच्या आधारावर पार पाडतां यावी अशा हेतूनें सदरहु योजना करण्यांत आलेली आहे.

कांहीं झालें तरी आम्हीं फ्रँक खालीं पडूं देणार नाहीं असा आपला कृतनिश्चय फ्रेंच प्रधानमंडळ वारंवार जाहीर करीत आलें आहे व लोकांचा डळमळणारा विश्वास दृढ करण्याचा त्याचा यत्न चालू आहे. आतांपर्यंत ह्या धोरणास यश आलें आहे; परंतु ह्यापुढें अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत राष्ट्रीय चलन सावरून धरणें फ्रेंच सरकारास कितपत जमेल हें सांगतां येणें कठिण आहे. हुंडणावळीचा कायदेशीर दर बदलावा ह्या मताचे अनेक लोक फ्रान्समध्यें आहेत, परंतु अधिकारारूढ प्रधानमंडळास ह्या धोरणाचा अवलंब करणें परवडत नाहीं, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. फ्रान्सची राष्ट्रीय इभ्रत ह्या धोरणाशीं निगडित आहे अशी सामान्यतः समजूत असल्यानें सदरहु प्रश्न वरील प्रकारच्या स्थितींत राहिला आहे. त्याचें काय होतें हें फ्रान्समधल्या निवडणुकीनंतर दिसून येईल.

# स्फुट विचार

### रोखेबाजारांतील हालचाल

मुंबईचा रोखेबाजार हें, युरोपांतील राजकीय व युद्धविषयक घडामोडींच्या वातावरणांत होणारी चलबिचल व्यक्त करणारें हवामानदर्शक यंत्रच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. साडेतीन टक्के व्याजाचे सरकारी कर्जरोखे तर ह्या बाबतींत अत्यंत नाजुक असून त्यांच्या बाजारभावांची हालचाल बाहेरील राजकीय भानगडींचें वळण त्वरित रीतीनें दिग्दर्शित करीत असते. जर्मनीच्या चढाईच्या धोरणामुळें युरोपांतलें वितुष्ट वाढून एकंदर प्रकरण हातघाईवर येतें कीं काय अशी शंका उपस्थित होतांच त्या कर्जरोख्यांचा बाजारभाव ९७ च्या खालीं थोडा वेळ घसरला. परंतु हेर हिटलरचें, लोकार्नोच्या तहावर सह्या करणाऱ्या राष्ट्रांस गेलेलें उत्तर अपेक्षेच्या मानानें जरा मृदु आहे, अशी बातमी प्रसिद्ध होतांच बाजारास थोडा धीर आला आणि पुन्हां तो दर ९७ रु. ८ आण्याच्या सुमारास चढला. ह्या कर्जरोख्याच्या भावास घसरगुंडी लागते कीं काय अशी वाटणारी भीति सध्या दूर झाली असून तो तात्पुरता स्थिरावला आहे, इतकेंच नाहीं तर त्याची वर चढण्याची प्रवृत्ति स्पष्ट दिसत आहे. जर्मनीच्या धोरणासंबंधाचा निकाल पुढें ढकलण्यांत आला असल्यानें रोखेबाजारास थोडें स्थैर्य प्राप्त झालें आहे. हेर हिटलरचें उत्तर फ्रान्सला अर्थातच मान्य नाहीं. परंतु तें राष्ट्रहि हातघाईवर येण्यास आजच तयार नाहीं व ग्रेटब्रिटनच्या मध्यस्थीनें असली आपत्ति टळेल असें वाटत आहे. ॲबिसीनियन युद्ध मिटण्याबद्दल प्रयत्न पुन्हां चालू होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. ह्या सर्व गोष्टींचा रोखेबाजारावर अनुकूल असाच परिणाम झाल्यावांचून रहाणार नाहीं.

### ओटावा कराराचें पुढें काय ?

लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें ओटावा करारासंबंधाचा सरकारी ठराव नापास होऊन करार रद्द होण्याविषयींची मि. जिना ह्यांची सूचना मंजूर झाली. ह्या रीतीनें व्यक्त झालेल्या बहुमतास मान देऊन त्याप्रमाणें कृति करण्याबाबत आतां सरकार काय कार्यक्रम आखतें इकडे लोकांचे डोळे लागून जाणें साहजिक आहे. असेंब्लीच्या अभिप्रायास अनुसरून सरकार आपलें धोरण निश्चित करील असें स्पष्ट अभिवचन त्या प्रश्नाचा निकाल लागण्यापूर्वी दिलें गेलें असल्यानें आणि तो अभिप्राय सरकारास प्रतिकूल असल्यानें आतां पुढें काय करावें असा पेच त्यांस

पडला असला पाहिजे. सेक्रेटरी ऑफ स्टेट व ब्रिटिश प्रधानमंडळ ह्यांस असेंब्लीचा निर्णय पसंत पडणें अशक्य आहे, हें निर्विवाद आहे. अत्यंत महत्त्वाच्या आर्थिक धोरणाविषयीं असेंब्लीनें कोणताहि निर्णय दिला तरी हिंदुस्थानाच्या अंतिम हिताच्या दृष्टीनें तो मान्य करावा किंवा नाहीं हें ठरवण्याची जबाबदारी व सत्ता कार्यकारी सरकारची आहे, हा सर जेम्स ग्रिग ह्यांनीं दुसऱ्या एका प्रसंगीं पुढें मांडलेला सिद्धांत प्रस्तुत प्रकरणीं उपयोगांत आणला जातो कीं काय अशी शंका एरव्हीं तात्काल उद्भवली असती. परंतु असेंब्लीचें मत मान्य करण्याविषयींच्या सरकारच्या स्पष्ट अभिवचनामुळें तिला जागा राहिलेली नाहीं. तसेंच, हिंदुस्थान सरकार व मध्यवर्ती हिंदी कायदेमंडळ ह्यांचें एकमत असेल तेथें सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनीं ढवळाढवळ करूं नये अशी आज कित्येक वर्षांची प्रथा असल्यानें ओटावा कराराच्या बाबतींत असें एकमत आहे का त्या दोहोंमध्यें दुमत आहे असा प्रश्न उद्भवतो. परंतु असेंब्लीचें मत मान्य करण्याबद्दल हिंदुस्थान सरकारनें अगाऊ आश्वासन दिलें असतां ओटावा कराराच्या बाबतींत मतभिन्नता आहे असें सेक्रेटरी ऑफ स्टेट ह्यांस म्हणतां यावयाचें नाहीं. ह्या अडचणींतून निसटण्यासाठी ब्रिटिश प्रधानमंडळ कांहीं पळवाट काढतें किंवा काय आणि हिंदुस्थान सरकारास असेंब्लीच्या अभिप्रायास बगल देण्याची एकादी सूचना करतें कीं काय हें आतां लवकरच दिसेल. नवीन व्हाइसरॉय कारभाराचीं सूत्रें आपल्या हातीं घेईतोंपर्यंत या प्रश्नाचा निकाल लागणार नाहीं असें कित्येकांस वाटत आहे.

---

## विभक्त सिंध प्रांत

हिंदुस्थानांतील प्रांतांची घटना आर्थिक किंवा सामाजिक तत्त्वावर झालेली नसून राजकीय घडामोडींत कारभाराच्या सोयीच्या दृष्टीनें झालेली आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या अमदानींत प्रारंभीं मद्रास, बंगाल व मुंबई एवढेच भिन्न इलाखे होते आणि तिच्या ताब्यांत नवीन मुलूख येऊं लागला तो त्या प्रांतांस वेळोवेळ जोडण्यांत आला. पुढें क्रमाक्रमानें नवीन प्रांत बनविण्यांत येऊन ह्या मुलखाचा त्यांमध्यें सोयीप्रमाणें अंतर्भाव केला गेला. सिंधचा प्रदेश १८४३ सालीं ईस्ट इंडिया कंपनीनें जिंकला, तेव्हां तो मुंबई इलाख्यास जोडण्यांत आला व ह्याचा परिणाम आमच्या इलाख्याची पश्चिम हिंदुस्थानांत एक लांबलचक पट्टी बनण्यांत झाला. भाषा, संस्कृति इत्यादि बाबतींत मुंबई इलाख्याचा मुख्य व जुना भाग आणि सिंध ह्यांमध्यें साधर्म्य मुळींच नव्हतें आणि त्यामधील कारभार मुंबई शहरांत बसून चालवणें येथील सरकारास अत्यंत गैरसोयीचें होतें. सिंध प्रांत पंजाबला अधिक जवळचा असल्यानें तो त्या प्रांतास जोडण्यांत यावा अशा विषयीं चर्चा कित्येक वेळां झालेली आहे. तथापि, हिंदी राज्यघटनेच्या सुधारणांचा विचार अलीकडे सुरू होईपर्यंत त्यासंबंधानें कांहींच कृति घडली नाहीं. सिंध मुंबई इलाख्यांतून व ओरिसा बहारमधून बाहेर काढावा व त्यांचे स्वतंत्र लहान प्रांत बनवावे अशी योजना नवीन राजकीय घटनेचा भाग म्हणून निश्चित झाली. वायव्य प्रांत गव्हर्नराच्या अमलाखाली मागेंच स्वतंत्र करण्यांत आला होता, आणि आतां सिंध व ओरिसा ह्यांचा स्वतंत्र संसार चालू झाला आहे.

---

## सिंध प्रांत व मुंबई इलाखा

सिंध प्रांताच्या विभक्तीकरणामुळें मुंबई इलाख्याच्या खर्चांत एकंदरीनें बचत झाली असून त्यास सुटसुटीतपणा आला आहे. मुंबई इलाख्यावरचा सिंधच्या खर्चाचा बोजा कमी झाला आहे तो आतां मध्यवर्ती सरकाराच्या डोक्यावर म्हणजे पर्यायानें सर्व हिंदी नागरिकांवर बसणार आहे; कारण, हिंदुस्थान सरकारास सिंधच्या कारभारांत येणारी तूट भरून काढावी लागणार आहे. कराची बंदर व सक्करचें धरण हीं सिंध प्रांताच्या संपत्तीचीं मोठीं साधनें आहेत; आणि शेतीच्या व व्यापाराच्या वृद्धीस तेथें पुष्कळ वाव आहे. पण सक्कर बराजपासून निव्वळ उत्पन्न मिळण्यास कालावधि लागेल. सिंधमधल्या शेतीचा विस्तार होऊन जनतेची कमाई वाढेल आणि सरकारी उत्पन्नांत करांच्या मार्गानें भर पडेल, तेव्हांच तो प्रांत स्वावलंबी होऊं शकेल. आज मुंबई सरकारच्या खर्चांत बचत झाली असून सिंधला प्रांतिक स्वातंत्र्याचें समाधान प्राप्त झालें आहे. मध्यवर्ती सरकारवरचा सिंधबाबतचा बोजा नाहींसा होणें आणि स्वतंत्र सिंध प्रांताची आर्थिक भरभराट होणें ह्या प्रगतीस किती वर्षें लागतील हें सांगतां येत नाहीं. तथापि, ह्या गोष्टी लवकरच घडून याव्या अशी सदिच्छा मुंबई इलाख्यांतील जनतेनें व्यक्त करणें उचित होईल.

---

## अकोला सेंट्रल बँक लि.

वरील बँकेचा ३० जून, १९३५ अखेरचा वार्षिक अहवाल आमचेकडे आला आहे, त्यांतील तपशीलवार माहिती देण्याची पद्धति अनुकरणीय आहे. आर्थिक मंदीमुळें बाजारभाव एकदम पडले व बँकांनीं दिलेलीं कर्जें गारठून जाऊन व्याजाची वसूलीही होणें मुष्कील झालें. ज्या जमिनीचे तारणावर कर्जें दिलीं, तें तारण अपुरें पडल्यानें सर्वच सहकारी बँकांस अतिशय ताण पडला. अशा बिकट परिस्थितीमधून अकोला सेंट्रल बँक मार्ग काढीत आहे, व शक्य त्या मार्गांनीं आपलें स्थान सावरण्याचा प्रयत्न करात आहे. जमीन–खरेदीमध्यें दिवसानुदिवस ज्यास्त रक्कम गुंतविली जात असून ही नाइलाजाची परिस्थिति अनेक सहकारी बँकांवर ओढवली आहे. ३० जून रोजीं बँकेच्या मालकीची १५,९९२ एकर जमीन होती. जमीन खंडानें लावून देण्यापेक्षां विकण्याकडे व्यवस्थापक मंडळीचें विशेष लक्ष आहे. हें धोरण अपरिहार्य आणि प्रसंगोचित आहे, असें म्हटलें पाहिजे. चालू सालीं झालेला सर्वच नफा बुडीत कर्जांचे तरतुदीसाठीं बाजूला काढण्यांत आला आहे. गेलीं कित्येक वर्षें भागीदारांस नफा न वांटतां बुडीत कर्जाच्या तरतुदीची व्यवस्था बँक करीत आली आहे. सालअखेर ही रक्कम ६,८०,८०९ रुपये होईल. बँकेच्या विशिष्ट परिस्थितींत हें एकच इष्ट धोरण संभवत असून भागीदारांनीं कांहीं काळ अशी झीज सोसल्यास बँकेच्या व्यवहाराची घडी पूर्ववत् बसण्यास चांगलें सहाय होईल. सध्याच्या अत्यंत कठीण परिस्थितीमध्यें बँकेचीं सूत्रें धिमेपणानें चालविणें हें व्यवस्थापकांचें कर्तव्य आहे आणि अकोला सेंट्रल बँकेचे चालक त्यासंबंधांत जागरूकता व आस्थेवाइकपणा दाखवीत आहेत हें अभिनंदनीय आहे.

---

## दुसरी माळशिरस तालुका सहकारी परिषद्

स्वागताध्यक्षः—श्री. कुलकर्णी व अध्यक्षः-श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचीं भाषणें

ता. ३०-३-३६ रोजीं माळशिरस येथें दुसरी माळशिरस तालुका को. कॉन्फरन्स श्री. वैकुंठराय मेहता, मॅनेजिंग डायरेक्टर, बॉ. प्रॉ. को. बँक मुंबई, यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. परिषदेकरितां ३१ सोसायट्याचे प्रतिनिधी, स्थानिक व इतर निमंत्रित मंडळी व पाहुणे मिळून एकंदर ४००-५०० चे वर मंडळी उपस्थित होती.

### तालुक्यांतील सोसायट्या

माळशिरस तालुक्यांतील सहकारी चळवळीसंबधीं आढावा काढतांना स्वागताध्यक्ष श्री. मारुतराव तुकाराम कुलकर्णी हे आपल्या भाषणांत म्हणाले:—"या तालुक्यांत ही चळवळ सुरू होऊन २०-२१ वर्षे झाली व तेव्हांपासून आतांपर्यंत ३३ सोसायट्या स्थापन झाल्या असून ३२ शेतकी सोसायट्यांमध्यें मेंबराची संख्या १,६०० आहे. मेंबराची ठेव ३४,२०० रु. असून बिगर मेंबराची ठेव २५,५०० रु. व २६ सोसायट्यांकडे बँकेचें कर्ज ७०,९०० रु. आहे. रिझर्व फंड ४६,९०० रु. झाला असून खेळतें भांडवल २,००,००० रु. चें आहे. ३३ सोसायट्यांपैकीं ४ अ वर्गांत, २३ ब वर्गांत, ५ क वर्गांत, व १ ड वर्गांत अशी वर्गवारी आहे.

सवलतीचे मुदतींत पहिले वर्षीं ५ सोसायट्यांनीं सवलतीचा फायदा घेतला व ५४५ रु. अनामत म्हणून परत केले गेले. दुसरे वर्षीं २९ सोसायट्यांनीं सवलतीचा फायदा घेतला व ६,३५३ रु. अनामत म्हणून परत केले गेले. चालू सालींहि शक्य तितक्या जास्त सोसायट्या सवलतीचा फायदा घेतील अशा तऱ्हेनें प्रयत्न चालू आहेत व सोसायट्यांमध्यें शक्य तितकी जास्त प्रगति होण्याबद्दलची खटपट चालू आहे. तथापि, तालुक्यांत सोसायट्या स्थापन झाल्यामुळें मेंबरांची सांपत्तिक स्थिती सुधारली आहे अगर कसे व एकंदरींत सहकारी चळवळीचा फैलाव कितपत झाला आहे याची बारकाईनें चौकशी करण्यासाठी एकादें कमिशन नेमणें जरूर आहे.

### पाण्यासंबंधीं गैरसोई

माळशिरस तालुका दुष्काळग्रस्त असलेमुळें ९-१० वर्षांपूर्वी सरकारनें निरा राईट बँक कनाल काढून पाणी विपुल आणलें व त्यामुळें तालुक्यांतील लोक सुखी व श्रीमंत होणार म्हणून आम्हीं त्यावेळीं आनंदानें हुरळून गेलों. परंतु आतां अनुभव मात्र असा आला कीं सुख-संपत्तीची वाढ तर झाली नाहींच परंतु पाणीपट्टी थकल्यामुळें जमिनींच्या लिलावाचें सत्र सुरू झालें व जिवापाड जतन केलेल्या जमिनी या पाणीपट्टीच्या पायीं आमचे जवळून नाहींशा होऊं लागल्या. पिकास लागणारें पाणी विपुल मिळण्याची सोय होऊनहि शेतीचे उत्पन्नांत वाढ झाली नाहीं याला अनेक कारणें आहेत. पाणी घेण्यासंबधानें इरिगेशन खात्यानें जे नियम केले आहेत त्यांपैकीं बरेचसे नियम जाचक असलेमुळें शेतकऱ्यांस बरेंच नुकसान सोसावें लागत आहे. ह्याकरितां त्यासंबंधीं हल्लींचे नियमांत काय सुधारणा होणें जरूर आहे याचा विचार करावयास पाहिजे.

शेतीच्या धंद्यास लागणारें भांडवल कमी व्याजाचे दरानें सभासदांना पुरविण्याची व्यवस्था प्रॉ. बँकेकडून केली जात आहे व सरकारनेंहि ही चळवळ पुष्कळ दिवसांपासून व विशेषतः गेल्या दोन तीन वर्षांपासून विशेष प्रमाणांत सवलतीसारखे उपाय योजून ती यशस्वी होणेबद्दल प्रामाणिकपणें प्रयत्न चालविले आहेत. परंतु शेतकीमध्यें सुधारणा होऊन प्रापंचिक स्थितींहि सुधारली नाहीं व चळवळहि अद्याप व्हावी तशी कार्यक्षम झाली नाहीं. करितां या बाबतींत सरकार व प्रां. बँक यांनीं आपलेकरितां आणखी काय करावयास पाहिजे याबद्दलहि विचार होणें जरूर आहे."

### अध्यक्षांचें भाषण

अध्यक्षस्थानीं श्री. वैकुंठराय यांची रीतसर निवड झाल्यावर त्यांनीं प्रास्तविक भाषण केलें. ते म्हणाले, "दहा वर्षांपूर्वीं सोसायट्या नवीन असलेमुळें प्रचाराची विशेष जरूरी होती. आतां आपण दहा वर्षें काम करून काय फायदा झाला याचा आढावा काढून पुढील कार्यक्रम आंखला पाहिजे. दहा वर्षांपूर्वी इन्स्टिट्यूट-मार्फत चौकशी करून जरी सोसायट्या स्थापन केल्या तरी त्यांत चुका झाल्या आहेत. आमचे बँकेकडून कांहीं चुका झाल्या असल्यास त्याबद्दल मी जबाबदार आहें व ज्या दुरुस्त करतां येण्यासारख्या असतील त्या दुरुस्त करणें जरूर आहे.

### सहकारी चळवळीच्या प्रसारास वाव

आपल्या तालुक्यांत जेवढीं गांवें आहेत त्यांपैकीं निम्या गांवांना सोसायट्या आहेत. म्हणजे गांवांशीं सोसायट्यांची शेकडेवारी ५० पडते. इतर भागांशीं तुलना करतांना हा भाग मागसलेला आहे असें वाटत नाहीं. परंतु शेतकऱ्यांची संख्या लक्षांत घेतां फक्त एक दशांस भाग सोसायटींत सामील आहे. म्हणजे बहुतेक शेतकरी यांत सामील नाहींत. या भागांत तीन लक्ष एकर शेतीची जमीन असून शेतकऱ्यांचा शेतीचे कामीं खर्च कमींतकमी पंधरा लक्ष रुपये होत आहे. त्या मानानें आपलें भांडवल अपुरें पडत आहे व आपल्या सोसायट्यांतील भांडवल इतर भांडवलापेक्षां फारच कमी आहे. यावरून आपली चळवळ यशस्वी झाली आहे असें वाटत नाहीं.

शेतकी प्रधान असलेल्या इतर कोणत्याहि देशापेक्षां आपल्या देशांतील शेतकऱ्यांची स्थिती फारच बिकट झाली आहे. पूर्वींपेक्षां आतां शेतीमधून निम्मेंहि उत्पन्न निघत नाहीं व त्यामुळें जागतिक मंदीचा परिणाम इतर समाजापेक्षां शेतकऱ्यांवर जास्त प्रमाणांत झाला आहे. ही परिस्थिति दूर करण्याकरितां सरकारनेंहि हा प्रश्न हातीं धरल्यास तो सोडवितां येण्यासारखा आहे. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी लँड मार्गेज बँका काढाव्यात याबद्दल आज जो ठराव येणार आहे त्यास माझी संमती आहे. शेतकऱ्यांना लांब मुदतीनें व कमी व्याजानें कर्ज देऊन त्यांचेकडून कर्जाची फेड करून घेणें जरूर आहे. शेतींतील उत्पन्न वाढवावयाचें असल्यास सुधारलेलीं औतें व उत्तम बीबियाणें यांचा उपयोग केला पाहिजे व येथील शेती खात्याचे अनुभविक अधिकारी श्री. भांडारकर यांचे सहाय्य घेतलें पाहिजे.

[ अपूर्ण

## नव्या उमेदवारानें यशस्वी होण्यासाठीं काय करावें ?

### कायदेमंडळांतील आयुष्यक्रम

पार्लमेंटांत नव्यानेंच प्रवेश करणाऱ्या सभासदानें कोणत्या गोष्टी लक्ष्यांत ठेवल्या पाहिजेत, ह्याचें मार्मिक विवेचन लॉर्ड स्नोडन ह्यांनीं आपल्या एका लेखांत केलें आहे. उमेदवारीच्या काळामध्यें सभासदानें स्वतःबद्दल चांगलें मत निर्माण केलें नाहीं व प्रसिद्धी मिळविण्याची घाई केली तर त्यास पुढें पस्तावावें लागतें, हा अनुभव आपल्या इकडील सार्वजनिक संस्थांतहि येतो. हिंदी नव्या राज्यघटनेमध्यें कायदेमंडळांतील सभासदांच्या संख्येंत बरीच वाढ करण्यांत आली आहे व सभासदत्व प्राप्त होण्यासाठीं आजपासूनच लोकांची तयारी सुरू आहे. ह्या दृष्टीनें लॉर्ड स्नोडन ह्यांचे खालीं दिलेले अनुभवसिद्ध विचार उमेदवार व मतदार ह्या दोघांसहि मार्गदर्शक होतील

इंग्लंडमध्यें, राजकीय चळवळी पक्षांमार्फत कराव्या लागतात, स्वतंत्र व्यक्तींचें वजन पडूं शकत नाहीं. कारण, तेथील लोकांस ग्राह्य कोणतें व अग्राह्य कोणतें हें समजण्याची ज्यास्त पात्रता आहे. कॉंझरवेटिव्ह, लिबरल व मजूर हे इंग्लंडमधील तीन प्रमुख पक्ष होत व निवडणुकीस उभें रहावयाचें असेल तर ह्यांपैकीं कोणत्या तरी पक्षातर्फे उभें रहावें लागतें. सामान्य लोकांसहि हें निश्चित माहीत असतें कीं, पार्लमेंटांत एकटा दुकटा स्वतंत्र मनुष्य कांहीं करूं शकत नाहीं, महत्त्व आहे तें त्याच्या मतास. तेव्हां अमूक एक व्यक्ति निवडून देण्यापेक्षां, अमूक एका पद्धतीनें पार्लमेंटांत मत देणारा निवडून आणला, तर कार्यसिद्धीच्या दृष्टीनें तें जास्त प्रभावी असतें. ह्या कारणानें, मान्यता पावलेले व आदरणीय असे मोठमोठे मुत्सद्दी पुरुष सुद्धां, त्यांचीं मतें मतदारांस पटेनाशीं होतांच निवडणुकींत अयशस्वी ठरतात. नव्या उमेदवारानें ही गोष्ट लक्षांत बाळगून, कोणत्या तरी पक्षाचा अधिकृत उमेदवार असा शिक्का आपणावर मारून घेणें जरूर असतें. ब्रिटिश मतदार हे शिक्षित असल्यानें विशिष्ट व्यक्तीच्या गुणावगुणाचा विशेष विचार न करतां आपल्या आवडीच्या पक्षाचे प्रतिनिधीस ते मतें देतात. ही पद्धत हिंदुस्थानांतील प्रांतांत सुरू व्हावी व प्रधानमंडळें हीं विशिष्ट पक्षांतील पुढाऱ्यांनीं बनविलेलीं असावीं, असा हेतु मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणांच्या मुळाशीं होता, परंतु तो अनेक कारणामुळें साध्य झालेला दिसत नाहीं.

निवडणुकीस उभें राहून पहिल्या खेपेसच निवडून येणारा उमेदवार नशीबवान समजला जातो. साधारणपणें, पहिल्या निवडणुकींत अनुभव मिळवावयाचा व त्याचे सहायानें पुढील वेळीं यशस्वी व्हावयाचें, असें बहुतेक सभासदांच्या बाबतींत होतें. प्रत्येक पक्ष आपले उमेदवार उभे करतो व त्यांतल्या त्यांत पैसेवाल्या मनुष्यास एखाद्या पक्षाचे अधिकृत उमेदवार होणें सोपें जातें ह्यांत आश्चर्य नाहीं. सभांतून भाषणें करण्याची व विशेषतः मध्यें आडवलें असतां वेळ मारून नेण्याची हातोटी साधल्याखेरीज उमेदवारास यश मिळणार नाहीं. निवडणुकीचे वेळीं आपलीं मतें न झाकतां तीं स्पष्टपणें मतदारांचे पुढें मांडण्यानें उमेदवाराबद्दल अनुकूल ग्रह निर्माण होतो, हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. उमेदवार हा मोठा फाकडा वक्ता असला पाहिजे असें नाहीं. परंतु त्यास आपलें म्हणणें मुद्देसूदपणें व स्वच्छ मांडतां आलें पाहिजे. बोलण्याची हातोटी थोड्याफार संवयीनें प्राप्त होते; त्यांत अवघड असें कांहीं नाहीं.

कित्येक नवे सभासद पार्लमेंटांत गेल्याबरोबर पहिल्याच दिवशीं शाळेंतील विद्यार्थ्यांसमोर बोलावें त्याप्रमाणें भाषण करतात. ह्याचा परिणाम त्यांच्या अपेक्षेचे नेमका उलट होतो. सार्वजनिक सभांतून भाषणें करणें वेगळें व पार्लमेंटसारख्या मंडळांत चर्चा करणें वेगळें. कायदेमंडळांतील भाषणांत मुद्यांचा अंश ज्यास्त असावा लागतो व अतिशयोक्ति टाळावी लागते. भावनोद्दीपक भाषणांचा परिणाम सामान्य जनतेवर होतो तसा कायदेमंडळांतील सभासदांवर होणें शक्य नसतें. कित्येक सभासद बोलण्याची एकहि संधी दवडत नाहींत आणि प्रसंगाकडे लक्ष न देतां भाषणें करतात, त्यामुळें अशा सभासदांचें वजन पडत नाहीं. जरूर तेव्हांच व नवीन मुद्दा असेल तरच बोलणाऱ्या सभासदांच्या शब्दांस मान मिळतो. लांब लांब व कंटाळवाणीं भाषणें करण्यांत हिंदी कायदेमंडळांतील सभासद पटाइत आहेत असा येथें अनुभव आहे. नवीन मुद्दा कोणताहि नसतांना लिहून आणलेलें भाषण वाचण्यापासून कायदेमंडळाचा कोणताच फायदा होत नाहीं. सभासदाच्या पहिल्या भाषणावरून त्याचेबद्दल लोकांचें प्रतिकूल वा अनुकूल मत बनतें. सबब प्रथम भाषण करण्याचा प्रसंग नीट निवडून काढला पाहिजे. पहिल्याच वेळीं फार सुरेख भाषण केलें म्हणजे त्याप्रमाणें नेहमीं भाषण ऐकण्यास मिळेल अशी इतरांची अपेक्षा बनते. म्हणून आवाक्याबाहेर छाप पाडण्याचा प्रयत्न करतां कामा नये. कायदेमंडळाचे सभासद झाल्यानें आपल्या मिळकतीची तरतूद होईल अशी आशा कित्येकांना वाटते; परंतु तें खरें नाहीं. स्वतःच्या अपेक्षेप्रमाणें आपले मनोरथ कधींच पार पडणें शक्य नसतें; तथापि, स्वतःस शक्य तेवढी देशसेवा आपण केली, ह्या भावनेमध्येंच प्रत्येकानें समाधान मानलें पाहिजे. कायदेमंडळांत प्रवेश करणारांपैकीं ज्यांचे पुढें कांहीं निश्चित ध्येय आहे, अशांना स्नोडन साहेबांचे वरील अनुभवजन्य विचार उपयुक्त वाटल्यावांचून रहाणार नाहींत. मतदारांसहि आपले प्रतिनिधी निवडण्यास त्यांची मदत होईल.

## अहमदाबाद येथील कापडाच्या गिरण्या

अहमदाबाद मिल ओनर्स असोसिएशनची वार्षिक सभा झाली, त्यावेळीं श्री. कस्तुरभाई लालभाई ह्यांनीं केलेल्या अध्यक्षीय भाषणांतील महत्त्वाच्या भागाचा सारांश येथें दिला आहेः-

( १ ) कपाशीच्या भावांत वाढ झाली, त्या मानानें कापडाची किंमत वाढली नाहीं.

( २ ) मुंबईच्या मानानें अहमदाबाद येथील मजुरीचे दर सवा पट आहेत.

( ३ ) अहमदाबाद येथील गिरण्यांच्या संख्येंत अगर उत्पादनांत वाढ करण्यापेक्षां सध्याचें स्थान मजबूत करण्याकडे लक्ष पुरवलें पाहिजे. शक्य तेथें काटकसरहि करणें जरूर आहे.

( ४ ) एकमेकांच्या कापडाची हुबेहुब नक्कल करून आपण अंतर्गत स्पर्धा वाढविली आहे. उत्पादनांत विविधता आणल्याखेरीज व रसायनांच्या सहायानें नव्या तऱ्हेचें कापड तयार केल्याखेरीज आपलें भागणार नाहीं.

( ५ ) मालाचा उठाव करणारे घाऊक व किरकोळ व्यापारी ह्यांस कापडाचे भरपूर नमुने पुरवणें, पॅकिंग मजबूत व आकर्षक करणें, वैयक्तिक आवडी-निवडींस महत्त्व देऊन त्याबरहुकूम माल काढणें, इत्यादि मार्गांनीं स्पर्धेस तोंड दिलें पाहिजे.

( ६ ) जानेवारी, १९३६ मध्यें अहमदाबाद येथील ३१ व मुंबई येथील ३० गिरण्यांत रात्रपाळी चालू होती. त्यामुळें खर्चांत बचत होते, परंतु कांहीं काळ उत्पादन मर्यादित करणेंच फायद्याचें होणार आहे. ह्या संबंधांत मुंबईच्या गिरण्यांबरोबर वाटाघाट चालू आहे.

( ७ ) इराण, तुर्कस्तान, केनिया, एडन इत्यादि ठिकाणीं होत असलेली आपली निर्गत कमी झाली आहे. ती वाढविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

## गेलें वर्ष मुंबई येथील गिरण्यांस कसें गेलें ?

मुंबई येथील गिरणी मालकांच्या असोसिएशनची वार्षिक सभा नुकतीच भरली होती, त्यावेळीं असोसिएशनचे मावळते अध्यक्ष सर जोसेफ के ह्यांनीं मुंबई शहरांतील कपास-कापडाच्या गिरण्यांस गेलें वर्ष कसें गेलें ह्याचा आढावा घेतला. त्यांच्या भाषणांतील महत्त्वाच्या मुद्यांचा सारांश येथें दिला आहे.

(१) गेल्या वर्षी बहुतेक सर्व गिरण्या तोट्यांत चालल्या. स्पर्धेमुळें मालास किफायतशीर भाव आला नाहीं.

(२) चोपन तासांच्या आठवड्यामुळें उत्पादनास येणारा खर्च वाढला आहे, व त्या कारणानें यंत्रें ज्यास्तींत जास्त राबवणें जरूर झालें आहे. उत्पादनावर नियंत्रण घालण्याचा ह्या प्रश्नाबरोबरच विचार करणें प्राप्त आहे.

(३) सध्याचें उत्पादन व आयात हीं कायम रहातील असें गृहीत धरल्यास येत्या वर्षी एकूण ६३० कोटि वार कापड हिंदुस्थानांत खपेल. दहा वर्षांपूर्वीच्या मानानें हा आकडा सवापट असला, तरी किंमतींत घट झालेली असल्यामुळें कापडावर होणारा लोकांचा एकूण खर्च वाढलेला नाहीं.

(४) गेल्या पांच वर्षांत हिंदुस्थानानें दरसाल सरासरीनें ११० कोटि रुपये कापडावर खर्च केले. त्या पूर्वीच्या पांच वर्षांची वार्षिक सरासरी १४० कोटि रुपये पडते. १९३५-३६ सालीं ११६ कोटि रुपयांचें कापड खपेल, असा अंदाज आहे.

(५) गेल्या पांच वर्षांत मुंबई येथील गिरण्यांत दरसाल ११० कोटि वार कापड तयार झालें. त्या पूर्वीच्या पांच वर्षांची वार्षिक सरासरी ९८ कोटि वार इतकी होती.

(६) कांहीं विशिष्ट जातीच्या मालाचें उत्पादन जरूरीपेक्षां ज्यास्त होत असल्यानें त्याचे भाव पडतात व त्याचा परिणाम इतर कापडाचे किंमतीवरहि होतो. ठराविक प्रतीच्या कापडाची किमान किंमत ठरविण्याचें धोरण आंखण्यांत सर्व गिरण्यांनीं सहकार्य केल्यास हा प्रश्न सुटणार आहे.

(७) गेल्या वर्षी कामगारांनीं आपलीं कामें चांगलीं केलीं व ते संतुष्ट होते, असें सर्वसाधारणपणें म्हणतां येईल. १९३४ सालीं तासांवर काम करणाऱ्या मजुरांच्या वेतनाची किमान मर्यादा निश्चित करण्यांत आली. इतर मजुरांचे बाबतींतहि हेंच धोरण आखण्याचें घाटत आहे.

---

### गिरणीमालकांस जुटीनें वागण्याविषयीं इषारा
### सर एच. पी. मोदी यांचें भाषण

हिंदी गिरणीमालकांच्या फेडरेशनच्या तिसऱ्या वार्षिक बैठकीचे वेळीं, तिचे अध्यक्ष सर एच. पी. मोदी, ह्यांनीं मजुरांबाबत हिंदुस्थानांत होत असलेल्या कायद्यांबद्दल नापसंती व्यक्त केली. मजुरांस रहाण्यासाठी घरांचा पुरवठा, त्यांच्या शिक्षणाची सोय, इत्यादि गोष्टींची जबाबदारी गिरणीवाल्यांवर लादण्यांत येत आहे. वास्तविक ह्या बाबी सरकारच्या कार्यक्षेत्रांत येतात. कांहीं काळपर्यंत मजुरांबाबत गिरणीमालकांवर ज्यास्त बोजा पडेल, असे कायदे सरकार सुचविणार नाहीं, ह्या सर फ्रँक नॉइस ह्यांच्या आश्वासनाबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें. इंटरनॅशनल लेबर ऑफिसनें तर घिसाडघाई चालविली आहे, तिला आळा बसला पाहिजे. चाळीस तासांचा आठवडा हिंदुस्थानांत सक्तीनें सुरू केला कीं, हिंदुस्थानचा आर्थिक ऱ्हास झालाच म्हणून समजावें, असें ते म्हणाले.


धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०
कडून
हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक
नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा:—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

This year 1934-35
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

(ESTD. 1907)

*Branches:* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca,
*Offices:* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## अकलेची परीक्षा

### प्रश्नाचें उत्तर द्या

मुलामुलींच्या विचारशक्तीची व चाणाक्षपणाची परीक्षा करण्यासाठी त्यांस, वरून दिसण्यास सोपे पण कांहींसे गोंधळांत पाडणारे प्रश्न विचारण्याचा प्रघात आहे. त्यांचीं उत्तरें देतांना मुलें विलक्षण चुका करतांना आढळतात. पण मोठ्या माणसांचीहि असल्या प्रश्नांचे बाबतींत दिशाभूल होते आणि शिकले सवरलेले व व्यवहारी लोकहि चुकीचीं उत्तरें देतात असा अनुभव आहे. ब्रिटिश हाउस ऑफ कॉमन्स ह्या कायदेमंडळांत एका सभासदानें वरील प्रकारचा प्रश्न सहेतुक विचारला असतां त्यास अकरा भिन्न भिन्न उत्तरें मिळालीं !

उदाहरणार्थ खालील सोपा प्रश्न घ्या:—

पेठेंत औषधें विकणाराचें व कापडाचें अशीं दोन दुकानें एकमेकांस लागून होतीं. औषधाच्या दुकानांत एका गृहस्थानें १२ आण्यांस पेटंट औषधाची एक बाटली खरेदी केली व १ रुपया दुकानदारास दिला. दुकानदाराजवळ मोड नव्हती. त्यानें शेजारच्या कापडवाल्याकडून, तो रुपया देऊन, १६ आणे आणले व त्यांतले ४ आणे गिऱ्हाइकास दिले आणि तो गृहस्थ निघून गेला. थोड्याच वेळांत, कापडवाल्यानें औषधांच्या दुकानदाराकडे जाऊन रुपया खोटा असल्याची तक्रार केली. तेव्हां त्या नाण्याच्या मोबदला आपल्याजवळचा चांगला रुपया औषधांच्या दुकानदारास शेजाऱ्याच्या हातावर ठेवावा लागला.

#### प्रश्न

ह्या व्यवहारांत औषधांच्या दुकानदाराचें किती नुकसान झालें?

#### उत्तर

औषध विकणाराचें नुकसान:–( १ ) चार आणे व ( २ ) १२ आणे किंमत लावलेली पेटंट औषधाची बाटली.

#### दुसरा प्रश्न

एखाद्या बारा वर्षांच्या मुलास विचारण्यासारख्या खालील प्रश्नास किती प्रौढ माणसें बिनचूक उत्तर देतील ?

प्रश्नः—एक बाटली व तिचें बूच ह्या दोहोंस मिळून १ रुपया १ आणा किंमत पडते. नुसत्या बुचापेक्षां नुसत्या बाटलीला १ रुपया ज्यास्त पडतो. तर नुसत्या बाटलीची किंमत काय आणि नुसत्या बुचाची किंमत काय ?

#### चुकीचें उत्तर

"बाटलीची किंमत १ रुपाया व बुचाची १ आणा" असें उत्तर चटदिशी बहुतेक लोक देतील. पण तें साफ चुकीचें आहे.

#### बिनचुक उत्तर

"बाटलीची किंमत १ रुपया ½ आणा आणि बुचाची किंमत ½ आणा" हें वरील प्रश्नाचें बिनचुक उत्तर आहे.

( टि. बि. वरून )

---

## छत्रींत कांचेच्या खिडकीची सोय

पावसांत छत्री घेऊन रस्त्यानें चाललें असतांना समोरून येणारीं माणसें दिसत नाहींत व त्यांच्याशीं टक्कर होण्याचा प्रसंग येतो. कांचसारख्या पारदर्शक परंतु लवचीक अशा पदार्थाची खिडकी छत्रींत बसवून ही अडचण दूर करण्याची कृति एका कल्पक अमेरिकनानें काढली आहे.

## हिंदी बंदरांत एकवटलेला व्यापार

हिंदुस्थानाच्या व्यापाराचे दृष्टीनें बंदरांचें महत्त्व किती आहे, ह्याची कल्पना खालील आंकड्यांवरून येईल:—

| वर्ष | आयात कोटि रु. | निर्गत कोटि रु. | एकूण कोटि रु. |
|---|---|---|---|
| १९३३–३४ | ११५ | १५० | २६५ |

ह्या व्यापारापैकीं कांहीं विशिष्ट बंदरांचे वांटणीस एकूण व्यापारापैकीं मोठा अंश येतो, ह्याची माहिती खालील आंकडे देतील:—

१९३३–३४

| बंदर | आयात कोटि रु. | निर्गत कोटि रु. | एकूण कोटि रु. |
|---|---|---|---|
| कराची | १२·९६ | १४·२२ | २७·१८ |
| मुंबई | ४६·१६ | २९·४९ | ७५·६५ |
| मद्रास | ११·१८ | ९·७ | २०·८८ |
| विजगापट्टम | ·७ | ·३९ | ·४६ |
| कलकत्ता | ३२·१२ | ५८·४५ | ९०·५७ |
| चितगांव | ·०७ | ५·२४ | ५·९३ |
| रंगून | ८·४६ | १४·९४ | २३·४१ |
| | | | २४३·६७ |

कलकत्ता व मुंबई ह्या बंदरांचें महत्त्व वरील कोष्टकावरून तात्काळ ध्यानांत येईल. हिंदुस्थानाचा व्यापार कांहीं बंदरांमार्फतच विशेषेंकरून होण्यास कित्येक कारणें आहेत. मुंबई, मद्रास व कलकत्ता हीं ब्रिटिश अमदानीचे सुरवातीपासून राज्यकारभाराचीं तीन महत्त्वाचीं ठिकाणें होतीं व साहजीकच तेथें लोकवस्ती वाढली व व्यापारास आणि उद्योगधंद्यास उत्तेजन मिळालें. एकोणिसाव्या शतकाचे उत्तरार्धांत आगगाडीचे रस्ते आंखण्यांत आले, ते ह्या केंद्रांचें महत्त्व जाणूनच निश्चित झाले. लोहमार्गानें येणाऱ्या व जाणाऱ्या मालाच्या वहातुकीमुळें ह्या तीन बंदरांचें व्यापारी महत्त्व वाढतच गेलें. कराची व चितगांव ह्या बंदरांचे बाबतींतहि हींच गोष्ट घडली आहे.

---

## कॅनडाची मध्यवर्ती बँक

हिंदुस्थानांतील रिझर्व्ह बँकेसारखी मध्यवर्ती बँक कॅनडा देशांत आहे. ही बँक सरकारी भांडवलाची व सरकारी हुकमतीनें चालणारी संस्था असावी अशा मताचा एक पक्ष हिंदुस्थानाप्रमाणें कॅनडांत होता आणि आहे. ह्या मतास अनुसरून कायदा करून घेण्याची खटपट कॅनडामध्यें होणार असल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. बँक ऑफ कॅनडाचें सध्याचें भागीदारांचें भांडवल सुमारें १३० लक्ष रुपये आहे. ह्यांत सरकारच्या मालकीच्या १½ कोटि रुपयांची भर घालावी आणि बँकेच्या चालकमंडळांत सरकारनियुक्त सभासदांचें मताधिक्य असावें आणि खाजगी भांडवलवाल्यांचें सध्या असलेलें प्राबल्य दूर करावें अशी सुचवण्यांत येणारी ही योजना आहे. मध्यवर्ती बँक खाजगी भागीदारींची असावी कीं सरकारी भांडवलाची असावी ह्या जुन्या वादास कॅनडामध्यें अर्थातच पुन्हां रंग येऊन तेथील दोन मुख्य राजकीय पक्षांमधील वादाचा तो विषय होईल.

## साम्राज्य बोटींतून प्रवास करा

इ. स. १९२३ सालीं नेमलेल्या ली कमिशननें आय. सी.एस. वर्गातील नोकरांस पुष्कळच सवलती दिलेल्या आहेत. नोकरीवर असतांना चार वेळां इंग्लंडला जाण्यायेण्याचा प्रत्येक युरोपियन सिव्हिल सर्व्हंटास खर्च मिळतो व प्रत्येक मुलास एकदां जातां येतें. त्याचप्रमाणें, हिंदी वरिष्ठ नोकरांस हिंदुस्थानाबाहेर जावयाचें असल्यास भरपूर पगारी आठ महिन्यांची रजा मिळते. हे सर्व नोकर परदेशीं गेल्यावर आपला पगार तिकडेच वसूल करतात. गेल्या वर्षी ३३ कोटि रुपये ह्या रीतीनें इंग्लंडांत व इतर देशांत गेलेल्या नोकरांस पगार म्हणून देण्यांत आले व हिंदुस्थानाबाहेर पेन्शनचे रूपानें ८ कोटि रुपये गेले.

हिंदुस्थान सरकारचे तिजोरीमधून सिव्हिल सर्व्हंटांच्या येण्याजाण्याचा खर्च भागविला जात असला तरी कोणत्या कंपनीच्या आगबोटींतून प्रवास करावयाचा, हा प्रश्न ज्याचा त्याचा आहे. तथापि साम्राज्यांतर्गत व्यापाराची सुरक्षितता ब्रिटिश साम्राज्याच्या बोटींतूनच मालाची वहातुक होण्यावर अवलंबून आहे व इतर देश आगबोटींस सहाय करीत आहेत, तेव्हां हिंदी सरकारकडून ज्यांस पैसे मिळतात, अशा अधिकाऱ्यांनीं तरी ब्रिटिश साम्राज्याच्या बोटींतूनच प्रवास करणें इष्ट आहे असा हुकूम जरी सरकारनें काढला नसला, तरी आपली तशी शिफारस स्पष्ट रीतीनें जाहीर करण्यास सरकार चुकलेलें नाहीं. सरकारकडून सवलत मिळणारे अधिकारी शक्य तोंवर ब्रिटिश जहाजांतूनच प्रवास करतील, अशी आशा व्यक्त करण्यांत आली असून होम सेक्रेटरी मि. हॅवेट ह्यांनीं १७ मार्च १९३४ रोजीं काढलेलें ह्या अर्थाचें पत्रक असेंब्लीस गेल्या महिन्यांत सादर करण्यांत आलें. इतर देशांनीं आगबोट कंपन्यांस सहाय देणें व हिंदुस्थान सरकारनें आपल्या युरोपियन नोकरांस स्वदेशीं जाण्यायेण्यास लागणारा खर्च स्वतः सोसून फक्त साम्राज्याच्या बोटींतूनच प्रवास करण्यास सांगणें, ह्यांत वास्तविक कांहींच फरक नाहीं. ब्रिटिश साम्राज्याच्या बोटी म्हणजे वस्तुतः ग्रेट ब्रिटनच्याच बोटी होत. इतर देश निदान स्वतःच्या पैशांतून तरी आगबोट कंपन्यांस सहाय करतात; हिंदुस्थान सरकारनें, हिंदी पगार घेणाऱ्या युरोपियन अधिकाऱ्यांस साम्राज्यांतील देशांच्या बोटींतूनच जा असें सांगणें म्हणजे पर्यायानें हिंदी पैशानें ब्रिटिश बोटींस सहाय करणें नव्हे काय? हा प्रश्न येथें सुचल्याखेरीज रहात नाहीं.

---

## जगाच्या व्यापारांत सुधारणा

गेल्या सालाचे शेवटचे तीन महिने आणि १९३४ सालाचे शेवटचे तीन महिने ह्या मुदतींत एकूण आंतरराष्ट्रीय व्यापार किती झाला ह्याची तुलना केली असतां, १९३४ च्या मानानें १९३५ मध्यें ६ टक्के किंमतींत वाढ झाली असें दिसतें. हा किंमतीचा हिशेब सोनें प्रमाण धरून केलेला आहे व अशा रीतीनें निरनिराळ्या देशांच्या चलनांत झालेल्या फेरबदलाचा तुलनेवर होणारा परिणाम शक्य तेवढा टाळला आहे. मालाच्या किंमतीच्या ऐवजीं वजनाचा आधार घेऊन तुलना केल्यास असें दिसून येतें कीं, १९२९ सालाच्या मानानें १९३५ च्या अखेरच्या तीन महिन्यांत जगाचा व्यापार ८४·१ टक्के होता. १९३१ पासून एवढें मोठें प्रमाण पूर्वीच्या कोणत्याच वर्षांत आढळून आलें नाहीं.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—२ |
| १% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | ११९-१२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८-१० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११८—० |
| ४% १९६०-७० ... ... | ११२-१२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९८—२ |
| ३½% १९४७-५० ... ... | १०६—६ |
| ४% १९४३ ... ... ... | ११०—४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७—४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०६—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०६-१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षे मुदत) | १०६-१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | ११०—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२८—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १०४—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३१-१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५३०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १२९—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १००—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९½% ) | ८७७—७ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५७—३ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२३-१२ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १४८१—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५२१—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९२—८ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६९—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १४६—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५२८-१२ |

WANTED
RESPECTABLE
AND
INFLUENCIAL
AGENTS
FOR
VENUS ASSURANCE Co. Ltd.,(Delhi)
Apply for Terms and Agency to the Superintendent.
VENUS ASSURANCE Co. Ltd., ( Delhi )
Laxmi Road, Poona City.


माधव सोमण ब्रदर्स
आम्हीं स्वतः तयार केलेलीं लुगडीं व इतर पेठांचा माल गिऱ्हाइकांस खात्रीलायक विकतों.
हुजूरपागेसमोर, पुणें, २.

वेस्टर्न इंडिया
लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.
स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी—सातारा.
संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

| | | |
|---|---|---|
| बोनस त्रैवार्षिक दरहजारीं | हयातींतील | रु. ६० |
| | हयातीनंतरचें | रु. ७५ |
| १९३५ मधील नवें काम | | ५१,५१,८९२ रु. |
| एकूण चालू काम | | २,५०,१५,०८२ रु. |
| एकूण जिंदगी | | ६१,६९,१६९ रु. |
| लाइफ फंड | | ५०,९९,४३९ रु. |

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

मासिक वीज खर्चांत बचत पाहिजे ना?
तर मग मुंबईत तयार झालेले
बिजली दिवेच वापरा—




स्थानिक व्यापाऱ्याकडे न मिळाल्यास खालील पत्त्यावर लिहा:—
बिजली प्रॉडक्ट्स ( इंडिया ) लिमिटेड
पो. बॉ. नं. ४५१६,
मुंबई नं. ८

न. वि. वडनेरकर
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.
आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.
शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

स्वदेशी
कापड म्हणजे काय!
(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.
या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.
हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.
खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण
स्वदेशी भांडार
लक्ष्मीरोड, पुणें २.

प्रो. काळे ह्यांचें नवीन पुस्तक

## रिझर्व्ह बँक

हिंदुस्थानात राष्ट्रीय मध्यवर्ती बँक ह्या नात्यानें रिझर्व्ह बँकेची स्थापना होऊन त्या संस्थेचें काम चालू झालें आहे. रिझर्व्ह बँकेची घटना, तिच्या कार्याचा व्याप, तिचा इतर बँकांशीं संबंध इत्यादि विषयांची सांगोपांग माहिती ह्या पुस्तकांत दिली असून रिझर्व्ह बँकेच्या कायद्याच्या निरनिराळ्या कलमांची छाननी केलेली आहे. अवघड विषयाचा सुलभ बोध व्हावा म्हणून पुस्तक–कर्त्यानें बँकिंगच्या धंद्यांतले आधुनिक प्रकारचे व्यवहार, त्यांची उपपत्ति व त्यांचें कार्य ह्यांची अत्यंत सोप्या मराठी भाषेत चर्चा केली आहे आणि देशी व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें कोणत्या योजना अमलांत आणल्या पाहिजेत ह्या संबंधानें व्यावहारिक सूचना केल्या आहेत. रिझर्व्ह बँक ही, राष्ट्रीय आर्थिक प्रगतीस परिपोषक होईल काय ? ह्या प्रश्नास प्रस्तुत पुस्तकांत उत्तर मिळण्यासारखें आहे.

**पृष्ठें १३०–किंमत १ रुपया ( ट. हं. वेगळें )**

पुस्तक मिळण्याचीं ठिकाणें:—

( १ ) व्यवस्थापक, "अर्थ" ग्रन्थमाला, पुणें ४.

( २ ) आर्यभूषण प्रेस, पुणें २.

( ३ ) दि को-ऑपरेटर्स बुकडेपो, ९, बेकहौस लेन, फोर्ट, मुंबई. २

## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा ( Dandruff ), केंस गळणें व टक्कल यांवर अनुभविक उपाय. केंसांची वाढ करण्यास उत्कृष्ट साधन. white oil पासून अलिप्त. बाटली किं. १ रु. पो. व पॅ. निराळें. पुण्यांत नू. म. विद्यालय भांडार, येथें मिळेल.

**संजीवन मॅन्युफॅक्चरिंग. कं. अमदाबाद.**

## S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

## K. K. & Co.

**Photographic Dealers**

**POONA.**

## एन. ए. ॲन्ड फ्रेन्ड्स

स्टेशनर्स, जनरल मर्चन्टस, ॲन्ड कमिशन एजन्टस.

आप्पा बळवंत चौक, पुणें २.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १५ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १६ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १७ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १८ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | १९ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २० शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २१ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २२ साक्री ( „ „ ) |
| ९ अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २३ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० शेवगांव ( „ „ ) | २४ मालेगांव ( „ नाशिक ) |
| ११ कोपरगांव ( „ „ ) | २५ सटाणा ( „ „ ) |
| १२ भिवंडी ( „ ठाणें ) | २६ कळवण ( „ „ ) |
| १३ पालघर ( „ „ ) | २७ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १४ कल्याण ( „ „ ) | २८ कालोल ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल. मेहता.

मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा घ. नं. १२४/१३ पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख १५ एप्रिल, १९३६. अंक १६

"दुसरें मूल्यमापन जाहीर झालें"

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—

कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

"अर्थ" ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला
पुणें ४.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें

मध्यम वर्गीतील गृहेच्छू लोक | अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य

भाडेकरी—घरमालक—गृहयोजना

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.

जनरल मॅनेजर

MARATHE & Co.
ENGINEERS & IRON FOUNDERS

WORKS: Natu Bag, Bhikardas Road, POONA 2

Can undertake to do any sort of casting.
We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act.
Our prices are very competitive.

OFFICE: 978-79, Sadashiv, Laxmi Rd., POONA 2

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

## विविध माहिती

### येत्या जूनमधलें खग्रास सूर्यग्रहण

येत्या जूनच्या १९ तारखेस खग्रास सूर्यग्रहण आहे परंतु तें हिंदुस्थानांतल्या कोणत्याहि भागांत दिसणार नाहीं. त्याचें शास्त्रीय रीतीनें निरीक्षण करण्यासाठी हिंदुस्थान सरकार कोडायकॅनॉल येथील वेधशाळेंतले डॉ. राइट्स ह्यांस जपानला मुद्दाम पाठवणार आहे. १९ जूनला इंग्लंडमध्यें ग्रहण लागलेलाच सूर्य उगवेल. ग्रीस, एशिया मायनर, एशियांतला रशियन प्रदेश व जपान ह्या पट्ट्यांत खग्रास ग्रहण दिसेल.

### हिंद-जपान व्यापारी करार

हिंदुस्थान व जपान ह्यांचे दरम्यान झालेल्या व्यापारी करा-राची मुदत लवकरच संपेल. तेव्हां त्याबाबत बोलणीं सुरू करण्याविषयीं जपाननें हिंदुस्थान सरकारास लिहिलें असून त्यांचें उत्तर लंडन मार्फत जाईल, असें समजतें.

### जगांतील सोन्याचें उत्पादन

गेल्या वर्षीं जगांतील खाणींतून एकूण ३ कोटि ५ लक्ष औंस ( ८ कोटि तोळे ) वजनाचें सोनें निघालें. ह्या पैकीं ५६·१ टक्के सोनें ब्रिटिश साम्राज्यांतील खाणींतलें होतें. ऑस्ट्रेलियांत निघालेल्या सोन्याची किंमत सुमारें ११ कोटि रुपये होती.

### उच्च शिक्षणावर आर्थिक मंदीचा परिणाम

मद्रास इलाख्यांतील आर्ट्स कॉलेजांत शिकणाऱ्या विद्या-र्थ्यांची संख्या १९३३-३४ मध्यें ९२०९ होती, ती १९३४-३५ मध्यें ८,८४७ झाली. विश्वविद्यालयाच्या पदवीचा उदरनिर्वाहास उपयोग होत नाहीं, ह्या जाणीवेचा हा परिणाम असावा. हायस्कु-लांतील विद्यार्थ्यांच्या संख्येंतहि दोन लक्षांची घट होऊन ती १९३४-३५ मध्यें १,७७,२२० इतकी होती. प्राथमिक शाळां-तल्या विद्यार्थ्यांची संख्या मात्र वाढून २४,१७,४१० झाली. मुलींची संख्याहि वाढून ती ३,८१,०१३ झाली. मद्रास इला-ख्याची लोकसंख्या ४$\frac{1}{2}$ कोटींच्यावर आहे.

### जपानी कापडाची निर्गत

गेल्या वर्षीं जपान मधून सुमारें २७० कोटि चौरस यार्ड लांबीचें कापड परदेशांत गेलें. एवढी मोठी निर्गत पूर्वी कधींहि झाली नव्हती.

### तयार कपडे वापरणाऱ्या स्त्रिया

अमेरिकेमध्यें दहांतल्या नऊ स्त्रिया तयार कपडे विकत घेतात. फ्रान्समध्यें दहांत नऊ स्त्रिया मापें देऊन कपडे शिवून घेतात. इंग्लंडमधील स्त्रियांचा रिवाज वरील दोन देशांतील स्त्रियांच्या मध्यें येतो. अमेरिकेंत कोणत्याहि मापाचे वाटेल त्या नमुन्याचे तयार कपडे मिळतात, हें तयार कपड्यांच्या तेथील लोकप्रियतेचें कारण आहे.

### बेकारीनिवारणार्थ कॅनडांत पांच कोटि डॉलर खर्च

बेकार लोकांस काम आणि मदत देण्याच्या हेतूनें पांच कोटि डॉलर खर्च करण्याचा कॅनडामधील सरकारचा बेत आहे.

### ग्रेट ब्रिटनमध्यें नित्य उपयोगाच्या वस्तूंवर कर

१९३४-३५ च्या मार्चअखेर संपलेल्या वर्षांत, ग्रेट ब्रिटनमध्यें खाली दिलेल्या तीन वस्तूंवरील करांचें दर माणशीं सरासरी प्रमाण सुमारें ६० रुपये इतकें पडलें. ह्यापैकीं, १० रुपये चहाकॉफीवरील करापासून, २८ रुपये मादक पेयांपासून व २० रुपये तंबाखूवरील करापासून जमा झाले. वरील तीनहि जिनसा जीवनास अत्यावश्यक अशा आहेत, असें म्हणतां यावयाचें नाहीं, तथापि त्यांस सामान्य जनतेच्या रहाणींत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे.

### ब्रिटिश जनतेचा समजूतदारपणा

गर्दीच्या प्रसंगीं चित्त शांत ठेवून व गैरसोय सोसूनहि आनंदी वृत्ति धारण करणारांत ब्रिटिश लोकांचा नंबर बराच वर लागेल. ह्याचें प्रत्यंतर पंचम जॉर्ज बादशहांच्या शवाच्या मिरवणुकीचे वेळीं आलें. गर्दीमधील शेकडा ८० लोकांना आपण मिरवणूक पहाण्यास आलों आहोंत एवढ्यावरच समाधान मानावें लागलें तरी मिरवणुकीचे प्रसंगीं त्या सर्वांनीं स्तब्धता राखली. एवढ्या गर्दींत अपघातहि क्वचितच झाले. फ्रान्समध्यें, 'जोन ऑफ आर्क'च्या वार्षिक उत्सवाचे वेळीं एका दिवसांत वीस तरी मृत्यु होतात!

### राष्ट्र-संघाची टोलेजंग इमारत

जिनीव्हा येथें राष्ट्रसंघाची नवी भव्य इमारत तयार झाली आहे, तिला आतांपर्यंत सुमारें दीड कोटि रुपये खर्च आला आहे. ह्या इमारतींत ९०० खोल्या, १,६५० खिडक्या आणि १,७०० दरवाजे आहेत. वर चढण्याचे २१ विजेचे पिंजरे तिच्यामध्यें बसवले असून टेलिफोन्सची संख्या ९५० आहे. इमारतींत उपहारगृह, पानगृह, बँक, पोस्ट ऑफिस आणि २०० वृत्तपत्रीय प्रतिनिधींची व्यवस्था ह्या सोयीहि करण्यांत आल्या आहेत.

### अमेरिकेच्या तिजोरींत चांदीचा संचय

चांदीचा भाव पडूं न देण्याच्या हेतूनें तिची खरेदी करीत रहाण्याचें धोरण अमेरिकन सरकारनें स्वीकारल्यापासून त्याचा चांदीचा साठा विलक्षण वाढला आहे. ह्या संचयांत आज मितीस १८१ कोटि, ४० लक्ष औंस वजनाची ( १ औंस = २$\frac{1}{2}$ तोळे ) चांदी साठली आहे. एकट्या मार्च महिन्यांत अमेरिकन तिजोरी-मार्फत ४ लक्ष औंस चांदी खरेदी करण्यांत आली.

### कामाचे तास कमी करण्याचें ब्रिटिश सरकारनें नाकारलें

पगारांत कपात न करतां कामगारांच्या आठवड्यांतील कामाचे तास चाळीसावर आणावे, ह्या इंटरनॅशनल लेबर ऑफि-सच्या सूचनेस ब्रिटिश सरकारनें विरोधात्मक उत्तर दिलें आहे.

### गेल्या वर्षांतलें हिंदी कस्टम्सचें उत्पन्न

१९३५-३६ सालांत हिंदुस्थान सरकारास जकातींचें उत्पन्न किती झालें, ह्याचे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून असें दिसतें कीं, गेल्या मार्च अखेरच्या वर्षांतील एकूण जमा ५६ कोटि २७ लक्ष रुपये इतकी झाली. त्याच्या पूर्वीच्या सालीं हा आंकडा ५४ कोटि ३८ लक्ष असा होता.

अनुक्रमणिका.


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १८६ | हिंदी स्वदेशी साखर—तांदूळ व गहूं ह्यांच्या आयातीवर जकात... | |
| २ सरकारचीं तात्पुरतीं कर्जें | १८७ | ५ वसाहतींच्या वांटणीविषयींची मागणी ... | १९१ |
| ३ मुंबईतल्या टॅक्सींच्या भाड्यासंबंधीं बांधा ... | १८८ | ६ पंजाबांत ग्रामसुधारणा | १९२ |
| ४ स्फुट–विचार ... | १८९ | ७ व्यापारी संस्थांच्या संघाची वार्षिक बैठक | १९३ |
| औद्योगिक प्रगति आणि बेकारी—वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक उन्नति- न्यूझीलंडची मध्यवर्ती बँक—ग्रामसुधारणा करूं इच्छिणारांची भूमिका– | | ८ "बी. ई. एस. टी." | १९३ |
| | | ९ बँकिंगच्या क्षेत्रांत | १९४ |
| | | १० निवडक बाजारभाव | १९५ |
| | | ११ दुसरी माळशिरस तालुका सहकारी परिषद् ... | १९५ |



# अर्थ

बुधवार, ता. १५ एप्रिल, १९३६


## सरकारचीं तात्पुरतीं कर्जें

### ट्रेझरी बिलांचे व्यवहार व व्याजाचे दर

कोणत्याहि सरकारच्या चालू उत्पन्नाची जमा आणि चालू खर्च ह्यांचा मेळ आठवडान आठवडा व महिनान महिना बसत नसतो. कित्येक करांच्या उत्पन्नाची जमा विशिष्ट महिन्यांत जारीनें होते आणि इतर वेळीं मंदी असते. सरकारचा खर्च मात्र स्थिरतेनें सारखा चालू असतो. उत्पन्न–खर्चाची वर्षअखेर तोंडमिळवणी झाली तरी हातीं येणाऱ्या रकमा व खर्च होणाऱ्या रकमा ह्यांच्यामध्यें वेळोवेळ जी तफावत पडते ती भरून काढण्यासाठी सरकारास जरूर तो पैसा तात्पुरता उसना घ्यावा लागतो. तात्पुरती गरज भागवण्याकरितां कर्ज काढण्याच्या आवश्यकतेसंबंधानें खाजगी धंदेवाले आणि सरकार ह्यांचेमध्यें फारसा फरक नाहीं. सरकारची ही उसनवारी दोन प्रकारची असते. त्याचा सावकार मुख्यत्वेंकरून मध्यवर्ती बँक असल्यानें त्या संस्थेकडून वेळोवेळ पैसा उसना घेतला जातो. त्यास "वेज ॲण्ड मीन्स अडव्हान्सेस" म्हणतात. सरकारचा पैसा ह्या बँकेंत जमा होत असतो आणि तिच्याच मार्फत सरकारी खर्चहि चालतो. तेव्हां गरजेप्रमाणें उसनवारी आणि परतफेड हीं सतत चाललेलीं असतात. परंतु सरकारला जरा मोठ्या प्रमाणावर रकमा लागतात, त्या दुसऱ्या एका मार्गानें उभ्या केल्या जातात आणि तो मार्ग म्हणजे "ट्रेझरी बिल" ह्या नांवानें प्रसिद्ध असलेले अल्प मुदतीचे रोखे विकून जनतेकडून तात्पुरतें कर्ज काढणें हा होय. ह्या रोख्यांची मुदत तीन, सहा महिन्यांपासून बारा महिन्यांपर्यंत असतें आणि त्यांची विक्री सामान्यतः टेंडर्स मागवून करण्यांत येते. ठरल्या मुदतीचें व्याज कापून घेऊन बाकीचा पैसा धनको सरकारास देतात व रोखे ताब्यांत घेतात. व्याजाचा दर अर्थातच पैशाच्या बाजाराची वेळोवेळ परिस्थिति असेल त्याप्रमाणें कमी-जास्त होत असतो. इंग्लंडमधली ही ट्रेझरी बिलांची पद्धति हिंदुस्थानांतहि सरकारनें उचलली आहे.

सरकारच्या पैशासंबधाच्या तात्पुरत्या गरजा भागवणें हा जरी ट्रेझरी बिलांचा मुख्य उद्देश असला तरी ह्या कर्जरोख्यांस ब्रिटिश आणि हिंदी पैशाच्या बाजारांत कायमचें आणि महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें असून ते रोखे त्या बाजाराचें प्रधान अंग बनलें आहे. देशांतील बँकांस आपला खेळता पैसा तात्पुरता गुंतवण्यास तें अत्यंत सोयीचें साधन असतें आणि बँकिंगचे व्यवहार सुरळीत चालावे म्हणून सरकारास ट्रेझरी बिलांबाबतचें आपलें धोरण विशिष्ट रीतीनें आखावें लागतें. सरकारी तिजोरी, पैशाचा बाजार आणि बँकिंगचे व्यवहार ह्यांचा परस्पर-संबंध अतिशय निकटपणाचा असल्यानें सरकारास स्वतःचा जमाखर्च आणि देशांत खेळणारा पैसा ह्यांचें दुहेरी तंत्र व्यवस्थितपणें संभाळावें लागतें. बँकेकडून घेतलेल्या कर्जाची बाकी वर्षअखेर पूज्य करण्यांत येते, परंतु ट्रेझरी बिलांची बाकी एका सालांतून दुसऱ्या सालांत ओढली जाते. गेल्या पांच महिन्यांत हिंदी ट्रेझरी बिलांस टेंडरांमार्फत लोकांची मागणी किती आली, सरकारनें किती रकमांचा स्वीकार केला आणि बिलांवर व्याज किती दिलें गेलें ह्यासंबंधाचे दर आठवड्याचे आकडे खालीं दिले आहेतः–

### हिंदुस्थानसरकारचीं ट्रेझरी बिलें

| तारीख | टेंडराची रकम (लक्ष रुपये) | स्वीकारलेली (रकम लक्ष रु.) | व्याजाचा दर (द. सा. द. शे.) |
|---|---|---|---|
| | | | रु. आ. पै |
| १९३५ | | | |
| नोव्हें. ६ | ५४५ | २०० | ० १५ ३ |
| " १३ | ३९६ | २०० | ० १५ ० |
| " १९ | ३७० | २०० | १ ० १ |
| " २६ | ४१० | २०० | १ ० ८ |
| डिसें. ३ | ३७८ | २०० | १ ० ९ |
| " १० | ४०८ | २०० | १ ० ६ |
| " १७ | ३६७ | २०० | १ ० ९ |
| १९३६ | | | |
| जाने. २ | ४२७ | २०० | १ ० ० |
| " ७ | ३८२ | २०० | १ १ ५ |
| " १५ | ४९० | २०० | ० १५ ११ |
| " २१ | २६८ | १०० | ० १५ ११ |
| " २९ | ३६५ | १०० | ० १४ ० |
| फेब्रु. ४ | २४३ | १०० | ० १२ ० |
| " ११ | | | |
| " १८ | | | |
| " २५ | | | |
| मार्च ३ | | | |
| " १० | १८० | १०० | ० १० ० |
| " १७ | १८६ | १०० | ० ८ ११ |
| " २३ | १४२ | १०० | ० ८ ८ |
| " ३१ | १०० | १०० | ० १२ ० |

प्रारंभीं व्याजाचा दर १ रुपयाच्या आसपास सुमारें ११ आठवडे होता, तो उतरत उतरत शेवटीं ८ आण्यांपर्यंत कसा खालीं आला आणि त्याच रीतीनें टेंडरांच्या व स्वीकारलेल्या रकमाहि कशा क्रमाक्रमानें रोडावत गेल्या, हें वरील आकड्यांवरून स्पष्ट दिसून येईल. ट्रेझरी बिलांची विक्री व परतफेड कशी होत गेली आणि त्यावरच्या देण्याची बाकी किती उरली ह्याचे आकडे खालीलप्रमाणें आहेतः–

## ट्रेझरी बिलांची विक्री, परतफेड व शिल्लक

| आठवड्याची अखेरची ता. | विकलेल्या बिलांची रकम ( लक्ष रुपये ) | परत फेडीची रकम ( लक्ष रुपये ) | बाकी राहिलेली रकम (कोटि रु. लक्ष रु.) | |
|---|---|---|---|---|
| १९३५ | | | को. | ल. |
| ऑक्टो. ३० | २०० | | ३० | ५२ |
| नोव्हें. ८ | २०० | | ३२ | ५२ |
| „ १५ | २०० | | ३४ | ५२ |
| „ २१ | २०० | | ३६ | ५२ |
| „ २८ | २०० | | ३८ | ५२ |
| डिसें. ५ | २०० | | ४० | ५२ |
| „ १२ | २०० | २०० | ४० | ५२ |
| „ १९ | २०० | ७६० | ३४ | ९२ |
| १९३६ | | | | |
| जाने. ४ | २०० | ११९३ | २५ | ७९ |
| „ ११ | २०० | ३७९ | २४ | ० |
| „ १८ | २०० | २०० | २४ | ० |
| „ २५ | १०० | २०० | २३ | ० |
| फेब्रु. १ | १०० | २०० | २२ | ० |
| „ ८ | १०० | २०० | २१ | ० |
| „ १५ | | २०० | १९ | ० |
| „ २२ | | २०० | १७ | ० |
| „ २९ | | २०० | १५ | ० |
| मार्च ७ | | २०० | १३ | ० |
| „ १४ | १०० | २०० | १२ | ० |
| „ २१ | १०० | २०० | ११ | ० |
| „ २८ | १०० | | १२ | ० |
| „ ३१ | १०० | २०० | ११ | ० |

ट्रेझरी बिलांची आठवड्याची विक्री कमी करावयाची, योग्य मुदतीस परतफेड करावयाची आणि अशा रीतीनें देण्याची बाकी उतरीत आणावयाची हें धोरण सरकारनें स्वीकारल्यानें पांच महिन्यांत बिलांची बाकी ३५½ कोटि रुपयांवरून मार्चअखेर ११ कोटींपर्यंत खाली आली. ह्याचा परिणाम बाजारास पैशाचें अजीर्ण होण्यांत व अल्प मुदतीचे व्याजाचे दर घसरण्यांत झालेला दिसून येतो. शिवाय, रिझर्व्ह बँकेची विलायती हुंड्यांची खरेदी सारखी चालूच आहे व त्यामार्फत मोकळ्या झालेल्या पैशाची भर पुन्हां बाजारांत पडत आहे. पैशाचा पूर वाहूं देऊन व्याजाचा दर बँकांस अग्राह्य करून टाकण्याच्या ह्या धोरणावर स्वाभाविकपणें टीका होत आहे. डिसेंबरच्या मध्यापासून मार्च अखेरच्या साडे-तीन महिन्यांत ट्रेझरी बिलांची बाकी ४०½ कोटींवरून ११ कोटींवर आली. ह्यांतल्या तफावतीची रकम पचवणें पैशाच्या बाजारास अत्यंत अवघड गेलें असून त्याची तारांबळ उडाली आहे. चालू वर्षांत ट्रेझरी बिलांची रकम २५ कोटि रुपयांपर्यंत नेण्याचें आश्वासन सर जेम्स ग्रिग ह्यांनीं बजेट सादर करतांना दिलें आहे. सुमारें २९ कोटि रुपयांच्या विलायतेंतील कर्जाची फेड सरकारास लवकरच करावयाची आहे आणि त्याकरितां जादा कर्ज काढावें लागणार नाहीं असें फडनवीसांनीं जाहीर केलें आहे. तेव्हां ट्रेझरी बिलें विकूनच ही रकम त्यांस उभी करावी लागेल. परंतु परतफेडीच्या प्रत्यक्ष प्रसंगीं एकदम एवढी रकम उभी करणें योग्य व शक्यहि होणार नाहीं. म्हणून एव्हांपासूनच क्रमाक्रमानें ह्या पैशाची उभारणी करावी लागेल हें उघड आहे.

---

## मुंबईतल्या टॅक्सींच्या भाड्याविषयीं वांधा

भाड्याच्या टॅक्सिवाल्यांनीं दर मैलास चार आणे ह्याप्रमाणे गिऱ्हाइकांकडून भाडें घ्यावें कां तें आठ किंवा सहा आणे असावें ह्या संबंधानें मुंबई शहरांत माजलेल्या वादाचें रहस्य तिऱ्हाइतांस समजणें कठिण झालें असलें पाहिजे. मैली चार आणे दर आकारण्याची आपणांस परवानगी असावी अशी टॅक्सीवाल्यांची मागणी आणि हा दर फार हलका आहे असें त्यावर पोलीस कामिशनरचें म्हणणें हें सकृद्दर्शनीं चमत्कारिक वाटतें. आपणांस दर मैली ज्यास्त भाडें मिळावें असा टॅक्सीवाल्यांनीं आग्रह धरणें आणि सामान्य जनतेसाहि ह्या त्वरित गतीच्या वहानाची सोय उपभोगण्यास मिळावी म्हणून तो हलका असावा अशी पोलीस-खात्यानें सूचना करणें हें दिसायला सरळ दिसतें. पण मुंबईस वस्तुस्थिति त्याच्या उलट असून चार आणे दराचा आग्रह टॅक्सी-वाल्यांचा आणि तो सहा आणे असावा असें म्हणणें पोलीसचें, हा प्रस्तुत वांध्यांतला प्रकार उफराटा झाला अशी कोणाचीहि समजूत होणें स्वाभाविक आहे.

खरें पाहिलें तर कोणत्याहि मालाची विक्रीची किंमत विशिष्ट भावानें व्यवहार झाले असतां शेवटीं निवळ रकम किती हातीं येईल ह्याच्या अंदाजावर अवलंबून ठेवावी लागते. रेलवेच्या, बसेसच्या वगैरे वहातुकीच्या साधनांचे आणि नाटक-सिनेमागृहांचे व पोस्टाचे दर ह्या तत्त्वावरच निश्चित होत असतात. दर कमी केला असतां मालाचा उठाव आणि गिऱ्हाइकी वाढेल आणि विक्रीची एकूण रकम अधिक होईल तर किंमत उतरवणें श्रेयस्कर ठरेल. पण किंमत कमी झाली व त्या मानानें गिऱ्हाइकी वाढली नाहीं तर उतरलेल्या दरानें होणारें नुकसान उठावाच्या वाढीनें भरून निघावयाचें नाहीं आणि दर हलके करण्याचें धोरण चुकीचें होईल. मैली चार आणे दरानें, आठ आणे देण्याची ऐपत असणारे लोक कमी पैसा देतील, त्यांचेकडून आज निश्चितपणानें होणारी मिळकत मर्यादित होईल आणि टॅक्सीवाल्यांस आपला धंदा चालवणें व गाड्या चांगल्या स्थितींत ठेवणें परवडावयाचें नाहीं, ही मुंबईतल्या वादाची एक बाजू आहे. ह्याच्या उलट टॅक्सीवाल्यांचें म्हणणें असें कीं, ज्यांस आठ-सहा आणे दर भारी वाटतो व म्हणून जे टॅक्सी वापरण्याचें टाळतात असे मध्यम स्थितींतले अनेक लोक चार आणे दर झाला असतां आपणांस आश्रय देतील आणि श्रीमंतांपासून मिळावयाच्या पैशांत जी तूट येईल ती वाढणाऱ्या गिऱ्हाइकीनें भरून निघेल. अशा रीतीनें, दरांत फेरफार झाला असतां काय परिणाम घडून येईल ह्या विषयीच्या अंदाजाबाबतचा हा वांधा आहे, हें उघड आहे. टॅक्सींची आजची संख्या व चालू दरानें त्यांस होणारी मिळकत ह्या बाबतच्या अनुभवाच्या दृष्टीनें दर कमी केला असतां काय परिणाम होईल याचा अंदाज केला पाहिजे. टॅक्सींच्या उत्पन्न—खर्चाचे भिन्न अंदाज दोन बाजूंच्या वतीनें पुढें मांडण्यांत येत आहेत, आणि त्यांवर अधिकारयुक्त निर्णय देणें हें काम सोपें नाहीं.

अजमास म्हटला कीं त्यांत अनिश्चितपणा व वैयक्तिकपणाच्या कल्पनेचा खेळ ह्या गोष्टी येणारच. तथापि, प्रयोगादाखल दर उतरवून मर्यादित काळपर्यंत त्याचा अनुभव घेणें हा एक तडजोडीचा मार्ग येथें सुचतो; आणि त्याचाहि विचार प्रस्तुत वादांत झालाच असला पाहिजे आणि तो योग्य रीतीनें होणें अगत्याचें आहे. मुंबईच्या टॅक्सीवाल्यांस

सरासरीनें आज भरपूर पोटापुरतें काम मिळतें काय ? टॅक्सीचा दरमैली दर चार आणे केला तर व्हिक्टोरिया, 'बेस्ट' कंपनीच्या बसेस इत्यादि वहानांचा उपयोग करणारे लोक टॅक्सीकडे वळतील काय ? असलें नवीन गिऱ्हाइक त्यांस किती मिळण्याचा संभव आहे ? श्रीमान गिऱ्हाइकें आज मैली आठ आणे देतात तींहि चार आण्यांत प्रवास करूं लागलीं असतां टॅक्सीवाल्यांच्या मिळकतींत किती तूट येईल आणि ती हलक्या दरामुळें वाढणाऱ्या गिऱ्हाइकीनें भरून निघणें शक्य आहे काय ? हे मुख्य विचाराचे मुद्दे प्रस्तुत प्रकरणांत उद्भवतात आणि त्यांसंबंधाच्या अंदाजावर एकंदर वादाचा निकाल अवलंबून रहावा लागेल. भाड्याचे हलके दर आणि गाड्यांची सुरक्षितता व सोइस्करपणा ह्यांच्या दृष्टीनेंच सरकारी खात्यानें सध्या चालू असलेला बांधा मिटवला पाहिजे. जनतेच्या हिताचें योग्य रक्षण होत आहे किंवा नाहीं हेंच त्या खात्यानें मुख्यत्वेंकरून पहावयाचें असतें. त्या हितास बाध येत नसेल तर खाजगी धंदेवाल्यांस आपले व्यवहार मोकळेपणानें करूं देणें हेंच उचित आहे.

## स्फुट विचार

### औद्योगिक प्रगति आणि बेकारी

व्हाइसरॉय लॉर्ड वुइलिंगडन ह्यांनीं मध्यवर्ती कायदेमंडळांत निरोपवजा गेल्या आठवड्यांत भाषण केलें, त्यामध्यें मध्यम वर्गांतली बेकारी व देशाची वाढती लोकसंख्या ह्या विषयांचा उल्लेख प्रामुख्यानें आला, ह्यावरून त्यांच्या महत्त्वाच्या आपणांस असलेल्या जाणीवेची साक्ष लोकांस पटवण्याची आवश्यकता सरकारास भासली आहे असें दिसून येतें. सप्रू कमिटीच्या रिपोर्टीचा सन्मानपूर्वक निर्देश करून व्हाइसरॉयांनीं असें प्रतिपादन केलें कीं कित्येकांच्या मतें औद्योगिक उन्नति हा बेकारीवर रामबाण उपाय आहे आणि ह्या कल्पनेंत तथ्य असलें तरी रोगाच्या मुळाशीं गेल्यावांचून म्हणजे प्रचलित शिक्षणपद्धतींत आमूलाग्र फेरबदल झाल्यावांचून त्यांत विशेष सुधारणा होणें शक्य नाहीं. पण शिक्षणक्रमांत सुधारणा आणि औद्योगिक प्रगति ह्या दोन गोष्टी एका वेळीं बरोबर झाल्या पाहिजेत असेंच लोकमत आजवर व्यक्त झालेलें आहे हें सरकारनें ध्यानांत ठेवलें पाहिजे. शिक्षणक्रम बदलला आणि व्यापार व उद्योगधंद्यांचा विस्तार झाला नाहीं, तर ह्या बदलाचा तरी काय उपयोग होणार ? भिन्नभिन्न दर्जाच्या व प्रकारांच्या शिक्षणाची आवश्यकता नाकारतां येणार नाहीं. त्याची विविध आर्थिक व्यवसायांशीं योग्य सांगड घातली जाणेंच अगत्याचें आहे. आजच्या मितीस असा मेळ बसत नाहीं, आणि तरूण पिढी शाळांतून व कॉलेजांतून आंधळेपणानें शिक्षण-यंत्रामधून बाहेर पडत आहे. शिक्षणाची सोय करावयाची त्याप्रमाणेंच तरूण पिढीस उदरनिर्वाहाची व्यवस्था करण्यास अनुकूल वातावरण उपलब्ध होईल अशी तरतूद करावयाची हें समाजाचें म्हणजे सरकारचें दुहेरी कर्तव्य आहे.

### वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक उन्नति

लॉर्ड वुइलिंग्डन ह्यांनीं आपल्या भाषणांत हिंदुस्थानची वाढती लोकसंख्या आणि शेतीच्या धंद्याचें महत्त्व ह्या विषयावरहि त्रोटक विचार प्रकट केले. कोणत्याहि देशाचें महत्त्व त्यांतील लोकांच्या संख्येवर अवलंबून नसून तें त्यांच्या कर्तबगारीनें अजमावयाचें असतें हा त्यांचा अभिप्राय सर्वग्राह्य आहे. समाजांत अनेक दरिद्री व दुःखी माणसें असण्यापेक्षां थोडी पण सुखी व संस्कृत प्रजा असणें इष्ट आहे ह्यांत वाद नाहीं. तथापि, हें ध्येय साध्य होण्यास शिक्षण व उद्योगधंद्यांची प्रगति ह्यांची आवश्यकता आहेच. लोकसंख्येच्या बेसुमार वाढीस आळा बसावयाचा असेल व ती कार्यक्षम आणि अनेकगुणसंपन्न व्हावयाची असेल तरी देखील शिक्षणप्रसार आणि आर्थिक उन्नति ह्या गोष्टी अवश्य हव्या. सारांश, ह्या बाबी परस्परावलंबी आहेत, हें विसरून चालावयाचें नाहीं. उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या वाढीस सरकारनें विधायक व सहेतुक साहाय्य द्यावें, आणि त्याशिवाय हिंदुस्थानच्या दारिद्र्याचा व बेकारीचा प्रश्न सुटावयाचा नाहीं, ही लाकांची मागणी लॉर्ड वुइलिंग्डन ह्यांच्या मनांत असावी व तिला अनुलक्षून ह्या विषयाचा उल्लेख त्यांनीं विशिष्ट रीतीनें केला असावा असें दिसतें. शेतीच्या एकमेव व्यवसायावर हिंदुस्थानच्या कोट्यवधि प्रजेस अवलंबून रहाणें शक्य व इष्ट नाहीं, हा सिद्धांत आज दोन पिढ्यांच्यावर पुढें मांडण्यांत येत असतां सरकारनें त्या संबंधांत साशंक असावें हें चमत्कारिक आहे. शेतीची सुधारणा व त्या संबंधांत शास्त्रीय शोध अत्यावश्यक आहेत ह्या विषयीं दुमत नाहीं आणि व्हाइसरायांनीं त्या विषयाचा उल्लेख केला हें ठीक झालें. परंतु औद्योगिक व व्यापारविषयक प्रगतीवांचून ह्या देशास दुसरा तारणोपाय नाहीं हें सत्य जनता व सरकार ह्यांच्या मनावर ठसणें अगत्याचें आहे.

### न्यूझीलंडची मध्यवर्ती बँक सरकारी बँक होणार ?

कोणत्याहि देशांतली मध्यवर्ती बँक भागीदारांची संस्था असावी म्हणजे राजकीय पक्षांस तिच्या कारभारांत स्वार्थी हेतूनें ढवळाढवळ करतां येत नाहीं ह्या तत्वावर बहुतेक राष्ट्रांच्या मध्यवर्ती बँकांची उभारणी झालेली आहे. हिंदुस्थानांत रिझर्व्ह बँक स्थापन होण्यापूर्वी, ती सरकारी भांडवलाची संस्था असूं नये आणि खाजगी भांडवलाच्या पायावर तिची स्थापना व्हावी ह्या मताचा पुरस्कार करण्यांत आला होता आणि त्यासहि आधार इतर देशांतील उदाहरणांचाच होता. हिंदुस्थान सरकारनें स्वतःचें भांडवल घालून रिझर्व्ह बँक स्थापन करावी हा अनेकांचा अभिप्राय त्यामुळें अमान्य करण्यांत आला व हिंदी रिझर्व्ह बँक अखेर भागीदारांची बँक झाली. लोकमताचा प्रवाह अलीकडे उलट दिशेनें वाहूं लागला आहे; निदान, कॅनडा व न्यूझीलंड ह्या देशांत तरी भागीदारांच्या राष्ट्रीय मध्यवर्ती बँकेचें रूपांतर सरकारी भांडवलाच्या बँकेंत करण्याचा यत्न चालू आहे. कॅनडामधील एका राजकीय पक्षाच्या ह्याबाबतच्या कार्यक्रमाचा उल्लेख आम्हीं केला आहे. न्यूझीलंडचे मुख्य प्रधान कॅनडाचा कित्ता गिरवण्याच्या खटपटींत आहेत. मध्यवर्ती बँकेच्या खाजगी भागीदारांचे पैसे सरकारनें देऊन टाकावे व ते भाग स्वतः विकत घेऊन बँक आपल्या मालकीची करावी अशी त्यांची योजना आहे. चलन व पतीचे व्यवहार ह्यांचें नियंत्रण सरकारास करतां यावें हा तिच्या मुळाशीं मुख्य उद्देश आहे. मामुली व्यवहार सध्याप्रमाणेंच चालतील पण बँकेचें धोरण आखण्याचें काम व जबाबदारी सरकार आपल्या अंगावर घेईल असें त्यांचें म्हणणें आहे. मध्यवर्ती बँकेचीं सूत्रें सरकारच्या हातीं आलीं कीं देशांत विपुल पैसा खेळून आर्थिक स्वर्ग खालीं उतरेल असें समजण्याइतकें आपण मूर्ख नाहीं; तथापि व्याजाच्या दरांचें व पैशाच्या पुरवठ्याचें योग्य नियंत्रण झाल्यास आर्थिक प्रश्न सुटण्यास सहाय होईल असें त्यांनीं बोलून दाखविलें आहे.

### ग्राम-सुधारणा करूं इच्छिणारांची भूमिका

सामान्य जनतेच्या हिताकरितां चालविल्या जाणाऱ्या चळवळींत पडणाऱ्या लोकांनीं त्या जनतेशीं समरस होणें आवश्यक आहे, हा सिद्धांत प्रतिपादन करणारा महात्मा गांधींचा अग्रलेख "हरिजन"च्या गेल्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. "खेडेगांवांच्या सुधारणेबाबतींतल्या चळवळींत खेडेगांवीं जनतेच्या शिक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा आहे; तसेंच शहरांतील लोकांनाहि त्या जनतेच्या रहाणीपासून पुष्कळ शिकण्यासारखें आहे ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे", ह्या आशयाचें एक मार्मिक विधान त्या लेखांत आहे, तें थोड्याशा निराळ्या दृष्टीनेंहि अत्यंत अर्थपूर्ण आहे. खेडेगांवांतल्या लोकांच्या नैसर्गिक, बौद्धिक, सामाजिक, भावनात्मक व आर्थिक परिस्थितीचें नीट आकलन झाल्यावांचून त्यांच्या सुधारणेसंबंधाचा बाहेरील लोकांनीं केलेला उपदेश व यत्न फलद्रूप होणें शक्य नाहीं. सर्वच गोष्टींकडे पहाण्याची शहरवासीयांची दृष्टि विशिष्ट पद्धतीची असते. ह्यामुळें खेडेगांवांतल्या लोकांच्या अडचणी व आकांक्षा ह्यांचें आकलन होणें त्यांस कठिण जातें आणि त्यांनीं सुचवलेले प्रगतीचे उपाय अनेक वेळां निष्फळ ठरतात, असा अनुभव आहे. ह्यासाठी खेडेगांवी जनतेच्या परिस्थितीची व्यापक व वास्तविक कल्पना येणें प्रथम अगत्याचें असतें. शेतीची व रहाणीची सुधारणा, सहकारी संघटन इत्यादि बाबतींत अपेक्षेप्रमाणें आजवर यश आलें नाहीं ह्याचें एक कारण वरील कल्पनेच्या अभावांत सांपडण्यासारखें आहे. "ज्यांस दानत नाहीं, ज्यांची रहाणी सामान्य जनतेच्या दर्जाच्या मानानें उच्च प्रतीची आहे आणि हातीं घेतलेल्या कामांत आवश्य असलेली माहिती ज्यांस नाहीं, अशांच्या हातून हरिजन किंवा खेडेगांवी लोक ह्यांच्या उद्धाराचें कार्य होणें अशक्य आहे," हा महात्मा गांधींचा अभिप्राय जनतेची प्रगति घडवून आणण्याचा यत्न करणाऱ्या सर्व लोकांनीं ध्यानांत वागवण्यासारखा आहे.

---

### हिंदी स्वदेशी साखर

१९३१-३२ ते १९३४-३५ ह्या अवधींत हिंदी साखरेचें उत्पादन २½ लक्ष टनांपासून ६ लक्ष टनांवर गेलें. महायुद्धापूर्वी हिंदुस्थानांत दरवर्षी सरासरीनें ६½ लक्ष टन साखर बाहेरून येत असे; तिच्यावरची ५ टक्के जकात धरून ह्या साखरेस हिंदी जनतेस सुमारें १३ कोटि रुपये किंमत द्यावी लागत असे. १९३४-३५ सालच्या ६ लक्ष टन स्वदेशी साखरेस १२½ कोटि रुपये किंमत द्यावी लागली. महायुद्धापूर्वी साखरेवर ५ टक्के आयात जकात होती. सध्या स्वदेशी साखरेवर १३ टक्के पट्टी घेतली जाते. सर्व गोष्टी लक्षांत घेतां असें दिसून येईल कीं, पूर्वी विलायती साखरेस जी किंमत द्यावी लागत असे तिच्या मानानें हल्ली स्वदेशी साखर स्वस्त पडते. जकातीच्या संरक्षणामुळें स्वदेशी साखर महाग झालेली नाहीं आणि वीस वर्षांपूर्वींपेक्षांहि तिची किंमत बाजारांत कमी आहे.

---

### तांदूळ व गहूं ह्यांच्या आयातीवर जकात

हिंदुस्थान देश शेतीच्या धंद्यावर मुख्यत्वेंकरून अवलंबून असल्यानें धान्य व कच्चा माल ह्यांची निर्गत येथून परदेशांत व्हावी हें सरळ आहे. परंतु जागतिक स्पर्धा आणि आर्थिक मंदी ह्यांच्या योगानें तांदूळ व गहूं परदेशांतून हिंदुस्थानांत येत आहे! ही परराष्ट्रीय स्पर्धा हिंदी शेतकऱ्यास अपायकारक आहे हें उघड आहे. अगोदरच शेतीच्या मालाचे भाव पडलेले आणि त्यांत बाहेरून येणाऱ्या तांदूळ-गव्हाची भर असा प्रकार झाल्यानें हिंदुस्थान सरकारनें ह्या मालाच्या आयातीवर जकात बसवली आहे. अजून परिस्थिति सुधारली नाहीं ही गोष्ट लक्षांत घेऊन तांदुळावर दर मणास १२ आणे दरानें आयात जकात आणखी एक वर्षपर्यंत चालू ठेवण्याचें सरकारनें ठरवलें आहे. गव्हाच्या बाबतींत थोडी सुधारणा झाली असली तरी दर हंड्रेडवेटास एक रुपाया ह्याप्रमाणें आयातीवर जकात त्याच मुदतींत बसवण्याचें सरकारनें योजिलें आहे. दोन्हीं जकातीच्या बाबतचीं बिलें लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें दाखल करण्यांत आलीं आहेत.


## Local Self Government Service

The Training Classes at Bombay, Poona and Ahmedabad for officers of the Local Self Government Service conducted under the joint auspices of the Government of Bombay and Local Self Government Institute will begin for 25-4-36. For Prospectus and admission apply to:—

| (For other centres:) | (For Poona:) |
|---|---|
| Superintendent, 11, Elephinstone Circle, Bombay No. 1. | B. M. GUPTE, M. A., LL. B., Hon. Secretary & Treasurer, Maharashtra Branch, 410, Shanwar, Poona. |

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२

अधिकृत भांडवल : : १०,००,०००

विक्रीस काढलेलें भांडवल : ५,००,०००

**दर शेअरची किं. : रु. ५०**

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री व त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

## वसाहतींच्या वांटणीविषयींची मागणी

### जागतिक महत्त्वाचा एक प्रश्न

महायुद्धाच्या अखेर झालेल्या तहाच्या अन्वयें जर्मनीच्या आफ्रिका खंडांतील व इतर वसाहती काढून घेतल्या गेल्या आणि त्यांची व्यवस्था राष्ट्रसंघाच्या देखरेखीखाली "मँडेट" ह्या नांवानें जेत्या राष्ट्रांच्या हातीं देण्यांत आली, हें शल्य जर्मन राष्ट्रास सारखें बोचत राहिलें असून युरोपच्या बाहेरचा आपला प्रदेश आपणांस परत मिळावा अशी मागणी हेर हिटलर ह्यानें आतां असंदिग्धपणानें केली आहे. स्वतःच्या युरोपिअन मुलखाच्या बाहेर अंकित प्रदेश आपला राजकीय विस्तार आणि विशेषतः आर्थिक उन्नति व जनतेची चांगली रहाणी यांच्या दृष्टीनें अत्यावश्यक, नव्हे अपरिहार्य आहे, ही मागणी इटलीच्या ॲबिसीनियन युद्धाच्याहि मुळाशीं आहे. इटलीची समजूत काढून ॲबिसीनियांतली मोहीम मुसोलीनीनें बंद करावी ह्या हेतूनें सर सॅम्युअल होअर यांनीं ब्रिटिश परराष्ट्रमंत्री ह्या नात्यानें एक विधायक सूचना केली होती, तिचा रोख वसाहतींसंबंधीं उपस्थित झालेला वांधा दूर करण्याकडेच होता. सर सॅम्युअल ह्यांचें धोरण इटलीस विशेष अनुकूल व अबिसीनियास अन्यायकारक असें असल्याचा फार गवगवा होऊन त्यांस आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला. तथापि, आपणांस वसाहती राष्ट्रीय आर्थिक जीवनाच्या पूर्ततेसाठी आवश्यक आहेत, ही इटली व जर्मनी ह्या राष्ट्रांची मागणी शिल्लकच राहिली आहे आणि तिचा समाधानकारक निकाल लागल्यावांचून युरोपांत व एशियांतहि शांतता रहाणें अशक्य आहे ही गोष्ट आतां स्पष्ट झाली आहे. पूर्व एशियामध्यें जपाननें चढाईचें धोरण स्वीकारलें असून चीन व रशिया ह्यांच्याशीं त्या राष्ट्राचे खटके सारखे उडत आहेत, ह्याचेंहि कारण आपल्या ताब्यांतल्या मुलखाचा विस्तार होण्याची जपानला भासत असलेली आवश्यकता हेंच आहे.

ग्रेटब्रिटन व फ्रान्स ह्यांचें साम्राज्य युरोपाबाहेर दुसऱ्या खंडांत पसरलें आहे. बेल्जम व हॉलंड ह्यांसारख्या चिमुकल्या युरोपिअन राष्ट्रांच्याहि इतर खंडांत वसाहती आहेत. आपले हातपाय पसरावयास ह्या प्रकारचा वसाहतींतला वाव आपणांसहि मिळावा अशी इच्छा जर्मनी आणि इटली ह्या महत्त्वाकांक्षी राष्ट्रांस होणें स्वाभाविक आहे. उद्योगधंद्यांस लागणारा कच्चा माल व खाण्याचे पदार्थ ह्यांचा हुकमी व स्वस्त पुरवठा करून घेण्यांत वसाहतींचा उपयोग होतो, वाढत्या लोकसंख्येस त्यांमध्यें उदरनिर्वाहाचें साधन उपलब्ध होतें आणि पक्का माल विकण्यास तेथें बाजारपेठा थाटतां येतात, हे फायदे युरोपाबाहेर स्वतःच्या आश्रयाखालीं मुलूख असल्यापासून युरोपिअन राष्ट्रांस होतात अशी त्यांची विचारसरणी आहे. साम्राज्यविषयक महत्त्वाकांक्षाहि वसाहतींचा ताबा मिळवण्याच्या त्यांच्या प्रयत्नाच्या बुडाशीं आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अशा रीतीनें वसाहतींची वांटणी हा जागतिक महत्त्वाचा प्रश्न होऊन बसला आहे, आणि त्याचा निकाल करणें हें ग्रेटब्रिटन व फ्रान्स ह्यांच्यासारख्या सम्राट राष्ट्रांच्या दृष्टीनें अगत्याचें झालें आहे. पण कच्चा माल व बाजारपेठा ह्यांची वांटणी कोणत्या तत्वावर करावी आणि राजकीय सत्तेविषयींची हाव सर्व राष्ट्रांस आहे तिला ह्या वांटणींत स्थान द्यावें किंवा काय ही अत्यंत नाजूक व अवघड बाब आहे. युरोपांतील प्रमुख राष्ट्रांस हें प्रकरण चर्चेसाठी हातीं घेणें आतां अपरिहार्य झालें आहे.

वसाहतींच्या वांटणीच्या प्रश्नास आर्थिक व राजकीय बाजू आहेत आणि त्यांचे संबंधांत बारकाईनें चौकशी व छाननी व्हावी लागेल हें उघड आहे. त्याबरोबरच, जे मुलूख वांटले जावयाचे, त्यांतील रहिवाशांच्या इच्छेचा व स्वातंत्र्याचा विचार होणार किंवा नाहीं, का प्रदेशांच्या वांटणींत त्यांचीहि वांटणी, भिन्नभिन्न राजकीय सत्तेखालीं, तद्देशीयांच्या हितसंबंधांचें योग्य संरक्षण न होतां घडून यावयाची हे जिव्हाळ्याचे प्रश्न उद्भवतात. त्यांच्या चर्चेंत युरोपिअन राष्ट्रांमध्यें हमरतुमरी झाल्यावांचून रहाणार नाहीं. आफ्रिकन वसाहतींचा इतिहास कांहीं युरोपिअन राष्ट्रांस विशेष भूषणात्मक आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं; आणि तुम्हीं जशा युरोपच्याबाहेर वसाहती मिळवल्या तशा आम्हींहि मिळवण्यास कां हरकत असावी असा सरळ सवाल इटली, जर्मनी व जपान ह्यांसारखीं राष्ट्रें टाकल्याशिवाय रहाणार नाहींत. जागतिक अस्वस्थतेस चेतना देण्यासारखी ही नवी भानगड असल्याकारणानें तिची व्यापक दृष्टीनें व शांतमनानें चर्चा होणें आवश्यक आहे. लीग ऑफ नेशन्स युनिअन ह्या संस्थेच्या एका कमिटीनें वसाहतींच्या मागणीविषयींच्या प्रश्नाची चौकशी करून तपशीलवार माहिती प्रसिद्ध केली आहे, ती ह्या चर्चेस सहायकारक होण्याजोगी आहे. वसाहती नसल्यानें राष्ट्रांची गैरसोय कितीशी होते, कच्चा माल मिळण्याचे बाबतींत वसाहतींची मदत किती होते, वसाहतींत बाजारपेठा फायदेशीर रीतीनें स्थापतां येतात कीं काय आणि वाढत्या लोकसंख्येस त्यांमध्यें कितीसा वाव मिळेल इत्यादि तपशिलासंबंधाची त्यांतली माहिती बोधप्रद होईल. "वसाहतींचें भवितव्य" ह्या नांवाचें एक छोटेखानी पुस्तक मि. लिओनार्ड बार्न्स ह्यांनीं अलीकडे प्रसिद्ध केलें असून त्यांतहि उपयुक्त सूचना केल्या आहेत. वसाहती काबीज करून आपली साम्राज्यसत्ता वाढवणें हा यापुढें केवळ वैयक्तिक राष्ट्रीय महत्त्वाकांक्षेचा प्रश्न रहाणार नाहीं आणि त्याचा व्यापक आंतरराष्ट्रीय भूमिकेवर विचार व्हावा लागेल अशीं चिन्हें दिसत आहेत. तथापि आंतरराष्ट्रीय भावना आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य ह्यांचा योग्य मेळ बसण्याइतकी अनुकूल जागतिक परिस्थिति अजून निर्माण व्हावयाची आहे. ह्या बाबतींत खुद्द राष्ट्रसंघाचा इतिहास फारसा उत्तेजनकारक नाहीं. तरीहि, संघशक्ति आणि सहकार ह्या तत्त्वांचा आश्रय करून राष्ट्रें आपलें धोरण निश्चित करतील तरच शांतता व प्रगति ह्यांविषयीं मानव जातीस आशा आहे, एरव्हीं नाहीं, ही गोष्ट निर्विवाद आहे.

---

### दि बॉंबे को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा, मार्च महिन्याचा म्हणजे एकोणिसाव्या वर्षांतील शेवटचा अंक प्रसिद्ध झाला आहे. त्यामध्यें श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचा 'मद्रासमधील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा', श्री. मळजी ह्यांचा 'दोहद येथील सहकाराची प्रगति' इत्यादि लेख प्रसिद्ध झाले असून प्रो. काळे ह्यांचें ढाका येथील आर्थिक परिषदेच्या वेळचें ग्रामसंघटनेवरील व्याख्यान व श्री. प्रीतमराय देसाई ह्यांचें पश्चिम खानदेश इंस्टिट्यूटतर्फे झालेलें शेतीच्या दुय्यम धंद्यांवरील व्याख्यान हीं वरील अंकांत उद्धृत केलीं आहेत. त्याचप्रमाणें क्वार्टर्लीमध्यें नेहमींचीं माहितीपूर्ण सदरें देण्यांत आलीं आहेत. अंक वाचनीय आहे.

---

### पंजाबांत ग्रामसुधारणा

#### मि. ब्रेन ह्यांचे उद्गार

पंजाबांत ग्रामसुधारणेच्या कार्याचें संघटन आणि विस्तार व्हावा म्हणून या कामाचा विशेष अनुभव असलेले अधिकारी, मि. ब्रेन, ह्यांची नेमणूक करण्यांत आली आहे. पंजाबी शेतकरी व जमीनदार ह्यांस उद्देशून त्यांनीं फेरोझपूर येथील आपल्या भाषणांत नुकतेच खालील आशयाचे उद्गार काढलेः—

" मार्गांतली खरी अडचण आहे ती लोकांच्या आळशीपणाची आहे. हिंवाळ्यांत पंजाबी शेतकरी शेतांत काम करण्याऐवजीं सकाळच्या प्रहरीं दररोज दोन तास शेकोटीपाशीं बसून आळसांत वाया घालवतो. सतत श्रम कोणासच नको असतात आणि लोकांमध्यें प्रगति आणि सुख ह्यांचेबाबत उत्कट इच्छेचा पूर्ण अभाव आहे. खेडेगांवांमध्यें करणारांस वाटेल तेवढें काम आहे, करणारी माणसेंच हवीं आहेत. जमीनदारवर्गापाशीं पैसा नाहीं, ह्या म्हणण्यांत कांहींच तथ्य नाहीं. लग्नकार्य, कज्जेदलाली व दारू ह्यांसाठीं त्यांस वाटेल तेवढा पैसा मिळतो. खरोखर ग्रामसुधारणेचा प्रश्न आहे तो आर्थिक नसून नैतिक आहे. गुन्हेगारीच्या कामांत लोक सहकार्यास तयार असतात; परंतु आपलीं घरें, रस्ते व भोंवतालची स्थिति सुधारणें त्यांस नको असतें. प्रगतीविषयीं जनतेंत आस्था उत्पन्न करणें हेंच महत्त्वाचें कार्य आज देशापुढें आहे. लांडून व गोक्रण ह्या दोन गांवांतील लोकांनीं स्वतःच्या उन्नतीचें उत्तम उदाहरण घालून दिलें आहे. त्यांनीं भोंडणें टाकलीं आहेत. शेतें व रस्ते सुधारले आहेत व मुलांच्यासाठीं खेळण्याचीं पटांगणें तयार केलीं आहेत. सर्वच गोष्टींबद्दल सरकारला दोष देण्यांत हंशील नाहीं. स्त्रियांचें शिक्षण हा ग्रामसुधारणेचा पाया आहे. हिंदी स्त्रियांस आपल्या मुलांची जोपासना कशी करावी आणि त्यांस स्वच्छता व स्वाभिमान कसा शिकवावा हें समजत नाहीं. स्त्रियांस शिक्षण मिळाल्यावांचून खेडेगांवांत सुधारणेची अपेक्षा करणें फुकट आहे. "

### विलायतेंत उभारलेल्या जुन्या कर्जाची परतफेड

येत्या वर्षीं हिंदुस्थान सरकार मुळींच कर्ज उभारणार नाहीं, उलट, ग्रेट ब्रिटनमध्यें मागें उभारलेल्या कर्जाची मुदत भरतांच त्याची परतफेड करण्यांत येईल, असें हिंदुस्थान सरकारच्या फडणवीसांनीं जाहीर केलें होतें. त्याप्रमाणें जुलै, १५ रोजीं ५½ टक्के व्याजाच्या रोख्यांचे पैसे परत देण्यांत येतील, असें भारतमंत्र्यांनीं आतां जाहीर केलें आहे. ह्या कर्जाची रकम १ कोटि, ६९ लक्ष पौंड असून तें १९३१ सालीं ग्रेट ब्रिटनमध्यें उभारण्यांत आलें होतें.

### अहमदनगरची म्युनिसिपालिटी १५ लाखांचें कर्ज काढणार ?

सरकारचें पूर्वीचें कर्ज फेडून टाकून नवीन कामें हातीं घेण्यासाठीं १५ लाख रुपयांचें कर्ज काढण्याचा अहमदनगर म्युनिसिपालिटीचा विचार आहे. हलक्या व्याजाच्या दरानें पैसा मिळाल्यास सरकारी दहा लक्ष रुपयांच्या कर्जाची फेड होऊन खर्चांत बचत करतां येईल व शिवाय नवीन कामांवर खर्चण्यास पैसा मिळेल, हा नवीन कर्जाच्या योजनेंत दुहेरी हेतु आहे.


**धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०**

कडून

**हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | |
|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |

| | | |
|---|---|---|
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |

| | |
|---|---|
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.



**CONFIDENCE**

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE.**

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**

**This year 1934-35**

**Exceeds**

**2 CRORES & 50 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

**HINDUSTHAN**

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca,

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## हिंदी व्यापारी संस्थांच्या मध्यवर्ती संघाची वार्षिक बैठक

———:०:———

### सरकारास सूचना व शिफारसी

[ हिंदुस्थानांतील व्यापार संस्थांच्या ( चेंबर्सच्या ) मध्यवर्ती संस्थेचें ( फेडरेशनचें ) वार्षिक अधिवेशन दिल्ली येथें गेल्या आठवड्यांत भरलें होतें. त्या वेळीं तिचे अध्यक्ष, लाला पद्मपद सिंघानिआ, ह्यांनीं केलेल्या भाषणाचा सारांश व बैठकींत मंजूर झालेल्या ठरावांची रूपरेषा येथें देण्यांत येत आहे. ]

### लाला सिंघानिआ ह्यांचें भाषण

" नव्या राज्यघटनेमुळें मध्यवर्ती सरकारच्या खर्चाची तरतूद कशी करावी, हा प्रश्न उपस्थित होणार आहे. करांचे मार्गानें उत्पन्नांत वाढ होण्यास वाव नसल्यामुळें युद्धाच्या पूर्वी लष्करी खर्च जेवढा होत असे तेवढ्यावर तो आणून ठेवणें किंवा इंग्लंड-कडून खर्चाचा कांहीं हिस्सा रकम मिळवणें, हे दोनच मार्ग संभवतात. प्रांतिक सरकारांच्या अंदाजपत्रकांची परिस्थिति अशीच असमाधानकारक आहे. मुंबई व मद्रास ह्यांखेरीज इतर सर्व प्रांतांच्या अंदाजपत्रकांत तूट येत आहे, हें चिन्ह आशाजनक नाहीं.

चलनाची वाढ करून भांडवली स्वरूपाचा खर्च करण्यासाठी मुबलक पैशाची सोय सरकारनें करावी, अशी सूचना कित्येक दिवस करण्यांत येत आहे. तिचा सरकारनें विचार करणें जरूर आहे. हिंदुस्थान सरकारनें चलनाचा पुरवठा वाढवल्यास प्रांतिक सरकारांस नव्या उपयुक्त योजना अमलांत आणतां येतील.

सरकारनें आपलें जकातीबाबतचें धोरण बदलून उद्योग-धंद्यांच्या वाढीस सहाय करावें. रिझर्व्ह बँकेनें शक्य तोंवर देशाच्या औद्योगिक प्रगतीस हातभार लावावा व सावकारांनीं गांजलेल्या शेतकरी प्रजेसाठी भांडवल पुरविण्याची सोय करावी.

ओटावा करार रद्द करण्याचें ठरविल्याबद्दल असेंब्लीमधील बिनसरकारी सभासद अभिनंदनास पात्र आहेत.ह्यापुढें सरकार आणि व्यापारीवर्ग ह्यांचेमध्यें विचारविनिमय होण्यास ज्यास्त संधि देण्यांत येऊन व निर्गत वाढवून हिंदुस्थानची आर्थिक परिस्थिति सुधारण्याकडे त्याचा उपयोग होईल, अशी आशा आहे. व्यापारी वर्गाचा सल्ला विचारांत घ्यावयाचें सरकारनें ठरविल्यास फेडरेशन ह्या बाबतींत अवश्य सहकार्य करील. "

### मंजूर झालेले ठराव

( १ ) ओटावा कराराबाबतच्या ठरावाबद्दल असेंब्लीचें अभिनंदन, ( २ ) सोन्याची निर्गत बंद करण्याविषयीं सरकारास विनंति, ( ३ ) करांचें ओझें कमी करून व खर्चांत बचत करून सरकारनें व्यापारांत सुधारणा घडवून आणावी व राष्ट्रीय महत्त्वाच्या बाबींवर खर्च करावा अशी सूचना, ( ४ ) उत्पन्नाचा अंदाज कमी धरून वाढावा येईल त्याचा विनियोग कायम स्वरूपाच्या खर्चाकडे करण्याच्या सरकारी धोरणाची अग्राह्यता, ( ५ ) हिंदी धंद्यांस आवश्यक असलेल्या कच्च्या मालाचा पुरवठा बहुंशीं हिंदुस्थानांत असल्या खेरीज त्या धंद्यास संरक्षण मिळूं नये, ह्या फिस्कल कमिशननें घालून दिलेल्या दंडकाविरुद्ध स्पष्ट मताचें प्रदर्शन, ( ६ ) विमाविषयक कायद्यांत दुरुस्ती सुचविण्यासाठी नेमलेल्या मि. सेन ह्या अधिकाऱ्याच्या रिपोर्टाची छाननी करण्यासाठी कमिटी नेमण्याबाबत मागणी ( ७ ) रेल्वेजची आर्थिक परिस्थिति अत्यंत बिघडली आहे, त्याबाबत चौकशी करून हिशेबाची पद्धत, वर्गवारी,इत्यादि संबंधांत रिपोर्ट करण्यासाठी व्यापारी वर्गाच्या प्रतिनिधींची कमिटी नेमण्याबद्दल सरकारास सूचना, ( ८ ) पोर्ट ट्रस्टसच्या बोर्डावर हिंदी सभासदांचें आधिक्य असावें अशी कायद्यांत योजना करण्याची सरकारास शिफारस, ( ९ ) परदेशांत व ब्रिटिश वसाहतींत हिंदी लोकांच्या हितसंबंधांविरुद्ध करण्यांत आलेल्या कायद्यांसंबंधीं सरकारच्या गुळमुळीत धोरणाबद्दल नापसंती, ( १० ) हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या साखरेवर सरकारनें दर हंड्रेडवेटास १ रु. ५ आ. पट्टी बसविली आहे. त्यापैकीं निदान २ आणे तरी सुधारलेल्या उंसाची लागवड व त्यासंबंधांतील माहितीचा प्रसार करण्यासाठी खर्चण्यांत यावेत अशी मागणी, ( ११ ) डफरीन जहाजावर शिक्षण घेतलेल्या नाविकांस हिंदी किनाऱ्यालगत संचार करणाऱ्या बोटींवर उमेदवारीच्या व नोकरीच्या जागा मिळाव्यात, अशी सरकारनें निश्चित तरतूद करण्याबद्दल मागणी, ( १२ ) कोळसा व जळणांचीं तेलें ह्यांच्या आयातीवर जकात बसवावी व कोळशाच्या खाणींचा धंदा पुन: व्यवस्थित कसा चालेल ह्यासंबंधीं सूचना करण्यासाठी कमिटी नेमावी अशी शिफारस, इ.

———

### " बी. ई. एस. टी. "

मुंबई शहरास वीज पुरवणाऱ्या व ट्रामगाड्या आणि बसेस-मधून वहातुकीची सोय करणाऱ्या बी. ई. एस. टी. कंपनीची वार्षिक सभा नुकतीच झाली. त्या वेळीं कंपनीचे अध्यक्ष, सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास हे म्हणाले:—" मुंबई इलाख्यांतील इतर सर्व वीज कंपन्या गिऱ्हाइकांकडून, वीज कमी खर्च झाली तरी दरमहा किमान अडीच रुपये वसूल करतात. पण मुंबईची कंपनी हा किमान चार्ज घेत नाहीं. तिचीं ६,७०० गिऱ्हाइकें दरमहा एक रुपयापेक्षां कमी किंमतीची वीज वापरतात व २४,७०० गिऱ्हाइकांचें बिल दोन रुपयांहून ज्यास्त नसतें. हिंदुस्थानांतील इतर कोणत्याहि वीज-कंपनीपेक्षां मुंबईची कंपनी लहान गिऱ्हाइ-कांचे सोयीकडे ज्यास्त लक्ष्य देते. विजेचे दर उतरविण्याचें कंपनीचें धोरण असून गेल्या तीन वर्षांत सात वेळां ते कमी करण्यांत आले आहेत. ह्या वर्षअखेर अधिकृत भांडवलापैकीं उरलेले ६०,००० भाग कंपनी विक्रीस काढणार आहे, त्यांस जानेवारी १९३७ पासून डिव्हिडंड मिळेल. "


### ' अर्था 'ची उपयुक्तता

ए. जी. कोतवाल अँड कंपनी, अकौंटंट्स व ऑडिटर्स आणि प्राप्तीवरील करासंबंधींचे सल्लागार, विजापूर, हे लिहितात:—

"आपलें पत्र आम्हांस अत्यंत उपयुक्त वाटतें, कारण त्यांत व्यापार व उद्योगधंदे ह्यांसंबंधीं ताजी बातमी येत असते. मागील सालाप्रमाणेंच " अर्थ " आमचेकडे दर आठवड्यास पाठवीत जावा."

## बँकिंगच्या क्षेत्रांत

### रिझर्व्ह बँकेची शेतीच्या धंद्यास सहाय देण्याची योजना

हिंदुस्थानांतील शेतीचें महत्त्व ध्यानांत घेऊन त्या धंद्यास पैसे पुरविण्यासाठी योजना आंखण्याबाबत रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत तरतूद करण्यांत आलेली आहे. ह्या संबंधांतील प्रश्नांचा पद्धतशीर विचार करून प्रांतिक सरकारें, सहकारी बँका व रिझर्व्ह बँक ह्यांच्या व्यवहारांत एकसूत्रीपणा आणण्यासाठी रिझर्व्ह बँकेनें एका स्वतंत्र विभागाची स्थापना करावी, अशी ही योजना आहे. मि.डार्लिंग ह्यांनीं शेतकरी वर्ग आणि सहकारी संस्था ह्यांच्या गरजा व परिस्थिति समजून घेऊन आपला रिपोर्ट सादर केला होता, त्यावर प्रांतिक सरकारांचीं मतें मागविण्यांत आलीं होतीं. रिझर्व्ह बँकेच्या नुकत्याच भरलेल्या सेंट्रल बोर्डाचे सभेंत हा प्रश्न निघाला तेव्हां कांहीं प्रांतिक सरकारांकडून अजून माहिती न आल्याकारणानें त्यांस सदरहु बाबतींत तगादा लावण्याचें ठरलें. ह्या संबंधांतील कायदेशीर तजवीज होणें कित्येक प्रांतिक सरकारांच्या दिरंगाईमुळें लांबणीवर पडलें आहे.

---

### जामीन स्वीकारतांना बँकेनें कोणती खबरदारी घ्यावी ?

( १ ) जामीन रहाणावर बँकेनें कोणतेंहि दडपण आणूं नये; कारण पुढें करार रद्द करण्यास एवढें कारण पुरें होतें.

( २ ) जामीन रहाणारानें आवश्यक कागदपत्रांवर सही केली म्हणजे कर्ज मागणारास जरूर तें कर्ज देण्यांत येईलच असें नाहीं, असें अर्जदारास स्पष्ट बजावावें.

( ३ ) शक्यतोंवर जामानदारी घेण्यासाठी बँकेच्या ठराविक मसुद्याचाच उपयोग करावा. खासगी पत्राचे स्वरूपांत देण्यांत आलेल्या जामीनानें बँकेच्या हितसंबंधाचें पूर्ण संरक्षण न होण्याचा संभव असतो. त्याचप्रमाणें, बँकेच्या ठराविक मसुद्यांत फेरफार करतांनाहि विशेष काळजी घ्यावी; कारण एकादाच शब्द गळला किंवा इकडचा तिकडे झाला, तरी सबंध अर्थ बदलण्याची भीति असते.

( ४ ) कर्जाची मागणी करणाराविषयीं जामीनदारास माहिती पुरविण्यास बँक बांधलेली नाहीं, तथापि कित्येक वेळां ती देणें श्रेयस्कर असतें. ( मँ. गा. कमर्शिअलवरून )

---

### परदेशांत स्थापन होणारी पहिली हिंदी एक्सचेंज बँक

दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लंडनमध्यें एक एक्सचेंज बँक स्थापन करणार असल्याचें वृत्त मागेंच प्रसिद्ध झालें आहे. ह्या एक्सचेंज बँकेचे बोर्डावर कांहीं हिंदी व कांहीं युरोपियन डायरेक्टर्स असतील व सुरवातीचीं कांहीं वर्षें तिची व्यवस्था युरोपियन मॅनेजरांच्या देखरेखीखालीं असेल, असें समजतें. परदेशांत स्थापन होणारी ही पहिलीच हिंदी एक्सचेंज बँक असल्यानें येथील जनतेचें आपुलकीच्या भावनेनें तिच्याकडे लक्ष असणें स्वाभाविक आहे.

---

### फ्रेंच चलनाचें भवितव्य

राजकीय वातावरणाच्या अस्थिरतेमुळें फ्रेंच चलनाची किंमत उतरत आहे. कर्जरोखे विकून टाकून आपलें भांडवल देशाबाहेर पाठवण्याची प्रवृत्ति पॅरिसमध्यें स्पष्ट दिसत आहे. हुंडणावळीचा दर १ ब्रिटिश पौंड = ७५·२० फ्रँक इतका घसरला, ह्यावरून वरील प्रवृत्तीची कल्पना येते. तिला आळा घालण्यासाठी बँकेचा व्याजाचा दर (बँकरेट) आणखी चढवला जाण्याचा संभव आहे.

---

## Notice to Contractors.

Sealed percentage tenders in Form B-1 for the following works will be received by the Undersigned on the dates noted against them upto 3 P. M. Other particulars regarding the contract etc. can be had at the Undersigned's Office during Office hours.

| | Estimated cost Rs. | Date of receiving tenders. |
|---|---|---|
| 1. Reconstructing Bridge No. 182 in mile 115/7 of Karwar Bellary Road. | 43,036 | 7th May 1936. |
| 2. Constructing a causeway over the Budgatti Nalla in mile 14 of Havanur Ekambi Road. | 25,038 | |
| 3. Reconstructing mile 274/5 to 275/4 of the Poona Bangalore Road with 2″ shelmacdam. | 12,328 | |

2. Acceptance of the tender rests with the undersigned and no reason will be given for acceptance or rejection of any tender.

Executive Engineer's Office, Dharwar, 7th April 1936.

P. K. SHINDE
Executive Engineer, Dharwar Dn.

---

## Notice to Contractors.

Sealed percentage tenders in form F-1 for the following works will be received by the undersigned on the 6th May 1936 upto 2 P. M. Other particulars regarding the contract etc., can be had at the undersigned's Office during Office hours.

| | Estimated cost. |
|---|---|
| 1. C. R. to Poona Bangalore Road-miles 288 to 319 and Gadag Palla Road miles 29 to 50. | Rs. 14,416 |
| 2. C. R. to Poona Bangalore Road-miles 320 to 353 and Havanur Ekambi Road miles 1 to 29/4. | Rs. 10,465 |
| 3. C. R. to Gadag Palla Road-miles 51 to 67/3 and Havanur Ekambi Road miles 29/5 to 56/5. | Rs. 5,872 |

2, The acceptance of the tender rests with the undersigned and no reason will be given for the acceptance or rejection of any tender.

Excecutive Engineer's Office, Dharwar, 6th April 1936.

P. K. SHINDE
Executive Engineer, Dharwar Dn.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—२ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०—२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८–१० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११८—० |
| ४% १९६०–७० ... ... | ११३—४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९८—६½ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०६–१२ |
| ४% १९४३ ... ... ... | ११०—६ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०७—४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०५—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०६–१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १०६–१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११०—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२९—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०३—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३२ —८ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५३७—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३०—० |

## दुसरी माळशिरस तालुका सहकारी परिषद्

### अध्यक्ष श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचें भाषण

( मागील अंकावरून समाप्त. )

"कॅनालच्या पाण्याचा उपयोग वास्तविक लहान लहान शेतकऱ्यांना झाला पाहिजे परंतु त्यांना त्याचा उपयोग न होतां मोठ्या प्रमाणांत पाणी जिकडे खपेल तिकडे होत आहे. साखरेच्या कारखान्यांना उत्तेजन देणेंसाठी पाण्याचा उपयोग होत असला तरी लहान शेतकऱ्यालाहि त्याचा उपयोग करून दिला पाहिजे. परंतु सरकारचें तिकडे जितकें असावयास पाहिजें तितकें लक्ष असल्याचें दिसत नाहीं. आमचे शेतकरी लोक अडाणी आहेत. त्यांच्या हातून कांहीं चुका होत असतील तर कालव्याच्या अधिकाऱ्यांनीं अशा सभांस हजर राहून त्या त्यांच्या निदर्शनास आणल्या पाहिजेत व त्यांना समजावून सांगितल्या पाहिजेत. कालवा हा शेतकऱ्यासाठी आहे हें त्यानीं विसरू नये.

आपण तयार केलेल्या मालाची विक्री किफायतशीर होण्याकरितां सहकारी धोरणावर या तालुक्यांत अकलूज येथें मालविक्रीची संस्था काढण्यांत आली आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. पूर्वीपेक्षां आतां लोकसंख्या जास्त असल्यामुळें आपला उदरनिर्वाह शेतीवरच होईल असें वाटत नाहीं. आपली आर्थिक स्थिती सुधारावयाची असेल तर रिकाम्या वेळांत रहाट चालविणें वगैरे सारखे दुय्यम धंदे केले पाहिजेत. यापुढें आपण जो माल घ्याल त्यांत खेडेगांवांत उत्पन्न होणाऱ्या मालाचा उठाव होईल इकडे लक्ष द्या. आपल्या देशी धंद्यांचें पुनरुज्जीवन करण्याचे कामीं सोसायट्या, तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्स व सुपरवायझिंग युनिअन्स यांचा चांगला उपयोग होईल. अशी उन्नती न झाल्यास त्यांत आमचीच कांहींतरी कसूर झाली आहे, असें मी म्हणेन. सभासदांना शिक्षण देण्याची पेढीकडून व इतर रीतीने कांहींतरी व्यवस्था झाली पाहिजे व या बाबतींत प्रो. भागवत यांनीं केलेला उपक्रम इकडे निदान एक-दोन खेडेगांवांत तरी झाला पाहिजे.

सर्व लोकांनीं आपलेपुढें ध्येय काय आहे हें समजावून घेतलें पाहिजे व त्याचा फैलाव मिशनरी लोकांप्रमाणें अत्यंत चिकाटीनें व जोमानें करून दाखविला पाहिजे. अशा रीतीनें जर प्रयत्न केले गेले व त्यास सरकारचा पाठिंबा मिळाला तर खात्रीनें लोकांचें कल्याण होईल."


# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

## रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतो, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

**WANTED**
RESPECTABLE
AND
INFLUENCIAL
**AGENTS**

FOR

**VENUS ASSURANCE Co. Ltd.,(Delhi)**

Apply for **Terms** and **Agency** to the Superintendent.
**VENUS ASSURANCE Co. Ltd., ( Delhi )**
**Laxmi Road, Poona City.**

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची
प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**

च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा.
किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

**माधव सोमण ब्रदर्स**

आम्हीं स्वतः तयार केलेलीं लुगडीं व इतर पेठांचा माल गिऱ्हाइकांस खात्रीलायक विकतों.

हुजूरपागेसमोर, पुणें, २.

*For All Medicinal Requisites*
— TRY —


**N. MAHADEV & Co.**

**DISPENSING CHEMISTS**
AND
**DRUGGISTS**

City Post Office Corner, POONA 2.

**मासिक वीज खर्चांत बचत पाहिजे ना ?**
**तर मग मुंबईत तयार झालेले**

**बिजली दिवेच वापरा—**




स्थानिक व्यापाऱ्याकडे न मिळाल्यास
खालील पत्त्यावर लिहाः—

बिजली प्रॉडक्ट्स ( इंडिया )
लिमिटेड

पो. बॉ. नं. ४५१६,
मुंबई नं. ८

**न. वि. वडनेरकर**
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ
बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

**स्वदेशी**
**कापड म्हणजे काय ?**

(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.
या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.
हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.
खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण

**स्वदेशी भांडार**

लक्ष्मीरोड, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं १२४/१३ पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख २२ एप्रिल, १९३६. अंक १७

## Public Works Department.

**AHMEDNAGAR DIVISION.**

Sealed tenders in $F_2$ are invited for Section No. 1 of remodelling Pravara Left Bank Canal, estimated cost Rs. 49,275/-. Tenders accompanied by Treasury Chalan for payment of Rs. 500/- as earnest money in any Government Treasury and a Solvency certificate should be addressed to the Executive Engineer, Ahmednagar Division, Ahmednagar and delivered at his camp office ( at Khandala on P. L. B. C.) by 6 P. M. on 30-4-1936. Tender forms together with conditions of contract will be available at the office of the undersigned on payment of Rs. 3/-which will not be refunded.

The Superintending Engineer, Deccan Irrigation Circle, Poona is not bound to accept the lowest or any tender or to assign any reason for the non-acceptance of the same.

Sd/- N. B. Gadre,
14-4-36 Executive Engineer,
Ahmednagar Division.

## WANTED.

Influential and hard-working Agents At Ahmednagar, Dhulia, Kolhapur, Nasik and Poona for Sun Life Assurance Company of Canada on liberal terms. Apply :—

The Manager,
Sun Life Assurance Company of Canada,
Hornby Road, Fort BOMBAY.

**डॉन ऑफ इंडिया विमा कंपनी लिमिटेड, पुणें**

**पाहिजेत**

दुप्पट रकमेची व नफ्याची 'डॉन'ची बँको इन्शुअरन्स इन्व्हेस्टमेंट पॉलिसी किंमत फक्त रुपये १०

मुंबई इलाख्यांत जिल्ह्यांचे ठिकाणीं प्रसाराकरितां चीफ ऑर्गनाइझर्स पाहिजेत. मासिक पगार रु. १०० ते २५० लायकीप्रमाणें. जास्त चौकशी करा व माहिती मागवा.

जनरल मॅनेजर.

## NOTICE FOR TENDERS

F-1 tenders are invited for the work of "Constructing a Bridge across the Kundalika River in mile No. 26 of Dharamtar Mahableshwar Road section II" estimated cost being Rs. 79,294/-.

2. Conditions of contract and forms of tender etc. may be obtained from the Office of the Executive Engineer, Ratnagiri upto 5 P. M. on 20th May 1936, on payment of Rs. 5/-. Amount of earnest money to be paid into Government Treasury is Rs. 1,000/-.

3. Tenders will be received by the Executive Engineer, upto 3 P. M. on 26th May 1936.

4. The Superintending Engineer, Southern Circle, Belgaum, reserves the right to reject any or all tenders without assigning any reason.

Ratnagiri, 10th April 1936. Sd/- B. P. Jagtap,
Executive Engineer, R. Dn.

**WANTED**
**RESPECTABLE**
AND
**INFLUENCIAL**
**AGENTS**
FOR
**VENUS ASSURANCE Co. Ltd.,(Delhi)**

Apply for **Terms** and **Agency** to the Superintendent.
**VENUS ASSURANCE Co. Ltd., ( Delhi )**
**Laxmi Road, Poona City.**

**'अर्थ' ग्रन्थमाला**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

# विविध माहिती

### हिंदी रेल्वेजच्या उत्पन्नांत वाढ

बहुतेक सर्व हिंदी रेल्वेजच्या उत्पन्नांत किंचित् वाढ होत आहे, असें त्यासंबंधांतल्या ताज्या आंकड्यांवर दिसतें.

### मोटारींच्या अपघाताविरुद्ध प्रचार

ता. १० ते १३ एप्रिल ईस्टरची सुट्टी होती. ह्या दिवसांत शहाराबाहेर पडून सफरीस जाणारांची इंग्लंडमध्यें फार मोठी गर्दी उडते व त्यामुळें अपघातहि पुष्कळ होतात. सुटी सुरू होण्यापूर्वी तेथील वहातुक खात्याच्या मंत्र्यांनीं रेडिओवर भाषण करून अपघातांची भीषणता वर्णन केली व एकट्या ईस्टरच्या सुट्टीमध्यें आठ हजारांवर अपघात होतात, असें सांगितलें. भाषण ऐकणाऱ्या प्रत्येकानें अपघातांत न सांपडण्याची खबरदारी घ्यावी व मोटरवाल्यांनीं पादचारी लोकांची विशेष काळजी घ्यावी, असें त्यांनीं सुचविलें. अपघाताविरुद्ध ह्या प्रचाराचा कितपत उपयोग झाला, हें लवकरच समजेल.

### कॅन्सर आणि रेडियमचा पुरवठा

कॅन्सरच्या ( व्रग ) रोगावर रेडियम धातूचा उपाय यशस्वी होतो; हें खरें असलें तरी त्या संबंधांतील अतिशयोक्तिपूर्ण विधानांच्या संबंधांत इंग्लंडमधील नॅशनल रेडियम कमिशननें आपली असंमति दर्शविली आहे. रोगी मनुष्यास कॅन्सरचा विकार पुनः होण्याचा संभव कायम राहिल्यानें रेडियममध्यें 'रोगमुक्त' करण्याची शक्ति आहे असे शब्दप्रयोग करणें युक्त नाहीं व कॅन्सरसारख्या दुःसाध्य रोगाविषयीं खोट्या आशा निर्माण करणें योग्य होणार नाहीं, असें कमिशननें आपल्या १९३४-३५ च्या अहवालांत म्हटलें आहे. रेडियमला दिवसानुदिवस मागणीहि ज्यास्त ज्यास्त येऊं लागली असल्यानें त्याचा पुरवठा करणें कठिण होणार आहे.

### मुंबई इलाख्यांतील म्युनिसिपालट्यांचें उत्पन्न व खर्च

सन १९३४-३५ सालीं मुंबई इलाख्यांतील ( सिंधसुद्धां ) म्युनिसिपालट्यांचें एकूण उत्पन्न ४ कोटि रुपये इतकें झालें. पूर्वीच्या वर्षापेक्षां हा आंकडा ५३ लाखांनीं जास्त आहे. नवीन उभारलेल्या कर्जाची रकम व असाधारण उत्पन्न हीं सोडलीं तर १९३४-३५ मध्यें म्युनिसिपालट्यांस २ कोटि, २२½ लक्ष रुपये उत्पन्न झालें असें म्हणतां येईल. रस्त्यांप्रीत्यर्थ व शिक्षणासाठीं केलेल्या खर्चांत त्या सालीं वाढ झाली. त्यांच्या रकमा अनुक्रमें १७½ लक्ष रु. व ४५½ लक्ष रु. अशा होत्या.

### प्राप्तीची रकम व कराची चुकवाचुकव

प्राप्तीवरील कर भरणारानें आपल्या प्राप्तीचा खरा आंकडा दाखल करावा लागतो. खरी प्राप्ति दडवून कर चुकवणारे कित्येक लोक आढळतात, आणि इन्कम टॅक्सखातें त्या संबंधांत बारकाईनें चौकशी करून प्रत्येकाचें खरें उत्पन्न शोधून काढण्याचा प्रयत्न करतें. कर देणारांनीं आपल्या प्राप्तीचे दिलेले आंकडे ग्राह्य धरण्यांत आले असते तर हिंदुस्थान सरकारास गेल्या वर्षी ६३ कोटि रुपये नुकसान आलें असतें !

### महाराष्ट्रीय मंडळाचा मोफत शारीरिक शिक्षण-वर्ग : स्त्री-शाखा

वरील वर्ग पुणें येथें सालाबादप्रमाणें १ मे १९३६ ते १ जून १९३६ पर्यंत चालविण्यांत येणार आहे. परगांवच्या स्त्रियांच्या सोयीकरितां एक वसतिगृह उघडण्यांत येईल. अर्ज पाठविण्याची अखरची तारीख २५ एप्रिल ही आहे.

### अमेरिकन गिरण्यांतल्या चात्या कमी झाल्या

अमेरिकेंतील गिरण्यांमध्यें कापसाचें सूत कातण्याच्या एकूण २ कोटि, ९० लक्ष चात्या आहेत. पंचवीस वर्षांमागें चात्यांचा हाच आकडा होता. मध्यंतरी वाढ झाली ती अलीकडच्या आर्थिक मंदींत नाहींशी झाली. एकट्या १९३५ सालांत १६ लक्ष चात्या बंद झाल्या.

### परदेशस्थ पाहुण्यांचें आदरातिथ्य

ग्रेट ब्रिटनमध्यें सरकारी पाहुण्यांचा मानमरातब ठेवण्यासाठीं योजिलेल्या सरकारी फंडाचा ३१ मार्च अखेरचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यांत नेपाळ देशाच्या प्रतिनिधींप्रीत्यर्थ १५,००० रुपये खर्चीं पडले आहेत. ट्रॅन्सजोर्डनच्या अमीराचे मानमरातबास २०,००० रुपये खर्च आला. दारू, सिगार, इत्यादींवर ७,५०० रुपये खर्च झाले !

### लखनौ येथील कॉंग्रेसची यात्रा

लखनौ येथें ईस्टरच्या सुट्टींत भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनास ४० हजार प्रेक्षक हजर होते. एकूण सुमारें ५ हजार स्त्रियांनीं ह्या सोहळ्यांत भाग घेतला. वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींची संख्या पुरी अडीचशे होती.

### मंत्रिमंडळांतील सभासदांस एकसारखाच पगार द्या

ग्रेटब्रिटनच्या मंत्रिमंडळांतील सर्व सभासदांस एकजात वेतन मिळत नाहीं. मुख्य प्रधानांचें वेतन वाढविण्यांत येऊन बाकीच्या सर्व मंत्र्यांस एकच ठराविक पगार असावा, अशी एक सूचना पार्लमेंटांत नुकतीच करण्यांत आली होती, ती १५० विरुद्ध ५६ मतांनीं पास झाली.

### हिंदी लाकडाचा उपयोग वाढत्या प्रमाणांत करा

इमारत कामास उपयोगी पडेल, असें किती तरी लांकूड हिंदी जंगलांत सापडतें. त्याचा उपयोग वाढत्या प्रमाणांत करण्यांत येऊन त्यास गिऱ्हाइक यावें, ह्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें डेहराडून येथील जंगल संशोधन इन्स्टिट्यूटला जोडून एक 'टिंबर डेव्हलपमेंट सेक्शन' सुरू केला आहे. कोणाहि अधिकाऱ्यास, इंजिनियरास व कंत्राटदारास ह्या खात्याकडून लाकडाविषयीं माहिती व सल्ला मिळूं शकेल.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. ११ मार्च रोजीं पुरा झालेला आठवडा | ८३,१७,९२५ |
| ता. १८ मार्च रोजीं पुरा झालेला आठवडा | ९१,७६,४५५ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते १८ मार्च १९३६ अखेर | २,६७,६४,७८,३३२ |

## अनुक्रमणिका.


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ... १९८ |
| २ आर्थिक क्षेत्रांत 'सुधारणा' आणि 'क्रांति' ह्यांविषयींचा वाद | ... १९९ |
| ३ सोन्या-चांदीच्या आयातीवर जकात | ... २०० |
| ४ स्फुट-विचार — राष्ट्रीय सभा आणि शेतकऱ्यांच्या दुःस्थितीचें निवारण-पुणें म्युनिसिपालिटीनें योजिलेली जकात—घरगुती स्वदेशी धंदे व सरकारचें सहाय-फ्रान्समधून सोन्याचा वाढता ओघ—दि मिरज स्टेट बँक लि. | ... २०१ |
| ५ परदेशांतील व्यापार व उद्योगधंदे | ... २०२ |
| ६ शेतकरी व सहकारी सोसायट्या | ... २०३ |
| ७ शेतकऱ्यांच्या कर्जाची तडजोड करणारीं बोर्डें | २०३ |
| ८ जपानची व्यापारी हिकमत | ... २०४ |
| ९ मुंबईमध्यें कॅनरी काढण्याची योजना | ... २०५ |
| १० कंपनी कायद्यांत दुरुस्ती | २०७ |
| ११ सहकारी चळवळ — नाशिक जिल्ह्यांत सहकाराचा प्रचार—हैद्राबाद संस्थानांतील प्रगति | ... २०७ |
| १२ सॉलिसिटरच्या अशिलांचें खातें व बँकेची जबाबदारी | ... २०८ |
| १३ निवडक बाजारभाव | २०९ |



# अर्थ

बुधवार, ता. २२ एप्रिल, १९३६


## आर्थिक क्षेत्रांत "सुधारणा" आणि "क्रांति" ह्यांविषयींचा वाद

### पंडित जवाहिरलाल ह्यांची भूमिका

जमीन व यंत्रसामुग्री (भांडवल) ह्यांसारखीं संपत्तीच्या उत्पादनाचीं साधनें खाजगी वैयक्तिक मालकीचीं असूं नयेत आणि उद्योगधंदे व व्यापार समाजाच्या सामुदायिक सत्तेनें चालून संपत्तीची वांटणीहि ह्याच समतेच्या व समुदायमूलक तत्त्वावर व्हावी हें समाजसत्तावादाचें सार आहे. "खाजगी मालकी व वारसा हक्क कायद्यानें रक्षित असतात आणि त्यांचे योगानें समाजांत विषमता उत्पन्न होते. ज्याच्या हातांत जमीन व भांडवल तो ऐदी असला तरी अरेराव बनतो आणि श्रमजीवी बहुसंख्याक लोकांच्या मेहनतीनें बनलेल्या अन्नवस्त्राचा मालक होतो; अंगमेहनत करणाऱ्या जनतेस अशा ऐतोबांच्या मर्जीनें ते अंगावर टाकतील त्या तुकड्यावर संतुष्ट होऊन रहावें लागतें. हा अन्याय व ही विषमता दूर होण्यास मालमत्तेवरची कायदेशीर खाजगी मालकी काढून टाकून ती समाजाच्या म्हणजे श्रमोपजीवी जनतेच्या ताब्यांत देणें हाच एक मार्ग आहे." गेल्या शतकांत मोठमोठाले कारखाने व भांडवलवाले ह्यांच्या अमदानीचा प्रसार होऊन, "गांवांत घर नाहीं, रानांत शेत नाहीं," अशी स्थिति असलेला कामकरी वर्ग परावलंबी व बहुसंख्य बनल्या कारणानें ह्या औद्योगिक घटनेच्या वाढीबरोबरच वरील प्रकारचीं मतें अंतर्भूत असलेला समाजसत्तावाद युरोपभर पसरला. औद्योगिक घडाडी व उत्कर्ष ह्यांस मालमत्तेवरील खाजगी, वैयक्तिक मालकीहक्काचा ओलावा असल्यावांचून आणि व्यक्तिस्वातंत्र्य, स्पर्धा आणि फायद्याची लालच ह्यांची त्यांस उत्तेजनात्मक जोड मिळाल्याशिवाय संपत्तीचें उत्पादन कार्यक्षम रीतीनें व्हावयाचें नाहीं आणि सर्वत्र दारिद्र्य पसरेल अशी समजूत धंदेवाले आणि अर्थशास्त्रज्ञ ह्यांनीं करून दिली होती. ह्या दोन विचारसरणींच्या मधला झगडा आज तीनचार पिढ्या चालला आहे. समाजसत्तावादाचे अनेक पुरस्कर्ते प्रसिद्धी पावले आहेत. त्यांमध्यें कार्ल मार्क्स ह्यांस आद्य गुरु आणि त्याच्या "भांडवल" नांवाच्या ग्रंथास प्रमाणग्रंथ असें स्थान प्राप्त झालें आहे. समाजसत्तावाद्यांमध्यें अनेक संप्रदाय व पंथ असून त्यांचें प्रचारकार्य व चळवळ पाश्चात्य देशांमध्यें सर्वत्र कमीअधिक प्रमाणांत चालू आहे. त्यांच्यापैकीं आत्यंतिक मतास मूर्त स्वरूप रशियामध्यें प्राप्त झालें आहे, हा समाजसत्तावादाचा मोठा विजय आहे; परंतु ह्या विजयाचा परिणाम म्हणूनच जणूं काय इतर देशांत ह्या प्रकारच्या समाजसत्तावाद्यांचें महत्त्व कमी झालें आहे, इतकेंच नव्हे तर जर्मनी व इटली ह्या देशांत तें जवळ जवळ नामशेषच झालें असून इतरत्रहि त्यांचें वजन उतरलें आहे. दुसऱ्या बाजूनें, अर्थशास्त्रज्ञांचे सिद्धांत व शिकवण ह्यांचा खाजगी मालमत्तेच्या संस्थेस पूर्ण पाठिंबा असला तरी आर्थिक व सामाजिक विषमता दूर व्हावी आणि वैयक्तिक स्वार्थ व स्पर्धा ह्यांचें समाजहिताच्या दृष्टीनें नियंत्रण व्हावें ह्या मतास त्यांची पुष्टि मिळाली आहे. तथापि ह्या मतास अनुसरून सामाजिक व आर्थिक उत्क्रांति हळूहळू घडून येणाऱ्या सुधारणांच्या मार्गानें व्हावी ही गोष्ट पुढारलेल्या समाजसत्तावाद्यांस मान्य नाहीं. वर्ग-कलहाच्या सहायानें सर्व सांपत्तिक यंत्र कामकरी जनतेच्या हातीं यावें अशी त्यांची आकांक्षा व शिकवण आहे. बहुसंख्याक जनतेस हा उपाय अघोरी वाटतो आणि ह्यामुळें लोकशाहीचा पूर्ण पगडा असलेल्या राष्ट्रांतहि आत्यंतिक मताच्या समाजसत्तावाद्यांस थारा मिळत नाहीं.

आधुनिक पद्धतीचे उद्योगधंदे हिंदुस्थानांत प्रसार पावल्यानें येथेंहि कामकरीवर्गाची व समाजसत्तावादाची चळवळ चालू होणें अपरिहार्यच होतें. पाश्चात्य देशांप्रमाणें येथेंहि कामकऱ्यांच्या हितसंबंधांचें रक्षण करण्यासाठीं कायदे झाले आहेत. बंगाल, बिहार, संयुक्तप्रांत व मध्यप्रांत ह्यांमध्यें जमीनदारांच्या कुळांचें संरक्षण कायद्यानें करण्यांत आलें असून त्याबाबत सारखी प्रगति होत आहे. श्रीमंतांवर चढीच्या दरानें प्राप्तीवरील कर बसवून संपत्तीच्या विषम वांटणीस आळा घालण्यांत आला आहे आणि सहकारी चळवळ भांडवलशाही व नफेबाजी ह्यांस मर्यादा घालीत आहे. अर्थात् ह्या दिशेनें प्रगति अधिक व्यापक प्रमाणांत व जोरानें होणें आवश्यक आहे. परंतु पाश्चात्य देशांतल्याप्रमाणें येथील समाजसत्तावाद्यांस हा मंद गतीचा उत्क्रांति मार्ग, तो केवळ "सुधारणा पंथ" आहे म्हणून मान्य नाहीं. मूलग्राही आर्थिक पुनर्घटना घडवून आणूं इच्छिणाऱ्या ह्या समाजसत्तावाद्यांचा प्रचार अलीकडे जोरावला आहे. राष्ट्रीय सभेच्या लखनौच्या अधिवेशनाचे अध्यक्ष, पंडित जवाहिरलाल, हे त्यांचे उत्साही व श्रद्धावान् अध्वर्यू आहेत आणि ही गोष्ट त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत स्पष्ट केली आहे. राष्ट्रीय सभेचे अनुभवी प्रमुख पुढारी आपल्या मार्गानें जाण्यास तयार नाहींत ह्याची त्यांस जाणीव असून ती त्यांनीं व्यक्त केली आहे, हा त्यांचा प्रांजलपणा लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे. स्वतःचें घोडें दामटून देशांत दुही माजवण्यास आपण सहाय करणार नाहीं असेंहि त्यांनीं जाहीर केलें आहे, ह्यांत त्यांचा मुत्सद्दीपणा, आत्मसंयमन व राष्ट्राभिमान प्रतीत होतो. जगांत चाललेल्या उलाढालीपासून हिंदुस्थानास अलिप्त रहातां येत नाहीं आणि त्यांचा आम्हीं ऐतिहासिक बुद्धीनें विचार केला

पाहिजे, ही त्यांनीं पुढें मांडलेली विचारसरणी चिंतनीय आहे. पण हिंदुस्थानांतल्या परिस्थितीस ती लागू केली असतां पंडितजींच्या शिकवणीस तिच्या योगानें पुष्टि मिळत नाहीं, ह्याचें प्रत्यंतर त्यांच्याच भाषणांत सांपडतें. आपला ध्येयवाद इतर पुढाऱ्यांस मान्य नाहीं हें त्यांनीं सांगितलें आहे, एवढेंच नाहीं तर, समाजसत्तावादाच्या तत्त्वज्ञानास अनुसरून हिंदुस्थानांत मोठमोठे कारखाने व धंदे झपाट्यानें निघाले पाहिजेत, ह्या आपल्या मताशीं खादीस व खेडेगांवांतल्या छोटेखानी वैयक्तिक धंदांस उत्तेजन देणें सध्याच्या येथील परिस्थितींत अगत्याचें आहे, ह्या अभिप्रायाचा त्यांनीं मेळ घातला आहे. त्यांच्या सांप्रदायाशीं विसंगत असलेलें हें सुधारणावादी व उत्क्रांतिमूलक वळण त्यांस, तात्पुरतें कां होईना, मान्य करावें लागलें आहे. राष्ट्रीय सभेच्या अनुभवी, निरलसपणें व स्वार्थत्यागपूर्वक खेडोपाडीं काम करणाऱ्या विचारवंत पुढाऱ्यांच्या वजनाचा हा परिणाम आहे, हें उघड आहे. ध्येयवादित्व कितीहि उत्कट असलें तरी परिस्थितीच्या दृष्टीनें त्यास पायबंद घालणें आवश्यक होतें, ह्याचें हें उदाहरण आहे. रशियांतला बोल्शेव्हिकांचा क्रांतिकारक कार्यक्रम हा एक प्रकारचा समाजसत्तावादाचा प्रयोग आहे, आणि तो पूर्ण यशस्वी झाला आहे किंवा त्यांतली घटना टिकाऊ आहे असें आज निश्चयानें सांगतां येणार नाहीं. त्या कार्यक्रमाचा शास्त्रीय सिद्धांतांचा पाया डळमळीत आहे व त्याचा परिणाम दुसऱ्या राष्ट्रांवर किती प्रतिकूल झाला आहे हें स्पष्ट दिसतच आहे. तेव्हां, हिंदुस्थानांत उत्क्रांतीच्या मार्गानें सुधारणा घडवून आणण्या ऐवजीं आमूलाग्र आर्थिक घटनांतर करणें शक्य व इष्ट आहे असें कसें म्हणतां येईल ? समाजसत्तावाद्यांच्या अग्रणींचीं महत्त्वाचीं तत्त्वें व भविष्यें खरीं ठरलीं आहेत असें नाहीं. तसेंच, अन्य मार्गानीं जाणाऱ्या समाजसुधारकांच्या प्रयत्नांस व तत्त्वांस यश आलेलें नाहीं असेंहि नाहीं. राष्ट्रीय सभेच्या व इतर कार्यकर्त्या पुढाऱ्यांचेंहि ध्येय सामान्य जनतेची रहाणी सुखाची, स्वातंत्र्याची व समतेची असावी हेंच आहे. पण ध्येय साध्य करण्याचे त्यांचे मार्ग भिन्न आहेत आणि त्यांवर त्यांची दृढ श्रद्धा असून तेच योग्य आणि इष्ट फलदायी आहेत अशी त्यांस खात्री वाटत आहे. तुझी जमीन व घरदार, समाजसत्तावाद्यांची अमदानी सुरू झाल्यास, तुझ्या हातून काढून घेण्यांत येईल व तुझ्या मुलांबाळांस त्यांचा वारसा मिळणार नाहीं असें हिंदी शेतकऱ्यांस सांगितल्यास त्यांस तें रुचेल काय ? लहान सहान धंदेवाले व मध्यम स्थितींतले लोक मजूर बनण्यास तयार होतील काय ? हे जिव्हाळ्याचे प्रश्न येथें उद्भवतात. त्यांचें समाधान नुसत्या ध्येयवादानें होणें अव्यावहारिक आहे. समाजसत्तावाद्यांच्या कार्यक्रमास व प्रचारास अनुलक्षून बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांनीं लखनौस केलेल्या एका भाषणांत अत्यंत मार्मिक असे कांहीं उद्गार निघाले, त्यांचा पंडित जवाहिरलाल ह्यांच्याकडे रोख होता, हें उघड दिसतें. ते म्हणाले:—"मी एक खेडवळ माणूस आहें. मला पुस्तकें समजत नाहींत. मीं मागें जें कांहीं वाचलें होतें, तें सर्व आतां विसरलों आहें. मी जें कांहीं ठरवतों त्यास पुस्तकाचा आधार नाहीं. माझ्या मतांस खेडेगांवांतील लोकांच्या रहाणीचा, त्यांच्या दारिद्र्याचा व दुःखाचाच आधार आहे. खेडेगांवांतून हिंडतांना त्यांच्या गरजा काय आहेत आणि त्यांची अवनति व उन्नति ह्यांच्या मुळाशीं कोणतीं कारणें आहेत, हें मीं पाहिलें आहे. हिंदुस्थानचें भवितव्य पुस्तकी ज्ञानाच्या जोरावर निश्चित व्हावयाचें असेल तर हा देश कोठल्या खड्ड्यांत जाऊन पडेल हें सांगतां येत नाहीं." ह्या उद्गारांचें रहस्य अधिक स्पष्ट करून सांगण्याचें प्रयोजन नाहीं.

---

## सोनें, चांदी व जवाहिर ह्यांच्या आयातीवर जकात

### पुणें शहर म्युनिसिपालिटीच्या योजनेवर मराठा चेंबरचें मत

मराठा चेम्बरच्या कमिटीच्या मतें पुणें शहर म्युनिसिपालिटीनें योजिलेली सोनें-चांदीवरील जकात अयोग्य, अव्यवहार्य व अनिष्ट आहे. ही योजना यशस्वी होण्याच्या मार्गांत व्यावहारिक स्वरूपाच्या व तत्त्वाच्या अनेक अडचणी उत्पन्न होण्यासारख्या असल्यानें ती पूर्ण माहितीच्या व खुलाशाच्या अभावीं अग्राह्य आहे, असें चेम्बरच्या कमिटीचें मत आहे.

कोणताहि कर बसवावयाचा असतां तो मोठ्या प्रमाणांत कायदेशीर रीतीनें चुकवितां येणार नाहीं अशी खात्री असावयास पाहिजे. तो कर वसूल करण्याची पद्धति व्यापारी व जनता यांस विशेष त्रासदायक व गैरसोयीची असूं नये. कर वसूल करण्याचे बाबतींत होणारा खर्च त्यापासून व्हावयाच्या उत्पन्नाच्या मानानें अल्प असला पाहिजे. योजिलेल्या कराचा बाजारपेठेंत चालणाऱ्या व्यवहारांवर प्रतिकूल परिणाम होऊन व्यापाराची घडी विस्कटण्याचा आणि तो दुसरीकडे हालण्याचा संभव असूं नये. नाहीं तर कराच्या उत्पन्नाचा उगमच संकुचित होऊन व्यापारी वर्गाची व जनतेची आर्थिक स्थिति बिघडण्याची भीति असते. कराच्या आकारणींत विषमता उत्पन्न होऊन त्याचा बोजा श्रीमंतांपेक्षां गरीबांवर अधिक पडणार नाहीं अशी खबरदारी घेतां आली पाहिजे.

पुणें शहरांतल्या सोनें-चांदीच्या व्यापाराची परंपरा व परिस्थिति लक्षांत घेतां पुणें म्युनिसिपालिटीनें योजिलेला कर वर निर्दिष्ट केलेल्या कराविषयींच्या सर्वमान्य तत्त्वांशी विसंगत होईल असें मराठा चेम्बरच्या कमिटीस वाटत आहे. कर कसा व कोठें वसूल करणार, व्यापारी व सामान्य नागरिक सोनें, चांदी व जवाहिर अंगावर आणतात व जकात चुकविण्यासाठीं मोठ्या प्रमाणावर पुढें आणतील त्यांवर तो कसा घेणार ? या रीतीनें पद्धतशीर मार्गानें जकात चुकविली गेली असतां म्युनिसिपालिटीस उत्पन्न किती होणार ? जकातीच्या वसूलीकरितां कोठे व किती नोकर नेमणार, त्यांचे पायीं खर्च किती येणार, व्यापार चोरटा व अन्य पेठांत होऊं लागल्यास त्याचें नियंत्रण कसें करणार इत्यादि महत्त्वाच्या तपशीलाबाबत म्युनिसिपालिटीनें काय विचार, अंदाज आणि योजना केलीं आहेत हें प्रसिद्ध झालेलें नाहीं. चेम्बरला सदरहु तपशीलवार माहिती पुरविण्यांत यावी अशी विनंति आहे.

वर निर्दिष्ट केलेल्या तत्त्वांच्या निकषावर घासूनच म्युनिसिपालिटीनें योजिलेल्या जकातीच्या योजनेची परीक्षा करावी लागेल. प्रत्यक्ष तपशीलवार योजना आखण्याचा व अमलांत आणण्याचा प्रयत्न होईल तेव्हां तिचे दीर्घगामी परिणाम आणि व्यावहारिक दोष ध्यानांत येतील. वरवर पाहातांहि सोनें–चांदीवरील जकातीची सूचना सदोष आणि अग्राह्य दिसते. तिच्यापासून अपेक्षेप्रमाणें उत्पन्न येणार नाहीं आणि व्यापारावर व जनतेवर तिचा अनिष्ट परिणाम मात्र होण्याचा पुष्कळ संभव आहे. आज जी माहिती उपलब्ध आहे तिच्यावरून विचार करतां पुणें म्युनिसिपालिटीनें सोनें, चांदी व जवाहीर यांच्या आयातीवर जकात बसविल्यास अनेक घोटाळे व दुष्परिणाम होतील असें म्हणण्यास पुष्कळ जागा आहे आणि म्हणून ती योजना अमान्य करणें आणि ती अमलांत आणूं नये असा अभिप्राय व्यक्त करणें चेंबरच्या कमिटीस अगत्याचें वाटतें.

---

## स्फुट विचार

### राष्ट्रीय सभा आणि शेतकऱ्यांच्या दुःस्थितीचें निवारण

राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष, पंडित जवाहिरलाल, ह्यांचा उत्कट समाजसत्तावाद आणि अनुभवी व वजनदार काँग्रेस-नेत्यांचा त्यांच्या ध्येयास व कार्यक्रमास असलेला तितक्याच उत्कटतेचा तात्विक आणि व्यावहारिक विरोध ह्यांचा उल्लेख आजच्या अग्रलेखांत आम्हीं केलेलाच आहे. परिस्थिति लक्षांत घेऊन आपल्या ध्येयवादास अध्यक्षांनीं कसा लगाम घातला आहे आणि त्या योगानें राष्ट्रीय सभेच्या चालकांचें ऐक्य कसें कायम राखलें गेलें आहे ह्याचें दिग्दर्शन तेथें करण्यांत आलें आहे. स्वतः जमीन कसणाऱ्या शेतकरी वर्गास राष्ट्रीय सभेची घटना व कार्यक्रम ह्यांमध्यें महत्त्वाचें स्थान देण्याच्या प्रश्नाचा निकालहि अशाच तडजोडीच्या भूमिकेवर लखनौस झालेला आहे असें सभेचा ह्या विषयावरील ठराव पाहिला असतां तात्काल दिसून येईल. खेडे-गांवांतील लोकांचें दारिद्य, बेकारी व कर्जबाजारीपणा घालवण्या-साठीं उपाय-योजना करण्याचा प्रश्न राष्ट्रीय सभेपुढें आला असतां त्याबाबत निरनिराळ्या प्रांतांत परिस्थिति भिन्न-भिन्न असल्यामुळें प्रांतिक काँग्रेस कमिट्यांकडून तद्विषयक शिफारसी मागवाव्या असें ठरलें. शेतकरी वर्गाच्या हितसंबंधांस बाघ आणणाऱ्या, जमीनधार-णाची पद्धति, खंड, जमिनीचा सारा, खेडेगांवांची आर्थिक स्थिति, इत्यादि संबंधांतल्या निरनिराळ्या बाबींची चौकशी करून कमि-ट्यांनीं आपल्या सूचना करावयाच्या आहेत. 'शेतकरी व काम-करी वर्गांचें संघटन' असल्या शुष्क शब्दप्रयोगावर संतुष्ट न रहातां राष्ट्रीय सभेनें आपल्या ठरावास व्यावहारिक व विधायक स्वरूप दिलें आहे. प्रांतांप्रांतांतली परिस्थिति व ती सुधारण्याचे उपाय ह्यांमध्यें भिन्नता आहे व असणार ह्याची जाणीवहि त्यांत स्पष्ट आहे. हा सर्व, महात्मा गांधींची खादीची व ग्रामोद्योगाची चळवळ चालली आहे, तिचाच वास्तविकपणानें विजय आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. खादीच्या प्रसारास सहाय करणें म्हणजेच पंडित जवाहिरलाल ह्यांच्या कार्यास सहाय करणें होय हा त्यांचा उद्गार अर्थपूर्ण आहे ह्यांत संशय नाहीं.

### पुणें म्युनिसिपालिटीनें योजिलेली सोनें-चांदी-वरील जकात

पुणें शहर म्युनिसिपालिटीनें सोनें, चांदी व जवाहीर ह्यांच्या आयातीवर जकात बसवण्याचें योजिलें आहे, त्या संबंधानें मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजनें आपला अभिप्राय तिकडे कळवला आहे, त्यांतला मुख्य भाग आम्हीं आजच्या आमच्या अंकांत दुसरीकडे छापला आहे. वाढता खर्च भागवतां येण्याकरितां नवीन कराची आवश्यकता आहे आणि कारभाराच्या सुधारलेल्या कार्यक्षमतेनें व काटकसरीनें कार्यभाग होण्यासारखा नाहीं ही गोष्ट म्युनिसिपालिटीनें प्रथम सिद्ध केली पाहिजे. असें झाल्यास आपणांस जरूर असलेल्या सुखसोयींची किंमत करांच्या स्वरूपांत देण्यास नागरिकांनीं तयार झालें पाहिजे हें उचित आहे. तरीहि बसवावयाचा नवीन कर कोणत्या प्रकारचा असावा आणि तो कसा वसूल व्हावा ह्याचा योग्य निर्णय होण्या-वर त्याची ग्राह्याग्राह्यता अवलंबून राहील. ह्या संबंधांत कांहीं तात्त्विक व व्यावहारिक महत्त्वाचे दंडक सर्वमान्य झालेले आहेत आणि त्यांस धरूनच नवीन कराची योजना असणें अगत्याचें आहे. मराठा चेंबरनें आपल्या अभिप्रायांत सदरहु नियमांचा उल्लेख करून सोनें, चांदी व जवाहीर ह्यांवर योजिलेली जकात अनेक अडचणी उत्पन्न करणारी आणि अव्यवहार्य आहे असें म्हटलें असून म्युनिसिपालिटीनें लोकांच्या माहितीसाठीं कराच्या योजनेचा तपशील प्रसिद्ध करावा असें सुचविलें आहे. रेल्वे-स्टेशनावर व इतर ठिकाणीं नाकीं बसवून तेथें सोन्या-चांदीच्या आयातीवर जकात घेणें म्युनिसिपालिटीस अर्थातच शक्य नाहीं. असे मोलवान् जिन्नस व्यापाऱ्यांस व इतरांस अंगावर सहज आणतां येऊन जकात चुकवतां येईल आणि शहरांत येणाऱ्या माणसांची संशयावरून झडती घेणें अशक्य होईल. सोनें-चांदी शहरांत किती आली आणि ती कोणी आणिली हें ठरवण्याचे दुसरे संकल्पित मार्ग अन्यायकारक, अव्यवहार्य आणि अनिष्ट ठरतील, असें वाटण्यास जागा आहे. करांच्या वसूल होणाऱ्या रकमेच्या मानानें शहरांतील व्यापार, धंदेवाले व सामान्य जनता ह्यांस होणारी गैरसोय व त्रास ह्यांचें पारडें जड झाल्यास तो त्याज्यच म्हटला पाहिजे. योजिलेल्या कराच्या वसुलीची व्यवस्था कशी करावयाची ह्याची कल्पना म्युनिसिपालिटीनें जनतेपुढें मांडल्यास तिची ज्यास्त छाननी करणें सोयीचें होईल. सकृद्दर्शनीं, मराठा चेंबरनें म्हटल्याप्रमाणें, सोनें, चांदी व जवाहीर ह्यांवर जकात घेण्याची म्युनिसिपालि-टीची कल्पना व्यवहार्य व ग्राह्य आहे असें वाटत नाहीं आणि ती बसवावयाची असें म्हटल्यास तिच्यापासून होणारे दुष्परि-णाम ह्यांचा विचार झाला आहे, असें दिसत नाहीं. विवक्षित व्यापारी वर्गावर किंवा सोनें-चांदी खरेदी करणारांवर कराचा बोजा पडेल म्हणूनच केवळ नवीन जकातीस विरोध झाल्यास तो समर्थनीय ठरणार नाहीं. परंतु कराची योजना मूलतःच सदोष आणि आक्षेपार्ह असल्यास तो म्युनिसिपल कारभाराच्या पद्धतीचा व सर्वच नागरिकांच्या हितानहिताचा प्रश्न होतो आणि ह्याच दृष्टीनें त्याचा विचार होणें युक्त आहे. मराठा चेंबरनें उपस्थित केलेले मुद्दे चिंतनीय आहेत.

### घरगुती स्वदेशी धंदे व सरकारचें सहाय

लखनौ येथें भरलेल्या ग्रामोद्योग प्रदर्शनाचा उद्देश लहान-सहान खेडेगांवीं धंद्यांस उत्तेजन देणें हा होता. सरकारनेंहि ह्या बाबतींत सहायकारक धोरण आखावें आणि संरक्षणाचा विधा-यक कार्यक्रम उत्साहानें हातीं घ्यावा ह्या आशयाचा एक ठराव लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत पास झाला. ठरावांत गर्भित असलेल्या हेतूसंबंधानें हिंदुस्थान सरकारच्या प्रतिनिधींनीं पूर्ण सहानुभूति व्यक्त केली आणि अलीकडे लहान सहान धंद्यांच्या उत्कर्षासाठी त्यांनीं किती सहाय दिलें आहे ह्याची हकीकत सांगितली. उद्योगधंद्यांच्या वाढीच्या आणि विशेषतः खेडगांवी व छोटेखानी व्यवसायांच्या पुनरुज्जीवनाच्या व संरक्षणाच्या प्रश्नास अलीकडे इतकें महत्त्व प्राप्त झालें आहे कीं, असेंब्लींतल्या लोकप्रतिनिधींचें सरकारी धोरणाच्या स्पष्टीकरणानें समाधान न होऊन त्या बाबत चौकशी करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत यावी अशी सूचना बहुमतानें मंजूर झाली. हा विषय प्रांतिक सरकारांच्या कक्षेंतला असला तरी मध्यवर्ती सरकारानें त्यासंबंधांत व्यापक धोरण आणि विधायक योजना आखल्यावांचून म्हणण्यासारखें परिणामकारक कार्य होणें अशक्य आहे, ह्यांत शंका नाहीं. असेंब्लींत झालेल्या चर्चेंत युरोपिअन सभासदांनींहि ठरावांतील मुख्य कल्पनेस पाठिंबा दिला, हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. औद्योगिक संर-क्षणाच्या धोरणांत मोठ्या प्रमाणावरील आणि छोटेखानी धंदे

ह्यांच्यामध्यें विरोध येण्याचें कारण नाहीं, ह्या मुद्याचाहि उल्लेख करण्यांत आला. असेंब्लींत पास झालेला ठराव शिफारसवजा असून सरकारास बंधनकारक नाहीं, हें मात्र खरें आहे.

### फ्रान्समधून सोन्याचा वाढता ओघ

युरोपांतील प्रक्षुब्ध वातावरण आणि आंतरराष्ट्रीय अस्वस्थता ह्यांच्या योगानें फ्रान्सची अंतर्गत आर्थिक परिस्थिति सारखी बिघडत चालली आहे. ह्या बिघाडाचें एक स्पष्ट लक्षण म्हटलें म्हणजे बँक ऑफ फ्रान्सच्या संग्रहांतला राष्ट्रीय चलनाचा आधार असलेला सुवर्णनिधि घटत जाणें हें होय. गेल्या वर्षी मार्च महिन्यांत त्या बँकेपाशीं ८,२५९ कोटि फ्रँक किंमतीचें सोनें होतें आणि गेल्या महिन्यांत यंदाच्या सालीं तो आंकडा ६,५७० कोटींपर्यंत उतरला. मागणी बरहुकूम घाव्या लागणाऱ्या देण्याशीं सुवर्णनिधीचें प्रमाण गेल्या वर्षी ८० टक्क्यांच्या वर होतें तें एका वर्षांत ७० टक्के झालें. चालू महिन्यांत त्यांत आणखी घट झाली असून सहहु प्रमाण ६७ टक्क्यांपर्यंत घसरलें आहे. आपल्या चलनास असलेला सोन्याचा आधार न सोडण्याचा आणि फ्रँकची सोन्यांत होणारी किंमत कमी न करण्याचा फ्रेंच राज्यकर्त्यांचा निर्धार असल्या परिस्थितींत कितीसा टिकतो हें आतां पहावें.

### दि मिरज स्टेट बँक लि०

वरील बँकेचा ३० जून, १९३५ अखेरचा अहवाल आमचेकडे आला आहे. बँकेचें वसूल भांडवल २० हजार रुपये असून मुदतीच्या व इतर ठेवी सुमारें ११½ लक्ष रुपयांच्या आहेत. बँकेनें ४ लक्ष रुपये सरकारी रोख्यांत गुंतविलेले आहेत व इतर बँकांमध्यें केव्हांहि उभे करतां येण्याजोगे व रोख मिळून २¾ लक्ष रुपये आहेत. कॅश क्रेडिट्स व कर्जें ह्यांत २¾ लक्ष रुपये आहेत. रामप्रताप हरीचंद पेढीकडून व शेट लल्लुभाई लीलाचंद ह्यांचेकडन बँकेच्या येणें रकमा पुरेपूर वसूल होण्याची खात्री नसल्यानें बँकेनें अहवालाचे सालीं झालेल्या नफ्यांतून १६,००० रुपये संशयित कर्जखातीं ( बॅड डेट्स ) टाकले आहेत, हें योग्य आहे. बँकेचा व्यवहार सालोसाल वाढत आला आहे, तथापि व्यापारांतील मंदीमुळें एकूण भांडवलापैकीं थोडीच रकम कर्जांत गुंतवतां आली आहे, असें दिसतें. साल अखेर बँकेनें ४ टक्के डिव्हिडंड दिलें. माफक डिव्हिडंड वांटून संशयित व बुडीत कर्जासाठीं व इतर खास निधि मजबूत करण्याचें धोरण बँकेनें चालू ठेवावें. मिरज संस्थानचे दिवाण श्री० जोशी हे बँकेचे चेअरमन असून हायकोर्ट जज्ज, श्री. घोलकर, हे मॅनेजर आहेत.

### नवे व्हाइसरॉय, मार्केस ऑफ लिनलिथगो ह्यांचे प्रथम उद्गार

" जमीन कसणारा शेतकरी हिंदी राष्ट्राचा आधारस्तंभ आणि त्याच्या उत्कर्षाचा पाया आहे. शेतीच्या धंद्याच्या सुधारणेचें विशेष महत्त्व ह्या ( मुंबई ) शहराचे नागरिक ओळखतात आणि शेतकऱ्याच्या सुखावर आपली स्वतःची सुस्थिति अवलंबून आहे ही गोष्ट ते जाणतात, हें पाहून मला आनंद होतो. "

" आपल्या सुंदर शहराचा ( मुंबईचा ) तुम्हां नागरिकांस अभिमान वाटावा हें योग्य आहे. आर्थिक मंदी सर्व जगास भोंवली आहे आणि तिच्यामधून हें शहर सुटलें नाहीं. तथापि, मंदीचा काळ जाऊन चलतीस प्रारंभ झाला आहे असें तुमच्याप्रमाणें मलाहि वाटतें. उद्योग, साहस आणि लोकसेवेविषयीं तत्परता ह्यासंबंधानें मुंबईकरांची ख्याती आहे. ह्या गुणांनीं मंडित झाल्यामुळें इतर शहरांच्या स्पर्धेपासून भीति बाळगण्याचें त्यांस कारण नाहीं. "

## परदेशांतील व्यापार व उद्योगधंदे

### ब्रिटिश विमा-मंडळयांची प्रगति

ब्रिटिश विमा-मंडळयांनीं १९२५–३४ ह्या दहा वर्षांत उतरवलेल्या विम्यांची वार्षिक सरासरीची एकूण रकम सुमारें १५५ कोटि रुपयांपासून २४५ कोटींपर्यंत वाढली. उतरलेल्या पॉलिसींच्या वार्षिक सरासरीच्या आंकड्यांत ३ लक्ष ८७ हजारांपासून ५ लक्ष ३५ हजारांपर्यंत वाढ झाली. मोटार गाड्यांच्या विम्याची रकम १९३४ सालीं ४० कोटि रुपये होती व ती ७२ विमा मंडळयांमध्यें विभागली गेली होती.

### ब्रिटिश सिमेंटला ऑस्ट्रेलियांत सवलत नाहीं ?

ओटावा कराराच्या अन्वयें ब्रिटिश सिमेंट ऑस्ट्रेलियामध्यें बिन-जकात येऊं द्यावयास हवें. ऑस्ट्रेलियन प्रधान मंडळानें ब्रिटिश सिमेंटला जकातीची माफी असावी आणि इतर सिमेंटवर दर टनास २० ते २५ शिलिंग जकात घेतली जावी असें सुचवलें होतें. पण हाउस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हस ह्या कायदे मंडळाच्या सभेनें ग्रेट ब्रिटनला माफी देण्याचें नाकारलें. सेनेटच्या सभेंत हा ठराव बदलून घेण्याचा प्रधान मंडळाचा विचार आहे.

### हिंदी रेल्वे आणि ब्रिटिश रेल्वे

हिंदुस्थानांतल्या रेल्वेजच्या व्यवहारांत मंदी व नुकसान आहे. पण ब्रिटिश रेल्वेजची चलती आहे. १९३४ च्या मानानें १९३५ सालीं त्यांची, खर्च वजा जाऊन, निवळ जमा सुमारें दोन कोटि रुपयांनीं वाढली. ब्रिटिश रेल्वेजची एकूण जमा गेल्या वर्षी सुमारें २०० कोटि रुपयांवर होती व खर्च सुमारें १६५ कोटि रुपये झाला. हिंदी रेल्वेजवर नफा कधीं सुटणार ?

### जर्मन सरकारची जहाज-मंडळयांस मदत

नॉर्थ जर्मन लॉईड आणि हँबूर्ग अमेरिका लाइन ह्या दोन सर्वांत मोठ्या जहाज मंडळयांस, त्यांची सांपत्तिक स्थिति समाधानकारक व्हावी म्हणून सहाय्य देण्याचें जर्मनीच्या सरकारनें ठरविलें आहे. ह्या मंडळयांस आज सुमारें २१ कोटि रुपयांचें बँकांचें देणें आहे तें जर्मन सरकार स्वतः उचलून देऊन टाकणार आहे. म्हणजे जर्मन सरकार वरील मंडळयांचे सावकार होईल आणि बँकांच्या देण्याची फेड ट्रेझरी बिलांच्या स्वरूपांत केली जाईल.

### साखरेच्या ब्रिटिश कारखान्यांचें एकीकरण

ग्रेटब्रिटनमधील बीटापासून साखर तयार करणाऱ्या कारखान्यांचें एकीकरण घडवून आणण्याविषयींची योजना बहुतेक पूर्ण होत आली आहे. कारखानदारांनीं परस्परांशीं सहकार्य करून तडजोडीनें ही योजना यशस्वी होण्याच्या मार्गावर आणून ठेविली आहे.

### ब्रिटिश रेल्वेंतून एकूण १३० कोटि प्रवास

ग्रेट-ब्रिटनधील चार प्रमुख रेल्वेजवर १९३५ सालीं उतारू लोकांनीं एकूण १३० कोटि वेळां प्रवास केला. १९३४ पेक्षां हा आंकडा ३ कोटींनीं वाढलेला आहे. प्रवाशांची १९३५ सालांतली संख्या पूर्वीच्या वर्षापेक्षां २½ कोटींनीं ज्यास्त होऊन ती ८५½ कोटि भरली.

## शेतकरी व सहकारी सोसायट्या

( ले:—श्री. ना. आ. रुकडे, सुपरवायझर, सहकारी सोसायट्या, तालुका वांई )

'केसरी' पत्राच्या ता. ३१ मार्चच्या अंकांत 'शेतकरी व सहकारी पतपेढ्या' ह्या शीर्षकाखाली 'एक कनवाळू' ह्यांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील कांहीं मजकूर वस्तुस्थितीस धरून नाहीं व सहकारी चळवळीविरुद्ध लोकमत बनण्यास तो कारणीभूत होण्याचा संभव आहे, ह्याकरितां खालील खुलासा करणें आवश्यक आहे.

सहकारी पतपेढ्यांचे बाबतींत सरकारचें व प्रजेचें जितकें सहकार्य आहे तितकें सहकार्य, तुलनात्मक दृष्टीनें पाहिल्यास, दुसऱ्या बाबतींत क्वचितच आढळेल. पतपेढ्यांचे संबंधांतील सरकारच्या अधिकाराबद्दल तक्रार करणें रास्त होणार नाहीं. कोणतीहि संस्था म्हटली म्हणजे नियम आलेच व नियमांची बजावणी योग्य रीतीनें होत आहे किंवा नाहीं हें पहाण्यास नियंत्रण करणारी योजनाहि पण हवीच. जेथें निरनिराळ्या प्रकारचे लोक एकत्रित होतात, तेथें अशा नियंत्रणाची ज्यास्तच आवश्यकता आहे. सरकारी नियंत्रण जाचक नसून सहकारी खातें कसलेच नियम मुद्दाम कोणावर लादत नाहीं. कोणतेहि नियम सहकारी सोसायट्या बदलूं शकतात, फक्त त्यास खात्याची मंजुरी लागते व ती कायद्याचे कक्षेत असलेल्या सर्व गोष्टींस मिळतेहि. कायदा, कानू व लोकांनींच केलेले नियम योग्य रीतीनें पाळले जातात किंवा नाहीं, एवढेंच सरकार पहातें.

सहकारी पतपेढ्यांना मृगजलाची उपमा देऊन 'कनवाळू'नें अन्याय केलेला आहे. पतपेढी म्हणजे शेतकऱ्यांना फुकट पैसे पुरविणारी कामधेनू नव्हे. सहकारी पतपेढ्यांकडून घेतलेल्या कर्जाचा विनियोग अनुत्पादक कामाकडे करूं नये, असा पतपेढ्यांचा नियम असतो. सभासदांच्या जिंदगीचा व उत्पन्न-खर्चाचा हिशेब करून दिलेल्या कर्जाचा असा विनियोग केल्यानें कसें चालणार? पतपेढी ही कर्जाचें निवारण करणारी संस्था नसून शेतकऱ्यांच्या चालू कामधंद्यास मदत करणारी ती संस्था आहे, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. सावकारी पाशांत सांपडलेल्या एकाद्या शेतकऱ्यानें पतपेढीकडे धांव घेतली तर पेढी त्याच्या पतीबाहेर कर्ज कसें देऊं शकणार! कमी व्याजानें कर्ज देणें वेगळें व पूर्वकर्जाची रकमच कमी करून त्याचें निवारण करणें वेगळें.

विहिरीच्या दुरुस्तीसाठीं काढलेल्या कर्जाचें उदाहरण देऊन, पतपेढीकडून कर्ज काढणें सोपें असतें परंतु त्याचा मागाहून फार त्रास होतो, असें 'कनवाळू'नें सूचित केलें आहे. पतपेढी म्हणजे पैशाचें दुकान नाहीं कीं, कोणीहि तेथून कर्ज न्यावें. कर्ज मागणाऱ्या सभासदाच्या सांपत्तिक स्थितीची किती कसून परीक्षा केली जाते व सरकारी आणि बँकेचे अधिकारी ह्यांच्या सल्ल्यानेंच सर्व व्यवहार कसा केला जातो व किती चाळण्यांतून चाळून कर्ज दिलें जातें हें पाहिलें म्हणजे कर्ज किती काळजी-पूर्वक तपासाअंतीं देण्यांत येतें हें समजेल. सावकारांचा व्याजाचा दर द. द. १२ ते ४० टक्क्यांपर्यंत असतो. पतपेढ्यांचा दर सावकारापेक्षां केव्हांहि अल्पच असतो. एखाद्या गांवांत ६ टक्के दरानें कर्ज मिळत असेल तर तेथें ९ रु. ६ आ. दरानें कर्ज देणारी सोसायटी काढूं नये, असा सरकारी नियम आहे. सावकार सामान्यतः सोनें किंवा जमीनगहाण ह्यांचे तारणावर कर्ज देतो. परमेश्वरी नोटीवर तें दिल्यास शक्य तों दुपटीची रकम लिहून घेण्यांत येते. गहाणखतावर कर्ज उभारण्यांत अनेक अडचणी असतात. ह्या उलट, पतपेढीचें एक पै व्याज भागविलें तरी पावती मिळते. स्टँपफी, रजिस्ट्रेशनफी इत्यादि माफ असतात. परतफेडीच्या मार्गांतील अडचणींबद्दल असें सांगतां येईल, कीं शक्य तोंवर बाजारभावाची परिस्थिति पाहूनच कर्ज देण्यांत येतें. कर्जाचे हप्ते हंगामास धरूनच असतात. मधें अर्धे हप्ते स्वीकारण्यांत येतात व नडीप्रसंगीं मुदतहि देण्यांत येते. लवाददावा करण्याचें काम सरकारचें नसून हुकूमनामा झाल्याखेरीज सरकारी अधिकारी वसुलीबाबत विचारणा करीत नाहींत. हुकूमनामा झाल्यावर सावकारी कर्जाप्रमाणेंच हें कर्ज वसूल केलें जातें. 'कनवाळू'नें सरकारच्या वसुलीबाबत केलेली टीका वस्तुस्थितीचा विपर्यास करणारी आहे. "पतपेढीनें फिर्याद केली व शेतकऱ्यानें कर्ज कबूल केलें कीं, लागलीच जंगम माल जप्तीचा हुकूम" हें विधान अतिशयोक्तिपूर्ण आहे. सोसायटीचा दावा लवादापुढें चालतो. ज्या त्या पेढीच्या गांवीं शक्य तों काम चालतें. हिशेब पाहून पटवून दिले जातात. पुनः तक्रार करण्यास मुदत असते. नंतर सोसायटीकडे हुकूमनामा येतो. परिस्थिति पाहून तो हुकूमनामा तसाच कांहीं दिवस ठेवतां येतो. हें सर्व करूनहि कुळानें पैसे भागवले नाहींत तरच रेव्हेन्यू अधिकाऱ्यांकडे तो पाठविला जातो. लोकनियुक्त आमदारांनीं सहकारी चळवळींत ज्यास्त लक्ष घातलें पाहिजे, हें 'कनवाळू'चें विधान मात्र पटण्याजोगें आहे. 'सहकारी शैक्षणिक योजना' नुकतीच तयार झाली आहे. तिचा फायदा सहकारासंबंधीं प्रचार होण्यास होईल, ह्यांत संशय नाहीं.

## शेतकऱ्यांच्या कर्जांची तडजोड करणारीं बोर्डें

### मुंबई सरकारचें नवें बिल

आमच्या इलाख्यांत शेतकऱ्यांचीं कर्जें कमी होण्याबाबत कायदेशीर तजवीज करण्याचें प्रांतिक सरकारनें ठरविलें असून त्यासंबंधानें एक कायद्याचा मसुदा तयार केला आहे. त्याचें स्वरूप स्थूलमानानें खालीं वर्णिलें आहे. शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्याचे तीन मुख्य मार्ग आहेत:—( १ ) सावकार व कर्जदार ह्यांनीं आपआपसांत खुषीनें तडजोड करणें, ( २ ) ही तडजोड सक्तीनें होण्याची कायद्यानें तजवीज करणें व ( ३ ) बिलांतील योजनेस अनुसरून कन्सीलिएशन बोर्डातर्फे तडजोड करणें. ह्यांपैकीं तिसऱ्या मार्गानें सरकार 'तडजोड बोर्डां'ची नेमणूक करील व तीं शेतकरी आणि सावकार ह्यांचेमध्यें तडजोड घडवून आणतील. सावकारांवर बोर्डाचा निकाल बंधनकारक होणार नाहीं, परंतु तो मान्य करणारांस इतरांचे मानानें वसुलीचे वेळीं अग्रहक्क मिळणार असल्यानें बोर्डांच्या तडजोडीस मान्यता मिळेल, अशी अपेक्षा आहे. ऋणको शेतकऱ्यानें तडजोडीमधील कराराप्रमाणें फेड केली नाहीं, तर जमीन साऱ्याप्रमाणें पैशाची वसुली केली जाईल. सावकारांस व कुळांस आपल्यातर्फे वकील देतां येणार नाहीं, तथापि दुसऱ्यास उभें करतां येईल. बोर्डांचे निकालावर अपील नाहीं, परंतु बोर्ड स्वतः आपल्या निकालाचा फेरविचार करूं शकेल.

## जपानची व्यापारी हुशारी

पोस्टामार्फत आपल्या मालाचे नमुने पाठवून जपानमधील व्यापारी इतरांस आपल्या मालाचा परिचय करून देतात. नमुन्याबरोबरच किंमत व वहातुकीचा खर्च ह्यांबद्दल सविस्तर माहिती पुरविण्याची त्यांची पद्धत अनुकरणीय आहे. मालाचा नमुना पॅकबंद करून त्यावर एक नोटिसवजा कागद लावण्यांत येतो व त्यावर खालीलप्रमाणें मजकूर असतो:—"हें सँपल पोस्टानें पाठविलेलें आहे, ह्या कारणानें त्यास पडणारी किंमत खऱ्या किंमतीच्या मानानें अधिक आहे. सोबतच्या लेबलावरून मालास खरोखर काय किंमत पडेल, हें समजेल."

लेबलांत खालीलप्रमाणें कोष्टकवार माहिती असते:—

| नमुना |
|---|
| नं. |
| किंमत ( येनमध्यें ) |
| माल उतरल्यावरची अमेरिकन नाण्यांत किंमत ( डॉलरमध्यें ) |
| जकात......डॉलर, व शतमानानें % |
| इतर खर्च |
| हुंडणावळ......डॉलरास .....येनप्रमाणें |
| ......दिवसांत माल पोंचता केला जाईल |
| खोक्यांतील माल......डझन......घन फूट......पौंड |
| पॅकिंग—एका खोक्यांत......जिनसा |

---

## मुंबईमधील टॅक्सीचा दर उतरत नाहीं

मुंबईमधील टॅक्सीचा दरमैली आकार चार आणे करावा, ही टॅक्सीवाल्यांची मागणी कमिशनर ऑफ पोलिसनें अमान्य करून सहा आणे हाच आकार कायम केला आहे.

चार आणे दरानें टॅक्सीची एका वर्षांत १८,००० मैल चाल होऊन त्यांपैकीं १२,००० मैलांबद्दल भाडें मिळेल त्याचे ३,००० रुपये व टॅक्सी थांबवून ठेवल्याबद्दल ६०० रुपये ह्याप्रमाणें ३,६०० रुपये उत्पन्न होऊन त्यांतून २,८१७ रुपये खर्च वजा जातां वर्षअखेर ७८३ रुपये नफा उरेल असें टॅक्सीवाल्यांचें म्हणणें होतें. ह्या आंकड्यांपैकीं उत्पन्नाचे आंकडे फुगलेले आहेत व गाडी १८,००० मैल चालली तर ती ८ वर्षे टिकणें शक्य नाहीं आणि घसाऱ्याची तरतूद पुरेशी केलेली नाहीं, असें कमिशनर ऑफ पोलिसनें उत्तर दिलें.

---

## इटलीविरुद्ध बहिष्कार यशस्वी होत आहे

इटलीनें राष्ट्रसंघास धाब्यावर बसवून ॲबिसिनियाविरुद्ध युद्ध चालू ठेवलें, म्हणून राष्ट्रसंघाच्या राष्ट्र-सभासदांनीं इटलीवर आर्थिक व व्यापारी बहिष्कार पुकारला. तो विशेष कडक नसला तरी त्यामुळें इटलीचा परराष्ट्रीय व्यापार निम्म्यानें कमी झाला आहे. इतर राष्ट्रांचे मानानें इंग्लडनें सर्वांत ज्यास्त स्वार्थत्याग केल्याचें आंकड्यांवरून दिसतें. दिवसानुदिवस इटलीची आयात व निर्गत कमी कमी होत आहे.

---

प्रो. काळे ह्यांचें नवीन पुस्तक

**रिझर्व्ह बँक**

हिंदुस्थानांत राष्ट्रीय मध्यवर्ती बँक ह्या नात्यानें रिझर्व्ह बँकेची स्थापना होऊन त्या संस्थेचें काम चालू झालें आहे रिझर्व्ह बँकेची घटना, तिच्या कार्याचा व्याप, तिचा इतर बँकांशीं संबंध इत्यादि विषयांची सांगोपांग माहिती ह्या पुस्तकांत दिली असून रिझर्व्ह बँकेच्या कायद्याच्या निरनिराळ्या कलमांची छाननी केलेली आहे. अवघड विषयाचा सुलभ बोध व्हावा म्हणून पुस्तक-कर्त्यानें बँकिंगच्या धंद्यांतले आधुनिक प्रकारचे व्यवहार, त्यांची उपपत्ति व त्यांचें कार्य ह्यांची अत्यंत सोप्या मराठी भाषेंत चर्चा केली आहे आणि देशी व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें कोणत्या योजना अंमलांत आणल्या पाहिजेत ह्या संबंधानें व्यावहारिक सूचना केल्या आहेत. रिझर्व्ह बँक ही, राष्ट्रीय आर्थिक प्रगतीस परिपोषक होईल काय ? ह्या प्रश्नास प्रस्तुत पुस्तकांत उत्तर मिळण्यासारखें आहे.

**पृष्ठें १?०–किंमत १ रुपया** ( ट. हं. वेगळें )

पुस्तक मिळण्याचीं ठिकाणें:—

( १ ) व्यवस्थापक, "अर्थ" ग्रन्थमाला, पुणें ४.

( २ ) आर्यभूषण प्रेस, पुणें २.

( ३ ) दि को-ऑपरेटर्स बुकडेपो, ९, बेकहौस लेन, फोर्ट, मुंबई.

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी

टेलरिंग फर्म

मॅनेजर:-व्ही. पी. पाटसकर, D.M.T.C.A. (London.)

**पाटसकर आणि कंपनी**

कटर (शिलाईमास्तर) अ. भट

४८ निहाल पेठ, पुणें शहर.

सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी

आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

**श्री माणकेश एजन्सी**

शहापूर लुगडीं, जरीचीं व टोपपदरी, अंगास रंग न लागणारीं मिळतात.

तसेंच, इरकल, खंबायत वगैरे पेठेचा गॅरंटीड माल मिळतो.

मंडई रस्ता, शनीचा पार, पुणें.

**'अर्था'चे किरकोळ अंक**

खालील ठिकाणीं मिळतात.

पुणें १ आर्यभूषण छापखाना कचेरी.
२ एन. ए. अँड फ्रेंड्स, अप्पा बळवंत चौक.

कोल्हापूर रा. शं. गोखले, रामकृष्ण कार्यालय.

सोलापूर व्ही. के. भागवत, हनुमान कार्यालय.

## फळें व त्यांचे पदार्थ टिकविण्याकरितां मुंबईमध्यें 'कॅनरी' काढण्याची योजना

लेखकः—एस. एस. भट, एम्. एजी., शेतकी कॉलेज, पुणें.
भाषांतरकारः—के. जी. कोल्हटकर, बी. एजी.

( मागील अंकावरून चालू )

**(१४) मुंबईस कारखाना काढण्यांत येणाऱ्या अडचणी**

( १ ) इतर ठिकाणाहून मुंबईस फळें आणण्याच्या वाहतुकीचा खर्च फारच जबर होईल.

( २ ) कारखाना उघडण्यास मुंबईस जागेची फार अडचण होईल व जागेचा खर्च अवाढव्य होईल.

( ३ ) मजुरीचा खर्च जास्त होईल.

वरील मुद्यांपैकीं पहिला मुद्दा फारसा महत्त्वाचा नाहीं. कारण मुंबईशिवाय इतर ठिकाणीं कारखाना उघडल्यास डबे, बाटल्या, पॅकिंगचीं यंत्रें वगैरे नेण्याआणण्यास जितका खर्च पडेल तितका खर्च इतर ठिकाणांहून फळें आणण्यास लागणार नाहीं. शिवाय, एकाच जातीचीं बहुतेक सर्व फळें या कारखान्यांत खपविलीं जातील.

दुसरा मुद्दा कारखान्याच्या जागेचा. मुंबईस जागा फारच महाग पडेल परंतु वर सांगितलेले अनेक फायदे लक्षांत घेतां एवढा खर्च करणें खात्रीनें परवडेल.

मजुरीची बाब लक्षांत घेतां विजेच्या सहाय्यानें कारखाना सुरू केल्यास ह्याहि अडचणीचें निराकरण होईल व त्यांतून अशा कारखान्यांत काम करण्यास जे तज्ञ लोक लागतात ते कोठेंहि गेले तरी त्यांस सारखीच मजुरी द्यावी लागेल.

**( १५ ) या धंद्यास लागणारें भांडवल व उत्पन्न यांचा अंदाज.**

या धंद्यास भांडवल किती घालावें लागेल हें कारखान्याच्या व्याप्यावर अवलंबून राहील. त्याचप्रमाणें काढावयाचा माल व विक्रीचा अंदाज हा सुद्धां भांडवल उभें करतांना लक्षांत घेतला पाहिजे. धंदा पूर्ण ऊर्जितावस्थेंत आणावयाचा असेल, तर भांडवल फार मोठें पाहिजे. भांडवल जरूरीपेक्षां कमी असणें हें फार धोक्याचें असतें. थोडेसें भांडवल घालून अगदी लहान प्रमाणांत धंदे करणाऱ्या लोकांचें पुष्कळ वेळां नुकसान होतें.

आधीं उल्लेख केल्याप्रमाणें कमीत कमी मोठ्या प्रमाणावर माल काढून त्याची किफायतशीर रितीनें विक्री करणें हें तत्त्व कोणताही कारखाना सुरू करण्यापूर्वी लक्षांत ठेविलें पाहिजे. मोठ्या प्रमाणांवर कमीत कमी माल काढणें म्हणजे एकाच विशिष्ट प्रकारच्या मालाचे डबे अगर बाटल्या निदान २५,००० तरी असावयास पाहिजेत. अशा कारखान्यास जर सुरवात करावयाची व त्यांत आंबा, पेरू व कागदी लिंबू या तीन फळांचे पदार्थ बनवावयाचे तर प्रत्येकीं २५,००० बाटल्या अगर डबे मिळून एकंदर दरवर्षी ७५,००० नग माल कारखान्यांतून मिळाला पाहिजे. याकरितां लागणारी यंत्रसामुग्री त्याच्या सहापट माल निघेल, एवढी मोठी असली पाहिजे. हेतू हाच कीं, बाजारच्या मागणीप्रमाणें माल तात्कडतोब पुरविणें कारखानदारांस शक्य झालें पाहिजे. याप्रमाणें एकंदर अंदाज केला असतां सरासरीनें यंत्रसामुग्रीस २५,००० रुपये लागतील व ५०,००० रुपये चालू खर्चास लागतील. या सर्व भांडवलावर शेकडा १० ते २० टक्के निव्वळ नफा झाल्याशिवाय राहणार नाहीं.

( १६ ) समारोपः—फळें व भाज्या कॅनिंग करून डब्यांतून अगर बाटल्यांतून सांठवून ठेवण्याच्या धंद्याला अलीकडे बरेंच उत्तेजन मिळत आहे. याचें कारण काय असावें याचा आपण जर विचार केला तर आपणांस असें दिसून येईल कीं, हल्ली धान्याच्या किंमती फारच उतरल्या आहेत व त्यामुळें जरूर तो पैसा शेतकऱ्यांस मिळत नाहीं. त्याप्रमाणें पुष्कळ महत्त्वाकांक्षी लोक फळ-बागांकडे हल्ली जास्त लक्ष देत असल्यानें त्याच्या क्षेत्राची वाढहि पुष्कळच झाली आहे. पुष्कळ लोक ह्या धंद्यांत पडले, आहेत व अनेकांनीं याविषयीं अभ्यास व चौकशी चालविली आहे. या धंदेवाल्यांची प्रगति जरी मंदपावली असली तरी एक गोष्ट निर्विवाद आहे कीं, व्यवस्थित रीतीनें हा धंदा केल्यास यश येण्यास कांहींच हरकत नाहीं. लहान प्रमाणांत हा धंदा करणारे जरी आपणांस बुडालेले दिसतात तरी मोठ्या प्रमाणावर दक्षतेनें, मूलतत्त्वें लक्षांत घेऊन व सुधारलेल्या पद्धतीनें हा धंदा चालविल्यास यशश्री तुमचीच आहे.

या धंद्याच्या वाढीस पुष्कळच वाव आहे. कच्चा माल या देशांत केव्हांहि विपुल मिळतो व त्यांतून निरनिराळे हंगाम, तऱ्हतऱ्हेच्या वस्तूंचें उत्पादन व स्वस्त मजूरी या त्रयीनें ह्या धंद्याची प्रगति होण्यास कांहींच हरकत नाहीं. डब्यांतील टिकवून ठेविलेल्या पदार्थांस या देशांत भरपूर मागणी आहे पण परदेशी मालानेंच बाजार जवळ जवळ भरलेले आहेत.

या सर्वांचा निष्कर्ष हाच कीं, हा धंदा यशस्वी होण्यास बरेचसें खेळतें भांडवल, सुधारलेली यंत्रसामुग्री, तज्ञ देखरेख व उत्तम प्रकारचा माल निर्माण करणें या गोष्टींची आवश्यकता असते. मालाच्या खरेदी विक्रीची व्यवस्था सुद्धां अनुभवी माणसांनींच केली पाहिजे, तसेंच या संबंधाचे दोनही संकुचित असतां कामा नये.

जो माल आपण तयार करावयाचा तो पूर्ण शुद्ध, टिकाऊ व चवदार आहे अशी जनतेची पूर्ण खात्री झाली पाहिजे. अशी खात्री झाल्यावर कारखान्याचा व कारखानदारांचा लौकिक वाढून मालास चांगलाच भाव येईल. अशा प्रकारचा कारखाना मुंबईस असणें सर्व बाजूंनीं विचार केला असतां योग्य ठरेल.

---

### ट्रेझरी बिलें

गेल्या आठवड्यांत एकूण १ कोटि, १५ लक्ष रुपयांचीं ट्रेझरी बिलांबाबतचीं टेंडरें आलीं व त्यांपैकीं १ कोटि रुपयांचीं स्वीकारलीं गेलीं. व्याजाचा सरासरीचा दर द. सा. द. शे. १३ आणे पडला. चालू आठवड्यांत २ कोटि रुपयांचीं टेंडरें मागवण्यांत आलीं आहेत.

---

### विलायती हुंड्या

विलायती हुंड्यांबाबत ४७ लक्ष पौंडांचीं टेंडरें, गेल्या आठवड्यांत आलीं. त्यांतलीं सुमारें ¾ इतकीं १ रुपयास १ शिलिंग ६$\frac{1}{2}$ पेन्स ह्या दरानें स्वीकारण्यांत आलीं. चालू आठवड्यांत पुन्हां १० लक्ष पौंडांचीं टेंडरें मागवण्यांत आलीं आहेत.

---

### चढती चांदी व मंद सोनें

चांदीचा भाव गेल्या आठवड्यांत चढतीचा असून तो १०० तोळ्यांस ५१ रु. ८ आण्यांपर्यंत गेला. सोनें मात्र मंद होतें आणि त्याचा भाव दर तोळ्यास ३४ रु. १३ आणे असा होता.

## कंपनी कायद्यांत दुरुस्ती

हिंदुस्थानांत प्रचलित असलेलां कंपनी कायदा जुना पुराणा झाला असल्यानें त्यांत दुरुस्ती होणें आवश्यक झालें होतें. या कारणानें हिंदुस्थान सरकारनें त्यासंबंधांत चौकशीअंतीं एक बिल तयार करून तें असेंब्लींत मांडलें आहे. त्यांतील महत्त्वाच्या कलमांचा गोषवारा ता. १ एप्रिलच्या अंकांत आम्हीं दिलेला आहे.

हें बिल तपशीलवार छाननीकरितां असेंब्लीच्या सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्यांत यावें असें सुचवतांना सर नृपेंद्र सरकार ह्यांनीं सरकारची भूमिका विशद केली आणि तें बिलांत दाखल असलेल्या प्रत्येक कलमास चिकटून रहाणार नाहीं व योग्य त्या सूचना मान्य करील, असें सांगितलें. हिंदुस्थानांतील उद्योगधंदे अजून मागसलेल्या स्थितींत आहेत, तेव्हां कंपन्यांच्या भागीदारांचें हितसंरक्षण होणें जरूर असलें, तरी चालकांवर निष्कारण त्रासदायक बंधनें घालणें इष्ट होणार नाहीं, ह्या त्यांच्या विधानास कोणी हरकत घेईल, असें वाटत नाहीं. अपुऱ्या भांडवलावर उभारलेल्या कंपन्यांस ह्यापुढें कामकाज सुरू करण्यास जरूर असलेलें सर्टिफिकेट मिळणार नाहीं. त्यामुळें भरमसाटपणें काढल्या जाणाऱ्या कंपन्यांस आळा बसेल, अशी अपेक्षा आहे. कमींत कमी किती भांडवल जमलें म्हणजे कंपनी व्यवहार सुरू करील, हें कंपनीच्या उत्पादकांनीं आतां आपल्या मर्जीप्रमाणें ठरवावयाचें नसून कायद्यानें त्याची तजवीज केली जावयाची आहे. विक्रीस काढलेल्या भांडवलापैकीं निदान तिसरा हिस्सा भांडवल तरी खपलेलें असलें पाहिजे व त्यापैकीं चवथा हिस्सा तरी वसूल झालेलें पाहिजे, अशी कायद्यानें तरतूद केली जाणार आहे. कंपन्यांच्या रजिस्ट्रारला कित्येक जादा अधिकार देण्यांत येणार आहेत; त्यामुळें कंपन्यांच्या व्यवस्थेवर योग्य नियंत्रण राहील. हिंदुस्थानांतील भागीदार वर्ग जागृत नसल्यानें कंपनी डबघाईस येईपर्यंत तो तिच्याकडे लक्ष देत नाहीं. ताळेबंद दाखल करण्याची मुदत ठरवून दिल्यास भागीदारांचें लक्ष कंपनीकडे वरचेवर वेधलें जाईल. भागीदारांनीं निवडलेल्या प्रतिनिधींचें डायरेक्टर बोर्डांत मताधिक्य असावें, ह्याकरितां निदान दोन तृतीयांश डायरेक्टरांची निवड कंपनीच्या साधारण सभेंत व्हावी, अशी बिलांत तरतूद केलेली आहे. कित्येक वेळां कंपनीच्या आर्टिकल्स अन्वयें नवीन डायरेक्टर्स नेमण्याचा बोर्ड ऑफ डायरेक्टरांस अधिकार दिलेला असतो, तो वरील दुरुस्तीनें नियंत्रित होणार आहे. मॅनेजिंग एजन्सीविरुद्ध आज कित्येक दिवस तक्रारी ऐकू येत आहेत. त्या लक्ष्यांत घेऊन मॅनेजिंग एजंटांवर कित्येक बंधनें घालण्यांत आलीं आहेत.

श्री. भुलाभाई देसाई ह्यांनीं असेंब्लीमधील चर्चेच्या वेळीं मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतीचें समर्थन केलें व कंपन्यांचे नफ्यावर मॅनेजिंग एजंटाचे हितसंबंध अवलंबून असणें जरूर आहे, असें सांगितलें. डायरेक्टरांस कर्जें मिळण्याबाबत कडक प्रतिबंध, हिशेबतपासनिसांचें स्वातंत्र्य, इत्यादि बाबतींत त्यांनीं विधायक सूचना केल्या. प्रो. रंगा ह्यांनीं बिलावर प्रतिकूल टीका करून भांडवली पद्धतीच्या उद्योगधंद्यांचे संघटनास विरोध दर्शविला व मॅनेजिंग एजन्सी पद्धत बंद करून तें काम सरकारनें स्वतःकडे घ्यावें असें सुचविलें.


**धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०**

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**

**This year 1934-35**

**Exceeds**

**2 CRORES & 50 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca,

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## सहकारी चळवळ

### नाशिक जिल्ह्यांत सहकाराचा प्रचार

नाशिक जि. को. इन्स्टिट्यूटनें गेल्या २ वर्षांत शेतकऱ्यांमध्यें बरीच जागृति केली आहे. बागलाणमध्यें सटाणें, नागपूर, अजमीर, सौंदाणें, जोरण इ. ठिकाणीं मॅनेजिंग कमिटीचे क्लास भरविण्यांत आले. सदैर प्रसंगीं को. कायदा, पंचकमिटीची जबाबदारी, झालेल्या चुका व करावयाच्या दुरुस्त्या इ. मुद्यांवर प्रॉ. ऑफिसर श्री. एम. जी. शेटे ह्यांनीं अतिशय सोप्या भाषेंत व्याख्यानें देऊन जागृति केली. ते म्हणाले:—"शेतकऱ्यांना कागदपत्रांचा किंमतच वाटत नाहीं. वास्तविक कागदपत्र म्हणजेच सोसायटीचा जीव होय. पंचकमिट्या ठराविक मुदतींत काम असो वा नसो, भरविल्याच पाहिजेत. त्याप्रसंगीं पोटनियम व कायदे यांचें थोडेसें वाचन करण्याची संवय ठेवा. कारण हा सर्व व्यवहार कायदा व नियम यांच्या आधारावरच चालविला पाहिजे. पंचांनीं प्रामाणिकपणा, विश्वास व कार्याचें महत्त्व संपादन केलें पाहिजे. सोसायट्या या अनियमित जबाबदारीच्या असतात. त्यांपासून दरएक मेंबरावर केवढी जोखम आहे याची जाणीव ठेवा. तुम्हांला क्षणोक्षणीं ज्या अडचणी वाटतील त्या सुपरवायझिंग युनियन व बँक यांच्या सल्ल्यानें दूर करा. इ० " याच दौऱ्यांत चौंधाणें, खामखोण, निरपूर, इ. ठिकाणीं मॅजिक लँटर्न द्वारें त्यांनीं व्याख्यानें दिलीं. खेड्यांत लोक ज्ञानाकरितां फारच भुकेलेले दिसले. सटाणें ता. को. सु. युनियनचे अध्यक्ष श्री. धर्माजी नानाजी पाटील हेही ठिकठिकाणीं हजर असून त्यांनीं व्याख्यानें दिलीं.

---

### हैद्राबाद संस्थानामध्यें सहकारी चळवळीची प्रगति

जुलै १९३४ अखेरचा, हैद्राबाद संस्थानांतील सहकारी खात्याचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे; त्यावरून खालील माहिती मिळते.

गेल्या वर्षांतील प्रगति

| जुलै अखेर | नव्या सोसायट्या | एकूण सोसायट्या | खेळतें भांडवल | सभासद | सोसायट्यांचें स्वतःचें भांडवल |
|---|---|---|---|---|---|
| १९३३ | १३४ | २,५५४ | २·३१ कोटि | ७६००० | ८३ |
| १९३४ | २१९ | २,७३९ | २·३९ कोटि | ८३००० | ९० |

सहकारी खात्याचे नियंत्रणाखालीं एकूण ३९ मध्यवर्ती बँका, २,२७२ क्रेडिट सोसायट्या, ४०० बिगर शेतकी सोसायट्या व ब्रिटिश हद्दीमधील २६ सोसायट्या होत्या.

---

### सर्वांगीण ग्रामसुधारणेची आवश्यकता

"हिंदुस्थानांत ग्रामसुधारणा करतांना सर्व बाजूंनीं प्रयत्न झाले पाहिजेत; एक एक प्रश्न स्वतंत्रपणें घेण्यांत कांहीं हंशील नाहीं. सामाजिक जीवन, शिक्षण, शेती—सुधराई, आरोग्य, हे सर्व प्रश्न एकदमच सोडवले पाहिजेत. हिंदी शेतकरी हा मनुष्यप्राणी असून त्याच्या गरजाहि मानवी दर्जाच्या आहेत, त्या भागविल्या पाहिजेत." मि. सी. एफ. स्ट्रिकलंड, सी. आय. ई., ह्यांच्या इंग्लंडमधील भाषणांतील एक उतारा.

---


वेस्टर्न इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी—सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५

१९३५ मधील नवें काम ५१,५१,८९२ रु.
एकूण चालू काम २,५०,१५,०८२ रु.
एकूण जिंदगी ६१,६९,१६९ रु.
लाइफ फंड ५०,९९,४३९ रु.

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२
अधिकृत भांडवल : : : १०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल : ५,००,०००

दर शेअरची किं. : रु. ५०

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री व त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

## सॉलिसिटरच्या अशिलांचें खातें आणि बँकेची जबाबदारी

एका इंग्लिश सॉलिसिटरचीं बँकेंत दोन खातीं होतीं. एक स्वतःचें वैयक्तिक व दुसरें त्याच्या अशिलांचें. दोन्ही खात्यांवर सॉलिसिटर आणि त्याचा हिशेबनीस ह्यांच्या सह्यांनीं व्यवहार होत असे. सॉलिसिटरच्या बायकोनें घटस्फोटाचा खटला जिंकला व १५० पौंडांचा कोर्टखर्च त्याच्यावर बसला. ह्या रकमेच्या मर्यादेपर्यंत खर्चासाठीं सॉलिसिटरचीं खातीं जप्त करण्याचा कोर्टानें हुकूम दिला. सॉलिसिटरच्या एका अशिलाचें दुसऱ्यास देणें होतें, त्याबाबतची रकम सॉलिसिटरच्या अशिलांच्या खात्यांत भरली गेली आणि ती तिऱ्हाइत इसमास बावी म्हणून सॉलिसिटरनें तेवढा चेक काढला. कोर्टाचा हुकूम लक्षांत घेतां ह्या ४८ पौंडांच्या चेकचे पैसे आपणांस देतां येत नाहींत असें म्हणून बँकेनें तो काढणाराकडे परत पाठवला ( रिफर टु दि ड्रॉवर ). सॉलिसिटरनें बँकेवर फिर्याद केली. तिचा निकाल देतांना न्यायाधिशांनीं बँक ही तिच्या गिऱ्हाइकांच्या ठेवींच्या बाबतींत ऋणको असल्यानें कोर्टाच्या हुकुमास अनुसरून चेकचे पैसे देण्याचें तिनें नाकारलें हें योग्य केलें असा अभिप्राय व्यक्त केला. सॉलिसिटरच्या अशिलाच्या खात्यास आपला हुकूम लागू नये असें कोर्टास म्हणतां येऊन अशिलांच्या पैशाचें रक्षण होऊं शकेल. परंतु प्रस्तुत प्रकरणांत तसा स्पष्ट हुकूम दिलेला नसल्यानें बँकेचें करणें कायदेशीर होतें असें न्यायाधिशांनीं ठरवलें. ह्या निकालावर अपील होऊन सॉलिसिटर्सच्या अशिलांच्या पैशाची सुरक्षितता आणि बँकांच्या जबाबदारीचें स्पष्टीकरण ह्या प्रश्नांची चर्चा होऊन समाधानकारक व्यवस्था घडून येईल तर तें इष्ट आहे असें मत व्यक्त करण्यांत येत आहे. नाहीं तर अशिलांचें खातें निराळें राहूनहि त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं आणि बँकांसहि आपल्या कर्तव्याच्या व जबाबदारीच्या मर्यादा स्पष्ट कळणार नाहींत, अशी परिस्थिति निर्माण झाली आहे.

---

### वाईटांतून चांगलें निघालें

तीन वर्षांपूर्वी १९३३ मध्यें हेर हिटलरनें जर्मनींमधील कित्येक विश्वविद्यालयांतील शिक्षकांना बडतर्फ करून त्यांस बेकार केल्याची हकीकत सर्वांस माहीत आहेच. ह्या पंडितांस त्यांचे आणीबाणीचे प्रसंगीं आश्रय देण्याचे हेतूनें इंग्लंडमध्यें अकॅडेमिक असिस्टन्स कौन्सिल ह्या नांवाची संस्था निर्माण करण्यांत आली. तिनें प्रथमतः निराश्रित झालेल्या जर्मन शिक्षकांची संपूर्ण यादी तयार केली व वेगवेगळ्या देशांत त्यांस किती व कसा वाव मिळणें शक्य आहे, ह्याची माहिती जमा केली. मान्यता पावलेल्या हुषार शास्त्रज्ञांस आपलें संशोधन चालू ठेवतां यावें, ह्याकरितां फंड जमविण्यांत आला, त्याची रकम सुमारें सहा लक्ष रुपये भरली. त्यांतून, ब्रिटिश विश्वविद्यालयांत पाहुणे म्हणून बोलावण्यांत आलेल्या जर्मन पंडितांस तनखा देण्यांत आला. जर्मन विश्वविद्यालयांतील एकूण शिक्षकांपैकीं एक षष्ठांश म्हणजे सुमारें १,३०० शिक्षक कामावरून निघाले, त्यांपैकीं ७०० जणांनीं देशांतर केलें. ह्या ७०० पैकीं ३६३ शिक्षकांची कायम स्वरूपाची तरतूद करण्यांत आली असून ३२४ शिक्षकांस अद्याप हंगामी तनखा चालू आहे. अकॅडेमिक असिस्टन्स कौन्सिलचें काम कायम स्वरूपाच्या मजबूत पायावर चालू रहावें व कामाचा विस्तार होऊन संशोधनास उत्तेजन मिळावें, ह्या दृष्टीनें एक नवी सोसायटी स्थापन होणार आहे, ती असिस्टन्स कौन्सिलचें काम पुढें चालवून त्यास व्यापक स्वरूप देईल.

---

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—८ |
| १% करमाफ लोन ( १९४५-५५ ) .... | १२०—३ |
| १% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८-१२ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११८—३ |
| ४% १९६०-७० ... ... | ११३-११ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९८—४ |
| ३½% १९४७-५० ... ... | १०६-१५ |
| ४% १९४३ ... ... ... | ११०-११ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०८—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०६—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०७—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रुव्हमेंट ट्रस्ट बाँड (७० वर्षे मुदत) | १०७—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—८ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२९—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०५—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३२—६ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५३२—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १००—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ८८९—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५७—३ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२३-१२ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १४९०—० |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि. ७½%) | १५२१—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८आ.) | १७०—४ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १४८—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५२३-१२ |

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.


Photographic Dealers

POONA.

तुम्हांस हवें, त्याच धर्तीचें

किर्लोस्कर पोलादी फर्निचर

पलंग, खुर्च्या, टेबल, बांक, कोच, शेल्फ, कपाट, स्टुलें, पाळणे इ. इ.



हेंच एक फर्निचर होय.

डौलदार, मजबूत, आटोपशीर.

सविस्तर माहिती मागवा.

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड, किर्लोस्करवाडी.

पहिल्यानें सुरक्षितता

रस्त्यावरून जातांना तुम्ही सुरक्षिततेचा मार्ग पहिल्यानें पहातां. हीच गोष्ट पैसे बँकेंत किंवा विम्यांत गुंतविण्यासंबंधीं आहे. पहिल्यानें तुम्ही पैशाची सुरक्षितता पहातां; नंतर व्याज किंवा बोनस..

हिशेब तपासणी आणि प्रतिनिधित्व सरकारी खात्याकडे असल्यानें

दि बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लि.

मध्यें आपले पैसे गुंतविण्यास कसलाच धोका नाहीं.

सविस्तर माहितीकरितां लिहा—

कुळकर्णी आणि कंपनी, चीफ ऑर्गनायझर्स } चुनीलाल डी. बरफीवाला, मॅनेजिंग डायरेक्टर.

९ बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.


## Notice to Contractors.

Sealed percentage tenders in Form B-1 for the following works will be received by the Undersigned on the dates noted against them upto 3 P. M. Other particulars regarding the contract etc. can be had at the Undersigned's Office during Office hours.

| | Estimated cost Rs. | Date of receiving tenders. |
|---|---|---|
| 1. Reconstructing Bridge No. 182 in mile 115/7 of Karwar Bellary Road. | 43,036 | 7th May 1936. |
| 2. Constructing a causeway over the Budgatti Nalla in mile 14 of Havanur Ekambi Road. | 25,038 | |
| 3. Reconstructing mile 274/5 to 275/4 of the Poona Bangalore Road with 2″ shelmacdam. | 12,328 | |

2. Acceptance of the tender rests with the undersigned and no reason will be given for acceptance or rejection of any tender.

Executive Engineer's Office, Dharwar, 7th April 1936. } P. K. SHINDE, Executive Engineer, Dharwar Dn.

## Notice to Contractors.

Sealed percentage tenders in form F-1 for the following works will be received by the undersigned on the 6th May 1936 upto 2 P. M. Other particulars regarding the contract etc., can be had at the undersigned's Office during Office hours.

| | Estimated cost. |
|---|---|
| 1. C. R. to Poona Bangalore Road miles 288 to 319 and Gadag Palla Road miles 29 to 50. | Rs. 14,416 |
| 2. C. R. to Poona Bangalore Road miles 320 to 353 and Havanur Ekambi Road miles 1 to 29/4. | Rs. 10,465 |
| 3. C. R. to Gadag Palla Road miles 51 to 67/3 and Havanur Ekambi Road miles 29/5 to 56/5. | Rs. 5,872 |

2. The acceptance of the tender rests with the undersigned and no reason will be given for the acceptance or rejection of any tender.

Excecutive Engineer's Office. Dharwar, 6th April 1936. } P. K. SHINDE, Executive Engineer, Dharwar Dn.

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली

पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—

**कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.**

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला } हयातीनंतर विम्यास
३७॥ रु. } दर हजारीं त्रैवार्षिक नफा } ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, ' अर्थ ' ग्रन्थमाला
पुणें ४.


**माधव सोमण ब्रदर्स**

आम्हीं स्वतः तयार केलेलीं लुगडीं व इतर पेठांचा माल गिऱ्हाइकांस खात्रीलायक विकतों.

हुजूरपागेसमोर, पुणें, २.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

**मासिक वीज खर्चांत बचत पाहिजे ना ?**
तर मग मुंबईत तयार झालेले
**बिजली दिवेच वापरा—**




स्थानिक व्यापाऱ्याकडे न मिळाल्यास खालील पत्त्यावर लिहाः—

बिजली प्रॉडक्ट्स ( इंडिया ) लिमिटेड
पो. बॉ. नं. ४५१६,
मुंबई नं. ८

**न. वि. वडनेरकर**
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

स्वदेशी
कापड म्हणजे काय ?

(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.

या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.

हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.

खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण

**स्वदेशी भांडार**
लक्ष्मीरोड, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. ९२४/१३ पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख २९ एप्रिल, १९३६. अंक १८


**WANTED.**

Influential and hard-working Agents At Ahmednagar, Dhulia, Kolhapur, Nasik and Poona for Sun Life Assurance Company of Canada on liberal terms. Apply :—
The Manager,
Sun Life Assurance Company of Canada,
Hornby Road, Fort BOMBAY.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

**मासिक वीज खर्चांत बचत पाहिजे ना ?**
**तर मग मुंबईंत तयार झालेले**
**बिजली दिवेच वापरा—**

स्थानिक व्यापाऱ्याकडे न मिळाल्यास खालील पत्त्यावर लिहा:—
बिजली प्रॉडक्ट्स (इंडिया) लिमिटेड
पो. बॉ. नं. ४५१६,
मुंबई नं. ८




**न. वि. वडनेरकर**
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

**स्वदेशी कापड म्हणजे काय !**
(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.
या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.
हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणी-पासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.
खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण
**स्वदेशी भांडार**
लक्ष्मीरोड, पुणें २.

# विविध माहिती

### शाईवाले स्टीफन्स यांची सव्वा कोटीची संपत्ति

स्टीफन्स नांवाच्या प्रसिद्ध ब्रिटिश शाईवाल्यांच्या घराण्यांतले मि. मायकेल स्टीफन्स दोन महिन्यांपूर्वी दिवंगत झाले. त्यांची मालमत्ता सव्वा कोटि रुपयांच्यावर आहे. ह्या गृहस्थांच्या आजोबांनीं शाईचा धंदा स्थापला व १९२५ सालीं त्याचें कंपनींत रूपांतर झालें.

### लष्करी खात्यावरील खर्च

आयर्लंडमधील लष्करी खात्यावर त्या देशाचे एकूण उत्पन्नाच्या ५ टक्क्यांइतका खर्च करण्यांत येतो. ग्रेट ब्रिटनमध्यें हें प्रमाण १८ टक्के इतकें पडतें. हिंदी लष्कराचा खर्च एकूण बजेटाचे जवळ जवळ ४० टक्क्यांवर रकम खाऊन जातो.

### ब्रिटिश सिनेमा व चित्रपट

ग्रेट ब्रिटनमधील सिनेमाचे धंद्यास उत्तेजन मिळावें, ह्याकरितां आठ वर्षांपूर्वी ब्रिटिश चित्रपटांना संरक्षण देण्यांत आलें होतें. ह्या संरक्षणाची मुदत १९३८ मध्यें संपते. संरक्षण देणाऱ्या कायद्यानें प्रत्येक सिनेमागृहानें कांहीं विशिष्ट प्रमाणांत ब्रिटिश चित्रपट दाखविलेच पाहिजेत, अशी सक्ति करण्यांत आलेली आहे. हें प्रमाण सध्या दर शंभरांत वीस, इतकें भारी आहे. ह्या सवलतीचा फायदा घेऊन काढलेले कित्येक चित्रपट टाकाऊ असतात व त्यामुळें ब्रिटिश धंद्याचें नांव दूषित होतें, अशी तक्रार ऐकूं येत आहे.

### कोचीन बंदर वरच्या वर्गांत चढलें

मुंबई, मद्रास, कलकत्ता, कराची इत्यादि बंदरें पहिल्या प्रतीचीं ( मेजर पोर्ट ) गणलीं जातात व बाकीचीं दुय्यम ( मायनर पोर्ट ) समजलीं जातात. कोचीनच्या बंदरास बढती मिळाली असून त्यास पहिल्या वर्गांत चढविण्यांत आलें आहे. ह्या बाबतींतलें जरूर तें बिल लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत मंजूर झालें असून तपशीलवार कायदा पुढें करण्याचा सरकारचा विचार आहे.

### मुंबई शहरांतील रस्ते

मुंबई कॉर्पोरेशनचे हद्दींत २२२ मैल लांबीचे रस्ते असून ते दुरुस्त राखण्यासाठी दरसाल एकूण ३० लक्ष रुपये, म्हणजे दर मैलास सरासरीनें १३,५०० रुपये खर्च येतो.

### रस्तेसुधराईसाठी १५ लक्ष रुपये

मुंबई सरकारनें मुंबई ते नाशिक व मुंबई ते पुणें ह्या रस्त्यांच्या सुधराई प्रीत्यर्थ अनुक्रमें ९,३४,००० व ५,३५,००० रुपये मंजूर केले आहेत.

### उपयुक्त सूचना करणारांस बक्षिसें

इंग्लंडमधील लंडन ॲन्ड नॉर्थ ईस्टर्न रेल्वेनें उपयुक्त सूचना करणारांस रोख बक्षिसें देण्याची योजना आखलेली आहे. ह्या योजनेनुसार रेल्वेनें आतांपर्यंत सुमारें नऊ हजार रुपये वाटले आहेत. सूचनांचा विचार करून बक्षिसें ठरवणाऱ्या कमिटीस कल्पना सुचविणारांचीं नांवें सांगण्यांत येत नाहींत व केवळ गुणावर बक्षिस देण्यांत येतें.

### लाइपझिग फेअरमध्यें हिंदुस्थान सरकार भाग घेणार नाहीं

जर्मनीमध्यें लाइपझिग येथें भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या प्रदर्शनांत व बाजारांत हिंदुस्थान सरकार भाग घेणार नाहीं, असें दुय्यम भारतमंत्र्यांनी पार्लमेंटांत सांगितलें.

### अमेरिकेंत परदेशीयांवर करवाढ

परदेशी कंपन्या व व्यक्ति ह्यांच्या अमेरिकेंत होणाऱ्या प्राप्तीवर भारी कर बसविण्याबद्दलचें बिल अमेरिकेच्या कायदेमंडळापुढें मांडण्यांत आलें आहे.

### कपाशीच्या क्षेत्रांत व पिकांत वाढ

सन १९३५-३६ सालाबद्दलचा हिंदी कपाशीच्या पिकासंबंधाचा सरकारी अंदाज प्रसिद्ध झाला आहे. २५ कोटि एकरांत कपास लावण्यांत येईल व त्यांतून ५७½ लक्ष गासड्या ( १ गासडी = ४०० पौंड ) कपास निघेल असा अंदाज आहे. म्हणजे, पिकाच्या क्षेत्रांत ५ टक्के व उत्पन्नांत १८ टक्के वाढ होईल, अशी अपेक्षा आहे.

### व्हाइसरॉयसाहेबांची शेतीच्या जनावरांविषयीं आस्था

हिंदुस्थानच्या नव्या व्हाइसरॉयसाहेबांनीं दोन उत्कृष्ट दर्जाचे वळू बैल विकत घेतले असून दिल्लीच्या आसपासचे प्रदेशांतील शेतकऱ्यांस त्यांचा उपयोग करून घेतां येईल, अशी योजना होणार आहे.

### हिंदी तागाच्या धंद्यासाठी मध्यवर्ती कमिटी

कपाशीच्या पिकाची व धंद्याची सुधारणा घडवून आणण्याची कामगिरी करण्यासाठी 'इंडिअन सेंट्रल कॉटन कमिटी' स्थापन झाली असून तिचें उपयुक्त कार्य चाललें आहे. त्याच धर्तीवर तागाच्या धंद्याच्या संबंधांत एक मध्यवर्ती कमिटी नेमण्याचें ठरलें असून तिची घटनाहि निश्चित झाली आहे..

### औद्योगिक शिक्षण देणारी मुसलमानांसाठी स्वतंत्र संस्था

मि. महमद हाजी साबू सिद्दिक ह्यांच्या देणगीमधून मुंबई येथें वरील संस्थेची स्थापना झाली असून तिचा उद्‌घाटन समारंभ गेल्या आठवड्यांत झाला. २२ लक्ष रुपयांच्या व्याजांतून संस्थेचा वार्षिक खर्च चालेल व एकूण २५० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची त्यांत सोय होईल.

### शांततेचा पुरस्कार करणारा चित्रपट दाखविण्यास बंदी ?

लीग ऑफ नेशन्स युनियननें युद्धाचे दुष्परिणाम व शांततेच्या मार्गानें भांडणें मिटविण्याचा सुपरिणाम दाखविणारी एक फिल्म तयार केली आहे. ग्रेटब्रिटनमधील सेन्सॉरनें ती नापास केली. चित्रपट तयार होतांना युद्धखात्यानें आपल्या सामुग्रीचा उपयोग करूं दिलेला नसल्यास लायसेन्स मिळेल, असें शेवटीं ठरलें. शांततेचा पुरस्कार करणाऱ्या बोलपटांमुळें रंगरूटाचे मार्गांत अडचणी उत्पन्न होतात, अशी युद्ध खात्याची तक्रार असावी व त्याचा परिणाम सेन्सार बोर्डावर होत असेल अशी शंका येण्यास त्यामुळें कारण उत्पन्न झालें आहे.

अनुक्रमणिका.


पृष्ठ

१ विविध माहिती ... २१२

२ सामाजिक जबाबदारीच्या विम्याच्या योजना २१३

३ 'क्रॉस' चेकचा रोखीनें वटाव ! ... ... २१४

४ यशस्वी धंदेवाल्याचा तरुणांस उपदेश ... २१४

५ स्फुट-विचार ... २१५
हिंदी सोन्याची निर्गत — सोन्याची निर्गत आणि लॉर्ड केट्टो—धोबीघाट हा कारखाना आहे ! —ट्रेझरी बिलांची साप्ताहिक विक्री—सार्वजनिक रस्ते वापरण्याचें शिक्षण—दक्षिण आफ्रिकेंत जकातीविषयींचें धोरण—रोखेबाजारांतील हालचाल

६ मंडळ्यांचीं प्रसिद्धीपत्रकें २१७

७ ग्रेटब्रिटनचें अंदाजपत्रक २१८

८ अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ ... ... २१९

९ सक्करचें धरण ... २१९

१० बेळगांव ता. डे. अॅ. असोसिएशन ... २१९

११ मुंबईच्या रोखेबाजाराचा हीरकोत्सव ... ... २२०

१२ निवडक बाजारभाव २२०



# अर्थ

बुधवार, ता. २९ एप्रिल, १९३६


## सामाजिक जबाबदारीच्या विम्याच्या योजना

एक काळ असा होता कीं, त्या वेळीं व्यक्तिस्वार्थ व स्पर्धा हे सामाजिक जीवनाचे आधारस्तंभ समजले जात असून धंदेवाले आणि अर्थशास्त्रवेत्ते ह्यांचें या बाबतींत एकमत होतें. परंतु गेल्या तीस–चाळीस वर्षांत ह्या मतांत अत्यंत महत्त्वाचा बदल झाला आहे. अनियंत्रित स्वार्थ आणि स्पर्धा हा अर्थशास्त्रीय सिद्धांतांचा पाया नाहीं; सामाजिक व राष्ट्रीय हिताच्या व्यापक विचारांनीं व्यक्तिस्वार्थ मर्यादित होतो आणि करावा लागतो; आणि असें होण्यांत समाजाचें व व्यक्तीचें अंतिम हितच आहे ही विचारसरणी अर्थशास्त्रीय ग्रंथांमध्यें प्रभावी झाली आहे. राज्यकर्ते आणि धंदेवाले ह्यांच्यावरहि वरील कल्पनांचा परिणाम होऊन समाजांतील असहाय, मागसलेल्या व शक्तिहीन वर्गांस समाजाच्यातर्फे सहाय देऊन सशक्त बनवण्याचें धोरण अमलांत आलें आहे. कर्जबाजारी लोकांचें सावकारांपासून संरक्षण; कामकरी वर्गाच्या हिताचे, कारखानदारांवर आवश्यक सुधारणा लादणारे कायदे; सक्तीच्या शिक्षणाचा प्रसार; जनतेच्या आरोग्याबाबतच्या घरें, रुग्णालयें इत्यादि संबंधांतल्या सोयी; असल्या अनेक मार्गांनीं समाजांतली आर्थिक विषमता दूर करण्याची व्यवस्था झाली आहे. ध्येयाकडे अतित्वरेनें धांव घेणाऱ्या समाजसत्तावाद्यांस ह्या सुधारणा "तुरुतदाण महापुण्य" स्वरूपाच्या आहेत, ह्या समजुतीमुळें त्या अमान्य वाटतात. असल्या अर्धवट योजनांनीं जनतेची दिशाभूल होऊन ध्येय गाठण्याच्या मार्गांत त्यांची अडचण भासते असा त्यांचा अभिप्राय आहे. तथापि, हळूहळू कां होईना, निश्चित प्रगति होत आहे असें दिसत असतां कोरड्या ध्येयवादाच्या खड्ड्यांत उडी घालण्याची सामान्य लोकांची तयारी नसते व प्रवृत्तिहि सहज होऊं शकत नाहीं. भांडवलशाहीनें समाजसत्तावाद्यांच्या फुग्यांतली हवा आर्थिक व सामाजिक सुधारणा घडवून आणून काढून टाकण्याचा प्रयत्न केला आहे, असें मानलें तरी विषमता व अन्याय दूर करण्याचे सामाजिक उपाय सामान्यतः इष्ट व ग्राह्य वाटणें स्वाभाविक आणि व्यवहारास धरूनच आहे.

आर्थिक दृष्ट्या बलहीन असलेल्या वर्गांच्या अडचणी नाहींशा करून त्यांचें जीवित सुखी करण्याच्या योजनांमध्यें त्यांस भोगाव्या लागणाऱ्या आपत्तींचें निवारण सामाजिक विम्याच्या पद्धतीनें करण्याच्या व्यवस्थेस महत्त्वाचें स्थान दिलें पाहिजे. वार्धक्य, आजारीपणा आणि बेकारी ह्या आपत्ती गोरगरीबांस अत्यंत जाचक होतात, आणि प्रसंग आला असतां किंवा अगोदर त्याविषयीं तरतूद करणें त्यांच्या अल्प कमाईच्या व मागासलेपणाच्या कारणानें शक्य होत नाहीं. अशा स्थितींत, पाश्चात्य देशांमध्यें सरकार, कामकरी व मालक त्यांच्या सहकारितेनें विम्याच्या योजना अमलांत आलेल्या आहेत. कामकरी व इतर गरीब लोकांच्या असहाय स्थितीची जबाबदारी केवळ त्यांच्या दुर्दैवावर किंवा कार्यहीनतेवर टाकली न जातां तीमध्यें धंदेवाले व सबंध समाज सहभागी आहे हें तत्त्व शास्त्रशुद्ध व व्यवहारशुद्ध आहे ह्याविषयीं आतां बहुतेक ऐकमत्य असल्यानें पातीच्या तत्त्वावर विम्याच्या योजना पुढारलेल्या देशांत अमलांत आल्या आहेत. वार्धक्य, आजारीपणा व बेकारी ह्यांसाठी विम्याची वर्गणी बसते तिचे तीन समसमान हिस्से करतात आणि कामकरी, मालक व सरकार हे तीन पक्ष आपल्या वांट्याचे पैसे भरतात, अशी ही योजना असते. शेतांत काम करणाऱ्या मजूरांसहि बेकारी विम्याची योजना लागू करण्याचें ग्रेटब्रिटनमध्यें घाटत आहे, ह्यावरून विम्याच्या द्वारें संपत्तिविहीन वर्गांच्या आर्थिक सुस्थितीची जबाबदारी, स्वावलंबन आणि सहकार ह्या तत्त्वांच्या पायावर सबंध समाजावर टाकण्याची प्रथा कशी विस्तार पावत आहे, ह्याची कल्पना येईल.

ह्या संबंधांत ग्रेटब्रिटनमध्यें सर वुइल्यम बीव्हरिज ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नेमलेल्या एका कमिटीच्या शिफारसींचा उल्लेख केला असतां तें उपयुक्त होईल. त्या देशांत हातांनीं काम करणाऱ्या मजुरांचें उत्पन्न कितीहि मोठें असलें तरी त्या सर्वांचा अंतर्भाव बेकारी विम्याच्या तेथील राष्ट्रीय योजनेंत होतो; परंतु पांढरपेशा (इंग्लंडमध्यें त्यांस "काळे डगलेवाले", "ब्लॅक कोटेड" असें म्हणतात) नोकरांस वार्षिक २५० पौंड कमाल मर्यादा लागू करण्यांत आली आहे. ह्या मर्यादेच्यावर ज्यांची मिळकत असेल, त्यांस विम्याच्या योजनेचा फायदा मिळत नाहीं. वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ४०० पौंड करावी अशी बीव्हरिज कमिटीची सूचना आहे आणि ती अमलांत आल्यास चार लक्ष पांढरपेशा नोकरांची बेकारी–विम्याची सोय होईल. हे चार लक्ष लोक, त्यांचे मालक व सरकार ह्यांपैकीं प्रत्येकाची वार्षिक विमा-वर्गणी एकूण एक कोटि रुपये होईल आणि अशा रीतीनें विमा-निधींत दरवर्षी तीन कोटि रुपये जमा होतील आणि त्यास मजबुती येईल. ह्या विषयांत खोल जाण्याचें येथें कारण नाहीं. पाश्चात्य देशांत बेकारीसारख्या आपत्तींपासून सामान्य स्थितींतल्या लोकांचें संरक्षण करण्याचे उपाय कसे अमलांत आणले जात आहेत आणि सध्याच्या मंदीच्या काळांतहि त्यांचा विस्तार कसा चालला आहे, हें दाखवण्याचाच प्रस्तुत उद्देश आहे.

हिंदुस्थानांत विमा व्यवसाय अजून बाल्यावस्थेंतच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं आणि कामकरी व नोकरवर्ग ह्यांच्या बाबतींत सामाजिक जबाबदारीच्या विम्याच्या योजनांचा तर

मागमूसच नाहीं. पेन्शन, प्रॉव्हिडंट फंड, ग्रँच्युएटी इत्यादि प्रकारची सोय सरकारी व निमसरकारी नोकरांच्या बाबतींत आहे. तथापि, असहाय, परोपजीवी आणि दरिद्री सामान्य जनतेचा विचार केल्यास त्यांच्या कुटुंबांची कांहींच सोय नाहीं असें आढळून येईल. ह्या देशांतहि अशा प्रकारचा उपक्रम करण्याची वेळ केव्हांच येऊन गेली आहे; आणि प्रयोगादाखल तरी निदान विम्याच्या विशेष योजना आखणें आवश्यक आहे. सामुदायिक जबाबदारीचें तत्त्व त्यांमध्यें अंतर्भूत झालें असल्यानें सरकारनें त्या कामास लागणारा पैसा कोठून आणावा हा प्रश्न प्रथमच उपस्थित होईल. अडचण खरी असली तरी तिला आज नाहीं उद्यां तोंड द्यावें लागणार आहे आणि ह्या दृष्टीनेंच त्याचा विचार होणें अगत्याचें आहे. शेतीच्या धंद्यांतील जनावरांचा विमा उतरण्याचें कार्य सहकारी संस्थांमार्फत करतां येतें ही गोष्ट थोड्याबहुत अनुभवाची आहे. निसर्गाच्या लहरींचे परिणाम शेतकऱ्यास जसे भोगावे लागतात तसे दुसऱ्या धंद्यांत क्वचितच लोकांस भोंवतात. ह्या संबंधांत शेतकऱ्याच्या आपत्तींचें निवारण व्हावें म्हणून विम्याची योजना आखणें शक्य आहे कीं नाहीं ह्याची चर्चा झाली पाहिजे. सारांश, सामाजिक जबाबदारीच्या तत्त्वावर आधारलेल्या विम्याच्या योजना हिंदुस्थानांत चालू करण्याचा प्रश्न सरकार आणि लोकप्रतिनिधि ह्यांनीं हातीं घेणें अगत्याचें आहे. श्रीमान व पुढारलेलीं पाश्चात्य राष्ट्रें आणि हिंदुस्थान ह्यांच्या परिस्थितींत महदंतर असलें तरी येथील लोकांच्या गरजा व अडचणी लक्षांत घेऊन बाहेरच्या अनुभवाचा उपयोग त्यांच्या हितासाठी शक्य तितका करणें अगत्याचें आहे.

## ‘ क्रॉस ’ चेकचा रोखीनें वटाव करतां येईल काय ?

### सरकारी तिजोरीची विशिष्ट परिस्थिति

कित्येक प्रसंगीं, अधिकारी ह्या नात्यानें मामलेदारांच्या नांवावर ‘ क्रॉस ’ चेक काढून लोक जमीन महसूल वगैरे भरतात. मामलेदारांचें, मामलेदार ह्या नात्यानें, बँकेंत खातें नसतें व त्या कारणानें, आलेला चेक बँकेंत जमा करणें अशक्य असतें. चेक क्रॉस केलेला असला, म्हणजे नियमाप्रमाणें तो फक्त खात्यांत जमा करतां येतो व त्याची रकम आदा करतां येते; त्याचे रोख पैसे मिळत नाहींत. ह्यामुळें, ‘ क्रॉस ’ चेकचे पैसे मामलेदाराचे हातीं येत नाहींत व तो चेक परत करावा लागतो. ह्या कारणानें गैरसोय होऊन चेक काढणाराचे प्रतिष्ठेस बाध येण्याचा संभव असतो व विनाकारण खर्च वाढून गैरसोय होते. सरकारी तिजोरीस ‘ बँक ’ असें समजून चेकचे पैसे तिला रोखीनें आदा करणें रास्त होईल काय ? असा येथें प्रश्न उद्‌भवतो.

वास्तविक पहातां, सरकारी ट्रेझरी ही “ बँक ” नाहीं व तिच्यावर काढण्यांत आलेल्या ‘ क्रॉस ’ चेकचे पैसे, एक बँक दुसऱ्यास आदा करील, त्याप्रमाणें आदा करतां येणार नाहींत. हा सरळ नियम झाला व ट्रेझरीवर काढण्यांत आलेला ‘ क्रॉस ’ चेक वटला नाहीं, तर त्याबद्दल बँकेस जबाबदार धरतां येणार नाहीं. तथापि, कोणत्याहि बँकेच्या मानानें सरकारची प्रतिष्ठा विशिष्ट दर्जाची असल्याकारणानें क्रॉस चेकची रकम आदा करण्यांत धोका वाटत नाहीं व कित्येक प्रसंगीं असल्या चेकचे पैसे रोखीनें दिले जातात, असा अनुभव आहे. हिशेब तपासनीसहि त्यावर आक्षेप घेत नाहींत, असें आढळतें. हा रिवाज नियमाविरुद्ध असला, तरी त्यामुळें बँकेच्या गिऱ्हाइकांची सोय होऊन त्यांत धोक्याची भीति नसते व त्यामुळेंच तिचे विरुद्ध तक्रार करण्याचें कारण पडत नाहीं. अर्थात्, तात्विक दृष्ट्या तो रिवाज सदोष समजला पाहिजे. ट्रेझरीवरील चेक रोखीनें वटवणें अगर न वटवणें हें प्रत्येक बँकेच्या मर्जीवर अवलंबून राहील व ते तसे वटविण्याबद्दल चेक काढणारास अगर तो दाखल करणारास बँकेस आग्रह करतां येणार नाहीं.

तथापि, बँकेनें हें सर्व टाळून आपल्या खातेदारांस ट्रेझरीवर क्रॉस चेक न काढण्याबद्दल सूचना देणें ज्यास्त सोईचें होईल असें वाटतें. खातेदारास ही विशिष्ट परिस्थिति समजावून सांगितल्यास, क्रॉस चेक न देणें आपल्याच हिताचें आहे, हें त्याच्या ध्यानांत येईल. क्रॉस चेक दिला गेल्यास त्याचा वटाव करणें बँकेच्या मर्जीवर अवलंबून राहील व धोरणी बँकर, आपल्या बँकेवर काढलेला चेक परत पाठविण्याऐवजीं त्याचे पैसे रोख देईल हें सरळ आहे. परंतु, अशी पाळीच येऊं न देणें ज्यास्त श्रेयस्कर ठरेल. ह्या संबंधांत आमचेकडे आलेल्या विचारणेस अनुलक्षून वरील खुलासा केलेला आहे. त्याविषयीं कोणास कांहीं नवीन मुद्दा मांडावयाचा असेल, तर त्यास ‘अर्थां’त अवश्य स्थान मिळेल.

## यशस्वी धंदेवाल्याचा तरुणांस उपदेश

हलक्या स्थितींतून श्रीमंतीच्या शिखरावर चढलेल्या एखाद्या धंदेवाल्यानें बेकारांस किंवा भिकार कामांत आपला गुजारा करणाऱ्या तरुणांस दीर्घोद्योग व चिकाटी ह्यांमध्यें यशाची गुरुकिल्ली आहे असा उपदेश केला असतां तो अर्थहीन व दुःखावर डागण्या देण्यापैकीं आत्मश्लाघेचा प्रकार आहे असें कित्येकांस वाटतें. तथापि, असल्या अनुभवमूलक उपदेशांत, आपल्या विशिष्ट परिस्थितींत उपयोगी पडण्यासारखा कांहींच तथ्यांश किंवा ग्राह्यांश नसतो असें कोणीहि मानणें चुकीचें आहे. दीर्घपरिश्रम व चिकाटी ह्यांच्या जोरावर आपलें नशीब काढलेला एक श्रीमान धंदेवाला म्हणतो:—

“ तीव्र स्पर्धा बोकाळली असली तरी गरीब कुटुंबांतील तरुणांस धंद्यांतल्या वरच्या जागा पटकावणें शक्य आहे. ह्या बाबतींत माझ्या लहानपणीं जे गुण अत्यावश्यक होते, ते आज मितीसहि तसेच अगत्याचे आहेत. कसून मेहनत करण्याची पात्रता, हातीं घ्यावयाच्या धंद्याबद्दल खडानखडा माहिती करून घेण्याविषयीं तळमळ आणि अजिंक्य उत्साह, हे ते गुण होत. ” तो पुढें म्हणतो:—

“ होईल तितकें कमी काम करण्याची प्रवृत्ति धंद्यांत यश प्राप्त होण्याचे मार्गांतली एक धोंड आहे. मी स्वतःचा नित्याचा उद्योग संभाळून सात वर्षें पर्यंत एका रात्रीच्या शाळेंत शिकण्यास जात असें आणि तेथें आपल्या धंद्याची तपशीलवार माहिती करून घेत असें. कित्येक वेळां रोजचें काम संपल्यावर मी पुन्हां कारखान्यांत जाऊन तेथें काम करणारांचें निरीक्षण करून त्यांचेकडून अधिक ज्ञान संपादन करीत असें. ”

# स्फुट विचार

## हिंदी सोन्याची निर्गत — ब्रिटिश बँकरचें मत

हिंदुस्थानांतून सोन्याचा प्रवाह सारखा बाहेर वहात आहे, त्यासंबंधानें येथील लोकमत व्यक्त झालें असतां त्यांत तथ्य नाहीं असें म्हणण्याची प्रवृत्ति सरकारी अधिकाऱ्यांमध्यें दिसून येते. हिंदी सोन्यास चांगला भाव येऊन त्याची बाहेरच्या देशांत विक्री होते, हें शेतकरीवर्गाच्या आणि एकंदर राष्ट्राच्या हिताचें आहे आणि हिंदुस्थानांतून सोन्याची निर्गत व्हावयास अजून किती तरी वाव आहे अशा आशयाचा अभिप्राय ते प्रकट करीत असतात. निर्गत होणारें सोनें जनतेच्या अनेक वर्षांच्या शिलकेंतलें भांडवल असून, चालू उत्पन्नावर लोकांचा वार्षिक गुजारा व्हावयास पाहिजे तसा तो आर्थिक मंदी व हलाखी ह्यांचे योगानें होत नसल्यानें त्यांस भांडवल विकून चरितार्थ चालवावा लागत आहे हें स्थूल मानानें हिंदी सोन्याच्या निर्गतीचें स्वरूप व रहस्य आहे. सरकारी अधिकाऱ्यांनीं ही वस्तुस्थिति नाकारण्यांत वास्तविक कांहीं हशील नाहीं. चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया अँड चायना ह्या संस्थेचे अध्यक्ष, सर वुइल्यम फूट मिचेल ह्यांनीं बँकेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं ह्या विषयास अनुलक्षून काढलेले उद्गार ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत. ते म्हणाले: "प्रस्तुत काळीं स्वावलंबी राष्ट्रांमध्यें हिंदुस्थानची गणना केली पाहिजे, कारण एकूण हिंदी उत्पन्नाचा दहावा-बारावा हिस्साच परदेशांत व्यापाराचे मार्गानें निर्गत होतो. हिंदुस्थानची आर्थिक घटना कृषिप्रधान असून कांहीं काळ ती अशीच रहाणें अपरिहार्य आहे. प्रचलित आर्थिक मंदीचा परिणाम हिंदी शेतकऱ्यांवर तात्काल झाला नसला तरी गेल्या चार वर्षांत त्यांची मिळकत सारखी घटत आली आहे. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं, जरूरीच्या जिनसा विकत घेण्यास त्यांस कर्ज काढावें लागलें आहे किंवा बचत केलेल्या सोन्याचांदीच्या स्वरूपांतल्या पैशास त्यांस मुकावें लागलें आहे."

## सोन्याची निर्गत आणि लॉर्ड केट्टो

चार्टर्ड बँकेचे अध्यक्ष, सर डब्ल्यू फूट मिचेल ह्यांनीं हिंदुस्थानांतून बाहेर जाणाऱ्या सोन्यासंबंधानें काढलेले उद्गार वर नमूद केले आहेत. सध्यां चाललेल्या सोन्याचा प्रवाहाविरुद्ध आक्षेप घेण्याचें कारण नसून तो आणखी कांहीं काळपर्यंत तसाच होत राहिला तरी हरकत नाहीं असा उलटच्या प्रकारचा अभिप्राय मर्कंटाइल बँक ऑफ इंडियाचे अध्यक्ष, लॉर्ड केट्टो, ह्यांनीं त्या बँकेच्या वार्षिक सभेंत व्यक्त केला. ते म्हणाले:— "हिंदुस्थान देश हळुहळु पण निश्चितपणें आर्थिक मंदींतून बाहेर पडत आहे. १९३५ सालीं हिंदी निर्गत व्यापार आयातीपेक्षां ७० कोटि रुपयांनीं ज्यास्त होता. नुसत्या मालाचा हिशेब केला असतां हा आकडा फक्त १५ कोटि असून बाकीचे ५५ कोटि निर्गत झालेल्या सोन्याबद्दलचे आहेत, हें खरें आहे. सोन्याची निर्गत हिशेबांत न घेतली जातांहि निर्गतीचा आकडा मोठा असणें हें इष्टच आहे. तथापि परराष्ट्रांतली देणीं भागविण्यासाठीं सोन्याची निर्गत करणें आवश्यक झाल्यास आणखी कित्येक वर्षें ही निर्गत चालू रहाण्यास अडचण पडूं नये असें मला वाटतें. ह्या योगानें हिंदुस्थानच्या आर्थिक हितास बाध येणार नाहीं. कारण, बाहेर जाणारें सोनें कांहीं झालें तरी लोकांच्या पडून राहिलेल्या संचयापैकीं असून त्याचा खरा उपयोग निर्गतीमुळे होत आहे. १९३१ पासून झालेली सुवर्ण निर्गत डोळ्यांत भरण्यासारखी आहे ह्यांत शंका नाहीं. तिची एकूण किंमत २६१ कोटि रुपये होते, पण येथें हें विसरतां कामा नये कीं १९१० सालापासून हिंदुस्थानांत ४ कोटि, ३० लक्ष औंस इतकें सोनें बाहेरून आलें असून आजच्या भावानें त्याची किंमत ४०० कोटि रुपये होईल; आणि १९१० च्या पूर्वी आयात झालेल्या सोन्याचा विचार केल्यास "हिंदुस्थानच्या संग्रहीं असलेल्या सोन्यापैकीं फारच थोडें बाहेर बाजारांत आलें आहे", हें कंट्रोलर ऑफ करन्सीच्या रिपोर्टांतील विधान सर्वांस पटण्यासारखें आहे."

## धोबीघाट हा "कारखाना" आहे!

कारखान्यांतील मजुरांच्या कामासंबंधानें कारखानदारांवर निरनिराळीं नियंत्रणें घालून कामकरी लोकांच्या हिताचें संरक्षण करण्याकरितां हिंदुस्थानांत एक स्वतंत्र कारखाना-कायदा आहे. त्याच्या दुरुस्तीचें एक लहानसें बिल लेजिस्लेटिव्ह असेंब्लीपुढें नुकतेंच येऊन मंजूर झालें. ज्या जागांमध्यें दहा किंवा दहापेक्षां अधिक माणसें कामावर आहेत अशांचा अंतर्भाव कारखाना ह्या संज्ञेच्या मर्यादेंत येऊन त्यांस कायद्याचीं नियंत्रणें (कामाचे तास, यंत्रांपासून कामकऱ्यांचें संरक्षण होण्याबाबत व्यवस्था इ.) लागू व्हावीं अशी सामान्य योजना असून असे कारखाने कोणते आहेत हें निश्चित आणि जाहीर करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांस देण्यांत आलेला आहे. असेंब्लीनें मंजूर केलेल्या दुरुस्तीचा उद्देश, कारखान्यांच्या इमारतींच्या बाहेरहि काम करणाऱ्या मजुरांस जरूर तेथें कायदा लागू करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांस देणें, हा आहे. ह्यासंबंधानें भाषण करतांना सर फ्रँक नॉइस ह्यांनीं, धोबीघाटांचा अंतर्भाव कारखान्यांत व्हावा असा सरकारचा नवीन दुरुस्ती सुचवण्यांत मुख्यत्वेंकरून उद्देश असल्याचें सांगितलें. आसामांतला चहाचा व तांदूळ सडण्याचा धंदा ह्यांची वरील दुरुस्तीनें निष्कारण गैरसोय होईल अशी असेंब्लींतल्या एका सभासदानें तक्रार केली तर ज्यांमध्यें मजुरांच्या हिताबाबत कांहींच निर्बंध नाहींत अशा सर्व धंद्यांस कारखान्यांचा कायदा लागू करावा असें दुसऱ्यानें सुचवलें. ह्या प्रकारची तजवीज करण्याचा सरकारचा बेत आहे असें सर फ्रँक नॉइस ह्यांनीं आश्वासन दिलें. योजलेला कायदा घरगुती लहानसहान धंद्यास विघातक होणार नाहीं अशी व्यवस्था होणें अगत्याचें आहे ह्या आशयाची पुढें आलेली दुरुस्ती, तिची आवश्यकता नाहीं असें सरकारतर्फें सांगण्यांत आल्यावरून, नामंजूर झाली.

## ट्रेझरी बिलांची साप्ताहिक विक्री वाढली

गेले तीन महिने रिझर्व्ह बँकेच्या मार्फत हिंदुस्थान सरकार दर आठवड्यास एक कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकून तीन महिन्यांच्या मुदतीनें लोकांकडून तात्पुरतें कर्ज घेत असे. मुदत संपलेल्या ट्रेझरी बिलांचा पैसा दर आठवड्यास दोन कोटि ह्या रकमेनें एकीकडे परत देण्यांत येत होता आणि नवीन कर्ज मात्र एक कोटि रुपयांचें घेण्यांत येत होतें. जानेवारी ते एप्रिल हे महिने सरकारी उत्पन्नाच्या विशेष जोरानें होणाऱ्या वसुलीचे असल्यानें ट्रेझरी बिलांच्या मार्गानें घ्यावयाच्या कर्जाची रकम हिंदुस्थान सरकारनें हळुहळु मर्यादित करण्याचें धोरण अंगिकारलें होतें.

त्याचा परिणाम असा झाला कीं, सरकारचें ट्रेझरी बिलांचें कर्ज गेल्या जानेवारीच्या प्रारंभीं २५ कोटि रुपये होतें, त्याची रकम चालू महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत ९ कोटींवर उतरली. आपला फाजील पैसा अल्प मुदतीनें गुंतवण्यास बँकांस ट्रेझरी बिलांचें साधन फार सोयीचें होत असतें, परंतु सरकारनें ह्या बिलांबाबतचा आपला व्यवहार संपुष्टांत आणल्या कारणानें ही सवड नाहींशी होऊन पैशाचा बाजारांतला पुरवठा वाढला आणि व्याजाचा दर उतरला. ही कुंचबणा दूर करण्यासाठी आणि स्वतःच्या उत्पन्नाच्या दृष्टीनें मंदी असलेल्या एप्रिल पासूनच्या पुढच्या महिन्यांत तिजोरींत पैशाचा भरपूर पुरवठा व्हावा म्हणून सरकारास दर आठवड्यास एक कोटीच्या ऐवजीं दोन कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकणें क्रमप्राप्त होतें. त्याप्रमाणें रिझर्व्ह बँकेमार्फत गेल्या आठवड्यांत दोन कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलांबाबत टेंडरें मागवण्यांत आलीं. एकंदर टेंडरें ४ कोटी, ९६ लक्ष रुपयांचीं होतीं व त्यांपैकीं २ कोटि रुपयांचीं स्वीकारण्यांत आलीं. व्याजाचा सरासरीचा दर द. सा.द . शे. १३ आणे २ पै इतका बसला. चालू आठवड्यांत पुन्हां २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विक्रीसाठी काढण्यांत येतील. ह्या धोरणाचा परिणाम पैशाच्या बाजारावर अनुकूल असाच होईल, ह्यांत संशय नाहीं.

### सार्वजनिक रस्ते वापरण्याचें शिक्षण

सार्वजनिक संस्थांनीं सार्वजनिक उपयोगाकरितां केलेल्या सुखसोयी लोकांनीं कशा अनुभवाव्या ह्याचें नागरिकांस योग्य शिक्षण मिळण्याची आवश्यकता दिवसानुदिवस ज्यास्त भासूं लागली आहे. कर देणारे नागरिक ह्या नात्यानें सार्वजनिक सुखसोयींचे आपण मालक असून त्यांचा आपल्या इच्छेप्रमाणें उपयोग करण्यास मोकळे आहों ह्या भावनेनें प्रत्येकजण वागूं लागल्यास काय अनवस्था प्रसंग येईल ह्याची थोड्यांसच कल्पना असते. आपल्या वागणुकीपासून इतरांची गैरसोय होणार नाहीं ह्या विचारानें प्रत्येक नागरिकानें स्वतःचें वर्तन ठेवलें नाहीं तर सर्वांसच त्रास होतो. वहातुकीच्या साधनांचें स्वरूप व त्यांची गर्दी शहरांमध्यें दिवसानुदिवस वाढत चालल्यानें त्यांतले रस्ते अरुंद व अपुरे वाटावयास लागले आहेत आणि अपघात व गैरसोय ह्यांची वाढ होत आहे. म्युनिसिपालिट्यांनीं रस्ते रुंद करून पादचारी नागरिकांसाठी बाजूच्या वाटा ( फुटपाथ ) ठेवणें जरूर आहे. परंतु वहानांतून व वहानांवरून जाणारे आणि पायानें जाणारे लोक ह्या सर्वांनींच परस्परांची सोय पाहिली पाहिजे. रस्ता अडवणें, रस्त्याच्या भलत्या बाजूनें जाणें, वहानें फाजील वेगानें हांकणें, जोरानें वळणें घेणें इत्यादि निष्काळजीपणाची व बेफिकीरीची वागणूक चांगल्या नागरिकाचें लक्षण नव्हे ही कल्पना जनतेच्या मनावर ठसली पाहिजे. ' पॅसेंजर्स अँड ट्रॅफिक रिलीफ असोसिएशन ' ह्या नांवाची एक संस्था मुंबईस आहे. तिचे अध्यक्ष, मि. कारंजिया, ह्यांनीं त्या संस्थेच्या वार्षिक भोजनाचे प्रसंगीं ह्या प्रश्नाचा उल्लेख केला. रस्त्यांच्या बाजूंवर दुकानदारी चाललेली बंद झाली पाहिजे, तिच्या योगानें रहदारीस अडथळा होतो असें त्यांनीं सांगितलें. त्याबरोबरच, रस्त्यानीं कसें चालावें ह्याचें शिक्षण सामान्य जनतेस मिळण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली. मोटारी हाकणारे व सायकलवाले ह्यांनीं आपली विशिष्ट प्रकारची जबाबदारी ओळखली पाहिजे आणि सार्वजनिक रस्ते वापरण्याचा आपणांप्रमाणेंच इतरांस पूर्ण हक्क आहे हें विसरतां कामा नये. तसेंच, पादचारी नागरिकांनीं सावधगिरीनें आणि दुसऱ्यांची सोय पाहून चाललें पाहिजे. या बाबतींत सर्वांचें परस्पर सहाय होणें अगत्याचें आहे, आणि तें बाहेरच्या नियंत्रणापेक्षां अंतस्फूर्तीनेंच विशेष झालें पाहिजे. पुण्यासारख्या शहरांत त्वरित वेगानें जाणाऱ्या वाहनांची संख्या झपाट्यानें वाढली आहे, आणि त्या मानानें रस्त्यांची रुंदी वाढलेली नाहीं, फूटपाथचीहि सोय नाहीं, आणि नागरिकांच्या वागणुकीच्या कल्पनांस योग्य वळण लागलेलें नाहीं. तरी ह्या विषयाकडे जनतेचें लक्ष्य जितकें ज्यास्त आकर्षतां येईल तितकें तें इष्ट आहे.

### दक्षिण आफ्रिकेंतील जकातीविषयींचें धोरण

आयात व निर्गत व्यापारावरील संरक्षक जकातींबाबतच्या धोरणाचा विचार करण्यासाठी दक्षिण आफ्रिकेंत नेमलेल्या कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. संरक्षक जकातींची मर्यादा सामान्यतः २५ टक्के असावी आणि विशेष कारणाकरितांच तिचें उल्लंघन व्हावें असें कमिशनचें बहुमत आहे. परराष्ट्रीय मालाची स्पर्धा लक्षांत घेतां दक्षिण आफ्रिकेंतल्या उद्योगधंद्यांचा सर्व प्रकारचा उत्पादन खर्च कमी करण्यांत आला पाहिजे आणि याकरितां संरक्षित धंद्यांचें नुकसान होणार नाहीं अशा रीतीनें संरक्षक जकाती कमी करणें जरूर आहे. युरोपिअन कामकऱ्यांची मजुरी जबर आहे आणि संरक्षित धंद्यांमध्यें त्यांस परवडत नाहीं अशा दरानें मजुरी दिली जात आहे. ज्या कारखान्यांचा माल परदेशीं जातो, त्यांची परिस्थिति ह्यामुळें प्रतिकूल झाली आहे. कमिशनच्या बहुसंख्यांक सभासदांच्या मतें संरक्षित धंद्यांनीं खर्चांत काटकसर केली नाहीं तर त्यांस द्यावें लागणारें सहाय सारखें चालू ठेवावें लागेल. कमिशनच्या इतर सभासदांस वरील विचारसरणी मान्य नाहीं.

### रोखेबाजारांतील हालचाल

ब्रिटिश बजेट, युरोपांतली राजकीय परिस्थिति आणि राष्ट्रसंघाची ॲबिसीनिअन युद्धाबाबतची भूमिका ह्यांविषयीं येणाऱ्या बातम्यांचा परिणाम रोखेबाजारावर थोडासा प्रतिकूल होऊन साडेतीन टक्क्यांचे सरकारी कर्जरोख्यांचा भाव थोडासा घसरला. तथापि, युरोपांत फारशी गडबड होण्याची भीति नाहीं असें दिसून येतांच आणि मि. चेंबरलेन ह्यांच्या बजेटाचा आर्थिक परिस्थितीवर विशेष परिणाम होत नाहीं असा रंग दिसतांच तो पुन्हां सुधारला. चांदीच्या बाजारांत मात्र बरीच चलबिचल झाली. चांदीच्या भावानें ५० रु. ६ आणे आणि ५२ रु. ८ आणे ह्यांच्या दरम्यान हेलकावे खाल्ले. सोन्यास विशेष तेजी नसली तरी एकंदरीनें त्याच्या किंमतीची प्रवृत्ति चढीच्या बाजूस होती. तोळ्यास ३४ रु. १४ आणे हा भाव शेवटीं स्थिरावला.

### बक्षिसें व नजराणे देण्यासाठी घ्यावयाच्या वस्तु स्वदेशीच खरेदी करा

शिक्षण-संस्थांतून विद्यार्थ्यांना बक्षिसादाखल द्यावयाच्या वस्तु व समारंभांतून मंगल व शुभ प्रसंगीं द्यावयाचे नजराणे आतां देशी वस्तूंमधून निवडणें सोपें झालें आहे, कारण अनेक नवीन नवीन देशी वस्तू निघूं लागल्या आहेत. या बाबतींत कोणासहि उपयुक्त व मार्गदर्शक माहिती रे म्युझियम पुणें, ह्या संस्थेंतून मिळेल व आपल्या किंमतीच्या अंदाजांत बसवितां येतील अशा अगदीं अल्प किंमतीपासून ते भारी भारी किंमतीपर्यंत अनेक प्रकारच्या वस्तु संस्थेच्या संग्रहालयांत पहावयास मिळतील. बक्षिसासाठी किंवा नजराण्यासाठी योग्य अशा वस्तु म्युझियम संस्थेमार्फत मिळावयास कोणासहि अडचण पडणार नाहीं.

## मंडळ्यांचीं प्रसिद्धीपत्रकें ( प्रॉस्पेक्टस् )

### एक महत्त्वाचा निवाडा

संयुक्त भांडवलांच्या मंडळया प्रथम भांडवल जमवतांना किंवा भांडवल वाढवावयाचें असल्यास प्रसिद्धी-पत्रकें काढीत असतात, त्यांमध्यें जनतेची दिशाभूल न होणें आणि मंडळयांच्या परिस्थितीसंबंधानें जरूर ती सर्व माहिती जाहीर होणें अगत्याचें असतें. आपला पैसा एखाद्या मंडळीच्या भांडवलांत घालीत असतांना त्याची सुरक्षितता किंवा धोका निश्चित करतां यावा ह्यासाठी लोकांस तिच्याविषयींच्या महत्त्वाच्या सर्व बाबींविषयीं चालकांनीं पूर्ण ज्ञान करून दिलें पाहिजे. ह्या प्रकरणीं ग्रेटब्रिटनमध्यें बरेच दिवस गाजलेल्या एका खटल्यांत न्यायाधिशांनीं महत्त्वाचा निवाडा केला आहे, तिकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. मिन्याचा व्यापार करणाऱ्या एका मंडळीनें एका सट्ट्याची बातमी जनतेपासून झांकून ठेवून प्रसिद्धीपत्रक काढलें आणि त्यामुळें लोकांचा गैरसमज होऊन त्यांस मंडळीच्या सट्ट्याच्या व्यवहारांत बूड आली तेव्हां नुकसान लागलें. प्रसिद्धीपत्रक काढण्यापूर्वीं झालेल्या विशिष्ट करारांची माहिती मंडळीच्या चालकांनीं त्या पत्रकांत द्यावयास पाहिजे होती, ती दिली नाहीं हा प्रस्तुत खटल्यांत महत्त्वाचा मुद्दा निघाला होता. मिन्यांचा जागतिक पुरवठा आपल्या सत्तेखालीं आणून त्या मालाची किंमत चढवावयाची आणि त्यावर भरमसाट नफा मारावयाचा अशी चालकांची योजना होती आणि ती यशस्वी करण्यासाठी त्यांस जादा भांडवल हवें होतें. सट्ट्याची माहिती प्रसिद्ध झाली असती तर लोक सावध होऊन त्यांनीं आपला पैसा मंडळीस दिला नसता. ह्यामुळें चालकांची योजना फसली असती; तथापि जनतेचें नुकसान टळलें असतें. काढलेलें प्रसिद्धीपत्रक खोटें होतें कीं काय हा मुद्दा अपिलांत न्यायाधिशांपुढें होता आणि त्यांनीं त्याचा खोटेपणा सिद्ध झाला असल्याचें दर्शवून खालच्या कोर्टानें दिलेला शिक्षेचा निकाल कायम केला.

" खोटें " प्रसिद्धीपत्रक म्हणजे काय ? खऱ्या नाहींत अशा गोष्टी दाखल आहेत म्हणूनच नव्हे तर ज्या महत्त्वाच्या बाबी नमूद करणें आवश्यक असतांना त्या दाखल केल्या नाहींत म्हणूनहि पत्रक खोटें होऊं शकतें हा प्रस्तुत खटल्यांत न्यायमूर्तींनीं प्रस्थापित केलेला सिद्धांत अत्यंत महत्त्वाचा आहे. १९३२ सालीं प्रसिद्धी पावलेल्या कायलसेट खटल्यांतच ह्या प्रकारचा अभिप्राय कोर्टानें स्पष्ट दिला होता आणि त्याचाच पुनरुच्चार प्रस्तुत प्रकरणांत झालेला आहे. खोट्या प्रसिद्धीपत्रकाचा अपराध घडण्यास त्यांत खोटीं विधानें असलीं पाहिजेत असें नाहीं; तर मुद्याच्या बाबींची अप्रसिद्धी व त्यामुळें होणारी दिशाभूल हें अपराधाचें तितकेंच महत्त्वाचें लक्षण आहे असें न्यायाधिशांनीं चार वर्षांपूर्वीच असंदिग्धपणानें सांगितलें होतें. गैरसोयीच्या वाटणाऱ्या गोष्टींची माहिती दडवून ठेवणें हा अपराध आहे ह्याची जाणीव मंडळयांचे उत्पादक व चालक ह्यांनीं बाळगली पाहिजे, असा बोध प्रस्तुत खटल्याच्या निकालापासून सरळ निघतो. सव्वा कोटि रुपयांच्या वायद्याचा करार पूर्वीच झालेला होता, तो पासष्ट लाखांचें जादा भांडवल उभें करतांना मंडळीच्या चालकांनीं जनतेच्या नजरेस आणला नाहीं आणि ह्या योगानें लोकांची दिशाभूल झाली, ही विचारसरणी न्यायाधिशांच्या निकालांत निर्णायक झाली आहे, हें लक्षांत ठेवणें जरूर आहे.

इंग्लिश कंपनी-कायद्याखालीं प्रस्तुत निकाल दिलेला नाहीं, हें येथें नमूद केलें पाहिजे. मंडळयांच्या व्यवस्थापकांनीं फसवण्याच्या हेतूनें केलेल्या असत्य विधानांस लागू असलेला लार्सेनी ॲक्ट ह्या व्यापक स्वरूपाच्या कायद्याखालचा तो निर्णय आहे. महत्त्वाच्या सर्व करारांबाबत प्रसिद्धीपत्रकांत माहिती देण्यांत आली पाहिजे असें कंपनी कायदाहि म्हणतो आणि ह्या लेखाचा मुख्य विषय जो मिन्यांबाबतचा खटला, त्यांत अशी माहिती देण्यांत आली नव्हती ही गोष्ट सिद्ध होऊं शकली असती. तथापि, ह्या बाबीची आवश्यक असलेली स्पष्ट तरतूद कंपनीकायद्यांत नाहीं आणि ती होणें अगत्याचें आहे असें मत इंग्लंडमध्यें व्यक्त केलें जात आहे. मंडळीच्या वतीनें झालेल्या करारांच्या तारखा व त्यांच्याशीं संबंध असलेल्या व्यक्ती एवढ्यांचीच माहिती दिल्यानें लोकांचा कार्यभाग होणार नाहीं. तिला भांडवल देऊं पहाणाऱ्या जनतेस ह्यापेक्षां अधिक माहिती उपलब्ध होणें आवश्यक आहे. कंपनीकायद्यांत महत्वाच्या अनेक दुरुस्त्या होण्याची जरूरी इंग्लंडमध्यें भासत आहे आणि हिंदुस्थानांतल्या कायद्याची पुनर्रचना केली जात आहे अशा प्रसंगीं आजपर्यंत आलेले अनुभव आणि भासलेल्या अडचणी ह्यांचा नीट विचार होऊन नवीन कायदा बनवला गेला पाहिजे. भागीदारांस व एकंदर जनतेस संयुक्त भांडवलाच्या मंडळयांच्याबाबत सर्व महत्त्वाच्या गोष्टींची माहिती सहज उपलब्ध होईल अशी व्यवस्था होणें अगत्याचें आहे हा निष्कर्ष कंपनीकायद्याविषयींच्या चर्चेतून काढतां येईल. कायदा कितीहि तपशीलवार व कडक असला तरी त्यापासून जनतेचें पूर्ण संरक्षण होणें शक्य नाहीं, हें खरें असलें तरी कायद्याची तरतूद होईल तितकी व्यापक असावी ह्याविषयीं मतभेद असण्याचें कारण नाहीं. औद्योगिक व व्यापारी मंडळया सुरळीत चालण्यावर आर्थिक प्रगति अवलंबून आहे आणि ह्या दृष्टीनेंहि मंडळयांच्या कारभाराविषयींची मुद्याची माहिती लोकांस मिळणें आवश्यक आहे असें म्हणतां येईल.

---

### सेंट्रल बँकेचा लाहोरांत रौप्य-महोत्सव

लाहोरांत सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा रौप्य-महोत्सव गेल्या आठवड्यांत साजरा झाला. त्या प्रसंगीं पंजाबचे गव्हर्नर, सर हर्बर्ट इमर्सन, ह्यांनीं त्या संस्थेविषयीं गौरवपर उद्गार काढले. सर सोराबजी पोचखनवाला ह्यांनीं बँकेच्या स्थापनेपासून पंचवीस वर्षें तिची सेवा केली आहे तीबद्दल त्यांचा बहुमानपर्वक उल्लेख करून तिला प्राप्त झालेल्या यशास व्यवहाराचा चोखपणा आणि सावधगिरीचें धोरण हीं कारणीभूत झालीं असल्याचें गव्हर्नरांनीं सांगितलें. जनतेच्या सोयींकडे अधिकाधिक लक्ष द्यावयाचें पण दूरदर्शीपणा, कारभाराचा सरळपणा आणि विचारपूर्ण वर्तन इत्यादि गुणांस चिकटून रहावयाचें ह्या प्रकारची बँकेची प्रवृत्ति असून बँकिंगच्या धंद्यांत जुगारी व्यवहारास थारा द्यावयाचा नाहीं ह्या निश्चयामुळें सदरहू संस्थेची नांव घेण्यासारखी प्रगति झाली आहे असें ते म्हणाले. असल्या शहाणपणाच्या मार्गापासून बँकिंगच्या संस्था च्युत झाल्या असतां कोणत्या आपत्ति ओढवतात ह्याचा अनुभव पंजाबांतील लोकांस चांगला आला आहे, ह्या गोष्टीचाहि त्यांनीं उल्लेख केला.

## ग्रेटब्रिटनचें १९३६-३७ चें अंदाजपत्रक

गेल्या मार्च अखेर पूर्ण झालेल्या बारा महिन्यांत ग्रेटब्रिटनच्या बजेटांत ५ लक्ष पौंडांचा वाढावा अपेक्षित होता, तथापि वर्षअखेरच्या हिशेबांत तो २९½ लक्ष झालेला आढळून आला. इटली-ॲबिसिनिया युद्धामुळें नैमित्तिक स्वरूपाच्या खर्चांत वाढ होऊनहि इतकी शिल्लक राहिली, तेव्हां चालू सालीं नवे कर बसणार नाहींत अशी ब्रिटिश लोकांची कल्पना होती. गेल्या दोन वर्षांतलें उत्पन्न खर्चाचे आंकडे व त्यासंबंधांतील चालू सालचे अंदाज खालीं दिले आहेत.

वार्षिक बजेटांतील उत्पन्न-खर्चाचे आंकडे

(पौंड)

| | १९३३-३४ | १९३४-३५ | १९३५-३६ |
|---|---|---|---|
| | कोटि लक्ष | कोटि लक्ष | कोटि लक्ष |
| उत्पन्न | ७१ ६४ | ७५ २९ | ७७ ६० |
| खर्च | ७० ८८ | ७५ ०० | ७९ ७१ |
| वाढावा | — | — | — |
| (+) तूट (-) | +७६ | +२९ | -२ ११ |

यंदाचे सालीं खर्चांत जरी बरीच वाढ होणार असली, तरी उत्पन्नहि वाढणार आहे, हें वरील आंकड्यांवरून समजेल. तथापि युद्धविषयक खात्याचे खर्च बरेच वाढणार असल्यामुळें हल्लीच्या दरानें करांची वसुली झाल्यास बजेटांत दोन कोटींची तूट येईल असा अंदाज आहे. ती भरून काढण्यासाठी करांची आकारणी चुकविणारांवर कायदेशीर उपाययोजना कडक रीतीनें करण्यांत येणार आहे. युद्धोपयोगी खात्यांच्या खर्चाचा बोजा कांहीं अंशीं बजेटावर पडणार असला, तरी जरूरीप्रमाणें कर्ज उभारणें प्राप्त होईल. प्राप्तीवरील करांत वाढ करण्यांत येणार असून दर पौंड उत्पन्नामागें यापुढें ३ पेन्स अधिक कर आकारण्यांत येईल. चहाच्या आयातीवर सरसकट दर पौंड चहास २ पेन्स प्रमाणें जकात वाढविण्यांत आली आहे. तसेंच रस्त्यांसाठीं उभारलेल्या फंडांतून अर्धा कोटि पौंड चालू खर्चासाठी घेण्यांत येतील.

उत्पन्नाच्या ह्या जादा बाबींमुळें बजेटांत सालअखेर लहानसा वाढावा उरेल, अशी अपेक्षा आहे.

प्राप्तीवरील करांत व चहावरील जकातींत केलेली वाढ ब्रिटिश जनतेस रुचणार नाहीं, हें उघड आहे आणि मि. चेंबर्लेन ह्यांच्या बजेटाविषयीं लोकमत विशेष संतोषदर्शक नाहीं, असें आलेल्या बातम्यांवरून दिसतें. युद्धविषयक खर्चांत होणारी ५० टक्के रकमेची वाढ शुभसूचक कशी म्हणावी ? तथापि, ती ब्रिटिश प्रधानमंडळास अगत्याची वाटत आहे, ह्यावरून जागतिक राजकीय वातावरणाची कल्पना येते.

---

## अजस्र कंपनीचा अजस्र नफा

'इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज' ह्या अवाढव्य कंपनीचा व्याप फार मोठा आहे. तिचें जाळें अनेक ब्रिटिश धंद्यांवर आणि ग्रेटब्रिटनच्या बाहेर अनेक देशांत पसरलें आहे. गेल्या डिसेंबर-अखेर पुऱ्या झालेल्या वर्षांत ह्या कंपनीस सुमारें ११ कोटि रुपये नफा झाला ! घसाऱ्यासाठी व प्राप्तीवरील कराबाबत तजवीज करूनहि तिला ९ कोटि रुपये निवळ नफा उरला. सर्वसाधारण गंगाजळी व इतर फंड ह्यांमध्यें दीडकोटि रुपये टाकण्यांत आले आहेत.

धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०
कडून
हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक
नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी
चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें
त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS
This year 1934-35
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS

BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

HINDUSTHAN
Co-operative Insurance Society, Ltd.
( ESTD. 1907 )

Branches : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca,
Offices : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, General Manager.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ

### १९३५ सालांतील कामाचा अहवाल

हातानें कातलेल्या सुतापासून हातमागांवर तयार व्हावयाच्या कापडाचा धंदा उर्जितावस्थेस आणण्यासाठी सुमारें १२ वर्षांमागें "ऑल इंडिया स्पिनर्स असोसिएशन" स्थापन करण्यांत आली. तथापि त्या संस्थेचें श्रेय मर्यादित आहे आणि इतर उद्योगधंद्यांचीहि जोपासना करणें अवश्यक असून त्यासाठी संघटित प्रयत्नांची जरूरी आहे असें दिसून आल्यावरून स्पिनर्स असोसिएशनच्या कार्यास व्यापक स्वरूप देऊन खेडेगांवांतील उद्योगधंदे उर्जितावस्थेस आणण्याच्या उद्देशानें ऑक्टोबर १९३४ मध्यें मुंबई येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या ४८ व्या अधिवेशनाचे प्रसंगीं ग्रामोद्योग संघाची योजना मंजूर करण्यांत आली व १४ डिसेंबर १९३४ रोजीं वर्धा येथें "अखिल भारतीय ग्रामोद्योग संघा" ची स्थापना झाली. राजकारणापासून पूर्णपणें अलिप्त राहून ग्रामोद्धार, खेडेगांवीं उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन, शेतकऱ्यांची नैतिक आणि शारीरिक उन्नति इत्यादि कामें संघानें हातीं घ्यावीं असें ठरलें.

संघाचें काम व्यवस्थापक मंडळाच्या देखरेखीखाली चालतें. वर्षअखेर, संघाच्या पटावर ५६ प्रतिनिधि, ४३२ सभासद, ६ पगारदार प्रचारक, २८ शिफारस केलेलीं दुकानें व ६ जोडलेल्या संस्था होत्या. स्थानिक लोकांच्या मदतीनेंच शक्य तोंवर संघाचें काम चालतें; प्रतिनिधि आपआपल्या क्षेत्रांतून पैसे जमा करतात. संघानें मुख्यत: ( १ ) खेडेगांवांतील आरोग्य व स्वच्छता, (२) अन्न आणि ( ३ ) उद्योगधंदे ह्यांकडे लक्ष्य पुरवलें. ठिकठिकाणीं मुताऱ्यांची सोय, मनुष्याच्या विष्ठेपासून खत तयार करणें, गटारें बांधणें, खड्डे भरणें, मेलेल्या जनावरांचा फायदेशीर विनियोग करणें, वेगवेगळया तऱ्हेच्या अन्नाचें त्यांतील सत्त्वाचे दृष्टीनें पृथ:करण करून त्यासंबंधीं माहिती पुरवणें, शेतकऱ्यांच्या रोजच्या खाण्यांत येणाऱ्या पदार्थांत सुधारणा घडवून आणणें, भात कांडणें, गहूं दळणें, तेल गाळणें, गूळ तयार करणें, इत्यादि बाबतींत प्रयत्न करण्यांत आले व मृत उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन करण्याची खटपट करण्यांत आली.

संघाच्या प्रचारकांनीं वेळोवेळ संघाच्या कार्याबद्दल माहिती सांगणारीं व्याख्यानें दिलीं. स्वच्छता व अन्न ह्यांसंबंधीं तक्ते व नकाशे ठिकठिकाणच्या यात्रांचे व परिषदांचे वेळीं दाखविण्यांत आले. खेडेगांवांतील उद्योगधंद्यांचीं प्रदर्शनें भरविण्यांत आलीं. त्यांमध्यें लखनौ येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाच्या वेळचें सर्वांत मोठें होतें. संशोधनाचें कामहि चालू होतें. खेड्यांतील मालाच्या फायदेशीर उठाव करण्याची योजना तयार करण्यासाठी एक पोट-कमिटी नेमण्यांत आली. संघानें मान्यता दिलेल्या २८ दुकानांतून खेड्यांत तयार होणारा माल विक्रीस ठेवलेला होता. संघाच्या व्यवस्थेखाली माल तयार करणाऱ्या प्रत्येक कामगारास किमान वेतन मिळालें पाहिजे, व तें रोज आठ तास काम करणारास स्वत:च्या योगक्षेमास तरी पुरलें पाहिजे, असा संघाचा कटाक्ष आहे. सवड होतांच हें वेतन वाढविण्यांत येऊन, कुटुंबाच्या पोषणास पुरें पडेल, एवढी रक्कम कामगारांस मिळावी, असा प्रयत्न संघ करणार आहे.

अहवालाचे सालीं संघास देणग्यांचे रूपानें ३८ हजार रुपये व वर्गणीच्या रूपानें ९½ हजार रुपये मिळाले. संघानें मान्यता दिलेलीं अशीं महाराष्ट्रांत दोन दुकानें आहेत. त्यांपैकीं एक— ग्रामोद्योग भाण्डार—पुणें येथें असून दुसरें पूर्व खानदेशांत एरंडोल येथें आहे.

अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाचें कार्य चांगल्या तऱ्हेनें चाललें असल्याचें वरील अहवालावरून दिसून येईल. संघानें पहिल्याच वर्षीं केलेली प्रगति समाधानकारक असून, त्याचे हातून उत्तरोत्तर ज्यास्त भरीव कामगिरी पार पडेल अशी आशा आहे.

---

### सक्करचें धरण

सिंधू नदीच्या सक्कर जवळील धरणास २८ कोटि रुपये खर्च आला. ह्या रकमेवरील व्याज आणि नोकरवर्गाचा वार्षिक पगार व चालू खर्च मिळून दरसालचा १,८७,००,००० रुपयांचा खर्च आहे. सक्कर शहराजवळ तीन मैलांवर हें धरण बांधण्यांत आलें असून त्यांतून सात कालवे—चार उजव्या तीरावर व तीन डाव्या तीरावर—काढण्यांत आले आहेत. ७५ लक्ष एकर जमिनीस त्यामुळें पाणी मिळून दरसाल ६० लक्ष एकरांत पीक लावतां येईल. कालवे व त्यांच्या शाखा ह्यांची लांबी १,६०० मैल भरेल व पाटांची एकूण लांबी ३,७०० मैलांवर जाईल.

ह्या धरणाप्रीत्यर्थ येणारा वार्षिक खर्च भरून कसा निघणार, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. त्याबरोबरच, पाण्याच्या विपुल पुरवठ्यामुळें उपस्थित होणाऱ्या मलेरियासारख्या आपत्तींचाहि प्रश्न कमी महत्त्वाचा नाहीं.

---

### बेळगांव तालुका डे. अॅ. असोसिएशन लि.

वरील डेव्हलपमेंट अॅग्रिकल्चरल असोसिएशनचा १९३४–३५ सालाचा वार्षिक अहवाल आमचेकडे आला आहे. असोसिएशनचे पटावर एकूण १७८४ सभासद असून त्यांतील १७४२ व्यक्तिश: व ४२ सोसायट्या आहेत. असोसिएशनचा अहवाल विस्तृत व तपशीलवार आहे. बीं व खतें ह्यांची विक्री, प्रात्यक्षिकें, फळझाडांच्या लागवडीस मदत, प्रचार, गुरांच्या पैदाशींत सुधारणा, सभासदांच्या मालाची विक्री, सोसायट्यांस वेळोवेळ सल्ला व मदत, वसुलीस प्रोत्साहन इत्यादि मार्गांनीं जळगांव असोसिएशन उत्कृष्ट कार्य करीत असल्याचें अहवालावरून लक्षांत येतें. असोसिएशननें आतांपर्यंत आपला 'अ' वर्ग कायम राखलेला आहे. शेतकऱ्यांची सर्वांगीण उन्नति घडवून आणून त्यांचें हितसंरक्षण करण्याचें महत्त्वाचें काम असोसिएशन उत्साहानें करीत आहे. श्री. टी. बी. भोयटे हे वरील असोसिएशनचे अध्यक्ष आहेत.

---

### लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचें गेलें अधिवेशन

लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या गेल्या अधिवेशनांत एकूण २४५६ प्रश्न सभासदांनीं सरकारी अधिकाऱ्यांस विचारले. त्यांपैकीं १८४० तोंडी उत्तरांच्या व ६१६ लेखी उत्तरांच्या अपेक्षेनें विचारण्यांत आले. सभासदांच्या हजेरीच्या सरासरीचें प्रमाण दर बैठकीस १२० पडलें. हजेरीचा कमाल आंकडा १३८ होता आणि ओटावा कराराच्या चर्चेचे प्रसंगामुळें ही संख्या एवढी मोठी होती. हजेरीची किमान संख्या ८९ होती.

---

## मुंबईच्या रोखेबाजाराचा हीरकोत्सव

मुंबई स्टॉक एक्सचेंजचा हीरकोत्सव नुकताच साजरा झाला. त्यावेळीं, १९२३ सालापासून एक्सचेंजचे अध्यक्ष असलेले मि. श्रॉफ ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण करण्यांत आलें. सुरवातीस एक्सचेंजच्या उपाध्यक्षांनीं संस्थेचा इतिहास थोडक्यांत सांगितला, तो मनोरंजक आहे.

शेअर बाजाराची अधिकृत रीत्या स्थापना होण्यापूर्वी कित्येक वर्षें रोखे व भाग ह्यांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार चालू होते. १८४० मध्यें फक्त सहा दलाल होते. ही संख्या वीस वर्षांत साठ झाली. १८६३ ते ६५ च्या दरम्यानचे काळांत त्यांत वाढ होऊन त्यांचा आकडा अडीचशें झाला. सर्व व्यवहार खुल्या जागेंत होई व कित्येक प्रसंगीं बँका व दुकानदार त्यांस आपल्या पायऱ्यांवरून घालवून देत. ९ जुलै १८७५ रोजीं दलालांच्या संघटनेस मूर्त स्वरूप प्राप्त होऊन सध्याच्या संस्थेची स्थापना झाली. त्यावेळीं एक्सचेंजचे तीनशे समासद होते, आतां ४७२ आहेत. संस्थेचा फंडहि २५ लक्ष रुपयांहून मोठा झाला आहे. सुरवातीस सभासदत्त्वाची फी १५ रुपये होती, ती आतां सुमारें २० हजार रुपये आहे. मध्यंतरीं १९२० मध्यें त्याचीच किंमत ४८ हजार रुपये झाली होती.

## सोलापूर स्पिनिंग अँड वीव्हींग कंपनी

सोलापूर इलेक्ट्रिक सप्लाय वर्क्स सोलापूर स्पिनिंग अँड वीव्हिंग कंपनीच्या मालकीचें असून तें दुसऱ्या एका मंडळीस ६ लक्ष ७० हजार रुपयांस विकावें, त्यांत कंपनीचें हित आहे, अशी सूचना गिरणीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनीं डिबेंचर धारण करणारांपुढें मांडली असतां ती नामंजूर झाली. डिबेंचर्स होल्डर्सच्या ट्रस्टींनीं ह्या सूचनेला मान्यता देऊन त्याप्रमाणें करार-मदार करण्यास सुरवात केली होती. विक्रीच्या रकमेचा विनियोग गिरणीसाठी नवी यंत्रसामुग्री आणण्याकडे करण्याचा डायरेक्टर बोर्डाचा विचार होता. स्पर्धेस तोंड देण्यासाठीं कार्यक्षम यंत्रांची जरूरी आहे, असें बोर्डाचें म्हणणें होतें. डिबेंचर धारण करणारांच्या व भागीदारांच्या मंजुरीवर ही विक्रीची योजना अवलंबून असल्यानें भागीदारांच्या सभेचें आतां कारण उरलेलें नाहीं. वीज पुरवठ्याचा धंदा फायदेशीर रीतीनें चालली असल्यानें तो गिरणीकंपनीनें विकूं नये आणि आपल्या स्वतःच्या ताब्यांत ठेवावा असें डिबेंचर्स धारण करणारांच्या सभेंत ठरलें आाण बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची विक्रीची योजना निष्फळ झाली.

## शेतकऱ्यांच्या कर्जाची तडजोड करणारीं बोर्डें

शेतकऱ्यांचीं कर्जें कमी होण्याबाबत कायदेशीर तजवीज करून त्यांच्या कर्जाची तडजोड करणारीं बोर्डें मुंबई इलाख्यांत स्थापन करणाऱ्या बिलाचा सारांश आम्हीं 'अर्थ'च्या ता. २२ एप्रिलच्या अंकांत दिलेला आहे. श्री. व्ही. एन. पाटील, मुंबई कायदेमंडळांत हें बिल मांडणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

## अहमदाबाद येथील सहकारी हौसिंग सोसायट्या

अहमदाबाद येथें घरें बांधण्यास मदत करणाऱ्या ४२ सहकारी सोसायट्या असून त्यांत ७५ लक्ष रुपये भांडवल गुंतलेलें आहे. हरिजनांसाठी तीन स्वतंत्र सोसायट्या आहेत.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% ( १९४०-४३ ) ... ... | १११—८ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०—२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८—१२ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११८—८ |
| ४% १९६०–७० ... ... | ११४—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९८—७ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०६—१५ |
| ४% १९४३ ... ... ... | ११०—११ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०८—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०६—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०७—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रुव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | १०७—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—८ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२८–१२ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०५—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३२—२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५३१—४ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १२९—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १००—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ८८६—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५३—७ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १४८०—० |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५०५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६९–१२ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १४७—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५१७—८ |

## Public Works Department.

**AHMEDNAGAR DIVISION.**

Sealed tenders in $F_2$ are invited for Section No. 1 of remodelling Pravara Left Bank Canal, estimated cost Rs. 49,275/-. Tenders accompanied by Treasury Chalan for payment of Rs. 500/- as earnest money in any Government Treasury and a Solvency certificate should be addressed to the Executive Engineer, Ahmednagar Division, Ahmednagar and delivered at his camp office (at Khandala on P. L. B. C.) by 6 P. M. on 30-4-1936. Tender forms together with conditions of contract will be available at the office of the undersigned on payment of Rs. 3/-which will not be refunded.

The Superintending Engineer, Deccan Irrigation Circle, Poona is not bound to accept the lowest or any tender or to assign any reason for the non-acceptance of the same.

Sd/- N. B. Gadre,

14-4-36 Executive Engineer, Ahmednagar Division.

## NOTICE TO CONTRACTORS

Sealed percentage tenders in Form F-1 for the following works will be received by the Undersigned on 13th May 1936 upto 2 P. M. Other particulars regarding the contract etc. can be had at the Undersigned's office during office hours :—

| | Estimated Cost. |
|---|---|
| 1. C. R. to the Poona Bangalore Road and Hubli Sholapur Road ... | Rs. 7476/- |
| 2. C. R. to Karwar Bellary Road section from Hubli to Gadag ... | Rs. 7266/- |
| 3. C. R. to Karwar Bellary Road section from Sangtikop to Hubli ... | Rs. 5679/- |
| 4. C. R. to Gadag Pala Road and Karwar Bellary road section from Gadag to Hosrur and C.R. to Road from Mile No. 8 of Gadag Pala to Hosrur Bungalow... | Rs. 3668/- |
| 5. C. R. to Kamta Hubli Road... | Rs. 2622/- |

2. The acceptance of the tender rests with the Undersigned and no reason will be given for the acceptance or rejection of any tender.

Ex. Engr's Office, Dharwar. 25th April 1936.

P. K. Shinde, Executive Engineer, Dharwar Division, Dharwar.

कोल सप्लाइंग फर्म

उत्तम दगडी कोळसा (बंगाल, सी.पी.)

आणि

कोक ह्यांचे व्यापारी

व

म्युनिसिपल, लोकलबोर्ड,

पी. डब्ल्यु. डी. (सरकारी) कॉन्ट्रॅक्टर्स

५११ बुधवार पेठ, पुणें शहर २.

तारेचा पत्ता:-व्यंकटेश. फोन नं. ४७१

K. K. & Co.

Photographic Dealers

POONA.

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

माधव सोमण ब्रदर्स

आम्हीं स्वतः तयार केलेलीं लुगडीं व इतर पेठांचा माल गिऱ्हाइकांस खात्रीलायक विकतों.

हुजूरपागेसमोर, पुणें, २.

WANTED

RESPECTABLE AND INFLUENCIAL AGENTS

FOR

VENUS ASSURANCE Co. Ltd., (Delhi)

Apply for Terms and Agency to the Superintendent.

VENUS ASSURANCE Co. Ltd., (Delhi)

Laxmi Road, Poona City.

"दुसरें मूल्यमापन जाहीर झालें"

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—

कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

"अर्थ" ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. (ट. ख. निराळा)

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला पुणें ४.

दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. — पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

आपणांस विहीर बोअर करावयाची आहे काय?

भिडे आणि सन्स्

स्वतः तयार केलेल्या मशीननें बोअर खणून देतात.

चौकशी कराः—

भिडे आणि सन्स

सांगली (S. M. C.) शनीचा पार, पुणें २

श्री माणकेश एजन्सी

शहापूर लुगडीं, जरीचीं व टोपपदरी, अंगास रंग न लागणारीं मिळतात.

तसेंच, इरकल, संवायत वगैरे पेठेचा गॅरंटीड माल मिळतो.

मंडई रस्ता, शनीचा पार, पुणें.

डॉन ऑफ इंडिया विमा कंपनी लिमिटेड, पुणें

पाहिजेत

दुप्पट रकमेची व नफ्याची 'डॉन'ची बँको इन्शुअरन्स इन्व्हेस्टमेंट पॉलिसी किंमत फक्त रुपये १०

मुंबई इलाख्यांत जिल्ह्याचे ठिकाणीं प्रसाराकरितां चीफ ऑर्गनाइझर्स पाहिजेत. मासिक पगार रु. १०० ते २५० लायकीप्रमाणें. जास्त चौकशी करा व माहिती मागवा.

जनरल मॅनेजर.

संजीवन हेअर टॉनिक

दारुणा (Dandrulf), केंस गळणें व टक्कल यांवर अनुभविक उपाय. केंसांची वाढ करण्यास उत्कृष्ट साधन. white oil पासून अलिप्त. बाटली किं. १ रु. पो. व पॅ. निराळें. पुण्यांत नू. म. विद्यालय भांडार, येथें मिळेल.

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग. कं. अमदाबाद.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख ६ मे, १९३६. अंक १९

पहिल्यानें सुरक्षितता

रस्त्यावरून जातांना तुम्ही सुरक्षिततेचा मार्ग पहिल्यानें पहातां. हीच गोष्ट पैसे बँकेंत किंवा विम्यांत गुंतविण्यासंबंधीं आहे. पहिल्यानें तुम्ही पैशाची सुरक्षितता पहातां; नंतर व्याज किंवा बोनस.
हिशेब तपासणी आणि प्रतिनिधित्व सरकारी खात्याकडे असल्यानें

दि बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लि.

मध्यें आपले पैसे गुंतविल्यास कसलाच धोका नाहीं.
सविस्तर माहितीकरितां लिहा—
कुळकर्णी आणि कंपनी चीफ ऑर्गनायझर्स
चुनीलाल डी. बरफीवाला मॅनेजिंग डायरेक्टर.
९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

माधव सोमण ब्रदर्स

आम्हीं स्वतः तयार केलेलीं लुगडीं व इतर पेठांचा माल खात्रीलायक गिऱ्हाइकांस विकतों.
हुजूरपागेसमोर, पुणें, २.

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

वेस्टर्न इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी-सातारा.
संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५

१९३५ मधील नवें काम ५१,५१,८९२ रु.
एकूण चालू काम २,५०,१५,०८२ रु.
एकूण जिंदगी ६१,६९,१६९ रु.
लाइफ फंड ५०,९९,४३९ रु.
एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

WANTED
RESPECTABLE AND INFLUENCIAL AGENTS
FOR
VENUS ASSURANCE Co. Ltd., (Delhi)
Apply for Terms and Agency to the Superintendent.
VENUS ASSURANCE Co. Ltd., ( Delhi )
Laxmi Road, Poona City.

# विविध माहिती

### ओरिएंटल विमाकंपनीची प्रगति

गेल्या वर्षअखेर ओरिएंटल विमा कंपनीनें ८ कोटि ९० लक्ष रुपयांचे ४८,८५८ विमे उतरविले, म्हणजे त्या पूर्वीच्या सालाचे मानानें १ कोटि २७ लक्ष रुपयांचें काम ज्यास्त झालें. ब्रिटिश साम्राज्यांत स्थापन झालेल्या कंपन्यांमध्यें ओरिएंटलचा १० वा नंबर लागतो.

### मार्केटिंग अधिकाऱ्यांचा विचारविनिमय

मध्यवर्ती सरकारचे व प्रांतिक सरकार व संस्थानें ह्यांचे मार्केटिंग अधिकारी ह्यांच्या संयुक्त अधिवेशनाची दुसरी बैठक ता. २७ एप्रिल रोजीं दिल्ली येथें झाली. अध्यक्ष,सर ब्राहस बर्ड, ह्यांनी आपल्या भाषणांत बैठकीचा उद्देश, गेल्या वर्षांतील अनुभवाचा आढावा काढणें व येत्या वर्षांतील कामाची रूपरेषा आंखणें, असा असल्याचें सांगितलें.

### इंडियन मर्चंट्स चेंबरच्या परीक्षा

इंडियन मर्चंट्स चेंबरच्या व्यापारी परीक्षांस गुरुवार ता. ७ मे रोजीं सुरवात होऊन त्या सोमवार ता. ११ मे पर्यंत चालतील. पुणें येथील परीक्षा फर्ग्युसन कॉलेजांत मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या देखरेखीखालीं होतील.

### महारोगावर उपचार

ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांमध्यें २० लक्ष महारोगग्रस्त लोक आहेत. इंग्लंडमधून त्या व्याधीची हकालपट्टी झाली असली तरी इतरत्र ती व्याधि जनतेंत वावरत आहे. ह्या रोगावर इलाज करण्याचें काम ब्रिटिश एंपायर लेप्रसी असोसिएशन ह्या संस्थेनें हातीं घेतलें असून हायड्नोकार्पस ह्या नांवाच्या तेलाचा तो बरा करण्यांत चांगला उपयोग होतो असा अनुभव आला आहे. ज्या झाडांपासून हें तेल निघतें त्याचें बीं महारोगग्रस्त देशांत पाठविण्यांत आलें आहे.

### खाणावळींतल्या नोकरांचे विचित्र पोषाक

कोपेनहेगनमधील खाणावळींचे मालक आपल्या नोकरांनीं सदैव ईक पोषाक वापरावे असा आग्रह धरीत असल्यानें आपणांस फार त्रास होतो,अशी तक्रार तेथील खाणावळीमधील नोकर करीत आहेत. कडक गळोती व खमीज हीं तर गैरसोयीचीं आहेतच. पण त्याच्याहि पुढें जाऊन नोकरांनीं नाटकांतल्या पात्रांसारखे पोषाक करावे असा हट्ट खाणावळीचे मालक धरीत असल्यानें ते लोक वैतागून गेले आहेत. आपल्या नोकरांनीं गाणीं म्हटलीं पाहिजेत असेंहि कित्येक मालक म्हणत आहेत !

### हिंदुस्थानांत रेडिओचा प्रसार

रेडिओ बाळगण्याचे परवाने असणारांची संख्या दिवसानुदिवस वाढत आहे. हिंदुस्थानांत असे २७ हजार लायसनदार असून त्यांचेकडून फीच्या रूपानें २ लक्ष ७० हजार रुपये दरवर्षी जमा होतात. मुंबई इलाख्यांत १०,५५२ लोकांचेजवळ रेडिओ आहे. बंगालचा नंबर दुसरा लागतो; त्या प्रांतांत मुंबईच्या दुप्पटीपेक्षां अधिक लोकसंख्या असतांहि फक्त ८,०३८ लोकांनीं रेडिओ घेतला आहे. बाकी सर्व प्रांत ह्या बाबतींत बरेच मागसलेले आहेत.

### पडसें

पडसें येणें सर्वांच्या परिचयाचें आहे, परंतु त्यावर रामबाण उपाय अजून सापडलेला नाहीं. ग्रेट ब्रिटनमधील आकडेशास्त्रज्ञांनीं असा अंदाज केला आहे, कीं पडशामुळें तेथील रहिवाशांचें दर माणशीं दर वर्षी ४० रुपये नुकसान होतें. वाया गेलेली वेळ, औषधें, डॉक्टरचीं बिलें, इत्यादि सर्वांची वरील हिशेबांत गणना केलेली आहे.

### पंधरा लक्ष टन गव्हाच्या साठवणीची सोय

परदेशांतून गहू आला असतां तो १५ लक्ष टनांपर्यंत साठवणींत ठेवण्याची ब्रिटिश बंदरांमध्यें सोय आहे. एवढा गहू ग्रेट ब्रिटनमधील लोकांस १० आठवडे पुरेल. गेल्या मार्चच्या १ तारखेस ब्रिटिश बंदरांतली गव्हाची साठवण फक्त २ लक्ष ४४ हजार टन एवढीच होती. युद्धाचा प्रसंग आल्यास त्यास तोंड देतां यावें म्हणून वरील साठवण वाढविण्यांत यावी अशी सूचना इंग्लंडमध्यें करण्यांत आली आहे.

### पहिल्या प्रतीचीं व दुय्यम दर्जाचीं बंदरें

कोचीन बंदर वरच्या वर्गांत चढल्याची माहिती 'अर्थां'च्या ता. २९ मेच्या अंकांत आम्हीं दिली आहे. पहिल्या प्रतीच्या बंदरांच्या व्यवस्थेबद्दल मध्यवर्ती सरकार जबाबदार असतें व कमी महत्त्वाचीं बंदरें प्रांतिक सरकारांच्या किंवा हिंदी संस्थानांच्या ताब्यांत असतात. आयात–निर्गत व्यापाराचा ९० हिस्से भाग पहिल्या प्रतीच्या बंदरांचे वांट्यास येतो व मुंबई आणि कलकत्ता हीं बंदरें त्यांतील मोठा अंश पटकवितात. मुंबई इलाख्यांतील सुरत व भडोच हीं दुय्यम दर्जाचीं बंदरें ऐतिहासिक महत्त्वाचीं आहेत. होनावर, कारवार, मालवण, रत्नागिरी व वेंगुर्ला हीं इतर बंदरें मुंबईस पूरक होत असत.

### कागदाचा कारखाना उभारण्यास म्हैसूर सरकारचें सहाय

भद्रावती (म्हैसूर) येथील लोखंडाचे कारखान्याजवळ एक कागदाचा कारखाना उभारण्यांत येणार आहे. त्यास लागणाऱ्या २१ लाखांच्या भांडवलाचा दहावा हिस्सा रकम म्हैसूर सरकार घालणार आहे व कारखान्यासाठी जागा मोफत देणार आहे. दरसाल १०,००० टन बांबू १२ रुपये टन ह्या दरानें पुरविण्याचें सरकारनें कबूल केलें आहे. दिवसासाठी व रात्रीचे वेळीं अनुक्रमें ६½ पै व ४ पै युनिट ह्या दरानें विजेचा पुरवठा करण्यांत येईल. कारखान्यास इतर अनेक बाबतींत सरकारची मदत होणार आहे. कारखान्याचे डायरेक्टर बोर्डावर सरकारतर्फे नऊ जण नेमण्यांत येणार असून त्यांपैकींच एकास बोर्डाचे अध्यक्ष करण्यांत येईल.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २५ मार्च रोजीं पुरा झालेला आठवडा | ५४,३३,८९१ |
| ता. २ एप्रिल रोजीं पुरा झालेला आठवडा | ७८,९२,८९७ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते २ एप्रिल १९३६ अखेर | २,६८,३८,०५,१२२ |

## अनुक्रमणिका.

पृष्ठ
१ विविध माहिती ... २२४
२ सर ओटो नीमायर ह्यांचा रिपोर्ट ... ... २२५
३ मुंबई बंदराचा परराष्ट्रीय व्यापार ... ... २२६
४ येलूर को. सु. यूनियन २२६
५ स्फुट विचार ... २२७
सुपरव्हिजन कमिटीच्या शिफारसींबाबत सरकारचा ठराव--नीमायर रिपोर्टा-संबंधीं लोकमत---पंडित नेहरूंच्या भाषणाची प्रति-क्रिया--चेल्जन चलनाचें स्थिर सुवर्णाधिष्ठान-सरकारच्या व्यापारी धोरणा-वर टीका--शेतीस विसरूं नका
६ सहकारी पतपेढ्यांच्या देखरेखीची व्यवस्था २२९
७ पूर्व खानदेश सहकारी लँड मॉर्गेज बँक ... २३१
८ प्राप्तीवरील कराच्या आकारणींत सुधारणा २३१
९ बँकांचें राष्ट्रीय कार्य २३१
१० टेलिफोनमुळें होणारी सोय ... ... २३२
११ निवडक बाजारभाव २३३

# अर्थ

बुधवार, ता. ६ मे, १९३६

## नीमायर रिपोर्ट—सरकारी उत्पन्नाची वांटणी

नवीन राज्यघटनेच्या अमदानीस प्रारंभ होतांना उत्पन्न-खर्चाच्या बाबतींत मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक सरकार ह्यांचे मध्यें वांटणी कशी व्हावी ह्यासंबंधानें शिफारशी करण्याकरितां सर ओटो नीमायर ह्यांची योजना झाली होती. त्यांनीं हिंदुस्थानभर हिंडून आणि जरूर त्या अधिकाऱ्यांशीं चर्चा करून माहिती गोळा केली आणि तिच्या आधारानें रिपोर्ट तयार केला. त्यांचा रिपोर्ट आतां प्रसिद्ध झाला असून त्यास अनुसरून ब्रिटिश पार्लमेंट आपलें धोरण आखील आणि त्यांतील शिफारशीं विषयींचा निर्णय जाहीर करील. सर ओटो ह्यांस तीन तंत्रें संभाळावयाचीं होतीं. ( १ ) नवीन निर्माण झालेल्या प्रांतांस मध्यवर्ती सरकाराच्या तिजोरींतून कांहीं उत्पन्न तोडून देऊन त्यांच्या बजेटांची तोंडमिळवणी होईल अशी व्यवस्था करणें, ( २ ) इतर प्रांतांमध्यें तुटींचीं बजेटें असतील किंवा खर्चाबाबत ओढघस्तपणाची स्थिति असेल तेथें त्यांच्या उत्पन्नांत वाढ होण्याची तरतूद करणें व ( ३ ) ह्याप्रमाणें प्रांताच्या सांपात्तिक स्थितीस मजबुती आणतांना मध्यवर्ती सरकारास आपल्या विशिष्ट जबाबदाऱ्या पार पाडतां येतील अशा प्रकारचें त्याचें उत्पन्न राहील ह्याविषयीं खबरदारी घेणें, हीं तीं तंत्रें होत. सिंध, ओरिसा आणि वायव्य सरहद्द प्रांत ह्यांचा संसार मध्यवर्ती तिजोरींतून मदत मिळाल्यावांचून चालणें अशक्य म्हणून नवीन राज्यघटनेच्या मामुली खर्चांत कांहीं कालपर्यंत त्या मदतीचा अंतर्भाव होणें अपरिहार्य आहे. नवीन राज्यघटना मुख्यत्वेंकरून प्रांतिक कारभारांत अमलांत यावयाची असल्याकारणानें त्यांच्या उत्पन्नाचा योग्य ठिकाणीं व योग्य प्रमाणांत वाढावा करणें आणि "शुभास्ते पंथानः संतु" असें म्हणतां येण्याजोगी त्यांच्या उत्पन्नाची घडी बसवणें हेंहि अगत्याचें आहे. उत्पन्नाची ही वांटणी चालली असतां प्रांतांप्रांतांमध्यें थोडीफार ओढाताण होऊन प्रत्येक प्रांत आपणास कांहीं जादा रकम मिळाली तर पहावी म्हणून खटपट करणार. उत्पन्न-खर्चाचे बाबतींत प्रांतांमध्यें विषमता आहे आणि ती अनेक कारणांमुळें पूर्व काळांतच निर्माण झालेली आहे. ती एकदम नाहींशी करणें अशक्य आहे, म्हणून विशेष मागसलेल्या प्रांतांस थोडीबहुत मदत देऊन त्यांची सांपत्तिक स्थिति सुधारणें एवढेंच कार्य व्यावहारिक मर्यादेंत बसतें. शेवटीं, ज्याच्या तिजोरीवर ह्या देणग्यांचा ताण पडणार त्या मध्यवर्ती सरकाराच्या उत्पन्न-खर्चाची तोंडमिळवणी समाधानकारक रीतीनें होणें हेंहि तितकेंच अगत्याचें आहे.

उत्पन्नाला अनेक वांटेकरी आणि आपणांस शक्य तितका ज्यास्त पैसा मिळावा अशी प्रत्येकाची इच्छा; नवीन राज्यघटना अमलांत आणण्याचें काम पुढें ढकलतां येत नसून तें त्वरित होण्याची निकड; त्यासाठी मध्यवर्ती सरकाराच्या उत्पन्नांतले हिस्से गरजू दिसणाऱ्या प्रांतांमध्यें वांटून देण्याची आवश्यकता; मध्यवर्ती सरकारावरच्या विशिष्ट जबाबदाऱ्या लक्षांत घेऊन जरूरी इतकें त्याचें उत्पन्न अबाधित राहील अशी व्यवस्था करण्याचें महत्त्व, इत्यादि अनेक प्रकारांच्या बाबींचा परस्पर भेळ घालण्याचें सर ओटो नीमायर ह्यांचें काम अत्यंत अवघड होतें ह्यांत शंका नाहीं. "गंडस्योपरि पिटिका संवृत्ता' ह्या न्यायानें वांटणीचा सध्याचा काल आर्थिक मंदीचा व अनिश्चितपणाचा असल्यामुळें पुढें परिस्थिति काय होईल ह्याचा अंदाज करणें व त्याप्रमाणें योजना आखणें विशेषच कठिण होऊन बसलें आहे. एवंगुण विशिष्ट पार्श्वभूमि ध्यानांत धरून सर ओटो ह्यांच्या शिफारसींचा विचार केला पाहिजे. खर्चाच्या बाबी अनेक व निकडीच्या आणि उत्पन्न मात्र मर्यादित अशी अगदी सामान्य स्थितींतल्या कुटुंबाच्या उत्पन्नाची व्यवस्था लावण्यासारखेंच काम त्यांस करावें लागलें आहे. हिंदुस्थान सरकारचा खर्च ह्यापुढें कमी होण्याची आशा त्यांस दिसत नाहीं. व्याजाचे दर उतरल्यामुळें थोडी बचत होईल, पण कर्जफेडीची तरतूद जरा सढळ हातानें करावी लागेल आणि म्हणून सामान्य स्थिति आहे तशीच राहील असें त्यांस वाटत आहे. आर्थिक मंदी दूर होऊन रेल्वेजचें उत्पन्न हळूहळू वाढेल अशी त्यांची अपेक्षा आहे आणि ती पुरी झाल्यास हिंदुस्थान सरकारास थोडीशी फूस सांपडेल. एकंदरीनें विचार करतां, नवीन राज्यघटना अमलांत येण्याच्या मार्गांत सरकारी उत्पन्न-खर्चाच्या परिस्थितीची अडचण येणार नाहीं असा सर ओटो ह्यांचा अभिप्राय आहे. नव्या-जुन्या प्रांतांस मध्यवर्ती सरकाराकडून सहाय व्हावयाचें आहे, तें रोख रकमा देणें, जुनें कर्ज रद्द करणें आणि विशिष्ट कराच्या उत्पन्नांतला हिस्सा तोडून स्वाधीन करणें ह्या निरनिराळ्या मार्गांनीं केलें जावयाचें आहे. मुंबई, मद्रास आणि पंजाब ह्या तीन प्रांतांस तूर्त कांहींच प्राप्ति व्हावयाची नाहीं. अनुक्रमेंकरून सिंध, गंजम जिल्हा व सरहद्दप्रांत ह्यांच्या विभक्तीकरणामुळें त्यांच्या खर्चांत बचत झाली आहे, हें त्याचें कारण आहे असें सांगण्यांत आलें आहे. सर ओटो नीमायर ह्यांच्या शिफारसींच्या प्रमुख अंगांचें विवेचन प्रस्तुत विषयावरील पुढच्या लेखांत करण्यांत येईल.

## मुंबई बंदराचा परराष्ट्रीय व्यापार

### परिस्थिति सुधारली नाहीं

मुंबई बंदरांतून होणाऱ्या परराष्ट्रीय व्यापाराचे १९३५-३६ सालाबाबतचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून आयात-निर्गतीच्या संबंधांत सुधारणा झालेली नसून इकडून बाहेर जाणाऱ्या मालाच्या परिमाणांत घटच झाली आहे, असें दिसून येतें. हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराच्या प्रगतीचें गमक निर्गतीच्या वाढींत असतें. मालाच्या आयातीच्या मानानें निर्गत वाढली नाहीं तर परदेशीय येणें कमी होऊन दुसऱ्या देशांचें देणें मात्र अधिक निघतें. गेल्या सालच्या व्यापाराच्या आकड्यांस ही कसोटी लावली असतां परिस्थितीची प्रतिकूलता ध्यानांत येते. १९३३–३४ व १९३४–३५ ह्या सालांशीं गेल्या वर्षाची म्हणजे मार्च १९३६ अखेर पुऱ्या झालेल्या बारा महिन्यांच्या मुदतीची तुलना केल्यास गेल्या सालीं आयात ज्यास्त झालेली निदर्शनास येते. ही वाढ मागील दोन वर्षांच्या मानानें अनुक्रमें करून ६ टक्के आणि २६ टक्के इतकी झालेली आहे. परंतु त्याचबरोबर निर्गत व्यापारांतली घट अनुक्रमें करून १५ टक्के व १२ टक्के इतकी झालेली आहे. गेल्या वर्षी मुंबई बंदरांत ४ कोटि, १४ लक्ष रुपये किंमतीची चांदी आली. त्या पूर्वीच्या दोन वर्षांतले चांदीच्या आयातीचे आकडे अनुक्रमें करून १ कोटि,५९ लक्ष व ४० लक्ष असे होते. म्हणजे, आयातीच्या वाढ्यांत चांदीची बरीच भर पडली आहे असें स्पष्ट दिसतें. सोन्याची आयात अर्थात केवळ नांवाचीच असणार आणि गेलें वर्ष व तत्पूर्वीचीं दोन वर्षें ह्यांतले आकडे अनुक्रमें करून ६१ लक्ष, ३५ लक्ष व ५६ लक्ष रुपये असे होते. म्हणजे येथें फारशी तफावत नाहीं. सोनें-चांदी वगळल्यास इतर मालाच्या आयातीची एकूण किंमत गेल्या सालीं ५४½ कोटि रुपये भरली. तत्पूर्वीच्या दोन सालांशीं तुलना करतां हा आकडा अनुक्रमें करून ८० लक्ष व ८ कोटि रुपये एवढ्यानें अधिक होता, आणि हीच वाढ शतमानानें १½ टक्का व १३ टक्के होते. कपाशीची आयात १९३४–३५ पेक्षां १ कोटि ३६ लक्ष रुपयांनीं अधिक झाली, रंगांची आयात ३५ लक्ष रुपयांनीं वाढली आणि सुताची ३१ लक्षांनीं ज्यास्त झाली. मसाल्याचे पदार्थ आणि लोखंड–पोलाद ह्यांचीहि आयात अनुक्रमेंकरून २१ व १७ लक्ष रुपयांनीं वाढली. धुवट व रंगी कापडाच्या आयातींत मात्र घट झाली. त्याची किंमत ६१ लक्ष रुपयांनीं उतरली. रेशमी कापड, लोकरीचें कापड, व यंत्रसामुग्री ह्यांच्या आयातीच्या किंमतींत अनुक्रमेंकरून ५२ लक्ष, ४१ लक्ष व २७ लक्ष इतकी घट झाली.

निर्गत व्यापाराकडे पाहिलें असतां सोन्याचा ओघ बराच रोडावला ही गोष्ट तात्काळ डोळ्यांत भरते. १९३३–३४ मध्यें ५३ कोटि, ६४ लक्ष व १९३४–३५ मध्यें ५० कोटि, ३६ लक्ष इतकें सोनें परदेशांत गेलें होतें, पण १९३५–३६ सालीं ही निर्गत पुष्कळच कमी झाली व ती ३८ कोटि, २६ लक्ष रुपयांवर आली. हिंदी सोन्याच्या निर्गतीचा प्रवाह आटत गेला आहे, हें वरील आकड्यांवरून स्पष्ट दिसतें. चांदीच्या निर्गतींत मात्र थोडी वाढ झाली आणि तिची किंमत २ कोटि, ३१ लक्ष रुपये इतकी भरली. त्यापूर्वीच्या दोन सालांचे तुलनात्मक आकडे अनुक्रमें ३१ व ८३½ लक्ष रुपये असे होते. मुंबई बंदरांतून होणारा निर्गत व्यापार वाढला नसून उलट कमी झाला ह्याचें मुख्य कारण सोनें–चांदी विषयींवरील आकड्यांत सापडतें. सोनें–चांदी वगळल्यास इतर मालाची निर्गत पूर्वीच्या वर्षापेक्षां ५७½ लक्ष रुपयांनीं घटली. १९३३-३४ सालाच्या मानानें १९३५–३६ सालचा निर्गतीचा आकडा (३० कोटि, ४४ लक्ष रुपये) २ कोटि रुपयांनीं म्हणजे ७ टक्क्यांनीं अधिक होता तरी गेल्या सालाच्या मानानें त्यांत सुधारणा तर नाहींच पण २ टक्क्यांनीं पीछेहाटच झाली. म्हणजे, आमच्या कच्या व अर्ध–कच्या मालाचा खप वाढावयास हवा होता तो वाढला नाहीं आणि घटत जाणाऱ्या सोन्याच्या निर्गतीनेंच परराष्ट्रीय व्यापाराची तोंड मिळवणी व्हावी लागली हें उघड आहे. शेतीच्या मालाचा उठाव आणि निर्गत वाढल्यावांचून शेतीच्या धंद्यांत सुधारणा व्हावयाची नाहीं व सामान्य जनतेची कमाई व आर्थिक स्थिति प्रगतीच्या मार्गास लागावयाची नाहीं हें सांगावयास नको. कच्च्या लोकरीची व कापसाच्या कापडाची निर्गत अनुक्रमेंकरून ३० लक्ष व २४ लक्ष रुपये इतक्यानें पूर्वीच्या वर्षापेक्षां ज्यास्त झाली खरी, परंतु हा वाढावा, कपास व गळिताचीं धान्यें ह्यांत जी घट झाली तिनें धुवून टाकला. कपाशीची निर्गत १ कोटि ८ लक्ष, कापसाच्या सुताची १४½ लक्ष आणि गळिताच्या धान्याची २१ लक्ष रुपये एवढ्यानें कमी झाली. ह्याप्रमाणें मुंबई बंदराच्या परराष्ट्रीय व्यापाराचा पाढा आहे आणि तो उत्तेजनकारक नाहीं असें दुर्दैवानें म्हणावें लागतें.

---

## येलूर को. सु. युनिअन (जिल्हा सातारा) येथील बक्षिस समारंभ

गेल्या चार पांच वर्षांतील जागतिक मंदीमुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितींत शेतकरी मेंबरांना मदत करण्याकरितां योजिलेल्या सवलतीच्या व्याजाचे दराचा यूनिअननें फारच चांगल्या प्रमाणांत फायदा करून घेतला आहे.

वरील योजना १९३३–३४ व १९३४–३५ या दोन्ही वर्षी सुरू होती. पहिल्या वर्षी यूनिअन मधील २० सोसायट्यांपैकीं १५ सोसायट्यांनीं व दुसऱ्या वर्षी १८ सोसायट्यांनीं सदरची योजना यशस्वी करून आपल्या मेंबरांना व्याज परत केलें. या दोन वर्षांत वरील सोसायट्यांनीं आपल्या सभासदांस सुमारें २४,००० रुपये सूट दिलेली आहे. तीन सोसायट्यांनीं आपल्या चांगल्या मेंबरांना सर्व व्याज माफ केलें.

अशा प्रकारें ही योजना यशस्वी करण्याचे कामीं ज्या ऑनररी कार्यकर्त्यांनीं मेहनत घेतली त्यांचा गौरव करून त्यांना बक्षिसें वाटण्याचा समारंभ मे. रजिस्ट्रारसाहेब यांचे हस्तें ता. २७–४–३६ रोजीं येलूर येथें मोठ्या समारंभानें साजरा करण्यांत आला.

प्रथम, सवलतीची योजना यशस्वी करणेचे कामीं मेहनत घेणाऱ्यांपैकीं श्री. शंकरराव बोगर वगैरे पांच इसमांना सहकारी खात्यामार्फत कोशे व पटके बक्षीस देण्यांत आले. यूनिअनमार्फत ३६ कार्यकर्त्यांना चांदीचे बिल्ले व चार सेक्रेटरींना ५० रुपयांचीं भांडीं बक्षिसादाखल देण्यांत आलीं. शेवटीं यूनिअनसोसायट्यांमधील हौशी पहिलवानांच्या कुस्त्या होऊन समारंभ यशस्वीपणें पार पडला.

---

# स्फुट विचार

## सुपर्व्हिजन कमिटीच्या शिफारसींबाबत सरकारचा ठराव

सहकारी संस्था--विशेषतः शेतकी पतपेढ्या--ह्यांच्या देखरेखीची व्यवस्था आज त्यांच्या यूनिअनच्या मार्फत सुपरव्हायजर्सच्या हातून चालते आणि त्या कामाचें निमंत्रण प्रत्येक जिल्ह्यांत स्थापन झालेल्या बोर्ड ऑफ सुपर्व्हायजिंग यूनिअन्सकडून केलें जातें. मुंबई सरकारनें कांहीं वर्षांमागें एक काटकसर कमिटी ( टॉमस कमिटी ) नेमली होती, तिनें सुपर्व्हायजर्सची देखरेख कुचकामाची व निष्कारण खर्चाची असल्यानें ती काढून टाकून तिच्या ऐवजीं सरकारी ऑडिटर्सची देखरेख सुरू करावी आणि ऑडिट फी व यूनिअन फी मधून त्यांचा खर्च सहज भागून सरकारी तिजोरींत शिल्लक उरेल, असा सल्ला दिला होता. देखरेखीचा आणि यूनिअन फीचा अधिकार सरकारच्या हातांत सर्वस्वी जावा ही गोष्ट बिनसरकारी कार्यकर्त्यांस पसंत पडली नाहीं आणि त्यांनीं टॉमस कमिटीच्या शिफारसींविरुद्ध ओरड केल्यामुळें मुंबई सरकारनें ह्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां एक कमिटी नेमली. ह्या कमिटीनें केलेल्या शिफारसींवरचा सरकारचा निर्णय ठरावाच्या रूपांत प्रसिद्ध झाला असून त्यांतल्या प्रमुख मुद्यांचें टांचण आम्हीं आजच्या अंकांत दुसरीकडे प्रसिद्ध केलें आहे व त्यांत कमिटी आणि सरकार ह्यांचेमध्यें झालेले मतभेद स्पष्टपणें दाखविले आहेत. सुपर्व्हायजर लायक असावे आणि त्यांचा पगार, बढती वगैरेबद्दलची व्यवस्था निश्चित आणि समाधानकारक करावी म्हणजे त्यांच्या हातून चांगलें काम घडेल आणि यूनिअन्स आणि त्यांचें प्रत्येक जिल्ह्याचें बोर्ड ह्यांच्या नजरेखाली देखरेखीचा कारभार कार्यक्षम रीतीनें होईल हें तत्व सरकारनें मान्य केलें आहे,ही आनंदाची गोष्ट आहे. ऑडिट फीचें सबंध उत्पन्न सरकारनें देखरेखीच्या कामासाठी खर्चण्यास तयार व्हावें ही कमिटीची सूचना मात्र सरकारनें मान्य केली नाहीं, आणि त्यांतले २५ हजार रुपये सध्याप्रमाणें सरकारी तिजोरींत पडावे असें ठरविलें आहे. गुजराथ व कोंकण ह्या भागांतल्या यूनिअन्स सांपत्तिक दृष्ट्या स्वावलंबी होऊं शकणार नाहींत म्हणून तेथील यूनिअन फी ८ आण्यांचे ऐवजीं १२ आणे असावी ही कमिटीची सूचनाहि अमान्य करण्यांत आली आहे. त्या युनिअन्सला येणारी तूट ऑडिट फीमधून भरून काढावी लागणार असल्यानें कमिटीनें सुचविलेली सुपर्व्हायजर्सच्या पगाराची योजना अमलांत आणण्याचे मार्गांत अडथळा येईल अशी भीति वाटते. कमिटीची योजना वरील दोन बाबतींत दुरुस्त करून ती अमलांत आणण्याचें काम रजिस्ट्रार यांचेकडे सोंपविण्यांत आलें आहे. पैशाविषयींच्या वर नमूद केलेल्या अडचणी दूर होण्यास ते काय उपाय सुचवतात तें पहावें. प्रस्तुत विषयासंबंधानें उपस्थित होणाऱ्या इतर बाबींचाहि योग्य विचार होणें आवश्यक आहे.

---

## नीमायर रिपोर्टासंबंधीं लोकमत

सर ओटो नीमायर ह्यांच्या रिपोर्टाच्या प्रसिद्धीबाबत हिंदुस्थानांतील वृत्तपत्रांस योग्य सवड देण्यांत आली नाहीं आणि त्यामुळें लोकमत व्यवस्थित रीतीनें बनण्याकरितां आपल्या वाचकांस त्यांस पद्धतशीरपणानें बातमी पुरवतां आली नाहीं, ह्याबद्दल मुंबईच्या टाइम्स ऑफ इंडियानें असमाधान व्यक्त केलें आहे. हिंदी लोकमतास मान देण्याचें महत्व इंग्लंडमध्यें सरकारास वाटत नाहीं ह्या आशयाची टीका त्या पत्रास करावी लागली आहे, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. नवीन राज्यघटनेस प्रांतांमध्यें पुढच्या एप्रिलांत प्रारंभ व्हावयाचा आहे, त्यास नीमायर रिपोर्ट हा शुभशकून आहे असें मत ब्रिटिश वर्तमानपत्रांत व्यक्त झालें आहे. नवीन अमदानी चालू होण्यास द्रव्यबळ लागेल तें हिंदुस्थानांत नाहीं असा ध्वनि त्या रिपोर्टांतून निघाला असता तर राजकीय सुधारणांचा गाडा सांपत्तिक अडथळ्यांत अडकून पडला असता. तसें होण्याचें कारण नाहीं.ह्या रिपोर्टांतील अभिप्रायाबद्दल कांहीं ब्रिटिश वृत्तपत्रांनीं हिंदुस्थानाचें अभिनंदन केलें आहे. ह्याच्या उलट, सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास ह्यांच्यासारख्या हिंदी पुढाऱ्यांच्या मतें नीमायर रिपोर्टांत प्रतिबिंबित झालेली देशाची आर्थिक व सांपत्तिक परिस्थिति निराशाजनक आहे. कराचा बोजा किंवा लष्करी खर्च कमी होण्याची आशा नाहीं आणि रेल्वेजच्या सांपत्तिक स्थितीच्या सुधारणेवर सर्व प्रगति अवलंबून रहाणार आहे. प्रांतिक सरकारांचें उत्पन्न वाढण्याचा फारसा संभव दिसत नाहीं आणि मुंबई इलाख्यास प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नांतला आपला हिस्सा मिळण्यास वर्षानुवर्षे वाट पहावी लागणार आहे. हिंदुस्थानची आर्थिक प्रगति घडवून आणण्यासाठी जरूर असलेले प्रयत्न आणि त्यांप्रीत्यर्थ करावा लागणारा खर्च ह्यांचा विचार करण्यांत आलेला नाहीं. प्रांतिक स्वायत्तता म्हणजे कमी खर्च करणें व अधिक कर बसवणें ह्या बाबतींतली सत्ता असाच प्रकार व्हावयाचा, अशी टीका सर पुरुषोत्तमदास ह्यांनीं केली आहे. राजकीय सुधारणा अगोदरच तुटपुंजा व असमाधानकारक आणि त्यांस जनतेस भारी किंमत द्यावी लागणार हें नीमायर रिपोर्टासंबंधाच्या हिंदी लोकमताचें सार आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

## पंडित नेहरूंच्या भाषणाची प्रतिक्रिया

मुंबईच्या इंडियन मर्चन्ट्स चेंबरचे उपाध्यक्ष, श्री. ए. डी. श्रॉफ, ह्यांनीं चेंबरच्या त्रैमासिक सभेचे वेळीं, श्री. जवाहरलाल नेहरू ह्यांच्या गेल्या काँग्रेसमधील अध्यक्षीय भाषणांतील मुख्य मुद्यांबाबत स्वतःच्या दृष्टीनें आक्षेपार्ह वाटणाऱ्या विधानांवर टीका केली. श्री. श्रॉफ ह्यांनीं प्रतिपादिलेलें मत हें चेंबरचें अधिकृत मत म्हणून समजण्यांत आलें नाहीं, तरी व्यापाऱ्यांची सर्वसाधारण भूमिका लक्ष्यांत येण्यास त्यांचें भाषण उपयोगी पडेल, ह्यांत संशय नाहीं. आपल्या देशाचे सद्यःस्थितींत वर्गकलह माजवणें योग्य होणार नाहीं व पंडितजींच्या तत्वज्ञानानें अनिष्ट वातावरण उत्पन्न होऊन देशाचें आर्थिक हितास त्यामुळें बाध येईल, असें त्यांनीं सांगितलें. त्याबरोबरच, श्री. श्रॉफ ह्यांना सरकारासहि इषारा दिला. बिकट आर्थिक परिस्थिति, वाढती बेकारी मालाचे उतरते बाजारभाव, इत्यादि चिन्हें काय दर्शवितात ह्याचा सूक्ष्मपणानें विचार न केल्यास सर्वत्र निराशेचें पटल पसरून पंडित नेहरूंनीं व्यक्त केलेल्या कल्पनांचा पगडा जनतेच्या मनावर बसेल ह्याविषयींच्या जबाबदारीची जाणीव त्यांनीं सरकारास करून दिली. मालमत्तेवरील खाजगी मालकी नाहींशी करण्यासंबंधाच्या पंडितजींच्या विचारांबद्दल श्री. श्रॉफ ह्यांनीं नापसंती दर्शवली. औद्योगिक प्रगतीस त्यामुळें आडकाठी येऊन ज्यास्त सुरक्षित ठिकाणीं म्हणजे परदेशांत भांडवलाचा ओघ वाहूं लागेल, असें त्यांनीं बजावलें. पंडित जवाहरलाल ह्यांच्या अध्यक्षीय भाषणाची प्रतिक्रिया अशा रीतीनें समाजांतील भिन्नभिन्न वर्गांवर होऊं लागली आहे. श्री. श्रॉफ ह्यांच्या भाषणाचा प्रतिध्वनि इतरत्रहि उमटूं लागला असून शुद्ध राष्ट्रीयत्वाच्या भावना ज्यास्त दृढ होण्याची आवश्यकता विशेषेंकरून प्रतिपादली जात आहे.

---

### बेल्जम चलनाचें स्थिर सुवर्णाधिष्ठान

आपल्या राष्ट्रीय चलनांत सोन्याचा भाव कायद्यानें निश्चित करून तो स्थिर राखण्याची व्यवस्था करण्याचा सर्व देशांतील सरकारांचा मामुली रिवाज आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. अलीकडच्या जागतिक आर्थिक धामधुमीच्या काळांत हा परिपाठ ग्रेटब्रिटन आदिकरून राष्ट्रांसहि मोडावा लागला असून राष्ट्रीय चलनाचा विशिष्ट दरानें सोन्याशीं विनिमय करण्याची कायदेशीर जबाबदारी त्यांनीं टाकून दिली आहे. खुल्या बाजारांत सोनें महाग होऊन त्याच्या कायदेशीर प्रमाणाची स्थिरता कायम राखणें अशक्य झाल्या कारणानें कांहीं राष्ट्रांच्या सरकारांनीं तो दर बदलून घेतला आहे. अशा देशांपैकीं बेल्जम हा एक देश आहे. त्या देशाचें प्रमुख राष्ट्रीय नाणें बेल्गा हें आहे आणि १९२६ सालीं एक बेल्गा = $\frac{१}{५}$ ग्रॅम वजनाचें सोनें असें प्रमाण निश्चित करण्यांत आलें होतें. त्यानंतर हें प्रमाण आणखीहि उतरवण्याची आवश्यकता भासूं लागली. बेल्जम सरकारनें त्याची किंमत २५ ते ३० टक्के कमी करण्याचा अधिकार आपणाकडे गेल्या सालीं घेतला आणि प्रत्यक्ष व्यवहारांत २८ टक्के घट केली. उतरलेल्या दरानें १ बेल्गा = $\frac{३}{२०}$ ग्रॅम वजनाचें सोनें असें प्रमाण बसतें. सदरहु नवीन प्रमाण एका वर्षाच्या अनुभवावरून कायद्यानें निश्चित करण्यास लायक असें सिद्ध झाल्यावरून त्याप्रमाणें बेल्जम सरकारानें गेल्या मार्चच्या अखेर हुकूम काढला आहे. म्हणजे, बेल्जम राष्ट्राचें चलन फिरून कायदेशीर रीत्या सुवर्णाधिष्ठित झालें आहे. ठराविक दरानें बेल्गा आणि सोनें ह्यांचा परस्पर विनिमय करतां यावा म्हणून एक स्वतंत्र फंड निर्माण करण्यांत आला होता, त्याचा उपयोग करण्याची आवश्यकता भासलेली नसून त्याची ह्यापुढें जरूर नसल्यानें तो बंद करण्यांत आला आहे. असल्या बाहेरच्या मदतीवांचून चलनाचें सुवर्णप्रमाण स्थिर राखण्याची खात्री बेल्जमच्या मध्यवर्ती बँकेस वाटत आहे. परराष्ट्रांच्या देण्या-घेण्याची परिस्थिति अनुकूल असण्यावर मध्यवर्ती बँकेची ही धमक अवलंबून आहे. फ्रेंच चलनाचें सुवर्ण प्रमाण कमी करावें अशी चळवळ फ्रान्समध्यें अलीकडे चालली आहे तिच्यावर तेथील नवीन निवडणुकीचा आणि बेल्जमच्या चलनविषयक धोरणाचा कांहीं परिणाम होतो कीं काय हें लवकरच दिसून येईल.

---

### कलकत्त्याच्या इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सची सरकारी धोरणावर टीका

कलकत्त्याच्या इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सनें हिंदुस्थान सरकारास एक पत्र लिहिलें आहे, त्यांत सरकारच्या हल्लीच्या औद्योगिक व व्यापारविषयक धोरणावर टीका करण्यांत आली आहे. सरकारचे फडनवीस, सर जेम्स ग्रिग, ह्यांचा कल पहिल्यापासूनच खुल्या व्यापाराकडे असल्याचें सुप्रसिद्ध आहे. बेकारीनिवारणास उद्योगधंद्यांच्या कृत्रिम वाढीचा उपयोग होणार नाहीं, अशा विश्वासानें ग्रिगसाहेबांनीं असेंब्लीच्या गेल्या अधिवेशनांत औद्योगिक संरक्षणाच्या तत्वाची हेटाळणी केली व जनतेच्या आकांक्षांवर विरजण घातलें. उद्योगधंद्यांस संरक्षण दिल्यानें गिऱ्हाइकांवर कोट्यवधि रुपयांचा बोजा बसतो, असें सांगून आर्थिक स्वावलंबनाचा प्रयत्न करण्यांत देशाचें नुकसान आहे, असें त्यांनीं प्रतिपादन केलें. हिंदी उद्योगधंद्यांस संरक्षण मिळण्याबाबतची लोकांची मागणी एकमुखी असून ती आज ५० वर्षांची जुनी आहे. सरकारनेंहि ती मान्य केली असून कित्येक जातींच्या मालावर संरक्षक जकाती बसविण्यांत आल्या आहेत. इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सनें आपल्या पत्रांत कपास कापडाच्या गिरण्या, साखरेचे व पोलादाचे कारखाने, इत्यादि संबंधीं तपशीलवार उदाहरणें देऊन संरक्षक जकातीमुळें झालेल्या फायद्याकडे सरकारचें लक्ष वेधलें आहे. उद्योगधंद्यांच्या वाढीच्या अनुषंगानें होणारे इतर सुपरिणामहि विसरतां येणार नाहींत. कारखाने भरभराटीस आले म्हणजे परराष्ट्रीय व्यापार खुंटेल, ह्या म्हणण्यांतहि कांहीं तथ्य नाहीं. फडनविसांच्या भाषणामुळें सरकारच्या धोरणाबद्दल लोकांचा प्रतिकूल ग्रह होतो व त्यामुळें उद्योगधंद्यांचे वाढीच्या मार्गांत अडचण उत्पन्न होते, असें चेंबरचें म्हणणें आहे. इतर देशांत संरक्षक धोरण जारीनें अंमलांत आणण्यांत येतें व हिंदुस्थानासारख्या मागसलेल्या देशांत संरक्षक उपायांची ज्यास्तच आवश्यकता आहे, ह्यांत संशय नाहीं. सर जेम्स ग्रिग ह्यांनीं प्रतिपादलेलें अर्थशास्त्र जगांतील कोणत्याच देशांत मान्य झालेलें नाहीं; तेव्हां हिंदुस्थानांत त्याची अंमलबजावणी करण्याचा आग्रह कां? ह्या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर मिळालें पाहिजे. लॉर्ड लिन्लिथगो ह्या 'शेतकरी' व्हाइसरॉयांच्या नेमणुकीमुळें व फडनविसांच्या प्रतिगामी धोरणामुळें लोकांच्या मनांत हिंदुस्थानाच्या आर्थिक प्रगतीसंबंधानें संदेह उत्पन्न झाला आहे, त्याचें निराकरण होणें जरूर आहे.

---

### उद्योगधंद्यांस मदत देतेवेळीं शेतीस विसरूं नका

मध्यप्रांत व वऱ्हाडमधील व्यापारी व कारखानदार ह्यांच्या परिषदेचे अध्यक्ष श्री. वालचंद हिराचंद ह्यांनीं आपल्या भाषणांत प्रदर्शित केलेले विचार समतोल आणि मननीय आहेत. शेतीच्या मालास चांगला भाव मिळून शेतकऱ्यांची ग्रहणशक्ति वाढली पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. उद्योगधंदे वाढले तरी तयार मालास गिऱ्हाइक मिळण्याचे दृष्टीनें कारखान्यांची वाढ व शेतकऱ्यांची सुधारणा एकदमच झाली पाहिजे, हें सयुक्तिक आहे. फळें, मुरांबे, लोणी, इत्यादि मालाच्या आयातीवर जबर जकात बसविण्यांत आली म्हणजे स्थानिक उत्पादन वाढून त्यास गिऱ्हाईकहि मिळेल, असें त्यांनीं सुचवलें. शेती व उद्योगधंदे ह्यांची सांगड घालून दिल्याखेरीज प्रगति जोरानें होणार नाहीं, हें उघड आहे. तथापि, शेतीस प्राधान्य देण्याचें धोरण अतिरेकास जाऊं न देण्याबद्दल दक्षता बाळगली पाहिजे. उत्पादक विरुद्ध उपभोक्ते हा लढा माजूं न देतां त्यांचे परस्पर हितसंबंध आज विरोधी स्वरूपाचे वाटले, तरी राष्ट्रीय दृष्ट्या परिणामीं ते एकमेकांस पूरक आहेत, हें लक्ष्यांत ठेऊनच धोरण आखणें रास्त होईल.

---

### फुटबॉलच्या सामन्यांवर जुगार

कोणतीहि गोष्ट घडून येण्यांत अनिश्चितपणा असला कीं, ती तात्काळ जुगारीचा विषय होऊं शकते. फुटबॉलच्या सामन्यांवर ग्रेटब्रिटनमध्यें विशिष्ट प्रकारची जुगार अलीकडे विलक्षण वाढली आहे. तीमध्यें घातलेल्या पैशाची रकम दोन वर्षांत ८ कोटि रुपयांवरून २५ कोटि रुपयांवर गेली आहे. ह्या जुगारीस आळा घालण्याच्या उद्देशानें कॉमन्स सभेंत एका सभासदानें आणलेल्या बिलावर वाद होऊन तें नामंजूर करण्यांत आलें. जुगारीपासून लोकांस परावृत्त करणें म्हणजे स्वतःच्या पैशाचा वाटेल तसा सदुपयोग अथवा दुरुपयोग करण्याचा त्यांचा हक्क हिरावून घेणें होय असें कित्येकांचें मत पडलें!

---

## सहकारी पतपेढ्यांच्या देखरेखीची व्यवस्था

### कमिटीच्या रिपोर्टावर सरकारचा ठराव

मुंबई इलाख्यांतील सहकारी पतपेढ्यांच्या देखरेखीची सुपरवायजिंग यूनिअन्सच्यामार्फत चाललेली प्रचलित व्यवस्था असमाधानकारक असून ती सरकारनें स्वतःकडे घेऊन आपल्या ऑडिटर्सच्याकडून करावी, म्हणजे खर्च कमी येऊन काम अधिक चांगलें होईल, अशा प्रकारची शिफारस टॉमस कमिटीनें केली होती. सहकारी संस्थांनीं ह्या सूचनेस विरोध केल्यावरून सरकारनें ह्या प्रश्नाचा विचार करून योजना सुचविण्यासाठी एक कमिटी नेमली होती. तिचा रिपोर्ट प्रसिद्ध होऊन बराच काळ लोटला. आतां मुंबई सरकारनें कमिटीच्या शिफारसींसंबंधानें आपला अभिप्राय तपशीलवार रीतीनें प्रसिद्ध केला आहे आणि त्या निर्णयाची अंमलबजावणी होण्याबाबत हुकूम काढला आहे. कमिटीचें व आपलें एकमत कोणत्या बाबींमध्यें आहे आणि मतभेद कोठें आहे हें दर्शवून सरकारनें नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ठरावांत स्वतःचा निर्णय जाहीर केला आहे.

सरकारी ऑडिटर्समार्फत पतपेढ्यांची देखरेख व्हावी ही टॉमस कमिटीची कल्पना सरकारनें अमान्य केली असून यूनिअन्स अधिक सुसंघटित करून लायक सुपरव्हायझर्सकडून देखरेखीचें काम करून घेतलें जावें, ह्या सुपर्व्हिजन कमिटीच्या शिफारशीस पाठिंबा दिला आहे.

तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्स व अहमदाबादची बँकिंग युनिअन ह्यांच्याखाली ज्या पतपेढ्या आज आहेत, त्यांच्याकरितां यूनिअन्स स्थापन केल्या जाव्या हें कमिटीचें म्हणणें सरकारास मान्य आहे. पंचमहालमधल्या भिल्लांच्या पेढ्यांची देखरेख त्यांचेसाठी नेमलेल्या मामलेदाराकडे रहावी असें त्यांचें मत आहे.

सुपरव्हायाजिंग यूनियनच्या पंच कमिटींत ९ सभासद असावे आणि त्यामध्यें सेंट्रल बँक व इंस्टिट्यूटची जिल्हा शाखा ह्यांचे प्रतिनिधी असावे इत्यादि प्रकारची घटना कमिटीनें सुचवली आहे, तिलाहि सरकारनें मान्यता दिली असून पतपेढ्यांचें योग्य नियंत्रण व्हावें म्हणून यूनिअन्सना जास्त अधिकार देण्यांत यावे ह्याबद्दलची शिफारसहि सरकारास पसंत आहे.

सुपरव्हायजिंग यूनिअन्सच्या कामाची व्यवस्था पहाण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यांत एक मध्यवर्ती बोर्ड असावें व त्यावर जिल्ह्याची बँक आणि इंस्टिट्यूट ह्यांचा एक एक प्रतिनिधी असावा आणि यूनिअन्सच्या संख्येच्या विशिष्ट प्रमाणांत त्यांचे प्रतिनिधी घेतले जावे ह्याविषयीं सरकारी ठरावांत तपशीलवार योजना नमूद केली आहे. कोणत्याहि यूनिअनला एकापेक्षां ज्यास्त प्रतिनिधी मिळूं नये पण सर्व यूनिअन्सना प्रतिनिधि पाठवण्याची संधी मिळावी ह्याबद्दल त्या योजनेंत कटाक्ष आहे. जिल्ह्यांत दोहोंपेक्षां अधिक यूनिअन्स नसल्यास त्यांस आळीपाळीनें एक प्रतिनिधि मिळेल, त्यांची संख्या दोहोंपेक्षां अधिक असून पांचापेक्षां जास्त नसेल तर दोन प्रतिनिधी असतील आणि त्यांची संख्या पांचाच्यावर असेल तर तीन प्रतिनिधी मिळतील. निवडणुकीसाठी यूनिअन्सचा एक गट केला जाईल. पहिलीं तीन वर्षें असिस्टंट रजिस्ट्रार हे अधिकारपरत्वें जिल्हाबोर्डाचे अध्यक्ष रहातील व ह्या मुदतीनंतर सदरहु बाबीचा फेरविचार केला जाईल. जरूर वाटल्यास जिल्ह्यांतील एखाद्या सहकारी गृहस्थाची सभासद म्हणून निवड करण्याची मुभा बोर्डास दिली जाईल.

सुपर्व्हायजर्सच्या नेमणुका, बढत्या वगैरेचे बाबतींत जिल्हाबोर्डास पूर्ण अधिकार असावा ह्या विषयींची कमिटीची शिफारस सरकारास मान्य आहे. बोर्डाच्या सभा वक्तशीर भराव्या व त्यांस पगारी किंवा बिनपगारी सेक्रेटरी असावा ह्या सूचनेसहि सरकारची मान्यता आहे.

जिल्हा बोर्ड ही प्रांतिक सहकारी इंस्टिट्यूटच्या जिल्हाशाखेची सबकमिटी म्हणून समजावी ह्या आशयाची कमिटींतल्या अल्पसंख्याक सभासदांची शिफारस सरकारनें अमान्य केली असून जिल्हा बोर्ड सर्वस्वी स्वतंत्र रहावें ह्या बहुसंख्याकांच्या मतास पाठिंबा दिला आहे.

सर्व जिल्हा बोर्डांच्या कामकाजावर सर्वसाधारण रीतीची देखरेख करण्यासाठी एक मध्यवर्ती प्रांतिक बोर्ड असावें ही कमिटीची शिफारस नामंजूर करण्यांत आली आहे. देखरेखीच्या कामांत असिस्टंट रजिस्ट्रार व रजिस्ट्रार ह्यांची नजर आणि सर्वसाधारण रीतीची हुकमत असल्याकारणानें अशा प्रांतिक बोर्डाची आवश्यकता नाहीं असा आपला अभिप्राय सरकारनें व्यक्त केला आहे.

सुपर्व्हायजरचें शिक्षण युनिव्हर्सिटीच्या इंटरमीजिएट किंवा सत्सम परीक्षेपर्यंत झालेलें असावें आणि त्यास खेडेगांवांची चांगली माहिती असावी असें कमिटीचें म्हणणें होतें. ह्यांपैकीं शिक्षणाच्या किमान दर्जाची अट सरकारनें काढून टाकली आहे. नेमावयाच्या सुपर्व्हायजरास प्रत्यक्ष कामकाजाचें शिक्षण देण्यांत यावें ही सूचना त्यांस मान्य आहे. सुपर्व्हायजर्सचे पगार, रजा इत्यादि बाबतच्या कमिटीच्या शिफारसीहि मान्य करण्यांत आल्या आहेत.

किती पतपेढ्यांच्या यूनिअन्स बनवाव्या आणि त्या कशा व कोठें बनवाव्या ह्याबाबत कामिटीनें योजना सुचविली आहे तींत दुरुस्ती होऊन प्रत्येक यूनिअन कार्यक्षम आणि त्याबरोबरच सांपत्तिक दृष्टीनें स्वावलंबी होईल अशी त्यांची पुनर्घटना व्हावी, असें सरकारचें म्हणणें आहे.

शेतकी बिगर क्रेडिट आणि बिगर शेतकी क्रेडिट अशा सहकारी संस्था, कमिटीच्या शिफारसींस अनुसरून, यूनिअन घटनेच्या क्षेत्रांत येण्यास सरकारची हरकत नाहीं. आजमितीस यूनिअन्सना सामिल झालेल्या शेतकी पतपेढ्यांकडून सरकार कमी दरानें ऑडिट फी घेतें, ती सवलत मात्र ह्या संस्थांस देण्यास तें तयार नाहीं.

देखरेखीच्या योजनेस लागणारा पैसा तीन मार्गांनीं येईल : (१) जोडलेल्या संस्थांची फी, (२) पतपेढ्यांस दिलेल्या कर्जांच्या विशिष्ट प्रमाणांत जिल्हाबँकांकडून देणगी आणि (३) ऑडिट फीच्या उत्पन्नांतून सरकारची ग्रँट. ह्यांपैकीं पहिली फी शेकडा ८ आणे सध्या आहे ती तशीच चालू राहील. गुजराथ व कोकण ह्या भागांत यूनिअन्सचा सर्व भागत नाहीं म्हणून १२ आणे आकारावे ही कमिटीची सूचना सरकारनें अमान्य केली आहे आणि तेथें तूट येईल ती ऑडिट फीच्या वाढाव्यांतून सरकारनें भरून काढावी असें ठरावांत म्हटलें आहे.

मध्यवर्ती बँकांच्या दृष्टीनें यूनिअन्सची चांगली व सुधारलेली देखरेख इष्ट व हितकारक असल्यानें त्यांनीं पतपेढ्यांकडे असलेल्या कर्जांचे एकूण रकमेवर शेकडा ४ आणे किमान ग्रँट म्हणून द्यावे. एकंदर १३ मध्यवर्ती बँकांपैकीं आठांनीं ह्या गोष्टीस

रुकार दिला असून बाकीच्या पांच तशीच मान्यता देतील अशी सरकारास उमेद वाटत आहे.

शेतकी पतपेढ्या, शेतकी बिगर क्रेडिट संस्था आणि बिगर शेतकी संस्था यूनिअन्सना जोडलेल्या असल्यास त्यां सर्वांकडून जेवढी ऑडिट फी सरकार वसूल करील ती सबंद नव्या देखरेखीच्या योजनेस खर्च लागेल त्यासाठी सरकारनें द्यावी म्हणजेच योजना यशस्वी होईल असा कमिटीचा अभिप्राय होता, तो सरकारास मान्य नाहीं. शेतकी पेढ्यांकडून येणाऱ्या ऑडिट फी मधून २५ हजार रुपये स्वतःकरतां काढून घेऊन बाकीची रकम सुपर्व्हायझिंग यूनिअन्सना ग्रँट देण्यांत खर्चावी हें पूर्वीचें सरकारचें धोरण तें बदलण्यास तयार नाहीं.

यूनिअन्सना सामील असलेल्या संस्थांची व बँकांची ग्रँट ह्यांचा सबंद जिल्ह्याचा असा एकत्रित फंड बनवावा आणि यूनिअन्सच्या गरजांस अनुसरून जिल्ह्याच्या बोर्डानें त्या पैशाची वांटणी करावी, म्हणजे जिल्ह्याचा पैसा जिल्ह्यांत खर्चला जावा हें कमिटीनें घालून दिलेलें तत्व सरकारनें मान्य केलें आहे.

देखरेखीची नवी घटना व योजना लवकर अमलांत आणण्याची विनंति रजिस्ट्रार यांस करण्यांत यावी. चालू सालच्या प्रांतिक बजेटांत नमूद असलेली सुपरव्हायजिंग यूनिअन्सना द्यावयाची ग्रँट कशी वांटण्यांत यावी ह्या विषयींच्या सूचना त्यांनीं सरकारास योग्य वेळीं कराव्या.

---

### जमशेदपूरमधील कारखाने

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीच्या नोकरींत ५० हजार माणसें असून त्यांच्या पगाराची वार्षिक रकम २ कोटि रुपये भरते. आगगाडीच्या वहातुकीचें बिल सुमारें १½ कोटि रुपये होतें. जकातीबद्दल दरसाल ५ लक्ष रुपये द्यावे लागतात. पोलादावरील अंतर्गत पट्टीचे दरमहा ३ लक्ष रुपये होतात. कंपनीचे हातून दरवर्षी ५ कोटि रुपये दिले जातात. पोलादाचे कारखान्याच्या सान्निध्यानें इतर अनुषंगिक कारखानेहि जमशेदपूर व त्याचे आसपास स्थापन झालेले आहेत. ह्या सर्व कारखान्यांत मिळून १ लक्ष लोक कामावर आहेत व कारखान्यांचा वार्षिक खर्च ८ ते १० कोटि रुपये आहे.

---

### कामगारांस हक्काची पगारी रजा कायद्यानें मिळवून देतां येईल काय?

कारखान्यांतील कामगारांना पगारी रजा मिळण्याबद्दल, आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेच्या येत्या जूनमध्यें भरणाऱ्या अधिवेशनांत चर्चा होणार आहे. ह्या प्रश्नावर हिंदुस्थान सरकारनें आपलें मत कळविलें आहे, त्यांत ह्या तत्त्वाबद्दल अनुकूलता दर्शविली असून हिंदुस्थानांत त्याची कायद्यानें अंमलबजावणी मात्र सर्वत्र करतां येणें कठीण आहे, असें म्हटलें आहे. सरकारी अधिकारी आणि नोकर व स्थानिक स्वराज्य संस्थांतील कामगार ह्यांस हक्काची पगारी रजा मिळत असली तरी खासगी नोकरींतील बहुसंख्याक लोकांस तशी रजा मिळत नाहीं.

---

### ग्रेटब्रिटनमध्यें किती टेलिफोन आहेत?

ब्रिटिश पोस्ट ऑफिसच्या कक्षेंत २७ लक्ष टेलिफोन्स जोडलेले आहेत, आणि दरवर्षी दोन लक्षांची भर टेलिफोन स्टेशन्समध्यें पडेल अशी अपेक्षा आहे.

---


**धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०**

कडून

**हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी

चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें

त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

**CONFIDENCE**

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**

**This year 1934-35**
**Exceeds**
**2 CRORES & 50 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment **Rs. 23** On Whole Life **Rs. 20**

**HINDUSTHAN**

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## पूर्व खानदेश जिल्हा सहकारी लँड मॉर्गेज बँक

### व्हॅल्युएशन अधिकाऱ्याच्या खर्चाची तरतूद

मुंबई इलाख्यांतील शिक्षण-मंत्री, दिवाण बहादुर कंबळी, ह्यांनीं पूर्व खानदेशांत दौरा काढला त्या वेळीं तेथील सहकारी इन्स्टिट्यूट, सहकारी जिल्हा बँक व सहकारी जमीनगहाणाची बँक ह्यांनीं त्यांस मानपत्रें अर्पण केलीं. पूर्व खानदेश जिल्हा सहकारी लँड मॉर्गेज बँकेचें ता. २९ ऑगस्ट रोजीं गव्हर्नर साहेबांचे हस्तें उद्घाटन झालें. बँकेनें आतांपर्यंत ३६,६५० रुपयांच्या २४ कर्जांस शिफारस केली आहे. त्यांतील ११ कर्जांचे कागदपत्र प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेकडे पाठविण्यांत आले, त्यांपैकीं १५,२०० रुपयांचीं ९ कर्जें मंजूर होऊन आलीं आहेत.उरलेल्या १३ कर्जांची मंजुरी लवकरच मागण्यांत येईल. ४२,४४५ रुपये कर्जांचे २४ अर्ज बँकेकडे आलेले आहेत, त्यांचेसंबंधीं व्यवस्था चालू आहे. बँकेचें जमा झालेलें भांडवल २२,२१० रुपये असून तें ३१५ सभासदांकडून वसूल झालेलें आहे. ३१ मार्च अखेरच्या मुदतींत बँकेस ५०० रुपये तोटा आला. जमिनीची किंमत ठरविणाऱ्या 'व्हॅल्युएशन' अधिकाऱ्यास मॅनेजरचेंहि काम संभाळावें लागतें व त्यामुळें कामाचा निकाल लागण्यास विलंब होतो. ह्याकरितां एका स्वतंत्र मॅनेजरची नेमणूक लवकरच करावी लागेल. लँड मॉर्गेज बँकांची योजना अंमलांत आणतेवेळीं व्हॅल्युएशन अधिकाऱ्यासंबंधींचा खर्च सरकारनें सोसण्याचें कबूल केलें होतें, परंतु आतां प्रत्येक मॉर्गेज बँकेस ५०० रुपयेच देण्याचें त्यांनीं ठरविलें आहे.प्राथमिक अवस्थेंत तरी शेतकऱ्यांचे हिताकडे पाहून सरकारनें व्हॅल्युएशन अधिकाऱ्यासंबंधाचा खर्च भागवावा, अशी पूर्व खानदेश लँड मॉर्गेज बँकेच्या मानपत्रांत सरकारास सूचना करण्यांत आली. जमीन गहाणाच्या बँकांची योजना यशस्वी होण्यास शेतकऱ्यांच्या कर्जाची तडजोड करणारीं बोर्डें फारच सहायकारक होतील, परंतु अशा बोर्डांस कायदेशीर महत्त्व असणें जरूर आहे. मुंबई कायदेमंडळांत मांडण्यांत येणाऱ्या ह्याविषयींच्या बिलाचें कायद्यांत रूपांतर होण्यास दिवाणबहादुरांनीं मदत करावी, अशीहि मानपत्रांत विनंति करण्यांत आली. कर्जाची परतफेड करण्यास समर्थ असलेल्या कुळांसच बँक पैसे देईल, परंतु शेतीच्या मालाचे—विशेषतः कपाशीचे—भाव पडल्यामुळें शेतसाऱ्याचा शेतकऱ्यावर भयंकर भार पडतो. शेतकऱ्यांची स्थिति सुधारून त्यांस कर्जाची परतफेड करण्याची पात्रता येईल, अशा योजना सरकारनें हातीं घ्याव्या, असें मानपत्रांत शेवटीं सुचविण्यांत आलें.

लँड मॉर्गेज बँकेच्या मानपत्रास उत्तर देतांना दि. ब. कंबळी म्हणाले, कीं दहा जिल्हा मॉर्गेज बँकांस मिळून तीन व्हॅल्युएशन अधिकारी पुरविण्याचें अभिवचन सरकारनें दिलें होतें. ही व्यवस्था गैरसोईची वाटल्यावरून प्रत्येक बँकेस स्वतंत्रपणें मदत देण्याचें सरकारनें ठरवलें. शेतीच्या मालाचा उठाव करण्याबद्दलच्या योजनांसंबंधीं मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांची चौकशी चालू आहे व कित्येक मार्केटिंग अधिकारी नेमण्यांत आले आहेत. चौकशी संपल्यानंतर जरूर ती योजना केली जाईल. मॉर्गेज बँकांच्या डायरेक्टरांवरील विशिष्ट जबाबदारीचा उल्लेख करून, त्यांनीं आपलें काम उत्साहानें व स्वार्थत्यागानें चालवावें, असा उपदेश दिवाणबहादुरांनीं आपल्या भाषणांत केला.

---

## प्राप्तीवरील कराच्या आकारणींत सुधारणा

### कराचें उत्पन्न कसें वाढवतां येईल ?

प्राप्तीवरील करापासून होणारें उत्पन्न वाढावें अशी सरकारची खटपट एकसारखी चालू आहे. दोन मार्गांनीं हें घडून येणें शक्य आहे:—(१) कराचे दर वाढवणें व (२) कराचे बाबतींत होणारी चुकवाचुकव व गळती थांबवून उत्पन्नांत भर घालणें. ही वाढ खालील मार्गांनीं घडवून आणतां येण्याजोगी आहे, अशी सूचना एका लेखकानें केली आहे.

(१) हिंदुस्थानांत काम करणाऱ्या नोकरांनीं आपले पगार, पेन्शनें इत्यादि हिंदुस्थानाबाहेर आदा केल्यास त्यावर इनकमटॅक्स बसत नाहीं. त्यांवर कराची आकारणी केल्यास सालिना एक कोटि रुपये उत्पन्न वाढेल असा अंदाज आहे.

(२) हिंदुस्थान सरकारनें इंग्लंडमध्यें उभारलेल्या कर्जरोख्यांवर कर माफ असतो. परदेशांतील भांडवल हिंदुस्थानांत आकर्षण्यासाठी अशा सवलतींची मार्गें जरूरी भासली असली तरी त्यांचें आतां कारण उरलेलें नाहीं.

(३) हिंदुस्थानाबाहेर मिळविलेलें अगर लागू झालेलें उत्पन्न करांचें कक्षेंत येणें जरूर आहे. सध्याच्या कायद्याप्रमाणें ह्या मिळकतीची रकम हिंदुस्थानांत आणली तरच तीवर कराची आकारणी होते. कित्येक लोक हा पैसा परदेशांतच पुनः गुंतवतात व कर चुकवतात.

(४) हिंदुस्थानांतून मालाची निर्गत करणारे व्यापारी खरेदीची किंमत फुगवून दाखवितात, त्यामुळें नफा कमी दिसतो अशी तक्रार आहे. ह्या बाबतींत चौकशी करणें आवश्यक आहे.

(५) कित्येक हिंदी संस्थानिक सरकारी व इतर रोख्यांत पैसे गुंतवितात. संस्थानिकांचें हें उत्पन्न करमाफ असण्याचें कारण नाहीं.

(६) एकाच प्राप्तीवर दुप्पट कराची आकारणी होऊं नये, हें तत्त्व ठीक आहे. त्या अन्वयें, हिंदुस्थान व इंग्लंड येथें व्यापार करणाऱ्या ब्रिटिश फर्म्सना त्यांनीं भरलेल्या कराचा कांहीं अंश परत मिळतो. अशाच तऱ्हेची सवलत ब्रिटिश करपद्धतींत आहे, परंतु तिचा हिंदुस्थानास फारसा उपयोग होत नाहीं. दोन देशांनीं एकमेकांस दिलेली ही सवलत दोघांनींहि रद्द करावी.

(७) शेतीपासून होणारी प्राप्ती अजिबात ह्या कराचे बाहेर आहे. जमीनदारांवर त्यामुळें इतरांचे मानानें करभार अत्यल्प पडतो. पांच किंवा सहा हजारांचे वरील शेतीच्या उत्पन्नास इनकम टॅक्स लागू करणें सयुक्तिक होईल.

---

### बँकांचें राष्ट्रीय कार्य

'सेंट्रल बँक ऑफ इंडिया'च्या रौप्य महोत्सवाचे प्रसंगीं लाहोर येथें ता. २२ एप्रिल रोजीं भाषण करतांना पंजाबचे गव्हर्नर, सर हर्बर्ट इमरसन, हे म्हणाले:—

"उद्योगधंद्यांस बँकांचें सहाय दोन प्रकारांनीं होण्याजोगें आहे—निर्दोष योजनांस पैशाची मदत करणें व सदोष योजनांस ती नाकारणें. चांगल्या योजनांस पैशाचा पुरवठा होणें जितकें आवश्यक आहे, तितकेंच, यशस्वी होण्याचा संभव नसलेल्या योजनांवर पैसा खर्च होऊन लोकांचा विश्वास उडण्याचा प्रसंग येऊं न देणें जरूर आहे. शास्त्रशुद्ध पायावर ज्या बँकेचे व्यवहार चालतात, ती बँक राष्ट्राचे दृष्टीनें अत्यंत उपयुक्त समजली पाहिजे. सेंट्रल बँक अशाच तऱ्हेची बँक आहे."

### टेलिफोनमुळें पाहिजे ती माहिती मिळते !

बरोबर किती वाजले हें समजण्यास टेलिफोनमुळें उत्तम सोय होते ह्यांत शंका नाहीं. परंतु जनतेस टेलिफोनचा अधिकाधिक उपयोग व्हावा म्हणून पाश्चात्य देशांत ज्या क्लृप्त्या योजण्यांत येत आहेत, त्यांचा विचार केला असतां कौतुक वाटतें. फ्रान्समधले पोस्ट व तारखात्याचे मंत्री, मि. मँडेल, ह्यांचें धोरण धडाडीचें व प्रगतिपर आहे. त्यांच्या अमदानींत टेलिफोनवाल्या नागरिकानें कसलीहि माहिती विचारली तरी ती पुरवण्याची सोय करण्यांत आली आहे. आगगाड्या सुटण्याच्या वेळा, कर्जरोख्यांचे बाजारभाव इत्यादि बाबतींत लोकांची जिज्ञासा टेलिफोनवर तृप्त करण्यांत येते, इतकेंच नाहीं तर एखादें औषध किंवा दुसरा एखादा जिन्नस बाजारांतून हवा असला किंवा डॉक्टर घरीं यावयास पाहिजे असला तर तीहि मागणी पुरी केली जाते. अशा प्रकारची सोय अर्थातच फुकट केली जात नाहीं आणि ठराविक दरानें त्यासाठीं पैसा द्यावा लागतो. एका विनोदी गृहस्थानें माहिती देणारा टेलिफोनचा नंबर पुकारून एका विशिष्ट माशाच्या शरिराच्या रचनेसंबंधानें तपशीलवार प्रश्न विचारले. त्यास जरूर ती माहिती देण्यांत आली; पण महिनाअखेर सदरहु गृहस्थाकडे गेलेल्या टेलिफोनच्या बिलांत चार रुपये त्याप्रीत्यर्थ चढवलेले त्यास आढळले! सरकारी खात्यानें जनतेची वाढती सोय केली म्हणून ती सर्वस्वी फुकट कशी मिळणार ?

---

### टेलिफोनवर बोलकें घड्याळ किती वाजले तें सांगणार

टेलिफोनच्या कोणत्याहि ग्राहकास बरोबर किती वाजले हें जाणण्याची इच्छा झाल्यास त्यानें आपणासमोरील चक्रावर ठराविक आकडे फिरवतांच दीड ते तीन मिनिटेंपर्यंत एक घड्याळ तास, मिनिटें व सेकंड त्यास सांगत राहील अशी व्यवस्था लंडनमध्यें येत्या जुलैपासून चालू होणार आहे. ग्राहकांशीं बोलणारें घड्याळ दर दहा सेकंदांनीं वेळ जाहीर करील. समजा ३ वाजून १० मिनिटांच्या सुमारास डायल फिरवून वेळेची पृच्छा कोणी एकानें केला, तर घड्याळ म्हणेल:-" तिसऱ्या ठोक्यास ३ वाजून १० मिनिटें बरोबर होतील." पुढें तीन ठोके पडतील आणि नंतर लागलीच घड्याळ उद्गारील:-" तिसऱ्या ठोक्यास ३ वाजून १० मिनिटें व १० सेकंड होतील." त्या नंतर तें म्हणेल. "३ वाजून १० मिनिटें व २० सेकंड झाले" ह्या क्रमानें वेळेचें मापन व घोषणा सारखी चालू राहील.

---

### हातानें काम आणि डोक्यानें काम


हस्तव्यवसाय करणारा कामकरी आणि हातांनीं काम करणारा पण डोक्याच्या मदतीनें तें करणारा पांढरपेशा नोकर ह्यांचे दोन निरानिराळे वर्ग करण्यांत येतात. तथापि हें वर्गीकरण नेहमीं समाधानकारक होतें असें मात्र नाहीं. हातानें काम करणारा मजूर आणि पांढरपेशा गणला जाणारा नोकर ह्यांच्या वर्गीकरणाच्या अडचणीस उद्देशून एका ब्रिटिश कमिटीनें आपल्या रिपोर्टांत खालील उदाहरण दिलें आहे. रिपोर्ट म्हणतो:-" टाइपरायटरचे किंवा हिशेब करण्याच्या यंत्रांचे टाइप बोटांनीं दाबणारा नोकर पांढरपेशा समजला जातो, परंतु लिनो टाइपचें तसेंच बटण छापखान्यांत दाबणारा इसम हस्तव्यवसाय करणाऱ्या कामकऱ्यांच्या वर्गांत घालण्यांत येतो."

---


## किर्लोस्कर पोलादी फर्निचर

फलंग, खुर्च्या, टेबल, बांक, कोंच, शेल्फ, स्टुलें, पाळणे इ०

कॅटलॉग मागवा.



वापरल्यानें पूर्ण समाधान मिळतें

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड....किर्लोस्करवाडी (सातारा)



## व्यापारी उलाढाली

ले०:—प्रो. वा. गो. काळे,

वृत्तपत्रांत येणाऱ्या व्यापारविषयक बातम्यांचें रहस्य समजावून सांगणारें पुस्तक.

किं. १ रु. (ट. ह. वेगळें)


## Notice to Contractors.

Sealed percentage tenders in Form B-1 for the following works will be received by the Undersigned on 8th May 1936 upto 2 P. M. Other particulars regarding the contract etc., can be had at the Undersigned's Office during office hours.

| | | Estimated Cost |
|---|---|---|
| 1. | C. R. to Poona Bangalore Road | Rs. 10,555/- |
| 2. | —do—Dharwar Saundatti Bagewadi Road | Rs. 7,605/- |
| 3. | —do—Dharwar Goa Road miles 1 to 18 | Rs. 1,752/- |
| 4. | —do— " " " " 19 to 58 | Rs. 2,612/- |
| 5. | —do—Dharwar Haliyal Road | Rs. 2,565/- |
| 6. | —do—Belgaum Linganmath Road and Nandgad Nagargalli Road. | Rs. 5,566/- |
| 7. | Improving the Karwar Bellary Road section from Gadag to Hesrur (Metal and Murum collection only). | Rs. 9,927/- |

2. The acceptance of the tender rests with the Undersigned and no reasons will be given for the acceptance or rejection of any tender.

Ex. Engineer's Office, Dharwar, 1st May 1936.

Sd/- P. K. SHINDE, Executive Engineer, Dharwar Dn. Dharwar.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—६ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०—४ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८-१२ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११८—६ |
| ४% १९६०–७० ... ... | ११३-१३ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९८—½ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०६-१३ |
| ४% १९४३ ... ... ... | ११०-१२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०८—६ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०६—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०८—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षे मुदत) | १०७—४ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५२–६२ ) ... | ११०—० |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—८ |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२८-१२ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०६—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३२—८ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५३०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १२९—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १००—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ८८८-१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १२% ) | १५३—७ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १४८०—० |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि. ७½%) | १५२२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २रु. ८ आ.) | १६९—४ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १४३—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५१७—८ |

---

## NOTICE TO CONTRACTORS

Sealed percentage tenders in Form F-1 for the following works will be received by the Undersigned on 13th May 1936 upto 2 P. M. Other particulars regarding the contract etc. can be had at the Undersigned's office during office hours :—

| | Estimated Cost. |
|---|---|
| 1. C. R. to the Poona Bangalore Road and Hubli Sholapur Road ... | Rs. 7476/- |
| 2. C. R. to Karwar Bellary Road section from Hubli to Gadag ... | Rs. 7266/- |
| 3. C. R. to Karwar Bellary Road section from Sangtikop to Hubli ... | Rs. 5679/- |
| 4. C. R. to Gadag Pala Road and Karwar Bellary road section from Gadag to Hosrur and C.R. to Road from Mile No. 8 of Gadag Pala to Hosrur Bungalow ... | Rs. 3668/- |
| 5. C. R. to Kumta Hubli Road ... | Rs. 2622/- |

2. The acceptance of the tender rests with the Undersigned and no reason will be given for the acceptance or rejection of any tender.

Ex. Engr's Office, Dharwar. 25th April 1936.

P. K. SHINDE, Executive Engineer, Dharwar Division, Dharwar.

आपले घरीं सालाचे बेगमीचें मीठ घेण्यापूर्वी आपले वाण्याजवळ

**सॉल्ट सॉल्ट**

बद्दल चौकशी करणेस विसरूं नका. ह्या मिठाची १ किंवा २ मणाची गोणी घेतल्यास आपला मीठ सुकवण्याचा, दळण्याचा व रांजणांत भरून ठेवण्याचा सर्व त्रास वांचेल. हें मीठ गोणींतच पण निवाऱ्याचे जागीं ठेवल्यास भर पावसाळ्यांत पाझरत नाहीं. आपले वाण्याजवळ नसल्यास आम्हांला लिहा.

रिप्रेझेंटेटिव्ह– एम्. वी. भिडे, तुळशीबाग, पुणें २

Uran Salt Works. 583, Chira Bazar, Bombay 2.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**

च्या लोकप्रिय प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

# दि बॉंबे लाइफ अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड.

( स्थापना १९०८ )

प्रगति

कंपनीची **लोकप्रियता** सिद्ध करते

कमाल प्रगति : पुरें केलेलें नवीन काम मिळविलें तें

| | | |
|---|---|---|
| १९२५ | : | रु. २२,१८,५०० |
| १९२७ | : | रु. ३८,७७,००० |
| १९२९ | : | रु. ५१,२२,५०० |
| १९३१ | : | रु. ५८,६६,५०० |
| १९३३ | : | रु. ९४,१६,५०० |
| **१९३५** | **:** | **रु. १,२३,२८,०००** |

माफक हप्ते, भरपूर बोनस, क्लेम्सची तात्काळ भरपाई, व पॉलिसींतील सवलतींच्या अटी हें " बॉंबे लाइफ पॉलिसी " चें वैशिष्ट्य आहे.

एजन्सी व पॉलिसी ह्यासंबंधींच्या तपशिलासाठीं लिहा:—

मॅनेजर,

बॉंबे लाइफ बिल्डिंग, ४५।४७, चर्चगेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.



## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | दर हजारीं त्रैवार्षिक नफा | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.



## " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, ' अर्थ ' ग्रन्थमाला
पुणें ४.



## डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें

| मध्यम वर्गांतील गृहेच्छू लोक | अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य |
|---|---|

### भाडेकरी—घरमालक—गृहयोजना

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.

जनरल मॅनेजर



INSURE WITH—

## The SUN SHINE INSURANCE Ltd.

LAHORE

BECAUSE OF
Its Most Modern, Unique & Beneficial Schemes

*For Prospectus Please write to:—*

Special Officer,
POONA BRANCH


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख १३ मे, १९३६. अंक २०

**MARATHE & Co.**
ENGINEERS & IRON FOUNDERS

WORKS : Natu Bag, Bhikardas Road, POONA 2

Can undertake to do any sort of casting.
We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act.
**Our prices are very competitive.**

OFFICE : 978-79, Sadashiv, Laxmi Rd., POONA 2

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

**माधव सोमण ब्रदर्स**
आम्हीं स्वतः तयार केलेलीं लुगडीं व इतर पेठांचा माल खात्रीलायक गिऱ्हाइकांस विकतों.
हुजूरपागेसमोर, पुणें, २.

*For All Medicinal Requisites*
— TRY —
**N. MAHADEV & Co.**
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner, POONA 2.

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी
टेलरिंग फर्म
मॅनेजरः-द्वा. प. पाटसकर, D.M.T.O.A. (London.)
**पाटसकर आणि कंपनी**
कटर अ. [illegible]
४८ निहाल पेठ, पुणें शहर.
सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी
आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

**न. वि. वडनेरकर**
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.
आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.
शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

**कोल सप्लाइंग फर्म**
उत्तम दगडी कोळसा ( बंगाल, सी.पी. )
आणि
कोक ह्यांचे व्यापारी
व
म्युनिसिपल, लोकलबोर्ड,
पी. डब्ल्यु. डी. ( सरकारी ) कॉन्ट्रॅक्टर्स
५११ बुधवार पेठ, पुणें शहर २.
तारेचा पत्ताः—व्यंकटेश. फोन नं. ४७१

**स्वदेशी**
**कापड म्हणजे काय?**
(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.
या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.
हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.
स्वदेशी माल मिळण्याचें खात्रीचा पुण्यांतील एकच ठिकाण
**स्वदेशी भांडार**
लक्ष्मीरोड, पुणें २.

# विविध माहिती

### मोटारीच्या चांचणींत स्त्रिया ज्यास्त अयशस्वी ठरतात

मोटार चालविण्यास परवाना मागणाऱ्या प्रत्येक तीन स्त्रियांपैकीं त्यांच्या चांचणीत एक नापास होते, असा ग्रेट ब्रिटनमध्यें अनुभव आहे. पुरुषांचे बाबतींत हें प्रमाण पांचास एक असें पडतें. सांगितलेल्या वेळीं चांचणीस हजर न रहाणारांची संख्या दर आठवड्यास ४५० इतकी भरते.

### संतति-नियमनाचें उट्टें निसर्ग काढतो ?

एका ब्रिटिश पत्रांतील लेखक म्हणतोः–" गेल्या दोन वर्षांत ग्रेटब्रिटन, हॉलंड, जर्मनी व न्यूझीलंड ह्या देशांमध्यें कित्येक स्त्रियांस एकाच बाळंतपणांत चार मुलें झालीं, आणि अमेरिकेंत एका स्त्रीस पांच झालीं. ह्याच काळांत दोन दोन व तीन तीन मुलांस एकाच वेळीं जन्म देणाऱ्या स्त्रियांच्या संख्येनें रेकॉर्ड मोडलें आहे. संतति-नियमनाच्या चळवळीचें उट्टें काढण्याचा हा निसर्गाचा प्रयत्न तर नाहीं ? "

### बँकांतील अजस्र ठेव

अमेरिकेंतील फेडरल रिझर्व्ह बँक ऑफ न्यूयॉर्क ही जगांतील, ठेवींच्या दृष्टीनें, सर्वांत मोठी बँक आहे. त्या बँकेंतील ठेवींची रकम सुमारें ८½ अब्ज रुपये भरते. ग्रेट ब्रिटनमधील मिडलंड बँकेचा नंबर दुसरा लागतो; त्यामधील ठेवींचा आंकडा ५¾ अब्ज रुपये आहे. गेल्या वर्षीं सर्वच बँकांचे ठेवींत बरीच वाढ झाली आहे.

### घरें बांधण्याची मोहीम

ग्रेट ब्रिटनमध्यें नवीं घरें बांधण्याचें प्रमाण दरसाल वाढत आहे, हें त्यासाठीं पुरविलेल्या पोलादी मालाच्या तुलनात्मक आकड्यांवरून स्पष्ट होतें.

घरें बांधण्यासाठीं पुरविलेला पोलादी माल

| १९३२ (टन) | १९३४ (टन) | १९३५ (टन) |
|---|---|---|
| १४ लक्ष ४४ हजार | २२ लक्ष ६६ हजार | २४ लक्ष ७१ हजार |

### देणावळ तशी धुणावळ

लेखकांच्या हातावर हिंदी चित्रपटांचे मालक पुष्कळ वेळां पन्नास रुपड्या टिकवून त्यांचेकडून कथानक लिहून घेतात आणि ह्यामुळें तें काम भिकार होतें, अशी तक्रार एका त्रैमासिकांत प्रसिद्ध झाली आहे. पक्वान्नाची गोडी त्यांत घातलेल्या साखरेवर अवलंबून असते ह्या पंजाबी म्हणीचा उल्लेख करून, लेखकांस योग्य मेहनताना दिल्यावांचून चांगलीं कथानकें रचलीं जाणार नाहींत अशी इशारत ह्या लेखांत देण्यांत आली आहे. देणावळ तशी धुणावळ !

### मुंबई येथील सोन्या–चांदीच्या बाजारांत वांधा

गेल्या आठवड्यांत मुंबई येथील सोन्या–चांदीच्या बाजाराचें नियंत्रण मंडळ व दलाल ह्यांचेमध्यें व्यवहारांच्या पद्धतिबाबत वांधा उत्पन्न होऊन नेहमीसारखी उलाढाल झाली नाहीं. वैशाख वायद्यापासून सुरू व्हावयाची मंडळानें ठरवलेली पद्धति गैरसोयीची व खर्चाची असल्याविषयीं दलाल व व्यापारी ह्यांची तक्रार होती, परंतु गेल्या शनिवारपासून सर्व व्यवहार पूर्ववत् चालू झाले.

### टाटा कंपनीच्या भागांची किंमत चढली

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीच्या डायरेक्टरांनीं गेल्या वर्षाबद्दल निरनिराळ्या भागांवर द्यावयाचें डिव्हिडंड जाहीर केलें आहे. तें लोकांस समाधानकारक वाटल्यावरून कंपनीच्या सर्व भागांचे बाजारभाव चढले आहेत. ऑर्डिनरी भागांची किंमत १४८ रुपयांपर्यंत उतरली होती, ती १५२ रुपयांवर चढली.

### संतति-नियमन परिचार संस्था

स्त्री-वर्गांत संतति-नियमनाच्या साधनांचा प्रचार करण्याच्या उद्देशानें विनामूल्य सल्ला देण्यासाठीं मुंबईस परळ भागांत एक परिचारालय स्थापन झालें आहे. हिंदुस्थानांत स्थापन झालेली ह्या प्रकारची सदरहू संस्था पहिलीच आहे असें म्हणतात.

### मुंबई म्युनिसिपालिटी आणि स्वदेशी मालाची खरेदी

मुंबईच्या म्युनिसिपालिटीनें १९३४–३५ सालांत एकूण १७ लक्ष ४८ हजार रुपयांचा माल खरेदी केला. त्यापैकीं ७¼ लक्ष रु. किंमतीचा माल देशी होता आणि सुमारें १० लक्षांचा परदेशी होता. परदेशी माल बहुतेक परदेशी कंपन्यांकडून खरेदी केला गेला.

### चीन देशांत सहकारी चळवळीचा विस्तार

१९३४ सालअखेर चीनमध्यें एकूण १५,४४९ सहकारी संस्था होत्या, त्यांपैकीं केवळ गेल्या एक वर्षांत स्थापन झालेल्या संस्थांची संख्या ९,००० होती. आर्थिक मंदीमुळें चिनी शेतकऱ्यांची स्थिति बिघडली असल्यानें सहकारी संस्थांची वाढ अशा मोठ्या प्रमाणांत झाली असली पाहिजे. एकूण सभासदांची संख्या ५½ लक्ष आहे. सहकारी संस्थांपैकीं ६७ टक्के पतपेढ्या आहेत. गेल्या सालीं नवीन सहकारी कायदा अंमलांत आला व सहकारी खातें स्थापन झालें. चीनमधील सहकारी चळवळीस सरकारचें उत्तम सहाय मिळत आहे.

### फ्रान्सच्या सुवर्णनिधीस ओहोटी

नुकत्याच झालेल्या कायदे मंडळाच्या निवडणुकींत समाजसत्तावाद्यांचें मताधिक्य होऊन अधिकाराचें पारडें त्या पक्षास अनुकूल झाल्यानें फ्रान्समध्यें अस्वस्थता आणि अनिश्चितपणा उत्पन्न झाला असून त्याचा परिणाम सोन्याच्या निर्गतीस पुन्हां जोर येण्यांत झाला आहे. बँक ऑफ फ्रान्सच्या सुवर्णनिधीस ओहोटी लागली असून निधीचें देणें—रकमेशीं असलेलें प्रमाण ६४·८५ टक्क्यांपर्यंत उतरलें आहे.

### एप्रिल महिन्यांतील जकातीचें उत्पन्न

एप्रिल १९३६ मध्यें हिंदुस्थान सरकारास जकातीपासून एकूण ४ कोटि ६१ लक्ष रुपये उत्पन्न झालें. गेल्या वर्षांतील तत्सम आकडा ४ कोटि ५६ लक्ष रु. असा होता.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २ एप्रिल रोजीं पुरा झालेला आठवडा | ७८,९२,८९७ |
| ता. ९ एप्रिल रोजीं पुरा झालेला आठवडा | ३६,२०,८९५ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते ९ एप्रिल १९३६ अखेर | २,६९,३४,२६,०१७ |

## अनुक्रमणिका.

पृष्ठ
१ विविध माहिती ... २३६
२ आडांत आहे तसें पोहऱ्यांत येईल ... २३७
३ हिंदी सिव्हिल सर्व्हिस २३८
४ स्फुट विचार ... २३९
ॲबिसीनियाचा पाडाव ह्रा राष्ट्रसंघाचा पराजय–राष्ट्रसंघाचा अवतार संपला-रेल्वे-मोटार स्पर्धा–प्रांतिक सरकारांनीं जागरूक असावें–सेंट्रल बँकेच्या नोकरवर्गासाठीं फंड–गेलें वर्ष एक्सचेंज बँकांस कसें गेलें–टाटा कंपनीच्या भागांवरील डिव्हिडंड
५ राष्ट्रांचें वाढतें आर्थिक स्वावलंबन ... २४१
६ ब्रिटिश बँकर हिंदुस्थानासंबंधानें काय म्हणतात! २४२
७ तरुणांचा तरणोपाय-उद्योगधंदे व व्यापार ... २४३
८ ग्रेट ब्रिटनमध्यें आयुर्विम्याची प्रगति ... २४३
९ हिंदी रिझर्व्ह बँकेची प्रगति ... ... २४४
१० निवडक बाजारभाव २४५

अर्थ

बुधवार, ता. १३ मे, १९३६

## आडांत आहे तसें पोहऱ्यांत येईल

### नीमायर शिफारसी

समाजांतील निरनिराळ्या वर्गांतील लोकांकडून करांच्या रूपानें पैसा गोळा करण्यांत येतो आणि राज्यकारभाराच्या सोयीसाठीं बनविलेल्या क्षेत्रांमध्यें खर्चाकरितां त्याची वांटणी केली जाते. हीं क्षेत्रें मध्यवर्ती, प्रांतिक व स्थानिक राज्यव्यवस्थेचीं होत. सबंद राष्ट्राच्या सामुदायिक हिताच्या बाबी मध्यवर्ती सरकाराच्या कक्षेंत येतात आणि त्यास तोडून दिलेलें उत्पन्नहि त्याच्या कारभारास व खर्चास साजेसेंच असतें. प्रांतांचे गट बनवण्यांत लोकसंख्या, नैसर्गिक परिस्थिति इत्यादि बाबतींत समतेचें तत्त्व पाळलेलें आहे असा मुळींच प्रकार नाहीं. ह्या कारणानें हिंदुस्थानांतलें प्रांत लहान-मोठ्या आकाराचें आणि विषम लोकसंख्येचे व उत्पन्नाचे असे झाले आहेत. मध्यवर्ती सरकारनें आपलीं कर्तव्यें आणि उत्पन्न–खर्चाच्या बाबी निश्चित करून बाकीचीं कामें आणि उत्पन्नें प्रांतिक सरकारांवर सोंपविलीं आहेत. हेंच लोण प्रत्येक प्रांतिक सरकारानें स्थानिक संस्थांपर्यंत नेऊन पोंचवलें आहे. प्रांतांची घडण राजकीय स्थित्यंतरास अनुसरून झाल्याचें इतिहासावरून दिसून येईल आणि सोयीसाठीं त्यांची पुनर्घटना केल्याचें ताजें उदाहरण सिंध व ओरिसा ह्यांच्या विभक्तीकरणांत सापडेल. प्रांतिक घटणेबरोबर त्यांच्या सरकाराच्या सांपत्तिक स्थितिची ठेवणहि बनत आली आहे. ह्या कारणानें प्रांतिक सरकारांचीं उत्पन्नें व दरमाणशी वार्षिक खर्च ह्यांचें प्रमाण प्रांतनिहाय भिन्न आहे. मध्यवर्ती सरकार निरनिराळ्या प्रांतांतून दरमाणशी सरासरीनें किती पैसा करांच्या रूपानें उचलतें ह्याच्या प्रमाणांतहि भिन्नता आहे. प्रांतिक परिस्थिति व उत्क्रांति ह्यांस धरून प्रांतांतील जनतेचें माणशी उत्पन्न व कर देण्याचें सामर्थ्य ह्यांत विलक्षण विषमता आढळते. तेव्हां, मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक सरकरा ह्यांच्या दरम्यान उत्पन्नाची वांटणी करण्यास कोणीहि बसला तरी त्यास लेखणीच्या फटकाऱ्यानें वर वर्णिलेली विषमता दूर करतां येणें शक्य नाहीं. कांहीं वर्षांचे उत्पन्न–खर्चाचे आंकडे घेऊन आणि पुढील सालांत होणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज करून सर ओटो निमायर ह्यांनीं दुरुस्त वांटणी केली आहे. आडांत असल त्या मानानें पोहोऱ्यांत येणार ह्या न्यायानें ही वांटणी झाली असून कांहीं प्रांतांच्या उत्पन्नांत वाढावा झाला आहे तर इतरांस पुढच्या आशेवर कालक्रमणा करावी लागणार आहे.

कुटुंबांतल्या लहान मुलांप्रमाणें सिंध, आसाम व सरहद्द प्रांत ह्या नवीन प्रांतांस सढळ हातानें उत्पन्न देण्यांत आलें आहे. त्यानंतर थोडी प्रतिकूल सांपत्तिक परिस्थिति असलेल्या प्रांतांस जादा उत्पन्न वांटलें आहे. संयुक्त प्रांतास प्रतिवर्षी २५ लाख ह्याप्रमाणें पांच वर्षें मदत मिळेल. आसामाच्या उत्पन्नांत ३० लक्षांचा वाढावा करण्यांत आला आहे. ओरिसा प्रांतास ४० लक्ष रुपयांशिवाय दुष्काळ फंडास मदत म्हणून पुनः जादा रकम मिळावयाची आहे. त्या प्रांतांतल्या इमारतींसाठा हिंदुस्थान सरकारनें मदतीची तजवीज केली पाहिजे ती निराळीच. बंगालच्या लोकसंख्येच्या मानानें तेथील सरकारचा खर्च अल्प प्रमाणांत होतो, ह्याचें एक कारण जमीनदारी धारापद्धतीमुळें जमीनमहसुलांत वाढ होणें अशक्य झालें आहे आणि सरकारी उत्पन्न मर्यादित राहिलें आहे, हें होय. तागाच्या निर्गतीवरील जकातीचें उत्पन्न कस्टम्सचें उत्पन्न असल्यानें आणि त्यावर मध्यवर्ती सरकारचा हक्क पूर्णत्वानें असल्यामुळें तें प्रारंभीं हिंदुस्थान सरकार सर्वस्वीं स्वतःसच घेत असे. पण बंगाल सरकारनें फार ओरड केली व त्या उत्पन्नांतला निम्मा हिस्सा त्यास मिळावा अशी योजना मध्यवर्ती सरकारनें मान्य केली. राज्यघटनेच्या कायद्यांत ही वांटणी अंतर्भूत केली आहे तरी तेवढ्यानें बंगालचें समाधान झालें नाहीं आणि आपणांस तें सबंध मिळावें असा त्या प्रांतानें तगादा लावला. तागाची लागवड मुख्यत्वेंकरून बंगालमध्यें होते आणि तागाच्या निर्गतीवरील जकातीचा भुर्दंड बंगाल प्रांतास पडतो हा कोटिक्रम सर ओटो निमायर ह्यांनीं अग्राह्य ठरवला आहे आणि त्या मुद्यावर जकातीचा जादा हिस्सा देण्यांतलें तत्व अमान्य केलें आहे. तथापि बंगाल सरकारची सांपत्तिक स्थिति लक्षांत घेतां त्यास सहाय देणें जरूर आहे आणि तें देण्याचा व्यावहारिक मार्ग जकातींतल्या हिश्याचाच आहे असें म्हणून त्यांनीं ५० टक्क्यांत आणखी १२½ टक्क्यांची भर हिंदुस्थान सरकारनें घालावी अशी शिफारस केली आहे. विचारसरणी कोणतीहि असली तरी बंगालला उत्पन्नांत वाढावा करून मिळाला आहे हें खरें.

मुंबई इलाख्याची बोळवण, पांच वर्षांनीं शक्य झाल्यास प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नाची वांटणी मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक सरकार ह्यांच्यामध्यें निम्मी–निम्मी होईल त्यावेळीं वांटावयाच्या निम्म्या रकमेपैकीं दै ह्या इलाख्यास मिळावा, ह्या सूचनेनें करण्यांत आली आहे. ह्या शिफारसींविरुद्ध मुंबई सरकार जोराची तक्रार करणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे, पण तिचा कांहीं उपयोग होईल असें वाटत नाहीं. निमायर रिपोर्टावर सर्व सरकारांचीं मतें मागवण्यांत आलीं आहेत, त्यांत मुंबई सरकारचाहि अभिप्राय अपेक्षित आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणीं मामुली पद्धतीपेक्षां ह्या मतविचारणेस अधिक महत्त्व आहे असें मानण्याचें कारण नाहीं. सर ओटो ह्यांचा रिपोर्ट ब्रिटिश सरकार

व पार्लमेंट बहुतेक जसाच्या तसा स्वीकारील असें दिसतें. तक्रार करून प्रांतीवरील कराच्या उत्पन्नांतल्या वांट्याविषयींची आपली जुनी व न्याय्य मागणी वेळोंच पुढें करावयाची हें धोरण मुंबई सरकारनें स्वीकारावें हें सरळ आहे यांत शंका नाहीं. ह्या मागणीचा, कोणी सांगावें ? आज नाहीं उद्यां उपयोग होण्याचा संभव आहे. जो जोरानें आणि सारखा ओरडतो त्यास कांहीं तरी मिळतें हाच न्याय येथें लागू करावा लागतो. इतर कांहीं प्रांत ह्याच मार्गाचा अवलंब करतील. हिंदुस्थानची आर्थिक स्थितिच इतकी इलाखीची झाली आहे कीं नवीन राज्यघटनेंत सुधारणेप्रीत्यर्थ खर्च करण्यास प्रांतिक सरकारांस फारसा वाव मिळण्यासारखा नाहीं. सामान्य करांचा बोजा कायम रहाणार व अनाठायीं खर्च कमी व्हावयाचे नाहींत. रेलवेचें उत्पन्न वाढण्याच्या शक्यतेवर बरीच भिस्त ठेवण्यांत आली आहे. काटकसर आणि हिंदुस्थान सरकारच्या खर्चाविषयींचें सामान्य धोरण हे प्रश्न आपल्या कामाच्या कक्षेंत येत नाहींत, ह्या समजुतीनें सर ओटो निमायर ह्यांनीं त्यांचा विचार केलेला नाहीं आणि त्यांची चौकशी ह्या दृष्टीनें पहातां मर्यादित स्वरूपाची झाली आहे. त्यांनीं केलेल्या वांटणी संबंधानें "आडांत आहे तसें पोहऱ्यांत येईल" एवढेंच म्हणून स्वस्थ बसावें लागतें.

---

## हिंदी सिव्हिल सर्व्हिस

### ब्रिटिश उमेदवारांचा तुटवडा

हिंदुस्थानांत चालू व्हावयाच्या राजकीय सुधारणा पोकळ आहेत असें हिंदी लोकमत एका बाजूस व्यक्त केलें जात आहे आणि दुसऱ्या बाजूस हिंदी सिव्हिल सर्व्हिसमध्यें ब्रिटिश उमेदवारांचा तुटवडा पडत आहे. ह्या गोष्टीचें रहस्य लक्षांत यावें म्हणून थोडासा पूर्वतिहास येथें दिला आहे. सन १८५३ पूर्वी हिंदुस्थानांतील अधिकाराच्या वरच्या जागा ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांचे वशिल्यानें भरल्या जात असत. तेव्हांपासून, परीक्षेमध्यें पास झालेल्या पहिल्या कांहीं उमेदवारांस गुणानुक्रमें त्या जागा देण्यांत येऊं लागल्या. ही परीक्षा इंग्लंडमध्येंच घेण्यांत येत असल्यानें सहाजिकच इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्यें हिंदी लायख तरुणांचा प्रवेश होणें प्रायः अशक्य होतें. ही परीक्षा इंग्लंडाप्रमाणें हिंदुस्थानांतहि घेण्यांत यावी असा ठराव ब्रिटिश पार्लमेंटानें १८९२ सालीं केला होता, परंतु त्याची अंमलबजावणी करण्याचें काम हातीं घेण्यांत आलें नाहीं. आय. सी. एस. मधील जबाबदारीच्या जागांवर हिंदी उमेदवारांच्या ज्यास्त प्रमाणांत नेमणुका व्हाव्या, अशाविषयीं चळवळ कित्येक दिवस चालू होती. हिंदुस्थानास स्वराज्याचे हक्क देण्याबाबत कॉमन्स सभेमध्यें जाहीर केलेल्या धोरणास अनुसरून भारतमंत्री मि. मॅंटेग्यू व व्हाइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड ह्यांनीं सुधारणाविषयक आपला रिपोर्ट तयार केला, त्यानें आय. सी. एस. च्या हिंदीकरणाचे प्रश्नास पुनः चालना मिळाली. इंग्लंडमध्यें नेमणुका होतात, त्याच पद्धतीनें त्या हिंदुस्थानांत होण्याबद्दल त्यांत आग्रह धरण्यांत आला व कांहीं ठराविक प्रमाणांत ( ३३ टक्के ) ही भरती हिंदुस्थानांतच झाली पाहिजे, असें मत व्यक्त करण्यांत आलें. ह्या प्रमाणांत दरसाल १½ टक्क्यांची भर पडून दहा वर्षांत ४८ टक्क्यांपर्यंत जावें, असेंहि त्यांत सुचविण्यांत आलें. ह्या सर्व सूचनांचा अंतर्भाव करणारा सरकारी ठराव १९२० सालीं जाहीर करण्यांत आला.

हिंदी सिव्हिल सर्व्हिसमधील जागांवर पूर्वी युरोपिअनांच्या उड्या पडत असत. परंतु हिंदी मंत्र्यांचे हाताखालीं त्यांस आतां कामें करण्याची पाळी आल्यानें इंग्रज उमेदवार पूर्वीइतके आकर्षिले जाण्याचें कमी झालें. वाढत्या महागाईमुळें पगाराचें अभिषहि पुरेसें प्रभावी राहिलें नाहीं. सिव्हिल सर्व्हिसमध्यें उत्कृष्ट दर्जाचे लायख तरुण दाखल होणें अगत्याचें आहे व त्यासाठीं कांहीं तरी उपाययोजना केली पाहिजे, ह्या हेतूनें १९२३ सालीं ली कमिशनची नेमणूक झाली. हिंदीकरणाची गति शीघ्रतर व्हावी हें ली कमिशननें मान्य केलें, कारण त्या खेरीज हिंदी नोकर वर्गांत जबाबदारीची जाणीव निर्माण होणार नाहीं असें त्याचें मत होतें. हिंदी व युरोपियन नोकरांच्या संख्येचें परस्पर प्रमाण ५०:५० असें असावें, अशी कमिशननें शिफारस केली. आय. सी. एस. मध्यें युरोपियन नोकरांची किमान संख्या कशी राखतां येईल हाच महत्त्वाचा प्रश्न आतां उपस्थित झाला होता. ह्याकरितां, कमिशननें सिव्हिल सर्व्हंटांचे पगार, पेन्शनें, सवलती, अधिकार, इत्यादि बाबतींत सढळ हातानें तरतूद केली. असें होऊनहि योग्य उमेदवारांचा तुटवडा असल्याची तक्रार अजून कमी झालेली नाहीं. उलट ती ज्यास्तच तीव्र झाली आहे.

१९२० च्या कायद्यानें सुरू झालेल्या सुधारणांमुळें ब्रिटिश उमेदवारांवर जसा प्रतिकूल परिणाम झाला, तसाच आतांहि झालेला दिसत आहे व हिंदी पुढाऱ्यांच्या राजकीय घोषणांमुळें आणि प्रतिकूल धोरणामुळें सिव्हिल सर्व्हिसच्या भवितव्याबद्दल संदेह उत्पन्न झाला आहे. ह्या कारणानें ब्रिटिश वसाहतींमध्यें नोकरीस जाण्याकडे त्यांचा कल असतो. व्यापारांत ज्यास्त पैसा मिळतो आणि त्यामुळेंहि सिव्हिल सर्व्हिसमध्यें येण्यास ते नाखुष असतात. परीक्षेचा निकाल जाहीर होण्याचीहि वेळ गैरसोईची असते, अशी तक्रार आहे.

कोणत्याहि कारणानें का होईना, सिव्हिल सर्व्हिसमधील हिंदी-युरोपियनांच्या भरतीचें ५० : ५० हें प्रमाण राखलें गेलेलें नाहीं, इतकेंच नव्हे तर हिंदी उमेदवारांचीहि मूळ योजनेस अनुसरून भरती झालेली नाहीं. गेल्या पांच वर्षांत ९१ ब्रिटिश व १९३ हिंदी लोकांस ह्या सर्व्हिसमध्यें प्रवेश मिळाला. १९३५-३६ मध्यें फक्त ५ ब्रिटिश व २६ हिंदी उमेदवारांची निवड केली जाईल. ही तूट भरून काढण्यासाठीं ग्रेट ब्रिटनमधील कॉलेजांतून प्रचार करण्यांत येऊन लायख विद्यार्थ्यांची नेमणूक करण्यांत येईल, असें प्रसिद्ध झालें होतें. हिंदुस्थान सरकार व ब्रिटिश सरकार ह्यांमध्यें बरीच वाटाघाट होऊन अनेक योजनांचा विचार झाला. हिंदी उमेदवारांसाठीं स्वतंत्र परीक्षा असावी व तीमधील अपेक्षित गुणांचा व योग्यतेचा ब्रिटिश परीक्षेशीं संबंध असूं नये, अशा तऱ्हेचें मत मांडण्यांत आलें होतें, परंतु सध्याची एकच परीक्षेची व विशिष्ट लायकीच्या दर्जाची पद्धत कायम रहावी असें ठरलें. सिव्हिल सर्व्हिसमध्यें नव्या उमेदवारांची तूट कशी भरून काढावयाची, ह्या संबंधींहि योजना आखण्यांत आली असल्याचें समजतें.

---

### अँग्लो इराणिअन ऑइल कंपनी

अँग्लो पर्शियन ऑइल कंपनी ह्या नांवानें स्थापन झालेल्या कंपनीस इराण सरकारनें आपल्या हद्दीमधील ५ लक्ष चौरस मैल क्षेत्रफळांतील पेट्रोलसंबंधाचे एकमेवाद्वितीय हक्क दिले होते. १९३२ सालीं ६० वर्षांचा नवीन करार करण्यांत आला व गेल्या वर्षी कंपनीचें नांव बदलून अँग्लो इराणिअन कंपनी असें ठेवण्यांत आलें. १९३५ सालीं कंपनीनें ७४३ लक्ष टन पेट्रोलचें उत्पादन केलें व स्वतःच्या मालकीच्या नळांतून तें इराणच्या आखाताचे कांठावर शुद्ध करून निर्गत केलें. कंपनीच्या व्यवहारक्षेत्रानें सबंध पृथ्वी व्यापली आहे. बर्मा-शेल ऑइल स्टोरेज अँड डिस्ट्रिब्यूटिंग कंपनीमार्फत हिंदुस्थानांत माल पुरविला जातो.

# स्फुट विचार

## ॲबिसीनियाचा पाडाव हा राष्ट्रसंघाचा पराजय आहे

इटलीनें ॲबिसीनिया पादाक्रांत करून जिंकला आणि राष्ट्रसंघाच्या सभासदत्वांत भूषण मानणारा जगांतला एक स्वतंत्र देश नाहींसा झाला. ॲबिसीनियांतल्या युद्धाचा शेवट कसा होणार ह्याचें भविष्य कित्येक महिन्यांपूर्वीच वर्तवण्यांत आलें होतें आणि ॲबिसीनियन लोकांनीं शत्रूस तोंड देऊन इतके महिने नेट धरला हीच गोष्ट आश्चर्यकारक व भूषणावह आहे. जगाच्या इतिहासांत ॲबिसीनियन युद्धास विशिष्ट महत्त्व प्राप्त झाल्यावांचून रहाणार नाहीं, ह्याचें कारण ॲबिसीनियाचा पराजय हा राष्ट्रसंघाचा पराजय आहे. जागतिक शांततेविरुद्ध इटलीनें गुन्हा केला असें राष्ट्रसंघानें जाहीर करून इटलीचें पारिपत्य करण्याच्या वाटाघाटी चालविल्यामुळें ॲबिसीनियास आशा उत्पन्न होऊन आपणांस प्रमुख युरोपिअन राष्ट्रांचें सहाय मिळेल असें वाटत होतें. परंतु वायफळ बडबडींत दिवस घालवून राष्ट्रसंघानें इटलीचा मार्ग सुलभ आणि ॲबिसीनियाचें स्वसंरक्षणाचें काम कठिण करून टाकलें. तरवारीच्या जोरावर इटलीनें ॲबिसीनिया जिंकला आणि त्या देशाचें स्वामित्व सर्वस्वी इटलीकडे आलें, अशी दर्पोक्ति मुसुलोनीच्या मुखांतून निघाली आहे, ह्याचा अर्थ बळी तो कान पिळी ह्या तत्वाचा उघड उघड विजय झाला असा स्पष्ट होत आहे. राष्ट्रां-राष्ट्रांतली भांडणें तडजोडीनें मिटवून जगांतून युद्धाची हद्दपारी करावयाची हें राष्ट्रसंघाच्या धोरणाचें सूत्र प्रसंग येतांच फोल ठरलें आहे. कोणत्याहि राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राविरुद्ध युद्ध पुकारल्यास बाकीच्या राष्ट्रांनीं एकजुटीनें त्याचें पारिपत्य करावें ही राष्ट्रसंघाची प्रतिज्ञा विफल झाली आहे. ॲबिसीनियाच्या स्वातंत्र्याचा नाश झाल्यानें राष्ट्रसंघाच्या नांवाला काळीमा लागला आहे ही गोष्ट ब्रिटिश व अमेरिकन लोकमतानें कबूल केली असून आपल्या स्वातंत्र्य रक्षणासाठी बलवान राष्ट्रांवर विसंबून रहाण्यांत राम नाहीं अशी बलहीन व लहान राष्ट्रांची खात्री झाली आहे. जागतिक शांतता व आंतरराष्ट्रीय सलोखा ह्यांच्या पायावर आर्थिक मंदीचें निवारण पुष्कळसें अवलंबून होतें, आणि ॲबिसिनियन युद्धाच्या ज्वाळा दूरवर पसरल्या नाहींत ही एक आपत्ति टळली म्हणून समाधान मानावें तर राष्ट्रसंघाची जी नामुष्की झाली आहे, तिच्या योगानें जगाच्या आर्थिक परिस्थितीच्या सुधारणेचे मार्गांत मोठाच व्यत्यय उत्पन्न झाला आहे, ही गोष्ट डोळ्यांपुढें उभी रहाते. सर्व राष्ट्रांच्या हिताच्या बाबींचा एकत्र विचार होऊन सहकारितेचें तद्विषयक धोरण अमलांत यावें ह्या कल्पनेस धक्का बसला असून परस्परांविषयीं साशंक असलेल्या राष्ट्रांचे गट निर्माण होऊन इटलीचें अनुकरण करण्याची प्रवृत्ति दृढ होण्याची भीति वाटत आहे.

---

## राष्ट्रसंघाचा अवतार संपला — पुढें काय ?

सर्व राष्ट्रांनीं मिळून सामुदायिक शांततारक्षण करण्याचा आपला प्रयत्न फ्रान्स वगैरे राष्ट्रांच्या कुचराईमुळें फसला आणि राष्ट्रसंघास आपलें मुख्य कर्तव्य करतां न येऊन त्याचा अवतार संपला ही लाजिरवाणी गोष्ट इतकी निर्विवाद स्पष्ट झाली आहे कीं, ती ब्रिटिश मुत्सद्यांस कबूल करावी लागली आहे. ॲबिसीनिया हा आफ्रिकेंतला रानटी लोकांचा प्रदेश जिंकून इटलीनें आधुनिक सुधारणा तेथें प्रस्थापित करण्याचें सांस्कृतिक काय पूर्ण केल्यानें आतां राष्ट्रसंघाचा गाडा सुरळीत चालण्यास सहाय देण्यास आपण मोकळे आहों अशी मायावीपणाची भाषा मुसुलोनीनें प्रारंभिली आहे. टाना सरोवर, सूदान व इजिप्त ह्यांच्या बाजूच्या ब्रिटिशांच्या हितसंबंधांस किंचितहि बाध आणण्याची आपली इच्छा नाहीं आणि फ्रान्स संबंधानें आपलें धोरण स्नेहाचें राहील असें म्हणून ॲबिसीनियन युद्धाचा अपराध पचवण्याचा त्याचा बेत आहे. ॲबिसीनियाचें भवितव्य निश्चित करण्यांत राष्ट्रसंघाचा सल्ला घ्यावा आणि त्या देशांत, मोरोक्कोमध्यें फ्रेंचांचें वर्चस्व आहे त्या प्रकारची सत्ता इटलीची चालावी अशी सूचना फ्रान्समधून आली आहे. इटलीच्या शिरजोरपणास फ्रेंच सरकारनें मुसुलोनीस कुचरपणा करून फूस दिली म्हणून उत्तेजन मिळालें ही गोष्ट आतां जगजाहीर असल्यानें ह्या प्रकारची योजना फ्रान्सनें सुचवावी हें स्वाभाविक आहे. परंतु अशा प्रकारच्या पट्ट्या लावून राष्ट्रसंघाचा जीर्णोद्धार करण्यांत हंशील नाहीं असेंच जागतिक मत बनलें आहे, ह्यांत संशय नाहीं. ज्या राष्ट्रसंघास ॲबिसीनियाच्या स्वातंत्र्याचें रक्षण करतां आलें नाहीं, तो ठेवून करावयाचें काय ? असा प्रश्न सर्वत्र विचारण्यांत येत आहे. बिनराजकीय प्रश्नांची वाटाघाट करण्याकरितां ही संस्था अस्तित्वांत ठेवून तिचा खर्च निष्कारण करीत बसणें वेडेपणाचें आहे हें मत सर्वत्र पसरत आहे. युरोपिअन राष्ट्रांचे गट बनून व महायुद्धापूर्वी त्यांचे परस्परांचें विरुद्ध असे पक्ष बनले होते, तशी स्थिति निर्माण होऊन जगांत परस्परांविषयीं अविश्वास माजून रहाणार कीं काय अशी भीति वाटत आहे. सारांश, इटलीच्या ॲबिसीनियांतील विजयानें गेल्या अठरा वर्षांतल्या शांतता पुरस्काराच्या प्रयत्नांवर बोळा फिरवला असून आतां पुढें काय करावें हा प्रश्न युरोपिअन राष्ट्रांच्या आणि राष्ट्रसंघाच्या इतर सभासदांच्या पुढें उभा राहिला आहे. प्रत्येक राष्ट्रानें स्वसंरक्षणाची योग्य तजवीज करावी अशी पाळी आली आहे आणि सामुदायिक शांततेच्या भ्रमाचा भोपळा फुटला आहे.

---

## रेल्वे–मोटार स्पर्धा

मोटार लॉऱ्यांची स्पर्धा हिंदी रेलवेना तीव्रपणानें भासूं लागल्यापासून ती दूर होण्यास उपाय योजण्याचा विचार सारखा चालू आहे. अलीकडे रेल्वे नुकसानींत आल्या आहेत व माणसांच्या आणि मालाच्या वहातुकींतला मोटारींचा वाढता हिस्सा त्यास कारणीभूत आहे, ह्या समजुतीनें रेलमार्गाचें गिऱ्हाइक दुसरीकडे जाणार नाहीं अशी व्यवस्था करण्याचें घाटत आहे. रेल्वे आणि मोटारी ह्यांपैकीं जें साधन अधिक सोयीचें व स्वस्त असेल त्याचा उपयोग करण्याची जनतेची प्रवृत्ति असणार हें स्वाभाविक आहे. जोंपर्यंत रेल्वेजचेंच तेवढें साधन लोकांस उपलब्ध होतें तोंपर्यंत गैरसोय झाली तरी त्याचा उपयोग करणें भाग होतें. परंतु मोटार लॉऱ्यांच्या योगानें जनतेची सोय झाली आहे, तिची जागा रेल्वेज भरून काढूं शकत नाहींत हें विसरून चालणार नाहीं. मोटार लॉरी गांवातल्या भरवस्तींतून निघून दुसऱ्या गांवीं त्याचप्रमाणें मध्यवर्ती बाजार पेठेंत किंवा प्रवाशांच्या घरींहि त्यांस नेऊन सोडते. ही सोय आगगाडींत नाहीं. ह्यामुळें आगगाडीनें न जातां मोटारीनें प्रवास करण्याची जनतेची प्रवृत्ति वाढली आहे. खर्चाच्या दृष्टीनेंहि मोटारीची वहातुक सोयीची पडते. मद्रास अँड सदर्न मराठा रेल्वेचें उदाहरण घेतल्यास असें आढळून येईल कीं, तिच्या स्टेशनांजवळील कित्येक गांवांचा प्रवास मोटारीनें करणें अधिक

सुखकर व स्वस्त वाटलेंच पाहिजे. अशा स्थितींत रेल्वेजचें उत्पन्न कमी झालें आहे, एवढ्याच कारणासाठी मोटारींच्या स्पर्धेस नियंत्रण घालणें लोकहिताच्या दृष्टीनें चुकीचें आणि अन्यायाचें ठरेल. आगगाड्या सुरू झाल्यामुळें बैलगाड्यांसारखीं इतर वहातुकीचीं साधनें मागें पडलीं. तोच प्रकार मोटार लॉऱ्यांचा धंदा जोरानें चालू झाल्याकारणानें रेल्वेजच्या संबंधांत झालेला आहे. ही प्रवृत्ति आर्थिक नियमास धरून झालेली आहे आणि जोंवर तीमुळें जनतेच्या हितास बाध येत नाहीं किंवा अनिष्ट परिणाम घडून येत नाहींत तोंवर कृत्रिम रीतीनें तिच्यांत ढवळाढवळ करणें युक्त होणार नाहीं.

### प्रांतिक सरकारांनीं जागरूक असावें

रेल्वेज व मोटारगाड्या ह्यांच्या परस्पर-स्पर्धेस तूर्त महत्त्व प्राप्त झालें आहे, ह्याचें कारण रेल्वेजची सांपत्तिक दुःस्थिति व तिच्या योगानें हिंदुस्थान सरकारच्या उत्पन्न-खर्चाच्या व्यवस्थेंत झालेला बिघाड हें होय. रेल्वेजची व्यवस्था व ताबा हिंदुस्थान सरकारचा आणि मोटारींची वहातूक प्रांतिक सरकारच्या नियंत्रणाखालीं, अशी हिंदुस्थानांतली दुहेरी परिस्थिति आहे. त्यामुळें रेल्वेजच्या वहातुकीचें उत्पन्न आणि मोटारींच्या धंद्याचा विकास ह्यांचा मेळ बसणें कठिण झालें आहे. ज्या ठिकाणीं रेल्वेचा प्रवेश झाला आहे, तेथें जाण्यास मोटारींचे रस्ते पुरवण्यांत येऊं नयेत आणि तें क्षेत्र सर्वस्वी रेल्वेजच्या ताब्यांत रहावें असें हिंदुस्थान सरकारचें म्हणणें आहे आणि ह्या बाबतींत तें प्रांतिक सरकारांच्या सहकारितेची अपेक्षा करीत आहे. प्रांतांच्या सरकारांस मध्यवर्ती सरकारनें आपल्या उत्पन्नाचा ज्यास्त भाग देऊन सहाय करावें अशी त्यांची मागणी आहे. पण ती पुरी होण्याचा संभव हिंदुस्थान सरकारची सांपत्तिक स्थिति सुधारेल तर आहे. रेल्वेजचें उत्पन्न वाढून नफा उरणें हा ती स्थिति सुधारण्याचा मुख्य उपाय आहे आणि प्रांतिक सरकारांस, मोटारींच्या वहातुकीची अनिष्ट स्पर्धा आपल्या मुलखांत मर्यादित करून रेल्वेंना मदत देतां देण्यासारखी आहे. तेव्हां, स्वतःच्या फायद्यासाठी प्रांतिक सरकारांनीं प्रस्तुत प्रश्नांत मन घालून रेल्वेजच्या उत्पन्न-वाढीचा मार्ग मोकळा करून द्यावा असें हिंदुस्थान सरकारचें म्हणणें आहे. ह्याबाबत सध्या चर्चा चालू असून निश्चित योजना तयार होत आहे. रेल्वेजचें उत्पन्न वाढलें तर तें सर्वांस पाहिजेच आहे आणि त्या बाबतींत मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकार ह्यांचा सहविचार आणि सहकार होणें हेंहि इष्ट आहे. तथापि आपल्या कक्षेंतल्या मोटार-वहातुकीपासून जनतेस मिळणाऱ्या सोयी कमी होऊन मोटारींच्या धंद्यास विघातक अशा योजना निश्चित केल्या जाणार नाहींत अशी खबरदारी प्रांतिक सरकारांनीं वेळींच घेणें अगत्याचें आहे. आमच्या इलाख्यांत मोटारींच्या मालकांवर जादा कराचा बोजा नुकताच बसला आहे, ही गोष्ट मुंबई सरकारनें प्रामुख्यानें लक्ष्यांत बाळगली पाहिजे. नाहीं तर, रेल्वेजची सांपत्तिक स्थिति सुधारून प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नाचा अंश मिळण्याच्या आमिषानें मोटारींच्या धंद्याचें नुकसान व लोकांची गैरसोय मात्र होईल आणि प्रांतिक सरकारांस मिळावयाच्या जादा उत्पन्नाची बाब अनिश्चित राहील. सबंद राष्ट्राच्या हिताविषयींच्या प्रश्नाकडे प्रांतिक सरकार व जनता यांनीं संकुचित दृष्टीनें पहावें असें कोणी म्हणणार नाहीं. तथापि, प्रांतिक सरकारांनीं भलतींच नियंत्रणें आपल्यावर व आपल्या प्रांतांतल्या धंद्यांवर लादलीं जाणार नाहींत अशी खटपट केली पाहिजे.

### सेंट्रल बँकेच्या नोकरवर्गासाठीं सहायक फंड

सेंट्रल बँक ऑफ इंडियास येत्या डिसेंबर महिन्यांत २५ वर्षें पुरी होतील. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, सर सोराबजी पोचखनवाला, ह्यांच्या कामगिरीबद्दल गुणग्राहकता व्यक्त करण्यासाठी भागीदारांनीं बँकेस सर सोराबजींचा एक अर्ध पुतळा नजर केला आहे, त्याचें उद्घाटन गेल्या शनिवारीं सर फिरोज सेटना ह्यांचे हस्तें झालें. त्याच प्रसंगीं, नियोजित 'सेंट्रल बँक ऑफ इंडिया क्लार्क्स फॅमिली फंडा'साठी पहिला हप्ता म्हणून २५ हजार रुपयांचा चेक त्यांचे स्वाधीन करण्यांत आला. ह्या फंडाचा विनियोग गरजू कारकुनांच्या कुटुंबीयांस मदत करण्याकडे करण्यांत येणार आहे. बँकेचे अध्यक्ष हे फंड कमिटीचे अध्यक्ष रहातील व दोन डायरेक्टर आणि नोकरवर्गापैकीं दोन कमिटीमध्यें असतील. ह्या फंडाची उपयुक्तता कायम टिकावी ह्याकरितां दरसाल त्यांत कांहीं रकम टाकावी, अशी बोर्डास विनंति करण्यांत आली.

### गेलें वर्ष एक्सचेंज बँकांस कसें गेलें ?

हिंदुस्थानांत कमी अधिक व्यवहार करणाऱ्या सुमारें अठरा एक्सचेंज बँका आहेत. इंपिरियल बँकेनेंहि परराष्ट्रीय व्यापारविषयक व्यवहार करण्यास आतां सुरवात केली आहे व एक नवी हिंदी एक्सचेंज बँक स्थापन करण्याची खटपट चालू आहे. गेल्या वर्षीं मुंबई बाजारांतील अल्प मुदतीच्या कर्जावरील व्याजाचा दर अत्यंत हलका राहिला व १९३५ च्या उत्तरार्धांत अशा कर्जास मागणीहि येईना. हिंदुस्थान सरकारनें आपल्या कर्जरोख्यांवरील व्याजाचा दर उतरविण्याची संधि साधली व त्यामुळें बँकांचें उत्पन्न कमी झालें. परराष्ट्रीय व्यापारहि पूर्ववत चालत नसल्यानें स्पर्धा व चोढओढ सुरू झाली. तथापि त्यांस मिळणाऱ्या नफ्याचें प्रमाण कायम राहिलें आहे.

### टाटा कंपनीच्या भागांवरील डिव्हिडंड

टाटा आयर्न अँन्ड स्टील कंपनीच्या येत्या वार्षिक साधारण-सभेच्या मंजुरीसाठी डायरेक्टरांनीं खालीलप्रमाणें नफ्याची वाटणी सुचविली आहे:—

| भाग | दर्शनी किंमत | डिव्हिडंड |
|---|---|---|
| प. प्रेफरन्स | १५० रु. | प्रत्येक भागास ९ रु. इनकम टॅक्स माफ नाहीं. |
| दु. प्रेफरन्स | १०० रु. | (१) प्रत्येक भागास १४ रु. इ. टॅ. माफ नाहीं. |
| | | (२) ३ रु. ८ आ. जादा. हायकोर्टानें मंजुरी दिलेल्या योजनेनुसार व कंपनीच्या १३३ व्या आर्टिकलला अनुसरून. |
| साधारण भाग | ७५ रु. | प्रत्येक भागास ६ रु. |
| डिफर्ड भाग | ३० रु. | प्रत्येक भागास ७ रु. ८ आ. |

टाटा कंपनीची दिवसानुदिवस प्रगति होत आहे व त्यामुळें ऑर्डिनरी भाग धारण करणारांचे हातीं डिव्हिडंड येत आहे. दुसऱ्या प्रेफरन्स भागांवरील रुज झालेलें कांहीं जुनें डिव्हिडंड द्यावयाचें राहिलेलें आहे, तेंहि आतां देण्यांत येईल.

## राष्ट्रांचें वाढतें आर्थिक स्वावलंबन

### ग्रेटब्रिटनचें उदाहरण

व्यक्ती आणि मानवी जग ह्यांस जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा संघटित राष्ट्राचा असतो ह्याची जाणीव दिवसानुदिवस दृढतर होत चालली आहे. व्यक्तिस्वातंत्र्याची बडेजाव आणि जागतिक संस्कृतीच्या महत्त्वाचें स्तोम ह्यांचे योगानें मानवी प्रगति होऊं शकत नाहीं असा आतां अनुभव येऊन चुकला आहे. समाजानें म्हणजे राष्ट्रीय सरकारनें व्यक्तिस्वातंत्र्यास हात लावूं नये आणि भांडवलशाहीस राष्ट्रीय मर्यादा उल्लंघून स्वहित साधण्यास रान मोकळें ठेवावें, म्हणजे सर्वांची प्रगति आपोआप होते, ही जुनी कल्पना अनुभवानें त्याज्य ठरली आहे. त्याचप्रमाणें, समाजसत्तावाद्यांचा राष्ट्रीयत्वास विरोध आणि आंतरराष्ट्रीयत्वाचा पुरस्कारहि व्यावहारिक दृष्ट्या अग्राह्य असल्याचें प्रत्ययास आलें आहे. संघटित राष्ट्रांनीं आपल्या लोकांच्या आर्थिक उन्नतीच्या योजना आखाव्या आणि जरूर दिसेल तेथें व्यक्तींची इच्छा बाजूस सारून उद्योगधंदे व व्यापार ह्यांस इष्ट वळण लावावें हा प्रकार ग्रेटब्रिटनसारख्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या माहेरघरांत चालू झाला आहे. राष्ट्राचें अस्तित्वच जेथें सरकारनें योजलेल्या संरक्षणाच्या उपायांवर अवलंबून आहे, तेथें त्या उपायांस सहायकारक होतील अशा आर्थिक योजना अमलांत आणणें हेंहि समाजाचें म्हणजे सरकारचें कर्तव्य होऊन बसतें. स्वतःचें संरक्षण प्रथम आणि नंतर इतर गोष्टी हें तत्त्व पूर्वापार सर्वमान्यच आहे. त्यास अनुसरूनच आर्थिक संघटन होणें अपरिहार्य आहे. जगाच्या शांततेसंबंधानें लोकांची राष्ट्रसंघावर भिस्त होती, परंतु राष्ट्रांच्या हातून महत्त्वाच्या बाबतींत परिणामकारक सहकार्य होऊं शकत नाहीं असें सर्वांच्या निदर्शनास आलें आहे. राष्ट्रांमधले तंटे युद्धाचा आश्रय न करतां तडजोडीनें मिटवावयाचे हें प्रमुख युरोपिअन राष्ट्रांनीं मान्य केलेलें तत्व कृतींत उतरत नसून सर्वत्र भावी युद्धांत आपला दम टिकूं शकेल अशी तजवीज करण्यांत मुत्सद्दी गुंतले आहेत. शस्त्रास्त्रांचा पुरवठा-व त्यासाठी लागणारा खर्च कमी न होतां वाढत आहे. ह्या कारणानें आंतरराष्ट्रीय व्यापार मर्यादित झाला आहे व तो वाढण्याची आशा तूर्त खुंटली आहे. स्वसंरक्षणासाठी राष्ट्रांमध्यें युद्धसामुग्रीची तयारी पाहिजे, ह्याचाच अर्थ असा होतो कीं भावी युद्धांत अपरिहार्य व अत्यंतोपयोगी अशा मालाचा व माणसांचा योग्य पुरवठा होण्याविषयींची शाश्वती पाहिजे. म्हणजे, आर्थिक व्यवहारांस सरकारनें आवश्यक दिसेल त्या तऱ्हेनें वळण लावण्याचें महत्त्व ओघानेंच सिद्ध झालें. लढाऊ खात्यावरचा खर्च जनतेवर करांचा ज्यास्त बोजा लादून आणि कर्ज काढूनहि वाढवणें ब्रिटिश सरकारास जरूर झालें आहे, हें मि. चेंबर्लेन ह्यांच्या बजेटावरून दिसून आलेंच आहे. ह्या संबंधांत ' लंडन टाइम्स ' नें आपल्या एका अग्रलेखांत खालील उद्गार काढले आहेतः—" ह्या देशांत ( ग्रेटब्रिटन ) तयार होणाऱ्या अन्नसामुग्रीची पैदास वाढवणें आणि जनतेच्या आरोग्यांत सुधारणा घडवून आणणें ह्यांसाठी योग्य अशा योजना आखल्या जाव्या ह्या मागणीस, राष्ट्राच्या संरक्षणाविषयींचा प्रश्न प्रामुख्यानें पुढें आल्याकारणानें विशेष जोर प्राप्त झाला आहे. " राष्ट्राचें संरक्षण धडधाकट सैनिकांवांचून होऊं शकत नाहीं, म्हणून चांगल्या प्रकृतीची व सशक्त जनता हवी आणि त्यासाठी स्वतःच्या देशांत उत्पन्न होणाऱ्या अन्नसामुग्रीचा चांगला व भरपूर पुरवठा हवा. हें घडून येण्यास ब्रिटिश शेतीचा विस्तार झाला पाहिजे व त्या धंद्यांतलें उत्पादन वाढलें पाहिजे. ह्या प्रकारचा लंडन टाइम्सचा अभिप्राय आहे, तो जगांत चाललेल्या आर्थिक घडामोडींच्या दृष्टीनें विचार करण्यासारखा आहे. ग्रेटब्रिटन हें राष्ट्र उद्योग--व्यापार प्रधान आहे, पण त्यांत अलीकडे शेतीच्या धंद्यास कृत्रिम रीतीनें उत्तेजन दिलें जात असून खुल्या व्यापाराचें तत्त्व धाब्यावर बसवण्यांत आलें आहे. तेथें साखरेची व गव्हाची पैदास वाढली आहे आणि इतर मालाच्या उत्पादनाचा विस्तार होत आहे. पण लंडन टाइम्स व त्या पत्राच्या मताचे लोक ह्यांचें एवढ्यानें समाधान झालेलें नसून सध्यापेक्षां विस्तृत प्रमाणावर अन्नाच्या पुरवठ्याची कायमची व निश्चित व्यवस्था झाली पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. युरोपांतलें सध्याचें युद्धाचें वातावरण निवळलें तरी ग्रेट ब्रिटनची आर्थिक स्वावलंबनाबाबतची जरूर नाहींशी व्हावयाची नाहीं आणि ही कायमची व्यवस्था व जबाबदारी समजली गेली पाहिजे असा अभिप्राय मि. लॉइड जॉर्ज ह्यांच्यासारख्या मुत्सद्यानें व्यक्त केला आहे. आंतरराष्ट्रीय श्रमविभागाचें तत्त्व मागें पडून आर्थिक स्वावलंबनाचा पुरस्कार प्रमुख युरोपिअन राष्ट्रांत चालला असून त्यास अनुसरून कृतिहि घडत आहे. ह्यावरून हिंदी जनता व सरकार यांस महत्त्वाचा बोध घेतां येण्याजोगा आहे. स्वदेशी आणि औद्योगिक संरक्षण ह्या बाबतींतले प्रश्न राष्ट्रीय वृत्तीनें सोडवणें हिंदुस्थानांत अत्यंत आवश्यक आहे ही गोष्ट सर्वांच्या मनांवर बिंबली पाहिजे. ह्या बाबतींत हिंदुस्थान सरकारच्या धोरणांत सहानुभूतिशून्यता शिरण्याची आणि हिंदी जनतेंत अज्ञान, गैरसमज आणि मतभेद ह्यांचा गोंधळ उडून तो देशाच्या राष्ट्रीय आर्थिक उन्नतीस विघातक होण्याची भीति उत्पन्न झाली आहे. सबब, जनतेच्या नेत्यांनीं वेळींच सावध होऊन आपणांस इष्ट वाटत असलेलें आर्थिक धोरण सरकाराकडून आंखून घेण्याची शिकस्त केली पाहिजे आणि स्वतः स्वावलंबनाचा आणि सहकार्याचा मार्ग चोखाळला पाहिजे. ग्रेटब्रिटनमधल्या सरकाराचें व जनतेचें उदाहरण ह्या देशांत खात्रीनें मार्गदर्शक होईल आणि म्हणूनच प्रस्तुत लेखांत आम्हीं त्याचें दिग्दर्शन केलें आहे.

### शेतीच्या मालास ग्रेटब्रिटनमध्यें उत्तेजन

शेतीच्या धंद्यांतील मालाबाबत ग्रेटब्रिटननें दुहजवी धोरण अंगीकारलें आहे. ब्रिटिश शेतकऱ्यास बाहेरून येणाऱ्या मालाची स्पर्धा जाचक होऊं नये आणि आयात व्यापारांत परकीय राष्ट्रांच्या मानानें ब्रिटिश साम्राज्यांतील देशांस जकातीच्या सवलती असाव्या, असें त्या धोरणाचें दुहेरी स्वरूप आहे. ग्रेटब्रिटनमध्यें होणाऱ्या आयातीचे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत त्यावरून १९३५ सालीं ह्या धोरणाचा यशस्वीपणा चालू राहिला असें दिसतें. शेतीच्या मालाची आयात घटली असून तिच्यांतला साम्राज्यांतर्गत देशांचा हिस्सा वाढला आहे. दूध व लोणी ह्यासारख्या पदार्थांची परराष्ट्रांतून होणारी आयात मात्र अपेक्षेप्रमाणें कमी न होतां वाढली आहे, हा अपवाद आहे. तथापि ह्या बाबतींतहि साम्राज्यांतर्गत देशांतून पूर्वीपेक्षां अधिक माल आला आहे.

## ब्रिटिश बँकर हिंदुस्थानासंबंधानें काय म्हणतात ?

———:०:———

परराष्ट्रांत स्थापन झालेल्या पण हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराबाबत व्यवहार करणाऱ्या एक्सचेंज बँकांचें हित त्या देशांतल्या आर्थिक परिस्थितीशीं संलग्न झालेलें असतें. हिंदुस्थानांत आर्थिक व व्यापारविषयक चलती असेल तर त्यांचे व्यवसाय मोठ्या प्रमाणावरचे आणि फायदेशीर होतील हें उघड आहे. एशियांतील इतर देशांमध्येंहि परराष्ट्रीय व्यापारास पैसा पुरवण्याचें कार्य ह्या बँका करितात आणि त्यांचे वार्षिक रिपोर्ट व ताळेबंद ह्यांमध्यें सदरहु व्यापाराच्या स्थितीचें प्रतिबिंब उमटलेलें पहावयास सांपडतें. विशेषेंकरून, एक्सचेंज बँकांच्या वार्षिक सभांचे प्रसंगीं त्यांचे अध्यक्ष आपल्या संस्थेच्या कारभाराचा आढावा घेतात व त्याचें सिंहावलोकन करतात त्यांत उपयुक्त माहिती दिलेली असते आणि मतप्रकाशनहि आढळतें. चार्टर्ड बँक, नॅशनल बँक, मर्कन्टाइल बँक, ईस्टर्न बँक, इत्यादि संस्थांच्या वार्षिक सभांत त्यांच्या अध्यक्षांनीं केलेलीं भाषणें अलीकडे प्रसिद्ध झाली आहेत आणि त्यांतले हिंदुस्थानासंबंधाचे उद्गार संक्षिप्त रीतीनें वाचकांच्या माहितीसाठीं आम्हीं येथें देत आहों. त्यांवरून हिंदुस्थानांतल्या परिस्थितीविषयीं ह्या बँकर्सचे अभिप्राय काय आहेत ह्याची कल्पना येईल.

***

"नॅशनल बँक ऑफ इंडिया"चे डेप्युटी चेअरमन, मि. लँगफर्ड जेम्स, ह्यांच्या भाषणाचा सारांशः—

" गेल्या वर्षाच्या दुसऱ्या सहामाहींत पैसा विपुल असूनहि तो गुंतवण्यास वाव फारच थोडा होता. व्यापाराची मंदी आणि कर्जरोख्यांवर सुटणाऱ्या व्याजाचा अल्प दर ह्यांमुळें बँकेस फायदा मिळवणें कठिण झालें. अजूनहि परिस्थिति विशेषशी आशाजनक नाहीं. हिंदुस्थानचा आंतरराष्ट्रीय व्यापार गेल्या वर्षीं थोडाफार वाढलेला आहे. गेल्या वर्षीं ४७ लक्ष औंस सोनें निर्गत झालें, त्याची किंमत ४४ कोटि रुपये भरली. ३ कोटि रुपयांची चांदीहि बाहेर गेली.

चांदीच्या बाजारभावांत विशेष वाढ झाल्यानें चांदीचे बाजारांत बऱ्याच उलाढाली झाल्या व सट्टेवाल्यांचें फावलें. सरकारनें ६ कोटि रुपयांची चांदी निर्गत केली. व्यापाऱ्यांनीं केलेल्या चांदीच्या निर्गतीची व आयातीची किंमत अनुक्रमें ३ कोटि ४५ लक्ष रु. व १ कोटि १७ लक्ष रुपये भरली. चांदीचे व्यवहारांत मुंबईमधील कित्येक धंदेवाले बुडाले, परंतु ही बँक असल्या व्यवहारांपासून अलिप्त राहिली. कमी पाऊस पडल्यामुळें व क्वचित प्रसंगीं फाजील पाणी झाल्यामुळें बंगाल प्रांतास गेलें वर्ष वाईट गेलें. तथापि, आर्थिक मंदींतून हिंदुस्थान हळु हळु डोकें वर काढीत आहे. गेल्या चार वर्षांत हिंदी निर्गत एकसारखी वाढत आहे हें त्याचेंच चिन्ह आहे. शेड्यूल्ड बँकांनीं हिंदी रिझर्व्ह बँकेंत आपल्या ठेवींच्या विवक्षित हिस्सा रकम ठेवलीच पाहिजे, असा निर्बंध आहे. ह्या रकमांवर व्याज मिळत नाहीं. आर्थिक परिस्थिति सुधारल्यानंतर हें नुकसान शेड्यूल्ड बँकांस जाणावल्यावेरीज रहाणार नाहीं. आज पैशास मागणीच नाहीं, म्हणून नुकसान फारसें वाटत नाहीं. "

***


धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०
कडून
हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक
नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |
|---|---|

| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
|---|---|---|

| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |
|---|---|

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.



# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

**This year 1934-35**
**Exceeds**
**2 CRORES & 50 LAKHS**

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## उद्योगधंदे आणि व्यापार हाच तरुणांचा तरणोपाय आहे.

### प्रोफेसर काळे ह्यांनीं केलेल्या सूचना

अनाथ विद्यार्थीगृह, पुणें, येथील विद्यार्थ्यांनीं मॅट्रिकपर्यंतचा अभ्यासक्रम पुरा केला असतां आतां पोटापाण्याचा प्रश्न कसा सोडवावा ह्या संबंधानें चर्चा व सूचना करण्याची डॉ. खेर ह्यांनीं विनंति केल्यावरून तेथें गेल्या रविवारीं सायंकाळीं प्रोफेसर काळे ह्यांनीं व्यक्त केलेले विचार आणि दिलेला व्यावहारिक सल्ला खालीं संक्षेपानें आम्हीं प्रसिद्ध करीत आहों:—

१ हायस्कूलचा किंवा कॉलेजाचा अभ्यास पुरा केलेल्या विद्यार्थ्यांस पोट भरण्याचा उद्योग मिळण्याचा अगोदरच अवघड झालेला प्रश्न गेल्या पांच वर्षांत आर्थिक मंदीमुळें विशेष बिकट झाला आहे.

२ सुस्थितींतल्या कुटुंबांतील तरुणांस वकील, डॉक्टर किंवा अध्यापक असल्या धंद्यांत चांगलें शिक्षण घेऊनहि स्थान प्राप्त होणें दुरापास्त झालें आहे.

३ उद्योगधंदे व व्यापार ह्यांकडे आमच्या समाजाचें आजवर दुर्लक्ष झाल्याकारणानें त्यांमध्यें वाव असूनहि प्रवेश मिळणें कठिण झालें आहे.

४ तरुणांस धंद्यांची नुसती यादी वाचून दाखवून कांहीं उपयोग नाहीं किंवा तूं अमूक धंदा कर असें प्रत्येक तरुणास निश्चयानें सांगतां येणार नाहीं. तयार धंदा अगर नोकरी चालत येण्याची त्यांनीं अपेक्षा करूं नये.

५ प्रत्येक तरुणाची स्थानिक आणि कौटुंबिक परिस्थिति आणि बौद्धिक व शारीरिक पात्रता ह्यांचा धंद्याची निवड करतांना विचार होणें इष्ट आहे. एकच सल्ला सर्वांस सारखा उपयोगी पडणार नाहीं.

६ सरकारी नोकरी मिळण्याची अपेक्षा ह्यापुढें कोणी फारशी करूं नये. व्यक्तिगत व मंडळयांच्या धंद्यांत आणि स्थानिक संस्थांमध्यें वाव आहे. त्यांमधील कामाची लायकी अभ्यासानें मिळवली पाहिजे. उद्योगधंदे व व्यापार हाच तरुणांचा तरणोपाय आहे.

७ विशेष बुद्धिमान व मेहनती विद्यार्थ्यांस कॉलेजांतील वरचें शिक्षण घेतां येईल आणि जरूर पडल्यास अंगमेहनतीचें किंवा बौद्धिक जोड काम करून पुढच्या आयुष्यक्रमाचा पाया घालतां येईल.

८ आप्तेष्टांच्या शिफारसीनें स्वतःस युक्त वाटणाऱ्या उद्योगांत शिरकाव करून घेण्याचा यत्न करावा. उमेदवारी व अनुभव ह्यांच्या दरवाज्यांतूनच कायम धंद्याची वाट आहे हें विसरूं नये.

९ टाइपरायटिंग, पत्रव्यवहार, जमाखर्च इत्यादि विषयांच्या व्यावहारिक ज्ञानाची आजकाल तरुणांस विशेष आवश्यकता आहे.

१० डोळे उघडे ठेवून बाजार पेठांचें निरिक्षण करावें आणि आपणांस कोणता उद्योग उचलतां येण्याजोगा आहे किंवा कोणचा नवा धंदा सुरू करतां येणें शक्य आहे, हें पहावें. स्वतःची धमक आणि लोकांची आवड ह्यांचा मेळ घालावा.

११ पडेल तें आणि लागेल तितका वेळ काम करण्याची तयारी पाहिजे. अल्प वेतनाचें व श्रमाचें काम मन लावून करण्यास तरुणांनीं मागें पुढें पहातां कामा नये. क्रमाक्रमानें एकांतून दुसरें आणि लहानांतून मोठें काम दिसतें.

१२ आजचे अनेक मोठेमोठे धंदेवाले व श्रीमान लोक प्रारंभीं हलकीं कामें करणारे दरिद्री तरुण होते, त्यांचें उदाहरण सतत डोळ्यांपुढें ठेवावें आणि अपयशानें खचून जाऊं नये. आशावादित्व आणि चिकाटी हे गुण अंगीं बाणले पाहिजेत.

१३ चालू धंद्यांत उमेदवार किंवा नवाशिक्या म्हणून शिरकाव घेण्याइतकीच महत्त्वाची गोष्ट नवीन धंदा निर्माण करणें ही आहे. जनतेच्या बदलत्या आवडीनिवडींकडे बारकाईनें लक्ष देऊन लोकांची नवीन सोय कमी खर्चांत कशी करतां येईल हें पहात असावें. हलकें समजलें जाणारें काम कसें करूं अशी लाज वाटून देऊं नये. नवीन धंदे व जुन्या धंद्यांचे नवीन पर्याय अनेक आहेत.

१४ तालुक्याच्या लहान–मोठ्या गांवांत व खेडेगांवांत तरुणांस जनतेची सोय व सेवा करून स्वतःच्या पोटास मिळवण्यास पुष्कळ जागा आहे.

१५ कोणता धंदा करून पोट भरावयाचें ह्या विषयींचे प्रयोग आणि निर्णय प्रत्येकानें दुसऱ्यांच्या सल्ल्यानें व सहायानें पण स्वतःच्या बुद्धीनें व हिमतीनें केला पाहिजे.

१६ कार्यपरायणता व सचोटी ह्यांच्या योगानें दुसऱ्यांचा विश्वास संपादन केल्यास लहान सहान धंद्यांस लागणारें भांडवल मिळूं शकतें.

---

### ग्रेट ब्रिटनमध्यें आयुर्विम्याची प्रगति

विम्याचा प्रसार होण्यास हिंदुस्थानांत पुष्कळ वाव आहे आणि त्याची प्रगति होणें अत्यंत इष्ट आहे ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली आहे. इतर देशांत चाललेल्या विम्याच्या विस्ताराची माहिती येथील जनता व विमा–मंडळया ह्यांस उत्तेजनदायक झाल्यावांचून रहाणार नाहीं. ब्रिटिश कंपन्यांनीं ग्रेट ब्रिटनमध्यें उतरवलेल्या "नफ्यासह" आयुर्विम्याच्या पॉलिसी १९२५ मध्यें ३६ लक्ष ५७ हजार शिल्लक होत्या त्या १९३४ मध्यें ४४ लक्ष १७ हजार झाल्या. ह्या पॉलिसींची देणें असलेली रक्कम १९२४ मध्यें ९३ कोटि पौंड होती, ती १९३४ मध्यें १९९ कोटि पौंड झाली. नफाविरहित पॉलिसी १९३४ मध्यें १० लक्ष होत्या व त्यांची रकम ३६ कोटि पौंड होती. त्यांच्या रकमेचे आंकडे ह्या दोन वर्षांत अनुक्रमें करून ३५ कोटि व ५१ कोटि पौंड असे होते. ब्रिटिशेतर मंडळ्यांच्या व्यवहारांचा समावेश वरील आंकड्यांत केलेला नाहीं. पण निश्चित वार्षिक उत्पन्न मिळण्याच्या विमाप्रकाराचाहि त्यांत अंतर्भाव नाहीं. ह्यासंबंधांतले १९२५ आणि १९३४ चे आंकडे अनुक्रमें करून ३० लक्ष आणि ५५ लक्ष पौंड असे आहेत.

---

### पू. खा. जिल्हा सहकारी लँड मॉर्गेज बँक, लि.

ता. ३१ मार्च, १९३६ अखेर वरील बँकेकडे सुमारें ३½ लक्ष रुपयांची मागणी करणारे ३८० अर्ज आले. त्यांपैकीं गेल्या सात महिन्यांत सुमारें २०० अर्जांचा निकाल करण्यांत आलेला असून ह्यांपैकीं ७९ हजार रुपयांच्या मागणीचे ४८ अर्ज दाखल करून घेण्यांत आले आहेत. बाकीच्या १८० अर्जांची चौकशी व्हावयाची आहे, असें ताज्या माहितीवरून समजतें.

## हिंदी रिझर्व्ह बँकेची प्रगति

एप्रिल १९३५ च्या आरंभापासून रिझर्व्ह बँकेच्या कारभारास सुरवात झाली व सरकारी चलनखात्याची व्यवस्था बँकेकडे आली. रिझर्व्ह बँकेच्या बँकिंगच्या व्यवहारास प्रत्यक्ष सुरवात जुलैच्या प्रारंभापासून झाली व बँकरेट जाहीर होऊं लागला. ज्या ठिकाणीं रिझर्व्ह बँकेच्या शाखा नाहींत, तेथें इंपीरियल बँक तिचे एजंट ह्या नात्यानें व्यवहार करते. ३१ मार्च १९३६ अखेरची रिझर्व्ह बँकेची प्रगति खालील आंकडे दर्शवितील:—

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया
( कोटि रु. )

| | ५ एप्रिल १९३५ | २८ जून १९३५ | २७ सप्टें. १९३५ | २७ डिसें. १९३५ | ३ एप्रिल १९३६ |
|---|---|---|---|---|---|
| **देणें** | | | | | |
| खेळत्या नोटा | १६७.० | १६२.४ | १५६.३ | १७२.१ | १६९.८ |
| ठेवी | | | | | |
| सरकारी | १८.४ | २२.३ | १३.४ | ७.१ | ७.९ |
| इतर | ७.८ | १७.१ | ३५.८ | २८.२ | ३५.१ |
| **येणें** | | | | | |
| सोनें | ४४.४ | ४४.४ | ४४.४ | ४४.४ | ४४.८ |
| रुपये ( नाणें ) | ४९.९ | ५१.९ | ५८.१ | ५७.२ | ५९.८ |
| परदेशांतील शिलका | ११.९ | १८.३ | १५.८ | १८.० | २२.४ |
| ब्रिटिश चलनांतल (स्टर्लिंग) रोखे | ४८.६ | ५३.२ | ६६.२ | ६६.२ | ६७.३ |
| हिं. सरकारचे रोखे | ४३.१ | ३८.५ | २५.५ | २५.५ | २४.४ |
| गुंतविलेल्या रकमा | ५.० | ६.० | ५.४ | ५.२ | ५.१ |

रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या म्हणजे शेड्यूल्ड बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे आपल्या ठेवींच्या विशिष्ट प्रमाणांत शिलका राखल्या पाहिजेत, असा कायद्याचा निर्बंध आहे. ह्या शिलकांवर रिझर्व्ह बँक व्याज देत नाहीं. 'नॅशनल बँक ऑफ इंडिया' ह्या एक्सचेंज बँकेच्या वार्षिक सभेचे वेळीं तिच्या उपाध्यक्षांनीं ह्यावर टीका केली व परिस्थिति सुधारून व्याजाचे दर वाढले, म्हणजे हिंदी व्यापारी बँकांस हें व्याजाचें नुकसान जाणवल्याखेरीज रहाणार नाहीं, असें सांगितलें. तथापि,रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेमुळें व्यापारी बँकांकडील ठेवींचा ओघ एक्सचेंज बँकांकडे वळल्याचीं अजून चिन्हें दिसत नाहींत. वर दिलेल्या आंकड्यांवरून रिझर्व्ह बँकेच्या नोटास दर शेकडा २६½ इतकें सोन्याचें तारण आहे व ब्रिटिश चलनांतील रोखे व शिलका हिशेबांत घेतल्यास एकूण तारण ७९ टक्के इतकें होतें, असें आढळून येईल.

### 'अर्था'चें व्यवसायबंधूकडून स्वागत

"व्यापारविन्मुख म्हणून समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्राला नवीन इष्ट तें वळण लावण्याच्या दृष्टीनें अशा पत्राची फार आवश्यकता आहे, व म्हणूनच प्रो. काळे यांनीं केवळ कर्तव्यबुद्धीनें तें चालविलें याबद्दल त्यांस धन्यवाद देणें जरूर आहे. प्रो. काळे यांच्यासारख्या सुप्रसिद्ध, कठीण विषय सुलभ करण्यांत निष्णात व चिकाटीच्या वृत्तीच्या अर्थशास्त्रज्ञाकडे या पत्राचें संपादकत्व असल्यामुळेंच प्रतिकूल परिस्थितीतहि तें प्रगतीच्या मार्गाला लागलें. प्रो. काळे हे आपलें कर्तव्य करीत आहेत; महाराष्ट्र जनतेनें मात्र त्यांच्या प्रयत्नाचें चीज करून आपलें कर्तव्य पार पाडलें पाहिजे."

—स्थानिक स्वराज्य त्रैमासिक


# NOTICE TO CONTRACTORS.

Sealed percentage tenders in Form B-1 for the following works will be received by the Undersigned on 20-5-1936 upto 2 P. M. Other particulars regarding the contract etc., can be had at the Undersigned's Office during office hours.

1. C. R. to Belgaum Hungund Road Rs. 4,742/-
2. C. R. to Gadag Badami Road Rs. 3,688/-
3. C. R. to Sholapur Hubli Road Rs. 3,266/-

2. The acceptance of the tender rests with the Undersigned and no reason will be given for the acceptance or rejection of any tender.

Ex. Engr's Office, Dharwar. 9th May 1936.

P. K. Shinde, Executive Engineer, Dharwar Division.

# NOTICE TO CONTRACTORS.

Sealed item rate tenders in B-2 form are invited for the work "Providing drainage and flushing type latrines for the students' Hostel at the College of Engineering, Poona" estimated to cost Rs. 16,039/-.

2. Tender forms, specifications, etc., can be had in the Undersigned's Office during office hours upto 19th May 1936 on Payment Rs. of 3/-

3. An earnest money of Rs. 160/- to be paid into Poona treasury and completed chalan to accompany the tender.

4. A solvency certificate should accompany the tender.

5. Tenders will be received in the Undersigned's office upto 3 P. M. on 21st May 1936.

Office of the Ex. Engr. Poona Division. Poona, 9th May 1936.

Sd/- G. D. Daftary, Executive Engineer, Poona Division.

# S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

## व्यापारी उलाढाली

ले०:—प्रो. वा. गो. काळे,

वृत्तपत्रांत येणाऱ्या व्यापारविषयक बातम्यांचें रहस्य समजावून सांगणारें पुस्तक.

किं. १ रु. (ट. ह. वेगळें)

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—८ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०—६ |
| ५% ( १९२९-४४ ) लोन ... ... | १०९—० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११८—१२ |
| ४% १९६०—७० ... ... | ११४—२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९८—१० |
| ३½% १९४७—५० ... ... | १०७—० |
| ४% १९४३ ... ... ... | १११—० |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०८—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०६—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०८—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | १०८—२ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३—६३ ) ... | ११०—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—८ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२८—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०६—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३२—६ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५३१—४ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १२९—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १००—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ८८३-१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५३-१२ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २२५—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २३५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १५०५—० |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५३५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७०—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १५२-१२ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५३३-१२ |


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १५ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १६ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १७ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १८ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | १९ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २० शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २१ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २२ साक्री ( „ „ ) |
| ९ अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २३ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० शेवगांव ( „ „ ) | २४ मालेगांव ( „ नाशिक ) |
| ११ कोपरगांव ( „ „ ) | २५ सटाणा ( „ „ ) |
| १२ भिवंडी ( „ ठाणें ) | २६ कळवण ( „ „ ) |
| १३ पालघर ( „ „ ) | २७ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १४ कल्याण ( „ „ ) | २८ कालोल ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २००००००चेवर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल. मेहता.
मॅनेजिंग डायरेक्टर.

## हिंदी रिझर्व्ह बँकेची प्रगति

एप्रिल १९३५ च्या आरंभापासून रिझर्व्ह बँकेच्या कारभारास सुरवात झाली व सरकारी चलनखात्याची व्यवस्था बँकेकडे आली. रिझर्व्ह बँकेच्या बँकिंगच्या व्यवहारास प्रत्यक्ष सुरवात जुलैच्या प्रारंभापासून झाली व बँकरेट जाहीर होऊं लागला. ज्या ठिकाणीं रिझर्व्ह बँकेच्या शाखा नाहींत, तेथें इंपीरियल बँक तिचे एजंट ह्या नात्यानें व्यवहार करते. ३१ मार्च १९३६ अखेरची रिझर्व्ह बँकेची प्रगति खालील आंकडे दर्शवितील:—

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया
( कोटि रु. )

| | ५ एप्रिल १९३५ | २८ जून १९३५ | २७ सप्टें. १९३५ | २७ डिसें. १९३५ | ३ एप्रिल १९३६ |
|---|---|---|---|---|---|
| **देणें** | | | | | |
| खेळत्या नोटा | १६७.० | १६२.४ | १५६.३ | १७२.१ | १६९.८ |
| ठेवी | | | | | |
| सरकारी | १८.४ | २२.३ | १३.४ | ७.१ | ७.९ |
| इतर | ७.८ | १७.१ | ३५.८ | २८.२ | ३५.१ |
| **येणें** | | | | | |
| सोनें | ४४.४ | ४४.४ | ४४.४ | ४४.४ | ४४.८ |
| रुपये ( नाणें ) | ४९.९ | ५१.९ | ५८.१ | ५७.२ | ५९.८ |
| परदेशांतील शिलका | ११.९ | १८.३ | १५.८ | १८.० | २२.४ |
| ब्रिटिश चलनांतल (स्टर्लिंग) रोखे | ४८.६ | ५३.२ | ६६.२ | ६६.२ | ६७.३ |
| हिं. सरकारचे रोखे | ४३.१ | ३८.५ | २५.५ | २५.५ | २४.४ |
| गुंतविलेल्या रकमा | ५.० | ६.० | ५.४ | ५.२ | ५.१ |

रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या म्हणजे शेड्यूल्ड बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे आपल्या ठेवींच्या विशिष्ट प्रमाणांत शिलका राखल्या पाहिजेत, असा कायद्याचा निर्बंध आहे. ह्या शिलकांवर रिझर्व्ह बँक व्याज देत नाहीं. 'नॅशनल बँक ऑफ इंडिया' ह्या एक्सचेंज बँकेच्या वार्षिक सभेचे वेळीं तिच्या उपाध्यक्षांनीं ह्यावर टीका केली व परिस्थिति सुधारून व्याजाचे दर वाढले, म्हणजे हिंदी व्यापारी बँकांस हें व्याजाचें नुकसान जाणवल्याखेरीज रहाणार नाहीं, असें सांगितलें. तथापि,रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेमुळें व्यापारी बँकांकडील ठेवींचा ओघ एक्सचेंज बँकांकडे वळल्याचीं अजून चिन्हें दिसत नाहींत. वर दिलेल्या आंकड्यांवरून रिझर्व्ह बँकेच्या नोटांस दर शेकडा २६½ इतकें सोन्याचें तारण आहे व ब्रिटिश चलनांतील रोखे व शिलका हिशेबांत घेतल्यास एकूण तारण ७९ टक्के इतकें होतें, असें आढळून येईल.

### 'अर्था'चें व्यवसायबंधूकडून स्वागत

"व्यापारविन्मुख म्हणून समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्राला नवीन इष्ट तें वळण लावण्याच्या दृष्टीनें अशा पत्राची फार आवश्यकता आहे, व म्हणूनच प्रो. काळे यांनीं केवळ कर्तव्यबुद्धीनें तें चालविलें याबद्दल त्यांस धन्यवाद देणें जरूर आहे. प्रो. काळे यांच्यासारख्या सुप्रसिद्ध, कठीण विषय सुलभ करण्यांत निष्णात व चिकाटीच्या वृत्तीच्या अर्थशास्त्रज्ञाकडे या पत्राचें संपादकत्व असल्यामुळेंच प्रतिकूल परिस्थितीतहि तें प्रगतीच्या मार्गाला लागलें. प्रो. काळे हे आपलें कर्तव्य करीत आहेत; महाराष्ट्र जनतेनें मात्र त्यांच्या प्रयत्नाचें चीज करून आपलें कर्तव्य पार पाडलें पाहिजे."

—स्थानिक स्वराज्य त्रैमासिक


## NOTICE TO CONTRACTORS.

Sealed percentage tenders in Form B-1 for the following works will be received by the Undersigned on 20-5-1936 upto 2 P. M. Other particulars regarding the contract etc., can be had at the Undersigned's Office during office hours.

1. C. R. to Belgaum Hungund Road Rs. 4,742/-
2. C. R. to Gadag Badami Road Rs. 3,638/-
3. C. R. to Sholapur Hubli Road Rs. 3,266/-

2. The acceptance of the tender rests with the Undersigned and no reason will be given for the acceptance or rejection of any tender.

Ex. Engr's Office, Dharwar. 9th May 1936. — P. K. SHINDE, Executive Engineer, Dharwar Division.

## NOTICE TO CONTRACTORS.

Sealed item rate tenders in B-2 form are invited for the work "Providing drainage and flushing type latrines for the students' Hostel at the College of Engineering, Poona" estimated to cost Rs. 16,039/-.

2. Tender forms, specifications, etc., can be had in the Undersigned's Office during office hours upto 19th May 1936 on Payment Rs. of 3/-

3. An earnest money of Rs. 160/- to be paid into Poona treasury and completed chalan to accompany the tender.

4. A solvency certificate should accompany the tender.

5. Tenders will be received in the Undersigned's office upto 3 P. M. on 21st May 1936.

Office of the Ex. Engr. Poona Division. Poona, 9th May 1936. — Sd/- G. D. DAFTARY, Executive Engineer, Poona Division.

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

## व्यापारी उलाढाली

ले०:—प्रो. वा. गो. काळे,

वृत्तपत्रांत येणाऱ्या व्यापारविषयक बातम्यांचें रहस्य समजावून सांगणारें पुस्तक.

किं. १ रु. (ट. ह. वेगळें)

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—८ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०—६ |
| ५% ( १९२९-४४ ) लोन ... ... | १०९—० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११८-१२ |
| ४% १९६०—७० ... ... | ११४—२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९८-१० |
| ३½% १९४७—५० ... ... | १०७—० |
| ४% १९४३ ... ... ... | १११—० |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०८—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०६—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०८—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १०८—२ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३—६३ ) ... | ११०—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२२—८ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२८—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०६—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३२—६ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५३१—४ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १२९—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १००—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ८८३-१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १२% ) | १५३-१२ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २२५—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २३५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १५०५—० |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५३५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. द्रु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७०—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १५२-१२ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ५३३-१२ |

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

**स्थापना १९११.**

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( ज़ि. पुणें ) | १५ अकलूज ( जि. सोलापूर |
| २ सातारा ( „ सातारा ) | १६ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १७ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १८ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | १९ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २० शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २१ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २२ साक्री ( „ „ ) |
| ९ अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २३ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० शेवगांव ( „ „ ) | २४ मालेगांव ( „ नाशिक ) |
| ११ कोपरगांव ( „ „ ) | २५ सटाणा ( „ „ ) |
| १२ भिवंडी ( „ ठाणें ) | २६ कळवण ( „ „ ) |
| १३ पालघर ( „ „ ) | २७ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १४ कल्याण ( „ „ ) | २८ कालोल ( „ „ ) |

**खेळतें भांडवल रु. २००००००चे वर**

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकारितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल. मेहता.
मॅनेजिंग डायरेक्टर.

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "
स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—
कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.
अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी
हयातींतील विम्यास ३७॥ रु. | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास ४५ रु.
जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

" अर्थ " ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं. १ रु. ( ट. स. निराळा )
व्यवस्थापक, ' अर्थ ' ग्रन्थमाला
पुणें ४.

दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.
रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.
पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.
सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये ?
ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.
तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.
८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

आपणांस विहीर बोअर करावयाची आहे काय ?
भिडे आणि सन्स्
स्वतः तयार केलेल्या मशीननें बोअर खणून देतात.
चौकशी कराः—
भिडे आणि सन्स
सांगली ( S. M. C. ) शनीचा पार, पुणें. २

श्री माणकेश एजन्सी
शहापूर लुगडीं, जरीचीं व टोपपदरी, अंगास रंग न लागणारीं मिळतात.
तसेंच, इरकल, संबायत वगैरे पेठेच्या गॅरंटीड माल मिळतो.
मंडई रस्ता, शनीचा पार, पुणें.

डॉन ऑफ इंडिया विमा कंपनी लिमिटेड, पुणें
पाहिजेत
दुप्पट रकमेची व नफ्याची 'डॉन'ची बँको इन्शुअरन्स इन्व्हेस्टमेंट पॉलिसी किंमत फक्त रुपये १०
मुंबई इलाख्यांत जिल्ह्याचे ठिकाणीं प्रसाराकरितां चीफ ऑर्गनाइझर्स पाहिजेत. मासिक पगार रु. १०० ते २५० लायकीप्रमाणें. जास्त चौकशी करा व माहिती मागवा.
जनरल मॅनेजर.

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा ( Dandruff ), केंस गळणें व टक्कल यांवर अनुभविक उपाय. केंसांची वाढ करण्यास उत्कृष्ट साधन. white oil पासून अलिप्त. बाटली किं. १ रु. पो. व पॅ. निराळें. पुण्यांत नू. म. विद्यालय भांडार, येथें मिळेल.
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग. कं. अमदाबाद.

हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुर्डा, घ. नं. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.


संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ | पुणें, बुधवार, तारीख २० मे, १९३६. | अंक २१

## किर्लोस्कर पोलादी फर्निचर

फलंग, खुर्च्या, टेबल, बांक, कोंच, शेल्फ, स्टुलें, पाळणे इ०

कॅटलॉग मागवा.



वापरल्यानें पूर्ण समाधान मिळतें

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड....किर्लोस्करवाडी (सातारा)

---

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

## दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय

प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

---

## डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणे

| | |
|---|---|
| मध्यम वर्गांतील | अत्यंत उपयोगी, फायदेशीर व |
| गृहेच्छू लोक | सहज सुलभसाध्य |

भाडेकरी—घरमालक—गृहयोजना

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.

जनरल मॅनेजर

---

## पहिल्यानें सुरक्षितता

रस्त्यावरून जातांना तुम्ही सुरक्षिततेचा मार्ग पहिल्यानें पहातां. हीच गोष्ट पैसे बँकेंत किंवा विम्यांत गुंतविण्यासंबंधीं आहे. पहिल्यानें तुम्ही पैशाची सुरक्षितता पहातां; नंतर व्याज किंवा बोनस.

हिशेब तपासणी आणि प्रतिनिधित्व सरकारी खात्याकडे असल्यानें

## दि बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लि.

मध्यें आपले पैसे गुंतविल्यास कसलाच धोका नाहीं.

सविस्तर माहितीकरितां लिहा—

कुळकर्णी आणि कंपनी, चीफ ऑर्गनायझर्स | चुनीलाल डी. बरफीवाला, मॅनेजिंग डायरेक्टर.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

---

## WANTED.

Influential and hard-working Agents At Ahmednagar, Dhulia, Kolhapur, Nasik and Poona for Sun Life Assurance Company of Canada on liberal terms. Apply :—

The Manager,
Sun Life Assurance Company of Canada,
Hornby Road, Fort, BOMBAY.

---

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

# विविध माहिती

## सामाजिक विम्याचा जर्मनींत प्रसार

आजारीपणाबद्दल कामकऱ्यांचा विमा उतरविण्याची योजना जर्मनींत १८८५ सालीं प्रथम अमलांत आली, तेव्हांपासून १९३४ पर्यंत एकूण सुमारें २,५०० कोटि रुपये विमेदारांस मिळाले, आणि त्याच मुदतींत अपघाताबद्दलच्या विम्याचे ७५० कोटि रुपये देण्यांत आले. वार्धक्य व असहाय स्थिति ह्यांमध्यें सामाजिक विम्याचा उपयोग जर्मनींत किती होतो ह्याची कल्पना येण्यास एवढें नमूद करणें पुरें आहे कीं आजारानें निकामी झालेलीं २५ लक्ष माणसें, ६ लक्ष विधवा आणि ३½ लक्ष अनाथ अर्भकें ह्यांना एका वर्षांत त्यापासून मदत मिळाली आहे. प्रतिवर्षी १०० कोटि रुपये ह्याप्रमाणें जर्मनींत वांटण्यांत येतात.

## इंग्रजी भाषेचा प्रसार

आतांपर्यंत, जर्मनीमध्यें हायस्कुलांतून फ्रेंच ही दुय्यम भाषा म्हणून शिकविली जात असे. १९३७ पासून तिची जागा इंग्रजी घेणार आहे.

## "क्वीन मेरी" आगबोटीचा विमा साडेसहा कोटि रुपये

ग्रेट ब्रिटनमध्यें "क्वीन मेरी" ह्या नांवाची उतारूंची ने-आण करणारी प्रचंड आगबोट नुकतीच चालू झाली आहे. तिचा साडेसहा कोटि रुपयांस विमा उतरला असून वार्षिक प्रिमियम सुमारें ८ लक्ष रुपये बसतें. साडेसहा कोटि रुपये ही किंमत आगबोटीचा सांगाडा व यंत्रसामुग्री यांचीच आहे.

## रहाणीच्या खर्चाचें मान

मुंबई शहरांतील कामकरी वर्गाच्या सामान्य रहाणीचा खर्च, महायुद्धापूर्वीच्या म्हणजे १९१४ सालच्या मानानें पहातां वाढलेला किंवा कमी झालेला नाहीं. ह्या वर्गाच्या मामुली रहाणीचा खर्च, बाजारभाव अलीकडे उतरल्यामुळें, एकवीस वर्षांपूर्वीच्या खर्चाच्या पातळींत येऊन बसला आहे.

## सोलापूर व अहमदाबाद येथील रहाणीचा खर्च

जानेवारी १९२८ शीं तुलना करतां सोलापूर येथील कामकरी वर्गाच्या मामुली रहाणीचा खर्च ३२ टक्क्यांनीं उतरला आहे. त्यांत खाण्याच्या पदार्थांवरील खर्चांत ४२ टक्के बचत झाली आहे. अहमदाबादच्या १९२७ मधल्या रहाणीचा विचार करतां बचतीचे तत्सम आकडे अनुक्रमेंकरून ३१ आणि ४३ असे असल्याचें दिसतें.

## मुंबईतले घाउक बाजारभाव

मुंबईतल्या ठळक प्रकारांच्या मालाचे सरासरीचे घाउक बाजारभाव गेल्या मार्च महिन्यांत जुलै १९१४ च्या (महायुद्धापूर्वीच्या कालाच्या) मानानें ५ टक्क्यांनीं उतरलेले असल्याचे दिसून आले. हा आर्थिक मंदीचा परिणाम आहे हें उघड आहे. खाण्याच्या जिनसांचे घाउक बाजारभाव तर २२ वर्षांपूर्वीच्या मानानें ८ टक्क्यांनीं खाली गेले आहेत. म्हणजे शेतकऱ्याच्या पदरांत कमी पैसा पडत आहे ह्याचा हा पुरावा आहे.

## जपानमधील सहकारी चळवळ

जपानमध्यें १४,८४३ सहकारी संस्था असून त्यांच्या सभासदांची संख्या ५६ लक्ष ४४ हजार आहे.

## एका दिवसानें केलेला फरक

गेल्या सालच्या फेब्रुआरी महिन्याच्या मानानें १९३६ च्या फेब्रुवारी महिन्यांत एकूण जगाचा व्यापार सुमारें ८½ टक्क्यांनीं वाढला. किंमतींत झालेली ही वाढ, सोन्याचा भाव गेल्या सालापेक्षां चालू सालच्या फेब्रुआरींत थोडा अधिक होता ह्यामुळें घडून आला आणि यंदाच्या फेब्रुआरींत १९३५ च्या फेब्रुआरीपेक्षां एक दिवस ज्यास्त होता ह्या कारणानेंहि वाढावा झालेला आहे. मालाच्या किंमतीच्या ऐवजी त्याच्या वजनाचा, आकाराचा व संख्येचा विचार केल्यास व्यापारांत मुळींच सुधारणा झाली नाहीं असें राष्ट्रसंघामार्फत प्रसिद्ध झालेल्या आकड्यांवरून दिसून येतें.

## पोस्ट ऑफिसांतील ठेवींवरील व्याजाचा दर उतरला

पोस्ट ऑफीस सेव्हिंग्ज बँकांमधील ठेवींवरील व्याजाचा दर तीन टक्क्यांवरून अडीच टक्क्यांवर नोव्हेंबर १९३३ पासून आणण्यांत आला होता, तो आतां १ जुलै १९३६ पासून आणखी उतरविण्यांत येऊन दोन टक्के राहील, असें सरकारनें जाहीर केलें आहे.

## ब्रिटिश प्राप्तीवरील कराचें उत्पन्न

ब्रिटिश प्राप्तीवरील कर मिळकतीच्या दर पौंडास एक पेनी (२४० पेन्सांस १ पेनी=मिळकतीचा $\frac{1}{240}$) इतका असला म्हणजे सरकारास सुमारें ५½ कोटि रुपये एकूण उत्पन्न मिळतें. चालू सालीं तो कर दर पौंड प्राप्तीस ५७ पेन्स (२४० पेन्सांपैकीं ५७ पेन्स) इतका असून त्याचें एकूण सरकारी उत्पन्न सुमारें ३४० कोटि रुपये होईल.

## जपानी लोण्याची इंग्लंडमध्यें आयात

सुमारें २२ देशांतून इंग्लंडमध्यें लोणी येतें व साप्ताहिक आयात ९,२०० टनांहून ज्यास्त असते. आतां जपाननेंहि इंग्लंडकडे लोणी पाठविण्यास सुरवात केली आहे.

## मोटार गाड्यांचे आयातींत मुंबई इलाख्याचा पहिला नंबर

इतर प्रांतांचे मानानें मुंबई इलाख्यांत मोटार गाड्यांची आयात सर्वांत मोठी आहे. हिंदुस्थानांत उतरणाऱ्या गाड्यांपैकीं निम्म्या गाड्या मुंबई बंदरांत उतरतात. गेल्या वर्षी मुंबई इलाख्यांत ६,८४३ गाड्यांची आयात झाली. बंगालचा दुसरा नंबर लागला; त्या प्रांतामध्यें ३,२८७ गाड्या आल्या.

## मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

ता. ९ मे रोजीं पुरा झालेला आठवडा. ३६,२०,८९५

ता. १६ मे रोजीं पुरा झालेला आठवडा. ५६,४५,५६६

ता. २१ सप्टेंबर १९३१ ते १६ मे १९३६ अखेर २,६९,९०,७१,६८३

अनुक्रमणिका.


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २४८ |
| २ सहकारी संस्था आणि रिझर्व्ह बँक... ... | २४९ |
| ३ स्वावलंबी यशस्वी स्वदेशी धंदा... ... ... | २५० |
| ४ प्रांतिक सरकारांस दिलेली कर्जें ... ... | २५० |
| ५ स्फुट विचार ... | २५१ |
| व्यापारी करारांचा फेरविचार—शिक्षणक्रमांतील सुधारणेचें कार्य हातीं केव्हां घेणार?—मुंबई इलाख्यास झालेला अन्याय—आंकड्यांच्या प्रसिद्धींत होणारी दिरंगाई—सुवर्णाच्या जागतिक उत्पादनांत वाढ—शेतीच्या धंद्यांतील बेकारीची चौकशी—ग्रामसुधारणेची ढाल—स्वर्गवासी सर एम्. रामचंद्रराव | |
| ६ विचित्र धोक्याबाबतचे विमे... ... ... | २५३ |
| ७ ग्रेटब्रिटनचा व्यापार सावरला ... ... | २५३ |
| ८ ब्रिटिश बँकर हिंदुस्थानासंबंधानें काय म्हणतात? | २५४ |
| ९ खेडेगांवांतील उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन ... | २५५ |
| १० बॉंबे लाइफ ॲशुअरन्स कं. लि. ... ... | २५६ |
| ११ नाशिक जिल्हा इन्स्टिट्यूटचें प्रचारकार्य ... | २५६ |
| १२ निवडक बाजारभाव | २५७ |
| १३ सिमेंट कंपन्यांचें आशाजनक भवितव्य ... | २५७ |



# अर्थ

बुधवार, ता. २० मे, १९३६


## सहकारी संस्था आणि रिझर्व्ह बँक

### मि. डार्लिंग यांच्या रिपोर्टाचें काय झालें?

(१)

दोन वर्षांमागें हिंदुस्थान सरकारानें मि. डार्लिंग ह्यांची नेमणूक करून देशाच्या निरनिराळ्या भागांतील सहकारी संस्थांस रिझर्व्ह बँकेकडून पैशाची मदत कशी मिळूं शकेल ह्याविषयीं चौकशी व शिफारसी करण्याचें काम त्यांच्याकडे सोपविलें होतें. त्याचप्रमाणें, रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या व्यापारी बँका आणि सराफ ह्यांच्या मार्फत शेतीच्या धंद्यास पैसा पुरवण्या बाबतहि चौकशी करण्यास त्यांस सांगितलें होतें. मि. डार्लिंग ह्यांचा रिपोर्ट रिझर्व्ह बँकेच्या बोर्डाकडे गेला असून त्यासंबंधानें प्रांतिक सरकारांचे अभिप्राय मागवण्यांत आले आहेत असें समजतें. ह्या कामांत इतकी दिरंगाई कां व्हावी आणि मि. डार्लिंग ह्यांचा रिपोर्ट जनतेच्या माहितीसाठी अजून कां प्रसिद्ध करण्यांत आलेला नाहीं हे प्रश्न येथें सहाजिकच सुचतात. प्रांतिक सहकारी संस्थांच्या परिस्थितीसंबंधानें प्रतिकूल विधानें त्या रिपोर्टांत व्यक्त करण्यांत आलीं असून त्यासंबंधानें प्रांतिक सरकारांचें म्हणणें रिझर्व्ह बँकेच्या बोर्डास अगोदर समजावयास हवें आहे अशी शंका कित्येकांनीं प्रकट केली आहे. मि. डार्लिंग ह्यांनीं सहकारी चळवळीसंबंधानें प्रतिकूल उद्गार काढले असले तरी तिच्यामधील कार्यकर्त्यांस त्यांचा अभिप्राय समजणें आवश्यक आहे. किंबहुना, असे उद्गार सुधारणेच्या दृष्टीनें अपकारक होण्याऐवजीं उपकारकच ठरले असते. रिझर्व्ह बँक कायद्याच्या ५४ व ५५ कलमांमध्यें, त्या बँकेंत एक स्वतंत्र शेती खातें उघडण्यांत यावें आणि त्यानें रिझर्व्ह बँक व शेतीच्या धंद्यास होणारा व व्हावयाच्या पैशाचा पुरवठा ह्यांचा संबंध जोडण्याची खटपट करावी अशी तरतूद केलेली आहे आणि तसेंच, शेतीचा धंदा व सराफांचे व्यवहार ह्यांस रिझर्व्ह बँकेच्या कक्षेंत आणण्यासाठी कायद्यांत दुरुस्ती होणें आवश्यक वाटेल तर बँकेनें तशी शिफारस हिंदुस्थान सरकारास करावी असेंहि त्यांत सांगितलें आहे मि. डार्लिंग ह्यांनीं गोळा केलेली माहिती आणि तिच्या आधारानें बनविलेलीं मतें ह्यांचा उपयोग रिझर्व्ह बँकेच्या बोर्डास आपलें स्वतःचें धोरण निश्चित करण्यास खात्रीनें होईल यांत संशय नाहीं. सहकारी चळवळ आणि शेतीचा धंदा ह्यांची परिस्थिति निरनिराळ्या प्रांतांत भिन्न असल्यामुळें आणि तिचा संबंध प्रत्यक्ष रीतीनें प्रांतिक सरकारांशीं येत असल्याकारणानें सर्व बाजू नीट समजाव्या म्हणून त्या सरकारांच्या मि. डार्लिंग ह्यांच्या रिपोर्टावरील मताचें महत्त्व रिझर्व्ह बँकेच्या डायरेक्टरांस विशेष वाटत असलें पाहिजे. तथापि, ह्यावर आमचें असें म्हणणें आहे कीं, सहकारी संस्था कांहीं सरकारी संस्था नाहींत; त्या बिनसरकारी कार्यकर्त्यांनींच बहुतांशीं चालविल्या जात आहेत. तेव्हां, त्यांच्या संबंधानें मि. डार्लिंग ह्यांनीं केलेल्या रिपोर्टावर, प्रांतिक सरकारांबरोबरच सहकारी संस्थांच्या चालकांस आपलें मत बनवण्याची व व्यक्त करण्याची संधि देणें उचित नव्हतें काय? आपणांविषयीं मि. डार्लिंग ह्यांनीं काय म्हटलें आहे हें समजण्याची आवश्यकता सहकारी कार्यकर्ते व संस्था ह्यांस तीव्रतेनें भासणें स्वाभाविक आहे. प्रांतिक सरकारांकडे अभिप्रायाविषयीं पृच्छा झाली असतां त्यांनीं तरी निदान ह्या कार्यकर्त्यांचे व संस्थांचे अभिप्राय घेणें आवश्यक होतें. पण तसेंहि झालेलें नाहीं. ह्यावरून लोकांनीं अनुमान काय काढावें? हें सर्व प्रकरण असें गुलदस्तांत कां अशी शंका त्यांस आली असल्यास त्यांत आश्चर्य कसलें?

मि. डार्लिंग ह्यांचेकडे सोपविलेली कामगिरी आणि रिझर्व्ह बँक कायद्याच्या दोन कलमांचा वर उल्लेख केला आहे त्यांत नमूद असलेल्या बाबी ह्यांचा विचार करतां कलकत्त्याच्या 'इंडिअन फिनॅन्स' साप्ताहिकानें उपस्थित केलेले खालील प्रश्न चिंतनीय वाटतात. त्यांच्याविषयीं मि. डार्लिंग ह्यांनीं माहिती आणि मत दिलें असलें पाहिजे आणि त्यासंबंधानें रिझर्व्ह बँकेस आपला स्वतःचा अभिप्राय बनवणें आवश्यक आहेः—(१) निरनिराळ्या प्रांतांत सहकारी चळवळ कोणत्या स्थितींत आहे? तिची प्रगति होत आहे काय? शेतकऱ्यांच्या पैशाबद्दल गरजा भागवण्याचें काम तिच्याकडून कसें होत आहे? सहकारी संस्थांस पैशाचा तुटवडा कोठें पडला आहे काय? (२) मध्यवर्ती प्रांतिक सहकारी बँक आणि इतर सहकारी बँका ह्यांचे परस्पर संबंध कोणत्या प्रकारचे आहेत? प्रांतिक बँकांची स्थिति कशी आहे? त्यांस पैशाची वाण भासत आहे काय? त्यांस अधिक पैसा पुरवला गेला असता तर त्याचा सदुपयोग होण्यासारखी परिस्थिति होती काय? (३) रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या किती बँका शेतीच्या धंद्यास पैसा पुरवतात? सहकारी बँकांशीं तुलना करतां शेतकऱ्यांशीं व्यवहार करण्यांत त्यांस कोणत्या प्रकारच्या अडचणी भासतात? (४) शेतीच्या धंद्यांत उपस्थित होणाऱ्या हुंड्यांवर आणि सहकारी व जोडलेल्या बँकांच्या वचन चिठ्ठ्या इत्यादि रोख्यांवर पैसा देतांना कोणत्या विशेष मर्यादा घालणें जरूर आहे? ह्या व्यवहारांत मुदती, रकमा वगैरेंच्या बाबतींत कोणती पद्धति स्वीकारणें इष्ट आहे? (५) रिझर्व्ह बँकेनें फक्त प्रांतिक सहकारी बँकेशीं व्यवहार करावा किंवा इतर सहकारी बँकांशीं व्यवहार तिनें करण्यास हरकत नाहीं? (६) रिझर्व्ह बँकेनें इतर बँकांची-

तपासणी कशी करावी? ह्या कामासाठी कोणते व किती अधिकारी नेमणें जरूर आहे? (७) प्रांतिक जमीन गहाणाच्या बँकांस रिझर्व्ह बँकेकडून सहाय कसें मिळेल? (८) रिझर्व्ह बँकेच्या शेती–शाखेंत कोणते व किती अधिकारी व नोकर नेमणें आवश्यक आहे? वरील प्रश्नांबाबत माहिती आणि शिफारसी मि. डार्लिंग ह्यांच्या रिपोर्टांत असावयास पाहिजेत आणि त्यासंबंधांत रिझर्व्ह बँक आणि सहकारी कार्यकर्ते, बँकर व शेतीच्या धंद्यांत सुधारणा होण्याबद्दल प्रयत्न करणारे ह्या सर्वांनीं विचार करून आपलें मत व्यक्त केलें पाहिजे. मि. डार्लिंग ह्यांचा रिपोर्ट ह्या पूर्वींच प्रसिद्ध होणें अगत्याचें होतें असें आम्हीं म्हणतों याचें कारण वर नमूद केलेल्या प्रश्नांचें विलक्षण महत्व हेंच होय.

---

## स्वावलंबी यशस्वी स्वदेशी धंदा

---

### सिमेंटच्या कारखान्यांचें एकत्रीकरण

औद्योगिक संरक्षणाच्या सहायावांचून यशस्वी झालेला सिमेंटचा हा एकटाच मोठ्या प्रमाणावरील हिंदी धंदा आहे. सिमेंटच्या कारखानदारांनीं सहकार्यानें वागून, एके वेळीं मागें पडत असलेल्या ह्या धंद्यास आतां भक्कम पायावर आणून उभें केलें आहे. सर्व कारखान्यांचें एकत्रीकरण करणाऱ्या "असोसिएटेड सिमेंट कंपनीज ऑफ इंडिया, लि०" ह्या नियोजित कंपनीच्या स्थापनेनें हिंदी औद्योगिक क्षेत्रांत क्रान्ति घडून येणार आहे, ह्यांत संशय नाहीं. मि. एफ. ई. दिनशॉ ह्यांनीं सिमेंटचे कारखाने उर्जितावस्थेस येण्यासाठी फार परिश्रम केले होते व त्यांच्या मृत्यूनंतर अवघ्या चार महिन्यांतच ही योजना फलद्रूप होत आहे. नव्या कंपनीचें भांडवल आठ कोटि रुपये असून त्यांत षोण व्हॅली पोर्टलंड सिमेंट कंपनी खेरीज बाकी सर्व कंपन्या सामील झाल्या आहेत. षोण व्हॅली कंपनी ब्रिटिश मालकीची आहे, तथापि नव्या कंपनीच्या किंमती व उत्पादन ह्या संबंधीं योजना स्वतःवर बंधनकारक करून घेण्यास तिनें तयारी दर्शविली आहे.

महायुद्धाचे काळांत हिंदी सिमेंटास विशेष मागणी येऊन हा धंदा उर्जितावस्थेस आला. १९१४ सालीं एकूण फक्त ९४५ टन हिंदी सिमेंटचा खप झाला, १९२५ सालीं हा आकडा ३½ लक्ष टनांवर गेला! महायुद्धाच्या चलतीच्या दिवसांत कित्येक नवे कारखाने निघाले व त्यांमध्यें आपआपसांत अनिष्ट स्पर्धा होऊं लागली. १९२४ सालीं सिमेंट कारखानदारांनीं टॅरिफ बोर्डाकडे संरक्षणाची मागणी केली होती, परंतु फाजील उत्पादन व घातकी अंतर्गत स्पर्धा ह्यांमुळें सदरहु धंद्यांत नफा उरत नाहीं ह्या मुद्यावर बोर्डानें संरक्षण नाकारलें व सरकारनेंहि हा निर्णय मान्य केला. ह्यामुळें सिमेंट कंपन्यांस स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारण्याखेरीज गत्यंतरच नव्हतें. १९२६ सालीं सिमेंट कारखानदारांच्या संघाची स्थापना होऊन त्यानें सिमेंटच्या बाजारभावांत सुधारणा घडवून आणली. १९२७ सालीं काँक्रीट असोसिएशनची स्थापना करण्यांत आली. सिमेंटचा उपयोग वाढत्या प्रमाणांत करण्यांत यावा ह्याबाबत प्रचार करून व मोफत सल्लामसलत देऊन ह्या असोसिएशननें सिमेंटच्या धंद्यास उत्कृष्ट सहाय केलें आहे. गेल्या वर्षी ८¼ लक्ष टन सिमेंट खपलें व सर्व कारखाने भरभराटींत होते.

हिंदी सिमेंटच्या कारखान्यांत सहकार्य घडवून आणण्याचे बाबतींत १९३० सालीं सिमेंट मार्केटिंग कंपनीच्या स्थापनेनें आणखी एक पाऊल पुढें पडलें. ह्या मार्केटिंग कंपनीनें सर्व कारखान्यांमधील उत्पादन नियंत्रित केलें असून सिमेंटमध्येंहि कित्येक सुधारणा घडवून आणल्या आहेत. एकत्रीकरणच्या योजनेस अनुसरून सर्व कंपन्या एका मोठ्या कंपनीचे घटक या नात्यानें आतां उत्पादनाचें काम करतील. तथापि, सिमेंट कंपन्यांचें वैयक्तिक जीवित त्यानें नष्ट झालेलें नाहीं. एका मध्यवर्ती संस्थेकडे व्यवस्थेचें कार्य सोपविण्यांत आल्यानें कसोशीची खरेदी आणि काळजीपूर्वक देखरेख व तपासणी हीं शक्य होऊन उत्पादनखर्चांत व विक्रीचे व्यवस्थेंत बरीच बचत होईल.

सिमेंटचा उपयोग विस्तृत रीतीनें करण्यांत येत आहे व हिंदी सिमेंटचा खप प्रत्यहीं वाढत आहें. ह्या धंद्यांत सुमारें २५ हजार लोक गुंतलेले आहेत. सिमेंटचे धंद्यावर इतर धंद्यांचीहि भरभराट अवलंबून आहे. दरसाल २¼ लक्ष टन कोळसा ह्या कारखान्यांत खपतो व १¼ कोटि तागाचीं पोतीं सिमेंट भरण्यासाठी लागतात. वहातुकीसाठी रेल्वे कंपन्यांस मिळकत होत असेल ती वेगळीच. सिमेंटचा धंदा भरभराटींत असूनहि त्यावर कराचा बोजा अजून फारसा बसलेला नाहीं, हें विशेष होय. कित्येक सिमेंटचे कारखाने संस्थानी हद्दींत आहेत, हें त्याचें कारण असूं शकेल. रोखे बाजारांत सिमेंटच्या भागांस चांगला भाव आहे, ह्याचें गमक ह्या धंद्याच्या उज्वल भवितव्यतेबद्दल लोकांस वाटणाऱ्या विश्वासांत आढळेल.

---

## प्रांतिक सरकारांस दिलेलीं कर्जें

---

### प्रॉव्हिन्शिअल लोन्स फंड

हिंदुस्थान सरकारानें उभारलेल्या कर्जांस तारण म्हणून सर्व उत्पन्न लावून देणें शक्य व्हावें, या करितां १९१९ च्या सुधारणा कायद्यापूर्वीं प्रांतिक सरकारांस कर्जें उभारण्याची परवानगी नव्हती. हलक्या दरानें कर्ज मिळावें व पत कायम रहावी ह्या दृष्टीनें वरील योजना करण्यांत आली होती. प्रांतिक सरकारांस कर्जाची जरूर पडल्यास हिंदुस्थान सरकार त्याची तजवीज करीत असे. अजूनहि ही व्यवस्था चालू असून त्या संबंधातील 'प्रॉव्हिन्शिअल लोन्स फंडा'चा १९३४–३५ सालाबद्दलचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे.

वर्षाचे सुरवातीस फंडांत ७¼ लक्ष रूपये होते व वर्ष अखेर ३ लक्ष रुपये शिल्लक राहिले. हिंदुस्थान सरकारानें फंडास २ कोटि ८९ लक्ष रुपये कर्ज दिलें व प्रांतिक सरकारांकडून १ कोटि ८१ लक्षांची परत फेड झाली. गेल्या वर्षांत फंडांतून ४¾ कोटि रुपये प्रांतिक सरकारांस कर्जाऊ देण्यांत आले. ३१ मार्च १९३५ अखेर फंडाकडे प्रांतिक सरकारांकडून १ अब्ज ७८ कोटि रुपये देणें रहातें. हिंदुस्थान सरकारनें लोन्स फंडाकडून ३⅓ टक्के दरानें व्याज घेतलें व फंडानेंहि ह्याच दरानें व्याज आकारलें. अनुत्पादक कामासाठी घेतलेल्या कर्जावर मात्र ३¾ टक्के दरानें व्याजाची आकारणी करण्यांत आली. प्रांतिक सरकारांनीं द्यावयाच्या रकमांवरील व्याजाचा दर ऑक्टोबर १९३४ पासून उतरविण्यांत आला आहे.

---

# स्फुट विचार

### व्यापारी करारांचा फेरविचार

ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांमध्यें परस्पर-सवलतींच्या जकातींबाबत करार चालू ठेवावा किंवा कसें, ह्यासंबंधीं लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें प्रतिकूल ठराव करून करार रद्द करावा, असें आपलें मत व्यक्त केलें होतें.असेंब्लीचा अभिप्राय आपण मान्य करूं असें आश्वासन सरकारनें अगाऊ दिलें असल्याकारणानें ह्या प्रश्नांत ढवळाढवळ करणें भारतमंत्र्यास शक्य नव्हतें. हिंदुस्थानानें करारामधून आपलें अंग काढून घ्यावें, त्याप्रमाणें नोटीसहि तात्काळ धावी, ह्या लोकपक्षाच्या सूचनेस अनुसरून हिंदुस्थान सरकारनें ग्रेट-ब्रिटनला तसें कळवलें आहे. जुन्या कराराचे बदली नव्या योजनांचा अंतर्भाव करणारा करार होण्यास इंग्लंडची मान्यता आहे, तथापि त्याची पूर्वतयारी म्हणून जरूर असलेली चर्चा केव्हां व कशी व्हावी, ह्याचा निर्णय झालेला नाहीं. हिंदुस्थानानें जपानशीं केलेला व्यापारी करार तितक्याच महत्त्वाचा असून हिंदी कपास व जपानी कापड ह्यांच्या निर्गतीचें व आयातीचें परिमाण ठरविणाऱ्या कराराची मुदत मार्च, १९३७ अखेर संपते. ही मुदत भरण्यापूर्वी नवीन करार करण्यांत येणें आवश्यक आहे व त्यासंबंधांतील बोलणीं चालू आहेत. हिंदुस्थान सरकारनें व्यापारी संस्थांकडून त्यांचीं मतें मागविलीं असून जपाननेंहि पूर्व तयारी सुरू केली आहे. हिंद-जपान करारामुळें हिंदी कपाशीस मागणी कायम राहिली व त्यामुळें शेतकऱ्यांचा फायदा झाला, ही गोष्ट निर्विवाद आहे. जपानी कापडाची आयात व हिंदी कपाशीची निर्गत ह्यांचें परस्पर-प्रमाण कसें राखलें असतां तें फायदेशीर होईल, हाच चर्चेमध्यें वादाचा प्रश्न असणार हें उघड आहे. दोन्हीं बाजू ताणून धरतील व शेवटीं तडजोडीनें कराराच्या अटी ठरतील. ओटावा करारइतके हिंद-जपान करारासंबंधीं हिंदी लोकमत प्रतिकूल नव्हतें, ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे.ह्या दोन्ही करारांचा फेरविचार करण्याची पाळी एकदमच येत असून त्यांत हिंदुस्थान सरकारची मुत्सद्देगिरी कसास लागणार आहे.

---

### शिक्षणक्रमांतील सुधारणेचें कार्य हातीं केव्हां घेणार ?

सुशिक्षितांमधील बेकारीवर उपाय म्हणून शिक्षणक्रमांत सुधारणा घडवून आणण्याचें हिंदुस्थान सरकारनें योजिलें आहे, त्या संबंधींच्या कार्यांत काय प्रगति झाली,हें आतां प्रसिद्ध झालें आहे.सरकारचे एज्युकेशनल कामिशनर, सर जॉर्ज अँडरसन, हे सेवानिवृत्त होत असून त्यांचे जागीं संयुक्त प्रांताचे माजी डायरेक्टर ऑफ पब्लिक एज्युकेशन, डॉ. मॅकेन्झी हे येत आहेत. सध्याच्या शिक्षणपद्धतीमधील अभ्यासक्रमांत पायऱ्या बसवून विशिष्ट व्यवसाय करू इच्छिणारांस ठराविक पायरीवरून धंद्यांत शिरण्याचा मार्ग मोकळा करावयाचा व दुय्यम शिक्षणास लागणाऱ्या काळांत बचत घडवून आणावयाची, अशा प्रकारची सुधारणा साधारणपणें सर्वांस मान्य झालेली आहे. सेंट्रल अडव्हायसरि बोर्ड ऑफ एज्युकेशन ह्या हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या शिक्षण तज्ज्ञांच्या बोर्डासहि ही योजना मान्य आहे. तथापि, शिक्षणाविषयींची आर्थिक जबाबदारी व व्यवस्था प्रांतिक सरकारांकडे असल्याकारणानें त्यांचीं मतें मागविण्यांत येत आहेत. अशा रीतीनें सुधारणेची घोषणा ऐकूं येत असली तरी प्रत्यक्ष व्यवहारांत ती केव्हां येणार, हा प्रश्नच आहे. हिंदुस्थान सरकारास शैक्षणिक सुधारणेबद्दल आस्था वाटत असल्यास त्यानें हें कार्य नेटानें पुढें चालवलें पाहिजे. शिक्षणाच्या ध्येयांत व पद्धतींत फेरफार होणें अगत्याचें आहे ह्या विषयीं सरकार व जनता ह्यांचेमध्यें मतभेद नाहीं. त्यामुळें सुधारणेचें पाऊल जोरानें पुढें पडण्यास अडचण येऊं नये. अखिल भारतीय स्वरूपाच्या ह्या प्रश्नांत हिंदुस्थान सरकारानें लक्ष्य घातलें, ह्याबद्दल सरकारचें अभिनंदन केले पाहिजे. तथापि ही जबाबदारी अत्यंत अवघड असून ती पार पाडणें सोपें नाहीं. सुधारणेची घोषणा झाली,परंतु प्रत्यक्ष कार्यास जारीनें सुरवात केव्हां व कशी होणार ह्या बद्दलची लोकांची जिज्ञासा तृप्त होणें आवश्यक आहे.

---

### मुंबई इलाख्यास झालेला अन्याय

निमायर शिफारसी जशाच्या तशाच ब्रिटिश पार्लमेंट मान्य करील असा रंग दिसत असला तरी त्यांच्या योगानें मुंबई इलाख्यास होणाऱ्या अन्यायाबद्दल तक्रार करणें प्रांतिक सरकार व जनता ह्यांचें कर्तव्य आहे. आमच्या प्रांतिक सरकारानें, मुंबई इलाख्यास प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नांतला योग्य हिस्सा न मिळाल्या कारणानें त्याची सांपत्तिक स्थिति अत्यंत असमाधानकारक झाली असल्याविषयीं आपलें म्हणणें ब्रिटिश प्रधानमंडळास कळविलें असल्याचें समजतें. मुंबईच्या प्रमुख व्यक्तींनींहि असाच अभिप्राय जाहीर रीतीनें व्यक्त केला आहे. मुंबईची इंडियन मर्चेंट्स् चेंबर व पुण्याची डेक्कन सभा ह्या संस्थांनीं मुंबई इलाख्याची न्याय्य बाजू पुढें मांडण्याचें आपलें कर्तव्य बजावलें आहे हें सर्वस्वी उचित आहे. सोळा वर्षांपूर्वी झालेल्या मेस्टन योजनेंत मुंबई इलाख्याच्या हितसंबंधाकडे कानाडोळा करण्यांत आला होता आणि त्याविषयींची ओरड त्याचवेळीं व पुढें करण्यांत आली होती. आतां निमायर योजना अमलांत येणार आहे तीहि आमच्या इलाख्यास अन्यायकारक आहे. मुंबई इलाखा जादा कर बसवून आपल्या बजेटाची तोंडमिळवणी करीत आला आहे आणि पैशाच्या अभावीं सर्व प्रकारची प्रगति त्यास थांबवावी लागली आहे. सिंध प्रांत विभक्त झाल्यानें होणाऱ्या बचतीनें मुंबई सरकारचा सांपत्तिक प्रश्न सुटत नाहीं, आणि उत्पन्नाच्या टंचाईची त्याची अडचण दूर होत नाहीं. जमीन महसूल व दारूचें उत्पन्न ह्यांत वाढ होणें अशक्य व अनिष्टहि असल्यानें प्राप्तीवरील कराची वाढत्या उत्पन्नाची बाब मुंबई सरकारच्या हातीं येणें अगत्याचें आहे, ही गोष्ट डेक्कन सभा व इंडियन मर्चेंट्स चेंबर ह्यांनीं प्रामुख्यानें निदर्शनास आणली आहे. ह्या तक्रारीचा तात्काळ उपयोग होवो अथवा न होवो, गाऱ्हाणें वेशीस टांगण्याचें कर्तव्य वेळींच बजावलें जाणें अगत्याचें आहे.

---

### आकड्यांच्या व माहितीच्या प्रसिद्धींत होणारी दिरंगाई

सामान्य नागरिक, व्यापारी, धंदेवाले आणि शेतकरी ह्यांच्या हिताच्या दृष्टीनें आर्थिक व सामाजिक महत्वाच्या विषयांसंबंधाची माहिती वेळच्या वेळीं प्रसिद्ध होत नाहीं व त्यामुळें लोकांची गैरसोय होते अशी तक्रार हिंदुस्थानांत आज कित्येक वर्षे चालली आहे. ह्या प्रश्नाच्या बाबतींत अनेकवार चर्चा व चौकशी झाली असली तरी त्याचा समाधानकारक निकाल अजूनहि लागत नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. बाजारभाव, शेतीच्या धंद्याची परिस्थिति, सहकारी व इतर बँका ह्यांचे व्यवहार, कंपन्यांची प्रगति इत्यादि अनेक जिव्हाळ्याच्या विषयांसंबंधाचे

आकडे वेळचे वेळीं प्रसिद्ध होणें अगत्याचें असतें आणि इतर देशांत ते त्याप्रमाणें प्रसिद्ध होत असतात. परंतु हिंदुस्थानांत शिळी माहिती देणारे अहवाल वाचण्याचा लोकांवर नेहमी प्रसंग येतो आणि त्यामुळें असली हकीकत निरुपयोगी ठरते. आकडे गोळा करून ते वेळोवेळ प्रसिद्ध करण्यासाठी हिंदुस्थान सरकारचें एक स्वतंत्र खातें आहे. त्या खात्यास दोन प्रकारची माहिती जमा करावयाची असते. मध्यवर्ती सरकाराचा प्रत्यक्ष संबंध ज्या बाबींशीं आहे त्यांविषयींची माहिती सदरहु खातें विलंब न लागतां गोळा करून प्रसिद्ध करूं शकतें, पण अशा कित्येक महत्त्वाच्या बाबी आहेत कीं, ज्या संबंधानें आकडे प्रांतिक सरकारांनीं गोळा करून मध्यवर्ती प्रसिद्धी खात्यास पुरवावयाचे असतात, आणि ह्या कार्यांतच विशेष दिरंगाई होते असा अनुभव आहे. पैशाच्या अभावीं आम्हांस वेळच्यावेळ माहिती मिळवून ती व्यवस्थित स्वरूपांत पुरवणें शक्य होत नाहीं असें प्रांतिक सरकारचें म्हणणें असल्याचें समजतें. कोणतेंहि वर्ष संपून सव्वा वर्ष लोटल्यावांचून त्या वर्षाबाबतचे आंकडे प्रांतिक सरकारांस पुरवतां येत नांहींत, ही सध्याची स्थिति खरोखर अत्यंत असमाधानकारक आहे. ह्याबद्दलची स्वतःची जबाबदारी प्रांतिक सरकारांस नाकरतां येणार नाहीं आणि ती पुरी पाडण्याच्या कामीं पैशाच्या टंचाईची सबब त्यांनीं सांगून चालणार नाहीं. आर्थिक व सामाजिक महत्त्वाच्या माहितीच्या आधारानें सार्वजनिक धोरण आखण्याचें कार्य दिवसानुदिवस अधिक विस्तृत होणार असल्यानें प्रांतिक सरकारांनीं ह्या प्रश्नांत ज्यास्त लक्ष्य घालणें आवश्यक आहे. प्रांतिक सरकारांनीं एकमेकांशीं आणि मध्यवर्ती सरकाराशीं आकडे गोळा करणें व ते प्रसिद्ध करणें ह्याबाबत पूर्ण सहकार्य केल्यावांचून आज मितीस हिंदुस्थानांत जें वैगुण्य दिसून येत आहे तें दूर होणार नाहीं. ज्याविषयींची जबाबदारी केवळ प्रांतिक सरकारांवर आहे त्या संबंधांतले आकडे आणि अहवाल प्रसिद्ध करण्यांतहि दिरंगाई होते असा लोकांचा अनुभव आहे. तेव्हां आपला आळस झाडून आकड्यांच्या प्रसिद्धीसंबंधांत प्रत्येक प्रांतिक सरकारनें विशेष जागरूक असलें पाहिजे. जरूर ती प्रांतिक आणि अखिल भारतीय माहितीच उपलब्ध होत नाहीं तेथें प्रगतीचें धोरण आखणार कसें व त्यास अनुसरून कार्य करणार कसें ?

### सुवर्णाच्या जागतिक उत्पादनांत वाढ

आतांपर्यंत कोणत्याहि वर्षीं सोन्याचें जेवढें उत्पादन झालें होतें त्याहून जास्त उत्पादन १९३५ सालीं झालें. १९३४ मध्यें २९३ कोटि स्विस फ्रँक किंमतीचें सोनें जगांतील खाणींतून निघालें; १९३५ सालीं हा आंकडा ३२९ कोटि स्विस फ्रँक इतका झाला. फ्रान्स, हॉलंड, इटली व स्वित्झरलंड ह्या देशांच्या मध्यवर्ती बँकेमधील सुवर्णसंचयास ओहोटी लागली; ह्या उलट, जागतिक वार्षिक उत्पादनाच्या दुपटीइतकें सोनें अमेरिकन सरकारच्या तिजोरीनें शोषण केलें. सोन्याचें आतां मुबलक उत्पादन होऊं लागलें असल्याकारणानें चलनास तारण कमी पडण्याची भीति दूर होऊन विनिमयसाधनांचा पुरवठा भरपूर होईल व त्यामुळें किंमतीमध्यें इच्छित वाढ घडून येईल, अशी आशा करण्यास जागा उत्पन्न झाली आहे. अल्प मुदतींचीं आंतरराष्ट्रीय कर्जेहि कमी होऊन १९२० च्या मानानें तीं आतां निम्मीं सुद्धां उरलेलीं नाहींत. जागतिक मंदीची तीव्रता कमी होऊं लागल्याचीं हीं लक्षणें आहेत असें म्हणावें तर इतर गोष्टी आर्थिक परिस्थिति सुधारण्याचे मार्गांत आड येण्याचा संभव दिसत आहे. आजचें राजकीय वातावरण आंतरराष्ट्रीय सलोख्यास व आर्थिक स्थैर्यास पोषक नाहीं. ह्या विकट अवस्थेमधून राष्ट्रें बाहेर कशीं निघतात आणि अनुकूल परिस्थितीचा सुधारणेच्या कामीं कसा उपयोग करून घेतात, हाच अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे.

### शेतीच्या धंद्यांतील बेकारीची चौकशी

कामकऱ्यांच्या हितासंबंधांचें रक्षण करण्याच्या हेतूनें स्थापण्यांत आलेल्या आंतरराष्ट्रीय संस्थेचें (इंटरनॅशनल लेबर ऑर्गेनायझेशन) मुख्य कार्य, निरनिराळ्या धंद्यांतल्या मजूरांच्या परिस्थितीसंबंधानें माहिती गोळा करून प्रसिद्ध करणें आणि तीस अनुसरून योग्य सुधारणा सुचवणें हें आहे. ह्या संस्थेच्या मुख्य समितीनें (गव्हर्निंग बॉडी) एक कायमची शेती कमिटी नुकतीच स्थापन केली आहे आणि शेतीच्या धंद्यांत गुंतलेल्या लोकांच्या आर्थिक व सामाजिक प्रश्नांविषयीं चौकशी करण्याचें काम तिच्याकडे सोपवण्यांत आलें आहे. शेतीच्या धंद्यांत बेकारी व अपुरें काम किती आहे, ह्या विषयींची सर्व देशांबाबतची माहिती कमिटी गोळा करणार आहे. ह्या प्रकारच्या तिच्या कार्याचा हिंदुस्थानांत चाललेल्या ग्रामसुधारणेच्या चळवळीस उपयोग होईल अशी अपेक्षा आहे. मोटारीच्या वाढत्या धंद्यांतील कामकरी लोकांच्या स्थितीचाहि प्रश्न हातीं घेण्याचें आंतरराष्ट्रीय संस्थेनें ठरविलें आहे.

### ग्रामसुधारणेची ढाल

आमच्या इलाख्यांत ग्रामसुधारणेचें कार्य सर्वांत उत्तम रीतीनें करणाऱ्या खेडेगांवास दरवर्षी सरकारतर्फे एक ढाल बक्षिस देण्यांत येत असते. यासाठी, प्रत्येक विभागांतून एक गांव पसंत करण्यांत येतो. बक्षिस देतांना (१) सुधारणेच्या प्रयत्नांचें सातत्य व चिकाटी, (२) स्वावलंबन आणि (३) दृष्य फल ह्या तीन गोष्टींस महत्त्व दिलें जाईल, असें जाहीर झालें होतें. गेल्या वर्षी ग्रामसुधारणेची ढाल मिळण्याचा मान सोलापूर जवळील मुळेगांवाच्या (वस्ती,७९६) वांटणीस आला होता. सरकारनें ह्या बक्षिसासंबंधी आतां तपशीलवार नियम केले आहेत. प्रांताधिकारी आपल्या हद्दीमधील तीनचार खेडेगांवांची शिफारस करतील व तीस अनुसरून जिल्हा कमिटीच्या सल्यानें बक्षीस कोणत्या गांवास यावें, तें कलेक्टर ठरवितील. कलेक्टरांचा निर्णय सल्याच्या स्वरूपाचा असेल व अखेरचा निकाल गव्हर्नरांचे हातांत राहील. ढालीसंबंधीं विचार करतांना खेडेगांवांतील आरोग्य, शेती, रस्ते, शिक्षण ह्या सर्वांसच प्रत्येकीं १० मार्क असून उद्योगधंदे व भांडवलपुरवठा ह्यांस प्रत्येकीं ५ मार्क आहेत. त्यांतील सर्वांत ज्यास्त मार्क मिळविणाऱ्या खेडेगांवास ग्रामसुधारणेची ढाल दिली जावयाची आहे.

### स्वर्गवासी सर एम्. रामचंद्रराव

मद्रासचे सर एम्. रामचंद्रराव ह्यांचे मृत्यूनें जमीनगहाणाच्या बँकांच्या केवळ मद्रास इलाख्यांतच नव्हे तर सबंध हिंदुस्थानांत चाललेल्या कार्याची हानी झाली आहे. जमीनगहाणाच्या बँकांस प्रांतिक सरकारचें सहाय मिळवून त्यांचा यशस्वी रीतीनें विस्तार करण्याचें सर्व श्रेय सर एम्. रामचंद्रराव ह्यांस आहे. त्यांनीं मद्रासमध्यें घालून दिलेल्या उदाहरणाचा कित्ता इतर प्रांतांमध्यें गिरवणें सोयीचें होऊन गेलें होतें आणि मुंबई इलाख्यांत जमीनगहाणाच्या बँका निघण्यापूर्वी त्यांचा सल्ला व अनुभव मार्गदर्शी झाला होता हें आम्हांस माहीत आहे. सर एम्. रामचंद्रराव ह्यांची शेती व सहकारी बँका ह्यांचे प्रतिनिधि या नात्यानें रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती बोर्डावर नेमणूक झाली होती.

## विचित्र धोक्यांबाबतचे विमे

### एका दलालाचे अनुभव

कोणत्या प्रकारच्या धोक्याबाबत विमा उतरावा त्यास मर्यादाच नाहींशी झाली आहे. विलक्षण रीतींच्या विम्यासंबंधांतले स्वतःचे अनुभव एका ब्रिटिश विमा दलालानें सांगितले आहेत, ते अत्यंत मनोरंजक आहेत.

पंचम जॉर्ज बादशहांच्या मृत्यूच्या आदलेच दिवशीं, ह्या आपत्तीच्या धोक्याबाबतच्या एक महिन्याच्या मुदतीचा विमा त्या दलालानें शेकडा पन्नास गिनी या दरानें उतरला होता. युरोपमध्यें युद्ध होण्याच्या धोक्यासंबंधांत विमा उतरणें ही गोष्ट तर मामुली होऊन गेली आहे. गेल्या ब्रिटिश बजेटांत करांचे संबंधांत समाविष्ट झालेल्या फेरफारांचे योगानें नुकसान होण्याची भीति कित्येकांस वाटत होती आणि तिच्या बाबतींत त्यांनीं विमा उतरवला होता.

बाळंतिणींस जुळीं मुलें होण्याच्या धास्तीचा विमा उतरणेंहि आतां नित्य परिचयाचें झालें आहे. अशा प्रकारच्या विम्याबद्दलची मागणी विस्तृत असल्यास गिऱ्हाइकांची इच्छा तृप्त करणें दलालांस विशेष अवघड जात नाहीं. परंतु कित्येक वेळां त्यांचेकडे विलक्षण मागण्या येतात, त्याप्रसंगीं मात्र त्यांच्या धंद्यांत गोंधळ उडाल्यावांचून रहात नाहीं.

एका दांपत्यानें आपल्या भावी मुलाबाळांची तरतूद विमा उतरून केली होती. परंतु बरींच वर्षे पर्यंत त्यांस अपत्यदर्शन न झाल्यानें विम्याची रकम स्वतःच्या उपयोगासाठीं मिळावी अशीं त्यांनीं मागणी केली. त्या जोडप्यास पुढें संतान झालेंच तर विम्याची रकम परत होण्याबाबत विमा उतरवला तरच त्याची मागणी मान्य करावी असा निर्णय कोर्टानें दिला. ह्या प्रकरणांत मूल होण्याच्या धोक्यासंबंधांत विमा उतरण्याचें काम दलालास अतिशय कठीण झालें.

हॉटेलांतून खून किंवा आत्महत्या झाल्यास त्याच्या गिऱ्हाइकींस धोका येतो म्हणून त्याचा विमा उतरीत असतात. केसांस भलत्याच रंगाचा कलप चुकून लागला असतां येणाऱ्या आपत्तीच्या विम्याचा त्या धंद्यांतले लोक आश्रय घेतात.

वर निर्दिष्ट केलेला दलाल, एका गिऱ्हाइकाच्या इच्छेवरून त्यानें धारण केलेल्या बँकेच्या भागांबाबतच्या पैशाची पूर्ण भरपाई करण्याची पाळी येण्याबाबत विमा उतरीत आला आहे. गाणारांचा आवाज बिघडतो, त्याचा विमाहि तो उतरवून देतो. पाळलेल्या जनावरांच्या आयुष्याचे विमे उतरवण्याची पद्धति रूढ झाली आहे.

एका ब्रिटिश कंपनीस, आगबोटीनें हिंदुस्थानास जात असलेल्या आपल्या एजंटाचा विमा त्याच्या न कळत उतरावयाचा होता. वरील दलालानें आगबोटीवरील डॉक्टरास बिनतारेचा संदेश पाठवून एजंटाचा नूर कसा काय आहे ह्या विषयीं माहिती आणविली आणि ह्या रीतीनें एक चांगली पॉलिसी मिळविली.

नुकतीच जन्मलेलीं कोंबडींचीं पिलें नर आहेत का माद्या आहेत हें ओळखण्याची कला माहीत असलेला एका जपानी तज्ज्ञाची त्या कामीं नेमणूक झाली म्हणून इंग्लंडला जात होता. नेमणारास त्या जपान्याचा आजार व अपघात ह्यांबद्दल विमा उतरावयाचा होता. आगबोट येतांच दलालानें त्यास गांठून त्यानें जपानी भाषेंत दिलेल्या उत्तरांचें इंग्रजींत भाषांतर बोटीवरील दुभाष्याकडून करून घेतलें आणि विम्याकरितां आवश्यक असलेले कागद पुरे केले. (मॅ. गा. क. वरून)

## ग्रेटब्रिटनचा व्यापार सांवरला

### अमेरिका मार्गे पडला व हिंदुस्थान घसरला

जगाच्या एकूण आंतरराष्ट्रीय व्यापारांत (आयात आणि निर्गत व्यापार मिळून) ग्रेट ब्रिटनचा हिस्सा सर्वांत मोठा असल्याचें १९३५ सालच्या जागतिक व्यापाराविषयींच्या आकड्यांवरून सिद्ध होतें. ब्रिटिश राष्ट्राचा हा हिस्सा १४ १/६ टक्के आहे. दुसरा नंबर अमेरिकेचा (११ टक्के), तिसरा जर्मनीचा (८ ७/१० टक्के) व चौथा फ्रान्सचा (६ ५/६ टक्के) लागतो. त्यांच्या खाली अनुक्रमें जपान, कॅनडा, बेल्जम, नेदर्लंडस्, हिंदुस्थान, दक्षिण आफ्रिका व ऑस्ट्रेलिया हे देश येतात. हिंदुस्थानचा विस्तार व विशेषतः लोकसंख्या लक्ष्यांत घेतां ह्या देशाचा व्यापारांत इतका खाली नंबर यावा, हें आमच्या दारिद्र्याचें व मागसलेपणाचें स्पष्ट लक्षण आहे. प्रचलित आर्थिक मंदी सुरू होण्यापूर्वी १९२९ सालीं जागतिक व्यापारांत अमेरिकेचें स्थान पाहिलें होतें (१४ ५/६ टक्के) आणि इंग्लंडचा नंबर दुसरा होता (हिस्सा १३ २/५ टक्के). त्या वर्षी जर्मनीचा हिस्सा ९ १/३ टक्के व फ्रान्सचा ६ १/२ टक्के होता. त्याच्याखाली अनुक्रमें करून कॅनडा, हिंदुस्थान, जपान, नेदर्लंडस्, बेल्जम, अर्जेंटिना व ऑस्ट्रेलिया ह्याप्रमाणें देश होते. ह्यावरून हिंदुस्थानचें स्थान व्यापारांत कसें घसरलें आहे, हें स्पष्ट होतें.

### ब्रिटिश गाड्यांची आयात वाढली

हिंदुस्थानांत आयात होणाऱ्या मोटारगाड्यांत ब्रिटिश मालाची कशी सरशी होत आहे, हें खालील आंकड्यावरून समजेल:—

मोटार गाड्यांची आयात

| कोठून आल्या | १९३३–३४ | १९३४–३५ | १९३५–३६ |
|---|---|---|---|
| ग्रे. ब्रिटन | ५,३४८ | ६,३११ | ६,७४४ |
| अमेरिका | २,२२७ | ५,५६४ | ३,८५१ |
| कॅनडा | १,७१५ | २,०५७ | २,३२८ |
| जर्मनी | १०६ | १२० | ३३५ |
| इटली | २२१ | २६७ | २१० |

### "शेती आणि शेतकरी"

ह्या मासिकाच्या मे महिन्याच्या अंकांत ग्रामसुधारणा—प्रचार कार्याची एक दिशा, पाटाच्या पाण्यावर गव्हाची लागवड, कोंबड्यांची जोपासना, हाडांचें खत, इत्यादि उपयुक्त लेख प्रसिद्ध झाले आहेत.

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

श्री. न. गं. आपटे बी. एजी. यांनीं
चांगल्या फळापासून केलेले शुद्ध
रस व सरबतें
मिळण्याचें मुख्य ठिकाण
महाराष्ट्र इंडस्ट्रियल को. एजन्सी पुणें २
व सर्व प्रमुख दुकानें
मुंबईत: तांबे आरोग्यभुवन, गिरगांव व कोट.

## ब्रिटिश बँकर हिंदुस्थानासंबंधानें काय म्हणतात?

( मागील अंकावरून समाप्त )

---

'चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया अॅन्ड चायना' चे अध्यक्ष सर विल्यम फूट मिचेल, ह्यांच्या भाषणाचा सारांश:—

"नुकत्याच पास झालेल्या नव्या राज्यघटनाविषयक बिलानें हिंदुस्थानांतील परिस्थिति सुधारण्यास बरीच मदत होणार आहे. हिंदी शेतकऱ्याच्या मिळकतीस गेलीं चार वर्षे उतरती कळा लागली असल्यानें पदरची चीजवस्त विकून किंवा कर्जें काढूनच त्यास गुजराण करावी लागत आहे.

ग्रेटब्रिटननें सुवर्णचलन सोडल्यापासून हिंदी सोन्याची निर्गत चालू आहे. अमेरिकेच्या चांदीविषयक धोरणामुळें त्या धातूचा भाव वाढला व हिंदुस्थानांतील चांदीचीहि निर्गत सुरू झाली. हिंदी सरकारची आर्थिक परिस्थिति समाधानकारक आहे. बजेटांची तोंडमिळवणी होत असून हिंदुस्थानाची पत वाढली आहे. मुबलक पैसा पडून राहिल्यानें व्याजाचे दर लंडनमधील दराप्रमाणें अगदी खाली गेले आहेत. लँकेशायरनें ज्यास्त ज्यास्त हिंदी कपास घेण्याचें धोरण अमलांत आणलेलें आहे. तेव्हां, वरिष्ट दर्जाच्या इंग्लिश कापडास जकातींमध्यें सवलत देऊन हिंदुस्थान परस्परसहायकता दाखवील अशी आशा आहे. हिंदुस्थानांत ह्या दर्जाचें कापड तयार होत नाहीं, परंतु वरच्या वर्गांतील लोकांस तें हवें असतें; लँकेशायर त्याचा पुरवठा करूं शकेल."

*
* *

'दि मर्कंटाइल बँक ऑफ इंडिया' चे अध्यक्ष लॉर्ड केट्टो ह्यांच्या भाषणाचा सारांश:—

"हिंदुस्थानांतील राजकीय व आर्थिक परिस्थिति बरीच सुधारली आहे. सध्यांच्या दिवसांत ओळीनें तीन वर्षें वाढाव्याचीं अंदाजपत्रकें दाखवितां येण्याचें भाग्य इतर देशांस क्वचितच लाभलेलें आहे. हिंदुस्थानांतील सुस्थिति हा लॉर्ड विलिंग्डन ह्यांच्या विवेकपूर्ण व प्रभावी राज्यकारभाराचा परिणाम आहे, ह्यांत शंका नाहीं. हिंदी आर्थिक परिस्थिति जितक्या सत्वर निवळली असें सर जेम्स ग्रिग ह्यांना वाटतें, तितकी ती निवळल्याचा एक्सचेंज बँकांना तरी अनुभव आलेला नाहीं. अर्थात्, ज्यास्त माहितीचीं साधनें फडनविसांस उपलब्ध आहेत व त्यांचे उद्गार आशादायक आहेत ह्यांत संशय नाहीं. खालील तीन गोष्टींत सुधारणा घडवून आणल्यास हिंदुस्थानाची आर्थिक प्रगति झपाट्यानें होईल, असें मला वाटतें: (१) आयात मालावर आकारण्यांत येणाऱ्या जकाती जबर आहेत व त्यांचा भार गरीब शेतकऱ्यांवर पडतो. शेतीच्या मालास भाव येत नसल्यानें शेतकऱ्यांची जास्तच दैना उडालेली आहे. शेती व उद्योगधंदे ह्यांच्या हितसंबंधांकडे तौलनिक दृष्ट्या पाहूनच जकातीच्या विषयींचें धोरण आखलें पाहिजे. ( २ ) हिंदुस्थानांत कराचा बोजा भयंकर आहे. इनकम टॅक्स व सुपरटॅक्स ह्यांवर बसविण्यांत आलेली जादा पट्टी काढून टाकणें आवश्यक आहे. ( ३ ) कंपन्यावरील सुपर टॅक्स अजिबात रद्द केला पाहिजे. इंग्लंडमध्यें अशा तऱ्हेचा कर आतां घेण्यांत येत नाहीं. टॅक्सेशन इन्क्वायरी कमिटीनें ह्या संबंधांत मागेंच आपला अभिप्राय दिलेला आहे. संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यांचे मार्गांतील ही अडचण नाहींशी झाली पाहिजे. हिंदुस्थानचे फडनवीस निर्भीड आहेत; त्यांनीं आपलें धैर्य दाखविण्याची हीच वेळ आहे."

---


## धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

### नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा:—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

This year 1934-35
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches:* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca,
*Offices:* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## खेडेगांवांतील उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन

[ पुणें येथील वसंत व्याख्यानमालेतर्फे ता. १६ मे रोजीं श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचें 'मुंबई इलाख्यांतील खेडेगांवां धंदे' ह्या विषयावर व्याख्यान झालें, त्यांतील महत्त्वाच्या मुद्यांचा सारांश येथें दिला आहे. ]

[ १ ] जगांतील सर्व बेकारांची बेरीज तीन कोटि भरते, असा राष्ट्रसंघानें केलेल्या हिशेबाचा अंदाज आहे. तथापि, एकट्या हिंदुस्थानांतच चार ते पांच कोटि लोकांना काम नाहीं, असें तज्ञांचें म्हणणें आहे.

[ २ ] हिंदुस्थानाची लोकसंख्या ३७ कोटि आहे, ती पुढच्या सालेसुमारीपर्यंत ४० कोटींवर जाईल. ब्रिटिश हिंदुस्थानांतील २७ कोटि लोकांच्या वांट्यास अवघे २३ कोटि एकर पिकाखालील जमीन येते, धान्याचा पुरवठा जरूरीच्या मानानें अत्यल्प आहे आणि लोकसंख्या तर वाढत आहे. ह्या २३ कोटि एकरांपैकीं फक्त ५ कोटि एकर पाण्याखाली आहेत. मुंबई इलाख्यांत हें प्रमाण १००:४ इतकेंहि पडत नाहीं.

[ ३ ] ह्यास उपाय म्हणजे शेतीवर अवलंबून नसलेल्या उद्योगधंद्यांची वाढ, हा होय. जमिनीच्या लहान तुकड्यांवर गुजराण करणाऱ्या शेतकऱ्यांस घरगुती जोडधंदे हा एकच तरणोपाय आहे.

[ ४ ] देशांत मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या उद्योगधंद्यांची जलद वाढ व्हावी, ही मागणी कांहीं नवीन नाहीं. स्वदेशी धंद्यांस जकातीबावत संरक्षण आतां मिळून लोकांकडूनहि त्यांचा पुरस्कार करण्यांत आला आहे. इतकें असूनहि शेकडा एकापेक्षां ज्यास्त माणसांना कारखान्यांत जागा मिळालेली नाहीं. कपास कापडाच्या गिरण्यांचें उदाहरण घेतल्यास, हिंदुस्थानास लागणारा सर्व माल स्वदेशांत तयार झाला, तरी पांच लाखांहून ज्यास्त माणसांना ह्या धंद्यांत वाव मिळणार नाहीं. खेडेगांवांत रहाणाऱ्या कोट्यवधि लोकांची ऐपत वाढल्याखेरीज हिंदी बाजारपेठांत मालाचा उठाव ज्यास्त प्रमाणावर होणार नाहीं.

[ ५ ] शहरांतील मोठ्या प्रमाणावर चाललेले कारखाने दारिद्र्य व बेकारी कमी करूं शकलीं नाहींत, ह्याचें कारण खेडेगांवांतील मागें राहिलेल्या लोकांस त्यामुळें काम मिळालें नाहीं. परदेशी यंत्रसामुग्री व विलायती कच्चा माल ह्यांच्या योगानें देशांतील मालाचा उठाव व्हावा तसा होत नाहीं व खेडेगांवांतील हुशार कामगारांसहि काम मिळत नाहीं.

[ ६ ] खेडेगांवीं उद्योगधंद्यांचे योगानें हें नुकसान टळतें. विशेषतः, शेतीप्रधान देशांत अशा उद्योगधंद्यांचें महत्त्व विशेष आहे.

[ ७ ] कुटुंबांतील माणसांचे सहाय्यानें किंवा स्वतःच्या फुरसतीचे वेळीं चालविलेल्या उद्योगधंद्यांस खेडेगांवीं उद्योगधंदे असें म्हणतां येईल. यंत्रसामुग्रीचा प्रसार होण्यापूर्वीं सर्व धंदे ह्याच स्वरूपाचे होते. सरकारच्या जकातविषयक प्रतिकूल धोरणामुळें ते सर्व बुडाले; हातमागाच्या धंद्यासारखे कांहीं धंदे मात्र कसे तरी तगून आहेत.

[ ८ ] खेडेगांवीं व दुय्यम धंद्यांच्या यशस्वितेबद्दल शेतकी कमिशननें शंका प्रदर्शित केली असली, तरी प्रो० रॉबर्टसन व डॉ. बौले ह्यांच्या मतें सदरहु उद्योगधंद्यांचें महत्त्व केवळ आर्थिकच नव्हे, तर सामाजिक सुद्धां विशेष आहे.

[ ९ ] आतांपर्यंत बहुतेक प्रांतिक सरकारांनीं हातमागाचे धंद्यास थोडें सहाय देण्यापलीकडे ह्या विषयांत लक्ष घातलेलें नाहीं. मुंबई इलाख्याच्या उद्योगखात्यानें सुधारलेली सामुग्री वापरण्याविषयीं प्रचार, शिक्षणाची सोय, विक्रीची व्यवस्था, इत्यादि मार्गांनीं हातमागाचे धंद्याच्या पुनरुज्जीवनाची खटपट चालविली आहे. इतर धंद्यांचे बाबतींत ह्याच उदाहरणाचा कित्ता गिरवावा लागेल.

[ १० ] हिंदुस्थान सरकारकडून मिळालेल्या देणगीपैकीं फक्त २५ हजार रुपये कातडीं कमावण्याचे धंद्यास सहाय देण्यासाठी राखून ठेवलेले आहेत, तथापि त्या संबंधांत निश्चित योजना अजून आंखलेली नाहीं खेडेगांवातल्या खेडेगांवांतच कातडी कमावली जाऊन स्थानिक कच्च्या मालासहि मागणी उत्पन्न केली जाईल, अशी व्यवस्था होणें जरूर आहे.

[ ११ ] इतर खेडेगांवीं धंद्यास सहाय देण्यासंबंधीं विशेष मोठी योजना झालेली नाहीं. मुंबईच्या उद्योग खात्याचे १९३३-३४ चे अहवालांत तपशीलवार नमूद केलेल्या कित्येक उद्योगधंद्यांसंबंधीं चौकशी झालेली असूनहि नव्या योजनेंत त्यांना स्थान मिळालें नाहीं, हें आश्चर्यकारक आहे. इलाख्यांत सहाय देण्यास लायक असलेल्या धंद्यांपैकीं जिल्हावार सोइस्कर अशा धंद्यांची निवड करून शक्य तर सहकारी तत्त्वावर त्यांस मदत देण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

[ १२ ] फायदेशीर विक्री होण्यासंबंधी व्यवस्था, नवीन नमुने व नवीन तऱ्हेचा माल ह्याबावत सल्ला, शास्त्रीय व व्यापारी दृष्टीनें धंद्यांची चिकित्सा, व्यावहारिक सूचना, औद्योगिक यंत्रसामुग्रीसंबंधीं संशोधन करणाऱ्या संस्थांची स्थापना इत्यादि मार्गांनीं सरकारास खेडेगांवीं उद्योगधंद्यास सहाय करतां येण्याजोगें आहे.

[ १३ ] आपल्या देशांत ज्या मालास मागणी आहे, अशा रोजच्या गरजा भागविणाऱ्या मालाचें उत्पादन वाढविण्याकडेच विशेष लक्ष दिलें पाहिजे व परदेशी मालाची आयात थांबविली पाहिजे म्हणजे शेतकऱ्यांस रोखीनें माल विकत घेण्याची पाळी येणार नाहीं व त्यांच्या संसारास बळकटी येईल. रिकामटेकडेपणामुळें होणारे अनर्थहि त्यामुळें टळतील. पंजाबमध्यें दुय्यम धंद्यांचा स्त्रियांत चांगल्या तऱ्हेनें प्रसार झालेला आहे.

[ १४ ] ह्याबावत सरकारची जबाबदारी मोठी आहे. जर्मनीमधील लहान प्रमाणावरील धंद्यांचें अनुकरण येथें झालें पाहिजे. मध्यवर्ती बँकिंग कमिटीनें जर्मनीमधील परिस्थितीचा अभ्यास होण्याविषयीं शिफारस केली होती.

[ १५ ] जनतेनेंहि ह्या संबंधांतलें आपलें कर्तव्य केलें पाहिजे. मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्यास फार मोठ्या प्रमाणावर संरक्षण लागतें, तसें येथें जरूर नाहीं.

[ १६ ] अखिल भारतीय ग्रामोद्योग संघानें ग्रामसुधारणेचें व ग्रामसंघटनेचें कार्य म. गांधींच्या नेतृत्वाखाली चालविलें आहे, त्याचा शेतकऱ्यांस विशेष उपयोग होणार आहे. स्थानिक उद्योगधंद्यांचे प्रश्न सोडविण्यास स्थानिक प्रयत्नच झाले पाहिजेत व मालाचा उठाव करण्याची खटपट झाली पाहिजे.

[ १७ ] ह्यासाठी लागणारा स्वार्थत्याग फार मोठा नाहीं; तो खुषीनें करावयाचा आहे व त्यांतील हेतु संपत्ति वाढविण्याचा नसून हस्तव्यवसाय करणारांच्या अर्धपोटीं जीवितास हातभार लावण्याचाच केवळ आहे. ह्याकरितां, प्रत्येकानें आपआपल्या क्षेत्रांत आपल्या शक्तीप्रमाणें ह्या चळवळीस मदत करणें कर्तव्यच ठरतें.

[ १८ ] पुणें शहर व महाराष्ट्र यांनीं स्वदेशी चळवळीच्या बाबतींत महत्वाची कामगिरी केलेली आहे. त्यांनीं हें ग्रामोद्योगाचें काम हातीं घ्यावें अशी त्यांस माझी विनंति आहे.

## बॉंबे लाइफ अॅशुअरन्स कं. लि.

---:०:---

### २८ वा वार्षिक अहवाल

बॉंबे लाइफ अॅशुअरन्स कंपनीची २८ वी वार्षिक सभा गेल्या आठड्यांत भरली होती. त्या प्रसंगीं डायरेक्टरांचा रिपोर्ट भागीदारांस सादर करतेवेळीं अध्यक्ष सर लल्लूभाई सामळदास म्हणालेः-"इतर धंद्यांप्रमाणें विमा व्यवसायांतहि दिवसानुदिवस स्पर्धा वाढत आहे. हिंदुस्थानांत सध्यां अस्तित्त्वांत असलेल्या कंपन्यांबरोबर नव्या कंपन्यांसहि वाव आहे. त्यामुळें स्पर्धा वाढेल, परंतु तीमध्यें अनिष्टतेस थारा मिळाला नाहीं म्हणजे झालें.

नवीन स्थापन झालेल्या कित्येक कंपन्या प्रांतिक भावनेचा फायदा घेऊन विम्यापासून मिळणारा फायदा समजावून सांगण्याऐवजीं प्रांताभिमान जागृत करून काम मिळवितात. हें प्रांताप्रांतांमधील वैषम्य अनिष्ट असून हिंदुस्थानाबद्दल सामुदायिक आपलेपणा वाटण्याचे मार्गांत तें येण्याचा संभव आहे."

कंपनीची दाक्षिण कारवारमधील उडपी येथील इमारत पुरी होत आली असून नव्या दिल्लीमधील इमारतीचें काम चालू आहे.

### कंपनीच्या कामाचा अहवाल

कंपनीच्या १९३५ सालांतील नव्या कामाचा अहवाल खालील प्रमाणें आहेः—

विमा अर्जः ७,४३८.
अर्जांतील विम्याची रकम १,५०,४२,९१५ रु.
पॉलिसी दिल्याः ६,३३४
पॉलिसींची रकमः १,२३,२८,६६५ रु.
पॉलिसीवरील वार्षिक उत्पन्नः ६,५१,०१६-१५-० रु.
नामंजूर विमे ( रकम ) ४,१६,००० रु.
क्लेम्सः मृत्यूमुळें, १६९; मुदत भरल्यामुळें, १०३
डिव्हिडंडः ४ टक्के व बोनस ८ टक्के. दोन्ही कर माफ.

सर लल्लूभाई सामळदास हे बॉंबे लाइफ अॅशुअरन्स कंपनीचे अध्यक्ष असून श्री. ज्योतींद्र एल. मेहता हे मॅनेजर आहेत.

---

### नाशिक जिल्हा सहकारी इन्स्टिटयूटचें प्रचार कार्य

नाशिक जिल्हा स. इन्टिटयूटतर्फे इगतपुरी म्युनिसिपालीटीचे झाडुवाले, भंगी, बत्तीवाले वगैरे खालचे प्रतीचे नोकरांची सभा इगतपुरी म्युनिसिपालिटीचे व्हाइस-चेअरमन श्री. गोपाळराव खेमनार यांचे अध्यक्षतेखालीं ता. ११ मे, १९३६ रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां म्युनिसिपल हॉलमध्यें भरली होती.

श्री. एम. जी. शेटे, प्रोपागांडा ऑफीसर, नाशिक डि. को. इन्स्टिटयूट, यांनीं सोसायटी म्हणजे काय हें सांगून एकी, काटकसर व नियमितपणाची वागणूक या गुणांचे जोरावर प्रत्येकाला आपली आर्थिक उन्नति कशी करून घेणें शक्य आहे, हें सभेस स्पष्ट समजावून सांगितलें. सोसायट्यांपासून फायदे कोणते आहेत, सवलती कोणत्या देण्यांत आल्या आहत, कायद्यानें कोणकोणत्या बाबतींत सोसायट्यांना संरक्षण दिलेलें आहे, वगैरे बाबी समजावून दिल्यानंतर नोकरांकरितां एक सोसायटी स्थापन करावी असें सर्वानुमतें ठरविण्यांत आलें व सभेचें काम संपलें.

---


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,०४,००,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रें ( मुंबईनजिक ), मलबार हिल ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**चालू ठेवीवरील व्याजाचा दर**

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेकडा १ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धा आम्हीं ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धा ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः— टी. आर. लालवाणी.


---


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

**लक्ष्मीरोड, पुणें**

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२

**अधिकृत भांडवल : : : १०,००,०००**

**विक्रीस काढलेलें भांडवलः ५,००,०००**

**दर शेअरची किं. : रु. ५०**

चालू ठेवी द. द. शेकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री व त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११-१५ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०—१ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—७ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—७ |
| ४% १९६०–७० ... ... | ११४-१३ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९९-३½ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०७-१३ |
| ४% १९४३ ... ... ... | १११-१० |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०९—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०७—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०८—४ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | १०८—४ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | १०८—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२३—८ |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२८-१२ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०७-१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३२—९ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५४२—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३०—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | ९९—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ८८३-१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १२% ) | १५४-११ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २२५—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २३५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १५४७—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५५५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २रु. ८ आ.) | १६७—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १६३—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ६२५—० |

## सिमेंट कंपन्यांचें आशाजनक भवितव्य

सिमेंटच्या कारखान्यांचें एकत्रीकरण होऊन नव्या योजनेस ता. १ जुलै, १९३६ रोजीं सुरवात होईल. असोसिएटेड सिमेंट कंपनी लि. मध्यें दहा कंपन्या सामील झाल्या असून ह्या योजनेमुळें अगोदरच भरभराटींत असलेल्या ह्या धंद्यास तेजी येईल, असा अंदाज आहे. ह्या संबंधांतील आशाजनक प्रवृत्ति खालील कांहीं कंपन्यांच्या तुलनात्मक आंकड्यांवरून दृग्गोचर होत आहे:-

| कंपनी | व्यवस्था | १९३४ नफा | १९३४ डिव्हि. | १९३५ नफा | १९३५ डिव्हि. |
|---|---|---|---|---|---|
| | मॅ. एजंट्स | लक्ष रु. | % | लक्ष रु. | % |
| बुंदी | किलिक निक्सन | १०¾ | १८¾ | १५ | २० |
| इंडियन सिमेंट | टाटा सन्स | ४½ | १० | ५¼ | १५ |
| शहाबाद | टाटा सन्स | १५½ | १५ | १८ | २२½ |
| ओखा सिमेंट | मि. कॅप्टन ( मॅ. डायरेक्टर ) | ८ | १३½ | ८ | १६ |

असोसिएटेड कंपनीमध्यें सामील होणारी प्रत्येक कंपनी सुस्थितींत असून, सुसज्ज व कार्यक्षम यंत्रसामुग्री, पुरेसें खेळतें भांडवल इत्यादि अनुकूल गोष्टींमुळें ह्या नव्या योजनेस उत्तम तऱ्हेनें सुरवात होणार आहे.


# WANTED

WANTED for the Fisheries Section of the Department of Industries, Bombay, an Inspector of Fisheries to supervise the working of the Fish Curing Yards in the Bombay Presidency. The headquarters of the incumbent of the post will be fixed at Malvan.

QUALIFICATIONS :—Candidates must have obtained a degree in Zoology or Botany and must have a good knowledge of chemistry. Candidates must have practical experience of work done at the Fish Curing Yards, including the curing of fish. Only those able to speak and write Marathi and Kanarese need apply. Salary :—Rs. 130-5/2-170.

CONDITIONS OF SERVICE :—No allowances of any kind are attached to the post. The selected candidate will be on probation for one year in the first instance and will be subject to new leave and pension rules.

Candidates selected for interview will be required to present themselves in Bombay at their own expense.

Applications with particulars as to age and caste and latest certificates should be addressed to the Director of Industries, Old Custom House Yard, Bombay, so as to reach him not later than 15th June 1936. Those already in Government service may also apply through their Heads of Departments.

13th May 1936.

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली

पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः–

**कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.**

अध्यक्ष–श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | दर हजारीं त्रैवार्षिक नफा | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.



" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.



'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

**महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचा मजबूत पाया**

**मध्यप्रांत व वऱ्हाड**

हायस्कूल, मिडल स्कूल व नॉर्मल स्कूल ह्यांतील शिक्षकांच्या ग्रंथालयासाठीं मंजूर

# अर्थ

[ व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि आर्थिक विषयांस वाहिलेलें साप्ताहिक ]

संपादक : प्रो. वा. गो. काळे

सहायक : श्री. श्री. वा. काळे

**मुंबई इलाखा**

सरकारी व सरकारमान्य शाळांत व ट्रेनिंग कॉलेजांत घेण्यासाठीं मंजूर

महाराष्ट्रीयांचीं मनें उद्योगधंदे, व्यापार, इत्यादि धनोत्पादक व्यवहारांकडे वळून त्यांस ह्या विषयांची गोडी लागावी, या दृष्टीनें 'अर्था'ची मांडणी केलेली असते. व्यापारी, शिक्षक, विद्यार्थी, सार्वजनिक कार्यकर्ते व सर्वसाधारण नागरिक ह्या सर्वांनीं 'अर्था'चें वाचन केलें असतां महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीचा मजबूत पाया तयार झाल्याखेरीज रहाणार नाहीं. उद्योगधंद्यांत असणाऱ्या, त्याचप्रमाणें त्यांत नव्यानें पडणाऱ्या सर्वांस हें पत्र मार्गदर्शक होईल.

प्रत्येक महाराष्ट्रीय कुटुंबांत व शाळेंत अर्थ वाचला जाणें आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी फक्त चार रुपये असून टपालखर्च वेगळा नाहीं. मनिऑर्डर पाठवून वर्गणीदार व्हा.

व्यवस्थापक, अर्थ, अर्थ ऑफिस, पुणें ४



पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी

टेलरिंग फर्म

मॅनेजरः–व्ही. ना. पाटसकर, D.M.T.C.A. (London.)

**पाटसकर आणि कंपनी**

स्थापित इ. स. १८७८

४८ निहाल पेठ, पुणें शहर.

सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी

आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.



'अर्था'चे किरकोळ अंक

खालील ठिकाणीं मिळतात.

पुणें १ आर्यभूषण छापखाना कचेरी.
२ एन. ए. अँड फ्रेंड्स, अप्पा बळवंत चौक.

कोल्हापूर रा. शं. गोखले, रामकृष्ण कार्यालय.

सोलापूर व्ही. के. भागवत, हनुमान कार्यालय.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख २७ मे, १९३६. अंक २२

श्री. न. गं. आपटे, बी. एजी. यांनीं
चांगल्या फळापासून केलेलें शुद्ध

**रस व सरबतें**

मिळण्याचें मुख्य ठिकाण
महाराष्ट्र इंडस्ट्रियल को. एजन्सी पुणें २
व सर्व प्रमुख दुकानें
मुंबईंत: तांबे आरोग्यभुवन, गिरगांव व कोट.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची
प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**

च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा.
किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा ( Dandruff ), केंस गळणें व टक्कल यांवर अनुभविक उपाय. केंसांची वाढ करण्यास उत्कृष्ट साधन. white oil पासून अलिप्त. बाटली किं. १ रु. पो. व पॅ. निराळें. पुण्यांत नू. म. विद्यालय भांडार, येथें मिळेल.

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग. कं. अमदाबाद.

**डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि., पुणें**

मध्यम वर्गांतील गृहेच्छु लोक | अत्यंत उपयोगी, फायदेशीर व सहज सुलभसाध्य

**भाडेकरी–घरमालक–गृहयोजना**

माहितीपत्रक मागवा व विमेदार व्हा.
जनरल मॅनेजर

*For All Medicinal Requisites*
— TRY —

**N. MAHADEV & Co.**

DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner, POONA 2.

**WANTED.**

Influential and hard-working Agents At Ahmednagar, Dhulia, Kolhapur, Nasik and Poona for Sun Life Assurance Company of Canada on liberal terms. Apply :—
The Manager,
Sun Life Assurance Company of Canada,
Hornby Road, Fort, BOMBAY.

**माधव सोमण ब्रदर्स**

आम्हीं स्वतः तयार केलेलीं लुगडीं व इतर पेठांचा माल सात्रीलायक गिऱ्हाइकांस विकतों.

हुजूरपागेसमोर पुणें २.

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

# विविध माहिती

### मुंबई येथील आंबा प्रदर्शन

बॉंबे प्रेसिडेन्सी फ्रूट ग्रोअर्स असोसिएशनच्या मार्फत हें प्रदर्शन भरणार असून त्यांत हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणचे आंबे मांडतां येतील. प्रदर्शनांत कलमी फळांबरोबर साधीं फळेंहि ठेवण्यास हरकत नाहीं. प्रत्येक जातींमधील उत्कृष्ट फळास पदक बक्षिस मिळेल. आंब्यापासून तयार केलेल्या पदार्थांसहि प्रदर्शनांत जागा आहे. त्याचप्रमाणें, आंब्यांचें पॅकिंग करण्याबद्दल चढाओढ लावण्यांत येईल. हें प्रदर्शन ता. ७ जून रोजीं सुरू होऊन तीन दिवस चालेल.

### खेडेगांवांत पोस्टाच्या सोई वाढणार

पोस्टाच्या सोईचा खेडोंपाडींहि प्रसार करण्यासाठी हिंदुस्थान सरकारच्या यंदाचे अंदाजपत्रकांत दोन लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. ज्या पोस्ट ऑफिसामुळें दरसाल १२० रुपयांची किंवा त्याहून ज्यास्त तूट येईल, अशीं ऑफिसें बंद करण्याचें धोरण गेलीं पांच वर्षें अमलांत होतें. आतां पोस्ट खात्याच्या बजेटाची तोंडमिळवणी होत असल्यानें ही तुटीची कमाल रकम २४० रुपये करण्यांत आली आहे. ह्या धोरणामुळें ज्यास्त पोस्ट ऑफिसें चालू रहातील.

### जमशेदपूरच्या टाटा कंपनीमधील कामगार

टाटा आयर्न ॲन्ड स्टील कंपनीमधील कामगारांच्या रोजच्या हजेरीची सरासरी गेल्या वर्षी १८,१९९ इतकी होती. ह्यामध्यें कंत्राटदारांचे हाताखालील मजुरांचा समावेश केलेला नाहीं.

### इंग्लंडमधील लोक कायदा पाळण्यांत ज्यास्त तत्पर झाले काय ?

जॉर्ज बादशहांच्या २५ वर्षांच्या कारकीर्दीमध्यें ग्रेटब्रिटनमधील तुरुंगांत कशी सुधारणा घडून आली, ह्याची माहिती खालील तुलनात्मक आंकडे देतील.

| | वर्ष १९१० | वर्ष १९३४ |
|---|---|---|
| निशाबाजीबद्दल तुरुंगाची शिक्षा | ५४,४५२ | ६,८३८ |
| तुरुंगांची संख्या | ५६ | २६ |
| तुरुंगांत कैद्यांची आवक | १,८६,३९५ | ५६,४२५ |
| रोजची सरासरी | २०,८२६ | १२,२३८ |
| लहान मुलांस तुरुंगाची शिक्षा | ९,८९१ | १,८९४ |

### अमेरिकेची लोकसंख्या

अमेरिकेची आजची लोकसंख्या १२ कोटि ७५ लक्ष आहे, म्हणजे १९३० च्या च्या मानानें ४७½ लक्षांची तीमध्यें वाढ झाली.

### साखरेच्या यंत्रसामुग्रीची आयात कमी झाली

१९३४-३५ सालीं एकूण १ कोटि ५ लक्ष रुपये किंमतीची साखर तयार करण्यास लागणारी यंत्रसामुग्री परदेशांतून हिंदुस्थानांत आली. गेल्या वर्षी ( १९३५-३६ सालीं ) ही आयात फक्त ६५ लक्ष रुपयांची झाली.

### कराची येथील टेलिफोन एक्सचेंज

कराची येथील टेलिफोन एक्सचेंज अजून जुन्या पद्धतीचा आहे. त्या ऐवजीं ऑटोमॅटिक एक्सचेंजची योजना चालू असून इमारतींचें बांधकाम वर्षअखेर पुरें होईल.

### हिंदुस्थानांत मोटार लॉऱ्यांची आयात

गेल्या वर्षी ( १९३५-३६ मध्यें ) हिंदुस्थानांत ८,४७६ मोटार लॉऱ्यांची आयात झाली, त्यांपैकीं ५,०५१ गाड्या अमेरिकेंत तयार झाल्या होत्या व २,३३३ गाड्या कनेडियन होत्या. ग्रेटब्रिटनमधून फक्त ९८२ गाड्या आल्या.

### हिंदी लोखंडाचा इंग्लंडमध्यें वाढता खप

गेल्या सालीं ग्रेट ब्रिटनमध्यें एकूण ८४,२५५ टन लोखंडाची आयात झाली, त्यांपैकीं ६७,०४१ टन लोखंड हिंदी होतें. चालू सालीं आतांपर्यंत हिंदी लोखंडाची इंग्लंडमध्यें होणारी निर्गत वाढत्या प्रमाणांत आहे.

### संयुक्त प्रांतांतले साखरेचे कारखाने

संयुक्त प्रांतांत १९३२ मध्यें 'व्हॅक्युअम पॅन' पद्धतीचे साखरेचे कारखाने फक्त ३३ होते. त्यांची संख्या आतां ६५ वर गेली असून त्यांचें एकूण वार्षिक उत्पादन ३ लक्ष टन इतकें झालें आहे.

### चीन देशांत रिझर्व्ह बँकेची स्थापना

चीनमध्यें मध्यवर्ती रिझर्व्ह बँक स्थापन करण्याचें तेथील सरकारनें निश्चित केलें असून त्या संबंधांतली पूर्व तयारी पूर्ण झाली आहे.

### हिंदुस्थान सरकारचें नवें कर्ज

हिंदुस्थान सरकारनें २¾ टक्के दराचें १२ कोटि रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें असून त्याचे अर्ज स्वीकारण्याची मुदत मंगळवार ता. २६ रोजीं संपली. कर्जावरील व्याज करमाफ नाहीं. परतफेड १ जून १९५२ रोजीं हमखास होईल परंतु १ जून १९४८ नंतर ती केव्हांहि करण्याचा हक्क सरकारनें राखून ठेवला आहे.

### मुंबई शहरांतील पुतळे

मुंबई शहरांत एकूण १०६ पुतळे, अर्धपुतळे व स्मारक-स्तंभ आहेत. ह्यांपैकीं ४२ पुतळ्यांची व्यवस्था म्युनिसिपालिटी पहाते व ४४ पुतळे मुंबई सरकारच्या पी. डब्ल्यू. डी. चे देखरेखीखालीं आहेत.

### जपानी सुताची इंग्लंडमध्यें आयात

जपानमधून कपाशीच्या सुताची इंग्लंडमध्यें निर्गत वाढत्या प्रमाणावर होऊं लागली आहे. १९३४ सालीं २½ कोटि पौंड वजनाचें जपानी सूत इंग्लंडमध्यें आलें; १९३५ मध्यें हा आकडा ३½ कोटींवर गेला.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. १६ मे रोजीं पुरा झालेला आठवडा | ३६,२०,८९५ |
| ता. २३ मे रोजीं पुरा झालेला आठवडा | ७०,८६,६०१ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते २३ मे १९३६ अखेर | २,७०,६१,५८,२८४ |

अनुक्रमणिका.


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ... २६० | मिळणार !-हिंदुस्थान सरकारचें नवें कर्ज | |
| २ सहकारी चळवळ आणि रिझर्व्ह बँक... | ... २६१ | ४ उच्च शिक्षणाची सोय आणि विद्यार्थ्यांची वाढती संख्या | ... ... २६५ |
| ३ स्फुट विचार | ... २६२ | ५ सहकारी चळवळ | ... २६६ |
| येत्या प्रांतिक निवडणु-कींची पूर्वतयारी--मत-वैचित्र आणि लोक-शिक्षण--लोकमतांत खळबळ--पंडित जवाहिर-लाल ह्यांची घोषणा व उत्तर-प्रत्युत्तर--ब्राह्म-णांची आर्थिक परिषद्-तोंडाएवढा मांडा कसा | | ६ आल्बर्टमधला आर्थिक प्रयोग | ... ... २६७ |
| | | ७ देवधर स्मारक फंड | २६८ |
| | | ८ मॅनेजिंग एजन्सी पद्धत | २६८ |
| | | ९ यंत्रसामुग्रीची हिंदुस्थानांत आयात | ... २६८ |
| | | १० निवडक बाजारभाव | २६९ |



# अर्थ

बुधवार, ता. २७ मे, १९३६


## सहकारी चळवळ आणि रिझर्व्ह बँक

---:०:---

### जमीन गहाणाच्या बँका

सहकारी चळवळीसंबंधानें मि. डार्लिंग ह्यांनीं गोळा केलेली माहिती आणि काढलेलीं अनुमानें सहकारी कार्यकर्त्यांपुढें असलीं म्हणजे त्यांस परिस्थिति अजमावण्याचें व स्वतःचें मत बनवण्याचें उत्कृष्ट साधन उपलब्ध झालें असतें. चळवळीच्या प्रगतीविषयीं प्रांतिक सरकारांवर विशेष जबाबदारी आहे ह्यांत शंका नाहीं आणि मि. डार्लिंग ह्यांच्या रिपोर्टाबाबत त्यांचा अभिप्राय मिळवण्याचा रिझर्व्ह बँकेनें यत्न करणें वाजवी आहे. तथापि, ह्या जबाबदारीचा वाढता भाग सहकारी कार्यकर्त्यांवर टाकण्याचें धोरण आजपर्यंत योग्य रीतीनें अंगीकारलें न गेल्यामुळें चळवळीस यावी तशी बळकटी आलेली नाहीं ही गोष्ट प्रस्तुत प्रकरणीं ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. नाहीं तर, प्रांतिक सहकारी बँका व त्यांचेमार्फत इतर सहकारी संस्था ह्यांची साखळी रिझर्व्ह बँकेशीं जोडावयाची असतां त्यांचेविषयीं व्यक्त झालेला अभिप्राय आणि केलेल्या सूचना ह्यांची माहिती सदरहू संस्थांमधील कार्यकर्त्यांस पुरवली जाऊं नये असा प्रकार घडलाच नसता. ह्या कारणानें सहकारी संस्थांस दूरदर्शी, व्यापक व व्यावहारिक धोरण निश्चित करण्याची संधि व तद्द्वारा मिळणारें शिक्षण ह्यांस कार्यकर्ते मुकले आहेत. स्वतःच्या हितानहिताची जाणीव ठेवून आपल्या हिमतीवर संस्था चालविणें हें सहकारी जनतेचें मुख्य ध्येय आणि कार्य आहे. मि. डार्लिंग ह्यांचा रिपोर्ट त्यांस विचार करण्यास योग्य वेळीं मिळाला नाहीं ही गोष्ट त्या ध्येयास व कार्यास परिपोषक नाहीं.

रिझर्व्ह बँक सहकारी बँकांस कोणत्या तऱ्हेची मदत करणार? "इंडियन फिनॅन्स" मधील लेखकानें ह्या प्रश्नाचें उत्तर दिलें आहे, तें मननीय आहे:—"अनेक प्रांतांत सहकारी चळवळीची पीछेहाट झाली आहे. कांहींमध्यें तर तिचा बोजबारा उडाला आहे; असल्या प्रांतांत सहकारी बँकांस रिझर्व्ह बँकेकडून सहाय मिळणें अशक्य आहे. तेथें सहकारी चळवळ सावरून धरण्याचा प्रयत्न निश्चयानें व योजनात्मक पद्धतीनें झाला पाहिजे; आणि त्या कामीं रिझर्व्ह बँकेचा सल्ला व सहकार्य हीं मिळूं शकतील. ज्या प्रांतांतील सहकारी बँका चांगल्या स्थितींत आहेत तेथें त्यांस पैशाची अडचण भासत नाहीं आणि तो पुरवण्याचा प्रश्न उद्भवत नाहीं. ह्या बँकांजवळ पैसा पडून आहे आणि त्याचा विनियोग करण्याची अडचण त्यांस भासत आहे; अशी परिस्थिति आजमितीस मद्रास, मुंबई आणि पंजाब ह्या प्रांतांमध्यें आहे. ह्यावरून असा निष्कर्ष निघतो कीं, जेथें सहकारी बँका डबघाईच्या स्थितींत आहेत, तेथें रिझर्व्ह बँकेनें त्यांस सहाय देऊं नये आणि ज्या प्रांतांत त्यांची सुस्थिति आहे त्या प्रांतांत त्यांस रिझर्व्ह बँकेच्या सहायाची जरूर नाहीं. शेतीच्या धंद्यास पैसा पुरवावयाचा तो रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या लहान बँकांस पुरवतां येईल आणि त्यांनीं शेतीच्या मालाच्या तारणावर तात्पुरतीं कर्जें दिलीं पाहिजेत. सहकारी चळवळीच्या कक्षेबाहेरील क्षेत्रांत हें काम रिझर्व्ह बँकेस लहान व्यापारी बँकांमार्फत करतां येईल. कोणत्या व्यापारी बँकांस पैसा पुरवावयाचा हें रिझर्व्ह बँकेनें चौकशी व पारख करून ठरवलें पाहिजे."

वर निर्दिष्ट केलेल्या लेखकाच्या मताप्रमाणें अल्प मुदतीचीं कर्जें देण्याचे कामीं रिझर्व्ह बँकेस सहकारी चळवळींत प्रस्तुत मुळीच वाव नाहीं, तथापि लांब मुदतीच्या जमीन तारण गहाणावरील कर्जांचे बाबतींत त्या बँकेस थोडेंबहुत सहाय देतां येण्यासारखें आहे, असें त्याचें मत आहे. शेतकऱ्यांच्या डोक्यावरचा जुन्या कर्जांचा बोजा कायम आहे तोंपर्यंत अल्प मुदतीच्या कर्जांचा त्यास उपयोग नाहीं. ह्या दृष्टीनें जमीन गहाणाच्या बँकांचें महत्त्व विशेष आहे. ह्या जाणीवेनें मद्रास, पंजाब व मुंबई ह्या प्रांतांत असल्या संस्थांचें कार्य मोठ्या प्रमाणांत चालू करण्यांत आलें आहे. डिबेंचर्सच्या स्वरूपांत स्वस्त व्याजाच्या दरानें पैसा उभारण्याची आवश्यकता त्यांस विशेष भासते. प्रांतिक सरकारांनीं ह्या कर्जांच्या मुद्दलाची व व्याजाची हमी घेतली आहे म्हणून पैसा उभारण्याचें काम बरेंच सुकर झालें आहे. मद्रास इलाख्यांत ५½ ते ६ टक्के व्याजाच्या दरानें जमीन गहाणाच्या बँकेनें प्रारंभीं पैसा उभारला, पण अलीकडे व्याजाचा दर सरसकट ३½ टक्क्यांपर्यंत उतरवण्यांत आला आहे. ह्या बाबतींत रिझर्व्ह बँकेचें सहाय उपयोगी पडलें असल्याचें सांगतात. पैशाच्या बाजारांतील व्यवहारांच्या पद्धतीशीं विशेष परिचय नसल्याकारणानें किफायतशीरपणानें डिबेंचर्सच्या साधनानें पैसे कसे उभे करावे हें जमीन गहाणाच्या बँकांस नीट समजत नाहीं आणि त्या बाबतींत रिझर्व्ह बँकेच्या तज्ज्ञांचा सल्ला उपयोगी पडेल अशी अपेक्षा आहे. कर्जाऊ दिलेल्या रकमांची परतफेड होत जाईल तेव्हां दरवर्षी जमा झालेल्या मुद्दलामधून डिबेंचर्सचे पैसे चिठ्या टाकून त्यांत नांव निघेल त्याप्रमाणें देऊन टाकण्याची बँकांची व्यवस्था अनुचित आहे, कारण तिचे योगानें डिबेंचर्सचा बाजारभाव चढत नाहीं आणि ह्या रीतीनें व्याजाचा दर उतरत नाहीं अशी टीका केली जात आहे. ह्याऐवजीं म्युनिसिपालिट्या व पोर्ट ट्रस्ट्स वसूल झालेल्या मुद्दलाचा एक निधि बनवतात, त्याचें अनुकरण जमीन गहाणाच्या बँकांनीं करावें अशी सूचना पुढें मांडण्यांत आली आहे,

ती विचार करण्याजोगी आहे. रोख्यांत नमूद असलेली रकम केव्हांहि परत घेणें भाग पडेल ही भीति नाहींशी झाली असतां डिबेंचर्स मध्यें पैसे गुंतवण्याची लोकांची प्रवृत्ति वाढेल आणि डिबेंचर्सचे बाजारभाव चढून बँकांनीं काढावयाच्या कर्जावरील व्याजाचा दर उतरेल आणि त्यांचा फायदा होईल, अशी वरील सूचनेच्या मुळाशीं कल्पना आहे. महिनानुमहिना डिबेंचर्स काढीत बसल्यानें त्यांचा बाजारभाव वर जाण्याच्या मार्गांत अडथळा येतो. त्यापेक्षां वेळोवेळ लागणाऱ्या रकमा रिझर्व बँकेकडून कर्जाऊ घेऊन पैशाच्या बाजाराची परिस्थिति अनुकूल होतांच डिबेंचर्स काढण्याचें धोरण स्वीकारलें गेल्यास वरील प्रकारचा अडथळा येणार नाहीं, डिबेंचर्सचे बाजारभाव चढीचे रहातील व व्याजाचे दर जमीन गहाणाच्या बँकांच्या दृष्टीनें सोयीचे होतील. ह्या कामीं रिझर्व बँकेनें सहाय देणें योग्य व इष्ट होईल. बँक ऑफ इंग्लंडचें धोरण त्या प्रकारचें असतें व त्याचा कित्ता हिंदुस्थानांत गिरवला जाणें अगत्याचें आहे. प्रांतिक सरकारांचा व रिझर्व बँकेचाहि पाठिंबा जमीन गहाणाच्या बँकांस आहे असें लोकांस दिसेल तर त्यांचा विश्वास ह्या संस्थांवर अधिक दृढ होऊन त्यांचें कार्य सुकर होईल. कर्ज देणें व त्यासाठीं लागणारा पैसा खुल्या बाजारांत उभा करणें ह्या दोन्ही बाबतींत व्याजाचे दर शक्य तितके हलके असणें हें जमीन गहाणाच्या बँकांच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें आहे. म्हणून ह्या संस्था आणि रिझर्व्ह बँक यांचें पूर्ण सहकारित्व होणें आवश्यक आहे.

# स्फुट विचार

## येत्या प्रांतिक निवडणुकींची पूर्वतयारी

हिंदुस्थानांत सध्याचा काळ राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक कल्पनांच्या झगड्याचा आहे. नवीन राज्यघटनेस अनुसरून प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुकी जसजशा जवळ येतील तसतसा हा झगडा अधिकाधिक रंगणार आहे. आमच्या देशांतली परिस्थिति कांहींशी फ्रान्स सारखी असून ग्रेट ब्रिटनमध्यें ज्याप्रमाणें कॉंझर्व्हेटिव्ह, लिबरल व लेबर असे तीनच प्रमुख पक्ष आहेत तशी वस्तुस्थिति येथें नाहीं आणि आमचेकडे बहुतेक प्रांतांत अनेक पक्षोपपक्ष व गट ह्यांची गर्दी आहे. येथील प्रांतिक कायदेमंडळांची घटनाहि असल्या बारभाईस पोषक आहे आणि स्वतंत्र मतदारसंघांमुळें पक्षांचा व गटांचा गोंधळ विशेषच माजण्याचा संभव दिसत आहे. कायदेमंडळांच्या निवडणुकी जनतेस नागरिकत्वाचें आणि सार्वजनिक हिताच्या प्रश्नांचें शिक्षण देण्याचे कामीं उपयुक्त होत असतात, हा त्यांचा एक प्रकारचा फायदा आहे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. मतदारांचा पाठिंबा मिळवण्यासाठीं भिन्न भिन्न पक्षांच्या उमेदवारांस, आपण निवडून आल्यास कोणत्या सुधारणा घडवून आणूं आणि कोणत्या प्रकारचें धोरण उचलून धरूं ह्याविषयीं माहिती व आश्वासनें द्यावीं लागतात. नवीन राज्यघटनेच्या कायद्या अन्वयें विशिष्ट मर्यादेंत प्रांतिक स्वायत्तता स्थापन व्हावयाची असून कायदेमंडळांत जनतेनें निवडलेल्या लोकांचें पूर्ण प्राबल्य रहावयाचें आहे. लोकनियुक्त सभासदांमधूनच कार्यकारी प्रधानमंडळें निवडलीं जातील आणि सरकारी व सरकारनियुक्त सभासद ह्यांस कायदेमंडळांत पूर्वीप्रमाणें स्थान मिळणार नाहीं. ह्या कारणानें येत्या निवडणुकीस विशेष महत्व प्राप्त होणार आहे. कायदेमंडळांत जाऊं नये असें म्हणणारा पक्ष सध्या अस्तित्वांत नाहीं, आणि प्रधानकीच्या जागा संधि मिळाल्यास स्वीकारून राज्यशकट हाकण्यास सहाय करणें योग्य आहे किंवा कसें ह्याविषयीं कांहीं लोकांमध्यें वाद व शंका असली तरी येत्या निवडणुकींत भाग घेऊन तींत आपल्या विचाराचे अधिकाधिक सभासद निवडून आणावे ह्याबद्दलची खटपट प्रत्येक पक्ष आणि गट करणार आहे. ह्यामुळें येत्या निवडणुकीचें महत्व ज्यास्तच वाढावयाचें आहे.

## मतवैचित्र्य आणि लोकशिक्षण

आपल्या पक्षाचे किंवा गटाचे ज्यास्तींत ज्यास्त सभासद निवडून यावे असा प्रयत्न त्यांपैकीं प्रत्येक करीत असतो आणि त्याकरितां मतदारांस आकर्षण्यासाठीं मोहक कार्यक्रम पुढें मांडतो. निवडणुकीचे पूर्वीं दिलेलीं वचनें पुढें पुरीं होतातच असें नाहीं आणि त्या वेळची घोषणा, जाहीरनामे, भाषणें, ह्यांत अतिशयोक्तीचाहि भाग मोठा असतो. आपल्या मालाचें प्रदर्शन करून त्याकडे गिऱ्हाइकें खेंचण्यास दुकानदार ज्या युक्त्या लढवतात, त्याच मासल्याच्या कल्पत्या निवडणुकीच्या मोहिमेंत सर्व पक्ष उपयोगांत आणतात, असा चोहोंकडचा अनुभव आहे. बदलणाऱ्या परिस्थितींत आपण सरकारच्या धोरणास अमूक प्रकारचें वळण लावण्याची खटपट करूं व त्या मार्गानें आर्थिक व सामाजिक उन्नति घडवून आणूं असें अभिवचन प्रत्येक पक्ष देत असतो, आणि आपल्या विचारांशीं जुळणारा कार्यक्रम पुढें मांडणाऱ्या उमेदवारांस पाठिंबा देण्याची संधी मतदारांस मिळते. ग्रेटब्रिटनमध्यें आज लिबरल तर उद्यां कॉंझर्वेटिव्ह आणि परवां कामकरी पक्ष ह्यांची निवडणुकींत सरशी होऊन त्यास कायदेमंडळांत मताधिक्य व वर्चस्व प्राप्त होतें व सरकारी धोरणास बदलती दिशा लागते, ह्याचें कारण, जनतेच्या मतांत, परिस्थिति व तिच्या सुधारणेसाठीं पक्षोपपक्षांनीं सुचवलेले उपाय ह्यांचे योगानें होणारा फेरबदल हें आहे. हिंदुस्थानांत मतदारसंघ खुले नसून जातिविशिष्ट असल्यानें जनतेस निवडणुकींत मिळणारें शिक्षण व त्यामुळें होणारें आंदोलन ह्या गोष्टी अत्यंत मर्यादित स्वरूपांत घडून येणें अपरिहार्य आहे. तरीहि, निवडणुकीपूर्वींच्या दंगलींत मतभेद व विचार-वैचित्र्य ह्यांचें कमी-अधिक प्रमाणांत सार्वत्रिक प्रदर्शन झाल्यावांचून रहावयाचें नाहीं. मतदारांस स्वतःच्या बाजूस वळवण्याच्या चळवळीस प्रारंभ आतां होत असून त्यासाठीं परिषदा व सभा भरवण्याचा उपक्रम चालू झाला आहे. त्यांमध्यें आर्थिक, सामाजिक, राजकीय इत्यादि विविध मतांची घोषणा होत असून पुढें व्हावयाच्या निवडणुकीच्या स्वरूपाची थोडीबहुत कल्पना त्यांवरून येऊं लागली आहे.

## लोकमतांत खळबळ

देशाची राजकीय, आर्थिक व सामाजिक घटना ह्यांविषयींचा ध्येयवाद, शेती, उद्योगधंदे व शिक्षण ह्यांचे बाबतींतलें धोरण, जमीनधाऱ्याची व शेतसाऱ्याची पद्धति, करांचा बोजा, शेतकऱ्यांचें ऋणविमोचन, भांडवलवाले व मजूर ह्यांचे परस्पर-संबंध, सामाजिक चालीरीतींमध्यें इष्ट वाटत असलेल्या सुधारणा कायद्यानें घडवून आणण्याच्या योजना, इत्यादि अनेक बाबींचा अंतर्भाव पक्षोपपक्ष व त्यांचे प्रतिनिधि यांच्या घोषणा व भाषणें ह्यांमध्यें होईल. वरील प्रश्न जनतेस जिव्हाळ्याचे वाटतात आणि सध्याच्या आर्थिक हलाखींतून व मंदीमधून आपणांस बाहेर काढण्याच,

यत्न कायदेमंडळांत शिरणाऱ्या उमेदवारांनीं करावा अशी इच्छा मतदारांची स्वाभाविकपणें असणार. निवडणुकीच्या धामधुमींत जनतेच्या शिक्षणाची संधी उत्पन्न होईल, तिचा योग्य फायदा सर्वांनीं घेणें अगत्याचें आहे. जाहीर रीतीनें होणाऱ्या वादविवादांतूनच सत्याचें ज्ञान मिळण्याचें साधन लोकांस उपलब्ध होतें. निवडणुकीच्या धामधुमींत भ्रामक युक्तिवाद आणि अनिष्ट प्रकारची टीका ह्यांची धूळ उडते ही गोष्ट खरी आहे. तथापि, विविध मतांच्या गलबल्यांतच इष्टानिष्ट व ग्राह्याग्राह्य विचारांची निवड करण्याची संवय जनतेनें स्वतःस लावून घेतली पाहिजे. सध्याच्या काळांत सामाजिक व आर्थिक जीवनाशीं कायद्याचा व कार्यकारी सरकारचा निकट संबंध येतो, या कारणानें कायदेमंडळाच्या सभासदांची निवडणूक विशेष महत्त्वाची होऊन बसली आहे. ह्यामुळें हिंदू सनातन्यांपासून तों नवमतवाद्यांपर्यंत भिन्नभिन्न विचारांच्या गटांमध्यें खळबळ माजून रहावी ह्यांत आश्चर्य नाहीं. ह्याचें एक उदाहरण म्हणून वऱ्हाड प्रांतीय वर्णाश्रम स्वराज्य संघाची परिषद चालू महिनाअखेर भरणार आहे, तिच्या संबंधांत प्रसिद्ध झालेल्या पत्रकाचा निर्देश करतां येईलः—

" पाश्चात्य संस्कृतीनें दिपून अनेक विद्वान् म्हणविणारे समाजनेते तत्कालिक एकांगी आमिषांस भुलून परकीय सत्तेच्या आश्रयानें सर्व समाजास पाश्चात्य वळणावर नेण्याचा कसून यत्न करीत आहेत. या यत्नाचा आमच्या धर्मावर, संस्कृतीवर आणि शेवटीं समाजावर काय परिणाम होईल इकडे त्यांचें लक्ष नाहीं. उदाहरणार्थ, आमच्या वैवाहिक व्यवस्थेंत घोटाळा माजवणारा सारडा कायदा अधिक कडक करण्याचा यत्न होत आहे...... सारांश, आज आम्हीं राजकीय आणि आर्थिक दृष्टीनें पारतंत्र्य आणि विपत्ति भोगीत आहोंत ... यास्तव आतां औदासीन्य, अनास्था अथवा जीवनाच्या क्षुद्र सुखाचा लाभ टाकून ह्या परिस्थितींतून बाहेर पडण्याचा हरतऱ्हेनें यत्न करणें अत्यंत आवश्यक झालें आहे. "

---

## पंडित जवाहिरलाल ह्यांची घोषणा व उत्तर-प्रत्युत्तर

पुराण मताभिमान्यांची भूमिका एका टोकास व नवमतवाद्यांचें ध्येय दुसऱ्या टोकास आणि त्यांच्या मध्यभागीं विचारांच्या अनेक छटा असा प्रकार हिंदुस्थानाच्या समाजकारणांत, अर्थकारणांत व राजकारणांत दिसून येत आहे. आपली समाजसत्तावादात्मक बाजू पंडित जवाहिरलाल नेहरू ह्यांनीं लखनौच्या राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावरून अध्यक्षीय भाषणांत मांडली आणि गेल्या आठवड्यांत मुंबईमध्यें अनेक भाषणांत स्पष्ट करून दाखविली. समाजसत्तावादाच्या आत्यंतिक ध्येयास अनुसरून खाजगी मालमत्तेवरील वैयक्तिक हक्क नष्ट झाला पाहिजे आणि केवळ श्रमजीवी वर्गाच्या हातांत आर्थिक व राजकीय सत्ता एकत्रित झाली पाहिजे हें ध्येय पुढें ठेवून हिंदुस्थानांतील जनतेनें चळवळ करावी, तरच ह्या देशाचा तरणोपाय आहे असें पंडितजींचें मत आहे आणि तें त्यांनीं असंदिग्ध रीतीनें पुढें मांडलें आहे. हें ध्येय आपण आज कोणावर लादूं इच्छित नाहीं आणि शकत नाहीं ही गोष्ट त्यांनीं स्पष्ट केली आहे, पण त्याची कास धरणें मात्र हिंदी लोकांस अपरिहार्य आहे असें त्यांचें मत आहे. आर्थिक व सामाजिक क्रांति-प्रवर्तक विचार त्यांनीं अनेकवार ठासून व्यक्त केले असतां त्यांस विरोधात्मक जबाब मिळणें हें ओघानेंच प्राप्त झालें. पंडितजींच्या इतक्याच प्रांजलपणानें मुंबइच्या एकवीस प्रमुख धंदेवाल्यांनीं एक पत्रक प्रसिद्ध करून समाजसत्तावादाचा त्यांचा प्रचार देशास हानिकारक होणार असल्याविषयीं अभिप्राय व्यक्त केला आहे. आत्यंतिक समाजसत्तावादाबरोबर वर्ग-कलह, आर्थिक प्रगतीची पीछेहाट आणि विचाराच्या स्वातंत्र्याचा नाश ह्या गोष्टी येतात आणि त्यांचें बीज हिंदुस्थानांत पेरणें आत्मघातकीपणाचें आहे असा ह्या एकवीस पुढाऱ्यांच्या उत्तराचा आशय आहे. ह्यावर मुंबईंतील कांहीं प्रमुख व्यापारी व पंडित जवाहिरलाल ह्यांनीं परस्परांस आश्वासनें दिलीं आहेत, त्यांवरून समाजसत्तावादाच्या भरमसाट प्रचाराच्या दुष्परिणामाची जाणीव दोन्ही पक्षांस झाली असल्याचें उघड होत आहे. रेलवेजची सरकारी मालकी, जमीनधाऱ्याची पद्धति, सावकार आणि कामकरी ह्यांच्या विषयींचे कायदे इत्यादि बाबतींत समाजसत्तावादाची मूलतत्वें या देशांत ह्या पूर्वींच अंगिकारण्यांत आलीं आहेत. समाजसत्तावादाचा उत्कट प्रचार ह्या देशांत नवा असला तरी त्यांतला पूर्वपक्ष व उत्तरपक्ष ह्यांचा वाद युरोपांत जुनाच आहे. इतर राष्ट्रांनीं तो वाद पचनीं पाडला आहे. हिंदुस्थानांतल्या जनतेनें त्यांत ग्राह्यांश असेल तेवढा घेऊन, आपल्या आर्थिक व सामाजिक घटनेंत त्याचा अंतर्भाव करावयाचा आहे. समाजसत्तावादास, तो रामबाण उपाय आहे म्हणून, डोक्यावर घेऊन नाचणें किंवा त्याच्या उच्चाराचीहि भीति बाळगणें ह्या दोन्ही गोष्टी अयोग्य आहेत. बाहेरचें राष्ट्र, मग तें रशिया असो किंवा जर्मनी असो, त्याची हुबेहुब नक्कल येथें उठवूं पहाणें अव्यावहारिकपणाचें व अदूरदर्शित्वाचें लक्षण आहे. आपल्या देशांतल्या विशिष्ट परिस्थितीस अनुलक्षून सबंध राष्ट्राच्या प्रगतीस परिपोषक होईल असेंच धोरण येथें स्वीकारलें जाणें उचित आहे. वर निर्दिष्ट केलेल्या वादाचा प्रतिध्वनी निवडणुकीच्या दंगलींत ऐकूं यावयाचा असून जनतेनें त्याचा सावधान चित्तानें व विवेकी बुद्धीनें समाचार घेतला पाहिजे.

---

## ब्राह्मणांची आर्थिक परिषद

समाजांतील कोणत्याहि वर्गांतील किंवा गटांतील लोकांनीं आपल्या आर्थिक व सामाजिक हिताच्या प्रश्नांचा विचार स्वतंत्रपणानें आणि तुटक रीतीनें करणें हिंदुस्थानाच्या व विशेषेंकरून महाराष्ट्राच्या सध्याच्या परिस्थितींत अपरिहार्य होतें तेव्हां दोन महत्त्वाच्या गोष्टींसंबंधानें योग्य खबरदारी घेणें अगत्याचें असतें. अशा प्रकारचा तुटकपणाचा प्रयत्न सामाजिक व राष्ट्रीय संसाराच्या एकजीविव्यास बाधक होणार नाहीं अशी काळजी कार्यकर्त्यांनीं अवश्य घेतली पाहिजे. त्याचप्रमाणें, लहानसहान वर्गांचे व गटांचे स्वोन्नतीविषयींचे कार्यक्रम केवळ जात्यभिमानासारख्या भावनेवर आधारले जाण्याचा संभव असल्यामुळें ते व्यावहारिकत्वाच्या तत्त्वाचे कसोटीस उतरले पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष असणें आवश्यक आहे. निरनिराळ्या सामाजिक गटांनीं विलग रीतीनें स्वतःच्या शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगतीचा कार्यक्रम पार पाडला तर तसलें विशिष्टीकरण राष्ट्रहितास विघातक होईलच असें नाहीं आणि त्याचा सामाजिक व राष्ट्रीय एकीकरणाशीं मेळ घालणेंहि शक्य आहे. तथापि, आर्थिक क्षेत्रामध्यें केले जाणारे ह्या प्रकारचे यत्न आधीच दुभंगलेल्या आमच्या समाजाच्या ठिकऱ्या उडवल्या वांचून रहाणार नाहींत आणि अव्यवहारिकत्वाच्या

दोषामुळें ते यशस्वी होणारहि नाहींत.पुण्यास गेल्या आठवड्यांत भरलेल्या ब्राह्मण आर्थिक परिषदेंत जीं भाषणें झालीं व जे ठराव मंजूर झाले, त्यांस वर नमूद केलेली कसोटी लावली गेली पाहिजे. ब्राह्मण समाज हा आज विशिष्ट धंदा करणारा एकजीवी वर्ग राहिलेला नाहीं. त्यामध्यें व्यवसाय-विविधता दोन-तीनशे वर्षांपूर्वीच उत्पन्न झालेली आहे. असा कोणताहि उद्योग नाहीं कीं, जो ब्राह्मण करीत नाहींत आणि असा कोणताहि नवा आचार आणि विचार नाहीं कीं, जो त्यांपैकीं अनेकांनीं उचललेला नाहीं, अशी आजची स्थिति आहे. सरकारी व निम-सरकारी नोकरीचा पूर्वीचा धोपटमार्ग बंद झाला असतां ब्राह्मण तरुणांस स्वतंत्र उद्योगधंदे व व्यापार ह्यांचा मार्ग मोकळा करून कसा द्यावा हा त्या समाजापुढें अवघड प्रश्न असून व्यावसायिक मनोवृत्तीस प्रोत्साहन, व्यावहारिक शिक्षण, औद्योगिक बाबतींतला योग्य सल्ला इत्यादि प्रकारची मदत देण्याचें कार्य पुढाऱ्यांनीं करण्याचें ठरवणें उचित आणि इष्ट होईल. पण ह्याच्या पलिकडे जाऊन जातिविशिष्ट धंदे व व्यवसाय काढण्याचा उपक्रम करणें हें सर्वथा अव्यवहार्य, अयोग्य आणि हानिकारक होईल हें स्पष्टपणें सांगणें जरूर आहे. ब्राह्मण आर्थिक परिषदेचे नेते विधायक कार्यक्रम हातीं घेतील तेव्हां त्यांनीं अत्यंत जपून पाऊल टाकलें पाहिजे.नाहीं तर भाषणें हवेमध्यें जाऊन प्रत्यक्ष हातांत कांहींच पडावयाचें नाहीं.

---

## "तोंडा एवढा मांडा" कसा मिळणार ?

वरील विषयाचें विवेचन अधिक स्पष्ट होण्याकरितां आणखी चार शब्द लिहिणें आवश्यक वाटतें. आर्थिक हलाखी आणि बेकारी सर्वांस भोवत असली तरी संसाराच्या दारांत उभ्या असलेल्या तरुणांस ती विशेष जाचक होत आहे. पिढीजात धंदा सोडून दुसरा उद्योग हातीं घेण्याचा प्रसंग ज्यांच्यावर येतो असे कमी-अधिक शिकलेले सर्व जातींचे लोक ह्या वर्गांत मोडतात. ब्राह्मणांशिवाय इतर वर्गांस नोकऱ्यांचा मार्ग आज मोकळा आहे, पण त्यांमधील सुशिक्षितांची संख्या वाढत जाईल त्या मानानें नोकऱ्यांचा पुरवठा कमी पडून पोटाच्या व्यवसायाचा प्रश्न उद्यां त्यांचेहि बाबतींत बिकट होणार आहे. अनेक पिढ्या परिचयाच्या झालेल्या व्यवसायांचे मार्ग बंद झाल्यानें किंवा त्यांत अतोनात गर्दी उडाल्याकारणानें सर्व जातींचा व त्यांमध्यें ब्राह्मणांचा कोंडमारा होऊन ती कोंडी फोडणें ह्या वर्गास अगत्याचें व निकडीचें वाटत आहे हें स्वाभाविक आहे आणि संक्रमण कालांत पोटाचा उद्योग पहाण्याचें सामर्थ्य तरुणांत उत्पन्न व्हावें म्हणून त्यांनीं सामुदायिक उपाय योजावे हें समयोचित आहे. तथापि, तरुणांस धंदा द्यावयाचा तो आर्थिक तत्वांस अनुसरूनच यशस्वी होईल हें विसरून चालावयाचें नाहीं. बाजारभाव आणि गिऱ्हाइकी कोणत्याहि जातीच्या किंवा वर्गाच्या भावनेनें किंवा इच्छेनें ठरत नसते. बाजारांत चढाओढीनें निश्चित होणाऱ्या किंमतीस आणि योग्य नफा उरेल अशा बेतानें प्रत्येक धंद्यांतल्या विविध जातींच्या व पेशांच्या गिऱ्हाइकांस माल विकणें परवडलें पाहिजे. व्यापारी, धंदेवाला किंवा कामकरी ह्यास तो ब्राह्मण म्हणून बाजारांत किफायतशीर भाव अथवा मजूरी मिळणार नाहीं. नुसत्या ब्राह्मण गिऱ्हाइकांवर त्यास विसंबतां येणार नाहीं किंवा सोयीचें व सुखाचें काम मिळणार नाहीं. त्याहिपेक्षां महत्वाची गोष्ट अशी आहे कीं आज समाजांत जन्मानें जात ठरते, धंदा ठरत नाहीं. एकाच धंद्यांत अनेक जातींचे लोक कामें करतांना आपण पहातों आणि नवीन नवीन व्यवसाय निघत असतां ही प्रवृत्ति बळावत जाणार आहे. शिवणकाम, हरतऱ्हेची दुकानदारी आणि विविध प्रकारचा व्यापार ह्यांमध्यें सर्व जातींचीं माणसें खांद्यास खांदा लावून कामें करीत आहेत. अलीकडला बोलपटाचा धंदा घेतला तर त्यांत हें मिश्रण उत्कृष्ट रीतीनें पहावयास सांपडतें. धंद्यांतली व गिऱ्हाईकांमधली ही जातींची गलत ध्यानांत ठेवूनच भिन्न भिन्न वर्गातल्या लोकांनीं आर्थिक कार्यक्रम आखला पाहिजे. व्यापारांत व उद्योगधंद्यांत सवता सुभा अनिष्ट व अशक्य आहे आणि त्यांचे बाबतींत कोणत्याहि जातीस स्वतः पुरता मर्यादित असा खात्रीचा, सवलतीचा व सुखाचा 'तोंडा एवढा मांडा' मिळावयाचा नाहीं. बाजाराच्या शर्यतींत सर्व घोडे सारखे. शर्यतींत घालण्यापूर्वी त्यांची वाटेल तेवढी तयारी करा, पण यश त्यांच्या गुणांवर अवलंबून राहील.

---

## हिंदुस्थान सरकारचें नवें कर्ज

"चालू सालांत खेळत्या पैशाबाबतची आपली परिस्थिति इतकी समाधानकारक राहील कीं, हिंदुस्थान सरकारास नवीन कर्ज काढण्याची आवश्यकता मुळींच भासणार नाहीं, इतकेंच नव्हे तर ग्रेट ब्रिटनमधल्या जुन्या कर्जाची फेडदेखील आपण सहज करून टाकूं" असें विधान सर जेम्स ग्रिग ह्यांनीं लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत निक्षून केलें होतें. असें असतां, २¾ टक्के व्याजाच्या १२ कोटि रुपयांच्या नव्या सरकारी कर्जाची जाहिरात अचानक फडकलेली पाहून लोकांस आश्चर्य वाटलें असेल. बाजारांत विपुल पैसा पडून आहे आणि सरकारी कर्जरोख्यांस—विशेषतः मध्यम प्रकारच्या मुदतीच्या रोख्यांस—विलक्षण मागणी आहे. या कारणानें ३½ टक्क्यांच्या प्रामिसरी नोटांचा भावहि चढला आहे आणि बँकांस व विमा मंडळयांस फालतू पैसा गुंतवण्यास साधन उरलें नाहीं. अशा स्थितींत नव्या सरकारी कर्जाचें पैशाच्या बाजारांत स्वागत व्हावें आणि तें सबंद तात्काळ उचललें जावें ह्यांत कांहींच आश्चर्य नाहीं. सरकारी कर्ज रोख्यांवरील व्याजाचा दर २¾ टक्क्यांवर उतरावा हा योग अपूर्व आहे, यांत शंका नाहीं आणि आर्थिक मंदी कोणत्या मर्यादेपर्यंत गेली आहे ह्याचें नवें कर्ज हें उत्कृष्ट निदर्शक आहे. पैशाच्या बाजारास आणि बँकांस नवीन कर्जरोखे उपलब्ध करून सहाय देण्याचें कार्य नवीन सरकारी कर्जामुळें होणार आहे ह्यांत शंका नाहीं. हिंदुस्थान सरकारास पैशाची तात्पुरती तंगी भासत असल्यानें त्यांनीं नवीन कर्ज उभारण्याचें ठरवलें असलें पाहिजे असा तर्क आहे. कर्जावरील व्याजाचा दर आणि त्याची १९४८-५२ ही परत फेडीची मुदत पैशाच्या बाजाराची प्रचलित स्थिति लक्षांत घेऊनच सरकारनें निश्चित केली आहे. ३½ टक्क्यांच्या प्रॉमिसरी नोटेचा भाव ९९ रु. १२ आण्यांपर्यंत कांहीं काळ गेला ह्यावरून खेळत्या पैशाचा पुरवठा आणि कर्जरोख्यांची लोकांची मागणी ह्यांबाबत आज काय अवस्था आहे ह्याची चांगली कल्पना येते.

---

## उच्च शिक्षणाची सोय
### आणि
## विद्यार्थ्यांची वाढती संख्या

विश्वविद्यालयांत देण्यांत येणारें शिक्षण व्यावहारिक उपयुक्ततेचें नाहीं व त्यामुळें सुशिक्षितांमध्यें बेकारी वाढत आहे, अशा आशयाची तक्रार हिंदुस्थानांत सर्वत्र ऐकूं येत आहे. विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येबरोबर उद्योगधंद्यांची वाढ झाली नाहीं, तर विद्येच्या सांस्कृतिक उपयुक्ततेस प्रभावी होण्यास वावच मिळत नाहीं. खुद्द शिक्षणाचीहि समाधानकारक रीतीनें सोय होण्यास कठीण जातें. प्रत्येक विद्यालयांत ज्यास्तींत जास्त किती विद्यार्थ्यांची सोय होऊं शकेल याविषयीं मर्यादा असल्यामुळें मागणी बरहुकूम नवीं विद्यालयें स्थापन होत आहेत. समाजांतील कांहीं विशिष्ट लोकांसच विश्वविद्यालयीन शिक्षण हौसेखातर घेणें परवडतें.

ग्रेट ब्रिटनमध्यें, १९२९ सालीं आपला सर्व वेळ शिकण्यांत खर्च करणारे ४४ हजार विद्यार्थी विश्वविद्यालयांच्या पटांवर होते. आज ही संख्या ५० हजारांवर गेली आहे. इतर देशांचे मानानें विश्वविद्यालयांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचें प्रमाण इंग्लंडांत ज्यास्त नसून उलट कमीच पडत आहे, हें खालील कोष्टक सांगेल:—

| देश | विश्वविद्यालयांतील विद्यार्थी विद्यार्थ्यांचें एकूण लोकसंख्येशीं प्रमाण १ विद्यार्थी = किती लोकसंख्या ? |
|---|---|
| इंग्लंड | १,१४७ |
| स्कॉटलंड | ५०० |
| स्वित्झरलंड | ३८७ |
| अमेरिका | १२५ |

अमेरिकेंतील विद्यार्थ्यांमध्यें व्यवसायविषयक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा भरणा विशेष आहे, हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

इतर देशांत विश्वविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या इंग्लंडचे मानानें ज्यास्त असली तरी सध्याची तेथील सोय वाढत्या संख्येस पुरी पडणार नाहीं. विश्वविद्यालयांतील शिक्षकांवर शिक्षणाव्यतिरिक्त इतर कामाचा बराच बोजा असतो, तो हलका होणें अवश्य आहे. त्याचप्रमाणें, संशोधन ह्या नांवाखाली कांहींतरी किचकट विषयांत डोकें खुपसून त्यासंबंधाची माहिती प्रसिद्ध करणारास बढती देण्यापेक्षां ज्याचे योगानें विद्यार्थ्यांत स्फूर्ति उत्पन्न होते अशा शिक्षकास योग्य पारितोषिक देण्यांत आलें पाहिजे. ग्रेट ब्रिटनमधील शैक्षणिक संस्थांसंबंधीं रिपोर्ट सादर करणाऱ्या एका कमिटीचीं वरील मतें हिंदुस्थानांतील शिक्षण तज्ज्ञांनींहि विचारांत घेण्याजोगीं आहेत.

१९३४ सालअखेर सर्व हिंदी विश्वविद्यालयांत मिळून १,१३,३२८ विद्यार्थी शिकत होते, म्हणजे दर सव्वा तीन हजार लोकसंख्येंत एक विद्यार्थी, असें प्रमाण पडलें. इतर देशांचे मानानें हें प्रमाण अत्यल्प असलें तरी सुशिक्षितांस स्वावलंबी होतां येणें अशक्य होऊं लागल्यानें व विश्वविद्यालयांत शिकण्याचें ध्येय नोकरी मिळणें एवढेंच असल्याकारणानें विद्यार्थ्यांची भरती त्यांचेच हिताची नाहीं, अशी परिस्थिति निर्माण झाली आहे. सुशिक्षितांमधील बेकारीची सरकारासहि जाणीव आहे, परंतु प्रत्यक्ष उपाययोजनांचा अवलंब केव्हां होणार ? व्यवसायविषयक शिक्षणाची योजना आंखण्यासाठी दोन ब्रिटिश तज्ञ लवकरच हिंदुस्थानांत दाखल होणार आहेत, असें समजतें. ही हिंदुस्थानांतली मामुली पद्धति आहे. हिंदी तज्ञांस हें काम करतां येणार नाहीं काय ? योजलेल्या चौकशींत निष्कारण कालक्षेप होऊन फलप्राप्ति कांहीं व्हावयाची नाहीं असें भविष्य वर्तवणारे लोक चूक करीत आहेत असें म्हणण्यास आधार नाहीं. शिवाय, शिक्षणक्रमांतील सुधारणे-बरोबरच औद्योगिक व व्यापारी प्रगतीचीहि तजवीज झाल्या-खेरीज हा प्रश्न सुटणें शक्य नाहीं, हें लक्ष्यांत बाळगलें पाहिजे, तें वेगळेंच. तज्ञांनीं मागें हें सांगितलें आहे. ते पुन्हां तेंच सांगणार !

### मुंबई सरकारचें १९३५–३६ चें दुरुस्त अंदाजपत्रक

मुंबई इलाख्याच्या गेल्या वर्षांतील उत्पन्न खर्चाचा कच्चा अंदाज बजेट मांडतेवेळीं कायदेमंडळास सादर करण्यांत येतो. नंतर कांहीं दिवसांनीं दुरुस्त अंदाज तयार होतो व वर्ष अखेर पक्के हिशेब तयार होतात. १९३५–३६ सालाबद्दलचे दुरुस्त आकडे आतां प्रसिद्ध झाले आहेत. वर्षाचे सुरवातीस सरकार-जवळ १ कोटि, ५६ लक्ष रुपये शिलक होते, त्यांपैकीं ७५ लक्ष रुपये दुष्काळ निवारण फंडाचे होते. वर्ष अखेर उत्पन्नांत २९ लक्ष रुपये तूट येईल असा अंदाज होता, परंतु ही तूट २ लाखां-वर जाणार नाहीं, अशी अपेक्षा आहे. जमीन महसूल व कालव्याच्या पाण्यावद्दलची पट्टी मिळून सुमारें २७ लक्ष रुपये कमी वसूल होतील परंतु इतर खात्यांचा वसूल वाढेल, असा हा अखेरचा अंदाज आहे. अंदाज पत्रकांतील अपेक्षेचे मानानें खर्च ५ लाखांनीं वाढलेला आढळेल. नवीन निर्माण केलेल्या वजनमापांच्या खात्याच्या व सुधारणा खात्याच्या कामा-मुळेंही खर्चांत वाढ होणार आहे.

एशियन पॉलिसी

म्हणजेच

आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत

धी एशियन ॲशुरन्स कंपनी, लिमिटेड

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

## सहकारी चळवळ

### इगतपुरी तालुका सहकारी परिषद्

नाशिक को-ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूटचे विद्यमानें इगतपुरी येथें ता. १४ मे १९३६ रोजीं दुपारी इगतपुरी तालुक्यांतील सहकारी सोसायट्यांची सहकारी परिषद् मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूटचे ऑनररी सेक्रेटरी श्री. राऊत ह्यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. स्वागतमंडळाचे अध्यक्ष श्री. व्ही. जी. तिडके ह्यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर अध्यक्षांचें भाषण झालें. ते म्हणाले कीं, केवळ हलक्या व्याजाच्या दरानें कर्ज मिळण्याची सोय होऊन शेतकऱ्यांचें भागत नाहीं. जुन्या कर्ज-फेडीची तजवीज, मालाच्या विक्रीची व्यवस्था, शेतीच्या धंद्याचें ज्ञान, ह्याबरोबरच काटकसर, प्रामाणिकपणा व परस्पर सहाय इत्यादि गुणांची आवश्यकता आहे. अंथरूण पाहून पाय पसरणें व सचोटीनें वागणें अत्यंत जरूर आहे.

इगतपुरी तालुक्यांत ज्यास्त नवीन सोसायट्या स्थापन करण्याची आवश्यकता, सहकारी पद्धतीनें मालाची विक्री करण्याबाबत योजना, पिण्याच्या पाण्याची सोय, प्रांतिक सहकारी बँकेनें आपल्या कर्जावरील व्याजाचे दर उतरविण्याविषयीं आग्रह, नाशिक जिल्हा लँड मॉर्गेज बँकेनें इगतपुरी तालुक्याकडे ज्यास्त लक्ष पुरविण्याविषयीं विनंति इत्यादि संबंधीं परिषदेनें ठराव पास केले.

नाशिक जिल्हा इन्स्टिटयूटचे चेअरमन रा. ब. वंडेकर व सेक्रेटरी श्री. तिडके ह्यांनीं आभार मानल्यावर परिषदेचें अधिवेशन संपलें.

---

### पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक, लि.

पुणें जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि. ही संस्था गेल्या सालीं को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्टाखाली नोंदण्यांत आली व तिनें आपल्या कार्यास सप्टेंबर १९३५ मध्यें आरंभ केला. पहिले एक दोन महिने माहितीपत्रकें व पोट नियम छापणें वगैरे प्राथमिक कामकाज करण्यांत गेलें. कर्जाच्या अर्जांची चौकशी करण्यास आरंभ आक्टोबरच्या २० तारखेपासून करण्यांत आला. तारीख ३० एप्रिल १९३६ पर्यंत ८९ अर्जदारांच्या १,३८,६०० रुपयांच्या कर्जमागणीच्या अर्जांची चौकशी करण्यांत येऊन त्यांपैकीं २८ अर्ज मुंबई प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेकडे मंजुरीकरितां पाठविण्यांत आले. त्यांपैकीं बहुतेक सर्व अर्ज मंजूर होऊन आलेले आहेत. चौकशीकरितां लागणारी योग्य ती कोष्टकवार माहिती अर्जदाराकडून त्वरित येत नसल्यामुळें चौकशीच्या कामांत बराच वेळ मोडतो असा अनुभव आहे. गेल्या आठवड्यापासून बँकेच्या लायक अर्जदारांस कर्ज वाटण्यास सुरवात केली आहे व या साल अखेर बऱ्याचशा इसमांस कर्ज वाटण्यांत येईल अशी अपेक्षा आहे.

---

### ब्रिटिश धोरण—जकाती व स्वस्त पैसा

इंग्लंडचे फडनवीस, मि. नेव्हिल चेंबर्लेन, हे कॉमन्स सभेपुढें बजेट मांडतांना म्हणालेः—"ब्रिटिश प्रधानमंडळाच्या धोरणाचीं दोन मुख्य अंगें, बाहेरून येणाऱ्या मालावर बसविण्यांत आलेल्या जकाती आणि खेळत्या चलनाचा विपुल व स्वस्त पुरवठा हीं आहेत आणि त्यांचे योगानें ब्रिटिश कारखाने व शेतीचा धंदा ह्यांस मजबुती प्राप्त झाली आहे."


दी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
|---|---|---|
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थे-कडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.



CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

This year 1934-35

Exceeds

2 CRORES & 50 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## आल्बर्टामधला आर्थिक प्रयोग

### मि. आबरहार्ट यांची योजना

मनुष्य एखाद्या व्याधीनें त्रस्त झाला आणि तिच्यांतून मुक्त होण्याची आशा फारशी दिसत नसली तर तो वाटेल ते उपाय करून संकटांतून निसटण्यास उद्युक्त होतो, हा मानवी स्वभाव आहे. व्याधीनें गांजल्यामुळें मनुष्याची सारासार बुद्धि मंदावते आणि विचारशक्ती क्षीण होते व अशक्य अथवा अव्यावहारिक मार्गांचा अवलंब करण्यास तो तयार होतो. सामाजिक व आर्थिक दुःस्थितींत सांपडलेल्या जनसमूहाची मानसिक प्रवृत्ति ह्याच प्रकारची बनते. शारीरिक व कौटुंबिक आपत्तींमध्यें स्वभावतः सुविचारी असलेलीं माणसें दैवी उपायांच्या मागें लागलेलीं आणि एरव्हीं खुळचट समजल्या जाणाऱ्या इलाजांचा प्रयोग करून पहात असलेलीं आपणांस प्रत्यहीं आढळतात. शिकले सवरलेले लोक हतबुद्ध होऊन भलत्या सलत्या मार्गदर्शकाचें अनुयायित्व पत्करतात आणि तो दाखवील ती वाट चालू लागतात, ह्याचें रहस्य वरील उपपत्तीनें उकलण्यासारखें आहे. सामाजिक व आर्थिक दुःस्थितीवर नवीन व ज्याचा अनुभव नाहीं असा कोणी उपाय सांगितला असतां तो करून नशीबाची परीक्षा पहाण्यास माणसें उद्युक्त होतात, ह्याचें कारण, निराशेनें त्यांचीं मनें कुंठित झालेलीं असतात आणि आगींतून फोपाट्यांत पडण्याच्या शक्यतेनें नियंत्रित होण्यासारखी त्यांची बौद्धिक स्थिति नसते, हेंच मुख्यत्वें करून असतें. आर्थिक व सामाजिक सुधारणेविषयींच्या भरमसाट योजनांस लोकांची मूक संमति कित्येक वेळां मिळते, ह्याचें कोडें अशाच रीतीनें सोडवावें लागतें. ह्या प्रकारच्या योजनांमध्यें मुळींच कांहीं तथ्य नसतें असें नव्हे. पण त्यांचा अपेक्षित परिणाम घडून येईल किंवा कसें आणि त्यांच्या गुणाबरोबर दुर्गुणहि शिरतील किंवा काय ह्याचा जितका खोल विचार व्हावा तितका होत नाहीं. इतकेंच नव्हे, तर पूर्वकाळांत व अन्यत्र नियोजित उपाय निष्फळ किंवा अपायकारक ठरले ह्याची जाणीवहि सामान्य लोकांस असत नाहीं.

कॅनडा देशांत आल्बर्टा ह्या नांवाच्या प्रांतांत आर्थिक दुःस्थितीवरच्या एका उपायाचा प्रयोग चालू आहे, त्याची माहिती वरील विवेचनाच्या दृष्टीनें बोधप्रद होईल. अनेक प्रांतांचें मिळून झालेलें कॅनडा हें संघटित राष्ट्र आहे. हिंदुस्थानांत संघटित (फेडरल) राज्यपद्धति प्रस्थापित व्हावयाची आहे, त्याच प्रकारची राज्यघटना कॅनडामध्यें प्रचलित आहे. आल्बर्टा प्रांताची लोकसंख्या मुंबई किंवा कलकत्ता ह्या शहरांच्या लोकसंख्येपेक्षां कमी आहे. तथापि तो मुंबई किंवा बंगाल ह्यांसारखा कॅनडांतला निराळा व स्वतंत्र प्रांत आहे. प्रांतिक स्वायत्ततेची राज्यघटना तेथें अमलांत आहे, हें सांगावयास नकोच. सुमारें आठ महिन्यांमागें तेथें निवडणुकी झाल्या तेव्हां आर्थिक सुधारणावादी एका राजकीय पक्षास कल्पनेपेक्षां मोठा असा विजय मिळाला. त्या पक्षाचें धुरीणत्व मि. आबरहार्ट नांवाच्या सेवानिवृत्त शिक्षकास प्राप्त झालें असून निवडणुकीपूर्वी मोठी चळवळ करून आर्थिक सुधारणेच्या आपल्या एका योजनेस त्यानें बहुजन समाजाची संमति मिळवली. प्रचलित मंदीचें मुख्य कारण जनतेच्या हातांत खेळता पैसा नाहीं, हें असून सरकारनें चलनाचा पुरवठा प्रत्येक माणसास भरपूर होईल अशी तजवीज केल्यास उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांची चलती सहज होईल ह्या कल्पनेचा जनक मेजर डग्लस या नांवाचा एक अमेरिकन ग्रंथकार आहे आणि त्याच्या योजनेची भवतिनभवति पुष्कळ झालेली आहे. मि. आबरहार्ट यानें ती कल्पना उचलली आणि आल्बर्टा प्रांतांत सत्ताधीश होण्यास जनतेनें आपणांस निवडून संधी दिली तर वर्ष-दीड वर्षाच्या आंत आपण योग्य उपाय योजून आर्थिक मंदी दूर करूं असें अभिवचन देण्याचा सपाटा लावून लोकांचीं मनें आकर्षिलीं आणि त्यांचा पाठिंबा मिळवला. मेजर डग्लस ह्यांच्या देखरेखीखालीं "सामाजिक उसनवारी"च्या, मि. आबरहार्ट ह्यांच्या, योजनेची अंमलबजावणी व्हावयाची होती. पण त्या गृहस्थांनीं ही जबाबदारी शिरावर घेण्याचें नाकारलें असल्याची बातमी कांहीं दिवसांपूर्वी प्रसिद्ध झाली असून आल्बर्टा आणि कॅनडाचें मध्यवर्ती सरकार ह्यांचे दरम्यान तत्संबंधी कायदेशीरपणाविषयींचा वांधा उपस्थित झाला आहे असें समजतें. ह्या अडचणींचे योगानें आबरहार्ट ह्यांचा प्रयोग नीट होतो किंवा नाहीं ह्याचीच शंका आहे.

मि. आबरहार्ट ह्यांच्या योजनेचा मुख्य विशेष आल्बर्टा प्रांताच्या प्रत्येक नागरिकास व्यवहारांत वापरण्यासाठी २५ डॉलर दर महिना मिळावे आणि सरकारनें बाजारभाव निश्चित करून ते स्थिर राखावे, हा आहे. नोटांसारखीं, पण हातोहात न फिरणारीं अशीं सर्टिफिकिटें सरकार काढणार आणि त्यांचा उपयोग वरील रकम खर्चण्यांत व्हावयाचा आहे. सर्टिफिकिटांचा उपयोग जनतेनें कपडे व खाण्याचे पदार्थ विकत घेण्यांत करावयाचा आहे. त्यांचे योगानें नागरिकांच्या मिळकतींत भर पडावयाची नाहीं व त्यांच्या मोबदला मामुली चलनहि मिळावयाचें नाहीं. सरकारनें लोकांस उसनवार दिलेल्या रकमा व्यापारी व्यवहारांवर पट्टी बसवून वसूल केल्या जातील. जनतेची विशेष गैरसोय व नुकसान न होतां ह्या मार्गानें सरकारी उत्पन्न जमा करतां येईल अशी मि. आबरहार्टची कल्पना आहे. तज्ञांचें मंडळ नेमून योग्य बाजारभाव वेळोवेळ निश्चित केले जातील आणि त्या बेतानें बाहेरून येणाऱ्या मालावर जकात आकारण्यांत येईल. सर्व प्रकारच्या उत्पादनावर सरकारची नजर राहील आणि प्रांताचें आर्थिक जीवन सुरळीत चालण्यासाठी जरूर असलेले सर्व उपाय तें योजील. कॅनडाचें राष्ट्रीय चलन प्रांतिक सरकार तेवढें वापरील आणि जनतेचें चलनाचें काम आल्बर्टाच्या सर्टिफिकिटांनीं भागेल.

ह्या तऱ्हेची योजना कितीशी व्यावहारिक आहे याविषयीं तिला सामान्यतः पाठिंबा देणारांमध्येंहि साशंकपणा उत्पन्न होणें साहजिक आहे. त्याचप्रमाणें, ती कॅनडाच्या राज्यघटनेच्या कायद्याशी कित्येक बाबतींत विसंगत असल्याचाहि अभिप्राय व्यक्त करण्यांत आला आहे. आपली योजना सोपी व सुसाध्य असल्याची मि. आबरहार्ट ह्यांची भावना असली तरी तिचे योगानें आल्बर्टाच्या सामाजिक व आर्थिक जीवनांत गोंधळ माजून जाईल अशी भीति विचारी लोकांस वाटत आहे. व्यवहारांत खेळावयाच्या पैशाचा पुरवठा वचनचिठ्यांचा प्रसार करून वाढविला असतां त्याबरोबर उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांचें नियंत्रण करण्याची आवश्यकता उपस्थित होते आणि सोप्या दिसणाऱ्या सुधारणेच्या योजना गुंतागुंतीच्या व दूरगामी परिणाम घडवून आणणाऱ्या अशा ठरतात. कोणतेंहि कार्य केवळ त्याच्या सद्धेतूवरून इष्ट मानतां येत नाहीं, आणि विशेषतः सामाजिक व राष्ट्रीय जीवनाच्या घटनेंत फेरफार करावयाचे असतां त्यांचा व्यापक आणि व्यावहारिक बुद्धीनें विचार होणें अगत्याचें असतें. आल्बर्टा प्रांतांतला मि. आबरहार्ट ह्यांचा आर्थिक प्रयोग जगाच्या निरीक्षणाचा बोधकारक विषय बनला आहे ह्यांत आश्चर्य नाहीं. अगदीं अलीकडे प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून असें समजतें कीं आल्बर्टांत जिचा प्रयोग व्हावयाचा ती योजना व्यावहारिक आहे किंवा नाहीं, ह्याची छाननी करण्याचें काम एका कमिशनकडे सोपविलें जावें म्हणून तेथील कायदेमंडळानें बिल मंजूर केलें आहे.

### देवधर स्मारक फंड

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटचे एक संस्थापक व कांहीं वर्षे अध्यक्ष आणि सहकारी चळवळीचे पुरस्कर्ते कै. श्री. गोपाळ कृष्ण देवधर ह्यांच्या स्मारकाच्या योजनेसंबंधानें इन्स्टिटयूटच्या अध्यक्षांनीं एक विनंतिपत्रक काढलें आहे. स्मारक फंडाचा विनियोग करण्याचें काम इन्स्टिटयूटचे अध्यक्ष, प्रांतिक सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि सहकारी खात्याचे रजिस्ट्रार ह्यांच्या कमिटीकडे सोपविलेलें आहे. एकाद्या जिल्ह्यांत एक हजाराहून ज्यास्त रकम जमल्यास ती कमिटीच्या सल्ल्यानें त्याच जिल्ह्यांत खर्चली जाण्याच्या सदरहु जिल्ह्यास आग्रह धरतां येईल. श्री. देवधरांचें एक तैलचित्र मुंबई येथील विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंगमध्यें लावून उरलेल्या रकमेचा विनियोग खालीलप्रमाणें करण्याची योजना आहे:—( १ ) इलाख्यांतील सर्वोत्कृष्ट शेतकी सोसायटीस ढालीचें वार्षिक बक्षीस, ( २ ) निवडक खेड्यांतून लहान ग्रन्थालयांची स्थापना, ( ३ ) इंन्स्टियूटतर्फे भरणाऱ्या परीक्षांत पहिला नंबर येणारांस पारितोषिकें, ( ४ ) निवडक खेडेगांवास प्रौढ शिक्षणाच्या साहित्यांचा पुरवठा.

वरील योजनेमुळें सहकारी चळवळीच्या शैक्षणिक, सामाजिक व नीतिविषयक अंगोपांगांचा विकास होईल, असा भरंवसा आहे.

---

### टाटा आयर्न अॅन्ड स्टील कंपनी

मार्च ३१, १९३६ अखेर संपणाऱ्या वर्षी जमशेदपूरच्या टाटा स्टील कंपनीस १,५८,०२,४९५ रु० नफा झाला. ९८ लक्ष रुपये घसारा म्हणून बाजूस ठेवले, ते वेगळेच. नोकर वर्गास बोनस देण्यासाठी १२ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. १९२१ नंतर सर्व तऱ्हेच्या भागांस डिव्हिडंड देण्याची सुस्थिति ह्या वर्षी पहिल्या प्रथमच उपस्थित झाली. विक्रीची किंमत कमी होऊनहि कंपनीस वरील प्रमाणें नफा झाला, हें विशेष होय.कंपनीनें अहवालाचे सालीं अंतर्गत पट्टीच्या रूपानें ३५ लक्ष रुपये सरकारास दिले. आतांपर्यंत कोणत्याच वर्षी गेल्या वर्षाइतकें उत्पादन झालें नव्हतें.

---

### कंपनी कायद्यामधील दुरुस्ती व औद्योगिक प्रगति

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या दुसऱ्या त्रैमासिक सभेचे वेळीं चेंबरचे अध्यक्ष श्री. वालचंद हिराचंद हे आपल्या भाषणांत म्हणाले:—

" कंपनी कायद्याच्या दुरुस्तीचें सरकारी बिल असेंब्लीपुढें तिच्या गेल्या अधिवेशनांत मांडण्यांत आलें. ह्या दुरुस्त बिलानें मॅनेजिंग एजंटांच्या सत्तेवर बरेच नियंत्रण बसणार आहे. हिंदुस्थानांत औद्योगिक प्रगति सत्वर झाली पाहिजे व ती सामुदायिक भांडवलाच्या मंडळयांचे योगानेंच होऊं शकेल. मॅनेजिंग एजन्सीइतकें कंपन्या चालविण्यांत कार्यक्षम असें दुसरें कोणतेंहि साधन नाहीं. कित्येक अडीनडीचे प्रसंगीं मॅनेजिंग एजंटांची पत मंडळीचे उपयोगी पडते. ग्रेट ब्रिटनमध्यें अपरिचित असलेल्या ह्या पद्धतीचा अंगीकार तेथील फर्मस हिंदुस्थानांत करीत आहेत. बिल पास होण्यापूर्वी नेमले गेलेल्या मॅनेजिंग एजंटांनीं बिलाचें कायद्यांत रूपांतर झाल्यावर वीस वर्षांचें आंत आपली जागा खाली करावी, ही बिलांतील योजना सर्वस्वी अमान्य आहे, कारण त्यामुळें उभय पक्षांत करण्यांत आलेल्या हक्कांवर गदा येणार आहे. "

### यंत्रसामुग्रीची हिंदुस्थानांत आयात

हिंदुस्थानांतील कारखान्यांत परदेशी यंत्रसामुग्री बसवून तिच्या सहायानेंच उत्पादन करण्यांत येते; मोठ्या प्रमाणावर कामें देणारीं यंत्रे हिंदुस्थानांत फारच थोडी तयार होतात. ह्या दृष्टीनें, यंत्र सामुग्रीच्या आयातीमधील वाढ हें औद्योगिक प्रगतीचें चिन्ह समजलें जातें. १९३४–३५ च्या मानानें १९३५–३६ सालीं एक कोटि ज्यास्त रुपयांचीं म्हणजे एकूण १३ कोटि ६८ लक्ष रुपये किंमतीचीं यंत्रें हिंदुस्थानांत उतरलीं. ह्या आयातीमधील प्रमुख देशांचा हिस्सा खालीलप्रमाणें आहे:—

( लक्ष रु. )

| देश | यंत्रांच्या आयातीची किंमत | |
|---|---|---|
| | १९३४–३५ | १९३५–३६ |
| ग्रेट ब्रिटन | ९१५ | १२५ |
| जर्मनी | १२६ | १६४ |
| अमेरिका | ११४ | ११७ |
| जपान | ११ | १७ |
| बेल्जम | १६ | १७ |

---

### नुकसान भरपाई बाबतच्या कायद्याची अंमलबजावणी

कारखान्यांतील कामगारास तो आपलें काम करीत असतांना अपघात झाला व तो अपघात त्याच्या हलगर्जीपणामुळें झालेला नसला, तर त्यास अगर त्याच्या नातेवाइकांस अपघाताच्या स्वरूपाच्या मानानें नुकसान भरपाई मिळते. ही भरपाई कारखानदाराचे करवीं करण्यांत येते. ह्या संबंधांत १९२३ सालीं कायदा पास झालेला आहे. १९३५ सालीं, पंगुत्वाच्या नुकसान भरपाई दाखल कामगारांस ८७,७३८ रुपये मिळाले.त्या पूर्वीच्या सालीं ७४,६७७ रुपये देवविले गेले होते. कामगारांस नुकसान भरपाई मिळवून देण्याची खटपट अहमदाबाद येथील टेक्सटाईल लेबर यूनियनखेरीज इतर मजुरांचे संघ करीत नाहींत, असा सरकारी अहवालांत उल्लेख आहे.

---

### " प्राविण्य "

ह्या मासिकाचा मे महिन्याचा अंक प्रसिद्ध झाला आहे. प्रो. काळे ह्यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त झालेल्या समारंभाचे वेळीं त्यांनीं केलेल्या भाषणाचा सारांश अंकाचे सुरवातीस देण्यांत आला आहे. ' ब्लड प्रेशर,' ' साखर व ती कशी तयार करतात ' ' विम्याच्या धंद्याबाबत हिंदवासीयांची काळजी ' इत्यादि लेख वाचनीय आहेत.

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

The House for Quality goods at most reasonable prices.
K. M. BELSARE & Co.,
PLAIN & DECORATIVE FURNITURE
FOR
Home, School, College, Office etc. in
WOOD & IRON
Sadashiv, POONA 2

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११-१४ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—१ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—७ |
| ४३/४% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९-१२ |
| ४% १९६०—७० ... ... | ११५—६ |
| ३१/२% बिनमुदत ... ... ... | ९९-९३/४ |
| ३१/२% १९४७—५० ... ... | १०७-१२ |
| ४% १९४३ ... ... ... | १११-१२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०९—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०७—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०८—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षें मुदत) | १०८—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३—६३ ) ... | ११०—६ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १२९-१२ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १०९—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३४—६ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५५८-१२ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३१-१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | ९९—८ |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९३/४% ) | ८९२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५६—४ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २२५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २३५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५१/२% ) | १५४६—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७१/२%) | १५७०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७०—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १६६—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ६४१—४ |


# वेस्टर्न इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी—सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५

१९३५ मधील नवें काम ५१,५१,८९२ रु.

एकूण चालू काम २,५०,१५,०८२ रु.

एकूण जिंदगी ६१,६९,१६९ रु.

लाइफ फंड ५०,९९,४३९ रु.

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२

अधिकृत भांडवल : : : १०,००,०००

विक्रीस काढलेलें भांडवल : ५,००,०००

## दर शेअरची किं. : रु. ५०

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री व त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

“ दुसरें मूल्यमापन जाहीर झालें ”
स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:–
कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.
अध्यक्ष–श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी
हयातींतील विम्यास ) दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला ) हयातीनंतर विम्यास
३७॥ रु. ) दर हजारीं त्रैवार्षिक नफा ) ४५ रु.
जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

“ अर्थ ” ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकं.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं. १ रु. ( ट. ख. निराळा )
व्यवस्थापक, ‘अर्थ’ ग्रन्थमाला, पुणें ४.

दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.
रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.
पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.
सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये ?
ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.
तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.
८१५–१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

न. वि. वडनेरकर
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.
आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.
शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

बंगाल
कोल सप्लाइंग फर्म
उत्तम दगडी कोळसा ( बंगाल, सी.पी. )
आणि
कोक ह्यांचे व्यापारी
व
म्युनिसिपल, लोकलबोर्ड, पी. डब्ल्यु. डी. ( सरकारी ) कॉन्ट्रॅक्टर्स
५११ बुधवार पेठ, पुणें शहर २.
तारेचा पत्ताः–व्यंकटेश. फोन नं. ४७१

स्वदेशी
कापड म्हणजे काय ?
(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.
या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.
हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.
खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण
स्वदेशी भांडार
लक्ष्मीरोड, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ‘दुर्गाधिवास,’ भांबुर्डा, घ. नं. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTER ED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख ३, जून १९३६. अंक २३

## वेस्टर्न इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी—सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

| | | |
|---|---|---|
| बोनस त्रैवार्षिक दरहजारीं | हयातींतील | रु. ६० |
| | हयातीनंतरचें | रु. ७५ |

| | |
|---|---|
| १९३५ मधील नवें काम | ५१,५१,८९२ रु. |
| एकूण चालू काम | २,५०,१५,०८२ रु. |
| एकूण जिंदगी | ६१,६९,१६९ रु. |
| लाइफ फंड | ५०,९९,४३९ रु. |

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

INSURE WITH—

**The SUN SHINE INSURANCE Ltd.**

LAHORE

BECAUSE OF

Its Most Modern, Unique & Beneficial Schemes

*For Prospectus Please write to:—*

Special Officer,
POONA BRANCH

## MARATHE & Co.

ENGINEERS & IRON FOUNDERS

| WORKS : | Can undertake to do any sort of casting. | OFFICE : |
|---|---|---|
| Natu Bag, Bhikardas Road, POONA 2 | We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act. **Our prices are very competitive.** | 978-79, Sadashiv, Laxmi Rd., POONA 2 |

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तक.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

# विविध माहिती

### चलनी नोटांचा प्रसार

बँक ऑफ इंग्लंडच्या प्रचलित असलेल्या नोटांची किंमत सुमारें ५६५ कोटि रुपये आहे. हिंदुस्थानांत १९५ कोटि रुपयांच्या चलनी नोटा चालू आहेत. गेल्या वर्षाच्या मानानें दोन्ही देशांतील नोटांच्या प्रमाणांत पुष्कळ वाढावा झालेला दिसत आहे.

### कारखानदार व कामगार ह्यांमधले तंटे

गेल्या वर्षी हिंदुस्थानांत कारखानदार आणि कामकरी ह्यांच्यामध्यें एकूण १४५ तंटे झाले; त्यांपैकीं एकामध्येंहि प्रांतिक सरकारांनीं ढवळाढवळ केली नाहीं, असें एका प्रश्नास उत्तर देतांना मि. बटलर ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें.

### स्वदेशी कागद आणि टारिफ बोर्डाच्या शिफारसी

स्वदेशी कागदाच्या धंद्यास जकातीचें संरक्षण दिलेलें आहे, त्या संबंधांत कागदाची योग्य वर्गवारी करण्याचें काम हिंदी टॅरिफ बोर्डाकडे सोपवण्यांत आलें होतें. बोर्डाच्या सूचना सरकारनें मान्य केल्या असून त्यांची अंमलबजावणी केली जाईल असें आतां जाहीर झालें आहे.

### हलके समजले जाणारे सामाजिक गट

नवीन राज्यघटनेच्या कायद्यांत, अत्यंत मागसलेले व हलके समजले जाणारे सामाजिक गट, वर्ग, जाती व वंश ह्यांची स्वतंत्र यादी करण्यांत यावयाची योजना आहे. संयुक्त प्रांतांतल्या असल्या जातींची व उपजातींची संख्या सुमारें साठ भरते, त्यांची नांवानिशी सरकारी गॅझिटांत प्रसिद्ध झाली आहे.

### पांच मिनिटांत खलास !

हिंदुस्थान सरकारच्या १२ कोटि रुपये किंमतीच्या नव्या कर्जरोख्यांस ३० कोटींची मागणी होती. कर्जाबद्दलचे अर्ज घेण्यास मेच्या २६ तारखेस सकाळीं १० वाजतां प्रारंभ झाला आणि १० वाजून पांच मिनिटांनीं रिझर्व्ह बँकेच्या मुंबई येथील कचेरीचे दरवाजे जरूरीपेक्षां रकम जास्त आली म्हणून बंद करण्यांत आले. पांच हजार रुपयांखालचे अर्ज स्वीकारण्यांत यावयाचेच नव्हते.

### अर्थशास्त्रज्ञाची अनुभवासाठीं शेतांत मजूरी

मि. हॅरोल्ड कॉक्स ह्या नांवाचे प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ, लेखक व वक्ते गेल्या महिन्याचा प्रारंभीं वयाच्या ७७ व्या वर्षी वारले. त्यांनीं केंब्रिज विश्वविद्यालयाची पदवी मिळतांच, खेडेगांवांच्या परिस्थितीचें प्रत्यक्ष ज्ञान व अनुभव प्राप्त करून घेण्यासाठीं बारा महिनेपर्यंत शेतावर सामान्य मजुराचें काम केलें! ही गोष्ट अनुकरणीय नाहीं काय?

### जर्मनीचा शस्त्रास्त्रांवरील अवाढव्य खर्च

गेल्या पांच वर्षांत जर्मनीनें शस्त्रास्त्रांच्या तयारी प्रीत्यर्थ सुमारें अडीच हजार कोटि रुपये खर्च केले असून नुसत्या गेल्या सालचा ह्या कामांतला जर्मन सरकारचा खर्च ११० कोटि रुपये झाला, अशी माहिती मि. वुइन्स्टन चर्चिल ह्यांनीं कॉमन्स सभेंत निवेदन केली.

### ग्रेटब्रिटनमध्यें एक हजार हिंदी विद्यार्थी

ब्रिटिश शिक्षण संस्थांमध्यें सुमारें पांच हजार परराष्ट्रीय विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यांपैकीं १,७०० चेवर एशिया खंडांतून गेलेले असून त्यांमध्यें हिंदी विद्यार्थ्यांची संख्या हजार–अकराशे असते.

### डनलॉप रबर कंपनी

ह्या कंपनीस ३१ डिसेंबर १९३५ अखेर संपणाऱ्या वर्षी सुमारें २३/४ कोटि रुपये नफा झाला. खुद्द इंग्लंडमध्यें स्थापन झालेल्या अमेरिकन रबर कंपन्यांची स्पर्धा डनलॉप कंपनीस जाणवूं लागली आहे.

### ट्रेझरी बिलांची विक्री बंद

गेले दोन आठवडे ट्रेझरी बिलांस मागणी अगदी जुजबी आल्याकारणानें त्यांची विक्री तूर्त बंद ठेवण्यांत आली आहे.

### रोल्स रॉइस कंपनी

विमानांस लागणारीं इंजनें बनविणारी इंग्लंडमधील ही सर्वांत मोठी कंपनी आहे, परंतु हिंदुस्थानांत ती मोटारगाड्यांसाठी प्रसिद्ध आहे. कंपनीनें २२१/२ टक्के डिव्हिडंड जाहीर केलें आहे.

### सेंट्रल बँक दुय्यम एक्सचेंज बँक काढणार

एक्सचेंज बँकेचे व्यवहार करणारी एक दुय्यम बँक लंडनमध्यें स्थापन करण्याची सेंट्रल बँक ऑफ इंडियाची खटपट जोरानें चालू आहे. ह्या बँकेच्या व्यवहाराबद्दल सेंट्रल बँक हमी घेईल.

### शाळांमध्यें बोलपटांची व्यवस्था

शिक्षणाचे कामीं बोलपटांचा उपयोग शाळांमध्यें करण्याची प्रवृत्ति वाढत आहे. इंग्लंडमधील सातशे शाळांत बोलपट दाखवण्याची व्यवस्था झाली असून, मुलां–मुलींच्या शिक्षणास योग्य अशा बोलपटांची संख्या वाढत आहे. विविध विषयांसंबंधांतले बोलपट तयार करण्याची कामगिरी त्या, त्या विषयांतल्या सर्वमान्य तज्ज्ञांवर सोंपवण्यांत आली आहे.

### मुलांसाठी मैदानांची सोय

पंचम जॉर्ज बादशहांच्या रौप्य ज्युबिलीनिमित्त ग्रेटब्रिटनमध्यें उभारण्यांत आलेल्या फंडामधून मुलांसाठी खेळण्याच्या जागा उपलब्ध करण्याप्रीत्यर्थ ६०० एकर जमीन सरकारमार्फत घेण्यांत येणार आहे. ह्या नवीन मैदानांवर १४ ते १८ च्या दरम्यान वयाचीं २५ हजार मुलें खेळूं शकतील.

### फिरता दंतवैद्य

मुलांच्या आरोग्याची व शरीरप्रकृतीची इंग्लंडमध्यें तेथील सरकार व स्थानिक संस्था किती काळजी घेतात, ह्याचें प्रत्यंतर ससेक्स परगण्याच्या त्या संबंधांतील अलीकडल्या एका उपक्रमांत मिळतें. तेथील खेड्यापाड्यांतील शाळांमधील मुलांसाठीं एक फिरत्या दंतवैद्यकीचा प्रयोग चालू करण्यांत आला असून चार चाकांवरील हा दवाखाना थेट मुलांचे घरांसमोर उभा राहून दातांसंबंधीं सर्व उपचारांची व्यवस्था करतो.

### बर्लिन येथील नवें विमानगृह

बर्लिन येथें एक मोठें विमानगृह बांधण्यांत यावयाचें आहे, त्यास सुमारें ६३/४ कोटि रुपये खर्च येईल. जगांतील सर्व विमानगृहांत ह्याचा पहिला नंबर लागेल.

### दि निजाम शुगर फॅक्टरी लि.

वरील नांवाचा एक साखरेचा कारखाना निजामसागर ( सं. हैद्राबाद ) येथें स्थापन होणार आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २३ मे रोजीं पुरा झालेला आठवडा | ७०,८६,६०१ |
| ता. ३० मे रोजीं पुरा झालेला आठवडा | ८५,६६,१६५ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते ३० मे १९३६ अखेर | २,७१,४७,२४,४४९ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २७२ | ६ करारावाबतच्या ... दाव्याचा निकाल | २७७ |
| २ हिंदुस्थानांत तज्ज्ञांचा दुष्काळ आहे कीं काय? | २७३ | ७ प्रांतिक स्वायत्ततेस प्रारंभ | २७८ |
| ३ नवीन सहकारी नियमांचें रहस्य | २७४ | ८ नव्या राज्यघटनेच्या सुरवातीचा संक्रमण काल | २७८ |
| ४ स्फुट विचार ... निमायर 'लवाद निवाडा'—टाटा कंपनीची प्रगति—ट्रेझरी बिलांची विक्री तूर्त थांबली—चीन, चांदी आणि अमेरिका—इलाख्यांतील पाऊस पाणी—स्वदेशी साखरेचें उत्पादन वाढलें | २७५ | ९ नव्या कायदेमंडळाच्या निवडणुकी | २७८ |
| | | १० सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारांचा दौरा | २७९ |
| | | ११ सहकारी जळवळ सरकारचे अधिकार वाढणार—पतपेढींचे पोटनियम—टॅक्सी ड्रायव्हरांची सोसायटी—लिक्विडेशन बाबत नियम | २८० |
| ५ औद्योगिक मंडळ्यांचें नफा वाटणीचें धोरण | २७७ | १२ निवडक बाजारभाव | २८१ |


# अर्थ

बुधवार, ता. ३ जून, १९३६

## हिंदुस्थानांत तज्ज्ञांचा दुष्काळ आहे कीं काय ?

### बाहेरील तज्ज्ञांची गर्दी

कोणत्याहि बाबतींत नवें धोरण आखण्याचा किंवा जुन्या धोरणांत फेरबदल करण्याचा प्रसंग आला असतां चौकशी व शिफारसी करण्याकरितां बाहेरच्या तज्ज्ञांचा त्या कामीं नेमणूक करावयाची हा हिंदुस्थानांतील सरकारचा ठराविक प्रघात आहे. आमचा देश मागसलेला असून इतर देश सर्वच बाबतींत झपाट्यानें पुढें जात असल्यामुळें नव्या नव्या पद्धति व सुधारणा ह्यांची परदेशी तज्ज्ञांस जशी माहिती असते तशी हिंदुस्थानांतील अनुभवी व हुशार माणसांसहि असूं शकणार नाहीं. त्याचप्रमाणें, आपली कार्यक्षमता वाढवण्यास उत्तम सल्ला बाहेरच्या तज्ज्ञांकडून मिळून उपयोगी होण्यासारखा असल्यास, तो परदेशी म्हणूनच केवळ अमान्य समजणें स्वार्थाच्या दृष्टीनेंहि चुकीचें होईल. ह्या दोन्ही गोष्टींत तथ्य असलें तरी प्रत्येक महत्वाच्या प्रश्नासंबंधांत परकीय तज्ज्ञांकडे धांव घेण्याची सरकारची सवय अनिष्ट आहे हें थोड्या सूक्ष्म विचाराअंतीं सहज लक्ष्यांत येण्यासारखें आहे. प्रस्तुत प्रकरणीं विचारांत घ्यावयाचा पहिला मुद्दा असा आहे कीं, परकीय तज्ज्ञ कितीहि मोठे माहितगार असले तरी त्यांस आपल्या ज्ञानाचा उपयोग हिंदुस्थानांतल्या अज्ञात परिस्थितींत करावयाचा असतो आणि ह्या कारणानें काळाचा व पैशाचा निष्कारण व्यय होऊन त्यांचा सल्ला दोषरहित असा होईलच अशी खात्री देतां येत नाहीं. दुसरा मुद्दा असा कीं, हिंदी माणसांस स्थानिक परिस्थितीची उत्तम माहिती असते आणि त्यांस परदेशांतील सुधारणांचा अभ्यास करून त्याचा उपयोग हिंदुस्थानच्या प्रगतीप्रीत्यर्थ करणें शक्य आहे. परदेशी तज्ज्ञांस येथें येऊन परिस्थितीची माहिती करून घेऊन ती सुधारण्याविषयीं सूचना करतां येतात, तर हिंदी तज्ज्ञांस परदेशांत जाऊन तेथील ज्ञान मिळविणें आणि त्याच्या आधारावर येथें शिफारसी करणें हें कां साधूं नये ? तिसरा मुद्दा असा कीं, बाहेरचा अनुभव मिळवलेले हिंदी तज्ज्ञ स्वतःच्या देशास कायमचे जसे उपयोगी होतील तसे परकीय तज्ज्ञ होणें शक्य नाहीं. हिंदुस्थानाच्या खर्चानें बाहेरच्या तज्ज्ञांस जो अनुभव मिळतो तो त्यांस स्वतःच्या देशांच्या उपयोगास लावतां येतो. हिंदी तज्ज्ञांस योग्य संधी मिळाल्यास त्यांसहि आपल्या देशाचें हित ह्याप्रमाणें साधतां येऊन त्यांचा वेळ व त्यांवर झालेला खर्च सत्कारणीं लागेल. मोठ्या व जबाबदारीच्या जागांवर हिंदी लोकांच्या नेमणुका न करण्याच्या सरकारी धोरणावर अनेक वर्षें टीका होत आली आहे तिचें रहस्य वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. हिंदी लोकांमध्यें आत्मविश्वास उत्पन्न होत नाहीं आणि स्वतःच्या देशासंबंधानें धोरण निश्चित करण्याच्या संधीस ते मुकतात, हा बाहेरच्या तज्ज्ञांची नेमणूक करण्याच्या पद्धतींतला ठळक दोष आहे.

हिंदुस्थानच्या सांपत्तिक व आर्थिक प्रश्नांच्या चौकशीसाठीं नेमलेल्या कमिशनांत व कमिट्यांत ह्या देशांतला एकहि गृहस्थ असावयाचा नाहीं, आणि चौकशीचें काम लंडनमध्यें चालावयाचें असा प्रकार कित्येक वर्षें नित्यानुभवाचा झाला होता. एक दोन हिंदी माणसांचा अंतर्भाव कमिटींत करावयाचा व तिचें कांहीं काम येथें व्हावयाचें ह्या तऱ्हेची सुधारणा अगदीं अलीकडे झाली आहे आणि लोकांनीं जोरानें केलेल्या ओरडीचा तो परिणाम आहे. पंधरा वर्षांपूर्वीच्या फिस्कल कमिशनचे अध्यक्ष सर इब्राहिम रहिमतुल्ला हे हिंदी गृहस्थ होते, तर नऊ वर्षांपूर्वीच्या शेती कामेशनचें अध्यक्षत्व सध्यांचे व्हाइसरॉय, लॉर्ड लिन्लिथगो ह्यांचेकडे होतें. सायमन कमिशनमध्यें एकहि हिंदी गृहस्थ नव्हता आणि मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकार ह्यांच्यामध्यें व्हावयाच्या उत्पन्नाच्या वाटणीची योजना सुचवण्यास सर ओटो नीमायर ह्या एकट्याच बाहेरील तज्ज्ञाची नेमणक करण्यांत आली होती. असल्या प्रघातास चिकटून राहण्याचें धोरण सरकारास अजूनहि सोडवत नाहीं. सर ओटो ह्यांच्यासारखी चौकशी त्यांचे पूर्वी एक दोन ब्रिटिश तज्ज्ञांनीं अगोदर केलीच होती. आर्थिक माहिती व आकडे ह्यांचे व्यवस्थेबद्दल सल्ला देण्यास प्रो. बॉले व मि. रॉबर्टसन येऊन गेले. रेल्वेजमध्यें खर्चाची बचत, व्यवस्थेच्या पुनर्घटनेनें कशी करावी हें सांगण्यास एका ब्रिटिश तज्ज्ञान हिंदुस्थानच्या दोन वाऱ्या केल्या आहेत आणि पुन्हां रेल्वेजच्या सांपत्तिक स्थितीची चौकशी विस्तृत प्रमाणावर करण्याचें व त्यासाठी ब्रिटिश तज्ज्ञ शोधून काढण्याचें घाटत आहे. सर जोसिआ स्टँप हे रेल्वे व्यवस्थेंतले प्रसिद्ध असे ब्रिटिश तज्ज्ञ आहेत. त्यांनीं आपली नेमणूक होण्यास नकार दिल्याची वदंता आहे. हिंदी रेल्वे बोर्डांत हिंदी तज्ज्ञ न नेमल्याबद्दल लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें सरकारी धोरणाचा अनेक वेळां निषेध केला आहे. आतां पुन्हां बाहेरचे तज्ज्ञ धुंडाळण्याची खटपट चालली आहे. हिंदुस्थानांत लायक माणसांचा असा काय तुटवडा पडला आहे कीं, आमच्या रेलवेजच्या सांपत्तिक पुनर्घटनेच्या प्रश्नाच्या चौकशीकरितां बाहेरून तज्ज्ञ आणण्याची आवश्यकता भासावी ? होतकरू हिंदी माणसांस तज्ज्ञ बनण्याची संधी मिळत नाहीं आणि हिंदुस्थानांत तज्ज्ञ नाहींत म्हणून ते बाहेरून आणावयाचे हें धोरण चमत्कारिक नाहीं काय ? बँकिंगची चौकशी करण्याकरितां नेमलेल्या कामिटीस असेच युरोपिअन तज्ज्ञ स्वतंत्रपणानें जोडण्यांत आले होते. प्राप्तीवरील कराच्या पद्धतीची छाननी आजमितीस दोन इंग्लिश तज्ज्ञ करीत आहेत आणि इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्च-

रल रिसर्चला सल्ला देण्यासाठी दोघेजण बाहेरून येणार आहेत. हिंदी शिक्षित तरुणांस उद्योगधंदा मिळावा ह्या हेतूनें प्रचलित शिक्षणपद्धतींत सुधारणा सुचवण्याचें मध्यवर्ती शिक्षण मंडळानें ठरवलें असून त्या कामांतहि सल्ला देण्यासाठीं बाहेरचे तज्ज्ञ नेमले जावयाचे आहेत. प्रांतिक सरकारांचें त्या योजनेंत सहकार्य किती होईल हें तूर्त अजमावण्यांत येत आहे आणि त्यांच्या उत्तरांच्या अनुरोधानें शिक्षणतज्ज्ञांसंबंधाची योजना अंमलांत यावयाची आहे. ह्या सल्लागारांचा खर्च सोसण्याची हिंदुस्थान सरकाराची तयारी आहे; परंतु त्यांच्या सल्ल्याचा आपण उपयोग करून घेऊं असें आश्वासन प्रांतिक सरकारांनीं आपणांस अगाऊ दिलें पाहिजे असा मध्यवर्ती सरकारचा आग्रह आहे. ह्याचें कारण उघड आहे. शिक्षण ही सर्वस्वी प्रांतिक सरकारांच्या अधिकारांतली बाब आहे व शिक्षण पद्धतींत व्हावयाच्या सर्व सुधारणा त्यांचे हातूनच घडून आल्या पाहिजेत. सध्या हिंदुस्थानांत बाहेरच्या तज्ज्ञांवांचून पान हालेनासें झालें आहे, ही देशाची प्रगति आहे का पीछेहाट आहे ?

## नवीन सहकारी नियमाचें रहस्य

सहकारी कायद्यास अनुसरून नियम करण्यांत आले आहेत, त्यांमध्यें एक नवीन कानू घालण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे, त्याविषयीं प्रसिद्ध झालेली माहिती आजच्या अंकांत दुसरीकडे दिली आहे. ह्या प्रकरणांत उत्साही व ध्येयनिष्ठ सहकारी कार्यकर्त्यांनीं लक्ष घालून योग्य उपायांचा अवलंब करणें जरूर आहे. कोणत्याहि सहकारी संस्थेच्या कारभारांत गैरव्यवस्था आहे असें दिसून आल्यास विद्यमान पंचकमिटी बदलण्याचा सभासदांच्या साधारण सभेचा अधिकार नवीन कानूनें सरकार स्वतःकडे घेत आहे. कित्येक सहकारी संस्थांमध्यें अव्यवस्था माजून पक्षभेद, चुरस व भांडणें ह्यांमुळें त्यांचें काम बिघडल्याचीं उदाहरणें अलीकडे घडलीं आहेत ह्यांत शंका नाहीं. पंच नीट काम करीत नाहींत आणि त्यांस ताळ्यावर आणणें, त्यासंबंधानें खास जबाबदार असलेल्या सर्वसाधारण सभेच्या हातून होत नाहीं, अशी परिस्थिति उत्पन्न झाली असतां त्या गोंधळाचा निकाल कसा लागावयाचा हा प्रश्न उपस्थित होतो. वास्तविक पहातां, हा प्रश्न बिनसरकारी कार्यकर्ते व देखरेख करणाऱ्या आणि शिस्त ठेवणाऱ्या त्यांच्या संस्था ह्यांनींच सोडवला पाहिजे. तथापि, ह्या व्यक्ती व संस्था असल्या भानगडींत पडत नाहींत व पडल्यास त्यांचें कांहीं चालत नाहीं, असा अनुभव येतो. ह्या रीतीनें लोकांनीं आपली जबाबदारी ओळखली नाहीं आणि सहकारी चळवळींत शिस्त राखण्याचें आपलें कर्तव्य बजावलें नाहीं म्हणजे तंटे मिटवण्याचें आणि संस्थांची बिघडलेली घडी नीट करण्याचें काम अधिकाऱ्यांवर येऊन पडतें. त्यांचा सल्ला पंचांनीं व सर्वसाधारण सभेनें ऐकला नाहीं आणि सहकारी संस्थेची अव्यवस्था चालू राहून तिचें व सबंद चळवळीचें नांव बदू होऊं लागलें तर पुढें काय व्हावयाचें ? रजिस्ट्रारला अव्यवस्थेची चौकशी करून संस्था गुंडाळल्या जाण्याविषयींचा हुकूम देण्याचा कायदेशीर अधिकार आहे, पण हा निर्वाणीचा उपाय योजण्यापूर्वी त्यांच्या कारभार-मंडळांत व व्यवहारांत सुधारणा घडवून आणण्यासाठी सौम्य उपाय योजण्यास दुसरें कांहीं करतां येत नाहीं. म्हणून नवीन नियम करून आज अस्तित्वांत नसलेली सत्ता सरकार आपल्या हातांत घेत आहे.

आमच्या सहकारी चळवळींत खरी लोकशाही नाहीं आणि जनतेस आपली जबाबदारी व हक्क ह्यांची जाणीव नाहीं, ह्या वस्तुस्थितीचें नवीन नियम हें लक्षण आहे. खरें पाहिलें तर भांडणें मिटवणें व अव्यवस्था दूर करून शिस्तीची जोपासना करणें हें काम यूनिअन्स व इन्स्टिट्यूट ह्यांसारख्या लोकनियंत्रित संस्थांनीं करावयास पाहिजे आणि सरकारनें तें स्वतः अंगावर घेऊं पहावें ही गोष्ट स्वयंशासित गणल्या जाणाऱ्या सहकारी संस्थांस खात्रीनें भूषणावह नाहीं. मतभेद व तंटे सार्वजनिक संस्थांमध्यें होणें अपरिहार्य आहे; पण ते लोकांनीं आपणच मिटवले पाहिजेत. तरच सहकारी चळवळीसारख्या आर्थिक व सामाजिक संघटनेमध्यें स्वारस्य आहे. सरकारनें योजलेल्या नियमानें सहकाऱ्यांचे डोळे उघडून आपला कारभार स्वतःचे तंत्राखाली राखण्याची सद्बुद्धि त्यांस होणें अगत्याचें आहे. सरकारी खात्यानें बाहेरून सल्ला व सहाय द्यावें, पण संस्थांचा कारभार लोकांनीं सर्वस्वी स्वावलंबन, शिस्त व तडजोड ह्यांच्या जोरावर चालवला पाहिजे. 'असें आज होत नाहीं म्हणून आम्हांस नाइलाजानें आंत हात घालावा लागत आहे' असें सरकारचें म्हणणें आहे. त्यास कार्यकर्ते व त्यांच्या संघटित संस्था ह्यांनीं योग्य, सयुक्तिक आणि व्यावहारिक उत्तर दिलें पाहिजे. जनता जागरूक, सुसंघटित व कार्यक्षम असती तर सरकारनें योजिलेला नवीन नियम करण्याचें ठरवलें नसतें. जागृति, संघटन व आत्मसुधारणा ह्यांविषयींची संधि सरकारच्या प्रस्तुत योजनेनें लोकांस आणून दिली आहे, तिचा व्यवस्थित उपयोग सहकारी कार्यकर्ते करतील काय ? नियमास अखेरची मंजूरी मिळण्यापूर्वी हें कार्य झालें पाहिजे व तें होण्यासारखें आहे. सहकारी चळवळीच्या प्रगतीसंबंधानें आस्था वाटून विधायक कामगिरी करणारे उत्साही व निरपेक्ष कार्यकर्ते मात्र पुढें आले पाहिजेत. नवीन नियमानें होणारें कार्य घडून येईल अशी व्यवस्था आपण स्वतः करूं ह्याविषयीं त्यांनीं कायदेमंडळ व सरकार ह्यांची खात्री पटवली पाहिजे.

## मोटारींचीं शिंगें वाजविण्यास बंदी

जरूर नसतांना मोटारीचें शिंग वाजविण्याच्या मोटारवाल्यांच्या संवयीमुळें त्यांचे कर्णकर्कश आवाज नागरिकांस सहन करावे लागतात. रात्रीं ११ ते सकाळीं ६ चे दरम्यान मुंबई मधील कांहीं विशिष्ट रस्त्यांवर शिंग वाजविण्यास बंदी करणारा हुकूम कमिशनर ऑफ पोलीसनें काढला आहे, त्याच्या अंमलबजावणीस ता. १ जून रोजीं सुरवात झाली. दोन महिनेपर्यंत हा प्रयोग करून तो यशस्वी झाल्यास शिंगबंदीच्या मनाई हुकमाचें क्षेत्र वाढविण्यांत येईल.

## मुंबई इलाख्याच्या रौप्य ज्युबिली फंडाची वांटणी

पंचम जॉर्ज बादशहांच्या रौप्य ज्युबिलीनिमित्त मुंबई इलाख्यांत जमा होणाऱ्या रकमेपैकीं ७० टक्के रकम ज्या त्या जिल्ह्यांत खर्चण्यासाठी परत केली जाईल, ह्या आश्वासनास अनुसरून गव्हर्नर साहेबांनीं खालीलप्रमाणें पैशाची वांटणी केली आहे:—

| जिल्हा | रुपये (हजार) | जिल्हा | रुपये (हजार) |
|---|---|---|---|
| ठाणें | १३¼ | सातारा | १५½ |
| नाशिक | ७¼ | पुणें | ४४½ |
| अहमदनगर | २०½ | कुलाबा | ७½ |
| पूर्व खानदेश | २४ | रत्नागिरी | ८½ |
| मुंबई उपनगर | ५½ | धारवाड | ४३ |

# स्फुट विचार

## निमायर 'लवाद निवाडा'—पदरीं पडलें पवित्र झालें

हिंदुस्थान सरकार आणि प्रांतिक सरकारें ह्यांच्यामध्यें उत्पन्नाची वांटणी नवीन राज्यघटनेच्या मनूंत कशी व्हावी ह्या संबंधानें सर ओटो निमायर ह्यांच्या शिफारसींवर सेक्रेटरी ऑफ स्टेट आणि ब्रिटिश पार्लमेंट यांनीं अखेरची मान्यता दिली असल्यानें तो वादग्रस्त प्रश्न आतां कायमचा निकालांत निघाला आहे. वास्तविक पहातां, निमायर योजनेनें हिंदुस्थानांत कोणाचेंच समाधान झालेलें नाहीं. परंतु ती लवाद निवाड्याच्या स्वरूपाची आहे अशी कल्पना करून तिला मान्यता द्यावी लागत आहे. प्रांतिक राज्यघटनेस प्रारंभ करणें पुढें ढकलणें ब्रिटिश प्रधान मंडळाच्या दृष्टीनें इष्ट नाहीं आणि तिला सुरवात होण्यास उत्पन्नाची वांटणी निश्चित झालीच पाहिजे. निमायर योजनेची आणखी चर्चा व्हावयाची म्हणजे कालहरण होणार आणि तें होऊनहि हिंदुस्थानच्या असमाधानकारक आर्थिक परिस्थितींत अधिक चांगल्या शिफारसी वाटाघाटींतून बाहेर निघणें अशक्य. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून भारत मंत्र्यांनीं निमायर योजना जशीच्या तशीच मंजूर केली आहे. बाहेरच्या तज्ञानें वादं विषयक प्रश्नांचा निःपक्षपातीपणानें निकाल दिला असल्यानें तो लवाद निवाडा म्हणून स्वीकारण्यावांचून हिंदुस्थान-सरकार व प्रांतिक सरकारें ह्यांस गत्यंतर नाहीं. निमायर योजनेची अंमलबजावणी होतांना कोणत्या अडचणी उपस्थित होतील आणि आपल्यावर कोणती जबाबदारी येईल हें मध्यवर्ती सरकारानें स्पष्ट नमूद केलें आहे. त्यावरून त्यांचें मन कसें साशंक आहे हें दिसून येतें. प्रांतिक सरकारांच्या तक्रारी तर रहाणारच आणि नवीन राज्यघटनेच्या अंमलबजावणींत जबाबदार मंत्र्यांची स्थिति बिकट होणार हें निःसंशय आहे. 'पदरीं पडलें पवित्र झालें' या न्यायानें सरकारांस आज स्वस्थ बसणें प्राप्त आहे. परंतु देशाची आर्थिक स्थिती लवकरच सुधारली नाहीं, रेल्वेजचा खर्च कमी होऊन उत्पन्न वाढलें नाहीं आणि प्रांतिक सरकारांस हातपाय हालवण्यास पैशाचा वाव मिळाला नाहीं तर नवीन राज्यघटना यशस्वी होणें कठीण जाईल, ही महत्वाची गोष्ट सरकारनें ध्यानांत बाळगली पाहिजे. निमायर योजना चालू झाली एवढ्यावर विसंबून राहून भागावयाचें नाहीं. त्या करितां देशाची सांपत्तिक स्थिती सुधारण्याचे उपाय अंमलांत आणण्याचें हिंदुस्थान सरकारानें मनावर घेणें अगत्याचें आहे. नाहीं तर करांचा बोजा कायम राहूनहि प्रगति व्हवयाची नाहीं.

---

## टाटा कंपनीची प्रगति

टाटा आयर्न ॲन्ड स्टील कंपनीची २८ वी वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत कंपनीच्या बोर्डाचे अध्यक्ष सर नवरोजी सकलातवाला यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. त्या वेळीं कंपनीच्या सर्व दर्जाच्या भागीदारांस डिव्हिडंड मिळण्याचा सुयोग सुमारें १५ वर्षांच्या अवधीनंतर प्रथमच प्राप्त झाला. कंपनीच्या पोलादाच्या उत्पादनावर सरकारी पट्टी बसवण्यांत आली आहे, रेल्वेजना पुरवल्या जाणाऱ्या रुळांची किंमत कमी करण्यांत आली आहे आणि रेल्वे वाहतुकीचे दर चढले आहेत. ह्या बाबतींत परिस्थिति प्रतिकूल असतांहि एकूण उत्पादन वाढलें आणि खर्चांत बचत करण्यांत आली म्हणूनच कंपनीस म्हणण्यासारखा नफा गेल्या सालीं होऊं शकला. वरील प्रतिकूल बाबींचा अडथळा नसता तर नफ्याची रकम पुष्कळ वाढलेली दिसली असता. कारखान्यांतील यंत्रसामुग्री ज्यास्त कार्यक्षम करण्याचें धोरण कंपनीनें गेलीं कांहीं वर्षें चालू ठेवलें आहे, त्यावर वरीच टीका झाली होती. परंतु ह्या सुधारणांमुळेंच, धंद्यास मिळालेलें संरक्षण कमी झालें व वहातुकीचे दरांत वाढ झाली तरी कंपनी नफा काढूं शकली, असें सर नवरोजींनीं आपल्या भाषणांत सांगितलें. कंपनीच्या वाढत्या भरभराटीमध्यें तिच्या कामगारांसहि योग्य हिस्सा मिळाला आहे. कारखान्यांत अधिक कामगारांस काम मिळून दर माणशीं प्राप्तीहि ज्यास्त झाली आहे. जमशेदपूर येथें कामगारांच्या सोईसाठी १९३६–३७ मध्यें बरींच नवीं घरें बांधण्यांत यावयाचीं असून, त्यांसाठी १९२१–२२ नंतर प्रथमच मोठी रकम खर्च व्हावयाची आहे. कंपनीच्या शाळांतून विद्यार्थ्यांची वाढ झाली असून त्याबाबत ह्यापुढें जास्त रकमेची तरतूद केली जाणार आहे. कारखान्यांतील यंत्रसामुग्री आतां जुनी होत आली असल्यानें तिची किंमत ताळेबंदांत कमी कमी धरण्याचें धोरण बोर्डानें चालू ठेवलें आहे. पोलादाचे धंद्यांत हितसंबंध असणाऱ्या इतर कारखानदारांशीं टाटा कंपनीच्या प्रतिनिधींची ह्या धंद्याचे प्रगतीसंबंधीं चर्चा चालू आहे व कंपनीच्या दृष्टीनें हितावह व योग्य अशा योजनेस टाटांचे प्रतिनिधी मान्यता देतील, असें अध्यक्षांनीं सांगितलें. आतांपर्यंत कित्येक वर्षें कंपनीला प्राप्तीवरील कर व सुपरटॅक्स द्यावा लागण्याचा प्रसंगच उद्‌भवला नाहीं व त्याबाबत हिशेबांत नोंद घेण्याचें कारण नव्हतें; यापुढें सदरहु कर कंपनीच्या नफ्यांतील बरीच मोठी रकम खाणार असा रंग दिसतो. एकंदरींत पहातां, सर नवरोजी सकलातवाला ह्यांस कंपनीस पुढें चांगले दिवस असल्याची खात्री वाटत आहे. हिंदुस्थानांतील पहिल्या प्रतीच्या ह्या कंपनीबद्दल लोकांस आस्था व तिच्या संस्थापकांबद्दल आदर वाटत असल्यानें, तिच्या भागीदारांसच नव्हे तर एकंदर हिंदी जनतेस कंपनीचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत जावा अशी सदिच्छा असणें स्वाभाविक आहे.

---

## ट्रेझरी बिलांची विक्री तूर्त थांबली

हिंदुस्थान सरकारास नवीन कर्जाचे १२ कोटि रुपये हलक्या व्याजाच्या दरानें मिळाल्यामुळें त्यांची त्यापुरत्या पैशाची गरज भागली आहे आणि बँकांस आपली फाजील शिल्लक ह्या कर्जरोख्यांमध्यें गुंतवण्यास साधन प्राप्त झालें आहे. तीन महिने मुदतीचे ट्रेझरी बिलांच्या स्वरूपाचे कर्ज रोखे विकण्यांत सरकारचा उद्देश, त्यांस खर्चास खेळता पैसा लागतो तो सोईच्या दरानें तात्पुरता उभा करणें हा असतो. नवीन कर्जानें हा हेतु सफल होऊन सरकारला भरपूर पैसा सहज मिळाला आहे, तेव्हां आतां त्यांस ट्रेझरी बिलें विकण्याची आवश्यकता उरली नाहीं. बँकांसहि ट्रेझरी बिलांसारख्या साधनांची आवश्यकता तूर्त भासत नाहींशी झाली आहे. दोन बाजूंनीं ह्या तऱ्हेची परिस्थिति निर्माण होऊन सरकारनें ट्रेझरी बिलांची विक्री सध्या बंद केली आहे ही गोष्ट क्रमप्राप्त अशीच झाली आहे. मेच्या १३ तारखेस, सरकारनें विक्रीस काढलेल्या २ कोटि रुपयांच्या ट्रेझरी बिलांस टेंडरांमार्फत ५ कोटि रुपयांची मागणी आली. त्याच्या पुढच्या आठवड्यांत म्हणजे मेच्या २० तारखेस पुन्हां २ कोटि रुपयांचीं बिलें विक्रीस निघालीं असतां मागणीच्या टेंडरांची रकम २ कोटि, ३५ लक्षच भरली. मागणी कमी झाली तरी त्या मानानें व्याजाचा

दर मात्र विशेष चढला नाहीं. १३ मेस द. द. ८ आणे दर होता, तो २० मेला ८ आणे ४ पै झाला. इंपीरिअल बँकेसारख्या संस्थांनीं पैशाच्या बाजाराची परिस्थिति निरीक्षण करून हलक्या व्याजाच्या दराचें नवीन सरकारी कर्ज निघणार असा कयास बांधला असला पाहिजे आणि त्यामुळें ट्रेझरी बिलांस येणारी मागणी गारठली असली पाहिजे. गेल्या २६ तारखेस बिलांस आलेल्या मागणीसंबंधाचीं टेंडरें जेमतेम २ कोटि रुपयांचीं भरलीं. ह्या रीतीनें मागणी रोडावलेली दिसतांच सरकारनें ट्रेझरी बिलांची विक्री तूर्त थांबवण्याचें ठरवून त्याप्रमाणें आपला निश्चय जाहीर केला. रिझर्व्ह बँकेच्या नोट खात्यास मात्र गेल्या महिन्याच्या २२ तारखेस २ कोटि, ३३ लक्ष रुपयांचीं ट्रेझरी बिलें, त्यांची मुदत पुरी झाली असतां, पुन्हां देण्यांत आलीं. सदरहु बँकेच्या बाबतींत परतफेडीच्या स्थितींतलीं बिलें पुन्हां चालू करण्याचें धोरण सबंद मे महिनाभर अमलांत होतें.

## चीन, चांदी आणि अमेरिका

चांदीच्या बाजारभावाचें भवितव्य अमेरिकेच्या मुठींत आहे ही गोष्ट आतां सर्वांच्या परिचयाची झाली आहे. अमेरिकेंत चांदीचा फार मोठा पुरवठा आहे आणि तिची किंमत उचलून धरण्याचें धोरण त्या राष्ट्राच्या सरकारनें स्वीकारलें आहे. इतर देशांच्या मानानें चीनचा चांदीशीं फार निकट संबंध येतो ह्याचें कारण त्या देशांतलें चलन प्रामुख्यानें चांदीचें आहे हें होय. मध्यंतरीं अमेरिकेच्या कारवाईमुळें चांदी कडाडली तेव्हां चीनमध्यें चलनाची तारांबळ उडाली आणि चिनी सरकारास चांदीच्या व्यापारासंबंधानें कडक निर्बंध घालावे लागले. चिनी सरकारनें ह्याच्याहि पुढें जाऊन चांदीचा नाद सोडून देऊन आपल्या चलनास सोन्याचा आधार घेण्याचा विचार चालवला. चांदीचा उपयोग मर्यादित करून सोन्याकडे धाव घेण्याचें चीननें ठरवणें अर्थातच अमेरिकेच्या हितास बाधक आहे तेव्हां चीनशीं वाटाघाट करून दोन्ही राष्ट्रांच्या सोईची कांहीं तरी योजना आखणें अपरिहार्य होतें. त्याप्रमाणें अमेरिकेकडून पैसा कर्जाऊ घेऊन चीननें चांदीचा उपयोग चालू ठेवावा अशी व्यवस्था झाली असल्याचें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. चीननें घेतलेल्या चांदीच्या तारणावर अमेरिकेनें त्या देशास पैसा पुरवावा हा त्या व्यवस्थेचा मथितार्थ आहे असें प्रसिद्ध झालेल्या बातमीवरून दिसतें. ह्या कराराचा परिणाम चांदीच्या बाजारांत स्थैर्य उत्पन्न करण्यांत झाला तर तें हिंदुस्थान व इतर देश ह्यांस इष्टच आहे. हिंदुस्थानांतला म्हणजे मुंबईचा चांदीबाजार फार महत्त्वाचा आहे. त्यामध्यें वारंवार होणाऱ्या खळबळींस वरील, चीन व अमेरिका ह्यांच्या मधल्या, व्यवहारानें आळा बसल्यास धंदेवाल्यांचें व सामान्य जनतेचेंहि हित आहे.

## इलाख्यांतील पाऊसपाणी

हिंदुस्थानची आर्थिक परिस्थिति ही एक पावसाची जुगार आहे, ही एक जुनी म्हण असून तिचें स्मरण मे महिना अखेर व जूनच्या प्रारंभीं विशेषें करून होत असतें. ह्या देशांत शेतीच्या धंद्याचें विलक्षण महत्व आहे आणि त्या धंद्याची परिस्थिति सर्वस्वी पावसावर अवलंबून रहाते. पावसाच्या लहरी स्वभावामुळें शेतकऱ्यांच्या संसारास जुगारीचें स्वरूप प्राप्त होतें. समाजांतील सर्व वर्गाचें स्वास्थ्य प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें शेतीच्या सुस्थितीशीं निगडित झालेलें आहे, ह्या कारणानें पावसाळ्याच्या प्रारंभीं अखिल जनतेचे डोळे आकाशाकडे लागून रहावे, ह्यांत आश्चर्य नाहीं. गेल्या एक दोन आठवड्यांत महाराष्ट्राच्या अनेक भागांत वळवाचे पाऊस झाले आहेत. तथापि पाण्याची टंचाई नेहमींप्रमाणें हजारों ठिकाणीं भासत आहे. अशा रीतीनें पिण्याच्या पाण्याची मारामार चोहोंकडे पडावी हें हलाखीचें लक्षण आहे. मृगाचा पाऊस वेळेवर पडेल असा अंदाज करण्यांत आला आहे आणि अरबी समुद्रांतील खळबळीनें त्यास पुष्टि मिळत आहे. पाऊसपाणी व शेतीची हालहवाल ह्या संबंधानें २३ मे अखेरच्या आठवड्यांतील माहिती सरकारी रीत्या प्रसिद्ध झाली आहे, तीवरून कोंकणांत तुरळक पाऊस झाला, बागाइताची स्थिति बरी आहे, जमिनीची तयारी चालू आहे आणि कुलाबा, रत्नागिरी व कानरा ह्या जिल्ह्यांचे कांहीं भाग वगळल्यास पिण्याच्या पाण्याचा पुरवठा पुरेसा आहे असें दिसतें. मध्यभागांत कांहीं ठिकाणीं थोडा पाऊस झाला. पुणें जिल्ह्यांत कित्येक भागांत कपाशीच्या पेरणीस सुरवात झाली आहे आणि बहुतेक सर्वत्र पावसाच्या आगमनाची तयारी चालली आहे. पुणें, बेळगांव आणि धारवाड जिल्हा येथील कांहीं ठिकाणीं पिण्याचें पाणी अपुरें आहे आणि पुणें व बेळगांव जिल्हा ह्यांमध्यें कांहीं जागीं बागाइतासहि पुरें पाणी नाहीं. कडबा पुरेसा आहे व जनावरांची स्थिति चांगली आहे. धान्याचे भाव अस्थिर आहेत.

## स्वदेशी साखरेचें उत्पादन वाढलें

उसापासून तयार केलेल्या साखरेचें उत्पादन वाढत आहे व त्यामानानें गुळाची साखर कमी होत आहे. १९३५–३६ चा उसाचा मोसम उत्कृष्ट असून यंदाइतका ऊंस ह्यापूर्वी कधीच पेरला गेला नव्हता. हिंदुस्थानांतील एकूण पिकाच्या ५६ टक्के ऊंस संयुक्त प्रांतांत पिकतो व स्वदेशी साखरेच्या एकूण उत्पादनापैकीं निम्म्याच्यावर उत्पादन त्या प्रांतांतल्या कारखान्यांत होतें. तेथील लागवडींत ह्या वर्षी २२ टक्के वाढ झाली आहे व ह्या कारणानें गुळाचा भाव उतरला आहे. गेल्या दोन व चालू वर्षांतले साखरेच्या उत्पादनाचे आकडे खालीं दिले आहेत:—

| वर्ष | उत्पादन (टन) |
|---|---|
| १९३४–३५ | ७,६८,००० |
| १९३५–३६ | ८,४९,००० (अंदाज) |
| १९३६–३७ | ९,०४,००० (अपेक्षा) |

उसाच्या लागवडीचे व गुळाच्या उत्पादनाचे तुलनात्मक आकडे खालीलप्रमाणें आहेत:—

| वर्ष | उसाची लागवड (एकर) | गुळाचें उत्पादन (टन) |
|---|---|---|
| १९३४–३५ | ३३,०८,००० | ४८,७२,००० |
| १९३५–३६ | ३४,७१,००० | ५०,८५,००० |

१९३४–३५ सालीं साखरेचे १९ नवे कारखाने निघाले म्हणजे आज एकूण १४२ कारखाने अस्तित्वांत आहेत. साखर तयार करण्यास लागणाऱ्या यंत्रसामुग्रीची आयात आतां कमी झाली आहे, परंतु जावा व जपान ह्या देशांतून यंत्रें उतरल्याची प्रथमच नोंद झाली आहे.

**माधव सोमण ब्रदर्स**

आम्हीं स्वतः तयार केलेलीं लुगडीं व इतर पेठांचा माल खात्रीलायक गिऱ्हाइकांस विकतों.

हुजूरपागेसमोर, पुणें २.

## औद्योगिक मंडळयांचें नफावांटणीचें धोरण

---:०:---

समाईक भांडवलाचे तत्त्वावर उभारलेल्या व्यापारी व औद्योगिक मंडळयांनीं नफ्याची वाटणी करतांना अत्यंत सावधगिरीचें धोरण ठेवणें आवश्यक असतें. भागीदारांस साहजिकच मिळेल तितकें ज्यास्त डिव्हिडंड हवें असतें; परंतु डिव्हिडंडचा दर कायम राखतां यावा व मंडळीचें स्थैर्य अचल रहावें व कांहीं काळ नुकसान आलें तरी तें सोसण्याची कुवत मंडळीस असावी, असें व्यवहारचतुर व दूरदर्शी व्यवस्थापकांचें म्हणणें असणार. भरमसाट नफावाटणी व स्थैर्याविषयींची फाजील कल्पना, ह्यांचेमधूनच मार्ग काढावा लागतो आणि स्थैर्याचें पारडें जरा झुकवावें लागतें. जागतिक आर्थिक मंदींतून कित्येक मंडळया सुखरूपपणें बाहेर पडल्या, ह्याचें कारण त्यांनीं अंगीकारलेलें सावधगिरीचें धोरण, हेंच होय.

औद्योगिक क्षेत्रांतील परिस्थिति निवळत चालली आहे, ही गोष्ट डिव्हिडंडमध्यें प्रतिबिंबित होण्यास वेळ लागतो, असा अनुभव आहे. नवीन मिळालेल्या कामाचें औद्योगिक उलाढालींत रूपांतर होऊन त्यापासून डिव्हिडंड होण्यास कांहीं काळ लोटावा लागतो. ब्रिटिश कंपन्यांसंबंधीं गेल्या कांहीं वर्षांचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून असें दिसून येतें कीं, १९२९ सालाच्या मानानें १९३५ सालीं उत्पादन १२ टक्के वाढलें, तरी नफावांटणी ५ टक्क्यांनीं मागें पडली आहे. गेल्या सालीं झालेल्या सुधारणेचा परिणाम यंदाचे नफावाटणींत दिसून येईल. कंपन्यांस झालेला नफा भागीदारांच्या हातीं का पडूं शकला नाहीं हें पहाण्याजोगें आहे. मंडळयांच्या डिबेंचर्सवरील व्याज प्रथम भागवून प्रेफरन्स भागीदारांस त्यांचें ठराविक डिव्हिडंड द्यावयाचें व उरेल तो नफा ऑर्डिनरी भाग धारण करणारांत वाटावयाचा, अशी पद्धत आहे.

मंदीमध्यें व त्यानंतरहि डिव्हिडंडचा दर नफ्याचे मानानें कसा स्थिर राहिला, हें खालील आकड्यांवरून दिसून येईलः—

| वर्ष | मंडळयांस पडलेलें डिव्हिडंड | वाटलेलें डिव्हिडंड | दोहोंमधील फरक |
|---|---|---|---|
| | % | % | % |
| १९२९ | १३·० | १०·० | ३·० |
| १९३० | १०·७ | ८·५ | २·२ |
| १९३१ | ९·९ | ८·७ | १·२ |
| १९३२ | ८·९ | ७·५ | १·४ |
| १९३३ | ९·८ | ७·५ | २·३ |
| १९३४ | ११·० | ८·३ | २·७ |
| १९३५ | १२·६ | ९·२ | ३·४ |

मंडळयांची मिळकत कमी झाली, तरी भागीदारांस दिलेल्या डिव्हिडंडचा दर त्या प्रमाणांत कमी होऊं दिलेला नाहीं, हें लक्ष्यांत ठेवण्याजोगें आहे. १९३२ नंतर नफ्याचें प्रमाण वाढलें तरी त्या मानानें डिव्हिडंडचा दरहि भरमसाट वाढूं दिलेला नाहीं.

मंडळयांस झालेल्या नफ्याचा कांहीं भाग पुनः खेळत्या भांडवलांत गुंतविण्याचें धोरणहि ग्रेटब्रिटनमध्यें आतां वाढत्या प्रमाणांत स्वीकारण्यांत येऊं लागलें आहे; म्हणजे उद्योगधंद्यास लागणाऱ्या भांडवलाचा पुरवठा परस्पर नफ्यांतून होत आहे. एकूण नफ्यापैकीं शंभरांत कितवा हिस्सा रकम रिझर्व्हच्या रूपानें परत खेळत्या भांडवलांत पडते तें खालील कोष्टकावरून समजेलः—

रिझर्व्हमध्यें टाकलेल्या रकमेचें एकूण नफ्याशीं प्रमाण

| वर्ष | % | वर्ष | % |
|---|---|---|---|
| १९२९ | १८·३ | १९३३ | १८·४ |
| १९३० | १६·२ | १९३४ | १९·४ |
| १९३१ | ९·६ | १९३५ | २२·२ |
| १९३२ | १२·२ | | |

म्हणजे, गेल्या वर्षातील एक चतुर्थांश ते एक पंचमांश नफ्याचा विनियोग उद्योगधंद्यांस भांडवल मिळवून देण्यांतच झाला. भागीदारांस नफा वाटण्यापूर्वी, वाटणीचा दर सालोसाल कायम राखण्याची व खेळत्या भांडवलाचा पुरवठा वाढविण्याची कशी तरतूद करण्यांत येते, हें वरील माहितीवरून समजून येईल. आपल्या इकडील विमा कंपन्या, बँका, पतपेढ्या, इत्यादींनीं ह्यापासून अवश्य बोध घ्यावा.

---

## करारासंबंधाच्या दाव्याचा निकाल

### जॉर्ज बादशहांच्या मृत्यूमुळें अपुरे राहिलेले करार

बादशहा पंचम जॉर्ज ह्यांचा आजारीपणा व मृत्यु ह्यांमुळें लंडनमधील कित्येक करार पुरे होण्याचे बाबतींत घोटाळा उत्पन्न झाला व त्यामुळें कोर्टकचेऱ्यांत दावे उपस्थित झाले. दर आठवड्यास चार हजार रुपये ह्या दरानें पैसे मिळण्याबाबत एका बँड कंपनीचा लंडनमधील विशिष्ट रेस्टॉरंटबरोबर करार झालेला होता. सोमवार, ता. २० जानेवारी १९३६ रोजीं बँडवाला कामावर आला असतांना, बादशहांच्या चिंताजनक अवस्थेमुळें बँडवादन बंद राहील, असें त्यास सांगण्यांत आलें. ज्या आठवड्यास बँड बंद राहिला, त्या मुदतीबद्दलचे पैसे मिळण्याबाबत त्यानें दावा लावला.ज्या दिवशीं बँड नाहीं त्या दिवसाचे पैसे मिळणार नाहींत, असा आपला करार होता व त्या अन्वयें योग्य कारण असेल तर बँड थांबविण्याचा आपणास हक्क असून बादशहांच्या आजारीपणामुळें अगोदरच आपलें गिऱ्हाईक बुडालें, त्यांत बँडवाल्याचे आणखी पैसे देऊन स्वतःचें नुकसान करून घेणें रास्त नाहीं, असें रेस्टॉरंटतर्फे सांगण्यांत आलें. दाव्याचा निकाल सांगतांना कोर्टानें असें सांगितलें कीं, सोमवारीं बादशहा अत्यवस्थ होते म्हणून व मंगळवारीं त्यांच्या मृत्यूची वार्ता सर्वांस समजली म्हणून रेस्टॉरंट बंद ठेवणें व बँडबद्दल पैसे न देणें रास्त धरतां येईल. पाण्याच्या पुरामुळें रेस्टॉरंटमध्यें शिरतांच येणार नाहीं, अशा प्रकारची ही परिस्थिति होती असें समजण्यास हरकत नाहीं. तथापि, त्या आठवड्यांतील इतर दिवशीं लंडनमधील थिएटरें चालू होतीं व वादीचा बँड काम करण्यास तयार असतांना, रेस्टॉरंटवाल्यास कमी गिऱ्हाइकें मिळाल्यामुळें खर्चांत बचत करावयाची होती, ह्या मुद्यांत तथ्य रहात नाहीं. बँड कंपनीस ह्या उरलेल्या चार दिवसांबद्दल कोर्टानें २,६०० रुपये देवविले.

---

### अर्भकांस दूध मिळण्याचें महत्व

दूध न मिळाल्यामुळें अर्भकांची अनास्था होते, ती दूर करण्यासाठीं सिमला म्युनिसिपालिटीनें १२० मुलांच्या उपयोगाकरितां मोफत दूध पुरवण्याचा उपक्रम केला आहे. हा प्रयोग तीन महिनेपर्यंत तरी चालू राहील. बाळंतिणी व अर्भकें ह्यांस दुधाचा खुराक मिळण्याचें महत्त्व फार मोठें असल्याचें व्हाइसरॉय ह्यांनीं प्रतिपादन केलें आणि ह्या दूध पुरवण्याच्या हेतूनेंच आपण दुभत्या जनावरांच्या सुधारणेचा प्रश्न हातीं घेतला असल्याचें सांगितलें.

## प्रांतिक स्वायत्ततेस प्रारंभ

### मध्यवर्ती सरकाराचा अभिप्राय

हिंदुस्थानच्या मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांमध्यें उत्पन्नाच्या बाबींची वाटणी ऑर्डर इन कौन्सिलनें करावी, अशी १९३५ च्या नव्या राज्यघटनेबाबतच्या कायद्यांत तरतूद आहे. ही ऑर्डर इन् कौन्सिल काढण्यापूर्वी त्याचा मसुदा पार्लमेंटापुढें मांडावयाचा होता, त्याप्रमाणें आतां सर्व विधि उरकला आहे. मध्यवर्ती व प्रांतिक सरकार ह्यांच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन त्या संबंधांत पार्लमेंटास स्वतंत्र तज्ञाचा सल्ला मिळावा ह्याकरितां ब्रिटिश सरकारनें प्रथम खास चौकशी करविण्याचें ठरविलें व त्यासाठी गेल्या सप्टेंबरांत सर ओटो निमायर ह्यांची नेमणूक जाहीर झाली. सर ओटो ह्यांचा रिपोर्ट गेल्या महिन्याचे सुरवातीसच बाहेर पडला. (१) प्रांतिक स्वायत्ततेमुळें कांहीं प्रांतांच्या अंदाजपत्रकांत पडणारी तूट भरून काढणें व (२) प्राप्तीवरील कराचा कांहीं हिस्सा प्रांतांमध्यें वांटून टाकण्याची योजना करणें हे दोन प्रश्न सर ओटो ह्यांस सोडवावयाचे होते. त्यांनीं केलेल्या सूचनांची माहिती "अर्थ"मध्यें मागें आलीच आहे. त्या शिफारसी ब्रिटिश सरकारनें स्वीकारल्या असल्याचें आतां जाहीर झालें आहे. भारतमंत्र्यांनीं ह्या बाबतींत आपलें मत देण्यापूर्वी मध्यवर्ती व प्रांतिक सरकार ह्यांचीं मतें मागवून तीं विचारांत घेतलीं होतीं. पैशाच्या सबबीवर प्रांतिक स्वायत्तता लांबणीवर पडूं नये, असेंच सर्व प्रांतिक सरकारांनीं त्यांस कळविलें होतें. आपणास ज्यास्त उत्पन्न मिळावें ह्याबद्दल त्यांपैकीं प्रत्येकानें शिकस्त केली. आजच कित्येक प्रांतांचीं बजेटें तुटीचीं आहेत व नवी राज्यघटना आली नसती, तरी तो प्रश्न असाच बिकट राहिला असता. नव्या वाढविलेल्या मतदार संघामुळें व कायदेमंडळांमुळें होणारा जादा खर्च त्या मानानें गौण स्वरूपाचाच मानला पाहिजे. सध्यापेक्षां अधिक चांगल्या आर्थिक परिस्थितींत वरील प्रश्नाचा बिकटपणा विशेष तीव्रतेनें भासला नसता. ह्या सर्व साधकबाधक गोष्टींचा विचार करून भारतमंत्र्यांनीं असें जाहिर केलें आहे कीं, नव्या राज्यघटनेस आर्थिक परिस्थितीपासून धोका प्राप्त होणार नाहीं व प्रांतिक स्वायत्तता १ एप्रिल १९३७ रोजीं अंमलांत येण्यास हरकत नाहीं. ह्याप्रमाणें नवीन राज्यघटनेची मुहूर्तमेढ रोवली गेली आहे.

मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें ह्यांमध्यें उत्पन्नाची वाटणी सर ओटो निमायर ह्यांनीं अत्यंत समतोलपणानें केलेली आहे व तीमध्यें फेरफार करण्यास सबळ कारण नाहीं, असा अभिप्राय भारतमंत्र्यांनीं व्यक्त केला आहे. प्रांतिक स्वायत्तता यशस्वी होण्यासाठी प्राप्तीवरील करावर चढवलेल्या पट्ट्या (सर्चार्ज) जरूर पडल्यास चालू ठेवण्याचे कामीं भारतमंत्री सहाय करतील. प्राप्तीवरील करांत प्रांतिक सरकारांस वाटेकरी करण्याची सूचना निमायर शिफारसींप्रमाणें नियोजित मुदतीमध्यें फलद्रूप होईल असें निश्चितपणें सांगतां येत नाहीं, हा अभिप्राय प्रांतांमध्यें समाधानकारक वाटणें शक्य नाहीं. हिंदुस्थान सरकारास सर ओटो ह्यांच्या शिफारसी सर्वसाधारणपणें मान्य आहेत. प्रांतिक स्वायत्तता अमलांत येण्यामुळें मध्यवर्ती सरकारास सुरवातीस दरसाल २३/४ कोटि रुपये जादा खर्च येणार आहे. ही रकम हिंदुस्थान सरकारच्या अंदाजापेक्षां फारच मोठी असली, तरी नव्या राज्यघटनेस योग्य सुरवात व्हावी, ह्यासाठी तितकी झीज त्यानें सोसण्याचें ठरविलें आहे. जादा खर्च झेपले किंवा नाहीं हें पुढील कांहीं वर्षांतील परिस्थितीविषयींचा अंदाज खरा ठरण्यावरच अवलंबून रहाणार, हें उघड आहे. (१) हिंदुस्थान युद्धाचे वणव्यांत सापडण्याचा संभव, (२) अंतर्गत राजकीय चळवळीचा प्रादुर्भाव, (३) रेल्वेजचें उत्पन्न कायम टिकून तें वाढण्याची शक्यता आणि (४) जकातीच्या उत्पन्नांत घट होण्याचा संभव ह्या चार बाबी विचारांत घेतां त्यांपैकीं युद्धासंबंधानें कांहींच अंदाज करणें शक्य नाहीं हें उघड आहे. राजकीय चळवळीची आपणास भीति वाटत नाहीं, असें मात्र हिंदुस्थान सरकारनें आपलें मत व्यक्त केलें आहे. रेल्वेजचें उत्पन्न वाढविण्याची तजवीज तात्काल केली पाहिजे असा त्यांचा विशेष आग्रह आहे. मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्नांत जकातीचें उत्पन्न ही एक महत्त्वाची बाब आहे व तें कायम राखण्यासाठी त्यांचे दर हळूहळू कमी करावे लागतील असा त्यांचा अभिप्राय आहे. एकंदरीनें पाहतां, हिंदुस्थान सरकारनें निमायर शिफारसी मान्य केल्या असून प्रांतिक स्वायत्तता यशस्वी होण्यास परिस्थिति अनुकूल राहील, अशी आशा व्यक्त केली आहे.

## नव्या राज्यघटनेच्या सुरवातीचा संक्रमण काल

नवी राज्यघटना अंमलांत येण्यापूर्वीच्या संक्रमणावस्थेंत राज्यकारभार कसा चलावा ह्या बाबतची योजना ऑर्डर इन कौन्सिलच्या स्वरूपांत पार्लमेंटपुढें ठेवण्यांत आली आहे. प्रांतिक स्वायत्ततेस १ एप्रिल १९३७ रोजीं सुरवात होईल. नवीं कायदेमंडळें अस्तित्वांत येऊन त्यांनीं पास केलेल्या अंदाजपत्रकास गव्हर्नरांची अनुमति मिळण्यापूर्वीच्या मुदतीमध्यें सहा महिनेपर्यंतच्या खर्चाची तजवीज करण्याचा अधिकार गव्हर्नरांस राहील. ह्या खर्चाची रकम प्रांताच्या पूर्वसालच्या दुरुस्त अंदाजपत्रकांतील खर्चाचे निम्म्याहून ज्यास्त असतां कामा नये. नव्या कायदेमंडळापुढें ठेवण्यांत यावयाच्या पहिल्या अंदाजपत्रकांत वरील खर्ची रकमांचा अंतर्भाव करावा लागेल. हा खर्च आपल्या अधिकारांतच गव्हर्नर मंजूर करूं शकतील व मंजुरी न मिळालेल्या बाबी पुरवणी अंदाजपत्रकाचे रूपानें कायदेमंडळापुढें मांडतां येतील. प्रांतिक स्वायत्तता सुरू झाल्यावर बारा महिनेपर्यंत पूर्वीचेच कर कायम चालू ठेवण्याचा गव्हर्नरांस अधिकार आहे. प्रांतिक स्वायत्ततेस प्रारंभ झाल्यावरहि त्यापूर्वी प्रचलित असलेले कायदेमंडळाचे कायदे नव्या मंडळाकडून रद्द अगर दुरुस्त होईपर्यंत अंमलांत रहातील. नव्या राज्यघटनेमध्यें प्रांतिक सरकारांकडे सोंपविलेलीं कामें फेडरेशन सुरू होईपर्यंत वर्षभर प्रांतिक सरकारांनींच करावयाचीं आहेत.

### नव्या कायदेमंडळाच्या निवडणुकी

नव्या राज्यघटनेच्या नियमांप्रमाणें प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुकीचे वेळीं मतदारांना आणण्या-नेण्यासाठी भाड्याचीं वहानें उपयोगांत आणणें बेकायदेशीर होणार नाहीं. चालू नियमांप्रमाणें असें करणाऱ्या उमेदवाराची निवडणूक बेकायदा ठरते. कायदेमंडळांची मुदत नव्या घटनेंत वाढली असल्याकारणानें निवडणुकींमध्यें मत देण्यास अगर उमेदवार म्हणून उभे रहाण्यास मनाई करण्याच्या ज्या शिक्षा आहेत, त्यांचीहि मुदत गुन्हा मोठा अगर लहान असेल त्या मानानें सहा व चार वर्षांची असावी असें ठरलें आहे. निवडणुकीप्रीत्यर्थ व्हावयाच्या खर्चाची कमाल मर्यादाहि घालून देण्यांत येईल.

### सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारांचा रत्नागिरी जिल्ह्यांतील दौरा

श्री. पंजाबी, आय. सी. एस., रजिस्ट्रार, को. सो. पुणें हे ता. १९ ते २४ मे पर्यंत रत्नागिरी जिल्ह्यांत दौऱ्यावर होते. या मुदतींत त्यांनीं वेंगुर्लें, मालवण, राजापूर, शिपोशी, रत्नागिरी व धामणी येथें तेथील व आजूबाजूचे सोसायट्यांची तपासणी केली. या वेळचे त्यांचे तपासणीचा विशेष म्हणजे प्रत्येक सोसायटीच्या अडचणी समजाऊन घेऊन त्यांवर उपाययोजना सुचविणें हा होता.

वेंगुर्लें येथें नवीनच रजिस्टर झालेल्या अर्बन बँकेचा उद्घाटण समारंभ त्यांचे अध्यक्षतेखालीं ता. २०।५।३६ रोजीं साजरा झाला. त्या वेळीं त्यांनीं आपल्या भाषणांत अर्बन बँकांचे हेतु, कार्य, त्यांचे नियमांतून भागीदारांस शे. ७½ चेवर डिव्हिडंड देण्याची मनाई ठेवण्याचे हेतु, फायद्यापैकीं शे. २५ रिझर्व्ह फंडांत घालण्याचें महत्व, वगैरे मुद्दे विशद करून सांगितले.

रत्नागिरी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटला त्या संस्थेचे ऑफिसांत त्यांनीं ता. २६।५।३६ रोजीं भेट दिली. त्यावेळीं इन्स्टिट्यूटचे वतीनें त्यांस एक मानपत्र देण्यांत आलें. त्यांत श्री. पंजाबी यांनीं ह्या जिल्ह्याकरितां आजपर्यंत केलेलें कार्य नमूद असून कार्यकर्त्यांच्या अडचणी सांगितलेल्या होत्या. बऱ्याच चर्चेनंतर त्यांनीं (१) खोती गांवांतून नवीन शेतकी पतपेढ्या काढण्यास संमति दिली. (२) नवीन अर्बन बँकांस सध्या तालुका ट्रेझरीवर आर. टी. आर. मिळत नाहींत ते मिळण्याची खटपट चालू असल्याचें सांगितलें व (३) जिल्हा ग्रामसुधारणा कमेटीचे मार्फत विणकाम, सुतारकाम, टोपल्या विणणें वगैरेसारख्या ग्रामोद्योगांस उत्तेजन देण्याकरितां स्वतंत्र सोसायट्या काढण्यास सुचविलें.

जिल्हा इन्स्टिट्यूट, तिचे प्रचारक श्री. भाटवडेकर ह्यांचेमार्फत तिचें कार्य—सहकारी चळवळीचा प्रचार व सोसायट्यांची सुधारणा—चांगलें करीत असल्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें व मानपत्रांत सोसायट्यांवर देखरेख करण्याकरितां स्वतंत्र सुपरवायझिंग युनिअन काढण्यापेक्षां इन्स्टिट्यूटकडेच तें काम सोंपवावें या केलेल्या मागणीचा आपण सहानुभूतिपूर्वक विचार करूं असें त्यांनीं सांगितलें.

---

### व्यापारी प्राथमिक व दुय्यम परीक्षा

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ह्या संस्थेनें व्यापारी प्राथमिक व दुय्यम परीक्षा घेण्याचा जो उपक्रम केला आहे त्याचा मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या कार्यकारी मंडळानें आपल्या ता. ३० माहे मार्च सन १९३६ रोजीं झालेल्या सभेंत विचार केला. व्यापारी आपले व्यवहार जुन्या पद्धतीनें करतात. त्यांच्याकडील नोकरवर्गाला वरील प्रकारचें व्यापारी शिक्षण मिळाल्यास तो वर्ग आपलें काम अधिक उपयुक्त रीतीनें करूं शकेल ह्या दृष्टीनें त्या योजनेचा विचार करून तिचा योग्य तो फायदा करून घ्यावा, अशी मराठा चेंबरनें एक पत्रक काढून आपल्या सभासदांस विनंति केली आहे.

---

### महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचें मासिक मुखपत्र

ह्या मुखपत्राचा एप्रिल-मे चा जोड अंक प्रसिद्ध झाला आहे. त्यामध्यें मध्यवर्ती पाट (ज्यूट) कमिटीवरील लेख, पेणकर कटलरी कंपनीची माहिती, नीमायर रिपोर्टांतील सूचनांचा सारांश, इत्यादि उपयुक्त मजकूर प्रसिद्ध झाला आहे.

---


**धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०**

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

**CONFIDENCE**

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**

**This year 1934-35**
**Exceeds**
**2 CRORES & 50 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

**HINDUSTHAN**

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

# सहकारी चळवळ

**सहकारी चळवळीचे व्यवस्थेंत सरकारचे अधिकार वाढणार**

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीचें नियंत्रण १९२५ च्या सहकारी सोसायट्यांच्या कायद्यानुसार होतें.ह्या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी जरूर ते नियम करण्याची सत्ता सरकारनें आपणाकडे राखून ठेवलेली आहे. फक्त ते कायम करण्यापूर्वी त्यांस प्रसिद्धी देण्याचें बंधन सरकारावर आहे. हे नियम मुंबई कायदेमंडळाची पुढची बैठक भरण्यापूर्वी एक महिना कायदेमंडळाच्या टेबलावर ठेवावयाचे असतात व त्यांत दुरुस्ती करण्याचा अगर ते नामंजूर करण्याचा त्यास अधिकार असतो. मुंबई सरकारनें योजिलेल्या कांहीं नियमांचा मसुदा वरील कायद्यास अनुसरून जाहीर करण्यांत आला आहे व ३१ मे, १९३६ च्या आंत पोंचणाऱ्या त्यासंबंधांतील तक्रारी अगर सूचना सरकार विचारांत घेईल, असें प्रसिद्ध झालें आहे.

सहकारी सोसायट्यांबाबतच्या नियमांत ४७ व्या नियमापुढें खालील ४८ वा नियम घालण्यांत यावयाचा आहे:—

“ जरुर वाटल्यास त्याप्रमाणें गॅझिटांत जाहीर करून व त्या संबंधांतील कारणें नमूद करून ( अ ) कोणत्याहि सोसायटीच्या विद्यमान कमिटीचे ऐवजीं नवीन कमिटी सरकार नेमूं शकेल किंवा ( ब )कमिटीच्या कांहीं सभासदांस दूर करून त्यांचे जागीं एक किंवा अधिक सभासदांची नेमणूक तें करील. वरील ( अ ) प्रमाणें नेमलेल्या कमिटींत नवाहून ज्यास्त सभासद असणार नाहींत. वरील प्रमाणें नेमणुका करण्यापूर्वी सोसायटीस पैसे पुरवणाऱ्या बँकेचा, सोसायटीच्या कमिटीचा व सभासदांचा जरूरीप्रमाणें सल्ला घेण्यांत येईल. परंतु तातडीचे प्रसंगीं तो घेण्यास सरकार बांधलेलें नाहीं. सरकारनियुक्त कमिटीच्या अधिकाराची कमाल मुदत तीन वर्षें असेल, परंतु (ब) प्रमाणें नेमलेल्या इसमांचें सभासदत्व त्यांनीं ज्यांची जागा घेतली असेल,त्यांच्या मुदतीपुरतेंच राहील. नवीन कमिटया व सभासद ह्यांस सर्व वाजवी अधिकार मिळतील.नव्या कमिटीस जुन्या कमिटीचे बायलॉज बंधनकारक होतील, परंतु गणसंख्या मात्र तीन असेल. ”

---

**शेतकी सहकारी पतपेढीचे पोटनियम ( अ ) १**

नवीन शेतकी सहकारी पतपेढ्या स्थापन करण्याचे बाबतींत सुधारलेले शेअरपद्धतीचे पोटनियम अ ( १ ) च्या प्रति सहकारी खात्याकडे शिल्लक नसल्यानें अत्यंत अडचण भासत होती. ती अडचण दूर करण्याचें हेतूनें अहमदनगर डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटनें जरूर त्या सर्व दुरुस्तीसह व पोटनियमांसह अ ( १ ) पत्रकाच्या प्रती तयार करून छापून घेतल्या आहेत. रजिष्ट्रारसाहेबांची त्यास अगाऊ संमति मिळालेली आहे. सोबत नवीन शेतकी सहकारी पतपेढ्या स्थापन करण्यास लागणारी जरूर ती सर्व माहिती सुलभ रीतीनें जोडली आहे. सदरील प्रती नगर को. इन्स्टिट्यूटकडे विकत मिळतील. तरी गरजूंनीं त्या बाबतींत नगर इन्स्टिट्यूटशीं पत्रव्यवहार करावा.

---

**टॅक्सी ड्रायव्हरांची सहकारी सोसायटी**

मुंबई येथील टॅक्सी ड्रायव्हर्स यूनियनचा स्वत:साठी एक सहकारी सोसायटी काढण्याचा विचार आहे. यूनियनच्या सभासदांसाठीं पेट्रोल पंप उघडणें व मीटर दुरुस्तीचीं कामें हातीं घेणें हा सदरहु सोसायटीचा सुरवातीस उद्देश राहील.

**सहकारी सोसायट्यांच्या लिक्विडेशनबाबत नियम**

इंदूर येथील को-ऑपरेटिव्ह ‘ रोटरी क्लब ’मध्यें सहकारी संस्थांच्या लिक्विडेशनसंबंधीं गेल्या मासिक सभेंत चर्चा झाली. वाईट अवस्थेस पोंचलेल्या सोसायट्या गुंडाळण्यासाठी लिक्विडेटरची रजिस्ट्रारनें नेमणूक केली व त्यानें सोसायटीच्या कामकाजाचा ताबा घेतला, कीं सोसायट्या को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्टाच्या कक्षेबाहेर जातात व लिक्विडेशनचें काम सिव्हिल प्रोसीजर कोडाप्रमाणें चालतें, अशी सध्याची परिस्थिति असल्याचें रोटरी क्लबाचे निदर्शनास आलें. लिक्विडेशनचें काम चालू असतांना सोसायट्यांचे व्यवहारांवर रजिस्ट्रारचाच ताबा रहावा, अशी नियमांत दुरुस्ती करणें आवश्यक आहे, असें मत व्यक्त करण्यांत आलें.

---


**Dawn of India's Insurance field-workers' Training Institute. Poona.**

**The training course will commence by the 1st of July 1936.**

Applications are invited from Matriculates for admission to the Training Institute. Candidates who join the Institute are also coached up for Advocate's examination.


Apply for Prospectus to:—

99, Laxmi Road, POONA.

D. V. Atre, B. A. (Hons.); LL. B. Principal.



**किर्लोस्कर पोलादी फर्निचर**



खुर्च्या, टेबल, बांक, कोंच, शेल्फ, कपाट, पलंग, स्टुलें, पाळणे इ. इ.

**मजबूत बांधणी : उत्तम प्रकारचें फिनिश.**

ठिकठिकाणच्या किर्लोस्कर एजंटकडे अगर थेट खालील पत्त्यावर मागणी करा.

**किर्लोस्कर बंधु, लिमिटेड, किर्लोस्करवाडी.**

( जि. सातारा )

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११-१४ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०-१३ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—८ |
| ४% १९६०—७० ... ... | ११५—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९८-१३½ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०७—२ |
| ४% १९४३ ... ... ... | १११—२ |
| २¾% १९४८—५० ... ... | १००—२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०९—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०७—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०८—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | १०८—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३—६३ ) ... | ११०—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३०—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११०—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३३-१० |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३२—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | ९९—८ |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ८९२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५८—२ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २२५—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २५०—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १५९५—५ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५६८—१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७०—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८०—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ६९६—४ |


**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्रॉव्हिडंट विमा कं.

**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**

च्या लोकप्रिय प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठी लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

आपले घरीं सालाचे बेगमीचें मीठ घेणेपूर्वी आपले वाण्याजवळ

**सॉलर सॉल्ट**

बद्दल चौकशी करणेस विसरूं नका. ह्या मिठाची १ किंवा २ मणाची गोणी घेतल्यास आपला मीठ सुकवण्याचा, दळण्याचा व रांजणांत भरून ठेवण्याचा सर्व त्रास वांचेल. हें मीठ गोणींतच पण निवाऱ्याचे जागीं ठेवल्यास भर पावसाळ्यांत पाझरत नाहीं. आपले वाण्याजवळ नसल्यास आम्हांला लिहा.

रिप्रेझेंटेटिव्ह— एम. बी. भिडे, तुळशीबाग, पुणें २

Uran Salt Works. 583, Chira Bazar, Bombay 2.

**पहिल्यानें सुरक्षितता**

रस्त्यावरून जातांना तुम्ही सुरक्षिततेचा मार्ग पहिल्यानें पहातां. हीच गोष्ट पैसे बँकेंत किंवा विम्यांत गुंतविण्यासंबंधीं आहे. पहिल्यानें तुम्ही पैशाची सुरक्षितता पहातां; नंतर व्याज किंवा बोनस.

हिशेब तपासणी आणि प्रतिनिधित्व सरकारी खात्याकडे असल्यानें

**दि बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लि.**

मध्यें आपले पैसे गुंतविल्यास कसलाच धोका नाहीं.

सविस्तर माहितीकरितां लिहा—

कुळकर्णी आणि कंपनी चीफ ऑर्गनायझर्स | चुनीलाल डी. बरफीवाला मॅनेजिंग डायरेक्टर.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

# दि बॉंबे लाइफ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड.

( स्थापना १९०८ )

प्रगति

कंपनीची लोकप्रियता सिद्ध करते

कमाल प्रगति : पुरें केलेलें नवीन काम मिळविलें तें

| | | |
|---|---|---|
| १९२५ | : | रु. २२,१८,५०० |
| १९२७ | : | रु. ३८,७७,००० |
| १९२९ | : | रु. ५१,२२,५०० |
| १९३१ | : | रु. ५८,६६,५०० |
| १९३३ | : | रु. ९४,१६,५०० |
| १९३५ | : | रु. १,२३,२८,००० |

माफक हप्ते, भरपूर बोनस, क्लेम्सची तात्काळ भरपाई, व पॉलिसींतील सवलतींच्या अटी हें " बॉंबे लाइफ पॉलिसी " चें वैशिष्ट्य आहे.

एजन्सी व पॉलिसी ह्यासंबंधींच्या तपशिलासाठीं लिहाः—
मॅनेजर,
बॉंबे लाइफ बिल्डिंग, ४५।४७, चर्चगेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

प्रो. काळे ह्यांचें नवीन पुस्तक

## रिझर्व्ह बँक

हिंदुस्थानांत राष्ट्रीय मध्यवर्ती बँक ह्या नात्यानें रिझर्व्ह बँकेची स्थापना होऊन त्या संस्थेचें काम चालू झालें आहे. रिझर्व्ह बँकेची घटना, तिच्या कार्याचा व्याप, तिचा इतर बँकांशीं संबंध इत्यादि विषयांची सांगोपांग माहिती ह्या पुस्तकांत दिली असून रिझर्व्ह बँकेच्या कायद्याच्या निरनिराळ्या कलमांची छाननी केलेली आहे. अवघड विषयाचा सुलभ बोध व्हावा म्हणून पुस्तक-कर्त्यानें बँकिंगच्या धंद्यांतले आधुनिक प्रकारचे व्यवहार, त्यांची उपपत्ति व त्यांचें कार्य ह्यांचा अत्यंत सोप्या मराठी भाषेंत चर्चा केली आहे आणि देशी व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें कोणत्या योजना अंमलांत आणल्या पाहिजेत ह्या संबंधानें व्यावहारिक सूचना केल्या आहेत. रिझर्व्ह बँक ही, राष्ट्रीय आर्थिक प्रगतीस परिपोषक होईल काय ? ह्या प्रश्नास प्रस्तुत पुस्तकांत उत्तर मिळण्यासारखें आहे.

पृष्ठें १३०-किंमत १ रुपया ( ट. हं. वेगळें )

पुस्तक मिळण्याचीं ठिकाणें:—

( १ ) व्यवस्थापक, "अर्थ" ग्रन्थमाला, पुणें ४.
( २ ) आर्यभूषण प्रेस, पुणें २.
( ३ ) दि को-ऑपरेटर्स बुकडेपो, ९, वेकहौस लेन, फोर्ट, मुंबई.

प्रो. काळे ह्यांचें

'अर्थ' ग्रन्थ मालेंतील तिसरें पुस्तक

## व्यापारी उलाढाली

महाराष्ट्रांत व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांचा उत्कर्ष व्हावा असें प्रत्येकास वाटतें, परंतु ह्या संबंधांत जे व्यवहार चालतात त्यांची माहिती फार थोड्या लोकांस असते. सामान्य जनतेस कमाईतून बचत करण्याची संवय लागून तीमधून निर्माण होणाऱ्या द्रव्यसंग्रहाचा उपयोग, व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या अभिवृद्धीकडे व्हावा, ह्याकरितां औद्योगिक व व्यापारी मंडळ्या ह्यांचे व्यवहार कसे चालतात, बाजारांत निरनिराळ्या प्रकारांच्या उलाढाली कशा होतात, इत्यादि विषयांचें ज्ञान महाराष्ट्रीय समाजांत पसरणें आवश्यक आहे. वृत्तपत्रांमध्यें व एकिवांत ह्या संबंधांत ज्या बातम्या येतात, त्यांचें रहस्य ओळखण्याची पात्रता लोकांमध्यें उत्पन्न झाली पाहिजे. हें ज्ञान महाराष्ट्रीय लोकांस सुगम रीतीनें व्हावें, ह्या उद्देशानें प्रस्तुत पुस्तक मुद्दाम लिहिलें आहे आणि त्याचा योग्य उपयोग जनता करून घेईल असा ग्रंथकर्त्यास विश्वास वाटत आहे.

पृ० १४३—किंमत १ रुपया. ( ट. हं. वेगळें )

मिळण्याचीं ठिकाणें:—

( १ ) व्यवस्थापक, ' अर्थ ' ग्रंथमाला, पुणें ४.
( २ ) आर्यभूषण प्रेस, पुणें २.
( ३ ) दि को-ऑपरेटर्स बुक-डेपो, ९ वेकहौस लेन, फोर्ट, मुंबई.

## K. K. & Co.

Photographic Dealers

POONA.

## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली


हें पत्र पुणें, पेठ मांयुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' मांयुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हांशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ | पुणें, बुधवार, तारीख १०, जून १९३६. | अंक २४

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

**MARATHE & Co.**

ENGINEERS & IRON FOUNDERS

WORKS : Natu Bag, Bhikardas Road, POONA 2

Can undertake to do any sort of casting.

We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act.

**Our prices are very competitive.**

OFFICE : 978-79, Sadashiv, Laxmi Rd., POONA 2

**Dawn of India's Insurance field-workers' Training Institute. Poona.**

**The training course will commence by the 1st of July 1936.**

Applications are invited from Matriculates for admission to the Training Institute. Candidates who join the Institute are also coached up for Advocate's examination.

Apply for Prospectus to:—

99, Laxmi Road, POONA. — D. V. Atre, B. A. (Hons.); LL. B. Principal.

**माधव सोमण ब्रदर्स**

आम्हीं स्वतः तयार केलेलीं लुगडीं व इतर पेठांचा माल खात्रीलायक गिऱ्हाइकांस विकतों.

हुजूरपागेसमोर, पुणें २.

**" दुसरें मूल्यमापन जाहिर झालें "**

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली

पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—

**कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.**

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

**" अर्थ " ग्रन्थमाला**

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकं.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

# विविध माहिती

### कॅनडामधील कोंबड्या व अंडीं

जगांतील कोणत्याहि देशामधील लोकांपेक्षां कनेडिअन लोक ज्यास्त अंडीं खातात. तेथें दरसाल प्रत्येक मनुष्य सरासरीनें ४०० अंडीं संपवितो. १९३५ सालीं त्या देशांत एकूण २२½ कोटि अंडीं खपलीं. तेथील कोंबड्यांची संख्या २½ कोटि असून प्रत्येक कोंबडी सरासरीनें दरसाल ११२ अंडीं घालते.

### इटली–ॲबिसिनिया युद्धांतील बळी

ॲबिसिनियामधील युद्धांत इटलीचे २,७६६ गोरे व १,५९३ तद्देशीय सैनिक कामास आले, असें प्रसिद्ध झालें आहे.

### म्हैसूर सरकार रेल्वे ताब्यांत घेणार

म्हैसूर संस्थानांतील रेल्वेजची व्यवस्था मद्रास अँड सदर्न मराठा रेल्वे कंपनीकडे आहे, ती म्हैसूर सरकार स्वतःकडे घेणार असल्याचें जाहीर झालें आहे. १ जुलै रोजीं ही वर्गावर्गी झाली,म्हणजे म्हैसूरचे ताब्यांत एकूण ७२२ मैल लांबीचे रेल्वेचे फाटे येतील.

### महाबळेश्वर येथें विजेचे दिवे लागणार

महाबळेश्वर येथें विजेचा पुरवठा करण्याचें लायसेन्स, मुंबई येथील दि प्रेशस इलेक्ट्रिक कंपनीस मिळालें आहे व कंपनीनें खांब पुरण्यास सुरवात केली आहे.

### भिल्ल लोकांचा आयुष्यक्रम दाखविणारा चित्रपट

'इलस्ट्रेटेड वीकली ऑफ इंडिया' चे संपादक, मि. जेम्सन, ह्यांनीं खानदेशांतील भिल्ल, गोंड, इत्यादि जातींचा आयुष्यक्रम दाखविणारी एक फिल्म तयार केली आहे व त्यांत जरूर त्या सुधारणा करण्यासाठीं ती अमेरिकेस पाठविण्यांत येणार आहे.

### दाट वस्तीचीं घरें

दोन खोल्यांच्या बिऱ्हाडांत तीनपेक्षां अधिक माणसें रहात असलीं तर तीं अनिष्ट प्रकारच्या दाटीचीं घरें समजावीं अशी व्याख्या केल्यास इंग्लंड व वेल्स मिळून ७० लक्ष माणसें ह्या प्रकारच्या घरांत रहातात असें आढळतें. आरोग्य व सोय यांच्या दृष्टीनें ही अवस्था अनिष्ट असल्याविषयीं तक्रार करण्यांत येत आहे. दाट वस्तीच्या बिऱ्हाडांची वरील व्याख्या हिंदुस्थानांतल्या लोकांच्या रहाणीस लागू केली तर काय दिसेल ?

### सैन्यांतून पळून जाणारे सैनिक

सैन्यांतील नोकरी सोडून जाण्याचें प्रमाण मंदीचे काळांत कमी असतें व सुबत्तेच्या दिवसांत तें वाढतें, असा अनुभव आहे. सर्वसाधारणपणें शंभरांतले सुमारें दोघेजण पळून जातात, परंतु सुबत्तेच्या काळांत हें प्रमाण सातांवर जातें, असा अमेरिकेमधील अनुभव आहे.

### अमेरिकेचा आरमारावरील खर्च

अमेरिकेचें सरकारी दप्तराचें नवें वर्ष १ जुलै रोजीं सुरू होतें. ह्या नवीन सालाकरितां आरमाराप्रीत्यर्थ सुमारें १½ अब्ज रुपये मंजूर करण्याचें ठरलें आहे !

### फ्रान्समधील संप मिटला

फ्रान्सचे मुख्य प्रधान, मि. ब्लम, ह्यांच्या मध्यस्थीमुळें तेथील उग्रस्वरूप धारण करणारा कामकऱ्यांचा संप मिटला आहे. फ्रेंच चलन व हुंडणावळ ह्यांचे बाबतींत ते कोणतें धोरण स्वीकारतात हें लवकरच दिसून येईल.

### बँकांस सुट्टी

ता. १३ जून रोजीं 'झरथोस्त–नो–दिसो' निमित्त बँका बंद राहतील.

### ब्रिटिश वसाहत मंत्र्यांनीं गौप्यस्फोट केल्याचें सिद्ध झालें

१९३६–३७ च्या ब्रिटिश बजेटांतील आगामी करवाढीचा, पार्लमेंटांत बजेट दाखल होण्यापूर्वी, गौप्यस्फोट केल्याचा ग्रेट ब्रिटनचे वसाहतमंत्रि मि. टॉमस ह्यांजवरील आरोप, चौकशी कमिशननें एकमतानें शाबीत धरला आहे. मि. टॉमस ह्यांनीं कमिशनच्या कामास सुरवात होतां क्षणींच आपल्या जागेचा राजीनामा दिला होता.

### पंजाबमध्यें पदवीधर शेतकरी

पदवीधर तरुणांस शेतीचा धंदा करून उपजीविका करतां यावी ह्या हेतूनें त्यांचेसाठीं वसाहती बनवण्याच्या योजनेची तयारी पंजाब सरकारनें चालविली आहे. पदवीधरांनीं जमीन कुळांस लावून न देतां स्वतः करावयाची आहे, तथापि योग्य सुखसोयींची तरतूद वसाहतींमध्यें करण्यांत येईल.

### राजवाड्यांत तीस टायपिस्ट

ब्रिटिश बादशहांच्या बकिंगहॅम राजवाड्यांत तीस टायपिस्ट आहेत. त्यांचा दर्जा व कामाची व्यवस्था हीं अत्यंत समाधानकारक आहेत

### कोट्याधीश कमी होत चालले

सहा वर्षांपूर्वी इंग्लंडमध्यें ८१९ कोट्याधीश होते. त्यांची संख्या हळूहळू घटत चालली असून दोन वर्षांपूर्वी ती निम्म्यावर आली. संपत्तीच्या विभागणीची विषमता कमी होणें व आर्थिक मंदी हें सदरहु प्रवृत्तीचें कारण असावें.

### अमेरिकेंतील मोटारवाले

अमेरिकेंत गेल्या वर्षी स्वतःच्या मालकीची मोटार असलेले अडीच कोटि नागरिक होते आणि त्यांनीं मोटारींच्या संबंधांत सुमारें ३५० कोटि रुपये इतका कर निरनिराळ्या स्वरूपांत भरला. म्हणजे प्रत्येक मोटारवाल्यास सरासरीनें १४० रुपये कर द्यावा लागला.

### केनियांतील वृद्ध हिंदी व्यापाऱ्याचा मृत्यु

कराचीहून १८८८ सालीं प्रथम केनियांत जाऊन उद्योगधंद्याच्या जोरावर प्रतिष्ठा पावलेले मि. जेरवानजी नांवाचे मुसलमान गृहस्थ वयाचे ८२ व्या वर्षी नैरोबी येथें मृत्यु पावले.

### मुंबई येथील आंबा प्रदर्शन

ता. ७, ८ व ९ रोजीं मुंबई येथें भरलेल्या आंबा प्रदर्शनांत वेगवेगळ्या ६०जातींचे आंबे ठेवण्यांत आले होते. मुंबई येथील मलबार हिलवरील झाडाचा हापूस आंबा सर्वोत्कृष्ट ठरला. सर्वांत जड आंब्याचें वजन दोन शेर भरलें.

### डनलॉप कंपनीचे रबराचे मळे

डनलॉप रबर कंपनीनें गेल्या दहा वर्षांत सुमारें ३५ हजार एकरांमध्यें रबराची लागवड केली आहे. दर एकरांतून सरासरीनें एक हजार पौंड रबर मिळतें.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. ३० मे रोजीं पुरा झालेला आठवडा | ८५,६६,१६५ |
| ता. ६ जून रोजीं पुरा झालेला आठवडा | ६६,५०,९३९ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते ता. ६ जून १९३६ अखेर | २,७२,१३,७५,३८८ |

अनुक्रमणिका


| पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ विविध माहिती ... २८४ | पुरविणारी कचेरी-पारशी समाजामधील बेकारी-निवारण | |
| २ लहान प्रमाणावरील उद्योग-धंद्यांचें महत्त्व ... २८५ | ६ सहकारी चळवळ ... २९० | |
| ३ जगांतील पहिल्या प्रतीची आगबोट ... ... २८६ | बार्शी सेंट्रल बँक-श्री. भागवत ह्यांची कर्तव्य-निष्ठा-सारस्वत को. बँक-मुंबईंत सहकारी पतपेढी | |
| ४ रेशमी किड्यांची निर्गत २८६ | ७ खेड्यांतील जनावरें सुधारण्याची योजना ... २९१ | |
| ५ स्फुट विचार ... २८७ | ८ सहकारी पतपेढ्यांचा नवीन ४८ वा नियम २९२ | |
| नवीन कर्ज कां काढलें?-ॲबिसिनिया इटलीच्या साम्राज्याचा घटक झाला-पुढें काय?-अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ-व्यापारविषयक माहिती | ९ निवडक बाजारभाव २९३ | |



# अर्थ

बुधवार, ता. १० जून, १९३६


## लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यांचें महत्त्व

### ग्रामोद्योग संघ व सरकार ह्यांचें कार्य

म्हैसूर येथील स्वदेशी प्रदर्शनांत श्री. कुमाराप्पा ह्यांनीं अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ व त्याचें कार्य या विषयावर केलेल्या भाषणाचा सारांश प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील कांहीं मुद्दे मननीय असल्यानें त्यांकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. "मागें शेती व उद्योगधंदे ह्यांची एकमेकांस जोड होती आणि लोकांच्या जरूरीचे जिन्नस देशी कारागीर तयार करीत. अलीकडे विलायती व देशांतल्या देशांतच कारखान्यांमध्यें तयार होणारा माल वापरण्याची सामान्य जनतेसहि संवय लागल्यानें शेतीच्या धंद्यांत गर्दी होऊन तो धंदा उदरभरणास अपुरा बनला आहे. लोक कारखान्यांत वाढत्या प्रमाणांत मजूरी करूं लागल्यानें आणि देशी कलाकुसरीच्या वस्तूंस पूर्वीसारखी मागणी नसल्यानें कारागिरीचा ऱ्हास झाला आहे. ह्याचा एकूण परिणाम दारिद्र्य व बेकारी ह्यांत झाला आहे." हिंदुस्थानाच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितीचें श्री. कुमाराप्पा यांनीं केलेलें हें निदान पुष्कळ अंशीं योग्य आहे आणि हिंदी अर्थशास्त्रज्ञ हेंच सांगत आले आहेत. त्यांनीं काढलेले चार सिद्धांतहि सर्वसामान्य रीतीनें मान्य होण्यासारखे आहेतः-(१) मागणी अस्तित्वांत नसतां मालाची उत्पत्ति झाल्यानें तो माल गिऱ्हाइकांवर लादण्याचे प्रयत्न करण्याची प्रवृत्ति निर्माण होते; (२) बाजारपेठा लक्षांत न घेतां कारखानदार माल काढतात तेव्हां उत्पादनाच्या बाबतींत स्पर्धा होऊन पुरवठा फाजील होतो; (३) कारखान्यांत मोठ्या प्रमाणावर माल काढल्यानें कामकरी लोकांतला माणुसपणा नाहींसा होऊन ते निर्जीव यंत्रें बनतात, (४) यंत्रांच्या सहायानें मोठ्या प्रमाणांत कारखाने चालण्यानें लक्षावधि लोकांस किफायतशीर उद्योग मिळण्याची मारामार पडून बेकारीचा फैलाव होतो. सुदैवानें हिंदी कारागिरी अजून सर्वस्वी नष्ट झालेली नाहीं आणि त्यांचें आधुनीकरण सल्ला व सहाय देऊन होणें शक्य आहे. हें घडवून आणणें हाच अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाचा मुख्य उद्देश आहे, अशा रीतीचें श्री. कुमाराप्पा ह्यांचें सांगणें आहे.

सर्वस्वी मोठ्या प्रमाणावरच्या कारखान्यांमध्येंच संपत्तीचें उत्पादन झालें पाहिजे अशा मताचे कांहीं लोक आहेत. त्याच्या उलट, यांत्रिक उत्पादनास सर्वथा विरोध करणारांचाहि एक वर्ग आहे. वस्तुतः, ह्या दोन्ही भूमिका आत्यंतिक व एकांगी स्वरूपाच्या असून मोठ्या व लहान प्रमाणावरील धंद्यांचें मिश्रण होऊन त्यांचा मेळ बसणें हेंच हितकारक आहे. हिंदुस्थान देशाची आज परिस्थितीच अशी आहे कीं, येथें वरील मिश्र प्रकारची घडी बसवण्यावांचून गत्यंतर नाहीं. आपल्या देशांत जो माल तयार होत नाहीं तो परदेशांतून आणणें भाग आहे. पण हा माल तरी स्वदेशांत तयार होणाऱ्या जिनसांच्या मोबदला म्हणूनच घेतां येणें शक्य आहे, ही गोष्ट श्री. कुमाराप्पा यांनीं नमूद केली आहे आणि ग्रामोद्योगांची बाजू एकंदरीनें सयुक्तिक रीतीनें पुढें मांडली आहे. मोठमोठ्या धंद्यांस प्रथमावस्थेंत सरकारी संरक्षणाची आवश्यकता असते व शेतीच्या धंद्यासहि सरकारचें अनेकविध पाठबळ लागतें. ह्या कार्यक्रमास आपणांस आज हात घालतां येत नसून मोठ्या धंद्यांच्या बाबतींत कारखानदार स्वतःच्या हिताची जोपासना करण्यास समर्थ आहेत असें सांगून कापूस, तेलें, साखर, रेशीम, कागद, रंग इत्यादींच्या संबंधांत संघटन व प्रगति कशी करतां येईल ह्याचें त्यांनीं दिग्दर्शन केलें. खेडेगांवांत काम करणारांनीं तेथील जनतेशीं समरस होण्याच्या आवश्यकतेवर त्यांनीं भर दिला आणि आर्थिक उन्नतीच्या कामीं सरकार व लोक ह्यांचें परस्पर सहकार्य होण्याची जरूरी असल्याचें सांगितलें. म्हैसूर संस्थानचें ह्या बाबतींतलें धोरण प्रगमनशील असल्यानें ही गोष्ट तेथें शक्य होत आहे, हें उघड आहे. हिंदुस्थानाच्या इतर भागांतहि असें सहकार्य होण्यास अडचण पडतां कामा नये. खेडेगांवांच्या सुधारणेसंबंधानें सर्वत्र एकमत दिसून येत असून अलीकडे सरकार त्या प्रश्नांत विशेष लक्ष घालीत असल्याचें दिसतें. मुंबई इलाख्यांत लहान सहान उद्योग धंद्यांस द्रव्याची व इतर प्रकारची मदत देण्याचा उपक्रम प्रांतिक औद्योगिक खात्यामार्फत होत आहे, ही गोष्ट मि. अडवाणी ह्यांनीं कांहीं दिवसांमागें पुणें येथें आपल्या एका भाषणांत जाहीर केली होती. सरकारकडून हें सहाय जास्त प्रमाणांत मिळविण्याची खटपट लोकांनीं केली पाहिजे. छोटेखानी धंद्यांचें पुनरुज्जीवन व त्यांची प्रगति झाल्यावांचून आमच्या देशाच्या आर्थिक उन्नतीच्या मार्गांत पुढें पाऊल पडावयाचें नाहीं हें आतां स्पष्ट झालें आहे. म्हणून ह्या विषयाकडे विशेष लक्ष पुरवणें हें पुढाऱ्यांचें आणि सुशिक्षित वर्गाचें कर्तव्य आहे. हिंदुस्थान सरकारच्या आश्रयाखालीं मध्यवर्ती औद्योगिक संशोधनमंडळ स्थापन झालें असून अनेक लहानमोठ्या धंद्यांच्या संबंधांत त्याचें काम चालू आहे. गळिताच्या धान्यांपासून तेल काढण्याचा व त्याचा उपयोग करण्याचा धंदा उदाहरणार्थ घेतला तर त्या बाबतींत वरील मंडळाच्यामार्फत चौकशी झाली आहे आणि चालली आहे असें दिसतें. हें संशोधन कार्य तज्ज्ञांचें व खर्चाचें आहे आणि तें सरकारच्या सहायावांचून होणें हिंदुस्थानांत तरी कठीण आहे. त्याचा पूर्ण उपयोग करून घेण्याची लोकांनीं दक्षता बाळगली पाहिजे.

## जगांतील पहिल्या प्रतीची आगबोट : "क्वीन मेरी"

युरोप व अमेरिका ह्यांमध्यें प्रवाशांची नेहेमीं मोठी वहातुक चालू असते व ह्या दोन खंडांस विभागणाऱ्या अटलँटिक महासागरांतून प्रवाशांस आगबोटीनें प्रवास करावा लागतो. ही वहातुक अर्थातच आगबोट कंपन्यांस फलदायी होते व यामुळें ह्या धंद्यांत भयंकर चढाओढ निर्माण झाली आहे. युरोप ते अमेरिका हा प्रवास कमीत कमी वेळांत परंतु आरामशीर रीतीनें व्हावा, ह्या दृष्टीनें वहातुक-कंपन्या आपआपल्या आगबोटी त्वरित गतींच्या व सुखदायक अशा बनवण्याचे प्रयत्न करीत आहेत. सर्वांत उत्कृष्ट आगबोटीस अर्थातच स्पृहणीय महत्त्व प्राप्त होतें व आपोआपच ती आपल्या कंपनीची जाहिरात करते. दोन वर्षांपूर्वी फ्रान्स देशाच्या 'नॉर्मंडी' नांवाच्या आगबोटीनें हा मान पटकावला, त्यास ग्रेटब्रिटनच्या 'क्वीन मेरी' ह्या बोटीनें उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. मागें जर्मनी व इटली ह्या देशांच्या आगबोटींनीं हें उच्च स्थान मंडित केलेलें होतें व अमेरिकेचाहि त्या बाबतींत सध्या प्रयत्न चालू आहे. वास्तविक पहातां, अमेरिका व युरोप ह्यांमधील प्रवाशांच्या वहातुकीच्या मानानें आगबोटींमधील जागा जरूरीपेक्षां ज्यास्त झाली आहे. परीक्षेंत ज्याप्रमाणें पहिल्या नंबरास लागणारे शेवटचे पांच दहा गुण मिळविणें हेंच अवघड असतें, त्याप्रमाणेंच बोटींचा दर ताशीं दोन तीन मैल वेग वाढविण्यासाठीं खर्चांत वाढ फार होते. त्यामुळें वहातुक फायदेशीर पडत नाहीं व सरकारी सहायाखेरीज आगबोट कंपन्यांचें भागत नाहीं असा अनुभव आहे.

'क्वीन मेरी' नें ता. २६ मे रोजीं मोठ्या समारंभानें इंग्लंडमधील सौथहॅम्प्टन बंदरांतून ॲटलँटिक महासागरांत प्रथम प्रवेश केला. दर तीन आठवड्यांतून एकदां ह्याप्रमाणें जुलै २२ पर्यंत तीन प्रवास पूर्ण झाले म्हणजे तिच्या यंत्रांची तपासणी होऊन व जरूर त्या सुधारणा होऊन तिचीं नेहमीचीं पर्यटणें सुरू होतील. व्यापारीवर्गास वेळेचें महत्त्व विशेष असतें. ह्या कारणानें पुढेंमागें विमानमार्गाचा ते अवलंब करतील, हा संभव आगबोट कंपन्यांस दृष्टीआड करतां येणार नाहीं. परंतु, हवेमध्यें दोन दिवस रिकामें बसण्यापेक्षां 'क्वीन मेरी'सारख्या आगबोटींत आपलें कामकाज पहातां येण्याची सोय व्यापाऱ्यांस व श्रीमंतांस जास्त रुचेल, अशी अपेक्षा आहे.

'क्वीन मेरी' ही बोट क्युनार्ड व्हाइट स्टार कंपनीच्या मालकीची असून ती तयार करण्यांत २½ लक्ष लोकांचें सहाय झालेलें आहे. तिचें घनफळ पार्लमेंटच्या इमारतीपेक्षां मोठें आहे व ८०० लोक एकदम खान्यास बसतील, एवढें मोठें तिचें रेस्टॉरंट आहे. दीड लक्ष लोकवस्तीच्या गांवास पुरेल, इतकी वीज तयार करण्याची शक्ति तिच्या विद्युत्यंत्रांत आहे व बोटीवरील विजेच्या तारांची लांबी ४ हजार मैल भरेल. ही प्रचंड बोट जगांतील पहिला नंबर पटकावणार असा रंग दिसतो. पहिल्या सफरीमध्यें तिनें 'नॉर्मंडी'चें रेकॉर्ड मोडलें नसलें, तरी तें लवकरच मोडलें जाईल, अशी अपेक्षा आहे.

### आय. सी. एस. मधील भरती

आय. सी. एस. मध्यें लायक ब्रिटिश उमेदवारांची निवड करण्याचें नवें धोरण जाहीर झाल्यापासून सुमारें १०० उमेदवारांचे अर्ज दाखल झाले असल्याचें कळतें.

### रेशमी किड्यांची जपानमधून निर्गत

इटलीनें ६० हजार ग्रॅम्स वजनाचीं उत्कृष्ट रेशमी किड्यांचीं अंडीं नुकतीच जपानकडून खरेदी केलीं आहेत. आज चार हजार वर्षें, रेशमी किड्यांचा धंदा चीनमध्यें चालत आला आहे. सुमारें १,६०० वर्षांपूर्वीं जपानमध्यें त्याचा प्रसार झाला. तेराव्या शतकांत फ्रान्स व इटली ह्या देशांतहि रेशमी सूत व कापड तयार होऊं लागलें. एकोणिसाव्या शतकाचे मध्यास ह्या देशांतील रेशमी किड्यांस रोग झाल्यामुळें धंदा बुडाला व चीन आणि जपान ह्यांतून रेशमाची निर्गत होऊं लागली. किड्यांचीं चांगलीं अंडीं पुरविण्याचें कामहि जपाननें केलें, तथापि चीनमध्यें रेशमाचें उत्पादन पहिल्याप्रमाणेंच जगाच्या निम्म्याइतकें कायम राहिलें. १९११ चे सुमारास जपाननें जोराची उडी मारली व १९३३ मध्यें उत्पादनाचे बाबतींत पहिला नंबर पटकावला. त्या सालीं जगांतील एकूण रेशमाच्या पाऊण हिस्सा रेशीम एकट्या जपाननें पुरविलें. शेकडा १५ टक्के इतका देखील हिस्सा चीनच्या वांटणीस आला नाहीं. किड्यांची उत्पत्ती वाढवणें व त्याचें नियंत्रण करणें हें काम जपानमध्यें एका सरकारी खात्याकडे सोंपविण्यांत आलेलें आहे.

### जपाननें आपलें चलन हलकें केलें

जपानच्या मध्यवर्ती बँकेनें दर ग्रॅमच्या वजनास ३,$\frac{1}{6}$ च्या ऐवजी ३$\frac{2}{3}$ येन ह्याप्रमाणें सोन्याच्या खरेदी-विक्रीची किंमत चढवली आहे. म्हणजे जपानी चलन १३ टक्क्यांनीं हलकें करण्यांत आलें आहे. जागतिक व्यापारांत जपानला यशस्वी रीतीनें चढाओढ करतां यावी हा या धोरणाचा उद्देश आहे.

### "बँक ऑफ फ्रान्स"चे भागीदार

बँक ऑफ फ्रान्सचे १,८२,५०० भाग (शेअर्स) ४०,००० लोकांच्या हातांत असून त्यापैकीं ३५,००० भागीदार सामान्य स्थितींतलीं माणसें आहेत. २०० भागीदारांच्या हातीं मिळून पुष्कळ भाग असून बँकेच्या व्यवस्थापक मंडळींतले १२ सभासद निवडण्याची सत्ता हेच मूठभर लोक गाजवतात.

### वेस्टर्न इंडिया ऑइल डिस्ट्रिब्यूटिंग कं. लि.

वरील कंपनीची १९३४ सालाबद्दलची वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत मुंबई येथें भरली होती. कंपनीचीं पेट्रोल पुरवठा करण्याचीं मुंबई, मद्रास व कलकत्ता हीं तीन केंद्रें आहेत व कराची येथूनहि ह्यापुढें पुरवठा केला जाईल. कंपनीतर्फे गेल्या डिसेंबरांत सर फिरोज सेठना व मि. धैरा ह्यांनीं रशियन ऑईल प्रॉडक्टस लि. च्या अधिकाऱ्यांची लंडनमध्यें भेट घेतली. अशा रीतीनें उत्पादक व विक्रेत्या कंपन्यांमध्यें ह्यासंबंधीं विचारविनिमय झाला. वेस्टर्न इंडिया ऑईल डिस्ट्रिब्यूटिंग कंपनीस पेट्रोलच्या विक्रीवर नफा झाला असला तरी एकूण हिशेब लक्षांत घेतां ३½ लक्ष रुपये निव्वळ तोटा आल्याचें आढळलें. तथापि, पहिल्या वर्षाच्या १० लक्ष रुपये तोट्याचे मानानें ही प्रगति समाधानकारक समजली पाहिजे.

### कलकत्ता ट्रामवे कं. लि.

ह्या कंपनीची वार्षिक साधारण सभा लंडनमध्यें नुकतीच भरली होती, त्या वेळीं सदरहु कंपनीस १९३५ सालीं सुमारें १० लक्ष रुपये नफा होऊन भागीदारांस ९ टक्के दरानें डिव्हिडंड दिल्याचें जाहीर झालें. गेल्या पांच वर्षांत कलकत्त्यामधील ट्रामवेची वहातूक बरीच वाढली आहे. १९३१ सालीं ट्राममधून एकूण ८ कोटि ३२ लक्ष उतारूंनीं प्रवास केला. १९३५ सालीं हा आंकडा १० कोटि १५ लक्ष झाला. दर माणशीं प्रत्येक मैली भाडें एका पैहून कमी पडतें, त्यामुळें बसेसच्या स्पर्धेचा ट्रामगाड्यांचे उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम झालेला नाहीं.

## स्फुट विचार

### नवीन कर्ज कां काढलें ?

बारा कोटि रुपयांचें पावणे तीन टक्के व्याजाचें हिंदुस्थान सरकारचें नवें कर्ज अत्यंत यशस्वी रीतीनें उभारण्यांत आलें, ह्यांत संशय नाहीं. परंतु सरकारनें ह्याच वेळीं कर्ज काढलें तें कोणत्या उद्देशानें काढलें, ह्या संबंधानें मात्र मतवैचित्र्य दिसून येतें. विलायतेंतलें कर्ज परत देऊन टाकण्यासाठीं ही रकम उभी केली गेली असें म्हणावें तर तिची आवश्यकता होती अशी कल्पना करण्यास आधार नाहीं. नवीन कर्ज न काढतांहि विलायती कर्जाची फेड आपण करूं शकूं असें सर जेम्स ग्रिग ह्यांनीं असेंब्लींत बोलून दाखविलें होतें आणि त्यांचा हा संकल्प पुरा न होण्यासारखा बदल परिस्थितींत झालेला नाहीं. सरकारच्या तात्पुरत्या खेळत्या कर्जाची रकम फुगल्या कारणानें तिच्यापैकीं बारा कोटि रुपयांचें रूपांतर मध्यम मुदतीच्या कर्जांत करणें हाहि सरकारचा हेतु असणें शक्य नाहीं. कारण, ट्रेझरी बिलांची सरकारनें देणें असलेली रकम अगदीं लहान आहे. अलीकडे सरकारनें पोस्टल सेव्हिंग्ज बँकांतील ठेवींवरील व्याजाचा दर आणि पोस्टल कॅश सर्टिफिकिटांचा दर उतरवल्यामुळें त्या द्वारांनीं पैसा कमी येतो, ती तूट भरून काढण्याकरितां सरकानें नवें कर्ज काढलें असलें पाहिजे असा कित्येकांचा तर्क आहे. सरकारी वर्षास नुकताच प्रारंभ झाला असल्यानें ह्या कल्पनेंत कितीसें तथ्य आहे, हें सांगणें कठीण आहे. वस्तुस्थिति अशी दिसते कीं, बाजारांत पैशाचा पुरवठा विपुल झाला असल्याचें आणि आपला फाजील पैसा गुंतवण्याचें बँकांस साधन नसल्याचें दिसून येतांच उतरलेल्या व्याजाच्या दरानें बारा कोटि रुपयांची रोकड कर्जाच्या स्वरूपांत उभी करून ठेवावी आणि जरूरीप्रमाणें तिचा उपयोग करावा असें हिंदुस्थान सरकारच्या फडणविसांनीं ठरविलें असलें पाहिजे, हेंच अनुमान नवीन कर्जासंबंधानें युक्त वाटतें. सरकारी कर्जरोख्यांवरील व्याजाचा दर पावणे तीन टक्क्यांपर्यंत उतरवतां येणें ही विशेष महत्त्वाची गोष्ट आहे आणि ह्या पैशाचा योग्य विनियोग फडणविसांस करतां येण्यासारखा आहे. नवीन कर्जाच्या बाबतींत सरकारला अपूर्व यश आलें, तेव्हां आतां साडे तीन टक्क्यांच्या प्रॉमिसरी नोटींचें रूपांतर हलक्या व्याजाच्या कर्जांत करण्याचा मार्ग मोकळा झाला आणि लवकरच ह्यासाठीं नवें कर्ज निघणार असा कित्येकांनीं कयास केला होता. पण त्यांत कांहीं तथ्य आहे असें वाटत नाहीं. ह्या नोटांचा बाजारभाव ९९ च्या आसपास येतांच कित्येकांनीं त्यांच्या रूपांतराविषयींच्या सूचना मागें केल्या होत्या. तथापि, शंभर कोटींच्या वरच्या किंमतीच्या ह्या कर्जरोख्यांस हात लावण्याचें धाडस सरकार करील असा रंग दिसत नाहीं आणि त्यास परिस्थिति अनुकूल आहे असेंहि म्हणतां येत नाहीं. निदान, बारा कोटींचें नवें कर्ज ही वरील प्रकारच्या साडेतीन टक्केवाल्या नोटांच्या अदलाबदलीची पूर्वतयारी आहे, असें मानण्यास जागा नाहीं. अनुकूल परिस्थितीचा योग्य वेळीं फायदा घेऊन पैसा उभारून तयार ठेवणें एवढाच नवीन कर्जाचा उद्देश दिसतो.

---

### ॲबिसिनिया इटलीच्या साम्राज्यांतील घटक बनला

इटली व ॲबिसिनिया ह्यांचेमधील युद्ध संपून ॲबिसिनियाचे दशहा रास तफारी ह्यांनीं देशत्याग केला आहे व ते लंडनमध्यें दाखल झाले आहेत. इटलीनेंहि ॲबिसिनियाच्या राज्यव्यवस्थेबाबत तरतूद केली असून इटालियन पूर्व आफ्रिकेंत त्या देशास सामील केलें आहे. इरिट्रिया, अम्हारा, गॅला सिडॅमो, हरार व सोमालिलॅंड ह्या पांच प्रांतांवर प्रत्येकीं एक गव्हर्नर नेमण्यांत यावयाचा असून अडिस अबाबा येथें इटालियन पूर्व आफ्रिकेच्या व्हाइसरॉयचें वास्तव्य असणार असल्याचें जाहीर झालें आहे. अशा रीतीनें ॲबिसिनियाची वासलात लागली असून राष्ट्रसंघास धाब्यावर बसविणाऱ्या इटलीची आज तरी सरशी झाल्याचें दिसतें. राष्ट्रसंघ आतां इटलीसंबंधीं काय धोरण ठेवणार, इकडे सर्व जगाचे डोळे लागून राहिले आहेत. आर्थिक दंडयोजना प्रभावी ठरली नाहीं व इटलीनें आपला हट्ट तडीस नेला, आतां इटलीस विनाकारण कां ज्यास्त दुखवा ? असा पोक्त विचार इंग्लंड व फ्रान्स ह्या राष्ट्रांस सुचल्यास आश्चर्य नाहीं; परंतु आपणास न जुमानणाऱ्या इटलीस राष्ट्रसंघ पूर्ववत् आपल्या सभासदत्वाचें मानाचें स्थान देणार कीं काय ह्याविषयीं शंका आहे. इटली ॲबिसिनिया पचवणार, हें उघड दिसत आहे, परंतु त्यास इतर राष्ट्रें संमति देण्यास कशीं व केव्हां तयार होतील, एवढाच प्रश्न आहे. तथापि, राजकारणांत मुरलेल्या मुत्सद्यांस तो अवघड नाहीं हें खरें. इकडे ॲबिसिनियाबद्दल मात्र सर्व जगास सहानुभूति वाटत आहे, परंतु केवळ तिच्या मदतीनें रास तफारीस पुनः राज्यप्राप्ति होणें अशक्य आहे.

---

### पुढें काय ?

इटलीनें ॲबिसीनिया आपल्या साम्राज्यांत सामील केला असून तेथील नव्या राज्यव्यवस्थेस राष्ट्रसंघानें मुकाट्यानें मान्यता द्यावी अशी त्याची अपेक्षा आहे. संघाच्या दंडयोजनेची क्षिती न बाळगतां इटलीनें ॲबिसिनियन युद्ध चालू ठेवून तें अखेरीस जिंकलें व शत्रूच्या मुलखाची व्यवस्था लावली. आतां राष्ट्रसंघानें निष्कारण गडबड करून वितुष्ट कां राखावें व दंडयोजनेची भाषा कां वापरावी ? असा मुसुलोनीचा सवाल आहे. आपण कोणत्याहि युरोपियन राष्ट्राचें नुकसान केलें नाहीं आणि कोणाच्याहि हितसंबंधांस बाध आणला नाहीं; तसेंच, ह्यापुढें इंग्लंड व फ्रान्स ह्या राष्ट्रांशीं सलोख्यानें वागण्याची इटलीस आतुरता आहे; तेव्हां जणूं काय ॲबिसीनियांत कांहींच घडलें नाहीं असें समजून राष्ट्रसंघानें आपलें कार्य चालवावें असें त्याचें म्हणणें आहे. ह्या कोटिक्रमानें राष्ट्रसंघास पेंच पडला आहे. आपली दंडयोजनेची धमकी निष्फळ ठरली असल्याची त्यास जाणीव आहे आणि इटलीनें गिळलेलें ॲबिसीनियाचें माणीक बाहेर काढण्यासाठीं युद्ध करावें लागल्यास ती जबाबदारी अंगावर घेण्याची त्याची तयारी नाहीं. राष्ट्रसंघाच्या असल्या असहायतेचा इटलीनें पूर्ण फायदा घेतला असून संघाच्या हातून आपल्या विरुद्ध कांहींच विघातक असें होऊं शकणार नाहीं अशी त्यास खात्री वाटत आहे. दंडयोजना बंद करावी तर इटलीच्या दंडेलीपुढें राष्ट्रसंघास माघार घ्यावी लागली अशी कबुलीच दिल्यासारखें होणार, म्हणून कित्येकांचें मन त्यांस खात आहे. पण इटलीशीं वैमनस्य वृथा चालू ठेवण्यांत तरी काय फायदा आहे ? त्याच्या योगानें पाश्चात्य राष्ट्रांतली आर्थिक परिस्थिति ज्यास्त बिघडेल आणि इटलीचें नुकसान म्हणजे पर्यायानें सर्व युरोपचें नुकसान आहे असा पोक्त विचार कांहीं जण व्यक्त करीत आहेत. इकडे राष्ट्रसंघाच्या सभा पुढें पुढें ढकलण्यांत येत असून मुख्याच्या प्रश्नास हात घालण्याची

कोणत्याच प्रमुख राष्ट्राची तयारी दिसत नाहीं. युरोपांत कोठें तरी उत्पात काढण्याची इटलीची तयारी चालली असल्याविषयींच्या बातम्या गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झाल्यानें राष्ट्रसंघ हतबल झाला असल्याची प्रचीति दृढतर होत आहे. चीन व जपान ह्यांचें वितुष्ट वाढत असून प्रकरण हातघाईवर येण्याची भीति उत्पन्न झाली आहे. ह्या रीतीनें जगांत चोहोंकडे अशांतता माजून राहिली असल्यानें आर्थिक परिस्थिति सुधारण्याच्या मार्गांत विलक्षण अडचणी उपस्थित झाल्या आहेत. त्यांमधून मार्ग पुढारी राष्ट्रांनीं काढावयाचा नाहीं तर कोणी काढावयाचा ? आंतरराष्ट्रीय संबंधांमध्यें बेबंदशाही माजून गेली असतां मागील इतिहासाची पुनरावृत्ति झाल्यावांचून राहणार नाहीं ह्याची जाणीव सध्याच्या आधुनिक सुधारणेच्या काळांत करून देण्याचा प्रसंग यावा, हें मानवी संस्कृतीचें दुर्दैव आहे.

## अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाच्या महाराष्ट्रांतील कामाचा अहवाल

राष्ट्रीय सभेच्या मुंबई येथील अधिवेशनांत पास झालेल्या एका ठरावानुसार अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाची स्थापना करण्यांत आली. ह्या संघानें महाराष्ट्रांत केलेल्या कार्याच्या अहवालाची एक प्रत संघाच्या व्यवस्थापक मंडळावरील महाराष्ट्राचे सभासद श्री. वैकुंठराय ल. मेहता ह्यांचेकडून आमचेकडे आली आहे. साल अखेर महाराष्ट्रांत संघाचे ७ तंत्री, २१ साधारण सभासद, १८ अवैतनिक कार्यकर्ते व ३ पगारी कार्यकर्ते होते. हातानें कागद बनवणें, घोंगड्या करणें, कातडी कमावणें आणि त्याच्या वस्तु बनविणें व फळांचा रस काढून तो टिकवणें ह्या महाराष्ट्रांतील चार धंद्यांकडे संघानें प्रथम लक्ष दिलें. जुन्नर येथील हातकागदाच्या धंद्यास तेजी येत असून दहा पंधरा माणसांस नवीन काम लागलें आहे. घोंगड्यांच्या धंद्याबाबत संशोधनपूर्वक अभ्यास करण्यासाठी एका इसमाची योजना करण्यांत आली आहे. संघाचा संदेश व कार्याची दिशा ह्यांचें लोण खेड्यांपाड्यांपर्यंत पोचावें, ह्याकरितां निरनिराळ्या विषयांवर मराठीमध्यें पत्रकें छापून तीं वाटण्यांत आलीं. गेल्या वर्षांत विलेपार्लें येथें एक व पंढरपूर येथें दोन अशीं एकूण तीन ग्रामोद्योगाचीं प्रदर्शनें भरलीं होतीं. कित्येक नव्या उपक्रमासंबंधीं चौकशी करण्यांत आली व शेतकरी, दुकानदार आणि गिऱ्हाईक ह्यांच्यामध्यें परस्परांचे हितसंबंध वाढविण्याची खटपट केली. ( १ ) संघानें पुरस्कार केलेल्या वस्तूंचा वापर वाढविणें, ( २ ) स्वच्छता व आरोग्य यांच्याबद्दल जातीनें खटपट करणें, ( ३ ) मरणोन्मुख धंद्यांचें पुनरुज्जीवन करणें व ( ४ ) काम करणारांस कांहीं विशिष्ट किमान मजुरी तरी मिळेल अशी योजना करणें, ह्या गोष्टींकडे कार्यकर्त्यांनीं लक्ष पुरविण्याचें ठरविलें आहे. श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या नेतृत्वाखाली संघाचें काम व्यवस्थित चालू आहे. तथापि, त्याचें क्षेत्र वाढविण्यास उत्साही व निरपेक्ष कार्यकर्त्यांची जरूरी संघास वाटत असेल, तर इतर भानगडींपासून दूर राहून केवळ हेंच समाजोपयोगी कार्य करण्याची इच्छा असणारांस त्यामध्यें उत्कृष्ट संधि प्राप्त होण्याजोगी आहे.

## व्यापारविषयक माहिती व आंकडे पुरविणारी कचेरी

उद्योगधंदे, व्यापार, शेती इत्यादि संबंधींच्या माहितीचे आंकडे योग्य वेळीं वक्तशीरपणें पुरविले जाणें आर्थिक प्रगतीस सहायक आहे. जगांतील सर्व पुढारलेल्या राष्ट्रांत हें काम व्यवस्थितपणें केलें जातें व त्यामुळें आर्थिक घडामोडींची माहिती मिळून त्याप्रमाणें धोरण आंखण्यास सोयीचें होतें. हिंदुस्थानांत अशा व्यवस्थेचा अभाव आहे, ही गोष्ट अनेक वेळां सरकारच्या निदर्शनास आलेली असून, त्या संबंधांत सुधारणा होणें इष्ट आहे व त्याबाबत निश्चित योजना केली पाहिजे, ह्याची जाणीव त्यांस आहे असें सांगण्यांत येतें. हिंदुस्थान सरकारच्या व्यापारविषयक खात्याची माहिती जमा करणारी कचेरी कलकत्ता येथें आहे, ती दिल्लीस नेण्यासंबंधीं वाटाघाट सध्या चालू असल्याचें समजतें. देशांतील बेकारांची संख्या, इत्यादि सारख्या अत्यंत उपयुक्त विषयाच्या माहितीचें काम ही कचेरी हातीं घेईल, तर तिची उपयुक्तता वाढेल, ह्यांत संशय नाहीं. ह्या बाबीचा विचार चालला असल्याची वदंता आहे.

## पारशी समाजामधील बेकारीनिवारण

सर सोराबजी पोचखानवाला, सर जहांगिर कोयाजी व मि. डी. जे. इराणी ह्यांनीं पारशांमधील बेकारी निवारणासाठी योजना करण्याचे कामीं पुढाकार घेतला असून बेकारांची संख्या, त्यांस सध्यां मिळत असलेली मदत, त्यांची लायकी, इत्यादींसंबंधीं आंकडेवार माहिती प्रथम जमा करण्यांत येणार आहे. हलक्या पगारावर कां होईना, पण पारशी बेकारांना काम लागावें, असा ह्या प्रयत्नांचा हेतु असून जरूर तेथें पुरवणीदाखल मदत करण्यांत यावयाची आहे. प्रयोगादाखल योजना अंमलांत आणावयाची म्हटल्यास दरमहा दहा हजार रुपये ह्याप्रमाणें तीन वर्षेपर्यंत पुरेल इतक्या रकमेचा फंड जरूर आहे, असें उत्पादकांचें म्हणणें आहे.

## मद्रास इलाख्यांतील कायदेपंडितांची उमेदवारी

कायद्याची पदवी मिळवणारासाठी मुंबई विश्वविद्यालयाच्या परीक्षेचा दोन वर्षांचा अभ्यासक्रम आहे व पदवीधर वकील एकदम सनद काढून काम चालवूं शकतो. मद्रास इलाख्यामध्यें, कायद्याची पदवी मिळाल्यानंतर होतकरू वकिलानें एका जुन्या वकिलाकडे निदान एक वर्षभर उमेदवारी केली पाहिजे असा निर्बंध आहे. ह्याखेरीज, त्यास वकिलीच्या धंद्यासंबंधीची परीक्षा द्यावी लागते आणि मग त्याचें नांव नोंदलें जातें.

## जमीनमहसुलांत सूट

शेतीच्या मालाचे भाव अजून सुधारले नसल्याकारणानें, १९३५–३६ सालाबाबतच्या जमीनमहसुलांत कांहीं सवलत देण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. तथापि, पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश, अहमदनगर व सोलापूर ह्या जिल्ह्यांच्या वांट्यास कांहींच सूट आलेली नाहीं. पुणें जिल्ह्यांतील मुळशी पेट्यांत व नाशिक जिल्ह्यांतील कांहीं गांवांस रुपयांत चार आणे सूट मिळाली आहे. त्याचप्रमाणें, सातारा जिल्ह्यांतील कांहीं गांवांस दोन आणे सूट देण्यांत आली आहे.

## ' शेती आणि शेतकरी '

ह्या मासिकाच्या जून १९३६ च्या अंकांत शेतकी खात्याच्या १९३४–३५ सालच्या अहवालांतून घेतलेल्या कांहीं महत्वाच्या गोष्टींची माहिती देण्यांत आली आहे. ' काजू, ' ' पिकांचे शत्रू, ' 'तंबाखूच्या पाण्याचा उपयोग,' ' कोंबड्यांची जोपासना 'इत्यादि लेखहि वाचनीय आहेत.

## सोनें, फ्रेंच चलन आणि हुंडणावळ

फ्रान्समध्यें कायदे मंडळाच्या निवडणुकी होऊन नवीन प्रधान-मंडळ अधिकारारूढ झाल्यानें आणि त्या मंडळाचा विशेष ओढा समाजसत्तावाद-प्रेरित धोरण व आर्थिक योजना अमलांत आणण्याकडे असल्यानें तेथें अस्वस्थता माजून राहिल्याच्या बातम्या आल्या आहेत. फ्रेंच सरकारची सांपत्तिक स्थिति आज कित्येक वर्षें ओढगस्तपणाची राहिली असून बजेटांत तूट सारखी येत आहे आणि राष्ट्रीय कर्ज वाढत आहे. उद्योगधंदे व व्यापार ह्यांची अंतर्गत परिस्थितिहि फ्रान्समध्यें असमाधानकारक आहे. ह्या अंतस्थ दुःस्थितींचें एक महत्त्वाचें लक्षण म्हटलें म्हणजे फ्रेंच चलनाची दुरवस्था हें आहे. जगांतील राष्ट्रांमध्यें सोन्याची वांटणी विषम झाल्यानें तें महागलें आहे. ह्याचाच अर्थ, अनेक देशांतील राष्ट्रीय चलनाची किंमत उतरली आहे. चलनाच्या कायद्यानें अमूक रुपयास एक तोळा सोनें असा दर सरकारनें ठरवला आणि आर्थिक घडमोडींमुळें सोन्याचा भाव बाजारांत निराळा असला तर ह्या दोहोंचा मेळ सरकारास बसवावा लागतो. ग्रेटब्रिटन, अमेरिका, बेल्जम वगैरे राष्ट्रांनीं ह्या रीतीनें आपलीं चलनें व सोनें ह्यांच्या किंमतींची एकवाक्यता दर बदलून घडवून आणिली आहे. परंतु असा बदल करणें हा राष्ट्रीय इभ्रतीचा प्रश्न आहे ह्या भावनेनें फ्रेंच सरकार चलनाच्या व सोन्याच्या पूर्वीच्या दरास चिकटून बसलें आहे. हें धोरण यशस्वी होणार नाहीं ह्या भीतीनें फ्रेंच जनता सोनें बाहेर देशांत पाठवीत आहे किंवा नोटांच्या मोबदला तें घेऊन संग्रहीं ठेवीत आहे. ह्या कारणानें लोकांचा फ्रान्समध्यें व फ्रान्सच्या बाहेर फ्रँक ह्या चलनावरचा विश्वास डळमळला असून बँक ऑफ फ्रान्सच्या निधींतल्या सोन्यास सारखी ओहोटी लागली. फ्रँक, डॉलर व स्टर्लिंग म्हणजे पौंड ह्यांच्या परस्पर किंमती स्थिर रहाव्या ह्यासंबंधानें बँक ऑफ इंग्लंड व ब्रिटिश फडनवीस ह्यांनीं दक्षता बाळगली आहे. फ्रान्समधलें नवें प्रधानमंडळ चलनाबाबतच्या पूर्वीच्या धोरणांत बदल करतें कीं काय आणि बँक ऑफ फ्रान्सच्या घटनेंत व व्यवहारांत हात घालतें कीं काय ह्याविषयीं शंका उत्पन्न झाल्याकारणानें फ्रँकचा दर अस्थिर झाला आहे आणि फ्रान्समधून सोन्याच्या निर्गतीचा चाललेला ओघ वाढला आहे. गेल्या आठवड्याच्या मध्यास फ्रँकचा भाव एका पौंडास ७६$\frac{1}{2}$ फ्रँक इतका एकदम उतरला. ह्याप्रमाणें फ्रँकची घसरगुंडी होऊं लागली असतां ब्रिटिश फडनवीशी खातें व बँक ऑफ इंग्लंड त्यास कसें सावरून धरणार? सोनें उतरणार ह्या भीतीनें मुंबईच्या बाजारांत कमी भावानें त्याची बरीच विक्री झाली आणि बाजारभाव तोळ्यास ३४$\frac{1}{2}$ रुपयांवर घसरला. फ्रेंच सरकार चलन व हुंडणावळ ह्यांचे बाबतींत कोणतें धोरण स्वीकारणार हें निश्चित झाल्यावांचून बाजारांत असली अस्थिरता माजून रहाणें स्वाभाविकच होतें. फ्रेंच राष्ट्रानें आपल्या चलनाची किंमत कमी करून इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांचा कित्ता गिरवावा अशी इच्छा सर्वत्र प्रकट करण्यांत येत आहे. पण काल्पनिक राष्ट्रीय इभ्रत व चलनाचें स्थैर्य ह्यांपैकीं कोणत्या बाबीस नवें फ्रेंच प्रधानमंडळ महत्व देतें, ह्यावर सोन्याची बाजारांतली किंमत अवलंबून रहाणार आहे हें उघड आहे.

अलीकडे इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका ह्यांच्यामधल्या हुंडणावळीची परिस्थिति कशी बदलत आली आहे आणि सोन्याच्या बाजारभावांत काय फेरबदल झाले आहेत, ह्या विषयींची कल्पना तत्संबंधीं प्रसिद्ध झालेल्या आंकड्यांवरून येईल. ह्या रीतीची चलबिचल होऊं नये म्हणून सोनें व फ्रेंच हुंड्या ह्यांची खरेदी-विक्री पद्धतशीर रीतीनें इंग्लंडमध्यें केली जात असल्याचा उल्लेख वर आलाच आहे. जरूरीप्रमाणें केल्या जाणाऱ्या ह्या व्यवहारांचा अपेक्षित उपयोग न होतां हुंडणावळीचे दर बिघडले आहेत. ह्यावरून फ्रान्समधल्या परिस्थितीचे परिणाम कोणते व कसे घडून आले आहेत ह्याची कल्पना येते.

## बृहन्महाराष्ट्राची औद्योगिक उन्नति

### बृहन्महाराष्ट्रीयांचा साखरेचा कारखाना.

बृहन्महाराष्ट्राची औद्योगिक प्रगति घडवून आणण्याच्या ध्येयानें दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड स्थापन करून व ११ जानेवारी १९३५ रोजीं कमेन्सींग सर्टिफिकेट मिळवून उत्पादकांनीं कार्याला आरंभ केला. कंपनीचे मॅनेजिंग एजन्ट ह्यांस स्वतंत्र अधिकार नसून कंपनीच्या कारभाराचीं सर्व सूत्रें संचालक मंडळाचें बोर्ड व पोट कमेट्या ह्यांच्या हातीं ठेविलीं आहेत व त्यांचेकडूनच सर्व कार्यक्रम व योजना आंखल्या जातात आणि खर्चाची आकारणी करून दिली जाते. खर्चाकरितां लागणाऱ्या रकमा म्यानेजिंग एजन्टास स्वतंत्रपणानें ब्यांकेतून काढतां येत नाहींत आणि त्यांस वाटेल तसा पगार किंवा फायदा काढण्याची सवडहि ठेविलेली नाहीं. महाराष्ट्रांतील कांहीं कंपन्यांनीं भागीदारांना त्यांनीं घेतलेल्या भागांवर कित्येक वर्षें नफा न दिल्यामुळें म्यानेजिंग एजन्सीच्या पद्धतीवरील महाराष्ट्रीय जनतेचा विश्वास उडालेला दिसतो व त्यामुळें नवीन कंपन्यांचे शेअर विकत घेण्याचे वेळीं महाराष्ट्र जनतेचें मन साशंक होणें साहजिक आहे. सबब या कंपनीच्या म्यानेजिंग एजन्सीबद्दल वरील खुलासा केला आहे. हल्लीं मॅनेजिंग एजन्ट श्रीयुत आगाशे, वकील, हे एकटेच आहेत. भांडवल देणारे महाराष्ट्रीय, मॅनेजिंग एजन्सींत भागीदार होण्यास तयार असल्यास त्यांना भागीदार घेण्याची तजवीज संचालक मंडळ करील.

कारखान्याकरितां लागणारा ऊस स्वतःच्या जमिनींत व स्वतःच्या लागवडीनें माफक किंमतींत मिळण्याची तजवीज कंपनीनें केली आहे. निरनिराळ्या कामासाठीं महाराष्ट्रीय तज्ज्ञ योग्य वेळीं कंपनी नेमणार आहे. साडेचार हजार टन साखर करण्याची मशिनरी आणणेची योजना संचालक मंडळानें आखलेली आहे व तिला पांच लक्ष रुपये लागतील. ही रकम सप्टेंबर १९३६ पर्यंत कंपनीला मिळाली पाहिजे. शेअरच्या भांडवलावर कंपनीची मशिनरी आणावी, डिबेन्चर्स किंवा कर्ज शक्य तोंवर काढूं नये, असें संचालक मंडळानें ठराविलें आहे. आजामितिस ब्यांकांकडून मिळणाऱ्या दोन किंवा तीन टक्के व्याजापेक्षां जास्त व्याज कंपनीच्या शेअरला देतां येण्यासारखी अनुकूल परिस्थिति खात्रीनें आहे. साखरेच्या धंद्याला संरक्षण मिळाल्यामुळें हिंदुस्थानांत सुमारें शें-सवाशें साखरेचे नवे कारखाने निघाले, पण बृहन्महाराष्ट्रीयांच्या समाईक भांडवलावरचा असा हा एकच कारखाना आहे. तो यशस्वी करण्याची जबाबदारी बृहन्महाराष्ट्रीय जनतेवर आहे. कंपनीचे शेअर विकत घेऊन आणि इतर मार्गांनीं वरील जबाबदारी महाराष्ट्रीय जनता पार पाडील अशी आशा आहे.

विष्णु नारायण वर्तक
अध्यक्ष,
दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लिमिटेड.

## सहकारी चळवळ

### बार्शी सेंट्रल बँकेच्या शाखेचें उद्घाटन

कै. भाऊसाहेब साने ह्यांनीं १९०६ मध्यें स्थापन केलेल्या ह्या बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेनें आपल्या कार्यक्षेत्रामध्यें ठिकठिकाणीं शाखा काढण्याचें ठरविलें आहे. त्याप्रमाणें पहिली शाखा बार्शी–सोलापूर रस्त्यावरील वैराग ह्या महत्त्वाच्या जागीं फेब्रुवारीमध्यें स्थापन करण्यांत आली. तिचें औपचारिक उद्घाटन ता. ३१ मे रोजीं श्री. भाऊराव साने ह्यांच्या हस्तें झालें. वैरागची लोकसंख्या सुमारें चार हजार असून तेथें व्यापारहि बराच चालतो. येथें पूर्वी एक पतपेढी होती, तिची नोंद नुकतीच रद्द झाली आहे. बँकेनें तूर्त तेथें कच्च्या मालाचे तारणावर कर्जे देण्याचा व्यवहार करण्याचें ठरविलें आहे.

श्री. महालिंग आप्पा होसाळी ह्यांनीं श्री. साने ह्यांचे अध्यक्षपदासाठी नांव सुचविलें व श्री. प्रभाकरपंत केसकर ह्यांनीं अनुमोदन दिलें. श्री. अवचट, श्री. धर्माधिकारी, श्री. होसाळी, श्री. बाबुराव वंढ इत्यादींचीं भाषणें झाल्यावर अध्यक्षांनीं सहकारी चळवळ ही उत्तम नागरिक बनविण्यास कशी शिकविते, हें स्पष्ट केलें. वैरागच्या शाखेमार्फत, सुरक्षितपणाची खात्री पटेल त्याप्रमाणें सर्व तऱ्हेचा व्यवहार सुरू करण्याचा मॅनेजिंग बोर्ड विचार करील असें त्यांनीं सांगितलें व बँकेनें सुरू केलेल्या उपक्रमाचा सर्वांनीं भरपूर फायदा घ्यावा अशी विनंति केली.

### असिस्टंट रजिस्ट्रार, श्री० भागवत, ह्यांची कर्तव्यनिष्ठा

सहकारी खात्याचे असिस्टंट रजिस्ट्रार श्री. एन. पी. भागवत ह्यांचा पाचगणी येथें मुक्काम असतांना त्यांनीं डोंगराच्या पायथ्याशीं सुमारें तीन मैलांवर असलेल्या चिखली ह्या खेडेगांवास भेट देऊन तेथील कृष्णा खोऱ्यांतील कोकणी लोकांकरितां काय कार्य करतां येईल, ह्याचें समक्ष निरीक्षण केलें. जाण्याची वाट धोक्याची असल्याबद्दल त्यांस दिलेल्या भयसूचना बाजूस सारून ते वांई तालुक्याचे यूनियन सुपरवायझर, श्री. रुकडे व ॲग्रि. ऑर्गनायझर ह्यांचे समवेत निघाले. त्या तिघांसहि वाटेंत एका कोंकणी माणसाचा आधार घेऊन सरपटत उतरावें लागलें. असिस्टंट रजिस्ट्रार साहेबांनीं मोठ्या धैर्यानें व चिकाटीनें ह्या कष्टाच्या वाटेनें जाऊन गांवांतील लोकांस सहकारी सोसायटी व ग्रामसुधारणा ह्यांचें महत्व पटवून दिलें. रात्रीं आठ वाजतां तिघेहि परत फिरले व विजेच्या टॉर्चच्या उजेडांत डोंगर चढून मुक्कामास आले.. कृष्णा खोऱ्यांतील ह्या अवघड मुलखास असि. रजिस्ट्रारच्या हुद्यावर असलेल्या अधिकाऱ्यांनीं पूर्वीं भेट दिलेली नव्हती, ह्या दृष्टीनें श्री. भागवत ह्यांनीं हें 'रेकॉर्ड'च केलें आहे, असें 'अर्था'चे एक बातमीदार लिहितात..

### सारस्वत को. बँक लि. मुंबई

वरील बँकेची ठाकुरद्वारांत एक उपशाखा उघडण्याचा समारंभ गेल्या आठवड्यांत सहकारी खात्याचे रजिस्ट्रार, श्री. पंजाबी, ह्यांचे हस्तें झाला. ह्या उपशाखेचे रोजचे हिशेब मुख्य कचेरीच्या हिशेबांत सामील करून घेण्यांत येतील.

### मुंबईंत नवी सहकारी पतपेढी

'टाइम्स ऑफ इंडिया'च्या नोकरांसाठी एक पतपेढी नुकतीच स्थापन झाली आहे. आजच तिच्या सभासदांची संख्या ६५० आहे.


## धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा:—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you:

NEW BUSINESS

**This year 1934-35**
**Exceeds**
**2 CRORES & 50 LAKHS**

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches:* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Offices:* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

# अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ

## खेड्यांतील जनावरें सुधारण्याची योजना आणि तदंगभूत उद्योगधंदे

लेखक– श्री. जे. एन. मानकर, मंत्री, जीवदया मंडळ कालबादेवी, मुंबई नंबर २.

खेड्यांत शेतकऱ्यांना साधारणपणें खालील कारणासाठी जनावरें बाळगावीं लागतात:—

(१) शेतीकाम, वाहन व वहातूक यासाठी चांगले बैल व रेडे ह्यांची जरूरी असते.

(२) घरच्या उपयोगापुरत्या दूधदुभत्यासाठी सामान्य प्रतीच्या म्हशी व गाई ठेवतात. लोणी व तूप यांचा धंदाहि त्यायोगें चालतो. शिवाय वळूहि ठेविलेले दिसतात.

(३) कमजोर व वांझोटी जनावरें खताच्या दृष्टीनें उपयुक्त ठरून शिवाय त्यांच्या नैसर्गिक मृत्यूनंतर त्यांच्या कातड्यांचाहि उपयोग होतो.

(४) पैसा उभारण्यासाठी शेतकऱ्याला जेव्हां रोख पैशाची नड लागते तेव्हां तो, नको असलेलें किंवा नवीन घेतलेलें जनावर विकून टाकतो. पण या अपरिहार्य गरजेचें पर्यवसान शेतकऱ्याला विक्रीची चटक लागण्यांत झालेलें आहे. म्हणजे, जो शेतकरी पूर्वी केवळ गरजेसाठी म्हणून जनावर विकत असे तोच आतां आपलीं जनावरें बेधडक कसायाला विकूं लागलेला आहे आणि यामुळें खेड्यांतील गोधनाला गळती लागली आहे. वास्तविक रीतीनें पाहिलें तर खेड्यांतील प्रत्येक जनावर आपल्यापरी उपयोगी आहेच, पण हीं उपयोगी असणारीं जनावरें कमी खर्चांत फायदेशीर कशीं होतील हें पाहणें आज आवश्यक झालें आहे. त्यासाठी कांहीं योजना आंखावयास पाहिजे. अशा प्रकारच्या दुहेरी कारणासाठी मूळ चांगल्या प्रकारच्या गाईंची पैदास करणें आवश्यक आहे.

**कामाची रूपरेखा:**–हें काम करूं इच्छिणारानें परिस्थितीची पूर्ण माहिती करून घेऊन खालील आंकडेवार माहिती जमवावी:–

(१) उपरिनिर्दिष्ट प्रकारच्या उपयोगाच्या जनावरांची संख्या

(२) (अ) शेतीसाठी (आ) दुभत्यासाठी आणि (इ) खतासाठी लागणारीं जनावरें.

(३) कडबा व गवती कुरणें यांची तरतूद.

**निवड व प्रतवारी:**–नंतर त्यानें (१) चांगली निपज होण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या गाईंची निवड करून त्यांची नोंद ठेवावी. (२) दुधासाठी चांगल्या म्हशी ठेवून त्यांचीहि नोंद ठेवावी. (३) कमजोर गाई, म्हशी व बैल यांचा उपयोग ते जिवंत असेपर्यंत फक्त खतासाठीच करावा. त्यांना इतर जनावरांपासून कटाक्षानें अलग ठेवून त्यांच्यापासून निपज होऊं देऊं नये. यांच्यापासून फक्त खत व त्यांच्या मरणानंतर कातडीं यांचीच प्राप्ति होईल. यांच्यापासून होणारी निपज थांबविल्यामुळें कमजोर गुरांची पैदास आपोआपच घटूं लागेल.

**वळू संस्था अथवा नंदीशाला:**—वरीलप्रमाणें प्राथमिक माहिती, निवड, प्रतवारी आणि चांगल्या जनावरांची नोंद वगैरे केल्यावर खालील पद्धतीनुसार 'नंदीशाला' खेड्यांत उघडावी:—

(१) स्थानिक तीन सभासदांचें एक व्यवस्थापक मंडळ नेमावें आणि त्यानें पुढील कामास प्रारंभ करावा.

(२) गांवांतील एकाद्या देवळांत (महादेवाच्यासारख्या) अगर स्थानिक संस्थांच्या आवारांत प्रशस्त जागा असल्यास त्या ठिकाणीं बैलांचा गोठा ठेवावा.

(३) एतद्देशीय चांगला वळू त्या ठिकाणीं ठेवावा आणि इतर कमजोर खोंडांना खच्ची करावें.

(४) ज्यांच्याजवळ चांगली गाय असेल त्यांना या संस्थेचे सभासद होतां येईल. सभासदांना उत्तम निपजेसाठी वळू वापरण्याचा अधिकार राहील.

(५) वळू सांभाळण्यास एक गुराखी ठेवून त्याच्या देखरेखीखालीं तो वळू सभासदांच्याच खिल्लाराबरोबर हिंडेल.

(६) ज्या सभासदांच्या गाई चांगल्या निपजेसाठी वळूकडे आणल्या जातील त्यांनी १ रु. किंमतीचा दाणा वळूसाठी द्यावा.

(७) वळूकरितां लागणारा कडबा सभासदांनीं पुरवावा.

(८) वळूपासून झालेल्या उत्पत्तीची नोंद ठेवावी. त्यापैकीं जीं खोंडें (गोऱ्हे) चांगलीं असतील त्यांची निगा राखावी व बाकीच्यांना खच्ची करावें.

(९) गाईंची निगा राखणें, गोठे स्वच्छ ठेवणें वगैरेसाठी लागणारी उपयुक्त माहिती वेळोवेळी पत्रकांच्या द्वारा अगर सभांतून सभासदांना पुरवावी.

(१०) सभासदांच्या जनावरांसाठी एक गवती कुरण मोफत अगर माफक दरानें मिळवावें.

(११) संस्थेंत नोंदविलेल्या गाईपासून झालेली निपज सभासदांनीं विकूं नये. कारण त्यामुळें बीजशुद्धि कायम रहणार नाहीं.

(१२) अशा प्रकारच्या अनेक वळूसंस्था एकाच जिल्ह्यांतील अनेक खेड्यांतून काढणें जरूर आहे. म्हणजे, तीन वर्षांनंतर त्यांच्यांतल्या त्यांच्यांत वळूंची देवघेव करतां येईल.

(१३) संस्थेनें सुरवातीला खेड्यांतील लोकांना वळू पुरवावेत व त्यांचा खर्च शेतकऱ्यांनीं चालवावा.

(१४) संस्थेनें वर्षांतून एकदां लहान वळूंचें प्रदर्शन भरवीत जावें, म्हणजे त्यायोगें प्रगतीचें मोजमाप करितां येईल.

(१५) चांगल्या निपजीसाठी नोंद केलेल्या व झालेल्या जनावरांची कत्तल किंवा विक्री अजिबात होऊं देऊं नये.

### खेड्यांतील दूधदुभत्याचा धंदा

(१) जवळपास दुधाला गिऱ्हाईक मिळण्याचा संभव असेल तर कार्यकर्त्यानें खेड्यांतील दूध ठराविक दरानें घेऊन, तें एकत्र जमवावें आणि मग तें विकण्याची व्यवस्था करावी. विक्रीचें धोरण असें ठेवावें कीं,त्यायोगें सर्व खर्चवेच भरून निघावा. कार्यकर्त्यानें खेड्यांतील लोकांस दूधदुभत्याची आरोग्याच्या दृष्टीनें कशी निगा ठेवावी त्याचप्रमाणें जनावरांच्या चारापाण्याची कशी व्यवस्था ठेवावी वगैरेबद्दल शास्त्रीय माहिती समजावून द्यावी.

(२) ज्या ठिकाणीं दुधाचा खप होण्यास जवळपास बाजार नसेल त्या ठिकाणीं उरणाऱ्या (वाढाव्याच्या) दुधाचा उपयोग लोणी, तूप व 'केसीन' काढण्याकडे करावा. दूध एकत्र जमवावें व दही बनविल्यानंतर त्यापासून लोणी व तूप करावें. लोणी देशी पद्धतीनें तयार केल्यास ताकाचा उपयोग खेडेगांवांतील लोकांस देण्यांत अगर जनावरांना पाजण्यांत करावा. जर यंत्राच्या

साहाय्यानें दुधाची मलई वेगळी केली असेल तर मुलावाळांना आणि वासरांना देण्यासाठी व 'केसीन' साठी निराळें दूध वापरावें. दुधापासून होणाऱ्या या वस्तूंना कोठेंहि गिऱ्हाईक मिळण्यास अडचण पडणार नाहीं.

**खताचा धंदाः**—गुरांच्या शेणामुतासाठी प्रत्येकाचा निराळा किंवा सर्वांच्यासाठी एक सामुदायिक खड्डा खणावा म्हणजे त्यामुळें खताची सोय होत जाईल. मेलेल्या जनावरांचीं हाडें, शिंगें वगैरे पदार्थ अशा खड्ड्यांतच टाकीत जावेत. हे पदार्थ खतासाठी फार उपयुक्त असतात.

## सहकारी सोसायट्यांचा नवीन ४८ वा नियम

लेः—श्री. लक्ष्मण महादेव देशपांडे ( कऱ्हाड )

सदरहु ४८ वा नियम नवीन सामील करणेंत येणार असें गॅझेट-मध्यें प्रसिद्ध झालें असून त्यासंबंधीं आम्हांस कांहीं सूचना कळविणें असल्यास त्या ता. ३१-५-३६ चे आंत कळवाव्या असा मजकूर आपले ता. ३-६-३६ चे अंकांत प्रसिद्ध झाला आहे. गॅझेट-मधील प्रसिद्धी ही कायदेशीर असली तरी वस्तुतः गॅझेट न घेणाऱ्या व न समजणाऱ्या सोसायट्याच अजमासें शेकडा ९५ पेक्षांहि जास्त निघतील. सबब ज्या वेळीं एकाद्या नियमाची दुरुस्ती गॅझेटमध्यें प्रसिद्ध करण्यांत येते, त्यावेळीं प्रत्येक सोसायटीला, निदान अर्बन सेंट्रल बँकांना तरी त्यासंबंधाची माहिती देणें इष्ट आहे.

ता. १-५-३६ होऊन गेली, यामुळें आतां कायदेशीर रीतीनें कोणतीहि सूचना मांडतां येणार नाहीं.* तथापि जबाबदार अधि-काऱ्यांचें लक्ष वेधावें म्हणून खालील विचार मांडीत आहें.

१ कमिटींतील सभासदांचे बाबतींत जो नवीन नियम घालणेकरतां सुचविला आहे **त्या कमिटींतील सभासदांचा** उल्लेख मूळ कायद्यांत कोठेंहि आलेला नाहीं.

२ कमिटीच्या संबंधांचा उल्लेख नियम नं.४ डी. यांत आलेला आहे व तेथे प्रत्येक सोसायटीनें आपले बायलॉज कोणते कोणते बाबतींत केले पाहिजेत हें नमूद करणेकरतां तो आला आहे. यावरून कायदा अगर नियम यांत कमिटीचे बाबतींत कांहींहि निश्चित असें स्वतंत्रपणें ठरविलेलें नाहीं.

३ मूळ कायद्याचें कलम ७१ खालीं नियम करण्याचा सर-कारास अधिकार आहे. तथापि त्यांतील कोणते पोट-कलमाखालीं नवीन नियम ४८ बसतो, ह्याचा उल्लेख केलेला नाहीं. कमिटीचे सभासदांची बाब ही केवळ बायलॉजवर सोपविली असल्यानें त्या संबंधांत काय धोरण स्वीकारावें याचा उहापोह मूळ कायद्यांत दुरुस्ती सुचवून करून घेणें चांगलें, कारण नवीन नियमहि कायदे-मंडळास मंजूर, नामंजूर अथवा दुरुस्त करणेचा अधिकार आहे.

४ जरूरीचे वेळीं रजिस्ट्रार यांचे हातांत योग्य सत्ता असूं नये असें आमचें म्हणणें नाहीं.

५ प्रस्तुत कामीं असें म्हणतां येईल कीं, जर कोणत्याहि एकाद्या कमिटीचे हातून योग्य प्रकारें काम होत नाहीं, असें रजिस्ट्रार यांना आढळून येईल तर त्यांना ती सर्व कमिटी रद्द करून संबंध निवडणूक नवीन करविणेचा अधिकार देणेंत यावा व या निवडणुकींनंतरहि काम चांगलें होत नाहीं, असें दिसून आल्यास ती सोसायटी रद्द करणेचा असलेला अधिकार रजिस्ट्रार यांनीं चालवावा.

* ह्या संबंधांतली मुदत सरकारनें वाढविली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. —सं. अर्थ


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

उभारलेलें भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,०४,००,०००

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), वांद्रें ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेकडा १ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धा आम्हीं ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धा ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः — टी. आर. लालवाणी.

## एशियन पॉलिसी

ASIAN ASSURANCE Co. Ltd.

म्हणजेच

### आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयस्कर योजना.

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत

### धी एशियन ॲशुरन्स कंपनी, लिमिटेड

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## पावसानें ओढून धरलें !

चालू हंगामांतील पाऊसपाण्याविषयींचें भविष्य आपणांस सांगतां येत नाहीं असें हिंदुस्तान सरकारच्या हवामान खात्यानें प्रसिद्ध केलें आहे, आणि त्यामुळें जनतेची निराशा झाली आहे. इकडील पावसाची परिस्थिति बाहेरील उष्णता, वाऱ्यांचा जोर इत्यादि अनेक बाबींवर अवलंबून असते आणि त्यांच्या आधारावर हवामानखातें आपल्या भविष्याची इमारत उठवतें. परंतु यंदा बाहेर ठिकाणचीं मामुलीं गमकें अनिश्चित असल्यानें त्यांचा भविष्य वर्तविण्याचे कामीं उपयोग करतां येणें शक्य नाहीं असें खात्याचें म्हणणें आहे. शास्त्रीय दृष्टीनें व व्यावहारिक उपयुक्ततेच्या दृष्टीनें पहातां हा अभिप्राय योग्य आहे असेंच म्हणावें लागतें. तथापि प्रारंभीं आशा दाखवून पावसानें आतां ताणून धरलें आहे, ह्या कारणानें जनतेच्या मनांत काळजी उत्पन्न झाली आहे. पावसास महाराष्ट्राच्या अनेक भागांत वेळेवर सुरवात झालेली नाहीं, तथापि तो लवकर येण्याचीं चिन्हें मुळींच नाहींत असें म्हणतां येत नाहीं. पावसाच्या वाऱ्यांचा जोर कमी आहे, त्यामुळें वृष्टि होत नाहीं. ही स्थिति लवकर बदलणें इष्ट आहे. येत्या आठवड्यांत काय बदल होतो तें पहावें.


## Fergusson College, Poona.

The College opens on 20th June 1936. Accommodation being limited to 1200 undergraduates, students should apply, on prescribed forms, for admission to the classes and the hostel as early as possible. F. Y., I. A., B. A., students will pay Rs. 15/- and others their laboratory fee for one year at the time of admission. Admission will be granted from 5th June 1936 (12 noon to 3 p. m. on working days.)

27th May 1936. G. S. Mahajani, Principal.



मु. कराड ] फक्त एका रुपयास [ कोडें नं. १

## प्रत्येक जण (१००) रुपये मिळवा

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

बाजूचे कोष्टकांत अशा रीतीनें आंकडे भरा कीं, ज्याची आडवी व उभी बेरीज मोजतांना प्रत्येक ओळीची बेरीज ३० यावी. कोष्टकांत एका जातीचे दोन आंकडे येऊं नयेत. प्रवेश फी एक रुपया म. ऑ. नें भरून कोष्टकाचें एक किंवा सोळापर्यंत उत्तरें एकाच वेळीं पाठवितां येतील. परंतु सोळापेक्षां अधिक उत्तरें पाठवावयाचीं असतील तर प्रत्येक उत्तरास एक आणा जादा फी पडेल. उत्तरें खालील पत्त्यावर प्रवेश फी भरून व आपला पूर्ण पत्ता लिहून पाठवावींत. उत्तरें किती पाठविलीं त्याचा आंकडा लिहावा. आमचा निकाल शेवटचा व सर्वांना कायदेशीर बंधनकारक होईल. आणखी कांहीं बाबतींत जास्त खुलासा पाहिजे असल्यास एक आण्याचें तिकीट पाठवावें. उत्तरें जूनअखेरपर्यंत स्वीकारण्यांत येतील. आमचें सीलबंद करून ठेवलेलें खऱ्या उत्तराचें कोष्टक जुलै महिन्यांत जाहीर करण्यात येईल. जाहीर झालेल्या उत्तराप्रमाणेंच ज्याचें उत्तर बरोबर असेल त्या प्रत्येकाला १०० रुपये बक्षिस देण्यांत येईल.

**इनामी हरिफाई कार्यालय—कराड. (जि. सातारा.)**


## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| **सरकारी कर्जरोखे** | |
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | ११०-१२ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०—६ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८—५ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—६ |
| ४% १९६०—७० ... ... | ११४—९ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९८—६¼ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०६—१२ |
| ४% १९४३ ... ... ... | १११—० |
| २¾% १९४८—५२ ... ... | ९९—१४½ |
| **निमसरकारी रोखे** | |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०९—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०७—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०८—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | १०८—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३—६३ ) ... | ११०—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२३—० |
| **मंडळयांचे भाग** | |
| **बँका** | |
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३०—४ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११०—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३३—८ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५६२—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३१—१२ |
| **रेल्वेज** | |
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १०१—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९०५—० |
| **वीज** | |
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १२% ) | १५७—८ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २३०—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १५९२—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५६८—१२ |
| **इतर** | |
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६९—१२ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १७५—० |
| टा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ६७१—४ |

प्रो. काळे ह्यांचें नवीन पुस्तक

## रिझर्व्ह बँक

हिंदुस्थानांत राष्ट्रीय मध्यवर्ती बँक ह्या नात्यानें रिझर्व्ह बँकेची स्थापना होऊन त्या संस्थेचें काम चालू झालें आहे. रिझर्व्ह बँकेची घटना, तिच्या कार्याचा व्याप, तिचा इतर बँकांशीं संबंध इत्यादि विषयांची सांगोपांग माहिती ह्या पुस्तकांत दिली असून रिझर्व्ह बँकेच्या कायद्याच्या निरनिराळ्या कलमांची छाननी केलेली आहे. अवघड विषयाचा सुलभ बोध व्हावा म्हणून पुस्तक-कर्त्यानें बँकिंगच्या धंद्यांतले आधुनिक प्रकारचे व्यवहार, त्यांची उपपत्ति व त्यांचें कार्य ह्यांचा अत्यंत सोप्या मराठी भाषेत चर्चा केली आहे आणि देशी व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें कोणत्या योजना अंमलांत आणल्या पाहिजेत ह्या संबंधानें व्यावहारिक सूचना केल्या आहेत. रिझर्व्ह बँक ही, राष्ट्रीय आर्थिक प्रगतीस परिपोषक होईल काय ? ह्या प्रश्नास प्रस्तुत पुस्तकांत उत्तर मिळण्यासारखें आहे.

पृष्ठें १३०-किंमत १ रुपया ( ट. हं. वेगळें )

पुस्तक मिळण्याचीं ठिकाणें:—

( १ ) व्यवस्थापक, "अर्थ" ग्रन्थमाला, पुणें ४.

( २ ) आर्यभूषण प्रेस, पुणें २.

( ३ ) दि को-ऑपरेटर्स बुकडेपो, ९, बेकहौस लेन, फोर्ट, मुंबई.

प्रो. काळे ह्यांचें

'अर्थ' ग्रन्थ मालेंतील तिसरें पुस्तक

## व्यापारी उलाढाली

महाराष्ट्रांत व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांचा उत्कर्ष व्हावा असें प्रत्येकास वाटतें, परंतु ह्या संबंधांत जे व्यवहार चालतात त्यांची माहिती फार थोड्या लोकांस असते. सामान्य जनतेस कमाईतून बचत करण्याची संवय लागून तीमधून निर्माण होणाऱ्या द्रव्यसंग्रहाचा उपयोग, व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या अभिवृद्धीकडे व्हावा, ह्याकरितां औद्योगिक व व्यापारी मंडळ्या ह्यांचे व्यवहार कसे चालतात, बाजारांत निरनिराळ्या प्रकारांच्या उलाढाली कशा होतात, इत्यादि विषयांचें ज्ञान महाराष्ट्रीय समाजांत पसरणें आवश्यक आहे. वृत्तपत्रांमध्यें व ऐकिवांत ह्या संबंधांत ज्या बातम्या येतात, त्यांचें रहस्य ओळखण्याची पात्रता लोकांमध्यें उत्पन्न झाली पाहिजे. हें ज्ञान महाराष्ट्रीय लोकांस सुगम रीतीनें व्हावें, ह्या उद्देशानें प्रस्तुत पुस्तक मुद्दाम लिहिलें आहे आणि त्याचा योग्य उपयोग जनता करून घेईल असा ग्रंथकर्त्यास विश्वास वाटत आहे.

पृ० १४३—किंमत १ रुपया. ( ट. हं. वेगळें )

मिळण्याचीं ठिकाणें:—

( १ ) व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रंथमाला, पुणें ४.

( २ ) आर्यभूषण प्रेस, पुणें २.

( ३ ) दि को-ऑपरेटर्स बुक-डेपो, ९ बेकहौस लेन, फोर्ट, मुंबई.

## K. K. & Co.

Photographic Dealers

POONA.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १५ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १६ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १७ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १८ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | १९ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २० शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २१ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २२ साक्री ( „ „ ) |
| ९ अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २३ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० शेवगांव ( „ „ ) | २४ मालेगांव ( „ नाशिक ) |
| ११ कोपरगांव ( „ „ ) | २५ सटाणा ( „ „ ) |
| १२ भिवंडी ( „ ठाणें ) | २६ कळवण ( „ „ ) |
| १३ पालघर ( „ „ ) | २७ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १४ कल्याण ( „ „ ) | २८ कालोल ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २०००००० चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६|३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख १७, जून १९३६. अंक २५

विम्याचें काम सुरू झालें !!! अपूर्व सवलती, माफक हप्ते !!!

दि गुड-वुइल ॲशुअरन्स कं. लि.

हेड ऑफिस—कुपवाड, जिल्हा सातारा.

( पोस्ट– मिरज मिशन हॉस्पिटल )

चेअरमन्
डॉ. व्ही. जी. वैशंपायन, M. L. C., सोलापूर.

बोर्ड ऑफ ॲडव्हायसर्स
(१) श्री. आण्णासाहेब चिरमुले,
रि. म्या. डा., वेस्टर्न इं. इं. कं., सातारा.
(२) श्री. तात्यासाहेब केळकर,
संचालक, 'केसरी' व 'मराठा', पुणें.
(३) रा. ब. बी. के. जोशी,
दिवाण, संस्थान मिरज ( सीनियर )

रेफरी, मेडिकल बोर्ड
डॉ. आर. एच्. भडकमकर,
M. A., M. D., पुणें.

लीगल ॲडव्हायसर
सरदार व्ही. व्ही. कुर्लेकर,
M. A., LL. B., मिरज.

कन्सल्टिंग ॲक्चुअरी
श्री. जी. एस्. मराठे,
M. A., A. I. A., पुणें.

महाराष्ट्र, मध्यप्रांत, कर्नाटक, गुजराथ वगैरे भागांत
प्रमुख गांवीं प्रामाणिक, हुषार मेहनती एजंटस् नेमणें आहेत.

कमिशन वगैरेबाबत हेड ऑफिसकडे आतांच लिहा !

कुपवाड, जिल्हा सातारा
पोस्ट–मिरज मिशन हॉस्पिटल.

बी. व्ही. मराठे, B. A., LL. B.,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# विविध माहिती

### मोटारींबाबत गुन्हे

ग्रेट ब्रिटनमध्यें १९३५ सालीं मोटारींबाबत ५,१८,२४० गुन्हे घडले व अपराध्यांकडून वसूल केलेल्या दंडाची रकम ५० लक्ष रुपये भरली. फाजील वेगानें मोटार हांकण्याबद्दल १९३४ सालीं ५० हजार लोकांस शिक्षा झाली होती; गेल्या वर्षी सुमारें सव्वा लाख लोकांना त्याबद्दल शासन मिळालें.

### हिंदुस्थानाचे नकाशे करण्यांत दिरंगाई

सबंद हिंदुस्थानाचे, दर इंचास एक मैल ह्या प्रमाणावर नकाशे तयार करण्याचें काम १९०५ सालीं सुरू झालें तें १९३० सालीं पुरें होईल, अशी त्यावेळीं अपेक्षा होती. सध्याच्या वेगानें हें काम १९५० चे पूर्वी संपण्याचा रंग दिसत नाहीं.

### धुळें येथील कॉटन मार्केट

यंदाचे वर्षी ह्या मार्केटमध्यें कपाशीच्या ६० हजार गाड्या उतरल्या.

### सारावाक येथील तेलाच्या खाणी

सिंगापूर येथील आरमारी ठाण्यास सारावाक ह्या ब्रिटिश प्रदेशांतील खाणींतून तेलाचा पुरवठा होतो. ह्या खाणी दहा वर्षांत कोरड्या पडतील, अशी भीति आहे व म्हणून नवीन खाणींचा शोध चालू आहे.

### आयर्लंडचें राष्ट्रीय कर्ज

आयर्लंड स्वतंत्र झालें, तेव्हां त्यास राष्ट्रीय कर्ज मुळीच नव्हतें, तें आतां सुमारें ७५ कोटि रुपये झालें आहे.

### कर्ज फेडीचे हप्ते अमेरिकेस मिळत नाहींत

अमेरिकेस अनेक युरोपिअन राष्ट्रांचें युद्धकर्जाबाबतचें देणें आहे.परंतु त्याचे हप्ते भरणें बहुतेकांनीं बंद केले आहेत. चालू वर्षांत फिन्लंड शिवाय दुसरें कोणतेंहि राष्ट्र अमेरिकेस हप्ता देणार नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे.

### मालाच्या वृत्तपत्रीय जाहिरातींचा खर्च

विशिष्ट छाप असलेल्या मालाच्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींवर गेल्या वर्षी ग्रेट ब्रिटनमध्यें सुमारें ४५ कोटि रुपये खर्च झाले, असा अंदाज करण्यांत आला आहे.

### बाजार पेठांची पहाणी

जर्मनीच्या मध्यवर्ती बँकेचे गव्हर्नर, डॉ. शाख्ट, हे युरोपांतल्या लहानसहान देशांत विमान मार्गानें हिंडून आपल्या देशाच्या व्यापारवृद्धिस वाव मिळवण्याची खटपट करीत आहेत.

### पंधरा लाखांची नवी इमारत

सरकारच्या कचेऱ्यांसाठी मध्यवर्ती इमारत मुंबईमध्यें बांधण्यांत यावयाची आहे, त्याप्रीत्यर्थ टेंडरें मागविण्यांत आलीं आहेत. एकूण कामाची अंदाजी किंमत पंधरा लक्ष रुपये भरेल. प्रत्येक टेंडराबरोबर पंधरा हजार रुपये इतकी रकम बयाणा म्हणून भरावी लागेल.

### बेकार युरोपियनांस सहाय

हिंदुस्थानांतील युरोपियनांमध्येंहि बेकारी डोकाऊं लागली आहे. अर्थात्, त्यांच्या दृष्टीनें सोइस्कर काम न मिळणें, असाच ह्या बेकारीचा अर्थ केला पाहिजे. १९२२ सालापासून आतांपर्यंत १८५ युरोपियनांस हिंदुस्थानांतून परत इंग्लंडकडे जाण्यासाठी युरोपियन बेकार सहायक कमिटीनें मदत केली.

### मुंबई शहरांत लागलेल्या आगी

मुंबई शहरामध्यें १९३५-३६ सालीं एकूण २९८ आगी लागल्या व त्यामुळें सुमारें चार कोटि रुपये किंमतीच्या मालमत्तेवर आपत्ति आली. त्यांत एकूण ८,८६,४५९ रुपये नुकसान झालें, त्यांपैकीं फक्त ६६,३०९ रुपयांच्या मालमत्तेचा विमा उतरलेला नव्हता.

### सिंध प्रांताचें अंदाजपत्रक

सिंध प्रांताचें अंदाजपत्रक ह्या सालापासून स्वतंत्र करण्यांत यावयाचें असून, त्यांत येणारी एक कोटींची तूट हिंदुस्थान सरकार सोसणार आहे. सिंध प्रांतावर ३० कोटि, ३८ लक्ष रुपये कर्जाचा बोजा आहे. ही रकम त्या प्रांताच्या वार्षिक उत्पन्नाच्या अठरा पट भरते. पांच-शष्ठांश कर्ज सक्कर धरणाबाबतचें आहे. एकूण कर्जाचे पायीं ह्या प्रांताचे दरवर्षी १ कोटि ४६ लक्ष रुपये खर्ची पडणार आहेत.

### सुएझचा कालवा बंद करतां येणार नाहीं

ॲबिसिनियामधील युद्धाचे वेळीं सुएझच्या कालव्याची नाकेबंदी करून इटलीस शह देण्याबद्दलच्या सूचना पुढें आल्या होत्या. सुएझ कालवा पक्षातीत असून त्यांत सर्वांस प्रवेश खुला आहे, असें कालवा कंपनीच्या अध्यक्षांनीं तिच्या वार्षिक सभेमध्यें अलीकडे स्पष्ट जाहीर केलें आहे. एखाद्या देशानें इतरांस बंदी करण्याचा प्रयत्न केल्यास तें गैरकायदा होईल, असें त्यांचें म्हणणें आहे.

### अमेरिकेला कर्जफेडीचे हप्ते केव्हां मिळणार ?

युरोपांतील बहुतेक सर्व देशांनीं अमेरिकेचें कर्ज काढलेलें अजून परतफेड करण्याचें मात्र ते पुढें ढकलत आहेत. ग्रेट ब्रिटननें अमेरिकेचें सुमारें २५० कोटि रुपये देणें आहे. अमेरिका तडजोड करण्यास तयार आहे, परंतु त्या संबंधांतलीं बोलणीं यशस्वी होण्यास अजून परिस्थिति अनुकूल नाहीं, असें ग्रेट ब्रिटननें अमेरिकेस कळविलें आहे.

### व्हाइटवे लेडलॉ आणि कं.

व्हाइटवे लेडलॉ आणि कंपनी, लि० ह्या सुप्रसिद्ध मंडळीनें आपल्या प्रेफरन्स भागांवर १९३२ पासून डिव्हिडंड दिलेलें नाहीं. ऑर्डिनरी भागांवर तर १९३० सालापासून डिव्हिडंड नाहीं. मंडळीच्या पुनर्घटनेबद्दल डायरेक्टरांचा विचार चालू आहे.

### महाराष्ट्र स्वदेशी संघ

महाराष्ट्र स्वदेशी संघाची वार्षिक सभा गेल्या रविवारीं भरली. तीमध्यें गेल्या सालच्या कामाचा अहवाल व हिशेब मंजूर झाले आणि चालू वर्षासाठी अधिकारी व कार्यकारी मंडळ ह्यांची निवड करण्यांत आली. संघाचें काम लहान प्रमाणावर आणि धीमें धीमें परंतु चिकाटीनें चाललें आहे. ज्यास्त जोरानें व विस्तृत रीतीनें प्रचारकार्य होण्यास जनतेचें सहाय मिळणें अगत्याचें आहे.

### कुत्र्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय

ब्रिटिश रेल्वेजवरील प्रवाशांच्या कुत्र्यांसाठी प्रत्येक स्टेशनवर पिण्याच्या पाण्याची सोय यंदापासून करण्यांत यावयाची आहे. हिंदुस्थानांत माणसांनाच पाणी मिळण्याची पंचाईत आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. ६ जून रोजीं पुरा झालेला आठवडा | ६६,५०,९३९ |
| ता. १३ जून रोजीं पुरा झालेला आठवडा | ९८,७२,९७६ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते १३ जून १९३६ अखेर | २,७३,१२,४८,३६४ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २९६ | रक मंडळीचें स्कूल ऑफ कॉमर्स | |
| २ ग्रामसुधारणेचा पॅलेस्टाइन-मधला उद्योग ... | २९७ | ५ आयुर्विम्याचा प्रसार | ३०१ |
| ३ रस्त्यांवरील अपघात | २९७ | ६ निवडक बाजारभाव | ३०१ |
| ४ स्फुट विचार ... | २९८ | ७ महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांची आर्थिक उन्नति ... | ३०३ |
| भारतसेवक समाज–बेकारी-बाबत सरकार काय उपाय योजणार?–अमेरिकन कर्जाचा हप्ता व इंग्लंड—खेडेगांवांत रेडिओचा उपयोग—इन्शुअरन्स फील्ड वर्कर्स इन्स्टिट्यूट—आरोग्याचा विमा व सरकारची पूर्व तयारी–शिक्षणप्रसा- | | ८ सिल्व्हर वेडिंग फंड | ३०३ |
| | | ९ ग्रामसुधारणेची ढाल | ३०३ |
| | | १० प. स्वा. जि. को. लँड मॉर्गेज बँक ... | ३०४ |
| | | ११ महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांची आर्थिक पहाणी ... | ३०५ |
| | | १२ विजेच्या सामानाची वाढती आयात ... ... | ३०५ |


# अर्थ

बुधवार, ता. १७ जून, १९३६

## ग्रामसुधारणेचा पॅलेस्टाइनमधला उद्योग

महायुद्धाच्या समाप्तीनंतर पॅलेस्टाइन ह्या देशाची व्यवस्था ग्रेटब्रिटनकडे देखरेखीकरितां सोंपवण्यांत आली. तेथील अरब शेतकरी ( फेला ) अत्यंत मागसलेल्या व हलाखीच्या स्थितींत असल्याचें आढळून आल्यानें ग्रामसुधारणेचा प्रश्न व्यवस्थित रीतीनें हातीं घेण्यांत आला. दारिद्र्य, निरक्षरता, कर्जबाजारीपणा, परावलंबन, निरुत्साह इत्यादि दुःस्थितीचीं सर्व लक्षणें पॅलेस्टाइनमधील शेतकरी वर्गांत दिसून येत होतीं. त्यांच्या सुधारणेस खेडेगांवांतल्या शाळांच्या स्थापनेनें प्रारंभ झाला. तेथील ७५० खेड्यांपैकीं ३०० गांवांमध्यें आतां शाळा चालू आहेत. त्यांच्यांतला शिक्षणक्रम प्रारंभीं शहरांतील शिक्षणसंस्थांच्या धर्तीवर होता, पण त्याचा शेतकरी जनतेस कांहीं उपयोग होण्यासारखा नाहीं असें तात्काळ आढळून आल्यामुळें मलांच्या अभ्यासांत शेतीच्या धंद्यास प्राधान्य दिलें जावें असें ठरलें. ह्या हेतूनें प्रत्येक शाळेभोंवतीं एक मळा लावण्यांत आला आणि शेतीचीं कामें व शाळेंत दिलें जाणारें शिक्षण ह्यांचा मेळ घालण्यांत आला. त्याचप्रमाणें, १५ होतकरू शिक्षक शेतीचें खास शिक्षण देऊन तयार करण्यांत आले. अमेरिकेंतल्या नियर ईस्ट फाउंडेशन नामक फंडांतून ह्या कार्यास द्रव्यसहाय मिळाल्यानें ग्रामसुधारणेच्या प्रयोगास जोर येऊं शकला. पॅलेस्टाइनमध्यें खेडेगांवची शाळा हें ग्रामसुधारणेचें उगमस्थान व प्रमुख अंग बनलें आहे ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. सदरहु चळवळीसंबंधानें खालील बाबी महत्त्वाच्या आहेतः—

( १ ) खेडेगांवीं शाळांत शेतीच्या कामास विशेष महत्त्व देण्यांत येत असतें. ( २ ) शाळेच्या आसपास शेतें व मळे लावलेले असून शिक्षक व विद्यार्थी ह्यांचा बराचसा वेळ त्यांमध्यें जातो. ( ३ ) तेथें शेतीच्या सुधारणेचे प्रयोग करण्यांत येऊन त्यांपासून खेडेगांवीं जनतेसहि शिक्षण मिळतें. ( ४ ) अलीकडे सरकारचीं निरनिराळीं खातीं ह्या शाळांकडे लक्ष देऊं लागलीं असल्यानें ग्रामसुधारणेस त्यांचेंहि सहाय मिळतें. ( ५ ) शेती सुधारणेचे प्रयोग करण्यांत येतात, त्यांविषयीं शेतकरीवर्गास कुतूहल व आस्था वाटूं लागली आहे. ( ६ ) शाळेंतील शिक्षक आपलें काम बरें आणि आपण बरें असें न म्हणतां ग्रामसुधारणेच्या प्रश्नाकडे व्यापक दृष्टीनें पहातात आणि त्यासंबंधानें प्रत्यक्ष काम करतात. आरोग्य, औषधपाण्याची तरतूद, स्वच्छता, आजाऱ्याची शुश्रूषा इत्यादि कामें त्यांनीं हातीं घेतलीं असून खेडेगांवांमध्यें करमणुकीचीं साधनें पुरवण्यांत येत आहेत. ह्या योगानें खेडेगांवांच्या पांचवीस पुजलेल्या भांडणांस आळा बसला आहे. ( ७ ) गांवांत स्थायिक व फिरता ग्रंथसंग्रह सुरू करण्यांत आला असून प्रौढ माणसांकरितां रात्रीच्या शिक्षणाचीहि सोय केली जात आहे.

१९३३ सालाच्या अखेरीस ग्रामसुधारणेच्या वर वर्णिलेल्या अंगांपैकीं शिक्षकांविषयींच्या कार्यास सरकारनें मान्यता देऊन त्यास अधिक चालना मिळेल अशी तजवीज करण्याचें ठरवलें आणि खेडेगांवांच्या गरजांस अनुसरून शिक्षक तयार करण्याची मध्यवर्ती संस्था स्थापन केली. १९३४–३५ सालअखेर ह्या संस्थेंतून १०० शिक्षक तयार होऊन बाहेर पडले आहेत. त्यांच्या अभ्यासक्रमांत खेडेगांवीं उद्योगधंद्यांचाहि समावेश करण्यांत आला आहे आणि ह्या शैक्षणिक उपक्रमावर खास तज्ज्ञांची देखरेख आहे.

ह्याच्या पुढची पाहिरी म्हणजे नमुनेदार खेडेगांवें तयार करण्याबाबतची होय. निरनिराळया भागांतलीं आठ खेडीं निवडण्यांत आलीं असून तेथें होणाऱ्या सुधारणांचा कित्ता इतरत्र गिरवला जावा अशा उद्देशानें काम चालू आहे. ह्या सर्व कार्यक्रमांत सरकारी खात्यांतले अधिकारी आणि जनता ह्यांचें पूर्ण सहकार्य होत आहे. रेडिओच्या द्वारें खेडेगांवीं लोकांस ज्ञान देण्याचा उपक्रमहि करण्यांत आला असून सिनेमाचा उपयोग ह्या बाबतींत व्हावा अशी योजना हातीं घेण्यांत आली आहे.

वरील माहिती "ओपन कोर्ट" नांवाच्या नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या एका लेखावरून घेतली असून आमच्या देशांत ग्रामसुधारणेचें कार्य चाललें आहे, त्यासंबंधांत ती बोधप्रद होईल. ह्यांत संशय नाहीं.

---

## रस्त्यांवरील अपघात

### लहान मुलांस सायकल चालविण्यास बंदी ?

पुण्यासारख्या शहरांतून वाढत्या रहदारीबरोबर अपघातांची संख्या वाढत आहे, ह्याचा अनुभव सर्वांस आहेच. मोटारींसारख्या जलद वेगानें जाणाऱ्या वहानांसाठीं रस्त्यांचा उपयोग केला जाईल, अशी शहरें वसतांना कल्पना नव्हती. आतां वस्ती वाढली असून वहानांची संख्या व त्यांचा वेग ह्यांतहि भरमसाट वाढ झाली आहे. शहरांच्या वाढत्या विस्ताराबरोबर सायकलींची आवश्यकता भासूं लागली व वहातुकीच्या इतर स्वस्त साधनांचे अभावीं सायकलींचा उपयोग वाढत्या प्रमाणावर करण्यांत येऊं लागला. रहात्या घरापासून शाळा–कॉलेजें लांब पडल्यानें विद्यार्थ्यांमध्यें सायकल ही अवश्य वस्तु होऊन बसली व लहान मुलेंहि सायकलीचा सर्रास उपयोग करूं लागलीं. गवताचे भारे, दुधाचे हंडे, वीजकामाच्या शिड्या, इत्यादि सायकलीवर वाहून नेण्याची पद्धत सायकलस्वारांस सोईची पडली, तरी इतरांचे दृष्टीस तीं

सुरक्षित वाटत नाहीं. तीन सायकलस्वारांनीं एकाच ओळींत समांतर जाऊं नये, सायकलीचे पाठीमागचे बाजूस लाल गोळा लावला पाहिजे, एकाच सायकलीवर दोघांनीं बसतां कामा नये, इत्यादि नियमांची आतां कसून अंमलबजावणी होत आहे. तथापि, दहा–बारा वर्षांखालील मुलें अजून मोठ्या सायकलींवर मधे आडवा पाय घालून बसलेलीं आढळतात आणि कोणी सायकल वापरावी व ती कशासाठीं ह्यास कांहींच मर्यादा नाहीं.

रस्त्यांवरील जलद वहातुकीमुळें बाल सायकलस्वारांचे जीव धोक्यांत पडतात, ह्याबद्दल संशय नाहीं. आपल्या मुलास सायकलीवरून शाळेंत पाठविलें तरी तो घरीं येईपर्यंत त्याचे आईबाप काळजी करीत बसतात. इंग्लंडमधील एका कमिटीनें शाळेंत जाणाऱ्या लहान मुलांच्या दृष्टीनें रस्त्यावरील वहातुकीचा विचार करून आपला अभिप्राय प्रसिद्ध केला आहे, त्यांतील महत्त्वाच्या शिफारसी खालीलप्रमाणें आहेत:—

( १ ) निष्काळजीपणानें वहान चालविणारास कडक शिक्षा, ( २ ) मुलांच्या संरक्षक कमिट्यांची जिल्हानिहाय स्थापना, ( ३ ) शाळेजवळील चौकांतून जादा पोलीस संरक्षण, ( ४ ) इतर वहातुकीचीं साधनें उपलब्ध असतील व जेथें सायकलचा उपयोग करणें धोक्याचें असेल, तेथें सायकलीवर जाण्यास विद्यार्थ्यांस बंदी, ( ५ ) सायकलस्वारांची चांचणी करण्यासंबंधीं सूचनेची व्यवहार्यता इ.

अकरा ते बारा वर्षांखालील मुलांस सायकलवर बसण्यास प्रतिबंध करावा, अशी एक सूचना कमिटीपुढें आली होती, परंतु अशा अर्थाचा कायदा अमलांत आणणें कठीण जाईल, तसेंच, रस्त्यांचा उपयोग करण्यास, शिकण्याची मुलांस संधि मिळणार नाहीं, असें तिनें मत दिलें. तथापि मुलांच्या मानानें फार मोठ्या आकाराच्या सायकली असणें, सायकलला पुस्तकें इत्यादि बांधण्यासाठीं कॅरिअर नसल्यामुळें एका हातांत किंवा खाकेंत पुस्तकें नेणें, इत्यादि प्रघात बंद पाडले पाहिजेत; आपल्या मुलांस सायकलीवर नीट बसतां येत असून त्यांस वहातुकीचे नियम समजतात, ह्याबद्दल त्यांचे पालकांनीं काळजी घेतली पाहिजे; रस्त्यांवरून कसें जावें, हें मुलांस शिकविण्याची जबाबदारी मुख्यत: पालकांची आहे, हें त्यांचे मनावर बिंबविलें पाहिजे; वर्तमानपत्रें व सिनेमा ह्यांचे द्वाराहि ह्यासंबंधीं शैक्षणिक काय चालविणें इष्ट आहे; त्याचप्रमाणें, बेदारकारपणें मोटारी हाकणाऱ्या सारथ्यांस अत्यंत कडक शिक्षा झाली पाहिजे, म्हणजे इतरांस वचक बसेल व लायसेन्स रद्द करण्याच्या शिक्षा ज्यास्त प्रभावी होतील अशी अपेक्षा आहे, असा कमिटीचा अभिप्राय आहे.

वरील सूचना आज येथें जरी फार कडक वाटल्या, तरी रस्त्यांवरील अपघात टाळण्यासाठी कोणत्या प्रकारचे नियम केले पाहिजेत, हें समजण्यास त्या उपयोगी ठरतील. दाट वस्ती, अरुंद रस्ते, वेगवान मोटारी व त्यांचे अशिक्षित व बेजबदार सारथी, दगा देणारा रस्त्यांचा पृष्ठभाग, इत्यादि गोष्टी वहातुकीचें नियंत्रण करण्याची जरूरी विशेष तातडीनें नजरेस आणतात. रस्त्यांवरून जाणाऱ्या एका विशिष्ट वर्गाविरुद्ध नियम न करतां सर्वच लोकांस सुरक्षितपणें संचार करतां यावा, अशी योजना झाली पाहिजे. अपघातांची वाढती संख्या हीच गोष्ट निदर्शनास आणते.

———

# स्फुट विचार

## भारत सेवक समाजाची गेल्या वर्षांतली कामगिरी

गेल्या १२ जून रोजीं भारत सेवक समाजाच्या ( सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या) स्थापनेस ३१ वर्षें पुरीं झालीं. सर्वांगीण राष्ट्रीय उन्नतीच्या क्षेत्रांत काम करणारी ही संस्था कै. नामदार गोखले ह्यांनीं १२ जून, १९०५ रोजीं स्थापन केली व स्वार्थत्यागपूर्वक देशसेवा करण्याचें ब्रीद तिनें स्वीकारलें. समाजाचे सुमारें तीस सभासद् आपलें कार्य उत्साहानें करीत असल्याचें तिच्या १९३५–३६ च्या अहवालावरून दिसतें. राजकीय क्षेत्रांतील कामगिरी ही सोसायटीच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची बाब आहे, परंतु तिला आनुषंगिक अशीं सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक इत्यादि क्षेत्रें तितकींच महत्वाचीं समजलीं जातात. सोसायटीच्या पटावर आज मितीस २९ सभासद् असून पंडित हृदयनाथ कुंझरू हे तिचे अध्यक्ष आहेत. सोसायटीच्या उत्पादकसभासदांपैकीं श्री. देवधर हे अहवालाचे सालीं स्वर्गवासी झाले. १९२७ सालापासून ते सोसायटीचे अध्यक्ष होते. त्यांच्या मृत्यूनें समाजाची फार मोठी हानि झाली आहे. सोसायटीच्या कार्यपद्धतीचें वैशिष्ट्य असें आहे, कीं तिचे सभासद् सोसायटीचे वतीनें कामें न करतां इतर संस्था स्थापून व त्या चालवून समाजकार्य करीत असतात. ह्या कारणानें, सोसायटीच्या कार्याचा अहवाल संक्षेपत: निवेदन करतां येणें कठिण असतें. राजकीय कामगिरीच्या दृष्टीनें गेल्या वर्षाचा अहवाल विशेष उत्साहकारक दिसत नाहीं. नव्या राज्यघटनेस जोराचा विरोध करून, आतां नाइलाजानें ती राबवून घ्या, अशा मताचा प्रचार सोसायटीनें केला व त्यांत सोसायटीच्या तीनहि मुखपत्रांनीं चांगली कामगिरी बजावल्याबद्दलचा अहवालांत उल्लेख आहे. हिंदुस्थानाबाहेरील हिंदी लोकांचें हितसंरक्षण, संस्थानी प्रजेचीं गाऱ्हाणीं, कायदेमंडळांत सोसायटीच्या सभासदांनीं केलेलें कार्य, स्थानिक स्वराज्यासंबंधींचे प्रश्न, कामगारांच्या हिताचें रक्षण, सहकार व ग्रामोद्धार, सामाजिक सुधारणा, हरिजनांचा उद्धार, गुन्हेगार जातींचा समाजांत पुनर्प्रवेश, स्काउटिंग, इत्यादि वेगवेगळ्या क्षेत्रांमध्यें सोसायटीच्या सभासदांनीं केलेल्या कार्याचा गोषवारा अहवालांत दिलेला आहे. अहवालाचे शेवटीं प्रिन्सिपॉल गाडगीळ ह्यांच्या नेतृत्वाखालीं चालू असलेल्या गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स ॲन्ड इकनॉमिक्स ह्या संस्थेच्या कार्याची माहिती देण्यांत आली आहे. ह्या इन्स्टिट्यूटनें पुणें शहराची आर्थिक पाहणी करण्याचें योजिलें असून पुणें शहर म्युनिसिपालिटीनें ह्या योजनेचा पुरस्कार केला आहे. सवर्धन व लष्कर हद्दींचाहि वरील पाहणींत समावेश व्हावा असा प्रयत्न चालू आहे.

———

## बेकारीबाबत सरकार काय उपाय योजणार ?

सर तेजबहादुर सप्रू ह्यांनीं सुशिक्षित लोकांच्या बेकारीचा प्रश्न धसास लावल्यामुळें आणि त्यांच्यासारख्या वजनदार गृहस्थानें त्याचा पिच्छा पुरवल्या कारणानें हिंदुस्थान सरकारास त्याच्याकडे दुर्लक्ष करणें अशक्य झालें आहे. खुद्द व्हाइसरॉय ह्यांनीं त्यांस मुलाखतीस बोलवून त्यांच्या सूचनांची काळजीपूर्वक चर्चा केली असल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. त्या सरकाराचीं निरनिराळीं खातींहि त्या बाबतींत हालचाल करून बेकारीनिवारणार्थ स्वत:स काय करतां येईल ह्याचा विचार करूं लागलीं आहेत,

असें दिसतें. ह्या संबंधांत शिक्षण व इतर सरकारी खात्यांच्या सूचनांचा विचार होण्याकरितां एकादी लहानशी कमिटीहि नेमली जाईल असा रंग दिसतो. शिक्षणपद्धतींत सुधारणा व सरकारी नोकरींत प्रवेश मिळण्याच्या बाबतींतली उमेदवारांची लायकी ह्या संबंधांत योजना निश्चित झाल्यास उच्च शिक्षणाचे पायीं वेळ व पैसा खर्ची होऊन तरुणांच्या पदरांत बेकारी येऊन पडते तसले प्रसंग बरेचसे टळतील अशा विचारांचा वारा सध्या वहात आहे. ह्या वरवरच्या उपायांचें महत्त्व मोठें आहे, ह्यांत संशय नाहीं. भलत्याच शिक्षण पद्धतीमुळें राष्ट्राचें जें भयंकर नुकसान आज होत आहे, त्यास मर्यादा घातल्या गेल्या तरी पुष्कळ उपयुक्त कार्य होईल, हें निर्विवाद आहे. तथापि, हिंदी जनतेची आर्थिक स्थिति सुधारल्यावांचून हे व असले दुसरे इलाज विशेष सहायकारक होणार नाहींत, हें प्रस्तुत प्रसंगीं विसरून चालणार नाहीं. योजलेले उपायहि हरले म्हणजे निराशा होऊं नये आणि करावयाचे प्रयत्न पायाशुद्ध व्हावे म्हणून प्रारंभींच खबरदारी घेतली पाहिजे. सरकारच्या आर्थिक व सांपत्तिक धोरणाशीं ह्या प्रश्नाचा निकट संबंध असल्यानें त्याची अत्यंत महत्त्वाची बाजू दृष्टिआड होण्याची भीति आहे. बेकारीनिवारणार्थ आणि सांपत्तिक उन्नतीप्रीत्यर्थ ज्या योजना हातीं घेतल्या जाणें अगत्याचें आहे, त्यांची भाषा सरकारदरबारीं कोठेंच ऐकूं येत नाहीं, हें ध्यानांत ठेवणें जरूर आहे आणि त्याचा विचार लोकांच्या पुढाऱ्यांनीं वेळींच केला पाहिजे.

---

## अमेरिकन कर्जाचा हप्ता इंग्लंड देऊं शकत नाहीं

महायुद्धामुळें युरोपिअन राष्ट्रांचें परस्परांस कोट्यवधि रुपयांचें देणें झालें आणि त्या सर्वांचा अमेरिका प्रचंड घेणेकरी बनला. युरोपिअन राष्ट्रांनीं एकमेकांच्या कर्जाची फेड करण्याचें अनेक अडचणींमुळें मार्गच बंद ठेवलें आणि त्या बाबतची भाषाहि ऐकूं येईनाशी झाली. ग्रेटब्रिटननें अमेरिकेस द्यावयाची पैशाची हप्तेबंदी करण्यांत आली होती व तिला अनुसरून कांहीं काळपर्यंत कर्जफेड झालीहि. पण इंग्लंडला स्वतःचें देणें आपल्या ऋणकोकडून मिळेनासें झालें आणि युद्धकर्जाच्या बाबतींत सर्वच युरोपिअन देणेदार मूग गिळून बसले, अशा स्थितींत अमेरिकेच्या कर्जाचा हप्ता वेळच्या वेळीं देत बसणें श्रेयस्कर नाहीं असें ब्रिटिश मुत्सद्यांस आढळन आलें. तेव्हां त्यांनींहि आपल्या कर्जफेडीचा हप्ता चुकवला. दोन वर्षांपूर्वी अमेरिकेनें हप्त्याची योग्य वेळीं मागणी केली तेव्हां पैशाची भरपाई करण्यास प्रस्तुत परिस्थिति अनुकूल नसून पुढें मागें त्या प्रश्नाचा विचार करणें सोईचें होईल असें ग्रेट ब्रिटननें उत्तर दिलें. जून१५ ही हप्ताफेडीची तारीख जवळ आली कीं, अमेरिकेकडून ग्रेटब्रिटनला स्मरणार्थ लिहून येतें व तूर्त विचार करण्यास सवड नाहीं असें त्या राष्ट्राचें उत्तरहि मिळतें. चालूं जून महिन्यांत एकूण सुमारें २२ कोट रुपये देणें होतील असें अमेरिकेनें नुकतेंच इंग्लंडला कळवलें आणि अत्यंत सौम्य शब्दांत देण्याबद्दलची आठवण करून दिली. त्या प्रश्नाचा विचार व चर्चा करण्यासारखी परिस्थिति अजून निर्माण झालेली नाहीं तथापि त्याचें स्मरण करून दिल्याबद्दल ब्रिटिश सरकार अमेरिकेचे अत्यंत आभारी आहे, अशा आशयाचें दरबारी उत्तर सर रोनॉल्ड लिंडसे, अमेरिकेंतले ब्रिटिश वकील, ह्यांनीं पाठविलें आहे.

---

## खेडेगांवांत "रेडिओ"चा उपयोग

परकीय शब्द देशी भाषांमध्यें येऊं देण्याच्या इष्टानिष्टतेसंबंधानें साहित्तिकांमध्यें एकीकडे चर्चा होत असतां दुसरीकडे, हिंदी जनतेंत आर्थिक व सामाजिक परिवर्तन चालू आहे, त्याच्या ओघांत लोकांच्या वाणींत अपभ्रष्ट इंग्रजी शब्दांचा झपाट्यानें प्रसार होत आहे. सिनेमा, ग्रामोफोन इत्यादि शब्दांबरोबर आतां रेडिओचा परिचय जनतेस होणार असें दिसत असून उत्तर हिंदुस्थानांत त्याचा 'राडू' बनल्याचें प्रसिद्ध झालें आहे. रेडिओच्या द्वारें खेडेगांवांतील रहिवाशांस करमणूक व ज्ञान यांचें सोपें साधन उपलब्ध करून द्यावें आणि अशा रीतीनें ग्रामसुधारणेच्या कार्यास हातभार लावावा ह्याविषयीं सरकारमार्फत जोराचा प्रयत्न चाललेला आहे. इंडिअन स्टेट ब्रॉडकास्टिंग सर्व्हिस हें हिंदुस्थान सरकारच्या ध्वनिक्षेप व्यवस्थेचें प्रस्तुत नांव आहे, तें अत्यंत बोजड आाण सामान्य माणसांस वापरण्यास कठिण असें आहे. म्हणून त्याच्या एवजीं ऑल इंडिया रेडिओ ह्या नांवाचा उपयोग करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. दिल्लीच्या आसपासच्या खेडेगांवांमध्यें रेडिओच्या द्वारें गाणीं व भाषणें तेथील लोकांस ऐकावयास मिळतील आणि तीं सामान्य जनतेस रुचतील व पचतील अशा रीतीनें त्यांची निवड करण्याचा उपक्रम सध्या चालला आहे. ग्रामोफोनवरचीं गाणीं खेडेगांवांतहि आतां लोकप्रिय झालीं असून चहाच्या व फराळाच्या दुकानांमध्यें त्यांच्या वांचून चालेनासें झालें आहे. करमणूक व ज्ञानाचा प्रसार ह्यांचे बाबतींत रेडिओ हें ह्याहिपेक्षां ज्यास्त प्रभावी असें साधन होणार ह्यांत शंका नाहीं. ह्या दृष्टीनें पाहातां लोकशिक्षणाच्या ह्या नव्या उपक्रमाचा व्यवस्थितपणानें आणि इष्ट रीतीनें उपयोग होण्याचें महत्व किती आहे हें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

---

## 'डॉन ऑफ इंडिया' ची इन्शुअरन्स फील्ड वर्कर्स इन्स्टिटयूट, पुणें

वरील संस्थेची स्थापना १९३४ सालीं झाली असून डॉन ऑफ इंडिया विमा कंपनीच्या चालकांकडे तिचें नेतृत्व आहे. व्यापारी क्षेत्रामध्यें शास्त्रीय व व्यावहारिक माहिती असणारांची मोठी उणीव आज दिसून येते, ती भरून काढण्याचा सदरहु संस्थेचा उद्देश आहे. खुद्द विमा व्यवसायामध्येंच कित्येक सुशिक्षित तरुणांस वाव आहे आणि त्यांस शिक्षण मिळण्याची तजवीज झाल्यास एक मोठी सोय होईल. मराठा चेंबर ऑफ कॉमर्सनें नेमलेल्या परीक्षकांच्या बोर्डाकडून उमेदवारांची परीक्षा घेतली गेल्यास उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस व्यापारी क्षेत्रामध्यें मान्यता मिळणें सोपें जाईल. ह्या संबंधांत मराठा चेंबरचें सहाय मिळविण्याची खटपट चालू आहे. इन्स्टिटयूटचा अभ्यासक्रम बारा महिन्यांचा असून, त्यामध्यें जरूर असलेल्या सर्व विषयांचा समावेश करण्यांत आलेला आहे व प्रवेश मिळवूं इच्छिणारांचें शिक्षण मॅट्रिकच्या दर्जाचें असावें, असें ठरलें आहे. ॲडव्होकेटच्या परीक्षेस बसणारांसाठींहि सायंकाळचे वर्ग चालू करण्यांत यावयाचे आहेत. डॉन ऑफ इंडियाच्या ट्रेनिंग इन्स्टिटयूटनें अंगिकारलेलें हें कार्य अत्यंत महत्त्वाचें व आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें तात्काळ हातीं घेण्याच्या योग्यतेचें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. व्यावसायिक शिक्षण घेतलेले लोक ज्या मानानें महाराष्ट्रभर पसरतील, त्या मानानें आमच्या आर्थिक प्रगतीचा पाया मजबूत व विस्तृत होणार असून त्यामुळें शास्त्रशुद्ध पद्-

तीनें व्यवसाय चालविले जाण्यास सहाय होणार आहे. विमा व्यवसायाचें व्यावहारिक व तात्त्विक शिक्षण इतर धंद्यांतहि उपयोगी पडण्यासारखें आहे, हें विसरतां कामा नये. धंदेवाईकपणाची वृत्ति आणि संचय महाराष्ट्रांत जितकी वाढेल तितकी हवी आहे ह्या दृष्टीनें प्रस्तुत इन्स्टिटयूटकडे पहाणें आवश्यक आहे.

### आरोग्याचा विमा व सरकारची पूर्व चौकशी

आयुर्विम्याची व आगीच्या विम्याची हिंदुस्थानांत व्हावी तशी प्रगति झालेली नाहीं, तेव्हां इतर पद्धतीचे विमे आपल्या देशांत मागसलेले असावे, ह्यांत आश्चर्य नाहीं. कारखान्यांतील कामगारांचे संघ सुसंघटित व कार्यक्षम नसल्यानें आरोग्याचा विमा त्यांचेमध्यें सुरू करण्याचे मार्गांत अनेक अडचणी आहेत. देशाचा विस्तार व उद्योगधंद्यांमधील सहकार्याचा अभाव, हेंहि ह्या दुःस्थितीचें कारण आहे. असेंब्लीच्या गेल्या अधिवेशनामध्यें आरोग्याचे विम्याबाबत चर्चा झाली होती, तीस अनुसरून हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारांचा सल्ला विचारला आहे. अर्थात् हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा व गुंतागुंतीचा असून, त्यासंबंधीं घाईनें कायदा पास करतां येणें शक्य नाहीं. तथापि, कामगारांच्या सोई पहाण्याचें आपलें धोरण सरकारनें वरील पहाणीचे रूपानें व्यक्त केलें आहे व तें आशादायक आहे. कामगार वर्गानें व त्याच्या पुढाऱ्यांनीं हा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न हातीं घेऊन सरकारास आपला सद्हेतु प्रत्यक्ष कृतींत आणावयास लावणें जरूर आहे.

### शिक्षण प्रसारक मंडळीचें स्कूल ऑफ कॉमर्स

शिक्षण प्रसारक मंडळीच्या स्कूल ऑफ कॉमर्सनें, पुणें येथें एप्रिल १९३६ मध्यें झालेल्या 'Government Commercial Diploma' ह्या परीक्षेस ५१ विद्यार्थी पाठविले होते. ता. ११ जून १९३६ रोजीं या परीक्षेचा निकाल 'Bombay Government Gazette' मध्यें प्रसिद्ध झाला असून या शाळेनें पाठविलेल्या विद्यार्थ्यांपैकीं १४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांत पांच विद्यार्थी 'दुसऱ्या' वर्गांत पास झाले असून नऊ विद्यार्थी 'पास' वर्गांत पास झाले आहेत. गेल्या दोन वर्षांपेक्षां हा निकाल अत्यंत समाधानकारक लागला आहे असें शाळेचे व्यवस्थापक, प्रो. ना. ग. नारळकर, हे कळवितात. शाळेची प्रवेश फी ५ रु. व वार्षिक फी ८० रु. आहे. नवीन विद्यार्थी ता. ४ जुलै १९३६ पर्यंत दाखल केले जातील. माहितीपत्रक, सुपरिंटेंडेंट, शि. प्र. मंडळीचें 'स्कूल ऑफ कॉमर्स,' पुणें, यांस लिहिलें असतां विनामूल्य पाठविण्यांत येईल.

### खाणींमध्यें स्त्री कामगारांस मनाई

कोळशाच्या व इतर खाणींतून स्त्रियांस रात्रीचे वेळीं काम करण्यास सध्या मनाई आहे. १ जुलै १९३७ नंतर कोणत्याहि स्त्री कामगारास खाणीमध्यें केव्हांहि मजुरीचें काम करतां येऊं नये, अशा अर्थाची दुरुस्ती नियमांत करण्याचा सरकारचा विचार आहे. इतर कामासाठी खाणींत उतरण्यास त्यांस प्रतिबंध होणार नाहीं.

### हिंदी सिमेंट कंपन्यांचें एकीकरण

हिंदुस्थानांतल्या सिमेंट तयार करणाऱ्या कंपन्यांची एकमेकांत बेलगाम स्पर्धा चालून त्यांच्या धंद्यांत गोंधळ माजतो व नुकसान येतें असा अनुभव आल्यानें त्यांपैकीं दहा मंडळ्यांनीं स्वतःचें एकीकरण घडवून आणण्याचें निश्चितपणें ठरविलें आहे. ह्या योजनेची चर्चा आज बरेच दिवस चालली असून शेवटीं आतां तिला मूर्त स्वरूप प्राप्त व्हावयाचें आहे. वरील कंपन्यांची 'असोसिएटेड सिमेंट कंपनीज" ह्या नांवाची एक कंपनी बनेल आणि तिच्या एकूण आठ कोटि रुपयांच्या भांडवलांत प्रत्येक कंपनीस ठराविक प्रमाणांत हिस्सा मिळेल. आपली मालमत्ता व देणें-घेणें ह्याची मालकी व जबाबदारी प्रत्येक कंपनीची राहील. हिंदी सिमेंटचें उत्पादन आणि विक्री करण्याचें कार्य नवीन एकीकृत कंपनीच्याच अधिकारांत सर्वस्वी राहील. हा एकंदर उपक्रम प्रचंड आहे, ह्यांत शंका नाहीं.

### कामाचे तास कमी करण्याचे प्रयत्न

इंटर नॅशनल लेबर ऑफिसनें गेल्या वर्षी ४० तासांच्या आठवड्यास मान्यता दिली व त्याच्या अंमलबजावणीस हळु हळु सुरवातहि करण्यांत आली. हें तत्त्व वाढत्या प्रमाणांत लागू व्हावें अशी खटपट सध्या चालू असलेल्या अधिवेशनांत करण्यांत येत आहे. कापडाच्या गिरण्यांतील कामाचे तास कमी करण्यास इंग्लंड, जपान व हिंदुस्थान ह्या तीनहि देशांचे सरकारी व गिरणी मालकांचे प्रतिनिधी तयार नाहींत. कपास कापडाचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या प्रमुख राष्ट्रांस मान्य नसलेली कामाच्या तासांचे बाबतची सुधारणा लेबर कॉन्फरन्समध्यें मंजूर झाल्यास त्याचा उपयोग होणार नाहीं, हें उघड आहे.

### सरकारी दवाखाने

मुंबई इलाख्यांतील इस्पितळें व दवाखाने ह्यांसंबंधीचा १९३२ ते ३४ ह्या तीन वर्षांचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. ह्या पूर्वीच्या तीन वर्षांच्या मानानें अहवालाचे मुदतींत दवाखाने व इस्पितळें ह्यांचा फायदा घेणाऱ्या रोग्यांचे संख्येंत शेंकडा १४½ टक्के घट झाली आहे. १९३२ सालानंतर एडनमधील रोग्यांचे आकडे एकूण हिशेबांत घेतलेले नाहींत, ह्यामुळें ही घट दिसते. ह्या खेरीज, औषधें नेणारांवर एक आणा फी बसविल्यामुळें दवाखान्यांचा फायदा कमी लोक घेऊं शकले. इस्पितळांत राहून औषधोपचार घेणारांसहि रोज दोन आणे किमान द्यावे लागतात, परंतु त्यांच्या संख्येवर ह्या फीचा परिणाम झालेला नाहीं.

### मि. बॉल्डविन ह्यांचीं सनातन तत्त्वें

ग्रेटब्रिटनचे मुख्य प्रधान, मि. बॉल्डविन, ह्यांनीं एका भाषणांत आपण खालील तत्त्वांचे कट्टे पुरस्कर्ते आहों, असें जाहीर केलें:—"धर्माचें अधिष्ठान, राजसत्ताक पद्धति व राज्यघटना ह्यांचें अबाधित स्थैर्य, साम्राज्य व त्यांतली जूट आणि ब्रिटिश जनतेचें स्वास्थ्य."

### नोकरीकरतां केलेल्या अर्जांस पोस्टाची सवलत

नोकरीसाठी केलेल्या अर्जांस नेहेमीच्या दरापेक्षां निम्मा दर ग्रेट ब्रिटनमध्यें आकारण्यांत येतो. "नोकरीकरितां अर्ज" असा शिक्का मारलेल्या एका कागदावर मजकूर लिहून तो पाकिटांत घालावयाचा, परंतु पाकीट बंद करावयाचें नाहीं, म्हणजे ही सवलत मिळते.

## आयुर्विम्याचा प्रसार

—⁂—

### अमेरिका, इंग्लंड व हिंदुस्थान

ग्रेट ब्रिटनमध्यें आयुर्विम्याची प्रगति किती समाधानकारक रीतीनें होत आहे, ह्यासंबंधीं माहिती ' अर्था ' च्या १३ मे १९३६ च्या अंकांत आलेली आहे. तथापि, दर माणशी विम्याचें प्रमाण किती पडतें हें पाहिल्यास अमेरिका व कॅनडा या देशांचा नंबर जगांत अनुक्रमें पहिला व दुसरा लागतो. एकूण चालू काम कॅनडापेक्षां ग्रेट ब्रिटनमध्यें ज्यास्त आहे, परंतु चालू काम व दर माणशी विम्याची रकम ह्या दोन्ही बाबतींत अमेरिका अग्रेसर आहे. गेल्या दहा वर्षांत ग्रेट ब्रिटनमध्यें विम्याचे रकमेंत ४५ टक्के वाढ झाली, अमेरिकेंत ५५ टक्के तर कॅनडांत ६२ टक्के वाढ झाली. हे आंकडे ग्रेट ब्रिटनमध्यें अजून विम्याचे प्रसारास किती वाव आहे, हें दर्शवितात.

अमेरिका, कॅनडा, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड, ग्रेट ब्रिटन व ऑस्ट्रेलिया हे देश दर माणशीं विम्याची रकम लक्ष्यांत घेतां ह्याच अनुक्रमानें येतात. अर्थात्, दक्षिण आफ्रिकेमधील फक्त युरोपियनांचा वरील प्रतवारींत विचार केलेला आहे. तद्देशीयांत विम्याचा प्रसार झालेला नाहीं. ह्या सहा देशांपैकीं सर्व इंग्रजी भाषा बोलणारे असून त्यांतील पांच ब्रिटिश साम्राज्यांत आहेत, असें अभिमानानें सांगण्यांत येतें. युरोपांतील देशांतून सेव्हिंग्ज बँकांत शिलका टाकण्याची प्रवृत्ति दिसते; ग्रेटब्रिटनमध्यें विमा कंपन्या ह्या ज्यास्त लोकप्रिय संस्था आहेत. हिंदुस्थानासारख्या मागसलेल्या देशांत द्रव्यसंचयच अगोदर कमी, त्यांतून बँकांत पैसे ठेवण्याची प्रवृत्ति नाहीं; तेव्हां चालू उत्पन्नांतून पैसे शिलक टाकून विमा उतरविण्याचें प्रमाण अत्यल्प असणार, हें उघड आहे. तथापि, सुशिक्षित व विम्यामुळें मिळणाऱ्या संरक्षणाची किंमत ओळखणारे लोक ह्यांमध्यें विम्याचा प्रसार ज्यास्त होण्यास मुबलक वाव आहे. गरीबीमुळें एकूण विम्याची रकम फार मोठी भरणार नाहीं, परंतु विमेदारांची संख्या वाढावयास कोणती हरकत आहे? दर माणशी विम्याचें प्रमाण कमी असलें तरी एकूण उत्पन्नाच्या मानानें तें पुरेसें असण्यास आडकाठी येऊं नये. ह्या दृष्टीनें हिंदी विमा कंपन्यांस अमर्याद वाव आहे. विम्यामुळें कुटुंबाच्या संसारास मदत होते व सुरक्षिततेच्या भावनेमुळें इतर व्यवहारांतहि कार्यक्षमता वाढते. त्याचप्रमाणें, आयुष्यक्रमास शिस्त लागून त्याचा परिणाम हितावह असाच होतो. ह्या सर्व दृष्टींनीं पहातां विम्याचा प्रसार होणें हिंदुस्थानांत अगत्याचें असून, विमा हा निवळ धंदा नाहीं, प्रौढ शिक्षणाचें तें एक साधन आहे, ह्या भावनेनें विमा कंपन्यांनीं आपले कारभार चालविणें इष्ट आहे.

---

### " बालसन्मित्र "

श्री. मिसाळ ह्यांच्या संपादकत्वाखाली निघणाऱ्या, मुलांसाठी चालविण्यांत येणाऱ्या ह्या पाक्षिकास ता. १ जून रोजीं तिसरें वर्ष सुरू झालें. लहान मुलांस वाचनाची गोडी लागून त्यांची जिज्ञासा वाढावी, ह्या उद्देशानें हें पत्र चालविण्यांत येतें. श्री. मिसाळ ह्यांनीं कित्येक लहान लहान पुस्तकें लिहिलेलीं आहेत व ह्या पाक्षिकानें तेंच कार्य व्यवस्थितपणें चालू ठेवलें आहे. 'बालसन्मित्रा 'स मुंबई इलाखा, मध्यप्रांत व वऱ्हाड आणि इंदूर येथील शाळाखात्यांनीं मंजुरी दिलेली आहे.

## निवडक बाजारभाव

---

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | ११०-११ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०—७ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८—७ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—६ |
| ४% १९६०—७० ... ... | ११४-१२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९८—५ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०६-१२ |
| ४% १९४३ ... ... ... | ११०-११ |
| २¾% १९४८—५२ ... ... | १००—३ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०९—४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०७—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०८—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | १०८—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११०—६ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३०—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११०—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३३-१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५७१—४ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३१—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १०१—४ |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९०५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५९—६ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २३०—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १६१७—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५६०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९३—२ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १५५—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १७६—४ |
| टा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ६८६—४ |

---

## WANTED.

Influential and hard-working Agents At Ahmednagar, Dhulia, Kolhapur, Nasik and Poona for Sun Life Assurance Company of Canada on liberal terms. Apply :—

The Manager,
Sun Life Assurance Company of Canada,
Hornby Road, Fort, BOMBAY.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

## दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठी लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

## रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

प्रो. काळे ह्यांचें
'अर्थ' ग्रन्थ मालेंतील तिसरें पुस्तक

## व्यापारी उलाढाली

महाराष्ट्रांत व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांचा उत्कर्ष व्हावा असें प्रत्येकास वाटतें, परंतु ह्या संबंधांत जे व्यवहार चालतात त्यांची माहिती फार थोड्या लोकांस असते. सामान्य जनतेस कमाईतून बचन करण्याची संवय लागून तीमधून निर्माण होणाऱ्या द्रव्यसंग्रहाचा उपयोग, व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या अभिवृद्धीकडे व्हावा, ह्याकरितां औद्योगिक व व्यापारी मंडळ्या ह्यांचे व्यवहार कसे चालतात, बाजारांत निरनिराळ्या प्रकारांच्या उलाढाली कशा होतात, इत्यादि विषयांचें ज्ञान महाराष्ट्रीय समाजांत पसरणें आवश्यक आहे. वृत्तपत्रांमध्यें व ऐकिवांत ह्या संबंधांत ज्या बातम्या येतात, त्यांचें रहस्य ओळखण्याची पात्रता लोकांमध्यें उत्पन्न झाली पाहिजे. हें ज्ञान महाराष्ट्रीय लोकांस सुगम रीतीनें व्हावें, ह्या उद्देशानें प्रस्तुत पुस्तक मुद्दाम लिहिलें आहे आणि त्याचा योग्य उपयोग जनता करून घेईल असा ग्रंथकर्त्यास विश्वास वाटत आहे.

पृ० १४३—किंमत १ रुपया. ( ट. हं. वेगळें )

मिळण्याचीं ठिकाणें:—

( १ ) व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रंथमाला, पुणें ४.
( २ ) आर्यभूषण प्रेस, पुणें २.
( ३ ) दि को-ऑपरेटर्स बुक-डेपो, ९ बेकहौस लेन, फोर्ट, मुंबई.

प्रो. काळे ह्यांचें सर्वांस उपयुक्त पुस्तक

## बँका आणि त्यांचे व्यवहार

ह्या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति ह्यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून, बँकांनीं आपला कारभार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा ह्या बाबतींत उपयुक्त सूचना केल्या आहेत. त्यांत चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँक, सावकारी धंदा, आर्थिक मंदी, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक प्रश्नांची सांगोपांग चर्चा आली आहे. सध्यांच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास तें बोधप्रद होईल अशा रीतीची पुस्तकाची मांडणी व विवेचनपद्धति आहे. बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाईक, व्यवस्थापक आणि नोकर ह्यांनीं तें अवश्य वाचून त्याचें मनन केलें पाहिजे.

कापडी बांधणी किंमत १ रु.

प्रती, आर्यभूषण प्रेस, पुणें, यांचेकडे मिळतील.

## महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांची आर्थिक उन्नति

हिंदुस्थान हा देश शेतीप्रधान असून तेथें उद्योगधंद्याच्या प्रगतीचे अभावीं प्रजेचें शेतीवरील अवलंबन वाढत्या प्रमाणांत आहे, ही गोष्ट नव्यानें सांगावयास नको. महाराष्ट्रांतील परिस्थिति इतर प्रांतांचे मानानें एका दृष्टीनें ज्यास्तच बिकट आहे. उद्योगधंद्यांचे बाबतींत सबंद हिंदुस्थानांत मुंबई इलाख्यास अग्रेसरत्वाचा मान आहे, परंतु खुद्द महाराष्ट्र कारखाने व मोठ्या प्रमाणावरील औद्योगिक उत्पादन ह्यांस पारखा असल्यासारखाच आहे. पाण्याखाली अशी फारच थोडी जमीन ह्या भागांत आहे व आहे ती जमीनहि निकृष्टावस्थेस जात आहे. शेतीच्या पिकांचे भाव पडल्यापासून शेतकऱ्यांत त्राण राहिलेला नाहीं व कर्ज मिळणेंहि त्यास कठीण झालें आहे, कारण त्यास आवश्यक असलेलें तारण त्याचेजवळ उरलेलें नाहीं. अशा रीतीनें, उद्योगधंद्यांत पुढारलेल्या मुंबई इलाख्यांतील महाराष्ट्रांत उद्योगधंदे व कारखानेहि नाहींत व शेतीहि फायदेशीर उरलेली नाहीं. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा इतका वाढला आहे कीं, शेतकरी व कर्जबाजारी हे शब्द समानार्थी झाले आहेत.

हिंदुस्थानची प्रगति होणें असल्यास शेतकऱ्यांची परिस्थिति प्रथम सुधारली पाहिजे, हें जाणून महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या कार्यकारी मंडळानें एका कमिटीच्या मार्फत त्या संबधांत चौकशी करविली. ह्या कमिटीच्या अहवालाचा सारांश आज आम्हीं दुसरीकडे दिला आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचा प्रश्न ज्या मानानें बिकट, त्या मानानें तो सोडविण्याची उपाययोजनाहि कार्यक्षम असली पाहिजे, ह्या विचारानें कमिटीनें आपल्या शिफारसी केल्या आहेत. तथापि, आमूलाग्र फरक एकदम घडवून आणणें कठिण आहे, याची जाणीव कमिटीच्या सूचनांत दिसून येते. महसुलांत ५० टक्के कपात व बिनसरकारी रीतीनें पिकाची आणेवारी, ही कमिटीची प्रमुख मागणी आहे. ह्या प्रकारच्या सुधारणा आज कित्येक वर्षें सुचवण्यांत आल्या आहेत. इतर व्यवसायांतील लोकांचे मानानें शेतीचे धंद्यावर अवलंबून असणाऱ्या जनतेवर कराचा बोजा जास्त पडतो व हा बोजा उत्पन्नांत प्रतिकूल फरक झाला तरी कमी होत नाहीं, उलट त्याचें प्रमाण वाढतें, ही गोष्ट अमान्य करतां येणार नाहीं. शेतकऱ्यांनीं सहकारी संघटनेचा अवलंब करणें श्रेयस्कर आहे हें कमिटीचें मत त्या चळवळीमधील कार्यकर्त्यांस उत्साहकारक वाटेल, परंतु आजपर्यंत तिचा प्रसार मर्यादित कां राहिला आहे आणि सध्या तिची स्थितिहि असावी तशी समाधानकारक कां नाहीं ह्याचा खोल विचार कमिटीनें केला आहे असें दिसत नाहीं.

शेतकऱ्यांनीं जोडधंदे करावे असा कमिटीचा अभिप्राय आहे, परंतु त्यांपासून मोठीशी फलप्राप्ति होईल, अशी जनतेची विशेष अपेक्षा दिसत नाहीं. एकंदरीनें पहातां, कमिटीच्या सूचना आत्यंतिक स्वरूपाच्या नसून, त्या तत्त्वत: अमान्य होण्याचें कारण नाहीं. तथापि, राज्यकारभाराचा गाडा प्रचलित पद्धतीनें चालण्यास पुरेसा पैसा मिळावयाचा असेल, तर कमिटीच्या शिफारसी प्रत्यक्ष कशा अमलांत येणार हाच अवघड प्रश्न आहे. सध्याच्या परिस्थितींत जरूर ती सुधारणा, तिला व्यावहारिक मुरड घालून, घडवून आणणें व चालत आलेल्या पद्धतींत महत्वाचे बदल करणें, ह्यांत महदंतर आहे. ह्या कारणानें, तात्कालिक उपाय ह्या दृष्टीनेंहि कमिटीच्या सर्व शिफारसी जशाच्या तशा अंमलांत आणणें नवीन कायदेमंडळांत कठिण आहे हें कोणाच्याहि लक्षांत सहज येईल. उदाहरणार्थ, सरकार आणि जनता ह्यांचे हितसंबंध विरोधी स्वरूपाचे असल्यास, महसुलाची आकारणी बिनसरकारी कमिटीनें करावी, ही मागणी युक्त होईल; परंतु आगामी प्रांतिक स्वायत्ततेमध्यें जबाबदार राज्यपद्धति अंमलांत आल्यावर आणि सर्वच सभासद लोकप्रतिनिधि झाल्यावर सरकारास प्रजेचें हित पाहण्यास लावणें व उपरिनिर्दिष्ट सुधारणा घडवून आणणें सारखेंच सोपें अगर अवघड होईल. सबंद प्रांतिक बजेट मंजूर-नामंजूर करण्याची सत्ता प्रातिनिधिक कायदेमंडळास प्राप्त व्हावयाची असून प्रधानमंडळ त्यास जबाबदार रहावयाचें आहे असा नवीन राजकीय घटनेचा रोख आहे. सरकारी उत्पन्नाच्या मुख्य बाबींचा वसूल, जमीन महसुलांत घट झाल्यानें कमी झाल्यास त्याची भरपाई अन्य मार्गांनीं करून राज्यशकट हांकण्याची जबाबदारी कायदेमंडळ व कार्यकारी मंत्री ह्यांवरच पडेल. तेथें निराळें सरकार रहाणार नाहीं ह्या गोष्टीची जाणीव सर्वांस होणें आवश्यक आहे.

---

### सिल्व्हर वेडिंग फंड

पंचम जार्ज बादशहा व महाराणी मेरी ह्यांच्या विवाहास २५ वर्षें पूर्ण झाल्यानिमित्त एक 'सिल्व्हर वेडिंग फंड' उभारण्यांत आला होता, त्याचा १९३५ अखेरचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. अहवालाचे सालीं ह्या फंडांतून ७४,५४० रुपयांच्या शिष्यवृत्या देण्यांत आल्या, परंतु मुंबई इलाख्याचे वांटणीस फक्त ९,१०० रुपये आले. तथापि, साल अखेर ह्या इलाख्यांतील २५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ति मिळत होती. सध्याच्या धोरणानुसार सिल्व्हर वेडिंग फंड १९४० चे सुमारास संपून जाईल, अशी अपेक्षा आहे. गेल्या महायुद्धाचे वेळीं लष्करी कामगिरी केलेल्या हिंदी अधिकाऱ्यांच्या व सैनिकांच्या मुलांची व कौटुंबीयांची शिक्षणाची सोय फंडांतून केली जाते.

---

### ग्रामसुधारणेची ढाल

ग्रामसुधारणेच्या बाबतींत सर्वांत उत्कृष्ट प्रगति करणाऱ्या मुंबई इलाख्यांतील खेडेगांवास सर फ्रेड्रिक साइक्स ढाल देण्यांत येते. प्रत्येक विभागांतून एक एक खेडेगांव निवडण्यांत येऊन त्यास ही ढाल मिळते. मध्य विभागांतील सोलापूर जिल्हा हद्दीमधील मुळेगांवास यंदा ही ढाल मिळाली आहे. उत्तर विभागापैकीं कैरा जिल्ह्यांतील लंभवेल व दक्षिण विभागांतील विजापूर जिल्ह्यांतील होनटगी गांवाचे वांटणीस वरील ढाल आली आहे.

---

### तिसऱ्या वर्गाचे उतारू व परतीचीं तिकिटें

मुंबई ते पुणें तिसऱ्या वर्गानें प्रवास करणारांची संख्या मोठी असल्यानें आठवड्याची कमी भाड्याचीं परतीचीं तिकिटें काढण्यापासून रेल्वेचा फायदा नाहीं, उलट उत्पन्न कमी होईल असें जी. आय. पी. रेल्वेच्या मुंबई येथील स्थानिक सल्लागार कमिटीच्या अध्यक्षांनीं कमिटीस सांगितलें. इंटर वर्गानें प्रवास करणारांसाठी ज्यास्त डबे ठेवल्यास तिसऱ्या वर्गाच्या उतारूंस जागा कमी पडेल, सबब त्या वर्गाच्या उतारूंसहि ही सवलत मिळणार नाहीं.

---

### नवी लँड मॉर्गेज बँक

ठाणें, कुलाबा व मुंबई उपनगर ह्याकरितां एक लँड मॉर्गेज बँक स्थापण्याचे प्रयत्न व त्या प्रीत्यर्थ प्रचार चालू आहे.

## प. खा. जि. को. लँड मार्गेज बँकेची प्रगति

पश्चिम खानदेश जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँड मार्गेज बँक धुळें, या बँकेचें रीतसर कामकाज सप्टेंबर, १९३५ पासून सुरू झालें. सुरवातीचे दोन महिने पूर्व तयारींत व प्रचारकार्यांतच गेले, आणि त्यानंतरच लँड व्हॅल्युएशन ऑफिसर ह्यांस बँकेचें मुख्य व महत्त्वाचें काम हातीं घेतां आलें. शेतकरी वर्गास ह्या लँड मार्गेज बँकेचें महत्त्व व उपयुक्तता आतां पूर्णपणें पटली आहे, हें आजपावेतों खालील वर्णिलेल्या बँकेच्या कामावरून पूर्णपणें व्यक्त होत आहे.

बँकेच्या कामाची प्रगति

| | अर्जांची संख्या | कर्जाची रकम |
|---|---|---|
| कर्जमागणी | १४७ | २,९५,०६५ |
| तपासलेले अर्ज | १२८ | २,६२,००० |
| बोर्डानें विचारांत घेतलेले अर्ज | ७४ | ... |
| बँकेनें शिफारस केलेले अर्ज | ५४ | ७६,४५० |
| प्रांतिक लँड मार्गेज बँकेनें मंजूर केलेले अर्ज | २० | ३९,०५० |

सावकारांशीं तडजोड करून त्यांस ह्या जिल्हा लँड मॉर्गेज बँकेनें प्रत्यक्ष सुमारें १५,००० रुपये देऊन सभासदांची कर्जफेड केली आहे. बाकीचीं मंजूर झालेलीं कर्जेंहि वांटण्याचें काम चालू आहे. बँकेच्या बिगर कर्जदार सभासदांचें भाग-भांडवल ११,५०५ रु. असून सभासदांचें भाग भांडवल १,८८५ रु. आहे. कर्जें जसजशीं दिलीं जातील, तसतशी ह्या रकमेंत शेकडा पांच टक्के वाढ होत जाणार आहे.

या बँकेबरोबरच स्थापन झालेल्या इतर लँड मॉर्गेज बँकांशीं तिची तुलना केली असतां प्रगतीच्या दृष्टीनें ह्या बँकेचा अनुक्रम बराच वर लागेल, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## वांई तालुक्यांतील सहकारी कार्यकर्त्यांचा सन्मान

ता. २८ मे रोजीं सहकारी खात्याचे रजिस्ट्रार ह्यांनीं वांई तालुका को. सु. यूनियनची तपासणी केली. तपासणीनंतर त्यांनीं यूनियनच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केलें. असि. रजिस्ट्रार श्री. भागवत ह्यांच्या भाषणानंतर वांई तालुक्यांतील श्री. बाळकृष्ण मारुती पाटील ( गुळुंब ) व श्री. धोंडीराम बापू वाघ ( आसले ) ह्यांस रजिस्ट्रारसाहेबांचे हस्तें 'को-ऑपरेटिव्ह सर्व्हिस'चीं रौप्य पदकें देण्यांत आलीं.

## कर्जाची तडजोड करणारीं बोर्डें—म्हैसूर सरकारचें बिल

म्हैसूर सरकारनें कर्जाची तडजोड करण्यासाठी नेमावयाच्या बोर्डाबाबत एक बिल म्हैसूर कायदेमंडळांत आणण्याचें ठरविलें आहे. हें बिल १०० रुपयांपेक्षां ज्यास्त कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांस लागू होईल व सावकार आणि ऋणको शेतकरी ह्यांमध्यें तडजोड घडवून आणण्यांत आल्यावर ती नोंदण्यांत येऊन त्यास दिवाणी कोर्टाच्या हुकुमनाम्याइतका दर्जा प्राप्त होईल. ह्या तडजोडीच्या अटींप्रमाणें वसूल न झाल्यास जमीनमहसुलाच्या बाकीप्रमाणें रकम वसूल करण्यांत येईल. बोर्डानें केलेली तडजोड असेरचा निर्णय अशी समजली जाईल.

मुंबई कायदेमंडळांत वरील स्वरूपाचेंच एक बिल श्री. पाटील हे मांडणार आहेत.


धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०
कडून
हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक
नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | |
|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |

| | | |
|---|---|---|
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |

| | |
|---|---|
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

This year 1934-35
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांची आर्थिक पहाणी.

[महाराष्ट्र प्रांतिक कॅांग्रेस कमिटीच्या कार्यकारी मंडळानें शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीची व त्यांच्या निकडीच्या गरजांची पहाणी करण्यासाठी नेमलेल्या कमिटीचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील महत्त्वाच्या मुद्यांचा सारांश येथें देण्यांत येत आहे.]

(१) पैशाच्या साधनानें आर्थिक व्यवहार सुरू झाल्यापासून जागतिक घडामोडींवर शेतकऱ्यांचें जीवन अवलंबून राहूं लागलें आहे.

(२) १९२८–२९ पासून पिकांचे भाव शेंकडा पन्नासांनीं उतरले आहेत, परंतु उत्पादन खर्च व रहाणी ह्यांत घट झालेली नाहीं.

(३) लागवडीची जुनाट पद्धति, खताची वाण, कर्ज मिळण्याच्या सोयींचा अभाव, विक्रीमधील अंदाधुंदी व अव्यवस्था, जमिनींत पडणारे पोटहिस्से, वगैरे दोषांमुळें शेतकऱ्यांचें उत्पन्न घटत आहे.

(४) कर्जावरील व्याज, खंड व सारा ह्यांचेमुळें शेतकऱ्याच्या कमाईचें शोषण होत आहे.

(५) सामुदायिक शेती नाहीं, तरी निदान सहकारी पद्धतीनें शेती केल्यास उत्पादन व विक्री ह्या दोनहि व्यवहारांत बचत करतां येणें शक्य आहे.

(६) बिन शेतकरी अडत्यांचे हातांतील विक्रीचा व्यवहार सहकारी प्रयत्नानें शेतकऱ्यांचे हातीं परत आणून दिला पाहिजे.

(७) सध्याच्या कर-पद्धतींत आमूलाग्र पुनर्घटना केल्यावांचून जमीनमहसुलांत इष्ट ती सुधारणा होणें कठीण आहे. तेव्हां तात्कालिक उपाय तरी आज सुचविणें जरूर आहे.

(८) लहान बिगरशेतकी उत्पन्नावर प्राप्तीवरील कर माफ असतो, त्याप्रमाणें २५० रुपयांखालील उत्पन्न असलेल्या शेतकऱ्यांस सारामाफी असावी.

(९) पिकांची आणेवारी सरकारी अधिकाऱ्यांनीं न करतां ती पंचांमार्फत व्हावी व ह्या पंचांमध्यें सहकारी खातें, लोकलबोर्ड, जिल्ह्याचे प्रांतिक कायदेमंडळांतील सभासद ह्यांचा समावेश व्हावा.

(१०) महसुलांत ५० टक्के कपात व बिनसरकारी रीतीनें पिकाची आणेवारी, ही कमिटीची प्रमुख मागणी आहे.

(११) दख्खनमधील चालू असलेली रयतवारी पद्धति नामशेष मात्र आहे, कारण शकडा ८० शेतकऱ्यांस स्वतःची शेतजमीन नाहीं. जमिनीची मालकीच दिवसानुदिवस कांहीं थोड्या लोकांचे हाता जात असल्यामुळें व रयतवारी प्रांतांतील जमीनदारीवर वहिवाटदारीच्या कायद्याचें कोणतेंच बंधन नसल्यामुळें चालू पद्धति जुलमी झाली आह.

(१२) स्वतःची जमीन नसणारा शेतकरी ५०: ५० टक्क्यांच्या बटाईनें खंडानें जमीन करतो; परंतु लागवडीचा खर्चच ह्या निम्या हिश्शांत भागत नाहीं. ह्याला उपाय म्हणून कबुलायतीचा निश्चितपणा, खंडाच्या रकमेचें नियंत्रण व खंडकऱ्याच्या हक्काची देवघेव करण्याचा हक्क ह्या तीन गोष्टींची कायद्यानें तरतूद झाली पाहिजे.

(१३) खोतीभागासाठीं कबुलायतीचा नमुना कायद्यानें ठरवून टाकणें जरूर आहे. आजपासून वीस वर्षांच्या आंत खोतीपद्धत हलके हलके नाहींशी करण्यांत यावी.

(१४) शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा परमावधीस गेला असून तो प्रश्न सौम्य उपायांनीं कधींहि सुटणार नाहीं. निकडीचा उपाय म्हणून मंदी दूर होईपर्यंत व्याजाची व कर्जफेडीची तहकुबी जाहीर करावी.

(१५) 'कर्जविमोचन मंडळां'नीं कर्जाचें मान आजच्या बाजारभावांस अनुसरून हलकें करावें.

(१६) जुन्या कर्जांतून शेतकऱ्यांस अजीबात मुक्त केलें, तरी शेतीचा धंदा सुधारल्याखेरीज व त्याची उत्पादन शक्ति वाढविल्याखेरीज त्यांचा दिवाळखोरपणा नाहींसा होणार नाहीं.

(१७) सरकारी परवाना मिळालेले सावकार प्रत्येक खेड्यांत नेमले, म्हणजे त्यांच्या गैरवाजवी व्यवहारांवर नियंत्रण ठेवतां येईल.

(१८) महाराष्ट्राच्या ज्या भागांत वर्षांतून दोन पिकें काढतात, त्या ठिकाणीं शेतीबरोबर जोड धंद्यांची वाढ होणें अशक्य आहे, परंतु ज्या भागांत एकच पीक निघतें, तेथें जोडधंदे सुरू करणें शक्य आहे.

(१९) सूत काढण्याचा व विणण्याचा धंदा दुय्यम धंदा म्हणून महाराष्ट्रांत सुरू करण्याजोगा आहे.

---


## P. W. D. Ahmednagar Division.

Sealed tenders are invited for the supply of Petty Stores, teakwood and kerosene oil for 12 months from 1st July 1936. Tenders accompanied by chalan for payment of earnest money in cash in any Government Treasury at Rs. 75/- for Petty Stores and Rs. 25/- for teakwood and kerosene oil should be addressed to the Executive Engineer, Ahmednagar Division, Ahmednagar and delivered at his Office up to 3 P. M. on 1-7-1936 (Wednesday). Tender forms together with conditions of contract will be available at the office of the undersigned on payment of Rs. 3/- for Petty Stores and Re. 1/- each for others during office hours. No tender copies will be sent by V. P. P. Tenderers should furnish solvency certificate to the extent of above Rs. 15000/- for (1) and Rs. 5000/- for (2 & 3).

The Exicutive Engineer reserves the right to accept any tender without assigning reason.

(Sd.) N. B. GADRE,
Executive Engineer
Ahmednagar Division.

13-6-36.

---

## नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. व तिच्या शाखा यांत ठेवलेल्या चालू व सेव्हिंग्ज बँक ठेवींवर ता. १ जुलै १९३६ पासून पुढें फेर सूचना देईपर्यंत व्याज दरसाल दरशेंकडा अनुक्रमें अर्धा व दीड टक्का या दरानें देण्यांत येईल. कळावें.

द. दि. चितळे,
ता. १०-६-३६. मॅनेजिंग डायरेक्टर

## पहिल्यानें सुरक्षितता

रस्त्यावरून जातांना तुम्ही सुरक्षिततेचा मार्ग पहिल्यानें पहातां. हीच गोष्ट पैसे बँकेंत किंवा विम्यांत गुंतविण्यासंबंधीं आहे. पहिल्यानें तुम्ही पैशाची सुरक्षितता पहातां; नंतर व्याज किंवा बोनस.

हिशेब तपासणी आणि प्रतिनिधित्व सरकारी खात्याकडे असल्यानें

**दि बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लि.**

मध्यें आपले पैसे गुंतविल्यास कसलाच धोका नाहीं.

सविस्तर माहितीकरितां लिहा—

कुळकर्णी आणि कंपनी, चीफ ऑर्गनायझर्स } चुनीलाल डी. बरफीवाला, मॅनेजिंग डायरेक्टर.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

---

## GOKHALE INSTITUTE OF POLITICS AND ECONOMICS.

**SERVANTS OF INDIA SOCIETY'S HOME, POONA 4.**

ADMISSIONS TO STUDENTS—reading for the M. A. Examination by paper or by thesis in Economics. One scholarship of Rs. 25 P. M. to be awarded to a research student this year.

D. R. GADGIL,
Directer.

---

## Government Commercial Diploma

The S. P. MANDALI'S SCHOOL OF COMMERCE, Poona, will reopen on the 22nd June 1936 to coach Students for the above Diploma. Admission fee Rs. 5. Annual tuition fee Rs. 80. Scholarships and free and half-free studentships available to deserving students. Admission upto 4th July 1936. For free prospectus apply to the Superintendent.

N. G. NARALKAR,
Superintendent.

---

## The Willingdon College, Sangli.

Reopens on the 20th June, 1936. Tuition fees per student per term are Rs. 60, and hostel rent Rs. 12 for a double and Rs. 15 for a single room. Messing charges come to about Rs. 12 per month. Cheapness, efficiency and healthy surroundings are special features of the College. Freeships and scholarships are granted to deserving students.

D. G. KARVE,
Principal.

---

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

**लक्ष्मीरोड, पुणें**

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२

अधिकृत भांडवल : : : १०,००,०००

विक्रीस काढलेलें भांडवल: ५,००,०००

**दर शेअरची किं. : रु. ५०**

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री व त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

---

Camp Education Society's

## SECONDARY TRAINING DEPARTMENT

**Prin.:—P. K. ATRE**

Is allowed by the Educational Department to train teachers and private pupils for the S. T. C. Examination. Term begins from June 15. Fees Rs. 85/- for the year. Apply for prospectus to the Principal.

---

## K. K. & Co.

**Photographic Dealers**


**POONA.**

---

## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## किर्लोस्कर पोलादी फर्निचर



खुर्च्या, टेबल, बांक, कोंच, शेल्फ, कपाट, पलंग, स्टुलें, पाळणे इ. इ.

**मजबूत बांधणी : उत्तम प्रकारचें फिनिश.**

ठिकठिकाणच्या किर्लोस्कर एजंटकडे अगर थेट खालील पत्त्यावर मागणी करा.

**किर्लोस्कर बंधु, लिमिटेड, किर्लोस्करवाडी.**
( जि. सातारा )

## माधव सोमण ब्रदर्स

आम्हीं स्वतः तयार केलेलीं लुगडीं व इतर पेठांचा खात्रीचा माल गिऱ्हाइकांस विकतों.

हुजूरपागेसमोर, पुणें २.

**मु. कराड ] फक्त एका रुपयास [ कोडें नं. १**

## प्रत्येक जण (१००) रुपये मिळवा

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

बाजूचे कोष्टकांत ० ते १५ पर्यंतचे आंकडे अशा रीतीनें भरा कीं, ज्यांची आडवी व उभी बेरीज मोजतांना प्रत्येक ओळीची बेरीज ३० यावी. कोष्टकांत एका जातीचे दोन आंकडे येऊ नयेत. प्रवेश फी एक रुपया म. ऑ. नें भरून कोष्टकाचे एक किंवा सोळापर्यंत उत्तरें एकाच वेळीं पाठवितां येतील. परंतु सोळापेक्षां अधिक उत्तरें पाठवावयाचीं असतील तर प्रत्येक उत्तरास एक आणा जादा फी पडेल. उत्तरें खालील पत्त्यावर प्रवेश फी भरून व आपला पूर्ण पत्ता लिहून पाठवावींत. उत्तरें किती पाठविलींत त्याचा आंकडा लिहावा. आमचा निकाल शेवटचा व सर्वांना कायदेशीर बंधनकारक होईल. आणखी कांहीं बाबतींत जास्त खुलासा पाहिजे असल्यास एक आण्याचें तिकीट पाठवावें. उत्तरें जूनअखेरपर्यंत स्वीकारण्यांत येतील. आमचें सीलबंद करून ठेवलेलें खऱ्या उत्तराचें कोष्टक जुलै महिन्यांत जाहीर करण्यात येईल. जाहीर झालेल्या उत्तराप्रमाणेंच ज्याचें उत्तर बरोबर असेल त्या प्रत्येकाला १०० रुपये बक्षिस देण्यांत येईल.

**ईनामी हरिफाई कार्यालय—कराड. (जि. सातारा.)**


## पुणें येथील स्मॉलकॉज जज्ज यांचे कोर्टांत

### मुक्काम पुणें येथें

दिवाणी मुकद्दमा नंबर ४९२२ सन १९३५ पैकीं

चंद्रशेखर गोविंद आगाशे रा. पुणें पेठ शनवार घ. नं. २६७ } वादी

विरुद्ध

लालचंद रघुनाथ मारवाडी जात मारवाडी पोरवाल, धंदा व्यापार रा. सासवड जि. पुणें. } प्रतिवादी

प्रतिवादी यांसः—

ज्यापेक्षां वादी यानें तुम्हांवर रु. ११८ मिळणेबद्दल दावा केला आहे, त्यापेक्षां सदरहू दाव्याचा जबाब देण्यासाठीं तारीख २ माहे ७ सन १९३६ रोजीं दिवसां ११ वाजतां जातीनें किंवा ज्या कोणा प्लीडरास योग्य माहिती दिली असेल व दाव्यासंबंधीं सर्व मुद्यांच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल, किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्याबरोबर असेल अशा प्लीडराच्यामार्फत या कोर्टांत हजर होण्याविषयीं या लेखावरून तुम्हांस समन्स करण्यांत येत आहे; व तुम्हीं हजर होण्यासाठीं जो दिवस ठरविला आहे तो दाव्याच्या अखेर निकालासाठीं नेमिला आहे. यास्तव ज्यांच्या जबानीवरून व ज्या दस्तऐवजांवरून तुमच्या जबाबास बळकटी येईल असा भरवसा बाळगण्याचा तुमचा इरादा असेल तसे सर्व साक्षीदार व तसे सर्व दस्तऐवज त्या दिवशीं हजर करण्यास तुम्हीं सिद्ध असलें पाहिजे.

तुम्हांस नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरीं लिहिलेल्या दिवशीं तुम्हीं हजर न झाल्यास तुमच्या परोक्ष दाव्याची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

तसेंच तुम्हांस अशीहि नोटीस देण्यांत येत आहे कीं, निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तिच्यापूर्वीं बजावणीसाठीं पत्ता लिहून देण्यांत तुम्हीं कसूर केल्यास तुमच्या बचावाकडे लक्ष देण्यांत येणार नाहीं.


आज तारीख ११ माहे ६ सन १९३६ रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्क्यानिशीं दिलें.

आर. एच्. वाडेकर
for Registrar.

कारकून. शिक्का


नळ, फ्लशिंगचे संडास, ड्रेनेज, फर्निचर, इत्यादींबद्दलच्या कामासाठीं

## श्री हर अँड को



खास विचारा.

कोणतेंहि काम त्वरित व समाधानकारक केलें जातें.

**डेक्कन जिमखान्यासमोर, पुणें ४.**

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

**Dawn of India's Insurance field-workers' Training Institute. Poona.**

The training course will commence by the 1st of July 1936.

Applications are invited from Matriculates for admission to the Training Institute. Candidates who join the Institute are also coached up for Advocate's examination.

Apply for Prospectus to:—

99, Laxmi Road, POONA. — D. V. Atre, B. A. (Hons.); LL. B. Principal.

**वेस्टर्न इंडिया**

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी–सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५

१९३५ मधील नवें काम ५१,५१,८९२ रु.

एकूण चालू काम २,५०,१५,०८२ रु.

एकूण जिंदगी ६१,६९,१६९ रु.

लाइफ फंड ५०,९९,४३९ रु.

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:–

**कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.**

अध्यक्ष–श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

**न. वि. वडनेरकर**

जव्हेरी आणि सराफ, रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

बंगाल

**कोल सप्लाइंग फर्म**

उत्तम दगडी कोळसा (बंगाल, सी.पी.) आणि कोक ह्यांचे व्यापारी व म्युनिसिपल, लोकलबोर्ड, पी. डब्ल्यु. डी. (सरकारी) कॉन्ट्रॅक्टर्स

५११ बुधवार पेठ, पुणें शहर २.

तारेचा पत्ता:–व्यंकटेश. फोन नं. ४७१

**स्वदेशी**

कापड म्हणजे काय ?

(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.

या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.

हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.

स्वदेशी माल मिळण्याचें खात्रीचा पुण्यांतील एकच ठिकाण

**स्वदेशी भांडार**

लक्ष्मीरोड, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ | पुणें, बुधवार, तारीख २४, जून १९३६. | अंक २६

विम्याचें कामास सुरुवात झाली

**गुडवुइल ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड.**

विमा—तज्ञ श्री. जी. एस्. मराठे यांनीं अनेक कंपन्यांचे अनुभवावरून तयार केलेल्या खास योजना

—सर्व तऱ्हेच्या विम्यांची सोय—अत्यंत सुलभ अटी—

**विमेदारांना कमी हप्ता पडण्याची आमच्या कंपनीची खास सवलत**

आजच प्रास्पेक्टस् मागवून आपला विमा उतरा.

ठिकठिकाणीं एजंटस् नेमणेचे आहेत. भरपूर कमिशन मिळेल. चौकशी करा.

पोस्ट—मिरज मिशन हॉस्पिटल.

बी. व्ही. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर

**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.**

पत्ता : डेक्कन जिमखाना पुणें, ४

यांचीं शास्त्रोक्त, खात्रीलायक व गुणकारी औषधें

| | |
|---|---|
| च्यवनप्राश पौष्टिक व शक्तिवर्धक | २० तो. १ रु. |
| वज्रदंती दंतमंजन | बा. किं. ४ आणे |
| केशवर्धन तेल | १० तो. १५ आणे |
| एरंडपाक मलावरोध घालविणारा | १० तो. ६ आणे |
| हेमगर्भ मात्रा सर्व वात कफरोगहर | मात्रा ५ रु. |
| सुवर्णराजवंगेश्वर धातुवर्धक | १ तो. ५ रु. |
| वाळा सरवत उन्हाळ्यांत थंड पेय | १ पौं. १२ आणे |
| त्रिभुवनकीर्ति सर्व ज्वरांवर | १ तो. १२ आणे |

याशिवाय प्रवाळ, मौक्तिक इ. भस्में, सर्व तऱ्हेचीं आसवें, अरिष्टें, मात्रा, गुटिका, अवलेह वगैरे मागवून एकवार अनुभव घ्या. कॅटलॉग मागवा.

ठिकठिकाणीं एजन्सी देणें आहेत. एजन्सी घेऊं इच्छिणारांनीं नियम मागवावे.

**नवीन फणसपोळी**
व
**लोणच्याचा हिंग**

मिळण्याचें खात्रीचें ठिकाण

कुलकर्णी आणि मंडळी
लोणी व किराणा दुकान, सदाशिव पेठ, पुणें.

**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय

संजीवनी मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

# विविध माहिती

### रेल्वेवरील मालाचे दरांत वाढ

इंडियन रेल्वे कॉन्फरन्स असोसिएशननें ठरविल्याप्रमाणें रेल्वेवरील मालाच्या वहातुकीच्या दरांची फेरतपासणी करण्यांत येत आहे. यादीमधील १,४०० तऱ्हेच्या जिनसांपैकीं ३०० जिनसांचा विचार केला जाऊन सर्वसाधारणपणें दरामध्यें दहा टक्के वाढ होईल. वर्तमानपत्रांच्या पार्सलांचें दरांत ७९ टक्के वाढ होणार असल्याचें समजतें.

### जपानी मालाचा द्राविडी प्राणायाम

कलकत्ता बंदरामध्यें जपानी कापड उतरून तें नेपाळमध्यें जातें व तेथून तें परत बिहार प्रांतांत येतें, अशी मुंबईच्या मिल ओनर्स असोसिएशननें तक्रार केली होती. नेपाळमध्यें येणाऱ्या जपानी मालावर कलकत्ता येथें लादलेली जकात परत करण्यांत येते व त्यामुळें नेपाळमधून तोच माल ब्रिटिश हिंदुस्थानांत परत येऊन तेथें किफायतशीर विकला जातो. हिंदुस्थान सरकारनें नेपाळमधून होणारी ही आयात बेकायदा ठरविली आहे व नेपाळ सरकारनेंहि त्याविरुद्ध हुकूम काढला आहे.

### हिंदुस्थानांत कामगार-कारखानदारांचे तंटे

१ जानेवारी ते ३१ मार्च १९३६ अखेर हिंदुस्थानांतील कामगार व कारखानदार ह्यांमध्यें एकूण ३१ तंटे झाले, त्यांपैकीं बंगालच्या वांट्यास १३ व मुंबईच्या वांट्यास ६ आले. ह्या तंट्यांमुळें मजुरीचे एकूण ३,१८,००२ दिवस बुडाले.

### नवीं घरें बांधण्याची ब्रिटनमधली मोहीम

मार्च, ३१ अखेरच्या सहामाहींत ग्रेटब्रिटनमध्यें एकूण १,७४,८०० नवीन घरें बांधण्यांत आलीं. १९१८ सालापासून आजतागायत ३० लाखांहून ज्यास्त नवीं घरें तेथें बांधून झालीं.

### मुंबईमधील डांबरी रस्ते

मुंबई शहरांतील रस्त्यांची एकूण लांबी २२२ मैल असून त्यांपैकीं ४४३/४ मैल लांबीचे रस्ते डांबरी आहेत.

### कामाचे तास कमी करण्याचा प्रयत्न अयशस्वी झाला

इंटरनॅशनल लेबर ऑफिस कॉन्फरन्सपुढें, कापडाच्या गिरण्यासाठीं ४० तासांच्या आठवड्याचा प्रश्न आला, तेव्हां तो चर्चिला जाऊन त्याचा निकाल पुढील वर्षावर ढकलण्याचें ठरलें.

### रशियन साखरेचा हिंदुस्थानांत प्रवेश

हिंदी बाजारांत रशियांतून साखर विक्रीसाठी येणार, असा रंग दिसत आहे.

### निजाम सरकारचे कर्जरोखे 'अधिकृत' झाले

निजाम सरकारनें उभारलेल्या कर्जरोख्यांचें महत्त्व आतां वाढणार आहे, कारण गव्हर्नर जनरल इन कौन्सिलनें त्यांस मान्यता दिली असून इंपीरियल बँक ऑफ इंडिया ॲक्टान्वयें ते आतां अधिकृत रोखे झाले आहेत. हिंदुस्थान सरकारच्या कर्जरोख्यांचे तारणावर इंपीरियल बँक ज्याप्रमाणें कर्ज देते, त्याचप्रमाणें निजाम सरकारच्या रोख्यांचे तारणावरहि आतां ती बँक कर्ज देईल.

### बिनतिकिटाच्या रेल्वे-प्रवासावर नियंत्रण ?

हिंदी रेल्वेजवरील वादविवादाचे वेळीं कॉमन्स सभेमध्यें भाषण करतांना सर वॉल्टर स्माइल्स ह्यांनीं, बिगरतिकिटानें प्रवास करणारांचें नियंत्रण करण्यासाठीं अँग्लो इंडियन तिकिट इन्स्पेक्टरांच्या ज्यास्त नेमणुका करणें जरूर आहे, असें सांगितलें.

### बादशहांचा मुकुट

ग्रेट ब्रिटनच्या राजाचा मुकुट राज्याचे हद्दीबाहेर नेतां येत नाहीं, ह्यामुळें १९११ सालीं जॉर्ज बादशहा ह्यांना दिल्ली दरबाराचे वेळीं विभूषित करण्याकरितां एक नवीन मुकुट बनविण्यांत आला, त्यास सुमारें आठ लक्ष रुपये खर्च आला. तो फक्त एकदांच वापरण्यांत आलेला आहे. आठवे एडवर्ड हिंदुस्थानांत येऊन त्यांनीं दिल्ली येथें दरबार भरविल्यास हा मुकुट लंडनहून इकडे आणावा लागेल.

### येलूर गांवास ग्रामसुधारणेची ढाल

ग्रामसुधारणेचें सर फ्रेड्रिक साइक्स शील्ड मध्यविभागांतील येलूर ह्या गांवास देण्यांत आलें आहे. सातारा जिल्ह्यामध्यें हें गांव अत्यंत प्रगतिपर असून तेथें ग्रामसुधारणेचें कार्य कसोशीनें व अविश्रांत चालू असल्याबद्दल हें शील्ड त्यास मिळालें आहे.

### म्हैसूर संस्थानचें कर्ज

म्हैसूर संस्थानास एकूण सहा कोटि रुपये कर्ज आहे व त्याची फेड करण्यासाठीं व्यवस्थित तरतूद करण्यांत आलेली आहे.

### लंडन बंदरांत उतरणाऱ्या आगबोटी

गेल्या वर्षी लंडनच्या बंदरांत एकूण १५,००० आगबोटी उतरल्या. ह्यांपैकीं निम्म्यापेक्षां ज्यास्त बोटी ब्रिटिश मालकीच्या होत्या.

### पोस्टल ऑर्डर्स

हिंदुस्थानामध्यें पोस्टखात्यानें पोस्टल ऑर्डर्स नव्यानेंच सुरू केल्या आहेत. ग्रेटब्रिटनमध्यें दर आठवड्यास एक कोटि ऑर्डर्स खपतात, ह्यावरून त्यांची तेथील लोकप्रियता दिसून येते.

### ऑस्ट्रेलियाचा बोलपटाच्या धंद्यांत प्रवेश

ऑस्ट्रेलियामध्यें बोलपटाचा धंदा सुरू करण्यांत यावयाचा असून त्याप्रीत्यर्थ अमेरिकेंतून नट व नटी नेण्यांत येतील. यंदाचे वर्षी वीस बोलपट निर्माण करण्याचा तेथील चालकांचा विचार आहे.

### अहमदाबाद येथें एक नवीन व्यापारी संस्था

अहमदाबाद येथें एक मर्चंट्स चेंबरची स्थापना करण्यासंबंधीं खटपट चालू आहे.

### शस्त्रक्रियेची सामुग्री विलायती कां ?

लंडन येथील सर्जिकल मॅन्युफॅक्चरिंग कंपनीकडून मुंबई इलाख्यांतील इस्पितळांनीं शस्त्रक्रियेसाठीं लागणारें सामान घ्यावें, अशा अर्थाची सूचना मुंबई इलाख्याच्या सर्जन जनरलनें सर्व इस्पितळांना केली आहे. ह्याविरुद्ध महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सनें जोराची तक्रार केली आहे.

### इमारतींच्या गहाणांत गुंतलेलें ब्रिटिश भांडवल

नवीन बांधलेल्या घरांच्या तारणांवर भांडवल पुरवणाऱ्या ग्रेटब्रिटनमधील संस्थांचें एकूण भांडवल १९३५ सालअखेर सुमारें ८०० कोटि रुपये होतें.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | |
|---|---|
| ता. १३ जून रोजीं पुरा झालेला आठवडा | ९८,७२,६७६ |
| ता. २० जून रोजीं पुरा झालेला आठवडा | ३३,१६,२४५ |
| ता. २१सप्टेंबर १९३१ ते २० जून १९३६ अखेर | २,७३,७९,६१,६ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३१० |
| २ हिंदी टारिफ बोर्डाची इतिश्री ... | ३११ |
| ३ सिमेंटच्या कंपन्यांचें एकत्रीकरण ... | ३११ |
| ४ स्फुट विचार ... | ३१८ |
| राष्ट्रसंघ, इटली व ॲबिसीनिया–राष्ट्रसंघ आणि ध्येयशून्यता—व्हाइसरॉय आणि पशुसुधारणेचा प्रयत्न–औद्योगिक व्यवसाय शिकविण्याची योजना–स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारावर आक्रमण–फिरून यत्न करून पहा–'लोकशिक्षण' | |
| ५ महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति | ३१५ |
| ६ संयुक्त प्रांतांतील बेकारी-निवारण ... | ३१६ |
| ७ सिमला ... | ३१५ |
| ८ सहकारी संस्थांचे संबंधांतील नवीन नियम | ३१७ |
| ९ अहमदाबाद येथील व्यवसायविषयक कॉलेजें | ३१७ |
| १० खेडेगांवांतील परिस्थिति व शहरांतले कार्यकर्ते | ३१७ |
| ११ मोटारींचा नवा कारखाना ... | ३१८ |
| १२ विजेच्या सामानाची वाढती आयात ... | ३१८ |
| १३ निवडक बाजारभाव | ३१९ |



# अर्थ

बुधवार, ता. २४ जून, १९३६


## हिंदी टारिफ बोर्डाची इतिश्री ?

बावीस वर्षांमागें औद्योगिक संरक्षणाचें तत्त्व हिंदी कायदे मंडळ आणि सरकार ह्यांनीं मान्य केलें, तेव्हां संरक्षणाची मागणी करणाऱ्या धंद्यांची चौकशी करण्यासाठीं तीन सभासदांचें एक टारिफ बोर्ड प्रथम नेमलें गेलें. त्यानें आजपर्यंत पन्नास–साठ धंद्यांबाबत चौकशी केली असून कित्येकांस जकातीच्या व इतर स्वरूपांत संरक्षण देण्यांत यावें अशी शिफारस केली आहे. तथापि, ह्या बोर्डाची नेमणूक कायमची म्हणून कधींच झाली नाहीं व त्याची बारा महिन्यांची आयुर्मर्यादा दर वर्षीं वाढविण्याचा क्रम आजवर चालला आहे. बोर्डाकडे सोपवलेल्या सर्व चौकशा पुऱ्या झाल्या असून त्यास देण्यासारखें काम तूर्त उरलें नाहीं, ह्या सबबीवर तें बंद करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरवलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. साखरेच्या धंद्यास दिलेल्या व पुढें द्यावयाच्या संरक्षणाचा प्रश्न दोन वर्षांनीं उद्भवेल तेव्हां तात्पुरत्या बोर्डाची नेमणूक करण्यांत येईल. असा हा प्रकार घडून येणार हें अलीकडे स्पष्ट दिसूं लागलें होतें. देशी धंद्यांस संरक्षण देण्याचे बाबतींत हिंदुस्थान सरकारांत अलीकडे विशेषसा उत्साह दिसून येत नव्हता, एवढेंच नव्हे तर टारिफ बोर्डाच्या चौकशा व त्याच्या शिफारसींस अनुसरून बसवावयाच्या संरक्षक जकाती ह्या बाबतींतल्या भानगडींस तें कंटाळल्यासारखें झालें होतें. हिंदी उद्योगधंद्यांस संरक्षण देण्याच्या धोरणासंबंधानें सरकारांतली कांहीं बडी मंडळी साशंक झाली असल्याचींहि चिन्हें दृग्गोचर होत होतीं. मोदी–लीज व ओटावा करार ह्यांचेविषयीं झालेल्या वादामुळें ही साशंकपणाची वृत्ति बळावली असली पाहिजे, आणि सध्या कोणत्याहि स्वदेशी धंद्यास संरक्षण देण्याचा प्रश्न हातीं नाहीं असें पाहून एक तपाच्यावर अस्तित्वांत असलेल्या टारिफ बोर्डाचा शेवट करण्याचें सरकारनें ठरविलें असलें पाहिजे.

ज्यास करण्यासारखें काम नाहीं तें बोर्ड ठेवून निष्कारण खर्च करण्यांत हशील नाहीं आणि सरकारनें टारिफ बोर्ड बंद करण्याचें ठरवलें तें योग्यच झालें, असें सकृद्दर्शनीं वाटण्याचा संभव आहे. परंतु जनतेची मागणी, टारिफ बोर्ड असावें, एवढीच नाहीं तर तें कायमच्या व विस्तृत स्वरूपांत रहावें अशा प्रकारची होती व आहे हें येथें विसरून चालणार नाहीं. बोर्ड अस्तित्वांत असलें म्हणजे आमच्या धंद्याची चौकशी करून त्यास संरक्षण द्या असें म्हणण्याची कारखानदारांस स्फूर्ति होते आणि त्याबाबत राष्ट्रास निष्कारण भुर्दंड पडतो असें कित्येकांस भासेल; परंतु, इतर देशांमध्यें टारिफ बोर्डासारखीं मंडळें तेथील सरकारांनीं नेमलीं असून त्यांस विस्तृत क्षेत्रांत कार्य करण्याचो सवड ठेवली आहे. देशी उद्योगधंद्यांची पहाणी करून, त्याचप्रमाणें राष्ट्रीय जकातींच्या व्यवस्थेचा वेळोवेळ विचार करून शिफारशी करण्याची कामगिरी त्यांचेकडे सोपविलेली असते. हिंदुस्थानांतील उद्योगधंदे अजून मागसलेल्या स्थितींत आहेत आणि ह्यापुढें आंतरराष्ट्रीय स्पर्धा वाढावयाची असल्यानें टारिफ बोर्डासारख्या मंडळाचें कायमचें अस्तित्व येथें आवश्यक आहे. औद्योगिक संरक्षणाकडे व्यापक दृष्टीनें पाहून वरील प्रकारची योजना सरकारनें हातीं घेणें इष्ट होतें. पण तसें न करतां असलेलें टारिफ बोर्ड गुंडाळण्याचा आपला विचार हिंदुस्थान सरकारनें अंमलांत आणल्यास आर्थिक क्षेत्रांतली ही एक महत्त्वाच्या बाबतींत राष्ट्राची पीछेहाट झाली असें म्हणावें लागेल. संरक्षण देण्यास लायक असे धंदे शिल्लक नाहींत असें सरकारचें मत असल्यास तें बनवण्याचा अधिकार त्यास कसा पोहोचतो असा प्रश्न विचारण्यासारखा आहे. संरक्षणाबाबत कोणत्याहि धंद्याची मागणी आली असतां तिच्यावर प्राथमिक अभिप्राय व्यक्त करण्याचा हिंदुस्थान सरकाराचा रिवाज आहे. तो कितीसा योग्य आहे ह्याविषयीं प्रतिकूल टीका मागें अनेक वेळां झालीच आहे.

---

## सिमेंटच्या कंपन्यांचें एकत्रीकरण

### 'असोसिएटेड सिमेंट कंपनीज् लि.'

मि. एफ्.ई.दिनशा ह्यांच्या प्रयत्नांमुळें सिमेंटचे कारखाने उर्जितावस्थेस आले, ही गोष्ट महाशूर आहे. ह्या कारखान्यांनीं संयुक्त होऊन एका छत्राखालीं काम केल्यास सिमेंटचा धंदा ह्यापेक्षांहि भरभराटीस येईल, अशी त्यांची खात्री होती व त्या संबंधांत त्यांनीं प्रयत्नहि चालविले होते. त्यांच्या मृत्यूनंतर अवघ्या सहा महिन्यांतच त्यांची योजना फलद्रूप होत आहे. दहा हिंदी सिमेंट कंपन्यांनीं 'असोसिएटेड सिमेंट कंपनीज् लि.' ह्या नियोजित मध्यवर्ती कंपनीमध्यें सामील होण्याचें कबूल केलें आहे व त्याबद्दलच्या करारपत्राचा मसुदाहि प्रसिद्ध झाला आहे. प्रत्येक कंपनीच्या उत्पादनशक्तीच्या मानानें त्यांस नव्या कंपनीकडून ह्या वर्गावर्गीबद्दल मोबदला भाग मिळतील. दर टन उत्पादनशक्तीस साठ रुपये अशी किंमत ठरविण्यांत आली आहे. ह्याबरोबरच, प्रत्यक कंपनीनें दर टन उत्पादनशक्तीस दहा रुपये ह्या हिशेबाप्रमाणें नव्या मध्यवर्ती कंपनीचें भांडवल उभारण्यास रकम द्यावयाची आहे. म्हणजे, त्यामुळें असोसिएटेड कंपनीजला जरूर तें खेळतें भांडवल मिळून सिमेंट कंपन्यांचा माल वगैरे रोखीनें खरेदी करण्यास लागणारा पैसाहि उपलब्ध होणार आहे. ह्या प्रचंड मध्यवर्ती कंपनीचें आठ कोटींचें भांडवल प्रत्येकीं शंभर रुपयांच्या

भागांत विभागण्यांत यावयाचें आहे.त्याचा भरणा सभासद कंपन्यांकडूनच बव्हंशीं होईल, कारण त्यांच्या कारखान्यांबद्दलच्या विक्रीच्या रकमेऐवजीं त्यांस भागच मिळावयाचे आहेत.

वरील प्रचंड कंपनीची व्यवस्था 'सिमेंट एजन्सीज् लि.' ह्या नांवाच्या मॅनेजिंग एजन्सीकडे राहील व तीमध्यें सिमेंटच्या सध्याच्या कारखान्यांचे प्रतिनिधींनाच प्राधान्य मिळेल. मध्यवर्ती कंपनीस मिळणाऱ्या नफ्यांतून घसारा व इतर स्पेशल फंडांची तरतूद करण्यापूर्वी परंतु व्याज व व्यवस्थेचा खर्च भागविल्यानंतर उरलेल्या रकमेंतून ७½ टक्के कमिशन ह्या मॅनेजिंग एजन्सीस मिळावयाचें आहे. ह्या कराराची मुदत पंधरा वर्षांची ठरली आहे. अपेक्षेप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्यास, असोसिएटेड कंपनीज् लि. एका वर्षानंतर सात ते आठ टक्के इतकें कर-माफ डिव्हिडंड देऊं शकेल, अशी अपेक्षा आहे.

धंद्यामधील सहकार्याचें महत्त्व व त्याची उपयुक्तता पटवून देण्यास हिंदी सिमेंटचा धंदा हें उत्कृष्ट उदाहरण आहे. परदेशी सिमेंटची आयात व स्पर्धा हें हिंदी कारखान्यांच्या दुःस्थितीचें कारण नसून त्यांची परस्परांमधली स्पर्धा हेंच तिच्या मुळाशी आहे, असा अभिप्राय टारिफ बोर्डानें दहा वर्षांपूर्वीच व्यक्त केला होता. संरक्षणाच्या ऐवजीं तुम्हांस आत्मसंघटनेचीच जरूरी आहे असें बोर्डानें हिंदी कारखानदारांस पर्यायानें कळवलें होतें आणि त्याचें म्हणणें खरें असल्याची प्रचीती आज आली आहे. संघशक्तीची कास धरण्यास हिंदी सिमेंट कंपन्यांनीं तात्काल सुरवात केली व सरकारी संरक्षणाच्या अभावीं स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारला. १९३० सालीं स्थापन झालेल्या सिमेंट मार्केटिंग कंपनीनें सर्व कारखान्यांतील उत्पादन नियंत्रित करून मालामध्येंहि सुधारणा घडवून आणली. त्याचप्रमाणें, सामुदायिक प्रसिद्धीकरणाच्या धोरणामुळें अल्प खर्चांत प्रचारहि चांगला झाला. तथापि, सिमेंटचा खप हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणीं सारखा होत नसल्यानें जेथें खप होतो, तेथें दूरदूरच्या कारखान्यांतूनहि माल येतो व नजीकच्या कारखान्यांच्या दारांतलें गिऱ्हाईक जातें, अशी परिस्थिति उत्पन्न झाली. वर्षांतून किती माल काढावयाचा हें ठरलें असलें तरी खपाच्या बाबतींत सहकार्य व्हावें तसें होऊं शकलें नाहीं. आतां नियोजित मोठ्या कंपनीस हें कार्य उत्कृष्ट रीतीनें करतां येईल. सिमेंटच्या विक्रीचा दर चढीचा ठेवून नफेबाजीचें आकुंचित धोरण न स्वीकारतां, सिमेंटचा उपयोग व खप वाढविण्याकडे लक्ष देऊन गिऱ्हाइकांचें हितहि ही कंपनी पाहील, अशी अपेक्षा करणें अयोग्य होणार नाहीं. किंबहुना, नव्या कंपनीनें पूर्ण मक्तेदारी निर्माण करून देशी सिमेंटचे भाव चढीचे ठेवतां कामा नयेत.संरक्षक जकात नसल्यानें कंपनीस सिमेंट महाग करतां येणार नाहीं आणि हिंदी गिऱ्हाइकांच्या हिताकडे दुर्लक्ष करणें तिला कठिण जाईल, ही गोष्ट नमूद केली पाहिजे.

---

### केमिकल्सचा व्यापार

हिंदुस्थान व पूर्व एशियांतले देश ह्यांमध्यें खपणाऱ्या केमिकल्सची किंमत जगाच्या केमिकल्सच्या एकूण व्यापाराच्या एक-अष्टमांशाइतकी आहे. ब्रिटिश केमिकल्सच्या निर्गतीपैकीं एक पंचमांश निर्गत वरील प्रदेशांत होते. जपान व हिंदुस्थान ह्या देशांची केमिकल्सची आयात किंमतींत सारखी आहे, पण जपान ब्रिटिश माल बहुतेक घेतच नाहीं असें म्हटलें तरी चालेल आणि हिंदी आयातींत मात्र ब्रिटिश माल एक-तृतियांशाच्यावर असतो.

## स्फुट विचार

### राष्ट्रसंघ, इटली व ॲबिसीनिया

व्यक्ती आणि समाज ह्यांवर युद्धाचे घातुक परिणाम होतात, तें ध्यानांत आणून ह्यापुढें आपापसांत यादवी होऊं द्यावयाची नाहीं ह्या कृतनिश्चयानें जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं महायुद्धाचे अखेरीस एक संघ स्थापन केला आणि शांतता, तडजोड व गुन्हेगारांचें पारिपत्य ह्या विषयींची कामगिरी त्याचेकडे सोंपविली. कित्येक राष्ट्रांचा स्वार्थसाधुपणा आणि त्याचा प्रतिकार जुटीनें करण्यास लागणाऱ्या सामर्थ्याचा अभाव हे दोष संघाच्या कार्यांत लवकरच दिसून आले व त्याच्या फाटाफुटीस प्रारंभ झाला. आपण त्यास धाब्यावर बसवून अतिक्रमणाचें धोरण स्वीकारलें तरी संघ आपल्या विरुद्ध कांहीं करूं शकत नाहीं असें आढळून येतांच जपान, जर्मनी ह्यांसारखीं राष्ट्रें त्यामधून फुटून बाहेर पडलीं. प्रत्येक सभासद स्वार्थाच्या दृष्टीनें सर्व प्रश्नांकडे पाहूं लागला आणि संघाचें सामुदायिक असें मत प्रभावी होणें अशक्य झालें. संघास न जुमानतां इटलीनें ॲबिसीनियावर स्वारी करून तो देश पादाक्रांत केला व आपल्या मुलखांत सामीलहि केला, तेव्हां राष्ट्रसंघाचा सर्वच बोज नाहींसा झाला. गुन्हेगार म्हणून ठरविलेल्या राष्ट्राविरुद्ध जाहीर झालेल्या दंडयोजनेस मूर्तस्वरूप देण्याची संघाच्या प्रमुख सभासदांची तयारी नसल्यामुळें संघ मोडून तरी टाकला पाहिजे किंवा त्याची पुनर्घटना केली पाहिजे हा प्रश्न उपस्थित झाला. इटलीचें वैर संपादन करण्यास फ्रान्स प्रारंभापासूनच नाखुष होता व त्यानें प्रसंगीं प्रत्यक्ष असें कांहींच करावयाचें नाहीं ह्या बुद्धीनें दंडयोजनेस संमति दिली होती. ॲबिसीनियाच्या स्वातंत्र्याबाबतचा फ्रान्सचा हा बेफिकीरपणा पाहून आणि दंडयोजना पुरी पाडण्याची जबाबदारी एकट्या स्वतःवर घेण्यास जरूर असलेला स्वार्थत्याग करण्याची त्याची तयारी नसल्यानें इंग्लंडनें दंडयोजनेची भाषा वापरण्यापलीकडे कांहीं केलें नाहीं. ॲबिसीनियाचें गिळलेलें माणिक ओकून टाकण्यास त्याच्याशीं इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी ह्या राष्ट्रांनीं जुटीनें युद्ध केल्यावांचून इटली केव्हांहि तयार होणें शक्य नाहीं; आणि ह्या राष्ट्रांचें सदरहु बाबतींत एकमत कधींहि होणार नाहीं ह्याची तर इटलीस पक्की खात्री आहे. तेव्हां ॲबिसीनियाचा प्रश्न सोडून देऊन पुढच्या विधायक कामगिरीस आतां लागा अशी भाषा इटलीनें राष्ट्रसंघाशी बोलण्यास प्रारंभ केला आहे.

---

### राष्ट्रसंघ आणि ध्येयशून्यता

इटलीविरुद्ध जाहीर केलेल्या सामुदायिक दंड-योजनेंतून इंग्लंडनें पाय मागें घेणें कमीपणाचें आहे व तें राष्ट्रसंघाच्या मुळाशीं कुऱ्हाड घालण्यासारखें आहे असें ग्रेटब्रिटनमध्यें अनेक जबाबदार लोकांस वाटत असून त्या मताचा प्रतिध्वनि पार्लमेंटमध्यें स्पष्ट ऐकूं आला आहे. तथापि, बॉल्डविन प्रधान मंडळानें पोक्त विचार करून दंडयोजना रद्द करण्याचें ठरविलें आहे. सामुदायिक धोरण आपणांस पूर्णपणें मान्य असल्याचें इंग्लंड व फ्रान्स दोघेहि ठासून सांगत आहेत. परंतु राष्ट्रांनीं व्यक्तिशः आपल्या वांट्यास येणारी कृति केल्यावांचून सामुदायिक धोरणाची अंमलजावणी कशी होणार? दंडयोजनेंत फ्रान्सचा सहकार नाहीं म्हणून इंग्लंड स्वतंत्र रीतीनें कांहीं करूं शकत नाहीं ही गोष्ट स्पष्ट असतां त्या योजनेची नुसती घोषणा करण्यांत

काय अर्थ आहे ? त्यापेक्षां इटलीशीं सामोपचाराची भाषा बोलून युरोपियन अर्थकारण व राजकारण ह्यांची विस्कटलेली घडी पुन्हां नीट बसवणें अधिक श्रेयस्कर आहे असें ब्रिटिश प्रधानमंडळाचें नवें व निश्चित धोरण आहे. त्या बाबतींत इंग्लंडनें दाखविलेल्या मार्गानें जाण्यास आपण तयार आहों असें फ्रान्सच्या नवीन प्रधान मंडळानें जाहीर केलें आहे. म्हणजे, ॲबिसीनियन स्वातंत्र्याचा ग्रंथ आटोपला, तेव्हां त्याचा शोक न करतां राष्ट्रसंघाची नवी घडी बसविण्याचा उद्योग आतां हातीं घ्यावा, असें ह्या दोन प्रमुख युरोपियन राष्ट्रांचें म्हणणें आहे हें उघड आहे. ब्रिटिश प्रधान मंडळाविरुद्ध ह्या बाबतींत कितीहि काहूर माजलें तरी शेवटीं त्यांतून कांहींच विधायक असें निष्पन्न होणार नाहीं ह्यांत संशय नाहीं. राष्ट्रसंघाची पुनर्घटना होणें म्हणजे त्याच्या मूळ उद्देशापैकीं एक प्रमुख उद्देश सोडून देणें असें व्हावयाचें असून युरोपांत नवीन आंतरराष्ट्रीय घटना घडून यावयाची आहे. ह्या नवीन संघटनेस कोणत्याहि प्रकारचें स्वरूप प्राप्त झालें तरी मूळच्या राष्ट्रसंघाचा ध्येयवाद आणि त्याच्याशी निगडित असलेलीं न्याय, राष्ट्रस्वातंत्र्य, समता व शांतता ह्याविषयींचीं उदात्त तत्वें ह्यांस हरताळ लागला हें निश्चित आहे. इंग्लंडमधील उच्च विचारांच्या व ध्येयांच्या पुरस्कर्त्यांस ह्याबद्दल खंत वाटत आहे. राष्ट्रसंघाबाबत सध्या जो बनाव होऊं पहात आहे, त्याचे परिणाम दूरगामी झाल्यावांचून रहाणार नाहींत. महायुद्धोत्तर काळांत आतां नवीन मनूस प्रारंभ होणार आहे अशीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत.

---

### व्हाइसरॉय आणि पशुसुधारणेचा प्रयत्न

हिंदुस्थानचे व्हाइसरॉय, लॉर्ड लिनलिथगो, ह्यांनीं मुंबई इलाख्याच्या गव्हर्नरांस एक पत्र पाठवून, शेतीच्या जनावरांमध्यें सुधारणा घडवून आणण्यासंबंधांतील आपली कळकळ त्यांत व्यक्त केली आहे. जनावरांची पैदास सुधारावी, ह्याकरितां हिंदुस्थानभर लोकांत जागृति व्हावी व त्यांची सक्रिय सहानुभूति व मदत मिळावी, अशी व्हाइसरॉयसाहेब खटपट करणार आहेत. आपल्या कारकीर्दीच्या सुरवातीसच त्यांनीं दिल्लीच्या शेतकऱ्यांस तीन वळू बक्षीस दिले व ऐपतदार लोकांनीं ह्या देणगीचा कित्ता गिरवावा अशी सूचना केली. चांगल्या जातीच्या जनावरांची पैदास करण्यासाठी सर्व तऱ्हेनें प्रयत्न करण्यांत यावेत, ह्या त्यांच्या सूचनेस विशेषतः मध्यम ऐपतीच्या वर्गातील लोकांकडूनच विशेष पाठिंबा मिळाल्याचें आढळून आलें. मुंबई इलाख्यामध्यें ह्या कार्याचा प्रचार करण्यासाठी इलाख्याच्या प्रांतिक सरकारास काय करतां येण्यासारखें आहे, ह्याचें दिग्दर्शन लॉर्ड लिनलिथगो ह्यांनीं आपल्या पत्रांत केलें आहे आणि वळू बक्षीस देऊन व इतर मार्गांनीं मदत करणारांची माहिती त्यांनीं मागविली आहे. व्हाइसरॉय साहेबांची शेती सुधारणेसंबंधांची कळकळ सुप्रसिद्धच आहे. आपल्या कारकीर्दीमध्यें हिंदुस्थानांतील शेती सुधराईबद्दल कांहीं तरी कार्य व्हावें, अशी त्यांची इच्छा आहे व त्याकरितां ते ह्या प्रश्नांत जातीनें लक्ष घालीत आहेत. सरकारनें पुरस्कार केलेल्या गोष्टींचें लवकर अनुकरण केलें जातें, असा अनुभव आहे. ह्या दृष्टीनें, शेतीच्या जनावरांची पैदास सुधारण्यास निमसरकारी संस्था व व्यक्ती ह्यांचें उत्कृष्ट सहाय होईल अशी अपेक्षा आहे. व्हाइसरॉय साहेबांनीं शेतकऱ्यांच्या अन्नाचा प्रश्नहि हातीं घेतला असून, त्यांचें अन्न सकस कसें करतां येईल ह्याबाबतच्या संशोधनास चालना देण्यास त्यांनीं सुरवात केली आहे. पुराण वस्तूंचें संशोधन व त्यांचें रक्षण ह्यांचेशीं लॉर्ड कर्झन ह्या व्हाइसरॉयांचें नांव जसें निगडित झालें आहें, त्याचप्रमाणें लॉर्ड लिनलिथगो ह्यांचें शेती सुधारणेशीं होणार, असें दिसतें. एका महत्वाच्या प्रश्नाकडे व्हाइसरॉय जातीनें लक्ष पुरविणार, ही फार आनंदाची गोष्ट आहे. परंतु हिंदी लोकांपुढें तितक्याच तातडीचे व महत्त्वाचे इतर अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न आहेत, त्यांकडे दुर्लक्ष होणार नाहीं, ह्याविषयीं खबरदारी घेतली पाहिजे. शेतीच्या एका अंगाच्या सुधारणेचा खरा उपयोग दुसऱ्या अंगांतहि प्रगति झाल्यावांचून होणार नाहीं ह्या प्रकारचें सदरहु धंद्यांतले परस्परावलंबन ध्यानांत बाळगलें जाणें आवश्यक आहे. जनावरांची उत्कृष्ट निपज झाली असतां त्यांच्या खाण्याची योग्य संधि नसेल तर इष्ट कार्यभाग व्हावयाचा नाहीं. शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्याविषयींच्या सूचना व संधी ह्यांचा स्वीकार सर्वत्र करण्यास कोणीहि चुकूं नये, हें मात्र येथें सांगणें अगत्याचें आहे. एखाद्या गोष्टीचा कांहीं काळापर्यंत बोलबाला होतो व पुढें तिच्या संबंधांत अनास्था उत्पन्न होते असें घडूं देतां कामा नये.

---

### औद्योगिक व्यवसाय शिकविण्याची योजना

मध्यम वर्गातील सुशिक्षितांमधील बेकारीचा प्रश्न मुंबई सरकारनें हातीं घेतला असून त्याबाबत सरकारचें औद्योगिक खातें योजना तयार करीत आहे. इंग्रजी सातव्या इयत्तेपर्यंत शिकलेल्या विद्यार्थ्यांची कारखान्यांमध्यें व्यवसायविषयक शिक्षणाची सोय करण्यांत यावयाची आहे. तीन ते पांच वर्षेपर्यंत त्यांना उमेद्वारी करावी लागेल व त्याबद्दल त्यांस कोणत्याहि तऱ्हेची फी न पडतां उलट थोडेंफार वेतन देण्यांत येईल. सुमारें दीड महिन्यांपूर्वी औद्योगिक खात्याचे प्रमुख, श्री. अडवाणी, ह्यांनीं कारखानदारांस पत्रें लिहून त्यांची ह्या योजनेबाबत मतें मागविलीं होतीं. त्याचप्रमाणें, शाळांच्या हेडमास्तरांकडेहि त्यांनीं विचारणा केली होती. दोघांहिकडून उत्तेजनपर उत्तरें आलीं असल्याचें समजतें. कारखानदारांनीं उमेदवारांस शिक्षण देण्याचें कबूल केलें असून तीन महिन्यांच्या शिक्षणानंतर योग्य मोबदलाहि देऊं केला आहे. ह्या व्यावहारिक शिक्षणाबरोबरच उमेदवारांस आठवड्यांतून दोनदां तात्त्विक पाठांस हजर रहावें लागेल व त्यास दरसाल ३० रु. फी पडेल. अशा तऱ्हेनें शास्त्रशुद्ध शिक्षण घेतलेल्या सुशिक्षित तरुणांस काम मिळण्यास पंचाईत पडणार नाहीं व त्यांस वेतनहि समाधानकारक मिळेल अशी अपेक्षा आहे. पुढें काम मिळण्याचा संभव आहे तितक्या उमेदवारांसच तूर्त ह्या योजनेंत प्रवेश मिळेल; परंतु दरसाल चारशे ते पांचशे विद्यार्थ्यांस ही संधी मिळेल असें वाटत आहे. दरसाल मॅट्रिकचे परीक्षेस बसणाऱ्या वीस हजार मुलांतून एवढे उमेदवार सहज मिळूं शकतील. डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, श्री. अडवाणी, हे सध्या योजना पुरी करीत असून लवकरच ती कायदेमंडळापुढें मांडण्यांत येईल. सरकारनें ह्याप्रीत्यर्थ ५० हजार रुपयांची तरतूद केलेली असून तपशीलवार योजना आंखण्याचें काम श्री. अडवाणी ह्यांजकडे सोपविलेलें आहे. ह्या योजनेबरोबरच, इलाखाभर औद्योगिक शाळा स्थापन करून त्यांत रोजच्या वापराचे जिन्नस तयार करण्याचें शिक्षण देण्याची योजनाहि तयार होत आहे. कारखानदारांचे सहकार्यावरच ह्या योजनांचें यश अवलंबून रहाणार, हें उघड आहे.

---

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारावर आक्रमण ?

१९१९ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टान्वयें व १९२३ च्या मुंबईच्या लोकल बोर्ड्स ॲक्टान्वयें आज कित्येक स्थानिक स्वराज्य संस्थांनीं विशिष्ट धंद्यांवर व उत्पन्नांवर कर बसविलेले आहेत. नव्या राज्यघटनेप्रमाणें हे कर तसेच चालू रहाण्यास हरकत नाहीं परंतु १९३५ च्या ॲक्टानें शेतीवरील कराखेरीज इतर सर्व तऱ्हेच्या उत्पन्नांवर कर बसविण्याचा व तो वसूल करण्याचा अधिकार मध्यवर्ती—फेडरल—सरकाराकडे सोंपविलेला आहे. अर्थात्, स्थानिक स्वराज्य संस्थांना हा अधिकार राहिलेला नाहीं. १ जानेवारी, १९३५ च्या आधीं अशा तऱ्हेचे कर बसविलेले असल्यास, फेडरल सरकार प्रांतिक स्वायत्ततेस सुरवात झाल्यानंतर ते रद्द करीपर्यंत, तसेच अंमलांत रहातील. धंदे, व्यवसाय, इत्यादींवर उत्पन्नांच्या मानानें आज स्थानिक स्वराज्य संस्था कराची आकारणी करतात, ती ह्यापुढें कायदेशीर होणार नाहीं. तथापि हेंच तत्त्व आडमार्गानें अंमलांत आणतां येईल. कराचा दर प्राप्तीवर अवलंबून न ठेवतां इतर कोणत्या तरी प्राप्तीनिदर्शक गोष्टींवर—नोकरांची संख्या, भाड्यानें घेतलेली जागा इत्यादींवर तो अवलंबून ठेवला, म्हणजे झालें. ह्या प्रश्नासंबंधीं उपस्थित झालेली ही अडचण दूर करण्यासाठी १९३५ च्या ॲक्टांत पार्लमेंटाकडून दुरुस्ती करून घ्यावी लागेल. तूर्त, मुंबई सरकारनें आपल्या हद्दीमधील स्थानिक स्वराज्य संस्थांस येत्या १ एप्रिलपर्यंत उत्पन्नावर अगर व्यवसायावर नवीन कर न बसविण्याविषयीं कळविलें आहे.

---

### फिरून यत्न करून पहा

माउंट एव्हरेस्ट हें जगांतील अत्युच्च शिखर हिमालय पर्वतावर विराजमान झालेलें असून त्याची उंची समुद्राच्या सपाटीपासून २९,१४१ फूट आहे. ह्या शिखरावर चढून जाण्याचे आतांपर्यंत चार प्रयत्न झाले व ते सर्व अयशस्वी ठरले. कर्नल ब्रूस ह्यांनीं १९२२ सालीं व १९२४ सालीं असा दोनदा यत्न केला व २८,००० फुटांपर्यंत उंच त्यांचे साथीदार जाऊं शकले. तथापि, ह्या अपजयानें निराश होऊन हा खटाटोप बंद न पडतां माउंट एव्हरेस्ट काबीज करण्याचा फिरुन एकदां १९३३ सालीं यत्न झाला, परंतु त्यांतहि यश आलें नाहीं. प्रत्येक खेपेस मिळालेल्या अनुभवाचा फायदा मागाहून येणारास मिळत गेला व यंदाचे वर्षी उत्कृष्ट तयारीनें एव्हरेस्ट गांठण्याची शिकस्त करण्यांत आली आणि ह्या खेपेस तरी एव्हरेस्टवरील स्वारी यशस्वी होण्याची आशा उत्पन्न झाली. मे महिन्याचा शेवटचा आठवडा व जूनचे पहिले दोन आठवडे मिळून सुमारें वीस दिवसच फक्त हें शिखर गांठण्यास सोइस्कर असतात. वायव्येकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळें त्या वेळीं बर्फ वितळलेलें असतें व मान्सूनचा पाऊस अजून सुरू व्हावयाचा असतो. यंदा,१९३३ सालाप्रमाणेंच, ही अनुकूलता लाभली नाहीं व मि. रटलज ह्यांस परत फिरावें लागलें. एव्हरेस्टच्या इतक्या समीप गेल्यानंतर, शिखर गांठून काय प्राप्ति होणार आहे, असा प्रश्न कित्येकांस सुचणें स्वाभाविक आहे, परंतु साहसी व धाडसी युरोपियन लोकांची यशाची कल्पना इतकी साधी नाहीं. आजवर न झालेली गोष्ट करण्यांत भूषण आहे हें तर खरेंच, परंतु ती पार पाडतांना इतर अनेक नव्या कल्पना सुचतात व त्यांचा उपयोग दुसऱ्या बाबतींत होतो. शास्त्रीय शोधांचा उगम पुष्कळ वेळां अशाच तऱ्हेच्या प्रयत्नांत आढळतो. त्याचप्रमाणें, लोकांमध्यें धाडस व साहस ह्यांचें बीज पेरलें जाऊन राष्ट्रीय भावनेस योग्य व इष्ट वळणहि त्यामुळें लागतें. हिंदुस्थानांतील हिमालय पर्वताचे शिखरावर आरोहण करण्यासाठी पाश्चात्यांमध्यें अहमहमिका लागावी, परंतु हिंदुस्थानांतील लोकांत त्याबद्दल जिज्ञासाहि उत्पन्न होऊं नये, ह्या प्रवृत्तीमध्येंच आपल्या अतिमंद जीवितचें व औदासिन्याचें गमक आढळतें. हीच गोष्ट आर्थिक व इतर व्यवसायांस लागूं पडते. सुधारणा व प्रगति ह्यांची इमारत सजविण्यास जरूर तो पाया तयार करणें, हें कार्य अत्यंत महत्त्वाचें असून त्याची हयगय करून चालणार नाहीं. त्याची उठावणी अनेक बाजूंनीं व्हावी लागेल.

---

### 'लोकशिक्षण'

ह्या मासिकाचा मे-जूनचा जोड अंक प्रसिद्ध झाला असून त्याचें नवीन व्यवस्थेचें पहिलें व प्रारंभापासूनचें सहावें वर्ष पुरें झालें आहे. मराठी भाषेंत वाङ्मयविषयक, सामाजिक, राजकीय व शास्त्रीय प्रश्नांची भारदस्त चर्चा करणारे तज्ज्ञांनीं लिहिलेले लेख प्रसिद्ध करून सुशिक्षित वर्गाच्या विचारास चालना देण्याचा ह्या मासिकाचा उद्देश पुष्कळसा सफळ होत आहे ह्याबद्दल मासिकाचे संपादक, श्री. जांभेकर, ह्यांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. अशा प्रकारच्या उच्च दर्जाच्या व संस्कृतीच्या विकासास परिपोषक होणाऱ्या मासिकाच्या महत्त्वाची जाणीव महाराष्ट्रीय मध्यम स्थितींतल्या वर्गांत फारशी उत्पन्न झालेली दिसत नाहीं, आणि ह्यामुळें तें चालवण्याची व नियमितपणानें प्रसिद्ध करण्याची जबाबदारी किती मोठी आहे ह्याची कल्पना थोड्याच लोकांस असते. "लोकशिक्षणा"च्या संपादकांनीं केवळ कर्तव्यनिष्ठेनें प्रेरित होऊन स्वार्थत्यागपूर्वक जी वाङ्मयाची व महाराष्ट्रीय संस्कृतीची सेवा चालवली आहे तिचें योग्य चीज होणें अगत्याचें आहे. प्रस्तुत जोड अंकांत विविध विषयांवर विद्वानांचे लेख आले आहेत, ते नेहमींप्रमाणें वाचनीय आहेत. संपादकांनीं "साल अखेरचे दोन शब्द" अंकाच्या शेवटीं लिहिले आहेत त्यांच्याकडे वाचकांचें सहानुभूतिपूर्ण लक्ष्य जाऊन "लोकशिक्षणा"स त्याच्या सातव्या वर्षांत अधिक लोकाश्रय मिळो असें आम्हीं इच्छितों.

---

### येळूर (जिल्हा सातारा) गांवास सर फ्रेड्रिक साइक्स शील्ड

मुंबई सरकारनें, मध्य भागांतील ग्रामसुधारणेचे कामीं चांगली कामगिरी करणाऱ्या गांवाकरितां ठेवलेलें सर फ्रेड्रिक साइक्स शील्ड हें चालू वर्षी येळूर गांवास मिळालें. त्याबद्दल ता. १८-६-३६ रोजीं येळूर येथें ग्रामस्थांची सभा भरून आनंद व्यक्त करण्यांत आला.

सभेंत येळूरनें ग्रामसुधारणेचे कामीं जी प्रगति केली व हल्लीं जीं कामें आस्थेनें सुरू आहेत त्या कामीं मदत व प्रोत्साहन देणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांचे आभार मानण्यांत आले.

त्याचप्रमाणें तेथें विणकामाचा वर्ग सुरू करून विणकामाच्या दुय्यम धंद्यास मदत केल्याबद्दल मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्याच्या डायरेक्टरांचेहि आभार मानण्यांत आले.

वरील मंडळींच्या मदतीनें व विशेषतः येळूर को. सुपरवायझिंग युनिअनच्या मदतीनें येळूर येथें सुधारणा झाली, असेंहि सभेनें नमूद केलें.

## महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति

( ले.:-श्री. लक्ष्मण महादेव देशपांडे, कऱ्हाड )

महाराष्ट्र प्रांतिक कॉं. कमिटीच्या कार्यकारी मंडळानें दूरदर्शीपणानें सन १९३५ सालीं ह्या प्रांतांतील शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीची पहाणी करण्याकरितां एक कमिटी नेमली. या कमिटीनें आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला आहे व त्यासंबंधींची बातमी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली आहे. कमिटींत साम्यवादी पक्षाचे सभासद आहेत व याच मताचा पगडा सबंध रिपोर्टांत दिसून येतो. कोणी पाहणी केली म्हणून रिपोर्ट करून सांगोत अथवा कोणी अनुभव म्हणून सांगोत, शेतकऱ्यांची स्थिति समाधानकारक नाहीं हें कोणीहि कबूल करील. परंतु प्रस्तुत रिपोर्टांत सावकार व कुळें, जास्त जमिन धारण करणारे शेतकरी व त्यांचीं कुळें, व खोत आणि त्यांचीं कुळें यांचेमध्यें कलह कसे पिकतील इकडे पूर्ण लक्ष दिल्याचें दिसतें. कमिटीनें आपल्या निर्णयाचा व शिफारशींचा सारांश दिला आहे. त्यांतील पहिलेच कलमांत शेतकऱ्यांचे आर्थिक व्यवहार जागतिक व्यवहाराशीं संबद्ध असल्यामुळें त्यावर उपाय शोधून काढतांना आंतरराष्ट्रीय व्यवहाराचे पार्श्वभूमीचा विचार केला पाहिजे असें म्हटलें आहे. अर्थात्, पुढील सर्व सूचना वर्गकलहास प्रोत्साहन देणाऱ्या आहेत ह्यांत आश्चर्य नाहीं. शेतकरी सुद्धा सुस्थितींत असलेला कमिटीस पाहवत नाहीं. "बिनशेतकरी वर्गाच्या व सधन शेतकरी वर्गाच्या हातीं जमीन केंद्रित होत आहे" असें कमिटी आपल्या रिपोर्टांत म्हणते, त्यावरून वरील अनुमानास बळकटी येते. शेतीच्या उत्पन्नास दर नाहीं हें शेतकऱ्यांच्या हल्लीच्या आपत्तीचें मुख्य कारण मुलकी अधिकारी मि. अँडरसन यांचे प्रमाणें कमिटीसहि कबूल दिसतें. पण त्या बाबीकडे फारसें लक्ष न पुरवितां कर्जावरील व्याज, खंड व सारा या तीन जळवा शेतकऱ्यास लागल्या आहेत असा उल्लेख केला आहे. म्हणजे सावकार, जमीनदार व सधन शेतकरी आणि सरकार ह्या त्या तीन जळवा होत असें दाखविलें आहे. असो. कमिटीच्या रिपोर्टाचा थोडा तपशीलवार विचार करूं.

सावकाराच्या कर्जाच्या व व्याजाच्या ओझ्याखालीं शेतकरी नामशेष होण्याची पाळी आली असें जें वाटतें त्यास किती वर्षे झालीं याचा उल्लेख रिपोर्टांत नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, या भागांतील सावकार वर्ग सन १८७९ चा दक्षिणेंतील शेतकरी ऋणमुक्त करण्याचा कायदा ( दक्षिणेंतील सावकार नाहींसे करण्याचा कायदा? ) पास झाल्यापासून कमी होत आला, तो गेल्या १०-१५ वर्षांत नामशेष झाला आहे. सातारा जिल्ह्यांत तरी अशी स्थिति आहे. यास कांहीं अपवाद असेल पण तो अपवाद वरील नियमाचे सिद्धीस कमीपणा आणीत नाहीं. सावकाराच्या कर्जामुळें शेतकरी नाहींसे होतील ही साम्यवादी कल्पना, पण प्रत्यक्ष सावकार नामशेष झाला आहे. अलीकडील १०-१५ वर्षांतील व्यवहार, शेतकरीच ऋणको व शेतकरीच सावकार असे होत असतात. याचा अर्थ, जो शेतकरी जवळ दोन पैसे करतो तो दुसऱ्या शेतकऱ्यास कर्ज देतो. या कर्जाच्या रकमेवर व्याजाचा करार नसतो. ऋणको शेतकऱ्याची जमीन सावकार शेतकरी आपले कबजांत घेतो व जमिनीचें उत्पन्न व्याजांत घेणेचें असतें, आणि मूळ रकम दिली म्हणजे जमीन सोडणेचा करार असतो. अशा तऱ्हेचे व्यवहार अलीकडे सररहा होत आहेत. कमिटीनें ठिकठिकाणीं पहाणी करून जर आपला रिपोर्ट लिहिला असता तर त्यांना हें सहज समजलें असतें. कमिटीच्या एकंदर रिपोर्टाची मदार सरकारी रिपोर्ट व बिनसरकारी मंडळींनीं लिहिलेले लेख व केलेलीं भाषणें यांवर दिसते. अर्थात् कर्ज व व्याज तहकूब करावें ही कमिटीची सूचना वर सांगिलेल्या व्यवहारास कशी लागू करता येतील याचा विचार त्यांना शिवलेला दिसत नाहीं. नजर गहाणखताचाच व्यवहार त्यांचे नजरेसमोर दिसतो. कर्जे सर्व पाण्यांत बुडविलीं तरी ही शेतकऱ्याची स्थिति सुधारणार नाहीं असेंहि कमिटी नमूद करते. अशा परिस्थितींत कर्ज तहकूब केलें तरी काय उपयोग होणार हें कमिटी सांगत नाहीं. सावकार ही एक जळू आहे इतकेंच ऋणको शेतऱ्याचे मनांत भरविणेचा कमिटीचा विचार दिसतो. कारण जो शेतकरी ऋणकोपणांतून मुक्त होईल त्याच्याबद्दल कमिटीस सहानुभूति नसून तो वाईटच ठरणार. अशा स्थितींत शेतकऱ्यांच्या सुस्थितीचा उपाय कमिटी सांगेल हें शक्य नाहीं. ही कर्जासंबंधीं हकीकत झाली.

आतां खंडासंबंधीं विचार करूं. कारण, ही कमिटीच्या मतें शेतकऱ्याचे मार्गे लागणारी दुसरी जळू होय.

" बिनशेतकरी व सधन शेतकरी अशा २९ % लोकांच्या हातीं ८० % जमीन आहे व यामुळें जमिनीच्या वहिवाटीचा प्रश्न उपस्थित झाला आहे" असें कमिटी म्हणते. कांहीं लोकांच्या हातीं पुष्कळ जमीन असली म्हणजे जमिनीच्या वहिवाटीचा प्रश्न कसा उपस्थित होतो हें समजत नाहीं. तथापि एरव्हीं " हक्क " शब्द उच्चारतांच समान हकाशिवाय जे लोक शब्द उच्चारीत नाहींत ते शेतकऱ्यांना या खंडाच्या जमिनी कायम शाश्वत टिकण्याचा व विक्रीचा हक्क म्हणतात हें विशेषच होय ! ज्या खंडांबद्दल कमिटी इतकी नाखूष आहे ते खंड किती आहेत याचा ४१५ संबंध गांवांचा तक्ता कमिटीनें प्रसिद्ध करावा असें माझें त्यांना आव्हान नव्हे पण सांगणें आहे. सरकारनें आपलें तरम वाढवितांना खंडाच्या रकमेचाच मोठा आधार घेतला आणि कमिटीहि सरकारचेंच अनुकरण करीत आहे. वास्तविक कमिटीनें खंडाचे संबंधांत कांहीं चौकशी केली असल्याचें प्रसिद्ध झालेले हकीकतीवरून दिसत नाहीं. जमिनीचा सरकारी आकार म्हणजे खंड नव्हे. अर्थात् त्यापेक्षां कमी खंड हा तर नव्हेच नव्हे हें कबूल केलें— आणि तसें कोणीहि कबूल करतो—तर ज्यास खंड असें म्हणता येईल अशी जमीन शेंकडा दहा टक्याच्या आंत खास येईल हें दोन चार गांवांच्या उदाहरणावरून सिद्ध करतां येईल. म्हणजे शेंकडा ९०जमीन बिन-खंडाची असते. अशा स्थितींत खंड ही शेतकऱ्यास लागलेली जळू म्हणून वर्णन करणें म्हणजे अल्पसंख्य जमीनदार व सधन शेतकरी यांचेमध्यें व त्यांचे खंडकरी शेतकऱ्यांमध्यें कलह उत्पन्न करणें होय हें उघड आहे. एकाचे हक्क दुसऱ्यास देऊन टाकावे अशी कमिटीची शिफारस ! या कमिटींतील दोन गृहस्थ लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे हल्लींचे सभासद आहेत व पुढील कायदेमंडळांत काँग्रेस तर्फे उमेदवार उभे करणें करतां यांचीच निवड झाली आहे. कांहीं एक चौकशी न करतां व विरुद्ध बाजूचें म्हणणेंहि न ऐकतां जे गृहस्थ एकाचे हक्क दुसऱ्यास द्यावेत म्हणून बेधडक शिफारस करतात त्यांचे शिफारशीची मंडळी कायदेमंडळांत आल्यावर काय करतील याचा विचार करण्या सारखी गोष्ट आहे. कमिटीनें चौकशी केली असती तर त्यांना आढळून आलें असतें कीं, अशाहि थोड्या जमिनींचे कबूलायतींतील पूर्वीचे खंड प्रत्यक्ष वसूल केले जात नाहींत.

कमिटीची या पुढची पायरी म्हणजे खोती हक्क २० वर्षांचे अवधींत समूळ नष्ट करण्यांत यावेत, ही शिफारस होय. या संबंधांत कोणा खोताकडे कांहीं विचारपूस केली असल्यास न कळे. पण असे तीव्र उपाय जी कमिटी सुचविते त्या कमिटीच्या मनांत कोणत्याहि शेतकऱ्यांची स्थिती सुधारावी या कळकळीपेक्षां वर्ग कलह लौकर कसे सुरू होतील हीच कळकळ ज्यास्त दिसते. रशियाचें अनुकरण करून सर्वत्र बेबंदशाही पसरावी, असें क्रांति मान्य असलेले साम्यवादी म्हणत असतात. पण त्यांचा प्रचार उघड होत नाहीं अथवा होऊं दिला जात नाहीं. तथापि अशा तऱ्हेचे रिपोर्ट निवडणुकीचे वेळीं प्रसिद्ध करून बहुसंख्य लोकांचीं मतें मिळविणेचा दूरदर्शीपणा कमिटीनें केला आहे. त्याचें फळ त्यांना किती मिळतें हें लौकरच दिसेल.

---

**संयुक्तप्रांतांत बेकारीच्या निवारणाप्रीत्यर्थ सरकारी प्रयत्न**

सर तेजबहादुर सप्रू ह्यांच्या अध्यक्षतेखालीं बेकारीवर उपाय-योजना सुचविण्याकरितां संयुक्तप्रांताच्या सरकारनें एक कमिटी नेमली होती. ह्या कमिटीनें आपला रिपोर्ट सादर केला, तेव्हां पैशाच्या सबबीवर त्यांतील शिफारसी अमलांत आणण्याचें पुढें ढकलण्याचा सरकारचा विचार होता असें दिसतें. तथापि, कायदे-मंडळानें ह्या प्रश्नाचें महत्त्व ओळखून जादा करपट्टीस अनुमति दर्शविली व त्यामुळें सप्रू कमिटीच्या सूचनांस व्यवहारक्षेत्रांत पाऊल टाकण्याचा सुयोग आला. संयुक्तप्रांत सरकारनें आतां ह्या प्रीत्यर्थ दरसाल तीन लक्ष रुपये खर्चण्याचें ठरविलें आहे. ह्या-खेरीज, सोपीव खात्यांमध्यें इष्ट ती सुधारणा घडवून आणण्या-साठीं एक लक्ष रुपये काढून ठेवण्यांत आले आहेत. उद्योगधंद्यांचें व्यावहारिक शिक्षण, औद्योगिक योजना फलद्रूप होण्यास यंत्र-सामुग्री इ. घेण्यासाठी सहाय, शेतीची प्रत्यक्ष माहिती, बेकारांस काम मिळवून देण्याऱ्या बोर्डाची स्थापना, वैद्यकीय योजना, इत्यादि गोष्टीप्रीत्यर्थ पैशाच्या ह्या जादा नेमणुकीचा विनियोग होणार आहे. शैक्षणिक पद्धतीच्या पुनर्घटनेसंबंधीं चौकशी व विचार चालू आहे.

---

**सिमला**

१८१५ ते १६ च्या नेपाळच्या युद्धांत ब्रिटिश सरकारास मदत केल्याबद्दल त्यावेळचें हें खेडें पतियाळाच्या महाराजांस बक्षीस देण्यांत आलें. कॅप्टन केनेडीनें तेथें प्रथम आपलें निवासस्थान बांधलें. १८२७ सालीं लॉर्ड आमहर्स्ट ह्या व्हाइस-रॉयनें सिमल्यास भेट दिली. लॉर्ड डफरिन ह्यांनीं व्हाइसरॉयाच्या दर्जास शोभेल अशी इमारत बांधून त्यांत १८८८ सालीं प्रवेश केला. ह्या इमारतीस ४० लक्ष रुपये खर्च आला. तो भरून काढ-ण्यासाठीं १८८६ सालीं प्राप्तीवरील कर बसविण्यांत आला, असें लोक म्हणत. हिंदुस्थान सरकारचें सिमल्यावरील गिर्यारोहण थांब-विल्यास खर्चांत बरीच बचत होईल, परंतु सरकारी अधिकाऱ्यांस सध्याची व्यवस्थाच ज्यास्त सोईची वाटते आणि असेंब्लीच्या सभासदांसहि ह्या काटकसरीचें महत्त्व पटत नाहीं असें दिसतें. असेंब्लीची एक बैठक सिमल्यास भरत असते.

---

**बी. बी. अँड सी. आय. रेल्वे**

बी. बी. अँड सी. आय. रेल्वे कंपनीस मार्च अखेर पुऱ्या-झालेल्या वर्षीं एकूण ११ कोटि, २४ लक्ष रुपये उत्पन्न झालें, म्हणजे त्या पूर्वीच्या सालापेक्षां सोळा लाख रुपये उत्पन्न जास्त झालें. ह्या उलट, व्यवस्थेचा खर्च एकोणीस लाखांनीं कमी होऊन तो ६ कोटी २२ लक्ष रुपयांवर आला.


**धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०**

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थे-कडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

**CONFIDENCE**

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**

**This year 1934-35**
**Exceeds**
**2 CRORES & 50 LAKHS**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

**HINDUSTHAN**

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Offices* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## सहकारी संस्थांचे संबंधांत नं. ४८ चा नवा नियम

मुंबई सरकारनें सहकारी संस्थांचे बाबतींत नंबर ४८ चा एक नवीन नियम करण्याचें ठरविलें आहे.त्या संबंधीं पुणें मर्चंट्स को. बँकेचे चेअरमन, श्री. नि. ना क्षीरसागर, लिहितात:—

"कांहीं पतपेढ्यांचें कामकाज सुव्यवस्थितपणें चाललें नसेल तर त्या संस्थांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना आंखणें भाग पडत असलें तरी त्यांच्या सभासदांचे न्याय्य व कायदेशीर हक्क कायम ठेवूनच सुधारणा घडवून आणली पाहिजे. नवीन होणारा नियम ह्या तत्त्वावर आक्रमण करणारा असा होणार आहे व सहकारी चळवळींतील एकादा कार्यकर्ता सरकारचे रोषास पात्र झाल्यास त्यास ह्या चळवळींतून दूर करण्याचा अधिकार ह्या नियमानें सरकार घेऊं पहात आहे. सहकारी चळवळ ऊर्जितावस्थेस येण्यास, त्यासाठी निर्वेतन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचेच परिश्रम कारणीभूत झालेले आहेत, परंतु सहकारी खातें व हीं कार्यकर्ती माणसें ह्यांचा मिलाफ होत नाहीं. एकाद्या संस्थेची पंच कमिटी योग्य तऱ्हेनें काम करीत नसल्यास तिची सुधारणा करण्यासाठी कमिटी अगर सभासदच काढण्याची जरूरी नाहीं. संस्थेची सुधारणा इतर मार्गांनीं करतां येण्याजोगी आहे. १९३४ सालीं रजिस्ट्रार ह्यांनीं पंच कमिटींत सरकारतर्फे एक सभासद असावा, सोसायट्यांचे सेक्रेटरीस अगर मॅनेजरास काढण्याचा सरकारास अधिकार असावा, इत्यादि सूचना केल्या होत्या; परंतु सहकारी संस्थांच्या विरोधामुळें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. पुणें जिल्हा को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटनें एक सर्क्युलर काढून प्रस्तुत प्रश्नावर मतें मागविलीं आहेत. पुणें जिल्ह्यांतील सर्व सहकारी संस्था नव्या नियमास विरोध करतील, ह्यांत शंका नाहीं. येथील सर्व संस्थांनीं जाहीर रीतीनें नापसंती व्यक्त करावी."

---

### अहमदाबाद येथील व्यवसायविषयक कॉलेजें

अहमदाबाद येथील व्यापारी कॉलेजास सरकारची मान्यता मिळाली असून ता. २१ जून रोजीं त्याचें उद्घाटन सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास ह्यांचे हस्तें झालें. पुणें येथील एका संस्थेनें पुण्यामध्यें व्यापारी कॉलेज काढण्याबाबत केलेल्या अर्जाचें भिजत घोंगडें मुंबई विश्वविद्यालयांत अजून पडलें आहे असें दिसतें. गुजराथेंत असल्या कामास पैशाचा भरपूर पाठिंबा असल्यानें नवीन संस्था काढण्याचें कार्य तिकडे सुकर होतें. अहमदाबाद येथें एक इंजिनियरिंग कॉलेज स्थापन करण्याचे प्रयत्न चालू असून, त्याप्रीत्यर्थ शेठ कस्तुरभाई लालभाई ह्यांनीं पंधरा लक्ष रुपयांची देणगी दिली आहे.

---

### खेडेगांवांतील परिस्थिति व शहरांतले कार्यकर्ते

बंगलोर येथील महिला सेवा समाजापुढें भाषण करतांना श्री. वल्लभभाई पटेल म्हणाले:—

"हिंदुस्थानाचें केंद्र म्हणजे खेडेगांव. तेथील रहाणी सुधारल्याखेरीज हिंदुस्थानाची आर्थिक, राजकीय अगर सामाजिक प्रगति होणें अशक्य आहे. शहरी वातावरणांत वाढलेल्या स्त्रियांस खेडेगांवांतील परिस्थितीशीं समरस होऊन तेथें कार्य करतां येणें कठिण आहे. सुखाची लालसा वाढविणारें वातावरण खेडेगांवांत उत्पन्न करून तेथील समाधानी व शांत वातावरण दुखविण्यानें हानि मात्र होईल. शहरांतून रहाणीचें मान वाढविण्याचा सपाटा चालू असतांना खेडेगांवांतील लोकांस दोन वेळां पोटभर अन्नहि मिळत नाहीं, ही परिस्थिति अत्यंत करुणास्पद आहे."


# एशियन पॉलिसी

म्हणजेच

## आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत

**धी एशियन ॲशुरन्स कंपनी, लिमिटेड**

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

## Dawn of India's Insurance field-workers' Training Institute. Poona.

**The training course will commence by the 1st of July 1936.**

Applications are invited from Matriculates for admission to the Training Institute. Candidates who join the Institute are also coached up for Advocate's examination.

Apply for Prospectus to:—

99, Laxmi Road, Poona. — **D. V. Atre,** B. A. (Hons.); LL. B. Principal.

## WANTED.

Influential and hard-working Agents At Ahmednagar, Dhulia, Kolhapur, Nasik and Poona for Sun Life Assurance Company of Canada on liberal terms. Apply :—

The Manager,
Sun Life Assurance Company of Canada,
Hornby Road, Fort, BOMBAY.

## मोटारींच्या नव्या कारखान्याची पूर्वतयारी

मुंबई येथें लवकरच स्थापन होणार असलेल्या मोटारींच्या कारखान्यामध्यें सुरवातीस फक्त दोन तऱ्हेच्या मोटारीच बनविण्यांत यावयाच्या आहेत. अमेरिका अगर युरोप यामधील एकाद्या मोटारींचे मोठ्या कारखान्याशीं करार करून त्याचें सहकार्य मिळविण्याची खटपट चालू आहे. नियोजित कारखान्यास इमारती, यंत्रसामुग्री इत्यादींसाठी ९० लक्ष रुपये लागतील व ६० लक्ष रुपयांचें खेळतें भांडवल लागेल. हे दीड कोटि रुपये उभारण्यासाठी संयुक्त भांडवलाची मंडळी स्थापन करण्यांत येईल. तिच्या भागांची किंमत खालीलप्रमाणें असेल:–

| भाग | प्रत्येकीं किंमत | एकूण रकम |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| १०,००,००० | १० | १०० लक्ष |
| ४०,००० | १०० | ४० „ |
| १,००० | १,००० | १० „ |

नियोजित मंडळीच्या मेमोरँडममध्यें, हिंदुस्थान सरकार ह्या कारखान्यास कोणत्या रीतीनें मदत करूं शकेल, हें सांगितलें आहे. सध्याची मोटारींच्या आयातीवरील जकात वाढवून नवी ‘ संरक्षक जकात ’ बसवावी आणि सरकारी खात्यांस लागणाऱ्या गाड्या सरकारनें ह्या कारखान्याकडून घ्याव्या, अशी मंडळीची अपेक्षा आहे. रेल्वेच्या दरांत सवलत मिळावी व कारखान्यासाठी परदेशांतून आणावयाच्या मालावरील जकातींत सूट मिळावी, अशीहि मंडळीची मागणी आहे.

## विजेच्या सामानाची वाढती आयात

हिंदुस्थानांतील कित्येक मोठ्या शहरांत विजेच्या दिव्यांनीं प्रवेश केला आहे व विद्युत्‌शक्ति उत्पन्न करण्याच्या कित्येक योजना अंमलांत येत आहेत. ह्या कारणानें, विजेच्या यंत्रसामुग्रीची व इतर मालाची आयात वाढत आहे. १९३४–३५ मध्यें हिंदुस्थानांत २ कोटि ८१ लक्ष रुपये किंमतीचा विजेचा माल उतरला होता; गेल्या वर्षीं हा आंकडा ३ कोटि, ८ लाखांवर गेला. कांहीं महत्त्वाच्या बाबींसंबंधांतले आंकडे येथें दिले आहेत:—

विजेच्या मालाची आयात

| | १९३४–३५ (लक्ष रु.) | १९३५–३६ (लक्ष रु.) |
|---|---|---|
| विजेच्या तारा | ८७ | ९३ |
| पंखे | २५ | ३२ |
| तारेची व टेलिफोनची यंत्रसामुग्री | १५ | १८ |
| दिवे | २६ | ३० |
| बॅटऱ्या | १५ | २० |
| इतरं | ३९ | ३५ |

विजेच्या यंत्रांची आयातहि अहवालाचे सालीं १९३४–३५ च्या मानानें ३७ लक्ष रुपयांनीं वाढून ती २ कोटि ५ लक्ष झाली.

## तीस लक्ष नवीं घरें

गेल्या पंधरा वर्षांत ग्रेट ब्रिटनमध्यें तीस लक्ष नवीं घरें बांधण्यांत आलीं. त्यांपैकीं सुमारें १,३०० कोटि रुपये किंमतीचीं सतरा लक्ष घरें कुटुंबांच्या रहाण्याच्या सोयीसाठी खरेदी केली गेलीं.


## P. W. D. Ahmednagar Division.

Sealed tenders are invited for the supply of Petty Stores, teakwood and kerosene oil for 12 months from 1st July 1936. Tenders accompanied by chalan for payment of earnest money in cash in any Government Treasury at Rs. 75/- for Petty Stores and Rs. 25/- for teakwood and kerosene oil should be addressed to the Executive Engineer, Ahmednagar Division, Ahmednagar and delivered at his Office up to 3 P. M. on 1-7-1936 (Wednesday). Tender forms together with conditions of contract will be available at the office of the undersigned on payment of Rs. 3/- for Petty Stores and Re. 1/- each for others during office hours. No tender copies will be sent by V. P. P. Tenderers should furnish solvency certificate to the extent of above Rs. 15000/- for (1) and Rs. 5000/- for (2 & 3).

The Executive Engineer reserves the right to accept any tender without assigning reason.

(Sd.) N. B. GADRE,
Executive Engineer,
Ahmednagar Division.

13-6-36.

## Government Commercial Diploma

The S. P. MANDALI'S SCHOOL OF COMMERCE, Poona, will reopen on the 22nd June 1936 to coach Students for the above Diploma. Admission fee Rs. 5. Annual tuition fee Rs. 80. Scholarships and free and half-free studentships available to deserving students. Admission upto 4th July 1936. For free prospectus apply to the Superintendent.

N. G. NARALKAR,
Superintendent.

## The Willingdon College, Sangli.

Reopened on the 20th June, 1936. Tuition fees per student per term are Rs. 60, and hostel rent Rs. 12 for a double and Rs. 15 for a single room. Messing charges come to about Rs. 12 per month. Cheapness, efficiency and healthy surroundings are special features of the College. Freeships and scholarships are granted to deserving students.

D. G. KARVE,
Principal.

## K. K. & Co.
**Photographic Dealers**
**POONA.**

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

Camp Education Society's

**SECONDARY TRAINING DEPARTMENT**

Prin.:—P. K. ATRE

Is allowed by the Educational Department to train teachers and private pupils for the S. T. C. Examination. Term begins from June 15. Fees Rs. 85/- for the year. Apply for prospectus to the Principal.

The House for Quality goods at most reasonable prices.

**K. M. BELSARE & Co.,**

PLAIN & DECORATIVE FURNITURE

FOR

Home, School, College, Office etc. in

WOOD & IRON

Sadashiv, POONA 2

**दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.**

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२

अधिकृत भांडवल : : : १०,००,०००

विक्रीस काढलेलें भांडवल : ५,००,०००

**दर शेअरची किं. : रु. ५०**

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंडया, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | ११०-१३ |
| ३% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०-११ |
| ३% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८—७ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—६ |
| ४% १९६०—७० ... ... | ११५—२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९८-१३ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०६-१५ |
| ४% १९४३ ... ... ... | ११०-११ |
| २¾% १९४८—५२ ... ... | १००—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०७-१२ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०८—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | १०८—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | ११०-१२ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३०—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११३—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३३-१४ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | ११६७—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३०-१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १०१-१२ |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९०२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५९-११ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २३०—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १६३३-१२ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५५६—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १८५-१० |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १५६—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८०—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७११—४ |

## माधव सोमण ब्रदर्स

आम्हीं स्वतः तयार केलेलीं लुगडीं व इतर पेठांचा खात्रीचा माल गिऱ्हाइकांस विकतों.

हुजूरपागेसमोर, पुणें २.

## श्री माणकेश एजन्सी

शहापूर लुगडीं, जरीचीं व टोपपदरी, अंगास रंग न लागणारीं मिळतात.

तसेंच, इरकल, संवायत वगैरे पेठेचा गॅरंटीड माल मिळतो.

मंडई रस्ता, शनीचा पार, पुणें.

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी

टेलरिंग फर्म

## पाटसकर आणि कंपनी

मॅनेजर:-व्ही. ग. पाटसकर, D.M.T.O.A. (London.)

स्थापना १९२१ ?

४८ निहाल पेठ, पुणें शहर.

सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी

आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

*For All Medicinal Requisites*

— TRY —

## N. MAHADEV & Co.

DISPENSING CHEMISTS

AND

DRUGGISTS

City Post Office Corner, POONA 2.

## दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें — पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये ?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:-

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष-श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

## " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.


हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुर्डा. घ. नं. ९२४/१३, पुणें शहर; येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख १ जुलै, १९३६. अंक २७

विम्याचे कामास सुरुवात झाली

## गुडवुइल ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड.

विमा-तज्ञ श्री. जी. एस्. मराठे यांनीं अनेक कंपन्यांचे अनुभवावरून तयार केलेल्या खास योजना

—सर्व तऱ्हेच्या विम्यांची सोय—अत्यंत सुलभ अटी—

विमेदारांना कमी हप्ता पडण्याची आमच्या कंपनीची खास सवलत

आजच प्रॉस्पेक्टस् मागवून आपला विमा उतरा.

ठिकठिकाणीं एजंटस् नेमणेचे आहेत. भरपूर कमिशन मिळेल. चौकशी करा.

पोस्ट—मिरज मिशन हॉस्पिटल.

बी. व्ही. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर

## दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें — पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

# विविध माहिती

## ब्रिटिश सैन्यांत शिरणाऱ्या उमेदवारांची कडक तपासणी

गेल्या वर्षी एकूण २३,००० उमेदवार शारीरिक तपासणीमध्यें नालायक ठरून ब्रिटिश लष्करामध्यें त्यांस प्रवेश मिळूं शकला नाहीं. परीक्षा फार कडक आहे, कीं सैन्यांत शिरूं पहाणारे उमेदवारच नालायक असतात, असा प्रश्न ह्या संबंधांत उत्पन्न झाला आहे. ह्या लोकांचे दात खराब असतात, ह्यांत मात्र संशय नाहीं, कारण १९३४ सालीं सैन्यांत दाखल केलेल्या प्रत्येक उमेदवाराचे सरासरीनें पांच दांत किडलेले होते, ते भरून घ्यावे लागले !

## इराकमधील परदेशी विमा कंपन्या

परदेशी विमा कंपन्यांनीं इराकमध्यें व्यवहार करण्यास इराकी सरकारची परवानगी मिळवली पाहिजे असा नवीन कायदा तेथें करण्यांत आला आहे. असल्या कंपन्यांस सुमारें सव्वा लक्ष रुपयांचें डिपॉझिट एखाद्या इराकी बँकेंत ठेवावें लागतें आणि ह्या अटीवरच आयुष्याच्या विम्याचें काम त्यांस करतां येतें. इराकमध्यें व्यवहार करणाऱ्या एकूण २५ कंपन्यांपैकीं २० ब्रिटिश आहेत.

## बालिका सिनेमा नटी—शर्ले टेंपल

अमेरिकन बालिका सिनेमा नटी शर्ले टेंपल हिचा बोलबाला अलीकडे खूपच झाला आहे. आवडत्या नट-नटींस कौतुकाचीं पत्रें पाठविण्याचा पाश्चात्य देशांत सिनेमाशोकीनांस फार नाद आहे. शर्ले टेंपलला दर आठवड्यास हजारों पत्रें येतात आणि तिची साप्ताहिक मिळकत अडीच लक्ष रुपये आहे असें सांगतात.

## जबलपूर येथें एक नवीन कारखाना

रसायनांचें उत्पादन करणारी एक मंडळी जबलपूर जिल्ह्यामध्यें स्थापन होणार आहे. सर्व तऱ्हेचीं ॲसिड्स, अमोनिया, जंतुनाशक द्रव्यें, इत्यादि सदरहू मंडळीचे कारखान्यांत तयार होतील. त्यांत गुंतविण्यांत येणारें भांडवल सर्वांशीं ब्रिटिश असून फक्त दोन हिंदी डायरेक्टर घेण्यांत येतील असें दिसतें.

## पॅरिस येथील प्रचंड प्रदर्शन

पुढल्या वर्षी पॅरिसमध्यें एक प्रचंड प्रदर्शन भरावयाचें असून तें यशस्वी व्हावें म्हणून फ्रेंच सरकार पुष्कळ खर्च करणार आहे. शहराच्या मध्यवर्ती भागांत ७४ एकर जमीन प्रदर्शनासाठी पसंत करण्यांत आली आहे. मानवी संस्कृतीच्या सर्व अंगांचा परामर्श प्रदर्शनांत घेण्यांत येईल.

## मि. लॉईड जॉर्ज दुकानदार झाले !

ग्रेट ब्रिटनचे माजी मुख्य प्रधान व सुप्रसिद्ध मुत्सद्दी मि. लॉईड जॉर्ज ह्यांनीं सुरवातीस हौसेनें मळा लावला. परंतु त्यांत तयार होणारीं फळें, भाज्या, फुलें इत्यादि माल पडून राहूं लागला. त्याचा उठाव करण्याकरितां मि. लॉईड जॉर्ज ह्यांनीं आतां एक दुकान उघडलें आहे.

## रेल्वेजच्या उत्पन्नांत वाढ

१ एप्रिल ते १० जून अखेरच्या मुदतीमध्यें हिंदुस्थान सरकारच्या ताब्यांतील रेल्वेजना सुमारें १८ कोटि ७४ लक्ष रुपये उत्पन्न झालें. हा आकडा १९३६ मधील तत्सम आकड्यापेक्षां १९ लाखांनीं व १९३५ मधील आकड्यापेक्षां ३९ लाखांनीं ज्यास्त आहे.

## मोटारींच्या शिंगांस बंदी

गेल्या महिन्याचे एक तारखेपासून, मुंबई शहराच्या कांहीं विशिष्ट विभागांतील रस्त्यांवर रात्रीं ११ ते सकाळीं ६ पर्यंत मोटारींचीं शिंगें वाजविण्यास बंदी करण्यांत आली होती. हा प्रयोग जुलैअखेर चालावयाचा आहे. शिंगबंदीचा परिणाम समाधानकारक झाल्याचें आढळून आलें असून हा नियम कायम करण्याचा व त्याच्या अंमलबजावणीचें क्षेत्र वाढविण्याचा पोलीस-अधिकाऱ्यांचा विचार आहे.

## बेकारांची गणती

मद्रास सरकारनें आपल्या इलाख्यांतील बेकारांची गणती करण्याचें ठरविलें आहे. पदवीधर बेकारांची लायकी व सद्यःस्थिति ह्यांविषयींची माहिती सरकारास कळवावयाची आहे.

## रोहरी कालवा

सक्करचे धरणांतून काढलेला सिंधू नदीचा 'रोहरी' कालवा सुरवातीचे कांहीं मैल पर्यंत सुएझच्या कालव्यापेक्षा ज्यास्त रुंद आहे. त्यांतील पाण्याची खोली १२½ फूट असून दर सेकंदास ३¾ फूट ह्या वेगानें पाणी वहातें.

## म्हैसूर सरकारची चंदनाच्या तेलापासून मिळकत

म्हैसूर सरकारास चंदनाचे तेलापासून दरसाल चांगलें उत्पन्न होतें. १९३६–३७ मध्यें त्यापासून ११ लक्ष रुपये मिळतील अशी अपेक्षा आहे.

## ब्रिटिश बादशहांचा साधेपणा

आठवे एडवर्ड बादशहा ह्यांस डामडौलाचा कंटाळा आहे. बादशहांचेसाठी स्पेशल डबे व गाड्या यांची सोय केलेली आहे, पण एडवर्ड बादशहा त्यांचा उपयोग करतील असें दिसत नाहीं. पहिल्या वर्गाच्या सामान्य डब्यांत ते प्रवास करतात.

## पब्लिक ट्रस्टीचा अवाढव्य कारभार

विशिष्ट नागरिकांच्या मालमत्तेची सरकारतर्फे व्यवस्था पहाण्याचें काम ग्रेट ब्रिटनमध्यें पब्लिक ट्रस्टीचें आहे. त्याच्या ताब्यांत ३५० कोटि रुपयांची मालमत्ता असते, पंधरा-वीस हजार मृत्युपत्रांची तो व्यवस्था करतो आणि प्रतिवर्षी त्याच्यामार्फत दहा-पंधरा कोटि रुपयांचा बटवडा होतो.

## अहमदाबाद येथील कापडाच्या गिरण्या

मुंबई शहर हें कापडाच्या गिरण्यांचें आगर समजलें जातें, तथापि अहमदाबादनें मागाहून सुरवात करूनहि तेथें हा धंदा उत्तम तऱ्हेनें प्रस्थापित केला आहे. कार्यक्षमतेच्या बाबतींत अहमदाबाद येथील गिरण्या जगांतील कोणत्याहि इतर गिरण्यांस हार जाणार नाहींत, असें म्हणतात. मुंबई व अहमदाबाद येथील गिरण्यांच्या उत्पादनाचे फेब्रुवारी १९३६ मधील तुलनात्मक आंकडे येथें दिले आहेत.

| | सूत काढलें (लक्ष पौंड) | कापड विणलें (लक्ष पौंड) |
|---|---|---|
| अहमदाबाद | १,३८ | १,३३ |
| मुंबई | २,३६ | २,९७ |

## मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २० जून रोजीं पुरा झालेला आठवडा | ९८,७२,९७६ |
| ता. २७ जून रोजीं पुरा झालेला आठवडा | ४७,१०,७४८ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते २७ जून १९३६ अखेर | २,७४,२६,७२,३५७ |

अनुक्रमणिका

पृष्ठ

१ विविध माहिती ... ३२२
२ इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चचें कार्य ... ... ३२३
३ मुंबई इलाख्यांतली सहकारी चळवळ ... ३२३
४ स्फुट विचार ... ३२४
ब्रिटिश कापडावरील जकात कमी झाली—गिरणीवाल्यांच्या मागण्या व सरकारचा निर्णय—नीमायर योजना मान्य, पुढें काय—? कर्जनिवारणासाठीं अपुरी तरतूद—कै. भाऊराव कोल्हटकर ह्यांचें गाणें ऐकावयास मिळेल काय?—माल फुकट मिळूनहि महाग पडतो—हिंदी गिरण्यांची प्रगति—मॅनेजिंग एजन्सीचा पुरस्कार
५ शेतकऱ्यांच्या मालाचा उठाव ... ३२६
६ बादशहांचा राज्यारोहण समारंभ ... ३२७
७ शेतकऱ्यांचें शहाणपण ३२७
८ सहकारी चळवळ व सरकारी नियंत्रण ... ३२८
९ नाशिक डि. को. इन्स्टिट्यूटचें प्रचारकार्य ... ३२९
११ जागतिक परिस्थितीचा आढावा ... ३३०
१२ निवडक बाजारभाव ३३०

अर्थ

बुधवार, ता. १ जुलै, १९३६

## इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चचें कार्य

हिंदुस्थानचे सध्याचे व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो ह्यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यांत आलेल्या शेतकी कमिशनच्या शिफारसींस अनुसरून इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चची १९२९ सालीं स्थापना झाली. शेती व शेतीचीं जनावरें ह्यांसंबंधानें संशोधन करून सुधारणेचा मार्ग दाखविणें आणि हिंदुस्थानाबाहेर चालू असलेल्या संशोधनाची व त्याची सांगड घालणें, हें महत्त्वाचें काम कौन्सिलकडे सोंपविण्यांत आलें. शास्त्रीय विषयांची माहिती देणारीं पत्रकें व पुस्तकें प्रसिद्ध करणें, संशोधकांच्या शिक्षणाची तजवीज करणें व हिंदी विश्वविद्यालयांचा व शेतीविषयक संशोधनाचा निकट संबंध घडवून आणणें, इत्यादि कामेंहि कौन्सिलनें करावयाचीं असतात. शेती कमिशनच्या सूचनांस अनुसरून मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं आपापल्या शेतकी खात्यांत करावयाच्या सुधारणांच्या योजना आखल्या, इतक्यांत आर्थिक मंदीस सुरवात झाली व संशोधनावर होणाऱ्या व करण्यांत यावयाच्या खर्चास सर्वांत आधीं कात्री लागली. इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें शेती व जनावरें ह्यांच्या संबंधांतील संशोधनास मदत म्हणून ग्रँट देण्यास सुरवात केली व यंदाचे वर्षी वेगवेगळया ७५ योजनांसाठी १७ लक्ष रुपयांची मदत देण्यांत येत आहे. इंपीरिअल कौन्सिल हें मध्यवर्ती सरकारचें मामुली खातें नसून, त्यावर होणारा खर्च वार्षिक बजेटांवर अवलंबून नसतो. कौन्सिलला सरकारकडून विशिष्ट देणगी मिळते व तिचा विनियोग करणें कौन्सिलच्याच हातांत असतें.

इंपीरिअल कौन्सिल साधारणपणें संशोधनच्या पंचवार्षिक योजनांस लागणाऱ्या जादा संशोधकांच्या वेतनासाठी व शास्त्रीय उपकरणांच्या खर्चासाठी प्रांतिक सरकारांस ग्रँट देतें. जमीन, इमारत, इत्यादि भांडवली स्वरूपाचा खर्च शक्य तितका कमी करून तो प्रांतिक सरकारांनीं अंगावर घ्यावा, अशी पद्धत आहे. साखरेच्या धंद्याकडे कौन्सिलनें प्रथम लक्ष पुरवलें व 'साखर कमिटी'ची स्थापना केली. साखरेच्या धंद्यास संरक्षण मिळण्याबाबत टारिफ बोर्डापुढें आपलें म्हणणें मांडून तें मिळवून देण्यांत कौन्सिलनें पुढाकार घेतला आणि उंसाची लागवड व साखरेचें उत्पादन ह्या दोन्हीं बाबतींत तज्ञांचा सल्ला मिळण्याची सोय केली. उंसावरील रोगांबाबत उपचार कार्य चालूच आहे व साखरेच्या धंद्यासंबंधांतील मध्यवर्ती संशोधन कार्यालयाची योजना ह्या वर्षअखेर फलद्रूप होईल अशी अपेक्षा आहे. साखरेच्या धंद्याबाबत कौन्सिलनें आजवर २० लक्ष रुपये खर्च केले आहेत. त्याचा परिणाम उंसाच्या लागवडींत झालेली वाढ व साखरेच्या कारखान्यांची वाढती संख्या ह्यांत दिसून येईल.

ऊंस व साखर ह्यांसाठी कौन्सिलनें केलेलें कार्य लोकांस थोडेंफार माहीत आहे, परंतु हिंदुस्थानांतील सर्वांत महत्त्वाचें पीक जें तांदूळ, त्याकरितांहि कौन्सिल उपयुक्त कार्य करीत आहे, ह्याची माहिती फार जणांस नाहीं. वेगवेगळया प्रांतांत संशोधन कार्य चालू असून तांदळाच्या ज्यास्त उत्पन्नदायक जातींची पैदास करण्याबाबत प्रयोग सुरू आहेत. फळांचा पुरवठा वाढून तो सुधारावा, ह्यासाठी पुणें येथील कोल्ड स्टोरेज एक्सपेरिमेंटल स्टेशनमध्यें फळांची साठवण व वहातुक ह्यांविषयीं आंबे व संत्रीं ह्या फळांवर प्रयोग करण्यांत येत आहेत व कोणत्या परिस्थितींत तीं उत्तम टिकतात, हें अजमावण्याचें काम चालू आहे. जमिनीचा कस कसा सुधारतां येईल, ह्या विषयींहि कौन्सिलतर्फें ठिकठिकाणीं संशोधन करण्यांत येत आहे. संशोधनाचे बाबतींत सर्वच प्रांतांत एकसारखी प्रगति झालेली नाहीं; तथापि, गेलीं सहा वर्षें दिवाणबहादुर सर टी. विजयराघवाचार्य ह्या हिंदी गृहस्थाचे नेतृत्वाखालीच कौन्सिलनें ही प्रगति केली, परदेशांतील तज्ञावाचून अडलें नाहीं, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

## मुंबई इलाख्यांतल्या सहकारी चळवळीची माहिती

(१)

जून, १९३५ अखेरच्या सवा वर्षाचा मुंबई सहकारी खात्याचा अहवाल सहकारी रीत्या अजून प्रसिद्ध व्हावयाचा आहे. तथापि, गेल्या वर्षाप्रमाणेंच यंदाहि रजिस्ट्रार ह्यांच्या कृपेनें १९३४-३५ सालाबाबतची सहकारी चळवळीची मिळालेली माहिती येथें देत आहों. एप्रिल ते मार्चच्या ऐवजी जुलै ते जून असें सहकारी वर्ष गेल्या सालीं चालू झाल्याकारणानें १९३४-३५ चे खालील आकडे पंधरा महिन्यांचे आहेत व त्यांमध्यें सिंधच्या आकड्यांचा समावेश झालेला आहे हें लक्षांत ठेवावें. निरनिराळ्या सहकारी संस्थांबाबतचे ठळक माहितीचे आकडे प्रथम घेतले आहेत:—

| संस्थेचा प्रकार | संस्थांची संख्या | | सभासदांची संख्या | |
|---|---|---|---|---|
| | १९३३-३४ | १९३४-३५ | १९३३-३४ | १९३४-३५ |
| सेंट्रल बँका | २० | १६ | १५,३१८ | १५,८१४ |
| शेतकी संस्था | ४,७५५ | ४,७३० | ३,०९,८०१ | ३,००,६९९ |
| बिगर शेतकी संस्था | ९२० | ५,६५२ | २,७५,९१४ | ३,१३,८८० |
| एकूण | ५,६९५ | ५,६५२ | ६,०१,०३३ | ६,३०,३९३ |
| युनिअन्स | ११८ | ११६ | | |
| विमा संस्था | ३ | २ | १,९३४ | २,०४६ |
| एकूण | १२१ | ११८ | १,९३४ | २,०४६ |
| अखेरची बेरीज | ५,८१६ | ५,७७० | ६,०२,९६७ | ६,३२,४३९ |

| संस्थांचे प्रकार | एकूण भांडवल | | रिझर्व्ह फंड | |
|---|---|---|---|---|
| | १९३३–३४ | ९३४-३५ | १९३३–३४ | १९३४-३५ |
| | रु. कोटि लक्ष | रु. कोटि लक्ष | रु. लक्ष हजार | रु. लक्ष हजार |
| सेंट्रल बँका | ५ ८३ | ५ ९७ | २१ ५७ | २९ ३८ |
| शेतकी संस्था | ४ ११ | ४ ४ | ७६ ९२ | ८३ ५१ |
| बिगर शेतकी संस्था | ६ २१ | ६ ८० | ४७ ४७ | ६१ ६५ |
| एकूण | १६ १६ | १६ ८२ | १४५ ९८ | १७४ ५५ |

वरील कोष्टकावरून असें दिसून येईल कीं, संस्थांची संख्या गेल्या वर्षी घटली असली तरी सभासदांची एकूण संख्या वाढली आहे. शेतकी सोसायट्यांचाच विचार केला असतां त्यांची संख्या व त्यांतल्या सभासदांची संख्या ह्या दोहोंतहि घट झालेली आढळेल. एकूण भांडवल आणि रिझर्व्ह फंड ह्यांतहि वाढ झाली आहे. शेतकी सोसायट्यांच्या एकूण भांडवलांत मात्र वाढ न होतां घट झाली आहे. १९३४–३५ सालीं १३९ सहकारी संस्था गुंडाळण्यांत आल्या आणि ९९ नवीन रजिस्टर केल्या गेल्या ह्याचा तपशील खाली दिला आहे:—

| | गुंडाळल्या | नवीन रजिस्टर झाल्या |
|---|---|---|
| शेतकी पतपेढ्या | ६५ | २८ |
| शेतकी सोसायट्या ( इतर ) | १७ | २९ |
| पगारी नोकरांच्या संस्था | ३२ | १२ |
| अर्बन बँका | ११ | ८ |
| हाउसिंग सोसायट्या | १ | १२ |
| कंझूमर्स " | ६ | २ |
| उत्पादक " | ३ | ... |
| यूनिअन्स | ३ | १ |
| इतर | १ | ७ |
| | १३९ | ९९ |

### राज्यारोहणाचा उत्सव व जपानी बनावटीचीं निशाणें

मे १९३५ मध्यें जॉर्ज बादशहांच्या राज्यारोहणाचा रौप्य-महोत्सव साजरा झाला, त्या प्रसंगीं राजनिष्ठा प्रदर्शित करण्यासाठी लावलेल्या निशाणांत जपानी मालाचाच मोठा भरणा असल्याचें ग्रेटब्रिटनमध्यें आढळून आलें. १२ मे १९३७ रोजीं आठव्या एडवर्डांचा राज्यारोहण समारंभ होणार आहे. त्यावेळीं ह्या गोष्टीची पुनरावृत्ति होऊं न देण्याची ब्रिटिश सरकारानें खबरदारी घ्यावी, असें ब्रिटिश टेक्स्टाइल एक्झिबिशनच्या अध्यक्षांनीं व्यापारखात्याचा प्रमुखांस सुचविलें आहे. ब्रिटिश कारखानदार जरूर तेवढीं निशाणें पुरवूं शकतील, असें त्यांनीं कळविलें आहे. जपानचें आक्रमण आणि हा स्वदेशीचा पुरस्कार हीं ध्यानांत बाळगण्यासारखीं आहेत.

### कलकत्ता कॉर्पोरेशनचें नवें कर्ज

ड्रेनेजचीं व इतर कामें पार पाडण्याकरितां कलकत्ता कॉर्पोरेशननें ३ टक्के दराचें ६० लक्ष रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें असून सरकारची मंजुरी मागण्यांत आली आहे. कर्जाची परतफेड ३० वर्षांनीं करण्यांत येईल.

## स्फुट विचार

### ब्रिटिश कापडावरील जकात कमी झाली

ब्रिटिश कापडाच्या आयातीवरील जकात, त्याच्या उत्पादनाचा खर्च आणि हिंदी गिरण्यांस जरूर असलेलें संरक्षण ह्यांची तुलना करून, कमी करणें इष्ट आहे कीं नाहीं ह्या विषयींची चौकशी व शिफारसी करण्यासाठी एक खास टारिफ बोर्ड नेमण्यांत आलें होतें. हिंदी कापडाची पैदास झपाट्यानें वाढत असून त्यास भारी जकातीच्या संरक्षणाची आवश्यकता नाहीं आणि तिच्या योगानें लँकेशायरच्या मालास निष्कारण अडथळा मात्र होतो अशी ब्रिटिश कारखानदारांची तक्रार होती. त्या गाऱ्हाण्याचा विचार करून ब्रिटिश मालावरची जकात उतरवणें इष्ट आहे असें दिसल्यास त्याप्रमाणें विधायक सूचना करणें हें वरील मुद्दाम नेमलेल्या टारिफ बोर्डाचें काम होतें. हिंदी कारखानदारांच्या मतें पूर्वींचीच जकात देशी कापडाच्या संरक्षणाच्या दृष्टीनें आवश्यक होती. टारिफ बोर्डाचा निर्णय हिंदी गिरणीवाल्यांस प्रतिकूल असा होणार हें भविष्य कित्येकांनीं वर्तवलें होतें आणि तेंच आतां खरें ठरलें आहे. टारिफ बोर्डाच्या शिफारसी मान्य होऊन त्या अमलांतहि आल्याचें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे. ही त्वरा लक्ष्यांत भरण्यासारखी आहे. मालाच्या किंमतीवर २५ टक्के किंवा दर पौंड वजनास ४$\frac{३}{४}$ आणे ह्याप्रमाणें जो दर आधिक भरेल त्या दरानें जकात ब्रिटिश बनावटीच्या सामान्य कापडावर घेण्यांत येत असे त्याच्या ऐवजीं अनुक्रमें २० टक्के किंवा ३$\frac{१}{२}$ आणे ह्यांमधल्या अधिक ठरणाऱ्या दरानें ती घेतली जावी, त्याचप्रमाणें किनारीच्या, घुवट व रंगी मालावरची जकात २०टक्के करावी, अशा टारिफ बोर्डाच्या सूचनेचा अंमल चालू झाला आहे. कापसाच्या सुतावरील जकातींत फेरफार सुचवण्यांत आलेला नसून ती तशीच रहाणार आहे. छिटें व कृत्रिम रेशिम ह्यांचे बाबतींत बोर्डानें कांहींच शिफारसी केलेल्या नाहींत. वरील निकालानें हिंदी गिरणीवाल्यांची निराशा झाली असली पाहिजे, परंतु वास्तविक पहातां, आपण मागितलेलें संरक्षण टारिफ बोर्ड मान्य करील अशी अपेक्षा त्यांस असण्याचें कारण दिसत नाहीं.

### गिरणीवाल्यांच्या मागण्या व सरकारचा निर्णय

टारिफ बोर्डाच्या शिफारसी एकमतानें केलेल्या आहेत व त्या जशाच्या तशाच हिंदुस्थान सरकारनें उचलल्या आहेत. जकात कमी करण्याचा परिणाम कस्टम्सच्या उत्पन्नावर प्रतिकूल होण्याची भीति सरकारास वाटत नाहीं. टारिफ बोर्ड काय सूचना करतें ह्या संबंधानें अनिश्चितता असल्यानें ब्रिटिश मालाच्या आयातींत अलीकडे घट झाली आहे, आणि एप्रिल व मे ह्या दोन महिन्यांची जमा अपेक्षेच्या मानानें १६ लक्ष रुपयांनीं कमी झाली आहे. ही साशंक वृत्ति दूर व्हावी म्हणून आपण नवीन जकाती तात्काळ अमलांत आणण्याचें जाहीर केलें आहे असें हिंदुस्थान सरकारचें म्हणणें आहे. संरक्षक जकाती वर–खाली करण्याचा अधिकार कायदे मंडळानें सरकारास दिलेला आहे, त्याचा उपयोग प्रस्तुत प्रकरणांत करण्यांत आला आहे. पूर्वी, १९३२ व १९३३ सालीं जपानी कापडावरील जकात अनुक्रमें ५० व ७५ टक्के पर्यंत चढवण्यांत आली, ती ह्याच अधिकाराच्या जोरावर होय. इतर जकातींच्यावरील जादा पट्ट्या ( सर्चार्जेस) कमी होतील त्या वेळींच ब्रिटिश कापडावरची जकात कमी केली

जावी अशी शर्त मोदी–लीज करारांत नमूद होती, तिच्या संबंधानें सरकारचें असें म्हणणें आहे कीं तो करार झाल्यावर जादा जकात पट्टीचा अंतर्भाव २५ टक्के जकातीमध्यें खास कायद्यानें केलेला असल्यानें त्याबाबतींत कांहीं प्रश्नच उद्भवत नाहीं. जकात किती उतरावी ह्या विषयीं लँकेशायरची मागणी काय होती हें स्पष्ट नमूद झालेलें नसल्या कारणानें ब्रिटिश कारखानदारांचें ५ टक्के घटीनें समाधन होईल किंवा कसें हें सांगतां येत नाहीं, पण त्यांनीं केलेले अंदाज पहातां जकात पूज्य झाली असती तरी तसें त्यांस हवें होतें. ह्याच्या उलट, हिंदी गिरणीवाल्यांच्या हिशेबानें जकात ५० टक्के इतकी चढवणें आवश्यक होतें. तेव्हां असल्या आकडेमोडीकडे दुर्लक्ष करून आपणांस योग्य दिसलें तेंच टारिफ बोर्डानें केलें आणि तें आपण सर्वथा मान्य केलें आहे, असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे.

---

**नीमायर योजना मान्य केली, परंतु पुढची व्यवस्था काय ?**

नवीन राज्यघटनेमध्यें मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक सरकार ह्यांचेमध्यें उत्पन्न-खर्चाच्या बाबतींत वाटणी सुचविण्यासाठी सर ओटो निमायर ह्यांची योजना झाली होती. त्यांनीं केलेल्या शिफारसींना अनुसरून भारतमंत्र्यांनीं पार्लमेंटापुढे ऑर्डर इन् कौन्सिलचा मसुदा मांडला व तो जसाच्या तसा पास झाला. नव्या राज्यघटनेस आर्थिक परिस्थितीपासून धोका प्राप्त होणार नाहीं, असें त्यावेळीं भारतमंत्र्यांनीं जाहीर केलें. हिंदुस्थान सरकारनें सर ओटो ह्यांच्या शिफारसी मान्य करतांना येत्या कांहीं वर्षांतील परिस्थितिविषयक आशादायक अपेक्षेवर मदार ठेवली असल्याचें आढळतें. प्रांतिक स्वायत्ततेमुळें सुरवातीस दरसाल अडीच कोटि रुपयांचा जादा खर्च सोसण्याचें कबूल करतांना नव्या राज्यघटनेच्या सुरवातीस अडथळा नको, हाच विचार सरकारच्या निर्णयाचे मुळाशी असला पाहिजे. तथापि, नीमायर योजनेमुळें मध्यवर्ती सरकारचे हात आखडले जाणार असून येतीं दहा वर्षें कर्जाचें ओझें हलकें करण्याची भाषाहि काढूं देणार नाहींत, असें सरकारास आतां वाटूं लागल्याचें दिसतें. कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी दरसाल करण्यांत येणारी तरतूद सध्याच अपुरी पडत आहे व यापुढें ज्यास्त सवड मिळण्याची पंचाईत पडणार, असा स्पष्ट रंग दिसत आहे. प्रांतिक सरकारांच्या कित्येक अनुत्पादक कर्जांची जबाबदारी मध्यवर्ती सरकारनें आपणांकडे घेतली असल्यानें, त्याची 'गंडस्योपरि पिटिका संवृत्ता' अशी अवस्था झाली आहे. इकडे, रेल्वेजकडून मिळावयाच्या रकमेंत घट झाली असून वहातुकीच्या नव्या साधनांपुढें रेल्वेजचा निभाव कसा लागणार, ह्याबद्दल चिंता वाटूं लागली आहे. सरकारचे, म्हणजें पर्यायानें कर भरणाऱ्या रयतेचे, आज आठ अब्ज रुपये रेल्वेजमध्यें गुंतलेले आहेत. हें भांडवल अनुत्पादक ठरून त्यावर व्याज सुटलें नाहीं, तर सरकारची परिस्थिति अत्यंत बिकट होणार, हें उघड आहे.

---

**कर्जनिवारणासाठीं अपुरी तरतूद**

वरील आठ अब्ज भांडवलाची गणना अनुत्पादक कर्जामध्यें करणें भाग पडल्यास, म्हणजे इतकी मोठी रकम निवळ बोजा ठरल्यास, हिंदुस्थान सरकारची कर्जविषयक परिस्थिति फारच बिकट होण्याचा संभव आहे. १९२३–२४ सालीं सरकारच्या कर्जाचे परतफेडीची निश्चित योजना आंखण्यांत आली होती व वेगवेगळ्या जातीच्या कर्जाचे फेडीस विशिष्ट कालाची मर्यादा घालण्यांत आली होती. दर साल ३ कोटि ९६ लक्ष रुपये बाजूस ठेवून ते सिंकिंग फंडांत टाकल्यास ठराविक वर्षांच्या मुदतींत कर्जफेड होईल, असा अंदाज करण्यांत आला होता व १९२४–२५ सालापासून ४ कोटि रुपये सिंकिंग फंडांत टाकण्यांत येऊं लागले. त्याचप्रमाणें, ३१ मार्च १९२३ नंतर जी कर्जांत वाढ होईल, तिच्या $\frac{1}{80}$ वा हिस्सा रकमहि दरसाल वेगळी राखून तिचा विनियोग कर्जनिवारक फंडाकडे करण्याचें ठरलें. १९३५ सालीं बजेटावरील आपल्या भाषणांत, सर जॉर्ज शूस्टर ह्यांनीं वार्षिक तीन कोटींची तरतूद आतां पुरी पडेल असें सांगितलें व तेव्हांपासून दरसाल सिंकिंग फंडांत तेवढीच रकम ठेवण्यांत येऊं लागली व सर जेम्स ग्रिग ह्यांनीं ज्यास्त तरतूद न करतां वाढाव्याचीं बजेटें दाखविण्यास सुरवात केली. नीमायर योजनेमुळें मध्यवर्ती सरकारावर पडलेली जादा आर्थिक जबाबदारी व रेल्वेजच्या उत्पन्नाचें उतरतें प्रमाण ह्यांमुळें कर्जनिवारक फंडाची मोठ्या प्रमाणावर तरतूद करणें आतां ज्यास्तच आवश्यक झालें आहे. रेल्वेजमध्यें गुंतलेलें भांडवल सुरक्षित राखावयाचें असल्यास आजपासून त्याप्रीत्यर्थ तजवीज करून दरसाल जरूर तेवढी रकम बाजूस राखून ठेवली पाहिजे.

---

**कै. वा. भाऊराव कोल्हटकर ह्यांचें गाणें ऐकावयास मिळेल काय ?**

किर्लोस्कर संगीत मंडळीचे सुप्रसिद्ध नट कै. वा. भाऊराव कोल्हटकर ह्यांचें गाणें ग्रामोफोनवर आज ऐकावयास मिळेल तर काय बहार होईल ! ह्या प्रसिद्ध गवयी नटानें एका काळीं महाराष्ट्रास आपल्या मधुर गायनाच्या योगें चटका लावला होता हें सुप्रसिद्ध आहे. पण त्यांचें गाणें ऐकण्याची तहान आजच्या पिढीस कशी भागवतां यावी ? ह्या बाबतींत एक आशाजनक गोष्ट घडून आली आहे, ती अशी कीं, सुप्रसिद्ध ब्रिटिश मुत्सद्दी, मि. ग्लॅडस्टन ह्यांचें १८९० सालीं त्यावेळीं नवीनच प्रचारांत आलेल्या ग्रामोफोनमध्यें घेतलेलें भाषण इंग्लंडमध्यें रेडिओवर श्रोत्यांस ऐकावयास मिळालें आहे. लॉर्ड टेनिसन ह्यांनीं त्या सुमारास म्हटलेल्या एका काव्याचाहि पुनर्जन्म ह्या रीतीनें होण्याचा संभव आहे. ग्रामोफोन नव्यानें चालू झाला, त्यावेळीं आवाज साठवण्याची कला प्राथमिक अवस्थेंत होती व सध्याप्रमाणें तबकड्या उपयोगांत नव्हत्या. तबकड्यांच्या ऐवजीं नळकांडीं किंवा बांगड्या यंत्रांतल्या दांड्यावर फिरत आणि कानांस रबरी नळ्या लावून त्यांमधून आवाज ऐकावा लागे. बंद केलेल्या पेट्यांत ठेवलेलीं ह्या प्रकारचीं नळकांडीं इंग्लंडमध्यें अलीकडे सांपडलीं आहेत व त्यांत वर निर्दिष्ट केलेल्या प्रसिद्ध व्यक्तींचे आवाज संग्रहित केलेले आहेत. हीं नळकांडीं नाजुक आहेत आणि त्यांतले आवाज तबकड्यांवर चढवणें अत्यंत अवघड आहे. त्यांच्या नकलाहि उपलब्ध नाहींत. पुण्यांतल्या गणपत्युत्सवांत, नवीनच प्रचलित झालेल्या ग्रामोफोनच्या नवलाईच्या नळकांड्यांतून मि. ग्लॅड्स्टन ह्यांचें भाषण एक आणा देऊन सुमारें ४० वर्षांपूर्वी ऐकलेलीं माणसें आहेत. त्याच वेळीं कै. वा. भाऊराव कोल्हटकर ह्यांचें "किति किति सांगूं तुला" हें पद ग्रामोफोनमध्यें कानांत नळीचें टोंक घालून ऐकल्याचें त्यांस स्मरेल. ह्या पदाचें नळकांडें शाबूत स्थितींत उपलब्ध होऊन त्यावरील पद विद्युत्पद्धतीनें तबकडीवर घेतां आलें तरच ह्या पदाचें पुनरुज्जीवन होणें शक्य आहे. भाऊरावांच्या पदाचें जुनें रेकॉर्ड सांपडणें आणि त्याचें नवें रेकॉर्ड तयार होणें ह्या गोष्टी वरील अडचणी लक्षांत

घेतां, दुःसाध्य आहेत असें वाटून ह्या मृगजलाविषयीं निराशा उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. तथापि, चौकशी व प्रयत्न करून पहाण्यासारखा आहे. त्याचप्रमाणें, भाऊरावांचें जुन्या पद्धतीच्या ग्रामोफोनमधलें गाणें ऐकल्याचें स्मरणाऱ्या अनेक व्यक्ती असल्यास वर निर्दिष्ट केलेल्या आठवणीस दुजोरा मिळेल.

### माल फुकट मिळूनहि महाग पडतो !

एका युरोपिअन व्यापाऱ्यानें परदेशांतील दुसऱ्या व्यापाऱ्यास कांहीं माल अगदीं स्वस्त भावानें आपण विकावयास तयार आहों असें कळवलें. खरेदीदारानें, आपणास तो भाव परवडत नाहीं असें उत्तर दिल्यावरून पहिल्या व्यापाऱ्यानें किंमत आणखी कमी केली व वहातुक, विमा वगैरे बद्दलचा खर्च स्वतः सोसण्याचें कबूल केलें. तरी, 'हा भावहि भारी आहे' असें उत्तर व्यापाऱ्यास मिळालें. शेवटीं, माल मोफत देऊन वरचा खर्चाहि आपण सोसतों असें व्यापाऱ्यानें खरेदीदारास लिहिलें. 'फुकटासहि माल महाग आहे' असें गिऱ्हाइकाचें उत्तर आलें. हें काय गौडबंगाल होतें? ह्यांतली वस्तुस्थिति अशी होती कीं विकणाऱ्या व्यापाऱ्यास त्याच्या सरकारकडून परदेशांत माल विकण्याबद्दल भरपूर द्रव्य-सहाय मिळावयाचें होतें, पण खरेदीदार व्यापाऱ्याच्या देशांत आयात मालावर जबरदस्त जकात बसवण्यांत आली होती. ह्यामुळें एका देशांत केवळ मालाच्या निर्गतीचें बक्षिस मिळण्यावर व्यापारी खुष होता, परंतु दुसऱ्या देशांत जबर जकातीमुळें फुकट मिळणारा मालहि घेऊन विकण्यांत नुकसान येत होतें. सध्यां कित्येक देशांत तेथील सरकारांनीं आंतरराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रणें घालून बाजारभाव कसे कृत्रिम करून टाकले आहेत हें वरील कल्पित गोष्टीवरून चांगलें ध्यानांत येतें.

### हिंदी गिरण्यांची प्रगति

१९३१ नंतरच्या काळांतील हिंदी गिरण्यांच्या प्रगतीचा आढावा टारिफ बोर्डानें काढला आहे, त्यावरून सूत काढण्याचे ऐवजीं कापड विणण्याकडे गिरण्यांची प्रवृत्ति असल्याचें आढळून येतें. मुंबई इलाख्याबाहेर कपास-कापडाच्या गिरण्यांत बरीच वाढ झाली. १९३१ च्या मानानें कापडाचें उत्पादन २५ टक्के वाढलें असून सुताचें उत्पादन १५ टक्के सुधारलें आहे. हिंदी कपाशीचा हिंदुस्थानांतील गिरण्यांत होणारा उठावहि १५ टक्क्यांनीं वाढला आहे, परंतु परदेशी कपाशीची आयात ५८ टक्क्यांनीं फुगलेली आढळते. ह्याचें कारण, हिंदी गिरण्यांनीं वरच्या नंबरचें सूत काढण्यास केलेली सुरवात हें होय. मुंबईमधील गिरण्यांपेक्षां अहमदाबाद येथील गिरण्या सर्वसाधारणपणें चांगला नफा मिळवीत आहेत.

### मॅनेजिंग एजन्सीचा पुरस्कार

हिंदुस्थान सरकारनें लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें मांडलेल्या कंपनी कायद्याच्या दुरुस्तीचे बिलावर मत देतांना मुंबई चेंबर ऑफ कॉमर्सनें हिंदुस्थानांतील परिस्थितींत मॅनेजिंग एजन्सीची पद्धत अत्यंत सोईची आहे, असें म्हटलें आहे. मॅनेजिंग एजंट व डायरेक्टर होण्यास लायक असणाऱ्या माणसांचा हिंदुस्थानांत तुटवडा असल्यामुळें त्यांच्यावर बंधनें लादून त्यांस हीं कामें हातीं घेण्यापासून परावृत्त करण्यांत येऊं नये असें चेंबरचें मत आहे. मुंबई चेंबर ही ब्रिटिश व्यापारी हितसंबंधाचें संरक्षण करणारी मुंबईमधील जुनी संस्था आहे.

## शेतकऱ्यांच्या मालाचा उठाव व नित्योपयोगी जिनसांची खरेदी

सातारा जिल्हा व्हिलेज इंप्रूव्हमेंट कमिटीच्या प्रचार सब कमिटीनें भरविलेल्या शेती व प्रचार वर्गापुढें भाषण करतांना इस्लामपूर येथील सहकारी सोसायट्यांचे ॲग्रिकलचर ऑर्गनायझर श्री. साळुंके हे म्हणाले:—

" गरजू शेतकऱ्यांनीं आपली एकजूट करावी, आपणांस लागणाऱ्या जिनसा पुरविणारीं स्वतःचीं दुकानें स्थापन करावीं व त्याला लागणारें भांडवल आपसांत भाग ( शेअर्स ) काढून व ठेवी जमवून उभारावें. भांडवल अपुरें पडत असल्यास बँकेकडून कर्ज घ्यावें. अशीं दुकानें सहकारी कायद्याखालीं नोंदून घ्यावींत व ह्या दुकानांमार्फत मागविलेल्या जिनसा गिऱ्हाइकांना योग्य दरानें विकाव्यात. शिलकी राहिलेल्या फायद्यांतून भागावर म्हणजे स्वतः उभारलेल्या भांडवलावर डिव्हिडंड द्यावें व गिऱ्हाइकांनीं ज्या प्रमाणांत दुकानांतून माल घेतला असेल त्या प्रमाणांत त्यांना नफा वाटून द्यावा. मात्र अशीं दुकानें चालविण्याकरितां लायक व विश्वासू नोकरवर्ग स्वतःचा नेमावा. सभासदांची दुकानांवर अढळ निष्ठा रहाण्याकरितां जोरानें प्रयत्न करण्यांत यावा. उधारीचा व्यवहार अजीबात बंद ठेवला पाहिजे. या सर्वांपेक्षां जास्त महत्त्वाचें कार्य म्हणजे अशा दुकानांविषयीं स्त्रीवर्गाची सहानुभूति व सहकार्य मिळविलें पाहिजे, कारण बाजारहाट हा मुख्यतः बायकांचा प्रांत आहे.

आपल्या मालास चांगला भाव येण्यासाठी शेतकऱ्यांनीं एकजूट करून बाजारपेठेच्या ठिकाणीं आपलीं स्वतःचीं अडतीचीं ऊर्फ विक्रीचीं दुकानें आपल्या स्वतःच्या भांडवलावर स्थापावीं व तीं उपरिनिर्दिष्ट दुकानांप्रमाणेंच चालवावीं. मंदीच्या दिवसांत शेतकऱ्यांना आपला माल नुकसानीनें विकावा लागूं नये म्हणून त्यांना त्यांच्या मालाच्या तारणावर आगाऊ रकम (ॲडव्हान्स) द्यावी व त्यांचा माल सहकारी दुकानानें आपल्या ताब्यांत ठेवावा. मालकाच्या संमतीनें योग्य भाव आल्यावर मालाची विक्री करावी. परंतु प्रामाणिक व लायक पगारी नोकर नेमण्याविषयीं खबरदारी घ्यावी. स्त्रिया व पुरुष अशा दोन्ही गिऱ्हाईकांची अढळ निष्ठा आपल्या दुकानावर राहील अशी तजवीज करावी. सभासदांना दुकानामार्फत माल विकण्याची सक्ती केली तर ते फायदेशीर होईल. "

## को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे कायद्यांतील नवा नियम

### पुणें जिल्हा को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटचा विरोध

मुंबई को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांचे ॲक्टामध्यें नवीन होऊं पहाणाऱ्या नियमास विरोध करण्यासाठी गुरुवार ता. २५ जून रोजीं पुणें जिल्ह्यांतील को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांची सभा पुणें जिल्हा को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष व पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन, श्री. भा. म. गुप्ते, यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेंत श्री. चितळे यांनीं नवीन होऊं पहाणाऱ्या नियमास विरोध करणारा व या नियमाचा विचार निदान तूर्त तरी सहा महिने तहकूब ठेवावा असें मत व्यक्त करणारा ठराव मांडला व तो मंजूर झाला.

## बादशहांचा राज्यारोहण समारंभ

### अनेक संस्कार व त्यांबाबतचे हक्कदार

संस्कार आणि विधी ह्यांचें हिंदू समाजांत फार मोठें बंड आहे, असें आपण नेहमीं ऐकतों. पण कित्येक बाबतींत ब्रिटिश समाज अत्यंत गतानुगतिक आहे, हें थोड्यांसच माहीत असेल. आमच्या इकडे राजा गादीवर बसतांना अनेक विधी करावे लागतात आणि राज्यारोहणाचे वेळीं कोणीं कोठें उभें रहावें आणि कोणीं कोणतें काम करावें हें ठरलेलें असतें. हिंदुस्थानांतील वाङ्मयांत असल्या विधींचीं मनोरंजक वर्णनें आहेत आणि त्यासंबंधांतली व्यवस्था सांगितलेली आहे. आठवे एडवर्ड बादशहा ह्यांच्या राज्यारोहणाचा समारंभ पुढच्या मे महिन्यांत होईल. तो फार मोठ्या प्रमाणावर होणार असून त्याचा कार्यक्रम विविध, चित्ताकर्षक व प्रेक्षणीय व्हावयाचा आहे. त्यासंबंधांत जे विधी होतील त्यांविषयीं फारशी ठाऊक नसलेली माहिती एका ब्रिटिश वृत्तपत्रांत आली आहे. शेंकडों वर्षें चालत आलेले संस्कार आणि त्यांत भाग घेण्याचा हक्क सांगणारी मंडळी ह्यांची चौकशी करून निर्णय देण्याचें काम एकेचाळीस सभासदांच्या एका मंडळाकडे सोपवलेलें आहे. आपल्या कुळांत संस्कार व विधी ह्यांमध्यें विशिष्ट काम करण्याचा हक्क आहे हें अर्जदारानें सिद्ध केलें पाहिजे. राजाच्या मस्तकावर मुकुट ठेवण्याची सेवा आपली आहे असें आर्चबिशप ऑफ कँटबरी सांगतो व तो हक्क सहज मान्य होतो. तो नसेल तर त्याचें काम बिशप ऑफ लंडन करतो. आर्चबिशप ऑफ यॉर्कचा तो हक्क नाहीं; त्याचा अधिकार राणीच्या मस्तकावर मुकुट ठेवण्याचा आहे. राजवाड्यांतली अंतर्गत व्यवस्था पहाण्याचा हक्क लॉर्ड ग्रेट चेंबरलेनचा असतो व लॉर्ड चम्ले हे सदरहु हक्क सांगतील. राजेसाहेबांचे कपडे त्यांस नेऊन देणें हें त्यांचें काम आहे आणि त्यांस त्याबद्दल चाळीस वार लांबीची मखमल मिळते. कित्येक प्रसंगीं मखमलीबद्दल रोकड पैसा देण्यांत आला आहे. राज्यारोहणाच्या आदले दिवशीं रात्रीं राजेसाहेबांनीं वापरलेला बिछाना व त्या भोंवतालचे पडदे वगैरेहि मिळण्याचा लॉर्ड ग्रेट चेंबरलेनचा हक्क आहे. वेस्टमिंस्टरचे डीन व त्यांचें मंडळ राज्यारोहणाचे दिवशीं एक आस सोनें, दारू व मासे ह्यांची मागणी वहिवाटीप्रमाणें करतील व ती मान्य होईल. गरीबांस देकार करण्याच्या उपयोगार्थ मार्क्विस ऑफ एक्झीटर चांदीचा वाडगा हक्क म्हणून मागतील व तो त्यांस मिळेल. पण काम करतांना हुशारी यावी म्हणून ते पेय मागतील, तें त्यांस दिलें जाईल असें दिसत नाहीं.

सांक पोर्टर्सचे बॅरन राजेसाहेबांवर छत्र धरण्याचा आपला हक्क सांगतील आणि हें शुद्ध मेलवान रेशमाचें कापड वहिवाटीस अनुसरून त्यांच्या मालकीचें होईल. राजेसाहेब हातांत दंड धरतील त्यास आधार देण्याचा हक्क ग्लव्ह सार्जंट यांचा आहे. ड्यूक ऑफ न्यूकॅसल व अर्ल ऑफ श्रूस्बरी हे दोघे सदरहु हक्क पुढें मांडतील, पण आठवे एडवर्ड ह्यांसारख्या तरुण बादशहांस त्यांच्या टेकूची आवश्यकता भासणार नाहीं. लंडनच्या लॉर्ड मेयरचाहि एक हक्क आहे आणि तो स्फटिकाची एक गदा घेऊन चालण्याचा आहे. अर्ल ऑफ एरोल ह्यांनीं घ्यावयाची गदा चांदीची असून जिच्या दोन्ही टोंकांस बारा औंस सोनें असतें. राज्यारोहणानंतर वेस्टमिंस्टर हॉलमध्यें मोठी मेजवानी होत असे पण चवथ्या जॉर्जच्या कारकिर्दीपासून ती बंद झाल्यानें त्यासंबंधांतले अनेकांचे हक्कहि बंद झाले आहेत. तरीहि राजेसाहेबांचे मुदपाकखान्यांतले सेवक म्हणून अनेक बडे लोक हक्क सांगतील. लोकांस घोड्यावरील लढाईचें आव्हान करणारा राजेसाहेबांचा एक रक्षक मागें असे. त्याच्याऐवजीं आतां त्यांचें निशाण धरणारा राज्यारोहणाच्या मिरवणुकींत भाग घेतो. राजेसाहेबांचे कपडे शिवणारा, त्यांचे बहिरीससाणे संभाळणारा, त्यांस मागितलीं म्हणजे पेयें देणारा, जेवणाच्या मेजावरचें आच्छादन घालणारा ह्या नात्यांनीं हक्क सांगितले जातात, पण ते मान्य होत नाहींत आणि त्याबद्दल त्यांस कांहींतरी बक्षिस मिळतें. जुने कागदपत्र, वहिवाटी, रिवाज वगैरेंची चौकशी करून निकाल देण्याचें काम लॉर्ड चॅन्सेलर व प्रिव्हीकौन्सिलचे कायदे पंडित सभासद ह्यांनीं मुख्यत्वें करून करावयाचें आहे.

## शेतकऱ्यांचें शहाणपण

### जर्मन शेतकऱ्यांच्या म्हणी

[सामान्य जनतेंत रूढ असलेल्या म्हणींत कितीतरी तत्वज्ञान व शहाणपण साठवलेलें असतें. एका जर्मन साप्ताहिकांत तिकडच्या कांहीं म्हणीं आम्हांस आढळल्या, त्या मराठी स्वरूपांत खाली दिल्या आहेत.]

१ मनुष्याची उन्नति त्याच्या उपजत गुणांच्या मानानेंच होणार. (आढांत असेल तसें पोहोऱ्यांत येईल.)

२ पोकळ कणसें असलेलीं ताटें उंच वाढतात.

३ तोंडी अगर लेखी करारांचें बंधन बळकट नसतें. नैसर्गिक परिस्थितीचा ताण पडतांच तें ताडकन तुटतें.

४ भोंवतीं कुत्रीं राहूं देऊन निजणाराच्या अंगावर गोमाशा बसणारच.

५ सोन्याची कसोटी विस्तवानें, स्त्रीची सोन्याच्या दागिन्यानें आणि पुरुषाची स्त्रीनें होते.

६ न्याय व सत्य यांनीं भरलेल्या पोत्यापेक्षां मूठभर सोन्याचें वजन अधिक भरतें.

७ मनुष्यस्वभावाची ओळख देवळापेक्षां बाजारांतच अधिक सुलभतेनें होते.

८ एक मेंढरूं पळालें कीं, बाकीचीं त्याच्यामागें धांवतात.

९ प्रसंग आणि परिस्थिति पाहून वागणारास लोक शहाणा म्हणतात.

१० सावकाराचें ऋण काढून जो शेती करतो, त्याचें शेत कितीहि पिकलें तरी त्याला विकावयाला धान्य उरत नाहीं. शेवटीं त्याला घरदार व भांडींकुंडीं दुसऱ्याच्या स्वाधीन करावीं लागतात.

११ पंखांशिवाय कोणाला उडतां येणार नाहीं.

१२ जो माझे दोष माझ्या तोंडावर मोकळेपणानें सांगतो व माझ्या भलेपणाविषयीं खाजगी रीतीनें मजजवळ बोलतो, त्यास उदंड आयुष्य लाभो.

१३ वेतनावांचून अधिकार देणें म्हणजे चोरी करण्यास संधि देणें होय.

१४ जे बैल धान्य पिकवितात त्यांना तें क्वचितच खावयास मिळतें.

१५ बेडकाला जरी सोन्याच्या खुर्चीवर बसवलें, तरी तो पुन्हां डबक्यांतच उडी घेणार.

१६ गाडीच्या चाकावर धूळ व चिखल नेहमीं उडणारच.

१७ घाण हातांतच घाण सांचते.

१८ माकड जितकें वर वर चढतें तितकी त्याची खालची बाजू अधिकाधिक स्पष्ट दिसते.

# सहकारी चळवळ

## सहकारी चळवळ व सरकारी नियंत्रण

### कर्नाटक भाग सहकारी परिषद

### प्रो. काळे ह्यांचें अध्यक्षीय भाषण

[ ता. २९ जून रोजीं धारवाड भाग सहकारी परिषदेचें अधिवेशन प्रो. वामन गोविंद काळे ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरलें होतें. त्या वेळीं प्रो. काळे ह्यांनीं केलेल्या अध्यक्षीय भाषणांतील महत्त्वाचा भाग येथें उद्धृत केला आहे. ]

"आपल्या इलाख्यांतील सहकारी चळवळीनें इतर प्रांतांतील चळवळीच्यापेक्षां आर्थिक मंदीस ज्यास्त चिकाटीनें तोंड दिलें आहे. तथापि सरकारनें लोकांना विशेष सहाय्य केलेलें दिसत नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या एक कोटि रुपयांच्या देणगीचा जो गाजावाजा करण्यांत आला त्यावरूनच आर्थिक परिस्थितीच्या बिकटपणाची लोकांस योग्य कल्पना नसल्याचें स्पष्ट दिसतें. सरकार व चळवळीचे चालक ह्यांचेपुढें नियोजित कार्यक्रम कांहीं नसून ते प्रवाहाबरोबर वहात चाललेले आहेत. सुपरव्हिजन कमिटीच्या शिफारसी मान्य करून सरकारनें सहकारी चळवळीवरील आपली पकड ज्यास्तच दृढ केली आहे. बिनसरकारी इन्स्टिट्यूटकडे प्रचारासेरीज कोणतीच कामगिरी आतां रहाणार नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांचें सहकारी चळवळीवरील आक्रमण आतां इतकें पुढें गेलें आहे कीं सरकारास व लोकांस, कोणासच, आपण कोठें आहोंत हें समजत नाहीं.

ह्या बिकट परिस्थितीमध्यें सुद्धां आपल्या प्रांतांतील चळवळ टिकाव धरून आहे. तथापि, तीमध्यें कित्येक अनिष्ट गोष्टींचा भरणा झाला असून सरकारी नियंत्रणावांचून निभावणार नाहीं, अशा अर्थाची सूचना ऐकूं येत आहे व चांगल्या सोसायट्यांचें व लोकांचें काम मागें ठेवून कांहींमधील गैरव्यवस्थेचें स्तोम माजविलें जात आहे. ह्यास खरा उपाय सरकारी नियंत्रण वाढविणें हा नसून सहकारविषयक शिक्षण व बिनसरकारी संघटण हाच होय व हीच गोष्ट सरकारनें लोकांच्या मनावर बिंबाविणें आवश्यक आहे.

ह्या संबंधांतील गोंधळाचें व कलुषित पूर्वग्रहाचें प्रत्यंतर सरकारनें योजलेल्या नव्या ४७ व्या नियमांत आढळतें. सोसायटीची मॅनेजिंग कमिटी व तिचे सभासद काढून टाकण्याचा अधिकार ह्या नियमानें सरकार आपणांकडे घेऊं पहात आहे. आजच रजिस्ट्रारला सहकारी चळवळीवर नियंत्रण ठेवण्याचे जरूर ते अधिकार आहेत व ह्या नव्या नियमानें त्यास जादा सत्ता प्राप्त होणार आहे. आपण नेमलेल्या लोकांचे करवीं सोसायट्यांचे व्यवहार चालविण्याची जबाबदारी सरकारनें स्वीकारणें शहाणपणाचें ठरणार नाहीं व बिनसरकारी निरपेक्ष कार्यकर्त्यांच्या सहानुभूतीस व सक्रिय सहायास मात्र सहकारी चळवळ मुकेल. नवीन नियमाचा मसुदा प्रसिद्ध करण्यापूर्वी प्रांतिक सहकारी बँकेचा अगर इन्स्टिट्यूटचा सल्ला घेणें सुद्धां सरकारास आवश्यक वाटलें नाहीं, ही गोष्ट परिस्थितीच्या अनिष्टतेची सूचक आहे. कित्येक वर्षे रजिस्ट्रारच्या पर्सनल असिस्टंटचें काम केलेले, कांहीं काळ रजिस्ट्रारचें काम पाहिलेले व अहमदाबाद जिल्हा सहकारी इन्स्टिट्यूटचे हल्लींचे अध्यक्ष, रावबहादूर गुणवंतराय देसाई, ह्यांनींहि वरील नियमाविरुद्ध आपलें मत स्पष्टपणें जाहीर केलें आहे. प्रांतिक स्वायत्ततेचे सुरवातीस इतर कित्येक अडचणी उपस्थित झाल्या असल्या तरी सहकारी चळवळीनें आपलें स्थान बळकट राखावें व तिनें पायाशुद्ध प्रगति करावी, अशी खटपट सहकारी कार्यकर्त्यांनीं करणें जरूर आहे.

सहकारी सेंट्रल व अर्बन बँकांतील वाढत्या ठेवींवरून लोकांचा सहकारी चळवळीवर विश्वास दिसून येतो. तथापि, शेतीच्या धंद्यांत आतां किफायत न उरल्याकारणानें व जुनीं कर्जें तुंबून राहिल्यानें बँकांना आपल्या रकमा गुंतविण्यास कठिण जात आहे. उतरलेल्या व्याजाच्या दरांचा फायदा कर्ज काढणाऱ्या शेतकऱ्यांचे वांट्यास यावा, अशी तरतूद होत आहे. रिझर्व्ह बँक शेतीस व सहकारी चळवळीस कोणत्या प्रकारानें मदत देणार व मि. डार्लिंग ह्यांच्या त्या संबंधांतील रिपोर्टाचें पुढें काय झालें, हें अजून गूढच आहे. सहकारी चळवळीवरील आपली पकड वाढविण्याऐवजीं सरकारनें शेतीच्या मालाचा फायदेशीर उठाव करण्याच्या योजना आंखण्याकडे लक्ष पुरवावें. जमीन गहाणाच्या बँका जिल्हानिहाय स्थापन होत आहेत हें ठीक आहे. परंतु त्यांसंबंधांतील खरी अडचण कर्जवसुलीच्या वेळींच उत्पन्न होणार आहे व त्याच्या परिणामाकडे लक्षपूर्वक पाहिलें पाहिजे. शेतीविषयक इतरहि अनेक प्रश्नांत सहकारी कार्यकर्त्यांनीं मन घालणें जरूर आहे. हिंदुस्थानाची आर्थिक प्रगति शेतकऱ्यांच्या प्रगतीवर अवलंबून रहाणार हें उघड आहे व विशेषतः बहुसंख्याक शेतकऱ्यांनाच आर्थिक मंदीनें पोळून काढलें आहे. ह्या बिकट परिस्थितींतून आपण निश्चयानें व अढळ ध्येय पुढें ठेवून मार्ग काढला पाहिजे."

### युरोपांतील युद्धमय वातावरण

गेल्या महायुद्धाच्या सुरवातीचे आधीं युरोपांतील परिस्थिति जितकी बिकट झाली होती, त्यापेक्षां आजची परिस्थिति अतिशयच वाईट आहे, पण आपण बोलण्यांत व हंसण्यांत वेळ घालवून प्रसंगास तोंड देण्याची तयारी मात्र करीत नाहीं, असे उद्गार ग्रेट ब्रिटनचे युद्धमंत्री मि. डफ कूपर ह्यांनीं आपल्या एका भाषणांत नुकतेच काढले.

### दुकानाचा नोकर, मालक व गिऱ्हाईक

"आमच्याकडे गेला महिनाभर नाहीं" असें दुकानचा नोकर गिऱ्हाइकास सांगतांना ऐकून मालक पुढें सरसावून म्हणाला: "साहेब क्षणभर थांबा. मी जिनसाची व्यवस्था करतों." असें म्हणून मालक नोकरावर रागावला: "गिऱ्हाइकास 'नाहीं' असें कधींहि सांगूं नये. आपल्या दुकानीं माल नसला तर दुसरीकडून तो आणून द्यावा." नोकरानें शांतपणानें उत्तर केलें; "शेटजी, हें ठीक आहे. पण अलीकडे पाऊस नसल्याबद्दल आमची भाषा चालू होती आणि आमच्याकडे गेला महिनाभर पाऊस नाहीं असें मीं म्हटलें". ह्यावर मालकाचा चेहरा बघण्यासारखा होता.

### विमा आणि राष्ट्रीय प्रगति

कलकत्ता येथें भाषण करतांना मि. एस. एन्. गुप्त म्हणाले:— "विम्याचा प्रसार आणि सामाजिक प्रगति हीं बरोबर पुढें जात असतात. विम्याचा प्रसार देशांत जस जसा होत जाईल त्या मानानें कोणत्याहि देशाची प्रगति होत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं."

## नाशिक डि. को. इन्स्टिटयूटचें प्रचारकार्य

(१)

### तालुका सुपरवायझिंग यूनीयनची स्थापना

नाशिक व सिन्नर तालुक्यांतील सोसायट्यांची सुपरवायझिंग यूनीयन स्थापन करण्याकरितां ता. १९ जून १९३६ रोजीं सिन्नर येथें रावबहादुर आर. व्ही. वंडेकर, नाशिक डि. को. इन्स्टिटयूटचे अध्यक्ष, यांचे अध्यक्षतेखाली सर्व सोसायट्यांची सभा भरली होती.

आरंभीं डि. को. इन्स्टिटयूटचे ऑनररी सेक्रेटरी श्री. तिडके यांनीं अध्यक्षांची सूचना आणून तीस श्री. जे. के. गायकवाड यांनीं अनुमोदन दिल्यावर रावबहादुर आर. व्ही. वंडेकर हे अध्यक्षस्थानीं विराजमान झाले. नंतर नाशिक डिस्ट्रिक्ट बँकेचे मॅनेजर श्री. व्ही. डी. कारखानीस यांनीं सभेचा उद्देश, यूनीयनची घटना, तिचें कार्यक्षेत्र, सोसायट्यांना तीपासून होणारा फायदा, ग्रुप सेक्रेटरीची योजना व सोसायट्या सुधारण्यास तिचा होणारा उपयोग वगैरे मुद्दे समजावून सांगितल्यावर श्री. जे. के. गायकवाड आणि श्री. के. बी. देशमुख यांचीं भाषणें झालीं व खालील ठराव सर्वानुमतें पास झाले:—

(१) सुपरवायझिंग यूनियनच्या स्थापनेबद्दल सभेचें एकमत,
(२) सिन्नर तालुक्यास ग्रुप सेक्रेटरीची योजना लागू करणें,
(३) सिन्नर तालुक्यासाठी श्री. भाऊराव पाटील ह्यांची जनरल सेक्रेटरी म्हणून नेमणूक इ.

अध्यक्षांचें शेवटीं समारोपादाखल भाषण झालें.

(२)

### झाडूवाले व भंगी ह्यांचेसाठी सहकारी सोसायटी

नाशिक इन्स्टिटयूटचे विद्यमानें सिन्नर म्युनिसिपॅलिटीचे झाडूवाले व भंगी ह्यांची सभा सिन्नर येथें म्युनिसिपॅलिटीचे अध्यक्ष श्री. देशमुख यांचे अध्यक्षतेखाली म्युनिसिपल हॉलमध्यें ता. १८ जून रोजीं भरविण्यांत आली होती. आरंभीं डिस्ट्रिक्ट ऑनररी ऑर्गनायझर श्री. के. बी. देशमुख ह्यांनीं सभेचा उद्देश व सोसायटी स्थापण्यापासून होणारे फायदे समजावून सांगितले. नंतर नाशिक इन्स्टिटयूटचे प्रोपागँडा ऑफिसर श्री. एम्. जी. शेटे यांनीं सोसायटीचीं मुख्य तत्त्वें व त्यांचा व्यवहारांत होणारा उपयोग, पतपेढीची घटना, तिचें कार्यक्षेत्र इ. समजावून दिलें. नंतर अध्यक्षांनीं समयोचित भाषण करून सोसायटी काढण्याची आवश्यकता किती आहे हें पटवून दिल्यावर श्रोत्यांच्या शंकांचें निरसन करण्यांत आलें व सोसायटी काढण्याचें निश्चित ठरलें, असें अर्थाचे एक बातमीदार कळवितात.

### नवीन सहकारी नियम

मुंबई इलाख्याच्या सहकारी कायद्यान्वयें नियम केलेले आहेत त्यांत एक नवीन नियम दाखल करावयाचा सरकारचा विचार आहे. त्या नियमानें सरकारच्या हातांत फाजील सत्ता जाईल व त्या योगानें चळवळीच्या प्रगतीस अडथळा होईल ह्या आशयाचें मत अनेक सहकारी संस्थांकडून व्यक्त केलें जात आहे.

### स्वीडनमध्यें सहकार

स्वीडन देशांत पांच लक्ष कुटुंबें सहकारी चळवळींत सामील झालेलीं आहेत. तेथील एकूण लोकसंख्येपैकीं तिसरा हिस्सा माणसें आपल्या रोजच्या गरजा सहकारी संस्थांच्यामार्फत भागवतात.


**धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०**

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.



**वेस्टर्न इंडिया**

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी–सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५ }

| | |
|---|---|
| १९३५ मधील नवें काम | ५१,५१,८९२ रु. |
| एकूण चालू काम | २,५०,१५,०८२ रु. |
| एकूण जिंदगी | ६१,६९,१६९ रु. |
| लाइफ फंड | ५०,९९,४३९ रु. |

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.



**K. K. & Co.**

Photographic Dealers

POONA.

## जागतिक परिस्थितीचा आढावा

[ इंटर नॅशनल लेबर ऑफिसच्या जिनीव्हा येथील परिषदेच्या विसाव्या अधिवेशनास आपला वार्षिक अहवाल सादर करतांना लेबर ऑफिसचे डायरेक्टर, मि. हॅरोल्ड बटलर, ह्यांनीं गेल्या वर्षांतील जगाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांच्या अहवालांतील महत्त्वाच्या मुद्यांचा सारांश येथें दिला आहे. ]

( १ ) जगांतील उत्पादन वाढलें आहे, मालाच्या किंमती सुधारल्या आहेत व लेबर ऑफिसला माहिती पुरविणाऱ्या देशांतील बेकारी १५ टक्क्यांनीं कमी झाली आहे. हुंडणावळींमधील चढउतारहि कमी झाला आहे.

( २ ) तथापि, आंतरराष्ट्रीय व्यापारांत विशेष सुधारणा झालेली नाहीं व उत्पादनांतील वाढीचे मानानें कामावर असलेल्यांची संख्या वाढलेली नाहीं. युद्धोपयोगी सामुग्रीचें उत्पादन जोरानें चालू आहे परंतु त्यामुळें भासणारी तेजी केवळ दिखाऊ आहे.

( ४ ) युद्धमय वातावरणामुळें सर्वत्र भीतीची छाया उमटते व त्यामुळें प्रगति खुंटते.

( ५ ) राजकीय प्रश्न सोडवितांना सामाजिक व आर्थिक प्रश्नांचा विचार न करणें, ही मोठी चूक आहे. साम्राज्यतृष्णा, युद्धाप्रीत्यर्थ खडी तयारी, इत्यादींच्या मुळाशीं दारिद्र्य अगर तें येण्याची भीति, राहणीचें उतरतें मान, भविष्यकाळाविषयीं निराशा, इत्यादि कारणपरंपरा आढळते.

( ६ ) अर्थात्, त्यास उपाय म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापारावरील बंधनांचें उच्चाटन, कच्च्या मालाचा पुरवठा, हुंडणावळीमध्यें स्थैर्य, चलन-विषयक धोरणासंबंधानें आंतरराष्ट्रीय एकवाक्यता, आंतरराष्ट्रीय देण्यां-घेण्यांस सुरवात, इत्यादि आर्थिक सुधारणा घडवून आणणाऱ्या गोष्टी, हाच होय.

---


## PUBLIC WORKS DEPARTMENT.

**AHMEDNAGAR DIVISION.**

Sealed tenders in B-2 are invited for constucting a Bridge of R. C. C. Girder type over the River Kas near Bota on Poona-Nasik Road Mile No. 60/7, estimated cost Rs. 29,359/- ( work portion only ). Tenders accompanied by Treasury Chalan or Bank receipt for Rs. 300/- as earnest money with a solvency certificate should be addressed to the Executive Engineer, Ahmednagar Division and delivered in his office at Ahmednagar by 5 P. M. on 8th July 1936. Tender forms with conditions of contract will be available at the office of the undersigned on payment of Rs. 2/- ( two only ), which will not be refunded. No tender forms will be issued on 8-7-36.

The undersigned reserves the right to accept the lowest or any tender or to assign any reason for the non-acceptance of same.

27-6-36

( Sd.) N. B. GADRE,
Executive Engineer,
Ahmednagar Division.


## निवडक बाजारभाव

---

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% ( १९४०-४३ ) ... ... | ११०-१३ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०-१२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८—८ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—६ |
| ४% १९६०—७० ... ... | ११५—६ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९८—१४ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०७—१ |
| ४% १९४३ ... ... ... | ११०-११ |
| २¾% १९४८—५२ ... ... | १००—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १०७-१२ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०८—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | १०८—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३—६३ ) ... | ११०-१२ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३१—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५-१४ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५८५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३१—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १०१—४ |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९१७—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५७—१३ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २३०—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १६२१—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि. ७½%) | १५५६—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १८५-१० |
| टाटा आयर्न (१०० रु. ड्. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६१—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८१-१२ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७२१—४ |

---

## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

उभारलेलें भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,०४,००,०००

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), वांद्रें ( मुंबईनजिक ), मलबार हिल ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**चालू ठेवीवरील व्याजाचा दर**

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा १ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरलि रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्हीं ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धा ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः— **टी. आर. लालवाणी.**

## पहिल्यानें सुरक्षितता

**रस्त्यावरून जातांना तुम्ही सुरक्षिततेचा मार्ग पहिल्यानें पहातां. हीच गोष्ट पैसे बँकेंत किंवा विम्यांत गुंतविण्यासंबंधीं आहे. पहिल्यानें तुम्ही पैशाची सुरक्षितता पहातां; नंतर व्याज किंवा बोनस.**

हिशेब तपासणी आणि प्रतिनिधित्व सरकारी खात्याकडे असल्यानें

## दि बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लि.

**मध्यें आपले पैसे गुंतविल्यास कसलाच धोका नाहीं.**

सविस्तर माहितीकरितां लिहा—

**कुळकर्णी आणि कंपनी** चीफ ऑर्गनायझर्स
**चुनीलाल डी. बरफीवाला** मॅनेजिंग डायरेक्टर.

**९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.**

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

## दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय

**प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.**

माहितीसाठी लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

## Dawn of India's Insurance field-workers' Training Institute. Poona.

**The training course will commence by the 1st of July 1936.**

Applications are invited from Matriculates for admission to the Training Institute. Candidates who join the Institute are also coached up for Advocate's examination.

Apply for Prospectus to:—

99, Laxmi Road, POONA.
**D. V. Atre,** B. A. (Hons.); LL. B. Principal.

## S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

## एशियन पॉलिसी

म्हणजेच

## आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयिस्कर योजना.

**महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत**

## धी एशियन अॅशुरन्स कंपनी, लिमिटेड

**एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १**

# दि बॉंबे लाइफ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड.

(स्थापना १९०८)

प्रगति

कंपनीची **लोकप्रियता** सिद्ध करते

कमाल प्रगति : पुरें केलेलें नवीन काम मिळविलें तें

| | | |
|---|---|---|
| १९२५ | : | रु. २२,१८,५०० |
| १९२७ | : | रु. ३८,७७,००० |
| १९२९ | : | रु. ५१,२२,५०० |
| १९३१ | : | रु. ५८,६६,५०० |
| १९३३ | : | रु. ९४,१६,५०० |
| **१९३५** | **:** | **रु. १,२३,२८,०००** |

माफक हप्ते, भरपूर बोनस, क्लेम्सची तात्काळ भरपाई, व पॉलिसींतील सवलतीच्या अटी हें "बॉंबे लाइफ पॉलिसीं" चें वैशिष्ट्य आहे.

एजन्सी व पॉलिसी ह्यासंबंधींच्या तपशिलासाठीं लिहा:—
मॅनेजर,
बॉंबे लाइफ बिल्डिंग, ४५।४७, चर्चगेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

"दुसरें मूल्यमापन जाहीर झालें"

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टके फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

"अर्थ" ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं: १ रु. (ट. ख. निराळा)

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

नवीन फणसपोळी
व
लोणच्याचा हिंग
मिळण्याचें खात्रीचें ठिकाण
कुलकर्णी आणि मंडळी
लोणी व किराणा दुकान, सदाशिव पेठ, पुणें.

आपणांस विहीर बोअर करावयाची आहे काय ?

**भिडे** आणि **सन्स्**

स्वतः तयार केलेल्या मशीननें बोअर खणून देतात.

चौकशी करा:—
भिडे आणि सन्स
सांगली (S. M. C.) शनीचा पार, पुणें. २


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ | पुणें, बुधवार, तारीख ८ जुलै, १९३६. | अंक २८

विम्याचे कामास सुरुवात झाली

## गुडवुइल ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड.

विमा–तज्ञ श्री. जी. एस्. मराठे यांनीं अनेक कंपन्यांचे अनुभवावरून तयार केलेल्या खास योजना

—सर्व तऱ्हेच्या विम्यांची सोय—अत्यंत सुलभ अटी—

विमेदारांना कमी हप्ता पडण्याची आमच्या कंपनीची खास सवलत

आजच प्रॉस्पेक्टस् मागवून आपला विमा उतरा.

ठिकठिकाणीं एजंटस् नेमणेचे आहेत. भरपूर कमिशन मिळेल. चौकशी करा.

पोस्ट–मिरज मिशन हॉस्पिटल.

बी. व्ही. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर

## आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

पत्ता : डेक्कन जिमखाना, पुणें ४

यांचीं शास्त्रोक्त, खात्रीलायक व गुणकारी औषधें

| | |
|---|---|
| च्यवनप्राश पौष्टिक व शक्तिवर्धक | २० तो. १ रु. |
| वज्रदंती दंतमंजन | बा. किं. ४ आणे |
| केशवर्धन तेल | १० तो. १५ आणे |
| एरंडपाक मलावरोध घालविणारा | १० तो. ६ आणे |
| हेमगर्भ मात्रा सर्व वात कफरोगहर | मात्रा ५ रु. |
| सुवर्णराजवंगेश्वर धातुवर्धक | १ तो. ५ रु. |
| वाळा सरबत उन्हाळ्यांत थंड पेय | १ पौं. १२ आणे |
| त्रिभुवनकीर्ति सर्व ज्वरांवर | १ तो. १२ आणे |

याशिवाय प्रवाळ, मौक्तिक इ. भस्में, सर्व तऱ्हेचीं आसवें, अरिष्टें, मात्रा, गुटिका, अवलेह वगैरे मागवन एकवार अनुभव घ्या. कॅटलॉग मागवा.

ठिकठिकाणीं एजन्सी देणें आहेत. एजन्सी घेऊं इच्छिणारांनीं नियम मागवावे.

## नवीन फणसपोळी
व
## लोणच्याचा हिंग

मिळण्याचें खात्रीचें ठिकाण

कुलकर्णी आणि मंडळी

लोणी व किराणा दुकान, सदाशिव पेठ, पुणें.

## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टकल
ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

# विविध माहिती

### निकाराग्वा देश राष्ट्रसंघांतून बाहेर पडणार

निकाराग्वा देशानें राष्ट्रसंघाचें सभासदत्व सोडण्याचें ठरविलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

### राष्ट्रसंघाची पुनर्घटना ?

राष्ट्रसंघाच्या घटनेमध्यें सुधारणा करण्याचा प्रश्न संघाच्या कौन्सिलमध्यें चिली देशाच्या प्रतिनिधीनें उपस्थित केला आहे.

### हिंद–जपान व्यापारी कराराची पूर्वतयारी

हिंद–जपान व्यापारी कराराची मुदत संपत आली असल्यानें नव्या कराराच्या पूर्वतयारीस सुरवात झाली आहे. जपानतर्फे त्या देशाचे सिमला येथील मुख्य वकील वाटाघाट करणार असून त्यांस मदत करण्यासाठीं जपानमधून तीन तज्ञ येणार आहेत. हिंदुस्थानातर्फे बोलणीं कोणीं व कशीं करावयाचीं हें जुलैच्या दुसऱ्या आठवड्यांत सरकार व्यापारी वर्गाच्या सल्ल्यानें ठरविणार आहे.

### इंपीरिअल इन्स्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजी

वरील संस्थेच्या स्वतंत्र अस्तित्वास ता. ७ जुलै रोजीं सुरवात झाली. इतके दिवस, हारकोर्ट बटलर इन्स्टिट्यूटचा साखर विभाग म्हणून चालू असलेलें काम ही संस्था आतां हातीं घेणार आहे. कानपूर येथें तिची स्थापना झाली असून श्री. श्रीवास्तव हे तिचे पहिले डायरेक्टर आहेत. पांच वर्षांत मिळून १४ लक्ष रुपये हिंदुस्थान सरकारकडून ह्या इन्स्टिट्यूटला मिळणार आहेत.

### सिनेमाचा खेड्यापाड्यांत प्रसार होणार

लहानसहान खेड्यांतूनहि दाखवितां येतील असे चित्रपट काढून त्यांचा देशभर प्रसार करण्यासाठीं मुंबईमध्यें एक कंपनी स्थापन होणार आहे. न जळणाऱ्या अरुंद फिल्म्सचा उपयोग करून लहानशा मोटारींतून चित्रपट कोठेंहि अल्पखर्चांत नेऊन ते दाखवितां येतील. हे चित्रपट इकडून तिकडे नेण्यावर सरकारी नियमांचें नियंत्रण रहाणार नाहीं व ते दाखविण्यासाठीं लायसेन्स मिळालेल्या थिएटरांची आवश्यकता उरणार नाहीं. लोकांमध्यें सिनेमाची आवड उत्पन्न करण्याचा मुद्दाम प्रयत्न करण्यांत येईल.

### दोन तज्ञांची नेमणूक

इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या कार्याची तात्त्विक व आर्थिक दृष्ट्या तपासणी करून त्यावर आपलीं मतें देण्यासाठीं दोन तज्ञांची नेमणूक झाली आहे. हे दोघे इंपीरिअल कौन्सिलतर्फे चालू असलेल्या प्रत्येक प्रांतांतील कामाची पहाणी करीत हिंदुस्थानभर दौरा काढतील.

### सहकारी खरेदी संस्था

सहकारी तत्त्वावर खरेदी करण्याची व्यवस्था असलेल्या ग्रेट-ब्रिटनमधील संस्थांचे एकूण ७५ लक्ष सभासद आहेत. तथापि त्यांची दरमाणशीं साप्ताहिक खरेदी सरासरीनें दहा आण्यांच्यावर जात नाहीं.

### कुकडी नदीवरील नवा पूल

पुणें-नाशिक रस्त्यावर, पुण्यापासून ५२ मैलांवर पिंपळवाडी गांवानजीक कुकडी नदी लागते. पावसाळ्यांत ह्या नदीस कित्येक वेळां मोठा पूर येऊन वहातुक बंद पडते, परंतु तेथें नुकत्याच बांधण्यांत आलेल्या पुलानें ही गैरसोय दूर केली आहे. ह्या पुलाची लांबी ३०० फूट असून रुंदी १८ फूट आहे व तो बांधण्यास ६० हजार रुपये खर्च आला.

### अमेरिकन बजेटांतील प्रचंड तूट

अमेरिकन सरकारास नुकत्याच संपलेल्या वर्षी १,३०० कोटि रुपयांची तूट आली. त्या सरकारास १०० अब्जांहून ज्यास्त रुपयांचें कर्ज आहे. शांततेच्या काळामध्यें त्या सरकारास एवढी तूट पहिल्या प्रथमच आलेली आहे.

### आगीच्या विमा कंपन्यांचें सहकार्य

ह्या आठवड्यामध्यें लंडन येथें ब्रिटिश, हिंदी, अमेरिकन व युरोपांतील आगीच्या विमाकंपन्यांचे प्रतिनिधी जमणार असून आपल्या धंद्यांत येणाऱ्या अडचणींविषयींच्या महत्त्वाच्या प्रश्नांचा निर्णय करणार आहेत, अशी बातमी आली आहे. तथापि, हिंदी कंपन्यांस ह्या परिषदेस निमंत्रण नाहीं, असें समजतें.

### प्रांतिक स्वायत्ततेस प्रारंभः खर्चासंबंधीं वाटाघाट

प्रांतिक स्वायत्ततेस प्रारंभ होण्यापूर्वीच मध्यवर्ती व प्रांतिक सरकार ह्यांमधील खर्चाच्या वांटणीबद्दल ओढाताण सुरू झाली आहे. शक्य तितका खर्च मध्यवर्ती सरकारावर टाकण्याचा प्रांतिक सरकारांचा प्रयत्न आहे. मध्यवर्ती सरकारचे नोकरीमधील लोकांस ह्यापुढें प्रांतिक सरकारांच्या दवाखान्यांतून व इस्पितळांतून साध्या रोग्यांप्रमाणें समजलें जाईल व त्यांकडून मामुली फी वसूल करण्यांत येईल, असें समजतें.

### कॅश सर्टिफिकिटांवरील व्याजाचा दर उतरला

पोस्ट ऑफिस कॅश सर्टिफिकिटांवरील चक्रवाढ व्याजाचा दर तीन टक्क्यांवरून अडीच टक्क्यांवर आणण्यांत आला आहे. सेव्हिंग्ज बँक ठेवींवरील व्याजाचा दर दोन टक्के करण्यांत आला आहे. हे नवे दर ता. १ जुलै पासून अंमलांत आले.

### उंसाच्या धंद्यांतल्या सुधारणेबद्दल बक्षिस

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सनें दर एकरीं उंसाचें कमाल पीक काढणारास एक हजार रुपयांचें बक्षिस लावलें होतें तें एकरीं चार टन काढणाऱ्या कळंबच्या कारखान्यास मिळालें आहे. उंसापासून जास्तींत जास्त साखर काढण्याबद्दलचें ५०० रुपयांचें बक्षिस बेलवंडी शुगर फार्म लिमिटेडनें मिळवलें आहे. साखरेचा हा कमाल उतारा ११३/४ टनांच्यावर पडला.

### बँक ऑफ इंडियाचें सहामाही डिव्हिडंड

गेल्या जून अखेरच्या सहा महिन्यांच्या मुदतींत बँक ऑफ इंडियास नऊ लक्ष रुपये नफा झाला. प्राप्तीवरील कर माफ द. सा. द. शे. १० टक्के दरानें डिव्हिडंड वांटण्याचें ठरलें आहे.

### इंपीरिअल बँक ऑफ इंडिया

प्रसिद्ध झालेल्या ताज्या आकड्यांवरून असें दिसतें कीं, इंपीरिअल बँकेचें एकूण खेळतें भांडवल ९१ कोटि रुपये असून त्यापैकीं २०३/४ कोटि रोकड आहे, २४३/४ कोटि कर्जाऊ दिलें आहे व सुमारें ४२ कोटि कर्जरोख्यांत गुंतवलेलें आहे.

### व्यापारी जहाजें बांधण्याच्या धंद्यास जपानच्या सरकारची मदत

१९३७–३८ सालाच्या बजेटांत जपानच्या सरकारनें व्यापारी जहाजें बांधण्यास मदत म्हणून ८ कोटि रुपयांची तरतूद करावी, अशी सूचना वहातुकीच्या खात्यानें त्यास केली असल्याचें समजतें.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २७ जून रोजीं पुरा झालेला आठवडा | ४७,१०,७४८ |
| ता. ४ जुलै रोजीं पुरा झालेला आठवडा | ४८,३५,८७० |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते ४ जुलै १९३६ अखेर | २,७४,७५,०८,२२७ |

अनुक्रमणिका

पृष्ठ

१ विविध माहिती ... ३३४
२ ब्रिटिश बँक नोटांस परराष्ट्रीय गिऱ्हाईक ... ३३५
३ वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची प्रगति ... ३३५
४ फ्रान्समध्यें संतति-नियमनाचे परिणाम ... ३३३
५ स्फुट विचार ... ३३७
ॲबिसीनियन प्रकरणावर पडदा पडला—बाहेरील तज्ज्ञ व वृत्तपत्रांतील बातम्या·पुणें शहराची आर्थिक पहाणी—गाऊसपाण्याची हालहवाल—'प्रभा'चा खास अंक—मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय—डॉ. चाटी अनाथ विद्यार्थी गृह
६ मुंबई शहरांतील पोलिस-खात्याचा अहवाल ... ३३९
७ सिमेंट कंपन्यांचें एकत्रीकरण ... ३३९
८ पुणें शहराची आर्थिक पहाणी ... ३४०
९ आंतरराष्ट्रीय सहकारी दिन ... ३४१
१० स्वदेशी काचेचा धंदा ३४२
११ निवडक बाजारभाव ३३३

# अर्थ

बुधवार, ता. ८ जुलै, १९३६

## ब्रिटिश बँक-नोटांस परराष्ट्रीय गिऱ्हाइक

### चलनाच्या क्षेत्रांतला एक मजेदार अनुभव

कायदेमंडळाच्या ( चेंबर ऑफ डेप्युटीज ) नव्या निवडणुकींत फ्रान्समध्यें समाजसत्तावाद्यांचा विजय होऊन त्यांच्या पक्षांचें प्रधानमंडळ बनलें आहे. गेला महिनाभर त्या देशांत चोहोंकडे कारखान्यांत कामकरी लोकांनीं संप केले आहेत, ह्याचें कारण आपल्या मागण्यांचा पुरस्कार करणाऱ्या समाजसत्तावाद्यांची झालेली राजकीय सरशी हें होय. मतदारांस निवडणुकीपूर्वी दिलेलीं अभिवचनें पुरीं करण्याची जबाबदारी नवीन फ्रेंच प्रधान-मंडळावर येऊन पडली असून, तिला अनुसरून नवीन कायदे करण्यांत येत आहेत. कामकरी वर्गाचें समाधान करावयाचें म्हणजे सरकारचा व कारखानदारांचा खर्च वाढणें अपरिहार्य आहे. त्याचा परिणाम बाजारभाव आणि राष्ट्रीय कर्ज वाढण्यांत होणार. फ्रेंच बजेटाची तोंडमिळवणी होण्याची पंचाइत वर्षानु-वर्ष प्रधानमंडळास पडत आली आहे. त्यासंबंधांतली परिस्थिति अधिक बिघडणार नाहीं आणि आपल्या समाजसत्तावादात्मक धोरणाचा व्यापार व उद्योगधंदे ह्यांवर प्रतिकूल परिणाम होणार नाहीं ह्या संबंधांत नवीन प्रधानमंडळास खबरदारी घेणें प्राप्त आहे. असल्या अडचणींतून फ्रेंच प्रधानमंडळ सावधगिरीनें मार्ग काढीत आहे. परराष्ट्रीय संबंध, चलन व हुंडणावळ ह्या बाबतींतल्या धोर-णांत मात्र कांहीं फरक होणार नाहीं असें त्यानें जाहीर केलें आहे. फ्रेंच चलन विपुल आणि सोन्याच्या किंमतीच्या मानानें स्वस्त झाल्यावांचून फ्रान्सला गत्यंतर नाहीं हें मत त्या देशांत व इतरत्र अनेक वजनदार व तज्ज्ञ लोकांनीं व्यक्त केलें आहे. कांहीं झालें तरी चलनास हात लावावयाचा नाहीं व हुंडणावळीचा दर बदलावयाचा नाहीं असा फ्रेंच सरकारचा आतांपर्यंतचा निश्चय आहे आणि त्या धोरणांत आपण बदल केल्यास व्यवहारांत घोटाळे माजतील व लोकांचा चलनावरील विश्वास उडेल अशी नवीन प्रधानमंडळासहि भीति वाटत आहे आणि म्हणून त्यानें जनतेची जाहीर रीतीनें ह्या बाबतींत खातर-जमा केली आहे. हा निश्चय किती काळपर्यंत टिकतो ह्या विषयीं सर्वत्र शंका प्रकट केली जात आहे. समाजसत्तावादी प्रधानमंडळ क्रांतिकारक स्वरूपाच्या आर्थिक धोरणाचा अवलंब करील अशी भीति मध्यम स्थितींतल्या व पैसेवाल्या फ्रेंच लोकांस वाटत आहे. ह्याचा परिणाम फ्रान्समधून बाहेर जाणारा सोन्या-चा ओघ वाढण्यांत झालेला आहे.

आपला पैसा सोन्याच्या स्वरूपांत परदेशांत नेऊन ठेवावा आणि विशेषतः ग्रेटब्रिटनमध्यें त्याची बँकांमध्यें ठेव ठेवावी अशी प्रवृत्ति फ्रेंच जनतेंत ठळकपणानें दिसत आहे. सोन्याची देवघेव व निर्गत बँक ऑफ फ्रान्स व फ्रेंच सरकार ह्यांनीं बंद केली तरी फ्रेंच चलन देऊन ब्रिटिश चलन ( स्टर्लिंग ) घेऊन ठेवण्याचा क्रम फ्रान्समध्यें जोरानें चालू आहे. ह्या व्यवहाराच्या योगानें फ्रेंच लोकांच्या इंग्लिश बँकांतल्या ठेवी वाढतात आणि ग्रेट-ब्रिटनमधल्या हुंड्यांच्या व बँकिंगच्या व्यवहारांत गोंधळ माजतो असा अनुभव आहे लंडनमध्यें सोनें विकत घेण्यास अडचण होते म्हणून फ्रेंच लोक बँक ऑफ इंग्लडच्या नोटा खरेदी करी-त आहेत. एका देशांतल्या लोकांनीं दुसऱ्या देशांतलें कागदाचें चलन खरेदी करणें हें स्वतःच्या राष्ट्रीय चलनाविषयींचा अविश्वास व ब्रिटिश चलनाबाबतचा विश्वास फ्रेंच जनतेस आज वाटत आहे, त्याचें स्पष्ट निदर्शक आहे. इंग्लिश बँकांत आपला किती पैसा आहे हें सरकारास समजूं नये म्हणून ते मामुली ठेव म्हणून तेथें तो गुंतवीत नाहींत आणि त्याच्या ब्रिटिश नोटा घेऊन त्यांचीं पुडकीं सुरक्षित रीतीनें ब्रिटिश बँकिंग व इतर संस्थांमध्यें ठेवतात. ह्याचे योगानें बँक ऑफ इंग्लडच्या नोटांस असलेली मागणी वाढली आहे व त्यांचा प्रसार जास्त प्रमाणावर झाला आहे. व्यापार वाढण्याचाहि कांहीं अंशीं हा परिणाम असला तरी फ्रेंच लोकांचा पैसा मोठ्या प्रमाणांत ब्रिटिश बँक नोटांत गुंतविला जात आहे ह्यांत संशय नाहीं, असें माहितगारांचें म्हणणें आहे. जादा नोटा काढावयाच्या झाल्यास त्यांचेसाठी बँक ऑफ इंग्लंडला तारण म्हणून रोखे किंवा सोनें संग्रहीं ठेवावें लागतें. गेल्या पांचसहा महिन्यांत ह्या बँकेनें सुमारें १४ कोटि रुपयांचें सोनें ह्या प्रीत्यर्थ खरेदी केलें आहे. नोटांस सध्याच्या प्रमाणें मागणी आणखी कांहीं काळपर्यंत चालू राहिली तर बँकेस पंचवीस कोटि रुपयांचें सोनें विकत घ्यावें लागेल असा अंदाज आहे.

गेल्या वर्षाच्या मानानें चालू सालच्या जून महिन्यांत बँक ऑफ इंग्लंडच्या नोटांची रकम साडेतीन कोटि पौंडांनीं ( सुमारें वीस कोटि रुपये ) वाढली असून सुवर्णनिधींत दीड कोटि पौंडांची (सुमारें वीस कोटि रुपये ) वाढ झाली आहे. ह्याच्या उलट, बँक ऑफ फ्रान्सच्या सुवर्ण निधींत एका वर्षांत सुमारें दीड हजार कोटि फ्रँक्सची घट झाली आहे. फ्रान्स व इतर युरोपिअन देशांतील लोकांच्या मागणीमुळें ब्रिटिश बँक-नोटांच्या प्रसारांत किती वाढ झाली आहे ह्याचा नक्की आकडा देणें कठिण आहे. तथापि गेल्या वर्षी तो ७ ते १० कोटि रुपये असावा व चालू वर्षी आतां तो २० कोटि रुपयांवर गेलेला आहे. दुधाची तहान ताकानें भागवावी ह्या न्यायानें सोनें नाहीं तरी स्थिर कागदाचें चलन घेऊन तें गांठीं ठेवावें ही प्रवृत्ति युरोपियन देशांत केवढ्या मोठ्या प्रमाणा-वर लोकांमध्यें पसरली आहे ह्याची वरील माहितीवरून

कल्पना येते. ब्रिटिश पौंडाचें महत्त्व त्या कारणानें वाढलें आहे ह्यांत संशय नाहीं, पण नोटांची मागणी पुरी पाडण्यास बँक ऑफ इंग्लंड व ब्रिटिश सरकार ह्यांस यातायात पडते आणि ब्रिटिश बँकिंग व पैशांचा बाजार ह्यांवरहि अस्थिरतेचा परिणाम होतो हें विसरून चालणार नाहीं. संग्रहित नोटांचें बँकांतल्या ठेवींमध्यें व परदेशी हुंड्यांत रूपांतर पुढें होईल तेव्हां कमी-अधिक घोटाळा उडणारच व त्यास तोंड देण्याची इंग्लंडमध्यें तयारी करावी लागेल. बाहेरून आलेला पैसा बँकांत ठेव म्हणून रहात नाहीं व त्याचीं नोटांचीं भेंडोळीं बनतात. ह्याचा परिणाम असा होतो कीं एका बाजूनें सरकारास ट्रेझरी बिलें काढावीं लागतात पण त्यांत गुंतवण्यास बँकांजवळ जादा ठेवी जमलेल्या नसतात आणि त्या बिलांवरचे व्याजाचे दर मात्र चढतात. म्हणजेच पैशाच्या बाजारांत अस्थिरता उत्पन्न होते. चलन व हुंडणावळ ह्यांच्या क्षेत्रांत युरोपमध्यें काय तऱ्हा चालल्या आहेत ह्याचें परकी लोकांनीं ब्रिटिश कागदी चलनाची चालविलेली खरेदी व संग्रह हें एक नमुनेदार उदाहरण आहे.

## वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची प्रगती

वरील कंपनीचा १९३५ साल-अखेरचा अहवाल आमचेकडे आला आहे. वेस्टर्न इंडयाचा १९१३ मध्यें स्थापना झाली, तेव्हांपासून तिची सर्व बाजूंनीं अखंड रीतीनें सारखी प्रगति होत आहे. हिंदुस्थानांतील विमा व्यवसायाच्या क्षेत्रांत ह्या मंडळीस उच्च स्थान प्राप्त झालें असून पहिल्या प्रतीच्या हिंदी कंपन्यांच्या वर्गांत तिची गणना होते. मंडळीचें कार्य भरीव आहे, आणि त्याची प्रगति अधिक जोरानें व्हावी ह्याविषयीं प्रयत्न मंडळी करीत आहे. हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांतून प्रांतिक सल्लागार मंडळें नेमण्याचा तिनें उपक्रम केला आहे. अहवालाचे सालीं वेस्टर्न इंडियानें ५११/२ लक्ष रुपयांचें, म्हणजे १९३४ मधील कामापेक्षां १०१/२ लक्ष रुपयांचें जास्त काम पुरें केलें. तिचा विमाखाती फंड ९३/४ लाखांनीं वाढून तो ६०१/४ लक्ष रुपये झाला आहे. मंडळीच्या ठेवींची मूळ किंमत ६० लक्ष ७७ हजार रुपये आहे, परंतु आजच्या बाजारभावानें ती ७२ लक्ष ५२ हजार रुपये भरते. मंडळीनें आपल्या ताळेबंदांत मूळ किंमतच दाखविलेली आहे व ही गोष्ट सांपत्तिक मजबुती व स्थैर्य ह्यांकडे विशेष लक्ष पुरविण्याच्या तिच्या चालकांच्या धोरणाचें निदर्शक आहे. मंडळीच्या कामांतील लॅप्सचें प्रमाण आजच्या बिकट आर्थिक परिस्थितींतहि उतरलें आहे व तें चार टक्क्यांपेक्षांहि कमी आहे. गेल्या वर्षी विमापत्रकांवरील कर्जाच्या व्याजाचा दर उतरवून मंडळीनें विमेदारांची सोय केली. अहवालाचे सालीं, दहा हजारांवरील रकमेचा विमा उतरविणारांस वार्षिक हप्त्यावर एक टक्का सूट देण्यास तिनें सुरवात केली आहे. मुंबईमध्यें स्वतःच्या मालकीचे जागेवर मंडळी आपली इमारत बांधणार असून पुणें येथेंहि इमारत बांधण्याचा तिचा विचार आहे. वैयक्तिक पतीवर मंडळीनें कोणासहि कर्ज दिलेलें नाहीं. तिनें गुंतविलेल्या रकमांवर ५.४५ टक्के दरानें व्याज- सुटलें ह्यावरून मंडळीच्या व्यवस्थेचा किफायतशीरपणा दिसून येतो. मंडळीकडे आज २ कोटी १७ लक्ष रुपयांचे विमे चालू असून तिचें वार्षिक उत्पन्न १६३/४ लाखांवर आहे. मजबुतीकडे विशेष लक्ष पुरवून त्याबरोबरच खर्चाचे प्रमाणांत वाढ होऊं न देतां आपलें कार्यक्षेत्र वाढविण्याचा मंडळीचा प्रयत्न चालू आहे. हें साहसमिश्रित सावधगिरीचें धोरण अनुकरणीय असून, तें वेस्टर्न इंडियाचे कीर्तीमध्यें भर घालणारें आहे. काटकसरीचा कारभार, स्थैर्य व मजबुती ह्यांस प्राधान्य, विमेदारांची योग्य निवड, प्रगतिपर धोरण, इत्यादि गोष्टी अहवालावरून स्पष्ट होत आहेत. १९३८ सालीं मंडळीची रौप्य ज्युबिली साजरी व्हावयाची आहे. त्या प्रसंगानें मंडळीच्या कार्याचे विस्तारास उत्कृष्ट सहाय प्राप्त होईल ह्यांत संशय नाहीं.

## फ्रान्समध्यें संतति-नियमनाचे परिणाम

हिंदुस्थानांतली लोकसंख्या सारखी वाढत चालली असून तिच्या योगानें देशाचें दारिद्र्य व हलाखी ह्यांत भर पडत असल्याविषयीं सर्वत्र ओरड ऐकूं येते आणि ह्या प्रजावृद्धीचें नियंत्रण व्हावें म्हणून संतति-नियमनाचे कृत्रिम उपायहि सुचवण्यांत येत आहेत. फ्रान्स देशांत आज अनेक वर्षे हे उपाय अमलांत असून लोकसंख्या वाढत नाहीं म्हणून काळजी उत्पन्न झाली आहे. लोकसंख्या सारखी व योग्य प्रमाणांत वाढणें हें प्रगतीचें लक्षण समजण्यांत येतें. आरोग्यांत होणाऱ्या सुधारणेमुळें मृत्युसंख्येचें प्रमाण कमी होत चाललें आहे परंतु विवाह व संतति ह्यांमध्यें घट होत आहे. समाजाचें रक्षण होण्यास आपली लोकसंख्या पुरेशी नाहीं अशी भीति फ्रान्समध्यें वाटत असून फ्रेंच राष्ट्र मृत्यूच्या पंथास लागलें असल्याची भाषाहि अनेकवार वापरली गेली आहे. फ्रान्समधल्या संतति-नियमनाचे परिणाम तेथील लोकसंख्येविषयींच्या आकड्यांवरून दिसून येतात. गेल्या वर्षाच्या जूनअखेर फ्रान्सची लोकसंख्या ४ कोटि १९ लक्ष होती आणि १९२७ व १९३४ ह्या सालीं फ्रेंच लोकसंख्येचा तोच आकडा होता. म्हणजे गेल्या दहा वर्षांत फ्रान्सची लोकसंख्या स्थिर राहिली आहे हें उघड आहे. एवढेंच नव्हे तर १९१३ च्या मानानें तीमध्यें फक्त अडीच लक्षांचा वाढावा झालेला आहे. १९३४ सालीं मृत्यूंपेक्षां जनन ४३ हजारांनीं अधिक तरी होतें, पण १९३५ मध्यें जननापेक्षां एकोणीस हजार पांचशें मृत्यूच अधिक होते. गेल्या वर्षी फ्रान्समध्यें एकूण ६ लक्ष ३९ हजार अर्भकें जन्मलीं आणि २ लक्ष ८५ हजार विवाह झाले. महायुद्धाच्या नंतरच्या काळांत एवढे लहान आकडे कोणत्याच दुसऱ्या सालीं नव्हते, आणि हे दोन्ही आकडे १९१३ सालच्या मानानें कमीच आहेत. दर दहा हजार माणसांत विवाह किती झाले ह्याचा विचार केल्यास गेल्या वर्षाचे व एकंदरीनें अलीकडचे आकडे उतरत आले आहेत असें दिसून येतें. १९३५ मध्यें दर दहा हजारीं १३६ च काय ते विवाह झाले. अगोदर लग्न न करण्याकडे लोकांची प्रवृत्ति व लग्न झालेंच तर संतति-नियमन, असला प्रघात फ्रान्समध्यें जारीनें चालू आहे. दर दहा हजार लोकांमध्यें १९१३ सालीं १७५ मृत्यु झाले. १९३५ चा हा तत्सम आकडा १५७ आहे. राष्ट्रसंरक्षणास मनुष्यबळाची आवश्यकता आहे आणि जर्मनी व इटली या देशांत प्रजावृद्धीस उत्तेजन देण्यांत येत आहे हें लक्षांत घेतां लोकसंख्येचा प्रश्न फ्रान्समध्यें चिंतनीय झाला असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. प्रजा वाढल्यानें देशांदेशांत युद्धें होण्याची भीति निर्माण होते असें म्हणतात. पण फ्रान्समध्यें प्रजा वाढत नाहीं म्हणून युद्धाचें भय वाटण्यासारखी स्थिती उत्पन्न झाली आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

## स्फुट विचार

### अॅबिसीनियन प्रकरणावर पडदा पडला !

राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेपुढें आपलें गाऱ्हाणें मांडून इटलीनें शस्त्रास्त्रांच्या जोरावर जिंकलेला अॅबिसीनिया देश त्यास पचूं देऊं नये अशी आग्रहाची शेवटची विनंति अॅबिसीनियाच्या बादशहानें केली. पण तिचा कांहीं एक उपयोग न होतां "आतां झालें तें झालें" अॅबिसीनिया इटलीनें जिंकला आहे, तो कांहीं केल्या परत येऊं शकत नाहीं असा आपला स्पष्ट निर्णय राष्ट्रसंघानें दिला आहे. अॅबिसीनियन बादशहानें राष्ट्रसंघास त्याच्याच मूलतत्त्वांची, ठरावांची व जाहीर केलेल्या धोरणाची मुद्देसूदपणानें व चिकाटीनें अखेरची कसोटी लावली पण संघ हिणकसच ठरला. उदात्त तत्त्वांचा नुसता उच्चार करून त्याप्रमाणें कृति करण्याचा प्रसंग येतांच संघाचे प्रमुख सभासद कच खातात असा अनुभव आल्यानें ही आंतरराष्ट्रीय संघटना कोणत्या स्वरूपांत ह्यापुढें चालू ठेवावी ह्या प्रश्नाचा विचार करण्याची पाळी संघावर आतां आली आहे. राष्ट्रांचा वैयक्तिक स्वार्थ आणि त्यांचें सामुदायिक धोरण ह्यांमध्यें विरोध उत्पन्न होऊन त्यांच्या हातून एकमतानें महत्वाचें कार्य होत नाहीं हा धडा राष्ट्रसंघास मिळाला खरा. परंतु अॅबिसीनियाचें स्वातंत्र्य नष्ट झालें आणि राष्ट्रसंघाचे हेतु व त्याचें सामर्थ्य ह्यांचे बाबतींत जगाचा विश्वास उडाला आहे. ही राष्ट्रसंघाची पीछेहाट जागतिक आपत्तीच होय. राष्ट्रांमध्यें फाटाफूट व तट, परस्परांच्या सहायाविषयीं साशंकपणा, शस्त्रास्त्रांची वाढ ह्या गोष्टी जगाच्या आर्थिक प्रगतीच्या मार्गांतलीं विघ्नें होत. राष्ट्रसंघाची पुनर्घटना करण्याची भाषा सध्या ऐकूं येत आहे, तिचें काय होतें तें दिसेलच.

---

### बाहेरील तज्ज्ञांच्या नेमणुकीबाबत वृत्तपत्रीय बातम्या व त्यांचा इन्कार

आर्थिक व सांपत्तिक महत्वाच्या कांहीं प्रश्नांबाबत चौकशी करून हिंदुस्थान सरकारास सल्ला देण्याच्या कामावर बाहेरील तज्ज्ञांची नेमणूक होण्याचें घाटत असल्याच्या बातम्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्या होत्या. हिंदुस्थान सरकारचे आर्थिक सल्लागार म्हणून कोलंबिया युनिव्हर्सिटींतले मि. गेयर ह्यांची निवड होणार असल्याच्या वदंतेस अशा प्रकारची प्रसिद्धी मिळाली होती. परदेशांतून सरकारास तज्ज्ञ आणणें आवश्यक वाटावें ह्या रीतीचा तज्ज्ञांचा तुटवडा हिंदुस्थानांत आहे कीं काय ह्या अर्थाची टीका प्रस्तुत प्रकरणीं होणें स्वाभाविक आहे. पण टाइम्स ऑफ इंडियाच्या सिमला येथील बातमीदारानें ह्या नेमणुकीबद्दलच्या वाटाघाटीची बातमी कशी बाहेर आली ह्याविषयीं आश्चर्य प्रकट केलें आहे. सदरहु गृहस्थ आपल्या कामांत वाकबगार असल्याची ख्याति असून त्यांची निवड झाल्यास त्यांत वावगें कांहीं नाहीं, परंतु मद्रासमध्यें ह्या गोष्टीची परिस्फुटता प्रथम झाली ती कशी झाली ह्याचें त्या बातमीदारास गूढ वाटत आहे. आर्थिक तज्ज्ञाच्या जागेसाठीं इतरहि कांहीं उमेदवारांचीं नांवें विचारांत घेण्यांत आलीं आहेत असें तो म्हणतो आणि म्हणून मि. गेयर ह्यांची नेमणूक होणार हें निश्चित समजतां येत नाहीं असें त्याचें मत आहे. दुसऱ्याहि एका नेमणुकीविषयींची बातमी मद्रासेकडे फुटली असल्याचा टाइम्सच्या बातमीदारानें उल्लेख केला आहे. हिंदी रेल्वेजच्या सांपत्तिक स्थितीची चौकशी हिंदुस्थान सरकार करणार ही कल्पना जुनीच आहे आणि ती चौकशी एखाद्या बाहेरच्या तज्ज्ञाकडे सोपवली जाणार असा तर्कहि मागेंच करण्यांत आला आहे. तथापि लंडन पॅसेंजर ट्रॅन्स्पोर्ट बोर्डाचे अध्यक्ष, लॉर्ड अॅशफिल्ड, ह्यांचे नांव सदरहु चौकशीचे बाबतींत पुढें आलें आहे. हे गृहस्थहि अनुभवी तज्ज्ञ असून योजिलेल्या कामास सर्वस्वी लायक आहेत असें टाइम्सच्या बातमीदारानें तपशील देऊन म्हटलें आहे. परंतु त्याच्या माहितीप्रमाणें लार्ड अॅशफील्ड आजारी आहेत व तूर्त तरी ते नवीन काम अंगावर घेतील असें दिसत नाहीं. वरील दोन महत्वाच्या बातम्या अवेळीं कशा बाहेर आल्या ह्याचा छडा सरकार लावीलच. जनतेच्या दृष्टीनें हिंदी तज्ज्ञ नेमले जाणें ही महत्वाची गोष्ट आहे आणि सरकारनें ह्या बाबतच्या आपल्या धोरणांत इष्ट ती सुधारणा करणें अगत्याचें आहे, असें मत अनेकवार व्यक्त केलें गेलें आहे. त्याचा योग्य विचार सरकारनें करून लोकांच्या इच्छेप्रमाणें आपली जुनी परंपरा सोडून दिली पाहिजे. राजकीय सुधारणा होऊं घातल्या आहेत त्यांचें हें महत्वाचें अंग आहे हें सरकारच्या ध्यानांत कधीं येणार ?

---

### पुणें शहराची आर्थिक पाहणी

प्रिन्सिपॉल धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या नेतृत्वाखालीं गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अॅन्ड इकनॉमिक्स ही संस्था उपयुक्त संशोधनकार्य करीत आहे, ह्याची माहिती सर्वांस आहेच. पुण्यांतील फळविक्री व महाराष्ट्रांतील मोटार वहातुक ह्या विषयांवर दोन संशोधन ग्रंथ संस्थेनें प्रसिद्ध केले आहेत व तिनें आतां पुणें शहराच्या आर्थिक पाहणीचें मोठ्या जबाबदारीचें काम अंगावर घेतलें आहे. हिंदुस्थानामध्यें विश्वसनीय आर्थिक माहितीचा अभाव असून ती पद्धतशीर रीतीनें गोळा करण्याचें काम कठिण असतें. हातीं घेतलेल्या सामाजिक किंवा आर्थिक महत्वाच्या प्रश्नांचें यथार्थ स्वरूप माहीत असल्याखेरीज त्यांसंबंधांत उपाययोजना कशी करणार ? खेडेगांवांच्या पहाण्या कित्येक प्रांतांमध्यें करण्यांत आलेल्या आहेत, परंतु शहरांच्या पहाण्या अजून फारशा झालेल्या नाहींत. इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत अशा अनेक पध्दतशीर चौकशा झालेल्या असून जीवनाच्या सर्व अंगोपांगांवर प्रकाश पाडण्याचे हे प्रयत्न उपयुक्त ठरले आहेत. पुणें शहराच्या म्युनिसिपालिटीनें पुरस्कार केलेली प्रस्तुत पहाणी हिंदुस्थानांतील पहिलीच बिनसरकारी पहाणी होय, असें म्हणतां येईल व त्याबद्दल प्रि. गाडगीळ ह्यांची इन्स्टिटयूट व म्युनिसिपालिटी ह्या दोघांचेंहि अभिनंदन करणें जरुर आहे. पहाणीमध्यें आढळून येणाऱ्या शहरसुधराईच्या गरजा व आर्थिक जीवनामध्यें करतां येण्याजोग्या सुधारणा केवळ पुणें शहराच्या नागरिकांसच नव्हे, तर महाराष्ट्रांतील व महाराष्ट्रा बाहेरील शहरांसहि मार्गदर्शक होतील ह्यांत शंका नाहीं. पुण्याच्या नागरिकांनीं ह्या समाजोपयोगी कार्यास मनःपूर्वक सहाय करणें अगत्याचें आहे.

---

### पाऊसपाण्याची हालहवाल

जूनच्याअखेर पुऱ्या झालेल्या आठवड्यांतलि पाऊस पाण्याच्या परिस्थितीबद्दल मुंबई सरकारच्या गॅझिटमध्यें माहिती प्रसिद्ध झाली आहे, तीवरून इलाख्यांत चोहोंकडे पाऊस पडला आहे व थोड्याच भागांत त्याची वाण अजून भासत आहे असें दिसतें. गुजराथमध्यें एकंदरीनें परिस्थिति बरी आहे आणि पेरण्यांस सुरवात झाली आहे. भडोच व पंचमहालच्या कित्येक भागांत

कपाशीची पेरणी होत आहे. हा जिल्हा शिवाय करून इतरत्र पाण्याचा पुरवठा जरुरी इतका आहे. कोकणांत पाऊस चांगलाच झाला आहे आणि शेतीचीं मामुली कामें चालू आहेत. मध्य भागांतले खानदेश, अहमदनगर व पुणें आणि दक्षिण विभागांत विजापूर हे जिल्हे वगळल्यास इतरत्र महाराष्ट्रांत व कर्नाटकांत पुरेसा पाऊस झालेला आहे. ह्या निर्दिष्ट केलेल्या जिल्ह्यांत मात्र पावसाची जरूर आहे. सातारा व बेळगाव जिल्ह्यांत, उलट, उघडीप हवी आहे. अहमदनगर, सोलापूर व विजापूर जिल्ह्यांत पेरण्यासाठी लोक पावसाची वाट पहात आहेत. धारवाडांत जास्त पावसामुळें पेरण्या अडून राहिल्या आहेत. नाशिक व पुणें जिल्हा ह्यांमध्यें कपाशीचे पेरे चालले आहेत. पुणें व धारवाड वगळल्यास सर्वसाधारणपणें दक्षिणेंत पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत नाहीं. पुणें व बेळगांव जिल्ह्यांत बागाइतासहि पाणी पुरेसें नाहीं.

### 'प्रभा'चा खास साहित्य व शिक्षण अंक

चालू वर्षीतील आपल्या खास अंकांच्या योजनेनुसार हा ता. ७ जुलैचा साहित्य व शिक्षण अंक, शैक्षणिक संस्थांच्या वर्षारंभाची संधी साधून प्रसिद्ध करण्यांत आला आहे. अंकांतील लेखांची निवड योग्य रीतीनें करण्यांत आली असून त्यांत शिक्षण-पद्धतीच्या विविध अंगांचा परामर्श घेण्यांत आला आहे. कित्येक लेख मार्गदर्शक होण्यासारखे आहेत. डॉ. खैर ह्यांनीं गृहशिक्षणामधील दाखविलेले दोष व मुळांना लहानपणींच आर्थिक दृष्टि येऊं देण्याची प्रतिपादलेली आवश्यकता विचारपवर्तक आहेत. शिक्षणाचें ध्येय व्यक्तिविकास हें असो अगर ज्ञानसंपादन हें असो, द्रव्यार्जनाचें साधन ह्या दृष्टीनेंच आज बहुसंख्य विद्यार्थ्यांचे पालक शिक्षणाकडे पहातात, ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं. तेव्हां, ह्या दृष्टीनें शिक्षणक्रमास पूरक म्हणून मुलांस कार्यक्षम करणारें गृहशिक्षण त्यांस देणें आवश्यक आहे. अंकांतील इतर लेखहि वाचनीय आहेत व मनोरंजनाकडेहि भरपूर लक्ष देण्यांत आलेलें आहे.

### मुंबई मराठी ग्रन्थसंग्रहालय

वरील संस्थेस सध्या अठ्ठतिसावें वर्ष चालू आहे. १९३५ साली संस्थेनें हेमंत व्याख्यानमाला गुंफण्याचा नवीन उपक्रम सुरू केला व त्याच वर्षाच्या डिसेंबर महिन्यांत मालेच्या दुसऱ्या वर्षास सुरवात झाली. संस्थेच्या पटावर ४२२ मासिक सभासद आहेत व एकूण १६,७४० पुस्तकें संस्थेच्या संग्रहीं आहेत. मुंबई शहरांतील मराठी भाषा बोलणारांची संख्या इतकी मोठी असतांना मराठी ग्रन्थसंग्रहालयाच्या मासिक वर्गणीदारांची संख्या अल्प असल्याबद्दल संस्थेच्या १९३५ सालाच्या अहवालांत खेद प्रदर्शित करण्यांत आला आहे.

### डॉ. चाटी अनाथ विद्यार्थी गृह, सोलापूर

वरील अनाथ विद्यार्थी गृहाचा १-४-३४ ते ३१-३-३६ चा सहावा अहवाल आमचेकडे आला आहे. ब्राह्मण समाज सेवा संघातर्फे ह्या संस्थेची १९२२ सालीं स्थापना झाली व क. डॉ. चाटी ह्यांच्या मदतीमुळें तिची प्रगति झाली. इतरांच्या सहानुभूतीचाहि संस्थेस उपयोग झालेला आहे. संस्थेमध्यें ३८ विद्यार्थी असून त्यांच्या शारीरिक, आयोगिक, धार्मिक व बौद्धिक प्रगतीकडे लक्ष पुरविलें जातें. संस्थेच्या गरजा परविण्यासाठी आश्रयदात्यांची आवश्यकता आहे.

### ब्रिटिश रेल्वेचा परिवार

दर मिनिटास एक मैल वेगानें सारख्या जाणाऱ्या अशा ५९ आगगाड्या ग्रेटब्रिटन देशांत चालू आहेत. दररोज त्या सर्वांचा मिळून ५,००० मैल लांबीचा प्रवास होतो.

ब्रिटिश रेल्वेजवर ४२ हजार प्रवाशांचे डबे आहेत आणि त्यांत खाण्यापिण्याच्या सोईचे ६४५ आहेत आणि ३८३ निजून प्रवास करण्याचे डबे आहेत.

त्यांच्या २० हजार इंजनांस वगैरे सुमारें दीड कोटि टन वजनाचा कोळसा लागतो, तो ब्रिटिश खाणींतून काढलेला असून त्यामुळें हजारों कामकऱ्यांस पोटास मिळतें.

त्यांच्या वापरांत येणाऱ्या दोन कोटि विटा, सत्तावीस लक्ष वार लांबीचें कापड आणि दोन लक्ष टनांच्यावर पोलाद हा सर्व माल ब्रिटिश कारागिरीचा असतो.

सर्वांत मोठ्या "वाघणी"स ५६ चाकें आहेत आणि १५० टन वजनाचा माल तिच्यामध्यें मावतो.

### एडिसन ह्यांचें जिवंत स्मारक

सुप्रसिद्ध अमेरिकन संशोधक मि. एडिसन हे १९३१ सालीं वारले. त्यांनीं हजारो शोध लावले असून त्यामुळें मानवी जीवन सुखी होण्यास मदत झाली आहे. ह्या अद्वितीय संशोधकाचें जिवंत स्मारक रहावें, म्हणून त्यांच्या स्मरणार्थ १०० शिष्यवृत्त्यांची योजना करण्यांत आली आहे. अत्यंत हुषार विद्यार्थ्यांस उत्कृष्ट संधि प्राप्त करून देणें, हा ह्या योजनेचा हेतु आहे. शिष्यवृत्तीची रकम विद्यार्थ्यानें हातीं घेतलेल्या कामावर अवलंबून राहील व त्याचें काम संपेपर्यंत शिष्यवृत्ति चालू राहील.

### ब्रिटिश सहकारी संस्था आणि व्यापार

ग्रेटब्रिटनमध्यें अंतर्गत व्यापाराची एकूण उलाढाल दरसाल सुमारें २,३५० कोटि रुपयांची होते. त्यापैकीं १५ टक्के व्यापार सहकारी संस्थांच्या हातांत आहे, २५ टक्के दुकानदारीच्या कंपन्या करतात आणि बाकीचे ६० टक्के किरकोळ दुकानदार करतात.

### जपानी लोकांची शहरांमध्यें गर्दी

गेल्या ऑक्टोबरमध्यें जपानची खानेसुमारी घेण्यांत आली, त्या वेळीं त्या देशाची लोकसंख्या १९३० सालांतील लोकसंख्येच्या पेक्षां ५० लाखांनीं वाढून ती ६ कोटी, ९२½ लक्ष झाली असल्याचें आढळलें. शहरी लोकसंख्येचें प्रमाण वाढत आहे. १९३० सालीं एकूण लोकांपैकीं २४ टक्के लोक १२७ शहरांत रहात असत; आतां ३३ टक्के लोक शहरवासी झाले आहेत. जपानची राजधानी टोकियो ह्या शहराची लोकसंख्या ५८¾ लक्ष आहे.

### ग्रेटब्रिटनमधील २०० धर्म

हिंदुस्थान हें धर्म, जाती व पंथ ह्यांचें माहेरघर आहे, असें मानण्यांत येतें परंतु खुद्द ग्रेटब्रिटनमध्यें वेगवेगळ्या दोनशेहून ज्यास्त धर्मकल्पनांचे अनुयायी आहेत असें एका लेखकानें दाखविलें आहे.

## सिमेंट कंपन्यांचें एकत्रीकरण

सिमेंट कंपन्यांच्या एकत्रीकरणाच्या योजनेप्रमाणें तींत सामील होणाऱ्या प्रत्येक कंपनीनें द्यावी लागणारी व तिला मिळणारी रकम इत्यादि संबंधांतली माहिती खालील कोष्टकांत दिली आहे:—

| सिमेंट कं. | उत्पादनशक्ति | कंपनीस ती सामील करून घेण्यासाठीं मिळणारा मोबदला | सामील होणाऱ्या कं.नें नियोजित कं. द्यावयाची रोख रक्कम | कं. चीं मालमत्ता विकण्यापूर्वीं भरावें लागलें तें द्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| | टन | लक्ष रु. | लक्ष रु. | लक्ष रु. |
| सी. पी. | १,८०,००० | १०८ | १८ | ४$\frac{1}{4}$ |
| बुंदी | १,६०,००० | ९६ | १६ | ५$\frac{1}{2}$ |
| शहाबाद | १,४०,००० | ८४ | १४ | ३$\frac{1}{2}$ |
| कटणी | ८७,००० | ५२ | ८$\frac{3}{4}$ | १ |
| पंजाब | ८०,००० | ४८ | ८ | ५$\frac{1}{4}$ |
| ओखा | ८०,००० | ४८ | ७ | २ |
| कोइमतूर | ६०,००० | ३६ | ६ | — |
| युनायटेड | ५०,००० | ३० | ५ | ३$\frac{3}{4}$ |
| ग्वाल्हेर | ४५,००० | २७ | ४$\frac{1}{2}$ | $\frac{3}{4}$ |
| इंडियन | ४०,००० | २४ | ४ | ४$\frac{1}{2}$ |

## मुंबई शहरांतील पोलिस खात्याचा अहवाल

मुंबई शहर पोलिसांनीं १९३५ सालीं एकूण १,४४,२०० लोकांवर खटले भरले, त्यांपैकीं १,३६,५९० जणांस शिक्षा झाल्या. पोलिसाकडे वर्दी दिलेल्या चोऱ्यांत ६ लक्ष ८१ हजार रुपये किंमतीची मालमत्ता गेल्याची तक्रार होती, त्यांपैकीं १ लक्ष ८७ हजारांचा माल मालकांस परत मिळाला. अहवालाचे सालीं १९ छापखाने व २३ वर्तमानपत्रें ह्यांचेकडून जामीन मागण्यांत आला. एकूण ४,१६० मोटार गाड्या रजिस्टर करण्यांत आल्या, त्यांतील ३,०२१ गाड्या अमेरिकन व १,३८५ गाड्या ब्रिटिश होत्या. रस्त्यांवरील अपघातांत ३,५२४ लोकांस दुखापती होऊन १०१ सम दगावले. अपघातांची संख्या वाढत असल्याचा अहवालांत उल्लेख आहे. अपराधी मोटार-हाक्यांस पुरेसें शासन होत नाहीं, अशी कमिशनर ऑफ पोलीसची तक्रार आहे. मोटारसिरीज २,१८९ व्हिक्टोरिया व १,५१५ बैलगाड्या भाड्याच्या वहातुकीचा धंदा करतात. वर्षअखेर शहरांतील पोलिसांची संख्या ४,४९९ इतकी होती, म्हणजे दर पोलिसागणिक ३२ गुन्हे व आठ नागरिकांगणिक एक गुन्हा असें पोलिसांशीं व लोकवस्तीशी गुन्ह्यांचें प्रमाण पडलें.

### ग्रेटब्रिटनमधील कोळशाची उतरती निर्गत

ग्रेटब्रिटनमधील कोळशाच्या खाणींतून निघणाऱ्या मालांपैकीं शेंकडा २३ इतका कोळसा परदेशीं रवाना होतो. सहा वर्षांपूर्वी हें प्रमाण २९ टक्के होतें, तथापि अंतर्गत मागणी अलीकडे वाढली आहे व त्या योगानें निर्गतीमधली तूट भरून निघत आहे.

दखनचें भूषण

# वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कं.लि.

[ सातारा. ]

—१९३५ च्या रिपोर्टांतील ठळक गोष्टी—

चढती प्रगति
वाढता धंदा
अप्रतिम स्थैर्य

| | |
|---|---|
| एकूण चालूं काम | २,७०,००,००० रु.हून अधिक |
| एकूण लागू क्लेम | १४,४३,७७० रुपये |
| १९३५ मधील नवें काम | ५१,३०,०४२ रुपये |
| वार्षिक उत्पन्न | १६,६५,२३३ रुपये |
| लाइफ ॲशुअरन्स फंड | ६०,४२,८७३ रुपये |

आदर्श पत
मोठी ऐपत
दांडगी दानत

बोनस त्रैवार्षिक दर हजारी— आयुष्याच्या पॉलिसीवर ७५ रुपये आणि मुदतीच्या पॉलिसीवर ६० रुपये

सार्‍या देशांत कमींत कमी लॅप्स रेशिओ—शेंकडा ४ हून कमी

पुणें शाखाः बुधवार चौक, पुणें शहर.

मुख्य कचेरीः सातारा शहर.

## पुणें शहराची आर्थिक पहाणी

### गोखले इन्स्टिट्यूटमार्फत होणारें कार्य


[ 'गोखले राजकारण व अर्थशास्त्र संशोधन मंदीर' या संस्थेनें पुणें शहर म्युनिसिपालिटीपुढें पुण्याच्या आर्थिक पाहणीची एक योजना मांडली, ती म्युनिसिपालिटीनें मान्य केली असून त्यासंबंधांत इन्स्टिट्यूटनें कामास सुरवातहि केली आहे. ह्या आर्थिक पहाणीच्या कार्याची रुपरेषा थोडक्यांत खाली दिली आहे. ]

गेल्या पंचवीस-तीस वर्षांत सर्व प्रकारच्या सामाजिक व आर्थिक पहाणीच्या कामाचें महत्त्व सर्व जगभर फार वाढलें आहे. पहाणीनें दोन प्रकारच्या गोष्टी साधतां येतात. एक शास्त्रीय व दुसरी व्यावहारिक. समाजशास्त्र व अर्थशास्त्र यांतील निरनिराळ्या सिद्धांतांचा पडताळा पाहणें हें कार्य सामाजिक व आर्थिक परिस्थितीच्या निरनिराळ्या अंगाची तपशीलवार पाहणी वेळोंवेळीं केल्याशिवाय शक्य नसतें. हें शास्त्रीय कार्य झालें. बहुतेक पाहणींच्या बुडाशीं या शास्त्रीय हेतूहूनहि निराळा हेतू असतो. कोणत्याहि अडचणींतून वाट काढावयाची, कोणत्याहि बिकट प्रश्नाचा उलगडा लावावयाचा, कोणत्याहि समाजाची उन्नती साधण्याकरतां पुढील धोरण आखावयाचें, म्हणजे या सर्व गोष्टी करण्यास त्या प्रश्नाची अगर समाजाची सर्व बाजूंनीं तपशीलवार माहिती मिळविणें अत्यावश्यक असतें. म्हणूनच समाजानें अगर सरकारनें कोणतेंहि धोरण स्वीकारण्यापूर्वीं माहिती मिळवण्याकरितां पहाणी करणें नितांत जरूरीचें असतें.

हिंदुस्थानांत आर्थिक पाहणीचें काम कांहीं दिशांनीं बरेच वर्षांपूर्वीं सुरू झालेलें आहे. विशेषतः खेडेगांवांची पाहणी करणें हे डॉ. मॅन यांच्या उद्योगानंतर सर्व देशभर पुष्कळ जणांनीं हातीं घेतलें व निरनिराळ्या भागांतील एकदोन एकदोन खेड्यांच्या पहाण्या होऊन चुकल्या आहेत. पंजाबमधील निम–सरकारी आर्थिक बोर्डानें हें काम मोठ्या प्रमाणावर चालविलें आहे. पण शहरांच्या पाहण्यांकडे अजून फारसें लक्ष गेलेलें नाहीं. मुंबईच्या मजूर खात्यानें शहरी मजूरवर्गाच्या परिस्थितीबाबत केलेल्या निरनिराळ्या पाहण्या या अपवादात्मक समजावयाच्या. परंतु हिंदुस्थानांतील एखादाहि शहराची आर्थिक बाजूनें तरी समग्र झालेली पाहणी आमचे ऐकिवांत नाहीं. तेव्हां पुणें शहर म्युनिसिपालिटीनें पुरस्कृत केलेली ही पाहणी हिंदुस्थानांतील पहिलीच होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सुधारलेल्या पाश्चात्य देशांत अशा पाहण्यांचें महत्त्व सर्वांस पटलें असून, शहरांच्या पाहणीचें तेथें एक शास्त्रच निर्माण झालें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. लंडन, लिव्हरपूल, अमेरिकेंतील पिट्सबर्ग, क्लीव्हलँड, शिकागो, न्यूयॉर्क वगैरे शहरांच्या पाहणीचीं अशींच उदाहरणें देतां येतील. अर्थात् या पाहण्या फार व्यापक स्वरूपाच्या आहेत. यांत केवळ आर्थिक बाबींचाच नव्हे तर सामाजिकहि सर्व बाबींचा समावेश केला जातो. आणि एक प्रकारें असेंच करणें योग्य आहे. कारण सबंध शहरभर माहिती मिळविण्याचा उपक्रम सुरू केला म्हणजे एका बरोबरच दुसरीहि बरीच माहिती मिळविणें सोपें पडतें व या गोष्टी वारंवार होणाऱ्या नसल्यामुळें जितकी व्यापक माहिती मिळविणें शक्य असेल तेवढी मिळविणें श्रेयस्कर ठरतें. प्रस्तुत पाहणीच्या मुळाशी अशीच कल्पना होती. परंतु पैशाची नड मनांत आणून ह्या पाहणीचें क्षेत्र कांहींसें संकुचित करण्यांत आलें आहे. कारखाने, दुकानें, उद्योगधंदे, व्यापार, वाहतुक, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, दस्तुरी, मजूरांचे तळ इत्यादि बाबींकडे वेळेची व पैशाची सवड झाल्यास विशेष लक्ष पुरविण्यांत येईल. रहातीं घरें, त्यांची बांधणी, त्यांतील स्वच्छता, आरोग्य, वैद्यकीय उपचाराची तरतूद इत्यादि गोष्टींचाहि तपासणीमध्यें समावेश करण्याचा मानस आहे. पाहणीचा विस्तार शक्य तितका मोठा करून ती त्यांतल्या त्यांत सर्वांगीण करण्याचा प्रयत्न करण्यांत येणार आहे.

पाहणी करण्याचें मुख्य साधन म्हणजे व्यापारी, कारखानदार इत्यादिकांचे घरोघर जाऊन प्रश्नपत्रिकेवर माहिती टिपून घेणें हें आहे. अर्थात् प्रत्येकाचे घरीं जाणें अशक्य असल्यामुळें कांहीं निवडक माणसांकडून प्रश्न भरून घेतलेल्या प्रश्नपत्रिकांवर व निरनिराळे व्यापारी आणि कारखानदारांच्या मंडळ्या व संघ यांजकडून मिळणाऱ्या संघटित माहितीवरच अवलंबून रहावें लागेल. अशा रीतीनें हरएक प्रकारच्या उद्योगासंबंधीं व व्यापाराबद्दल माहिती मिळविणें आवश्यक आहे. या सर्व वेगवेगळ्या पोट-पाहण्या झाल्या. पण सबंध शहराचें आर्थिक जीवन कसें आहे याचा ठाव घेण्याचा एक सर्वमान्य उपाय आहे, तो म्हणजे शहरांतील प्रत्येक भागांतील कांहीं कुटुंबांची नमुन्यादाखल तपशीलवार पाहणी करणें हा होय. असल्या नमुन्यावरून आर्थिक जीवनाबद्दल जीं अनुमानें काढण्यांत येतील तीं सरसहा मान्य करण्यास कांहीं हरकत नाहीं असा आकडेशास्त्रज्ञांचा अभिप्राय आहे. उद्योगधंदे, दुकानें, मजूरवर्ग इत्यादिकांच्या प्रत्यक्ष निरनिराळ्या पाहण्या व हजार–बाराशे घरांच्या नमुन्यांची घरपाहणी हीं एकमेकांस पोषक होतील व अशा रीतीनें पुणें शहराचें आर्थिक जीवन कसें चाललें आहे, त्यांत नडी कोणत्या आहेत, सुधारणेस वाव कोठें आहे, वगैरे बाबींबद्दल या पाहणीच्या द्वारें भरपूर उजेड पाडतां येईल असें वाटतें. अर्थात् पाहणी यशस्वी होणें अगर न होणें हें बहुतांशीं नागरिकांचे सहकार्यावर अवलंबून आहे. माहिती पुरविल्यानें आपले हितास धक्का पोहोंचेल अशी भीति कोणीहि बाळगण्याचें कारण नाहीं. कारण ह्या पाहणीचा हेतु उपयुक्त सिद्धांत मांडणें एवढाच आहे. ह्या समाजोपयोगी कार्यास सर्वांनीं जरूर ती माहिती पुरवून व अन्य तऱ्हेनें सहाय करणें आवश्यक आहे.

चालविण्याचा खर्च थोडा
व
कामाचें प्रमाण सर्वांत जास्त
म्हणूनच
कि
लों
स्क
र

"कल्याण" शेंगायंत्र वापरा!
किर्लोस्कर बंधु, लिमिटेड, किर्लोस्करवाडी
( जि. सातारा. )

## आंतरराष्ट्रीय सहकारी दिन

### प्रो. काळे ह्यांचें भाषण व समारोप

सालाबादप्रमाणें हा सहकारी दिन पुणें येथें जिल्हा इन्स्टिटयूटच्या विद्यमानें गेल्या शनिवारीं साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं बिनसरकारी व सरकारी सहकारी कार्यकर्ते शंभराच्यावर हजर होते. श्री. बापूसाहेब गुप्ते ह्यांस इतर कामामुळें हजर रहातां न आल्यानें सभेचें अध्यक्षस्थान प्रो. काळे ह्यांनीं स्वीकारलें होतें. त्यांचें प्रास्ताविक व अखेरचें भाषण आणि इतर वक्त्यांच्या भाषणांचा त्यांनीं केलेला समारोप ह्यांतले महत्त्वाचे मुद्दे खाली दिले आहेत:—

(१) जगांतल्या निरनिराळ्या देशांतल्या सहकारी संस्थांची परिस्थिति आणि आपल्याकडील चळवळीची परिस्थिति ह्यांचा विचार करून पुढच्या कार्याची दिशा आखणें, हा आजचा दिवस साजरा करण्यांत मुख्य उद्देश असला पाहिजे.

(२) जर्मनी व इटली ह्यांसारख्या देशांत राजकीय उलाढालींमुळें तेथील सहकारी चळवळीचें स्वातंत्र्य व लोकसत्तात्मक तत्त्व नष्ट झालें असून इंग्लंड वगैरे देशांत ह्या गोष्टीची पूर्ण जाणीव उत्पन्न झाली आहे.

(३) ग्रेटब्रिटनमध्यें सहकारी संस्थांनीं आंतरराष्ट्रीय शांतता व परस्पर स्नेहसंबंध ह्यांचा पुरस्कार चालवला असून त्यांस सरकारचें प्रतिकूल धोरण व बिनसरकारी धंदेवाले ह्यांची स्पर्धा यांशीं झगडावें लागत आहे.

(४) आपलें ध्येयवादित्व, संघटन व अंतर्गत शिस्त ह्यांचें रक्षण करण्याचे आटोकाट प्रयत्न शिक्षण, प्रचार व विचारविनिमय ह्यांचे द्वारां त्यांनीं चालविले आहेत.

(५) हिंदुस्थानांत आपणांस ह्या बाबतींत अजून पुष्कळ शिकण्यासारखें आहे. आर्थिक व सामाजिक दृष्टया बलहीन अशा वर्गांचें संघटन करून त्यांस स्वावलंबी व सुखी बनवण्याचे यत्न सर्व समजूतदार व शिकलेल्या लोकांनीं स्वार्थत्यागपूर्वक सतत केले पाहिजेत.

(६) शिस्त, सामुदायिक कार्य व तडजोडीची वृत्ति ह्या मार्गांनीं आपण ध्येयाकडे प्रगति करणें जरूर आहे.

(७) लोकहिताच्या प्रश्नांचा अभ्यास करून त्यांस योग्य सल्ला पुढाऱ्यांनीं दिला पाहिजे. सरकार व बिनसरकारी कार्यकर्ते ह्यांच्यामध्यें वास्तविक पहातां विरोध येण्याचें प्रयोजन नाहीं. सहविचारानें वागल्यास वितुष्ट आणि भांडणें ह्यांस जागा मिळणार नाहीं.

(८) नवीन सहकारी नियमाविरुद्ध लोकमत प्रदर्शित होत आहे तें प्रस्तुत प्रकरणीं असा सहविचार झाला नाहीं यामुळेंच होय. शेतकी सोसायट्यांस असला नियम लागू असतां कोणी ओरड केली नाहीं, म्हणून सध्याची चळवळ हा शहरच्या लोकांचा स्वार्थी गिल्ला आहे अशी टीका एका वक्त्यानें केली ती अज्ञानमूलक आहे. यूनियनच्या मूळ सूचनेवरून आणि बँक व अ. रजिस्ट्रार ह्यांच्या सल्ल्यानें शेतकी सोसायटीच्या कारभाराचें नियंत्रण केलें जातें, त्याच तत्त्वाची अंमलबजावणी बँकांसारख्या संस्थांचे बाबतींत व्हावी व एकट्या सरकारनें ही सत्ता आपल्या हातीं घेऊं नये अशी नवीन नियमाच्या विरोधकांची रास्त मागणी आहे व ती सहकारी तत्त्व व कार्यपद्धति ह्यांस सर्वस्वी अनुसरून आहे.

(९) त्याचप्रमाणें, खेडेगांवांतल्या शेतकी सोसायट्या व शहरांतील बँकांसारख्या संस्था ह्यांच्यामध्यें विरोध असल्याचा भास कांहीं जणांस होतो आणि तो भेद ते वारंवार व्यक्त करतांना आढळतात. पण ही कल्पनाहि भ्रामक असून साप म्हणून भुई बडवण्यासारखी आहे. सहकारी चळवळींत तिचें तत्त्व मान्य करणाऱ्या सर्व लोकांचा समावेश झाला पाहिजे. सुशिक्षित, चांगल्या सामाजिक दर्जाचीं व पैसेवालीं माणसें कार्य करण्यास जेवढीं मिळतील तेवढीं हवींच आहेत. सर चुनिलाल मेथासारखी श्रीमान धंदेवाली मंडळी व मुंबई प्रांतिक बँकेसारखी संस्था शहरी व भांडवलशाहीचा पुरस्कार करणारी म्हणून सहकारी चळवळींत त्याज्य मानणें वेडेपणाचें व बालिश होईल हें सांगावयास नको.

(१०) जनहिताच्या दृष्टीनें स्वार्थत्यागपूर्वक, शिस्तीनें व जुटीनें आपण काम करूं तरच सहकारी चळवळ टिकेल. अंतःकलह, परस्पर विरोध व शिस्तीचा अभाव ह्यांस थारा मिळाल्यास सहकारी चळवळ संपली असें समजावें.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

### स्टॅट्यूटरी सभेची नोटीस.

बँकेच्या सभासदांची स्टॅट्यूटरी सभा (इंडियन कंपनी ॲक्ट, कलम ७७ प्रमाणें) रविवार ता. २६ जुलै, १९३६ रोजीं संध्याकाळीं ५ वाजतां नूतन मराठी विद्यालय हायस्कूलचे सभागृहांत (२१, बुधवार, पुणें शहर) भरणार आहे. सभेंत कंपनी कायद्याप्रमाणें सदर बाबत करावयाचीं सर्व कामें केलीं जातील.

न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें २. ता. ५ जुलै, १९३६

बोर्डाचे हुकुमावरून, M. V. Gokhale मॅनेजर.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

### पहिल्या साधारण सभेची नोटीस.

बँकेच्या सभासदांची पहिली साधारण सभा रविवार, ता. २६ जुलै, १९३६ रोजीं संध्याकाळीं ५-३० वाजतां नूतन मराठी विद्यालय हायस्कूलचे सभागृहांत (२१, बुधवार, पुणें शहर) भरणार आहे. सभेंत आतांपर्यंत बँकेनें केलेल्या प्रगतीचा विचार होईल.

न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें २. ता. ५ जुलै, १९३६

बोर्डाचे हुकुमावरून, M. V. GOKHALE मॅनेजर.

मुलांचा आनंद कोणा पालकाला नको ! त्यांतून 'आनंदा' चा खास अंक ! मग काय त्यावर मुलांच्या उड्यावर उड्या !

## 'आनंदा'च्या खास अंकाचा थाट

आतां सर्व मुलांना माहीत झाला आहे. ती दोन रंगी छपाई चित्रांची लयलूट, गोष्टींची रम्यता, कवितांची बहार—हो ! सांगायचें विसरलोंच ! यंदां पुष्कळ कवितांना त्यांतील वर्णनाच्या चित्रांचीच चौकट बसविली आहे—गुळगुळीत कागद, सुबक छपाई व मोहरेदार मुखपृष्ठ हे खास अंकाचे विशेष त्यांना ठाऊक झाले आहेत. 'आनंद' वर्षभर त्यांची किती करमणूक करतो, त्यांच्या ज्ञानांत किती भर घालतो व त्यांना किती हवाहवासा वाटतो हें तीं केव्हांहि सांगतील. आपण आपल्या मुलांकरितां तो एक वर्षभर घेऊन पहा म्हणजे आपणांसहि कळून येईल. वार्षिक वर्गणी ट. ह. सह लहान अंकाची २ रु. मोठ्या अंकाची ३ रु. वर्षारंभ जुलैपासून. अंक दरमहा पंधराव्या तारखेस प्रसिद्ध होतो.

पत्ता:—म्यानेजर आनंद, पुणें २.

## स्वदेशी काचेचा धंदा

### सद्यःस्थिति आणि सुधारणेचे उपाय

इंडिअन रिसर्च कौंसिलच्या शिफारसीवरून इंडिअन रिसर्च ब्यूरोचे असिस्टंट डायरेक्टर, मि. डिक्सन, ह्यांनीं चालू सालीं हिंदी काचेच्या धंद्याची पहाणी केली. चौकशीमध्यें आढळून आलेल्या महत्त्वाच्या बाबी त्यांनीं आपल्या अहवालांत नमूद केल्या असून त्यांसंबंधांत कित्येक उपयुक्त सूचनाहि केल्या आहेत. काचेच्या स्वदेशी धंद्याशी संबंध असलेल्या लोकांनीं त्यांचा नीट विचार करणें अगत्याचें आहे.

हिंदी काचेचा धंदा मुख्यत्वेंकरून पांच क्षेत्रांमध्यें आढळतो. संयुक्त प्रांत, बंगाल, मुंबई इलाखा, मध्यप्रांत व पंजाब हीं तीं क्षेत्रें होत. काचेच्या धंद्याचें प्रमुख क्षेत्र संयुक्त प्रांत हें आहे व त्यांत फेरोझाबाद हें बांगड्यांच्या धंद्याचें माहेरघर आहे. फारच थोडे कारखाने मोठ्या प्रमाणावर चालतात. बहुतेक छोटेखानी आहेत. त्यांचें वळण सामान्यतः जपानी धंद्याचें आहे. पंजाबांत पानिपत येथें काचेचा धंदा चालतो तो जुनाट पद्धतीचा आहे. नवीन तऱ्हांच्या मालास मागणी वाढत असल्यानें हा धंदा नष्ट होण्याच्या पंथास लागला आहे.

काचेच्या उत्पादनांत लागणाऱ्या वाळूच्या गुणांकडे कारखानदार नीट लक्ष पुरवींत नाहींत. सोडा ॲश शिवाय बाकीचीं सर्व द्रव्यें हिंदुस्थानांत विपुल आहेत, ही परिस्थिति काचेच्या धंद्यास अनुकूल अशी आहे.

बांगड्या करण्याचा व्यवसाय हा एक प्रकारचा घरगुती धंदा आहे. परंतु त्यांतल्या कृतींची परिस्थिति असमाधानकारक आहे. एका खोलींत लावलेल्या भट्टीच्या भोंवतीं अनेक माणसें काम करतात आणि धूर व उष्णता ह्यांचे योगानें त्यांचा जीव बेजार होत असतो. हे "बोलनवाले" चारचार तासांच्या पाळीनें काम करतात. त्यांच्या कामाच्या कृतींत सोप्या प्रकारच्या सुधारणा चालू करणें शक्य व इष्ट आहे.

काचेचे स्वदेशी कारखाने परदेशी मालाशी टक्कर देत आहेत परंतु बाटल्यांची आयात वाढत्या प्रमाणावर आहे. हा माल बहुतेक सर्व जपानमधून येतो आणि तो इतका स्वस्त विकला जातो कीं त्याच्याशीं स्पर्धा करणें हिंदी कारखानदारांस अशक्य आहे. दिव्यांच्या चिमण्यासारखे जिन्नस हिंदुस्थानांत चांगले विपुल होतात, पण काचेचे तक्ते व टेबलावर वापरावयाचे जिन्नस बाहेरूनच येतात.

कारखान्यांत ( ह्यांत घरगुती धंद्याचा समावेश केलेला नाहीं ) तयार होणाऱ्या बांगड्या आणि घरगुती, छोटेखानी उद्योगांस पुरवली जाणारी काच ह्यांचें वार्षिक उत्पादन सुमारें ३० लक्ष रुपयांचें होतें असा अंदाज आहे. माल स्वस्त पडावा ह्या उद्देशानें तो तयार करावा लागल्यामुळें त्यांत दोष रहातात. कारागीर व कामगार ह्यांचमध्यें वाकबगारीचा मुळींच अभाव नाहीं. अधिक कार्यक्षम देखरेख असेल तर जास्त चांगला माल निघणें शक्य आहे. बहुतेक सर्व स्वदेशी माल परदेशी मालाची नक्कल असते. हिंदी काचेंत सोडा ॲशचें प्रमाण जरूरीपेक्षां निष्करण जास्त असतें व लाइम कमी असतो. यामुळें माल कमी प्रतीचा निघतो. इतर कच्च्या मालाचा खर्च भिन्न भिन्न क्षेत्रांत वेगवेगळा असतो आणि तो रेल्वे वहातुकीच्या खर्चावर अवलंबून रहातो. इतर कच्च्या मालाच्या मानानें सोडा ॲशचा खर्च भारी असतो. पांढऱ्या काचेच्या पैदाशींत कोळशाचा खर्च जवर येतो, आणि हा खर्च तयार झालेल्या मालाच्या परिमाणाच्या भावानें ज्यास्त असतो. भट्ट्या सदोष असल्यानें उत्पादनकार्य काटकसरीनें होऊं शकत नाहीं. हिंदी कलेचा उपयोग विशिष्ट नवीन प्रकारच्या नमुन्याचा माल काढण्यांत केला जात नाहीं. सारांश, स्वदेशी काचेच्या मालाची उत्पत्ति सुधारून तिचा उत्पादन खर्च कमी करतां येणें शक्य आहे.


धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०
कडून
हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक
नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

*For All Medicinal Requisites*
— TRY —
N. MAHADEV & Co.
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner, POONA 2.

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी
टेलरिंग फर्म
पाटसकर आणि कंपनी
४८ निहाल पेठ, पुणें शहर.
सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व
तयार कपड्यांचे व्यापारी
आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% ( १९४०-४३ ) ... ... | ११०–१५ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०–१२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८–११ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९–१२ |
| ४% १९६०–७० ... ... | ११५—८ |
| ४% १९४३ ... ... ... | ११०–१४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९९–३½ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०७—४ |
| २¾% १९४८–५२ ... ... | १००—७ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११०—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १००—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रुव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | १११—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२३—४ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३३—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३६—६ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५८८–१२ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १०२—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९२२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉम्बे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १२% ) | १६०–१० |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २३०—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२७—८ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १६७८–१२ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५९०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १८८—२ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६४—४ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८७–१२ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७६३–१२ |


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं
असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १५ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( ,, सातारा ) | १६ विरमगांव ( ,, अहमदा |
| ३ इस्लामपूर ( ,, ,, ) | १७ धुळें ( ,, प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( ,, ,, ) | १८ दोंडाईचें ( ,, ,, ) |
| ५ तासगांव ( ,, ,, ) | १९ शिरपूर ( ,, ,, ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( ,, ,, ) | २० शहादें ( ,, ,, ) |
| ७ शिराळें ( ,, ,, ) | २१ नंदुरबार ( ,, ,, ) |
| ८ कोरेगांव ( ,, ,, ) | २२ साक्री ( ,, ,, ) |
| ९ अहमदनगर ( ,, अहमदनगर ) | २३ शिंदखेडें ( ,, ,, ) |
| १० शेवगांव ( ,, ,, ) | २४ मालेगांव ( ,, नाशिक ) |
| ११ कोपरगांव ( ,, ,, ) | २५ सटाणा ( ,, ,, ) |
| १२ भिवंडी ( ,, ठाणें ) | २६ कळवण ( ,, ,, ) |
| १३ पालघर ( ,, ,, ) | २७ दोहद ( ,, पंचमहाल ) |
| १४ कल्याण ( ,, ,, ) | २८ कालोल ( ,, ,, ) |

## खेळतें भांडवल रु. २००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी
स्वीकारल्या जातात
आणि
फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जे
दिलीं जातात.
शिवाय
इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा
व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

**Dawn of India's Insurance field-workers' Training Institute. Poona.**

**The training course will commence by the 1st of July 1936.**

Applications are invited from Matriculates for admission to the Training Institute. Candidates who join the Institute are also coached up for Advocate's examination.

Apply for Prospectus to:—

99, Laxmi Road, POONA. — D. V. Atre, B. A. (Hons.); LL. B. Principal.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**

च्या लोकप्रिय

प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

नळ, फ्लशिंगचे संडास, ड्रेनेज, फर्निचर, इत्यादींबद्दलच्या कामासाठीं

**श्री हर अँड को**



ह्यांस विचारा.

कोणतेंहि काम त्वरित व समाधानकारक केलें जातें.

डेक्कन जिमखान्यासमोर, पुणें ४.

प्रो. काळे ह्यांचें

'अर्थ' ग्रन्थ मालेंतील तिसरें पुस्तक

**व्यापारी उलाढाली**

महाराष्ट्रांत व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांचा उत्कर्ष व्हावा असें प्रत्येकास वाटतें, परंतु ह्या संबंधांत जे व्यवहार चालतात त्यांची माहिती फार थोड्या लोकांस असते. सामान्य जनतेस कमाईतून बचत करण्याची संवय लागून तीमधून निर्माण होणाऱ्या द्रव्यसंग्रहाचा उपयोग, व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या अभिवृद्धीकडे व्हावा, ह्याकरितां औद्योगिक व व्यापारी मंडळ्या ह्यांचे व्यवहार कसे चालतात, बाजारांत निरनिराळ्या प्रकारांच्या उलाढाली कशा होतात, इत्यादि विषयांचें ज्ञान महाराष्ट्रीय समाजांत पसरणें आवश्यक आहे. वृत्तपत्रांमध्यें व ऐकिवांत ह्या संबंधांत ज्या बातम्या येतात, त्यांचें रहस्य ओळखण्याची पात्रता लोकांमध्यें उत्पन्न झाली पाहिजे. हें ज्ञान महाराष्ट्रीय लोकांस सुगम रीतीनें व्हावें, ह्या उद्देशानें प्रस्तुत पुस्तक मुद्दाम लिहिलें आहे आणि त्याचा योग्य उपयोग जनता करून घेईल असा ग्रंथकर्त्यांस विश्वास वाटत आहे.

पृ० १४३—किंमत १ रुपया. ( ट. हं. वेगळें )

मिळण्याचीं ठिकाणें:—

( १ ) व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रंथमाला, पुणें ४.

( २ ) आर्यभूषण प्रेस, पुणें २.

( ३ ) दि को-ऑपरेटर्स बुक-डेपो, ९ बेकहौस लेन, फोर्ट, मुंबई.

**" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "**

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली

पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—

**कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.**

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
| --- | --- | --- |
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

**" अर्थ " ग्रन्थमाला**

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुर्डा घ. नं. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.


वर्ष २ | पुणें, बुधवार, तारीख १५ जुलै, १९३६. | अंक २९

विम्याचे कामास सुरुवात झाली
गुडवुइल ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड.
विमा-तज्ञ श्री. जी. एस. मराठे यांनीं अनेक कंपन्यांचे अनुभवावरून तयार केलेल्या खास योजना
—सर्व तऱ्हेच्या विम्यांची सोय—अत्यंत सुलभ अटी—
विमेदारांना कमी हप्ता पडण्याची आमच्या कंपनीची खास सवलत
आजच प्रॉस्पेक्टस् मागवून आपला विमा उतरा.
ठिकठिकाणीं एजंटस् नेमणेचे आहेत. भरपूर कमिशन मिळेल. चौकशी करा.
पोस्ट—मिरज मिशन हॉस्पिटल.
बी. व्ही. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "
स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—
कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.
अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी
हयातींतील विम्यास ३७॥ रु. | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास ४५ रु.
जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

" अर्थ " ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं. १ रु. ( ट. ख. निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !
ज्युनियर प्रभाकर
सेफ्टी स्टोव्ह
माहितीपत्रक मागवा
मेकर्सः–ओगले ग्लास वर्क्स. लि.
ओगलेवाडी, ( सं: औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः–
१ केळकर ब्रदर्स, बुधवार चौक.
२ म. इं. को. ऑ. एजन्सी, लक्ष्मीरोड.

# विविध माहिती

### १९३४ सालांतील कारखाने व कामगार

१९३४ सालीं हिंदुस्थानांत नोंदलेल्या कारखान्यांत त्या पूर्वीच्या सालापेक्षां २०३ नीं वाढ होऊन एकूण कारखान्यांची संख्या ९,७६१ झाली. त्यांत एकंदर १४ लक्ष ८७ हजार कामगार कामावर होते. मुंबई इलाख्यांत ३२ नवे कारखाने स्थापन झाले. सिंधमध्यें सक्करच्या धरणाचे आजूबाजूचे प्रदेशांत २४ जिनिंगच्या गिरण्या निघाल्या. फॅक्टरी ॲक्टाचें उल्लंघन करणाऱ्या कारखानदारांवर सरकारनें लक्ष ठेवल्याचें दिसतें, कारण १९३३ सालीं १,३२५ कारखानदारांना त्याबाबत शासन मिळालें होतें व अहवालाचे सालीं त्यांची संख्या १,४६८ झाली.

### ब्रिटिश जनतेचा अन्नाचा खर्च

ग्रेटब्रिटनमध्यें दरमहा दर माणशीं सुमारें २५ रुपये अन्नाप्रीत्यर्थ खर्च होतात. त्या राष्ट्रांतील लोकांच्या एकूण वार्षिक मिळकतीचा तिसरा हिस्सा अन्नासाठी खर्चला जातो.

### वाढप्याचें काम शिकविण्याची शाळा

लंडन कौंटी कौन्सिलनें वाढप्याचें काम शिकवण्याची एक शाळा लंडन येथें चालविली आहे व तीमध्यें शिक्षण घेण्यासाठी इतर युरोपिअन देशांतूनहि उमेदवार येतात. रेस्टॅारंटमध्यें वेटरचें काम करणारांस ह्या शाळेंत शिक्षण मिळतें. आचाऱ्याचें काम शिकावयाचा शिक्षणक्रम तीन वर्षांचा असून वाढपीकामाचा दोन वर्षांचा आहे. १४ ते २१ वर्षांच्या तरुणांस शाळेंत दाखल करून घेण्यांत येतें. सध्या ३५० विद्यार्थी तेथें शिक्षण घेत आहेत. शाळेंतून बाहेर पडणाऱ्या तज्ज्ञांस काम मिळण्याची पंचाइत पडत नाहीं. व्यवसायाच्या पूर्वतयारीवर केलेल्या खर्चाच्या मानानें पुढें बरी प्राप्ती होते, ह्यामुळेंच वाढप्यांस दोन वर्षे शिक्षण मिळवण्यांत घालवणें परवडतें, हें उघड आहे.

### हौरा पुलासाठी कर्ज

नव्या हौरा पुलाप्रीत्यर्थ कलकत्ता पोर्ट ट्रस्टनें १½ कोटि रुपयांचें कर्ज काढण्याची सरकारकडे परवानगी मागण्याचें ठरविलें आहे. ह्या पुलास एकूण ३,२२,४८,२०० रुपये खर्च येईल, असा अंदाज आहे.

### ग्रेट ब्रिटनमधील हिंदी विद्यार्थी

ब्रिटिश विश्वविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या ब्रिटिशेतर परंतु साम्राज्यांतील विद्यार्थ्यांची संख्या दरसाल सरासरीनें २,७०० भरते. त्यांपैकीं १,५०० विद्यार्थी हिंदी असतात व त्यांतील मुलींची संख्या शंभराचे आसपास असते.

### मुंबई शहरांतील युरोपिअन वस्ती

मुंबई शहरांतील युरोपियन वस्ती सुमारें ३१ हजार भरेल.

### दर तासाला एक हजार सिगारेट्स करणारीं यंत्रें

सिगारेट्स करण्याच्या एका प्रचंड आधुनिक यंत्रांतून दर मिनिटास एक हजार सिगारेट्स पूर्ण तयार होऊन बाहेर पडतात.

### हिंदी रेल्वेजचें उत्पन्न

हिंदुस्थान सरकारच्या मालकीच्या रेलवेजना १९३५-३६ सालीं ४ कोटि रुपये नुकसान आलें, असें नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या हिशेबावरून समजतें. सबंद वर्षभर रेलवेजचें उत्पन्न निराशाजनक होतें; फक्त शेवटच्या चार–पांच आठवड्यांत थोडी सुधारणा आढळून आली.

### अमेरिकन सरकारचीं विमानें

अमेरिकन सरकारच्या विमानखात्याकडे सध्या १,८०० विमानें आहेत, त्यांत २,३२० विमानांची भर टाकण्यांत याव-याची आहे.

### ॲबिसीनियांत आर्थिक पुनर्घटना

ॲडिस अबाबा येथें नवीन धंदे स्थापन करण्यांत येत आहेत, त्यांमध्यें संयुक्त भांडवलाच्या मंडळ्या आहेत. एक मोटार गराज काढण्यांत आलें आहे त्याचें नांव "साम्राज्य गराज" असें ठेवलें आहे.

### सारस्वत स्टोर्स, लि०

दादर (मुंबई) विभागांतील सारस्वत कुटुंबांच्या सोईसाठी वरील नांवाची सामुदायिक भांडवलाची मंडळी स्थापन झाली असून तिच्या दुकानांत औषधें, वर्तमानपत्रें, मासिकें व इतर सर्व नित्योपयोगी जिनसांची विक्री केली जाईल.

### हिंदी लष्करांतील सैनिकांचें आरोग्य

हिंदी लष्करामध्यें १९३४ सालीं एकूण २,०९७ हिंदी अधिकारी व १,१७,२७६ इतर सैनिकें होते. ब्रिटिश अधिकाऱ्यांची संख्या २३,३४४ होती व इतर ब्रिटिश सैनिक ५४,४२९ होते. अधिकाराच्या जागेवरील सैनिकांस आजारी पडून इस्पितळांत जाण्याचा प्रसंग इतर सैनिकांपेक्षां कमी वेळां येतो; परंतु हिंदी अधिकारी व सैनिक ह्या दोघांचेंहि ब्रिटिशांपेक्षां आरोग्य चांगलें राहिल्याचें खालील आकडे सांगतातः–

| | इस्पितळांत जाणाऱ्यांचें दरहजार संख्येशीं प्रमाण |
|---|---|
| ब्रिटिश अधिकारी | ४२९ |
| ,, सैनिक | ५७४ |
| हिंदी अधिकारी | ३३५ |
| ,, सैनिक | ४५६ |

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. ४ जुलै रोजीं पुरा झालेला आठवडा | ४८,३५,८७० |
| ता. ११ जुलै रोजीं पुरा झालेला आठवडा | १,४२,३७,४२१ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते ११ जुलै १९३६ अखेर | २,७६,१७,४५,६४८ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३४६ | बँके को. क्वार्टर्ली | |
| २ साखरेचे महाराष्ट्रीय कारखाने ... | ३४७ | ६ आर्थिक मंदी व आंतरराष्ट्रीय प्रवास ... | ३५१ |
| ३ मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीची माहिती | ३४८ | ७ हिंदी व्यापारी धोरणाबाबत खुलासा ... | ३५१ |
| ४ एडन ... | ३४८ | ८ पुणें जिल्हा लँड मॉर्गेज बँक .. | ३५२ |
| ५ स्फुट विचार ... | ३४९ | ९ राजकारण आणि अर्थकारण ... | ३५३ |
| स्वदेशी काचेचा धंदा—परदेशांतील शिक्षणावर व्यर्थ खर्च—त्रावणकोर संस्थानचें कर्ज—एशियन विमा कंपनी—पुणें मर्चंट्स को. बँक—उत्पादक मालाच्या निर्गतीवर बंधन— | | १० हौरा पुलाचें कंत्राट | ३५३ |
| | | ११ म्युनिसिपालट्यांचा कारभार कसा सुधारेल ! | ३५३ |
| | | १२ निवडक बाजारभाव | ३५४ |



# अर्थ

बुधवार, ता. १५ जुलै, १९३६


## साखरेचे महाराष्ट्रीय कारखाने

### बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटची तयारी

स्वदेशी चळवळींत ज्या कित्येक जिनसांवर भर देण्यांत येत असे त्यांमध्यें साखरेस महत्त्वाचें स्थान प्राप्त झालेलें होतें ही गोष्ट अनेकांच्या ध्यानांत असेल. आपल्या देशांत तयार झालेल्या शुद्ध साखरेचा पुरवठा मागणीच्या मानानें तोकडा असे आणि त्या कारणानें स्वदेशी-भक्तांची निराशा होई. जाव्हामधून येणारी शुभ्र साखर बाजारांत स्वस्त विकली जाई आणि तिच्याशी स्वदेशी साखरेचा टिकाव लागत नसे. हिंदुस्थानांत वापरल्या जाणाऱ्या एकूण साखरेपैकीं तीनचतुर्थांश माल जाव्हासारख्या परदेशांतून येत असे. हिंदुस्थान देशांतली जमीन व हवापाणी उंसाच्या व साखरेच्या उत्पादनास अत्यंत अनुकूल व हा देश साखरेचें माहेरघर असें असतांनाहि भांडवल, यंत्रसामुग्री व संघटन ह्यांच्या सहायानें जाव्हांतल्या मळेवाल्या कारखानदारांनीं आमच्यावर मात केली, ही परिस्थिति हिंदी राष्ट्रास खचित भूषणावह नव्हती. सरकारनें ह्या बाबतींत पुढाकार घेऊन स्वदेशी साखरेच्या धंद्यास ऊर्जितावस्था आणावी अशी मागणी अनेक वर्षे करण्यांत येत होती आणि न्यायमूर्ती रानडे ह्यांनीं त्या प्रश्नाकडे जनता व सरकार ह्यांचें लक्ष्य वेधलें असल्याचें आम्हीं गेल्या वर्षी त्यांच्या लेखांचा सारांश "अर्था" त प्रसिद्ध करून निदर्शनास आणलें होतें. हिंदुस्थान सरकारच्या विद्यमानें शेतकी संशोधनाचें कार्य करीत असलेल्या मंडळानें अखेर हा प्रश्न धसास लावला आणि मध्यवर्ती कायदेमंडळामें टारिफ बोर्डाच्या शिफारसविरून स्वदेशी साखरेच्या धंद्यास जकातीचें भरपूर संरक्षण दिलें. त्याचा सुपरिणाम होऊन हिंदुस्थानांत पांचसहा वर्षांत अनेक कारखाने निघाले आणि साखरेच्या बाबतींत हिंदुस्थान देश आतां पूर्णपणें स्वावलंबी बनला आहे. संरक्षक जकातीमुळें अनुकूल परिस्थिति निर्माण झाली, तिचा भरपूर फायदा संयुक्तप्रांत व बहार ह्यांनीं घेतला आणि हिंदी साखरेच्या कारखान्यांची वाढ त्या प्रांतांत झपाट्यानें होऊन आपला माल दूरदूरच्या प्रांतांत खपवण्याची आवश्यकता व अडचण त्यांस भासूं लागली आहे.

महाराष्ट्रांतील कारखानदारांनीं ह्या भागांतल्या विशेष अनुकूल परिस्थितीचा फायदा घेऊन उंसाची पैदास व साखरेचें उत्पादन नेटानें चालविलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे. कोणताहि नवा धंदा यशस्वी होण्यास उत्पादन खर्च बेताचा आणि मालाचा पुरेसा खप होण्यास भरपूर वाव ह्या गोष्टी प्रामुख्यानें आवश्यक असतात. उत्तर हिंदुस्थानांत ऊंस माफक खर्चानें तयार होतो ही त्यांस विशेष अनुकूल अशी महत्वाची बाब आहे. महाराष्ट्रांत पाणी पुरवठ्याचा वगैरे खर्च ज्यास्त होतो, पण येथें नवीन सुधारलेल्या जातींचा ऊंस लावण्यांत येत आहे त्याचें पीक दर-एकरी ज्यास्त येऊन त्यांत उत्तर हिंदुस्थानी उंसापेक्षां साखरेचा अंश अधिक असतो. ह्या कारणानें एका बाजूची उणीव दुसऱ्या बाजूनें बहुतेक भरून निघते. त्याचप्रमाणें, महाराष्ट्रांतले साखरेचे कारखाने हवापाण्याच्या वैशिष्ट्यामुळें अधिक काळपर्यंत चालू ठेवतां आल्यानें त्यांत घातलेल्या भांडवलावर अधिक साखर व फायदा काढतां येतो. महाराष्ट्राच्या उत्पादनशक्तीच्या मानानें त्याच्या क्षेत्रांत व बाजारपेठांच्या टापूंत साखरेच्या खपास वाव अजून कितीतरी असल्यानें कारखाने व त्यांचें गिऱ्हाइक ह्यांच्या परस्पर-सान्निध्याचा फायदा त्यांस मिळूं शकतो आणि बाहेरच्या चढाओढीची भीति फारशी उरत नाहीं. महाराष्ट्रीय कारखान्यांत गाळला जाणारा ऊंस त्यांच्या स्वतःच्या मालकीचा व सान्निध्यांत असल्यानें लागवडीच्या व इतर खर्चांतली कूस बाहेर न जातां त्यांसच मिळते. महाराष्ट्रांतल्या उंसाचा विशेष कसदारपणा आणि त्यांतल्या साखरेचा उंच प्रतीचा उतारा ह्या गोष्टी सांगावांगीच्या नसून आतां प्रत्यक्ष अनुभवाच्या झाल्या आहेत आणि त्या विषयींची खात्री कोणासहि सहज करून घेतां येण्यासारखी आहे. बेलापूर, बेलवंडी, रावळगांव, फलटण, कळंब, अकलूज, कोल्हापूर ह्या ठिकाणीं चाललेले कारखाने पाहून साहस, संघटन व भांडवल उपलब्ध असतां महाराष्ट्रीयांस आपल्या प्रदेशांतल्या नैसर्गिक परिस्थितीचा धनोत्पादनाचे कामीं उत्कृष्ट उपयोग करतां येऊन शेतकरी व कामकरी लोकांस पोटाचा नवीन धंदा कसा देतां येतो ह्याची प्रचीति सर्वांस येईल. निरेच्या नवीन कालव्याचे काठीं सरकारनें मुद्दाम राखून ठेवलेल्या जमिनीच्या गटांतली उत्कृष्ट जमीन बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटनें मिळवली आहे व तीमध्यें उंची जातींच्या उंसाची लागवड केली आहे. ह्या व इतर बाबींतली आपल्या कारखान्याची सर्व पूर्व-तयारी शुगर सिंडिकेटनें जय्यत केली असून विलायतेहून आणावयाच्या यंत्रसामुग्रीस लागणाऱ्या भांडवलाबद्दल जनतेकडे मागणी केली आहे. वर वर्णिलेली साखरेच्या महाराष्ट्रीय कारखान्यांविषयींची आशाजनक परिस्थिति आणि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटनें आपल्या कारखान्याबाबत केलेली पद्धतशीर पूर्व-तयारी लक्ष्यांत घेऊन ह्या मंडळीच्या प्रयत्नास सहाय करणें हें महाराष्ट्रीयांचें कर्तव्य आहे. सिंडिकेटला तीन महिन्यांच्या अवधींत यंत्रसामुग्रीस लागणारें भांडवल मिळालें पाहिजे. मोठ्या प्रमाणावरील नव्या धंद्यांत वेळ साधण्याचें विशेष महत्त्व असतें ही गोष्ट महाराष्ट्राच्या औद्योगिक उन्नतीच्या चहात्यांनीं ध्यानांत ठेवावी.

## मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीची माहिती*

(२)

१९३४–३५ सालीं सहकारी सोसायट्यांच्या संख्येंत होणारी घट मंदावली व त्यांच्या सभासदांचे संख्येंत, खेळत्या भांडवलांत व रिझर्व्ह फंडांत वाढ झाली, हें खालील कोष्टकावरून ध्यानांत येईल. थकबाकीचे बाबतींतहि सुधारणा घडून आली आहे.

सहकारी चळवळीची प्रगति

| | १९३४-३५ | | १९३३-३४ | |
|---|---|---|---|---|
| | वाढ | घट | वाढ | घट |
| सोसायट्यांची संख्या | ... | ४६ | ... | ६४ |
| सभासदांची ,, | २९,४७२ | ... | ७,३१२ | ... |
| खेळतें भांडवल (रु.) | ६५ लक्ष = ३·३% | ... | ३६ लक्ष = २·३% | ... |
| रिझर्व्ह फंड (रु.) | २८½ लक्ष = १९·९% | ... | २४½ लक्ष = २०·१% | ... |
| थकबाकी (रु.) | ... | ३६¾ हजार = १·१% | ... | १७ल. २०ह. = ५·३% |

सोसायट्यांच्या स्वतःच्या भांडवलसंबंधांतली माहिती खालील कोष्टकांत दिली आहे:—

सोसायट्यांचें स्वतःचें भांडवल

| | भागांचें भांडवल | सभासदांच्या ठेवी | रिझर्व्ह फंड | एकूण |
|---|---|---|---|---|
| | लक्ष रु. | लक्ष रु. | लक्ष रु. | लक्ष रु. |
| सेंट्रल बँका | ४८ | ३७२ | २९ | ४४९ |
| शेतकी सोसायट्या | ४० | ५३ | ८४ | १७७ |
| बिगर-शेतकी सोसायट्या | १३४ | २८४ | ६२ | ४८० |
| एकूण (१९३४–३५) | २२२ | ७०९ | १७५ | १,१०६ |
| एकूण (१९३३–३४) | २०४ | ६६२ | १४६ | १,०१२ |

सहकारी चळवळीमधील एकूण भांडवल एका वर्षांत ९४ लाखांनीं वाढून तें ११ कोटि ६ लक्ष रुपये झालें. त्यापैकीं भागांचें भांडवल व रिझर्व्ह फंड मिळून सुमारें ४ कोटींची रकम होते. सहकारी मालकीच्या ह्या भांडवलामुळें चळवळीस स्थैर्य प्राप्त होऊन सध्याच्या बिकट परिस्थितीसहि ती तोंड देऊं शकत आहे.

शेतकऱ्यांच्या प्राथमिक पतपेढ्यांची संख्या अजूनहि घटत असल्याचें १९३४-३५ च्या आंकड्यांवरून दिसून येतें. तथापि नव्या सोसायट्यांच्या नोंदणीसंबंधांतील लोकांची मागणी पुरी झाल्यास एकूण संस्थांची संख्या पूर्वीप्रमाणें होईल, अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. ह्या बाबतचे १९३४-३५ सालांतील परिस्थिति दर्शवणारे ठोकळ आंकडे येथें दिले आहेत:—

*ह्या विषयावरील पहिला लेख ता. १ जुलैच्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे.

शेतकी प्राथमिक पतपेढ्या

| | १९३४-३५ | | १९३३-३४ | |
|---|---|---|---|---|
| सोसायट्यांची संख्या | ४,४६५ | | ४,५०२ | |
| सभासदांची संख्या | २,२७,४५८ | | २,३६,८६९ | |
| | लक्ष | हजार | लक्ष | हजार |
| खेळतें भांडवल | ३७५ | ५४ | ३८७ | ३९ |
| त्यांपैकीं स्वतःचें | १५८ | २९ | १६० | ०३ |
| | = ४२ टक्के | | = ४८ टक्के | |
| | लक्ष | हजार | लक्ष | हजार |
| रिझर्व्ह फंड | ७६ | ०३ | ७० | ८९ |
| सभासदांच्या ठेवी | ४८ | ९५ | ५८ | ५२ |
| भागांचें भांडवल | ३३ | ३० | ३० | ६२ |

## एडन

आज सुमारें शंभर वर्षें हिंदुस्थानाशी राज्यव्यवस्थेच्या सोईसाठी निगडित झालेल्या एडन ह्या चिमुकल्या प्रदेशाची व्यवस्था साम्राज्य सरकार आपणा स्वतःकडे १ एप्रिल १९३७ पासून घेणार असल्याचें जाहीर झालें आहे. एडन हें शहर अरबस्तानाचे दक्षिणेस तांबड्या समुद्राच्या तोंडाशी वसलेलें असून सुएझ कालव्यामधून जाणाऱ्या-येणाऱ्या बोटींचें कोळसा घेण्याचें हें एक महत्त्वाचें ठिकाण आहे. पूर्व आफ्रिकेमधून निर्गत होणारा कोळसा ह्याच बंदरांतून बोटींवर चढविला जातो. एडन शहर, पेरिम बेट व आजूबाजूचा मुलूख मिळून सुमारें ७५ चौरस मैलांचा हा टापू असून त्याची लोकसंख्या ४८,००० आहे. १८३९ सालीं इंग्रजांनीं एडन आपल्या ताब्यांत घेतलें. त्यावेळीं तांबडा समुद्र व भूमध्य समुद्र ह्यांस जोडणारा सुएझचा कालवा खोदण्यांत आलेला नव्हता. १८६९ सालीं हा जलमार्ग पुरा होऊन स्वाभाविकपणेंच त्याचें व्यापारी व राजकीय महत्त्व वाढलें आणि त्यामुळें एडन हें नाकें आपल्या ताब्यांत ठेवणें इंग्रजांस जरूर झालें.

१९३२ सालीं एडनची मुंबई इलाख्यापासून फारकत करण्यांत येऊन त्याचा ताबा हिंदुस्थान सरकारकडे गेला. आतां, येत्या एप्रिलपासून, हिंदुस्थान व एडन ह्यांचा परस्पर संबंध सुटणार असून एडनची व्यवस्था ब्रिटिश वसाहतमंत्र्यांकडे जाणार आहे. तथापि, मुंबई हायकोर्टाकडे एडनच्या सुप्रीम कोर्टाच्या निकालावर अपील करतां येणार आहे. हिंदी व्यापाऱ्यांची एडन येथें वसाहत असून त्यांपैकीं कित्येक व्यापारी मिठाच्या व्यापारांत गुंतलेले आहेत. एडन मधून हिंदुस्तानांत मिठाची मोठ्या प्रमाणावर आयात होते. आतां हिंदुस्थानापासून एडन अलग झाल्यानें ह्या मिठावर जकात द्यावी लागेल. ह्या मिठाचे व्यापारांत विशेषतः मुंबईच्या व्यापाऱ्यांचे हितसंबंध असून ते व्यापारी मिठाच्या आयातीसंबंधांत सवलती मागण्याचा संभव आहे व त्यामुळें इतर प्रांतांस त्यास विरोध करणें अपरिहार्य होईल. भूमध्य समुद्राच्या आसपासच्या प्रदेशांत सध्या राजकीय स्थित्यंतरें होत असल्यानें एडनचें लष्करीदृष्ट्या महत्त्व वाढलें आहे. एडनच्या नव्या राज्यव्यवस्थेची जबाबदारी एका गव्हर्नरावर सोपविण्यांत यावयाची असून त्याच्या मदतीस एक कार्यकारी मंडळ देण्यांत येईल. त्यांतील सभासदांची संख्या किती असावी, हें ठरलेलें नाहीं. सध्यां एडनप्रीत्यर्थ हिंदुस्थानचे दर वर्षीं १६ लक्ष रुपये खर्च होतात, त्या खर्चाची जबाबदारी ह्या पुढें ब्रिटिश सरकारावर पडणार आहे.

## स्फुट विचार

### स्वदेशी काचेचा धंदा

इंडस्ट्रिअल रिसर्च ब्यूरोचे असिस्टंट डायरेक्टर, मि. डिक्सन, ह्यांनीं हिंदी काचेच्या धंद्याबाबत चौकशी करून आपले विचार आणि सूचना प्रसिद्ध केल्या आहेत, त्यांचा सारांश आम्हीं गेल्या अंकांत दिला आहे. बंगाल प्रांतांतल्या स्वदेशी काचकारखानदारांच्या मंडळाचे अध्यक्ष, मि. सेन, ह्यांनीं मि. डिक्सन ह्यांच्या रिपोर्टावर टीका केली आहे. तिच्यांतले महत्त्वाचे मुद्दे लक्षांत घेण्याजोगे असल्यानें त्यांचा निर्देश येथें करीत आहों. स्वदेशी काचकारखान्यांतल्या भट्ट्या चांगल्या नसतात, त्यांस जळणाचा खर्च जास्त येतो व उष्णता हवी तशी उत्पन्न होत नाहीं, ह्या मि. डिक्सन ह्यांनीं वर्णिलेल्या असमाधानकारक परिस्थितीची कारखानदारांस पूर्ण जाणीव आहे. पण त्यांचें म्हणणें असें आहे कीं, सुधारलेल्या भट्ट्या लावण्यास मूळ खर्च फार येतो आणि तो आपल्या आंवाक्याच्या बाहेरचा असतो. ज्यास्त उत्पादक व कार्यक्षम भट्ट्यांच्या ऐवजीं जपानी तऱ्हेच्या भट्ट्या देशी कारखानदार उपयोगांत आणतात, याचें कारण त्यांस खर्च व मेहनत कमी लागते हें होय. देशी कारखाने लहान प्रमाणावर चालवण्यांत येतात आणि सध्यांच्या स्पर्धेच्या काळांत त्यांमध्यें सुधारलेल्या नमुन्यांच्या भट्ट्यांस लागणारें भांडवल किफाइतशीरपणानें गुंतवणें परवडत नाहीं ही गोष्ट मि. डिक्सन ह्यांच्या निदर्शनास स्पष्टपणें कलकत्त्यांत आणलेली होती, पण तिचा उल्लेख त्यांनीं आपल्या रिपोर्टांत केलेला नाहीं अशी मि. सेन ह्यांची तक्रार आहे. सरकारनें देशी काचेच्या धंद्यास योग्य संरक्षण दिल्यास अधिक भांडवल घालून त्यांत सुधारणा घडवून आणणें शक्य होईल; पण कारखानदारांच्या ह्या मागणीकडे दुर्लक्ष झालें आहे. उंची तऱ्हेचा किंवा नवीन नमुन्यांचा माल हिंदी काचकारखान्यांत निघत नाहीं ह्या टीकेसहि स्वदेशी धंद्याचें दारिद्र्य, त्यास सहन करावी लागणारी परदेशी मालाची स्पर्धा आणि सरकारी सहायाचा अभाव हींच कारणें आहेत असें मि. सेन यांचें उत्तर आहे. हिंदी कारखान्यांत दिव्यांच्या चिमण्या वगैरे माल पुष्कळ निघतो व त्यास चांगला खप आहे ह्या विधानांत थोडी अतिशयोक्ति आहे व तो माल काढणें सोपें असल्यानें प्रत्येक कारखानदार तिकडेच लक्ष देतो असें त्यांचें म्हणणें आहे. सरकारी सहानुभूतीची ऊब असल्यावांचून स्वदेशी काचेच्या धंद्यांत सुधारणा होऊन त्याची उन्नति होणार नाहीं असा त्यांच्या टीकेचा निष्कर्ष आहे. पण हा सरकारच्या धोरणाचा प्रश्न असल्यानें आपण त्यांत शिरलों नाहीं असें मि. डिक्सन उत्तर देणार हें उघड आहे. यांत्रिक व व्यावहारिक दृष्टीनें आपण देशी काचकारखान्यांची पहाणी करून सूचना केल्या आहेत, इतर बाबींचा विचार व निर्णय सरकार व कारखानदार ह्यांनीं करावयाचा आहे, ही त्यांची भूमिका असणें साहजिक पण गैरसमज उत्पन्न करणारी आहे.

### परदेशांतील शिक्षणावर व्यर्थ खर्च !

एकट्या ग्रेटब्रिटनमध्यें दरसाल सरासरीनें पंधराशे हिंदी विद्यार्थी निरनिराळ्या संस्थांमध्यें शिक्षण घेत असतात. त्यांचा वेळ, शक्ती व पैसा ह्यांचा सदरहु कामीं विनियोग होण्यापासून फारसें हित होत नाहीं अशी टीका ऐकूं येऊं लागली आहे. खुद्द हिंदुस्थानांतील उच्च शिक्षणाचे बाबतींत अशा प्रकारची टीका होत असतां परदेशांत आमच्या तरुणांचा काळ व त्यांच्या पालकांचा पैसा फुकट जावा हें अनिष्टच वाटण्यासारखें आहे. कित्येक बाबतींतलें शास्त्रीय व व्यावहारिक शिक्षण हिंदुस्थानांत मिळूं शकत नाहीं. तें बाहेरील देशांत पैदा करणें हिंदी राष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीनें आवश्यक आहे ह्यांत शंका नाहीं आणि ह्या कामीं झालेल्या खर्चाचा पूर्ण मोबदला व्यक्तींस व राष्ट्रास त्यांच्या उन्नतीस होणाऱ्या सहायाच्या स्वरूपांत निश्चयानें मिळेल. परंतु पाश्चात्य देशांतील शिक्षण-संस्थांच्या पदव्यांस कायमची किंमत रहाणें शक्य नाहीं आणि त्यांची व्यावहारिक उपयुक्ततेच्या दृष्टीनें छाननी होणें अपरिहार्य आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. हिंदुस्थानच्या इंग्लंडमधील हाय कमिशनरच्या शिक्षणखात्याचे मुख्य, डॉ. केल, ह्यांनीं ब्रिटिश शिक्षणसंस्थांत होणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांच्या गर्दीचा उल्लेख करून तिच्या उपयुक्ततेविषयीं शंका प्रदर्शित केली आहे. विलायतेंत जाणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांपैकीं अनेकांस हिंदुस्थानांत राहून कमी खर्चानें आपला शिक्षणक्रम पुरा करतां येईल आणि त्यांच्या पालकांचा वाया जाणारा पैसा वांचेल असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला आहे तो चिंतनीय आहे. विलायती पदव्यांस एका काळीं कांहीं विशिष्ट कारणांमुळें सरकारांत व बिनसरकारी संस्थांत खास मान्यता होती, ती तशी आतां उरलेली नाहीं ह्याचा अनुभव अनेक तरुणांस प्रत्यक्ष आला आहे. नोकरी देणें ज्यांच्या हातांत आहे अशा लोकांनीं विलायती पदव्यांस कृत्रिम किंमत देऊन हिंदी पदव्या धारण करणाऱ्या लायक व पात्र तरुणांचा हिरमोड करूं नये व परदेशांतील शिक्षणाचें अवास्तव स्तोम माजवूं नये. सारासार विचाराचा व तारतम्याचा आणि विलायती शिक्षणाचा खर्च व त्यापासून होणारें राष्ट्रहित ह्यांच्या आढाव्याचा हा प्रश्न आहे. बाहेरच्या देशांत जाऊन तेथून कांहीं तरी भरीव घेऊन येण्याची पात्रता व धमक ज्यांमध्यें असेल अशा तरुणांच्या उत्साहाचा भंग होऊं नये, हें उचित आहे. परंतु परराष्ट्रीय शिक्षण-संस्थाच्या पदव्यांत कांहीं विशेष आहे अशी भ्रामक समजूत कोणीहि करूं नये व करून घेऊं नये आणि तो केवळ फॅशनचा किंवा नादाचा विषय होऊं नये ह्याबद्दल खबरदारी घेणें जरूर आहे.

### त्रावणकोर संस्थानचें कर्ज—जरूरीच्या पांचपट मागणी

त्रावणकोर दरबारनें ३½ टक्के दरानें ५० लक्ष रुपयांचें कर्ज काढण्याचें जाहीर केलें होतें. कर्ज १९५६ च्या मुदतीच्या परत फेडीचें असून त्यास अखिल हिंदुस्थानांतून मागणी आली. दरबारास ५० लक्ष रुपये हवे होते आणि लोकांची मागणी २ कोटी ८० लक्ष रुपयांची भरली. त्या कारणानें कर्जरोख्यांची विक्री तात्काळ बंद करण्यांत आली आणि मागणीदारांस आतां हिस्सेरशीनें रोखे वांटून दिले जातील. वीस वर्षें मुदतीचें कर्ज व त्यावरील व्याजाचा दर ३½ टक्के अशी स्थिति असतांहि त्रावणकोर संस्थानच्या कर्जावर लोकांच्या उड्या पडल्या ह्यावरून देशांत आर्थिक मंदी किती आहे, ह्याची कल्पना येते. बँका, विमा कंपन्या व पैसेवाले लोक ह्यांस आपली शिल्लक गुंतवण्यास वाव राहिलेला नाहीं. हिंदुस्थान सरकारनें आपल्या रोख्यांवरचा आणि सेव्हिंग्ज बँकेचा व कॅश सर्टिफिकिटांचा व्याजाचा दर उतरवला आहे. अशा स्थितींत लांब मुदतीच्या रोख्यांत ३½ टक्के व्याज घेऊन त्यावर संतुष्ट रहाण्यास लोक तयार झाले आहेत. ह्यापुढें कांहीं

वर्षेपर्यंत व्याजाचे सर्वसाधारण दर फारसे चढणार नाहींत, अशीहि कल्पना लोकांत पसरली असावी. तथापि, मुख्यत्वेंकरून तुरुतदान महापुण्य ह्या न्यायानेंच हलक्या व्याजाच्या दरानें आपला पैसा लांब मुदतीच्या रोख्यांत गुंतवण्याची प्रवृत्ति पैसेवाल्या मंडळीमध्यें उत्पन्न झाली आहे ह्यांत शंका नाहीं. पैशाच्या बाजारांत त्रावणकोर दरबारची पत मोठी आहे ही गोष्टहि त्यास मिळालेल्या कर्जाचे बाबतींतल्या विशेष यशानें सिद्ध झाली आहे.

---

### दि एशिअन ॲशुअरन्स कं. लि.

वरील कंपनीच्या ३१ डिसेंबर १९३५ अखेरच्या अहवालावरून कंपनीनें आपली प्रगति कायम ठेविली असल्याचें दिसत आहे. ह्या वर्षी ७६½ लाखांचें नवें काम तिनें पुरें केलें असून तिच्यामध्यें आतां २½ कोटींपेक्षा ज्यास्त किंमतीचे विमे चालू आहेत. वर्षाचे सुरवातीस लाइफ फंडांत ३४ लक्ष रुपये होते; सालअखेर ह्या फंडाची रकम सुमारें ४३ लक्ष रुपये झाली आहे. कंपनीनें वैयक्तिक तारणावर फारच थोडी रकम—सुमारें ४००० रु. दिलेली आहे. सुमारें २० लक्ष रुपये सरकारी व निमसरकारी रोखे आणि मंडळयांचे भाग व डिबेंचर्स ह्यांत गुंतविलेले आहेत. कंपनीचे ॲक्चुअरी, श्री. मराठे, ह्यांनीं मूल्यमापनाचे वेळीं खर्चाचें प्रमाण ज्यास्त धरून व कंपनीस पडलेल्या व्याजाचे दरापेक्षा कमी दरानें हिशेब करूनच ४½ लाखांचा वाढावा दाखविलेला आहे. ह्या कारणानें विमेदारांच्या अंतिम हिताकडे व बोनसच्या रूपानें त्यांस मिळावयाच्या नफ्याकडे, दोन्हींकडे लक्ष पुरविलें गेलें आहे. विमेदारांना हयातीनंतरचे विम्यांवर व इतर विम्यांवर अनुक्रमें दरसाल दर हजारीं १५ व २० रुपये बोनस मिळालें आहे. कंपनीच्या भागीदारांस ६% अधिक ४% रौप्यज्युबिली बोनस मिळून १०% डिव्हिडंड वाटण्यांत आलें. विम्याच्या हप्त्यांचे दर लक्षांत घेतां, ह्यापेक्षा ज्यास्त दर असणाऱ्या कंपन्यांचेपेक्षाहि एशियन मोठें बोनस देऊं शकते, ह्याबद्दल कंपनीच्या ॲक्चुअरींनीं तिचें अभिनंदन केलें आहे. वाढती स्पर्धा, उतरते व्याजाचे दर, इत्यादि अडचणींतून मार्ग काढून कमी खर्चांत ज्यास्त काम मिळविणें ही गोष्ट सोपी नाहीं. कंपनीच्या हप्त्यांच्या उत्पन्नाशी तिच्या खर्चाचें पडणारें प्रमाण उतरत असून गेल्या तीन वर्षांत तिनें नवीन काम चांगलें मिळविलें आहे. कंपनीचे अध्यक्ष, श्री. जम्नादास मेहता, ह्यांनीं आपल्या भाषणांत कंपनीच्या धोरणासंबंधीं खुलासा केला. ते म्हणाले, " ज्यास्त ज्यास्त बोनस देत जाणें अदूरदर्शीपणाचें आहे. विशेषत: सध्या व्याजाचे दर उतरले आहेत व त्या कारणानें गुंतविलेल्या रकमांवर पहिल्या प्रमाणें व्याज सुटणें संभवनीय नाहीं. तेव्हां आपली मजबुती कायम राखणें हेंच श्रेयस्कर आहे. आपल्या ॲक्चुअरीनें मूल्यमापन करतेवेळीं कमी व्याजाच्या दरानें हिशेब केला आहे, इतकेच नव्हें, तर खर्चाचें प्रमाणहि आहे त्यापेक्षा ज्यास्त धरलें आहे. शेवटीं हें आमचें सावधगिरीचें धोरणच शहाणपणाचें ठरेल. ज्यास्त काम मिळविण्याच्या अभिलाषानें खर्चाकडे न पहाणारास पस्तावावें लागेल, अशी भीति आहे."

---

### पुणें मर्चंट्स कोऑपरेटिव्ह बँकेची द्वादश वार्षिक प्रगति

ह्या बँकेचा मुख्य उद्देश लहान व मध्यम दर्जाच्या व्यापारी लोकांस भांडवल पुरवून त्यांच्या व्यवहारांस सहाय करणें हा आहे. तिला आतां बारा वर्षें पुरीं होत आहेत. ह्या प्रसंगानिमित्त गेल्या रविवारीं सभासदांचें एक संमेलन भरवण्यांत आलें होतें. त्याच्या कार्यक्रमांतला एक भाग म्हणून सायंकाळीं अहवालवाचन व भाषणें झालीं. त्यांत बँकेनें केलेल्या गेल्या बारा वर्षांतल्या कामगिरीचा आढावा घेण्यांत आला आणि पुढील कार्याचें दिग्दर्शनहि झालें. श्री. तात्यासाहेब केळकर, असि. रजिस्ट्रार श्री. भागवत व प्रो. काळे ह्यांचीं भाषणें झालीं, त्यांत शहरांतल्या सहकारी बँकांनीं जुटीनें वागून आपल्या सभासदांच्या गरजा व अडचणी ह्यांचेकडे विशेष लक्ष पुरवलें पाहिजे ह्या मुद्यांवर जोर देण्यांत आला. मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या चालकांनीं संमेलन भरवून संस्थेच्या सभासदांचें स्नेहसंवर्धन घडवून आणण्याचा उपक्रम केला त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें, पुढें आपणांस पुष्कळ कार्य करावयाचें आहे ह्याच्या जाणीवेची जागृति उत्पन्न करून त्या संबंधांतलीं तत्त्वें आणि पद्धति ह्यांची चर्चा करण्याची संधि त्यांनीं सभासदांस व हितचिंतकांस आणून दिली, हें बँकेच्या भावी उत्कर्षाचें द्योतक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँकेची उत्तरोत्तर प्रगति होवो असें आम्ही मन:पूर्वक इच्छितों.

---

### बाँबे को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा जून १९३६ चा अंक प्रसिद्ध झाला आहे, त्यामध्यें मुंबई इलाख्यांतील दुय्यम धंदे, जमीन-गहाणाच्या बँका वि. सेंट्रल बँका, मुंबई डेक्कनमधील हस्तव्यवसाय व सहकार, इत्यादि वाचनीय लेख आले असून अभिप्राय, संपादकीय स्फुटें, सहकारविषयक माहिती, पत्रव्यवहार, आंतरराष्ट्रीय विभाग, इन्स्टिट्यूटचें कार्य, रजिस्ट्रारचीं सर्क्युलरें व सरकारी ठराव इत्यादि नेहमींचीं सदरेंहि माहितीपूर्ण अशींच आहेत. त्यामुळें अंक वाचनीय झाला आहे.




नवीन फणसपोळी

व

मसाल्याची चटकदार

ऑफिस सुपारी

मिळण्याचें खात्रीचें ठिकाण:

कुलकर्णी आणि मंडळी.

लोणी व किराणा दुकान

सदाशिव पेठ, फडतरे चौक,

पुणें, २.



## आर्थिक मंदी व आंतरराष्ट्रीय प्रवास

आर्थिक मंदीमुळें लोकांच्या उत्पन्नांत घट होते व प्रथम अनावश्यक खर्चाची छाटाछाट करण्याची त्यांची प्रवृत्ति असते. आवश्यक खर्चास जरूर तेवढे पैसे बाजूस ठेवून उरलेल्या रकमेचा विनियोग चैनीकडे व बचत करण्याकडे होतो. सध्याच्या मंदीमुळें श्रीमंत लोकांच्या चैनीसहि आळा बसला असल्याचें दिसतें. १९२९ सालीं अमेरिकेंतील लोकांनीं परदेशगमनाप्रीत्यर्थ सुमारें २५० कोटि रुपये खर्च केले; १९३४ सालीं हा आंकडा ५०-५५ कोटींवर घसरला! जर्मनीच्या बाबतींतहि असेंच झालें आहे. १९२९ सालीं जर्मन प्रवाशांनीं जर्मनीबाहेर सुमारें २१ कोटि रुपये नेले; १९३३ सालीं ७ कोटि रुपयेहि बाहेर खर्च झाले नाहींत! १९२९ सालीं फ्रान्सला परराष्ट्रांतील पाहुण्यांकडून ११० कोटि रुपये मिळाले; १९३३ सालीं पुन्या ३५ कोटींची सुद्धां प्राप्ति झाली नाहीं. ऑस्ट्रिया, स्वित्सरलंड इत्यादि देश परदेशांतील पाहुण्यांचे सत्कारावर बराच पैसा मिळवितात व त्यांचेंहि फार नुकसान झालें आहे.

आर्थिक मंदीप्रमाणें इतरहि कांहीं कारणें आंतरराष्ट्रीय प्रवास कमी होण्याच्या मुळाशी आहेत. महायुद्धापूर्वी प्रवासी एका देशांतून कोणत्याहि दुसऱ्या देशांत अडकाठी न येतां जाऊं शकत असे, फक्त त्याचे जवळ जरूर तेवढें विनिमय-साधन असलें, म्हणजे झालें. परंतु, महायुद्धाचे समाप्तीपासून ही सरळ ये-जा बंद झाली असून, प्रत्येक देशाचे सीमेवर अनेक प्रकारांचीं बंधनें घालण्यांत आलीं आहेत. पासपोर्टची भानगड, नाना प्रकारच्या जकाती वगैरे अडचणींनीं प्रवाशांस बेजार केलें आहे. महायुद्धानंतरच्या सुरवातीच्या कांहीं वर्षांत कित्येक देशांत चलनविषयक गोंधळ माजून राहिले होते व चलनाची अधिकृत किंमत व बाजारभाव ह्यांचा मेळ नसल्यानें परिस्थिति ज्यास्तच बिकट झाली होती. त्यांतून राष्ट्रें बाहेर पडून आपली चलनपद्धति स्थिर करतात न करतात तोंच आर्थिक मंदीनें त्यांस गाठलें व आंतरराष्ट्रीय देणीं घेणीं मिटवितां येण्यासाठीं परराष्ट्रीय व्यापारावर व चलनाच्या निर्गतीवर कडक बंधनें घालण्यांत सर्व राष्ट्रांनीं शिकस्त केली. ह्या कारणानें, बाहेर देशांत जाणारांची संख्या कमी झाली, व आपल्या देशांतील लोकांस बाहेर जाण्यास प्रतिबंध करून परराष्ट्रांतील पाहुण्यांस मात्र आकर्षण करण्याचा सर्वांनीं प्रयत्न चालविला. जर्मनीनें तर परदेशीं जाणाऱ्या प्रत्येक माणसानें रोज किती खर्च करावा, ह्याचें कमाल प्रमाण ठरवून दिलें, म्हणजे, शक्य तितकें जर्मन चलन बाहेर जाऊं न देण्याची खटपट केली.

आंतरराष्ट्रीय प्रवास व आंतरराष्ट्रीय देणीं घेणीं ह्यांचा परस्पर संबंध कसा येतो, हें लक्ष्यांत घेण्याजोगें आहे. एक अमेरिकन प्रवासी हिंदुस्थान देश पहाण्यासाठी निघाला आहे अशी आपण कल्पना करूं. येथें आल्यावर खर्चण्यास लागणारी रकम तो स्वतः बरोबर आणणें शक्य नाहीं. तेव्हां तो न्यूयॉर्क येथील बँकेंत पैसे ठेवून तिच्याकडून हिंदुस्थानांतील बँकांवर पटणाऱ्या हुंड्या घेईल. अशा रीतीनें हिंदुस्थानांत त्यास जरूरीप्रमाणें रकम उभी करतां येईल, परंतु हिंदी बँकांनीं आदा केलेल्या रकमांची त्यांस भरपाई कशी होणार? वटवलेल्या हुंड्या ह्या बँका न्यूयॉर्कला परत पाठवितील व तेथील आपल्या खात्यावर त्याबद्दलची रकम जमा करून घेतील. अशा रीतीनें, अमेरिकेंतील बँकांत हिंदी बँकांचे नांवावर ठेव निर्माण होईल व त्याचा उपयोग अमेरिकन मालाची हिंदुस्थानांत आयात झाल्यास तिच्याबद्दलचें देणें भागविण्याकडे करतां येईल. म्हणजे, आपल्या नागरिकांनीं हिंदुस्थानांतील प्रवासाचें सुख भोगल्याबद्दल अमेरिकेनें इकडे माल पाठवून त्याचा मोबदला दिला पाहिजे, असा अर्थ झाला.

कित्येक देशांनीं आपल्या नागरिकांच्या परराष्ट्रीय प्रवासावर बंधनें कां घातलीं आहेत ह्याचा वरील उदाहरणानें उलगडा होईल. जितके जर्मन नागरिक परदेशीं जातील तितक्यांस तेथें व्हावयाच्या खर्चासाठी तेथील स्थानिक चलन उपलब्ध करून द्यावें लागेल; म्हणजे परदेशांतील बँकांमधील ठेवींतून त्यांस रकमा काढून द्याव्या लागतील. व्यापाराच्या मंदीमुळें जर्मनीच्या खात्यावर इतर देशांत फारशा ठेवी नाहींत व त्यामुळें अगोदरच त्या देशाची आयात रोडावली आहे. ह्या उलट, परराष्ट्रांतील जितके पाहुणे जर्मनीमध्यें येतील, तेवढे त्या देशास हवे आहेत, कारण त्यामुळें जर्मनीला इतर देशांतील देणीं भागविण्यास साधन मिळणार आहे. ऑलिंपिक खेळांसाठी जगांतील सर्व देशांतून यंदा जर्मनीमध्यें खेळाडू जाणार आहेत व त्याप्रीत्यर्थ जर्मनीनें अनेक सवलती दिल्या आहेत, त्याचें रहस्य तरी हेंच आहे.

आर्थिक मंदी व चलन आणि हुंडणावळ ह्यासंबंधांतल्या अडचणींखेरीज राजकीय स्वरूपाच्या कांहीं बाबींचाहि आंतरराष्ट्रीय प्रवासावर प्रतिकूल परिणाम झालेला आहे. युरोपांतील कित्येक राष्ट्रांस आपल्या नागरिकांनीं परदेशांत प्रवास करणें अपायकारक वाटतें. तेथील स्वातंत्र्याच्या अनुभवानें आपल्या नागरिकांमध्यें स्वतःच्या राज्यव्यवस्थेविषयीं असंतोष उत्पन्न होईल अशी भीति कित्येक राष्ट्राधिपतींना वाटते व आपणांविरुद्ध परदेशांत ते कारवाई तर करणार नाहींत ना, अशीहि त्यांस शंका येते. तथापि, प्रजासत्ताक राष्ट्रांनीं उचल खाऊन आंतरराष्ट्रीय प्रवास खुला केल्यास इतर राष्ट्रांनाहि फार काळ आपल्या नागरिकांस डांबून ठेवतां येणार नाहीं. परदेशप्रवास हा आतां केवळ वैयक्तिक इच्छेचा प्रश्न उरलेला नसून त्यास राजकीय व आर्थिक महत्त्व कसें प्राप्त झालें आहे व राष्ट्रीय धोरणाची ती एक बाब कशी होऊन बसली आहे, हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल.

### हिंदी व्यापारी धोरणाबाबत खुलासा

जिनीव्हा येथें भरलेल्या २० व्या इंटरनॅशनल लेबर कॉन्फरन्सपुढें भाषण करतांना हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी, सर भूपेंद्रनाथ मित्र, ह्यांनीं सरकारच्या व्यापारी धोरणाबाबत खुलासा केला. ते म्हणाले:— "व्यापार शक्य तितका खुला व बंधनांनीं न जखडलेला असावा, असेंच हिंदी सरकारचें मत आहे. हिंदी जकातींचा मूळ हेतु उत्पन्नाची तरतूद करणें हाच आहे व त्यास अनुसरून सर्व जिनसांवर अल्पशी एकजात पट्टी बसविण्यांत आली आहे. चैनीच्या पदार्थांवरील जकात ज्यास्त भारी दरानें आकारण्यांत येते व राष्ट्रीय हितास पोषक होईल त्या मानानें कांहीं वस्तूंवर जकात अजीबात माफ करण्यांत येते अगर तीमध्यें सवलत दिली जाते. टारीफ बोर्डाच्या जाहीर चौकशीनंतर कांहीं विशिष्ट धंद्यांस संरक्षण देण्याचें ठरल्यास संरक्षक जकाती बसविण्यांत येतात."

### ब्रिटिश बजेटांत तूट येणार

राष्ट्ररक्षणासाठी शस्त्रास्त्रांवर जादा खर्च करण्याचें ब्रिटिश-सरकारनें ठरविल्यामुळें यंदा त्यांच्या बजेटांत तूट येणार हें निश्चित आहे. तूट किती येणार एवढाच काय तो प्रश्न आहे.

## पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि०, पुणें

### जाहीर खुलासा

आम्हांस वेळोवेळीं विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचीं उत्तरें सार्वजनिक हिताचीं असल्यानें, त्यांचा खुलासा खालीं करीत आहोंत:-

प्र. (१) लँड मॉर्गेज बँकेकडून फक्त जुनें कर्ज फेडण्यासच कर्ज मिळतें काय?

उत्तर– बँकेकडून जुनें कर्ज फेडण्याकरितां, शेती सुधारण्याकरितां, भारी किंमतीची शेतीउपयुक्त यंत्रसामुग्री खरेदी करण्याकरितां व लागवड जास्त फायदेशीर व्हावी म्हणून जमीन खरेदी करण्याकरितां कर्ज मिळूं शकतें.

प्र. ( २ ) कर्जाच्या अर्जाची किमान व अधिकांत अधिक मर्यादा कोणती?

उत्तर– ४०० रुपयांपेक्षां कमी कर्ज–मागणीच्या अर्जाचा विचार करण्यांत येत नाहीं.सर्वसाधारणपणें जास्तींत जास्त कर्ज-मागणीच्या अर्जाची मर्यादा १०,००० रुपये आहे. परंतु सहकारी खात्याचे रजिस्ट्रार व मुंबई प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँक यांच्या परवानगीनें प्रत्येकीं २५,००० रुपयांपेक्षां जास्त नाहीं अशा वर्षांतून फक्त चार अर्जांचा विचार करण्यांत येतो.

प्र. ( ३ ) व्याजाचा दर काय आहे ?

उत्तर—दरसाल दरशेंकडा ६ प्रमाणें.

प्र.( ४ ) हप्तेबंदी कशी करतात ?

उ.––कर्जाची रक्कम परत देण्यास सोईची जावी म्हणून व्याज व मुदलाचा हिशेब करून सारखे हप्ते ठरविले आहेत.सोबत माहितीकरितां कांहीं वार्षिक हप्ते दिले आहेत:—

मुदत व वार्षिक हप्ते

| कर्जाची रकम रु. | वर्षें ५ | वर्षें १० | वर्षें १६ | वर्षें २० |
|---|---|---|---|---|
| ५०० | ११८-१२-० | ६८–२–० | ५१-९-० | ४७-१२-० |
| १,००० | २३७- ७-० | १३५-१४-० | १०३-०-० | ८७–८–० |

जास्त माहिती पाहिजे असल्यास आमचे ऑफिसांत मिळेल.

पुणें जिल्हा को.लँड मॉर्गेज बँक, लि. पुणें. } आर. एच. देशपांडे लँड व्हॅल्युएशन ऑफिसर, पुणें.

## नाशिक जिल्ह्यांत सहकाराचा प्रसार

नाशिक जिल्हा सुपरवायझिंग यूनियन बोर्डाची सभा मालेगांव येथें ता. २६ जून रोजीं भरली होती. तीमध्यें, नाशिक जिल्ह्यांत ग्रुप सेक्रेटरीबाबतची योजना अमलांत आणण्याचें व नाशिक, सिन्नर व इगतपुरी हे तीन तालुके मिळून एक यूनियन स्थापन करण्याचें ठरलें. सुपरवायझर व ग्रुप सेक्रेटरी ह्यांनीं मुंबई को. इन्शुअरन्स सोसायटीमध्यें विमे उतरवून त्याची उपयुक्तता सोसायट्यांचे सभासदांस पटवून द्यावी, असेंहि ठरलें.

## आंतरराष्ट्रीय सहकारी दिन समारंभ

ता. ४ जुलै, १९३६ रोजीं अवसरी खुर्द (पेटा आंबेगांव, जि. पुणें) येथें श्री. के. पी. दीक्षित, अध्यक्ष, खेड-जुन्नर यूनियन, यांचे अध्यक्षतेखालीं आंतरराष्ट्रीय सहकारी दिन साजरा करण्यांत येऊन रा. वसगडेकर, रा. कुलकर्णी सुपरवायझर, श्री. पी. जी. आपटे वकील, खेड, यांचीं भाषणें झालीं. सभेस अवसरी खुर्द, बुद्रुक व गावडेवाडी येथील मंडळी हजर होती.


धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |
|---|---|
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा:—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

This year 1934-35

Exceeds

2 CRORES & 50 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches:* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Offices:* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## राजकारण आणि अर्थकारण

### वाई येथें प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान

लो. मा. टिळक ह्यांच्या पुण्यतिथीनिमित्त होणाऱ्या वार्षिक उत्सवांत वाई येथें प्रो. काळे ह्यांचें मथळयांत दिलेल्या विषयावर व्याख्यान झालें, त्यांतले ठळक मुद्दे खाली नमूद केले आहेत:—

( १ ) जगांतल्या सर्व देशांत राजकारणास विशेष महत्व देण्यांत येतें, ह्याचें कारण सामाजिक जीवनांत राजसत्तेचें असणारें विलक्षण प्रभुत्व हें आहे

( २ ) एका काळीं आर्थिक घटना राजसत्तेच्या पूर्ण कब्यांत होती. पुढें वैयक्तिक आर्थिक स्वातंत्र्यांत राज्यकर्त्यांनीं हात घालणें अनिष्ट आहे अशा विचाराचा पगडा विशेषत: इंग्लंड-सारख्या देशांत बसला.

( ३ ) अर्थकारणाचा राजकारणाशीं निकट संबंध आहे ह्या तत्त्वास अलीकडे व्यवहारांत. सर्वत्र मान्यता मिळाली आहे. आंतरराष्ट्रीय व अंतर्गत राजकारण आर्थिक सामाजिक जीवनाशी संबद्ध असल्याची जाणीव जगांत जागृत असल्याचें गेल्या दहा-पंधरा वर्षांचा इतिहास सांगत आहे.

( ४ ) आर्थिक स्वायत्ततेच्या ध्येयाच्या मार्गे पाश्चात्य राष्ट्रें नाहीं म्हणतां म्हणतां लागलीं आहेत, हें त्यांमधील सरकारांच्या अलीकडल्या धोरणावरून स्पष्ट दिसत आहे.

( ५ ) व्हर्सईच्या तहानें झालेल्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा बोजवारा तिच्या आर्थिक अप्रयोजकतेमुळें झाला असून राष्ट्रसंघाची आज दुर्दशा उडाली आहे, तिच्या मुळाशी अर्थकारणच आहे हें सूक्ष्म विचारा अंतीं दिसून येण्यासारखें आहे.

( ६ ) हिंदुस्थानांतील राजकारणांत स्वराज्य व स्वदेशी ह्यांची तीस वर्षांपूर्वी सांगड घालण्यांत आली, त्याचें रहस्यहि आमच्या पुढाऱ्यांच्या दूरदर्शीपणांतच सांपडेल.

( ७ ) शेतीची जोपासना, खेडेगांवीं व लहान मोठ्या उद्योगधंद्यांचा व व्यापाराचा उत्कर्ष, व मिळाल्यास सरकारचें सहाय घेऊन व तें न मिळाल्यास स्वतःच्या जोरावर आर्थिक प्रगतीचा प्रयत्न, ह्यांचें महत्व राजकरणांत फार मोठें आहे.

( ८ ) मिळेल ती संधी साधून व राज्यघटना आणि राजकरण ह्यांचा शक्य तितका उपयोग करून राष्ट्रीय आर्थिक प्रगतीचा गाडा पुढें जाण्यास प्रत्येक व्यक्तीनें त्यास हातभार लावला पाहिजे.

( ९ ) निसर्गानें हिंदुस्थानास ज्या देणग्या दिल्या आहेत, त्यांचा फायदा मानवी श्रमानें व संघटित आणि कार्यक्षम उपायांनीं आपण घेणें आवश्यक आहे.

( १० ) महाराष्ट्रानें आपला वांटा ह्या राष्ट्रीय कार्यांत उचलला पाहिजे आणि जागतिक व अंतर्गत घडामोडींकडे लक्ष पुरवून आपलें आर्थिक कर्तव्य बजावलें पाहिजे.

### रेल्वे-कामगारांच्या संख्येंत घट

गेल्या पांच वर्षांत हिंदुस्थानांतील रेल्वेजचा विस्तार वाढला असला तरी कामगारांची संख्या व त्यांस मिळणारें वेतन हीं कमी झालीं आहेत, हें खालील आकड्यांवरून लक्ष्यांत येईल:—

| | १९२९–३० | १९३४–३५ |
|---|---|---|
| कामगारांची संख्या | ८,१७,३२३ | ७,०५,०८७ |
| रेल्वे रस्त्याची लांबी | ४१,७२४ मैल | ४३,०२१ मैल |
| पगार खर्च | ३९ कोटि ६९ लक्ष रु. | ३५ कोटि २२ लक्ष रु. |

### हौरा पुलाचें कंत्राट

हुगळी नदीवर बांधण्यांत यावयाच्या हौरा पुलाचें कंत्राट मेसर्स क्लीव्हलंड ब्रिज अँड इंजिनिअरिंग कंपनीस देण्यांत आलें आहे. ह्या ब्रिटिश कंपनीनें २ कोटी १४ लक्ष रुपयांचें टेंडर दिलें होतें; परंतु मेसर्स क्रूप्स ह्या जर्मन फर्मचें टेंडर २ कोटि ९ लक्ष रुपयांचें होतें. मेसर्स बर्न, ब्रेथवेट ॲण्ड जेसप ह्या हिंदुस्थानांतील कंपनीचें टेंडर २ कोटी ३२ लाखांचें होतें. हौरा पुलासारखीं मोठीं कामें वरचेवर निघत नसतात, ह्या दृष्टीनें हिंदी कर्तृत्वशक्तीस वाव मिळणें जरूर होतें. खेरीज, हुगळी नदीचे चाळे पूर्णपणें माहीत असणाऱ्या अनुभविक तज्ज्ञांचें हातूनच हें काम पार पडणें युक्त झालें असतें. हिंदी कंपनीस काम देणें कां आवश्यक होतें, ह्यासंबंधीं लिहितांना 'इंडियन फिनॅन्स'नें खालील मुद्दे पुढें मांडले आहेत:—

( १ ) स्वस्ताईच पहावयाची होती, तर 'क्रूप्स 'ला कंत्राट मिळावयास हवें. ( २ ) युरोपमध्यें राजकीय अस्वस्थता निर्माण होण्याच्या भीतीनें 'क्रूप्स'चें नांव वगळलें असलें तर बाकीच्या सर्व विलायती कंपन्यांना हाच मुद्दा लागू आहे. ( ३ ) हिंदी कंपनीनें तज्ज्ञांचा सल्ला घेऊन व त्रास आणि खर्च सोसून पुलाची वेगळ्या तऱ्हेनें योजना सुचविली आहे. ( ४ ) मि. राल्फ फ्रीमन-सारख्या अनुभविक व जगप्रसिद्ध तज्ज्ञाची ह्या योजनेस मान्यता आहे. ( ५ ) टेंडरमध्यें नमूद केलेल्या रकमेपेक्षां कमी खर्चांत काम करण्याची हिंदी कंपनीची तयारी असल्यास तिला तें पार पाडण्यास सवलत देणें जरूर आहे.

टाटा कंपनीनें हौरा पुलाच्या कामाबाबत मागणी येईल ती पुरवितां यावी, ह्यासाठी अगोदरपासूनच यंत्रसामुग्री वाढवून जय्यत तयारी ठेवली होती. त्या कंपनीचीहि हिंदुस्थानांतील कंपनीस कंत्राट न मिळाल्यानें निराशा होईल.

### म्युनिसिपालट्यांचा कारभार कसा सुधारेल ?

मुंबई इलाख्यांतील म्युनिसिपालट्यांच्या करवसुलीची बाकी १९३४–३५ अखेर ३९ लक्ष १२ हजार रुपये इतकी होती, म्हणजे ही रकम गेल्या सालापेक्षां ८८ लक्षांनीं वाढली आहे. कित्येक म्युनिसिपालट्यांची व जिल्हा लोकल बोर्डांची आर्थिक परिस्थिति समाधानकारक नाहीं. ती सुधारण्याकरितां लोकल फंडूस अकौंटसूच्या एक्झॅमिनरनें खालील सूचना केल्या आहेत:—

( १ ) नोकरवर्गाच्या पगारावर होणाऱ्या खर्चांत बचत, ( २ ) पाणी-पुरवठ्यासारख्या बाबींच्या खर्चाची त्याप्रीत्यर्थ बसवलेल्या पट्टींतूनच तरतुद, ( ३ ) म्युनिसिपल कर व पट्टया ह्यांची वक्तशीर वसुली, ( ४ ) नोटिसा व वॉरंटें काढण्याच्या अधिकाराचा जरूरीप्रमाणें उपयोग, ( ५ ) कराची अगर पट्टीची माफी देतांना कसोशीनें चौकशी व अधिकाराचा योग्य उपयोग, ( ६ ) चांगल्या दरानें माल मिळावा व कंत्राटें देतांना काटकसर व्हावी, अशी व्यवस्था, ( ७ ) माल विकत घेतांना तो खराब होणार नाहीं अगर चोरीस जाणार नाहीं ह्याबद्दल खबरदारी, ( ८ ) वर्षामध्यें करावयाच्या कामांची व्यवस्थित आंखणी व योजना, ( ९ ) शिलकी रकमा योग्य रीतीनें गुंतविणें.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—२ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०-१५ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८-११ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९-१२ |
| ४% १९६०–७० ... ... | ११५—२ |
| ४% १९४३ ... ... ... | १११—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९९-९½ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०७—६ |
| २¾% १९४८–५२ ... ... | १००—९ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११०—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १००—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षें मुदत) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ )° ... | १११—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२३—४ |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३५—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११९—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३६—४ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १६००—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १४०—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १०७—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—४ |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९२२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १६२—८ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २३०—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२७—८ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १६७३-१२ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५९७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९०—० |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६५—४ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८५—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७५२—८ |

एशियन पॉलिसी

ASIAN ASSURANCE Co. Ltd.

म्हणजेच

आयुर्विम्याच्या निरनिराळया सर्वांस सोयीस्कर योजना.

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत

धी एशियन ॲशुरन्स कंपनी, लिमिटेड

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

वेस्टर्न इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी–सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५

१९३५ मधील नवें काम ५१,३०,०४२ रु.

एकूण चालू काम २,७०,००,००० रु. अधिक

एकूण जिंदगी ७१,७१,०९३ रु.

लाइफ फंड ६०,४२,८७३ रु.

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें शहर.

## नोटीस

या बँकेच्या सन १९३६-३७ सालच्या हिशेबांची तपासणी करण्यासाठीं येत्या वार्षिक साधारण सभेनें हिशेब तपासनिसांची नेमणूक करावयाची आहे. तरी सदर जागेसाठीं ज्यांस उमेदवार म्हणून उभे रहावयाचें असेल त्यांनीं आपले अर्ज बँकेचे पुणें कचेरींत तारीख ३१ जुलै, १९३६ पर्यंत दाखल होतील अशा बेतानें पाठवावेत. अर्जदार हा बँकेचा भागीदार असला पाहिजे. उमेद्वारानें अर्जांत आपलें संपूर्ण नांव, पत्ता व लायकी अवश्य नमूद करावी. कळावे.

पुणें शहर.
तारीख ९ जुलै, १९३६. } द. दि. चितळे. मॅनेजिंग डायरेक्टर.

---

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें शहर.

## नोटीस

या बँकेच्या सन १९३६--३७ च्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवडणूक व्हावयाची आहे. त्यासाठीं व्यक्तिशः मतदारांची यादी तयार झाली असून ती बँकेच्या मुख्य कचेरींत व शाखाकचेऱ्यांत नोटीसबोर्डावर निवडणुकीचा नियम नं. ३ प्रमाणें लाविली आहे. तरी निवडणुकीसाठीं लायक उमेद्वारांचीं नांवें सूचक व अनुमोदक यांच्या सहीसह व उमेद्वारांच्या लेखी संमतीनें शनिवार ता. ८ ऑगस्ट, १९३६ रोजीं दुपारीं ४ वाजण्यापूर्वीं बँकेच्या पुणें कचेरींत दाखल होतील अशा बेतानें पाठवावीत. सदर बाबत कोणास जास्त माहिती पाहिजे असल्यास त्यांनीं बँकेच्या कचेरीच्या वेळांत चौकशी करावी म्हणजे ती त्यांना देण्यांत येईल.

पुणें शहर.
तारीख १० जुलै १९३६, } द. दि. चितळे. मॅनेजिंग डायरेक्टर.

---


गणेशचतुर्थीस प्रसिद्ध होणार !

## पुरुषार्थाचा गणेशांक (भाग २ रा)

या अंकांत गणपतीसंबंधींचें वैदिक, पौराणिक व महाराष्ट्रीय साधुसन्तांचें सर्व लिखाण सोपपत्तिक येणार असून शिवाय उत्तर व दक्षिण हिन्दुस्थानांत संशोधकांस ज्या प्राचीन गणेशमूर्ति आढळल्या आहेत, त्यांचीं विशेष माहितीसह सुबक छायाचित्रें देणार आहों. किं. २ रु. पण **वर्गणीचे ३ रु. म. ऑ. नें पाठविणारांस हा अंक वर्गणींतच मिळेल.**

**गणेशांक** भाग १ ला किं. २ रु.; पण चालू ग्राहकांस हा अंक फक्त १ रु. स देऊं. तरी वाचकांनीं रजिस्ट्रेशनखर्चासह एकंदर ४८३ रु. पाठवावे. म्हणजे दोन्ही विशेषांक रजिस्टरनें पाठवूं. प्रत्येक हिन्दूच्या घरीं हे अंक असले पाहिजेत.

**व्यवस्थापक पुरुषार्थ, औंध, ( जि. सातारा ).**



**WANTED** Arts Graduates & Medical Practitioners to push up Rural Uplift & Medical Relief Movement in furtherance of Insurance Benefit Plans throughout district places in the Presidency. Adequate remuneration to capable workers.

Apply with particulars to :—

Head Office :—
99, LAXMI ROAD,
POONA. } General Manager, THE DAWN OF INDIA LIFE INS. CO. LTD.


---

## पुणें येथील स्मॉलकॉज जज्ज यांचे कोर्टांत

### मुक्काम पुणें येथें

दिवाणी मुकदमा नंबर ४२५० सन १९३५ पैकीं

लीलाधर मनसाराम या. ना. इु. तर्फे रिसीव्हर १ रावबहादूर हणमंतराम रामनाथ मारवाडी, २ बी. के. कुळकर्णी रा. पुणें. } वादी

विरुद्ध

नरहर रामचंद्र पोतनीस रा. पुणें पेठ भवानी मोती मंघाडीचे दुकानी. } प्रतिवादी

प्रतिवादी यांस:—

ज्यापेक्षां वादी यानें तुम्हांवर रु. ६९८१५८९ मिळणेबद्दल दावा केला आहे, त्यापेक्षां सदरहू दाव्याचा जबाब देण्यासाठीं तारीख २० माहे ७ सन १९३६ रोजीं दिवसां ११ वाजतां जातीनें किंवा ज्या कोणा प्लीडरास योग्य माहिती दिली असेल व दाव्यासंबंधीं सर्व मुद्यांच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल, किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्याबरोबर असेल अशा प्लीडराच्यामार्फत या कोर्टांत हजर होण्याविषयीं या लेखावरून तुम्हांस समन्स करण्यांत येत आहे; व तुम्हीं हजर होण्यासाठीं जो दिवस ठरविला आहे तो दाव्याच्या अखेर निकालासाठीं नेमिला आहे. यास्तव ज्यांच्या जबानीवरून व ज्या दस्तऐवजांवरून तुमच्या जबाबास बळकटी येईल असा भरवसा बाळगण्याचा तुमचा इरादा असेल तसे सर्व साक्षीदार व तसे सर्व दस्तऐवज त्या दिवशीं हजर करण्यास तुम्हीं सिद्ध असलें पाहिजे.

तुम्हांस नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरीं लिहिलेल्या दिवशीं तुम्हीं हजर न झाल्यास तुमच्या परोक्ष दाव्याची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

तसेंच तुम्हांस अशीहि नोटीस देण्यांत येत आहे कीं, निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तिच्यापूर्वीं बजावणीसाठीं पत्ता लिहून देण्यांत तुम्हीं कसूर केल्यास तुमच्या बचावाकडे लक्ष देण्यांत येणार नाहीं.

आज तारीख ६ माहे ७ सन १९३६ रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्क्यानिशीं दिलें.

आर. एच्. वाडेकर
for Registrar.

कारकून. शिक्का

# S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी
टेलरिंग फर्म

मॅनेजर-श्री. पं. पाटसकर, D.M.T.C.A. (London.)

## पाटसकर आणि कंपनी

सोमवारी बंद

४८ निहाल पेठ, पुणें शहर.

सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी

आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

आपणांस विहीर बोअर करावयाची आहे काय ?

## भिडे आणि सन्स्

स्वतः तयार केलेल्या मशीननें बोअर खणून देतात.

चौकशी कराः—
भिडे आणि सन्स

सांगली ( S. M. C. ) शनीचा पार, पुणें. २

मु. कराड ] फक्त एका रुपयास [ कोडें नं. १

## प्रत्येक जण (१००) रुपये मिळवा

|  |  |  |  |
|---|---|---|---|
|  |  |  |  |
|  |  |  |  |
|  |  |  |  |

बाजूचे कोष्टकांत ० ते १५ पर्यंतचे आंकडे अशा रीतीनें भरा कीं, ज्यांची आडवी व उभी बेरीज मोजतांना प्रत्येक ओळीची बेरीज ३० यावी. कोष्टकांत एका जातीचे दोन आंकडे येऊं नयेत. प्रवेश फी एक रुपया म. ऑ. नें भरून कोष्टकाचे एक किंवा सोळापर्यंत उत्तरें एकाच वेळीं पाठवितां येतील. परंतु सोळापेक्षां अधिक उत्तरें पाठवावयाचीं असतील तर प्रत्येक उत्तरास एक आणा जादा फी पडेल. उत्तरें खालील पत्त्यावर प्रवेश फी भरून व आपला पूर्ण पत्ता लिहून पाठवावीत. उत्तरें किती पाठविलीं त्याचा आंकडा लिहावा. आमचा निकाल शेवटचा व सर्वांना कायदेशीर बंधनकारक होईल. आणखी कांहीं बाबतींत जास्त खुलासा पाहिजे असल्यास एक आण्याचें तिकिट पाठवावें. उत्तरें २४-७-३६ पर्यंत स्वीकारण्यांत येतील. आमचें सीलबंद करून ठेवलेलें खऱ्या उत्तराचें कोष्टक २६-७-३६ ला जाहीर करण्यांत येईल. जाहीर झालेल्यां उत्तराप्रमाणेंच ज्याचें उत्तर बरोबर असेल त्या प्रत्येकाला १०० रुपये बक्षिस देण्यांत येईल.

ईनामी हरिफाई कार्यालय—कराड. (जि. सातारा.)

## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

## रे पेपर मिल, मुंढवा, पुणें — पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ | पुणें, बुधवार, तारीख २२ जुलै, १९३६. | अंक ३०

## दि गुड-वुइल
## ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारास

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा; मॅनेजिंग डायरेक्टर

## WANTED.


Influential and hard-working Agents At Ahmednagar, Dhulia, Kolhapur, Nasik and Poona for Sun Life Assurance Company of Canada on liberal terms. Apply :—

The Manager,
Sun Life Assurance Company of Canada,
Hornby Road, Fort, BOMBAY.

## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभाविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

चालविण्याचा खर्च थोडा
व
कामाचें प्रमाण सर्वांत जास्त
म्हणूनच
कि
र्लो
स्क
र




"कल्याण" शेंगायंत्र वापरा!

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड, किर्लोस्करवाडी
( जि. सातारा. )

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
## V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

## K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



. किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !
ज्युनियर प्रभाकर
सेफ्टी स्टोव्ह
माहितीपत्रक मागवा
मेकर्सः—ओगले ग्लास वर्क्स. लि.
ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः—
१ केळकर ब्रदर्स,
बुधवार चौक.
२ म. ई. को. ऑ. एजन्सी,
लक्ष्मीरोड.

## विविध माहिती

### म्हैसूर सरकारचा शिक्षणावरील खर्च

म्हैसूर सरकारनें १९३४–३५ सालीं शिक्षण खात्यावर ३९३/४ लक्ष रुपये खर्च केले.

### हिंदुस्थान सरकारचें जकातींपासून उत्पन्न

हिंदुस्थान सरकारास जकातींपासून १९३४–३५ मध्यें एकूण ५४१/४ कोटि रुपये उत्पन्न झालें. १९३३–३४ सालांतील उत्पन्नापेक्षां हा आकडा ५१/४ कोटींनीं ज्यास्त आहे.

### दंडयोजना संपली—स्नेहभाव सुरू झाला

इटलीविरूद्ध अंमलात आणलेली दंडयोजना उठवून ग्रेटब्रिटननें आतां इटलीशीं सख्यत्वाचें नातें जोडण्याचा प्रयत्न चालविला आहे. दंडयोजनेमुळें ब्रिटनच्या इटलीकडे होणाऱ्या निर्गतींत ह्या वर्षाच्या पहिल्या सहामाहींत पांच कोटि रुपये किंमतीच्या मालाची घट झाली, ती भरून निघेल, अशी आशा मि. रन्सिमन ह्यांनीं पार्लमेंटांत व्यक्त केली.

### स्कॉच व्हिस्कीचा अमेरिकेंत प्रसार

अमेरिकेमधील दारूबंदी १९३३ मध्यें उठली, तेव्हांपासून त्या देशांत ज्यास्त ज्यास्त दारू उतरूं लागली आहे. स्कॉच व्हिस्की तेथें लोकप्रिय झाली असून त्यामुळें ह्या ब्रिटिश धंद्यास व व्यापारास तेजी आली आहे.

### चलनी नोटा

हिंदुस्थानांत काढलेल्या एकूण चलनी नोटांची किंमत २०० कोटि रुपयांवर गेली आहे.

### आय. सी. एस. ची परीक्षा

दिल्ली येथें आय. सी. एस. च्या परीक्षेस ता. ५ जानेवारी १९३७ रोजीं सुरवात होणार असून त्याप्रीत्यर्थ अर्ज स्वीकारण्याची अखेरची तारीख १५ ऑगस्ट १९३६, ही आहे.

### इटली विरुद्ध बहिष्कार उठला

राष्ट्रसंघाच्या ठरावानुसार इटली विरुद्ध गेल्या नोव्हेंबरमध्यें पुकारण्यांत आलेला आर्थिक बहिष्कार ता. १५ जुलैपासून उठविल्याचें फ्रेंच, ब्रिटिश, कनेडियन व हिंदी सरकारांनीं जाहीर केलें आहे.

### ग्रामसुधारणेबद्दल ढाल व बक्षिसें

खेडेगांवांच्या सुधारणेच्या कार्यांत जास्तींत जास्त प्रगति करून दाखविण्याबद्दल एक ढाल आणि उपयुक्त वस्तूंच्या स्वरूपांतलीं बक्षिसें देण्याचें संयुक्त प्रांताच्या सरकारनें ठरविलें आहे. मुंबई इलाख्याचें अनुकरण इतरत्र होऊं लागलें आहे.

### पोस्टल पार्सलाबाबत नियम

रजिस्टर करावयाच्या पार्सलावर पाठवणाराचें नांव व पत्ता लिहिलेला असल्यावांचून तें कोणत्याहि पोस्ट ऑफिसांत स्वीकारलें जाणार नाहीं असें पोस्ट खात्यानें जाहीर केलें आहे. पार्सल पोचल्याची पावती हवी असल्यास त्याबाबतची छापील चिठ्ठी असते ती भरून पार्सलाच्या बरोबर पोस्ट ऑफिसांत दाखल केली पाहिजे, असेंहि प्रसिद्ध झालें आहे.

### शेतीच्या धंद्यांतले विलायती तज्ञ हिंदुस्थानांत येणार

सर जॉन रसेल आणि डॉ. राइट हे दोन ब्रिटिश तज्ञ येत्या हिवाळ्यांत हिंदुस्थानांतलीं शेतीचीं पिकें व दुधदुभत्याचा व्यवसाय ह्यांसंबंधांत चौकशी करून सल्ला देण्यासाठीं यावयाचे निश्चित झालें आहे.

### क्वेट्टाच्या पुनर्रचनेस प्रारंभ

क्वेट्टा शहराचा भूकंपानें नाश झाला, त्याच्या पुनर्रचनेप्रीत्यर्थ १ कोटि, ३२ लक्ष रुपये येत्या सालीं खर्च व्हावयाचे आहेत. त्या रकमेंतून बांधल्या जाणाऱ्या इमारतींचीं कंत्राटें हिंदुस्थानांतल्या कंपन्यांस देण्यांत आलीं आहेत.

### गुरांस गोंदण्याची योजना

चोरीस गेलेलीं व हरवलेलीं शेतीचीं जनावरें ओळखतां यावीं म्हणून त्यांचे कान गोंदण्याची योजना पंजाबमध्यें तेथील ग्रामसुधारणा कार्याचे कमिशनर, मि. ब्रेन, ह्यांनीं सुचविली आहे.

### खानेसुमारी करण्यासाठीं विमानांचा उपयोग

कॅनडामधील कांहीं दूरच्या मुलखांतील शिरगणति करण्यासाठी ३,५०० कारकून विमान मार्गानें नेण्यांत यावयाचे आहेत.

### रेल्वेदरांत वाढ : बंदरांचा व्यापार वाढणार ?

रेलवेजवरून होणाऱ्या मालाच्या वहातुकीचे दर लवकरच वाढविण्यांत यावयाचे आहेत, त्याचा फायदा कराची बंदरास होईल अशी अपेक्षा आहे. रेल्वेनें माल पाठविण्याऐवजीं कराची बंदरांतून जलमार्गानें तो धाडणें स्वस्त पडेल व त्यामुळें सर्वच मोठ्या बंदरांचा व्यापार वाढेल.

### मुंबई इलाख्यांतील कालव्याखालील जमीन

१९३४–३५ सालीं एकूण १ कोटि ९२ हजार एकर जमीन कालव्याच्या पाण्यानें भिजली.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. ४ जुलै रोजीं पुरा झालेला आठवडा | ५८, ३५, ८७० |
| ता. ११ जुलै रोजीं पुरा झालेला आठवडा | ४९, १२, ६२२ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते ११ जुलै १९३६ | |
| अखेर | २, ७६, ६६, ५८, २७० |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३५८ | ६ संघटित व कार्यक्षम ब्रिटिश सहकारी चळवळ | ३६३ |
| २ रेल्वेज स्वतः च्या पायावर उभ्या कशा रहातील? | ३५९ | ७ म्हैसूर संस्थानांतील सहकारी चळवळ | ३६३ |
| ३ अपूर्णपात्र विमेदारांची अडचणीची परिस्थिति | ३६० | ८ हौरा पुलाच्या चालू खर्चाची तरतूद | ३६४ |
| ४ इराकमध्यें जपानी मालाचें नियंत्रण ... | ३६० | ९ रस्त्यांचें राष्ट्रीकरण | ३६४ |
| ५ स्फुट विचार ... | ३६१ | १० उत्पादक मालाच्या निर्गतीवर बंधन | ३६४ |
| स्वदेशी धंदे—सावधगिरीची सुचना—हिंद-जपान व्यापारी करार—ब्रिटिश कारखानदारांची संरक्षणाविषयीं मागणी—साडेतीन टक्के व्याजाचे रोखे—विन तिकिटाचा रेल्वे प्रवास—ओगले ग्लास वर्क्स लि.—हौरा पुलाचें कंत्राट | | ११ सहकार व ग्रामसुधारणा | ३६५ |
| | | १२ पोलिस खात्याचा अहवाल | ३६६ |
| | | १३ निवडक बाजारभाव | ३६६ |
| | | १४ ऑडिटर व साधारण सभा | ३६७ |
| | | १५ सोन्याच्या साठवणीसाठी भुयार व किल्ला | ३६७ |



# अर्थ

बुधवार, ता. २२ जुलै, १९३६


## रेल्वेज स्वतःच्या पायावर उभ्या कशा रहातील ?

### मोटारींची स्पर्धा

हिंदुस्थानाची नवी राज्यघटना आर्थिक अडचणींचे खडकावर आदळूं नये, ह्याकरितां सरकारी उत्पन्न–खर्चाचा मेळ बसणें आवश्यक आहे व तो तसा बसेल अशी खात्री झाल्याखेरीज राजकीय सुधारणांच्या अंमलबजावणीस सुरवात करूं नये, असें धोरण ब्रिटिश सरकारनें स्वीकारलें होतें. सर ओटो निमायर ह्यांनीं मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें ह्यांमध्यें उत्पन्नाची वाटणी केली तेव्हां अपुऱ्या उत्पन्नाची अडचण नवी घटना चालू होण्याचे मार्गांत येणार नाहीं असें ठरलें आणि प्रांतिक स्वायत्ततेमुळें मध्यवर्ती सरकारास दरसाल २½ कोटि रुपयांचा जादा खर्च येणार आहे तो सोसण्याची हिंदुस्थान सरकारची तयार झाली. तथापि नव्या अमदानीचा जादा खर्च सरकारास झेपणें अगर न झेपणें हिंदी रेल्वेजचें उत्पन्न वाढण्यावर अवलंबून राहिलें असून तें वाढविण्याची तात्काळ तजवीज केली पाहिजे व ह्या दृष्टीनें मध्यवर्ती सरकारची हालचाल चालू झाली आहे. १९३५-३६ सालीं सरकारच्या मालकीच्या रेल्वेजना ४ कोटि रुपये नुकसान आलें. आज कित्येक वर्षे रेल्वेजचा कारभार आतबट्ट्याचा झाला असून त्यांमधून मध्यवर्ती सरकारास कांहींच प्राप्ती न होतां त्यांत गुंतविलेलें भांडवल हा एक अनुत्पादक बोजा ठरतो कीं काय, अशी भीति उत्पन्न झाली आहे. अलीकडे मोटारगाड्यांच्या व्यवहाराचा प्रसार झपाट्यानें झाला आहे आणि त्यांची स्पर्धा आगगाड्यांस चांगली भोवत आहे. ह्या नवीन संकटास तोंड देऊन आपलें उत्पन्न शाबूत राखणें रेल्वेजना कठीण झालें असून दिवसानुदिवस त्यांची परिस्थिति बिकट होत चालली आहे. मोटारींच्या वहातुकीची तीव्र स्पर्धा आणि जास्त उत्पन्न मिळविण्याची निकड ह्या दुहेरी पेंचांत सरकारी रेल्वेजचा धंदा सापडला आहे आणि त्यांतून मार्ग काढण्यासाठी उपाययोजना शोधल्या व सुचविल्या जात आहेत.

'ट्रॅन्स्पोर्ट अडव्हायसरी कौन्सिल'ची दुसरी बैठक सिमला येथें गेल्या आठवड्यांत भरली होती, त्या प्रसंगीं आपल्या सुरवातीच्या भाषणांत व्हाइसरॉय साहेबांनीं हिंदी रेल्वेज स्वतःच्या पायावर उभ्या कशा राहूं शकतील याविषयीं कांहीं विचार प्रदर्शित केले. मोटारींच्या स्पर्धेस कसें तोंड देतां येईल व मोटार व रेल्वे ह्यांतून होणाऱ्या वहातुकीची सांगड कशी घालण्यांत येईल ह्यासंबंधीं सल्ला देण्यासाठीं ट्रॅन्स्पोर्ट कौन्सिल स्थापन करण्यांत आलें व त्याची पहिली बैठक १९३५ च्या जानेवारींत भरली होती. त्यानंतर आतां ह्या प्रश्नानें ज्यास्त उग्र स्वरूप धारण केलें आहे. रेल्वेजनीं आपल्या वहातुकीच्या दरांत बदल कोणत्या रीतीनें केला असतां उत्पन्न वाढेल, हा मुद्दा सध्या महत्त्वाचा असून त्या दृष्टीनें कौन्सिलनें विचार करावा, असें व्हाइसरॉय साहेबांनीं सुचविलें.

रेल्वेज आपले दर ठरवितांना स्वतःस प्रत्येक बाबीवर खर्च काय पडतो हें न पहातां गिऱ्हाइकास कोणता दर पचेल ह्याकडे लक्ष पुरवितात व ज्यास्तींत ज्यास्त उत्पन्न कशा रीतीनें मिळेल हें पहातात. असें केलें नाहीं तर वजनानें जड व आकारानें मोठा परंतु किंमतीनें हलका अशा मालाची आगगाड्यांतून वहातुक कधींच झाली नसती. कोळसा किंवा गूळ ह्यांस भारी दर परवडणार नाहीं. तथापि किंमतवान परंतु वजनानें हलक्या मालास ज्यास्त वहातुक–खर्च परवडेल. ह्या दृष्टीनेंच मालाच्या वहातुकीचे दर ठरविलेले असतात. साहजिकपणेंच, जड मालापेक्षा मौल्यवान मालाच्या वहातुकींतच रेल्वेजचा फायदा असतो. मोटारींच्या स्पर्धेनें नेमक्या ह्या मालावरच हल्ला चढविला आहे व असला माल आतां मोटारलॉऱ्यांतून नेण्यांत येऊं लागला आहे. लॉऱ्यांतून होणाऱ्या ह्या वहातुकीस वेळींच आळा घातला नाहीं, तर रेल्वेजना फलदायी होणारी वहातुक नेमकी त्यांच्या हातांतून जाईल व शेतीच्या आणि इतर कमी किंमतच्या मालावर ज्यास्त दरांची आकारणी करावी लागेल. शेतीच्या मालास हा बोजा सोसणार नाहीं व विक्रीच्या ठिकाणीं सदरहू माल नेणें किफायतशीर न झाल्यानें त्याचा व्यापारावर अनिष्ट परिणाम होऊन शेतकऱ्यास नुकसान सोसावें लागेल. मोटारींच्या स्पर्धेचा हा परिणाम दीर्घगामी आहे व त्याचा बंदोबस्त करणें अगत्याचें झालें आहे.

मोटारींच्या धंद्याची घटना अजून विस्कळित असून त्यांत एकसूत्रीपणा आलेला नाहीं. ह्या कारणानें आगगाड्यांप्रमाणें मोटारींचे बाबतींत वक्तशीरपणा आढळून येत नाहीं. एकाच मालकीच्या अनेक मोटारी असल्या व अशा मालकांची संख्या मर्यादित असून त्यांचें एकमेकांत सहकार्य असलें, म्हणजे मोटारींची वहातुक सुव्यवस्थित होईल व आगगाड्यांच्या वेळापत्रकाशी मोटारींचें वेळापत्रक जोडून घेतां येईल, ही व्हाइसरॉय साहेबांनीं केलेली सूचना आगामी धोरणाची निदर्शक तर नाहींना ? मोटारींचे गिऱ्हाईक, मोटार मालक, रेल्वेज म्हणजेच कर भरणारे नागरिक व रेल्वेचे गिऱ्हाइक ह्यांमधील परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालून धोरण आखणें अत्यंत कठीण असलें तरी तें आवश्यक झालें आहे व त्याच्या यशस्वितेवरच मध्यवर्ती सरकारची मदार आहे. एकंदर आर्थिक परिस्थिति सुधारल्यास हा प्रश्न सुटण्यास मदत होईल, परंतु त्या सुधारणेवर अवलंबून रहातां येणार नाहीं अशी आजची स्थिति आहे. रेल्वे-मोटार स्पर्धेच्या प्रश्नास दुसरीहि बाजू आहे, हें विसरतां कामा नये. मोटारींतून व लॉऱ्यांतून वहातुक व प्रवास करणें

ज्यास्त सोईचें व स्वस्त पडत असतांना केवळ रेल्वेजचें उत्पन्न वाढविण्यासाठी मोटार-वहातुकीवर बंधनें घालणें श्रेयस्कर होणार नाहीं. मोटार वहातुकीच्या धंद्यांत आज कित्येकांनीं भांडवल गुंतविलेलें आहे व मोठ्या चिकाटीनें त्यांनीं स्पर्धेस तोंड देऊन धंदा चालविला आहे. अशा तऱ्हेनें प्रस्थापित केलेल्या धंद्यास धक्का लागणें योग्य होणार नाहीं. रेल्वेजना स्वतःच्या पायावर उभें करतांना, गिऱ्हाइकांची सोय पहाणाऱ्या व त्यांच्या पैशाची बचत करणाऱ्या मोटार वहातुकीच्या धंद्याच्या हितसंबंधांकडे लक्ष पुरविलें जाणें अगत्याचें आहे.

## अपूर्ण–पात्र विमेदारांची अडचणीची परिस्थिति

विमा कंपन्यांच्या प्रॉस्पेक्टसमध्यें छापलेल्या हप्त्यांच्या कोष्टकांप्रमाणें विमेदारांकडून हप्ते घेण्यांत येतात; परंतु कांहीं विमेदारांकडून ज्यास्त रकमेची मागणी करण्यांत येते. कंपन्यांचें लक्ष विमेदारांच्या आयुर्मर्यादेकडे असतें व सरासरीनें अपेक्षित मर्यादेच्या मानानें एखाद्या विमेदाराचें आयुष्य अल्प ठरण्याचा संभव आढळून आला, तर त्याची भरपाई जादा हप्त्यांचे रूपानें त्याजकडून केली जाते. विमेदाराचा धंदा अगर त्याच्या वसतीचें ठिकाण हीं धोक्याचीं असल्यास त्याचे हप्त्यांत वाढ करण्यांत येते, ती वेगळी. विम्याचा अर्ज करणारांत शारीरिक व्यंग आढळल्यास,त्याच्या आयुष्यांत त्यास कांहीं विशिष्ट दुखणीं आलेलीं असल्यास अगर त्याच्या कौटुंबिक इतिहासांत दोष आढळल्यास हप्त्यांत जी वाढ केली जाते, त्या संबंधींच आज येथें विचार कर्तव्य आहे.वास्तविक पहातां अशा अपूर्णपात्र विमेदारांसच विम्याची ज्यास्त जरूरी असते व त्यांच्या कौटुंबीयांस विम्याचें संरक्षण मिळणें निकडीचें असतें. तथापि, कोणत्या व्यंगासाठी हप्त्यांत किती वाढ केली असतां पुरेशी होते व कोणते विमे नाकारणें इष्ट आहे ह्यासंबंधीं जरूर ती आकडेवार माहिती नसल्यानें कित्येक वेळां विमेदारांस अन्याय होण्याचा संभव असतो. कित्येक रोग पंचवीस वर्षांपूर्वी असाध्य अगर दुःसाध्य समजले गेले असते, त्यांवर आज उपाय यशस्वी होऊं शकतो व त्यामुळें अशा रोगांसंबंधीं विमा कंपन्यांनी स्वीकारावयाच्या धोरणांत बदल पडत जाणें स्वाभाविक आहे. नव्या व वाढत्या अनुभवाबरोबर विमा कंपन्यांची हप्त्यांची आकारणी ज्यास्त पायाशुद्ध होत जाईल, हें उघड आहे.अपूर्णपात्र विमेदाराकडून जादा हप्त्याची मागणी केल्यापासून दोन अनिष्ट परिणाम घडून येतात. विमेदारास स्वतःबद्दल काळजी वाटूं लागून त्याच्या प्रकृतीवर प्रतिकूल परिणाम घडून येण्याचा संभव असतो. आपल्या प्रकृतीच्या दोषांची जाणीव करून दिली गेल्यामुळें विमेदार तिची जास्त काळजी घेऊं लागेल असेंहि दुसऱ्या बाजूनें म्हणतां येईल. तथापि सदरहु विमेदाराचें नांव विम्याच्या काळया यादींत पडतें, ह्यांत शंका नाहीं. कोणत्याहि कंपनीकडे त्यानें विमा वाढविण्यासाठी अर्ज केला, तर त्याच्या पूर्वीच्या अर्जाचा निकाल कसा झाला ह्याबद्दल त्यास विस्तारानें माहिती द्यावी लागते व जरी त्याची प्रकृति सुधारली तरी त्याचा विमाविषयक पूर्वेतिहास पुसला जात नाहीं. आज विमेदाराची प्रकृति उत्कृष्ट असून इतर सर्व गोष्टींचा विचार करतां त्याच्या विमाअर्जास पहिल्या प्रतीचे गुण मिळाले तरी मागें एकदां लागलेला डाग विमा कंपन्या विसरत नाहींत व त्याचें प्रायश्चित्त आजहि त्यास भोगावें लागतें. विमा कंपनी व विमेदार ह्यांचें नुकसान न होतां ह्या अडचणींतून कांहीं तरी मार्ग निघून सदरहु प्रश्न सोडवला गेला पाहिजे.

"आपण ह्यापूर्वी कोठें विमा उतरला होता काय ?" असा प्रश्न प्रत्येक कंपनी विमाअर्जांत विचारीत असते व त्यांत विमेदारानें दिलेल्या माहितीवरून त्याच्या पूर्वेतिहासाची चौकशी करण्यांत येते. सर्व विमा कंपन्यांचें हित एकमेकांस मदत करण्यांतच असल्यानें विमेदारांविषयीं जरूर ती माहिती त्या परस्परांस पुरवितात व ह्या गतवृत्तांताचा उपयोग विमाअर्ज मंजूर करण्यापूर्वी केला जातो. ह्याकरितां, विमाअर्जांची छाननी करण्याचें काम प्रथमपासूनच पायाशुद्ध व एकजात होणें अगत्याचें असतें. प्रत्यक्ष व्यवहारांत, कंपन्या वेगवेगळें धोरण स्वीकारीत असलेल्या आढळतात व हें धोरण कित्येक प्रसंगीं इतर देशांतील अनुभवावरून स्वतःचें मत बनवून आखलेलें असतें. ह्या कारणानें एखाद्या व्यक्तीचा अर्ज एका कंपनीनें नेहेमीच्या दरानें स्वीकारला तर दुसरी कंपनी त्यावर जादा दरानें हप्त्यांची आकारणी करील, अशी परिस्थिति निर्माण होते. बरें, विमेदारानें चुकून ह्या दुसऱ्या कंपनीकडेच प्रथम अर्ज केला तर त्यावर अपूर्ण पात्रतेचा शिक्का बसून पुनः दुसऱ्या कोणत्याहि कंपनीकडे अर्ज केला असतां हा काळा शिक्का नडण्याची भीति असते.

वरील परिस्थितीची पाश्चात्य देशांतील विमातज्ज्ञांसहि जाणीव आहे व तीमध्यें सुधारणा झाली पाहिजे, असें त्यांचें मत आहे. हिंदुस्थानांतील ह्या संबंधांतले आकडे जमा करून त्यांवरून सिद्धांत मांडण्याचें काम अजून व्हावयाचें आहे. तोंपर्यंत हा व्यवहार असाच चालणार.विमाशास्त्रांत पुढारलेल्या देशांतहि अजून ह्या बाबतींत प्रगति झालेली नाहीं, तेव्हां आपण त्याबद्दल विषाद मानण्याचें कारण नाहीं. अनुभवजन्य व पायाशुद्ध सिद्धांतांच्या अभावीं कशी परिस्थिति उत्पन्न होते, ह्याची फक्त कल्पना येथें करून दिली आहे.

## इराकमध्यें जपानी मालाच्या आयातीचें नियंत्रण

तुम्हांस आमच्या देशांत आपला माल खपवण्याची इच्छा असेल तर तुम्हीं आमचा माल घेतला पाहिजे असें इराकी सरकारनें जपानला स्पष्ट कळवलें असून त्याप्रमाणें कस्टम खात्याचा नियमहि केला आहे. इराकमध्यें खपावयाच्या आपल्या मालाच्या १५ टक्के किमतीचा इराकी माल जपानी कारखानदारांनीं इराकमधून घेतला पाहिजे असा निर्बंध १९३७ सालाकरितां घालण्यांत आला असून १९३८ सालीं हें प्रमाण २५ टक्के होणार आहे. कापड, कापूस, रेशीम, रेयॉन हाच जपानी माल मुख्यत्वेंकरून इराकमध्यें खपतो आणि तेथील बाजार-पेठांत जपानचें प्राबल्य प्रस्थापित होण्यापूर्वी ब्रिटिश मालाची सरशी असे. परंतु जपाननें इराकचा माल देवाण-घेवाण म्हणून घेतला नाहीं तरी त्याच्या स्वस्तपणामुळें तो त्या देशांत मोठ्या प्रमाणांत खपे. नवीन नियमानें जपानी मालाच्या आयातीस आळा बसून इराकमध्यें त्या जातीच्या ब्रिटिश मालाचें बस्तान बसेल.

# स्फुट विचार

## स्वदेशी धंदे—सावधगिरीची सूचना

सांपत्तिक अडचणीमुळें हिंदुस्थान सरकारास आयात मालावर अवर जकाती बसवणें गेल्या सहा-सात वर्षांत जरूर पडलें आहे; आणि ह्या रीतीनें परदेशी मालाच्या आयातीचें नियंत्रण झालें, त्याचा फायदा कित्येक लहान-मोठ्या स्वदेशी धंद्यांस मिळून त्यांची वाढ व उत्कर्ष ह्यांस सहाय उपलब्ध झालें आहे. जकातींचे दर चढवले गेले त्यावेळीं हिंदी उद्योगधंद्यांस त्यांचे योगानें सहाय मिळावें हा हेतु नव्हता. तथापि, केवळ सरकारी उत्पन्न वाढवण्याच्या उद्देशानें बसवण्यांत किंवा चढवण्यांत आलेल्या जकातींचा परिणाम मात्र कांहीं स्वदेशी धंद्यांस उत्तेजन मिळण्यांत झाला आहे, ह्यांत शंका नाहीं. औद्योगिक संरक्षण देण्याच्या इच्छेनें जें धोरण अंगीकारण्यांत आलें नाहीं त्याचा परिणाम संरक्षणांत होऊन बाहेरून येणाऱ्या मालाचें नियंत्रण अप्रत्यक्ष रीतीनें होत आहे आणि त्यामुळें चढवलेल्या जकातींचें उत्पन्न मात्र अपेक्षेच्या मानानें चढत नाहीं ही गोष्ट सरकारच्या नजरेस येऊन आयात जकातींची छाननी व्हावी आणि विशेष उत्पन्न न देणाऱ्या जकाती कमी कराव्या असें त्यांस बरेच दिवस वाटत आहे. हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेम्स ग्रिग, हे उघड उघड खुल्या व्यापाराचे पुरस्कर्ते असून त्यांनीं जकाती उतरवण्याच्या धोरणाचें जाहीर रीतीनें समर्थनहि केलें आहे. हिंदुस्थान सरकारनें ह्या प्रश्नाबाबत चौकशी व सूचना करण्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्याच्या शिफारसींची अंमलबजावणी होण्याचें घाटत असल्याची बातमी आतां प्रसिद्ध झाली आहे. लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचा सल्ला न घेतां ब्रिटिश कापडावरील जकात कमी करण्याबाबतची खास टारिफ बोर्डाची शिफारस सरकारनें आपल्या अधिकारांत तात्काळ नुकतीच अमलांत आणली, तसाच प्रकार वरील अधिकाऱ्यानें केलेल्या सूचनांचे संबंधांत होण्याचा संभव दिसत आहे. वास्तविक पाहतां हा स्वदेशी धंद्यांचा प्रश्न देशास अत्यंत जिव्हाळ्याचा असा आहे आणि त्याची चौकशी करण्याचें काम टारिफ बोर्डाकडे सोंपवणें अगत्याचें होतें; आणि कांहीं झालें तरी जकातींसंबंधाच्या धोरणांत बदल करावयाचा झाल्यास लोकमताच्या व असेंब्लीच्या सहायानें ती गोष्ट घडून येणें अगत्याचें आहे. तरी प्रस्तुत प्रकरणीं लोकमत वेळींच स्पष्टपणें व्यक्त होणें आवश्यक असून आपल्या नियोजित धोरणाचा खुलासा हिंदुस्थान सरकारनें केला पाहिजे.

## हिंद-जपान व्यापारी करार

हिंदुस्थान व जपान ह्यांचे दरम्यान तीन वर्षांमागें व्यापारी करार झाला, त्याच्या फेरविचाराबाबत वाटाघाटीस प्रारंभ झाला आहे. आमच्या देशाच्या बाजूनें पाहिलें असतां हिंदी शेतकरी वर्ग व स्वदेशी कापडाच्या गिरण्या ह्यांच्या हितसंबंधांचें योग्य संरक्षण करणें हा जपानशी व्हावयाच्या कराराचा प्रमुख उद्देश असला पाहिजे. जपानी राष्ट्र हें हिंदी कपाशीचें फार मोठें गिऱ्हाइक आहे आणि त्यामध्यें हा आमचा माल पुष्कळसा खपला नाहीं तर त्याचा बाजारभाव पडल्यावांचून रहाणार नाहीं. हिंदी कपाशीची किंमत उतरणें किंवा तिला देशांत व देशाबाहेर पुरेसें गिऱ्हाइक नाहीं म्हणून तिचें पीक मर्यादित करणें ह्या दोन्ही गोष्टी आमच्या शेतकरी वर्गाच्या दृष्टीनें अनिष्ट आहेत. तेव्हां, जपाननें हिंदी कपास विशिष्ट प्रमाणांत घेतलीच पाहिजे अशी शर्त हिंद-जपान करारांत समाविष्ट होणें अगत्याचें आहे. हिंदी शेतकऱ्यांची ही गरज जाणून, आपलें कापड हिंदुस्थाननें मोठ्या प्रमाणांत घेतलें तरच आपण हिंदुस्थानचा कापूस घेऊं ही शर्त जपान स्वतःच्या औद्योगिक हिताच्या दृष्टीनें पुढें मांडणार हें उघड आहे. जपानच्या हातांतला हा हुकमाचा पत्ताच आहे आणि चालू झालेल्या चर्चेमध्यें त्याचे प्रतिनिधी तो टाकल्याशिवाय रहाणार नाहींत. परंतु हिंदी शेतकरी व कारखानदार ह्यांच्यामधला वरून दिसणारा ह्या प्रकारचा विरोध अगोदरच प्राथमिक वाटाघाटींत दूर करण्यांत आला असून दोन्ही वर्गांची एकमुखी मागणी सरकारला कळविण्यांत आली आहे ही समाधानाची गोष्ट आहे. जपानी मालाच्या हिंदी गिरण्यांच्या मालाशीं होणाऱ्या स्पर्धेस आळा बसण्यासाठी जपानमधून येणाऱ्या कापडाचें प्रमाण कमी करण्यांत यावें अशी स्वदेशी कारखानदारांची मागणी आहे. जपानला हिंदी कापूस घेतल्यावांचून गत्यंतर नाहीं; कारण आमच्या कपाशी सारखा माल त्या राष्ट्रास दुसरीकडे मिळण्याची सोय नाहीं. म्हणून हिंदी कापूस खरेदी करण्याची कबुली देण्यांत जपान ह्या देशावर उपकार करीत आहे किंवा त्यास विशेष सवलतीनें वागवीत आहे असें मुळींच नाहीं, हें स्पष्ट आहे. तेव्हां, कपाशीच्या खपाविषयींचें हिंदुस्थानचें परावलंबन जपानी राष्ट्र दाखवतें तसें अडचणीचें नाहीं हें येथें ध्यानांत ठेवलें पाहिजे. स्वस्त जपानी मालाचें चोहोंकडे आक्रमण चाललें आहे, त्याचाहि विचार होऊन त्यावर उपाय योजणें आवश्यक झालें आहे.

## ब्रिटिश कारखानदारांची संरक्षणाविषयीं मागणी

गेल्या तीन वर्षांतल्या व्यापारी घडामोडींचें सिंहावलोकन करून ब्रिटिश कारखानदारांच्या संघानें ( फेडरेशन ऑफ ब्रिटिश इंडस्ट्रीज ) सरकारला जकातींच्या धोरणाबाबत कांहीं शिफारसी केल्या आहेत. ब्रिटिश धंद्यांचें परदेशी मालाच्या स्पर्धेपासून पुरेसें संरक्षण केलें जावें हा त्या सूचनांचा आशय आहे. चालू जकातींच्या योगानें परदेशी मालाच्या आयातीचें जेथें नियंत्रण होत नाहीं, तेथें जरूर दिसेल त्या देशांतून येणाऱ्या मालाचें परिमाण ठरवून टाकावें; ब्रिटिश साम्राज्यांतील देशांमधून आयात होणाऱ्या मालापासूनहि ब्रिटिश कारखान्यांस संरक्षण मिळावें; सर्व जगांतील राष्ट्रांमध्यें ग्रेटब्रिटन इतका परदेशी माल कोणताच देश घेत नाहीं ह्या वस्तुस्थितीचा फायदा व्यापारी करार करतांना घेतला जावा; ब्रिटिश मालास जे देश सवलती देत नाहींत, त्यांस मित्रत्वाच्या तहांतील व्यापारी सवलतींच्या शर्तींचा फायदा देणें बंद व्हावें; ओटावा कराराची कसून अंमलबजावणी करावी; व्यापारी करार करतांना दुसऱ्या देशांनीं स्वतः बनवलेला माल व अन्य देशांतून आणून निर्गत केलेला माल ह्यांमध्यें भेद करण्यांत यावा आणि सवलतींसाठी ह्यांपैकी पहिल्या प्रकारच्या मालासच महत्त्व दिलें जावें अशा अर्थाच्या त्या शिफारशी आहेत. ब्रिटिश कारखानदारांच्या वरील मागण्यांकडे लक्ष दिलें असतां हिंदी स्वदेशी धंद्यांस संरक्षण देणें किती आवश्यक आहे ह्याची सहज कल्पना येईल. आमचे फडनवीस, सर जेम्स ग्रिग, आपल्या मायदेशांत औद्योगिक संरक्षणासंबंधानें काय चाललें आहे आणि त्या बाबतींत ब्रिटिश सरकार कसें जागरूक आहे ह्याचा विचार करून स्वतःचें धोरण आखतील तर बरें होईल.

## साडेतीन टक्के व्याजाच्या रोख्यानें शंभराची मर्यादा ओलांडली

बाजारांत पैशाचा विपुल पुरवठा असतां साडेतीन टक्क्यांच्या सरकारी प्रॉमिसरी नोटांचा भाव ९९ च्या आसपास घुटमळत रहावा ही गोष्ट आश्चर्य वाटण्यासारखी होती. कांहीं महिन्यांपूर्वी बाजाराची परिस्थिति अशी झाली होती कीं, ह्या नोटांचा भाव शंभराच्यावर जाण्याची अपेक्षा कित्येक लोक करीत होते. हिंदुस्थान सरकारनें मध्यंतरीं २३/४ टक्क्यांचें १९४८-५२ चें कर्ज काढलें त्यामुळें पैसा गुंतण्यास नवें साधन उत्पन्न झालें आणि त्याचा परिणाम साडेतीन टक्के व्याजाच्या नोटांचा वर जाण्याचा वेग थांबण्यांत झाला असें म्हणतां आलें. ट्रेझरी बिलांच्या साधनानें सरकार दर आठवड्यास पैसा बाजारांतून शोषून घेत आहे तरी बिलांवरील व्याजाचा दर हलकाच राहिला आहे. गेल्या आठवड्यांत दोन कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें सरकारनें विकलीं त्यांवर व्याजाचा दर अवघा द. द. ८ आणे ११ पै पडला! पावणे तीन टक्के दराच्या (१९४८-५२) रोख्यांचा बाजारभाव १०० रु. १४ आ. असून ३ टक्के व्याजाच्या रोख्यांची किंमत चार रुपयांनीं शंभराच्यावर आहे. अशा परिस्थितीचा बिनमुदतीच्या ३१/२ टक्के व्याजाच्या रोख्यांवर अनुकूल परिणाम होणें साहजिक होतें. युरोपमधील अनिश्चित राजकीय परिस्थिति आणि लंडनमधील रोखे-बाजाराचा एकंदर नूर ह्या गोष्टीहि मुंबईच्या रोखेबाजारावर परिणामकारक होत असतात. साडेतीन टक्क्यांच्या नोटांनीं शंभराची मर्यादा ओलांडली ही गोष्ट स्वाभाविक असली तरी त्या रोख्यांच्या इतिहासांत नमूद करण्यासारखी आहे ह्यांत शंका नाहीं. त्यांच्या बाजारभावांत विशेष चढउतार होतो किंवा १०० च्या वर तो कांहीं आठवडे टिकतो हें आतां पहावें.

---

## बिन तिकिटाचा रेल्वे प्रवास

तिकिटावांचून प्रवास करणारांची संख्या मोठी असल्यानें हिंदी रेल्वेजचें उत्पन्न बुडतें असा अनुभव आल्यावरून रेल्वे कायद्यांत दुरुस्ती करण्याचें ठरलें आहे. बिन तिकिटाच्या प्रवासाचा गुन्हा करणाऱ्या उतारूवर रेल्वेस फसवण्याचा आपला उद्देश नव्हता हें सिद्ध करण्याची जबाबदारी टाकण्यांत येणार असून अपराधी दोन महिन्यांपर्यंतच्या शिक्षेस पात्र होईल. कायद्यांत ह्या प्रकारची दुरुस्ती आवश्यक असली तरी तिच्या अंमलबजावणीमुळें रेल्वेचें नुकसान लबाडीनें करण्याचा ज्यांचा हेतु नाहीं अशा उतारूंस शिक्षा व त्रास होणार नाहीं अशी खबरदारी घेतली जाणें इष्ट आहे. घाईमुळें किंवा गर्दीमुळें तिकिट घेतां आलें नाहीं असें कित्येक वेळां अनेक उतारूंच्या बाबतींत घडतें. अशी मंडळी निष्कारण कायद्याच्या कचाटींत सांपडणार नाहीं अशी तजवीज करणें शक्य आहे. त्याचप्रमाणें, तिकिटें मिळण्याची सोय अधिक विस्तृत प्रमाणावर करणें, प्रवाशांवर नजर राहील अशी व्यवस्था करणें, इत्यादि सुधारणा रेल्वेजनीं आपल्या स्वतःच्या कारभारांत केल्या पाहिजेत. लबाडीस शिक्षा व्हावी पण निरपराधी माणसांस त्रास होऊं नये अशा रीतीनें कायद्याचा अंमल होणें अगत्याचें आहे.

---

## ओगले ग्लास वर्क्स लि.

वरील कंपनीचा ३१-१२-३५ असेरचा १५ वा वार्षिक अहवाल आमचेकडे आला आहे. स्वदेशी काचेच्या धंद्यास संरक्षणाची जरूर असूनहि तें त्यास न मिळाल्याकारणानें सर्वच कारखान्यांची परिस्थिति बिकट झाली आहे. ह्या संबंधांत माहिती व टीका "अर्था"मध्यें वेळोवेळ आली आहे. ओगले ग्लास वर्क्सनें प्रचलित स्पर्धेस तोंड देऊन १,८३,५८६ रुपयांचा काचमाल अहवालाचे सालीं तयार केला व त्यांतून इतर खात्यांचेहि वरचे खर्च भागविण्याइतका नफा मिळविला, ही गोष्ट अभिनंदनीय आहे. प्रतिकूल परिस्थिति उत्पन्न झाली असतां तयार व्हावयाच्या मालाच्या प्रकारांत बदल करून कारखान्यास नव्या क्षेत्रांचीं द्वारें उघडून देण्यांत ओगले वर्क्सचें चातुर्य दिसून येतें. यांत्रिक सहाय्यानें बाटल्या करण्याचा त्यांचा उपक्रम यशस्वी होत असून त्या मालास मागणीहि भरपूर आहे. कंदीलांचे बाबतींत मात्र कारखान्यास उतरत्या बाजारभावांस तोंड देणें अशक्य झालें आहे व ज्या उत्पादनांत कूस रहात नाहीं तें चालू ठेवण्यांत हंशील नाहीं ह्या योग्य विचारानें हें खातें तूर्त बंद ठेवण्यांत आलें आहे. अहवालाचे सालीं अडीच हजार मोठे स्टोव्ह विकले गेले. आतां कंपनीनें लहान व कमी किंमतीचा ज्यूनियर नमुना काढला असून तोहि लोकप्रिय होईल अशी अपेक्षा आहे. एनामलिंग खात्याचें काम समाधानकारक चाललें असून जी. आय. पी. रेल्वेचें एक अवघड काम कंपनीनें दक्षतेनें पुरें केलें आहे. कंदील व काचमाल ह्यांचे बाबतींत जपानची स्पर्धा विशेष जाचक होत असल्यानें व हिंदी कारखान्यांनीं उत्पादनाचे पद्धतींत बहुंशीं जपानी कारखान्यांचें अनुकरण केलें असल्यानें, जपानांतील कार्यपद्धतीचा ताजा अनुभव मिळविण्यासाठी कंपनीचे अधिकारपरत्वें असलेले डायरेक्टर श्री. श्रीपादराव ओगले ह्यांनीं त्या देशांत जाऊन अलीकडे प्रत्यक्ष निरीक्षण केलें आहे. त्याचा फायदा कारखान्यास होईल ह्यांत संशय नाहीं. प्रतिकूल परिस्थितींत हा कारखाना नेटानें चालविण्यांत येत आहे व आज भागीदारांस डिव्हिडंड देण्यासारखी परिस्थिती नाहीं. तथापि ती आज नाहीं उद्यां सुधारून ओगले ग्लास वर्क्सला चांगले दिवस येतील अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं

---

## हौरा पुलाचें कंत्राट

कलकत्त्याशेजारच्या नवीन हौरा पुलाचें दोन कोटि रुपयांचं कंत्राट क्लीव्हलंड ब्रिज अँड इंजिनिअरिंग कंपनी नांवाच्या ब्रिटिश मंडळीस द्यावें असें हौरा ब्रिज कमिशनर्सनीं ठरविलें होतें, त्या निर्णयास बंगाल सरकारची मंजूरी मिळाली आहे. हिंदुस्थानांतल्या कांहीं कंपन्यांनीं गट करून त्याच्या वतीनें नवीन पुलाच्या कामाचें टेंडर दिलें होतें. ह्या देशांत धंदा करणाऱ्या मंडळ्यांस तें काम मिळालें असतें तर येथील उद्योगधंद्यास उत्तेजन प्राप्त झालें असतें असें लोकमत पूर्वीच प्रसिद्ध झालें आहे. तथापि, क्लीव्हलंड कंपनीची कामाची योजना व तिच्या संबंधाचें टेंडर हींच निवड करणाऱ्या मंडळानें पसंत केल्यानें हिंदुस्थानांतल्या प्रतिस्पर्धी गटाची निराशा झाली आहे. बंगाल सरकार तरी ह्या संबंद प्रश्नाचा फेर विचार करील ह्या आशेचा तंतु राहिला होता, तोहि आतां तुटला आहे. हौरा पुलांत वापरावयाचे पोलादी बनावटीचे भाग हिंदुस्थानांत तयार झालेले असल्यास देशी कारखान्यांस काम मिळेल अशी अपेक्षा प्रथमपासून होती. तथापि आतां एका ब्रिटिश कंपनीचें टेंडर पसंत करण्यांत आलें तरी हिंदुस्थानांतील कारखाने व ती कंपनी ह्यांचे दरम्यान करार होऊन कच्चें पोलाद टाटा कंपनीकडून घेतलें जाईल आणि पुलाचे भाग बंगालमधल्या कारखान्यांत तयार होतील अशी अपेक्षा आहे. असें झाल्यास हौरा पुलाचें कंत्राट परदेशी कंपनीकडे गेलें तरी त्या संबंधातलें कांहीं काम येथें तयार होईल.

---

## संघटित व कार्यक्षम ब्रिटिश सहकारी चळवळ

### आमच्या सहकाऱ्यांनीं घ्यावयाचा बोध

ग्रेट ब्रिटनमधील सहकारी चळवळीच्या मध्यवर्ती संस्थेचा गेल्या सालचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यांत दिलेल्या माहितीवरून सदरहु चळवळीची प्रगति झपाट्यानें चालली असल्याचें दिसून येतें. ब्रिटिश सहकारी संस्था मुख्यत्वेंकरून मालाची विक्री करण्याचा व्यवहार करतात आणि त्याच्या अनुषंगानें मोठ्या प्रमाणावरील खरेदी आणि कारखाने काढून त्यांत उत्पादनहि हातीं घेतात. ब्रिटिश राष्ट्रीय सहकारी " यूनिअन " ही फेडरेशनच्या स्वरूपाची प्रातिनिधिक संस्था आहे आणि सल्ला देणें व चळवळीची घडी नीट बसवणें हें तिचें महत्वाचें कार्य आहे. गेल्या वर्षीं ब्रिटिश सहकारी संस्थांची पैशाची एकूण उलाढाल १७ कोटि रुपयांनीं वाढली आणि चालू सालीं ही प्रगति ज्यास्त जोरानें होईल अशी यूनिअनची अपेक्षा आहे. ही आशा फलद्रूप झाल्यास १९३६ सालांत मालाची विक्री करणाऱ्या सहकारी संस्थांची किरकोळ व्यापारांतली देवघेव ३०० कोटि रुपयांच्यावर जाईल असा अंदाज आहे. मध्यवर्ती यूनिअनच्या व्यवस्थामंडळानें आपल्या अहवालांत सर्व संस्थांनीं जुटीच्या राष्ट्रीय धोरणास पाठिंबा देण्याची आवश्यकता प्रतिपादली आहे. संस्था एककल्लीपणानें वागून आपल्या मध्यवर्ती यूनिअनला धाब्यावर बसवतील तर ब्रिटिश सहकारी चळवळीची पीछेहाट होईल असा अभिप्राय वरील मंडळानें व्यक्त केला आहे. प्राथमिक संस्थांमध्यें व्यवहारक्षेत्राबाबत मतभेद उत्पन्न होऊन भांडणें झाल्यास त्यांचा निर्णय करण्याची सत्ता यूनिअनला असली पाहिजे असें त्यांचें निक्षून सांगणें आहे. चारशें सहकारी संस्थांत प्रत्येकी एक हजारापेक्षां कमी सभासद आहेत. तर नऊशें संस्थांत प्रत्येकी सुमारें पांच हजार आहेत. ह्या परिस्थितींत लहान संस्थांचें एकीकरण होणें इष्ट वाटत आहे. अशा संस्था डबघाईस आल्या म्हणजे त्यांचें काय करावें आणि त्या दुसऱ्या संस्थांत सामील कराव्या कीं काय हा विचार करण्यापेक्षां किफाइतशीर रीतीनें चालतील अशा संस्थांचाच पुरस्कार केला जावा ह्या मतास मान्यता मिळत आहे.

विकावयाचा माल (उदाहरणार्थ, पायतनें) कारखान्यांत तयार करण्याच्या सहकारी संस्था आहेत. त्यांच्या व्यवहारक्षेत्राची मर्यादित आंखणी होण्याची जरूर भासत असून त्या प्रश्नाचा विचार चालू आहे. किरकोळ विक्रीच्या, घाउक विक्री करणाऱ्या व उत्पादक आणि पातीदारीच्या कारखान्यांच्या अशा तीन प्रकारच्या माल तयार करणाऱ्या सहकारी संस्था आज ग्रेटब्रिटनमध्यें अस्तित्वांत आहेत. त्यांमध्यें अनिष्ट स्पर्धा होऊं नये आणि उत्पादन व विक्री ह्यांचा मेळ बसावा ह्यासाठी योजना करण्याचें घाटत आहे. अनेक प्रकारांच्या मालाची (उदाहरणार्थ, दूध, कोळसा, औषधें इ.) विक्री करणाऱ्या संस्थांस हरतऱ्हेचें सहाय देणारीं मंडळें वाढत्या प्रमाणावर कार्य करीत आहेत. निरनिराळ्या मालाच्या किरकोळ विक्रीच्या क्षेत्रांत सहकारी संस्थांचें पाऊल सारखें पुढें पडत असल्याचें अहवालांत दिलेल्या त्यासंबंधांतल्या आकड्यांवरून दिसतें. ग्रेटब्रिटनमध्यें सरकारच्या देखरेखीखाली मालाच्या विक्रीची व्यवस्था करण्यांत आली असून परदेशी आयातीच्या नियंत्रणानें व अंतर्गत पुरवठा मर्यादित करून बाजारभाव वाढवण्याचें तत्त्व त्या योजनेच्या मुळाशी आहे. बाहेरच्या मालाची आयात मर्यादित होऊन त्यांतला खप चालू कारखाने व दुकानें ह्यांचेमध्यें वाटला जातो व ह्याचा परिणाम सहकारी संस्थांस भोगावा लागतो. ह्या संस्थांस आपल्या प्रतिस्पर्ध्यांकडून खरेदी करून तो माल विकणें भाग पडतें. ही अडचण ब्रिटिश सहकारी खरेदी-विक्रीच्या दुकानांस चांगलीच जाणवत आहे. ग्रेटब्रिटन मधल्या सहकारी चळवळीविषयीं वर त्रोटक हकीकत दिली आहे तीवरून तेथील सहकारी संस्था व कार्यकर्ते स्वतःच्या पायावर उभे राहून संघटित व स्वतंत्र, पण कार्यक्षम रीतीनें आपल्या हितानहिताचे प्रश्न कसे सोडवतात ह्याची कल्पना येईल. हिंदुस्थानांतील सहकाऱ्यांनीं असल्या उदाहरणांवरून कितीतरी बोध घेण्याजोगा आहे. स्वावलंबन, संघटन आणि शिस्त ह्यांचे बाबतींत आपण मागसलेले असल्याची जाणीव त्यांस होऊन तिच्या प्रेरणेनें त्यांचे हातून प्रत्यक्ष कार्य घडलें पाहिजे.

---

### म्हैसूर संस्थानांतील सहकारी चळवळ

[ म्हैसूर सरकारनें आपल्या संस्थानांतील सहकारी चळवळीची पहाणी करून चळवळींत सुधारणा सुचविण्यासाठी एक कमिटी नेमली होती, तिच्या सूचनांचा मतितार्थ येथें थोडक्यांत दिला आहे. ]

( १ ) बिनसरकारी जबाबदार लोकांचा सल्ला घेतल्याखेरीज धोरण बदलण्यांत येऊं नये. असा सल्ला देण्यासाठी एक सल्लागार मंडळ स्थापन करण्यांत यावें.

( २ ) चळवळीच्या प्रतिनिधींना कायदे-मंडळांत जागा मिळावी.

( ३ ) सरकारी अधिकाऱ्यांना सहकारी संस्थांच्या मॅनेजिंग कमिटीवर काम करण्यापूर्वी सरकारची आगाऊ परवानगी घ्यावी लागते, ती लागूं नये.

( ४ ) दलितवर्गासाठी वेगळ्या सोसायट्या स्थापन करावयाच्या, त्यांची व्याप्ति विशिष्ट धंद्यांपुरतीच असावी.

( ५ ) स्त्रियांकरितां वेगळ्या पतपेढ्यांची, त्या स्त्रिया म्हणूनच केवळ, आवश्यकता नाहीं.

( ६ ) सहकारी सोसायट्यांच्या सभासदांस, त्यांस दरमहा पगार मिळत असल्यास, प्रॉव्हिडंड फंडांत रकम टाकणें सक्तीचें असावें.

( ७ ) सरकारी अधिकाऱ्यांना आपल्या खात्याच्या अगर कचेरीच्या सोसायटीमार्फतच फक्त कर्ज घेतां यावें. त्यांच्या कर्ज काढण्यावर कडक बंधनें असावींत.

( ८ ) सरकारनें आपल्या देखरेखीखाली व फडनविशी खात्यास जोडून एक 'सेंट्रल बँक' स्थापन करावी.

---

### दूधदुभत्याच्या पुरवठ्याची सहकारी सोसायटी

मुंबई शहर व त्याचीं उपनगरें ह्यांस शुद्ध दूध व तूप पुरविण्यासाठी एक सहकारी सोसायटी स्थापन करण्याचें घाटत असून कलकत्ता व मद्रास येथील त्या पद्धतीच्या संस्थांकडून माहिती मागविण्यांत आली आहे.

---

### हौरा पुलाच्या चालू खर्चाची तरतूद

नवीन हौरा पूल सुस्थितींत राखण्यासाठी येणाऱ्या खर्चाची तरतूद व्हावी म्हणून बंगाल सरकार खालीलप्रमाणें कर बसविणार आहे:— (१) कलकत्त्यामधील जमिनींच्या व इमारतींच्या वार्षिक उत्पन्नावर १½ % कर, (२) हौरा स्टेशनकडे अगर त्या स्टेशनांतून बाहेर ईस्ट इंडिया रेल्वेवरून किंवा बंगाल नागपूर रेल्वेवरून जाणाऱ्या मालावर दर मणावर ज्यास्तींत ज्यास्त २ पै प्रमाणें पट्टी. मीठ, मॅंगेनीज व कोळसा यांवर सदरहु पट्टी माफ आहे. (३) ई. आय. आर. व बं.ना. रेल्वेवरून हौरा पूल ओलांडणाऱ्या प्रत्येक उतारूवर ज्यातींत ज्यास्त ३ पै कर. (४) हुबळी नदीवर पोर्ट कमिशनरनें चालविलेल्या होड्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या पहिल्या वर्गाच्या उतारूंवर ६ पै व दुसऱ्या वर्गाच्या उतारूंवर ३ पै कर.

---

### रस्त्यांचें राष्ट्रीकरण

ग्रेटब्रिटनमधील महत्त्वाचे रस्ते एकजात सरकारी नियंत्रणाखाली आणण्यांत यावयाचे असून स्थानिक स्वराज्य संस्थांचे हातांतून ते काढून घेण्यांत येतील. हल्लींच्या व्यवस्थेंत वहातुक खात्यास कोणत्याहि बाबतींत--रस्तारुंदी, सायकलींसाठी स्वतंत्र मार्ग आखून देणें इ.—वहातुकीचें नियंत्रण करतां येत नाहीं. आतां हे ४,५०० मैल लांबीचे रस्ते सरकारी नियंत्रणाखाली आल्यानें त्यांची रुंदी, पृष्ठभाग, उजेडासाठी दिव्यांची व्यवस्था इत्यादि गोष्टींत एकसूत्रीपणा आणतां येऊन वहानांचा वेग वाढला तरी अपघात टाळतां येतील. ही नवी व्यवस्था येत्या सरकारी वर्षाचे सुरवातीपासून अंमलांत येईल.

---

### उत्पादक मालाच्या निर्गतीवर बंधन

स्वित्झरलंड हें घड्याळांच्या धंद्याचें माहेरघर समजलें जातें. रशियानें त्या देशांतून घड्याळें तयार करण्याचीं कांहीं यंत्रें मागविलीं असतां स्विस सरकारनें ह्या करारास मान्यता देण्याचें नाकारलें. हीं यंत्रें तयार करणाऱ्या शेकडों कामगारांस जरी सुरवातीस काम मिळालें, तरी शेवटीं परदेशी घड्याळांची जाचक स्पर्धा स्विस कारखानदारांना नडेल, हें कारण वरील नकाराचे मुळाशी होतें. ग्रेटब्रिटननें कापड तयार करण्याचीं यंत्रें मागणीबरहुकुम जगभर निर्गत केलीं, तरी त्या देशाच्या विशिष्ट स्थानामुळें व त्याच्या साम्राज्याच्या विस्तारामुळें परदेशी कापडाच्या स्पर्धेपासून इतके दिवस लँकेशायर आपला बचाव करूं शकलें. स्वित्झरलंड देशाची गोष्ट वेगळी आहे.

---

### जर्मनीच्या वसाहती व जागतिक शांतता

दक्षिण आफ्रिकेचे लष्करी खात्याचे मंत्री, मि. पिरो, हे एका मुलाखतींत म्हणाले:—

"जर्मनीच्या वसाहती हिरावून घेतल्याबद्दल त्या देशास आफ्रिकेमध्यें नवा मुलुख नुकसानभरपाईदाखल दिल्याखेरीज जर्मनीशी शांतता टिकविणारा करार करण्यास अनुकूल भूमिकाच तयार होणें अशक्य आहे, असें ग्रेटब्रिटनमधील मुत्सद्यांचें मत आहे. युरोपमध्यें श्वेतवर्णीयांची संस्कृति कायम टिकविण्यास आफ्रिकेमध्यें जर्मनांचें सहकार्य मिळणें आवश्यक आहे."

---


**धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०**

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | |
|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |

| | | |
|---|---|---|
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |

| | |
|---|---|
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

---

**पहिल्यानें सुरक्षितता**

रस्त्यावरून जातांना तुम्ही सुरक्षिततेचा मार्ग पहिल्यानें पहातां. हीच गोष्ट पैसे बँकेंत किंवा विम्यांत गुंतविण्यासंबंधीं आहे. पहिल्यानें तुम्ही पैशाची सुरक्षितता पहातां; नंतर व्याज किंवा बोनस.

हिशेब तपासणी आणि प्रतिनिधित्व सरकारी खात्याकडे असल्यानें

**दि बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लि.**

मध्यें आपले पैसे गुंतविल्यास कसलाच धोका नाहीं.

सविस्तर माहितीकरितां लिहा—

कुळकर्णी आणि कंपनी, चीफ ऑर्गनायझर्स
चुनीलाल डी. बरफीवाला, मॅनेजिंग डायरेक्टर.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

---

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

# सहकार व ग्रामसुधारणा

## बागलाण–कळवण–चांदवड तालुका सहकारी परिषद

नाशिक जिल्ह्यांतील बागलाण, कळवण व चांदवड ह्या तालुक्यांची सहकारी परिषद सटाणें येथें ३० जून रोजीं श्री. दे. रा. वाघ ह्यांचे अध्यक्षेतखाली भरली होती. स्वागताध्यक्ष, श्री. धर्माजी तानाजी पाटील, ह्यांच्या भाषणानंतर अध्यक्षांचें प्रास्तविक भाषण झालें व कित्येक ठराव परिषदेनें पास केले. त्या ठरावांपैकीं कांहीं ठरावांची रूपरेषा येथें दिली आहे:–

सोसायटयांकडून प्रांतिक को. बँकेनें पाच टक्के दरानें व्याज घ्यावें– कर्जाची रकम देण्यासाठी बँकेनें सोईचे दोन वार ठरवून द्यावे–हंगामांत सहा वाजेपर्यंत बँकेनें भरणा स्वीकारावा– वर्षाचें व्याज आकारून व तें मुद्दलांत मिळवून बँक सोसायटयांकडून व्यवहारांत चक्रवाढव्याज घेतात; ही पद्धत बंद करावी–चांदवड तालुक्यांतील सोसायटयांच्या खालावलेल्या परिस्थितीची पहाणी करून उपाययोजना करण्यासाठी कमिटी नेमावी–नवीन नियम ४८ बद्दल निषेध–सोसायटयांसंबंधाचा पत्रव्यवहार बँकेनें व सहकारी खात्यानें मराठींतून करावा–सभासदांत साक्षरतेचा प्रसार करण्यासाठी इन्स्टिटयूटनें योजना करावी–सोयसाटयांचे रोखे नोंदताना सोसायटयांचे चेअरमन अगर सेक्रेटरी ह्यांची ओळख स्वीकारण्यांत यावी–कळवण–चांदवड तालुक्यांतील पश्चिम भागांत भिल्ल सोसायटयांच्या धर्तीवर सोसायटया स्थापाव्या—इ. इ.

## ग्रुप सेक्रेटरींचा डिबेटिंग क्लब

कळवण–चांदवड तालुक्यांतील ग्रुप सेक्रेटरींचा डिबेटिंग क्लब स्थापन करण्यासाठी श्री. ठाकूर, बँक इन्स्पेक्टर, बॉम्बे प्रॉ. को. बँक, कळवण, यांनीं सेक्रेटरींची ता. १०–६–१९३६ रोजीं सभा बोलविली होती. सदरहु क्लबास यूनियन सुपरवायझर श्री. क्षीरसागर व श्री. देशपांडे यांनीं मूर्तस्वरूप दिलें. ता. १०-७-१९३६ रोजीं 'शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति व ती सुधारण्याचे उपाय' यावर चर्चा करण्यांत आली. श्री. नाडकर्णी, एजंट बाँबे प्रॉ. को. बँक, हे वरील क्लबाचे सेक्रेटरी आहेत.

## येलूर गांवास सर फ्रेडिक साइक्स शील्ड देण्याचा समारंभ

ग्रामसुधारणेबाबत सरकारनें मध्यविभागासाठी ठेवलेलें "सर फ्रेड्रिक साइक्स शील्ड" येलूर गांवास मिळालें. हें शील्ड अर्पण करण्याचा समारंभ सातारा जिल्ह्याच्या कलेक्टरांचे हस्तें ता. ११।७।३६ रोजीं इसलामपूर येथें मोठ्या थाटानें साजरा होऊन येलूर गांवाचा गौरव करण्यांत आला. सदर समारंभास अनेक अधिकारी व इतर लोक मिळून दोन हजारांवर लोक हजर होते. बँडच्या वादनांत कचेरींतून ढाल वाजतगाजत आणवून उच्चासनावर मांडल्यावर सभेच्या कामास सुरवात झाली. श्री. फलटणे वकील, सेक्रेटरी, ग्रामसुधारणा संघ, वाळवें, यांनीं सर्वांचें स्वागत केलें. त्यानंतर श्री किणीकर, प्रांतसाहेब, दक्षिणभाग, सातारा, यांनीं येलूर गांवानें आतांपावेतों ग्रामसुधारणेच्या कोणत्या गोष्टी केल्या हें सांगितलें. श्री. भाऊराव पाटील यांनीं, २०–२५ वर्षांपूर्वीं खून-मारामाऱ्यांत अग्रेसर असलेल्या येलूर गांवानें पूर्वींच्या गोष्टी सोडून सुधारणेच्या कामांत अग्रेसरत्व मिळविल्याबद्दल येलूर गांवाचें अभिनंदन करून पुढेंहि तें त्यानें टिकवावें अशी आशा प्रदर्शित केली. मि. हमीदअली, कलेक्टर, ह्यांनीं शील्ड अर्पण करतांना येलूरकरांचें अभिनंदन केलें. शेवटीं येलूरकरांतर्फे श्री. शंकरराव बोगर यांनीं शील्ड मिळविण्याच्या बाबतींत सहाय करणारांचे व समारंभास उपस्थित असणारांचे आभार मानले.

## सांगली संस्थान शिक्षक सहकारी पतपेढी लि.

वरील पतपेढी १०-५-३२ रोजीं स्थापन झाली. ३१ मे १९३६ अखेर तिच्या पटावर २९५ सभासद होते. सभासदांच्या वाढत्या संख्येबरोबर वर्गणीरूपानें जमा होणारें भांडवलहि वाढत आहे. एकूण ८½ हजार रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकीं सुमारें ७ हजार रुपये सभासदांकडे कर्जाऊ आहे. सालअखेर पतपेढीस ३९१ रु. ९ आणे ११ पै. नफा झाला त्यांतून भागीदारांस ६½ टक्के दरानें डिव्हिडंड वाटण्याबद्दल मॅनेजिंग कमिटीनें शिफारस केली. पतपेढीची वार्षिक साधारण सभा सांगली येथें प्रिन्सिपॉल कर्वे ह्यांचे अध्यक्षतेखाली भरली होती.

पतपेढीच्या १३६ सभासदांनीं पतपेढीकडून कर्ज घेतलें. मे १९३६ अखेर फक्त ४७ रु. थकबाकी राहिलेली दिसते. जुनें कर्ज फेडणें व घरखर्च ह्यांसाठीच कर्जाचा विनियोग मुख्यतः करण्यांत आला. तथापि, शेती, लग्न, बाळंतपण, औषधोपचार, इत्यादींसाठीहि कर्जाचा उपयोग झाला. संस्था उपयुक्त कार्य करीत असल्याचें अहवालावरून दिसतें.

## स्थानिक स्वराज्य त्रैमासिक

लोकल सेल्फ गव्हर्मेंट इन्स्टिटयूटच्या महाराष्ट्र शाखेच्या विद्यमानें निघणाऱ्या स्थानिक स्वराज्य त्रैमासिकाचा मे महिन्याचा अंक प्रसिद्ध झाला आहे. सदरहु अंकांत दिल्ली येथील अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य परिषदेच्या अध्यक्षांचें भाषण सारांशानें दिलें असून १९३४–३५ सालच्या म्युनिसिपल कारभारासंबंधींच्या सरकारी अहवालाचें समग्र मराठी भाषांतर प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. अहमदनगर व पुणें येथील म्युनिसिपालट्यांच्या व प. खा. जिल्हा बोर्डाच्या वार्षिक अहवालांतील महत्त्वाच्या बाबींचा गोषवाराहि देण्यांत आला आहे. श्री. य. द. खोले ह्यांनीं आपल्या लेखांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक हितसंबंधांची चर्चा केली असून तुलनात्मक व आकडेवार माहितीच्या आधारें सदरहु संस्थांस उपलब्ध असलेल्या करांच्या बाबी विस्तृत करणें इष्ट व आवश्यक आहे, असें सुचविलें आहे. स्थानिक संस्थांचें आर्थिक परावलंबन दूर करण्यासाठी त्यांस योग्य कर बसविण्याचे मार्ग दाखवून व राष्ट्रीय करांपैकीं योग्य हिस्सा देऊन मदत करणें सरकारचें कर्तव्य आहे, असें श्री. खोले ह्यांनीं प्रतिपादलें आहे.

## आनंद ( खास अंक )

बालवर्गासाठी कै. वा. गो. आपटे ह्यांनीं सुरू केलेल्या ह्या मासिकास ३० वर्षें पूर्ण झालीं असून त्याचा ३१ व्या वर्षाचा पहिला–जुलै १९३६ चा–अंक प्रसिद्ध झाला आहे. इतकीं वर्षें अव्याहतपणें बालवाचकांची सेवा चालवून आनंदानें आपलें नांव सार्थ केलें आहे. प्रस्तुत खास अंक गोष्टी, चित्रें, इत्यादि साधनांनीं उत्कृष्ट रीतीनें सजविलेला असून 'आनंदा'च्या कीर्तीस शोभेल असा आहे.

## पोलिस खात्याचा अहवाल

### कांहीं उद्‌बोधक माहिती

मुंबई इलाख्यांत एकूण १७,५७६ पोलिस शिपाई असून त्यांचेवरील अधिकाऱ्यांची संख्या ७७८ आहे.

* * * * *

पोलिस खात्यावर १९३५--३६ सालीं ९९ लक्ष रुपये खर्च झाला. त्यापूर्वीच्या वर्षी ९७३/४ लक्ष रुपये खर्च झाला होता. प्रत्येक पोलिसामागे ५१५ रु. १४ आणे, असें खर्चाचें प्रमाण पडलें.

* * * * *

इंग्लंड व वेल्समध्यें १.५३ चौरस मैलास व ८४५ लोकवस्तीस एक पोलिस असें प्रमाण आढळतें; मुंबई इलाख्यांत हेंच प्रमाण अनुक्रमें ४.४९ चौरस मैलांस व ९१७ लोकसंख्येस एक पोलिस, असें पडतें.

* * * * *

अहवालाचे सालीं पोलिसांनीं ७५,८१४ बेवारशी कुत्रीं मारलीं.

* * * * *

मुंबई सबर्बन जिल्ह्यांत गुन्हेगारीचें प्रमाण सर्वांत ज्यास्त आढळतें. रत्नागिरी जिल्ह्यांत गुन्हेगारीचें प्रमाण अत्यंत अल्प आहे.

* * * * *

१९३५-३६ सालीं पोलिसांनीं एकूण २,५०४ मोटरगाड्यांची नव्यानें नोंद केली व ११,०३७गाड्यांची फेरनोंद झाली.

* * * * *

जिल्ह्यांतील रस्त्यांवर होणाऱ्या मोटारींचे अपघातांत कशी वाढ होत आहे, हें खालील आकडे दाखवितातः—

| | अपघातांत आलेले मृत्यु | जखमी झालेले लोक | अपघातांची संख्या |
|---|---|---|---|
| १९३४ | ११२ | १,३८८ | १,२२३ |
| १९३५ | १४१ | १,३९९ | १,४५० |

## वेस्टर्न इंडिया विमा कंपनी

### प्रगतीचा गोषवारा

(सन १९१३ ते १९३५) रु.

| | |
|---|---|
| एकंदर चालू काम | २,७०,००,००० चे वर |
| १९३५ सालांतील नवीन काम | ५१,३०,०४२ |
| एकंदर वार्षिक उत्पन्न | १६,५५,२३६ |
| एकंदर दिलेली क्लेमची रक्कम | १४,४३,७७० |
| लाइफ व रिझर्व फंड | ६६,८४,२९८ |
| कंपनीची एकंदर जिंदगी | ७१,७१,०९३ |
| खर्चाचें प्रमाण | शेकडा २४.१८ |
| लॅप्सचें प्रमाण | „ ५ हून कमी |
| त्रैवार्षिक बोनस | रु. ७५ व ६० |

### हिंदुस्थान व आर्थिक उन्नति

अहमदाबाद येथील नवीन व्यापारी कॉलेजाचे उद्‌घाटन-समारंभाचे प्रसंगीं भाषण करतांना सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास म्हणाले :—“ हिंदुस्थानचें भवितव्य व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांचे प्रगतीवर अवलंबून आहे. पुस्तकी ज्ञान किंवा अध्यापकांचीं व्याख्यानें ह्यांवर विसंबून न रहातां विद्यार्थ्यांनीं स्वतंत्रपणानें विचार करण्यास शिकलें पाहिजे. पांचशापेक्षां अधिक गृहस्थांच्या जटीच्या आश्रयानें हें नवीन कॉलेज अस्तित्वांत आलें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.”

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—२ |
| १% करमाफ लोन (१९४५-५५) ... | १२१—५ |
| ५% (१९३९-४४) लोन ... ... | १०८—१० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—१४ |
| ४% १९६०–७० ... ... | ११५—९ |
| ४% १९४३ ... ... ... | १११—३ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | १००—२ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०८—० |
| २¾% १९४८–५२ ... ... | १००—१४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११०—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १००—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०९—१४ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | १११—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२३—८ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३६—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११८—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३६—१० |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १६००—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३९—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १०८—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—४ |
| अहमदाबाद-प्रांतिज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९२२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५९—६ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २२७—८ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५¾% ) | १६५८—१२ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६०७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९०—० |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६३—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १७८—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७०६—४ |

## ऑडिटरला कंपनीच्या साधारण सभेस हजर रहाण्याचा हक्क आहे काय ?

१९१३ सालच्या हिंदी कंपनी कायद्यानें, ऑडिटरनें साधारण सभेस हजर रहाण्याविषयीं कांहींहि तरतूद केलेली नाहीं; तथापि १९३६ च्या दुरुस्ती बिलांत ऑडिटरास हजर रहाण्याचा हक्क देण्यांत यावा, असें सुचविलेलें आहे. १९२९ सालच्या इंग्लिश कंपनी कायद्यानें हा हक्क मान्य केलेला आहे. कंपनीच्या सभेपुढें ऑडिटरनें तपासलेले हिशेब मंजुरीसाठी मांडण्यांत येतात त्यावेळीं ऑडिटरला हजर रहाण्याचा व बोलण्याचा हक्क असावा, डायरेक्टरांच्या मर्जीवर ती गोष्ट अवलंबून राहूं नये, अशी तरतूद दुरुस्त बिलांत करण्यांत आली आहे. सध्या ऑडिटरला डायरेक्टरांचे परवानगीनें सभेस हजर रहातां येतें व सामान्यतः त्यास डायरेक्टरांचें निमंत्रणाहि असतें.तथापि,डायरेक्टरांच्या खुषीचा हा प्रश्न असल्यानें त्यांच्या धोरणानेंच त्यास वागावें लागतें. नवीन बिलांत सुचविलेली योजना मंजूर झाल्यास ऑडिटर डायरेक्टरांच्या इच्छेविरुद्धहि बोलूं शकेल, इतकेंच नव्हे,तर त्यानें बोलणें जरूर असतांनाहि तो बोलला नाहीं, तर त्याचें मौनत्व डायरेक्टरांच्या दिशाभूल करणाऱ्या भाषणास संमतिनिदर्शक आहे असें समजलें जाईल. लंडन जनरल बँकेविषयक ह्या संबंधांतील निवाडा प्रसिद्ध आहे. त्या बँकेच्या ऑडिटरनें " ह्या वर्षी डिव्हिडंड देण्यांत येऊं नये " असा शेरा मारला असतांहि सात टक्के दरानें डिव्हिडंड वाटावें असें डायरेक्टरांनीं सुचविलें, परंतु ऑडिटरनें सभेमध्यें हजर राहूनहि मौन स्वीकारलें व खरी परिस्थिति भागीदारांच्या नजरेस आणून दिली नाहीं. ऑडिटरनें तपासलेल्या हिशेबांत डिव्हिडंड वांटण्यापुरता वाढावा दिसत होता त्याचा फायदा डायरेक्टरांनीं घेतला. ऑडिटरनें, ऑडिटर ह्या नात्यानें आपलें काम बजावलें नाहीं ह्याबद्दल त्यानें नुकसानभरपाई करणें जरूर असून तो व कंपनीचे डायरेक्टर ह्यांस संयुक्त प्रतिवादी करणेंहि रास्त होईल, असा निर्णयांत उल्लेख आहे. —"जर्नल ऑफ दि इंडियन मर्चेंट्स चेंबर"वरून.

---

## सोन्याच्या साठवणीसाठी भुयार व भुइकोट किल्ला

युरोपिअन राष्ट्रांकडून धनकोच्या नात्यानें घेतलेलें ऐनजिनसी सोनें सुरक्षितपणें राखून ठेवण्याकरितां अमेरिकन राष्ट्रास कडेकोट बंदोबस्त करणें प्राप्त झालें आहे. हें १,५०० कोटि रुपये किंमतीचें सोनें भरभक्कम भुयारांत साठवण्यांत येऊन त्याच्या भोंवतीं मजबूत तटबंदी करण्यांत आली आहे. किल्ल्याच्या भिंतीवर तोफा डागल्या जातील आणि किल्ल्याच्या सभोंवार घोडेस्वार व तोफखाना ह्यांचा पहारा राहील. सध्या वरील सोनें न्यूयॉर्कमध्यें आहे, तें केंटकी परगण्यांत नॉक्स किल्ल्यांत हालवलें जाईल. सशस्त्र व सुरक्षित अशा पन्नास आगगाड्यांत घालून तें नेण्यांत यावयाचें आहे. गाड्यांच्या हालचाली सक्त पहाऱ्यांत पण गुप्त रीतीनें होतील. भुयाराच्या माथ्यावर किल्ल्याची तटबंदी दोन मजले उंचीची आहे व तिचें काम कॉंक्रीटचें आहे. त्यास प्रत्येक कोपऱ्यावर बुरुज आहे व त्यांवर तोफा डागल्या जातील. किल्ला चौकोनी आहे व त्याच्या प्रत्येक बाजूची लांबी शंभर फूट आहे.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२
अधिकृत भांडवल : : : १०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल: ५,००,०००

**दर शेअरची किं. : रु. ५०**

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

---

**WANTED** Arts Graduates & Medical Practitioners to push up Rural Uplift & Medical Relief Movement in furtherance of Insurance Benefit Plans throughout district places in the Presidency. Adequate remuneration to capable workers.

Apply with particulars to :—

Head Office :— 99, LAXMI ROAD, POONA. — General Manager, THE DAWN OF INDIA LIFE INS. CO. LTD.

---

The House for Quality goods at most reasonable prices.

**K. M. BELSARE & Co.,**

**PLAIN & DECORATIVE FURNITURE**

FOR

Home, School, College, Office etc. in

WOOD & IRON

Sadashiv, POONA 2

मुलांचा आनंद कोणा पालकाला नको? त्यांतून 'आनंदा' चा खास अंक! मग काय त्यावर मुलांच्या उड्यावर उड्या!

## 'आनंदा'च्या खास अंकाचा थाट

आतां सर्व मुलांना माहीत झाला आहे. ती दोन रंगी छपाई चित्रांची लयलूट, गोष्टींची रम्यता, कवितांची बहार–हो! सांगायचें विसरलोंच! यंदां पुष्कळ कवितांना त्यांतील वर्णनाच्या चित्रांचीच चौकट बसविली आहे–गुळगुळीत कागद, सुबक छपाई व मोहरेदार मुखपृष्ठ हे खास अंकाचे विशेष त्यांना ठाऊक झाले आहेत. 'आनंद' वर्षभर त्यांची किती करमणूक करतो, त्यांच्या ज्ञानांत किती भर घालतो व त्यांना किती हवाहवासा वाटतो हें तीं केव्हांहि सांगतील. आपण आपल्या मुलांकरितां तो एक वर्षभर घेऊन पहा म्हणजे आपणांसहि कळून येईल. **वार्षिक वर्गणी** ट. ह. सह **लहान अंकाची २ रु. मोठ्या अंकाची ३ रु. वर्षारंभ जुलैपासून.** अंक दरमहा पंधराव्या तारखेस प्रसिद्ध होतो.

पत्ताः—म्यानेजर आनंद, पुणें २.

नळ, फ्लशिंगचे संडास, ड्रेनेज, फर्निचर, इत्यादींबद्दलच्या कामासाठी

## श्री हर अँड को



हौस विचारा.

कोणतेंहि काम त्वरित व समाधानकारक केलें जातें.

डेक्कन जिमखान्यासमोर, पुणें ४.

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः–

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष–श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | दर हजारीं त्रैवार्षिक नफा | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

## " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

## न. वि. वडनेरकर

जव्हेरी आणि सराफ, रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

## नवीन फणसपोळी

व

मसाल्याची चटकदार

## ऑफिस सुपारी

मिळण्याचें खात्रीचें ठिकाणः

**कुळकर्णी आणि मंडळी.**

लोणी व किराणा दुकान सदाशिव पेठ, फडतरे चौक, पुणें, २.

## स्वदेशी

कापड म्हणजे काय?

(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.

या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.

हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.

खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण

## स्वदेशी भांडार

लक्ष्मीरोड, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ | पुणें, बुधवार, तारीख २९ जुलै, १९३६. | अंक ३१

## दि गुड-वुइल ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारास

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत.

पत्रव्यवहार करावा.

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा;

मॅनेजिंग डायरेक्टर

## आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

पत्ता : डेक्कन जिमखाना, पुणें ४

यांचीं शास्त्रोक्त, खात्रीलायक व गुणकारी औषधें

| | |
|---|---|
| च्यवनप्राश पौष्टिक व शक्तिवर्धक | २० तो. १ रु. |
| वज्रदंती दंतमंजन | बा. किं. ४ आणे |
| केशवर्धन तेल | १० तो. १५ आणे |
| एरंडपाक मलावरोध घालविणारा | १० तो. ६ आणे |
| हेमगर्भ मात्रा सर्व वात कफरोगहर | मात्रा ५ रु. |
| सुवर्णराजवंगेश्वर धातुवर्धक | १ तो. ५ रु. |
| वाळा सरबत उन्हाळ्यांत थंड पेय | १ पौं. १२ आणे |
| त्रिभुवनकीर्ति सर्व ज्वरांवर | १ तो. १२ आणे |

याशिवाय प्रवाळ, मात्तिक इ. भस्में, सर्व तऱ्हेचीं आसवें, अरिष्टें, मात्रा, गुटिका, अवलेह वगैरे मागवन एकवार अनुभव घ्या. कॅटलॉग मागवा.

ठिकाठिकाणीं एजन्सी देणें आहेत. एजन्सी घेऊं इच्छिणारांनीं नियम मागवावे.

## WANTED.

Influential and hard-working Agents At Ahmednagar, Dhulia, Kolhapur, Nasik and Poona for Sun Life Assurance Company of Canada on liberal terms. Apply :—

The Manager,
Sun Life Assurance Company of Canada,
Hornby Road, Fort, BOMBAY.

*For All Medicinal Requisites*

— TRY —

## N. MAHADEV & Co.

DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS

City Post Office Corner, POONA 2.


## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

## K. K. & Co.

Photographic Dealers
POONA.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः—ओगले ग्लास वर्क्स. लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः—

१ केळकर ब्रदर्स,

बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी,

लक्ष्मीरोड.

# विविध माहिती

### बँकांस सुट्टी

ता. ३ ऑगस्ट रोजीं नारळी पौर्णिमेनिमित्त बँका बंद राहतील.

### जगांतील सर्वांत उंच चिमणी

जर्मनीमध्यें बांधण्यांत येत असलेल्या एका कारखान्याच्या चिमणीची उंची सुमारें ४६५ फूट भरेल व तिच्या बांधकामासाठी १४ लक्ष विटा लागतील. चिमणीच्या पायाची रुंदी सुमारें ८० फूट असून भिंतींची रुंदी सुरवातीस ६½ फूट आहे.

### ग्रेटब्रिटनचा जहाजांचा धंदा

जहाजांतून मालाची वहातुक करण्यांत ग्रेटब्रिटनचें अग्रेसरत्व होतें, परंतु आतां तो देश आपलें पुढारीपण गमावूं लागला आहे. १९०० सालीं जगाचा निम्मा व्यापार ब्रिटिश जहाजांतून होई; १९१४ सालीं हें प्रमाण ४१·६ टक्के इतकें होतें व आतां तें २६·८ टक्क्यांवर आलें आहे. गेलीं चार वर्षें सर्वच देशांस जहाज-वहातुकीच्या बाबतींत वाईट गेलीं. परंतु १९३५-३६ सालीं थोडी सुधारणा झाली असतांहि ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्यांचा हिस्सा बराच कमी झाला.

### युद्धप्रसंगीं अन्नसामुग्रीची तरतूद

युद्धाचा प्रसंग ओढवला असतां ग्रेटब्रिटनमध्यें अन्नाचा मुबलक पुरवठा कसा पुरेसा होईल, ह्यासंबंधीं एक सरकारी कमिटी चौकशी करीत आहे.

### टेलिफोनचा दर : मिनिटास १८ रुपये

ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्या दोन देशांमध्यें बिनतारी टेलिफोन १९२७ सालीं सुरू झाला, त्यावेळीं प्रत्येक मिनिटास ६५ रुपये असा दर होता. १ जुलै १९३६ पासून दर उतरविण्यांत आला असून आतां एका मिनिटास फक्त १८ रुपये पडतात.

### देशाच्या व्यापारांत राष्ट्रीय दृष्टी

फ्रेंच कायदे मंडळांत दगडी कोळशाच्या धंद्याची पुनर्घटना होण्यासंबंधीं नवीन कायदा पास झाला आहे. परदेशांतून येणाऱ्या कोळशापैकीं ४० टक्के माल फ्रेंच आगबोटींतूनच आला पाहिजे असा निर्बंध त्यांत घालण्यांत आला आहे. आगबोटीच्या देशी धंद्यास उत्तेजन देणें हा सदरहु कलमाचा उद्देश आहे, हें उघड आहे.

### ट्रेझरी बिलांवर आठ आणे आठ पै व्याज

गेल्या आठवड्यांत सरकारला ट्रेझरी बिलांवर २ कोटि रुपये हवे होते, त्यांबद्दल चार कोटि रुपयांचीं टेंडरें दाखल होऊन विकलेल्या दोन कोटींच्या बिलांवर द. सा. द. शे. ८ आणे ८ पै इतकें व्याज बसलें.

### ब्रिटिश पोलादाच्या धंद्याची चौकशी

ब्रिटिश पोलादाच्या धंद्याबाबत चौकशी व शिफारसी करण्याची सूचना बोर्ड ऑफ ट्रेडच्या प्रेसिडेंटनीं आयात-जकात सल्लागार मंडळास केली आहे. धंद्याच्या परिस्थितीची पहाणी करून राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें त्यांत कोणतें धोरण व कार्यक्रम आंखणें जरूर आहे ह्या विषयीं सदरहु मंडळानें सल्ला द्यावयाचा आहे.

### शस्त्रसामुग्रीचें उत्पादन करणारे कारखाने सरकारी होणार

शस्त्रसामुग्री तयार करणारे कारखाने स्वतःच्या ताब्यांत घेण्याचें फ्रेंच सरकारनें ठरविलें असून तेथील कायदेमंडळानें त्या संबंधांतील बिल पास केलें आहे. चालू कारखान्यांचे भाग गेल्या सात वर्षांतील त्यांच्या सरासरी बाजारभावानें विकत घेण्यांत येतील.

### मुंबई इलाख्यांतील जनावरांची संख्या

मुंबई इलाख्यांतील शेतीविषयक जनावरांची खानेसुमारी जानेवारी १९३५ मध्यें करण्यांत आली. सबंद इलाख्यांत मिळून ९९½ लक्ष जनावरांची नोंद झाली. अशी मोजणी दर पांच वर्षांनीं होत असते.

### म्हैसूर संस्थानांतील सहकारी सोसायट्या

१९३४-३५ अखेर म्हैसूर संस्थानांत एकूण १,९९८ सहकारी सोसायट्या होत्या. त्यांच्या सभासदांची संख्या १,४४,८९८ असून भागांचें भांडवल व रिझर्व्ह फंड ५१½ लक्ष रुपये व २९¾ लक्ष रुपये अनुक्रमें होते.

### जर्मनीमधील बेकारी कमी होऊं लागली

जर्मनीमधील बेकारी कमी होत आहे. गेल्या मे अखेर एकूण १४ लक्ष ९१ हजार लोक त्या देशांत बेकार होते. हा आकडा गत सालाच्या तत्सम आकड्यापेक्षां २६ टक्क्यांनीं कमी आहे.

### मुंबई कायदेमंडळाची येती बैठक

मुंबई कायदेमंडळाची येती बैठक पुणें येथें ता. ७ सप्टेंबर रोजीं सुरू होईल.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. ११ जुलै रोजीं पुरा झालेला आठवडा | ५८, ३५, ८७० |
| ता. १८ जुलै रोजीं पुरा झालेला आठवडा | ८८, ४६, ९८४ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते १८ जुलै १९३६ अखेर | २, ७७, ५५, ०५, २५४ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३७० |
| २ रेल्वे–मोटार स्पर्धा ... | ३७१ |
| ३ महाराष्ट्र व कर्नाटक ह्यांमधील आर्थिक परिस्थितीचें सिंहावलोकन... | ३७१ |
| ४ स्फुट विचार ... | ३७२ |
| दि बँक ऑफ महाराष्ट्र—स्वदेशी साखरेचा उत्कर्ष—देशी साखरेच्या धंद्यापासून जनतेचा फायदा—प्रांतिक रस्त्यांचा स्वार्थत्याग–खेडेगांवांशी संबंध राखा–पुणें जिल्ह्यांतील फळांची पैदास व विक्री-विषारी धुरापासून बचाव करण्याची तयारी | |
| ५ ॲल्युमिनिअम ... | ३७५ |
| ६ लंडनमधील हिंदी एक्स चेंज बँक ... | ३७५ |
| ७ दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. | ३७६ |
| ८ दि बँक ऑफ बार्शी लि. | ३७६ |
| ९ मुंबई इलाख्यांतल्या सहकारी चळवळीची माहिती | ३७७ |
| १० सहकारी वृत्त ... | ३७७ |
| ११ १९३४–३५ सालांतील शिक्षणविषयक प्रगति | ३७८ |
| १२ निवडक बाजारभाव | ३७९ |



# अर्थ

बुधवार, ता. २९ जुलै, १९३६


## रेल्वे–मोटार स्पर्धा

रेल्वेज व मोटारी ह्यांमधून होणाऱ्या वहातुकीमध्यें स्पर्धा होऊं नये, अशा रीतीनें त्या दोघांची सांगड घालून देण्याची आवश्यकता केवळ हिंदुस्थानांतच नव्हे, तर इतर देशांतहि भासूं लागली आहे. स्पर्धेमुळें रेल्वेज व मोटारी ह्या दोघांचेंहि नुकसान होतें व सर्वसाधारण आर्थिक घडामोडींवरहि त्याचा अनिष्ट परिणाम होतो. ज्या वहातुकीस रेल्वेचा मार्ग ज्यास्त सोईचा आहे, तेथें मोटारींनीं स्पर्धा करूं नये व ज्या ठिकाणीं मोटारींची वहातुक ज्यास्त सोइस्कर असेल तेथें रेल्वेजनीं शिरूं नये, हें तत्त्व अंमलांत आणणें दोघांसहि फायद्याचें आहे. कांहीं बाबतींत आगगाड्या व मोटारी ह्यांचें सहकार्य ज्यास्त युक्त ठरेल व त्या ठिकाणीं एकमेकांना परस्पराशी मिळतें घ्यावें लागेल. त्याचप्रमाणें, दोन्ही प्रकारांच्या वहातुकीमध्यें योग्य त्या सुधारणा कराव्या लागतील. आगगाड्यांच्या इतकें मोटारींचें संघटण हिंदुस्थानांत तरी अजून झालेलें नाहीं. दराच्या आकारणीमधील तफावत हीहि मोटारी व आगगाड्या ह्यांच्या सहकार्यांतील एक मोठी अडचण आहे. जगांतील पुढारलेल्या बहुतेक सर्व राष्ट्रांत ह्या अडचणी दूर करण्यासाठी कायदे झालेले असून मोटारवाले व रेल्वेजचे प्रतिनिधि ह्यांचीं संयुक्त मंडळें स्थापन करण्यांत आलेलीं आहेत. मोटारींतून वहातुक करण्यासाठी कित्येक देशांत सरकारची आगाऊ परवानगी घ्यावी लागते व ती मिळण्यापूर्वी सरकार सार्वजनिक हिताचें रक्षण करण्यासाठी योग्य ती खबरदारी घेतें. जरूरीपेक्षां ज्यास्त मोटारींस, माल वहाण्यास परवाना मिळत नाहीं. जर्मनीमध्यें मोटारींच्या प्रसारास ज्यास्त उत्तेजन मिळतें, असा अनुभव आहे. ऑस्ट्रिया सारख्या देशांतून, कोणता माल कोणत्या मार्गानें पाठविण्यांत यावा, ह्यासंबंधीं वांटणी करून देण्यांत आलेली आहे. फ्रान्समध्यें, दूर जावयाचा जड माल रेल्वेनें पाठवावा लागतो, परंतु थोडक्या अंतराच्या वहातुकीस रेल्वे मार्ग बंद करून मोटारींस जागा करून द्यावी लागते. जर्मनी व ग्रेटब्रिटन ह्या देशांत रेल्वे कंपन्या स्वतःच्या मोटारी ठेवून त्यांचें वेळापत्रक आपल्या वेळापत्रकाशीं जोडून घेतात; ह्या उलट, फ्रान्समध्यें रेल्वे कंपन्यांना मोटारींच्या वहातुकीशीं कोणताहि संबंध ठेवण्यास प्रतिबंध आहे. वरील सर्व माहितीचें सार थोडक्यांत खालीलप्रमाणें काढतां येईल:—

(१) वहातुकीच्या नव्या कंपन्यांस परवानगी देण्यापूर्वी प्रत्येक सरकार त्यांच्या आवश्यकतेसंबंधीं बारकाईनें चौकशी करतें.

(२) साधारणपणें, हे निर्बंध भाड्याच्या मोटारींना व लांब पल्ल्याच्या वहातुकीस लावण्यांत येतात. खासगी रीतीनें होणाऱ्या वहातुकीवर बंधनें नाहींत.

(३) मोटार-वहातुकीच्या कंपन्यांवर दर प्रसिद्ध करण्याची, सर्वांस सारखें वागविण्याची व माल नेण्यास नकार न देण्याची सक्ती करण्याची प्रवृत्ति आढळते. ह्या उलट, रेल्वेजवरील कांहीं नियंत्रणें शिथिल करण्यांत आलीं आहेत.

मोटारी व रेल्वेज ह्यांच्यामधील स्पर्धेचा परिणाम त्यांच्या दर-आकारणीवर होत असल्यानें, त्यांची सांगड घातली जाणें सार्वजनिक हिताचें होईल ह्यांत संशय नाहीं. हिंदुस्थानांतील ह्या संबंधांतील परिस्थितीचा आढावा आम्हीं "अर्था" च्या गेल्या अंकाचे अग्रलेखांत घेतलेला आहे. इतर राष्ट्रांतील परिस्थिति व तीवरील उपाययोजना ह्यांची तुलनात्मक माहिती हिंदुस्थानांतील प्रश्न सोडविण्यास उपयोगी पडेल. रेल्वेजच्या राष्ट्रीय मालकीमुळें आपल्या देशांत ह्या प्रश्नानें वेगळयाच स्वरूपाचा आर्थिक प्रश्न उत्पन्न केलेला आहे व त्याचा निकाल करणें अगत्याचें झालें आहे. हिंदी रेल्वेजच्या दरांत लवकरच वाढ होणार असून त्याचा परिणाम काय होतो, ह्याकडे सर्वांचें लक्ष लागून रहाणें स्वाभाविक आहे.

## महाराष्ट्र व कर्नाटक ह्यांमधील आर्थिक परिस्थितीचें सिंहावलोकन.*

महाराष्ट्र व कर्नाटक ह्यांच्या आर्थिक परिस्थितीसंबंधाच्या प्रश्नावर लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट निबंधास एक हजार रुपयांचें बक्षीस टिळक स्वराज्य संघानें जाहीर केलें होतें, त्यास अनुसरून श्री. वाय. एस. पंडित ह्यांनीं लिहिलेला निबंध संघानें नेमलेल्या परीक्षक मंडळास पसंत पडून तो आतां छापून पुस्तक रूपानें प्रसिद्ध करण्यांत आला आहे. मुंबई इलाख्यांतील व मध्यप्रांतांतील मराठी मातृभाषा असलेले जिल्हे व वऱ्हाड ह्यांचा महाराष्ट्रांत अंतर्भाव केलेला असून बेळगांव, धारवाड, विजापूर, व कारवार ह्या जिल्ह्यांचा कर्नाटकांत समावेश करण्यांत आला आहे. लेखकानें प्रारंभीं भौगोलिक माहिती दिली असून भूपृष्ठ, नद्या-पर्वत, हवा-पाणी, जंगलें, इत्यादि नैसर्गिक वैशिष्ट्यांचें विस्तारानें वर्णन केलें आहे. त्याच्यापुढें, औद्योगिक क्रान्तीच्या पूर्वीपासून आतांपर्यंत शेतीमध्यें झालेल्या स्थित्यंतरांची थोडक्यांत माहिती आली आहे. कपास, गहूं, ऊंस, भुइमूग इत्यादि व्यापारी पिकांवरच प्रामुख्यानें आजवर कसा भर दिला गेला व खाण्याच्या धान्यांची कशी आबाळ झाली, ह्याचें दिग्दर्शन नंतर आलें आहे.

* "इकनॉमिक कंडिशन्स इन महाराष्ट्र ॲन्ड कर्नाटक" लेखकः—श्री. वाय. एस. पंडित, एम. ए., पृ. २१२.

शेतकऱ्यांस वर्षभर शेतांत काम नसल्यानें, कित्येक महिने त्यांस स्वस्थ बसावें लागतें. मागें निदान स्थानिक गरजा भागविण्यासाठी कांहीं वस्तू तयार करण्यांत तरी शेतकऱ्यांचा वेळ जाई, परंतु आतां बाहेरून स्वस्त व तयार माल मुबलक येऊं लागल्यानें उद्यम धंदे नाहींसे झाले आहेत. वर्षांतील सहा महिने त्यांस काम देणाऱ्या कांहीं धंद्याची तजवीज होऊन शेतकऱ्यांची ही गरज भागविण्यांत आली पाहिजे. मोठ्या प्रमाणावर चाललेल्या सुनियंत्रित धंद्यांत कापडाच्या गिरण्यांचा समावेश होतो, परंतु त्यांतील बहुतेकांची मालकी महाराष्ट्रीयांच्या हातांत नाहीं. औद्योगिक कारखान्यांची वाढ एकूण लोकसंख्येच्या मानानें अल्प झाली आहे व कोंकण आणि कर्नाटक ह्या भागांत मोठ्या प्रमाणावर चाललेला एकहि धंदा आढळून येत नाहीं. लहान प्रमाणावर चालविण्यांत येणारे धंदे कसेबसे तगून आहेत, त्यांत उपयोगिली जाणारी यंत्रसामुग्री कार्यक्षम नाहीं व भांडवलाच्या व विक्रीच्या व्यवस्थेचा पूर्ण अभाव आहे. पुस्तकाच्या अखेरच्या भागांत लेखकानें व्यापार, वहातुक, भांडवल व त्याची तरतूद, इत्यादींची माहिती दिली असून शेवटीं समारोप केला आहे. वरील प्रत्येक बाबतींत सुधारणा करण्यास अमर्याद वाव असून मोठ्या प्रमाणावर पद्धतशीर रीतीनें प्रयत्न केल्याखेरीज महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिति सुधारणार नाहीं हें अनुमान त्यावरून सहज निघतें. लेखकानें आपल्या पुस्तकांत प्रत्येक ठिकाणीं तपशीलवार आकडे देऊन व समतोलपणानें चर्चा व परिस्थितीचें वर्णन करून ती सुधारण्याची दिशा दाखवून दिली आहे. आर्थिक प्रश्नांचें महत्त्व आतां महाराष्ट्रीयांस वाटूं लागलें असल्यानें त्यांस प्रस्तुत पुस्तक उत्तेजनकारक होण्यासारखें आहे. टिळक स्वराज्य संघानें महाराष्ट्रास व कर्नाटकास सध्याच्या परिस्थितींत अत्यंत जिव्हाळ्याचा वाटणारा विषय हातीं घेऊन त्या संबंधाची माहिती पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली ह्याबद्दल त्या संस्थेचें अभिनंदन केलें पाहिजे. ग्रंथलेखक, श्री. पंडित, ह्यांनींहि आपलें काम उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें ह्यासंबंधानें त्यांचेंहि कौतुक करणें आवश्यक आहे. विवेचन पद्धति सोपी व सुबोध असून लेखकानें दोनशें पृष्ठांच्या मर्यादेंत विषयाची मांडणी उत्कृष्ट केली आहे, ह्यांत शंका नाहीं.

### युद्धसामुग्रीच्या बाबतींतल्या स्वावलंबनाची प्रतवारी

उद्यां नाहीं तरी परवा जगांत मोठें युद्ध होणार ह्या कल्पनेनें राष्ट्रांची स्वावलंबनाची तयारी किती आहे ह्याचा अंदाज करण्यांत डोकीं खर्चलीं जात आहेत, ह्यावरून भविष्यकाळ चिंताकारक आहे ह्यांत दुर्दैवेंकरून शंका नाहीं. जगांतील राष्ट्रांमध्यें जास्तींत जास्त सामुग्रीच्या स्वावलंबनाचें सामर्थ्य अमेरिकेंत आहे असें एकानें आकडे मोडून सिद्ध केलें आहे. युद्धास अत्यावश्यक असलेला २४ प्रकारांचा माल हिशेबांत घेऊन त्यानें असें अनुमान काढलें आहे कीं त्यांचे बाबतींत अमेरिकेच्या पुष्कळ खाली पण दुसरा नंबर जर्मनीचा लागतो. जर्मनीचें स्वावलंबन सामर्थ्य अमेरिकेच्या सामर्थ्याच्या एक-तृतियांश इतकें आहे. फ्रान्सचा नंबर तिसरा व रशियाचा चौथा आहे. ब्रिटिश राष्ट्र त्याच्या थोडेसें खाली येतें आणि इटली व जपान ह्यांचा नंबर अगदी शेवटीं आहे.

## स्फुट विचार

### दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

दि बँक ऑफ महाराष्ट्र ह्या पुणें येथें नुकत्याच स्थापन झालेल्या संयुक्त भांडवलाच्या व्यापारी बँकेची स्टॅट्यूटरी सभा व पहिली साधारण सभा गेल्या रविवारीं पार पडल्या. जून १९३६ अखेर बँकेनें केलेल्या प्रगतीचा त्यावेळीं आढावा घेण्यांत आला, त्यांतील महत्त्वाच्या आकड्यांचा सारांश आजच्या अंकांत ३७६ व्या पृष्ठावर देण्यांत आला आहे. अवघ्या पांच महिन्यांत ह्या बँकेनें विशेष खटपटीखेरीज सुमारें १ लक्ष ८० हजार रुपयांच्या दर्शनी किंमतीचे भाग विकून त्यांपैकीं ९० हजार रुपये बँकेकडे रोख जमा केले. ५० रुपयांच्या प्रत्येक भागापैकीं फक्त २५ रुपयेच आज घेऊन उरलेले २५ रुपये तूर्त न मागण्याचें बँकेनें ठरविलेलें आहे. सुमारें २½ लाखांच्या ठेवी ठेवून जनतेनें बँकेवरील आपला विश्वास प्रकट केला आहे. ता. ८ फेब्रुवारी रोजीं बँकेच्या उद्घाटनाचे वेळीं बँकेच्या ध्येयासंबंधीं खुलासा करण्यांत आला होता, तेंच ध्येय पुढें ठेऊन बँकेनें आपलें धोरण आखलें आहे. महाराष्ट्रांतील बँकिंगच्या धंद्याची संघटनात्मक पद्धतीनें प्रगति घडवून आणण्याच्या हेतूनें तिनें कांहीं योजना हातीं घेतल्या आहेत. त्या यशस्वी होऊन, अल्प अवधींत बँक लोकप्रिय झाली त्याच रीतीनें तिची प्रगति शीघ्र गतीनें होईल व 'बँक ऑफ महाराष्ट्र' हें आपलें नांव ती सार्थ करील अशी आम्हांस आशा आहे.

### स्वदेशी साखरेचा उत्कर्ष

हिंदुस्थानांतील देशी साखरेच्या धंद्याची विलक्षण प्रगति अलीकडे झाली आहे तिच्यासंबंधानें अधिकारयुक्त वाणीनें बोलण्याचा कोणास हक्क असेल तर तो सर विजयराघवाचार्य, शेती संशोधन मंडळाचे माजी उपाध्यक्ष, ह्यांस आहे असें म्हटलें, असतां त्यांत किंचितहि अतिशयोक्ती होण्याची भीति नाहीं. ह्या विषयासंबंधानें पुण्यांत मागें व्यक्त केलेले विचार त्यांनीं अन्नमलय विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांपुढें नुकतेच पुन्हां मांडले. देशी साखरेच्या धंद्याचा उत्कर्ष होण्याचें मुख्य कारण त्यास मिळालेलें जकातीचें संरक्षण हें असून त्या योगानें उंसाची वाढलेली पैदास, परदेशांत जाणाऱ्या कोट्यवधि रुपयांची बचत, हजारो लोकांस मिळालेला कामधंदा, इत्यादि स्वरूपांत हिंदी जनतेस फायदा मिळत आहे. गेल्या सात वर्षांत उंसाखालचें क्षेत्र दहा लक्ष एकरांनीं वाढलें असून सुधारलेल्या व सकस जातींच्या उंसाच्या लागवडींत पांचपट वाढ झाली आहे. ह्या अवधींत साखरेचे कारखाने २९ चे १४५ झाले आहेत व साखरेची पैदास ९० हजार टनांपासून ६ लक्ष १० हजार टनांवर गेली आहे. चालू सालीं देशी साखरेचें एकूण उत्पादन ८ लक्ष टन होईल असा अंदाज आहे. परदेशी साखरेची आयात मागें दहा लक्ष टन होती ती आतां सव्वा दोन लक्ष टन पर्यंत उतरली आहे. येत्या दोन वर्षांत देशी साखरेची पैदास दहा लक्ष टन होऊन हिंदुस्थान साखरेच्या संबंधांत पूर्णपणें स्वावलंबी होईल अशी सर विजयराघवाचार्य ह्यांची अपेक्षा आहे. ह्या वाढीबरोबर साखरेची किंमत उतरली असून ती महायुद्धापूर्वीच्या मानानेंहि स्वस्त आहे. संरक्षक जकातींमुळें साखर खाणाऱ्या जनतेवर खर्चाचा बोजा मुळींच पडलेला नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

### देशी साखरेच्या धंद्यापासून जनतेचा फायदा

स्वदेशी साखरेच्या धंद्याचा उत्कर्ष झाल्यामुळें विलायती साखरेची आयात संपुष्टांत आली आणि परकी साखरेस पैसा द्यावा लागला असतां तो देशांतच राहिला. १९३४–३५ सालांत देशी कारखान्यांमध्यें १२½ कोटि रुपयांची साखर तयार झाली. ती विकून आलेल्या किमतीपैकीं निम्मा पैसा म्हणजे सुमारें ६ कोटि रुपये ऊंस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या पदरांत पडले, १ कोटि २० लक्ष रुपये वहातुकींच्या साधनांच्या मालकांस मिळाले, ३ कोटि रुपयांची कामकरी लोकांची मजूरी झाली आणि ५० लक्ष रुपये नोकरांचा पगार म्हणून त्यांस देण्यांत आले. देशी साखरेच्या कारखान्यांत २ लक्ष कामकरी व ९ हजार शिक्षित नोकर आहेत. ह्या आकड्यांवरून देशी साखरेच्या उत्पन्नाची वांटणी जनतेमध्यें कशी सर्वहितकारक रीतीनें होत आहे हें दिसून येईल. साखरेच्या कारखान्यांच्या मिळकतींच्या पैशानें बड्या भांडवलवाल्यांचे खिसे गरम होतात ही कांहीं जणांची समजूत साफ चुकलेली आहे ही गोष्ट सर विजयराघवाचार्य ह्यांनीं वर निर्दिष्ट केलेले आकडे देऊन आपल्या अन्नमलयनगर येथील भाषणांत स्पष्ट केली आहे. देशी धंद्यास सरकारचें संरक्षण मिळालें असतां त्याचा उपयोग राष्ट्राच्या आर्थिक उन्नतीचे कामीं कसा होऊं शकतो ह्याचा उत्कृष्ट पुरावा हिंदी साखरेच्या धंद्यानें गेल्या पांच–सात वर्षांत केलेल्या झपाट्याच्या प्रगतींत मिळण्यासारखा आहे. स्वदेशी धंद्यांस हिंदी जनतेनें संघटित रीतीनें, उत्साहानें व नेटानें सहाय करून सरकारचें धोरणहि त्यांस अनुकूल करून घेण्याचें अगत्य किती आहे हें आतां निराळें सांगण्याची आवश्कता नाहीं. इतर राष्ट्रें स्वतःचें आर्थिक धोरण परिस्थितीस अनुसरून बदलीत आहेत, अशा स्थितींत औद्योगिक संरक्षणाच्या हिंदुस्थान सरकारच्या धोरणाचा ओघहि योग्य दिशेनें वळणें जरूरीचें झालें आहे अशी सूचना सर विजयराघव ह्यांनीं आपल्या भाषणांत अखेरीस केली, तिचें रहस्य आमच्या पुढाऱ्यांच्या ध्यानांत नीट येईल अशी आशा आहे.

---

### प्रांतिक रस्त्यांचा रेल्वेजसाठी स्वार्थत्याग

रेल्वे-मोटार स्पर्धेच्या प्रश्नास इतर देश कसें तोंड देत आहेत, ह्या संबंधींची माहिती आजच्या अग्रलेखामध्यें आम्हीं दिली आहे. सिमला येथें भरलेल्या ट्रॅन्सपोर्ट अडव्हायसरी कौन्सिलच्या बैठकींत जें धोरण आखण्यांत आलें, तें इतर देशांतील योजनांचा आढावा घेऊनच आखलें असलें पाहिजे, असें म्हणण्यास जागा आहे. लांब पल्ल्यावर जाणारा माल लोहमार्गानेंच जाणें इष्ट आहे, असा सदरहु कौन्सिलचा अभिप्राय आहे. आंतरप्रांतीय रस्ते चांगल्या स्थितींत टिकण्याविषयीं हिंदुस्थान सरकार नेहेमी जागृत असतें व जड लॉऱ्यांच्या वहातुकीमुळें हे रस्ते खराब होणार अशी ॲडव्हायसरी कौन्सिलला भीति वाटत आहे. सरकारी रस्त्यांवरून खासगी रीतीनें अगर भाड्यानें वहातुक करणाऱ्या मोटार वाहनांनीं सरकारी परवाना काढला पाहिजे व ह्या परवान्यांत लिहिलेल्या विशिष्ट रस्त्यांवरूनच आणि विशिष्ट माल भरूनच मोटार गाड्यांनीं प्रवास केला पाहिजे, अशा अर्थाची अट घालण्यांत यावयाची आहे. अशा प्रकारचे परवाना-विषयक नियम जाचक होण्याचा संभव आहे व नियमांची अंमलबजावणी करण्याचें काम प्रांतिक सरकारांवर सोंपवलें तरी त्यांतली अडचण कायम रहाणार, अशी भीति वाटते. तथापि, रेल्वेजचें उत्पन्न वाढविण्याकरितां मध्यवर्ती सरकारास येनकेनप्रकारेण रस्त्यांवरील वहातुकीची स्पर्धा कमी करणें आवश्यक आहे व त्याकरितां शक्य त्या उपायांचा अवलंब करण्यांत येणार आहे, असें दिसतें. पेट्रोलवरील जकातीपासून हिंदुस्थान सरकारास मिळणाऱ्या उत्पन्नाचा कांहीं भाग प्रांतिक सरकारांस वांटून दिला जातो, ह्या गोष्टीचा फायदा घेऊन मध्यवर्ती सरकार प्रांतिक सरकारांवर दडपण पाडण्याचा प्रयत्न करील, असा रंग दिसतो. पहिलीं सात वर्षेपर्यंत, प्रांतिक सरकारांच्या वाट्यांस येणाऱ्या रकमेपैकीं एक चतुर्थांशापेक्षां ज्यास्त रकम, त्यांनीं हिंदुस्थान सकारच्या मतें रेल्वेजशीं स्पर्धा करतात अशा रस्त्यांचे प्रीत्यर्थ खर्च करतां कामा नये, अशी अट घालण्यांत येणार असल्याचें समजतें. त्याचप्रमाणें, इतरहि कित्येक निर्बंध घालण्यांत यावयाचे आहेत. प्रांतिक सरकारांचे त्यांच्या रस्त्यांबाबतचें धोरण नियंत्रित करण्याविषयींच्या आपल्या सत्तेचा उपयोग मध्यवर्ती सरकार वेळेवर करील व परवान्यांसंबंधींचे नियम मोटारवहातुकीस हानिकारक होऊन वहातुक–साधनांचे बाबतींत एक मोठी क्रान्ति घडून येईल, अशीं चिन्हें आज दिसत आहेत. हिंदुस्थान सरकारास प्रस्तुत धोरण आखणें अपरिहार्य झालें असलें, तरी प्रांतिक सरकारांच्या न्याय्य हितसंबंधांचें रक्षण होणें जरूर आहे व मोटर वहातुकीचा धंदा करणारांच्या व्यवहारावर जरूरीपेक्षां जास्त नियंत्रण बसूं नये, अशी खबरदारी मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं घेतली पाहिजे. प्रत्येक प्रांतांतील गरजा व अडचणी भिन्न आहेत, त्यांचाहि परामर्श घेतला गेला पाहिजे; एकच साच्याचे नियम सर्वत्र लागू करणें अव्यवहार्य व अनिष्ट होईल.

---

### खेडेगांवांशीं संबंध राखा

हिंदुस्थान सरकारच्या सूचनेस अनुसरून मुंबई सरकारनें आपल्या हाताखालच्या कलेक्टरांस व डेप्युटि कलेक्टरांस पत्रें लिहून त्यांजकडून कांहीं माहिती मागविली आहे. ह्या अधिकाऱ्यांचा खेडुतांशीं दिवसानुदिवस कमी कमी संबंध येऊं लागला असल्याचें दृष्टोत्पत्तीस आल्यावरून ही विचारणा होत आहे. मोटारींचा प्रवेश होऊं शकेल अशा मार्गानेंच फिरती होऊं लागली म्हणजे जिल्ह्यांतील अंतर्गत विभागांस अधिकाऱ्यांच्या भेटीचा योग क्वचितच येणार, हें उघड आहे. घोड्यावरून फिरती होत असे त्यावेळीं ह्या वाहनाचा प्रवेश खेडोपाडीं होऊं शके व त्या कारणानें अंमलदार व प्रजा ह्यांचा निकट संबंध येऊन खेडुतांच्या परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन समक्ष करण्याची अंमलदारांस संधि मिळे. त्याचप्रमाणें, शेतकरी व सरकारी अधिकारी ह्यांमध्यें सलोखा राहण्यास त्याचें सहाय होई. आतां शहरें व खेडीं ह्यांमधील वाढत्या दळणवळणामुळें एका दृष्टीनें त्यांमधील अंतर कमी झालें असलें तरी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंबंधीं विचारविनिमय, शेतीविषयीं आवड, खेडुतांसंबंधीं आत्मीय भावना, इत्यादि गोष्टींचा शहरांतून पूर्ण अभाव दृष्टोत्पत्तीस येतो. ग्रामसुधारणेच्या सरकारी व बिनसरकारी चळवळीमुळें खेडेगांवांकडे कांहीं लोकांचें लक्ष गेलें असलें तरी शहरा सुशिक्षितांस शेतकरी व त्यांचें जीवित ह्याबद्दल पूर्ण अनास्था असते. हिंदुस्थानांतील बहुसंख्याक लोकांचें पोट पुष्कळ अंशीं शेतीवर अवलंबून आहे, ही गोष्ट विसरली जाते व शहरांतील वातावरणांत सुशिक्षित मनुष्य रंगून जातो. पाश्चात्य देशांतून यांत्रिक सुधारणा इकडे आल्या, त्यामुळें मोटारी व इतर साधनांचा उपयोग शहरांतून करण्यांत येऊं लागला व वहातुकीसाठी

लागणारे घोडे, बैल, इत्यादींचें उच्चाटन झालें. मंगलकार्यातील मिरवणुकीचे समयीं अश्ववाहनाची जागा मोटारींनीं घेतली व समारंभांसारख्या मामुली प्रसंगींहि आपल्या खऱ्या जीवनसाधनांची आठवण आपण विसरूं लागलों आहों. शेतीशी आपला अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आहे, हें दर्शविण्यासाठी इंग्लंडसारख्या बह्वंशीं यंत्र–जीवी राष्ट्राचे राजे सुद्धा समारंभाचे प्रसंगीं मुद्दाम अश्वरथाचा उपयोग करतात, परंतु शेतीप्रधान देशांत आपण यांत्रिक प्रगतींत पुढारलेले देशहि जी गोष्ट करीत नाहींत तें करून खऱ्या निकडीच्या प्रश्नाकडे कानाडोळा करीत आहों. शेतीचें हिंदुस्थानांतील महत्त्व लक्षांत घेऊन व त्यावर निर्वाह करणारांचें बहुसंख्यत्व ध्यानांत घेऊन खेडुतांच्या अडचणींचें जरूर त्या मार्गांनीं निवारण करणें हें सुशिक्षितांचें कर्तव्यच ठरतें. आपल्या अंमलदारांना सरकारनें, " तुम्हीं फिरतीसाठी घोडा बाळगला आहे का ? " ह्या विचारलेल्या प्रश्नांतील स्वारस्य अंमलदारांप्रमाणें शहरवासी सुशिक्षितांनींहि लक्ष्यांत घेण्याजोगें आहे.

---

### पुणें जिल्ह्यांतील फळांची पैदास व विक्री

पुणें येथील गोखले इन्स्टिट्यूट ऑफ् पॉलिटिक्स ॲन्ड इकनॉमिक्स ह्या संस्थेनें १९३१ सालीं संशोधन–कार्य हातीं घेतलें व पुणें जिल्ह्यांतील फळांच्या विक्रीसंबंधानें अहवाल १९३३ सालीं इंग्रजींत प्रसिद्ध केला. त्याचाच मराठी सारांश आतां पुस्तकरूपानें बाहेर आला आहे. सदरहु संशोधनाचा मुख्य हेतु, पुणें जिल्ह्यांत उत्पन्न होणाऱ्या फळांची विक्री मुख्यतः पुणें शहराच्या बाजारांत कशा प्रकारें होते व त्यांबाबत होणाऱ्या हरएक प्रकारच्या व्यवहारांस व घडामोडींस काय खर्च लागतो, हें शोधून काढणें, हा होता. पुणें जिल्ह्यांतील फळांच्या पैदाशीबद्दल सर्वांत ज्यास्त प्रसिद्ध असणाऱ्या खेड्यांपैकीं वीस खेड्यांतील प्रश्नावलीस अनुसरून जमा केलेल्या माहिताचा समावेश वरील संशोधनाच्या हकीकतींत करण्यांत आला आहे. फळांची पैदास व पुरवठा, फळांच्या विक्रीची घडामोड, पुणें येथील रे मार्केट, फळांच्या विक्रीच्या खर्चाच्या बाबी, फळें बाजारांत पाठविण्याची पूर्वतयारी, इत्यादि प्रकरणांत पुस्तकांतील मजकुराची योग्य वांटणी व मांडणी केलेली आहे. शेवटीं उपसंहार व शिफारसी ह्यांनीं सुमारें ४० पृष्ठें व्यापलीं आहेत व त्यामुळें संशोधनाची व्यावहारिक उपयुक्तता वाढली आहे. पुस्तकाचे सुरवातीस वेगवेगळ्या फळांच्या लागवडीबाबतचे नकाशे देण्यांत आले आहेत. सबंद पुस्तकच माहितीनें भरगच्च भरलेलें आहे. ह्या उपयुक्त प्रकाशनाचें मराठी भाषांतर प्रसिद्ध केल्यामुळें अनेक लोकांची सोय होणार आहे व त्याबद्दल गोखले इन्स्टिट्यूट व त्याचे चालक ह्यांचे आभार मानणें आवश्यक आहे.

---

### विषारी धुरापासून बचाव करण्याची तयारी

राष्ट्रसंघाची पुनर्घटना आणि प्रमुख युरोपिअन राष्ट्रांमध्यें शांततेच्या रक्षणाबाबत सहकार्याचे करार घडवून आणण्याबद्दल वाटाघाटी चालल्या आहेत. तथापि, युरोपांत युद्ध होणार नाहीं किंवा युरोपाबाहेरील युद्धांत आपण ओढले जाणार नाहीं अशी खात्री प्रमुख पाश्चात्य राष्ट्रांस वाटत नाहीं. भावी युद्धाच्या भीतीमुळें आपला देश व आपले नागरिक ह्यांच्या संरक्षणाची तजवीज युरोपिअन राष्ट्रें करीत आहेत. ग्रेटब्रिटननें शस्त्रास्त्रांवर कोट्यवधि रुपयांचा जादा खर्च करण्याचें ठरविलें असून यंदाच्या बजेटांत त्या योगानें तूट निश्चित येणार असें मि. चेंबर्लेन, ब्रिटिश फडनवीस, ह्यांनीं स्पष्ट जाहीर केलें आहे. भावी युद्धाचा प्रकार आधिभौतिक सुधारणेबरोबर बदलणार असून शत्रूच्या हल्ल्यापासून बिनलढाऊ नागरिकांचा बचाव करण्याचे उपाय पद्धतशीर रीतीनें अमलांत आणले जात आहेत. विषारी धूर हवेंतून बॉंब टाकून दाट मनुष्य वस्तीच्या ठिकाणीं पसरणें आणि इमारतींचा व नागरिकांचा बळी घेणें ही भावी युद्धांतली अत्यंत भीतिजनक अशी शत्रूची युद्धसरणी व्हावयाची आहे. इटलीनें ॲबिसीनियांत ह्या अस्त्राचा उपयोग केल्याविषयींच्या हकीकती प्रसिद्ध झाल्यापासून राष्ट्रें विशेष सावध होऊन त्यांमधील नागरिकांस विषारी धुरापासून बचाव करणारीं कवचें वापरण्याची तालीम देण्यांत येत आहे. ब्रिटिश सरकारानें कवचें तयार करण्याचे कारखाने स्थापन केले आहेत आणि तीं वापरण्याचें शिक्षण देण्याकरितां शिक्षक तयार होत आहेत. नागरिकांच्या बचावाची ह्या प्रकारची तयारी फार विस्तृत प्रमाणावर होत आहे आणि त्यासाठी स्वतंत्र खातें निर्माण करण्यांत आलें आहे.

---

### ग्रेटब्रिटनमध्यें शेतीविषयक धंद्यास सरकारी सहाय

मांसासाठी जनावरें पाळणारांस ग्रेटब्रिटनमध्यें दर वर्षास साडेसात कोटि रुपये इतकी सरकारी मदत देण्याचें ठरलें आहे, अशी माहिती कॉमन्स सभेंत कृषिमंत्री, मि. इलियट, ह्यांनीं दिली. साम्राज्याच्या बाहेरून येणाऱ्या मांसावर नियंत्रणमूलक जकात बसविली जाईल व तिचें वार्षिक उत्पन्न चार कोटि रुपये होईल असा अंदाज आहे. शेतीशीं संलग्न असलेल्या धंद्यांस द्रव्यसहाय देण्याचें ब्रिटिश सरकारचें धोरण निश्चित झालें आहे, त्याचें वरील जकात हें एक ध्यानांत ठेवण्यासारखें उदाहरण आहे.

---

### महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचें मासिक मुखपत्र

वरील मुखपत्राच्या ताज्या ( जून व जुलैच्या ) अंकांत चेंबरचा, हिंदी कंपनी कायद्याबाबतच्या दुरुस्तीच्या बिलावरील अभिप्राय दिला आहे. जपानमधील मोटारगाड्यांचे कारखाने, कापडाचा हिंदुस्थानांतील खप, कॅनडा, सिमेंटचा धंदा व त्याची व्याप्ती इत्यादि विषयांवर माहितीपूर्ण लेखहि त्यांत आले आहेत.

---

### " महादजी शिंदे व उत्तर हिंदुस्तानांतील घडामोडी ( १७८५–१७९४ ) "

दिल्लीच्या तक्तावर नामधारी बादशहा बसवून पेशव्यांचे वतीनें महादजी शिंदे दिल्ली येथील सूत्रें हलवीत असत, त्या काळची विश्वसनीय माहिती देणारीं, ब्रिटिश सरकारच्या उत्तर हिंदुस्थानांतील एजंटांनीं लिहिलेलीं पत्रें वरील पुस्तकांत एकत्रित केलेलीं आहेत. मुंबई सरकारच्या दप्तरांतून त्यांची निवड करून सर यदुनाथ सरकार ह्यांनीं तीं संपादिलीं आहेत. पुस्तकांत शिंदे सरकारचीं दोन चित्रें दिलीं आहेत, त्यांतील एक चित्र गणेशखिंडींतील गव्हर्नरांच्या बंगल्यामधील १७९१ सालच्या एका चित्रावरून काढलेलें आहे. पुस्तकाची किंमत ५ रु. ८ आ. आहे.

---

## अल्युमिनिअम

अल्युमिनिअम ह्या धातूचा शोध लागून फार वर्षें झालेलीं नाहींत. १८०७ सालीं सर हम्फ्रे डेव्ही यानें ॲल्युमिनिअम ऑक्साइड पासून अल्युमिनियम वेगळें काढण्याचा प्रयत्न केला होता. १८२५ सालीं एका डॅनिश शास्त्रज्ञानें व १८२७ सालीं व्हूलर ह्या जर्मन शास्त्रज्ञानें अल्युमिनिअमची अनुक्रमें पूड व खडे तयार करून दाखवले. १८५५ च्या सुमारास ॲल्युमिनिअमची किंमत दर शेर वजनास तीनशे रुपयांच्यावर होती, ती आतां अडीच रुपयांहून ज्यास्त नाहीं. ॲल्युमिनिअमच्या उत्पादनांत सुधारणा होत आली आहे, त्याचाच हा परिणाम होय. गेल्या शतकामध्यें ह्या धातूस सोन्यासारखी किंमत होती व दागदागिन्यांसाठीहि त्याचा उपयोग केला जाई. सध्या ॲल्युमिनिअमाचा जगांतील वार्षिक खप २½ लक्ष टनांपेक्षा ज्यास्त आहे. गेल्या दहा वर्षांतच तो दुप्पट झाला आहे. सुरवातीस, स्वयंपाकाचीं भांडीं, बटणें, आरशाच्या व तसबिरींच्या चौकटी, केसांतील पिन्स, फण्या, इत्यादींसाठीच फक्त ह्या धातूचा उपयोग केला जाई. इतर धातूंशीं मिश्रण केलें असतां त्याची उपयुक्तता पुष्कळच वाढते, असें आढळून आल्यानंतर कित्येक नव्या जिनसा करण्याकडे त्याचा उपयोग होऊं लागला आहे. ॲल्युमिनिअम हें उत्कृष्ट विद्युत्वाहक असल्यानें विजेच्या कामांत त्याचा उपयोग जास्त जास्त करण्यांत येऊं लागला आहे. ॲल्युमिनिअमच्या अगदीं पातळ पट्ट्या काढतां येतात. दोन हजार पट्टांची मिळून रुंदी एका इंचापेक्षां ज्यास्त होत नाहीं. मोटार गाड्यांच्या प्रसारामुळें ॲल्युमिनिअमला येणारी मागणी वाढली आहे, कारण त्यांच्या इंजनांतले कित्येक भाग आतां ॲल्युमिनिअम व इतर धातू ह्यांच्या मिश्रणाचे करण्यांत येऊं लागले आहेत.

बॉक्साइट ह्या खनिज द्रव्यापासून ॲल्युमिनिअमचें उत्पादन करण्यांत येतें. ६० टक्के ॲल्युमिनिअम ऑक्साइड आणि सिलिकॉन ऑक्साइडचा व आयर्न ऑक्साइडचा कांहीं अंश मिळून हें बॉक्साइट बनलेलें असतें. ऑक्साइडपासून शुद्ध ॲल्युमिनिअम तयार करणें अत्यंत खर्चाचें काम आहे व त्याप्रीत्यर्थ विजेचा पुरवठाहि फार मोठा असावा लागतो.

औद्योगिक क्षेत्रांत पुढारलेल्या देशांमध्यें उपयोगिल्या जाणाऱ्या ॲल्युमिनिअमपैकीं शेकडा ३५ ते ४० टक्के ॲल्युमिनिअमचा विनियोग वेगवेगळ्या वहानांचे रचनेमध्यें करण्यांत येतो. वजनानें हलका परंतु मजबुतीनें भक्कम अशा त्यांच्या गुणाधर्मामुळें ॲल्युमिनिअम मिश्रणांचें महत्त्व फार वाढलें आहे, कारण त्यामुळें वहानांचा वेग वाढतो व तीं चालविण्यास कमी शक्ती पुरते. अर्थात्, तीं बनविण्यास लागणारा सुरवातीचा खर्च वाढतो, परंतु त्याची भरपाई पुढें पुरेपूर होते. विमानांच्या बनावटीमध्यें ॲल्युमिनिअमनें तर क्रान्ति करून सोडली आहे. आगगाड्या व जहाजें ह्यांमध्येंहि त्यानें प्रवेश केला आहे. सायकलींचे कित्येक भाग आतां ॲल्युमिनिअमचे बनविलेले असतात व त्यामुळें त्यांचें वजन कमी होऊनहि मजबुती कायम राहूं शकते. वीज वहाण्यासाठी ॲल्युमिनिअच्या तारा फारच उपयुक्त असतात. त्या वजनानें हलक्या असतात व स्वतःच्या ऑक्साइडचा त्यावर लेप बसविला म्हणजे वेगळ्या इनसुलेटरचें काम उरत नाहीं. ॲल्युमिनिअम रंग महाग पडला तरी तो चिरकाल टिकतो व त्यायोगानें पाण्यापासून आंतील वस्तूचें उत्कृष्ट संरक्षण होतें. सिगारेट्स, चॉकोलेट, इत्यादि वस्तूंचें पॅकिंग करण्यासाठी ॲल्युमिनिअम फॉइलचा उपयोग करतात. त्याचे इतरहि कित्येक दुसरे उपयोग आहेत व त्यामुळें सर्व राष्ट्रांतून आपणांस ह्या धातूचा पुरवठा पुरेसा मिळावा, ह्या प्रीत्यर्थ प्रयत्न चालू आहेत.

### लंडनमधील हिंदी एक्सचेंज बँक

मुंबईच्या सेंट्रल बँक ऑफ इंडियानें, लंडन येथें एक एक्सचेंज बँक स्थापन करण्याचें ठरविलें असल्याची बातमी मागेंच प्रसिद्ध झाली आहे. सदरहु बँक लवकरच रजिस्टर करण्यांत येईल. तिच्या सात डायरेक्टरांपैकीं चौघे हिंदी गृहस्थ असून त्यांतील दोघे—सर अतुल चतर्जी व सर पदमजी जिनवाला—हे लंडन येथेंच रहातील. सप्टेंबरच्या सुरवातीस बँकेच्या कामाकाजास सुरवात होईल, अशी अपेक्षा आहे.

### लंडनमध्यें म्हैसूरचे महाराज

म्हैसूरचे महाराज प्रकृतिस्वास्थ्यासाठी विलायतेस गेले आहेत. हिंदुस्थानाबाहेरची त्यांची ही पहिलीच सफर आहे. महाराज अत्यंत धार्मिक वृत्तीचे असल्याविषयीं त्यांची प्रसिद्धी आहे. लंडनमधल्या हॉटेलांत ही वृत्ति कायम ठेवतां यावी अशी सोय करण्यांत आली आहे. त्यांच्याकरितां स्वतंत्र स्वयंपाकघर राखून ठेवलें असून एका दिवाणखान्याचें देवघर बनवलें आहे आणि त्यांत हिंदुस्थानांतून नेलेली चामुंडेश्वरी देवीची सुवर्णमूर्ती ठेवण्यांत आली आहे.

### सहकारी सोसायट्यांबाबतचा ४८ वा नियम कायम झाला

सहकारी सोसायट्यांबाबतच्या नियमांत ४७ व्या नियमानंतर नवा ४८ वा नियम घालण्याबाबतचा आपला मानस, त्याचा मसुदा मे १९३६ मध्यें प्रसिद्ध करून सरकारनें जाहीर केला होता. त्यासंबंधांत तक्रारी अगर सूचना मागविण्यांत आल्या होत्या. अखेर सदरहु नवा नियम कायम करण्यांत आल्याचें २३ जुलैच्या सरकारी गॅझेटांत जाहीर झालें आहे.

### सहकारी खात्याचे नवे रजिस्ट्रार

सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार, श्री. पंजाबी, हे रजेवर जात असून त्यांचे जागीं सुरतचे कलेक्टर, श्री. भनसाळी, ह्यांची नेमणूक झाली आहे, असें समजतें.

**DECCAN BOOK STALL**

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें

### कामाचा आढावा

[ हिंदी कंपनी कायद्याच्या ७७ व्या कलमाप्रमाणें 'दि बँक ऑफ महाराष्ट्रा'च्या सभासदांची ( स्टॅट्यूटरी ) सभा रविवार, ता. २६ जुलै रोजीं बँकेचे चेअरमन, प्रो. वा. गो. काळे, ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. त्या वेळीं बँकेनें ३० जून अखेर केलेल्या प्रगतीचा आढावा भागीदारांस सादर करण्यांत आला. सदरहु बँक स्थापन झाल्यानंतर तीन महिन्यांनीं, ता ८ फेब्रुवारी रोजीं, तिचें सर सोराबजी पोचखनवाला ह्यांच्या हस्तें उद्घाटन होऊन व्यवहारास सुरवात झाली. स्टॅट्यूटरी रिपोर्टांतील महत्त्वाचे आकडे येथें दिले आहेत. ]

बँकेचे एकूण ३,६२८ भाग मंजूर झालेले आहेत. रोख रकम दिल्यासेरीज, कोणासहि दुसऱ्या कोणत्याहि कारणास्तव भाग मंजूर करण्यांत आलेले नाहींत. वरील भागांबद्दल बँकेकडे ८९,८२५ रुपये रोख जमा झालेले आहेत. बँकेचा अपेक्षित प्राथमिक खर्च नऊ हजार रुपये आहे त्यांतील, भाग खपविण्याबद्दल दिलेलें कामिशन धरून, ५,५७७ रु. ४ आ. २ पै खर्च झालेले आहेत. चालू व सेव्हिंग्ज खातीं व कायम ठेवी ह्यांत मिळून २,४५,२०४ रु. जमा झाले. फर्निचर, इत्यादींबद्दल १,९४० रु. १५ आणे खर्च झाले. भाग खपविण्यासाठी ९२५ रु. कमिशन देण्यांत आलें. कर्जें, कॅश क्रेडिट्स व हुंड्या ह्यावाबत ६२,८९७ रु. १३ आ. २ पै दिले गेले. २,२०,११२ रु. १० आ. ६ पै सरकारी व निमसरकारी रोखे व कंपन्यांचे भाग ह्यांत गुंतविण्यांत आले व २५,००० मुंबईच्या यूनियन बँकेंत मुदतबंद ठेवण्यांत आले.

---

### बँक ऑफ बार्शी, लि.

( वार्षिक सभा: २६ जुलै, १९३६ )

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल: | १२¼ | शिलक(ऑफिस व बँक): | १९¾ |
| ठेवी: | ७३¼ | कर्जें ( दिलेलीं ) | ७०¾ |
| रिझर्व्ह फंड: | २ | | |

वरील बँकेचा ३१-३-३६ अखेरचा नववा वार्षिक अहवाल आमचेकडे आला आहे. गतसालाचे मानानें ठेवींमध्यें समाधानकारक वाढ झाली आहे. येणें ह्या सदरांत सोनें-चांदीचे गहाणावर २१½ हजार रुपये, मिळकतीचे गहाणावर ८ हजार रुपये, कायम ठेवींच्या पावतींचे गहाणावर ७¼ हजार रुपये व व्यक्तिमात्राचे तारणावर ३३¼ हजार रुपये असे आकडे आढळतात. अहवालाचे सालीं बँकेस १,३२४ रु. ९ आ. नफा झाला, त्यांतून ५०० रु. रिझर्व्ह फंडांत टाकून शेकडा ५ टक्के दरानें प्राप्तीवरील कर-माफ डिव्हिडंड द्यावें, अशी डायरेक्टरबोर्डानें शिफारस केली.

---

### कौन्सिल हॉलमधील विजेचें नवीन काम

पुणें येथील कौन्सिल हॉल व अहमदनगर येथील डिस्ट्रिक्ट जज्ज ह्यांचा बंगला ह्या इमारतींच्या इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशनचीं कामें मुंबई सरकारतर्फे पुण्याचे व्ही. जी. ॲन्ड सन्स ह्यांस देण्यांत आलीं आहेत. व्ही. जी. ॲन्ड सन्सनीं पुण्यांतील व पुण्याबाहेरील मोठमोठ्या संस्थांचीं कामें यापूर्वी केलेलीं आहेत व ह्या नव्या कामांमुळें त्यांच्या कीर्तींत भर पडणार आहे.

---


## धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | |
|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |

| | | |
|---|---|---|
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |

| | |
|---|---|
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा:—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

---

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२

अधिकृत भांडवल : : : १०,००,०००

विक्रीस काढलेलें भांडवल: ५,००,०००

**दर शेअरची किं. : रु. ५०**

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

## मुंबई इलाख्यांतल्या सहकारी चळवळीची माहिती

### कर्जे-बाकी व वसुली

### ( ३ )*

सहकारी सोसायट्यांनीं आपल्या सभासदांस अहवालाचे सालीं नवीं कर्जें त्या पूर्वीच्या सालापेक्षां ज्यास्त दिलीं व परतफेडीचे बाबतींतहि सुधारणा आढळून आली, हें खालील आकड्यांवरून समजून येईलः—

( आकडे लक्ष रुपयांचे आहेत )

| वर्ष | येणें असलेली बाकी | वसूल | तहकुबी | थकबाकी | नवीन कर्ज |
|---|---|---|---|---|---|
| १९३२–३३ | ३४१ | ७२ | ९० | १७९ | ५७ |
| १९३३–३४ | ३२५ | ६९ | ९५ | १६२ | ५५ |
| १९३४–३५ | ३२९ | ९७ | ७३ | १५९ | ८५ |

### वर्गीकरण

प्राथमिक सहकारी सोसायट्यांचें वर्गीकरण त्यांच्या गुणदोष-परत्वें कसें करण्यांत आलें हें खालील आकड्यांवरून लक्ष्यांत येईलः—

| वर्ष | ऑडिटरनें तपासलेल्या सोसायट्या | वर्गवारी | | | | न तपासलेल्या अगर वर्ग न ठरविलेल्या सोसायट्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब. | क | ड | |
| १९३४-३५ | ४,३९३ | १५९ | २,२६८ | १,५०० | ४६६ | ६४ |
| १९३३-३४ | ४,४३१ | १५८ | २,२७८ | १,६७४ | ३२१ | ५५ |

### डिस्ट्रिक्ट सेंट्रल बँका

जिल्ह्यांच्या मध्यवर्ती बँकांच्या ठेवी व त्यांचे रिझर्व्ह फंड ह्यांत समाधानकारक वाढ झालेली आढळते. सोनें, रोखे व शेतीचा माल ह्यांचे तारणावर व्यक्तींना दिलेल्या कर्जांत पुष्कळच वाढ झालेली आहे.

| | १९३३–३४ रु. | | १९३४–३५ रु. | |
|---|---|---|---|---|
| | लक्ष | हजार | लक्ष | हजार |
| भागांचें भांडवल | ३३ | ०३ | ३५ | १७ |
| खेळतें भांडवल | ३६९ | ७४ | ३८५ | ३५ |
| रिझर्व्ह फंड | ९ | ४४ | १४ | ९९ |
| ठेवी | ३०३ | २० | ३२० | ७६ |
| सोसायट्यांकडून येणें | १६६ | ०२ | १६१ | २५ |
| थकबाकी | १०१ | ०९ | ६३ | ९० |
| एकूण कर्जाशी थकबाकीचें प्रमाण | ६८· | ८ % | ३९· | ७ % |
| व्यवस्थेचा खर्च | ३ | ८१ | ६ | १३ |

गेल्या वर्षांतील आकडे १५ महिन्यांच्या व्यवहाराचे आहेत, म्हणून व्यवस्थेचा खर्च इतका ज्यास्त वाटतो. १९३४–३५ सालीं कोणत्याहि बँकेनें अनुकूल परिस्थिति असूनहि, सहा टक्क्यांपेक्षां ज्यास्त दरानें डिव्हिडंड वांटलें नाहीं.

* ह्या विषयावरील पहिले दोन लेख ता. १ व १५ जुलैच्या अंकांत अनुक्रमें प्रसिद्ध झाले आहेत.

### नागपूर प्रीमियर को. हौसिंग सोसायटी, लि.

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवलः | ५९ | कर्जें | २३८ |
| ठेवीः | ११४ | जरूर त्यावेळीं हातीं येण्या-जोग्या व रोख रकमा | २८ |
| प्रांतिक बँकेकडून कर्जः | ९३ | रोखे व भाग | ७ |
| रिझर्व्ह फंड | २¼ | | |

वरील हौसिंग सोसायटीच्या सभासदांच्या संख्येंत व वसूल भांडवलांत अहवालाचे सालीं बरीच वाढ झाली आहे. सभासदांकडून कायम ठेवी स्वीकारून बाहेरून कर्जें घेण्याची जरूर पडूं न देण्याचें सोसायटीचें धोरण अभिनंदनीय आहे. थकबाकीची रकम अल्प आहे व सोसायटीनें दिलेल्या कर्जांस गहाणाचें व विमा पॉलिसींचें भरपूर तारण आहे. अहवालाचे सालीं झालेल्या नफ्यापैकीं १,०८१ रुपये रिझर्व्ह फंडांत टाकून सोसायटीनें ५ टक्के दरानें डिव्हिडंड दिले आहे. नागपुरांतील मध्यम वर्गास भासणारी घरांची वाण वरील हौसिंग सोसायटी उत्कृष्ट रीतीनें भरून काढीत आहे.

### कळवण तालुका ( जि. नाशिक ) सहकारी वृत्त

( १ ) बँक इन्स्पेक्टर व सुपरवायझर यांचे प्रयत्नानें वाखारी शाहू छत्रपति व पिंपळगांव शिवाजी छत्रपति सुखसंपत्तिवर्धक सोसायट्या रजिस्टर करण्यासंबंधीं अधिकाऱ्यांबरोबर पत्रव्यवहार चालू आहे.

(२) चांगलें बीं वापरण्याची संवय लागावी म्हणून तालुक्यांतील १८ सोसायट्यांस बाजरीचें बीं चाळण्याच्या १८ चाळण्या शेतकी खात्याकडून मागवून त्या सोसायट्यांस देण्यांत आल्या आहेत.

( ३ ) सटाणें-कळवण-चांदवड सहकारी परिषदेमध्यें ठरल्याप्रमाणें श्रावणाच्या पहिल्या सोमवारीं म्हणजे ता.२०–७–१९३६ रोजीं निवाणें, तालुका कळवण, येथें सहकारी वृक्षारोपण-दिन हेडमास्तर चांद्रोरकर यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. त्यावेळीं बँकेचे इन्स्पेक्टर श्री. ठाकूर व एजंट श्री. नाडकर्णी, तसेच यूनियन सुपरवायझर श्री. क्षीरसागर व श्री. देशपांडे ह्यांचीं भाषणें झालीं. वाजंत्री लावून आणि वृक्षांची मिरवणूक काढून, आंब्यांचीं व वडाचीं झाडें लावण्यांत आलीं. सोसायटीचे उत्साही सेक्रेटरी श्री. दोधू पाटील ह्यांनीं ह्या बाबतींत बरीच मेहनत घेतली.

### मध्यभाग सहकारी अर्बन बँकांची परिषद

वरील परिषदेचें अधिवेशन सातारा येथें गुरुवार, ता. ३० जुलै, १९३६ रोजीं प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार आहे.

यशासाठीं दररोज १॥ पै खर्च करा.
आरोग्य, ऐश्वर्य व जीवन सौंदर्य यांना वाहिलेलें
बृहन्महाराष्ट्राचें आवडतें व लोकप्रिय
भाग्योदय मासिक
आजच सुरू ठेवा. दरमहा प्रसिद्ध होतें. यांत उत्साहवर्धक लेख, स्फूर्तिदायक चरित्रें, चटकदार लघुकथा आणि सुंदर कविता येत असतात. वा. व. २॥ रु. पुढील पत्त्यावर लिहा.
साहित्य कार्यालय, कराड जि. सातारा.

## १९३४-३५ सालांतील शिक्षणविषयक प्रगति

### मुंबई इलाख्यांतील शिक्षण खात्याचा अहवाल

१९३४-३५ मध्यें मुंबई इलाख्यांत शिक्षणाची कशी प्रगति झाली, हें दाखविण्यासाठी १९३३-३४ च्या आकड्यांबरोबर १९३४-३५ मधील आकड्यांची खाली तुलना केली आहे.

| | १९३३-३४ | १९३४-३५ |
|---|---|---|
| शिक्षणविषयक संस्था | १६,७३० | १६,९२७ |
| त्यांतील विद्यार्थी | १३,७४,२९६ | १४,२२,१४६ |
| शिक्षणावर झालेला एकूण खर्च ( रु. ) | ३ कोटि,९८ लक्ष | ४ कोटि, ११ लक्ष |
| कॉलेजांची संख्या | ३४ | ३४ |
| कॉलेज-विद्यार्थ्यांची संख्या | १६,४३० | १७,७३६ |
| अँग्लो-व्हरनॅक्युलर शाळा | ५७१ | ६१० |
| त्यांतील विद्यार्थी | १,००,९५९ | १,०८,७३२ |
| प्राथमिक शाळा | १४,६१६ | १४,७३० |
| त्यांतील विद्यार्थी | ११,६८,५६४ | १२,०६,८८२ |
| त्यांप्रीत्यर्थ झालेला एकूण खर्च ( रु. ) | १,९९,१७,१३८ | २,९९३२,५७३ |
| ह्या खर्चांपैकीं सरकारनें केलेला खर्च | १,०९,५७,९५० | १,१०,५६,५५२ |
| शेतीस प्राधान्य देणाऱ्या शाळा | ८० | ८४ |
| त्यांतील विद्यार्थी | २,६८८ | २,७६६ |
| मुलींसाठीं शिक्षण विषयक संस्था | २,०३१ | २,०६७ |
| त्यांतील मुलींची संख्या | ३,१४,५९० | ३,३१,५०१ |
| कॉलेजांत शिकणाऱ्या मुलींची संख्या | १,१६० | १,२५० |
| कर्वे युनिव्हर्सिटीमधील मुली | १५५ | १७४ |
| इंटरमीजिएट व मागसलेल्या जातींचे विद्यार्थी | ६,६६,०६९ | ६,८९,८९३ |
| मुसलमान विद्यार्थी | १,६७,५६४ | १,७३,७२५ |

वरील माहितीवरून, मुंबई इलाख्यांतील शिक्षणविषयक प्रगतीची कल्पना येईल. खेडेगांवांतील शाळांतून मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था असावी तितकी चांगली नाहीं, असा डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनच्या अहवालांत उल्लेख आहे. संख्या वाढीबरोबर शिक्षणांत सुधारणा होणें अगत्याचें आहे. ह्या बाबतींत विधायक कार्यक्रम आंखला जाऊन त्याविषयींच्या योजना अमलांत येणें आवश्यक आहे.

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

**एशियन पॉलिसी**

म्हणजेच

**आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.**

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत

**धी एशियन अॅशुरन्स कंपनी, लिमिटेड**

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

**वेस्टर्न इंडिया**

**लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.**

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी-सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५

१९३५ मधील नवें काम ५१,३०,०४२ रु.

एकूण चालू काम २,७०,००,००० रु. अधिक

एकूण जिंदगी ७१,७१,०९३ रु.

लाइफ फंड ६०,४२,८७३ रु.

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—१ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—१ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८—१० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—१३ |
| ४% १९६०—७० ... ... | ११५—३ |
| ४% १९४३ ... ... ... | १११—१ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९९—१५½ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०७—१४ |
| २¾% १९४८—५२ ... ... | १००—१४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११०—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १००—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०९—१४ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३—६३ ) ... | १११—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२३—८ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकी ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३३—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकी ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११८—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३६—४ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५८५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३८—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १०६—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—४ |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९२२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १६०—० |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४०—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २४५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १६६६—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६१०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९०—० |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६५—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८६—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७४५—० |

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची
प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.
दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.
च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा.
किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

**WANTED** Arts Graduates & Medical Practitioners to push up Rural Uplift & Medical Relief Movement in furtherance of Insurance Benefit Plans throughout district places in the Presidency. Adequate remuneration to capable workers.

Apply with particulars to :—

Head Office :— 99, LAXMI ROAD, POONA.
General Manager, THE DAWN OF INDIA LIFE INS. CO. LTD.

CONFIDENCE
is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its
YEARS OF
Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service
HAS CREATED
PUBLIC CONFIDENCE
The following figures will convince you :
NEW BUSINESS
This year 1934-35
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS
BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20
HINDUSTHAN
Co-operative Insurance Society, Ltd.
( ESTD. 1907 )
*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices :* throughout India & the East.
S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*
POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें — पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

गणेशचतुर्थीस प्रसिद्ध होणार!

## पुरुषार्थाचा गणेशांक (भाग २ रा)

या अंकांत गणपतीसंबंधींचें वैदिक, पौराणिक व महाराष्ट्रीय साधुसन्तांचें सर्व लिखाण सोपपत्तिक येणार असून शिवाय उत्तर व दक्षिण हिन्दुस्थानांत संशोधकांस ज्या प्राचीन गणेशमूर्ति आढळल्या आहेत, त्यांची विशेष माहितीसह सुबक छायाचित्रें देणार आहों. किं. २ रु. पण **वर्गणीचे ३ रु. म. ऑ. नें पाठविणारांस हा अंक वर्गणींतच मिळेल.**

**गणेशांक** भाग १ ला किं. २ रु.; पण चालू ग्राहकांस हा अंक फक्त १ रु. स देऊं. तरी वाचकांनीं रजिस्ट्रेशनखर्चासह एकंदर ४=३ रु. पाठवावे. म्हणजे दोन्ही विशेषांक रजिस्टरनें पाठवूं. प्रत्येक हिन्दूच्या घरीं हे अंक असले पाहिजेत.

व्यवस्थापक पुरुषार्थ, औंध, (जि. सातारा).

## MARATHE & Co.

ENGINEERS & IRON FOUNDERS

| WORKS: | | OFFICE: |
|---|---|---|
| Natu Bag, Bhikardas Road, POONA 2 | Can undertake to do any sort of casting. We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act. **Our prices are very competitive.** | 978-79, Sadashiv, Laxmi R d. POONA 2 |

“ दुसरें मूल्यमापन जाहीर झालें ”

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. — दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा — हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

## नवीन फणसपोळी

व

मसाल्याची चटकदार

## ऑफिस सुपारी

मिळण्याचें खात्रीचें ठिकाण:

**कुळकर्णी आणि मंडळी.**

लोणी व किराणा दुकान

सदाशिव पेठ, फडतरे चौक, पुणें, २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें २.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख ५ ऑगस्ट, १९३६. अंक ३२

## दि गुड-वुइल
## ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारास
भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा;
मॅनेजिंग डायरेक्टर

## पहिल्यानें सुरक्षितता

रस्त्यावरून जातांना तुम्ही सुरक्षिततेचा मार्ग पहिल्यानें पहातां. हीच गोष्ट पैसे बँकेंत किंवा विम्यांत गुंतविण्यासंबंधीं आहे. पहिल्यानें तुम्ही पैशाची सुरक्षितता पहातां; नंतर व्याज किंवा बोनस.
हिशेब तपासणी आणि प्रतिनिधित्व सरकारी खात्याकडे असल्यानें

## दि बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लि.

मध्यें आपले पैसे गुंतविल्यास कसलाच धोका नाहीं.
सविस्तर माहितीकरितां लिहा—

कुळकर्णी आणि कंपनी चीफ ऑर्गनायझर्स
चुनीलाल डी. बरफीवाला मॅनेजिंग डायरेक्टर.
९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.


## न. वि. वडनेरकर

जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !
ज्युनियर प्रभाकर
सेफ्टी स्टोव्ह
माहितीपत्रक मागवा
मेकर्सः–ओगले ग्लास वर्क्स. लि.
ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः–
१ केळकर ब्रदर्स, बुधवार चौक.
२ म. इं. को. ऑ. एजन्सी, लक्ष्मीरोड.

## विविध माहिती

### बँकांस सुट्टी

ता. १० ऑगस्ट रोजीं गोकुळअष्टमीनिमित्त बँका बंद रहातील.

### सरकारी रेल्वेवरील खर्चास मंजुरी

१९३७–३८ सालामध्यें २ कोटि ७ लक्ष रुपये सरकारी रेल्वेजवरील आगगाडीचे डबे व वाघिणी ह्यांचे खरेदीप्रीत्यर्थ खर्च करण्यांत यावयाचे आहेत व त्यास रेल्वे स्टँडिंग फिनॅन्स कमिटीनें मंजुरी दिली आहे.

### नव्या राजवटीमधील आर्थिक प्रश्नांची चर्चा

नवीन राज्यघटना अंमलांत आल्यानंतर प्रत्येक प्रांतास आपली स्वतःची पैशाची भरपूर तजवीज करावी लागेल. रिझर्व्ह बँकेंत स्वतःचें खातें उघडून, जरूर प्रसंगीं बँकेकडून त्यांस तात्पुरतीं कर्जेंहि घ्यावीं लागतील. कर्जें उभारणें, दुष्काळ-निवारणाची तरतूद करणें, इत्यादि कामें प्रत्येक प्रांतास स्वतःपुरती स्वतंत्र करावीं लागतील. ह्या सर्व कामांत एकवाक्यता यावी ह्यासाठी प्रांतिक सरकारांच्या प्रतिनिधि-तज्ज्ञांची एक परिषद सिमला येथें ता. ५ व ६ ऑगस्ट रोजीं भरणार आहे.

### नव्या हिंद-ब्रिटिश कराराची पूर्व तयारी

ओटावा करार संपुष्टांत आल्यानंतर त्याचे जागीं नवा हिंद-ब्रिटिश व्यापारी करार करण्याचे हेतूनें बोलणीं चालू झालीं आहेत. वाटाघाटींची दिशा निश्चित करण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकार व व्यापारी मंडळें ह्यांचेकडून त्यांचीं मतें मागविलीं आहेत.

### सुशिक्षित बेकारांस शिंपीकाम शिकविण्याची शाळा

सुशिक्षितांमधील बेकारी–निवारणासाठी पंजाब सरकारनें अमृतसर येथें शिवणकाम शिकविण्याची एक शाळा स्थापन केली आहे. लंडनमध्यें शिक्षण घेतलेला व हिंदुस्थानांतील युरोपियन दुकानांत अनुभव घेतलेला असा एक इंग्लिश तज्ज्ञ त्यासाठी नेमण्यांत यावयाचा आहे.

### जनावरांसाठी सकस अन्न

जनावरांस सकस अन्नाचा पुरवठा व्हावा ह्याप्रीत्यर्थ वेगवेगळ्या खाद्यांसंबंधीं प्रयोग करण्यासाठी बरेलीजवळ इझतनगर येथें एक सरकारी इन्स्टिट्यूट स्थापन होणार आहे. त्यासाठी इमारती वगैरेप्रीत्यर्थ ५ लक्ष रुपये मंजूर झाले असून वार्षिक खर्चाकरितां दरसाल १ लक्ष रुपये सदरहु संस्थेस मिळावयाचे आहेत.

### सेंट्रल बँकेची मद्रास येथील शाखा

सेंट्रल बँक ऑफ इंडिया, लि. च्या मद्रास शाखेचें उद्घाटन ता. २९ जुलै १९३६ रोजीं झालें.

### हिंदुस्थानांतील ट्रेड यूनियन्स ( मजूर संघ )

१९३३–३४ सालीं हिंदुस्थानांत नोंदलेल्या यूनियन्सची संख्या २१३,म्हणजे त्यापूर्वींच्या सालांतील संख्येपेक्षां २२ नें ज्यास्त भरली. त्यांच्या सभासदांच्या संख्येंतहि सुमारें ७३ हजारांनीं वाढ होऊन ती २ लक्ष ८५ हजार झाली. पटावरील सभासदांच्या संख्येच्या मानानें वर्गणीच्या वसुलीचें प्रमाण फार अल्प असल्याचें आढळलें. बंगालमधील एका यूनियनचे पटावर १५ हजारांवर सभासद असतांना व वर्गणीचा दर आठ आण्यांपासून चार रुपयांपर्यंत असतांना फक्त १,५७६ रुपये इतकीच वर्गणी जमा होऊं शकली. १९३३–३४ मध्यें २४ यूनियन्स बंद पडल्या अगर रद्द करण्यांत आल्या.

### सिंधमध्यें कापडाची नवी गिरणी निघणार ?

राजा गोविंदलाल शिवलाल मोतीलाल ह्यांची सिंधमध्यें एक कापडाची गिरणी काढण्यासंबंधीं खटपट चालू आहे, असें समजतें.

### राष्ट्रसंघाच्या खर्चाचें अंदाजपत्रक

राष्ट्रसंघाच्या खर्चासाठी १९३७ सालीं सुमारें २¼ कोटि रुपये लागतील. राष्ट्रसंघांतील एकूण ५८ सभासद–राष्ट्रांपैकीं २३ राष्ट्रांनीं आपली वर्गणी वक्तशीरपणें दिलेली नाहीं. निकाराग्वा ह्या राष्ट्रानें गेल्या १६ वर्षांत फक्त एकदाच आपली वर्गणी दिलेली आहे.

### मुलांमुलींकरितां स्वतंत्र बोलपट

मुलांमुलींस पहाण्यास योग्य असे बोलपट दाखवण्याची खास व्यवस्था युरोपांतील अठरा देशांत चालू असून त्यांपैकीं कित्येकांमध्यें, सोळा-सतरा वर्षांखालील मुलांस इतर बोलपट दाखवणाऱ्या सिनेमागृहांत जाण्याची मनाई केलेली आहे.

### मोटारींबाबतच्या गुन्ह्यांसाठी स्वतंत्र कोर्टें

मोटारींबाबतच्या गुन्ह्यांचो चौकशी करण्याकरितां ग्रेट ब्रिटनमध्यें एक जादा कोर्ट नेमण्यांत यावयाचें आहे, अशा अर्थाची माहिती सरकारतर्फे तेथील लॉर्डांच्या सभेंत देण्यांत आली.

### नऊशें रुपयास एक हत्ती

त्रावणकोर संस्थानाच्या जंगल खात्यानें गेल्या महिन्यांत १५ हत्ती लिलावास काढले होते, त्यांपैकीं ११ हत्ती प्रत्येकीं सरासरीनें ९०० रुपयांस विकले गेले. हत्ती व हस्तिदंत ह्या दोहोंसहि आतां विशेष मागणी येत नाहीं.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३८२ | ७ जर्मनीचें व्यापारविषयक धोरण .. | ३८७ |
| २ विमेदारांच्या आरोग्याची जोपासना ... | ३८३ | ८ खासा व्यवहार ! ... | ३८७ |
| ३ सहकारी अर्बन बँकांची परिषद् ... | ३८४ | ९ हटलीनें युद्धासाठी कर्ज कसें उभारलें ? ... | ३८७ |
| ४ अल्युमिनिअमः उत्पादन व खप ... | ३८४ | १० मुंबई इलाख्यांतील कारखाने ... | ३८८ |
| ५ स्फुट विचार ... | ३८५ | ११ विमानमार्गाची लोकप्रियता ... | ३८८ |
| हें चित्र पहा आणि तें चित्र पहा—मॅनेजिंग एजन्सीचा पुरस्कार व नवें बिल—अर्बन बँकाच्या संघाची आवश्यकता—पाऊस पाण्याची हालहवाल—नॅशनल लायब्ररी, वांद्रे | | १२ मध्यमार्गांतील सहकारी अर्बन बँकांची परिषद् | ३८९ |
| | | १३ साताराची सहकारी भाग परिषद् ... | ३८९ |
| | | १४ कळवण तालुका सहकारी वृत्त ... | ३९० |
| ६ धुळें अर्बन को. बँक लि. | ३८६ | १५ निवडक बाजारभाव | ३९१ |



# अर्थ

बुधवार, ता. ५ ऑगस्ट, १९३६


## विमेदारांच्या आरोग्याची जोपासना

### मेट्रॉपॉलिटन कंपनीचें कार्य

सार्वजनिक आरोग्याकडे लक्ष पुरविण्याचें काम वास्तविक स्थानिक स्वराज्य संस्थांचें आहे. तथापि, त्यांचे हातून हें काम व्हावें तितकें समाधानकारक होत नाहीं, असा सार्वत्रिक अनुभव आहे. आपल्याकडे येणाऱ्या रोग्यांस आरोग्याविषयीं वारंवार सूचना देऊन डॉक्टर लोक ह्या कामीं उपयुक्त कार्य करूं शकतील, परंतु त्यांस पुरेसा वेळ मिळणें शक्य नसतें व रोग बरा करतां आला तरी त्यांस आरोग्याविषयीं सल्ला देतां येईलच असें सांगतां येत नाहीं. मनुष्यानें आपल्या स्वतःचे शरीराची काळजी घेऊन तें निरोगी कसें राखावें, ह्यासंबंधीचा सल्ला देण्यास विमाकंपन्यांचा कसा उपयोग करतां येतो, ह्यासंबंधीं विवेचन येथें करावयाचें आहे.

आरोग्याचा फैलाव होण्यांत विमा कंपन्यांचाहि स्वतःचा फायदा असतो; म्हणजे विमेदार व कंपन्या ह्यांचे हितसंबंधांमध्यें विरोध नसल्यानें आरोग्याचा प्रचार विमा कंपन्यांनीं हातीं घेणें दोघांच्याहि हिताचें असतें. विमेदारांची आयुमर्यादा शक्य तेवढी वाढावी, अशीच विमा कंपन्यांची इच्छा असते. तेव्हां कंपन्यांनीं त्या संबंधांत यत्न करणें हें स्वाभाविक आहे. न्यूयॉर्क येथील मेट्रॉपॉलिटन विमा कंपनी ही आयुष्याच्या विम्याचें काम करणारी जगांतील सर्वांत मोठी कंपनी आहे. तिच्या चालकांनीं पंचवीस वर्षांपूर्वीच आपल्या विमेदारांच्या आरोग्याकडे लक्ष पुरविण्यास सुरवात केली व त्याचा सुपरिणाम आतां सिद्ध झाला आहे. आपण हें काम केवळ विमेदारांच्याच हितानें प्रेरित होऊन करीत आहों, असें सदरहु कंपनी मुळींच म्हणत नाहीं. तथापि विमेदारांची आयुमर्यादा वाढली म्हणजे ज्यास्त वर्षे कंपनीस हप्ते मिळत रहातात व मृत्यूमुळें येणारे क्लेम्स पुढें पुढें ढकलले जातात.

सदरहु कंपनीनें आपल्या विमेदारांसाठी मोफत वैद्यकीय तपासणीची सोय केली व अशी तपासणी नियमानें कांहीं काळपर्यंत चालू ठेवली. सात वर्षांच्या प्रयोगानंतर आलेल्या अनुभवाचा आढावा घेतला, तेव्हां असें आढळून आलें कीं, सुरवातीच्या दोन वर्षांतील एकूण ६,००० तपासलेल्या विमेदारांपैकीं २१७ लोक मरण पावले. वैद्यकीय तपासणी न केलेल्या इतर ६,००० विमेदारांत ३०३ मृत्यु झालेले आढळले. म्हणजे, पांच वर्षांत मिळून मृत्यूचे प्रमाणांत शेंकडा २५ टक्क्यांची बचत झाली. ह्या फायद्याची पैशांत किंमत केली, ती सोळा लक्ष रुपयांहून ज्यास्त भरली. त्यांतून पांच लक्ष रुपये खर्च म्हणून वजा केले तरी कंपनीनें वैद्यकीय तपासणीवर केलेल्या खर्चाच्या रकमेवर शेकडा २०० टक्के व्याज सुटलें, असें म्हणतां येईल.

कंपनीच्या आरोग्यविषयक प्रचाराच्या उपक्रमास १९०९ सालीं सुरवात झाली. ह्या प्रयत्नाचा विमेदारांवर झालेला परिणाम खालील आकड्यांत प्रतिबिंबित झाला आहे:—

**जन्माचे वेळीं आयुर्मर्यादेची अपेक्षा**

| | १९११–१२ वर्षे | १९३३ वर्षे | सुधारणा वर्षे |
|---|---|---|---|
| अमेरिका ( एकूण लोकसंख्या ) | ५३ | ६१¼ | ८¼ |
| मेट्रॉपॉलिटन कंपनीस आलेला अनुभव | ४६½ | ५९ | १२½ |

ह्यावरून सर्वसाधारण लोकसंख्येची आयुमर्यादेची अपेक्षा १६ टक्क्यांनीं वाढली असतां मेट्रॉपॉलिटनच्या विमेदारांचे बाबतींत तीमध्यें २५ टक्के सुधारणा झाली असें दिसून येईल. ह्या विमेदारांसंबंधाची आयुष्याबाबतची अपेक्षा सर्वसाधारण लोकसंख्येबाबतच्या अपेक्षेपेक्षां कमी असण्याचें कारण, वरील आकडे इंडस्ट्रिअल विम्याबद्दल म्हणजे मजूरीन काम करणारांविषयीं आहेत, हें होय. निर्दिष्ट विमेदारांस ४½ हजार दिवसांचें जणूं काय ज्यास्त आयुष्य उपलब्ध झालें आहे व त्याचा फायदा तरुण कामगारांस विशेषेंकरून मिळेल, हें उघड आहे. अर्थात, गेल्या कांहीं वर्षांतील आयुमर्यादेची वाढ केवळ मेट्रॉपॉलिटनच्या प्रयत्नांमुळेंच झालेली नाहीं; किंवा फक्त अमेरिकेमध्येंच ती आढळून येते असें नाहीं. ग्रेटब्रिटनमध्येंहि तीच प्रवृत्ति दृष्टोत्पत्तीस येते.

मेट्रॉपॉलिटन कंपनी आपल्या विमेदारांच्या शुश्रूषेची व्यवस्था करते व त्यासाठी तिनें ७०८ नर्सेस कामावर ठेवल्या आहेत. आरोग्यविषयक माहितीपत्रकांच्या द्वारां प्रचार करण्यांत येतो व सिनेमागृहें, शाळा, इत्यादि ठिकाणीं फिल्मसहि दाखविल्या जातात. १९३५ सालीं अशा तऱ्हेच्या फिल्म्स ६५ हजार ठिकाणीं दाखविल्या गेल्या व त्याचा सुमारें २ कोटि लोकांनीं फायदा घेतला. तसेंच, वर्तमानपत्रें व मासिकें ह्यांमध्येंहि जाहिराती प्रसिद्ध केल्या जातात. ह्या सर्व प्रयत्नांस यश येत आहे, ह्याबद्दल त्यासंबंधांतील आकडे ग्वाही देत आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर कंपनीचा कारभार चालू आहे, म्हणूनच ती असें कार्य करूं शकते व त्याचा फायदा कंपनीच्या विमेदारांबरोबर इतरांसहि मिळतो. इतर विमा कंपन्यांनीं ह्या दिशेनें प्रयत्न केल्यास त्यांची उपयुक्तता वाढेल ह्यांत संशय नाहीं. अमेरिकेखेरीज इतर देशांत अशा प्रकारचे प्रयत्न विशेष जोमानें करण्यांत आलेले आढळत नाहींत. हिंदुस्थानांतील कंपन्यांस विमेदारांची व जनतेची सेवा व त्याबरोबरच आपली प्रगति व भरभराट असें दुहेरी ध्येय डोळ्यासमोर ठेवण्यासंबंधांत, मेट्रॉपॉलिटनच्या उदाहरणावरून बोध घेतां येण्यासारखा आहे.

## सहकारी अर्बन बँकांची परिषद

सहकारी चळवळींतली परिस्थिति आज अशा प्रकारची आहे कीं, तिच्या पुढाऱ्यांनीं सिंहावलोकन करून पुढील मार्ग निश्चित करणें अगत्याचें झालें आहे. आपण कोठून आलों आणि कोणीकडे चाललों ह्याचा वेळोवेळ विचार करून नवीन उत्पन्न होणाऱ्या अडचणी व प्रश्न निकालांत काढणें प्रत्येक चळवळीच्या नेत्यांचें आवश्यक कर्तव्य असतें. पिछेहाट किंवा दिशाभूल होऊं द्यावयाची नसेल तर आपलें ध्येय व कार्यपद्धति निर्वेध राखण्याची जबाबदारी ओळखून ह्या पुढाऱ्यांस वागावें लागतें. सध्याची आर्थिक मंदी हें नवीन विघ्न सहकारी चळवळीच्या मार्गात येऊन पडलें आहे आणि त्याच्याशीं झगडण्यांत शक्तीचा व कालाचा पुष्कळ व्यय होत आहे. त्याच्या योगानें सुधारणा व विस्तार ह्यांची गति खुंटली आहे. अशा स्थितींत, संकट निवारणाचे उपाय योजले जात असतां सहकाराचीं मूलभूत तत्त्वें आणि पद्धति अबाधित राहिलीं आहेत किंवा नाहींत ह्याचा विचार करण्याचें विस्मरण होण्याची भीति असते, तुरुतदान, महापुण्य ह्या म्हणीप्रमाणें वागण्याची प्रवृत्ति जनतेंत बळावते आणि सहकारी तत्त्व आणि सहकारी कार्यकर्ते ह्यांचेमधील अंतर वाढत जातें. मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या गेल्या पांच वर्षांच्या इतिहासाचें अवलोकन केल्यास तीमध्यें ह्या प्रकारची अवस्था निर्माण झाली आहे हें प्रत्येक सूज्ञ माणसाच्या लक्ष्यांत आल्यावांचून रहाणार नाहीं असें आम्हांस वाटतें.

मध्य विभागांतल्या पुणें, सातारा, सोलापूर व नगर ह्या चार जिल्ह्यांतल्या अर्बन बँकांची परिषद गेल्या गुरुवारीं साताऱ्यास भरली होती. तीमध्यें झालेलीं भाषणें व चर्चा सहकारी चळवळीचें सिंहावलोकन व तिच्या बाबतींत मार्गदर्शन ह्यांचे दृष्टींनीं उद्बोधक झालीं. अर्बन बँकांची परिषद विलग भरवण्याच्या कल्पनेस मूर्त स्वरूप देण्याचा उपक्रम साताऱ्यास प्रथमच झाला, ह्याचें महत्त्व लक्ष्यांत येणें अगत्याचें आहे. शेतकी सोसायट्या व अर्बन बँका ह्यांचीं कार्यक्षेत्रें भिन्न भिन्न असलीं तरी त्यांच्या मुळाशी एकच अभेद्य तत्त्व आहे ह्या गोष्टीचा अनेक वेळां विसर पडतो आणि त्यांच्या कार्यकर्त्यांमध्यें विरोध असल्याचा आभास होतो. वास्तविक पहातां, सहकारी चळवळ एकजीवी असून तीमध्यें कार्याच्या सोयीसाठी श्रमविभागाच्या तत्त्वावर स्वतंत्र क्षेत्रें निर्माण केलेलीं आहेत आणि महत्त्वाच्या प्रश्नांचे बाबतींत त्यांनीं एकमतानें वागणें इष्ट आहे. ध्येय आणि पद्धति ह्यांचे संबंधांत एकवाक्यता असली म्हणजे विशिष्ट विषयांची चर्चा अर्बन बँका व बिन-अर्बन संस्था ह्यांनीं अलगपणानें करणें सोयीचें व इष्ट असतें. साताऱ्याच्या परिषदेंत अर्बन बँकांनीं आपल्या हिताच्या अनेक प्रश्नांची चर्चा केली आणि प्रॉव्हिन्शियल बँकांच्या शाखा व डिस्ट्रिक्ट बँका ह्यांच्याशीं व्यवहारांचे संबंधांत त्यांचा विरोध उपस्थित होतो, त्यांचा खल झाला. सहविचारानें व तडजोडीनें प्रश्न निकालांत काढण्याची प्रवृत्ति परिषदेंत दिसून आली, ती अभिनंदनीय होती. ह्या दोन वर्गांतल्या संस्थांच्या कार्यक्रमाच्या मर्यादा कित्येक ठिकाणीं मिश्रित होतात आणि एकमेकांमध्यें स्पर्धा उत्पन्न झाल्यासारखें दिसतें. अर्बन बँकांचा प्रसार व प्रगति ह्यांस पूर्ण वाव मिळावा आणि त्यांस वाढतें व्यवहारक्षेत्र उपलब्ध व्हावें ह्याबद्दल एकमत आहे, आणि ह्या दृष्टीनें काय उपाय योजावे ह्याचीहि साताऱ्याच्या परिषदेंत चर्चा झाली.

लहान–मोठ्या अर्बन बँका व सोसायट्या ह्यांच्या अडचणी दूर होण्यासाठी त्यांचा संघ स्थापन करण्याबाबत महत्त्वाची चर्चा परिषदेंत झाली. ह्या प्रकारच्या संघटनेची उपयुक्तता बँकांच्या चालकांस पटली तर त्यांनीं संघाच्या यशस्वितेकरतां लागणारा स्वार्थत्याग करण्याची तयारी ठेवली पाहिजे. त्यांनीं आपलें संघटन मजबूत केलें तर संघाकडून अनेक अडचणींचें निवारण करण्यास सहाय होईल. शिस्त, कार्यक्षमता आणि जूट ह्यांच्या अभावामुळें कित्येक अर्बन बँकांच्या व्यवहारांत व्यत्यय येत असल्याचें दिसून येत असून सरकारकडून होणाऱ्या अतिक्रमणाचें निवारणहि त्यांस करतां येत नाहीं. कर्जें देणें, पैसा दुसऱ्या प्रकारांनीं गुंतवणें, शेतीच्या मालाच्या तारणावर पैसा देणें इत्यादि अवघड प्रश्न बँकांस सोडवावयाचे आहेत आणि ते व्यवस्थितपणें सुटण्यास समजूतदारपणा, कार्यक्षमता आणि निःपक्षपातीपणा त्या गुणांचें विशेष अगत्य आहे. साताऱ्याच्या परिषदेचे योगानें सहकारी अर्बन बँकांस महाराष्ट्रांत आपली प्रगति योग्य रीतीनें घडवून आणण्यास उत्तेजन मिळेल अशी आशा आहे.

---

### अल्युमिनिअमः उत्पादन व खप

ॲल्युमिनिअमचा धंदा हा जगांतील महत्त्वाच्या धंद्यांत आतां गणला जातो व तो सुरू होऊन पुरीं पंचवीस वर्षेंहि झालीं नसलीं तरी त्याचें महत्त्व मात्र फार आहे. लोखंड ज्या ज्या कारणाकरितां वापरण्यांत येतें, त्या त्या कारणासाठी अल्युमिनिअमचाहि उपयोग करतां येतो. तथापि लोखंडाच्या स्वस्ताईमुळें आज अल्युमिनिअम महाग पडतें. ह्या दोन धातूंचा खप सध्याच्या प्रमाणांत चालू राहिला, तर चांगल्या प्रतीच्या अल्युमिनिअमचा सांठा चांगल्या लोखंडाचे सांठ्यापेक्षां ज्यास्त दिवस जाईल, अशी अपेक्षा आहे. ह्याखेरीज, अल्युमिनिअम कमी प्रमाणांत उपलब्ध करून देणाऱ्या खनिज पदार्थांचा पुरवठा अत्यंत मुबलक आहे. ॲल्युमिनिअमच्या उत्पादनाचे बाबतींत १९३४ सालीं अमेरिकेचा नंबर पहिला लागला, परंतु गेल्या वर्षी जर्मनीनें ती जागा घेतली. नॉर्वे, फ्रान्स, ग्रेटब्रिटन व इटली ह्या देशांचा नंबर खाली लागतो. बॉक्साइटचें उत्पादन ज्या ठिकाणीं होईल त्याच ठिकाणीं ॲल्युमिनिअमचें होईल, असा नियम नाहीं; ॲल्युमिनिअम तयार करण्यास विजेची अगर पाण्याची शक्ति लागते व ती जेथें स्वस्त मिळेल, तेथें ॲल्युमिनिअमचें उत्पादन करणें सोपें जातें.

अल्युमिनिअमचे बाबतींत स्वावलंबी होण्याचें जपाननें ठरविलें आहे. बॉक्साइट जपानमध्यें सांपडत नाहीं; तथापि तें बाहेरून आणून व त्यांतून अल्युमिनिअम काढून जपाननें हा धंदा सुनियंत्रित केला आहे. एका जपानी कंपनीनें ॲल्युमिनिअमची निर्गत करण्यासहि सुरवात केली आहे व नमुन्याचे तक्केहि परदेशीं धाडले आहेत. ॲल्युमिनिअमचें उत्पादन करणारे देश जपानच्या वरील प्रयत्नांकडे काळजीपूर्वक लक्ष देऊन पहात आहेत.

---

### समुद्रास्तृप्यंतु !

ब्राझील देशांत कॉफीचें पीक मोठें येतें, परंतु मंदीमुळें तिला भाव येत नाहीं. म्हणून कॉफी समुद्रांत फेकून देऊन उरलेल्या मालास बरी किंमत आणावी असा यत्न त्या देशांत चाललेला आहे. जून, १९३५ ते एप्रिल, १९३६ ह्या मुदतींत कॉफीच्या साडेतीन कोटि पिशव्या समुद्रास्तृप्यंतु झाल्या असें प्रसिद्ध झालें आहे.

## स्फुट विचार

### हें चित्र पहा आणि तें चित्र पहा

औद्योगिक संरक्षणाचें तत्त्व हिंदी कायदेमंडळ व सरकार ह्यांनीं चवदा वर्षांमागें मान्य केलें व त्यास अनुसरून आजपावेतों सुमारें पन्नास स्वदेशी धंद्यांबाबत चौकशी होऊन कांहींस जकातीच्या अगर इतर स्वरूपांत संरक्षण देण्यांतहि आलें आहे. तथापि आतां ह्या धोरणासंबंधीं सरकारचा विशेषसा उत्साह दिसून येत नाहीं व चौकशी करणाऱ्या टारिफ बोर्डाचें विसर्जन करण्याचें ठरवून सरकारनें संरक्षणाची जरूर असलेल्या धंद्यांची गैरसोय केलेली आहे. संरक्षणाची मागणी करणारे अर्ज टारिफ बोर्डाकडे चौकशीसाठी सोपविण्याचें काम सरकारनें स्वतःकडे घेतलें होतें; बोर्डानें स्वयंस्फूर्तीनें उद्योगधंद्यांची पहाणी करण्याचा त्यास अधिकार नव्हता. हिंदी सरकारनें टारिफ बोर्डाची नेमणूक रहित करून आतां जणूं काय कोणत्याच धंद्यास संरक्षणाची जरूरी उरलेली नाहीं, असा निर्णय दिल्यासारखें झालें आहे. ब्रिटिश सरकारनें स्वीकारलेलें धोरण हिंदी सरकारच्या धोरणाच्या अगदीं उलट स्वरूपाचें आहे. त्या देशांत "इंपोर्ट ड्यूटीज ॲडव्हायसरी कमिटी"कडे संरक्षक जकातीबाबतच्या मागण्यांचा विचार करण्याचें काम सोपविलेलें आहे. युद्धासाठी लागणाऱ्या मालावरील जकाती वाढविण्यास परंतु कमी न करण्यास सुचवण्याचा अधिकार सदरहु कमिटीस देण्यांत आलेला आहे. संरक्षक जकातींमध्यें वाढ करण्याच्या दृष्टीनें आपण होऊन चौकशी करणें ही गोष्ट कमिटीच्या अधिकारांतली आहे. संरक्षण मागणाऱ्या कारखानदारांस आपली बाजू सबळ करण्यासाठीं जरूर तें सहाय देण्याची जबाबदारीहि तिच्यावर टाकलेली आहे. म्हणजे, जी कमिटी अर्जांचा निकाल करणार, तीच अर्ज तयार करणार, अशी परिस्थिति आहे. ह्यावरून संरक्षक जकाती वाढविण्याकडे व देशी धंद्यांस उत्तेजन देण्याकडे ब्रिटिश सरकारचा कल कसा आहे, ह्याची स्पष्ट कल्पना येते. हिंदी टारिफ बोर्डाचे मर्यादित अधिकार व त्या बोर्डाचें विसर्जन ह्यांची ग्रेट ब्रिटनमधील ॲडव्हायसरी कमिटीच्या अधिकाराशीं व वाढत्या महत्त्वाची तुलना केली असतां ती हिंदुस्थानांतील चमत्कारिक परिस्थितीसंबंधानें अत्यंत बोधप्रद झाल्याखेरीज रहाणार नाहीं.

---

### मॅनेजिंग एजन्सीचा पुरस्कार व नवें बिल

हिंदी कंपनीकायद्याबाबत दुरुस्तीचें एक बिल मध्यवर्ती कायदेमंडळापुढें असून, त्याचें कायद्यामध्यें लवकरच रूपांतर होईल. दुरुस्ती बिलामध्यें मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतीवर अनेक बंधनें घालण्यांत आलेलीं असून त्यामुळ व्यापारी वर्गांत खळबळ उडालेली आहे. भागीदारांच्या हिताचें रक्षण करण्याऐवजीं मॅनेजिंग एजंट्स आपल्याच फायद्याकडे पहातात व त्यामुळें कंपनी व तिला भांडवल पुरवणारे लोक ह्यांचें नुकसान होतें, असा मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतीवरील आक्षेप आहे. मॅनेजिंग एजंट्स हे स्वतःच कंपन्यांचे उत्पादक असतात. कंपनी स्थापन झाल्यानंतर तिला माल पुरविणें, तिचा विमा उतरणें इत्यादि कामें हे एजंटस स्वतः परंतु इतरांच्या नांवानें करून त्या व्यवहारावर नफा मिळवितात, अशी त्यांचे संबंधानें तक्रार आहे. हिंदुस्थान सरकारचे कायदा मंत्री, सर नृपेंद्र सरकार, ह्यांनीं मुंबईच्या इंडियन मर्चंट्स चेंबरला एक खलिता पाठवून सध्याच्या मॅनेजिंग एजन्सीपद्धतीमधील दोष सोदाहरण दाखविले असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. सदरहु चेंबरचे कित्येक सभासद स्वतःच मॅनेजिंग एजन्सीज्चे भागीदार असल्यानें, एजन्सीच्या पद्धतीवर त्यांस टीकाहि करतां येत नाहीं व नव्या बिलास पाठिंबाहि देतां येत नाहीं अशी परिस्थिति निर्माण झाली आहे, असें म्हणतात. त्यांनीं नव्या बिलावर अनुकूल अभिप्राय प्रकट केल्यास मॅनेजिंग एजंट्स ह्या नात्यानें स्वतःस मिळणाऱ्या नफ्याविरुद्ध मत प्रदर्शित केल्यासारखें होणार आहे. कंपन्याचे उत्पादक व एजंट्स विरुद्ध भागीदार असा हा लढा असून, भागीदारांचीच कंपनी बनत असल्याकारणानें त्यांच्या हिताविरुद्ध उघडपणें मत व्यक्त करणें व्यापारी मंडळास कठिण जाणार, हें उघड आहे. असेंब्लीच्या येत्या अधिवेशनांत ह्या प्रश्नावर खुलासेवार चर्चा होईलच.

---

### अर्बन बँकांच्या संघाची आवश्यकता

साताऱ्यास गेल्या आठवड्यांत अर्बन बँकांची परिषद भरली होती, तीमध्यें सदरहु संस्थांचा एक संघ स्थापन करण्याबाबत ठराव मंजूर झाला आहे. ह्या विषयाची चर्चा अनेक वेळां होऊन त्याप्रमाणें कृति मागेंच घडून यावयास हवी होती अशी अपेक्षा कोणाची असल्यास तींत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. परंतु सदरहु प्रकारणीं असें घडतें कीं मोठ्या बँका स्वतः सामर्थ्यवान असल्यानें त्यांस संघाची निकड विशेष भासत नाहीं आणि लहान–सहान संस्थांस संघासारख्या घटनेचें महत्त्व पटलें असलें तरी त्यांच्यांमध्यें त्या बाबतींत हालचाल करण्याचें सामर्थ्य नसतें. त्याचप्रमाणें, सर्वांच्या हिताकरितां संघ स्थापावा असें सामान्य मत व्यक्त झालें तरी त्यासंबंधांत जरूर असलेली खटपट करण्यास कोणी पुढें होत नाहीं आणि शेवटीं ती कल्पना तेथेंच जिरून जाते. पुणें, नगर, सोलापूर व सातारा ह्या चार जिल्ह्यांमध्यें मिळून लहान मोठ्या कित्ती तरी अर्बन बँका व सोसायट्या आहेत, परंतु त्यांची परस्परांस ओळखहि नाहीं असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांचा संघ काढावयाचा तर तो प्रत्येक जिल्ह्याकरितां एक निराळा असावा कीं काय ह्या सूचनेचाहि विचार साताऱ्याच्या परिषदेंत झाला आणि असा मर्यादित संघ यशस्वी होण्याच्या मार्गांत पैसा व कार्यक्षमता ह्यांचे बाबतींत अडचणी उत्पन्न होण्याची भीति असल्यानें चार जिल्ह्यांची मिळून एक बळवान संस्था निर्माण करणें अगत्याचें आहे असा अभिप्राय चर्चेअंतीं व्यक्त करण्यांत आला. परिषदेच्या अध्यक्षांनींहि ह्या विषयासंबंधानें जागृतीस पोषक होतील असे विचार प्रकट केले होते आणि अर्बन बँकांचा व सोसायट्यांचा संघ निघून त्याचे हातून उपयुक्त कामगिरी होण्यास त्या संस्थांमध्यें स्वार्थत्याग करण्याची आणि जुटीनें वागण्याची तयारी असली पाहिजे असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें होतें. अनेक लहान संस्थांच्या संख्याबळाचें सहाय मोठ्या बँकांस आवश्यक आहे हें त्यांनीं विसरूं नये आणि थोरांनीं लहानांस मदत करणें हें सहकारा चळवळीचें आद्य तत्त्व आहे हें ध्यानांत ठेवून सर्वांनींच आळस व निरुत्साहवृत्ति टाकून द्यावी आणि कामास लागावें.

---

### पाऊसपाण्याची हालहवाल

जुलै २५ अखेर पुऱ्या झालेल्या आठवड्यांतील पाऊस पाण्याच्या परिस्थितीसंबंधानें मुंबई सरकारच्या गॅझेटमध्यें माहिती प्रसिद्ध झाली आहे, तीवरून यंदा पाऊस दगा देणार कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे. विशेषतः मध्यभाग व दक्षिण भाग ह्यांमध्यें पाण्याची टंचाई भासूं लागली आहे. अहमदनगर सोलापूर,

पुणें इत्यादि जिल्ह्यांतील पेरण्या कित्येक ठिकाणीं लांबणीवर पडल्या असून पिण्याच्या पाण्याचाहि तुटवडा भासूं लागला आहे. कालव्याच्या पाण्यावरील उंसासहि बाधा झाली आहे. पावसास तात्काळ सुरवात झाली नाहीं तर भयंकर परिस्थिति उत्पन्न होईल असें दिसत आहे. अहमदनगर येथील दुष्काळ फंड कमिटीनें गुरांसाठी कडबा व गवत मिळवून देण्याप्रीत्यर्थ ३५ हजार रुपये मंजूर केले आहेत. ह्याप्रमाणें शेतकऱ्यांस सहाय देण्याची तयारी आतांच करावी लागत आहे यावरून भवितव्यतेच्या भीषणतेची कल्पना येते. वेळींच पाऊस पडून पुढील आपत्ति टळो.

## नॅशनल लायब्ररी, वांद्रें

वरील लायब्ररीचा ३१–३–३६ अखेरचा १९ वा वार्षिक अहवाल आमचेकडे आला आहे. संस्थेचे पटावर एकूण २७७ सभासद आहेत व ३,९१२ पुस्तकें तिच्या संग्रहीं आहेत. अहवालाचे सालीं सुमारें ४०० रुपयांचीं नवीं पुस्तकें खरेदी करण्यांत आलीं. सभासदांनीं वाचनासाठी नेलेल्या एकूण ७,१५५ पुस्तकांपैकीं ४,६७५ पुस्तकें कादंबऱ्या व नाटकें होतीं. लायब्ररीची दरमहा वर्गणी फक्त चार आणे आहे व ह्या अल्प पैशांत उपयुक्त पुस्तकें व कालिकें सभासदांस वाचावयास मिळतात. संस्थेचें कार्य व्यवस्थितपणें चालू असल्याचें अहवालावरून दिसून येतें.

## धुळें अर्बन को. बँक लि.

( वार्षिक सभा : ता. १६ ऑगस्ट, १९३६ )

| | | | |
|---|---|---|---|
| भाग भांडवल : | ९० हजार रु. | शिलक : रोख व बँकेंत : | २,०० ह. रु. |
| ठेवी : | ५,३५ ,, ,, | कर्जें : | ४,४५ ,, ,, |
| रिझर्व्ह फंड : | ५३ ,, ,, | सरकारी नोटा : | ७५ ,, ,, |
| इतर फंड : | ३४ ,, ,, | इमारत : | १३ ,, ,, |
| एकूण : | ७४९ ,, ,, | एकूण : | ७४९ ,, ,, |

बँकेच्या सभासदांची संख्या १,६१२ आहे. गेल्या वर्षीपेक्षां १९३५–३६ अखेरची बँकेकडील कर्जाची बाकी ५१ हजारांनीं कमी झाली आहे. एकूण १ लक्ष ११ हजारांच्या थकबाकीपैकीं २० हजारांच्या बाकीचें येणें संशयित आहे. थकलेली बाकी वसूल करण्याचे शक्य ते प्रयत्न चालू आहेत आणि ती वसूल न झाल्यास तरतूद म्हणून २० हजारांचा फंडहि बँकेनें वेगळा काढून ठेवला आहे. सालअखेर बँकेस १६ हजार रु. नफा झाला. डिव्हिडंड ईक्वलायझेशन फंडांत ३½ हजार रुपये टाकूनहि, मॅनेजिंग कमिटीस ७½ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यासंबंधीं शिफारस करतां आली, ही गोष्ट समाधानकारक आहे. बँकेच्या ताळेबंदावरून व नफातोटा पत्रकावरून तिचा कारभार सुव्यवस्थित रीतीनें चालविला जात असल्याचें आढळून येतें.

## श्री. खोले ह्यांची उमेदवारी

मध्य भागांतील अर्बन बँकांतर्फे एक प्रतिनिधी मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या डायरेक्टर बोर्डावर निवडण्यांत येतो. सदरहू जागेसाठी श्री. यशवंत दत्तात्रय खोले, एल. एस. जी. डी., हे उभे आहेत. सध्या ते पुणें येथील कॉसमॉस बँकेचे एक डायरेक्टर असून गेलीं कित्येक वर्षें त्यांनीं सहकारी चळवळीमध्यें उत्साहानें भाग घेतलेला आहे.

## विमानगृहांसाठी सोईस्कर जागेची तरतूद

विमानांच्या वहातुकीमध्यें दिवसानुदिवस वाढ होत आहे, परंतु मोठ्या शहरांचे जवळ उतरण्याची सोय असल्याखेरीज विमानांचा पुरेपूर उपयोग करून घेतां येणार नाहीं. शंभर मैलांच्या विमानाचे प्रवासास ३५–४० मिनिटें पुरतात, परंतु शहरांतील वस्तींतून विमानगृहापर्यंत व तेथून परत येण्यासच ह्यापेक्षा ज्यास्त वेळ लागूं लागला, तर विमानांचा प्रवास व्हावा तेवढा सोईचा होणार नाहीं. चांगल्या तऱ्हेच्या विमानगृहास २०० एकर जागा लागते व आजूबाजस उंच इमारती येऊं नयेत अशी व्यवस्था करावी लागते. एवढी मोठी जागा शहराचे मध्यवर्ती ठिकाणीं आतां उपलब्ध होणें शक्य नाहीं व जरी ती मिळाली तरी त्याबद्दल जबर किंमत द्यावी लागेल. विलायतेमधील कित्येक शहरांपुढें हा प्रश्न पडला आहे. परंतु ज्या कांहीं शहरांनीं जागेची मागेंच तरतूद केली, त्यांची मात्र सोय झाली आहे.

## हिंदी सोन्याच्या निर्गतीमध्यें वाढ

चालू सालाच्या पहिल्या तिमाहीमध्यें, म्हणजे एप्रिल, मे व जून मिळून, एकूण ८ कोटि ८८ लक्ष रुपये किंमतीच्या सोन्याची निर्गत झाली. गेल्या वर्षीतील तत्सम मुदतीमधील सोन्याच्या निर्गतीची किंमत ४ कोटि १० लक्ष रुपये होती.

## बँक ऑफ लंडनजवळील सोन्याचा संचय

बँक ऑफ लंडनच्या संग्रहीं आज सुमारें ४३⁄४ अब्ज रुपये किंमतीचें सोनें आहे. १९१४ सालीं सदरहू बँकेजवळ फक्त ५० कोटि रुपयांचें सोनें होतें.

## मुंबई ते लोणावळा सीझन तिकिटें

मुंबई ते लोणावळा तिसऱ्या वर्गाची सीझन तिकिटें १ ऑक्टोबरपासून प्रयोगादाखल सुरू करण्यांत येणार आहेत.

## दरमाणशी व्यापार

आयात व्यापाराची वार्षिक सरासरीची किंमत चीन देशांत दर माणशी २ रुपये आहे. हा आकडा जर्मनींत ६८ रुपये, ग्रेट ब्रिटनमध्यें १८५ रुपये, डेन्मार्कमध्यें २०० आणि स्विस्लँडमध्यें २७५ रुपये असा आहे. हिंदुस्थानांत दर माणशी आयात व्यापार सरासरीनें ४ रुपये आहे.

## ऑस्ट्रियन चलन

ऑस्ट्रियन चलनाची सोन्याच्या मानाची किंमत २५ टक्के कमी करण्याची तरतूद कायद्यानें होण्याचें घाटत आहे.

## जर्मन सेव्हिंग्ज बँकांचा व्यवहार

जर्मनींतल्या सेव्हिंग्ज बँकांनीं १२० कोटि रुपयांचीं १० लक्ष कर्जें १९३५ सालीं दिलीं.

पुणें शहर म्युनिसिपालिटीकडून मंजूर होणाऱ्या

**भव्य इमारती बांधण्याकरितां सुंदर नकाशाबाबत**

**कन्सल्टिंग सर्व्हेअर जी. जी. तळवलकर यांना भेटावें.**

वेळः—सकाळीं ८ ते १० व दुपारीं ४ ते ६. ठिकाणः—७७३, सदाशिव, पुणें २.

## जर्मनीचें व्यापारविषयक धोरण

**सामर्थ्यवान ऋणकऱ्याचा आपल्या सावकारांवरील पगडा**

गेल्या महायुद्धामध्यें अपयश मिळाल्यामुळें जर्मनीस व्हर्सेईचा तह मान्य करावा लागला व त्या कारणानें तो देश आपल्या वसाहतींस मुकला. इतर देशांतून कच्चा माल मिळविण्यास जरूर तें विनिमय-साधन जर्मनीजवळ नसल्यानें त्यास उधारीची याचना करणें प्राप्त होतें. कच्या मालास ज्यावेळीं विशेष मागणी नव्हती व तो पडून होता, त्यावेळीं जर्मनीस तो माल मिळूं शके; कारण आपला माल कोठेंच न खपण्यापेक्षां उधारीनें कां होईना तो उठविण्यास इतर देश तयार होत. बाजारभाव आतां सुधारले असल्यामुळें ही परिस्थिति उरलेली नाहीं व कच्या मालास गिऱ्हाइक मिळूं लागलें आहे. जर्मनीनें आपल्या खरेदीबाबतचें आपलें देणें भागविलेलें नसल्याकारणानें त्याकडची बाकी वाढविण्यास इतर देश तयार होत नाहींत. बाहेरील खंडांतून जर्मनीमध्यें होणारी कच्च्या मालाची आयात अशा रीतीनें बंद पडली आहे. परंतु ह्या कठिण प्रसंगांतून जर्मनीनें खुबीनें माग काढला असून युरोपांतील कित्येक देशांवर आपला पगडा बसविला आहे.

पूर्व, दक्षिण आणि मध्य युरोपांतील कित्येक देशांचा धान्य, लोंकर, तंबाखू, इत्यादि माल जर्मनी आयात करूं लागला आहे. ह्या मालाची किंमत रोखीनें देण्यांत येत नाहीं; फक्त तेवढी रकम त्यांचे खात्यावर जमा करण्यांत येते व त्या देशांनीं खरेदी केलेल्या जर्मन मालाची किंमत त्यांचें नांवें लिहून हिशेब करण्यांत येतो. हा माल जर्मनी इतर देशांस क्वचित् प्रसंगीं नुकसान सोसूनहि विकतो व अशा रीतीनें जगांतील इतर राष्ट्रांकडून माल विकत घेण्यासाठी लागणाऱ्या विनिमय-साधनाची तरतूद करतो. इकडे, जर्मनीस माल पुरविणाऱ्या देशांस मात्र आपल्या खात्यांतील जमेकडे पाहूनच केवळ समाधान मानावें लागतें. हॉलंड, पोलंड, ग्रीस, युगोस्लाव्हिया, रुमानिया, बल्गेरिया, इत्यादि देशांनीं जर्मनीस कच्चा माल पुरविला, त्याचें येणें ' गोठून ' गेलें असून केवळ कागदी हक्क उरले आहेत ! अशा रीतीनें, बलिष्ठ देणेकरी आणि असहाय घेणेकरी ह्यांची गांठ पडली आहे.

ह्या देशांच्या सर्व तऱ्हेच्या कच्च्या मालाचा उठाव करण्याची जबाबदारी जर्मनी आपल्या शिरावर घेतो व माल चांगला नसला तरी तो स्वीकारून त्याबद्दलची किंमत वसूल करण्याचा कागदी हक्क त्या देशांस बहाल करतो. माल पाठविणारांचें ह्या व्यवहारांत नुकसान होण्याची क्वचितच पाळी येते. कारण निर्गत करणाऱ्या देशांतील सरकारास मालाच्या उत्पादकांचें देणें रोखीनें भागवावें लागतें. शेतकरीवर्ग त्यांस स्वतःच्या सरकाराकडून मालाचे रोख पैसे मिळाल्यामुळें संतुष्ट रहातो. जर्मनीबद्दल त्यास आपुलकी वाटूं लागते व जर्मनीच्या राजकारणविषयक कारवाईस सहानुभूति मिळते. उलट, त्यांच्या सरकारांस मात्र आपल्या देणेकऱ्याचे पाय धरावे लागतात.

आपल्या देणेकऱ्याकडून माल मागविल्यासेरीज पैशाची वसुली होणार नाहीं, हें जाणून जर्मनीमध्यें हे देश आपलीं कंत्राटें देतात व ब्रिटिश किंवा फ्रेंच प्रतिस्पर्ध्यांचे भाव कमी असले तरी जर्मन कारखानदारांसच पसंत करतात. म्हणजे, केवळ वजाबाकीनें देणें भागविलें जातें. जर्मनी मात्र हिशेब पुरे होऊं न देण्याबद्दल काळजी घेतो व आपली देणें बाकी कायम राहील अशी खटपट करतो. नवीन काम स्वीकारण्याच्या करारांतच कच्च्या मालाच्या आयातीची अट घालण्यांत येते व अशा रीतीनें युरोपांतील इतर देशांचें जर्मनीकडील येणें फुगत जातें. ह्या युक्तीनें युरोपमधील देशांवर जर्मनीनें आपली पकड बसविली आहे व ते देश आपल्या मालाच्या उठावासाठी जर्मनीच्या तोंडाकडे पाहूं लागले आहेत. स्वतःचे कारखाने काढावयाचे म्हटले, तरी जर्मन यंत्रसामुग्री व सुटे भाग आणि जर्मन कामगार व अधिकारी ह्यांच्याखेरीज त्यांचें पाऊल पडत नाहीं. ब्रिटिश व फ्रेंच मालाची जागा जर्मन माल घेऊं लागला आहे व ह्या चंचुप्रवेशामुळें जर्मन देशाचें वजन चोहोंकडे वाढूं लागलें असल्यानें इतर राष्ट्रांच्या डोळ्यांत ही गोष्ट सलत आहे. आपली स्वतःची आर्थिक परिस्थिति बिकट असतांना सुद्धा खुद्द घेणेकऱ्यावरच मात करण्याचें जर्मनीचें धोरण यशस्वी होत आहे व त्याचा प्रतिकार करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

## खासा व्यवहार !

एक दिसण्यांत भोळा गृहस्थ वाण्याच्या दुकानीं गेला आणि त्यानें आठ आण्यांचा पुड्यांत बांधलेला साखऱ्या घेतला. पण इतक्यांत कांहीं आठवलेसें करून त्यानें साखरेचा पुडा परत करून त्याच्याऐवजीं चहा घेतला. नंतर चहाचा पुडा त्यानें माघारी दिला व त्याच्याबद्दला आठ आण्यांचे बदाम घेऊन तो रस्ता सुधारूं लागला. बदामांचे आठ आणे देण्यास विसरल्याचें वाण्यानें गिऱ्हाइकाच्या नजरेस आणलें तेव्हां तो गृहस्थ म्हणालाः " बदामांबद्दल मीं आतांच चहाचा पुडा नाहीं कां तुला दिला ?" "मग त्या चहाचे पैसे नकोत कां द्यायला ?" असें विचारतां गृहस्थानें उत्तर दिलें, " मी साखरेचा पुडा तुला दिला तो कोठें गेला ? " त्यावर वाणी म्हणालाः "आणि त्या साखरेचे पैसे कोठें आहेत ? " गिऱ्हाइकानें त्यावर उत्तर दिलेंः " माझ्याजवळ तुझी साखर नसतांनाच तूं तिच्याबद्दल मला पैसे कसे मागतोस ! "

## इटलीनें युद्धासाठी कर्ज कसें उभारलें ?

इटलीनें ॲबिसीनियाशीं युद्ध करण्याकरितां जून १९३६ अखेर सुमारें २९० कोटि रुपये खर्च केले. एवढी मोठी रकम उभी करण्यासाठी इटलीनें योजिलेली युक्ति लक्ष्यांत घेण्याजोगी आहे. ५ टक्के दराच्या सरकारी रोख्यांचें १९३४ सालीं ३½ टक्क्यांच्या रोख्यांत रूपांतर करण्यांत आलें होतें. ह्या रोखेदारांस, त्यांनीं कांहीं विशिष्ट रकम रोखीनें दिल्यास, पहिल्या कर्जाचें पुनः ५ टक्क्यांत रूपांतर करण्याची सवलत देण्यांत आली. अशा रीतीनें नवें रोख कर्ज १० टक्के दरानें पडलें. कांहीं कर्ज बाजारांत शंभराच्या रोख्यास ९५ ह्या भावानें विकण्यांत आलें. इटालियन नागरिकांनीं धारण केलेल्या परदेशांतील रोख्यांचे तारणावरहि ५ टक्के दराचे ट्रेझरी बाँड्स काढण्यांत आले.

## निजाम स्टेट रेल्वे मोटर सर्व्हिस सुरू करणार

निजाम स्टेट रेल्वेनें मागविलेल्या २५० मोटर बसेस ह्या वर्षअखेर हिंदुस्थानांत येऊन दाखल होतील. रेल्वे स्टेशनांस जोडणाऱ्या रस्त्यांवर रेल्वे कंपनी मोटारींची वहातुक सुरू करणार असून ३,८०० मैल रस्त्यांची आखणी ह्या दृष्टीनें झालेली आहे. सदरहु मोटारी वक्शीरपणें व ठराविक दर घेऊन चालविण्यांत येतील.

## मुंबई इलाख्यांतील कारखाने

### गेल्या वर्षाच्या अहवालांतील कांहीं माहिती

( १ ) गेल्या वर्षी आमच्या इलाख्यांत एकूण १,७४६ कारखाने चालू होते व त्यांतील मजुरांची संख्या ४,२०,७१६ इतकी होती, म्हणजे १९३५ सालांतील संख्येपेक्षां ती सुमारें २४ हजारांनीं वाढली. रात्रपाळी करणारांची संख्याहि दुपटीहून ज्यास्त झाली आहे.

( २ ) अहमदाबाद शहराच्या औद्योगिक प्रगतीबरोबर कारखान्यांतील सांडपाण्याच्या विनियोगाची व्यवस्था मात्र झालेली नाहीं, ती लवकर होणें जरूर आहे.

( ३ ) अहमदाबाद व सोलापूर ह्या शहरांची हवा कापडाच्या गिरण्यांस सोईची नाहीं, तथापि तेथील गिरण्यांनीं आपल्या इमारतींमधील हवेंत आर्द्रता आणून ती सुधारण्याकरितां योजना केल्या आहेत व त्यावर गेल्या कांहीं वर्षांत मिळून सुमारें ६० लक्ष रुपये खर्च केले आहेत.

( ४ ) साखरेच्या कारखान्यांत मालकांस व कामगारांस, दोघांसहि, कारखान्याचें वातावरण नवीन असून त्याबाबतच्या धोक्यांची त्यांस अजून असावी तशी कल्पना आलेली नाहीं.

( ५ ) १९३६ च्या जानेवारीमध्यें नवा फॅक्टरी ॲक्ट अमलांत आला व त्यानें कामाचे तास साठावरून चोपन्नावर आणले. तथापि, ॲक्टांतील नवे नियम पाळण्यांत कारखानदारांनीं विशेष कुचराई केली नाहीं.

### विमानमार्गाची लोकप्रियता वाढली

टाटा कंपनीच्या विमानांतून नेण्यांत आलेल्या उतारूंच्या संख्येंत व मालाच्या वजनांत सालोसाल झपाट्यानें वाढ होत आहे, हें खालील आंकड्यांवरून समजून येईल:—

| वर्ष | विमानांचा एकूण प्रवास | उतारूंचा प्रवास | टपालाचें वजन |
|---|---|---|---|
| | ( मैल ) | ( मैल ) | ( शेर ) |
| १९३२ | २८,६०० | | १,५७५ |
| १९३३ | १,३८,६०० | ५,५०० | ११,७५० |
| १९३४ | १,४५,००० | ८,३०० | २०,७५० |
| १९३५ | २,८७,००० | २६,००० | ३३,८२५ |

१९३६ सालांतील पहिल्या सहामाहींत विमानांचा प्रवास गेल्या वर्षांतील तत्सम मुदतीमधील प्रवासाच्या मानानें २० टक्क्यांनीं वाढला आहे व उतारूंची संख्या दुप्पट झाली आहे.

### 'डेड लेटर ऑफिस' चें कार्य

३१ मार्च, १९३६ अखेर संपलेल्या सहामाहींत पोस्टांत टाकलेल्या पत्रांपैकीं शेकडा ९९·४६ टक्के पत्रें त्यांवर लिहिलेल्या मालकांस पोंचतीं केलीं गेलीं. हिंदुस्थानांत अनेक भाषा व लिप्या प्रचलित असल्यानें पत्रांचा बटवडा बिनचूक करणें कठिण असतें. जीं पत्रें मालकांस पोंचतीं करतां येत नाहींत, अशांची रवानगी मुंबई, कलकत्ता, मद्रास, लखनौ व नागपूर येथील कचेऱ्यांत—डेड लेटर ऑफिसांत—होते व तेथें मालकाचा पत्ता लावण्याची खटपट केली जाते. उपरिनिर्दिष्ट सहामाहींत सुमारें ३५ लक्ष पत्रें डेड लेटर ऑफिसांत पोंचविलीं गेलीं, त्यांतील ४ लक्ष पत्रांचे लेखक व मालक ह्या दोघांचाहि पत्ता लागला नाहीं.


दी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०
कडून
हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक
नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | |
|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |

| | | |
|---|---|---|
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |

| | |
|---|---|
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा:—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you:

NEW BUSINESS

This year 1934-35
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches:* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices:* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER: Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## मध्यभागांतील सहकारी अर्बन बँकांची परिषद

### अध्यक्ष, प्रो. काळे ह्यांचें भाषण

[ मध्यभागांतील पुणें, सोलापूर, नगर व सातारा ह्या चार जिल्ह्यांतल्या सहकारी अर्बन बँकांची पहिली स्वतंत्र परिषद सातारा येथें ता. ३० जुले रोजीं भरली होती. त्यावेळीं तिचे अध्यक्ष, प्रो. काळे, ह्यांनीं केलेल्या भाषणाचा सारांश येथें दिला आहे. ]

( १ ) केवळ चर्चेच्या सोयीसाठी आणि श्रमविभागणीच्या व विशिष्टीकरणाच्या तत्त्वावरच ही परिषद अलग भरत आहे. सहकारी संस्थांचें स्वतंत्र अस्तित्व व कारभार आणि त्यांची जूट व एकजीवित्व ह्यांमध्यें मुळांत विरोध नाहीं व तो आपण उत्पन्न होऊं देतां कामा नये. अर्बन बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका व प्रांतिक बँक ह्यांचा वारंवार संबंध येतो; तेव्हां इतरांच्या कारभारांत ढवळाढवळ न करतां एकमेकाशीं तडजोड व परस्पर-सहाय करणें सर्वांचें कर्तव्य आहे.

( २ ) सहकारी नियमांमध्यें सरकारनें नवीन ४८ वा नियम दाखल केला, तो सहकारी चळवळीच्या हिताच्या दृष्टीनें व खुद्द सरकारच्या कारभाराच्या दृष्टीनेंहि अनिष्ट आहे. सोसायट्यांची अंतर्गत व्यवस्था सुधारण्याची भलतीच जबाबदारी सरकारनें आपल्या शिरावर घेतली आहे. स्वयंशासित सहकारी चळवळीच्या अधिकारावरील आक्रमणापासून आपण स्वतःचा बचाव करूं शकलों नाहीं, ह्यापासून योग्य तो बोध घेणें जरूर आहे. संघटित काम, शिस्त, देवाण-घेवाण करण्याची प्रवृत्ति व कार्यक्षमता ह्यांची वाण भासूं लागली असून अर्बन बँकांनीं आपल्या यूनियन्स स्थापन करण्याची वेळ आली आहे. असा संघ स्थापून तो चालवण्यास लागणारा स्वार्थत्याग व शिस्त आपणांमध्यें आहे हें बँकांनीं सिद्ध केलें पाहिजे.

( ३ ) सर्व अर्बन बँकांनीं सामुदायिक रीतीनें करावयाच्या गोष्टींमध्यें यूनियन्सची स्थापना, सरकारकडे अगर सहकारी खात्याकडे सवलती अगर दाद मागण्याची व्यवस्था इत्यादि गोष्टी येतात. त्याचप्रमाणें, कांहीं प्रश्न सर्वांच्याच हिताचे परंतु बँकांची घटना व अंतर्व्यवस्था ह्याबाबतचे आहेत. सभासदांची संख्या, भागांचें भांडवल, व्यवस्थापक मंडळाची घटना व निवड, कर्जें देण्याची पद्धति व त्यांच्या रकमेची मर्यादा, निवडणुकीची पद्धत, हिशेबतपासणी, इत्यादि प्रश्न ह्या स्वरूपाचे आहेत. कर्जें देणें व बँकेचा पैसा अन्य रीतीनें गुंतविणें ह्या गोष्टींमध्यें सावधगिरी, निस्पृहपणा, व हिशेबीपणा ह्यांची फार आवश्यकता आहे. ह्या बाबतींत नेहमीं अडचणी उपस्थित होतात व त्या योग्य रीतीनें दूर केल्या पाहिजेत.

(४) जिल्हा मध्यवर्ती बँका व प्रांतिक बँकेच्या शाखा ह्यांच्यांशीं अर्बन बँकांचे संबंध विशिष्ट व्यवहारांच्या बाबतींत कोणत्या प्रकारचे असावे, त्यांचीं कार्यक्षेत्रें कशीं विभागलीं जावीं, इत्यादि प्रश्नांचाहि विचार नीट झाला पाहिजे. त्याचप्रमाणें, सहकारी खातें व सरकार ह्यांचेपुढें अर्बन बँकांची बाजू सयुक्तिक रीतीनें मांडून पैसा गुंतविण्याचे नवीन मार्ग व त्याबाबत सवलती मिळवतां येण्याजोग्या आहेत.

( ५ ) हिंदुस्थानांतील इतर प्रांतांशीं तुलना करतां मुंबई इलाख्यांतील अर्बन सहकारी संस्थांचा विस्तार समाधानकारक आहे. आतां त्यांनीं विशेष संघटन करून आणखी पुढें पाऊल टाकण्याची वेळ आलेली आहे. आपल्या इलाख्यांतील इतर विभागांतील अर्बन संस्थांचे मानानें मध्यभागांतील संस्थांच्या खेळत्या भांडवलाची सरासरी रकम अत्यल्प आहे, ह्यावरून सदरहू संस्थांच्या वाढीस किती वाव आहे, हें दिसून येतें.

( ६ ) अर्बन संस्थांचे सभासद शेती सोसायट्यांच्या सभासदांचे मानानें ज्यास्त शिकलेसवरलेले, समजूतदार, व्यवहारी व हिशेबी असावयास पाहिजेत. ही जबाबदारी ओळखून त्यांनीं इतरांस सुव्यवस्थेचें उदाहरण घालून दिलें पाहिजे.

( ७ ) कोणत्याहि चळवळीची यशस्विता तिच्यामधील शिस्त व जूट ह्यांवर अवलंबून असते. ह्या गुणांची आवश्यकता सहकारी चळवळींत तर विशेष आहे हें ध्यानांत वागवणें अगत्याचें आहे.

## साताराची सहकारी भाग परिषद

### रा. ब. नवले ह्यांचें भाषण

अकरावी भाग परिषद साताऱ्यास गेल्या आठवड्यांत भरली, तीमध्यें रा. ब. नवले ह्यांनीं केलेल्या अध्यक्षीय भाषणांतले प्रमुख मुद्यांबाबतचे उतारे खालीं दिले आहेत:—

" माझे समजुतीप्रमाणें या भागांतील शेतकरी विद्येंत फारच मागसलेले असल्यामुळें आणि सहकारी चळवळीची वाढ करण्याकरितां जीं माणसें सुरवातीच्या वेळीं नेमलीं गेलीं तीं शेतकरी वर्गांतील नसल्यामुळें किंवा तीं शेतकऱ्यांवर जगणाऱ्या वर्गाच्या हितसंबंधाशीं एकजीव असल्यामुळें सहकारी चळवळीचीं मूलतत्त्वें शेतकऱ्यांना योग्य प्रकारें किंवा योग्य भाषेंत समजाऊं शकलीं नाहींत. "

" पहिला प्रश्न असा आहे कीं, शेतकरी समाज दुःखी कां आहे? त्याला माझें उत्तर, शेतकरी समाज भोळा, अशिक्षित, परधार्जिणा, सारासार विचार करण्यास असमर्थ असा आहे म्हणून. यानंतर असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, ही स्थिति शेतकऱ्याला कां प्राप्त झाली? या प्रश्नाला उत्तर द्यायचें झालें तर जातीभेदामुळें, असेंच मी उत्तर देईन. "

" यांतून शेतकरी वर्ग सोडवावयाचा असेल तर रा. विचारे, स्वागताध्यक्ष, यांनीं सुचविलेल्या शेतीला जोडून इतर धंदे सहकारी पद्धतीनें करण्याच्या योजनेलाच मी पाठिंबा देईन. या योजनेमुळें शेतकऱ्यांना परस्पर-सहकारी चळवळीचा अभ्यास करावयाला वेळ मिळूं शकेल. निरनिराळ्या हितसंबंधाच्या लोकांबरोबर आपल्या हिताची दक्षता बाळगता येईल, आणि नागणूक थांबेल; मग शेतकरी स्वावलंबी होऊं शकेल. त्याचप्रमाणें, सहकारी बँकेनेंहि या योजनेला बँकेच्या हिताच्या दृष्टीनें उचलून धरणें जरूर आहे. आज प्रत्येक सहकारी सभासद कर्ज घेतो आणि आपल्या बुद्धीप्रमाणें त्याचा विनियोग करतो. त्याच्या समजुतीप्रमाणें उत्पन्न निघूं शकत नाहीं, हें आपल्याला दिसून आलेलें आहेच."

" तीस वर्षांच्या काळांत या चळवळीवर कोट्यवधि रुपये सरकारचे खर्च झाले असतील आणि त्यामुळें जर कल्पनेप्रमाणें चळवळीला यश आलें नसलें तर असे निरनिराळे प्रयोग करून पहाणें हें एक सरकारच्या कर्तव्यांपैकीं, आद्यकर्तव्य आहे अशी माझी समजूत असल्यामुळेंच, मी आपणापुढें माझे विचार थोडें विस्तृतपणें मांडण्याचा प्रयत्न केला आहे. "

" याशिवाय दुसरी बाब सुचवावयाची म्हणजे आपल्या देशांत पाऊस नेहमी अनिश्चित आहे. त्याचा परिणाम शेतीच्या पिकावर अनिष्ट असा होत असतो. आमच्या भागांत पुष्कळ डोंगर असून ओढे आणि नद्याही पुष्कळ आहेत...सहकार्यानें

लहान पाटबंधारे निर्माण करून त्याचा उपयोग शेतीकडे करून घेतला पाहिजे, आणि मोठी धरणें तयार करण्याकरितां सरकारकडे वरचेवर विनंती करणें जरूर आहे."

"आपल्याला पाहिजे असलेलें कर्ज आज योग्य व्याजाचे दरानें मिळत नाहीं, याचें कारण शोधून तें नष्ट केलें पाहिजे."

"...सहकारी चळवळीला महत्व येण्याकरितां आणि सहकारी संस्थांचे हितसंबंध पहाण्याकरितां त्यांचा प्रतिनिधि असेंब्लींत असणें जरूर होतें. या बाबीकडे सरकारचें आणि सहकारी चळवळींतील पुढाऱ्यांचें आतांपर्यंत लक्ष कां वेधलें नाहीं हें मला सांगतां येणें शक्य नाहीं. पण ही बाब महत्वाचीच समजावयास पाहिजे होती असें मला वाटतें."

"जग ही एक बाजारपेठ झाली आहे. जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकाला वहातुकीच्या सोयींमुळें माल जाऊं शकतो. इतकेंच नव्हें, तर चढाओढहि करूं शकतो. आपल्यालाही या चढाओढींत भाग घेणें जरूर पडत आहे. तेव्हां आपणही समर्थ होण्याकरितां आपले उद्योगधंदे आणि शेती सहकार्यानें करणें जरूर नाहीं असें कोण म्हणूं शकेल?"

"फक्त आपल्या परिस्थितात वाढलेलीं माणसेंच आपल्या सुखदुःखाची कल्पना करूं शकतील. बाकीच्यांना कळणें शक्य नाहीं. म्हणून बंधु भगिनींनो जागृत होऊन स्वावलंबनानें, सहकार्याची कास धरून, आपली आणि देशाची सुधारणा करण्यास समर्थ व्हा."

### कळवण तालुका (जि. नाशिक) सहकारी वृत्त

१. बँक इन्स्पेक्टर व सुपरवायझर यांनीं बँक यूनिअन व ग्रुप सेक्रेटरी मिळून नोकरलोकांकरितां स्टाफ सहकारी वाचनालय काढण्याचें निश्चित केलें आहे व त्या कामीं बँक इन्स्पेक्टर व सुपरवायझर यांनीं रु. ५ वगणी दिली आहे व बाकीची वर्गणी गोळा करण्याचें काम सुरू आहे.

२. कळवण तालुक्यांत पाऊस नाहीं. कपाशी व भुईमुगाची पेरणी फारच कमी झाली आहे. पेरणी झाली ती ऊन घरीत आहे. धान्य व वैरण यांचे भाव वाढूं लागले आहेत.

३. ग्रुप सेक्रेटरी डिबेटिंग क्लबची सभा ता. ७-८-१९३६ रोजीं सुपरवायाझिंग यूनियनच्या कचेरींत भरणार असून ऐतिहासिक पुरुषाचें चरित्र व त्यापासून घ्यावयाचा बोध ह्या विषयावर चर्चा होणार आहे.


दी को-ऑपरेटिव्ह पीपल्स बँक लिमिटेड, लिंब.

## जाहीर नोटीस.

या बँकेची सातवी वार्षिक साधारण सभा शुक्रवार, ता. १४।८।३६ रोजीं दुपारीं ३ वाजतां बँकेचे ऑफिसांत (१) ताळेबंद मंजूर करणें, (२) नफ्याची वाटणी करून भागावरील व्याज ठरविणें, (३) सन १९३६।३७ सालासाठीं व्यवस्थापक मंडळी निवडणें वगैरे कामांसाठीं भरणार आहे. तरी बँकेचे सर्व सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांनीं सभेस अवश्य यावें, अशी विनंति आहे. कळावें.

लिंब, जि. सातारा<br>ता. २३।७।१९३६ — T. M. THAKUR, प्रेसिडेंट.

श्री माणकेश एजन्सी

शहापूर लुगडीं, जरीचीं व टोपपदरी, अंगास रंग न लागणारीं मिळतात.

तसेंच, इरकल, संबायत वगैरे पेठेचा गॅरंटीड माल मिळतो.

मंडई रस्ता, शनीचा पार, पुणें.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

K. K. & Co.

Photographic Dealers

POONA.

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

*For All Medicinal Requisites*

— TRY —

N. MAHADEV & Co.

DISPENSING CHEMISTS AND DRUGGISTS

City Post Office Corner, POONA 2.

**WANTED** Arts Graduates & Medical Practitioners to push up Rural Uplift & Medical Relief Movement in furtherance of Insurance Benefit Plans throughout district places in the Presidency. Adequate remuneration to capable workers.

Apply with particulars to :—

Head Office :— 99, LAXMI ROAD, POONA. — General Manager, THE DAWN OF INDIA LIFE INS. CO. LTD.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—१ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—० |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८—१० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—१३ |
| ४% १९६०—७० ... ... | ११५—३ |
| ४% १९४३ ... ... ... | १११—१ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९९—१२½ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०७—११ |
| २¾% १९४८—५२ ... ... | १००—१२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १०९—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १००—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १०९—१४ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षे मुदत) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३—६३ ) ... | १११—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२३—८ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३५—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११८—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३६—३ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५८७—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३९—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १०६—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—४ |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९२५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १६०—० |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४०—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २४५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १६४६—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६१०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९२—८ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६५—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८७—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७४२—८ |


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १५ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १६ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १७ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १८ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | १९ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २० शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २१ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २२ साक्री ( „ „ ) |
| ९ अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २३ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० शेवगांव ( „ „ ) | २४ मालेगांव ( „ नाशिक ) |
| ११ कोपरगांव ( „ „ ) | २५ सटाणा ( „ „ ) |
| १२ भिवंडी ( „ ठाणें ) | २६ कळवण ( „ „ ) |
| १३ पालघर ( „ „ ) | २७ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १४ कल्याण ( „ „ ) | २८ कालोल ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २००००००० चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि बॉंबे लाइफ अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड.

( स्थापना १९०८ )

प्रगति

कंपनीची **लोकप्रियता** सिद्ध करते

कमाल प्रगति : पुरें केलेलें नवीन काम मिळविलें तें

| | | |
|---|---|---|
| १९२५ | : | रु. २२,१८,५०० |
| १९२७ | : | रु. ३८,७७,००० |
| १९२९ | : | रु. ५१,२२,५०० |
| १९३१ | : | रु. ५८,६६,५०० |
| १९३३ | : | रु. ९४,१६,५०० |
| **१९३५** | **:** | **रु. १,२३,२८,०००** |

माफक हप्ते, भरपूर बोनस, क्लेम्सची तात्काळ भरपाई, व पॉलिसींतील सवलतींच्या अटी हें " बॉंबे लाइफ पॉलिसीं " चें वैशिष्ट्य आहे.

एजन्सी व पॉलिसी ह्यासंबंधींच्या तपशिलासाठीं लिहा:—

मॅनेजर,

बॉंबे लाइफ बिल्डिंग, ४५।४७, चर्चगेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.



प्रो. काळे ह्यांचें नवीन पुस्तक

## रिझर्व्ह बँक

हिंदुस्थानांत राष्ट्रीय मध्यवर्ती बँक ह्या नात्यानें रिझर्व्ह बँकेची स्थापना होऊन त्या संस्थेचें काम चालू झालें आहे. रिझर्व्ह बँकेची घटना, तिच्या कार्याचा व्याप, तिचा इतर बँकांशीं संबंध इत्यादि विषयांची सांगोपांग माहिती ह्या पुस्तकांत दिली असून रिझर्व्ह बँकेच्या कायद्याच्या निरनिराळ्या कलमांची छाननी केलेली आहे. अवघड विषयाचा सुलभ बोध व्हावा म्हणून पुस्तक-कर्त्यांनें बँकिंगच्या धंद्यांतले आधुनिक प्रकारचे व्यवहार, त्यांची उपपत्ति व त्यांचें कार्य ह्यांची अत्यंत सोप्या मराठी भाषेंत चर्चा केली आहे आणि देशी व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें कोणत्या योजना अंमलांत आणल्या पाहिजेत ह्या संबंधानें व्यावहारिक सूचना केल्या आहेत. रिझर्व्ह बँक ही, राष्ट्रीय आर्थिक प्रगतीस परिपोषक होईल काय ? ह्या प्रश्नास प्रस्तुत पुस्तकांत उत्तर मिळण्यासारखें आहे.

पृष्ठें १२०-किंमत १ रुपया ( ट. हं. वेगळें )

पुस्तक मिळण्याचीं ठिकाणें:—

( १ ) व्यवस्थापक, "अर्थ" ग्रन्थमाला, पुणें ४.

( २ ) आर्यभूषण प्रेस, पुणें २.

( ३ ) दि को-ऑपरेटर्स बुकडेपो, ९, बेकहौस लेन, फोर्ट,मुंबई.



प्रो. काळे ह्यांचें

'अर्थ 'ग्रन्थमालेंतील तिसरें पुस्तक

## व्यापारी उलाढाली

महाराष्ट्रांत व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांचा उत्कर्ष व्हावा असें प्रत्येकास वाटतें, परंतु ह्या संबंधांत जे व्यवहार चालतात त्यांची माहिती फार थोड्या लोकांस असते. सामान्य जनतेस कमाईतून बचत करण्याची संवय लागून तीमधून निर्माण होणाऱ्या द्रव्यसंग्रहाचा उपयोग, व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या अभिवृद्धीकडे व्हावा, ह्याकरितां औद्योगिक व व्यापारी मंडळ्या ह्यांचे व्यवहार कसे चालतात, बाजारांत निरनिराळ्या प्रकारांच्या उलाढाली कशा होतात, इत्यादि विषयांचें ज्ञान महाराष्ट्रीय समाजांत पसरणें आवश्यक आहे. वृत्तपत्रांमध्यें व ऐकिवांत ह्या संबंधांत ज्या बातम्या येतात, त्यांचें रहस्य ओळखण्याची पात्रता लोकांमध्यें उत्पन्न झाली पाहिजे. हें ज्ञान महाराष्ट्रीय लोकांस सुगम रीतीनें व्हावें, ह्या उद्देशानें प्रस्तुत पुस्तक मुद्दाम लिहिलें आहे आणि त्याचा योग्य उपयोग जनता करून घेईल असा ग्रंथकर्त्यास विश्वास वाटत आहे.

पृ० १४३—किंमत १ रुपया. ( ट. हं. वेगळें )

मिळण्याचीं ठिकाणें:—

( १ ) व्यवस्थापक, ' अर्थ ' ग्रंथमाला, पुणें ४.

( २ ) आर्यभूषण प्रेस, पुणें २.

( ३ )दि को-ऑपरेटर्स बुक-डेपो,९ बेकहौस लेन,फोर्ट,मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख १२ ऑगस्ट, १९३६. अंक ३३

## दि गुड-वुइल

### ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारास

भरपूर सवलती मासिक हप्ते

ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत.

पत्रव्यवहार करावा.

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा; मॅनेजिंग डायरेक्टर

## आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

पत्ता : डेक्कन जिमखाना, पुणें ४

यांचीं शास्त्रोक्त, खात्रीलायक व गुणकारी औषधें

| | | |
|---|---|---|
| च्यवनप्राश | पौष्टिक व शक्तिवर्धक | २० तो. १ रु. |
| वज्रदंती | दंतमंजन | बा. किं. ४ आणे |
| केशवर्धन तेल | | १० तो. १५ आणे |
| एरंडपाक | मलावरोध घालविणारा | १० तो. ६ आणे |
| हेमगर्भ मात्रा | सर्व वात कफरोगहर मात्रा | ५ रु. |
| सुवर्णराजवंगेश्वर | धातुवर्धक | १ तो. ५ रु. |
| वाळा सरबत | उन्हाळ्यांत थंड पेय | १ पौं. १२ आणे |
| त्रिभुवनकीर्ति | सर्व ज्वरांवर | १ तो. १२ आणे |

याशिवाय प्रवाळ, मौक्तिक इ. भस्में, सर्व तऱ्हेचीं आसवें, अरिष्टें, मात्रा, गुटिका, अवलेह वगैरे मागवून एकवार अनुभव घ्या. कॅटलॉग मागवा.

ठिकठिकाणीं एजन्सी देणें आहेत. एजन्सी घेऊं इच्छिणारांनीं नियम मागवावे.

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्टस.

स्वदेशी
कापड म्हणजे काय !

(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.

या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीविषयीं तुमची फसवणूक होणार नाहीं.


हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.

खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण

## स्वदेशी भांडार

लक्ष्मीरोड, पुणें २.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः-ओगले ग्लास वर्क्स. लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः-

१ केळकर ब्रदर्स,

बुधवार चौक.

२ म. ई. को. ऑ. एजन्सी,

लक्ष्मीरोड.

## विविध माहिती

### न्यू स्वस्तिक विमा कंपनी

दि न्यू स्वस्तिक लाइफ ॲशुअरन्स कं. लि. ह्या नांवाची आयुर्विम्याचें काम करणारी एक नवी कंपनी मुंबई येथें स्थापन झाली असून श्री. बा. सी. कामत हे तिचे अध्यक्ष आहेत.

### असोसिएटेड सिमेंट कंपनीज लि.

हिंदी सिमेंट कंपन्यांच्या एकत्रीकरणाच्या योजनेस मूर्त स्वरूप प्राप्त होऊन नव्या 'असोसिएटेड' कंपनीस ता. ४ ऑगस्ट रोजीं रजिस्ट्रेशनचें सर्टिफिकेट मिळालें. ह्या कंपनीच्या अधिकृत कामास ऑक्टोबरमध्यें सुरवात होईल, असें समजतें.

### कापडाच्या निर्गतींत जपानची आघाडी

१९३१-३५ ह्या मुदतीमध्यें ग्रेट ब्रिटनमधून होणाऱ्या कापडाच्या निर्गतींत फक्त १४ टक्के वाढ झाली, परंतु जपानच्या बाबतींत मात्र ही वाढ ९९ टक्के झाली आहे.

### विषारी धुरापासून बचाव

पुनः युद्ध उपस्थित होण्याचा प्रसंग आल्यास, त्यामध्यें शत्रूचा नाश करण्यासाठी विषारी धुराचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करण्यांत येईल, ह्याबद्दल सर्व देशांची खात्री झाली आहे. अशा प्रकारच्या हल्ल्यापासून आपल्या प्रजाजनांचा बचाव करण्यासाठी ग्रेटब्रिटननें आतांपासूनच तयारी चालविली आहे. येत्या वर्षअखेर सुमारें २½ कोटि तोंडावर चढवावयाच्या संरक्षक पिशव्या बनवण्यांत येऊन नागरिकांच्या उपयोगासाठी तयार ठेवण्यांत येतील, अशी बातमी आहे. तथापि, सहा तासांपेक्षां जास्त काळपर्यंत ह्या आवरणाचा उपयोग होणार नाहीं, ही अडचण अजून दूर झालेली नाहीं.

### चहाचा खप कमी झाला

गेल्या एप्रिलमध्यें सबंद जगांत मिळून ६ कोटि ५४ लक्ष पौंड चहा खपला. मार्च महिन्यांत ७ कोटि १ लक्ष पौंड चहाचा खप झाला होता व १९३५ च्या एप्रिलमध्यें ७ कोटि ८२ लक्ष पौंड चहाची विक्री झाली होती. १९३६ च्या पहिल्या चार महिन्यांत मिळून १९३५ मधील तत्सम मुदतीमधील खपाच्या मानानें १ कोटि ६९ लक्ष पौंड चहा कमी विकला गेला.

### ओरिअंट पेपर मिल्स लि.

वरील कंपनी कलकत्ता येथें रजिस्टर झाली असून तिचें भरणा झालेलें भांडवल ३१ लक्ष रुपये आहे. कंपनीचे भाग विक्रीस काढलेले नाहींत, कारण सर्व भांडवल खपून गेलें आहे. बिर्ला ब्रदर्स लि. हे कंपनीचे मॅनेजिंग एजंट्स आहेत.

### ग्रेटब्रिटनचें सर्वांत मोठें गिऱ्हाइक कोणतें ?

ग्रेटब्रिटनचें सर्वांत मोठें गिऱ्हाइक आजवर हिंदुस्थान असे. गेल्या सहामाहींत दक्षिण आफ्रिकेनें ती जागा घेतली आहे. त्या देशांत फक्त २० लक्ष श्वेतवर्णी व ६० लक्ष कृष्णवर्णी लोक असून हिंदुस्थानापेक्षां तो देश ज्यास्त ब्रिटिश माल खरेदी करतो, असें दक्षिण आफ्रिकन सरकारच्या व्यापारी प्रतिनिधीनें लंडनमधील एका परिषदेंत मोठ्या अभिमानानें सांगितलें. ब्रिटिश मालाची द. आफ्रिकेंत आयात वाढत आहे, परंतु आफ्रिकन मालाचा ग्रेटब्रिटनमधील उठाव मात्र कमी होत आहे, अशी त्यानें तक्रार केली.

### ब्रिटिश सुताची निर्गत वाढली

गेल्या जानेवारी ते जून ह्या सहामाहींत ग्रेटब्रिटनमधून सुताची एकूण निर्गत झाली, त्याचें वजन ७६३ लक्ष पौंड होतें. १९३५ च्या पहिल्या सहामाहींत ७०८ लक्ष पौंड वजनाचें सूत बाहेर गेलें होतें व १९३४ मधला हा आकडा ६८६ लक्ष इतकाच होता. म्हणजे गेल्या दोन-तीन वर्षांत ब्रिटनच्या ह्या व्यापारांत थोडी प्रगति झालेली आहे.

### पण कापडाची निर्गत कमी झाली

ब्रिटिश सुताच्या निर्गतींत वाढ झाली असली तरी लँकेशायरच्या कापडाची निर्गत मात्र वाढावयाच्या ऐवजी थोडीशी कमीच झाली आहे. १९३५ च्या पहिल्या सहामाहींत १०० कोटि चौरस वार कापड ग्रेटब्रिटनमधून परदेशांत गेलें होतें, परंतु चालू सालच्या सहा महिन्यांच्या मुदतींत ही निर्गत फक्त ९२ कोटि चौरस वार भरली. हिंदुस्थानांत १९३५ च्या सहामाहींत ३१½ कोटि वार ब्रिटिश कापड आलें होतें आणि चालू सालांत फक्त २२½ कोटि वारच आयात झालें आहे.

### युरोपांतील सहकारी संस्थांची पहाणी

सहकारी चळवळीसंबंधीं अमेरिकेचे अध्यक्ष, मि. रूझवेल्ट, ह्यांचा अनुकूल ग्रह झाला असून युरोपांतील सहकारी स्टोअर्स, सहकारी विमा व बँकिंग संस्था, विक्रीची व्यवस्था, उत्पादनाच्या संस्था इत्यादींची पहाणी करण्यासाठी त्यांनीं तीन संशोधक तज्ज्ञांची नेमणूक केली आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. ८ ऑगस्ट रोजीं पुरा झालेला आठवडा. | ७७,८५,६१० |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते ८ ऑगस्ट १९३६ अखेर. | २,७९,०९,४१,२१५ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ३९४ |
| २ सोन्याची सरी का सुरी? | ३९५ |
| ३ बँकिंगच्या क्षेत्रांत | ३९६ |
| ४ स्फुट विचार — मराठा व्यापाऱ्यांचें चेंबर—विद्यार्थ्यांची शारीरिक स्थिति-स्वदेशीची व्याख्या—किती टक्के स्वदेशी?—परदेशांतून येणाऱ्या पाहुण्यांचें स्वागत | ३९६ |
| ५ मराठा चेंबरची वार्षिक सभा | ३९८ |
| ६ हिंदुस्थान सरकारच्या ग्रामसुधारणेबाबतच्या ग्रँटचा विनियोग | ३९९ |
| ७ सहकारी अर्बन बँकांची प्रगति | ३९९ |
| ८ कै. भाऊराव कोल्हटकरांच्या रेकॉर्ड्स! | ४०० |
| ९ विमेदारांच्या आरोग्याची जोपासना | ४०० |
| १० कॉलेज विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी | ४०१ |
| ११ रजिस्ट्रेशन खात्याचा अहवाल | ४०१ |
| १२ दि ट्रस्ट ऑफ इंडिया ॲश्युअरन्स कं. लि. | ४०२ |
| १३ निवडक बाजारभाव | ४०३ |



# अर्थ

बुधवार, ता. १२ ऑगस्ट, १९३६


## सोन्याची सरी का सुरी ?

(१)

जगांतलें सोन्याचें उत्पादन मागणीच्या मानानें अपुरें पडत असून त्या योगानें बाजारभाव उतरले आहेत आणि त्याकरितां उपलब्ध असलेल्या सोन्याचा पुरवठा चलनासाठी हात राखून वापरला पाहिजे, अशी ओरड कित्येक तज्ज्ञांनीं चालविली होती. व्यापाराची वाढ व सोन्याचें जागतिक उत्पादन ह्यांत मेळ बसणें शक्य नाहीं हें सिद्ध करण्याच्या हेतूनें त्यांनीं तपशीलवार आकडेहि प्रसिद्ध केले होते. गेल्या सात वर्षांमध्यें अनेक राष्ट्रांनीं आपलीं चलनें हलकीं करून सोन्याची किंमत कृत्रिम रीतीनें चढविली आहे आणि सोन्याचें जगांतलें एकूण उत्पादन ५८ टक्क्यांनीं वाढलें आहे. ह्यामुळें सोन्याच्या तुटवड्याविषयींची ओरड निरर्थक ठरली आहे. सोन्याचें जागतिक उत्पादन कसें वाढलें आहे हें दर्शवणारे आकडे खालीं दिले आहेतः—

**सोन्याचें जगांतलें उत्पादन**

( लक्ष औंस )

| साल : | १९२९ | १९३१ | १९३३ | १९३४ | १९३५ |
|---|---|---|---|---|---|
| वजन : | १९५ | २२३ | २५३ | २७७ | ३१० |

राष्ट्रीय चलनें नरम झाल्यानें सोन्यास चांगला भाव येत आहे, त्याचा परिणाम खाणींतल्या उत्पादनाच्या उद्योगास उत्तेजन मिळण्यांत झाला आहे. ह्या सोन्याच्या खाणीच्या धंद्यांत रशियानें प्रवेश केला असून त्यामध्यें उत्पादन सात वर्षांत १० लक्षांचें ५६ लक्ष औंस झालें आहे; आणि रशियन खाणींची निपज सारखी वाढतच आहे. सध्याची अनेक क्षेत्रांत दिसत असलेली सोन्याच्या उत्पादनांतली प्रगति चालू राहिल्यास १९४० सालीं जागतिक पैदास ४०० लक्ष औंसांपर्यंत चढेल असा अंदाज करण्यांत आला आहे.

सोन्याचा दुष्काळ होणार ह्या भविष्याचे ठिकाणीं त्याचा सुळसुळाट होणार असा अंदाज तज्ज्ञांकडून प्रसिद्ध होत आहे, हा योगायोग विचित्रच म्हटला पाहिजे. सोन्याचा जागतिक पुरवठा वाढल्यास बाजारभाव भलतेच चढतील अशी अमेरिकन बँकर्सना भीति वाटत असून त्या बाबतींत आवश्यक असें नियंत्रण घालण्याची व्यवस्था झाली पाहिजे असें ते म्हणूं लागले आहेत. मध्यवर्ती बँकांनीं चलन आणि इतर विनिमय साधनें ह्यांचा उपयोग आपल्या कह्यांत ठेवण्याची व्यवस्था अलीकडे इतकी कार्यक्षम बनवली आहे कीं, सोन्याचा व्यवहारांत सुळसुळाट होऊन त्यामुळें बाजारभाव भरमसाटपणानें कडकण्याची वास्तविकपणें भीति बाळगण्याचें कारण नाहीं. दक्षिण आफ्रिकेंतला सोन्याच्या खाणींचा धंदा आज भरभराटीच्या स्थितींत आहे आणि तेथील सरकारास त्यापासून चांगलें उत्पन्नहि मिळत आहे. तेथील खाणींच्या धंदेवाल्यांच्याहि मतानें सोन्याचें उत्पादन कमी होण्याचा किंवा त्याची किंमत विशेष खालीं जाण्याचा रंग नाहीं. तथापि, अमेरिकेच्या चलन विषयक धोरणावर आणि व्यापाराच्या घडामोडींवर सोन्याचें भवितव्य अवलंबून आहे असें त्यांस वाटत आहे. सुवर्णचलन पद्धतीस चिकटून राहिलेलीं व तिचा त्याग करणारीं सर्वच राष्ट्रें सोन्याचा संग्रह करीत असून कोणाच्याहि दृष्टीनें सोन्याचें महत्त्व अजून कमी झालेलें नाहीं, हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. डॉलर-स्टर्लिंग हुंडणावळ अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्या राष्ट्रांनीं स्थिर राखण्यांत यश संपादन केलें आहे ही गोष्टहि अनुकूल आहे. बाजारभाव थोडेसे चढत आहेत आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराची घडी हळुहळु बसण्याच्या मार्गांत आहे.

प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ, प्रो. कॅसल, ह्यांच्या मतें पदार्थांची किंमत मापणें, देवघेवींत उपयोगीं पडणें व चलनाचा आधार होणें ह्या तिन्हीं कामांत सोन्याचें महत्त्व आतां उरलेलें नाहीं. हा त्यांचा अभिप्राय जुना असला तरी त्यांनीं अलीकडे त्याची पुनरुक्ति केली आहे. ज्या धातूची किंमत अस्थिर असल्याचें अनुभवानें सिद्ध झालें आहे, तिला राष्ट्रीय किंमतीचा आधार मानणें चुकीचें आहे असें त्यांचें म्हणणें आहे. कागदाच्या चलनाचा सुवर्णाचा आधार काढून टाकून तें चलन व्यवहारांत असें खेळवण्यांत यावें कीं त्यांत व्यक्त झालेले बाजारभाव स्थिर रहातील, अशी त्यांची सूचना आहे. ब्रिटिश पौंडाचा कोणत्याहि वजनाच्या सोन्याशीं संबंध असण्याचें मुळींच कारण नाहीं. गेल्या पांच-सहा वर्षांत सोन्याच्या आधारावांचून कागदाच्या पौंड-नोटांची किंमत स्थिर राहिलेली आपण प्रत्यक्ष पहातोंच आहों कीं नाहीं? सोन्याच्या आश्रयावांचून चालणाऱ्या पौंडास मुद्दाम त्या धातूचा टेकू देण्यांत काय हंशील आहे? सुवर्णाचें दास्य पत्करून आपला आर्थिक संसार राष्ट्रांनीं त्याच्या लहरीवर अवलंबून ठेवण्याचें प्रयोजन नाहीं हें प्रो. कॅसल ह्यांचें मत तात्त्विक दृष्ट्या मान्य केलें तरी प्रत्यक्ष जागतिक परिस्थितींत तें अव्यवहार्य आहे हें कोणासहि दिसल्यावांचून रहात नाहीं. सुवर्णत्याग केलेलीं राष्ट्रेंहि आपला सुवर्णसंचय वाढवीत आहेत आणि पुढें परिस्थिति कशीहि बदलली तरी तिला तोंड देण्याची तयारी करीत आहेत. ह्यावरून राष्ट्रीय चलनें आणि सोनें ह्यांची कायमची फारकत होणार अशी कित्येकांची अपेक्षा आहे ती साधार आहे असें मानण्यास जागा नाहीं. पूर्वींप्रमाणें सोन्याचें नाणें मर्यादित स्वरूपांतहि व्यवहारांत खेळणार नाहीं हें खरें असलें तरी त्यावरचा सामान्य जनतेचा विश्वास जोंवर ढळला नाहीं, तोंवर त्याचें चलन व्यवस्थेंतलें स्थान अबाधित रहाणार ह्यांत संशय नाहीं. हिंदुस्थानांतून बाहेर चाललेला सोन्याचा प्रवाह मात्र अजून बंद झाला नाहीं आणि ह्या निर्गतींत राष्ट्रीय दृष्ट्या कांहीं विचार करण्यासारखें आहे असें हिंदुस्थान सरकारास वाटत नाहीं, हें विशेष आहे! आंतरराष्ट्रीय परिस्थिति निवळली असतां सोन्याचा प्रश्न आपोआप सुटणार आहे. तथापि प्रत्येक राष्ट्रानें त्यासंबंधांत आपल्यापुरती तरतूद करून ठेवणें अगत्याचें आहे.

---

## बँकिंगच्या क्षेत्रांत

### ब्रिटिश बँकांची चलती

अकरा प्रमुख ब्रिटिश बँकांतल्या ठेवींची एकूण रकम गेल्या जूनमध्यें २२२ कोटि पौंडांच्यावर ( २,९७० कोटि रुपये ) चढली. १९३५ च्या जूनच्या मानानें हा आकडा १५ कोटि पौंडांनीं ( २०० कोटि रुपये ) ज्यास्त आहे. बँकांनीं ट्रेझरी बिलांत वगैरे गुंतविलेल्या पैशांतच वाढ झाली आहे असें नसून गिऱ्हाइकांस दिलेल्या कर्जांच्या एकूण रकमेंतहि वाढावा दिसून येत आहे. कर्जांची ही रकम गेल्या जूनमध्यें ८७ कोटि पौंड (१,१६४ कोटि रुपये) इतकी झाली. ग्रेटब्रिटनमध्यें अंतर्गत औद्योगिक व व्यापारी उलाढालींत प्रगति होत असल्याचें हें निदर्शक आहे. आगबोटी बांधणें, पोलाद–लोखंडाचा माल तयार करणें, इत्यादि ब्रिटिश धंद्यांची सध्या चलती असून त्या देशांत बेकारीचा आकडा उतरत आहे. ह्या परिस्थितीचा अनुकूल परिणाम ब्रिटिश बँकांतल्या ठेवी व त्यांनीं धंदेवाल्यांस दिलेलीं कर्जें ह्यांमध्यें होणें स्वाभाविक आहे. ग्रेटब्रिटनमध्यें होत असलेल्या आर्थिक स्थितींतला उल्लेख तेथील बोर्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्ष, मि. रन्सिमन, ह्यांनीं कॉमन्स सभेमध्यें केला. हिंदुस्थानांतील बदलत्या परिस्थितीचा आढावा अधिकारी वर्गानें कायदेमंडळांत वेळोवेळ घेण्याची व्यवस्था नाहीं, हा आमच्या राज्यघटनेंतला ठळक दोष आहे.

---

### आर्थिक मंदी व बँकांचे व्यवहार

चालू सालच्या पहिल्या सहामाही बाबतच्या आपल्या रिपोर्टांत इंपीरिअल बँक ऑफ इंडियानें हिंदुस्थानांत यंदा पैशास मागणी मंद असल्याचें नमूद केलें आहे. ही सहामाही व्यापारी चलतीची असूनहि हिंदी बँकांपाशीं पैसा ह्याप्रमाणें पडून राहिला आहे, हें आर्थिक मंदीचें स्पष्ट लक्षण आहे. रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या बँकांनीं दिलेलीं कर्जें व विकत घेतलेल्या हुंड्या ह्यांची एकूण रकम चालू वर्षाचे प्रारंभीं ८८ कोटि रुपये होती, ती पुढें १०१ कोटींपर्यंत चढून सहामाही अखेरीस ९५ कोटींवर उतरली, परंतु त्यांच्या जवळील ठेवींचा आकडा मात्र २२० ते २२५ कोटींच्या आसपास राहिला. सोन्याची निर्गत हिंदुस्थानांतून सारखी चालली असल्यानें त्याच्या मोबदला मिळणारा पैसा लोकांकडून बँकांमध्यें ठेवींच्या मार्गानें जातो आणि त्याचा उपयोग, मंदीमुळें व्यापार व उद्योगधंदे ह्यांस देण्याकडे करतां येत नाहीं, अशी परिस्थिति आहे. ट्रेझरी बिलांवर सुटणाऱ्या व्याजाचा दर उतरणें हा त्याच परिस्थितीचा परिणाम आहे. बँकांपाशीं जमणारा पैसा कर्जरोख्यांमध्यें गुंतवणें अपरिहार्य होऊन रोख्यांच्या किंमती चढल्या आहेत. ह्या सर्व कारणांचा इंपीरिअल बँकेच्या नफ्यावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. तथापि कर्जरोख्यांच्या चढलेल्या किंमतीचा फायदा तिला मिळाला आहे.

---

### प्रमुख ब्रिटिश बँकांचें डिव्हिडंड

चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहीच्या व्यवहारावर पांच ब्रिटिश प्रमुख बँकांनीं गेल्या सालाप्रमाणेंच डिव्हिडंड जाहीर केलें आहे.

---

## स्फुट विचार

### मराठा व्यापाऱ्यांचें मंडळ ( चेंबर )

मराठा ( दक्षिणी ) व्यापाऱ्यांच्या उद्योगधंद्यांच्या हितसंबंधांचें संरक्षण करून त्यांच्यांत परस्पर-सहकार्य वाढविणें आणि व्यापार-उदिमांच्या प्रगतीच्या मार्गांतील अडथळे दूर करणें, ह्या हेतूनें मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज ह्या संस्थेची स्थापना झाली. तिच्या दुसऱ्या वार्षिक अहवालावरून चेंबरचें कार्य योग्य मार्गानें चालू आहे, असें दिसून येतें. चेंबरच्या पटावर सुमारें ८० सभासद आहेत. ह्या संख्येंत वाढ होण्यास अर्थातच पुष्कळ वाव आहे. चेंबरनें वेळोवेळ उपस्थित होणाऱ्या आर्थिक प्रश्नांवर आपलें मत प्रदर्शित करून व तें योग्य त्या अधिकाऱ्यांकडे पाठवून सार्वजनिक हिताचें रक्षण करण्याचा प्रयत्न केला. तथापि, महाराष्ट्र बँकेच्या स्थापनेची पूर्वतयारी, ही चेंबरची अहवालाचे सालांतील सर्वांत भरीव कामगिरी समजली पाहिजे. सदरहु व्यापारी बँकेची प्रगति समाधानकारक होत आहे व क्रमाक्रमानें तिचें पाऊल पुढें पडत आहे. इतर व्यापारी संस्थांपेक्षां मराठा चेंबरनें अंगीकारलेलें कार्य एका दृष्टीनें ज्यास्त बिकट आहे, कारण महाराष्ट्रांत आर्थिक मनोवृत्ति अजून निर्माण व्हावयाची आहे व तें कार्य चेंबरनेंच हातीं घेणें जरूर आहे. व्यापारी शिक्षणाची आवश्यकता, महाराष्ट्राची औद्योगिक पहाणी, इत्यादि प्रश्न चेंबरपुढें आहेत, परंतु सभासदांचें संख्याबल, त्यांचा अंगीकृत कार्यावरील विश्वास व परस्पर–सहकार्य ह्यावांचून त्या संस्थेच्या प्रयत्नांचें पाऊल झपाट्यानें पुढें पडणें कठिण जाईल. ह्या परिस्थितींत चेंबरनें केलेली कामगिरी निःसंशय अभिनंदनीय आहे. दक्षिणी व्यापारी व कारखानदार ह्यांनीं सभासद होऊन व आपल्या अडचणी तिचेपुढें मांडून संस्थेच्या कार्यास मदत करावी, ही श्री. कामत ह्यांनीं चेंबरच्या वार्षिक सभेचे वेळीं केलेली सूचना फलद्रूप होईल अशी आम्हांस आशा आहे.

---

### विद्यार्थ्यांची शारीरिक स्थिति

आमचे इलाख्यांतील कॉलेजांत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्याची प्रथा पडली आहे ती अत्यंत उपयुक्त आहे ह्यांत शंका नाहीं. शरीराच्या वाढीच्या दिवसांत उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांच्या हातून त्यांच्या प्रकृतीची अनास्था होते. एका बाजूनें अभ्यासाचा ताण व दुसऱ्या बाजूनें व्यायामाचा अभाव असा प्रकार झाल्यानें विद्यार्थ्यांच्या शरीराची हानि होते आणि राष्ट्राचा आधारस्तंभ जी तरुण पिढी, ती निर्बल व निरुत्साही बनते अशी आज कित्येक वर्षांची तक्रार आहे. वैद्यकीय तपासणीच्या योगानें प्रत्येक विद्यार्थ्यास आपल्या शारीरिक अवस्थेंत काय दोष आहेत हें कळून ते दूर करण्याची संधि मिळते. हवापाणी, सामाजिक रहाणी, खाण्यापिण्याची व्यवस्था ह्यांचा परिणाम कॉलेजांत शिकणाऱ्या तरुणांच्या प्रकृतीवर भिन्नभिन्न होतो, हें आजच्या अंकांत दुसरीकडे त्यांच्या वैद्यकीय तपासणीचा सारांश दिला आहे, त्यावरून लक्षांत येईल. एका टोकास कर्नाटक आणि दुसऱ्या टोकास गुजराथ व सिंध प्रांत ह्यांचेमध्यें विद्यार्थ्यांच्या शारीरिक स्थितींत तफावत दिसून आली आहे ती विचार करण्यासारखी आहे. शरीराचा पीळदारपणा, वजन, प्रकृतीचा निरोगीपणा ह्यांचे बाबतींत तुलनात्मक माहिती प्रसिद्ध झाली आहे, तिचा उपयोग निरनिराळ्या शिक्षण-केंद्रांत विद्यार्थी, त्यांचे

पालक आणि शिक्षक ह्यांचे हातून सुधारणेचे कामीं होणें अगत्याचें आहे. बौद्धिक व मानसिक उन्नतीइतकेंच शारीरिक सौष्ठवाचें महत्त्व आहे ह्या गोष्टीची जाणीव आमच्या समाजास झाली पाहिजे. उच्च शिक्षण व्यावहारिक दृष्ट्या कुचकामाचें आहे आणि त्याची पद्धति संस्कृतीस व विद्वत्तेस पोषक नाहीं अशी ओरड चालू आहे. त्यांतच, आमच्या विद्यार्थ्यांची शरीरप्रकृतीहि चांगली नसते ह्या तक्रारीची भर पडली असतां कॉलेज शिक्षण घडाचें ना गोडाचें अशी अवस्था होणार हें उघड आहे.

### " स्वदेशी "ची व्याख्या

आपल्या लोकांस काम मिळेल, त्यांचें भांडवल उद्योगधंद्यांत गुंतून त्यावर व्याज सुटेल आणि आपले कामकरी व धंदेवाले ह्यांच्या कौशल्यास व कर्तृत्वास वाव मिळून देशांत संपत्तीचा विस्तार होईल ह्याच कल्पनेनें जनता स्वदेशी मालास स्वार्थत्यागपूर्वक उत्तेजन देत असते. आमचे इकडे स्वदेशीची व्याख्या त्याच दृष्टीनें केलेली आहे. मालकी, भांडवल, कच्चा माल हीं बाहेरचीं असल्यास त्या धंद्यांतल्या मालास वास्तविक स्वदेशी म्हणतां येत नाहीं व म्हणूनच हीं साधनें विशिष्ट प्रमाणांत आपल्या देशांतलींच असलीं पाहिजेत, असा आग्रह धरण्यांत येतो. स्वदेशीच्या ह्या प्रकारच्या व्याख्येस तत्त्व व व्यवहार ह्यांचा पूर्ण आधार आहे, हें इतर देशांत ह्या बाबतींत काय धोरण अवलंबतात याकडे पाहिलें असतां स्पष्ट दिसून येतें. लँकेशायरच्या कापडास ब्रिटिश साम्राज्यांत आणि इतरत्र जकातीची सवलत द्यावयाची ती तो माल खुद्द ग्रेटब्रिटनमध्यें प्रारंभापासून शेवटपर्यंत बनवला गेला आहे अशी खात्री झाली तरच द्यावी ह्या आशयाची सूचना ब्रिटिश कारखानदारांनीं केली असून ती अनेक ठिकाणीं स्वीकारण्यांत आली आहे. जपानमध्यें किंवा दुसऱ्या देशांत कोणत्याहि मालाची बहुतेक सर्व बनावट मुळांत होऊन त्यावर ग्रेटब्रिटनमध्यें शेवटचा हात फिरला म्हणजे तो जिन्नस ब्रिटिश बनावटीचा आहे असें समजूं नये, ह्या लँकेशायरच्या तत्त्वाची अंमलबजावणी झाली असतां ब्रिटिश मालाकरितां योजलेल्या सवलती इतर मालास मिळत नाहींत व त्याची स्पर्धा थांबते. ग्रेटब्रिटनचा स्वदेशी माल कोणता हें वरील व्याख्येप्रमाणें स्पष्ट करून लँकेशायरच्या कारखानदारांनीं आपलें म्हणणें मान्य करण्याविषयीं ऑस्ट्रेलियास विनंति केली आणि त्या देशानें ह्या सूचनेचा सहानुभूतिपर विचारहि केला आहे. परंतु ब्रिटिश स्वदेशी मालास उत्तेजन देण्याचा ऑस्ट्रेलियानें योजिलेला मार्ग मात्र सुचविलेल्या पद्धतीहून भिन्न आहे.

### किती टक्के स्वदेशी ?

सूत कातण्यापासून कापडास तकाकी देण्यापर्यंतच्या सर्व क्रिया ब्रिटिश कारखान्यांत झाल्या असतील तरच त्या मालास स्वदेशी ब्रिटिश माल म्हणावें हा दंडक ऑस्ट्रेलियानें उचलला नाहीं. जकातीच्या सवलतीस पात्र होण्यास कापसाचें कापड, रेशीम, रेयॉन वगैरे मालांत ब्रिटिश मजूरी व कच्चीं द्रव्यें ह्यांचें प्रमाण पूर्वीं किंमतीच्या २५ टक्के होतें तें ५० टक्के असावें असें त्यानें ठरविलें आहे. मालाची बहुतेक बनावट स्वतःच्या कारखान्यांत करून अखेरच्या संस्कारापुरता तो जपानसारख्या राष्ट्रांनीं ग्रेटब्रिटनमध्यें पाठवल्यास अर्थातच तो वरील कोष्टकांत बसणार नाहीं व त्यास ब्रिटिश मालाप्रमाणें सवलतहि मिळणार नाहीं, हा हिशेब ऑस्ट्रेलियन योजनेच्या मुळाशीं आहे. परंतु येथें एक अनपेक्षित आपत्ति उपस्थित होते, ती सध्याच्या मानानें कपाशीचा भाव चढल्यास अमेरिकन कापसापासून ग्रेटब्रिटनमध्यें तयार झालेला सर्व माल, ५० टक्के ब्रिटिश मजूरी आणि कच्चीं द्रव्यें असलेलें कापड म्हणजे ब्रिटिश कापड ह्या व्याख्येच्या चवकटींत बसूं शकेल काय ह्याविषयींच्या शंकेची आहे. कित्येक जातींच्या व प्रकारांच्या कापडांत, तें सर्वस्वी ग्रेटब्रिटनमध्यें तयार होऊनहि, त्यांत कपाशीच्या किंमतीचें प्रमाण मोठें आणि मजूरी व इतर साधनें ह्यांचे कमी भरण्याचा संभव असल्यानें ५० टक्क्यांची कसोटी त्यास लागू पडणार नाहीं हें संभवनीय आहे. ही शंका केवळ काल्पनिक नसून कॅनडानें सवलतीची वरीलप्रमाणें योजना मागें केली होती, तिच्या बाबतींत ह्या अडचणीचा अनुभव आलेला आहे. म्हणून तसला प्रकार ऑस्ट्रेलियाच्या सवलतीच्या संबंधांत होऊं नये अशी सूचना लँकेशायरच्या वतीनें आगाऊ देणें मँचेस्टर गार्डिअनसारख्या पत्रास आवश्यक वाटलें आहे.

### परदेशांतून येणाऱ्या पाहुण्यांचें स्वागत

सध्या बर्लिन ( जर्मनी ) येथें आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक सामने चालू आहेत, त्यांप्रीत्यर्थ लक्षावधि लोक परदेशांतून जर्मनीमध्यें आलेले आहेत. हे पाहुणे जर्मनीमध्यें प्रवास करीत असतांना त्यांचें योग्य रीतीनें आदरातिथ्य केलें जावें व जर्मनीमधील आयुष्यक्रमासंबंधीं त्यांचें अनुकूल मत व्हावें, असा जर्मन सरकारचा कटाक्ष आहे. इतर देशांतून आलेल्या पाहुण्यांनीं स्वदेशीं परत गेल्यावर जर्मन शेती व खेडीं ह्यासंबंधीं चांगला अभिप्राय व्यक्त करावा व अशा रीतीनें जर्मनीची प्रतिष्ठा वाढावी, अशी नात्सी सरकारची इच्छा आहे. आहार व शेती ह्या खात्याचे प्रमुख, हेर डार, ह्यांनीं वरील हेतूस उद्देशून एक सूचनापत्रक काढलें आहे, त्यांत स्थानिक अधिकाऱ्यांवर खेड्यांतील रस्ते स्वच्छ राखण्याची जबाबदारी टाकण्यांत आली आहे. रस्त्यांस लागून असलेल्या घरांस रंग देण्यांत यावा, घरांपुढील बागांतून फुलझाडें लावण्यांत यावीं, कुंपणें दुरुस्त करावींत, रस्त्यांवरील दिव्यांच्या बाबतींत जरूर ती सुधारणा केली जावी, प्रत्येकानें पाहुण्यांशीं नम्रतेनें वागून त्यांस सर्व बाबतींत सहाय करावें इत्यादि सूचनांचा मथितार्थ जर्मनीविषयीं पाहुण्यांचा अनुकूल ग्रह व्हावा, असाच स्पष्ट दिसतो. इतर देशांच्या सहानुभूतीची जर्मनीस विशेष फिकीर वाटते अशांतला भाग नाहीं, परंतु ती मिळाल्यास जर्मनीस हवी आहे. सामन्याप्रीत्यर्थ येणाऱ्या ज्यू लोकांशींहि नीट वागण्याची सूचना नागरिकांस देण्यांत आली आहे. ऑलिंपिक पाहुण्यांचें संरक्षण करण्याची सरकारनें हमी घेतली असल्यानें हें जरूर झालें असलें तरी नात्सी सरकारच्या ज्यू लोकांबाबतच्या धोरणांत फरक पडला आहे, असें मात्र समजण्याचें कारण नाहीं.

### इंपीरियल बँक ऑफ इंडिया

गेल्या जून अखेरच्या सहामाहींत इंपीरियल बँक ऑफ इंडियास ३७ लक्ष २७ हजार रुपये निवळ नफा झाला. गेल्या सालअखेर पुढें ओढलेल्या नफ्याची रकम, रु. २८ लक्ष ६० हजार होती आणि ह्या दोहोंची बेरीज ६५ लक्ष ८७ हजार रुपये गेल्या जून अखेर बँकेच्या हातांत नफा म्हणून राहिली. तीमधून १२ टक्के करमाफ डिव्हिडंड भागीदारांस देण्यांत येणार आहे.

## मराठा चेंबरची वार्षिक सभा

### श्री. कामत व प्रो. काळे ह्यांचीं भाषणें

'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज'ची द्वितीय वार्षिक सभा पुणें येथें रविवार, ता. ९ ऑगस्ट, रोजीं चेंबरचे अध्यक्ष श्री. बा. सी. कामत ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेनें चेंबरचा दुसऱ्या वर्षाचा अहवाल मंजूर केला आणि नव्या वर्षासाठी कार्यकारी मंडळाची व अध्यक्षांची निवड केली. अध्यक्ष, श्री. कामत व कार्याध्यक्ष, प्रो. काळे ह्यांनीं सभेंत केलेल्या भाषणांचा सारांश येथें दिला आहे.

### श्री. कामत ह्यांचें भाषण

महाराष्ट्रांतली सर्वसाधारण परिस्थिति लक्षांत घेतां मराठा चेंबरनें आपलें काम समाधानकारक रीतीनें चालविलें आहे असा अभिप्राय व्यक्त करून श्री. कामत हे आपल्या भाषणांत म्हणाले:-

"नव्या राज्यघटनेनुसार अस्तित्वांत येणाऱ्या मुंबई प्रांतिक कायदेमंडळामध्यें व्यापारी संस्थांस कांहीं जागा देण्यांत आल्या आहेत. महाराष्ट्रांतील छोटे व्यापारी व कारखानदार ह्यांचे प्रश्न मोठे व्यापारी व कारखानदार ह्यांच्या प्रश्नांहून भिन्न असले तरी तितक्याच महत्त्वाचे आहेत, ह्या दृष्टीनें त्यास कायदेमंडळांत प्रतिनिधित्व मिळावें, अशी हॅमन्ड कमिटीपुढें आपल्या चेंबरनें मागणी केली होती; तथापि ती नाकारण्यांत आली. ह्याचा अर्थ, आपल्या हितसंबंधाच्या संरक्षणार्थ आपण ज्यास्त संघटित होऊन झगडलें पाहिजे, असाच समजला पाहिजे.

काचेच्या-धंद्यांत दक्षिणी लोकांनीं बरीच प्रगति केलेली आहे, तथापि टारिफ बोर्डानें सोडा ॲश हा काचमालांतील कच्चा पदार्थ हिंदुस्थानांत तयार होत नाहीं ह्या सबबीवर संरक्षण नाकारून सदरहु धंद्याची कुचंबणा केली आहे. कच्च्या मालाच्या पुरवठ्याचे प्रश्नास इतकें महत्त्व देण्याचें वास्तविक कारण नाहीं. सरकारनें उद्योगधंद्यास संरक्षण देण्याबाबतचें धोरण ज्यास्त सहानुभूतिपूर्वक आखणें जरूर आहे.

विम्याचा धंदा महाराष्ट्रांत वाढीस लागला आहे. विमा कंपन्यांच्या कायद्यांत दुरुस्ती करण्यापूर्वी ह्या धंद्याशीं संबंध असणारांचें मत अजमावलें जाणें जरूर आहे. तसें करण्यासाठी कमिटी नेमली जावी व तिनें पुण्यास येऊन महाराष्ट्रांतील व्यापारी व कंपन्या ह्यांस आपलें म्हणणें पुढें मांडण्यास संधी द्यावी अशी माझी सूचना आहे.

नाणेबाजारांतील पैशाच्या स्वस्ताईचा फायदा महाराष्ट्रीयांनीं करून घेणें जरूर आहे. आपल्या चेंबरच्या प्रयत्नानें स्थापन झालेली बँक ऑफ महाराष्ट्र प्रो. काळे ह्यांच्या नेतृत्वाखालीं प्रगति करीत आहे. चेंबरचे एक सभासद व कार्यकर्ते, श्री. धोंडूमामा साठे, हे नाशिक जिल्ह्यांत एक व्यापारी बँक काढण्याच्या उद्योगांत आहेत. त्यांस त्यांच्या अंगीकृत कार्यांत यश येवो, असें मी इच्छितों.

मोठ्या प्रमाणावर चाललेल्या उद्योगधंद्यांची महाराष्ट्रांत मोठी उणीव आहे, ती भरून काढण्याचा प्रयत्न बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट करीत आहे. स्वतःच्या मालकीचें उंसाच्या लागवडीचें मोठें क्षेत्र मिळवून सिंडिकेटनें यशाचा पाया घातला आहे. सिंडिकेटनें आखलेली शेअरविक्रीची बिनधोक योजना दक्षिणी मंडळींनीं सढळ हातानें शेअर विकत घेतल्यानें पार पडणार आहे. श्री. अभ्यंकर, साठे, जोशी, राजगुरू, आपटे, पटवर्धन इत्यादि चेंबरचे उत्साही सभासद भांडवल मिळविण्याची खटपट करीत आहेत. सिंडिकेटच्या कारखान्यामुळें सुमारें दोन हजार दक्षिणी लोकांस व्यवसाय मिळणार आहे. मराठा चेंबर दक्षिणी व्यापारी मंडळींच्या वतीनें वर निर्दिष्ट केलेल्या व इतर प्रश्नांसंबंधानें मतप्रचार करीत आहे. दक्षिणी व्यापाराच्या व उद्योगधंद्यांच्या हिताचें संरक्षण करणें हें चेंबरचें ध्येय असून तें साध्य होण्यास व्यापारी मंडळींनीं स्वतः चेंबरचे सभासद होऊन व आपल्या अडचणी कळवून चेंबरला मदत करावी, अशी माझी विनंति आहे."

### प्रो. काळे ह्यांचें भाषण

"प्रांतिक स्वायत्ततेच्या अमदानींत मुंबई सरकारावर व ह्या इलाख्यांतील लोकांवर मोठी जबाबदारी येऊन पडणार आहे; कारण आर्थिक व औद्योगिक प्रगति घडवून आणण्यास जरूर तो पैसा कररूपानें उभा करण्यासाठी आपल्या प्रांताजवळ साधन उरलेलें नाहीं. जमीनमहसूल व अबकारी ह्यांपासून मिळणाऱ्या उत्पन्नांत वाढ होणें शक्य नाहीं व प्राप्तीवरील कराचा वांटा आपल्या हातीं येण्यास बराच अवकाश आहे. लोकांचें उत्पन्न वाढविणाऱ्या आर्थिक उपक्रमांचा अवलंब केल्याखेरीस आपणांस दुसरा मार्ग नाहीं.

आपला महाराष्ट्र विशेषेंकरून कृषिप्रधान व नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून रहाणारा विभाग आहे. त्यामुळें ह्या प्रदेशांत शेतीस लहान-मोठ्या उद्योगधंद्यांची जोड अवश्य आहे. साखरेच्या कारखान्यांची ह्या भागांत अलीकडे झालेली स्थापना व त्यांची वाढ ह्या दृष्टीनें इष्ट व योग्य अशीच समजली पाहिजे. म्हैसूर व हैद्राबादसारख्या संस्थानांतील कारखान्यांस त्या संस्थानी सरकारचें जसें सहाय होतें, तसें सहाय मुंबई सरकारनें आपल्या हद्दीमध्यें स्थापन होणाऱ्या नव्या कारखान्यांस दिलें पाहिजे. सरकारी अधिकाऱ्यांचें ह्या संबंधांतील धोरण बिगर-माहितीचें व सहानुभूतिशून्य असतें असें न्यायमूर्ती रानडे ह्यांनीं टाइम्स पत्रांत १८९९ सालीं लिहिलेल्या लेखमालेंत (ह्या लेखांचा गोषवारा गेल्या वर्षाच्या जानेवारी महिन्यांतल्या "अर्था"च्या तीन अंकांत प्रसिद्ध झालेला आहे.) मुद्देसूद रीतीनें सिद्ध केलें होतें. छत्तीस वर्षांनंतर सध्याच्या काळांत त्या प्रकारच्या तक्रारीस वास्तविक पहातां जागा राहूं नये. आगामी स्वायत्ततेमध्यें तर ह्या विषयींची जबाबदारी ज्यास्तच वाढणार आहे. हिंदुस्थान सरकारचा संरक्षक धोरणावरील पहिला विश्वास उडूं लागल्याचीं चिन्हें दिसत आहेत व खुद्द टारिफ बोर्डाचेंहि विसर्जन करण्यांत आलें आहे. बेकारीस आळा घालणें, शेतीमध्यें सुधारणा करणें, इत्यादि कामें औद्योगिक प्रगतीची कास धरल्याखेरीज होणार नाहींत. हा आर्थिक धोरणाचा व सांपत्तिक मुत्सद्देगिरीचा प्रश्न मुंबई सरकारनें दूरदृष्टीनें हातीं घेणें अगत्याचें आहे. ह्या कामीं आतां लोकांनीं संघटित प्रयत्न केले पाहिजेत व सरकारनेंहि आपली जबाबदारी ओळखून उद्योगास लागलें पाहिजे."

---

### नंदुरबार तालुका (पश्चिम खानदेश) सहकारी वृत्त

नंदुरबार तालुका को. सुपरवायझिंग यूनियन लि. च्या सबकमिटीनें ग्रुपसेक्रेटरीची योजना त्या भागाचे ऑडिटर व बँकेचे इन्स्पेक्टर ह्यांचे सहायानें तयार केली आहे व ती धुळें येथील असिस्टंट रजिस्ट्रारसाहेबांच्या परवानगीनें लवकरच अमलांत येईल. सुपरवायझर श्री. उपाचार्य ह्या बाबतींत बरीच मेहनत घेत आहेत.

---

## हिंदुस्थान सरकारच्या ग्रामसुधारणेबाबतच्या ग्रँटचा विनियोग

ग्रामसुधारणेच्या कार्याकरितां हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारांत रकमा वांटून दिलेल्या आहेत. सदरहू पैशाचा विनियोग कशा तऱ्हेनें केला जावा, ह्यासंबंधांत मध्यवर्ती सरकारनें प्रांतिक सरकारांस एक सविस्तर पत्र लिहून आपला मानस कळविला आहे. सरकारनें दिलेल्या रकमा खर्च करण्याचा अधिकार शक्यतोंवर जिल्हाधिकाऱ्यांस देण्यांत यावा, योजना आखावयाच्या त्या तात्कालिक स्वरूपाच्या नसाव्यात व कित्येक कामें एकदम हातीं घेण्याऐवजीं कांहीं निवडक कार्यावरच भर दिला जावा, असें हिंदुस्थान सरकारचें म्हणणें आहे.

१९३५-३६ सालीं ग्रामसुधारणेप्रीत्यर्थ ९२½ लक्ष रुपये प्रांतिक सरकारांस देण्यांत आले. चालू सालीं १ कोटि ३ लक्ष रुपये खालील कोष्टकाप्रमाणें दिले जातील:—

| प्रांत | खेडेगांवी वस्ती ( लक्ष ) | गेल्या वर्षी दिलेली रकम ( लक्ष रु.) | यंदा द्यावयाची रकम (लक्ष रु.) |
|---|---|---|---|
| मद्रास | ३७९ | १४ | १५ |
| मुंबई | १३८ } | ७ | { ५ |
| सिंध | ३¼ } | | { ३ |
| बंगाल | ४६½ | १६ | १८ |
| संयुक्तप्रांत | ४३ | १५ | १७ |
| पंजाब | २०½ | ८½ | ८½ |
| ब्रह्मदेश | १३ | ५ | ५ |
| बिहार | ३१ } | १२½ | { १२ |
| ओरिसा | ७¾ } | | { ४ |
| मध्यप्रांत | १३¾ | ५ | ६ |
| आसाम | ८½ | ५ | ५ |
| वायव्य सरहद्दप्रांत | २ | ३ | ३ |
| दिल्ली | — | ½ | ½ |
| अजमीर-मारवाड | — | ½ | ½ |
| कूर्ग | — | ½ | ½ |
| एकूण | | ९२½ | १,०३ |

उपरिनिर्दिष्ट सुमारें २ कोटींची रकम ग्रामसुधारणेसाठी वांटण्यांत आली, त्याहून मोठी रकम वांटण्याचा प्रसंग पुनः लवकर येण्याचा संभव नाहीं; कारण ह्यापुढें मध्यवर्ती सरकारचे करवसुलीचे कित्येक अधिकार प्रांतिक सरकारांस उपलब्ध होणार आहेत. प्रत्येक प्रांतांतील परिस्थिति भिन्न आहे व गेल्या वर्षी हातीं घेतलेल्या कित्येक योजना प्रयोगात्मक होत्या हें खरें आहे. ह्या दृष्टीनेंहि त्या योजनांचा पुनर्विचार होणें जरूर आहे. बहुतेक प्रांतांनीं एकदोन निवडक योजनांवर भर न देतां अनेक कार्यें एकदम हातीं घेतलीं आहेत, ही गोष्ट इष्ट नाहीं. मंजुरी देण्याची सत्ताहि केन्द्रीभूत होतां कामा नये. प्रत्येक जिल्ह्याच्या वांट्यास येणारी रकम जिल्हाधिकाऱ्याच्या इच्छेप्रमाणें नियोजित कार्यावर खर्च करतां आली पाहिजे, असें हिंदुस्थान सरकारचें म्हणणें आहे. ज्या खेडेगांवांतून रकम खर्चिली जावयाची, त्या गांवांतील लोकांनीं कार्यास हातभार लावणें व्यापक दृष्टीनें पहातां अगत्याचें आहे. ग्रँटच्या एक तृतीयांशापेक्षां ज्यास्त रकमेच्या मोबदला खेडूतांनीं पैशाच्या अगर मजूरीच्या स्वरूपांत मदत करावी, अशी अट घालतां येणें शक्य आहे.

प्रत्येक प्रांतिक सरकारनें, खेडेगांवांतील रस्त्यांची सुधारणा, पाणीपुरवठा, शेतीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण, इत्यादींसारख्या दोनतीन निवडक योजना हातीं घ्याव्या. प्रांतिक सरकारांस ग्रामोद्धारासाठी दिलेल्या रकमांतील बाकी वर्षअखेर रद्द होणार नसल्यानें दीर्घ मुदतीवर पसरलेल्या योजना आखण्यास हरकत नाहीं. जिल्हाधिकाऱ्यास ग्रँटच्या रकमेचा विनियोग करण्यास स्वातंत्र्य असलें, तरी आखलेल्या योजना निश्चित असाव्या व त्यांची आणि खर्चाची वरचेवर एका लायक अधिकाऱ्यामार्फत तपासणी व्हावी. कामाच्या प्रगतीचा अहवाल प्रांतिक सरकारांकडे पाठविण्याची जिल्हाधिकाऱ्यांवर जबाबदारी असावी, म्हणजे सर्व जिल्ह्यांतील कार्यांत एकसूत्रीपणा आणतां येईल. प्रांतिक सरकारांस वांटलेल्या रकमेच्या सुमारें ८० टक्के रकम जिल्ह्यांतील खेडेगांवीं लोकसंख्येच्या प्रमाणांत सर्व जिल्ह्यांस देण्यांत यावी व उरलेली २० टक्के रकम विशेष योजनांसाठी राखून ठेवावी. हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारांकडून आपल्या ग्रँटच्या विनियोगाबाबत वरीलप्रमाणें सूचना करून तपशीलवार माहिती मागविली आहे.

### सहकारी अर्बन बँकांची प्रगति

सभासदांची संख्या, भाग-भांडवल, खेळतें भांडवल, रिझर्व्ह फंड इत्यादि सर्व बाबतींत मुंबई इलाख्यांतील सहकारी अर्बन बँकांची प्रगति झपाट्यानें होत आहे. ह्या समाधानकारक स्थितीची कल्पना खालील आकड्यांवरून येईल.:—

| | १९३३-३४ | १९३४-३५ |
|---|---|---|
| बँकांची संख्या | ११४ | १२१ |
| सभासद | १,५९,९५७ | २,०९,६०३ |
| भाग भांडवल | ६७ ल. रु. | ७६¾ ल. रु. |
| रिझर्व्ह फंड | २८ | ४०½ |
| खेळतें भांडवल | ४३४ | ४८३½ |
| सभासदांच्या ठेवी | २२१¾ | २६६½ |
| नफा | ८¼ | १०½ |
| डिव्हिडंड | ६ ते ९ टक्के | ६ ते ७½ |

### एक नवा उपक्रम

लिंब को. पी. बँकेचे प्रेसिडेंट श्री. ठाकूर यांनीं लिंब येथें, "उद्योग संवर्धक सहकारी मंडळ" या नांवाची एक लिमिटेड कंपनी सहकारी कायद्याखालीं नोंदविण्याचा प्रयत्न चालविला आहे. या मंडळामार्फत प्रथम तेथें एक कापडाची लहान गिरणी निघणार असून दुसऱ्याहि अनेक धंद्यांस मंडळाकडून मदत मिळण्यासारखें व्यापक ध्येय मंडळानें ठेवलेलें आहे. पंचवीस रुपयांचा एक शेअर असून अधिकृत भांडवल ५० हजार रु० ठरविलेलें आहे. एक हजार रुपये भांडवल जमलेलें असून मंडळाचे पोटनियम तयार करून ते मंजुरीसाठी पाठविण्यांत आले आहेत. खेडेगांवांतील हा नवा उपक्रम प्रशंसनीय आहे.

## कै. भाऊराव कोल्हटकरांचें गाणें ऐकावयास मिळेल काय ?

रा. रा. संपादक, "अर्थ" यांसः—

सा. न. वि. वि. आपल्या साप्ताहिकाच्या गेल्या महिन्याच्या एका अंकांत इंग्लंडचे प्रसिद्ध मुत्सद्दी मि. ग्लॅडस्टन व राजकवी लॉर्ड टेनिसन यांच्या भाषणांचीं जुनीं ग्रामोफोन रेकॉर्ड्स विलायतेंत उपलब्ध झालीं असून तीं ऐकतां येतील अशी व्यवस्था करण्यांत येत असल्याची माहिती दिली आहे. त्याचप्रमाणें, प्रसिद्ध महाराष्ट्रीय नट व गायक, कै. भाऊराव कोल्हटकर, यांच्याही पदांचीं जुनीं नळावर घेतलेलीं रेकॉर्ड्स हल्लीचे पिढीस ऐकावयास मिळण्याची सोय होणें शक्य आहे, अशी उपयुक्त सूचना आपण केली आहे.

कै. भाऊराव यांची, सौभद्र नाटकांतील पदांचीं रेकॉर्ड्स मीं स्वतः ऐकलीं आहेत. माझे स्नेही, रा. रा. गजानन सखाराम देशपांडे, बी. एससी., शिक्षक कन्याशाळा, पुणें, (हल्ली ते बी. टी. चा अभ्यास कोल्हापूर येथें करीत असतात) यांनीं गतवर्षीं हिज मास्टर्स व्हॉइसच्या एका जुन्या ग्रामोफोनवर सौभद्र नाटकांतील रा. भाऊराव कोल्हटकरांच्या पदांच्या बांगड्या लाविल्या होत्या; सदरहू ग्रामोफोन जरी बिघडलेला होता, तरी बांगड्यांचा आवाज चांगला ऐकूं येत होता. ग्रामोफोन व रेकॉर्ड्स रा. देशपांडे यांनीं आपले नातेवाईक, श्री. चिंतामण गजानन देव, इनामदार, मुक्काम ओझर, जिल्हा पुणें, यांचेकडून आणिलीं होतीं.

कै. भाऊराव यांच्या पदांच्या बांगड्या आतां फारच दुर्मीळ झाल्या आहेत. कोणी तज्ज्ञानें या बांगड्यांपासून नवीन रेकॉर्ड्स करून हल्लीचे पिढीस कै. भाऊरावांची गायकी ऐकावयाची संधी आणून दिल्यास फार बरें होईल.

आपली सूचना अत्यंत उपयुक्त वाटल्यावरून हें पत्र आपणांस लिहीत आहे. तरी त्यास आपले पत्रांत जागा द्याल अशी आशा आहे. कळावें,

ता. २-८-३६ आपला,

"अर्थाचा" एक ऋणानुबंधी

---

### विमेदारांच्या आरोग्याची जोपासना व डॉन ऑफ इंडिया विमा कं.

"विमेदारांच्या आरोग्याची जोपासना" ह्या शीर्षकाखाली 'अर्था' च्या गेल्या अंकांत आम्हीं न्यूयॉर्क येथील मेट्रॉपॉलिटन विमा कंपनीच्या कार्यासंबंधानें माहिती दिली होती. ह्या संबंधांत डॉन ऑफ इंडिया लाइफ इं. कं. लि. च्या जनरल मॅनेजरांकडून आम्हांस एक पत्र आलें असून त्यामध्यें सदरहु कंपनीच्या आयुष्यसंवर्धनपर योजनेसंबंधीं खुलासा करण्यांत आला आहे. त्याचा सारांश खालीं दिला आहे:—

"आपण हिंदुस्थानांतील विमा कंपन्यांस जागृत करण्याचा प्रयत्न केलांत, याबद्दल आम्ही आपलें अभिनंदन करतों. अशा तऱ्हेचा सुसंघटित प्रयत्न आमचे कंपनीचे चालक मंडळानें सन १९३४ सालांत सुरू केला आहे व त्याचा योग्य व हितकारक परिणाम विमेदारांचे आरोग्यरक्षण दृष्ट्या कंपनीस फायदेशीर होत आहे असा अल्पांशानें का होईना अनुभव येत चालला आहे. आमचे कंपनीचे मेडिकल रेफरी सुविख्यात डॉ. भडकमकर यांचे अध्यक्षतेखालीं १५ जुलै १९३४ रोजीं विमेदारांच्या आरोग्यचिकित्सामंदिराचें उद्घाटन झालें, त्यामध्यें कंपनीच्या डायरेक्टर मंडळांतील उत्साही डॉ. एम्. एस्. बेके व डॉ. एम्. एन्. कढे हे दोन वर्षे काम करीत आहेत व अनुभवानें या आरोग्यसंरक्षक योजनेचा विमेदार फायदा घेतात ही गोष्ट सिद्ध झाली आहे. ही आरोग्य योजना ज्यास्त प्रमाणांत प्रचारित व्हावी व ती खेडेगांवांतील बहुजनसमाजांत देखील पसरावी, ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन सबंध इलाख्यांतील ग्रामोद्धारमंडळांमार्फत आर्थिक संघटनेबरोबर विमासंरक्षक साधनांचाहि प्रसार करण्याचा आमचा प्रयत्न चालू आहे........."

---

## कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणें.

### ३० वी वार्षिक सभा.

या बँकेची ३० वी वार्षिक सभा नूतन मराठी विद्यालय हायस्कूलचे असेंब्ली हॉलमध्यें सन १९३५-३६ सालचा अहवाल, ताळेबंद, नफ्याची वांटणी व वार्षिक निवडणुकी वगैरे कामांसाठीं ता. २७ सप्टेंबर १९३६ रोजीं दुपारीं दोन वाजतां भरणार आहे. तरी त्यावेळीं सर्व सभासदांनीं अवश्य यावें अशी विनंति आहे.

न्यू किताब बिल्डिंग,
लक्ष्मी रोड, पुणें.
५ ऑगस्ट १९३६

बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे
हुकुमावरून.
मा. के. कुळकर्णी,
सेक्रेटरी.


## दी ट्रस्ट ऑफ इंडिया अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पो. बॉ. नं. ४६, पुणें नं. २

चेअरमन : दि. ब. के. आर. गोडबोले,
बी. ए., एम्. सी. ई., सी. बी. ई.,
एम्. आय. ई., (इंडिया)
दौंड-बारामती व पाचोरा-जामनेर रेल्वे कं. चे भागीदार

— विशिष्ट अंगें —

१. या कंपनीच्या घटनेप्रमाणें विमेदारांना कंपनीच्या नफ्यापैकीं शेंकडा ९६ नफा बोनसच्या स्वरूपांत परत करण्यांत येतो. विमेदारांना स्वतःतर्फेचे डायरेक्टर्स निवडून देतां येतात.

२. "ट्रस्ट ऑफ इंडिया"च्या प्रत्येक विमेदारास त्याच्या पॉलिसीरकमेंतून शस्त्रक्रिया किंवा रुग्णालयाच्या खर्चासाठीं कंपनीकडून मदत मिळण्याची सवलत दिली जाते. विमेदार पंगू किंवा चरितार्थाचें साधन मिळविण्यास असमर्थ झाल्यास त्याचे विमाहप्ते बंद होऊन त्याला त्याची विमारक्कम दहा वार्षिक हप्त्यांनीं दिली जाते. याशिवाय, सोडकिंमत, हप्तेबंद विमा, रद्द पॉलिसी चालू करण्याविषयीं सवलती, पॉलिसी-तारणावरील कर्ज, घरें विकत घेण्याच्या योजना, वार्षिक हप्त्यावर अडीच टक्के सूट इ० सर्व सवलतींचा अंतर्भाव "ट्रस्ट ऑफ इंडिया" कंपनीनें केला आहे.

## कॉलेज विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी

मुंबई विश्वविद्यालयास जोडलेल्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय तपासणीबाबतचा १९३५-३६ सालचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. ही तपासणी डिसेंबर १९३५ पूर्वी पुरी करण्यांत आली व तपासण्यांत आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १२,३७० होती. कोल्हापूर कॉलेजांतील तपासणीचा अहवाल उशिरा हातीं आल्यामुळें विश्वविद्यालयाच्या अहवालांत तो स्वतंत्रपणें शेवटीं छापला आहे. तपासणीपासून काढण्यांत आलेल्या निष्कर्षाचें सार खालीलप्रमाणें आहे:—

( १ ) दक्षिण विभागांतील विद्यार्थ्यांचे स्नायू चांगले असले तरी त्यांचें वजन कमी होतें. कसदार अन्नाचा अभाव, हें त्याचें कारण होय.

( २ ) गुजरात विभागांतील विद्यार्थ्यांची प्रकृति सामान्यत: असमाधानकारक आढळली. त्यांतील विद्यार्थी फार लठ्ठ अगर अतिशय किरकोळ असे होते व त्यांचें खेळांकडे आणि व्यायामाकडे दुर्लक्ष असल्याचें दिसून आलें.

( ३ ) कर्नाटक विभागांतील विद्यार्थ्यांचा वैद्यकीय तपासणींत पहिला नंबर लागला व त्यांची प्रकृति सर्वांत चांगली आहे, असें निदर्शनास आलें.

( ४ ) सिंधी विद्यार्थ्यांचें वजन समाधानकारक होतें परंतु शरीर पीळदार नव्हतें.

( ५ ) विद्यार्थिनींनीं श्वासोच्छ्वासाचा व्यायाम घेणें अगत्याचें आहे.

( ६ ) एकूण २,१५२ म्हणजे शेंकडा १२ विद्यार्थ्यांची दृष्टि सदोष असून त्याविषयीं काळजी घेतली जात नाहीं.

( ७ ) वैद्यकीय तपासणीमध्यें कर्नाटक कॉलेजचा नंबर पहिला लागतो व हैद्राबाद ( सिंध ) कॉलेजचा शेवटीं येतो. गुजरातमधील कॉलेजांचा नंबरहि तळाशींच आहे.

( ८ ) प्रत्येक विद्यार्थ्याच्या तपासणीचा तक्ता त्यास पहावयास मिळणें जरूर आहे. सदरहु तपासणीची एक प्रत विद्यार्थ्यांच्या पालकांकडे पाठविण्यांत यावी.

### रजिस्ट्रेशन खात्याचा अहवाल

१९३५ सालीं मुंबई इलाख्यांतील रजिस्ट्रेशन खात्याकडे एकूण २,८६,०४७ दस्तऐवज नोंदले गेले व त्यांची किंमत २६ कोटि रुपये भरली. म्हणजे, १९३४ सालाच्या मानानें रजिस्ट्रेशनमध्यें ८,७०१ दस्तऐवजांच्या संख्येची आणि नोंदलेल्या दस्तऐवजांच्या किंमतींत ३½ कोटि रुपयांची वाढ झाली. व्याजाचे दर उतरले असल्यामुळें स्थावर इस्टेटींत पैसे गुंतविण्याच्या लोकांच्या प्रवृत्तीचा हा परिणाम असावा.

अहवालाचे सालीं सहकारी सोसायट्यांचेसंबंधीं ११,९७१ दस्तऐवज नोंदण्यांत आले. १९३४ सालीं हा आंकडा १,५७१ नें कमी होता.

पारशी समाजांतील ५४१ विवाह नोंदले गेले व स्पेशल मॅरेज ॲक्टान्वयें ८४ विवाह रजिस्टर झाले.

रजिस्ट्रेशन खात्यास अहवालाचे सालीं एकूण १७½ लक्ष रुपये उत्पन्न झालें. त्यांतून खर्च वजा जातां १० लक्ष १४ हजार रुपये निवळ उत्पन्न उरलें.


धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०
कडून
हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक
नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा:—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.



धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

उभारलेलें भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,०४,००,०००

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रें ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा १ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्हीं ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट:— टी. आर. लालवाणी.



S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

## दि ट्रस्ट ऑफ इंडिया ॲश्युअरन्स कंपनी

### स्टॅटच्युटरी सभेची हकीकत

दि ट्रस्ट ऑफ इंडिया ॲश्युअरन्स कंपनी ( हेड ऑफिस ६, बुधवार पेठ, पुणें २. ) च्या भागीदारांच्या स्टॅटच्युटरी सभेच्या वळीं कंपनीचे अध्यक्ष दिवाण बहादुर का. रा. गोडबोले, बी. ए., एम. सी. ई., सी. बी. ई., एम. आय. ई., यांनीं केलेलें भाषण:—

सद्‌गृहस्थहो,

ता. १२ जून १९३६ पर्यंतच्या स्टॅटच्युटरी रिपोर्टाचा विचार करण्यासाठी आपण येथें जमलों आहों. आपली कंपनी ता. ४ जून १९३५ रोजीं रजिस्टर झाली. ता. १७ जानेवारी १९३६ रोजीं, म्हणजे चालू वर्षारंभीं काम करण्याची परवानगी जॉइंट स्टॉक कंपनीच्या रजिस्ट्रारकडून मिळाली. या मुदतींत १०२० शेअर्सची विक्री करण्यांत येऊन रु. ४०,०००/— जमविण्यांत आले.

कंपनीचें खर्चाचें प्रमाण शक्य तितकें कमी ठेवण्याचा डायरक्टर्सनीं प्रयत्न केल्याचें आपल्याला रिपोर्टावरून आढळून येईलच. आतांपर्यंत मॅनेजिंग एजन्टसनीं विनावेतन काम केलें असून डायरेक्टर्सनीं आपली फी घेतली नाहीं. कंपनीच्या शेअर—प्रॉस्पेक्टसमध्यें प्राथमिक खर्चासाठीं रु. १०,०००/—ची मंजुरी घेतली असून, हा खर्च रु. ५१४२/११/— इतक्याच रकमेंत भागविला आहे.

खर्चाच्या बाजूपैकीं एकाच रकमेचा खुलासा केला पाहिजे. कंपनीनें सेव्हिंग–क्लॉक्स खरेदीसाठीं रु. ४९०९/१०/६ खर्ची टाकले आहेत. हीं घड्याळें नाणें टाकलें तरच चालतात. यामुळें विमेदारांचा विमा-हप्ता आपोआप गोळा होतो. या घड्याळांमुळें आयुर्विम्याची लोकप्रियता बरीच वाढली आहे. हीं घड्याळें एका विख्यात जर्मन कंपनीपासून खरेदी केलीं असून कारखानदारांनीं त्याबद्दलची हमी घेतली आहे.

आजपर्यंत झालेल्या कामाचा उल्लेख येथें करणें आवश्यक आहे. आतांपर्यंत एक लाखावेक्षां जास्त रकमेचे विमाअर्ज कंपनीकडे आले असून, त्यांपैकीं पाऊण लाखापेक्षां जास्त रकमेचे मान्य करण्यांत आले आहेत. यांपैकीं पुष्कळसें काम ज्या वर्गांत विम्याचा प्रसार झाला नव्हता, अशा वर्गांतून आलें आहे.

यावरून आपल्या लक्षांत आलें असेलच कीं, या थोड्या मुदतींत कंपनीनें पुष्कळ मोठी प्रगति दाखविली आहे. मला अशी आशा वाटते कीं, या कंपनीचें कार्य दिवसेंदिवस वाढत जाईल व नवीन काम मिळविण्यासाठीं मी तुम्हां सर्वांना कंपनीशीं सहकार्य करण्याची विनंति करतों.

यानंतर कंपनीच्या भागीदारांच्यातर्फे पुढील प्रश्न विचारण्यांत आले.

( १ ) श्री. पुरंदर गणेश मराठे, पुणें नं. ४ यांजकडून...

प्रिलिमिनरी खर्च म्हणून दाखविलेली रक्कम रु.५१४२/११/- ही दिसण्यांत बरीच मोठी वाटते. या खर्चाचा तपशील सांगण्यांत येईल काय ?

श्री. गोडबोले यांच्याकडून खुलासा...

| | |
|---|---|
| रजिस्ट्रेशन फी | रु. ५००-०-० |
| डायरेक्टर्सची व कांहीं शेअरहोल्डर्सची सहानुभूति इ. मिळविण्यासाठीं रजिस्ट्रेशनपूर्वी केलेला प्रवासखर्च | रु. ८२९-१०-० |
| छपाई व स्टेशनरी | रु. ३४५२-६-० |
| यांतील बरीचशी छपाई कंपनीला ३ वर्षें पुरेल इतकी आहे. | |
| जाहिरात | रु. ३६०-११-० |
| एकूण | रु. ५१४२-११-० |

( २ ) श्री. आर. एन. अभ्यंकर, बी.ए., एलएल. बी., मॅनेजिंग एजन्ट—कॉमनवेल्थ ॲश्युअरन्स कंपनी, लि. पुणें २ यांजकडून...

कॅपिटल रिसीटमध्यें शेअरडिपॉझिट म्हणून रु. ६६०/—जमा दाखविली आहे. हे शेअर्स कां मान्य करण्यांत आले नाहींत ? शेअर्स मान्य करतांना कांहीं विशेष धोरण पाळण्यांत आलें होतें काय ?

श्री. गोडबोले यांच्याकडून खुलासा...

आतांपर्यंत १०२० शेअर्स अलॉट करण्यांत आले. या शेअर्सवर जमा झालेली रक्कम रु. ४०,०००/— भांडवली खर्चासाठीं पुरेशी वाटल्यावरून जास्त शेअर्स अलॉट करण्यांत आले नाहींत. असें धोरण ठेवण्यांत भांडवलावर द्याव्या लागणाऱ्या व्याजाचा बोजा कंपनीवर वाढूं नये हा एकच हेतु होता.

१०००ची दर्शनी किंमत रु.१०००००/—आमच्या मतें विमेदारांना कंपनीबद्दल विश्वास वाटण्यास पुरेशी आहे. या सोईमुळें मोठ्या भांडवलाचें स्थैर्य मिळून त्यांपैकीं ४० टक्के भागावरच कंपनीला व्याज द्यावें लागेल.

शेअर्ससाठीं ज्या अनुक्रमानें अर्ज आले त्या अनुक्रमानेंच ते अलॉट करण्यांत आले आहेत. याशिवाय दुसरें धोरण शेअर्स मान्य करताना ठेवलें नव्हतें.

( ३ ) श्री. राजगुरु, डायरेक्टर—कॉमनवेल्थ ॲश्युअरन्स कं. लि., पुणें यांजकडून......यापुढें आणखी किती शेअर्स अलॉट करण्याचा कंपनीचा विचार आहे ?

श्री. गोडबोले यांच्याकडून खुलासा...

आतांपर्यंतच्या अनुभवावरून व कंपनीचे फायदे विस्तृत करण्यासाठी आणखी सुमारें ५०० शेअर्स विकण्याचा आमचा विचार आहे.

स्टॅटच्युटरी रिपोर्ट पास करण्याच्या अध्यक्षांच्या ठरावाला दुजोरा देताना बॅरिस्टर एन. एम्. पटवर्धन ( सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज व एकवेळचे वर्कमेन्स कॉंपेनसेशन कमिशनवरील अधिकारी ) म्हणाले...आपण हा रिपोर्ट बिनहरकत पास करावा. शक्यतोंवर थोड्या भांडवलांत प्राथमिक खर्च भागविण्याचें मॅनेजिंग एजंटसचें धोरण स्पृहणीय आहे. यापुढें हप्त्याचें उत्पन्न जमा होऊं लागल्यावर आतां जमविलेलें जास्त भांडवल निरुपयोगी होईल. मुंबईच्या न्यू इंडिया कंपनीनें प्राथमिक जमा केलेलें भांडवल परत केल्याचें आपणांस माहीत आहेच. विम्याचा धंदा हा स्वत: भांडवल निर्माण करणारा धंदा आहे. कॅनडांतील सन लाइफ कंपनीनें विमेदार व कंपनीचे नोकर यांचेसाठीं एक शहर वसविण्याचें ठरविलें आहे.

काटकसर व पैशाच्या व्यवहाराबद्दलच्या दक्षतेबद्दल दिवाण बहादुरांचें नांव प्रसिद्ध आहे. त्यांनीं अनेक कंपन्या उभारून यशस्वी करून दाखविल्या आहेत व पुण्यांतील अनेक संस्थांचे ते अध्यक्ष असून त्यांचें काम पहात आहेत.

त्याचप्रमाणें, मध्यप्रांतांत कमिशनर म्हणून सेवानिवृत्त झालेले व एक वेळचे जॉइंट स्टॉक कंपनीचे रजिस्ट्रार श्री. के. एस. जटार, सी. आय. ई. हे उपाध्यक्ष आहेत. या अध्यक्ष—उपा-

-ध्यक्षांच्या जोडीकडे बोट दाखविल्यानंतर कंपनीच्या काटकसरी-च्या धोरणाबद्दल जास्त शिफारसीची जरूरी लागेल असें वाटत नाहीं.

यानंतर मतें घेऊन स्टॅट्युटरी रिपोर्ट एकमतानें पास झाल्याचें जाहीर करण्यांत आलें. खानसाहेब एच्. डी. विनॉय यांनीं अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर सभा बरखास्त झाली.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—१ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०-११ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८—७ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—४ |
| ४% १९६०–७० ... ... | ११४-१२ |
| ४% १९४३ ... ... ... | १११—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९९-१५½ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०७—४ |
| २¾% १९४८–५२ ... ... | १००-११ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १११—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १००—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | ११०—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | १०९-१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५२–६२ ) ... | १११—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२३—८ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३५—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११५-१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५—४ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५८२—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १०६—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—४ |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९३०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५९—६ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४०—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २४५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १६२२—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६१०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९२—८ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६५—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८४—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७२३-१२ |


एशियन पॉलिसी

म्हणजेच

आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत

धी एशियन अॅशुरन्स कंपनी, लिमिटेड

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

वेस्टर्न इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी–सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५

१९३५ मधील नवें काम ५१,३०,०४२ रु.

एकूण चालू काम २,७०,००,००० रु. अधिक

एकूण जिंदगी ७१,७१,०९३ रु.

लाइफ फंड ६०,४२,८७३ रु.

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

## दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें — पदमजी पेपर मिल, मुंबई.**

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.



मुलांचा आनंद कोणा पालकाला नको! त्यांतून 'आनंदा'चा खास अंक! मग काय त्यावर मुलांच्या उड्यावर उड्या!

### 'आनंदा'च्या खास अंकाचा थाट

आतां सर्व मुलांना माहीत झाला आहे. ती दोन रंगी छपाई चित्रांची लयलूट, गोष्टींची रम्यता, कवितांची बहार–हो! सांगायचें विसरलोंच! यंदां पुष्कळ कवितांना त्यांतील वर्णनाच्या चित्रांचीच चौकट बसविली आहे–गुळगुळीत कागद, सुबक छपाई व मोहरेदार मुखपृष्ठ हे खास अंकाचे विशेष त्यांना ठाऊक झाले आहेत. 'आनंद' वर्षभर त्यांची किती करमणूक करतो, त्यांच्या ज्ञानांत किती भर घालतो व त्यांना किती हवाहवासा वाटतो हें तीं केव्हांहि सांगतील. आपण आपल्या मुलांकरितां तो एक वर्षभर घेऊन पहा म्हणजे आपणांसहि कळून येईल. **वार्षिक वर्गणी** ट. ह. सह **लहान अंकाची २ रु. मोठ्या अंकाची ३ रु. वर्षारंभ जुलैपासून.** अंक दरमहा पंधराव्या तारखेस प्रसिद्ध होतो.

पत्ताः—**म्यानेजर आनंद, पुणें २.**



गणेशचतुर्थीस प्रसिद्ध होणार!

### पुरुषार्थाचा गणेशांक (भाग २ रा)

या अंकांत गणपतीसंबंधींचें वैदिक, पौराणिक व महाराष्ट्रीय साधुसन्तांचें सर्व लिखाण सोपपत्तिक येणार असून शिवाय उत्तर व दक्षिण हिन्दुस्थानांत संशोधकांस ज्या प्राचीन गणेशमूर्ति आढळल्या आहेत, त्यांचीं विशेष माहितीसह सुबक छायाचित्रें देणार आहों. किं. २ रु. पण **वर्गणीचे ३ रु. म. ऑ. नें पाठविणारांस हा अंक वर्गणींतच मिळेल.**

**गणेशांक** भाग १ ला किं. २ रु.; पण चालू ग्राहकांस हा अंक फक्त १ रु. स देऊं. तरी वाचकांनीं रजिस्ट्रेशनखर्चासह एकंदर ४॥३ रु. पाठवावे. म्हणजे दोन्ही विशेषांक रजिस्टरनें पाठवूं. प्रत्येक हिन्दूच्या घरीं हे अंक असले पाहिजेत.

**व्यवस्थापक पुरुषार्थ, औंध, (जि. सातारा).**



**WANTED** Arts Graduates & Medical Practitioners to push up Rural Uplift & Medical Relief Movement in furtherance of Insurance Benefit Plans throughout district places in the Presidency. Adequate remuneration to capable workers.

Apply with particulars to :—

Head Office :— 99, LAXMI ROAD, POONA. — General Manager, THE DAWN OF INDIA LIFE INS. CO. LTD.



यशासाठीं दररोज १॥ पै खर्च करा.

आरोग्य, ऐश्वर्य व जीवनसौंदर्य यांना वाहिलेलें बृहन्महाराष्ट्रांतें आवडतें व लोकप्रिय

### भाग्योदय मासिक

आजच सुरू ठेवा. दरमहा प्रसिद्ध होतें. यांत उत्साहवर्धक लेख, स्फूर्तिदायक चरित्रें, चटकदार लघुकथा आणि सुंदर कविता येत असतात. वा. व. २॥ रु. पुढील पत्त्यावर लिहा.

**साहित्य कार्यालय, कराड जि. सातारा.**



पुणें शहर म्युनिसिपालिटीकडून मंजूर होणाऱ्या

**भव्य इमारती बांधण्याकरितां सुंदर नकाशाबाबत**

कन्सल्टिंग सर्व्हेअर जी. जी. तळवलकर यांना भेटावें.

वेळः—सकाळीं ८ ते १० व दुपारीं ४ ते ६. — ठिकाणः—७७३, सदाशिव, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख १९ ऑगस्ट, १९३६. अंक ३४

दि गुड-वुइल
ॲशुअरन्स कंपनी लि.
पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल
विमेदारास
भरपूर सवलती माफक हप्ते
ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा;
मॅनेजिंग डायरेक्टर


FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

WANTED Arts Graduates & Medical Practitioners to push up Rural Uplift & Medical Relief Movement in furtherance of Insurance Benefit Plans throughout district places in the Presidency. Adequate remuneration to capable workers.
Apply with particulars to :—
Head Office :— 99, LAXMI ROAD, POONA. } General Manager, THE DAWN OF INDIA LIFE INS. CO. LTD.

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "
स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:–
कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.
अध्यक्ष–श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी
हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.
जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

" अर्थ " ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं. १ रु. ( ट. ख. निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः–ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः–

१ केळकर ब्रदर्स, बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी, लक्ष्मीरोड.

# विविध माहिती

### हिंदी चित्रपटांचा धंदा

हिंदुस्थानांत एकूण सुमारें ७०० सिनेमागृहें असून त्यांतलि २०० गृहांत फक्त इंग्रजी, २५० गृहांत फक्त देशी व २५० गृहांत देशी व इंग्रजी असे दोन्ही तऱ्हेचे चित्रपट दाखविण्यांत येतात. सिनेमाचे धंद्यांत हिंदी लोकांचे ८½ कोटि रुपये गुंतलेले आहेत. गेल्या पांच वर्षांत हिंदुस्थानानें अमेरिकेंतून ५६ लक्ष रुपयांची सिनेमाविषयक यंत्रसामुग्री मागविली. हिंदुस्थान अमेरिकेस दरसाल ५० लाख रुपये ह्या मार्गानें देत आहे. सर फिरोज सेटना ह्यांनीं वरील माहिती आपल्या मुंबई येथील एका व्याख्यानांत नुकतीच दिली.

### ट्रेझरी बिलांवर द. सा. द. शे. ७ आणे व्याज

– गेल्या आठवड्यांत दोन कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें सरकारनें विक्रीस काढलीं, त्यांस दोन कोटि पंधरा लक्षांची लोकांची मागणी टेंडरमार्फत आली. दोन कोटींचीं बिलें सरकारनें विकलीं आणि त्यांवर त्यास दरसाल दर शेकडा ७ आणे ह्या दरानें व्याज पडलें.

### हिंदी गव्हाचें पीक

गेल्या दोन हंगामांमध्यें हिंदी गव्हाच्या पिकाचें क्षेत्र व उत्पादन किती होतें, ह्या विषयाचे तुलनात्मक आंकडे खालीं दिले आहेत. यंदाच्या सालीं क्षेत्रांत २ टक्के व उत्पादनांत ३ टक्के घट झालेली त्यावरून दिसून येईलः—

| वर्ष | क्षेत्र ( एकर ) | उत्पादन ( टन ) |
|---|---|---|
| १९३४–३५ | ३,४४,९०,००० | ९७,३८,००० |
| १९३५–३६ | ३,३६,३१,००० | ९४,३५,००० |

### लोकांची प्राप्ति आणि बाजारभाव

ग्रेट-ब्रिटनमधील लोकांच्या वार्षिक प्राप्तीविषयींच्या माहितीवरून सर जोसिआ स्टँप ह्यांनीं असें अनुमान काढलें आहे कीं, बाजारभाव चढीचे असतात तेव्हां वरच्या दर्जाच्या लोकांची प्राप्ती कनिष्ठ दर्जाच्या जनतेच्या मिळकतीच्या मानानें वाढते आणि बाजारभाव उतरले असतां हें प्रमाण उलट होतें.

### बंगालमध्यें कापडाच्या उत्पादनाची वाढ

मागें बंगाली लोक धोतरें व सद्र्याचें कापड गुजरातमधूनच बहुतेक आणवीत. अलीकडे बंगाल प्रांतांत गिरण्या निघून त्यांत होणाऱ्या कापडाचें उत्पादन वाढत आहे. १९३३–३४ मध्यें हें उत्पादन सुमारें ११½ कोटि चौरसवार होतें तें आतां १५ कोटींपर्यंत आलें आहे.

### हिंदुस्थानांतील पिकांची लागवड

हिंदुस्थानाचें एकूण क्षेत्रफळ ६६ कोटि, ८० लक्ष एकर आहे. त्यापैकीं २३ कोटि, ४० लक्ष एकर जमीन लागवडीस निरुपयोगी आहे. ९ कोटि एकर तर जंगलच आहे. १९३४-३५ सालीं एकूण २२ कोटि, ७० लक्ष एकर जमीन लागवडीखाली आली, त्यांतील ३१ टक्के जमिनींत तांदुळाचें पीक काढण्यांत आलें. कालव्याखाली २ कोटि, ६० लक्ष एकर जमीन भिजली, १ कोटि ३० लक्ष एकरांस विहिरींचें पाणी मिळालें व ६० लक्ष एकरांस तलावांतून पाण्याचा पुरवठा झाला.

### इटलीशीं व्यापार करण्यांत येणाऱ्या अडचणी

इटलीविरुद्ध योजिलेली आर्थिक दंडयोजना राष्ट्रसंघानें रद्द केली असली तरी त्या देशाशीं इतर राष्ट्रांचा व्यापार पूर्ववत् सुरू होण्यास अडचण पडत आहे. इटली खरेदी करील त्या मालाची किंमत विक्रेत्या राष्ट्रांस कशी मिळावयाची हा प्रश्न महत्त्वाचा आहे. केवळ कागदी येणें वाढविण्यास तीं राष्ट्रें तयार नाहींत.

### ॲव्हरी कंपनीस झालेला नफा

वजनाचे काटे व इतर साहित्य तयार करणाऱ्या डब्ल्यू. ॲण्ड टी. ॲव्हरी लि. ह्या बर्मिंगहॅम ( ग्रेट ब्रिटन ) येथील कंपनीस गेल्या वर्षअखेर सुमारें २० लक्ष रुपये नफा झाला.

### पुणें येथील औद्योगिक प्रदर्शन

पुणें येथील येतें औद्योगिक प्रदर्शन फेब्रुवारी व मार्च १९३७ मध्यें भरणार असून त्याच्या पूर्वतयारीस सुरुवात झाली आहे.

### पाश्चात्य राष्ट्रांची लोकसंख्या घटत जाणार !

श्वेतवर्णीय राष्ट्रांची लोकसंख्या दिवसानुदिवस वाढणार तर नाहींच, पण ती स्थिरहि न रहातां सारखी कमी होत जाणार, असें अनुमान एका शास्त्रज्ञानें काढलें आहे.

### हिंदुस्थानांत पोलादाचा नवीन कारखाना

बंगालमधील बेंगॉल आयर्न आणि इंडिअन आयर्न ॲंड स्टील कंपनी ह्या दोन कारखान्यांच्या एकीकरणाची योजना त्यांच्या बोर्डांनीं मान्य केली आहे. बंगाल मधील लोखंडी कारखान्यांच्या सहकार्यानें पोलादाचा एक नवीन कारखाना उभारण्याची योजनाहि पूर्ण झाली आहे. टाटा कंपनीहि ह्या नव्या कारखान्यांत भांडवल घालणार आहे.

### हिंद सिलोन व्यापारी करार

हिंदुस्थाननें ओटावा करार रद्द झाल्याचें जाहीर केल्यामुळें आतां त्यास साम्राज्यांतील निरनिराळ्या देशांशीं स्वतंत्र व्यापारी करार करावे लागतील. सिलोनशी व्हावयाच्या कराराची वाटाघाट लवकरच चालू होणार आहे.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४०६ | ७ पुणें सें. को. बँक लि. | ४११ |
| २ सोन्याची सरी का सुरी ! | ४०७ | ८ बडोदें संस्थानांतील सहकारी चळवळ ... | ४११ |
| ३ पॅलेस्टाइन ... | ४०८ | ९ मुंबई इलाख्यांतील तंबाखूचें पीक ... | ४१२ |
| ४ स्फुट विचार ... | ४०८ | १० सक्करचें धरण ... | ४१२ |
| शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांची राष्ट्रीय मालकी—जागतिक शांतता व युद्धाची तयारी—आंतरराष्ट्रीय व्यापाराचें नवें वळण | | ११ ग्रंथलेखकांच्या पोटापाण्याचा प्रश्न ... | ४१३ |
| ५ सहकारी चळवळ ... | ४०९ | १२ आंतरराष्ट्रीय व्यापारपद्धतीमधील क्रांति ... | ४१३ |
| रजिस्ट्रारसाहेबांचा दौरा—अर्बन बँकांची यूनियन | | १३ नागपूर प्री. को. हौसिंग सोसायटी ... | ४१४ |
| ६ रोखे बाजार सद्दल | ४१० | १४ गुजरातमधील अर्बन बँकांची यूनियन ... | ४१४ |
| लंडन—अमेरिका—फ्रान्स—हिंदुस्थान | | १५ निवडक बाजारभाव | ४१५ |

अर्थ

बुधवार, ता. १९ ऑगस्ट, १९३६

## सोन्याची सरी का सुरी ?

(२)

सोन्याचें जागतिक उत्पादन गेल्या सहा वर्षांत सारखें वाढत आलें आहे हें खरें असलें, तरी जगाच्या व्यापारी देवघेवीस पुरें पडेल इतका त्याचा वाढावा आहे काय ? का त्याचा फाजील पुरवठा होईल ? हे प्रश्न शिल्लक रहातातच. जगांतील खाणींतून प्रतिवर्षी बाहेर निघणाऱ्या सर्व सोन्याचा चलन किंवा चलनाचा आधार म्हणून उपयोग केला जात नाहीं; तें अनेक इतर कार्यांकरितां उपयोगांत आणलें जातें. तथापि सर्व देशांत मिळून एकूण किती सोनें आहे, त्यांत दरवर्षी किती भर पडते आणि व्यापारी व वैयक्तिक देण्या-घेण्यांसाठीं किती सोनें आवश्यक आहे, ह्याचा हिशेब केल्यास वरील प्रश्नास स्थूलमानानें उत्तर देणें शक्य आहे. स्वीडनमधील प्रसिद्ध अर्थशास्त्रवेत्ते, प्रो. कॅसल, ह्यांनीं प्रस्तुत विषयाची चर्चा करून तत्संबंधांत आपला अभिप्राय व्यक्त केला आहे; त्याचा येथें उल्लेख करणें सोयीचें होईल. सोन्याचें उत्पादन वाढत आहे, ह्यावरून मागणीच्या मानानें त्याचा पुरवठा भरपूर होईल आणि आंतरराष्ट्रीय हुंडणावळ आणि राष्ट्रीय चलनें व बाजारभाव ह्यांचें स्थैर्य ह्याबाबतचा प्रश्न सुटेल असें म्हणतां येत नाहीं. त्यांच्या मतानें महायुद्धापूर्वीच्या साठ वर्षांत व्यापारी उलाढालींत प्रतिवर्षी सरासरीनें ३ टक्के वाढ होत असे, आणि म्हणून तिच्याशीं मेळ बसण्यासाठीं व बाजारभाव स्थिर रहाण्यासाठीं सोन्याच्या वार्षिक उत्पादनांत दरवर्षी ३ टक्के वाढ होणें आवश्यक होतें. सोन्याच्या एकूण पुरवठ्याच्या ३ टक्के इतकी वार्षिक वाढ व्यापारास जरूर असतां १९२० सालीं ती फक्त २ टक्केच भरून अपुरी ठरली. अलीकडे सोन्याचें उत्पादन वाढल्या कारणानें हा आकडा अपेक्षेप्रमाणें ३ टक्क्यांवर आला आहे. ह्यासंबंधांत प्रो. कॅसल यांनीं तयार केलेला तक्ता खालीं दिला आहे. त्यांत मागील हिशेबाच्या पद्धतीस अनुसरून दरवर्षी एकंदर पुरवठ्यापैकीं २ टक्के सोनें अनेक कारणांनीं नाहींसें होतें असें गृहीत धरलें असून आकडे जर्मन सुवर्ण मार्क ह्या चलनांतले आहेत.

| वर्ष | वार्षिक उत्पादन | वर्ष अखेर शिल्लक असलेला पुरवठा | वर्षारंभींच्या पुरवठ्याच्या किती टक्के एक वर्षांत उत्पादन झालें ? |
|---|---|---|---|
| | कोटि मार्क | कोटि मार्क | % |
| १९३० | १८० | ८,३२० | २ १/५ |
| १९३१ | १९२ | ८,४९६ | २ ३/१० |
| १९३२ | २१० | ८,६८९ | २ २/५ |
| १९३३ | २१८ | ८,८९० | २ १/२ |
| १९३४ | २३९ | ९,११२ | २ ७/१० |
| १९३५ | २६४ | ९,३५८ | २ ९/१० |

एका काळीं सोन्याच्या दुष्काळाबद्दल हाकाटी होती, आतां त्याच्या सुकाळाविषयीं ओरड होणार. सोन्याचें उत्पादन सारखें वाढत राहिलें तर तें पचवण्याची शक्ति जगाच्या बाजारांत नसल्यानें तें व त्यावर आधारलेलें चलन भलत्या परिमाणांत व्यवहारांत खेळूं लागून भाव कडकतील, अशी भीति कित्येकांस वाटूं लागली आहे, ती अनाठायी आहे असें प्रो. कॅसल ह्यांचें मत आहे. सध्यापेक्षां अधिक प्रमाणांत बँकांनीं आपल्या संग्रहीं सोनें ठेवून दिलें असतां चलनाच्या वाढीकडे त्याचा उपयोग होणार नाहीं आणि मागणी व पुरवठा यांचा मेळ बसून बाजारभाव कडकण्याचें कारण नाहीं. बाजारभावांची चढण्याकडे थोडीशी प्रवृत्ति झाल्यास सध्याच्या आर्थिक मंदीच्या दृष्टीनें ती इष्टच आहे. पुढें व्यापार व उद्योगधंद्यांच्या चलतीची लाट उसळून बाजारभाव मरमसाट चढतील ह्या कल्पनेनें सोन्याच्या उत्पादनाचें नियंत्रण व्हावें अशी सूचना करणें शहाणपणाचें ठरणार नाहीं. ह्यासंबंधांत सोन्याच्या पुरवठ्याचा विचार झाला, तसा त्यास आलेल्या व येणाऱ्या मागणीचाहि होणें आवश्यक आहे. सोनें चलनाचा आधार म्हणून सर्व किंमतीचें माप असलें, तरी त्यास स्वतःची म्हणून स्वतंत्र किंमत आहेच. इतर पदार्थांप्रमाणें त्याच्या किंमतीस मागणी-पुरवठ्याचा नियम लागतो, आणि त्याची किंमत त्याच्या मोबदला बाजारांत मिळणाऱ्या कमी—ज्यास्त मालावरून मापतां येते. हिंदुस्थानांत सोन्याचा भाव तोळ्यास २४ रुपयांवरून ३५ रुपयांपर्यंत वर गेला आहे हें प्रसिद्धच आहे. इतर देशांत कमी-अधिक प्रमाणांत अशीच परिस्थिति आहे लंडनमधील बाजारभाव १९३० मध्यें १०० होता असें कल्पिलें तर मंदीमुळें आज तो आकडा ९२ झाला आहे आणि सोन्याची किंमत त्या अवधींत दर औंसास ८४ शिलिंगांपासून १४० शिलिंगांपर्यंत वर गेली आहे. म्हणजे, सोन्याव्यतिरिक्त इतर जिनसांच्या मानानें सोन्याची किंमत ८० टक्के चढली आहे. आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याची व्यवस्था करण्यासाठीं बेसल येथें जी बँक स्थापन करण्यांत आली आहे, तिनें नुकतेंच असें प्रसिद्ध केलें आहे कीं, सोन्यांत व्यक्त केले असतां चालू बाजारभाव, गेल्या सवाशे वर्षांत कधींहि खालीं गेले नव्हते, इतके उतरले आहेत असें आढळून येतें. सोन्याची किंमत ह्यापुढें कमी होणार, म्हणजे बाजारभाव चढणार असा तिचा कयास आहे. त्याचें उत्पादन वाढलें असूनहि इतर पदार्थांच्या मानानें सोन्याची किंमत चढली आहे, ह्याचें कारण दुसरें कांहीं नसून त्यास असलेली विलक्षण मोठी मागणी हेंच होय, असा अभिप्राय एकंदर परिस्थितीचा विचार करून प्रो. कॅसल ह्यांनीं बनविला आहे.

## पॅलेस्टाइन

[ पॅलेस्टाइनमधील परिस्थितीसंबंधीं चौकशी करण्यासाठीं ब्रिटिश सरकारनें एक रॉयल कमिशन नेमलें असून अर्ल पील हे त्याचे अध्यक्ष आहेत. त्या देशामधील बंडाळी संपल्यानंतरच कमिशनच्या कामास सुरवात होणार आहे. ]

गेले कांहीं महिने पॅलेस्टाइनचें नांव बऱ्याच प्रामुख्यानें पुढें आलें आहे. १९१७ सालीं ब्रिटिशांनीं तुर्कांकडून हा प्रदेश जिंकला. महायुद्धानंतर १९२२ सालीं राष्ट्रसंघानें पॅलेस्टाइनची व्यवस्था पहाण्याचें काम ग्रेटब्रिटनकडे सोंपविलें व तेव्हांपासून ब्रिटिश मँडेटचा दर्जा त्या देशाच्या घटनेस प्राप्त झाला. पॅलेस्टाइनचें क्षेत्रफळ बेल्जम देशापेक्षां थोडें लहान असून त्याची लोकसंख्या १९३१ सालीं दहा लक्ष होती. पॅलेस्टाइन हें ज्यू लोकांचें मूल व पवित्र स्थान आहे म्हणून त्या लोकांचें स्वतःचें असें दुसरें राष्ट्र नसल्या कारणानें आपल्या मायभूमीकडे त्यांचा विशेष ओढा स्वाभाविकपणानेंच आहे. १९३५ सालीं ६१ हजार ज्यू पॅलेस्टाइनमध्यें गेले. गेल्या चार वर्षांत त्यांची तेथील संख्या दुप्पट झाली. ही अशीच वाढ होत राहिल्यास आपल्या मानानें ज्यू लोकांचेंच संख्याबल व महत्त्व वाढेल, अशी अरबांस भीति वाटत आहे व ह्या कारणाकरितांच ज्यू लोकांच्या वसाहतीस आळा घालण्यांत यावा, अशी त्यांची मागणी आहे. पॅलेस्टाइन मँडेटची व्यवस्था पहाण्याची जबाबदारी ब्रिटिश सरकारावर आहे, ह्या कारणानें सदरहु प्रश्नाचा समाधानकारक निकाल लावण्याची त्या सरकारनें खटपट करणें आवश्यक झालें आहे. पॅलेस्टाइन हें लष्करी दृष्टीनें महत्त्वाचें केंद्र असल्यानें ब्रिटिश सरकारास ह्या प्रश्नाचा योग्य तऱ्हेनें निकाल लावणें अपरिहार्य होणार आहे. अरब लोक हे मागसलेले आहेत, पॅलेस्टाइनची प्रगति ज्यू लोकांनींच घडवून आणली आहे व भांडवलाचा पुरवठा त्यांनींच केला आहे, असें ज्यू लोकांतर्फे म्हणतां येईल. नवीन कारखान्यांची स्थापना व शेतीमध्यें सुधारणा हें ज्यू लोकांच्या भांडवलामुळें व त्यांची बुद्धी आणि कल्पकता ह्यांमुळेंच शक्य झालें आहे, ह्यांत संशय नाहीं. पॅलेस्टाइनमध्यें अजून पुष्कळ वस्तीस वाव आहे, परंतु अरबांस ज्यू लोकांचा वरचष्मा नको आहे. इटलीनें अरबांच्या मागणीस सहानुभूति दर्शविल्यामुळें त्यांस प्रोत्साहन मिळालें आहे. ज्यू लोकांविरुद्ध अरबांनीं चालविलेल्या चळवळीचें बंडाळींत रूपांतर झालें असून अजून शांतता स्थापन होण्याचें चिन्ह दिसत नाहीं. अरब व ज्यू ह्यांच्या न्याय्य हक्कांसंबंधीं समाधानकारक निकाल देऊन तो अमलांत आणण्याची जबाबदारी अर्थातच ब्रिटिश सरकारावर पडणार. ज्यू लोकांच्या पॅलेस्टाइनमधील वसतीस प्रतिबंध होणार नाहीं असें अभिवचन राष्ट्रसंघाकडून त्यास मार्गेच मिळालेलें असल्यानें त्यांनीं आतां माघार कां घ्यावी ? उलट, अरबांनीं ज्यू लोकांच्या आक्रमणास तोंड देण्यासाठीं उपाययोजना कोणती करावी ? पॅलेस्टाइन ह्या एकाच देशाचे आपण घटक आहोंत ह्या दृष्टीनें प्रेरित होऊन एकमेकांस सहाय करण्याची उच्च भावना दोन्ही लोकांत प्रसृत झाल्याखेरीज ज्यू लोकांसंबंधीं अरबांस वाटणारा तिटकारा नाहींसा होणार नाहीं. परंतु, भांडवलवाल्या ज्यू लोकांपुढें अरबांचा टिकाव लागणें कठिण जाईल, हेंहि तितकेंच खरें आहे. ज्यू-अरब भांडणांत शक्य तोंवर न पडण्याचा पण ज्यू लोकांस दिलेलीं अभिवचनें पाळण्याचा ब्रिटिशांचा बेत दिसतो. नुकत्याच नेमलेल्या कमिशनचें काम शांतता प्रस्थापित झाल्याखेरीज सुरू होणार नाहीं, असें जाहीर झालें आहे, ह्यावरून सदरहु धोरणावर बराच प्रकाश पडला आहे.

## स्फुट विचार

### शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांची राष्ट्रीय मालकी

राष्ट्रांस युद्धास चिथावणी देऊन आपल्या मालाच्या खपावर गबर होण्यांत शस्त्रास्त्रें बनवणाऱ्या धंदेवाल्यांचा फायदा आहे, सबब असल्या कारखान्यांचें नियंत्रण करण्याच्या हेतूनें ते राष्ट्रीय मालकीचे करावे अशी सूचना अनेकवार करण्यांत आली आहे. युद्धें झालीं तरच तोफा, बंदुका व दारूगोळा मोठ्या प्रमाणावर खपणार आणि तो माल बनवणाऱ्या कारखान्यांस नफा होणार. तेव्हां नाशकारक युद्धाचें एक मोठें मूळच उपटून टाकावें हा उद्देश, शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांची मालकी व व्यवस्था राष्ट्रीय सरकारांच्या हातीं यावी ह्या सूचनेमध्यें आहे, हें उघड आहे. फ्रेंच कायदेमंडळाच्या प्रमुख सभेंत ह्यासंबंधांत कायद्याचा एक मसुदा मंजूर झाला आहे व त्यास तेथें प्रचंड बहुमताचें पाठबळ मिळालें आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें लोकमतप्रदर्शनापलीकडे अजून प्रगति झाली नसली तरी फ्रान्सच्या उदाहरणानें ब्रिटनमधल्या शस्त्रास्त्रांच्या धंद्याचें राष्ट्रीयकरण होण्याविषयींच्या चळवळीस उत्तेजन मिळण्यासारखें आहे. खाजगी मालकीच्या लढाऊ मालाच्या कारखान्यांत तयार होणारी युद्धसामुग्री सरकारनें विकत घेण्याची प्रचलित पद्धति बदलण्यांत राष्ट्रीय सुरक्षिततेस धोका आहे, अशा मताचे कित्येक लोक इंग्लंडमध्यें आहेत, त्यांस फ्रेंच कायदेमंडळाच्या नवीन धोरणानें उत्तर मिळणार आहे. स्वतःचें असंदिग्ध संरक्षणक्षमत्व हा तर फ्रेंचांच्या परराष्ट्रीय धोरणाचा आत्मा आहे. त्या लोकांस युद्धसामुग्रीचें राष्ट्रीयकरण बिनधोक्याचें वाटतें, तर इतर राष्ट्रांसच तसें करणें भीतिदायक कां वाटावें ? आपण इतर देशांस स्वतःच्या उदाहरणानें नवीन मार्ग दाखवून दिला आहे असें फ्रेंच मुत्सद्दी म्हणत आहेत. त्याचा परिणाम ब्रिटिश राष्ट्राच्या धोरणावर कितीसा होतो तें पहावें.

### जागतिक शांतता व युद्धाची तयारी

युरोपांत शांततेची स्थापना होण्यासाठीं करारमदार करण्याबाबत प्रमुख राष्ट्रांमध्यें वाटाघाटी चालू असतां जणूं काय आज नाहीं उद्यां युद्ध होणार ह्या कल्पनेनें त्यांची शस्त्रास्त्रांच्या पुरवठ्याची तयारी मात्र बंद पडलेली नाहीं. स्पेनमधल्या अंतःकलहाच्या व बंडाळीच्या ज्वाला बाहेर पसरूं नयेत म्हणून इतर राष्ट्रांनीं एकमतानें वेळींच खबरदारी घेतली आहे ही एक समाधानाची गोष्ट आहे. ग्रेटब्रिटन व इजिप्त ह्यांच्या परस्पर राजकीय संबंधांत बांधा पडला होता तो दूर होण्याच्या मार्गांत आहे अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे, तीहि समाधानकारक आहे. पॅलेस्टाइनमध्यें अरब व ज्यू ह्यांचेमधील वितुष्टाचें भिजत घोंगडें पडलें आहे, त्याचें निराकरण अजून व्हावयाचें आहे. त्याशिवाय, खुद्द युरोपांत आंतरराष्ट्रीय दिलजमाईच्या मार्गांत वारंवार विघ्नें येत आहेत, तीं काळजी उत्पन्न करणारीं आहेत. आपल्या नागरिकांस द्यावयाच्या लष्करी शिक्षणाच्या लायकीची किमान वयोमर्यादा रशियानें २१ वर्षांच्या ऐवजीं १९ केली आहे, ह्या कारणानें त्या राष्ट्राचा बेत सैनिकांची संख्या वाढवून युद्धाची जारीनें तयारी करण्याचा आहे असें इतर राष्ट्रांस वाटत आहे. फौजा, आरमारें व लढाऊ विमानें ह्यांस कात्री लागण्याच्या ऐवजीं त्यांचा सर्वत्र विस्तार होत असल्याचें दिसतें हें चिन्ह बरें नाहीं. फ्रेंच सरकारची सांपत्तिक स्थिति अत्यंत बिकट असतांहि लढाऊ विमानांची

तरतूद मोठ्या प्रमाणावर करण्याचें त्यानें ठरविलें आहे आणि त्या प्रीत्यर्थ करावयाच्या खर्चास कायदेमंडळाची मंजूरीहि मिळवली आहे. जर्मनीपाशीं अडीच हजार विमानें जय्यत तयार आहेत आणि दरवर्षी एक हजार ह्या प्रमाणें लढाऊ विमानांची पंचवार्षिक योजना फ्रान्सनें आखली आहे व ह्या कामीं प्रतिवर्षी दहा कोटि रुपये खर्च व्हावयाचे आहेत ! भावी युद्धाच्या तयारीविषयींची ही युरोपिअन राष्ट्रांची एकमेकांची स्पर्धा कधीं थांबणार ? जागतिक शांततेचीं बोलणीं व युद्धाची तयारी ह्या गोष्टी परस्परविसंगत नाहींत काय ?

---

## आंतरराष्ट्रीय व्यापाराचें नवें वळण

आयात व निर्गत व्यापारांत निघणाऱ्या हुंड्यांच्या द्वारें बँकांच्या मार्फत देण्या-घेण्याची वजावाट होण्याची पद्धति अलीकडे बदलली असल्याची व तिला राष्ट्रीय सरकारें नवीन वळण लावण्याचा प्रयत्न करीत असल्याची माहिती आम्हीं दुसरीकडे दिली आहे. ह्या उपक्रमाचें एक उदाहरण जर्मनी व तुर्कस्तान ह्यांचे दरम्यान होणाऱ्या व्यापाराचें देतां येईल आणि ऑटोमान बँकेचे अध्यक्ष, सर हर्बर्ट लॉरेन्स, ह्यांनीं सदरहु संस्थेच्या वार्षिक सभेंतल्या आपल्या भाषणांत त्याचा प्रामुख्यानें उल्लेख केला म्हणून त्यास एक प्रकारचें विशेष महत्त्व आहे. आयात मालाच्या किंमतीची फेड निर्गत मालाच्या किंमतींतूनच होण्याची शर्त नवीन वळणाच्या व्यापारी करारांत असते, ह्या कारणानें दोन देशांमध्यें होणाऱ्या देवघेवीस ठराविक दिशा लागते व तिच्यांत मामुली मोकळेपणा रहात नाहीं. तुर्कस्तानमधून बाहेर जाणाऱ्या मालांतला ४० टक्के माल जर्मनी जादा किंमती देऊन आपल्याकडे आकर्षत असून त्या देण्याची भरपाई स्वतःचा पक्का माल तुर्की व्यापाऱ्यांच्या गळ्यांत बांधून करीत आहे अशी प्रस्तुत प्रकरणीं तक्रार आहे. ह्यामुळें इंग्लंड व फ्रान्स ह्या देशांत होणारी तुर्की निर्गत कमी झाली आहे व त्या देशांचें देणें देण्यास तुर्कस्तानला अडचण भासत आहे अशी सर हर्बर्ट लॅरेन्स यांची तक्रार आहे. फ्रान्स व इंग्लंड ह्यांचेकडून येणें पुरेसें नाहीं, मग त्या देशांचें मामुली देणें तुर्कस्ताननें कसें भागवावें ही अडचण उपस्थित झाली असतां तिला तोड काढण्यांत आली आहे, ती अशी. तुर्कस्तानचा फ्रान्सशी असा करार झाला आहे कीं, परराष्ट्रीय देण्याघेण्याची घडी नीट बसेपर्यंत तुर्कस्तानानें आपलें देणें पन्नास टक्क्यांपुरतेंच रोखीनें भागवावें व बाकीच्या पन्नास टक्क्यांबाबत फ्रान्सनें दगडी कोळसा वगैरे जातींचा तुर्की माल घ्यावा आणि त्याचे येणारे पैसे घेणेदारांस वांटून द्यावे. कर्जदार राष्ट्रांस परकीय देशांतल्या धनकोंस द्यावयाचा पैसा मालाच्या स्वरूपांतच देतां येणार, हें उघड आहे, आणि ह्या मालास मज्जाव झाल्यास घेणेदारांस कांहींच मिळावयाचें नाहीं. फ्रेंच सरकारनें तुर्की मालाच्या आयातीस मान्यता देऊन आपल्या नागरिकांस तुर्कस्तानाकडून यावयाच्या कर्जाची व व्याजाची फेड करून घेण्याचा मार्ग मोकळा करून दिला आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

---

## सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारांचा पश्चिम खानदेशांतील दौरा

( एका बातमीदाराकडून )

सहकारी खात्याचे रजिस्ट्रार, श्री. के. एल. पंजाबी, यांनीं पश्चिम खानदेशांत दौरा काढला असून ता. १२-८-३६ रोजीं साक्री तालुक्यांतील स्थानिक सहकारी संस्थांस त्यांनीं भेट दिली. मंदीच्या तडाक्यांत सांपडून दुःस्थितीस पोहोंचलेल्या सोसायट्यांची संकटांतून सुटका करण्यासाठी त्यांनीं रिबेट पद्धतीची योजना अमलात आणून बरीच सुधारणा केली आहे. त्या योगानें दुर्दैवाचे फेऱ्यांत सापडलेल्या अनेक शेतकऱ्यांस सहाय मिळालें आहे.

रजिस्ट्रार साहेबांचें सहानुभूतीचें धोरण चालू दौऱ्यांत पुन्हां दिसून आलें आहे. सध्या तरी निदान दुष्काळाचीं चिन्हें साक्री तालुक्यांत दिसत असल्यामुळें शेतकऱ्यांचे व जनावरांचे प्राण वांचविण्यासाठी सहकारी संस्थांना काय करतां येईल यासंबंधीं रजिस्ट्रार साहेबांबरोबर वाटाघाट करण्यांत आली, त्या वेळीं सुमारें १५० मंडळी हजर होती. अशा तऱ्हेच्या योजना सहकारी पुढाऱ्यांनीं तयार केल्यास त्यांचा योग्य विचार करण्याबद्दल रजिस्ट्रार साहेबांनीं आश्वासन दिलें. रजिस्ट्रार साहेबांचा ह्यापुढील दौरा शिरपूर, पारोळा, एरंडोल, अमळनेर, जळगांव वगैरे भागांत होणार आहे.

---

## मध्यभागांतील सहकारी अर्बन बँकांची यूनिअन

सोलापूर, नगर, सातारा व पुणें ह्या चार जिल्ह्यांतील सहकारी अर्बन बँकांची परिषद् नुकतीच साताऱ्यास भरली. तीमध्यें सदरहु विभागांतील अर्बन बँका व सोसायट्या ह्यांचा एक संघ ( यूनियन ) स्थापन व्हावा असें ठरून त्याबाबतची सर्व व्यवस्था करण्याचा अधिकार खालील गृहस्थांच्या कमिटीस देण्यांत आलाः—

( १ ) प्रो. काळे ( अध्यक्ष ), ( २ ) श्री. फिरोदिया, नगर, ( ३ ) श्री. कुंभकोणी, सोलापूर, ( ४ ) श्री. सुरनीस, पंढरपूर, ( ५ ) रा. सा. बारटक्के, सातारा, ( ६ ) श्री. देशपांडे, कऱ्हाड, ( ७ ) श्री. जोशी, कऱ्हाड व ( ८ ) श्री. क्षीरसागर, (चिटणीस ), पुणें.

चालू महिन्याचे अखेरीस मुंबई येथें सेंट्रल व अर्बन बँकांची परिषद् भरावयाची आहे, त्या प्रसंगाची संधि साधून वरील कमिटीची सभा ता. ३० ऑगष्ट रोजीं भरवावी अशी सूचना आमचेकडे आली आहे, ती विचार करण्यासारखी आहे. रविवार ता. ३० रोजीं सकाळीं किंवा मुख्य परिषदेच्या नियोजित वेळेच्या अगोदर एक तासभर कमिटीची चर्चा होणें सोइस्कर पडेल असें वाटतें. कमिटीच्या सभासदांशिवाय इतर गृहस्थांस हजर राहून सूचना वगैरे करावयाच्या असतील तर तसेंहि करतां येणें शक्य आहे. मुंबईस ता. २९ ला एकत्र जमल्यानंतर कमिटीच्या सभेविषयीं तपशील ठरवतां येईल. तरी ह्या बाबतींत अर्बन बँका व सोसायट्या ह्यांनीं मन घालून आपलें म्हणणें कमिटीचे अध्यक्ष अगर श्री. क्षीरसागर, पूना मर्चंट्स कोऑपरेटिव्ह बँक, ह्यांस कळवल्यास बरें होईल.

---

## दैव आणि यत्न

" यशाला सुदैव हें जरूरच आहे. पण त्याची वाट पहात बसल्यानें सुदैव कोणाकडे चालून येत नाहीं. आपण स्वतः हिंडून तें शुंडून काढावें लागतें. "

---

# पैशाचा बाजार

## लंडनचा रोखेबाजार

लंडनच्या रोखेबाजाराचें नियंत्रण करणारी संस्था आहे तिला गेल्या मार्च अखेर पुऱ्या झालेल्या बारा महिन्यांत सुमारें ४० लक्ष रुपये नफा झाला आणि तिच्या ३६ पौंड किंमतीच्या प्रत्येक भागावर १४ पौंड डिव्हिडंड पडलें. ह्या संस्थेच्या पटावर व्यवहार होण्यास पात्र असे रोखे व भाग अधिकृत मानण्यांत आले आहेत, त्यांची एकूण दर्शनी किंमत सुमारें २४,७०० कोटि रुपये भरेल. ज्या भागांस अधिकृत असल्याची मंजूरी नाहीं अशांची किंमत सुमारें १३,३५० कोटि रुपये होईल. वरील चोवीस हजार कोटि रुपयांपैकीं सुमारें ८,७०० कोटि रुपये सरकारी कर्जरोख्यांत गुंतलेले आहेत, सुमारें २९० कोटि ब्रिटिश मंडळ्यांस कर्जाऊ देण्यांत आले आहेत व सुमारें १,१८० कोटि ब्रिटिश डोमिनिअन्स आणि वसाहती ह्यांमधील कर्जांत घातले आहेत. रोखे बाजारांत सरकारी रोख्यांचें महत्त्व किती आहे हें वरील आकड्यांवरून दिसून येईल. लढाऊ सामानाच्या उत्पादनास सध्या चलती असली तरी त्याचा ह्या बाजारावर एकंदरीनें विशेष परिणाम होत नाहीं, ह्याचें कारण त्यांतील धंद्यांचें भांडवल, तुलनात्मक दृष्टीनें पाहिलें असतां फारसें नाहीं. रोखे बाजाराच्या अधिकृत पटावर असलेल्या, पोलाद–लोखंडाच्या कंपन्यांचे भाग दर्शनी किंमतींत सुमारें ५१० कोटि रुपये इतकेच भरतील आणि तेलाच्या खाणींच्या मंडळ्यांबाबतचा आकडा फक्त १९० कोटि रुपये एवढा आहे. जनतेचा मोकळा पैसा गुंतवण्याचें रोखे बाजार हें केवढें मोठें साधन आहे हें, गेल्या सालीं तेथें व्यवहार होण्याची परवानगी मिळण्याविषयीं अर्ज आले त्यांत एकूण एक हजार कोटि रुपये दर्शनी किमतीचे भाग व इतर ऋणलेख दाखल झाले होते, ह्यावरून दिसून येईल.

---

## अमेरिकेंत गुंतलेलें परराष्ट्रीय भांडवल

अमेरिकेंत लांब मुदतीचे सरकारी व बिनसरकारी कर्जरोखे, डिबेंचर्स, कंपन्यांचे भाग वगैरे ऋणलेखांत परराष्ट्रीय नागरिकांचा पैसा गुंतला आहे, त्याची एकूण रकम १,२५० कोटि रुपयांच्या आसपास असावी असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या रकमेपैकीं २७ टक्के म्हणजे सुमारें ३३५ कोटि रुपये रकम ब्रिटिश मालकीची आहे. कनेडिअन नागरिकांचे २५० कोटि रुपये वरील प्रमाणें गुंतले आहेत व त्याच्या खाली हॉलंड व स्वित्सर्लंड ह्यांची प्रत लागते. फ्रान्सचे पुरे ७० कोटि रुपयेहि अशा रीतीनें अमेरिकेंत गुंतलेले नाहींत. अमेरिकेच्या बाहेरच्या लोकांचे अल्प मुदतीनें सुमारें ३०० कोटि रुपये त्या देशांत गुंतलेले आहेत, त्या रकमेचा अंतर्भाव वर निर्दिष्ट केलेल्या १,२५० कोटींच्या बेरजेंत केलेला नाहीं. हुंडणावळीच्या अडचणींमुळें ब्रिटिश भांडवल अमेरिकेंत जाणें श्रेयस्कर नाहीं असें दिसून आल्यावरून तसें होऊं देण्याविरुद्ध लोकांस सल्ला देणें जरूर वाटलें असल्याचें एका लेखकानें ध्वनित केलें आहे. ब्रिटिश 'चलन' व हुंडणावळ ह्यांचें स्थैर्य कायम ठेवण्याची जबाबदारी ज्यांचेवर आहे त्यांचें असा सल्ला देणें हें काम आहे आणि तो ऐकण्याचें नागरिकांचें कर्तव्य आहे, हें उघड आहे.

---

## बँक ऑफ फ्रान्सची पुनर्घटना

फ्रान्समध्यें समाजसत्तावादी प्रधानमंडळ अधिकारारूढ झालें आहे आणि बँक ऑफ फ्रान्सची पुनर्घटना ही त्याच्या कार्यक्रमांतली एक महत्त्वाची बाब असल्यानें ही मध्यवर्ती राष्ट्रीय बँक राज्यकारभाराचें एक खातेंच बनते कीं काय असें वाटत होतें. फ्रेंच बँकिंगचा धंदा मूठभर श्रीमान लोकांच्या हातीं असल्यानें सरकार व जनता ह्यांस त्याचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं आणि ही पैसेवाली मंडळी लोकशाहीस आवश्यक वाटत असलेल्या सुधारणांच्या मार्गांत व्यत्यय उत्पन्न करते, अशी फ्रान्समध्यें तक्रार होती. राष्ट्रीय मध्यवर्ती बँक सामान्य जनतेच्या हुकमतीखालीं आणण्याच्या धोरणाची अंमलबजावणी समाजसत्तावादी प्रधान मंडळानें नुकतीच केली आहे. ती करतांना आपण जबाबदारीच्या जाणीवेनें वागत असून भरमसाट फेरबदल घडवून आणीत नाहीं ही गोष्ट मंडळानें सिद्ध केली आहे. बँक ऑफ फ्रान्स ही भागीदारांची संस्था असली तरी तिच्यामध्यें दोनशे श्रीमान कुटुंबांचें वर्चस्व प्रस्थापित झालें होतें. आतां नवीन घटनेस अनुसरून चाळीस हजार भागीदारांस मतदानाचा हक्क प्राप्त झाला आहे. त्याचप्रमाणें बँकेंत कारभाराचें नियंत्रण करणारांचें मंडळ आहे, त्यांत शेती, व्यापार, उद्योगधंदे व सरकार ह्या सर्वांच्या प्रतिनिधींचा अंतर्भाव करण्यांत आला असल्यानें लोकसत्तेची छाप बँकेच्या व्यवस्थेवर पडण्याची तरतूद झाली आहे. बँकेचे गव्हर्नर व व्हाइस गव्हर्नर ह्यांसारख्या प्रमुख अधिकाऱ्यांचे पगार व पेन्शनें निश्चित केलीं गेल्यानें त्यांच्या कारभारांत स्वतंत्र बुद्धि व सातत्य ह्यांबाबत स्थैर्य उत्पन्न झालें आहे. चलन, हुंडणावळ व राष्ट्रीय कर्ज ह्यांचे संबंधांत घडवून आणावयाच्या सुधारणांचा मार्ग मोकळा झाला असें आतां फ्रेंच प्रधानमंडळास वाटत आहे. एका बाजूस प्रधानमंडळ आणि विरुद्ध बाजूस राष्ट्रीय मध्यवर्ती बँक असा प्रकार ह्यापुढें न होतां पैशाबाबतचा आपला कार्यक्रम अंमलांत आणण्यास लागणाऱ्या सवलती फ्रेंच सरकारास मिळण्याची व्यवस्था झाली आहे; आणि ही सर्व सुधारणा कायदेमंडळाच्या मंजुरीनेंच झाली आहे.

---

## हिंदी बँकांची परिस्थिति

हिंदुस्थानच्या रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या बँकांत चालू महिन्याच्या पहिल्या आठवड्याच्या अखेर बिन मुदतीच्या व मुदतीच्या एकूण ठेवी अनुक्रमेंकरून १२९ कोटि, ९५ लक्ष आणि १०० कोटि, ७६ लक्ष रु. अशा होत्या. त्यांची रिझर्व्ह बँकेंत ठेवावयाची बिन-व्याजी शिल्लक एकूण ३२ कोटि, ८१ लक्ष रु. होती. त्यांनीं हिंदुस्थानांत एकंदर ८८ कोटि, ९९ लक्ष रु. कर्जाऊ दिले होते आणि फक्त २ कोटि, ७७ लक्ष रुपयांच्या हुंड्यांत पैसे गुंतवले होते.

---

## मुंबईचा रोखे बाजार

गेल्या आठवड्यांत मुंबईच्या रोखे बाजारांत विशेष हालचाल झाली नाहीं. साडेतीन टक्क्यांचा सरकारी रोखा ९९ रु. ८ आण्यांच्या आसपास घुटमळत राहिला. लंडनमध्यें सोन्याचे भाव उतरल्यामुळें तीच प्रवृत्ति इकडील बाजारांत दिसून आली व तोळ्यास ३४$\frac{3}{4}$ रु. हा दर टिकून राहिला. चांदीच्या बाजारांत फारसा जीव नव्हता आणि तिचा भाव १०० तोळ्यांस ४८ रु. १२ आणे ह्याप्रमाणें होता.

---

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि.

ह्या बँकेचा, ३० जून १९३६ रोजीं पुऱ्या होणाऱ्या १९ व्या वर्षाचा अहवाल व ताळेबंद आमच्याकडे आला आहे. जिल्ह्याच्या ह्या मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विशिष्ट जबाबदारीच्या स्थानाचा उल्लेख आम्हीं गेल्या वर्षीं अहवालावर अभिप्राय देतांना केलेलाच आहे. सदरहु जबाबदारीच्या दृष्टीनें पहातां पुणें सेंट्रल बँकेची प्रगति व्यवस्थित रीतीनें होत आहे, असें अहवालावरून स्पष्ट दिसतें. जनतेचा बँकेवरील विश्वास अजमावण्याचें प्रमुख साधन तिच्याकडे येणाऱ्या ठेवी, हें आहे. ठेवींवरील व्याजाचे दर कमी करणें, नवीन खातीं उघडण्याचें बंद करणें, वगैरे सर्व प्रयत्न करूनहि पुणें सेंट्रल बँकेस ठेवींचा ओघ हटवणें शक्य झालें नाहीं. ह्या रकमा किफायतशीरपणें गुंतविण्याचे प्रयत्न सहकारी खात्याच्या संमतीनें चालू आहेत. सोन्या–चांदीच्या तारणावरील कर्जांच्या व्यवहारास सुरवात झाली आहे. व्यक्तिशः सभासदांना मालाचे तारणावर कर्जें देण्याची व्यवस्थाहि लवकरच अंमलांत येईल. स्थावर मिळकत, जामिनकी, पत, कांहीं विशिष्ट भाग, डिबेंचर्स, वगैरेंच्या तारणांवर कर्ज देण्यासंबंधाचे नियम बहुतेक तयार झाले आहेत व पुढील सालीं या व्यवहारांत बरीच मोठी रकम गुंतेल, अशी अपेक्षा आहे.

अहवालाचे सालीं बँकेकडील ठेवींत सात लाखांची वाढ झाली असून एकूण खेळतें भांडवल ५१½ लक्ष रुपये झालें आहे. ह्या रकमेपैकीं ९¼ लक्ष रुपये शेतकी सोसायट्यांस दिलेले असून ३¼ लक्ष रुपये इतर सोसायट्यांत गुंतलेले आहेत. ३६ लक्ष रुपये सरकारी व इतर रोख्यांत व इतर बँकांतल्या ठेवींत गुंतले असून १¼ लक्ष रुपयांचे व्यक्तिशः सभासदांना ओव्हरड्राफ्ट देण्यांत आलेले आहेत. संस्थेची इमारत व मालमत्ता ह्यांची किंमत सुमारें १¼ लक्ष रुपये भरेल.

बँकेजवळील सरकारी रोख्यांची बाजारभावानें होणारी किंमत त्यांस प्रत्यक्ष पडलेल्या किंमतीपेक्षां ४६ हजारांनीं ज्यास्त आहे, पण हा वाढावा हिशेबांत घेतलेला नाहीं. गंगाजळी व इतर फंड ह्यांची बँकेनें समाधानकारक तरतूद केलेली आहे. सुरक्षितपणास बाध येऊं न देतां कर्जदारांस शक्य त्या सवलती देण्याचें धोरण बँकेनें ठेवलें आहे. सालमजकुरी बँकेच्या इमारतीवर मजला चढविण्याचें काम पुरें झालें व त्यामुळें कामाची सोय होऊन भाड्याचें जादा उत्पन्नहि येऊं लागलें आहे. वर्षअखेर बँकेस २१¼ हजार रुपये नफा झाला, त्यांतून ७¾ हजार रुपये गंगाजळींत व १½ हजार रुपये बुडीत व संशयित कर्जफंडांत टाकावेत व भागीदारांस ६ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यासाठी १९½ हजारांचा विनियोग करावा, अशी बँकेच्या बोर्डानें शिफारस केली आहे. ठेवीच्या मार्गानें जमा होणाऱ्या पैशास किफायतशीरपणें गुंतविण्याचे नवे मार्ग बँकेस लवकरच खुले होणार आहेत. त्या योगानें ठेवीच्या पैशापैकीं आणखी कांहीं रकम फायदेशीर रीतीनें गुंतवतां येणार आहे. सध्याच्या मंदीच्या परिस्थितीचा विचार करतां बँकेनें आपला कारभार काळजीनें व दूरदृष्टि ठेवून चालविला आहे, ह्यांत शंका नाहीं.

### वार्षिक सभा

३० ऑगस्ट, ५ वाजतां, वाई अर्बन को. बँक, वाई.
" " चतुःशृंगी को. के. सोसायटी, पुणें.
६ सप्टेंबर, १२॥ वाजतां, पुणें सें. को. बँक, पुणें.
१४ सप्टेंबर, ३ वाजतां, को. पीपल्स बँक, लिंब.
२७ सप्टेंबर, २ वाजतां, कॉसमॉस को. अ. बँक, पुणें.

## बडोदें संस्थानांतील सहकारी चळवळ

वाईट सोसायट्या रद्द करून चांगल्या सोसायट्यांस सुदृढ करण्याचें धोरण बडोदें राज्यांतील सहकारी खात्यानें १९३४-३५ सालीं अंमलांत आणलें. त्यामुळें सोसायट्यांची संख्या घटली, परंतु सभासदांची संख्या मात्र वाढून ती ४५¾ हजारांवरून ४९ हजारांवर गेली. सोसायट्यांचें खेळतें भांडवलहि ६ लाखांनीं वाढून तें ८०½ लाख झालें. सहकारी खात्यानें चांगल्या दर्जाचें बीं व नवीन तऱ्हेचीं पिकें ह्यांचा प्रसार करण्याची खटपट केली. एकाच मालकीच्या पण ठिकठिकाणीं पसरलेल्या शेतांच्या तुकड्यांचें एकत्रीकरण करण्याचाहि यत्न चालु होता. गेलीं सात–आठ वर्षें थकबाकीचें प्रमाण वाढत आलें आहे, ह्या अनिष्ट गोष्टीचे दुष्परिणाम सोसायट्यांच्या सभासदांचे नजरेस आणले पाहिजेत असा सहकारी खात्याच्या अहवालावर बडोदे सरकारचा अभिप्राय आहे. कित्येक नॉन-क्रेडिट सोसायट्या इतर क्रेडिट व नॉन–क्रेडिट सोसायट्यांकडून रकमा कर्जाऊ घेतात, ही पद्धत घातुक असून त्यामुळें थकबाकी वाढण्याच्या प्रवृत्तीस सहाय होईल, अशी भीति सरकारी ठरावांत व्यक्त करण्यांत आली आहे.


फक्त पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकेच्या सभासदांकरितां

**नोटीस**

या बँकेची एकोणिसावी वार्षिक साधारण सभा रविवार, तारीख ६ सप्टेंबर, १९३६, रोजीं दुपारीं साडेबारा वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे असेंब्ली हॉलमध्यें भरून तींत सन १९३५–३६ सालचा अहवाल, ताळेबंद व नफावाटणी मंजूर करणें, सरकारी व बँकेनें नेमलेल्या हिशेब तपासनीसांच्या तपासणी यादींचा विचार करणें, पुढील सालाकरितां बँकेचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, डायरेक्टर्स, व ऑडिटर निवडणें, बँकेचे पोटनियम व डायरेक्टर यांच्या निवडणुकीचे नियमांतील दुरुस्त्यांचा विचार करणें, वगैरे कामें करण्यांत येतील. तरी सदर सभेस बँकेच्या सर्व सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंती आहे. डायरेक्टरांच्या निवडणुकीकरितां मतें देण्याची वेळ तारीख ६ सप्टेंबर, १९३६, रोजीं सकाळीं ८ ते १० व दुपारीं ३ ते ५ अशी ठरविली आहे.

बोर्डाचे हुकुमावरून,
द. वि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर,

**N. M. V. HIGH SCHOOL, POONA.**

The Preliminary Examination is compulsory for all students to be sent up by this school for the October Matriculation Examination. The Examination will be held from 1-9-36 to 5-9-36. Results with detailed marks will be declared on 10-9-36. A Revision class for all sent-up students will be held from 15-9-36 to 30-9-36. Only the prescribed fee of Rs. 5/- will be charged. Enrolment from 15th August, 1936.

N. G. Nabalkar,
11-8-36.] Superintendent.

### मुंबई इलाख्यांतील तंबाखूचें पीक

मुंबई इलाखा तंबाखूच्या लागवडीचे दृष्टीनें हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांत अग्रेसर आहे. गेल्या वर्षीं त्यांत एकूण १ लक्ष, ८० हजार एकर जमीन तंबाखूखालीं होती. खालील विभाग (संस्थानें धरून) पिकाचे दृष्टीनें महत्त्वाचे आहेत:—

| | | |
|---|---|---|
| कैरा ( गुजरात ) | ८७¼ | हजार एकर. |
| बेळगांव ( कर्नाटक ) | ६० | ,, ,, |
| कोल्हापूर संस्थान | ४३ | ,, ,, |
| सांगली संस्थान | ६½ | ,, ,, |

बडोदें संस्थानांतहि पुष्कळ तंबाखू पिकते. गेल्या २५ वर्षांत तंबाखूची एकूण लागवड दुप्पट झाली आहे. गुजरातमध्यें धूम्रपानाची संवय मोठ्या प्रमाणावर असल्यामुळें तेथील तंबाखूस विक्रीचें क्षेत्र तयार आहे. कर्नाटकांतहि धूम्रपानाचा प्रसार थोडा नाहीं; उलट, तेथील लोकांस गुजराती लोकांपेक्षां सरासरीनें दुप्पट तंबाखू लागते. स्थानिक खप सोडला असतां, कर्नाटक व गुजरात प्रांत मिळून सुमारें ६० हजार टन तंबाखू विक्रीसाठी बाजारांत येते. इलाख्यांतील इतर सर्व भागांत मिळून ३ हजार टनांपेक्षां ज्यास्त तंबाखू तयार होत नाहीं.

---

### सक्करचें धरण

सिंधू नदास सक्कर येथें धरण बांधलें असून त्यांतून सात कालवे काढण्यांत आले आहेत. ह्या 'लॉइड बराज'च्या योजनेइतकी पाणीपुरवठ्याची मोठी योजना जगांत दुसरीकडे कोठेंहि नाहीं. एकट्या धरणाचे बांधकामास ५ कोटि, ११ लक्ष रुपये खर्च आला व सबंद योजनेस २० कोटि रुपये लागले. सर्व कालव्यांची मिळून लांबी ६,४७३ मैल भरते व त्यांतून काढलेल्या पाटांची लांबी सुमारें ८४ हजार मैल आहे. कालव्यांचें सर्वांत रुंद पात्र तळाशीं ३४६ फूट व त्याची खोली १२ फूट आहे. ग्रेट ब्रिटनमधील टेम्स नदींतून लंडन पुलाखालून जाणाऱ्या पाण्याचे प्रवाहापेक्षां सिंधूच्या एका कालव्याचा प्रवाह मोठा आहे व त्याची रुंदी सुएझच्या कालव्याचे रुंदीपेक्षा दीडपट मोठी भरते. कालव्यांतून काढलेल्या पाटांची सबंद पृथ्वीस दोनदा प्रदक्षिणा होईल, एवढी त्यांची लांबी आहे. सिंधमधील आर्थिक जीवनामध्यें सक्करच्या धरणानें क्रांति घडवून आणली आहे व गहूं, कपास, तांदूळ, इत्यादि पिकांमुळें सिंधमधील वाळवंटाचें सुपीक व उत्पन्नदायी प्रदेशांत रूपांतर होणार आहे.

---

### अमेरिकन कपाशीविषयीं अंदाज

अमेरिकन कपाशीच्या उत्पादनाविषयींच्या अंदाजाचें सर्व जगभर विशेष कुतूहल असतें, कारण त्यावर अनेक देशांतल्या गिरण्या, व्यापारी व शेतकरी ह्यांची कमाई अवलंबून रहाते. परंतु उत्पादनाचा अंदाज नेहमी अनिश्चित असल्यानें बाजारभावांत सारखी अस्थिरता रहाणें अपरिहार्य आहे. यंदाच्या हंगामांत अमेरिकेंत सुमारें सव्वा कोटि गाठी कापूस होईल असा अगदी अलीकडचा अजमास असून जगांतली त्यास येणारी एकूण मागणी त्यापेक्षां थोडी अधिक भरेल अशी कल्पना आहे. ह्या बातमीनें बाजारभाव थोडे चढण्याची प्रवृत्ति बळावेल असा रंग दिसतो.

---


धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०
कडून
हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक
नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

This year 1934-35
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## ग्रंथलेखकांच्या पोटापाण्याचा प्रश्न

पुस्तकें लिहून त्यांवर आपलें पोट भरूं पहाणें ह्यांत कमीपणाचा मुळीच भाग नाहीं. इतर धंदेवाले ज्याप्रमाणें विविध प्रकारांचीं कामें करून उदरनिर्वाहाची व्यवस्था लावतात, त्याचप्रमाणें ग्रंथ निर्माण करून त्या मार्गानें चरितार्थ चालवण्याचा प्रत्येक लायक माणसास हक्क आहे. आपलें ज्ञान, बुद्धि किंवा कल्पनाशक्ति ह्यांचा उपयोग करून जनरंजनाचें काम केल्यास त्याबद्दलचा मोबदला ग्रंथकर्त्यास मिळणें उचित आहे. विशिष्ट धनिक लोकांच्या औदार्यावर अवलंबून रहाण्यापेक्षां लेखनाचा धंदा खुलेपणानें चालवून पोट भरणें हें लेखकांस पसंत पडणें स्वाभाविक आहे. पण मुद्रक, प्रकाशक व वाचक ह्यांच्या तडाख्यांत आपल्या श्रमाचें चीज होऊन योग्य मेहनताना मिळण्याची आपणांस मारामार पडते, अशी लेखकांची तक्रार नेहमी ऐकूं येते. ग्रंथकारांच्या संमेलनांत व असल्याच इतर प्रसंगीं ह्या वस्तुस्थितीची चर्चाहि होते. मुद्रकांच्या छापखान्यांचा चालू खर्च भागला पाहिजे, प्रकाशकांस पुस्तकांच्या विक्रीपासून किफायत झाली पाहिजे आणि वाचकांस शक्य झाल्यास फुकट किंवा अल्प खर्चांत इच्छित ग्रंथ वाचावयास मिळाले पाहिजेत. ह्या निरनिराळ्या वर्गांच्या आत्महिताच्या रगाड्यांत ग्रंथकर्ते भरडून निघतात.

ह्या तऱ्हेची तक्रार महाराष्ट्रांत किंवा हिंदुस्थानांतच ऐकूं यते असें नाहीं. एका इंग्रजी साप्ताहिकांतल्या लेखकानें इंग्लंडमधील लेखकांचें ह्या बाबतींतलें गाऱ्हाणें वेशीस टांगलें आहे. अलीकडे पुस्तकांची निर्मिति मोठ्या प्रमाणावर होऊन ग्रंथालयें व वाचनालयें ह्यांचा विस्तार मोठा झाला आहे. एखाद्या पुस्तकाच्या पंधराशें प्रती खपल्या असतां आपला खर्च भागतो असें प्रकाशक समजतात. पण लिहिण्याच्या कागदाचा, टायपिंगचा मामुली व किरकोळ खर्च वजा जाऊन लेखकाच्या हातांत चारशें रुपये जेमतेम पडतात. ही रकम मिळण्यास केव्हां, केव्हां, दीड-दोन वर्षेंहि लोटावीं लागतात. ग्रंथकर्त्यांची अशी असमाधानकारक स्थिति असतां इतर वर्गांची सोय मात्र व्यवस्थित होत असते. एका ग्रंथालयांतलें पुस्तक पन्नास लोक वाचतात आणि अशा रीतीनें ते प्रत्येकीं पुरा पाऊण आणाहि लेखकास मेहनताना म्हणून देत नाहींत. पुस्तकांच्या जुन्या प्रतींचे वाचक तर कांहींच झीज सोशीत नाहींत. ग्रंथालयें अत्यंत महत्वाची अशी सामाजिक सेवा करतात ह्यांत वाद नाहीं. पण त्यांचे योगानें ग्रंथकर्त्यांची उपासमार होतें, हें अन्याय्य आहे. ह्या बाबतींत लेखकांच्या वास्तविक हक्कांचें रक्षण होईल व त्यांस आपल्या मेहनतीबद्दल तिचा फायदा घेणाऱ्या जनतेकडून मोबदला मिळेल अशी व्यवस्था होणें अगत्याचें आहे; आणि त्या प्रश्नाकडे कायदेमंडळें व सरकार ह्यांचें लक्ष्य गेलें पाहिजे ह्या आशयाची सूचना वर निर्दिष्ट केलेल्या इंग्लिश पत्रांत करण्यांत आली आहे. पुस्तकें वाचकांच्या हातीं आळीपाळीनें जातील तेव्हां पोस्टाच्या स्टँपासारखें, लेखकांच्या मोबदल्याबद्दलचें तिकिट लावण्याची व्यवस्था व्हावी अशी त्याची योजना आहे. ती कितपत व्यवहार्य आहे आणि ह्या देशांत तिची अंमलबजावणी करतां येईल कीं नाहीं हा प्रश्न वादग्रस्त असला तरी तिच्या मुळाशी असलेली तक्रार विचार करण्यासारखी आहे ह्यांत मतभेद होण्याचा संभव नाहीं. लायक, स्वाभिमानी व स्वतंत्र विचाराच्या ग्रंथकर्त्यांस उत्तेजन मिळून त्यांचे हातून समाजाची शैक्षणिक सेवा घडावी ही महत्त्वाची गोष्ट आहे आणि त्या बाबतींत जरूर ती तरतूद करणें निःसंशय सार्वजनिक हिताचें कार्य आहे.

## आंतरराष्ट्रीय व्यापारपद्धतींत झालेली क्रांति

अलीकडील आंतरराष्ट्रीय हुंडणावळीच्या व व्यापारी देवघेवीच्या गोंधळांत कोणत्या मालाचा व कोणत्या प्रमाणांत ऐनजिनसी विनिमय परस्परांनीं करावयाचा हें ठरवून त्या तत्त्वावर परस्परांमध्यें आयात-निर्गतीचे करार करण्याची प्रवृत्ति राष्ट्रांमध्यें बळावली आहे. आपल्या स्वतःच्या धंद्यांचें संरक्षण करून अत्यावश्यक तेवढाच माल बाहेरून आणावयाचा असें धोरण राष्ट्रांनीं अधिकाधिक स्वीकारल्यानें परिस्थितीस अनुसरून परस्पर सोयीचे असे व्यापारी करार राष्ट्रें करीत आहेत, ही आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंधांत घडून येणारी क्रांति लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. व्यापाऱ्यांनीं ज्यास्त किंमत मिळेल त्या बाजारांत माल विकावा आणि स्वस्त मिळेल त्या ठिकाणीं तो खरेदी करून स्वदेशीं आणावा ही प्रचलित मंदीपूर्वीची मामुली देवघेवीची पद्धति जाऊन तिच्या जागीं राष्ट्रीय सरकारांनीं आयात-निर्गत व्यापाराच्या मर्यादा व तपशील इतर देशांशीं करारमदार करून ठरवून टाकावा, ह्या तऱ्हेचा प्रघात आतां रूढ झाला आहे.

परदेशांतून माल आयात झाला असतां त्याच्या किंमतीची भरपाई कशी करावयाची हा प्रश्न अनेक राष्ट्रांस अवघड झालेला आहे. निर्गत होणाऱ्या मालावर निघावयाच्या हुंड्यांच्या पैशानें आयात मालाबद्दलच्या हुंड्यांचें देणें वजावाटीनें देऊन टाकावयाचें ही गोष्ट, व्यापाराचा ओघ सदरहु पद्धतीस अनुकूल नसल्यानें, शक्य होत नाहीं. ह्या कारणानें, परस्परांच्या देण्याघेण्याची वजावट करून विशिष्ट मर्यादेंत व्यापार चालू ठेवण्याची व्यवस्था व्यापारी करारांच्या मार्गानें करण्याची पद्धति अंमलांत आणणें राष्ट्रांस आवश्यक व सोयीचें झालें आहे. आंतरराष्ट्रीय विनिमयांत सोन्याची आयात-निर्गत करणें अलीकडच्या परिस्थितींत कठीण आहे. म्हणून जणूं काय राष्ट्रीय व्यापाराच्या जमाखर्चीत खात्यावर देणें-घेणें लिहून व्यवहार चाललेला आहे आणि ही सर्व व्यवस्था राष्ट्रांच्या सरकारांमार्फत होत आहे, हें विशेष आहे. चलन व हुंडणावळ ह्यांबाबतची अंतिम जबाबदारी सरकारांवर असल्यानें त्यांचे संबंधांतली घडी नीट बसवून देण्याचें राष्ट्रीय हिताचें कार्य त्यांसच करणें प्राप्त आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापारी संघानें वर वर्णिलेल्या करारांविषयींची माहिती गोळा करून प्रसिद्ध केली आहे, ती बोधप्रद आहे. चोवीस राष्ट्रांनीं एक किंवा अधिक राष्ट्रांशीं ह्या तऱ्हेचे परस्पर-देवघेवीचे करार केले असल्याचें तिच्यावरून समजतें. एकूण करारांची संख्या १३१ आहे. संघानें करारांविषयीं सर्व तपशील दिला आहे. करारांच्या संख्येच्या दृष्टीनें जर्मनीचा पहिला नंबर लागतो आणि त्या राष्ट्रानें ३२ निरनिराळे व्यापारी करार केले असल्याचें दिसून येतें. तुर्कस्तान, रुमानिया, इटली, हंगेरी, ग्रीस, बल्गेरिया व लग्झेंबर्ग हे देश त्याच्या खाली येतात. ग्रेटब्रिटननें स्वतः व्यापारी करार केले आहेत आणि ते जर्मनी, स्पेन, हंगेरी, इटली, रुमानिया तुर्कस्तान व युराग्वे ह्यां देशांशीं आहेत. ह्यांपैकीं स्पेन व इटली ह्या देशांशी झालेल्या करारांतच ऐनजिनशी आयात-निर्गतीच्या विनिमयाची तरतूद आहे व इतर करारांत परस्परांनीं कोणता माल व किती माल घ्यावा-द्यावा ह्याची व्यवस्था निश्चित झालेली आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे बाबतींत एवढ्या विस्तृत रीतीनें झालेला फेरबदल ही गेल्या शतकांतील जागतिक आर्थिक पद्धतींत घडून आलेली एक विलक्षण क्रांतिच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. अर्थशास्त्राच्या प्रमाणभूत सिद्धांतांच्या दृष्टीनेंहि ह्या घडामोडींचें विशेष महत्त्व आहे हें नमूद करणें आवश्यक आहे.

## नागपूर प्रीमियर कोआपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.

वरील सोसायटीची सर्वसाधारण वार्षिक सभा ता. २६ जुलै १९३६ रोजीं श्री. भोंसले, बी. कॉम्., ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. आपल्या प्रास्ताविक भाषणांत अध्यक्ष म्हणाले:— "ता. ३०-६-३६ रोजीं संपणाऱ्या वर्षअखेर सोसायटीनें आपला सर्व खर्च फक्त १,३७९ रुपयांत भागविला, यावरून तिचा कारभार अत्यंत काटकसरीनें परंतु दक्षतेनें चालला आहे हें दिसून येईल. आर्थिक स्थैर्यामुळें सोसायटीजवळ एक लक्ष बावीस हजार रुपयांच्या लांब मुदतीच्या ठेवी कमी दरांत येऊं शकल्या ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे आणि त्यामुळेंच तिनें आपल्या कर्जदारांना व्याजाच्या दरांत सूट देऊन तो आतां दरसाल दर शेकडा ६ पर्यंत उतरविला आहे. एक वर्षांत मुदत संपणाऱ्या ठेवींची रक्कम पन्नास हजारांच्या घरांत जाईल असा अदमास आहे व तत्प्रीत्यर्थ सोसायटीजवळ तीस हजारांचें तरतें तारण आज उभें आहे. अशा तऱ्हेची आर्थिक सुरक्षितता अन्यत्र क्वचितच दिसून येईल. असल्या तऱ्हेचे राखीव संरक्षण कोणत्याहि प्रतिकूल सांपत्तिक परिस्थितीला तोंड देण्यास पुरेसें होईल हें उघड आहे. यामुळें ठेवी ठेवणाऱ्यांच्या मनांत सोसायटीच्या आर्थिक सुस्थितीबद्दल जो आत्मविश्वास उत्पन्न होतो तोच तिच्या भरभराटीला प्रामुख्यानें कारणीभूत होत असतो.

चालू सालीं सोसायटीनें घराच्या कामाप्रीत्यर्थ भागिदारांस सत्तर हजार रुपये कर्जाऊ दिले. अधिक कर्ज देण्याबद्दलची मागणी सारखी वाढतच आहे. पण लोकांनीं शेअर घेऊन व कमी-अधिक मुदतीच्या ठेवी ठेवून संस्थेला कार्यक्षम केल्याशिवाय तिला ही वाढती मागणी पुरी करणें अर्थातच शक्य नाहीं. भागीदारांना शेअरच्या रकमेवरील मुनाफा ( डिव्हिडंड ) शेकडा पांचपेक्षां कमी मिळालेला नाहीं.

सोसायटी दिवसेंदिवस अधिक कार्यक्षम व आर्थिक दृष्ट्या अधिक स्थिर होत आहे हें तिच्या ताळेपत्रकांतील देवघेवींच्या आकड्यांवरून कोणाच्याहि निदर्शनास येईल. उत्तरोत्तर तिची भरभराट होत आहे एवढेंच नाहीं तर प्रतिवर्षीं मागील वर्षापेक्षां तिच्या प्रगतीचें पाऊल पुढें पडून या प्रगतिपरंपरेंत खंड पडणार नाहीं हेंहि विहंगमदृष्टच्या अहवालाकडे अवलोकन करणाऱ्याला दिसून येईल.

वरील तऱ्हेचा अत्यंत आशाजनक भरभराटीचा वार्षिक रिपोर्ट सर्व सभासदांनीं सभेंत मंजूर केला व डिव्हिडंडच्या पांच टक्के दराचा साभार स्वीकार केला. सभेंत पुढील वर्षाकरितां कार्यकारी मंडळाची निवडणूक व इतर किरकोळ कामकाज झालें व सोसायटीच्या कार्यनौकेचें सुकाणूं पुढील वर्षाकरितांहि श्री. भोंसले यांच्याकडेच देऊन सभा बरखास्त झाली.

### पॅलेस्टाइनमध्यें सहकाराची प्रगति

गेल्या वर्षाच्या अखेरीस पॅलेस्टाइनमध्यें ७५० सहकारी संस्था अस्तित्वांत होत्या, त्यांपैकीं ६८४ ज्यू लोकांच्या व ७३ अरबांच्या होत्या. गेल्या तीन वर्षांत ज्यू संस्थांची संख्या तिप्पट झाली असून ज्यू नागरिकांपैकीं निम्मी जनता सहकारी बनली आहे. पॅलेस्टाइनमधील सहकारी संस्थांचें एकूण भांडवल १३ कोटि रुपयांच्यावर आहे व त्यांच्या जवळच्या ठेवींची रकम सुमारें ४ कोटि रुपये आहे. ज्यू लोक इतर देशांत वैयक्तिक फायद्यासाठी धडपडतात असा प्रवाद आहे, पण पॅलेस्टाइनमध्यें त्यांच्या आर्थिक जीविताचें संघटन सहकारी तत्त्वावर झालें आहे !

## गुजरातमधील अर्बन बँकांची यूनिअन

### ३० जून १९३६ अखेरचा नववा वार्षिक अहवाल

गुजरात विभागांतल्या पीपल्स बँक्स व अर्बन क्रेडिट सोसायट्या ह्यांच्या यूनियनमध्यें एकूण १७ बँका व अर्बन क्रेडिट सोसायट्या सामील असून त्यांचें एकूण खेळतें भांडवल ४४ लक्ष, १२ हजार रु. आहे. त्यांतील सुरतच्या एकट्या बँकेचेंच खेळतें भांडवल २३ लाखांहून अधिक आहे.

यूनियनला बँकांनीं व सोसायट्यांनीं द्यावयाची फी त्यांच्या निवळ नफ्याच्या ठराविक प्रमाणावर ( ५ टक्के ) बसविण्यांत आली आहे. ही फी नफ्यावर अवलंबून न ठेवतां, ती खेळत्या भांडवलाच्या विशिष्ट प्रमाणांत घेण्यांत यावी, अशी सूचना यूनियनच्या वार्षिक सभेंत करण्यांत आली. ह्या फीची कमाल मर्यादा ५०० रु. व किमान मर्यादा ५० रु. असावी अशी दुरुस्ती सदरहु सूचनेंत अंतर्भूत आहे. यूनियनकडून आपल्या सभासद बँकांचे व सोसायट्यांचे हिशेब वर्षांतून चार वेळां एका रजिस्टर्ड अकौंटंटमार्फत तपासण्यांत येतात, परंतु त्याचा आकार सरकारी ऑडिट फीच्या निम्माच असतो.

बलसार बँकेची वर्गवारी यूनियनच्या खटपटीमुळें सुधारून तिला 'अ' वर्ग मिळाला. स्वतः युनियनहि 'अ' वर्गांत आहे व तिच्या कामाबद्दल स्पेशल ऑडिटरनें प्रशंसा केली आहे. सभासद-बँकांस द्यावी लागणारी सरकारी ऑडिट फी कमी केली जाईल ह्या अपेक्षेनें स्पेशल ऑडिटरच्या सूचनांनुसार यूनियननें आपलें तपासणीचें काम केलें, परंतु तिच्या आकारांत बदल न झाल्यास यूनियनला आपला खर्च मर्यादित करून सभासद्-बँकांकडून घ्यावयाचा फीचा दर उतरावा लागेल.

अर्बन बँकांच्या तिसऱ्या परिषदेमध्यें बँकांचा पैसा फायदेशीरपणें कसा गुंतवितां येईल, ह्यासंबंधीं विचार करण्याकरितां एक कमिटी नेमण्यांत आली. तिनें, सध्याच्या यूनियनचें एका स्वतंत्र बँकिंग यूनियनमध्यें रूपांतर करण्यांत यावें व त्या यूनियननें देखरेखीचेंहि काम करावें असें सुचविलें. सदरहु यूनियनमध्यें सामील होणाऱ्या बँकांच्या खेळत्या भांडवलाचा कांहीं भाग एका इन्व्हेस्टमेंट ट्रस्टच्या भागांत गुंतविण्यांत यावा व त्याच्यामार्फत रकमा गुंतविल्या जाव्या अशीहि तिनें सूचना केली. कमिटीच्या ठरावानुसार यूनियननें आपल्या कानूंत दुरुस्ती केली व सहकारी खात्याची ह्या योजनेस संमतीहि मिळवली. कोणत्या रोख्यांत पैसे गुंतविले जावे, तेंहि ठरलें; परंतु अखेर कांहीं अनपेक्षित अडचणींमुळें ह्या योजनेस मूर्त स्वरूप देतां आलें नाहीं.

चार बँका यूनियनच्या बँकिंग विभागाच्या सभासद झाल्या आहेत व त्यांच्या भागांवर अहवालाचे सालीं त्यांस ७½ टक्के दरानें डिव्हिडंड मिळालें आहे.

### हिंदी कापडाचें वाढतें उत्पादन

हिंदुस्थानांतील कापडाच्या गिरण्यांचें उत्पादन सारखें वाढत आहे, त्या विषयींचे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत:—

| वर्ष | चौरस वार |
|---|---|
| १९३३–३४ | २९४,४५,००,००० |
| १९३४–३५ | ३३९,७०,००,००० |
| १९३५–३६ | ३५७,००,००,००० |

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—१ |
| ५% . करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०-१२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८—७ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—६ |
| ४% १९६०—७० ... ... | ११४-१४ |
| ४% १९४३ ... ... ... | १११—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९९—८ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०७-११ |
| २¾% १९४८—५२ ... ... | १००-१४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १११—४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १००—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | ११०—४ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षें मुदत) | ११०—० |
| ४% म्हैसर कर्ज ( १९५३—६३ ) ... | १११-१५ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२४-१० |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३४—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १११—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३३-१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५६७—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३६—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १०६—० |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९६—४ |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९४०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १६०—० |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४०—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २५०—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १६४१—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६१५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९६-१२ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६५—४ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८४—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७३१—४ |


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२

अधिकृत भांडवल : : : १०,००,०००

विक्रीस काढलेलें भांडवल : ५,००,०००

### दर शेअरची किं. : रु. ५०

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published any. where and supply it at publisher's price.

## S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी
टेलरिंग फर्म
**पाटसकर आणि कंपनी**
४८ निहाल पेठ, पुणें शहर.
मॅनेजर-व्ही.पी. पाटसकर, D.M.T.O.A. (London.)
सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी
आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.
**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**
च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठी लिहा.
किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

आपणांस विहीर बोअर करावयाची आहे काय ?
**भिडे आणि सन्स्**
स्वतः तयार केलेल्या मशीननें बोअर खणून देतात.
चौकशी कराः—
भिडे आणि सन्स
सांगली ( S. M. C. ) शनीचा पार, पुणें. २

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

**संजीवन हेअर टॉनिक**
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**MARATHE & Co.**
ENGINEERS & IRON FOUNDERS

| WORKS : | | OFFICE : |
|---|---|---|
| Natu Bag, Bhikardas Road, POONA 2 | Can undertake to do any sort of casting. We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act. **Our prices are very competitive.** | 978-79, Sadashiv, POONA 2 |

प्रो. काळे ह्यांचें नवीन पुस्तक
**रिझर्व्ह बँक**
हिंदुस्थानांत राष्ट्रीय मध्यवर्ती बँक ह्या नात्यानें रिझर्व्ह बँकेची स्थापना होऊन त्या संस्थेचें काम चालू झालें आहे. रिझर्व्ह बँकेची घटना, तिच्या कार्याचा व्याप, तिचा इतर बँकांशीं संबंध इत्यादि विषयांची सांगोपांग माहिती ह्या पुस्तकांत दिली असून रिझर्व्ह बँकेच्या कायद्याच्या निरनिराळ्या कलमांची छाननी केलेली आहे. अवघड विषयाचा सुलभ बोध व्हावा म्हणून पुस्तक-कर्त्यानें बँकिंगच्या धंद्यांतले आधुनिक प्रकारचे व्यवहार, त्यांची उपपत्ति व त्यांचें कार्य ह्यांची अत्यंत सोप्या मराठी भाषेंत चर्चा केली आहे आणि देशी व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें कोणत्या योजना अंमलांत आणल्या पाहिजेत ह्या संबंधानें व्यावहारिक सूचना केल्या आहेत. रिझर्व्ह बँक ही, राष्ट्रीय आर्थिक प्रगतीस परिपोषक होईल काय ? ह्या प्रश्नास प्रस्तुत पुस्तकांत उत्तर मिळण्यासारखें आहे.
पृष्ठें १३०-किंमत १ रुपया ( ट. हं. वेगळें )
पुस्तक मिळण्याचीं ठिकाणें:—
( १ ) व्यवस्थापक, "अर्थ" ग्रन्थमाला, पुणें ४.
( २ ) आर्यभूषण प्रेस, पुणें २.
( ३ ) दि को-ऑपरेटर्स बुकडेपो, ९, बेकहौस लेन, फोर्ट, मुंबई.

प्रो. काळे ह्यांचें
'अर्थ' ग्रन्थमालेंतील तिसरें पुस्तक
**व्यापारी उलाढाली**
महाराष्ट्रांत व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांचा उत्कर्ष व्हावा असें प्रत्येकास वाटतें, परंतु ह्या संबंधांत जे व्यवहार चालतात त्यांची माहिती फार थोड्या लोकांस असते. सामान्य जनतेस कमाईतून बचत करण्याची संवय लागून तीमधून निर्माण होणाऱ्या द्रव्यसंग्रहाचा उपयोग, व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या अभिवृद्धीकडे व्हावा, ह्याकरितां औद्योगिक व व्यापारी मंडळ्या ह्यांचे व्यवहार कसे चालतात, बाजारांत निरनिराळ्या प्रकारांच्या उलाढाली कशा होतात, इत्यादि विषयांचें ज्ञान महाराष्ट्रीय समाजांत पसरणें आवश्यक आहे. वृत्तपत्रांमध्यें व ऐकिवांत ह्या संबंधांत ज्या बातम्या येतात, त्यांचें रहस्य ओळखण्याची पात्रता लोकांमध्यें उत्पन्न झाली पाहिजे. हें ज्ञान महाराष्ट्रीय लोकांस सुगम रीतीनें व्हावें, ह्या उद्देशानें प्रस्तुत पुस्तक मुद्दाम लिहिलें आहे आणि त्याचा योग्य उपयोग जनता करून घेईल असा ग्रंथकर्त्यास विश्वास वाटत आहे.
पृ० १४३—किंमत १ रुपया ( ट. हं. वेगळें )
मिळण्याचीं ठिकाणें:—
( १ ) व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रंथमाला, पुणें ४.
( २ ) आर्यभूषण प्रेस, पुणें २.
( ३ ) दि को-ऑपरेटर्स बुक-डेपो, ९ बेकहौस लेन, फोर्ट, मुंबई.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ | पुणें, बुधवार, तारीख २६ ऑगस्ट, १९३६. | अंक ३५

## एशियन पॉलिसी

ASIAN ASSURANCE Co. Ltd.

म्हणजेच

आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयिस्कर योजना.

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत

**धी एशियन अॅशुरन्स कंपनी, लिमिटेड**

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

**WANTED** Arts Graduates & Medical Practitioners to push up Rural Uplift & Medical Relief Movement in furtherance of Insurance Benefit Plans throughout district places in the Presidency. Adequate remuneration to capable workers.

Apply with particulars to :—

Head Office :— 99, LAXMI ROAD, POONA. } General Manager, THE DAWN OF INDIA LIFE INS. Co., LTD.

## वेस्टर्न इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी—सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५

१९३५ मधील नवें काम ५१,३०,०४२ रु.
एकूण चालू काम २,७०,००,००० रु. अधिक
एकूण जिंदगी ७१,७१,०९३ रु.
लाइफ फंड ६०,४२,८७३ रु.

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

## S. B. JOSHI & Co.


ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल.
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं !! आवाज नाहीं !!!

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः—ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः—

१ केळकर ब्रदर्स, बुधवार चौक.

२ म. ई. को. ऑ. एजन्सी, लक्ष्मीरोड.

## विविध माहिती

### आणखी एक प्रचंड आगबोट

" क्वीन मेरी " ह्या नामांकित आगबोटीच्या जोडीस त्याच नमुन्याची दुसरी एक आगबोट बांधण्याचें ग्रेटब्रिटननें ठरविलें असून त्याप्रीत्यर्थ ७ कोटींच्यावर रुपये खर्च व्हावयाचे आहेत.

### पॅरिस शहरांतील लोकवस्ती

पॅरिस शहरांतील लोकसंख्या गेल्या पांच वर्षांत ७१ हजारांनीं कमी झाली असली, तरी त्या शहराच्या उपनगरांत वस्ती वाढली आहे. वहातुकीच्या साधनांत झालेल्या सुधारणेचा हा परिणाम आहे. पॅरिस शहर व त्याचीं उपनगरें ह्यांची लोकसंख्या ६० लाखांवर आहे.

### पोलंडची वसाहतींसाठीं मागणी

दक्षिण अमेरिका व दक्षिण आफ्रिका येथें आपणांस वसाहतींसाठीं मुलूख मिळावा अशी पोलंड देशानें राष्ट्रसंघाकडे मागणी केली आहे. त्या देशाची लोकसंख्या जलद वाढत आहे, परंतु नैसर्गिक संपत्ति पुरवठ्याची नाहीं. इंग्लंड व फ्रान्स ह्या सारख्या देशांनीं वसाहतीसाठीं आपणांस अल्प व्याजानें भांडवल पुरवावें, अशी पोलंडची मागणी आहे व तिला जर्मनी व इटली ह्यांचा पाठिंबा आहे.

### इंग्लंडमधील औद्योगिक चलती

जुलै महिन्यांतल्या ब्रिटिश निर्गत व्यापाराचा आकडा ५३ कोटि रुपये होता. गेल्या सहा वर्षांत एवढा मोठा आकडा प्रथमच प्रसिद्ध झाला आहे.

### ब्रिटिश शेतकऱ्यांची हिंदुस्थानास भेट

हिंदुस्थानांतली परिस्थिति अवलोकन करून व्यापारी स्नेह संबंध दृढ करण्याच्या हेतूनें कित्येक ब्रिटिश शेतकरी चालू वर्षअखेर ह्या देशांत येण्याकरितां निघणार आहेत. राजकारणापासून अलिप्त असलेली ब्रिटिश नॅशल यूनिअन ही संस्था सदरहू दौऱ्याची सर्व व्यवस्था करीत आहे. साम्राज्यांतील इतर देशांत असे दौरे पूर्वी काढण्यांत आलेले आहेत.

### लंडनमध्यें हिंदी एक्सचेंज बँक

पहिली हिंदी एक्सचेंज बँक लंडनमध्यें चालू करण्याचा समारंभ हिंदू आणि पार्शी विधींस अनुसरून सर सोराबजी पोचखनवाला ह्यांच्या हस्तें झाला.

### अमेरिकेच्या २०० नव्या आगबोटी व ७५ कोटि रुपये खर्च

आपलें आगबोटींचें व आरमारी बळ वाढवून राष्ट्रीय व्यापारास उत्तेजन देण्यासाठीं ७ वर्षांत ७५ कोटि रुपये खर्चून २०० नव्या आगबोटी चालू करण्याचें अमेरिकन काँग्रेसनें ठरविलें आहे.

### इंपीरियल बँक ऑफ इंडिया

इंपीरियल बँक ऑफ इंडियाकडे चालू महिन्याच्या पहिल्या आठवड्याच्या अखेर ८० कोटि, २३ लक्ष रुपयांच्या ठेवी होत्या. तिनें ४३ कोटि ७२ लक्ष रु. कर्जरोख्यांत गुंतवले असून, २२ कोटि ५३ लक्ष रु. कर्जाऊ दिले होते. हातीं असलेल्या व इतर बँकांतल्या मिळून रोख शिलकेची रकम २२ कोटि, ६४ लक्ष रुपये होती.

### ब्रिटिश प्रधानमंडळाचे सभासद

ब्रिटिश प्रधानमंडळांतील २१ मंत्र्यांपैकीं १५ जण विश्वविद्यालयाचे पदवीधर आहेत. त्यांच्या चालू वयाची सरासरी ५५½ वर्षें आहे. रॅम्से मॅक्डोनल्ड हे सर्वांत वयोवृद्ध ( ७० वर्षें ) असून त्यांचे चिरंजीव, माल्कम मॅक्डोनल्ड, हे सर्वांत लहान ( ३५ वर्षांचे ) आहेत.

### प्रीमियर कन्स्ट्रक्शन कं. लि.

वरील कंपनीनें ६½ टक्के दराच्या प्रत्येकीं १०० रु. दर्शनी किंमतीच्या १५ हजार दुसऱ्या प्रेफरन्स भागांपैकीं ५ हजार भाग विक्रीस काढले आहेत. मेसर्स देवकरण नानजी ॲन्ड सन्स ह्यांनीं वरील सर्व १५,००० भाग खपविण्याची जबाबदारी स्वीकारली आहे व त्याबद्दल त्यांस मोबदला म्हणून ४५ हजार रुपये मिळणार आहेत. सर लल्लुभाई सामळदास हे वरील कंपनीचे अध्यक्ष असून श्री. वालचंद हिराचंद हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

### नवा हिंद–ब्रिटन करार

ग्रेटब्रिटनशीं करावयाच्या नव्या व्यापारी तहासंबंधीं हिंदुस्थान सरकारनें व्यापारी संस्था व प्रांतिक सरकारें ह्यांकडून त्यांचीं मतें मागविलीं होतीं. आतां वाटाघाटीस सुरवात करावी असें बहुमत असून बोलणीं हिंदुस्थानांत व्हावीं असें कित्येकांचें म्हणणें असल्याचें समजतें.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २२ ऑगस्ट १९३६ रोजीं पुरा झालेला आठवडा | ४७,८७,००२ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते २२ ऑगस्ट १९३६ अखेर | २,७९,९०,५४,९०७ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४१८ | ५ प्रांतिक सहकारी बँकांची परिषद् ... ... | ४२३ |
| २ सोन्याची सरी का सुरी ? | ४१९ | ६ ग्रां. स. इन्स्टिट्यूटच्या कौन्सिलची सभा ... | ४२३ |
| ३ जाहिरात व मालाचा प्रसार ... ... | ४१९ | ७ सहकारी बँकेच्या जमीस अडथळा ... ... | ४२४ |
| ४ स्फुट विचार ... उच्चशिक्षणाचें ध्येय व कार्य–'स्वदेशी' साखरेच्या धंद्यांत आयर्लंडचें यश–ब्रिटन–रशिया व्यापार—फ्रान्सचें इंग्लंडमध्यें कर्ज–इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्स–गुन्हेगार जातींची सुधारणा–न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. | ४२१ | ८ बँकांचे व सोसायट्यांचे वार्षिक अहवाल ... | ४२५ |
| | | ९ रशियांत प्रजावृद्धीस सरकारचें उत्तेजन ... | ४२६ |
| | | १० हिंदी सूत व कापड | ४२६ |
| | | ११ मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतीवर टीका... ... | ४२६ |
| | | १२ निवडक बाजारभाव | ४२७ |



# अर्थ

बुधवार, ता. २६ ऑगस्ट, १९३६


## सोन्याची सरी का सुरी ?

(३)

सोन्याचें उत्पादन झपाट्यानें वाढत असतां त्याची किंमत न उतरण्यास त्यास असलेली मागणी प्रभावी होत असली पाहिजे. ही मागणी कोठून येत आहे ? अलीकडच्या काळांत आंतरराष्ट्रीय अविश्वास आणि भावी युद्धाची भीति ह्यांमुळें जगांत तर सर्वच लोकांचीं मनें साशंक झालीं असून, प्रत्येकजण आपल्या संपत्तीचें सोन्यामध्यें रूपांतर करण्याच्या खटपटींत आहे. राष्ट्रीय चलनांचें पुढें कांहीं होवो, सोनें गांठीं असलें म्हणजे आपल्या संपत्तीस शक्य तेवढा भरभक्कम आधार होईल, ह्या कल्पनेनें प्रत्येकाचा सोन्याकडे ओढा आहे. राष्ट्रीय मध्यवर्ती बँकांवर चलनें स्थिर व सुरक्षित राखण्याची जबाबदारी असल्यानें त्यांची प्रवृत्ति आपला सुवर्णनिधि वाढवण्याची आहे. जगांतील सर्व बँकांचा मिळून सुवर्णसंचय किती आहे, ह्याचे आकडे पाहिले तर असें दिसून येतें कीं, १९२० ते १९३५ ह्या पंधरा वर्षांत ६०० कोटि जुन्या व १,००० कोटि नव्या डॉलरच्याइतका वाढला आहे. ही सुमारें २,५०० कोटि रुपये किंमतीच्या सोन्याची बँकांच्या गंगाजळींत झालेली वाढ, विशेषेंकरून प्रचलित आर्थिक मंदी लक्ष्यांत घेतां, मामुली आवश्यकतेच्या मानानें भरमसाट आहे असेंच म्हणावें लागेल. निरनिराळ्या देशांत खाजगी व्यक्ती व संस्था आणि तेथील सरकारें ह्यांनीं आपल्या संग्रहीं सोनें बाळगलें आहे त्याची भर वरील आकड्यांत घातली पाहिजे म्हणजे सुवर्णास एकूण मागणी कशी वाढली आहे ह्याची कल्पना येईल. ह्या प्रकारच्या सोन्याचें परिमाण फार मोठें नाहीं; तें गंगाजळींत झालेल्या वर निर्दिष्ट केलेल्या वाढीच्या सहावा हिस्सा एवढेंच आहे. तथापि, हिंदुस्थानांतून सोन्याच्या निर्गतीचा प्रवाह सारखा चालला आहे आणि तें बाहेरील देशांत मोकळें पसरत आहे ही गोष्ट ध्यानांत घेतां, वरील संग्रह हिशेबांत धरणें आवश्यक आहे. सध्याची आर्थिक मंदी दूर होतांच, कांहीं वर्षांनीं हिंदुस्थानाबाहेर गेलेलें सोनें इकडे परत फिरण्याचा संभव आहे ही गोष्टहि विसरून चालावयाचें नाहीं.

ह्या प्रकारच्या अनेक बाबींचा विचार करतां येत्या पांच–चार वर्षांत सोन्याचा भाव थोडा उतरेल असा अंदाज प्रो. कॅसल यांनीं केला आहे. राष्ट्रीय सरकारांच्या सांपत्तिक अडचणी व युद्धसामुग्रीच्या तयारीवर होणारा खर्च ह्यांमुळें व्यवहारांत अधिक चलन खेळेल व त्याचा परिणाम बाजारभाव चढण्यांत होईल. तसाच परिणाम, व्याजाचे दर हलके रहातील अशी व्यवस्था करण्याचा व कागदी विनिमय-साधनें विपुलतेनें समाजांत खेळतीं ठेवण्याचा राष्ट्रांचा प्रयत्न चालू आहे, त्याचाहि होणार. भविष्याच्या पोटांत काय काय गोष्टी आहेत, ह्याचा अंदाज करणें अशक्य आहे. तथापि, संभाव्य घडामोडींची कल्पना करून तिच्यावर सोन्याच्या भावी किंमतीविषयींचें अनुमान उभें करतां येईल. अमेरिका व त्याबरोबर ग्रेट ब्रिटन आपलें चलन हलकें करून सोन्याची किंमत कदाचित् वाढवतील, परंतु एकंदर बाजारभाव चढल्यास त्या धोरणाचा म्हणण्यासारखा परिणाम व्हावयाचा नाहीं. राष्ट्रांनीं आपल्या चलनास असलेला सोन्याचा आधार मुळांतच काढून टाकल्यास त्याची किंमत भलत्याच प्रमाणांत उतरेल. पण ही गोष्ट अशक्य कोटींतली आहे हें मागचा व सद्यःस्थितीचा अनुभव स्पष्टपणें सांगतो. सोन्याची किंमत फार उतरूं लागल्यास त्या परिस्थितीचा फायदा घेण्यास सर्व ऋणको पुढें सरसावतील आणि स्वस्त झालेलें सोनें कर्जफेडीदाखल स्वीकारण्याचें धनको नाकारतील तर कर्जदार खाका वर करण्यास कायदेशीरपणानें मोकळे होतील. सोन्यांत परतफेड होण्याची शर्त असलेल्या कर्जांचें परिमाण जगांत आज एवढें प्रचंड आहे कीं, त्याच्या किंमतीवर ह्या व्यवहारांचा परिणाम होणें अपरिहार्य आहे. उद्योगधंद्यांत व डागदागिन्यांत सोन्याचा उपयोग केला जातो, त्यास अलीकडे मंदीमुळें आळा बसला आहे, पण पुढें हें नियंत्रण दूर होऊन त्यासंबंधांतली मागणी वाढणें संभवनीय आहे. ह्या रीतीनें अनेक साधक–बाधक बाबींचा हिशेब करतां सोन्याच्या बाजारभावांत वेळोवेळ चढउतार झाला तरी त्या धातूस जागतिक मान्यता आहे ती कायम रहाणार ह्यांत संशय नाहीं, असा आपल्या चर्चेचा निष्कर्ष प्रो. कॅसल ह्यांनीं काढला आहे.

## जाहिरात

—×—

### मालाचा प्रसार वाढविण्याचें उत्कृष्ट साधन

यंत्रांचे सहायानें मोठ्या प्रमाणावर मालाचें उत्पादन करतां येतें, परंतु त्या मानानें मालाचा उठाव होतो असें नाहीं. नव्या, नव्या जिनसा तयार करण्याचे कारखाने रोज निघत आहेत, आणि नवीन नमुन्यांच्या पदार्थांचें उत्पादन वाढत आहे; परंतु ह्या वस्तू गिऱ्हाइकांच्या नजरेसमोर याव्या कशा ? लोकांचें लक्ष मालाकडे वेधून व त्यांस आपल्या जिनसांचे गुण पटवून दिल्याखेरीज विक्री तडाख्यानें होत नाहीं आणि यंत्रसामुग्री कितीहि कार्यक्षम असली तरी तयार होणारा माल उठेपर्यंत कारखानदारांस हात जोडून स्वस्थ बसणें भाग पडतें. जाहिरात व प्रचार हीं उत्पादन व खप ह्या दोहोंस जोडणारा सांधा होत. जाहिरातीच्या भपक्यानें सामान्य वस्तूसहि कांहीं दिवस गिऱ्हाईक

आलें, तरी तें टिकाऊ नसतें. कित्येक वेळीं, एकाच पदार्थाच्या जाहिरातीमुळें इतर अनेक जिनसांस मागणी येते, असाहि अनुभव आहे. जाहिरातींच्या ह्या गुणांमुळें उत्पादक, कारखानदार व विक्रेते ह्यांचें जाहिरातींवांचून भागेनासें झालें आहे. वर्तमानपत्रांसहि त्याकारणानें उत्पन्नाचें एक मोठें साधन प्राप्त झालें आहे.

आधुनिक पद्धतीनें व्यवहार करणाऱ्या पाश्चात्य देशांत निरक्षरांचा पूर्ण अभाव असल्यासारखाच आहे. त्यामुळें, वर्तमानपत्रें व नियतकालिकें ह्यांस वाचक फार असतात, इतकेंच नव्हे तर ग्राहकांची संख्याहि वाचकांच्या संख्येच्या तोडीची असते. हिंदुस्थानांत साक्षर लोक थोडे व बहुतेकांजवळ जिन्नस खरेदण्यास पुरेसा पैसा नाहीं, अशी स्थिति असल्यानें जाहिरातींचा उपयोग व्हावा तितका होत नाहीं. ग्रेटब्रिटनमधील प्रत्येक १०० कुटुंबांत दररोज सरासरीनें १५२३ दैनिकें व प्रत्येक आठवड्यास १३० साप्ताहिकें खपतात, असा हिशेब करण्यांत आला आहे. अशा १५११ वृत्तपत्रांत व नियतकालीकांत मिळून जाहिरातींवर गेल्या वर्षी एकूण सुमारें २२ कोटि रुपये तेथें खर्च केले गेले. १९२१ सालीं जाहिरातींच्या धंद्यांत फक्त १० हजार लोक गुंतलेले होते; १९३१ सालीं १८ हजार लोकांची उपजीविका ह्या धंद्यावर अवलंबून असल्याचें आढळून आलें.

आपल्या मालाची जाहिरात कोठें व कशी द्यावी, ह्यासंबंधीं सल्ला देणारा एक मध्यस्थवर्ग आतां निर्माण झाला असून त्याच्या अनुभवाचा व माहितीचा फायदा पैसा देऊन घेणें कारखानदारांस व व्यापाऱ्यांस परवडतें. कारण, ह्या शास्त्राचा स्वतंत्र अभ्यास केलेल्या अनुभवी मनुष्याच्या अभिप्रायास दिलेली किंमत वाढत्या व्यापारानें व मालाच्या प्रसारानें भरून येते, अशी त्यांस खात्री पटली आहे. कित्येक मोठे व्यापारी स्वतःचें स्वतंत्र जाहिरातखातें निर्माण करून त्यामध्यें जाहिरात–तज्ज्ञांची नेमणूक करतात.

जाहिरात दिली असतां मालाची प्रसिद्धि होते, ही गोष्ट प्रत्येक व्यापारी जाणतो, परंतु कित्येक प्रसंगीं जाहिरात जेवढी यशस्वी व्हावयास पाहिजे तेवढी होत नाहीं. गिऱ्हाइकांची मनोवृत्ति ओळखून त्यांच्या मनाचा ठाव काढण्याचें काम तज्ज्ञांकडे सोपविणेंच ज्यास्त श्रेयस्कर ठरतें. एकादें नवें पेय तयार करून तें बाजारांत विक्रीस काढणारास प्रथम आपल्या मालास मागणी किती येईल, स्पर्धा व चढाओढ किती होईल, सध्याचीं पेयें टाकून देऊन नवीन पेय घेण्यास लोकांस कसें प्रवृत्त करतां येईल, पेयाची लज्जत लोकप्रिय होईल किंवा नाहीं, इत्यादि प्रश्नांचा विचार करावा लागेल. तें पेय गिऱ्हाइकांचे हातीं पडेपर्यंतच्या विक्रीसंबंधाच्या सर्व क्रिया योजाव्या लागतील व जाहिरातीसाठीं वर्तमानपत्रांची निवड करावी लागेल. प्रत्येक वर्तमानपत्राचे वाचक कोणत्या दर्जाचे व आवडी–निवडीचे आहेत, सदरहु पत्रांचा खप कोणत्या जिल्ह्यांत विशेष होतो, त्यांच्या वाचकांमध्यें ऐपतदार लोक किती आहेत, इत्यादींवर जाहिरातीचा मजकूर व उठाव अवलंबून राहिला पाहिजे हें उघड आहे.

सामुदायिक रीतीनें जाहिरात देण्याची प्रथा आतां वाढत्या प्रमाणावर असलेली आढळते. एकाच धंद्यामधील परस्पराशीं स्पर्धा करणारे व्यापारी व कारखानदार आपल्या मालास गिऱ्हाइक निर्माण करण्याचे वेळीं एकत्र येतात व परस्परसहकार्यानें आपला व्यापार वाढवितात. हिंदी सिमेंट कंपन्यांचें उदाहरण ह्या संबंधांत चटकन् नजरेसमोर येतें. सिमेंटचा वापर वाढविण्याकडे त्यांच्या संस्थेचा सारखा प्रयत्न चालू असतो व ह्या वाढणाऱ्या खपाचा फायदा सभासद-संस्थांस मिळतो. आगीच्या विम्याचें काम करणाऱ्या कंपन्यांचीहि अशाच प्रकारची योजना आहे. सॉफ्ट कोक, चहा, इत्यादि मालाच्या प्रसारासाठीहि वरीलप्रमाणेंच खटपट करण्यांत येते. पोस्ट व टपालखातें सुद्धा जाहिराती देत असतें. 'एअर मेलनें पत्रें पाठवा,' 'तारेनें अभिनंदन करा' 'टेलिफोनचा उपयोग करा' इत्यादि घोषणांच्या मुळाशीं जाहिरातीचीच कल्पना असते. सरकारी रेल्वेज तर परदेशांतहि जाहिराती देऊन तेथील लोकांस हिंदुस्थानांत बोलावित असतात. म्हैसूरसारखीं संस्थानें आपल्या सृष्टिसौंदर्याचें वर्णन करून पाहुणे आकर्षण्याची खटपट करतात, हेंहि सामुदायिक जाहिरातीचेंच उदाहरण होय. कर भरणाऱ्या नागरिकांतर्फे हा प्रचार केला जातो, हें त्याचें वैशिष्ट्य होय. खप वाढणें हें शेवटीं त्यांच्याहि हिताचेंच असतें.

लोकांच्या रुचिवैचित्र्यास मर्यादा नसल्याकारणानें नव्या, नव्या जिनसा त्यांचे पदरीं बांधण्यास जाहिरातीच्या साधनाचा उपयोग करावा लागतो व तो तसा कायम करावा लागणार, हें उघड आहे. देशांतील संपत्ति व तिची समाजांतील भिन्नभिन्न घटकांत होणारी वाटणी ह्यांवर जाहिरातींची उपयुक्तता अवलंबून रहाणें अपरिहार्य आहे. आज ज्या गोष्टी चैनीच्या सदरांत मोडतात त्यांचा अंतर्भाव उद्यां जरूरीच्या वस्तूंमध्यें होऊं लागला, म्हणजे साहजिकच जाहिरातवाल्या व्यापाऱ्यांचें व्यवहारक्षेत्र वाढतें. गिऱ्हाइकांच्या मनांत एकादी वस्तु आपणांस हवी असें वाटण्यावर जाहिरातींचें प्रभावीपण अवलंबून असलें, तरी मनांतील इच्छेस मूर्त स्वरूप देऊन ती वस्तु खरेदी करण्याचें साधन जवळ नसल्यास जाहिरातींचा उपयोग होणार नाहीं. गरीब लोकांच्या वाचनांत येणारीं व श्रीमंतांच्या नजरेस येणारीं वर्तमानपत्रें ह्यांमधील जाहिरातींची ह्या दृष्टीनें छाननी केली असतां वरील विधानाची सत्यता पटेल.

---

### कै. वा. भाऊराव कोल्हटकरांचें गाणें ऐकावयास मिळेल काय ?

वरील शिर्षकाखालीं 'अर्था' च्या १ जुलैच्या अंकांत आम्हीं प्रसिद्ध केलेल्या मजकुरास अनुसरून आमच्या एका वाचकाकडून आम्हांस आलेलें पत्र आम्हीं ता. १२ च्या अंकांत दिलें होतें. त्या पत्रामध्यें कै. भाऊरावांच्या गाण्याच्या बांगड्या गतवर्षींच स्वतः ऐकल्याचें त्यानें कळविलें होतें व त्या ज्या गृहस्थांचे मालकीच्या होत्या, त्यांचें नांवहि त्यांत निर्दिष्ट केलें होतें. ह्या संबंधांत कांहीं ज्यास्त माहिती हवी असल्यास ती श्री. ग. स. देशपांडे, बी. एस. सी., खो. नं. ६, श्री. ता. टी. कॉ. होस्टेल, कोल्हापूर, ह्या पत्त्यावर मिळूं शकेल, असें श्री. देशपांडे हे कळवतात.

---

### 'अर्था' चें स्वागत.

अर्थ:—या नांवाचें साप्ताहिक प्रो. वामनराव काळे यांच्याकडून 'म. सा. पत्रिके' कडे भेटीस येत असतें. या पत्राचें विशेष महत्त्व आम्हांस वाटतें; कारण, सांप्रतचें युग 'अर्था' चें आहे. एखाद्या विषयांत जो तज्ज्ञ असेल त्यानेंच साधारण लोकशिक्षणासाठीं ग्रंथ व लेख लिहिले तर तो योग अत्यंत अभिनंदनीय होय. तसा योग महाराष्ट्रांत जुळून आला आहे आणि हा 'अर्था' चा दुसरा विशेष होय असें आम्हांस वाटतें. 'अर्थ' साप्ताहिकाप्रमाणेंच एक आर्थिक वाङ्मयमालाहि प्रो. काळे यांनीं सुरू करून महत्त्वाची व खरी उपयुक्त लोकसेवा व वाङ्मयसेवा चालविली आहे. यथाक्रम त्या मालेंतील ग्रंथांचा परामर्ष 'पत्रिकें' त होईलच; आज 'अर्थ' द्वारें वामनरावजींनीं जो अत्यंत स्तुत्य व कालोचित असा उपक्रम केला आहे त्याबद्दल त्यांचें मनापासून अभिनंदन आम्हीं करतों. 'अर्थ' हा प्रत्येक शाळेंत व कुटुंबांत असला व वाचला गेला पाहिजे या 'अर्थ' कारांचें म्हणण्यास आमचा पूर्ण व हार्दिक पाठिंबा आहे.

**दत्तो वामन पोतदार**

( महाराष्ट्र साहित्य पत्रिका, एप्रिल–जुलै, १९३६. )

# स्फुट विचार

## उच्च शिक्षणाचें ध्येय व कार्य

मुंबई विश्वविद्यालयाचे चॅन्सेलर ह्या नात्यानें इलाख्याचे हंगामी गव्हर्नर, सर रॉबर्ट बेल, यांनीं वार्षिक पदवीदान समारंभाचे प्रसंगीं गेल्या आठवड्यांत भाषण केलें, त्यांत उच्च शिक्षणाचें ध्येय व व्यावहारिक उपयुक्तता ह्या विषयाची चर्चा त्यांनीं केली. ज्याचे योगानें आपलें पोट भरण्याची विद्या आमच्या तरुणांस साध्य होत नाहीं तें शिक्षण निरुपयोगी आहे असें मत एका बाजूनें व्यक्त करण्यांत येतें, तर दुसऱ्या बाजूनें असें प्रतिपादण्यांत येतें कीं विश्वविद्यालयीन शिक्षणाचा हेतु निरनिराळ्या पेशांत शिरून पदवीधरांनीं त्यांचीं कामें करावीं व आपल्या उदरनिर्वाहाची सोय लावावी हा नसून तरुणांची बौद्धिक व सांस्कृतिक वाढ करून त्यांमध्यें समाजाचे नेते बनण्याची पात्रता निर्माण करणें हें उच्च शिक्षणाचें मुख्य उद्दिष्ट असावयास पाहिजे. हीं दोन मतें पुढें मांडून त्यांपैकीं दुसऱ्याकडे आपला विशेष कल असल्याचें गव्हर्नर साहेबांनीं सांगितलें. उच्च शिक्षणांत आमच्या तरुणांचा इतका पैसा व काळ आणि इतकी शक्ति खर्ची पडते कीं, तें पूर्ण करून बाहेर पडतांच पुढें काय करावें ह्याची विवंचना त्यांस लागते. कॉलेजांत मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग त्यांनीं समाजास करून द्यावा, जनतेचें पुढारीपण पत्करून तिला योग्य मार्ग दाखवावा आणि देशाच्या उन्नतीप्रीत्यर्थ झटावें अशा प्रकारची पात्रता तरुण पिढींत उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आमच्या उच्च शिक्षणाच्या पद्धतींत असावें ही गोष्ट सर्वमान्य होण्यासारखी आहे. हिंदुस्थानांत आज लोकप्रगतीच्या ज्या चळवळी चालू आहेत त्यांचा उगम सुशिक्षित पुढाऱ्यांमध्येंच पहावयास सापडतो. तथापि, तरुणांनीं चांगले नागरिक बनावयाचे असतां कोणता तरी पेशा पत्करून त्यांत स्वतःच्या योगक्षेमाची सोय त्यांनीं करण्यावांचून गत्यंतर नाहीं. कांहीं थोड्यांनीं बौद्धिक उन्नतीच्या मार्गे लागावें व इतरांनीं पोटापाण्याच्या व्यवसायाचा धोपट मार्ग स्वीकारावा अशा प्रकारची वाटणी इष्ट व शक्य आहे काय ह्याविषयीं शंका असून बहुसंख्याक तरुण पुढारी होऊं शकत नाहींत किंवा स्वतःचें उदरभरण व संसार करण्याची पात्रताहि त्यांचे अंगीं येत नाहीं अशी आजची वस्तुस्थिति आहे. ह्या कारणानें उच्च शिक्षणाच्या पद्धतीस कोणतें वळण लावावें व तें कसें लावावें ह्याचें एक कोडें बनून राहिलें आहे.

## "स्वदेशी" साखरेच्या धंद्यांत आयर्लंडचें यश

बिटाच्या उत्पादनास कोट्यवधि रुपयांचें सहाय देऊन ब्रिटिश सरकारानें आपल्या देशांत "स्वदेशी" साखरेचे कारखाने यशस्वी होण्यास मदत केली, ह्या धोरणाचें अनुकरण आयरिश फ्री स्टेटच्या सरकारानें केलें असून आपल्या प्रयत्नांत यश मिळवलें आहे, ही गोष्ट हिंदुस्थानांत ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. साठ हजार एकरांत बिटाची लागवड झाली असतां आयरिश राष्ट्राची साखरेविषयींची मागणी पूर्णपणें भागवण्याइतका माल कारखान्यांत तयार होतो आणि ह्या मर्यादेपर्यंत बिटाचें उत्पादन आतां येऊन भिडलें आहे. परदेशी साखरेच्या आयातीचें नियंत्रण आणि आयरिश शेतकऱ्यांस दिलेलें द्रव्य-सहाय ह्याचा बोजा जनतेवर पडला असला तरी ह्या धोरणानें शेतकरी वर्गास अत्यंत जरूर असलेली मदत निकडीचे वेळीं झाली असल्याचें, संरक्षणास प्रतिकूल असलेले टीकाकारहि कबूल करीत आहेत. स्वदेशी साखरेचें उत्पादन आयरिश सरकारानें एका कंपनीकडे सोपविल्यानें तिच्या कारखान्यांच्या खर्चांत पुष्कळ बचत झाली आहे. उत्तर हिंदुस्थानांतच साखरेच्या कारखान्यांची गर्दी न होतां त्यांची विभागणी दक्षिणेच्या बाजूस व महाराष्ट्रांत होणें कसें सोयीचें आहे हें ह्यावरून ध्यानांत येईल. १९३५-३६ च्या हंगामांत २७,७३४ आयरिश शेतकऱ्यांनीं आपला ५ लक्ष, ६३ हजार टन वजनाचा बीट साखरेच्या कारखान्यांत आणून दाखल केला व गेल्या पिकापासून एकूण सुमारें ७९ हजार टन इतकी शुभ्र साखर तयार झाली. साखरेबरोबर निघणाऱ्या काकवीचा उपयोग शेतीच्या जनावरांसाठी पौष्टिक अन्न तयार करण्यांत फार मोठ्या प्रमाणांत होत आहे. आयरिश साखरेच्या धंद्यांत सुमारें तीन कोटि रुपयांचें भांडवल गुंतलें आहे व गेल्या वर्षीं त्यांत सुमारें दहा लक्ष रुपये निवळ नफा झाला. हिंदुस्थान देशहि आयर्लंडप्रमाणें साखरेच्या बाबतींत जवळ जवळ पूर्णपणें स्वावलंबी झाला आहे व ही अभिनंदनीय परिस्थिति टिकवण्याची जबाबदारी आमचें सरकार व जनता ह्यांच्यावर आहे.

## ब्रिटन-रशिया व्यापार

युरोपांतल्या अस्वस्थ स्थितींत परदेशांत माल पाठवणें व्यापाऱ्यांस धोक्याचें झालें आहे. निर्गत केलेल्या मालाचे पैसे येतील कीं नाहीं, हुंडणावळीच्या दरांत चलबिचल होऊन व्यवहारांत कांहीं नुकसान लागेल कीं काय इत्यादि बाबतींत व्यापार करणारांस धास्ती वाटते ती अनाठायी आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. ह्या संबंधांत आपल्या राष्ट्रीय निर्गतीस सहाय करण्याच्या हेतूनें ब्रिटिश सरकारानें एक स्वतंत्र खातें स्थापिलें असून तें व्यापाराबद्दलची हमी विशिष्ट प्रमाणांत घेतें. मागच्या येणीं बुडल्यामुळें रशियाशीं व्यवहार करण्यास ब्रिटिश व इतर व्यापारी कचरत आहेत. रशियास तर परदेशांमधून कांहीं जरूरीचा माल घेणें अपरिहार्य आहे व त्याच्या किंमतीची भरपाई होण्याची विश्वसनीय व्यवस्था करणें सोव्हिअट सरकारास प्राप्त आहे. ब्रिटिश धंदेवाल्यांस रशियाशीं व्यापार व्हावयास पाहिजे आहे, रशियास ब्रिटिश माल हवा आहे आणि ब्रिटिश सरकार ह्या व्यापारास मदत करण्यास तयार आहे. तेव्हां ह्या त्रिवेणीसंगमांतून कांहींतरी विधायक योजना निघणें स्वाभाविकच होतें. नुकत्याच झालेल्या करारास अनुसरून रशिया इंग्लंडमध्यें येत्या बारा महिन्यांत १२ कोटि रुपयांचा माल खरेदी करील व त्याची किंमत लंडनच्या बाजारांत त्या रकमेचे पांच वर्षांच्या मुदतीचें कर्ज काढून करील. ह्या कर्जादाखल ५½ टक्के व्याजाचे रशियाचे कर्जरोखे ग्रेटब्रिटनमध्यें विकण्यांत येतील व त्यांचेसंबंधांतली सर्व जोखीम ब्रिटिश सरकार घेईल. आपले पैसे किफायतशीर गुंतवण्यास ब्रिटिश बँकांस हें चांगलें साधन होईल.

## फ्रान्सचें इंग्लंडमध्यें कर्ज

व्यवहाराच्या ओघांत एका राष्ट्रास दुसऱ्या राष्ट्राचें देणें यावयाचें असतां त्यास जरूर असलेल्या हुंड्या किंवा सोनें उपलब्ध नसल्यास देण्याइतक्या रकमेचें कर्ज घेणेकरी देशांत काढणें प्राप्त होतें आणि असे प्रसंग इंग्लंड व फ्रान्ससारख्या राष्ट्रांवरहि अलीकडे आलेले आहेत. अलीकडे फ्रान्सची अंतर्गत आर्थिक व सांप-

त्तिक परिस्थिति ओढगस्तीची झाल्यानें त्या राष्ट्रानें गेल्या फेब्रुवारी महिन्यांत इंग्लंडमधील बँकांकडून सुमारें ५३ कोटि रुपयांचें कर्ज ३ टक्क्यांनीं घेतलें व परराष्ट्रीय देण्याची निकड भागवली. मूळ कर्ज तीन महिन्यांच्या मुदतीचें होतें व जरूर लागल्यास ही मुदत दोन वेळां वाढवण्यांत यावी असा करार झालेला होता. त्याप्रमाणें गेल्या मे महिन्यांत कर्जाची मुदत तीन महिन्यांनीं वाढवण्यांत आली व येत्या नोव्हेंबरमध्यें त्याची परतफेड व्हावयास हवी. मध्यंतरीच्या काळांत फ्रेंच सरकार व राष्ट्र ह्यांची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचा रंग दिसत नाहीं. तेव्हां तीन महिने मुदतीच्या कर्जाचें रूपांतर लांब मुदतीच्या कर्जांत तरी करून घ्यावें लागेल किंवा त्याच्या भरपाईबद्दल प्रत्यक्ष सोनेंच इंग्लंडला पाठवावें लागेल. बँक ऑफ फ्रान्सच्या निधींत सोन्याचा तुटवडा नसला तरी व फ्रेंच सरकारानें सोन्याच्या खाजगी निर्गतीचें व संचयाचें नियंत्रण केलें असलें तरी बँक नोटांचें चलन वाढत आहे व त्यामानानें गंगाजळींतलें सोन्याचें प्रमाण उतरत आहे. बँक ऑफ फ्रान्सची परिस्थिति दिसावयास आज बरी आहे, पण एकंदर आर्थिक घटनेवरच तिचीं पुढचीं स्थित्यंतरें अवलंबून रहाणार हें उघड आहे.

### इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्स

हिंदी बँकिंगच्या धंद्यांत वावरणाऱ्या लोकांची ही प्रमुख संस्था असून १९३५ सालच्या तिच्या नवव्या अहवालावरून संस्थेचें उपयुक्त कार्य व्यवस्थितपणें चालू असल्याचें निदर्शनास येतें. इन्स्टिट्यूटच्या सभासदांची संख्या सुमारें २½ हजार आहे. ह्या संस्थेतर्फे घेण्यांत येणाऱ्या परीक्षांस बँकांचे चालक विशेष मान देत असल्यानें त्या परीक्षांस महत्त्व प्राप्त झालें आहे. १९२९ सालीं १९ ठिकाणीं ८९ विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यांत आली होती. १९३५ सालीं १,००७ विद्यार्थी १०० केंद्रांमध्यें मिळून परीक्षांस बसले. इन्स्टिटयूटतर्फे एक त्रैमासिक चालविण्यांत येतें. मुंबई येथें संस्थेची मुख्य कचेरी असून अहमदाबाद, लाहोर, कलकत्ता, कराची व पुणें येथें तिच्या शाखा आहेत. बँकिंगच्या धंद्यांतील बहुतेक सर्व पुढारी इन्स्टिटयूटच्या कौन्सिलवर आहेत व बँकांचें संस्थेस उत्कृष्ट आर्थिक सहाय मिळतें. प्रो. काळे हे पुण्याच्या उपशाखेचे अध्यक्ष आहेत.

### "गुन्हेगार" जातींची सुधारणा

हिंदुस्थानांतील "गुन्हेगार" जातींस आपला आनुवंशिक धंदा चालविणें अशक्य झालें आहे. तथापि, त्यांस स्थायिक धंदा उपलब्ध करून देऊन त्यांस उपयोगी नागरिक बनविण्याची खटपट केल्याखेरीज त्यांच्या दुष्ट संवयी मोडणें शक्य नाहीं, ह्या कल्पनेनें सरकारी प्रयत्न चालू आहेत. ह्या संबंधांतील कायद्याच्या अंमलबजावणीचा मुंबई सरकारचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. सदरहु जातींच्या वसाहतींमधील लोकसंख्या ८,१८३ असून सुधारलेल्या लोकांच्या वसाहतींत ७,०९९ लोक रहात आहेत. कापडाच्या गिरण्या, रेल्वेजचीं वर्कशॉप्स, मुंढव्याची कागदाची गिरणी, अंबरनाथ येथील आगपेट्यांचा कारखाना, खानापूरचें जंगल इत्यादि ठिकाणीं त्यांस काम पाहून देण्यांत आलेलें आहे. हरणशिकारी व मांगगारुडी ह्या जातींच्या लोकांवर वसाहतींमधील शिक्षणाचा कांहींहि परिणाम होत नाहीं व त्यांस कायमचें डांबवून ठेवणें भाग पडतें. इतरांस वसाहतींबाहेर रहाण्याची व काम करण्याची परवानगी मिळते; फक्त त्यांवर देखरेख ठेवण्यांत येते.

### दि न्यू इंडिया ॲश्युरन्स कं. लि.

वरील कंपनी मुंबई येथें १९२९ सालीं स्थापन झाली. तिचें भरणा झालेलें भांडवल ७१ लाखांवर आहे व तिच्या डायरेक्टर बोर्डावर तज्ज्ञ व नामांकित पुढारी मंडळी आहेत. १९२९ सालापर्यंत कंपनीनें आयुष्याचे विमे उतरविण्यास सुरवात केलेली नव्हती. ह्या खात्यानें अल्पावधींतच कमालीची प्रगति केलेली आहे. कंपनीचा व्याप हिंदुस्थानभर व हिंदुस्थानाबाहेरहि वाढलेला असल्यानें त्याचा फायदा आयुर्विम्याच्या खात्यासहि मिळाला. कंपनीचें पहिलें त्रैवार्षिक मूल्यमापन १९३३ सालीं झालें, त्यांत २ लक्ष ५७ हजार रुपये वाढावा आढळून आला व त्यांतून अनुक्रमें वार्षिक १० व १५ रु. दरानें बोनस वाटण्यांत आलें. आगीचा विमा, अपघाताचा विमा, समुद्रावरील जोखमीचा विमा, इत्यादि बाबतचीं कंपनीचीं खातीं अलग असून आयुर्विम्याचे हिशेब स्वतंत्र ठेवलेले आहेत. आयुष्याचे विम्यासंबंधींचे कामांत कंपनीनें अल्पावधींत मिळवलेलें यश व लोकप्रियता नजरेंत भरण्याजोगी आहे. ३१ मार्च १९३६ अखेरच्या त्रैवार्षिक मूल्यमापनाकडे लोकांचें लक्ष लागून रहाणें स्वाभाविक आहे. गेल्या वर्षी कंपनीनें १ कोटि ४१ लक्ष रुपयांच्या ६,३०९ विमा पॉलिसी दिल्या होत्या व ३ कोटि ८५ लक्ष रुपयांचे १५,८३९ विमे तिच्याकडे चालू होते.

### सिनेमाचे प्रेक्षक

लंडन येथील एका सिनेमावाल्यानें प्रेक्षकांसंबंधीं कांहीं माहिती जमा करून त्यावरून कांहीं अनुमानें काढलीं आहेत. हास्यकारक चित्रपट दाखविला जात असेल तेव्हां चॉकोलेटचा खप ज्यास्त होतो व विचारप्रवर्तक गंभीर स्वरूपाची फिल्म असली तर सिगारेटस ज्यास्त खपतात, असा त्याचा निष्कर्ष आहे. लंडन बाहेरील विभागामधील प्रेक्षक सिनेमास जाण्यापूर्वी फिल्म्सविषयीं इतरांचें मत विचारतात, परंतु लंडनच्या रहिवाशांच्या शेजाऱ्या—पाजाऱ्यांशीं ओळखी क्वचितच असल्यानें वर्तमानपत्रांतील अभिप्रायावरच त्यांस अवलंबून रहावें लागतें. ताज्या बातमीचीं छोटीं रिळें दिवसानुदिवस ज्यास्त लोकप्रिय होत आहेत.

### ड्राय आइस कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

थंड हवेमध्यें फळें व इतर खाद्य पदार्थ ज्यास्त काळ सुस्थितींत रहातात, हें आतां सिद्ध झालें आहे. हवेमधील उष्णतामान कमी करण्यासाठीं 'ड्राय आइस' उर्फ घन कार्बन डाय-ऑक्साइड ह्याचा उपयोग करणें खर्चाच्या दृष्टीनें सोईचें होतें. ह्या ड्राय आइसचें उष्णतामान पाण्याचे बर्फापेक्षा १४१° फॅ. इतकें कमी असतें व त्याचें वजन व आकार हीं सोइस्कर असल्यानें वहातुक खर्चांतहि बचत होते. मांस, दूध, भाज्या, फळें, आइस्क्रीम इत्यादि साठवणें व त्यांची एका ठिकाणाहून दुसरकिडे वहातुक करणें ह्या कामीं ड्राय आइसचा उत्कृष्ट उपयोग होईल. हा धंदा हिंदुस्थानांत झपाट्यानें वाढेल, ह्या अपेक्षेनें मुंबई येथें सर होमी मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कंपनी स्थापन करण्यांत आलेली आहे. तिच्या कारखान्यास सुमारें ५½ लक्ष रुपये भांडवल लागेल अशी अपेक्षा आहे.

## प्रांतिक सहकारी बँकांची परिषद्

मुंबई इलाख्यांतील सहकारी बँकांची परिषद् मुंबई येथें ता. २९ व ३० ऑगस्ट रोजीं भरणार आहे. तिच्यामध्यें ज्या अनेक प्रश्नांची चर्चा होईल, त्यांपैकीं महत्त्वाच्या विषयांचा उल्लेख खालीं केला आहे.

'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्स' ह्या संस्थेचें सभासदत्व मार्गे कोणत्याहि बँकेच्या नोकरास खुलें होतें, परंतु आतां तीन लक्ष रुपयांच्यापेक्षां ज्यास्त रकमेचें जिचें भांडवल आहे अशा बँकांमधील नोकरांसच तिचे सभासद होतां येतें. ह्या कारणानें, अर्बन बँकांतील नोकरांची गैरसोय झालेली आहे.

जमीन गहाणाच्या बँका जेथें स्थापन झालेल्या आहेत, तेथें सेंट्रल बँकांनीं लांब मुदतीचीं कर्जें देऊं नयेत, असें मत प्रचलित होत आहे. निदान सध्या तरी जमीन गहाणाच्या बँका शेतकऱ्यांच्या कर्जाबाबत सर्व गरजा भागवूं शकत नाहींत, ह्या दृष्टीनें कांहीं विशिष्ट अटींवर सेंट्रल बँकांस हा व्यवहार करण्याची मोकळीक असावी असा प्रश्न उपस्थित झाला आहे व तो परिषदेंत चर्चेसाठी यावयाचा आहे.

बँकांवरील चेकचे पैसे जमा करण्याच्या पद्धतीसंबंधांतील अडचणींचाहि विचार परिषदेंत होईल, त्यांत ह्याबद्दल बँकांनीं आकारावयाचें कमिशन, परस्परांस द्यावयाच्या सवलती, इत्यादि बाबींचा परामर्श घेतला जाईल. रिझर्व्ह बँकेनें सहकारी बँकांस विशेष सवलती दिल्या पाहिजेत असें मत ह्यासंबंधांत व्यक्त होणें सहाजिक आहे.

लागू झालेलें परंतु प्रत्यक्ष वसूल न झालेलें व्याज नफातोटा पत्रकांत जमा करावें किंवा नाहीं, ह्याबद्दलचा सर्व बँकांचा प्रघात एकसारखा नाहीं. वसूल न झालेलें व्याज निव्वळ नफा काढण्यापूर्वी हिशेबांतून वजा करणें सुरक्षिततेच्या दृष्टीनें श्रेयस्कर आहे, असा अभिप्राय अनेक तज्ज्ञांनीं व्यक्त केला आहे तो स्वीकारण्यास योग्य आहे कीं काय? का त्याच्याऐवजीं दुसरी एखादी पद्धति अमलांत आणणें युक्त होईल? सहकारी वर्ष आतां ३१ मार्च ऐवजीं जून अखेर संपत असल्यानें ह्या प्रश्नास विशेष चालना मिळाली आहे. तत्त्व व व्यवहार ह्यांच्या दुहेरी दृष्टीनें सदरहु प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार केला जाईल ह्यांत संशय नाहीं.

अर्बन बँकांच्या सभासदांची किमान संख्या मर्यादित करण्याचें सहकारी खात्याचें धोरण कितपत श्रेयस्कर आहे, रेल्वे कंपन्यांचे भाग, म्युनिसिपालिट्यांचीं डिबेंचर्स, रिझर्व्ह बँकेचे भाग इत्यादींत रकमा गुंतविण्याची सहकारी बँकांस सवलत असावी कीं नाहीं, नियंत्रित जबाबदारीच्या सोसायट्यांस ठेवींची व कर्जांची रकम ज्यास्त मोठ्या प्रमाणांत घेण्यास मुभा असणें इष्ट आहे कीं नाहीं इत्यादि महत्त्वाचे प्रश्नहि परिषदेपुढें येणार आहेत. शेतीचे मालाच्या तारणावर अल्प व्याजाच्या दरानें ठराविक मुदतीपुरतीं कर्जें देण्याची व्यवस्था होणें जरूर आहे. कोर्टकचेऱ्यांची वाट बंद करून त्या व्यवहारांतील वांध्यांचा निकाल पंचामार्फत करतां येण्याजोगा आहे. कोठारांत माल ठेवून घेऊन त्याचे तारणावर कर्ज देतां येतें परंतु कर्जदारास बँकेच्या भागाची किंमत देतां येण्याजोगी परिस्थिति नसते. अशा व्यवहारापुरता सभासदांचा एक स्वतंत्र वर्ग निर्माण करावा अशी सहकारी रजिस्ट्रारांची सूचना आहे, ती विचारार्ह आहे.

अनियंत्रित जबाबदारीच्या सोसायट्या सध्याच्या बिकट आर्थिक परिस्थितींत तग धरूं शकत नसल्यानें सोसायट्यांची संख्या घटत आहे. अशा प्रसंगीं नियंत्रित जबाबदारीच्या सोसायट्यांची स्थापना श्रेयस्कर होईल किंवा नाहीं, असा प्रश्न निघाला आहे. वऱ्हाडमध्यें अशा तऱ्हेच्या सोसायट्यांचा पुरस्कार करण्यांत येत आहे, परंतु मुंबई इलाख्यांत त्यांचा उपक्रम व्हावा किंवा कसें हा प्रश्न चळवळीच्या प्रगतीच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. सोसायट्यांच्या लिक्विडेशनसंबंधींहि कांहीं मुद्दे परिषदेंत चर्चिले जातील. अर्बन व सेंट्रल बँकांच्या ऑडिटसंबंधीं सूचनाहि परिषदेच्या कार्यक्रमांत आहेत. वरील सर्व प्रश्नांचा बँकांच्या कारभाराशीं किती निकट व जिव्हाळ्याचा संबंध आहे, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. बँकांचे प्रतिनिधी साधक-बाधक मुद्यांचा विचार करून चर्चिलेल्या विषयांचा निर्णय करतील, ह्यांत संशय नाहीं.

### प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या कौन्सिलची सभा

प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या कौन्सिलची सभा रविवार ता. ९ ऑगस्ट रोजीं श्री. भास्करराव जाधव ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. त्यावेळीं खालील ठराव व निवडणुकी झाल्याः— (१) श्री. राऊत व श्री. मलिमठ ह्यांची नव्या सेक्रेटरींच्या जागीं निवड, (२) १९३६–३७ सालाबद्दल इन्स्टिट्यूटचें व तिच्या इमारतीचें अंदाजपत्रक, (३) बायलॉ २६ (ई) खालील कौन्सिलचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सहा सभासदांच्या निवडणुकीस उभे रहाणारांचे अर्ज दरवर्षी १५ ऑक्टोबरचे आंत कचेरींत दाखल व्हावेत, अशी नियमांत दुरुस्ती, (४) ऑल इंडिया को. इं. असोसिएशनच्या स्टँडिंग कमिटीवर अध्यक्ष व उपाध्यक्ष ह्यांची बिनविरोध निवड (५) एक्झिक्युटिव्ह कमिटीच्या तीन सभासदांची निवड, (६) नवा सहकारी ४८ वा नियम करण्यापूर्वी सर्वश्रेष्ठ बिनसरकारी अशा इन्स्टिट्यूटचा सल्ला न घेतल्याबद्दल सरकारचा निषेध व कायदे कौन्सिलांतील सभासदांस सदरहु कृतीविरुद्ध व नव्या नियमाविरुद्ध मत प्रदर्शित करण्याचा आग्रह, इ०

### सहकारी चळवळीस प्रोत्साहन देण्याची आवश्यकता

शेतकी कमिशन व मध्यवर्ती बँकिंग इन्क्वायरी कमिटी ह्यांच्या ज्या शिफारसी अजून अंमलांत आणलेल्या नाहींत, त्यासंबंधांत योजना आंखून सहकारी चळवळीस प्रोत्साहन देण्याच्या आवश्यकतेची जरूरी व्हाइसरॉय साहेबांचे कानावर घालण्यासाठी प्रांतिक सहकारी बँकांचेतर्फे श्री. रामदास पंतलु ह्यांच्या पुरस्कारानं एक डेप्युटेशन त्यांची भेट घेणार आहे.

### वार्षिक सभा

| | |
|---|---|
| ३० ऑगस्ट, ५ वाजतां, | वाई अर्बन को. बँक, वाई |
| " " | चतुःशृंगी को. क्रे. सोसायटी, पुणें |
| ३१ ऑगस्ट, ८ वाजतां, | पू. खानदेश सें. को. बँक लि., जळगांव |
| ६ सप्टेंबर, १२–३० वाजतां, | पुणें सें. को. बँक लि., पुणें |
| २० सप्टेंबर, १ वाजतां, | प. खानदेश स. नो. प. स. मंडळी लि., धुळें |
| २७ सप्टेंबर, २ वाजतां, | कॉसमॉस को. अ. बँक लि., पुणें |

## सहकारी बँकेच्या जप्तीस अडथळा केल्याबद्दल दंड

(श्री. द. प. चिंचळकर, वकील, अमळनेर; मॅनेजिंग डायरेक्टर अर्बन बँक, अमळनेर यांजकडून)

अमळनेर को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेंत कॅशक्रेडिटचें खातें ठेवून ती रकम न भरल्यामुळें चुनीलाल दगडूभाई भाटे व हिरालाल मोतीराम मारवाडी यांचेवर बँकेचा रु. ३,१०० चा लवादनिवाडा झाला. चुनीलाल दगडु हा बँकेला व आपल्या भागीदाराला बुडविण्यासाठी जंगम मालाची अफरातफर करीत असल्यामुळें बँकेनें निवाड्यापूर्वी जप्ति मिळविली. त्या जप्तीचे वेळीं चुनीलाल दगडु यानें आपले दुकानाला आपला भाऊ कनयालाल दगडु याचे नांवचा बोर्ड लावून दिला. माल तोच, दुकानाची जागा तीच, परंतु दुकानच्या मालकाला भाडेचिठी आपल्या भावाच्या नांवें नवीन लिहून देवविली व जप्तीचे वेळीं कनयालाल दगडु यानें आपल्या हलवाई दुकानावरून येऊन पाटील तलाठी व बँकेचे सेक्रेटरी यांस हरकत केली व जप्त केलेला थोडा माल पुनः दुकानांत नेवून ठेवला. या हकीगतीवरून मामलेदारसाहेब, अमळनेर, यांनीं कनय्यालाल दगडु भाटे याजवर जप्तीस हरकत केल्याबद्दल खटला चालविण्याबद्दल रुकार मिळवून पोलीस पाटील यास अधिकार देऊन पारोळें येथील माजिस्ट्रेट वर्ग १ कडे खटला दाखल केला. या खटल्यांत आरोपीनें बऱ्याच तक्रारी घेतल्यानें ३४ महिने खटला लांबला. फिर्यादीतर्फे आलेली हकीगत शाबीत धरून मॅजिस्ट्रेट यांनीं आरोपीस ३१।७।३६ रोजीं ५१ रुपये दंड केला. व्यापारी इसमानें जप्तीचे कामीं अशा तऱ्हेनें अडथळे आणल्याचें उदाहरण क्वचितच घडतें, यामुळें खटल्याच्या निकालाकडे बऱ्याच लोकांचें लक्ष वेधलें होतें.

---

## रजिस्ट्रारसाहेबांची प. खानदेश इन्स्टिटयूटला भेट

श्री. के. एल. पंजाबी, राजिस्ट्रार, को. सोसायटीज, ह्यांनीं इलाखा इन्स्टिट्यूटच्या पश्चिम खानदेश जिल्हा शाखेस ता. १३।८।३६ रोजीं भेट दिली. श्री. पालेकरसाहेब, असि. रजिस्ट्रार, श्री. नामदेवराव, एम. एल. सी., श्री. दीपचंद सुपडू पाटील, प्रेसिडेंट, जि. लो. बोर्ड, धुळें व श्री. एस. टी. मोरे, बार ॲट लॉ हेहि विनंतीवरून हजर होते. इन्स्टिट्यूटचे मॅनेजिंग कमिटीचे सर्व सभासद हजर होते. ह्या जिल्हा शाखेचा सन १९३५–३६ सालचा रिपोर्ट रजिस्ट्रार साहेबांचें पुढें मांडण्यांत आला आणि त्यांनीं इन्स्टिट्यूटच्या कामाबाबत सभासदांशीं चर्चा केली. नंतर इन्स्टिट्यूटतर्फे रजिस्ट्रारसाहेब यांस पानसुपारी व अल्पोपाहार देण्यांत आला. ता. १४।८।३६ रोजीं त्यांचा फोटो घेण्यांत आला.

---

## कळवण तालुका ( जि. नाशिक ) सहकारी वृत्त

( १ ) ग्रुप सेक्रेटरीज् डिबेटिंग युनियनमध्यें असि. सुपरवायझर श्री. देशपांडे ह्यांचे अध्यक्षतेखालीं ऐतिहासिक पुरुषांच्या चरित्राविषयीं चर्चा झाली, ( २ ) वसुली कमिटीची व ग्रुप सेक्रेटरींची सभा ता. ७ ऑगस्ट रोजीं भरली होती, ( ३ ) अजून ह्या तालुक्यांत पाऊस नाहीं. कॉलऱ्यासहि सुरवात झाली आहे, ( ४ ) ११ सप्टेंबर रोजीं सहकारी स्टाफ वाचनालयाचें उद्घाटन होणार आहे.

---


# धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

## नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२
अधिकृत भांडवल : : : १०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल : ५,००,०००

## दर शेअरची किं. : रु. ५०

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

# बँकांचे व सोसायट्यांचे वार्षिक अहवाल

### वाई अर्बन को. बँक लि., वाई

( वार्षिक सभा: ता. ३० ऑगस्ट, १९३६ )

| | | | |
|---|---|---|---|
| भाग भांडवल: | १५¾ ह. रु. | शिल्लक: रोख व बँकेंत: | ३८¼ ह. रु. |
| ठेवी: | ७८¼ " " | कर्ज: | २७ " " |
| रिझर्व्ह फंड: | ८ " " | कॅश क्रेडिट : | ४७¾ " " |
| इतर फंड : | ३½ " " | | |

अहवालाचे सालीं बँकेच्या सभासदांची संख्या ३९ नें वाढून ती २१५ झाली. सालमजकुरीं १३ प्रकरणें लवादनिवाड्याकरितां पाठविण्यांत आलीं, त्यांत एकूण ६½ हजार रु. गुंतलेले आहेत. ह्यापूर्वींच्या लवादनिवाड्यांत २०½ हजार रु. गुंतले आहेत ते वेगळेच. ह्या प्रकरणांचा उलगडा लवकर होणें इष्ट दिसतें. बँकेनें ठेवींवरील व्याजाचे दर उतरविले, तरी तिला भांडवलाची अडचण पडली नाहीं. सभासदांच्या कायम ठेवींत भर पडली असून बँकेचा पुण्या-मुंबईशीं व्यवहार वाढला आहे. मालाचे व सोन्याचे तारणावर रकमा गुंतविण्याची तजवीज करण्यांत येणार आहे. अनामत व्याजाची रकम ताळेबंदांत देणें सदरामध्यें लिहून व ११¾ हजारांवर फंड निर्माण करून बँकेनें आपल्या आर्थिक स्थितीस बळकटी आणली आहे. अहवालाचे सालीं बँकेस २,१४१ रु. ११ आणे नफा झाला. त्यांतून भागीदारांस ६ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यासाठीं ९१५ रु. मंजूर करावेत अशी डायरेक्टर बोर्डानें शिफारस केली आहे.

---

### पश्चिम खानदेश सरकारी नोकरांची परस्पर सहाय्यकारी मंडळी लि., धुळें

( वार्षिक सभा: २०–९–३६ )

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | ४०¾ | शिल्लक व सरकारी आणि निमसरकारी रोखे | २,५४ |
| रिझर्व्ह फंड | ८½ | कर्ज येणें | १,८५ |
| इतर फंड | ४ | | |
| वर्गणी | ३,४५ | | |
| से. बँक खातें | २६ | | |
| | ४,४४½ | | ४,४४½ |

मंडळीच्या पटावर १,११८ सभासद आहेत. गुदस्त सालीं थकबाकी शेकडा फक्त १·७ इतकी होती, ती अहवालाचे सालीं कमी होऊन आतां ती फक्त ·९९ इतकी आहे. १ डिसेंबर १९३५ रोजीं मंडळीनें सेव्हिंग्ज बँक खातें उघडलें व सात महिन्यांत त्यामध्यें ११५ लोकांनीं २६ हजार रुपये ठेवले. अहवालाचे सालीं निवळ नफा ४,५४३ रु. झाला, त्यांतून १,१३५ रु. रिझर्व्ह फंडांत, ८९० रु. रोख्यांच्या फंडांत व २०४ रु. इमारतफंडांत टाकून २,३१३ रुपयांचा विनियोग भागीदारांस ६½ टक्के दरानें डिव्हिडंड देण्याकडे करावा अशी मॅनेजिंग कमिटीची शिफारस आहे. मंडळीच्या इमारतीचे योजनेस रजिस्ट्रारसाहेबांची मंजुरी मिळाली आहे व इमारत लवकर उभारण्यासंबंधीं खटपट चालू आहे. मंडळीचें काम एकंदरीनें समाधानकारक चालल्याचें अहवालावरून स्पष्ट दिसत आहे.

---

### चतुःशृंगी को. क्रे. सोसायटी लि., पुणें

ह्या संस्थेचें कार्य आज २६ वर्षें अव्याहत चालू आहे, परंतु तिच्या कारभारांत सोसायटीचे सभासद मनःपूर्वक लक्ष घालीत नाहींत; व्यवहारांत थोडी सोय होते, एवढ्याच संकुचित दृष्टीनें तिच्याकडे ते पहातात, ही चालकांची तक्रार अजूनहि दूर होत नाहीं. "कमी व्याजानें कर्ज मिळतें, एवढ्याकरतां कर्ज काढावयाचें झालें म्हणजे सोसायटीचे सभासद व्हावयाचें, हा लोकांची भावना नाहींशी होणें अत्यंत अवश्य आहे," असें वरील सोसायटीच्या ताज्या अहवालांत म्हटलेला आहे. सोसायटीचे सभासद बहुतेक आर्यभूषण व ज्ञानप्रकाश छापखान्यांतील नोकर असल्यामुळें चालकांचे नेतृत्त्वाखाली तिचें काम चांगलें चालूं शकतें. तथापि, त्यांच्यामध्यें सहकाराची भावना प्रसृत व्हावयास पाहिजे तशी झालेली नाहीं, अशी चालकांची रास्त तक्रार आहे. सालअखेर एकहि कर्ज थकलेलें नाहीं. "कर्जाचा व्यवहार उत्तम चालविलेला दिसतो" असा ऑडिट शेरा आहे. अहवालाचे सालीं सोसायटीचे संस्थापक व अध्यक्ष श्री. गो. कृ. देवधर हे कालवश झाले, त्यामुळें संस्थेचें फार मोठें नुकसान झालें आहे.

---

### मिरजप्रांत व कुची तालुके को. सु. यूनियन लि., सांगली

( १-११-३४ ते ३१-५-३६ अखेरचा अहवाल )

ता. १-७-३४ रोजीं कुची तालुका सहकारी परिषद भरविण्यांत आली होती, त्यामध्यें झालेल्या वाटाघाटीस अनुसरून वरील यूनियनची स्थापना झाली. एकूण ४४ सोसायट्या तीमध्यें सामील असून ३,०२१ सभासद आहेत. सोसायट्यांकडे ७२½ हजारांच्या ठेवी आहेत व सालअखेर सामील सोसायट्यांतील सभासदांकडे २ लक्ष ३१ हजार रु. कर्ज येणें आहे, त्यांत १ लक्ष ६२ हजार रु. थकबाकी आहे. हा आकडा मोठा आहे, तथापि तो कमी करण्याकडे यूनियनचें लक्ष आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. यूनियनचा अहवाल तपशीलवार असून त्यांत प्रत्येक सोसायटीबाबत जरूर ती माहिती आकड्यांनिशी दिलेली आहे.

---


## नोटीस

गव्हर्नमेंट सर्व्हंट्स् महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें या संस्थेची वार्षिक साधारण सभा रविवार ता. १३ सप्टेंबर १९३६ रोजीं दुपारीं ४ वाजतां पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या असेंब्ली हॉलमध्यें भरणार आहे. त्यावेळीं सन १९३५-३६ सालाचा अहवाल व ताळेबंद मंजूर करणें, पुढील साळाकरितां सल्लागार मंडळ, कार्यकारी मंडळ व हिशेब तपासनीस यांच्या निवडणुकी करणें वगैरे कामें होतील.

सभेस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें. ज्या सभासदांनीं अगर ठेवीदारांनीं आपले पत्ते बदलले असतील त्यांनीं आपले नवीन पत्ते तावडतोब कळवावेत म्हणजे त्या पत्त्यावर अहवाल पाठविणेस बरें पडेल.

कार्यकारी मंडळाच्या हुकमावरून

आर. डी. भणगे

पुणें २४-८-३६ ऑ. सेक्रेटरी

## रशियांत प्रजावृद्धीस सरकारचें उत्तेजन

समाजसत्तावादाच्या तत्वांस मूर्त स्वरूप देण्याचे यत्न रशियामध्यें कळसास पोंचवले गेले असल्यानें तेथें येणाऱ्या अनुभवाकडे इतर देशांचें सतत लक्ष असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. पुराणमतवादी व दुसऱ्या देशांवर आक्रमण करण्याची इच्छा असलेल्या जर्मनी व इटली सारख्या राष्ट्रांत विवाह व जनन ह्यांस उत्तेजन देऊन भावी सैनिक तयार होण्यासाठी प्रजावृद्धीचे प्रयत्न सरकारामार्फत चालले आहेत. आंतरराष्ट्रीय शांतता हें समाजसत्तावाद्यांचें ध्येय असल्यानें रशियांत ह्या प्रकारचें धोरण अंगिकारण्यांत येईल असें वाटत नव्हतें. कुटुंबव्यवस्थेस त्यांचें मत फारसें अनुकूल नसल्यामुळें विवाहबंधनाचें शैथिल्य, घटस्फोटाची सोय, गर्भपातास कायदेशीर अनुमति इत्यादि बाबतींत रशियन सरकारनें लोकांस स्वातंत्र्य व मुभा दिली असल्यास ती गोष्ट अपेक्षित अशीच होती. तथापि, रशियांतले सत्ताधारी अनुभवावरून शहाणपण शिकत असून जरूरीप्रमाणें आपली समाजव्यवस्था व तिच्याविषयींच्या कल्पना ह्यांत फेरफार करण्यास कचरत नाहींत, ही गोष्ट लक्ष्यांत घेण्याजोगी आहे. रशियांत सरकारी संस्थांमध्यें राजरोसपणानें गर्भपात करण्यास स्त्रियांस सोय करून देण्यांत आली होती. ह्या व्यवस्थेची अनिष्टता लक्षांत येऊन तेथील सरकारानें अलीकडे नवीन कायदा केला असून गर्भवती स्त्रीच्या जीवितास बाळंतपणानें धोका येईल असें सिद्ध होईल तरच त्या व्यवस्थेचा फायदा घेतला जावा असें आतां ठरविलें आहे. "सातपुत्या" स्त्रियांस सरकारकडून प्रत्येकी दोन हजार रूबल ह्याप्रमाणें पांच वर्षें द्रव्यसहाय मिळेल. अकरा मुलें प्रसवणाऱ्या स्त्रीस मिळणारी मदत ह्याहिपेक्षां अधिक आहे. अर्भकांची नीट निगा व्हावी म्हणून खास व्यवस्था करण्यांत यावयाची असून घटस्फोटांस आळा बसावा म्हणून त्यांची फी वाढवण्यांत आली आहे. विवाहबंधन तोडून टाकणाऱ्या स्त्रीपुरुषांनीं आपल्या मुलांच्या खाण्यापिण्याची योग्य तरतूद न केल्यास त्यांस कडक शासन केलें जाणार आहे. १९६५ सालापर्यंत रशियाची लोकसंख्या ३० कोटि व्हावी अशी तेथील सोव्हिअट सरकारची योजना आहे असें म्हणतात. रशियाचा प्रदेश एवढा अवाढव्य आहे व त्यांतील अनेक विभागांत वसती इतकी तुरळक आहे कीं प्रजेची झपाट्यानें वाढ होणें त्यामधील सरकारास अगत्याचें वाटत आहे. एवढ्या प्रदेशाचें रक्षण करण्यास लढाऊ लोकहि जरूर आहेत, हें उघड आहे. शेतकरी वर्गांत जननाचें प्रमाण नेहमी मोठें असतें, परंतु सोव्हिअट राजवटींत त्या लोकांत गर्भपाताचा प्रसार जोरानें झाला व सरकारास प्रजावाढीविषयीं काळजी उत्पन्न झाली. रशियन सरकार ह्या कारणानें नवीन कायदे करण्यास उद्युक्त झालें व त्याच्या त्या रीतीनें बदललेल्या धोरणाचा परिणाम प्रजावृद्धि व कुटुंबव्यवस्था ह्यांस उत्तेजन मिळण्यांत होईल ह्यांत शंका नाहीं. दुसऱ्या राष्ट्रांचें अनुकरण खोल विचार न करतां आपल्या समाजांत करूं पहाणारांनीं ह्यापासून बोध घ्यावा.

### वर्तमानपत्राच्या धंद्यांत तेलकट व तिखट

"वर्तमानपत्राच्या धंद्यांतील कामानें प्रकृतीस जसा अपाय होतो, तसा भिकार खाणावळींतल्या अन्नानेंहि होत नाहीं. साधें व सात्विक अन्न सेवन केल्यास पचनक्रिया चांगली चालते; पण वर्तमानपत्राच्या धंद्यांत तिखट, तेलकट व आंबट ह्यांशिवाय भागतच नाहीं."

## हिंदी सूत व कापड

### उत्पादनाच्या प्रगतीची गती कमी झाली

हिंदी कपास कापडाचें व सुताचें उत्पादन वाढत आहे तथापि प्रगतीचें पाऊल मंदावलें आहे, असें त्या संबंधांतील आकड्यांवरून समजून येतें.

( आकडे लक्षांचे आहेत )

| | १९३५–३६ | | १९३४–३५ | |
|---|---|---|---|---|
| | उत्पादन | आयात | उत्पादन | आयात |
| सूत ( पौंड ). | | | | |
| नं. १ ते २५ | ७५५७ | ३·६ | ७२४८ | ६·९ |
| नं. २६ ते ४० | २३८० | १४८ | २२६८ | ८९ |
| नं. ४० चेवर | ५८५ | ८७ | ४३९ | ८४ |
| एकूण सूत | १०५२२ | २३८ | ९९५५ | १८० |
| कापड ( यार्ड ) | ३५७०९ | ९४६७ | ३३९७५ | ९४३७ |

१९३५–३६ सालांतील सुताचें उत्पादन १९३३–३४ मधील उत्पादनापेक्षा १५ टक्क्यांनीं ज्यास्त आहे, परंतु १९३४–३५ च्या मानानें फक्त ५½ टक्केच प्रगति झाली आहे. विणलेल्या कापडाचे उत्पादनांतील तत्सम आकडे अनुक्रमें १८ व ३½ टक्क्यांनीं ज्यास्त आहेत.

४० नंबरावरील सुताचें उत्पादन हिंदुस्थानांत वाढत आहे, परंतु २६ ते ४० नंबरांमधील सुताची आयात मात्र फुगली आहे. कापडाच्या आयातींत विशेष फरक झालेला नाहीं. गेल्या वर्षी हिंदी उत्पादनाच्या २६½ टक्के यार्ड कापडाची आयात झाली; १९३४–३५ मध्यें हें प्रमाण २८ टक्के इतकें होतें.

### मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतीवर टीका

मुंबई येथें भाषण करतांना प्रिन्सिपॉल दावर ह्यांनीं मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतीवर टीका केली. ते म्हणाले:—"मॅनेजिंग एजंटांचे करार लांबलचक असतात, कंपन्यांच्या भागीदारांचें मत न घेतां एजन्सी पिढ्यानपिढ्या चालविल्या जातात, एजंट्स भलत्याच दरानें व्यवहारांवर कमिशन मिळण्याबाबत व कंपनीशी कच्च्या मालाच्या खरेदी–विक्रीचे करार करतात. कंपन्या व मॅनेजिंग एजंट्स ह्यांचेमध्यें सध्यां चालू असलेल्या करारांची मुदत कमी करणें आवश्यक आहे. ज्या मॅनेजिंग एजन्सीज दहा वर्षांहून ज्यास्त काळ चालू आहेत, त्या दुरुस्त कंपनी-कायदा पास झाल्यानंतर पांच वर्षांत संपुष्टांत याव्या, अशी कायद्यांत तरतूद करणें जरूर आहे."

### मुंबई विश्वविद्यालयाचे नवीन पदवीधर.

मुंबई विश्वविद्यालयाचा पदवीदानसमारंभ गेल्या आठवड्यांत झाला, त्यावेळीं एकूण १,८८० विद्यार्थ्यांस पदव्या देण्यांत आल्या. पदवीधरांची वर्गवारी संख्या खालीलप्रमाणें आहे:—

बी. ए. ९४६; बी. टी. ८७; बी. कॉम्. ४३; एम. ए. ९८; एम. कॉम. १; बी. एससी. ३०१; बी. एजी. ३०; बी. ई. ५४; बी. एससी. (टेक्नॉ.) १३; एम. एससी. ३५; डी. एससी. १; एलएल. बी. १७६; एम. बी. बी. एस. ९१; बी. एच. वाय. २; एम. डी. १; एम. एस. १.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—४ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०-१३ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८—९ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९—६ |
| ४% १९६०–७० ... ... | ११४-१५ |
| ४% १९४३ ... ... ... | १११—५ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९९—२ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०७–१३ |
| २¾% १९४८–५२ ... ... | १०१—० |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १११—४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १००—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | ११०—४ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७० वर्षें मुदत) | ११०—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | १११-१५ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२४-१० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३२—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १११—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३३-१४ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५६५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १०६—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९९—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९०५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १६२—८ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४५—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २५६—४ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १६२६—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि. ७½%) | १६१५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९६–१४ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६६–१२ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८६—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७४०—० |

*For All Medicinal Requisites*
— TRY —
**N. MAHADEV & Co.**
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner, POONA 2.

The House for Quality goods at most reasonable prices.
**K. M. BELSARE & Co.,**
PLAIN & DECORATIVE FURNITURE
FOR
Home, School, College, Office etc. in
WOOD & IRON
Sadashiv, POONA 2

**पहिल्यानें सुरक्षितता**
रस्त्यावरून जातांना तुम्ही सुरक्षिततेचा मार्ग पहिल्यानें पहातां. हीच गोष्ट पैसे बँकेंत किंवा विम्यांत गुंतविण्यासंबंधीं आहे. पहिल्यानें तुम्ही पैशाची सुरक्षितता पहातां; नंतर व्याज किंवा बोनस.
हिशेब तपासणी आणि प्रतिनिधित्व सरकारी खात्याकडे असल्यानें
**दि बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लि.**
मध्यें आपले पैसे गुंतविल्यास कसलाच धोका नाहीं.
सविस्तर माहितीकरितां लिहा—
कुळकर्णी आणि कंपनी — चीफ ऑर्गनायझर्स
चुनीलाल डी. बरफीवाला — मॅनेजिंग डायरेक्टर.
९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी
टेलरिंग फर्म
मॅनेजर:-व्ही.पी. पाटसकर, D.M.T.O.A. (London.)
**पाटसकर आणि कंपनी**
४८ निहाल पेठ, पुणें शहर.
सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी
आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें — पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

## " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. (ट. ख. निराळा)

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
## V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

## दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

## K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली


हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुर्डा घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें २.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख २, सप्टेंबर १९३६. अंक ३५

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

वेस्टर्न इंडिया
लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.
स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी-सातारा.
संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.
बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५
१९३५ मधील नवें काम ५१,३०,०४२ रु.
एकूण चालू काम २,७०,००,००० रु. अधिक
एकूण जिंदगी ७१,७१,०९३ रु.
लाइफ फंड ६०,४२,८७३ रु.
एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.


MARATHE & Co.
ENGINEERS & IRON FOUNDERS
WORKS: Natu Bag, Bhikardas Road, POONA 2
Can undertake to do any sort of casting.
We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act.
Our prices are very competitive.
OFFICE: 978-79, Sadashiv, POONA 2

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

WANTED Arts Graduates & Medical Practitioners to push up Rural Uplift & Medical Relief Movement in furtherance of Insurance Benefit. Plans throughout district places, in the Presidency. Adequate remuneration to capable workers.
Apply with particulars to :—
Head Office :— 99, Laxmi Road, POONA. — General Manager, The Dawn of India Life Ins. Co., Ltd.

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं !! आवाज नाहीं !!!

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः-ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः-

१ केळकर ब्रदर्स,

बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी,

लक्ष्मीरोड.

## विविध माहिती

### बँकांस सुट्टी

शनिवार ता. ५ सप्टेंबर रोजीं पारशी वर्षारंभानिमित्त बँका बंद राहतील.

### पोलादाच्या कारखान्यांचें एकत्रीकरण

बंगाल आयर्न, बर्न अॅन्ड कं, इंडियन आयर्न व टाटा ह्या चार कंपन्यांचें एकत्रीकरण होण्याचा रंग दिसत असून त्या संबंधांतील वाटाघाटी लंडन येथें चालू आहेत. म्हणजे, आतां सिमेंटच्या कारखान्यांप्रमाणें पोलादाच्या कारखान्यांचेंहि सहकार्य होणार आहे. वाढत्या डिव्हिडंडच्या अपेक्षेनें वरील चारहि कंपन्यांचे भाग तेजीमध्यें आहेत.

### हिंदी ट्रन्क टेलिफोनच्या उत्पन्नांत घट झाली

एका शहरांतून दुसऱ्या शहरांतील इसमाशीं टेलिफोनमधून बोलावयाचें असलें, म्हणजे त्याप्रीत्यर्थ वेगळा आकार द्यावा लागतो. १९३५-३६ मध्यें अशा तऱ्हेच्या बोलण्यासाठी आकारण्यांत यावयाच्या दरांत कित्येक सवलती देण्यांत आल्यामुळें उत्पन्नांत तीन लक्षांची घट झाली व सरकारास ४४ लक्ष रुपये मिळाले.

### रेडिओसंबंधीं संशोधन

हिंदुस्थानांत पांच नवीं रेडिओचीं स्टेशन्स उघडण्यांत यावयाचीं आहेत, असें समजतें. हिंदी रेडिओ-तज्ज्ञ निर्माण करण्यांत यावेत अशा अपेक्षेनें दिल्ली येथील मध्यवर्ती रेडिओ संशोधन-गृहाचें काम चालणार आहे.

### आय. एम. एस. मधील हिंदी अधिकारी

इंडियन मेडिकल सर्व्हिसमध्यें कायम कमिशन मिळालेल्या अधिकाऱ्यांची एकूण संख्या ६१७ आहे व त्यांतील २०७ अधिकारी हिंदी आहेत. नांवानें इंग्रजी दिसले तरी ह्यांपैकीं कित्येक जण हिंदी नागरिकत्वाचे हक्क प्राप्त झालेले बिगर हिंदी असल्यानें त्यांची हिंदी ह्या सदरामध्यें गणती केलेली आहे.

### चिमकुलें स्वतंत्र राज्य

कॅथोलिकांचे जगद्गुरु, पोप, ह्यांचें इटलीमधलें व्हॅटिकन शहर हें जगांतील सर्वांत लहान स्वतंत्र राज्य आहे. त्याची एकूण लोकसंख्या अवघी ७०० आहे व त्यांतले बहुतेक लोक शिपाई व घरगुती नोकर आहेत.

### सातशे लोक आणि सहाशे टेलिफोन

व्हॅटिकन शहराची लोकसंख्या ७०० च असली तरी त्यांत ६०० टेलिफोन आहेत.

### आगगाड्यांचा वक्तशीरपणा

लंडन, मिडलंड अॅन्ड स्कॉटिश रेल्वेसंबंधीं नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका महिन्याच्या आकड्यांवरून असें समजतें, कीं ह्या अवधींत सदरहु रेल्वेच्या मार्गावरून एकूण २,७४,०९८ एक्सप्रेस व पॅसेंजर गाड्या गेल्या, त्यांपैकीं २,६२,९६८ म्हणजे शेकडा ९६ आगगाड्या आपल्या मुक्कामास वक्तशीर पोचल्या. केवळ एक्सप्रेस गाड्यांचा हिशेब केला असतां त्यांतील ९३ टक्के गाड्या अगदी ठराविक वेळेस स्वस्थानीं गेल्या, असें दिसतें. १९२३ सालीं वरील रेल्वे चालू झाली, तेव्हांपासून इतका वक्तशीरपणा आजपर्यंत आढळून आला नव्हता.

### मोटारींच्या शिंगास बंदी

मुंबई शहरांतील फोर्ट व कुलाबा विभागांत मोटारींचें शिंग वाजविण्यास सध्या रात्रीं ११ ते सकाळीं ६ पर्यंत बंदी आहे. ह्या बंदीची अंमलबजावणी ह्यापुढें २४ तासहि व्हावी, अशी व्यवस्था करण्यांत येत आहे. युरोपांतील कांहीं शहरांत ही पद्धत यशस्वी झालेली आहे.

### बार्शी लाइट रेल्वेचें उत्पन्न

एप्रिलच्या प्रारंभापासून ऑगस्टच्या २० तारखेपर्यंतच्या मुदतींत बार्शी लाइट रेल्वेचें उत्पन्न चालू सालीं ६ लक्ष ७३ हजार रुपये झालें. गेल्या वर्षी ह्याच मुदतींतल्या उत्पन्नाची रकम ७ लक्ष, ९४ हजार रु. इतकी होती.

### क्लिअरिंग हाउसची उलाढाल

मुंबई शहरांतील बँकांच्या परस्परांवर असलेल्या चेक्सची वजावाट करण्याची व्यवस्था आहे, तीमध्यें २८ ऑगस्ट रोजीं पुऱ्या झालेल्या आठवड्यांत १० कोटि, ६६ लक्ष रुपयांची उलाढाल झाली.

### एक जागा आणि अनेक अर्ज

लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या संरक्षणाचें काम करणाऱ्या मुख्याधिकाऱ्याच्या मदतनिसाची जागा भरावयाची होती, तिच्यासाठी पांच हजार लोकांनीं अर्जाचे फॉर्म नेले व शेवटीं एका मल्लयुद्ध-विशारद पदवीधराची त्या जागेवर नेमणूक झाली आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २२ ऑगस्ट १९३६ रोजीं पुरा झालेला आठवडा | ४७, ८७, ०९२ |
| ता. २९ ऑगस्ट १९३६ रोजीं पुरा झालेला आठवडा | ६०, ९४, ६८८ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते २९ ऑगस्ट १९३६ अखेर | २, ८०, ५१, ४९, ५९५ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४३० |
| २ बँकांच्या ठेवी व कर्जें | ४३१ |
| ३ स्फुट विचार ... | ४३२ |
| घरभाड्यावरील कराची आकारणी--डिस्ट्रिक्ट जज्जांचा तद्विषयक अभिप्राय--सहकारी बँकांची परिषद्--अर्बन बँकांचे प्रश्न--दुर्दैवानें पुष्काळाची छाया पसरली--खेडेगांवांविषयींचा चित्रपट--रिझर्व्ह बँकेच्या डायरेक्टरांची निवडणूक--सहकारी नियमांत दुरुस्ती--बेकारी व उद्योग धंद्यांच्या वाढीची आवश्यकता | |
| ४ उतरते व्याजाचे दर | ४३५ |
| ५ दुधाचें महत्त्व ... | ४३५ |
| ६ हिंदी व्यापारांत सुधारणा | ४३६ |
| ७ रक्ताचें दान ... | ४३६ |
| ८ रिझर्व्ह फंड आणि सिंकिंग फंड ... ... | ४३७ |
| ९ सहकारी बँकांचे व सोसाट्यांचे अहवाल ... | ४३८ |
| १० निवडक बाजारभाव | ४३९ |



# अर्थ

बुधवार, ता. २ सप्टेंबर, १९३६


## बँकांच्या ठेवी व कर्जें

### तुलनात्मक परीक्षण

जनतेनें बचत केलेला पैसा सुरक्षित व तिला थोडाबहुत किफायतशीर होईल अशा रीतीनें ठेवून घेऊन त्याचा विनियोग उद्योगधंदे व व्यापार ह्यांस लागणारें खेळतें भांडवल पुरवण्याकडे करणें हें बँकांचें मुख्य समाजोपयोगी कार्य आहे. त्यांनीं घेतलेल्या लोकांच्या ठेवी आणि गिऱ्हाइकांस दिलेलीं कर्जें ह्यांच्या परस्पर--प्रमाणावरून देशांतील आर्थिक परिस्थितीविषयीं अनुमान काढतां येतें. बँकांत किती पैसा जमतो व त्यापैकीं कितीसा धंदेवाल्यांस कर्जाऊ देण्यांत येतो आणि किती कर्जरोख्यांत वगैरे गुंतवावा लागतो ह्यासंबंधांतली माहिती व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या हालचालीची निदर्शक असते. बँकांच्या एकूण भांडवलापैकीं बराचसा भाग कर्जे देण्यांत योजिलेला असल्यास धंदेव्यापाराची चलती आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. गेल्या सहा वर्षांतल्या मंदीमुळें बँकांच्या गिऱ्हाइकांची कर्जाबद्दलची मागणी पूर्वीच्या मानानें कमी झाली असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. व्याजाचे दर उतरणें व कर्जरोख्यांचे बाजारभाव चढणें हीं त्याच परिस्थितीचीं लक्षणें आहेत. तथापि,अलिकडे आर्थिक मंदीस थोडा आळा बसत असल्याचीं चिन्हें दिसत आहेत. राष्ट्रीय सरकारांचें धंदे व व्यापार ह्यांस उत्तेजन देण्याचें धोरण, भावी युद्धाच्या भीतीनें कित्येक उद्योगांस मिळालेली चालना इत्यादि कारणांनीं हा परिणाम घडून येत असून आर्थिक घटनेंत स्थितिस्थापकतेचा स्वाभाविक गुण असतो, त्याचीहि ह्या कामीं मदत होत आहे.

पांच प्रमुख ब्रिटिश बँकांच्या ठेवी व कर्जें ह्यांमध्यें गेल्या चार वर्षांत पूर्वीच्या काळाच्या मानानें काय फेरबदल झाला आहे हें दर्शविणारे "एकॉनॉमिस्ट" ह्या साप्ताहिकावरून घेतलेले आंकडे शतमानानें खालीं दिले आहेत. १९३२ सालच्या ठेवींच्या व कर्जांच्या रकमा प्रत्येकी शंभर होत्या असें मानल्यास पुढील वर्षांत किती चढउतार झाला हें त्यांवरून दिसून येईल:—

**पांच प्रमुख ब्रिटिश बँकांचे आंकडे**

ता. ३० जून, १९३२=१००

| ता. ३० जून, | बँकांतल्या ठेवी | बँकांनीं दिलेलीं कर्जें | व्यापारी उलाढालीचें परिमाण |
|---|---|---|---|
| १९३३ | १११ | ९४ | १०४ |
| १९३४ | १०५ | ९२ | ११३ |
| १९३५ | ११२ | ९२ | ११९ |
| १९३६ | १२१ | १०१ | १२६ |

सात-आठ वर्षांमागें ठेवींपैकीं ५५ टक्के इतका पैसा बँका गिऱ्हाइकांस कर्जाऊ देत असत. तें प्रमाण आतां ४० टक्क्यांवर आलें आहे. व्यापाराची उलाढाल ज्या प्रमाणांत वाढली आहे, त्या प्रमाणांत बँकांच्या कर्जांत वाढ झालेली नाहीं. त्यास अनेक कारणें आहेत, तीं विचार करण्यासारखीं आहेत. उद्योगधंद्यांत अलीकडे थोडीशी चलती दिसत आहे, तिच्या योगानें धंदेवाल्यांच्या हातीं रोकड अधिक प्रमाणांत खेळत आहे, हें त्याचें पहिलें कारण आहे. पूर्वी बँकांनीं बुडित व संशयित कर्जें तोटा म्हणून निकालांत काढलीं होतीं, त्यांतल्या कांहीं रकमा वसूल होऊन नफातोटा पत्रकांत नफ्याच्या स्वरूपांत दाखल झाल्या आहेत, हें बँकांच्या अनुभवावरूनच दिसून येतें. यावरून धंदेवाल्यांच्या हातांत रोकड पैसा येत आहे, ह्यांत शंका नाहीं. पैशाच्या स्वस्ताईमुळें धंदेवाले बँकांकडून कर्जें न घेतां बाजारांत भागांच्या व डिबेंचर्सच्या स्वरूपांत भांडवल उभें करतात, ह्या प्रवृत्तीचाहि येथें निर्देश करणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें, मंडळ्या आपल्या वार्षिक नफ्यांतून माफक दरानें डिव्हिडंड वांटून त्यांतला बराच मोठा अंश निधीमध्यें टाकतात. म्युनिसिपालिट्यांसारख्या संस्थाहि बाजारांत कर्जें उभारून त्यांतून बँकांच्या देण्याची फेड करीत आहेत असें आढळून येतें. हायरपर्चेस ( मालाची किंमत हप्तेबंदीनें घेण्याचा व्यवहार ) पद्धतीनें व्यवहार करणाऱ्या मंडळ्यांस त्यांच्या येण्याच्या निम्म्यापर्यंत कर्जें बँका देतात. हें नवें गिऱ्हाइक बँकांस मिळत आहे, हें खरें; पण विमा मंडळ्या व हुंड्या सत्कारण्याचा धंदा करणाऱ्या मंडळ्या त्यांच्या क्षेत्रांत पदार्पण करीत आहेत. अलीकडे बँकांच्या गिऱ्हाइकांनीं घेतलेल्या कर्जांच्या रकमेची व्यक्तिशः सरासरी पूर्वीपेक्षां कमी झाली आहे ह्यांतहि शंका नाहीं.

ह्या रीतीनें ब्रिटिश बँकांच्या व्यवहारांत स्पर्धा उत्पन्न झाली आहे व तिला तोंड देण्याचा यत्न करणें त्यांस प्राप्त आहे. पैसा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पाठवण्याच्या सोयीचा महत्त्वाचा फायदा जनतेस बँकांकडून मिळतो व त्याचा खर्च दिलेल्या कर्जांवरील व्याजांतून त्या संस्थांस भागवावा लागतो. वरील चेक्सच्या वगैरे सोयीस आपणांस पैसा पडावा किंवा ती मर्यादित व्हावी ही गोष्ट जनतेस रुचणार नाहीं. तेव्हां, बँका सुरक्षित राहून त्यांचे व्यवहार सुरळीतपणें चालण्यास त्यांस कमी नफ्यावरच त्यांच्या भागीदारांस बेताच्या डिव्हिडंडवर संतुष्ट रहावें लागणार, असा निष्कर्ष "एकॉनॉमिस्ट" साप्ताहिकानें ब्रिटिश बँकांच्या परिस्थितीची छाननी करून काढला आहे. *हिंदुस्थानांतल्या व्यापाराच्या व बँकिंगच्या देवघेवींची परिस्थिति* थोडी भिन्न असली तरी इतरत्र चाललेल्या उलाढालींचें प्रतिबिंब तिच्यामध्येंहि पडलेलें दिसणें अपरिहार्य आहे. मंदी, व्याजाच्या दरांत उतार,

बँकांमधून ठेवींची गर्दी, गिऱ्हाइकांत कर्जाच्या मागणीविषयीं उत्सुकतेचा अभाव इत्यादि गोष्टी आपलेकडेहि दिसून येतात. ह्या देशांत बँकिंगचा प्रसार होण्यास वाव मात्र अजून पुष्कळ आहे. बँकिंग-संघटनेच्या बाबतींत हिंदुस्थान फार मागें आहे; त्यामुळें जनतेच्या बचतीचा उपयोग ठेवींच्या मार्गानें येणाऱ्या पैशांतून धंदेवाल्या लोकांस कर्जे देण्यांत बँकांस करतां येण्यासारखा आहे. प्रमुख हिंदी बँकांच्या जवळच्या ठेवी व त्यांनीं दिलेलीं कर्जें ह्यांची कल्पना रिझर्व्ह बँकेमार्फत त्यासंबंधांतली माहिती प्रसिद्ध होते तीवरून येण्यासारखी आहे. त्याबाबतचे तुलनात्मक आंकडे खालीं दिले आहेत, त्यांवरून दिसून येईल कीं, हिंदी बँकांनीं गिऱ्हाइकांस दिलेल्या कर्जाची रकम त्यांकडे असलेल्या ठेवींच्या प्रमाणांत वाढलेली तर नाहींच, पण उलट कमी झाली आहे! उद्योगधंदे व शेती ह्यांस उत्तेजन देण्याचा प्रयत्न हिंदुस्थानांत झालेला नाहीं, इकडे सरकारचें--विशेषतः लोकांचें--विशेष लक्ष लागणें अगत्याचें आहे हें स्पष्ट दिसतें.

हिंदी रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या ( शेड्यूल्ड ) बँकांची परिस्थिति दर्शविणारा तक्ता

| | ७ ऑगस्ट, १९३६ | | ५ जुलै, १९३५ | |
|---|---|---|---|---|
| | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष |
| ( १ ) हिंदुस्थानांत चालू ठेवी | १२९ | ९६ | १०९ | ८० |
| ( २ ) हिंदुस्थानांतल्या मुदतीच्या ठेवी | १०० | ७६ | ९७ | ७२ |
| ( ३ ) हिंदुस्थानांतील रोकड | | | | |
| ( अ ) नोटा | ४ | ७६ | ४ | ८२ |
| ( ब ) रुपये | | ५६ | | ४१ |
| ( क ) चिल्लर नाणीं | | २५ | | २० |
| ( ४ ) रिझर्व्ह बँकेंत ठेवी | ३२ | ८१ | २१ | ४७ |
| ( ५ ) हिंदुस्थानांत दिलेलीं कर्जें | ८८ | ९९ | १०२ | ८४ |
| ( ६ ) खरेदी केलेल्या ( डिस्कौंट ) हुंड्या | २ | ७८ | ३ | ९० |

### वाङ्मय व कला ह्यांविषयीं अभिरुची

"जें पुन्हां पुन्हां वाचलें असतां त्यापासून अधिकाधिक आनंद होतो व समाधान वाटतें, तें चांगलें पुस्तक होय."

"मी वाङ्मयाचा किंवा कलेचा ज्ञाता चिकित्सक नाहीं. मला काय आवडतें व आल्हाद देतें हें मात्र मी जाणतों, पण मला त्याची चिकित्सा करतां येत नाहीं आणि माझ्या अभिरुचीचें समर्थनहि मी करूं शकत नाहीं. अन्नामध्यें प्रोटीन व व्हिटामिन ह्यांचें प्रमाण काय आहे हें सांगतां न येतांच कित्येकांस त्याचें सेवन आनंद देतें. तथापि, पानांत पडणाऱ्या प्रत्येक पदार्थाची चिकित्सा करणारीहि कांहीं मंडळी असते. रुचकर अन्नावर मुकाट्यानें ताव देणारांपैकीं मी आहें आणि त्याच वृत्तीनें मी प्रत्येक ग्रंथ व कलाकृति ह्यांचा परामर्श घेत असतों." --लॉइड जॉर्ज.

### जर्मन वसाहती

"जर्मनीच्या वसाहती पुन्हां त्या राष्ट्राच्या स्वाधीन करण्यानें शांतता तर प्रस्थापित होणारच नाहीं, पण त्या योगानें एक विघ्न मात्र उत्पन्न होईल. ह्या वसाहती वास्तविकपणें कांहींच महत्त्वाच्या नाहींत व डॉ. शाख्टसारख्यांनीं त्यांचें स्तोम माजवावें, ह्याचें आश्चर्य वाटतें. तथापि, जागतिक संघटनेचा उपयुक्त भाग म्हणून जर्मन राष्ट्र आपली जबाबदारी लवकरच उचलील तेव्हां वसाहतींच्या कारभाराविषयींच्या प्रश्नांचा निर्णय करण्यांत त्यास सहकार्याची संधि मिळेल; पण त्यास अजून अवधी आहे. सध्याच्या परिस्थितींत जर्मनीची मागणी मान्य करतां येणें अशक्य आहे.":--सर आर्थर सॉल्टर.

## स्फुट विचार

### घरभाड्यावरील कराची आकारणी

आपला चालू खर्च भागवण्यासाठीं म्युनिसिपालिट्यांस नागरिकांवर कर व पट्ट्या बसवून जरूर तो पैसा उभा करावा लागतो. ह्या उत्पन्नाच्या बाबींपैकीं घरपट्टी ही एक महत्त्वाची बाब असते. घरमालकांस भाडें येतें किंवा स्वतःच्या घरांत राहिल्यानें द्याव्या लागणाऱ्या भाड्याची बचत होते, त्या रकमेवर विशिष्ट प्रमाणांत घरपट्टीची आकारणी केली जाते. भाडेकऱ्यांकडून प्रत्यक्ष वसूल होणारी रकम निश्चित असल्यानें तिच्यावर आकारल्या जाणाऱ्या पट्टीच्या रकमेसंबंधानें फारसा वाद उपस्थित होण्याचें कारण नसतें. घरांत स्वतः मालक रहात असेल तर सदरहू घर भाड्यानें दिलें असतें तर त्याचें काय उत्पन्न झालें असतें ह्याचा अंदाज करावा लागत असल्यानें मात्र कराच्या आकारणीबाबत मतभेद व वांधा उत्पन्न होण्याचा संभव असतो. येथेंहि कांहीं मार्गदर्शक व सूचक अशा बाबी निर्णायक अशा समजल्या जातात आणि घरमालक व स्थानिक संस्था ह्या दोघांच्या हितास बाधक होणार नाहीं ह्या रीतीनें आकारणीचा प्रश्न सोडवावा लागतो. घरपट्टीचा आकार ठरवण्यांत होणाऱ्या स्वाभाविक कल्पनाभेदासहि मर्यादा आहे. घरमालक घेत असलेलें भाडें वाजवीपेक्षां कमी आहे, ह्या समजुतीनें त्याबद्दलची ज्यास्त रकम कल्पून तिच्यावर घरपट्टीची आकारणी म्युनिसिपालिटीनें करणें न्यायाचें होणार नाहीं, हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल.

### डिस्ट्रिक्ट जज्जांचा तद्विषयक अभिप्राय

प्रस्तुत प्रश्नासंबंधानें ठाण्याच्या डिस्ट्रिक्ट जज्जांनीं नुकताच एका खटल्यांत निकाल देतांना महत्त्वाचे उद्गार काढले, त्यांत ग्रथित झालेल्या तत्त्वाकडे लक्ष्य वेधणें आवश्यक आहे. "विशिष्ट घरमालकानें आपलें घर जाणून बुजून त्यावरील पट्टी चुकवण्याच्या किंवा नातेवाइकांवर अथवा मित्रांवर मेहेरबानी करण्याच्या हेतूनें कमी भाड्यानें दिलें आहे असें समजण्यास पुरावा किंवा जागा असल्यावांचून शेजारच्या घरांत ज्यास्त भाडें येतें ह्याच मुद्यावर वरील मालकाचें घरहि अधिक भाड्यानें देतां येईल असें म्युनिसिपालिटीच्या इन्स्पेक्टरनें मत दिल्यास त्याप्रमाणें कराची आकारणी करणें शक्य नाहीं; भोंवतालच्या घरांमध्येंहि त्या घरांतल्या सारख्याच सोयी वगैरे आहेत, असें सिद्ध झाल्यावांचून ह्याबाबतींत योग्य तुलना करतां येणार नाहीं." कुर्ला म्युनिसिपालिटीनें एका मालकाच्या दोन घरांच्या भाड्याच्या वार्षिक उत्पन्नाच्या रकमा पट्टीच्या आकारणीकरितां वाढवून धरल्या होत्या व ती आकारणी कुर्ल्याच्या रेसिडेंट मॅजिस्ट्रेटनीं योग्य असल्याचा निकाल दिला होता. त्याविरुद्ध झालेल्या अपिलांत डिस्ट्रिक्ट जज्जांनीं घरांच्या भाड्याच्या पूर्वीच्याच रकमा मान्य व्हाव्या असा निर्णय दिला आणि तो देतांना वर उद्धृत केलेले उद्गार काढले. उत्पन्नावर करांची आकारणी कर्तव्य असतां कोणतीं मूलभूत तत्त्वें संभाळलीं पाहिजेत ह्यावर सदरहू अभिप्रायानें बोधप्रद प्रकाश पडत असल्यामुळें त्याची आम्हीं येथें चर्चा केली आहे.

### सहकारी बँकांची परिषद

गेल्या आठवड्याच्या अखेरीस मुंबई येथें सहकारी सेंट्रल व अर्बन बँकांची परिषद भरून तिच्यामध्यें अनेक महत्त्वाच्या विषयांची चर्चा झाली व ठराव मंजूर झाले. डिस्ट्रिक्ट बँकांनीं पतपेढ्यांस लांब मुदतीचीं कर्जें द्यावीं किंवा कसें ह्या प्रश्नाचा, साधक-बाधक गोष्टींचा विचार होऊन, बराच वेळ खल झाला. सदरहु बँकांनीं लांब मुदतीचीं कर्जें देण्याचे व्यवहार-विशेषत: जमीनगहाणाच्या स्वतंत्र बँका आतां स्थापन झाल्या असल्यानें-करूं नयेत असा हुकूम रजिस्ट्रार ह्यांनीं काढला आहे, तो अमलांत येऊं नये अशी मागणी परिषदेंत कांहीं सभासदांनीं केली व त्या आशयाचा ठरावहि पुढें मांडला. लांब मुदतीचीं कर्जें देण्यास लांब मुदतीचें भांडवल जरूर असतें, तें बँकांच्यापाशी निर्बंध रीतीनें असत नाहीं व ह्या कारणानें असल्या व्यवहारांमुळें त्या संस्था गोत्यांत येण्याची भीति आहे, असें मत मुद्दाम गोळा केलेल्या तद्विषयक माहितीच्या आधारानें रजिस्ट्रार ह्यांनीं व्यक्त केलें. शेतकरी लोकांस लांब मुदतीचीं कर्जें तर हवीं आणि त्यांमध्यें आपला पैसा अडकवून टाकणें सेंट्रल बँकांस कठिण; अशा स्थितींत ह्या खास व्यवहारांसाठी स्वतंत्र संस्थाच असणें अगत्याचें असून त्याप्रकारची व्यवस्था जगभर सर्वमान्य झाली आहे. आमचे इकडे जमीनगहाणाच्या बँका ह्याच कार्याकरितां हेतुपूर्वक स्थापन करण्यांत आल्या आहेत. त्यांचे हातून अपेक्षित काय व्हावें तितकें होत नाहीं, असें अनुभवानें सिद्ध झाल्यास पुढें काय करावें आणि विशिष्ट मर्यादेंत सेंट्रल बँकांनीं त्यांतला कांहीं भाग उचलावा किंवा काय हे प्रश्न उपस्थित होतील. सहकारी चळवळींत विशिष्ट क्षेत्रांत भिन्न भिन्न संस्थांनीं श्रमविभागाच्या तत्त्वास अनुसरून आपलें कार्य करणें योग्य आहे. वरील विचारसरणी अखेर प्रभावी ठरून परिषदेनें पुढें आलेल्या ठरावास मंजुरी देण्याचें नाकारलें.

### अर्बन बँकांचे प्रश्न

वरील परिषदेंत अर्बन बँकांच्या हिताचे कांहीं महत्त्वाचे प्रश्न चर्चिले जाऊन त्यांचा निर्णयहि समाधानकारक रीतीनें करण्यांत आला. सेंट्रल बँका व प्रांतिक सहकारी बँकेच्या जिल्ह्यांतल्या शाखा एका बाजूस आणि अर्बन बँका दुसऱ्या बाजस असा विरोध कित्येक बाबतींत उत्पन्न होत असतो. ह्या दोन वर्गांतल्या बँकांच्या कार्यक्षेत्रांचें कांहीं बाबतींत संमिश्रण होतें व आपल्या कार्याच्या मर्यादा निष्कारण आकुंचित होतात अशी तक्रार करण्यास अर्बन बँकांस कारण होतें. क्षेत्र व कार्य ह्यांच्या विभागणीबाबतचे वांधे दूर व्हावेत ह्या उद्देशानें कांहीं ठराव अर्बन बँकांच्या प्रतिनिधींनीं पुढें मांडले आणि त्यांची विस्तृत चर्चा होऊन देवाण-घेवाणीच्या वृत्तीनें ते बहुतेक मंजूरहि करण्यांत आले. शेतमालाच्या तारणावर कर्जें देण्याची चांगली व्यवस्था होण्यासंबंधाचा ठरावहि मान्य झाला व त्यासंबंधांत विधायक योजना मंजूर झाली. घरें गहाण घेऊन त्यांत पैसा गुंतवण्याचा व्यवहार बँका करतात, त्यास आळा घालणें सुरक्षिततेच्या दृष्टीनें इष्ट आहे कीं काय व त्यासाठी ट्रस्ट ॲक्टांत दुरुस्ती करणें आणि तसलेच दुसरे उपाय योजणें आवश्यक आहे किंवा काय ह्या प्रश्नावर परिषदेनें अभिप्राय व्यक्त करावा अशी रजिस्ट्रार यांनीं सूचना केल्यावरून वक्त्यांनीं त्याची भवति न भवति केली आणि ह्या व्यवहाराबाबत बँकांस आज हक्क व सवलती आहेत, त्यांमध्यें ढवळाढवळ करणें योग्य नाहीं असा आपला अभिप्राय परिषदेनें स्पष्टपणें व्यक्त केला. मुद्दल व व्याज ह्यांचे संबंधांत ज्यांचे बाबत सरकारनें हमी घेतली आहे अशा रोख्यांत व भागांत आणि त्याचप्रमाणें मोठ्या स्थानिक संस्थांच्या कर्जरोख्यांत पैसे गुंतवण्यास बँकांस मुभा असावी अशा आशयाचा ठरावहि मंजूर झाला. प्रत्यक्ष वसूल झालेलें तेवढेंच व्याज बँकांनीं नफ्यांत घ्यावें अशी सूचना पुढें आली होती. परंतु जोपर्यंत वसूल न झालेल्या व्याजाचा उपयोग नफावांटणींत होत नाहीं आणि ताळेबंदांत त्याच्या रकमेइतकें देणें असल्याचें दाखल करण्यांत येतें, तोपर्यंत तशी पद्धति अंगीकारण्यांत स्वारस्य नाहीं, असें बहुमत दिसून आल्यानें परिषदेनें सदरहु सूचना नामंजूर केली.

### दुर्दैवानें दुष्काळाचा छाया पसरली

पाऊस आज नाहीं उद्यां येईल अशी वाटत असलेली आशा निष्फळ होऊन ह्या इलाख्याच्या अनेक भागांत शेतीचें पहिलें पीक हातचें जाऊन दुष्काळाचीं भीषण चिन्हें दिसूं लागलीं आहेत. पांच सहा वर्षांच्या आर्थिक मंदीनें त्रस्त झालेल्या समाजावर ही आपत्ति ओढवली असल्यानें बहुसंख्य लोकांच्या दुःस्थितींत मोठी भरच पडली आहे. अवर्षणाचे परिणाम, शेतीच्या जनावरांचे चाऱ्याचे व पाण्याचे हाल, कित्येक खेडेगांवांत पिण्याच्या पाण्याचीहि टंचाई, चोहोंकडे पसरणारी बेकारी व पोटापाण्याची विवंचना ह्यांमध्यें तात्काळ दिसून येतात. अशा प्रसंगीं सरकार व जनता ह्यांनीं अवर्षणाच्या आपत्तीचें निवारण करण्याचे अनेकविध उपाय सहविचारानें व सहकार्यानें वेळींच योजावे लागतात, ह्याची जाणीव जिल्ह्यानिहाय असल्याचें दिसत आहे हें सुचिन्ह आहे असें म्हटलें पाहिजे. दुष्काळीं कामें काढणें, जनावरांच्या चाऱ्याची तरतूद करणें, शेतकऱ्यांस आवश्यक असलेल्या सवलती देणें इत्यादि कार्यक्रमाकडे लक्ष देण्यास प्रारंभ झाला आहे, त्यांत सरकारी अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्था आणि लोकहिताची आस्था बाळगणाऱ्या व्यक्ती ह्यांचें परस्परांस सहाय होणें इष्ट आहे. मुंबई सरकारनेंहि दुष्काळाबाबतचें आपलें धोरण जाहीर करून जनतेमध्यें विश्वास उत्पन्न केल्यास प्रस्तुत कठिण प्रसंगांतून निभावून जाण्यास जनतेस मदत होईल. दुष्काळपीडित भागांत तगाईच्या व इतर स्वरूपांत शेतीचा धंदा तगवण्याच्या योजना आंखल्या जात असून दुष्काळीं कामेंहि काढण्याची कित्येक क्षेत्रांत व्यवस्था होत आहे.

### खेडेगांवांविषयींचे चित्रपट

गॉमंट ब्रिटिश शैक्षणिक चित्रपटांत नुकतीच दोन पटांची भर पडली असून ते खेडेगांवांतली परिस्थिति आणि शेती व्यवसाय ह्यांसंबंधाचे आहेत. त्यांपैकीं पहिला "मध्ययुगीन खेडेगांव" हा असून त्यामध्यें तीनशें वर्षांपूर्वी इंग्लंडमध्यें प्रचलित असलेल्या शेतीच्या पद्धतीचें चित्र रेखाटलें आहे. त्या काळीं शेतकऱ्यांस गांवांतल्या रानांपैकीं निरनिराळ्या जातींच्या जमिनींच्या तुकड्यांत पिकें करण्याची संधि देण्याची पद्धति रूढ होती व त्यांचीं शेतें एका टापूंत किंवा एकत्रित अशीं केव्हांच नसत. ह्या रीतीनें वरील चित्रपटांत जुन्या ब्रिटिश खेडेगांवांतल्या ( अजूनहि कित्येक खेडीं त्या स्थितींत आहेत ) व्यवसायांची व रहाणीची तऱ्हा पहाणारांच्या डोळ्यांसमोर स्पष्ट उभी करण्यांत आली आहे. "शेतीचा कारखाना" हा दुसरा चित्रपट असून त्यांत पाउणशें वर्षांपूर्वी शेतकरी लोक आपलीं

कामें कशीं करीत असत, ह्याचें उठावदार चित्र रंगविलें आहे. खेडेगांवांच्या सामुदायिक जीवनाची कल्पना त्यावरून उत्कृष्ट येते, व राष्ट्रीय घटनेंत त्यास कोणतें स्थान आहे हें त्यावरून चांगलें ध्यानांत येतें.

### रिझर्व्ह बँकेच्या डायरेक्टरांची निवडणूक

हिंदी रिझर्व्ह बँकेच्या व्यवस्थापक मंडळांतील १६ सभासदांपैकीं ८ सभासद भागीदारांनीं आपापल्या क्षेत्रांतून निवडून द्यावयाचे असतात. मुंबई, कलकत्ता व दिल्ली ह्यांच्या वांट्यास प्रत्येकीं दोन सभासद आले असून मद्रास व रंगून मिळून दोन सभासदांस प्रतिनिधित्व मिळतें. दर बारा महिन्यांनीं चिठ्या टाकण्यांत येऊन ज्या यादीचें नांव निघेल त्या यादीतर्फे नेमण्यांत आलेल्या डायरेक्टरांचे ऐवजीं नवीन डायरेक्टर निवडण्यांत येतात. सुरवातीस सर्वच डायरेक्टर गव्हर्नर जनरल इन कौन्सिलनें नेमलेले आहेत. ते अशा रीतीनें एकामागाहून एक निवृत्त होऊन त्यांचे जागीं भागीदारनियुक्त डायरेक्टर येतील व नंतर आळीपाळीनें त्यांची मुदत भरेल. यंदा कलकत्ता यादीची चिठ्ठी निघाली असल्यानें त्या यादीतर्फे निवडणूक होईल.

### नव्या ४८ व्या सहकारी नियमांत दुरुस्ती

मुंबई प्रांतिक कायदेमंडळाचें येतें अधिवेशन ता. ७ सप्टेंबर रोजीं सुरू होणार आहे. नव्या ४८ व्या सहकारी नियमाबाबत सदरहु अधिवेशनांत श्री. बखले हे एक ठराव मांडणार आहेत. सोसायटीच्या कमिटीमधील सर्व सभासद रद्द करून नवी सोसायटी नेमण्याचा रजिस्ट्रारला अधिकार देण्यांत यावा, परंतु त्याची अंमलबजावणी करण्यापूर्वी प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटचे व बँकेचे अध्यक्ष व स्वतः रजिस्ट्रार अशा तिघांच्या बोर्डाची संमति घेण्यांत यावी, अशी श्री. बखले ह्यांची सूचना आहे. पूर्वीच्या कमिटीस आपलें म्हणणें मांडण्यासहि संधि मिळावी व देखरेख करण्याचें काम असलेल्या दुसऱ्या सोसायटीची (यूनिअन) निर्दिष्ट सोसायटी सभासद असेल, तर तिला नियम लागू होऊं नये. रजिस्ट्रारच्या हुकुमावर सरकारकडे अपील करण्यास मोकळीक असावी असेंहि श्री. बखले ह्यांच्या सूचनेंत म्हटलें आहे.

### बेकारी व उद्योगधंद्यांच्या वाढीची आवश्यकता

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या ता. २६ ऑगस्ट रोजीं भरलेल्या तिसऱ्या त्रैमासिक साधारण सभेपुढें भाषण करतांना श्री. वालचंद हिराचंद हे म्हणाले:—

"आज एका प्रसिद्ध ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें 'चांगले रीतीनें कसें रहावें?' हा प्रश्न नसून देशांतील बहुसंख्य लोकांपुढें 'जीवन कसें कंठावें?' हाच प्रश्न प्रामुख्यानें उभा आहे! आपल्यावरील जबाबदारीची जाणीव असणाऱ्या कोणत्याहि भल्या सरकारनें अशा परिस्थितीची दीर्घ काल उपेक्षा करणें शहाणपणाचें होणार नाहीं. सरकारचे बजेटांतील तूट जरी भरून काढण्यांत येऊन त्याची तोंडमिळवणी करण्यांत आली असली तरी देशांतील लाखों कुटुंबांतून आज बजेटांची तोंडमिळवणी होत नाहीं हें स्पष्ट आहे! देशांतील लहान मोठ्या उद्योगधंद्यांची वाढ करून ह्या परिस्थितीला बराच आळा घालतां येईल असें मला वाटतें. बेकारांना उद्योग पाहून देणाऱ्या कचेऱ्या (Employment Bureaus) स्थापन करणें वगैरे वरवरचे उपाय होत व त्यांनीं कार्यभाग होणारा नाहीं."

### ग्रामसुधारणा शिक्षण वर्ग, पालघर (१९३६)

पालघर तालुका शेती सुधारणा मंडळाच्या विद्यमानें पालघर येथें तारीख ६ ते १३ सप्टेंबर १९३६ पर्यंत वरील वर्ग चालविण्यांत येणार आहे. संस्थेचें कार्य फलदायी होण्यास माहितगार कार्यकर्त्यांची तालुक्यांत ठिकठिकाणीं जरूरी आहे असें संस्थेस वाटत आहे, म्हणून अशा इसमांना ग्रामसुधारणेच्या सर्व बाबींची माहिती मिळावी या हेतूनें मुद्दाम हा वर्ग चालविण्यांत येणार आहे. या वर्गांत शेतकी, आरोग्य, सहकार्य, जनावरांची व कोंबड्यांची जोपासना व दुय्यम धंदे या खेड्यांतील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या सर्व विषयांवर तज्ज्ञांकडून सप्रयोग व्याख्यानें व व्यावहारिक माहिती देण्यांत येईल. शिक्षण मोफत देण्यांत येईल.

### नंदुरबार तालुका (प. खानदेश) सहकारी वृत्त

नंदुरबार तालुक्यांतील सुपरवायझर श्री. उपाचार्य ह्यांनीं नंदुरबार यूनियनला सामील झालेल्या सोसायट्यांकडून हल्लीच्या पिकांचे परिस्थितीबद्दल रिपोर्ट मागविले आहेत. ही त्यांची कळकळीची कामगिरी स्तुत्य आहे. असा प्रयत्न इतर तालुक्यांत होऊन जादा कर्जें मागणीचीं पुरवणीपरमावधी पत्रकें तयार करून धान्य व इतर कारणांसाठी बँकेकडून कर्जें मागविणेंबद्दल खटपट व्हावी. हल्लीं पावसानें ताण दिल्यानें दुष्काळाचीं चिन्हें भासूं लागली आहेत.

### वाडा तालुका सुपरवायझिंग यूनियन, लि. ची वार्षिक सर्वसाधारण सभा

यूनियनला जोडलेल्या तालुक्यांतील सर्व सोसायट्यांची वार्षिक सर्वसाधारण सभा श्री. वैकुंठराय मेहता, मॅनेजिंग डायरेक्टर, मुंबई प्रॉ. को. बँक मुंबई, यांचे अध्यक्षतेखालीं गुरुवार तारीख १० सप्टेंबर १९३६ रोजीं वाडें येथें यूनियनच्या ऑफिसांत दुपारीं २ वाजतां यूनियनचा सन १९३५-३६ सालाचा अहवाल व वार्षिक हिशेबाचा ताळेबंद स्वीकारणें, सन १९३६-३७ सालाकरितां यूनियनचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व व्यवस्थापक मंडळ निवडणें इत्यादि कामांचा विचार करण्यासाठी भरणार आहे.

### वार्षिक सभा

| ता. (सप्टेंबर) | वेळ | बँक |
|---|---|---|
| ६ | १२-३० | पुणें सें. को. बँक, पुणें |
| ६ | २-० | अर्बन को. बँक, कराड |
| १० | ८-३० | भुसावळ पीपल्स को. बँक, भुसावळ |
| ११ | २-० | पुणें जि. को. लँड मॉर्गेज बँक, पुणें |
| १३ | ३-० | पूना मर्चंटस को. बँक, पुणें |
| १३ | ४-० | ग. स. महाराष्ट्र को. बँक, पुणें |
| १३ | ५-० | राजवाडे पीपल्स को. बँक, धुळें |
| १९ | ४-० | नगर डि. अ. सें. को. बँक, अहमदनगर |
| २० | १-० | प. खा. स. नो. प. स. मंडळी, धुळें |
| २० | ४-० | नगर डि. अ. सें. को. बँक, अहमदनगर (जादा सर्वसाधारण सभा) |
| २७ ९ | २-० | कॉसमॉस को. अ. बँक, पुणें |

### उतरते व्याजाचे दर व बँकांचा नफा

इंपीरिअल बँक ऑफ इंडियाच्या भागीदारांची वार्षिक सभा ता. १७ ऑगस्ट रोजीं भरली होती. त्यावेळीं मि. रीड के आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले:—

"पैसा स्वस्त दरानें मिळत असला म्हणजे ठेवींवर द्यावयाचें व्याज व कर्जदारांकडून घ्यावयाचें व्याज ह्यांत किफायतशीर तफावत रहात नाहीं. कर्जावरील व्याजाचे दर आधीं उतरतात व नंतर ठेवींवरील व्याजाचे दर कमी होतात. ह्या कारणानें व्याजाचे दर घसरत असतां बँकांचें अपेक्षेपेक्षां ज्यास्त नुकसान होतें; तेच दर चढीचे असले म्हणजे उलट परिस्थिति निर्माण होते व देण्या-घेण्याच्या व्याजाच्या दरांमधील नेहेमींच्या फरकापेक्षां त्यांस ज्यास्त फायदेशीर तफावत उरते. इंपीरियल बँकेच्या स्थापनेपासून आतांपर्यंत ठेवींचे दर (१½%) सध्यां इतके कधींच खाली आले नव्हते व पैशाचा पुरवठा हिंदुस्थानांत मागें कधींहि इतका स्वस्त झाला असेल असें वाटत नाहीं. परिस्थिति अशीच कायम रहाणें अर्थातच संभवनीय नाहीं."

### दुधाचें महत्त्व

राष्ट्रसंघातर्फे प्रसिद्ध झालेल्या पौष्टिक अन्नासंबंधाच्या प्रश्नावरील पुस्तकांत दुधाचें महत्त्व वर्णन केलेलें आहे:—

"मनुष्यप्राण्याच्या अन्नामध्यें दुधाचें महत्त्व फार आहे व पुरातन कालापासून दुधाचा अन्न म्हणून उपयोग करण्यांत आला आहे. युरोप व आशिया ह्यांचे सीमेवरील अरब व इतर जातींची शरीरप्रकृति व सामर्थ्य हीं दुधाच्या सात्त्विकपणाचीं निदर्शक होत. दुधाइतकें सर्वांगपूर्ण अन्न दुसरें कोणतेंहि नाहीं. मध्यम वर्गामध्यें संत्रीं व तत्सम फळांचा फैलाव जेवढा व्हावयास पाहिजे तेवढा झालेला नाहीं. ह्या फळांचेंहि अन्नाच्या दृष्टीनें विशेष महत्व आहे."


## नोटिस

धी नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, अहमदनगर, या बँकेचे सर्व सभासदांना कळविण्यांत येतें कीं, रविवार ता. २० सप्टेंबर १९३६ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां अमेरिकन मराठी मिशन हायस्कूल हॉल, कापड बाजार, अहमदनगर येथें सदर बँकेची जादा सर्वसाधारण सभा भरणार आहे. तरी त्यावेळीं बँकेच्या सर्व सभासदांनीं हजर राहावें अशी विनंती आहे.

### —: सभेपुढें येणारीं कामें :—

(१) संगमनेर अर्बन को–ऑपरेटिव्ह सोसायटीला आपले बँकेशीं एकरूप (Amalgamate) करून घेणें.

(२) त्या सोसायटीचा सर्व व्यवहार-जिंदगी व कर्ज-आपले बँकेनें घ्यावयाचा; आणि

(३) आपले बँकेनें संगमनेर येथें एक शाखा उघडावयाची.

(४) मे. चेअरमन यांचे मान्यतेनें सभेपुढें येणारीं इतर कामें.

त्र्यं. वि. निसळ, मॅनेजर — कुं. सो. फिरोदिया, चेअरमन

नगर डि. अ. सें. को. बँक लि.

अहमदनगर, ता. २७-८-३६.


### हिंदी जकातींचें उत्पन्न

| | रु. |
|---|---|
| जुलै १९३६ | ४ कोटि, ३८ लक्ष |
| जून, १९३६ | ४ कोटि, २८ लक्ष |
| जुलै, १९३५ | ४ कोटि, ३५ लक्ष |
| एप्रिल-जुलै १९३६ | १७ कोटि, ७९ लक्ष |
| एप्रिल–जुलै १९३५ | १७ कोटि, ७७ लक्ष |


## नोटिस

धी नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकेची या सालची सर्वसाधारण वार्षिक सभा ता. १३ सप्टेंबर १९३६ शनिवार रोजीं सायंकाळीं ४ वाजतां अहमदनगर येथें अमेरिकन मिशन हायस्कूल हॉलमध्यें भरणार आहे. तरी त्या वेळीं बँकेच्या सर्व सभासदांनीं (शेअरहोल्डर्सनीं) हजर रहावें अशी विनंति आहे.

### सभेपुढें येणारीं कामें

१ श्री. रा. रा. महादेव यज्ञेश्वर जोशी हे सेवानिवृत्त झालेले आहेत. सबब त्यांचा योग्य रीतीनें गौरव करणें.

२ सन १९३६ जूनअरेचा एक वर्षाचा ताळेबंद व अहवाल मंजूर करणें.

३ भागीदार लोकांस शेंकडा ७॥ प्रमाणें डिव्हिडंड (व्याज) देण्याचें व मॅनेजिंग बोर्डानें सुचविल्याप्रमाणें नफ्याची वांटणी मंजूर करणें.

४ पुढील वर्षाकरितां मॅनेजिंग बोर्डाची व चेअरमनची निवड करणें.

५ बँकेचे सध्यांचे पोटनियम १ ते ४८ रद्द करून त्यांऐवजीं मॅनेजिंग बोर्डानें सुचविलेले नवीन पोटनियम (Bye-Laws) मंजूर करणें.

(सदरचे बायलॉज् १ सप्टेंबर १९३६ पासून बँकेच्या ऑफिसच्या वेळांत पाहण्यास मिळतील अशी व्यवस्था करण्यांत आली आहे.)

६ बँकेच्या नोकर लोकांचे रजेसंबंधाचे व त्यांचे प्रॉव्हिडंट फंडासंबंधाचे नियम बोर्डानें सुचविलेले मंजूर करणें.

७ मॅनेजिंग बोर्डानें मेसर्स पी. जी. भागवत आणि कंपनी, रजिस्टर्ड अकौंटंट्स, यांची बँकेचे हिशेब दर तिमाहीस तपासण्यासाठीं म्हणून सन १९३६।३७ सालाकरितां नेमणूक केली आहे, त्यास मंजरी मिळावी.

८ संगमनेर येथें आपल्या बँकेची शाखा उघडण्याबद्दल विचार होणें.

९ सरकारी ऑडिटर्स यांजकडून आलेल्या ऑडिटमेमोचा विचार करणें.

१० सन १९३६।३७ सालाकरतां कमाल जबाबदारीची मर्यादा ठरविणें.

११ चेअरमनचे मान्यतेनें सभेपुढें येणारीं इतर कामें.

कृ. ज. जोशी, मॅनेजर — कुं. सो. फिरोदिया, चेअरमन

नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि.

अहमदनगर, ता. १-८-३६

## हिंदी व्यापारांत व बाजारभावांत सुधारणा

१९३५–३६ मध्यें हिंदी परराष्ट्रीय व्यापारांत सुधारणा घडून आली व पिकांस भावहि ज्यास्त आला, हें खालील तक्त्यावरून दिसून येईल. कपाशीच्या भावांत मात्र घट झालेली आढळून येईल.

| आयात-निर्गत | | १९३५-३६ कोटि रु. | १९३४-३५ कोटि रु. |
|---|---|---|---|
| मालाची निर्गत | | १६० | १५१ |
| मालाची आयात | | १३४ | १३२ |
| **बाजारभाव ( सरासरी )** | | | |
| कपास ( भडोच ) | दर खंडीस | २१९ रु १४ आ. | २२७ रु. ११ आ. |
| गहूं | दर मणास | २ रु. ४⅔ आ. | २ रु. २ आ. |
| भुइमूग | दर खंडीस | ३१ रु. ४ आ. | २९ रु. ३ आ. |
| चहा | दर पौंडास | ९½ आ. | ८¼ आ. |
| ताग | दर मणास | ७ रु. २ आ. | ५ रु. २ आ. |

ताजे बाजारभाव वरील भावापेक्षा चढीचेच आहेत.

## दुसऱ्याचा जीव वांचविण्यासाठी आपल्या रक्ताचें दान

एकाद्या रोग्याचे शरीरांतील रक्ताचा पुरवठा कमी झाला असला, तर दुसऱ्या मनुष्याचें रक्त त्याच्या अंगांत घालतां येतें. मनुष्याच्या रक्ताचे चार प्रकार संभवतात व देणाऱ्याचें व घेणाऱ्याचें रक्त एकाच प्रकारचें असावें लागतें. ह्यासंबंधांतील पहिला प्रयोग फ्लॉरेन्स ( इटली ) येथें १६५४ सालीं करण्यांत आला, परंतु रक्ताचा अशा तऱ्हेचा उपयोग ही संवयीची गोष्ट होण्यास विसावें शतक उजाडावें लागलें. आपलें रक्त स्वयंस्फूर्तीनें देणाऱ्या २,२०० लोकांची लंडन शहरांत एक संस्था आहे व तिचे सभासद बोलावणें येतांच सेवेस सादर होण्यास तयार असतात. जाण्यायेण्याच्या खर्चाखेरीज त्यांस एक पैहि मिळत नाहीं. उपरिनिर्दिष्ट संस्थेनें गेल्या सालीं ३,५०० रोग्यांस रक्त पुरविलें. दररोज सरासरीनें १६ बोलावणीं येतात व रोग्यांचा दर्जा अगर त्यांची गरीबी–श्रीमंती ह्यांकडे न पहातां संस्थेचे सभासद आपल्या रक्ताचा त्याग करतात. ह्या सभासदांपैकीं ४२९ स्त्रिया आहेत व त्या पुरुषांपेक्षां ज्यास्त उत्साही व निर्भय असतात, असा अनुभव आहे.

## जिब्राल्टर—ब्रिटिशांचें भूमध्य समुद्रांतील नाकें

भूमध्य समुद्रांतलें मान्याचें ठिकाण अशी जिब्राल्टरची प्रसिद्धी आहे, आणि स्पेनमध्यें चाललेल्या भयंकर यादवीच्या बातम्यांमध्यें त्याचा मधून मधून उल्लेख येत असतो, ह्याचें कारण स्पॅनिश किनाऱ्याशी त्याचें असलेलें निकटवर्तित्व हें होय. जिब्राल्टर हा चवदाशे फूट उंचीचा एक खडकच आहे. त्याची लांबी तीन मैल व रुंदी पाऊण मैल आहे. हा खडकाचा किल्ला बंदिस्त असून त्यावर सर्वत्र तोफा डागलेल्या आहेत. खडकाच्या पोटांत मोठमोठ्या गुहा आहेत, त्यांपैकीं एक तर दोनशे फूट लांब, नव्वद फूट रुंद व सत्तर फूट उंच आहे. जिब्राल्टरचा दगडी किल्ला गेलीं दीडशे वर्षे ब्रिटिशांचे ताब्यांत आहे व भूमध्यसमुद्रांतलें ब्रिटिश सामर्थ्य बहुतांशीं त्यावर आधारलेलें आहे.


**धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०**

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | |
|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |

| | | |
|---|---|---|
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |

| | |
|---|---|
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

**This year 1934-35**
**Exceeds**
**2 CRORES & 50 LAKHS**

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## " रिझर्व्ह फंड आणि सिंकिंग फंड "

[ लेखकः—श्री. एम. बी. रोंघे, F.C.I., M.I.C.S., D. Com ( Hons. ), Foreign Trade Services ]

हल्लीच्या व्यापारी जगांत ' रिझर्व फंड ' आणि 'सिंकिंग फंड' ह्या नांवाविषयीं आपण बरेंच ऐकतों; पण त्यांपासून कांहीं रकम बाजूला काढून ठेवण्याशिवाय दुसरा बोध होत नाहीं. कधीं कधीं कांहीं एक फंड बाजूला ठेवलेला नसतांना देखील " रिझर्व फंडा " विषयीं आपण ऐकतों. त्याचप्रमाणें, ' सिंकिंग फंड ' म्हणजे भावी कालीं विशेष कामाकरितां द्रव्यबल म्हणून राखून ठेवलेला फंड असा अर्थ केला जातो. अशाप्रकारें ह्या दोन्ही नांवांत फरक असतांना किंवा त्यांचें पृथक्करण करणारा एखादा प्रमाण आधार नसतांना देखील त्यांच्यासंबंधीं अमुक एक नियम करणें चांगलें होणार नाहीं. असो.

वास्तविक पहातां, ह्या दोन्ही नांवांत त्यांच्या बरबर स्वरूपावरून विशेष असा फरक आढळून आला नाहीं, तरी त्यांच्यांत फरक आहे आणि तो असावा असें माझें मत आहे. तें कसें हें आपण पाहूं या.

" फंड " हा शब्द " रिझर्व " ह्या शब्दाच्या मागें न लावतां नुसता " रिझर्व " हें नांव असल्यास किंवा आढळल्यास 'रिझर्व' आणि " रिझर्व फंड " ह्यांतील फरक चटकन् लक्षांत आल्याशिवाय रहात नाहीं. " रिझर्व " ह्या शब्दांत " फंड " हा शब्द अंतर्भूत केला गेल्यावर कांहीं तरी ठेव ( investment ) बाजूला राखून ठेविली आहे, असा बोध तात्काळ होतो. अर्थात् अशा प्रकारची ठेव बाजूला राखून न ठेवल्यास ' फंड ' हा शब्द ' रिझर्व ' ह्या शब्दाच्यापुढें लावूं नये. तेव्हां तर्कशास्त्रानुसार असें ठरवितां येईल कीं, ' फंड ' जर खरोखरच असेल तर ' रिझर्व ' ह्या शब्दापुढें तो शब्द लावावा. तथापि असला प्रघात दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. उदाहरणार्थ, शिल्लक-बंद आढाव्यांत ( Balance sheet ) " रिझर्व " ह्या शब्दानें गुंतवून ठेवलेली कांहीं रकम आहे किंवा नाहीं हें अगत्यपूर्वक सुचविलें जात नाहीं.

" सिंकिंग फंड " आणि " रिझर्व फंड " ह्यांतील फरक कांहीं अंशीं जरा संदिग्धच वाटतो, तथापि सिंकिंग फंडावरून विशेष कामाकरितां त्याची नेहमींच योजना असते, असें खात्रीनें म्हणतां येतें. रिझर्व फंडावरून जरी विशेष असा बोध होतो, तरी विशिष्ट कामाकरितांच त्याची योजना असावी, असें नाहीं.

सिंकिंग फंडाचे उद्देश अनेक आहेत, पण त्यांचे ठळकपणें दोन वर्ग करितां येतील. ( १ ) झिजणारा ऐवज पुन्हां नवा ( Renew ) करण्याकरितां फंडाची तरतूद करणें, ( २ ) कर्ज ( Liability ) फेडीकरितां रकम—विशेषतः कर्जरोख्यांची फेड —उभारणें.

पहिल्या उद्देशावरून, झिजणारा ऐवज उभारलेल्या किंवा दरवर्षी बाजूला ठेवलेल्या फंडामुळें फिरून आपल्या किंमतीवर आणला जातो. प्रत्यक्ष फंडाची रकम जरी दिसत नसली तरी दरवर्षी कमी होणारी किंमत नफ्या-तोट्याच्या तपशीलावर नांवें लिहिली जाते. वास्तविक पहातां ह्या झिजेचा नफा-तोट्याच्या ( Profit & Loss a/c ) तपशिलाशीं कांहीं संबंध नाहीं; पण तीच वस्तु पुन्हां लागल्यास ती विकत घेतां यावी म्हणून तरतुदीदाखल फंड उभारण्यास आरंभ केला जातो. असें केल्यास ही रकम डिव्हिडंड देण्यास उपयोगांत आणली जात नाहीं; मात्र त्यामधून इतर ऐवज करण्यास खर्च करितां येतो. तेव्हां कोणत्याहि भांडवलादाखल असलेल्या वस्तूची ( Asset ) आयुष्यमर्यादा ठरवून त्याप्रमाणें दरसाल किंवा ठराविक कालानें विशिष्ट रकम बाजूला ठेवली जाते.

दुसऱ्यासंबंधीं विचार केल्यास कठिण परिस्थिति निर्माण होऊं पहाते. एक तर झिजेचा ( Depreciation ) प्रश्न समोर येत नसल्यामुळें नफ्यातोट्याचा तपशील कोणत्याच दृष्टीनें पालटत नाहीं. पण पूर्ववत कांहीं तरी रकम नियमित कालानें बाजूला काढून कशीतरी गुंतवून ठेवलेली असते. उद्देश हा कीं, हेहि पैसे केव्हांहि डिव्हिडंड देण्याकरितां खर्च केले जाऊं नयेत. ह्यामुळें दरवर्षी नफ्यातोट्याच्या तपशीलाची जमेची बाजू ( credit balance ) वाढत जाते आणि अशा प्रकारें दरवर्षी एकसारखी रकम गुंतवून ' सिंकिंग फंड ' किंवा ' रिझर्व्ह फंड ' यांत जमा केली जाते; आणि जोंपर्यंत अशी रकम गुंतविलेली असते तोपावेतों तिला तें रूप असलेलें आढळतें. ज्यावेळीं कर्जफेडीची ( paying off Liabilities ) वेळ येते त्यावेळीं ठेवींतील रकम प्रथम वसूल करून घ्यावी लागते. हें काम झाल्यावर सिंकिंग फंडावरची जबाबदारी नाहींशी होते आणि नंतर ती रकम जनरल रिझर्व खात्यांत जमेंत धरली जाते.

वरील दोन उद्देशांसंबंधीं नफ्यातोट्याचा, तपशीलाचा आणि रोकडीचा प्रश्न पुढें ठेवून विचार करूं गेल्यास त्यांतील हेतु आणि त्यापासून निष्पन्न होणारें फळ ह्यांतील अदलाबदल ध्यानांत आल्याशिवाय रहात नाहीं.

हे बाजूला काढून ठेवलेले पैसे कसेतरी गुंतवून ठेविले जातात; उद्देश हा कीं त्या पैशाचा गरजेच्या वेळीं उपयोग होण्याबरोबर त्यापासून फायदाहि पदरांत पडावा.

पैसा गुंतवून ठेवण्याच्या मुख्य पद्धति दुसऱ्या भागांत दिल्या आहेत.


॥ श्रीहेरंब भवतु ॥

**श्रीमाणकेश एजन्सी**

**लुगडीं व खणाचे व्यापारी, मार्केट रोड, पुणें.**

आमचें दुकान गेलीं चारपांच वर्षे लुगडीं-खणासंबंधीं प्रसिद्ध आहेच. आम्हीं सर्व प्रकारची फॅन्सी किनार, मनमोहक रंग, चालू फॅशनचीं पातळें व स्पेशल खास **टिकेकरवाडी** येथील माल ठेवला आहे. लांब रुंद भरपूर, पोतास सफाईदार, टिकण्यांत उत्तम असा नांवाजलेल्या—

**" दि टिकेकर टेक्स्टाईल मिल " चा माल अगदीं नवीन फॅशनचा ठेवला आहे.**



**K. K. & Co.**

**Photographic Dealers**

**POONA.**

# सहकारी बँकांचे व सोसायट्यांचे अहवाल

### दि मायर ससून मिल परस्पर सहकारी पतपेढी लि.

शेतकी सोसायट्या, हौसिंग सोसायट्या, इत्यादींची माहिती सर्वांस आहेच; तथापि गिरणीमधील कामगार वर्गासहि सहकारी चळवळीचीं तत्त्वें कशी उपयोगी पडूं शकतात, हें दाखविण्यासाठीं मुंबईच्या मायर ससून मिल पतपेढीची माहिती येथें थोडी विस्तारानें देण्यांत येत आहे. सदरहू सोसायटीची स्थापना १९२१ मध्यें झाली. तिनें आपल्या ध्येयानुसार कामगारांना ऋणमुक्त करण्याचा व त्यांस काटकसरीची संवय लावण्याचा यत्न केला. गिरणीच्या आवारापुरतेंच कार्यक्षेत्र आकुंचित ठेवून चालणार नाहीं; कामगारांमध्यें रूढ होऊन बसलेल्या घातुक चालीरीती, लग्नकार्य, सणवार ह्यांवर होणारा अनाठायी खर्च, ह्यांकडेहि सहकारी संस्थेनें लक्ष पुरविलें पाहिजे, ह्या गोष्टीची मायर ससून मिल सोसायटीस जाणीव असल्याचें स्पष्ट दिसतें. सोसायटीच्या सभासदांची संख्या ६१७ असून भाग–भांडवळ १४ हजार रु. व ठेवींची रकम ११½ हजार रुपये आहे. अहवालाचे सालीं सभासदांस ४५½ हजार रुपये लांब मुदतीनें व २५३ सभासदांस ६½ हजार रुपये निकडीच्या कारणासाठीं देण्यांत आले. सावकारी कर्जाची तडजोड निम्यापेक्षांहि कमी रकमेंत करून सभासदांस सोसायटीनें उत्कृष्ट सहाय केलें आहे. वर्षअखेर रिझर्व्ह फंड ३½ हजार रुपयांचा होता, त्यांत आतां ४३७ रुपयांची भर पडत आहे. १९३५–३६ अखेर सोसायटीस एकूण नफा १,७७५ रुपये झाला त्यांतून ७½ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यासाठीं ९०० रुपयांचा विनियोग करण्यांत येईल. सोसायटी १९३० सालापासून 'अ' वर्गांत कायम आहे. सामुदायिक रीतीनें कामगारांसाठीं छत्र्या विकत घेऊन त्या कामगारांस मूळ किंमतीस विकल्यामुळें प्रत्येक छत्रीमागें कामगारांची कमींत कमी आठ आणे बचत झाली. हा उपक्रम चालू ठेवण्याजोगा आहे. वरील प्रगतिपर कामगिरीचें श्रेय व्यवस्थापक मंडळांतील कर्तव्यदक्ष सभासदांसच आहे व त्यांनीं चालविलेलें कार्य इतरत्र अनुकरणीय आहे, ह्यांत शंका नाहीं.

---

### पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि. पुणें

वरील बँकेच्या कामकाजास ता. १-९-३६ रोजीं सुरुवात झाली व कर्जाच्या अर्जांची चौकशी करण्यास प्रारंभ ऑक्टोबर अखेर झाला. साल अखेर बँकेनें एकूण ६८½ हजारांच्या ५० प्रकरणांची प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेकडे शिफारस केली व त्यांपैकीं २९ प्रकरणांस मंजुरी मिळून १४½ हजार रुपयांचें कर्ज वाटण्यांत आलें आहे. बँकेचे 'अ' वर्गाचे व 'ब' वर्गाचे अनुक्रमें ९,३६५ रुपयांचे व ५७ रुपयांचें भांडवल खपलें आहे. साल अखेर बँकेस १ हजार रुपये तूट आलेली आहे. बँकेच्या व्यवहाराचें हें पहिलेंच साल असल्यानें ही गोष्ट अपरिहार्यच समजली पाहिजे. पुणें जिल्ह्यांत जमिनींचे बारीक, बारीक तुकडे फार असल्याकारणानें त्यांची पहाणी करण्यास व मालकी हक्क ठरविण्यास वेळ लागतो. अहवालाचे सालीं चौकशी झालेल्या अर्जदारांस पुढील वर्षीं कर्ज देण्यांत येईल व त्यामुळें व्याजाचे उत्पन्नांत वाढ होऊन संस्था स्वावलंबी होईल अशी अपेक्षा आहे. बँकेचा व्यवहार वाढणें इष्ट असून तिचा कारभार अत्यंत काटकसरीनें चालू आहे, तसाच तो चालविला जाणें जरूर आहे. प्रत्येक जिल्ह्यांतील परिस्थितीवर त्या जिल्ह्याच्या मॉर्गेज बँकेचें यश अवलंबून रहाणार असल्यानें त्यांची परस्परांशी तुलना केवळ आकडेवारीनें करतां येणार नाहीं. पुणें जिल्ह्याची परिस्थिति विशिष्ट प्रकारची आहे ही गोष्ट तिच्या लँड मॉर्गेज बँकेच्या व्यवहारांचा विचार करतांना लक्ष्यांत घेणें आवश्यक आहे. बँक यशस्वी करण्याविषयीं तिच्या चालकांचे प्रयत्न चालले आहेत आणि कार्यक्षमता व काटकसर ह्यांच्या सहायानें ते फलद्रूप होतील अशी आशा करण्यास जागा आहे.

---

### पश्चिम खानदेश जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि., धुळें

ता. ८ सप्टेंबर १९३५ रोजीं बँकेचें रीतसर काम सुरू झालें. ३० जून १९३६ अखेर संपलेल्या वर्षअखेर 'अ' वर्गाचे व 'ब' वर्गाचे अनुक्रमें १४,०९५ रुपयांचे व ७४ रुपयांचे भाग खपले होते. बँकेनें सुमारें १ लक्ष रुपयांचे ६५ कर्जांचे अर्ज मंजूर केले, त्यांपैकीं प्रत्यक्ष २१,२०० रु. इतकें कर्ज दिलें गेलें. सावकार लोकांनीं तडजोड करून कुळांस सूट दिली त्याचें एकूण कर्जाशीं प्रमाण २७ टक्के पडलें. ह्यांत सुधारणा होण्यावर शेतकरीवर्गाचें हित अवलंबून आहे व त्यासाठीं कन्सीलिएटर्सनीं कसोशीनें लक्ष घालावें, अशी अहवालांत विनंति करण्यांत आली आहे. या बँकेला लागणारें कर्ज मुंबई प्रांतिक लँड मॉर्गेज बँक ४½ टक्के दरानें पुरवते व ६ टक्के दरानें ही बँक कर्ज देते. ह्या अल्प तफावतीवर व्यवहार करावयाचा म्हणजे उलाढाल मोठ्या प्रमाणावर झाली पाहिजे हें उघड आहे. बँकेनें पहिल्याच वर्षीं ८ रु. ० आ. ३ पै नफा दाखविला आहे. शक्य तोंवर कमी खर्चांत शेतकऱ्यांस बँकेचा उपयोग व्हावा, असें बोर्डाचें धोरण आहे तें स्तुत्य आहे. वर्षाचा अहवाल समाधानकारक व तिच्या भावी यशाबद्दल विश्वास उत्पन्न करणारा आहे.

---

### फलटण श्री लक्ष्मी सेंट्रल को. बँक लि., फलटण

| | | | |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | ५९ हजार रु. | रोख व बँकांतील शिल्लक | २३१ हजार रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ५१ „ „ | गुंतविलेल्या रकमा | २४¾ „ „ |
| ठेवी | ४५० „ „ | सोसायट्यांस दिलेलें कर्ज | २८५ „ „ |
| | | येणें व्याज खातें | २८¾ „ „ |

वरील बँकेकडील ठेवींमध्यें अहवालाचें साल अखेर ७८ हजारांची वाढ झाली आहे. सोसायट्यांना ३३ हजार रुपये कर्जाऊ देण्यांत आले व एकूण वसूल ८२½ हजार रुपये झाला. बँकेच्या कर्जावरील व्याजाचा दर उतरून तो ८ टक्के करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. व्यक्तिशः सभासदांस बँकेच्या कार्याचा फायदा घेतां यावा ह्यासाठीं बँकेच्या पोट-नियमांत दुरुस्त्या करण्यांत आल्या आहेत. सोसायट्यांकडे येणें असलेल्या कर्जांपैकीं १ लक्ष ८९ हजार रुपयांचें कर्ज व ५,२६० रु. व्याज थकलेलें आहे. हें थकबाकीचें प्रमाण कमी होणें अर्थातच आवश्यक आहे व येणें वेळेवर वसूल होणें ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. तथापि, आर्थिक मंदी व अवर्षण ह्यांचे योगानें वसुलीचा मार्ग बिकट झाला आहे, हें उघड आहे. व्याज खातीं रिझर्व्ह व इतर फंड मजबूत करण्याचें बँकेचें धोरण स्तुत्य असून त्या सर्व फंडांत मिळून वर्षअखेरच्या नफ्यांतून सुमारें पावणेआठ हजारांची भर पडणार आहे. वर्षअखेर बँकेस १२½ हजार रुपये नफा झाला, त्यांपैकीं भागीदारांस ६½ टक्के दरानें नफा वाटण्यासाठीं ३,६९५ रुपयांचा विनियोग करण्यांत यावयाचा आहे. रिपोर्टींत तपशीलवार माहिती चांगली दिली आहे.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११—४ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२०-१५ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८—९ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९-१० |
| ४% १९६०—७० ... ... | ११५—४ |
| ४% १९४३ ... ... ... | १११—५ |
| ३½% विनमुदत ... ... ... | ९९—८ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०७-१३ |
| २¾% १९४८—५२ ... ... | १०१—२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १११—४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १००—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | ११०-१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षे मुदत) | ११०—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३—६३ ) ... | ११२—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२५—० |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३१-१२ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | १११—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३३-१० |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५५५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३५—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ५% ) | १०६—८ |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ६% ) | ९९—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९०५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १६१—४ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४५—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २५८-१२ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १६३५—० |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६२०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९८—२ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६६—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८३-१२ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७१८-१२ |

## नोटीस

**पूना मर्चंटस को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें.**

[ फक्त सभासदांकरितां ]

या बँकेची वार्षिक साधारण सभा रविवार ता. १३ सप्टेंबर १९३६ रोजीं दुपारीं तीन वाजतां नूतन मराठी विद्यालयाचे 'असेंब्ली हॉल' मध्यें भरेल. त्यावेळीं सभेंत खालीलप्रमाणें कामें करण्यांत येतील:—

( १ ) मागील वार्षिक साधारण सभेचें प्रोसिडिंग कायम करणें.

( २ ) ३० जून १९३६ अखेर संपणाऱ्या सालाबद्दलचा बोर्ड ऑफ डायरेक्टरांचा अहवाल, ताळेबंद व नफ्याची वांटणी मंजूर करणें.

( ३ ) सन १९३६—३७ सालचें अंदाजपत्रक मंजूर करणें.

( ४ ) मे. स्पेशल ऑडिटरसाहेब को. सो. यांजकडून ता. ३१ मार्च १९३६ अखेर आलेल्या तपासणी यादीचा विचार करणें.

( ५ ) कौन्सिल, कौन्सिलचे अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणें.

( ६ ) बोर्ड ऑफ डायरेक्टर्स निवडणें.

( ७ ) बँकेचे हिशेब तपासनीस निवडणें व त्यांचें वेतन ठरविणें.

( ८ ) पोट नियम २३ [ ५ ] प्रमाणें बँकेच्या भांडवलाची मर्यादा ठरविणें.

( ९ ) बँकेच्या नोकरवर्गाकरतां केलेले प्रॉव्हिडंट फंडाचे नियम मंजूर करणें.

( १० ) ता. २९-८-३५ च्या वार्षिक साधारण सभेपुढें ठेवलेल्या पोट नियम दुरुस्त्याबाबत विचार करणें.

( ११ ) मे. रजिस्ट्रारसाहेब को. सो. यांनीं ता. ३०-५-३४ च्या वार्षिक साधारण सभेंत पास झालेल्या पोटनियमास दुरुस्त्या सुचविल्या आहेत त्याबाबत विचार करणें.

( १२ ) बँकेच्या पोटनियम दुरुस्त्याबाबत कमिटी नेमण्याचा विचार करणें.

( १३ ) सभेपुढें आणखी कांहीं कामें आल्यास त्यांचा मे. अध्यक्ष यांचे परवानगीनें विचार करणें.

निवडणुकीकरतां मतें देण्याची वेळ ता. १३ सप्टेंबर १९३६ रोजीं सायंकाळीं ५ ते ७ अशी ठेवली आहे. सभेस सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंति आहे.

लक्ष्मी रोड, पुणें.
ता. २८ आगस्ट १९३६

बोर्डाचे हुकुमावरून
व्ही. जी. गोखले
एजंट.

**सूचना:**—कौन्सिल, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स व ऑडिटर्सकरतां ज्या उमेदवारांना उभें रहावयाचें असेल त्यांनीं मत देण्यास लायक असलेल्या दोन सभासदांचे शिफारसीसह व मान्यतेसह आपल्या नांवाचीं सूचना पत्रें [ नॉमिनेशन पेपर्स ] ता. ४-९-३६ अखेर अगर त्यापूर्वी बँकेचे कामाचे वेळीं ऑफिसांत दाखल करावीत.

व्ही. जी. गोखले,
एजंट.

# दि बॉंबे लाइफ अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड.

( स्थापना १९०८ )

प्रगति

कंपनीची **लोकप्रियता** सिद्ध करते

कमाल प्रगति : पुरें केलेलें नवीन काम मिळविलें तें

| | | |
|---|---|---|
| १९२५ | : | रु. २२,१८,५०० |
| १९२७ | : | रु. ३८,७७,००० |
| १९२९ | : | रु. ५१,२२,५०० |
| १९३१ | : | रु. ५८,६६,५०० |
| १९३३ | : | रु. ९४,१६,५०० |
| **१९३५** | : | **रु. १,२३,२८,०००** |

माफक हप्ते, भरपूर बोनस, क्लेम्सची तात्काळ भरपाई, व पॉलिसींतील सवलतीच्या अटी हें " बॉंबे लाइफ पॉलिसीं " चें वैशिष्ट्य आहे.

एजन्सी व पॉलिसी ह्यासंबंधींच्या तपशिलासाठीं लिहाः—
मॅनेजर,
बॉंबे लाइफ बिल्डिंग, ४५।४७, चर्चगेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.



## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | दर हजारीं त्रैवार्षिक नफा | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.



## " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४.



आपणांस विहीर बोअर करावयाची आहे काय ?

# भिडे आणि सन्स्

स्वतः तयार केलेल्या मशीननें बोअर खणून देतात.

चौकशी कराः—

भिडे आणि सन्स

सांगली ( S. M. C. ) शनीचा पार, पुणें. २



पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी

टेलरिंग फर्म

मॅनेजरः—व्ही. पी. पाटसकर, D.M.T.C.A. (London.)

# पाटसकर आणि कंपनी

४८ निहाल पेठ, पुणें शहर.

सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी

आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं यकेन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ | पुणें, बुधवार, तारीख ९, सप्टेंबर १९३६. | अंक ७

## आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

पत्ता : डेक्कन जिमखाना, पुणें ४

**यांचीं शास्त्रोक्त, खात्रीलायक व गुणकारी औषधें**

| | | |
|---|---|---|
| **च्यवनप्राश** पौष्टिक व शक्तिवर्धक | २० तो. | १ रु. |
| **वज्रदंती** दंतमंजन | बा. किं. | ४ आणे |
| **केशवर्धन तेल** | १० तो. | १५ आणे |
| **एरंडपाक** मलावरोध घालविणारा | १० तो. | ६ आणे |
| **हेमगर्भ मात्रा** सर्व वात कफरोगहर | मात्रा | ५ रु. |
| **सुवर्णराजवंगेश्वर** धातुवर्धक | १ तो. | ५ रु. |
| **वाळा सरबत** उन्हाळ्यांत थंड पेय | १ पौं. | १२ आणे |
| **त्रिभुवनकीर्ति** सर्व ज्वरांवर | १ तो. | १२ आणे |

याशिवाय प्रवाळ, मौक्तिक इ. भस्में, सर्व तऱ्हेचीं आसवें, अरिष्टें, मात्रा, गुटिका, अवलेह वगैरे मागवून एकवार अनुभव घ्या. कॅटलॉग मागवा.

**ठिकठिकाणीं एजन्सी देणें आहेत. एजन्सी घेऊं इच्छिणारांनीं नियम मागवावे.**

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

*For All Medicinal Requisites*
— TRY —
## N. MAHADEV & Co.
**DISPENSING CHEMISTS**
AND
**DRUGGISTS**
City Post Office Corner, POONA 2.

**WANTED** Arts Graduates & Medical Practitioners to push up Rural Uplift & Medical Relief Movement in furtherance of Insurance Benefit Plans throughout district places in the Presidency. Adequate remuneration to capable workers.


Apply with particulars to :—

Head Office :— 99, LAXMI ROAD, POONA.
General Manager, THE DAWN OF INDIA LIFE INS. Co., LTD.

## संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**The House for Quality goods at most reasonable prices.**
## K. M. BELSARE & Co.,
**PLAIN & DECORATIVE FURNITURE**
FOR
Home, School, College, Office etc. in
WOOD & IRON
**Sadashiv, POONA 2**

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !
ज्युनियर प्रभाकर
सेफ्टी स्टोव्ह
माहितीपत्रक मागवा
मेकर्स:-ओगले ग्लास वर्क्स., लि.
ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्स:-
१ केळकर ब्रदर्स, बुधवार चौक.
२ म. इं. को. ऑ. एजन्सी, लक्ष्मीरोड.

## विविध माहिती

### बँकांस सुट्टी

शुक्रवार, ता. ११ सप्टेंबर रोजीं 'खोरदाद साल' ह्या पार्शी सणानिमित्त बँका बंद रहातील.

### नव्या बादशहांचीं तिकिटें

आठवे एडवर्ड बादशहा यांचा मुखवटा धारण करणारीं तिकिटें ग्रेट ब्रिटनमध्यें पोस्टांतून मिळूं लागलीं आहेत. विक्रीच्या पहिल्याच दिवशीं एकूण तीन कोटि तिकिटें खपलीं. रोजच्या विक्रीची सरासरी दोन कोटि आहे.

### हिंदी एक्सचेंज बँकेच्या व्यवहारास सुरवात झाली

सेंट्रल एक्सचेंज बँक ऑफ इंडिया ह्या हिंदी संस्थेचें उद्घाटन लंडन येथें काल ( ता. ८ रोजीं ) होऊन आजपासून तिचें काम सुरू होणार आहे.

### मुंबई इलाख्यांतील १९३४-३५ मधील औद्योगिक परिस्थिति

१९३४-३५ मध्यें अहमदाबाद येथें कापडाच्या पांच नवीन गिरण्या स्थापन झाल्या व मुंबई उपनगर जिल्ह्यांत दोन आगपेट्यांचे कारखाने निघाले. सोलापूर येथील कापडाच्या गिरण्यांस इतर गिरण्यांची स्पर्धा जाचक होत आहे. व्यापार व उद्योगधंदे ह्यांचे संबंधांत इतर बाबतींमध्यें विशेष फरक झाला नाहीं, असें मुंबई सरकारच्या अहवालांत नमूद आहे.

### अहमदाबाद येथील गिरणी बंद होणार

अहमदाबाद येथील लक्ष्मी कॉटन मिल ता. १ ऑक्टोबरपासून बंद ठेवण्यांत येणार आहे असें म्हणतात. मालाचा उठाव होत नसल्यानें कापड पडून रहातें, त्याचा हा परिणाम आहे. वरील गिरणींत १,२०० कामगार आहेत, ते आतां बेकार होणार ! दुष्काळांत तेरावा महिना.

### अमेरिकन मोटारगाड्यांचें उत्पादन

गेल्या जुलै महिन्यांत अमेरिकन मोटार गाड्यांचें एकूण उत्पादन ( फोर्ड गाड्या वगळून ) ३ लक्ष, ३९ हजार नग इतकें झालें. १९३५ जुलैच्या मानानें हा आकडा ३५ टक्क्यांनीं अधिक होता.

### पोलादाच्या धंद्याची चलती

सध्या ग्रेट ब्रिटनमध्यें लोखंड व पोलाद ह्यांचें उत्पादन झपाट्यानें वाढत असून तो धंदा चांगला तेजींत आहे. चालू सालच्या पहिल्या सात महिन्यांतलें ब्रिटिश पोलादाचें उत्पादन गेल्या वर्षाच्या तत्सम आकड्याच्या मानानें २० टक्के ज्यास्त झालें आहे.

### वेस्ट एण्ड थिएटर

पुणें येथील वेस्ट एन्ड थिएटराची इमारत सुधारून वाढविण्यांत आली असून ता. ४ रोजीं तेथें चित्रपट दाखविण्यास पुनः सुरवात झाली.

### आठ आणे दरानें ट्रेझरी बिलांची विक्री

ता. १ सप्टेंबर रोजीं रिझर्व्ह बँकेनें स्वीकारलेल्या दोन कोटि रुपयांच्या ट्रेझरी बिलांवर सरासरी व्याजाचा दर द. द. शे. आठ आणे पडला.

### सहा अब्जांची तूट

चालू वर्षअखेर अमेरिकन बजेटांत सुमारें सहा अब्ज रुपयांची तूट येईल, असा प्रेसिडेंट रुझवेल्ट ह्यांचा अंदाज आहे.

### इटालियन कामगारांच्या पगारांत वाढ

इटलीमधील सुमारें ८० हजार कामगारांच्या वेतनांत सात ते दहा टक्के वाढ करण्यांत आली आहे.

### मुंबई इलाख्यांतील सरकारी साऱ्याची वसुली

गेल्या वर्षीं, माफी व तहकुबी सोडून बाकीचा सारा जवळ जवळ शंभर टक्के वसूल झाला, असें सरकारी अहवालांत म्हटलें आहे.

### सोडा ॲशचें हिंदुस्थानांत उत्पादन

काच तयार करण्यासाठी लागणाऱ्या सोडा ॲशचें हिंदुस्थानांत उत्पादन करण्याचे इंपीरियल केमिकल इंडस्ट्रीज ( इंडिया ) लि. ह्या कंपनीचे प्रयत्न चालू आहेत. तज्ञांच्या मतें सोडा ॲशच्या उत्पादनास हिंदुस्थानांत अनुकूलता असल्याचें समजतें.

### 'क्वीन मेरी' बोटीनें रेकॉर्ड मोडलें

युरोप ते अमेरिका हा प्रवास कमी वेळांत परंतु आरामशीर रीतीनें करण्यांत फ्रान्स देशाच्या 'नॉर्मंडी' नांवाच्या आगबोटीनें पहिला नंबर मिळविला होता. ग्रेट ब्रिटनच्या 'क्वीन मेरी' आगबोटीनें त्याच्या पुढें जाण्याचा यत्न केला व तो यशस्वी होऊन ह्या ब्रिटिश आगबोटीनें आतां जगांत पहिल्या प्रतीचें स्थान पटकावलें आहे. सदरहू बोटीस अटलँटिक महासागर पश्चिमेकडून पूर्वेकडे ओलांडण्यास 'नॉर्मंडी' पेक्षां २ तास व ३१ मिनिटें कमी, म्हणजे एकूण ३ दिवस २३ तास व ५७ मिनिटें लागलीं. 'क्वीन मेरी' ही बोट कुनार्ड व्हाइट स्टार कंपनीच्या मालकीची आहे.

### कापडाच्या गिरण्यांस मंदीची झळ

मुंबई शहरामधील कापडाच्या गिरण्यांतील रात्रपाळींचें प्रमाण गेल्या मे महिन्याच्या मानानें आतां तिसऱ्या हिश्शानें कमी झालें आहे व त्यामुळें उत्पादनांत शेकडा १० इतकी घट पडली आहे. अहमदाबाद येथील गिरण्यांसहि मंदीनें ग्रासलें आहे.

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ४४२ |
| २ मंदीचें तेजीमध्यें संक्रमण | ४४३ |
| ३ प्रजा व प्रदेश ह्यांची राष्ट्रांमधली वांटणी | ४४४ |
| ४ स्फुट विचार — टारिफ बोर्डासंबंधीं सरकारचें आश्वासन—जागतिक शांतता परिषद्—सार्वजनिक हित आणि अधिकाऱ्यांचा वैयक्तिक फायदा—पालघर येथें ग्रामसुधारणा—गुरांच्या चाऱ्याचीं पिकें व पाणी—विमा कायद्यांत दुरुस्ती—चहा कसा तयार करावा ? ऑलिंपिक | ४४५ |
| ५ असेंब्लींत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश | ४४६ |
| ६ मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळ | ४४७ |
| ७ ब्रिटिश सहकारी चळवळीचे नेते काय म्हणतात ! | ४४७ |
| ८ प्रो.काळे ह्यांचें ग्रामसुधारणेवर भाषण | ४४८ |
| ९ दसपुती स्त्रियांची चढाओढ | ४४८ |
| १० सहकारी बँकांचे व सोसायट्यांचे अहवाल | ४४९ |
| ११ निवडक बाजारभाव | ४५० |

अर्थ

बुधवार, ता. ९ सप्टेंबर, १९३६

## मंदीचें तेजीमध्यें संक्रमण

### सावधगिरीची सूचना

सध्या हिंदुस्थानांत नवीन औद्योगिक व व्यापारी मंडळ्यांच्या स्थापनेनें जोराची उचल घेतली आहे. आर्थिक मंदी दूर होऊन तिचें चलतीमध्यें संक्रमण होत असतां असा प्रकार नेहमी घडत असतो आणि भावी भयसूचना देण्याची योग्य वेळहि हीच असते. मंदीचें रूपांतर तेजींत होणें ही स्वाभाविकपणानें घडणारी गोष्ट असून जनतेच्या आर्थिक सुधारणेच्या दृष्टीनें तिचें स्वागत करावें लागतें. मंदीच्या काळांत विपुल झालेलें भांडवल तेजीच्या अपेक्षेनें नवीन औद्योगिक व व्यापारी उपक्रमांत घालण्याची प्रवृत्ति उत्तेजनार्ह असली तरी ह्या कामीं घिसाडघाई, अदूरदृष्टि किंवा भरमसाटपणा ह्यांस थारा मिळूं नये अशी इशारत देणें जरूर होतें. तेजीची लाट उसळत असतांना तिच्याबरोबर वाहून गेल्याचे दुष्परिणाम मागें काय घडून आले ह्याची विस्मृति होते. तेव्हां, लोकांनीं मनाचा समतोलपणा राखूनच औद्योगिक प्रगतीच्या योजनांस उत्तेजन द्यावें असा सल्ला वेळींच देणें अगत्याचें ठरतें. आपला पैसा पुरून किंवा बिनकिफाइतशारपणानें पडून राहूं देण्याची संवय एका बाजूस आणि दुसऱ्या बाजूस, व्यावहारिक व सुरक्षितपणाच्या विचारांस महत्त्व न देतां भपकेदार पण भरीवपणांचा गुण नसलेल्या धंदेयोजना दामटून त्यांचा पुरस्कार करणें ह्या दोन परस्पर-विरुद्ध टोंकांचा मध्यबिंदु काढणें अवघड असलें तरी अशक्य नसतें हें येथें सांगितलें पाहिजे. कलकत्त्याच्या "इंडियन फिनॅन्स" ह्या पत्रानें सदरहू बाबतींत इशारत दिली आहे, ती कालोचित आहे. एक नवीन कंपनी निघण्याच्या बेतांत आहे अशा नुसत्या बातमीबरोबर तिच्या भागांत पैसे घालण्यासाठी अर्ज करणारांची नुकतीच हुल्लड झाली, तिचा दाखला देऊन त्या पत्रानें लोकांस जागें केलें आहे.

त्या पत्राच्या लिखाणाच्या नेहमीचा रोख हिंदी उद्योगधंदे व व्यापार ह्यांची बढती व्हावी असा असल्यानें त्यानें जनतेस दिलेल्या सूचना विचार करण्यास योग्य आहेत, ह्यांत शंका घेण्याचें कारण नाहीं. औद्योगिक प्रगतीस सहाय देणें हें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य आहे. विशेषत: आर्थिक मंदीनें त्रस्त झालेल्या समाजांत चैतन्य उत्पन्न करण्याचे प्रयत्न होत असतां त्यांस हातभार लावणें हें आवश्यक असून त्यांत व्यक्तिहित व सामुदायिक उन्नति साधण्याची सर्वांस संधि मिळते. हिंदुस्थानासारख्या दरिद्री देशांत व महाराष्ट्रासारख्या मागसलेल्या भागांत तर असल्या प्रयत्नांचें व सहकार्याचें महत्त्व विशेष आहे. नवीन कंपनीसंबंधानें ज्या विशिष्ट बाबतींत चौकशी व खात्री करून घेणें जरूर असतें, त्यांची "इंडियन फिनॅन्स"नें जंत्री दिली आहे, तिचा सारांश वाचकांस मार्गदर्शक होण्यासारखा असल्यानें तो आम्हीं येथें सादर करीत आहों. पैसे गुंतवूं पहाणारानें नवीन कंपनीचे मॅनेजिंग एजंट्स कोण आहेत व त्यांची लायकी, सचोटी व विश्वसनीयता किती आहे ह्याची नीट चौकशी करावी. कंपनीचा उद्देश, कार्याचें क्षेत्र व यशस्वीपणाची शक्यता ह्यांचा बारकाईनें त्यानें विचार करावा. मॅनेजिंग एजंट्सना मिळावयाचा मेहनताना, सवलती व नफ्याचा भाग ह्या बाबी योग्य आहेत किंवा वाजवीपेक्षां ज्यास्त आहेत हें त्यानें पहावें. डायरेक्टर्स स्वतंत्र मताचे गृहस्थ आहेत का नामधारी चालक आहेत आणि त्यांची निवडणूक भागीदारांच्या इच्छेप्रमाणें होण्याची नियमांत तरतूद आहे किंवा नाहीं ह्याविषयीं पूर्ण माहिती करून घ्यावी. कंपनीस पुरेसें भांडवल मिळेल अशी व्यवस्था आहे कीं नाहीं अथवा भांडवलाच्या अभावामुळें तिचें अडेल हेंहि पैसा गुंतवणारानें पहाणें आवश्यक आहे.

अलीकडे निघालेल्या कंपन्यांपैकीं शेकडा नव्वदांची परिस्थिति, विचारांत घ्यावयाच्या वरील गोष्टींच्या संबंधांत समाधानकारक आहे असें "इंडियन फिनॅन्स" मधल्या अनुभवी व माहितगार लेखकानें म्हटलें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. मागें एकदां कंपन्या बुडाल्या किंवा कित्येकांची अवस्था आज असावी तशी नाहीं, एवढ्याच कारणानें नवीन निघणाऱ्या औद्योगिक योजनांच्याकडे पहावयाचें सुद्धां नाहा, ही वृत्ति अर्थातच त्याज्य गणली पाहिजे. उलट, प्रत्येक योजनेची काळजीपूर्वक छाननी करून आपला शिलकी पैसा नवीन धंद्यांत घालण्याची सार्वत्रिक प्रवृत्ति असणं अत्यंत आवश्यक आहे. सध्या मंदीची रात्र संपून चलतीचा दिवस उगवत आहे आणि नव्या मंडळ्यांस कदाचित ऊत येण्याचा भाति आहे. तीस अनुलक्षून लोकांनीं विचारानें वागाव असा सल्ला दण उचित आहे. नवीन धंदे काढणारांनींहि हें लक्षांत वागवावें कीं चुकीचें, घाईचें व भरमसाटपणाचें प्रायश्चित्त वाइटाबरोबर चांगल्या योजनांसहि भोगावें लागून त्याचा दुष्परिणाम समाजाच्या एकंदर औद्योगिक प्रगतीवर व आर्थिक भवितव्यावर होत असतो. आकाश निरभ्र व स्वच्छ असतांनाच भावी वादळाबद्दलचा इशारा देणें व घेणें श्रेयस्कर असतें. केवळ दुसऱ्याच्या अनुकूल-प्रतिकूल अभिप्रायावर किंवा बाजारी गप्पांवर विसंबून न रहातां पैसे गुंतवणारांनीं स्वत: माहिती मिळवून आपलें मत बनवावें आणि विश्वसनीय, नि:पक्षपाती व माहीतगार तज्ज्ञांचा सल्ला घेऊन देशाच्या आर्थिक उन्नतीस हातभार लावावा व त्यांत स्वार्थहि साधावा. स्वार्थ आणि राष्ट्रार्थ ह्यांचा मेळ घालून वर्तन करण्यांत शहाणपणाचें नागरिकत्व आहे.

## प्रजा व प्रदेश ह्यांची राष्ट्रांमधली वांटणी

भोंवतालचा व दूरदूरचा प्रदेश पादाक्रांत करून तो आपल्या सत्तेखाली आणण्याची महत्त्वाकांक्षा राजेलोकांत प्राचीन काळापासून असलेली इतिहासावरून दिसते. इतर राजांस जिंकून स्वत: सार्वभौम बनण्याचा त्यांच्यापैकीं अनेकांचा यत्न प्रसिद्ध आहे. युरोपांत अलेक्झांडर, सीझर व नेपोलियन आणि हिंदुस्थानांत रामायण-महाभारतकाळापासून अगदीं अलीकडच्या युगांतरांत अनेक सार्वभौम राजे व बादशहा होऊन गेले आहेत. सार्वभौमत्वाच्या ऐश्वर्याची लालसा हेंच वरील सम्राटांच्या दिग्विजयविषयक प्रयत्नांचें मुख्य प्रेरक कारण होतें, तरी ह्या विजयापासून होणारे सांपत्तिक फायदे मुळींच विचारांत घेण्यासारखे नव्हते असें म्हणतां यावयाचें नाहीं. लहान-सहान राजेंहि मोठ्यांचें अनुकरण मर्यादित कक्षेंत करत आले असून राज्य व प्रजा ह्यांच्या विस्ताराबरोबर त्यांच्या आर्थिक सामुग्रींतही भर पडलेली आहे. राज्याचा विस्तार व संपत्तींत भर हीं नियमानें एकत्र झालीं आहेत असें मात्र दिसत नाहीं आणि कित्येकांनीं राज्यमोहास बळी पडून स्वतःचें व प्रजेचें अनहित पदरांत घेतल्याचे दाखले सांपडतील. वरील तऱ्हेच्या राज्यतृष्णेपासून आधुनिक राष्ट्रांतले सत्ताधारी अलिप्त नाहींत हें, गेलें महायुद्ध व इटलीनें अबिसिनियाचा केलेला अपहार ह्यांवरून स्पष्टच होत आहे. रानटी हवसाणांत आधुनिक सुधारणा प्रस्थापित करणें हा ॲबिसिनिया पादाक्रांत करण्यांत आपला मुख्य हेतु आहे असें इटलीनें सांगितलें असलें तरीं राजकीय व आर्थिक महत्त्वाकांक्षेचीच प्रेरणा मुसोलिनीच्या धोरणांत विशेष जागरूक आहे ह्याविषयीं कोणासच शंका नाहीं. महायुद्धाच्या शेवटीं झालेल्या तहाअन्वयें आपल्या आफ्रिकेंतल्या वसाहती जेत्या राष्ट्रांनीं आपणांपासून हिरावून घेतल्या, त्या स्वतःस परत मिळणें जरूर आहे अशी मागणी जर्मनी जोरानें पुढें मांडीत आहे. आपल्या लोकांच्या आर्थिक जीवनास वसाहती अगत्याच्या आहेत हा विशेष महत्त्वाचा मुद्दा जर्मनीच्या मागणीच्या मुळाशीं आहे.

प्रमुख राष्ट्रांच्या ताब्यांतील किंवा हुकमतीखालील वसाहती आज सर्व खंडांमध्यें लांबलचक पसरल्या आहेत. त्यांतली संपत्तीचीं नैसर्गिक साधनें व मालाच्या खपास जरूर असलेल्या बाजारपेठा ह्यांचा खराखुरा उपयोग त्यांवर सत्ता चालवणाऱ्या राष्ट्रांस कितीसा होतो ? संकुचित प्रदेशांत वाढती प्रजा ज्यांस जगवावी लागते अशा राष्ट्रांस नवीन मुलूख ताब्यांत येणें आवश्यक आहे काय ? आणि संपत्तीच्या साधनांची वांटणी समतेनें होण्यास आजच्या वसाहतींच्या व्यवस्थेंत कांहीं फेरफार करणें इष्ट व शक्य आहे काय ? हे प्रश्न अलीकडे चर्चेचे विषय झाले आहेत. राष्ट्रांतील प्रजेच्या योगक्षेमाचा विचार कर्तव्य असतां त्यांच्या हुकमतीखालील प्रदेशाची नुसती लांबी रुंदी पाहून चालणार नाहीं, हें उघड आहे. निसर्गाची अनुकूलता सर्वत्र सारखी नसते, तथापि लोकसंख्या आणि जीवनसामुग्री ह्यांच्या परस्पर-प्रमाणाचें बाबतींत राष्ट्राराष्ट्रांत मोठी विषमता आज दृष्टोत्पत्तीस येते, ह्यांत शंका नाहीं. प्रदेशाच्या फेरवांटणीचा विचार होणें आवश्यक आहे असें कांहीं मुत्सद्यांस वाटत असलें तरी तें व्यवहार्य व जरूरहि नाहीं असा अनेकांचा अभिप्राय आहे. हा प्रश्न आंतरराष्ट्रीय आर्थिक समता व न्याय ह्या विषयींचाच केवळ नसून राजकीय व राष्ट्रीय सत्तेची कल्पना त्याच्याशीं निगडित झालेली आहे. ह्यामुळें त्याची चर्चा समतोलपणानें व निर्विकार मनानें होणें कठिण होऊन बसलें आहे. राष्ट्रीय सत्तेखालील प्रदेश व लोकसंख्या ह्यांची वांटणी जगांतील प्रमुख राष्ट्रांमध्यें कशी झाली आहे, हें दर्शवणारे आकडे, मि. क्लार्क ह्या अमेरिकन ग्रंथकारानें प्रस्तुत विषयासंबंधानें लिहिलेल्या पुस्तकांत जुळवले आहेत, ते खालीं दिले आहेतः—

### लोकसंख्या व भूपृष्ठ ह्यांची वांटणी

जगांतील एकूण लोकसंख्या व भूपृष्ठ ह्यांची हिस्सेरसी प्रमुख राष्ट्रांमध्यें कशी झाली आहे हें खालील तक्त्यावरून दिसून येईल—

| | लोकसंख्या एकूण लोकसंख्येपैकीं किती टक्के | क्षेत्रफळ एकूण भूपृष्ठापैकीं किती टक्के |
|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन ... | ...२४·४ ... ... | २३·९ |
| रशिया ... | ... ८·२ ... ... | १६·० |
| फ्रान्स ... | ... ५·३ ... ... | ९·३ |
| अमेरिका ... | ... ६·९ ... ... | ७·३ |
| इटली ... | ... २·२ ... ... | २·१ |
| हॉलंड ... | ... ३·५ ... ... | १·६ |
| बेल्जम ... | ... १·१ ... ... | १·९ |
| इतर पाश्चात्य राष्ट्रें ... | १७·८ ... ... | २२·५ |
| चीन ... | ...२०·३ ... ... | ६·९ |
| जपान ... | ... ६·२ ... ... | १·५ |
| इतर पाश्चात्येतर राष्ट्रें... | ... ४·१ ... ... | ७·० |
| | १००·० | १००·० |

### मूषक-चलन

मुंबईच्या एका भागांत मूषक-चलन चालू असल्याची हकीकत 'टिटबिट्स' पत्रानें दिली आहे. कर भरणारांस आपलें देणें नाण्यांच्या ऐवजीं उंदरांच्या स्वरूपांत देण्याची मुभा तेथें आहे असें त्याचें म्हणणें आहे. हें मूषक-चलन सुरू झाल्यापासून हजारो उंदीर कराच्या वसुलींत दाखल झाले असल्याचेंहि त्यानें सांगितलें आहे. प्लेगच्या प्रतिबंधासाठी काढलेल्या मूषकांवरच्या मोहिमेंत मूषक धरून आणणारांस मिळणाऱ्या मोबदल्याचें हें चलनात्मक वर्णन असावें, हें उघड आहे.

### दुग्धवस्त्र-परिधान

इटलीचे प्रसिद्ध परराष्ट्रीय वकील, सीनॉर ग्रँडी, ह्यांनीं दुधाचा केलेला पोषाक चढवून नवीन फॅशन चालू केली असल्याची बातमीहि त्या पत्रानें दिली आहे. दुधांतील अवशेषापासून निघणाऱ्या द्रव्याचें उत्तम सूत बनतें व त्याचें सुंदर कापड तयार करतां येतें, त्याची, त्यांचा पोषाक ही जाहिरातच आहे. दुधांतून अल्ब्युमिनॉइड निघतो, त्याचें लॅनिटल बनवतात आणि त्यापासून सूत आणि कापड तयार करतात. इटलीमध्यें हा धंदा एका मोठ्या कारखान्यांत सुरू झाला आहे. आर्थिक बाबतींत पूर्णपणें स्वावलंबी होण्याचे राष्ट्रांचे यत्न चालू आहेत, त्यांचें हें एक नमुनेदार उदाहरण आहे.

## मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळ

—x—

[ मुंबई इलाख्याच्या सहकारी खात्याच्या ३० जून १९३५ अखेरच्या वार्षिक अहवालांतून चळवळींसंबंधाचे ताजे आंकडे आम्हीं 'अर्था' मध्यें प्रसिद्ध केलेलेच आहेत. सदरहु अहवाल व त्याचा सारांश आतां अधिकारी रीत्या प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील महत्त्वाच्या बाबींचा गोषवारा येथें देत आहों.]

( १ ) अर्बन सोसायट्यांची हळु हळु व्यवस्थितपणें प्रगति होत आहे; त्याचप्रमाणें शेतकी पतपेढ्याहि सुधारत आहेत. कर्जदारांस दिलेल्या सवलतींमुळें दुःस्थितींतल्या खेड्यांतून चळवळीची लोकप्रियता वाढली आहे. कर्जावरील व्याजाचे दर उतरविले असले तरी सोसायट्यांच्या मजबुतीस धक्का बसलेला नाहीं.

( २ ) चांगल्या व काटकसरी शेतकऱ्यांस आपल्या पायावर उभें करणें हा जमीन गहाणाच्या बँकांचे मुळाशीं हेतु आहे. तेव्हां, लायक शेतकऱ्यांसच पूर्ण चौकशीअंतीं कर्ज मिळणार हें उघड आहे. शेतकऱ्यांचें एकजात ऋणविमोचन करणें ह्या बँकांचे शक्तीबाहेरचें काम आहे.

( ३ ) सहकारी चळवळीसंबंधीं जनतेंत उत्पन्न झालेल्या वाढत्या उत्साहाचा फायदा घेऊन चळवळीचा फैलाव करण्याची वेळ आली आहे. परंतु पैशाचे अभावीं विशेष कांहीं करतां येणार नाहीं. मध्यवर्ती सरकारकडून आलेली सहकारी प्रचारासाठी खर्चावयाची रकम अत्यंत समयोचित आहे. स्पेशल कमिटीनें सुचविल्याप्रमाणें शेतकी सोसायट्यांच्या देखरेखीची पुनर्रचना केली, तर योग्य मार्गानें चळवळीचा विस्तार होईल.

( ४ ) शेतीचें उत्पादन वाढल्याखेरीज केवळ स्वस्त दरानें पैशाचा पुरवठा करून त्याचा उपयोग होणार नाहीं. तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्स व ॲग्रिकल्चरल इंप्लिमेंट सोसायट्या उपयुक्त कार्य करीत आहेत, परंतु शेतीच्या मालाची विक्रीची योजना अद्याप समाधानकारक नाहीं. मेहनती कार्यकर्ते व लायक आणि विश्वसनीय नोकर ह्यांचा अभाव वरील गोष्टीस कारणीभूत आहे.

( ५ ) नागरिकत्वाचे धडे शिकविण्यास सहकारी चळवळीचा अत्यंत उपयोग होतो. जेथें चळवळीचा उत्कृष्ट प्रसार झाला आहे, तेथें ग्रामोद्धाराच्या चळवळीचीहि चांगली प्रगति झालेली आहे. इलाख्यांतील बहुतेक सर्व जिल्ह्यांतील सोसायट्या जातीय व पक्षोपपक्षीय कलहापासून अलिप्त आहेत. कर्नाटकांतील कांहीं जिल्ह्यांत मात्र भांडणाची प्रवृत्ति सोसायट्यांच्या कारभारांत दिसून येत आहे.

( ६ ) चळवळीचा प्रसार करण्यापेक्षां अस्तित्वांत असलेल्या संस्था मजबूत करण्याचें सहकारी खात्याचें धोरण बरेंच यशस्वी झालें आहे. कर्जाची वसुली करण्यासाठी नेमलेल्या खास अधिकाऱ्यांनीं आपलें काम समाधानकारकपणें पार पाडलें आहे. त्यांनीं २६ लक्ष ३७ हजारांची वसुली केली, त्यांपैकीं फक्त १२ लक्ष १३ हजार रुपये एवढीच रकम जमिनी विकून उभारावी लागली.

( ७ ) सवलतीच्या व्याजाचे दराच्या योजनेचा कित्येक सोसायट्यांनीं फायदा घेतला. १९३३-३४ मध्यें ही योजना प्रयोगावस्थेंत होती, ती अहवालाचे सालीं सर्व जिल्ह्यांस लागू करण्यांत आली. सभासदांनीं एकमेकांस कर्जफेडीबद्दल जी निकड लाविली त्यामुळें चळवळीमधील सहकाराचें स्वरूप उत्कटतेनें अनुभवास आलें. ही योजना थोडा फेरफार करून चालू ठेवली आहे.

( ८ ) सध्या ग्रामोद्धार हा अत्यंत महत्त्वाचा विषय झाला आहे. संशोधन व मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च ग्रामसुधारणेस अवश्य आहे व तें काम सरकार व ग्रामसुधारणेचें ध्येय बाळगणाऱ्या संस्था ह्यांनींच हातीं घेतलें पाहिजे. ग्रामसुधराईसाठी मदत सर्वच सहकारी संस्थांस करतां येईल. शेतीचीं साधनें पुरविणाऱ्या, पिकांचें रक्षण करणाऱ्या, विक्रीच्या, इत्यादि सोसायट्या शेतकऱ्यांचें आर्थिक जीवन सुधारण्यास हातभार लावतात. बेटर लिव्हिंग व रूरल रीकन्स्ट्रक्शन सोसायट्यांचें तर ग्रामसुधारणा हें अंगीकृत कार्यच होय.

( ९ ) अहवालाचे सालीं हौसिंग सोसायट्या ११ नीं वाढून त्यांची संख्या १०२ झाली व त्यांचें खेळतें भांडवल १ कोटि १६½ लक्ष रुपये झालें. आर्थिक मंदीमुळें मुंबईमधील ६० सोसायट्या अडचणींत सांपडल्या आहेत. भाडेकऱ्यांच्या अभावामुळें उत्पन्न कमी झाल्यामुळें वक्तशीर कर्जफेड होत नाहीं. समृद्धीच्या काळांत घेतलेल्या जमिनीस आतां गिऱ्हाईक मिळण्यास पंचाईत पडत आहे. हौसिंग सोसायट्यांस घरें बांधण्यासाठी सरकारकडून कर्ज मिळणार नाहीं ह्या अटीवरच आतां नव्या सोसायट्या राजिस्टर करण्यांत येतात.

( १० ) स्टोअर्स सोसायट्यांची प्रगति विशेष समाधानकारक नसली तरी निरुत्साहकारक खास नाहीं. स्टोअर्सवरील सभासदांच्या निष्ठेचा अभाव, बाजारांतील स्पर्धा इत्यादि कारणांमुळें त्यांच्या प्रगतीस अडथळा येतो. विणकऱ्यांच्या ४६ सोसायट्या कशाबशा तगून आहेत.

( ११ ) अनेकविध व बिकट अडचणींस तोंड देऊन सहकारी चळवळीचें कार्य योग्य मार्गानें चालू आहे ही गोष्ट समाधानकारक आहे. लांब मुदतीच्या कर्जाची वाटणारी वाण भरून काढण्यासाठी जमीन गहाणाच्या बँकांची आवश्यकता कित्येक वर्षें भासत होती. दहा जिल्हा बँका व एक प्रांतिक बँक ह्यांची आतां स्थापना झाली असून त्यांस सुरवातीचीं कांहीं वर्षें सरकारी सहाय मिळणार आहे.

---

### ब्रिटिश सहकारी चळवळीचे नेते काय म्हणतात ?

ब्रिटिश सहकाऱ्यांची वार्षिक परिषद् नुकतीच भरली होती. तिचे अध्यक्ष, मि. रिडल, ह्यांनीं आपल्या चळवळींतल्या गुणदोषांचें विवेचन अत्यंत निर्भीडपणानें केलें. त्यांचे कित्येक महत्त्वाचे उद्गार हिंदुस्थानांतील सहकारी कार्यकर्त्यांस खात्रीनें मननीय वाटण्याजोगे आहेत. मध्यवर्ती प्रातिनिधिक संस्थेस धाब्यावर बसवून स्वतःचें घोडें स्वतंत्रपणानें दामटण्याची प्रवृत्ति कित्येक सहकारी संस्थांत दिसून येते, ती अनिष्ट असल्याचें मि. रिडल ह्यांनीं निक्षून सांगितलें व ते म्हणाले:—" राष्ट्रसंघाच्या पुढें भानगडीचे व गुंतागुंतीचे प्रश्न असतात आणि तो संघ कार्यक्षम रितीनें चालूं शकत नाहीं ह्याचें आपणां सर्वांस नवल वाटतें. आपल्या चळवळींतले हितसंबंध बहुशः स्थानिक महत्त्वाचे असतात, पण त्यांस इतकें महत्त्व प्राप्त होतें कीं, सहकारी संस्थांचा संघ आपणांस स्थापतां येत नाहीं. आपल्या मामुली व्यवहारांत ही शिस्त जशी महत्त्वाची आहे तशीच ती सहकारी चळवळींत आहे. हुकूम धुडकावून लावणारा बडतर्फ होतो; त्याचप्रमाणें मध्यवर्ती परिषदेचे ठराव धाब्यावर बसवणारी सहकारी संस्था शिक्षेस पात्र झाली पाहिजे. कोणत्याहि मोठ्या चळवळीचें उदात्त तत्त्व आणि क्षुद्र मनें ह्यांचा मेळ बसणें अशक्य आहे." सहकारी चळवळींत कार्यकर्ते व सभासद ह्यांची वृत्ति पूर्ण सहकाराची असली पाहिजे. चळवळींत अधिकाराच्या जागांवर असलेल्यांची वृत्ति सहकारी असतेच असें नाहीं.

## प्रो. काळे ह्यांचें ग्रामसुधारणेवर भाषण

मुख्य वक्ते ह्या नात्यानें प्रो. काळे यांनीं पालघर ग्रामसुधारणा शिक्षण वर्गाचे उद्घाटन समारंभाचे वेळीं भाषण केलें, त्यांतले महत्त्वाचे मुद्दे खालीं दिले आहेतः—(१) शेतीचा धंदा व शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा ह्यांसंबंधाची चर्चा आज दोन पिढ्यांच्यावर चालली असून दुष्काळ कमिशनांपासून ते नऊ वर्षांपूर्वीच्या शेतकी कमिशनपर्यंत त्या बाबतींत अनेक सूचना व शिफारसी करण्यांत आलेल्या आहेत. (२) शेतकऱ्यांचा कायदा, पाटबंधाऱ्यांचीं कामें, सहकारी चळवळ, शेतकी खात्यांचा विस्तार इत्यादि मार्गानीं कित्येक सुधारणाहि झाल्या आहेत. (३) परंतु शेती सुधारणें व शेतकरी सुधारणें ह्यांत अंतर आहे; आणि आजमितीस शेतीसुधारणेपेक्षां ग्रामोद्धारासच अधिक महत्त्व दिलें जात आहे हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. (४) आपली स्थिति असमाधानकारक असून ती सुधारलीच पाहिजे अशी आच स्वतः शेतकऱ्यास वाटल्यावांचून बाहेरून होणारे प्रगतीचे प्रयत्न फलदायी व्हावयाचे नाहींत, ही गोष्ट शेती कमिशननें प्रामुख्यानें प्रतिपादली असून त्यासंबंधांत विधायक कृति करण्याचें महत्त्व त्या कमिशनचे अध्यक्ष सध्या हिंदी व्हाइसरॉय झाल्यानें त्यांस विशेष पटत आहे असें दिसतें. (५) जग झपाट्यानें पुढें जात आहे व शहरांतून नवीन कल्पना, सवयी व जिन्नस खेडेगांवांत चालले आहेत. त्या मानानें शेतकऱ्याची कमाई व त्याचा धंदा ह्यांत सुधारणा होत नाहीं. (६) पुरे उद्योगधंदे व मिळकत नसल्यानें खेडेगांवीं जनतेची शारीरिक व मानसिक स्थिती हीन दर्जाची बनली आहे व ती सुधारणें हें मुख्य काम आहे. ह्या दृष्टीनें कुणबी-अडाण्याची व कारू-नारूची जुनी विस्कटलेली खेडेगांवांची घडी नव्यानें बसवली पाहिजे व ग्रामसंघटनेचा अर्थ तरी हाच आहे अशा व्यापक भूमिकेवरच हा प्रश्न सोडवला पाहिजे. (७) दोन-चार वर्षांत उरकण्यासारखें हें काम नाहीं आणि त्यांत सरकार आणि समजूतदार व शिकलेले लोक ह्यांचें सहकार्य सतत चालणें अगत्याचें आहे. (८) रात्रीच्या शाळा वाचनालयें चालवणें, विहिरी खोदून व तलाव नीट करून पाण्याचा पुरवठा करणें, दवाखाने व औषधोपचार ह्यांची तरतूद करणें, नवे रस्ते करणें, झाडें लावणें इत्यादि अनेक बाबींचा उल्लेख नुकताच करण्यांत आला आहे ह्यावरून ग्रामसुधारणेच्या व्यापक स्वरूपाची कल्पना येण्यासारखी आहे. (९) शिक्षण वर्गाच्या कार्यक्रमांत ह्या प्रकारच्या व इतर अनेक प्रश्नांचा अंतर्भाव करण्यांत आला आहे ही समाधानाची गोष्ट आहे. (१०) ग्रामसुधारणेचें कार्य करूं इच्छिणारांनीं वर्गाचा ज्यास्तींत ज्यास्त फायदा करून घेतला पाहिजे. (११) सुशिक्षित व सुस्थितींतील नागरिकांनीं आपापल्या परीनें ग्रामसुधारणेच्या कार्यक्रमास हातभार लावून तें सारखें चालू राहील अशी व्यवस्था केली पाहिजे. (१२) प्रगतीचें ध्येय आणि सहकार्य व संघटन ह्यांचे सहायानें व्यापक भूमिकेवर सतत व्यावहारिक प्रयत्न अशा स्वरूपाचा कार्यक्रम असेल तरच ग्रामसुधारणेचा प्रचंड व अवघड प्रश्न सुटण्याच्या मार्गास लागेल.

### ब्रिटिश तज्ञांचें आगमन

इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या शास्त्रीय संशोधन-कार्याची पहाणी करण्यासाठी बोलावलेले दोघे ब्रिटिश तज्ञ ४ नोव्हेंबर रोजीं हिंदुस्थानांत दाखल होतील.

### दसपुती स्त्रियांची बक्षिसासाठी चढाओढ

टॉरॉंटो येथील एका बॅरिस्टरानें तेरा लक्ष रुपये बाजूस काढून ठेवले असून आपल्या मृत्यूनंतर दहा वर्षांचे अवधींत जिला ज्यास्तींत जास्त मुलें होतील त्या स्थानिक स्त्रीस सदरहु रकम मिळावी अशी योजना केली असल्यानें त्या बक्षिसाकरितां तिशीं-चाळिशींतल्या चार-पांच स्त्रियांमध्यें स्पर्धा चालली आहे. ह्यांपैकीं तीन स्त्रियांस प्रत्येकीं दहा मुलें झालेलीं असून एकीचीं सर्व अपत्यें जिवंत व दुसऱ्या दोघींचीं नऊ हयात आहेत. न्यूज ऑफ दि वर्ल्ड पत्र म्हणतें कीं एकतीस वर्षांची चौथी स्त्री त्यांच्याशीं चढाओढ करूं पहात आहे. तिला नऊ मुलें आहेत व पुढील महिना अखेर आपणांस जुळीं अपत्यें होतील अशी तिची अपेक्षा आहे. ती खरी ठरल्यास ह्या स्त्रीचा नंबर पहिला लागून ती बक्षिस पटकावील. जुळ्यांच्या सहायानें वरचा नंबर व बक्षिस मिळण्याची इतर स्त्रियांची आशा फलद्रूप झालेली नाहीं.

### दौंड–बारामती रेल्वे कंपनी

वरील कंपनीच्या गेल्या आठवड्यांत भरलेल्या साधारण सभेंत ३१ मार्च १९३६ अखेर संपलेल्या सहामाहीकरितां ५ टक्के दरानें डिव्हिडंड मंजूर करण्यांत आलें. प्राप्तीवरील कर वजा जातां भागीदारांस ४$\frac{3}{4}$ टक्के दरानें व्याज पडेल.

दौंड–बारामती रेल्वे कंपनीचे 'शापुरजी गोडबोले आणि कंपनी' हे मॅनेजिंग एजंट्स असून दिवाण बहादुर गोडबोले हे अध्यक्ष आहेत. कंपनीचें भरणा झालेलें भांडवल १२$\frac{1}{2}$ लक्ष रुपये आहे. दौंड–बारामती रेल्वेच्या फाट्याची लांबी २७$\frac{1}{2}$ मैल आहे.

### पाचोरा–जामनेर रेल्वे कंपनी

ह्या कंपनीची व्यवस्था 'शापुरजी गोडबोले आणि कंपनी' कडेच असून दिवाण बहादुर गोडबोले हेच तिचे अध्यक्ष आहेत. तिचें भरणा झालेलें भांडवल १६$\frac{1}{2}$ लक्ष रुपये आहे आणि तिच्या फाट्याची लांबी ३४$\frac{3}{4}$ मैल आहे. ३१ मार्च अखेरच्या सहामाहीसाठीं ह्या कंपनीच्या भागीदारांस ५ टक्के (कर वजा जातां ४$\frac{3}{4}$ टक्के) दरानें डिव्हिडंड वाटण्याचें तिच्या साधारण सभेंत ठरलें.

### वार्षिक सभा

| ता. (सप्टेंबर.) | वेळ | बँक |
|---|---|---|
| १० | ८-३० | भुसावळ पीपल्स को. बँक, भुसावळ |
| ११ | २—० | पुणें जि. को. लँड मॉर्गेज बँक, पुणें |
| १३ | ३—० | पूना मर्चंटस को. बँक, पुणें |
| १३ | ४—० | ग. स. महाराष्ट्र को. बँक, पुणें |
| १३ | ५—० | राजवाडे पीपल्स को. बँक, धुळें |
| १५ | २—० | पू. खा. जि. को. लँड मॉर्गेज बँक, जळगांव |
| १९ | ४—० | नगर डि. अ. सें. को. बँक, अहमदनगर |
| २० | १—० | प. खा. स. नो. प. स. मंडळी, धुळें |
| २० | ४—० | नगर डि. अ. सें. को. बँक, अहमदनगर (जादा सर्वसाधारण सभा) |
| २७ | २—० | कॉसमॉस को. अ. बँक, पुणें |
| २७ | ३—० | पंढरपूर माध्यंदिन ब्रह्मवृंद को. अर्बन बँक, पंढरपूर |

# स्फुट विचार

## टारिफ बोर्डासंबंधीं सरकारचें आश्वासन

औद्योगिक संरक्षणाचे बाबतींत हिंदुस्थान सरकारास पूर्वी इतकी आस्था गेल्या दोन-तीन वर्षांत वाटेनाशी झाली आहे अशी कल्पना जनतेमध्यें पसरली असून सध्या टारिफ बोर्ड अस्तित्वांत नसल्यानें तिला पुष्टि मिळाली आहे. टारिफ बोर्डाचें विसर्जन सरकारनें कायमचें केलें नसून त्याच्याकडे चौकशी-साठी सोपवण्यास संरक्षणाबावतचे प्रश्न नाहींत म्हणूनच केवळ त्याच्या सभासदांच्या नेमणुका केलेल्या नाहींत, ह्या आशयाचें सरकारच्या धोरणाचें समर्थन ह्यापूर्वीच प्रसिद्ध झालें होतें. टारिफ बोर्डाचें अस्तित्व हंगामी स्वरूपाचें प्रथमपासूनच आहे आणि औद्योगिक चौकशीचा प्रसंग लवकरच उपस्थित होणार आहे, तेव्हां त्याचें पुनरुज्जीवन रीतसर होईल ही सरकारची भूमिका आहे. गेल्या आठवड्यांत लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत हा प्रश्न तातडीच्या चर्चेसाठीं निघाला, तेव्हां सरकारतर्फे वरील आशयाचें उत्तर देण्यांत आलें आणि संरक्षणाचे धोरणाबाबत किंचितहि फेरबदल झालेला नाहीं, असें आश्वासनहि देण्यांत आलें. सरकारच्या अलीकडील धोरणाविषयीं नापसंती दर्शव-ण्याच्या हेतूनें असेंब्लीचें कामकाज तहकूब व्हावें अशा आश-याची पुढें आलेली सूचना, वर निर्दिष्ट केलेला खुलासा व आश्वासन लक्ष्यांत घेतां, मागें घेणें तिच्या पुरस्कर्त्यास उचित वाटलें. सरकारच्या धोरणांत फरक झालेला नसून हिंदी धंद्यांस संरक्षण देण्याचे बाबतींतली त्याची उत्सुकता मुळींच कमी झालेली नाहीं तर निषेध करावयास जागा कोठें राहिली? ही विचारसरणी प्रस्तुत बाबतींत प्रभावी ठरली. लोकमत प्रदर्शित करण्याची संधी सूचनेवरच्या चर्चेनें उपलब्ध झाली आणि टारिफ बोर्डाची घटना कायम स्वरूपाची असावी व त्याचें कार्यक्षेत्र समाधानकारक असावें अशा अर्थाचा स्वतंत्र ठराव असेंब्लीपुढें येण्यास मार्ग मोकळा झाला.

## जागतिक शांतता परिषद

महायुद्धाची आठवण बुजून गेल्यासारखी होऊन कांहीं राष्ट्रें शस्त्रास्त्रें सरसावूं लागलीं आहेत. युद्धाची घोर आपत्ति जगा-वर पुन्हां येऊं नये अशा हेतूनें बहुतेक प्रमुख देशांत शांततेचा पुरस्कार करणाऱ्या संस्था स्थापन झाल्या आहेत हें असल्या घातुक महत्त्वाकांक्षेच्या दृष्टीनें अभिनंदनीय आहे. विसाव्या शत-कांत कांहीं युरोपिअन राष्ट्रांच्या पुढाऱ्यांनीं कारण नसतां दंड थोपटून उभें रहावें व जणूं काय इतरांस युद्धास आव्हान द्यावें हें खेदजनक आहे. ह्या प्रवृत्तीचा वेळींच प्रतिकार होण्यास लोकमत सर्वत्र जागृत होऊन त्यानें जागतिक शांततेचा भंग होणार नाहीं अशा प्रकारचें धोरण आंखण्यास आपल्या राज्यकर्त्यांस लावलें पाहिजे. गेल्या आठवड्यांत ब्रसेल्स येथें जागतिक शांतता परि-षद भरली होती व तिला सर्व खंडांतील राष्ट्रांच्या प्रतिनिधींचा पाठिंबा मिळाला हें समाधानकारक आहे. असल्या महत्त्वाच्या जागतिक परिषदेस जर्मनी व इटली ह्या देशांचे प्रतिनिधी उप-स्थित नसणें ही गोष्ट डोळ्यांत भरण्यासारखी आहे. रशिया व जपान ह्या देशांतूनहि शांतता परिषदेस प्रतिनिधी जावे आणि वरील दोन पुढारी समजल्या जाणाऱ्या राष्ट्रांची तीमध्यें गैर-हजिरी लागावी, ह्यावरून सरळ अनुमान निघतें तें उघडच आहे. मानवी संस्कृतीचें अस्तित्व आंतरराष्ट्रीय सलोख्यावर अवलंबून असून जागतिक शांततेचा पुरस्कार जितका विस्तृतपणानें, जोरानें व संघटित रीतीनें होईल तितका तो इष्टच आहे.

## सार्वजनिक हित आणि अधिकाऱ्यांचा वैयक्तिक फायदा

सरकारी नोकरींत असलेल्या माणसांनीं आपलें लक्ष सार्व-जनिक हिताकडेच सर्वस्वी दिलें पाहिजे आणि लोकांचें हित व स्वतःची सोय किंवा फायदा ह्यांमध्यें विरोध उत्पन्न होण्याचा संभव असतां असल्या भानगडींपासून दूर राहिलें पाहिजे, हा सामान्य दंडक सर्वमान्य आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. राज्यकारभाराच्या सचोटीसंबंधानें यत्किंचितहि संशय येण्यास जागा असतां कामा नये असें राज्यकर्त्यांचें धोरण असलें पाहिजे ह्याचीं उदाहरणें अलीकडे इंग्लंडमध्यें घडलीं आहेत व त्यांमध्यें जबाबदार राज्यकर्त्यांचें वर्तन अनुकरणीय व अभिनंदनीय असेंच झालें आहे, ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. वसाहतींचे मंत्री, मि. टॉमस, ह्यांचा बादरायण संबंध, ब्रिटिश बजेटांतील कांहीं बाबींची परिस्फुटता झाली ह्या गोष्टीशीं लागण्याची शंका येतांच, प्रधानमंडळानें खास चौकशी करवली व मंत्र्यास आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला. अशा प्रकारचें दुसरें एक उदा-हरण नुकतेंच घडलें आणि त्या प्रकरणांतहि ह्याच तऱ्हेची शिस्त ब्रिटिश मुख्य प्रधानांनीं पाळली आहे. विमान खात्याचे चिटनवीस, सर क्रिस्टोफर बुलक, ह्यांच्या मनांतून सरकारी नोकरी सोडून इंपीरिअल एअरवेज ह्या कंपनीच्या चालक मंडळांत शिरावयाचें होतें आणि टपालाच्या वहातुकी-बाबत त्या कंपनीशीं वाटाघाट चालू असतां सर क्रिस्टो-फर ह्यांनीं आपल्या खाजगी कामाविषयीं बोलणीं चालविलीं. सचोटीचा प्रश्न ह्या प्रकरणांत उद्भवत नसला तरी इंपीरिअल एअरवेज कंपनीस द्यावयाच्या मक्त्याचा विचार चालू असतां त्याशीं निकट संबंध असलेल्या सरकारी खात्यांतल्या एका अधि-काऱ्यानें वैयक्तिक हिताच्या प्रश्नांच्या वाटाघाटी करणें उचित नव्हतें असा अभिप्राय मुख्य प्रधानांनीं सदरहु प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या कमिटीनें दिल्यावरून सर क्रिस्टोफर ह्यास कामावरून दूर केलें असल्याचें जाहीर झालें आहे. "आपलें कर्तव्य आणि वैयक्तिक स्वार्थ ह्यांमध्यें विरोध उत्पन्न होईल अशी परिस्थिति सरकारी नोकरांनीं उत्पन्न होऊं देऊं नये आणि स्वकर्तव्यास स्वार्थाचे मानानें त्यांनीं कमी महत्त्व कधींहि देतां कामा नये" असा दंडक ब्रिटिश सरकारनें मागेंच प्रसिद्ध केला आहे. शिस्तीस उचलून धरण्याचें ब्रिटिश सरकारचें धोरण कडक असलें तरी राज्यकारभाराच्या निर्मळपणाच्या दृष्टीनें तें योग्यच ठरतें. सार्वजनिक संस्थांत काम करणाऱ्या मंड-ळींनींहि प्रस्तुत प्रकरणापासून बोध घेण्याजोगा आहे.

## पालघर येथें ग्रामसुधारणा शिक्षणाचा वर्ग

पालघर तालुका शेती सुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू आठवडाभर ग्रामसुधारणा शिक्षण वर्गाचा विविध कार्यक्रम व्हाव-याचा आहे. त्याचा उद्घाटन समारंभ प्रि. भिसे ह्यांचे हस्तें गेल्या रविवारीं पालघर येथें झाला व त्या प्रसंगीं मुख्य वक्ते ह्या नात्यानें प्रो. काळे ह्यांचें भाषण झालें. शेतकरी वर्गास बोधप्रद होईल असें छोटेखानी प्रदर्शनहि ह्या निमित्तानें मांडण्यांत आलें आहे व शिशुसंगोपनाविषयींची माहिती देण्याच्या हेतूनें तद्वि-

षयक विभागाची जोड त्यास देण्यांत आली आहे. ग्रामसुधारणा शिक्षण वर्गांत सुमारें पन्नास जिज्ञासू व कार्यकर्ते, व्याख्यानद्वारा निरनिराळ्या विषयांचें ज्ञान तज्ज्ञांकडून दिलें जाईल त्याचा फायदा घेणार आहेत. विषय व व्याख्याते ह्यांची निवड उत्कृष्ट रीतीची झाली असून उद्घाटन समारंभास श्रोतृवर्ग चांगला जमला होता. श्री. स. भि. पाटील यांनीं स्वागतपर भाषण केल्यावर पालघरचे मामलतदार, मि. देसाई, ह्यांनीं तालुक्यांत निरनिराळ्या ठिकाणीं चाललेल्या ग्रामसुधारणेच्या कार्याची माहिती दिली. शेतकी खात्याचे श्री. जांभेकर ह्यांनीं वरील सर्व उपक्रमाचे बाबतींत मेहनत घेतली असून त्यांस स्थानिक पुढाऱ्यांचें सहाय होत आहे. उद्घाटन समारंभाचे वेळीं दिसून आलेला उत्साह व शिक्षण वर्गाकरितां आखलेला भरीव कार्यक्रम पहातां हा उपक्रम व्यावहारिक दृष्ट्या उपयुक्त होईल असें वाटण्यास जागा आहे.

### गुरांच्या चाऱ्याचीं पिकें व कालव्याचें पाणी

अवर्षणामुळें चाऱ्याचा पुरवठा कमी होऊन जनावरांच्या खाण्याचे हाल होणार ते वांचवण्यासाठी चाऱ्याचीं पिकें काढून तो पुरवठा वाढवणें इष्ट असतें व मागील दुष्काळांच्या अनुभवावरून पहातां शक्यहि होतें. सदरहु पिकांस जरूर असलेलें पाणी सरकारी कालव्यांच्या प्रदेशांत सवलतीच्या दरानें शेतकऱ्यांस मिळाल्यास चाऱ्याचीं पिकें काढतां येतील हें लक्ष्यांत घेऊन त्या विषयींची तरतूद करण्यांत आली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. अहमदनगर व नाशिक ह्या जिल्ह्यांमध्यें गोदावरी व प्रवरा ह्या नद्यांच्या कालव्यांचें पाणी दर एकरीं एक रुपया ह्या दरानें शक्य तितक्या विस्तृत प्रमाणावर पुरवण्याचें ठरलें असल्याविषयींची योजना सरकारनें जाहीर केली असून तिचा फायदा शेतकऱ्यांनीं तात्काळ घेतला पाहिजे. ही सवलत इतर कालव्यांच्या हद्दींतहि देण्याचा सरकारचा विचार आहे. जनावरें जगवण्याचे शिकस्तीचे प्रयत्न करणें अगत्याचें आहे, ह्या दृष्टीनें वरील सरकारी सवलतीची योजना स्तुत्य आहे.

### विमा कायद्यांत दुरुस्ती

विम्याचे कायद्यामध्यें दुरुस्ती सुचविण्याकरितां नोव्हेंबर महिन्यांत एक कमिटीची नेमणूक करण्यांत येणार आहे, असें सरकारचे कायदामंत्री, सर नृपेंद्र सरकार, ह्यांनीं असेंब्लींत जाहीर केलें. ह्या संधीचा फायदा घेऊन विमा क्षेत्रांतील पुढारी मंडळींनीं त्यांस आवश्यक वाटत असलेल्या सुधारणांचा मसुदा तयार करण्यास सुरवात केली आहे. कांहीं दिवसांपूर्वी भरलेल्या एका सभेंत ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी एक कमिटी नेमण्यांत आली, तीमध्यें हिंदुस्थानांतील सात प्रमुख कंपन्यांच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यांत आला. हिंदुस्थानांत काम करणाऱ्या परदेशी कंपन्यांस सक्तीनें सरकारी परवाना घेण्यास लावणें, सरकारांत डिपॉझिट्स ठेवण्याची अट त्यांस लागू करणें, हिंदी कंपन्यांस संरक्षण देणें, इत्यादि प्रश्नांचा खल कमिटीनें केला असून आतां जरूर त्या दुरुस्त्यांचा समावेश केलेल्या बिलाचा एक मसुदा तयार करण्यांत येईल व सरकारकडे पाठविला जाईल.

### 'चहा कसा तयार करावा ?'

हिंदी चहाचा प्रसार वाढविण्यासाठी इंडियन टी सेस कमिटीचे प्रयत्न चालू असतात. सदरहु कमिटीनें 'चहा कसा तयार करावा ?' ह्या नांवाचें एक पत्रक प्रसिद्ध केलें आहे. चहा पिणें चांगलें कीं तें अपायकारक आहे हा प्रश्न बाजूस ठेवला, तरी चहाच्या चहात्यांनीं योग्य तऱ्हेनें केलेलाच चहा घ्यावा, ह्याबद्दल दुमत होण्याचें कारण नाहीं. ह्या दृष्टीनें वरील पत्रकांतील माहिती उपयुक्त आहे. एक पौंड चहाच्या पत्तीचा २४० पेले चहा होतो, असें त्यांत म्हटलें आहे. चहासाठी उपयोगांत आणावयाचें पाणी ताजें व उकळतें असलें पाहिजे. तें आधी उकळलेलें अगर फार वेळ उकळत राहिलेलें असतां कामा नये. चहा करतांना अमलांत आणण्याचे सात सोपे नियम कमिटीच्या पत्रकांत दिले आहेत. ७, चर्चलेन, कलकत्ता, ह्या पत्त्यावर मागणी केली असतां हें पत्रक मिळूं शकेल.

## लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

आय. सी. एस. मध्यें घेण्यांत यावयाच्या हिंदी व युरोपियन उमेदवारांमधील निम्मे-निम्मे हें प्रमाण ली कमिशननें सुचविलें व तें पार्लमेंटनें मान्य केलें होतें. १९२२ सालापासून आतांपर्यंत दिल्ली येथील परीक्षा देऊन फक्त ९४ हिंदी उमेदवार आय. सी. एस. मध्यें दाखल झाले. ह्या उलट, लंडन येथील परीक्षेंत १९४ हिंदी उमेदवार पास झाले. १९३१ नंतर एकूण ३५० ( त्यांतील १७५ हिंदी व १७५ युरोपियन ) उमेदवारांची भरती व्हावयास हवी होती; तथापि, वस्तुस्थिति अशी झाली आहे कीं १६२ हिंदी उमेदवारांस व फक्त ९६ युरोपियनांसच प्रवेश मिळालेला आहे. युरोपियनांची संख्या हिंदी उमेदवारांचे बरोबरीनें आणण्याकरितां त्यांच्या भरतीची नवी योजना करण्यांत आली व हिंदी विद्यार्थ्यांस दिल्लीच्या परीक्षेचा मुख्य मार्ग मोकळा ठेवण्यांत आला. ही व्यवस्था व तिच्या मुळाशीं असलेली विचारसरणी लेजिस्लेटिव्ह असेंब्लीस पटली नाहीं. परीक्षेमध्यें हिंदी विद्यार्थी यशस्वी होतात व युरोपियन मागें पडतात; तेव्हां लायक हिंदी उमेदवारांस बाजूला सारून नालायक युरोपियनांस आय. सी. एस. मध्यें दाखल करून घ्यावयाचें कीं काय ? असा प्रश्न चर्चेमध्यें उपस्थित करण्यांत आला व सरकारी धोरणाविषयीं नापसंती व्यक्त करणारी सूचना बहुमतानें पास झाली.

* * *

हिंदी टारिफ बोर्डाचें विसर्जन करण्यांत आलें असलें तरी त्याचा अर्थ सरकारी धोरणांत बदल झाला आहे असें समजूं नये; जरूर त्यावेळीं नव्या बोर्डाची नेमणूक करण्यांत येईल, असें आश्वासन सरकारतर्फे सर महमद झाफरुल्लाखान ह्यांनीं दिलें.

* * *

मद्रास ॲन्ड सदर्न मराठा रेल्वेच्या हिंदुस्थान सरकारशीं झालेल्या कराराची मुदत १९३७ मध्यें संपते. ही रेल्वे विकत घेण्यास सरकारास २३ कोटि रुपये लागतील. सदरहु रकम पौंडाच्या नाण्यांत ग्रेट ब्रिटनमध्यें द्यावी लागणार असल्यानें हिंदुस्थानांत तितकें कर्ज उभारून उपयोग होणार नाहीं, असें फडनवीस, सर जेम्स ग्रिग, म्हणाले.

* * *

हिंदुस्थानाविषयीं अनिष्ट कल्पना पसरवणारीं पुस्तकें व चित्रपट ह्यांस आळा बसावा ह्या दृष्टीनें राष्ट्रसंघाकडे खटपट करण्यांत यावी, ह्या सूचनेचा काळजीपूर्वक विचार करण्यांत आला व अशा प्रयत्नांचा उपयोग होणार नाहीं, असें हिंदुस्थान सरकाराप्रमाणें भारतमंत्र्यांचेंहि मत पडलें.

# सहकारी बँकांचे व सोसायट्यांचे अहवाल

## अर्बन को. बँक लि. कराड

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल: | २०१/२ | रोख व बँकांत शिल्लक: | ५२ |
| रिझर्व्ह व इतर फंड: | १७ | कर्जरोखे भाग व मिळकत खरेदी: | २०३/४ |
| ठेवी: | १९३१/२ | कर्ज येणें: | १५६ |

वरील बँकेच्या सभासदांची संख्या ५४० आहे. बँकेचा व्यवहार सालोसाल वाढत आहे. थकबाकीचें प्रमाण शेकडा १०·२१ इतकें पडतें, तें शेकडा १० चे वर जाऊं न देण्याचा बँकेचा प्रयत्न चालू आहे. बँकेस पांच वर्षें मुदतीनें स्थावर मिळकतीचे प्रथम तारणावर २५ हजार रुपये गुंतविण्यास परवानगी मिळालेली असून त्याप्रमाणें व्यवहारास सुरवात झालेली आहे. बँकेच्या ताळेबंदांत कर्जरोख्यांचा बाजारभाव हिशेबांत धरलेला असला तरी त्याबाबतचा स्वतंत्र फंड मजबूत करण्याकडे बँकेचें लक्ष आहे. तथापि, रोख्यांची दर्शनी अगर मूळ पडलेली किंमत, जी कमी असेल ती, ताळेबंदांत घेणें ज्यास्त इष्ट असतें हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. अहवालाचे सालीं बँकेस ५३६२ रु. नफा झाला, त्यांतून भागीदारांस ७½ टक्के दरानें १,५०० रु. नफा वाटावा अशी डायरेक्टरांच्या बोर्डाची सूचना आहे. बँकेची कराड स्टेशनवर शाखा काढण्याचा बँकेचा विचार असून शाखा स्थापन झाल्यास सभासदांची सोय व बँकेचें भांडवल गुंतविण्यास सुरक्षित स्थान उपलब्ध होईल. बँकेची प्रगति घिमेपणानें व समाधानकारक होत आहे.

## पूना मर्चंट्स को. बँक लि., पुणें

(वार्षिक सभा १३–९–३६)

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल: | ५४ | शिल्लक: रोख व बँकांत: | ४५ |
| रिझर्व्ह व इतर फंड: | १२ | इनव्हेस्टमेंट: | ५ |
| ठेवी: | २०१ | कर्ज: | २३१ |

३० जून, १९३६ अखेर वरील बँकेचे ५७५ सभासद होते. बँकेकडील ठेवी वाढत असून संस्थेच्या वाढत्या व्यापास सोईची अशी स्वतःची इमारत असणें इष्ट वाटल्यावरून ह्याबाबत योजना आखण्याचा प्रश्न बोर्डानें हातीं घेतलेला आहे. अहवालाचे सालीं थकबाकीचें प्रमाण बरेंच समाधानकारक असून वसूल व्यवस्थित होत आहे असें दिसतें. बँकेच्या कर्जावरील व्याजाचा दर नऊ ऐवजीं आतां साडेसात टक्के करण्यांत आला असून कर्जफेडीची मुदत ३० महिन्यांची करण्यांत आली आहे. सालअखेर बँकेस ७,६५४ रु. निवळ नफा झाला, त्यांतून भागीदारांस ६ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यासाठी ३,२४० रुपयांचा व नोकरवर्गास बोनस प्रीत्यर्थ २१५ रुपयांचा विनियोग करावा आणि उरलेली रकम रिझर्व्ह व इतर फंडांत टाकावी अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. पूना मर्चंट्स बँक हा संस्था उपयुक्त कार्य करीत असून परिस्थिति लक्ष्यांत घेऊन चालक तिची प्रगति योग्य दिशेनें होईल अशी व्यवस्था करण्याचा प्रयत्न करीत असल्याचें अहवालावरून दिसून येतें.

## म्हसवे को. सुपरवायझिंग यूनियन लि., पारोळें

वरील यूनियनला २६ सोसायट्या सामील आहेत. यूनियनमधील सोसायट्यांतून एकण १,६७,७०१ रु. इतकी थकबाकी आहे व बँकेची ५७,२५४ रु. थकबाकी आहे. अहवालाचे सालीं सात सोसायट्यांनीं सवलतीच्या धोरणाचा फायदा घेतला. वाईट सोसायट्यांस चालना देण्याचा कसून प्रयत्न करण्यांत आला. नवीन सभासद करून घेतल्यानें व कर्जें सढळपणानें दिल्यामुळें सोसायट्यांचें येणें कर्ज वाढलें असलें तरी वसुलांत सुधारणा होऊन थकबाकीचा आकडा कमी झालेला दिसत आहे. यूनियनला स्वतःची इमारत असावी, ह्यासंबंधीं खटपट चालूं आहे.

## पुणें सेंट्रल को. बँक लि., पुणें

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. ची १९ वी वार्षिक सभा श्री. बापूसाहेब गुप्ते यांचे अध्यक्षतेखालीं रविवार तारीख ६ सप्टेंबर, १९३६ रोजीं दुपारीं १२-३० वाजतां नूतन मराठी विद्यालयाचे असेंब्ली हॉलमध्यें भरून तींत पुढीलप्रमाणें मुख्यतः कामें झालीं. (१) सन १९३५-३६ सालचा अहवाल व ताळेबंद मंजूर करण्यांत आला. सदर सालांत संस्थेस सुमारें ३१,३०० रु. नफा झाला. वरील नफ्यापैकीं गंगाजळी व इतर फंडांत नियमाप्रमाणें जरूर ती रकम ठेवल्यानंतर शिलकी राहिलेल्या नफ्यांतून भागीदारांना दरसाल दर शेकडा ६ टक्के प्रमाणें फायदा वाटण्याचें ठरलें. (२) गरीब शेतकऱ्यांस बँकेचे फायदे त्यांस बँकेचे भाग खरेदी करण्याची ऐपत नसल्यानें आजवर घेतां येत नसत. ही अडचण लक्षांत घेऊन यापुढें मामुली प्रवेश फी घेऊन लायख इसमांस सभासदत्वाचे कांहीं ठराविक हक्क उपभोगण्याची संधि मिळावी अशा दृष्टीनें बँकेच्या नियमांत जरूर त्या दुरुस्त्या करण्यांत आल्या. त्याचप्रमाणें, बोर्डावर निवडून येणारे डायरेक्टर हे थकबाकीदार असतां कामा नयेत अगर थकबाकीदार संस्थेचे प्रतिनिधी असतां कामा नयेत अशा प्रकारचा दंडक यापुढें घालण्यांत आला. (३) पुढील सालासाठी डायरेक्टरांची निवडणूक झाली. बोर्डाचे अध्यक्ष म्हणून श्री. घों. कृ. ऊर्फ धोंडूमामा साठे यांची व उपाध्यक्षाचे जागेवर डॉ. ढमढेरे यांची निवडणूक झाली. (४) सन १९३६–३७ सालासाठी हिशेबतपासनीस म्हणून रा. गो. द. आपटे, बी. ए., जी. डी. ए, आर. ए., यांची ६०० रु. वर निवडणूक करण्यांत आली.

## राजवाडे पीपल्स को. बँक लि., धळें

(वार्षिक सभा: १३–९–३६)

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल: | ३७१/६ | शिल्लक: रोख व बँकांत: | ११३ |
| ठेवी: | २८१ | कर्ज व ओव्हरड्राफ्ट: | १९५ |
| रिझर्व्ह फंड: | ३ | सरकारी रोखे: | २२ |
| निवळ नफा: | ४१/४ | | |
| | ३३६१/६ | | ३३६१/६ |

एका विशिष्ट ध्येयानें प्रेरित होऊन स्थापन केलेल्या ह्या बँकेची प्रगति समाधानकारक होत आहे. अहवालाचे सालअखेर सभासदांची संख्या १,३७२ झाली असून ठेवींतहि वाढ झालेली आहे. एकूण १ लक्ष १६ हजार रुपये एवढी रकम दरमहाच्या परतफेडीनें कर्जाऊ दिलेली आहे. शेकडा पांचप्रमाणें कर्ज-फेड करणें सुद्धां बऱ्याच लोकांना जड जातें, अशी अहवालांत नोंद आहे. चालू सालीं एकूण नफ्याची रकम ४,३११ रु. होते, त्यांतून भागीदारांस ७½ टक्के दरानें डिव्हिडंड मिळणार आहे. राजवाडे संशोधन मंडळास बँकेच्या नफ्यांतून रकम द्यावयाची असते. सार्वजनिक कार्यास सहाय करण्याच्या हेतूनें स्थापन झालेली ही संस्था फलदायी झाली आहे व त्याबद्दल तिचें अभिनंदन करणें जरूर आहे.

## पूर्व खानदेश जि. को. लँड मॉर्गेज बँक लि., जळगांव
### ( वार्षिक सभा: १५-९-३६ ).

वरील बँक उघडण्याचा समारंभ ता. २९।८।३५ रोजीं मुंबई इलाख्याचे गव्हर्नर, लॉर्ड ब्रेबोर्न, ह्यांचे हस्तें होऊन बँकेच्या प्रत्यक्ष कामास ता. १-९-३५ रोजीं सुरवात झाली. बँकेकडे एकूण २१, ११५ रुपये शेअर भांवडल जमा झालें असून आतां-पर्यंत १९ सभासदांस २९, १५० रुपये जुन्या कर्जाच्या फेडी-साठी देण्यांत आले आहेत. अहवालाचे सालांत नाहीं, तरी बँकेच्या कामास प्रत्यक्ष सुरवात झाल्यापासून एका वर्षात, सुमारें ५० हजार रुपये कर्ज वाटण्यांत येईल. ही परिस्थिति समाधानकारक आहे. सावकारांस प्रत्यक्ष रकमा देतांना २९, १५० रुपयांत ८, १६३ रुपयांची सूट मिळवून देण्यांत आली. ह्यांत झालेला शेतकऱ्यांचा फायदा लक्षांत ठेवण्यासारखा आहे. सालअखेर बँकेला २५० रुपये तोटा आला असला तरी तो अपरिहार्यच होता. ह्या बँकेनें प्रांतिक बँकेकडे शिफारस केलेल्या कर्जाच्या अर्जांपैकीं एकहि प्रकरण सदोष म्हणून अद्याप परत पाठविण्यांत आलेलें नाहीं, ह्यावरून बँकेच्या दक्षतेची कल्पना येईल. कर्जाचे हप्ते वक्तशीर मिळण्या-वर बँकेचें यश अवलंबून आहे ह्या गोष्टीचा अहवालांत निर्देश करण्यांत आलेला आहे. बँकेची प्रगति उत्तेजनकारक आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## कळवण सहकारी वृत्त

१. मुंबई. प्रॉ. को. बँकेच्या कळवण शाखेंत दुष्काळनिवार-णार्थ सभा श्री. रावबहादुर वंडेकर, जे. पी., एम. एल. सी. व डायरेक्टर, मुं. प्रॉ. को. बँक यांनीं बोलावली होती. सदर सभेंत शाखा कमिटी मेंबर, यूनियनपंच, सहकारी खात्याचे स्थानिक अधिकारी वगैरे मंडळी प्रामुख्यानें हजर होती. सभेंत दुष्काळ-निवारणार्थ तालुक्याचे परिस्थितीनुसार तीन भाग करून त्या त्या भागाकरितां दुष्काळनिवारणार्थ कमिटी व त्यांवर एक सेंट्रल कमिटी नेमण्यांत येऊन सदर कमिटीचे सेक्रेटरी, सुपरवायझर व बँक इन्स्पेक्टर यांना नेमण्यांत आलें आहे. या सभेनें दुष्काळ कमिटीस कामें आंखून दिलीं आहेत.

२. पाळे खुर्द सोसायटीची जनरल सभा तारीख १९-८-३६ रोजीं झाली. बँक इन्स्पेक्टरनें सहकारितेबद्दल माहिती दिली व शेती सुधारणा कमिटी नेमण्यांत आली.

३ निवाणे सोसायटीची वार्षिक साधारण सभा बागलाणचे सुप्रसिद्ध श्री. धर्मा पाटील, सुपरवायझिंग युनियनचे प्रेसिडेंट, सटाणा, यांचे अध्यक्षतेखाली तारीख २२-८-३६ रोजीं भरली. मेंबरांस साक्षर करण्यासाठी सोसायटीमार्फत नफ्यांतून रात्रीची शाळा काढण्याचें ठरलें असून त्यासाठी २० रु. राखून ठेवले. शेती सुधा-रणा कमिटी निवडण्यांत आली. कमाल मर्यादा पत्रकें तीन वर्षांनीं करण्याबद्दलचा ठराव पास झाला.


अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें
सरकारी मान्यतेचें
झारापकर टेलरिंग अँड कटिंग कॉलेज
माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २

धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०
कडून
हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक
नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी
चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें
त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थे-कडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

धी बँक ऑफ इंडिया लि.
[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

उभारलेलें भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,०४,००,०००

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), वांद्रें ( मुंबईनजिक ), मलबार हिल ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदा-बाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा १ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँके-कडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लाग-ल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः— टी. आर. लालवाणी.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११-११ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—३ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९-१२ |
| ४% १९६०—७० ... ... | ११५—९ |
| ४% १९४३ ... ... ... | १११—८ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९९-१०¼ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०७-१४ |
| २¾% १९४८—५२ ... ... | १०१—३ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १११—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १००—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | ११०-१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षें मुदत) | ११०—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३—६३ ) ... | ११२—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२५—० |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३१—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १११—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३४—० |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५३६—४ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३५—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०६—८ |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९९—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९०५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५५—५ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४५—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २५८-१२ |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १६३६—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६२०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९८-१२ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६५—४ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८५—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७२६—४ |

### ज्यू लोकांची संख्या

जगांतील ज्यू लोकांची एकूण संख्या १ कोटि ६३ लक्ष, म्हणजे जगाच्या लोकसंख्येचे मानानें शेकडा ¾ टक्के आहे. देशाच्या लोकवस्तीशीं ज्यू लोकांच्या संख्येचें प्रमाण पोलंड देशांत सर्वांत जास्त आहे.


गणेशचतुर्थीस प्रसिद्ध होणार !

**पुरुषार्थाचा गणेशांक** (भाग २ रा)

या अंकांत गणपतीसंबंधींचें वैदिक, पौराणिक व महाराष्ट्रीय साधुसन्तांचें सर्व लिखाण सोपपत्तिक येणार असून शिवाय उत्तर व दक्षिण हिन्दुस्थानांत संशोधकांस ज्या प्राचीन गणेशमूर्ति आढळल्या आहेत, त्यांचीं विशेष माहितीसह सुचक छायाचित्रें देणार आहों. किं. २ रु. पण **वर्गणीचे ३ रु. म. ऑ. नें पाठविणारांस हा अंक वर्गणींतच मिळेल.**

**गणेशांक** भाग १ ला किं. २ रु.; पण चालू ग्राहकांस हा अंक फक्त १ रु. स देऊं. तरी वाचकांनीं रजिस्ट्रेशनखर्चासह एकंदर ४८३ रु. पाठवावे. म्हणजे दोन्ही विशेषांक रजिस्टरनें पाठवूं. प्रत्येक हिन्दूच्या घरीं हे अंक असले पाहिजेत.

व्यवस्थापक पुरुषार्थ, औंध, ( जि. सातारा ).


## PUBLIC WORKS DEPARTMENT.

Sealed tenders on B-2 forms will be received by the Undersigned in his office at Thana upto 2 P. M. ( S. T. ) on 21st september 1936, for the following works and will be opened on the same day there.

| Name of work. | Estimated cost. |
|---|---|
| ( 1 ) Improving Dharamtar Campoli road. | Rs. 63,260/- |
| ( 2 ) Constructing a three stage landing at Dharamtar ( Alibag side). | „ 27,679/- |

2/- Blank forms with specification can be had on payment of Rs. 3/-for each work on any working day during office hours except the day on which tenders are to be received.

3/- Each tender should be accompanied by a chalan of Rs. 1,500/- and Rs. 800/- for first and second work respectively as earnest money paid into any Government Treasury or the Reserve Bank of India without which no tender will be considered. The balance of Rs. 1,500/- and Rs. 800/- on account of Security Deposit will be deducted at 5% from bills.

4/- The Superintending Engineer, Northern Circle, Bombay, for the 1st work and the Executive Engineer, Thana Division, for second work do not bind themselves to accept any or the lowest tender and no reason for acceptance or rejection of any tender will be given.

Thana
1st September 1936.

B. K. BOSE.
Executive Engineer,
Thana Division.

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

---

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:-

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष-श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

---

## " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

---

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
## V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS.
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

---

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

## दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

---

## K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

---

## 'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख १६, सप्टेंबर १९३६. अंक ३८

दि गुड-वुइल
ॲशुअरन्स कंपनी लि.
पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल
विमेदारास
भरपूर सवलती माफक हप्ते
ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा; मॅनेजिंग डायरेक्टर


MARATHE & Co.
ENGINEERS & IRON FOUNDERS
WORKS : Natu Bag, Bhikardas Road, POONA 2
Can undertake to do any sort of casting.
We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act.
Our prices are very competitive.
OFFICE : 978-79, Sadashiv, POONA 2

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

"दुसरें मूल्यमापन जाहीर झालें"
स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—
कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.
अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी
हयातींतील विम्यास ३७॥ रु. | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास ४५ रु.
जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

"अर्थ" ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं. १ रु. ( ट. ख. निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !

ज्युनियर प्रभाकर सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः—ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः—

१ केळकर ब्रदर्स, बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी, लक्ष्मीरोड.


## विविध माहिती

### बँकांस सुट्टी

शनिवार, ता. १९ रोजीं गणेश चतुर्थी व संवत्सरीनिमित्त बँका बंद रहातील.

### वेडेपण आणि विवाह

अमेरिकेंतील वेड्यांच्या इस्पितळांत दाखल होणाऱ्या लोकांत विवाहित व अविवाहित ह्यांचें परस्पर-प्रमाण १:३ असें असतें. विवाहितांस बायकांचें वेड असतें असें म्हणतात, पण बायकांवांचून अविवाहित तिप्पट वेडे बनतात असें वरील माहितीवरून दिसतें.

### उंसाच्या पिकाचा अंदाज

यंदाचे वर्षी हिंदुस्थानांत एकूण ४२ लक्ष एकर जमिनींत ऊंस लावण्यांत आला असून गेल्या वर्षापेक्षां लागवडीमध्यें १६ टक्के वाढ झाली आहे असा सरकारी अंदाज आहे. उंसाच्या पिकाची प्रांतवार वांटणी खालीलप्रमाणें आहेः—संयुक्तप्रांतः ५१ टक्के, पंजाबः १४½ टक्के, बिहारः १० टक्के, बंगालः ७ टक्के, मुंबई ३ टक्के.

### लंडन शहरांत राज्यारोहणासाठी गर्दी

आठवे एडवर्ड बादशहा ह्यांच्या राज्यारोहणाचे समारंभाप्रीत्यर्थ मे, १९३७ मध्यें लंडन येथें मोठा सोहळा होणार आहे. त्या निमित्तानें सुमारें ४० हजार कॅनेडियन व २० हजार ऑस्ट्रेलियन लोक इंग्लंडला जातील अशी अपेक्षा आहे.

### संयुक्त प्रांतानें उभारलेलें कर्ज

संयुक्त प्रांताच्या सरकारनें १९६६ सालच्या परतफेडीचे तीन टक्के दरानें ३ कोटि रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे. ह्या रकमेचा विनियोग उत्पादक कामास भांडवल पुरविण्याकडे करण्यांत येणार असून १९६१ सालानंतर केव्हांहि कर्ज परत करण्याचा हक्क त्या सरकारनें राखून ठेवला आहे.

### पार्शी समाजाचा दानधर्म

पार्शी समाज दानशूरतेबद्दल प्रसिद्ध आहे. स्वतःच्या जातीसच त्यांचें औदार्य मर्यादित नसून, कोणत्याहि संकटाचे वेळीं जात व धर्म ह्यांचा विचार न करतां पार्शी धनिक मदत करतात असा अनुभव आहे. गेल्या वर्षी केवळ आपल्या समाजांतील लोकांची स्थिति सुधारण्याकरितांच उदार पार्शी धनिकांनीं अर्ध्या कोटिहून जास्त रकमा दिल्या.

### अहमदाबाद येथील कॉलेजासाठी दोन लक्ष रुपये

शेठ कस्तुरभाई लालभाई व त्यांचे दोन बंधू ह्यांनीं मिळून अहमदाबाद येथें एक नवें आर्टस कॉलेज स्थापन होण्यासाठी दोन लक्षांची देणगी दिली आहे.

### टेलिफोनचा वापर लोकप्रिय करण्याचा प्रयत्न

एका शहरांतून दुसऱ्या शहराशी टेलिफोन करावयाचा असतां त्यासाठी जादा फीची आकारणी केली जाते व त्याप्रीत्यर्थ रकम अनामत ठेवावी लागते. अशा ट्रंक टेलिफोन्सची लोकप्रियता वाढविण्यासाठी १ ऑक्टोबर १९३६ पासून एक वर्षभर, प्रयोगाखातर, अनामत रकमेची अट काढून टाकण्यांत येणार आहे.

### जी. आय. पी. रेल्वेचें उत्पन्न

एप्रिल ते ऑगस्ट अखेरच्या मुदतींत जी. आय. पी. रेल्वेस यंदा ५ कोटि, २२ लक्ष रुपये उत्पन्न झालें आहे. गेल्या सालीं त्याच मुदतींतल्या उत्पन्नाची रकम ५ कोटि ५ लक्ष रुपये इतकी होती.

### आगगाड्यांच्या डब्यांत गर्दी

जी. आय. पी. रेल्वेवरील आगगाड्यांच्या डब्यांत किती गर्दी होते हें पाहण्यासाठी गेल्या जूनच्या पहिल्या आठवड्यांत ४,२१७ गाड्यांची चांचणी करण्यांत आली असतां त्यांपैकीं फक्त २१ गाड्यांत विशेष गर्दी होती असें आढळून आलें. गर्दीचें प्रमाण एकंदरीनें कमी होत चाललें आहे, असें अनुमान काढण्यांत आलें आहे.

### मॉडेल मिल्स, नागपूर

नागपूर येथील मॉडेल मिल्स कंपनीची सोळावी साधारण सभा गेल्या आठवड्यांत मुंबई येथें सर माणेकजी दादाभाय ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. गेल्या सालीं कंपनीस झालेला पावणे तेरा हजार रुपयांच्या नफ्याचा विनियोग मागील वर्षांत साचलेला तोटा भरून काढण्याकडे करावयाचें ठरलें. कंपनीस गेलें वर्ष अत्यंत वाईट लागल्याचें आणि गिरणीचा खर्च शक्य तितका कमी करण्याचा यत्न झाल्याचें सांगण्यांत आलें.

### सिंद्या स्टीम नॅव्हिगेशन कं. लि.

गेल्या वर्षी वरील कंपनीस ८ लक्ष १५ हजार रु. निवळ नफा झाला, त्यांतून दर भागास १ रुपया ह्याप्रमाणें कर भरलेलें डिव्हिडंड देण्याचें ठरलें. कंपनीच्या प्रत्येक भागाची किंमत १५ रुपये आहे. गेल्या वर्षी ६ आणे डिव्हिडंड देण्यांत आलें होतें.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. ५ सप्टेंबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ४६,७६,३८३ |
| ता. १२ सप्टेंबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ७०,१०,२६६ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते १२ सप्टेंबर १९३६ अखेर | २,८१,६८,३६,२४४ |

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| पृष्ठ | पृष्ठ |
| १ विविध माहिती ... ४५४ | ६ बादशहांचें राज्यारोहण व त्यासंबंधीं विमे ४५९ |
| २ जागतिक महत्त्वाचे दोन विषय ... ४५५ | ७ मुंबई इलाख्यांतील कपाशीचें पीक ... ४६० |
| ३ कायदे मंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश ... ४५६ | ८ ऑलिंपिक सामने व जर्मन पोस्ट ऑफिस ४६० |
| ४ स्फुट विचार ... ४५७ | ९ वार्षिक सभा ४६० |
| चलनी नोटा आणि रुपयाचें नाणें—कंपन्यांच्या कायद्याची दुरुस्ती—मॅनेजिंग एजन्सीची पद्धति—बिलांतील इतर दुरुस्त्या—आयुर्वेद रसशाळा पुणे लि.—महाराष्ट्रांतील मोटार वहातुक— | १० सहकारी बँकांचे व सोसायट्यांचे अहवाल ४६१ |
| | ११ बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या भांडवलाची योजना ... ४६२ |
| | १२ आगगाड्यांच्या डब्यांतील साखळीचा दुरुपयोग ४६२ |
| ५ विम्याचे विविध हेतु ४५९ | १३ निवडक बाजारभाव ४६३ |

अर्थ

बुधवार, ता. १६ सप्टेंबर, १९३६

# जागतिक महत्वाचे दोन विषय

### फॅसिझम् वि. बॉल्शेव्हिझम् व वसाहतींची वांटणी

जागतिक व आंतरराष्ट्रीय महत्वाचे दोन जबरदस्त प्रश्न आज उपस्थित झाले असून ते कसे सुटणार इकडे सर्वांचे डोळे लागून रहाणें स्वाभाविक आहे. वसाहतींची राष्ट्रांमध्यें वांटणी आणि आत्यंतिक स्वरूपाच्या समाजसत्तावादाच्या प्रसाराविरुद्ध झगडा हे ते प्रश्न होत; आणि प्रमुख राष्ट्रांतील मुत्सद्यांच्या, ते सोडवण्याच्या कौशल्याची परीक्षा होण्याची आतां वेळ आली आहे. सदरहू प्रश्न सामोपचारानें सुटले नाहींत तर जागतिक शांतता व सुस्थिति ह्यांस भयंकर धोका आहे, ह्यांत शंका नाहीं. जर्मनी व इटली हे देश युद्धाची तयारी करून अस्तन्या सारीत आहेत आणि त्यांच्या चढाईविरुद्ध स्वतःचें संरक्षण करतां यावें अशाविषयीं खबरदारी घेणें इतरांस प्राप्त झालें आहे. एवंच, सर्व जगच जणूं काय भावी युद्धाच्या अपेक्षेनें किंवा भीतीनें साशंक व अस्वस्थ होऊन गेलें आहे. स्पेनमधल्या अंतस्थ बंडाळीच्या ज्वाळा बाहेर पसरूं नयेत ह्यासाठी प्रमुख राष्ट्रें खबरदारी घेत आहेत, तरी ह्या संबंधांत उद्यां काय होईल ह्याची खात्री वाटत नाहींशी झाली आहे. फ्रान्समधील कारखान्यांत कामकऱ्यांच्या संपाची एका काळीं उसळलेली लाट शांत झाली होती, ती पुन्हां उचल घेत आहे. स्पेनमधल्या समाजसत्तावादी सरकारास, त्या देशांत चाललेल्या रणधुमाळींत, त्याच्या बंडखोर शत्रूविरुद्ध सहाय करावें अशी इच्छा फ्रान्समध्यें प्रकट होत असतां फ्रेंच प्रधान मंडळास तटस्थवृत्तीचें धोरण चालू ठेवणें कठिण होत आहे असें दिसतें. स्पेनच्या सरहद्दीस लागलेलें दुसरें राष्ट्र पोर्तुगाल हें आहे व तेथील सरकारासहि ह्याच प्रकारची अडचण तीव्रतेनें भासत आहे. स्पेनमध्यें लढणाऱ्या दोन परस्पर विरुद्ध पक्षांस त्यांचेविषयीं सहानुभूति वाटणाऱ्या राष्ट्रांनीं सहाय करावयाचें ठरवल्यास स्पॅनिश बंडाळीच्या ज्वाला सबंध युरोपभर व युरोपाच्या बाहेरहि पसरण्यास वेळ लागावयाचा नाहीं, हें जाणून युरोपिअन राष्ट्रें तो वणवा जागच्या जागींच दाबून टाकण्याची शिकस्त करीत आहेत. सध्याची वेळ आणीबाणीची असून आत्यंतिक समाजसत्तावाद अथवा बोल्शेव्हिझम जमीनदोस्त केल्यावांचून जगास गत्यंतर नाहीं, अशा आशयाचे उद्गार नात्सीपक्षाच्या परिषदेंत हेर गोबेल्स ह्यांनीं नुकतेच काढले. बोल्शेव्हिक प्रवृत्ति हाणून पाडण्यासाठी पोर्तुगीज सरकारास कडक उपाय योजावे लागले आहेत. फ्रान्समध्यें अधिकारारूढ असलेल्या समाजसत्तावादी प्रधान मंडळाच्या अडचणींचा उल्लेख वर केलाच आहे. ब्रिटिश कामकरी संघांची परिषद् प्लीमथ येथें नुकतीच भरली होती, तीमध्यें कम्युनिस्ट म्हणजे आत्यंतिक विचाराच्या समाजसत्तावाद्यांस इंग्लंडमध्यें थारा मिळणार नाहीं ही गोष्ट निक्षून स्पष्ट करण्यांत आली, हें लक्ष्यांत घेण्यासारखें आहे. आपली राज्यघटना कोणत्या प्रकारची असावी हें निश्चित करण्याचा अधिकार प्रत्येक राष्ट्राचा आहे; त्यांत मध्यें पडण्याचें इतरांस प्रयोजन नाहीं. तथापि, ह्या अंतर्गत झगड्यास आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाल्याचीं उदाहरणें इतिहासांत नमूद आहेत.

महायुद्धाच्या समाप्तीनंतर हिसकावून घेतलेल्या जर्मन वसाहती आमच्या आम्हांस परत द्या अशी मागणी हेर हिटलरनें केली असून त्या बाबतींत राष्ट्रसंघाच्या मागें त्यानें तगादा लावला आहे. ही मागणी फेटाळून न लावतां तिचा निकाल गोडीगुलाबीनें व सामोपचारानें लावण्याचा प्रयत्न ब्रिटिश मुत्सद्दी करीत आहेत. राष्ट्रसंघ ह्या प्रश्नाचा सर्व बाजूंनीं विचार करील आणि तो जर्मनीच्या मागणीचा सहानुभूतिपूर्वक निर्णय देईल; परंतु तसें होण्यापूर्वी राष्ट्रसंघाच्या कार्यांत जर्मनीनें आपला योग्य वांटा उचलला पाहिजे आणि त्याच्या जबाबदाऱ्या शिरावर घेण्यास तयार झालें पाहिजे असें त्यांचें म्हणणें आहे. जर्मनीची मागणी केवळ आर्थिक हेतूनेंच करण्यांत आली असेल तर त्या राष्ट्रास कच्च्या मालाचा पुरवठा अनियंत्रित रीतीनें मिळण्याची व्यवस्था करतां येईल असेंहि आश्वासन देण्यांत येत आहे. पण त्यानें जर्मनीचें समाधान होईल असें वाटत नाहीं, हें हेर हिटलर यांनीं सदरहू प्रश्नाचे बाबतींत ब्रिटिश मुत्सद्यांस दिलेल्या उत्तरावरून स्पष्ट होत आहे. "ज्यांस स्वतःच्या मालकीच्या वसाहती नाहींत अशा राष्ट्रांचें दुःख वसाहतवाल्या राष्ट्रांस कसें कळणार? इतर राष्ट्रांकडून जर्मनीनें कच्चा माल विकत घ्यावा हें म्हणणें सोपें आहे, पण त्या मालाच्या बदला द्यावें लागणारें हुंड्यांच्या स्वरूपांतलें चलन, तोकड्या निर्गतीमुळें उपलब्ध होत नाहीं, ही जर्मनीची अडचण लक्षांत घेतां वरील प्रकारचा उपाय सुचवणें म्हणजे दुष्काळपीडित लोकांस दूधभात खावयास सांगण्यासारखें हास्यास्पद आहे," अशा आशयाची हेटाळणीची टीका हेर हिटलरनें केली आहे! आपल्या हातांतल्या किंवा हुकमतीखालीं असलेल्या वसाहती सोडण्याच्या प्रश्नाचा आतां नुसता विचार करण्यासहि ब्रिटिश लोकमत तयार होणार नाहीं, असें लंडन टाइम्समधल्या प्रस्तुत विषयावरील ताज्या लेखावरून उघड होत आहे. म्हणजे, कांहींतरी निमित्त पाहून आंतरराष्ट्रीय झगडा कोठेंतरी सुरू होण्याची संधि जर्मनी साधणार असा तर्क करण्यास जागा उत्पन्न झाली आह. हिटलरप्रमाणें मुसोलिनीहि युद्धाची भाषा वारंवार बोलत असून त्याची साम्राज्यतृष्णा तृप्त झाली आहे असें वाटत नाहा. सारांश, समाजसत्तावाद व वसाहतींची आंतरराष्ट्रीय वांटणी हे दोन विषय सध्या जागतिक राजकारणांत प्रामुख्यानें पुढें आले असून ते शांततेच्या व तडजोडीच्या मार्गानें सुटणें अगत्याचें झालें आहे. सबंध जगाची आर्थिक सुस्थिति व प्रगति त्यांच्या निकालावर अवलंबून रहाणार आहे.

## कायदेमंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

मुंबई सरकारच्या दुष्काळ निवारणाबाबतच्या धोरणासंबंधीं असमाधान व्यक्त करणारी तहकुबीची सूचना मुंबई कायदे कौन्सिलांत प्रचंड बहुमतानें पास झाली. वादविवादाचे वेळीं सरकारतर्फे उत्तर देतांना खा. ब. कूपर ह्यांनीं इलाख्याच्या कित्येक भागांत पाऊस पडूं लागला असल्याचें सांगितलें. गुजरातमधील परिस्थिति तेथें झालेल्या पावसामुळें पालटली असल्याचेंहि त्यांनीं ता. १० रोजीं कायदेमंडळास कळविलें. अर्ध्या इंचापेक्षां ज्यास्त पाऊस पडला, कीं हें शुभ वर्तमान तारेनें कळविण्याबद्दल त्यांनीं अधिकाऱ्यांस हुकूम दिले आहेत.

***

मुंबई येथील सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स अखिल भारतीय स्वरूपाचें नसल्यानें हिंदुस्थान सरकारनें त्या कॉलेजाचे खर्चाप्रीत्यर्थ ग्रँट देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं, असें शिक्षण मंत्री, दि. ब. कंबळी, ह्यांनीं एका प्रश्नास उत्तर दिलें.

***

होमिओपॅथिक, आयुर्वेदिक, युनानी इत्यादि नाना प्रकारचीं औषधें जनतेमध्यें खपत आहेत व त्यांसंबंधाच्या शिक्षणाची सोय व परीक्षांची तरतूद नसल्याकारणानें सरकारास लायक नसलेल्या हकीम-वैद्यांचें नियंत्रण करतां येत नाहीं. डोळे तपासून औषधें देणाऱ्या अनधिकृत वैद्यांच्या प्रश्नाचा विचार ह्या परिस्थितींत करतां येणें कठीण आहे असें गृहमंत्र्यांनीं सांगितलें.

***

सिटी ऑफ बॉम्बे पोलीस ॲक्टान्वयें गेल्या तीन वर्षांत अनुक्रमें ३४६, ५७८ व ६६३ लोकांस मुंबई शहरांतून हद्दपार करण्यांत आलें.

***

मुंबई इलाख्यांतील शाळांमधून सिनेमा फिल्म्स दाखविण्याची व्यवस्था करण्याच्या प्रश्नाचा सरकारनें विचार केला, परंतु पैशाची टंचाई, भाषांची विविधता, लायक माणसांचा अभाव, इत्यादि अडचणींमुळें विधायक योजना अद्याप अंमलांत आणतां आली नाहीं. तथापि, ज्या शिक्षण संस्था स्वतःचे खर्चानें सिनेमा दाखविण्याची व रेडिओची व्यवस्था करतात, त्यांस सरकार उत्तेजन देत असतें.

***

लँड इंप्रूव्हमेंट लोन्स ॲक्ट व ॲग्रिकल्चरिस्ट्स लोन ॲक्ट ह्यांचे अन्वयें देण्यांत येणाऱ्या तगाई कर्जावर मुंबई इलाख्यांत अनुक्रमें ७·८ व ७·३३ टक्के दरानें व्याज आकारण्यांत येतें.

***

मार्च १९३४ पर्यंत मुं. प्रॉ. सहकारी बँक त्या काळीं अस्तित्वांत असलेल्या तीन जमीन गहाण बँकांकडून ७ टक्के दरानें व्याज घेत असे व ह्या बँका आपल्या सभासदांस ८ टक्के दर लावीत असत. वरील तारखेनंतर त्यासंबंधीं हे दर अनुक्रमें ६½ व ७ टक्क्यांवर उतरविण्यांत आले.

***

हेड कॉन्स्टेबलचे खालच्या दर्जाचे पोलीस अधिकाऱ्यास रस्त्यांवरील मोटार तपासण्याचा अधिकार असूं नये, अशी नियमांत दुरुस्ती करण्याबद्दलचा ठराव कायदेमंडळापुढें आला असतां तो नामंजूर झाला.

ब्रॉडकास्टिंगचा हिंदुस्थानांत प्रचार करण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें ४० लक्षांचा फंड वेगळा काढून ठेवला आहे. रेडिओची यंत्रसामुग्री तयार करण्याकडे ह्या रकमेचा विनियोग करण्यांत यावयाचा नाहीं. तथापि त्यासंबंधांतील संशोधनकार्याची त्यांतून व्यवस्था करण्यांत येईल.

***

हिंदी रेल्वेजवर मागें नेटिव्ह ह्या नांवानें हिंदी लोकांस व युरेजियन ह्या नांवानें अँग्लो इंडियन लोकांस संबोधण्यांत येत असे; त्या ऐवजीं इंडियन व अँग्लो इंडियन ह्या शब्दांचा उपयोग करावा असें सरकारनें आपल्या अधिकारामधील रेल्वेजना १९११ सालीं कळविलें. १९११ सालच्या खानेसुमारींत अँग्लो इंडियन ह्या शब्दाचा उपयोग करण्याची मुभा देण्यांत आली.

***

हौरा पुलाचे कंत्राटाचे बाबतींत हिंदुस्थान सरकारास कोणताच अधिकार नव्हता; ती बाब सर्वस्वी बंगाल प्रांतिक सरकारचे अधिकारांतील होती, असें सर झाफरुल्ला ह्यांनीं सांगितलें.

***

निजामास वऱ्हाड परत देण्यासंबंधीं कोणत्याहि तऱ्हेची वाटाघाट चालू नाहीं, असें सर नृपेंद्र सरकार ह्यांनीं जाहीर केलें.

***

अंदमान येथील कैद्यांची परिस्थिति समक्ष अवलोकन करण्यासाठी असेंब्लीच्या दोन सभासदांस अंदमान बेटांत पाठविण्यांत येणार आहे.

***

नव्या बादशहांचा मुखवटा धारण करणारीं पोस्टाचीं तिकिटें व नोटा १९३७ च्या उत्तरार्धांत मिळूं लागतील, असें सर जेम्स ग्रिग ह्यांनीं सांगितलें. नाणीं व नोटा ह्यांवरील सध्याच्या लिपींत बदल करण्याचा सरकारचा विचार नाहीं, असेंहि ते म्हणाले.

***

पैशाच्या बाजारासंबंधीं प्रांतिक सरकारांस सल्ला देण्याचें व पैशाच्या बाजारास कर्ज उभारण्यासंबंधीं माहिती पुरवण्याचें काम ह्यापुढें रिझर्व बँक करील, असें सर जेम्स ग्रिग म्हणाले. संयुक्त प्रांताच्या सरकारनें ३ टक्के दरानें कर्ज काढतांना रिझर्व्ह बँकेचा सल्ला घेतला होता व मध्यवर्ती सरकाराचेंहि मत विचारलें होतें, हेंहि त्यांनीं स्पष्ट केलें.

***

हिंदी मनुष्यास पुरेसें सकस अन्न मिळविण्यास रोजीं दोन आणे पुरे होतात, असें सर गिरिजाशंकर बाजपेयी ह्यांनीं सांगितलें.

---

### असेंब्लीच्या सभासदाच्या मृत्यूबाबत दुःखप्रदर्शन कसें करावें ?

लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचा विद्यमान अगर माजी सभासद मृत्यु पावल्यास त्याबद्दल असेंब्लीनें आदर कसा व्यक्त करावा, हें ठरविण्याकरितां असेंब्लीमधील पक्षांच्या पुढाऱ्यांची सभा अध्यक्षांचे खोलींत भरली होती. अधिवेशन चालू असेल त्या शहरीं ( दिल्ली अगर सिमला ) विद्यमान सभासद मयत झाला तरच असेंब्लीची बैठक दिवसभर तहकूब करावी; मृत्यू इतर ठिकाणीं घडला असेल तर किंवा माजी सभासदाचे मृत्यूचे बाबतींत, मग तो कोठेंहि येवो, असेंब्लींत फक्त दुःखप्रदर्शक ठराव पास करण्यांत यावा, असें ठरलें.

# स्फुट विचार

## चलनी नोटा आणि रुपयाचें नाणें

हिंदुस्थानांत चलनी नोटा काढण्याचा अधिकार मागें मध्यवर्ती सरकाराकडे होता, तो रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया स्थापन झाल्यापासुन त्या संस्थेकडे आला आहे. रुपये पाडण्याची म्हणजे टांकसाळीवरची सत्ता मात्र पूर्वीप्रमाणें सरकारच्या हातांत आहे आणि विशिष्ट परिस्थितींत बँक मागेल तेव्हां ठराविक रकमेनें तिला सरकारनें नाणें पुरवलें पाहिजे अशी व्यवस्था कायद्यानें केली आहे. त्याचप्रमाणें, पन्नास कोटींच्यावर रुपयांचें नाणें रिझर्व्ह बँकेपाशी जमून तें जरूरीपेक्षां ज्यास्त आहे असें तिला वाटल्यास तें सरकारास देऊन त्याच्या मोबदला दुसरें चलन, सोनें किंवा रोखे मिळण्याचा हक्क बँकेस आहे. रिझर्व्ह बँकेविषयींच्या साप्ताहिक माहितीचे तक्ते पाहिले असतां, खेळत्या चलनी नोटांची व बँकेजवळच्या शिलकी रुपयांची रकम फुगत चालली आहे असें दिसून येतें. चलनी नोटांचा आकडा आतां २०२ कोटींच्यावर गेला आहे, पण त्याच्याच बरोबर रुपयांच्या नाण्यांचें प्रमाण ६७ कोटींच्या पलीकडे गेलें आहे. खेळत्या नोटांचा आकडा वाढला, ह्यावरून व्यवहारांत अधिक चलन फिरत आहे असें अनुमान काढावयाचें नाहीं; कारण, रुपयांचें नाणें व्यवहारामधून परत फिरून बँकेजवळ येऊन पडलें आहे. गेल्या वर्षाच्या ऑगस्टअखेर १९३ कोटींच्या चलनी नोटा देशांत प्रचलित होत्या, तो आकडा चालू वर्षाच्या ऑगस्ट अखेर २०२ कोटि रुपये झाला; म्हणजे त्यांत ९ कोटींच्यावर वाढावा झाला. त्याच बारा महिन्यांच्या मुदतींत बँकेजवळील रुपयांची रकम ५७ कोटींची ६७½ कोटि झाली. म्हणजे, व्यवहारांतले रुपये बँकेकडे परत फिरले असून त्यांच्याऐवजी चलनी नोटा प्रचलित झाल्या आहेत. रुपये बँकेकडे परत येतात, ह्याचा अर्थ, मंदीमुळें ह्या चलनास सामान्य जनतेची मागणी नाहीं, असा होतो. पावसाळ्यांत रुपये परत यावयाचे आणि हिवाळा व उन्हाळा ह्यांच्या मोसमांत ते पुन्हां व्यवहारांत जावयाचे असा चलनाच्या उलाढालींचा सामान्यतः ओघ असतो. परंतु अलीकडे असा अनुभव आला आहे कीं जनतेच्या जवळचे रुपये बँकेकडे आले असतां ते पुन्हां परत जात नाहींत. हा आर्थिक मंदीचा परिणाम आहे, ह्यांत शंका नाहीं; आणि तो टिकल्यास जरूरीपेक्षां ज्यास्त झालेलें आपल्या जवळचें नाणें रिझर्व्ह बँकेस सरकारकडे परत करणें इष्ट होईल. बँक व सरकार ह्यांचे दरम्यान रुपयांच्या नाण्यांचें देणें-घेणें व्हावयाचें, त्यास विशिष्ट मर्यादा कायद्यानें घातलेल्या आहेत; त्यांस अनुसरून ही व्यवस्था व्हावी लागेल हें उघड आहे.

---

## कंपन्यांच्या कायद्याची दुरुस्ती

कंपन्यांच्या कायद्याच्या दुरुस्तीचें बिल सध्यां लेजिस्लेटिव्ह असेंब्लीपुढें असून त्याची चर्चा तेथें चालू आहे. ह्या बिलांतील कलमांचें निरिक्षण बारकाईनें झालें आहे व कायदेमंडळाच्या कमिटीमधून तावून सुलाखून तें बाहेर पडलेलें आहे. तथापि, हा कंपनी कायदाच इतका विस्तृत आहे, त्यांत इतक्या बाबींची गुंतागुंत झालेली आहे आणि त्यामध्यें इतके तात्विक व व्यावहारिक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित झाले आहेत व होण्यासारखे आहेत कीं लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत कित्येक मुद्यांवर मतभेद अजूनहि व्यक्त केला जाणें अपरिहार्य आहे. तथापि,प्रस्तुत बिलाची मांडणी अनेक तज्ज्ञांचा सल्ला घेऊन व साधक-बाधक गोष्टींचा विचार करूनच केलेली आहे ही गोष्ट प्रसिद्ध आहे; आणि त्या बाबतींत सरकारचे कायदे-मंत्री, सर नृपेंद्र सरकार, ह्यांनीं घेतलेल्या मेहनतीचा गौरवपूर्वक उल्लेख जाहीर रीतीनें करण्यांत आला आहे. कंपन्यांच्या कायद्याची अंमलबजावणी होत असतांना भासलेल्या अडचणी व दिसून आलेले दोष दूर करणें हा सध्याच्या दुरुस्तीबिलाचा मुख्य उद्देश आहे आणि कायदा अधिक कार्यक्षम व इष्टफलदायी बनवण्याकडेहि सध्याच्या संधीचा फायदा घेण्यांत येणार आहे, हें योग्यच आहे. कंपन्यांत पैसे घालणाऱ्या जनतेच्या हितसंबंधांचें संरक्षण व्हावें, व्यवस्थापक व कारभारी मंडळींनीं आपल्याच पोळीवर तूप ओढण्याचा प्रयत्न केल्यास त्यास नियंत्रण बसण्याची तरतूद मंडळ्यांच्या घटनेंत असावी, त्यांचे हिशेब चांगल्या रीतीनें ठेवले व तपासले जावे, सारांश, सामान्य लोकांच्या पैशाचा दुरुपयोग केला जाऊं नये व भागीदारांची हुकमत कारभारावर चालावी हा कायद्याचा हेतु असतो. तथापि, कित्येक बाबी अशा असतात कीं कायद्याचीं कितीहि कुंपणें त्यांच्या भोंवतीं घातलीं तरी त्यांची अव्यवस्था होण्यास एका नाहीं तरी दुसऱ्या बाजूनें वाट सांपडते. ह्या प्रकारचा उपयुक्ततेचा मर्यादितपणा सर्वच कायद्यांत असतो आणि इतर गोष्टींप्रमाणें औद्योगिक व्यवहारांत वैयक्तिक सचोटी, जबाबदारीची जाणीव व कार्यक्षमता ह्या गुणांवरच त्यांचें यश अवलंबून राहतें. तरीहि, कंपन्यांच्या कारभाराची व्यवस्था शक्य तेवढ्या मर्यादेपर्यंत कायद्यानें बद्ध करणें हें सार्वजनिक हिताचेंच ठरतें. कायदा निष्कारण अडचणी उत्पन्न करण्याकरितां नसून कंपन्यांचें काम पद्धतशीर, सुरळीत व सरळपणानें चालावें ह्याकरितां आहे, हें ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे.

---

## मॅनेजिंग एजन्सीची पद्धति

कंपनी कायद्याबाबत एक अत्यंत वादग्रस्त प्रश्न म्हटला म्हणजे मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतींतल्या गुणदोषांविषयींचा असून ती रहावयाची असल्यास एजंट्स ह्यांचे अधिकार व जबाबदाऱ्या काय असाव्या ह्या संबंधांतल्या मतभेदाचा होय. कंपन्यांचा कारभार डायरेक्टर्सपैकीं एकानें किंवा त्यांच्या बोर्डाच्या हाताखालील व्यवस्थापक नोकरानें पहाण्याऐवजी तो एखाद्या व्यक्तीवर किंवा मंडळीवर विशिष्ट मोबदल्याच्या शर्तीवर सोपवावयाचा ही पद्धति हिंदुस्थानांत सररास चालू आहे, तशी ती इतर देशांत नाहीं. ह्या पद्धतींत मॅनेजिंग एजंटांच्या हातीं फाजील सत्ता जाऊन कंपनीच्या हिताकडे दुर्लक्ष होतें, कारखान्यांची व्यवस्था कार्यक्षम रीतीनें चालत नाहीं, एजंट लोक भरमसाट नफा मारून स्वतःचे खिसे गरम करतात अशी तक्रार आज अनेक वर्षे ऐकूं येत आहे. कंपनी काढतांनाच मॅनेजिंग एजंट्स आपणांस सोयीचे व फायदेशीर असे करार करतात आणि त्यांचे परिणाम भागीदारांस भोगावे लागतात, असा अनुभव कित्येक ठिकाणीं आल्याकारणानें मॅनेजिंग एजन्सीची पद्धतीच काढून टाकावी किंवा निदान तिच्यावर भरपूर नियंत्रणें घालावीं अशा सूचना करण्यांत आल्या आहेत. हिंदुस्थानांतल्या विशिष्ट परिस्थितींत मॅनेजिंग एजंट्स नसतील तर औद्योगिक प्रगतीच्या मार्गांत अडथळा उत्पन्न होईल आणि नवीन उद्योगधंदे काढण्याची व ते चालविण्याची जबाबदारी शिरावर घेण्यास लायक लोक पुढें येणार नाहींत असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे, त्यांत पुष्कळ

तथ्य आहे. इतर देशांत मॅनेजिंग एजन्सीची पद्धति अस्तित्वांत नाहीं, तर आम्हीं ह्या देशांत ती कां चालू ठेवावी असा प्रश्न असेंब्लीमधील चर्चेत विचारण्यांत आला असतां सर नृपेंद्र सरकार ह्यांनीं, "जातवार मतदारसंघ जगांत इतर कोठेंहि नसून ते हिंदुस्थानांत मात्र आहेत, तशीच आमच्या देशाच्या वैशिष्ट्याची ही गोष्ट आहे" ह्या आशयाचें उत्तर दिलें तें मोठें मार्मिक व अर्थपूर्ण आहे. जी पद्धति अपरिहार्य आहे तिच्यामध्यें शक्य तितकीं नियंत्रणें घालून ती चालू ठेवल्यावांचून गत्यंतर नाहीं, असा बहुमताचा निष्कर्ष असून कायद्यानें मॅनेजिंग एजंट्सवर कोणतीं बंधनें घालावीं ह्याचा निर्णय करणें हा प्रश्न काय तो शिल्लक रहातो, ह्या दृष्टीनेंच असेंब्लीमध्यें सदरहु विषयाची चर्चा झाली.

### बिलांतील इतर दुरुस्त्या

सिलेक्ट कमिटीनें दुरुस्त केलेलें बिल असेंब्लीस समजावून सांगतांना सर नृपेंद्र सरकार ह्यांनीं इतरहि अनेक मुद्यांचा परामर्श घेतला. कंपनीच्या प्रॉस्पेक्टसमध्यें, मॅनेजिंग एजंसट्ना नफ्याचा कांहीं विशिष्ट अंश मिळावा अशी तरतूद केली जावी व हा मोबदला वाढविणें असल्यास अगर इतर कोणत्याहि पद्धतीनें त्याची रकम निश्चित करणें असल्यास भागीदारांची संमति त्यास आवश्यक असावी, अशा अर्थाची दुरुस्ती बिलांत करण्यांत आली आहे. नवीन कंपनी स्थापन करतेवेळीं जमा करावयाच्या भांडवलाची किमान मर्यादा बिलानें घालून दिली आहे. त्याचप्रमाणें, आपलीं नफा-तोटा-पत्रकें प्रसिद्ध करणें कंपन्यांस ह्यापुढें जरूर होणार असून त्यांमध्यें व्यवस्थापकांस दिलेल्या मोबदल्याचा व घसाऱ्यासाठी काढून ठेवलेल्या रकमेचा तपशील देणें बंधनकारक केलें जाणार आहे. मॅनेजिंग एजन्सीची पद्धति कांहीं बाबतींत सदोष व अनिष्ट असली, तरी तिच्यामध्यें विशिष्ट सुधारणा केल्यास ती हिंदुस्थानांतील सद्यःस्थितीस उपकारकच ठरेल, असा असेंब्लीमधील बहुमताचा रोख दिसतो. मॅनेजिंग एजंटांचे हल्लींचे अधिकार कायम रहावेत असें म्हणणारांचा एक गट आणि त्याच्या विरुद्ध, भागीदारांच्या हक्कांचा पुरस्कर करणारा दुसरा गट, असा असेंब्लीच्या सभासदांमध्यें मतभेद दिसून येत असून सुमारें तीन आठवडे ह्या विषयाची चर्चा चालू राहील अशी अपेक्षा आहे.

### आयुर्वेद रसशाळा पुणें, लि०

वरील कंपनी १ ऑगस्ट १९३५ रोजीं रजिस्टर झाली. ३१ मे १९३६ अखेर तिचे १२३८ भाग खपले असून १८३/४ हजार रु. रोख भांडवल मिळालें आहे. कंपनीच्या औषधांची विक्री सुमारें शंभर ठिकाणीं चालू आहे. कंपनीस पहिल्याच वर्षी २,७३६ रु. नफा झाला हें व्यवस्थापकांस भूषणावह आहे. ह्या रकमेपैकीं १,२८०रु. प्राथमिक खर्च खातीं वर्ग करून उरलेल्या रकमेंतून पांच टक्के दरानें नफा जाहीर करण्यांत आला. सदरहु वाटावयाच्या नफ्यापैकीं कंपनीच्या घटनेप्रमाणें भागीदारांस प्रथम ३ टक्के कर भरलेलें डिव्हिडंड देण्यांत येऊन उरलेली रकम राष्ट्रीय शिक्षण मंडळास देणगी म्हणून देण्यांत येईल. कंपनीच्या व्यवस्थापकांच्या दक्षतेमुळेंच कंपनी इतक्या लवकर भरभराटीस आली, हें उघड आहे. कंपनीस ज्यास्त भांडवलाची जरूरी आहे व तें मिळण्यास तिच्या कार्याचा वृत्तांत उत्कृष्ट रीतीनें सहायकारक होईल, असा भरंवसा वाटतो.

### महाराष्ट्रांतील मोटारवहातुक*

पुणें येथील गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स ॲन्ड इकॉनॉमिक्स ह्या संस्थेनें मोटारवहातुकीची पहाणी करून त्याबाबतचा अहवाल मार्च १९३५ मध्यें इंग्रजींत प्रसिद्ध केला, त्याचें संक्षिप्त रूपांतर आतां प्रसिद्ध झालें आहे. संस्थेच्या वरील विषयासंबंधींच्या बहुमोल कामगिरीचा उल्लेख इंग्रजी मूळ अहवालाचे निरीक्षण करतांना आम्हीं ता. ८ मे १९३५ च्या अंकांत केलेलाच आहे. मोटार आणि आगगाड्या ह्यांच्या स्पर्धेमुळें मोटार वहातुकीच्या प्रश्नास प्राप्त झालेल्या स्थानाची कल्पना वाचकांना आलेली आहेच. ह्या दृष्टीनें वरील परीक्षणाचें महत्त्व ज्यास्तच वाढलें आहे. मोटारवहातुकीसंबंधाच्या सर्व अंगोपांगांची चर्चा करून संशोधकद्वय प्रि. धनंजयराव गाडगीळ व श्री. ल. वि. गोगटे ह्यांनीं पुस्तकाचे शेवटीं विधायक सूचना केलेल्या आहेत. मोटारीच्या धंद्यामधील लोकांनींच नव्हे तर सर्वसामान्य वाचकांनींहि हें पुस्तक जरूर वाचावें अशी आमची शिफारस आहे.

## हिंदुस्थानांतील शेतीचीं जनावरें

### हिंदुस्थान सरकारच्या सुधाराईसंबंधीं योजना

( १ ) जगांतील कोणत्याहि इतर देशापेक्षां हिंदुस्थानांतील जनावरांची संख्या अधिक आहे. ती ३० कोटींच्यावर असून अमेरिकेंतील संख्येच्या दुप्पट आहे.

( २ ) जनावरांच्या सुधारणेशीं हिंदुस्थान सरकारचा प्रत्यक्ष संबंध नाहीं; प्रांतिक सरकारांच्या सोंपीव खात्याच्या क्षेत्रांतली ती बाब आहे. तथापि शास्त्रीय संशोधन, गुरांचा रोगांपासून बचाव, इत्यादि बाबतींत मध्यवर्ती सरकार मदत करीत असतें.

( ३ ) जनावरांच्या रोगांसंबंधीं इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें संशोधन करून उपचार सुचविले आहेत व कौन्सिलातर्फे अनेक प्रयोग चालू आहेत.

( ४ ) सकस अन्न गाईंस मिळाल्यास त्यांच्या दुधांत ५० टक्के वाढ होऊं शकते, हें सिद्ध झालें आहे. ह्यासंबंधांत प्रयोग चालू असून इझ्झत नगर येथें नवीन स्थापन झालेल्या संस्थेंत संशोधनाच्या कार्याची प्रगति होत आहे.

( ५ ) चांगल्या प्रतीच्या जनावरांची उत्पत्ति व जोपासना व्हावी, ह्याप्रीत्यर्थ प्रयत्न चाललें आहेत. डेअरीच्या धंद्यासंबंधीं व सकस दुधाचा पुरवठा आणि त्याची वहातुक ह्या संबंधींहि संशोधन करण्यांत येत आहे.

### हिंद लाइन्स लि.

हिंदुस्थान आणि युरोप ह्यांचे दरम्यान उतारूंची वहातुक करणारी वरील नांवाची एक नवीन हिंदी कंपनी रजिस्टर करण्यांत आली आहे. तिचें अधिकृत भांडवल १० कोटि रुपये आहे.

### राष्ट्रधर्म, सरस्वती मठ संस्था. मुंबई

वरील संस्थेतर्फे पुणें जिल्ह्यांतील मावळ तालुक्यामधील कांहीं गांवांत शिक्षणप्रसाराचें व ग्रामोन्नतीचें कार्य मोठ्या उत्साहानें करण्यांत येत असतें. तिच्या कोथुर्णे शाळेचा उद्घाटन समारंभ, शिवळी शाळेच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ व बक्षिससमारंभ १९ व २० सप्टेंबर रोजीं साजरे होणार आहत. श्री. सोनूताई काळे ह्या उद्घाटनसमारंभाच्या अध्यक्ष आहेत.

*लेसक—ध. रा. गाडगीळ व ल. वि. गोगटे पृ. सं. ६७ किं. ८ आ.

## विम्याचे विविध हेतु

### विम्याच्या तारणावर धंद्याचें भांडवल

नाना प्रकारांच्या जोखमींचा विमा उतरण्याचा प्रघात पाश्चात्य देशांमध्यें वाढत आहे. नवीन चित्रपट तयार करणाऱ्या धंदेवाल्यास कांहीं महिनेपर्यंत भांडवल दुसरीकडून आणणें आवश्यक असतें पण त्याकरितां द्यावें लागणारें तारण त्याच्या जवळ असतेंच असें नाहीं. चित्रपटाचें उत्पन्न विशिष्ट रकमेपेक्षां कमी झाल्यास त्याबद्दलची हमी घेण्याचा उद्योग चालू झाल्यापासून बँकेच्या कर्जास जरूर असलेलें तारण ह्या विमा पॉलिसीचें होऊं शकतें. चित्रपटाच्या धंद्यांत होणाऱ्या नुकसानीची हमी विशिष्ट रकमेपर्यंत विमा कंपनीनें घेतली असतां ह्या कराराच्या जोरावर चित्रपटकारास बँकेकडून भांडवल उभें करण्याचें साधन उपलब्ध होतें. पॉलिसीचे हप्ते विमाकंपनीस मिळतात, बँकेस कर्जाऊ द्यावयाच्या रकमेस पुरें तारण मिळूं शकतें व चित्रपटाचा खर्च भागवण्यास लागणारा पैसा धंदेवाल्याच्या हातीं येतो. ह्या धंदेवाल्यास पूर्वीच्या चित्रपटाच्या मालकीचा मोबदला मिळत असतो व केवळ त्याच मिळकतीवर त्यास अवलंबून रहावें लागलें असतें तर नवीन चित्रपटांची योजना लांबणीवर टाकून कित्येक महिने हात जोडून बसण्याची पाळी आली असती. विमेवाले लोक हमी घेतात, ती चित्रपटाच्या खर्चास आवश्यक असलेल्या सबंध रकमेची घेत नसून तिच्या निम्म्यापर्यंत घेतात आणि त्याच मर्यादेंत बँकहि कर्ज देते, हें उघड आहे. चित्रपटाचा धंदा करणाऱ्या माणसास एक चित्रपट बाहेर आला कीं लागलीच दुसऱ्याचें काम हातीं घेतां येतें व तयार चित्रपटाचें उत्पन्न भरपूर हातीं येण्याची वाट पहावी लागत नाहीं ही त्यासंबंधांतल्या विम्याची मुख्य सोय आहे, आणि ती लक्षांत घेतां पॉलिसीप्रित्यर्थ द्यावा लागणारा पैसा हें एक उत्पादक स्वरूपाचें भांडवलच आहे असें समजलें पाहिजे.

एखाद्या श्रीमान वयस्क गृहस्थास संतान नसल्यास त्याच्या संपत्तीवर जवळच्या नातेवाइकांचा डोळा असतो व त्यास वारस उत्पन्न होणें ही त्यांच्या दृष्टीनें मोठ्या गैरसोयीची गोष्ट असते. असला प्रसंग उद्भवल्यास त्याच्या जोखमीचाहि विमा उतरण्यांत येतो. एका गृहस्थास त्याच्या ऐंशीव्या वर्षी पुत्रप्राप्ती झाली, ही गोष्ट अनपेक्षित अशी घडली. त्याच्या नातलगांनीं ह्या प्रसंगाच्या जोखमीचा विमा उतरला असल्यानें त्यांस चांगला फायदा झाला व विमेवाल्यास भारी रकमांस मुकावें लागलें.

जुळीं मुलें होणें ही अनेकांच्या दृष्टीनें इष्टापत्ती नसते आणि इतर अनिष्ट गोष्टींप्रमाणें ह्या बाबतहि विमा उतरला जातो. विम्याच्या रकमेच्या अडीचटक्के विम्याचा हप्ता जुळया मुलांच्या पॉलिसीबाबत भरावा लागतो.

वर वर्णिलेल्या अनेक जातींच्या विम्यांसंबंधांत लॉइड्स ही संस्था इंग्लंडमध्यें प्रसिद्ध आहे. तिच्यामध्यें धंदा करणारे सुमारें सोळाशे सभासद आहेत. रोखे बाजाराच्या व्यवस्थेप्रमाणेंच तिची घटना असून तशाच रीतीनें तिचें कार्य चालतें. प्रत्येक सभासदास सुमारें सात हजार रुपये प्रवेश फी द्यावी लागते आणि तो इसम जडबुडाचा असावा लागतो. ज्यांमध्यें पैसा मिळण्याचा किंवा जाण्याचा संभव असतो अशा सर्व व्यवहारांतल्या नुकसानीची हमी लॉइड्स संस्थेंतले धंदेवाले (अंडर रायटर) घेतात. आयात-निर्गत करणारे व्यापारी, कारखानदार, शर्यतींत पैसे लावणारे लोक, नाना तऱ्हेचे विमे उतरतात. आवाज बिघडण्याची व पायास विकृति होण्याची आपत्ति ह्या बाबतींत गवयी, नट, नटी व नर्तकी विमे उतरतात. शर्यतींच्या वेळीं पाऊस पडणें, न पडणें, एखादी गोष्ट अनपेक्षित रीतीनें कल्पनेपेक्षां अगोदर किंवा उशीरा घडणें, अंगीकृत कार्यांत यश-अपयश येणें ह्या सर्व बाबी विम्याच्या क्षेत्रांत येतात. आगीच्या विम्याचा अंतर्भाव त्यांत अर्थातच होतो, पण आयुष्याच्या विम्याचा मात्र होत नाहीं.

प्रसिद्ध वेंबले प्रदर्शन पहिल्यांदा भरलें तेव्हां त्याचा विमा सुमारें पंचवीस कोटि रुपयांस उतरलेला होता. क्रिकेट, फुटबॉल सारख्या खेळांच्या बाबतहि विमा उतरण्यांत येतो. पुस्तक प्रकाशक व वर्तमानपत्राचे मालकहि ह्या सवलतीचा केव्हां केव्हां फायदा घेतात.

असल्या निरनिराळया व्यवहारांत विमेवाले लोक मोठी जोखीम अंगावर घेतात, ह्यांत शंका नाहीं. पण प्रत्येक व्यवहारांतल्या पॉलिसीबद्दल किती पैसा घ्यावा हें त्यांस अनुभवावरून समजतें. सरासरीनें त्यांस फायदा होतो म्हणून तर ती मंडळी आपला धंदा चालवतात. नाहीं तर, विमेवाल्यांच्या व्यवहारांतली जोखीम उचलण्यास आणखी दुसरे विमेवाले लागतील आणि हें शेंपूट कधीं संपावयाचेंच नाहीं.

### बादशहांचें राज्यारोहण व त्यासंबंधीं विमे

मे, १९३७ मध्यें बादशहा आठवे एडवर्ड ह्यांच्या राज्यारोहणाचा समारंभ होणार असून त्यानिमित्तानें मोठी मिरवणूक निघणार आहे. हा उत्सव ठराविक दिवशीं अगर महिन्यांत होण्यावर अनेकांचा नफा अगर तोटा अवलंबून आहे. निशाणें तयार करणारे, मिरवणुकीच्या मार्गाच्या दुतर्फा प्रेक्षकांची बसण्याची व्यवस्था करणारे, इत्यादि लोक ह्या प्रसंगाकडे अत्यंत आशेनें पहात आहेत, परंतु कांहीं कारणानें उत्सव पुढें ढकलला गेला तर त्यांचें भयंकर नुकसान होणार आहे. ह्या तोट्यापासून संरक्षण होण्यासाठी त्यांनीं विम्याचा मार्ग अंगीकारला असून, एक दिवस उत्सव उशीरा झाल्यास दर १०० रुपये मिळण्यासाठीं ते १५ रुपये विमा-हप्ता देण्यास तयार आहेत. १९३७ मध्यें समारंभ न होण्याचा संभव कमी असल्यानें त्याबाबतच्या विम्याचा दर दरशेंकडा १० इतका आहे. बादशहांचें चित्र धारण करणारीं पेयपात्रें तयार करणाऱ्या एका कारखानदारास मोठा पेंच पडला आहे. राज्यारोहणसमारंभाचे आधीं बादशहांचा विवाह झाल्यास महाराणींचेंहि चित्र सदरहु जलपात्रांवर काढावें लागेल व आधी तयार केलेला माल वायां जाईल. अशा 'धोक्या'च्या संबंधांत त्या कारखानदारास विम्याचें संरक्षण हवें आहे.

### महापुराची आपत्ति टाळण्याचा प्रयत्न

दरसाल बिहार प्रांतामध्यें पुराची आपत्ति ओढवते व त्यामुळें अतोनात नुकसान होतें. तें टाळण्याची कांहीं तरी कायमची योजना आखण्याचा बिहार सरकारचा विचार आहे. पावसाच्या जोरावर पूर अवलंबून रहाणार हें उघड आहे व इंजिनियर कितीहि तज्ज्ञ असला तरी पावसावर त्याचा ताबा चालणार नाहीं. तथापि, पडलेलें पाणी नद्यांच्या वरच्या पात्रांतून खालीं एकदम वहाणार नाहीं अशी तजवीज करतां येणें शक्य आहे व त्यामुळें नद्या आपलें पात्र फोडून बाहेर पाणी पसरविणार नाहींत अशी व्यवस्था करतां येईल. सरकार अशा योजनेचा विचार करीत आहे.

### मुंबई इलाख्यांतील कपाशीचें पीक

हिंदुस्थानांतील एकूण कपाशीच्या चवथा हिस्सा पीक मुंबई इलाख्यांत होतें. चालू सालीं ऑगस्ट महिन्यापर्यंत १३ लक्ष एकरांत कपाशीची पेरणी झालेली होती. गेल्या वर्षाचे मानानें लागवडीच्या क्षेत्रफळांत घट झाली, ह्याचें कारण पावसाचा अभाव हें आहे. क्षेत्रफळाची वांटणी कपाशीच्या वेगवेगळया जातींमध्यें खालीलप्रमाणें झालेली आहे:—

| | एकर |
|---|---|
| उमरा— | |
| खानदेश | १२,२५,००० |
| बार्शी आणि नगर | ६२,००० |
| कुमठा–धारवाड | १४,००० |
| वेन्टर्न्स व नॉर्दर्न्स | १,००० |

### ऑलिंपिक सामने व जर्मन पोष्टऑफिस

बर्लिनमध्यें ऑलिंपिक खेळांचे सामने झाले, त्यावेळीं जर्मन पोष्टऑफिसास पुष्कळ काम पडलें तथापि त्याबद्दलची व्यवस्था विस्तृत प्रमाणावर व चोख ठेवण्यांत आली होती. पोष्टाचीं पाकिटें व कार्डें (विशेषतः चित्राचीं) दररोज नेहमींपेक्षां २५–३० लक्ष इतकीं अधिक लागत होतीं आणि ३०–४० हजार टेलिफोनचे संदेश चालले होते. परराष्ट्रीय पाहुण्यांस आलेल्या पत्रांवरचे पत्ते अपुरे व अस्पष्ट असले तरी तीं योग्य माणसांस पोंचवून देण्याची व्यवस्था काळजीपूर्वक करण्यांत येत असे. आंत नाणें टाकून बोलण्याचे ५०० नवे टेलिफोन उभे करण्यांत आले होते व त्यांपैकीं २०० सामन्यांच्या मैदानांत होते. ह्यासंबंधातली माहिती चार निरनिराळ्या भाषांत छापली होती.

### टेलिफोनवर बुद्धिबळाचा सामना

बुद्धिबळाच्या सामन्यास खेळणारांनीं एकत्र जमून डाव टाकण्याची आवश्यकता नाहीं. टेलिफोननें दोन बाजूंचे डाव कळवण्यांत येऊन सामना होऊं शकतो. हा प्रघात इंग्लंडमध्यें सुरू झाला असून नुकताच एक सामना तेथें झाला तो सात तास चालला होता आणि त्यास एकूण सवाशें रुपये खर्च आला. प्रवासाचें भाडें न द्यावें लागल्यानें ह्यांत बचतच झाली.

### वार्षिक सभा

| ता. (सप्टेंबर) | वेळ | बँक |
|---|---|---|
| १९ | ४—० | नगर डि. अ. सें. को. बँक, अहमदनगर |
| २० | १—० | प. खा. स. नो. प. स. मंडळी, धुळें |
| २० | ४—० | नगर डि. अ. सें. को. बँक, अहमदनगर (जादा सर्वसाधारण सभा) |
| २० | ६—० | लक्ष्मी को. बँक, सोलापूर |
| २२ | १–३० | बॉम्बे प्रॉ. को. बँक लि., मुंबई |
| २७ | २—० | कॉसमॉस को. अ. बँक, पुणें |
| २७ | ३—० | पंढरपूर माध्यंदिन ब्रह्मवृंद को. अ. बँक, पंढरपूर |
| २७ | ४—० | बेळगांव पायोनियर अ. को. क्रे. बँक, बेळगांव |
| २७ | ४—० | बार्शी सें. को. बँक, बार्शी |
| २८ | २—० | बॉंबे प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँक लि., मुंबई |


धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०
कडून
हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक
नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी
चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें
त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा:—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.



CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS
This year 1934-35
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS

BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

HINDUSTHAN
Co-operative Insurance Society, Ltd.
( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

# सहकारी बँकांचे व सोसायट्यांचे अहवाल

## दि लक्ष्मी को. बँक लि., सोलापूर

( वार्षिक सभा: २०-९-३६ )

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल: | १३¼ | शिलका व भागांत | |
| रिझर्व्ह व इतर फंड: | २¾ | गुंतलेल्या रकमा: | ८¾ |
| न वाटलेला नफा: | १½ | येणें कर्ज व व्याज: | ५१½ |
| ठेवी: | ४२ | | |

वरील बँकेच्या सभासदांची संख्या ४१२ आहे. अहवालाचे मुदतींत बँकेकडील ठेवी वाढल्या आहेत व लोक दिवसानुदिवस बँकेचा जास्त जास्त उपयोग करून घेऊं लागले आहेत. थकबाकीचें वसूल व्हावयाच्या कर्जाशी पडणारें प्रमाण ( २५·६% ) समाधानकारक नाहीं, ह्याची व्यवस्थापकांस जाणीव आहे. 'सभासदांकडून बँकेचें कर्ज परत करण्यांत अनियमितपणा वाढला आहे' असें अहवालांत नमूद आहे. सहा महिन्यांपेक्षां अधिक थकलेलें व्याज नफ्यांत न धरण्याचें योग्य धोरण यंदा अंमलांत आणलेलें आहे. नफ्यांतून ६¼ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यास कमी पडणारी रकम न वांटलेल्या नफ्यांतून घ्यावी, अशी बोर्डाची सूचना आहे.

---

## पूर्व खानदेश सेंट्रल को. बँक लि.

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| शेअर भांडवल : | ४४५ | शिल्लक, रोख व बँकांत : | २७७ |
| रिझर्व्ह : | ३८९ | रोखे, भाग आणि | |
| ठेवी : | ४५३३ | मुदतीची ठेव : | १२५७ |
| | | कर्जे : | ३८२४ |

महाराष्ट्रांतील जिल्हा बँकांमध्यें आकार व कार्याचा व्याप ह्या दृष्टीनें पूर्व खानदेश सेंट्रल बँकेचा दर्जा बराच वरचा आहे. ५९२ सोसायट्या व ४७४ इसम तिचे सभासद असून भाग भांडवल ४ लक्ष ४५ हजार रुपये व खेळतें भांडवल ५१ लक्ष ६९ हजार रुपये आहे. बँकेनें धरणगांव व चोपडें येथें नोव्हेंबर १९३५ मध्यें शाखा उघडल्या आहेत व त्या फायदेशीर रीतीनें चालल्या आहेत. जून अखेर संपलेल्या वर्षी बँकेस एकूण ९८½ हजार रुपये नफा झाला. त्यांतून रिझर्व्ह फंडांत २५ हजार रु., बिल्डिंग फंडांत १० हजार रु., सोसायट्यांस रिबेट देण्यास १० हजार रु., बॅड डेट्स फंडांत २०½ हजार रु. व डिव्हिडंड फंडांत ८ हजार रु. असा विनियोग करून भागीदारांस ५ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यासाठी २२ हजार रुपये खर्च करावे, असें डायरेक्टर बोर्डानें सुचविलें आहे. ह्या वेगवेगळ्या फंडांत भरपूर वाढ करून प्रचलित व्याजाच्या दरास अनुरूप असें ५ टक्के दरानें डिव्हिडंड देण्याचें बँकेचें धोरण योग्य आहे. साल अखेर थकलेली बाकी १७½ लक्षांवर होती, तथापि गेल्या दोन सालांपेक्षां अहवालाचे सालीं सोसायट्यांकडील वसूल अधिक झालेला आहे. सोसायट्यांच्या सभासदांचा माल किफायतशीर विकला जावा ह्यासाठी सेल सोसायट्यांमार्फत तो विकण्याचें धोरण आंखण्यांत आलेलें आहे. एकंदरीनें, बँकेचें धोरण प्रगतिपर असेंच आहे.

---

## इसलामपूर को. पीपल्स बँक लि., इसलामपूर

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल : | २२¾ | शिलक रोख व बँकांत: | ३३½ |
| ठेवी : | १३८ | गुंतविलेल्या रकमा : | १७ |
| रिझर्व्ह व इतर फंड : | १०⅓ | कर्जें : | १५२ |
| इतर देणें : | २५½ | इतर जिंदगी : | १ |
| निवळ नफा : | ८½ | | |

बँकेच्या सभासदांची संख्या ३४८ आहे. बँकेच्या व खेळत्या भांडवलांत अहवालाचे सालीं ७१ हजार रुपयांनीं वाढ झाली आहे. एकूण कर्जापैकीं २० हजार रुपये म्हणजे शेकडा १३·६ इतकी थकबाकी आहे. सोन्या-चांदीच्या गहाणावर अहवालाचे वर्षी ८ हजार रुपये गुंतविले गेले. सालअखेर बँकेस ८६०६ रु. नफा झाला. सरकारी कर्जरोख्यांवरील नफा १०७६ रु. नफावाटणींत न घेतां स्वतंत्र इनव्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंड निर्माण करून त्यांत तो वर्ग केला आहे. भागीदारांस ६¼ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यासाठीं १४०० रुपयांचा विनियोग केला जाईल. बँकेनें रिझर्व्ह, इत्यादि फंड निर्माण करून ते वाढविण्याचें योग्य धोरण अंगीकारलें आहे. उरण इसलामपूर येथें एक नवीन अर्बन बँक नोंदण्यांत आली आहे, तिच्याशी घातुक स्पर्धा होऊं नये अशी इसलामपूर बँक खबरदारी घेत आहे. बँकेची प्रगति समाधानकारक होत आहे.

---

## पुणें जिल्हा लँड मॉर्गेज बँकेची सभा

पुणें जिल्हा लँड मॉर्गेज बँकेची सर्वसाधारण सभा गेल्या रविवारीं भरली होती. तिला बँकेचे अनेक सभासद उपस्थित होते. बँकेचा गेल्या वर्षाचा अहवाल व ताळेबंद मंजूर करण्यांत आला. हिशेब तपासनिसांची यादी दप्तरीं दाखल करण्यांत आली. बँकेचे व्यवहारासंबंधानें चर्चा झाली. तीमध्यें कांहीं सभासदांनीं सूचना केल्या, त्यांचा योग्य विचार होईल, असें आश्वासन अध्यक्षांनीं दिलें. चालू सालाचें अंदाजपत्रक सभेस समजून देण्यांत आलें व तिनें त्यास मंजुरी दिली. डायरेक्टरांच्या बोर्डानें पोटनियमांत कांहीं दुरुस्त्या सुचविल्या होत्या, त्यांची आवश्यकता काय आहे, ह्याचें स्पष्टीकरण झाल्यावर सभेनें त्यांस रीतसर मंजुरी दिली. सभेचें विसर्जन झाल्यावर चहापानाची व्यवस्था करण्यांत आली होती. पुणें सेंट्रल बँकेच्या मुख्य दिवाणखान्यांत ही सभा भरली होती व लँड मॉर्गेज बँकेचे अध्यक्ष, श्री. बा. सी. कामत, ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें.

---

## खेड अर्बन कोऑपरेटिव्ह बँक, लि. खेड ( जि. पुणें )

खेड अर्बन कोऑपरेटिव्ह बँक लि. ची पांचवी वार्षिक साधारण सभा तारीख ३०।८।३६ रोजीं झाली. सन १९३६।३७ सालासाठी रा. रघुनाथ वामन जोशी, वकील, हे चेअरमन निवडून आले. बँकेच्या सभासदांची संख्या सालअखेरीस १६३ आहे. भागांचें वसूल भांडवल ३,६०० रुपये आहे. रिझर्व्ह फंड ५५० रु. असून इतर फंड्स ४०० रुपयांचेवर आहेत. ठेवींची संख्या १३,६२७ रु. व कर्जांची येणें बाकी १७,५३९ रु. असून चालू सालीं बँकेस ६१० रुपये नफा झालेला आहे. सभासदांस दरसाल दरशेकडा ५-१०-० प्रमाणें डिव्हिडंड वांटणेचें ठरलें आहे.

---

## बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या भांडवलाची योजना

मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचा एक मुख्य उद्देश महाराष्ट्रीय जनतेचीं मनें आर्थिक उन्नतीकडे वळवून नवीन उद्योगधंदे निघण्यास उत्तेजन व सहाय करणें हा आहे. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटचें कार्य ह्या क्षेत्रांत येत असल्यानें सदरहु प्रश्न चेंबरनें हातीं घेतला आहे. सिंडिकेटच्या संचालक मंडळानें शेअर विक्रीची नवीन योजना जाहीर केली असून त्या योजनेनुसार शेअरविक्रीचें काम चालू आहे. चेंबरच्या वतीनें समक्ष कारखान्याच्या शेतवाडीवर जाऊन पाहणी करण्यांत आल्यानंतर व सर्व योजना समजावून घेतल्यानंतर चेंबरच्या प्रतिनिधींचें असें मत पडलें कीं, सिंडिकेटनें उसाच्या लागवडीकरितां घेतलेली जमीन उत्कृष्ट असून सिंडिकेटचा साखरेचा कारखाना उभारून तो यशस्वी करण्याबाबत प्रयत्नांची शिकस्त करावी. चेम्बरच्या कार्यकारी मंडळानेंहि सिंडिकेटच्या योजनेचा सर्व बाजूंनी विचार केला असून सिंडिकेटच्या संचालक मंडळानें शेअरविक्रीची जी नवीन योजना केली आहे तिला हार्दिक पाठिंबा देण्याचें ठरविलें आहे. मराठा चेंबरची महाराष्ट्रांतील व्यापारउदिमाच्या हितचिंतक धनिक गृहस्थांना अशी आग्रहाची विनंति आहे कीं, सिंडिकेटच्या संचालक मंडळानें शेअरविक्रीच्या केलेल्या नवीन योजनेस त्यांनीं सक्रिय पाठिंबा द्यावा. ऑक्टोबर अखेरीच्या आंत नवीन योजनेप्रमाणें निदान पांच लाखांचे शेअर अर्ज सिंडिकेटकडे येणें जरूर आहे. आजतागायत सुमारें दोन लाखांचे शेअर अर्ज आलेच आहेत. उतरलेले तीन लाखांचे पुढील दीड महिन्याच्या अवधींत येणें आवश्यक आहे. सिंडिकेटचा कारखाना उभा राहण्यानें विविध प्रकारचे मिळून दोन हजार लोकांना काम मिळणार आहे व त्यामुळें अंशतः का होईना परंतु बेकारीचा प्रश्न सुटण्यास सहाय होणार आहे. सिंडिकेटचे शेअर खरेदी केल्यामुळें धनिकांना आजच्या पैशाच्या स्वस्ताईच्या काळांत चांगलें व्याज मिळण्यासारखें आहे व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्रीयांच्या हातून हा मोठा भांडवलाचा धंदा उभारला जाऊन महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीचें पाऊल पुढें पडणार आहे. या सर्व गोष्टींचा महाराष्ट्रीय जनतेनें सावधान चित्तानें सहानुभूतिपूर्ण विचार करावा व सिंडिकेटचे शेअर विकत घ्यावे अशी चेंबरनें जाहीर विनंति केली आहे.

---

### आगगाडीच्या डब्यांतील साखळीचा दुरुपयोग

गंभीरलाल जेसाराज व्होरा यांनीं गेल्या मे महिन्यांत बी. बी. ॲन्ड सी. आय. रेल्वेच्या डब्यांतील साखळी ओढण्याच्या उतारूंच्या हक्काचा दुरुपयोग केला, ह्या आरोपावरून त्यांचेवर रेल्वे ॲक्टान्वयें खटला भरण्यांत आला होता. अहमदाबादहून जामनगरला आपल्या कुटुंबासह जात असतां व्होरांचें मूल अहमदाबादच्या प्लॅटफॉर्मवर राहिलें व गाडी सुरू झाली. व्होरांनीं साखळी ओढून गाडी थांबविली. रेल्वेचें म्हणणें असें कीं, साखळीचा हा उपयोग करण्यास पुरेसें व सबळ कारण नव्हतें. मुंबईच्या गिरगांव कोर्टाचे ऑनररी मॅजिस्ट्रेट ह्यांनीं रेल्वेविरुद्ध निकाल देतांना, " अशा प्रसंगांत सांपडलेल्या कोणीहि मनुष्यानें साखळी ओढली असती. रेल्वेनें अशा प्रसंगीं ज्यास्त सहानुभूति दाखविणें जरूर होतें " असे उद्गार काढले.

---

### पुणें मर्चंट्स को. बँक लि., पुणें

पुणें मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडच्या ता. १३-९-३६ रोजीं झालेल्या वार्षिक साधारण सभेंत कौन्सिल, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स व ऑडिटर यांच्या निवडणुकी होऊन खालील उमेदवार निवडून आले:—

**कौन्सिलः**—( १ ) श्री. न. चिं. केळकर, ( २ ) श्री. धों. कृ. साठे, ( ३ ) श्री. ल. ब. भोपटकर, ( ४ ) सरदार ल. दा. गोळे व ( ५ ) शेठ दामोदर मुळजी.

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्सः**—( १ ) श्री. ग. म. नलावडे, ( २ ) श्री. भा. त्रिं. तिखे, ( ३ ) श्री. कृ. पेंडसे, ( ४ ) श्री. नि. ना. क्षीरसागर, ( ५ ) श्री. चिं. त्रिं. चितळे, ( ६ ) श्री. दा. ग. बापट व ( ७ ) श्री. ना. सं. जमदाडे.

**ऑडिटरः**—श्री. गो. द. आपटे.

---

### ग. स. महाराष्ट्र को. बँक, लि., पुणें

वरील बँकेची वार्षिक साधारण सभा ता. १३-९-३६ रोजीं होऊन खालीलप्रमाणें निवडणुकी झाल्याः—

**सल्लागार मंडळः**—(१) श्री. व्ही. एम. दीक्षित पटवर्धन, एम. एस. सी., (२) श्री. आर. एम. थेरी व (३) श्री. डी. यू. मांढरे

**कार्यकारी मंडळः**—(१) श्री. पी. बी. गुंजटकर, (२) श्री. एन. जी. करमरकर, (३) श्री. डी. जे. कावळे, (४) श्री. आर. वाय. नाईक, (५) श्री. जी. जी. आळेकर, (६) श्री. एच. आर. कुकनूर, (७) श्री. सी. बी. लागवणकर, (८) श्री. एस. एन. महाशब्दे व (९) श्री. व्ही. एन. खुरूद.

**हिशेब तपासनीसः**—(१) श्री. व्ही. एस. गोरे व (२) श्री. डी. एम. मोघे.

**सेक्रेटरीः**—श्री. आर. डी. भणगे.

---

### " लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम पुणें "-रे मार्केट टॉवर

या इमारतीची उंची ८० फूट आहे व तिची रचना अष्टकोनाकृति आहे. या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून आठ दिशांनीं सर्व शहराचा उत्कृष्ट देखावा दिसतो आणि येथून सर्व देखाव्यांचे उत्कृष्ट फोटो घेतां येतात. पर्वतीचा देखावा सकाळीं व संध्याकाळीं फार नयन-रमणीय दिसतो.

---


## नोटीस.

### पूना मर्चंट्स् कोऑपरेटिव्ह् बँक लिमिटेड लक्ष्मीरोड, पुणें.

या बँकेचे ऑफिसची जागा ता. १ आक्टोबर १९३६ पासून ३३७ बुधवार पेठ ( ढमढेरे बोळाचे कोपऱ्यावर ) पुणें येथें नेण्यांत येणार आहे. तरी ता. १-१०-३६ पासून बँकेचे सर्व व्यवहार वरील पत्त्यावर चालतील.

ता. १४-९-३६.

बोर्डाचे हुकुमावरून,
व्ही. जी. गोखले.
एजंट.

दोन अंकी छोटें विनोदी नाटक

# सोयरीक

लेखिकाः—

सौ. शकुंतला ( परांजपे ) स्लेप् सॉफ

पुढील आठवड्यांत प्रसिद्ध होईल.

## निवडक बाजारभाव

...

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११-११ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९-१२ |
| ४% १९६०—७० ... ... | ११५—७ |
| ४% १९४३ ... ... ... | १११—८ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९९-११½ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०७-१३ |
| २¾% १९४८—५२ ... ... | १०१—३ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १११—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १००—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | ११०-१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षे मुदत) | ११०—८ |
| ४% म्हसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११२—४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३२—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११२—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३३—८ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५५६—४ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३७—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०६—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९९—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९०५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५३—७ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २६०—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ५½% ) | १६१७—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६२०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २००—० |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६६—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८४—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७२१—४ |


॥ ॐ नमः शिवाय ॥

**SHRI HAR & CO.,**


**Plumbers, Sanitary Fitters, Building & Furniture Repairers, & Contractors**

Free advice regarding
Sanitary fittings
&
Building materials.

**Enquire at**

FERGUSSON
COLLEGE
ROAD,

**Opposite Deccan Gymkhana, POONA 4.**



**अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें**
**सरकारी मान्यतेचें**
**झारापकर टेलरिंग अँड कटिंग कॉलेज**
माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २


### दि बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

## नोटीस.

नोटीस देण्यांत येते कीं बँकेची २५ वी साधारण सभा मंगळवार, ता. २२ सप्टेंबर १९३६ रोजीं १-३० ( स्टँ. टा. ) वाजतां अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई, येथील बँकेच्या रजिस्टर्ड ऑफिसमध्यें भरणार आहे. त्यावेळीं सभेंत खालीलप्रमाणें कामें करण्यांत येतीलः—

( १ ) ३० जून १९३६ अखेर संपणाऱ्या सालाबद्दलचा डायरेक्टरांचा अहवाल व हिशेबतपासनिसांनीं तपासलेले बँकेचे हिशेब मंजूर करणें.

( २ ) डिव्हिडंड जाहीर करणें.

( ३ ) डायरेक्टरांची निवडणूक करणें.

( ४ ) हिशेब तपासनीस नेमून त्यांचें वेतन ठरविणें.

मुंबई
७ सप्टेंबर, १९३६.

बोर्डाचे हुकुमावरून,
वैकुंठ एल. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

वि. सू. बँकेचीं ट्रॅन्स्फर बुकें २३ सप्टेंबर पासून ४ आक्टोबर-पर्यंत, दोन्हीं दिवस धरून, बंद रहातील.


**Wanted** capable and influential Organising Field-workers in Maharashtra, Karnatak and Gujarath on a monthly salary of Rs. 125/- to canvass the sale of Dawn's 10 years' Insurance Policies and 5% Guaranteed Benefit Policies, and also other attractive Schemes. Apply for service conditions to the General Manager, The Dawn of India Life Insurance Co., Ltd., 99, Laxmi Road, Poona 2.

# एशियन पॉलिसी

म्हणजेच

**आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.**

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत

**धी एशियन अॅशुरन्स कंपनी, लिमिटेड**

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

**संजीवन हेअर टॉनिक**
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**S. B. JOSHI & Co.**
ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १५ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १६ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १७ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १८ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | १९ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २० शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २१ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २२ साक्री ( „ „ ) |
| ९ अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २३ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० शेवगांव ( „ „ ) | २४ मालेगांव ( „ नाशिक ) |
| ११ कोपरगांव ( „ „ ) | २५ सटाणा ( „ „ ) |
| १२ भिवंडी ( „ ठाणें ) | २६ कळवण ( „ „ ) |
| १३ पालघर ( „ „ ) | २७ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १४ कल्याण ( „ „ ) | २८ कालोल ( „ „ ) |

**खेळतें भांडवल रु. २००००००चे वर**

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ | पुणें, बुधवार, तारीख २३ सप्टेंबर, १९३६. | अंक ३९

## दी ट्रस्ट ऑफ इंडिया अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पो. बॉ. नं. ४६, पुणें नं. २

**चेअरमन : दि. ब. के. आर. गोडबोले,**
बी. ए., एम्. सी. ई., सी. बी. ई.,
एम्. आय. ई., ( इंडिया )
दौंड-बारामती व पाचोरा-जामनेर रेल्वे कं. चे भागीदार

— विशिष्ट अंगें —

१. या कंपनीच्या घटनेप्रमाणें विमेदारांना कंपनीच्या नफ्यापैकीं शेंकडा ९६ नफा बोनसच्या स्वरूपांत परत करण्यांत येतो. विमेदारांना स्वतःतर्फेचे डायरेक्टर्स निवडून देतां येतात.

२. "ट्रस्ट ऑफ इंडिया"च्या प्रत्येक विमेदारास त्याच्या पॉलिसीरकमेंतून शस्त्रक्रिया किंवा रुग्णालयाच्या खर्चासाठीं कंपनीकडून मदत मिळण्याची सवलत दिली जाते. विमेदार पंगू किंवा चरितार्थाचें साधन मिळविण्यास असमर्थ झाल्यास त्याचे विमाहप्ते बंद होऊन त्याला त्याची विमारक्कम दहा वार्षिक हप्त्यांनीं दिली जाते. याशिवाय, सोडकिंमत, हप्तेबंद विमा, रद्द पॉलिसी चालू करण्याविषयीं सवलती, पॉलिसी-तारणावरील कर्ज, घरें विकत घेण्याच्या योजना, वार्षिक हप्त्यावर अडीच टक्के सूट इ० सर्व सवलतींचा अंतर्भाव "ट्रस्ट ऑफ इंडिया" कंपनीनें केला आहे.

**WANTED** Arts Graduates & Medical Practitioners to push up Rural Uplift & Medical Relief Movement in furtherance of Insurance Benefit. Plans throughout district places in the Presidency. Adequate remuneration to capable workers.

Apply with particulars to :—

Head Office :— 99, Laxmi Road, POONA. } General Manager, The Dawn of India Life Ins. Co., Ltd.

## वेस्टर्न इंडिया

**लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.**

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी–सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५

१९३५ मधील नवें काम ५१,३०,०४२ रु.
एकूण चालू काम २,७०,००,००० रु. अधिक
एकूण जिंदगी ७१,७१,०९३ रु.
लाइफ फंड ६०,४२,८७३ रु.

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

## S. B. JOSHI & Co.


**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः—ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः—

१ केळकर ब्रदर्स,

बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी,

लक्ष्मीरोड.

# विविध माहिती

### कलकत्ता येथील प्रचंड प्रदर्शन

कलकत्ता येथें १९३८–३९ च्या हिवाळ्यांत् एक प्रचंड स्वरूपाचें प्रदर्शन भरविण्यांत येणार असून त्याची पूर्वतयारी चालू आहे.

### जपानी फळांची कॅनडामध्यें जाहिरात

जपानचीं लिंबें व नारिंगें कॅनडामध्यें जाऊं लागलीं असून तीं प्रकृतीस हितकारक असल्याविषयीं जाहिरातद्वारां प्रसिद्धी केली जाते.

### बर्मिंगहॅमच्या सायकली

साध्या व मोटार सायकलींच्या प्रचंड धंद्याबद्दल ग्रेटब्रिटनमधील बर्मिंगहॅम शहराची जगभर प्रसिद्धी आहे. सध्या ह्या धंद्यास चलती असून सायकलींचा निर्गत व्यापार वाढला आहे असें दिसतें. गेल्या जुलै महिन्यांत सुमारें २३ लक्ष रुपये किंमतीच्या ब्रिटिश सायकली परदेशीं रवाना झाल्या. गेल्या वर्षीच्या जुलै महिन्यांतला आकडा ह्याच्या निम्म्याहून थोडा अधिक होता.

### सुटांतले सुताचे टाके

सामान्य माणसाच्या युरोपिअन पद्धतीच्या एका सुटांत शिवणारास ७४,३९२ टाके घालावे लागतात; आणि त्यांपैकीं ३६,००० टाके हातानें घातलेले असतात, असा हिशेब एका हंगेरिअनानें केला असल्याचें टिट् बिट्स पत्र म्हणतें.

### सार्वजनिक कामें काढल्यानें बेकारीनिवारणास मदत होते काय ?

बेकारीनिवारणास सहाय म्हणून सरकारनें रस्ते, इमारती, इत्यादींचीं बांधकामें काढावीं, असें अनेक वेळां सुचविण्यांत येतें. अशा योजनांचा बेकारी कमी करण्याकडे प्रत्यक्ष किती उपयोग होतो ह्यासंबंधीं राष्ट्रसंघानें आपल्या सभासदांचा अनुभव व अभिप्राय विचारला होता. ग्रेटब्रिटननें ह्या योजनांचा उपयोग होत नाहीं असें मत दिलें आहे. परंतु अमेरिकेनें आपणांस त्याबावतींत चांगला अनुभव आल्याचें कबूल केलें आहे.

### प्रजावाढीस उत्तेजन

वाढत्या लोकसंख्येचें पोट भरावें ह्यासाठीं इटली एकीकडे मुलुखगिरी करीत आहे व दुसरीकडे प्रजावाढीस प्रोत्साहन देत आहे ! इटलीमधील सरकारी व म्युनिसिपालिटींतील नोकऱ्यांत ह्यापुढें विवाहितांस प्राधान्य मिळणार आहे. एकाच वेळीं दोन व तीन मुलें होणाऱ्या मातांस पारितोषिकें मिळणार असून आठ अपत्यांच्या पितरांस आपल्या मुलांच्या शिक्षणाकरितां फी द्यावी लागणार नाहीं.

### ग्रेटब्रिटनमधील पोस्टांतील लोकांच्या ठेवी

ग्रेटब्रिटनमधील पोस्टल सेव्हिंग्ज बँकांत एकूण एक कोटि नागरिकांच्या ठेवी आहेत व प्रत्येकाच्या खात्यांत सरासरीनें ५२५ रुपये आहेत. गेल्या दहा वर्षांत एकूण ठेवींच्या रकमेमध्यें सुमारें ३२ टक्के वाढ झालेली आहे.

### टेलिफोनचें प्रमाण

व्हॉटेकिन शहरांत दर शंभर माणसांस ८५ ह्याप्रमाणें टेलिफोन आहेत. अमेरिकेंत दर शंभर माणसांमागें १३, ग्रेट ब्रिटनमध्यें ५, फ्रान्समध्यें ३ व इटलींत २ आहेत.

### हिंदुस्थानांत रेडिओचा प्रसार

चालू वर्षाचे सुरवातीपासून ३१ जुलै अखेर हिंदुस्थानांत रेडिओचे परवाने धारण करणारांच्या संख्येंत ५,०९२ लोकांची भर पडली. १ एप्रिल, १९३५ ते ३१ जुलै, १९३६ अखेर रेडिओच्या साहित्यावर एकूण १,४९,००० रुपये जकात घेण्यांत आली.

### तीन कोटींचें कर्ज पंधरा मिनिटांत खलास

संयुक्त प्रांत सरकारनें उभारलेलें तीन टक्के दराचें १९६१–६६ चें कर्ज गेल्या आठवड्यांत पंधरा मिनिटांत खपलें ! एक हजाराच्या सर्व मागण्या पुऱ्या केल्या जातील, परंतु त्यापेक्षां ज्यास्त रकमेच्या अर्जांच्या वांटणीस शेकडा चाळीस अशी कर्जाची रकम येईल.

### उद्योगधंद्यांच्या खात्यांत नवीन नेमणूक

मुंबई इलाख्यांत उद्योगधंद्यांची प्रगति शीघ्र गतीनें व्हावी, ह्यासाठीं उद्योग खात्यांत एक डेप्युटि डायरेक्टर नेमण्यांत यावयाचा आहे व सर्वस्वीं लायक अशा माणसाची निवड व्हावी ह्याकरितां त्या जागेसाठीं अर्ज करण्याची संधि अत्यंत विस्तृत रीतीनें देण्यांत येणार आहे.

### हवेच्या मार्गानें टपालांतून पत्रें

गेल्या सालीं हवेच्या मार्गानें टपालांतून ग्रेटब्रिटनमधून हिंदुस्थानांत १ कोटि पत्रें आलीं. १९३४ सालीं हा आकडा ६० लक्ष व १९३३ मध्यें ४० लक्ष होता.

### लखनौ येथें औद्योगिक परिषद् व प्रदर्शन

मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांच्या प्रतिनिधींची औद्योगिक परिषद् लखनौ येथें येत्या डिसेंबरमध्यें ७ व ८ ह्या तारखांस भरणार आहे. त्याच शहरांत औद्योगिक व कृषिविषयक प्रदर्शन त्याच सुमारास चालू होणार असून तें दोन महिनेपर्यंत उघडें रहाणार आहे.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४६६ | ६ सरकारास लागणाऱ्या मालाची खरेदी | ४७० |
| २ आर्थिक मंदी आणि तुलनात्मक बाजारभाव | ४६७ | ७ सहकारी बँकेचें व सोसायट्यांचे अहवाल | ४७१ |
| ३ जर्मनींत व्यवसायात्मक जातिव्यवस्था ? ... | ४६७ | ८ कायदेमंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश ... | ४७३ |
| ४ असेंब्लींत कंपनी बिलावर चर्चा ... | ४६८ | ९ टाटा वीज कंपनीची प्रगति ... | ४७३ |
| ५ स्फुट विचार ... | ४६९ | १० वार्षिक सभा | ४७४ |
| रोखेबाजाराच्या अध्यक्षांचा सल्ला—सावधगिरीची सूचना—हा खटाटोप कशाला ?—सहकारी नियम बदलण्याचा अयशस्वी प्रयत्न | | ११ निवडक बाजारभाव | ४७५ |
| | | १२ नंदादेवी शिखर गांठलें | ४७५ |
| | | १३ मुंबईंत हिंदुस्थान सरकारच्या इमारती | ४७५ |

अर्थ

बुधवार, ता. २३ सप्टेंबर, १९३६

## आर्थिक मंदी आणि तुलनात्मक बाजारभाव

### हिंदुस्थानांतील परिस्थिति

आर्थिक मंदीचें मुख्य लक्षण म्हटलें म्हणजे बाजारभाव उतरून खालावलेल्या स्थितींत रहाणें, हें होय. १९३०–३१ सालीं प्रचलित मंदीस प्रारंभ झाला आणि ज्या मानानें कोणत्याहि देशांतले सर्वसामान्य बाजारभाव चढणीस लागले असतील, त्या मानानें तेथील आर्थिक मंदी दूर होत आहे असें समजण्यास हरकत नाहीं. देशांत नवीन कामें काढणें, चलनव्यवस्थेंत योग्य वळण लावणें, धंदे-व्यापारास उत्तेजन देणें इत्यादि मार्गांनीं बाजारभाव हळहळु चढवून मंदी घालवण्याचा प्रयत्न राष्ट्रीय सरकारांनीं चालवला असून त्यांत अनेकांस यशहि आलें आहे. हिंदुस्थानांतील मंदी आपल्या प्रयत्नांनीं हटावयाची नाहीं, तीमध्यें सुधारणा होण्यास जागतिक आर्थिक परिस्थिति अनुकूल झाली पाहिजे, असें आमचें सरकार म्हणत आहे. प्रत्यक्ष वस्तुस्थिति मात्र अशी आहे कीं, खुद्द ग्रेट ब्रिटनमधले बाजारभाव गेल्या पांच-सहा वर्षांत क्रमाक्रमानें चढत आले आहेत व हिंदुस्थानांत त्यामानानें प्रगति झालेली नाहीं. इंग्लंडप्रमाणें अमेरिका, कॅनडा, जर्मनी वगैरे देशांतहि बाजारभाव वर जात आहेत. ह्यासंबंधांतले तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत, ते 'स्टेटिस्ट' पत्रानें बनवलेल्या कोष्टकावरून घेतले आहेत. त्यांच्याकडे नजर फेकली असतां हिंदुस्थानांतल्या स्थाइक झालेल्या मंदीची स्पष्ट कल्पना येईल. १९१३ सालचे सर्वसाधारण सरासरीचे बाजारभाव म्हणजे १०० असें समजून पुढील वर्षांत शतमानानें त्यांत काय चढउतार झाला आहे, हें त्यांमध्यें दर्शविलें आहे:—

जगांतले घाउक बाजारभाव

( १९१३ = १०० )

| | ग्रेटब्रिटन | अमेरिका | कॅनडा | फ्रान्स | जर्मनी | हिंदुस्थान |
|---|---|---|---|---|---|---|
| १९१३ | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| १९२९ | १३५ | १३६ | १४९ | ६२३ | १३७ | १४१ |
| १९३० | ११४ | १२३ | १३५ | ५४३ | १२४ | ११६ |
| १९३१ | ९६ | १०४ | ११३ | ४६२ | ११० | ९६ |
| १९३२ | ९४ | ९२ | १०४ | ४०७ | ९६ | ९१ |
| १९३४ | ९६ | १०७ | ११२ | ३६६ | ९८ | ८९ |
| १९३५ | ९९ | ११४ | | ३४७ | १०१ | ९१ |
| १९३६ | | | | | | |
| जानेवारी | १०२ | ११५ | ११४ | ३६४ | १०३ | ९२ |
| मे | १०० | ११२ | ११२ | ३७४ | १०३ | ९० |

सहा वर्षामागें आर्थिक मंदी सुरू झाली, त्यावेळीं बाजारभावांच्या सरासरीचे शतमानाचे आकडे, १९१३ सालच्या परिस्थितीशी तुलना करतां ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान ह्या दोन देशांत अगदी सारखे होते. १९३५ मध्यें ग्रेट ब्रिटनचा आकडा १९१३ सालच्या आकड्यास जाऊन भिडला, पण हिंदुस्थानचा रेंगाळून ९ टक्क्यांनीं मागें राहिला. चालू सालच्या प्रारंभापासून ब्रिटिश आकडा १०० च्या पुढें जाऊं लागला व गेल्या जुलेमध्यें तर तो १०२ इतका झाला आहे. हिंदुस्थानचे बाजारभाव १९३२ सालच्या आकड्याजवळ जे थबकले आहेत ते पुढें हालतच नाहींत. ग्रेट ब्रिटनमध्यें उद्योगधंद्यांची चलती झाली आहे व व्यापार बढत आहे. ह्या कारणानें तेथें बाजारभाव चढून बेकारीस आळा बसत आहे; हिंदुस्थानांत आर्थिक परिस्थितीच्या सुधारणेचें, बाजारभाव चढणें हें जें चिन्ह आहे, तें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. बाजारभाव खालावले असले म्हणजे शेतीच्या मालास कमी किंमत येते व बहुसंख्याक जनतेची कमाई मर्यादित होते. सर्वसाधारण लोकांची मिळकत उतरल्याचा परिणाम बिगरशेती व्यवसायांवर प्रतिकूल होतो आणि मंदीच्या थंड लाटेनें सर्व समाज गारठतो. जनतेची सर्वसामान्य रहाणी हीन दर्जाची करून टाकणें हा मंदीचा दुष्परिणाम होय. शेतीच्या मालास चांगला भाव येऊं लागल्यावांचून सध्याची असमाधानकारक आर्थिक स्थिति सुधारणार नाहीं. महायुद्धाच्या पूर्वीच्या वर्षाचे मानानें १९२९ सालापर्यंत ह्या स्थितीची चढती कमान होती, हें वरील कोष्टकांतल्या आकड्यांवरून समजेल. आज मितीस १९२९ सालाचा पल्ला गाठण्याची गोष्ट दूर राहिली, पण १९१३ सालाच्याहि मागें आम्हीं हिंदुस्थानांत आहों! कांहीं अपवाद वगळले असतां, जगांतील बहुतेक देशांनीं १९१३ सालच्या बाजारभावांची मजल गाठन त्याच्याहि पुढें उडी मारिली आहे. हिंदुस्थान देश मात्र ह्या बाबतींत मागें राहिला आहे.

---

## जर्मनींत व्यवसायात्मक जातिव्यवस्था ?

कोणी कोणता पोटाचा धंदा करावा हें ज्याच्या त्याच्या गुणांवर, कर्तृत्वावर व त्यास मिळणाऱ्या संधीवर अवलंबून न रहातां, तें समाजानें किंवा सरकारनें ठरवण्याची प्रवृत्ति कित्येक युरोपिअन राष्ट्रांत बळावत चालली आहे असें दिसतें. जिला भांडवलशाही म्हणतात, त्या आधुनिक आर्थिक घटनेमध्यें अनियंत्रित स्पर्धा असली तरी गुणी कामगारास गिरणीमालक बनण्याची संधि मिळेलच असें नाहीं, आणि ह्यामुळें कामकऱ्यांच्या जणूं काय पिढीजाद जातीच बनतात. तथापि, सामान्य स्थितींतून वर डोकें काढून कारखान्यांचे व धंद्यांचे मालक बनल्याचीं हजारों इसमांचीं उदाहरणें देतां येतात. रशियासारख्या समाजसत्तावादी देशांत सर्वच नागरिक सारखे कामकरी गणले जातात, आणि त्यांस

समाज कामें देतो व त्यांमध्यें रोजमुरा वांटतो. तेथेंहि प्रत्यक्ष व्यवहारांत कामाची व पगाराची थोडीबहुत विषमता आढळून आली तरी एकंदरीनें सर्वच एकसारखे समाजाचें कामकरी ह्या तत्त्वाचें पालन करण्याचा यत्न होत असतो व भांडवलवाला व मजूर, श्रीमान व दरिद्री असला भेद उत्पन्न न होण्यासारखी समाजाची घडी बसवण्यांत येते. जर्मनीमध्यें अलीकडे ह्याच्या उलट प्रकार चालू करण्यांत आला आहे. जमीनदार लोकांस विशिष्ट कायद्यानें जमिनीस डांबून टाकण्यांत तर आलेंच आहे. पण आतां वाटेल त्या धंद्यांत शिरण्याची स्वतंत्रता व्यक्तीस असूं नये आणि सरकारनें प्रत्येकाची ह्या बाबतींतली लायकी ठरवावी अशी नवी व्यवस्था सुरू करण्यांत आली आहे. हस्तव्यवसायाचें, कारकुनीचें किंवा यांत्रिक काम करूं पहाणाऱ्या प्रत्येक इसमास एक "कामाची वही" देण्यांत आली असून ती जवळ नसणाऱ्यास नोकरी देणें हा गुन्हा समजण्यांत येणार आहे. ह्या वहींत ती धारण करणाराचा पूर्वीचा प्रत्यक्ष किंवा पिढीजाद उद्योग काय होता किंवा आहे हें नमूद केलें जाईल, पण त्यांत सदरहु माणसाची लायकी किंवा कार्यक्षमता ह्याविषयींचा एकहि शब्द असणार नाहीं. नोकरी पाहून देण्याचें काम ज्या जर्मन सरकारी खात्याकडे आहे, त्यानें चालू सालच्या पहिल्या तीन महिन्यांत सात लक्ष इसमांस सल्ला दिला असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. स्त्रियांस बहुतेक घरगुती नोकरीचा मार्ग दाखविण्यांत येतो आणि कारखान्यांतील कामापासून त्यांस परावृत्त करण्यांत येतें.

किरकोळ दुकानदारी कोणी करावी ह्याबाबत जर्मनीमध्यें अलीकडे अडचणी उपस्थित झाल्या आहेत. नात्सी छापाचीं राजकीय मतें असणें हा लायकींतला प्रमुख गुण आहेच. पण दुकानदारीच्या विशिष्ट शाखेंत गर्दी अगोदरच झाली आहे काय आणि नवीन इसम त्या धंद्यांत आला तरी चालेल किंवा नाहीं हें स्थानिक अधिकाऱ्यानें ठरवावयाचें असतें. हा अधिकारी स्थानिक धंदेवाल्यांचा सल्ला घेतो आणि ह्या लोकांस तर नवीन प्रतिस्पर्धी नको असतो. ह्या कारणानें होतकरू धंदेवाल्यांची कुचंबणा होते अशी तक्रार ऐकूं येत आहे. वरील व्यवस्थेचा परिणाम पिढीजाद धंदेवाल्यांच्या जाती निर्माण करण्यांत होत आहे. एखाद्या धंद्याशी पूर्वापार संबंध असेल तरच तो चालवण्याची विशिष्ट लोकांस संधी मिळणार आहे. "स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः" ह्या गीतावचनाचा सामान्यतः हिंदुस्थानांत जो अर्थ करण्यांत येतो, त्यांतल्या तत्त्वास अनुसरून पिढीजाद धंद्यांवर आधारलेले गट किंवा जाती निर्माण होण्याची प्रवृत्ति जर्मनींत दिसूं लागली असून नात्सी पक्षानें बुद्धिपुरःसर अंगिकारलेल्या सामाजिक व आर्थिक घटनेविषयींच्या धोरणास ती धरून आहे. पूर्वापार चालत आलेला किंवा सध्याचा व्यवसाय करून त्यांत पुढारीपण मिळवणें हें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य आहे ह्या तत्त्वाचा ध्वनी जर्मन सरकारनें सुरू केलेल्या नवीन व्यवस्थेंतून स्पष्ट निघत आहे. वैयक्तिक आवडनिवड आणि पात्रता ह्यांस तीमध्यें महत्त्व नाहीं, हा त्या व्यवस्थेचा विशेष दिसतो. रशियांत एक तऱ्हा तर जर्मनींत दुसरी तऱ्हा असा सामाजिक क्रांतीचा व संक्रमणाचा ओघ वहात आहे ही गोष्ट इतर देशांतील विचारी व समंजस लोकांनीं, विशेषतः समाजाच्या नेत्यांनीं, अवश्य लक्ष्यांत घेण्यासारखी आहे.

---

## असेंब्लींत कंपनी बिलावर चर्चा

ऑडिटरच्या निवडणुकीचे वेळीं मतांसाठी मॅनेजिंग एजंटांनीं खटपट करूं नये, ही सूचना सर 'नृपेंद्र सरकार ह्यांनीं मान्य केली नाहीं.

* * *

कंपनी रजिस्टर होतेवेळीं, तिच्या नोकरींत प्रांतिक सरकार ठरवील तेवढे स्थानिक लोक उमेदवार म्हणून घेण्याची अट घालण्यांत यावी ही सूचना असेंब्लीनें मंजूर केली नाहीं. एखाद्या धंद्यास संरक्षण देतेवेळीं अशी तरतूद करणें ज्यास्त सयुक्तिक होईल असें सर कावसजी जहांगिर म्हणाले.

* * *

कंपनीच्या मुख्य उद्देशाचे दृष्टीनें दुय्यम महत्त्वाच्या, मॅनेजर अगर मॅनेजिंग एजंट ह्यांची नेमणूक, इत्यादि मेमोरॅंडममधील बाबींमध्यें बदल करावयास स्पेशल ठरावाची आवश्यकता असूं नये, अशा अर्थाची दुरुस्ती सरकार व कॉंग्रेस पक्ष यांस पसंत पडून ती पास झाली.

* * *

क्राउन, एंपरर, किंग, क्वीन, रॉयल, इत्यादि कांहीं विशिष्ट शब्दांचा कंपनीच्या नांवांत समावेश करण्यास गव्हर्नर जनरल इन् कौन्सिलची पूर्वसंमति असण्याचें कारण नाहीं, अशा अर्थाची सुचवण्यांत आलेली दुरुस्ती नापास झाली. गव्हर्नर जनरलच्या ह्या अधिकाराचा दुरुपयोग होणार नाहीं कशावरून ? ह्या शंकेस, गेल्या २५ वर्षांत तसें उदाहरण घडलेलें नाहीं, असें श्री. सेन ह्यांनीं उत्तर दिलें.

* * *

विशिष्ट वर्षी झालेल्या अगर न वाटलेल्या पूर्वीच्या नफ्यांतूनच कंपनीच्या भागीदारांस नफा वांटण्यांत यावा, अशी सूचना बहुमतानें पास झाली.

* * *

भागीदारांच्या सभेंतील बहुसंख्येस सभा तहकूब करावी असें वाटल्यास सभेच्या अध्यक्षास ती तहकूब करणें भाग पडावें, ही दुरुस्ती असेंब्लीस मान्य झाली नाहीं.

* * *

पूर्ण भरणा झालेल्या भागांची वर्गीवर्गी नोंदण्याचें नाकारण्याचा कंपनीस अधिकार असूं नये, ही सूचना नापास झाली. ह्या अधिकाराचा दुरुपयोग दृष्टोत्पत्तीस आलेला नाहीं, असें सांगण्यांत आलें.

* * *

कंपनीचें शेअर-रजिस्टर तपासतांना भागीदारांस टांचणें करून घेण्याची परवानगी देण्यांत येण्याविषयींची तरतूद बिलांत करण्यांत आली.

* * *

कंपनीचे जे डायरेक्टर व ऑडिटर राजीनामा देतील, त्यांचीं नांवें व राजीनाम्याचीं कारणें स्टॅट्युटरी रिपोर्टांत नमूद करण्यांत यावींत, ही सूचना नामंजूर झाली. अशा प्रसिद्धीकरणामुळें कंपनीच्या हितसंबंधांस बाध येण्याचा संभव आहे, असें सर एन. एन. सरकार म्हणाले.

* * *

भागीदारानें कंपनीचा भाग खरेदी केल्या दिवसापासून त्यास मत देण्याचा हक्क नव्या दुरुस्त बिलानें दिलेला आहे, तो सध्या अस्तित्वांत असलेल्या कंपन्यांचे बाबतहि लागू करावा, ही सूचना पास झाली.

# स्फुट विचार

## रोखेबाजाराच्या अध्यक्षांचा सल्ला

आर्थिक मंदीचें संक्रमण तेजीमध्यें होत असतां औद्योगिक विस्ताराच्या नव्या योजना पुढें येणें स्वाभाविक असतें; तथापि, उद्योगधंद्यांच्या विकासाच्या ह्या काळांत, त्यांकरितां भांडवल मागणाऱ्या योजकांनीं आणि विशेषतः किफायतशीर रीतीनें आपला पैसा गुंतवूं पाहणाऱ्या सामान्य जनतेनें आपलें पाऊल काळजीनें टाकणें अगत्याचें आहे, ह्या आशयाची सूचना आम्हीं 'अर्था'च्या २ सप्टेंबरच्या अंकांतील अग्रलेखांत केली होती. त्याच आशयाची इशारत मुंबईच्या रोखेबाजार संस्थेचे अध्यक्ष, मि. के. आर. पी. श्रॉफ, ह्यांनीं जाहीर पत्रक काढून दिली आहे. त्यांच्या सारख्या गृहस्थाच्या अधिकारयुक्त शब्दांस विशेष महत्त्व आहे हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. नवीन कंपनी निघून तिच्यासाठीं भांडवलाची मागणी होत असतां, पुढें मांडल्या जाणाऱ्या योजनेबद्दल चौकशी करावी आणि तिची व्यवस्था व भावी यश ह्यांसंबंधानें खात्री करून घेतल्यावांचून तिला आश्रय देऊं नये असें त्यांचें लोकांस सांगणें आहे. रोखेबाजाराच्या पटावर एखाद्या कंपनीचे भाग दाखल असून त्यांच्या किंमती वेळोवेळ जाहीर होतात, एवढ्यावरून त्या भागांत पैसे गुंतवण्यास हरकत नाहीं असें अनुमान कोणीहि काढूं नये; कारण, कंपन्यांची स्थिति चांगली आहे किंवा नाहीं, ह्याविषयीं अभिप्राय व्यक्त करणें हें रोखेबाजार संस्थेचें काम नाहीं. पंधरा-सोळा वर्षांमागें तेजीची लाट आली होती, तिचें स्मरण मि. श्रॉफ ह्यांनीं करून दिलें असून नवीन कंपन्या काढणारे किंवा नवीन भांडवल उभारणारे लोक स्वतःच्या फायद्याकरितां कोणत्या क्लृप्त्या योजतात आणि त्यांचे योगानें भोळे लोक फायद्याच्या मागें लागून कसे फशी पडतात, ह्याचेंहि वर्णन त्यांनीं केलें आहे. कित्येक हुशार मंडळी नवीन कंपन्यांचे भाग एकदम स्वतः घेऊन टाकतात आणि त्यांस जनतेची जोराची मागणी येऊन त्यांची किंमत चढली कीं ते नफा काढून घेऊन विकून टाकतात. वाढलेल्या किंमतीनें खरेदी झालेल्या भागांवर योग्य व्याज किंवा डिव्हिडंड पडत नाहीं आणि खरेदीदारांची शेवटीं फसगत होते. हिंदुस्थानांत सध्या निरनिराळ्या भागांत नवीन कंपन्यांचें व भागांचें मोठें पीक आलें आहे, त्यासंबंधांत जनतेनें सावध रहावें असा मि. श्रॉफ यांचा सल्ला आहे.

## सावधगिरीची सूचना

बेकारी व मंदी दूर होऊन औद्योगिक चलती चालू व्हावी ही सदिच्छा प्रत्येकाची असली पाहिजे आणि असें होण्यास भांडवल नवीन धंद्यांत व व्यापारांत गुंतणें अत्यावश्य आहे. जनतेनें उदीम-धंद्यांत भांडवल घालणें आणि आर्थिक प्रगति घडून येणें ह्यांचा निकट संबंध स्पष्ट आहे. पण औद्योगिक चलतीच्या काळांत कित्येक भानगडी व चुका होण्याचा संभव असतो, ह्या अनुभवसिद्ध गोष्टीची आठवण रहाणें व करून देणें समाज-हिताच्या दृष्टीनें आवश्यक असतें. मुंबईच्या रोखे बाजाराचे अध्यक्ष, मि. श्रॉफ, ह्यांनीं प्रसिद्ध केलेल्या पत्रकांतलि एक-दोन बाबींचा उल्लेख वर केला आहे. चालू मंडळ्या अधिक किंमत घेऊन आपले भाग विकतात व जादा भांडवल उभे करतात, त्याचा किफायतशीर विनियोग होण्याची शक्यता लोकांनीं लक्षांत आणली पाहिजे अशीहि सूचना त्यांनीं केली आहे. भाग धारण करण्याच्या हेतूनें न घेतां ते त्यांचा भाव चढतांच फायद्यानें काढून टाकणाऱ्या हुशार धंदेवाल्यांच्या कारवाईवर त्यांचा विशेष कटाक्ष आहे. समाइक भांडवलाच्या तत्त्वावर चालवल्या जाणाऱ्या मंडळ्यांची प्रगति होणें अत्यंत इष्ट आहे. पण त्यांच्या यशस्वितेच्या मार्गांत वरील प्रकारची कारवाई करणारी मंडळी विघ्न उपस्थित करतात, म्हणून त्यांचें संबंधांत फार जपून वागलें पाहिजे. रोखे बाजारांतली उलाढाल हा विस्तवाशीं खेळ आहे, हें त्यांत न मुरलेल्या बहुसंख्य जनतेनें नेहमीं ध्यानांत वागवावें. थोडक्या वेळांत व अल्प श्रमानें खूप पैसा आपणांस मिळावा असें अनेकांस वाटतें; परंतु हे व्यवहार सर्वस्वीं मोठ्या धोक्याचे असतात, हें विसरून चालावयाचें नाहीं. सल्ला पाहिजे आहे तो सामान्य स्थितींतल्या माणसांस हवा आहे, कारण रोखेबाजारांतल्या कारवाया व भानगडी ह्यांचे संबंधांत ते अजाण असतात; आणि त्यांचें नुकसान होणें म्हणजे सबंद समाजाचें नुकसान होणें असें असून त्याचा अनिष्ट परिणाम राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीवर हानिकारक रीतीनें होत असतो. ही गोष्ट ध्यानांत आणून, मुंबईच्या रोखेबाजाराच्या अध्यक्षांनीं जाहीर रीतीनें जनतेस वेळींच सावध केलें आहे, ह्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. पैसे गुंतवण्याच्या कामीं विश्वसनीय तज्ज्ञ व बँका ह्यांचा अभिप्राय बिनमाहितगार लोकांनीं घ्यावा ह्या त्यांच्या सूचनेकडे येथें लक्ष वेधणें जरूर आहे.

## हा खटाटोप कशाला ?

हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या शिक्षणपद्धतींतले दोष दूर होऊन कार्यक्षम व स्वतःचें पोट भरण्याची पात्रता असलेले पदवीधर विद्यार्थीठांतून बाहेर पडावे अशा संबंधानें सप्रू कमिटीनें केलेल्या शिफारसी प्रसिद्ध आहेत. ह्या बाबतींत हिंदुस्थान सरकारास कांहीं विधायक कार्य करतां येण्यासारखें आहे कीं काय ह्या प्रश्नाचा विचार होऊन कांहीं विशिष्ट मुद्यांचा त्यांनीं निर्णय केला आहे असें समजतें. प्रचलित पुस्तकी शिक्षणपद्धतास व्यावहारिक वळण कसें लावतां येईल ह्याबद्दल चौकशी व शिफारसी करण्याकरितां बाहेरून तज्ज्ञ आणण्यांत येणार आहेत आणि किती लोकांस व कोणांस पाचारण करावें ह्याचाहि विचार चालला आहे असें दिसतें.एकंदरींत, हें सर्व प्रकरण अजून पूर्व-चौकशीच्या क्षेत्रामध्येंच आहे आणि त्यांतली विधायक कामगिरी म्हणजे परकीय तज्ज्ञांच्या नेमणूकीचा विचार हींच व्हावयाची आहे ! ह्या चौकशा किती वेळां व्हावयाच्या व किती काळ चालावयाच्या ? आणि त्यांकरितां परदेशांतील अनेक तज्ज्ञ कशाला हवेत ? हिंदुस्थानांत तज्ज्ञ नाहींतच कीं काय? शिवाय, ह्या तज्ज्ञांस येथील परिस्थिति अगदी नवीन असणार व तिचें ज्ञान अगोदर स्वतःस करून घ्यावें लागणार. हें झालें म्हणजे मग ते सल्ला देणार आणि नंतर त्याचा पुन्हां विचार होऊन त्याप्रमाणें अंमलबजावणी होणार ! ह्या सर्व खटाटोपीची व द्राविडी प्राणायामाची आवश्यकता काय आहे व त्याचा व्यावहारिक उपयोग कितीसा आहे ? हे प्रश्न कोणाहि जाणत्या हिंदी माणसास सुचण्यासारखे आहेत. पण ते विचारतो कोण व त्यांस उत्तर देण्याच्या भानगडींत पडतो कोण ?

## नवीन सहकारी ४८ वा नियम बदलण्याचा अयशस्वी प्रयत्न

नवीन सहकारी ४८ वा नियम रद्द करण्यांत यावा असा ठराव मुंबई प्रांतिक कायदेमंडळांत आला असतां तो नामंजूर झाला. सोसायट्यांच्या अधिकारक्षेत्राचें सरकारनें अतिक्रमण करूं नये असें एका बाजूनें सांगण्यांत आलें, तर सहकारी संस्थांच्या हिताच्या दृष्टीनें तसें करणें जरूर आहे, असें दुसऱ्या बाजूनें प्रतिपादण्यांत आलें. ४८ वा नियम अजीबात रद्द झाला नाहीं तरी त्याच्या अंमलबजावणीशीं इन्स्टिट्यूटसारख्या सहकारी संस्थांचा संबंध राहील अशा रीतीनें त्यांत दुरुस्ती व्हावी ह्या आशयाचा दुसरा ठराव कायदेमंडळापुढें आला होता. सहकारी चळवळींतल्या लोकशाहीच्या व जबाबदारीच्या तत्त्वास नवीन नियमानें बाध येऊं नये असा त्याचा हेतु होता आणि नव्या नियमाची अंमलबजावणी करण्यापूर्वी रजिस्ट्रारनीं प्रांतिक इन्स्टिट्यूट व बँक ह्यांचे अध्यक्ष व स्वत: रजिस्ट्रार ह्यांच्या बोर्डाचा सल्ला घ्यावा व सुपरवायझिंग यूनियनला सामील असलेल्या सोसायट्यांस नवीन नियम लावण्यांत येऊं नये, अशा अर्थाची दुरुस्ती त्यांत सुचविली होती. परंतु हा दुसरा ठराव व त्यासंबंधांतल्या इतर सूचनाहि नापास होऊन ४८ नंबरचा नवा नियम अखेर कायम झाला.

## सरकारास लागणाऱ्या मालाची खरेदी

हिंदुस्थानांतील मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांस दरसाल कित्येक कोटि रुपयांच्या मालाची खरेदी करावी लागते. हा माल तयार होत असतांना त्यावर देखरेख ठेवणें इष्ट असल्यानें व किंमत आणि सोय ह्यांचे दृष्टीनेंहि इंग्लंडमध्यें खरेदी करणें फायदेशीर आहे, असें कित्येक वर्षे सांगण्यांत येई. तथापि, हिंदुस्थानांतील कारखान्यांमध्यें आवश्यक माल निघूं लागल्यानें ह्या विचारसरणींत तथ्य उरलें नाहीं व १९२४ सालीं, हिंदुस्थानांत उत्पादन झालेल्या मालाचा प्रथम स्वीकार करण्याचें आपलें धोरण सरकारनें जाहीर केलें. त्याचप्रमाणें, हिंदुस्थानांतील मालाची खरेदी करणाऱ्या एका मध्यवर्ती खात्याची ( इंडियन स्टोअर्स डिपार्टमेंटची) स्थापनाहि करण्यांत आली. लंडनमधील खरेदीची व्यवस्था हाय कमिशनर पहातो. हिंदुस्थानांतील खरेदी वाढून लंडनमधील काम कमी व्हावें अशी लोकांची आज कित्येक वर्षांची मागणी आहे.

हिंदुस्थान सरकारच्या इंडियन स्टोअर्स डिपार्टमेंटनें १९३५-३६ सालीं एकूण ५ कोटि, ५९ लक्ष रुपयांच्या मालाची खरेदी केली. ही रकम त्यापूर्वीच्या सालांतील खरेदीपेक्षां ८३ लक्षांनीं ज्यास्त आहे. ७७½ लक्ष रुपयांचा माल ह्या खात्यामार्फत लंडन येथून मागविण्यांत आला. भांडवली स्वरूपाच्या खर्चांत सरकारांनीं हात आखडता घेतला असला तरी खरेदी मालाचे किंमतींत गेल्या वर्षी बरीच वाढ झालेली आढळून आली आहे. परदेशांतून आयात होणाऱ्या मालाऐवजीं हिंदी बनावटीच्या मालास उत्तेजन देण्याचें स्टोअर्स खात्याचें धोरण असून ते अबाधित चालू ठेवलें असल्याविषयीं अहवालांत ग्वाही देण्यांत आली आहे.

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें
सरकारी मान्यतेचें
झारापकर टेलरिंग अँड कटिंग कॉलेज
माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २

## हिंदी रेल्वेजची दिवाळखोरी केव्हां संपणार ?

नवीन राज्यघटना अंमलांत आल्यामुळें मध्यवर्ती सरकारास जादा खर्च सोसावा लागणार आहे व त्यासंबंधांत जादा उत्पन्नाची तरतूद करणें आवश्यक होणार आहे. तथापि,रेल्वेजच्या जमाखर्चांत आज कित्येक वर्षे तूट येत असून १९३१-३२ सालानंतर मध्यवर्ती सरकाराच्या उत्पन्नांत आगगाड्यांनीं एक पैचीहि भर घातलेली नाहीं. हिंदुस्थान सरकारनें आगगाड्यांवर जो खर्च केला आहे, त्याची भरपाई दूर राहिली, परंतु चालू खर्चाचीहि तोंडमिळवणी करणें रेल्वेजना जड जात आहे व अशा रीतीनें रेल्वेजमध्यें गुंतविलेलें भांडवल अनुत्पादक कर्ज ठरूं पहात आहे. हा आतबट्ट्याचा व्यवहार किती काळ चालणार ? आगगाड्या व मोटारी ह्यांच्यामधील स्पर्धेमुळें प्रस्तुत प्रश्नाचा समाधानकारक निकाल लागणें ज्यास्तच बिकट होत चाललें आहे. बिगर तिकिटानें प्रवास करणारांवर निर्बंध, उतारूंच्या व मालाच्या वहातुकीच्या दरांत वाढ, मालाची फेरतर्गवारी, कामगारांच्या संख्येंत काट इत्यादि मार्गांनीं खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे; तथापि, ही खटपट केवळ ‘ दर्यामें खसखस ’ अशी ठरत आहे. दहा कोटि रुपयांचा खड्डा दरसाल भरून काढण्यास ही तुटपुंजी उपाययोजना कशी पुरी पडणार ? मध्यवर्ती सरकारनें रेल्वेजच्या खर्चाचा कांहीं अंश आपणाकडे घेतला व आपल्या मालाच्या वहातुकीवर पुऱ्या दरानें रेल्वेजना रकमा दिल्या, तर रेल्वेजच्या बजेटाची तोंडमिळवणी होण्यास सहाय होईल,हें खरें.तथापि, मध्यवर्ती बजेटावर रेल्वेजचा बोजा अन्य मार्गानें पडणार, हाच त्याचा अर्थ आहे. व्यापारांत सुधारणा झाली व नवीन दाखल होणारे नोकर कमी पगारावर घेतले तरी वर्षाकाठी सात-आठ कोटींची बचत कशी होणार, हा महत्त्वाचा प्रश्न येथें आहे. लष्करी खात्याच्या दृष्टीनें महत्त्वाच्या रेल्वेजच्या बाबत येणारी वार्षिक दीड दोन-कोटींची तूट हिंदुस्थान सरकारावर लादली, तरी देखील मुख्य अडचण दूर होत नाहीं.

लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या पब्लिक अकाउंट्स कमिटीनें वरील सर्व मुद्यांचा काळजीपूर्वक विचार केला असून परिस्थितींतून मार्ग कसा काढावा हें दाखविण्यासाठी एका तज्ज्ञाची नेमणूक करावी, अशी तिनें सूचना केली आहे. मध्यवर्ती बजेटावर बोजा न पडतां रेल्वेजच्या कारभारांतूनच तूट भरून निघून वाढावा कसा उरेल, हें सांगण्याचें काम सदरहु तज्ञाकडे सोंपविण्यांत यावें, असा कमिटीचा आग्रह आहे. वरील तज्ञाचा रिपोर्ट प्रसिद्ध करण्यांत येऊन कायदेमंडळास त्याची चर्चा करण्याची संधि मिळावी, असा अभिप्रायहि कमिटीच्या बिनसरकारी सभासदांनीं नमूद केला आहे.

## सेंट्रल बँक ऑफ इंडियाचें उच्च ध्येय व कार्य

सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या भागीदारांची संख्या २५ हजार आहे. तिच्या हिंदुस्थानांत ५५ शाखा असून २५ दुय्यम शाखा आहेत. बँकेच्या मुंबई शहरांतील मुख्य कचेरीमधील व शाखांतील खात्यांचें मुंबईमधल्या लोकवस्तीशीं १:१७ असें प्रमाण पडतें. म्हणजे मुंबईतील दर सतरा माणसांपैकीं एकाचें खातें ह्या बँकेंत आहे. एक्सचेंज बँकिंगच्या व्यवहारांत पडून हिंदुस्थानच्या आयात-निर्गत व्यापारास पैसा पुरवण्याचें बँकेचें ध्येय लंडनमध्यें ‘ सेंट्रल एक्सचेंज बँक ऑफ इंडिया ’ च्या स्थापनेमुळें साध्य होणार आहे, असे उद्गार सर सोराबजी पोचखनवाला ह्यांनीं लंडनमधील उद्घाटनसमारंभाचे प्रसंगीं काढले.

# सहकारी बँकांचे व सोसायट्यांचे अहवाल

## वेळगांव पायोनियर अर्बन को. क्रे. बँक लि; बेळगांव

(वार्षिक सभा: २७-९-३६)

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल: | १२२३/४ | शिल्लक, रोख व बँकांत: | १५८ |
| रिझर्व्ह फंड: | ११९ | सरकारी रोखे इ०: | १४३ |
| इतर फंड: | ७८ | कर्जे: | ६९८३/४ |
| ठेवी: | ६२३ | घरें, शेती, इ०: | ५ |
| १९३५-३६ चा नफा: | २६१/२ | | |

वर्षअखेर सभासदांचे पटावर ३,२८६ नांवें आहेत, परंतु पोट-नियमाप्रमाणें अपात्र झालेल्या १,२०३ सभासदांची नांवें कमी करण्यांत येणार आहेत. बँकेनें कॅश क्रेडिटच्या पद्धतीनें दिलेल्या कर्जांत सुमारें २४ हजारांनीं वाढ झाली आहे, ही बँकिंगच्या संवयीच्या वाढीचे दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची गोष्ट समजली पाहिजे. मध्यम वर्गांतील मेहनती व्यापाऱ्यांची त्यामुळें उत्तम सोय होते व बँकांसहि रकमा गुंतविण्याचें उत्कृष्ट साधन प्राप्त होतें. जरूर लागेल एवढ्या रकमेच्या कर्जाची मर्यादा ठरवून ठेवून तिला अनुसरून प्रत्यक्ष उचललेल्या कर्जावर व्याज भरावयाचें; ह्या कॅश क्रेडिट पद्धतीचा उपयोग करणारास व्याजामध्यें बचत करतां येते व त्यास काटकसरीची व वक्तशीरपणाची संवय लागते. बेळगांव पायोनियर बँकेचे रिझर्व्ह व इतर फंड मजबूत असून, ताळेबंदांत रोख्यांची खरेदी किंमतच धरली असल्यानें सुमारें १६ हजारांचा गुप्त रिझर्वहि तिच्यामध्यें निर्माण झालेला आहे. वर्षअखेर बँकेस झालेल्या नफ्यांतून ७१/२ टक्के दरानें डिव्हिडंड वांटण्यासाठीं ८,८०० रुपये खर्च करावेत आणि ६,६०५ रुपये रिझर्व्ह फंडांत, ५,५००, रुपये इमारत फंडांत आणि ९८० रुपये बुडीत व संशयित कर्ज फंडांत टाकावेत अशी डायरेक्टर बोर्डाची सूचना आहे. धर्मादाय फंडांतहि १,७७० रुपये पडाव-याचे आहेत. बँकेची प्रगति समाधानकारक रीतीनें होत असून मजबुतीच्या दृष्टीनें तिच्या चालकांनीं केलेली तरतूद अनुकरणीय आहे.

---

## दि महाड को. अर्बन बँक लि., महाड

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल: | ८,५२५ | शिल्लक, रोख व बँकांत: | २५,४०३ |
| रिझर्व्ह फंड: | ५४३ | कॅश क्रे. अकाउंट: | ११,२७९ |
| ठेवी: | २८,८८४ | कर्जे: | ४,४७० |
| चालू सालचा नफा: | १,५३३ | | |

वर्षअखेर बँकेचे एकूण १३८ सभासद आहेत. लोकांना लहान प्रमाणांत आपली शिल्लक बँकेंत ठेवतां यावी, म्हणून बँकेमध्यें सेव्हिंग्ज खातें उघडण्याची खटपट चालू आहे. बँकेस ज्यास्त रकमेच्या आर. टी. आर. ची परवानगी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यांत येत आहेत. महाड येथील व्यापाऱ्यांनीं कॅश क्रेडिट खात्याकडे ४ लक्ष ३१ हजारांचा व्यवहार करून वर्षअखेर व्याजासुद्धां चोख निकाल केला, ही गोष्ट अभिनंदनीय आहे. एकूण १,६१५ रुपयांच्या नफ्यांतून भागीदारांस ७१/२ टक्के दरानें डिव्हिडंड वांटण्यांत यावयाचें आहे. जून १९३६ अखेर बँकेच्या फंडांची बेरीज सुमारें १,३५० रुपये भरेल. बँकेचा व्यवहार लहान प्रमाणावर असला, तरी तो व्यवस्थितपणें व काळजीपूर्वक चालविला जात आहे, असें अहवालावरून दिसून येतें.

---

## दि सोलापूर डि. सें. को. बँक लि., सोलापूर

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल: | ११९ | शिल्लक, रोख व बँकांत | २३६ |
| रिझर्व्ह फंड: | ३६ | मुदत ठेवी: | ७१० |
| इतर फंड: | ३५ | सरकारी रोखे व भाग: | २२२१/२ |
| ठेवी: | १३८८ | कर्जे: | ३९३ |
| नफा: | १०१/२ | इमारत: | ३५ |

बँकेचे ४१५ व्यक्तिशः सभासद असून १६० पतपेढ्या भागीदार आहेत. बँकेनें नवीन भाग विकण्याचें बंद केलें आहे. ठेवींवरील व्याजाचे दर कमी करूनहि ठेवींच्या रकमेंत वाढ झालेली आहे. धान्याचे तारणावर कर्जे देण्याचा नवीन उपक्रम बँकेनें सुरू केला आहे. पतपेढ्यांकडून येणें असलेल्या कर्जाचा वसूल नवीन दिल्या जाणाऱ्या कर्जापेक्षां ज्यास्त असल्यानें बँकेचें उत्पन्नांत घट होऊन नफ्यावरहि त्याचा परिणाम होऊं लागला आहे. वरील प्रयत्नांमुळें पतपेढ्यांत सुधारणा झाली आहे व ह्यापुढें ज्यास्त कर्जाची शिफारस होण्यास अडचण येणार नाहीं. पतपेढ्यांकडील थकबाकीचें प्रमाण शेकडा ३० पडत आहे. बँकेनें उत्पन्न वाढविण्यासाठीं सर्व प्रकारचे प्रयत्न चालू ठेवले असून चालू वर्षी त्यांचे सुपरिणाम दिसून येतील, अशी अपेक्षा आहे. बँकेच्या कुर्डूवाडी व पंढरपूर येथें शाखा असून दोन्हींसहि प्रत्येकीं अडीच हजारांवर नफा झाला आहे. बँकेजवळ व इतर बँकांत चालू खात्यावर व मुदतीनें मिळून सुमारें ९१/२ लाख रुपये आहेत, त्यांतील कांहीं भाग गुंतवितां येण्यासारखा आहे. ताळेबंदांत सरकारी रोख्यांची व भागांची खरेदीची किंमतच दाखविली आहे, ती बाजारभावापेक्षां सुमारें २० हजारांनीं कमी आहे. ह्या कारणानें ताळेबंदाची मजबुती वाढली आहे. एकूण नफ्यापैकीं रिझर्व्ह फंडांत २,६५० रुपये टाकून भागीदारांस ५ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यासाठीं ५,८१९ रुपये खर्च व्हावेत व रिकव्हरी कन्सेशन फंडांत २,००० रु. टाकावेत, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे.

---

## नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को. बँक लि., अहमदनगर

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल: | १०१ | शिल्लक, रोख व बँकांत: | ७३४ |
| ठेवी: | ११८० | सरकारी रोखे व | |
| रिझर्व्ह व इतर फंड: | १८३ | भाग: | १६१ |
| देणें व्याज: | १०३/४ | जमिनी: | ३२१/२ |
| निवळ नफा: | २८ | कर्जे व कॅश क्रेडिट: | ५८४ |

वरील बँकेच्या सभासदांची संख्या १,६२८ आहे. व्याजाचे दर कमी करूनहि ठेवींची रकम कमी न होतां अहवालाचे सालीं वाढत गेली. रिबेटच्या योजनेचा जास्त लोकांनीं फायदा घ्यावा अशी बँकेची खटपट चालू आहे. सभासदांकडे कर्जाची रकम थकत आहे, ह्याची बँकेस जाणीव असून थकलेली बाकी वसूल करण्यास एक इन्स्पेक्टर नेमण्याची व्यवस्था होत आहे. बँकेजवळील रोख्यांची बाजारभावानें होणारी किंमत ताळेबंदांत दाखविलेल्या रकमेपेक्षां २१ हजारांनीं जास्त आहे. म्हणजे, हा एक प्रकारचा गुप्त रिझर्व्हच निर्माण झाला आहे. बँकेचा सामान्य रिझर्व्ह व इमारत, बॅड डेटस, प्रॉव्हिडंट इत्यादि बाबतचे फंड मजबूत असून त्यांमुळें बँकेस स्थैर्य व विश्वसनीयता प्राप्त झालीं आहेत. वर्ष अखेर बँकेस २८ हजार रुपये नफा झाला, त्यांतून ७ हजार रुपये रिझर्व्ह फंडांत व ८ हजार रुपये इतर वेगवेगळया फंडांत टाकून ७१/२ टक्के दरानें

डिव्हिडंड देण्यासाठी ७ हजार रुपये मंजूर करावेत अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. चांगला व्यवहार करणाऱ्या कॅश क्रेडिट खातेदारांस व्याजाचा रिबेट देण्याकरितां १½ हजार रुपये व १ हजार रुपये धर्मादायाकरितां काढून १,१०० रुपये पुढील वर्षासाठी शिल्लक ठेवण्यांत यावयाचे आहेत. वरील अहवालावरून बँकेची परिस्थिति भक्कम असून वर्षामधील तिचा व्यवहार फायदेशीर झाला असल्याचें दिसून येतें.

### दि पंढरपूर अर्बन को. बँक लि., पंढरपूर

( वार्षिक सभा २४–९–३६ )

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल : | ३० | शिल्लक, रोख व बँकांत : | ६१½ |
| रिझर्व्ह फंड : | १४¾ | इनव्हेस्टमेंट : | ७३⅓ |
| बिल्डिंग फंड : | ५½ | लँड बिल्डिंग : | १६½ |
| ठेवी : | २५७ | कर्जे : | १४० |
| नफा : | २¾ | नवी इमारत : | १२½ |

वरील बँकेच्या सभासदांची संख्या ८८२ आहे. पंढरपूर तालुक्यांतील सभासदांस कर्जे देण्याचें बंद करावें लागल्यामुळें सभासदांची संख्या घटली आहे व गुदस्त सालापेक्षां कर्जांची वांटणी व वसूल हीं दोन्हीं कमी प्रमाणांत झालीं आहेत. वरील बँकेच्या कार्यक्षेत्रांत हाच व्यवहार दुसऱ्या दोन संस्था करीत असल्यानें तिच्या व्यवहारांवर प्रतिकूल परिणाम झाला व नफाहि कमी उरला,ही गोष्ट अहवालांत प्रामुख्यानें नमूद करण्यांत आली आहे. गुदस्त सालीं थकबाकीचें प्रमाण १६·८ होतें तें अहवालाचे सालीं २१·२ असें झालें आहे. येणें बाकी कमी झाल्यामुळें थकबाकीचें प्रमाण वाढलें असलें, तरी शक्य त्या उपायांनीं वसूल वाढवून तें कमी करण्याचें बँकेचे प्रयत्न चालू आहेत. मालाचे तारणावर पैसे पुरविण्याची पद्धत बँकेमें चालू ठेवली आहे व बँकेच्या स्वतःच्या वखारींचें काम लौकरच सुरू करण्यांत येणार आहे. तथापि, ह्या व्यवहारांत इतर बँकांच्या स्पर्धेमुळें अर्बन बँकेची कुचंबणा होत असल्याचें अहवालांत स्पष्ट केलें आहे. हुंड्या व चेक्स ह्यांच्या देवघेवींच्या व्यवहारांतहि घट झाली आहे. बँकेच्या जवळील रोख्यांचे बाजारभावांत २,६०० रुपयांचा वाढावा झाला असला तरी तो नफातोटा पत्रकांत घेतलेला नाहीं, हें योग्यच आहे. एकूण २,८१८ रुपयांच्या नफ्यांतून भागीदारांस ५ टक्के दरानें डिव्हिडंड वांटावें, अशी बोर्डाची शिफारस आहे. रिझर्व्ह फंडांत ७०४ रुपये व बिल्डिंग फंडांत ५०० रुपये पडणार आहेत. सर्वसाधारण प्रतिकूल आर्थिक परिस्थिति व इतर बँकांची व्यवहारांत स्पर्धा ह्या दिव्यांतून बँकेचा व्यवहार कसोशीनें व जबाबदारीनें चालविला जात आहे व त्याचें फळ बँकेस प्रगतीच्या रूपानें मिळाल्याखेरीज रहाणार नाहीं.

### दि कोऑपरेटिव्ह पीपल्स बँक लि., लिंब

वरील संस्थेची सातवी वार्षिक जनरल सभा शुक्रवार ता. १४।८।३६ रोजीं दुपारीं ३ वाजतां बॉ. प्रॉ. बँकेचे सातारा भागचे इन्स्पेक्टर, श्री. गोविंदराव पाटील, यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेस ५८ मेंबरांपैकीं ३४ मेंबर, कांहीं ठेवीदार व गांवांतील सद्गृहस्थ मिळून एकंदर ८०।८५ लोक हजर होते. प्रथमतः श्री. ठाकूर यांनीं प्रास्ताविक भाषण करून अध्यक्षांची सूचना केल्यावर अध्यक्ष स्थानापन्न झाले. सेक्रेटरी, श्री. अभ्यंकर, यांनीं गेल्या सभेचें प्रोसिडिंग व ताळेबंद वाचून दाखविला. प्रत्येक खात्यांत उलाढाल कशी झाली ही तपशीलवार माहितीहि सांगण्यांत आली. बँकेनें वाचनालय ठेविलें असून त्याचा पुष्कळ लोक फायदा घेतात. निरनिराळ्या उपयुक्त संस्थांसहि धर्मादाय खात्यांतून मदत करून बँक ही सर्वांची संस्था असून तिचा फायदा सर्व दृष्टींनीं कसा करून घेतां येतो हें सिद्ध करून दाखविलें आहे. विक्रीस पाठवावयाच्या मालाचे रसीदीवर अडव्हान्स रकम देण्याचाहि उपक्रम बँकेनें केला असून तोहि उपयुक्तच आहे. सन १९३६।३७ सालासाठीं अध्यक्ष म्हणून श्री. ठाकूर व सेक्रेटरी म्हणून रा. अभ्यंकर यांची सर्वानुमतें निवड करण्यांत आली. अध्यक्षांनीं समारोप करतांना ही बँक सातारा जिल्ह्यांतील अर्बन बँकांमध्यें व्यवहाराचे दृष्टीनें शहरांतील बँकांपेक्षां जरी लहान असली तरी कार्य, उपयुक्तता, आणि ध्येय या दृष्टीनें तिचा नंबर बराच वर लागेल असें सांगितलें. तिचें खर्चाचें प्रमाण फारच कमी आहे. प्रेसिडेंट आणि सेक्रेटरी ह्यांचेवर लोकांचा पूर्ण विश्वास आहे ही गोष्ट, त्यांच्या निवडणुकीस सहा वर्षांत कोणींहि विरोध केला नाहीं, यावरूनच सिद्ध होते.

### मालेगांव तालुका को. सुपरवायझिंग् यूनियन लि.

मालेगांव तालुका को. सुपरवायझिंग यूनियनची सातवी वार्षिक साधारण सभा मालेगांव येथील म्युनिसिपल हॉलमध्यें तारीख ३०-८-३६ रोजीं श्री. भाऊराव सखाराम हिरे, बी. ए. एलएल. बी. वकील यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेच्या मामुली कामकाजानंतर दुष्काळी परिस्थितीबद्दल उत्तम तऱ्हेनें विचारविनिमय झाला व मामलेदार साहेबांनीं तगाई रूपानें अगर दुष्काळी कामें काढून दुष्काळी मदतीचें अभिवचन दिलें व चारण्याबाबतच्या सवलती जाहीर केल्या. तसेंच तेथील मुंबई प्रा. को. बँकेचे सीनिअर इन्स्पेक्टर मे. हळवे यांनीं सुद्धां दुष्काळनिवारणार्थ चारा, धान्य व बिवारा इत्यादि बाबतींत हेड आफिसकडे पाठविलेल्या सूचना व आपत्तीचे वेळीं लोक कशा तऱ्हेनें मदत देण्यास तयार आहेत याचा खुलासा केला. याशिवाय यूनियननें दुष्काळनिवारणेचे बाबतींत ठरावहि केले आहेत.

सोसायट्यांच्या हिताच्या दृष्टीनें सरकारनें पंच कमिट्या सस्पेंड करणेबाबत जो नवीन नियम केला आहे, त्या बाबतींत सरकारनें फेरविचार करावा किंवा सरकार फेरविचार करण्यास तयार नसल्यास अशा प्रकारचे लोकप्रतिनिधींचे अधिकार काढून सरकारनें आपल्या हातांत घेतले याबद्दल निषेध व्यक्त करण्यांत यावा, असा ठराव एकमतानें पास करणेंत आला.

### पुणें जिल्हा कोआपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि., पुणें

ता. ३१ ऑगस्ट पर्यंत १५३ अर्जांची ( मागणी रु. २,५६,००० ) चौकशी करण्यांत येऊन ८६ अर्जांची ( रकम रु. १,१२,००० ) मुंबई प्रॉव्हिन्शियल बँकेकडे बोर्डाकडून शिफारस करण्यांत आली आहे. मुंबई बँकेकडून आजतागायत ४५ अर्ज ( रकम रु. ६४०,०० ) मंजूर झाले असून ३३,००० रुपयांचा बटवडा झालेला आहे. चालू महिन्यांत सुमारें १५ ते २० हजार रुपये देण्यांत येतील. तारण अपुरें असल्यामुळें २८ मागणी अर्ज ( रु. ३४,००० ) नामंजूर करण्यांत आले.

## कायदेमंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

हिंदी संस्थानांस हिंदुस्थान सरकार जरूरीप्रमाणें कर्ज देतें तेव्हां प्रत्येक वेळीं योग्य ती पूर्व चौकशी केली जात असते. सदरहु कर्जावर आकारण्यांत येणारा व्याजाचा दर ठराविक व निश्चित नाहीं. तथापि, तो सहा टक्क्यांपेक्षां ज्यास्त नसतो. ह्या आशयाची माहिती हिंदी फडनविसांनीं असेंब्लीमध्यें दिली.

***

हिंदी संस्थानांतील ब्रॉडकास्टिंगचें नियंत्रण करण्याची सरकारास सत्ता नाहीं, परंतु ब्रिटिश हद्दीमधील पद्धतीस धरूनच त्यांतील ब्रॉडकास्टिंगचे नियम आखण्यांत येतील, अशी व्यवस्था परस्पर विचारविनिमयानें करण्यांत येईल.

***

पोस्टाच्या कार्डाचा आकार (लांबी-रुंदी) वाढविण्याचा सरकारचा विचार नाहीं.

***

जरूरीपेक्षां ज्यास्त झालेल्या रेल्वे कामगारांची लायकी-नालायकी विचारांत घेण्यांत येऊन नालायक कामगारांस आधीं काढून टाकावें, अशी सूचना सरकारनें आपल्या अधिकारांतील रेल्वेजना केली आहे व ती कंपन्यांच्या व्यवस्थेखालील रेल्वेकडेहि पाठविण्यांत आली आहे.

***

अंदमान बेटांत ३० एप्रिल १९३६ रोजीं ५,९०५ पुरुष कैदी व ६७ स्त्री कैदी असून गेल्या १० वर्षांत तेथें पाठविण्यांत आलेल्या कैद्यांची एकूण बेरीज १०,१३२ भरते.

***

सध्याच्या मुंबईच्या कौन्सिलाचें चालू अधिवेशन हें शेवटचेंच असल्यामुळें त्यानें पास न केलेलीं बिलें आपोआपच गळणार आहेत.

***

मुंबई शहरांतील कपाशीच्या व्यापाराचें नियंत्रण करून त्यावर एकमुखी सत्ता चालावी ह्या उद्देशानें सरदार रा. ब. भीमभाई नाईक ह्यांनीं एक बिल मुंबई कायदेमंडळांत मांडलें होतें, तें त्यांनीं परत घेतलें.

***

मुंबई इलाख्यांतील शेतकऱ्यांची कर्जबाजारीपणांतून मुक्तता करण्यासाठी तडजोड करणारीं बोर्डें नेमणाऱ्या, श्री. व्ही. एन. पाटील (पू. खानदेश) ह्यांच्या बिलाचें पहिलें वाचन पास झालें व तें एका कमिटीकडे विचारासाठी सोपविण्यांत आलें. बिलाचें तत्त्व सरकारनें मान्य केलें असून तपशिलांत फेरफार करावा लागेल, असं त्यांच्यातर्फें सांगण्यांत आलें.

***

मुंबई इलाख्यांतील सरकारी इस्पितळांनीं आपल्या शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या सामुग्रीची खरेदी लंडनमधील एका विशिष्ट कारखानदाराकडून करावी, असें सर्क्युलर सर्जन जनरलनें काढलें होतें. सदरहु कारखानदाराचें टेंडर इतरांच्या टेंडरांपेक्षां ४२ टक्क्यांनीं कमी होतें, म्हणून त्याचे दर पसंत करण्यांत आले, असें सर आलि महंमद खान देहलवी ह्यांनीं एका प्रश्नास उत्तर दिलें.

***

गोवा लॉटरीच्या तिकिटांची मुंबई इलाख्यांत होणारी विक्री थांबविण्याचा सरकारचा विचार नाहीं.

***

३१ मार्चअखेर संपणाऱ्या दोन वर्षांत मुंबई शहरामध्यें स्टोव्हच्या अपघातामुळें एकूण ३६ माणसें मृत्युमुखीं पडलीं. त्यांपैकीं १५ मुली व १४ तरुण स्त्रिया होत्या.

***

१९२९ सालीं मुंबई विश्वविद्यालयाच्या मतदार संघाचे पटावर ९ हजार मतदार होते, परंतु आतां ती संख्या फक्त ४,३९५ इतकीच आहे. हॅमंड कमिटीपुढें आपलें म्हणणें मांडतांना मुंबई सरकारनें, मताधिकाराचे पूर्वीचेच नियम कायम ठेवावेत, असें मत व्यक्त केलें होतें. तथापि हॅमंड कमिटीनें हे पदवीधर नोंदलेले असले पाहिजेत, असा अभिप्राय दिला. त्यासंबंधांतील आर्डर इन कौन्सिलनें आणखी एक अट घातली व पदवीधरांची नोंद ठराविक तारखेचे आधीं दोन वर्षांपूर्वी झालेली असली पाहिजे असा निर्बंध घातला. ह्या नवीन निर्बंधामुळें, पदवी प्राप्त होऊन सात वर्षे लोटलेल्या व आपला मतदानाचा हक्क पूर्वी गाजवलेला असलेल्या कित्येक मतदारांचा मताधिकार नष्ट झाला आहे. ह्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याकरितां डॉ. वाड ह्यांनीं आणलेली तहकुबीची सूचना प्रांतिक कायदे मंडळांत नापास झाली.

***

नव्या ४८ व्या सहकारी नियमाच्या आधारें सरकारनें कर्नाटक सेंट्रल को. बँकेचे डायरेक्टर बोर्ड रद्द करून नवीन नेमणुका केल्या, ह्याबद्दल नापसंती दर्शविण्याकरितां कौन्सिलमध्यें तहकुबीची सूचना मांडण्यांत आली होती. तथापि, ती विचारांत घ्यावी, ह्या मताचे फक्त १५ च सभासद उभे राहिल्यानें सूचनेवर चर्चा होऊं शकली नाहीं व ती फेटाळली गेली.

## टाटा वीज कंपनीची प्रगति

टाटा हैड्रो इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनीच्या धरणांत पाण्याचा भरपूर साठा झालेला आहे. तथापि, हिंदुस्थानांतील इतर ठिकाणीं पाऊस जरूरीपेक्षां कमी अगर फाजील झालेला आहे. ह्या कारणानें, लोकांजवळ खरेदी करण्याचें त्राण न राहून कापडाचा खप कमी होण्याचा संभव आहे. टाटाच्या विजेचें मुंबईमधील गिरण्या हेंच प्रमुख गिऱ्हाईक असल्यानें, कंपनीच्या विजेच्या खपावर अवर्षणाचा व अतिवृष्टीचा दुष्परिणाम होणें अशक्य नाहीं. गेल्या वर्षी कंपनीनें सर्वसाधारणपणें दर युनिटला ५⅔ पै ह्या दरानें वीज विकली. घसारा खातीं मोठ्या रकमा कंपनी टाकीत आल्यानें आतां एकूण खेळत्या भांडवलाच्या २८ टक्के इतका त्या बाबतचा रिझर्व्ह साठला आहे. ऑर्डिनरी भागांवर कर भरलेलें ८ टक्के दरानें डिव्हिडंड यंदा देण्यांत येणार आहे.

## मुंबई इलाख्याची दिवाळखोरी

१९३४-३५ हें मुंबई सरकारच्या तुटीच्या बजेटाचें आठवें वर्ष होय. प्रचलित राज्यघटनेच्या अमदानीस जरी ३ कोटि, ९ लक्ष रुपयांच्या शिलकेनें सुरवात झाली, तरी १९३५ अखेर एकूण ५ कोटि ८५ लक्षांची घट झाली असल्याचें दिसून येतें. इलाख्यांतील उत्पन्नदायक करांत वाढ होण्याचा आतां संभव नाहीं व खर्चांत बचत करण्यासहि जागा उरलेली नाहीं, असें मुंबई इलाख्याच्या १९३६ च्या ऑडिट रिपोर्टांत म्हटलें आहे.

वार्षिक सभा

| ता. ( सप्टेंबर ) | वेळ | बँक |
|---|---|---|
| २४ | १२-० | बार्शी ता. अॅ.को.के. अँड सेल सोसायटी, बार्शी |
| २४ | ४-० | श्री भलभीम प.स. मंडळी,कोल्हापूर |
| २७ | २-० | कॉसमॉस को. अ. बँक, पुणें |
| २७ | ३-० | पंढरपूर माध्यंदिन ब्रह्मवृंद को. अ. बँक, पंढरपूर |
| २७ | ८-० | बेळगांव डि. सें. को., बँक,बेळगांव |
| २७ | ८-० | इचलकरंजी सें. को. बँक, इचलकरंजी |
| २७ | ४-० | बेळगांव पायोनियर अ. को. के. बँक, बेळगांव |
| २७ | ४ ० | बार्शी सें. को. बँक, बार्शी |
| २८ | २-० | बॉंबे प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँक लि., मुंबई |

### बॉंबे प्रॉ. को. बँक लि., मुंबई

वरील बँकेस १९३५-३६ अखेर १,४३,२६३ रु. १० आणे ९ पै. नफा झाला, त्यांतून भागीदारांस ५ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यासाठी ६४,८४५ रुपये मंजूर करावे, गंगाजळींत १२,५६१ रुपये टाकावेत, १४,००० रुपये बँकेच्या नोकरवर्गास बोनस द्यावा, १०,००० रुपये रीबेट देण्यासाठी राखून ठेवावे व ४१,८५७ रुपये पुढील साालाच्या हिशेबांत ओढावे अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे.

### नं. १ मिलिटरी अकाउंट्स को. के. बँक लि., पुणें

वरील बँकेनें पुणें येथें टिळक रोडवर ४,७५० रुपयांस जागा खरेदी करून त्यावर एक १३½ हजारांची स्वतःची इमारत बांधली आहे. सदरहु इमारतीचा उद्घाटन समारंभ ता. १९ सप्टेंबर रोजीं कंट्रोलर ऑफ मिलिटरी अकाउंट्स ( स. कमांड ) मि. स्लेटर, ह्यांचे हस्तें मोठ्या थाटानें झाला. अहवालाचे सालीं थकबाकीचा आंकडा ८,४०० रुपयांवरून निम्म्यावर आला व इतरहि बाबतींत बँकेनें प्रगति केली. बँकेचे सेक्रेटरी श्री. व्ही. टी. चितळे ह्यांच्या कामगिरीचा अहवालांत निर्देश करण्यांत आला आहे.

### बार्शी सेंट्रल को. बँक लि०

वरील बँकेचे संस्थापक व बार्शी भागांतील सहकारी सोसायट्यांचे आद्यप्रवर्तक; कै. भाऊसाहेब साने, ह्यांचे स्मरणार्थ बँकेच्या इमारतीवर एक हॉल बांधण्यांत आला आहे. सदरहु हॉलचा उद्घाटन समारंभ ता. २७ रोजीं दुपारीं ३ वाजतां प्रो. वा. गो. काळे ह्यांचें हस्तें होणार आहे.

### महाराष्ट्र कोऑपरेटिव्ह थ्रिफ्ट सोसायटी लि., पुणें.

ह्या सोसायटीची तारीख २२-८-३६ रोजीं कोरमच्या अभावीं तहकूब झालेली ८ वी वार्षिक साधारण सभा पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मुख्य दिवाणखान्यामध्यें रविवार तारीख २७ सप्टेंबर, १९३६ रोजीं सकाळीं ८-३० वाजतां भरणार आहे. तरी सभेस सर्व सभासदांनीं अगत्य यावें अशी सेक्रेटरींची विनंति आहे.


## धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी

चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें

त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२

अधिकृत भांडवल : : १०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवलः ५,००,०००
खपलेलें भांडवल : २,०४,१५०
रोख भरलेलें भांडवल : ९९,२७५

**दर शेअरची किं. : रु. ५०**

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री व त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११-११ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—१ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८-१५ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९-१३ |
| ४% १९६०-७० ... ... | ११५-७ |
| ४% १९४३ ... ... ... | १११-८ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९९-११ |
| ३½% १९४७-५० ... ... | १०७-११ |
| ३¾% १९४८-५२ ... ... | १०१-३ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १११-८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १००-८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | ११०-१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | ११०-८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | ११२-४ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२५-० |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३२-८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११२-४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३२-११ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५६०-० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३८-४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | १०४-८ |
| पाचोरा-जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९९-० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९½% ) | ९०५-० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५३-१२ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४७-८ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २६०-० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ६½% ) | १६१२-८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६१६-४ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २००-० |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १६६-४ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८४-८ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७२१-४ |

### नंदादेवी शिखर गांठलें

वेल्स युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर ग्रॅहॅम ब्राऊन, ह्यांच्या नेतृत्वाखाली चार ब्रिटिश व चार अमेरिकन अशा आठ साहसी लोकांनीं नंदादेवी शिखरावर आरोहण करण्याचा प्रयत्न केला व त्यास ता.२९ ऑगस्ट रोजीं यश येऊन त्यांनीं पर्वताचें अत्युच्च शिखर गाठण्याचें जागतिक "रेकॉर्ड" निर्माण केलें आहे. नंदादेवी हें गंगा नदीचें एक उगमस्थान संयुक्तप्रांतांत असून त्याची समुद्रसपाटीपासून उंची २५,६६१ फूट आहे. मौंट एव्हरेस्ट हें हिमालयाचें शिखर २९,१४१ फूट उंच आहे व अद्याप तें अजिंक्य राहिलें आहे.

### मुंबईंत हिंदुस्थान सरकारच्या इमारती

मध्यवर्ती सरकार ह्या नात्यानें हिंदुस्थान सरकारास स्वतःच्या स्वतंत्र कारभाराच्या कचेऱ्यांसाठीं मुंबई शहरांत निराळ्या इमारतींची जरूर असते. सध्या भाड्यानें घेतलेल्या इमारतींवर ह्या कचेऱ्यांचें काम भागवण्यांत येतें व त्याप्रीत्यर्थ प्रतिवर्षी दीड लाख रुपयांच्यावर खर्च करावा लागतो. सबब, हिंदुस्थान सरकारच्या मालकीच्या ८ लक्ष रुपये किंमतीच्या जागेवर १२ लक्ष रुपये किंमतीच्या इमारती उभारण्याचें आतां निश्चित करण्यांत आलें आहे. ह्या योजनेमुळें भाड्याच्या खर्चांत बरीच बचत होईल असा अंदाज आहे. सदरहु योजनेस असेंब्लीच्या फिनॅन्स कमिटीनें संमति दिली आहे.


ह्युम सेप्टिक टॅंक
वापरल्यानें
आरोग्य व स्वच्छता ठेवली जाते.
नादुरुस्त होण्याची भीति नाहीं.
कित्येक वर्षे लोक वापरून सुखी आहेत.
संडासाचें पाणी घाण वास न येतां बाहेर येतें
व
तें भाजी उगवण्यास उपयोगांत आणतां येते.

ह्युम पाईप
( सिमेंट कांक्रीटच्या )
फार मजबुत व टिकाऊ असतात.
महाराष्ट्रांतील कारखानेः—
मुंबई, पुणें, सोलापूर, मिरज, द. हैद्राबाद.
दि इंडियन ह्युम पाईप कं., लि.
बॅलर्ड इस्टेट, मुंबई.

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
## V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

## दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

## K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

## 'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः-

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष-श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

## " अर्थ " ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. (ट. ख. निराळा)

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख ३० सप्टेंबर, १९३६. अंक ४०

## दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

स्वदेशी
कापड म्हणजे काय?

(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.

या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.

हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.

खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण


## स्वदेशी भांडार

लक्ष्मीरोड, पुणें २.

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः–ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः–

१ केळकर ब्रदर्स, बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी, लक्ष्मीरोड.

# विविध माहिती

### पाणीपुरवठ्याच्या सरकारी योजना

सरकारी काळव्यांनीं हिंदुस्थानांतील सुमारें तीन कोटि एकर जमिनीस पाणी मिळतें, म्हणजे ब्रिटिश हिंदुस्थानांतील पिकाखालील जमिनीचा सातवा हिस्सा ह्या पाण्यानें भिजतो. सुमारें १५१ कोटि रुपये वरील पाणीपुरवठ्याच्या योजनांत गुंतविलेले आहेत व ह्या भांडवलावर सरासरीनें ४·९ टक्के व्याज पडतें. हिंदुस्थानांत पाणीपुरवठ्याच्या ३०० वर मोठ्या योजना असून गेल्या ५० वर्षांत पाण्याखालील जमीन तिपटीनें वाढलेली आहे.

### आठ नवीं रेडिओ स्टेशन्स

हिंदुस्थान सरकार आठ नवीं रेडिओ स्टेशन्स बांधणार आहे, त्याप्रीत्यर्थ ३६ लक्ष रुपये खर्च येईल. त्रिचनापल्ली, ढाका, लखनौ किंवा संयुक्त प्रांतांतील दुसरें एखादें सोइस्कर शहर, लाहोर, मद्रास, कलकत्ता, दिल्ली व पेशावर ह्या शहरांच्या वांट्यास हा लाभ यावयाचा आहे.

### ॲम्स्टरडम येथील विमानगृह

तुम्ही मुंबईचें बोरीबंदर ( व्हिक्टोरिया टर्मिनस ) स्टेशन पाहिलें आहे. त्याच्या प्लॅटफॉर्म वगैरेच्या विस्ताराची दसपटवीसपट करा. म्हणजे ॲम्स्टरडम ( हॉलंडची राजधानी ) येथील विमानगृहाच्या पसाऱ्याची कल्पना येईल.

### बंगाल आयर्न कंपनीची विक्री

इंडियन आयर्न ॲन्ड स्टील कंपनी ही बंगाल आयर्न कंपनीची सर्व मालमत्ता सुमारें २½ कोटि रुपयांस विकत घेणार आहे. बंगाल आयर्न कंपनी तोट्यांत चाललेली असून तिच्या ताळेबंदांत सुमारें ३२ लक्ष रुपये तूट म्हणून पुढें ओढलेले आहेत. तिच्या भागीदारांस नव्या कंपनीचे भाग नको असल्यास त्याबद्दल रोख रकम दिली जाईल.

### मुंबई शहरांतील प्रांतिक उत्पन्नाची वसुली

मुंबई इलाख्याच्या एकूण उत्पन्नांपैकीं २ कोटि, ७८ लक्ष रुपये एवढी रकम १९३३–३४सालीं एकट्या मुंबई शहरांत वसूल झाली.

### हिंदी सिमेंटचें उत्पादन व त्याचा खप

३१ मार्च अखेर संपलेल्या वर्षी हिंदुस्थानांत ८ लक्ष ८६ हजार टन सिमेंट खपलें. सिमेंट कंपन्यांचें एकत्रीकरण घडवून आणणाऱ्या कंपनीजवळ १४½ लक्ष टनांइतकें वार्षिक उत्पादन करण्याची तरतूद आहे; म्हणजे आजच्या मागणीचे मानानें उत्पादन शक्ति भरपूर आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

### ब्रिटिश मालकांच्या ऑस्ट्रेलियांत गिरण्या

लँकेशायरमधील कापडाचे कित्येक कारखानदार आतां आस्ट्रेलिया देशांत जाऊन तेथें गिरण्या काढणार आहेत.

### आय. सी. एस. च्या उमेदवारांनो, निर्धास्त रहा !

आय. सी. एस. मध्यें दाखल होणाऱ्या ब्रिटिश उमेदवारांस बदललेल्या राजकीय परिस्थितीमुळें आपले आर्थिक हितसंबंध सुरक्षित रहाण्याची खात्री वाटत नाहीं. लॉर्ड हेली ह्यांनीं ब्रिटिश वर्तमानपत्रांत एक पत्र लिहून, "अशी काळजी वाटण्याचें कारण नाहीं; भारतमंत्र्यास त्यासंबंधांत पुरेसे अधिकार आहेत, स्वतः आपण नोकरींत दाखल झालों त्या वेळेइतकीच आतांहि निश्चिंती बाळगण्यास हरकत नाहीं, " असें जाहीर केलें आहे.

### वेड्यांची वसाहत

बेल्जममध्यें तेथील सरकारनें चवदा हजार वस्तीच्या एका गांवांत पांच हजार वेड्यांची रहाण्याची सोय केली आहे. ह्या वेड्यांमध्यें आपण नेपोलियन, सीझर, झार, कायसर इत्यादि वीर आहों असें समजून वागणारे अनेक वेडे आहेत. त्यांपैकीं एक आपण जिराफ हें उंच मानेचें जनावर आहे असें समजतो आणि डोक्याच्या मागें भली उंच काठी उभी बांधून रस्त्यानें हिंडतांना आढळतो !

### दुष्काळ निवारण फंड

मुंबई सरकार दरसाल कांहीं रकम वेगळी काढून दुष्काळ निवारण फंडांत टाकीत असे. नव्या राज्यघटनेमध्यें सदरहु फंडाची तरतूद करण्यांत आलेली नसल्याकारणानें त्या फंडाची रकम प्रांताच्या नेहमींच्या जमाखर्चांत सामील होईल. असें न होतां, फंड कायम राहून तो वाढावा, एवढ्याकरितां वरील फंडाची स्थापना करण्यासाठी मुंबई सरकार एक बिल कायदेमंडळांत आणणार आहे. सध्याच्या फंडांतील बाकी रकम हिंदुस्थान सरकारच्या कर्जरोख्यांत गुंतवून नव्या फंडाची उभारणी करण्यांत येईल. फंडांत ६३ लक्ष रुपये कायम राखले जातील व कमी पडणारी रकम दर वर्षी त्यांत भरली जाईल.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. १९ सप्टेंबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ५४,७१,७२० |
| ता. २६ सप्टेंबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ४५,६५,५३० |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते २६ सप्टेंबर १९३६ अखेर. | २,८२,६८,७३,४९४ |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४७८ |
| २ शेतकऱ्यांच्या पिकांचा विमा ... | ४७९ |
| ३ ग्रामसुधारणा ... | ४८० |
| ४ हिंदुस्थानचा स्वार्थत्याग व परोपकार ... | ४८० |
| ५ स्फुट विचार ... | ४८१ |
| फ्रेंच चलनांवर गंडांतर !—फ्रँक सुवर्णावरून खाली आला—ब्रिटिश छत्र्यांस संरक्षण पाहिजे !—मोटार ड्रायव्हर्स असोसिएशन—गव्हाच्या पिकास ब्रिटिश सरकारचें सहाय—ब्रिटिश टाइपरायटरच्या धंद्यास संरक्षण | |
| ६ कोण काय विकत घेतो ! | ४८२ |
| ७ जगांतल्या आर्थिक व सामाजिक घडामोडी... | ४८३ |
| ८ रेल्वे स्टेशनवरचे बगीचे | ४८३ |
| ९ सहकारी चळवळ व ग्रामोद्धार ... | ४८४ |
| १० आर्थिक मंदी व दुष्काळ ह्यांतून काढावयाचा मार्ग | ४८५ |
| ११ कायदेमंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश ... | ४८५ |
| १२ निवडक बाजारभाव | ४८६ |


# अर्थ

बुधवार, ता. ३० सप्टेंबर, १९३६


## शेतकऱ्यांच्या पिकांचा विमा उतरण्याची योजना

यंदा मुंबई इलाख्याच्या अनेक भागांत अवर्षणामुळें खरीपाचें पीक न आल्यानें शेतीच्या धंद्याचे हाल झाले आहेत. कधी थंडीचा कडाका तर कधी जरूरीपेक्षां कमी किंवा ज्यास्त पाऊस असें होऊनहि शेतीच्या पिकांस धोका उत्पन्न होतो. वेळेवर आणि पाहिजे इतका पाऊस झाला असें क्वचितच घडतें आणि दरवर्षी पिकांची आणेवारी करावी लागते, हें सदरहु बाबतींतल्या अनिश्चितपणाचें लक्षण होय. शेतकऱ्यांचा धंदा ही एक प्रकारची जुगार आहे आणि त्यांचें जीवित स्वकष्टावलंबी न रहातां परावलंबी बनलें आहे. हिंदी लोकांचा पोटापाण्याचा व कमाईचा प्रमुख उद्योग म्हणजे शेती; आणि खुद्द सरकारच्या उत्पन्नाचा त्या धंद्याच्या सुस्थितीशीं इतका निकट संबंध आहे कीं, हिंदुस्थान सरकारचें बजेट ही "शेतीच्या धंद्यावर खेळण्यांत येणारी जुगार" आहे असें म्हणण्याचा प्रघात एका काळीं रूढ झालेला होता. माणसांच्या आयुष्यांत अनेक प्रकारचे धोके येतात, त्यांचा विमा उतरण्याची व्यवस्था होते तर शेतीसारख्या धंद्यांतल्या आपत्तींविषयींचा विमा कां उतरतां येऊं नये हा प्रश्न येथें उद्भवतो. शेतीच्या जनावरांचे बाबतींत विमा उतरणाऱ्या कांहीं सहकारी संस्था स्थापन झाल्या आहेत ह्यावरून प्रस्तुत विषय हिंदुस्थानांत सर्वस्वी अज्ञात आहे असें म्हणतां येणार नाहीं. ह्याच पद्धतीचा अधिक विस्तृत प्रमाणावर उपयोग होण्याच्या शक्यतेचा विचार आजपावेतों कसा झाला नाहीं हेंच आश्चर्य आहे.

इमारती व कच्चा पक्का माल ह्यांचे संबंधांत कारखानदार आगीचा विमा उतरीत असतात आणि बाजारभाव खाली-वर होण्यापासून धोका असतो, त्याचेहि विमे उतरण्यांत येतात. पाश्चात्य देशांत कामकरी लोकांवर येणाऱ्या आपत्तींचे विमे उतरण्याची तजवीज कायद्यानें व सरकारच्या सहायानें करण्यांत आली आहे. वार्धक्य, बेकारी, आजारीपण हीं संकटें गरीब मजूर वर्गास बाधक होतात, त्यांपासून विम्याच्या योजनेनें त्यांचें संरक्षण करण्यांत येतें. नोकर, मालक व सरकार ह्या तिघांकडून विम्याच्या पॉलिसीचे पैसे भरले जाण्याची व्यवस्था केलेली असते व कांहीं देशांत वृद्ध मजुरांस पेन्शनहि मिळतें. औद्योगिक उन्नति व आर्थिक संघटना ह्यांत हिंदुस्थान देश इतका मागसलेला आहे कीं, वर निर्दिष्ट केलेल्या प्रकारांच्या विम्याच्या योजना विचारांत घ्याव्या अशीहि स्थिति येथें नाहीं, ही अडचण सकृद्दर्शनी भासण्यासारखी आहे, ह्यांत शंका नाहीं. पण हिंदुस्थानांत बहुसंख्य लोकांचें जीवित शेतीच्या धंद्यावर अवलंबून असतां व त्या धंद्यांत अवर्षण, पूर, पिकांचे व जनावरांचे रोग असले धोके सारखे येत असतां त्यासंबंधांत शेतकऱ्यांचें संरक्षण करण्याचा विम्याचा उपाय, विशिष्ट मर्यादेंत कां होईना, योजतां येईल किंवा नाहीं, ह्याचा विचार होण्यास हरकत असूं नये. असल्या प्रश्नांची चर्चा करतांना पुढारलेल्या पाश्चात्य देशांशीं हिंदुस्थानची तुलना करण्यांत हंशील नाहीं, हें बहुतांशीं खरें असलें तरी इतर ठिकाणीं प्रगतिकारक योजना अंमलांत आणण्याचा प्रयत्न चालला असतां त्यापासून येथील सरकारास कांहींतरी बोध खचित घेतां येईल.

अवर्षणासारख्या आपत्तींचा विमा उतरवून अमेरिकन शेतीच्या पिकांचें रक्षण करण्याची योजना हातीं घेण्याचें आश्वासन प्रेसिडेंट रूझव्हेल्ट यांनीं दिलें आहे. पहिलीं कांहीं वर्षें सरकारनें दरवर्षी सुमारें सहा-सात कोटि रुपयांची मदत दिल्यास ही योजना स्वयंपूर्ण व यशस्वी होऊं शकेल अशी तिच्या पुरस्कर्त्यांची अपेक्षा आहे. अवर्षणाप्रीत्यर्थ अमेरिकन सरकारास वारंवार मोठमोठ्या रकमा खर्चाव्या लागतातच; त्यापेक्षां अधिक खर्च विम्याच्या योजनेसाठीं करावा लागणार नाहीं, असें त्यांचें म्हणणें आहे. अवर्षण किंवा रोग ह्यांचेमुळें कोणत्याहि शेतकऱ्याचें पीक बुडून त्यास अपेक्षित कमाई झाली नाहीं, असें होऊं नये, एवढी तजवीज विम्याचे द्वारां करणें शक्य आहे. विम्याची रकम निश्चित करण्यासाठीं शेतकऱ्यांच्या पिकांची मामुली किंमत ठरवण्यांत येऊन विम्याची वर्गणी (प्रीमियम) आकारली जाईल. वर्गणी मालाच्या स्वरूपांत किंवा रोखीनं वसूल करण्यांत येऊन हा माल सरकारी कोठारांमध्यें साठवला जाईल व रोख वसुलीच्या पैशानेंहि माल विकत घेऊन ठेवला जाईल. मामुली उत्पन्नाच्या मानानें शेतकऱ्यांचें पीक कमी येईल तेव्हां त्या दोहोंमधल्या फरका इतका माल त्यांस कोठारांतून मिळेल आणि ह्याकरितां शेतकऱ्यांस कोठारांवर वराती दिल्या जातील. वराती विकून शेतकऱ्यांस रोकड उभी करतां येईल किंवा इच्छेप्रमाणें त्यांच्या रकमेचा माल मोबदला मिळेल. कडबा साठवून ठेवून दुष्काळाचे प्रसंगीं तो शेतकऱ्यांस योग्य दरानें मिळावा अशी व्यवस्था नगर जिल्ह्यांत करून पहाण्यांत आली आहे. असल्या योजनेस विम्याच्या तत्त्वाची जोड देण्यांत आल्यास ती उपयुक्त झाल्यावांचून रहाणार नाहीं. हिंदी खेडेगांवांत मागें धान्याचीं कोठारें असत व त्यांचा दुष्काळांच्या आपत्तींत उपयोग होत असते. असा संचय करण्याची व्यवस्था अलीकडे नाहींशी झाली आहे. पीक बरें आलें तरी शेतकऱ्यांच्या हातांत पैसा, धान्य किंवा कडबा उरत नाहीं आणि अवर्षणाचे काळांत त्यांस भलत्या किंमती देऊन कडबा व धान्य विकत घेण्याची पाळी येते. पण साधनाच्या अभावीं ही खरेदी त्यांस शक्य होत नाहीं आणि त्यांचे व जनावरांचे हाल होतात. आमच्या शेतकरी वर्गाचा अडाणीपणा, त्यांचें दारिद्र्य व कर्जबाजारीपणा ह्या अडचणी त्यांच्या धंद्याची व जीविताची सुधारणा घडवून

आणण्याचा प्रयत्न कर्तव्य असतां पुढें उभ्या रहातील. तथापि, ग्रामसुधारणेच्या कार्यांत हाच अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे आणि तो सुटल्यावांचून सुधारणेचे इतर प्रयत्न जुजबीच ठरणार आहेत, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. शेतीच्या उत्पन्नांत घट-तूट होणें त्या धंद्याच्या विशिष्ट नैसर्गिक परिस्थितींत अपरिहार्य आहे. त्या धंद्याच्या आर्थिक भूमिकेंत चढउतार व खड्डे भरपूर आहेत. ही उंच-सखलीची परिस्थिति दूर करून तीमध्यें सरासरीचा सारखेपणा उत्पन्न करणें हें आर्थिक संघटनेचें व सुधारणेचें काम आहे. विम्याच्या पद्धतीचा उपयोग त्याप्रीत्यर्थ होऊं शकेल किंवा नाहीं हें पहाणें त्या कार्यक्रमांतला एक भाग आहे. ह्या दृष्टीनें प्रस्तुत प्रश्नाचा विचार होणें अगत्याचें आहे.

## ग्रामसुधारणा*

### श्री. आपटे ह्यांचें नवें पुस्तक

ग्रामसुधारणेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा व निकडीचा असून त्याकडे सरकारचें व लोकांचें लक्ष्य अलीकडे विशेष रीतीनें वेधलें गेलें आहे. सरकारी प्रयत्नांबरोबरच खासगी संस्था व व्यक्ती ह्यांचे ग्रामोन्नतीप्रीत्यर्थ प्रयत्न चालू आहेत. ह्या कार्याचें स्वरूप अत्यंत व्यापक असून तें कार्य योग्य मार्गानें चालण्यास संघटना, उत्साह व चिकाटी ह्यांची आवश्यकता आहे. ग्रामसुधारणेच्या कामीं शक्य तितक्या लोकांची सहानुभूति मिळवून त्यांस ह्या कामीं हातभार लावण्यास प्रवृत्त केलें पाहिजे आणि ह्या कार्याचें महत्त्व व व्यापकता ह्यासंबंधांतली माहिती समाजांत पसरली पाहिजे. ह्या दृष्टीनें श्री. न. गं. आपटे ह्यांनीं प्रसिद्ध केलेल्या वरील विषयावरील पुस्तकाचें स्वागत करणें जरूर आहे. श्री. आपटे ह्यांस शेतीविषयक शास्त्रीय ज्ञान तर आहेच, पण त्याच्या जोडीस खेडेगांवीं परिस्थितीचा प्रत्यक्ष अनुभवहि त्यांस असून कै. श्री.गो. कृ. देवधर ह्यांच्या नेतृत्वाखाली त्यांनीं ग्रामसुधारणेचें काम केलेलें आहे. प्रस्तुत पुस्तकांत शेती व खेड्यांची स्थिति ह्या विषयांवरील निरनिराळ्या वेळीं लिहिलेले लेख श्री. आपटे यांनीं प्रसिद्ध केले आहेत, ते समयोचित असेच आहेत. पुस्तकांतील लिखाणांत लेखकाची व्यापक व खोल दृष्टि आणि ग्रामसुधारणेविषयींची कळकळ प्रतीत होते.

लेखकानें प्रथम ग्रामसुधारणेच्या प्रश्नाची सांगोपांग कल्पना व त्याबाबत करण्यांत आलेल्या प्रयत्नांची माहिती दिली आहे. अज्ञान, शिक्षण, दारिद्र्य, कच्च्या मालाची निर्गत व पक्क्या मालाची आयात, खेडेगांवांतील तंटे-बखेडे, हुशार लोकांची शहराकडे धांव, मोटार वहातुकीचा परिणाम, गिरण्या, इत्यादि खेडेगांवी जीवनाशीं निगडित असलेल्या प्रश्नांची त्यांनीं चर्चा केली आहे. पुण्यापासून १७ मैल असलेल्या अवीं गांवाच्या तपशीलवार पाहणीची बोधप्रद माहिती पुढच्या प्रकरणांत आली आहे. १९३४ सालीं इंडियन सायन्स कॉंग्रेसपुढें वाचलेले दोन निबंध नंतर उद्धृत करण्यांत आले आहेत. त्यांपैकीं एकामध्यें योजनात्मक शेतीची आखणी व ग्रामसुधारणा ह्यासंबंधीं ऊहापोह केला असून दुसऱ्यामध्यें प्रौढशिक्षणाविषयींचे आपले विचार लेखकानें मांडले आहेत. मुंबई इलाख्याचे माजी गव्हर्नर, सर फ्रेडरिक साइक्स, ह्यांनीं ग्रामसुधारणेबाबत काढलेल्या पत्रकांतील सूचनांविषयीं लेखकाचें म्हणणें त्यानंतरच्या प्रकरणांत आलें असून पुढें महाराष्ट्रांतील खेडेगांवी धंदे व महाराष्ट्रांतील फळांचा व्यापारी दृष्टीनें उपयोग हे दोन विषय चर्चिले आहेत. लेखकानें फळांचे रस काढून ते बाटल्यांतून विकण्याच्या धंद्याकडे काळजीपूर्वक लक्ष पुरविलेलें असल्याकारणानें व त्यासंबंधांत कांहीं यंत्रसामुग्री स्वतः बनविली असल्यानें, ह्या धंद्याविषयींच्या त्याच्या अनुभवजन्य लिखाणास विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणांत खेड शिवापूर येथील ग्रामसुधारणेच्या प्रयत्नांची... हकीकत देण्यांत आली आहे व अखेरील परिशिष्टांत पुरंदर तालुक्याच्या आर्थिक पहाणीच्या पूर्वतयारीचा परिचय करून दिलेला आहे. विषयांच्या ह्या विविधतेवरून पुस्तकाची व्याप्ति लक्षांत येईल.

पुस्तकास विजापूर जिल्हाधिकारी श्री. डी. एस. मोडक ह्यांनीं प्रस्तावना लिहिली असून प्रो. वा. गो. काळे ह्यांचा उपोद्घात आहे. ह्या दोघांनींहि, ग्रामसुधारणेच्या अनेक प्रश्नांवर प्रकाश पाडल्याबद्दल लेखकाचें अभिनंदन केलें आहे.

*" रूरल रीकन्स्ट्रक्शन " ले.:—श्री. एन. जी. आपटे, बी. एजी. वाटर फायडिंग स्पेशालिस्ट. पृ. सुमारें १००. किं. १ रु. ८ आ.

## हिंदुस्थानचा स्वार्थत्याग व परोपकार

हिंदी अफूची चीनमध्यें होणारी निर्गत कमी करण्याचें धोरण हिंदुस्थान सरकारनें १९०८ सालीं प्रथम अंमलांत आणलें. पुढें ही निर्गत दहा वर्षांच्या अवधींत अजिबात बंद करण्यांत येईल, असें १९२६ च्या जूनमध्यें जाहीर करण्यांत आलें. औषधें व शास्त्रीय संशोधन ह्यांसाठी बाहेर अफू पाठविण्यास आडकाठी करण्याचा अर्थातच सरकारचा विचार नव्हता. १ जानेवारी १९३६ नंतर हिंदुस्थानांतून अफूची निर्गत मुळीच झालेली नाहीं. ही निर्गत हळुहळु कशी उतरवीत आणलेली आहे, हें खालील आकड्यांवरून समजेल:—

| मुदत | अफूच्या निर्गतीची किंमत (लक्ष रु.) |
|---|---|
| १९१०–११ ते १९१२–१३ | ८०२ |
| १९२०–२१ ते १९२२–२३ | १८३ |
| १९२२–२३ ते १९२४–२५ | १६८ |
| १९३२–३३ ते १९३३–३४ | ५५ |
| १९३४ ते १९३५ | १९ |

हिंदुस्थानांत दर माणशी अफूचा खप अत्यल्प प्रमाणांत असून तोहि कमी कमी होत आहे. अंतर्गत खप ही बाब प्रांतिक सरकारांच्या हातांत आहे. इतर देशांतील अफूचें व्यसन कमी करण्याच्या परोपकाराबद्दल हिंदुस्थानचें दरसाल आठ कोटि रुपयांचें नुकसान झालेलें आहे. अफूची निपज व ठोकळ विक्री हिंदुस्थान सरकारनें आपल्या हातांत ठेवली होती व आहे आणि त्या सरकारास ह्या व्यवहारांत चांगला नफा उरत असे. चीनमध्यें अफूचें व्यसन बोकाळलें असल्यानें त्या देशांत हिंदी अफूस मागणी असे व तिला किंमतहि बरी येई. ह्या व्यसनाचा बीमोड करण्याचें चिनी राजकर्त्यांनीं ठरवल्यावरून हिंदुस्थान सरकारनें त्या कामीं सहकार्य करण्याचें अभिवचन दिलें आणि तें पूर्णपणें पाळण्यांत आलें आहे.

# स्फुट विचार

### फ्रेंच चलनावर गंडांतर

कोणत्याहि देशाच्या चलनाचें स्थैर्य व सुस्थिति हीं व्यापाराची देवघेव, अंतर्गत आर्थिक परिस्थिती व सरकारच्या उत्पन्न-खर्चाची तात्कालिक व्यवस्था ह्यांवर अवलंबून रहातात. फ्रान्सच्या संबंधांत ह्या सर्व गोष्टी प्रतिकूल आहेत. बजेटाची तोंडमिळवणी होत नाहीं, व्यापार घटला आहे व युद्धाच्या भीतीमुळें शस्त्रास्त्रांवर जादा खर्च मात्र चालला आहे. असें असूनहि फ्रेंच सरकारानें आपल्या चलनाचें सोन्याशी असलेलें प्रमाण न बदलण्याचा निश्चय कायम राखण्याची शिकस्त केली. अमेरिका,इंग्लंड वगैरे देशांनीं सोन्याच्या मानानें आपलीं चलनें हलकीं म्हणजे कमी किंमतीचीं करून व्यापारांत येणारी अडचण मागेंच दूर करून बाजारभाव स्थिर राखले आहेत. इतर राष्ट्रांच्या चलनांच्या मानानें फ्रेंच चलन म्हणजे फ्रँक फाजील वजनाचा किंवा किंमतीचा आहे आणि त्याची किंमत पौंड व डॉलर ह्यांच्याशी जुळती करून घेणें अगत्याचें आहे असें मत खुद्द फ्रान्समध्यें जबाबदार लोकांनीं व्यक्त केलें असतांहि सध्याच्या समाजसत्तावादी प्रधान मंडळानें देखील त्याच्याकडे इतके दिवस कानाडोळा केला. आज नाहीं उद्यां ही वृत्ति सोडून देणें प्राप्त होईल ह्या समजुतीनें कित्येक फ्रेंच नागरिक आपले पैसे देशाबाहेर पाठवीत असून त्या योगानें बँक ऑफ फ्रान्सच्या सुवर्णनिधीस ओहोटी लागली. फ्रेंच सरकारानें ह्या सुवर्णनिर्गतीस आळा घालण्याचे उपाय अनेक वेळां करून पाहिले आहेत. तथापि, बँकेचा व्याजाचा दर चढवणें,सोनें झांकून ठेवणें किंवा परदेशी पाठवणें असल्या व्यवहारांचें नियंत्रण करणें इत्यादि उपाय कांहीं काळपर्यंत यशस्वी झाले तरी हुंडणावळ व चलन ह्यांच्या बाबतचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटत नाहीं असा अखेर अनुभव आला आहे. जर्मन मध्यवर्ती बँक व आर्थिक व्यवस्था ह्यांचें मुख्य, डॉ. शाख्ट्, हे नुकतेच पॅरिसला भेट देऊन गेले ह्यावरून फ्रेंच हुंडणावळीविषयींचें धोरण बदलणार अशा तर्कास जागा उत्पन्न झाली. पौंड व फ्रँक ह्यांचे परस्पर प्रमाण १:७५ चें उद्यां १:१०० झालें तर आज लंडनला पैसे पाठवून ठेवणाऱ्या फ्रेंच व्यक्तीस सदरहु रकम परत आणली असतां अधिक फ्रँक मिळतील व हा व्यवहार फायद्याचा होईल,अशा स्वरूपाच्या चलनाच्या अनिश्चित वातावरणांत फायदा काढूं पहाणारे लोक असतात व त्यांच्या कारवाईनें हुंडणावळीच्या दरांत अधिकच चलबिचल होते. तोच प्रकार इतके दिवस चालला होता व त्याचा परिणाम पैशाच्या,रोख्यांच्या व सोन्याच्या बाजारावरहि झाल्यावाचून राहिला नाहीं.

### अखेर फ्रँक सुवर्णावरून खाली आला

फ्रेंच चलनाचें सुवर्ण प्रमाण कमी करावें, अशी चळवळ त्या देशामध्यें अलिकडे चालली होती व फ्रँकची किंमत लवकरच उतरविण्यांत येईल, अशी अपेक्षा होती. फ्रेंच सरकारनें आपल्या चलनास असलेला सोन्याचा आधार न सोडण्याची आणि फ्रँकची सोन्यांत होणारी किंमत कमी न करण्याची पराकाष्ठा केली. तथापि,गेल्या आठवड्यांत, फ्रेंच सरकारास फ्रॅन्क चलनाचें सुवर्णाधिष्ठान काढून टाकणें भाग पडलें व त्या चलनाची नवी किंमत ४९ ते ४३ मिलिग्रॅम वजनाच्या सोन्याचे दरम्यान राहील असें त्यानें जाहीर केलें. म्हणजे एका ब्रिटिश पौंडास आतां ९६ ते १०३ फ्रँक द्यावे लागतील. स्वित्सरलंडनें फ्रान्स देशाचें अनुकरण केलें असून हॉलंडहि त्याच मार्गानें जाईल असा रंग दिसतो. चलन व हुंडणावळ ह्यांमध्यें स्थैर्य राखून आर्थिक परिस्थितात व जागतिक व्यापारांत सुधारणा घडवून आणण्यासाठी अमेरिका, ग्रेटब्रिटन व फ्रान्स ह्या तीन देशांमध्यें करार झाला आहे व त्यामुळें एकंदर परिस्थिति सुधारण्यास सहाय होईल, अशी अपेक्षा आहे. फ्रेंच चलनाची किंमत उतरल्यामुळें तेथील सरकाराजवळील सुवर्ण संचयाची किंमत वाढून त्यामुळें सरकारास सुमारें २०० कोटि रुपये फायदा होईल, त्याचा विनियोग अर्थातच चलनव्यवस्थेमधील फरकामुळें झालेल्या नुकसानीच्या भरपाईकडे व हुंडणावळ स्थिर राखण्याकडे करण्यांत येईल. फ्रॅन्कचें सुवर्णावरून उच्चाटन ही जगाच्या आर्थिक घडामोडीमधील एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट झाली असून त्यामुळें व लंडन-वॉशिंग्टन-पॅरिस करारामुळें आर्थिक प्रगतीचे मार्गातील अडथळे कमी होण्यास मदत होईल, अशी आशा आहे.

### ब्रिटिश छत्र्यांस संरक्षण पाहिजे !

ग्रेटब्रिटनमधील छत्र्यांच्या कारखानदारांच्या तीन निरनिराळ्या संस्थांचें राष्ट्रीय भूमिकेवर एकीकरण करून त्यांचा एक संघ बनवण्याचें ठरलें आहे. संघटन, अंतर्गत सुधारणा व परकीय स्पर्धेपासून संरक्षण हा सदरहु संघाचा तिहेरी हेतु आहे. आजमितीस कापसाच्या कापडावर व छत्र्यांवर २० टक्के आणि रेशीम ह्यांच्या छत्र्यांवर ४३$\frac{1}{3}$ टक्के ह्याप्रमाणें ग्रेट ब्रिटनमध्यें जकात घेतली जाते. जपानी व ऑस्ट्रियन छत्र्यांच्या स्वस्ताईमुळें ही जकात अपुरी पडते व आपणांस त्यांच्या स्पर्धेचा त्रास होतो, अशी ब्रिटिश कारखानदारांची तक्रार आहे. ह्या कारखानदारांस लागणाऱ्या कच्च्या मालावरहि जकात असल्यानें त्यांचा उत्पादन खर्च वाढतो व परदेशी मालाच्या किंमतींत त्यांस आपल्या छत्र्या विकणें परवडत नाहीं. छत्र्यांचें विविध प्रकारचें कापड इंग्लंडमध्यें बनवण्याचा यत्न झालेला असला तरी बाहेरून किती तरी माल त्या देशांत येतो. छत्र्यांच्या मुठी जर्मनीमधून येतात व त्यांस जर्मन सरकारची मदत मिळते असें म्हणतात. मुठी बनवणाऱ्या ब्रिटिश कारखानदारांनीं आपणांस जकातीचें संरक्षण मिळावें म्हणून आपल्या सरकाराकडे मागणी केली आहे आणि तिला छत्र्यांच्या कारखानदारांचा विरोध नाहीं. निरनिराळ्या सुट्या भागांवर संरक्षक जकाती बसवतांना पूर्ण बनवलेल्या मालावरची जकात वाढण्याची आवश्यकता लक्षांत घेतली गेली पाहिजे, एवढेंच त्यांचें म्हणणें आहे. कांचेसारख्या किंवा कापडासारख्या स्वदेशी धंद्यांस द्यावयाच्या संरक्षणाचा प्रश्न निघाला असतां हिंदुस्थान सरकार त्यांत फाकांडें फोडीत असतें आणि खुद्द ग्रेट ब्रिटनमध्यें स्वदेशीस किती सढळ हातानें व तत्परतेनें सहाय दिलें जातें, ह्यांतला फरक डोळ्यांत भरण्यासारखा आहे. आमचे फडनवीस, सर जेम्स ग्रिग, ह्यांच्या नजरेस वरील गोष्ट आलेली नाहीं काय ?

### दि पूना प्रायव्हेट मोटार ड्रायव्हर्स असोसिएशन, पुणें

मोटारींच्या सारथ्यांचे दोन वर्ग आहेत; एक, भाड्याचीं वहानें चालवणारांचा व दुसरा, खाजगी गाड्या चालविणारांचा. लॉरीवाल्यांचे व खासगी गाड्या चालविणारांचे हितसंबंध भिन्न स्वरूपाचे असून त्यांचें संरक्षण करण्याच्या प्रयत्नांची दिशाहि भिन्न असणें अपरिहार्य आहे. वरील दुसऱ्या वर्गातील लोकांचा सामाजिक

व आर्थिक दर्जा वाढावा आणि त्यांच्यामध्यें सहकार्य होऊन सर्वांचेंच हित व्हावें, या उद्देशानें वरील संस्था स्थापन करण्यांत आलेली आहे. मोटारमालकांशी ह्या संस्थेचा विरोध नाहीं. केवळ आपल्या सभासदांच्या गरजा भागविणें व एकोप्यानें काम करणें हेंच असोसिएशनचें ध्येय आहे. हें कार्य पार पाडण्यास संस्थेच्या सभासदांची संख्या वाढून त्यांमध्यें सहकार्य व जूट ह्यांची भावना दृढमूल झाली पाहिजे. मोटारड्रायव्हर्स असोसिएशनला हातीं घेतां येण्याजोग्या कित्येक योजना आहेत व त्या पार पाडण्यावरच तिचें यश अवलंबून आहे.

### गव्हाच्या पिकास ब्रिटिश सरकारचें सहाय

ग्रेटब्रिटनमध्यें, तेथील सरकारनें, ब्रिटिश शेतकऱ्यानें पिकवलेल्या गव्हाची किंमत ठराविक बाजारभावानें मिळण्याबद्दल हमी घेतली आहे. पिठाच्या गिरण्यांत दळून तयार होणाऱ्या कणकेवर पट्टी बसवण्यांत आली असून तिच्या उत्पन्नांतून शेतकऱ्यास प्रत्यक्ष आलेली किंमत आणि ठरलेला बाजारभाव ह्यांमधील तफावत भरून काढण्यांत येते. म्हणजे, शेतीच्या धंद्यास सहाय, जनतेवर अप्रत्यक्ष कर बसवून ब्रिटिश सरकार देतें, हें उघड आहे. आर्थिक मंदी व बाहेरून येणाऱ्या मालाची स्पर्धा ह्यांचे योगानें ब्रिटिश शेतकऱ्यास गव्हाचें पीक करणें परवडत नाहीं, असें दिसून आल्यावरून वरील सरकारी हमीची व सहायाची योजना अंमलांत आणण्यांत आली आहे. शेती व इतर धंदे ह्यांस सरकारनें सहाय देण्याचें धोरण हिंदुस्थानांत अनुकरणीय नाहीं काय ?

### ब्रिटिश टाइपरायटरच्या धंद्यास संरक्षण

ग्रेटब्रिटनमध्यें १९२५ सालीं ६१,४०० टाइपरायटर परदेशांतून आले. १९३३ मध्यें हा आयातीचा आकडा ५०,००० होता. परदेशी टाइपरायटरांच्या आयातीची स्पर्धा आपल्या धंद्याच्या वाढीच्या आड येते अशी ब्रिटिश कारखानदारांनीं तक्रार केल्यामुळें जकातीच्याबाबत सल्ला देणाऱ्या कमिटीच्या शिफारसीवरून ऑफिस टाइपरायटरवरची जकात प्रत्येकी ३½ पौंडांची ४½ पौंड करण्यांत आली आहे. हिंदी टारिफ बोर्ड व औद्योगिक संरक्षणाचें धोरण ह्यांची व सदरहु प्रकरणाची तुलना कशी होते ? इंग्लंड तें इंग्लंड आणि हिंदुस्थान तें हिंदुस्थान हेंच ह्या प्रश्नाचें उत्तर आहे.


फक्त पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि. च्या सभासदांकरितां

## नोटीस.

पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि. ची विशेष साधारण सभा रविवार, तारीख १८ आक्टोबर, १९३६ रोजीं दुपारीं चार वाजतां पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या "मेनहॉल"मध्यें भरणार असून तींत नवीन पोटनियम नं. ५९ (अ) मंजूर करणें, पोटनियम नंबर ६५ (७) दुरुस्त करणें व मे. अध्यक्षांचे परवानगीनें सभेपुढें येणाऱ्या किरकोळ कामांचा विचार करणें वगैरे कामें करण्यांत येतील. तरी सदर सभेस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंती आहे. या सभेपुढें विचाराकरितां कांहीं सूचना करावयाच्या असल्यास त्या बँकेकडे ता. १३।१०।३६ पर्यंत दाखल होतील अशा बेतानें पाठवाव्या.

पुणें ता. २४ सप्टेंबर १९३६

बोर्डाचे हुकुमावरून
द. वि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर


### कोण काय विकत घेतो ?

लहान खेडेगांवांस तालुक्याच्या ठिकाणासारखीं मोठीं गांवें आणि त्यांस जिल्ह्याचीं मुख्य ठिकाणें, ह्याप्रमाणें हरतऱ्हेचा माल खरेदी करण्यास पेठा जनतेस सोयीच्या वाटतात. अशा प्रकारच्या मध्यवर्ती मोठ्या गांवांत व शहरांत नाना तऱ्हेचे जिन्नस पहावयास व पारखून विकत घेण्यास सांपडल्यानें तेथें दुकानदारी विस्तृत प्रमाणावर चालते आणि तेथील व्यापारी स्थानिक गिऱ्हाइकांइतकेच बाहेरून येणाऱ्या लोकांवर माल खपण्याच्या बाबतींत अवलंबून असतात. मुंबईस मधून मधून जाणारा माणूस विशिष्ट जिनसांच्या खरेदीची योजना डोळ्यांत ठेवतो आणि सहसा रिक्तहस्तें परत येत नाहीं. लग्नकार्यें वगैरेसाठी येथें येणारे लोक पुण्यांत केवढ्या मोठ्या प्रमाणावर खरेदी करितात हें सर्वश्रुतच आहे. हाच प्रकार कमी ज्यास्त रीतीनें इतर लहानमोठ्या शहरांबाबतचा असतो. परदेशांतलीं गिऱ्हाइकें आपल्याकडे वळवून आणण्याचा यत्न सर्वत्र राष्ट्रें करीत असतात, त्याचा हेतु वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. व्यापारी व दुकानदार ह्यांसहि बाहेरून येणाऱ्या गिऱ्हाइकांस कोणता माल आवडेल तो व आवश्यक असतो ह्याकडे लक्ष्य देऊन तो तयार ठेवण्याची व्यवस्था करणें हितावें असतें. बाहेरचें गिऱ्हाइक आकर्षण्याची कला आतां आमच्या दुकानदारांस साधली आहे ही गोष्ट पुण्यासारख्या शहरांत अलीकडे थाटलेल्या निरनिराळा माल विकण्याच्या दुकानांवरून दिसून येण्याजोगी आहे. भिन्न भिन्न ठिकाणांच्या गिऱ्हाइकांच्या आवडीनावडीची छाननी केली असतां ती खात्रीनें मनोरंजक होईल.

लंडनमधल्या दुकानदारांचा अनुभव पहातां, रशियन व अमेरिकन गिऱ्हाइकांचा विशेष ओढा कपडे खरेदी करण्याकडे असतो. अमेरिकन लोक चिलमी विकत घेतात आणि आपल्या स्त्रियांबरोबर केवळ बघे म्हणून दुकानांत न जातां वस्त्रप्रावरण व तसलेच इतर जिन्नस खरेदी करतात. जर्मन लोक तालमीचीं उपकरणें आणि फ्रेंच लोक लहानसहान चैनीच्या वस्तु पसंत करतात. इटालिअन गिऱ्हाइकें कपडे घेतात आणि ऑस्ट्रियांत इतर युरोपिअन देशांमधून येणारे गृहस्थ अत्तरें खरेदी करतात. ह्या गिऱ्हाइकांपाशी फारसा पैसा नसल्यानें त्यांचेपासून दुकानदारांस म्हणण्यासारखी प्राप्ती होत नाहीं. अमेरिकनांचे व कॅनेडियनांचे खिशांत मात्र पैसा खुळखुळत असतो. दुकानदार चाणाक्ष असतात व दुकानांत शिरणाऱ्या लोकांचा नूर पाहून त्यांचेकडून काय अपेक्षा करावी हें त्यांस चटकन समजतें. कित्येक गिऱ्हाइकांसहि मालाची चांगली पारख असते आणि तो कोठें व कोणत्या किंमतीस घ्यावा ह्याची त्यांस पूर्ण माहिती असते. घासाघिशी करणाऱ्या गिऱ्हाइकांपेक्षां असले लोक दुकानदार पसंत करीत असल्यास त्यांत नवल नाहीं.

### कोळशापासून पेट्रोल

आर्थिक स्वावलंबनाच्या राष्ट्रीय कार्यक्रमांतली एक महत्त्वाची बाब, कोळशापासून पेट्रोल करण्याच्या उद्योगासंबंधांतली आहे. सध्याच्या राजकीय व आर्थिक मनूमध्यें पेट्रोलचें विलक्षण प्राबल्य आहे. तथापि, कित्येक देशांत कोळसा आहे पण रॉकेल तेलाच्या खाणींवर त्यांचा ताबा नाहीं. ह्याविषयींचें परावलंबन दूर होण्याच्या दृष्टीनें दगडी कोळशापासून पेट्रोल बनविण्याचे प्रयोग सुरू झाले व आतां ते यशस्वी ठरले आहेत. पेट्रोल करण्यास लायक असा अपरिमित दगडी कोळशाचा साठा इंग्लंड व स्कॉटलंड ह्यांच्या भूमीच्या उदरांत आहे. त्याचा उपयोग पेट्रोलचें उत्पादन मोठ्या प्रमाणांत करण्याकडे केला जाणार आहे. जर्मनीनें हा धंदा केव्हांच यशस्वी केला आहे.

## जगांतल्या आर्थिक व सामाजिक घडामोडी

( १ )

सध्याची आर्थिक हलाखी केव्हां व कशी दूर होणार ह्याची प्रत्येकास चिंता लागून राहिलेली असतां ह्या प्रश्नास निश्चयात्मक किंवा समाधानकारक उत्तर देण्याचें सामर्थ्य मात्र कोणांतहि असलेलें दिसत नाहीं. सर्वच बाबतींत जगांत आज अनिश्चितता, अस्थैर्य व नियम-बद्धतेचा अभाव पसरला असल्याकारणानें ही दुर्दैवाची घटना निर्माण झाली आहे. राष्ट्रसंघाची आवश्यकता सर्वमान्य असली तरी त्या संस्थेचें वजन आंतील फाटाफुटीमुळें आंतरराष्ट्रीय प्रकरणांत पडेनासें झालें आहे. आंतरराष्ट्रीय सलोखा व सहकार्य वाढत जाण्याच्या ऐवजी राष्ट्रें आर्थिक बाबतींत स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनण्याची व अलग रहाण्याची खटपट करीत आहेत. आर्थिक दुःस्थिति निवारण्याचे उपाय प्रत्येक राष्ट्र स्वतःपुरते स्वतंत्रपणानें अवलंबीत आहे व त्यामुळें जागतिक सहकार्याचा फायदा मिळणें सर्वांसच कठिण झालें आहे. जगांत संपत्तीचें उत्पादन विपुल असतां त्याची वांटणी विषमरीतीनें होत असल्याकारणानें स्वार्थप्रेरित खाजगी कारखानदारीच्या पद्धतीच्या ठिकाणीं सामाजिक, सामुदायिक मालकीची घटना प्रस्थापित होणें हितकर होईल, ह्या मतास स्वाभाविकपणेंच चालना मिळाली आहे. सबंद समाजाच्या वतीनें राष्ट्रांतले उद्योगधंदे व व्यापार ह्यांची व्यवस्था चालावी आणि मूठभर श्रीमान लोकांच्या सत्तेची, संपत्तीची व मिळकतीची नागरिकांत समान वांटणी व्हावी, ह्या तत्त्वावर रशियांत चालू असलेल्या आर्थिक पद्धतीचें अनुकरण इतरत्र होण्याचें महत्त्व प्रतिपादलें जात आहे आणि समाजसत्तावादाकडे कल असलेल्या लोकांचे ह्या दिशेनें प्रयत्नहि चालू आहेत. ह्या प्रकारची क्रांति होणें म्हणजे प्रगति नसून मानवी संस्कृतीचा नाश होणें होय, हें मत समाजसत्तावाद्यांचे प्रतिस्पर्धी त्यांच्या इतक्याच श्रद्धेनें आवेशानें व जोरानें पुढें मांडीत आहेत आणि स्वहित संरक्षणार्थ व स्वमत पुष्ट्यर्थ संघटन करीत आहेत. ह्या दोन पक्षांचा झगडा आपणांस हानिकारक हाणार ह्या जाणीवेनें कित्येक राष्ट्रांतलीं विचारी माणसें व पुढारी त्यापासून आपले समाज अलिप्त राखण्याची शिकस्त करीत आहेत. स्पेनमध्यें चाललेल्या अंतस्थ बंडाळीनें वर वर्णिलेल्या परिस्थितीवर उत्कृष्ट प्रकाश पाडला आहे.

क्रांतीचे दुष्परिणाम टाळून शांततेच्या व उत्क्रांतीच्या मार्गानें इष्ट प्रगति घडवून आणण्याचे प्रयत्न करणें हें फॅसिझम किंवा आत्यंतिक समाजसत्तावाद ह्यांच्या तडाक्यांत अजून न सापडलेल्या राष्ट्रांतील पुढाऱ्यांचें कर्तव्य समजलें जात आहे, तें योग्यच आहे. रशिया, जर्मनी व इटली ह्या देशांतील सर्वसत्ताधारी व्यक्ति व पक्ष ह्यांनीं कोणती प्रगति घडवून आणली आहे, सुपरिणामांबरोबर त्यांमध्यें लोकांस दुष्परिणामहि भोगावे लागत आहेत कीं नाहीं व त्यांपासून आपणांस कोणता बोध घेतां येईल ह्या गोष्टींचा शांत मनानें विचार सर्वत्र होणें अगत्याचें झालें आहे. म्हणून, वस्तुस्थितीची ह्या संबंधांतली विश्वसनीय माहिती असण्याचें विशेष महत्त्व आहे. रशियामध्यें जुनी परंपरा मोडून राज्यक्रांति घडवून आणल्यापासून जनतेची प्रगति कल्पनेबाहेर झाली आहे, असें बॉल्शेव्हिकांचें म्हणणें आहे. मोठमोठे कारखाने काढले, शेती सुधारली, शिक्षणाचा प्रसार केला, बेकारी होऊं दिली नाहीं व एकंदरीनें जनता सुखी केली हें सिद्ध करणारे आंकडे ते प्रसिद्ध करीत आहेत आणि त्यांत सत्य नाहीं असें नाहीं. पण मुसोलिनी व हिटलर हे सर्व सत्ताधिकारी आपण व आपला पक्ष यांनीं स्वतःच्या राष्ट्राची ह्याच प्रकारची बहुमोल कामगिरी रशियन प्रकारची घटना हाणून पाडूनच बजावली असल्याची बढाई मारीत आहेत. ध्येय, संस्कृति, संघटना, मार्ग ह्यांचे बाबतींत सदरहु दोन भिन्न प्रकारच्या पुरस्कर्त्यांमध्यें अर्थातच जमीन अस्मानाचें अंतर आहे. अशा स्थितींत पूर्वग्रहदूषित न होतां व उत्साहातिरेकानें किंवा अंधश्रद्धेनें ह्या दोहोंपैकीं विशिष्ट बाजूचा पुरस्कार करणें किंवा निषेध करणें वरील देशांच्या बाहेरील लोकांस युक्त होणार नाहीं. आपल्या स्वतःच्या राष्ट्राच्या व समाजाच्या परिस्थितींत कोणते सुधारणेचे उपाय इष्ट व व्यवहार्य आहेत हें त्यांनीं विचारपूर्वक ठरविलें पाहिजे. रशिया, जर्मनी व इटली ह्या देशांतल्या राजकीय आर्थिक व सामाजिक घडामोडी वस्तुतः प्रयोगात्मक आहेत व त्यांतले नेते जरूरीप्रमाणें आपलीं धोरणें बदलतहि आहेत. तेव्हां अशा स्थितींत, आपल्या देशांत त्यांची नक्कल उठवूं पहाणें वेडेपणाचें होणार आहे. तेव्हां ह्या बाबतींत प्रथम वस्तुस्थितीचें ज्ञान आणि सारासार विचार हीं अत्यावश्यक आहेत. म्हणून, वर निर्दिष्ट केलेल्या जागतिक घडामोडी आणि विचार-आचारांचे वहाणारे ओघ ह्यांसंबंधानें विवेचन करण्याचें ह्या लेखमालेंत योजिलें आहे.

---

### रेल्वे स्टेशनावरचे बगीचे

स्टेशनें सुव्यवस्थित व सुशोभित स्थितींत ठेवण्याची खटपट पाश्चात्य देशांतल्या रेल्वे मंडळ्या करतात; आणि ह्या बाबतींत रेल्वे नोकरांमध्यें चढाओढ लावून त्यांस बक्षिसें देतात. सुंद बगीचांनीं सुशोभित केलेलीं स्टेशनें लोकांनीं पहावीं म्हणून एक ब्रिटिश रेल्वे कंपनी खास आगगाड्या सोडण्याची व्यवस्था करणार आहे. प्रमुख स्टेशनांमध्यें ह्या गाड्या पाव तास उभ्या करण्यांत येतील आणि बगीचांची वगैरे शोभा पहाण्याची उतारू लोकांस संधि देण्यांत येईल. जनतेची सोय, रेल्वेची जाहिरात आणि वाढतें उत्पन्न ह्या गोष्टी वरील उपक्रमानें साधतील. हिंदुस्थानांतील रेल्वे स्टेशनांत बसण्याची सोय नाहीं, तेथें सौंदर्य व बगीचे ह्यांचें नांव कशास पाहिजे ?

---

### हिंदी कामकरी-संघ

हिंदुस्थानांतील कारखान्यांमधील कामकऱ्यांचे संघ संख्याबल व द्रव्यबल ह्यांचे बाबतींत मागसलेले असल्याचे त्या संबंधाच्या १९३४-३५ सालच्या अहवालावरून दिसून येतें. संघांच्या सभासदांची संख्या २ लक्ष असून एकूण उत्पन्न सुमारें ५½ लक्ष रुपये आहे, म्हणजे दर सभासदामागें तें पुरें २ रुपयेहि सरासरीनें पडत नाहीं. नॉर्थ वेस्टर्न रेल्वेच्या कामकरी संघांत १९३४-३५ सालीं सभासद २५० चे २७,५०० इतके झाले, पण त्याचें उत्पन्न मात्र ४३२ रुपये होते.

---

### टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यापारी परीक्षा

सुरवातः १६ नोव्हेंबर, १९३६

केंद्रें: पुणें, धुळें व आकोला.

अर्जाची शेवटची तारीखः १० आक्टोबर, १९३६

पारितोषिकें: ( १ ) नागरी टाइपरायटरवर ज्यास्तींत ज्यास्त वेग दाखवून उत्तीर्ण होणारास वच्छराज आणि कंपनीचें २५ रुपयांचें बक्षीस, ( २ ) 'प्राथमिक जमाखर्चांत ज्यास्तींत ज्यास्त गुण मिळविणारांस १० रुपयांचें 'घारे' पारितोषिक.

# सहकारी चळवळ व ग्रामोद्धार

### दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

वरील बँकेची १८ वी वार्षिक सभा ता. १९ रोजीं श्री. व्ही. पी. वर्दे; ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत बँकेच्या अहवालाचे सालांतील प्रगतीचें समालोचन केलें व गिरगांव विभागांतील लहान सहान खातेदारांची बँकेमुळें किती सोय होते, ह्याचें त्यांनीं वर्णन केलें. व्याजाचे दर कमी करूनहि बँकेजवळील ठेवी दुप्पट (सुमारें ५ लक्ष रु.) झाल्या. सालअखेर बँकेस ५,२९२ रु. नफा झाला. त्यांतून भागीदारांस ६½ टक्के दरानें डिव्हिडंड मंजूर करण्यांत आलें, वक्तशीर कर्जफेड करणारांस व्याजावर रुपयांत तीन आणे रिबेट देण्याचें ठरलें. बँकेच्या अधिकृत भांडवलाची मर्यादा अर्ध्या लाखावरून एक लाखावर नेण्यांत आली.

---

### भुसावळ पीपल्स को. बँक लि., भुसावळ

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल : | ७५ | शिलक, रोख व बँकांत : | १७५ |
| रिझर्व्ह व इतर फंड : | ३६ | भागांत गुंतविलेले : | ५ |
| ठेवी : | ४०३ | कर्जें इ० : | ३५३ |
| १९३५–३६ चा नफा : | १५ | इमारत : | ३ |

बँकेचे एकूण ५७६ सभासद आहेत. अहवालाचे सालीं वसुली समाधानकारक होऊन थकबाकी फक्त ६·०३ टक्के इतकीच राहिली, ही गोष्ट अभिनंदनीय आहे. थकबाकीहि वसूल होण्याजोगी आहे. बँकेनें १२½ लक्ष रुपयांचा हुंड्यांचा व्यवहार केला. वर्षअखेर बँकेस १५,०८१ रुपये नफा उरला व त्यांतून भागीदारांस ७½ टक्के दरानें डिव्हिडंड देण्याचें ठरलें. सुमारें ८ हजार रुपये वेगवेगळ्या फंडांत टाकण्यांत आले आहेत. बँकेनें रिझर्व्हची केलेली ही तरतूद अनुकरणीय आहे. तिचा व्यवहार किफायतशीर चालला असल्याचें अहवालावरून स्पष्ट दिसतें.

---

### कॉसमॉस को. अर्बन बँक लि., पुणें

| | हजार रुपये | | हजार रुपये |
|---|---|---|---|
| भाग भांडवल: | ८१½ | शिलक, रोख व बँकांत: | १०७ |
| गंगाजळी व इतर फंड: | ३१ | इनव्हेस्टमेंट: | १७१ |
| ठेवी: | ४०७½ | कर्जें व ओव्हरड्राफ्ट्स: | १८१ |
| १९३५-३६ चा नफा: | ९½ | | |

सालअखेर वरील बँकेच्या पटावर १,९२६ सभासद आहेत. अहवालाचे वर्षी बँकेनें एकूण १ लक्ष १४ हजारांचीं कर्जे दिलीं व १ लक्ष ४२ हजारांचा वसूल केला. कर्जाची वसुली अत्यंत समाधानकारक झाली, अशी अहवालांत नोंद आहे. थकबाकीचें प्रमाणहि २·१३ टक्क्यांनीं उतरून तें १०·०७ टक्क्यांवर आलें. घराचे तारणावर लांब मुदतीनें आणखी ५० हजार रुपये गुंतविण्याची परवानगी बँकेनें मिळविली आहे; त्यामुळें सभासदांची सोय होऊन बँकेसहि रकमा किफायतशीर गुंतविण्यास साधन उपलब्ध झालें आहे. १ जानेवारी १९३६ पासून बँकेनें नोकरवर्गासाठी प्रॉव्हिडंड फंड सुरू केला आहे. सालअखेर बँकेस ९,६५२ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस ६½ टक्के दरानें डिव्हिडंड वाटण्याचें ठरलें. २,४१३ रुपये गंगाजळींत व १,००० रुपये इमारत फंडांत टाकण्यांत आले आहेत. वरील अहवालावरून बँकेची प्रगति समाधानकारक रीतीनें चालू असल्याचें दिसतें व तिच्या मजबुतीची कल्पना येते.

---

### दि बॉंबे प्रॉ. को. इन्स्टिट्यूट, पूर्व खानदेश.

ह्या जिल्हा शाखा इन्स्टिट्यूटचे, ५९० सोसायट्या व ४० व्यक्ती, असे सभासद आहेत आणि त्यांचेकडून अहवालाचे सालीं एकूण ५,३८५ रु. वर्गणी जमा झाली. व्यक्तिशः सभासदांकडून व्हावी तशी वर्गणी वसूल झालेली नाहीं, अशी तक्रार आहे. शाखेनें सहकारी दिन साजरा केला व सर्व जिल्हाभर तो कसा पाळण्यांत यावा, ह्यासंबंधीं सर्व सोसायट्यांस सूचना पाठविल्या. एकूण बारा पंचकमेटी ट्रेनिंग क्लासेस व तीन सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासेस भरविण्यांत आले. दोन फील्ड वर्कर्स परिषदा भरविण्यांत आल्या, त्यांत कित्येक महत्त्वाच्या विषयांचा खल व निर्णय करण्यांत आला. असोदा येथील प्रदर्शनाचे वेळीं शाखेनें सहकारी स्टॉल मांडला होता. ग्रामोद्धाराचे कार्यांतहि शाखेनें सहाय केलें. श्री. वामनराव व्यंकटराव पाटील हे अहवालाचे सालीं शाखेचे चेअरमन होते.

---

### सुपरवायझिंग यूनियनचीं कर्तव्यें

वाडा तालुका को. सुपरवायझिंग यूनियनची वार्षिक सभा ता. १० सप्टेंबर रोजीं भरली होती. त्यावेळीं मामुली कामानंतर कांहीं वक्त्यांचीं भाषणें झालीं. शेवटीं, मुंबई प्रां. को. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. वैकुंठराय मेहता, हे आपल्या भाषणांत म्हणाले:—"आपले अहवालावरून यूनियनचें काम फार चांगलें चाललें आहे, असें दिसतें. आपणांस एक उत्तम सुपरवायझर लाभले, ही आनंदाची गोष्ट आहे. यूनियन्सची शिस्त चांगली असावी. त्यांनीं चालू सोसायट्यांचे व्यवहार सुधारून जरूर तेथें नव्या सोसायट्या स्थापाव्या. सुपरवायझर हे सोसायट्यांचे अधिकारी नसून ते सेवक आहेत, अशी त्यांची भावना असावी. आपल्या मालाचा आपणांस पुरेपूर मोबदला मिळवून घेणें अगत्याचें आहे व त्याकरितां खरेदी-विक्री संघांची आवश्यकता आहे. मालाचा भाव वाढता राहील असा प्रयत्न केला पाहिजे. दुय्यम धंद्यांकडेहि लक्ष देणें जरूर आहे खंडाचा प्रश्न, कर्जबाजारीपणा, इत्यादि गोष्टींकडे यूनियननें सेवाधर्मानें पाहून व सरकारपुढें अडचणी मांडून शक्य ती खटपट केली पाहिजे."

---

### मठाचें उद्घाटन व कोनशिलासमारंभ

मावळ तालुक्यांतील कांहीं खेड्यांत सतत नऊ वर्षें शिक्षणाचें काम करीत असलेल्या राष्ट्रधर्म सरस्वतीमठ संस्थेनें ता. १९ रोजीं भोर संस्थानच्या हद्दींतील कोथुर्णे येथें घडवून आणलेला नवीन सरस्वती मठाचा उद्घाटनसमारंभ श्रीमती सोनूबाई काळे यांच्या हस्तें पार पडला. सदर समारंभास कोथुर्णे येथील व बाजूच्या गांवांतून सुमारें १५० मंडळी आली होती. कोथुर्णें येथील रा. आगाशे व बाकी गांवकरी मंडळी यांच्या खटपटीमुळें या ठिकाणीं मठ काढणें संस्थेस शक्य झालें. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत शिक्षणाचें महत्त्व सांगून असलें ज्ञानदानाचें काम करणाऱ्या सरस्वती मठ संस्थेबद्दल गौरवपूर्वक उल्लेख केला. याच वेळीं संस्थेच्या शाळांचा बक्षिससमारंभ उरकण्यांत येऊन यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसें देण्यांत आलीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ९॥ वाजतां संस्थेच्या शिवली येथील शालागृहाचा कोनशिलासमारंभ मुंबई कॉर्पोरेशनचे इंजिनिअर रा. पाटकर, यांचें हस्तें साजरा करण्यांत आला. शिवली येथील गांवकऱ्यांनीं जातीनें मेहनत घेऊन शालागृहाकरितां काम करण्याचें कबूल केलें आहे.

## आर्थिक मंदी व दुष्काळ ह्यांतून काढावयाचा मार्ग

### सर चुनीलाल ह्यांचें भाषण

[ मुंबई प्रांतिक सहकारी बँकेचे अध्यक्ष, सर चुनीलाल मेहता, ह्यांनीं बँकेच्या वार्षिक सभेचे वेळीं केलेल्या भाषणाचा सारांश. ]

( १ ) गेल्या वर्षामध्यें बँकेनें सरकारी रोख्यांत व इतर बँकांत ठेवींच्या रूपानें गुंतविलेल्या रकमांवर व्याज कमी सुटलें. उलट, बँकेचें खेळतें भांडवल तीस लाखांनीं वाढून तें किफायतशीर गुंतविण्यास साधन मात्र उरलें नाहीं. सहकारी सेंट्रल व अर्बन बँकांजवळील पैसा प्रांतिक बँकेकडे येतो, कारण त्यांस रकमा गुंतविण्यास वाव मिळत नाहीं. स्वस्त पैशाचा मुबलक पुरवठा असतांना तो सुरक्षित रीतीनें कर्जाऊ देतां येऊं नये, ही खरोखर विलक्षण गोष्ट आहे. जमिनीची किंमत उतरल्यामुळें व परतफेडीचें शेतकऱ्यांत त्राण न उरल्यामुळें कर्जास ह्यापुढें ज्यास्त मागणी येण्याचा संभव नाहीं. नवीन सोसायट्यांची स्थापना व सभासदांच्या संख्येंत वाढ ह्या मार्गानें आपल्या गिऱ्हाइकांत वाढ झाली पाहिजे.

( २ ) गेल्या वर्षी बँकेनें ज्यास्त खर्च केला, तो विशिष्ट परिस्थितींत जरूरच होता. नव्या शाखा स्थापून, ज्यास्त नोकर नेमून व परतफेडीची व देखरेखीची व्यवस्था सुधारून ही परिस्थिति सुधारली पाहिजे.

( ३ ) शेतीच्या मालाचा उठाव करण्यास मागें बँकेनें सहाय केलें होतें, त्याच धोरणानें कार्य चालू ठेवण्याचा बँकेचा विचार आहे. चांगल्या बियांचा पुरवठा व विहिरी आणि ताली बांधण्यास उत्तेजन, ह्या बाबतींत बँकेनें पुढाकार घेणें आवश्यक आहे.

( ४ ) दुय्यम धंदे व खेडेगांवी धंदे ह्यांची प्रगति होणें जरूर आहे. अहवालाचे सालीं कांहीं निवडक सोसायट्यांस अशा धंद्यांस उपयुक्त असणारीं साधनें बक्षिसाच्या रूपानें बँकेनें दिलीं.

( ५ ) लिक्विडेशनमध्यें निघालेल्या सोसायट्यांकडून बँकेस सोळा लक्ष रुपये येणें आहे, त्याची वसुली लवकर होणें जरूर आहे. प्रांतिक लँड मॉर्गेज बँक आपल्या बँकेच्या लँड मॉर्गेज खात्याचें येणें–देणें लवकरच स्वीकारील व त्या शाखेचा ताबा घेईल अशी आशा आहे.

( ६ ) येत्या ऑक्टोबरच्या ११ व्या तारखेस आपल्या बँकेस २५ वर्षें पुरीं होतात. तथापि, अवर्षणामुळें निर्माण झालेल्या दुष्काळाचे प्रसंगीं बँकेचा रौप्यमहोत्सव साजरा करणें योग्य होणार नाहीं. उलट, बँकेनें दुष्काळपीडितांस शक्य तेवढें सहाय केलें पाहिजे. परिस्थिति सुधारेपर्यंत हा उत्सव पुढें ढकलणेंच उचित आहे.

---

### वजन–मापाच्या कायद्यांत दुरुस्ती

१९३२ च्या वजन-मापाच्या कायद्यान्वयें ज्या कांहीं विशिष्ट स्थानिक संस्थांस वजनमापावर शिक्का मारण्याचा अधिकार देण्यांत आला आहे, त्यांसच फक्त वजनमापें तपासण्याबद्दल फी आकारतां येते. अशी फी सर्व स्थानिक संस्थांस घेतां यावी, ह्या अर्थाची दुरुस्ती आतां कायद्यांत करण्यांत येणार आहे.

कमी माप घालणें, हा सध्याच्या कायद्याप्रमाणें गुन्हा समजला जातो. मापामध्यें किती चूक झाली तर ती गुन्ह्याचे सदरांत येऊं नये, हें प्रत्येक मालाबाबत व धंद्याबाबत ठरविण्याचा अधिकार सरकारास असावा, अशी दुरुस्ती व्हावयाची आहे.

---

## कायदे मंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

राष्ट्रसंघास हिंदुस्थानानें द्यावयाच्या वार्षिक रकमेमध्यें मोठी कपात करावी, ही सर फिरोज सेठना ह्यांची सूचना कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें पास झाली.

* * *

दक्षिण आफ्रिकेचें शिष्टमंडळ हिंदुस्थानांत आलें आहे, त्याचा फायदा घेऊन त्या देशांतील हिंदी लोकांच्या अडचणींसंबंधीं शिष्टमंडळाशी चर्चा करण्याची सरकार संधि घेईल काय ? ह्या प्रश्नास असेंब्लींत दिलेल्या उत्तरांत त्याबाबत शिष्टमंडळानेंच पुढाकार घेतला पाहिजे, असें सरकारतर्फे सांगण्यांत आलें.

* * *

ग्रेटब्रिटनमधील फौजेमध्यें दर एक हजार सैनिकांस चार डॉक्टर असें प्रमाण पडतें. हिंदुस्थानांत हें प्रमाण १,०००:२३⁄४ इतकेंच आहे.

* * *

नवीन कंपनी कायदा अंमलांत आल्यानंतर स्थापन होणाऱ्या प्रत्येक कंपनीच्या बोर्डावरील डायरेक्टरांपैकीं निदान निम्मे हिंदी असले पाहिजेत, अशा अर्थाची कंपनी बिलांत सुचवलेली दुरुस्ती नामंजूर झाली.

* * *

लोकलबोर्डांचा मतदारसंघ वाढविणाऱ्या दुरुस्तीची सरकारी सूचना मुंबई कायदेमंडळांत पास झाली. त्या अन्वयें नव्या असेंब्लीच्या सर्व मतदारांस लोकल बोर्डांचे निवडणुकींत मतें देतां येतील. सध्या शेकडा ९ नागरिकांस तालुका बोर्डांचे निवडणुकींत भाग घेतां येतो व शेकडा २ नागरिक जिल्हा बोर्डांचे निवडणुकीस पात्र आहेत. दुरुस्त बिलानें तालुका व जिल्हा बोर्डांचे मतदारांस प्रत्येक जिल्ह्यांत सरासरीनें अनुक्रमें १० व ७४ हजारांची भर पडणार आहे.

* * *

दरसाल ६० रुपये घरभाडें भरणाऱ्या मुंबई शहरांतील नागरिकांस नव्या प्रांतिक असेंब्लीसाठी मताचा अधिकार आहे. मुंबई कॉर्पोरेशनच्या बाबतींत १२० रुपये घरभाडें भरणारासच मताधिकार आहे. ही भाड्याची अट ६० रुपयांवर उतरविणारें दुरुस्तीचें बिल पास झालें.


दि डॉन ऑफ इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें.

पुणें व सोलापूर येथें

बिल्डिंग इन्व्हेस्टमेंट आणि बँकिंग डिपार्टमेंटची

कंपनीचे बँकर्सनीं पसंत केलेली

ता. १ आक्टो-बरपासून सुरू ] नवीन योजना [ ता. १ आक्टो-बरपासून सुरू

मुदतीच्या ठेवींवर मासिक व्याज देण्याची

फायदेशीर अपूर्व सोय.

बँकेच्या उतरत्या व्याजाच्या काळांत लोकांस आपले कौटुंबिक निर्वाहास साधन अगर मदत म्हणून ठेवीवर मासिक, नियमित व किफायतशीर व्याज देण्याची व्यवस्था तारीख १ आक्टोबर १९३६ पासून अमलांत आणली आहे.

गरजूंनीं जास्त माहिती मागवावी अगर समक्ष भेटावें.

पुणें, ता. २२-९-३६ | जनरल मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११–११ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८–१५ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९–१३ |
| ४% १९६०–७० ... ... | ११५—८ |
| ४% १९४३ ... ... ... | १११—९ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९९–११½ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०७–११ |
| २¾% १९४८–५२ ... ... | १०१—३ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १११—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १००—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | ११०–१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | ११०—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११३—२ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२५—० |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३५—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११२—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३३—१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५६२—९ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३९—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९९—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९०६—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५४—१ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४८–१२ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २६०—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ६½% ) | १६०८–१२ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६१७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २००–१० |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७०–१२ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८४–१२ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७१८—२ |


**धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०**

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थे-कडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.**

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवलः | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल : | २,०४,१५० |
| रोख भरलेलें भांडवल : | ९९,२७५ |

**दर शेअरची किं. : रु. ५०**

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

## आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

पत्ता : डेक्कन जिमखाना, पुणें ४

यांचीं शास्त्रोक्त, खात्रीलायक व गुणकारी औषधें

| | |
|---|---|
| च्यवनप्राश पौष्टिक व शक्तिवर्धक | २० तो. १ रु. |
| वज्रदंती दंतमंजन | बा. किं. ४ आणे |
| केशवर्धन तेल | १० तो. १५ आणे |
| एरंडपाक मलावरोध घालविणारा | १० तो. ६ आणे |
| हेमगर्भ मात्रा सर्व वात कफरोगहर | मात्रा ५ रु. |
| सुवर्णराजवंगेश्वर धातुवर्धक | १ तो. ५ रु. |
| वाळा सरबत उन्हाळ्यांत थंड पेय | १ पौं. १२ आणे |
| त्रिभुवनकीर्ति सर्व ज्वरांवर | १ तो. १२ आणे |

याशिवाय प्रवाळ, मौक्तिक इ. भस्में, सर्व तऱ्हेचीं आसवें, अरिष्टें, मात्रा, गुटिका, अवलेह वगैरे मागवून एकवार अनुभव घ्या. कॅटलॉग मागवा.

**ठिकठिकाणीं एजन्सी देणें आहेत. एजन्सी घेऊं इच्छिणारांनीं नियम मागवावे.**

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारी मान्यतेचें

## झारापकर टेलरिंग अँड कटिंग कॉलेज

माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २

# एशियन पॉलिसी

म्हणजेच

## आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयिस्कर योजना.

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत

## धी एशियन ॲशुरन्स कंपनी, लिमिटेड

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १


## Notice to Contractors

Sealed Item rate Tenders in B-2 form are invited for the work of Providing additional accommodation for patients at the Central Mental Hospital, Yeravda, estimated to cost Rs. 2,31,500/- approximately.

2. Tender forms and other particulars can be had during office hours at the Undersigned's office on payment of Rs. 5/-

3. Earnest money of Rs. 2,500/-should be paid into Treasury and chalan attached to the tender.

4. Tender forms will be issued (24 hours after demand and) upto 22nd October 1936 and tenders received upto 3 p.m. on 26th October 1936.

G. D. DAFTARY,
Executive Engineer,
Poona Division.

Poona,
26th September 1936

### दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी. लिमिटेड, पुणें.

## भागीदारांस नोटीस.

ह्या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें शहर, ह्या कंपनीच्या भागीदारांची सातव्या वर्षाची सर्वसाधारण सभा कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसमध्यें ( ११, बुधवार पेठ, हुजुरपागेसमोर ) तारीख ४ ऑक्टोबर १९३६, रविवार रोजीं दुपारीं ५ वाजतां पुढील कामाचा विचार करण्यासाठी भरणार आह. तरी सर्व भागीदारांना सभेस येण्याविषयीं विनंति आहे.

**सभेपुढें येणारीं कामें:—**

( १ ) ३० एप्रिल १९३६ रोजीं संपणाऱ्या वर्षाअखेरचा कंपनीच्या ऑडिटरांनीं तपासलेला ताळेबंद व बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचा त्याबाबतचा वार्षिक अहवाल स्वीकारणें व मंजूर करणें.

( २ ) चालू सालासाठी म्हणजे १९३६-३७साठी विमेदारांनीं सुचविलेल्यांपैकीं हिशेब तपासनीस नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें. कंपनीचे हिशेब तपासनीस मेसर्स खरे आणि कंपनी व श्री. जी. डी आपटे., बी. ए., जी. डी ए., आर. ए., हे रिटायर होत असून फेरनिवडणुकीस पात्र आहेत, व ते निवडणुकीस उभेही आहेत.

( ३ ) आर्टिकल नं. १२८ प्रमाणें श्री. बी. एस. कामत व शेठ राजमल लखीचंद हे दोन डायरेक्टर्स रिटायर होत असून त्यांचे जागीं दोन डायरेक्टरांची निवडणूक करणें. श्री. बी. एस. कामत व शेठ राजमल लखीचंद हे दोघेही फेर निवडणुकीस पात्र असून निवडणुकीसाठीं उभे आहेत.

( ४ ) अध्यक्षांच्या परवानगीनें सभेपुढें आलेल्या इतर कामांचा विचार करणें. कंपनीची शेअर ट्रॅन्सफर बुकें तारीख २८ सप्टेंबर १९३६ ते १० ऑक्टोबर १९३६ पर्यंत दोन्ही दिवस धरून बंद ठेवण्यात येतील.

बोर्ड ऑफ डायरेक्टरांचे हुकुमावरून
अभ्यंकर आणि कंपनी
मॅनेजिंग एजन्टस

पुणें, तारीख ७ सप्टेंबर, १९३६

मुलांचा आनंद कोणा पालकाला नको ? त्यांतून 'आनंदा' चा खास अंक ! मग काय त्यावर मुलांच्या उड्यावर उड्या !

**'आनंदा'च्या खास अंकाचा थाट**

आतां सर्व मुलांना माहीत झाला आहे. ती दोन रंगी छपाई, चित्रांची लयलूट, गोष्टींची रम्यता, कवितांची बहार—हो ! सांगायचें विसरलोंच ! यंदां पुष्कळ कवितांना त्यांतील वर्णनाच्या चित्रांचिच चौकट बसविली आहे—गुळगुळीत कागद, सुबक छपाई व मोहरेदार मुखपृष्ठ हे खास अंकाचे विशेष त्यांना ठाऊक झाले आहेत. 'आनंद' वर्षभर त्यांची किती करमणूक करतो, त्यांच्या ज्ञानांत किती भर घालतो व त्यांना किती हवाहवासा वाटतो हें तीं केव्हांहि सांगतील. आपण आपल्या मुलांकरितां तो एक वर्षभर घेऊन पहा म्हणजे आपणांसहि कळून येईल. **वार्षिक वर्गणी** ट. ह. सह **लहान अंकाची २ रु. मोठ्या अंकाची ३ रु. वर्षारंभ जुलैपासून.** अंक दरमहा पंधराव्या तारखेस प्रसिद्ध होतो.

पत्ता:—म्यानेजर आनंद, पुणें २.



**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City



The House for Quality goods at most reasonable prices.

**K. M. BELSARE & Co.,**

PLAIN & DECORATIVE FURNITURE

FOR

Home, School, College, Office etc. in

WOOD & IRON

Sadashiv, POONA 2



**CONFIDENCE**

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

**This year 1934-35**

**Exceeds**

**2 CRORES & 50 LAKHS**

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

**HINDUSTHAN**

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD. 1907 )

*Branches:* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Offices:* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.



**ह्युम सेप्टिक टँक**

वापरल्यानें

आरोग्य व स्वच्छता ठेवली जाते.

नादुरुस्त होण्याची भीति नाहीं.

कित्येक वर्षें लोक वापरून सुखी आहेत.

संडासाचें पाणी घाण वास न येतां बाहेर येतें

व

तें भाजी उगवण्यास उपयोगांत आणतां येते.

—o—

**ह्युम पाईप**

( सिमेंट कांक्रीटच्या )

फार मजबुत व टिकाऊ असतात.

महाराष्ट्रांतील कारखानेः—

मुंबई, पुणें, सोलापूर, मिरज, द. हैद्राबाद.

**दि इंडियन ह्युम पाईप कं., लि.**

बॅलर्ड इस्टेट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख ७ ऑक्टोबर, १९३६. अंक ४१

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें
सरकारी मान्यतेचें
झारापकर टेलरिंग अँड कटिंग कॉलेज
माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २

ह्युम सेप्टिक टँक
वापरल्यानें
आरोग्य व स्वच्छता ठेवली जाते.
नादुरुस्त होण्याची भीति नाहीं.
कित्येक वर्षें लोक वापरून सुखी आहेत.
संडासाचें पाणी घाण वास न येतां बाहेर येतें
व
तें भाजी उगवण्यास उपयोगांत आणतां येते.


ह्युम पाईप
( सिमेंट कांक्रीटच्या )
फार मजबुत व टिकाऊ असतात.
महाराष्ट्रांतील कारखानेः—
मुंबई, पुणें, सोलापूर, मिरज, द. हैद्राबाद.
दि इंडियन ह्युम पाईप कं., लि.
बॅलर्ड इस्टेट, मुंबई.

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

*For All Medicinal Requisites*
— TRY —
N. MAHADEV & Co.
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner, POONA 2.

दि डॉन ऑफ इंडिया
लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें.
पुणें व सोलापूर येथें
बिल्डिंग इन्व्हेस्टमेंट आणि बँकिंग डिपार्टमेंटची
कंपनीचे बँकर्सनीं पसंत केलेली
ता. १ आक्टोबरपासून सुरू ] नवीन योजना [ ता. १ आक्टोबरपासून सुरू
मुदतीच्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची
फायदेशीर अपूर्व सोय.
बँकेच्या उतरत्या व्याजाच्या काळांत लोकांस आपले कौटुंबिक निर्वाहास साधन अगर मदत म्हणून ठेवीवर मासिक, नियमित व किफायतशीर व्याज देण्याची व्यवस्था तारीख १ आक्टोबर १९३६ पासून अमलांत आणली आहे.
गरजूंनीं जास्त माहिती मागवावी अगर समक्ष भेटावें.
पुणें, ता. २२-९-३६ | जनरल मॅनेजर.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्स:-ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्स:-

१ केळकर ब्रदर्स, बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी, लक्ष्मीरोड.

## विविध माहिती

### पॅरिस विश्वविद्यालयांतील विद्यार्थी

पॅरिस युनिव्हर्सिटींत गेल्या वर्षाच्या अखेर एकूण २८,३१५ विद्यार्थी होते. त्यांपैकीं ४,७१६ परदेशांतून आलेले असून ७,९८४ विद्यार्थिनी होत्या. परराष्ट्रीय विद्यार्थ्यांचा भरणा वैद्यकीय शास्त्रामध्यें मुख्यत्वेंकरून होता.

### बारा लक्ष ग्रंथांचा संग्रह

कोलंबिया युनिव्हर्सिटीच्या ग्रंथसंग्रहांत बारा लक्ष ग्रंथ आहेत.

### दक्षिण आफ्रिकेंत हिंदुस्थानचा माल

हिंदुस्थानांतून दक्षिण आफ्रिकेंत जो माल जातो त्यापैकीं दोन तृतीयांश कलकत्त्याहून निर्गत होणारा तागाचा माल असतो.

### जुन्या मोटार बसेसना गोव्यांत बंदी

माणसांची ने-आण करण्यासाठीं उपयोगांत आवयाच्या जुन्या व वापरलेल्या मोटार बसेस आपल्या मुलखांत येण्याची व रजिस्टर होण्याची बंदी करणारा हुकूम गोव्याच्या गव्हर्नरांनीं काढला आहे. मालाची वहातुक करणाऱ्या असल्या मोटार गाड्यांस हा निर्बंध लागू नाहीं.

### फिजी बेटांत हिंदी लोक

फिजी बेटाची एकूण लोकसंख्या १९३४ साल अखेर १ लक्ष, ९६ हजार असून तीमध्यें १ लक्ष, २ हजार हिंदी लोक होते.

### पेट्रोलवरील करांतून रोडफंडाची वाटणी

पेट्रोलवरील करामधून रस्ते सुधराईसाठीं मुंबई इलाख्यास ( सिंध धरून ) दरसाल १६ ते २० लक्ष रुपये मिळत असत. चालू वर्षी एकट्या मुंबई प्रांताच्या वांट्यासच सुमारें १८ लक्ष रुपये येतील. स्वतंत्र झालेल्या सिंधचा हिस्सा त्यास वेगळा दिला जाईल.

### मुंबई इलाख्याचा कोयनेलचा वांटा

हिंदुस्थान सरकार मुंबई इलाख्यास दरसाल ३०० पौंड कोयनेल लोकांत वाटण्यासाठीं देत असतें.

### न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि.

वरील कंपनीच्या आयुर्विमा खात्यानें ३१ मार्च अखेर संपलेल्या वर्षी एकूण १ कोटि, ७६½ लक्ष रुपयांचे ७,९३१ विमे उतरविले. लाइफ फंडांत १४½ लाखांची भर पडून सालअखेर ४० लक्ष ८१ हजारांचा फंड झाला आहे.

### हिंदी कोळशानें सिलोनी आगगाड्या चालणार

सिलोन देशाच्या सरकारी रेल्वेजना येत्या वर्षी कोळसा पुरविण्याचें कंत्राट हिंदुस्थानास मिळालें आहे. गेलीं दोन वर्षे दक्षिण आफ्रिकेस तें मिळालें होतें. निर्गत होणाऱ्या प्रत्येक टन कोळशावर देण्यांत आलेल्या आठ आण्यांच्या सूटीमुळें हें शक्य झालें आहे. देशी व्यापार व उद्योगधंदे ह्यांस सहानुभूतिपूर्वक सहाय करण्याच्या सरकारी धोरणाचा परिणाम कसा हितकारक होतो, याचें हें उदाहरण आहे.

### डेक्कन व्हर्नॅक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी, पुणें

वरील संस्थेनें १९३५-३६ सालीं एकूण ७१ मराठी पुस्तकांचें परीक्षण केलें. त्यांपैकीं ३९ पुस्तकांस सुमारें १,६०० रुपयांचीं बक्षिसें व १९ पुस्तकांस प्रशस्तिपत्रें देण्यांत आलीं.

### जुना नर्मदा पूल मुंबईसरकार विकत घेणार

बी. बी. अॅन्ड सी. आय. रेल्वेचा नर्मदा नदीवरील जुना पूल विकत घेण्यासंबंधीं मुंबई सरकार व रेल्वे बोर्ड ह्यांमध्यें वाटाघाट चालू आहे. सध्याची रेल्वेवरील वहातूक व नवीन केले जाणारे रस्ते ह्यांमध्यें चढाओढ होऊं न देण्याच्या अटीवर ५ लक्ष रुपयांस तो पूल मुंबईसरकारचे स्वाधीन करण्यास रेल्वे बोर्ड तयार आहे. ठाकठीक करून त्याचीं दोन्ही टोंकें रस्त्यांस मिळविण्यासाठीं आणखी ११ लक्ष रुपये खर्च येईल. रेल्वेशीं अनिष्ट स्पर्धा होऊं नये म्हणून ह्या पुलावरील वहातुकीवर टोल बसविला जाईल. रेल्वे कंपनीच्या एजंटाची संमति अजून आलेली नाहीं.

### हिंदी चहाचें उत्पादन व खप

१९३५-३६ मध्यें हिंदुस्थानांत ४० कोटि ५७ लक्ष पौंड चहाचें उत्पादन होऊन त्यापैकीं ८ कोटि पौंड चहाचा स्वदेशांतच खप होईल, असा अधिकृत अंदाज प्रसिद्ध झाला आहे.

### टायर विक्रेत्यांचा संघ

मोटार टायरचे कारखानदार वेगवेगळ्या क्षेत्रांतील विक्रेत्यांशीं निरनिराळ्या अटींवर करार करतात व कांहीं विक्रेत्यांस ज्यास्त दरानें डिसकॉउंट देतात. ह्या प्रकारास आळा बसवून टायरचा धंदा किफायतशीर चालावा, ह्यासाठीं मुंबई इलाखा, मध्य हिंदुस्थान, हैद्राबाद संस्थान व राजपुताना ह्यांतील प्रमुख व्यापाऱ्यांनीं एक संघ स्थापन केला आहे. त्याची बैठक गेल्या महिन्याचे अखेरीस मुंबई येथें भरून कार्याची दिशा ठरविण्यांत आली.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| ता. २६ सप्टेंबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ४५,६५,५३० |
| ता. ३ ऑक्टोबर रोजीं पुरा झालेला आठवडा | २५,१७,७४४ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते ३ आक्टोबर १९३६ अखेर | २,८२,९३,९१,२३८ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४९० | ६ दूरदर्शनाची दिव्यदृष्टि | ४९४ |
| २ हुंडणावळीच्या क्षेत्रांत खळबळ ... ... | ४९१ | ७ फैजपूर येथील प्रदर्शन | ४९४ |
| ३ व्याजाचा दर शून्य ते उणे दोन टक्के! ... | ४९२ | ८ कै. वा. भाऊसाहेब साने ह्यांचें स्मारक ... | ४९५ |
| ४ आर्थिक सुस्थिति व लोकसंख्येची वाढ ... | ४९२ | ९ शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कसा कमी होईल? | ४९५ |
| ५ स्फुट विचार ... | ४९३ | १० सहकारी चळवळ ... | ४९६ |
| हिंदुस्थानची हुंडणावळ कायम!–सहकारी ऑडिट फीची वसुली–ऑडिट फीचा विनियोग—कॉमनवेल्थ विमा कंपनी लि.–दि बाँबे को. क्वार्टर्ली–इंडियन को. रिव्ह्यू | | ११ बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि. ... ... | ४९७ |
| | | १२ महाराष्ट्रांतील मोटार वहातुकीच्या व्यापाऱ्यांस विनंति ... ... | ४९७ |
| | | १३ निवडक बाजारभाव | ४९८ |
| | | १४ कॉमनवेल्थ विमा कंपनीची प्रगति ... | ४९८ |



# अर्थ

बुधवार, ता. ७ ऑक्टोबर, १९३६


## हुंडणावळीच्या क्षेत्रांत खळबळ

फ्रान्सनें परराष्ट्रीय हुंडणावळीचा आपला कायदेशीर दर उतरवण्याचा निश्चय जाहीर केल्याबरोबर आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या क्षेत्रांत खळबळ उडून गेली. जगांतील राष्ट्रांमध्यें ह्या बाबतींत अलीकडे दोन गट निर्माण झालेले होते. आर्थिक मंदीची परिस्थिति लक्षांत घेऊन ज्या राष्ट्रांनीं आपल्या चलनांतली सोन्याची किंमत म्हणजेच परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर पडलेल्या बाजारभावांच्या मेळांत आणला तीं राष्ट्रें एका वर्गांत येतात आणि त्यांमध्यें ग्रेटब्रिटन, अमेरिका, इटली, बेल्जम इत्यादि राष्ट्रांची गणना होते. दुसऱ्या गटांतील राष्ट्रांनीं असा फेरबदल करण्याचें नाकारलें व आपले पूर्वींचेच हुंडणावळीचे दर कायम ठेवले व त्यांचें नेतृत्व फ्रान्सकडे आलें. त्यांमध्यें स्वित्सर्लंड, हॉलंड वगैरे देश प्रमुख होते. जगाचा व्यापार सुरळीतपणानें चालण्यास सर्व राष्ट्रांच्या हुंडणावळीच्या दरांची सारखी घडी बसणें आवश्यक असतें आणि वरीलप्रमाणें दोन तट त्यांमध्यें पडल्यानें आर्थिक परिस्थिति सुधारण्याच्या मार्गांत अडचण भासूं लागली. जुन्या दरानें फ्रँकच्या मोबदला द्यावें लागणारें सोनें बँक ऑफ फ्रान्सच्या संग्रहांत भरपूर असल्यानें, व्यापाराची व उद्योगधंद्यांची गैरसोय झाली तरीहि आपण इंग्लंड व अमेरिका ह्यांचा कित्ता गिरवणार नाहीं असा फ्रान्सनें आग्रह धरला आणि हुंडणावळींत बदल न करणें हा फ्रेंच राष्ट्राच्या इभ्रतीचाच जणूं काय प्रश्न होऊन बसला. समाजसत्तावादी फ्रेंच प्रधान मंडळाच्या हातीं राज्यसूत्रें आलीं तेव्हां त्यासहि ह्याच धोरणास चिकटून रहाणें भाग पडलें. तेथील एकंदर परिस्थिति इतकी प्रतिकूल झाली कीं, अखेर फ्रेंच सरकारास हा नाद सोडून देणें अपरिहार्य आहे असें दिसून आलें आणि इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांशीं वाटाघाट करून त्यानें आपला हुंडणावळीचा दर उतरवण्याचा निश्चय जाहीर केला. फ्रान्सच्या गटांतल्या व त्याच्या तंत्रानें चालणाऱ्या स्वित्सर्लंड ह्या व हॉलंडसारख्या राष्ट्रांस ह्याच धोरणाचा अंगिकार करणें प्राप्त झालें आहे. अशा रीतीनें जागतिक हुंडणावळीच्या क्षेत्रांत एकाएकी खळबळ उडून गेली.

सहा वर्षांमागें राष्ट्रीय चलनांची व्यवस्था सुवर्णमापन पद्धतीस अनुसरून चालत असे. ठराविक वजनाचें सोनें हें चलनाचें व बाजारभावांचें अंतिम माप समजण्यांत येऊन ठराविक दरानें चलनाच्या मोबदला सोन्याची खरेदी-विक्री करण्याची जबाबदारी मध्यवर्ती बँकेवर कायद्यानें टाकलेली होती. राष्ट्रांराष्ट्रांमध्यें होणाऱ्या देण्याघेण्यांत प्रत्येक राष्ट्राच्या सुवर्णमापाचा संबंध इतरांच्या सुवर्णमापाशीं सहजच निश्चित होऊन त्या परस्पर-प्रमाणांत त्यांच्या दरम्यान फिरणाऱ्या हुंड्यांचा दर निश्चित होत असे. अनेक कारणांमुळें सहा वर्षांपूर्वीं बाजारभाव सर्वत्र उतरले, आणि त्यांचें अंतिम माप म्हणजे सोनें महागलें. ह्या स्थितींत कागदी चलनाच्या मोबदला महागलेलें सोनें कायदेशीर दरानें देणें कठिण होऊन बँकांचा सुवर्णसंचय अपुरा पडूं लागला. ह्यास उपाय म्हणून ब्रिटिश सरकारनें ठराविक दरानें सोनें विकण्याची बँक ऑफ इंग्लंडची जबाबदारी दूर केली व परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर बाजारभावाप्रमाणें बदलूं दिला. ह्याचा परिणाम अर्थातच अमेरिकेच्या व्यापारावर होऊं लागल्यानें त्या राष्ट्रानें ग्रेटब्रिटनच्या बदललेल्या पौंडाच्या किंमतीस जुळेल या बेतानें डॉलरचें सोनेरी माप कमी केलें, म्हणजे महागलेल्या सोन्याच्या मानानें कागदी चलनाची किंमत कमी करून हुंडणावळीचा दर बदलला. स्वस्त झालेला पौंड आणि स्वस्त बनवलेला डॉलर ह्यांचा परस्पर संबंध १ : ५ ह्या प्रमाणांत राखण्याच्या खटपटींत इंग्लंड व अमेरिका ह्या दोन्ही राष्ट्रांनीं यश संपादन केलें. व्यापाराच्या ओघांत त्यांच्याशीं देणें-घेणें सारखें चालवावयाचें असल्यानें बेल्जम, इटली इत्यादि राष्ट्रांनीं आपल्या चलनांचीं सुवर्णमापें व हुंडणावळीचे दर बदलून पौंड व डॉलर ह्यांच्याशीं ते जुळते करून सोनें व बाजारभाव ह्यांचा नवीन मेळ बसवला. फ्रान्सनें मात्र त्यांचें अनुकरण केलें नाहीं, हें वर सांगितलेंच आहे व त्याचा परिणाम फ्रेंच हुंडणावळ, व्यापार व बँकिंग ह्यांत अनिश्चितपणा उत्पन्न होण्यांत झाला. आपला हट्ट चालवणें ह्यापुढें अनिष्ट व अशक्य आहे हें अखेर जाणून फ्रेंच प्रधान मंडळानें इंग्लंड व अमेरिका ह्यांच्याशीं विचारविनिमय केला आणि पौंड व फ्रँक ह्यांचें परस्पर-प्रमाण सुमारें १:७५ होतें, तें १:१०० च्या आसपास निश्चित करण्याचें ठरवलें.

ह्या नवीन दरानें पौंडाच्या व डॉलरच्या मानानें फ्रँक स्वस्त होणार व फ्रेंच चलन देशांत अधिक खेळणार. ह्याचाच अर्थ, फ्रान्समधील सामान्य बाजारभाव चढून जनतेची रहाणी महाग होणार. चालू मजुरीच्या दरानें महर्घतेमुळें कामकरी वर्गाची हलाखी उडणार असल्यानें त्यांच्या हितसंरक्षणाची तरतूद समाजसत्तावादी फ्रेंचमंडळास अवश्य केलीच पाहिजे. हुंडणावळ व चलन ह्यांची नवी घडी नीट बसावी म्हणून वरीलसंबंधांत व इतर बाबतींत विशिष्ट कायदे होणें जरूर असून ते झाले आहेत व होत आहेत. फ्रान्सच्या धोरणाचा कित्ता गिरवून स्वित्सर्लंडच्या सरकारनें आपली हुंडणावळ बदलली आहे. इंग्लंड आपल्या चलनव्यवस्थेच्या संरक्षणार्थ व स्वास्थ्याकरितां योग्य उपाय योजीत आहे व इटलीहि ह्या प्रश्नाचा स्वतःच्या दृष्टीनें विचार करीत आहे. पौंड व डॉलर ह्यांचें परस्पर-प्रमाण १:५ असें आहे, तें थोडेसें बदलून ठाम करावें किंवा कसें ह्याविषयीं इंग्लंड व अमेरिका ह्यांचेमध्यें वाटाघाट चालल्याची बातमी प्रसिद्ध झाली होती. त्या कोष्टकाचे प्रमाणांत डॉलर स्वस्त व पौंड महाग असावा असें इंग्लंडला

वाटत नाहीं.ह्याच्या उलट, डॉलर थोडासा स्वस्तच असावा अशी अमेरिकेची इच्छा आहे. कांहीं झालें तरी आतां निश्चित होणारे हुंडणावळीचे दर स्थिर राखण्यासाठी ह्या कामीं योजावयाचे स्वतंत्र फंड अस्तित्वांत आहेत, त्यांचा उपयोग करावा लागेल. जरूरीप्रमाणें सोनें किंवा परराष्ट्रीय हुंड्या ह्यांची खरेदी-विक्री करण्यासाठी हे फंड वापरले जातात. असला फंड फ्रान्समध्येंहि निर्माण व्हावयाचा आहे. मध्यवर्ती बँकेंतल्या सुवर्णनिधीची किंमत नवीन हुंडणावळीच्या दरानें म्हणजे स्वस्त फ्रँकच्या मोबदल्यांत वाढणार असून ह्या दोन किंमतींतल्या फरकांतून हा फंड तयार होईल. गेले कित्येक दिवस फ्रेंच हुंडणावळीचा दर जाहीर झाला नाहीं, ह्याचें कारण तो निश्चितच झाला नाहीं, हें होय. आंतरराष्ट्रीय वाटाघाटी व राष्ट्रीय कायदे व व्यवस्था ह्यांचा निकाल लागला म्हणजे जागतिक हुंडणावळीच्या क्षेत्रांत उडालेली खळबळ शांत होऊन आंतरराष्ट्रीय देवघेवींत स्थिरता व नियमबद्धता उत्पन्न होईल अशी आशा आहे.

## व्याजाचा दर शून्य (०) ते उणे दोन (–२) टक्के !

कॅनडामध्यें आल्बर्टा हा एक लहान प्रांत आहे. चलनपद्धतीच्या सुधारणेच्या एका विचित्र योजनेच्या पुरस्काराबद्दल त्याचे मुख्य प्रधान, मि. आबरहार्ट, ह्यांस प्रसिद्धि प्राप्त झाली आहे. त्यांच्या संकल्पित योजनेस तिचे मूळ उत्पादक, मेजर डग्लस, ह्यांचा पाठिंबा न मिळाल्याकारणानें मि.आबरहार्ट ह्यांनीं आतां एक दुसरी शक्कल काढली आहे. तिचा उद्देश भांडवलावरील व्याजाचा दर शून्य करून सरकारला कर्जाऊ पैसा उणे २ टक्के दरानें मिळावा हा आहे. ह्या कल्पनेंतलें तत्व असें आहे. आपल्या अपेक्षेप्रमाणें व्याज न मिळाल्यास पैसेवाले लोक तो रिकामा पडून राहूं देतात आणि त्यामुळें व्यापार-धंद्यांत भांडवल येत नाहीं व बेकारी उत्पन्न होते. नाशवंत माल दुकानदारांस येईल त्या किंमतीस काढून टाकावा लागतो, त्याप्रमाणें आपला पैसा कर्जाऊ न दिल्यास किंवा अन्य तऱ्हेनें न उपयोगांत आणल्यास नुकसान होईल असें पैसेवाल्या लोकांस वाटेल तेव्हांच ते कर्जें देण्यास किंवा खर्च करण्यास तयार होतील. व्याजाचे दर कमी होऊन उद्योगधंद्यांत ज्यास्त भांडवल गुंतेल तर औद्योगिक चलती होईल ह्यांत शंका नाहीं. म्हणून आल्बर्टाच्या सरकारनें आपलीं देणीं भागवण्यासाठी दोन वर्षें मुदतीच्या बिनव्याजी नोटा काढण्याचें योजिलें आहे. त्या ज्यांच्या हातीं जातील, त्यांनीं त्यांच्या दर्शनी किंमतीचा एक टक्का ह्या प्रमाणांत दर आठवड्यास सरकारकडून तिकिटें विकत घेऊन त्यांस चिकटवलीं पाहिजेत. असें न झाल्यास नोटांची किंमत कमी कमी होत जाईल, आणि ह्या नुकसानीच्या भीतीनें त्या धारण करणारे लोक त्या उपयोगांत आणतील. नोटांची किंमत उतरत जाऊं देण्याऐवजी बिनव्याजानें त्यांची रकम कर्जाऊ दिलेली बरी, ह्या विचारानें लोक पैसा खर्चण्यास उद्युक्त होतील. बरें, नोटा काढणाऱ्या सरकारचा ह्या व्यवहारांत फायद्याच आहे. नोटांवर लावावयाच्या तिकिटांच्या विक्रीचें कराचें उत्पन्न त्यास मिळेल. नोटांची दर्शनी किंमत दोन वर्षांच्या मुदतीनंतर परत द्यावयाची त्या वेळेस त्यांवर १०४ आठवड्यांचे १०४ टक्के इतकी रकम तिकिटांच्या उत्पन्नाच्या स्वरूपांत अगोदरच सरकारच्या हातीं आलेली असणार. म्हणजे सरकार दोन वर्षेंपर्यंत रकम वापरून परत करणार व त्यावर कराचें उत्पन्न १०४ टक्के मिळवणार आणि अशा तऱ्हेनें त्यास दरसाल दर शेकडा उणे २ टक्के व्याज पडणार !

आल्बर्टाच्या पोतडींत आणखी कित्येक योजना आहेत. त्यांचे मार्गांतली पहिली अडचण, प्रांतिक सरकारास चलन व बँकिंग ह्यांचे संबंधांत कायदे करण्याची सत्ता आहे कीं नाहीं ह्याबद्दलची शंका, ही होय. कॅनडाची राजकीय घटना व राष्ट्रीय कायदे ह्यांच्याशी विसंगत असलेल्या आर्थिक क्षेत्रांतल्या योजना बेकायदेशीर ठरल्यास सगळाच ग्रंथ आटोपला. आल्बर्टा सरकारच्या नोटा व्यवहारांत लोकांनीं स्वीकारल्याच पाहिजेत अशी कायदेशीर सक्ती वरील योजनेंत नसल्यानें पैसा समाजांत खेळणें कठिण होईल आणि योजनेचा हेतु साध्य व्हावयाचा नाहीं ही अडचण आणखी आहेच. परंतु असल्या अडथळयांस न जुमानतां मि. आबरहार्ट ह्यांनीं आपले प्रयत्न चालूच ठेवले आहेत. लोकांच्या हातांत चलन नाहीं, म्हणून त्यांस बेकारी व मंदी भोंवते आणि ती नाहींशी करण्याचा उत्कृष्ट व सोपा मार्ग म्हटला म्हणजे जनतेमध्यें फुकट चलन वांटणें हा होय, ह्या कल्पनेनें त्यांस घेरलें आहे. आल्बर्टामध्यें नुकताच एक कायदा पास झाला आहे त्या अन्वयें एक " पतगृह " स्थापन व्हावयाचें असून ज्या नागरिकांस पतीच्या स्वरूपांत चलन हवें असेल त्यांचीं नांवें तेथें दाखल करून घेतलीं जातील. ह्या संस्थेच्या शाखा चोहोंकडे काढण्यांत येतील आणि विशिष्ट अटी मान्य करून आपलीं नांवें नोंदवणारांस सरकारी नोटा वापरण्यास देण्यांत येतील. ह्या नोटांच्या मोबदला रोख चलन मागण्याचा कोणासहि हक्क असावयाचा नाहीं. या कारणानें नोटा व्यवहारांत खेळल्या नाहींत तर कॅनेडिअन राष्ट्रीय नाण्याच्या म्हणजे डॉलरच्या मानानें त्यांची किंमत उतरेल आणि बाहेरच्या व्यापाराची गैरसोय होईल. नोटा सर्रास स्वीकारल्या गेल्या तर आल्बर्टांतले बाजारभाव चढतील व हुंडीचा दर प्रतिकूल होईल. अडचणी उत्पन्न करणारे हे परिणाम घडून येऊं नयेत म्हणून आल्बर्टाचें सरकार अनेक उपाय योजणार असून त्यांचे योगानें भांडवल व चलन ह्यांचा भरपूर पुरवठा होऊन औद्योगिक चलतीस उत्तेजन मिळेल पण इतर भानगडी उपस्थित होणार नाहींत, अशी पुरस्कर्त्यांस आशा वाटत आहे. उदाहरणार्थ, बाजारभावांत फाजील चढउतार होऊं न देण्यासाठी एक बोर्ड स्थापन व्हावयाचें असून पदार्थांच्या किंमती स्थिर राखण्याचें काम त्याचेकडे सोंपवण्यांत येणार आहे. आल्बर्टांत चाललेल्या प्रयोगांकडे जगाचें लक्ष्य लागून राहील, हें सांगावयास नको.

## आर्थिक सुस्थिति व लोकसंख्येची वाढ

प्रो. कार सॉंडर्स ह्यांच्या लोकसंख्येवरील प्रश्नासंबंधीच्या पुस्तकाचें परीक्षण करतांना प्रो. लास्की लिहितातः—

" पॅलेस्टाइनमध्यें वसति करण्यास गेलेल्या ज्यू लोकांमध्यें जननाचें प्रमाण अधिक कां आढळतें? त्याचें कारण, तेथें आशादायक वातावरण असून आपली जन्मभूमि ज्यून्नत करण्याची त्यांस आशा वाटते, हें होय. आर्थिक स्थैर्य व मुलांसाठी तरतूद करतांना स्वतःच्या सुस्थितीवर घाला न येण्याच्या शाश्वतीसंबंधीं लोकांस खात्री पटली म्हणजे लोकसंख्येचा प्रश्न सुटण्यास वेळ लागणार नाहीं. ह्या शाश्वतीखेरीज केवळ सरकारी प्रयत्नांनीं जननाचें प्रमाण बदलणें शक्य नाहीं. मुलें होण्यामुळें आर्थिक अडचण उपस्थित होत असेल, तर आईबाप संतती न होण्याची खबरदारी घेतील. अमेरिकेस गेल्या शतकांत आलेला अनुभव व रशियाचा संतती-नियमनासंबंधांत बदलेला दृष्टिकोन, हीं वरील सिद्धांताचींच उदाहरणें आहेत. "

# स्फुट विचार

### हिंदुस्थानची हुंडणावळ कायम?

फ्रेंच हुंडणावळीचा दर बदलण्याचें निश्चित होऊन ह्या फेरबदलाशी स्वतःची हुंडणावळ जुळती करण्याचें अनेक युरोपिअन राष्ट्रांनीं ठरविल्यानें हिंदुस्थानच्या ह्या संबंधांतील धोरणाचा फेरविचार होणें आवश्यक आहे असें असेंब्लीच्या सभासदांस वाटणें स्वाभाविक आहे. हिंदी चलन ब्रिटिश पौंडाशीं दर रुपयास १८ पेन्स ह्या दरानें बद्ध करून टाकण्यांत आलें आहे आणि त्यास स्वतंत्र हालचाल करण्याचें सामर्थ्य नाहीं. ब्रिटिश पौंड स्टर्लिंग हें आमच्या रुपयाचें अंतिम माप झालें आहे आणि हिंदी चलनाचें परराष्ट्रीय मोल पौंडाच्या किंमतीवर अवलंबून आहे. रुपयाचा १८ पेन्साचा दर योग्य नाहीं आणि तो उतरवला पाहिजे अशी मागणी कित्येक वर्षें लोकमत करीत आलें असतां सरकार त्या दरासच चिकटून राहिलें आहे. हिंदी चलनाचें परावलंबन दूर होण्यास सध्याची संधि अनुकूल आहे, ह्या बुद्धीनें लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत ह्या प्रश्नाचा तातडीनें विचार व्हावा म्हणून कामाच्या तहकुबीची सूचना लोकपक्षातर्फे मांडण्यांत आली, तिला सर जेम्स ग्रिग यांनीं सरकारच्या बाजूनें विरोध केला. तरीही अध्यक्षांनीं सूचनेची चर्चा होण्यास हरकत नाहीं असा निर्णय दिला. तथापि, सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें ही चर्चा हितकारक नाहीं, असें कारण सांगून गव्हर्नर जनरल ह्यांनीं आपल्या अधिकारांत तिला परवानगी नाकारली. हिंदी हुंडणावळीबाबत काय धोरण आखलें जावें ह्याचा विचार असेंब्लींत याप्रमाणें होऊं शकला नाहीं तरी सर जेम्स ग्रिग ह्यांनीं संक्षिप्त रीतीनें सरकारच्या म्हणण्याचें दिग्दर्शन केलेंच. चर्चा व्हावी किंवा नाहीं ह्या बाबीचाच निर्णय होण्यापूर्वी हुंडणावळीच्या दरांत फेरबदल होण्याच्या इष्टानिष्टतेविषयीं सर जेम्स ग्रिग ह्यांस भाषण करतां येत नाहीं असा मुद्दा लोकपक्षाच्या बाजूनें उपस्थित करण्यांत आला. परंतु मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन फडनवीसांनीं हिंदी हुंडणावळींत ढवळाढवळ करणें चुकीचें व अनिष्ट होईल हें सरकारचें मत सांगून टाकलेंच. मुख्य सूचनेच्या चर्चेस गव्हर्नर जनरल ह्यांनीं परवानगी देण्याचें नाकारल्यामुळें दुसरी बाजू लोकप्रतिनिधींस मात्र पुढें मांडतां आली नाहीं आणि हें सर्व प्रकरण एकतर्फी रीतीनें निकालांत निघालें.

---

### सहकारी ऑडिट फीची वसुली

१९३२-३३ सालीं ऑडिट फी वसूल होऊन सरकारांत जमा किती झाली व सुपरवायझिंग युनियन्सना त्यांतून ग्रँट किती देण्यांत आली, अशा अर्थाचा एक प्रश्न मुंबई कायदेमंडळांत विचारण्यांत आला होता, त्यास उत्तर देतांना शिक्षण-मंत्र्यांनीं विशिष्ट आकडे सादर केले. ह्यासंबंधांत अनेक जादा प्रश्नोत्तरें झालीं. तथापि, त्यांमध्यें मुख्य प्रश्नाचें रहस्य स्पष्ट झालें नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, १९३१ सालापर्यंत ५० हजारांपेक्षां ज्यास्त खेळत्या भांडवलाच्या सेंट्रल व अर्बन बँका आणि हौसिंग सोसायट्यांखेरीज बाकी सर्व सहकारी सोसायट्यांचें ऑडिट सरकार मोफत करीत असे. २९ डिसेंबर १९३० च्या सरकारी ठरावानें शेतीच्या सोसायट्यांवरहि ऑडिट फी बसविली गेली. ह्या फीच्या वसुलींतून सरकारी खजिन्यांत दरसाल २५ हजार रुपये घेण्यांत यावे व उरलेल्या रकमेचा विनियोग सरकारनें सुपरवायझिंग युनियन्सना सबसिडी देण्यासाठी करावा असें ठरावांत म्हटलें होतें. शिक्षण-मंत्र्यांनीं दिलेल्या आकड्यांवरून असें दिसतें, कीं सरकारनें आपल्या जाहीर केलेल्या धोरणाप्रमाणें सुपरवायझिंग युनियन्सना सबसिडी दिलेली आहे, तरीहि २५ हजारांपेक्षां बरीच मोठी रकम सहकारी चळवळींतून बाहेर जाऊन सरकारच्या खजिन्यांत दाखल झाली असली पाहिजे. शेती पतपेढ्याकडून घेतलेल्या फीचा विनियोग सर्वस्वी त्यांचे उपयोगाकरितां व्हावा आणि तिच्या जमेपैकीं पंचवीस हजार रुपयांपेक्षां अधिक रकम सरकारच्या सर्वसाधारण उत्पन्नांत समाविष्ट होऊं नये ही सहकारी कार्यकर्त्यांची मागणी वाजवी होती.

---

### ऑडिट फीचा विनियोग

सोसायट्यांचे हिशेब तपासण्यासाठी सरकारचा दरवर्षी खर्च होतो, त्यांतला कांहीं अंश शेती-पतपेढ्यांवर बसवल्या जाणाऱ्या ऑडिट पट्टींतून भागावा, म्हणजे सहकारी खात्यावरील सरकारी खर्चांत त्या मानानें बचत होईल. हा नवीन ऑडिट फीच्या जमेंतून २५ हजार रुपये काढून घेण्याविषयींच्या सरकारी ठरावाचा मुख्य हेतु होता. त्यास अनुसरून सदरहु रकम बाजूस काढली व ठरावाप्रमाणें सुपरवायझिंग संस्थांस ग्रॅन्टस दिल्या असतांहि नवीन ऑडिट फीच्या वसुलांतून शिलक किती राहिली आणि त्या पैशाचें काय झालें ह्याची माहिती कायदेमंडळापुढें येणें आवश्यक होतें. ही शिलक रकम सरकारच्या सर्वसाधारण उत्पन्नांत जमा केली न जातां बाजूस काढून ठेवण्यांत यावी आणि तिचा उपयोग सहकारी चळवळीप्रीत्यर्थ केला जावा अशी सूचना प्रांतिक इन्स्टिट्यूटनें सरकारास केली होती. परंतु तिच्याकडे विशेष लक्ष दिलें गेलें नाहीं व हिशेबाच्या अडचणीच्या मुद्यावर ती फेटाळली गेली असें दिसतें. गेलीं कांहीं वर्षें इन्स्टिट्यूटला सरकारनें बजेटांतील रकमेपेक्षां जादा ग्रँट दिली आहे, ती विचारांत घेतली असतांहि ऑडिट फीच्या जमेंत सालोसाल किती शिलक उरली व ती सर्वसाधारण सरकारी उत्पन्नांत गेली असल्यास ती रकम कसकशी "लॅप्स" झाली ह्याची माहिती प्रसिद्ध होणें जरूर आहे. शिलक ऑडिट फीचा स्वतंत्र फंड निर्माण करणें अशक्य होतें असें वाटत नाहीं. निदान गेल्या पांच वर्षांत ही रकम तरी किती झाली आणि तिचा विनियोग कोणत्या रीतीनें करण्यांत आला ह्याचा तपशील सहकारी जनतेस मिळण्यास हरकत असूं नये. जादा ऑडिट फीचा पैसा सहकारी संस्थांचा असून त्यावर सरकारनें हक्क सांगूं नये असें प्रो. काळे ह्यांनीं, मागील प्रांतिक सहकारी परिषदेंत, सर फ्रेडारिक साइक्स ह्यांचे आभार मानण्याच्या ठरावावर भाषण करतांना निक्षून सांगितलें होतें. त्यासंबंधांत सरकारनें काय धोरण ठेवलें आहे ह्याची माहिती लोकांस मिळणें आवश्यक आहे. परवांच्या कायदेमंडळांतील प्रश्नोत्तरांतून ती बाहेर येऊं शकली नाहीं तरी ती अन्य रीतीनें व अन्य प्रसंगीं प्रसिद्ध होणें अगत्याचें आहे, ह्यांत दुमत होण्याचें कारण नाहीं.

---

### कॉमनवेल्थ विमा कंपनी लि.

वरील कंपनीच्या कारभारास आतां सात वर्षें पूर्ण झालीं असून तिच्या प्रगतीची गति अखंड राहिली आहे. कंपनीची लोकप्रियता वाढत्या प्रमाणावर आहे व महाराष्ट्राबाहेरहि तिचा जम उत्तम तऱ्हेनें बसला आहे. मुंबई व दिल्ली येथें तिच्या शाखा स्थापन

झाल्या आहेत. सध्याच्या परिस्थितींत आपला पैसा सुरक्षितपणें परंतु किफायतशीर रीतीनें व्याजीं लावणें सर्वच कंपन्यांस बिकट झालें आहे, ह्यांत शंका नाहीं. घरांचे तारणावर रकमा देणें व सरकारनें गॅरंटी दिलेल्या रेल्वे कंपन्यांच्या भागांत पैसे गुंतविणें, ह्या मार्गांचा कॉमनवेल्थनें केलेला अवलंब विमेदारांच्या व भागीदारांच्या हिताचाच आहे. कंपनीचे सुमारें १३/४ लक्ष रुपये घरांच्या पहिल्या गहाणावर देण्यांत आलेले आहेत, १३/४ लक्ष रुपये दर्शनी किंमतीचे तिचे सरकारी रोखे आहेत व ५० हजार रुपये रेल्वे शेअर्समध्यें गुंतविण्यांत आले आहेत. कंपनीच्या कामांतील लॅप्सचें प्रमाण मागील वर्षाप्रमाणेंच कमी (२५%) राहिलें आहे. व्यवस्थेच्या खर्चाचें प्रमाण उतरत असून, लवकरच तें आणखी कमी होईल, अशी अपेक्षा आहे. कॉमनवेल्थ कंपनीनें अल्पावधींत मिळविलेली मान्यता व लोकप्रियता अभिनंदनीय आहे, ह्यांत संशय नाहीं.

### " दि बॉंबे को. क्वार्टर्ली "

वरील त्रैमासिकाचा सप्टेंबरचा अंक प्रसिद्ध झाला आहे. हंगेरी देशामधील शेतकऱ्यांच्या मध्यवर्ती सहकारी यूनियनची हकीकत पहिल्या लेखांत देण्यांत आली आहे. आर्बिट्रेशन व मुदतीचा कायदा, ग्रामसंघटनेचें स्वरूप व मर्यादा, मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीचें निरीक्षण, ब्रह्मदेशांतील सहकारी चळवळ, शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचा प्रश्न, इत्यादि विषयांवर वाचनीय लेख त्यामध्यें आले आहेत. अहमदनगर जिल्ह्यांतील सहकारी चळवळीची तपशीलवार संपूर्ण माहिती देणारा श्री. जी. के. प्रधान ह्यांचा लेख उद्बोधक आहे. त्यामध्यें लेखकानें नगर जिल्ह्यांतील चळवळीची आरंभापासून हकीकत दिली असून तेथील सोसायट्यांसंबंधीं व कार्यासंबंधीं खुलासेवार चर्चा केली आहे. क्वार्टर्लीचीं नेहमीचीं सदरेंहि वाचनीय आहेत. एकंदरीनें हा अंक विचार-प्रवर्तक असा झाला आहे.

### " दि इंडियन कोऑपरेटिव्ह रिव्ह्यू "

ऑल इंडिया कोऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट्स असोसिएशनच्या ह्या मुखपत्राचा जुलै महिन्याचा अंक प्रसिद्ध झाला आहे. निरनिराळ्या प्रांतांतील सहकारी चळवळींचा आढावा घेणारे लेख वरील ताज्या अंकांत आले आहेत. मालाचा उठाव करण्यासाठी सहकारी भांडवलाची योजना, सहकारामुळें होणारे आर्थिक व नैतिक फायदे, इत्यादि विषयाची चर्चा करणारे लेखहि त्यामध्यें आहेत. इतर ठिकाणीं प्रसिद्ध झालेल्या महत्त्वाच्या माहितीचे उतारे, अभिप्राय, इत्यादि सदरें नेहेमीप्रमाणें देण्यांत आलीं आहेत.

### टेलिफोनचा वापर वाढत चालला

मुंबई, कलकत्ता, कराची, मद्रास व रंगून येथील टेलिफोन कंपन्यांस दिलेल्या परवान्यांची मुदत १९६३ चे आधीं भरत नाहीं. तथापि १९४३ मध्यें सदरहु कंपन्यांची मालमत्ता स्वतःच्या मालकीची करण्याचा अधिकार सरकारनें राखून ठेवलेला आहे.

सिमला येथील ऑटोमॅटिक टेलिफोन एक्सचेंज हिंदुस्थानांतील सर्वांत पुरातन असून ब्रिटिश साम्राज्यांतहि त्याच्या इतके जुने एक्सचेंज फारसे आढळणार नाहींत.

कलकत्ता व असनसोल हीं शहरें टेलिफोननें प्रथम जोडलीं गेलीं. दिल्ली-सिमला व पुणें-मुंबई टेलिफोन नंतर आले.

## दूरदर्शनाची दिव्यदृष्टि (टेलिव्हिजन)

एका काळीं सर्वथा अशक्य वाटणाऱ्या गोष्टी आतां शक्य व प्रत्यक्ष अनुभवाच्या अशा होऊं लागल्या आहेत. तारांच्या मार्फतचा व बिनतारेचा संदेश, ग्रामोफोन, चित्रपट, विमानें, ह्यांचे चमत्कार नित्य परिचयाचे होऊन त्यांची मजल खेडेगांवांपर्यंतहि जाऊन पोहोंचली आहे. शेकडों, हजारों मैल दूरच्या अंतरावर गाणें किंवा भाषण चाललें असतां तें ध्वनिक्षेपक यंत्राच्या द्वारें घरांत किंवा बाजारांत कोणासहि ऐकूं येईल अशी सोय झाली आहे. आधुनिक भौतिक शास्त्रांच्या प्रगतीस मर्यादाच नाहीं असें वाटण्यास लावणारा प्रत्यक्ष अनुभवाचा पुरावा प्रत्यहीं नवा, नवा उपलब्ध होत आहे. काल आणि स्थळ ह्यांनीं अबाधित अशा रीतीनें दूरचे आवाज ऐकूं येणें शक्य झालें, त्याप्रमाणें कोठेंहि बसून दूरचें पहातां येण्याची शक्ति सामान्य माणसास येईल काय ह्याविषयीं आजवर कुतूहल व शंका वाटत होती. ह्याहि बाबतींत भौतिक शास्त्रांच्या प्रगतीचा वरदहस्त फलद्रूप झाल्याची संतोषदायक बातमी अलीकडे प्रसिद्ध झाली आहे. हजारों मैल दूर चाललेलें संगीत रेडिओवरून ऐकूं येतें, तसा बोलणाराचा व गाणाराचा आविर्भाव हाहि प्रत्यक्ष दिसण्याची व्यवस्था पद्धतशीरपणानें करतां येणें शक्य झालें आहे. दूरदर्शनाच्या दिव्यदृष्टीसंबंधाचे (टेलिव्हिजनचे) प्रयोग इंग्लंडमध्यें बरेच दिवस चालले होते. त्यांस यश येऊन सामान्य जनतेच्या आटोक्यांत हा नवा चमत्कार येणार आणि तो बहुसंख्य लोकांस अनुभवण्यास मिळणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. ब्रिटिश ब्रॉडकास्ट कंपनीनें नुकतांच लंडन शहराच्या उत्तर विभागांत टेलिव्हिजनचा प्रात्यक्षिक प्रयोग करून दाखविला. टेलिव्हिजनची सामुग्री जवळ असलेल्या लंडनच्या अनेक नागरिकांस वक्ते, नट, नर्तक व साहित्तिक ह्यांचे कार्यक्रम घरांत बसून ऐकावयास व पहावयास मिळाले. ह्या प्रयोगावरून रेडिओ व चित्रपट ह्यांचेप्रमाणें दूरदर्शनहि मामुली व नित्यपरिचयाचें होण्यास फारसा काळ लोटणार नाहीं अशी आशा उत्पन्न झाली आहे. हिंदुस्थानांत हा प्रकार केव्हां चालू होणार इकडे आतां लक्ष लागल्यावांचून रहाणार नाहीं.

### खादी व खेडेगांवी उद्योगधंदे ह्यांचें प्रदर्शन

(फैजपूर : ता. २५ ते ३१ डिसेंबर १९३६)

राष्ट्रसभेच्या ५० व्या अधिवेशनाचे वेळीं फैजपूर (पूर्व खानदेश) येथें खादीचें व खेडेगांवी उद्योगधंद्यांचे प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. तें पहाण्यासाठी खानदेश, वऱ्हाड, मध्यप्रांत, इत्यादि भागांतील खेड्यांपाड्यांतून अनेक लोक येतील. हें नवें गिऱ्हाइक साधण्यास वरील प्रदर्शनामुळें उत्कृष्ट संधि मिळणार आहे. प्रदर्शनाची मांडणी अगदी साधी केली जाईल व आजूबाजूच्या खेड्यांतील लोकांस सोइस्कर अशा वेळेस (दुपारीं १२ ते सायंकाळी ५पर्यंत) प्रदर्शन खुलें ठेवण्यांत येईल. शो-केसेस, पेट्रोमॅक्सचे दिवे, हात कंदील, इत्यादि आगाऊ कळविल्यास भाड्यानें मिळतील. स्टॉल्स सुशोभित करण्यासाठी फक्त खादीच वापरतां येईल. प्रत्येक स्टॉलला २० ते ५० रु. भाडें पडेल. माहितीपत्रक व व नियम ह्यांसाठी पोस्ट बॉक्स ४७२, मुंबई, अगर फैजपूर येथील पत्त्यावर लिहावें. १ नोव्हेंबर ही स्टॉल्स घेण्याची अखेरची तारीख आहे.

## बार्शी येथें कै. वा. भाऊसाहेब साने यांचें स्मारक

### प्रो. काळे यांचें भाषण

बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे उत्पादक, कै. वा. भाऊसाहेब साने यांचें स्मारक म्हणून त्या संस्थेचे इमारतीवर एक दिवाणखाना बांधण्यांत आला आहे आणि त्याचा उद्‌घाटन समारंभ ता. २७ सप्टेंबर रोजीं प्रो. काळे ह्यांचे हस्तें झाला. बँकेचे सभासद व गांवांतील प्रतिष्ठित गृहस्थ सभेस उपस्थित असून एकंदर समाज मोठा जमला होता. इलाख्यांतील अत्यंत जुन्या सहकारी संस्थांमध्यें बार्शीच्या बँकेची गणना होते. वर्षानुवर्ष तिची सारखी प्रगति होत आली आहे, ह्याचें मुख्य कारण, तिचे उत्पादक व चालक ह्यांनीं बँकेच्या व्यवहारांत लक्ष घालून तिची कार्यक्षमता कायम ठेवली आहे, हें होय. न्यायमूर्ती रानडे ह्यांचें राष्ट्रीय ध्येय व समाजोपयोगी कार्य ह्यांची छाप कै. वा. भाऊसाहेब साने ह्यांच्यावर पडली होती व त्यांचा पुण्याच्या 'ज्ञानप्रकाश'शीं अनेक वर्षे निकट संबंध होता, ही गोष्ट प्रो. काळे यांनीं आपल्या भाषणांत प्रामुख्यानें सांगितली. सहकारी चळवळ हिंदुस्थानांत सुरू होतांच तिचा उपयोग बहुजन समाजास करून देतां येईल ह्या बुद्धीनें भाऊसाहेबांनीं तिचा पुरस्कार हातीं घेतला. त्यांचीं भाषणें व लेख ज्यांनीं वाचले आहेत, त्यांस भाऊसाहेबांची नितांत निष्ठा व कळकळ यांची कल्पना सहज येण्यासारखी आहे. व्यापाराचें प्रमुख ठिकाण अशाविषयीं बार्शी शहराची ख्याती पिढ्यान् पिढ्या चालत आली आहे आणि भाऊसाहेबांनीं महाराष्ट्रभर सहकारी चळवळीचा प्रचार करून तिचे प्रमुख नेते म्हणून लोकादर संपादन केला, त्याचे योगानें त्या कीर्तीमध्यें भर पडली आहे. वरील आशयाची प्रस्तावना करून प्रो. काळे ह्यांनीं श्रद्धावान, स्वार्थत्यागी व मेहनती पुढाऱ्यांचें महत्व सहकारी चळवळीस किती आहे, ह्याचें विवेचन केलें. पाश्चात्य देशांमध्यें ध्येयवादी नेत्यांच्या सतत श्रमामुळेंच तेथील सहकारी संस्थांत जिवंतपणा टिकला आहे. त्याचें अनुकरण हिंदुस्थानांत होणें अगत्याचें असून त्या बाबतींत कै. वा. भाऊसाहेब ह्यांचा किता होतकरू कार्यकर्त्यांनीं गिरवला पाहिजे. भांडवलशाही ह्या नांवानें संबोधल्या जाणाऱ्या आर्थिक घटनेंतले दोष टाळून सामान्य स्थितींतल्या लोकांस आपली रहाणी व उद्योगधंदा सुधारण्यास सहाय करणें आणि वैयक्तिक नफेबाजीचें उच्चाटन करून परस्पर-सहाय व सेवा ह्यांचा परिपोष करणें हा सहकारी चळवळीचा हेतु आहे. ह्या ध्येयवादास व्यावहारिकपणाची जोड असावी लागते, आणि ती मिळेल तरच सहकारी संस्था यशस्वी होतात. शिक्षण व संघटन ह्यांचा कार्यक्रम सारखा चालू ठेवला म्हणजेच सहकाराचीं तत्वें जनतेच्या अंगीं बाणतात. हेंच काम कै. वा. भाऊसाहेबांनीं तत्परतेनें, चिकाटीनें व उत्साहानें केलें, आणि त्यांचें स्मारक बार्शी सेंट्रल बँकेच्या इमारतीवर दिवाणखाना चढवून करण्यांत आलें आहे, हें सर्वस्वी उचित आहे. त्यांच्या कामगिरीचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून बँकेचे चालक आजपर्यंत कारभार करीत आले. तसाच क्रम पुढें चालो आणि या संस्थेस उत्तरोत्तर अधिक यश लाभो अशी इच्छा शेवटीं प्रकट करून प्रो. काळे ह्यांनीं आपलें भाषण संपवलें.

## शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कसा कमी होईल ?

### मि. डार्लिंग ह्यांचा अभिप्राय : सहकारी चळवळीची उपयुक्तता

हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणासंबंधीं चौकशी करावी, अशा अर्थाची लोकपक्षाची सूचना ७४ विरुद्ध ४१ मतांनीं असेंब्लींत नुकतीच पास झाली आहे. प्रांतिक सरकारांकडे बोट दाखवून आपली जबाबदारी टाळण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार नाहीं, असें सर गिरिजाशंकर वाजपेयी ह्यांनीं सूचनेवरील चर्चेंत सांगितलें. प्रांतांनीं ह्या बाबत कायदे केले आहेत. त्यांचे परिणाम काय होतात हें पाहिलें पाहिजे, असेंहि ते म्हणाले. शेतकऱ्यांच्या उत्पन्नांत वाढ होणें हा त्यांच्या कर्जबाजारीपणावरील तोडगा आहे, व त्याकरितां शेतीच्या मालाच्या किंमतींत सुधारणा होणें जरूर आहे, असें मि. मॉर्गन म्हणाले. जमिनीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण, दुय्यम उद्योगधंद्यांची तरतूद, शेतीच्या जनावरांमध्यें सुधारणा, मालाचा उठाव योग्य रीतीनें होण्याच्या योजना, इत्यादि संबंधांतले प्रश्नहि त्याशीं निगडित आहेत व कर्जबाजारीपणांतून मुक्त होण्याची व कर्जे होऊं न देण्याची जरूरी शेतकऱ्यांस पटली पाहिजे असा त्यांच्या म्हणण्याचा आशय होता.

पंजाबमधील शेतीचा प्रत्यक्ष अनुभव असलेले व शेतीच्या धंद्यास सहाय करण्यासाठी रिझर्व्ह बँकेचा एक स्वतंत्र विभाग स्थापन करण्यासंबंधीं सल्ला देण्याकरितां हिंदुस्थानभर चौकशी करण्यासाठी सरकारनें नेमलेले, मि.एम.एल.डार्लिंग, ह्यांस 'तज्ज्ञ' ह्या नात्यानें असेंब्लीचे तात्पुरते सभासद नेमण्यांत आलें होतें.ते म्हणाले:"कर्जबाजारीपणाचें स्वरूप आतां सर्वांस परिचयाचें झालेलें आहे.उत्पन्नाचे मानानें शेतकऱ्यांचें कर्ज फाजील आहे.तथापि वीस इतर देशांतील परिस्थिति येथील स्थितीहून भिन्न नाहीं.सावकारांवर बंधनें घालणारे कायदे करून हा प्रश्न सोडवूं पहाणें योग्य नाहीं. तडजोडीनें कर्जाची रकम सर्वसाधारणपणें शेकडा चाळीस कमी होईल. तथापि, कर्जाचा प्रश्न सोडविण्यास सहकारी चळवळीसारखें दुसरें साधन नाहीं. एकट्या पंजाबांत २३ हजार सहकारी पतपेढ्या असून त्यांचें भांडवल १२ कोटि रुपये आहे. ह्या चळवळींतूनच आशेचा मार्ग आहे."

गृहमंत्रि, सर हेन्री क्रेक, हे म्हणाले, कीं प्रांतिक सरकारांनीं ह्या प्रश्नासंबंधांत तीस वेगवेगळे कायदे केलेले आहेत व त्यांचा परिणाम लक्षांत घेऊनच पुढें काय करणें आवश्यक आहे ह्याचा निर्णय करतां येईल.


**MARATHE & Co.**

**ENGINEERS & IRON FOUNDERS**

| WORKS : | Can undertake to do any sort of casting. | OFFICE : |
|---|---|---|
| Natu Bag, Bhikardas Road, POONA 2 | We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act. **Our prices are very competitive.** | 978-79, Sadashiv, POONA 2 |

## सहकारी चळवळ

### बेळगांव डि. सेंट्रल को. बँक लि., बेळगांव

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल: | २०३ | शिलक, रोख व बँकांत: | २३४ |
| गंगाजळी: | ७६½ | ठेवी: | ९४०½ |
| इतर फंड: | ६५½ | कर्जें: | ७४६½ |
| ठेवी: | १६६५½ | गुंतविलेल्या रकमा: | ९८½ |
| १९३५-३६चा नफा: | १७½ | हेड ऑफिस इमारत: | १९ |

साल अखेर बँकेचें खेळतें भांडवल २० लक्ष रुपये आहे, त्यांपैकीं ११ लक्ष रुपये प्रांतिक बँकेंत व इतर बँकांत ठेव म्हणून ठेवलेले आहेत. अहवालाचे वर्षी फक्त १½ लक्ष रुपयांचें कर्ज सोसायट्यांस दिलें गेलें. प्रचलित मंदी व बेळगांव जिल्ह्याच्या कित्येक भागांत पडलेला दुष्काळ, ह्याचा हा परिणाम आहे. सोसायट्यांकडून सुमारें ३ लक्षांची वसुली झाली व साळअखेर ६० हजार रुपये थकबाकी राहिली. गेल्या वर्षी हा आंकडा १ लक्ष ३४ हजार रुपये इतका होता. कर्जाच्या मुदती वाढवून देण्याचें धोरण स्वीकारणें कांहीं जिल्ह्यांत अपरिहार्य झालें आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्यें बँकेनें आपला व्यवहार वाढविण्यासाठी सभासदांस वैयक्तिक कर्जें देण्याकडे ज्यास्त लक्ष पुरविणें श्रेयस्कर होईल असें वाटतें. त्यामुळें बँकेचा पैसा गुंतविण्यास साधन उपलब्ध होऊन,इतर बँकांत मोठ्या ठेवी राखण्याचें कारण उरणार नाहीं. ह्या दृष्टीनें पहातां जुन्या कर्जफेडीकरतां जमीन गहाण बँकेच्या पद्धतीनें कर्जें देणें, सोन्याच्या तारणावरील कर्जाचा दर उतरविणें, इत्यादि मार्गांनीं बँकेचे व्यवहार वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत ही गोष्ट अभिनंदनीय आहे. सालअखेरच्या वाटण्याजोग्या नफ्यापैकीं भागीदारांस ५ टक्के दरानें डिव्हिडंड वाटण्यासाठी १०½ हजारांचा विनियोग होईल व २ हजार रुपये सोसायट्यांस रिबेट देण्यासाठी उपयोगांत आणले जातील.

---

### मुंबई प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बँक लि., मुंबई

वरील बँकेचें उद्घाटन मुंबईच्या गव्हर्नरांचे हस्तें ता. १५-१-३६ रोजीं झालें. ३० जून अखेर बँकेचें भरणा झालेलें भांडवल ३ लक्ष ६३ हजार रुपये होतें. अहवालाचे मुदतीमध्यें नऊ प्राथमिक बँकांकडून ४ लक्ष रुपये कर्जाचे २१० अर्ज आले. त्यांपैकीं २ लक्ष ९१ हजारांचे १७७ अर्ज मंजूर करण्यांत आले. पांच प्राथमिक बँकांस ३७ अर्जदारांसाठी ६५ हजार रुपये कर्जाऊ देण्यांत आले. बँकेच्या व्याजाचा दर ४½ टक्के आहे व प्राथमिक बँका ६ टक्के दरानें कर्जें देतात. ३० जून अखेर बँकेस ९,६३० रुपये तोटा आला, तो सुरवातीचा खर्च लक्षांत घेतां, अपरिहार्यच होता व सरकारच्या १० हजारांच्या ग्रँटमधून तो भागविला जाईल. सध्या बँक आपल्या भागांच्या भांडवलांतून कर्जें देत आहे, परंतु लवकरच डिबेंचर्सच्या रूपानें भांडवल उभारण्यांत येऊन कर्जाची मागणी पुरवितां येईल. लँड मॉर्गेज बँकांचा उपक्रम यशस्वी करण्याची जबाबदारी प्रांतिक बँकेवर असून ती बँकेकडून पार पडेल, अशी आशा आहे. सर लल्लुभाई सामळदास हे बँकेचे अध्यक्ष आहेत व श्री. बी. व्ही. मर्टेकर हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

---

### कै. वा. साने ह्यांच्या चित्राचें अनावरण

बार्शी येथील सोशल क्लबाचे, कै. वा. भाऊसाहेब साने हे एक संस्थापकांपैकीं होते. त्यांचें एक चित्र स्मारक म्हणून क्लबाचे दिवाणखान्यांत ठेवण्याचें सभासदांनीं ठरविलें होतें. त्या चित्राचा अनावरण समारंभ प्रो. काळे ह्यांच्या हस्तें ता. २८ सप्टेंबर रोजीं सकाळीं करण्यांत आला. वेळ सकाळची असूनहि समारंभास प्रमुख मंडळी हजर होती. सर्व पेशांच्या व धंद्यांतल्या लोकांस आणि सरकारी अधिकारी व बिनसरकारी नागरिक ह्यांस विचार-विनिमयाचें व करमणुकीचें सोशल क्लब हें एक सोयीचें साधन असतें. असली संस्था स्थापणें व चालवणें हें एक समाजहिताचें कार्यच समजलें पाहिजे, असे उद्गार प्रो. काळे ह्यांनीं काढले आणि कै. वा. भाऊसाहेब साने ह्यांच्या व्यापक व दूरदृष्टि सार्वजनिक धोरणाचें कौतुक केलें.

### नवी सहकारी सोसायटी

मुंबई येथें टॅक्सी ड्रायव्हर्स कोऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स सोसायटी स्थापन होण्याचें घाटत आहे. ह्या नियोजित सोसायटीचें भांडवल २५ हजार रुपये असावें असें ठरविण्यांत आलें आहे.

---

### दि बँक ऑफ बार्शी लि.

वरील बँकेचें वसूल भांडवल १२ हजार रुपये असून ठेवींची रकम ७३½ हजार रुपये आहे. बँकेनें सुमारें ७१ हजारांचीं कर्जें दिलेलीं आहेत. वर्षअखेर तिच्या व्यवहारांत १,३२५ रुपये नफा उरला, त्यांतून ५ टक्के दरानें डिव्हिडंड वांटण्याचें ठरलें. रिझर्व्ह फंडांत ५०० रुपये टाकण्यांत आले.

---

### बॉंबे कोऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटी लि.

३० जून अखेर संपलेल्या वर्षांत वरील सोसायटीनें १३,१९,०५० रुपये किंमतीच्या एकूण १,८९१ विमा पॉलिसी दिल्या व १,८३१ नवे सभासद करून घेतले. लाइफ अॅशुअरन्स फंड ७१½ हजारांचा १ लक्ष ३२ हजार इतका झाला. आतां सोसायटीजवळ १ लक्ष ७२ हजार रुपये दर्शनी किंमतीचे सरकारी रोखे आहेत.

---

### शेतीचीं उपकरणें पुरविणारी ( इंप्लिमेंट ) सहकारी सोसायटी, पाथर्डी

नगर जिल्ह्यांतील वरील सोसायटीच्या स्वतःच्या इमारतीचा उद्घाटन समारंभ ता. २७ सप्टेंबर रोजीं जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष, श्री. फिरोदिआ, ह्यांचे हस्तें झाला. ह्या सोसायटीचे संग्रहीं सुमारें २२५ नांगर इत्यादि उपकरणें असून तीं सभासदांस भाड्यानें देण्यांत येतात. १९३५-३६ अखेर सोसायटीस १,७०१ रुपये नफा झाला.

---

### सेक्रेटरीजच्या परीक्षा

( जळगांव येथील जिल्हा इन्स्टिट्यूटचें सर्क्युलर )

प्रवेश अर्ज व फी पाठविण्याची तारीख : २५-१०-३६

| को. सेक्रेटरीज परीक्षा | अर्बन बँक सेक्रेटरीज परीक्षा |
|---|---|
| ( फी: रु. ३ ) | ( फी: रु. ५ ) |
| ता. २२-११-३६ | २४-११-३६ |
| ते | ते |
| ता. २३-११-३६ | २६-११-३६ |

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें

( १ )

### साखरेच्या धंद्यांतील नफ्याचें प्रमाण

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. कंपनीची प्रत्यक्ष माहिती न घेतां वर्तमानपत्री पत्रव्यवहारानें व खासगी संभाषणांतून साखरेच्या धंद्यांत फायदा उरला नाहीं असा गैरसमज उत्पन्न करणारीं विधानें करणाऱ्या व्यक्ती आढळतात. त्यामुळें महाराष्ट्रांत साखरेच्या धंद्यांत नफ्याचें प्रमाण काय आहे तें येथें सविस्तर दिलें आहे.

महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांना, साखरेच्या धंद्याला १९३२ सालीं हिंदुस्थान सरकारनें दिलेल्या संरक्षणाचा जितका फायदा झाला, त्यापेक्षां अधिक व कायमचा फायदा जावा जातीच्या उंसाची लागवड महाराष्ट्रांत यशस्वी झाली त्यामुळें झालेला आहे. जमिनी चांगल्या असल्यास जावा जातीचा उंस दर एकरीं ६० टन येऊं शकतो व त्यांत साखरेचें प्रमाण ९ मण उसाला १ मण साखर असें असतें.

हल्लीं महाराष्ट्रांत जावा जातीच्या १० मण उंसाची एक मण साखर तयार होते व ऊंस चरकांत घातल्यापासून साखर तयार होऊन पोतें शिवीपर्यंत साखर तयार करण्याचा खर्च दरमणीं २ रु. येतो. साखरेचा कारखाना ६०० ते १,००० टनांचा असल्यास साखर तयार करण्याचा खर्च दरमणीं १ रु. ८ आ. पर्यंत असतो. कारखान्याला होणारा नफा उंसाच्या किंमतीवर व कणांवर अवलंबून असतो. ज्या कारखान्यानें दोन फूट पिंगट काळी माती व त्या खाली मुरूम अशा जमिनी मिळविल्या असतील त्या कारखान्याला कमी खर्चांत उंसाचें पीक चांगलें येतें व ऊंस स्वस्त व चांगला कणदार मिळतो. दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. कंपनीची स्थापना महाराष्ट्रांतील इतर कारखान्यांपेक्षां विलंबानें झाली. परंतु, पुढील तीस वर्षांच्या चढाओढींत कारखाना यशस्वी रहावा म्हणून वरील प्रकारची जमीन संचालक मंडळानें तीस वर्षांच्या मुदतीनें घेतली आहे व जमीन कारखान्यापासून दोन ते अडीच मैलांच्या टापूंत असल्यामुळें वहातुकीचा खर्च कमी झालेला आहे. हल्लीं कंपनीला १० रु. टन या भावानें ऊंस पडतो. म्हणजे, दरमणीं ६ आण्यांपेक्षां कमीच भाव पडतो. ज्या कारखानदारांनीं कारखाना लवकर उभा करावा म्हणून वरीलप्रमाणें निवड करून जमिनी घेतल्या नाहींत त्यांना जमिनी चांगल्या नसल्यामुळें व एका टापूंत नसल्यामुळें पिकाचा खर्च व वहातुकीचा खर्च जास्त येतो व ऊंस महाग पडतो.

**साखरेच्या एक मणाचा खर्च**

| | |
|---|---|
| १० मण ऊंस दरमणीं भाव ६ आणे | रु. ३–१२–० |
| एक मण साखर तयार करण्याचा खर्च | रु. २–०–० |
| एकूण | रु. ५–१२–० |
| साखरेवरील दरमणीं जकात | रु. ०–१५–५ |
| एकूण | रु. ६–११–५ |

हल्लीं जावा साखरेवर दर हंड्रेडवेटास ९ रु. १ आ. जकात आहे. म्हणजे दरमणीं ६ रु. १० आ. ६ पै जकात आहे.मुंबईस हल्लीं साखरेचे भाव खाली दिल्याप्रमाणें आहेत.

| | एक हंड्रेडवेट | एक बंगाली मण |
|---|---|---|
| रेडी जावा | १३ रु. ८ आ. | ९ रु. १४ आ. |
| केसर (संयुक्तप्रांत) | १३ रु. | ९ रु. ८ आ. ९ पै. |

नुकसान सोडून व टाऊन ड्यूटी सोडुन दरमणीं २रु.११आ. भावानें जावा साखर विकते असे रिपोर्ट आहेत. वरील भाव घेतला तरी जावा साखरेचा दरमणीं हिंदुस्थानांत भाव (२ रु. ११ आ. + ६ रु. १० आ. ६ पै साखरेवरील दरमणीं जकात) ९ रु. ५ आ. ६ पै होतो. पुणें, सोलापूर, पंढरपूर, मिरज, सांगली याठिकाणीं उत्तर हिंदुस्थानांतील साखर पाठविणेस दरमणीं १२ आ. रेल्वेभाडें पडतें. यामुळें पुणें, अहमदनगर व सोलापूर या जिल्ह्यांतील साखर-कारखान्यांना वरील ठिकाणीं दरमणीं ९ रु. प्रमाणें भाव मिळतो. म्हणजे ९ रु.–( ६ रु. ११ आ. ५ पै ) =२ रु. ४ आ. ७ पै इतका नफा दरमणीं राहतो. ४ आ. ७ पै वाहतुकीकरितां सोडून दिले तरी दर मणीं २ रु. नफा रहातो.

महाराष्ट्रांतील २५० टनांची फॅक्टरी दरवर्षी १,२६,००० मण साखर तयार करूं शकते व मणीं २ रु. प्रमाणें २,५२,००० रुपये नफा सदर फॅक्टरीला रहातो. वरील नफ्यांतून एक लक्ष दोन हजार रुपये मशिनरी, इमारती वगैरे वरील घसारा व प्राप्तीवरील कर वजा जातां दीड लक्ष रुपये नफा उरतो. २५० टनांच्या कारखान्याचें १५,००,००० रुपये भांडवल धरलें तर १० टक्के नफा राहातो. साखरेचा भाव आणखी कमी झाला तरी ५ टक्के नफा राहील हें वरील हिशेबावरून दिसून येईल.

---

## महाराष्ट्रांतील मोटार वाहतुकीच्या व्यापाऱ्यांस विनंति

### मराठा चेंबरचें पत्रक

रेल्वे व मोटारी यांमधील चुरशीमुळें रेल्वेचें उत्पन्न घटत चाललें आहे. या समजुतीनें ती चुरस कमी करण्याकरितां व मोटार वाहतुकीच्या धंद्यांतील अनिष्ट गोष्टींना आळा घालण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें १९१४ च्या इंडियन मोटार व्हिहिकल्स ॲक्टाची दुरुस्ती करण्याचें वहातुक सल्लागार मंडळाच्या शिफारसीनुसार ठरविलें. सदर दुरुस्तीचें बिल सिमला येथें सांप्रत चालू असलेल्या असेंब्लीच्या बैठकींत मांडण्यांत येऊन सदर बिलावर मत अजमाऊन पहावें असें ठरलें. महाराष्ट्रामध्यें मोटार वाहतुकीचा धंदा बऱ्याच मोठ्या प्रमाणावर चालू आहे. नवीन बिलामुळें या वाहतुकीवर हरएक प्रकारचीं बंधनें घातलीं जावयाचीं असल्यामुळें पुणें येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सनें या प्रश्नाबाबत मोटार वाहतुकीच्या व्यापाऱ्यांचीं मतें अजमावून बिलामुळें कसकशा अडचणी उत्पन्न होतील हें योग्य अधिकाऱ्यांपुढें मांडण्याचें ठरविलें आहे व त्याकरितां एक उपमंडळ नेमलें आहे. सदर मंडळ मोटार वाहतुकीच्या व्यापाऱ्यांच्या शक्य तितक्या गांठी-भेटी घेऊन अडचणी जातीनें समजावून घेणार आहे. महाराष्ट्रांतील ठिकठिकाणच्या मोटार वाहतुकीच्या व्यापाऱ्यांनीं नवीन बिलामुळें घातल्या जावयाच्या बंधनांचा विचार करावा व आपलीं मतें मराठा चेंबर ऑफ कॉमर्स यांजकडे अगत्यपूर्वक कळवावीं, अशी चेंबरनें जाहीर विनंति केली आहे.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% (१९४०-४३) ... ... | १११–११ |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—३ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८–१५ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | ११९–१० |
| ४% १९६०–७० ... ... | ११५—८ |
| ४% १९४३ ... ... ... | १११–१२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९९–११ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०७–१० |
| ३¾% १९४८–५२ ... ... | १०१—३ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १११–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १११—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १११—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | ११०—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११२–१२ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२५—० |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३३—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११२—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३३—१० |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५५७—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३९–१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९९—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. ९¾% ) | ९१६—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५५—५ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २४८–१२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २५५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ६½% ) | १५४८–१२ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १५९७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. पं. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २०१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. डुं. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७१—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८६—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७२४—६ |

## कॉमनवेल्थ विमा कंपनीची प्रगति

[ कॉमनवेल्थ विमा कंपनीची सातवी वार्षिक सभा ता. ४ आक्टोबर रोजीं भरली होती, त्यावेळीं कंपनीच्या गेल्या वर्षांत झालेल्या कामाचा आढावा घेण्यांत आला. कॉमनवेल्थ कंपनीच्या प्रगतीसंबंधीं माहिती खालीं दिली आहे. ]

( १ ) ३० एप्रिल १९३६ रोजीं संपणाऱ्या वर्षांत कंपनीकडे ३३ लक्ष, १५ हजार रुपयांचे विमा अर्ज आले, त्यांपैकीं २८ लक्ष १६ हजारांचे अर्ज मंजूर झाले.

( २ ) कंपनीचें एकूण उत्पन्न ४ लक्ष २४ हजार रुपयें इतकें झालें. सर्व खर्चाची तरतूद होऊन लाइफ अॅशुअरन्स फंडांत सुमारें दोन लाखांची भर पडली व त्या फंडाची रकम ५ लक्ष, ३६ हजार रुपये झाली.

( ३ ) व्यवस्थेच्या खर्चाचें हप्त्यांच्या एकूण उत्पन्नाशीं प्रमाण ४४·०१% म्हणजे गेल्या सालापेक्षां २·५९% कमी पडलें.

( ४ ) ३८३ हजारांचे क्लेम्स दाखल झाले, त्यांतील १४ हजार रुपये देण्यांत आले आहेत. सुमारें १५ हजारांचे क्लेम साल अखेर आलेले आहेत.


जे. जी. दातार

जिलब्या मारुतीजवळ, घ. नं. ८७२, पुणें २

सर्व तऱ्हेच्या समारंभाकरितां हार, गोटे, इत्यादि माल सुबक स्वस्त व वक्तशीर तयार करून मिळेल.


## PUBLIC WORKS DEPARTMENT.

Sealed tenders on B–2 form will be received by the Undersigned in his office at Thana upto 2 P. M. ( S. T. ) on Monday the 19th October 1936 for widening the asphalt macadam width of miles 6/4 to 9/7 of the Bandra Ghodbunder Road estimated to cost Rs. 38,000/– and will be opened there on the same day.

2/–Blank forms with specifications can be had on payment of Rs. 3/–on any working day during office hours except the day on which tenders are to be received.

3/– Each tender should be accompanied by chalan of Rs. 1,140/– as earnest money paid into any Government Treasury or the Reserve Bank of India without which no tender will be considered and the balance of security deposit of Rs. 1,140/– will be deducted at 10% from bills.

4/– The Executive Engineer, Thana Division does not bind himself to accept any or the lowest tender and no reason for the acceptance or rejection of any tender will be given.

THANA,
1st October
1936.

Sd/- B. K. Bose,
Executive Engineer,
Thana Division.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १५ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १६ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १७ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १८ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | १९ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २० शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २१ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २२ साक्री ( „ „ ) |
| ९ अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २३ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० शेवगांव ( „ „ ) | २४ मालेगांव ( „ नाशिक ) |
| ११ कोपरगांव ( „ „ ) | २५ सटाणा ( „ „ ) |
| १२ भिवंडी ( „ ठाणें ) | २६ कळवण ( „ „ ) |
| १३ पालघर ( „ „ ) | २७ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १४ कल्याण ( „ „ ) | २८ कालोल ( „ „ ) |

**खेळतें भांडवल रु. २००००००चे वर**

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा:—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# वेस्टर्न इंडिया

## लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी—सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

| | | |
|---|---|---|
| बोनस त्रैवार्षिक दरहजारीं | हयातींतील | रु. ६० |
| | हयातीनंतरचें | रु. ७५ |

१९३५ मधील नवें काम ५१,२०,०४२ रु.

एकूण चालू काम २,७०,००,००० रु. अधिक

एकूण जिंदगी ७१,७१,०९२ रु.

लाइफ फंड ६०,४२,८७३ रु.

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

| | |
|---|---|
| 41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City. |

# दि बॉंबे लाइफ अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड.

( स्थापना १९०८ )

प्रगति

कंपनीची **लोकप्रियता** सिद्ध करते

कमाल प्रगति : पुरें केलेलें नवीन काम मिळविलें तें

| | | |
|---|---|---|
| १९२५ | : | रु. २२,१८,५०० |
| १९२७ | : | रु. ३८,७७,००० |
| १९२९ | : | रु. ५१,२२,५०० |
| १९३१ | : | रु. ५८,६६,५०० |
| १९३३ | : | रु. ९४,१६,५०० |
| **१९३५** | **:** | **रु. १,२३,२८,०००** |

माफक हप्ते, भरपूर बोनस, क्लेम्सची तात्काळ भरपाई, व पॉलिसींतील सवलतीच्या अटी हें " बॉंबे लाइफ पॉलिसीं " चें वैशिष्ट्य आहे.

एजन्सी व पॉलिसी ह्यासंबंधींच्या तपशिलासाठीं लिहा:—
मॅनेजर,
बॉंबे लाइफ बिल्डिंग, ४५।४७, चर्चगेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.



" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.



**न. वि. वडनेरकर**

जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व झुबक वस्तु मिळतील.



FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.



शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**

च्या लोकप्रिय प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख १४ ऑक्टोबर, १९३६. अंक ४२

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

## ह्युम सेप्टिक टँक

वापरल्यानें
आरोग्य व स्वच्छता ठेवली जाते.
नादुरुस्त होण्याची भीति नाहीं.
कित्येक वर्षें लोक वापरून सुखी आहेत.
संडासाचें पाणी घाण वास न येतां बाहेर येतें
व
तें भाजी उगवण्यास उपयोगांत आणतां येते.

## ह्युम पाईप

( सिमेंट कांक्रीटच्या )
फार मजबुत व टिकाऊ असतात.
महाराष्ट्रांतील कारखानेः—
मुंबई, पुणें, सोलापूर, मिरज, द. हैद्राबाद.

दि इंडियन ह्युम पाईप कं., लि.
बॅलर्ड इस्टेट, मुंबई.

## आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

पत्ता : डेक्कन जिमखाना, पुणें ४

यांचीं शास्त्रोक्त, खात्रीलायक व गुणकारी औषधें

| | |
|---|---|
| च्यवनप्राश पौष्टिक व शक्तिवर्धक | २० तो. १ रु. |
| वज्रदंती दंतमंजन | बा. किं. ४ आणे |
| केशवर्धन तेल | १० तो. १५ आणे |
| एरंडपाक मलावरोध घालविणारा | १० तो. ६ आणे |
| हेमगर्भ मात्रा सर्व वात कफरोगहर | मात्रा ५ रु. |
| सुवर्णराजवंगेश्वर धातुवर्धक | १ तो. ५ रु. |
| वाळा सरबत उन्हाळ्यांत थंड पेय | १ पौं. १२ आणे |
| त्रिभुवनकीर्ति सर्व ज्वरांवर | १ तो. १२ आणे |

याशिवाय प्रवाळ, मौक्तिक इ. भस्में, सर्व तऱ्हेचीं आसवें, अरिष्टें, मात्रा, गुटिका, अवलेह वगैरे मागवून एकवार अनुभव घ्या. कॅटलॉग मागवा.

ठिकठिकाणीं एजन्सी देणें आहेत. एजन्सी घेऊं इच्छिणारांनीं नियम मागवावे.

## दि डॉन ऑफ इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें.

पुणें व सोलापूर येथें
बिल्डिंग इन्व्हेस्टमेंट आणि बँकिंग डिपार्टमेंटची
कंपनीचे बँकर्सनीं पसंत केलेली

ता. १ आक्टोबरपासून सुरू ] नवीन योजना [ ता. १ आक्टोबरपासून सुरू


मुदतीच्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची
फायदेशीर अपूर्व सोय.

बँकेच्या उतरत्या व्याजाच्या काळांत लोकांस आपले कौटुंबिक निर्वाहास साधन अगर मदत म्हणून ठेवींवर मासिक, नियमित व किफायतशीर व्याज देण्याची व्यवस्था तारीख १ आक्टोबर १९३६ पासून अमलांत आणली आहे.

गरजूंनीं जास्त माहिती मागवावी अगर समक्ष भेटावें.

पुणें, ता. २२-९-३६ | जनरल मॅनेजर.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं !! आवाज नाहीं !!!

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः—ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः—

१ केळकर ब्रदर्स, बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी, लक्ष्मीरोड.

## विविध माहिती

### फोर्डच्या दहा लक्ष मोटारगाड्या

" व्ही एट १९३६ " नमुन्याच्या फोर्ड मोटारगाड्यांचें उत्पादन दहा लक्षांच्या वर गेलें आहे.

### मद्रास इलाख्यांत मोटारींची आयात

मोटारगाड्यांची आयात मद्रास इलाख्यांत सारखी वाढत आहे. १९३४-३५ सालीं १,७५८ गाड्यांची आयात झाली होती, ती १९३५-३६ मध्यें वाढून १,८०९ गाड्या गेल्या वर्षीत मद्रास इलाख्यांत आल्या. ह्यांमध्यें ब्रिटिश गाड्यांचा विशेष भरणा आहे.

### महायुद्धांत हिंदुस्थाननें सोसलेली झीज

गेल्या महायुद्धाप्रीत्यर्थ हिंदुस्थान सरकारच्या तिजोरींतून सुमारें १५० कोटि रुपये खर्च होऊन ग्रेटब्रिटनला त्या रकमेचें सहाय मिळालें. हिंदी फौजा रणांगणावर गेल्या, त्यांचा मामुली खर्च सुमारें ४५ कोटि रुपये झाला तो ह्याशिवाय हिंदुस्थानास सोसावा लागला. युद्धाबाबतच्या पेन्शनांचा खर्च दरवर्षी १ कोटि, १५ लक्ष रुपये आहे तो हळूहळू कमी होत आहे. महायुद्धांत ६२ हजार हिंदी सैनिक कामास आले व ६७ हजार जखमी झाले.

### कंपनी बिलाच्या चर्चेस १८ दिवस लागले

लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत कंपनी बिलाची चर्चा १८ दिवस चालली होती. मतें मोजण्याचे एकूण ११ प्रसंग आले आणि त्यांपैकीं ८ वेळां सरकारपक्षाची सरशी झाली.

### ऑस्ट्रियाचें चलन व हुंडणावळ

ऑस्ट्रियानें आपल्या चलनाचें सुवर्णमान निश्चित केलें आहे.

### शास्त्रीय संशोधनाप्रीत्यर्थ अकरा लाखांची देणगी

सुप्रसिद्ध हिंदी शास्त्रीय संशोधक, सर प्रफुल्लचंद्र रॉय, ह्यांनीं स्थापन केलेल्या बेंगाल केमिकल वर्क्सपासून त्यांस नफा म्हणून एकूण ११ लक्ष रुपये मिळावयाचे आहेत. ही रकम त्यांनीं कंपनीकडून अद्याप घेतलेली नाहीं. ती आतां काढून घेऊन तिचा विनियोग शास्त्रीय संशोधनासाठीं देणगी देण्याकडे करावयाचें सर प्रफुल्लचंद्रांनीं ठरविलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

### अमेरिकन डॉलर

अमेरिकन डॉलरचें सुवर्णमूल्य जरूर पडल्यास कमी करण्याचा अधिकार आपणांस कायदेमंडळानें दिला आहे, त्याचा आपण प्रसंग पडल्यास उपयोग करूं, असें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं बोलून दाखविलें आहे.

### यु. टी. सी. प्रीत्यर्थ सरकारचा खर्च

विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांस लष्करी शिक्षण देण्याप्रीत्यर्थ हिंदुस्थान सरकार दरसाल ६½ लक्ष रुपये खर्च करतें.

### त्सेक हुंडणावळीचा दर उतरला

त्सेकोस्लोव्हेकियाच्या सरकारनें आपल्या राष्ट्रीय चलनाची किंमत १० ते १६ टक्केपर्यंत कमी करण्याचें ठरविलें आहे.

### तंबाखू ओढण्याचा अनुकूल परिणाम

तंबाखू ओढण्याचा शारीरिक व मानसिक स्थितीवर अनुकूल परिणाम होतो असा अभिप्राय डॉक्टरांनीं व्यक्त केल्यामुळें त्यांच्या सल्ल्यास अनुसरून ग्रेटब्रिटनमधील तुरुंगांत कैद्यांस तलफ भागवण्याची संधी देण्याचें घाटत आहे.

### रोखे बाजारांत नाकारलेली परवानगी

अमलगमेटेड इलेक्ट्रिक सिटी कंपनी ( बेळगांव ) लि. ह्या मंडळीच्या भावांचे व्यवहार मुंबईच्या रोखे बाजारांत होण्यास जरूर असलेली परवानगी बाजाराच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनीं नाकारली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

### कराची पोर्ट ट्रस्ट कर्जाची परतफेड

१९०६ सालीं उभारलेल्या सहा लाखांच्या कराची पोर्ट ट्रस्ट डिबेंचर्सची परतफेड १ जानेवारी १९३७ रोजीं केली जाईल.

### मेसर्स एस. बी. जोशी ह्यांस ड्रेनेजचें काम

मुंबई उत्तर भागांतील ( दादर ते माहीम ) ड्रेनेजच्या मुख्य लाइनचें २ लक्ष, ६८ हजार रुपयांचें काम, मेसर्स एस. बी. जोशी आणि कंपनी, इंजिनिअर्स अँड काँट्रॅक्टर्स, ह्यांस द्यावें असा ठराव ४, ऑक्टोबरला मुंबई कॉर्पोरेशननें केला असल्याचें समजतें.

### हिंदुस्थान : ब्रिटिश कापडाचें मोठें गिऱ्हाईक

ग्रेट ब्रिटनमधून निर्गत होणाऱ्या कपास कापडापैकीं चौथा हिस्सा माल १९३५ सालीं हिंदुस्थानांत उतरला. १९१३ सालीं हेंच प्रमाण ४३ टक्के इतकें होतें. अजूनहि हिंदुस्थान हें ग्रेटब्रिटनचें कापडाचें सर्वांत मोठें गिऱ्हाईक आहे. १९३५ सालीं ग्रेट ब्रिटनमधून हिंदुस्थानांत ५० कोटि वार कापडाची आयात झाली.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. ३ ऑक्टोबर रोजीं पुरा झालेला आठवडा | २५,१७,७४४ |
| ता. १० ऑक्टोबर रोजीं पुरा झालेला आठवडा | १,१७,६७,९११ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते १० ऑक्टोबर १९३६ अखेर, | २,८४,११,५९,१४९ |

## अनुक्रमणिका

पृष्ठ
१ विविध माहिती ... ५०२
२ हुंडणावळ आणि हिंदुस्थान सरकार ... ५०३
३ स्वदेशी साखर आणि जाव्हाची हुंडणावळ ५०४
४ संतति-नियमनाचे दुष्परिणाम भोंवणार! ... ५०४
५ स्फुट विचार ... ५०५
पौंडाच्या गाड्याबरोबर रुपयाच्या नळ्याला यात्रा—काठेवाडी बंदराची स्पर्धा थांबणार—प्रांतिक सहकारी बँकेची ज्युबिली—दि गुडविल अॅशुरन्स कं. लि.—कंपनी बिलाचें कायद्यांत रूपांतर झालें—हिंदी कोळशाचें जतन
६ औंध स्टेट सेंट्रल बँक लि., औंध ... ५०६
७ प्रांतिक सहकारी बँकेचें अभिनंदन ... ... ५०६
८ सहकारी चळवळ ... ५०७
९ फ्रँक, पौंड डॉलर, लिरा ५०९
१० दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें ५१०
११ शेतकऱ्यांच्या उन्नतीकरितां प्रांतिक बँकेचे प्रयत्न ... ... ५११
१२ विलायती चष्म्यांतून दिसणारी मुंबई ५११
१३ निवडक बाजारभाव ५१२
१४ असेंब्लींत कंपनी बिलावर चर्चा ... ... ५१३

अर्थ

बुधवार, ता. १४ ऑक्टोबर, १९३६

# हुंडणावळ आणि हिंदुस्थान सरकार

जगांतील बहुतेक राष्ट्रांनीं स्वतःच्या व्यापारास व उद्योगधंद्यांस अनुकूल व साजेसा होईल असा हुंडणावळीचा दर निश्चित करून चलन-व्यवस्थेस परिस्थितीस अनुसरून योग्य वळण आतां लावलें आहे. हिंदुस्थान सरकारनें मात्र ह्या बाबतींत कांहीं करावयाचें नाहीं असें ठरवलें असून लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत तत्संबंधांतल्या प्रश्नास उत्तर देतांना सर जेम्स ग्रिग ह्यांनीं सदरहु निश्चय असंदिग्धपणानें जाहीर केला आहे; आणि त्यासंबंधांत सभातहकुबीची चर्चा होऊन सरकारपक्षास जय मिळाल्यानें त्यावर नकाराचा स्पष्ट शिक्का आतां बसला आहे. हिंदी हुंडणावळीच्या प्रश्नाविषयीं हिंदुस्थान सरकारच्या गेल्या पन्नास वर्षांतल्या धोरणास धरूनच ही घोषणा व निकाल आहे, ह्यांत कांहीं शंका नाहीं. हिंदी चलन पद्धतीच्या इतिहासाची परंपरा माजी फडनवीस चालू ठेवीत आहेत, एवढेंच त्यावरून सिद्ध होत आहे. हिंदुस्थानांत नवीन राज्यघटना प्रस्थापित होणार व लोकशाहीच्या नवीन मनूस प्रारंभ होणार असा एका बाजूस पुकारा करण्यांत येत आहे आणि दुसऱ्या बाजूस सेक्रेटरी ऑफ स्टेट म्हणजे ब्रिटिश पार्लमेंट हिंदी आर्थिक धोरणावरची आपली पकड शिथिल करण्यास तयार नाहीं, अशी ही परिस्थिति आहे. असल्या प्रश्नांच्या बाबतींत खुद्द हिंदुस्थान सरकारासच विचार व आचार ह्यांचें स्वातंत्र्य नाहीं, तेथें हिंदी लोकमतास कोण विचारतो? १८९३ सालीं सरकारी टाकसाळींत चांदीचे रुपये पाडून घेण्याचा जनतेचा हक्क काढून घेण्यांत आला आणि १८९९ मध्यें सुवर्ण-मूल्यमापनपद्धति सुरू करण्यांत आली. पुढच्या दहा वर्षांत सरकारनें ही व्यवस्था टाकून दिली आणि ऐन जिनसी सोन्याच्या ऐवजी परराष्ट्रीय हुंड्या हाच हिंदी चलनाचा आधार असल्यानें आंतरराष्ट्रीय देण्या-घेण्याचें काम भागतें ह्या सबबीवर नवी व लंगडी चलनपद्धति अमलांत आणली. महायुद्धकालांत ही व्यवस्था कोलमडून पडली असतां ती न बदलतां सरकारनें हुंडणावळीचा दर तेवढा १६ पेन्सांच्या ऐवजी २४ पेन्स केला. ह्या दरास उचलून धरणें अशक्य आहे असें सरकारास लवकरच आढळून आलें; तथापि त्या घोडचुकीचें प्रायश्चित्त मात्र हिंदुस्थानास कोट्यवधि रुपयांचें नुकसान सोसून भोगावें लागलें. पुढें, हिल्टन यंग कमिशनच्या शिफारसींवरून हुंडणावळ रुपयास १८ पेन्स ह्या दरानें निश्चित करण्यांत आली आणि सुवर्ण-परिमाण पुन्हां प्रस्थापित झाल्याचें जाहीर करण्यांत आलें. १९१९ मध्यें सर दादीबा दलाल व १९२७ मध्यें सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास, ह्यांनीं हुंडणावळीच्या सरकारी धोरणाविरुद्ध असलेलें हिंदी लोकमत मुद्देसूद रीतीनें पुढें मांडलें, परंतु त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. हिंदुस्थानच्या विशिष्ट आर्थिक स्थितींत १८ पेन्सांचा हुंडणावळीचा दर शेतीस व उद्योगधंद्यांस अनुकूल नाहीं आणि तो १६ पेन्स करावा ह्याबद्दल झालेली जोराची चळवळ निष्फळ ठरून जनतेची मागणी अमान्य करण्यांत आली. सारांश, हिंदी लोकमत आणि हिंदुस्थान सरकार ह्यांस धाब्यावर बसवून ब्रिटिश मंत्रिमंडळानें चलन-हुंडणावळीच्या संबंधांत आपणा स्वतःस योग्य वाटत असलेलें धोरण ह्या देशावर लादण्याचा क्रम चालू ठेवला आहे.

सप्टेंबर, १९३१ मध्यें खुद्द ग्रेटब्रिटननें आपलें सुवर्णचलन सोडून दिलें व हुंडणावळीचा दर म्हणजे पौंडाची परराष्ट्रीय चलनांतली किंमत हवेंत हेलकावे खात सोडून दिली. त्या वेळच्या हिंदी हुंडणावळीचा इतिहास मनोरंजक आहे, व त्याचें स्मरण करून देणें जरूर आहे. ब्रिटिश सरकारनें पौंडाचा सुवर्णाचा आधार काढून घेतला ह्याविषयींची बातमी हिंदुस्थान सरकारास अधिकारी रीतीनें सेक्रेटरी ऑफ स्टेटकडून कळावयास पाहिजे होती ती तशी वेळेवर कळली नाहीं आणि त्यासंबंधांत ह्या देशांत काय करावें ह्याचा खुलासा झाला नाहीं. हिंदी चलनास ब्रिटिश पौंडाचा आधार न घेतां सोन्याचा आधार घ्यावा आणि हिंदी हुंडणावळ स्वतंत्र रहावी ही हिल्टन यंग कमिशनची शिफारस १९२७ मध्यें मान्य केली गेली असल्यानें हिंदुस्थान सरकारनें बाहेरून मिळालेल्या बातमीच्या आधारावर ग्रेटब्रिटनचें अनुकरण करण्याचें तातडीनें ठरवून त्याप्रमाणें एक वटहुकूमहि प्रसिद्ध केला. त्याच दिवशीं संध्याकाळीं दुसऱ्या गोलमेज परिषदेच्या फेडरल स्ट्रक्चर सब कमिटीच्या सभेंत, हिंदी हुंडणावळ सोन्याच्या आधारावरून निसटली तरी तिला ब्रिटिश पौंडास डांबून टाकलें असल्याचें सेक्रेटरी ऑफ स्टेट ह्यांनीं जाहीर केलें. हिंदुस्थान सरकारची घोषणा व ब्रिटिश प्रधानमंडळाचा निर्णय ह्यांमध्यें विरोध उत्पन्न झाला असतां येथील सरकारास नमतें घेतलें पाहिजे हें उघडच आहे. त्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारनें आपला पूर्वींचा जाहीरनामा माघारी घेतला आणि हिंदी चलन १८ पेन्स ह्या दरानें सोन्याच्या ऐवजीं अस्थिर झालेल्या ब्रिटिश पौंडास जोडलें असल्याचें प्रसिद्ध केलें. सोन्याच्या बाजारभावाबरोबर पौंडाच्या हुंडणावळीनें हेलकावे खाल्ले तरी हिंदी रुपयांची हुंडणावळ मात्र वरखालीं जाण्यास मोकळी असतां कामा नये आणि तिला पौंडाशी बांधून टाकलें पाहिजे हें विचित्र धोरण येथील सरकारास मुकाट्यानें मान्य करावें लागलें आहे.

हिंदी आर्थिक प्रश्न सोडवण्याची व हिंदी जनतेस हितावह काय होईल हें ठरवण्याची जबाबदारी इंग्लंडनें आपल्या शिरावर घेतली आहे आणि नवीन राज्यघटनेंत ह्या आर्थिक बंधनाचा समावेश केलेला आहे. ही गोष्ट लक्ष्यांत ठेवली म्हणजे हिंदी हुंडणावळीच्या प्रश्नाची चर्चा व्हावी म्हणून तहकुबीची सूचना लेजिस्लेटिव्ह-

असेंब्लीमध्यें आली असतां तिला व्हाइसरॉयांनीं नकार दिला व शेवटीं चर्चा झालीच तेव्हां लोकप्रतिनिधींचें मत हाणून पाडण्याची सरकारपक्षानें शिकस्त केली. ह्यांतलें इंगित तेव्हांच समजण्यासारखें आहे. हिंदुस्थान सरकार व हिंदी कायदेमंडळ ह्यांस आर्थिक स्वातंत्र्य नसल्यानें चलन व हुंडणावळ ह्यांचे संबंधांत इतर राष्ट्रांनीं परिस्थितीस अनुसरून योजना अमलांत आणल्या आहेत, तसें ह्या देशांत होणें अशक्य आहे, हें उघड आहे. आम्हीं जें, जें कांहीं ठरवतों तें, तें तुमच्या हिताचें आहे असें समजून विशेष चर्चा करण्याची तसदी घेऊं नका असें आम्हांस सेक्रेटरी ऑफ स्टेट व हिंदी फडनवीस सांगणार आणि तें ऐकून घेऊन हिंदी जनतेनें गप्प बसावें अशी अपेक्षा करणार हें पूर्वापार चालत आलेल्या पद्धतीस धरून क्रमप्राप्तच आहे. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, स्वित्झर्लंड, इटली इत्यादि राष्ट्रांनीं चलन व्यवस्थेच्या बाबतींत कांहींहि केलें असलें तरी हिंदुस्थानची हुंडणावळ पौंडाला चिकटून राहिली पाहिजे व तिच्या दराविषयींची चर्चाहि होतां कामा नये ही ब्रिटिश सरकारची कल्पना ह्या देशांत लोकांस पटणें शक्य नाहीं. सद्यःपरिस्थिति लक्ष्यांत घेऊन सरकारनें हिंदी हुंडणावळीचा दर इतर राष्ट्रांप्रमाणें बदलावा या ठरावास गव्हर्नर-जनरल ह्यांनीं हरकत न घेतल्यानें त्याची चर्चा असेंब्लींत गेल्या आठवड्यांत होऊं शकली. सरकार व विरुद्धपक्ष ह्यांनीं सदरहु ठरावावर सारखीं मतें पडून केवळ अध्यक्षांच्या (परंपरागत नियमास अनुसरून वाव्या लागलेल्या) जादा मतानें ठराव नामंजूर झाला व सरकारचें धोरण विजयी झालें हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

## स्वदेशी साखर व जाव्हाची हुंडणावळ

हॉलंडच्या सरकारानें आपल्या चलनाची (गिल्डरची) किंमत म्हणजे हुंडणावळीचा दर, फ्रान्सचें अनुकरण करून, उतरवल्यास जाव्हामधून हिंदुस्थानांत ज्यास्त साखरेची आयात होण्याचा संभव आहे काय असा प्रश्न लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें सरकारास विचारण्यांत आला होता आणि त्यास हिंदी फडनवीसांनीं "नाहीं" असें उत्तर दिलें. जाव्हा ही हॉलंडची वसाहत असून तेथील मोठ्या प्रमाणावर चाललेल्या साखरेच्या कारखान्यांची स्पर्धा हिंदुस्थानास भोवते आणि ती लक्ष्यांत घेऊनच हिंदी साखरेच्या धंद्यास जरूरी इतकें जकातीचें संरक्षण देण्यांत आलेलें आहे. हॉलंडचें चलन तेंच जाव्हाचें चलन आहे आणि हॉलंडच्या (डच) हुंडणावळीच्या दरांत बदल झाला असतां जाव्हाच्याहि हुंडणावळींत तितकाच बदल होणार हें स्पष्ट आहे. डच गिल्डर स्वस्त करण्यांत येईल तर जाव्हा साखरेस हिंदुस्थानासारख्या बाजारपेठांत किंमत येईल तिचें, बदललेल्या हुंडणावळीच्या दरानें, ज्यास्त चलन जाव्हाच्या कारखानदारांच्या पदरांत पडेल आणि ह्या देशांत संरक्षक जकात बसवलेली असतांनाहि आपला माल इकडे पाठवणें त्यांस परवडेल. अनुकूल हुंडणावळीमुळें जाव्हाच्या कारखानदारांच्या हातांत विशिष्ट वजनाच्या मालाची अधिक रकम येणें म्हणजे त्या साखरेवर हिंदुस्थानांत घेतली जाणारी जकात कमी होणें व देशी साखरेस स्पर्धेची बाधा पोहोचणें होय. बदलत्या डच हुंडणावळीचा असा अनिष्ट परिणाम होण्याचा संभव आहे कीं काय व तो असल्यास त्याच्या प्रतिकाराची कोणती योजना हिंदुस्थान सरकारनें निश्चित केली आहे, ह्याची माहिती काढण्याच्या हेतूनें मि. रॅम्से स्कॉट ह्या युरोपिअन सभासदांनीं सर जेम्स ग्रिग ह्यांस वर निर्दिष्ट केलेला प्रश्न विचारला होता. गिल्डरची किंमत उतरेल त्या मानानें जाव्हा साखरेची विक्रीची किंमत चढवण्याचें ठरलें असल्याविषयींची माहिती अधिकारीरीतीनें आपणांस मिळाली आहे आणि त्यावरून जाव्हा साखरेची हिंदुस्थानांतली आयात वाढण्याची भीति नाहीं असा फडनवीसांनीं आपल्या उत्तरांत खुलासा केला आहे. जाव्हाच्या कारखानदारांनीं साखरेच्या विक्रीची आपली स्थानिक किंमत वाढवण्याच्या निश्चयावर आमच्या सरकारनें अवलंबून न रहातां हुंडणावळीच्या दरांत हॉलंड ज्या मानानें फरक करील त्या मानानें जाव्हा साखरेवरची हिंदी जकात वाढवणें हा अगदीं सरळ व योग्य मार्ग आहे. स्वदेशी साखरेस देण्यांत आलेलें संरक्षण अभंग व अभेद्य रहाण्यांतच त्याचें रहस्य व महत्त्व आहे. ह्या दृष्टीनें पहातां, हिंदुस्थान सरकारनें जागरूक राहून डच हुंडणावळीच्या दराच्या भावानें साखरेवरील येथील जकात चढवली पाहिजे. परदेशी कारखानदारांच्या बाजारभावांविषयींच्या योजनांवर आमच्या सरकारनें विसंबून चालणें सुरक्षिततेचें नाहीं. स्वदेशी साखरेच्या कारखानदारांनीं हा प्रश्न वेळींच धसास लावणें अगत्याचें आहे. इतर राष्ट्रांच्या हुंडणावळविषयक धोरणाचा परिणाम आपल्या देशी उद्योगधंद्यांवर कसा तात्काळ होतो, ह्याचें प्रस्तुत प्रकरण हें नमुनेदार उदाहरण आहे.

## संतति-नियमनाचे दुष्परिणाम भोंवणार ?

कृत्रिम उपायांनीं संतति-नियमन केल्यानें पाश्चात्य देशांमध्यें लोकसंख्या मर्यादित झाली असतां सामान्य जनतेस अधिक सुखाची प्राप्ति होत असल्याची कल्पना बरीच पसरली होती. लोकसंख्या सारखी वाढत गेल्यानें प्रत्येकास मिळणारा संपत्तीच्या मिळकतीचा हिस्सा वाढत जाण्याच्या ऐवजीं कमी होत जाणार, म्हणून प्रजेची वाढ मर्यादित होण्याचें महत्त्व प्रतिपादलें जाऊन संतति-नियमनाचे कृत्रिम उपाय सर्रास अमलांत आले. ह्या विषयाबाबतच्या विचारांचा लंबक पाश्चात्य राष्ट्रांमध्यें आतां दुसऱ्या टोकास जाऊन श्वेतवर्णीय लोकांच्या संख्येंत घट होत आहे, तिच्या योगानें भीतिप्रद अवस्था उत्पन्न झाल्याची जाणीव विचारी लोकांच्या मनांस त्रास देऊं लागली आहे. ह्यापुढें पाश्चात्य राष्ट्रांत एका पिढीच्या मागून तेवढीच मोठी पिढी निर्माण होणें अशक्य आहे आणि प्रत्येक पिढी जणूं काय खची होत जाणार, हें कार्ल सॉंडर्ससारख्या विद्वानांनीं पुराव्यानिशी सिद्ध करून दाखविलें आहे. आजच्या पिढीच्या मानानें उद्यांची पिढी तीन–चतुर्थांश होणार आणि असाच क्रम पुढें चालून वंशनाश होण्याची भीति असल्याचें त्यांनीं विद्वत्ताप्रचुरपणें प्रतिपादन केलें आहे. ही आपत्ति टाळावयाची असेल तर श्वेतवर्णीय लोकांच्या आचार-विचारांत क्रांति झाली पाहिजे; कारण, आज पाश्चात्य जनतेमध्यें "संतति नको" ह्या कल्पनेचा विलक्षण पगडा बसला आहे. हिंदुस्थान व चीन ह्या देशांत लोकसंख्या सारखी वाढत आहे तिचें काय होणार ? ह्या प्रश्नाचें उत्तर देणें कठिण आहे. तथापि, पाश्चात्य देशांत संततिनियमनाचे काय कटु अनुभव आले आहेत ह्यांचा विचार होऊन त्यांपासून आमच्या इकडे योग्य बोध घेतला जाणें मात्र अगत्याचें आहे. संतति-नियमनाच्या प्रघातानें जनन मर्यादित होऊं लागलें असतां घट थांबवणें व लोकसंख्या कायम ठेवणें कठिण होतें ही गोष्ट पाश्चात्य राष्ट्रांच्या लोकसंख्येच्या इतिहासावरून स्पष्ट झाली आहे. तेव्हां त्या घसरणीस लागण्यापूर्वी प्रजावृद्धिविषयक प्रश्न अन्य रीतीनें सोडवण्याचा विचार अवश्य झाला पाहिजे.

# स्फुट विचार

### पौंडाच्या गाड्याबरोबर रुपयाच्या नळयाला यात्रा

आकुंचित स्वार्थैक दृष्टी व अनिष्ट अहमहमिका ह्यांचे योगानें आंतरराष्ट्रीय हुंडणावळीच्या व्यवस्थेचा प्रश्न सुटणें कठिण होऊन गेलें असतां फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांनीं पुढाकार घेऊन तो सोडवण्याच्या मार्गावर आणून ठेवला आहे; अशा स्थितींत हिंदुस्थाननें आपल्या स्वतःच्या हुंडणावळीचा दर बदलण्याची भाषा बोलून वरील सहकार्यास विघ्न उत्पन्न करावें हें सर्वांच्याच हितास बाधक आहे, ह्या आशयाचा कोटिक्रम लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत सर जेम्स ग्रिग व त्यांस पाठिंबा देणारे सर कावसजी जहांगीर ह्यांनीं केला. ही विचारसरणी किती भ्रामक आहे, हें लक्षांत येणें आवश्यक आहे. आपल्या हुंडणावळीचे दर विशिष्ट प्रमाणांत स्थिर करण्याच्या प्रयत्नांत अमेरिका, फ्रान्स व इंग्लंड हीं राष्ट्रें गुंतली आहेत, त्याच वेळीं हिंदुस्थाननेंहि आपली हुंडणावळ त्यांच्याशी जुळती करून घ्यावी असें असेंब्लीच्या सभासदांनीं सुचविलें तर त्यांत बिघडलें कोठें व उपरिनिर्दिष्ट राष्ट्रांस अडचण कशी उत्पन्न झाली ? आपला हुंडणावळीचा दर काय असावा हें प्रत्येक राष्ट्रानें स्वतःची एकंदर आर्थिक परिस्थिति विचारांत घेऊन ठरवावयाचें असतें. इतर राष्ट्रांनीं स्वतःपुरती ही गोष्ट केली आहे व तीं त्यासंबंधांत निश्चित योजना अमलांत आणीत आहेत. त्यांचेप्रमाणेंच हिंदुस्थान सरकारानें स्वतंत्र रीतीनें विचार व निर्णय करणें अगत्याचें असतां ह्या प्रश्नाची चर्चा आंतरराष्ट्रीय व्यवस्थेस विघातक होईल हा युक्तिवाद पुढें यावा हेंच आश्चर्यकारक आहे. फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या चर्चेत भाग घेऊन हिंदुस्थाननें त्यांस सहाय करणें आणि आपली हुंडणावळ त्यांच्याशी जुळवून घेणें हें आमच्या सरकारचें कर्तव्य आहे. हुंडणावळीचा दर कोणता असावा ह्यासंबंधानें मतभेद होऊं शकेल; पण त्या प्रश्नाचा आम्हीं विचार सुद्धां करणार नाहीं, एवढेंच नव्हे तर चर्चा करण्याची केवळ कल्पनाहि अनिष्ट व त्याज्य आहे असें जबाबदार लोकांनीं ठासून सांगावें, ह्याचा अर्थ, आम्हांस स्वतंत्र विचाराची बुद्धि व शक्ती नाहीं असाच होतो. ब्रिटिश पौंडाच्या पोटांत रुपया येतो आणि त्याच्या हालचालीबरोबर हिंदी चलनाची हालचाल आपोआप होईल, ही व्यवस्था हिंदुस्थानच्या हिताची असल्यानें येथील सरकार व जनता ह्यांनीं ग्रेटब्रिटनच्या धोरणावर अवलंबून रहावें व स्वतःच्या डोक्यास व्यर्थ शीण देऊं नये हें सर जेम्स ग्रिग ह्यांच्या असेंब्लींतल्या भाषणाचें सार आहे. आर्थिक प्रश्नांच्या बाबतींत हिंदी मध्यवर्ती कायदेमंडळास कांहींच सत्ता नाहीं ह्याचा आणखी दुसरा कोणता पुरावा पाहिजे ?

---

### काठेवाडी बंदरांची स्पर्धा थांबणार

मुंबई बंदराशी काठेवाडांतील बंदरें अनिष्ट स्पर्धा करीत आहेत व त्यामुळें मुंबईचा व्यापार घटत आहे, अशी तक्रार आज कांहीं वर्षें चालू आहे. ह्या प्रश्नाशी केवळ ब्रिटिश मुलखांतील जनतेचाच नव्हे तर खुद्द हिंदुस्थान सरकारचाहि संबंध आलेला आहे. एका बंदराचा व्यापार दुसऱ्या बंदरांकडे गेला इतकीच मात्र ही बाब नाहीं. काठेवाडी संस्थानांतील बंदरांत बिगर जकात किंवा कमी जकातीनें माल उतरून तो संस्थानांमधून ब्रिटिश हद्दींत येतो व त्यामुळें हिंदुस्थान सरकारची जकात बुडते, ह्या कारणानें त्या सरकारास सदरहु बंदरांच्या स्पर्धेकडे लक्ष पुरवणं भाग पडलें. मुंबई शहराच्या व्यापारी महत्त्वाच्या दृष्टीनेंहि ह्या प्रश्नाकडे पहाणें जरूर होतें. ह्या बाबत सरकारनें जुनागड, नवानगर, पोरबंदर मोर्वी व बडोदें ह्या संस्थानांशी केलेल्या करारांसंबंधीं ता. ६ ऑक्टोबर रोजीं फडनविसांनीं असेंब्लीमध्यें माहिती दिली. ह्या करारांअन्वयें, संस्थानांच्या बंदरांत उतरणाऱ्या मालावर ब्रिटिश हिंदुस्थानाच्या जकातीच्या दरानें आकारणी केली जाईल व त्यापैकीं कांहीं किमान रकम संस्थानांस देण्यांत येईल. भावनगर संस्थानांतील बंदर हे मुंबईचें प्रमुख प्रतिस्पर्धी आहे, तथापि भावनगर संस्थानाशी अद्याप करार पुरा झालेला नाहीं. आपल्या तहनाम्याच्या आधारावर तें संस्थान विशिष्ट हक्क मागत असून ह्या संबंधांत हिंदुस्थान सरकार वाटाघाट करीत आहे. अशा रीतीनें बंदरांच्या व्यापाराचें नियंत्रण करण्यांत येत असून जकात चुकविणारांवर बंधन घातलें गेलें आहे. त्यामुळें काठेवाडांतून खरोखरच माल उतरविणें सोईचें असल्याखेरीज तेथील बंदरांचा उपयोग केला जाणार नाहीं व प्रत्येक बंदरास व्यापाराचा रास्त हिस्सा मिळेल.

---

### प्रांतिक सहकारी बँकेची ज्युबिली

मुंबई प्रांतिक सहकारी बँक ता. ११ ऑक्टोबर १९११ रोजीं रजिस्टर करण्यांत आली व तिला गेल्या रविवारीं २५ वर्षे पूर्ण झालीं. बँकेचा रौप्यमहोत्सव यंदा थाटानें साजरा व्हावयाचा होता. परंतु बँकेच्या क्षेत्रांतील अवर्षणामुळें व दुष्काळामुळें तो तहकूब करण्यांत आला. तथापि, बँकेच्या शाखांचे ठिकाणीं ता. ११ रोजीं सभा भरविण्यांत येऊन तो दिवस पाळण्यांत आला. १९०६ सालीं खेडेगांवांतील सोसायट्यांस भांडवल पुरविणारी अर्बन बँक म्हणून स्थापन झालेल्या ह्या संस्थेचें १९११ सालीं सेंट्रल बँकेंत रूपांतर झालें व १९२३ पासून ती मुंबई प्रांतिक मध्यवर्ती बँक ह्या नांवानें ओळखली जाऊं लागली. तिच्या आतां सुमारें ३० शाखा असून खेळतें भांडवल अर्धा कोटीवर आहे. जेथें मध्यवर्ती जिल्हा बँका नाहींत अशा ठिकाणीं सहकारी सोसायट्यांना पैसा पुरविणें हें ह्या संस्थेचें मुख्य काम असून जिल्हा बँकांसहि ती वेळ पडल्यास कर्जें देते. सहकारी पतपेढ्यांची ती इलाख्याची मध्यवर्ती संस्था आहे. शेतकऱ्यांसाठी इतक्या दीर्घकाल बँकेनें बजावलेली कामगिरी अभिनंदनीय आहे. इलाखा बँक ह्या नात्यानें तिनें अखिल हिंदुस्थानांत महत्त्वाचें स्थान प्राप्त करून घेतलें आहे. ह्याचें श्रेय बहुतांशीं तिचे अध्यक्ष व चालक ह्यांस दिलें पाहिजे. बँकेची प्रगति ह्यापुढेंहि जोमानें सारखी होत राहो असें आम्हीं इच्छितों.

---

### दि गुडविल अॅशुअरन्स कंपनी, लि.

वरील कंपनीची स्टॅट्युटरी सभा गेल्या महिन्यांत कुपवाड येथें भरली होती, त्यावेळीं भागीदारांस कंपनीनें केलेल्या कामाचा परिचय करून देण्यांत आला. कंपनीनें ४१३ भाग मंजूर केले असून त्याबाबत एकूण २९,५७५ रुपये जमा झाले आहेत. प्राथमिक खर्चासाठी केलेल्या ८,००० रुपयांच्या अंदाजापैकीं २,६०१ रुपये खर्ची पडले आहेत. कंपनीनें २५ हजारांचे सरकारी रोखे कंट्रोलर ऑफ करन्सीकडे डिपॉझिट ठेवले असून विमे स्वीकारण्यास सुरवात केली आहे. कंपनीची जुळवाजुळव, भांडवलाची तयारी, डिपॉझिटची तरतूद, इत्यादि बाबतींत व्यवस्थापकांनीं केलेलें कार्य समाधानकारक आहे. गुडविल कंपनीची विम्याचें कामांतहि प्रगति शीघ्रगतीनें होईल, अशी अपेक्षा करण्यास जागा आहे.

### कंपनी बिलाचें कायद्यांत रूपांतर झालें

हिंदी कंपनी-कायद्यामध्यें दुरुस्ती होणें आवश्यक आहे, अशी आज कित्येक वर्षांची मागणी होती, ती आतां नव्या कंपनी कायद्यानें पुरी झाली आहे. सुमारें तीन आठवडे सारखी चर्चा चालून वाद्विवादाच्या भट्टींतून बाहेर आलेलें हें बिल सरकारचे कायदामंत्री, सर नृपेंद्र सरकार, ह्यांच्या अविश्रांत मेहनतीचें आणि समयोचित व मार्मिक विचारसरणीचें तसेंच श्री. सुशील सेन ह्यांनीं केलेल्या पूर्वतयारीचेंच फळ आहे, असें म्हटलें पाहिजे. कंपन्यांत पैसे गुंतविणाऱ्या जनतेचें हितसंरक्षण व्हावें, परंतु त्यामुळें व्यवस्थापकांच्या कर्तबगारीचें क्षेत्र मात्र आकुंचित होऊं नये; व्यवस्थापक मंडळाच्या अधिकारावर भागीदारांचें नियंत्रण असावें, मंडळाचे हिशेब चोख रहावेत व वैयक्तिक स्वार्थसाधनास आळा बसावा, इत्यादि हेतु कायद्याचे मुळाशी आहेत. मॅनेजिंग एजंटांबाबत ह्यासंबंधांतली तक्रार यापुढें रहाणार नाहीं, निदान तिची तीव्रता कमी होईल, अशी अपेक्षा आहे. मॅनेजिंग एजंटांच्या अधिकाराचा प्रश्न हा बिलांतील सर्वांत महत्त्वाचा विषय होता. नव्या कायद्यानें एजंटांचे अधिकार मर्यादित केले असून भागीदारांस कंपन्यांच्या व्यवहारांत ज्यास्त लक्ष घालतां येणें शक्य होणार आहे. उद्योगधंद्यांची वाढ न खुंटता त्यांची योग्य मार्गानें वाढ व्हावी व प्रत्येकास त्याच्या हक्काप्रमाणें कंपन्यांच्या व्यवस्थेमध्यें अंशभागी होतां यावें अशी तरतूद कंपनी कायद्यानें केली आहे. विमा कंपन्यांबाबतच्या कायदा-दुरुस्तीचें भिजत पडलेलें प्रकरणहि असेंच लवकर निकालांत निघेल, अशी आशा आहे.

---

### हिंदी कोळशाचें जतन

हिंदुस्थानांत कोळशाचा पुरवठा मुबलक असला, तरी चांगल्या दर्जाचा कोळसा कमी आहे आणि त्याबाबत जरूर ती दक्षता बाळगण्यांत आली नाहीं, तर कालांतरानें कोळशाच्या अभावीं लोखंड-पोलादाच्या कारखान्यांसहि जळणाची अडचण भासेल, असा अभिप्राय हिंदुस्थान सरकारचे डायरेक्टर ऑफ दि जिऑलॉजिकल सर्व्हे ह्यांनीं गेल्या वर्षी व्यक्त केला होता. कोळशाच्या खाणींचे मालक थोड्या वेळांत ज्यास्त नफा काढण्याच्या उद्योगांत असतात; कोळशाचा पुरवठा सतत कायम कसा टिकेल ह्या व्यापक प्रश्नाकडे त्यांचें लक्ष नसतें व त्या कारणानें उत्पादनाचे वेळीं ते कोळसा वाया घालवतात, अशा स्वरूपाची तक्रार खाणीवाल्यांसंबंधीं आज कित्येक वर्षे करण्यांत येत आहे. हिंदी कोळशाचा धंदा अनियंत्रित व स्पर्धेनें गांजलेला असा असून परस्पर सहकार्याच्या अभावामुळें तो उर्जितावस्थेस येणें ज्यास्तच कठिण झालें आहे. हिंदी खाणींमधील कोळशाचा अपव्यय थांबवून, त्याच्या सांठ्याचें जतन कसें करतां येईल, ह्यासंबंधीं उपाय सुचविण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें पांच जणांची एक चौकशी कमिटी नेमली आहे. मि. बरोज (बरद्वान) हे तिचे अध्यक्ष असून श्री. वालचंद हिराचंद हे एक सभासद आहेत.

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २

## औंध स्टेट सेंट्रल बँक लि., औंध

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल: | १,११¼ | शिलक, रोख व बँकांत: | १७२ |
| फंड्स: | १५½ | स्टेट बँकेकडून वर्ग होऊन अलेले भाग, लिमिटेड बँकेनें गुंतविलेल्या कॅश सर्टिफिकिटांची व लोन्स आणि डिबेंचर्सची किंमत: | ११६ |
| औंध संस्थानच्या ठेवी: | २,३३½ | कर्जें, संस्थानच्या हमीचीं: | ४५५ |
| इतर ठेवी : | ५९९ | „ लि. बँकेनें दिलेलीं: | २६३ |
| ओव्हरड्राफ्ट: | २३½ | | |
| १९३५–३६ चा नफा: | १४½ | | |

सन १९३२ सालीं वरील लिमिटेड बँक स्थापन झाली व तिनें पूर्वीच्या स्टेट बँकेचा व्यवहार आपणांकडे घेतला. त्यावेळच्या बँकेच्या येण्यापैकीं ४½ लक्ष रुपये अजून राहिले आहेत. त्यांतील कांहीं कर्जास तारण अपुरें आहे. तथापि, तीं कर्जें स्टेट बँकेनें दिलेलीं व संस्थानाची हमी असलेलीं असल्यानें बुडीत रकमांबद्दल बँकेस तोशीस लागणार नाहीं. लिमिटेड बँकेचे २०९ व्यक्ती व ६९ सोसायट्या मिळून २७८ भागीदार आहेत. बँकेकडील ठेवी वाढत असून दिलेल्या कर्जांतहि प्रगति आढळून येते. सरकारी रोख्यांची ताळेबंदांत दाखविलेली किंमत बाजारभावापेक्षां कमी आहे आडपाडी, कुंडल, गुणदाळ व बिचूद येथें बँकेच्या शाखा असून त्यांतील पहिल्या तीन नफ्यांत आहेत. बिचूद शाखा येत्या सालापासून नफा दाखवील, अशी अपेक्षा आहे. जानेवारी, १९३६ पासून बँकेकडे संस्थानच्या तिजोरीचें काम सोंपविण्यांत आलें आहे व त्याबाबत बँकेनें संस्थानास चालू खर्चासाठी एक लाखापर्यंत ओव्हरड्राफ्ट देण्याचा आहे. संस्थानांतील सहकारी सोसायट्यांचें ऑडिट बँकेकडेच असून त्याबद्दल संस्थान ५०० रुपयांची ग्रँट देतें. अशा रीतीनें औंध सेंट्रल बँक ही औंध संस्थानाची खरोखरच मध्यवर्ती बँक झाली आहे व त्यामुळें संस्थानांतील सहकारी संस्थांची वाढ होऊन बँकिंगची सवय सर्वत्र फैलावेल, अशा आशेस जागा आहे. बँकेचा कारभार प्रगतिपर धोरणानें चालू आहे व त्याबद्दल तिचे व्यवस्थापक प्रशंसेस पात्र आहेत.

---

## प्रांतिक सहकारी बँकेचें अभिनंदन

### प्रो. काळे ह्यांचा संदेश

प्रांतिक सहकारी बँकेच्या ज्युबिलीनिमित्त गेल्या रविवारीं मुंबईच्या मुख्य कचेरींत भरलेल्या सभेस प्रो. काळे ह्यांनीं खालील आशयाचा संदेश पाठविला होता:—

" मला आजच्या सभेस नाइलाजानें हजर राहतां येत नाहीं, तथापि तिला हा संदेश पाठविणें मी आपलें कर्तव्य समजतों. हिंदुस्थानांतील सहकारी मध्यवर्ती बँकांमध्यें मुंबई प्रांतिक बँकेनें महत्त्वाचें स्थान प्राप्त करून घेतलें आहे, याचें श्रेय ह्या संस्थेचे चालक व व्यवस्थापक ह्यांचें ध्येयवादित्व व कार्यक्षमता ह्यांस आहे. प्रांताची मुख्य बँक ह्या नात्यानें आपणांवर येणारी जबाबदारी नीट ओळखून ह्या बँकेनें आपलें धोरण उदारपणाचें व सहानुभूतीचें असें राखिलें आहे. ह्याचा उपयोग इलाख्यांतल्या सर्व सहकारी संस्थांस झाला आहे व सतत होत आहे. बँकेची उत्तरोत्तर प्रगति होत जावो अशी माझी इच्छा ह्या प्रसंगीं मी प्रकट करीत आहें. "

# सहकारी चळवळ

## मुंबई प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बँक लि.

### वांई येथें नवी शाखा उघडण्याचा समारंभ

ता. ५।१०।३६ रोजीं मुंबई प्रॉव्हिन्शिअल को. बँकेची ३० वी शाखा वांई येथें उघडण्याचा समारंभ सातारा जिल्हा स्कूल बोर्डाचे चेअरमन, श्री. जी. आर. कुलकर्णी, बी. ए., एलएल. बी., यांचे हस्तें साजरा करण्यांत आला. सदर उद्घाटन समारंभासाठी बँकेचे मॅनेजर श्री. रमणिकराय मेहता हे मुद्दाम मुंबईहून आले होते. गांवांतील इतर प्रतिष्ठित सद्गृहस्थ व सोसायट्यांचे प्रतिनिधी मिळून सुमारें २०० चे वर लोक समारंभास हजर होते. प्रारंभीं बँकेचे सीनियर इन्स्पेक्टर श्री. गायतोंडे यांनीं जमलेल्या सर्व मंडळींचें स्वागत करून गेल्या आठ वर्षांत वांई तालुक्यांतील सहकारी चळवळीचें पाऊल कसें पुढें पडत गेलें याचा त्रोटक इतिहास निवेदन करून सन १९२७ सालीं तालुक्यांत अवघ्या ५ सहकारी पतपेढ्या होत्या, त्यांची संख्या आतां ३१ वर जाऊन त्यांचे खेळतें भांडवल सध्यां एक लक्ष रुपयांचे वर गेलें आहे, याचें सर्व श्रेय तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन व सुपरवायझिंग युनियन ह्यांचे चालक यांना आहे असें सांगितलें व वाढलेल्या सहकारी पतपेढ्यांची गरज भागविण्याकरितां व तालुक्यांत सहकारी सोसायट्या स्थापन करण्यास पुष्कळ वाव असल्यामुळें सहकारी चळवळीच्या प्रगतीस चालना देण्याकरतां बँकेची शाखा असणें किती जरूर आहे ह्यांचें वर्णन केलें व त्या हेतूनेंच बँकेनेंहि शाखा उघडली आहे असें सांगितलें. इतर शाखांना जशी एक एक शाखा कमेटी नेमून दिलेली आहे त्याचप्रमाणें वाई शाखेसहि सोसाट्यांनीं निवडून दिलेल्या सभासदांची एक प्रातिनिधिक स्वरूपाची शाखा-कमेटी नेमली जाईल व शाखा-कमेटी ही सोसायट्या व बँक यांना सांधणारें, त्यांचे संबंध दृढतर करणारें व सोसायट्यांच्या अडी-अडचणी निवारण करणारें मंडळ असल्यामुळें इतर ठिकाणीं जसें तिनें उपयुक्त कार्य केलें आहे, तसेंच वाई तालुक्याकरतांहि नवीन नेमून दिल्या जाणाऱ्या कमेटीकडून कार्य केलें जाईल असा विश्वास व्यक्त केला. त्याचप्रमाणें नवीन शाखा काढण्याची जबाबदारी जशी येथील सहकारी पुढाऱ्यांवर आहे तसेंच तिचें कामकाज प्रगतिपर करण्यास मदत करणें याचीहि जबाबदारी त्यांच्यावरच पडते असें सांगून बँक व सोसायट्या यांचे संबंध अधिकाधिक आपुलकीच्या स्वरूपाचे होत जातील व बँकेच्या कार्यांत तिला नागरिक व कार्यकर्ते यांचा पाठिंबा मिळेल अशी आशा व्यक्त केली.

नंतर बँकेचे मॅनेजर, श्री. रमणिकराय मेहता, यांनीं अध्यक्षांना शाखा उघडल्याचें जाहीर करण्याची विनंती करतांना सहकारी बँकिंग व भांडवलशाही बँकिंग यांत किती महदंतर आहे हें विशद करून भांडवलशाही बँकिंगप्रमाणें नुसता फायदा मिळविणें हाच हेतु नसून शक्य तितक्या कमी व्याजाचे दरानें शेती व इतर धंदे यांस भांडवल पुरवणें व जनतेची खरी सेवा करणें हेंच सहकारी बँकिंगचें ध्येय आहे व त्या दृष्टीनेंच सर्व इलाखाभर बँकेच्या शाखा उघडण्याचा उपक्रम आहे, असें त्यांनीं सांगितलें.

शेवटीं शाखा उघडल्याचें जाहीर करतांना अध्यक्ष श्री. जी. आर. कुलकर्णी यांनीं प्रॉव्हिन्शिअल बँकेची शाखा वांई येथें उघडण्याच्या बाबतींत तालुक्यांतील सहकारी पुढाऱ्यांचे प्रयत्न यशस्वी झाल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करून सहकारी चळवळीची प्रगती अधिक झपाट्यानें करण्याकडे व एकमेकांच्या रोजच्या व्यवहारामध्येंहि सहकार्यानें वागण्याकरतां, नागरीक व सोसायटीतील कार्यकर्ते या संधीचा जरूर फायदा घेतील अशी आशा प्रगट केली. त्याचप्रमाणें, सहकारी तत्त्वांचा अभ्यासू रीतीनें प्रसार करण्याबद्दल व आपली आर्थिक स्थिति सुधारण्याबद्दल जमलेल्या शेतकरीबंधूंना उपदेश करून सहकार्य हें एक उच्च राष्ट्रीय तत्त्व असून त्याचा पुरस्कार करणें हें प्रत्येकाचें ब्रीद आहे असें सांगून सर्व सोसायट्या ह्या शाखेशी आपले संबंध एकनिष्ठतेचे ठेवतील व आपल्या मेंबरांची आर्थिक सुबत्ता राखण्याकडे तिचा उपयोग करून घेतील असा आपला विश्वास असल्याचें त्यांनीं सांगितलें. शेवटीं, शाखेची उत्तरोत्तर भरभराट होत जावो, व तालुक्यामध्यें सहकार्याचें हें नवें युग अधिक जोमानें प्रसार पावो अशी आशा व्यक्त करून शाखा उघडल्याचें त्यांनीं जाहीर केलें.

---

### डेक्कन मर्चंटस को. बँक लि., मुंबई

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल: | २५¼ | शिलक, रोख व बँकांत: | १०½ |
| फंड्स: | १९¼ | कर्जें: | १२४ |
| ठेवी: | २२५¼ | ओव्हरड्राफ्ट, कॅ. के. इ: | २४⅓ |
| ओव्हरड्राफ्ट: | १७⅓ | कर्जरोखे इ०: | १३१ |
| १९३५-३६ चा नफा: | ४½ | | |

अहवालाचे सालीं वरील बँकेनें १ लक्ष ८५ हजारांचीं कर्जें व्यापारी सभासदांस दिलीं, त्यांपैकीं ९० हजार रुपये मालाच्या तारणावर देण्यांत आले. सढळ हातानें लायक अर्जदारांस कर्जें दिलीं, त्याबरोबरच वसुलीबाबतहि कसोशीनें प्रयत्न करण्यांत आले. "थकलेल्या बाक्या वसुलीचें प्रमाण यावेळीं ज्यास्त असून अहवाल अखेरच्या मुदतींत एकाहि कर्जदाराची केस लवाद अगर बजावणीकरितां कलेक्टराकडे पाठविण्याचा प्रसंग आणला गेला नाहीं." कर्जरोख्यांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारांपोटीं बँकेस निवळ नफा १,८३८ रुपये झाला, तो बिल्डिंग, इनव्हेस्टमेंट व डिव्हिडंड फंडांत टाकण्यांत आला. ठेवीदारांच्या व इतर गिऱ्हाइकांच्या सोईसाठीं वर्तमानपत्रें वाचण्यास मिळण्याची सोय करण्यांत आली. अहवालावरून बँकेचें धोरण प्रगतिपर असल्याचें दिसून येतें. भागीदारांस ६ टक्के दरानें डिव्हिडंड वांटण्यांत आलें.

---

### दि वाई अर्बन को. बँक लि., वाई

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल: | १५,८५० | शिलक, रोख व बँकांत: | ३८,२२८ |
| गंगाजळी: | ७,९८३ | कर्जें: | ७४,९०३ |
| इतर फंड: | ३,५३१ | | |
| ठेवी: | ७८,३६२ | | |
| १९३५-३६ चा नफा: | २,१४१ | | |

बँकेचें एकूण खेळतें भांडवल १,१४,०६८ रु. आहे. वर्षअखेर बँकेस २,१४१ रु. नफा झाला, त्यांतून ६ टक्के दरानें भागीदारांस डिव्हिडंड देण्यांत आलें. आरंभींच्या अडचणींमुळें बँकेच्या थकबाकीचें प्रमाण बरेंच आहे, तथापि तें कमी होऊन बँकेची प्रगति उत्तम प्रकारें होऊन बँकेचा दर्जा वाढेल अशी आशा आहे. श्री. गोविंद गणेश वैद्य हे सुरवातीपासून सेक्रेटरीचें काम पहात आहेत. वाई येथील सुशिक्षितांचें लक्ष बँकेकडे व सहकारी चळवळीकडे वेधलें गेल्यास बँकेची उपयुक्तता वाढेल.

### दि रेमंड वुलन मिल स्टाफ अॅन्ड वर्कमेन प. स. पतपेढी लि., ठाणें

शेतकऱ्यांप्रमाणें गिरणींमधील कामगार वर्गासहि सहकारी चळवळीपासून कसा फायदा होतो, हें दाखविण्यासाठी मायर ससून मिल पतपेढीची माहिती 'अर्था' च्या ता. २ सप्टेंबरच्या अंकांत देण्यांत आली होती. रेमंड वुलन मिलच्या पतपेढीचा वृत्तांतहि असाच उद्बोधक आहे. मिलमधील सुमारें ८० टक्के कामगार पतपेढीमध्यें सामील आहेत.अहवालाचे सालीं ३१ हजार रुपये कर्जाऊ देण्यांत आले. एकूण १० सभासदांच्या बाहेरील सावकारांच्या कर्जाची तडजोड करण्यांत आली व त्यामुळें त्यांस ७०० रुपयांत १४० रुपये सूट मिळाली ! कामगारांच्या पगारावर मारवाड्यांची टांच कोर्टामार्फत वरचेवर येत असे, त्याबाबत 'रोजमजुरी मिळविणाऱ्या कामगारांच्या पगारावर टांच आणतां येत नाहीं' असा कोर्टाकडून निकाल मिळवल्यामुळें कामगारांचा बराच फायदा झाला आहे. आकस्मिक गरजेच्या कारणांसाठी कर्जें देण्याच्या पतपेढीच्या पद्धतीमुळें सावकारांपासून सभासदांचें संरक्षण होतें. एकंदरीनें पहातां पतपेढी कामगारांच्या हिताचें संरक्षण करीत असून त्याबद्दल तिचे चालक अभिनंदनास पात्र आहेत. पतपेढी पहिल्यापासूनच 'अ' वर्गांत आहे.

---

### श्री उत्तरेश्वर शिरूर हवेली तालुका को. सुपरवायझिंग यूनियन लि. पुणें

पुणें जिल्ह्यांतील शिरूर, हवेली व मावळ तालुके हे ह्या यूनियनचें कार्यक्षेत्र आहे व एकूण ३८ सोसायट्या यूनियनला सामील आहेत. त्यांपैकीं १ 'अ' वर्गांत, १६ 'ब' वर्गांत, ९ 'क' वर्गांत व १० 'ड' वर्गांत आहेत. वर्षअखेरीस सभासदांची संख्या२,३३५ आहे. बँकेकडील कर्ज १,५४,८५४ रु. असून त्यांपैकीं१,०१,०८४ रु. कर्ज थकलेलें आहे. म्हणजे ह्या थकबाकीचें प्रमाण शेंकडा ६५ पडतें. सोसायट्यांच्या खेळत्या भांडवलाशीं रिझर्व्ह फंडाचें प्रमाण शेंकडा ३६ आहे. युनियनच्या क्षेत्रांत योग्य ठिकाणीं नवीन सोसायट्या स्थापन करण्याचा प्रयत्न चालू आहे. १-११-३५ ते ७-११-३५ अखेर सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास भरविण्यांत आला होता. कांहीं सोसायट्यांच्या ऊंसवाल्या व भाजीपाल्याच्या मळेवाल्या सभासदांस सोसायट्यांतून पुरेसें कर्ज मिळत नाहीं व त्यामुळें ते सहकारी चळवळींतून बाहेर जाऊं लागले आहेत. अशा मोठ्या बागाइतदारांसाठी एक मध्यवर्ती सोसायटी स्थापन करण्याचा प्रयत्न चालू आहे. गेल्या वर्षापेक्षां अहवालाचे सालीं ७ अधिक सोसायट्या वरच्या वर्गांत गेल्या व ५ कमी सोसायट्या खालच्या वर्गांत आल्या, ह्यावरून सोसायट्यांत हळुहळु सुधारणा होत आहे, असें दिसतें. नवीन सालाकरितां श्री. राजाराम हणमंत लुपे ह्यांची अध्यक्ष व श्री. जयवंतराव तुकाराम सावंत ह्यांची उपाध्यक्ष म्हणून निवडणूक झाली आहे.

---

### मालेगांव विभाग सहकारी खरेदी विक्री संघ लि.

ता. ३०-८-३६ रोजीं वरील संघाची आठवी वार्षिक साधारण सभा श्री. भाऊराव सखाराम हिरे, बी. ए. एलएल. बी., वकील, यांचे अध्यक्षतेखालीं मोठ्या उत्साहानें पार पडली. सभेस प्रतिनिधी व सोसायट्यांचे सभासद व गांवांतील प्रमुख अधिकारी व व्यापारी मंडळी मिळून ३०० चे वर लोकांचा समुदाय जमला होता. सभेंत सन १९३५-३६ सालचा वार्षिक रिपोर्ट व ताळेबंद वाचून मंजूर करण्यांत आले. पुढील सालाकरितां रु. १,६५०चें खर्चाचें बजेट मंजूर करण्यांत आलें व अध्यक्षांच्या जागीं श्री. बी. एस. हिरे यांची नेमणूक करण्यांत आली. इतर काम आटोपल्यावर अध्यक्षांनीं श्री. पाटील, अग्रिकल्चरल ऑर्गनायझर, यांनीं थोडक्यांत शेतीसंबंधीं योग्य सल्ला द्यावा अशी विनंति केली. श्री. पाटील म्हणाले कीं शेतकऱ्यांनीं उसाच्या जुन्या जाती पुंड्या व खड्या ऐवजीं सी. ओ. नं. २९० व कोइमतूर यांची लागवड करावी. यांची लागवड करण्याचे कामीं सरकार सवलत देतें. तरी सवलतीचा फायदा शेतकरी बंधूंनीं अवश्य घ्यावा. या उसांना पाणी कमी लागून उतारा जास्त येतो. थंडीची बाधा होत नाहीं. म्हणून नवीन जातींच्या उसांची लागवड करावी.संघाच्या आडतींत माल विकून शेतकऱ्यांनीं फायदा करावा. संघास कार्यक्षम करावें. नंतर अध्यक्ष समारोप करतांना म्हणाले कीं, संघानें सन १९३५-३६ मध्यें शेतकऱ्यांचा दीड लाखांचा माल (कपाशी, भुईमुग, शेंगा, भुसार माल, गूळ) विकून शेतकऱ्यांची उत्तम सेवा बजावली. शेतकऱ्यांनीं इतर स्थानिक दलालांना फायदा न देतां संघामार्फतच आपला सर्व माल विकून संघाची भरभराट करावी. नंतर श्री. वामनराव पाटील, संघाचे चेअरमन, यांनीं श्री.हिरे यांचे व जमलेल्या मंडळींचे आभार मानले.

---

### खेड व जुन्नर तालुका को. सुपरवायझिंग यूनियन लि., खेड

खेड तालुक्यांत २९ व जुन्नर तालुक्यांत ७ सोसायट्या आहेत. सर्व ठिकाणीं ग्रुप सेक्रेटरींची योजना अमलांत आल्यावर काम जास्त पद्धतशीर होईल. वरील ३६ सोसायट्यांपैकीं 'अ' वर्गांत ३, 'ब' वर्गांत १८, 'क' वर्गांत १२ व 'ड' वर्गांत ३ आहेत. सध्याच्या दुष्काळामुळें व अवर्षणामुळें "पूर्वीचें कर्ज थकलेलें असून व्याजहि थकलेलें असतांना कांहीं ठिकाणीं कर्जाच्या कोणत्याहि अटी न घालतां नवीन कर्ज द्यावें लागत आहे, अशी सध्याची परिस्थिति चालू आहे." वर्षअखेर सोसायट्यांचें खेळतें भांडवल ३३ लक्ष व सभासदांची संख्या १,७८३ आहे. प्रतिकूल आर्थिक परिस्थितींत यूनियन आपलें काम शक्य तितक्या चांगल्या तऱ्हेनें करीत आहे. यूनिअनच्या अहवालांत सोसायट्यांच्या परिस्थितीविषयीं तपशीलवार माहिती दिली आहे व सूचना केल्या आहेत त्यावरून तिच्या अधिकाऱ्यांचें लक्ष सुधारणेच्या उपायांकडे कसें लागून राहिलें आहे हें प्रत्ययास येतें. यूनिअनचें काम कळकळीनें व उत्साहानें झालें आहे ह्याबद्दल अध्यक्ष,श्री. कृष्णाजीपंत दीक्षित, व त्यांचे सहकारी ह्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे.

---

### सभा

रविवार, ता १८ ऑक्टोबर रोजीं, ४ वाजतां पुणें सें. को. बँकेची विशेष साधारण सभा भरणार आहे.

खेड व जुन्नर ता. को. सुपरवायझिंग यूनियन लि. ची वार्षिक साधारण सभा खेड येथें ता. १२-१०-३६ रोजीं श्री. धोंडूमामा साठे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती.

पुणें जिल्हा इन्स्टिट्यूटमार्फत भरविण्यांत आलेली खेड तालुक्यांतील सहकारी सोसायट्यांची परिषद ता. ११-१०-३६ रोजीं प्रो. एस. आर. भागवत ह्यांचे अध्यक्षतेखालीं पार पडली.

---

## फ्रँक, पौंड, डॉलर, लिरा

फ्रान्सनें आपल्या चलनाची परराष्ट्रीय किंमत ( हुंडणावळीचा दर) उतरवल्याबरोबर त्या फेरबदलाशी इटलीनें आपली हुंडणावळ जुळती करून घेतली आहे. व्यापाराच्या ओघांत, आयात मालाबद्दल आपल्या राष्ट्रीय चलनांत किती पैसा द्यावा लागेल आणि निर्गत होणाऱ्या मालाच्या मोबदला हातांत राष्ट्रीय चलन किती पडेल ह्याची निश्चित कल्पना असल्यावांचून व्यवहार चालणें कठिण होतें. होणारा खर्च व येणारी किंमत हीं राष्ट्रीय कायदेशीर चलनांतच आकारलीं जातात आणि नफ्यातोट्याच्या हिशेबांत दाखल होतात. ह्या कारणानें, आपल्या मालाची खरेदीची किंवा विक्रीची किंमत परराष्ट्रीय बाजारपेठांत तेथील चलनांत किती आहे ही गोष्ट व्यापार-धंद्यांत महत्त्वाची नसून त्या किंमतीची रकम आपल्या राष्ट्रीय चलनांत किती भरते हा प्रश्न मुख्य असतो. ह्यासाठीच आंतरराष्ट्रीय हुंडणावळीचे दर निश्चित केलेले असतात आणि त्यांस अनुसरून व्यापाराचा व उद्योगधंद्यांतला हिशेब होत असतो. परंतु जागतिक व्यापाराची घडी अलीकडे विस्कटल्यामुळें राष्ट्रीय चलनांच्या किंमतीचा परस्पर-संबंध म्हणजे हुंडणावळीचे दर चंचल झाले आहेत आणि व्यापाराच्या देवघेवीशीं असंबद्ध असे बनले आहेत. अंतर्गत व बाहेरील बाजारभाव आणि परराष्ट्रीय देणें-घेणें ह्यांची घडी नीट बसेल ह्या बेतानें ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्या प्रमुख राष्ट्रांनीं पौंड-डॉलर हुंडणावळ एका पौंडास सुमारें पांच डॉलर ह्या दरानें स्थिर राखण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. हुंड्या ज्यास्त निघाल्या किंवा ज्यास्त देणें झाल्या तर घेण्या-देण्याची वजावाट आणि मेळ घालण्याची जबाबदारी राष्ट्रीय मध्यवर्ती बँक व सरकार ह्यांवर असते; आणि हुंडणावळीचा दर निश्चित करतांना ही जबाबदारी पार पाडतां येण्याची शक्यता लक्ष्यांत घेतलेली असते.

फ्रेंच चलनाची किंमत आज नाहीं उद्यां बदलणें भाग पडणार हें स्पष्ट दिसत होतें. त्याप्रमाणें अखेर पौंड व फ्रँक ह्यांचें परस्परप्रमाण १:७५ होतें तें आतां १:१०४ असें झालें आहे. इटलीस फ्रान्सचें अनुकरण करणें क्रमप्राप्त होऊन त्या राष्ट्राच्या चलनाचें परराष्ट्रीय मान सीन्यॉर मुसोलिनी ह्यांनीं गेल्या आठवड्यांत जाहीर केलें. शंभर लिरा = ७·९१ ग्रॅम वजनाचें सोनें ह्या प्रमाणांत पूर्वी किंमत होती, ती बदलून शंभर लिरा म्हणजे ४·६७७ग्रॅम अशी ती आतां निश्चित करण्यांत आली आहे. इटालिअन कायदेशीर चलनाचें मोल कमी करण्यांत आलें आहे असें ह्यावरून दिसून येईल. ब्रिटिश चलनांतली हुंडणावळ १ पौंड = ९२ लिरा आणि डॉलर-लिरा हुंडणावळ १ डॉलर = १९ लिरा अशी ठरवण्यांत आली आहे. सोन्याच्या मानानें लिराची किंमत उतरल्यानें बँक ऑफ इटलीपाशीं सुवर्णनिधि आहे, त्याची किंमत नवीन दरानें वाढेल आणि ह्या योगानें तफावत किंवा नफा उत्पन्न होईल तो सरकारी तिजोरीस जमा केला जाईल. हुंडणावळीचा दर उतरला असतां पैसा व्यवहारांत अधिक खेळून बाजारभाव चढतात व महर्घता होते असा अनुभव आहे. ह्याचे दुष्परिणाम सामान्य जनतेस जाचक होऊं नयेत म्हणून सीन्यॉर मुसोलोनी ह्यांनीं जरूर ते हुकूम सोडले आहेत. भाडीं व खंड वाढवण्यांत येऊं नयेत, नित्याच्या व्यवहारांत लोकांस ज्यास्त खर्च करावा लागूं नये म्हणून वीज, वहातुक इत्यादिकांचे दर चढवले जाऊं नयेत आणि खाण्याच्या पदार्थांच्या किंमती स्थिर रहाव्या ह्यासंबंधांत खबरदारी घेतली जात आहे. इटालिअन सरकार पांच टक्के व्याजाचें नवीन कर्ज काढणार आहे, त्यांत, जमिनीच्या मालकांनीं आपल्या मालमत्तेच्या निवळ किंमतीच्या पांच टक्के इतके पैसे गुंतवले पाहिजेत अशी सक्ती करण्यांत येईल. इटालिअन हुंडणावळीच्या दरांत बदल झाला आहे, त्याचा लंडन व मुंबई येथील बाजारावर म्हणण्यासारखा परिणाम घडून आला नाहीं. व्यावहारिक दृष्ट्या सोयीच्या असणाऱ्या प्रमाणांत फ्रान्स व इटली ह्यांनीं आपल्या चलनाच्या परराष्ट्रीय किंमती निश्चित केल्या आहेत, ही गोष्ट आंतरराष्ट्रीय व्यापाराची घडी नीट बसण्यास सहायक होईल असें मत सर्वत्र व्यक्त करण्यांत येत आहे. आपल्या परराष्ट्रीय हुंडणावळीच्या दरांत फेरफार करण्याची आवश्यकता नाहीं असें पोलंडच्या सरकारनें जाहीर केलें आहे. कांहीं प्रमुख राष्ट्रांचे पूर्वीचे व सध्याचे हुंडणावळीचे दर तुलनात्मक रीतीनें खालीं दिले आहेत, त्यांवरून एकंदर परिस्थितीची कल्पना येण्यास मदत होईल.

**पौंड-स्टर्लिंगची इतर देशांच्या चलनांत किंमत दर्शविणारें तुलनात्मक कोष्टक**

| | २० सप्टेंबर १९३१ पूर्वी | ४ सप्टेंबर १९३६ | ५ऑक्टोबर १९३६ |
|---|---|---|---|
| मार्क | २०·४३ | १२·५२ | १२·२३ |
| फ्रँक | १२४·२१ | ७६·५० | १०५·२५ |
| डॉलर | ४·८६ ३/५ | ५·०३ ३/४ | ४·९१ ३/८ |
| लिरा | ९२·४६ | ६४·०० | ९३·०० |
| गिल्डर (फ्लॉरिन) | १२·१० | ७·४२ | ९·१८ |


# नोटीस.

**औंध स्टेट सेंट्रल बँक, लिमिटेड, औंध, (जि. सातारा)**

कळविण्यांत येतें कीं:—

बँकेचे भागीदारांची चौथी सर्वसाधारण सभा शनिवार तारीख ३१ ऑक्टोबर १९३६ रोजीं दुपारीं ४ वाजतां ( स्टँ. टा. ) औंध येथें श्रीयमाई देवीचें मंडपांत खालील कामांकरितां भरणार आहे.

१. तारीख ३०-६-१९३६ अखेरचा ऑडिटर यांनीं तपासलेला ताळेबंद व नफातोटापत्रक स्वीकारणें.

२. नफ्याची वाटणी करणें व डिव्हिडंड जाहीर करणें.

३. सन १९३६-३७ सालाकरितां ऑडिटर यांची नेमणूक करणें व त्यांचें वेतन ठरविणें.

**सूचनाः—**

सदर दिवशीं सदर वेळेस कोरम न झाल्यास सदर सभा तहकूब करणेंत येईल व अशा रीतीनें तहकूब झालेली सभा शनिवार तारीख ७ नोव्हेंबर १९३६ रोजीं त्याच जागीं व त्याच वेळीं भरेल व कोरम नसलें तरी वरील सर्व कामें पुरीं करण्यांत येतील.

औंध
ता. १ ऑक्टोबर १९३६

बोर्डाचे हुकुमावरून,
बा. रा. वर्तक
मॅनेजर

**ता. क.—बँकेचीं ट्रान्सफरबुकें तारीख ३१-१०-३६ ते ७-११-३६ अखेर दोन्ही दिवस धरून बंद राहतील.**

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें

(२)

### संरक्षण गेलें तर ?

संरक्षण मिळण्यापूर्वी म्हणजे १९३२ सालापर्यंत जावा साखरेवर दर हंड्रेडवेटास ६ रु. किंवा दर बंगाली मणास ४ रु. ६ आ. ३ पै इतकी जकात होती, ती संरक्षण मिळाल्यापासून दर हंड्रेडवेटास ९ रु. १ आ. व दर बंगाली मणास ६ रु. १० आ. ६ पै आहे. संरक्षण काढून घेणार याचा अर्थ १९३२ सालीं दर हंड्रेडवेटास ३ रु. १ आ. वाढविलेली जकात सरकार कमी करणार. १९३४ पूर्वी देशी साखरेवर जकात नव्हती ती १ एप्रिल १९३४ पासून दरमणीं १५ आ. ५ पै बसली आहे. १९३२ नंतर जावा साखरेवरील वाढलेली जकात सरकारनें कमी केल्यास १९३४ सालीं देशी साखरेवर बसविलेली जकात कमी होणारच.

२५० टनांच्या महाराष्ट्रांतील साखरेच्या कारखान्याला साखर तयार करण्याचा खर्च दरमणीं ५ रु. १२ आ. किंवा दर हंड्रेडवेटास ८ रु. येतो. म्हणजे संरक्षण गेलें तर साखरेचे विक्रीचे व साखर तयार करण्याचे भाव खालीं दिलेप्रमाणें रहाणार.

| | दर मणास |
|---|---|
| साखरेचे विक्रीचे भाव | ७ रु. १ आ. ३ पै |
| साखर तयार करण्याचा खर्च | ५ रु. १२ आ. ० पै |
| नफा | १ रु. ५ आ. ३ पै |

साखर तयार करतांना जी काकवी शिल्लक रहाते त्यापासूनचें उत्पन्न जमेंत धरलें नाहीं. १,२६,००० मणांवर १,५७,००० रुपयांचे वर नफा रहाणार. नफा कमी राहिल्यामुळें त्या प्रमाणांत प्राप्तीवरील कर कमी होतो व घसारा व प्राप्तीवरील कर वजा जातां ८० ते ८५ हजार रुपये नफा रहातो; म्हणजे १५ लक्ष रुपयांवर ५ टक्के नफा पडतो. संचालक मंडळानें नफ्याचा अंदाज १९३२ पूर्वी म्हणजे साखरेच्या धंद्याला संरक्षण मिळण्यापूर्वी जी जकात होती ती धरूनच केलेला आहे, व म्हणूनच प्रेफरन्स शेअर ५ टक्के नफ्याचे काढलेले आहेत.

साखरेचा उतारा ११ टक्के पडूं लागल्यास १ मण साखर तयार करण्यास ९ मण ऊंस लागेल व दर एकरीं ५० टन उंसाचें पीक मिळाल्यास उंसाचा भाव दरमणीं ५ आ. पडेल व त्यामुळें दरमणीं १० आ. जास्त फायदा पडूं शकेल. परंतु शक्यता न धरतां अनुभवानें खात्री पटली तेच आंकडे व नफ्याचें प्रमाण महाराष्ट्र जनतेपुढें मांडलें आहे.

### "ओव्हर प्रॉडक्शन"

महाराष्ट्रांत हल्ली जे साखर-कारखाने आहेत त्यांतून ३७,००० टन साखर दरवर्षी तयार होते व साखरेचा खप दोन लक्ष टनांचा आहे. हिंदुस्थानांत दरवर्षी सुमारें १० लक्ष टन साखर खपते. १९३५-३६ सालीं देशी साखर सुमारें ८ लक्ष टन तयार झाली व जावाची सुमारें २ लक्ष टन साखर हिंदुस्थानांत आली, त्यांपैकीं सुमारें ८१ हजार टन मुंबई बंदरांत आली. तेव्हां "ओव्हर प्रॉडक्शन" ही तक्रार खरी नाहीं व महाराष्ट्राचे बाबतींत तर मुळीच खरी नाहीं याची खात्री पटेल. दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटची दरसाल आरंभीं ४,५०० टन साखर तयार होणार व ती कशी खपणार याची काळजीच रहात नाहीं.

कारखाना २० लक्ष रुपये भांडवलाचा आहे. आरंभीं २५० टनांचा कारखाना सुरू होईल व त्याकरितां १५,००,००० रुपयांचें भांडवल जमविलें जाईल. कारखाना ४०० टनांपर्यंत वाढविणें झाल्यास ५ लक्षांचें शिल्लक ठेवलेले शअर विक्रीस काढले जातील. कर्ज काढावयाचें नाहीं असें ठरविल्यामुळें मशिनरी, इमारती व उंसाचा खर्च सोडून २ ते ४ लक्ष "वर्किंग कॅपिटल" धरून नफ्याचा अंदाज दिलेला आहे.

महाराष्ट्रांतील कांहीं साखर कारखान्यांचे मॅनेजिंग एजंटांचे स्वतःचे साखर-कारखाने किंवा इतर व्यवसाय आहेत. दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. कंपनीच्या मंडळाचे मॅनेजिंग एजन्ट यानें सर्व वेळ कंपनीच्या कामाकरितां खर्च केला पाहिजे, प्राप्तीचा दुसरा उद्योग करितां कामा नये व भागीदारांना ६½ टक्के नफा दिल्याशिवाय नफ्यांतील कोणताही भाग मॅनेजिंग एजन्ट यास मिळूं नये अशा शर्ती मॅनेजिंग एजन्सीच्या करारांत घातल्या आहेत.

मुंबई इलाख्याच्या इरिगेशन खात्याच्या नियमाप्रमाणें ५ वर्षांत उंसाचीं फक्त दोन पिकें घेतां येतात व एक एकर ऊंस लावणेचा असल्यास तीन एकर जमीन द्यावी लागते. ऊंस काढून घेतल्यानंतर दोन वर्षें दुसऱ्या पिकांचें उत्पन्न विशेष येईल असा अंदाज नव्हता. सिंडिकेटचें उसाचें क्षेत्र सोलापूर जिल्ह्यांत आहे. सोलापूर जिल्ह्याचें हवामान कपाशीचे पिकाला अनुकूल आहे. ऊंस काढून घेतल्यानंतर उंसाचे पिकाला घातलेल्या खतापैकीं २० टक्के खत जमिनींत शिल्लक रहातें व कॅनॉलच्या पाण्याची सोय असल्यामुळें कपाशीचें पीक घेतां येतें असा अनुभव आलेला आहे. गतवर्षी लावलेल्या उंसाचे क्षेत्रापैकीं ३५ एकर जमिनींत सिंडिकेटनें कपाशी लावलेली आहे व दर एकरीं १५ मण ते खंडीभर कापूस येइल असा अंदाज आहे. त्यामुळें वर दर्शविलेल्या नफ्यापेक्षां जास्त नफा सिंडिकेटला पडूं शकेल असा अंदाज आहे.

शेअरवर नफा मिळून दोन हजार महाराष्ट्रीयांना उद्योगधंदा मिळणार आहे. वरील अनुकूल परिस्थिति महाराष्ट्र जनतेपुढें स्पष्टपणें मांडलेली आहे.

विष्णु नारायण वर्तक
अध्यक्ष


## L. S. G. D. CLASSES.

The next session of the Local Self Government Institute's Training Classes will begin from 15th October 1936 at Poona, Bombay and Ahmedabad. Apply for Prospectus to :—

| (For other Centres) | (For Poona Centre) |
|---|---|
| The Superintendent, Local Self Govt. Institute, 11 Elphinston Circle Fort—Bombay. | Sd/- B. M. GUPTE, M. A., LL B, Hon. Secretary & Treasurer Maharashtra Branch, 410 Shanwar, Poona. |

आपल्या अन्नांत माती कां कालवितां ?
स्वयंपाकांत वापरण्याचे सर्व जिन्नस निवडून साफ करून घेतां. मग मीठच तेवढें घाणेरडें कां वापरतां ?
आजच
'सोलर मिठा'ची आपल्या वाण्याकडे मागणी करा.
आपले वाण्याजवळ नसल्यास आम्हाला लिहा.
Uran Salt Works, 583 Chira Bazar, Bombay 2

## शेतकऱ्यांच्या उन्नतीप्रीत्यर्थ प्रांतिक बँकेचे प्रयत्न

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या रौप्य ज्युबिलीचे निमित्तानें बँकेचे अध्यक्ष, सर चुनीलाल मेहता, ह्यांनीं एक संदेश प्रसिद्ध केला आहे, त्यांत ते म्हणतात:—

" शेतीचा धंदा साधारणतः किफायतशीर नाहीं. तथापि, सहानुभूतिपर धोरण ठेवलें असतांहि कार्यक्षमतेस बाध येणार नाहीं अशा रीतीनें शेतीस शास्त्रशुद्ध पद्धतीनें भांडवलाचा पुरवठा करतां येतो, हें बँकेनें सिद्ध करून दाखविलें आहे. सहकारी पद्धतीनें भांडवल पुरवणें म्हणजे तें सर्वांच्या आटोक्यांत आणणें होय; परंतु ह्या बाबतींत विशिष्ट मर्यादा व नियंत्रणें असतात. ह्या दोहोंचा मेळ घालणें कठिण आहे, व तें काम बँकेनें हातीं घेतलें आहे. बाहेरच्या पैशाच्या बाजाराशीं शेतकऱ्यांच्या सुसंघटित संस्थांचा निकट संबंध येऊन त्या बाजाराचा सहकारी चळवळीस फायदा मिळावा, अशी व्यवस्था करण्याचें बँकेचें धोरण आहे. ह्या बरोबरच, शेतीच्या मालाची विक्री, खेडेगांवीं उद्योगधंद्यांची वाढ, स्वावलंबन व कार्यक्षमता ह्यासंबंधीं प्रचार, इत्यादि प्रगतीच्या उपांगांकडेहि बँकेचें लक्ष आहे. "

## विलायती चष्म्यांतून दिसणारी मुंबई

मुंबई कॉर्पोरेशनच्या निवडणुकींत तोतया मतदारांनीं केलेल्या फसवणुकीच्या हकीकतीवरून इंग्लंडमधील एका पत्रानें स्थानिक परिस्थितीचें खालीं दिल्याप्रमाणें शब्दचित्र काढलें आहे. लेखक म्हणतो कीं, एका मोठ्या घरांत वीस ते दोनशे माणसें असलेलीं कुटुंबें रहातात. त्यांतल्या बेकारांस मिळवते लोक पोसतात. कुटुंबांत आईबाप व मुलेंच केवळ असतात असें नसून त्यांत चुलते, काक्या, चुलतभाऊ, आजोबा, पणजोबा, इत्यादि एकत्र रहातात. कित्येक वेळां आपल्या सर्व गोतावळ्याची कुटुंबांतील माणसांस माहिती असत नाहीं आणि कामासाठी बाहेर जावें लागल्यामुळें त्यांचें महिनान महिना परस्पर-दर्शनहि घडत नाहीं. ह्या कारणानें मतदार निश्चित करणें कठिण पडतें. एखादा इसम मृत्यु पावला असतां त्याची नोंद होतेंच असें नाहीं आणि त्या माणसाचें मत त्याच्या गटाला मिळतें. अनेक वेळां कुटुंबाचे पाहुणेहि ह्या गर्दींत शिरतात आणि निवडणुकींत पराभवाचा रंग दिसला तर अनोळखी माणसांस पैसे देऊन त्यांचीं मतें टाकवतात.

## म्हैसूर शहरांतील भिकाऱ्यांचा सांस्कृतिक दर्जा

म्हैसूर येथील महाराजा कॉलेजच्या संख्याशास्त्र शाखेनें म्हैसूर शहरांतील भिक्षेकऱ्यांसंबंधीं आंकडे जमा केले, त्यावरून कित्येक उद्बोधक गोष्टी ध्यानांत येतात. म्हैसूर शहरांत एकूण ७०१ भिकारी (५७७ पुरुष व १२४ स्त्रिया) आढळले. बेकारीमुळें भिकाऱ्याचा धंदा पत्करणारांचा त्यांत बराच मोठा भाग आहे. त्यांतील कित्येक जण कुशल कामगार, सुशिक्षित इसम, नोकरीवरून निघालेले सरकारी नोकर, पेन्शनींमधील शिपाई, साधू व फकीर असे आहेत. शेकडा १७ भिकाऱ्यांस लिहितां-वाचतां येतें. मोटार ड्रायव्हर, फिटर, लघुलेखक, शिक्षक, सिळे-खेचक इत्यादींची संख्या १९ भरते.

## ब्रिटिश मोटारींचें सर्वांत मोठें गिऱ्हाईक

न्यूझिलंड हा ब्रिटिश साम्राज्यांतील देश ग्रेटब्रिटनमध्यें बनवलेल्या मोटारींचें पहिल्या प्रतीचें गिऱ्हाईक आहे. १९३६ च्या पहिल्या ८ महिन्यांत त्या देशानें ७,६७९ ब्रिटिश गाड्यांची आयात केली. दक्षिण आफ्रिकेचा नंबर दुसरा (४,१२२ गाड्या) लागतो.


# धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,०४,००,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज (शेख मेमन स्ट्रीट, मुंबई), बांद्रे (मुंबईनजीक), मलबार हिल (मुंबई), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा १ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट:— **टी. आर. लालवाणी.**

# दी ट्रस्ट ऑफ इंडिया अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड

**मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पो. बॉ. नं. ४६, पुणें नं. २**

**चेअरमन : दि. ब. के. आर. गोडबोले,**
बी. ए., एम्. सी. ई., सी. बी. ई.,
एम्. आय. ई., (इंडिया)
दौंड-बारामती व पाचोरा-जामनेर रेल्वे कं. चे भागीदार

— विशिष्ट अंगें —

१. या कंपनीच्या घटनेप्रमाणें विमेदारांना कंपनीच्या नफ्यापैकीं शेंकडा ९६ नफा बोनसच्या स्वरूपांत परत करण्यांत येतो. विमेदारांना स्वतःतर्फेचे डायरेक्टर्स निवडून देतां येतात.

२. "ट्रस्ट ऑफ इंडिया"च्या प्रत्येक विमेदारास त्याच्या पॉलिसीरकमेंतून शस्त्रक्रिया किंवा रुग्णालयाच्या खर्चासाठीं कंपनीकडून मदत मिळण्याची सवलत दिली जाते. विमेदार पंगू किंवा चरितार्थाचें साधन मिळविण्यास असमर्थ झाल्यास त्याचे विमाहप्ते बंद होऊन त्याला त्याची विमारक्कम दहा वार्षिक हप्त्यांनीं दिली जाते. याशिवाय, सोडकिंमत, हप्तेबंद विमा, रद्द पॉलिसी चालू करण्याविषयीं सवलती, पॉलिसी-तारणावरील कर्ज, घरें विकत घेण्याच्या योजना, वार्षिक हप्त्यावर अडीच टक्के सूट इ० सर्व सवलतींचा अंतर्भाव "ट्रस्ट ऑफ इंडिया" कंपनीनें केला आहे.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—५ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—१ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | १२०—० |
| ४% १९६०–७० ... ... | ११५-१० |
| ४% १९४३ ... ... ... | ११२—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९९-१२½ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०७-१२ |
| २¾% १९४८–५२ ... ... | १०१—३ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११२—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( गॅरंटी व तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत फेड ) | १११—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १११—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षें मुदत) | १११—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११२-१२ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२५—८ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३३—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११२—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३४—८ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५७५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३९-८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९९—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९१६—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५६—४ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २६०—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २५५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ६¾% ) | १५४२—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६०२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २०१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७२—४ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १८६—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७२६—४ |


धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०
कडून
हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक
नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी
चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें
त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्यआहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.



CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS
This year 1934-35
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS

BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

HINDUSTHAN
Co-operative Insurance Society, Ltd.
( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## असेंब्लींत कंपनी बिलावर चर्चा

नवीन कंपनी कायदा ( १९३६ ) अंमलांत येण्यापूर्वी नेमण्यांत आलेल्या मॅनेजिंग एजंटाचा कंपनीशी कांहींहि करार झालेला असो; २० वर्षांनंतर तो करार आपोआप रद्द होईल, अशी नव्या बिलामध्यें योजना आहे, ती रद्द करावी, ह्या अर्थाची युरोपियन गटानें पुरस्कार केलेली सूचना मंजूर झाली.

*
* *

सध्याच्या मॅनेजिंग एजंटांचे करार तीस वर्षांनंतर रद्द व्हावेत; तथापि नवा कंपनी कायदा अंमलांत येऊन पांच वर्षे झाल्यानंतर भागीदारांस एजंटांच्या करारांचें पर्यवसान करण्याचा अधिकार असावा; मात्र एजंटांच्या करारास ३० वर्षे झालीं असल्याखेरीज भागीदारांस हा हक्क प्राप्त होऊं नये, अशा स्वरूपाची काँग्रेस पक्षाची सूचनाहि नापास झाली.

*
* *

मॅनेजिंग एजंटानें मालाच्या खरेदी-विक्रीसंबंधांत कंपनीशी कोणत्याहि तऱ्हेचा करार करूं नये, अशा अर्थाची सर एच. पी. मोदी ह्यांची सूचना बिनविरोध पास झाली. अशा प्रकारच्या कराराबाबतच्या ठरावास हजर असलेल्या डायरेक्टरांपैकीं तीन चतुर्थांश डायरेक्टरांनीं संमती दिल्यासच फक्त मॅनेजिंग एजंट असला व्यवहार करूं शकेल.

*
* *

स्पेशल सभेमध्यें मंजूर झालेला ठराव पुनः पास करण्यासाठी बोलवावी लागणारी जादा सभा नव्या बिलाअन्वयें आवश्यक नाहीं.

*
* *

प्रत्येक कंपनीस निदान तीन डायरेक्टर्स असावेत, ही दुरुस्ती असेंब्लीस मान्य झाली नाहीं.

*
* *

संख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधित्व देणाऱ्या ( प्रपोर्शनल रेप्रेझेंटेशन ) पद्धतीनें डायरेक्टर बोर्ड दर तीन वर्षांनीं निवडण्यांत यावें, ह्या सूचनेस असेंब्लीमधील बहुसंख्याक सभासदांनीं विरोध केला.

*
* *

मॅनेजिंग एजंटास डायरेक्टरांपैकीं एक तृतीयांशापेक्षां ज्यास्त डायरेक्टरांची नेमणूक करण्याचा अधिकार असूं नये, ही दुरुस्ती असेंब्लीस मान्य झाली.

*
* *

कंपनीचे भाग-भांडवल वाढविण्याचें डायरेक्टरांनीं ठरविल्यानंतर नवीन भाग विकत घेण्याची संधि प्रथम जुन्या भागीदारांस देण्यांत आली पाहिजे, त्यांनीं नवीन भाग खरेदी केल्यानंतर उरतील तेवढे भाग इतरांस विकण्यास हरकत नाहीं, अशा अर्थाची दुरुस्ती मंजूर झाली.

*
* *

आपल्या वार्षिक ताळेबंदाबरोबर कंपन्यांनीं नफा-तोटा पत्रक किंवा जमा-नांवें पत्रकहि प्रसिद्ध करावें, अशी सूचना पास झाली.

---

### हिंदी कस्टम्सचें उत्पन्न गेलया वर्षापेक्षां कमी

एप्रिल ते सप्टेंबर ह्या सहामाहींत चालू सालीं हिंदुस्थान सरकारचें कस्टम्सचें उत्पन्न २६ कोटि, ११ लक्ष रुपये झालें. गेल्या वर्षाच्या पहिल्या सहामाहीचा हा आकडा २६ कोटि, ८९ लक्ष होता.

## पुणें येथील स्मॉलकॉज जज्ज यांचे कोर्टांत

### मुक्काम पुणें येथें

दिवाणी मुकदमा नंबर १६२० सन १९३६ पैकीं

लिलाधर मनसीराम या नांवचे दुकानचे रिसीव्हर
१ रावबहादूर हणमंतराम रामनाथ } वादी
२ बी. के. कुळकर्णी, पुणें.

विरुद्ध

महादेव गोपाळ घाटकर रा. पुणें लष्कर नवा मोदीखाना } प्रतिवादी

प्रतिवादी यांसः—

ज्यापेक्षां सदरहू वादी यानें तुम्हांवर रु.४९८१५८९ मिळणेबद्दल दावा केला आहे, त्यापेक्षां सदरहू दाव्याचा जबाब देण्यासाठीं ता.२०माहे११सन १९३६ रोजीं दिवसां ११ वाजतां जातीनें किंवा ज्या कोणा प्लीडरास योग्य माहिती दिली असेल व दाव्यासंबंधीं सर्व मुद्यांच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल, किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्याबरोबर असेल अशा प्लीडराच्यामार्फत या कोर्टांत हजर होण्याविषयीं या लेखावरून तुम्हांस समन्स करण्यांत येत आहे; व तुम्हीं हजर होण्यासाठीं जो दिवस ठरविला आहे तो दाव्याच्या अखेर निकालासाठीं नेमिला आहे. यास्तव ज्यांच्या जबानीवरून व ज्या दस्तऐवजांवरून तुमच्या जबाबास बळकटी येईल असा भरवसा बाळगण्याचा तुमचा इरादा असेल तसे सर्व साक्षीदार व तसे सर्व दस्तऐवज त्या दिवशीं हजर करण्यास तुम्हीं सिद्ध असलें पाहिजे.

तुम्हांस नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरीं लिहिलेल्या दिवशीं तुम्हीं हजर न झाल्यास तुमच्या परोक्ष दाव्याची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

तसेंच तुम्हांस अशीहि नोटीस देण्यांत येत आहे कीं, निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तिच्यापूर्वीं बजावणीसाठीं पत्ता लिहून देण्यांत तुम्हीं कसूर केल्यास तुमच्या बचावाकडे लक्ष देण्यांत येणार नाहीं.

आज तारीख ३० माहे ९ सन १९३६ रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्क्यानिशीं दिलें.

Sd. S. M. Chavan.
for Registrar.

कारकून. शिक्का

यशासाठीं दररोज १॥ पै खर्च करा.
आरोग्य, ऐश्वर्य व जीवनसौंदर्य यांना वाहिलेलें
बृहन्महाराष्ट्राचें आवडतें व लोकप्रिय
भाग्योदय मासिक
आजच सुरू ठेवा. दरमहा प्रसिद्ध होतें. यांत उत्साहवर्धक लेख, स्फूर्तिदायक चरित्रें, चटकदार लघुकथा आणि सुंदर कविता येत असतात. वा. व. २॥ रु. पुढील पत्त्यावर लिहा.
साहित्य कार्यालय, कराड जि. सातारा.

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:–

**कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.**

अध्यक्ष–श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

स्वदेशी

कापड म्हणजे काय !

(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.

या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.

हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.

खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण

**स्वदेशी भांडार**

लक्ष्मीरोड, पुणें २.

**दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.**

**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें — पदमजी पेपर मिल, मुंबई.**

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये !

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

॥ ॐ नमः शिवाय ॥

**SHRI HAR & CO.,**

**Plumbers, Sanitary Fitters, Building & Furniture Repairers, & Contractors**

Free advice regarding Sanitary fittings & Building materials.

**Enquire at**

FERGUSSON COLLEGE ROAD,

**Opposite Deccan Gymkhana, POONA 4.**



**DECCAN BOOK STALL**

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख २१ ऑक्टोबर, १९३६. अंक ४३

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.


ह्युम सेप्टिक टँक
वापरल्यानें
आरोग्य व स्वच्छता ठेवली जाते.
नादुरुस्त होण्याची भीति नाहीं.
कित्येक वर्षें लोक वापरून सुखी आहेत.
संडासाचें पाणी घाण वास न येतां बाहेर येतें
व
तें भाजी उगवण्यास उपयोगांत आणतां येतें.

ह्युम पाईप
( सिमेंट कांक्रीटच्या )
फार मजबुत व टिकाऊ असतात.
महाराष्ट्रांतील कारखानेः—
मुंबई, पुणें, सोलापूर, मिरज, द. हैद्राबाद.
दि इंडियन ह्युम पाईप कं., लि.
बॅलर्ड इस्टेट, मुंबई.

दि गुड-वुईल
अॅशुअरन्स कंपनी लि.
पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल
विमेदारास
भरपूर सवलती माफक हप्ते
ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा; मॅनेजिंग डायरेक्टर

दि डॉन ऑफ इंडिया
लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें.
पुणें व सोलापूर येथें
बिल्डिंग इन्व्हेस्टमेंट आणि बँकिंग डिपार्टमेंटची
कंपनीचे बँकर्सनीं पसंत केलेली
ता. १ आक्टो-बरपासून सुरू नवीन योजना ता. १ आक्टो-बरपासून सुरू
मुदतीच्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची
फायदेशीर अपूर्व सोय.
बँकेच्या उतरत्या व्याजाच्या काळांत लोकांस आपले कौटुंबिक निर्वाहास साधन अगर मदत म्हणून ठेवीवर मासिक, नियमित व किफायतशीर व्याज देण्याची व्यवस्था तारीख १ आक्टोबर १९३६ पासून अमलांत आणली आहे.
गरजूंनीं जास्त माहिती मागवावी अगर समक्ष भेटावें.
पुणें, ता. २२-९-३६ | जनरल मॅनेजर.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः—ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः—

१ केळकर ब्रदर्स, बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी, लक्ष्मीरोड.

## विविध माहिती

### सायन्स कॉंग्रेसचें ज्युबिली अधिवेशन.

इंडियन सायन्स कॉंग्रेसचें ज्युबिली अधिवेशन कलकत्ता येथें १९३८ मध्यें भरविण्यांत येणार आहे, त्याप्रीत्यर्थ १,१०,००० रुपये खर्च येईल. ५० ब्रिटिश व इतर देशांतील १० मिळून सुमारें ६० परदेशीय शास्त्रज्ञ अधिवेशनास हजर रहाणार आहेत.

### सोन्याची निर्गत चालू रहाणार !

मुंबई शहरांत हिंदुस्थानच्या इतर भागांतून दररोज सुमारें २५ हजार तोळे सोनें येतें, ह्या हिशेबानें दर आठवड्यास डिसेंबर-पर्यंत पाऊण कोटि रुपयांचें सोनें परदेशीं रवाना होत राहील, असा मुंबईमधील सोन्याचे बाजारांतील व्यापाऱ्यांचा अंदाज आहे. ग्रेट ब्रिटनमधून व इतर देशांतून सोन्यास चांगली मागणी आहे.

### रेडिओद्वारां शांततेसबंधी प्रचार

युद्धविषयक कल्पनांचा फैलाव होण्याचा संभव आहे, तो रेडिओच्या वाढत्या प्रचारानें टळावा व जागतिक शांतता व सलोखा ह्यांस पोषक अशाच तऱ्हेच्या बातम्या रेडिओद्वारां प्रसृत कराव्या, अशा अर्थाच्या कराराचा मसुदा राष्ट्रसंघानें तयार केला असून सर्व राष्ट्रांकडून त्याची अंमलबजावणी केली जावी ह्याबाबत संघाचे प्रयत्न चालू आहेत.

### कंपन्यांच्या वार्षिक सभेंत सिनेमा फिल्मचा उपयोग

लंडन येथील ट्रिप्लेक्स सेफ्टी ग्लास कंपनीची वार्षिक सभा नुकतीच झाली, त्यावेळीं अध्यक्षांनीं कंपनीची प्रगति कशी होत आहे, हें भागीदारांस दाखविण्यासाठी मॅजिक-लँटर्नच्या कांचांचा उपयोग केला. भागीदारांस ही पद्धत पसंत पडली व एकानें तर सिनेमा फिल्म्सच्या द्वारां कंपनीसंबंधाची माहिती देण्यांत यावी, असें सुचविलें.

### नवराबायकोची दुक्कल व दुकानदार

बाजारांत नवराबायकोची दुक्कल खरेदीसाठी गेली असतां कोणता जिन्नस पसंत करावा, ह्यासंबंधीं दोघांमध्यें कित्येक वेळां मतभेद उत्पन्न होतो. अशा प्रसंगीं दोघांसहि खुष करणें दुकान-दारास कठिण जातें व तो कोणाचीच बाजू न घेतां तटस्थवृत्ति स्वीकारतो. पत्नीच्या पसंतीवरच त्यानें भर द्यावा, असें एका अनुभवी फर्निचरच्या दुकानदारानें आपलें मत दिलें आहे.

### " युनायटेड प्रेस ऑफ इंडिया "

' युनायटेड प्रेस ऑफ इंडिया ' ह्या बातम्या पुरविणाऱ्या कंपनीच्या पुणें येथील शाखेचा उद्घाटनसमारंभ ता. ७ ऑक्टोबर रोजीं झाला. ' युनायटेड प्रेस 'ची स्थापना १९३३ साली झाली असून एकूण ६४ वृत्तपत्रें तिचे ग्राहक आहेत.

### दि ग्रेट इंडियन मेट्रॉपॉलिटन एक्झिबिशन

आठवे एडवर्ड बादशहा ह्यांच्या राज्यारोहण दरबाराचे प्रसं-गानें नव्या दिल्लीमध्यें एक प्रचंड प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. ब्रिटिश हिंदुस्थान, हिंदी संस्थानें, ग्रेटब्रिटन व आयर्लंड ह्यांमधील लोकांस त्यांत भाग घेतां येईल. प्रदर्शनाच्या व्यवस्था समितीचे सर एच. पी. मोदी हे अध्यक्ष आहेत. दरबाराचे वेळीं दिल्ली शहरास सुमारें एक कोटि लोक भेट देतील अशी अपेक्षा आहे.

### हौरा पुलाचें कंत्राटः हिंदी कंपनीस दुय्यम कंत्राटदार नेमलें

कलकत्त्याशेजारील हुगळी नदीवरील हौरा पुलाचें कंत्राट मेसर्स क्लीव्हलंड ब्रिज अँड इंजिनिअरिंग ह्या ब्रिटिश कंपनीस देण्यांत आलें आहे. वरील कंपनीनें मेसर्स ब्रेथवेट बर्न अँड जेसप कन्स्ट्रक्शन कंपनीस आपलें दुय्यम कंत्राटदार नेमलें आहे. ह्या दुसऱ्या कंपनींत हिंदी हितसंबंधांचें प्राधान्य आहे.

### सुशिक्षितांच्या बेकारीचें निवारण

सुशिक्षितांमधील बेकारीचें निवारण करण्याकरितां उपाय सुचविण्यासाठी संयुक्त प्रांत सरकारनें सर तेज बहादूर सप्रू ह्यांच्या नेतृत्वाखालीं एक कमिटी नेमली होती. तिच्या शिफार-सींस अनुसरून त्या सरकारनें तरूण सुशिक्षितांस काम मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणारें तीन वर्षें मुदतीचें एक " एम्प्लॉयमेंट बोर्ड " स्थापन केलें आहे.

### ट्रेझरी बिलांवर द. द. बारा आणे व्याज

गेल्या आठवड्यांत दोन कोटी रुपयांचीं हिंदुस्थान सरकारचीं त्रैमासिक मुदतीचीं ट्रेझरी बिलें विक्रीसाठी काढण्यांत आलीं असतां त्यांस २ कोटि ७७ लक्ष रुपयांची मागणी आली. स्वीकारलेल्या टेंडरांवर द. द. ११ आणे व्याजाचा दर सरा-सरीनें पडला.

### ब्रिटिश व्यापाऱ्यांचें इटालियन व्यापाऱ्यांकडून येणें

इटालिअन व्यापाऱ्यांकडून ब्रिटिश व्यापाऱ्यांची सुमारें अडीच कोटि रुपयांची येणें बाकी आहे. त्या बाकीची फेड कशी करून घ्यावी ह्यासंबंधांत इटली व ग्रेटब्रिटन ह्यांच्या अधिकाऱ्यांच्या वाटाघाटी चालू झाल्या आहेत.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. १० ऑक्टोबर रोजीं पुरा झालेला आठवडा | १,१७,६७,९९१ |
| ता. १७ ऑक्टोबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ८७,०७,४४५ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते १७ ऑक्टोबर १९३६ अखेर | २,८४,९८,६६,६०४ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ५१६ |
| २ प वा. सर लल्लूभाई सामळदास. ... | ५१७ |
| ३ बँका ठेवी कशा निर्माण करतात ? ... | ५१८ |
| ४ जागतिक शांततेवर चुंबनाचें शिक्कामोर्तब. ... | ५१८ |
| ५ स्फुट विचार. ... | ५१९ |
| मुंबईतले लाजीरवाणे भयंकर दंगे—हुंडणावळीच्या स्थैर्याची तिरंगी योजना—पॅलेस्टाइनमध्यें शांतता प्रस्थापित झाली—ब्रिटिश कामकरी पक्ष व युवक संघ—लोकसंख्येंत कैद्यांचें प्रमाण—अल्युमिनियमचा कारखाना काढा. | |
| ६ लोकशाही म्हणजे ऐदीपणाची चैन. ... | ५२० |
| ७ रत्व—मोटार स्पर्धा व ' रोडफड ' ... | ५२१ |
| ८ चहाचा प्रसार वाढविण्यासाठी संघटित प्रयत्न. | ५२१ |
| ९ प्राप्तीवरील करासंबंधीं दोन महत्त्वाचे निवाडे. | ५२२ |
| १० नागपूर विश्वविद्यालयाची प्रगति. ... | ५२२ |
| ११ लष्करी खात्यासाठी कोल्ड स्टोरेजची स्थापना. | ५२२ |
| १२ सहकारी चळवळ. ... | ५२३ |
| १३ निवडक बाजारभाव. | ५२५ |
| १४ हिंदुस्थान सरकारचें उद्योगधंद्यांस सहाय. | ५२५ |



# अर्थ

बुधवार, ता. २१ ऑक्टोबर, १९३६


## प. वा. सर लल्लूभाई सामळदास

मुंबई इलाख्याच्या आर्थिक व सामाजिक जिविनाशीं तीन तपें-पर्यंत अत्यंत निकट संबंध असलेला आणि हिंदुस्थानच्या सर्वांगीण प्रगतीविषयीं कळकळ बाळगून तिच्या बाबतींत अहर्निश झटणारा अनुभवी नेता, ह्या नात्यानें सर लल्लूभाइ सामळदास ह्यांची कामगिरी एवढी मोठी झाली आहे कीं, त्यांच्या निधनाच्या वार्तेनें जनतेच्या मनास धक्का बसल्यावांचून रहाणार नाहीं. त्यांची तीक्ष्ण बुद्धि, उदार ध्येयवादित्व, प्रेमळ स्वभाव, परोपकारी वृत्ति, उद्यमशीलता, साधी रहाणी इत्यादि गुणांनीं सव वर्गांच्या, जातींच्या व विचारांच्या लोकांस ते प्रिय झाले हात. उद्योगधंदे, व्यापार, बँकिंग, सहकारी चळवळ, शिक्षणप्रसार, सामाजिक सुधारणा ह्या राष्ट्रीय हिताच्या प्रश्नांचे संबंधांत त्यांस अत्यंत कळकळ वाटत असे आणि ती केवळ शाब्दिक नसून तिचें मूर्त स्वरूप त्यांनीं ह्या सर्व क्षेत्रांत केलेल्या भरीव परिणामकारक कार्यांत पहावयास मिळतें. उतरत्या वयांतहि त्यांचा उत्साह व परिश्रम तरुणांस लाजवण्यासारखे अविरत व दांडगे होते. टाटांची विविध औद्योगिक संघटना, बँक ऑफ बडोदा, सिंधा नॅव्हिगेशन कंपनी, बॉंबे लाइफ इन्शुअरन्स कंपनी इत्यादि अनेक आर्थिक संस्थांशीं प्रवर्तक व चालक ह्या नात्यानें त्यांचा संबंध असून असल्या चळवळींतले विश्वसनीय तज्ज्ञ म्हणून त्यांची गणना होत असे. त्यांचें सरकार दरबारीं वजन असे, तसेंच ते सर्व दर्जांच्या व पक्षांच्या लोकांमध्येंहि असे, ह्याचें कारण त्यांच्या हतूची शुद्धता, मनाचा समतोलपणा व सार्वजनिक हिताच्या कामीं अंगमेहनत करून सहाय देण्याची त्यांची तयारी हें होय. मुंबई विश्वविद्यालयाच्या सेनेटचे ते अनेक वर्षें सरकारनें नेमलेले सभासद होते आणि कांहीं काळपर्यंत प्रांतिक सरकारचे तात्पुरते कार्यकारी मंत्रीहि होते. पहिल्या कौंसिल ऑफ स्टेटमध्यें ते लोकानियुक्त सभासद होते व मुंबई प्रांतिक सहकारी बँकेचे उत्पादक, कांहीं वर्षें अध्यक्ष व शेवटपर्यंत डायरेक्टर होते. प्रांतिक लँड मॉर्गेज बँक मुंबईस चालू सालीं स्थापन झाली आहे, तिचें धुरीणत्व अध्यक्ष ह्या नात्यानें त्यांनीं स्वार्थत्यागपूर्वक पत्करलें होतें. कै. वा. गोपाळराव गोखले ह्यांच्याशी त्यांचा मित्रत्वाचा संबंध असे, आणि इतर राष्ट्रीय पुढाऱ्यांशीहि ते स्नेहभावानें वागत असत. त्यांचें वाचन, परिशीलन व लेखन अखेरपर्यंत अव्याहत चाललेलें असे आणि सार्वजनिक क्षेत्रांत प्रगति घडवून आणणारी कोणतीहि कल्पना त्यांचेपुढें मांडली असतां तिला मदत व उत्तेजन देण्याची त्यांची नेहमी तयारी असे.

राष्ट्र व समाज ह्यांच्या उन्नतीविषयीं सर लल्लूभाई ह्यांस वाटत असलेली कळकळ व त्या बाबतींतले त्यांचे परिश्रम ह्यांचा उल्लेख वर आला आहे. त्याचें उत्कृष्ट निदर्शक म्हणजे त्यांनीं सहकारी चळवळींत केलेलें कार्य होय. भावनगर संस्थानांत अधिकारी ह्या नात्यानें त्यांची झालेली नोकरी आणि मोठमोठाले कारखाने व व्यापारी संस्था काढण्यांत व चालवण्यांत त्यांनीं घेतलेला पुढाकार ह्यांचा विचार केला असतां गरीब व दुबळ्या शेतकरी वर्गाच्या विषयींची सहानुभूति व सहकारी संस्थांच्या मार्फत तिला मूर्त स्वरूप देण्याचा त्यांचा प्रयत्न ह्याविषयीं कोणास आश्चर्य वाटण्याचा संभव आहे. परंतु सहकारी चळवळी संबंधाची त्यांची कामगिरी सर लल्लूभाई ह्यांची सहृदयता व उदारध्येयवादित्व ह्यांची साक्षच पटवीत आहे. वीस वर्षांपूर्वी सहकारी चवळवळीच्या अडचणी व विस्तार ह्यांचेविषयीं चौकशी व शिफारसी करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें मॅकलॅगन कमिटी नेमली होती, तिचे ते सभासद होते आणि त्या चळवळीचे उद्देश व कार्यपद्धति ह्यांचे बाबतींत त्यांनीं अनेक परिषदांत विचारप्रवर्तक भाषणें करून व्यावहारिक स्वरूपाचा सल्ला दिला आहे. मुंबई इलाख्यांतल्या सहकारी संस्थांकडे त्यांचें सतत लक्ष असे व प्रांतिक सहकारी बँकेच्या डायरेक्टराचें काम ते मनःपूर्वक करीत. अखिल भारतीय सहकारी इन्स्टिट्यूट्सचा संघ काढण्यांत त्यांनीं पुढाकार घेतला होता व त्याचे ते कित्येक वर्षें अध्यक्ष होते. मुंबई इलाख्याची लँड मॉर्गेज बँक नुकतीच स्थापन झाली, तेव्हां तिच्या अध्यक्षाची दगदगीची व जबाबदारीची जागा त्यांनीं केवळ कर्तव्यपरायणतेनें स्वशिरावर घेतली. वार्धक्यामुळें प्रकृति नीट नसतांनाहि त्यांचें सार्वजनिक कार्य अव्याहत चालू असे. त्यांच्या निधनानें सहकारी चळवळीचें अपरिमित नुकसान झालें असून देशी व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या क्षेत्रांतला एक कार्यकर्ता व सल्लागार नाहींसा झाला आहे. त्यांचे तिन्ही मुलगे " लल्लू काकां " च्या मार्गानें जाऊन आर्थिक क्षेत्रांत उपयुक्त कार्य करीत आहेत. त्यांच्यावर व त्यांच्या सर्व कुटुंबावर दुर्धर प्रसंग आला आहे. आपल्या दुःखांत सर लल्लूभाई ह्यांचे अनेक मित्र व चहाते वांटेकरी आहेत, हें लक्षांत ठेवून त्यांनीं स्वतःचें सांत्वन करून घेतल्यावांचून गत्यंतर नाहीं. सरकार व जनता ह्या दोहोंच्या विश्वासास पात्र झालेल्या आणि सामाजिक प्रगतीचें ध्येय पुढें ठेवून तें गाठण्याचा सतत प्रयत्न करणाऱ्या पुढाऱ्यांची सहकारी चळवळीस किती आवश्यकता आहे, हें सर लल्लूभाई ह्यांच्या चरित्रावरून सिद्ध झालें असून, त्यांचें अनुकरण करण्याची स्फूर्ती आमच्या सुशिक्षित वर्गांत कार्यप्रवण होईल, अशी आम्हांस आशा आहे.

## बँका ठेवी कशा निर्माण करतात ?

'ठेव' हा शब्दच असा आहे कीं, ठराविक वेळीं परत मिळण्याच्या शर्तीनें गिऱ्हाइकांनीं बँकांच्या स्वाधीन केलेला स्वतःचा पैसा अशी कल्पना त्यावरून येते आणि ती वाजवीहि आहे. गिऱ्हाइकांनीं बँकांत ठेवलेली रकम ती ठेव अशी ठेवीची साधी व्याख्या होते. पैशाच्या स्वरूपांतली ठेव आणि कर्जरोखे, दागदागिने इत्यादींच्या स्वरूपांतली ठेव ह्या दोहोंमध्यें अर्थातच अंतर आहे, तें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. ह्या दोहोंपैकीं दुसऱ्या प्रकारची ठेव ऐनजिनसी जशीच्या तशी परत केली पाहिजे; पहिल्या तऱ्हेच्या ठेवींची रकम कायदेशीर चलनांत परत केली म्हणजे झालें, विवक्षित नंबराच्या नोटा किंवा विशिष्ट वर्षाच्या छापाचे रुपये गिऱ्हाइकांस दिले पाहिजेत असें नाहीं. आम्हीं प्रस्तुत प्रश्न उपस्थित करीत आहों तो ह्या फरकाविषयीं नसून बँकांतल्या ठेवींच्या उगमासंबंधाचा मूलग्राही आहे. गिऱ्हाइकांनीं बँकांत आणून ठेवलेली रोकड हाच त्यांच्या ठेवींचा आधार व आकार आहे आणि त्याच रकमेंतून बँकांस कर्जें देतां येतात अशी सामान्य समजूत आहे. गिऱ्हाइकांनीं बँकांच्या स्वाधीन पैसा केला म्हणजे त्यांतूनच त्या गरजू लोकांस कर्जें देतात, एरव्हीं त्यांचेजवळ पैसा येणार कुठला व त्या रकमा कर्जाऊ देणार कशा असें सकृद्दर्शनीं वाटणें साहजिक आहे. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं केवळ गिऱ्हाइकच नव्हे तर स्वतः बँका ठेवी निर्माण करतात आणि आधुनिक पद्धतीच्या व्यवहारांत ह्या प्रकारच्या ठेवींचें प्रमाण फार मोठें असतें. चालू खात्यावर पैसा ठेवून चेकसुच्या मार्गानें तो लागेल तसतसा उचलणें आणि आपली शिल्लक स्वतःजवळ न बाळगतां बँकांमध्यें ठेवणें हा प्रघात पाश्चात्य देशांत रूढ झाला आहे. तेथें बँका गिऱ्हाइकांस पतीवर किंवा रोख्यांच्या तारणावर कर्जें देऊन रकमा त्यांच्या खात्यांत टाकतात आणि अशा रीतीनें ठेवी उत्पन्न करतात.

'बँका ठेवी निर्माण करतात' हें वाक्य विचित्र वाटतें खरें, पण वरील आधुनिक पद्धति लक्ष्यांत घेतली असतां त्यांतलें रहस्य समजून येईल. जरूरीप्रमाणें उचलतां यावी अशी ठेव ज्यांस स्वतःच्या बचतींतून बँकेंत उभारतां येत नाहीं, ते लोक कर्जें काढतात व ही रकम त्यांचे खात्यांत जमा होते. बँकेनें दिलेलें कर्ज तिचें 'येणें' होतें व त्याचीच गिऱ्हाइकाची 'ठेव' बनल्यानें तितकेंच तिला 'देणें' होतें. अशा रीतीनें उद्भवलेल्या ठेवीवर गिऱ्हाइकें चेक काढतात, ते चेक इतरांच्या हातीं जाऊन बँकांमध्यें परत येतात आणि हें व्यवहाराचें रहाटगाडगें सारखें चालू रहातें. विशिष्ट प्रमाणांत रोकड बाळगली असतां बँका गिऱ्हाइकांस कर्जें देऊन ठेवी निर्माण करूं शकतात आणि ग्रेटब्रिटनमध्यें रोकड व ठेवींची एकूण रकम ह्यांचें परस्पर प्रमाण १ : १० असें आहे. कांहीं लोक रोकड नेऊन बँकांत ठेव ठेवतात आणि गिऱ्हाइकें आपला पैसा रोकडीच्या स्वरूपांतहि परत मागतात. अशा रीतीची मागणी भागवण्यासाठीं बँकांस रोकड जवळ बाळगावी लागते. तिच्या दसपटी इतक्या रकमेचीं कर्जें देऊन त्या आकाराच्या ठेवी मात्र त्यांस बनवतां येतात; आणि हाच व्यवहार गिऱ्हाइकांच्या सोयीचा व बँकांच्या फायद्याचा असतो. बँकांची रोकड शिल्लक आणि त्यांनीं दिलेलीं कर्जें व निर्माण केलेल्या ठेवी ह्यांची प्रमाणबद्धता वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. रोकड शिल्लक वाढली तर बँकांस त्या मानानें ठेवी वाढवतां येतील हें उघड आहे. तथापि, गेल्या पांच वर्षांत मंदीमुळें हें प्रमाण अनुभवास आलें नाहीं, ह्याचें कारण, कर्जें घेऊन त्या पैशाचा फायदेशीर विनियोग करण्याची बँकांच्या गिऱ्हाइकांस भासलेली अडचण हें आहे. ह्या प्रसंगीं कांहीं पैसा कमीअधिक लांब मुदतीच्या सरकारी रोख्यांत गुंतवणें शक्य व आवश्यक झालें असलें तरी ह्या व्यवहारास बँकांच्या दृष्टीनें मर्यादा असल्या कारणानें त्यांनीं रोकड व ठेवी ह्यांचें परस्पर प्रमाण १ : ९ इतकें वाढूं दिलें.

बँकेनें सरकारी रोखे खरेदी केले किंवा हुंड्या डिस्कौंट केल्या तर त्यांचे पैसे दलालाच्या किंवा गिऱ्हाइकाच्या खात्यांत जमा केले जाऊन त्या रकमांच्या इतक्या ठेवी उत्पन्न होतात. गिऱ्हाइकांस ओव्हरड्राफ्टवर कर्जें मंजूर होतांक्षणींच मात्र असा परिणाम घडून येत नाहीं. मंजूर केलेल्या रकमेचा चेक निघून तो कर्ज देणाऱ्या किंवा इतर बँकेंत भरला गेला म्हणजेच त्यांची ठेव बनते. एखाद्या ब्रिटिश बँकेनें बँक ऑफ इंग्लंड कडून किंवा तिच्या गिऱ्हाइकांकडून रोखे खरेदी केले असतां ठेव निर्माण होत नाहीं, ह्याचें कारण, सदरहु व्यवहारांत मध्यवर्ती बँकेंतील त्या बँकेची तेवढ्यापुरती शिल्लक कमी होते, हें होय. बँक ऑफ इंग्लंडकडून टेंडरमार्फत बँका ट्रेझरी बिलें खरेदी करतात, तेव्हां ह्या तऱ्हेचा हिशेब होत असतो. सरकारी कर्ज, हुंडणावळ, बँक रेट इत्यादि बाबतींतल्या मध्यवर्ती बँकेच्या धोरणाचा व्यापारी बँकांच्या व्यवहाराशीं निकट संबंध येतो आणि बँकांस पैशाचा विनियोग करण्याचें आपलें धोरण त्याच्या बेतानें आखावें लागतें. रोकड शिल्लक वाढली म्हणजे गिऱ्हाइकांस द्यावयाचीं कर्जें व ठेवी वाढतीलच असें नाहीं, आणि कमीअधिक लांब मुदतीच्या सरकारी रोख्यांत पैसा विशिष्ट प्रमाणाबाहेर गुंतवतां येईल असेंहि नाहीं. सरकारी तिजोरीची परिस्थिति व गरज, मध्यवर्ती बँकेची चलन व हुंडणावळ ह्यांचे संबंधांतली कारवाई आणि व्यापारी बँका व जनता ह्यांचे व्यवहार ह्या सर्वांचा योग्य मेळ बसवण्याची ह्या संबंधांत नेहमी आवश्यकता असते.

## जागतिक शांततेवर चुंबनाचें शिक्कामोर्तब

देवादिकांचीं नांवें आंत लिहून आपल्या इष्टमित्रांस पत्रें पाठवावयाचीं, त्यांनीं ह्याचप्रमाणें इतरांकडे पत्रें पाठवावीं असें सुचवावयाचें, आणि पत्रांची ही साखळी मोडणारावर आपत्ति येईल अशी भीति घालावयाची हा प्रकार हिंदुस्थानांत कांहीं लोक सद्हेतूनें पण खुळेपणानें करतांना आढळतात. जगांत शांतता प्रस्थापित व्हावी ह्या उदात्त हेतूनें लंडन येथील एका बाईनें चुंबनपत्रिकांचा उपक्रम केला असल्याची विलक्षण हकीकत प्रसिद्ध झाली आहे. पत्रांत चुंबनक्षेपन असतें आणि ज्या गृहस्थास तें मिळेल त्यानें दहा तरुणींस पुढें पाठवून त्यांच्या द्वारा चुंबनाचा प्रसार करावयाचा. तरुणींनीं दहा तरुणांकडे चुंबनासमवेत पत्र पाठवावयाचें आणि त्यांस ही साखळी चालती ठेवण्याविषयीं विनंति करावयाची. साखळी मध्येंच तोडणारावर संकट येईल ही भीति दाखवलेली असावयाचीच. ह्या तऱ्हेनें चुंबनद्वारा जिकडे तिकडे स्नेहभाव उत्पन्न झाला म्हणजे सर्व जगांत शांतता व बंधुभाव प्रस्थापित होईल अशी हा उपक्रम चालू करणारांची कल्पना आहे. चुंबनपत्रिकांच्या उपायानें युद्धें थांबतीं तर राष्ट्रसंघाची कांहींच आवश्यकता नसती. तथापि, जागतिक शांततेसंबंधानें सामान्य लोकांची किती उत्कट इच्छा आहे आणि ते ह्या बाबतींत कसे किंकर्तव्यतामूढ बनले आहेत, हें मात्र चुंबनपत्रिकांच्या साखळीच्या प्रयत्नावरून स्पष्ट प्रतीत होतें.

## स्फुट विचार

### मुंबईतले लाजीरवाणे भयंकर दंगे.

कायदा धाब्यावर बसवून मारामाऱ्या व दंगेधोपे करणें हें केव्हांहि व कोठेंहि अनिष्ट व गर्ह्य आहे. त्यांतहि, मुंबई सारख्या व्यापाराच्या व उद्योगधंद्यांच्या आणि सर्व धर्मांच्या, वर्णांच्या व जातींच्या लोकांनीं गजबजलेल्या शहरांत खुनांची व जाळपोळीची दंगल अनेक दिवस चालू रहावी ही अत्यंत लाजिरवाणी व दुर्दैवाची कहाणी आहे असें म्हणावें लागतें. रोजच्या सामान्य व्यवहारांतहि मतभेद उत्पन्न होऊन सामोपचारानें व तडजोडीनें तंटा न मिटल्यास कायदा व न्यायमंदिर ह्यांचाच मार्ग नागरिकांस स्वीकारावा लागतो; आणि तसें होण्यावरच सामाजिक व आर्थिक जीवनाचें स्वास्थ्य व अस्तित्व अवलंबून असतें. विविध प्रकारचा व्यापार व धंदे ह्यांमध्यें मुंबईंत अनेक धर्मांच्या व पेशांच्या लोकांचें रात्रंदिवस सारखें साहचर्य व सहकार चालू असतां एकाएकी त्यांचें जीवित मवाल्यांच्या तावडींत सांपडून ह्या बेजबाबदार लोकांस पेंढाऱ्यांप्रमाणें लुटालूट, जाळपोळ व खून करीत सुटतां यावें ही गोष्ट त्या शहराच्या नांवास कालिमा आणणारी आहे. असल्या दंग्यांत प्राणांची व वित्ताची हानी तर होतेच, पण समाजाच्या नागरिक व आर्थिक जीविताचा पायाच त्यांचे योगानें डळमळतो. मुंबईच्या व्यापारावर स्थानिक नागरिकांचाच नव्हे तर बाहेरच्या लाखों लोकांचा व्यापार-व्यवसाय अवलंबून आहे आणि त्या शहरांत मोठ्या प्रमाणावर दंगे झाले असतां त्यांचे परिणाम चिरकालिक आणि विस्तृत क्षेत्रांत नाश करणारे असे होतात. जेथें जीवाची व वित्ताची शाश्वति नाहीं, तेथें धंदा व व्यापार कसा चालणार? मवाल्यांच्या दंग्यांवर परिणामकारक उपाय काढून त्यांची अंमलबजावणी तात्काल व कार्यक्षम रीतीनें होईल अशी कायमची व्यवस्था करण्याची जबाबदारी सर्व नागरिकांवर आहे. मागील अनुभवावरून योग्य बोध न घेतल्यानें मुंबई शहरावर भयंकर दंग्यांचा प्रसंग पुन्हां ओढवला आहे. शहरांत अपरिमित नुकसान होऊन शेवटीं शांतता प्रस्थापित होत आहे. ती टिकाऊ व्हावी आणि अत्याचाराच्या पुनरावृत्तीचा संभव राहूं नये, ह्याविषयीं निश्चित व्यवस्था करण्याचें काम जबाबदार नागरिक व सरकार ह्यांनीं तात्काळ हातीं घेतलें पाहिजे.

---

### हुंडणावळीच्या स्थैर्याची तिरंगी योजना

फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांनीं परस्परांमधील हुंडणावळ नवीन ठरणाऱ्या दरानें स्थिर ठेवण्याचें निश्चित केलें आहे. ही योजना यशस्वी होण्यास, सदरहु राष्ट्रांचे दरम्यान सोन्याचें येणें-जाणें होईल त्याची किंमत ठरवली जाणें आणि त्याच किंमतीनें सोन्याचे व्यवहार होणें आवश्यक आहे. सोन्याचे भाव त्या देशांत वारंवार वर-खाली होण्याचा संभव राहील तर हुंडणावळींत चलबिचल पुन्हां उद्भवेल आणि सध्याचे ती स्थिर करण्याचे चाललेले प्रयत्न फुकट जातील, हें उघड आहे. तेव्हां, हुंडणावळीच्या स्थिरतेकरितां सोन्याची देवघेव ह्यापुढें करावी लागली असतां ती निश्चित भावानें व्हावी ह्याविषयीं अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स हीं राष्ट्रें तरतूद करीत आहेत. पौंड-डॉलर हुंडणावळ १ पौंड=४·८९ डॉलर आणि पौंड-फ्रँक हुंडणावळ १ पौंड=१०५ फ्रँक ह्या भावांच्या आसपास स्थिरावत असल्याचें दिसत आहे. अमेरिकेजवळ सोन्याचा भरपूर संग्रह असल्यानें नवीन योजनेस त्याचा भक्कम आधार मिळणार आहे. सुमारें २,५०० कोटि रुपये किंमतीच्या सोन्याचा अमेरिकन डॉलरला पाठिंबा आहे व त्याकारणानें डॉलरची पौंड किंवा फ्रँक ह्यांतली ठरणारी किंमत स्थिर राखण्याचें पूर्ण सामर्थ्य अमेरिकन राष्ट्रांत आहे. सोन्याची विक्रीची किंमत फक्त अमेरिका जाहीर करील आणि इंग्लंड व फ्रान्स ह्यांच्या किंमती गुप्त ठेवण्यांत येतील असें अमेरिकेच्या फडनवीशी खात्यानें प्रसिद्ध केलें आहे. ह्या दोन राष्ट्रांकडून अमेरिका सोनें खरेदी करील तेव्हां त्याचा भाव परस्पर-विचारानें निश्चित केला जाईल. हुंडणावळीच्या स्थैर्यासाठी ग्रेटब्रिटनचा जो एक स्वतंत्र फंड आहे, त्यांतून सोनें खरेदी होईल तेव्हां तें बहुतांशीं लंडनमधल्या प्रचलित बाजारभावानेंच होईल असें समजतें. प्रस्तुत प्रकरणाबाबत प्रसिद्ध झालेल्या बातम्यांवरून असें दिसतें कीं हुंडणावळीच्या स्थैर्याबाबतची तिरंगी योजना तपशीलवार रीतीनें निश्चित होत आहे आणि ती मजबूत पायावर उभी रहावी ह्याविषयीं अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स हीं राष्ट्रें शिकस्त करीत आहेत. अमेरिकेचें प्रचंड आर्थिक बल व जंगी सुवर्णसंग्रह ह्यांचे योगानें त्या राष्ट्रास विशेष महत्त्व आणि नेतृत्वहि प्राप्त होणें साहजिक आहे.

---

### पॅलेस्टाईनमध्यें शांतता प्रस्थापित झाली

गेले सहा महिने पॅलेस्टाइनमध्यें बंडाळी चालू होती, ती थांबून आतां शांतता प्रस्थापित झाली आहे. पॅलेस्टाइन हें ज्यू लोकांचें मूळ व पवित्र स्थान आहे व तेथें त्यांची वस्ती झपाट्यानें वाढत आहे. स्थानिक अरबांस ही गोष्ट अर्थातच नापसंत आहे, परंतु ज्यू लोकांच्या पॅलेस्टाइनमधील वसतीस प्रतिबंध होणार नाहीं असें राष्ट्रसंघाचें अभिवचन आहे. पॅलेस्टाइन मँडेटची म्हणजे कारभाराच्या देखरेखीची व्यवस्था ग्रेटब्रिटनकडे सोंपविण्यांत आलेली आहे व ज्यू-अरब भांडणांत न पडण्याचा त्या देशाचा विचार आहे. ज्यू लोकांविरुद्ध अरबांनीं चालविलेल्या मोहिमेस यश न येऊन अखेर तूर्त तरी त्यांनीं माघार घेतली आहे. अरबस्तानांतील स्वतंत्र राजांनीं त्यांच्यावर स्वतःचें वजन टाकून शांतता प्रस्थापित होण्यास मदत केली आहे. पॅलेस्टाइनमधील परिस्थितीसंबंधीं चौकशी करण्यासाठी लॉर्ड पील ह्यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटिश सरकारनें गेल्या ऑगस्टमध्यें एक कमिशन नेमलें होतें. आतां बंडाळी थांबली असल्यानें ह्या महिनाअखेर कमिशनच्या कामास सुरवात होईल अशी अपेक्षा आहे.

---

### ब्रिटिश कामकरी पक्ष व युवकसंघ

ब्रिटिश कामकरी पक्षानें आपल्या मतांचा प्रचार करण्याच्या उद्देशानें स्वतःच्या कक्षेंत एक युवकसंघ स्थापन केला होता आणि शिक्षण व करमणूक हे त्याचे प्रधान हेतु निश्चित केले होते. परंतु हे युवक वडील मंडळीचें अनुकरण करून वार्षिक परिषदा भरवूं लागले व पक्षाच्या घटनेंत स्वतंत्र भागीदारीचा हक्क सांगूं लागले. कामकरी पक्षाचें धोरण व कार्य ह्यांतहि त्यांची ढवळाढवळ होऊं लागली असें दिसून येतांच युवकसंघाचा मूळ उद्देश सफल होत नाहीं व पक्षास त्यापासून अडचण मात्र उत्पन्न होते ह्या कारणास्तव संघ मोडून टाकण्याचा निश्चय पक्षाच्या कार्यकारी मंडळानें केला आहे. ब्रिटिश कामकरी वर्गाची घटना मजबूत आहे आणि त्यांतला स्त्रीविभागहि कार्यक्षम आहे. परंतु त्या पक्षास आपला युवकसंघ पचनीं पाडतां आलेला नाहीं

किंवा आपलें उपयुक्त अंग म्हणूनहि त्याची वाढ करतां आलेली नाहीं, असें स्पष्ट दिसतें.

### लोकसंख्येंत कैद्यांचें प्रमाण.

भिन्नभिन्न देशांत तेथील एकूण लोकसंख्येच्या मानानें तुरुंगांत शिक्षा भोगणारे किती इसम असतात, ह्याची खानेसुमारी करण्यांत आली आहे. दर लक्ष लोकसंख्येंत इंग्लंड व वेल्समध्यें सुमारें ३० कैदी आहेत. आयरिश फ्रीस्टेटमध्यें हा आंकडा सुमारें २० आहे. फ्रान्स, नॉर्वे व डेन्मार्क ह्या देशांत दर लाख माणसांत ५० कैदी आहेत; ऑस्ट्रिया व पोलंड ह्यांमध्यें अनुक्रमें करून १०४ व १०५ आहेत. राजकीय गुन्हेगारांच्या छावण्या वगळल्यास जर्मनींत दर लक्षांत १५६ कैदी आहेत. बाल्कन देशांतला आंकडा २०० चे वर आहे आणि दक्षिण आफ्रिकेचा २३० आहे. हिंदुस्थानांत सर्वांत मोठा आंकडा वायव्य प्रांतांतला ३०० चा आहे व ब्रह्मदेशाचा १७१ आहे. हे आंकडे सर्वस्वी समान पद्धतीनें गोळा केलेले नसले आणि त्यांचें तुलनात्मक महत्त्व अगदीं बिनचुक नसलें तरी त्यांवरून निरनिराळ्या देशांत गुन्हेगारीचा फैलाव किती आहे, ह्याची कल्पना येण्यासारखी आहे.

### ॲल्युमिनियमचा कारखाना काढा

मुंबई इलाख्यांत ॲल्युमिनियमचे कारखाने चालणें कसें शक्य आहे, हें दर्शविणारें एक पत्रक डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीजनीं प्रसिद्ध केलें आहे. १९२९--३० सालीं सुमारें १½ कोटि रुपयांचें ॲल्युमिनियम हिंदुस्थानांत आलें. ह्या धातूचा खप वाढण्याचा संभव आहे. ठाणें जिल्ह्यांत बॉक्साइट सांपडलें असून विजेचा पुरवठाहि मुबलक आहे, तेव्हां त्यांतून ॲल्युमिनियम काढण्यास हरकत नाहीं. कल्याण व ठाकुर्ली हीं दोन ठिकाणें कारखाने स्थापन करण्यास विशेष सोईचीं होतील. आयात होणाऱ्या ॲल्युमिनयमच्या किंमतीपेक्षां देशी ॲल्युमिनियमच्या उत्पादनाची किंमत बरीच कमी राहील, असें पत्रकांत हिशेबवार दाखविलेलें आहे. सदरहु पत्रकाची प्रत गव्हर्नमेंट बुक डेपो, चर्नी रोड, मुंबई, ह्या पत्त्यावर तीन आण्यांस मिळूं शकेल.

### कलकत्ता कॉर्पोरेशन वीज पुरवठा आपल्या हातीं घेणार

कलकत्ता कॉर्पोरेशननें शहरास वीज पुरविणाऱ्या कंपनीची आपल्या हद्दींमधील सर्व मालमत्ता ता. १० ऑक्टोबर १९३८ रोजीं विकत घेण्याचें ठरविलें आहे व त्याप्रमाणें वीज कंपनीस कळविलें आहे.

### मुंबई शहरांतील दंगा व त्यासंबंधांतील विम्याचे दर

मुंबई शहरांतील दंग्यामधील आगी, लुटी, इत्यादींमुळें होणाऱ्या आपल्या नुकसानीची भरपाई व्हावी, म्हणून व्यापारी लोक तातडीनें संरक्षक विमा उतरूं लागले आहेत. नेहमींपेक्षां धोका वाढलेला असल्यामुळें मुंबईमधील विमा कंपन्यांनीं ह्यासंबंधांतील दर १४ आक्टोबरपासून चौपट केला आहे.

### ग्रेटब्रिटनमध्यें संत्र्यांचा तुटवडा

स्पेन व पॅलेस्टाईन येथील बंडाळीमुळें तेथून होणारी संत्र्यांची निर्गत रोडावली आहे व लंडनमध्यें संत्रीं दिडीनें महागलीं आहेत. दक्षिण आफ्रिकेमध्यें ह्या फळांची लागवड आतां बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होत असल्यानें ब्रिटिश बाजार काबीज करण्याचा त्या देशाचा प्रयत्न चालू आहे.

### हेर हिटलरच्या मतें लोकशाही म्हणजे ऐदीपणाची चैन

जर्मनी, इटली व रशिया ह्या देशांत आज विविध मतप्रकाशन व खुली चर्चा ह्यांस वाव नाहीं. एका सत्ताधाऱ्याच्या हुकमतीखालीं लष्करी शिस्तीनें लोकांनीं वागलें पाहिजे असा तेथें दंडक आहे. सभा नाहींत, वादविवाद नाहीं, साधक-बाधक विचारांची छाननी नाहीं, व्यक्तिमतस्वातंत्र्य नाहीं, असा प्रकार त्या देशांत चालू असून निर्णयात्मक सत्ता सर्वस्वी विशिष्ट पुढाऱ्यांच्या हातीं एकवटली आहे व हिटलर, मुसोलिनी व स्टॅलिन हे सांगतील ती पूर्वदिशा अशी व्यवस्था अमलांत आहे. विविध मतांचा परामर्श घेतला जाऊन सार्वजनिक हिताच्या प्रश्नांचा निर्णय व्हावा ही लोकशाही या नांवानें संबोधली जाणारी घटना नाहींशी होऊन तिची जागा सर्वाधिकाऱ्यांच्या एकछत्री कारभारानें घेतली आहे. ह्या व्यवस्थेचा पुरस्कार करतांना आत्मसमर्थनार्थ हेर हिटलर यांनीं कांहीं दिवसांपूर्वी खालील उद्गार काढलेः—

" सर्व शक्ती व विचार एका व्यक्तींत एकवटले तरच आपणांपुढें येऊन पडलेले अनेक प्रश्न सुटतील. लोकशाहीची घटना कांहीं राष्ट्रांत चैनीची वस्तु म्हणून युक्त असेल. आपल्या ताब्यांत २५-३० लाख चौरस मैलांच्या वसाहती असत्या आणि जर्मनींत दर चौरस मैलास ७ ८ माणसेंच असतीं, जर आणसांस कापूस, कोळसा, तांबें, जस्त, कथिल वगैरेंचा भरपूर पुरवठा असता, जर आमच्या भूमींतून रॉकेल तेल बाहेर येतें तर आम्हींहि लोकशाही राज्यव्यवस्थेची चैन उपभोगीत बसलों असतों आणि सर्वांनीं बडबड चालू ठेवली असती. पण जर्मनीसारख्या राष्ट्रास वरील जरूरीच्या वस्तू मिळण्यास मारामार पडत आहे, तेव्हां त्यांतील जनतेस उत्साह, निश्चय व कर्तृत्वाचा बाणा ह्यांची विशेष आवश्यकता आहे. जर तुम्हीं लोकांनीं बडबड बंद करून लोकशाही गुंडाळून ठेवली नसती तर आम्हांस खायला द्या असें म्हणत सरकारी कचेरीच्या दारांत बेकारांच्या झुंडी गोळा झाल्या असत्या. "

### आंतरराष्ट्रीय विश्वासाचा अभाव

" गेल्या वीस वर्षांत आंतरराष्ट्रीय करारांतली विश्वसनीयता व कार्यक्षमता नाहींशी झाली आहे. ध्येयवादित्व व भावना कमजोर होऊन राष्ट्रीय महत्त्वाकांक्षा, हटवादीपणा व भीति ह्यांचा झगडा चालू आहे. ज्यांत सर्वाधिकाऱ्यांनीं आपली सत्ता प्रस्थापित केली आहे, अशा राष्ट्रांत वाटेल त्या बऱ्यावाईट मार्गांनीं स्वतःचे हेतु साध्य करून घेण्याची प्रवृत्ति बळावली आहे."

—कॉर्डेल हल, अमेरिकन् सेक्रेटरी ऑफ स्टेट, ह्यांचें न्यूयॉर्क सिटींत केलेलें एक भाषण.

*For All Medicinal Requisites*
— TRY —
**N. MAHADEV & Co.**
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner, POONA 2.

## रेल्वे-मोटार स्पर्धा आणि "रोडफंड"

प्रांतिक सरकारांनीं मोटारींच्या वहातुकीचें नियंत्रण कसें करावें ह्याबद्दलच्या नियमांची चर्चा मध्यवर्ती सरकार व कायदेमंडळ ह्यांनीं चालविली आहे. मोटारचा धंदा करणाऱ्या लोकांचा आणि प्रांतिक सरकार व जनता ह्यांचा तिच्याशीं निकट संबंध असल्यामुळें होऊं घातलेल्या नियमांचे संबंधांत सर्वांनीं दक्षता बाळगणें अगत्याचें आहे. ह्या प्रश्नाचा इतिहास थोडक्यांत असा आहे. देशांत दळणवळणाच्या सोयीचे, चांगले व भरपूर रस्ते असावे ह्याकरितां कोणतें धोरण आंखणें इष्ट आहे ह्याचा विचार करण्यासाठी १९२७ मध्यें हिंदुस्थान सरकारनें एक कमिटी नेमली होती. तिच्या शिफारशींस अनुसरून त्या सरकारानें पेट्रोलवर दर गॅलनास २ आणे ह्या दरानें जादा कर बसविला व त्याच्या उत्पन्नामधून प्रांतिक सरकारें व संस्थानें ह्यांस त्यांच्या हद्दींतल्या पेट्रोलच्या खपाचें प्रमाणांत रस्ते सुधराईप्रीत्यर्थ रकमा वांटून द्याव्या असें ठरलें. ह्या उपक्रमास १९२९ मध्यें प्रारंभ झाला आणि पुढें पेट्रोलवरील कर २½ आणे करण्यांत आला, तो तसाच आज मितीस आहे. कराच्या उत्पन्नापैकीं १५ टक्के रक्कम हिंदुस्थान सरकार विशिष्ट भागांतले रस्ते, संशोधन, प्रयोग, इत्यादि बाबींसाठी राखून ठेवतें आणि बाकीचा पैसा प्रांतिक सरकारांस वांटून दिला जातो. ह्या रकमांचा विनियोग हिंदुस्थान सरकारच्या संमतीनें व्हावा लागतो.

पेट्रोलवरील जादा कराच्या उत्पन्नाचा उपयोग देशांतले आंतरप्रांतिक मोठे रस्ते आणि रेल्वेज जोडणाऱ्या अंतर्गत सडका ह्यांवर व्हावा आणि त्यांतल्या कांहीं पैशाचा विनियोग प्रांतिक सरकारांस त्यांच्या स्थानिक योजनांप्रमाणें करतां यावा, असा रोड कमिटीचा मूळ उद्देश होता असें दिसतें. परंतु १९३१ मध्यें प्रचलित मंदीस सुरवात झाल्यावर प्रांतिक सरकारांची पैशाबद्दल ओढाताण होऊन रस्त्यांवर खर्चण्यास रोड फंडाशिवाय दुसरा पैसा राहिला नाहीं. ह्याच सुमारास रेल्वेजची सांपत्तिक स्थिति बिघडली आणि मोटारवहातुकीची स्पर्धा त्यांस विशेष जाणवूं लागली. आजमितीस प्रांतांतील लोहमार्गांच्या एकूण लांबीच्या निम्या रेल्वेजशीं समांतर असे पक्के रस्ते आहेत आणि प्रांतांमध्यें एकूण सडका आहेत, त्यांच्या चवथा हिस्सा लांबीचे समांतर रेलमार्ग आहेत. मोटारींच्या रस्त्यांची स्पर्धा रेल्वेजशीं होऊं नये, हे रस्ते रेल्वेसंबंधांत विकल्प म्हणून उपयोगले जाऊं नयेत आणि मोटारींच्या वाढीच्या योगानें रेल्वेजच्या पोटावर पाय येऊं नये अशी हिंदुस्थान सरकारची इच्छा असणें स्वाभाविकच होतें. प्रांतांमध्यें रस्त्यांवर पैसा खर्च व्हावयाचा आणि विशेषतः रोडफंडाच्या उत्पन्नांतून खर्च व्हावयाचा तो रेल्वेजना पोषक होईल व वहातुकीचें गिऱ्हाइक पुरवतील अशा रीतीनें व्हावा असें हिंदुस्थान सरकारचें म्हणणें आहे. माल व माणसें ह्यांची वहातुक करणारीं परस्पर-प्रतिस्पर्धी दोन प्रकारांचीं आणि दोन भिन्न व्यवस्थेचीं वहानें असलीं म्हणजे त्यांत दोघांचें नुकसान आहे आणि रेल्वेजना मोटारींच्या स्पर्धेमुळें येणारा तोटा हा सर्व जनतेचा तोटा आहे अशी त्यांची विचारसरणी आहे. मोटारींच्या वहातुकीचें नियंत्रण प्रांतिक सरकारांनीं हिंदुस्थान सरकाराच्या सांगण्याप्रमाणेंच केलें पाहिजे आणि रोडफंडांतल्या प्रांतिक हिश्श्याचा विनियोग विशिष्ट प्रमाणांत रेल्वेजना वाढती गिऱ्हाइकी मिळेल अशा बेतानें प्रांतांमध्यें रस्त्यांचे कामीं झाला पाहिजे असा मध्यवर्ती सरकारचा आग्रह आहे. पाश्चात्य देशांत हिंदुस्थानाप्रमाणेंच रेल्वे मोटार स्पर्धा चालली आहे. तेथेंहि वरील प्रकारचें धोरण अवलंबण्यांत आलें असून त्याचें अनुकरण ह्या देशांत होणें अपरिहार्य आहे, ह्या तऱ्हेची मध्यवर्ती सरकारची बाजू आहे. तिचा निर्विकार मनानें विचार करावयाचा म्हटलें तरी प्रांतांमध्यें मोटार वाहतुकीचा मोठा धंदा प्रस्थापित झाला आहे त्याच्या हिताकडे व जनतेच्या सोयींकडेहि योग्य लक्ष्य पुरवलें जाणें आवश्यक आहे. तेव्हां प्रांतिक सरकार व जनता आणि मोटारींचा धंदा करणारे लोक ह्यांनीं आपलें म्हणणें वेळींच नीट पुढें मांडलें पाहिजे.

---

## चहाचा प्रसार वाढविण्यासाठी संघटित प्रयत्न

हिंदी चहाचें गिऱ्हाइक वाढविण्याकरितां व त्यासंबंधी प्रचार करण्यासाठीं, चहाचे निर्गतीवर एक पट्टी बसविण्यांत येऊन तिच्या उत्पन्नांतून खर्च करण्यांत येतो. इंडियन टी सेस कमिटीमार्फत हें काम केलें जात असे व गेल्या वर्षापर्यंत दर १०० पौंड चहाच्या निर्गतीवर आठ आणे ह्या दरानें पट्टी वसूल करण्यांत येई. मागील सालीं ही पट्टी चार आण्यांनीं वाढविण्यांत आली, त्यावेळीं सरकारनें दिलेल्या आश्वासनास अनुसरून 'इंडियन टी सेस बिल' मध्यवर्ती कायदेमंडळापुढें मांडण्यांत आलें व तें तेथें पासहि झालें.

नवीन बिलान्वयें टी सेस कमिटीचें नांव बदलून तिला 'टी मार्केट एक्सपॅन्शन बोर्ड' हें भारदस्त नांव प्राप्त झालें आहे व तिच्या सभासदांची संख्या पांचानें वाढून ती पंचवीस झाली आहे. चहाची विक्री फक्त मर्यादित मोसमांत, मे ते जानेवारी-फेब्रुवारीपर्यंत होत असते व त्यावेळींच पट्टी अर्थात वसूल होते. मोसम सोडून इतर महिन्यांत खर्चाव्या लागणाऱ्या पैशाची तरतूद करण्यासाठी बोर्डास पांच लाख रुपयांपर्यंत कर्ज उभारण्याचा अधिकार देण्यांत आलेला आहे. पट्टीच्या कमाल दराची मर्यादा बारा आण्यांवरून दीड रुपयांवर नेण्यांत आलेली आहे. ह्या वरील योजनेस बहुसंख्य मळेवाल्यांचा पाठिंबा आहे; फक्त कांहीं युरोपियन मळेवाल्यांचा तिला विरोध आहे.

टी बोर्डाच्या पंचवीस सभासदांपैकीं हिंदी मळेवाल्यांच्या वांटणीस, चहाच्या क्षेत्राच्या हिशेबानें फक्त चारच जागा यावयाच्या; तथापि, त्यांस सहा जागा देण्यांत आल्या आहेत. उरलेल्या एकोणीस जागा युरोपियन मळेवाल्यांस मिळतील, कारण हिंदुस्थानांतील एकूण मळ्यांपैकीं फक्त १६ टक्के क्षेत्र हिंदी मळेवाल्यांच्या मालकीचें आहे. श्री. दत्त ह्यांच्या सूचनेवरून बोर्डांतील सभासदांची संख्या २७ करण्यांत आली आहे. हिंदी चहाचे धंद्यावर ७ लक्ष मजुरांचें पोट अवलंबून आहे. मळ्यांत गुंतलेल्या एकूण ४० कोटि रुपयांच्या भांडवलापैकीं ९ कोटि रुपयांचें भांडवल हिंदी आहे.

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २

## प्राप्तीवरील करासंबंधी महत्त्वाचे दोन निवाडे

१

### उत्पन्नाचा तपशील मागविण्याचा राहिला, तरी कर टळत नाहीं.

३१ मार्च, १९३४ अखेर संपणाऱ्या वर्षामधील उत्पन्नावर १९३४–३५ सालीं प्राप्तीवरील कराची आकारणी करण्याची राहून गेली, तर त्यानंतरच्या वर्षीं ही चूक दुरुस्त करण्याचा इनकम टॅक्स अधिकाऱ्यास अधिकार आहे काय, ह्या प्रश्नाचा निकाल मुंबई हायकोर्टानें नुकताच दिला आहे.

इनकम टॅक्स कायद्याप्रमाणें २२ ( २ ) कलमान्वयें जरूर असलेली नोटीस मिसेस पिरोजबाई एन. कॉन्ट्रॅक्टर ह्यांजवर कर वसूल करावयाच्या वर्षीं बजावण्यांत आली नाहीं, परंतु ३४ व्या कलमाप्रमाणें त्यांचा १९३४–३५ चा कर राहून गेला ह्या सदराखाली, बाईवर २४ जून १९३५ रोजीं नोटीस बजावण्यांत आली.

इंडियन इनकम टॅक्सच्या तिसऱ्या कलमान्वयें, प्रत्येक मनुष्याच्या पूर्वसालच्या उत्पन्नावर कर बसविण्यांत येतो. इनकम टॅक्स अधिकाऱ्याकडून, उत्पन्नाचा आकडा सादर करण्यासंबंधी नोटीस येते. [ कलम २२ ( २ ) ] परंतु ती तशी न आल्यास आपण होऊन उत्पन्नाचा तपशील देण्याची नागरिकावर जबाबदारी नाहीं. ३४ व्या कलमान्वयें, कराची कोणत्याहि कारणानें आकारणी व्हावयाची राहिली असल्यास त्या वर्षानंतर एका वर्षाच्या मुदतींत इनकम टॅक्स अधिकारी नोटीस बजावून व उत्पन्नाचा तपशील मागवून कराची आकारणी करूं शकतो.

२२ ( २ ) व्या कलमाप्रमाणें आपणांवर नोटीस बजावली गेली नाहीं, तेव्हां ३४ व्या कलमाच्या अंमलबजावणीचा प्रश्नच उद्भवत नाहीं असें मिसेस कॉन्ट्रॅक्टर ह्यांचें म्हणणें होतें. कराची आकारणी कोणत्याहि कारणानें राहून गेली असली, तरी ३४ वें कलम लागू पडतें, असा हायकोर्टानें अभिप्राय व्यक्त केला. म्हणजे, २२ ( २ ) व्या अगर ३४ व्या, कोणत्याहि कलमांतील अटींप्रमाणें करवसुलीस सुरवात करतां येईल, असा ह्या निर्णयाचा अर्थ आहे. ३४ वें कलम व्यापक स्वरूपाचें आहे व २२ ( २ ) व्या कलमांतील नोटीस बजावली गेली नसली तरी त्याच्या अंमलबजावणीस व्यत्यय येऊं शकत नाहीं. तेव्हां, मिसेस कॉन्ट्रॅक्टर ह्या ३४ व्या कलमान्वयें प्राप्तीवरील करास पात्र आहेत, असा हायकोर्टानें निकाल दिला.

२

### रिझर्व्हजचें रूपांतर–भांडवल कीं नफा ?

रायपूर मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लि. जवळ १९३० सालीं तिच्या भरणा झालेल्या भांडवलाचे पांच पट म्हणजे सुमारें २५ लक्ष रुपये रिझर्व्हमध्यें पडून होतें. ह्या रकमेचें भांडवलांत रूपांतर करून त्यामधून भागीदारांस जादा भाग द्यावयाचे कंपनीनें ठरविलें. अरविंद मिल्स लि. नांवाची एक नवी कंपनी स्थापन करण्यांत आली व ह्या रिझर्व्हजच्या पैशांतून तिचे भाग खरेदी करण्यांत आले व ते रायपूर कंपनीच्या भागीदारांत वांटण्यांत आले. ह्या वांटणीमध्यें अहमदाबाद येथील शहा मोहनलाल छोटालाल ह्यांस १,६०० रुपयांचे १६ भाग मिळाले. प्राप्तीवरील कराची आकारणी करतांना इनकमटॅक्स अधिकाऱ्यानें शहांच्या मिळकतीमध्यें ह्या रकमेचा अंतर्भाव केला, परंतु ही मिळकत नसून ती केवळ भांडवली स्वरूपाची रकम आहे, असा श्री. मोहनलाल ह्यांनीं मुद्दा उपस्थित केला. वास्तविक पहातां, रायपूर कंपनीनें नवीन भाग दिले ते भांडवल वाढविण्याकरितां नसून त्या स्वरूपांत भागीदारांस नफा वांटण्याचें कंपनीचें धोरण होतें, असें इनकमटॅक्स अधिकाऱ्यांचें म्हणणें होतें. अखेरच्या निर्णयासाठीं मुंबई हायकोर्टाकडे हा प्रश्न आला. बाजूस काढून ठेवलेले रिझर्व्हज हे भांडवल समजावे कीं ते नफ्याचे सदरांत घालावेत, ह्या मुद्यावर ग्रेटब्रिटनमधील लॉर्ड सभेनें मागेंच निकाल दिलेला आहे, त्याचा दाखला देऊन, तो कंपनीचे अधिकारांतील प्रश्न आहे, व कंपनीनें रिझर्व्हजचें भांडवलांत रूपांतर केल्यास तें भांडवल झालें, असा हायकोर्टानें अभिप्राय व्यक्त केला. शहा मोहनलाल ह्यांस मिळालेले भाग प्राप्तीच्या सदरांत मोडत नाहींत व त्यांवर कर वसूल करतां येत नाहीं असा हायकोर्टाचा निर्णय झाला.

---

## नागपूर विश्वविद्यालयाची प्रगति

१९३६ सालीं नागपूर विश्वविद्यालयाच्या परीक्षांसाठी एकूण २,५८९ विद्यार्थी नोंदण्यांत आले. परीक्षा पास होणारांचें एकूण उमेदवारांशीं प्रमाण समाधानकारक होतें. एकूण १,५४५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

विशिष्ट कारणासाठी देण्यांत आलेल्या ४२ देणग्यांची एकूण रकम १,८४,००० रुपये भरली, म्हणजे ती पूर्वसालापेक्षां ५७ हजारांनीं ज्यास्त होती.

वर्धा येथील वासुदेव कॉलेज व रायपूर येथील राजकुमार कॉलेज विश्वविद्यालयास जोडून घेण्यांत आलीं.

विश्वविद्यालयाशीं निगडित असलेल्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांची एकूण संख्या ३,३९५ होती, म्हणजे १९३५ मधील संख्येपेक्षां ती तीनशेनीं ज्यास्त होती.

विद्यार्थ्यांचें आरोग्य असमाधानकारक असल्याबद्दल वैद्यकीय अधिकाऱ्यांचा शेरा आहे, हें ध्यानांत घेऊन विश्वविद्यालयानें व्यायामाधिकाऱ्याची नेमणूक व विद्यार्थ्यांच्या व्यायामविषयक शिक्षणाची व्यवस्था केली आहे.

---

### लष्करी खात्यासाठीं कोल्ड स्टोरेजची स्थापना

थंड हवेमध्यें जिन्नस ज्यास्त दिवस टिकतात हें मागेंच सिद्ध झालें आहे. पुणें येथील कोल्ड स्टोरेज रूममध्यें ह्याबाबत करण्यांत आलेले प्रयोग यशस्वी झाले आहेत. हिंदुस्थान सरकारच्या लष्करी खात्यानें असे कोल्ड स्टोरेज डेपो ठिकठिकाणीं स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या डेपोंतून सैनिकांस मांसादि पदार्थ 'ताजे' व स्वच्छ पुरवितां येतील. ह्याबाबतचें कंत्राट, दिल्लीच्या मेसर्स गोवन ब्रदर्स लि. नें स्थापन करावयाच्या कंपनीस मिळणार आहे. लष्करी खात्याची सोय झाल्यानंतर ह्या डेपोंतून सामान्य नागरिकांसहि माल पुरविण्यास ह्या कंपनीस हरकत घेतली जाणार नाहीं.

---

### डिबेंचर कर्जाची परतफेड

६ टक्के दराचें २५ लाखांचें मुंबई इंप्रूव्हमेंट ट्रस्ट डिबेंचर कर्ज १ नोव्हेंबर, १९३६ रोजीं परत केलें जाईल. ४½ टक्क्यांचें २५ लाखांचें पोर्ट ट्रस्ट डिबेंचर त्याच दिवशीं परत करण्यांत येईल. १ नोव्हेंबर, रविवारीं येत असल्यानें २ नोव्हेंबर रोजीं रकमा दिल्या जातील.

---

## प्रांतिक बँकेचा रौप्यमहोत्सव

### ठिकठिकाणच्या सभांतून बँकेचा गौरव

[ मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या रौप्य ज्युबिलीनिमित्त ता. ११ ऑक्टोबर १९३६ रोजीं बँकेच्या शाखांचे ठिकाणीं सभा भरून तो दिन मोठ्या उत्साहानें पाळण्यांत आला. ह्या सभांचें वृत्तांत आमचेकडे आले आहेत, त्यांचा सारांश येथें दिला आहे. प्रत्येक ठिकाणीं बँकेचे अध्यक्ष, सर चुनीलाल मेहता, ह्यांचा संदेश वाचून दाखविण्यांत आला. ]

**सिंदखेडें व दोंडाइचें**–सिंदखेड्याचे मामलेदार श्री. भुरे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं सभा झाली, त्यापूर्वी मिरवणूक काढण्यांत आली होती. इन्स्पेक्टर श्री. मेथा ह्यांनीं सभेचा उद्देश व महत्त्व हें सांगितलें व नंतर संदेश वाचून दाखविला. सभेनें बँकेच्या अभिनंदनपर ठराव पास केला. रात्रीं दिव्यांची रोषणाई करण्यांत आली. या सभेनंतर संयुक्त शाखा कमेटीची वार्षिक सभा श्री. व्यंकट शिवला पाटील ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरून मामुली कामें करण्यांत आलीं.

**कल्याण**–प्रथमतः शाखेस जोडलेल्या सोसायट्यांची पांचवी वार्षिक सधारण सभा श्री. दौलतराव ज. झुंजारराव, एम. एल. सी., ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरून अहवाल, ताळेबंद, बजेट, इत्यादी-संबंधीं कामें झालीं. नंतर रौप्यमहोत्सव सभेच्या कामास मामलेदार श्री. मेहता, ह्यांचे अध्यक्षतेखालीं सुरवात झाली. ॲडव्होकेट खंडेराव मुळे ह्यांनीं बँकेचें महत्त्व समजावून सांगणारें समयोचित असें भाषण केलें व अध्यक्षांनीं योग्य शब्दांत समारोप केला.

**पालघर**–श्री. देसाई, मामलेदार, ह्यांचे अध्यक्षतेखालीं सभा झाली. बँक इन्स्पेक्टर श्री. तांबवेकर ह्यांनीं सभेचा उद्देश समजावून सांगितला व संदेश वाचून दाखविला. चिंचणी पीपल्स को. बँकेचे चेअरमन श्री. जी. एन. शहा, श्री. सखाराम भिकाजी पाटील, श्री. सी. आर. श्रॉफ, इत्यादींचीं भाषणें झालीं. अध्यक्षांनीं सहकारी चळवळीचें महत्त्व प्रतिपादन केलें. बँकेतर्फे श्री. गाळवणकर ( अध्यक्ष, शाखा कमिटी ) व श्री. तांबवेकर ह्यांनीं शाखेतर्फे आभार मानले.

**साकी**—मिरवणुकीनंतर मामलेदार श्री. के. एन. नाईक, ह्यांचे अध्यक्षतेखालीं सभा झाली. सीनियर इन्स्पेक्टर श्री. काळे ह्यांनीं बँकेचा इतिहास व तिची कामगिरी सांगून संदेश वाचून दाखविला. श्री. माधवराव भोसले व श्री. करमरकर ह्यांच्या भाषणानंतर अध्यक्षांनीं समयोचित समारोप केला. रात्रीं रोषणाई, भजन, फोनो, इत्यादि कार्यक्रम झाला.

**कळवण**—तालुकाधिकारी श्री. पुरंदरे ह्यांचे अध्यक्षतेखालीं सभा झाली, त्यावेळीं बँकेचे डायरेक्टर, श्री. रा. ब. वंडेकर, एम. एल. सी. हे हजर होते. श्री. देशमुख ह्यांनीं संदेश वाचून दाखविला. रा. ब. वंडेकर ह्यांनीं बँकेच्या कामगारीचें वर्णन केलें. बँक इन्स्पेक्टर, श्री. ठाकूर, ह्यांनीं शेतकऱ्यांसाठी बँक कशी झटत आहे, ह्याची माहिती सांगितली. अध्यक्षांनीं बँकेच्या कार्याचा व ती शेतकऱ्यांस देत असलेल्या मदतीचा गौरवपूर्वक उल्लेख केला.

**अकलूज**–इरिगेशन खात्याचे एक्झिक्यूटिव्ह इंजिनियर मि. लिट्ल ह्यांचे अध्यक्षतेखालीं सभा झाली. माळशिरस यूनियनचे अध्यक्ष, श्री. मारुतराव कुलकर्णी, ह्यांनीं प्रास्ताविक भाषण करून अध्यक्षांची सूचना आणली, तीस श्री. दाते ह्यांनीं दुजोरा दिला. अध्यक्षांनीं संदेश वाचून दाखविला व शाखेचे एजंट श्री. पाटसकर ह्यांनीं तो मराठीमध्यें समजावून सांगितला. अध्यक्षांनीं संदेशासंबंधीं भाषण केलें. बँकेचे स्पेशल इन्स्पेक्टर, श्री. चावडा, ह्यांनीं थोडक्यांत बँकेचा इतिहास सांगितला व व्यापारी बँक व सहकारी बँक ह्यांतील फरक कोणता, तें स्पष्ट केलें. शुगर फॅक्टरीचे मॅनेजर श्री. फाटक, श्री. कुलकर्णी, श्री. फडणीस, इत्यादींचींहि भाषणें झालीं.

---

## कर्जावरील व्याजाचा दर कसा कमी होईल ?

### सहकारी रजिस्ट्रारांचें सर्क्युलर

[ सहकारी सोसायट्यांच्या रजिस्ट्रारनीं सोसायट्यांचे व्याजाचे दर उतरविण्यासंबंधीं व सोसायट्यांनीं काटकसर करण्याच्या आवश्यकतेसंबंधीं एक सर्क्युलर काढलें आहे, त्याचा गोषवारा येथें दिला आहे. ]

गेल्या तीन वर्षांत ज्या जिल्ह्यांतून सवलतीच्या योजनेसंबंधीं पुरेसा प्रचार झाला होता, त्या जिल्ह्यांमध्यें कित्येक सोसायट्यांनीं सवलतीच्या व्याजाच्या योजनेचा फायदा घेतला. ही योजना शेतकऱ्यांस हितकारक तर झालीच, परंतु त्याबरोबरच सहकारी चळवळीची लोकप्रियता वाढविण्यासहि ती कारणीभूत झाली. व्याजाचा दर हा साहजिकच सोसायट्यांच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून रहातो. तथापि, कित्येक सोसायट्यांनीं उत्कृष्ट रिझर्व्हज निर्माण केलेले असूनहि थकलेल्या व्याजाचें प्रमाण फार मोठें असल्यानें व्याजाचा दर कायमचा कमी करणें शक्य होत नाहीं. आपल्या निम्म्या सभासदांकडूनच फक्त व्याज वसूल झालें, तर सोसायटीस स्वतःस भांडवल पुरविणारांस वक्तशीर फेड करावी लागत असल्यानें कर्जावरील दर कमी करणें तिला परवडत नाहीं. सभासदांस वक्तशीरपणें व्याज भरण्याची संवय लागल्याखेरीज व्याजाचा दर खालीं आणतां येणें कठिण आहे.

सेंट्रल बँकांनीं सोसायट्यांस आकारावयाच्या व्याजाचा दर आणि ठेवींवरील व्याजाचा दर ह्यांतहि उतार होणें आवश्यक आहे. प्रांतिक व जिल्हा बँकांनीं आपले दर उतरविले आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. तथापि, कांहीं बँकांनीं दिलेल्या कर्जावरील दर अजून उतरावितां येणें शक्य आहे.

सोसायट्यांच्या व्यवस्थेच्या व इतर खर्चांतहि काटकसर होणें जरूर आहे. वार्षिक साधारण सभेंत मंजूर झालेल्या बजेटाबाहेर खर्च होऊं देतां कामा नये व तो तसा करणें अपरिहार्य झाल्यास सुपरवायझिंग यूनियनची पूर्वसंमती घेण्यांत यावी. जिल्हा, भाग इत्यादि परिषदांस प्रतिनिधी पाठविण्याची सोसायट्यांची चालू पद्धत सुधारली पाहिजे. ह्याबाबत फाजील खर्च होऊं देतां कामा नये. मोठ्या परिषदांपेक्षां तालुका परिषदांसारख्या परिषदा सोसायट्यांस ज्यास्त हितकारक ठरतात, हें त्यांनीं विसरूं नये. सेंट्रल बँकांच्या अगर प्रांतिक इन्स्टिट्यूटच्या वार्षिक सभा इत्यादींस हजर राहण्यापासून सोसायट्यांस परावृत्त करण्याचा रजिस्ट्रारसाहेबांचा विचार नाहीं, परंतु प्रत्येक सोसायटीनें अंथरूण पाहून हातपाय पसरावेत, असें त्यांचें म्हणणें आहे. वार्षिक सभा व परिषदा ह्या जोडून घेतल्यानें बरीच बचत होण्यासारखी आहे.

व्याजाचा दर कमी होण्याचें महत्त्व ध्यानांत आणून सोसायट्या वरील सूचना अंमलांत आणण्याचे कसून प्रयत्न करतील, अशी रजिस्ट्रार साहेबांस आशा आहे.

---

### पुणें जिल्हा को. इन्स्टिट्यूट

वरील इन्स्टिट्यूटचें ऑफिस ता. १५ ऑक्टोबर १९३६ पासून पुणें सेंट्रल को. बँकेच्या इमारतींत गेलें आहे.

### पुणें सेंट्रल को. बँक, लि.

वरील बँकेची विशेष साधारण सभा ता. १८–१०–३६ रोजीं भरून, तिनें रजिस्ट्रारच्या आगाऊ मंजुरीनें सोसायट्यांकडील कर्जावरील व्याजाचा दर विशिष्ट परिस्थितींत ४ टक्क्यांपर्यंत उतरविण्याचा डायरेक्टर बोर्डास अधिकार दिला. त्याचप्रमाणें, कसरीसंबंधींच्या नियमांत दुरुस्ती करण्यांत आली व ६½ टक्क्यांपेक्षां ज्यांच्या कर्जावरील व्याजाचा दर कमी नाहीं, अशा सोसायट्यांस कसर देण्याचा बोर्डास अधिकार देण्यांत आला. मात्र कसर वजा जातां होणारा व्याजाचा ऐन दर ५ टक्क्यांपेक्षां कमी होऊं शकणार नाहीं. बँकेमध्यें 'सेफ डिपॉझिट व्हॉल्ट' उघडण्याकरितां इमारतीमध्यें जरूर असलेल्या दुरुस्त्या करून आवश्यक सामान खरेदी करण्यासाठी सभेनें सर्वसाधारणपणें खर्चास मंजुरी दिली.

---

### पुणें पोस्टस आर. एम. एस. आणि टेलिग्राफ को. अर्बन बँक लि., पुणें

| | हजार रु. | | हजार रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल : | २४¼ | शिल्लक, रोक व बँकांत : | २६¾ |
| ठेवी : | ४१¼ | कर्जें : | ८२¾ |
| गंगाजळी : | ७½ | भाग : | ३ |
| १९३५-३६ चा नफा | २¾ | | |

वर्षअखेर बँकेचे ९५९ सभासद आहेत. अहवालाचे सालीं एकूण १ लक्ष रुपयांचीं ९२६ कर्जें देण्यांत आलीं. जामीन कसर्याबाबत एकंदर ७४६ रु. वसूल झाले, त्यांतून शेंकडा २५ जामीन कसवा रिझर्व्ह फंडांत जाऊन ५५९ रु. निवळ नफा उरला. सालअखेर जामीन कसवे भरणारांची संख्या ५६२ आहे. सर्व सभासदांनीं आपल्या बँकेचाच जामीन कसवा करावा, अशी बोर्डाची इच्छा आहे. वर्षअखेर बँकेस २,६२५ रु. नफा झाला, त्यांतून भागीदारांस ७½ टक्के दरानें १८०८ रु. डिव्हिडंड म्हणून वाटण्यांत आले. सभासदांची दृष्टि कर्जाकडे विशेष दिसते असा बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचा शेरा आहे. अहवालांत नमूद असलेल्या सूचनांकडे सभासदांचें लक्ष जाणें इष्ट आहे. एकंदरीनें बँकेचा व्यवहार समाधानकारक चाललेला आढळून येतो.

---

### दुधोंडी ( सं. सांगली ) परस्पर सहकारी मंडळी

वरील पतपेढीची वार्षिक सभा ता. ११–१०–३६ रोजीं सांगली संस्थानचे चीफ रे. ऑफिसर राव. रा. शं. फडणीस ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. मुख्य व्याख्याते म्हणून कऱ्हाडचे श्री. लक्ष्मणराव देशपांडे ह्यांची योजना झाली होती. अहवाल व ताळेबंद मंजूर झाल्यावर निरनिराळे नऊ ठराव पास झाले. वर्षअखेर संस्थेस झालेल्या १,०९० रु. नफ्यापकीं स्थानिक सार्वजनिक संस्थांस ७० रु. व कै. गो. कृ. देवधर स्मारक फंडास १० रु. अशा देणग्या मंजूर झाल्या.

नंतर श्री. देशपांडे यांचें "शेतकऱ्यांची सद्यःस्थिति व पतपेढ्यांचे उपयोग" या विषयावर सुश्राव्य भाषण झालें. कष्टाची कमी होत चाललेली सवय, खर्चाची वाढ, उत्पन्नांतील घट, सुधारणांसंबंधीं अज्ञान वगैरे कारणांमुळें शेतकरी वर्ग कसा खालावत आहे हें पाश्चात्य देशांतील उदाहरणें देऊन त्यांनीं स्पष्ट केलें. राव. फडणीस यांनीं संस्थेचें आजवरचें कार्य एकोप्यानें व प्रामाणिकपणानें असेंच चालविण्याबद्दल व खासगी तंटेबखेडे न वाढविण्याबद्दल कळकळीचा उपदेश केला. शेवटीं श्री. रेठरेकर वकील यांनीं सर्वांचे आभार मानल्यावर पानसुपारी अत्तर, गुलाब होऊन सभेचें काम आटोपलें.

दी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि॰
कडून
हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक
नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |
|---|---|

| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
|---|---|---|

| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |
|---|---|

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.
लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२
अधिकृत भांडवल : : : १०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल : ५,००,०००
खपलेलें भांडवल : २,०४,१५०
रोख भरलेलें भांडवल : ९९,२७५

दर शेअरची किं. : रु. ५०

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.
शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—६ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—२ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | १२०—० |
| ४% १९६०–७० ... ... | ११५-१४ |
| ४% १९४३ ... ... ... | ११२—० |
| ३½% विनमुदत ... ... ... | ९९—१५ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०७-१२ |
| २¾% १९४८–५२ ... ... | १०१—४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११२—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १११—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षे मुदत) | ११२—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११३—२ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२५—८ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३५—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११२—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५-१४ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५८०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३९-८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९९—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९१२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५७—३ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २६०—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २५५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ६½% ) | १५७५—० |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६००—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २०१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७२-१२ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १९९—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७९८-१२ |

### मुंबईच्या दंग्याचा हुंड्यांचे देवघवीवर परिणाम

मुंबई येथील दंग्यामुळें देशी पद्धतीनें बँकिंगचा व्यवहार करणारांच्या संस्था सोमवारीं व मंगळवारीं बंद ठेवण्यांत आल्या होत्या व त्यामुळें हुंड्यांचा व्यवहार नित्याप्रमाणें होऊं शकला नाहीं.

### असेंब्लीचें गेलें अधिवेशन

असेंब्लीचें सिमला येथील अधिवेशन ता. १६ रोजीं संपलें. ह्या अधिवेशनांत एकूण ३४ बैठका झाल्या व ७,५३७ प्रेक्षकांनीं गॅलरीमधून असेंब्लीचें कामकाज पाहिलें. म्हणजे, प्रेक्षकांची रोजची सरासरी ३७० पडली.

## हिंदुस्थान सरकारचें उद्योगधंद्यांस सहाय

[ हिंदुस्थानांतील उद्योगधंद्याच्या वाढीसाठीं सरकार करीत असलेल्या प्रयत्नांची संकलित माहिती श्री. एन. महादेव अय्यर, आय. सी. एस., ह्यांनीं आपल्या रिपोर्टांत दिली आहे. सदरहु रिपोर्टांत १९२८ ते ३५ पर्यंतची हकीकत आली आहे. ]

( १ ) उद्योगधंद्यांस सहाय करण्याचा प्रांतिक सरकारांस पूर्ण अधिकार आहे, तथापि पैशाचा अभाव व अखिल भारतीय स्वरूपाच्या उद्योगधंद्यांस मदत करण्याच्या मार्गांतील अडचणी ह्यांमुळें प्रांतिक सरकारांस आपलें लक्ष लहानसहान उद्योगधंद्यांपुरतेंच मर्यादित करावें लागलें.

( २ ) कापडाच्या गिरण्यांची संख्या वाढली असली तरी हातमागांचें महत्त्व अजून कमी झालेलें नाहीं. कपास-कापडाच्या अंतर्गत उत्पादनावरील पट्टी काढून टाकल्यामुळें व आयात मालावर जकात बसविल्यामुळें हातमागांचा धंदा निकृष्टावस्थेस पोंचला, त्यास मदत करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें पांच वर्षेपर्यंत दरसाल पांच लक्ष रुपये खर्चण्याचें ठरवलें. रेशमाचे धंद्यासाठींहि दरसाल एक लक्ष रुपये खर्चले जावयाचे आहेत. लहान प्रमाणावर चाललेल्या लोंकरीच्या धंद्यासाठीं ह्याच रीतीनें पांच लक्ष रुपये खर्च होणार आहेत.

( ३ ) खेडेगांवीं धंद्यासंबंधांत सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हटला म्हणजे उत्पन्न झालेल्या मालास गिऱ्हाइक मिळवून देणें, हा होय. सहकारी तत्त्वावर अशा योजना आखण्याचें काम चालू आहे.

( ४ ) मद्रास, पंजाब व संयुक्त प्रांत येथील पाण्याच्या शक्तीवर चालणाऱ्या विजेच्या उत्पादनाच्या योजना, इंडस्ट्रिअल रिसर्च ब्युरोची स्थापना, विविध शाखांमार्फत चाललेलें संशोधन, हिंदुस्थान सरकारनें हिंदी उद्योगधंद्यांस दिलेलें संरक्षण, इंडियन स्टोअर्स डिपार्टमेंट व रेल्वे बोर्ड ह्यांचें हिंदी मालास अग्रमान देण्याचें धोरण, इत्यादि बाबींचा अहवालांत उल्लेख करण्यांत आलेला आहे.

### मुंबई इलाख्यांतील वेड्यांचीं इस्पितळें

मुंबइ इलाख्यांत येरवडा, ठाणें, रत्नागिरी, धारवाड व अहमदाबाद अशा पांच ठिकाणीं वेड्यांचीं इस्पितळें आहेत आणि त्यांमध्यें १,६९२ इसमांची सोय आहे. तथापि, व्यथितांच्या गर्दीमुळें गेल्या वर्षीं दोन हजारांवर वेडे ह्या पांच इस्पितळांत ठेवावे लागले. त्यांत साधारणपणें दरसाल६२ जणांची भर पडते. इस्पितळांतील जागा वाढविण्याचा सरकारचा विचार आहे. इस्पितळें चालविण्यासाठीं गेल्या वर्षीं एकूण ७३लक्ष रु.खर्च आला, त्यापैकीं सरकारास प्रत्यक्ष ३½ लक्ष रुपये खर्चावे लागले. एकट्या येरवडा इस्पितळांत ९४० रोगी होते.

### जपानी कृत्रिम रेशमाच्या आयातींत वाढ

( एप्रिल ते जुलै )

हजार पौंड

| | १९३४ | १९३५ | १९३६ |
|---|---|---|---|
| कृत्रिम रेशमाचें सूत | ३३,३५ | ३२,४२ | ४९,५९ |
| कृत्रिम रेशमाचें कापड | २०,१४५ | २०,९८७ | ३१,१०७ |
| कृत्रिम रेशीम व इतर धाग्यांच्या मिश्रणाचें कापड | ४५,५१ | १४,२६ | ३०,५५ |

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी
टेलरिंग फर्म
मॅनेजर-व्ही.पी. पाटसकर, D.M.T.O.A. (London.)
**पाटसकर आणि कंपनी**
स्थापित इ.स. १९१७ (?)
४८ निहाल पेठ, पुणें शहर.
सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी
आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं यऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

The House for Quality goods at most reasonable prices.
**K. M. BELSARE & Co.,**
PLAIN & DECORATIVE FURNITURE
FOR
Home, School, College, Office etc. in
WOOD & IRON
Sadashiv, POONA 2

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

**वेस्टर्न इंडिया**
लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.
स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी-सातारा.
संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.
बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५
१९३५ मधील नवें काम ५१,३०,०४२ रु.
एकूण चालू काम २,७०,००,००० रु. अधिक
एकूण जिंदगी ७१,७१,०९३ रु.
लाइफ फंड ६०,४२,८७३ रु.
एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

**एशियन पॉलिसी**
ASIAN ASSURANCE Co. Ltd.
म्हणजेच
आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयिस्कर योजना.
महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत
धी एशियन अॅशुरन्स कंपनी, लिमिटेड
एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "
स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टके फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:-
**कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.**
अध्यक्ष-श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी
हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.
जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.


" अर्थ " ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं. १ रु. ( ट. ख. निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख २८ ऑक्टोबर, १९३६. अंक ४४

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

ह्युम सेप्टिक टँक
वापरल्यानें
आरोग्य व स्वच्छता ठेवली जाते.
नादुरुस्त होण्याची भीति नाहीं.
कित्येक वर्षें लोक वापरून सुखी आहेत.
संडासाचें पाणी घाण वास न येतां बाहेर येतें
व
तें भाजी उगवण्यास उपयोगांत आणतां येतें.

ह्युम पाईप
( सिमेंट कांक्रीटच्या )
फार मजबुत व टिकाऊ असतात.
महाराष्ट्रांतील कारखानेः—
मुंबई, पुणें, सोलापूर, मिरज, द. हैद्राबाद.
दि इंडियन ह्युम पाईप कं., लि.
बॅलर्ड इस्टेट, मुंबई.


FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची
प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.
दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.
च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा.
किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

MARATHE & Co.
ENGINEERS & IRON FOUNDERS
WORKS : Natu Bag, Bhikardas Road, POONA 2
Can undertake to do any sort of casting.
We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act.
Our prices are very competitive.
OFFICE : 978-79, Sadashiv, POONA 2

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः-ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः-

१ केळकर ब्रदर्स,
बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी,
लक्ष्मीरोड.

## विविध माहिती

### टेलिफोनचे दर उतरत नाहींत

सरकारचें टेलिफोन खातें फायद्यांत असलें, तरी टेलिफोनचे दर उतरविण्याइतका त्यास नफा उरत नाहीं, असें सर फ्रँक नॉईस ह्यांनीं असेंब्लींत सांगितलें.

### राष्ट्रसभेचें अधिवेशन

फैजपूर येथें भरणाऱ्या हिंदी राष्ट्रसभेच्या अधिवेशनाच्या तारखा २७, २८ व २९ डिसेंबर अशा तूर्त निश्चित करण्यांत आल्या आहेत.

### मुंबई शहरांतील डांबरी रस्ते

मुंबई शहरांतील सार्वजनिक रस्त्यांची लांबी २२२ मैल भरते. त्यांपैकीं, ५६ मैल लांबीचे रस्ते डांबरी आहेत.

### राणीच्या बागेची लोकप्रियता

मुंबई येथील राणीच्या बागेस गेल्या वर्षी एकूण २४½ लक्ष लोकांनीं भेट दिली, म्हणजे रोजची सरासरी ६,७२३ अशी पडली.

### मुंबई शहरांतील रेकॉर्ड जननसंख्या

गेल्या वर्षी मुंबई शहरांत एकूण ३४,४२८ अर्भकें जन्मास आलीं. म्हणजे, दर हजार लोकवस्तीशी जननाचें प्रमाण २९.६ इतकें पडलें. मुंबईमधील जननाच्या आकड्यांचे बाबतींत हें रेकॉर्ड आहे.

### जर्मनीनें परदेशांत चालवलेला मतप्रचार

जर्मनींतल्या नात्सी पक्षानें आपलीं मतें व कार्य ह्याविषयींचा प्रचार बाहेरच्या देशांत जोरानें चालवला आहे. १९३५ सालीं निरनिराळ्या भाषांत त्याबाबत एकूण ६५ लक्ष हस्तपत्रकें छापलीं गेलीं व त्यांतलीं ५० लक्ष परदेशांत धाडण्यांत आलीं. ह्याशिवाय ५ टन वजनाचीं पुस्तकें व चोपडीं पाठविलीं तीं वेगळींच.

### बगदादच्या नगररचनेकरितां जर्मन सल्लागार

बगदाद शहराची सुधारलेल्या पद्धतीनें मांडणी व्हावयाचें ठरलें असून नगररचनेसंबंधानें सल्ला देण्यासाठी जर्मनींतले प्रोफेसर ब्रिक्स ह्यांची नेमणूक झाली आहे.

### पोलंडला फ्रान्सची आर्थिक मदत

लढाऊ खर्च व व्यापारवृद्धि ह्यांसाठी पोलंडला कर्जाऊ भांडवल पुरवण्याचें व इतर सवलती देण्याचें फ्रान्सनें कबूल केलें आहे.

### हिंदुस्थानांतील उंसाची लागवड वाढली

१९३५-३६ च्या पेक्षां १९३६-३७ ची हिंदुस्थानांतील उंसाची लागवड १५ टक्क्यांनीं ज्यास्त आहे,असा अधिकृत अंदाज आहे. ४२ लक्ष ३२ हजार एकरांत ऊंस लावला जाईल अशी अपेक्षा आहे.

### अमेरिकेचें राष्ट्रीय कर्ज

अमेरिकेंत राष्ट्रीय सरकारास सुमारें ८,२५० कोटि रुपयांचें कर्ज आहे. ह्याशिवाय प्रांतिक सरकारें व स्थानिक संस्था ह्यांच्या कर्जाची रकम सुमारें ६,८०० कोटि रुपये होते, ती निराळीच.

### जर्मनींत पांच लक्ष गुन्हेगार व आरोपी सुटले

नात्सी सरकारविरुद्ध किरकोळ गुन्हे केल्याबद्दल शिक्षा झालेल्या अडीच लक्ष लोकांस हेर हिटलर ह्यांच्या हुकुमावरून सोडून देण्यांत आलें आहे आणि दुसऱ्या अडीच लाख आरोपींवरचे खटले काढून घेण्यांत आले आहेत.

### हिंद-जपान करार ३१ मार्च रोजीं संपणार !

३१ मार्च १९३७ रोजीं हिंद-जपान कराराची मुदत संपणार असून त्याप्रमाणें हिंदुस्तानातर्फे जपानला औपचारिक रीतीनें कळविण्यांत आलें आहे. सिमला येथें चालू असलेल्या नव्या करारासंबंधींच्या वाटाघाटी यशस्वी होतील, अशी आशाहि त्या खलित्यांत व्यक्त करण्यांत आली आहे.

### दंग्यांतील लूट व विमा कंपन्या

१९३२ सालीं मुंबई शहरामध्यें हिंदू-मुसलमानांचा दंगा झाला त्यावेळीं जाळपोळ, लूट इत्यादिसंबंधीं २४ लक्ष रुपयांचे क्लेम्स विमाकंपन्यांकडे दाखल झाले होते. सध्याच्या दंग्यामध्यें लुटीचें प्रमाण अधिक आहे व त्याबाबत विमा कंपन्यांकडे क्लेम्स येत आहेत. १४ आक्टोबर पासून कंपन्यांनीं आपल्या हप्त्याचा दर जादा धोक्याचे मुदतीमध्यें चौपट केला आहे.

### लंडनच्या रोखे बाजारांत हिंदी भागांचा प्रवेश

इंडियन आयर्न ॲन्ड स्टील कंपनीच्या भागांचा रोजचा दर लंडन स्टॉक एक्सचेंजमध्यें व्यवहार केल्या जाणाऱ्या रोख्यांचे किंमतीचे पत्रकांत ह्यापुढें समाविष्ट केला जाणार आहे. ही सवलत इंपीरियल बँक, रिझर्व्ह बँक, न्यू इंडिया विमा कंपनी, टाटा आयर्न ॲन्ड स्टील, टिटाघर कागद व कांहीं सिमेंट कंपन्या ह्यांच्या भागांस मिळावी, असें मि. एन आर. सरकार ह्यांनीं एका मुलाखतींत आपलें मत दिलें.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | |
|---|---|
| ता. १७ ऑक्टोबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ८७,०७,४४५ |
| ता. २४ ऑक्टोबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ३७,४६,७७२ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते २४ ऑक्टोबर १९३६ अखेर | २,८५,३६,१३,३७५ |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ... ५२८ | ५ थकवा घालविण्यासाठी विश्रांतीचें महत्त्व | ... ५३२ |
| २ हुंडणावळीचा जम बसला, पुढें काय? | ... ५२९ | ६ जगांतल्या आर्थिक व सामाजिक घडामोडी | ५३३ |
| ३ प्रो. काळे ह्यांचीं सांगली येथील व्याख्यानें | ... ५३० | ७ सर जॉन एलरमन ह्यांची मालमत्ता | ... ५३३ |
| ४ स्फुट विचार. | ... ५३१ | ८ सहकारी चळवळ | ... ५३४ |
| ब्रिटिश रेल्वे तज्ञ हिंदी रेल्वेजची चौकशी करणार–बाहेरील तज्ञांच्या नेमणुकीचें समर्थन–हास्यास्पद कोटिक्रम-आयरिश स्वदेशी धंदे व परकीय भांडवल–फळें व भाज्या ह्यांच्या विक्रीसाठी बोर्ड. | | ९ आजचा ॲबिसीनिया | ५३५ |
| | | १० खेडुतांच्या रहाणींत सुधारणा | ... ... ५३६ |
| | | ११ निवडक बाजारभाव | ५३७ |
| | | १२ पोस्टांतील निर्जीव खातीं | ५३७ |

# अर्थ

बुधवार, ता. २८ ऑक्टोबर, १९३६

## हुंडणावळीचा जम बसला, पण पुढें काय?

फ्रान्स, स्वित्सर्लंड व हॉलंड ह्या राष्ट्रांनीं आपल्या चलनांचा सोन्याशीं असलेला संबंध ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्यांच्या चलनाशी जुळता करून घेतला ही जगाच्या आर्थिक इतिहासांत गेल्या सहा वर्षांत घडून आलेली अत्यंत महत्त्वाची गोष्ट होय. सप्टेंबर, १९३१ मध्यें ग्रेट ब्रिटननें आपल्या पौंडाचें परिमाणभूत सोन्याचें कायदेशीर वजन सोडून दिलें आणि हुंडणावळीचा दर अस्थिर राहिला तरी हरकत नाहीं असें ठरविलें. हुंडणावळीचा कायदेशीर दर निश्चित असला म्हणजे त्या दरानें सोन्याची खरेदी-विक्री करण्याची जबाबदारी राष्ट्रीय मध्यवर्ती बँक व सरकार ह्यांवर येते. १९२९ सालीं विशेषेंकरून अमेरिकेंत जी आर्थिक घडामोड झाली तिच्या योगानें जागतिक व्यापार व आंतरराष्ट्रीय देवघेव ह्यांस नवीन वळण लागलें आणि पूर्वी ठरलेल्या दरानें सोनें किंवा परराष्ट्रीय हुंड्या ह्यांची खरेदी-विक्री होण्यास जरूर असलेला सुवर्णनिधि पुरवणें अशक्य आहे असें दिसून आल्याकारणानें बँक ऑफ इंग्लंडला आपल्या जबाबदारींतून ब्रिटिश पार्लमेंटनें मोकळें केलें. ह्याचा परिणाम सोन्याची किंमत पौंडांमध्यें चढण्यांत झाला, आणि इंग्लंडची अमेरिकेशी असलेली हुंडणावळीची व्यवस्था बिघडली. आंतरराष्ट्रीय व्यापारांतल्या देण्याघेण्याची वजावाट परस्परांवर निघालेल्या हुंड्यांच्या सहायानें होऊन अल्प प्रमाणांतच ह्यासंबंधांत सोन्याची आयात-निर्गत करावी लागावी अशा बेतानें हुंडणावळीचे दर व राष्ट्रीय चलनांचें सुवर्ण-परिमाण हीं निश्चित केलेलीं असतात. पौंडाची सोन्यामधली किंमत बदलतांच त्याचा अनिष्ट परिणाम आपला व्यापार व उद्योगधंदे ह्यांवर होऊं नये म्हणून अमेरिकेनें आपल्या स्वतःच्या सुवर्ण परिमाणांत योग्य तो बदल केला आणि पौंड-डॉलर हुंडणावळ विशिष्ट दरानें स्थिर झाली. आपापल्या हिताच्या संरक्षणार्थ, फ्रान्स, स्वित्सर्लंड व हॉलंड ह्या व्यतिरिक्त इतर राष्ट्रांनीं इंग्लंड व अमेरिका ह्यांचें अनुकरण तात्काल केलें. जगाच्या व्यापारास न जुळणारा असा परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर घट्ट धरून बसण्यांत फ्रान्सचें स्वतःचें नुकसान होत होतें. १ पौंड = ७५ फ्रँक हा दर वाजवीपेक्षां जास्त उंचीचा होता आणि त्या दरानें फ्रँक कायम राखण्याकरितां फ्रेंच सरकारास देशांतलें खेळतें चलन मर्यादित करावें लागत असे. चलन मर्यादित झालें असतां बाजारभाव मंदीचे होतात आणि व्यापार व उद्योगधंदे खालावतात. हे दुष्परिणाम सोसून फ्रँकच्या जुन्या दरास चिकटून राहण्याचा हट्ट फ्रान्सनें आतां सोडला आहे आणि त्या कारणानें आंतरराष्ट्रीय हुंडणावळीची घडी नीट बसण्यास सहाय झालें आहे.

फ्रँकची देवघेव, त्यामध्यें ६५३ मिलिग्रॅम वजनाचें सोनें आहे ह्या कल्पनेनें पूर्वी होत असे; आतां हें परिमाण कमी होऊन फ्रेंच सरकारनें ४३ ते ४९ मिलिग्रॅम इतकें निश्चित करण्यास कायदे मंडळाची मंजुरी मिळवली आहे. ह्या बदललेल्या परिमाणास अनुसरून फ्रँक-डॉलर हुंडणावळ पूर्वी १ डॉलर=१५ फ्रँक अशी होती ती ह्यापुढें १ डॉलर = २० ते २३ फ्रँक ह्याप्रमाणें व्हावयाची आहे. डॉलर–पौंड–फ्रँक हुंडणावळीचे दर अखेर कसे निश्चित होतील हें आज सांगतां येत नाहीं, तथापि त्यांस विशिष्ट मर्यादा येऊन बसल्या आहेत हें खास. स्वित्सर्लंडच्या फ्रँकचें सुवर्ण परिमाण पूर्वी २९० मिलिग्रॅम होतें, तें १९० ते २१५ मिलिग्रॅमच्या सुमारांत निश्चित व्हावयाचें आहे; म्हणजे त्या चलनाची सोन्यानें मापलेली किंमत २६ ते ३५½ टक्के उतरणार आहे आणि हा उतार फ्रेंच फ्रँक इतकाच होणार आहे. हॉलंडनें सोन्याची निर्गत बेकायदेशीर केली आहे आणि आपल्या चलनाच्या किंमतीचें रक्षण व्हावें म्हणून जरूर ती तजवीज केली आहे. ह्याप्रमाणें जगांतलि प्रमुख राष्ट्रांनीं आपापलीं चलनें व परराष्ट्रीय हुंडणावळीचे दर जागतिक परिस्थितीशीं मिळते केले आहेत. प्रचलित आर्थिक मंदी दूर होण्यास अनुकूल वातावरण पाहिजे तें घडवून आणण्याची ही केवळ पहिली पायरी आहे. १९३१ सालापूर्वी राष्ट्रीय चलनें व सोनें ह्यांचा विनिमय सहज होत असे, त्या तऱ्हेची सुवर्णमापन चलनाची व आंतरराष्ट्रीय हुंडणावळीची पद्धति पुन्हां पूर्णत्वानें चालू झाली किंवा होणार असें अनुमान काढणें मात्र चुकीचें होईल. आंतरराष्ट्रीय व्यापार घटला आहे. त्यांत व राष्ट्रीय उद्योगधंद्यांत नवचैतन्य उत्पन्न होण्यास हुंडणावळीची स्थिरता हें एक दुय्यम साधन आहे. जगाची राजकीय परिस्थिति सुधारून राष्ट्रांमध्यें परस्परांविषयीं अविश्वास वास करीत आहे तो दूर होणें ही प्रस्तुत अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. भावी युद्धाच्या तयारींत आणि भावी शत्रूपासून स्वतःचें संरक्षण कसें करावें ह्या विवंचनेंत प्रमुख युरोपिअन राष्ट्रें आहेत तोंवर आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या मार्गांतले अडथळे दूर होणें शक्य नाहीं. जिनीव्हा येथें राष्ट्रसंघाच्या एका कमिटीची सभा चालू महिन्याच्या प्रारंभीं भरली होती, तीमध्यें ग्रेटब्रिटन व फ्रान्स ह्यांच्या प्रतिनिधींनीं आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या मार्गांत कित्येक देशांत नियंत्रणें घातलेलीं आहेत, तीं काढून घेणें अगत्याचें आहे, ह्या मुद्यावर विशेष जोर दिला, तो ह्याच कारणासाठी होय. जर्मनीसारख्या देशांत आर्थिक स्वयंपूर्ततेचें धोरण अंगिकारण्यांत आलें असून निरनिराळ्या राष्ट्रांशीं व्हावयाच्या व्यापारास व हुंडणावळीच्या व्यवहारास मर्यादा घातल्या

आहेत, त्यांवर कमिटींतल्या फ्रेंच प्रतिनिधीचा कटाक्ष होता. चार वर्षांच्या अवधींत आपणांस लागणारा कच्चा माल स्वतःच तयार करावयाचा व त्या बाबतींत इतर देशांवर अवलंबून रहावयाचें नाहीं, अशी स्थिति निर्माण होण्याकरितां जर्मनीनें चतुर्वार्षिक योजना हातीं घेतली असल्याचें जाहीर झालें आहे. आपल्या वसाहती आपणांस परत मिळण्याबाबतची जर्मनीची मागणी आहे, तिचाहि निकाल समाधानकारक रीतीनें व्हावा लागेल. स्पेनमधल्या अंतःकलहामुळें युरोपांत तेढ उत्पन्न झाली आहे तीहि आर्थिक मंदी दूर होण्याच्या मार्गांतली एक अडचण आहे. हुंडणावळीच्या स्थिरतेनें आंतरराष्ट्रीय व्यापाराचा मार्ग मोकळा झाला असला तरी त्यांत मोठमोठे खड्डे आहेत, ते भरून निघतील तेव्हांच खऱ्या आर्थिक प्रगतीस जोर लागेल. जागतिक व्यापाराच्या गाडीच्या चाकांत हुंडणावळाच्या स्थैर्याचें ओंगण घातलें जात आहे, परंतु ती पुढें ढकलली जाण्यास सर्व राष्ट्रांचें बळ एकवटलें पाहिजे.

## प्रो. काळे ह्यांचीं सांगली येथील व्याख्यानें

सांगली येथील सिटी स्कूलच्या चालकांनीं गेल्या आठवड्यांत शारदोत्सवानिमित्त वुइलिंग्डन कॉलेजचे मुख्य, प्रि. कर्वे आणि प्रो. काळे ह्यांच्या व्याख्यानांचा कार्यक्रम यशस्वी रीतीनें पार पाडला. व्याख्यानास गांवांतील निरनिराळया धंद्यांच्या व पेशांच्या गृहस्थांची गर्दी होत असून श्रोत्यांमध्यें जिज्ञासा व उत्साह उत्कृष्ट रीतीनें व्यक्त होत होता, ह्याबद्दल शाळेचे चालक व सांगलीची जनता ह्या दोघांचेंहि अभिनंदन करणें जरूर आहे. प्रि.कर्वे ह्यांचें व्याख्यान 'फेडरेशन'ह्या विषयावर झालें आणि प्रो. काळे ह्यांच्या व्याख्यानांचे विषय 'हुंडणावळीची खळबळ' व "जागतिक आर्थिक घडामोडी"हे होते. हे सर्वच विषय हिंदी जनतेस सध्या अत्यंत जिव्हाळ्याचे वाटत असल्यानें सांगलीकरांस त्यांवरील व्याख्यानें विशेष अभिप्रेत वाटलीं असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं.

### हुंडणावळीची खळबळ

फ्रेंच सरकारानें आपल्या राष्ट्रीय चलनाची डॉलर व पौंड ह्यांचे मानानें स्वस्ताई नुकतीच केली असून फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका ह्यांचे दरम्यान हुंडणावळीचे दर स्थिर करण्याचे यत्न चालू आहेत, ह्या सर्व घडामोडींचें रहस्य प्रो. काळे ह्यांनीं आपल्या पहिल्या व्याख्यानांत विशद करून सांगितलें. हुंडणावळ म्हणजे काय, तिच्या दराचा राष्ट्रीय चलनाशीं संबंध कसा असतो, त्यांचा बाजारभावावर परिणाम कसा घडून येतो, ह्याची व्याख्यात्यांनीं अत्यंत सुलभ रीतीनें फोड केली आणि हुंडणावळीचा प्रश्न राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्त्वाचा कां व कसा होतो, हें उदाहरणें घेऊन श्रोत्यांस पटवून दिलें. जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं आपल्या चलनाचें सोन्याचें माप कमी केलें आहे त्याचा परिणाम बाजारभाव,उद्योगधंदे व व्यापार ह्यांवर अनुकूल झाला असून फ्रान्स, स्वित्सर्लंड, हॉलंड वगैरे देशांस इंग्लंड व अमेरिका ह्यांचें अनुकरण करून स्वतःच्या चलनाची त्यांच्या चलनांतली किंमत म्हणजे हुंडणावळ जुळती करून घेण्यापासून काय फायदा होणार आहे, ह्याचेंहि त्यांनीं विवेचन केलें. हिंदुस्थान सरकारनेहि राष्ट्रीय व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या हिताच्या दृष्टीनें अशाच प्रकारच्या धोरणाचा अंगिकार करणें अगत्याचें होतें; परंतु आमच्या देशांत आर्थिक बाबींत स्वावलंबनाची सत्ता नसल्यानें हिंदी रुपया ब्रिटिश पौंडास टांगून ठेवून स्वस्थ बसण्याची पाळी आली आहे.

### जागतिक आर्थिक घडामोडी

प्रो. काळे ह्यांच्या दुसऱ्या व्याख्यानांत अलीकडे जगांत आर्थिक घडामोडी मोठ्या प्रमाणावर चालल्या आहेत, त्यांचें विवेचन करण्यांत आलें. प्रत्येक राष्ट्रानें इतरत्र होणाऱ्या ह्या उलाढाली लक्षांत घेऊन स्वतःचें उचित असें औद्योगिक व व्यापारी धोरण आखणें अगत्याचें आहे, ह्या आपल्या मुख्य सिद्धांताच्या स्पष्टीकरणार्थ त्यांनीं चलनव्यवस्था, औद्योगिक संरक्षण, आंतरराष्ट्रीय व्यापारी करार, आर्थिक स्वयंसिद्धता, आर्थिक योजना, इत्यादि बाबतींत गेल्या पांच-दहा वर्षांत इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांत होत असलेले महत्त्वाचे फेरफार स्पष्ट करून सांगितले. आंतरराष्ट्रीय सहकार व राष्ट्रीय वृत्तीचें स्वावलंबी धोरण ह्यांचा परस्पर संबंध सध्या पूर्वीच्या मानानें निराळ्या प्रकारचा झालेला आहे. एकमेकांशी व्यापारासारख्या बाबतींत राष्ट्रांनीं सहकार तर केलाच पाहिजे,त्यावांचून त्यांचें क्षणभरहि चालणार नाहीं, परंतु हा सहकार प्रत्येक राष्ट्राच्या विशिष्ट परिस्थितीशी सुसंगत असला पाहिजे. पूर्वीप्रमाणें राष्ट्रांच्या सरकारांस आर्थिक प्रश्नांचे बाबतींत तटस्थपणाची वृत्ति स्वीकारून भागत नाहीं, हें ग्रेट-ब्रिटनसारख्या खुल्या व्यापाराच्या चहात्या राष्ट्रांत शेती, व्यापार व उद्योगधंदे ह्यांस संरक्षण देण्याचें महत्त्व व्यवहारांत पटलें आहे, ह्यावरून सिद्ध होत आहे. हिंद-जपान करार, ओटावा करार, जर्मनीची आर्थिक स्वयंसिद्धतेसंबंधाची योजना ह्यांचे दाखले देऊन व्याख्यात्यांनीं हा विषय विशद केला. हिंदी सरकार व हिंदी जनता यांनीं प्रचलित जागतिक घडामोडींपासून पुष्कळच बोध घेण्यासारखा आहे, तो कोणता तोहि प्रो. काळे ह्यांनीं स्पष्ट सांगितला. आत्मविश्वास, प्रगतीचें ध्येय व संघटन ह्यांच्या सहायानें हिंदी जनतेनें स्वदेशीचा अंगिकार केला पाहिजे व स्वतःच्या पायावर उभें रहाण्याची तयारी केली पाहिजे. असें होईल तरच हा देश आंतरराष्ट्रीय चढाओढींत जगेल.

## जमिनीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण: पंजाब सरकारचें बिल

मध्यप्रांतांतील १९२८ च्या कनसॉलिडेशन ऑफ होल्डिंग्ज अॅक्टाच्या धर्तीवर वरील बिलाची योजना करण्यांत आली आहे. एकाद्या ठिकाणच्या तीन चतुर्थांशापेक्षां जास्त जमीन धारण करणाऱ्या व एकूण जमीन मालकांच्या दोन तृतीयांशापेक्षां ज्यास्त मालकांनीं जमिनीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण करण्यांत यावें असा अर्ज केल्यास तो अर्ज सर्व मालकांतर्फे आहे असें मानण्यांत येईल व त्यांनीं मंजूर केलेली योजना सर्वांवर बंधनकारक होईल, अशी वरील बिलांत तरतूद करण्यांत आली आहे. वेगवेगळ्या ठिकाणीं विखुरलेल्या एकाच मालकीमधील जमिनीच्या तुकड्यांचे ऐवजीं एकेठिकाणीं त्यांच्या क्षेत्रफळाइतकी जमीन मालकास प्राप्त करून देणें, म्हणजे जमिनीची अदलाबदल करणें, एवढाच वरील बिलाचा मर्यादित उद्देश आहे. ह्याच स्वरूपाचें एक बिल मुंबई सरकारनें कायदेमंडळांत मागें आणलें होतें, परंतु तें लोकांच्या विरोधामुळें परत घ्यावें लागलें होतें.

## फर्ग्युसन आणि विलिंग्डन कॉलेज मॅगेझिनचा डॉ. परांजपे ज्युबिली विशेषांक

फर्ग्युसन कॉलेजचे माजी प्रिन्सिपॉल 'रँगलर' परांजपे ह्यांच्या षष्ट्यब्दपूर्तीचे प्रसंगानुसार वरील अंकाची सजावट करण्यांत आली आहे. डॉ. परांजपे ह्यांच्या आठवणींनीं हा अंक भरला असून अनेक पुढाऱ्यांचे व फर्ग्युसन कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांचे लेख त्यांत समाविष्ट आहेत. सदरहु अंकावरून डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या परिवाराची व डॉ. परांजपे ह्यांच्या कार्याची व लोकप्रियतेची कल्पना येते.

## स्फुट विचार

### ब्रिटिश रेल्वे तज्ञ हिंदी रेल्वेजची चौकशी करणार

हिंदुस्थान सरकारच्या मालकीच्या म्हणजे हिंदी राष्ट्रीय रेल्वेजची सांपत्तिक स्थिति सर्वस्वी बिघडून गेली असून त्यांचा व्यवहार गेलीं सहा वर्षे तोट्यांत चालला आहे. प्रचलित आर्थिक मंदीचा हा पुष्कळ अंशीं परिणाम आहे, ह्यांत शंका नाहीं. तथापि, बिघडलेली स्थिति मामुली उपायांनीं सुधारणें अशक्य वाटल्यावरून सरकारनें रेल्वेजच्या व्यवस्थेंत महत्त्वाचे फेरफार होणें जरूर आहे ह्या समजुतीनें त्या बाबतींत चौकशी व शिफारसी करण्यासाठीं दोन ब्रिटिश तज्ञांची नेमणूक केली आहे. रेल्वेजचा कारभार धंदेवाइक पद्धतीप्रमाणें चालला पाहिजे हें निर्विवाद आहे. कर्जाऊ भांडवल उभारून त्या बांधल्या आहेत व त्यांतलें पुष्कळसें कर्ज परदेशी भांडवलवाल्यांचें आहे. रेल्वेजचा मामुली खर्च भागून भांडवलावरचें व्याज देण्यास आणि घसारा काढून ठेवण्यास पुरी कूस राहील ह्या बेतानें त्यांचें उत्पन्न आलें पाहिजे. एवढेंच नव्हे, तर हा सर्व खर्च भागून भांडवलावर रीतसर नफाहि उरणें जरूर आहे. असें होईल तरच रेल्वेजचा कारभार नीट चालला असें म्हणतां येईल. सहा वर्षांपूर्वी अशी स्थिति होती आणि सर्व खर्चवेंच जाऊन सरकारी तिजोरींत पांच-चार कोटि रुपये दर वर्षी नफ्यादाखल जमा होत असत. अलीकडे हें पारडें सर्वस्वी फिरलें असून, नफा दूर राहिला, पण पुरत्या घसाऱ्याची तरतूद करणेंहि अशक्य झालें आहे. मोडतोड भरून निघण्याची आणि मूळ भांडवल अखंड रहाण्याची व्यवस्था कोणत्याहि व्यवसायांत मामुली उत्पन्नामधून होत नसेल तर तो धंदाच नव्हे. हिंदी रेल्वेज राष्ट्राच्या मालकीच्या असल्यानें त्या नुकसानींत चालणें अनिष्टच समजलें पाहिजे. रेल्वेजची स्थिति सुधारण्याच्या स्वतःच्या प्रयत्नांस यश येत नाहीं असें पाहून रेल्वे बोर्डानें हात टेकले असून विलायती तज्ञांकडे धांव घेतली आहे. आमच्या रेल्वेजच्या व्यवस्थेची प्रकृति तपासून योग्य उपाययोजना सुचवा आणि हा रोगी स्वतःच्या पायांवर उभा राहून चालूं लागेल असें करा ह्या प्रकारची कामगिरी सरकारनें त्यांच्यावर सोपविली आहे. गेलीं ऐंशी वर्षे हिंदुस्थानांत रेल्वेज चालू असतां त्यांसंबंधांत सल्ला देण्याची पात्रता असलेले दोन गृहस्थहि येथें सरकारास सापडूं नयेत ही नवलाचीच गोष्ट म्हटली पाहिजे. प्रत्येक बाबतींत हिंदुस्थान सरकारास बाहेरील तज्ञांकडे धाव घेणें जरूर वाटावें हें कांहीं भूषणावह नाहीं.

---

### बाहेरील तज्ञांच्या नेमणुकीचें समर्थन

हिंदी रेल्वेजच्या दुःस्थितीची चौकशी करण्यास दोन ब्रिटिश तज्ञ नेमले आणि त्यांच्या जोडीस एकहि हिंदी गृहस्थ दिला नाहीं, ह्या विषयींच्या सरकारच्या धोरणावर प्रतिकूल टीका होणें ही गोष्ट अपेक्षितच होती. तेव्हां, तिला काय उत्तर द्यावें हें सरकारच्या धोरणाचें समर्थन करणारांनीं आपल्या मनाशीं ठरवूनच ठेवलें असलें पाहिजे. सर राल्फ वेजवुड त्यांच्या जोडीनें बसून काम करण्यास लायक असा एकहि हिंदी गृहस्थ मिळणें अशक्य आहे असें विधान करणें कोणासहि धाष्ट्र्याचें वाटलें असतें. तेव्हां दुसऱ्याच कांहीं मुद्यांवर सरकारी धोरण उचलून धरलें जाणें भाग आहे. मुंबईच्या 'टाइम्स ऑफ इंडिया' पत्राच्या सिमल्याच्या बातमीदारानें ह्या बाबतींत कोटिक्रम केला आहे, तो वाचला म्हणजे हिंदी रेल्वेजच्या चौकशीसाठीं केवळ ब्रिटिश तज्ञ नेमण्याच्या मुळाशीं असलेल्या कल्पना किती भ्रामक आहेत ह्याची कल्पना येते. सदरहु बातमीदारानें सिमला येथील अधिकारी वर्गांतलें मत अजमावूनच त्याची दिशा निदर्शित केली आहे यांत शंका नाहीं. ब्रिटिश रेल्वेजच्या कारभाराची व त्यामध्यें सुधारणा घडवून आणून मंदीच्या परिस्थितींतून त्यांस बाहेर काढण्यासाठीं अमलांत आणलेल्या उपायांची उत्कृष्ट माहिती सर राल्फ ह्यांस आहे आणि हिंदी रेल्वेजच्या दुःस्थितीचें निदान करण्यास ते धैर्यानें पुढें आले आहेत असें म्हणून हिंदुस्थान सरकारचें मन उघडें करून दाखविण्याचा यत्न सदरहु लेखकानें केला आहे. बाहेरून येणारे तज्ञ चांगले माहितगार, हुषार व लायक गृहस्थ असतील ह्याविषयीं शंका घेण्याचें किंवा त्यांच्याविरुद्ध निष्कारण टीका करण्याचें कोणासच प्रयोजन नाहीं. हिंदी आर्थिक प्रश्न सोडवण्यास योग्य अशीं हिंदी माणसें नाहींत कीं काय आणि त्यासंबंधांतलें परावलंबन किती काळपर्यंत व कोणत्या मर्यादेपर्यंत चालावयाचें हा येथें प्रश्न आहे. परकीय तज्ञांच्या नेमणुकीमुळें हिंदी राष्ट्रावर नालायकीचा शिक्का बसत आहे ह्याची जाणीव निदान हिंदुस्थानें सरकारास असावयास पाहिजे होती.

---

### हास्यास्पद कोटिक्रम

हिंदी रेल्वेंत गुंतलेलें भांडवल बहुतांशीं ब्रिटिश मालकीचें असल्यानें त्यांच्या स्थितीविषयींच्या चौकशीचें काम ब्रिटिश तज्ञांच्या हातीं देणें आवश्यक होतें, हा हास्यास्पद मुद्दा वरील लेखकानें पुढें मांडला आहे. सर राल्फ वेजवुड हे ब्रिटिश भांडवलवाल्यांचे प्रतिनिधि व त्यांच्या हिताचे रक्षक ह्या नात्यानें अंगीकृत चौकशीचें काम करणार आहेत असें म्हणणें खुद्द सरकारास आणि सर राल्फ ह्यांस कितीसें रुचेल ह्याची शंका आहे. रेल्वेजचा खर्च कसा कमी करावा, त्यांचें उत्पन्न कसें वाढवावें, जरूर वाटल्यास त्यांच्या कारभाराची पुनर्घटना कशी करावी इत्यादि प्रश्नांचीच मुख्यत्वेंकरून चौकशी व्हावयाची असतां ब्रिटिश भांडवलाचा त्यांच्याशीं कसा संबंध येतो हेंच समजणें कठिण आहे. ब्रिटिश भांडवलावर व्याज द्यावें लागतें तें कमी करून हिंदी रेल्वेजचा कारभार कमी खर्चाचा करावा असें कोणीहि सुचवलेलें नाहीं, आणि तसें सुचवलें गेलें आहे असें क्षणभर मानलें तरी त्या बाबतींत सर राल्फ सारखे तज्ञ कसा सल्ला देणार ? ह्यासंबंधानें सल्ला देण्याची त्यांच्यामध्यें कोणती पात्रता आहे ? हिंदी रेल्वेजच्या स्थितीशीं हिंदी जनतेचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे असे असतां, तिचे प्रतिनिधि बाजूस सारून ब्रिटिश भांडवलवाल्यांच्या हिताचें रक्षण करण्याकरितां त्यांच्या प्रतिनिधींची निवड करण्यांत आली आहे हा टाइम्सच्या बातमीदाराचा मुद्दा स्वतः त्या भांडवलवाल्यांसहि रुचणार नाहीं. ह्या बातमीदाराचा ह्या पुढचाहि कोटिक्रम अत्यंत लटपटीत आहे. रेल्वे बोर्ड आणि हिंदुस्थानांतील कंपन्यांच्या रेल्वेज ह्यांचेमध्यें प्रस्तुत हलाखीच्या स्थितीचे बाबतींत मतभेद असल्यानें त्याबाबत निःपक्षपाती व निर्णयात्मक मत देण्यास ब्रिटिश तज्ञांसारखे तिऱ्हाइतच ज्यास्त उपयोगी पडतील ह्या त्याच्या म्हणण्यांतहि कांहीं तथ्य नाहीं. आंतरराष्ट्रीय व आंतरप्रांतीय व्यापाराच्या ओघास अलीकडे नवीन वळण लागलें आहे आणि रेल्वेज व मोटारी ह्यांची परस्पर स्पर्धा चालू आहे; ह्या प्रश्नांचें

आकलन व निकाल करण्यास बाहेरचे तज्ज्ञ हवे आहेत असें नाहीं. परंतु परकीय तज्ज्ञांचें खूळच हिंदुस्थानांत इतकें पिकलें आहे कीं सरकाराचा व जनतेचा जणूं काय आत्मविश्वासच नाहींसा झाला आहे. कोणत्याना कोणत्या कारणानें, हिंदी लोक स्वतःच्या हिताचे प्रश्न सोडवण्यास लायक नाहींत ही कल्पना दृढमूल झाली असून तिचें मूळ अधिक घट्ट करण्याचा चोहोंकडून प्रयत्न होत आहे असें एकंदर परिस्थिति पहातां वाटावयास लागतें. जनतेमध्यें प्रथम आत्मविश्वास उत्पन्न झाल्यावांचून सरकारावर तिच्या मताचें वजन पडणें शक्य नाहीं.

### आयरिश स्वदेशी धंदे व परकीय भांडवल

आयर्लंडमध्यें राष्ट्रीय भावना विशेष प्रदीप्त झाल्यापासून परदेशी भांडवलवाले व कारखानदार ह्यांचें प्रस्थ आपल्या देशांत चालूं द्यावयाचें नाहीं असें तेथील लोक व सरकार यांनीं ठरवून त्या बाबतींत नियंत्रणें घालण्यासाठीं जरूर ते कायदे पास केले. तथापि हीं नियंत्रणें चुकवूनहि परराष्ट्रीय कारखानदार आयर्लंडमध्यें धंदे चालवतात असें आढळून आलें असून त्याचा बंदोबस्त व्हावा म्हणून राष्ट्रीय धंदेवाल्यांच्या संघानें सरकारास कित्येक सूचना केल्या आहेत व त्यांस अनुसरून नवीन कायदे केले जावे असें त्यांचें म्हणणें आहे. परदेशी भांडवलवाले प्रचलित निर्बंध निरनिराळ्या हिकमती लढवून चुकवतात. आयर्लंडमध्यें थोड्या भांडवलाचा लहान कारखाना निघतो व त्याचे चालक आयरिश लोक असतात. परंतु कारखान्याचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर चालून त्यास लागणारें जादा भांडवल बाहेरून कर्जाऊ पुरवलें जातें किंवा तें कच्च्या मालाच्या स्वरूपांत परकीय मंडळया देतात आणि ह्या मार्गानें परराष्ट्रीय लोकांचा हात आंत शिरकतो. उदाहरणार्थ, सात हजार रुपये भांडवलावर निघालेल्या एका कारखान्याचें वार्षिक उत्पादन पावणेतीन लक्ष रुपयांचें झालें, तें ह्या रीतीनें झालें. ह्या दाखल्यावरून मूळ भांडवल आणि उत्पादनशक्ति ह्यांची माहिती कारखानदारांनीं दिली पाहिजे अशी कायद्यांत तरतूद करण्याविषयीं सूचना पुढें मांडण्यांत आली आहे. नामधारी आयरिश डायरेक्टर परकी भांडवलवाल्यांच्या वतीनें कंपन्यांचें काम पाहतात असेंहि कित्येक वेळां घडतें व त्या व्यवस्थेंत औद्योगिक सत्ता आयरिश लोकांच्या हातीं रहात नाहीं. परदेशी ट्रेड मार्क्सच्या सहाय्यानें कित्येक कंपन्या माल काढतात व त्याचा सहज खप होतो. आयरिश स्वदेशी कायद्याचें उल्लंघन करणाऱ्या ह्या सर्व प्रकारांचा पूर्ण प्रतिबंध व्हावा अशी शिफारस आयरिश कारखानदारांच्या संघानें सरकारास केली आहे.

### फळें व भाज्या ह्यांच्या विक्रीसाठीं बोर्ड

फळें व भाज्या ह्यांच्या विक्रीच्या मार्गातील अडचणी दूर करून गिऱ्हाईक वाढविण्याकरितां सहाय करण्यासाठीं मुंबई सरकारनें एक बोर्ड स्थापन केलें आहे. डॉ. चिमा हे त्याचे अध्यक्ष असून रा. ब. असवले, मुंबईच्या फ्रूट ग्रोअर्स असोसिएशनचे अध्यक्ष मि. बिवडवाला, क्रॉफर्ड मार्केटाचे अधिकारी मि. लाड, इलाख्यांतील फळवाल्यांचा व भाजीवाल्यांचा एक प्रतिनिधि व रेल्वेजचा एक प्रतिनिधि हे सभासद रहातील. भाज्या व फळें ह्यांच्या वहातुकीचे दरासंबंधीं बोर्डानें करावयाच्या सूचना मुंबई सरकार व मध्यवर्ती सरकार ह्यांचे मार्फत रेल्वे बोर्डाकडे जातील व नवीन नेमलेल्या चौकशी कमिटीसहि कळवण्यांत येतील, अशी अपेक्षा आहे.

### थकवा घालविण्यासाठीं विश्रांतीचें महत्त्व

आधुनिक द्रुतगतीच्या उत्पादन पद्धतीमध्यें कामगारांस जरूर तेवढी विश्रांति मिळत नाहीं व कामाच्या ताणाचा प्रकृतीस अपायकारक परिणाम होऊन त्यांस अकालीं वार्धक्य येतें, ही आतां अनुभवसिद्ध गोष्ट झाली आहे. कामगारांप्रमाणें मालकाचेंहि त्यामुळें नुकसान होतें, कारण नोकरांच्या वारंवार होणाऱ्या गैरहजेरींत नव्या व अनभिज्ञ माणसांकडून त्यास कामें करून घ्यावीं लागतात. शरीराच्या प्रत्येक हालचालीमुळें होणारी झीज जर भरून निघाली नाहीं व रक्तांत पसरणाऱ्या विषाचें प्रमाण वाढूं लागलें, तर त्यामुळें प्रकृतीस अपाय होतो. संथपणानें काम केलें तर तें ज्यास्त वेळ करतां येतें, परंतु तेंच जलद व विश्रांति न घेतां करावयाचें म्हटलें तर लवकर थकवा येतो. ताशीं तीन मैल वेगानें मनुष्य न थांबतां बारा चौदा मैल जाऊं शकला, तरी एका मैलापेक्षां अधिक धावणें त्यास कठीण जातें व पांच-दहा मिनिटांतच तो धापा टाकूं लागतो, ह्याचें कारण ज्या गतीनें त्याचे रक्तांत विष सांठतें, त्या गतीनें तें बाहेर फेंकलें जात नाहीं, हें होय.

कारखान्यांमध्यें यंत्राप्रमाणें श्रम करणाऱ्या कामगारांस वेळेवर विश्रांति मिळणें कसें आवश्यक आहे, ह्याची वरील उदाहरणावरून कल्पना येईल. दोन चार तासांच्या कामाचा थकवा दहा-पंधरा मिनिटांच्या विश्रांतीनें नाहींसा होऊं शकतो व दिवसभर काम करणारा माणूस रात्रीच्या झोपेनंतर पुनः ताजातवाना होतो. तथापि, कित्येक प्रसंगीं, पहिल्या दिवशीचा थकवा रात्रीच्या विश्रांतीनंतरहि नाहींसा होत नाहीं. मनुष्याच्या शरीराची झीज भरून न आल्यानें आजची ताकद उद्याला रहात नाहीं अशी परिस्थिति निर्माण होते व रोगास प्रतिबंध करण्याची शक्ति नाहींशी होऊन क्षीणता वाढत जाते. थकवा नाहींसा होऊन कामगार पुनः कार्यक्षम होण्यास विश्रांतीची जरूरी आहे आणि ह्या विश्रांतीमध्यें अर्थातच करमणूक, सकस अन्न, नोकरीसंबंधीं निश्चितपणा इत्यादींचा अंतर्भाव होतो. कामगारांची काम करण्याची शक्ती टिकून रहाण्यामध्यें गिरणीमालकांचेंहि हित असल्यानें सुटीची व विश्रांतीच्या वेळेची व्यवस्था त्यांनीं शास्त्रशुद्ध पायावर केली पाहिजे. फॅक्टरी ॲक्टामुळें मोठमोठ्या कारखान्यांतील कामगारांच्या कामाच्या वेळा निश्चित झाल्या असल्या व कामाच्या तासांची कमालमर्यादा घालून दिली गेली असली तरी बहुसंख्य लोक फॅक्टरी ॲक्टाखालीं येत नसल्यानें त्यांच्या विश्रांतीची कायदेशीर तरतूद झालेली नाहीं. आपल्या हाताखालील लोकांस विश्रांति व करमणूक ह्यांचीं साधनें उपलब्ध करून त्यांजकडून गोडीगुलाबीनें ज्यास्त काम करवून घेण्याची कला कित्येक प्रगमनशील कारखानदारांस चांगली साधलेली असते व त्यामुळें मालक व कामगार ह्या दोघांचेंहि हित होतें. अशा व्यापक दृष्टीनें ह्या प्रश्नाकडे पाहून स्वहित व कामगारांचें हित साधणारें धोरण आंखणारे मालक जितक्या ज्यास्त प्रमाणांत आढळतील त्या मानानें सामाजिक सुखांत वाढ होण्यास सहाय होईल.

### मलेरियाच्या प्रतिकारासाठीं १० लक्ष रुपये

इंडियन रिसर्च फंड असोसिएशननें मलेरिया प्रतिबंधक कार्याकरितां चालू सालासाठीं दहा लक्ष रुपये मंजूर केले आहेत, त्यांपैकीं आठ लक्ष रुपये प्रांतिक योजनांवर खर्च केले जातील.

## जगांतल्या आर्थिक व सामाजिक घडामोडी

( १ )

महायुद्ध संपून शांतता प्रस्थापित झाल्यावर आंतरराष्ट्रीय संबंध व राष्ट्रांची अंतर्गत सामाजिक व्यवस्था यांची विशिष्ट पद्धतीनें घडी बसली; परंतु अपेक्षेप्रमाणें ह्या पुनर्घटनेंत स्थैर्य निर्माण झालें नाहीं आणि चोहोंकडे नवीन घडामोडी होऊं लागल्या. रशियांत झालेली उलथापालथ अपूर्व अशी होती. प्रातिनिधिक स्वरूपाची राज्यव्यवस्था, खासगी मालकीच्या व स्पर्धेच्या तत्त्वावर आधारलेली शेती व उद्योगधंदे, आधिदैविक व आध्यात्मिक कल्पनांवर उभारलेली धर्माची, विवाहाची व कुटुंबाची व्यवस्था ह्या सर्वांचें उच्चाटन करून बॉल्शेव्हिकांनीं समाजसत्तेची स्वतःस प्रिय असलेली घटना प्रस्थापित केली. पुराणसंस्कृतीचा नाश करणाऱ्या क्रांतीची ही लाट आपल्याकडे उसळूं नये म्हणून जर्मनी व इटली ह्या देशांत फॅसिस्ट लोकांनीं तिचा प्रतिकार करण्याच्या हेतूनें दुसऱ्याच एका प्रकाराची दंडुकेशाही स्थापन केली. आर्थिक मंदीमुळें उत्पन्न झालेल्या हलाखीच्या स्थितीचा परिणाम समाजसत्तावादास इतर देशांतहि उत्तेजन मिळण्यांत झाला. फ्रान्समध्यें कायदेमंडळाच्या गेल्या निवडणुकींत त्या वादाच्या पुरस्कर्त्यांचें प्राबल्य प्रस्थापित झालें आहे व स्पेनमध्यें त्यांचा फॅसिस्ट प्रतिस्पर्ध्यांशी आज निकराचा व रक्तपातमय झगडा चालू आहे. दारिद्र्य, बेकारी, विषमता हीं दूर होण्याचे उपाय सर्वच देशांत अमलांत येत आहेत. पण त्यांच्या तऱ्हा भिन्न भिन्न असून जमीन, कारखाने, बँका, व्यापार इत्यादींची मालकी व व्यवस्था व्यक्तींच्या हातून काढून घ्यावी व ती सामुदायिक व सामाजिक करावी असा समाजसत्तावाद्यांचा आग्रह आहे, तर त्याच्याविरुद्ध, ह्या प्रकारची क्रांति राष्ट्रीय संस्कृति व अस्तित्व ह्यांचा नाश करणारी अतएव त्याज्य आहे, असें इतरांचें ठाम मत आहे. फॅसिस्ट घटना सर्वत्र एकच प्रकारची नाहीं. त्याप्रमाणेंच, समाजसत्तावादात्मक कल्पनांमध्येंहि अनेक तऱ्हा आहेत. रशियांतला बॉल्शेव्हिझम कित्येक समाजसत्तावाद्यांस देखील मान्य नाहीं. इंग्लंड वगैरे देशांत कामकरी वर्गाची चळवळ संघटित व सामर्थ्यवान आहे, पण तिच्यांतले लोक पार्लमेंटरी राज्यपद्धति मोडून रशियन बॉल्शेव्हिक पद्धति स्वीकारण्यास मुळींच तयार नाहींत. ह्या कारणानें अनेक देशांत, भांडवलशाही म्हणजे खाजगी आर्थिक मालकीचें प्राबल्य, सामान्य लोकांस मान्य नसलें व त्यास आळा घालण्याची जरूरी त्यांस भासत असली तरी आपली लोकसत्तात्मक राज्यव्यवस्था, राष्ट्रीय परंपरा, धर्म व संस्कृति हीं झुगारून देण्याची कल्पना त्यांस सर्वस्वी त्याज्य वाटत आहे. क्रांतीपेक्षां उत्क्रांतीवर अनेकांचा अधिक विश्वास असून राष्ट्रीय परंपरा व संस्कृति ह्यांस ते ज्यास्त महत्त्व देतात.

जर्मनी, इटली व रशिया ह्या देशांत सामाजिक क्रांत्या झाल्या असून सामान्य परिचयाच्या लोकशाहीचें तेथें उच्चाटन झालें आहे, आणि राज्यव्यवस्था, व्यापार, उद्योगधंदे, सामाजिक व धार्मिक संस्था ह्यांचे बाबतींत नवीन तऱ्हेची घडी बसवण्यांत आली आहे. ह्या क्रांतींचीं वर्णनें अनेक ग्रंथांत व लेखांत प्रसिद्ध झालीं आहेत. परंतु त्यांवरूनच नव्हे तर सदरहु देशांत जाऊन परिस्थिति पाहून आलेल्यांच्या हकीकतींवरूनहि वस्तुस्थितीची यथातथ्य कल्पना येत नाहीं. ह्याकारणानें, सदरहु देशांतल्या घडामोडींचीं उलट सुलट भडक रंगवलेलीं चित्रें दृष्टीस पडतात, तीं विश्वसनीय मानतां येत नाहींत. रशियांत बॉल्शेव्हिकांनीं केलेल्या समाजघटनेचें स्वतः निरीक्षण करून तिचें सांगोपांग वर्णन मिस्टर व मिसेस सिडने वेब ह्या प्रसिद्ध ब्रिटिश दांपत्यानें एका मोठ्या दोन-पुस्तकी ग्रंथांत केलें आहे, त्यांत दिलेली माहिती बोधप्रद मानली जाणें स्वाभाविक आहे. वेब पतिपत्नींचा राजकीय व आर्थिक घटनेचा व्यासंग दांडगा असून त्यांचे ग्रंथ प्रतिष्ठा पावलेले आहेत. लेखक-लेखिका आपल्या वयाचें आठवें दशक ओलांडून जाण्याच्या स्थितींत आहेत आणि वाढलेल्या वयाचा बुद्धीवर परिणाम झाला असल्याचा संभव त्यांस साशंक करीत आहे. मि. आणि मिसेस वेब ह्यांचा ओढा सामाजिक सुधारणा व समाजसत्तावाद ह्यांच्या बाजूस अगोदरचाच आहे; त्यामुळें बॉल्शेव्हिकांच्या क्रांतीसंबंधाचें त्यांचें स्वतःचें मत कमी-अधिक अनुकूल असणें स्वाभाविक आहे. "सोव्हिअट कम्युनिझम : नूतन संस्कृतीचा मनु ?" ह्या त्यांच्या जाड्या ग्रंथाचें परीक्षण "दि पोलिटिकल क्वार्टर्ली"च्या ताज्या अंकांत सर वुइल्यम बीव्हरिज ह्यांनीं, ग्रंथकर्त्यांसंबंधानें आदर मनांत बाळगून व निःपक्षपाती अभ्यासूची वृत्ति ठेवून केलें असल्यानें त्यास विशेष रीतीचें महत्त्व आहे. सर वुइल्यम ह्यांच्या लेखाच्या आधारानें वेब दांपत्याच्या ग्रंथांतल्या मुख्य विषयांचा परिचय वाचकांस करून दिला असतां तो बोधप्रद होईल असें आम्हांस वाटतें. तसें करण्यापूर्वी प्रस्तुत विषयाबाबत चार प्रास्ताविक शब्द लिहिणें उपयुक्त होईल.

---

### सर जॉन एलरमन यांची प्रचंड मालमत्ता

आगबोटींच्या वहातुकीच्या धंद्यांत अत्यंत यशस्वी म्हणून जगद्विख्यात् झालेले म० सर जॉन एलरमन ह्यांनीं आपल्या मागें सुमारें ४८ कोटि रुपयांची मालमत्ता ठेवली आहे. ग्रेट-ब्रिटनच्या बाहेरच्या इस्टेटीचा ह्या रकमेंत अंतर्भाव नाहीं, तो केल्यास एकूण मालमत्ता ५२ कोटींवर जाईल. तिच्यामधून वारसावरील कराच्या रूपानें ब्रिटिश तिजोरीस सुमारें २४ कोटि रुपये मिळतील. सर जॉन साहेबांनीं आपल्या हयातींत २६ कोटींपेक्षां जास्त रकम प्राप्तीवरील कर म्हणून दिलेली आहे. म्हणजे, त्यांच्या एकट्याच्या इस्टेटीमधून ब्रिटिश सरकारास एकूण सुमारें ५० कोटींचा लाभ झाला आहे व होणार आहे. सर जॉन एलरमन ह्यांच्या पत्नीस २० लक्ष रुपये रोख व दरसाल चार लक्ष रुपये तनखा मिळावयाचा आहे. त्यांनीं आपल्या विवाहित मुलीसाठीं अशाच प्रकारची व्यवस्था करून ठेवली आहे. त्यांच्या थोरल्या मुलास अर्थातच त्यांचा किताब, भरपूर रोख रकम व अडीच कोटींचा ट्रस्ट मिळेल.

---

### पदवीधर शेतकरी बनणार

विश्वविद्यालयाच्या पदवीधरांमध्यें शेतीची आवड निर्माण करून त्यांस शेतीच्या धंद्यांत शिरण्यास प्रोत्साहन देण्याच्या पंजाब सरकारच्या धोरणास अनुसरून, साठ पदवीधरांस सरकारांतून जमिनी बहाल करण्याचा समारंभ ता. १६ रोजीं थाटानें पार पडला. हा प्रयोग यशस्वी झाल्यास, बेकारीवर तोडगा म्हणून त्याचें क्षेत्र वाढविण्यांत येईल, असें सरकारी मंत्री, नवाब मुझफरखान, यांनीं जाहीर केलें.

---

# सहकारी चळवळ

## भिमथडी व इंदापूर तालुका को. सुपरवायझिंग यूनियन, लि., बारामती

वर्षअखेर सभासद सोसायट्यांची संख्या २३ + २८ = ५१ इतकी आहे. अहवालाचे सालीं सोसायट्यांच्या वर्गवारींत विशेषसा फरक झालेला दिसत नाहीं, तथापि सोसायट्यांचा व्यवहार प्रगतीच्या मार्गावर आहे, अशीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. यूनियन क्षेत्रांतील सोसायट्या तीन सुपरवायझर्समध्यें विभागून देण्यांत आलेल्या आहेत. यूनियनला 'ब' हा ऑडिट वर्ग मिळाला आहे. सभासद सोसायट्यांच्या भागांच्या भांडवलांत वाढ झाली असून सभासदांच्या ठेवी कमी झालेल्या आढळतात. सवलतीच्या योजनेचा सोसायट्यांनीं कसकसा फायदा घेतला, ह्यासंबंधीं अहवालांत तपशील देण्यांत आला असून इतरहि बाबतींत उपयुक्त माहिती विस्तारानें दिलेली आहे. त्यावरून यूनियन गटांतील सोसायट्यांच्या सुधारणेबाबत केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची चांगली कल्पना येते. मंदीमुळें कॅनॉल भागांतल्या सोसायट्यांची स्थिति विशेषच बिघडली असल्यानें यूनिअनच्या सुधारणेबाबतच्या प्रयत्नांचें महत्त्व अधिक आहे, असें म्हटलें पाहिजे. सहकारी खातें, बँक, यूनिअनचे चालक व अधिकारी आणि कार्यकर्ते ह्यांच्या सहकार्याचा सुपरिणाम दिवसानुदिवस वाढत्या प्रमाणांत दिसून येईल अशी आशा आहे. यूनियनची वार्षिक सभा ता. १०-१०-३६ रोजीं भरली होती, त्यावेळीं श्री. कृष्णराव खासेराव काकडे ह्यांची अध्यक्ष व रावसाहेब सोपानराव तुकाराम जाचक ह्यांची उपाध्यक्ष म्हणून निवडणूक करण्यांत आली.

## करमाळा तालुका को. सुपरवायझिंग यूनियन

ह्या यूनियनचे कार्यक्षेत्रांत एकूण २८ सोसायट्या आहेत. मागील सालापेक्षां चालू सालीं 'ड' वर्गातील दोन सोसायट्या 'क' वर्गात व 'क' वर्गातील आठ सोसायट्या 'ब' वर्गात आल्या, ह्यावरून प्रगति होत असल्याचें दिसून येईल. यूनियन 'ब' वर्गात आहे. करमाळे तालुक्यांत ग्रुप सेक्रेटरींची योजना नाहीं, ती लवकर अंमलांत येणें इष्ट आहे. सोसाट्यांचे एकूण सभासद १,३५६ असून त्यांपैकीं १,०६१ सभासदांकडे १ लक्ष ५७ हजार रु. बाकी येणें आहे. यापैकीं थकलेली बाकी ६७ हजार रु. (४२½%) आहे. २४० सभासदांच्या जमिनी असून ११६ सभासदांस अजिबात जमिनी नाहींत. २५ सोसायट्या नफ्यांत असून फक्त तीन सोसायट्या अल्पशा तोट्यांत आहेत. सोसायट्यांमार्फत ग्रामसुधारणेचें काम चालू आहे व डेव्हलपमेंट असोसिएशनला सहकार्यानें व आपलेपणानें शेतीसुधारणेबाबत सोसायट्या मदत करीत असतात. यूनियनचा अहवाल उत्साहवर्धक असून, तिचें काम ज्यास्त परिणामकारक व हितावह व्हावें, ह्याबद्दल चालकांचे प्रयत्न चालू आहेत.

## खेड व जुन्नर तालुका को. सुपरवायझिंग यूनियन लि., खेड

नवीन सालाकरितां वरील यूनियनच्या अध्यक्षांचे जागीं श्री. शिवराम रामजी पाटील गुंजाळ यांची व उपाध्यक्षांचे जागीं श्री. गंगाधर विठ्ठल कुलकर्णी ह्यांची बिनविरोध निवडणूक झाली.

## खेड व जुन्नर तालुका सहकारी परिषद

वरील परिषद् प्रो. एस. आर. भागवत ह्यांचे अध्यक्षतेखाली यशस्वी रीतीनें पार पडली. बँकेनें सोसायट्यांच्या व सोसायट्यांनीं सभासदांच्या कर्जावरील व्याजाचा दर कमी करणें, सवलतीची मुदत वाढविणें, सुखसंपत्तिसंवर्धक सोसायट्या स्थापणें, तलाव बांधणें, ओढे व डोंगरांतील पाणी अडवून धरणें बांधणें, रस्ते दुरुस्त करणें, पिकांची आणेवारी ठरवून सान्यास सूट, तहकुबी व मुदत मागणें, साक्षरतेचा प्रसार करणें, बैलगाड्यांचें धंद्यास उत्तेजन देणें, पन्नास रुपये अगर त्यापेक्षां ज्यास्त सारा भरणाऱ्या व प्राप्तीवरील कर देणाऱ्या इसमांस खेड अर्बन बँकेनें सभासद करून घेण्याबद्दल मंजुरी देणें, ५९ (अ) कलमाबद्दल कानू लवकर मंजूर करणें, स्पेशल रिकव्हरी ऑफिसरची नेमणूक करणें, बँडिंग ऑफिसरच्या नेमणुकीची मुदत वाढविणें, सोसायट्यांच्या सेक्रेटरींच्या कामांत स्थाइकत्व आणणें, इत्यादि विषयांबाबत परिषदेंत एकूण १४ ठराव पास झाले.

अध्यक्ष, प्रो. भागवत, ह्यांनीं गोष्टीरूपानें सोप्या भाषेंत मनुष्याच्या सर्वांगीण उन्नतीस आवश्यक असणाऱ्या गोष्टींचें विवेचन केलें व साक्षरता प्रसाराच्या प्रयोगाची माहिती सांगितली.

## कळवण तालुका (जि. नाशिक) सहकारी वृत्त

(१) कळवण-चांदवड तालुका को. सु. यूनियनची वार्षिक साधारण सभा ता. ११-१०-३६ रोजीं रा. ब. आर. व्ही. वंडेकर, जे. पी., एम. एड. सी., ह्यांचे अध्यक्षतेखाली झाली. (२) सहकारी नोकरवर्गाची सर लल्लुभाई सामळदास ह्यांचे निधनाबद्दल दुःख प्रदर्शन करण्यासाठी ता. १६-१०-३६ रोजीं सभा भरली होती. (३) डिबेटिंग क्लबाची ता. ७-१०-३६ रोजीं सभा होऊन ऐतिहासिक स्त्री-चरित्रांवर भाषणें झालीं. (४) सहकारी स्टाफ वाचनालयाची ता. ७-१०-३६ रोजीं सभा होऊन मॅनेजिंग कमिटीची निवडणूक झाली.

## पुरंदर ता. को. सु. यूनियन लि., जेजुरी

यूनियनला सामील असलेल्या २८ सोसायट्यांपैकीं १ 'अ' वर्गात, १३ 'ब' वर्गात, १२ 'क' वर्गात व २ 'ड' वर्गात आहेत. अहवालाचे सालांत १४ सोसायट्यांना सवलतीच्या व्याजाच्या योजनेचा फायदा मिळाला. तालुक्यांत नवीन सोसायट्या काढण्यास वाव असला तरी त्यासंबंधांत उत्साह दिसत नाहीं अशी अहवालांत नोंद आहे. अहवालाचे सालीं यूनियनचे ऑडिट झालें नाहीं. पूर्वीचा तपासणी वर्ग 'अ' आहे. १९३६-३७ सालाकरितां श्री. दगडोबा सोपानराव टिळेकर व श्री. भिकाजी बळवंत इंगळे हे अनुक्रमें अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडून आले आहेत.

## पश्चिम जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक, लि., धुळें

(३० सप्टेंबर १९३६ अखेरची प्रगति)

भाग भांडवल : १५,६७५ रु., कर्ज मागणी : ३,४७,६२० रुपयांचें १७७ अर्ज; लँड व्हॅल्युएशन ऑफिसरनें तपासलेले अर्ज : ३,४०,५१५ रुपयांचे १७३ अर्ज; बोर्डानें विचारांत घेतलेले अर्ज : १२३; प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेची मंजुरी : १,१६,४५० रुपयांचे ७२ अर्ज; प्रांतिक बँकेजवळ शिलक अर्ज : ३०,७५० रुपयांचे १४ अर्ज; बँकेची कर्ज वाटणी ४५,००० रु.

पहिल्याच साल अखेर नफा दाखविलेली मुंबई इलाख्यांतील ही एकच बँक आहे व झालेल्या कामाच्या आकाराचे बाबतींतहि तिचा नंबर पहिला येईल. ह्याबद्दल बँकेचे चालक व लँ. व्हॅ. ऑफिसर श्री. सप्रे हे अभिनंदनास पात्र आहेत.

## आजचा ॲबिसीनिया

ॲबिसिनिया काबीज केल्यानंतर आतां इटली तेथें आपलें साम्राज्य स्थापण्याचा प्रयत्न करीत आहे. तद्देशियांच्या हक्कांचें समर्थन करून त्यासंबंधांतील श्वेतवर्णीयांवरील विशिष्ट जबाबदारी प्रतिपादन करणारें साम्राज्यशाहीचें उदार धोरण इटलीनें अंगीकारलेलें नाहीं. उलट, ॲबिसिनिया हा इटलीकरितां आहे व परदेशस्थांचें तेथें कांहीं एक काम नाहीं, असें इटलीचें म्हणणें व्यवहारांत प्रतीत होऊं लागलें आहे आणि त्यांना ॲबिसिनियांतून निघून जाणें भाग पडेल, अशी व्यवस्था करण्यांत येत आहे.

ॲबिसिनियांतील व्यापार सर्वस्वी परकीयांचे हातांत आहे. बँक ऑफ एथिओपिआमध्यें व एशियाटिक पेट्रोलियम कंपनीमध्यें ब्रिटिशांचे हितसंबंध आहेत. हिंदुस्थानांतील कित्येक व्यापारी कुटुंबें तेथें स्थायी झालेलीं आहेत व रेल्वेची मालकी फ्रेंचांकडे आहे. बाकीचा व्यापार ग्रीक व आर्मीनिअन लोकांचे हातांत आहे. रोजच्या व्यापाराची घडी मोडून टाकली, म्हणजे सहाजिकच परकीयांस ॲबिसिनियांतून पाय काढावा लागेल आणि नंतर इटली व ॲबिसिनिया ह्यांमध्यें नव्यानें व्यापार सुरू करतां येईल, असें इटलीचें अंतस्थ धोरण आहे.

ॲबिसिनियामध्यें तेथील डॉलर व इटालियन लिरा हीं दोन चलनें प्रचलित ठेवून तेथील व्यापार मारण्याचा इटलीचा विचार दिसतो. १ डॉलर = १०½ लिरा असा परस्पर-विनिमयाचा खरा दर असतांना, १ डॉलर = ५ लिरा असा इटलीनें दर ठरवून टाकला आहे व ह्या दरानेंच व्यापार चालला पाहिजे, ह्या आग्रहामुळें डॉलर व्यवहारांतून नाहींसा झाला आहे व अंतर्गत आणि परराष्ट्रीय व्यापार बंद पडूं लागला आहे.

फ्रेंच रेल्वेनें आपलीं भाडीं डॉलरमध्यें घेण्याचा आग्रह धरला व त्याकामीं लिरा वापरला जावा असा इटालियन सरकारचा हट्ट होता. अखेर, रेल्वेनें लिरा चलनास संमति दिली व इटलीच्या कारखान्यांतून मालाची खरेदी करण्याचेंहि कबूल केलें. अशा रीतीनें इटलीचें ॲबिसिनियामध्यें आक्रमण चालू असून परदेशीयांची हकालपट्टी होत आहे.

## रेल्वे-चौकशी कमिटीची नेमणूक

हिंदुस्थान सरकारच्या मालकीच्या रेल्वेजसंबंधीं चौकशी करून त्यांचें उत्पन्न कसें वाढेल, मोटारी व आगगाड्या ह्यांमधील स्पर्धा कमी होऊन रेल्वेजची परिस्थिति कशी सुधारेल व रेल्वेजच्या अंदाजपत्रकाची शक्य तितक्या कमी मुदतींत तोंडामिळवणी कशी करतां येईल, ह्यासंबंधीं सूचना करण्याकरितां मध्यवर्ती सरकारनें एक चौकशी कमिटी नेमली आहे. लंडन ॲन्ड नॉर्थ ईस्टर्न रेल्वेचे जनरल मॅनेजर सर राल्फ एल. वेजवुड व लंडन, मिडलंड ॲन्ड स्कॉटिश रेल्वेचे चीफ मेकॅनिकल इंजिनियर मि. स्टेनर हे कमिटीचे सभासद आहेत. वरील कमिटी ता. १९ नोव्हेंबर रोजीं मुंबईमध्यें दाखल होईल.

## डोमिनिअन्स व ग्रेटब्रिटन ह्यांचा समान दर्जा

बादशहा सातवे एडवर्ड व पांचवे जॉर्ज ह्यांच्या राज्यारोहणाचे प्रसंगीं ग्रेटब्रिटनच्या मुख्य प्रधानांनीं साम्राज्यांतील इतर मुख्य प्रधानांचे तर्फे बादशहांस मुजरे केले होते. कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व दक्षिण आफ्रिका ह्यांचा ग्रेटब्रिटनचे बरोबरीचा दर्जा आहे, हें दर्शविण्यासाठीं आठव्या एडवर्ड बादशहांचे राज्यारोहणाचे वेळीं ह्या देशांचे प्रतिनिधी स्वतंत्रपणें मुजरा करणार आहेत. हिंदुस्थानास अर्थातच हा मान मिळणार नाहीं.


दि डॉन ऑफ इंडिया
लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें.
पुणें व सोलापूर येथें
बिल्डिंग इन्व्हेस्टमेंट आणि बँकिंग डिपार्टमेंटची
कंपनीचे बँकर्सनीं पसंत केलेली
ता. १ आक्टोबरपासून सुरू ] नवीन योजना [ ता. १ आक्टोबरपासून सुरू
मुदतीच्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची
फायदेशीर अपूर्व सोय.
बँकेच्या उतरत्या व्याजाच्या काळांत लोकांस आपले कौटुंबिक निर्वाहाचे साधन अगर मदत म्हणून ठेवीवर मासिक, नियमित व किफायतशीर व्याज देण्याची व्यवस्था तारीख १ आक्टोबर १९३६ पासून अमलांत आणली आहे.
गरजूंनीं जास्त माहिती मागवावी अगर समक्ष भेटावें.
पुणें, ता. २२-९-३६ | जनरल मॅनेजर.

CONFIDENCE
is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its
YEARS OF
Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service
HAS CREATED
PUBLIC CONFIDENCE
The following figures will convince you :
NEW BUSINESS
This year 1934-35
Exceeds
2 CRORES & 50 LAKHS
BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20
HINDUSTHAN
Co-operative Insurance Society, Ltd.
( ESTD. 1907 )
*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices :* throughout India & the East.
S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*
POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## खेडुतांच्या रहाणींत सुधारणा

—:०:—

### सरकारचें ग्रामसुधारणेबाबतचें कार्य

हिंदुस्थानांतील कोट्यवधि खेडुतांची रहाणी सुधारावी ह्या हेतूनें मध्यवर्ती सरकारानें ग्रामसुधारणेचा प्रश्न हातीं घेतल्यास दीड वर्ष लोटलें. प्रांतिक सरकारांस ह्याबाबत देणगीदाखल रकमा देण्यांत आल्या, त्यांचा विनियोग कसा केला गेला व ग्रामसुधारणेचें पाऊल कसें पुढें पडलें, ह्यासंबंधींचें, प्रांतिक सरकारांच्या अहवालावरून तयार केलेलें पत्रक हिंदुस्थान सरकारानें असेंब्लीस सादर केलें आहे.

ग्रामसुधारणेच्या योजनेमध्यें अंतर्भूत असलेल्या कार्यक्रमांत खालील बाबींचा समावेश होतोः—

( १ ) घोडे, बकऱ्या, गाई, कोंबड्या, ह्यांचीं प्रदर्शनें.

( २ ) सुखसंपत्तिसंवर्धक सोसायट्या.

( ३ ) शाळांतून देण्यासाठी बक्षिसें.

( ४ ) खेडेगांवासाठी सार्वजनिक उपयोगाच्या औषधाच्या पेट्या.

( ५ ) शिशु-प्रदर्शनें.

( ६ ) आरोग्य, शेती, इत्यादि विषयांवर मॅजिक-लॅंटर्नच्या सहायानें व्याख्यानें.

( ७ ) सार्वजनिक रेडियो.

( ८ ) हिंवतापप्रतिबंधक इलाज.

हिंदुस्थान सरकारच्या पत्रकामध्यें प्रांतवार माहिती देण्यांत आली आहे. त्यापैकी मुंबई इलाख्यासंबंधीच्या अहवालाचा गोषवारा येथें दिला आहे.

" औषधांच्या पेट्या, नारूवर इलाज, शिशु-प्रदर्शनें, दायांच्या कामांत सुधारणा, फर्स्ट एडच्या माहितीचा फैलाव, इत्यादि गोष्टींचा आरोग्य व स्वच्छता ह्यासंबंधाच्या योजनेंत समावेश होतो. "

" नारुचा फैलाव होऊं नये, ह्याकरितां विहिरींच्या पायऱ्या काढून टाकून त्याऐवजी पाणी शेंदून किंवा उचलन काढण्याची व्यवस्था करण्यांत येत आहे. "

" खेडेगांवांत काम करणारांसाठी शिक्षणवर्गाची योजना, मॅजिक लॅंटर्न व त्याच्या कांचा, ग्रामोफोन, वेगवेगळ्या विषयासंबंधीं माहिती पत्रकें व बोर्ड, इत्यादि मार्गांनीं प्रचारकार्य चालू आहे, आरोग्यासंबंधीं माहितीचा प्रसार करण्यासाठी कांहीं 'प्रचार गाड्या' (मोटारी) खरेदी करण्यांत आल्या आहेत. "

" जनावरांची पैदास चांगली व्हावी ह्या प्रीत्यर्थ कांहीं क्षेत्रांत विशेष प्रयत्न करण्यांत येत आहेत. कलमें करणें, बंधारे व ताली घालणें, डुकरांचा नाश करणें, अंडीं विक्री सोसायट्या काढणें, इत्यादि प्रीत्यर्थहि मध्यवर्ती सरकारच्या देणगीचा विनियोग करण्यांत येत आहे."


अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

**झारापकर टेलरिंग कॉलेज**

माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २

**धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०**

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टीफिकेट खातें | | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्यआहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.**

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | : १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल : | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल : | २,०४,१५० |
| रोख भरलेलें भांडवल : | ९९,२७५ |

**दर शेअरची किं. : रु. ५०**

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—७ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—२ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | १२०—० |
| ४% १९६०–७० ... ... | ११५-१५ |
| ४% १९४३ ... ... ... | ११२—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... | १००—२ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०७-१२ |
| २¾% १९४८–५२ ... ... | १०१—३ |
| **निमसरकारी रोखे** | |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११२—६ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १११—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | ११२—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११३-१० |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२५-१२ |
| **मंडळ्यांचे भाग** | |
| **बँका** | |
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३६—४ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११६—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५-१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५९१—४ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १४०-४ |
| **रेल्वेज** | |
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९९—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९१२—८ |
| **वीज** | |
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५५-१० |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २६०—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २५५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ६½% ) | १५७१—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि. ७½%) | १६०२—८ |
| **इतर** | |
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २०१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७३—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १९९—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७९५—० |

### हिंदुस्थानांत जपानी लोखंडी पत्रे उतरले

लोखंडी नळीच्या पत्र्यांची जपानमधून आयात वाढीस लागण्याचा संभव दिसत आहे. एप्रिल ते जून १९३६ ह्या मुदतीमध्यें ५ लक्ष रुपयांचे जपानी पत्रे हिंदुस्थानांत दाखल झाले. लोखंडी मालाचें उत्पादन वाढविण्यासंबंधीं जपाननें पंचवार्षिक कार्यक्रम आखला असून आज नाहीं तरी पांच वर्षांत ह्या धंद्यामध्येंहि जपान हिंदुस्थानाशी स्पर्धा करूं लागण्याचा संभव आहे, असें टाटा सन्स लि. च्या मि. दलालांचें मत आहे.

### पोस्टांतील दहा लक्ष ' निर्जीव ' खातीं

गेल्या दहा वर्षांत ज्या सेव्हिंग्ज खात्यांत पैशाचा भरणाहि झाला नाहीं व त्यांतील रकमा काढूनहि घेतल्या गेल्या नाहींत, अशीं पोस्टामध्यें ११,१०,७६२ सेव्हिंग्ज बँक खातीं आहेत. ह्या सर्व खात्यांवर एकूण सुमारें १५ लक्ष रुपये शिलक आहेत, म्हणजे, प्रत्येक खात्यावर १ रु. ४½ आणे अशी सरासरी पडते. १९३४–३५ अखेर पोस्टांतील एकूण खात्यांची संख्या ३० लक्ष असून त्यांतील ठेवींची रकम ४३ कोटि रुपयांवर आहे. एकंदर व्यवहारांच्या मानानें वरील ११ लक्ष खातेदारांचे १४ लक्ष रुपये म्हणजे कांहींच नाहींत व ते परत करण्यास पडणारा त्रास व खर्च अनाठायी होईल, असे सर फ्रँक नॉइस ह्यांनीं असेंब्लींत सांगितलें.

## वडगांव येथील से. सबजज्ज यांचे कोर्टांत

### मुक्काम वडगांव येथें

दिवाणी मुकदमा नंबर २३५ सन १९३४ पैकीं

पृथ्वीराज चौथमल मारवाडी लोणावळे } वादी

विरुद्ध

१ चांदबी ऊर्फ जैतुनबी कोम सयद महमद मुसलमान
२ कुलसुंबी भ्र. रमजूभाई ऊर्फ रमजान घोंडूभाई } प्रतिवादी

प्रतिवादी १–२यांसः—

ज्यापेक्षां सदरीं लिहिलेला वादी यानें ह्या कोर्टास अर्जी केली आहे कीं, सदर कामीं वादीनें ता. १५।८।३४ रोजी प्रतिवादीं विरुद्ध प्राथमीक हुकूमनामा मिळविला आहे तो पक्का करणेबद्दल कोर्टांत अर्ज केला आहे.

त्यापेक्षां यावरून तुम्हांस बजाविण्यांत येत आहे कीं, तारीख २१ माहे ११ सन १९३६ रोजीं सकाळचे ११ वाजतां तुम्हीं सदरहू अर्जीविरुद्ध कारण दाखविण्यासाठीं ह्या कोर्टांत जातीनें, किंवा योग्य रीतीनें माहिती दिलेल्या प्लीडराच्यामार्फत, हजर व्हावें, व तसें तुम्हांकडून घडून न आल्यास, सदरहू अर्जीची एकतर्फी चौकशी होऊन निकाल केला जाईल.

तसेंच तुम्हांस अशीहि नोटीस देण्यांत येत आहे कीं, निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तिच्यापूर्वीं बजावणीसाठीं पत्ता लिहून देण्यांत तुम्हीं कसूर केल्यास तुमच्या बचावाकडे लक्ष देण्यांत येणार नाहीं.

आज तारीख २१ माहे १० सन १९३६ रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्क्यानिशीं दिली.

D. V. KSHIRSAGAR

शिक्का

क्लार्क ऑफ दी कोर्ट वडगांव.

जे. जी. दातीर

जिलब्या मारुतीजवळ, घ. नं. ८७२, पुणें २

सव तऱ्हेच्या समारंभाकरितां हार, गोटे, इत्यादि माल सुबक स्वस्त व वकशीर तयार करून मिळेल.

संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

मुलांचा आनंद कोणा पालकाला नको! त्यांतून 'आनंदा' चा खास अंक! मग काय त्यावर मुलांच्या उड्यावर उड्या!

'आनंदा'च्या खास अंकाचा थाट

आतां सर्व मुलांना माहीत झाला आहे. ती दोन रंगी छपाई, चित्रांची लयलूट, गोष्टींची रम्यता, कवितांची बहार—हो! सांगायचें विसरलोंच! यंदां पुष्कळ कवितांना त्यांतील वर्णनाच्या चित्रांचीच चौकट बसविली आहे—गुळगुळीत कागद, सुबक छपाई व मोहरेदार मुखपृष्ठ हे खास अंकाचे विशेष त्यांना ठाऊक झाले आहेत. 'आनंद' वर्षभर त्यांची किती करमणूक करतो, त्यांच्या ज्ञानांत किती भर घालतो व त्यांना किती हवाहवासा वाटतो हें तीं केव्हांहि सांगतील. आपण आपल्या मुलांकरितां तो एक वर्षभर घेऊन पहा म्हणजे आपणांसहि कळून येईल. वार्षिक वर्गणी ट. ह. सह लहान अंकाची २ रु. मोठ्या अंकाची ३ रु. वर्षारंभ जुलैपासून. अंक दरमहा पंधराव्या तारखेस प्रसिद्ध होतो.

पत्ता:—म्यानेजर आनंद, पुणें २.

"दुसरें मूल्यमापन जाहीर झालें"

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टके फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—

कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. — दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा — हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

न. वि. वडनेरकर

जव्हेरी आणि सराफ, रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,'
'दुर्गाधिवास', पुणें ४.'

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
' किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख ४ नोव्हेंबर, १९३६. अंक ४५

## दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें — पद्मजी पेपर मिल, मुंबई.**

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

**स्वदेशी**

**कापड म्हणजे काय!**

(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.

या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.

हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.

खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण

## स्वदेशी भांडार

लक्ष्मीरोड, पुणें २.


## K. K. & Co.

Photographic Dealers
POONA.

## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः—ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः—

१ केळकर ब्रदर्स, बुधवार चौक,

२ म. इं. को. ऑ. एजन्सी, लक्ष्मीरोड.

## विविध माहिती

### मुंबईच्या म्हशीला दिल्लीची यात्रा

गवळी लोक भाकड म्हशी कवडीमोल विकतात आणि त्यांची कसाइखान्याकडे रवानगी होते. ह्या अनिष्ट पद्धतीची चौकशी व्हावी म्हणून आटलेली एक म्हैस व्हाइसरॉयांच्या आज्ञेवरून मुंबईहून मुद्दाम दिल्लीस पाठविण्यांत आली आहे.

### गवळयाच्या धंद्यांतले तज्ञ, डॉ. राइट, यांचा दौरा

हिंदुस्थानांत सल्लागार म्हणून पाचारण केलेले, गवळयाच्या धंद्यांतले माहितगार, डॉ. राइट, ह्यांचा दौरा मुंबई इलाख्यांत नोव्हेंबर २६ ते डिसेंबर ७ पावेतों व्हावयाच्या असून ते अहमदाबाद, सुरत, बडोदें, मुंबई व पुणें ह्या शहरांस भेट देणार आहेत.

### साखर-समितीचें लंडनमध्यें ठाणें

साखरेच्या जागतिक व्यापाराची नीट व्यवस्था लावण्याच्या हेतूनें एक आंतरराष्ट्रीय समिती स्थापन झालेली आहे. ब्रिटिश सरकारशी वाटाघाटी करण्यास सोयीचें पडावें म्हणून तिची एक कचेरी लंडनमध्यें चालू होणार आहे.

### फिरतीं पोस्ट-ऑफिसें

प्रदर्शनें, जत्रा, वगैरे ठिकाणीं पोस्ट ऑफिसची सोय नसल्यानें लोकांस अडचण भासते, ती दूर व्हावी म्हणून फिरत्या व तात्पुरत्या पोस्ट ऑफिसांचा उपक्रम इंग्लंडमध्यें करण्यांत येत आहे.

### चित्रपट दिग्दर्शकाची अडीच कोटीची मालमत्ता

प्रसिद्ध अमेरिकन चित्रपट-दिग्दर्शक, आयर्व्हिंग थालबर्ग, ह्याची अडीच कोटि रुपयांची मालमत्ता त्याची विधवा, 'मिस नॉर्मा शेअरर', ह्या विख्यात नटीस मिळावयाची आहे.

### जर्मनीचें आरमारी बळ

समुद्रावर सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्याची जर्मनीची महत्वाकांक्षा असून त्या राष्ट्राचें एक प्रचंड लढाऊ गलबत लाटांवर क्रीडा करूं लागलें आहे.

### इंग्लंडांत परदेशीय प्रवासी

गेल्या ऑगस्ट महिन्यांत ५२,४७१ परदेशीय प्रवाशी इंग्लंडला गेले, आणि त्यांमध्यें १५,७७१ अमेरिकन, १०,६६६ फ्रेंच, ४,८५७ डच, व ४,०४३ जर्मन होते.

### व्हेल मासेमारीचा धंदा

उत्तर युरोपिअन समुद्रांत व्हेल मासे पकडून त्यांच्यापासून तेल वगैरे पदार्थ काढण्याच्या धंद्यांत दर वर्षी २०–२५ कोटि रुपयांची उलाढाल होते.

### ब्रिटिश कंपन्यांचें भांडवल

ग्रेट ब्रिटनमध्यें कंपनी कायद्याच्या क्षेत्रांत येणाऱ्या सुमारें १ लक्ष ३७ हजार मंडळया १९३५ अखेर अस्तित्वांत होत्या. त्यांचें भरलेलें एकूण भांडवल सुमारें ७½ हजार कोटि रुपये होतें.

### लाखेचा हिंदुस्थानांतील धंदा

हिंदुस्थानांतील लाखेच्या सुधारणेबाबत शास्त्रीय शोध करण्यासाठी आजपर्यंत सुमारें २५ लक्ष रुपये खर्च झाले आहेत. हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या लाखेपैकीं १ टका सुद्धा माल देशांतल्या देशांत खपत नाहीं.

### ब्रिटिश पोस्टल सेव्हिंग बँकांचा व्यवहार

ग्रेट ब्रिटनमध्यें १७ हजार पोस्ट ऑफिसांत सेव्हिंग बँकेचा व्यवहार चालतो. ठेवीदारांची संख्या १ कोटीच्यावर असून खात्यांतली एकूण रकम सुमारें ८०० कोटि रुपये आहे. हिंदी लोकसंख्या ब्रिटिश लोकसंख्येच्या पांचपट असून येथील पोस्टल सेव्हिंग बँकेंतली ठेवींची रकम ब्रिटिश रकमेच्या सोळावा हिस्साहि नाहीं.

### नवीन विमा-कायद्याच्या मसुद्याची छाननी

हिंदी विमा कायद्याच्या दुरुस्ती बाबतची प्राथमिक कामगिरी करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें श्री. सेन ह्यांस नेमलें होतें. त्यांच्या रिपोर्टाची छाननी करण्याकरितां एक कमिटी नेमण्यांत आली असून तिच्या कामास दिल्ली येथें प्रारंभ झाला आहे. कमिटींत श्री. सेटलवाड, पंडित संतानम्, श्री. रे., श्री. सेन व सर फिरोज सेठना हे हिंदी सभासद आहेत.

### रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरचा राजीनामा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर, सर ऑस्बोर्न स्मिथ, ह्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला असून त्याचा गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिल यांनीं स्वीकार केला आहे. राजीनाम्याचें कारण अधिकृत रीत्या प्रसिद्ध झालेलें नाहीं, पण बँकेच्या कारभारांतील धोरणाबाबत मतभेद त्याच्या मुळाशी असावा असें म्हणतात.

### मुंबई शहरांत व्यवहार निर्वेध चालू

मुंबईमध्यें आतां व्यापाराचे मामुली व्यवहार पूर्ववत चालू झाले आहेत असें सरकारनें जाहीर केलें आहे. ह्या संबंधांत मुंबईबाहेर भलत्याच बातम्या पसरतात म्हणून पूर्ण शांततेची वस्तुस्थिति सरकारनें लोकांच्या नजरेस मुद्दाम आणली आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २४ ऑक्टोबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ३५,४६,७७२ |
| ता. ३१ ऑक्टोबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ५१,६५,२१७ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते ३१ ऑक्टोबर १९३६ अखेर | २,८५,८७,७८,५८८ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ... ५४० |
| २ व्याजाचे दर आणि रोख्यांचे भाव | ... ५४१ |
| ३ विमा प्रचारक व विमा मंडळ्या | ... ५४२ |
| ४ मानवी प्रयत्न आणि निसर्गाच्या योजना | ५४२ |
| ५ स्फुट विचार — व्यापारी करारांचें घोडें कोठें आडलें—हिंदी लाखेचा धंदा—आंतरराष्ट्रीय साखर समिति व हिंदुस्थान-धरणें व कालवे आणि वाढती लोकसंख्या-गव्हाचे पोहे—देशी चित्रपट दाखविण्याची सिनेमागृहांवर सक्ती ? | ... ५४३ |
| ६ रशियांतला नव्या सृष्टीचा प्रयोग | ... ५४५ |
| ७ पुणें शहराची आर्थिक पहाणी | ... ५४५ |
| ८ शस्त्रास्त्रांचे कारखाने खाजगी कीं सरकारी ? | ५४६ |
| ९ मराठी दस्तऐवजांचें कानडी जिल्ह्यांत रजिस्ट्रेशन | ५४६ |
| १० सहकारी चळवळ | ... ५४७ |
| ११ हिंदी कारखान्यांचें उत्पादन वाढलें | ... ५४८ |
| १२ निवडक बाजारभाव | ५४९ |



# अर्थ

बुधवार, ता. ४ नोव्हेंबर, १९३६


## व्याजाचे दर आणि रोख्यांचे भाव ह्यांचें काय होणार ?

फ्रान्सनें आपल्या चलनाचा जम इंग्लंड व अमेरिका ह्या देशांच्या चलनाशीं बसवला आहे, ह्याचा परिणाम व्याजाचे दर आणि कर्जरोखे व मंडळ्यांचे भाग ह्यांच्या किंमतीवर काय होणार ह्याविषयीं सर्वत्र तर्क चालू आहेत. ज्यांनीं आपले पैसे निरनिराळ्या प्रकारांनीं गुंतवले आहेत किंवा ज्यांस भांडवल उभारावयाचें आहे अशा लोकांस, अलीकडे व्याजाचे दर उतरून कर्जरोख्यांचे बाजारभाव चढले आहेत, त्यांचें भवितव्य काय आहे, हें जाणण्याची इच्छा उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. आर्थिक मंदीमुळें व्याजाचे दर उतरले आणि भांडवलास विशेष मागणी नसल्यानें सरकारी, निमसरकारी व इतर रोख्यांवर चोहों कडून उड्या पडून त्यांचे भाव चढले. पुढें मंदीची रात्र संपून तेजीची पहाट झाल्याचीं चिन्हें दिसत असतां भांडवलास हळु-हळु अधिक मागणी येणें आणि व्याजाचे दर चढणीस लागून रोख्यांच्या किंमती उतरणें क्रमप्राप्त आहे. तथापि, ह्या संधिकाळाच्या परिस्थितीवर फ्रान्सच्या स्वस्त झालेल्या फ्रँकचा काय परिणाम होणार ह्या प्रश्नाचा प्रस्तुत विचार कर्तव्य आहे. उतरलेल्या फ्रँच व स्विस हुंडणावळीमुळें फ्रान्स, स्वित्सर्लंड इत्यादि देशांत ज्यास्त चलन खेळणार; कारण, प्रत्येक डॉलरला व पौंडाला तेथें अधिक स्थानिक चलन मिळणार. सोन्याचा जागतिक पुरवठा अलीकडे वाढत आहे हेंहि येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. हें सोनें चलनास आधार म्हणून उपयोगी पडेल आणि त्याचे योगानें जास्त प्रमाणांत पैसा व्यवहारांत खेळता राहील. फ्रेंच जनतेनें हुंडणावळीच्या अनिश्चितपणामुळें लंडनमध्यें ठेवलेलें सोनें स्वदेशीं परत येईल आणि त्या मार्गानेंहि चलनाचा पुरवठा विस्तृत होण्यास सहाय मिळेल. लंडनमधलें सोनें पॅरिसला परत गेलें तरी त्यामुळें पैशाच्या आणि रोख्यांच्या ब्रिटिश बाजारावर त्याचा प्रतिकूल परिणाम होणार नाहीं. हुंडणावळीची स्थिरता कायम राखण्याकरितां उभारलेल्या स्वतंत्र फंडामधून हें सोनें जाईल आणि त्याच्या जागीं ट्रेझरी बिलें येतील. बँक ऑफ इंग्लंड जरूरीप्रमाणें ह्या संबंधानें योग्य धोरण अंगिकारील व व्यापारी बँकांचें नुकसान होणार नाहीं. त्यांच्याजवळची रोकड वाढेल आणि त्या अधिक रकमा रोख्यांत गुंतवतील. उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या चलतीनें व्याजाचे दर चढणीस लागावयाचे, त्यांस वाढता पैशाचा पुरवठा दुसऱ्या बाजूनें ओढून धरील आणि वर जाऊं देणार नाहीं, असें सर्वसामान्य रीतीनें विचार करतां अनुमान निघतें. रोख्यांचे बाजार भाव आणि व्याजाचे दर ह्यांचेकडे ह्याच दृष्टीनें पहाणें सरळ दिसतें.

सर्वच राष्ट्रांतील राज्यकर्त्यांस आणखी कांहीं काळपर्यंत स्वस्त भांडवल व हलके व्याजाचे दर असणें इष्ट वाटणार आहे. बेकारीच्या निवारणासाठीं कामें काढणें किंवा लढाऊ सामुग्री तयार करणें असल्या बाबींप्रीत्यर्थ सरकारांस सर्वत्रच जादा खर्च करावा लागणार असून त्यासाठीं कर्जावर अवलंबून रहाणें त्यांस प्राप्त आहे; आणि हीं कर्जें अल्प व्याजाच्या दरानें उभारतां येण्यांत त्यांची सोय व हित आहे. म्हणून व्याजाचे दर चढूं न देण्याचे प्रयत्न राज्यकर्ते करणार, यांत संशय नाहीं. इकडे मध्यवर्ती बँकांनीं सोन्याचा संग्रह वाढवण्याची खटपट चालविलीच आहे. गेल्या बारा महिन्यांत एकट्या बँक ऑफ इंग्लंडनें आपला सुवर्णसंचय सुमारें ७० कोटि रुपयांनीं वाढवलेला आहे. हा आकडा पौंडाच्या जुन्या किंमतीस धरून आहे; स्वस्त किंवा नरम झालेल्या पौंडाच्या किंमतीनें हिशेब केल्यास ही रकम १३० पौंड होईल. नव्या व उतरलेल्या हुंडणावळीच्या दरानें मध्यवर्ती बँकांचे सुवर्णसंग्रह किंमतीनें वाढले आहेत. चलनाचा फाजील विस्तार झाल्यास रोखे व मंडळ्यांचे भाग यांच्या किंमती भडकण्याची भीति असल्यानें या प्रकारच्या प्रवृत्तीस आळा घालण्याचा प्रसंग येण्यासारखा आहे. फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतील राज्यकर्ते आर्थिक परिस्थितीचें निरीक्षण काळजीपूर्वक व सूक्ष्म दृष्टीनें करीत असून आपल्या हुंडणावळीसंबंधाच्या धोरणाचा व्यापार व उद्योगधंदे ह्यांवर प्रतिकूल परिणाम होऊं न देण्याची खबरदारी घेत आहेत. उतरलेल्या हुंडणावळीच्या दराचा अंतर्गत व जागतिक परिस्थितीशीं समाधानकारक मेळ बसण्यास कांहीं काळ लोटणें जरूर आहे. भिन्न भिन्न धंद्यांतले लोक हा जम कसा बसतो, हें पहात आहेत. अपेक्षेप्रमाणें जागतिक मंदीस आळा बसण्याची प्रवृत्ति बळावेल तर ती गोष्ट सर्व राष्ट्रांच्या हिताचीच होईल, पण व्याजाचे दर व रोख्यांचे बाजारभाव ह्यांच्या सध्याच्या प्रवृत्तींत महत्त्वाचे बदल होतील असा आज रंग दिसत नाहीं. वास्तविक पहातां, जागतिक राजकीय व आर्थिक परिस्थिति अजून अनिश्चितच आहे. स्पेनमधल्या अंतस्थ युद्धाच्या ज्वाळा विझल्या नाहींत तोंवर ही अनिश्चितता दूर होणें कठिण आहे. मुंबईच्या बाजारांत कर्जरोख्यांस व कित्येक कंपन्यांच्या भागांस तात्पुरती विशेष तेजी आली आहे, परंतु ती वाढण्याचें किंवा फार वेळ टिकण्याचें कारण नाहीं. ह्या बाबतींतली अलीकडची बाजारभावांची स्थिति कांहीं काळपर्यंत अमलांत राहील असें वाटतें. व्याजाचे दर पुनः चढणें आणि रोखे व कंपन्यांचे भाग ह्यांच्या किंमतींत उतार होणें कित्येक महिने संभवनीय दिसत नाहीं.

### पूर्वींच्या व आजच्या ग्रंथकारांमध्यें अंतर

" पूर्वींचे ग्रंथकार मरून गेले, पण त्यांचे ग्रंथ आज जिवंत आहेत. आजच्या लेखकांचे ग्रंथ मृत झाले आहेत आणि ते स्वतः कसाबसा जीव धरून राहिले आहेत. "

# विमा-प्रचारक व विमा-मंडळया

## विमा उतरण्यास विलंब करूं नका

विमा एजंटास प्रथम आपल्या गिऱ्हाइकाचें मन वळवून त्यास विम्याचें महत्त्व पटवून द्यावें लागतें व त्याच्या परिस्थितीस जुळेल अशी पॉलिसी सुचवावी लागते. साधारणपणें खालील तीन प्रकारच्या पॉलिसींतून निवड करण्यांत येते.

( १ ) हयातीमधील अल्प मुदतीचा ( उ. १५ वर्षे ) विमा, पैसे गुंतवून व्याज मिळविण्यासाठीं.

( २ ) हयातींतील लांब मुदतीचा विमा, द्रव्यसंचय करून म्हातारपणाच्या तरतुदीसाठीं.

( ३ ) हयातीनंतर रकम देणारा विमा, मुलाबाळांच्या तरतुदीसाठीं.

विमा-उतरण्याचें ठरल्यानंतर कंपनीची निवड करण्याचा प्रश्न उद्भवतो. नवीन मिळविलेल्या कामाचे किंवा कंपनीच्या फंडांतील रकमांचे आकडे ह्यांकडेच केवळ विमेदारानें न पहातां कंपनीच्या व्यवस्थेकडे जास्त लक्ष पुरवणें जरूर आहे. उदाहरणार्थ, गृहीत धरलेल्या दरापेक्षा किती जास्त दरानें व्याज पडलें किंवा खर्चासाठीं तरतूद म्हणून, होणाऱ्या खर्चापेक्षा किती ज्यास्त रकम बाजूस काढून ठेवण्यांत आली आहे, हे प्रश्न कंपनीच्या फंडाच्या आकड्यापेक्षां कित्येक वेळां ज्यास्त महत्त्वाचे असतात.

विमा उतरण्याचें ठरवून व पॉलिसी निश्चित करून कंपनीची निवड झाल्यानंतर सुद्धां कित्येक विमेदार पहिला हप्ता भरण्याचें लांबणीवर टाकतात. स्वतःस पॉलिसीच्या करारानें बांधून घेण्याचें पुढें ढकलण्याची त्यांची इच्छा असते व कांहीं प्रसंगीं खरोखरच विशिष्ट वैयक्तिक कारणामुळें असें होणें अपरिहार्य होतें. विमा एजंटाची ही खरी कसोटीची वेळ असते. भावी विमेदाराचा आजारीपणा अगर एकादा अपघात आपला सवदा पुरा होण्याच्या मार्गांत अडथळा उत्पन्न करणार नाहीं कशावरून? अशा शंकेस जागा असते. कित्येक अशा गोष्टी घडतात कीं ज्यांमुळें विमेदाराची विम्यासंबंधींची पात्रता कमी होते, परंतु ह्याची खुद्द त्यास जाणीव नसते. विमेदाराच्या एकाद्या जवळच्या नातेवाइकास क्षय झाला अगर वेड लागलें, तर कंपनी जादा हप्ते बसवील; परंतु त्यानें आपला विमा आधींच उतरलेला असला तर मागाहून कंपनीस त्यासंबंधांत कांहींच करतां येणार नाहीं. वरील उदाहरणावरून विमा उतरण्यास विलंब न लावण्याचें महत्त्व ध्यानांत येईल.

खालीं दिलेल्या एका प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टीवरून विमा उतरण्यास विलंब न करण्याचें महत्त्व तावडतोब लक्ष्यांत येईल:--एका मनुष्यानें विमा उतरण्याचें ठरविलें, त्याची वैद्यकीय तपासणी झाली व मामुली दरानें त्याचा विमा स्वीकारण्यांत आला. तथापि, त्यानें पहिला हप्ता वेळेवर भरला नाहीं. इतक्यांत, त्याच्या एका नातेवाइकाचा क्षयानें अंत झाला. कौटुंबिक इतिहासांतील ही गोष्ट कंपनीस कळविणें जरूर झालें. कंपनीनें आपलें पहिलें स्वीकारपत्र रद्द करून जास्त दरानें हप्ते बसविले. विमा एजंट विमेदारास विमा लवकर पुरा करण्याची आवश्यकता समजावून सांगून त्याचेकडून पहिला हप्ता लवकर वसूल करूं शकला असता, तर विमेदारावर जादा खर्च अशा रीतीनें पडला नसता.

---

### विमामंडळ्यांस सल्ला

"मजबुतीपेक्षां कामाच्या आकाराकडे अधिक लक्ष दिलें जातें ह्यांत शंका नाहीं. नवीन काम मिळवण्याचे बाबतींत अल्पवयी विमा मंडळ्यांचे हातून घिसाडघाई होते, व तिचे दुष्परिणाम ध्यानांत घेतले जात नाहींत हें चांगलें नाहीं. चालकांच्या टोचणीमुळें विमा एजंट कामाच्या गुणांकडे कानाडोळा करतात आणि कंपनीच्या प्रगतीस व स्थैर्यास ज्यांचें सहाय होणें शक्य नाहीं असे विमा-अर्ज वर पाठवतात. अल्पवयी मंडळ्यांच्या बाबतींत असल्या अर्जांचे योगानें खर्चाचें प्रमाण वाढत असल्यानें त्यांपासून धोका असतो. पांच-दहा लाखांचें नवान काम मिळवण्यापेक्षां खर्चाचें प्रमाण बेतांत राखण्याचें महत्त्व ज्यास्त आहे. ह्या संबंधांत विमा-मंडळ्यांच्या धोरणांत योग्य सुधारणा होणें अगत्याचें आहे. नव्या मंडळ्यांच्या कामाचे परिमाण मर्यादित असणें अगदीं स्वाभाविक आहे. तथापि, काटकसर, कामाची निवड करण्यांत दक्षता, इत्यादि गुणांत त्यांनीं जुन्या मंडळ्यांस हार जातां कामा नये................ सुव्यवस्थेच्या आद्य तत्त्वांकडे जुन्या मंडळ्यांचेंहि दुर्लक्ष होतें, पण हा प्रकार नव्या मंडळ्यांत विशेष आढळतो. जुन्या मंडळ्यांस आपली इभ्रत संभाळावयाची असल्यानें कामाच्या आकारावर त्यांचा भर असतो. नव्या मंडळ्यांस इभ्रतीची अडचण नसल्यामुळें त्यांनीं आकारापेक्षां स्थैर्य व मजबुता ह्यांचेकडे अगत्यानें लक्ष पुरवावें. नवीन मंडळ्यांमधून चांगल्या मजबूत संस्था उदयास याव्या अशी आमची सदिच्छा आहे."—इंडिअन फिनॅन्स.

---

### ग्वाल्हेरच्या महाराजांचें राज्यारोहण : प्रजेसाठी उदार योजना

श्रीमंत जिवाजी महाराज शिंदे ह्यांच्या राज्यारोहणाचा समारंभ ता. २ रोजीं मोठ्या थाटानें झाला. त्या वेळीं महाराजांनीं रयतेसाठीं खालील देणग्या जाहीर केल्या:—

( १ ) शेतकऱ्यांस ६० लक्ष रुपयांची सूट.

( २ ) चांगले बैल, बीं, इत्यादि खरेदी करण्याप्रीत्यर्थ शेतकऱ्यांसाठीं २५ लक्ष रुपयांची तरतूद.

( ३ ) ग्रामसुधारणेचें कार्य व्यवस्थित रीतीनें अखंड चालू रहावें, ह्याकरितां १ कोटि रुपयांची देणगी.

( ४ ) संस्थानांतील जहागिरदार, इनामदार, इत्यादींस तनख्यामध्यें सूट, व्याजाची माफी, विशेष कठिण अवस्थेंत असलेल्यांच्या प्रश्नाची चौकशी करण्याकरितां कमिशनची नेमणूक, इत्यादि.

( ५ ) संस्थानांतील प्रमुख शहरांसाठीं पाणी पुरवठा व ड्रेनेज ह्यांसंबंधीं योजना.

---

**पाहिजे :** पुणें सेवासदन सोसायटीचे पुणें येथील स्त्रियांचे ट्रेनिंग कॉलेजकरितां लेडी सुपरिंटेंडेंट पाहिजे आहे. करिता मराठी मातृभाषा असलेल्या व बी. ए. बी. टी. पास असलेल्या लायक व अनुभवी स्त्री–उमेदवारांना बी. टी. डिग्री मिळविण्याचें वर्ष, कामाचा अनुभव, वय व लायकी–पत्रांच्या नकला ह्यांसह अर्ज खालीं सही करणार यांचेकडे ता. १५।११।३६ पर्यंत पाठवावे. दरमहा वेतन मासिक पगार रु. ६० व जागेचा भत्ता रु. १० मिळून एकुण रु. ७० मिळेल. निवडलेल्या उमेदवारास आपल्या खर्चानें समक्ष भेटीस यावें लागेल. नेमणूक शक्यतोंवर ता. १ डिसेंबर १९३६ पासून होईल. विशेष माहिती समक्ष अगर पत्रद्वारें मिळेल.

ग. वा. गरुड, ऑ. जनरल सेक्रेटरी,
पुणें सेवासदन सोसायटी, पुणें.

# स्फुट विचार

## व्यापारी करारांचें घोडें कोठें अडलें ?

ग्रेट ब्रिटन आणि जपान ह्या राष्ट्रांशीं हिंदुस्थानच्या व्यापारासंबंधीं व्हावयाच्या कराराच्या वाटाघाटींस प्रारंभ होऊन बराच काळ लोटला आहे, तरी चर्चेची प्रगति कितीशी झाली आहे, हें स्पष्ट कळण्यास साधन नाहीं. ओटावा करार रद्द होऊन ग्रेट ब्रिटनशीं स्वतंत्र कराराबाबत चर्चा व्हावी असें ठरून त्यासंबंधांत बोलण्याचा उपक्रम झाला असल्याचें कांहीं दिवसांपूर्वीं प्रसिद्ध झालें होतें. नवीन करार होईतोंपर्यंत ओटावा कराराचीच अंमलबजावणी चालावी आणि हिंदुस्थान व ग्रेटब्रिटन ह्यांची नवीन कराराविषयीं एकवाक्यता न झाल्यास परस्परांच्या संमतीशिवाय चालू व्यवस्थेंत बदल केला जाऊं नये असें ठरलें असल्याची बातमी नुकतीच वृत्तपत्रांत आली आहे. ओटावा कराराची आयुर्मर्यादा बिनमुदत वाढवण्यांत आली आहे, असाच ह्या बातमीचा अर्थ होतो. तरी, प्रस्तुत कराराचे संबंधांत चर्चेची प्रगति कोठवर झाली आहे आणि तिच्या मार्गांत अडचण आली असल्यास तिचें स्वरूप काय आहे हें सरकारनें लोकांच्या माहितीसाठी स्पष्ट रीतीनें जाहीर करणें आवश्यक आहे. हिंद-जपान व्यापारी कराराच्या वाटाघाटीचें घोडेंहि अडून पडलें आहे असें दिसतें. जपानचे प्रतिनिधि, मि. योनेझावा, हे कलकत्त्यास गेले असल्यानें दिल्ली येथें चाललेल्या चर्चेंत खंड पडला आहे व ते परत आल्यानंतर बोलणीं पुन्हा चालू होतील ह्या गूढवेष्टित बातमीनें 'टाइम्स ऑफ इंडिया'सारख्या पत्रासहि आश्चर्यचकित केलें आहे. हिंद-जपान कराराची मुदत संपल्यानें त्याच्या शर्ती ह्यापुढें, नवा करार होईपर्यंत, बंधनकारक रहाणार नाहींत ही बातमीसुद्धा टोकिओहून आली आणि हिंदुस्थान सरकारनें त्याविषयीं कांहींच खुलासा केला नाहीं, ह्याचेंहि त्या पत्रास नवल वाटत आहे. प्रस्तुत घोडें कोठें पेंड खात आहे याची माहिती सरकारनें प्रसिद्ध करावी अशी त्याची सूचना आहे. आर्थिक प्रश्नांचे संबंधानें हिंदी जनतेस आपण जबाबदार आहों असें सरकारास वाटत असतें तर त्यांनीं लोकमताची काळजी वाहिली असती. अशा जबाबदारीची जेथें जाणीव नाहीं तेथें त्यांनीं हा त्रास कां घ्यावा ?

## हिंदी लाखेचा धंदा

लाखेचा धंदा हिंदुस्थानांत प्राचीन असा असून त्या मालास जगामध्यें चांगली मागणीहि आहे. झाडांवर बसणाऱ्या विशिष्ट जातींच्या किड्यांपासून उत्पन्न होणाऱ्या ह्या पदार्थाचा अनेक धंद्यांत उपयोग केला जातो. ग्रॅमोफोनच्या तबकड्या, वार्निश, नाना प्रकारचीं खेळणीं, ह्यांत तो पदार्थ वापरणें फारच सोयीचें असल्यानें त्यास परदेशांत पुष्कळ मागणी आहे. हिंदुस्थानांतील विशिष्ट जंगलांमधील लाख गोळा होऊन तिच्यापासून बाजारांत विक्रीस लायक असे पदार्थ बनवले जाईपर्यंत ज्या उलाढाली होतात त्या काटकसरीनें व कार्यक्षम रीतीनें होण्यावर ह्या धंद्याची प्रगति व किफायतशीरपणा अवलंबून रहाणें सहाजिक आहे. सदरहु व्यवहार सुव्यवस्थित व्हावे म्हणून बरींच वर्षें संघटित यत्न चालू आहेत. लाखेच्या विक्रीवर अल्पशी पट्टी बसविण्यांत आली असून तिच्या उत्पन्नांतून ह्या प्रयत्नांचा खर्च चालत असतो. मध्यवर्ती कायदेमंडळानें सदरहु पट्टीबाबतचा कायदा दुरुस्त करून तिचा आकार नुकताच वाढवला आहे. पट्टीचें वार्षिक उत्पन्न आतां सुमारें अडीच लक्ष रुपये होऊन शास्त्रीय शोध आणि उत्पादन व विक्री ह्यांबद्दलची व्यवस्था ह्यांप्रीत्यर्थ ज्यास्त पैसा खर्चणें शक्य होईल. इतर पदार्थांप्रमाणें निसर्गजन्य लाखेस कृत्रिम लाखेची स्पर्धा भोवूं लागली असून हिंदी धंदा ह्या चढाओढींत जगावयाचा असेल तर त्याच्या सुधारणेबाबत जारीची व पद्धतशीर खटपट होणें आवश्यक आहे. लाखेवरील पट्टीचा कारभार पहाण्यासाठी प्रातिनिधिक स्वरूपाची एक धंदेवाल्यांची कमिटी आहे तिनें ह्या प्रश्नाकडे लक्ष पुरविलें पाहिजे. लाखेबाबतच्या शास्त्रीय शोधांप्रीत्यर्थ आजपर्यंत चोवीस लक्ष रुपये खर्च झाले आहेत. पण नुसत्या शोधांनीं कार्यभाग होत नाहीं. चांगल्या जातींचे निर्भेळ पदार्थ लाखेपासून उत्पन्न होऊन त्यांची विक्री सुधारलेल्या पद्धतीनें होणें अगत्याचें आहे. मालांत भेसळ कोठें व कशी होते, व्यापारांत निष्कारण खर्च कसा होतो, लाख गोळा करणारांस योग्य मेहनताना मिळतो किंवा नाहीं आणि मध्यस्थ दलालांची कारवाई मर्यादित करतां येईल कीं नाहीं, इत्यादि बाबींचा व्यावहारिक रीतीनें विचार झाला पाहिजे.

## आंतरराष्ट्रीय साखर-समिति व हिंदुस्थान

साखरेचें उत्पादन, विक्री व बाजारभाव ह्यांचे संबंधांत अनिष्ट स्पर्धा होऊं नये आणि व्यवहार एकमार्गी चालावे म्हणून कांहीं वर्षें एक आंतरराष्ट्रीय योजना अमलांत होती. तिची मुदत संपल्यावर तिला सामील असलेल्या जाव्हा व्यतिरिक्त राष्ट्रांच्या प्रतिनिधींची एक शर्करा-समिती दोन वर्षांमागें स्थापन करण्यांत आली. पुन्हां एकदां जागतिक स्वरूपाचा आंतरराष्ट्रीय करार करून साखरेच्या धंद्याची घडी बसवावी हा तिचा उद्देश आहे. ह्या प्रकारची व्यवस्था होण्याची आवश्यकता ग्रेट ब्रिटननें मागें प्रदर्शित केली असल्यानें त्या राष्ट्राकडूनच कांहीं विधायक कार्य होऊं शकेल अशी अपेक्षा आहे. साखर समितीची मुदत पुढील सालच्या ऑगस्ट महिन्यापर्यंत आहे. जाव्हाशीं वाटाघाटी अलीकडे झाल्या आहेत, त्यांवरून आंतरराष्ट्रीय करार नव्यानें करण्यास त्या देशाची हरकत नाहीं असें दिसतें. व्हावयाच्या योजनेची व्यवस्था सयुक्तिक असावी एवढीच शर्त जाव्हानें घातली आहे. ही तयारी झाल्यानंतर आतां ग्रेट ब्रिटनच्या मागें लागून पुढें पाउल टाकण्यास ब्रिटिश सरकारचें मन वळवणें ही कामगिरी साखर समितीस करावयाची आहे. त्या कामाच्या सोयीसाठीं कमिटीनें आतां लंडन येथें आपली एक कचेरी चालू करण्याचें ठरविलें आहे. खुद्द ग्रेटब्रिटनमध्यें बीटाची साखर तयार होते आणि त्या धंद्याच्या संरक्षणार्थ तेथील सरकारानें आजपर्यंत पन्नास कोटि रुपयांचें सहाय केलें आहे. तेव्हां, साखरेचें उत्पादन व व्यापार ह्यांच्या जागतिक व्यवस्थेसंबंधानें ब्रिटिश सरकारास काळजीपूर्वक विचार करून आपल्या स्वदेशी धंद्याच्या हिताची जोपासना करावी लागेल. साखरेच्या उत्पादनांत हिंदुस्थान देशानें आतां चांगली मजल मारली असल्यानें आमच्या ह्या स्वदेशी धंद्याच्या संरक्षणाचा प्रश्न येथील जनतेच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचा आहे आणि लंडनमध्यें होणाऱ्या वाटाघाटींत ह्या गोष्टीस प्राधान्य दिलें जाणें अगत्याचें आहे. हिंदुस्थान सरकारनें जागरूक राहून हिंदी साखरेच्या धंद्याची बाजू ब्रिटिश सरकारापुढें मांडली पाहिजे. कोणताहि आंतरराष्ट्रीय करार किंवा जागतिक व्यवस्था निश्चित होण्यापूर्वीं हिंदी उंसाचें पीक करणारा शेतकरीवर्ग आणि साखरेचे कारखानदार ह्यांचा अभिप्राय घेतला जाणें आवश्यक आहे, एवढेंच नव्हे तर हिंदी साखरेच्या धंद्याचें परकीय स्पर्धेपासून योग्य संरक्षण होईल अशी पूर्ण खबरदारी घेतली जाणें अगत्याचें आहे.

### धरणें व कालवे आणि वाढती लोकसंख्या

हिंदुस्थानांत वारंवार अवर्षण होतें, दुष्काळ पडतात आणि शेतकरी वर्गाची हलाखीची स्थिति होऊन कर्जबाजारीपणा वाढतो, ह्यास उपाय म्हणून धरणें व कालवे ह्यांचा विस्तार करण्याचें अगत्य लॉर्ड कर्झन ह्या व्हाइसरॉयांस भासलें आणि त्यांनीं ह्या कामीं धडाडीचें धोरण अमलांत आणण्याचें ठरवलें. त्यास अनुसरून गेल्या पस्तीस वर्षांत निरनिराळ्या भागांत आणि विशेषेंकरून पंजाब, सिंध, मुंबई व संयुक्तप्रांत ह्या प्रांतांत कालव्यांची प्रगति मोठ्या प्रमाणावर झाली आहे. कालव्याचें पाणी निश्चितपणें मिळण्याची सोय झाल्यानें पावसाच्या लहरीवर शेतकऱ्यांस अवलंबून रहावें लागत नाहीं आणि धान्य व इतर शेतीचा माल ह्यांचें उत्पादन वाढण्यास सहाय होतें. कालव्यांचें पाणी घेतल्यापासून होणारा शेतकऱ्यांचा फायदा व त्यांस त्यासाठीं भरावी लागणारी पट्टी, सरकारनें कालव्यांच्या व बंधाऱ्यांच्या कामांत घातलेलें भांडवल व त्यांपासून येणारें उत्पन्न, कालव्यांच्या मुबलक पाण्याचा शेतीसाठीं उपयोग करण्यांत आल्यानें जमिनीवर होणारा दुष्परिणाम व ती निकामी होण्याची भीति इत्यादि महत्त्वाचे प्रश्न ह्यासंबंधांत उद्भवतात आणि त्यांचा काळजीपूर्वक विचार होणें आवश्यक असतें. धरणें व कालवे ह्यांच्या बाबतींत एंजिनिअरिंगच्या दृष्टीनें शास्त्रीय स्वरूपाच्या अनेक भानगडींचें संशोधन व चर्चा होणें उपयुक्त असून त्यासाठीं हिंदुस्थानांत एक मध्यवर्ती बोर्ड स्थापन झालेलें आहे. त्याची सातवी वार्षिक सभा दिल्ली येथें नुकतीच भरली होती आणि तिच्यामध्यें लॉर्ड लिन्लिथगो ह्यांनीं प्रास्ताविक भाषण केलें. ह्या भाषणांत त्यांनीं अनेक महत्त्वाच्या प्रश्नांचा उल्लेख करून कालव्यांच्या संबंधांत तज्ज्ञ एंजिनिअरांच्या कामगिरीची किती उपयुक्तता आहे त्याचें विवेचन केलें. त्यांच्या भाषणांत आलेल्या मुद्यांचा विचार स्वतंत्र रीतीनें करणें जरूर आहे. येथें एवढेंच नमूद करतों कीं, आजपर्यंत हिंदुस्थानांत कालव्यांच्या कामांवर १५० कोटि रुपये खर्च झाले असून त्यांच्या सहाय्यानें प्रतिवर्षीं १०० कोटि रुपये किंमतीचीं पिकें निघतात. हिंदुस्थानची लोकसंख्या दरवर्षीं ४० लक्ष ह्या वेगानें झपाट्यानें वाढत असून १९४१ सालीं तिचा आंकडा ४० कोटींवर जाऊन थडकेल असा अंदाज आहे, नव्हे भीति आहे. कारण, ह्या वाढत्या लोकसंख्येस लागणारा अन्नाचा पुरवठा देशाच्या जमिनींतून कसा वाढावा हा बिकट प्रश्न उग्र स्वरूपांत पुढें उभा राहिला आहे. दारिद्र्य व उपासमार ह्यांपासून जनतेचें रक्षण कसें होईल, ह्याची काळजी वाटावयास लावणारा हा वरील अंदाज असून शेतीची सुधारणा व कालव्यांचा विस्तार ह्यांच्या सहायानें कांहीं संरक्षक उपाय निघेल कीं नाहीं ह्याचा विचार अवश्य झाला पाहिजे.

---

### गव्हाचे पोहे

'स्वतःच्या कल्पनेनें बनवलेल्या यंत्रांच्या सहायानें श्री. सहस्रबुद्धे ह्यांनीं आपल्या कारखान्यांत तयार केलेल्या गव्हाच्या पोह्यांची जाहिरात आजच्या अंकांत दुसऱ्या एका पानावार छापली आहे, तिकडे आम्हीं वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों. कित्येक महिने प्रयोग करून त्यांनीं दुधांत सहज विघटणारें व पौष्टिक असें हें सात्त्विक अन्न तयार केलें असून त्याच्या शक्तिवर्धक व उत्साहजनक गुणाविषयीं नामांकित भिषग्वरांनीं खात्री करून घेतली आहे. त्याच तऱ्हेच्या विलायती मालाच्या तोडीचे हे गव्हाचे पोहे झाले असून त्यापेक्षां स्वस्त आहेत. आजारी व अशक्त माणसांस तर ते विशेष उपयोगी पडतीलच, परंतु चांगल्या प्रकृतीच्या लोकांनीं त्यांचें दररोजचें पेय करून घेण्याच्या लायकीचा हा पदार्थ आहे. श्री. सहस्रबुद्धे ह्यांनीं हा नवीन स्वदेशी धंदा मोठ्या मेहनतीनें व चिकाटीनें निर्माण केला आहे, ह्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. वैद्यकीय तज्ज्ञांनींच केवळ त्यांच्या पोह्यांची प्रशंसा केली आहे असें नव्हे, तर तो माल वापरून समाधान वाटलेल्या अनेक ग्राहकांनींहि त्याची स्तुती केली आहे. श्री. सहस्रबुद्धे ह्यांच्या कल्पकतेचें व धडाडीचें योग्य चीज जनतेकडून होईल अशी आम्हांस आशा आहे.

---

### देशी चित्रपट दाखविण्याची सिनेमागृहांवर सक्ती ?

अमेरिकेंतील सुप्रसिद्ध मेट्रो गोल्डविन मेयर कंपनी मुंबई शहरामध्यें स्वतःचें एक सिनेमागृह बांधीत असून, त्याचें काम अत्यंत मोठ्या व भव्य प्रमाणावर चालू आहे. केवळ हिंदुस्थानांतच नव्हे, तर पृथ्वीच्या सबंद पूर्व भागांतहि एवढें प्रचंड थिएटर दुसरें नाहीं. मुंबई शहराच्या वांटणीस हें अभिमानास्पद सिनेमागृह येत असलें तरी हिंदी मालकीच्या चालू सिनेमागृहांशीं त्याची परिणामकारक स्पर्धा होईल ह्यांत शंका नाहीं. धोबी तलावासारख्या मध्यवस्तीच्या क्षेत्रांत हें सिनेमागृह अगदीं आधुनिक पद्धतीनें बांधलें जाणार आणि त्यांत इतरत्र उपलब्ध नसलेल्या सोयी लोकांस मिळणार. ह्या रीतीनें हिंदी बोलपटांच्या धंदेवाल्यावर चढाई होणार असल्यानें मेट्रो कंपनीस थिएटर बांधण्यास परवानगी देण्यांत येऊं नये, अशा अर्थाची विनंति सर फिरोज सेठना ह्यांच्या नेतृत्वाखालीं एका शिष्टमंडळानें हिंदुस्थान सरकारच्या उद्योग-मंत्र्यांस केली होती, परंतु तिचा उपयोग झाला नाहीं. नवीन थिएटरामुळें परदेशी चित्रपटांचाच बोलबाला होईल, म्हणून निदान सर्व थिएटरांस कांहीं विशिष्ट प्रमाणांत हिंदी चित्रपट दाखविण्याची कायद्यानें सक्ती व्हावी, अशी सूचना आतां करण्यांत येत आहे. ग्रेटब्रिटनमध्यें तेथील फिल्म कंपन्यांस सहाय करणारा ह्या प्रकारचा कायदा अंमलांत आहे, त्याचें हिंदुस्थानांत अनुकरण करण्यांत यावें, असें हिंदी सिनेमा धंद्यामधील कांहीं जणांचें मत आहे. ह्या उलट, परदेशी चित्रपटांची व थिएटरांची स्पर्धा हिंदी सिनेमा धंद्यास जागें करण्यास कारणीभूत होऊन त्याच्या वाढीस पोषकच होईल, असेंहि मत व्यक्त करण्यांत येत आहे. तथापि, तूर्त तरी चर्चेच्या पलीकडे हा प्रश्न जाईल, असें दिसत नाहीं.

---

### सैनिकाचा पेशा लोकप्रिय करण्याचे प्रयत्न

युद्ध उपस्थित झाल्यास आपण तयार असावें, ह्याकरितां प्रत्येक राष्ट्र जारीनें प्रयत्न करीत आहे. ग्रेटब्रिटननें ह्या बाबतींत जरा उशीरा सुरवात केली असली, तरी तेथेंहि प्रचार व शिक्षणकार्य जोमानें चालू आहे. सैनिकाचा पेशा स्वीकारणाऱ्या उमेदवारांचा तुटवडा भासूं नये, ह्याकरितां तो पेशा लोकप्रिय कसा करतां येईल, ह्यासंबंधीं ब्रिटिश सरकार प्रयोग करीत आहे व सर्वस्वी पात्र व लायक उमेदवारांचे अभावीं अपूर्णपात्र उमेदवारांस जादा शिक्षण देऊन व त्यांचे खाण्यापिण्याकडे विशेष लक्ष देऊन लढाईची पूर्वतयारी करण्यांत येत आहे. ही शारीरिक शिक्षणाची योजना यशस्वी झाल्यास सबंद देशभर तिचा प्रसार करण्यांत येईल. सैनिकाच्या पेशासंबंधीं तरुणलोकांत आवड निर्माण व्हावी, अशीहि खटपट केली जात आहे व उमेदवारांस सर्वतोपरी प्रोत्साहन देण्याचें सरकारचें धोरण आहे. त्यांच्या करमणुकीची विशेष व्यवस्था करून त्यांस लोणी, दूध व फळें हीं ज्यास्त प्रमाणांत पुरविण्यांत येत आहेत. सैन्यांत तरुणांनीं आपण होऊन यावें, असें वातावरण उत्पन्न करण्याचा हा प्रयत्न आहे.

## जगांतल्या आर्थिक व सामाजिक घडामोडी
(३)
### रशियांतील नव्या सृष्टीचा प्रयोग

बोल्शेव्हिकांनीं रशियामध्यें समाजाची जुनी रचना मोडून टाकून तिच्या ठिकाणीं आत्यंतिक समाजसत्तावादाच्या ध्येयानुसार सर्वस्वी नवीन घटना प्रस्थापित केल्यापासून ह्या उलथापालथीकडे व नवनिर्मितीकडे अखिल जगाचे डोळे लागून राहिले आहेत. रशियांत झालेल्या घडामोडींची प्रसिद्ध झालेली माहिती वाचून किंवा तेथील परिस्थितीचें प्रत्यक्ष निरीक्षण करून लोकांनीं बनवलेल्या मतांमध्यें मात्र विलक्षण विविधता आहे. जगांतले बहुसंख्याक मत जर पाहिलें तर तें बोल्शेव्हिकांच्या कृतीस सर्वथा प्रतिकूल आहे ह्यांत संशय नाहीं. रशियन समाजकुटुंबवाद ( कम्यूनिझम ) अनिष्ट व त्याज्य आहे एवढेंच नव्हे तर तो विषारी स्वरूपाचा असल्यानें त्यास यत्किंचितहि थारा न देतां सर्वांनीं त्याचा प्रसार होण्याची शक्यता नष्ट करण्याचा निश्चयात्मक व सामुदायिक प्रयत्न करणें अगत्याचें आहे, हें मत जगांत पसरलेलें आढळतें. जर्मनी व इटली ह्या देशांत हा यत्न पद्धतशीर रीतीनें झाला असून तेथील फॅसिझमची घटना बोल्शेव्हिजमच्या शत्रुत्वावरच मुख्यत्वें करून आधारलेली आहे. हीच विरोधाची वृत्ति कमी-अधिक प्रमाणांत इतर देशांतहि दिसून येते आणि बोल्शेव्हिक मतांचा व घटनेचा प्रचार होऊं न देण्याचा बंदोबस्त राष्ट्रीय सरकारांनीं जगांत चोहोंकडे केलेला आढळतो. ह्याचें कारण हजारों वर्षें प्रचलित असलेल्या व जगभर सर्वांस आदरणीय वाटणाऱ्या कल्पनांवर बोल्शेव्हिकांनीं वरवंटा फिरविला आहे, हें होय.

बोल्शेव्हिकांच्या तत्त्वज्ञानांत धर्म नाहीं, देव नाहीं, कुटुंबव्यवस्था नाहीं, खाजगी वैयक्तिक मालकीची संपत्ति नाहीं आणि प्रातिनिधिक स्वरूपाची व लोकशाही स्वरूपाची राज्य-व्यवस्था नाहीं. म्हणजे, ज्या कल्पना व संस्था सकल जग पूज्य, वंद्य, आवश्यक व मानवी समाजाचा आधार असें समजत आलें आहे, त्या सर्वांचें बोल्शेव्हिकांस वावडें आहे, आणि रशियांत त्यांनीं त्या उघळून लावल्या आहेत. बोल्शेव्हिकांनीं संघटित पक्ष निर्माण करून रशियांत जबरदस्तीनें व्यक्ती व संस्था ह्यांची जिंदगी व स्वातंत्र्य हीं नष्ट केलीं आहेत आणि आपली राजकीय सत्ता प्रस्थापित केली आहे. बोल्शेव्हिझमच्या प्रसाराबरोबर स्वतःची संपत्ति, संस्कृति व स्वतंत्रता ह्यांचा नाश हीं ठेवलेलीं आहेत, ह्या रशियांत घडलेल्या क्रांतीवरून निघणाऱ्या निष्कर्षानें इतर देशांतील जनता सावध झाली आहे आणि आत्यंतिक समाजसत्तावादाच्या प्रसाराचा प्रतिकार करण्यास सज्ज झाली आहे. समाजकुटुंबवाद्यांचें रशियांत फलद्रूप झालेलें तत्त्वज्ञान जुनेंच आहे आणि त्याचें व त्यावर आधारलेल्या योजनांचें विवेचन त्याच्या प्रणेत्यांच्या ग्रंथांत केलेलें आहे. त्यांत अंतर्भूत झालेलें ध्येय, तत्त्व व सिद्धांत ह्यांस क्रांतिमूलक प्रयत्नांनीं रशियांत बोल्शेव्हिकांनीं अल्प काळांत मूर्त स्वरूप दिलें आहे, हा त्यांचा विशेष आहे. खाजगी मालकीच्या मोठमोठ्या कारखान्यांवर आधारलेल्या "भांडवलशाही"च्या पोटांत तिच्या स्वतःच्या नाशाचीं बीजें असून तिची उत्क्रांति क्रांतीच्या स्वरूपांत व समाजसत्तात्मक आर्थिक घटनेंत आपोआप होते, हा समाजसत्तावाद्यांचा सिद्धांत खरा ठरण्यास मागसलेल्या रशियांतील परिस्थिति अनुकूल नव्हती. म्हणून बोल्शेव्हिकांनीं उत्क्रांतीची वाट न पहातां दडपशाहीनें व दांडगाईनें सत्ता बळकावून क्रांति घडवून आणिली. अंतस्थ बंडाळी व युद्ध, प्रचलित संस्था, व्यवस्था, कल्पना, रहाणी, व्यवहार ह्यांचा नाश आणि जुन्या रशियन संस्कृतीचें उच्चाटन होऊन तिच्या ठिकाणीं नवीन व्यवस्थेची स्थापना ही जी उलथापालथ झाली तिच्या योगानें बोल्शेव्हिकांचीं तत्त्वें व कार्यपद्धति ह्यांचेसंबंधानें जगभर अत्यंत प्रतिकूल ग्रह बनून गेला आहे. तशीच पण तात्त्विक दृष्ट्या निराळ्या तऱ्हेची दडपशाही फॅसिझमच्या नांवानें जर्मनी व इटली ह्या देशांत प्रस्थापित झाली आहे, ती बोल्शेव्हिझमच्या आपत्तीपासून जगाचें संरक्षण व्हावें म्हणून निर्माण करावी लागली असल्याचें मुसोलिनी व हेर हिटलर सांगत आहेत. फॅसिस्ट घटनेंतहि बोल्शेव्हिक व्यवस्थेप्रमाणें दंडुकेशाही व व्यक्तिस्वातंत्र्याचा अभाव ह्यांची आपत्ति असल्यानें जर्मनी, इटली व रशिया ह्या देशांच्या बाहेर ह्या दोन्ही पद्धतींसंबंधानें लोकमत साशंक व प्रतिकूल आहे. ह्या दोघांच्याहि प्रसाराच्या आघातापासून स्वतःच्या जुन्या संस्कृतीचें रक्षण करण्याची तयारी ठेवून त्या क्रांत्या प्रयोगात्मक आहेत अशा भावनेनें त्यांचेकडे पहाण्याची प्रवृत्ति अनेक विचारी लोकांची असल्याचें दिसत आहे.

---

## पुणें शहराची आर्थिक पहाणी

—:०:—

गोखले राजकारण-अर्थशास्त्र-संशोधन मंदिरानें पुणें शहराच्या आर्थिक संशोधनाचें कार्य हातीं घेतल्याचें आतां सर्वांस विदित झालें आहेच. सर्व शहराची पाहणी करण्याचें कार्य फार मोठें जबाबदारीचें व खर्चाचें असतें. खर्चाचे बाबतींत शहर म्युनिसिपालिटीनें हातभार लावण्याचें आश्वासन दिल्यामुळें, मंदिराचें काम बरेंच सुकर झालें असलें, तरी माहिती मिळविण्याचे कार्यांत शहरांतील कारखानदार, दुकानदार, निरनिराळ्या व्यवसायांतील इतर मंडळी व सर्वसाधारण जनता यांचें सहानुभूतीपूर्वक सहकार्य मिळाल्याशिवाय कामाची प्रगति झपाट्यानें होणार नाहीं. यासाठीं सर्वत्रांनीं या संशोधन कार्यास शक्य तेवढी मदत करावी अशी आम्ही विनंति करतों. मागील दोन महिन्यांत शहरांतील कांहीं कारखानदार मंडळींचे संघ व समाज यांनीं आपापल्या सभा बोलावून मंदिराकडून संशोधनाबाबतची माहिती विचारून घेतली व संस्थेस मदत करण्याविषयींचे सभेंत ठराव पास करून मदतीचीं अभिवचनें दिलीं. शहरांतील इतर संस्था, मंडळ्या, समाज, वगैरेंनीं अशाच सभा यापुढें बोलावून संस्थेच्या संशोधकांस सभेस हजर रहाण्यास सांगितलें, तर ते आनंदानें हजर राहून आपले हेतु व कार्य याविषयीं त्यांस दोन शब्द सांगून, त्यांच्याशीं विचारविनिमय करण्यास तयार आहेत. ज्या संस्थांनीं अगर समाजांनीं आजपावेतों सभा भरविल्या, त्यांची नामावली खालीं दिली आहे. कोणत्याहि व्यक्तीस, संस्थेस, समाजास अगर संघास पाहणीविषयीं माहिती पाहिजे असल्यास त्यांनीं त्याबद्दल संस्थेकडे जरूर शोध करावा.

१ प्रेस ओनर्स असोसिएशन. २ मराठा चेंबर. ३ तांबे-पितळेच्या धंद्यांतील कामकरी समाज (कसब्यांतील). ४ पूना सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक अँड क्रेडिट सोसायटीज. ५ हार्डवेअर मर्चंटस असोसिएशन. ६ ब्रास अँन्ड कॉपरवेअर मर्चंटस असोसिएशन. ७ दाऊदी बोहरी समाज. ८ स्वकुळ साळी समाज. ९ सराफ असोसिएशन. १० महाराष्ट्र इन्डस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह एजन्सी.

---

## शस्त्रास्त्रांचे कारखाने खाजगी कीं सरकारी ?

युद्धाचे घोर परिणाम इतके परिचयाचे झाले असतांहि त्याच्या तयारीकरितां शस्त्रास्त्रांवर पाण्यासारखा पैसा ओतण्याचा प्रसंग लहान-मोठ्या राष्ट्रांवर आला आहे हें मानवी समाजाचें दुर्दैव आहे. शस्त्रास्त्रें मर्यादित करण्याचे बाबतींत आंतरराष्ट्रीय करार घडवून आणण्याचे प्रयत्न निष्फळ झाले असून त्यांच्या वाढीचीच आवश्यकता सर्वत्र भासत आहे, ही लाजिरवाणी गोष्ट आहे. युद्धाचा निषेध व शांततेचा पुरस्कार करणारी चळवळ कित्येक देशांत चालू आहे तर मुसोलिनी व हेर हिटलर हे आपलीं राष्ट्रें युद्धास जय्यत तयार असल्याबद्दल फुशारकी मारीत आहेत. युद्धसामुग्री बनवण्याचे कारखाने खाजगी मालकीचे असल्यानें त्यांचे मालक स्वतःच्या फायद्यासाठी राष्ट्रांस लढण्यास उद्युक्त करतात असा आक्षेप कित्येक वर्षें घेतला जात असून ह्या अनिष्ट प्रवृत्तीस आळा बसावा म्हणून सदरहु कारखाने व्यक्तींच्या हातांतून काढून राष्ट्रीय सरकारांनीं आपल्या ताब्यांत घ्यावे अशी सूचना अनेकवार करण्यांत आली आहे. आयतीं तयार झालेलीं कार्यक्षम शस्त्रास्त्रें खाजगी कारखान्यांत विकत मिळतात किंवा कराराप्रमाणें त्यांत तयार करून मिळतात म्हणूनच केवळ कोणत्याहि देशांतले राज्यकर्ते दुसऱ्या देशांशीं भांडणें उकरून काढून युद्धास प्रवृत्त होतील हें सकृत्दर्शनीं शक्य वाटत नाहीं. त्याचप्रमाणें, युद्धसामुग्रीच्या कारखानदारांच्या चिथावणीनें राष्ट्राराष्ट्रांत युद्धें होतील हेंहि संभवनीय दिसत नाहीं. परंतु ही गोष्ट काल्पनिक नसून तिला प्रत्यक्ष वस्तुस्थितीचा आधार आहे, हें मि. नोल बेकर ह्यांनीं सदरहु विषयावरील लिहिलेला ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यांत दिलेल्या पुराव्यावरून सिद्ध होत आहे. शस्त्रास्त्रांचे कारखानदार दुष्ट असतात, असें नसून त्यांचा धंदा नीट चालण्यास त्यांच्या मालाचा खप वाढणें आवश्यक असल्यानें युद्धें किंवा युद्धाची तयारी त्यांस अभिप्रेत असणें स्वाभाविक आहे. हा शस्त्रांच्या खाजगी कारखानदारीचाच मूलग्राही दोष आहे.

जागतिक शांततेनें ह्या कारखानदारांच्या पोटावर पाय येणें अपरिहार्य असल्याकारणानें तिच्याविरुद्ध त्यांचे प्रयत्न चालणार हें ओघानेंच प्राप्त होतें. ह्या संबंधांत कारखानदारांचा विविध प्रकारचा प्रचार कसा चालतो आणि त्या कामीं कोणते बरेवुरे उपाय योजण्यांत येतात, ह्याचें वर्णन मि. नोल बेकर ह्यांनीं केलें आहे. शस्त्रास्त्रांचे कारखाने खाजगी असावे का राष्ट्रीय सरकारांच्या मालकीचे असावे ह्या प्रश्नाबाबत तीव्र मतभेद असल्यानें त्याची शहानिशा करण्यासाठी इंग्लंडमध्यें एक रॉयल कमिशन नेमण्यांत आलें होतें. त्याचा रिपोर्ट तयार झाला असून त्यांतील अभिप्राय ब्रिटिश सरकारच्या मतास अनुकूल आहे असें म्हणतात. शस्त्रास्त्रांचे कारखाने सरकारी मालकीचे असूं नयेत असें कमिशनचें म्हणणें आहे आणि ब्रिटिश प्रधान मंडळासहि असेंच वाटत आहे. कमिशनच्या मतें चालू पद्धतीमुळें विशेष लक्षांत घेण्यासारखे दुष्परिणाम घडलेले नाहींत आणि कारखाने सरकारानें चालवण्याच्या मार्गांत मोठ्या अडचणी आल्या वांचून रहाणार नाहींत. राजकीय दुष्परिणामांची अडचण त्यांमध्यें प्रमुख आहे. शस्त्रास्त्रांचे कारखाने राष्ट्रीय म्हणजे सरकारी मालकीचे करणें अनिष्ट असलें तरी त्यांवर सरकारचें नियंत्रण रहावें आणि त्यांचा दुरुपयोग केला जाणार नाहीं, अशी खबरदारी घेण्यांत यावी असें मात्र कमिशननें म्हटलें आहे, तें मत महत्वाचें आहे. ह्या मार्गानें जरी शस्त्रास्त्रांच्या उत्पादनावर आणि विक्रीवर समाजाचें नियंत्रण बसलें तरी तें इष्टच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. अमेरिकेच्या सेनेटनेंहि ह्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां एक कमिशन नेमलें आहे आणि फ्रान्समधील समाजसत्तावादी प्रधान मंडळाचा, शस्त्रास्त्रांचें उत्पादन सरकारी कारखान्यांत करण्याची पद्धति चालू करण्याचा बेत आहे. ह्या प्रकारच्या सुधारणांनीं जागतिक शांततेस सहाय होईल आणि युद्धाच्या प्रवृत्तीस पायबंद बसेल तर तें जगाच्या हिताचेंच आहे.

---

### मराठी दस्तऐवजांचें कानडी जिल्ह्यांत रजिस्ट्रेशन

दस्तऐवज रजिस्टर होण्यासंबंधांतल्या नियमांत अलीकडे दुरुस्ती झाली आहे, तीमध्यें मराठी दस्तऐवज विजापूर, धारवाड, बेळगांव व कानरा ह्या कानडी जिल्ह्यांत रजिस्टर होण्याची तरतूद करण्यांत आली आहे. ह्या बाबतींत प्रतिकूल टीका झाल्याकारणानें वस्तुस्थिति काय आहे ह्याचें स्पष्टीकरण सरकारनें डायरेक्टर ऑफ इन्फर्मेशनच्या मार्फत केलें आहे. कानडी जिल्ह्यांत मराठी दस्तऐवज रजिस्टर करण्याचा प्रघात साठ वर्षांच्यावर अमलांत आहे. रजिस्ट्रेशनच्या कायद्याअन्वयें झालेल्या नियमांत गेल्यासालीं दुरुस्ती झाली तेव्हां कर्नाटकांत रजिस्टर व्हावयाच्या दस्तऐवजांची भाषा कोणती असावी हें नमूद करतांना मराठी भाषेचा उल्लेख करण्याचा चुकीनें राहून गेला. ती चूक सरकारच्या नजरेस आल्यानें चालू सालीं ती दुरुस्त करण्यांत आली आहे. ह्यांत नवीन धोरण स्वीकारण्याचा प्रश्न नाहीं. कानडी दस्तऐवज कर्नाटकच्या बाहेरील जिल्ह्यांत रजिस्ट्रेशनसाठा सहसा येत नाहींत. तथापि ते तसे आल्यास बरोबर स्थानिक भाषेंत त्यांचें भाषांतर सादर केलें असतां त्यांचा रजिस्ट्रेशनसाठी स्वीकार करण्यांत येतो.

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

**झारापकर टेलरिंग कॉलेज**

माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २

दर ] **गाद्यांचा कारखाना** [ माफक

मशीनवर कापूस पिंजून सर्व तऱ्हेचें पिंजारी काम कोणत्याही पिंजाऱ्यापेक्षां उत्कृष्ट होतें. एकवेळ येऊन पहा. बाहेरगांवचें काम तावडतोब करून देऊं.

प्रो. श्री. रा. साठे

पत्ताः—उद्योग मंदिर घ. नं. १००३ सदाशिव पेठचे हौदासमोर, पुणें २.

**"व्हीट ब्लासम" म्हणजे गव्हाचे पोहे**

ह्या सारखें सात्त्विक आणि कसदार खाद्य दुसरें नाहीं. पुड्याची किंमत [ मापी २ शेर ] ०८ आणे. नमुन्यासाठी पावणे दोन आण्याचीं तिकिटें पाठवावीं.

कारखानदार :—भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, ७५३ सदाशिव पेठ, पुणें.

स्टॉकिस्टः—तांबे आरोग्य भुवन, मुंबई; श्री. लक्ष्मी ट्रेडिंग कंपनी, सांगली, बेळगांव, कोल्हापूर.

# सहकारी चळवळ

## इंदूर परस्पर सहकारी पेढी, (मर्यादित,) इंदूर

| हजार रु. | | हजार रु. | |
|---|---|---|---|
| भाग भांडवल : | ९७३/४ | रोख शिल्लक : | ५१/४ |
| गंगाजळी व इतर रिझर्व्हज : | ६१ | इमारत : | २३ |
| | | कर्ज : | ४३४१/२ |
| ठेवी : | ७४९१/२ | रोखे : | १२४ |
| १९३५–३६ चा नफा : | १६१/२ | ठेवी : | ३३० |

वरील बँकेची २७ वी साधारण सभा ता. ४–१०–३६ रोजीं झाली. पढीचे एकूण १४९७ सभासद आहेत. व्याजाचे दर कमी होत असतांहि पेढीमधील ठेवींत सवा लाखांची वाढ झाली, हें पेढीवरील जनतेच्या विश्वासाचें द्योतक आहे. अहवालाचे वर्षी धान्य, घर, जमानत, प्रॉमिसरी नोट, मुदत ठेवीची नोट, रकम, पत, इत्यादींचे तारणावर एकूण ३ लक्ष ९० हजार रुपये देण्यांत आले व ३ लक्ष ६१ हजार रुपये वसूल झाले, बाकी ४ लक्ष ३४१/२ हजार रुपये आहे. व्याजाच्या दरांतील सुटीचा एकूण २३९ सभासदांस १८८ रुपयांचा फायदा मिळाला. पेढीचे गंगाजळी व इतर निधी मजबूत असून त्यांत सारखी वाढ करण्याचें चालकांचें धोरण स्तुत्य आहे. वर्षअखेरीस नफ्यापैकीं रकमेची गंगाजळींत भर पडली, म्हणजे तीमध्यें एकूण ६७,८०२ रुपयांचा, संचय होईल. इंदूर परस्पर सहकारी पेढी व तिचे चालक स्थानिक सहकारी चळवळीच्या प्रगतीस उत्साहानें सहाय करीत आहेत, हें पेढीस भूषणावह आहे. पेढीचें कार्य पद्धतशीर चाललें आहे आणि त्याबद्दल पेढीचे चालक व व्यवस्थापक अभिनंदनास पात्र आहेत. कर्जवसुलीसाठीं दावे करावयाचा प्रसंग पेढीवर येणार नाहीं ह्याविषयीं सभासदांनीं खबरदारी घेतली पाहिजे आणि त्याबाबत व्यवस्थापकांशीं मनःपूर्वक सहकार्य केलें पाहिजे. अहवालाचे सालीं मुंतजीम बहादुर विनायक पांडुरंग माटे हे व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष व प्रोफेसर वामन गोपाळ ऊर्ध्वरेषे हे उपाध्यक्ष होते.

---

## प. खा. को. इन्स्टिटयूटची वार्षिक साधारण सभा

ह्या इन्टिटयूटची वार्षिक साधारण सभा तारीख १८-१०-३६ रोजीं इन्स्टिटयूटचे ऑ. सेक्रेटरी श्री. पुंडलिकराव माधवराव पाटील ह्यांचे अध्यक्षतेखालीं झाली. जिल्ह्यांतील सोसायटयांचे प्रतिनिधी सुमारे २०० वर हजर होते. प्रथम अध्यक्षांचे हस्तें कै. रावसाहेब लहू चिमणाजी पाटील व कै. उत्तमराव भिलाजीराव देशमुख ह्यांच्या फोटोचें अनावरण करण्यांत येऊन रिपोर्टवाचन, ताळेबंद, पुढील वर्षाकरितां श्री. दामोदर गणपत पाटील व श्री. पुंडलिकराव माधवराव पाटील ह्यांची अनुक्रमें चेअरमन व ऑ. सेक्रेटरी म्हणून सर्वानुमतें निवड करण्यांत आली व नंतर श्री. काळे, सि. इन्स्पेक्टर, श्री. कानडे, श्री. जी. टी. पाटील व श्री. आर. व्ही. शुक्ल ह्यांचींहि सहकारी चळवळ व शेतकऱ्यांची सद्यस्थिति ह्या विषयावर समयोचित भाषणें झालीं.

---

## दुखवटयाची सभा

सर लल्लूभाई सामळदास ह्यांचे निधनाबाबत प. खानदेश जिल्ह्यांतील सहकारी बंधु-भगिनी व सर्व सहकारी संस्थांतर्फे दुखवटयाची सभा श्री. विनायक वामन गरुड बी. ए. ह्यांचे अध्यक्षतेखालीं ता. १८-१०-३६ रोजीं भरविण्यांत आली. सर लल्लूभाईसंबंधीं गुणवर्णनपर भाषणें होऊन दुखवटयाचा ठराव पास करण्यांत आला.

---

## दि सातारा नामदेव को. बँक लि., सातारा

| हजार रु. | | हजार रु. | |
|---|---|---|---|
| भाग भांडवल : | १८१/४ | शिलक : | १६१/४ |
| ठेवी : | १,७४ | कर्ज : | ११२ |
| चेक बिझिनेस : | २४ | चेक बिझिनेस : | ७२ |
| फंड्स : | ९ | गुंतविलेली रकम : | ७ |
| व्याज, डिव्हिडंड इ. : | २ | व्याज येणें : | ९ |
| १९३५–३६ चा नफा : | ४ | येणें बाकी : | १०१/४ |

बँकेच्या सभासदांची संख्या ३१९ आहे. अहवालाचे सालीं बँकेस ४,१७७ रु. नफा उरला. कमिशनचे २,४११ रु. मिळाले. बँकेच्या कराड व कोरेगांव येथें दोन शाखा आहेत. रेल्वे रसिदींच्या व्यवहारांत बँकेनें चांगली पत निर्माण केली आहे. अहवालाचे सालीं नोकरवर्गाच्या पगाराचें स्केल, प्रॉव्हिडंट फंड व रजेचे नियम मंजूर केले आहेत, ते १-११-३६ पासून अंमलांत आले. बँकेचा कारभार व्यवस्थित व किफायतशीर व्हावा ह्याविषयीं चालकांचा प्रयत्न चाललेला दिसून येतो.

---

## अमळनेर तालुका को-ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग यूनियन, अमळनेर.

वरील यूनियनच्या विद्यमानें ता. १८-१०-३६ रोजीं अमळनेर येथील टाऊन हॉलमध्यें श्री. आर. बी. पालेकर, असि. रजिस्ट्रार, यांचे अध्यक्षतेखालीं सेक्रेटरींचा प्रॅक्टिकल ट्रेनिंग रिफ्रेशर क्लासचा उद्घाटन समारंभ मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. त्या वेळीं गांवांतील सहकारी चळवळींत प्रामुख्यानें भाग घेणारे सद्गृहस्थ व अधिकारी हजर होते.

सर लल्लुभाई सामळदास यांच्या निधनानें सहकारी चळवळीचें अत्यंत नुकसान झालें आहे, म्हणून प्रथम दुखवटयाचा ठराव पास करण्यांत आला व नंतर जमलेल्या सोसायट्यांच्या पंच कमिटीच्या मेंबरांशीं व सेक्रेटरींशीं मनमोकळेपणानें सहकारी विषयावर ५–६ तास चर्चा व व्याख्यानें झालीं.

नंतर पुढील तीन दिवस सहकारी खात्यांतील, बँकेच्या, इनस्टिटयूटच्या व यूनियनच्या अधिकाऱ्यांनीं व चळवळीमध्यें भाग घेणाऱ्या बिनसरकारी तज्ज्ञांनीं सेक्रेटरींना उपयुक्त अशी माहिती दिली.

वरील क्लास चालविण्याचे कामीं असि. रजिस्ट्रार, ऑडिटर्स, मॅनेजिंग डायरेक्टर, सिनियर इन्स्पेक्टर, प्रो. ऑफिसर, बँक इन्स्पेक्टर व एजंट, यूनियन सुपरवायझर्स व येथील श्री. बंगाली वकील, लवाद कोर्ट, यांनीं प्रामुख्याने भाग घेतला, याबद्दल श्री. त्र्यंबकराव खुशाल पाटील हे यूनियनचे प्रेसिडेंट या नात्यानें त्यांचे आभारी आहेत.

---

## पुणें जिल्हा को. इन्स्टिटयूट

वरील इन्स्टिटयूटची वार्षिक साधारण सभा ता. १-११-३६ रोजीं पुणें सेंट्रल को. बँकेच्या दिवाणखान्यांत श्री. बापूसाहेब गुप्ते ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेमध्यें गेल्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नवीन वर्षाचें अंदाजपत्रक हीं मंजूर होऊन श्री. य. रा. दाते ह्यांची अध्यक्ष व श्री. देवभानकर ह्यांची ऑनररी सेक्रेटरी म्हणून निवडणूक झाली.

## कराड व पाटण ता. को. सुपरवायझिंग यूनियन लि.

ह्या यूनियनच्या कार्यक्षेत्रांत कराड व पाटण या तालुक्यांतील एकूण ३७ सोसायट्या सामील आहेत. शिवाय, सालअखेरीस ऊरूल येथें एक नवीन सोसायटी रजिस्टर करण्यांत आली आहे. सोसायट्यांची वर्गवारी खालीलप्रमाणें आहे. 'अ' वर्गांत २, 'ब' वर्गांत २२, 'क' वर्गांत ११ व 'ड' वर्गांत २. म्हणजे, मागील सालापेक्षां पाटण तालुक्यांतील २ सोसायट्या खालच्या वर्गांत व कराड तालुक्यांतील ५ सोसायट्या वरच्या वर्गांत आल्या आहेत. ह्यावरून सोसायट्यांची सुधारणा होत असल्याचें दिसून येतें. यूनियन 'ब' वर्गांत असून तिचें काम एकसारखें सुधारत आहे. सदर यूनियनखालीं २८ सेक्रेटरी असून त्यांपैकीं ८ ट्रेन्ड आहेत. ग्रुप सेक्रेटरीची योजना नाहीं, ती लवकर अंमलांत येणें इष्ट आहे.

एकूण ३७ सोसायट्यांचे २,५७२ सभासद आहेत. पैकीं १७० सभासदांना जमीन नाहीं व १७७ मागसलेल्या वर्गांतले सभासद आहेत. सभासद-सोसायट्यांच्या भागांच्या भांडवलांत वाढ झाली असून सभासदांच्या ठेवी कमी झालेल्या आहेत. सन १९३५-३६ मध्यें ३० सोसायट्यांची कमाल मर्यादापत्रकांचे द्वारा यूनियननें रु. १,६६,१५० ची शिफारस केली आहेत. ३२ सोसायट्यांनीं आपल्या मेंबरांना रु. १,३०,८५४ इतकीं नवीन कर्जें दिलीं आणि सदर सालांत मुद्दल रु. १,१०,६३६ व व्याज रु. २४,२३३ इतका वसूल झाला आहे व सालअखेरीस १,८४५ कर्जदार सभासदांकडे रु. २,२२,०३६ बाकी येणें आहे. यापैकीं रु. ७५,७०७ ची बाकी थकलेली आहे. म्हणजे या थकबाकीचें येणें रकमेशी शेंकडा प्रमाण ३७ पडत आहे. गुदस्त सालीं हेंच प्रमाण ५२.२ होतें. म्हणजे थकबाकी नमूद करण्यासारखी कमी झालेली आहे. पैकीं ५८ लवाद केसीसमध्यें ८,३०३ व ११२ हुकुमनाम्यांत रु. ११,६६८ गुंतलेले असून ६ सोसायट्यांचे ताब्यांत १,५१७ रु. किंमतीच्या १२ एकर जमिनी आहेत. साल अखेरीस २८ सोसायट्या नफ्यांत असून ९ सोसायट्या तोट्यांत आहेत. १९३५-३६ सालांत ३५ सोसायट्यांनीं आपापल्या वार्षिक सभा भरविल्या होत्या.

यूनियनच्या मॅनेजिंग कमिटीच्या ८ सभा होऊन ६९ उपयुक्त ठराव पास झाले आहेत. अहवालावरून यूनियन कमिटी कार्यक्षम असल्याचें दिसतें. तसेंच, यूनियनचे दोन्हीं सुपरवायझर जबाबदारी ओळखून मेहनतीनें कामें करतात असें दिसतें. यूनियननें सोसायट्यामार्फत ग्राम सुधारण्याचें काम जोरांत चालू केलें आहे आणि त्याचप्रमाणें नवीन सोसायट्या स्थापणें व शेतकऱ्यांची जुनी कर्जफेड व शेती सुधारणा ह्याबाबत सोसायट्यांनीं मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. एकंदरीत यूनियनचा अहवाल उत्साहवर्धक असून तिचें काम परिणामकारक व हितावह होत आहे.

### रेडिओवरील इंग्रजींतून जाहिरातींस बंदी

रेडिओवरील वेळ भाड्यानें घेऊन त्याचा उपयोग मालाच्या जाहिरातीकडे करण्याची पद्धत कित्येक युरोपियन देशांत चालू आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें मात्र अशी व्यवस्था नाहीं. रेडिओवरील कार्यक्रमांत ह्या जाहिराती व्यत्यय आणतात व जाहिरातदारांचें प्रचारकार्य झालें तरी ऐकणारांची गैरसोय होते. युरोपांतील रेडिओगृहांतून इंग्रजी भाषेच्या मार्फत आपल्या मालाचें वर्णन ब्रिटिश लोकांचे कानीं पाडण्याची युक्ती कित्येक ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं व कारखानदारांनीं अंमलांत आणली आहे. अशा तऱ्हेच्या जाहिरातींस इतर देशांनीं प्रतिबंध करावा, ह्या संबंधीं ब्रिटिश सरकारचीं त्यांच्या सरकारांबरोबर बोलणीं चालू आहेत.

### इंग्लंडचा सुवर्ण संचय

चालू वर्षांत जानेवारी ते सप्टेंबर ह्या नऊ महिन्यांच्या अवधींत इंग्लंडमध्यें २३ कोटी पौंड किंमतीचें सोनें आयात झालें आणि फक्त ४ कोटी पौंडांचे सोनें बाहेर गेलें, म्हणजे १९ कोटी पौंड किंमतीचें सोनें इंग्लंडमध्यें राहिलें. गेल्या तीन-चार वर्षांत इंग्लंडचा सुवर्णसंग्रह सुमारें ७८० कोटी रुपयांनीं वाढला आहे. ह्यापैकीं सुमारें १७० कोटी रुपयांचें सोनें बँक ऑफ इंग्लंडच्या गंगाजळींत दाखल झालें आहे.

## हिंदी कारखान्यांचें उत्पादन वाढलें

प्रचलित आर्थिक मंदीमध्येंहि हिंदुस्थानांतील कित्येक उद्योगधंद्यांतलें उत्पादन वाढत आहे, ही गोष्ट समाधानकारक समजली पाहिजे. ह्यासंबंधांतले गेल्या दोन तीन वर्षांचे तुलनात्मक आंकडे खालीं दिले आहेत:—

| धंदा | मालाचें माप | १९३३-३४ | १९३४-३५ | १९३५-३६ |
|---|---|---|---|---|
| कापसाचें कापड | चौरस वार | ... | ३३९ कोटि | ३५६ कोटि |
| तागाचा माल | टन | ९ कोटि, ६ लक्ष | ९ कोटि, ४९ लक्ष | १० कोटि, ९ लक्ष |
| पोलाद | टन | ५ लक्ष, ५० हजार | ६ लक्ष, २७ हजार | ६ लक्ष, ७६ हजार |
| दगडी कोळसा | टन | १८ हजार | २० हजार | २० हजार |
| साखर | हंड्रेडवेट | ... ... | १३७ लक्ष | १७६ लक्ष |
| कागद | हंड्रेडवेट | ८ लक्ष, ७३ हजार | ८ लक्ष, ९२ हजार | ९ लक्ष, ६१ हजार |
| पेट्रोल | गॅलन | ७ कोटि, २६ लक्ष | ८ कोटि, १० लक्ष | ९ कोटि, १६ लक्ष |
| केरोसीन | गॅलन | १५ कोटि, ६९ लक्ष | १६ कोटि, ९२ लक्ष | १६ कोटि, २४ लक्ष |
| सिमेंट | टन | ६ लक्ष, ४२ हजार | ७ लक्ष, ८० हजार | ८ लक्ष, ९० हजार |
| आगकाड्या | ग्रोस | ... ... | १ कोटि, ६४ लक्ष | २ कोटि, ४२ लक्ष |
| कणीक | मण | १ कोटि, ४१ लक्ष | १ कोटि, ३७ लक्ष | १ कोटि, ३७ लक्ष |
| सल्फूरिक ॲसिड | हंड्रेडवेट | ४ लक्ष, ८० हजार | ५ लक्ष, २९ हजार | ५ लक्ष, ५६ हजार |
| सल्फेट ऑफ अमोनिया | टन | १० हजार | १४ हजार | १७½ हजार |

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—७ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—१ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | १२०—० |
| ४% १९६०–७० ... ... | ११६—० |
| ४% १९४३ ... ... ... | ११२—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... | १००–५¼ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०७–१० |
| २¾% १९४८–५२ ... ... | १०१—३ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११२—६ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १११—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षे मुदत) | ११२—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११३–१० |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२६—० |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३६—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५–१४ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५८५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १४०–४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९९—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९१२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५५–१५ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २६०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २६५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ६½% ) | १५७२—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६०२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २००–१० |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७२—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | २०४—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ८१८–१२ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळयास | ३५–३½ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयास | ४९—९ |

धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०
कडून
हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक
नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—
स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्यआहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.
सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

वेस्टर्न इंडिया
लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.
स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी–सातारा.
संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.
बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५
१९३५ मधील नवें काम ५१,३०,०४२ रु.
एकूण चालू काम २,७०,००,००० रु. अधिक
एकूण जिंदगी ७१,७१,०९३ रु.
लाइफ फंड ६०,४२,८७३ रु.
एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

### बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

**शाखा**

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १५ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १६ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १७ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १८ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | १९ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २० शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २१ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २२ साक्री ( „ „ ) |
| ९ अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २३ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० शेवगांव ( „ „ ) | २४ मालेगांव ( „ नाशिक ) |
| ११ कोपरगांव ( „ „ ) | २५ सटाणा ( „ „ ) |
| १२ भिवंडी ( „ ठाणें ) | २६ कळवण ( „ „ ) |
| १३ पालघर ( „ „ ) | २७ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १४ कल्याण ( „ „ ) | २८ कालोल ( „ „ ( |

## खेळतें भांडवल रु. २००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.



## दि डॉन ऑफ इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें.

पुणें व सोलापूर येथें

बिल्डिंग इन्व्हेस्टमेंट आणि बँकिंग डिपार्टमेंटची

कंपनीचे बँकर्सनीं पसंत केलेली

ता. १ आक्टोबरपासून सुरू ] **नवीन योजना** [ ता. १ आक्टोबरपासून सुरू

मुदतीच्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची

☞ फायदेशीर अपूर्व सोय. ☜

बँकेच्या उतरत्या व्याजाच्या काळांत लोकांस आपले कौटुंबिक निर्वाहास साधन अगर मदत म्हणून ठेवीवर मासिक, नियमित व किफायतशीर व्याज देण्याची व्यवस्था तारीख १ आक्टोबर १९३६ पासून अमलांत आणली आहे.

गरजूंनीं जास्त माहिती मागवावी अगर समक्ष भेटावें.

पुणें, ता. २२-९-३६ | जनरल मॅनेजर.



## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद



## आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

पत्ता : डेक्कन जिमखाना, पुणें ४

यांचीं शास्त्रोक्त, खात्रीलायक व गुणकारी औषधें

| | |
|---|---|
| च्यवनप्राश पौष्टिक व शक्तिवर्धक | २० तो. १ रु. |
| वज्रदंती दंतमंजन | बा. किं. ४ आणे |
| केशवर्धन तेल | १० तो. १५ आणे |
| एरंडपाक मलावरोध घालविणारा | १० तो. ६ आणे |
| हेमगर्भ मात्रा सर्व वात कफरोगहर | मात्रा ५ रु. |
| सुवर्णराजवंगेश्वर धातुवर्धक | १ तो. ५ रु. |
| वाळा सरबत उन्हाळ्यांत थंड पेय | १ पौं. १२ आणे |
| त्रिभुवनकीर्ति सर्व ज्वरांवर | १ तो. १२ आणे |

याशिवाय प्रवाळ, मौक्तिक इ. भस्में, सर्व तऱ्हेचीं आसवें, अरिष्टें, मात्रा, गुटिका, अवलेह वगैरे मागवून एकवार अनुभव घ्या. कॅटलॉग मागवा.

ठिकठिकाणीं एजन्सी देणें आहेत. एजन्सी घेऊं इच्छिणारांनीं नियम मागवावे.



शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्रॉव्हिडंट विमा कं.

## दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय

प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें.    सेक्रेटरी.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख ११ नोव्हेंबर, १९३६. अंक ४६

दर ] गाद्यांचा कारखाना [ माफक

मशीनवर कापूस पिंजून सर्व तऱ्हेचें पिंजारी काम कोणत्याही पिंजाऱ्यापेक्षां उत्कृष्ट होतें. एक वेळ येऊन पहा. बाहेरगांवचें काम तातडतोब करून देऊं.

प्रो. श्री. रा. साठे

पत्ता:—उद्योग मंदिर व. नं. १००३ सदाशिव पेटचे हौदासमोर, पुणें २.

*For All Medicinal Requisites*

— TRY —

**N. MAHADEV & Co.**

DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS

City Post Office Corner, POONA 2.

**दि गुड-वुइल**

**ॲशुअरन्स कंपनी लि.**

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारास

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंटस् नेमणें आहेत.

पत्रव्यवहार करावा.

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा;

मॅनेजिंग डायरेक्टर

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली

पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—

**कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.**

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला { हयातीनंतर विम्यास
३७॥ रु. } दर हजारीं त्रैवार्षिक नफा { ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्टस.

**न. वि. वडनेरकर**

जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ
बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

**K. K. & Co.**


Photographic Dealers

POONA.

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं !! आवाज नाहीं !!!

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः—ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः—

१ केळकर ब्रदर्स, बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी, लक्ष्मीरोड.

### " अर्था "चा पुढील अंक

दिवाळीच्या सुट्टीनिमित्त " अर्था "चा ता. १८ नोव्हेंबरचा अंक बंद राहील आणि त्या पुढचा अंक ता. २५ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल.

## विविध माहिती

### मुंबई म्युनिसिपालिटीचें उत्पन्न व खर्च

मुंबई शहर म्युनिसिपालिटीस १९३७–३८ मध्यें ३, १८, २१,००० रुपये उत्पन्न होऊन ३,३०,९९,००० रुपये खर्च येईल. वर्षाच्या सुरवातीची शिलक १८,०८,००० रुपये असेल, ती वर्षअखेर ५,३०,००० रुपये राहील. वरील आकडे येत्या सालच्या अंदाजपत्रकांतील आहेत.

### रस्त्यांवरून होणाऱ्या वहातुकीची खानेसुमारी

रस्त्यांवरून मालाची वहातुक किती होते, ह्याचा अंदाज बांधण्याकरितां मुंबई--आग्रा रस्त्यावर ठाणें गांवाशेजारी जी. आय. पी. रेल्वेचे अधिकारी ता. १५ ते २२ नोव्हेंबर अखेर येणाऱ्या जाणाऱ्या मालाची नोंदणी करणार आहेत. पुण्याशेजारी अशाच तऱ्हेचे आकडे गेल्या महिन्यांत गोळा करण्यांत आले होते. रेल्वे व मोटारगाड्या ह्यांमधील स्पर्धेचें स्वरूप स्पष्ट व्हावें एवढ्यासाठीच हा सर्व खटाटोप आहे.

### बँकांस सुट्टी

शुक्रवार ता. १३ व शनिवार ता. १४ रोजीं दिवाळीनिमित्त बँका बंद रहातील.

### राष्ट्रसंघाची वर्गणी

राष्ट्रसंघास हिंदुस्थाननें द्यावयाची वर्गणी सुमारें ११ टक्के कमी करण्यांत आली आहे. ग्रेटब्रिटन, रशिया व फ्रान्स ह्यांच्या हिश्श्यांत थोडी वाढ झाली आहे.

### विमानाचा १८ तासांत २ हजार मैल प्रवास

इंपीरिअल एअरवेजच्या टपालाची ने-आण करणाऱ्या विमानानें इंग्लंड ते इटली आणि परत हा दोन हजार मैलांचा प्रवास १८ तासांत केला.

### ट्रेझरी बिलांचा द. द. १० आणे व्याजाचा दर

गेल्या आठवड्यांत तीन महिने मुदतीच्या सरकारी ट्रेझरी बिलांस, दोन कोटि रुपयांच्या रोख्यांस, ३ कोटि ९८ हजार रुपयांची मागणी आली. विकलेल्या २ कोटींच्या बिलांवर दरसाल दर शेकडा १० आणे इतका व्याजाचा दर बसला.

### मि. रूझवेल्ट पुनः अध्यक्ष झाले

मि० रूझवेल्ट ह्यांची अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून प्रचंड बहुमतानें फेरनिवडणूक झाली.

### दिल्ली दरबार आणि व्यापाऱ्यांची तयारी

बादशहांच्या राज्यारोहणाचा दरबार पुढील सालअखेर दिल्ली येथें भरण्याचें जाहीर झाल्याबरोबर, व्यापारी, धंदेवाले व दुकानदार ह्यांनीं त्या आनंदोत्सवाचा फायदा घेण्याची तयारी एव्हांपासूनच चालू केली असून कलकत्ता व मुंबई येथील कांहीं मंडळ्यांनीं आपल्या शाखा हिंदुस्थानच्या राजधानींत काढल्या आहेत.

### चित्रपटाचे धंद्यांतील लोकांसाठी शैक्षणिक सफर

" मोशन पिक्चर सोसायटी ऑफ इंडिया "नें युरोप खंडाची तीन महिन्यांची सफर करण्याची योजना आंखली असून चित्रपटांचे धंद्यामधील लोकांस तिचा उपयोग होईल अशी अपेक्षा आहे. येत्या मे महिन्यांत सफरीस सुरवात होईल.

### बादशहांच्या राजवाड्यांत सिनेमाची सोय

आठवे एडवर्ड बादशहा हे सिनेमाचे अत्यंत शोकी आहेत. आपल्या बकिंगहॅम राजवाड्यामध्यें त्यांनीं फिल्म्स दाखविण्याची यंत्रसामुग्री बसविली आहे. राजेसाहेबांना जी फिल्म पहावयाची असेल, ती तिच्या कंपनीकडून आणवली जाते. मेजवानीनंतर पाहुण्यांना सिनेमा दाखविण्याची राजवाड्यांत आतां सोय झाली आहे.

### ब्रिटिश बिस्किटें महागलीं

ग्रेटब्रिटनमधून हिंदुस्थानांत आयात होणाऱ्या बिस्किटांचे भाव शेंकडा दहानें वाढले आहेत.

### सरकीच्या वहातुकीस सवलतीचा दर

सरकीच्या वहातुकीचा दर जी. आय. पी. रेल्वेनें १५ ते २० टक्के कमी केला आहे. मुंबईस पाठविण्यांत येणाऱ्या मालासच ही सवलत मिळेल.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. ३१ ऑक्टोबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ५१,६५,२१७ |
| ता. ७ नोव्हेंबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ९९,०९,३२२ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते ७ नोव्हेंबर १९३६ अखेर | २,८६,८६,८७,९१० |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५५२ | ५ जगांतल्या आर्थिक व सामाजिक घडामोडी | ५५७ |
| २ जर्मन राष्ट्राचा आर्थिक स्वयंपूर्ततेचा प्रयत्न | ५५३ | ६ कॅमेन्यानें नेम धरा... | ५५८ |
| ३ हिंदी विम्याचा धंदा | ५५४ | ७ सहकार व ग्रामोद्धार ... | ५५८ |
| ४ स्फुट विचार ... | ५५५ | ८ जागतिक उत्पादनांत वाढ ... ... ... | ५५९ |
| सरकारी खुलासा हवा–म. गांधींचा उपदेश–डॉ. मेट्-काफहि तेंच सांगतात—कृषिसंशोधनाची मध्यवर्ती संस्था— हिंदुस्थानासाठी परदेशी मालाची खरेदी–आगबोटींच्या वहातुकीचा धंदा—नवीन आय. सी. एस. ची भरती. | | ९ हिंदी फेडरल कोर्टाची स्थापना ... ... | ५६० |
| | | १० प्रांतिक तनख्याची तरतूद ... ... | ५६० |
| | | ११ राज्यारोहणाची तयारी | ५६० |
| | | १२ निवडक बाजारभाव | ५६१ |



# अर्थ

बुधवार, ता. ११ नोव्हेंबर, १९३६


## जर्मन राष्ट्राचा आर्थिक स्वयंपूर्ततेचा प्रयत्न

### हिंदुस्थाननें काय बोध घ्यावा ?

बाहेरून कच्चा व खाण्याचा माल आणला असतां त्याच्या मोबदल्यांत आपला पक्का माल परकीय राष्ट्रें घेत नाहींत आणि आयातीबद्दल मालाच्या ऐवजीं सोनें, चांदी वगैरे देण्यास आपणांजवळ नाहीं; शिवाय, इतर राष्ट्रांप्रमाणें स्वतःच्या मालकीच्या वसाहती आपल्या ताब्यांत नाहींत, ह्या कारणानें शक्य तोंवर जरूरीचे जिन्नस स्वदेशांतच बनवून आर्थिक. बाबतींत स्वयंपूर्ण व स्वयंसिद्ध व्हावयाचें असें धोरण जर्मनीनें आंखून त्याची जाहीर घोषणाहि केली आहे. परदेशी मालाची गरज होतां होईल तों स्वदेशी मालानेंच भागवावयाची आणि अडेल तेथेंच फक्त बाहेरून माल घ्यावयाचा, म्हणजे ह्या परदेशी मालाबद्दलचें देणें जर्मनीच्या निर्गत व्यापारावर काढण्यांत येणाऱ्या हुंड्यांमार्फत देतां येईल, ही सद्रहु धोरणाची व्यवस्था आहे. परदेशांकडून मिळावयाच्या येण्यापेक्षां त्यांस द्यावयाचें देणेंच आंतरराष्ट्रीय व्यापारांत अधिक निघूं लागलें असतां जर्मनीपाशीं ह्या तफावतीची भरपाई करण्याचें साधन नाहीं, आणि त्यामुळें असल्या व्यवहारांत जर्मन हुंडणावळ व चलन-व्यवस्था ह्यांमध्यें गोंधळ उडून गेल्यावांचून रहाणार नाहीं. फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका ह्यांचे दरम्यान हुंडणावळीबाबत विशिष्ट नवी व्यवस्था झाली आहे आणि तिच्याशीं इतर राष्ट्रांनीं आपली स्वतःची हुंडणावळ जुळती करून घेतली आहे. परंतु जर्मन राष्ट्र ह्या व्यवस्थेच्या बाहेर राहिलें असून स्वतःच्या चलनाच्या रक्षणार्थ स्वतंत्रपणानें योजना आखीत आहे. चार वर्षांच्या अवधींत जर्मन राष्ट्र परदेशी मालाच्या आयातीचे संबंधांत सर्वस्वी स्वावलंबी करून सोडावयाचें, असा चंग जर्मन पुढाऱ्यांनीं बांधला असून त्या कामीं सर्वतोपरी सहाय देण्याची विनंति ते जर्मन जनतेस करीत आहेत. राष्ट्राभिमानाच्या व राष्ट्ररक्षणाच्या भूमिकेवर हा स्वयंसिद्धतेचा प्रश्न उभा करण्यांत आला आहे आणि त्यासाठी हरतऱ्हेचे शिकस्तीचे प्रयत्न चालू आहेत.

नुसत्या खाण्याच्या पदार्थांचा विचार केला तरी त्यांच्या वापरामध्यें काटकसर झाली व सध्या त्यांत चाललेली नासधूस बंद झाली तर कोट्यवधि रुपयांची बचत होऊन त्या रकमेइतक्या मालाची परदेशांतून होणारी आयात मर्यादित होईल, ह्या मुद्यावर जर्मनींतल्या स्वयंपूर्ततेच्या चळवळींत विशेष जोर दिला जात आहे. खानावळी, विश्रांति-गृहें, कुटुंबें ह्यांमध्यें निष्काळजीपणामुळें खाण्यापिण्याच्या किती तरी मालाची उधळमाधळ होत असते. जिनसांची साठवण, त्यांची निगा, त्यांचा प्रत्यक्ष उपयोग, ह्या अनेकविध व्यवस्थेंत काटकरीस जागा आहे आणि ती काटकसर होण्यासाठी सर्व जनतेनें झटलें पाहिजे असा जर्मन पुढाऱ्यांचा आग्रह आहे. जर्मन जनतेच्या पोषणास लागणाऱ्या पदार्थांच्या एकूण पुरवठ्यापैकी ६५ टक्के इतकाच माल १९२७ सालीं खुद्द जर्मनींत उत्पन्न झाला होता. तेव्हांपासून स्वयंपूर्ततेची प्रवृत्ति हळू हळू बळावत गेल्यानें अलीकडे हें तद्देशीय उत्पादनाचें प्रमाण ८० टक्क्यांच्यावर चढलें आहे. बाकीचे राहिलेले २० टक्केहि जर्मनींत उत्पन्न करणें शक्य दिसत नाहीं. तेव्हां हा खड्डा कसा भरून काढावा हा प्रश्न उपस्थित होऊन राष्ट्रीय काटकसरीचा उपाय सुचवण्यांत आला आहे. प्रतिवर्षी सुमारें १५० कोटि रुपये किंमतीच्या खाण्यापिण्याच्या जिनसांची नासधूस जर्मनींत होते असा अंदाज आहे. ह्यापैकी निम्म्या नासधुसीची अव्यवस्था खाणावळी व कौटुंबिक स्वयंपाकघरें ह्यांमध्यें चालते असा हिशेब करण्यांत आला आहे. खाण्यापिण्याच्या पदार्थांची जर्मनींत होणारी वार्षिक आयात सुमारें १३० कोटि रुपयांची आहे. कितीहि काटकसर जर्मन जनतेनें केली तरी ही सबंद आयात बंद होणें अशक्य आहे. तथापि, लोकांनीं एकूण दुरुपयोगाचा तिसरा हिस्सा जरी थांबवला तरी ५० कोटि रुपयांच्या परदेशी मालाच्या आयातीची बचत होऊन जर्मन व्यापार व हुंडणावळ ह्यांस मदत होईल असें प्रस्तुत काटकसरीच्या योजनेच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें आहे. ह्या रीतीनें आयातींत मोकळी झालेली जागा जर्मन राष्ट्रास महत्त्वाच्या धंद्यांसाठीं अत्यंत जरूर असलेल्या कच्चा मालानें भरून काढतां येईल, हा त्यांचा मुख्य मुद्दा आहे.

हिंदुस्थानांतील खेडेगांवी व इतर हातधंदे ह्यांचें संरक्षण करण्यासाठी आपल्या रोजच्या व्यवहारांतील जिनसांचे बाबतींत जनतेनें विशिष्ट प्रकारच्या स्वदेशी मालास उत्तेजन द्यावें ह्या संबंधांत प्रयत्न चालू आहेत, त्यांचा वर वर्णिलेल्या जर्मन धोरणाच्या दृष्टीनें विचार करतां येणें शक्य आहे. हिंदी शेतकरी व कारागीर ह्या वर्गांत बेकारी पसरली आहे, तिला आळा घालण्यासाठी लोकांनीं विशिष्ट प्रकारचा माल वापरावा अशा तऱ्हेची स्वदेशीची व ग्रामोद्योग संघाची चळवळ चालू आहे, तिच्या मुळाशींहि हिंदी राष्ट्राची बिघडलेली आर्थिक घडी नीट बसावी, हाच हेतु आहे. स्वदेशी माल वापरून स्वकीय बांधवांस काम मिळवून देण्यांत होणारा स्वार्थत्याग अंतीं राष्ट्रहिताचा असून त्यापासून देशाच्या आर्थिक पुनरुज्जीवनास सहाय होणार आहे. ग्रामसंघटनाचा बोलबाला आज ह्या देशांत सर्वत्र चालू आहे, त्या संबंधांत खाण्यापिण्याच्या व वापरावयाच्या जिनसांचा योग्य उपयोग जनतेनें केला व त्याकरितां आपल्या रोजच्या व्यवहारांत, जेवणांत व पोषाखांत जरूर तो फेरफार केला, तर

कितीं सहाय होण्यासारखें आहे ह्याचाहि विचार होणें जरूर आहे. व्यापारी, औद्योगिक व कौटुंबिक व्यवहार ह्यांचेमध्यें काळजीनें व काटकसरीनें वागण्यास हिंदुस्थानांत वाव नाहीं, असें कोण म्हणेल? जर्मनींतल्या नात्सी पक्षाचें राजकीय व आर्थिक धोरण चुकीचें असेल, परंतु आंतरराष्ट्रीय व्यापार व राष्ट्रीय उद्योगधंदे ह्यांचें भवितव्य ह्यांवर त्याचे योगानें बोधप्रद प्रकाश पडतो. मोठमोठीं पुढारलेलीं राष्ट्रें स्वयंपूर्ण होण्याचा पद्धतशीर प्रयत्न करू लागलीं असतां इतरांस आपलें आर्थिक धोरण त्यांचा नीट विचार करून स्वतःच्या संरक्षणाच्या दृष्टीनें आखणें आवश्यक झालेंच पाहिजे.

---

## हिंदी विम्याचा धंदा

हिंदुस्थानांत चालणाऱ्या विम्याच्या कामासंबंधाचा सरकारी ॲक्चुअरीचा १९३४ अखेरचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून ह्या धंद्यासंबंधीं उपयुक्त माहिती मिळते. १९१२ व १९२८ सालांच्या विम्यासंबंधाच्या कायद्याचे अंमलाखालीं हिंदुस्थानांत एकूण ३६६ कंपन्या अहवालाचे वर्षी व्यवहार करीत होत्या, त्यांपैकीं २१७ हिंदुस्थानांत नोंदलेल्या असून १४९ कंपन्यांची नोंद इतर देशांत झालेली होती. हिंदी विमा कंपन्यांची कार्यपरत्वें होणारी विभागणी खालील कोष्टकावरून लक्षांत येईल:—

**हिंदुस्थानांत व्यवहार करणाऱ्या विमा कंपन्या**

| वर्ष | एकूण | हिंदुस्थानांत उभारलेल्या | ह्यांपैकीं फक्त आयुर्विम्याचें काम करणाऱ्या | आयुर्विमे व इतर विमे उतरणाऱ्या | फक्त इतर विमे उतरणाऱ्या |
|---|---|---|---|---|---|
| १९३२ | ३१९ | १६९ | १२४ | २९ | १६ |
| १९३३ | ३४१ | १९४ | १४५ | ३४ | १५ |
| १९३४ | ३६६ | २१७ | १६५ | ३६ | १६ |

वरील २१७ हिंदी कंपन्यांची प्रांतवार वांटणी खालीलप्रमाणें आहे:—

| | | | |
|---|---|---|---|
| मुंबई : | ६१ | सिंध : | १४ |
| बंगाल : | ४१ | दिल्ली : | १० |
| मद्रास : | ३७ | संयुक्त प्रांत : | १० |
| पंजाब : | २९ | इतर प्रांत : | १५ |

**परदेशी कंपन्या**

परदेशांत नोंदलेल्या परंतु हिंदुस्थानांत काम मिळविणाऱ्या १४९ कंपन्यांपैकीं १२५ कंपन्या आयुष्याव्यतिरिक्त इतर प्रकारच्या विम्यांचें काम करतात. परदेशी कंपन्यांची नोंदणीप्रमाणें वर्गवारी खालीं केली आहे:—

| | | | |
|---|---|---|---|
| ग्रेटब्रिटन : | ६९ | अमेरिका : | १६ |
| साम्राज्यांतील इतर देश : | २० | जपान : | ९ |
| युरोपांतील देश : | २० | जाव्हा : | ५ |

**नव्या हिंदी कंपन्या**

अहवालाचे सालीं आयुर्विम्याचें काम करणाऱ्या २६ नव्या हिंदी कंपन्यांची स्थापना झाली. त्यांपैकीं ५ मुंबई इलाख्यांत, ७ पंजाबमध्यें व ६ मद्रास इलाख्यांत आहेत. मागील पांच वर्षांत १०० नव्या कंपन्या निघाल्या आणि पुरेसें काम न मिळाल्यामुळें गेल्या चार-दोन वर्षांत १३ कंपन्यांस गाशा गुंडाळावा लागला.

**नवीन कामाचे आंकडे**

नवीन व्यवहाराच्या वांटणीचे आंकडे पुढें दिले आहेत, त्यांवरून गेल्या तीन वर्षांतील आयुर्विम्याचे कामासंबंधीं तुलनात्मक माहिती मिळेल.

ह्या आकड्यांवरून असें दिसून येईल, कीं हिंदी विमेदारांची संख्या वाढत असली तरी पॉलिसींची सरासरीची किंमत हळूहळू कमी होत आहे. परदेशी विमा कंपन्यांस हिंदी कंपन्यांची स्पर्धा जाणवलेली दिसत नाहीं. मध्यम व कनिष्ठ आर्थिक स्थितींतल्या लोकांमध्यें हिंदी मंडळयांच्या कामाचा प्रसार होत असून त्याचा फायदा सामान्य जनतेस वाढत्या प्रमाणांत मिळत आहे, असें अनुमान खालील तुलनात्मक आंकड्यांवरून निघतें, तें समाधानकारक आहे.

| | पॉलिसींची संख्या | विम्याची रकम (कोटि रु.) | हप्त्यांचें उत्पन्न (कोटि रु.) | प्रत्येक पॉलिसीची सरासरी किंमत रु. |
|---|---|---|---|---|
| **१९३२** | | | | |
| हिंदी कंपन्या | १,१३,००० | १९·०६ | १ | १,६७४ |
| परदेशी कंपन्या | २६,००० | ८·६ | ·५ | ३,३७६ |
| एकूण | १,३९,००० | २७·६६ | १ ५ | ........ |
| **१९३३** | | | | |
| हिंदी कंपन्या | १,५५,००० | २४·०० | १·२५ | १,५५५ |
| परदेशी कंपन्या | २८,००० | ९·०० | ·५० | ३,१२६ |
| एकूण | १,८३,००० | ३३·०० | १·७५ | ........ |
| **१९३४** | | | | |
| हिंदी कंपन्या | १,८३,००० | २८·०० | १·५० | १,५२८ |
| परदेशी कंपन्या | ३२,००० | १०·०० | ·५० | ३,२१३ |
| एकूण | २,१५,००० | ३८·०० | २·००. | ........ |

चालू कामाविषयींचे आंकडे पुढें दिले आहेत:—

**चालू काम**

| | | पॉलिसींची संख्या | विम्याची रकम ( कोटि रु. ) | वार्षिक उत्पन्न ( कोटि रु.) |
|---|---|---|---|---|
| १९३२ | हिंदी | ५·५४ लक्ष | १०२ | ४.७५ |
| | परदेशी | २·२० „ | ७६ | ४·२५ |
| १९३३ | हिंदी | ६·३६ „ | ११४ | ५·३३ |
| | परदेशी | २·३१ „ | ७९ | ४·२७ |
| १९३४ | हिंदी | ७·४२ „ | १·३२ | ६·०० |
| | परदेशी | २·४५ „ | ८३ | ४·५० |

**हिंदी कंपन्यांचा इतर देशांत प्रवेश**

कांहीं हिंदी विमा कंपन्यांनीं ब्रिटिश ईस्ट आफ्रिका, सिलोन, स्ट्रेटस सेटलमेंट्स, इत्यादि हिंदुस्थानाबाहेरील देशांत काम मिळविण्यास सुरवात केली आहे. अहवालाचे सालीं हिंदुस्थानाबाहेर ९४ लाखांचें काम त्यांस मिळालें. १९३४ अखेर ५ कोटींचें काम तेथें चालू होतें.

---

## स्फुट विचार

### सरकारी खुलासा हवा

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर ऑस्बोर्न स्मिथ, ह्यांचा हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेम्स ग्रिग, ह्यांच्याशीं महत्त्वाच्या प्रश्नांबाबत मतभेद होऊन त्यांस राजीनामा देणें भाग पडलें अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे. जागतिक चलन-परिस्थितींत बदल झाला आहे, तिला अनुसरून हिंदी हुंडणावळीच्या दराचा फेरविचार होणें आवश्यक आहे असें सर ऑस्बोर्न ह्यांचें मत असून ते फडनवीसांस मान्य नसल्यानें हा प्रसंग ओढवला असल्याचीहि मखलाशी त्या बातमीवर करण्यांत आली आहे. रिझर्व्ह बँक स्थापन होऊन अजून उणींपुरीं दोन वर्षेंहि झालेलीं नाहींत आणि तिच्या कारभाराची घडी अजून बसावयाची आहे, अशा स्थितींत सर ऑस्बोर्नसारख्या अनुभवी, लायक व कर्तृत्ववान कर्णधारास त्या संस्थेस रामराम ठोकावा लागला ही गोष्ट कोणासहि खेदकारक व निराशाजनक वाटल्याशिवाय राहणार नाहीं. हुंडणावळीच्या प्रश्नावर मतभेद होऊन त्यांस राजीनामा द्यावा लागला ह्या प्रसिद्ध झालेल्या बातमींत कितीसें तथ्य आहे ह्या विषयींचा अधिकृत खुलासा सरकारनें तात्काळ करावयास हवा होता. चलन, हुंडणावळ व व्यापार ह्यांचे संबंधांत मध्यवर्ती बँकेचें अपेक्षित कार्य व्यवस्थित होण्याची जबाबदारी मुख्यत्वेंकरून तिच्या गव्हर्नरावर असल्यानें त्याच्या मतास मान न देतां सरकारनें सर जेम्स ग्रिग ह्यांचा अभिप्राय अधिक विश्वसनीय मानला असेल तर त्याबद्दलचें स्पष्टीकरण होणें अगत्याचें आहे. हा प्रश्न राष्ट्रीय महत्त्वाचा व आर्थिक जिव्हाळ्याचा आहे. आम्हीं जें कांहीं करतों तें नेहमीं योग्यच असतें, त्यांत लोकांस काय सांगावयाचें आहे ? असली वृत्ति सरकारनें प्रस्तुत प्रकरणीं धारण करून चालणार नाहीं. फडनवीसांच्या आग्रही स्वभावाची ओळख जनतेस अगोदरच झालेली असल्यानें सदरहु प्रश्नावर स्पष्ट प्रकाश पडणें ज्यास्तच अगत्याचें झालें आहे.

---

### महात्मा गांधींचा उपदेश—खेडेगांवांत ज्ञानप्रसार

हिंदी जनतेंत अज्ञानाचा गाढ अंधार पसरला आहे तो दूर करून त्याच्या जागीं ज्ञानाचा प्रसार करण्याविषयींच्या सुशिक्षित वर्गाच्या जबाबदारीचा उल्लेख महात्मा गांधींनीं अहमदाबाद येथील आपल्या भाषणांत नुकताच केला. गुजराथ विद्यापीठानें लोकजागृतीचें कार्य केलें आहे त्याचा निर्देश करून लेखकांनीं खेडेगांवांत रहाणाऱ्या बहुजन समाजास समजेल अशा सोप्या व साध्या भाषेंत त्यांच्या उन्नतीस सहायक असें वाङ्मय निर्माण करण्याबाबत महात्माजींनीं उपदेश केला. देशास स्वराज्यप्राप्ति व्हावयाची असेल तर ती बहुसंख्य लोकांच्या प्रगतीनें व खेडेगांवांच्या पुनर्घटनेनेंच होईल हा महात्माजींचा सिद्धांत आतां सर्वमान्य झाला आहे, असें म्हटलें तरी चालेल. ह्या कामीं जे सर्वांगीण व संघटित यत्न व्हावयास पाहिजेत त्यांस सर्व वर्गांनीं व विशेषतः सुशिक्षित लोकांनीं मनःपूर्वक सहाय करणें अगत्याचें आहे हें सांगावयास नको. महात्माजींचें सर्व लक्ष आज खेडेगांवांकडे लागलें असून ग्रामोद्धारापलीकडे दुसरें कांहीं त्यांना दिसत व सुचत नाहीं असें म्हणून वर निर्दिष्ट केलेल्या त्यांच्या एकमार्गी भासणाऱ्या सूचनेकडे लेखकांनीं व साहित्यिकांनीं कानाडोळा करून चालावयाचें नाहीं. विद्यापीठांनीं, सुशिक्षित लोकांनीं व संशोधकांनीं, उच्च दर्जाचें वाङ्मय, तत्त्वज्ञान, कला इत्यादि विषयांचा योग्य परामर्श घेणें उचित आहे आणि ह्या क्षेत्रांत त्यांनीं आपली विशिष्ट कामगिरी बजावलीच पाहिजे. परंतु मूठभर सुशिक्षित लोक साहित्यचर्चेंत गुंग होऊन राहिले आणि विद्यापीठांच्या कार्याचें लोण सामान्य जनता व खेडेगांवें ह्यांचेपर्यंत येऊन पोहोंचलें नाहीं तर ही मंडळी व ह्या संस्कृति-संस्था यांचा राष्ट्राच्या अभ्युदयास खरा उपयोग झाला असें म्हणतां येणार नाहीं. देशाचें पुढारीपण सुशिक्षितांच्याकडे स्वाभाविक रीतीनेंच येतें पण लोकशाहीच्या काळांत निरक्षरांमध्यें ज्ञानप्रसार करण्याची जबाबदारीहि त्याचबरोबर येते, हें विसरून चालणार नाहीं. राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रश्नांची माहिती सुसाध्य होईल, अशा रीतीनें सर्व वर्गांमध्यें पसरवण्याचें कर्तव्य लेखकांनीं केलें पाहिजे, हा महात्माजींचा उपदेश "अर्था"च्या ध्येयास व कार्यक्रमास उपकारक असल्याकारणानें त्याचें आम्हांस विशेष महत्त्व वाटतें.

---

### डॉ. मेट्काफहि तेंच सांगतात

म्हैसूर विद्यापीठाचे व्हाइस चॅन्सेलर, डॉ. मेट्काफ, ह्यांनीं गेल्या महिन्याच्या अखेरीस पदवीदान समारंभाचे प्रसंगीं भाषण केलें, त्यांत उच्च शिक्षणाच्या प्रसाराचे योगानें संस्थानांतील निरक्षरता कमी झाली आहे काय ह्याविषयाचा त्यांनीं समाचार घेतला आणि तसें करतांना महात्मा गांधींच्या उपदेशाचाच अनुवाद केला असें म्हटलें तरी चालेल. जनतेच्या अज्ञानाचा डोंगर सर करण्यांत आजवर फारसें यश आलेलें नाहीं, हें त्यांनीं म्हैसूर संस्थानांतील शिक्षणप्रसाराचे आंकडे घेऊन सिद्ध केलें. संस्थानांतील शहरी व खेडेगांवी लोकसंख्या हिशेबांत धरली तर १९१२ ते १९३२ ह्या वीस वर्षांच्या अवधींत पांच वर्षांच्या वरील इसमांमधली निरक्षरता शेकडा ९३ वरून फक्त ८९·४ पर्यंतच खाली आली. म्हणजे, उच्च शिक्षणाच्या प्रगतीच्या मानानें साक्षरतेचा प्रसार मुंगीच्या पावलानें होत आहे असें यावरून दिसून येतें. प्रचलित पद्धतीपेक्षां अन्य उपाय योजल्यावांचून निरक्षरतेचा नाश होणार नाहीं, हें उघड असल्यानें स्वस्त व सोप्या वाङ्मयाचा प्रसार करण्याचा तोडगा त्यांनीं सुचविला आहे. सध्या ह्या प्रकारचें लिखाण सामान्य जनतेस उपलब्ध होत नाहीं. तरी, सुगम भाषेंत लिहिलेलीं व सुविचारप्रवर्तक अशीं वृत्तपत्रें जनतेमध्यें जरूर दिसल्यास फुकटहि वांटावीं, असें डॉ. मेट्काफ ह्यांचें म्हणणें आहे. पुष्कळ पैसा खर्चून शिकलेल्या मंडळीस कामावर ठेवण्याचें सामर्थ्य सामान्य लोकांत नसतें हें सुशिक्षितांच्या बेकारीचें एक कारण आहे असें मत त्यांनीं व्यक्त केलें, तेंहि विचार करण्यासारखें आहे. आर्थिक व्यवहारांची कार्यक्षमता व किफायतशीरपणा सुशिक्षितांस काम दिल्यानें वाढेल तर त्यांची बेकारी नाहींशी होऊन वैयक्तिक व सामाजिक संपत्तीहि वाढेल. आपल्या पगाराप्रीत्यर्थ होणारा खर्च मालकाच्या धंद्यांतून निघून त्यास नफा उरतो ही गोष्ट सुशिक्षितांनीं आपल्या लायकीनें व कामानें सिद्ध केली पाहिजे आणि मालकांनींहि दोघांस सारखीच हितकर होणारी ही व्यवस्था अमलांत आणून पहाणें आवश्यक आहे. महात्मा गांधींच्यासारखे, खेडेगांवांत अहर्निश जनतेच्या कल्याणासाठी झिजणारे नेते आणि डॉ. मेट्काफ ह्यांच्यासारखे, शिक्षण तज्ज्ञ, ह्यांचें देशी भाषांतल्या सुलभ वाङ्मयाच्या महत्त्वाबाबत एकमत झालें आहे हा योगायोग खरोखर उत्तेजनकारक आहे. आपल्या परिस्थितीचें ज्ञान सोप्या भाषेंत जनतेस करून देण्याच्या प्रयत्नास समंजस व सुशिक्षित वर्गाचें सहाय उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणांत मिळेल अशी आम्हांस आशा आहे.

---

### कृषिसंशोधनाची दिल्ली येथील मध्यवर्ती संस्था

शेतीच्या संबंधाचे शास्त्रीय शोध करण्याची संस्था बहार प्रांतांत पूसा येथें होती. धरणीकंपानें ह्या संस्थेच्या इमारतीस इजा झाल्याकारणानें तिचें स्थलांतर दिल्लीस करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आणि तेथील नवीन इमारतीस लागणाऱ्या पैशाची तरतूदहि केली. दिल्ली येथील संशोधन संस्थेच्या इमारतीचा पाया १९३५ च्या फेब्रुआरी महिन्यांत लॉर्ड वुइलिंग्डन ह्यांचे हस्तें बसवण्यांत आला आणि तिचें उद्घाटन सध्याचे व्हाइसरॉय, लॉर्ड लिनलिथगो, ह्यांनीं गेल्या आठवड्यांत केलें. शेतीच्या सुधारणेस व प्रगतीस शास्त्रीय संशोधनाचें महत्त्व किती आहे ह्याचें विवेचन करून प्रांतिक सरकारें व देशी संस्थानें ह्यांनीं दिल्ली येथील संस्थेंत चाललेल्या कामाचा फायदा घ्यावा असें त्यांनीं सुचवलें. पूसा येथून शेती संशोधनाची संस्था दिल्ली येथें हालवण्यास लोकमताचा बराच विरोध होता. दिल्लीचें हवापाणी व भोंवतालची नैसर्गिक परिस्थिति संशोधनास व प्रत्यक्ष प्रयोगास विशेष अनुकूल आहे ह्या मुद्यावर त्यांनीं स्थलांतराचें समर्थन केलें. संस्थेच्या कार्याचा विस्तार वाढवून तें अखिल देशास ज्यास्त उपयुक्त करण्याचा सरकारचा विचार असल्याचें व्हाइसरॉय ह्यांनीं सांगितलें.

### हिंदुस्थानासाठीं परदेशांतील मालाची खरेदी

हिंदुस्थानांतील मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांस परदेशांतून दरसाल कित्येक कोटि रुपयांचा माल मागवावा लागतो. ह्या खरेदीवर देखरेख करण्याचें काम इंडियन स्टोअर्स डिपार्टमेंटकडे असून त्याबाबतची लंडनमधील व्यवस्था हाय कमिशनर पहातो. सर फिरोझखान नून हे सध्या ह्या जागेवर आहेत. लंडनमधील ह्या खात्याचें काम दिवसानुदिवस वाढत आहे. १९३५-३६ सालीं ग्रेटब्रिटनमध्यें हिंदुस्थानातर्फे ३,५४३ टेंडरांची मागणी करण्यांत आली व माल पुरवण्याचीं व वहातुकीचीं एकूण ९,५३५ कंत्राटें देण्यांत आलीं. हें खातें चालविण्यास सुमारें १८ लक्ष रुपये खर्च आला. माल शक्य तितका स्वस्त व चांगला मिळावा, असें खात्याचें धोरण असतें व ग्रेटब्रिटनमधूनच माल घेतला जातो, असें नाहीं. तथापि, त्या देशामध्यें शेंकडा ९५½ इतक्या मालाची खरेदी अहवालाचे सालीं करण्यांत आली. १९३४-३५ मध्यें हें प्रमाण ९० इतकेंच होतें. जर्मनीकडून २½ लक्ष रुपयांचा माल घेतला, आणि स्वीडन व अमेरिका ह्यांच्या वांटणीस ६० हजारांचें काम आलें. ग्रेटब्रिटनमधील कारखान्यांतून उमेदवार म्हणून रहाण्यास तयार असलेल्या १७५ हिंदी अर्जदारांपैकीं १६० अर्जदारांची ह्या खात्यानें सोय लावली. बीट-साखरेचें उत्पादन आणि फळें व भाज्या टिकविण्याचा धंदा ह्याविषयींच्या उमेदवारीस विशेष मागणी होती.

### आगबोटींच्या वहातुकीचा धंदा: सरकारी सहायाची आवश्यकता

शिंद्या स्टीम नॅव्हिगेशन कंपनीच्या इमारतीच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ गेल्या आठवड्यांत मुंबई येथें श्री. मुळजीभाई देसाई ह्यांचे हस्तें पार पडला. त्यावेळीं कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. वालचंद हिराचंद, ह्यांनीं आगबोटींच्या वहातुकीच्या धंद्याची कहाणी व हिंदुस्थान सरकार ह्या हिंदी धंद्याची कशी आबाळ करीत आहे ह्याची माहिती सांगितली. हिंदुस्थानाच्या किनाऱ्यावरील वहातुकीचा अल्पांशच फक्त शिंद्या कंपनीच्या वांटणीस येतो, बाकी सर्व धंदा ब्रिटिश कंपन्यांचे हातीं आहे; भाड्याचे दराबाबतच्या जाचक स्पर्धेस शिंद्या कंपनीनें मोठ्या धीरानें तोंड दिलें आहे, आंतरराष्ट्रीय वहातुकीचा धंदा सर्वस्वी परकीयांचे हातीं आहे; ब्रिटिश कंपन्यांस त्यांचें स्वतःचें व हिंदी सरकार हीं सवलती देतात व आपलीं कामें त्यांचेकडे सोंपवितात, परंतु हिंदी कंपनीच्या गाऱ्हाण्यांकडे सरकार दुर्लक्ष करतें; हिंदुस्थान ते युरोप उतारूंच्या वहातुकीचा धंदा हातीं घेण्यासाठीं एक नवी हिंदी कंपनी प्रयत्न करीत आहे, त्यास सरकारनें सहाय करणें जरूर आहे, इत्यादि मुद्दे श्री. वालचंद ह्यांनीं आपल्या भाषणांत पुढें मांडले.

### १९३६-३७ मधील आय्. सी. एस्.ची भरती

गेल्या ऑगस्टमध्यें लंडन येथें घेण्यांत आलेल्या आय्. सी. एस.च्या परीक्षेंत १९ हिंदू, १ शीख व १ ख्रिस्ती असे २१ हिंदी उमेदवार पास झाले. येत्या जानेवारीमध्यें दिल्ली व रंगून येथें होणाऱ्या परीक्षेस बसणारांतून ५ हिंदी उमेदवार आय्. सी. एस्. मध्यें घेण्यांत येतील. त्यांतील २ जागा ब्रह्मी लोकांसाठीं असल्यानें फक्त ३ च जागा हिंदी उमेदवारांना मोकळ्या आहेत. ८ जागांवर मुसलमानांची नेमणूक करण्यांत येईल व अशा रीतीनें अल्पसंख्याकांची भरती केली जाईल. दिल्ली येथील परीक्षेंत जेवढे मुसलमान उमेदवार यशस्वी होतील, तेवढ्या जागा ह्या आठांतून कमी करण्यांत येतील.

### रेल्वे चौकशी कमिटीवर आणखी एक विलायती तज्ज्ञ

सर राल्फ एल. वेजवुड ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नेमण्यांत आलेल्या रेल्वे चौकशी कमिटीवर साउथ आफ्रिकन रेल्वेजचे चीफ ट्रॅफिक मॅनेजर, मि. ई. च. चीडल, ह्यांची नेमणूक करण्यांत आली आहे, यावरून एकाद्या हिंदी गृहस्थास अद्यापहि घेतलें जाणें अशक्य नाहीं, अशी आशा उत्पन्न झाली आहे!

### विमा कंपन्यांकडून दोन लाख रुपयांचें डिपॉझिट

हिंदी विमा कंपन्यांकडून कामास सुरवात करण्यापूर्वी ह्यापुढें दोन लक्ष रुपयांचे डिपॉझिट घेण्यांत यावें, अशी विम्याचे कायद्यांत दुरुस्ती सुचविणाऱ्या कमिटीची शिफारस आहे. भरमसाटपणें स्थापन होत असलेल्या कंपन्यांच्या प्रसारास आळा बसावा, ह्या हेतूनें वरील अट घालण्यांत यावयाची आहे.

### बडोदें संस्थानांतील विमा कंपन्यांची असोसिएशन

बडोदें संस्थानामध्यें आयुष्याच्या विम्याचें काम मिळविणाऱ्या कंपन्यांची 'बरोडा सेंट्रल लाइफ ॲशुअरन्स कंपनीज असोसिएशन' ह्या नांवानें बडोदा येथें एक संस्था स्थापन करण्यांत आली आहे. संस्थानाबाहेर नोंदलेल्या कंपन्यांसहि असोसिएशनचे सभासद होतां येईल.

### विम्याचे कायद्यांत दुरुस्ती

विम्याचे कायद्यामधील दुरुस्तीचें बिल असेंब्लीच्या दिल्ली येथील येत्या बैठकींत मांडण्यांत येईल व १९३७ च्या सिमला येथील बैठकींत तें पास होऊन त्याचें कायद्यांत रूपांतर होईल, अशी अपेक्षा आहे.

## जगांतल्या आर्थिक व सामाजिक घडामोडी

( ४ )

### रशियांतील पंचविधा क्रांति

रशियांतला क्रांतीचा प्रयोग प्रचंड प्रमाणावरचा आहे आणि तो बोल्शेव्हिकांनीं अपूर्व निश्चयानें, उत्साहानें व विश्वासानें चालविला आहे, ह्यांत शंका नाहीं. ही क्रांति पांच भिन्नभिन्न क्षेत्रांमध्यें घडवून आणण्यांत येत आहे. ( १ ) भौतिक प्रगतिमूलक, ( २ ) आर्थिक, ( ३ ) राजकीय, (४) धार्मिक व (५) कौटुंबिक अशीं रशियन क्रांतीचीं पांच स्वरूपें कल्पितां येतील. भौतिक शास्त्रांतले शोध आणि यांत्रिक कलेंतली प्रगति ह्यांचा सर्वत्र उपयोग करून रशियांत चोहोंकडे आधुनिक युग चालू करण्यांत आलें आहे. शिक्षण, आरोग्य, रुग्णशुश्रूषा, उद्योगधंदे ह्यांसंबंधांत जुन्या रशियाचा नवा रशिया बनवला जात आहे, आणि ह्या अनेक बाबतींत इंग्लंड, अमेरिका इत्यादि आधुनिक सुधारणेंत पुढारलेल्या राष्ट्रांचें अनुकरण होत आहे. जनतेस ज्यास्तींत ज्यास्त भौतिक सुखसोयी अनुभवावयास मिळाव्या, हा येथें मुख्य हेतु आहे. ज्या सुधारणा अमलांत येण्यास अन्यत्र अनेक पिढ्या लोटाव्या लागल्या, त्या बोल्शेव्हिकांनीं रशियामध्यें थोड्या वर्षांच्या अवधींत आत्मसात् करण्याचा चंग बांधला आहे.

स्वार्थप्रेरित माणसांनीं दुसऱ्याच्या श्रमाचा उपयोग करून त्यावर स्वतःचें पोट भरावें आणि मालाचा विनिमय करून त्यांतून नफा काढावा, ह्या प्रकारची आर्थिक व्यवस्था जगांत चालत आली आहे व चालली आहे, ती श्रमजीवी लोकांवर जुलूम करणारी आहे, ह्या समजुतीनें रशियांत तिचें उच्चाटन करण्यांत आलें आहे. कोणी कोणाचा मालक किंवा चाकर नाहीं, कोणी कोणास व्याज, खंड, भाडें, फायदा, देण्याचें कारण नाहीं; सर्वच कामकरी आहेत व असले पाहिजेत आणि त्यांनीं आपल्या मेहनतीचीं फळें समतेनें विभागून घेतलीं पाहिजेत, ही विचारसरणी रशियांतल्या आर्थिक क्रांतीच्या मुळाशी आहे. जगाच्या चिरपरिचयाची पद्धति टाकून देऊन आपल्या नवतत्त्वानुसार अगदीं अभिनव आर्थिक घटना प्रस्थापित करण्यांत बोल्शेव्हिकांनीं विलक्षण धारिष्ट केलें असून ह्या क्रांतीमुळें उद्भवणारे अडचणीचे प्रश्न सोडविण्यांत त्यांचें बुद्धिसर्वस्व खर्चलें जात आहे.

बोल्शेव्हिक लोक जडवादी व नास्तिक आहेत आणि ही त्यांची वृत्ति भौतिक शास्त्रांवरील त्यांच्या आत्यंतिक श्रद्धेस धरून आहे. इतर देशांत ज्या प्रकारचे संघटित धर्म आहेत त्या तऱ्हेच्या धर्मास रशियन समाजांत स्थान नाहीं. संस्कृतीमध्यें आर्थिक व शैक्षणिक दृष्टीनें स्वतंत्र कुटुंबास जें निश्चित स्थान इतरत्र आहे तें बोल्शेव्हिकांस मान्य नाहीं आणि स्त्रिया व मुलें ह्यांचेसंबंधांतलीं कुटुंबाचीं कर्तव्यें समाजाकडे सोंपविण्यांत आलीं आहेत. ह्या कारणानें स्त्रियांचा माता व गृहिणी ह्या नात्याचा दर्जा सर्वस्वी बदलला आहे. घटस्फोट सोपा झाला आहे, परंतु विवाहबंधन टाकून देणाऱ्या आईबापांवर मुलें पोसण्याची जबाबदारी सारखीच लादली आहे.

धार्मिक व कौटुंबिक बाबतींत व्यक्तित्व व भावना ह्यांच्या खेळास विशेष वाव असल्याकारणानें त्या क्षेत्रांमध्यें पुराणश्रद्धेचा चिवटपणा दुरतिक्रम होऊन रशियन क्रांतीचें पाऊल फारसें पुढें पडलेलें नाहीं आणि बोल्शेव्हिक पुढाऱ्यांस त्या विषयींच्या आपल्या धोरणास मुरड घालावी लागली आहे. समाजकारणांत स्त्रिया म्हणण्यासारखा भाग घेत नाहींत आणि मुलांचें संगोपन समाजाकडे न जातां त्यांच्यावरच बहुतेक पडतें. राजकीय घटनेंतली क्रांति मात्र पूर्णपणानें झाली आहे. रशियांत प्रातिनिधिक स्वरूपाचीं कायदेमंडळें व कार्यकारी मंडळें नाहींत आणि सामान्य नागरिकांनीं स्वतंत्रतेनें व्यक्त केलेल्या मताप्रमाणें राज्यकारभार चालत नाहीं. रशियन राज्यघटनेचा आत्मा बोल्शेव्हिकांचा समाज कुटुंबवादी पक्ष किंवा गट हा आहे आणि त्या पक्षांतल्या लोकांचें मत सर्व बाबतींत निर्णायक गणलें जातें. जर्मनी व इटली ह्या फॅसिस्टशासित देशांत असेच सत्ताधाऱ्यांचे कट्टर गट आहेत.

विशिष्ट विचारांच्या लोकांचा सर्वसत्ताधारी गट व त्याचा एकमेवाद्वितीय पुढारी ह्यांस जर्मनी व इटलीप्रमाणें रशियांतहि अग्रपूजेचा मान आहे. बोल्शेव्हिकांच्या पक्षांत वाटेल त्यास शिरतां येत नाहीं. वरून येणारे हुकूम शिरसावंद्य मानणें आणि अनन्य-साधारण पुढारीपणांत स्पर्धा होऊं न देणें ह्या गोष्टींवर विशेष कटाक्ष आहे. व्यक्ति-माहात्म्य, सर्वसत्ताधारित्व व व्यक्तिपूजा ह्यांचें रशियन घटनेंत जें वर्चस्व आहे, त्याचा परिणाम मानवी संस्कृतीवर व प्रगतीवर कसा होईल, हें आज सांगतां येत नाहीं. स्वतंत्र विचार, खुली चर्चा, बहुमत हीं दडपून गेल्यामुळें मनुष्यमात्राच्या नैसर्गिक गुणांचें व समाजाचें पुढें काय होईल ह्याचा तर्कहि करणें आज कठिण आहे.

समाजसत्तावादाचे किंवा समाजकुटुंबवादाचे जे सर्वश्रुत सिद्धांत आहेत, त्यांस सर्वस्वी धरून रशियांतले आर्थिक व्यवहार चाललेले नाहींत, हें येथें लक्ष्यांत ठेवणें आवश्यक आहे. ह्या वादाच्या सिद्धांतांस अनुसरून आणि त्याच्या प्रणेत्यांच्या शिकवणीप्रमाणें संपत्तीचें उत्पादन, विनिमय व विभागणी रशियांत समाजाच्या म्हणजे सरकारच्या हातांत सर्वस्वी असावयास हवी होती पण प्रत्यक्ष वस्तुस्थिति तशी नाहीं. उद्योगधंदे व व्यापार ह्यांची तेथें एकहाती व एकसूत्री मालकी नसून काम व नोकरी देणाऱ्या हजारो, लाखो निरनिराळ्या व्यवस्था आहेत. कांहीं उद्योग सरकार चालवतें व कांहीं स्थानिक संस्थांच्या कक्षेंत आहेत. ह्याहिपेक्षां महत्त्वाच्या उत्पादकांच्या संस्था सहकारी स्वरूपाच्या आहेत. ह्याशिवाय स्वतंत्रपणें धंदा करणारे लाखो कारागीर, शेतकरी व कोळी आहेत आणि कित्येक लोक सहकारी संस्थांमध्यें मजुरीनेंहि कामें करतात. ही व्यवस्था कट्टर समाजकुटुंबवादाला अगदीं सोडून आहे, पण ती चालू दिल्यावांचून गत्यंतर नसल्यानें तिच्या बाबतींत तत्त्वापेक्षां व्यवहाराकडेच लक्ष्य देणें बोल्शेव्हिक पुढाऱ्यांस प्राप्त झालें आहे.

---

### कॅमेऱ्यानें नेम धरा, बंदुकीनें नको

म्हैसूर संस्थानांतील जंगलामधील संपत्ती टिकविण्याचें महत्त्व दर्शविणारें एक पत्रक संस्थानच्या जंगलखात्यानें प्रसिद्ध केलें आहे. रानांतील श्वापदांपासून प्राणहानि अगर नुकसान होण्याचा संभव असेल, त्यावेळीं शिकारीस सरकार उत्तेजन देतें; परंतु इतर वेळीं श्वापदें व पक्षी मारूं नयेत, विशेषतः पक्ष्यांचा शेतीस बराच उपयोग होतो, असें सदरहु पत्रकांत म्हटलें आहे. निशाणबाजीचें सर्वांत सुधारलेलें साधन-कॅमेरा-उपयोगांत आणून जंगलांतील संपत्तीचें रक्षण करण्याविषयीं त्यांत सुचविलें आहे.

# सहकार व ग्रामोद्धार

## अखिल भारतीय सहकारी दिन

पुणें जिल्हा को ऑपरेटिव्ह इंस्टिट्यूटच्या विद्यमानें अखिल भारतीय सहकारी दिन गेल्या शनिवारीं श्री. बापूसाहेब गुते ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यांत आला. पुण्यांतील अनेक सहकारी कार्यकर्ते त्यावेळीं उपस्थित होते. प्रो. काळे, असि. र. श्री. नाईक, रि. ऑ. श्री. गोखले, इंस्टिट्यूटचे सेक्रेटरी श्री. देवभानकर व श्री. धोंडूमामा साठे ह्यांचीं भाषणें झालीं. अखिल भारतीय संघाकडून आलेला सहकारी दिनाबाबतचा ठराव मंजूर झाला आणि चहापान होऊन समारंभ समाप्त झाला.

## पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि., पुणें

वरील बँकेकडे ऑक्टोबर महिन्यांत १९,८०० रु. कर्जमागणीचे २० अर्ज आले. ऑक्टोबर अखेर बँकेनें ३२ अर्जदारांस ४४,१४८ रु. कर्ज वाटलें आहे.

## सातारा नामदेव को. बँक लि., सातारा

ह्या बँकेची वार्षिक साधारण सभा ता. २९-१०-३६ रोजीं होऊन श्री. रामकृष्ण नामदेव बागडे हे अध्यक्ष व श्री. बाळकृष्ण सावळाराम बारटक्के, बी. ए., एलएल. बी., हे मॅनेजिंग डायरेक्टर निवडून आले. इतर मामुली कामेंहि झालीं.

## कराड व पाटण ता. को. सुपरवायझिंग यूनियन लि., कराड

वरील यूनियनची वार्षिक साधारण सभा ता. १-११-३६ रोजीं भरली होती. अध्यक्ष, श्री. के. व्ही. विचारे, डायरेक्टर, मुंबई प्रॉ. को. बँक, ह्यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर, अहवाल, ताळेबंद, अंदाजपत्रक, इत्यादींस मंजुरी देण्यांत आली व उरल को. क्रे. सोसायटी यूनियनला सामील करून घेण्यांत आली. नवीन वर्षाकरितां श्री. शंकरराव जयसिंगराव मोहिते हे अध्यक्ष व श्री. बाबूराव बाळा पाटील, टेंभू हे उपाध्यक्ष निवडले गेले.

## बार्शी ता. को. सुपरवायझिंग यूनियन लि.

बार्शी ता. को. सु. यूनियनला एकूण ३५ सोसायट्या सामील असून, चालू सालीं यूनियन व बँक यांचे सहाय्यानें पांच नवीन सोसायट्या स्थापन करण्यांत आल्या. सर्व सोसायट्यांत एकूण मेंबर २,९८० असून में. ठेव रु. ५९,९५८, नॉन मेंबर ठेव रु. ३३,५५६, बँक कर्ज रु.६८,०००, शेअर भांडवल रु. २३,७४२ व सो. चा रिझर्व फंड रु. १,५१,६५१ असून खेळतें भांडवल रु. ३,६९,५७७ आहे. सोसायट्यांची वर्गवारी पुढीलप्रमाणें आहे. अ २, ब २७, क ५, ड १. चालू सालीं सवलतीचा फायदा ३१ सोसायट्यांनीं घेतला आहे. अहवालाचे सालांत सवलतीचे रूपानें मेंबरांना रु. २१,००० ची व्याजांत सूट देणेंत आली.

तालुक्यामधील सोसायट्यांनीं ग्रामसुधारणाकार्यांत पुष्कळ मदत केली. श्री. रंगराव देशमुख, पांगरी व श्री. जनार्दनपंत कुलकर्णी, आंबे जवळगे, यांनीं या कार्यांत बहुत मेहनत घेतली आहे. त्यांनीं पंचायती स्थापणें, रस्ते दुरुस्त करणें इ. कामें केलीं.

ह्या तालुक्यामधील बराच भाग सुपीक असल्यानें व सहकारी चळवळीचें बीजारोपण कै. भाऊसाहेब साने यांच्यासारख्या तज्ज्ञ सहकारी कार्यकर्त्यानें केलें असल्यानें पुष्कळ म्हणजे २० सोसायट्या स्थानिक भांडवलावर चालत आहेत. याचें सर्व श्रेय कै. भाऊसाहेब साने यांनाच देणें योग्य आहे.

## मालेगांव तालुका सहकारी वृत्त

मालेगांव तालुक्यांतील सर्व सेक्रेटरींची सभा भरून एक संघ व डिबेटिंग क्लब स्थापन करण्याचें ठरलें व सुपरवायझर, श्री. क्षीरसागर, ह्यांनीं ह्या नव्या संस्थेचें उद्घाटन केलें. श्री. एस. पी. सोनावणे हे ऑनररी सेक्रेटरी म्हणून काम पहाणार आहेत.

वरील तालुका को. सुपरवायझिंग यूनियनच्या विद्यमानें यूनियनच्या कचेरींत तारीख ७-११-१९३६ रोजीं श्री. लोटन ताथू पाटील, यूनियनचे अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली मोठ्या समारंभानें सहकारी दिन साजरा करण्यांत आला. सदर प्रसंगी श्री. हिरे वकील, व्हाइस प्रेसिडेंट व खाकुर्डी येथील शाळेचे हेडमास्तर, तसेच यूनियनचे सुपरवायझर श्री. क्षीरसागर यांचीं समयोचित भाषणें झालीं. मालेगांव तालुक्यांतील सर्व सहकारी संस्थांस यूनियननें सहकारी दिन साजरा करण्याबाबत विनंती केली होती त्याप्रमाणें बहुतेक सहकारी संस्थांनीं हा दिवस साजरा केला.

## शेती संशोधन-संस्थेचा व्याप

वरील संस्थेचें दिल्ली येथें स्थलांतर झालें असून तिच्या ताब्यांत ८०० एकर जमीन आहे. ह्या क्षेत्रापैकीं २० एकर इमारतींनीं व्यापले आहेत आणि त्यांमध्यें भिन्नभिन्न शास्त्रीय शाखांसाठीं स्वतंत्र प्रयोगशाला आहेत. वसतिगृहांत २४ विद्यार्थ्यांच्या रहाण्याची सोय आहे. ग्रंथालयांत ७०,००० पुस्तकें आहेत. शेतीच्या जनावरांकरितां सोयीच्या इमारती आहेत. संस्थेच्या मुख्य शेताचें क्षेत्र ४७५ एकरांचें आहे आणि त्यांत प्रयोगात्मक व इतर पिकें लावण्यांत आलीं आहेत.

## राष्ट्रधर्म सरस्वती मठ संस्थेची वार्षिक सभा

वरील संस्थेच्या वर्गणीदारांची व देणगीदारांची सर्वसाधारण सभा ता. १-११-३६ रोजीं मुंबई येथें भरली होती. सभेस ३०।४० मंडळी हजर होती. संस्थेचा १९३४।३५ सालचा अहवाल संस्थेनें मंजूर केल्यानंतर संस्थेचे उपाध्यक्ष रा. गोपूजकर यांनीं उपसंहारादाखल भाषण केलें. ' ग्रामोद्धाराचा अफाट प्रश्न अल्पांशीं तरी संस्थेस सोडवावयाचा झाल्यास संस्थेस २००० रु.च्या तुटपुंजा निधीपेक्षां किती तरी पटीनें अधिक निधि पाहिजे व तो जमवावयाचा असल्यास अनेक रीतींनीं संस्थेच्या वर्गणीदारांनीं व विशेषतः स्त्रियांनीं बरेंचसें कार्य करण्यासारखें आहे. प्रत्यक्ष कार्य जेथें चाललें आहे तेथें ठणठणीत कार्यकर्ता पाहिजे व त्याचप्रमाणें संस्थेच्या मुख्य कचेरींतील कार्य अबाधित चालावयाचें असल्यास कारभाराचीं सूत्रें हाकण्यास दररोज कार्य करण्यास समर्थ, विनामूल्य काम करणारा असा कार्यकर्ता पाहिजे. ' अशा आशयाचें भाषण झाल्यानंतर दादरचे रा. शंकरराव गोखले यांचें गायन होऊन कार्यक्रम खलास झाला.

**विद्यार्थी**

खास विद्यार्थ्यांच्या हितास वाहिलेलें " विद्यार्थी " हें साप्ताहिक ता. १४-११-३६ रोजीं प्रसिद्ध होणार. वा. वर्गणी रु. २॥ ट. ख. सह.

पत्ताः—३५१ अ, सदाशिव पेठ, पुणें, नं. २.

## NOTICE TO CONTRACTORS.

Percentage rate tenders in B–1 Form are invited for one or both of the undermentioned works, particulars in respect of which are furnished below. Tenders for each work should be submitted separately :—

| S. No. | Name of work | Estimated cost of work Rupees | Date of completion | Earnest money Rupees | Cost of tender Forms Rupees |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | Constructing a Bridge across Sonvi River in Mile 21 of Hatkhamba Poladpur Road. | 171,361 | 31-5-39 | 2500/- | 10/- |
| 2 | Constructing a Bridge across Shastri River in Mile 23 of Hatkhamba Poladpur Road. | 156,351 | 31-5-39 | 2000/- | 10/- |

2. Tender Forms and conditions of contract may be obtained from the office of the Undersigned upto 5 P. M. on 30–11–1936, on payment of fees given in column 6 above. Drawings may be seen in the office of the Undersigned, during office hours on week days except public holidays and blue print copies obtained if necessary on payment of fees at Rs. 0–4–0 per sq. foot, applications for which will be entertained upto 25–11–1936 only.

3. Tenders, sealed and superscribed with the name of work, will be received by the Undersigned upto 2 P. M. on 10–12–1936 and opened on the same day.

4. Earnest money as shown above should be paid into any Government Treasury and the Chalans therefor enclosed with each tender. This will be forfeited to Government by successful tenderers who fail to complete the contract documents. Unsuccessful tenderers will have their earnest money returned.

5. The Superintending Engineer, Southern Circle, reserves the right to reject any or all the tenders, and also to give one only or both the works to one contractor, without assigning any reason.

6. Tenderers who tender for both works should state whether they are capable of undertaking both works at the same time. Those tenderers who can undertake both works at the same time and who can quote lower on account of that should show in their covering letters what percentage reduction they can make on each tender in the event of both works being given to them.

7. Tenderers will have to submit with their tender or tenders a solvency certificate to show that they are thoroughly able to finance the work or works they tender for.

8. Intending contractors should inspect the sites and make themselves thoroughly acquainted with the local conditions, materials, etc. before submission of their tenders.

Ratnagiri, 7–11–1936.

B. P. JAGTAP
Executive Engineer,
Ratnagiri Dn.

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
माहितिपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २

### जागतिक उत्पादनांत वाढ

व्यापारांत येणाऱ्या मालाचे दोन वर्ग आहेत. सामान्य जनता रोजच्या गरजा भागवण्यासाठीं साखर, कापड, धान्य इत्यादि पदार्थ उपयोगांत आणते, त्यांचा एक वर्ग बनतो आणि कारखान्यांत यंत्रसामुग्रीसारख्या संपत्तीच्या उत्पादनाचें साधन म्हणून वापरला जाणारा माल दुसऱ्या वर्गांत पडतो. १९३२ ते १९३५ अवधींत जगांमध्यें दुसऱ्या प्रकारच्या मालाची पैदास ७० टक्क्यांनीं वाढली, पण पहिल्या वर्गांतल्या मालाची उत्पत्ति फक्त ४२ टक्केच अधिक झाली. उत्पादन वाढत आहे त्या प्रमाणांत मात्र बेकारी कमी झालेली नाहीं, ह्याचें कारण उत्पादनपद्धतीची वाढती कार्यक्षमता हें आहे. जेथें औद्योगिक चलती झाली आहे, तेथें मजुरी म्हणून दिलेल्या रकमेंत वाढ झाली आहे. मजुरी वाढली तरी जरूरीच्या जिनसांच्या किंमती कित्येक ठिकाणीं चढल्यानें त्याचा फायदा कामकऱ्यांस मिळालेला नाहीं.

### ग्वाल्हेर संस्थानचा जमाखर्च

ग्वाल्हेर संस्थानचें मामुली उत्पन्न सुमारें २¼ कोटि रुपये आहे. त्यांतल्या प्रमुख बाबी, जमीन महसूल ८४ लक्ष, रोखे व कर्जाऊ रकमांवरील व्याज ४२ लक्ष व जकाती ३४ लक्ष ह्या आहेत. खर्चाच्या बाजूस, लष्कर ४३ लक्ष, पोलिस २१ लक्ष, रस्ते व इमारती १७ लक्ष, ह्या मुख्य बाबी आहेत.

### क्वेट्टा शहराच्या पुनर्रचनेस प्रारंभ होणार

धरणीकंपामुळें उध्वस्त झालेल्या क्वेट्टा शहराच्या पुनर्रचनेचें काम येत्या उन्हाळ्याचे प्रारंभीं हातीं घेण्यांत येईल व त्याप्रीत्यर्थ सुमारें २० हजार मजूर परठिकाणांहून क्वेट्टयास जातील अशी अपेक्षा आहे.

## हिंदी फेडरल कोर्टाची स्थापना

हिंदुस्थानच्या नव्या राज्यघटनेची अंमलबजावणी भागशः होऊं लागली आहे. प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकी नजीक येऊन ठेपल्या आहेत व येत्या एप्रिलपासून प्रांतिक स्वायत्ततेस प्रारंभ होणार आहे. १ आक्टोबर, १९३७ रोजीं फेडरल कोर्टाचें काम सुरू होईल असें जाहीर झालें आहे. ह्या 'ऑर्डर इन् कौन्सिल' हुकुमास पार्लमेंटची मामुली संमति घ्यावी लागेल. फेडरशन-मध्यें सामील असलेल्या घटकांचें फेडरल कोर्ट हें वरिष्ठ कोर्ट आहे. ५० हजारांपेक्षा ज्यास्त रकमेबद्दल वांधा असलेलीं प्रकरणेंच फक्त फेडरल कोर्टापुढें नेतां येतील. सर न्यायाधीशाखेरीज आणखी ज्यास्तींत ज्यास्त सहा न्यायाधीश ह्या कोर्टावर नेमण्यांत येतील. मुख्य न्यायाधिशास दरमहा ७ हजार रुपये व व इतर न्यायाधिशांस ५ हजार रुपये वेतन मिळेल. दहा वर्षांपेक्षा ज्यास्त वर्षें कोणत्याहि ब्रिटिश अगर फेडरेशनला सामील होणाऱ्या संस्थानी हायकोर्टांत वकिली केली असणाराची फेडरल कोर्टाचा न्यायाधीश म्हणून नेमणूक होण्यास प्रत्यवाय नाहीं.

## प्रांतिक तनख्याची तरतूद

प्रांतांच्या गव्हर्नरांस खालीलप्रमाणें वार्षिक तनख्यांची 'ऑर्डर इन् कौन्सिल'नें तरतूद करण्यांत आली आहे. मुंबई, मद्रास व बंगाल ह्या इलाखाधिपतींच्या संबंधींचे आंकडे येथें दिले आहेतः—

| | मुंबई (रु.) | मद्रास (रु.) | बंगाल (रु.) |
|---|---|---|---|
| रहाण्याच्या जागांची दुरुस्ती | २३,००० | १४,००० | २०,५०० |
| खासगी | २५,००० | १८,००० | २५,००० |
| मिलिटरी सेक्रेटरी व त्याची कचेरी | १,३६,००० | १,१२,००० | १,२१,००० |
| बँड | ४२,००० | ४३,००० | ५०,००० |
| बॉडीगार्ड | ७८,००० | १,२६,००० | १,००,००० |
| सर्जन ( डॉक्टर ) | ३३,६०० | ३६,००० | ३४,८०० |
| फिरती | ६५,००० | १,१३,००० | १,२२,००० |
| मोटारगाड्या, इ. | १,०८,००० | ९२,००० | १,००,००० |
| फर्निचर, इ. | २५,००० | २१,५०० | ३४,००० |

वरील रकमा गव्हर्नरांस मूळ कायद्यान्वयें मिळावयाच्या असून कायदेमंडळाच्या मंजुरीचा प्रश्नच त्यांचे बाबतींत उद्भवूं नये, अशासाठी ही खास तजवीज आहे.

## बादशहांच्या राज्यारोहणाची तयारी : घोड्यांस तालीम

हिंदुस्थानांतील राज्यारोहण समारंभामधील मिरवणुकींत व्हाइसरॉय यांनीं उपयोगांत आणावयाच्या घोड्याची तालीम चालू झाली आहे. उंट, हत्ती, इत्यादींची संवय व्हावी म्हणून त्यास लंडनमधील प्राणिसंग्रहालयामध्यें त्यांच्या सान्निध्यांत फिरवण्यांत येत आहे. बादशहांच्या घोड्यांपुढें लष्करी बँड वाजवून व चित्रविचित्र कपड्यांची त्यांस संवय करवून ते बुजणार नाहींत, अशी व्यवस्था केली जात आहे. रस्त्यांवरील गर्दी हटविण्याचें काम अश्वारूढ लंडनमधील पोलिसांना करावें लागेल व तसें करतांना मार्गे सरतेवेळीं लोकांस घोड्यांच्या लाथा बसूं नयेत, ह्यासाठी पोलिसांच्या घोड्यांसहि शिक्षण देण्यास सुरवात झाली आहे.


# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

This year 1934-35

Exceeds

2 CRORES & 50 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches:* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Offices:* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

# S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

**पाहिजे :** पुणें सेवासदन सोसायटीचे पुणें येथील स्त्रियांचे ट्रेनिंग कॉलेजकरितां लेडी सुपरिंटेंडेंट पाहिजे आहे. करितां मराठी मातृभाषा असलेल्या व बी. ए. बी. टी. पास असलेल्या लायक व अनुभवी स्त्री–उमेदवारांना बी. टी. डिग्री मिळविण्याचें वर्ष, कामाचा अनुभव, वय व लायकी–पत्रांच्या नकला ह्यांसह अर्ज खालीं सही करणार यांचेकडे ता. १५।११।३६ पर्यंत पाठवावे. दरमहा वेतन मासिक पगार रु. ६० व जागेचा भत्ता रु. १० मिळून एकूण रु. ७० मिळेल. निवडलेल्या उमेदवारास आपल्या खर्चानें समक्ष भेटीस यावें लागेल. नेमणूक शक्यतोंवर ता. १ डिसेंबर १९३६ पासून होईल. विशेष माहिती समक्ष अगर पत्रद्वारें मिळेल.

गं. बा. गरुड, ऑ. जनरल सेक्रेटरी,
पुणें सेवासदन सोसायटी, पुणें.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—८ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—२ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | १२०—१० |
| ४% १९६०–७० ... ... | ११६—२ |
| ४% १९४३ ... ... ... | ११२—४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | १००—१३ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०८—२ |
| ३½% १९४८–५२ ... ... | १००—१२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११२—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | ११२—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षे मुदत) | ११२—४ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११३–१० |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२६—२ |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३५—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११४—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५–१४ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५८५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १४०–० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९९—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९१२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५५–१५ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २६०—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २६५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ६½% ) | १५८९—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६०७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २००–१० |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७३–१२ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | २०७—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ८३६—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळयास | ३५–५½ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येकें १०० तोळयास | ५२—५ |


# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२

अधिकृत भांडवल : : : १०,००,०००

विक्रीस काढलेलें भांडवल: ५,००,०००

खपलेलें भांडवल : २,०५,६००

रोख भरलेलें भांडवल : १,०२,१६०

## दर शेअरची किं. : रु. ५०

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंडया, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम. व्ही. गोखले,
मॅनेजर.



# धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

## नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्यआहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी
टेलरिंग फर्म
**पाटसकर आणि कंपनी**
४८ निहाल पेठ, पुणें शहर.
मॅनेजर:-व्ही.पी. पाटसकर, D.M.T.C.A. (London.)
सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व
तयार कपड्यांचे व्यापारी
आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

**दी ट्रस्ट ऑफ इंडिया ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड**
मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पो. बॉ. नं. ४६, पुणें नं. २

चेअरमन : दि. ब. के. आर. गोडबोले,
बी. ए., एम्. सी. ई., सी. बी. ई.,
एम्. आय. ई., (इंडिया)
दौंड-बारामती व पाचोरा-जामनेर रेल्वे कं. चे भागीदार
— विशिष्ट अंगें —
१. या कंपनीच्या घटनेप्रमाणें विमेदारांना कंपनीच्या नफ्यापैकीं शेंकडा ९६ नफा बोनसच्या स्वरूपांत परत करण्यांत येतो विमेदारांना स्वतःतर्फेचे डायरेक्टर्स निवडून देतां येतात.
२. "ट्रस्ट ऑफ इंडिया"च्या प्रत्येक विमेदारास त्याच्या पॉलिसीरकमेंतून शस्त्रक्रिया किंवा रुग्णालयाच्या खर्चासाठीं कंपनीकडून मदत मिळण्याची सवलत दिली जाते. विमेदार पंगू किंवा चरितार्थाचें साधन मिळविण्यास असमर्थ झाल्यास त्याचे विमाहप्ते बंद होऊन त्याला त्याची विमारक्कम दहा वार्षिक हप्त्यांनीं दिली जाते. याशिवाय, सोडकिंमत, हप्तेबंद विमा, रद्द पॉलिसी चालू करण्याविषयीं सवलती, पॉलिसी-तारणावरील कर्ज, घरें विकत घेण्याच्या योजना, वार्षिक हप्त्यावर अडीच टक्के सूट इ० सर्व सवलतींचा अंतर्भाव "ट्रस्ट ऑफ इंडिया" कंपनीनें केला आहे.

**संजीवन हेअर टॉनिक**
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**दि डॉन ऑफ इंडिया**
लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें.
पुणें व सोलापूर येथें
बिल्डिंग इन्व्हेस्टमेंट आणि बँकिंग डिपार्टमेंटची
कंपनीचे बँकर्सनीं पसंत केलेली
ता. १ आक्टोबरपासून सुरू ] **नवीन योजना** [ ता. १ आक्टोबरपासून सुरू
मुदतीच्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची
☞ फायदेशीर अपूर्व सोय. ☜
बँकेच्या उतरत्या व्याजाच्या काळांत लोकांस आपले कौटुंबिक निर्वाहास साधन अगर मदत म्हणून ठेवीवर मासिक, नियमित व किफायतशीर व्याज देण्याची व्यवस्था तारीख १ आक्टोबर १९३६ पासून अमलांत आणली आहे.
गरजूंनीं जास्त माहिती मागवावी अगर समक्ष भेटावें.
पुणें, ता. २२-९-३६ | जनरल मॅनेजर.

**एशियन पॉलिसी**
म्हणजेच
**आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.**
महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत
**धी एशियन ॲशुरन्स कंपनी, लिमिटेड**
एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख २५ नोव्हेंबर, १९३६. अंक ४६

## दि डॉन ऑफ इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें.

**पुणें व सोलापूर येथें**

बिल्डिंग इन्व्हेस्टमेंट आणि बँकिंग डिपार्टमेंटची कंपनीचे बँकर्सनीं पसंत केलेली

ता. १ आक्टोबरपासून सुरू ] **नवीन योजना** [ ता. १ आक्टोबरपासून सुरू

मुदतीच्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची

**फायदेशीर अपूर्व सोय.**

बँकेच्या उतरत्या व्याजाच्या काळांत लोकांस आपले कौटुंबिक निर्वाहास साधन अगर मदत म्हणून ठेवीवर मासिक, नियमित व किफायतशीर व्याज देण्याची व्यवस्था तारीख १ आक्टोबर १९३६ पासून अमलांत आणली आहे.

गरजूंनीं जास्त माहिती मागवावी अगर समक्ष भेटावें.

पुणें, ता. २२-९-३६ | जनरल मॅनेजर.

## ओरायन (मॅग्नमस्)

उत्कृष्ट व्हर्जिनिया तंबाकूपासून बनविलेली ही सिगारेट

२॥ आण्याला १० चें पाकिट किंवा १२ आणे ५० चा डबा

सर्वत्र मिळते.

एकदां ओढल्यानंतर नेहमींच पसंत कराल.

बनविणार—

**DECCAN TOBACCO WORKS,**
POONA 4

Telegraphic Address:—'CIGARETTES', POONA.
*Apply for Agencies.*

## "व्हीट ब्लासम" म्हणजे गव्हाचे पोहे

ह्या सारखें सात्त्विक आणि कसदार खाद्य दुसरें नाहीं. पुड्याची किंमत [ मापी २ शेर ] ०८ आणे. नमुन्यासाठी पावणे दोन आण्याचीं तिकिटें पाठवावीं.

कारखानदार :—भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, ७५२ सदाशिव पेठ, पुणें.

स्टॉकिस्ट:—तांबे आरोग्य भुवन, मुंबई; श्री. लक्ष्मी ट्रेडिंग कंपनी, सांगली, बेळगांव, कोल्हापूर.

## POONA CIRCULATING LIBRARY

**Deccan Gymkhana, POONA 4**

Magazines & Books supplied in your own home. Over 100 different English, Marathi, Hindi, Bengali, Gujrati, French & German journals to choose from.

*For particulars see or write to :—*

D. P. ATHALYE,
*Proprietor.*

## दर ] गाद्यांचा कारखाना [ माफक

मशीनवर कापूस पिंजून सर्व तऱ्हेचें पिंजारी काम कोणत्याही पिंजाऱ्यापेक्षां उत्कृष्ट होतें. एक वेळ येऊन पहा. बाहेरगांवचें काम तावडतोब करून देऊं.

प्रो. श्री. रा. साठे


पत्ताः—उद्योग मंदिर घ. नं. १००३ सदाशिव पेठेचे हौदासमोर, पुणें २.

## S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः-ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः-

१ केळकर ब्रदर्स, बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी, लक्ष्मीरोड.

## विविध माहिती

### बी. बी. अँड सी. आय. रेल्वेचें उत्पन्न वाढलें

एप्रिल ते ऑक्टोबर अखेरच्या सात महिन्यांत गेल्या वर्षाच्या ह्याच मुदतीच्या मानानें वरील रेल्वेचें उत्पन्न २४ लक्ष रुपयांनीं वाढून तें ६ कोटि, २२ लक्ष रुपये इतकें झालें.

### हुंडणावळीबाबत अमेरिकन सरकारचें धोरण

डॉलरच्या सुवर्णपरिमाणांत विशिष्ट मर्यादेपर्यंत घट करण्याचा अधिकार अमेरिकन कायदेमंडळानें अध्यक्षांस दिला आहे, त्याची मुदत येत्या जानेवारीअखेर संपेल, तेव्हां तो अधिकार तसाच चालू ठेवण्याचा विचार असल्याचें सरकारीरीत्या प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. हुंडणावळ व बाजारभाव जरूरीप्रमाणें कमी-जास्त करण्याची सत्ता कांहीं झालें तरी अमेरिकन सरकार सोडून देण्यास तयार नाहीं हें वरील बातमीवरून स्पष्ट होत आहे.

### वायरमेनच्या परीक्षा

विजेच्या कॉंपीटन्स व वायरमेन्स सर्टिफिकेटच्या परीक्षा ता. २५ जानेवारी १९३७ रोजीं सुरू होतील. मुंबई, पुणें, अहमदाबाद व कराची ह्या ठिकाणीं परीक्षा घेतल्या जातील. अर्जाची अखेरची तारीख ५ जानेवारी ही आहे.

### हिंदी फेडरल कोर्टावरील नेमणुका

हिंदी फेडरल कोर्टावर तूर्त मुख्य न्यायाधीश व दोन इतर न्यायाधीश ह्यांचीच फक्त नेमणूक करण्यांत येईल. अद्याप कामाचा अंदाज आलेला नसल्याकारणानें जास्त न्यायाधीश नेमण्याची आवश्यकता नाहीं.

### एकाच नांवाचीं अनेक गांवें

एकाच नांवाचीं अनेक गांवें सर्व देशांत असतात. परंतु तीं विशेष प्रसिद्ध नसल्यास फारशी अडचण पडत नाहीं. तथापि, इतर देशांच्या राजधान्यांचीं नांवें धारण करणारीं खेडीं स्वतःच्या देशांत क्वचितच आढळतात. न्यू यॉर्क ह्या नांवाचीं इंग्लंडमध्यें तीन खेडीं आहेत, स्कॉटलंडमध्यें 'मॉस्को' आहे, यॉर्कशायर परगण्यांत 'रोम' आहे व आयर्लंडमध्यें 'पॅरिस' नांवाचें बेट आहे.

### गव्हर्नरांस आयात जकातीची माफी

आगामी हिंदी फेडरेशनमधील घटक-प्रांतांच्या गव्हर्नरांनीं स्वतःच्या अगर आपल्या कुटुंबीयांच्या खासगी उपयोगासाठी हिंदुस्थानाबाहेरून कांहीं वस्तू मागविल्यास त्यांवर जकात आकारली जाणार नाहीं.

### मोटारगाडीच्या बनावटीची व विक्रीची किंमत

मोटारगाडी बनवण्यास जेवढा खर्च लागतो तेवढाच किंवा त्याच्यापेक्षां जास्त खर्च ती विकण्यास येतो !

### लंडनमध्यें १०,००,००० वा टेलिफोन

टेलिफोनचा वापर ग्रेटब्रिटनमध्यें अत्यंत लोकप्रिय झाला आहे. सरकारी पोस्टखात्याकडेच तेथील सर्व टेलिफोन्सची व्यवस्था आहे आणि लोकसेवेच्या तत्त्वानें, म्हणजे नफेबाजी न करतां, तें खातें टेलिफोनच्या प्रसाराची खटपट करीत असतें. लंडन शहरांत दहा लाखावा टेलिफोन गेल्या महिन्यांत बसविण्यांत आला.

### ब्रिटिश साम्राज्याची वाढ

महायुद्धाच्या अखेर झालेल्या व्हर्सेईच्या तहाअन्वयें ग्रेट ब्रिटनच्या कक्षेंत १६ लक्ष चौरस मैलांचा मुलूख आणि ३½ कोटि त्यांतले रहिवासी ह्यांची भर पडली. १९१४ सालच्या मानानें आज मितीस ब्रिटिश साम्राज्यांत एशियाटिक व आफ्रिकन लोकांची मिळून संख्या ७ कोटींनीं वाढली आहे.

### पटकी-प्रतिबंधक लस पावणेचार लाख लोकांस टोंचली

चालू वर्षाच्या प्रारंभापासून ऑक्टोबर १७ पर्यंत मुंबई इलाख्यांत पटकी-प्रतिबंधक लस एकूण ३ लक्ष, ८६ हजार लोकांस टोंचण्यांत आली.

### कारखानदार टिकाऊ मोटारी कां बनवीत नाहींत ?

झिजलेले भाग पुरवण्याचा धंदा बुडेल अशी भीति मोटारींच्या कारखानदारांस वाटली नसती तर फारसा खर्च न वाढतां सध्यापेक्षां दुप्पट टिकाऊ अशा मोटारगाड्या ( मालाच्या गाड्या वगळून ) त्यांनीं बनवल्या असत्या, असें एका तज्ञाचें म्हणणें आहे.

### संधिवातावर मोहीम

संधिवातामुळें ग्रेटब्रिटनमध्यें प्रतिवर्षी त्या रोगाबद्दलच्या विम्याचे पैसे आणि त्यासंबंधांतला औषधोपचार यांवर सुमारें ३० कोटि रुपये खर्च होतात असा अंदाज आहे. ह्या रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मोहीम चालवण्याचें घाटत आहे.

### रशियामध्यें लोखंड-पोलादाचें उत्पादन वाढलें

लोखंड व पोलाद ह्यांच्या उत्पादनाचे बाबतींत युरोपमधील राष्ट्रांत रशियाचा दुसरा व जगांत तिसरा नंबर लागतो. युरोपमध्यें पहिला नंबर मिळविण्याचा रशियाचा प्रयत्न चालू आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये, किंमत |
|---|---|
| ता. २१ नोव्हेंबर रोजीं पुरा झालेला आठवडा. | ४३,३६,०५९ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते २१ नोव्हेंबर १९३६ अखेर | २,८७,९७,३९,०८१ |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ५६४ |
| २ जाहीर माहिती व फेरविचार आवश्यक आहे | ५६५ |
| ३ सहकारी पतपेढ्यांचा कारभार ... ... | ५६६ |
| ४ हुंडणावळीच्या दरांतील उताराची जंत्री ... | ५६६ |
| ५ स्फुट विचार ... | ५६७ |
| ब्रिटिश तज्ज्ञ आले—मंदी, हुंडणावळ व बाजारभाव—बाजारभावांचे आंकडे पहा—स्वदेशी साखर व जकातीचें उत्पन्न—पूना सर्क्युलेटिंग लायब्ररी—ग्राम-सुधारणा मंडळ, सोलापूर—इटलीनें ॲबिसिनिया कसा जिंकला ?—मुंबईच्या दंग्यांतील आरोपी | |
| ६ पुणें औद्योगिक प्रदर्शन | ५६९ |
| ७ पुणें शहर म्युनिसिपालिटीचें नवें कर्ज ... | ५६९ |
| ८ हिंदी रेलवेज ... ... | ५७० |
| ९ मानवी प्रयत्न आणि निसर्गाच्या योजना ... | ५७० |
| १० साखरेची आयात व जकातीचें उत्पन्न ... | ५७० |
| ११ सहकारी चळवळ ... | ५७१ |
| १२ विमा कायद्यांत दुरुस्ती | ५७२ |
| १३ निवडक बाजारभाव | ५७३ |

# अर्थ

बुधवार, ता. २५ नोव्हेंबर, १९३६

## जाहीर माहिती व फेरविचार आवश्यक आहे.

सर ऑस्बोर्न स्मिथ ह्यांनीं रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या गव्हर्नरच्या जागेचा राजीनामा दिल्यानें जनतेमध्यें साशंक कुतूहल उत्पन्न झालें असून त्याचें समाधान हिंदुस्थान सरकारनें तात्काल करावयास हवें होतें. ह्यासंबंधानें लोकांत अनेक तर्क पसरले आहेत. हुंडणावळीचा दर जागतिक आर्थिक परिस्थिति लक्षांत घेतां बदलणें जरूर आहे असें सर ऑस्बोर्न ह्यांचें मत होतें, पण हिंदुस्थान सरकारचे फडनवीस आणि मुख्य आर्थिक सल्लागार, सर जेम्स ग्रिग, ह्यांस त्यांचें म्हणणें पटलें नाहीं आणि ह्या मतभेदाच्या ओढाताणींत मध्यवर्ती बँकेच्या गव्हर्नरास आपली जागा सोडावी लागली असावी असा एक तर्क होता. दुसरी व मागाहून प्रसिद्ध झालेली कल्पना अशी आहे कीं, प्रस्तुत प्रकरणाचा संबंध हुंडणावळीच्या प्रश्नाशीं मुळींच नाहीं आणि सरकार व हिंदी राष्ट्र ह्यांचें सांपत्तिक धोरण रिझर्व्ह बँकेच्या व्यवहाराच्या धोरणाशीं ज्या बाबतींत घासतें त्यांविषयीं वरील दोन अधिकाऱ्यांचा तीव्र मतभेद झाला असावा व सरकारनें आपल्या खास सल्लागारास उचलून धरलें असावें. राष्ट्राचे सांपत्तिक व आर्थिक धोरणाचे प्रश्न इतके जिव्हाळ्याचे व नाजुक असतात कीं त्यांची चर्चा जाहीर रीतीनें होणें अनिष्ट समजलें जातें. असल्या चर्चेचा परिणाम राष्ट्राचा व्यापार व एकंदर आर्थिक परिस्थिति ह्यांवर प्रतिकूल होण्याची खात्रीलायक भीति असते. ह्या कारणानें, सर ऑस्बोर्न स्मिथ ह्यांच्याशीं आपला मतभेद कोणत्या विषयासंबंधानें झाला हें फडनवीसांनीं खुलासेवार जाहीर रीतीनें सांगावें असें म्हणणें कदाचित् अनुचित ठरेल. तथापि, ह्या प्रश्नास दुसरी आणि अधिक जोरकस बाजू आहे हें सरकारच्या लक्षांत यावयास पाहिजे होतें.

रिझर्व्ह बँकेच्या व्यवहारांत आर्थिक नाहींत अशा विचारांची घालमेल होऊं नये ह्याविषयीं स्वतः सरकारचा प्रथमपासूनच कटाक्ष होता; आणि ह्या दृष्टीनें बँकेच्या गव्हर्नरावर विशिष्ट ध्येय व कार्य ह्यांची जबाबदारी टाकण्यांत आलेली आहे. तो अधिकारी भागीदारांचा म्हणजे अप्रत्यक्ष रीतीनें हिंदी जनतेचा प्रतिनिधि आहे असें मानण्यांत येणें हें स्वाभाविक आहे. मध्यवर्ती बँकेचा व्यवहार आणि राज्यव्यवस्थेचें धोरण ह्यांचा मेळ सतत बसलेला असला पाहिजे हें निर्विवाद असलें तरी बँकेच्या गव्हर्नरास राजिनामा देण्याची पाळी यावी इतक्या थरास त्याचा व सरकारचा मतभेद जावा ही गोष्ट अनपेक्षित होती. हिंदी रिझर्व्ह बँक अजून प्रयोगावस्थेंत आहे असें म्हटल्यास त्यांत खात्रीनें अतिशयोक्ति होणार नाहीं. सर ऑस्बोर्न स्मिथ हे गृहस्थ आपल्या कामांत अत्यंत निष्णात अशी त्यांची ख्याति आणि रिझर्व्ह बँकेची गाडी चांगली मार्गास लावून देण्याची त्यांनीं जबाबदारी उचललेली, अशा स्थितींत त्यांस मतभेदामुळें स्थानत्याग करावा लागला हें 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' असेंच झालें, ही कल्पना लोकांत पसरली तर ती स्वाभाविक समजली पाहिजे. ह्या कारणानें जनतेच्या मनांतला गैरसमज दूर करण्यासाठी सरकारनें त्यांची खातरजमा करणें अगत्याचें होतें. एका गव्हर्नरानें राजिनामा दिला म्हणून दुसऱ्याची नेमणूक केली अशा क्षुल्लक स्वरूपाची ही गोष्ट नव्हे. सर ऑस्बोर्न ह्यांचें मत चुकीचें व अग्राह्य नसेल असें नाहीं. त्याचप्रमाणें सर जेम्स ग्रिग ह्यांचा अभिप्राय निर्दोष असलाच पाहिजे असेंहि म्हणतां यावयाचें नाहीं. दोघांसहि आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या पाहिजेत. पण दोघेहि शेवटीं हिंदी जनतेसच वास्तविक जबाबदार आहेत. तेव्हां, बँकेच्या गव्हर्नरांनीं राजिनामा दिला ह्याविषयीं खुलासा करण्याची जबाबदारी सरकारवर येते ती चुकत नाहीं. बँकेच्या प्रगतीच्या व स्वतः सरकारच्या दृष्टीनेंहि खुलासा तात्काळ होणें अगत्याचें असतां ह्या बाबतींत मुग्धता स्वीकारण्यांत आली आहे, ती सर्वस्वी असमर्थनीय आहे. इंग्लंडसारख्या देशांत ही गोष्ट शक्य झाली नसती. सर ऑस्बोर्न स्मिथ ह्यांनीं कोणताच खुलासा करावयाचें नाकारलें आहे, तें शिस्तीस धरून आहे. पण सर जेम्स ग्रिग ह्यांची गोष्ट निराळी असून लोकांमध्यें निरनिराळे तर्कवितर्क त्यांनीं चालू द्यावे हें योग्य नाहीं.

हिंदी हुंडणावळीच्या वादानें ह्याच वेळीं डोकें वर काढलें आहे, त्या बाबतींतहि सरकारची मुग्धता किंवा फडनविसांची आग्रही वृत्ति चालावयाची नाहीं. हिंदी चलनव्यवस्थेविषयीं चौकशी झाली, त्यास दहा वर्षें झालीं आणि तिचा आधार असलेलें सुवर्ण परिमाण सुटल्यास पांच वर्षें लोटलीं आहेत. "जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं अजून आपापलीं चलनें स्थिर केलेलीं नाहींत आणि आंतरराष्ट्रीय हुंडणावळीच्या दरांमध्यें निश्चितता उत्पन्न झालेली नाहीं, तेव्हां हिंदुस्थानानें हा प्रश्न उपस्थित करणें योग्य नव्हे" असें सरकारच्या बाजूनें आजवर प्रतिपादण्यांत आलें आहे. पण फ्रान्सनें आपली हुंडणावळ ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्यांच्या सहायानें आतां जुळती करून घेतली असल्यानें हिंदुस्थानानेंहि आपल्या चलनव्यवस्थेचा फेरविचार करण्याची वेळ आली आहे, हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. अनुकूल परिस्थिति निर्माण झाली म्हणजे हुंडणावळीचा दर निश्चित केला जाईल असें रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत म्हटलें आहे. रुपया ब्रिटिश पौंडाला जोडला न जातां सोन्याच्या किंमतीवर त्याची किंमत ठरावी अशी हिल्टन यंग कमिशनची स्पष्ट शिफारस आहे. गेलीं पांच वर्षें अस्थिरपणाचीं असल्यानें ब्रिटिश पौंड हेंच रुपयाचें परिमाण धरून त्याच्या मानानें १८ पेन्सांच्या किंमतीस चिकटून रहाणें इष्ट होतें असें क्षणभर मानलें, तरीहि बदललेल्या सध्याच्या परिस्थितींत हिंदी चलन व हुंडणावळ ह्यांविषयीं चौकशी व चर्चा होऊं नये असें सरकारनें म्हटल्यास तें सयुक्तिक होणार नाहीं. हिंदी धंदे, शेती, व्यापार व जनतेची रहाणी ह्यांचा हुंडणावळीच्या दराशीं निकट संबंध असून प्रत्येक राष्ट्रानें तो लक्षांत घेऊन आपली चलनव्यवस्था बदलली आहे. हिंदुस्थान सरकारनें मात्र ह्या बाबतींत हालचाल मुळींच करूं नये हें आश्चर्यकारक आहे. जी गोष्ट आवश्यक आणि इष्ट म्हणून इतरत्र केली जाते तिचें आमचें येथें मात्र वावडें असावें ही गोष्ट पटण्यासारखी नाहीं. म्हणून चलन व हुंडणावळ ह्याबावतींतल्या परिस्थितीचा फेरविचार व्हावा अशी जी मागणी जनतेकडून होत आहे तिचा स्वीकार सरकारनें केला पाहिजे.

## सहकारी पतपेढ्यांचा कारभार*

सहकारी चळवळीसंबंधीं तात्त्विक व व्यावहारिक माहिती देणारीं मराठी भाषेंत बोटावर मोजतां येण्याजोगींच पुस्तकें आहेत. सहकारी क्षेत्रामधील काम करणाऱ्या माणसांस चळवळीची तत्त्वें व कार्यपद्धति नीट समजणें आवश्यक आहे व त्या दृष्टीनें सहकारी वाङ्मयाचा फैलाव जेवढा होईल, तेवढा पाहिजेच आहे. सहकारी चळवळीशीं हितसंबंध निगडित झालेला शेतकरीवर्ग बव्हंशीं निरक्षर असला, तरी पतपेढ्यांच्या चालकांत साक्षर माणसें कांहीं कमी नाहींत. त्यांच्या कामांत सहाय करणाऱ्या व कार्याचें स्वरूप, उद्देश, इत्यादि समजावून सांगणाऱ्या पुस्तकांची उणीव आतां थोडी फार भरून येऊं लागली आहे. गेल्या वर्षी 'सहकारी' चळवळ ह्या नांवाचें श्री. ना. आ. रुकडे ह्यांचें पुस्तक प्रसिद्ध झालें. श्री. ना. बा. केळकर ह्यांचें 'सहकारी पतपेढ्यांचा कारभार' हें पुस्तक नुकतेंच बाहेर आलें आहे. श्री. केळकर ह्यांस सहकारी चळवळीची पूर्ण माहिती असून कामाचा अनुभवहि दीर्घकालीन आहे. ह्या कारणानें त्यांचें पुस्तक इतरांस मार्गदर्शक होणार आहे.

लेखकानें आपल्या पुस्तकांत सहकारी पतपेढ्यांसंबंधीं सर्व प्रकारची माहिती अत्यंत सोप्या भाषेंत दिली आहे. पतपेढ्यांची स्थापना; त्याबाबतची पूर्वतयारी; सभासद, व्यवस्थापक, चेअरमन, सेक्रेटरी, इत्यादींचीं कर्तव्यें; जिंदगी व कमाल मर्यादा पत्रकें; सभा; जामिनकी; कर्जफेड; गंगाजळी; इत्यादि महत्त्वाच्या विषयांचें विवेचन सुबोध व परिणामकारक भाषेंत करण्यांत आलें आहे. पतपेढ्यांची सध्याची परिस्थिति लक्षांत घेऊनच लेखकानें व्यावहारिक सूचना केलेल्या आहेत, हें ह्या पुस्तकाचें वैशिष्ट्य समजलें पाहिजे. श्री. केळकर ह्यांच्यासारख्या निष्ठावंत सहकाऱ्याचा अनुभव व कळकळ आणि व्यवहारज्ञान ह्यांचें वरील पुस्तकांत उत्कृष्ट प्रतिबिंब पडलें आहे. सहकारी चळवळीच्या आधारानें शेतकरी आजच्या बिकट स्थितींतूनहि वर डोकें काढूं शकेल; तथापि त्यानें आपली उन्नति स्वतःच्या प्रयत्नांच्या व आत्मविश्वासाच्या जोरावर करून घेऊन मार्गास लागलें पाहिजे. ही उन्नति करून घेण्यासाठी (१) कर्ज हिशेबानें काढून ठराविक रकम दरवर्षी कर्जफेडीस लावलीच पाहिजे, (२) बिनहिशेबानें व्यवहार करतां कामा नये, (३) शक्य तेवढी काटकसर केली पाहिजे, (४) मेहनत व उद्योग करून मिळकत वाढवली पाहिजे, (५) जोडधंदे हातीं घेतले पाहिजेत, (६) वारंवार आत्मनिरीक्षण केलें पाहिजे, इत्यादि उपाय लेखकानें सुचविले आहेत. श्री. केळकर ह्यांनीं शेतकऱ्यांच्या परिस्थितीचें सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन करून दिलेला सल्ला पतपेढ्यांच्या सभासदांनीं ध्यानांत बाळगून त्याप्रमाणें वागणूक ठेवल्यास सहकारी चळवळीच्या सुधारणेस व वाढीस सहाय होईल, ह्यांत संशय नाहीं. पुस्तकास, माजी सहकारी रजिस्ट्रार व हल्लींचे अहमदाबादचे कलेक्टर, श्री. वि. शि. भिडे, ह्यांनीं अत्यंत उद्बोधक प्रस्तावना लिहिली आहे. "अशा पुस्तकाची एकादी तरी प्रत महाराष्ट्रांतील प्रत्येक सोसायटीच्या दप्तरांत ठेवली जाईल असा मला भरंवसा वाटतो," ह्या श्री. भिडे ह्यांच्या शिफारशीस आम्हीं मनःपूर्वक पाठिंबा देतों.

*सहकारी पतपेढ्यांचा कारभार ले.:—श्री. ना. बा. केळकर, बी. ए. पृ. संख्या १०७. किंमत ८ आणे.

## हुंडणावळीच्या दरांतील उताराची जंत्री.

### राष्ट्रीय चलनांचें सुवर्ण–परिमाण कसें कमी झालें?

गेल्या पांच वर्षांत जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं आपल्या चलनांचें सुवर्ण–परिमाण कमी करून हुंडणावळीचे दर कसे उतरवले आहेत ह्याचा त्रोटक इतिहास खालच्या जंत्रींत दिला आहे:—

| काळ | देश | चलन विषयक धोरण | सुवर्ण परिमाण (हुंडणावळ) किती टक्के कमी झाली |
|---|---|---|---|
| सप्टें. १९३१ | ग्रेट ब्रिटन | सुवर्ण परिमाण सोडून दिलें | ३९ टक्के कमी |
| ,, | पोर्तुगाल | ,, | ४० ,, |
| ,, | स्विडन | ,, | ४४ ,, |
| ,, | नॉर्वे | ,, | ४५ ,, |
| ,, | डेन्मार्क | ,, | ५१ ,, |
| ऑक्टो. १९३१ | फिन्लँड | ,, | ४९ ,, |
| ,, | जपान | ,, | ६६ ,, |
| ,, | ऑस्ट्रिया | पूर्वीच्या हुंडणावळीचा दर सोडून दिला | |
| ,, | हंगेरी | ,, ,, ,, | ,, ,, |
| एप्रिल १९३२ | ग्रीस | सुवर्ण परिमाण सोडलें | ५७ ,, |
| जून १९३२ | युगोस्लाव्हिया | ,, | २३ ,, |
| एप्रिल १९३३ | अमेरिका | ,, | ४१ ,, |
| जून १९३३ | एस्टलँड | ,, | ५७ ,, |
| फेब्रु. १९३४ | त्झेकोस्लाव्होकिया | सुवर्ण परिमाण कमी केलें | १७ ,, |
| मार्च १९३४ | इटली | युद्धाच्या तयारी-मध्यें अंतर्गत परिमाण उतरलें | ... ... |
| ,, १९३५ | बेल्जम | सुवर्ण परिमाण कमी केलें | २८ ,, |
| मे १९३५ | डॅन्झिग | ,, | ४२ ,, |
| सप्टें. १९३६ | फ्रान्स | ,, | २५-३४ ,, |
| ,, ,, | स्वित्सर्लंड | सुवर्ण परिमाण सोडलें | ३० ,, ,, |
| ,, ,, | हॉलंड | ,, | अनिश्चित |
| ,, ,, | लॅटलँड | चलन ब्रिटिश पौंडास जोडलें | ... |
| ऑक्टो. १९३६ | इटली | सुवर्ण परिमाण कमी केलें | ४१ ,, |
| ,, ,, | त्सेकोस्लाव्हेकिया | दुसऱ्यांदा सुवर्ण-परिमाण उतरलें | १६ ,, |

### कल्चर मोत्यें कशीं तयार होतात?

कल्चर मोत्यें कशीं तयार करतात हें दाखविणारें एक लहानसें प्रदर्शन जपानमधील एका कारखानदाराकडून लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें, या संस्थेस मिळालें आहे.

### हिंदी रेल्वेजच्या चौकशीसाठी विलायतेंतून तज्ज्ञ आले

हिंदी रेल्वेजची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचे उपाय सुचवण्याकरतां नेमलेले ब्रिटिश तज्ज्ञ, सर राल्फ वेजवुड, हे विलायतेहून हिंदुस्थानांत नियोजित चौकशीच्या कामासाठी आले आहेत.

### पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक, लि.

वरील बँकेच्या मॅनेजरच्या जागीं गेल्या महिन्यापासून श्री. रा. ब. वसगडेकर ह्यांची नेमणूक झाली आहे.

# स्फुट विचार

## ब्रिटिश तज्ज्ञ आले

हिंदी रेल्वेबोर्डाच्या अनुभवी तज्ज्ञांचे हातून तें काम होण्यासारखें नाहीं, म्हणून रेल्वेची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचे उपाय सुचवण्यासाठीं सर राल्फ वेजवुड हे ब्रिटिश तज्ज्ञ नेमले होते. ते आतां हिंदुस्थानांत आले असून आपल्या कार्यक्रमास प्रारंभ करणार आहेत. बोर्डाचे तज्ज्ञांस हिंदुस्थानांतील व विलायती रेल्वेजची माहिती असते म्हणून भारी पगारावर नेमण्यांत येतें. त्यांस हिंदी रेल्वे सुधारण्याचे मार्ग शोधून काढणें झेपावयाचें नाहीं, असें सरकारास वाटून बाहेरचे तज्ज्ञ ह्या कामाकरितां बोलवावे लागावे हें कांहीं फारसें भूषणावह नाहीं. रेल्वेजचें उत्पन्न कसें वाढेल आणि त्यांची व मोटारींची स्पर्धा ह्या मिळकतीस कशी बाधक होणार नाहीं, ह्याचा सर राल्फ व त्यांचे सहकारी विचार करणार असून व्यापारी आणि कारखानदार ह्यांचे अभिप्राय गोळा करणार आहेत. व्यावहारिक शिक्षणाचे दोन तज्ज्ञहि ह्या देशांत येऊन दाखल झाले आहेत. "आम्हांस इंग्लंडमधल्या शिक्षण-पद्धतीची माहिती आहे; पण हिंदुस्थानच्या परिस्थितीचें कांहींच ज्ञान नाहीं" असे सरळ उद्गार ह्या दोन तज्ज्ञांपैकीं मि. ॲबट ह्यांनीं आगबोटीवरून उतरतांच काढले आहेत. त्यांनीं सप्रू कमिटीचा रिपोर्ट वाचलेला नाहीं किंवा हिंदुस्थानच्या काय गरजा आहेत ह्याचें त्यांस अंधुकहि ज्ञान नाहीं. हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश असल्यानें शेती शिक्षणाची चांगली व्यवस्था करणें जरूर आहे अशी त्यांची आजची कल्पना आहे. चार-पांच महिने देशभर फिरून ते माहिती गोळा करतील आणि आपलें मत बनवतील. चौकशी कोणत्या मुद्यांविषयीं करावयाची हेंहि अजून ठरावयाचें आहे. ह्या सर्व परिस्थितींत हे विलायती तज्ज्ञ काय करणार आणि त्यांस देण्यांत येणारा त्रास व त्यांचेसाठीं होणारा खर्च फलदायी कसा होणार ह्याची लोकांस शंका आल्यास ती वावगी होणार नाहीं. हिंदी शिक्षणतज्ज्ञांस विलायतेंत पाठविलें असतें आणि त्यांचा सल्ला सरकारनें घेतला असतां तर भागलें नसतें काय?

## मंदी, हुंडणावळ व बाजारभाव

फ्रान्स, ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्या राष्ट्रांच्या पावलावर पाऊल टाकून हिंदुस्थाननें आपला हुंडणावळीचा दर जागतिक आर्थिक परिस्थितीशीं जुळता करून घेतला पाहिजे अशी हिंदी व्यापारी संघांनीं सरकारकडे मागणी केली आहे. दर रुपयास १८ पेन्स हा दर इतकीं वर्षें स्थिर राहिला आहे त्याच्याशीं खेळण्याच्या "माकडचेष्टा" आपण करणार नाहीं असें सर जेम्स ग्रिग यांनीं सदरहु मागणीचे बाबतींत लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत ठासून सांगितलें आहे आणि हिंदी हुंडणावळीचा प्रश्न तूर्त विचार करण्यासारखाहि नाहीं असें मत त्यांनीं प्रदर्शित केलें आहे. वास्तविक पहातां, १८ पेन्सांची हुंडणावळ हिंदुस्थानच्या सद्यःस्थितींत योग्य आहे कीं काय आणि ह्या देशांतली आर्थिक मंदी दूर होण्यास तिचा दर कमी केला पाहिजे कीं काय हें चौकशी करून ठरविणें हें तज्ज्ञांचें काम आहे. त्या संबंधांत ठाम मत ठोकून देण्याची जबाबदारी हिंदी फडनवीसांनीं आपल्या शिरावर घेणें हें धाडसाचें आहे. इंग्लंड, अमेरिका, जपान इत्यादि देशांतले बाजारभाव सारखे चढत आहेत आणि हिंदुस्थानांतले स्थिर आहेत. हें हुंडणावळ १८ पेन्स ह्या दरानें अचल राहून होत आहे. ह्यावरून हिंदी हुंडणावळीचा दर उतरल्यावांचून आमच्या देशांतले बाजारभाव बाहेरच्या बाजारभावांबरोबर क्रमाक्रमानें चढणार नाहींत असें अनुमान सहज निघतें. ह्या प्रकारच्या विचारसरणीचा अवलंब करून दहा वर्षांमागें हिल्टन यंग कमिशननें १८ पेन्सांच्या दराची शिफारस केली होती हें लक्षांत घेणें आवश्यक आहे. त्यासारखीच परिस्थिति पुन्हां निर्माण झालेली असतां आणि इतर राष्ट्रांनीं आपले हुंडणावळीचे दर उतरवून बाजारभाव चढवले आहेत आणि ह्या मार्गानें आर्थिक मंदी दूर करण्याची खटपट यशस्वीपणानें चालवली आहे, अशा प्रसंगीं हिंदुस्थाननें हात जोडून स्वस्थ बसणें आणि शेतकऱ्यांची व एकंदर जनतेची कमाई वाढवण्याचा प्रयत्न न करणें असमर्थनीय आहे.

## बाजारभावांचे आकडे पहा

दुसऱ्या देशांनीं हुंडणावळीचे दर अस्थिर होऊं दिले व कमी केले ह्यामुळें त्यांतले बाजारभाव चढले आणि हिंदुस्थान सरकारनें १८ पेन्सांची हुंडणावळ स्थिर ठेवली व येथील बाजारभाव उतरलेले तसेच राहूं दिले, ह्याचें प्रतिबिंब खालील आकड्यांत उतरलेलें स्पष्ट दिसून येईल. १९२९ सालीं म्हणजे प्रचलित मंदीचे पूर्वीं सर्व देशांतले सरासरीचे घाउक बाजारभाव १०० होते असें समजल्यास त्यांत गेल्या सात वर्षांत काय बदल झाला आहे हें त्यांवरून समजेल. इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतले भाव चढले आहेत आणि हिंदुस्थानचे गेल्या पांच वर्षांत मुळीच बदलले नाहींत. ह्या परिस्थितीपासून बोध घेऊन फ्रान्सनें अलीकडे आपली हुंडणावळ उतरवली आहे, हें प्रसिद्धच आहे.

बाजारभाव

१९२९ = १००

| | हिंदुस्थान | इंग्लंड | अमेरिका | जपान | फ्रान्स |
|---|---|---|---|---|---|
| १९२९ | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| १९३० | ८२ | ८४ | ९० | ८२ | ८८ |
| १९३१ | ६८ | ७० | ७६ | ६९ | ८० |
| १९३२ | ६४ | ६७ | ६८ | ७३ | ६८ |
| १९३३ | ६१ | ६८ | ६९ | ८१ | ६३ |
| १९३४ | ६३ | ७१ | ७८ | ८० | ६० |
| १९३५ | ६४ | ७४ | ८३ | ८४ | ५४ |
| १९३६ (ऑगस्ट) | ६३ | ७८ | ८५ | ९१ | ६४ |

## स्वदेशी साखर व जकातीचें उत्पन्न

"भाकर खाईन व ती तशीच शिल्लक ठेवीन" ह्या दोन परस्पर-विरोधी गोष्टी एकत्र घडणें शक्य नाहीं, अशा अर्थाची एक इंग्रजी म्हण आहे. परदेशी साखरेवर हिंदुस्थानांत गेलीं सहा वर्षें संरक्षक जकात घेण्यांत येते, तिच्या योगानें सरकारचें ह्या आयात मालावरील कस्टमचें उत्पन्न नाहींसें झालें आहे अशी तक्रार अलीकडे करण्यांत येत आहे, तिचा विचार करतां वरील म्हणीची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. संरक्षक जकातीचा उद्देश सरकारचें कस्टमचें उत्पन्न वाढवणें किंवा टिकवणें हा कधींच नसतो. परदेशी माल आयात होण्याचें क्रमी क्रमी होऊन ती थांबावी आणि बाहेरून येणाऱ्या मालाची जागा देशांत उत्पन्न झालेल्या

मालानें घ्यावी हाच संरक्षक जकातींचा निश्चित हेतु असतो. ह्या दृष्टीनें पहातां, हिंदुस्थानांतील स्वदेशी साखरेची पैदास वाढल्या-मुळें परदेशी साखरेची आयात बसली आणि सरकारचें तिच्या-वरील जकातीचें उत्पन्न घटलें ह्या टीकेंत कांहींच स्वारस्य नाहीं. ही उत्पन्नाची तूट हें संरक्षक जकातींचें धोरण यशस्वी झाल्याचें निदर्शक असून तें अभिनंदनीय आहे, असेंच उलट म्हटलें पाहिजे. साखरेवरील जकातीचें उत्पन्न १९३०-३१ सालीं सुमारें १०३ कोटि रुपये होतें, तें १९३४-३५ मध्यें ३ कोटि, ८१ लाख झालें व १९३५-३६ सालीं ३ कोटि, २४ लक्षांवर उतरलें. चालू वर्षीं ह्या उत्पन्नांत आणखीहि घट होण्याचा रंग दिसत आहे. ह्या प्रकारची वस्तुस्थिति ही स्वाभा-विक व इष्ट असा परिणाम होय. देशी साखरेस पंधरा वर्षें मुदतीचें जकातद्वारा संरक्षण देण्यांत आलें असून १९३८ सालाच्या पुढें, हिंदी साखरेच्या धंद्याची प्रगति लक्षांत घेतां, तें कमी-ज्यास्त करणें आवश्यक आहे कीं काय, ह्याची चौकशी पूर्व-संकल्पास अनुसरून टारिफ बोर्डाकडून आतां व्हावयाची आहे. त्यावेळीं या सबंध प्रश्नाची छाननी होऊन किती संरक्षण चालू ठेवणें आवश्यक आहे, ह्याचा निर्णय होईल. तेव्हां, संरक्षक धोरणामुळें सरकारचें उत्पन्न बुडालें अशी चाललेली हाकाटी गैरसमज उत्पन्न करणारी आहे ह्यांत शंका नाहीं. एकीकडे आयात जकातीच्या उत्पन्नांत घट झाली असतां दुसरीकडे देशी साखरेच्या पैदाशीवर घेण्यांत येणाऱ्या पट्टीचें उत्पन्न सरकारास गेल्या वर्षी १ कोटि, ५९ लक्ष रुपये झालें हें विसरतां कामा नये. एका बाजूनें होणारी उत्पन्नांतली घट दुसऱ्या बाजूनें सरकार भरून काढीत आहेच. देशी धंद्यांस न्याय्य व अपरिहार्य असेल तेवढेंच संरक्षण मिळावें असें प्रतिपादन करणें सरळ व योग्य आहे. परंतु संरक्षणाच्या मूळ धोरणासच फाटे फोडूं पहाणें म्हणजे स्वदेशी धंद्याच्या प्रगती-च्या मार्गांत विघ्न उत्पन्न करणें होय.

## पूना सर्क्युलेटिंग लायब्ररी

आपल्या आवडीचीं सर्व पुस्तकें व मासिकें विकत घेणें फारच थोड्या लोकांस शक्य असतें. ह्या कारणानें, कित्येकांस वाचनाची आवड असूनहि आपली तृष्णा अतृप्त ठेवणें भाग पडतें. सार्वज-निक ग्रंथालयांमध्यें पुस्तकें वाचावयास मिळतात; परंतु त्यांतील मासिकांची निवड प्रत्येकाच्या आवडीस अनुरूप असण्याचा संभव कमी असतो. तसेंच, तेथील ताजीं मासिकें घरीं नेण्यास मिळत नाहींत. स्वतःच्या घरीं फुरसतीच्या वेळांत विविध प्रका-रचीं पुस्तकें व मासिकें अल्प मोबदल्यांत देणाऱ्या संस्थेची आव-श्यकता होती. ती वाण श्री. डी. पी. आठल्ये ह्यांच्या पूना सर्क्युलेटिंग लायब्ररीनें भरून काढली आहे. दर महिन्यामध्यें वेगवेगळीं दहा मासिकें वाचनासाठी घरबसल्या मिळवावयास लायब्ररीची मासिक एक रुपया वर्गणी दिली म्हणजे पुरें आहे. लायब्ररीचीं (१) पुस्तकांचीं व (२) मासिकांचीं अशीं दोन खातीं आहेत व त्याबाबत योग्य ते नियम करण्यांत आलेले आहेत. कोणत्याहि व्यक्तीस व संस्थेस लायब्ररीचे वर्गणीदार होतां येते. मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराती, बंगाली, फ्रेंच व जर्मन, इतक्या भाषांतील मासिकें वाचकांस मिळूं शकतात. अत्यंत अल्प वर्गणींत जगांतील सर्वोत्कृष्ट नियतकालिकांचा आस्वाद घेऊं देणाऱ्या व वाचनीय पुस्तकें पुरविणाऱ्या ह्या लाय-ब्ररीनें लोकांची उत्कृष्ट सोय केलेली आहे, तिचा त्यांनीं अवश्य फायदा घ्यावा. लायब्ररीची कोल्हापूर व रत्नागिरी येथें लवकरच शाखा उघडणार आहेत. वाचनप्रेमी लोकांनीं श्री. आठल्ये ह्यांच्या ह्या उपक्रमास पाठिंबा द्यावा अशी आमची शिफारस आहे.

## ग्रामसुधारणा मंडळ, सोलापूर

वरील संस्थेचा १९३५-३६ चा विस्तृत अहवाल आमच्याकडे आला आहे. अहवालाचे वर्षांतील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे मुळेगांवानें सर फ्रेडरिक साइक्स ग्रामसुधारणा ढाल मिळविली ही होय. हिंदुस्थान सरकारच्या ग्रँटपैकीं सरकारनें वरील मंड-ळास १४,१०० रु. दिले. व आणखीहि रकमा कलेक्टराकडून वेळोवेळ मिळाल्या. शेतकीसुधारणा, ग्रामपंचायती, आरोग्य व रस्ते ह्यासंबंधीं सुधारणा, सुधारलेल्या शेतीच्या पद्धती-संबंधीं प्रचार, प्रसूतिगृहें, खेडेगांवीं उद्यम धंदे, इत्यादि बाबतींत ग्रामसुधारणामंडळानें केलेल्या कार्याची माहिती अहवालांत देण्यांत आली आहे. मंडळाच्या सभासदांची संख्या २१६ ची ३४१ झाली, ही गोष्ट उत्तेजनकारक समजली पाहिजे. सोलापूर जिल्ह्याचे कलेक्टर मि. सी. एन. मिलार्ड हे मंडळाचे अध्यक्ष व खा. ब. अब्दुल लतीफ हे उपाध्यक्ष व रा. ब. एन. सी. लिमये व श्री. रं. गो. गंधे हे ऑनररी सेक्रेटरी होते.

## इटलीनें ॲबिसिनिया कसा जिंकला?


इटलीचे ॲबिसिनियामधील युद्धांतील सेनानायक मार्शल डी बोनो आणि मार्शल बॅडोग्लिओ ह्या दोघांनीं ॲबिसिनियाच्या युद्धासंबंधीं पुस्तकें लिहिलीं असून त्यांस सीनॉर मुसलोनीची प्रस्तावना जोडली आहे. ह्या पुस्तकांतील वृत्तांतावरून इटलीच्या कावेबाजपणावर चांगलाच प्रकाश पडतो. १९३२ सालापासूनच मार्शल डी बोनोनें ॲबिसिनिया जिंकण्याच्या पूर्वतयारीस सुरुवात केली होती. इरिट्रियांत लष्करी रस्ते व इस्पितळें बांधून आणि पाण्याची व्यवस्था करून इटली निमित्ताची वाट पहात बसला होता. पण ह्या तयारीचा त्यानें मागमूसहि कोणास लागूं दिलेला नव्हता. ॲबिसिनियामधील दोन लक्ष लोकांस लांचलुचपतीच्या सहायानें डी बोनोनें वश करून घेतलें होतें. ही सर्व माहिती आतां अधिकृत रीत्या प्रसिद्ध झाली आहे. "इटलीस नाइलाजानें स्वसंरक्षणार्थ लढाईचे भानगडींत पडावें लागत आहे" ह्या अर्थाच्या इटलीच्या नक्राश्रुयुक्त विधानांचा पोकळपणा आतां चांगलाच उघडकीस आला आहे.

## मुंबईच्या दंग्यांतील आरोपी

मुंबई शहरांतील दंग्यास सुरवात झाल्यापासून ता. १८ नोव्हें-बर अखेर त्यांत भाग घेण्याबद्दल १,६४२ लोकांस अटक कर-ण्यांत आली. ह्यापैकीं, ८४० लोकांवर मारामारीचा आरोप आहे, १९७ आसामींस खुनाच्या आरोपापासून आपला बचाव करावा लागेल, कर्फ्यू ऑर्डर मोडल्याबद्दल ७५ जणांस व काठ्या व सुरे बाळगल्याबद्दल १३० इसमांस जाब द्यावा लागेल. १३९ लोकांवर संशयास्पद रीतीनें भटकल्याबद्दल आरोप ठेवण्यांत येईल. सुमारें २५० लोकांवर शाबीत होण्याजोगा आरोप ठेवतां येत नसल्यानें त्यांस सोडून देण्यांत आलें आहे.

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २

# लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें



डावीकडून उजवीकडेः—(१) भा. वि. घारपुरे, [ क्यूरेटर ]. (२) प्रो. शं. रा. कानिटकर, [ चेअरमन, म्युनिसिपल स्कुलबोर्ड ].
(३) मो. रा. ढमढेरे, [ उपाध्यक्ष, पुणें शहर म्युनिसिपालिटी ]. (४) सरदार जगन्नाथ महाराज पंडित.
(५) के. आ. भगन, [ अध्यक्ष, पुणें शहर म्युनिसिपालिटी ]. (६) न. चिं. केळकर.
(७) वि. आ. गडकरी. (८) ना. रू. झांजले, [ चेअरमन, स्टँडिंग कमिटी ].

या संस्थेच्या वरील विश्वस्तमंडळानें पुणें येथें १९३७ सालीं फेब्रुवारी-मार्च महिन्यांत औद्योगिक प्रदर्शन भरविण्याचें योजिलें आहे.

## पुणें औद्योगिक प्रदर्शन, १९३७

### आकर्षक बक्षिसांची योजना

लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें, या संस्थेच्या विद्यमानें पुणें येथें सन १९३७ सालीं फेब्रुआरी–मार्च महिन्यांत मागें सन १९३३ व १९३५ सालीं झालेल्या प्रदर्शनांच्या पद्धतीच्या अनुरोधानें औद्योगिक आंतर-प्रांतीय स्वरूपाचें एक मोठें प्रदर्शन भरविण्याचें म्यूझियमच्या ट्रस्टींनीं योजिलें आहे पुणें शहरच्या उद्योगधंद्यांस प्राधान्य देणें व त्यांच्या उन्नतीसाठी झटणें हें म्यूझियमचें ब्रीदवाक्य व आद्य कर्तव्य आहे आणि या प्रदर्शनाच्या द्वारें पुणें शहरांतील सर्व प्रकारच्या लहानमोठ्या उद्योगांस पुढें येण्यास अवसर मिळेल. यंदा या प्रदर्शनास जोडून छपाईच्या धंद्याचें संकलीत व सर्वांगपूर्ण असें प्रदर्शन भरविण्याचें येथील प्रेस-ओनर्स असोसिएशननें योजिलें आहे. असें अखिल भारतीय स्वरूपाचें छापखान्याच्या धंद्याचें व कलेचें प्रदर्शन हिंदुस्थानांत म्हणण्यासारखें झालेलें ऐकण्यांत नाहीं. या प्रदर्शनास जोडून अखिल भारतीय छापखानेवाल्यांची परिषद्हि भरविण्याची योजना आखण्यांत आली आहे. ही परिषद् व हें प्रदर्शन हें या वर्षीच्या प्रदर्शनाचें एक वैशिष्ट्यच होणार आहे. प्रदर्शनाची मुदत ता. ७ फेब्रुआरी ते ता. १४ मार्च १९३७ अशी मुक्रर करण्यांत आली आहे. श्रीमंत राजे बाळासाहेब पंत प्रतिनिधी, संस्थान औंध, यांच्या आश्रयानें रु. २,२५० चीं मोठीं आकर्षक व प्रोत्साहनपर बक्षिसें जाहीर झालीं आहेत.

प्रदर्शनांत येणाऱ्या नवीन वस्तूस रु. २५ चें एक अशीं १२ बक्षिसें ट्रस्टींनीं द्यावयाचें ठरविलें आहे. या बक्षिसाचे बाबतींत पुढील धोरण स्वीकारण्यांत येणार आहे. परदेशांतून येणारीं खेळणीं, हत्यारें इत्यादि कित्येक वस्तू या देशांत खपतात आणि ज्या अद्यापि येथें होऊं लागल्या नाहींत, परंतु होणें शक्य आहे अशा वस्तू संग्रहालयांत नमुन्यासाठी लवकरच आणून ठेवण्यांत येणार आहेत. या वस्तूंचे नमुन्याबरहुकूम नमुने यशस्वी रीतीनें तयार करणारांस रु. २५/– चें एक अशीं १२ बक्षिसें देण्यांत येणार आहेत. या योजनेचा हेतू असा कीं, त्यायोगें नवीन उत्पादनास प्रोत्साहन मिळावें व वरील योजनेंत जें तत्त्व आहे, त्याकडे लोकांचें अधिकाधिक लक्ष लागावें. यासंबंधीं अधिक माहिती म्यूझियम कचेरींतून मिळेल. ज्यांना एखादी वस्तू करावयाची असेल त्यांस नमुना डिपॉझिट ठेवून मिळेल. याशिवाय सेल्युलॉइडच्या बाहुलीसाठीं रु. २५० चें एक, भाकरी करवयाच्या यंत्रासाठी रु. १,००० चें एक व औंध संस्थानांतील कच्च्या द्रव्याचें पक्क्या द्रव्यांत यशस्वी रीतीनें रूपांतर करणारास रु. १,००० चें एक अशीं एकूण तीन, मोठालीं बक्षिसें श्रीमंत राजे बाळासाहेब पंत प्रतिनिधी, संस्थान औंध, यांनीं देऊं केलीं आहेत. या बक्षिसांची संपूर्ण योजना "स्वदेशी डायरेक्टरी" या म्यूझियम संस्थेनें प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत दिलेली आहे.

---

### पुणें शहर म्युनिसिपालिटीचें नवें कर्ज

मंडई तें रविवार पेठेंतील गोविंद हलवाई चौक ह्या नव्या रस्त्याच्या खर्चाप्रीत्यर्थ पुणें शहर म्युनिसिपालिटीनें मुंबई संरकारच्या मंजुरीनें कर्ज काढण्याचें ठरविलें आहे. कर्जाची रकम १½ लक्ष रुपये व व्याजाचा दर ४ टक्के असून परतफेडीची मुदत ५ वर्षे आहे. प्रत्येक शंभर रुपयांच्या रोख्यासाठी आपण किती रकम देण्यास तयार आहों, ह्यासंबंधीं टेंडरांचे अर्ज पैसा गुंतविणारांनीं म्युनिसिपालिटीकडे ५ डिसेंबर १९३६ च्या आंत पाठवावयाचे आहेत. अर्जाबरोबर शेंकडा १० इतकी रकम पाठविली पाहिजे.

## हिंदी रेल्वेज

दिल्ली येथें भरलेल्या रेलवे अधिकाऱ्यांच्या परिषदेंत लॉर्ड लिनलिथगो ह्यांनीं प्रास्ताविक भाषण केलें, त्यांतले मुख्य मुद्दे खाली दिले आहेत:—

१. हिंदी रेलवेजच्या ८० वर्षांच्या आयुष्यांतला पहिला निम्मा भाग तोटयाचा होता. परंतु पैशाच्या स्वरूपांतलें हें नुकसान रेलवेजमुळें दळणवळणाची सोय, व्यापारवृद्धि व दुष्काळ-निवारणास सहाय ह्यांनीं भरून निघालें.

२. चालू शतकाच्या पहिल्या तीस वर्षांत हिंदी रेलवेज फायद्यांत चालल्या आणि त्यांनीं सरकारी उत्पन्नांत सालोसाल भर टाकली.

३. गेल्या सहा वर्षांत मात्र रेलवेजना सांपत्तिक संकटांनीं ग्रासलें आहे, पण जगभर पसरलेल्या आर्थिक मंदीचाच हा परिणाम आहे.

४. रेलवेजच्या कारभारांत पुष्कळ काटकसर करण्यांत आली असली तरी आणखी बचत होण्याच्या प्रयत्नांत खंड पडूं देतां कामा नये.

५. उतारूंची, विशेषत: तिसऱ्या वर्गाच्या डब्यांचा उपयोग करणारांची, विशेष सोय रेलवेजनीं पाहिली पाहिजे. मोटारीनें प्रवास करण्यापेक्षां रेलवेनें जाणें त्यांस ज्यास्त सोयीचें व सुखकर वाटलें पाहिजे.

६. सर राल्फ वेजवुड आणि त्यांचे सहकारी हिंदी रेलवेज-संबंधानें चौकशी करण्यासाठीं आले आहेत, त्यांस सर्व प्रकारची माहिती पुरवली जाईल आणि त्यांचा उपयुक्त सल्ला आपणांस मिळेल अशी आशा आहे.

### सर झाफरुल्लाखान ह्यांचें भाषण

रेलवेजचे मंत्री, सर झाफरुल्लाखान, ह्यांस परिषदेंत उपस्थित होतां आलें नाहीं; पण त्यांचें लिहिलेलें भाषण वाचून दाखविण्यांत आलें त्यांत खाली दिलेले मुद्दे होते:—

१. अलीकडे रेलवे उत्पन्नांत सुधारणा झाली आहे, पण उतारूंच्या वाढत्या वहातुकीनें त्यांत कांहींच भर टाकलेली नाहीं.

२. रेलवेजचे नोकर उतारूंशीं नीट वागत नाहींत व त्यांच्या सोयींकडे पहात नाहींत अशा तक्रारी सरकारकडे आल्या असून त्यांबाबत सुधारणा होण्यास पुष्कळ जागा आहे.

३. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या सोयींसाठी विश्रांतिगृहें, तिकिटें त्वरित मिळण्याची तरतूद, इत्यादि बाबींत चांगली व्यवस्था होणें अगत्याचें आहे.

४. आगगाड्यांचीं वेळापत्रकें लोकांच्या सोयीच्या दृष्टीनें बसवण्याचीहि आवश्यकता आहे.

५. असल्या सुधारणा झाल्यास उतारूंकडून होणारें उत्पन्न वाढल्यावांचून रहाणार नाहीं.

६. मालाच्या वहातुकीचें उत्पन्न यंदा थोडें वाढलें असलें तरी त्या मानानें खर्चांतहि वाढ झाली आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

७. काटकसर व उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न हीं सतत चालू ठेवणें अगत्याचें आहे.

## मानवी प्रयत्न आणि निसर्गाच्या योजना

निसर्गावर जय मिळवून त्याच्या शक्तीचा उपयोग आपल्या इच्छेप्रमाणें करून घेणें ह्यांत मनुष्याच्या बुद्धीचा प्रभाव दिसून येतो. पण निसर्गाची शक्ति अफाट असल्यानें ती अनपेक्षित रीतीनें चालू लागली तर मात्र माणसाचा त्यापुढें टिकाव लागत नाहीं. लोकसंख्येच्या वाढीचें नियंत्रण करण्याचे मानवी यत्न फलद्रूप होण्यास काळ लागतो, पण निसर्गास तें कार्य चुटकी-सरशी करतां येतें. निसर्गाचे उपाय कडक व जालीम असून मनुष्यास त्रास देणारे असतात, पण कित्येक वेळां ते उपयुक्तहि ठरतात. मंदीमुळें उतरलेले बाजारभाव अवर्षणानें चढले ही गोष्ट अर्थातच अनिष्ट आहे. शेतकऱ्यांचें उत्पादन योग्य प्रमाणांत राहून भाव चढले तरच त्यांचा फायदा आहे. पीक आलें नाहीं व महागाई झाली तर चढलेल्या भावांनी त्यांचें कांहींच हित होणें शक्य नाहीं. म्हणून मंदीच्या निवारणाचा दुष्काळ हा उपाय नव्हे. सार्थीनीं मृत्युसंख्या वाढून बेकारीस आळा बसणें हें जसें अनिष्ट आहे, तसेंच दुष्काळाचेंहि आहे.

अलीकडे द्विदल धान्यांची—विशेषत: गव्हाची—जागतिक पैदास पुष्कळ वाढून त्यांचे बाजारभाव विलक्षण उतरले आहेत ही गोष्ट सर्वश्रुत आहे. गव्हाची लागवड मर्यादित करून त्या धान्याच्या पुरवठ्याचें नियंत्रण करण्याचे प्रयत्न कित्येक राष्ट्रांनीं केले असतां त्यांस यश आलें नाहीं. पण निसर्गाच्या कारवाईमुळें गव्हाचे भाव चढण्यास सहाय झालें आहे. १९३४ सालच्या अवर्षणामुळें गव्हाचें उत्पादन कमी झालें व निर्गत व्हावयाच्या गव्हाचा साठा ६० कोटि बुशेलवरून ३० कोटि बुशेलवर आला. गेल्या सालचीहि नैसर्गिक परिस्थिति अमेरिका व कॅनडा ह्या प्रमुख उत्पादक देशांत प्रतिकूल होती व त्या कारणानें गव्हाचें पीक मर्यादित झालें. ह्याचा परिणाम गव्हाचा भाव इंग्लंडमध्यें चढण्यांत झाला आहे व कृत्रिम महर्घतेचा यत्न यशस्वी झाला नाहीं तेथें नैसर्गिक परिस्थितीनें इच्छित कार्य घडवून आणलें आहे असें म्हणावयाचें! निसर्गाचें सहाय माणसांस हवें खरें, पण त्याचा असला प्रकार इष्ट नाहीं हें खास.

---

### साखरेची उतरती आयात व जकातीचे उत्पन्नांत घट

१९३४—३५ सालीं साखरेच्या आयातीवरील जकातीपासून हिंदुस्थान सरकारास ३ कोटि ८१ लक्ष रु. उत्पन्न झालें व १९३५—३६ सालीं ३ कोटि २४ लक्ष रु., म्हणजे ५७ लक्ष रु. कमी मिळालें. चालू वर्षी २ कोटि रु. उत्पन्न होईल, ही अंदाज-पत्रकांतील अपेक्षा खोटी ठरण्याचा रंग दिसत आहे. कारण एप्रिल तें सप्टेंबर ह्या पहिल्या सहामाहींत फक्त ३३ लक्ष रुपये जकात वसूल झाली आहे! मार्च १९३८ अखेर साखरेवरील संरक्षक जकातीची मुदत संपत आहे. त्यापूर्वीं ह्या धंद्यासंबंधीची चौकशी व शिफारस करण्यासाठीं टॅरिफ बोर्ड लवकरच नेमलें जाईल.

महिंद्रकर ब्रदर्स ह्यांचे थंडी-
गिरगांव, मुंबई करतां

# सहकारी चळवळ

### सटाणा तालुका को. सुपरवायझिंग यूनियन, लि.

वरील यूनियनची वार्षिक साधारण सभा ता. ३०-९-३६ रोजीं श्री. शंकरराव गणपतराव शेवाळे, बी. ए., एल. एल. बी., वकील, ह्यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. अहवाल, ताळेबंद, इत्यादि मंजूर झाल्यावर ऑडिट तपासणी यादी, शेरे व मॅनेजिंग बोर्डाचीं उत्तरें हीं वाचून दाखविण्यांत आलीं. यूनियन-फीच्या दरास मंजुरी दिल्यावर नवीन वर्षाचें अंदाजपत्रक पास करण्यांत आलें. १९३६-३७ सालाकरितां श्री. धर्माजी तानाजी पाटील व श्री. जयराम नारायण पाटील हे अनुक्रमें अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडले गेले. सेल सोसायटीस मदत करण्याबाबतचा ठराव पास झाल्यावर सीनियर इन्स्पेक्टर ह्यांनीं दुष्काळी परिस्थितींत सोसायट्यांस बँक देत असलेल्या नवीन कर्जाबाबतच्या अटी व सवलती समजावून सांगितल्या. शेवटीं अध्यक्षांनीं आपल्या समारोपांत सहकारी संस्थांची जरूरी, त्या टिकविण्याची जबाबदारी, कर्जाचा योग्य उपयोग, शेतकऱ्यांनीं हिशेबी बनण्याची आवश्यकता, शिक्षणाचा उपयोग, इत्यादि मुद्दे स्वानुभवाच्या दाखल्यांच्या सहायानें विशद केले. श्री. धर्माजी तानाजी पाटील ह्यांनीं अध्यक्षांचे आभार मानले.

### पश्चिम खानदेश जिल्हा को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट

शनिवार, ता. ७ नोव्हेंबर १९३६ रोजीं सहकारी दिन साजरा करण्याबद्दल इन्स्टिट्यूटकडून सर्व सोसायट्यांस कळविण्यांत आलें. तसेंच इन्स्टिट्यूटनेंहि सहकारी दिन धुळें येथें साजरा केला. सदर दिनानिमित्त येथील म्युनिसिपल हॉलमध्यें जाहीर सभा भरविण्यांत आली. येथील प्रमुख सहकारी बंधू, खात्याचे व बँकेचे अधिकारी व स्थानिक सोसायट्यांचे सभासद मिळून सुमारें १०० लोक हजर होते. प्रथम इन्स्टिट्यूटचे चेअरमन श्री. दामोदर गणपतराव पाटील ह्यांनीं सभेचा उद्देश समजावून सांगून खानदेश विभागाचे असि. रजिस्ट्रार श्री. आर. बी. पालेकर ह्यांनीं आजच्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारावें म्हणून त्यांना सर्वांतर्फे विनंति केली. अध्यक्ष स्थानापन्न झाल्यावर तेथील श्री. एस. एच. कानडे, श्री. साळुंके, श्री. जोग व श्री. शुक्ल ह्यांचीं सहकारी चळवळ ह्या विषयावर उद्बोधक भाषणें झालीं. सहकारी चळवळीवर आमचा दृढ विश्वास आहे अशा अर्थाचा ठराव सर्वानुमतें पास करण्यांत आला. अध्यक्षांनीं समारोप केल्यावर सर्वांस अल्पोपाहार व पानसुपारी देण्यांत येऊन हा गोड समारंभ आटोपला.

### नांदगांव-येवला ता. को. सुपरवायझिंग यूनियन, लि.

वरील संस्थेच्या विद्यमानें ता. ७-११-३६ रोजीं सहकारी दिन श्री. निळकंठराव माधवराव पवार, मालेगांव, ह्यांचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यांत आला. प्रथम सीनियर इन्स्पेक्टर श्री. हाळवे, ह्यांचें सहकाराचीं तत्त्वें ह्या विषयावर भाषण झालें. सुपरवायझर, श्री. कोष्टी, ह्यांनीं शाळेंतील मुलांस समजेल अशा सोप्या भाषेंत ह्याच विषयाचें विवेचन केलें. अध्यक्षांनीं समारोप केल्यावर सभेचें काम संपलें. संध्याकाळीं यूनियनचे कचेरींत श्री. का. ग. दीक्षित ह्यांच्या नकला झाल्या.

### कळवण तालुका सहकारी वृत्त

(१) कळवण-चांदवड तालुका ग्रुप सेक्रेटरींची सभा तारीख १०।११।३६ रोजीं होऊन सोसायट्यांविषयीं उपयुक्त कामाची चर्चा करण्यांत आली. (२) डिबेटिंग क्लबची सभा नारायण गणेश सेक्रेटरी यांचे अध्यक्षतेखालीं होऊन बेकारी व त्यावर इलाज या विषयावर बँक इन्स्पेक्टर यांचें व एजंट श्री. नाडकर्णी, अ. सुपरवायझर देशपांडे व सेक्रेटरी यांचीं जोरदार भाषणें झालीं. (३) तारीख ७-११-३६ रोजीं तालुका मामलेदार श्री. पुरंदरे यांचें अध्यक्षतेखालीं सहकारी दिन मोठ्या समारंभानें साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं सुपरवायझर मि. सावळगी, बँक इन्स्पेक्टर श्री. ठाकूर, एजंट श्री. नाडकर्णी यांचीं भाषणें झालीं. (४) सहकारी स्टाफ वाचनालयाची तारीख १०-११-३६ रोजीं सभा होऊन ३० रुपयांचीं उपयुक्त पुस्तकें आणण्याचें ठरलें. रिकाम्या झालेल्या सभासदांचे जागीं मि. सावळगी, सुपरवायझर, यांची नेमणूक झाली. (५) सहकारी स्टाफतर्फे 'तरुण पिढी' नांवाचें हस्तलिखित मासिक काढण्याचें ठरलें.

### नाशिक येथें सहकारी दिन

नाशिक जिल्हा सहकारी इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें नाशिक येथें रा. ब. वंडेकर ह्यांचे बंगल्यावर ता. ७ नोव्हेंबर १९३६ रोजीं रा. ब. व्ही. ए. गुप्ते, बी. ए., ह्यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी दिन साजरा करण्यांत आला. सभेमध्यें श्री. वाय. जी. धर्माधिकारी एम्. ए., एलएल. बी, ऑडिटर, को. सोसायटीज नाशिक, श्री. व्ही. डी. कारखानीस बी. ए., मॅनेजर, नाशिक डि. सें. को. बँक, श्री. एन्. ए. पुरंदरे, डि. ॲग्रि. ओव्हरसिअर, नाशिक आणि रावबहाद्दर वंडेकर यांचीं सहकारी चळवळीचा इतिहास व प्रगति, सहकारी चळवळीवरील आक्षेप व त्यांचें निरसन, सहकारी चळवळीच्या प्रगतिपथांतील अडचणी व तिचें कार्यक्षेत्र वगैरे महत्त्वाच्या मुद्यांवर अत्यंत उद्बोधक भाषणें झालीं. शेवटीं अध्यक्षांनीं समारोपादाखल भाषण करून ऑल इंडिया को. इन्स्टिट्यूटकडून आलेला संदेश व ठरावाचा मसुदा वाचून दाखविला व तो ठराव सर्वानुमतें टाळ्यांच्या गजरांत पास झाला. शेवटीं अध्यक्षांचे आभार मानल्यावर चहापान होऊन समारंभ समाप्त झाला.

### बागलाण सहकारीवृत्त

सटाणा ता. को. सु. यूनियनच्या विद्यमानें सामील सोसायट्यांचे निताणे, जराई, चौंधाणे व खामलोण अशा चार सोसायट्यांच्या गांवीं ग्रुप करून अखिल भारतीय सहकारी दिन ता. ७-११-३६ रोजीं मोठ्या प्रमाणांत साजरा करण्यांत आला. खेड्यांतील जनतेंत जागृति होण्यासाठीं मुद्दाम सदरचे समारंभ खेड्यांत व तेहि ग्रुपवार घेण्याचें ठरविलें होतें.

किंमत ओव्हरकोट खरेदी करा
रु. १२॥ बुधवार चौक, पुणें

## विमा कायद्यांत दुरुस्ती

### मराठा चेंबरचें मत

विम्याचे कायद्यांतील सुधारणेसंबंधीं मराठा चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे तिच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष, प्रो. वा. गो. काळे, ह्यांनीं हिंदुस्थान सरकारच्या कायदा-मंत्र्यास एक पत्र लिहिलें आहे. नव्या कायद्याच्या मसुद्यासंबंधीं चाललेल्या चर्चेंत चेंबरचें म्हणणें विचारांत घेतलें जावें, ह्या हेतूनें वरील पत्र पाठविण्यांत आलेलें आहे. आयुर्विम्याचें काम करणाऱ्या मंडळ्यांची अलीकडे वाढलेली संख्या आर्थिक प्रगतीचें चिन्ह असलें, तरी मंडळ्यांचें काम सुरक्षित रीतीनें चालविण्यांत येऊन विमेदारांचें हितसंरक्षण होणें आवश्यक आहे. परदेशी कंपन्यांस हिंदुस्थानांत मिळणाऱ्या सवलती ह्यापुढें अजिबात बंद केल्या पाहिजेत, त्या कंपन्यांचे हिंदी व्यवहारांतील फंड्स बहुतांशीं हिंदी रोख्यांत गुंतविले गेले पाहिजेत व त्यांच्या कामासंबंधीं सरकारकडे पुरी माहिती दाखल करण्याची त्यांवर जबाबदारी टाकली पाहिजे. नवीन कंपन्यांनीं कामास सुरवात करण्यापूर्वी सरकारांत ठेवावयाच्या डिपॉझिटची रकम २५ हजारांवरून २ लाखांवर नेण्यांत यावी. ह्या २ लक्षांपैकीं १ लक्ष रुपये एका रकमेंत घेण्यांत येऊन बाकी हप्त्यानें भरण्याची सवलत असावी. ह्या योजनेमुळें अव्यवहारी व पैशानें दुर्बल उत्पादकांवर नियंत्रण बसेल. लॅप्स झालेल्या कामाचे आकडे जाहीर झाले पाहिजेत. विमेदारांस नफा वांटतांना कंपन्यांनीं आपल्या ॲक्चुअरीच्या सल्ल्याविरुद्ध वागल्यामुळें व स्पर्धेस बळी पडल्यामुळें विमेदारांच्या हितास धक्का लागण्याचा प्रसंग येतो; ह्या गोष्टीस प्रतिबंध झाला पाहिजे. विमेदारास रीबेट देण्याच्या एजंटांच्या घातुक पद्धतीस आळा घालणें जरूर असून, त्यासंबंधांतील उपाययोजना कुशलतेनें केली पाहिजे. चेंबरनें आपल्या पत्रांत वरील सुधारणा सुचविल्या असून, त्या अमलांत आल्यास विमा कंपन्या व विमेदार ह्या दोघांच्याहि हितसंबंधांचें संरक्षण होईल व विमा व्यवसायाची सुरक्षित मार्गानें प्रगति होईल, अशी अपेक्षा त्यांत व्यक्त केली आहे.

**पाहिजेत.** नर्सिंगच्या ३॥ वर्षांच्या कोर्सकरितां जागा भरण्याच्या आहेत. वय १८ ते ३५ पर्यंत असावें व मराठी ५ वीपर्यंत व इंग्रजी ४ थीपर्यंत शिक्षण पूर्ण झाल्याचा दाखला असावा. गरजूंनीं खालील पत्त्यावर अर्ज करावेत.

जॉ. ऑ. सेक्रेटरी,

पुणें सेवासदन नार्सिंग ॲन्ड मेडिकल एज्युकेशन कमिटी, नर्सेस कॉर्टर्स, पुणें नं. २.

## NOTICE TO CONTRACTORS

Sealed percentage tender in form B–1 for the work of improvements to Bridge No. 63 in mile 13/5 of the Dharwar–Goa Road estimated to cost Rs. 11,399/– will be received by the undersigned on 14–12–1936 up to 2 P. M. Other particulars regarding the contract &c., can be had at the undersigned's office on any working day.

2. The acceptance of the tender rests with the undersigned and no reason will be given for the acceptance or rejection of any tender.

Ex. Engineer's Office, Dharwar. 21st November, 1936

P. K. Shinde
Executive Engineer,
Dharwar Division.

# वेस्टर्न इंडिया

## लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी–सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५

१९३५ मधील नवें काम ५१,३०,०४२ रु.

एकूण चालू काम २,७०,००,००० रु. अधिक

एकूण जिंदगी ७१,७१,०९३ रु.

लाइफ फंड ६०,४२,८७३ रु.

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

# एशियन पॉलिसी

म्हणजेचें

## आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत

**धी एशियन ॲशुरन्स कंपनी, लिमिटेड**

एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—९ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—१ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | १२०—८ |
| ४% १९६०-७० ... ... | ११६—० |
| ४% १९४३ ... ... ... | ११२—१ |
| ३½% बिनमुदत ... ... | १००—७ |
| ३½% १९४७-५० ... ... | १०७-१५ |
| २¾% १९४८-५२ ... ... | १०१—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११२—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | ११२—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | ११२—४ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | ११३—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२६-१० |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३४—४ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११६—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५-१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५६६—४ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १४०—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | १०४—८ |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९९—८ |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९१२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५५-१५ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २६०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २६५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ६½%) | १६७१—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६१५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २०१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १८०—४ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | २१८—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ८५८-१२ |

#### सोनें—चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळयास | ३५—३ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयास | ५२—२ |


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

**लक्ष्मीरोड, पुणें**

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२

अधिकृत भांडवल : : : १०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल : ५,००,०००
खपलेलें भांडवल : २,०५,६००
रोख भरलेलें भांडवल : १,०२,१६०

**दर शेअरची किं. : रु. ५०**

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंडया, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात. शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.



## धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा:—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:—

कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं. १ रु. ( ट. ख. निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें — पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये ?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख २ डिसेंबर, १९३६. अंक ४८

*For All Medicinal Requisites*
— TRY —
**N. MAHADEV & Co.**
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner, POONA 2.

**डेक्कन गोल्ड फ्लेक**

गो ल्ड फ्ले क

गिऱ्हाईकांच्या आवडीनिवडीचा पूर्ण विचार करून अनुभवी तज्ज्ञांच्या देखरेखीखालीं तयार केलेली ही सिगारेट फार लोकप्रिय झाली असल्यास नवल नाहीं.

*Apply for Agencies—*

**Deccan Tobacco Works,**
**Poona 4**
Tel. Address—'CIGARETTES' POONA.

**वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक**
आमचा इमारतीच्या बांधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात.
" गिलाव्याचा चुना हा तर आमचे चुन्याचे धंद्यांतील विशेष होय."
भाऊ गंगाधर साठे,
बिल्डिंग कॉंट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,
५१२ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणें २


" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "
स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्यां व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली.
पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—
**कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.**
अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी
हयातींतील विम्यास ३७॥ रु. | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास ४५ रु.
जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

स्वदेशी
कापड म्हणजे काय ?
(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.
या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.
हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.
खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण
**स्वदेशी भांडार**
लक्ष्मीरोड, पुणें २.

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः-ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः-

१ केळकर ब्रदर्स, बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी, लक्ष्मीरोड.


## विविध माहिती

### शांततेच्या स्थितींत लढाऊ खर्च वाढला

महायुद्धानंतर जगांत शांतता प्रस्थापित झाली, पण राष्ट्रांचा लढाऊ खर्च मात्र भयंकर वाढला आहे. जगांतला लढाऊ खर्च गेल्या दहा वर्षांत दीडपट व वीस वर्षांत दुप्पट झाला आहे. महायुद्धापूर्वी ह्या खर्चाचा आकडा १,००० कोटि रुपये होता, तो गेल्या सालीं २,००० कोटि झाला !

### ॲबिसिनियामध्यें कपाशीची लागवड वाढणार

ॲबिसिनिया घेतल्यापासून त्या देशांत कपाशीची लागवड वाढविण्याचे प्रयत्न इटलीनें चालविले आहेत. बीं पुरविणें, शेतकर्‍यांस धान्याचे स्वरूपांत व रोखीनें आगाऊ रकमा देणें, मालाचा उठाव करण्यास सहाय करणें, इत्यादि मार्गांनीं इटली ॲबिसिनियामध्यें कपाशीची लागवड सुधारण्याचा व वाढविण्याचा यत्न करीत आहे.

### ब्रिटिशांची "स्वदेशी" विषयींची निष्ठा

बादशहांच्या राज्यारोहण समारंभाचे संबंधांत निशाणें, पताका इत्यादि प्रकारचा माल परराष्ट्रांतून येईल, त्यावर १०० टक्के जकात घेतली जाईल असें जाहीर करण्यांत आलें आहे. स्वस्त परदेशी मालाची स्पर्धा अनिष्ट रीतीनें ब्रिटिश मालाशी होऊं नये हा वरील जबर जकातीचा हेतू आहे, असा खुलासाहि प्रसिद्ध झाला आहे.

### स्वित्सर्लंड देशांतून होणारी घड्याळांची निर्गत

स्वित्सर्लंड देश हा घड्याळें बनविण्याचे कामीं विशेष प्रसिद्ध आहे. त्या देशांतून दरसाल सरासरीनें परदेशांत एक कोटि घड्याळांची निर्गत होते.

### राष्ट्रसंघाचें गेलें अधिवेशन

राष्ट्रसंघाच्या नुकत्याच पार पडलेल्या अधिवेशनास ५८ सभासद राष्ट्रांपैकीं ५४ राष्ट्रांनीं आपले प्रतिनिधी पाठवले होते.

### जर्मनींत मेंढ्यांची वाढती संख्या

आर्थिक स्वयंसिद्धतेच्या तत्वास अनुसरून स्वदेशी लोकरीची पैदास वाढविण्याची खटपट जर्मन राष्ट्रानें चालविली आहे. जर्मनींतल्या मेंढ्यांची संख्या अलीकडे ३४ लक्षांची ५० लक्ष झाली आहे हें या प्रयत्नांस येणाऱ्या यशाचें गमक आहे. तथापि, हा आकडा ६० लक्षांपर्यंत चढला पाहिजे असें तज्ज्ञांचें म्हणणें आहे. मेंढपाळांचा धंदा शिकवण्याची एक शाळा जर्मनींत स्थापन झाली आहे.

### फ्रेंच मध्यवर्ती बँकेचा व्याजाचा दर उतरला

सोनें देशाच्या बाहेर जाऊं नये म्हणून बँक ऑफ फ्रान्सला आपला व्याजाचा दर चढवावा लागला होता. हुंडणावळीच्या नवीन धोरणामुळें सोन्याच्या निर्गतीची भीति नाहींशी होऊन व्याजाचा दर २ टक्केपर्यंत आतां उतरवण्यांत आला आहे.

### संपत्तीचा सदुपयोग

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटींत वैद्यकाचें शिक्षण व त्या शास्त्रांतलें संशोधन कार्यक्षम रीतीनें चालावें म्हणून लॉर्ड न्यूफील्ड ह्यांनीं सुमारें १३ कोटि रुपयांची देणगी मागें दिली होती. आतां तीमध्यें त्यांनीं आणखी १ कोटि रुपयांची भर घातली आहे. लॉर्ड न्यूफील्ड ह्यांची एकूण संपत्ति सुमारें २५ कोटि रुपये आहे आणि त्यांनीं सार्वजनिक हितासाठी इतरहि देणग्या दिल्या आहेत.

### हिंद-ब्रिटन व्यापारी करार

ओटावा कराराच्या ऐवजीं ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान ह्यांचे मध्यें नवीन व्यापारी करार व्हावयाचा आहे. ब्रिटिश मालास परदेशी मालाच्या मानानें विशेष सवलती मिळण्याची व्यवस्था नवीन करारांत केली जावी असें कॉमन्स सभेंत एका सभासदानें सुचवलें असतां ब्रिटिश कारखानदारांच्या हिताचें योग्य संरक्षण होण्याची दक्षता अवश्य बाळगली जाईल असें उत्तर सरकारतर्फे देण्यांत आलें.

### बीर पेयाचा जर्मनींत खप

बीर जातीची दारू पिण्याविषयीं जर्मन जनतेची प्रसिद्धी आहे. जर्मन राष्ट्राच्या एकूण वार्षिक उत्पन्नांतली ५ टक्के रकम ह्या पेयावर खर्चली जात असे आणि ह्या बाबतींत आतां ६ टक्क्यांपर्यंत प्रगति झाली आहे.

### रूसो-फ्रेंच हुंडणावळ

रशिया व फ्रान्स ह्यांचे दरम्यानचा हुंडणावळीचा दर १ रशियन रूबल : ३ फ्रेंच फ्रँक होता, तो आतां १ : ४½ असा करण्यांत आला आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २१ नोव्हेंबर रोजीं पुरा झालेला आठवडा. | ४३,३६,०५९ |
| ता. २८ नोव्हेंबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ६९,६३,२८३ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते २८ नोव्हेंबर १९३६ अखेर. | २,८८,३७०२,३६४ |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५७६ | ७ साखरेच्या उत्पादनांत वाढ ... ... | ५८० |
| २ मुंबईच्या रोखेबाजाराबाबत चौकशी ... | ५७७ | ८ सुरत जिल्ह्यांतील सहकारी चळवळींची प्रगति | ५८१ |
| ३ डिव्हिडंड का गंगाजळी? | ५७८ | ९ बँका व त्यांचे खातेदार | ५८२ |
| ४ स्फुट विचार ... | ५७८ | १० रे म्यूझियमला देणगी | ५८२ |
| मुंबईचा कपास बाजार— मुंबई म्युनीसिपल बँकेची योजना नामंजूर—महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई— सरकारी हवापाणी खात्याची कामगिरी | | ११ मि. रूझवेल्ट ह्यांचा विजय ... ... | ५८२ |
| | | १२ कृत्रिम तूप ... ... | ५८३ |
| | | १३ आंतरराष्ट्रीय व्यापार वाढत आहे ... .. | ५८३ |
| ५ पुणें शहाराची आर्थिक पहाणी ... | ५७९ | १४ वऱ्हाडावरील निजामांचें स्वामित्व ... ... | ५८४ |
| ६ जपानची औद्योगिक प्रगति ... ... | ५८० | १५ निवडक बाजारभाव | ५८५ |

अर्थ

बुधवार, ता. २ डिसेंबर, १९३६

## मुंबईच्या रोखे बाजाराबाबत चौकशी

संपत्तीवरील मालकी सिद्ध करणाऱ्या कागदपत्रांची व रोख्यांची देवघेव आधुनिक काळांत झपाट्यानें वाढली आहे. उद्योगधंदे व व्यापार मोठ्या प्रमाणावर होण्यास लागणारा अमर्याद पैसा नियमित जबाबदारीच्या तत्त्वावर समाइक भांडवलाच्या मंडळ्यांच्या मार्फत उभा करण्याची पद्धति फैलावल्यामुळें ह्या रोख्यांच्या व्यवहारांस विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. व्यक्तींनीं कंपन्यांचे भाग खरेदी केले असतां त्यांस मालकी हक्काचा कागद मिळतो आणि तो विकून त्याची रोकड उभी करण्याची त्यांस सोय असते. सरकारनें व निमसरकारी संस्थांनीं काढलेल्या कर्जांत ह्याच तऱ्हेनें व्यक्तींस आपला पैसा गुंतवतां येऊन त्याची मालकी दर्शविणारे रोखे खरेदतां व विकतां येतात. मंडळ्यांचे भाग व कर्जरोखे ह्यांत गुंतलेल्या पैशावर योग्य वेळीं नफा व व्याज मिळून मूळ मुद्दल रोकडीनें पुन्हां हातीं येण्याची व्यवस्था झाल्यानें उद्योगधंदे व व्यापार वाढण्यास सहाय होतें आणि त्याबरोबर जनतेस आपला पैसा किफायतशीरपणानें घालण्याची संधी प्राप्त होते. भाग व रोखे ह्यांच्या देवघेवीची पद्धति अस्तित्वांत नसेल तर आर्थिक प्रगतीस आवश्यक असलेलें भांडवल उद्योगधंद्यांस व व्यापारास मिळण्याची अडचण पडेल आणि लोकांचा पैसाहि अनुत्पादक रीतीनें पडून राहील. शिलकी संपत्तीचा विनियोग आर्थिक व्यवसायांच्या अभिवृद्धीसाठीं होण्यास रोख्यांच्या व भागांच्या देवघेवीचा व्यवहार सामाजिक हिताच्या दृष्टीनें किती उपयुक्त आहे हें ह्यावरून सहज ध्यानांत येईल. जनतेची रहाणी सुधारण्यास संपत्तीचें उत्पादन व विनिमय सुरळीत व्हावयास पाहिजे आणि त्यासाठीं भरपूर भांडवलाची आवश्यकता असते. हें भांडवल जनतेच्या बचतीमधूनच मिळतें आणि त्याची देवघेव रोखे व मंडळ्यांचे भाग ह्यांच्या द्वारें होत असते. आर्थिक व्यवहारांत पैसा खेळण्याच्या व्यवस्थेची ह्या प्रकारची साखळी बनते आणि आधुनिक औद्योगिक व्यवस्थेचें तें अत्यंत महत्त्वाचें लक्षण होऊन गेलें आहे.

कोणत्याहि मालाची खरेदी-विक्री म्हटली कीं त्याचा बाजार आणि त्यांतले धंदेवाले ह्यांची घटना ह्या गोष्टी आल्याच. त्याप्रमाणें, रोखे व मंडळ्यांचे भाग ह्यांचा स्वतंत्र बाजार व त्यांत व्यवहार करणारे दलाल ह्यांची उत्क्रांति झालेली आहे. मुंबई, कलकत्ता ह्यांसारख्या मोठ्या शहरीं हिंदुस्थानांत रोखे बाजार स्थापन होऊन विशिष्ट नियमास अनुसरून त्यांचें काम चालतें. लंडन, न्यूयॉर्क वगैरे रोखे बाजारांच्या धर्तीवर ही व्यवस्था असते, हें सांगावयास नको. रोखे बाजाराचें नियंत्रण त्यांतील दलालांच्या हातीं असणें स्वाभाविक असलें तरी त्यांच्या व्यवहारांचा संबंध सामान्य जनतेच्या हिताशी येतो, ह्या कारणानें सरकारास त्यांवर नजर ठेवणें आवश्यक असतें. मुंबईच्या रोखे बाजारांत दररोज लक्षावधि रुपयांची उलाढाल होते, तीमध्यें लोकांच्या हितास बाध येईल असे प्रकार न होऊ देण्याची जबाबदारी सरकारावर येते, ह्याचें मुख्य कारण वायद्यांच्या व्यवहारांमुळें उडणारा गोंधळ हें आहे. रोख्यांची देवघेव रोखीनें झाल्यास त्यांत फारशी भानगड होण्यास जागा नसते. निरनिराळ्या क्लृप्त्या योजून कृत्रिम रीतीनें रोख्यांचे व भागांचे भाव चढवणें व उतरवणें हे प्रकार इतर बाजारांप्रमाणें येथेंहि होणार. पण खरेदी-विक्रीच्या वायद्याच्या पद्धतींत जुगारीच्या स्वरूपाच्या व्यवहारांस वाव व उत्तेजन मिळतें आणि त्यामुळें रोख्यांच्या भावांत भलतीच चढघट होऊन सामान्य व्यक्ति व संस्था ह्यांचें नुकसान होण्याची भीति असते. भाव वर-खालीं होऊन आपल्या पदरांत फायदा पाडून घेण्याच्या आशेनें कित्येक लोक ऐपतीच्या बाहेर वायद्याचे सवदे करतात आणि ते पुरे करण्याचा प्रसंग आला असतां रोखे प्रत्यक्ष देणें किंवा स्वीकारणें त्यांच्या शक्तीबाहेरचें असतें. अशा वेळीं रोखे बाजाराचें नियंत्रण-मंडळ मध्यें पडून विशिष्ट भावानें करार पुरे केले जावे असा निर्णय देतें आणि देण्याघेण्याचा व्यवहार हातावेगळा करण्याची सवलत जुगारी वृत्तीच्या धंदेवाल्यांस मिळते. अशा तऱ्हेचीं उदाहरणें अनेक वेळां घडलेलीं आहेत. नियंत्रण-मंडळ ही तडजोड सद्धेतूनेंच करीत असलें तरी आणि ती न केल्यास सर्व बाजारावर आपत्ति कोसळण्याची भीति असली तरी जुगारी वृत्तीस आळा घालण्यांत त्यांस यश येत नाहीं आणि कृत्रिमपणानें चढवलेल्या किंवा उतरवलेल्या किंमतीमुळें हजारो निरुपद्रवी लोकांचें व संस्थांचें नुकसान होतें तें टळत नाहीं. मुंबईच्या रोखे बाजाराची सदोष व्यवस्था सुधारावी म्हणून सरकारनें मागें ॲटले कमिटी नेमली होती. परंतु तिच्या शिफारसींचा आणि व्यवस्था मंडळानें केलेल्या सुधारणांचा फारसा उपयोग झालेला नाहीं. अधिकृत दलाल, त्यांचे हस्तक व बाजारांत व्यवहार करणारे धंदेवाईक लोक ह्यांचे परस्पर संबंध कसे असावे, बाजारांत ऐपतीबाहेर व्यवहार होणार नाहींत ह्या विषयीं खबरदारी कशी घ्यावी, बाजारभाव भरमसाटपणें कमी-जास्त न होऊं देण्यास कोणते उपाय योजावे, दलालांचें कार्यक्षेत्र मर्यादित कसें करावें आणि सामान्य गिऱ्हाईकांची चांगली सोय कशी करावी हे महत्त्वाचे प्रश्न येथें उद्भवतात. ह्या संबंधांत बाजाराच्या सध्याच्या चालू व्यवस्थेवर विसंबून भागत नाहीं असें अनुभवावरून दिसून आल्यामुळें मुंबई सरकारनें ह्या सबंद प्रकरणाची चौकशी करण्यासाठीं नुकतीच एक कमिटी नेमली आहे. लंडनच्या रोखे बाजाराचा अनुभव असलेल्या एका तज्ज्ञाची अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यांत आली असून सर सोराबजी पोचखानवाला हे एक सभासद आहेत. जनतेच्या हिताच्या दृष्टीनें कमिटीची चौकशी अत्यंत महत्त्वाची आहे. व्यक्ति, संस्था, बँका, विमामंडळ्या, ह्यांस आपला पैसा रोखे बाजारांतील दलालांच्या मार्फत रोख्यांत घालावा व त्यांतून काढावा लागतो. ह्या व्यवहारांत वाजवीपेक्षां अधिक चढ-उतार न होणें आणि रोखे बाजारांतील उलाढालींस जुगाराचें स्वरूप प्राप्त न होणें हें सर्वांच्याच हिताचें आहे. कमिटी काय शिफारसी करते आणि त्या अमलांत येण्याची कोणती व्यवस्था सरकार घडवून आणतें हें आतां पहावें.

## डिव्हिडंड का गंगाजळी ?

व्यापारी व औद्योगिक संस्थांच्या चालकांचे पुढें दरवर्षी उभा रहाणारा प्रश्न म्हटला म्हणजे नफ्यापैकीं किती रकम गंगाजळी, घसारा इत्यादि करितां बाजूस काढून ठेवावी व किती डिव्हिडंड म्हणून भागीदारांमध्यें वांटून टाकावी, हा होय. नफा झाला कीं वांटून टाकावा, पुढचें पुढें पहातां येईल, अशी वृत्ति अदूरदृष्टीची व बेजबाबदारपणाची गणली जाणें हें इष्ट आहे, ह्यांत विचारी लोकांचें एकमत होण्यासारखें आहे. पुढें येणाऱ्या वाइट दिवसांची तरतूद वेळोवेळीं करणें आणि संस्थेस स्थैर्य प्राप्त होऊन तिच्या-संबंधानें जनतेंत विश्वास उत्पन्न होईल अशी व्यवस्था करणें हें मंडळ्यांच्या व संस्थांच्या चालकांचें कर्तव्य समजलें पाहिजे व त्यांच्या ह्या धोरणास बहुमताचा पाठिंबा मिळाला पाहिजे. सहकारी बँकांनीं ७½ टक्क्यांचे वर नफा वाटूं नये असा निर्बंध घालण्यांत आला आहे. त्याचा हेतु हाच आहे. सध्याच्या आर्थिक मंदीच्या अस्थिर परिस्थितींत राष्ट्रीय सरकारें नफ्यापैकीं किती भाग गंगाजळींत टाकावा व किती वांटावा ह्याच्या मर्यादा घालीत असून देशहितासाठी तसें करणें त्यांस आवश्यक वाटत आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ह्यासंबंधांतलीं धोरणें परिस्थितीस अनुसरून भिन्नभिन्न आहेत ही गोष्ट मात्र विशेष बोधप्रद आहे. नफ्याचा जो अंश डिव्हिडंड म्हणून वांटण्यांत येणार नाहीं, त्यावर अमेरिकेंत एक नवीन कर बसवण्यांत आला आहे, त्याचा हेतु संपत्ति गंगाजळींत थिजून न बसतां लोकांच्या हातांत खेळावी आणि आर्थिक मंदीच्या निवारणास सहाय व्हावें, हा आहे. हा नवा कर ७ ते २७ टक्के पर्यंत आकारण्यांत येतो. चालू वर्षाच्या जुलै ते सप्टेंबर ह्या तीन महिन्यांत गेल्या वर्षांतल्या ह्याच मुदतीच्या मानानें कंपन्यांनीं वांटलेलें डिव्हिडंड ३२ टक्के वाढलें असून नव्या कराचा अपेक्षित परिणाम घडून आलेला स्पष्ट दिसत आहे. जर्मनींतला डिव्हिडंडच्या बाबतींतला कायदा ह्याच्या उलट आहे. ६ टक्के डिव्हिडंड वांटून राहील तो नफा विशिष्ट फंडांत टाकलाच पाहिजे अशी जर्मनींत सक्ती आहे. ह्या देशांत भांडवलाचा तुटवडा झाला असून औद्योगिक अभिवृद्धीस लागणारा नवीन पैसा धंद्यांच्या नफ्यांतूनच उत्पन्न व्हावा ह्याची आवश्यकता तेथें तीव्रतेनें भासत आहे म्हणून जर्मन सरकारास असा निर्बंध घालणें प्राप्त झालें आहे. दुखणें एकच असलें तरी रोग्याच्या विशिष्ट परिस्थितीप्रमाणें भिन्न भिन्न उपाययोजना करणें राष्ट्रीय सरकारांस कसें योग्य वाटतें, याचें हें बोधप्रद उदाहरण आहे. दोन्ही राष्ट्रांस मंदी हाटवावयाची आहे. पण एकांत भांडवलाचा विपुल पुरवठा आहे तर दुसऱ्यांत तें पुरवून वापरावें लागत आहे. आर्थिक प्रश्नांचा निर्णय मार्मिकपणानें करण्याची आवश्यकता ह्या वस्तुस्थितीवरून उत्कृष्ट रीतीनें सिद्ध होत आहे.

---

### लोकसंख्या वाढविण्याचें रशियाचें धोरण

रशियामध्यें दरसाल सरासरीनें ६० लक्ष अर्भकें जन्मास येतात व लोकसंख्येंत ३५ लाखांची भर पडते. रशियाची आजची लोकसंख्या १७½ कोटि असून त्यांपैकीं ४३ टक्के माणसें १८ वर्षांखालील वयाचीं आहेत. गेल्या जुलैमध्यें, रशियानें भ्रूणहत्या बेकायदा ठरविली. ह्या योजनेचे मुळाशीं सार्वजनिक आरोग्य सुधारण्याचें धोरण तर आहेच, परंतु त्याबरोबरच लोकसंख्या वाढविण्याचा अंतिम हेतुहि त्यामध्यें आहे.

# स्फुट विचार

### मुंबईचा कपास बाजार

मुंबईच्या रोखबाजारच्या व्यवस्थेंत सुधारणा होण्याविषयीं चाललेल्या प्रयत्नांचें विवेचन आजच्या अग्रलेखांत आम्हीं केलें आहे. तेथील कपास बाजारासंबंधानेंहि बरेच दिवस तक्रारी ऐकावयास येत असून त्यांतील व्यवहाराबाबत कायद्याचा सरदार भीमभाई नाईक यांचा खर्डा प्रांतिक कायदेमंडळापुढें आला होता. मुंबईंत कपाशीचा व्यवहार करणाऱ्या, धंदेवाल्यांच्या विशिष्ट गटांस ह्या होऊं घातलेल्या कायद्यांतलें मुख्य तत्व अमान्य असल्यानें बहुतांशीं त्यांच्या खटपटीमुळें वरील बिल विचारासाठीं पुढें आलें नाहीं. ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनच्या विद्यमानें मुंबईस कपाशीचा व्यापार मुख्यत्वेंकरून चालतो. पण ह्या संस्थेची मक्तेदारी व्यापाऱ्यांच्या हितास पोषक नाहीं आणि लहान प्रमाणावर सवदे करूं इच्छिणाऱ्या धंदेवाल्यांकरितां दुसरा बाजार अस्तित्वांत असणें जरूर आहे असें प्रतिपादण्यांत येत आहे. ह्याच्या उलट असा युक्तिवाद करण्यांत येत आहे कीं, कपाशीच्या व्यापाराची व्यवस्था व नियमन एकाच संस्थेच्या हातीं असल्यावांचून व्यवहार सुरळीत चालणें अशक्य आहे. ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनच्या व्यवस्थेविरुद्ध बॉंबे मिल ओनर्स असोसिएशन व बॉंबे चेंबर्स ऑफ कॉमर्स ह्या वजनदार संस्थांनीं आक्षेप घेतले आहेत. प्रचलित व्यवस्थेंत दलालांचें प्राबल्य असल्यानें उत्पादक व खरेदीदार ह्यांच्या हिताचें संरक्षण नीट होत नाहीं आणि दलाल लोक स्वतःच्या क्षेत्राच्या बाहेर जाऊन आपणच सट्टे करतात असा आरोप करण्यांत आला आहे. ह्या व इतर तक्रारींस ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनचे अध्यक्ष, सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास, ह्यांनीं ठसठशीत उत्तर दिलें असून आपल्या संस्थेवर करण्यांत आलेले आरोप सर्वथा निराधार असल्याचें प्रतिपादलें आहे. तथापि, ह्या महत्त्वाच्या वादाचा निकाल असल्या उत्तर-प्रत्युत्तरांनीं लागण्यासारखा नसल्यानें त्यांत भाग घेणाऱ्या तीन संस्थांच्या प्रतिनिधींनीं एकत्र जमून मनमोकळी चर्चा गेल्या शुक्रवारीं करण्याचें ठरविलें ही समाधानाची गोष्ट आहे. कपास पिकवणारा शेतकरी वर्ग, खरेदीदार आणि दलाल ह्यांच्या एकमतानें बाजाराची व्यवस्था चालेल तर तें इष्ट आहे. विशेषतः शेतकऱ्यांच्या मालास चांगला भाव येईल आणि दलाल व गिरणीवाले ह्यांच्या चक्रांत सांपडून त्यांच्या हिताची हेळसांड होणार नाहीं अशी खबरदारी घेतली जाणें अगत्याचें आहे.

### मुंबई म्युनिसिपल बँकेची योजना नामंजूर

मुंबई शहराची लोकसंख्या, तिचें व्यापारी व औद्योगिक महत्त्व, इत्यादि गोष्टी लक्षांत घेतां, तिची म्युनिसिपालिटी ही एक श्रीमान, वजनदार व नाणावलेली संस्था असणें स्वाभाविक आहे. तिची कार्यक्षमता व तिच्या सभासदांचा नगराभिमान आणि बाणेदारपणा ह्याबद्दल चोहोंकडे लौकिक झालेला आहे. तिचें उत्पन्न सुमारें तीन कोटि रुपये असून पाणी पुरवठा व ड्रेनेज ह्यांसारख्या कामासाठी कोट्यवधि रुपये तिनें खर्चिले आहेत. मुंबई म्युनिपालिटीचा सर्वच कारभार मोठ्या प्रमाणावर चालत असल्यानें पैशाचे व्यवहारहि तिला विस्तृत प्रमाणांत करावे लागतात. ह्यावरून कांहीं सभासदांस अशी कल्पना सुचली कीं, म्युनिसिपालिटीनें स्वतःची एक बँक काढावी आणि तिच्या मार्फत पैसे देण्याघेण्याचे आणि कर्जें काढण्याचे व फेडण्याचे व्यवहार

करावें. ह्याच्या योगानें म्युनिसिपालिटीचीं स्वतःचीं पैशाचीं कामें स्वस्त रीतीनें व सोयवार होऊन व मुंबई शहरांत नांव घेण्यासारखी एक नवीन नमुनेदार बँकिंगची संस्था निर्माण होऊन नागरिकांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें फायदा होईल. मोठे धंदेवाले ज्याप्रमाणें आपल्या मुख्य धंद्याचीं उपांगें स्वतंत्र रीतीनें पण त्यास जोडून चालवतात आणि ह्या रीतीनें कच्चा व दुय्यम माल हवा तसा व स्वस्त मिळण्याची तरतूद करतात, त्याचप्रमाणें मुंबई कॉर्पोरेशननें आपली बँक काढून चालवावी हें तत्त्व त्या कल्पनेच्या बुडाशी होतें. परंतु मोठी नामांकित म्युनिसिपालिटी झाली तरी अशा स्थानिक संस्थेनें बँकिंगसारख्या नाजुक स्वरूपाच्या धंद्यांत पडावें कीं काय आणि मुंबई शहरांत रोखे बाजार आणि अनेक प्रसिद्ध बँका असतांना ह्या तिच्या साहसापासून नागरिकांचें हित साधेल किंवा काय हा वादग्रस्त प्रश्न चिंतनीयच होता. म्युनिसिपालिटीनें करावयाचीं सर्व मुख्य कामें झालीं, आतां बँक चालवावयाचें तेवढें राहिलें, असें कोणीहि म्हणणें शक्य नव्हतें. हे आक्षेप व अडचणी शेवटीं प्रभावी ठरून गेल्या आठवड्याच्या कॉर्पोरेशनच्या सभेंत हें प्रकरण नकारार्थानें निकालांत काढण्यांत आलें.

### महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई

वरील संस्था १९२७ सालीं स्थापन होऊन तिला आतां ९ वर्षें पूर्ण झालीं आहेत. ३० सप्टेंबर १९३६ अखेर संपलेल्या वर्षी चेंबरचे पटावर १८६ सभासद होते; मुंबईमधील ८८,संस्थानांतील २३ व बाहेरील ७५, अशी त्यांची वर्गवारी होती. अहवालाचे वर्षी, महाराष्ट्रांतील व्यापारी व कारखानदार ह्यांचेतर्फे वेळोवेळ स्थानिक व मध्यवर्ती सरकाराकडे व स्थानिक स्वराज्य संस्थांकडे गाऱ्हाणीं नेऊन चेंबरनें महाराष्ट्रीय उद्योगधंद्यांचें हितसंरक्षण करण्याच्या प्रयत्न केला, त्यासंबंधीं अहवालामध्यें सविस्तर माहिती देण्यांत आलेली आहे. शेठ वालचंद हिराचंद ह्यांनीं चेंबरच्या स्थापनेपासून तिच्या कार्यांत जातीनें लक्ष घातलें आहे व अध्यक्षांचे जागीं त्यांचीच निवड होत आली आहे. आपला वार्षिक अहवाल तत्परतेनें प्रसिद्ध करून चेंबरनें इतर संस्थांस कित्ता घालून दिला आहे, ह्यांत संशय नाहीं. चेंबरनें बजावलेल्या कामगिरीबद्दल तिच्या चालकांचें अभिनंदन करणें जरूर आहे.

### सरकारी हवा–पाणी खात्याची कामगिरी

हिंदुस्थानसरकारच्या हवा पाणी खात्याचें काम दिवसानुदिवस वाढत जाणार असून तें अधिकाधिक जबाबदारीचें होणार, असें स्पष्ट दिसत आहे. विमानांच्या वाढत्या वहातुकीबरोबर हवा-पाणी खात्याचे कामांतहि भर पडेल. रात्रीचे वेळीं विमानें चालवावयाचीं, म्हणजे वरच्या हवेंतील परिस्थितीची पूर्ण कल्पना वैमानिकांस करून देण्याची अगोदर २४ तास जय्यत तयारी पाहिजे. हिंदुस्थान, सयाम, मलाया, इंडो–चायना, ह्या मार्गानें विमानांची वहातुक आतां वक्तशीरपणें होऊं लागली आहे. १९३५-३६ सालीं, वैमानिकांस जरूर ती माहिती देणारे ८,६२४ अंदाज हवा-पाणी खात्यानें वेळोवेळ पुरविले. पाऊस व उष्णतामान ह्या संबंधींचे अंदाज हे वेगळेच. हिंदुस्थान, ब्रह्मदेश, पोर्ट-ब्लेअर व सयाम ह्या सर्वांत मिळून सरदहू खात्याच्या ३०० वर वेधशाला आहेत. ह्या खात्याची मध्यवर्ती कचेरी व वेधशाळा पुणें येथें आहे व तेथूनच पाऊसपाण्याचे व उष्णतामानाचे रोजचे मामुली आंकडे व अंदाज प्रसिद्ध केले जातात.

## पुणें शहराची आर्थिक पाहणी

### जाहीर विनंति

[ गोखले मंदिरानें हातीं घेतलेल्या आर्थिक पाहणीच्या कार्यास नागरिकांचें सहकार्य लाभावें, म्हणून पुणें येथील प्रमुख नागरिकांच्या सहीनें प्रसिद्ध करण्यांत आलेलें विनंतिपत्रक येथें दिलें आहे. सर्वांचे सहानुभूतिपूर्वक सहाय मिळाल्याशिवाय कामाची योग्य प्रगति होणार नाहीं. याकरितां सर्वांनीं ह्या कार्यास शक्य ती मदत करणें अगत्याचें आहे. ]

शहरांची पाहणी करण्याची जरूरी दिवसानुदिवस सर्वत्र वाढत्या प्रमाणांत भासूं लागली आहे. कोठल्याहि रोगाचें स्वरूप पूर्णपणें आकलन झाल्याशिवाय त्यावर उपाययोजना करणें अशक्य असते. हीच गोष्ट व्यापार–उद्योगधंद्यांच्या बाबतींत. व्यापार–उद्योगधंदे चांगल्या रीतीनें चालावेत व त्यांची भरभराट व्हावी अशी इच्छा असेल तर त्यांची सध्याची परिस्थिति काय आहे, ती तशी असण्याचीं कारणें काय, तींत कांहीं सुधारणा करतां येणें शक्य आहे काय, असल्या गोष्टींचा विचार प्रथम करणें जरूर आहे. ह्या दृष्टीनें गोखले संशोधन–मंदिरानें पुणें शहरांतील व्यापार–धंद्यांची सध्याची परिस्थिति काय आहे हें अजमावण्याचें व जुळल्यास कांहीं सूचनाहि करण्याचें बिकट पण अत्यंत उपयुक्त असें कार्य हातीं घेतलें आहे. ह्या आर्थिक पहाणीबरोबरच शहरांतील राहतीं घरें, आरोग्य, शिक्षणप्रसार, इत्यादींचीहि पहाणी करण्याचा मंदिराचा विचार आहे. नगरसभांनीं हातीं घ्यावयाच्या शहर–सुधारणेच्या सर्व प्रकारच्या योजनेस असल्या पहाणीचा फार उपयोग होईल हें उघड आहे. आनंदाची गोष्ट ही कीं, या कामाच्या खर्चापैकीं बराच मोठा भाग आपण पत्करून या कामाचा पुरस्कार करण्याचें पुणें नगरसभेनें व उपनगर सभेनें ठरविलें आहे.

गोखले राजकारण–अर्थशास्त्र–संशोधन–मंदिरानें हातीं घेतलेलें हें शहराच्या पहाणीचें कार्य जरी बिकट असलें तरी तें सुकर करणें जनतेच्या हातीं आहे. ह्या कामीं जनतेनें पूर्णपणें सहकार्य व मदत करणें अतिशय जरूरीचें आहे व ह्या मदतीवरच पहाणीचें यशापयश सर्वस्वीं अवलंबून आहे. पहाणी करण्याचीं मुख्य साधनें म्हणजे व्यापारी, कारखानदार इत्यादींचे घरोघर जाऊन प्रश्न–पत्रिकेवर माहिती टिपून घेणें, निरनिराळ्या व्यापारी–कारखानदारांच्या मंडळ्या व संघ यांजकडून संघटित माहिती घेणें, तसेच निरनिराळ्या पेठांतील व वस्तींतील कांहीं कुटुंबांची नमुन्यादाखल सविस्तर माहिती मिळविणें हीं होत. गोखले संशोधन मंदिराला माहिती पुरविल्यानें आपले हितास कोणत्याहि प्रकारें धोका पोहोंचेल अशी थोडीसुद्धां भीति बाळगण्याचें कारण नाहीं, असें आम्ही सांगूं इच्छितों. त्याचप्रमाणें, हें संशोधन परिणामीं पुणें शहराच्या उर्जितावस्थेच्या दृष्टीनें अत्यंत उपयोगी ठरेल अशी आम्हांस खात्री वाटते. तेव्हां हें समाजाचें कार्य आहे असें मानून सर्व नागरिकांनीं त्यास हातभार लावावा अशी त्यांस आमची विनंति आहे.

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २

## जपानची औद्योगिक प्रगति व हिंदुस्थाननें घेण्यासारखा बोध

बंगळूरच्या श्रीराम सिल्क थ्रोइंग फॅक्टरीचे श्री. नारायणराव नाइक, ओगले कांचकारखान्याचे श्री. आत्मारामपंत ओगले आणि मेसर्स रानडे ब्रदर्सचे, श्री. राजाभाऊ रानडे हे तिघे महाराष्ट्रीय अलीकडे जपानचा प्रवास आटोपून स्वदेशीं परत आले आहेत. त्यांचा सत्कार मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजनें गेल्या शनिवारीं केला आणि जपानमधले आपले अनुभव निवेदन करण्याची त्यांस विनंति केली. तीस मान देऊन तिन्हीं पाहुण्यांनीं जपानी लोकांनीं केलेल्या विलक्षण औद्योगिक प्रगतीचें रहस्य आपापल्या कल्पनेप्रमाणें चेंबरचे सभासद व इतर श्रोते यांचेपुढें मांडलें. त्यांच्या भाषणांतले ठळक मुद्दे खाली दिले आहेत.:—

१ जपानमध्यें मोठ्या कारखान्यांइतकेंच महत्त्व घरगुती छोटेखानी धंद्यांस आहे.

२ बहुतेक सर्व जनता साक्षर असून मुलांमुलींस धंदेशिक्षण देण्याची उत्कृष्ट सोय शाळांतून केलेली आहे.

३ जपान हें उद्योगधंद्यांचें राष्ट्र आहे असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. खेडेगांवांत सर्वत्र हरतऱ्हेचे धंदे चाललेले आढळतात.

४ तेथील मजुरीचे दर आणि कुटुंबांचें उत्पन्न फार आहे असें नाहीं. पण जनता सुखी व आनंदी दिसली.

५ जपानमध्यें हजारों कांचेचे कारखाने आहेत व त्यांमध्यें लहान प्रमाणावर चालणाऱ्या धंद्यांचें प्राबल्य आहे.

६ रेशमाच्या धंद्याची उन्नति जपाननें कळसास नेऊन पोंचवली आहे.

७ वहातुकीच्या सोयी उत्कृष्ट आहेत; आणि सरकारचें सहाय असल्या अनेक सोयींच्या द्वारेंच मुख्यत्वेंकरून मिळतें. मालाची विक्री करण्यासाठी सरकारच्या देखरेखीखाली व्यवस्था आहे. त्यामुळें अनिष्ट स्पर्धा व खप होण्याची अडचण हीं भासत नाहींत.

८ जपानमध्यें धंदेशिक्षण स्वस्त मिळण्याची चांगली व्यवस्था असल्यानें हिंदी तरुणांनीं तिचा फायदा घेणें फायदेशीर होईल.

९ जपानी लोक अत्यंत उद्योगी व कार्यक्षम आहेत. रेशमाचे धंद्याबाबत संशोधन व सुधारणा त्यांनीं सतत चालू ठेवूनच त्या धंद्यांत पाश्चात्य राष्ट्रांस मागें सारलें आहे.

१० जपानमध्यें कित्येक मोठे कारखाने आहेत परंतु लहानसहान व घरगुती धंद्यांची संख्या तेथें प्रचंड आहे.

११ लहान प्रमाणावरची यंत्रसामुग्री व कच्चा माल थोड्या भांडवलांत व सोयीनें मिळण्याची जपानांत उत्कृष्ट व्यवस्था आहे.

१२ जपानी लोकांची टापटीप, स्वच्छता व आदबीची वागणूक वाखाणण्यासारखी आहे.

१३ आपापसांत भांडणें व मारामाऱ्या करण्याची प्रवृत्ति त्यांचेमध्यें दिसून येत नाहीं.

१४ जपानांत लहान मुलें रडतांना आढळत नाहींत. लोक अत्यंत प्रामाणिक आहेत. बाहेर जातांना घरास कुलूप लावण्याचीहि त्यांस आवश्यकता भासत नाहीं.

१५ शिक्षण, संघटन, कार्यक्षमता, शिस्त इत्यादि गुणांच्या जोरावरच मुख्यतः जपानी राष्ट्रानें आपली प्रगति घडवून आणलेली आहे.

### प्रो. काळे ह्यांचें भाषण

पाहुण्यांचे आभार मानतांना प्रो. काळे ह्यांनीं त्यांच्या भाषणाचें सार थोडक्यांत सांगितलें, तें असें:—

१ जपाननें पाश्चात्य राष्ट्रांकडून यांत्रिक विद्या शिकून आपल्या गुरूवर मात केली आहे.

२ जपानी लोकांच्या यशाची किल्ली, त्यांची संघटना, शिस्त व मेहनत करण्याची तयारी ह्यांत आहे.

३ जपानी सरकार देशी उद्योग धंद्यांस सहाय करतें. ब्रिटिश सरकार इंग्लंडमध्यें हेंच धोरण आतां अवलंबीत असतां हिंदुस्थानांत मात्र काकू करीत आहे.

४ औद्योगिक शिक्षणाबाबत आमचे इकडे अनेक चौकशा झाल्या, फलनिष्पत्ति मात्र नाहीं. हेंहि आम्हांस शिकवावयास हिंदुस्थान सरकारनें पूर्वचौकशीसाठीं ब्रिटिश तज्ज्ञ बोलाविले आहेत.

५ हिंदी लोकांनीं स्वतःच्या पायावर उभे राहून संघटित व पद्धतशीर रीतीनें व चिकाटीनें आपली औद्योगिक उन्नति करून घेतली पाहिजे.

६ ह्या कामीं आम्हांस जपानी लोकांपासून अनेक गोष्टी शिकतां येण्यासारख्या आहेत.

७ धंद्यांतली नजर असलेली हिंदी मंडळी परदेशांत गेली असतां त्यांच्या मार्मिक दृष्टीस महत्त्वाच्या आणि अनुकरणीय गोष्टी कशा दिसतात हें आजच्या पाहुण्यांच्या भाषणावरून कळून आलें आहे.

८ मराठा चेंबरचा मुख्य उद्देश महाराष्ट्रीयांचें आर्थिक संघटन घडवून आणण्यास सहाय करणें हा असून जनतेनें ह्या संस्थेस सहकार्य करणें अगत्याचें आहे.

---

## साखरेच्या उत्पादनांत वाढ

१९३४-३५ च्या मानानें १९३५-३६ सालीं हिंदी कारखान्यांतील साखरेचें उत्पादन ५८ टक्क्यांनीं वाढलें. प्रत्येक शंभर मण उसापासून वेगवेगळ्या कारखान्यांत किती साखरेचें उत्पादन झालें, ह्यासंबंधीचे आंकडे पाहिले असतां, महाराष्ट्रांतील कारखान्यांचा पहिला नंबर लागतो. त्यांतील बहुतेकांचें उत्पादनाचें प्रमाण १०० : १० ह्यापेक्षां जास्त पडलें आहे. संयुक्तप्रांत व बिहार आणि ओरिसा ह्यांचा नंबर खाली येतो. अहवालाचे सालांतील साखरेचें उत्पादन व मिळणारा उतारा हीं अत्यंत स्पृहणीय समजलीं पाहिजेत. कारखान्यांतील परस्पर स्पर्धेमुळें मालाची किंमत उतरली असली, तरी त्यामुळें साखरेचा खप वाढून शिलकी माल उठण्यास साहाय्य होईल, अशी अपेक्षा आहे. चालू मोसमामध्यें साखरेच्या उत्पादनांत बरीच भर पडेल; कारण उसाची लागवड वाढली असून कांहीं नवीन कारखाने स्थापन झाले आहेत व कांहीं जुन्या कारखान्यांनीं आपली उत्पादनशक्ति वाढवलेली आहे.

व्यापारी-उद्मी लोकांस

**—अपूर्व संधि—**

**पुणें औद्योगिक प्रदर्शन १९३७**

## सुरत जिल्ह्यांतील सहकारी चळवळीची प्रगति

सुरत जिल्हा सहकारी बँकेचा रौप्य महोत्सव ता. २३ डिसेंबर १९३४ रोजीं साजरा झाला, त्यानिमित्तानें सुरत जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचा सांगोपांग इतिहास ग्रंथ रूपानें प्रसिद्ध करण्याची योजना बँकेचे अध्यक्ष, दिवाण बहादुर चुनिलाल गांधी, ह्यांनीं आखली. तिला मूर्त स्वरूप मिळून नियोजित ग्रंथ आतां प्रसिद्ध झाला आहे.

हिंदुस्थानांत सहकारी चळवळीची प्रगति कांहीं विशिष्ट अनुक्रमानें झाली, त्याच अनुक्रमानें प्रस्तुत पुस्तकांत सुरत जिल्ह्यांतील सहकारी संस्थांची प्रगति वर्णिलेली आहे. प्रथम, सहकारी पतपेढ्यांची स्थापना झाली; त्यांस भांडवल पुरविणाऱ्या मध्यवर्ती संस्था पाठोपाठ आल्या; शहरांमध्यें सहकारी चळवळीनें नंतर पाऊल टाकलें; मालाचा उठाव करण्यास सहकारी संघटनेची मदत घेण्यांत आली व देखरेख, प्रचार व शिक्षण ह्यांची तरतूद करण्यांत आली. जमीन गहाणाच्या बँका नुकत्याच स्थापन झाल्या आहेत. सुरत जिल्ह्यांतील सहकारी चळवळीची प्रगति ह्याच दिशेनें झालेली आहे.

सुरत जिल्ह्यामधील पहिल्या सोसायटीची स्थापना २३ मे १९०६ रोजीं झाली व १९०९ सालीं सोसायट्यांस भांडवल पुरवणाऱ्या पहिल्या संस्थेची स्थापना झाली. १९१२ सालच्या दुरुस्ती कायद्यामुळें अनेक नवीन सोसायट्यांच्या स्थापनेस चालना मिळाली. १९३३-३४ अखेर, एकूण १४४ शेतकी सोसायट्या चालू होत्या, त्यांचे सभासद ७½ हजार होते व खेळतें भांडवल १० लाखांवर गेलें होतें. १९२५ सालापासून चळवळीच्या प्रगतीचें पाऊल मंदावलें असून, त्या वर्षी थकबाकीचें प्रमाण ५·१% होतें, तें आतां ५०% पेक्षां ज्यास्त झालें आहे. सोसायट्यांचे अधिकारीच जेथें बाकी बुडवितात, तेथें इतर सभासदांकडून वसुली होणार कशी? सोसायट्यांकडून कर्जें घेतांना, तीं फेडण्याची सभासदांमध्यें भावनाच नसली, तर परतफेड करावयाची खटपट कोण करणार? इलाख्यांतील इतर ठिकाणीं ह्या बाबतींत येणारा अनुभव सुरत जिल्ह्यासहि आला आहे व मंदी, पडते बाजारभाव, इत्यादि कारणांमुळें परिस्थिति ज्यास्तच विकट झाली आहे.

पुस्तकाच्या दुसऱ्या प्रकरणामध्यें सुरत जिल्हा सहकारी बँकेचा इतिहास विस्तारानें देण्यांत आला आहे. १९०९ सालीं सुरत जिल्हा सहकारी अर्बन युनियन लि. ह्या नांवानें प्रथम स्थापन झालेल्या संस्थेचें १९१२ सालीं 'सुरत जिल्हा सहकारी युनियन लि.' मध्यें रूपांतर झालें व १९२५ सालीं तिला सध्याच्या बँकेचें नांव व स्वरूप प्राप्त झालें. मुंबई इलाख्यांतील मध्यवर्ती जिल्हा बँकांमध्यें सुरत बँकेनें महत्त्वाचें स्थान प्राप्त करून घेतलें आहे. बँकेनें जिल्ह्यांत पांच शाखा उघडल्या असून त्या सर्व चांगल्या चालल्या आहेत. खुद्द सुरत शहरामध्यें ह्या बँकेनें इतर व्यापारी बँकांच्या स्पर्धेस तोंड देऊन संपादन केलेली लोकप्रियता तिच्या चालकांस भूषणावह आहे. (अपूर्ण)

### "बालसन्मित्र" दिवाळी अंक

मालवण येथें श्री. पा. ना. मिसाळ ह्यांच्या संपादकत्वाखाली निघणाऱ्या ह्या पाक्षिकाचा दिवाळी अंक नेहेमींपेक्षां दुप्पट आकारांत निघाला असून त्यांत बालवाचकांचे अनेक लेख, कविता व कोडीं प्रसिद्ध झालीं आहेत.

### पुणें व्यापारी शाळा

मराठींतून आमूलाग्र व्यापारी शिक्षण घेऊन टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्राथमिक, दुय्यम व पदवी परीक्षेस बसतां येतें. तथापि त्या प्रकारचें शिक्षण देणारी संस्था महाराष्ट्रांत नाहीं हें जाणून श्री. त्र्यं. रा. गोरे व श्री. रा. त्र्यं. वैद्य, बी. ए., यांच्या सहकार्यानें "पुणें व्यापारी शाळा" स्थापन झाल्यामुळें एक मोठी गैरसोय दूर झाली आहे. शाळेचा सहामाही खास वर्ग डिसेंबरमध्यें नुकताच सुरू झाला आहे. तरी गरजूंनीं, विशेषतः ह्या आक्टोबरमध्यें बसलेल्या मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांनीं, या सहामाही वर्गाचा फायदा घेणें हितावह आहे.

### सरकारी लष्करांतील अनुभवी ड्रायव्हर

हिंदी लष्करांतील सुमारें २,५०० मोटार सारथी शांततेच्या काळांत रिकामे बसवावे लागतात. परंतु वेळ पडल्यास त्यांस कामावर रुजूं व्हावें लागतें. अशा ड्रायव्हरांस नोकरीवर ठेवण्याची ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं "ऑफिसर इन चॉर्ज, रॉ. इं. आर्मी सर्व्हिस कोअर रेकॉर्ड्स, दागशाई, सिमला हिल्स" ह्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा. हे ड्रायव्हर आपल्या कामांत तरबेज असून शिस्तीखालीं वाढलेले आहेत व २५ ते ३० रुपयांवर ते काम करण्यास तयार आहेत, असें हिंदुस्थान सरकारनें आपल्या एका पत्रकांत प्रसिद्ध केलें आहे.




**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणें**

**प्राथमिक, दुय्यम व व्यापारविशारद पदवी परीक्षा**

**सहामाही वर्ग नुकताच सुरू झाला**

# नांवें नोंदवा

मराठी शॉर्टहॅन्ड, टाइपरायटिंग, जमाखर्च, इन्कमटॅक्स, व्यापारी कायदा, वगैरे विषय शिकविले जातात.

७७३ सदाशिव पेठ, पुष्करणी हौदासमोर, पुणें शहर.

चौकशी
त्र्यं. स. गोरे,
चालकः- पुणें व्यापारी शाळा.

## बँका व त्यांचे खातेदार

### एका गुंतागुंतीच्या खटल्यांतील निवाडा

मिसेस नेल्सन ह्या नांवाच्या एका बाईचें कमर्शिअल बँक ऑफ स्कॉटलंडमध्यें खातें होतें व एका कंपनीच्या भागांचे तारणावर त्यांनीं बँकेकडून ओव्हरड्रॉफ्ट घेतला होता. जरूर पडल्यास बँकेनें हे भाग विकून टाकण्यास मिसेस नेल्सन ह्यांनीं संमति दिलेली होती. बाईच्या मुलाचीं दुसऱ्या दोन बँकांत खातीं होतीं व त्यानेंहि भागांचे तारणावर ह्या दोनहि बँकांकडून ओव्हरड्राफ्ट घेतलेले होते. एकदां ह्या दोन बँकांपैकीं नॅशनल बँकेकडचा ओव्हरड्राफ्ट वाढविणें मुलास भाग पडलें व त्याबाबत ज्यास्त तारण देणें जरूर झालें. मिसेस नेल्सन ह्यांनीं ह्या नवीन ओव्हरड्राफ्टच्या रकमेबद्दल १० हजार पौंडांपर्यंत हमी घेतली.

कांहीं वर्षांनीं मुलाचें दिवाळें वाजून तो मृत्यु पावला आणि त्याच्या आईवर आपली हमी पार पाडण्याचा प्रसंग आला. तिनें आपले भाग कमर्शिअल बँक ऑफ स्कॉटलंडमध्यें अगोदरच तारण लावून दिलेले होते. तेव्हां आतां कमर्शिअल बँकेचें देणें भागवून भागांची जी किंमत राहील, तेवढीच नॅशनल बँकेस लावून देतां येणें मिसेस नेल्सनला शक्य झालें. घराचें पहिलें गहाणखत व दुसरें गहाणखत ज्या प्रकारचे हक्क निर्माण करतात, त्याच प्रकारची परिस्थिति सदरहु भागांच्या बाबतींत निर्माण झाली. मिसेस नेल्सन ह्यांच्या ओव्हरड्राफ्टची रकम भागांच्या किंमतीमधून वसूल करण्याचा कमर्शिअल बँकेचा अग्रक्वाचा हक्क होता व मुलाचें कर्ज त्यांतून वसूल करण्याचा नॅशनल बँकेचा व तिसऱ्या बँकेचा नंतरचा व दुय्यम हक्क होता.

भाग विकून रकम वसूल करणें बँकांस जरूर झालें व त्यांनीं सर्वांनीं मिळून एकाच दलालामार्फत हा व्यवहार करण्याचें ठरविलें. ह्या व्यवस्थेनें भागांच्या विक्रीबाबत अनिष्ट स्पर्धा टळली व त्यामुळें बँकांचें व त्यांच्या गिऱ्हाईकाचें — मिसेस नेल्सन ह्यांचें — हितसंरक्षण होईल, अशी अपेक्षा होती. १९३४ च्या जानेवारीपर्यंत पुरेसे भाग विकण्यांत येऊन कमर्शिअल बँकेचें कर्ज फिटलें व नॅशनल बँकेचें देणेंहि चुकतें झालें. दोनहि बँकांस ही परिस्थिति माहीत असतांहि उरलेले सर्व भाग विकण्यांत आले व अखेर बँकांचीं सर्व देणीं भागवलीं जाऊन ९ हजार पौंड जरूरीपेक्षां ज्यास्त वसूल केले गेले, असें दिसून आलें. कमर्शिअल बँकेची बाकी फिटल्यानंतर विकेता दलाल हा फक्त नॅशनल बँकेचाच दलाल राहिला व मिसेस नेल्सन ह्यांच्या हितसंबंधास बाध येणार नाहीं ह्याबद्दल दक्षता घेण्याची जबाबदारी नॅशनल बँकेवर आली. ९ हजार पौंड किंमतीचे भाग जरूरीपेक्षा जास्त विकल्या कारणानें बाईचें जें नुकसान झालें, त्यास सदरहु बँकच कारणीभूत समजली पाहिजे, असा कोर्टानें निकाल दिला. बँकेकडे तारण म्हणून ठेवलेल्या मालाची अगर रोख्यांची किंमत त्यांची विक्री करून वसूल करतांना, बँकेनें योग्य ती काळजी घेतली पाहिजे, असा ह्या निवाड्याचा अर्थ आहे. घरासारखी मालमत्ता अखंड विकणें जास्त फायद्याचें असलें तरी भागांची विक्री गटागटानें करणें सोईचें होणें शक्य आहे. हें सर्वसामान्य तत्त्व बाजूस ठेवलें, तरी बँका व त्यांचे खातेदार ह्यांमधील संबंध विशिष्ट प्रकारच्या परस्पर जबाबदारीचे आहेत; खात्याचा व्यवहार होतांना दोघांनींहि विशेष काळजी घेणें त्यांचें कर्तव्य असतें, इत्यादि मुद्दे वरील निवाड्यास पोषक असेच आहेत.

---

### लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियमला जंगलविभागाची देणगी

प्रिन्स ऑफ् वेल्स म्यूझियम् ऑफ् वेस्टर्न इंडिया मुंबई, या संस्थेचे संग्रहीं असलेला जंगलविभाग लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें या संस्थेस मिळाला आहे व जंगलविषयक संग्रहाचे बरोबर मुंबई इलाखा सरकारनें या इलाख्याच्या जंगलखात्यांतून दरमहा रु. १५/– (रुपये पंधरा) ची निरंतरची देणगी या विभागाचे संवर्धनासाठीं ता. १६–१०–३६ पासून दिली आहे. या संग्रहामध्यें मुंबई इलाख्यांत पैदा होणाऱ्या लाकडापासून बरेली येथील संयुक्त प्रांत सरकारच्या कारखान्यांत तयार झालेले दांडे, मुठी, रिळे, बॉबिन्स इत्यादि वस्तु फार चांगल्या आहेत. सुमारें ४० निरनिराळ्या लांकडांच्या फळ्या, राळ, टरपेन्टाइन व कांहीं फर्निचर, इत्यादि जिन्नस पुणें येथील संग्रहालयांत नुकतेच आले आहेत. पुणें येथील म्यूझियममध्यें असलेला जंगलविभाग हळूहळू वाढवून त्यास जंगल-संग्रहालयाचें स्वरूप प्राप्त करून द्यावें असा संग्रहालयाच्या ट्रस्टींचा विचार आहे व त्यास सरकारकडून व जंगलखात्याकडून सतत मदत मिळत आहे. या संग्रहालयास आतांपर्यंत फर्निचरसाठीं रु. १,५०० किंमतीचें लांकूड व रु. ५०० किंमतीचे जंगल संपत्तीचे नमुने अशी एकूण रु. २,००० किंमतीची देणगी मुंबई सरकारकडून मिळाली आहे. या विभागास फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूट, डेराडून, म्हैसूर संस्थान व इतर प्रांतांतील जंगलखात्यांतूनहि मदत मिळाली आहे. पुणें येथें पूर्वीं चांगल्यापैकीं एक जंगलसंग्रहालय होतें, त्याचा कालांतरानें नाश झाला; परंतु आतां लॉर्ड रे इंडस्ट्रिअल म्यूझियम संस्थेच्या विद्यमानें या महत्त्वाच्या संग्रहालयाचें पुनरुज्जीवन होत आहे.

---

### मि. रूझवेल्ट ह्यांचा प्रचंड विजय

मि. फ्रँकलिन रूझवेल्ट, हे अमेरिकेचे अध्यक्ष होणार ह्यांत संशय उरलेला नाहीं. अध्यक्षपदाची मामुली निवडणूक ता. १४ डिसेंबर रोजीं होणार आहे. अध्यक्षांच्या निवडणुकीसाठीं प्रथम ५३१ मतदारांची निवड करण्यांत येते व प्रत्येक संस्थानातर्फे निवडण्यांत आलेल्या मतदारांच्या मतांवर अध्यक्षांची निवडणूक अवलंबून असते. न्यूयॉर्क संस्थानातर्फे ४७ मतदार पाठविण्यांत येतात, तर कांहीं लहान संस्थानांच्या वाट्यांस ३ देखील जागा येत नाहींत. मि. रूझवेल्ट ह्यांस वरील ५३१ पैकीं ५२३ मतें मिळतील. १८२० सालानंतर एवढा प्रचंड विजय दुसऱ्या कोणत्याहि अध्यक्षास मिळाला नव्हता. ४८ पैकीं ४६ संस्थानें मि. रूझवेल्ट ह्यांच्या बाजूचीं आहेत. निवडलेले ५३१ मतदार हे आपल्या पक्षाच्या अध्यक्ष–उमेदवारास मत देण्यास बांधलेले असल्यामुळें मि० रूझवेल्ट हे अध्यक्ष झाल्यासारखेच आहेत.

महिंद्रकर ब्रदर्स ह्यांचे
गिरगांव, मुंबई
थंडी-
करतां

## निर्भेळ लोण्याचें तूप आणि कृत्रिम तूप

( लेः—रा. ब. प्रो. द. ल. सहस्त्रबुद्धे )

अलीकडे १५–२० वर्षें तूप फार महाग झालें आहे व ४–५ वर्षांपूर्वी अशी स्थिति आली होती कीं, एक रुपयास अर्धा शेर सुद्धां तूप मिळणें कठीण होतें. ह्या महर्गतेमुळें गरीब आणि मध्यम वर्गातल्या लोकांना तूप खाणें अशक्यच होऊं लागलें होतें. कोणताहि जिन्नस महाग होऊं लागला कीं त्यांत सवंग पदार्थांची भेसळ केली जाऊन तो बाजारांत लोकांना फसवून चांगला जिन्नस म्हणून विकला जाणें हा सर्वसाधारण नियमच आहे. तूप महाग झाल्याबरोबर चरबीची भेसळ सुरू झाली. याच सुमाराला तेलापासून तुपासारखा घट्ट पदार्थ करून मोठ्या प्रमाणांत युरोपमधून हिंदुस्थानांत येऊं लागला व हा स्निग्ध पदार्थ कृत्रिम तूप म्हणून किंवा अलीकडे खरें तूप म्हणून सुद्धां विकण्याची सर्वसाधारण पद्धत पडली आहे. ती इतकी वाढली आहे कीं, प्रत्यक्ष दूध घेऊन त्यांतून तयार केलेल्या लोण्यापासून तूप आपणच केलें तर तें खरें तूप आहे अशी खात्री देतां येईल. नाहीं तर, भेसळीचें किंवा कृत्रिम तूप आहे असें गृहीत धरल्यास बहुतकरून चूक होणार नाहीं. पूर्वी ज्या ठिकाणाहून लोणी व तूप येत असे त्याच ठिकाणीं घट्ट केलेल्या तेलाचे डबे फार जातात व तेथें तुपांत व लोण्यांत मिसळ करून मगच इतर ठिकाणीं डबे पाठवितात. कांहीं ठिकाणीं दुधाची मलई काढून मुंबईस पाठविण्याची पद्धत आहे. तेथें मलई काढण्याच्या यंत्रांत मलईशी कृत्रिम तुपाची चांगली घुसळून भेसळ करतात व त्यामुळें विकत घेणारास लोणी किंवा प्रत्यक्ष मलईतून देखत काढलेलें लोणी मिळालें तेव्हां निर्भेळ तूप खात आहों अशी समजूत होते. कृत्रिम तूप किंवा भेसळीचें तूप याला खऱ्या तुपाचें हुबेहूब स्वरूप देतां येत असल्यानें त्याच्यांतला आणि खरें तूप यांतला फरक सहज कळण्यासारखा नाहीं. रसायनतज्ज्ञानें परीक्षा करूनच तें ठरवावें लागतें. इतका बेमालूम केलेला पदार्थ असेल तर तुपाची किंमत देऊन तो विकत घेण्यास व खाण्यास काय हरकत आहे, असा सहजच प्रश्न निघतो. त्याबद्दल थोडासा खुलासा करणें जरूर आहे. **कृत्रिम तुपांत तुपाचे सर्व गुण नाहींत** व असें असतां तुपाची किंमत देऊन आपले पैसे घालविणें रास्त होणार नाहीं. तूप, चरबी व तेल हे सर्व स्निग्ध पदार्थ आहेत, परंतु तूप **पचण्यास सोपें व त्यांत 'व्हिटॅमिन' म्हणजे जीवन पदार्थ** आहेत व त्यामुळें तुपाची किंमत इतर स्निग्ध पदार्थांपेक्षां फार मोठी आहे. **कृत्रिम तुपांत हे गुण नसल्यानें त्याला तूप समजून खाणें रास्त नाहीं.** यापेक्षां चांगलें ताजें तेल खाण्याचें ठरविल्यास फसवणूक चुकेल व पैशांतहि बचत होईल. तेलांत आम्ल पदार्थ तयार झाल्यास घशावर त्याचा परिणाम होण्याचा संभव आहे; तेवढ्याकरतां ताजें किंवा जमल्यास शुद्ध केलेलें तेल घेऊन तुपाऐवजीं तें जितकें घेतां येईल तितकें घेण्याचा प्रघात पाडावा.

("शेती आणि शेतकरी", नोव्हेंबर, १९३६.)

## आंतरराष्ट्रीय व्यापार वाढत आहे

आंतरराष्ट्रीय व्यापाराचे मार्गांत कृत्रिम अडचणी असतांहि त्याची हळु हळु प्रगति होत आहे. जगांतल्या ३५ प्रमुख राष्ट्रांपैकीं २७ राष्ट्रांची निर्गत वाढली असून २६ राष्ट्रांची आयात सुधारली आहे. १९३६ मधील पहिल्या सहामाहींत प्रगतीची गति वाढत्या प्रमाणावर असलेली आढळली. ही वाढ अर्थातच सर्व देशांच्या वाटणीस सारख्या प्रमाणांत आलेली नाहीं. अमेरिकेच्या बाबतींत निर्गतीपेक्षां आयात मोठी होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. अमेरिकेनें निर्गत केलेल्या मालापेक्षां सुमारें ४½ कोटि रुपयांचा ज्यास्त माल आयात केला. महायुद्धानंतर जर्मनराष्ट्र इतर राष्ट्रांचें देणेकरी बनलें, आणि अमेरिकन राष्ट्र सावकार बनलें. परराष्ट्रांकडून आपलें येणें जमा करीत असतांना सुद्धां आजवर अमेरिकेची निर्गत कायम राहून त्याच्या येणें रकमा वाढत होत्या. ही परिस्थिति दीर्घकाल टिकणें अर्थातच अशक्य होतें आणि घेणेकरी राष्ट्राची आयात मोठी असण्याची स्वाभाविक परिस्थिति आज नाहीं उद्यां उपस्थित होणें अपरिहार्यच होतें.

१९३५ च्या पहिल्या सहामाहीच्या मानानें १९३६ च्या पहिल्या सहामाहीसंबंधांतील झालेल्या कांहीं प्रमुख देशांच्या आयातनिर्गतीच्या आंकड्यामधील शतमानानें वाढ (+) अगर घट (–) खालील कोष्टकावरून समजून येईल.

### आयात–निर्गतीमधील वाढ घट

| देश | निर्गत | देश | आयात |
|---|---|---|---|
| चीन | + २८ | रशिया | + ३५ |
| दक्षिण आफ्रिका | + २६ | अमेरिका | + १७ |
| कॅनडा | + २१ | दक्षिण आफ्रिका | + १६ |
| जर्मनी | + १४ | कॅनडा | + १३ |
| अमेरिका | + १२ | फ्रान्स | + १३ |
| हिंदुस्थान | + १० | ग्रेटब्रिटन | + १२ |
| जपान | + ४ | जपान | + ११ |
| ग्रेटब्रिटन | + ·१ | जर्मनी | – १ |
| फ्रान्स | – ९ | हिंदुस्थान | – ८ |
| रशिया | – १३ | चीन | – १६ |

## नवीन कंपनी–कायदा ताबडतोब अंमलांत येणार

नवीन कंपनी-कायद्याच्या अंमलबजावणीचा प्रारंभ पुढें ढकलण्यांत यावा ह्या अर्थाची सूचना हिंदुस्थान सरकारास नापसंत होऊन हा कायदा येत्या जानेवारीच्या ११ तारखेपासून लागू केला जाईल, असें अधिकृत रीत्या जाहीर झालें आहे.

## एक कोडें

एका मनुष्याजवळ दोन म्हशी होत्या, त्या त्यानें प्रत्येकी १०० रुपयास विकल्या. एका म्हशीचे विक्रींत २५ टक्के नफा झाला, आणि दुसरीच्या व्यवहारांत त्याला २५ टक्के नुकसान आलें तर त्यास एकूण नफा अगर तोटा किती झाला?

किंमत ओव्हरकोट खरेदी करा
रु. १२॥
बुधवार चौक, पुणें

## वऱ्हाडावरील निजामांच्या स्वामित्वाची पुनर्घोषणा

हिंदुस्थानचे बादशहा व हैद्राबाद संस्थानचे निजाम ह्यांचे दरम्यान वऱ्हाड प्रांतासंबंधीं झालेला नवीन करार नुकताच प्रसिद्ध झाला आहे. ह्या करारान्वयें, बादशहांनीं निजाम सरकारच्या वऱ्हाडावरील स्वामित्वाचा पुनरुच्चार केलेला असून नवीन हिंदी संयुक्त घटनेमध्यें वऱ्हाड प्रांत दाखल होण्यास निजामांनीं संमति दिलेली आहे. ह्यापुढें मध्यप्रांत व वऱ्हाडच्या गव्हर्नरची नेमणूक निजामांशीं विचारविनिमय होऊन करण्यांत येईल. यूनियन जॅकच्या जोडीनें निजामांचें निशाण फडकविण्यांत येईल व वऱ्हाडच्या नागरिकांस पदव्या बहाल करण्याचा निजामांस अधिकार प्राप्त होईल. वऱ्हाडबद्दल निजाम सरकारास सालिना २५ लक्ष रुपये अबाधित मिळत रहावयाचे आहेत. निजामांच्या युवराजांस 'प्रिन्स ऑफ बेरार' ही पदवी मिळणार असून स्वतः निजाम हे 'हैद्राबादचे व वऱ्हाडचे निजाम' होतील. अशा रीतीनें निजामांच्या अधिकारामध्यें बाह्यतः तरी बरीच वाढ झालेली आढळून येईल. वरील करारावर बादशहांतर्फे व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो ह्यांची सही असून निजामांची स्वतःची सही आहे.

वऱ्हाड प्रांत परत मिळविण्याची निजामांनीं १९२४ सालीं केलेली खटपट व तिचा झालेला शेवट ह्याची सर्वांस माहिती आहेच. १९३६ च्या ह्या नव्या करारानें वऱ्हाड प्रांत फेडरेशनमध्यें दाखल होत असून, निजामांच्या वऱ्हाडावरील सार्वभौमत्वाच्या घोषणेपलीकडे ब्रिटिश सरकारनें निजामांस विशेष फलदायी हक्क दिलेले नाहींत. तथापि, वऱ्हाड प्रांताचा ब्रिटिश मुलखांत सर्वस्वी अंतर्भाव झाल्याचें बाह्य स्वरूप उत्पन्न झालें होतें आणि निजामांच्या त्यावरील स्वामित्वाची आठवण बुजत होती, त्या परिस्थितींत आतां स्पष्ट पालट झाला आहे. निजामांच्या स्वामित्वाचा ठसा वऱ्हाडवर नवीन योजनेमुळें उठून दिसणार आहे. १८५३ सालीं निजामांनीं वऱ्हाड प्रांत इंग्रजांचे स्वाधीन केला व त्याचे उत्पन्नांतून हैद्राबाद येथें जय्यत तयार ठेवलेल्या इंग्रज फौजेच्या खर्चाची तरतूद केली. खर्च भागून उरलेली बाकी निजामांस मिळावी अशी ह्या करारांत अट नमूद होती. ब्रिटिश सरकार व निजाम ह्यांचेमध्यें ह्या तहाच्या करारासंबंधीं कित्येक वर्षे तीव्र मतभेद होते, ते १९०२ सालीं लॉर्ड कर्झन ह्यांच्या अंमदानींत एका नव्या करारानें मिटविण्यांत आले व निजामांस दरसाल २५ लक्ष रुपये खंडणी देण्याचें ब्रिटिश सरकारनें कबूल केलें. ही खंडणी निजामांस अव्याहत मिळावयाची असून नुकत्याच झालेल्या करारानें तिला व निजामांच्या वऱ्हाडावरील सार्वभौमत्वाला बादशहांनीं मान्यता दिली आहे. वऱ्हाड प्रांताचा फेडरेशनमध्यें प्रवेश शक्य झाला ह्याचें कारण निजामांच्या संमतीवर ही गोष्ट अवलंबून होती आणि ती संमति ब्रिटिश सरकारांनीं विशिष्ट अटी मान्य केल्यामुळें मिळूं शकली.

---

### दि कमर्शिअल बँक लि., कोल्हापूर

ह्या बँकेची स्टॅट्यूटरी सभा ता. २२-११-३६ रोजीं भरली होती. भागांबद्दल बँकेकडे एकूण ३,५१० रु. जमा झालेले असून प्राथमिक खर्च ५३३ रु. १० आ. ३ पै झालेला आहे. ठेवींची रकम १२½ हजार रुपये असून ९½ हजार रुपयांचीं कर्जे देण्यांत आलेलीं आहेत. प्रो. एस. जी. दाभोळकर, बी. ए. एलएल. बी., हे बँकेचे चेअरमन व साळोखे आणि कंपनी मॅनेजिंग एजंट्स आहेत.


**धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०**

कडून

**हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक**

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.



**दि डॉन ऑफ इंडिया**

**लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें.**

**पुणें व सोलापूर येथें**

**बिल्डिंग इन्व्हेस्टमेंट आणि बँकिंग डिपार्टमेंटची कंपनीचे बँकर्सनीं पसंत केलेली**

ता. १ आक्टो- बरपासून सुरू **नवीन योजना** ता. १ आक्टो- बरपासून सुरू

**मुदतीच्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची फायदेशीर अपूर्व सोय.**

बँकेच्या उतरत्या व्याजाच्या काळांत लोकांस आपले कौटुंबिक निर्वाहास साधन अगर मदत म्हणून ठेवींवर मासिक, नियमित व किफायतशीर व्याज देण्याची व्यवस्था तारीख १ आक्टोबर १९३६ पासून अमलांत आणली आहे.

गरजूंनीं जास्त माहिती मागवावी अगर समक्ष भेटावें.

पुणें, ता. २२-९-३६ | जनरल मॅनेजर.



The House for Quality goods at most reasonable prices.

**K. M. BELSARE & Co.,**

**PLAIN & DECORATIVE FURNITURE**

FOR

Home, School, College, Office etc. in

WOOD & IRON

**Sadashiv, POONA 2**

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—८ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—० |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | १२०—८ |
| ४% १९६०-७० ... ... | ११५—७ |
| ४% १९४३ ... ... ... | १११-१४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | १००-२½ |
| ३½% १९४७-५० ... ... | १०७-१० |
| २¾% १९४८-५२ ... ... | १०१—३ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११२—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | ११२—४ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | ११२—४ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) ... | ११३—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२६-१० |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३४—४ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११६—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५-१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५७२—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३८-१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०४—८ |
| पाचोरा-जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९८—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९१२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५५-१० |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २६७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २६५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ६½% ) | १६२२—८ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६१५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २०१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७९—४ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | २१४—४ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ८३१—४ |

**पाहिजेत.** नर्सिंगच्या ३॥ वर्षांच्या कोर्सकरितां जागा भरण्याच्या आहेत. वय १८ ते ३५ पर्यंत असावें व मराठी ५ वीपर्यंत व इंग्रजी ४ थीपर्यंत शिक्षण पूर्ण झाल्याचा दाखला असावा. गरजूंनीं खालील पत्त्यावर अर्ज करावेत.

जॉ. ऑ. सेक्रेटरी,

पुणें सेवासदन नर्सिंग ॲन्ड मेडिकल एज्युकेशन कमिटी, नर्सेस क्वॉर्टर्स, पुणें नं. २.

## NOTICE TO CONTRACTORS

Sealed percentage tender in form B-1 for the work of improvements to Bridge No. 63 in mile 13/5 of the Dharwar-Goa Road estimated to cost Rs. 11,399/- will be received by the undersigned on 14-12-1936 up to 2 P. M. Other particulars regarding the contract &c., can be had at the undersigned's office on any working day.

2. The acceptance of the tender rests with the undersigned and no reason will be given for the acceptance or rejection of any tender.

Ex. Engineer's Office, Dharwar. 21st November, 1936

P. K. SHINDE
Executive Engineer,
Dharwar Division.

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

## वेस्टर्न इंडिया

**लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.**

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी—सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

बोनस त्रैवार्षिक दरहजारीं — हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५

१९३५ मधील नवें काम ५१,३०,०४२ रु.

एकूण चालू काम २,७०,००,००० रु. अधिक

एकूण जिंदगी ७१,७१,०९३ रु.

लाइफ फंड ६०,४२,८७३ रु.

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक, लिमिटेड

[ १९१३ च्या इंडियन कंपनीज् ॲक्ट ७ प्रमाणें स्थापन झालेली. ]

**अधिकृत भांडवल : : रु. १०,००,०००**

प्रत्येकीं रु. १०० प्रमाणें १०.००० शेअर्समध्यें विभागलेलें

**तूर्त विक्रीकरितां काढलेलें भांडवल : रु. ५,००,०००**

प्रत्येकीं रु. १०० प्रमाणें ५,००० शेअर्स.

अर्जासोबत प्रत्येक शेअरला ... रु. १५ : अर्जमंजुरीनंतर .... रु. १० प्रमाणें.

बाकीच्या रकमेची तूर्त मागणी केली जाणार नाहीं व ती रक्कम " अनकॉल्ड रिझर्व्ह " म्हणून राहील.

**संचालक मंडळ**

श्री. रामचंद्र नरहर अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी., मॅनेजिंग एजंट, कॉमनवेल्थ विमा कंपनी, लि., पुणें. — चेअरमन.

श्री. ग. रा. साठे, मालक, साठे बंधु, बिस्किट कारखानदार, पुणें.

श्री. श्री. र. राजगुरु, राजगुरु प्रेसचे मालक, कॉमनवेल्थ विमा कंपनीचे डायरेक्टर, पुणें.

श्री. श्री. म. जोशी, छापखान्यांस लागणाऱ्या यंत्रांचे व्यापारी व मशीनरी इम्पोर्टर.

श्री. दा. ग. बापट, डायरेक्टर, पूना मर्चंटस् को-ऑप० बँक, व हिंद बेनिफिट सोसायटी लि., पुणें.

श्री. चिं. त्र्यं. चितळे, डायरेक्टर, पूना मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक, पुणें.

श्री. नि. ना. क्षीरसागर, सराफ, डायरेक्टर व माजी चेअरमन, पूना मर्चंटस् को-ऑ. बँक पुणें. — मॅनेजिंग डायरेक्टर.

रजिस्टर्ड ऑफिसः—

**१० बुधवार, विश्रामबाग रोड, पुणें शहर.**

ऑडिटर्सः—

**बी. सी. अभ्यंकर ॲन्ड को.** रजिस्टर्ड अकौंटंटस्, ( मुंबई ).

बँकर्सः—

**पूना सेंट्रल को. ऑ. बँक लि., पुणें.**

सॉलिसिटरः—

**मेसर्स दिवेकर ॲन्ड को.**

**स्थापनेचे हेतु**—ही बँक मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशनमधील उद्देशाप्रमाणें बँकिंगचा व्यवहार करणार आहे.

व्यापार व उद्योगधंद्यांना भांडवलाची जरूर नेहमीं लागते, म्हणून ज्या देशांत व्यापार व उद्योगधंदे नेहमीं भराभराटींत दिसतात त्या देशांत भांडवल पुरवणाऱ्या संस्थांचें जाळेंच असतें, किंवा जेथें भांडवल पुरवणाऱ्या संस्था अनेक निघून आपलें भांडवल धंद्यांना पुरवितात, तेथील धंदे भरभराटीस येतात, असा उद्योग, धंदे आणि बँका यांचा अन्योन्यसंबंध आहे.

व्यापार व उद्योगधंदे यांपैकीं उद्योगधंद्यांना पैसा लांब मुदतीनें व मुबलक लागतो. याचें कारण व्यापारांतील भांडवल विक्रीरूपानें मोकळें होत असतें, व उद्योगधंद्यांतील भांडवलाचा मोठा भाग जागा, इमारती व माल तयार करण्याचीं उपकरणें इत्यादि न मोकळें होणाऱ्या सदरांत गुंतविला जातो. या कारणामुळें स्वतंत्र देशांमध्यें उद्योगधंद्यांना भांडवल पुरविणाऱ्या संस्था मुख्यत्वेंकरून राज्यसंस्थेचे प्रेरणेनें व मदतीनें चालविल्या जातात. राज्यसंस्थेनें चालविलेले असले प्रयत्न आपलेकडे फारसे-किंबहुना थोडेसुद्धां नाहींत.

आपल्या महाराष्ट्रांत व्यापारीप्रवृत्तीचे भांडवलवाले फारसे नाहींत व वर लिहिल्याप्रमाणें राज्यसंस्थेचें औदासीन्य यामुळें इतर प्रांतांपेक्षां व्यापार-उद्योगधंद्यांत महाराष्ट्र मागासलेला आहे. अलीकडे अलीकडे मात्र ही परिस्थिति हळूहळू बदलण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. याचें गमक म्हणजेच व्यापार व उद्योगधंद्यांना भांडवल पुरविण्याचे उद्देशानें खाजगी व सामुदायिक भांडवलाच्या संस्था—बँका निघूं लागल्या आहेत.

अशा अनेक संस्थांना महाराष्ट्रांत वाव आहे इतकेंच नव्हे तर त्यांची अत्यंत जरूरी आहे. उद्योगधंद्यांना वेळींच पुरेसें भांडवल मिळाल्यास त्यांची वाढ सकस व निरोगी होते. मात्र असें भांडवल गुंतवितेवेळीं चौकसपणें व दक्षतेनें व्यवहार केले पाहिजेत. याच विचारसरणीनें अत्यंत अल्पसा प्रयत्न म्हणून प्रेसिडेन्सी इन्डस्ट्रियल बँक लि. स्थापन होत आहे.

प्रॉस्पेक्टसच्या प्रति व शेअरच्या अर्जांचे नमुने बँकेच्या रजिस्टर्ड ऑफिसांत अगर कंपनीच्या बँकर्सकडून मिळतील.

[ वि. सू.:—डिपॉझिटर्सचीहि बँकेचे व्यवहारांवर संचालक मंडळाबरोबर देखरेख रहावी या हेतूनें डिपॉझिटरमधून एक डायरेक्टर को-आप्ट केला जाईल अशी व्यवस्था आर्टिकल्समध्यें केली आहे. ]


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ | पुणें, बुधवार, तारीख ९ डिसेंबर, १९३६. | अंक ४९

## दि डॉन ऑफ इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें.

.पुणें व सोलापूर येथें

बिल्डिंग इन्व्हेस्टमेंट आणि बँकिंग डिपार्टमेंटची
कंपनीचे बँकर्सनीं पसंत केलेली

ता. १ आक्टोबरपासून सुरू ] **नवीन योजना** [ ता. १ आक्टोबरपासून सुरू

मुदतीच्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची
☞ फायदेशीर अपूर्व सोय. ☜

बँकेच्या उतरत्या व्याजाच्या काळांत लोकांस आपले कौटुंबिक निर्वाहास साधन अगर मदत म्हणून ठेवींवर मासिक, नियमित व किफायतशीर व्याज देण्याची व्यवस्था तारीख १ आक्टोबर १९३६ पासून अमलांत आणली आहे.

गरजूंनीं जास्त माहिती मागवावी अगर समक्ष भेटावें.

पुणें, ता. २२-९-३६ | जनरल मॅनेजर.

## ओरायन (मॅग्नमस्)

उत्कृष्ट व्हर्जिनिया तंबाकूपासून बनविलेली ही सिगारेट

२॥ आण्याला १० चें पाकिट किंवा १२ आणे ५० चा डबा

सर्वत्र मिळते.

एकदां ओढल्यानंतर नेहमींच पसंत कराल.

बनविणार—
**DECCAN TOBACCO WORKS,**
POONA 4

Telegraphic Address:—'CIGARETTES', POONA.
*Apply for Agencies.*

## "व्हीट ब्लासम" म्हणजे गव्हाचे पोहे

ह्या सारखें सात्त्विक आणि कसदार खाद्य दुसरें नाहीं. पुड्याची किंमत [ मापी २ शेर ] ०८ आणे. नमुन्यासाठी पावणे दोन आण्याचीं तिकिटें पाठवावीं.

कारखानदार :—भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, ७५२ सदाशिव पेठ, पुणें.

स्टॉकिस्ट:—तांबे आरोग्य भुवन, मुंबई; श्री. लक्ष्मी ट्रेडिंग कंपनी, सांगली, बेळगांव, कोल्हापूर.

## वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक

आमचा इमारतीच्या बांधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात.

"गिलाव्याचा चुना हा तर आमचे चुन्याचे धंद्यांतील विशेष होय."

**भाऊ गंगाधर साठे,**
बिल्डिंग कॉंट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,
५१२ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणें २

## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टकल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः—ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः—

१ केळकर ब्रदर्स,

बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी,

लक्ष्मीरोड.

# विविध माहिती

### बँकांस सुट्टी

बुधवार, ता. १६ डिसेंबर १९३६ रोजीं रमझान ईद निमित्त बँका बंद रहातील.

### ट्रेझरी बिलांवर १३ आणे ११ पै व्याज

सरकारनें २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें गेल्या आठवड्यांत विक्रीस काढलीं होतीं, त्यांस फक्त २ कोटि १६ लक्षांची मागणी आली. त्यामुळें, स्वीकारलेल्या २ कोटींच्या टेंडरांवर द. सा. द. शे. १३ आणे ११ पै इतका व्याजाचा दर बसला.

### अहमदाबादेंत कापडास मागणी वाढली

गेल्या आठवड्यांत देशी गिरण्यांच्या कापडास अहमदाबादेंत मागणी बरी होती आणि किंमतीहि थोड्या चढल्या. ब्रिटिश व जपानी कापडाचीहि अशीच चलती दिसून आली.

### मुंबई इलाख्यांतील जमीनमहसुलाची वसुली

१९३५-३६ सालीं मुंबई सरकारास ३,६५,२७,००० रुपयांचा जमीन महसूल मिळावयाचा होता, त्यापैकीं ३,६४,७८,००० रुपये वसूल झाले. म्हणजे, शेकडा ९९·८ वसुली झाली.

### लंडन शहराची लोकसंख्या व वहातुकीचा प्रश्न

लंडन शहराची आजची लोकसंख्या ८० ते ९० लक्ष आहे. शहरांतील ट्राम, बस अगर आगगाडी ह्यांमधून शहरांतील प्रत्येक रहिवासी वर्षांतून सरासरीनें ४४० वेळां प्रवास करतो. शहराच्या वहातुकीचे नियंत्रणाच्या कक्षेंत ४ लक्ष २६ हजार मोटारगाड्या व २० लक्ष सायकली आहेत. शहरांतील रस्त्यांवरील वहातुकीचा प्रश्न सध्याच बिकट झाला आहे व त्यांत वाढत्या लोकसंख्येनें भर पडणार आहे.

### ग्रेट-ब्रिटनमधील पोस्टाच्या तिकिटांची विक्री

ग्रेट-ब्रिटनमधील पोस्टामार्फत दरसाल ७०० कोटि तिकिटें विकलीं जातात.

### वायरमेनच्या परीक्षा

विजेच्या कॉंपीटन्स व वायरमेन्स सर्टिफिकेटच्या परीक्षा ता. २५ जानेवारी १९३७ रोजीं सुरू होतील. मुंबई, पुणें, अहमदाबाद व कराची ह्या ठिकाणीं परीक्षा घेतल्या जातील. अर्जाची अखेरची तारीख ५ जानेवारी ही आहे.

### हिंदी फेडरल कोर्टावरील नेमणुका

हिंदी फेडरल कोर्टावर तूर्त मुख्य न्यायाधीश व दोन इतर न्यायाधीश ह्यांचीच फक्त नेमणूक करण्यांत येईल. अद्याप कामाचा अंदाज आलेला नसल्याकारणानें जास्त न्यायाधीश नेमण्याची आज आवश्यकता नाहीं.

### बी. बी. अँड सी. आय. रेल्वेचें उत्पन्न वाढलें

एप्रिल ते ऑक्टोबर असेरच्या सात महिन्यांत गेल्या वर्षाच्या ह्याच मुदतीच्या मानानें वरील रेल्वेचें उत्पन्न २४ लक्ष रुपयांनीं वाढून तें ६ कोटि, २२ लक्ष रुपये इतकें झालें.

### हुंडणावळीबाबत अमेरिकन सरकारचें धोरण

डॉलरच्या सुवर्णपरिमाणांत विशिष्ट मर्यादेपर्यंत घट करण्याचा अधिकार अमेरिकन कायदेमंडळानें अध्यक्षांस दिला आहे, त्याची मुदत येत्या जानेवारीअखेर संपेल, तेव्हां तो अधिकार तसाच चालू ठेवण्याचा विचार असल्याचें सरकाररीत्या प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. हुंडणावळ व बाजारभाव जरूरीप्रमाणें कमी-जास्त करण्याची सत्ता कांहीं झालें तरी अमेरिकन सरकार सोडून देण्यास तयार नाहीं, हें वरील बातमीवरून स्पष्ट होत आहे.

### जुन्या दिल्लीच्या बाजारपेठेचें नव्या दिल्लीमध्यें स्थलांतर

जुन्या दिल्ली शहरांतील काश्मिर गेटाच्या आसपासचीं मोठीं दुकानें तेथून उठून हळु हळु नव्या दिल्लींतील कनॉट प्लेसकडे जात आहेत. मोटार गाड्यांचीं बहुतेक सर्व दुकानें नव्या दिल्लींत गेलीं आहेत.

### म्हैसूर संस्थानांतील नवें धरण

म्हैसूर संस्थानांतील शिमसा नदीचें पाणी अडवून १० हजार एकर जमीन पाण्याखालीं आणण्याची योजना म्हैसूर सरकारनें मंजूर केली आहे. ८० फूट उंचीच्या व ४५० फूट लांबीच्या ह्या धरणास २२ लक्ष रुपये खर्च येईल व त्याचें काम १९४१ सालीं पुरें होईल.

### एकाच वेळीं जन्मलेल्या पंचकन्या पहाण्यास पांच लक्ष प्रेक्षकांची यात्रा

कॅनडा देशांतील ऑंटेरिओ प्रांतांत एका स्त्रीस एकाच वेळीं पांच मुली झाल्या. त्या आनंदानें खेळत असतां हा चमत्कार पहाण्यासाठीं पांच लक्ष माणसें दूरदूरच्या अंतरावरून येऊन गेलीं. त्यांच्या यात्रेचा एकूण खर्च अडीच कोटि रुपयांचेवर झाला असेल.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २८ नोव्हेंबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ६९,६३,२८३ |
| ता. ५ डिसेंबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ३९,३९,८४३ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते ५ डिसेंबर १९३६ अखेर | २,८८,७६,३१,४७५ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५८८ | ५ जगांतल्या आर्थिक व सामाजिक घडामोडी | ५९३ |
| २ व्हाइसरॉय आणि आर्थिक स्वयंसिद्धता ... ... | ५८९ | ६ वेड्यांचे इस्पितळांत राहण्याचा खर्च ... ... | ५९३ |
| ३ बँकिंगच्या क्षेत्रांत ... | ५९० | ७ सहकारी चळवळ ... | ५९४ |
| ४ स्फुट विचार ... | ५९१ | ८ साखरेच्या व्यापाऱ्यांची परिषद् ... ... | ५९५ |
| साखरेचे व्यापारी व कारखानदार—सिनेमाच्या धंद्यास सरकारी सहाय—एक्सचेंज बँका व मुंबईतील व्यापारी-बँकिंग कंपन्या आणि नवीन कंपनी कायदा—हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार—प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक-"प्रभा"चा खास अंक— | | ९ पुणें औद्योगिक प्रदर्शन | ५९५ |
| | | १० डनलॉप कंपनीचा नवा कारखाना ... ... | ५९६ |
| | | ११ हिंदी कापसाची जपानची खरेदी ... ... | ५९६ |
| | | १२ युद्धासाठी जय्यत तयारी | ५९६ |
| | | १३ निवडक बाजारभाव | ५९७ |



# अर्थ

बुधवार, ता. ९ डिसेंबर, १९३६


## व्हाइसरॉय आणि आर्थिक स्वयंसिद्धता

### हिंदुस्थानची वाट काय?

दिल्ली येथें चेम्सफर्ड क्लबांत भाषण करतांना व्हाइसरॉय, लॉर्ड लिनलिथगो, ह्यांनीं जागतिक राजकीय व आर्थिक घडामोडींचें स्थूल दृष्टीनें विवेचन केलें. असल्या विषयावर आपले विचार स्पष्टपणानें व्यक्त करणें हें व्हाइसरॉयांच्या दर्जाच्या अधिकाऱ्यास जबाबदारीचें व नाजुक असें वाटलें असलें पाहिजे. लॉर्ड कर्झन ह्यांचा काळ व त्यांच्यासारखे मुत्सद्दी ह्यांस ज्या प्रकारचें राजकारण व अर्थकारण शोभून गेलें असतें, त्या प्रकारचें धोरण सध्याच्या परिस्थितींत फारसें व्यवहार्य नाहीं. तथापि, काळ व स्थिति ह्यांच्या मर्यादा संभाळून लॉर्ड लिनलिथगो यांनीं आपल्या भाषणांत जागतिक व स्थानिक अशा कित्येक महत्त्वाच्या प्रश्नांचा समाचार घेतला असल्याचें दिसून येतें. आंतरराष्ट्रीय राजकीय व आर्थिक संबंध सध्याच्या काळीं इतके अस्थिर व अनिश्चित झाले आहेत कीं, ब्रिटिश मुत्सद्दी व मंत्री ह्यांसहि समतोलपणा राखणें कठिण होऊन गेलें आहे. एकीकडे, राष्ट्रसंघाचें आसन डळमळित होऊन जगांतील राष्ट्रांमध्यें नवीन तट पडत आहेत. दुसरीकडे, युरोप व आशिया ह्या दोन्हीं खंडांत राष्ट्रांच्या परस्पर संबंधांची पुनर्घटना चालली असून भावी युद्धांत स्वसंरक्षण कसें करतां येईल ह्याच्या विचारांत सर्व देश मग्न आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापार बसला आहे आणि प्रत्येक राष्ट्र स्वायत्तता, स्वावलंबन व आर्थिक स्वयंसिद्धता प्राप्त करून घेण्याच्या खटपटींत आहे. राजकीय, सामाजिक व आर्थिक घटना ह्यांमध्यें स्थैर्य उरलें नसून नवीन विचार, नवीन कल्पना आणि नवीन संस्था ह्या विषयींचे प्रयोग सर्वत्र चालू आहेत. ह्या घडामोडींचा परामर्श घेण्याचा यत्न लॉर्ड लिनलिथगो ह्यांच्या भाषणांत केलेला दिसतो.

ह्यापैकीं आर्थिक स्वयंपूर्णतेसंबंधानें त्यांनीं आपले विचार किंचित् विस्तारानें प्रकट केले असल्यानें त्यांविषयीं दोन शब्द येथें लिहिणें आवश्यक आहे. उद्योगधंदे, व्यापार आणि जनतेची रहाणी ह्यांचे बाबतींत शक्य तितक्या प्रमाणांत स्वावलंबी बनावयाचें, हें राष्ट्रांच्या आर्थिक स्वयंसिद्धतेचें मुख्य धोरण आहे. स्वतःचें युद्धसामर्थ्य वाढवणें हा एक हेतु सदरहू धोरणाच्या मुळाशीं आहे, तथापि युद्ध करण्याची महत्त्वाकांक्षा ज्यांच्यामध्यें अव्यवहार्य आहे अशा राष्ट्रांतहि आर्थिक स्वावलंबनाचा प्रादुर्भाव झाला असल्यामुळें हा उद्देश सार्वत्रिक रीतीनें प्रभावी आहे असें म्हणतां येणार नाहीं. राष्ट्रीय आर्थिक घटना व व्यवहार ह्यांचें नियमन करण्याचें कार्य राज्यकर्त्यांनीं हातीं घेतलें असून व्यक्तिस्वातंत्र्यास बंधनें घातलीं जात आहेत, ह्याचें कारण बदललेल्या परिस्थितींत ह्या प्रकारचें धोरण अपरिहार्य असल्याविषयींची प्रचलित समजूत हें होय. राज्यघटना कोणत्याहि तऱ्हेची असो, अमेरिका, ग्रेटब्रिटन, रशिया, जर्मनी इत्यादि सर्वच देशांत वैयक्तिक आर्थिक व्यवहारांत हात घालून त्यांस विशिष्ट वळण लावण्याची सरकारांची स्पष्ट प्रवृत्ति सर्व राष्ट्रांत दिसून येत आहे. अंतर्गत आर्थिक व्यवस्थेस वळण लावण्याच्या ह्या धोरणास अनुसरूनच देशांचे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे संबंध निश्चित झाले पाहिजेत हें ओघानेंच प्राप्त झालें. जागतिक घडामोडींचें ह्याप्रमाणें पृथक्करण करून आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ प्रत्यक्ष ग्रेटब्रिटनचेंच उदाहरण व्हाइसरॉयांनीं दिलें. ब्रिटिश बाजारांचें नियमन करण्याचें धोरण ग्रेटब्रिटनमधील सरकारनें अंगीकारलें तेव्हां परराष्ट्रीय व्यापाराचें नियंत्रण करणेंहि त्यास प्राप्त झालें अशी कारणकार्यपरंपरा त्यांनीं आपल्या भाषणांत लाविली आहे. भिन्न संस्कृतीच्या व भिन्न परिस्थितींतल्या अनेक प्रमुख राष्ट्रांनीं आर्थिक स्वयंसिद्धतेचें धोरण स्वीकारलें आहे ही गोष्ट अल्पकालिक नसून दूरगामी परिणाम उत्पन्न करणारी आणि दीर्घकाल टिकणारी आहे असा सिद्धांतहि त्यांनीं पुढें मांडला आहे.

फ्रान्सनें आपलें हुंडणावळीचें धोरण बदलून तें ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्या राष्ट्रांच्या धोरणाशीं जुळतें करून घेतलें ह्यावरून आतां आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या मार्गांतले अडथळे दूर होणार अशी उत्पन्न झालेली आशा फलद्रूप होण्याचा विशेष संभव नाहीं. आर्थिक संरक्षणाचें तत्त्व राष्ट्रीय घटनांच्या शरीरांत इतकें भिनलें आहे आणि त्या योगानें आर्थिक प्रश्न इतके गुंतागुंतीचे व नाजुक झाले आहेत कीं त्यांच्या जाळ्यांतून बाहेर निघणें राष्ट्रांस कठिण होऊन गेलें आहे आणि व्यापार व उद्योगधंदे ह्यांचें नियंत्रण ही गोष्ट सर्व देशांत नित्याच्या संवयीची होऊन बसली आहे. वरील अर्थाचें लंडन टाइम्सनें व्यक्त केलेलें मत आपणांस संमत असल्याचें व्हाइसरॉय ह्यांनीं जाहीर केलें. हिंदुस्थानच्या दृष्टीनें ही मान्यता महत्त्वाची आहे. तथापि, ह्या देशाच्या हिताच्या प्रश्नांचा विचार हिंदी जनतेच्या दृष्टीनें स्वतंत्रपणानें होईल तरच तिचा आम्हांस उपयोग आहे. हिंदुस्थानचें स्वतःचें असें राष्ट्रीय धोरण नसेल तर लॉर्ड लिनलिथगो ह्यांच्या मताप्रमाणें इतर देशांत जी नवीन व्यवस्था आवश्यक व हितकारक समजली जाते तिला येथें वाव राहाणार नाहीं. भाषणाचे शेवटीं त्यांनीं काढलेल्या उद्गारांवरून स्वदेशी आर्थिक धोरणासंबंधानें हिंदी जनतेची जी जोराची मागणी आहे तिला त्यांच्याकडून पाठिंबा मिळेल अशी आशा करण्यास जागा नाहीं. बदललेल्या जागतिक परिस्थितींत ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांनीं परस्पर सहकार करावा हें म्हणणें ठीक आहे. पण ह्या सहकारांत हिंदुस्थानच्या विशिष्ट गरजा व अडचणी ह्यांची हेळसांड होते, त्याची वाट काय? हिंदुस्थानच्या आर्थिक हिताची जोपासना स्वतंत्रपणानें करण्याची आवश्यकता व्हाइसरॉयांच्या निरीक्षणावरून त्यांस भासत नाहीं असें अनुमान त्यांच्या भाषणावरून निघतें. तें हिंदी जनतेस रुचण्याची अपेक्षा त्यांनीं करूं नये.

---

## बँकिंगच्या क्षेत्रांत

### ब्रिटिश बँकांची रोकड शिल्लक

लंडनमधला पैशाचा बाजार अत्यंत संघटित व संपन्न आहे हें सुप्रसिद्ध आहे. बँक ऑफ इंग्लंड, मोठ्या प्रमाणावरील "व्यापारी" बँका आणि हुंड्यांचा व्यवहार करणाऱ्या खास संस्था ह्यांचे परस्पर-संबंध तेथें इतके स्निग्ध आहेत कीं लंडनमध्यें पैशाच्या देव-घेवीचे व्यवहार फारच कार्यक्षम, सोयीवार व स्वस्त रीतीनें होऊं शकतात, असा लौकिक आहे. प्रमुख ब्रिटिश बँकांजवळच्या ठेवी आणि त्या परत करतां याव्या म्हणून त्यांनीं जवळ बाळ-गावयाची रोकड ह्यांचें परस्पर प्रमाण १०-१ असलें म्हणजे पुरें, हा त्यांच्यामध्यें सर्वमान्य दंडक ठरून गेलेला आहे. एक पौंड रोकड शिलक असली कीं, दहा पौंडांचें कर्ज व ठेव निर्माण करण्यास हरकत नाहीं असा ब्रिटिश बँकांचा अनुभवसिद्ध नियम झालेला आहे. बँकांचे अहवाल व हिशेब आणि त्यांचे संबंधांतले ग्रंथ ह्यांमध्यें ह्या प्रघाताचा नेहमीं उल्लेख करण्यांत येतो, इतका तो रुळून गेला आहे. ठेवींच्या देण्याच्या एक दशांश रोकड शिलक बँकांजवळ असावी ह्या नियमास अपवाद उत्पन्न झाल्याचें प्रसिद्ध झालेल्या ताज्या आंकड्यांवरून दिसून येतें. नित्य संवयीच्या दृष्टीनें अपवादात्मक झालेल्या ह्या गोष्टींकडे आर्थिक विषयांस वाहिलेल्या वृत्तपत्रांत लक्ष वेधण्यांत आलें आहे. ठेवींच्या १० टक्के रोकड सरासरीनें असण्याचे ऐवजीं गेल्या ऑक्टोबर महिन्यांत ती ९.९५ झाली. ही घट वास्तविक कांहीं मोठी आहे असें नाहीं आणि ह्या तफावतीवरून ब्रिटिश बँकांचा व्यवहार सदोष झाला अशांतलाहि प्रकार नाहीं. तथापि, तींत नावीन्य मात्र आहे.

### रोकडीचें प्रमाण कमी झालें तरी बिघडत नाहीं

ब्रिटिश बँकांच्या रोकड शिलकीचें प्रमाण १० टक्क्यांवरून ८ टक्क्यांपर्यंत खाली आलें, तरीहि कांहीं बिघडणार नाहीं आणि त्यामुळें लोकांच्या विश्वासास धक्का बसण्याचें कारण नाहीं. ग्रेट ब्रिटनमधल्या बँकांच्या स्थैर्याबाबत जनतेची पूर्वानुभवावरून खात्री झालेली आहे. बँकांच्या रोकड शिलकेचें महत्त्व द्विविध आहे. त्यांच्या मुख्य कचेऱ्या आणि शाखा ह्यांमध्यें गिऱ्हाइकांस देण्याकरितां नोटा व नाणीं नेहमीं लागतात. ही रकम वेळोवेळीं किती असावी ह्याची कल्पना बँकांच्या व्यवस्थापकांस असते. सर्वसाधारणपणें पाहिलें असतां, सरासरीनें ठेवींच्या ५ टक्के ही रकम असली म्हणजे भागतें असा अनुभव आहे. ह्या "पेटींतल्या रोकडी" (टिल मनी) शिवाय ब्रिटिश बँका कांहीं शिलक बँक ऑफ इंग्लंडमध्यें ठेवतात. ह्या संबंधांत हिंदी रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत, "जोडलेल्या" बँकांनीं मध्यवर्ती बँकेंत आपल्या ठेवींच्या विशिष्ट प्रमाणांत शिलक ठेवलीच पाहिजे असा निर्बंध आहे, तसा कायदा ग्रेट-ब्रिटनमध्यें नाहीं. बँक ऑफ इंग्लंडमध्यें रोकड ठेवणें हा तेथील व्यापारी बँकांच्या सोयीचा भाग आहे. परस्परांवर निघालेल्या चेक्सची वजावाट होण्याची (क्लिअरिंग) जी सोय केलेली असते, तीमध्यें देण्याघेण्याची एकमेकांकडे बाकी निघते, ती बँक ऑफ इंग्लंडवर चेक काढून भागवावी असा बँकांचा प्रत्यहीं व्यवहार चालतो. त्यांतील देण्याचाहि बँकांस अंदाज करतां येतो आणि अल्पकालिक कर्जें परत घेऊन त्याची तरतूद करतां येते. ह्यामुळें बँक ऑफ इंग्लंडमध्यें ठेवावयाच्या रोकड शिलकेची रकम अत्यंत मर्यादित होते आणि तिचा आंकडा सरासरीनें ठेवींच्या २ किंवा ३ टक्क्यांपेक्षा अधिक असण्याचें कारण नाहीं. तेव्हां हे ३ टक्के व "पेटींतल्या रोकडीचे" ५ टक्के मिळून एकूण ८ टक्के पर्यंत बँकांनीं शिलक बाळल्यास व्यवहारांत अडचण येणार नाहीं, आणि अलीकडे रोकड शिलकेचें प्रमाण १० टक्क्यांच्या थोडेसें खाली गेलें असतां ती गोष्ट अभूतपूर्व असली तरी तीमध्यें वावगें असें कांहीं नाहीं.

### रोकड शिलकेच्या प्रमाणाचे आंकडे

ग्रेट-ब्रिटनमध्यें दहा मोठ्या व्यापारी बँका असून त्यांपैकीं पांच प्रचंड आहेत, त्या "पांच प्रस्थें" ह्या सदरांत येत असतात. गेल्या ऑक्टोबर महिन्यांत रोकड शिलकेचें प्रमाण त्यांमध्यें काय होतें, ह्याचे आंकडे येथें दिले आहेत:—

... ठेवींशीं रोकड शिलकेचें प्रमाण

| "पांच प्रस्थें" | टक्के | इतर बँका | टक्के |
|---|---|---|---|
| बार्क्लेज | ९.९९ | कूट्स | ८.७७ |
| लॉइड्स | ९.२५ | डिस्ट्रिक्ट | १०.१३ |
| मिड्लंड | १०.३६ | ग्लिन, मिल्स | ९.९५ |
| नॅशनल प्रॉव्हि-न्शिअल | १०.०० | मार्टिन्स | १०.१४ |
| वेस्टमिंस्टर | १०.१९ | वुइल्यम्स डीकन्स | १०.०५ |

लॉइड्स, बार्क्लेज, कूट्स व ग्लिन, मिल्स ह्या चार बँकांच्या रोकड शिलकीचें प्रमाण १० टक्क्यांच्या खाली गेलें आहे, तर इतर संस्थांचें १० च्यावर आहे. सर्वांच्या मिळून सरासरीचें एकूण प्रमाण १० च्या खाली गेलेलें आहे.

### ग्रेट-ब्रिटनमधील पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँका

रोजंदारीनें काम करणाऱ्या कामगारांस आपले पैसे सुरक्षित ठेवतां यावे व लहान सहान रकमांची बचत करणारांची सोय व्हावी, ह्या हेतूनें मि. ग्लॅडस्टन ह्यांच्या फडनविशीच्या अमदानींत पोस्ट ऑफ सेव्हिंज बँक बिल पार्लमेंटनें मंजूर केलें व ग्रेट-ब्रिटनमधील पहिल्या सरकारी बँकेची स्थापना झाली. पोस्टांत पैसे ठेवणारांची संख्या सुरवातीपासून एकसारखी वाढत आली आहे व ठेवींतहि भर पडत आहे. महायुद्धाचे वेळीं कित्येक ठेवीदारांस आपल्या ठेवींच्या शाश्वतीबद्दल शंका येऊन त्यांनीं रकमा काढल्या. परंतु पोस्टखात्यानें क्षणाचाहि विलंब न लावतां त्यांची पैशाची सोय केली. ह्या कारणानें लोकांचा पोस्टल सेव्हिंग्ज बँकेवरील विश्वास उलट वाढतच गेला. आज एक कोटीपेक्षा ज्यास्त लोकांचीं पोस्टांत खातीं आहेत आणि प्रत्येक खात्यांत सरासरीनें ५०० रुपयांचे वर ठेवी आहेत. ग्रेटब्रिटनमधील प्रत्येक कुटुंबाच्या वाट्यास एक खातें येतें व चार जणांपैकीं एकाचे पैसे पोस्टांत असतात, अशी सरासरी पडते. रोजच्या व्यवहारांची संख्या १ लाखांपेक्षां ज्यास्त आहे. दरमहा, सात वर्षांखालील मुलांचीं ५,००० नवीं खातीं पोस्टांत उघडली जातात. अशा रीतीनें, पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँक ही संस्था ग्रेट ब्रिटनमधल्या लोकांच्या नित्य परिचयाची झाली असून त्यामुळें काटकसर, बचत, इत्यादि गुणांस उत्तेजन मिळतें. सरकारचाहि त्यांत फायदाच आहे. पोस्टल बँक ही ग्रेटब्रिटनमध्यें खरोखरच लोकांची स्वतःची बँक झाली आहे. हिंदुस्थानामध्येंहि पोस्टल सेव्हिंग्ज बँक लोकप्रिय व अत्यंत उपयुक्त अशी संस्था झाली आहे, तथापि तिच्या प्रगतीस अद्याप किती वाव आहे, ह्याची कल्पना वरील माहितीवरून येईल.

# स्फुट विचार

## साखरेचे व्यापारी व कारखानदार

कोणताहि धंदा झपाट्यानें विस्तार पावत असतां मालाची सांठवण, बाजारभाव, मजूरींचे दर, घाउक विक्रीची व्यवस्था, इत्यादि बाबींचा योग्य मेळ बसत नाहीं असें होतें आणि कांहीं काळपर्यंत त्यांत गोंधळ उडालेला दिसतो. तथापि, ह्या संबंधांत उद्भवणाऱ्या अडचणी दूर होऊन धंद्याची सर्व बाजूंनीं नीट घडी बसेल अशी तजवीज करण्याचें काम कारखानदार व व्यापारी ह्यांचें असतें. त्यांनीं, उपस्थित होणाऱ्या मतभेदाचा व इतर प्रश्नांचा निकाल सहविचारानें व संघटनेनें करावा लागतो. साखरेच्या व्यापाऱ्यांची एक परिषद् कानपूर येथें नुकतीच भरून तीमध्यें त्यांनीं कारखानदारांसंबंधांचीं आपलीं गाऱ्हाणीं वेशीवर टांगलीं आणि तीं दूर व्हावीं म्हणून कित्येक विधायक सूचनाहि केल्या. ह्या परिषदेची त्रोटक हकीकत आम्हीं आज दुसरीकडे दिली आहे. प्रगतीच्या दृष्टीनें अशी चर्चा उपयुक्त असते, आणि ती एकांगी होऊं नये व धंद्यास उपकारक व्हावी ह्यासाठीं कारखानदार व व्यापारी ह्यांनीं तडजोडीनें उपाययोजना करणें आवश्यक असतें. कारखानदार, कामकरी, शेतकरी, व्यापारी व साखर वापरणारी सामान्य जनता ह्या सर्वांचे हितसंबंध ह्या स्वदेशी धंद्याच्या उत्कर्षांत सारखेच निगडित झालेले आहेत हें कोणीहि विसरून चालणार नाहीं. सहविचार, संघटणा व सहकार्य ह्यांचे वांचून आर्थिक प्रगति शक्य नाहीं हें सर्वांनीं ध्यानांत वागवावें.

## सिनेमाचे धंद्यास सरकारी सहाय

ग्रेटब्रिटनमधील सरकार तेथील सिनेमाच्या धंद्यास सर्व तऱ्हेनें सहाय करीत आहे; परंतु हिंदुस्थानांत ह्या धंद्यास संरक्षण मिळत नाहीं आणि परदेशी चित्रपटांशीं स्पर्धा त्यास करावी लागते. तसेंच, आयात कच्च्या फिल्मबाबतहि जरूर ती सवलत मिळत नाहीं, अशी कित्येक दिवसांची हिंदी सिनेमावाल्यांची जुनी तक्रार आहे. ग्रेटब्रिटनमधील सरकार तेथील धंद्याच्या हितसंबंधाविषयीं अत्यंत जागरूक आहे. त्या देशांतील सिनेमागृहांत दाखविल्या जाणाऱ्या चित्रपटांपैकीं, त्यांच्या लांबीच्या हिशेबानें, शेकडा २० तरी ब्रिटिश बनावटीचे असले पाहिजेत, अशी कायद्याची सक्ती आहे. ब्रिटिश फिल्म्सचा पुरवठा ह्या मागणीच्या मानानें पुरेसा होत नसूनहि हें संरक्षण देण्यांत आलें, ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ह्या संरक्षणाचा फायदा घेण्यासाठी स्वस्त फिल्म्स तयार करण्याची संधी सिनेमा कंपन्यांनीं साधली, परंतु त्यामुळें एकंदर धंद्याचा दर्जा कमी होण्याची भीति उत्पन्न झाली. 'सिनेमाटोग्राफ फिल्म ॲक्ट'ची मुदत १९३८ मध्यें संपते. तेव्हां, ह्या धंद्यासंबंधीं चौकशी करून अहवाल सादर करण्याकरितां ब्रिटिश सरकारनें एक कमिटी नेमली होती, तिचें काम आतां पुरें झालें आहे. ब्रिटिश स्टूडिओ व सिनेमागृहें ह्यांच्या मालकीमध्यें परदेशीयांचा प्रवेश होऊं नये, अशी व्यवस्था करण्याविषयीं कमिटीनें आपल्या रिपोर्टांत सूचना केली आहे. त्याचप्रमाणें, ठराविक प्रमाणांत ब्रिटिश फिल्म्स दाखविण्याची सिनेमागृहांवरील सक्ती आणखी दहा वर्षें चालू रहावी, अशीहि कमिटीची शिफारस आहे. ग्रेटब्रिटनसारख्या देशांत सिनेमाच्या धंद्याचे संरक्षणासाठीं एवढे प्रयत्न करण्यांत येतात, तर हिंदुस्थानांत किती तरी पटीनें ह्या धंद्याची जोपासना करण्याची खटपट झाली पाहिजे हें सांगावयास नको. ह्या बाबतींत मोशन पिक्चर सोसायटी ऑफ इंडियानें चालविलेले प्रयत्न अभिनंदनीय आहेत, ह्यांत शंका नाहीं. सरकारनें ह्या बाबतींत ज्यास्त लक्ष घालणें अगत्याचें आहे व हिंदी सिनेमाचा धंदा संघटित झाल्यावर सरकारासहि ह्या धंद्याची उपेक्षा करून भागणार नाहीं.

## एक्सचेंज बँका व मुंबईतील व्यापारी

हिंदुस्थानचा परराष्ट्रांशीं आयात-निर्गत व्यापार चालतो, त्यांतील देवघेवींसाठीं पैसा पुरविण्याचें काम एक्सचेंज बँका करतात. हा व्यवहार जवळ जवळ सर्वस्वी युरोपियन बँकांचे हातांत आहे. हिंदुस्थानांतील व्यापारी परदेशांत माल पाठवितात तेव्हां ह्या बँका त्यांच्या हुंड्या विकत घेऊन त्या लंडनमध्यें विकतात किंवा त्यांची मुदत भरली म्हणजे त्यांचे पैसे वसूल करतात. त्याचप्रमाणें, हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांवरच्या हुंड्यांचे पैसे त्या येथें वसूल करतात. आगबोटींमध्यें परदेशांतला माल चढवला गेल्यावर त्या संबंधांतील दाखले वगैरे कागदपत्रें पुढें धाडण्यांत येतात व तीं दाखविल्याखेरीज आयात करणाऱ्या व्यापाऱ्यांस येथें माल मिळूं शकत नाहीं. हीं कागदपत्रें व्यापाऱ्यांचे हातीं येण्यास खोटी झाल्यास, त्यांचे ऐवजीं बँकांची 'गॅरंटी' म्हणजे खर्च व नुकसान भरून देण्याची हमी घेणारें पत्रक, आगबोट कंपन्या स्वीकारीत असत व त्यामुळें व्यापाऱ्यांची सोय होत असे. गेल्या पांचसहा महिन्यांपासून, अशा तऱ्हेची गॅरंटी देण्याचें बँकांनीं बंद केलें आहे. मालाच्या किंमतीचे दुपटीपेक्षां ज्यास्त रकमांबद्दल त्या जबाबदारी स्वीकारण्यास कबूल नाहींत आणि अशी मर्यादित गॅरंटी स्वीकारण्याची आगबोट कंपन्यांची तयारी नाहीं. मद्रास व कलकत्ता बंदरांत आगबोट कंपन्यांची हरकत नसतांना मुंबई येथें कंपन्यांनीं ह्या मर्यादित हमीचा स्वीकार कां करूं नये, अशी एक्सचेंज बँकांची पृच्छा आहे आणि आपली गैरसोय होत असल्याविषयीं व्यापाऱ्यांची तक्रार आहे.

## बँकिंग कंपन्या आणि नवीन कंपनी कायदा

नवीन कंपनी कायद्याच्या अंमलबजावणीस ता. १५ जानेवारी, १९३७ पासून सुरवात होणार आहे. बँकिंगचा धंदा करणाऱ्या कंपन्यांकरितां एक स्वतंत्र कायदा करण्याची कल्पना कित्येक दिवस प्रचलित होती, तथापि ह्या नव्या कायद्यामध्यें बँकिंग कंपन्यांसंबंधाचे जरूर ते नियम समाविष्ट करण्यांत आले आहेत. बँकिंगच्या धंद्यासंबंधीं अगर व्यवहाराविषयीं आतांपर्यंत कायदेशीर व्याख्या कोठेंहि करण्यांत आली नव्हती. तथापि, नव्या दुरुस्त कायद्यामध्यें बँकिंग कंपनीची व्याख्या देण्यांत आलेली असून तीमध्यें निर्दिष्ट केलेला व्यवहार करणाऱ्या कंपन्यांस नवीन कायद्यामधील कलमें लागू पडणार आहेत. सध्या अस्तित्वांत असलेल्या कंपन्यांस १५ जानेवारी, १९३७ नंतर दोन वर्षांची मुदत मिळणार असून त्यानंतर सदरहु कंपन्या नव्या कायद्याचे कक्षेंत येतील. ह्या कायद्यांतील व्याख्येमध्यें न बसणाऱ्या कोणत्याहि कंपनीस, आपल्या नांवामध्यें अगर व्यवहारांत बँक, बँकर, बँकिंग, ह्या शब्दांचा उपयोग करतां येणार नाहीं. मॅनेजिंग एजन्सीची पद्धत बँकिंगच्या धंद्यापुरती तरी अजिबात बंद होणार आहे. निदान ५० हजार रुपयांचें खेळतें भांडवल जमा होण्यापुरते भाग मंजूर होऊन रकम वसूल झाली असल्याखेरीज बँकिंग कंपनीचा व्यवहार सुरू होणें

अशक्य होईल. रिझर्व्ह फंडांतील रकम भरणा झालेल्या भांडवला इतकी होईपर्यंत नफ्याच्या निदान वीस टक्के इतकी रकम रिझर्व्ह फंडांत टाकली पाहिजे व रिझर्व्ह फंडांतील पैसे सरकारी रोख्यांत अगर इंडियन ट्रस्ट ॲक्टाच्या २० व्या कलमांत निर्दिष्ट केलेल्या रोख्यांतच गुंतविण्यांत आले पाहिजेत, असा निर्बंध नव्या कंपनी कायद्यांत घालण्यांत आला आहे. ठेवीदारांचे व भागीदारांचे हितसंबंध सुरक्षित रहावे, ह्याकरितां इतरहि कित्येक निर्बंध कायद्यांत समाविष्ट करण्यांत आले आहेत.

### हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार

हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराबाबतचा १९३५-३६ सालाचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यांतल्या ठळक बाबींचा निर्देश करणें आवश्यक आहे. १९३४-३५ सालीं ह्या देशांत बाहेरून १३२ कोटि रुपयांचा माल आला होता, तो १९३५ सालीं १३४ कोटि रुपयांचा आला. आयातींत ह्याप्रमाणें २ कोटि रुपयांचा वाढावा झाला. निर्गत ९ कोटींनीं वाढून तिचा आंकडा पूर्वसालाच्या १५६ कोटींच्या ऐवजी १६४ कोटि इतका झाला. १९३२-३३ व १९३३-३४ सालांचे आयातीचे आकडे अनुक्रमें करून १३३ व ११५ कोटि रुपये असे होते. ह्या दोन सालांतले निर्गतीचे आकडे अनुक्रमानें १३५ व १५१ कोटि असे होते. हा मालाच्या आयात-निर्गतीचा व्यवहार झाला. ह्यांत सोन्या-चांदीच्या व्यवहाराचे आकडे मिळवले पाहिजेत. तसें केलें असतां १९३५-३६ सालीं हिंदुस्थानच्या एकूण आयातीपेक्षां एकूण निर्गत ६७ कोटि रुपयांनीं जास्त होती असें दिसून येतें. १९३४-३५ मध्यें फाजील निर्गतीचा हा आकडा ७६ कोटि रुपये होता. १९३४-३५ सालीं सोन्या-चांदीच्या आयातीपेक्षां निर्गतीच्या फाजिलाचा आकडा ५२३/४ कोटि रुपये होता, तो १९३५-३६ ह्या वर्षी ३६३/४ कोटि झाला. अहवालाचे ह्या सालीं सोन्याची निवळ निर्गत ३७३/४ कोटि रुपये किंमतीची झाली. चांदीच्या निर्गतीची रकम वजा जातां निवळ आयात ह्या वर्षी ११/४ कोटि रुपयांची झाली. हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराच्या आढाव्याची मदार सोन्याच्या निर्गतीवरच अजून आहे, हें येथें लक्ष्यांत आल्यावांचून रहात नाहीं. सोन्याची आयात होणें बाजूसच राहिलें, त्याची सारखी निर्गत होत रहावी आणि परराष्ट्रीय देणें हिंदुस्थानास शिलकी सोनें बाहेर पाठवून भागवणें प्राप्त व्हावें हें आर्थिक सुस्थितीचें चिन्ह खचित नव्हे.

### दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक, लि.

वरील बँकेची जाहिरात "अर्थाच्या"च्या गेल्या अंकांत छापली होती, तिच्यावरून वाचकांस ह्या नवीन संस्थेचें कार्यक्षेत्र, संचालक मंडळ, स्थापनेचे हेतु, इत्यादि संबंधी माहिती मिळालेली आहेच. व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या वाढीविषयीं सध्या महाराष्ट्रांत जी जागृती झालेली आहे तिचें ह्या बँकेची स्थापना हें एक निदर्शक आहे, हें उघड आहे. व्यापार व उद्योगधंदे ह्यांपैकीं उद्योगधंद्यांस, त्यांच्या इमारती, यंत्रसामुग्री, इत्यादीसाठी लांब मुदतीनें व मुबलक पैसा लागतो. हें काम अल्प मुदतीचीं कर्जे देणाऱ्या व्यापारी बँकांच्या कक्षेंत येत नाहीं. उद्योगधंद्यांस वेळींच पुरेसें भांडवल उपलब्ध झाल्यास त्यांच्या वाढीस सहाय होतें. मात्र, असें भांडवल गुंतवितेवेळीं चौकसपणें व दक्षतेनें बँकेनें व्यवहार केले पाहिजेत, ह्या विचारसरणीस अनुलक्षून वरील बँक स्थापन होत आहे, असें तिच्या "स्थापनेचे हेतु" मध्यें नमूद आहे. बँकेच्या संचालक मंडळांत कारखानदारीचा धंदा करणारे अनुभवी गृहस्थ आहेत. बँकेचे अध्यक्ष, श्री. रा. न. अभ्यंकर, यांस व्यवसायाची माहिती व अनुभव आहे, व तिचा फायदा बँकेस मिळेल. बँकेचें अधिकृत भांडवल १० लक्ष रुपये असून, तूर्त १०० रुपयांस एक ह्याप्रमाणें ५,००० भाग विक्रीस काढलेले आहेत. अर्जासोबत १५ रु. व अर्जमंजुरीनंतर १० रु. भरावयाचे आहेत. बाकीच्या रकमेची सध्या मागणी केली जाणार नाहीं. ४० हजारांच्या भागांबद्दल अर्ज आल्यावर ते मंजूर करण्यांत येतील व बँकेच्या कामास सुरवात होईल. बँकेच्या उद्दिष्ट कार्यांत तिला यश येवो, असें आम्ही इच्छितों.

### "प्रभा" चा खास दांपत्य अंक

"प्रभा" साप्ताहिकाचा खास "दांपत्य अंक" काल रोजीं प्रसिद्ध झाला. मेल्या वर्षाच्या 'दांपत्य अंका' पेक्षा हा अंक पुष्कळच सरस असून त्यांतील लेख वाचनीय व विचारप्रवर्तक आहेत. हल्लीच्या कठिण, आर्थिक परिस्थितीमध्यें व बदलत्या समाजरचनेमध्यें कौटुंबिक जीवनाची कुचंबणा होऊं लागली आहे आणि पति-पत्नीचा स्वार्थ विरुद्ध सामाजिक हित असा लढा निर्माण होऊं पहात आहे. ह्या दृष्टीनें दांपत्य आयुष्यक्रमाचा सांगोपांग विचार होणें आवश्यक झालें आहे. "प्रभा" च्या प्रस्तुत विशेषांकामध्यें ह्या प्रश्नासंबंधीं अनेक अधिकारी लेखक-लेखिकांचे लेख प्रसिद्ध झाले असून, त्यांतील मतें सर्वांस मान्य झालीं नाहींत, तरी त्यांची दिशा समजून घेऊन आपल्या आचारास वळण लावण्यास अंकांतील लिखाणाचा उत्कृष्ट उपयोग होणार आहे. ह्या खास अंकाची पृष्ठसंख्या ६० असून त्याची किंमत ३ आणे आहे.


## नोटीस

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें या कंपनीच्या भागीदारांची दुसरी वार्षिक साधारण सभा पुणें येथें टिळक स्मारक मंदिरांत रविवार ता. १३ डिसेंबर सन १९३६ इसवी रोजीं दुपारीं ४ वाजतां भरणार आहे.

सभेपुढें येणारीं कामें.

१. ता. ३० जून १९३६ पर्यंतचा ताळेबंद व अहवाल मंजूर करणें.
२. सन १९३६-३७ सालाकरितां ऑडिटर्स नेमणें.
३. अध्यक्षांच्या परवानगीनें येणारीं इतर कामें.

तरी सर्व भागीदारांनीं सभेस हजर रहावें अशी विनंति आहे.

पुणें, ता. ३-१२-३६

बोर्डाचे हुकुमावरून
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजन्ट.

**पाहिजेत.** नर्सिंगच्या ३॥ वर्षांच्या कोर्सकरितां जागा भरण्याच्या आहेत. वय १८ ते ३५ पर्यंत असावें व मराठी ५ वीपर्यंत व इंग्रजी ४ थीपर्यंत शिक्षण पूर्ण झाल्याचा दाखला असावा. गरजूंनीं खालील पत्त्यावर अर्ज करावेत.

जॉ. ऑ. सेक्रेटरी,
पुणें सेवासदन नर्सिंग ॲन्ड मेडिकल एज्युकेशन कमिटी, नर्सेस कॉर्टर्स, पुणें नं. २

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
**झारापकर टेलरिंग कॉलेज**
माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २

## जगांतल्या आर्थिक व सामाजिक घडामोडी

### काम आणि मजूरी

(५)

वास्तविक पहातां समाजसत्तावादाच्या प्रतिज्ञेप्रमाणें उद्योगधंद्यांच्या कारभारांत कामकरी लोकांसच सर्व अधिकार असणें जरूर होतें. परंतु धंद्यांच्या मालकांस उखडणें म्हणजे त्यांची जागा सरकारनें घेणें होय; आणि ह्या कामीं व्यावहारिक स्वरूपाच्या अडचणी उपस्थित झाल्यानें ती मुळांतली कल्पना सोडून द्यावी लागली. संपत्तीच्या उत्पादनाच्या योजना स्वतः आखून त्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अनुभवावरून जड वाटल्यानें बोल्शेव्हिकांनीं तें काम इतरांवर सोंपवलें आहे आणि ह्या रीतीनें कामकऱ्यांच्या वर्चस्वास त्यांच्या व्यवस्थेंत जागा राहिली नाहीं. कामकऱ्यांच्याऐवजीं उपभोक्त्यांची म्हणजे माल वापरणारांची सत्ता तेथें चालते असें मि. व मिसेस वेब म्हणतात पण तेंहि वस्तुस्थिति-निदर्शक नाहीं. समाजसत्तावादाच्या कल्पनेप्रमाणें आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे जनतेची कमाई सारखी असण्यासंबंधाची होय. मिळकतीची विषमता हा भांडवलशाहीचा प्रमुख दोष मानण्यांत येतो, पण रशियांत ह्या बाबतींत समता अस्तित्वांत नाहीं. बोल्शेव्हिकांचा पुढारी, स्टॅलिन, ह्यानें समाजसत्तावाद आणि समाजकुटुंबवाद ( कम्यूनिझम ) ह्यांमधला फरक स्पष्ट करून सांगतांना असें म्हटलें आहे कीं, दोहोंमध्यें आपल्या शक्तीप्रमाणें काम केलेंच पाहिजे, पण समाजसत्तावादाच्या मतें कामाच्या मानानें प्रत्येकास मेहनताना मिळावयाचा आणि कम्यूनिझमच्याप्रमाणें मेहनताना प्रत्येकाच्या जरूरीस अनुसरून मिळावयाचा. दोहोंतहि मिळकतीची समता नाहीं, आणि रशियांतली कम्यूनिझम खरी कम्यूनिझम नव्हे. तेथें प्रत्येकाच्या जरूरीप्रमाणें मजुरी दिली जात नाहीं. स्टॅलिनच्या व्याख्येप्रमाणें समाजकुटुंबवाद कल्पिल्यास, त्यांत कामाच्या गुणास व किंमतीस धरून कमी-जास्त मेहनताना देतां येत नाहीं. असें असूनहि ह्याच समाजसत्तावादाच्या तत्त्वावर संपत्तीची वांटणी रशियांत चालली आहे.

इतर देशांतल्या कारखानदारांशीं झगडणाऱ्या मजूर संघांशीं रशियांतल्या कामकऱ्यांच्या गटांचें कांहींच साम्य नाहीं, कारण मालक व मजूर असा भेद रशियांत नाहीं. वरचे अधिकारी ठरवतील त्याप्रमाणें रशियन मजुरांचे गट पडतात आणि विशिष्ट तऱ्हेचें काम करणाऱ्या लोकांचे स्वतंत्र संघ तेथें नाहींत. कामकऱ्यांमध्यें वर्ग पाडलेले असून त्यांच्या मजुरीचे दर निरनिराळे आहेत. नुसत्या कामाच्या तासांप्रमाणें नव्हे तर कामाच्या आकाराप्रमाणेंहि मजुरीचे दर निरनिराळे आहेत. विशेष तऱ्हेचें काम करणारांची संख्या मर्यादित असेल तर त्यांस जादा मजुरी मिळते. सर्वांस कोणतेंना कोणतें तरी काम करावेंच लागतें. तयार झालेल्या मालाच्या किंमतींतून राष्ट्रास रक्षण, शिक्षण, आरोग्य इत्यादि बाबींसाठी लागणाऱ्या खर्चाचा पैसा वरून हुकूम येईल त्याप्रमाणें वजा होऊन बाकीची रकम कामकऱ्यांत वांटली जाते. त्यांस विमा वगैरेसाठी खर्चाव्या लागणाऱ्या बाबी हिशेबांत घेतल्या जाऊन मजुरीची रकम ठरते. ह्या सर्व घटनेंत मध्यस्थ, मालक किंवा भांडवलवाला कोणी नाहीं. संपत्तीचें उत्पादन, विनिमय व विभागणी समाजाचे किंवा प्रबळ राजकीय पक्षाचे पुढारी ह्यांचे हातांत आहे आणि ते सबंध आर्थिक यंत्र चालवतात. वैयक्तिक स्वार्थ, महत्त्वाकांक्षा, नफा मिळवण्याची इच्छा, कल्पकता व साहस ह्यांस त्यांत जागा नाहीं. धंद्यांची निवड, उत्पादकांत व उपभोक्त्या या वर्गांत स्पर्धा आणि परस्पर-विनिमयांत मिळणारा मोबदला ह्या गोष्टी खाजगी मालमत्ता व भांडवल ह्यांच्या अभावीं रशियांत संभवत नाहींत.

भांडवलशाही ह्या नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या समाजघटनेंत म्हणजे सामान्यतः रशियाव्यतिरिक्त इतर देशांत स्वतःच्या गरजा भागवण्यासाठी स्पर्धेची शिकस्त करून विनिमयाच्या द्वारें अधिकांत अधिक संपत्ति व सुखसोयी व्यक्ती प्राप्त करून घेतात आणि ह्या खटपटींत त्यांस मिळणाऱ्या यशाच्या मानानें सबंद समाजाच्या व्यवहारांचें यश मापलें जातें. असलें माप रशियांत नाहीं. कामगारांनीं अधिक मेहनत करावी व संपत्तीचें उत्पादन ज्यास्त करावें म्हणून त्यांस जादा मजुरीचें आमिष तेथें दाखविण्यांत येतें इतकेंच, पण हा प्रकार इतरत्रहि असून शिवाय स्वतंत्र जादा फायद्याचा मोह असतो. मालाचें उत्पादन, विक्री आणि वांटणी ह्या क्रिया ज्यास्त कार्यक्षम होण्यास व्यक्तिसाध्य फायद्याचें आमिष रशियांत नाहीं. औद्योगिक व व्यापारविषयक योजना आंखून त्यांची अंमलबजावणी करण्याचें काम ज्या लोकांच्या हातीं असतें त्यांची कार्यक्षमता मापून तिच्या मानानें कमी-अधिक बक्षिस व मिळकत लायख माणसांस मिळेल असें करण्याचें साधन रशियामध्यें अजून उपलब्ध नाहीं. जनतेस ज्यास्तींत ज्यास्त सुखसोयी मिळावयाच्या असतील तर त्यांचा खर्च व मिळकत ह्यांच्या हिशेबानें उत्पादन झालें पाहिजे. उत्पादनाचा खर्च व त्याची फलद्रूपता ह्यांचा अजमास रशियांत केला जात नाहीं, ह्या कारणानें तेथील आर्थिक घटनेची कार्यक्षमता मापणें शक्य होत नाहीं. ह्या वैगुण्याची मि. व मिसेस वेब ह्यांसहि जाणीव आहे. सरकार ठरवील ते बाजारभाव अशी स्थिति रशियांत असल्यामुळें त्यांवर चलनाचा काय परिणाम होतो हा प्रश्नच उद्भवत नाहीं. मागणी व पुरवठा ह्यांचा परस्पर-संबंध आणि अनियंत्रित चढाओढ ह्यांवर पदार्थांच्या किंमती व ते विकणारे व खरेदणारे ह्यांचा नफा अवलंबून नसल्यानें रशियन आर्थिक यंत्राची परीक्षा तज्ज्ञ मार्मिकतेनें करतां येत नाहीं.

---

### वेड्यांचे इस्पितळांत रहाण्याचा खर्च

मुंबई इलाख्यामधील वेड्यांच्या इस्पितळांतील दुखणाइतांच्या रोजच्या खर्चाबाबत रोजीं आकारण्यांत येणाऱ्या दराचे कोष्टकांत सुधारणा करण्यांत आलेली आहे. हे नवे दर १ डिसेंबर, १९३६ पासून अंमलांत येतील.

| रोग्याचें वार्षिक उत्पन्न अगर त्यास आणून ठेवणाराचें (रु०) | रोजीं दर |
|---|---|
| १,००० ते १,१९९ | ६ आणे |
| १,२०० ते १,७९९ | ८ आणे |
| १,८०० ते २,३९९ | १२ आणे |
| २,४०० ते २,९९९ | १ रुपया |

तीन हजारांवर उत्पन्न असल्यास, युरोपियन, पार्शी व पार्शीखेरीज इतर हिंदी, असे रोग्यांचे तीन वर्ग पाडण्यांत येऊन त्याप्रमाणें वेगवेगळ्या दरानें पैसे वसूल केले जातील. वरील तिसऱ्या वर्गांतील रोग्यांबाबत रोजीं १ रु. २ आणे हा कमाल दर ठरविण्यांत आला आहे. पार्शी व युरोपियन ह्यांचेवर ज्यास्त चढत्या दराची आकारणी केली जाईल. विशेष व्यवस्था व सवलत हीं हवीं असल्यास स्वतंत्र जादा दरानें पैसे द्यावे लागतात.

## सहकारी चळवळ

### सुरत जिल्ह्यांतील सहकारी चळवळीची प्रगति

( मागील अंकावरून समाप्त )

सुरत जिल्ह्यांतील पहिली अर्बन सोसायटी १९२१ सालीं नोंदली गेली. आतां त्या जिल्ह्यांत एकूण २४ अर्बन सोसायट्या असून त्यांचें एकूण खेळतें भांडवल ३० लक्ष रुपये आहे. ह्यांपैकीं बहुतेक सोसायट्या पगारदार सभासदांच्या आहेत.

सुरत जिल्ह्यांतील चार अर्बन बँकांपैकीं सुरत पीपल्स को. बँक ही सर्वांत मोठी आहे. तिची स्थापना १९२२ सालीं होऊन आतां तिचें खेळतें भांडवल २१ लाखांवर गेलें आहे. रांदेर येथील बँक १९२६ सालीं स्थापण्यांत आली, बलसार बँक १९२७ सालीं अस्तित्वांत आली व पार्डी बँकेचा जन्म १९३० सालीं झाला. सुरत पीपल्स बँकेच्या स्थापनेस व प्रगतीस रावसाहेब जाधव ह्यांचे परिश्रम प्रामुख्यानें कारणीभूत झालेले आहेत. ह्या बँकेच्या नेतृत्वाखालीं गुजरातमधील अर्बन बँकांची व क्रेडिट सोसायट्यांची एक यूनियन १९२७ सालीं स्थापन झाली आहे व तिचें काम समाधानकारकपणें चालू आहे.

ह्या यूनियनच्या कार्यासंबंधीं सविस्तर माहिती 'अर्था'च्या ता. १९ ऑगस्टच्या अंकांत आलेली आहे. मध्यविभागांतल्या पुणें, सातारा, सोलापूर, व नगर ह्या चार जिल्ह्यांतील अर्बन बँकांची सातारा येथें परिषद भरली होती. त्यावेळीं ह्या प्रश्नांचा खल झाला होता. तथापि, त्यांतून निष्पत्ति झालेली दिसत नाहीं.

पुस्तकाच्या अखेरच्या दोन प्रकरणांत मालाचा पुरवठा व उठाव ह्यांस सहाय करणाऱ्या नॉन-क्रेडिट सोसायट्यांचें व सहकाराच्या प्रचाराबाबतच्या व शिक्षणाबाबतच्या व्यवस्थेचें वर्णन आलें आहे. कॉटन सेल सोसायट्यांनीं सुरत जिल्ह्यांत चालविलेली कामगिरी समाधानकारक आहे व इतर शेतकी पिकांसाठीहि त्याच पद्धतीनें सहकाराची मदत घेतां येण्याजोगी आहे. ह्या बाबतींत प्रगतीस अद्याप पुष्कळ वाव आहे.

वरील संक्षिप्त हकीकतीवरून असें दिसून येईल कीं, सुरत जिल्ह्यांतील सहकारी चळवळीची प्रगति इतर भागांतील प्रगतीच्या मार्गानेंच झालेली आहे. सहकारावरील विश्वास व निष्ठावंत माणसें ह्यांची सर्वच जिल्ह्यांत वाण आहे व पतपेढ्यांचे सभासदांत जबाबदारीची जाणीव निर्माण होण्याची आवश्यकता सुरत जिल्ह्यांत इतर ठिकाणांइतकीच तीव्रतेनें भासत आहे. वरील पुस्तकामुळें सहकारी संस्थांची उत्क्रांति, त्यांचे मार्गांतील अडचणी व त्यांचें निराकरण, इत्यादि गोष्टींवर उत्तम प्रकाश पडला असल्याकारणानें हें पुस्तक सर्वांस मार्गदर्शक होण्याजोगें आहे. सुरत बँकेचे ॲडिशनल जनरल मॅनेजर, श्री. पी. टी. परेख, बी. कॉम., ह्यांनीं पुस्तक रचण्याचें काम अत्यंत मेहनतपूर्वक व कुशलतेनें पार पाडलें आहे, ह्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. पुस्तकाची मांडणी चांगली व भाषा सुबोध आहे. सुरत बँकेनें आपल्या रौप्यमहोत्सवाचे निमित्तानें हें पुस्तक प्रसिद्ध करून सहकारी चळवळीची उत्कृष्ट सेवा बजावली आहे.

सहकारी चळवळीच्या आद्यप्रवर्तकांपैकीं एक आणि आजतागायत कार्य करीत असलेले निष्ठावंत नेते, ह्या नात्यानें दिवाण बहादूर चुनीलाल गांधी ह्यांचें प्रस्तुत पुस्तकाचे निमित्तानें अभिनंदन करणें आवश्यक आहे.

---

### पेठ को. सुपरवायझिंग यूनियन लि., पेठ

१९१६ सालीं स्थापन झालेल्या ह्या यूनियनला १९ सोसायट्या सामील असून १९३५-३६ च्या अहवालाचे सालांत यूनियन 'अ' वर्गांत आहे. 'अ' वर्गांत २, 'ब' वर्गांत १२ व 'क' वर्गांत ५ सोसायट्या आहेत. सभासदांची संख्या १,८९९ आहे. वर्ष अखेर सभासदांच्या व बिगर सभासदांच्या ठेवी अनुक्रमें २६½ व ३३¾ हजारांच्या आहेत. सोसायट्यांकडे बँकेचें कर्ज ७४½ हजार रु. आहे. खेळतें भांडवल २ लक्ष ६७ हजार रुपये असून सभासदांकडील कर्ज २ लक्ष ४५ हजार रु. आहे. ७८ हजार रुपये थकलेले आहेत, म्हणजे थकबाकीचें प्रमाण ३२ पडतें. १९ सोसायट्यांवर १७ सेक्रेटरी काम करीत आहेत. ग्रुप-सेक्रेटरीची पद्धत अद्याप सुरू झालेली नाहीं. सवलतीची योजना यशस्वी करण्याचा यूनियननें कसून प्रयत्न केला. सहकारी तत्त्वांचा फैलाव करण्याकरितां पेठ व इस्लामपूर ह्या दोन गटांवर यूनियननें दोन वेळां व इन्स्टिट्यूटनें एक वेळ वर्ग भरविले होते. वरील अहवालावरून यूनियनचें काम समाधानकारक चालू असल्याचें दिसून येतें.

---

### मालेगांव डिव्हिजन फील्ड वर्कर्स कॉन्फरन्स

मालेगांव येथें श्री. सी. बी. हुली, आसि. रजिस्टार, मुंबई, यांचे अध्यक्षतेखालीं तारीख २९-११-१९३६ रोजीं फील्ड वर्कर्स कॉन्फरन्स झाली. सदर प्रसंगीं मालेगांव, बागलाण, नांदगांव, कळवण व चांदवड या भागांतील निरनिराळ्या संस्थांचे प्रतिनिधी, तसेंच सहकारी खात्यांत काम करणारी मंडळी हजर होती. सदर सभेंत व्याजाची सवलत, नवीन कर्ज देण्याचें धोरण, नवीन सोसायट्या नोंदण्याबाबत, तसेंच हल्लींच्या खालावलेल्या म्हणजे क, व ड वर्गांतील सोसायट्या सुधारण्याबाबत उपाय योजना, वगैरेसंबंधीं महत्त्वाची वाटाघाट होऊन त्या दृष्टीनें ठराव पास करण्यांत आले. वरील प्रकारचें धोरण ठरवितेवेळीं मालेगांव डिव्हिजनची पिकांची व इतर माहिती श्री. हिरे वकील व श्री. धर्मा तानाजी पाटील यांनीं देऊन शेतकऱ्यांस जरूर त्या सवलती मिळविण्याचा प्रयत्न केला.

---

### मर्यादेबाहेर कर्जें मंजूर करणारे सभासद व्यक्तिशः जबाबदार

एखाद्या सहकारी सोसायटीच्या कमिटीनें ठरलेल्या मर्यादेबाहेर कर्जें दिलीं, तर तिच्या सभासदांस त्याबद्दल जामीनदाराप्रमाणें व्यक्तिशः जबाबदार धरण्यांत यावें, अशा अर्थाची सूचना १९३१ सालच्या हिंदी मध्यवर्ती बँकिंग कमिटीनें केली होती. मद्रास इलाख्यांतील सहकारी कायदा ह्या शिफारशीस अनुसरून आतां दुरुस्त करून घेण्यांत आला आहे.

महिंद्रकर ब्रदर्स ह्यांचे
गिरगांव, मुंबई
थंडी-
करतां

## हिंदुस्थानांतील साखरेच्या व्यापाऱ्यांची परिषद्

### कारखानदार व व्यापारी ह्यांच्या सहकार्याची आवश्यकता

हिंदुस्थानांतील साखरेच्या व्यापाऱ्यांची परिषद् कानपूर येथें, मुंबईचे श्री. जगजीवन मुळजी ह्यांच्या अध्यक्षतेखाली गेल्या आठवड्यांत भरली होती. त्यावेळीं झालेल्या चर्चेनें हिंदी साखरेच्या व्यापारांतील अडचणींवर उत्तम प्रकाश पाडला आहे.

स्वागताध्यक्षांनीं, आपल्या भाषणांत, साखरेचें उत्पादन कसें झपाट्यानें वाढत आहे व त्यामुळें व्यापाऱ्यांची कशी अडचण होत आहे, ह्याचें वर्णन केलें. पांच महिन्यांत तयार होणारी साखर त्याच मुदतीमध्यें विकण्याची साखरेच्या गिरण्यांची खटपट असते, परंतु गिऱ्हाइकांची मागणी मात्र १२ महिने येत असते. साखर सुरक्षित साठवून ठेवण्याची व्यवस्था नसल्यानें व्यापाऱ्यांची अतिशय कुचंबणा होत आहे, असें त्यांनीं सांगितलें.

साखरेवरील संरक्षक जकातीपासून मिळालेल्या संरक्षणाचा फायदा घेऊन गिरणीवाल्यांनीं लाखों रुपये कमावले असले, तरी व्यापारी, गिऱ्हाइक, कामगार, शेतकरी, इत्यादींसंबंधांतील जबाबदारीची जाणीव त्यांस असलेली दिसत नाहीं, असे उद्गार अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत काढले. ते म्हणाले:—बिहार व संयुक्त प्रांत येथें दरमहा ६ ते ७ रुपयांवर थंडीच्या कडाक्यांत मजुरांकडून काम करवून घेण्यांत येतें व तज्ज्ञ कामगारासहि १५ रुपयांपेक्षां ज्यास्त वेतन मिळत नाहीं. हिंदुस्थानांत पिकणाऱ्या उंसापैकीं शेकडा फक्त १५ टक्के उंसाचा उपयोग साखरेच्या उत्पादनाकडे होतो व ह्या उंसाची किंमत संयुक्त प्रांत व बिहार येथें ५ आणे मण ह्या दरानें निश्चित करण्यांत आली असली, तरी उरलेल्या ८५ टक्के उंसावर शेतकऱ्यांस २३ आणेहि पडत नाहींत.

हिंदी व्यापाऱ्यांनीं साखरेचा व्यापार हातीं घेतला, त्यावेळीं ह्या व्यवहार नफ्याचा होईल, अशी त्यांची अपेक्षा होती. तथापि, त्यांचे कारखानदारांशीं झालेले करार अत्यंत प्रतिकूल स्वरूपाचे असल्यानें व साखरेचें उत्पादन अपेक्षेबाहेर झाल्यानें व्यापाऱ्यांची निराशा झाली. साखरेची प्रत ठरवितांनाहि अडचणी उपस्थित झाल्या व नमुन्याबरहुकूम माल न मिळाल्यामुळें, विक्रीच्या किंमतीपेक्षा खरेदी महाग पडण्याचा प्रसंग उद्भवला. मुंबईच्या व्यापाऱ्यांनीं संघटन करून, कराराचा एक मसुदा तयार केला आहे, त्यास ऑल इंडिया शुगर मर्चंटस कमिटीनें मान्यता द्यावी.

हिंदी साखरेच्या कारखानदार संघानें साखरेच्या विक्रीकरतां एक मध्यवर्ती बोर्ड स्थापन करण्याचें १९३४ सालीं ठरविलें, त्याबाबत अद्याप कांहींहि हालचाल दिसत नाहीं. गिऱ्हाइकांच्या आवडीनिवडी व मालाचा दर्जा, ह्यांबद्दलची माहिती कारखानदारांस कचेऱ्यांत बसून कशी मिळणार? जावामधून येणारी साखर एकजात असते; मग हिंदी साखरेच्या पुरवठ्यामध्यें कनिष्ठ दर्जाची साखर कां आढळून यावी? वायद्याच्या कराराबाबतहि हिंदी साखरेसंबंधीं बऱ्याच अडचणी आहेत.

हिंदी साखरेचें उत्पादन वाढत आहे. तथापि, साखरेच्या साठवण्याची कोठेंच व्यवस्था नाहीं. साखरेच्या धंद्याची वाढ जोरानें झाल्यामुळें व कारखान्यांनीं गेल्या पांच वर्षांत चांगला फायदा कमावला असल्यामुळें भारी आयात जकातीचें कारण उरणार नाहीं, असें हिंदी फडनवीस सुचवत आहेत. इकडे, आपलें जकातीचें उत्पन्न वाढावें, म्हणून समुद्रावरील काठेवाडांतील संस्थानें परदेशी साखरेच्या आयातीस सवलत देण्याचा रंग दिसतो. हिंदी साखरेच्या निर्गतीसाहि कोठें वाव नाहीं. ह्या कारणांमुळें, हिंदी साखरेचे बाजारभाव वाढण्याचा संभव दिसत नाहीं."

### मंजूर झालेले ठराव

परिषदेनें खालील विषयांवर ठराव मंजूर केले:—

(१) हिंदी साखरेचे कारखाने व व्यापारी ह्यांमधील सध्याच्या करारपत्राऐवजीं नवीन पत्रकाच्या मसुद्यास मंजुरी, (२) हिंदी साखरेच्या प्रती निश्चित करण्याबाबत सूचना, (३) टारिफ बोर्डास सादर करण्यासाठी हिंदी साखरेच्या धंद्यासंबंधीं माहिती गोळा करण्याकरितां एका कमिटीची नेमणूक, (४) साखरेच्या व्यापाऱ्यांच्या संस्थांस मालाचे सीलबंद नमुने मिळावे, अशी व्यवस्था करण्याबाबत कारखानदारांस विनंति, इ.

## पुणें औद्योगिक प्रदर्शनाचा संग्रहालय विभाग

ह्या विभागांत प्रेक्षकांना शेकडों प्रकारच्या नवीन वस्तू पहावयास मिळाव्या व याची योजना अशी असावी कीं त्यांतील संग्रहानें देशांत पैदा होणाऱ्या वस्तूंचा कॅटलाग तयार व्हावा. यांतील वस्तूंची मांडणी विषयवार व जातवार असावी; वस्तु बोधप्रद व नवीन उत्पादनास प्रोत्साहन देणाऱ्या असाव्या. हें काम मोठ्या मेहनतीचें व खर्चाचें आहे. परंतु, असा संग्रहालय हेंच प्रदर्शनाचें प्रमुख अंग आहे. या विभागास सहाय्यही पद्धतशीर व संघांचे द्वारें मिळालें पाहिजे. उदाहरणार्थ, इंडियन ग्लास मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशननें देशांत तयार होणारे कांचेचे नमुने मिळवावे. तांबा–पितळ असोसिएशननें सर्व प्रकारच्या धातूंच्या भांड्यांचा संग्रह जमवावा; टिंबर मर्चंट्स असोसिएशननें लांकडांच्या नमुन्यांचा संग्रह जमवावा. असें सहकार्य सुलभतेनें मिळाल्यावांचून संग्रहालय विभागास व्यापक व सर्वसंग्राहक स्वरूप प्राप्त होणार नाहीं. वरील धोरण ध्यानांत घेऊन या विभागाची तयारी चालू आहे. या विभागांत कोणासहि आपली वस्तु ठेवितां यावी म्हणून एका वस्तूस अगर एक स्क्वेअर फूट जागेस भाडें फक्त एक रुपया ठेविलें आहे.

## निबंधास बक्षीस

"सध्याच्या सुवर्ण निर्यातीचा हिंदुस्थानच्या आर्थिक स्थितीवर परिणाम" ह्या विषयावर ७५ ते १०० फुलस्केप टाइप केलेल्या पृष्ठांच्या लांबीचे मराठी भाषेंतील निबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठानें मागवले आहेत. निबंध ३१ मार्च, १९३७ चे आंत विद्यापीठाचे कचेरींत पोंचले पाहिजेत. पहिल्या प्रतीच्या निबंधास ५० रुपयांचें "आचार्य रवडे बक्षीस" देण्यांत येईल. निबंध परीक्षणाचा निकाल ता. १ जूनच्या सुमारास जाहीर होईल.

किंमत ओव्हरकोट खरेदी करा
रु. १२॥
बुधवार चौक, पुणें

### डनलॉप कंपनीचा नवा कारखाना

सायकली व मोटारी ह्यांच्या टायर व ट्यूब्स बनविणाऱ्या डनलॉप कंपनीनें बंगालमध्यें कलकत्त्यापासून ३० मैलांवर हुगळी नदीचे कांठावर एक कारखाना उभारला आहे. कंपनीनें १ कोटि, २० लक्ष रुपयांचें भांडवल काढलें असून त्यांपैकीं ६६ लक्षांचे भाग व आठांपैकी तीन डायरेक्टर हिंदी लोकांचे वाटणीस येतील, अशी अपेक्षा आहे. स्थानिक वीज व कोळसा, दक्षिण हिंदुस्थानांतील व ब्रह्मदेशांतील रबर, चांगल्या दर्जाचा लांब धाग्याचा कापूस, रसायनें, इत्यादींच्या ह्या कारखान्यांतील मागणीमुळें हिंदी मालाचा पुरस्कार होईल आणि २,००० हुशार कामगारांस धंदा मिळेल, अशी अपेक्षा आहे. १९३५ सालीं हिंदुस्थानांत २३/४ लक्ष मोटार टायर्स व २१/२ लक्ष मोटार ट्यूब्स आणि १७ लक्ष सायकल टायर्स व २० लक्ष सायकल ट्यूब्स आयात झाल्या, ह्यावरून कंपनीच्या व्यवहारास किती वाव आहे, ह्याची कल्पना येईल. ता. २८ नोव्हेंबर रोजीं बंगालच्या गव्हर्नरांचे हस्तें वरील कारखान्याचें उद्घाटन झालें.

### हिंदी कापसाची जपानची खरेदी

पूर्व-कराराप्रमाणें जपाननें प्रतिवर्षी हिंदी कापसाच्या १५ लक्ष गाठी घेतल्या पाहिजेत असें आहे; आणि ती अट पूर्णपणें पाळली गेली आहे. सध्या नवीन हिंद–जपान कराराच्या वाटाघाटी चालू आहेत त्यांचा अनुकूल–प्रतिकूल निकाल लागण्यापूर्वी कापसाची आपली वर्षाची बेगमी करून ठेवावी ह्या हेतूनें जपाननें चालू सालींहि भरपूर खरेदी केलेली आहे. १९३४ मध्यें जपानची खरेदी २० लक्ष गाठींच्यावर झाली व १९३५ सालीं हा आकडा १६१/२ लक्ष असा होता. चालू सालाच्या पहिल्या आठ महिन्यांत जपानमध्यें कापसाची आयात गेल्या वर्षाच्या ह्याच मुदतीच्या मानानें ज्यास्त झालेली आहे. हिंदी कापसाच्या जपानी आयातीमधील हिश्शांत २३ टक्क्यांचा वाढावा दिसून येत आहे.ह्याचें कारण हिंद–जपान व्यापारी कराराबावत चाललेली बोलणीं आणि त्यांच्या होणाऱ्या निकालाविषयीं साशंकवृत्ति हें असावें असें दिसतें.

### युद्धासाठीं जय्यत तयारी

सर्व राष्ट्रें भावी युद्धाच्या भीतीनें युद्धसामुग्रीची झपाट्यानें वाढ करीत आहेत. कांहीं राष्ट्रांनीं खड्या फौजा तयार ठेवल्या आहेत, तर कांहींनीं तात्पुरत्या करारानें आपल्या मनुष्यबळांत वाढ केलेली आहे. जगांतील सर्व राष्ट्रांमधील एकूण सैनिकांची संख्या १९३५-३६ सालीं ८२ लक्ष भरली. ह्यांपैकीं ५ लक्ष ४५ हजारांची गणना नाविक दलांत होते. १९३१ सालीं जगांतील एकूण सैनिकांची संख्या ६५ लक्ष होती. युरोपांतील सैनिकांमध्यें १२ लक्षांची भर पडली आहे. अशा रीतीनें युद्धोन्मुख सैनिकांची लढण्याची जय्यत तयारी झाली आहे. वैमानिक दलांचें महत्त्व दिवसानुदिवस वाढत असून त्यांच्या सामर्थ्यावर सर्व राष्ट्रांचा भर आहे. आतां, शस्त्रसंन्यास परिषदेचें कोणी नांवहि घेत नाहीं.

### प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान

गुरुवार, ता. १० डिसेंबर १९३६ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां भारत इतिहास–संशोधन–मंडळ–मंदिरांत कै. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे स्मृतिदिनानिमित्त प्रो. वा. गो. काळे यांचें 'मराठीशाहींतील सराफी धंद्याची आणखी कांहीं माहिती' या विषयावर जाहीर व्याख्यान होईल.


धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०
कडून
हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक
नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | |
|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |

| | | |
|---|---|---|
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |

| | |
|---|---|
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार करा:—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.
सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

व्यापारी-उद्यमी लोकांस
—अपूर्व संधि—
पुणें औद्योगिक प्रदर्शन १९३७

एशियन पॉलिसी
ASIAN ASSURANCE CO. LTD.
म्हणजेच
आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.
महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत
धी एशियन ॲशुरन्स कंपनी, लिमिटेड
एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—१ |
| ५% ( १९२९-४४ ) लोन ... ... | १०८—१३ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | १२०—० |
| ४% १९६०—७० ... ... | ११४—१२ |
| ४% १९४३ ... ... ... | १११—१२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | ९९—⅓ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०७—३ |
| २¾% १९४८—५२ ... ... | १०१—१५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११२—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १११—१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रुव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १११—१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३—६३ ) ... | ११३—८ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२६—१० |

### मंडळयांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३४—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११७—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५—६ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५७०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३८—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | १०४—८ |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९८—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९१२—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५४—६ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २६७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २६५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ६½% ) | १६०६—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६१५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २०१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७९—४ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | २२०—१२ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ८५२—८ |

#### सोनें—चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळयास | ३५—२½ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयास | ५२—७ |


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

उभारलेलें भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,०४,००,०००

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रें ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद—स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता—बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा १ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट:— टी. आर. लालवाणी.

## दी ट्रस्ट ऑफ इंडिया ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पो. बॉ. नं. ४६, पुणें नं. २

**चेअरमन : दि. ब. के. आर. गोडबोले,**
बी. ए., एम्. सी. ई., सी. बी. ई.,
एम्. आय. ई., ( इंडिया )
दौंड-बारामती व पाचोरा-जामनेर रेल्वे कं. चे भागीदार

— विशिष्ट अंगें —

१. या कंपनीच्या घटनेप्रमाणें विमेदारांना कंपनीच्या नफ्यापैकीं शेंकडा ९६ नफा बोनसच्या स्वरूपांत परत करण्यांत येतो. विमेदारांना स्वतःतर्फेचे डायरेक्टर्स निवडून देतां येतात.

२. "ट्रस्ट ऑफ इंडिया"च्या प्रत्येक विमेदारास त्याच्या पॉलिसीरकमेंतून शस्त्रक्रिया किंवा रुग्णालयाच्या खर्चासाठीं कंपनीकडून मदत मिळण्याची सवलत दिली जाते. विमेदार पंगु किंवा चरितार्थाचें साधन मिळविण्यास असमर्थ झाल्यास त्याचे विमाहप्ते बंद होऊन त्याला त्याची विमारक्कम दहा वार्षिक हप्त्यांनीं दिली जाते. याशिवाय, सोडकिंमत, हप्तेबंद विमा, रद्द पॉलिसी चालू करण्याविषयीं सवलती, पॉलिसी-तारणावरील कर्ज, घरें विकत घेण्याच्या योजना, वार्षिक हप्त्यावर अडीच टक्के सूट इ० सर्व सवलतींचा अंतर्भाव "ट्रस्ट ऑफ इंडिया" कंपनीनें केला आहे.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

आपल्या अन्नांत माती कां कालवितां ?
स्वयंपाकांत वापरण्याचे सर्व जिन्नस निवडून साफ करून घेतां. मग मीठच तेवढें घाणेरडें कां वापरतां ?
आजच
'सोलर मिठा'ची आपल्या वाण्याकडे मागणी करा.
आपले वाण्याजवळ नसल्यास आम्हाला लिहा.
Uran Salt Works, 583 Chira Bazar, Bombay 2

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँक - आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

"दुसरें मूल्यमापन जाहीर झालें"
स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः–
कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.
अध्यक्ष–श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी
हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.
जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

न. वि. वडनेरकर
जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.
आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.
शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.
रे पेपर मिल, मुंढवा, पुणें — पदमजी पेपर मिल, मुंबई.
पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.
सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये ?
ह्या प्रश्नांस; दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.
तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.
८१५–१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

"'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख १६ डिसेंबर, १९३६. अंक ५०

खरें समाधान—

आपलें कर्तव्य करणें यांतच आहे—
आपल्या कुटुंबांतील मंडळींची योग्य तरतूद आगाऊ करून ठेवणें
आपलें कर्तव्य आहे.
मग त्याला उपाय आमची पॉलिसी घेऊन विमा उतरणें हाच आहे.
दि गुडवुइल अॅशुअरन्स कंपनी, लि.
या कंपनीची पॉलिसी सर्व तऱ्हेनें सोइस्कर आहे.
—अत्यंत माफक हप्ते—भरपूर सवलती—एजंटांना योग्य कमिशन—
—एजंटाच्या वारसालाही कमिशन मिळणेची योजना—
विशेष माहितीसाठीं लिहा—
हेड ऑफिसः—कुपवाड, जि. सातारा. पोस्टः— मिरज मिशन हॉस्पिटल.


मुंबई व उपनगरांचे
चीफ् एजंटस्:—
डॅश एजन्सी, मुंबई नं. ७.

सातारा व नगर जिल्हे आणि औंध व भोर संस्थान या भागांचे चीफ् एजंटस्:-भारत एजन्सी, कऱ्हाड.

POONA CIRCULATING LIBRARY
Deccan Gymkhana, POONA 4
Magazines & Books supplied in your own home. Over 100 different English Marathi, Hindi, Bengali, Gujrati, French & German journals to choose from.
*For particulars see or write to:—*
D. P. ATHALYE,
*Proprietor.*

*For All Medicinal Requisites*
— TRY —
N. MAHADEV & Co.
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner, POONA 2.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः—ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः—

१ केळकर ब्रदर्स,

बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी,

लक्ष्मीरोड.

# विविध माहिती

### म्हैसूर संस्थानांतील शेतीस पाणीपुरवठा

म्हैसूर संस्थानामध्यें, शेतीकरितां पाणी साठवणारीं लहान मोठीं मिळून २५,००० धरणें व तलाव आहेत आणि त्यांत संस्थानचे हद्दींत पडणाऱ्या पावसापैकीं शेकडा १३ इतकें पाणी साठविलें जातें. पाणीपट्टीपासून संस्थानास ४० लक्ष रुपये उत्पन्न मिळतें. हीं धरणें व तलाव आज पुनः बांधावयाचीं झाल्यास, त्यास ३० कोटि रुपये खर्च येईल.

### चहाच्या प्रचारार्थ ४० लक्ष रुपये

चहाच्या खपाचा प्रसार करण्यासाठी व्हावयाच्या प्रचाराबाबत हिंदुस्थान देशास १९३७ सालीं सुमारें ४० लक्ष रुपये खर्च करावे लागेल असा अंदाज असून ही रकम उभी करण्याकरितां चहाच्या निर्गतीवरील पट्टींत १ जानेवारी १९३७ पासून वाढ करणें जरूर पडेल, असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे.

### रोममध्यें प्रचंड जयस्तंभ

इटलीनें नवीन स्थापन केलेल्या साम्राज्याचें द्योतक म्हणून रोममध्यें २६० फूट उंचीचा ब्रॉंझ धातूचा एक प्रचंड जयस्तंभ उभारण्यांत येत आहे. त्याचें वजन २५० टन होईल. आणि त्याच्या शिखरापर्यंत जाण्यास जिने व पाळणे यांची सोय करण्यांत येईल.

### बेडूक पाळण्याचा धंदा

ग्रेटब्रिटनमध्यें बेडूक पाळण्याचा धंदा चालू करण्याच्या हेतूनें बेडकांच्या बारा नर–मादा अमेरिकेंतून आणविल्या आहेत. प्रत्येक जोडीस सुमारें ६५० रुपये किंमत पडली असून बेडकांचें मांस लोकप्रिय होईल अशी कल्पना आहे.

### रशियांत शिक्षणाचा प्रसार

महायुद्धापूर्वी रशियांत प्राथमिक व दुय्यम प्रतीच्या शाळांमध्यें ७० लक्ष मुलें होतीं. त्यांची संख्या सध्या अडीच कोटींच्या वर गेली आहे. पूर्वी प्रौढ जनतेंत निरक्षरतेचें प्रमाण शेकडा ७० होतें, तें आतां १० पर्यंत उतरलें आहे.

### चित्रपटांतील चुंबनास कात्री ?

जपानी लोकांस चुंबन व नाच ह्यांचे देखावे आवडत नाहींत. म्हणून परदेशी चित्रपटांतून असलीं दृश्यें काढून टाकण्यांत येणार आहेत, असें म्हणतात. ह्या रीतीनें चित्रपटांस कात्री लावल्यास त्यांचा आकर्षकपणा कोठें राहिला असें इतर देशांत अनेकांस वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

### मोटारी व लॉऱ्या ह्यांची आयात कमी झाली

१९३५-३६ सालीं हिंदुस्थानमध्यें २ कोटि ५१ लक्ष रुपये किंमतीच्या १३,५९० मोटारगाड्यांची आयात झाली. पूर्व वर्षींपेक्षां ही आयात ८४४ नी कमी आहे. १९३४-३५ च्या मानानें गेल्या वर्षी १,५०० मोटार लॉऱ्या कमी आल्या. हिंदुस्थानांत उतरलेल्या लॉऱ्यांची किंमत १ कोटि २० लक्ष रुपये भरली.

### मोटारींच्या आयातीची प्रांतवार वांटणी

मोटारींचे धंद्यांत हिंदुस्थानांतील प्रांतांचा वांटा कसा आहे, ह्याची माहिती आयात मोटारींच्या खालील वर्गवारीवरून कळेलः—

| | |
|---|---|
| मुंबईः ५,८३९ | बंगाल : १,०८६ |
| मद्रासः ८२२ | सिंधः ३५३ |
| ब्रह्मदेशः १३२ | |

### हिंद–ब्रिटन कराराचीं बोलणीं पुढें ढकललीं ?

हिंद–ब्रिटन व्यापारी करारासंबंधांतील वाटाघाटी तूर्त बंद ठेवण्यांत आल्या आहेत. ब्रिटिश सरकारच्या सवलतीविषयींच्या मागण्या मान्यतेच्या मर्यादेपलीकडच्या असल्याविषयीं हिंदी प्रतिनिधी मंडळाचें एकमत आहे.

### चालू खात्यांतील रकमावर अर्धा टक्का व्याज

पुनः कळविण्यांत येईपर्यंत, चालू खात्याच्या रोजच्या शिलकांवर शेकडा ½ टक्का दरानें व्याज देण्यांत येईल, असें मुंबईतील २१ बँकांच्या व्यवस्थापकांनीं आपल्या खातेदारांस कळविलें आहे.

### सोनें महागलें, तरी हिंदी उत्पादन वाढत नाहीं

१९३३ सालीं सोन्याचें जागतिक उत्पादन २½ कोटि औंस झालें व त्यास २०० कोटि रुपये किंमत आली. सोन्याचा चढता भाव व मध्यवर्ती बँकांची मागणी ह्यांमुळें उत्पादनांतहि वाढ होत आहे. हिंदुस्थानांतील खाणींतून निघणाऱ्या सोन्याचें जागतिक उत्पादनाशीं प्रमाण १००:१·३५ इतकें पडतें. दक्षिण आफ्रिकेंत सर्वांत ज्यास्त सोनें निघतें. हिंदुस्थानांतील एकूण उत्पादनापैकीं ( ३,३६,१०६ औंस ) म्हैसूरमध्यें ९९·९ टक्के सोनें सापडतें. सोन्याच्या वाढत्या बाजारभावाबरोबर वार्षिक हिंदी उत्पादनांत भर पडत नाहीं, हें विशेष होय. तथापि, कोलार येथील खाणी आणखी बराच काळपर्यंत सोनें पुरवीत रहातील, अशी अपेक्षा आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. २९-११-३६ ते ५-१२-३६ | ३९,३९,८४३ |
| ता. ६-१२-३६ ते १२-१२-३६ | ४९,७५,५८६ |
| ता. २१-९-३१ ते १२-१२-३६ अखेर | २,८९,२६,०७,०६१ |

अनुक्रमणिका


पृष्ठ

१ विविध माहिती ... ६००
२ सहकारी संस्थांच्या स्थितीचा आढावा ... ६०१
३ मराठेशाहीतील सराफी धंदा ... ६०२
४ स्फुट विचार ... ६०३
सहावे जॉर्ज बादशहांनीं राज्यसूत्रें घेतलीं—बादशहांचा राज्यसंन्यास व विमा कंपन्यांचें नुकसान—सासरेच्या कारखानदारांचें व्यापाऱ्यांस उत्तर—म्युनिसिपल कचऱ्यांतील संपत्ति—स्वच्छ व टापटीपीचे रस्ते—ग्रेट-ब्रिटनचें कापडाच्या व्यापारांतील स्थान—हिंदी कोळशास मागणी वाढली
५ महाराष्ट्रांतील हरिजन ६०५
६ चीनमध्यें जपानी मालाची नाकेबंदी ... ६०५
७ सहकारी चळवळ ... ६०६
८ विम्याच्या पैशाची मागणी नामंजूर ... ६०७
९ १९३५-३६ सालांतील आयात ... ६०७
१० निवडक बाजारभाव ६०८



# अर्थ

बुधवार, ता. १६ डिसेंबर, १९३६


## सहकारी संस्थांच्या स्थितीचा आढावा

प्रांतिक सहकारी खातीं व संस्था ह्यांच्या प्रतिनिधींची एक परिषद हिंदुस्थान सरकारच्या विद्यमानें भरत असते, तीमध्यें सहकारी चळवळीमध्यें वेळोवेळ महत्त्वाचे व अवघड प्रश्न उपस्थित होतात, त्यांची चर्चा व निर्णय करण्यास चांगली संधि मिळते. भिन्न प्रांतांतल्या परिस्थितीच्या अनुभवाचा फायदा परिषदेच्या सर्व सभासदांस मिळून चर्चा अनेक दृष्टींनीं मार्गदर्शक अशी होते. चालू महिन्याच्या पहिल्या व दुसऱ्या आठवड्यांत दिल्ली येथें प्रथम प्रांतिक सहकारी रजिस्ट्रारांची सभा भरून तीमध्यें खात्यांच्या कारभारासंबंधाच्या व इतर विषयांची चर्चा झाली आणि नंतर रजिस्ट्रार व अन्य प्रतिनिधी ह्यांच्या परिषदेंत अनेक प्रश्नांचा उहापोह करण्यांत आला. अशा दुहेरी स्वरूपाच्या व्यवस्थेंत थोडी फार सोय आहे, ह्यांत शंका नाहीं. खात्यांच्या कारभाराबाबतच्या तपशिलामध्यें शिरण्याचें विशेष अगत्य बिनसरकारी सहकाऱ्यांस वाटावयाचें नाहीं आणि त्यांचा सल्ला घेण्यानें अधिकाऱ्यांसहि विशेष सहाय मिळेल असें नाहीं. तथापि, सहकारी खात्याच्या कारभाराशीं सहकारी संस्था व त्यांच्याशीं संबंध असणारे बिनसरकारी कार्यकर्ते यांचें कांहींच कर्तव्य नाहीं ही समजूत चुकीची आहे. ह्या दोन बाजूंमध्यें अडचणी व मतभेद पदोपदीं उपस्थित होत असतात आणि सहकारी संस्था चांगल्या चालाव्या ह्याबद्दल अधिकाऱ्यांस जशी काळजी वाटते तशीच काळजी खात्याचा कारभार व आपलें कार्य ह्यांचा दुवा नीट जोडलेला रहावा म्हणून सहकारी संस्थांच्या चालकांस वाटणें स्वाभाविक आहे. तेव्हां रजिस्ट्रारांच्या चर्चेंत इतर लोकांनीं भाग घेतल्यास तें कार्यक्षमतेस व प्रगतीस पोषकच होण्यासारखें आहे. चर्चेसाठी पुढें जाहीर परिषदेंत यावयाच्या प्रश्नांचाहि विचार रजिस्ट्रारांच्या सभांमध्यें अगोदर होऊन त्यांनीं आपलीं मतें त्याबाबतींत बनवलीं होतीं असें समजतें. ह्या सवत्या चर्चेचा उपक्रम योग्य आहे, असें आम्हांस वाटत नाहीं.

हिंदुस्थान सरकारचे मंत्री, सर जगदीश प्रसाद, ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत हिंदी सहकारी चळवळ सरकारच्या प्रेरणेनें मूळ निघाली आणि त्यांच्याच आश्रयानें आज ती चालली आहे ह्या गोष्टीवर जोर दिला. सरकारचा आश्रय, सहकारी संस्था स्वतःच्या पायावर पूर्णपणें उभ्या रहाण्यास समर्थ होण्यापूर्वी जेथें जेथें काढून घेण्यांत आला तेथें तेथें त्या संस्थांची दुस्थिति झाली असें सांगून सहकारी चळवळीचें परावलंबन कोणत्या प्रकारचें आहे, ह्याचें त्यांनीं दिग्दर्शन केलें. सहकारी चळवळ अजूनहि असावी तशी स्वावलंबी नाहीं हा दोष लक्ष्यांत घेण्यासारखा आहे. चळवळीचा बराच विस्तार झाला असला आणि तिच्यांत ९७ कोटि रुपयांचें भांडवल गुंतवलेलें असलें तरी कित्येक प्रांतांत सहकारी संस्थांचे नोकर व चालक हे व्यवहारकुशल व माहितगार नसतात अशी सर जगदीश ह्यांची तक्रार आहे. नोकर लोकांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ १५ लक्ष रुपये खर्चावे लागत आहेत ह्यावरून वरील वैगुण्याची नीट कल्पना येते असें त्यांचें म्हणणें आहे. आठ प्रांतांत मिळून २५ हजार सहकारी मंडळ्या गुंडाळून बंद कराव्या लागल्या, म्हणजे चळवळीच्या प्रारंभापासून आजतागायत चारांत एक संस्था रद्द करावी लागली आहे ही वस्तुस्थितिहि त्यांनीं प्रामुख्यानें पुढें मांडली. मंडळ्या मोठ्या प्रमाणांत मोडाव्या लागल्या असतां सहकारी चळवळीवरील जनतेचा विश्वास उडतो आणि वेळ, पैसा व उत्साह ह्यांचा अपव्यय होतो हा त्यांचा मुद्दा योग्य आहे. तथापि, चळवळीच्या दुस्थितीशीं प्रचलित आर्थिक मंदीचा संबंध किती आहे, तसेंच, जनतेचें अज्ञान व निरक्षरता आणि शेतकऱ्यांचें दारिद्र्य हीं त्या स्थितीस किती कारणीभूत झालीं आहेत, ह्याचा विचार प्रस्तुत प्रकरणीं होणें आवश्यक आहे. सहकारी शिक्षणाप्रीत्यर्थ १५ लक्ष रुपये खर्चावे लागत आहेत ह्याविषयीं सर जगदीश प्रसाद ह्यांनीं सखेदाश्चर्य प्रकट केलें. परंतु शेतकरीवर्गाची हलाखीची व अज्ञानीपणाची स्थिति लक्षांत घेतां हा खर्च कांहीं विशेष आहे असें म्हणतां येणार नाहीं. सहकारी संस्थांच्या स्थितीची दुसरी बाजूहि त्यांनीं पुढें मांडली हें चांगलें झालें. ह्या संस्थांनीं सबंद देशांत मिळून ३० कोटि रुपये बचत करून तितकें स्वतःच्या मालकीचें भांडवल केलें आहे ही गोष्ट खात्रीनें उत्तेजनकारक आहे. पंजाबांत शेकडा ४८ गांवांत, बंगालमध्यें २३ गांवांत आणि संयुक्तप्रांतांत फक्त पांचांमध्यें सहकारी संस्था आहेत. सभासदांच्या कुटुंबांतलीं माणसें हिशेबांत धरलीं तर एकूण दीड कोटि लोकांचा संबंध हिंदुस्थानांत सहकारी चळवळीशीं आज आहे. ही प्रगति भिन्नभिन्न प्रांतांत कमी-अधिक प्रमाणांत झाली आहे. विस्ताराच्या बाबतींत पंजाबचा नंबर पहिला आहे असें दिसतें आणि इतर प्रांतांत सहकारी संस्थांच्या वाढीस पुष्कळ जागा आहे. हिंदुस्थानच्या ३६ कोटि लोकसंख्येपैकीं अवघे दीड कोटि लोक ह्या चळवळीशीं संबद्ध आहेत, यावरून हीच गोष्ट स्पष्ट होते.

तथापि, सहकारी संस्थांची संख्या वाढण्यापेक्षांहि त्यांची स्थिति चांगली राहून त्यांपासून जनतेचें अधिकाधिक हित होणें हें अधिक महत्त्वाचें आहे. ह्यासाठीं, चळवळीची स्थिति समाधानकारक कां नाहीं, सहकारी संस्थांची व्यवस्था व कारभार नीट कां चालत नाहींत, त्यांचा मूळ उद्देश सफळ होण्यास आणि त्यांचेपासून लोकांत ज्यास्तींत ज्यास्त फायदा मिळण्यास कोणती उपाय-योजना केली पाहिजे, ह्या प्रश्नांचा विचार प्रत्येक प्रांतांत सरकारी अधिकारी व बिनसरकारी कार्यकर्ते ह्यांनीं आस्थापूर्वक करणें अगत्याचें आहे. सहकारी चळवळ हिंदुस्थानांत सरकारनें काढली आणि चालविली, ती सर्वस्वी लोकांच्या ताब्यांत जाणें व त्यांनीं तिचा कारभार यशस्वीपणानें स्वतंत्रतेनें पहाणें हें मूळचें उद्दिष्ट साध्य होण्याचा प्रयत्न चिकाटीनें झाला पाहिजे.

## मराठेशाहींतील सराफी धंदा

### प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान

—×—

### हिशेब लिहिण्याची सांप्रदायशुद्ध रीत

इतिहासाचार्य कै. वा. राजवाडे ह्यांच्या स्मृतिदिनाचे निमित्तानें येथील इतिहास मंडळांत प्रो. काळे ह्यांनीं आपल्या आर्थिक संशोधनांत उपलब्ध झालेली कांहीं मनोरंजक माहिती सांगितली. पेशवाई अखेर पुण्यांतील दोन सराफ, विठ्ठल सदाशिव तांबेकर आणि वल्लभदास सुंदरदास, यांचेमध्यें देण्याघेण्याच्या हिशेबाबावत कज्जा लागला. त्याचा निर्णय पंचांनीं दिला, त्याची माहिती देऊन निकालांतले महत्त्वाचे भाग व्याख्यात्यांनीं वाचून दाखविले. वल्लभदासाची पेढी मोडण्याची पाळी आली असतां त्यानें तांबेकरांचें द्यावयाचें देणें तडजोडीनें कमी रकमेला निश्चित करून घेतलें. पुढें तें ठरावाप्रमाणें न देतां वल्लभदासानें तांबेकरांनीं आपण भरलेल्या रकमा जमा केल्या नाहींत असें बालंट त्यांच्यावरच उलट आणलें. पंचांनीं दोन्ही बाजूंचें म्हणणें ऐकून घेतलें व कागदपत्र पाहिले, आणि आपल्या निकालांत वल्लभदासाची चांगलीच हजेरी घेतली. तसें करतांना सराफांनीं आपले हिशेब सचोटीनें व पद्धतशीर ठेवले पाहिजेत व धंद्याची शिस्त पाळली पाहिजे ह्याविषयीं त्यांनीं न्यायनिष्ठुरतेनें मार्गदर्शक उद्गार काढले आहेत:–“ वल्लभ सुंदर यांचे वहीचें लिहिणें सांप्रदायशुद्ध नाहीं व आचारहि खोटसाळ....वल्लभ सुंदर यांनीं ठरावाची बेरीज कमी व चौदाशें रुपये वसूल ज्यास्ती लिहिला तो पुरवणीस आला नाहीं. वादास खोटे पडले. ” वल्लभशेटजींचें हिशेबाचें लिहिणें किती गैरशिस्त होतें हें पुराव्यानिशीं पंचांनीं शेटजींचे पदरांत घातलें आहे, तें वाचनीय आहे.

तीन रकमा निरनिराळ्या वेळीं तांबेकरांस दिल्या असें शेटजींनीं वहींत लिहिलें आहे· पहिल्या दोन रकमा रुजू असून कोणीं कोणास दिल्या हें नमूद आहे. तिसऱ्या म्हणजे बिनरुजू रकमेच्या नोंदीची भाषा संदिग्ध आहे. त्यासंबंधांत पंच म्हणतात:–“जसा मजकूर पूर्वील दोन हजारांचे दोन्ही रकमांस आहे तसा येथें कोण कोणास देवितो हा संदर्भ नाहीं. तुमचे वती शेटजींचे ( दुल्लभ शेटजींचे ) घरीं भरले म्हणोन लिहितात. त्यास तुमचे वतीची गुर्जर भाषा याचा महाराष्ट्र अर्थ पहातां तुम्हांसंबंधें किंवा तुम्हा बाबत इतका अर्थ होतो. त्यास तांबेकर संबंधें यांनीं हजार रुपये शेटजीकडे भरले तरी तांबेकर यांणीं देविल्यावरून दिल्हे असे तेच जमा खर्च लिहीत नाहींत. तेंव्हां तांबेकर यांनीं देविले असते तरी तसाच मजकूर जमाखर्चीं लागला असता. आपण होऊन बिगर परवानगी रकम भरतात असा अर्थ जमाखर्चाचे परिभाषेवरून होतो. यावरून तांबेकर यांनीं देविल्याची खातरजमा केल्यावांचून तांबेकर यांजकडे रकम धरावी असें होत नाहीं. ”

हिशेब लिहिण्याची योग्य पद्धति कोणती ह्याची पंचांनीं बारकाईनें चौकशी केली. वल्लभ शेटजींची सावकारी वही खोटी कशी मानावी ह्या शंकेचें समाधान पंच असें करतात:– “ वहीचे लिहिण्याची चाल व रुजवात रकमांची वगैरे पहावयास वह्या आणून पंचांनीं पाहिल्या. तो सांप्रदायशुद्ध लिहिण्याचा क्रम जेव्हांचे तेव्हांच सावकारी लिहिण्यास असावा तसा नाहीं. ” तांबेकरांच्या नांवें टाकलेली रकम पुढें जमा करून उलट जमाखर्च करतां येईल ह्या समजुतीनें ही नोंद झाली असणें संभवनीय आहे ह्या शंकेचाहि पंचांनीं विचार केला आहे. हें शक्य· असलें तरी “ सांप्रदायशुद्ध जमाखर्चाचा क्रम नाहीं. तेव्हां या रकमेचा जमाखर्च तांबेकर यांचे नांवें केला म्हणून इतक्या जमाखर्चावरूनच रकम तांबेकर याजकडे धरणें प्रशस्त नव्हे ” असा त्यांचा निर्णय आहे.

गैररुजू एक हजाराची रकम दुल्लभ शेटजींस तांबेकरांनीं दिली असणें असंभाव्य असून त्यांचें येणें तडजोडीनें रुपयांत दहा आणे करून देण्याबद्दल ती रकम वल्लभदासनें शेटजींस अंतस्थ म्हणून दिली असली पाहिजे, असें दिसतें. पंच म्हणतात:— “ शेटजींस तांबेकरांनीं दिलें असें म्हणावें तरी रुपयाचे दहा आणे करून तोड पाडतात तेव्हां सावकाराचें नुकसान करून पंचायत घालून तोड पाडतात आणि दीडशे रुपये तांबेकर यांचे कारकुनास तोडमोडीबद्दल देतात ते तांबेकर अंतस्थ शेटजीस द्यावयास कबूल करतील असें कयासास येत नाहीं. वल्लभ सुंदर याचा नफा होतो ते पक्षीं त्यांनीं अंतस्थ द्यावयाचें मार्गाचेंच आहे व दिल्हे असेल असें कयासास येतें. येवढी तोड शेटजीनीं पाडली ते पक्षीं अंतस्थ पडलें असेल यांत संशयच नाहीं. ”

एकंदर वस्तुस्थितीचें व हिशेब लिहिण्याच्या तऱ्हेचें निरीक्षण करून “वल्लभ सुंदर यांचें लिहिणें व बोलणें केवळ अमार्गाचें......सारा कुभांडाचा मजकूर बोलतात असें स्पष्ट दिसोन येतें ” असा रोकडा अभिप्राय पंचांनीं दिला आहे. हिशेबांत ठिकठिकाणीं खोडाखोड केलेली आणि गैरवाजवी नोंदी केलेल्या त्यांस आढळल्या, त्यांचा निषेध कडक शब्दांनीं केलेला आहे. “ वहींस जागोजागीं रेघा काढून शेरे भरले आहेत, पोटीं तपशील नाहीं याप्रमाणें फारा ठिकाणीं अस्ताव्यस्त, चालीशिवाय लिहिण्याचा मार्ग आहे.”

कज्जांतल्या इतर बाबींची छाननी अशीच बारकाईनें केलेली असून त्यांवरील निर्णयहि स्पष्ट आहे. पंचांच्या ह्या निवाड्यावरून सावकारी लिहिण्याच्या मराठेशाहींतल्या पद्धतीवर उत्तम प्रकाश पडतो. हा सबंद निवाडा स्वतंत्रपणानें छापून प्रसिद्ध करण्यासारखा आहे.

पुण्याचे दीक्षित, पटवर्धन व अवरंगाबादेचे बाबूजी नाईक, भिडे ह्यांचे परस्परांचे देण्या–घेण्याचे शके १६५४ ते १६५७ सालांचे कागद सापडले आहेत. त्यांसंबंधाची माहिती प्रो. काळे ह्यांनीं सांगितली, तिचा सारांश स्थलसंकोचास्तव ह्या अंकांत देतां येत नाहीं, तो पुढें देऊं.

---

### सर्व राष्ट्रें आर्थिक उन्नतीच्या शोधांत आहेत

१९३२ ते १९३६ च्या मध्यापर्यंतच्या मालाचें उत्पादन व त्याच्या किंमती ह्या संबंधांतील आंकड्यांवरून जगाची उत्पादनशक्ति हळुहळु सुधारत असल्याचें दिसून येतें. आर्थिक प्रश्नांचें महत्त्व प्रत्येक राष्ट्रास पटलें असून उन्नतीचे मार्ग शोधण्यांत सर्व राष्ट्रें गुंग होऊन गेलीं आहेत. राष्ट्रसंघातर्फें प्रसिद्ध झालेल्या ‘ वर्ल्ड प्रॉडक्शन ॲन्ड प्राइसेस ( १९३५-३६ ) ’ ह्या पुस्तकांत वरील विषयाची चर्चा करण्यांत आली आहे.

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २

## स्फुट विचार

### सहावे जॉर्ज बादशहांनीं राज्यसूत्रें घेतलीं

एडवर्ड बादशहांच्या विवाह-प्रकरणामुळें ब्रिटिश राज्यघटनेवर गंडांतर आल्याकारणानें गेले एक दोन आठवडे अनिश्चितता व चिंता ह्यांची छाया चोहोंकडे पसरली होती. ह्या बादशहांची कारकीर्द शांततेची, सुखाची व परंपरेस अनुसरून प्रजारंजनपर होईल अशी अपेक्षा, त्यांच्या प्रिन्स ऑफ वेल्स ह्या नात्याच्या चरित्रावरून उत्पन्न झाली होती. त्यांनीं केलेल्या आपल्या पत्नीची निवड सर्वमान्य होण्यासारखी नव्हती; आणि त्या बाबतींतला आपला हट्ट सोडून देणें किंवा राजपदत्याग करणें ह्या दोन मार्गांपैकीं कोणता तरी एक स्वीकारल्यावांचून त्यांस गत्यंतर राहिलें नाहीं. त्यांनीं आपलाच हेका चालवणें किंवा सर्वच प्रकरण दिरंगाईवर टाकणें हें ब्रिटिश राजकारणाच्या दृष्टीनें अत्यंत धोक्याचें होतें. राजा आणि प्रजा ह्यांचेमध्यें विरोध उत्पन्न होणें आणि देशांत राजाचा एक व पार्लमेंटचा दुसरा असे दोन पक्ष निर्माण होणें हें अनिष्ट होतें. मिसेस सिंप्सन ह्यांच्या विरुद्ध असलेलें लोकमत लक्षांत घेऊन एडवर्ड बादशहांनीं त्यास मान दिला असता तर तें मोठ्या स्वार्थत्यागाचें व इंग्लंडच्या राजांच्या परंपरेस अनुरूप असें कृत्य झालें असतें. तथापि, एका बाजूस प्रेमसंन्यास व दुसऱ्या बाजूस राजसंन्यास असा पेंच पडला असतां आपल्या मनानें दुसरीच बाजू पत्करली आणि राजकारणांत तेढ उत्पन्न होऊं नये व खंड पडूं नये ह्या हेतूनें आपण राजपदाचा त्याग करण्याचें ठरवलें ही गोष्ट एडवर्ड बादशहांनीं जाहीर भाषणांत आतां प्रांजलपणानें सांगितली आहे, ह्यांत त्यांच्या मनाचा उदारपणा आणि ब्रिटिश राज्यघटनेवरील निष्ठा हीं स्पष्ट व्यक्त होतात. घडलेल्या सर्व गोष्टींची जबाबदारी त्यांनीं स्वतःवर घेतली असून मि. बाल्डविन व प्रधानमंडळ ह्यांस तीमधून सर्वस्वी मोकळें केलें आहे. ब्रिटिश राष्ट्राचें मन, त्याची परंपरा, त्याची शिस्त, त्याची लोकशाही पद्धति व मर्यादित सत्तेची राजसंस्था ह्यांवर गेल्या आठवड्यांतील घटनेनें उत्कृष्ट प्रकाश पाडला असून एडवर्ड बादशहांचा राजपदत्याग व त्यांचे बंधु सहावे जॉर्ज ह्यांचा राजपदाचा स्वीकार ह्या गोष्टी जगाच्या इतिहासांत पहिल्या प्रतीच्या महत्त्वाच्या अशा गणल्या पाहिजेत आणि त्या अत्यंत बोधप्रद आहेत ह्यांत शंका नाहीं. ब्रिटिश राजकारणांत अनेक वर्षांत न घडलेला संकटमय प्रकार होण्याचा दुर्धर प्रसंग ओढवला असतां त्यामधून सुरक्षितपणें बाहेर पडण्यांत राजा व प्रजा ह्यांनीं जो समंजसपणा व जें कौशल्य प्रकट केलें आहे त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें उचित आहे. सहावे जॉर्ज ह्यांनीं राज्यपद रीतसर स्वीकारलें आहे आणि चिंतेचे व मतभेदांचे ढग नाहींसे होऊन समाधानाच्या वातावरणांत नवीन राजवटीस प्रारंभ झाला आहे. पूर्वी ठरल्याप्रमाणें राज्यारोहण समारंभ मे महिन्याच्या १२ तारखेस व्हावयाचेंहि निश्चित झालें आहे. माजी बादशहांस ड्यूक ऑफ वुइंड्सर ही पदवी देण्यांत आली आहे.

---

### बादशहांचा राजसंन्यास व विमा कंपन्यांचें नुकसान

माजी बादशहा आठवे एडवर्ड ह्यांचा राज्यारोहण समारंभ मे, १९३७ मध्यें होणार होता. हा उत्सव ठराविक दिवशीं अगर महिन्यांत पार पडण्यावर अनेकांचा नफा-तोटा अवलंबून असल्यानें, कांहीं कारणानें उत्सव पुढें ढकलला गेल्यास, त्यामुळें होणाऱ्या तोट्याची तरतूद करण्यासाठी त्यांनीं विम्याचा मार्ग अंगिकारला होता. राज्यारोहणसमारंभाचे आधी बादशहांचा विवाह झाल्यास, समारंभाचे निमित्तानें तयार करण्यांत येणाऱ्या वस्तूंवर महाराणीचेंहि चित्र काढावें लागेल व आधीं तयार झालेला माल वायां जाईल, अशा प्रकारच्या धोक्यांचे संबंधांत अनेक व्यापाऱ्यांनीं व कारखानदारांनीं विम्याचें संरक्षण घेतलें होतें. तथापि, आतां अत्यंत अनपेक्षित विधिघटनेमुळें, ठराविक दिवशीं राज्यारोहण समारंभ झाला, तरी तो एडवर्ड बादशहांचा होणार नाहीं, आणि महाराणी तयार असल्या तरी त्या नव्या बादशहांच्या असणार; त्याचप्रमाणें, माजी बादशहा एडवर्ड ह्यांचा विवाह राज्यारोहण दिनाचे आधी झाला, तरी राज्यारोहण होणार ड्यूक ऑफ यॉर्क ह्यांचें व डचेच ऑफ यॉर्क ह्या होणार महाराणी. अशा रीतीनें, राज्यारोहणाबाबतचे अंदाज साफ चुकले असून विमा कंपन्यांचें अतोनात नुकसान होणार, हें स्पष्ट आहे. ज्यांनीं विमे उतरले नव्हते, त्यांस तर ठोकरच बसणार आहे. विशेषतः परदेशांतील जे कारखानदार राज्यारोहणाची वाट उत्सुकतेनें पहात होते व आपल्या मालाचा उठाव होऊन चंगळ होईल अशी अपेक्षा करीत होते, त्यांची भयंकर निराशा झाली आहे. वरील प्रसंगानें विम्याचें महत्त्व उत्कृष्ट पटवून दिलें आहे, ह्यांत शंका नाहीं. आलेलें नुकसान सोसण्यास व कांहीं कालावर त्याची विभागणी करण्यास व्यक्ती समर्थ नसतात, परंतु विमासंस्था हें कार्य करूं शकतात, हेंच त्यांचें वैशिष्ट्य आहे. विमाकंपन्यांविरुद्ध विमेदार व कारखानदार असे अनेक वांधे आतां निर्माण होतील, त्यांवरून विम्याचें जाळें किती पसरलेलें असतें, ह्याची सर्वांस कल्पना येईल.

---

### साखरेच्या कारखानदारांचें व्यापाऱ्यांस उत्तर

हिंदुस्थानांतील साखरेच्या व्यापाऱ्यांची एक परिषद् कानपूर येथें ३० नोव्हेंबर रोजीं भरली होती, त्यावेळीं व्यापाऱ्यांनीं कारखानदारांविषयींच्या आपल्या तक्रारी पुढें मांडल्या व कांहीं विधायक ठरावहि केले. ह्या परिषदेचा वृत्तांत "अर्थ" च्या गेल्या अंकांत आम्हीं दिला आहे. कारखानदारांच्या संघानें व्यापाऱ्यांच्या गाऱ्हाण्यांस उत्तर देण्याच्या हेतूनें एक पत्रक प्रसिद्ध केलें आहे, त्यानें वादग्रस्त प्रश्नांच्या दुसऱ्या बाजूवर प्रकाश पडला आहे. ऊंस गाळण्याच्या १९३५–३६ चे हंगामाचे सुरवातीस ॲबिसिनीयांतील युद्धामुळें साखरेचे भाव चढीचे होते व युद्धाचा वणवा पेटल्यास आपल्यास त्याचा फायदा मिळेल ह्या आशेनें व्यापाऱ्यांनीं फाजील खरेदीचे वायदे केले. युद्धाचे संबंधांत त्यांची निराशा होऊन भाव पडले व त्यांस आपल्या व्यवहारांत नुकसान आलें. उंसाचें उत्पादनहि अनपेक्षित रीतीनें वाढलें व साखरेचा पुरवठा मागणीपेक्षां ज्यास्त झाला. साखरेच्या कारखानदारांशीं केलेले आपले करार मोडून पुनः त्यांचें समर्थन करण्यासाठीं हिंदी साखर कनिष्ट दर्जाची निघत आहे, अशी ओरड व्यापारी करीत असल्याविषयीं कारखानदारांची तक्रार आहे. गेल्या वर्षाच्या अडचणीच्या परिस्थितींत कारखानदारांनीं व्यापाऱ्यांची सोय पहाण्याचा शक्य तोंवर प्रयत्न केला असें त्यांचें म्हणणें आहे. साखरेचा धंदा हिंदुस्थानांत नवा असल्याकारणानें तो तितकासा संघटित नाहीं. कारखानदार व व्यापारी ह्यांच्या सहकार्याची किती आवश्यकता आहे, ह्याची जाणीव गेल्या

वर्षाच्या मोसमानें त्यांस आणून दिलेली आहे. तेव्हां, दोषाची जबाबदारी कोणावर किती पडते, ह्याविषयीं रणें न माजवतां धंद्यांतील सर्व पुढारी मंडळींनीं परस्परांमध्यें सहकार्य घडवून आणण्याच्या प्रयत्नास लागलें पाहिजे.

### म्युनिसिपल कचऱ्यांतली संपत्ति

आपल्या अधिकारक्षेत्रांतील केराच्या पेट्यांमध्यें जमा होणारा कचरा चाळून व निवडून त्याचे पैसे करण्याची व्यवस्था पाश्चात्य म्युनिसिपालिट्यांच्या चालकांनीं परिणतावस्थेस नेली आहे. शहरवासीयांची राहाणी व व्यवसाय ह्यांवेवर म्युनिसिपल केराच्या पेट्यांत सापडणाऱ्या विविध प्रकारच्या पदार्थांचें स्वरूप व त्यांचा किफायतशीरपणा अवलंबून रहाणार, हें उघड आहे. शेफील्ड शहराच्या कचरा-पेट्यांतल्या संचयापासून तेथील नगर-संस्थेस एका वर्षांत दीड लक्ष रुपयांचें वर उत्पन्न झालें. टिनाच्या डब्यांसारख्या धातूंच्या तुकड्यांपासून त्यांपैकीं चाळीस हजार रुपये मिळाले. कोळसा, राख, माती ह्यांचेंहि उत्पन्न आलें. साबण, सतरंजांचे तुकडे इत्यादि जिन्नसहि ह्या उत्पन्नांत भर घालतात, आणि हाडें व खत म्हणून उपयोगी पडणारा इतर कचरा ह्यांचाहि अंश त्यामध्यें असतो. मँचेस्टर व बर्मिंगहॅम ह्या शहरांच्या म्युनिसि-पालिट्यांचें केरापासून होणारें वार्षिक उत्पन्न सव्वा लक्ष रुपये भरलें. लंडन शहर फार विस्तृत व गजबजलेलें, म्हणून त्यांत दर वर्षी ५०–६० हजार टन वजनाचा कचरा गोळा होतो, पण त्याचें उत्पन्न काढण्याकडे नगरसंस्थेचें विशेष लक्ष नाहींसें दिसतें. टिनचे डबे व कागद ह्यांखेरीज इतर जिनसांचें तिला महत्त्व वाटत नाहीं आणि म्हणून ह्या बाबीपासून तिला म्हणण्यासारखा फायदा होत नाहीं. कचऱ्यांतून काढण्यांत आलेला नफा ही शहरवासीयांच्या दृष्टीनें बचतीची बाब आहे त्यांत शंका नाहीं. कचरा वाहून नेऊन शहराची स्वच्छता राखणें हें नगरमाउलीचें कर्तव्य तर आहेच. पण तें फायदेशीर रीतीनें करतां आलें तर कर देणारांचें दुहेरी हित साधतें हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. कचऱ्याची संपत्ति बनवण्याचीं साधनें आतां उपलब्ध आहेत. त्यांचा पूर्ण उपयोग करून कार्य-क्षम कारभारानें स्थानिक संस्थांच्या चालकांनीं जनतेचा फायदा करून देणें आवश्यक आहे.

### स्वच्छ व टापटिपीचे रस्ते

व्हिएना शहरांतील रस्ते अत्यंत स्वच्छ असल्याविषयीं त्याची प्रसिद्धी आहे. रस्त्यांत कागद किंवा विड्यांचे तुकडे अथवा काड्या न टाकण्याची तेथील नागरिक खबरदारी घेतात, आणि ह्या संबंधांत पोलीसखातेंहि विशेष जागरूक असतें. ह्या मानानें न्यूयॉर्क शहरवासीय निष्काळजी असल्याचें आढळतें. तेथील उत्कृष्ट गणल्या जाणाऱ्या रस्त्याच्या कडेस सिगार व सिगारेटस, ह्यांचीं हजारों थोटुकें आणि कागदाचीं अनंत चिटोरीं फेकून दिलेलीं प्रत्यहीं सापडतात. त्या मानानें लंडन शहरांत टापटीप विशेष दिसून येते, आणि तेथील रस्ते व सार्वजनिक बागा पाहिल्या असतां स्वच्छता व सुव्यवस्था ह्यांनीं मन सुप्रसन्न होतें. जर्मन लोकांतहि स्थानिक व्यवस्था व स्वच्छता ह्यांचे बाबतींत शिस्त पाळण्याची सवय नागरिकांमध्यें दृढमूल झालेली आढळते. सार्वजनिक हिताची काळजी वहाण्याची जबाबदारी नागरिक व्यक्तिशः ओळखतात. अमेरिकेंत, ह्याच्या उलट, शिस्तीचा व सार्वजनिक जबाबदारीचा अभाव आहे. रस्त्यांत व उद्यानांत कागदाचे कपटे वगैरे टाकून घाण होऊं न देण्यासंबंधानें ग्रेटब्रिटनमध्यें विशेष कटाक्ष आहे. दुसऱ्याची आणि एकंदर समाजाची गैरसोय किंवा नुकसान होणार नाहीं असें स्वतःचें वर्तन ठेवणें हें चांगल्या नागरिकांचें लक्षण आहे ही कल्पना लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांत दृढ झाली पाहिजे. रस्ते स्वच्छ राखण्याचें आपलें काम नगरमाउलीनेंहि दक्षतेनें केलें पाहिजे.

### ग्रेटब्रिटनचें कापडाच्या व्यापारांतील स्थान

जपानच्या स्पर्धेमुळें ग्रेटब्रिटनचें कापडाच्या बाजारांतील स्थान टिकणें कठिण होत आहे अशी सर्वसाधारण समजूत आहे, ती खरी नाहीं. १९३० पासून, ब्रिटनचा ह्या व्यापारांतील हिस्सा कमी न होतां वाढतच असल्याचें आढळतें. कापसाच्या सुताचे एकूण जागतिक निर्गतीपैकीं शेकडा २७ इतकी निर्गत ब्रिटिश मालाची होते; म्हणजे गेल्या १० वर्षांत, ह्या व्यव-हारांत सुधारणाच झालेली दिसून येते. कपास कापडाचे बाबतींत जपाननें आघाडी मारली असली व ब्रिटनची निर्गत कमी झाली असली तरी एकूण व्यापाराचा ब्रिटनचे वाट्यास येणारा हिस्सा कायम राहिला आहे. हिंदुस्थान, चीन, जपान, डच ईस्ट इंडीज, सिलोन, इत्यादि देशांत ब्रिटिश माल पूर्वीप्रमाणें खपत नाहीं; तथापि, दक्षिण आफ्रिका, पश्चिम आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इत्यादि ठिकाणच्या पेठा ब्रिटननें काबीज केल्या आहेत.

### हिंदी कोळशास मागणी वाढली

गेल्या कांहीं वर्षांतील मागणीपेक्षा १९३५ सालीं हिंदी कोळ-शास मागणी बरी आली, तथापि बाजारभावांत मात्र चढ झाली नाहीं. कोळशाच्या निर्गतीच्या आंकड्यांतहि वाढ दिसत नाहीं. १९३५ सालीं २ कोटि १० लक्ष टन कोळसा हिंदुस्थानांतील खाणींमधून निघाला व त्याची किंमत ५ कोटि ८४ रुपये भरली. म्हणजे, १९३४ च्या मानानें उत्पादनांत ७½ लक्ष टनांची व किंमतींत १४¾ लक्ष रुपयांची वाढ झाली. कोळशाचे खाणींत काम करणाऱ्या कामगारांची रोजची सरासरी १९३४ च्या मानानें ८ हजारांनीं ज्यास्त, म्हणजे १ लक्ष ६० हजार होती. उत्पादनाचे दृष्टीनें राणीगंज व झारिया येथील खाणी सर्वांत ज्यास्त महत्त्वाच्या आहेत.


**दी प्रॉव्हिन्शिअल बँक ऑफ इंडिया लि.**

**हेड ऑफिस, बेंगलोर.**

**पुणें शाखा, महंमद बिल्डिंग, लक्ष्मीरोड, पुणें शहर.**

बिनव्याजी एक हजार रुपयांपर्यंत पैसे मिळविण्याची कायदेशीर अपूर्व योजना म्हणजेच 'चिटफंड' स्कीम.

वरील योजनेबाबत सर्व व्यवहार खास बँकेमार्फत होत असल्यानें मध्यम वर्गाची व छोट्या व्यापाऱ्यांची विशेष सोय झाली आहे. चौकशीकरितां लिहा अगर भेटा.

बँकेंत खालील व्यवहारही केला जातो.

चालू, सेव्हिंग्ज व मुदत ठेवी स्वीकारल्या जातात. व्याज अनुक्रमें २%, ३%, ४% ते ६%

पांच वर्षे मुदतीचीं किफायतशीर कॅशसर्टिफिकिटें मिळतात.

सोनें, चांदी, शेअर्स, इन्शुअरन्स पॉलिसी, घर व इतर मालावर कर्जाऊ रकमा दिल्या जातात.

एजंट,

शाखा–लक्ष्मीरोड, पुणें शहर.

## महाराष्ट्रांतील हरिजन*

वरील विषयावर श्री. एम्. जी. भगत ह्यांनीं आपल्या एम्. ए. च्या परीक्षेकरितां निबंध लिहिला व तो मुंबई विश्वविद्यालयाच्या नियतकालिकांत प्रसिद्ध झाला. पुस्तकरूपानें त्याचें आतां पुनर्मुद्रण करण्यांत आलें आहे.

अस्पृश्य समजल्या गेलेल्या जातींच्या उन्नतीकडे व उद्धाराकडे प्रगतिपर विचारी लोकांचें लक्ष आतां लागलेलें असून त्याप्रीत्यर्थ सर्वत्र प्रयत्न चालू असलेले दृष्टीस पडतात. तथापि, ह्या जातींच्या खऱ्या अडचणी कोणत्या आहेत, त्या लक्षांत न आल्यानें उत्साहाचे भरांत गौण गोष्टींला प्राधान्य दिलें जातें. हरिजनांच्या उद्धारासंबंधीं उत्पन्न झालेल्या जागृतीचें हें एक चिन्ह आहे ह्यांत संशय नाहीं, परंतु हरिजनांच्या भरीव हिताच्या प्रश्नांचा अभ्यास सूक्ष्मपणें होऊन कार्याची दिशा निश्चित केली जाणें आवश्यक आहे. श्री. भगत ह्यांनीं मुंबई इलाख्यांतील कांहीं मराठी जिल्ह्यांमधील सुमारें ६०० हरिजन कुटुंबांची पहाणी करून, मिळवलेली माहिती आणि तिच्यावरून निघणारीं अनुमानें नमूद केलीं आहेत. कुलाबा, ठाणें, नाशिक, सातारा, अहमदनगर व पूर्व खानदेश ह्या जिल्ह्यांमधील महार, चांभार, मांग, ढोर आणि भंगी कुटुंबांच्या ह्या रीतीनें मांडलेल्या परिस्थितीवर पुस्तकाची उभारणी करण्यांत आली आहे.

महार व मांग ह्यांच्या घरांमध्यें कुटुंबीयांची संख्या सर्वांत ज्यास्त आढळली. साक्षरतेचें प्रमाण चांभारांमध्यें सर्वांत अधिक आहे. आर्थिक दृष्ट्या त्यांची परिस्थिति इतरांपेक्षां बरी असण्याचा हा परिणाम असावा. इतर जिल्ह्यांपेक्षां सातारा जिल्ह्यांत साक्षरतेचा प्रसार अधिक झालेला दिसला. सर्वच जातींच्या लोकांचा चरितार्थ वंशपरंपरागत धंद्यांवर अवलंबून आहे, परंतु महारांपैकीं कित्येकजण मजुरी करतात. भंगी व चांभार ह्यांचेमध्यें इतर जातींइतकी बेकारी नाहीं. हरिजन कुटुंबांचें प्रत्येकीं उत्पन्न पहातां, शेकडा २४ कुटुंबांस दरमहा ५ रुपयांपेक्षां कमी प्राप्ति आहे व शेकडा ३२ कुटुंबांस ५ ते १० रुपये मिळतात. महार व मांग हे सर्वांत गरीब आहेत. विवाहप्रसंगीं होणाऱ्या खर्चामुळें हरिजनांच्या कर्जामध्यें फार मोठी वाढ होते. भंगी लोकांत हा खर्च सर्वांत मोठ्या प्रमाणावर होतो व मांग लोकांच्या खर्चाचें प्रमाण त्या मानानें अल्प आहे. लेखकाच्या तपासणीमधील कुटुंबांस विवाहप्रसंगीं केलेल्या खर्चासाठी शेकडा ६९ इतकी रकम कर्जाऊ घ्यावी लागली. भंगी व चांभार ह्यांमध्यें कर्जबाजारीपणाचें प्रमाण सर्वांत अधिक आहे. शिक्षण व पिण्याचें पाणी ह्यांचेसंबंधांतील हरिजनांच्या अडचणीसंबंधींची माहिती सर्वांस आहेच.

हरिजनांची सुधारणा करण्याचे विविध मार्ग लेखकानें सुचवून त्यांवर हरिजन कुटुंबांचीं मतें घेतलीं, त्यांसंबंधीं पुस्तकांत शेवटीं माहिती दिली आहे. अस्पृश्यतेचें कायद्यानें उच्चाटन, शिक्षण, विहिरी व इतर सार्वजनिक जागीं जाण्यास मुभा, अखाद्य मांसभक्षणास बंदी, सरकारी नोकरींत प्रवेश, सरकारी पडीक जागेचा हरिजनांसाठीं उपयोग, अल्प व्याजाच्या दरानें कर्जाची तरतूद, सहकारी पतपेढ्या, रहाण्याच्या जागेंत सुधारणा, वतनपद्धतीचा त्याग, वेतनाखेरीज काम करावें लागतें त्यावर निर्बंध, स्वच्छता, चांगल्या संवयी, इत्यादींसंबंधीं शिकवण, ह्या प्रकारांचे उपाय हरिजन कुटुंबांनीं सुचविलेले आहेत. त्यांची पाण्याची व शिक्षणाची गैरसोय दूर झाली पाहिजे, 'उच्च' जातींनीं त्यांच्याशीं खेळीमेळीनें वागलें पाहिजे आणि जातींच्या अभेद्य भिंती नाहींशा झाल्या पाहिजेत, त्याशिवाय हरिजनांची सुधारणा होणार नाहीं, असा पुस्तकाचा निष्कर्ष आहे. खुद्द हरिजनांतील वेगवेगळ्या जाती एकमेकांस समतेनें वागवीत नाहींत, तेथें इतर जातींनीं त्यांस जवळ केल्यानें अस्पृश्यतेचा प्रश्न सुटणार नाहीं; म्हणजे हा लढा स्पृश्य विरुद्ध अस्पृश्य वर्ग असाच फक्त नसून जात विरुद्ध जात अशा स्वरूपाचा आहे. अस्पृश्यतेचा नायनाट करण्याकरितां प्रांतिक बोर्डें असावींत व त्यांच्या उपशाखा सर्व देशभर पसरलेल्या असाव्या, अशी पुस्तककर्त्यानें सूचना केली आहे.

" ह्या कार्याची प्रगति हळू हळूच होणार व हरिजनांस शिक्षण देऊन त्यांस युक्त कामास लावण्यासाठी अतिशय खटपट केली पाहिजे. हिंदुस्थानाच्या सध्याच्या परिस्थितींत ह्यापेक्षां ज्यास्त पुण्यकारक कार्य क्वचितच आढळेल. आपल्या तरुण सुशिक्षितांनीं हें काम स्वार्थत्यागपूर्वक हातीं घेऊन ह्या दुर्भागी जातींची उन्नति घडवून आणावी. त्यासारखें कल्याणकारक दुसरें कार्य नाहीं," हा कै० ना. गोपाळ कृष्ण गोखले ह्यांच्या पुस्तकांतील उतारा अखेर देऊन लेखकानें पुस्तकाचा शेवट केला आहे.

हिंदुस्थान हें एक एकजीवी राष्ट्र होण्यासाठी त्यांतील सर्व नागरिकांची एकजात प्रगति होणें अत्यंत आवश्यक आहे. अस्पृश्य वर्गाच्या उन्नतीसंबंधीं शाब्दिक कळकळ दाखविण्याचा काळ आतां संपला असून, त्यांच्या व्यावहारिक स्वरूपाच्या उद्धाराची आवश्यकता स्पष्ट भासूं लागली आहे. म. गांधी ह्यांनीं हरिजनांच्या प्रश्नाकडे जनतेचें लक्ष वेधलें असून हरिजन सेवक संघामार्फत सबंद हिंदुस्थानभर कार्यहि मोठ्या निष्ठेनें व चिकाटीनें चालू आहे. तथापि, हा प्रश्न तात्काल सुटण्यासारखा नसून, एकनिष्ठ पद्धतीनें प्रचार व कार्य हीं चालू ठेवलीं पाहिजेत. श्री. भगत ह्यांनीं आपल्या पुस्तकामध्यें महाराष्ट्रांतील हरिजनांच्या जीवनाचें चित्र उत्कृष्ट रीतीनें सांगोपांग रेखाटलें आहे व त्यामुळें हरिजनांच्या प्रश्नाची विश्वसनीय माहिती उपलब्ध झाली आहे. केवळ एककल्ली व दिखाऊ उपायांनीं उन्नतीचें कार्य होणार नाहीं, तें अत्यंत कठिण व चिकाटीचें काम आहे, ह्याची स्पष्ट जाणीव प्रस्तुत पुस्तकाच्या वाचनानें होते.

* " दि अनटचेबल क्लासेस ऑफ महाराष्ट्र "
लेखकः—श्री. एम. जी. भगत, एम. ए., पृ. सं. ४५. किंमत १ रु.

---

### चीनमध्यें जपानी मालाची स्वयंस्फूर्तीनें नाकेबंदी

चीन देशांत जर्मन मालाचा प्रसार सर्वांत मोठ्या प्रमाणावर आहे; जपान व ग्रेटब्रिटन ह्यांचा नंबर दुसरा व तिसरा लागतो. जर्मन व्यापारी आपला माल विकण्यासाठीं कसून मेहनत घेतात व किंमतीसाठीं कित्येक वर्षें थांबण्यास तयार असतात. जपानविरुद्ध चिनी लोकमत असल्यानें जपानी मालाच्या प्रसारास फार अडथळे येतात. जपानी यंत्रांवर कामें करण्यास चिनी कामगार तयार नसतात व कच्च्या मालामध्यें जपानी माल आढळला तर संप पुकारतात. जपानची स्पर्धा अशा रीतीनें दूर होत आहे. शांघाई येथें येत्या जूनमध्यें एक औद्योगिक प्रदर्शन भरणार आहे, तें सर्व देशांच्या मालास खुलें असलें तरी जपानी माल त्यांत ठेवला जाणार नाहीं. जपानच्या ह्या नाकेबंदीचा ब्रिटिश व्यापारी फायदा करून घेण्याचा यत्न करीत आहेत.

## सहकारी चळवळ

### सहकारी चळवळीची प्रगति

अखिल भारतीय सहकारी परिषदेचें बारावें अधिवेशन दिल्ली येथें गेल्या आठवड्यांत भरलें होतें, त्यावेळीं परिषदेचें उद्घाटन करतांना सर जगदीश प्रसाद म्हणाले:—

"खेडुतांच्या हिताकडे लक्ष पुरविणारी सहकारी चळवळी-इतकी प्रभावी दुसरी कोणतीहि संस्था नाहीं. सरकारी पुरस्कारानें ह्या चळवळीचें ३० वर्षांपूर्वी बीजारोपण झालें व जेथें जेथें सरकारी नियंत्रण ढिलें करण्यांत आलें, तेथें तेथें चळवळीचे प्रगतींत संकटें उद्भवलेलीं आहेत......हिंदुस्थानांत आज सुमारें एक लक्ष सोसायट्या असून त्यांचें खेळतें भांडवल ९७ कोटि रुपये आहे. प्रत्येक १०० खेडेगांवांमागें ४८ सोसायट्या, असें प्रमाण पंजाबांत पडतें, तर बंगालमध्यें प्रत्येक १०० खेड्यांत २३ सोसायट्या आहेत. सोसायट्यांचे सभासद व त्यांच्या कुटुंबांतील मंडळी धरून, आतांपर्यंत फक्त १½ कोटि लोकांचा ह्या चळवळीशीं संबंध आलेला आहे."

### पुरंदर तालुका (जि. पुणें) सुपरवायझिंग यूनियन

वरील यूनियनची विशेष साधारण सभा सासवड येथें ता. ५ डिसेंबर रोजीं पुणें जिल्हा इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष, श्री. यशवंतराव दाते, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. त्यावेळीं इन्स्टिट्यूटचे ऑ. सेक्रेटरी श्री. देवभानकर व लँड मॉर्गेज बँकेचे श्री. देशपांडे हेहि हजर होते. यूनियनचे सुधारलेले पोटनियम स्वीकारणें, जिल्हा यूनियन बोर्डास यूनियन जोडणें, सवलतींसंबंधीं विचार करणें, इत्यादि कामें झाल्यावर यूनियनची कचेरी जेजुरीहून सासवडास आणण्याविषयींचा ठराव पास झाला. त्याचप्रमाणें, इन्स्टिट्यूटचा एक प्रतिनिधि यूनियनवर असावा व त्याबाबत पोटनियमांत जरूर त्या दुरुस्त्या कराव्या, असें ठरलें. श्री. देवभानकर व श्री. दाते ह्यांनीं इन्स्टिट्यूटच्या ध्येयाविषयीं व कार्याविषयीं आपल्या भाषणांत माहिती दिली.

### पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि., पुणें

वरील बँकेकडे नोव्हेंबर महिन्यांत ३३½ हजार रुपये कर्जमागणीचे २५ अर्ज आले. नोव्हेंबर अखेर बँकेनें ४४ हजार रुपये कर्ज वाटलें आहे.

### निम्मी ब्रिटिश जनता सहकारी चळवळींत

ग्रेट ब्रिटनच्या लोकसंख्येपैकी निम्मे लोक सहकारी चळवळींत असून सहकारी दुकानांतून जरूरीच्या मालाची खरेदी करतात. ब्रिटनमधल्या एकूण किरकोळ व्यापाराचा दहावा हिस्सा सहकारी संस्थांच्या क्षेत्रांत आलेला आहे.

### जर्मन सहकारी चळवळ

जर्मनीमधील सहकारी संस्थांची एकूण संख्या गेल्या सप्टेंबरच्या प्रारंभीं ५३,१६८ इतकी होती.

## सहकारी रजिस्ट्रारांचा चळवळीसंबंधीं आढावा

### सोलापूर येथील सभेमधील भाषण

सोलापूर जिल्ह्यांतील सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, यूनियन्सचे अध्यक्ष, ऑनररी ऑर्गनायझर्स, इत्यादि सहकारी चळवळीमधील कार्यकर्त्यांची एक सभा सोलापूर येथें ता. २७ नोव्हेंबर रोजीं बोलावण्यांत आली होती. त्यावेळीं, जिल्ह्यांतील सोसायट्यांच्या कामकाजांतील अडचणी व त्याबाबतचे प्रश्न समजावून घेण्यासाठीं सहकारी रजिस्ट्रार, श्री. एम्. डी. भनसाळी, हे स्वतः हजर होते. असिस्टंट रजिस्ट्रार हेहि उपस्थित होते. सभेमध्यें चर्चिल्या गेलेल्या प्रश्नांसंबंधीं रजिस्ट्रारसाहेबांनीं खालीलप्रमाणें मत व्यक्त केलें:—

"सोसायट्यांनीं अल्प मुदतीच्या करारानें कर्जें द्यावींत व व आपले पैसे अडकून पडणार नाहींत ह्याबद्दल काळजी घ्यावी. कर्जदाराचा मगदूर पाहून कर्जें दिल्यास कर्जफेड न करणारांची जमीन विकत घेण्याचें कारण पडणार नाहीं. जमिनीच्या खरेदींत गुंतलेल्या रकमांवरील व्याज सेंट्रल बँकांनीं माफ करावें, असा सल्ला मी देण्यास तयार नाहीं.

प्रत्येक सभासदाचें जिंदगीपत्रक व्यवस्थित व पूर्ण भरलेलें असणें अत्यंत आवश्यक आहे. सोसायट्यांनीं खरेदी केलेल्या जमिनींचीहि तपशीलवार माहिती तयार असावी. अशा जमिनी शक्य तितक्या लवकर विकून टाकण्याची खटपट असावी.

सोसायट्यांकडील कर्जें थकलीं, म्हणून सवलतींची योजना आंखण्यांत आली. चांगल्या सभासदांचें तिच्यामुळें नुकसान होतें. वक्तशीर फेड करणाऱ्या सभासदांस व्याजामध्यें सवलत देणें माझ्या मतें ज्यास्त सयुक्तिक होईल.

आपल्या सभासदांच्या कर्जावरील व्याजाचा दर उतरविणें सोसायट्यांस जेव्हां शक्य होतें, तेव्हां ह्या उतरलेल्या दराचा फायदा सर्व सभासदांस एकजात सारखा मिळावा, अशी व्यवस्था करण्यांत यावी. मागें कांहीं कर्जांवर ज्यास्त दरानें व्याज आकारण्यांत आलें असलें, तरी त्यावरीलहि व्याजांत सूट दिली जावी.

जेव्हां कांहीं अडचणीमुळें सभासदांस कर्जफेड करतां येत नाहीं, त्यावेळीं तहकुबी देण्यांत येतेच. हुकूमनामा कायम केल्यानंतर सवलती देण्यास माझा तत्त्वतः विरोध आहे, परंतु विशिष्ट प्रसंगीं योग्य इसमांस जरूर ती सवलत देण्यास हरकत नाहीं. हुकूमनाम्याच्या सध्याच्या बजावणीचे पद्धतींत कांहीं फेरफाराची आवश्यकता दिसत नाहीं. पगारदारांच्या सोसायट्यांमधील सभासदांमध्यें विम्याचा प्रसार होणें जरूर आहे. कांहीं व्यक्तींस विमा उतरविणें जाचक वाटलें, तरी विम्यामुळें एकंदरींत फायदाच होईल.

मीं ह्या जिल्ह्यांतील सर्व सहकारी संस्थांची अजून पहाणी केलेली नाहीं, तथापि माझ्या पहाण्यांत आलेल्या सोसायट्यांचें कामकाज पाहून मला समाधान वाटलें. शेतकी पतपेढ्यांनीं साठवलेले रिझर्व्ह अविचारानें कर्जें देऊन संपुष्टांत न येतील, अशी यूनियन्सनीं खबरदारी घ्यावी. आज भांडवलाचा पुरवठा करण्याचेंच फक्त काम सोसायट्या करीत आहेत. विक्री व पुरवठा ह्या बाबतींत अजून पुष्कळ कार्य करण्यास जागा आहे.

सहकारी कार्यकर्त्यांचें कार्य पाहून मला संतोष वाटतो. त्यांनीं आपलें कार्य एकनिष्ठपणानें व मन लावून चालू ठेवावें."

महिंद्रकर ब्रदर्स ह्यांचे थंडी-करतां
गिरगांव, मुंबई

## विम्याच्या पैशाची मागणी नामंजूर

### हायकोर्टाचा निवाडा

नोव्हेंबर १९२५ मध्यें श्री. जेठामल पटेल ह्यांनीं ओरिएंटल विमा कंपनीकडे ५,००० रुपयांचा विमा उतरण्यासाठी अर्ज केला. वैद्यकीय तपासणींत त्यांची प्रकृति चांगल्या प्रतीची आढळून आली. तरी त्यांस ३ वर्षांचें 'लोडिंग' देण्यांत आलें, म्हणजे त्या मानानें विमेदारास जादा हप्ते यावे लागले. एप्रिल १९२७ सालीं विमेदारानें नॅशनल विमा कंपनीकडे विमा उतरण्यासाठीं अर्ज केला, त्यांत ह्या जादा हप्त्यांचा उल्लेख केलेला नव्हता. वैद्यकीय तपासणीमध्यें त्याचें वजन कमी व प्रकृति क्षीण असल्याचें आढळून आलें व कंपनीनें अर्जाचा विचार करण्याचें पुढें ढकललें. २७ ऑगस्ट ते १० सप्टेंबरपर्यंत विमेदार औषध घेत होता. ह्याच सुमारास, मॅन्युफॅक्चरर्स विमा कंपनीनें, तिनें दिलेल्या विम्यावरील हप्ते बंद झाल्यामुळें, विमेदाराची पॉलिसी रद्द केली व ती पुनः चालू करावी, ह्या विषयींचा अर्जहि, विमेदाराच्या प्रकृतीविषयक अहवाल प्रतिकूल असल्यामुळें, नामंजूर केला. जून १९२८ मध्यें विमेदार डाकोर येथें गेला व एकाच दिवशीं त्यानें तीन कंपन्यांकडे विमा अर्ज पाठवले. ह्यांपैकीं एक अर्ज नॉर्विच यूनियन विमा-कंपनीकडे करण्यांत आला. विमा-अर्जांत त्यानें वरील इतिहास लिहिला नाहीं व शक्तिक्षीणतेबद्दल आपण वैद्यकीय उपचार केल्याचेंहि त्यानें निवेदन केलें नाहीं. ७ ऑगस्ट १९२८ रोजीं त्यानें नॉर्विच कंपनीचा हप्ता भरला व १० ऑक्टोबर १९२८ रोजीं विमेदार मरण पावला. विमेदाराच्या मुलानें विम्याच्या रकमेची मागणी केली, परंतु कंपनीनें ती नाकारली. म्हणून हें प्रकरण मुंबई हायकोर्टांत गेलें.

विमा-अर्जांत अर्जदारानें दिलेल्या उत्तरावरच विमा पत्रकाची उभारणी केलेली असल्यानें, विमेदारानें वस्तुस्थितीस सोडून उत्तरें लिहिलीं असल्यास विम्याचे पैसे देण्यास कंपनी बांधलेली नाहीं, असें न्यायाधिशांनीं सांगितलें. ज्या गोष्टींच्या निवेदनामुळें अर्जदाराचा विमा-अर्ज मंजूर होणें कठिण पडलें असतें अशा कित्येक गोष्टी विमेदाराचे पूर्वेतिहासांत होत्या. विमेदारानें सर्व माहिती सांगितली होती, परंतु एजंटानें व वैद्यकीय परीक्षकानें ती अर्जामध्यें नीट भरली नाहीं, असें वादीतर्फें प्रतिपादण्यांत आलें. हें खरें मानलें, तरी अर्ज लिहितेवेळीं एजंट हा कंपनीतर्फें काम करीत होता असें म्हणतां येणार नाहीं व एजंटास अर्जाव्यतिरिक्त मिळालेल्या माहितीबद्दल कंपनीस जबाबदार धरणें रास्त होणार नाहीं, असा न्यायाधिशांनीं अभिप्राय व्यक्त केला. विम्याची रकम देण्यास कंपनी बांधलेली नाहीं असा हायकोर्टानें निकाल दिला.

## १९३५-३६ सालांतील आयात

### साखरेची यंत्रसामुग्री, शिवण्याचीं यंत्रें, टाइपरायटर्स व शेतीचीं साधनें

साखरेच्या उत्पादनास लागणाऱ्या यंत्रसामुग्रीची आयात दिवसेंदिवस कमी होत आहे. १९३३-३४ सालीं ३ कोटि ३६ लक्ष रुपयांचीं यंत्रें हिंदुस्थानांत उतरलीं, १९३४-३५ मध्यें १ कोटि ५ लक्ष रुपये किंमतीची यंत्रसामुग्री आली, तर १९३५-३६ मध्यें फक्त ६६ लक्ष रुपयांचीं यंत्रें आयात झालीं. ह्यांपैकीं, ५० लाखांचीं यंत्रें ब्रिटिश बनावटीचीं होतीं.

शिवण्याच्या व विणण्याच्या यंत्रांची आयात, संख्येच्या दृष्टीनें वाढली असली, तरी त्यांच्या किंमतींत घट झाली आहे. अहवालाचे वर्षीं ६६ लक्षांचीं यंत्रें आलीं. म्हणजे त्यापूर्वीच्या वर्षांतील आयातीपेक्षां ८ लक्ष रुपयांचीं यंत्रें कमी आलीं.

टाइपरायटर्सच्या आयातींत मात्र वाढ झाली आहे. १९३४-३५ मध्यें १६ लक्ष रुपयांचे १५,२२० टाइपरायटर्स हिंदुस्थानांत आले; १९३५-३६ सालीं १५,८७० टाइपरायटर्स उतरले व त्यांची किंमत १७ लक्ष रुपये भरली. ह्यांपैकीं अमेरिकन बनावटीच्या यंत्रांची किंमत १५ लक्ष रुपये होती.

शेतीकामासाठीं लागणारे नांगर इत्यादि साधनांच्या आयातींत १ लाख रुपये किंमतीची घट झाली व आलेल्या मालाची किंमत १० लक्ष रुपये भरली.

### बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटची वार्षिक सभा

वरील सिंडिकेटची दुसरी वार्षिक सभा टिळक स्मारक मंदिरांत गेल्या रविवारीं भरली होती. सिंडिकेटचे अध्यक्ष, श्री. वर्तक ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. वार्षिक अहवाल व ताळेबंद सभेंत मंजूर करण्यांत आला आणि मेसर्स जी. डी. आपटे व मेसर्स जी. एम्. ओक ह्या हिशेबतपासनीसांची नेमणूक झाली.

### "शेती व शेतकरी"

ह्या मासिकाच्या डिसेंबर महिन्याच्या अंकांत उसाच्या लागवडीसंबंधीं लेख प्रसिद्ध झाले असून, वाळवी व तिचा नाश, सिगारेट कशा तयार करतात, दुय्यम धंदे, इत्यादि विषयांवर उपयुक्त मजकूर प्रसिद्ध झाला आहे.

### स्वदेशी मालास संरक्षण देण्याची उत्सुकता

आपल्या स्वतःच्या देशांतील उद्योगधंद्यांस ग्रेटब्रिटनमधील सरकार किती सहानुभूतीनें संरक्षण देतें, ह्याचें प्रत्यंतर पार्लमेंटांतील वादविवादाचे वेळीं नुकतेंच दिसून आलें. कौलें, चाकू, टाइपरायटर, इत्यादींच्या आयातीवर जादा जकात बसविणारें बिल सभागृहापुढें होतें. ह्या बिलास विरोध करतांना मि. ए. व्ही. अलेक्झँडर म्हणाले:-"ग्रेटब्रिटनमध्यें तयार झालेले टाइपरायटर विलायती बनावटीच्या यंत्रांपेक्षां बाजारांत स्वस्त मिळत असतांना, परदेशी टाइपरायटवर एक पौंड जकात जादा बसविण्यांत येत आहे."

ओव्हरकोट खरेदी करा

किंमत रु. १२॥

बुधवार चौक, पुणें

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—४ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८–१४ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | १२०—४ |
| ४% १९६०–७० ... ... | ११५—२ |
| ४% १९४३ ... ... ... | १११–१२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | १००—३ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०७—६ |
| २¾% १९४८–५२ ... ... | १०१—२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११२—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १११–१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षे मुदत) | १११–१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११३—६ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२६—८ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३६—० |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११७—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५—४ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५७५—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १३९—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९८—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९१७—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५३—७ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २६७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २६५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ६½% ) | १६१३–१२ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६१७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९८–१२ |
| टाटा आयर्न (१०० रु. द्वु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७९—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | २२३—८ |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ८५८—२ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळयास | ३५–१½ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येकें १०० तोळयास | ५२–१२ |


# वेस्टर्न इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

स्थापना स. १९१३. मुख्य कचेरी–सातारा.

संपूर्ण स्वदेशी, अत्यंत सुदृढ, माफक हप्त्याची पहिली व पहिल्या प्रतीची महाराष्ट्रीय विमासंस्था.

बोनस त्रैवार्षिक दरहजारीं { हयातींतील रु. ६० / हयातीनंतरचें रु. ७५

१९३५ मधील नवें काम ५१,३०,०४२ रु.

एकूण चालू काम २,७०,००,००० रु. अधिक

एकूण जिंदगी ७१,७१,०९३ रु.

लाइफ फंड ६०,४२,८७३ रु.

एजन्सी व इतर माहितीसाठीं पत्रव्यवहार करा.

## धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

## Public Works Department.

Sealed tenders on B-1 forms will be received by the undersigned in his office at Thana upto 2 P. M. ( S. T. ) on Tuesday the 22nd December 1936, for the following works :—

| *Name of work.* | *Estimated cost.* | *Amount of earnest money.* |
|---|---|---|
| (1) Widening Bridge in mile 37/3 of the Bombay-Poona Road. | 16,190/- | 550/- |
| (2) Raising & widening the roadway in mile 27 of Thana Panvel Road. | 14,307/- | 500/- |
| (3) Widening the bridge No. 110 in mile 14/6 of the Bandra-Ghodbunder Road. | 4,519/- | 150/- |

2/- Blank forms with specifications can be had on payment of Rs. 3/- per form per work on any working day during office hours except the day on which tenders are to be received.

3/- Each tender should be accompanied by a challan to the extent of the amount shown against each work as earnest money paid into any Government Treasury or Reserve Bank of India separately for each work without which no tender will be considered and the balance of the amount of Security Deposit will be deduced at 5% from bills.

4/- The Executive Engineer, Thana Division does not bind himself to accept any or the lowest tender and no reasons for the acceptance or the rejection of any tender will be given.

Thana, 10th December, 1936.

Sd./- B. K. Bose,
Executive Engineer,
Thana Dn.

---

व्यापारी-उद्मी लोकांस

**—अपूर्व संधि—**

पुणें औद्योगिक प्रदर्शन १९३७

---

**वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक**

आमचा इमारतीच्या बांधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात.

" गिलाव्याचा चुना हा तर आमचे चुन्याचे धंद्यांतील विशेष होय."

**भाऊ गंगाधर साठे,**

बिल्डिंग कॉंट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,
५१२ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणें २

---

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंद्लेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १५ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १६ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १७ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १८ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | १९ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २० शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २१ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २२ साक्री ( „ „ ) |
| ९ अहमद्नगर ( „ अहमद्नगर ) | २३ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० शेवगांव ( „ „ ) | २४ मालेगांव ( „ नाशिक ) |
| ११ कोपरगांव ( „ „ ) | २५ सटाणा ( „ „ ) |
| १२ भिवंडी ( „ ठाणें ) | २६ कळवण ( „ „ ) |
| १३ पालघर ( „ „ ) | २७ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १४ कल्याण ( „ „ ) | २८ कालोल ( „ „ ) |

**खेळतें भांडवल रु. २००००००चे वर**

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंद्लेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची
प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

# दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

# DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# K. K. & Co.

Photographic Dealers
POONA.

# दि डॉन ऑफ इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें.
पुणें व सोलापूर येथें
बिल्डिंग इन्व्हेस्टमेंट आणि बँकिंग डिपार्टमेंटची
कंपनीचे बँकर्सनीं पसंत केलेली

ता. १ आक्टोबरपासून सुरू ] नवीन योजना [ ता. १ आक्टोबरपासून सुरू

मुदतीच्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची
फायदेशीर अपूर्व सोय.

बँकेच्या उतरत्या व्याजाच्या काळांत लोकांस आपले कौटुंबिक निर्वाहास साधन अगर मदत म्हणून ठेवीवर मासिक, नियमित व किफायतशीर व्याज देण्याची व्यवस्था तारीख १ आक्टोबर १९३६ पासून अमलांत आणली आहे.
गरजूंनीं जास्त माहिती मागवावी अगर समक्ष भेटावें.

पुणें, ता. २२-९-३६ जनरल मॅनेजर.

# डेक्कन गोल्ड फ्लेक

गो ल्ड फ्ले क

गिऱ्हाईकांच्या आवडीनिवडीचा पूर्ण विचार करून अनुभवी तज्ज्ञांच्या देखरेखीखालीं तयार केलेली ही सिगारेट फार लोकप्रिय झाली असल्यास नवल नाहीं.

*Apply for Agencies*—

**Deccan Tobacco Works,**
**Poona 4**

Tel. Address—'CIGARETTES' POONA.

## " दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली
पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला { हयातीनंतर विम्यास
३७॥ रु. } दर हजारीं त्रैवार्षिक नफा { ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

## स्वदेशी

कापड म्हणजे काय?
(१) स्वदेशी व्यवस्था (२) स्वदेशी सूत (३) स्वदेशी मजुरी.
या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यानें स्वदेशीबद्दल तुमची फसवणूक होणार नाहीं.
हातरुमालापासून सर्व प्रकारचें रेशमी, सुती व गरम कापड व टांचणीपासून सर्व प्रकारची स्टेशनरी वगैरे.
खात्रीचा स्वदेशी माल मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण

# स्वदेशी भांडार

लक्ष्मीरोड, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ मांगुर्डा घ. नं. १३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांगुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख २३ डिसेंबर, १९३६. अंक ५१

## दि डॉन ऑफ इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें.

पुणें व सोलापूर येथें

बिल्डिंग इन्व्हेस्टमेंट आणि बँकिंग डिपार्टमेंटची कंपनीचे बँकर्सनीं पसंत केलेली

[ता. १ आक्टोबरपासून सुरू] नवीन योजना [ता. १ आक्टोबरपासून सुरू]

मुदतीच्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची फायदेशीर अपूर्व सोय.

बँकच्या उतरत्या व्याजाच्या काळांत लोकांस आपले कौटुंबिक निर्वाहास साधन अगर मदत म्हणून ठेवीवर मासिक, नियमित व किफायतशीर व्याज देण्याची व्यवस्था तारीख १ आक्टोबर १९३६ पासून अमलांत आणली आहे.

गरजूनीं जास्त माहिती मागवावी अगर समक्ष भेटावें.

पुणें, ता. २२-९-३६ | जनरल मॅनेजर.

## ओरायन (मॅग्नमस्)

उत्कृष्ट व्हर्जिनिया तंबाकूपासून बनविलेली ही सिगारेट

२॥ आण्याला १० चें पाकिट किंवा १२ आणे ५० चा डबा

सर्वत्र मिळते.

एकदां ओढल्यानंतर नेहमींच पसंत कराल.

बनविणार—

DECCAN TOBACCO WORKS,
POONA 4

Telegraphic Address:—'CIGARETTES', POONA.
*Apply for Agencies.*

## "व्हीट ब्लासम" म्हणजे गव्हाचे पोहे

ह्या सारखें सात्त्विक आणि कसदार खाद्य दुसरें नाहीं. पुड्याची किंमत [ मापी २ शेर ] ०८ आणे. नमुन्यासाठी पावणे दोन आण्याचीं तिकिटें पाठवावीं.

कारखानदार :—भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, ७५३ सदाशिव पेठ, पुणें.

स्टॉकिस्ट:—तांबे आरोग्य भुवन, मुंबई; श्री. लक्ष्मी ट्रेडिंग कंपनी, सांगलीं, बेळगांव, कोल्हापूर.

## वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक

आमचा इमारतीच्या बांधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात.

" गिलाव्याचा चुना हा तर आमचे चुन्याचे धंद्यांतील विशेष होय."

भाऊ गंगाधर साठे,
बिल्डिंग कॉंट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,
५१२ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणें २

## जे. जी. दातीर

जिलब्या मारुतीजवळ, घ. नं. ८७१, पुणें २


सर्व तऱ्हेच्या समारंभाकरितां हार, गोटे, इत्यादि माल सुबक स्वस्त व वक्तशीर तयार करून मिळेल.

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !
ज्युनियर प्रभाकर
सेफ्टी स्टोव्ह
माहितीपत्रक मागवा
मेकर्स:–ओगले ग्लास वर्क्स., लि.
ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्स:–
१ केळकर ब्रदर्स,
बुधवार चौक.
२ म. इं. को. ऑ. एजन्सी,
लक्ष्मीरोड.

## विविध माहिती

### बँकांस सुट्टी

गुरुवार, शुक्रवार व शनिवार, ता. २४, २५ व २६ डिसेंबर रोजीं नाताळनिमित्त बँका बंद रहातील.

### परदेशी भांडवलाची अमेरिकेकडे धाव

मि. रूझवेल्ट ह्यांची अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून फेर निवडणूक झाल्यापासून, परदेशांतील भांडवल अमेरिकेकडे धाव घेऊं लागलें आहे. रोखे बाजारांत रोखे खरेदी करण्याकडे ह्या पैशाचा उपयोग होत असून, ही प्रवृत्ति अशीच चालू राहण्याचा संभव दिसतो.

### कपाशीच्या वहातुकीसाठीं स्पेशल आगगाडी

नागपूर ते मुंबई ह्यांमध्यें ५२० मैलांचें अंतर आहे. वऱ्हाड व मध्यप्रांत ह्यांतून मुंबईकडे पाठविण्यांत येणारीं कपास तेथें लवकर पोचावी आणि ह्या वहातुकीमधील मोटारींची स्पर्धा टळावी, ह्याप्रीत्यर्थ जी. आय. पी. रेल्वेनें एका खास गाडीची सोय केली आहे.ही गाडी नागपूरहून रोज रात्रीं ९-३० वाजतां निघते व वाटेंत कपाशीच्या वाघिणी घेत घेत मुंबईस ३८३/४ तासांत पोहोंचते. गेल्या नोव्हेंबरमध्यें ही गाडी सुरू झाली व मोसम संपेपर्यंत ती चालू ठेवण्यांत येईल.

### ग्रेटब्रिटनमध्यें तयार कपड्यांची आयात वाढली

परदेशांतून ग्रेटब्रिटनमध्यें होणारी तयार कपड्यांची आयात वाढत आहे. विशेषत: जर्मनीमधून ज्यास्त माल येऊं लागला आहे. ह्या कारणानें ब्रिटिश शिंप्यांमध्यें चुळबुळ सुरू झाली आहे.

### रशियांतील प्रवाशांच्या संख्येंत वाढ

रशियामध्यें परदेशीय प्रवासी दिवसानुदिवस ज्यास्त ज्यास्त जाऊं लागले आहेत. चालू वर्षाच्या पहिल्या नऊमाहींत एकूण १८,४५० प्रवासी जाऊन आले. ह्यांपैकीं शेकडा २५ लोक अमेरिकेंतून गेले होते.

### ॲबिसिनियाच्या बादशहावर दावा

आपली राजधानी सोडून जातेवेळीं ॲबिसिनियाच्या बादशहानें आदिस अबाबाचा नाश करण्याचा हुकूम दिला. ह्यामुळें, लॉइड्स इन्शुअरन्स कंपनीस, नुकसान भरपाई दाखल आपल्या विमेदारांस १६ लक्ष रु. द्यावे लागले. ही रकम वसूल करण्याकरितां कंपनी बादशहावर ब्रिटिश कोर्टांत दावा आणणार आहे, असें समजतें.

### रेडिओवरील लायन्सेस-फी उतरली

रेडिओवरील लायसेन्स फी ता. १ जानेवारी १९३७ पासून १० रुपयांची ८ रुपये करण्यांत आली आहे. पूर्वींच्या लायसेन्सची मुदत भरण्यापूर्वी नवा लायसेन्स घेणारासच ही सवलत मिळेल. तूर्त एक वर्षपर्यंत ह्या प्रयोगाची अंमलबजावणी होईल.

### "मिकी माउस"ची लोकप्रियता

प्रसिद्ध "मिकी माउस"चे चित्रपट सर्व जगांत मिळून सुमारें ४६ कोटि लोक पैसे देऊन पहातात असा हिशेब एकानें केला आहे.

### व्ही-एट गाड्यांची लोकप्रियता वाढत आहे

फोर्ड मोटार कंपनीच्या व्ही-एट गाड्या सालोसाल ज्यास्त लोकप्रिय होत आहेत. १९३२ सालीं ही गाडी प्रथम बाजारांत आली, त्या वर्षीं ह्या बनावटीच्या १,५४,९५५ गाड्या खपल्या. १९३३ सालीं ३१/२ लक्ष,१९३४ सालीं ६३/४ लक्ष व १९३५ सालीं १०३/४ लक्ष, अशा रीतीनें व्ही. एट. गाडीचा खप वाढला आहे.

### इंडियन ह्यूम पाइप कंपनीची नवीन शाखा

पाणीपुरवठा, ड्रेनेज इत्यादींकरितां सिमेंट काँक्रीटचे नळ, सेप्टिक टँक, इत्यादि बनविणाऱ्या इंडियन ह्यूम पाइप कं. लि. नें भावनगर येथें एक नवीन कारखाना सुरु केला आहे. हिंदुस्थान, ब्रह्मदेश व सिलोन मिळून ह्या कंपनीचे पंचवीसाहून ज्यास्त कारखाने आहेत. कंपनीचा विस्तार आणि कामाचा व्याप स्पृहणीय आहे.

### कराची येथील कपास-कापडाची पहिली गिरणी

मुंबईमधील गिरण्यांत अनुभव घेतलेल्या एका सिंधी गृहस्थानें कराची येथें कापडाची गिरणी सुरू केली आहे, तिचें मामुली उद्घाटन ता. २८ जानेवारी रोजीं गव्हर्नरांचे हस्तें होईल. सिंधमधील ही पहिलीच गिरणी आहे.

### पिसाळलेलीं कुत्रीं चावलेल्यांस उपचार

पिसाळलेलीं कुत्रीं चावलेल्यांस उपचार करण्याची व्यवस्था सातारा, विजापूर, धुळें, अलिबाग, खेडा, भडोच, धारवाड, गोध्रा व ठाणा येथील सरकारी इस्पितळांमध्यें करण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ता. ६-१२-३६ ते १२-१२-३६ | ४९,५५,५८६ |
| ता. १३-१२-३६ ते १९-१२-३६ | ३३,९६,२८१ |
| ता. २१-९-३१ ते १९-१२-३६ | २,८९,६०,०३,३४२ |

अनुक्रमणिका


| पृष्ठ | | पृष्ठ | |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ६१२ | ६ आयुर्विमापत्राची निर्विवादता ... ... | ६१७ |
| २ पदवीधर विद्यार्थी आणि व्यापारी व्यवसाय ... | ६१३ | ७ हिंदी बँकिंगचा आढावा | ६१८ |
| ३ मराठेशाहींतला सराफी धंदा ... ... | ६१३ | ८ हिंदी साखरेचा धंदा व संरक्षक जकाती...... | ६१८ |
| ४ लोकसंख्येची वाढ का सुखी लोकांची वाढ? ... | ६१४ | ९ मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट ... | ६१९ |
| ५ स्फुट विचार ... हिंदी हुंडणावळ-बँक ऑफ इंग्लंडचा सुवर्णनिधि वाढला-आर्थिक मंदी कशी दूर होणार?-मोटार-लॉन्र्यांच्या संबंधाचे कायदे-" रसायनम्" | ६१५ | १० जगांतल्या आर्थिक व सामाजिक घडामोडी | ६२० |
| | | ११ निवडक बाजारभाव | ६२१ |



# अर्थ

बुधवार, ता. २३ डिसेंबर, १९३६


## पदवीधर विद्यार्थी आणि व्यापारी व्यवसाय

गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झालेल्या सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास आणि मि. फकीरजी भरूचा ह्यांच्या भाषणांनीं हिंदी तरुणांपुढील पोटापाण्याच्या प्रश्नावर चांगला प्रकाश पाडला आहे. दोघेहि गृहस्थ व्यापार-उद्योगधंद्यांत व कारखान्यांचे व कंत्राटांचे कामांत तज्ज्ञ आणि अनुभवी असल्याकारणानें, त्यांच्या शब्दांस व उपदेशास विशेष महत्त्व आहे. लखनौ विश्वविद्यालयाच्या पदवीदान प्रसंगीं भाषण करतांना, सर पुरुषोत्तमदास ह्यांनीं व्यापारी-व्यवसायांत जरूर असणाऱ्या गुणांची चर्चा केली आणि पदवीधर विद्यार्थ्यांस ह्या व्यवसायांत कसें यशस्वी होतां येईल, ह्या संबंधीं माहिती दिली. व्यापार म्हणजे केवळ रुपये-आणे-पैंचा व्यवहार नाहीं; निर्दय सावकार आणि निश्चेतन बँका ह्यांसंबंधानें गैरसमज करून घेण्याचें कारण नाहीं; मनुष्याच्या जीवनयात्रेंत आर्थिक सुखाचें महत्त्व विशेष आहे आणि तें मिळवून देण्यास व्यापारी व्यवसाय हें उत्कृष्ट जनसेवेचें साधन आहे; शेतीचें उत्पादन व त्याचा उठाव ह्यास सहाय, शेतकऱ्यांच्या रहाणींत सुधारणा, इत्यादि कामें पदवीधरांस करतां येण्याजोगीं आहेत; वगैरे मुद्यांचा सर पुरुषोत्तमदासांनीं परामर्श घेतला आणि व्यापारांत प्रवेश करूं इच्छिणाऱ्या उमेदवारांस सचोटी, उद्योगप्रियता, चिकाटी, धडाडी, युक्तिबाजपणा, समयसूचकता, व्यक्तित्व, धाडस, इत्यादि गुण कसे आवश्यक आहेत, ह्याचें त्यांनीं वर्णन केलें. व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांची प्रगति होऊन हिंदी प्रजेच्या रहाणींत सुधारणा घडून येण्यास पदवीधर कसें सहाय करूं शकतील, ह्याचेंहि त्यांनीं वर्णन केलें.

पदवीधरांस उपदेश करतेवेळीं सर पुरुषोत्तमदासांनीं आपल्या व्यापारी बंधूंसहि सूचना केल्या, हें योग्यच झालें. विश्वविद्यालयीन शिक्षणाबद्दल व्यापारी वर्गांत अत्यंत गैरसमज झालेला दिसतो कारण पदवीधर उमेदवारांस ह्या व्यवसायांत प्रवेश मिळणें अत्यंत कठिण जातें, असा अनुभव आहे. अमेरिकेंतील व्यापाऱ्यांचें अनुकरण करून, हिंदी धंदेवाल्यांनीं उमेदवारांस जबाबदारीच्या जागा द्याव्या, असा सर पुरुषोत्तमदासांनीं सल्ला दिला. मि. भरूच्या ह्यांनीं, मुंबई येथील एंजिनिअरिंग कॉंग्रेसचे अध्यक्ष ह्या नात्यानें भाषण करतांना, ह्याच अडचणीचा उल्लेख केला. एंजिनिअरिंग किंवा इतर शास्त्रीय शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांस गिरण्या, रेल्वे वर्कशॉप्स अगर विजेचे कारखाने ह्यांतून विनावेतन उमेदवारीहि मिळणें कठिण पडतें, अशी वस्तुस्थिति आहे. उद्योगधंदे, कारखाने, गिरण्या, इत्यादींमध्यें तज्ञ व व्यवहारकुशल अशा लोकांस ह्यापुढें ज्यास्त ज्यास्त मागणी येणार आहे, परंतु धंद्यांच्या विविध शाखा-उपशाखांचें शिक्षण देण्याची कोठेंच व्यवस्था नाहीं. हिंदुस्थानांत सुमारें ४३ हजार मैल लांबीचे रेल्वे रस्ते आहेत आणि दरसाल ५० कोटि उतारूंची व ९ कोटि टन मालाची वहातूक त्यांवरून होते. तथापि, रेल्वेसंबंधाच्या व्यवसायांचें विशेष शिक्षण देणारें ह्या देशांत एकहि कॉलेज नाहीं. हीच गोष्ट इतर व्यवसायांसहि लागू आहे.

आपापल्या व्यवसायांतील वरील दोघां अधिकारी पुढाऱ्यांनीं केलेल्या भाषणांवरून दोन-तीन गोष्टी स्पष्ट होतात. ( १ ) हिंदुस्थानांत औद्योगिक शिक्षणाची असावी तेवढी व असावी तशी सोय अद्यापि झालेली नाहीं, ( २ ) व्यापारी वर्ग तरुण पदवीधरांकडे सहानुभूतीनें पहात नाहीं आणि ( ३ ) हिंदी विद्यार्थ्यांचे अंगीं व्यापारी वृत्ति बाणलेली नाहीं. कच्च्या मालाचा व भांडवलाचा पुरवठा, मालाचा खप, अनिष्ट स्पर्धेचा अभाव इत्यादींवर व्यापार व उद्योगधंदे ह्यांची सुधारणा होणें अवलंबून आहे. तथापि, ह्या व्यवसायांतील मनुष्यबळाचेंहि महत्त्व कमी नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. वरील तीन्ही प्रश्नांचा समाधानकारक निकाल लागणें अत्यंत आवश्यक असून व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या प्रगतीस केवळ एकच उपाययोजना पुरेशी पडणार नाहीं. सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास आणि मि. भरूचा ह्यांच्या सूचना हिंदी मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं, व्यापाऱ्यांनीं आणि शिक्षणाधिकाऱ्यांनीं लक्षांत घेऊन त्यांस मूर्त स्वरूप देणें आवश्यक आहे. सुशिक्षितांची बेकारी व जनतेचें दारिद्र्य दूर करण्याचा हा मार्ग स्वीकारला गेल्यावांचून हिंदी राष्ट्रास अभ्युदयाची आशा करण्यास जागा नाहीं.

## मराठेशाहींतला सराफी धंदा

### प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान

( २ )

### शके १६५४ ते १६५७ मधले हिशेबाचे कागद

राजवाडे स्मृतिदिनाचे निमित्तानें दिलेल्या आपल्या व्याख्यानांत प्रो. काळे ह्यांनीं स्वतःस नवीन उपलब्ध झालेली सराफी कागदपत्रांतली माहिती सांगितली, तिचा सारांशः—

मराठेशाहींतला व्यापारी, खाजगी व सरकारी देण्याघेण्याचा व्यवहार आटोपण्यास लहानमोठे सावकार सर्व देशभर पेरले जाणें आवश्यक होतें. त्याप्रमाणें उपलब्ध झालेल्या हिशोबाच्या कागदांत सहज दहा वीस पानें चाळलीं असतां चाळीस सराफांचीं नांवें उल्लेखिलेलीं आढळलीं, तीं ऐकण्यासारखीं आहेत. मागील व्याख्यानांत व टांचणांत रोजनामे, खतावण्या, आढावे इत्यादि सराफी वह्यांचें वर्णन करण्यांत आलें आहे. दीक्षित. पटवर्धनांच्या दप्तरांत आणखी कांहीं कागद सांपडले आहेत, त्यांवरून मराठेशाहींत प्रचलित असलेल्या सराफी पद्धती-

संबंधानें ज्यास्त तपशीलवार माहिती मिळते. ठिकठिकाणच्या सराफांचे परस्परांच्या देण्या-घेण्याचे व्यवहार होतात, त्यांचें वर्षअखेर महिन्यांच्या व तिथींच्या अनुक्रमानें टांचण करून तें तपासून पहाण्यासाठी एकमेकांस पाठवण्याचा प्रघात महाराष्ट्रांत शके १६५४ सालीं होता, ही गोष्ट हातीं आलेल्या कागदांवरून स्पष्ट होत आहे. औरंगाबादचे बाबूजी नाइक भिडे व पुण्याचे सदाशिवभट दीक्षित ह्यांचे दरम्यान झालेल्या व्यवहारांचीं ह्या प्रकारचीं टांचणें येथें पुढें मांडण्यांत येत आहेत. ह्या कागदाच्या भेंडोळ्यांचे शिरावर राजश्री भिडे व राजश्री पटवर्धन ह्यांच्या खात्याचे हिशेब असें स्पष्ट म्हटलें आहे. एक सालच्या एकाच खात्याच्या जमा-नांवेच्या टांचणाच्या दोन प्रती आहेत. पण विशेष बोधप्रद गोष्ट ही कीं, दुसऱ्या एका सालचीं टांचणें दुहेरीं आहेत, म्हणजे भिडे व पटवर्धन ह्यांनीं परस्परांस पाठविलेले आपापल्या वह्यांतले उतारे आहेत. ह्यांत एकांतल्या जमा रकमा दुसऱ्यांत नांवे आहेत, हें उघडच आहे. एका वर्षाच्या अखेर बाकी काढलेली आहे, ती दुसऱ्या वर्षाच्या प्रारंभीं जमा किंवा नांवें ह्या सदरांत प्रारंभींच रीतसर दाखल केलेली आहे, हें एकामागून एक अशा दोन वर्षांच्या टांचणांतील नोंदींवरून दिसून येतें. पुण्यामध्यें ह्या बाक्या भिकाजी नाइक मराठे ह्यांनीं रुजू करून घेतल्या आणि त्यांमध्यें व्याज, हुंडणावळ व अडत ह्यांचा हिशेब झाला असल्याविषयीं शेरा आहे.

मराठेशाहींत सध्याप्रमाणें महिन्याचे कच्चे करून व्याजाचा आकार काढण्याची पद्धति प्रचलित होती हें ह्या विषयींच्या हातीं असलेल्या कागदांवरून स्पष्ट होतें. विशिष्ट महिन्यांत व विशिष्ट मितीस किती रकम देणें किंवा येणें असेल त्या मानानें हे कच्चे केले आहेत, हें मी स्वतः हिशेब करून पाहिलें आहे. दरमहा आठ आणे व्याजाचा दर ह्यांत धरलेला आहे. आणखी एक मनोरंजक गोष्ट म्हणजे "चूकभूल द्यावी घ्यावी" हा शेरा कागदांत आढळतो ही असून त्यास अनुसरून सराफांनीं परस्परांच्या टांचणांत देण्याघेण्यांतल्या चुका एकमेकांच्या नजरेस आणलेल्या आहेत आणि त्याप्रमाणें जमाखर्च दुरुस्त करण्याच्या सूचना केल्या आहेत. ह्या रीतीनें जमा करावयाच्या राहिलेल्या रकमांची किंवा वाजवीपेक्षां ज्यास्त नांवें लिहिल्या गेलेल्या रकमांचीं टांचणें करून पटवर्धन सराफांनीं बाबूजी नाईक भिडे ह्यांकडे पाठविलेलीं माझ्या हातांत आहेत. त्यांतली एक नोंद मनोरंजक असल्यानें वाचून दाखवण्यासारखी आहे.

शके १६५५च्या बाबूजी नाइक भिडे यांच्या हिशेबांत दिसून येणाऱ्या तफावतीचा तपशील दाखवणारा कागद माझ्या हातांत आहे त्यांत औरंगाबादचा गंगाराम कनोजा ह्याच्या हुंडीच्या पैशाचा मजकूर असून त्यानें द्यावयाच्या व्याजाबद्दल झालेल्या कज्ज्याचा उल्लेख आहे. व्याजाच्या पन्नास रुपयांपैकीं रुपये १५।— रुपये बाबूजी नाइकांनीं जमा करावयाचे राहिले ती तफावत दर्शविण्यांत आली आहे. त्याप्रमाणें इतर तफावतींच्या रकमांचा तपशील देऊन शेवटीं "दोनसे अडतीस रुपये पाउने सा आने भिकाजी नाइक यांपासून व्याज सुद्धां घेने उत्तर लिहिने" असा शेरा आहे. व्याजाच्या आकारणीच्या कांहीं कागदांत गुजराथी लिपी स्पष्ट असून तें लिहिणें एखाद्या गुर्जर कारकुनाचें असलें पाहिजे त्यांत शंका रहात नाहीं.

पटवर्धनांच्या कागदांत खानदेशांतील उंदीरखेडें व विजखेडें ह्या दोन गांवांतील दुकानांचे आढावे मिळाले आहेत, ते बोधप्रद आहेत. बचंकट देव ह्या नांवाचे गृहस्थ सदाशिवभट पटवर्धन सराफांचे तेथील गुमास्ते असून त्यांचे हे शके १६५५-५६ च्या सुमाराचे आढावे आहेत. आढावे पूर्ण असून तपशीलवार व पद्धतशीर आहेत. त्यांमध्यें दुकानांचा नफा-तोटा व शिलकी मालाच्या किंमती अगदीं बारकाईनें दिल्या आहेत.

विजखेड्याच्या हिशेबावरून त्या गांवाच्या आर्थिक परिस्थितीवर चांगला प्रकाश पडतो. त्या गांवांत विणकऱ्यांचा, रंगाऱ्यांचा व तेल्यांचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालत असला पाहिजे असें ह्या धंदेवाल्यांच्या नांवांच्या संख्येवरून स्पष्ट दिसतें. विजखेड्याची आजची आर्थिक स्थिति काय आहे ह्याची चौकशी मी चालविली आहे; ती फलद्रूप झाल्यास तुलनात्मक दृष्टीनें अभ्यास करून अनुमानें काढणें सोयीचें होईल. जमाखर्चाच्या कागदांत येणाऱ्या कित्येक शब्दप्रचारांचा योग्य अर्थ लागला आहे व लागत आहे. त्यांत कांहीं शंकास्थळें आहेत. त्यांचा निर्णय सराफी व्यवहारांविषयींचे ज्यास्त कागद हातीं येण्यावर पुष्कळसें अवलंबून राहील, कै. वा. राजवाडे ह्यांस अत्यंत प्रिय असलेल्या कार्याच्या मार्गांत काय प्रगति चालली आहे हें संशोधनाच्या आर्थिक क्षेत्रांतल्या एका कोपऱ्यांत मी काय करीत आहें हें दर्शवून जनतेच्या निदर्शनास आणावें आणि आजचा स्मृतिदिन साजरा करावा हा माझ्या व्याख्यानाचा हेतु थोडातरी सफल झाला तर मला आनंद वाटेल.

---

### लोकसंख्येची वाढ का सुखी लोकांची वाढ ?

संतति नियमनाच्या सुप्रसिद्ध पुरस्कर्त्या, मिसेस हौ-मार्टिन, ह्या बाई हिंदुस्थानांत आल्या असून सदरहु चळवळीच्या प्रचारार्थ त्या व्याख्यानें देणार आहेत. हिंदुस्थानास ही त्यांची तिसरी भेट आहे. मुंबई येथें भाषण करतांना बाई म्हणाल्या:—

"पौरस्त्य देशांत जननाचें व मृत्यूचें प्रमाण दरसाल दर हजारीं अनुक्रमें सरासरीनें ३० व २० असें पडतें; म्हणजे लोकसंख्येंत दर हजारी १० ची वाढ होते. बहुतेक पाश्चात्य देशांत जननाचें व मृत्यूचें प्रमाण कमी असूनहि लोकसंख्येंत भर पडत आहे. कांहीं देशांत लोकसंख्या वाढविण्याची खटपट करण्यांत येत आहे, परंतु ज्यास्त लोकसंख्या म्हणजे जास्त राष्ट्रबल, ही समजूत भ्रामक आहे. जगांतील सर्वांत मोठी लोकसंख्या असणारा चीन देश सुरक्षित आहे, असें कोण म्हणेल? लोकसंख्येपेक्षा लोक सुखी करण्याकडे ज्यास्त लक्ष देणें जरूर आहे."

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य
झारापकर टेलरिंग कॉलेज
माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २

व्यापारी उद्यमी लोकांस
—अपूर्व संधि—
पुणें औद्योगिक प्रदर्शन १९३७

# स्फुट विचार

## हिंदी हुंडणावळ—व्हाइसरॉयांचा नकार

मद्रासच्या हुंडणावळ-संघानें आपल्या शिष्टमंडळास मुलाखत मिळावी अशी विनंति व्हाइसरॉय ह्यांस केली असतां तिला नकारात्मक उत्तर आलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. हुंडणावळीचा चालू दर बदलण्याचा सरकारचा विचार नसल्यानें मुलाखतीचा व चर्चेचा कांहीं उपयोग होणार नाहीं हें नकाराचें कारण देण्यांत आलें आहे. सरकारचें हुंडणावळीस हात न लावण्याचें धोरण लोकांस माहीत आहे आणि त्यांत बदल होण्याच्या आवश्यकतेबाबत आपलें म्हणणें अधिकाऱ्यांपुढें मांडून त्यांचें मन वळवावें हा हुंडणावळसंघाचा हेतु आहे हें उघड आहे. तथापि, सरकारचें मत जणूं काय वज्रलेप झालें असून त्याच्याविरुद्ध असलेले विचार ऐकण्याचीहि त्यांची तयारी नाहीं. हुंडणावळीचा दर बदलण्याची नुसती भाषाहि सरकारास इतकी अनिष्ट वाटते कीं, त्यांच्या धोरणास दुसरी बाजू असणें व ती सयुक्तिक असणें अशक्य आहे अशी ठाम समजूत त्यांनीं करून घेतली आहे. ह्या समजुतीचा प्रतिध्वनी लंडनच्या "फिनॅन्शल न्यूज" पत्रांत उमटला असून त्या पत्राचा अभिप्राय व व्हाइसरॉयांचा नकार हे एकाच वेळीं प्रसिद्ध झाले आहेत, हा योगायोग विलक्षण आहे. महत्त्वाच्या नवीन राज्यघटनेस लवकरच प्रारंभ व्हावयाचा असतां हिंदी चलनव्यवस्थेंत फेरफार करणें अयोग्य आहे असें "फिनॅन्शल न्यूज" पत्राचें म्हणणें आहे. जगांतली आर्थिक स्थिति सुधारली म्हणजे रिझर्व्ह बँकेनें सरकारास हुंडणावळीच्या दरासंबंधानें योग्य शिफारस करावी असें निश्चित झालेलें असल्यानें तूर्त हा प्रश्न उपस्थित करतां येत नाहीं आणि ह्याशिवाय, नवीन राजकीय घटनेमध्यें जे आर्थिक निर्बंध दाखल आहेत त्यांस अनुसरून तो प्रश्न सर्वस्वी गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलच्या अधिकारांत असल्यानें नवीन प्रांतिक कायदेमंडळांच्या आग्रहामुळें हुंडणावळींत फेरबदल होण्याची भीति बाळगण्याचें कारण नाहीं, असें आश्वासन त्या पत्रानें दिलें आहे. ह्यावरून प्रस्तुत प्रकरणीं ग्रेटब्रिटनमध्यें आणि साम्राज्यसरकारच्या धोरणांत वारा कसा वहात आहे ह्याची स्पष्ट कल्पना येईल.

---

## बँक ऑफ इंग्लंडचा सुवर्णनिधि वाढला

मि. नेव्हिल चेंबर्लेन ह्यांनीं ब्रिटिश कॉमन्स सभेंत जाहीर केलें कीं, बँक ऑफ इंग्लंडच्या सुवर्णनिधींत ६१½ कोटि पौंड (सुमारें ८५ कोटि रुपये) किंमतीच्या सोन्याची भर तात्पुरती घालण्यांत आली असून ६ कोटि पौंडांच्या म्हणजे सुमारें तितक्याच रकमेच्या, सोन्याचें ज्यांस तारण नाहीं अशा, नोटा कमी करण्यांत आल्या आहेत. ब्रिटिश चलनाच्या निधींत सोनें न ठेवतां रोख्यांच्या तारणावर काढावयाच्या नोटांस कायद्यानें मर्यादा घातलेली आहे आणि ती आजमितीस २६ कोटि पौंड अशी आहे. सुवर्णनिधींत नवीन सोन्याची भर पडली असतां त्याच्या तारणावर जादा नोटा निघून व्यवहारांत खेळणारें चलन जरूरीच्या मानानें ज्यास्त होण्याची व त्याचा परिणाम बाजारभाव आणि हुंडणावळीचा दर ह्यांवर प्रतिकूल होण्याची भीति असते. म्हणून सुवर्णनिधी वाढतांच रोख्यांच्या तारणावर निघालेल्या नोटांचें चलन तितक्याच मानानें मर्यादित करण्यांत आलें आहे. तथापि, हुंडणावळीच्या स्थैर्याच्या संरक्षणासाठीं जो एक स्वतंत्र निधि म्हणजे फंड सुमारें ४००-५०० कोटि रुपयांचा निर्माण करण्यांत आला आहे आणि ज्याचा उपयोग हुंडणावळीच्या दरांत वेळोवेळीं होणाऱ्या फरकांस आळा घालण्याकरितां केला जात आहे, त्या निधीमधून साडे सहा कोटि पौंडाचें सोनें काढून घेण्याची आणि ६ कोटि पौंड किंमतीच्या नोटा कमी करण्याची आज काय आवश्यकता सरकारास भासली, ह्या विषयीं लंडनच्या सराफ मंडळीस विस्मय वाटत आहे. पॅरिस व न्यूयॉर्क येथील पेढीवाल्यांनीं लंडनमध्यें ठेव म्हणून ठेवलेला पैसा परत नेण्याचें ठरविल्यास त्या प्रसंगीं नोटांच्या बदला सोनें किंवा परदेशी हुंड्या याव्या लागतील, त्याची ही पूर्वतयारी असावी, असा कित्येकांचा तर्क आहे. हुंडणावळ-संरक्षण फंडांत पुरेसें सोनें आहे, त्याचा उपयोग ह्या कार्याप्रीत्यर्थ केला जाईलच, आणि विशेष जरूर पडल्यास बँक ऑफ इंग्लंडपाशीं सोन्याचा पुरवठा असावा म्हणून नवीन योजना अमलांत येत असली पाहिजे. अशा रीतीनें प्रस्तुत प्रकरणीं ग्रंथ लावण्यांत येत आहे. बँक ऑफ इंग्लंड आपला सुवर्णनिधी वाढवून ब्रिटिशचलन व्यवस्थेस कशी मजबुती आणीत आहे, हें मि. चेंबर्लेन ह्यांनीं जाहीर केलेल्या धोरणावरून दिसतें.

---

## अशा स्थितींत आर्थिक मंदी कशी दूर होणार ?

आर्थिक मंदी दूर होण्यास राष्ट्रांनीं परस्परांशीं होणाऱ्या व्यापारावरचीं सध्याचीं नियंत्रणें काढून टाकलीं पाहिजेत, असें प्रमुख मुत्सद्दी आपल्या भाषणांत सारखे सांगत आहेत. परंतु जणूं काय एक मोठें युद्ध लवकरच होणार अशी भीति वाटून सर्व राष्ट्रें स्वसंरक्षणाच्या तयारींत आहेत, असा विलक्षण देखावा आज चोहोंकडे दिसत आहे. युद्धकालांत व्यापार व उद्योगधंदे ह्यांचे मामुली व्यवहार चालत नाहींत आणि सरकारास त्यांमध्यें हात घालून त्यांचें नियंत्रण करावें लागतें. सध्याच्या मंदीच्या परिस्थितींतहि ह्याच प्रकारचें धोरण राष्ट्रीय सरकारांस अंगिकारावें लागल्यानें धंदे व आंतरराष्ट्रीय व्यापार ह्यांस तेज येईनासें झालें आहे. उद्यां युद्धप्रसंग उद्भवल्यास आपल्या लोकांच्या अन्नाची एक वर्षापुरती बेगमी कशी करतां येईल ह्याची तजवीज करणें ग्रेट ब्रिटनसारख्या राष्ट्रास अपरिहार्य वाटावें ह्यावरून जगाच्या आर्थिक परिस्थितीवर स्वच्छ प्रकाश पडत आहे. धान्य व खाण्यापिण्याचे इतर पदार्थ ह्यांच्या पुरवठ्याच्या संबंधांत इंग्लंड स्वावलंबी नाहीं आणि युद्धामुळें हे जिन्नस बाहेरून येण्याचें बंद झाल्यास ब्रिटिश जनतेची हलाखी होईल हें जाणून त्या देशांतील सरकारनें सदरहु बाबतींत योग्य तजवीज करण्याकरितां एक स्वतंत्र खातें निर्माण केलें आहे. राष्ट्रसंरक्षणाच्या दृष्टीनें अन्नसामुग्रीचा पुरवठा होण्याच्या बाबतींत त्यानें योजना तयार करावयाची आहे आणि त्यानें आपलें काम त्यासंबंधांतल्या इतर खात्यांशीं सहकार्य करून करावयाचें आहे. एक वर्षाच्या सामुग्रीस ३६¾ लक्ष टन गहूं, ५० लाख टन बटाट, २२½ लक्ष टन कांदे, ६ लक्ष टन लोणी व अनेक लक्ष टन दूध लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. युद्धामुळें ग्रेट ब्रिटनचें समुद्रावरचें दळणवळण बंद पडल्यास सहा आठवड्यांत ब्रिटिश जनतेची उपासमार होऊं लागेल असें सर सॅम्युअल होअर

ह्यांनीं बोलून दाखविलें आहे. असाच अभिप्राय इतर ब्रिटिश मुत्सद्यांनीं व्यक्त केला आहे. राष्ट्ररक्षणाची ही तरतूद अत्यंत अगत्याची आहे ह्यांत शंका नाहीं आणि तिकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं. तथापि, वरून दिसणाऱ्या शांततेच्या काळांत राष्ट्रांस युद्धापासून संरक्षण करण्याची आवश्यकता वाटावी, हें जगाचें दुर्दैव आहे. अशा परिस्थितींत जागतिक व्यापाराची घडी नीट बसून प्रचलित आर्थिक मंदी दूर होण्याची लोकांनीं अपेक्षा कशी करावी ?

## मोटार-लॉऱ्यांच्या संबंधाचे कायदे व मराठा चेंबर

येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या निमंत्रणावरून पुण्यांतील मोटारलॉऱ्यांच्या मालकांची एक सभा गेल्या शुक्रवारीं भरली होती. मोटार लॉऱ्यांच्या व्यवहारावर, सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें, कित्येक नवीन नियंत्रणें घालण्याचें घाटत असून हिंदुस्थान सरकारनें त्या बाबतींत कायदा-दुरुस्तीचा एक मसुदाहि तयार केला आहे. धंदेवाल्या लॉरीमालकांनीं वहातुक कोणत्या रस्त्यांनीं व कशी करावी, भाडें कसें व किती आकारण्यांत यावें, ह्या धंद्याची मुभा वाटेल त्यास ठेवावी किंवा ती विशिष्ट रीतीनें मर्यादित करावी, इत्यादि अनेक महत्त्वाचे प्रश्न प्रस्तुत प्रकरणीं उपस्थित झाले आहेत. लॉऱ्यांचे मालक व जनता ह्या दोहोंसहि ते सारखेच जिव्हाळ्याचे आहेत. विशेषतः धंदेवाल्या लॉऱ्यांच्या मालकांचे हितसंबंध नवीन होणाऱ्या नियमांशीं निकट रीतीनें संबद्ध आहेत. तेव्हां, त्यांचें ह्याबाबत काय म्हणणें व सूचना आहेत,त्यांचा वेळींच विचार होऊन त्यांची बाजू सरकारपुढें मांडली जावी ह्या हेतूनें मराठा चेंबरनें केलेला उपक्रम योग्यच आहे. गेल्या शुक्रवारच्या सभेस कित्येक ठळक लॉरीमालक उपस्थित होते, आणि त्यांनीं आपले विचार प्रदर्शित करून चेंबरशी सहकार्य करण्याचें आश्वासन दिलें. लॉऱ्यांचे अपघात घडतात, त्यांत होणाऱ्या नुकसानीच्या भरपाईची व्यवस्था विम्याच्या द्वारें कशी करतां येईल ह्याचाहि विचार चालू असून एक कमिटी त्यासंबंधांत लोकमत अजमावीत आहे. हा विम्याचा प्रश्नहि अत्यंत महत्त्वाचा आहे आणि त्याविषयींचें लॉरी-मालकांचें मत संघटित रीतीनें व्यक्त होणें आवश्यक आहे. कायदे व नियम होऊन गेले म्हणजे लोक जागे होऊन तक्रार करूं लागतात व त्याचा कांहींहि उपयोग होत नाहीं असा अनुभव येतो. तरी, वरील कायद्याचे बाबतींत आपल्या अडचणी व सूचना, विचारविनिमय करून, लॉऱ्यांच्या मालकांनीं वेळींच सरकारापुढें मांडाव्या ह्याकरितां मराठा चेंबरनें चालविलेला प्रयत्न फलद्रूप होणें अगत्याचें आहे. गेल्या शुक्रवारच्या सभेंत वर निर्दिष्ट केलेले सर्व प्रश्न चेंबरच्या चिटनवीसांनीं व अध्यक्षांनीं स्पष्ट रीतीनें समजावून दिले असून उपस्थित असलेल्या मंडळीस आपलें म्हणणें पद्धतशीरपणानें सरकारपुढें मांडलें जाण्याचें महत्त्व पटलें आहे. ह्याच्या पुढचें कार्य योग्य रीतीनें होईल अशी आम्हांस आशा आहे.

## " रसायनम् "

" रसायननिधि " ह्या संस्थेतर्फे रसायन शास्त्रविषयक करण्यांत येणाऱ्या संशोधनास व्यवस्थित प्रसिद्धी मिळावी आणि " रसायननिधी " च्या ध्येयानुसार कार्याचा प्रसार होण्याकरितां एकाद्या साधनाची जोड असावी, ह्या उद्देशानें " रसायनम् " ह्या कालिकाची योजना करण्यांत आलेली आहे. ह्या कालिकामध्यें रसायनशास्त्रविषयक इतर संशोधकांच्या निबंधांसहि स्थान मिळण्याची योजना आहे. वरील निधीची स्थापना होऊन सहा वर्षें झालीं आहेत, तथापि त्याचे आधी कित्येक वर्षें प्रो. द. बा. लिमये हे रसायनशास्त्राशीं समरस होऊन आपलें संशोधनकार्य उत्साहानें व चिकाटीनें करीत आले आहेत. प्रो. लिमये ह्यांच्या शोधांचें महत्त्व परदेशांतील विद्वानांसहि पटलें आहे. " रसायननिधी " नें स्वतःचें असें एक संशोधनक्षेत्र निर्माण केलें आहे व शास्त्रीय जगास ह्या संशोधनाचा उपयोग होऊं लागला आहे. पैशाचीं व उपकरणांचीं साधनें ह्यांचें पुरेंसें पाठबळ नसतांनाहि, प्रो. लिमये ह्यांनीं आपलें कार्य अखंड चालू ठेवलें आहे. प्रो. लिमये ह्यांनीं शास्त्रीय क्षेत्रांत प्राप्त करून घेतलेलें मानाचें स्थान आणि अत्यंत काटकसरीनें व शांतपणानें काम करण्याची त्यांची हातोटी, ह्यांची माहिती फारच थोड्यांस असेल. " रसायनम् " ह्या मुखपत्राचे द्वारां निधीच्या, म्हणजेच प्रो. लिमये ह्यांच्या, नेतृत्वाखालीं चाललेल्या संशोधनकार्याची माहिति समव्यवसायी विद्वानांस मिळणें सोपें झालें आहे. संशोधन कार्यास वाहून घेतलेल्या निधीच्या ह्या कार्याचें महत्त्व ओळखणारे लोक जेवढे मिळतील, तेवढे पाहिजेच आहेत. त्यामुळें, ह्या असामान्य उद्योगास सहाय होणार आहे.

## मालेगांव तालुका सहकारी वृत्त

(१) मालेगांव तालुक्यांतील सेक्रेटरीसंघाची मासिक सभा ता. ४-१२-१९३६ रोजीं श्री. क्षीरसागर, सुपरवायझर, यांचे अध्यक्षतेखालीं होऊन लोकल सेक्रेटरी व ग्रुप सेक्रेटरी याबाबत चर्चात्मक दृष्टीनें सेक्रेटरींचीं भाषणें झालीं व मालेगांव तालुका को. सु. यूनियनला ग्रुप-सेक्रेटरीची पद्धत लवकर अमलांत आणण्याबाबत ठराव पास करण्यांत आला.

(२) तालुक्यांतील सेक्रेटरींची यूनियन ऑफिसमध्यें ता. ४-१२-१९३६ रोजीं कामाची माहिती देण्याचे दृष्टीनें सभा झाली. सेल यूनियन मार्फत मेंबरांस माल विकणें, जिदंगी पत्रकें, कमाल मर्यादा तक्ते, पुरवणी परमावधी पत्रकें, वगैरे बाबत महत्त्वाची माहिती बँकेचे सी. इन्स्पेक्टर श्री. हळवे व सुपरवायझर श्री. क्षीरसागर यांनीं दिली.

॥ श्रीहेरंब भवतु ॥

**श्रीमाणकेश एजन्सी**

**लुगडीं व खणाचे व्यापारी, मार्केट रोड, पुणें.**

आमचें दुकान गेलीं चारपांच वर्षे लुगडी-खणासंबंधीं प्रसिद्ध आहेच. आम्हीं सर्व प्रकारची फॅन्सी किनार, मनमोहक रंग, चालू फॅशनचीं पातळें व स्पेशल खास **टिकेकरवाडी** येथील माल ठेवला आहे. लांब रुंद भरपूर, पोतास सफाईदार, टिकण्यांत उत्तम असा नांवाजलेल्या—

**" दि टिकेकर टेक्स्टाईल मिल " चा माल अगदीं नवीन फॅशनचा ठेवला आहे.**

## आयुर्विमापत्राची निर्विवादता

इतर अनेक धंदेवाइकांप्रमाणें विमामंडळया सुद्धा आपल्या गिऱ्हाइकाचें हित पहाण्यांत तत्पर असणें जरूर आहे. गिऱ्हाइकांचें हित पहाण्यांतच प्रत्येक धंद्याचा उत्कर्ष असतो. आपल्या देशांत आयुर्विम्याचा धंदा नव्यानें सुरू झाल्याकारणानें विमेदारांच्या सोईची कल्पना कित्येक विमामंडळयांस आलेली नाहीं, व म्हणूनच पुष्कळ वेळां अनिष्ट प्रसंग घडतात. विमेदार थोड्या मूल्यांत जास्तींत जास्त विमाद्रव्याची अपेक्षा करतो, म्हणून विमेदाराचे व मंडळीचे हितसंबंध परस्परविरोधी असतात, अशी भ्रामक समजूत विमा मंडळयांच्या चालकांची झालेली असते. वस्तुतः, विमेदार म्हणतो त्याप्रमाणें, त्याच्याकडून कमींत कमी नफा घेतला तर मंडळीचा विमेदारांचा संग्रह वाढेल व परिणामीं मंडळीचें हितच होईल, ही गोष्ट मंडळीच्या चालकांस समजत नाहीं.

इतर धंद्यांपेक्षांहि विम्याच्या धंद्यांत सचोटी व कर्तव्यतत्परता राखणें अत्यंत जरूर असतें. विमेदाराच्या पश्चात् त्याच्या अनाथ विधवेस व मुलाबाळांस द्रव्य देऊन त्यांच्या दुःखाचा भार हलका करण्याचें अत्यंत जबाबदारीचें व पवित्र कर्तव्य मंडळी शिरावर घेत असते. त्या बाबतींत काटेकोरपणा व कुचराई करणें म्हणजे अंगिकृत कर्तव्याचें पालन न करणें होय.

कलकत्ता हायकोर्टाचा एक निवाडा नुकताच प्रसिद्ध झाला आहे. पार्वतीचरण चक्रवर्ती ह्या गृहस्थानें १९१८ सालाचे सुमारास २० वर्षे मुदतीचें हयातींतील एक विमापत्र घेतलें. पार्वतीचरण १९२९ सालीं मृत झाला. त्यानें वक्तशीरपणानें वेळोवेळ विम्याचे हप्ते भरलेले होते. मृताची विधवा कर्तव्यदेवी हिनें जेव्हां मंडळीजवळ विमाधनाची मागणी केली, तेव्हां मंडळीनें तें नाकारलें. कारण असें कीं, विमापत्र घेण्याच्यावेळीं कौटुंबिक माहितीच्या तक्त्यावर पार्वतीचरणानें संपूर्ण माहिती दिलेली नव्हती. बंधू व भगिनी यांची माहिती देतांना त्यानें फक्त हयात व्यक्तींचीच माहिती दिली व मृत नातेवाइकांच्या माहितीचीं कोष्टकें त्यानें कोरींच ठेविलीं. कर्तव्यदेवीनें जेव्हां ही गोष्ट कोर्टाकडे नेली, तेव्हां "सदर्हु माहिती विशेष महत्त्वाची नाहीं" असें ठरवून खालच्या दोन्हीं कोर्टांनीं कर्तव्यदेवीची मागणी मंजूर केली. मंडळीनें ही गोष्ट हायकोर्टाकडे नेली. सदर्हु कोर्ट म्हणतें: "विमा हा करार आहे, व तो कांहीं तक्ते व अर्ज यांतील माहितीच्या जोरावर उभा केलेला असतो. त्या तक्त्यांतील जरूर ती माहिती विमेदारानें दिली नाहीं; मग ती किती महत्त्वाची होती हा प्रश्नच रहात नाहीं. आणि ज्या अर्थी सदर्हु तक्ता अपूर्ण होता त्याअर्थी ह्या कराराचा पायाच नाहींसा होत आहे." निकाल सहाजीकच कर्तव्यदेवीच्या विरुद्ध झाला.

हायकोर्टानें म्हटल्याप्रमाणें, करार अपुरा होता ही गोष्ट निर्विवाद आहे. पार्वतीचरणानें गाळलेली माहितीहि पण महत्वाची होती. समजा त्याच्या मृत बंधूंपैकीं कोणी क्षयानें मृत झाला होता असें मंडळीस विमापत्र देण्याच्या आधींच कळतें, तर मंडळीनें पार्वतीचरणाला विमापत्र दिलेंच नसतें. परंतु अशी माहिती अपुरी राहण्याचा दोष कोणाच्या पदरांत किती घालावयाचा हा प्रश्न महत्त्वाचा आहे. पार्वतीचरणानें ती माहिती (१) मंडळीस फसवण्याच्या उद्देशानें दिली नसेल, (२) किंवा त्याला त्या माहितीचें महत्त्व ठाऊक नसल्यानें, ती गौण ठरवून, दिली नसेल, (३) किंवा तो माहिती देण्याचें अजिबात विसरलाच असेल. कांहीं झालें तरी त्या माहितीचें हें विशिष्ट महत्व पार्वतीचरणास ठाऊक असणें जास्त संभवनीय का मंडळीस ठाऊक असणें ज्यास्त संभवनीय? पार्वतीचरणानें माहिती न देण्यांत त्याचा कोणताहि हेतु असला तरी मंडळीनें ही गोष्ट विमापत्र देण्याच्या वेळेस उघडकीस आणूं नये काय? असा प्रश्न येथें उद्भवतो. मंडळीनें सुशिक्षित व तज्ञ माणसें नेमून ही गोष्ट करावयास हवी होती असेंहि येथें म्हणतां येईल. पार्वतीचरणाच्या एका चुकीवर मंडळीची दुसरी चुकी होऊन, बिचाऱ्या कर्तव्यदेवीचें नाहक नुकसान झालें आहे. तिनें विमामंडळीवर भरंवसा ठेवला व त्या भरंवशाचा असा विपरीत परिणाम झाला. प्रत्यक्ष कुळाला शिक्षा न होतां त्याच्या अनाथ विधवेस, अशा तऱ्हेनें कायद्याच्या आधारानें कां होईना, अपाय पोहोचणें बंद झालें पाहिजे.

सर्वच विमामंडळयांत अशीं प्रकारणें होतात असें नाहीं. परंतु वरीलप्रमाणें जेव्हां प्रसंग घडतात तेव्हां विम्याची परीक्षा पहाच कशाला, असें वाटून प्रत्येक विमा-मंडळयांबद्दल मन साशंक होतें. अशा तऱ्हेची परिस्थिति निर्माण होऊंच नये म्हणून कांहीं मंडळया "निर्विवादतेचें" कलम माहिती पत्रकांत अगर विमापत्रांत घालतात. त्याचा उद्देश, विमापत्र अमूक एक मुदत चालू राहिल्यानंतर, विमाअर्ज वगैरे करारास आधारभूत कागदपत्रांतील दोषांबद्दल मंडळी विमेदारास जबाबदार धरणार नाहीं, असा असतो. अर्थातच वयाच्या दाखल्यासारख्या अत्यंत आधारभूत गोष्टी या कलमाखाली येणार नाहींत. परंतु, विमामंडळीकडून विमापत्रच नाकारलें जाण्याचा मग संभव रहात नाहीं. ही मुदत साधारणपणें दोन वर्षांची असते. तेवढ्यांत मंडळीनें जरूर ती माहिती शोधून विमापत्रास वाटेल तर हरकत घ्यावी. अशा तऱ्हेच्या कलमाचा विमेदारांस अत्यंत फायदा होणार आहे यांत संशय नाहीं.

पु. ग. मराठे

---

### आयुर्विमा कंपन्यांचे घेणेकरी आणि विमेदार

पेनिनसुलर लाइफ ॲशुअरन्स कंपनीमध्यें एका इसमानें विमा उतरला. सदरहू गृहस्थ मयत झाल्यामुळें त्याच्या विमापत्रकाची रकम लागू झाली. इतक्यांत, पेनिनसुलर कंपनी लिक्विडेशनमध्यें गेली. कंपनीच्या इतर घेणेकऱ्यांपेक्षां वरील विम्याचे रकमेचा घेणेकरी म्हणजे विमेदाराचा मुलगा, ह्याचा कंपनीकडून रकम मिळण्यांत अग्रहक्क आहे काय? असा प्रश्न उपस्थित झाला. कंपनीचे इतर घेणेकरी व विमेदार ह्यांचे हक्क सारखेच असून विमेदारास अग्रहक्क सांगता येणार नाहीं असा मुंबई हायकोर्टानें नुकताच निकाल दिला आहे.


आपणांस विहीर बोअर करावयाची आहे काय ?

**भिडे आणि सन्स्**

स्वतः तयार केलेल्या मशीननें बोअर खणून देतात.

चौकशी कराः—

भिडे आणि सन्स

सांगली ( S. M. C. ) शनीचा पार, पुणें २

## हिंदी बँकिंगचा आढावा

### निर्गत वाढविल्याखेरीज गत्यंतर नाहीं

[ गेल्या वर्षातील हिंदी बँकिंगचा आढावा 'स्टेटिस्ट' पत्रानें घेतला आहे, त्याचा सारांश येथें देत आहों. ]

सबंध वर्षभर व्याजाचा दर अत्यंत अल्प राहिला. निर्गतीच्या मोसमांत बँक रेट ३ टक्केच कायम होता. सोन्याची निर्गत जरा कमी प्रमाणांत परंतु सारखी चालू होती व त्यामुळें हुंडणावळीची मजबुती टिकून राहिली. चांदीची निर्गत डिसेंबर, १९३५ अखेर चालली होती, ती अमेरिकेंतील भाव उतरल्यानें थांबली व नंतर तिची हिंदुस्थानांत आयात सुरू झाली. हिंदुस्थानांत चलनाचें नियंत्रण करून रुपयाची इतर देशांच्या नाण्यांतील किंमत कायम राखण्याचें काम बजावण्यांत रिझर्व्ह बँकेस कांहींच अडचण भासली नाहीं.

एप्रिल १९३५ मध्यें रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली. तथापि आपला डिस्कौंटचा दर जाहीर करण्यास तिनें त्या वर्षाच्या जुलै मध्यें सुरुवात केली. नोव्हेंबर २८ रोजीं हा दर ३½ टक्क्यांचा ३ टक्के करण्यांत आला व अद्याप तो कायम आहे. आपली सर्व रोख शिलक रिझर्व्ह बँकेकडे ठेवून इंपीरिअल बँकेनें इतर बँकांस उदाहरण घालून दिलें. त्या दोन्ही बँकांचे व्यवहार सलोख्यानें चालू आहेत.

रिझर्व्ह बँकेकडील ठेवी वाढल्या आहेत व कर्जें कमी झालीं आहेत. सोन्याच्या अखंड निर्गतीमुळें व विक्रीमुळें जमा झालेला पैसा शहरांतील बँकांकडे येतो व त्याचा परिणाम रिझर्व्ह बँकांच्या देणें-घेणें पत्रकावर झालेला दिसतो. शेतीच्या मालाचे पडलेले बाजारभाव आणि शेतकऱ्यांस कर्जें देतांना सावकारांनीं आखडलेला हात, ह्या दोन कारणांमुळें बँकांमार्फत दिल्या जाणाऱ्या कर्जांत घट झाली आणि सावकारांस बँकेकडून रकमा उचलण्याचें कारणच उरलें नाहीं.

सरकारनें उभारलेलीं कर्जें व केलेली परतफेड ह्यांमुळें पैशाचे बाजारास तेजी अगर मंदी येत असते. अहवालाचे सालीं, कर्जें व परतफेड ह्यांची रमारमी झाली. ऑगस्ट १९३५ मध्यें रिझर्व्ह बँकेनें ३ टक्के दराचें १५ कोटींचें कर्ज उभारलें. ३७ कोटींचीं कर्जें परत द्यावयाचीं होतीं, त्यांपैकीं कांहीं वरील नव्या कर्जांत वर्ग झालीं व उरलेल्यांच्या परतफेडीसाठी ट्रेझरी बिलांच्या सहायानें तात्पुरत्या रकमा उभ्या करण्यांत आल्या. ट्रेझरी बिलांवरील व्याजाचा दर उतरत आला असून, सध्या तो शेकडा ·१२ आण्यांच्या आसपास आहे.

एप्रिल, १९३५ पासून आतांपर्यंत, ग्रेटब्रिटनमधील कर्जापैकीं सुमारें ४५ कोटींची फेड हिंदुस्थान सरकारनें केली आहे व १३ कोटींचें कर्ज उभारलें आहे. सुवर्णाधिष्ठित देशांनीं सुवर्णचलनाचा त्याग केल्यापासून, रुपयाची किंमत कमी करण्याच्या प्रश्नास चालना मिळाली; परंतु, १ रु.=१ शि. ६ पे. हा दर कायम ठेवण्याचा निश्चय सरकारनें जाहीर केला. हुंडणावळ मजबूत राखण्यास जरूर तीं साधनें रिझर्व्ह बँकेजवळ आहेत; तथापि, हिंदुस्थानास आपलें परराष्ट्रीय देणें भागवितां येईल एवढ्या रकमेनें, म्हणजे सुमारें ६० कोटींनीं, आयातीपेक्षां निर्गत जास्त झाल्याखेरीज, हुंडणावळीचा प्रश्न कायमचा सुटणार नाहीं. सोन्याची निर्गत थांबल्यास अगर चांदीची आयात वाढल्यास तात्काळ कठिण परिस्थिति निर्माण होईल.

व्याजाच्या प्रचलित हलक्या दराचा फायदा घेण्यांत येऊन, अहवालाचे सालीं कित्येक नवीन कंपन्यांची व कारखान्यांची स्थापना झाली. सरकारी रोख्यांची किंमत कळसास पोहोचली आणि बँकांना आपल्या ठेवींवरील दर पुनः उतरवावे लागले. "कॉल मनी"चा दर सरासरीनें शेकडा चार आणे होता व दोन टक्के दरानें बँकांकडून कर्जें सर्रास मिळत असत. शेतकऱ्यांच्या परिस्थितींत मात्र सुधारणा झालेली दिसत नाहीं. शेतीच्या मालाची किंमत, पौंड स्टर्लिंगच्या हिशेबानें, १९२९ च्या मानानें फक्त शेकडा ६५ इतकीच राहिली.

शेतीच्या धंद्याशी रिझर्व्ह बँकेचे व्यवहार कसे जोडतां येतील, ह्यासंबंधीं चौकशी करून सूचना करण्यासाठीं मि. डार्लिंग ह्यांची नेमणूक झाली, त्यास दोन वर्षें लोटून गेलीं. मि. डार्लिंग ह्यांचा अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला नाहीं. तथापि, सहकारी चळवळीच्या सध्याच्या परिस्थितीमध्यें रिझर्व्ह बँकेस शेतकऱ्यांकरितां विशेष कांहीं करतां येईल, असें दिसत नाहीं.

प्रांतिक सहकारी बँकांस त्यांच्या हुंड्या वटविण्यासंबंधांतील दिलेल्या सवलती देण्यापलीकडे रिझर्व्ह बँकेस जातां येणार नाहीं. प्रांतिक सरकारें शेतकऱ्यांच्या संरक्षणार्थ बरेच प्रयत्न करीत आहेत व शेतीचीं कर्जें कमी करून हलक्या दरानें नवीन कर्जें देण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. जरूरीइतकेंच कर्ज काढून वक्तशीर फेड करण्यास व पुनः कर्जांत न पडण्यास शेतकऱ्यांस शिकवणें, हाच त्यांच्या उद्धाराचा खरा मार्ग आहे.

## हिंदी साखरेचा धंदा म्हणजे संरक्षक जकातीचा विजय होय !

### ह्यापुढील काय—संशोधन व संघटन

हिंदी साखरेच्या धंद्यास देण्यांत आलेल्या संरक्षणाची मुदत ता. ३१ मार्च १९३८ रोजीं संपते. त्यानंतर पुनः ह्या धंद्यास किती संरक्षण देण्यांत यावें, ह्यासंबंधीं चौकशी करून अहवाल सादर करण्याकरितां एका टारिफ बोर्डाची नेमणूक लवकरच केली जाईल अशी अपेक्षा आहे. गेल्या पांच वर्षांत हिंदी साखरेच्या धंद्यानें उत्कृष्ट प्रगति केली असून वार्षिक १५ कोटींची परदेशी साखरेची आयात जवळ जवळ बंद पाडली आहे. एवढी मोठी रकम आतां परदेशांत जाण्याऐवजी हिंदुस्थानांतच खर्ची पडते व त्याचा फायदा कारखानदार, ऊंस लावणारे शेतकरी, कारखान्यांतील कामगार, वहातुकीचें काम मिळणाऱ्या आगगाड्या, लॉऱ्या व बैलगाड्या ह्या सर्वांसच मिळत आहे. उंसाची लागवड सालोसाल वाढत आहे, ह्याचा अर्थ इतर पिकांपेक्षां उंसाचें पीक

महिंद्रकर ब्रदर्स ह्यांचे
थंडी-
गिरगांव, मुंबई
करतां

शेतकऱ्यांस ज्यास्त सोइस्कर व फायदेशीर वाटतें, असा उघड दिसतो.

हिंदुस्थानांतील उंसाची लागवड

| वर्ष | एकर (लक्ष) | वर्ष | एकर (लक्ष) |
|---|---|---|---|
| १९३१-३२ | ३०$\frac{३}{४}$ | १९३४-३५ | ३६ |
| १९३२-३३ | ३४$\frac{१}{२}$ | १९३५-३६ | ३६$\frac{३}{४}$ |
| १९३३-३४ | ३४$\frac{१}{२}$ | १९३६-३७ | ४२$\frac{१}{२}$ |

साखरेच्या आजच्या, १९३२-३३ मधील व युद्धपूर्वकालीन बाजारभावाची तुलना केली, तर असें आढळून येईल कीं, गिऱ्हाइकाचें किंमतींत नुकसान झालेलें नाहीं. उलट, त्यास साखर स्वस्त मिळत आहे. साखरेच्या धंद्यानें सुमारे २ हजार शास्त्रीय पदवीधरांस व १० हजार मध्यम वर्गीतील लोकांस काम आणि २ लक्ष कामगार व २० लक्ष शेतकरी ह्यांस मिळकतीचें साधन निर्माण करून दिलें आहे. अंतर्गत स्पर्धेमुळेंच जाव्हा साखरेचा भाव खाली आला अशी वस्तुस्थिति आहे; संरक्षक जकातीचे अभावीं जाव्हा साखर गिऱ्हाइकांस स्वस्त पडली असती, असें म्हणणें चुकीचें आहे.

साखरेच्या वाढत्या उत्पादनाबरोबर तिची आयात कमी होऊं लागली व सरकारचें जकातीपासून मिळणारें उत्पन्न घटूं लागलें. अंतर्गत पट्टीचें उत्पन्न उलट वाढत आहे आणि उत्पन्नावरील कराच्या जमेंतहि सुधारणा होत आहे. जकातीचें उत्पन्न कमी झालें, म्हणून साखरेच्या धंद्यांतील संशो नाकडे, कार्यक्षमतेकडे व संघटनेकडे कानाडोळा करणें योग्य होणार नाहीं. साखरेबरोबर निघणाऱ्या उपपदार्थांचा फायदेशीर उपयोग करणें, उंसाच्या दर्जामध्यें सुधारणा घडवून आणणें, उंसाचें पीक कमी किंमतींत कसें काढतां येईल, ह्या विषयीं संशोधन करणें, इत्यादि मार्गांनीं ह्या धंद्यास सरकार सहाय करूं शकेल. अंतर्गत स्पर्धा बंद करून व साखरेच्या पुरवठ्याबाबत वहातुक-खर्च वांचेल अशा विक्रीच्या योजना आखून साखरेचा धंदा सुधारण्यांत आला पाहिजे. साखरेच्या उत्पादनांत सुधारणा करण्यास जागा आहे आणि फाजील उत्पादनास परदेशांत, विशेषतः ग्रेटब्रिटनमध्यें, बाजारपेठ मिळवून देण्यास सरकारनें मदत देतां येण्याजोगी आहे. साखरेचें हिंदुस्थानांत उत्पादन किती झपाट्यानें वाढत आहे, हें खालील कोष्टकावरून समजून येईल:—

हिंदी साखरेचें वाढतें उत्पादन

| वर्ष | उत्पादन (लक्ष टन) | वर्ष | उत्पादन (लक्ष टन) |
|---|---|---|---|
| १९३१-३२ | ४$\frac{३}{४}$ | १९३४-३५ | ७$\frac{३}{४}$ |
| १९३२-३३ | ६$\frac{३}{४}$ | १९३५-३६ | १०$\frac{१}{२}$ |
| १९३३-३४ | ७ | १९३६-३७ | ११$\frac{१}{२}$ (अंदाज) |

साखरेच्या उत्पादनाचे खर्चांत बचत झाली, तरच तिची निर्गत होणें शक्य होईल. उंसाच्या लागवडींत काटकसर करतां येण्यावर हें अवलंबून आहे. उंसाचें दर एकरीं उत्पादन वाढवून, त्याचा दर्जा सुधारून पुनः त्याच्या उत्पादनाची किंमत कमी व्हावी, ह्या दिशेनें संशोधन चालविलें पाहिजे.

( श्री. एम. पी. गांधी ह्यांच्या लेखावरून )

## मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूट

### १९३५-३६ मधील कामगिरीचा आढावा

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटची १८ वी वार्षिक सभा मुंबई येथें ता. २० डिसेंबर रोजीं भरली होती. त्यावेळीं इन्स्टिटयूटचा ३० जून १९३६ अखेरचा अहवाल व हिशेब मंजूर करण्यांत आले. चालू वर्षाकरितां श्री. भास्करराव जाधव व दिवाण बहादूर सी. एम. गांधी ह्यांची अनुक्रमें अध्यक्ष व उपाध्यक्ष ह्यांचे जागीं एकमतानें फेरनिवडणूक झाली. प्रांतिक सहकारी कौन्सिलवर सहा सभासद नेमण्यांत आले व हिशेब तपासनिसांची नेमणूक केली गेली.

सिंध प्रांत विभक्त झाल्यानें, प्रांतिक इन्स्टिटयूटचा व सिंधमधील शाखेचा आणि सोसायट्यांचा संबंध नष्ट झाला. सिंधमधील शाखेचें त्या प्रांताच्या स्वतंत्र इन्स्टिटयूटमध्यें आतां रूपांतर झालें आहे. मुंबई प्रांतिक इन्स्टिटयूटच्या सभासदांचे संख्येंत बरीच घट झाली आहे. सालअखेर ४,४९० सोसायट्या व ७९० व्यक्ती मिळून ५,२८० नांवें सभासदपटावर होतीं.

इन्स्टिटयूटची, तिच्या इमारत विषयींची आर्थिक परिस्थिति ज्यास्तच बिघडली आणि इमारतीच्या हिशेबांत सुमारें ५ हजारांची तूट आली. इमारत कर्जाचा बोजा १,४७,००० रुपये राहिला आहे. इन्स्टिटयूटची स्वतःची इमारत असूनहि, तिच्या पायीं संस्थेचें नकसान होत आहे, ही परिस्थिति लवकर सुधारणें आवश्यक आहे. तथापि, एकंदर सर्वसामान्य आर्थिक परिस्थिति सुधारल्याखेरीज इमारतखात्याची तूट कमी होईल, असें वाटत नाहीं. इन्स्टिटयूटला सरकारकडून २५ हजार रुपयांची ग्रँट मिळाली. १९३४-३५ हें वर्ष १५ महिन्यांचें होतें, त्याबद्दल जादा ५ हजारांची इन्स्टिटयूटची मागणी सरकारनें मान्य केली नाहीं.

इन्स्टिटयूटच्या अहवालामध्यें तिच्या शाखांच्या कार्याची माहिती विस्तारानें देण्यांत आली आहे. सेंट्रल एज्युकेशन बोर्डाचा अहवाल स्वतंत्र परिशिष्टांत दिला आहे, त्यावरून इन्स्टिटयूटच्या सहकारी शिक्षणाच्या शाळा व तिचीं इंग्रजी व इतर भाषांतील मुखपत्रें ह्यांच्या कार्याची कल्पना येते. एकंदरीनें आपलें देखरेखीचें, प्रचाराचें व शिक्षणाचें काम इन्स्टिटयूटनें प्रतिकूल परिस्थितींतहि मोठ्या चिकाटीनें चालू ठेवलें असल्याचें दिसून येतें.

### ग्रेटब्रिटनमध्यें सैनिकांचा तुटवडा—सक्तीची आवश्यकता!

लॉर्डांच्या सभेंत भाषण करतांना लॉर्ड स्टॅनहोप म्हणाले:—

"१९३६-३७ मध्यें ब्रिटिश सैन्यामध्यें ३५,३०० उमेदवारांची भरती करावयाची आहे. परंतु वर्षअखेर २१,५०० पेक्षां ज्यास्त उमेदवार येतील, असें वाटत नाहीं. सैनिकाचा पेशा स्वीकारणें नागरिकांच्या सुखीवर ठेवण्याची सध्याची पद्धत फार काळ टिकणें कठिण आहे. तरुण लोकांना सैन्यांत आकर्षावयाचें असल्यास सैनिकाचा पेशा त्यांस आवडेल ह्या दृष्टीनें सुधारणा केल्या पाहिजेत व समाजांत त्यांचा दर्जा वाढेल, अशी व्यवस्था केली पाहिजे."

किंमत ओव्हरकोट खरेदी करा
रु. १२॥ बुधवार चौक, पुणें

## हिंदी बँकिंगचा आढावा

### निर्गत वाढविल्याखेरीज गत्यंतर नाहीं

[ गेल्या वर्षांतील हिंदी बँकिंगचा आढावा 'स्टेटिस्ट' पत्रानें घेतला आहे, त्याचा सारांश येथें देत आहों. ]

सबंध वर्षभर व्याजाचा दर अत्यंत अल्प राहिला. निर्गतीच्या मोसमांत बँक रेट ३ टक्केच कायम होता. सोन्याची निर्गत जरा कमी प्रमाणांत परंतु सारखी चालू होती व त्यामुळें हुंडणावळीची मजबुती टिकून राहिली. चांदीची निर्गत डिसेंबर, १९३५ अखेर चालली होती, ती अमेरिकेंतील भाव उतरल्यानें थांबली व नंतर तिची हिंदुस्थानांत आयात सुरू झाली. हिंदुस्थानांत चलनाचें नियंत्रण करून रुपयाची इतर देशांच्या नाण्यांतील किंमत कायम राखण्याचें काम बजावण्यांत रिझर्व्ह बँकेस कांहीच अडचण भासली नाहीं.

एप्रिल १९३५ मध्यें रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली. तथापि आपला डिस्कौंटचा दर जाहीर करण्यास तिनें त्या वर्षाच्या जुलै मध्यें सुरुवात केली. नोव्हेंबर २८ रोजीं हा दर ३½ टक्क्यांचा ३ टक्के करण्यांत आला व अद्याप तो कायम आहे. आपली सर्व रोख शिलक रिझर्व्ह बँकेकडे ठेवून इंपीरिअल बँकेनें इतर बँकांस उदाहरण घालून दिलें. त्या दोन्ही बँकांचे व्यवहार सलोख्यानें चालू आहेत.

रिझर्व्ह बँकेकडील ठेवी वाढल्या आहेत व कर्जें कमी झालीं आहेत. सोन्याच्या अखंड निर्गतीमुळें व विक्रीमुळें जमा झालेला पैसा शहरांतील बँकांकडे येतो व त्याचा परिणाम रिझर्व्ह बँकांच्या देणें-घेणें पत्रकावर झालेला दिसतो. शेतीच्या मालाचे पडलेले बाजारभाव आणि शेतकऱ्यांस कर्जें देतांना सावकारांनीं आखडलेला हात, ह्या दोन कारणांमुळें बँकांमार्फत दिल्या जाणाऱ्या कर्जांत घट झाली आणि सावकारांस बँकेकडून रकमा उचलण्याचें कारणच उरलें नाहीं.

सरकारनें उभारलेलीं कर्जें व केलेली परतफेड ह्यांमुळें पैशाचे बाजारास तेजी अगर मंदी येत असते. अहवालाचे सालीं, कर्जें व परतफेड ह्यांची रमारमी झाली. ऑगस्ट १९३५ मध्यें रिझर्व्ह बँकेनें ३ टक्के दराचें १५ कोटींचें कर्ज उभारलें. ३७ कोटींचीं कर्जें परत द्यावयाचीं होतीं, त्यांपैकीं कांहीं वरील नव्या कर्जांत वर्ग झालीं व उरलेल्यांच्या परतफेडीसाठी ट्रेझरी बिलांच्या सहाय्यानें तात्पुरत्या रकमा उभ्या करण्यांत आल्या. ट्रेझरी बिलांवरील व्याजाचा दर उतरत आला असून, सध्या तो शेकडा १२ आण्यांच्या आसपास आहे.

एप्रिल, १९३५ पासून आतांपर्यंत, ग्रेटब्रिटनमधील कर्जांपैकीं सुमारें ४५ कोटींची फेड हिंदुस्थान सरकारनें केली आहे व १३ कोटींचें कर्ज उभारलें आहे. सुवर्णाधिष्ठित देशांनीं सुवर्णचलनाचा त्याग केल्यापासून, रुपयाची किंमत कमी करण्याच्या प्रश्नास चालना मिळाली; परंतु, १ रु.=१ शि. ६ पे. हा दर कायम ठेवण्याचा निश्चय सरकारनें जाहीर केला. हुंडणावळ मजबूत राखण्यास जरूर तीं साधनें रिझर्व्ह बँकेजवळ आहेत; तथापि, हिंदुस्थानास आपलें परराष्ट्रीय देणें भागवितां येईल एवढ्या रकमेनें, म्हणजे सुमारें ६० कोटींनीं, आयातीपेक्षां निर्गत जास्त झाल्याखेरीज, हुंडणावळीचा प्रश्न कायमचा सुटणार नाहीं. सोन्याची निर्गत थांबल्यास अगर चांदीची आयात वाढल्यास तात्काळ कठिण परिस्थिति निर्माण होईल.

व्याजाच्या प्रचलित हलक्या दराचा फायदा घेण्यांत येऊन, अहवालाचे सालीं कित्येक नवीन कंपन्यांची व कारखान्यांची स्थापना झाली. सरकारी रोख्यांची किंमत कळसास पोहोचली आणि बँकांना आपल्या ठेवींवरील दर पुनः उतरावे लागले. "कॉल मनी"चा दर सरासरीनें शेकडा चार आणे होता व दोन टक्के दरानें बँकांकडून कर्जें सर्रास मिळत असत. शेतकऱ्यांच्या परिस्थितींत मात्र सुधारणा झालेली दिसत नाहीं. शेतीच्या मालाची किंमत, पौंड स्टर्लिंगच्या हिशेबानें, १९२९ च्या मानानें फक्त शेकडा ६५ इतकीच राहिली.

शेतीच्या धंद्याशी रिझर्व्ह बँकेचे व्यवहार कसे जोडतां येतील, ह्यासंबंधीं चौकशी करून सूचना करण्यासाठीं मि. डार्लिंग ह्यांची नेमणूक झाली, त्यास दोन वर्षें लोटून गेलीं. मि. डार्लिंग ह्यांचा अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला नाहीं. तथापि, सहकारी चळवळीच्या सध्याच्या परिस्थितीमध्यें रिझर्व्ह बँकेस शेतकऱ्यांकरितां विशेष कांहीं करतां येईल, असें दिसत नाहीं.

प्रांतिक सहकारी बँकांस त्यांच्या हुंड्या वटविण्यासंबंधांतील दिलेल्या सवलती देण्यापलीकडे रिझर्व्ह बँकेस जातां येणार नाहीं. प्रांतिक सरकारें शेतकऱ्यांच्या संरक्षणार्थ बरेच प्रयत्न करीत आहेत व शेतीचीं कर्जें कमी करून हलक्या दरानें नवीन कर्जें देण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. जरूरीइतकेंच कर्ज काढून वक्तशीर फेड करण्यास व पुनः कर्जांत न पडण्यास शेतकऱ्यांस शिकवणें, हाच त्यांच्या उद्धाराचा खरा मार्ग आहे.

## हिंदी साखरेचा धंदा म्हणजे संरक्षक जकातीचा विजय होय !

### ह्यापुढील काय—संशोधन व संघटन

हिंदी साखरेच्या धंद्यास देण्यांत आलेल्या संरक्षणाची मुदत ता. ३१ मार्च १९३८ रोजीं संपते. त्यानंतर पुनः ह्या धंद्यास किती संरक्षण देण्यांत यावें, ह्यासंबंधीं चौकशी करून अहवाल सादर करण्याकरितां एका टारिफ बोर्डाची नेमणूक लवकरच केली जाईल अशी अपेक्षा आहे. गेल्या पांच वर्षांत हिंदी साखरेच्या धंद्यानें उत्कृष्ट प्रगति केली असून वार्षिक १५ कोटींची परदेशी साखरेची आयात जवळ जवळ बंद पाडली आहे. एवढी मोठी रकम आतां परदेशांत जाण्याऐवजी हिंदुस्थानांतच खर्ची पडते व त्याचा फायदा कारखानदार, ऊंस लावणारे शेतकरी, कारखान्यांतील कामगार, वहातुकीचें काम मिळणाऱ्या आगगाड्या, लॉऱ्या व बैलगाड्या ह्या सर्वांसच मिळत आहे. उंसाची लागवड सालोसाल वाढत आहे, ह्याचा अर्थ इतर पिकांपेक्षां उंसाचें पीक

महिंद्रकर ब्रदर्स ह्यांचे
गिरगांव, मुंबई
थंडी-
करतां

शेतकऱ्यांस ज्यास्त सोइस्कर व फायदेशीर वाटतें, असा उघड दिसतो.

हिंदुस्थानांतील उंसाची लागवड

| वर्ष | एकर (लक्ष) | वर्ष | एकर (लक्ष) |
|---|---|---|---|
| १९३१–३२ | ३०$\frac{३}{४}$ | १९३४–३५ | ३६ |
| १९३२–३३ | ३४$\frac{१}{२}$ | १९३५–३६ | ३६$\frac{३}{४}$ |
| १९३३–३४ | ३४$\frac{१}{२}$ | १९३६–३७ | ४२$\frac{१}{४}$ |

साखरेच्या आजच्या, १९३२–३३ मधील व युद्धपूर्वकालीन बाजारभावाची तुलना केली, तर असें आढळून येईल कीं, गिऱ्हाइकाचें किंमतींत नुकसान झालेलें नाहीं. उलट, त्यास साखर स्वस्त मिळत आहे. साखरेच्या धंद्यानें सुमारें २ हजार शास्त्रीय पदवीधरांस व १० हजार मध्यम वर्गांतील लोकांस काम आणि २ लक्ष कामगार व २० लक्ष शेतकरी ह्यांस मिळकतीचें साधन निर्माण करून दिलें आहे. अंतर्गत स्पर्धेमुळेंच जाव्हा साखरेचा भाव खाली आला अशी वस्तुस्थिति आहे; संरक्षक जकातीचे अभावीं जाव्हा साखर गिऱ्हाइकांस स्वस्त पडली असती, असें म्हणणें चुकीचें आहे.

साखरेच्या वाढत्या उत्पादनाबरोबर तिची आयात कमी होऊं लागली व सरकारचें जकातीपासून मिळणारें उत्पन्न घटूं लागलें. अंतर्गत पट्टीचें उत्पन्न उलट वाढत आहे आणि उत्पन्नावरील कराच्या जमेंतहि सुधारणा होत आहे. जकातीचें उत्पन्न कमी झालें, म्हणून साखरेच्या धंद्यांतील संशोधनाकडे, कार्यक्षमतेकडे व संघटनेकडे कानाडोळा करणें योग्य होणार नाहीं. साखरेबरोबर निघणाऱ्या उपपदार्थांचा फायदेशीर उपयोग करणें, उंसाच्या दर्जामध्यें सुधारणा घडवून आणणें, उंसाचें पीक कमी किंमतींत कसें काढतां येईल, ह्या विषयीं संशोधन करणें, इत्यादि मार्गांनीं ह्या धंद्यास सरकार सहाय करूं शकेल. अंतर्गत स्पर्धा बंद करून व साखरेच्या पुरवठ्याबाबत वहातुक-खर्च वांचेल अशा विक्रीच्या योजना आखून साखरेचा धंदा सुधारण्यांत आला पाहिजे. साखरेच्या उत्पादनांत सुधारणा करण्यास जागा आहे आणि फाजील उत्पादनास परदेशांत, विशेषतः ग्रेटब्रिटनमध्यें, बाजारपेठ मिळवून देण्यास सरकारनें मदत देतां येण्याजोगी आहे. साखरेचें हिंदुस्थानांत उत्पादन किती झपाट्यानें वाढत आहे, हें खालील कोष्टकावरून समजून येईल:—

हिंदी साखरेचें वाढतें उत्पादन

| वर्ष | उत्पादन (लक्ष टन) | वर्ष | उत्पादन (लक्ष टन) |
|---|---|---|---|
| १९३१–३२ | ४$\frac{३}{४}$ | १९३४–३५ | ७$\frac{१}{२}$ |
| १९३२–३३ | ६$\frac{३}{४}$ | १९३५–३६ | १०$\frac{१}{२}$ |
| १९३३–३४ | ७ | १९३६–३७ | ११$\frac{१}{४}$(अंदाज) |

साखरेच्या उत्पादनाचे खर्चांत बचत झाली, तरच तिची निर्गत होणें शक्य होईल. उंसाच्या लागवडींत काटकसर करतां येण्यावर हें अवलंबून आहे. उंसाचें दर एकरीं उत्पादन वाढवून, त्याचा दर्जा सुधारून पुनः त्याच्या उत्पादनाची किंमत कमी व्हावी, ह्या दिशेनें संशोधन चालविलें पाहिजे.

( श्री. एम. पी. गांधी ह्यांच्या लेखावरून )

## मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट

### १९३५–३६ मधील कामगिरीचा आढावा

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटची १८ वी वार्षिक सभा मुंबई येथें ता. २० डिसेंबर रोजीं भरली होती. त्यावेळीं इन्स्टिट्यूटचा ३० जून १९३६ अखेरचा अहवाल व हिशेब मंजूर करण्यांत आले. चालू वर्षाकरितां श्री. भास्करराव जाधव व दिवाण बहादूर सी. एम. गांधी ह्यांची अनुक्रमें अध्यक्ष व उपाध्यक्ष ह्यांचे जागीं एकमतानें फेरनिवडणूक झाली. प्रांतिक सहकारी कौन्सिलवर सहा सभासद नेमण्यांत आले व हिशेब तपासनिसांची नेमणूक केली गेली.

सिंध प्रांत विभक्त झाल्यानें, प्रांतिक इन्स्टिट्यूटच्या व सिंधमधील शाखेचा आणि सोसायट्यांचा संबंध नष्ट झाला. सिंधमधील शाखेचें त्या प्रांताच्या स्वतंत्र इन्स्टिट्यूटमध्यें आतां रूपांतर झालें आहे. मुंबई प्रांतिक इन्स्टिट्यूटच्या सभासदांचे संख्येंत बरीच घट झाली आहे. सालअखेर ४,४९० सोसायट्या व ७९० व्यक्ती मिळून ५,२८० नांवें सभासदपटावर होतीं.

इन्स्टिट्यूटची, तिच्या इमारत विषयींची आर्थिक परिस्थिति ज्यास्तच बिघडली आणि इमारतीच्या हिशेबांत सुमारें ५ हजारांची तूट आली. इमारत कर्जाचा बोजा १,४७,००० रुपये राहिला आहे. इन्स्टिट्यूटची स्वतःची इमारत असूनहि, तिच्या पायीं संस्थेचें नकसान होत आहे, ही परिस्थिति लवकर सुधारणें आवश्यक आहे. तथापि, एकंदर सर्वसामान्य आर्थिक परिस्थिति सुधारल्याखेरीज इमारतखात्याची चूट कमी होईल, असें वाटत नाहीं. इन्स्टिट्यूटला सरकारकडून २५ हजार रुपयांची ग्रँट मिळाली. १९३४–३५ हें वर्ष १५ महिन्यांचें होतें, त्याबद्दल जादा ५ हजारांची इन्स्टिट्यूटची मागणी सरकारनें मान्य केली नाहीं.

इन्स्टिट्यूटच्या अहवालामध्यें तिच्या शाखांच्या कार्याची माहिती विस्तारानें देण्यांत आली आहे. सेंट्रल एज्युकेशन बोर्डाचा अहवाल स्वतंत्र परिशिष्टांत दिला आहे, त्यावरून इन्स्टिट्यूटच्या सहकारी शिक्षणाच्या शाळा व तिचीं इंग्रजी व इतर भाषांतील मुखपत्रें ह्यांच्या कार्याची कल्पना येते. एकंदरीनें आपलें देखरेखीचें, प्रचाराचें व शिक्षणाचें काम इन्स्टिट्यूटनें प्रतिकूल परिस्थितींतहि मोठ्या चिकाटीनें चालू ठेवलें असल्याचें दिसून येतें.

### ग्रेटब्रिटनमध्यें सैनिकांचा तुटवडा—सक्तीची आवश्यकता !

लॉर्डांच्या सभेंत भाषण करतांना लॉर्ड स्टॅनहोप म्हणाले:—

"१९३६–३७ मध्यें ब्रिटिश सैन्यामध्यें ३५,३०० उमेदवारांची भरती करावयाची आहे. परंतु वर्षअखेर २१,५०० पेक्षां ज्यास्त उमेदवार येतील, असें वाटत नाहीं. सैनिकाचा पेशा स्वीकारणें नागरिकांच्या खुषीवर ठेवण्याची सध्याची पद्धत फार काळ टिकणें कठिण आहे. तरुण लोकांना सैन्यांत आकर्षावयाचें असल्यास सैनिकाचा पेशा त्यांस आवडेल ह्या दृष्टीनें सुधारणा केल्या पाहिजेत व समाजांत त्यांचा दर्जा वाढेल, अशी व्यवस्था केली पाहिजे."

ओव्हरकोट खरेदी करा

किंमत रु. १२॥

बुधवार चौक, पुणें

## जगांतल्या आर्थिक व सामाजिक घडामोडी

### निःपक्षपाती विचारसरणीची आवश्यकता

( ६ )

आर्थिक व्यवहारांची व्यवस्था मध्यवर्ती सत्तेस करतां येते आणि शेती, उद्योगधंदे व व्यापार ह्यांमध्यें व्यक्तींच्या इच्छेचे जागीं सर्वाधिकाऱ्यांच्या योजना प्रस्थापित करतां येतात, ही गोष्ट मात्र बोल्शेव्हिकांचे प्रयोगानें सिद्ध झाली आहे असें म्हणतां येईल. मानवी संस्कृति व समाजाची प्रगति ह्यांच्या दृष्टीनें सदरहु एकसूत्री व एकछत्री घटना कितीशी श्रेयस्कर ठरेल, हा प्रश्न निराळा. राशियामध्यें भौतिक प्रगति झपाट्यानें झाली आहे आणि जनतेस वाढत्या सुखसोयींचा पुरवठा त्वरित गतीनें होत आहे ह्यांत शंका नाहीं. शिक्षण, आरोग्य, औषधालयांची तरतूद, इत्यादि बाबतींत रशिया इतका मागसलेला होता कीं पश्चिम युरोपांतील राष्ट्रांच्या बरोबरीनें त्यांतील जनतेस प्रगतिपथावर आणून सोडण्याची बोल्शेव्हिकांची कामगिरी स्तुत्य व भूषणावहच समजली पाहिजे. त्यांनीं घडवून आणलेल्या राजकीय क्रांतीमुळेंच ही भौतिक प्रगति इतक्या थोड्या अवधींत शक्य झाल्याकारणानें समाजसत्तात्मक रशियन घटना सामान्य जनतेस प्रिय वाटणें स्वाभाविक आहे. परंतु भौतिक प्रगतीचीं अनेक सुखें क्रांतीवांचून अन्य मार्गांनीं उपभोगतां येण्याची व्यवस्था इतर राष्ट्रांत अगोदरच आहे. ह्यामुळें समाजक्रांतीची आवश्यकता तेथील जनतेस भासण्याचें कारण नाहीं. सामान्य लोकांची भौतिक उन्नति घडवून आणण्यास रशियन पद्धतीची क्रांति अपरिहार्य किंवा अगत्याची आहे असें रशियाच्या अलीकडच्या इतिहासावरून सिद्ध होतें असें म्हणतां येत नाहीं; आणि म्हणूनच बोल्शेव्हिक रशियाचा आदर्श इतर राष्ट्रांपुढें ठेवतां येत नाहीं.

भांडवलशाहीच्या अमदानींतहि युद्धासारख्या आणीबाणीच्या वेळीं मध्यवर्ती सत्तेच्या हुकुमशाहीचा अनियंत्रित कारभार आर्थिक क्षेत्रांत चालतो. तसल्या प्रसंगीं सरकार सांगेल तेच धंदे व व्यापार व्हावयाचे, सरकार म्हणेल त्याच पदार्थांचें उत्पादन व्हावयाचें आणि तें ठरवील तेच बाजारभाव अमलांत यावयाचे. मागणी-पुरवठ्याचा नियम आणि स्पर्धा ह्यांस राजसत्ता अशा प्रसंगीं वावच ठेवीत नाहीं. कमींत कमी खर्चानें व आयासानें ज्यास्तींत ज्यास्त उत्पादन करावयाचें हा काटकसरीचा हिशेब तेथें चालत नसतो. युद्धकाळची ही अपवादात्मक व्यवस्था रशियामध्यें मामुली झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. संपत्तीचें उत्पादन व वांटणी ह्यांचे बाबतींत मध्यवर्ती सरकारास तेथें अमर्याद सत्ता असून खर्च व कार्यनिष्पत्ति ह्यांच्या परस्पर-संबंधाचा बारकाईचा विचार तेथें होऊं शकत नाहीं आणि ह्यामुळें सामाजिक व आर्थिक व्यवहार काटकसरीनें होतात कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. रशियांत बेकारी नाहीं ह्या गोष्टीकडेहि त्याच दृष्टीनें पहाणें जरूर आहे. मध्यवर्ती सरकार आपल्या कल्पनेप्रमाणें कामें काढतें व चालवतें आणि त्याचप्रमाणें चलनाचा विस्तार करतें. अशा स्थितींत इतर देशांत धंद्यांमध्यें व व्यापारांत चढउतार होतो आणि मंदी चलतीचें रहाटगाडगें फिरत रहातें तसें रशियांत घडत नाहीं. उत्पन्न केलेला माल बाजारांत विकून येणाऱ्या पैशावर शेतकऱ्यांस चरितार्थ चालवावयाचा नसतो. त्यांस पोटापुरतें मिळेल अशी तरतूद केलेली असते आणि त्या वरच्या कमी-ज्यास्त उत्पादनास सरकार जबाबदार असतें. भांडवलशाहींत बेकारांस काम नाहीं तरी पोटास सरकार देतेंच, हें मात्र येथें लक्षांत ठेवलें पाहिजे.

आर्थिक मंदीमुळें इतर देशांत बेकारी पसरली आहे तशी ती रशियांत कां नाहीं हें वरील प्रतिपादनावरून ध्यानांत येईल. भांडवलशाहीच्या राज्यांत आर्थिक मंदीचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नाहीं असें गेल्या पांच-सहा वर्षांच्या जगाच्या इतिहासावरून वाटूं लागलें असून रशियन घटनेंत बेकारी उत्पन्न होत नाहीं असें दिसून आलें आहे. बोल्शेव्हिकांची क्रांति टाळून बेकारीचे दुष्परिणाम उद्भवणार नाहींत अशी व्यवस्था भांडवलशाहीस करतां येणार नाहीं काय ? हा प्रश्न मि. व मिसेस वेब ह्यांचे ग्रंथ वाचून सुचल्याशिवाय रहात नाहीं. सर्वच देशांत व खुद्द ग्रेटब्रिटनमध्येंहि भांडवलशाहीच्या मुळाशी असलेल्या स्पर्धेस व व्यक्ति–स्वातंत्र्यास अलीकडे मुरड घालण्यांत आली असून राज्यकर्ते संपत्तीचें उत्पादन, बाजारभाव, व्यापार इत्यादि आर्थिक व्यवहारांत दिवसानुदिवस अधिक हात घालून त्यांस योग्य वळण लावीत आहेत व बेकार पोशीत आहेत, असा देखावा आज दृष्टीस पडत आहे. अनेक अर्थशास्त्रज्ञ व इतर विचारी लोक ह्यांस भांडवलशाहीचीं वैगुण्यें स्पष्ट दिसतात आणि तीं दूर होण्याविषयीं त्यांचा कटाक्षहि आहे. रशियांत आजमितीस कांहींच चांगलें नाहीं असें म्हणणें हें जसें एकांगी आहे तसेंच रशियाबाहेरची आर्थिक पद्धति सर्वस्वी टाकाऊ आहे असें प्रतिपादणें हेंहि एकपक्षी आहे. भांडवलशाही साफ उधळून लावल्यावांचून समाजाची प्रगति होणार नाहीं आणि रशियन क्रांतीचाच कित्ता सर्वांनीं गिरविला पाहिजे हा सिद्धांत समर्थनीय नाहीं. आपली श्रद्धा व बुद्धि ह्यांस अनुसरून बोल्शेव्हिकांनीं रशियांत विविध प्रकारची क्रांति घडवून आणली आहे आणि त्यांनीं चालविलेल्या विस्तृत प्रमाणावरील प्रयोगाची छाननी अभ्यासू वृत्तीनें व निःपक्षपातीपणानें होणें इष्ट आहे. तो प्रयोग दुसऱ्या राष्ट्रांनीं जशाच्या तसाच उचलावा अशा प्रकारची त्याची यशस्विता सिद्ध झालेली नाहीं. कोणत्याहि क्रांतीमुळें होणारी फलश्रुति आणि त्याकरितां सोसावी लागणारी निरनिराळ्या तऱ्हेची झीज ह्यांचा हिशेब होणें आवश्यक असतें. ‘ दुरून डोंगर साजरे ’ ही म्हण येथें लक्ष्यांत ठेवली पाहिजे. रशियन बॉल्शेव्हिकांनींहि भांडवलशाहींत ज्या ग्राह्य गोष्टी आहेत, त्यांचा निःपक्षपातानें कां विचार करूं नये ? ‘मी म्हणतों व करतों तेंच सत्य व योग्य आहे आणि त्यापेक्षां भिन्न असलेले विचार व कृति त्याज्य आहेत,’ ही आग्रही मनोवृत्ति, ज्यांवर कोट्यवधि लोकांचें हितानहित अवलंबून आहे अशा महत्त्वाच्या प्रश्नांच्या चर्चेत व निर्णयांत अनिष्टच समजली पाहिजे. जर्मनी व इटली ह्यांसारख्या फॅसिस्ट देशांतहि भांडवलशाहींतला मुलभुत व्यक्तिस्वार्थ व अनियंत्रित स्पर्धा हीं नष्ट झालीं असून समाजसत्तावादाचाच एक विशिष्ट प्रकार रूढ झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स ह्या देशांमध्येंहि परंपरागत भांडवलशाहीस मुरड घातली जात आहे व समाजसत्तावादांतलीं कांहीं तत्त्वें सर्वत्र अंगवळणी पडत आहेत. ह्या रीतीच्या उत्क्रांतीनें इष्ट कार्यभाग होण्यासारखा आहे तर विध्वंसक क्रांतीची भाषा कशास पाहिजे ? ही कल्पना विचारवंतांच्या मनांत येणें स्वाभाविक आहे. रशियांत बोल्शेव्हिकांनीं विस्तृत क्रांति घडवून आणिली म्हणून तिची नक्कल दुसरीकडे उठलीच पाहिजे असें शास्त्र किंवा अनुभव सांगत नाहीं. रशियन क्रांतीची माहिती करून घेऊन तिच्यापासून बोध घेण्यासारखा असेल तर तो सर्वांनीं अवश्य घेतला पाहिजे. दोन विरुद्ध बाजूंचा आंधळेपणा व हटवादीपणा मात्र अनिष्ट व त्याज्य आहे.

( संपूर्ण )

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—६ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८–१४ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | १२०—६ |
| ४% १९६०–७० ... ... | ११५—५ |
| ४% १९४३ ... ... ... | १११–१३ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | १००—६ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०७—८ |
| २¾% १९४८–५२ ... ... | १०१—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११२—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १११–१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षें मुदत) | १११–१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११३—६ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२६—८ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३६–१२ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५—४ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५८०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १४१—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९८—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९१८–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५३—२ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २६७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २६५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ६½% ) | १६००—० |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६१७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९०—६ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७८—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | २३८—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ९४२—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळयास | ३५—¾ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळयास | ५२–१३ |


धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थे-कडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.



दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२

अधिकृत भांडवल : : : १०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल : ५,००,०००
खपलेलें भांडवल : २,०७,७००
रोख भरलेलें भांडवल : १,०३,१९०

दर शेअरची किं. : रु. ५०

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी
टेलरिंग फर्म
**पाटसकर आणि कंपनी**
४८ निहाल पेठ, पुणें शहर.
मॅनेजर:-व्ही. पी. पाटसकर, D.M.T.O.A. (London.)
मुख्य शाखा (कोल्हापूर) अ. ५३
सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व तयार कपड्यांचे व्यापारी
आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

**संजीवन हेअर टॉनिक**
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

**" दुसरें मूल्यमापन जाहीर झालें "**
स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली
पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनी:-
**कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.**
अध्यक्ष-श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी
हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.
जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.
मॅनेजिंग एजन्ट्स.

**" अर्थ " ग्रन्थमाला**
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं. १ रु. ( ट. ख. निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

**दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.**
**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें पदमजी पेपर मिल, मुंबई.**
पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.
सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये !
ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.
तुम्हास कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.
८१५-१६ भवानी पेठ, पुणें. अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गानिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अथ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख ३० डिसेंबर, १९३६. अंक ५२

## एशियन पॉलिसी

म्हणजेच

आयुर्विम्याच्या निरनिराळ्या सर्वांस सोयीस्कर योजना.

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं एजंट नेमावयाचे आहेत

धी एशियन अॅशुरन्स कंपनी, लिमिटेड
एशियन बिल्डिंग : मुंबई नं. १

## K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

## संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

## डेक्कन गोल्ड फ्लेक

गो ल्ड फ्ले क

गिऱ्हाईकांच्या आवडीनिवडीचा पूर्ण विचार करून अनुभवी तज्ज्ञांच्या देखरेखीखालीं तयार केलेली ही सिगारेट फार लोकप्रिय झाली असल्यास नवल नाहीं.

*Apply for Agencies—*

**Deccan Tobacco Works,**
**Poona 4**
Tel. Address—'CIGARETTES' POONA.

## दी प्रॉव्हिन्शिअल बँक ऑफ इंडिया लि.

हेड ऑफिस, बेंगलोर.

पुणें शाखाः महंमद बिल्डिंग, लक्ष्मीरोड, पुणें शहर.

बिनव्याजी एक हजार रुपयांपर्यंत पैसे मिळविण्याची कायदेशीर अपूर्व योजना म्हणजेच 'चिटफंड' स्कीम.

वरील योजनेबाबत सर्व व्यवहार खास बँकेमार्फत होत असल्यानें मध्यम वर्गाची व छोट्या व्यापाऱ्यांची विशेष सोय झाली आहे. चौकशीकरितां लिहा अगर भेटा.

बँकेंत खालील व्यवहारही केला जातो.

चालू, सेव्हिंग्ज व मुदत ठेवी स्वीकारल्या जातात. व्याज अनुक्रमें २%, ३%, ४% ते ६%

पांच वर्षें मुदतीचीं किफायतशीर कॅशसर्टीफिकिटें मिळतात.

सोनें, चांदी, शेअर्स, इन्शुअरन्स पॉलिसी, घर व इतर मालावर कर्जाऊ रकमा दिल्या जातात.

एजंट,
शाखा—लक्ष्मीरोड, पुणें शहर.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्स:-ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्स:-

१ केळकर ब्रदर्स, बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी, लक्ष्मीरोड.

# विविध माहिती

### सरकारी कचेऱ्यांतील कामाचे तास

मुंबई शहरांतील सरकारी कचेऱ्यांच्या कामाचे तास टॉमस कमिटीच्या शिफारसींस अनुसरून ६½ चे ७½ करण्यांत आले होते, ते आतां कमी होऊन ६¾ करण्यांत आले आहेत. १०-४५ ते ५-३० अशी हल्ली कामाची वेळ आहे.

### परदेशांतून ग्रेटब्रिटनमध्यें प्रवाशांचा ओघ

परदेशांतून ग्रेटब्रिटनमध्यें ज्यास्त ज्यास्त प्रवासी येऊं लागले आहेत. ही आयात १९३० सालीं जेवढी झाली, तेवढी आज-पर्यंत कोणत्याच वर्षी झाली नव्हती. तथापि, चालू वर्षाच्या पहिल्या दहा महिन्यांतच हें रेकॉर्ड मोडलें आहे; कारण ऑक्टो-बर अखेर, १९३० सालापेक्षां २१० जास्त प्रवासी ग्रेटब्रिटन-मध्यें आले आहेत.

### बॉम्बे टॉकीज, लि.

वरील सिनेमा कंपनीची दुसरी सर्वसाधारण सभा गेल्या आठ-वड्यांत भरली होती. त्यावेळीं भागीदारांस सादर केलेल्या डाय-रेक्टरांच्या अहवालावरून कंपनीस अहवालाचे वर्षी ८७,७९९ रुपये नुकसान आल्याचें दिसून येतें. ह्यापुढें कंपनीच्या व्यवहा-रांत नफा दिसूं लागेल अशी अपेक्षा अहवालांत व्यक्त करण्यांत आली आहे.

### निजाम स्टेट रेल्वेच्या नफ्यांत वाढ

निजाम स्टेट रेल्वेमध्यें १४ कोटि ७ लक्ष रुपये भांडवल गुंतलेलें आहे. ३१ मार्च १९३५ अखेर संपलेल्या वर्षांत ह्या रेल्वेस ९१ लक्ष रुपये नफा झाला. म्हणजे, भांडवलावर ६.२ टक्के व्याज सुटलें. गेल्या वर्षी ५.८ टक्के व्याज पडलें होतें.

### हिंदुस्थानांत परदेशी खेळण्यांची आयात

नाताळाचे सुमारास लहान मुलांच्या खेळण्यांची मोठी आयात हिंदुस्थानांत होत असते. ह्या व्यवसायांत जपान अग्रेसर असून, ग्रेटब्रिटन व जर्मनी हे देश पाठोपाठ येतात. नोव्हेंबर महिन्यांत हिंदुस्थानामध्यें ४५½ हजारांचीं जपानी खेळणीं आलीं, ग्रेट ब्रिटनमधून २९¾ हजारांचा माल उतरला व जर्मनीनें २०½ हजारांची खेळणीं इकडे पाठविलीं. अमेरिकेच्या वांट्यास फक्त २ हजारांचा व्यापार आला.

### ता. १५ व १७ फेब्रुवारी—सार्वजनिक सुट्ट्या

सोमवार व बुधवार, ता. १५ व १७ फेब्रुवारी, हे दोन दिवस मुंबई प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीनिमित्त सार्वजनिक सुट्टीचे समजले जातील असें सरकारी गॅझिटांत जाहीर झालें आहे.

### बँकांस सुट्टी

गुरुवार व शुक्रवार ता. ३१ डिसेंबर १९३६ व १ जानेवारी १९३७ रोजीं, अनुक्रमें वर्षअखेर आणि वर्षारंभ ह्यानिमित्त बँका बंद रहातील.

### पुण्याची वीज कंपनी भांडवल वाढविणार

दि पूना इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीचें भांडवल २० लाखांचें ३५ लाख करण्यांत यावें व त्याकरितां १०० रुपयांचा एक असे १५,००० ऑर्डिनरी भाग काढण्यांत यावे, हा ठराव पास करण्याकरितां कंपनीची विशेष साधारण सभा मुंबई येथें कंपनीच्या नोंदलेल्या कचेरींत ता. ३१ डिसेंबर रोजीं भरणार आहे. सध्याच्या भागीदारांस नवे भाग मिळण्याचा अग्रहक्क राहील आणि हल्लीच्या भागांच्या हक्कांप्रमाणेंच नवीन भागांस हक्क प्राप्त होतील.

### कॉंपेन्सेशन ब्रोकर्स लि.

हुंडणावळीच्या निर्बंधांमुळें ग्रेटब्रिटन व इतर युरोपियन देश ह्यांमध्यें मालाची आयात-निर्गत होण्यास अडचण पडते. तथापि ऐनजिनसी विनिमय झाल्यास परस्परांच्या येण्यादेण्याची वजावट आपोआपच होते. ह्या पद्धतीनें व्यापार करण्याकरितां वरील कंपनी ग्रेटब्रिटनमध्यें स्थापन झाली आहे व जर्मनीशीं तिचा व्यवहार मोठ्या प्रमाणावर चालेल अशी अपेक्षा आहे.

### शस्त्रास्त्रांचा व्यापार-इंग्लंडचें अग्रेसरत्व

१९३४ मध्यें शस्त्रास्त्रांच्या एकूण जागतिक निर्गतीपैकीं शेकडा २१.१ इतकी निर्गत एकट्या त्सेकोस्लोव्हाकियांतून झाली. ग्रेट ब्रिटननें २०.६ टक्के माल पुरवला. १९२९ पासून शस्त्रास्त्रांचा आंतरराष्ट्रीय व्यापार घटत चालला होता, तथापि शस्त्रसंन्यास परिषदेचा बोजवारा उडाल्यापासून हें पारडें फिरलें आहे.

### पुणें शहरांतील जन्म-मृत्यूंचे आंकडे

पुणें शहरांत १९३५-३६ सालीं एकूण ५,९५७ जन्म व ५,६२६ मृत्यू नोंदले गेले. जननाचें व मृत्यूचें दर हजार वस्तीशीं प्रमाण अनुक्रमें ३५.५९ व ३४.४४ असें पडलें.

### अमेरिकेंतील धनाढ्य लोक

दरसाल पाव कोटि रुपयांपेक्षा ज्यास्त मिळकत असणारे असे अमेरिकेंत १९३४ सालीं ३३ श्रीमान गृहस्थ होते. न्यूयॉर्क संस्थानांतील एका नागरिकाची वार्षिक प्राप्ति सवा कोटीपेक्षां ज्यास्त होती.

## अनुक्रमणिका


पृष्ठ

१ विविध माहिती ... ६२४
२ धनिक लोकांत त्यागवृत्ति वसली पाहिजे ... ६२५
३ पूर्ववैभव आणि सद्यःस्थिति ... ६२५
४ सिनेमाचे धंद्यास सरकारी सहाय ... ६२६
५ स्फुट विचार ... ६२७
मँचेस्टरचा कापडाचा धंदा-लँकेशायर आणि हिंदुस्थान-हिंदी रेल्वेजच्या प्रश्नाची पुनः चर्चा--मध्यम वर्गांतील बेकारी व मुंबई सरकारची योजना-डेक्कन अॅग्रिकल्चरल असोसिएशन, पुणें-रंगित सिमेंटचे प्रात्यक्षिक-सत्तेचें खरें केंन्द्रस्थान
६ सुखाचें मरण ... ६२९
७ फंड जमविण्याची नावीन्यपूर्ण तऱ्हा ... ६३०
८ रेलवेजचे वहातुकीचे दर आणि स्वदेशी धंदे ... ६३१
९ स्वदेशीविषयीं तीव्र भावना ... ६३१
१० हिंदुस्थानांतील सहकारी चळवळींची प्रगति ... ६३२
११ परराष्ट्रीय प्रवासी आकर्षण्यांत फायदा ... ३६२
१२ सुशिक्षितांमधील बेकारीचें निवारण ... ६३३
१३ निवडक बाजारभाव ६३३



# अर्थ

बुधवार, ता. ३० डिसेंबर, १९३६


## धनिक लोकांत त्यागवृत्ति वसली पाहिजे

रघुकुलांतील राजांचें वर्णन करतांना कालिदासानें आपल्या रघुवंशांत ते पुरुष आपल्या संपत्तीचा उपयोग दानधर्माकडे करणारे ( त्यागाय संभृतार्थानाम् ) होते असें म्हटलें आहे. संपत्तीचें सार्थक श्रीमान लोकांनीं तिचा विनियोग गोरगरीबांस सहाय देण्यांत करण्यामध्यें आहे असें दर्शवण्याचा हेतु त्यांत स्पष्ट आहे. धनिकांचें धनार्जन केवळ स्वसुखाकरतां असतां कामा नये आणि त्यांचेवर समाजाच्या सुस्थितीची जबाबदारी असते, हें सनातन सत्य सर्वमान्य असून सुसंस्कृतीस अनुसरून आहे. संपत्ती व तिच्या अनुषंगानें येणारा अधिकार ह्यांचा बेमुर्वतपणानें अंमल करणारांचें स्वार्थी वर्तन अभ्युदयकारी समाजघटना व समाजाचें सामुदायिक हित ह्यांच्याशीं सुसंगत असत नाहीं. आधुनिक यांत्रिक युगांत स्वार्थी व्यक्तित्वास विशेष जोर आला असल्यानें समाजामधील निरनिराळ्या घटकांत विरोध उत्पन्न झाला आहे आणि त्यास वर्गकलहाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. मालक विरुद्ध कामकरी आणि भांडवलशाही विरुद्ध समाजसत्तावाद हा तंटाहि त्या कलहाचेंच लक्षण आहे. अनियंत्रित स्पर्धा आणि वैयक्तिक स्वार्थसाधन ह्यांचे दुष्परिणाम अर्थशास्त्रज्ञांस अवगत असून संपत्तीच्या समाजांतील विषम विभागणीस आळा बसावा म्हणून श्रीमंतांच्या प्राप्तीवर अधिक दरानें सरकारनें कर लादण्याच्या तत्त्वास त्यांची पूर्ण संमति आहे.

श्रीमंत लोकांनीं समाजहितासंबंधाची जबाबदारी आपणांवर आहे ही जाणीव ठेवून आपल्या संपत्तीचा उपयोग केल्यास सध्या चोहोंकडे माजलेली अस्वस्थता व असंतोष ह्यांस पुष्कळ आळा बसेल. समाजांतील प्रत्येक व्यक्तीस जगण्याचा व सुखानें नांदण्याचा हक्क आहे ही मागणी वरील जाणिवेनें पुरी पाडतां येणें शक्य असून कर्तव्य, अधिकार आणि न्याय्य हक्क ह्यांचा मेळ बसवतां येईल, हें तत्त्व आतां चोहोंकडे मान्यता पावत आहे आणि भांडवलशाहीसहि त्याच्या अनुरोधानें कळत व नकळत मुरड बसत चालली आहे. रशिया, जर्मनी, इटली, फ्रान्स, ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्या भिन्नघटनेच्या राष्ट्रांत ही उत्क्रांतिक्रमी-अधिक प्रमाणांत झाली आहे किंवा होत आहे. श्रीमंतांनीं गरीबांच्या आणि कारखानदारांनीं कामकऱ्यांच्या सुखसोयींची तरतूद करणें हें ह्या प्रवृत्तीचें ठळक लक्षण आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. हिंदी संस्कृतीमध्यें वरील तत्त्व मूलभूत आहे आणि महात्मा गांधींची शिकवण त्यास धरून आहे. पाश्चात्य राष्ट्रांमध्यें सरकारांनीं ह्याबाबतींत केलेल्या उपक्रमाचा उल्लेख वर केला आहे आणि तिकडील कारखानदारांनीं व श्रीमान व्यक्तींनीं सामान्य जनतेच्या हितासाठी कोट्यवधि रुपये खर्चून केलेल्या व्यवस्थेचीं उदाहरणें प्रसिद्ध आहेत. अलीकडच्या काळांतील दानशूर हिंदी धनिकांचीं नांवें सर्वश्रुत असून प्रत्यक्ष मुंबई इलाख्यांत त्यांची संख्या अभिमानास्पद रीतीनें मोठी आहे. त्यांचा नामनिर्देश येथें करण्याची आवश्यकता नाहीं, इतकीं तीं लोकपरिचयाचीं आहेत.

इंग्लंडमधलें, लॉर्ड न्यूफील्ड ह्या दानशूर कारखानदारांचें ताजें उदाहरण येथें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ह्या गृहस्थानें इस्पितळें व वैद्यकाचें संशोधन ह्या प्रीत्यर्थ सुमारें तीन-चार कोटि रुपये दिले असल्याची हकीकत आम्हीं मागें दिली आहे. आतां त्यांनीं आपल्या हुकमतीखालीं असलेल्या नऊ मॉरिस कारखान्यांतील कामकऱ्यांच्याकरितां एक योजना आखून तिच्या अंमलबजावणीस प्रारंभहि केला आहे. ज्यांचें वार्षिक उत्पन्न तेरा हजार रुपयांपेक्षा जास्त नाहीं अशा आपल्या नोकर लोकांच्या वार्धक्यकालाची सोय व्हावी म्हणून त्यांनीं अगोदरच व्यवस्था केली आहे. कारखान्यांत मजूरीनें काम करणारांस रजेच्या दिवसांचा मेहनताना मिळून शिवाय आपल्या कंपन्यांच्या नफ्यांत हिस्सा मिळावा अशी योजना लॉर्ड न्यूफील्ड ह्यांनीं आतां निश्चित केली आहे. मॉरिस मोटार कंपनी लिमिटेडचे सुमारें पावणेतीन कोटि रुपयांचे भाग ते ट्रस्टींच्या स्वाधीन करणार असून त्यांवर दरवर्षी दिल्या जाणाऱ्या डिव्हिडंडचा एक स्वतंत्र फंड निर्माण केला जाईल आणि त्याची वांटणी कारखान्यांत रुजू असलेल्या कामकऱ्यांमध्यें करण्यांत येईल. म्हणजे हे कामकरी मॉरिस कंपनीचे भाग धारण करणारे होतील अशी लॉर्ड न्यूफील्ड ह्यांची विचारसरणी आहे. गेल्या अकरा वर्षांत त्यांनीं लोकोपयोगी कार्यास सात कोटि रुपये दिले आहेत. संपत्तीच्या योग्य उपयोगाचें हें नमुनेदार उदाहरण आहे. "आमचें सुदैव किंवा पराक्रम ह्यांचे योगानें आम्हांस मिळालेल्या संपत्तीवर इतरांचा काय हक्क आहे" असें धनिकांनीं म्हणून चालावयाचें नाहीं. संपत्तीचें उत्पादन किंवा तिचा लाभ ह्यांस समाजाचें सहकार्य व रक्षण ह्यांची आवश्यकता असल्यानें तिच्या उपभोगांत दुसऱ्यांस वांटेकरी करणें हें श्रीमंतांचें कर्तव्य ठरतें आणि त्याची अपेक्षा करण्याचा अधिकार समाजास पोहोंचतो.

## पूर्ववैभव आणि सद्यःस्थिति

### आर्थिक प्रगतीचा मार्ग

साताऱ्याच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या वार्षिक संमेलनाचे प्रसंगीं प्रो. काळे ह्यांनीं केलेल्या अध्यक्षीय भाषणाचा सारांशः—

( १ ) कै. वा. सीतारामपंत देवधर ह्यांनीं ह्या शाळेची स्थापना करून तिचा उत्कर्ष केला, त्यांची ध्येयनिष्ठा, शील व चिकाटी ह्या गुणांचें आजच्या प्रसंगीं स्मरण करणें उचित आहे.

( २ ) त्यांनीं घालून दिलेल्या मार्गानें ह्या शाळेचे मुख्या-

ध्यापक व शिक्षक आपलें कार्य नेटानें व कर्तव्यबुद्धीनें करीत आहेत, ह्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे.

( ३ ) विद्यार्थी व विद्यार्थिनी ह्यांचे संवाद आतांच झाले. त्यांचा कार्यक्रम उत्कृष्ट वठला ह्याबद्दल त्यांचें व शिक्षकांचें कौतुक करणें जरूर आहे.

( ४ ) ड्रिल्स, गाणीं व संवाद ह्यांच्या कार्यक्रमांत, टापटीप, शिस्त, तालबद्धता आणि सामुदायिक एकजीवी कृती ह्यांचें महत्त्व आहे तें तरुण पिढीनें पुढील सांसारिक व सार्वजनिक आयुष्यक्रमांतहि ओळखून त्याप्रमाणें आचरण केल्यास शिक्षणाचें चीज होईल.

( ५ ) सातारा शहर ही मराठेशाहीची राजधानी होती. येथें व सबंध जिल्हाभर जीं पूर्वेतिहासाचीं स्मारकें आहेत, त्यापेक्षां तरुण पिढीस अधिक स्फूर्तिदायक काय असणार ?

( ६ ) येथें राज्यकार्यधुरंधर मुत्सद्दी आणि शूर शिपाई होऊन गेले. त्यांचें वैभव कां नष्ट झालें ह्याचा बारकाईनें विचार करा.

( ७ ) मराठी राज्यांत व्यापार, धंदे व शेती चांगल्या स्थितींत होती आणि लोक उद्योगी होते. आज बेकारी कां माजली आहे ह्याची चौकशी होऊन तिच्यावर उपाययोजना करणें अगत्याचें आहे.

( ८ ) येथें तेच डोंगर, त्याच नद्या, तीच जमीन आहे आणि पूर्वीच्याच मराठ्यांचे वंशज रहात आहेत. मग आज आर्थिक दुःस्थिति कां दिसून येत आहे ?

( ९ ) मुला-मुलींचे आईबाप, पालक व शिक्षक ह्यांनीं ह्या प्रश्नाचा विचार करून सदरहू स्थितीस तोड काढली पाहिजे.

( १० ) सध्याची शिक्षणपद्धति निरुपयोगी असल्यानें बेकारी व दारिद्र्य देशांत माजलें असल्याची हाकाटी चोहोंकडे चालली आहे. विश्वविद्यालयांच्या पदवीदानप्रसंगीं वक्त्यांच्या भाषणांतून हाच सूर निघत आहे.

( ११ ) जगाच्या बदललेल्या परिस्थितींत व्यावहारिक स्वरूपाचें शिक्षण आमच्या देशांत दिलें जाणें अत्यंत आवश्यक झालें आहे. आज ह्या गोष्टींकडे आमचें दुर्लक्ष होत आहे.

( १२ ) सध्याचा काळ उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या प्रसाराचा आहे; त्यांत भाग घेऊन कार्यक्षम नागरिक बनण्याची पात्रता तरुण पिढींत उत्पन्न होईल असें शिक्षण घरांत, शाळांत व समाजांत सर्वत्र देण्यांत आलें पाहिजे.

( १३ ) ह्याबाबतींत पालकांचा बेफिकीरपणा दिसून येतो, तो दूर झाला पाहिजे, आणि शिक्षकांनींहि आपली जबाबदारी ओळखली पाहिजे.

( १४ ) सध्याची तरुण पिढी बिघडली असल्याविषयीं ओरड ऐकूं येते, पण ती खरी आहे असें मला वाटत नाहीं. परिस्थितीचें यथायोग्य ज्ञान करून घेऊन तरुणांस चांगला मार्ग दाखविण्याचें काम वयस्क मंडळींचें व पुढाऱ्यांचें आहे.

( १५ ) वेस्टर्न इंडियासारखी विमा कंपनी भरभराटीस आणून साताऱ्यानें महाराष्ट्रास धडा घालून दिला आहे. त्याच मार्गानें संघटितपणानें आतां आपणांस पुढें जावयाचें आहे.

( १६ ) न्यू इंग्लिश स्कूलमध्यें बौद्धिक व शारीरिक शिक्षणाची व्यवस्था कशी होते हें आपण आतांच श्री. पारसनीस ह्यांचेकडून ऐकलें आहे.

( १७ ) राष्ट्राच्या अभ्युदयास पोषक असें कार्य ह्या संस्थेकडून वाढत्या प्रमाणांत होत रहावें अशी माझी इच्छा आहे.

( १८ ) "अर्थ" पत्राचा संपादक व महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यासक ह्या नात्यानें, आर्थिक प्रश्नांविषयींची आमच्या सुशिक्षित वर्गांत किती अनास्था आहे ह्याचा अनुभव मी प्रत्यहीं घेत आहें. ही मनोवृत्ति बदलल्यावांचून उन्नतीची आशा करणें व्यर्थ आहे.

( १९ ) महाराष्ट्रीय समाजाची दृष्टि अंतर्मुख व व्यावहारिक बनून उद्योगधंदे, शेती व व्यापार ह्यांच्या सुधारणेकडे अधिकाधिक वळेल आणि ह्या कामीं सर्वांचें सहकार्य होईल तर आपला भाग्योदय जवळ येईल असें मला वाटतें.

## सिनेमाचे धंद्यास सरकारी सहाय

### धंदेवाल्यांच्या मागण्या

सिनेमाच्या धंद्यास सरकार कसें सहाय करूं शकेल, ह्याचें विवेचन श्री. चिमणलाल बी. देसाई ह्यांनीं मोशन पिक्चर कन्व्हेन्शनच्या मद्रास येथील अधिवेशनांतील आपल्या अध्यक्षीय भाषणांत केलें. खालील गोष्टींचा त्यांनीं प्रामुख्यानें उल्लेख केला:– ( १ ) सिनेमा धंद्यांतील अडचणींकडे लक्ष पुरविणाऱ्या स्वतंत्र सरकारी खात्याची स्थापना, ( २ ) मोशन पिक्चर सोसायटीस धंद्याची अधिकृत प्रातिनिधिक संस्था म्हणून मान्यता, ( ३ ) सोसायटीच्या सल्ल्यानें सेन्सॉर बोर्डांत दरसाल बदल, ( ४ ) सोसायटीच्या एका प्रतिनिधीस सदरहू बोर्डांत स्थान, ( ५ ) सिनेमाच्या धंद्याच्या सर्व कच्च्या मालावरील आणि यंत्रसामुग्रीवरील जकाती काढून टाकण्याची आवश्यकता, ( ६ ) सदरहू धंद्यास भांडवल पुरवणाऱ्या स्वतंत्र बँकेची स्थापना, ( ७ ) सर्व सरकारी खात्यांनीं ह्या धंद्यास सहाय करावें, असें फर्मान, ( ८ ) परदेशी स्पर्धेविरुद्ध संरक्षणाची योजना, ( ९ ) सिनेमासंबंधीं उच्च दर्जाच्या शास्त्रीय ज्ञानाची तरतूद करण्याची विश्वविद्यालयांस विनंति, ( १० ) कांहीं विशिष्ट प्रमाणांत शैक्षणिक फिल्म्स दाखविण्याची सिनेमागृहांवर सक्ती, ( ११ ) कच्च्या फिल्म्स व यंत्रसामुग्री तयार करणाऱ्या हिंदी उत्पादकांस भांडवलासंबंधीं व अन्य तऱ्हेनें सहाय, ( १२ ) सिनेमा कंपन्यांस शैक्षणिक फिल्म्स तयार करण्याकरितां सरकारी खात्यांकडून सवलत आणि मदत इ.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

झारापकर टेलरिंग कॉलेज

माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २

## स्फुट विचार

### मँचेस्टरचा कापडाचा धंदा

कापूस-सुताच्या ब्रिटिश गिरण्यांमध्यें ४६८ लाख चात्या आहेत, असें अलीकडच्या खानेसुमारीवरून दिसून येतें. व्यापारांतील घटतीमुळें अलीकडे त्यांपैकीं ६२ लक्ष चात्या बंद पडल्या असून बाकीच्याहि कामाच्या सर्व वेळभर चालत नाहींत. ह्या बाबतींत थोडीशी सुधारणा होत असल्याचीं चिन्हें दिसत असलीं तरी चात्यांच्या संख्येंत वाढ होण्याची आशा नाहीं. जगाला कापसाचें सूत व कापड पुरवण्याचा मक्ता एका काळीं लँकेशायरच्या गिरण्यांकडे होता. गेल्या दहा वर्षांत ही स्थिति पालटली आहे. बहुतेक देश हा धंदा स्वतः हस्तगत करीत आहेत. जपानची स्पर्धा तर लँकेशायरच्या गिरण्यांस तीव्रतेनें भासत आहे. हिंदुस्थानचेंहि सुताचें व कापडाचें उत्पादन झपाट्यानें वाढलें आहे. अशा स्थितींत ब्रिटिश गिरण्यांस महायुद्धापूर्वीची भरभराटीची स्थिति प्राप्त होईल अशी आशा करण्यास मुळीच जागा उरलेली नाहीं. सूत व कापड ह्यांच्या व्यापारांत जपानची चढाओढ ग्रेट ब्रिटनला चांगलीच भासत आहे. जगाच्या बाजारपेठांची दोघांमध्यें परस्परांस समाधानकारक अशी वांटणी व्हावी अशी लँकेशायरचे गिरणीवाले व व्यापारी ह्यांची इच्छा आहे. परंतु आपल्या उद्योगधंद्यांस व व्यापारास मर्यादा घालून घेण्यास जपान तयार होईल अशी अपेक्षा करणें फुकट आहे. स्वतःच्या गरजा व परिस्थिति ह्यांस अनुसरून प्रत्येक राष्ट्रानें आपापल्या उद्योगधंद्यांची घडी बसवावी असा सध्याचा काळ आहे. ह्या स्वदेशी तत्त्वाच्या धोरणाच्या पायावरच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापार उभारला जाणें अपरिहार्य आहे ही गोष्ट सर्वांनीं ध्यानांत ठेवली पाहिजे.

---

### लँकेशायर आणि हिंदुस्थान

ब्रिटन व हिंदुस्थान ह्यांच्यामध्यें व्हावयाच्या व्यापारी कराराच्या अटींची चर्चा तूर्त थांबली आहे. ह्या करारांत जपानच्या मानानें ग्रेटब्रिटनला विशेष सवलती हिंदुस्थानाकडून मिळाल्यावांचून लँकेशायरच्या कापडाच्या गिरण्यांस सुस्थिति प्राप्त होणार नाहीं, असें मत इंग्लंडमध्यें व्यक्त करण्यांत येत आहे. लॉइड्स पॅकिंग वेअरहाउस कंपनीचे अध्यक्ष, मि. वॉटकिन, मँचेस्टर येथें अलीकडे केलेल्या आपल्या भाषणांत म्हणाले कीं, हिंदुस्थाननें लँकेशायरला कितीहि सवलती दिल्या तरी प्रत्यक्ष ह्याच देशांत कापडाच्या गिरण्यांचें उत्पादन इतकें वाढलें आहे कीं महायुद्धापूर्वीच्या काळाप्रमाणें ब्रिटिश माल इकडे येऊन खपणें अशक्य आहे. लँकेशायरमधील गिरण्यांची प्रगति होण्यास त्यांस हिंदुस्थानांत जकातीची भली मोठी सवलत, हिंदी गिरण्यांस मिळणाऱ्या संरक्षणास संक्षेप आणि हिंदी जनतेच्या मिळकतींत वाढ ह्या तीन गोष्टी त्यांच्या मतें आवश्यक आहेत. हिंदुस्थान व इंग्लंड ह्यांचे दरम्यान व्हावयाच्या व्यापारी कराराचे बाबतींत ब्रिटिश कारखानदार व व्यापारी ह्यांच्या अपेक्षा कोणत्या प्रकारच्या आहेत, ह्याची कल्पना वरील भाषणावरून सहज येईल. औद्योगिक प्रगतीवांचून हिंदी जनतेचें उत्पन्न वाढणार कसें, हें उत्पन्न आमच्या स्वदेशी गिरण्यांच्या उत्कर्षाशिवाय ज्यास्त होणार कसें आणि संरक्षणावांचून आमच्या गिरण्यांची प्रगति होणार कशी ह्याचा विचार ब्रिटिश कारखानदार करीत नाहींत. ते केवळ स्वहिताच्या आकुंचित दृष्टीनें ह्या प्रश्नाकडे पहातात आणि हिंदुस्थानच्या गरजा व भावना ते विचारांत घेत नाहींत. तथापि, आमच्या सरकारास त्यांचा योग्य परामर्श घेणें आवश्यक आहे.

---

### हिंदी रेल्वेजच्या प्रश्नाची पुनः चर्चा

ह्या वर्षाचे सुरवातीस अंदाजपत्रकांत गृहीत धरलेल्या उत्पन्नापेक्षां रेल्वेजना १½ कोटि रुपये ज्यास्त मिळतील, अशी आतांपर्यंतच्या आकड्यांवरून अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. व्यापारांत होत असलेल्या सुधारणेचेंच हें फळ आहे आणि रेल्वेजचें उत्पन्न ह्यापुढें वाढत जाईल, अशी आशा आहे. हिंदी रेल्वेज फायद्यांत कशा चालतील, ह्यासंबंधीं सरकारनें शक्य ते प्रयत्न चालविले आहेत. तथापि, व्यापारीवर्गाकडून अपेक्षित सहकार्य व सल्ला सरकारास मिळत नाहीं, असें कलकत्ता येथील असोसिएटेड चेंबर्सच्या सभेंतील भाषणांत व्हाइसरॉयांनीं सांगितलें. वहातुकीचे दर वाढविण्याचा सोपा मार्ग फक्त सरकारास दिसतो अशी, चेंबरचे अध्यक्ष, सर एडवर्ड बेंथॉल, ह्यांनीं टीका केली होती, तिला व्हाइसरॉयांनीं उत्तर दिलें. दर उतरविल्यानें वहातुक वाढली, तरी तिला मर्यादा आहे आणि दरांमध्यें २५ टक्के कपात केली तर पूर्वी इतकेंच उत्पन्न मिळण्यास वहातुकींत ३२ टक्के वाढ व्हावी लागते व पूर्वी इतका नफा उरण्यास वहातुक ५० टक्के वाढावी लागते, असा हिशेब व्हाइसरॉयांनीं पुढें मांडला. रेल्वेजच्या बजेटाची तोंडमिळवणी करण्यास उत्पन्न वाढलें पाहिजे आणि खर्च कमी झाला पाहिजे. रेल्वेजच्या खर्चांत बचत होण्यास पुष्कळ जागा आहे, अशी सार्वत्रिक समजुत आहे. रेल्वेज संबंधांतील विशिष्ट गुंगागुंतीचे प्रश्न समजून घेऊन, आपल्या अनुभवानुसारं योग्य ती उपाय-योजना सुचविण्याचें काम सर राल्फ वेजवुड ह्यांचे अध्यक्षतेखाली नेमण्यांत आलेली कमिटी करीलच. ह्या कमिटीकडे व्हाइसरॉयांनीं बोट दाखवून, आपलें म्हणणें तिच्यापुढें मांडा, असा आपल्या दुसऱ्या एका भाषणांत हिंदी व्यापाऱ्यांस उपदेश केला आहे. रेल्वेजची गाडी नफ्याचे रुळावर पुनः आणण्यांत कर भरणाऱ्या सर्वच हिंदी नागरिकांचें हित आहे, हें विसरून चालणार नाहीं. तेव्हां, अंदाजपत्रकाची तोंडमिळवणी झाली तरी इतर मार्गांनीं अप्रत्यक्ष रीतीनें हिंदी प्रजेस रेल्वेजची तूट भरून काढावी लागतां कामा नये. ह्या व्यापक दृष्टीनेंच रेल्वेजच्या प्रश्नाचा निकाल लागला पाहिजे.

---

### मध्यम वर्गांतील बेकारी व मुंबई सरकारची योजना

सुशिक्षित तरुणांमधील बेकारीचा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी सरकारास नाकारतां येत नाहीं, ह्याची कबुली मुंबई सरकारनें आपल्या नव्या योजनेच्या द्वारा दिली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. शेतकऱ्यांचें ऋणविमोचन, ग्रामोद्धार, खेडेगांवी धंद्यांचें पुनरुज्जीवन, इत्यादि मार्गांनीं खेडुतांच्या हिताकडे सरकार लक्ष पुरवूं लागलें आहे. तथापि, मध्यम वर्गांतील तरुणांच्या पोटा-पाण्याचा प्रश्न सोडविण्यास सरकारनें अद्याप प्रयत्न केला नव्हता. उमेदवारीच्या आपल्या नव्या योजनेनें मुंबई सरकारनें एक स्तुत्य उपक्रम आरंभिला आहे. ह्या योजनेची फलद्रूपता अनुभवास येण्यास बराच काळ लोटावा लागेल. मुंबई सरकारनें बेकारी-निवारणासंबंधांतील आपली जबाबदारी अप्रत्यक्षपणें कां होईना ओळखली, हीच गोष्ट तूर्त मह-

त्वाची आहे. सरकारच्या नव्या उपक्रमामुळें, विद्यार्थ्यांमध्यें व्यावसायिक शिक्षणाची आवड उत्पन्न होऊन, मध्यम वर्गातील तरुणांस एक नवीन क्षेत्र निर्माण व्हावें, हा सदरहु योजनेंतील हेतु साध्य होणें कारखानदारांचे सहकार्यावर अवलंबून आहे. सरकारी पुरस्कारानें चालू झालेल्या ह्या योजनेंत कारखानदार मनापासून सहकार्य करतील, अशी अपेक्षा आहे.

---

### डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशन, पुणें

वरील असोसिएशनचा १९३५–३६ सालचा अहवाल आमचेकडे आला आहे, त्यावरून ह्या संस्थेनें ग्रामसुधारणेचें कार्य चिकाटीनें व पद्धतशीर रीतीनें चालविलें असल्याचें स्पष्ट दिसून येतें. खेड–शिवापूर हें संस्थेच्या कार्याचें केंद्रस्थान आहे. शेतकऱ्यांस त्यांच्या शेतीमध्यें सहाय करून त्यांची आर्थिक सुधारणा घडवून आणणें; प्रौढ शिक्षण, फिरतीं पुस्तकालयें, व्यायाम शाळा, स्काऊटिंग इत्यादि मार्गांनीं त्यांचा शैक्षणिक दर्जा वाढविणें; औषधपाणी, आरोग्य, बाळंतपण, इत्यादींविषयीं आस्थेनें व्यवस्था करणें आणि रस्ते व पाणी–पुरवठा ह्यांची व्यवस्था लावणें, ह्या असोसिएशनच्या कार्यक्रमांतील प्रमुख बाबी आहेत. जलसंशोधन, सद्दीप व्याख्यानें, गाई-म्हशींस दूध ज्यास्त यावें म्हणून 'मिनरल मिक्श्चर' ची योजना, 'शेती आणि शेतकरी' ह्या मासिकाच्या द्वारा प्रचारकार्य, इत्यादि गोष्टीहि संस्थेनें चालू ठेवल्या आहेत. मासिकाच्या सुमारें ४,००० प्रतींचा जनतेंत प्रसार होतो, ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. ग्रामसुधारेणेच्या कार्यकर्त्यांची एक परिषद मे, १९३६ मध्यें भरविण्यांत आली व त्यामुळें वेगवेगळया जिल्ह्यांतील अनुभवाचा एकमेकांस फायदा मिळाला. सरकारनें ग्रामसंघटनेचा पुरस्कार करण्यास प्रारंभ करण्यापूर्वींपासूनच डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशन आपलें कार्य करीत आहे व अनेक अनुभवी व विद्वान् लोक स्वार्थत्यागपूर्वक ह्या संस्थेस सहाय करीत आहेत, हा तिच्या कार्याचा एक विशेष गुण आहे. अहवालांतील तपशिलावरून संस्थेच्या कार्याची व्याप्ती मोठी असल्याचें दिसून येतें. मुंबई इलाख्याच्या शेतकी खात्याचे डेप्युटी डायरेक्टर श्री. व्ही. व्ही. गाडगीळ हे असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी व श्री. वा. सि. कामत हे कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष आहेत. असोसिएशननें चालविलेल्या कार्याची प्रगति होत राहो व तिच्यापासून इतरांसहि स्फूर्ति होवो, असें आम्ही इच्छितों.

---

### रंगित सिमेंटचें प्रात्यक्षिक

नवीन इमारतींना हल्ली सिमेंट जास्त वापरण्यांत येऊं लागलें आहे. सिमेंटच्या साध्या रंगाला उठाव दिसण्यासाठी त्यांत रंग मिसळीत, पण त्यामुळें सिमेंट कमी प्रतीचें होई व ते रंगहि पक्के नसत. अलिकडे ब्रिटिश पोर्टलंड सिमेंटच रंगित मिळूं लागलें असून त्याचे रंग कायम, टिकाऊ, सुंदर व उठावदार असतात. या सिमेंटचा उपयोग जमिनी करण्याकडेहि उत्तम होतो. मुंबई व पुणें येथें नवीन इमारतींना याचा उपयोग पुष्कळ होऊं लागला आहे. पुणें व महाराष्ट्र या भागाचे या मालाचे एकच विक्रेते श्री. मा. रा. जोशी, बी. ए., यांनीं या सिमेंटचा भिंतीला गिलाव्यासाठी व जमिनीला फरशी अगर टाइल्स ऐवजीं कसा उपयोग करावा हें प्रत्यक्ष दाखविण्यासाठीं एक इंग्लीश प्लास्टरर येथें आणला आहे; व ९४७, सदाशिव पेठ, गोखले हॉलजवळ आजपासून रोज सकाळीं १० ते १ व दुपारीं ३ ते ५ हें काम प्रत्यक्ष पहाण्यास मिळेल. इंजिनीअर्स, कॉन्ट्रॅक्टर्स व घरमालक यांनीं या संधीचा अवश्य फायदा घ्यावा.

---

### सत्तेचें खरें केंद्रस्थान

अमेरिकेची राजधानी पहाण्याकरितां कांहीं प्रवासी गेले होते, व आपल्या वाटाड्याजवळ त्यांनीं कॅपिटोल इमारत म्हणजे कायदे मंडळांचें ठिकाण पहाण्याची इच्छा दर्शवली. वाटाड्यानें प्रवाशांस मोटारींत घातलें व चेंबर ऑफ कॉमर्सच्या इमारतीपुढें त्यांस उभें केलें. कॅपिटोल इमारतीचा अर्धगोलाकृती डोम तेथें त्यांस कोठें दिसेना म्हणून त्यांनीं चौकशी केली. त्यावर, वाटाड्यानें उत्तर दिलें, " मला वाटलें, तुम्हांला अमेरिकेचें खरें कॅपिटोल आधीं पहावयाचें आहे. चेंबर ऑफ कॉमर्सची ही संगमरवरी इमारत आहे. येथूनच राज्यकारभार खरोखर नियंत्रित केला जातो; जुन्या पुराण्या कॅपिटोलमधून नाहीं ! मि. रुझवेल्ट ह्यांच्या आधीचे अध्यक्ष, मि. हूवर, ह्यांच्या कारकीर्दीमधील ही गोष्ट आहे व त्यामधील अभिप्रेत अर्थ उद्बोधक आहे.


**WHY NOT MAKE YOUR NEW HOME**
**OUTSTANDING FROM ITS NEIGHBOURS?**
USE
**"SNOWCRETE" White and Coloured Cements**
for all external Plaster Work and Terrazzo Flooring
**FOLLOW BOMBAY'S LEAD**
**गिलाव्यासाठी पांढरें व रंगीत सीमेंट वापरून**
**आपली नवी इमारत मुम्बई पद्धतीनें सुशोभित करा !**
रंगीत सीमेंटच्या पुण्यांतील नवीन इमारती
१. वाडिया कॉलेज. २. सेवासदन नर्सेस कार्टर्स. ३. लॉ कॉलेज. ४. वेस्ट एण्ड सिनेमा.
पुणें व महाराष्ट्राचे एकमेव विक्रेते : **माधव रामचंद्र जोशी, बी. ए.,**
९४०, सदाशिव पेठ, गोखले हॉल जवळ, पुणें शहर.

## सुखाचें मरण

“देवा, मला सुखानें मरण येऊं दे,” अशी प्रार्थना मृत्यूच्या सान्निध्यांत शारीरिक व मानासिक व्यथा अनुभवणारीं माणसें करीत असतात, आणि मृत्यु टळत नसल्यानें तो क्लेशरहित यावा अशी प्रत्येकाचीच इच्छा असते. असाध्य रोगानें पछाडलेल्या माणसाचे हाल त्यास स्वतःला सोसवत नाहींत व त्याच्या आप्तेष्टांस बघवत नाहींत, हा नित्याचा अनुभव आहे. प्राण हा सर्वांस सारखाच प्रिय आहे आणि जगण्याची इच्छा सार्वत्रिक आहे. इसापनीतींतल्या गोष्टीमधील मरणेच्छु माणसासमोर प्रत्यक्ष मृत्यु उभा राहिला तेव्हां त्याच्या मनाची अवस्था झाली तशी स्थितिहि बहुतेकांची वास्तविक असते. मनुष्य त्राग्यानें मृत्यु यावा असें म्हणतो, पण त्याची जीविताशा दुर्दम असते. मनुष्य-जीव उत्पन्न होऊं नये ह्याकरितां अलीकडे चाललेल्या प्रयत्नांकडे कित्येक भौतिक शास्त्रज्ञ व धर्मशास्त्रवेत्ते सहानुभूतीनें पाहतात. त्याप्रमाणें असाध्य रोगानें पीडित झालेल्या जीवाचा सुखानें अंत घडवून आणण्याच्या यत्नाचें कां होऊं नये असा विचार उपस्थित होतो. मानवी जीवाचा हत्या व आत्महत्या नीति, धर्मशास्त्र, समाजशास्त्र व कायदा ह्यांनीं निषिद्ध व शासनीय मानली आहे, आणि मनुष्येतर प्राण्यांचा न्याय मनुष्यास लागू होत नाहीं. मांसाहारी समाजांमध्येंहि तें तत्त्व मानण्यांत येतें. तथापि मृत्यु टळत नाहीं, हें निश्चित असतां असाध्य, दुखण्याच्या यमयातनांतून रोग्याची सुटका विशिष्ट परिस्थितींत आणि नियंत्रणाखाली होण्यास कायद्यानें संमति देण्यास काय हरकत आहे? असा प्रश्न उद्भवला आहे.

ब्रिटिश हाऊस ऑफ लॉर्ड्समध्यें लॉर्ड पॉन्सॉन्बी ह्यांनीं वरील प्रकारची संमति मिळावी म्हणून कायद्याचा एक मसुदा पुढें मांडला होता. परंतु वर दर्शवलेल्या नैतिक स्वरूपाच्या अडचणी ह्या बाबतींत उत्पन्न होतात आणि कायद्यांत कितीहि निर्बंध असले तरी त्याचा दुरुपयोग होण्याचा विलक्षण संभव असतो. “मला आतां मृत्यु येईल तर बरें” असें म्हणणारा व्यथित रोगी खरोखर आपलें मत बनवण्यास पात्र असतो काय? हा येथें एक महत्त्वाचा प्रश्न आहे. शिवाय, रोग्याच्या मनावर भोंवतालच्या लोकांच्या इच्छा व कल्पना ह्यांचे अनिष्ट परिणाम होण्याचा संभव असतो. असाध्य वाटणारे रोग हटवण्याचे नवीन उपाय उपलब्ध होत आहेत हेंहि येथें विसरतां कामा नये. ह्या बाबतींत वैद्यांवर भलतीच जबाबदारी येऊन पडणार आहे आणि दयार्द्र अंतःकरणानें घडवून आणलेल्या मृत्यूस खुनाचें स्वरूप प्राप्त होण्याची भीति आहे. वैद्यांचें काम रोग सुरक्षितपणानें आणि त्वरेनें बरा करण्याचें आहे. ह्या मर्यादेबाहेर त्यानें जातां कामा नये, नाहींतर त्यानें भलतीच जबाबदारी आपल्या शिरावर घेतल्यासारखें होईल. क्षयासारख्या कांहीं असाध्य दुखण्यांत रोग्यांस क्लेश होत नाहींत आणि ते अनेक वर्षें जगतात. प्रत्येकास असलेला जगण्याचा हक्क त्यापासून कोणीच हिरावूं शकत नाहीं आणि मृत्युशय्येवर पडलेला रोगी किंवा त्याचे आप्तेष्ट ह्यांस त्याचें मरण जवळ आणण्याचा निश्चय करतां येत नाहीं. लॉर्ड पॉन्सॉन्बी ह्यांच्या बिलाच्या दुसऱ्या वाचनाची सूचना पुढें आली असतां वर दिलेल्या सर्व मुद्यांचा उच्चार वक्त्यांनीं केला. त्या योगानें बिलाची अनिष्टता व अग्राह्यता बहुमताच्या मनास पटून तें नामंजूर झालें.

व्यापारी-उदमी लोकांस
—अपूर्व संधि—
पुणें औद्योगिक प्रदर्शन १९३७

दि डॉन ऑफ इंडिया
लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें.
पुणें व सोलापूर येथें
बिल्डिंग इन्व्हेस्टमेंट आणि बँकिंग डिपार्टमेंटची
कंपनीचे बँकर्सनीं पसंत केलेली
ता. १ आक्टोबरपासून सुरू ] नवीन योजना [ ता. १ आक्टोबरपासून सुरू
मुदतीच्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची
फायदेशीर अपूर्व सोय.
बँकेच्या उतरत्या व्याजाच्या काळांत लोकांस आपले कौटुंबिक निर्वाहास साधन अगर मदत म्हणून ठेवींवर मासिक, नियमित व किफायतशीर व्याज देण्याची व्यवस्था तारीख १ आक्टोबर १९३६ पासून अमलांत आणली आहे.
गरजूंनीं जास्त माहिती मागवावी अगर समक्ष भेटावें.
पुणें, ता. २२-९-३६ | जनरल मॅनेजर.

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी
टेलरिंग फर्म
पाटसकर आणि कंपनी
४८ निहाल पेठ, पुणें शहर.
मॅनेजर:-व्ही. जी. पाटसकर, D.M.T.O.A. (London.)
सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व
तयार कपड्यांचे व्यापारी
आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

POONA CIRCULATING LIBRARY
Deccan Gymkhana, POONA 4
Magazines & Books supplied in your own home. Over 100 different English, Marathi, Hindi, Bengali, Gujrati, French & German journals to choose from.
*For particulars see or write to:—*
D. P. ATHALYE,
*Proprietor.*

## फंड जमवण्याची नावीन्यपूर्ण तऱ्हा

### बँकांतल्या किरकोळ आणे, पैच्या देणग्या

पांचवे जॉर्ज बादशहा ह्यांच्या स्मरणार्थ ग्रेट ब्रिटनमध्यें एक फंड उभारण्यांत आला असून त्यांतला बराच भाग तरुण पिढीच्या शारीक उन्नतीसाठी खेळण्याचीं मैदानें देशभर पुरवण्या-प्रीत्यर्थ खर्चण्यांत यावयाचा आहे. दर एक हजार वस्तीस चार एकर जमीन ह्या प्रमाणांत ब्रिटिश गांवांस मैदानें पुरवावयाचीं म्हटल्यास ती योजना अवाढव्य होईल. तथापि, शक्य तितक्या ठिकाणीं खेळण्याच्या मैदानांची सोय करण्याचा तेथें संकल्प करण्यांत आला आहे. सुमारें २६ लक्ष रुपये ह्या योजनेसाठी तयार आहेत, पण आणखी ६५ लक्ष रुपयांची जरूर भासत असल्यानें ही रकम गोळा करण्याची एक नावीन्यपूर्ण तऱ्हा निश्चित झाली आहे. बँकांमध्यें ज्यांचीं खातीं आहेत, त्या सर्व नागरिकांनीं जानेवारीच्या विसाव्या तारखेस आपल्या खात्यांवर असलेल्या रकमेंत किरकोळ शिलिंग, पेन्स असतील, ते फंडास देऊन टाकावयाचे अशी ही योजना असून सदरहु पैसे फंडांत जमा करण्याचें बँकांनीं कबूल केलें आहे. ज्या लोकांनीं बँकां कडून कर्जें घेतलीं असतील व ज्यांच्या खात्यांत नांवें रकमा असतील त्यांमधूनहि वर्गणी जमा केली जाईल आणि ह्या त्यांच्या स्वार्थत्यागासहि बँकांनीं संमति दिली आहे.

ह्या योजनेच्या प्रयोगाची रंगीत तालीम कॉव्हेंट्री येथें ऑक्टोबर महिन्यांत झाली तेव्हां अपेक्षित कमाल रकमेच्या मानानें शेकडा सात ह्या प्रमाणांत पैसा जमा झाला असें आढळून आलें. ही लोकांच्या खुषीची गोष्ट असून त्यांनीं वर्गणी देण्याची इच्छा बँकांस लेखी कळवली तरच वर्गणी जमा व्हावयाची असल्यानें वरील प्रकारचें प्रमाण पडणें स्वाभाविक आहे. ब्रिटनमधील पांच प्रमुख बँकांत ( पोस्टल सेव्हिंग्ज बँका वगळून ) सुमारें १ कोटि, ४० लक्ष खातीं आहेत आणि त्या प्रत्येकांत सरासरीनें दहा शिलिंगाची चिल्लर आहे असें मानलें तर फंडास मिळण्यासारखी एकूण रकमेची बेरीज सुमारें ९ कोटि रुपये होते. कॉव्हेंट्री येथील प्रयोगांत जमा झालेल्या रकमेचें प्रमाण सर्व देशभर पडेल असें धरल्यास फंडास ६५ लक्ष रुपये हवे आहेत, ते मिळूं शकतील असा अंदाज आहे. ह्या योजनेनें बँकांवर कामाचा फारच मोठा ताण पडणार आहे. एकाच दिवशीं कोट्यवधि खात्यांचे हिशेब करावे लागतील आणि खातेदारांनीं मागितल्यास देणगीच्या हुकमाचे फॉर्म्स भरण्यासाठी पुरवावे लागतील. वर्तमानपत्रांमध्येंहि हे नमुने छापून प्रसिद्ध व्हावयाचे आहेत व त्या योगानें बँका व जनता ह्यांची सोय होणार आहे. अनेक संस्थांनीं फंड जमाविण्याची ही योजना यशस्वी करण्यास सहाय देण्याचें स्वतःच्या अंगावर घेतलें आहे. जनसेवेविषयीं आस्था, स्वार्थत्यागाची तयारी व सामाजिक संघटन व शिस्त ह्यांचें प्रस्तुत योजना हें नमुनेदार उदाहरण आहे. राष्ट्राची उन्नति व सुस्थिति तरुण पिढीच्या शारीरिक व मानसिक सौष्ठवावर अवलंबून असते, ह्याची जाणीव ब्रिटिश जनतेनें व्यक्त केली असून, तें साध्य करण्यासाठी संघटित व स्वार्थत्यागाचे प्रयत्न करण्याची तत्परता त्या लोकांनीं प्रस्तुत योजनेंत दाखविली आहे. ह्या उदाहरणापासून हिंदुस्थानांत किती तरी बोध घेण्यासारखा आहे हें निराळें सांगावयास हवें काय ?


स्था. १९१०



प्रथम मुंबई सरकारनें व कोल्हापूर सरकारनें मान्य केलेलें.

**जाधव टेलरिंग कॉलेज**

मॅट्रिक पास विद्यार्थ्यांकरितां, टेलरिंग कटिंगचा स्पेशल कोर्स व स्पेशल फी.

नांवें नोंदवा. ४९७ बुधवार, पुणें.



**धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०**

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

**नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.**

| | | |
|---|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी | |
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |
| त्रैवार्षिक कॅश सर्टिफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें | |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थे-कडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.



**दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.**

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२

अधिकृत भांडवल : : : १०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल : ५,००,०००
खपलेलें भांडवल : २,०७,७००
रोख भरलेलें भांडवल : १,०३,१९०

**दर शेअरची किं. : रु. ५०**

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें, सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

## रेल्वेजचे वाहतुकीचे दर आणि स्वदेशी धंदे

रेल्वेजवरील मालाच्या वहातुकीचे दर ठरवितांना देशी कार-
यांच्या सोईपेक्षां कच्च्या मालाची निर्गत कशी सौकर्यानें
मधर्ग, ह्याकडे अधिक लक्ष देण्यांत येतें, अशी हिंदी व्यापाऱ्यांची
निरनिराय जुनी तक्रार आहे. बाँबे युरोपियन चेंबर्स ऑफ कॉमर्सनें
सरकारेन्यीकशी कमिटीकडे आपलें म्हणणें सादर करतांना ह्या
शिक्षणावील कांही उदाहरणें दिलीं आहेत:—
परीक्षेसाठ—
घेऊनी ूपूर ते मुंबई ( ६४० मैल ) १ रु. १० आ. ११ पै
सरका क ते कानपूर ( ६४० मैल ) २ रु. ३ आ. ८ पै
आहे. गीध्व ते कलकत्ता ( १,१९१ मैल ) २ रु. ४ आ. ७ पै
त्यापी त ते कानपूर ( ७६१ मैल ) २ रु. ५ आ. ४ पै
१,२ अ.
येईलकरर ते मुंबई ( ७६३ मैल ) ० रु. १२ आ. ९ पै
ठपर ते अमरावती ( ५९९ मैल ) ० रु. १३ आ. ९ पै
न्य कादरांचे आकड्यांवरून, कच्च्या मालाची निर्गत बंदरांकडे
घे पद्देशी मदत होते व हिंदी कारखान्यांच्या मालाची
ह्य कशी महाग पडते ह्याची कल्पना येईल. स्वदेशी
र्द अमोलास स्वदेशी रेल्वेजचें सहाय न झाल्यानें त्यांच्या
रतातडचणी उपस्थित होतात, ह्याचीं अनेक उदाहरणें वेळो-
ी ह्यांडण्यांत आलीं आहेत. रेल्वेजचें उत्पन्न वाढवण्याच्या
रतात कशी सध्या चालू आहे. तिचा परिणाम, ही अडचण
नतःची दूर करण्यांत होईल अशी व्यवस्था होणें आवश्यक
णार्थ च्या कारखानदारांनीं व व्यापाऱ्यांनीं आपल्या तक्रारी
त्यावर मिटीपुढें वेळींच मांडल्या पाहिजेत.

---

लेल्य टिशांची "स्वदेशी" विषयीं तीव्र भावना

वैयर्थ्य णाचे उत्सवप्रसंगीं उपयोगांत येण्याचे पताका, ध्वज
ो दोन ानंदाचीं चिन्हें परदेशांतून आल्यास त्यांवर शंभर
अमे- बसवण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरवलें आहे. ब्रिटिश
फायदा त्येकांचें एवढ्यानें समाधान न होऊन ह्या मालाच्या
त्यांनीं ी व्हावयास हवी होती असें त्यांचें मत आहे.
सुपरि- कात २५ डिसेंबरपासून अमलांत येण्याचें सरकार-
ह्यावर झालेलें पाहून तर त्यांस फार राग आला आहे.
ासाठी, पूर्वी स्वस्त परदेशी माल इंग्लंडमध्यें येऊन बसेल
असते. ाय? त्याचा जाब पार्लमेंटांत जबाबदार मंत्र्यास
ा जन- यांत यावा अशी सूचना एका ब्रिटिश पत्रानें
नें पहा-

---

कारण,

असतो. दुकानदार खजील झाला.

जातात; हून मालाची आवाच्यासवा किंमत प्रथम सांगा-
र्व राष्ट्र कानदारांची घासाघिशीची सवय सर्व जगभर
ा एका तयार कपड्यांच्या दुकानांत एक गृहस्थ
ागरिक शिष्ट सुटाची किंमत त्यानें विचारली. सावज बरें
ांचा व न दुकानदारानें दहा पौंड किंमत सांगितली.
ती" म्हणून जरा दटावल्यासारखें करून विचा-
असें दुकानदारानें उत्तर दिलें. गृहस्थानें पुन्हा
ोरानें केला असतां, पांच पौंडांवर दुकानदार
डी- नें पांच पौंड दिले व सूट घेतला. मीं पुन्हां,
ारली, पण मला कमी ऐकावयास येतें, नाइलाज
गृहस्थ निघून गेला. दुकानदार खजील झाला,
तां ा.

॥ श्रीहेरंब भवतु ॥

# श्रीमाणकेश एजन्सी

**लुगडीं व खणाचे व्यापारी, मार्केट रोड, पुणें.**

आमचे दुकान गेलीं चारपांच वर्षे लुगडीं–खणासंबंधीं प्रसिद्ध आहेच. आम्हीं सर्व प्रकारची फॅन्सी किनार, मनमोहक रंग, चालू फॅशनचीं पातळें व स्पेशल खास **टिकेकरवाडी** येथील माल ठेवला आहे. लांब रुंद भरपूर, पोतास सफाईदार, टिकण्यांत उत्तम असा नांवाजलेल्या—

**"दि टिकेकर टेक्स्टाईल मिल" चा माल अगदीं नवीन फॅशनचा ठेवला आहे.**

प्रो. काळे ह्यांचें

'अर्थ' ग्रन्थमालेंतील तिसरें पुस्तक

# व्यापारी उलाढाली

महाराष्ट्रांत व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांचा उत्कर्ष व्हावा असें प्रत्येकास वाटतें, परंतु ह्या संबंधांत जे व्यवहार चालतात त्यांची माहिती फार थोड्या लोकांस असते. सामान्य जनतेस कमाईतून बचत करण्याची संवय लागून तीमधून निर्माण होणाऱ्या द्रव्यसंग्रहाचा उपयोग, व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या अभिवृद्धीकडे व्हावा, ह्याकरितां औद्योगिक व व्यापारी मंडळ्या ह्यांचे व्यवहार कसे चालतात, बाजारांत निरनिराळ्या प्रकारांच्या उलाढाली कशा होतात, इत्यादि विषयांचें ज्ञान महाराष्ट्रीय समाजांत पसरणें आवश्यक आहे. वृत्तपत्रांमध्यें व ऐकिवांत ह्या संबंधांत ज्या बातम्या येतात, त्यांचें रहस्य ओळखण्याची पात्रता लोकांमध्यें उत्पन्न झाली पाहिजे. हें ज्ञान महाराष्ट्रीय लोकांस सुगम रीतीनें व्हावें, ह्या उद्देशानें प्रस्तुत पुस्तक मुद्दाम लिहिलें आहे आणि त्याचा योग्य उपयोग जनता करून घेईल असा ग्रंथकर्त्यास विश्वास वाटत आहे.

पृ० १४३—किंमत १ रुपया. ( ट. हं. वेगळें )

**मिळण्याचीं ठिकाणें:—**

( १ ) व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रंथमाला, पुणें ४.
( २ ) आर्यभूषण प्रेस, पुणें २.
( ३ ) दि को-ऑपरेटर्स बुक-डेपो, ९ बेकहौस लेन, फोर्ट, मुंबई.

# DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

## हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीची प्रगति

गेल्या २८ वर्षांत हिंदुस्थानांतील सहकारी सोसायट्यांची संख्या ५५ पट, सभासदांची संख्या २७ पट आणि खेळतें भांडवल १४२ पट, ह्याप्रमाणें वाढ झाली आहे. खालील तुलनात्मक आंकड्यांवरून ह्या प्रगतीची उत्कृष्ट कल्पना येईल:—

| | १९०६–७ ते १९०९–१० | १९३४–३५ |
|---|---|---|
| सहकारी सोसायट्या | १९२६ | १,०६,०११ |
| मध्यवर्ती सोसायट्या, बँका, यूनियन्स इ. | १७ | १,४१५ |
| शेतकी सोसायट्या | १,७१३ | ९३,१६० |
| बिगर-शेतकी सोसायट्या | १९६ | ११,४३६ |
| प्राथमिक सोसायट्यांचे सभासद | १,६१,९१० | ४४,०९,६३७ |
| खेळतें भांडवल | ६८,१२,००० रु. | ९६,८८,५२,००० रु. |

ब्रिटिश हिंदुस्थानामध्यें, सोसायट्यांच्या संख्येच्या दृष्टीनें बंगाल (२३,४२६); पंजाब (२१,८८३) व मद्रास (१३,४१९) ह्या प्रांतांचा नंबर वर लागतो. संस्थानांपैकीं ग्वाल्हेरमध्यें सर्वांत ज्यास्त सोसायट्या आहेत.

सभासदांच्या संख्येच्या दृष्टीनें मात्र मद्रास, बंगाल व पंजाब असा अनुक्रम लागतो. संस्थानांत त्रावणकोर, म्हैसूर व ग्वाल्हेर असा अनुक्रम आहे.

लोकसंख्येच्या मानानें दर माणशीं खेळतें भांडवल, ब्रिटिश हद्दींत ३ रु. २ आ. आणि संस्थानांत २ रु. ५ आ., म्हणजे सर्वसाधारण सरासरीनें ३ रुपये पडतें. खेळत्या भांडवलाचे दृष्टीनें बंगालचा पहिला, पंजाबचा दुसरा, मुंबईचा तिसरा व मद्रासचा चौथा नंबर लागतो. म्हैसूर संस्थानांतील सहकारी चळवळीनें इतर सर्व संस्थानांपेक्षां ज्यास्त खेळतें भांडवल जमा केलें आहे. हिंदुस्थानांतील मध्यवर्ती बँकांच्या संख्येंत १९३४–३५ मध्यें वाढ झाली आहे व त्यांस मिळालेला नफाहि ५६ लाखांवर गेला आहे. एकूण सर्व सोसायट्यांस मिळून १ कोटि ८४ लक्ष रुपये नफा झाला आहे.

### संपत्तीच्या वांटणींत फरक पडला नाहीं

गेल्या महायुद्धानंतरच्या काळांत संपत्तीच्या सामाजिक विभागणीमध्यें विशेष फरक पडलेला नाहीं आणि वांटणीमधील विषमता कायम राहिली आहे, असें ग्रेट ब्रिटनमधील एका चौकशीच्या अहवालावरून दिसून येतें. १९३४ सालीं मृत झालेल्या पंचविसावरील वयाच्या लोकांत, आपल्या पश्चात १,३०० रुपयांवर रकम ठेवणारे शेंकडा २९ इसम आढळले. १९२४ सालीं तत्सम आंकडा २६ होता आणि युद्धपूर्व वर्षांत तो १८ होता. ह्यावरून, राष्ट्रांतील वैयक्तिक भांडवलाचा संचय वाढला आहे, हें मात्र सिद्ध होत आहे. तथापि, फार मोठ्या जिंदग्यांची संख्या कमी झाली आहे. १९११-१३ सालीं, एकूण लोकसंख्येपैकी पंचविसावरील वयाच्या लोकसंख्येंत शेंकडा एक ह्या प्रमाणांत देशांतील ७० टके भांडवल होतें. १९२४-३० मध्यें, हेच शेंकडा एक टके लोक एकंदर भांडवलाच्या ६० टके भागाचे मालक होते.

### परराष्ट्रीय प्रवासी आकर्षण्यांत फायदा

परदेशांतून येणाऱ्या प्रवाशानें प्रत्येकी दहा डॉलर दि[illegible] वांचून त्यास आपल्या हद्दींत येऊं द्यावयाचें नाहीं, असा [illegible] अमेरिकेनें १९२० सालीं केला आणि त्याचा हेतु परकी लो[illegible] उदरनिर्वाहार्थ त्या देशांत होणारी गर्दी बंद करणें हा होता. पूर्वी अमेरिका हा देश दरिद्री व बेकार युरोपिअनांचें मा[illegible] होता आणि त्यांतली वस्ती तुरळक असल्यानें नवीन कऱ्यांची भरती झाल्यास त्यास हरकत घेण्याचें प्रयोजन न[illegible] परंतु महायुद्धानंतर परकीयांच्या येण्यावर निर्बंध घालणें रिकन राष्ट्रास आवश्यक भासलें आणि इतर देशांतील कऱ्यांची अमेरिकन नागरिकांशीं होणारी स्पर्धा थांबली. [illegible] तोड म्हणून ग्रेट ब्रिटननें अमेरिकन प्रवाशांवर परवान्याचा प्रत्येकी दहा डॉलर घेण्यास सुरवात केली. १९२५ मध्यें रिकेनें पांच वर्षांपूर्वी बसवलेली पट्टी चाळीस राष्ट्रांशीं करार काढून टाकली किंवा कमी केली. इंग्लंडमध्यें अल्पका[illegible] रहाणाऱ्या अमेरिकनांचे बाबतींतली प्रवास-पट्टी ब्रिटिश स[illegible] कांहीं शर्तींवर कमी केली. तथापि, दहा डॉलरची परवाना[illegible] सर्वसाधारणपणें चालूच राहिली.

ग्रेट ब्रिटनचें हें धोरण त्याच्या स्वार्थासच विघातक होतें. [illegible] रिकन प्रवासी इंग्लंडमध्यें येऊन लाखो रुपये खर्च क[illegible] त्याचा फायदा ब्रिटिश लोकांस मिळतो. अमेरिकन प्रवास[illegible] प्रमाणें ब्रिटिश उद्योगधंदे व व्यापार ह्यांस सहायच क[illegible] त्यांच्या प्रवासास अडथळा करणें म्हणजे ब्रिटिश लोकांनीं स्[illegible] नुकसान करून घेणें असा वास्तविक प्रकार होता. उदाहर[illegible] १९३५ सालीं परवान्याचे पैसे भरून ब्रिटिश किना[illegible] ६८,५८८ अमेरिकन प्रवासी उतरले आणि त्यांनीं दि[illegible] पट्टीचें उत्पन्न अवघें ४½ लक्ष रुपये झालें. प्रवास-पट्टीचें [illegible] लक्षांत घेऊन ब्रिटिश सरकारनें ती आतां दहा डॉलरचे [illegible] डॉलर करण्याचें ठरविलें आहे. ही आडकाठी दूर झाल्यानें [illegible] रिकन प्रवाशांची संख्या वाढून ब्रिटिश व्यापाराचा [illegible] होईल अशी अपेक्षा आहे. कांहीं वजनदार ब्रिटिश पुढा[illegible] आपल्या सरकाराकडे ह्यासंबंधांत तक्रार केल्याचा हा [illegible] णाम आहे. आपल्या देशांत बाहेरून कोण लोक येतात [illegible] नजर ठेवणें राष्ट्रीय सरकारांस आवश्यक असतें आणि त्य[illegible] कांहीं मामुली नियंत्रणात्मक व्यवस्था परवान्यादाखल केलेली [illegible] परंतु त्या व्यवस्थेस कराचें स्वरूप देण्यांत सरकाराचा किंव[illegible] तेचा फायदा नसतो. उलट, परकीयांनीं आपला देश कौतुका[illegible] वयास यावें अशी त्यांची इच्छा असली पाहिजे व असतेहि. [illegible] परकी प्रवासी खिशांत पैसे घेऊन येतो आणि ते खर्चीत [illegible] ते पैसे स्वकीयांच्या खिशांमध्यें निरनिराळ्या स्वरूपांत [illegible] म्हणून परकी प्रवाशांस आकर्षून घेण्याचेंच धोरण बहुतेक स[illegible] अंगिकारतात. हिंदुस्थानांत प्रतिवर्षीं हजारों अमेरिकन न[illegible] येतात, त्यांपासून ह्या देशांतल्या व्यापाऱ्यांचा, कारागि[illegible] रेल्वेचा पुष्कळ फायदा होतो, असा अनुभव आहे.

महिंद्रकर ब्रदर्स ह्यांचे थं[illegible]

गिरगांव, मुंबई कर[illegible]

## सुशिक्षितांमधील बेकारीचें निवारण

### मुंबई सरकारची नवी योजना

मध्यम वर्गातील सुशिक्षितांमधील बेकारीचा प्रश्न सोडविण्यास निरनिराळ्या प्रांतांनीं हळु हळु सुरवात केली आहे आणि मुंबई सरकारनेंहि आतां एक योजना आखली आहे. व्यावसायिक शिक्षणाच्या सोईचे अभावीं आज कित्येक तरुण मॅट्रिकच्या परीक्षेस बसतात आणि अत्यंत खर्चाचें असें कॉलेजांतील शिक्षण घेऊनहि नोकरी न मिळाल्याकारणानें अखेर पस्तावतात. मुंबई सरकारनें ही गोष्ट विचारांत घेऊनच आपली योजना तयार केली आहे. एका दुय्यम डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीजची खास नेमणूक त्याप्रीत्यर्थ करण्यांत यावयाची आहे. ह्या अधिकाऱ्यास दरमहा १,२५० रुपये पगार व १०० रुपये वहानासाठीं भत्ता देण्यांत येईल.

मुंबई व अहमदाबाद येथील अनुक्रमें ५६ व ३३ कारखान्यांनीं दरसाल अनुक्रमें २७५ व १०० विद्यार्थी उमेदवार म्हणून घेण्याचें कबूल केलें आहे. इंग्रजी सातव्या इयत्तेपर्यंत शिकलेल्या ह्या विद्यार्थ्यांस पांच वर्षें उमेदवारी करावी लागेल. सुरवातीस त्यांस दरमहा १५ रुपये मेहनताना मिळेल आणि लायकीप्रमाणें पुढें त्यांत वाढ होईल. उमेदवारीची मुदत संपल्यावर त्यांची वरच्या दर्जाचे कामगार म्हणून नेमणूक होईल. ह्या शिक्षणाबरोबरच, प्रत्येक विद्यार्थ्यास सायंकाळीं आपआपल्या विषयासंबंधाच्या व्याख्यानांचे वर्गास हजर रहावें लागेल २५ ते ३० विद्यार्थ्यांचा एक एक वर्ग बनविण्यांत येईल. ह्या वर्गाची सालीना फी २० रुपये आहे. ज्यांच्या पालकांचें वार्षिक उत्पन्न १,००० रुपयांपेक्षां कमी आहे, अशा विद्यार्थ्यांपैकीं, कांहीं जणांस नादार म्हणून घेतलें जाईल. ह्या सर्व योजनेवर देखरेख करण्याकरितां डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज ह्यांचे अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमण्यांत आली आहे.

---

### शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या

मुंबई सरकारच्या योजनेस अनुसरून येत्या पांच वर्षांत खाली दिल्याप्रमाणें उमेदवारांच्या शिक्षणाची व व्यवसायाची व्यवस्था होईल:—

| | १९३७-३८ | १९३८-३९ | १९३९-४० | १९४०-४१ | १९४१-४२ |
|---|---|---|---|---|---|
| मुंबई | २७५ | २७५ नवे | २७५ नवे | २७५ नवे | २७५ नवे |
| | | १७५ पूर्वीचे | ३२५ पूर्वीचे | ४७५ पूर्वीचे | ६२५ पूर्वीचे |
| | २७५ | ४५० | ६०० | ७५० | ९०० |
| अहमदाबाद | १५० | १५० नवे | १५० नवे | १५० नवे | १५० नवे |
| | | १०० पूर्वीचे | १८५ पूर्वीचे | २७० पूर्वीचे | ३५५ पूर्वीचे |
| | १५० | २५० | ३३५ | ४२० | ५०५ |
| एकूण | ४२५ | ७०० | ९३५ | १,१७० | १,४०५ |

कारखान्याच्या मालकांकडून मिळालेल्या आश्वासनाचे आधारानें वरील अंदाज करण्यांत आला आहे. पांच वर्षांचे अखेरीस उमेदवारीच्या ह्या नव्या योजनेचें फल प्रत्यक्ष दिसून येईल.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ३% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—६ |
| ३% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०८—१४ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | १२०—८ |
| ४% १९६०—७० ... ... | ११५—९½ |
| ४% १९४३ ... ... ... | १११—९½ |
| ३½% बिनमुदत ... ... ... | १००—६ |
| ३½% १९४७—५० ... ... | १०७—८ |
| २¾% १९४८—५२ ... ... | १०१—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११२—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १११—१२ |
| ५% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७०वर्षें मुदत) | १११—१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३—६३ ) ... | ११३—६ |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२६—८ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३७—८ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड) | ११५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५—४ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५८७—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १४१—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड—बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०४—८ |
| पाचोरा—जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९८—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९२१—२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १३% ) | १५३—२ |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ). | २६७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २६५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि. डिव्हि. ६½% ) | १६४६—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६१७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | १९९—६ |
| टाटा आयर्न (१०० रु. दु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७७—८ |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | २४७—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ९५०—० |

#### सोनें—चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ३५—१ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास | ५२—६ |

किंमत रु. १२॥

ओव्हरकोट खरेदी करा

बुधवार चौक, पुणें

“ दुसरें मूल्यमापन जाहीर झालें ”

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली

. पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः-

**कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.**

अध्यक्ष-श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

हयातींतील विम्यास ३७॥ रु. } दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा { हयातीनंतर विम्यास ४५ रु.

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

**न. वि. वडनेरकर**

जव्हेरी आणि सराफ,
रविवार पेठ, सराफ
बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

**वास्तुशास्त्रज्ञ व घरमालक**

आमचा इमारतीच्या बांधकामाचा चुना शिफारसपूर्वक व अगत्यानें वापरतात.

“ गिलाव्याचा चुना हा तर आमचे चुन्याचे धंद्यांतील विशेष होय.”

भाऊ गंगाधर साठे,
बिल्डिंग कॉंट्रॅक्टर व मळलेल्या चुन्याचे व्यापारी,
५१२ सदाशिव, चिमण्या गणपती चौक, पुणें २

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.

**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**

च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

# रु. ५,००० आपलें बक्षिस आतांच मिळवा

प्रवेश फी
रु. १
( प्रत्येक यत्नास )

सीलबंद उत्तर
**दि वेस्टर्न बँक ऑफ इंडिया**
जवळ ठेवण्यांत आलें आहे.

प्रत्येक बिनचूक उत्तरास किमान २०० रु. मिळण्याची हमी.

फी व उत्तरें मिळण्याची अखेरची तारीख १६-१-३७ ]   [ निकाल तारीख २१-१-३७.

| | | |
|---|---|---|
| | | |
| | १५ | |
| | | |

बाजूचे कोष्टकांत ० ते २४ पर्यंतचे आंकडे अशा रीतीनें भरा कीं, ज्यांची उभी, आडवी व काटकोनी बेरीज ४५ यावी. कोष्टकांत एकच आंकडा पुनः येऊं नये. सीलबंद उत्तराशीं जुळणाऱ्या प्रत्येक उत्तरास किमान २०० रुपयांचें बक्षिस गॅरंटीनें दिलें जाईल. म. ऑ. अगर इंडियन पोस्टल ऑर्डरबरोबर पाठविलेलीं साध्या कागदावरील कितीहि उत्तरें स्वीकारलीं जातील. बक्षिसांच्या रकमेची गॅरंटी असून कोणत्याहि कारणानें ती कमी केली जाणार नाहीत. मॅनेजरचा निकाल कायद्यानें बंधनकारक व अखेरचा समजला जाईल.

वि. सू. ७ जानेवारी १९३७ पूर्वीं उत्तरें पाठविणारांपैकीं ज्यांचें उत्तर बरोबर येईल त्यांत १,००० रु. वांटले जातील. उत्तरें व फी प्रीमियर कमर्शिअल एजन्सी, कॉंपिटिशन डिपार्टमेंट, बॉंबे बझार, कराची ह्या पत्त्यावर पाठवावीत.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ‘दुर्गाधिवास,’ भांबुर्डा, घ. नं. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.